REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
...ळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ... लीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख १ जानेवारी, १९४१ | अंक १

## बेफाम !

"बेफाम काम केलंय् बुवा
दामुअण्णानी————"

आजवर हंसला नसाल
इतकें
**बेफाम हंसाल !**

★ नवयुगचा मराठी विनोदी बोलपट ★

## लग्न पहावं करून

दिग्दर्शक : विनायक
भूमिका : दामुअण्णा मालवणकर

★

२ रा तुफान गर्दीचा आठवडा

खेळाच्या वेळां नेहमींच्या

## मिनर्व्हा — पुणें

न्यू वेस्ट एण्ड—मुंबई

★

पिअरलेस प्रकाशन

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**'पायोनियर डाइंग हाऊस'**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु, (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

अशक्ततेवर

## रक्तवर्धक

वापरा.

सर्वत्र मिळतें.

—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.** पुणें ४.

# विविध माहिती

### रेल्वेवरील अपघातांचा विमा

हिंदुस्थानांत दरसाल सुमारें २०० रेल्वे उतारू अपघातांत मरण पावतात व ९००० उतारू जखमी होतात. ह्याची नुकसान-भरपाई रेल्वेजना करावी लागते. रेल्वेवरील उतारूंचा अपघाताचा व अपघातामुळें तीन महिन्यांच्या अवधींत येणाऱ्या मृत्यूचा विमा उतरविण्याची एक योजना इंडियन इन्शुअरन्स कंपनीज असोसिएशनचे सेक्रेटरी, मि. व्ही. जी. जोशी, हे तयार करीत आहेत.

### हुंडणावळीसंबंधीं करार

येन हें जपानचें व गिल्डर हें जावाचें चलन आहे. गिल्डर व स्टर्लिंग पौंड आणि गिल्डर व डॉलर ह्यांचा संबंध निश्चित करण्यांत आलेला आहे, परंतु येन व गिल्डर ह्यांचा नाहीं. त्यामुळें जपान व जावा ह्यांचेमधील देण्याघेण्याचा हिशेब सरळ होऊं शकत नाहीं. आतां हीं दोन्हीं चलनांची एकमेकांतील किंमत निश्चित करण्यांत आली आहे. ह्या हुंडणावळीच्या दरांत फरक करावयाचा झाल्यास तो योकोहामा स्पीशी बँक व जावा बँक ह्यांच्या परस्पर सल्यानेंच केला जाईल.

### हिंदुस्थान एअरक्राफ्ट लि.

वरील नांवानें श्री. वालचंद हिराचंद ह्यांनीं आपली विमानें तयार करणारी कंपनी ता. २३ डिसेंबर रोजीं नोंदली. कंपनीचें भांडवल ४ कोटि रुपये असून त्यापैकीं निम्में भांडवल म्हैसूर सरकार घेणार आहे. कंपनीच्या ५ डायरेक्टरांपैकी दोघे जण म्हैसूर सरकारचे प्रतिनिधि असतील. श्री. वालचंद हिराचंद हे अध्यक्ष आहेत.

### रेडिओवर बातम्या सांगणारा पाहिजे

दिल्ली येथील ऑल इंडिया रेडिओसाठीं मराठींत भाषांतर करून रेडिओवर बातम्या सांगण्याकरितां तात्पुरता एक मनुष्य पाहिजे आहे. अर्जदारास मराठी व इंग्रजी चांगलें येणें आवश्यक असून त्याचा आवाज रेडिओस योग्य असा असला पाहिजे. जागेचा पगार १५० रुपये आहे. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख २० जानेवारी, १९४१ ही आहे.

### युद्ध व आयुर्विमा

"१९१३ सालीं हिंदी आयुर्विमा कंपन्यांचा लाइफ फंड ५ कोटि, ८३ लक्ष रुपये होता, तो १९१९ मध्यें ७ कोटि, ८३ लक्ष रुपये झाला. नवीन विम्याचें कामहि २ कोटि, ९० लक्षांवरून ४ कोटि, ५० लक्षांवर गेलें. हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न ह्या काळांत १ कोटि, २७ लक्षांचें १ कोटि, ६९ लक्ष रुपये झालें. चालू युद्धकाळांतहि तसेंच घडेल; कोणाचेंहि नुकसान होणार नाहीं. ह्या वेळीं घाबरून जाणें इष्ट नाहीं." इंडियन लाइफ इन्शुअरन्स ऑफिसेस असोसिएशनतर्फे प्रसिद्ध करण्यांत आलेल्या पत्रकांत वरील माहिती देण्यांत आली आहे.

### हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांमधील व्यापारी कराराच्या वाटाघाटी

हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांमधील व्यापारासंबंधांतील चालू योजना ३१ मार्च, १९४१ अखेर बंद होईल. नवीन कोणती योजना अंमलांत आणावयाची ह्याविषयींची तयारी चालू आहे. हिंदुस्थान सरकारनें त्यासाठीं एक बिनसरकारी सल्लागार मंडळ नेमण्याचें ठरविलें आहे.

### विम्याची सक्ती

बंगालमधील सर्व सरकारी नोकरांचा सक्तीनें विमा उतरण्याची योजना तेथील सरकारपुढे आहे. त्या संबंधांतील तपशील जमा करण्यांत येत आहे.

### रक्ताची पूड

जखमी झालेल्या अगर अतिशय रक्तस्राव झालेल्या माणसाचें रक्तवाहिन्यांत दुसऱ्याचें रक्त टोचून त्याची शक्ति वाढवतां येते व अशा रक्ताचा साठा चटकन् उपलब्ध व्हावा, ह्यासाठीं तें साठवून ठेवण्याच्या योजना—रक्ताच्या बँका—पाश्चिमात्य देशांत अमलांत आहेत. रणांगणावर घायाळ झालेल्या सैनिकांस ताजें रक्त पुरविण्यासाठीं रक्ताची पूड तयार ठेवण्याची युक्ति आतां निघाली आहे. ही पूड,—"प्लॅस्मा"—शुद्ध पाण्यांत मिसळली, कीं रक्त तयार होतें व तें गरजू माणसाचे रक्तवाहिन्यांत टोचतां येतें.

### म्हैसूर संस्थानांतील कामगार

म्हैसूर संस्थानांत एकूण सुमारें ३३२ मोठे कारखाने आहेत, त्यांपैकीं ५०% कारखाने बंगलोर जिल्ह्यांत आहेत. त्याचे खालोखाल कोलार, म्हैसूर व शिमोगा हे जिल्हे क्रमानें येतात. म्हैसूर संस्थानांतील कारखान्यांत एकूण ६५ हजार कामगार आहेत, त्यांपैकी १८ हजार बंगलोर जिल्ह्यांतील, २४½ हजार कोलार जिल्ह्यांतील, १३ हजार म्हैसूर जिल्ह्यांतील व ३,९०० शिमोगा जिल्ह्यांतील कारखान्यांत कामावर आहेत. कोलारमधील कामगारांपैकी बहुतेक सोन्याच्या खाणींत मजूर आहेत.

### ऑस्ट्रेलिअन गहूं

ग्रेटब्रिटनला दरसाल लागणाऱ्या गव्हापैकी एक शष्ठमांश गहू ऑस्ट्रेलियांतून येतो. ऑस्ट्रेलियांतील जमीन मात्र सुपीक नाहीं. गव्हाच्या एकूण जागतिक उत्पादनापैकी फक्त ४% उत्पादन त्या देशांत होतें. त्यांतील निम्में निर्गत करतां येतें, ह्याचें कारण ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या लहान आहे, हें होय. ऑस्ट्रेलियांतील गव्हाची लागवड वाढत आहे. ऑस्ट्रेलियाकडून गहूं घेणें ग्रेटब्रिटनला सोईचें जातें याचें कारण त्याची किंमत देतांना हुंडणावळीस ताण पडत नाहीं. ऑस्ट्रेलियांतील शेतकऱ्याच्या जमिनीचें सरासरीं क्षेत्र ५०० एकर भरतें. त्यांपैकीं सुमारें ३०० एकरांत तो गहूं लावतो.

### ब्रिटिश दारूगोळ्याच्या कारखान्यांतील कामगार

ग्रेटब्रिटनमधील दारूगोळ्याच्या कारखान्यांतील कामगारास दर आठवड्यास ६७ तास काम पडतें. आठवड्यास वेतन सुमारें १०० रुपयें मिळतें. म्हणजे, दरमहा प्राप्ति ४०० रुपये झाली. दररोज सकाळीं आठ वाजतां तो कामावर हजर होतो. दोन मिनिटांपेक्षा अधिक उशीर झाला तर पंधरा मिनिटांचा पगार कापला जातो. बारा वाजतां त्यास जेवणासाठी एक तास सुट्टी मिळते, पांच वाजतां दहा मिनिटें विश्रांति मिळतें व साडेसात वाजतां तो सुटतो. १५ दिवसांनीं त्यास रात्रपाळी करावी लागते. बसमधून तो घरीं येतो, त्यावेळीं रात्रीचे आठ वाजून गेलेले असतात, व त्याची पत्नी जेवणासाठीं त्याची वाट पहात असते. युद्ध सुरू होण्यापूर्वी त्यास दरमहा दोनशें रुपये जेमतेम मिळत. आतां ह्या वाढलेल्या प्राप्तीमुळें त्याचें रहाणीचें मान सुधारलें आहे. त्याची पत्नी आतां विजेच्या कुकरमध्यें स्वैपाक करते. तिचेजवळ व्हॅक्युम क्लीनरहि आहे. कपड्यांवरहि ती आतां पुष्कळ ज्यास्त खर्च करते. उत्पादन वाढविण्यासाठी ब्रिटिश कामगार कसून प्रयत्न करीत आहेत.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २ | स्थिति—ब्रिटिश सरकारचें नवें कर्ज | |
| २ अर्थशास्त्र आणि अनियंत्रित व्यक्तिस्वातंत्र्य | ३ | ५ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... | ७ |
| ३ हिंदी शेती ... | ४ | ६ शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा ... | ८ |
| ४ स्फुट-विचार ... | ४ | ७ जर्मन कंपनीविरुद्ध दावा | ९ |
| "अर्था"स सातवें वर्ष लागलें—युद्ध, नाताळ आणि शांतता—सास्तरेच्या बाजाराची परि- | | ८ तटस्थ आयरा ... | ९ |
| | | ९ निवडक बाजारभाव ... | १० |



# अर्थ

बुधवार, ता. १ जानेवारी, १९४१


## अर्थशास्त्र आणि अनियंत्रित व्यक्तिवर्तन

### प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांचें म्हैसूर येथें भाषण

सुमारें अकरा वर्षांमागें प्रा. काळे ह्यांनीं म्हैसूर येथें अखिल भारतीय अर्थशास्त्रपरिषदेचें अध्यक्षस्थान मंडित केलें होतें आणि यंदा त्याच ठिकाणीं तेंच स्थान महाराष्ट्रीय अर्थशास्त्रपंडित प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं विभूषित केलें. ह्यापेक्षांहि अधिक महत्त्वाचा योगायोग म्हटला म्हणजे दोघांच्याहि भाषणांत एका विशिष्ट मुद्यावर जोर देण्यांत आला, हा होय. अर्थशास्त्राच्या सिद्धांताचा उपयोग आर्थिक प्रगतीविषयींचे प्रश्न सोडवण्यांत झाला पाहिजे आणि प्रत्येक देशाच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीच्या दृष्टीनें, लोकांचें जें प्रतिनिधीभूत सरकार, त्यानें सार्वजनिक हितास पोषक होईल असें सामुदायिक धोरण अंगिकारलें पाहिजे हा सिद्धांत प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत पुढें मांडला होता आणि त्या संबंधांत पाश्चात्य देशांमध्यें नवीन विचारांचें वळण कोणत्या प्रकारचें आहे ह्याचें विवेचन त्यांनीं केलें होतें. न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं भारतीय अर्थशास्त्राची मुहूर्तमेढ रोवतांना ह्याच तऱ्हेच्या विवेचनाचा आधार घेतला होता. सार्वजनिक हिताच्या प्रश्नांशीं अर्थशास्त्रीय सिद्धांतांचा कसा निकट संबंध आहे हें दाखवण्यासाठी प्रा. धनंजयराव ह्यांनीं आपल्या भाषणांत वरील विषयाच्या निरनिराळ्या बाजूंचा शास्त्रीय पद्धतीनें विचार केला. वैयक्तिक स्वातंत्र्य, अनियंत्रित स्पर्धा आणि उद्योगधंद्यांचे बाबतींत राजकीय सत्तेची तटस्थपणाची वृत्ति ह्या गोष्टी कित्येक पाश्चात्य अर्थशास्त्रीय पंडित आपल्या विवेचनांत गृहीत धरतात. अर्थशास्त्राचीं तत्त्वें आणि आर्थिक व्यवहार ह्यांचा प्रत्यक्ष संबंध जणूं काय कांहींच नाहीं असें ते भासवतात. तथापि ही भूमिका चुकीची आहे हें प्रा. गाडगीळ ह्यांनीं मुद्देसूद रीतीनें स्पष्ट करून दाखवलें आहे.

अर्थशास्त्राच्या पाश्चात्य प्रणेत्यांच्या पुढें राष्ट्रीय राजकीय सत्ता आणि सामाजिक आर्थिक हित ह्यांची संगति कशी लावावी हाच प्रश्न प्रामुख्यानें होता आणि शास्त्राच्या "शुद्ध" सिद्धांतांचा पुरस्कार करणारे पंडितहि आर्थिक प्रश्नांच्या व्यावहारिक बाजूंसंबंधानें मतें प्रदर्शित करीत असतात व सल्लाहि देतात त्यावेळीं त्यांची तात्त्विक भूमिका व सार्वजनिक प्रश्नांविषयींच्या धोरणाबाबतच्या सूचना ह्यांमधला विरोध तेव्हांच स्पष्ट होतो. अर्थशास्त्रीय सिद्धांत जनतेच्या रोजच्या जीवनास पारखे होऊं शकत नाहींत हेंच यावरून उघड होतें. जनतेनें आपल्या पोटापाण्याचे उद्योग करावे, व्यक्तींच्या ह्या प्रयत्नांत सरकारनें हात घालूं नये आणि प्रत्येकास आपापल्या इच्छेप्रमाणें व संधीप्रमाणें उदरनिर्वाहाची धडपड करूं देण्यांतच समाजाचें म्हणजे सर्वांचें अधिकांत अधिक हित आहे ही कल्पना कित्येक अर्थशास्त्रवेत्त्यांनीं अजूनहि टाकून दिलेली नाहीं ह्या गोष्टींचा उल्लेख करून सदरहू भूमिकेची छाननी प्रा. गाडगीळ ह्यांनीं आपल्या भाषणाच्या प्रारंभींच केली आहे आणि हिंदुस्थानच्या आर्थिक धोरणाचा निर्णय करणारे, "शुद्ध सिद्धांत"वाद्यांच्याच वर्गांत मोडतात ही गोष्ट प्रामुख्यानें पुढें मांडली आहे. अनियंत्रित, वैयक्तिक अर्थस्वातंत्र्याचा पुरस्कार ह्या देशांत केला गेला आहे, त्याचें स्वरूप काय होतें व आहे ह्याचें दिग्दर्शन त्यांनीं उदाहरणें देऊन केलें आहे.

अर्थशास्त्राच्या "शुद्ध" तत्त्वांप्रमाणें हिंदुस्थानांत सावकार आणि कर्जबाजारी शेतकरी किंवा मजूर ह्यांचे संबंध न्याय्य व परस्पर हिताचे असावयास हवे होते. पण प्रत्यक्ष अनुभव काय दाखवितो हें आतां सर्वांस कळून चुकलें आहे. निरनिराळ्या देशांतील परिस्थिति आणि गरजा एकाच प्रकारच्या असत नाहींत आणि म्हणून इंग्लंडसारख्या राष्ट्रास खुला व्यापार सोयीचा वाटला तर तो हिंदुस्थानसारख्या देशासहि तसाच वाटला पाहिजे ही अनियंत्रित व्यापाराच्या पुरस्कर्त्यांची कल्पना भ्रममूलक आहे आणि सूक्ष्म विचाराच्या कसोटीस उतरण्यासारखी नाहीं. परराष्ट्रीय मालाच्या स्पर्धेमुळें देशी उद्योगधंदे नाहींसे होतात आणि बेकारीचा प्रसार लोकांमध्यें होतो, ह्याचा चांगला अनुभव हिंदुस्थानांत आलेला आहे. पाश्चात्य देशांसहि हा अनुभव अलीकडे येत आहे. आर्थिक बाबतींत सरकारनें हात घालतां कामा नये ह्या तत्त्वाचा फोलपणा ह्याप्रमाणें प्रा. धनंजयराव ह्यांनीं स्पष्ट केला आहे आणि राज्यकर्त्यांस कोणत्या बाबतींत विधायक धोरण ह्या देशांत स्वीकारतां येण्याजोगें आहे ह्याचें विवेचन सोदाहरण केलें आहे. आर्थिक व सामाजिक घडामोडींत उद्योगधंद्यांच्या परिस्थितींत फेरबदल होतात आणि अनेक लोकांवर बेकारीची आपत्ति येते. असल्या प्रसंगीं बेकारांच्यासाठी कामें काढण्याची कायमची व्यवस्था करणें आणि नवीन उद्योगधंद्यांचे संबंधांत सुधारलेल्या यंत्रसामुग्रीचा उपयोग व भांडवलाचा पुरवठा ह्यांचें नियमन ह्या गोष्टी सरकारनें हातीं घेतल्या पाहिजेत अशी प्रा. गाडगीळ ह्यांची सूचना आहे. हिंदी अर्थशास्त्रज्ञ आपल्या क्षेत्रांतील प्रश्नांच्या राजकीय अंगाकडे लक्ष पुरवतात अशा तक्रारींचा उल्लेख करून असें करणें योग्य व शास्त्रीयदृष्ट्या इष्ट आहे असें मत व्यक्त करून त्यांनीं आपलें अध्यक्षीय भाषण पुरें केलें.

प्रा. धनंजयराव ह्यांच्या भाषणाचा रोख मुख्यत्वेंकरून कित्येक अर्थपंडित समाजाच्या आर्थिक जीवनाच्या बाबतींत राज्यकर्त्यांनीं तटस्थपणाचें धोरण स्वीकारणें शास्त्रीयदृष्ट्या अगत्याचें आहे असें प्रतिपादित असतात, त्या भूमिकेच्याविरुद्ध आहे. अशी भूमिका शास्त्रीय नाहीं, व्यावहारिक उपयोगाची तर नाहींच नाहीं, हें त्यांना सिद्ध करावयाचें होतें. हिंदुस्थानांत भारतीय अर्थशास्त्राचा उदय व विकास झाला ह्याचें कारण ब्रिटिश अर्थपंडित

व राज्यकर्ते ह्यांचें येथील आर्थिक धोरण हिंदी लोकांच्या जीवनांत योग्य सुधारणा होण्यास अनुकूल नव्हतें. ह्या बाबतींत हिंदी शास्त्रज्ञांनीं विचार करून निश्चित केलेला सिद्धांत होय. अर्थशास्त्रीय तत्त्वें आणि राष्ट्रीय आर्थिक जीवन ह्यांचा प्रत्यक्ष संबंध लावतां येत नाहीं अशी कित्येक पंडितांची अजूनहि समजूत आहे. ती चुकीची आहे, तिला शास्त्रीय आधार नाहीं आणि ती अनुभवाच्या व इष्टतेच्या कसोटीस उतरूं शकत नाहीं हेंच प्रा. गाडगीळ ह्यांस सिद्ध करावयाचें होतें आणि तें कार्य त्यांनीं हिंदी आर्थिक जीवनासंबंधीं दाखले देऊन उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें आहे. न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं घालून दिलेल्या परंपरेचा पुरस्कार करणारें तें भाषण आहे आणि त्यांतली विचारसरणी शास्त्रशुद्ध, उद्बोधक व नाविन्यपूर्ण आहे. अशा सुंदर अध्यक्षीय भाषणाबद्दल प्रा. धनंजयराव ह्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे.

## हिंदी शेती

### (१)

हिंदी शेती बहुंशीं पावसावर अवलंबून आहे. खरीप पिकें पावसाळ्यांत होतात. जून अगर जुलैमध्यें त्यांची पेरणी होऊन ऑक्टोबर ते डिसेंबर त्यांची कापणी होते. रब्बी पिकांची पेरणी सप्टेंबर अगर ऑक्टोबरमध्यें होते व फेब्रुवारी ते मे त्यांची कापणी होते. हिंदुस्थानचें क्षेत्र इतकें मोठें आहे कीं, सर्वत्र हिंदुस्थानास लागू पडेल अशा शेतीचें वर्णन एकदम करतां येणें अशक्य आहे. दक्षिण हिंदुस्थानांत कांहीं ठिकाणीं नोव्हेंबरपासून फेब्रुवारीपर्यंत पुनः पाऊस पडतो व तेथें भाताचीं दोन अगर तीन सुद्धा पिकें एका मागाहून अशीं काढतां येतात. म्हणजे, रब्बी व खरीप अशीं वेगळीं पिकें तेथें उद्भवतच नाहींत. उत्तर हिंदुस्थानांतहि कांहीं ठिकाणीं नोव्हेंबर ते फेब्रुवारी वळवाचा पाऊस पडतो.

#### कपास

हिंदी पिकांपैकी कांहीं पिकें शेतकरी स्वतःच्या पोटासाठींच करतात; कांहीं पिकें विक्रीसाठीच केवळ असतात. अर्थात् अशी वाटणीहि अगदीं काटेकोरपणानें करतां येणें अशक्य आहे. व्यापारी पिकांखालीं हिंदुस्थानांत एकूण २ ते २½ कोटि एकर जमीन आहे. जगांतील सर्वांत अधिक कपास अमेरिकेंत पिकते, तिचें खालोखाल हिंदुस्थानाचा अनुक्रम लागतो. हिंदी कपाशीच्या पिकाचा तपशील खालीं दिला आहे:—

| वर्ष | | हजार एकर | हजार गाठी |
|---|---|---|---|
| १९३०–३१ | ... | २३,४३९ | ५,१९२ |
| १९३१–३२ | ... | २३,४९४ | ४,००३ |
| १९३२–३३ | ... | २२,१५१ | ४,६१८ |
| १९३३–३४ | ... | २३,६९२ | ५,०५७ |
| १९३४–३५ | ... | २३,५१५ | ४,७९७ |
| १९३५–३६ | ... | २५,४४४ | ५,८६७ |
| १९३६–३७ | ... | २४,७५९ | ६,२३४ |
| १९३७–३८ | ... | २५,७४६ | ५,७२२ |
| १९३८–३९ | ... | २३,४८२ | ५,०७६ |
| १९३९–४० | ... | २१,३५६ | ४,९४२ |

अमेरिकेमध्यें कपाशीची लागवड कांहीं भागांतच केली जाते; हिंदुस्थानांत अनेक प्रांतांत ती होते. मुंबई प्रांतांत एकूण हिंदी उत्पादनापैकीं ३०% उत्पादन होतें, परंतु त्यांतहि चार प्रकारची कपास आढळते. हिंदुस्थानामध्यें कपाशीचें पीक अतिशय प्राचीन काळापासून होत आलें आहे. सिंधमध्यें मर्हेजोदारो येथें खणतांना कपाशीचें कापड सापडलें, ह्यावरून खिस्तापूर्वी ३ हजार वर्षे हिंदुस्थानांत कपास माहीत होती, हें सिद्ध होतें. १८५० चे सुमारास अमेरिकन जातींच्या कपाशीचे लागवडीस प्रारंभ झाला व ती लागवड आतां वाढत आहे. विशेषतः पंजाब व सिंध ह्या प्रांतांत अमेरिकन कपाशीची, पंजाब–अमेरिकन ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या जातींची, लागवड मोठ्या प्रमाणावर होते. उंची कापडाचे बनावटीस ह्या कापसाचें सूत उपयोगी असल्यामुळें ह्या कपाशीस मागणी चांगली असते.

पंजाब-अमेरिकन कपाशीचें उत्पादन दिवसेंदिवस कसें वाढत आहे, हें खालील तक्ता दर्शवितो:—

पंजाब–अमेरिकन कपाशीचें उत्पादन

| वर्ष | हजार गांठी |
|---|---|
| १९३३–३४ | १० |
| १९३४–३५ | उपलब्ध नाहीं |
| १९३५–३६ | २० |
| १९३६–३७ | ४७ |
| १९३७–३८ | ५४ |
| १९३८–३९ | ७२ |
| १९३९–४० | ६६ |

मध्यप्रांत, वऱ्हाड, खानदेश, मध्य हिंदुस्थान, रजपुताना इत्यादि ठिकाणची कपास आखूड धाग्याची आहे. ह्या कपाशीचा हिंदुस्थानांतील खप सुमारें १० लक्ष गाठी आहे. जपानमध्येंहि ती मोठ्या प्रमाणावर खपते. ह्या प्रांतांतील कपास पावसावरच पिकते व मोसमहि लहान असतो, त्याचा परिणाम धाग्याचे लांबीवर होणें स्वाभाविक आहे. सुरत, बडोदें, येथेंहि अशीच परिस्थिति असूनहि कपास लांब धाग्याची होते. हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव किती होतो व किती कपास निर्गत होते, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| वर्ष | हिंदी गिरण्यांत उठाव गाठी | परदेशीं निर्गत गाठी |
|---|---|---|
| १९२९–३० | २५,७३,७१४ | ३८,६८,००० |
| १९३०–३१ | २६,३३,१७६ | ३७,२९,००० |
| १९३१–३२ | २९,११,२६४ | १५,९२,००० |
| १९३२–३३ | २८,३७,१५८ | २८,६८,००० |
| १९३३–३४ | २७,०३,९९४ | ३४,०६,००० |
| १९३४–३५ | ३१,२३,४१८ | ३१,१५,००० |
| १९३५–३६ | ३१,८८,४१८ | ३७,०९,००० |
| १९३६–३७ | ३१,४६,७५२ | ४२,६७,००० |
| १९३७–३८ | ३६,६२,६४८ | २१,००,००० |
| १९३८–३९ | ३८,१०,७३४ | ३२,७४,००० |

# स्फुट विचार

## 'अर्था'स सातवें वर्ष लागलें

आजचा "अर्था"चा अंक हा ह्या साप्ताहिकाचा सातव्या वर्षाचा पहिला अंक आहे. गेलीं सहा वर्षें "अर्थ" आपलें कार्य शक्य तितक्या दक्षतेनें करीत आला आहे. महाराष्ट्रीयांचीं मनें उद्योगधंदे, व्यापार, इत्यादि धनोत्पादक व्यवहारांकडे वळवून त्यांस ह्या विषयांची गोडी लावावी ह्या उद्देशानें "अर्थ" स्थापन करण्यांत आला व त्याचें महाराष्ट्रीय जनतेनें चांगलें स्वागत केलें. आर्थिक विषयांच्या विवेचनास वाहिलेलें मातृभाषेंतील साप्ताहिक, ह्या दृष्टीनें "अर्था"स विशेष महत्त्व आहे. औद्योगिक व व्यापारविषयक प्रगतीचें महत्त्व लोकांस आतां पटूं लागलें आहे व त्या संबंधांतील प्रयत्न यशस्वी होण्यास आर्थिक उन्नतीचा मजबूत पाया तयार होणें आवश्यक आहे. ह्या दृष्टीनें, "अर्था" चा प्रसार सर्व महाराष्ट्रभर, घरोघर होणें जरूर आहे. शिक्षण संस्था, पतपेढ्या, बँका, व्यापारी मंडळ्या, त्याचप्रमाणें व्यक्तिशः शिक्षक, विद्यार्थी, दुकानदार, सार्वजनिक कार्यकर्ते व सर्वसाधारण नागरिक, ह्या सर्वांसच "अर्थ" अतिशय उपयोगी आहे. महाराष्ट्रीयांच्या आचारविचारांस व्यावहारिक वळण लावण्याच्या कार्मी आम्हांस आमच्या मित्रांचें व आश्रयदात्यांचें पूर्वीप्रमाणेंच ह्यापुढेंहि सहाय मिळत राहील अशी आशा आहे. त्या सर्वांचे आम्हीं मनःपूर्वक आभार मानतों. "अर्था" चा प्रसार अधिकाधिक होण्यास सर्वांनीं मदत करावी, अशी विनंति आहे.

---

## युद्ध, नाताळ आणि शांतता

बंधुभाव आणि शांतता ह्यांचा एकमेकांस संदेश देऊन त्याप्रमाणें आचरण वर्षभर ठेवण्याचा निश्चय करणें हा पाश्चात्य लोकांचा नाताळांतला नेहमींचा रिवाज आहे. यंदाच्या नाताळांत प्रचलित युद्ध संपून त्या निमित्तानें चाललेलें हत्याकांड बंद होण्याची आशा सफल झालेली नाहीं. युद्धाचा शेवट होऊन शांतता, स्वातंत्र्य आणि न्याय ह्यांचें साम्राज्य प्रस्थापित व्हावें अशी इच्छा प्रकट करण्यावांचून दुसरा मार्ग सामान्य माणसास आज मोकळा नाहीं. तथापि, नुसती सदिच्छा व प्रार्थना ह्यांनीं हें काम भागण्याजोगें नाहीं. स्वातंत्र्य, समता आणि न्याय ह्यांस पायांखाली तुडवून रानटीपणानें ज्या राष्ट्रांनीं प्राण व संपत्ति ह्यांचा संहार चालवला आहे त्यांचा बीमोड झाल्यावांचून शांततेचें साम्राज्य जगांत प्रस्थापित व्हावयाचें नाहीं. नाताळाच्या अनुषंगानें ब्रिटिश बादशहा आणि मि. चर्चिल इत्यादि मुत्सद्दी ह्यांनीं संदेश प्रकट केले आहेत त्यांत ह्या महत्त्वाच्या गोष्टीचा प्रामुख्यानें निर्देश केलेला आहे. जगांत शांतता पुन्हा प्रस्थापित व्हावी ह्या हेतूनें पोपनींहि प्रार्थना केली आहे, आणि अशा प्रार्थना ख्रिस्ती देवळांतून चोहोंकडे झाल्या आहेत. सध्याच्या युद्धासारखी आपत्ति जगावर पुन्हां येऊं नये आणि राष्ट्रांनीं शांततेनें व सहकारितेनें वागावें अशी जागतिक पुनर्घटना होण्याचें महत्त्व सर्वांस पटलें आहे. हिटलरशाहीचें निर्मूलन होईल तेव्हांच शांततामय पुनर्घटना शक्य होईल हें विसरतां कामा नये.

---

## साखरेच्या बाजाराची परिस्थिति

इंडिअन शुगर सिंडिकेट ह्या संस्थेनें आपल्या सभासदांवर असा निर्बंध घातला होता (त्यांस अशी सवलत दिली होती असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल) कीं त्यांनीं आपली साखर मुंबईमध्यें दर मणास १२ आणे ह्या प्रमाणांत कमी दरानें विकावी. नोव्हेंबरच्या २० तारखेस ह्या योजनेस सुरुवात झाली होती, पण ती व्यवस्था आतां बंद करण्यांत आली आहे. तिच्या योगानें उत्तर हिंदुस्थानांतील साखरेस मुंबईच्या बाजारांत दक्षिणेंतील कारखान्यांच्या मालाशीं स्पर्धा करतां येऊं लागली होती आणि तिचे भाव उतरले होते. संयुक्तप्रांत आणि बिहार येथील सरकारांनीं चालू हंगामांतील उत्पादन नियंत्रित केलें आहे. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम साखरेच्या बाजारांत स्थिरता उत्पन्न करण्यांत होईल अशी अपेक्षा आहे. गेल्या हंगामांतील साखर तीन चार लक्ष टन इतकी शिल्लक राहिल्यानें चालू सालीं साखरेचे भाव पडून कारखान्यांचें नुकसान होण्याची भीति उत्पन्न झाली होती तिचें निवारण होण्यास मदत म्हणून संयुक्त प्रांत व बिहार येथील सरकारांनीं चालू हंगामांत स्थानिक कारखान्यांतलें उत्पादन ७ लक्ष, २० हजार टनांस मर्यादित केलें आहे आणि नवीन साखरेचा भाव दरमणीं ९ रु. २ आणे ठरवून दिला आहे. साखरेचें उत्पादन कमी झाल्यानें शेतकऱ्यांचा ऊंस विकला जाणार नाहीं, ह्यावरहि उपाय योजण्यांत येत आहे. उसाची किंमत साडेचार आण्यांची सवाचार आणे मण करण्यांत आली आहे आणि उसावरची पट्टी पाऊण आण्याची एक आणा ठरवण्यांत आली आहे. ह्या जादा पट्टीचें उत्पन्न होईल त्यामधून शेतकऱ्यांस नुकसानभरपाई दाखल मदत दिली जाईल. ऊंस पिकवणारांचें नुकसान भरून निघावें आणि साखरेचें उत्पादन योग्य मर्यादेंत रहावें अशा बेतानें संयुक्त प्रांत व बिहार येथील सरकारांनीं आपलें नियंत्रणात्मक धोरण अमलांत आणलें आहे. त्याचा परिणाम हिंदी साखरेच्या धंद्यावर येऊं पहाणारें संकट दूर होण्यांत घडून येईल आणि त्यास स्थैर्य प्राप्त करून देण्यास मदत करील अशी आशा आहे

---

## ब्रिटिश सरकारचें नवें कर्ज

ता. २ जानेवारीपासून २½ टक्क्यांच्या नव्या ब्रिटिश कर्जरोख्यांच्या विक्रीस प्रारंभ होईल. सध्याच्या २½ टक्क्यांच्या रोख्यांची विक्री ३१ डिसेंबर रोजीं बंद करण्यांत आली. नवीन रोखे दर्शनी किंमतीसच विकत मिळतील व त्यांची परतफेड १५ ऑगस्ट, १९४६ रोजीं अगर नंतर दोन वर्षांचे आंत केली जाईल. ३% सेव्हिंग्ज बॉण्ड्सहि उद्यांपासून ग्रेटब्रिटनमध्यें मिळूं लागतील, त्यांची रकम १५ ऑगस्ट, १९४५ रोजीं अगर नंतर २० वर्षांत परत केली जाईल. अगदीं गरीबांसहि हे दोन्ही प्रकारचे रोखे घेतां यावे म्हणून २५ पौंडांच्या अर्जांचाहि विचार केला जाईल असें प्रसिद्ध झालें आहे. म्हणजे, कमींत कमी सुमारें ३५० रुपयांचे कर्जरोखे तरी मागितले पाहिजेत. नोव्हेंबर, १९३९ पासून आतांपर्यंत ब्रिटिश सरकारनें सुमारें १८अब्ज रुपयांचें कर्ज उभारलें आहे, ब्रिटिश जनतेनें सरकारास ह्या संबंधांत मनःपूर्वक सहाय केलें, ह्याबद्दल ब्रिटिश फडनवीस, सर किंग्जले वुड, ह्यांनीं आपल्या रेडिओवरील भाषणांत तिचे नुकतेच आभार मानले व नवीन कर्जरोखेहि लोक भरपूर प्रमाणांत खरेदी करतील, अशी

आशा त्यांनीं व्यक्त केली. युद्ध जिंकण्यासाठी अवास्तव खर्च कमी करून, सर्व आर्थिक बळ एकवटण्यासाठीच ह्या पैशाचा उपयोग होणार आहे व ब्रिटिश जनता नवीन कर्जउभारणीस सढळपणें हातभार लावील ह्यांत संशय नाहीं. व्याजाच्या व मुदतीच्या दृष्टीनेंहि नवीन रोखे अधिक आकर्षक आहेत.

### ताग

हिंदुस्थानांतील एकूण तागाच्या उत्पादनापैकीं ९०% उत्पादन एकट्या बंगालमध्यें होतें. खालील तक्त्यांत एकूण हिंदी लागवड, उत्पादन व निर्गत ह्यांची माहिती दिली आहे:—

आकडे हजार गाठींचे आहेत.

| वर्ष | एकूण एकर | एकूण उत्पादन | एकूण निर्गत |
|---|---|---|---|
| १९३० | ३,४९२ | ११,२०५ | ३,४७२ |
| १९३१ | १,८६२ | ५,५४२ | ३,२८७ |
| १९३२ | २,१४३ | ७,०७२ | ३,१४१ |
| १९३३ | २,५१७ | ७,९८७ | ४,१९० |
| १९३४ | २,६७० | ८,५०० | ४,२११ |
| १९३५ | २,१८१ | ७,२१५ | ४,११८ |
| १९३६ | २,८८६ | ९,६११ | ४,५९८ |
| १९३७ | २,८८९ | ८,९५६ | ४,१८१ |
| १९३८ | ३,१९५ | ६,८१९ | ३,८७० |
| १९३९ | ३,११९ | ९,६३५ | ३,२०९ |

फेब्रुवारी ते मे ह्यांचे दरम्यान तागाची लागवड करण्यांत येते. ताग तयार होण्यास तीन ते चार महिने लागतात. ग्रेटब्रिटन व जर्मनी ह्या देशांकडेच मुख्यतः हिंदी तागाची निर्गत होते.


## मुद्रण-विषयक मराठी साहित्य

१. मुद्रण—प्रवेश : लेखक शं. रा. दाते, बी. ए.
मुद्रणयंत्रावर मजकुराचा प्रवेश होईपर्यंतचें छापखान्याच्या धंदा-संबंधींचें सर्व विवेचन प्रस्तुत पुस्तकांत केलें असून छापखान्याच्या चालकांना, व्यवस्थापकांना, तसेंच छापखान्यांतील कामगारांना व छापकामें करून घेणाऱ्या गिऱ्हाइकांना अत्यंत उपयुक्त असें मराठींतील एक पुस्तक. तज्ज्ञांचे उत्तम अभिप्राय. हिंदी आवृत्तीही मिळूं शकते. कोणतीही आवृत्ति किंमत १ रु.

२. मुद्रण—विज्ञान : लेखक रि. का. संत
प्रस्तुत ग्रंथांत मुद्रण धंद्यासंबंधींची सर्व प्रकारची शास्त्रशुद्ध, व्यावहारिक व तात्त्विक माहिती क्रमवार दिली असून ग्रंथाचे छोटे छोटे भाग विषयाप्रमाणें पाडिले आहेत. पहिले चार भाग विक्रीस तयार आहेत.

- (१) पुस्तक — पहिलें — टाईप;
- (२) पुस्तक — दुसरें — जुळणी;
- (३) पुस्तक — तिसरें — पॉइंट पद्धति;
- (४) पुस्तक — चौथें — मुद्रण-शास्त्र.

● प्रस्तुत पुस्तकें कमिटी ऑफ डायरेक्शन फॉर टेक्निकल ट्रेनिंग, मुंबई यांच्या 'टायपोग्राफी' विषयाच्या सरकारी अभ्यासक्रमास धरून लिहिलीं असून आधुनिक शिक्षणपद्धतीनुसार प्रत्येक प्रकरणाचे शेवटीं प्रश्न व अभ्यास दिले असल्यानें विद्यार्थ्यांस शिकविण्यास सुलभ व मुद्रणाचा शास्त्रोक्त अभ्यास करूं इच्छिणाऱ्यांस अत्युपयुक्त. किंमत प्रत्येकीं चार आणे

*मिळण्याचीं ठिकाणें :*

१. लोकसंग्रह कारखाना, ६२५ सदाशिव, पुणें २.
२. आर्यभूषण छापखाना, लक्ष्मी रोड, पुणें २.



मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ जयसिंगपूर ( जि. कोल्हापूर ) |
| २ सातारा ( " सातारा ) | १९ विरमगांव ( " अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( " " ) | २० धुळें ( " प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( " " ) | २१ दोंडाईचें ( " " ) |
| ५ तासगांव ( " " ) | २२ शिरपूर ( " " ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( " " ) | २३ शहादें ( " " ) |
| ७ शिराळें ( " " ) | २४ नंदुरबार ( " " ) |
| ८ कोरेगांव ( " " ) | २५ साक्री ( " " ) |
| ९ वाई ( " " ) | २६ शिंदखेडें ( " " ) |
| १० अहमदनगर ( " अहमदनगर ) | २७ तळोदें ( " " ) |
| ११ शेवगांव ( " " ) | २८ मालेगांव ( " नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( " " ) | २९ सटाणा ( " " ) |
| १३ बेलापूर ( " " ) | ३० कळवण ( " " ) |
| १४ राहुरी ( " " ) | ३१ लासलगांव ( " " ) |
| १५ भिवंडी ( " ठाणें ) | ३२ नांदगांव ( " " ) |
| १६ पालघर ( " " ) | ३३ दोहद ( " पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( " " ) | ३४ कालोल ( " " ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

( ले. वा. चिं. भानू )

पंजाबांतील सहकारी शिक्षण:—जनतेमध्यें सहकारी तत्त्वांचा प्रसार करणें, नवीन नवीन कार्यकर्ते शिकवून तयार करणें व सहकारी संस्थांमधून कामें करीत असलेल्या नोकरवर्गाला त्याच्या कामकाजाबाबत पद्धतशीर रीतीनें वर्ग चालवून शिक्षण देणें याकामीं पंजाब प्रांतानें आघाडी मारलेली दिसते. सोसायट्या निर्माण करणें व नालायक झालेल्या सोसायट्यांचा कारभार गुंडाळणें एवढीं दोन प्रमुख कर्तव्यें सहकारी खात्याची आहेत असा प्रवाद होता. पण पंजाब प्रांतानें सहकारी शिक्षणाप्रीत्यर्थ लहानमोठे १७ अंमलदार नेमून तो गैरसमज दूर केलेला आहे. या १७ पगारदार अंमलदारांत एक शिक्षण असि. रजिस्ट्रार असून ५ इन्स्पेक्टर्स व ६ त्यांचे मदतनीस या शिवाय औद्योगिक बाबींचें शिक्षण देण्यासाठी एक स्वतंत्र अंमलदार असे आहेत. सहकारी चळवळींचे धागेदोरे येट स्वयपांक घरांत नेऊन भिडविले पाहिजेत हें आमचे कै. गोपाळराव देवधर कित्येकदां आग्रहानें सांगत असत.त्याचा मुंबई इलाख्यांत कांहीं परिणाम दिसून आला नाहीं तरी पण पंजाब प्रांतानें मात्र वर निर्देश केलेल्या शिक्षणयोजनेंत सुद्द स्त्रियांमध्यें चळवळीची माहिती व प्रसार व्हावा म्हणून एका स्त्रीअंमलदाराची नेमणूक केलेली आहे. याप्रमाणें एकूण १७अंमलदारांचा खर्च पंजाबचें सहकारी खातें चालवीत आहे. हिंदुस्थान सरकारकडून ग्रँटही मिळत असते. इंडियन को-आपरेटिव्ह रिव्ह्यूच्या गेल्याच अंकांत मि. सय्यद हुसेन, असिस्टंट राजिस्ट्रार, एज्युकेशन, पंजाब, यांनीं एक लेख लिहून सहकारी शिक्षणखात्याच्या कामाचा बोधक अहवाल दिलेला आहे. त्यावरून आढळून येतें कीं या खात्यानें १९३८–३९ सालीं, खालीलप्रमाणें ट्रेनिंग क्लासेस भरविले. (१) सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासेस ९१ भरले व त्यांत १,२४४ सेक्रेटरींनीं शिक्षण घेतलें. या वर्गामध्यें शिक्षण घेण्यासाठी जी मंडळी आली होती त्यांची शिक्षणविषयक लायकी व दर्जा, त्यांचा स्थानभेद आणि समजुती लक्षांत घेऊनच शिक्षणाचा कार्यक्रम व विषयांची रूपरेखा आखण्यांत आली होती. कायदा, कानू व पोटनियम यांचें महत्त्व व हिशेब ठेवण्याची पद्धति यांची माहिती तर क्लासमध्यें दिलीच पण त्याशिवाय पतपेढ्यांच्या कारभारांत कोठें कोठें व कसकशी ढिलाई आहे, त्यावर काय उपाय योजले पाहिजेत याबद्दलही अधिकार वाणीनें माहिती देऊन सोसायट्यांचा व्यवहार निर्दोष कसा होईल, जनतेमध्यें पसरलेले गैरसमज कसे दूर होतील याचीहि माहिती दिल्यानें क्लासची उपयुक्तता पुष्कळच वाढली असल्यास नवल नाहीं. (२) प्राथमिक सोसायट्यांचा ट्रेनिंग क्लास म्हणजे पंच कमेटी व चेअरमन यांचें काम करणाऱ्यांना उपयुक्त ज्ञान देण्याचा क्लास होय. असे १९५ क्लासेस १९३८–३९ सालीं भरविण्यांत आले व त्यांत ६७९९ इसमांनीं भाग घेतला होता. क्लासांत दाखल झालेल्या मंडळींच्या व स्थानिक गरजा व विशिष्ट परिस्थितीच्या मानानेंच शिक्षणाचा अभ्यासक्रम मुक्रर केला गेला. (३) औद्योगिक सोसायट्यांच्या सभासदांसाठी ७ क्लासेस भरविण्यांत आले. २२४ सभासदांची हजेरी होती. या वर्गामधून मार्केटिंगच्या विषयाची रूपरेखा व महत्त्व समजावून देण्यांत आलें. क्लासला हजर राहणारास शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या पण त्या रकमा त्यांचे कर्जखातीं जमा झाल्यानें तेवढाच त्यांचा कर्जाचा बोजा हलका झाला. (४) महिला पतपेढ्यांचे सभासदांसाठीं क्लासेस. असे ५ क्लासेस करविण्यांत आले. हजर सभासदांस रु. १४०० पर्यंत एकूण शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या. लेडी इन्स्पेक्ट्रेस यांनीं सहकारी पतपेढ्यांच्या ज्ञानाबरोबर संसारांतील व्यवहारिक ज्ञानही दिलें, त्यांत शिवण, विणणें, भरत काम तसेंच मुरंबे लोणचीं चटण्या कशा कराव्यात याचीही माहिती दिल्यानें हे क्लासेस फारच लोकप्रिय झाले. (५) बँकिंग युनियनच्या सेक्रेटरींचा क्लास. (६) लिक्विडेटर व स्पेशल रिकव्हरी एजंट्स यांचा क्लास, (७) इन्स्पेक्टर्स (आरंभीच नमूद केलेले अंमलदार) व सब इन्स्पेक्टर्स (रूरल व अर्बन विभागांतील) लेडी इन्स्पेक्ट्रेस क्लास, इत्यादि कार्यकारी अंमलदारांच्या शिक्षणासाठींही पंजाब सरकारनें क्लासेस भरवून सहकारी शिक्षण देण्याचे कामांत मोठी आघाडी मारलेली आहे यांत शंका नाहीं.

× × ×

इतर प्रांताच्या दृष्टीनें विचार करितां इतक्या वेगवेगळ्या क्लासेसच्या यादींत माझें समजुतीनें आपणसी दोन तरी क्लासेस भरावयास पाहिजे होते. ते म्हणजे एक अर्बन किंवा डि. सेंट्रल बँकांचे डायरेक्टरांसाठी व दुसरा सहकारी खात्यांत ऑडिटर, असि. रजिस्ट्रार वगैरे अंमलदार नेमून येतात त्यांच्यासाठी. या क्लासेसमध्यें शिकविणारांची अडचण पडणार नाहीं. मुंबई-पुण्याकडे असे तज्ज्ञ पुष्कळ आहेत. सर्व प्रकारच्या क्लासेसची आवश्यकता इकडे विशेष भासत आहेच.

× × ×

नाटक-तमाशामार्फत प्रचार:—सहकारी तत्त्वांचा प्रसार नाटक व तमाशे यांच्या सहाय्यानें करण्याचा प्रघात चमत्कृतीपूर्ण आहे. पंजाबमध्यें सहकारी नाट्यसंस्था काढण्यांत आली असून एका शिक्षणविषयक इन्स्पेक्टरकडे हें काम सोंपविण्यांत आलेलें आहे व सहकारी सोसायट्यांचे सबइन्स्पेक्टर्स या नाट्य संस्थेंत कामें करितात. अहवालाचे सालांत नाट्यसंस्थेनें १२९ गांवीं हिंडून १५६ प्रयोग केले. नाट्य-प्रयोगाची सर्वांनीं तारीफच केली आहे. पंजाबच्या प्रांतिक बँकेनें व युनिअन्सनीं या नाट्यसंस्थेचा खर्च भागविलेला आहे. आपल्या इकडील भागांत अशी एकादी संस्था काढून पहाण्यासारखी आहे. पण या नाट्य संस्थेला नाटकें कोण पुरविणार? नाट्य हें सृष्टीचें यथार्थ स्वरूप म्हणून कोणी हौशी लेखकानें मनावर घेतल्यास, या सहकारी नाट्य आदर्शांत पुष्कळांना आपलेच चेहेरे रंगविलेले दिसतील! सहकारी चळवळींचें व संस्थांचें सद्यःस्थितीचें स्वरूप रंगभूमीवर पहातांना खेडेगांवच्या शेतकरी जनतेबरोबरच शहरवासियांनाही मोठी रम्य करमणूक होईल यांत मात्र शंका नाहीं.

---

### विमानांचें उत्पादन

लवकरच कॅनडाचें विमानांचें मासिक उत्पादन २०० वर जाईल.

### रेल्वेजचा भांडवली खर्च

हिंदुस्थान सरकार १९४१-४२ मध्यें रेल्वेजवर १५३ कोटि रुपये भांडवली खर्च करणार आहे. जी. आय. पी. रेल्वेच्या हार्बर फाट्यावरील माहीम व वडाळा यांचेमध्यें एक नवीन स्टेशन उघडण्याची त्यांत तरतूद आहे.

## शेतकऱ्यांच्या कर्जफेडीच्या कायद्याखालील प्रसिद्ध केलेले कानू आणि त्यांसंबंधानें सूचना

(१)

लेखक—विनायक गणेश तिखे

या कायद्याखालील कानू ता. ५ डिसेंबर १९४० रोजीच्या सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाले आहेत व त्या संबंधानें कोणाला कांहीं सूचना करावयाच्या असतील त्या ता. ३१ जानेवारी सन १९४१ च्या आंत कराव्यात असें सरकारनें जाहीर केलें आहे. या कानूचे दोन भाग होतात: एक कानू आणि दुसरा कानूच्या पूर्ततेसाठी ठरविलेले फार्मचे मसुदे. त्यापैकी प्रथम कानूंचा विचार आम्हीं करणार आहोंत. हे कानू एकंदर ३९ आहेत. आणि फॉर्म्स २२ आहेत. यापैकीं कांहीं लोकांशीं संबंध येणारे आहेत आणि कांहीं बोर्डाच्या ऑफिसव्यवस्थेशीं आणि कामकाजाच्या स्वरूपाशीं संबंध येणारे आहेत. ऑफिस व्यवस्थेशी संबंध आलेल्या कानूंचा विचार सोडून बाकीच्या म्हणजे लोकांशीं संबंध येणाऱ्या कानूंचा विचार आम्ही करणार आहोंत. व तो समजुतीकरितां बाबवार करणार आहोंत.

### बोर्डाची घटना व लायकी

या कायद्याखालीं महत्त्वाची आणि लोकांच्या चिंतेची बाब म्हटली म्हणजे बोर्डाची योजना आणि बोर्डाच्या सभासदांची लायकी. बोर्डाच्या घटनेसंबंधानें मूळ कायद्याचें कलम ४ पाहिलें पाहिजे. बोर्ड एक माणसाचें नेमतां येईल अगर एकापेक्षां अधिक माणसांचेंही नेमतां येईल, त्या बाबतींत कानू असे:—

### एक माणसाचें बोर्ड

एक माणसाचें बोर्ड नेमतांना त्या माणसाची लायकी खालील-प्रमाणें पाहिजे:—“ज्या वेळीं एका माणसाचें बोर्ड असेल त्या वेळीं तो इसम सेकंड क्लास सबजज्ज अगर महालकरी याच्या-पेक्षां कमी दर्जाचा असा नसेल.” म्हणजे सरकारी नोकरांचे बाबतींत जे नियम आहेत त्या नियमाप्रमाणें सेकंड क्लास सबजज्ज अगर महालकरी अगर त्यांच्या वरचा असा सरकारी नोकरी केलेला अगर करीत असलेला असा मनुष्य एक माणसाचें बोर्ड म्हणून नेमला जाणार आहे. ज्या इसमाला या नियमाची कसोटी लागणार नाहीं असा इतर इसम कितीही मोठा असला तरी त्याचा उपयोग होणार नाहीं अगर त्याची नेमणूक होणार नाहीं.

### एकापेक्षा अधिक माणसांचें बोर्ड

मूळ कायद्यामध्यें अशा बोर्डाची घटना पुढीलप्रमाणें आहे.

अ. तीनपेक्षा कमी नाहीं, पांच पेक्षां अधिक नाहीं इतके सभासद असतील.

ब. या बोर्डाचे एक चेअरमन असतील, एक व्हाईस चेअरमन असतील. “ज्या वेळीं चेअरमन अगर व्हाईस चेअरमन गैरहजर असतील त्या वेळीं इतर सभासदांनीं तेवढापुरता चेअरमन अगर व्हाईस चेअरमन निवडावयाचा आहे.”

कानू नं. २ पोट कानू नं. २ अ यामध्यें फक्त चेअरमनचीच व्याख्या ठरविलेली आहे. ती अशी...“सरकारनें ज्याला चेअरमन म्हणून नेमलें तो चेअरमन”. या कानूमध्यें व्हाईस चेअरमनची व्याख्या ठरविलेली नाहीं. त्यामुळें मूळ कायद्यांत तरतूद असून सुद्धां कानूमध्यें जर व्याख्या ठरविली गेली नाहीं तर पुढें व्हाईस चेअरमनची नेमणूक व्हावयाची नाहीं. आणि व्हाईस चेअरमनची जर नेमणूक होत नसेल तर एकापेक्षां अधिक माणसाचें बोर्ड अस्तित्वात येणें कठीण पडणार आहे. तेव्हा येथें सूचना देणें जरूर आहे. व्हाइस चेअरमनच्या नेमणुकीच्या बाबतींत अधिक निःशंकपणा असावा असाही या सूचनेचा हेतू आहे.

**१ सूचना**—कानू नं. २ पोट कानू नं. २ यांतील चेअरमन या शब्दांपुढें “व्हाईस चेअरमन” असे शब्द घालावेत.

### सभासदांची व चेअरमनची लायकी

मूळ कायद्याचे कलम ४ पोट कलम ३ (३) प्रमाणें बोर्डाच्या सभासदांच्या लायकीचे प्रांतिक सरकारनें कानू करून ठरवावयाचे आहेत. कानू नं. ५ पो. का. २ यामध्यें फक्त अशा बोर्डाचे चेअरमन कोण असावेत हे सांगितलें आहे. तेव्हां या कामी पुढील सूचना अवश्य आहेत.

**२ सूचना**—कानू नं. ५ पोट कानू २ यांतील चेअरमन या शब्दापुढें “आणि व्हाईस चेअरमन” असे शब्द दोन ठिकाणीं घालावेत. ज्या वेळीं एकापेक्षा अधिक माणसाचें बोर्ड असेल त्या वेळी त्या बोर्डाचे चेअरमन कोणाला नेमलें जाईल याबद्दल कानू नं. ५ पोट कानू २ मध्यें सांगितलें आहे. ते असे.

अ. ज्यानीं सेकंड क्लास सबजज्ज अगर महालकरी यांच्या पेक्षां कमी नाहीं, अशा दर्जाची ज्यानें जागा धारण केलेली आहे अगर करीत आहे असा इसम अथवा

ब. जो कमींत कमी दहा वर्षे वकिली करीत असेल तो, अथवा

क. इन्कमटॅक्स ऑफिसर अथवा रजिस्टर्ड आकौंटन्ट अशी लायकी चेअरमनच्या जागेकरितां कानू-मध्यें सांगितलेली आहे. त्यामुळें याच माणसास चेअरमनची जागा मिळेल. मग दुसरा कोणी मोठा शेतकरी असो अगर मोठा व्यापारी अगर दुसरें कोणतेंही काम केलेलें असो त्यास ही जागा मिळ-णार नाहीं, म्हणून यांत खालीलप्रमाणें दुरुस्ती होणें जरूर आहे.

**३ सूचना**—कानू नं. ५ पो. का. २ च्या शेवटीं पुढील मज-कूर घालावा. “अगर त्या जिल्ह्यांतील कलेक्टरनें बोर्डाच्या सभा-सदांकरितां अगर असेसर्सकरितां तयार केलेल्या यादींतून प्रांतिक सरकारनें नेमलेला.”

अशी दुरुस्ती झाली तर चेअरमनची आणि व्हाईस चेअरमनची जागा संकुचित स्वरूपामध्यें रहाणार नाहीं. कलेक्टरच्या यादींत कोणाकोणाचा समावेश व्हावा यासंबंधींच्या सूचना पुढें दिलेल्या आहेत.

कानू ६ पोट कानू १ मध्यें कलेक्टरनें असेसर्सची यादी करावी असें सांगितलें आहे. या ठिकाणीं पुढील सूचना देणें जरूर आहे.

**४ सूचना**—कानू नं. ६ पोट कानू नं. १ मध्यें ज्या ज्या ठिकाणी असेसर्स असे शब्द आहेत त्यांच्या पुढें “आणि बोर्डाचे सभासद” असे शब्द घालावेत.

ही सूचना मंजूर झाली तर कलेक्टरला बोर्डाच्या सभासदां-करितां एक यादी करावी लागणार आहे. अगर असेसर्स व सभासद यांची एकच यादी होईल. जर अशी यादी झाली नाहीं तर बोर्डाच्या सभासदाकरितां कोणाचीही नेमणूक करतां येणार नाहीं.

या कानू नं. ६ पोट कानू नं. १ मध्यें ही यादी कलेक्टरनें तयार करावी, व ती सरकारकडे दाखल करावी असें म्हटलें आहे.

ही यादी सर्वांगीण आणि शक्य तितकी निर्दोष व्हावी असें वाटत असेल तर आणखी कांहीं लोकांशीं विचारविनिमय करणें जरूर आहे. म्हणून पुढील सूचना देणें प्राप्त आहे.

**५ सूचना—कानू ६ पो. कानू नं. १ मध्यें कलेक्टर या शब्दापुढें पुढील मजकूर घालण्यांत यावा.**

"त्या जिल्ह्यांतील १ डिस्ट्रिक्ट जज्ज, २ बार असोसिएशनचे अध्यक्ष, ३ जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष, ४ जिल्हा सेंट्रल को. बँक असेल तर त्या बँकेचे अध्यक्ष, ५ जिल्ह्यामध्यें प्रा. को. बँकेचा संबंध येत असेल तर त्या बँकेचे अध्यक्ष आणि ६ सहकारी खात्याचे रजिस्ट्रार यांच्याशीं विचारविनिमय करून असे शब्द घालावेत. या योगानें या यादीमध्यें कोणकोण गृहस्थ असावेत यासंबंधीं वेगवेगळे विचार पुढें येतील आणि वेगवेगळ्या दर्जाचीं माणसें पुढें येतील, व त्या योगानें ही यादी शक्य ती अधिक कार्यक्षम होण्यास मदत होईल. शिवाय एकटे कलेक्टरवर बरी अगर वाईट टिका होण्याचें टळेल.

ही यादी तयार करतांना कोणकोणत्या दर्जाचीं माणसें विचारांत घ्यावींत असें कोठेंही कानूमध्यें सांगितलें नाहीं, त्यामुळें ही यादी प्रथम कलेक्टरच्या मर्जीवरच अवलंबून रहाणार आहे. त्यासाठीं पुढील सूचना देणें भाग आहे.

**६ सूचना—कानू नं. ६ पोट कानू नं. १ च्या शेवटीं** पुढील मजकूर घालण्यांत यावा. या यादीमध्यें खालील दर्जाचे लोक असतील.

१ शंभर रुपये महिन्यापेक्षा कमी नाहीं असा पगार मिळत असलेला अगर ज्यानें मिळविलेला असेल असे खालील प्रकारचे नोकर.

(अ) सरकारचे (ब) सरकारी कायद्यान्वयें स्थापन झालेल्या मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचे (क) स्थानिक स्वराज्य संस्थेतील (ड) रजिस्टर झालेल्या शिक्षणसंस्थातील (इ) आणि सन १९१३ च्या कंपनी ॲक्ट खालील रजिस्टर झालेल्या संस्थांतील.

२ शंभर रुपयांपेक्षा कमी नाहीं इतका इनकमटॅक्स दहा वर्षे भरणारे.

३ ३२ रुपये साऱ्यापेक्षा अधिक सारा १० वर्षे भरणारे.

४ शंभर रुपयांपेक्षा कमी नाहीं, इतक्या साऱ्याची जमीन दहा वर्षे खंडानें करणारे.

५ जिल्हा लोकलबोर्ड, जिल्हा स्कूलबोर्ड, जिल्हा सें. को. बँकेचे डायरेक्टर. बोर्ड, कंपनी ॲक्टखालीं रजिस्टर झालेल्या संस्थांतील डायरेक्टर बोर्ड, म्युनिसिपल बोर्ड, यांमध्यें सन १९३० नंतर कमींत कमी सहा वर्षे जागा धारण करीत असलेला अगर ज्यानें धारण केलेली होती असा.

६ रजिस्टर्ड झालेल्या शिक्षणसंस्थेतील कमींत कमी दहा वर्षे जागा धारण करीत असलेले अगर करीत होते असे १ प्रिन्सिपाल, २ प्रोफेसर्स, ३ व्हा. प्रिन्सिपाल, ४ सुपरिन्टेंडेंट.

७ मुंबई कायदे कौन्सिल अगर मध्यवर्ती कायदे कौन्सिल यामध्यें निदान सहा वर्षे सभासदत्वाची जागा धारण करीत असलेले अगर धारण करीत होते असे.

८ पन्नास रुपयांपेक्षां कमी पेन्शन नाहीं असे पेन्शनर्स.

९ दहा वर्षे प्रॅक्टिस करीत असलेला लीगल प्रॅक्टिशनर

१० रजिस्टर्ड अकाउंटंट, जी व्यवस्था ठरेल त्याप्रमाणें.

११ त्या जिल्ह्यांत अगोदरच ज्युरर्स म्हणून, असेसर्स म्हणून जे. पी. म्हणून, जी माणसें नेमलेलीं असतील त्यांतून निवडलेले.

१२ सरकारनें अगर सरकारमान्य संस्थेनें दिलेले किताब जे निदान दहा वर्षे धारण करीत आहेत असे.

१३ गांवमुनसफीचें काम अगर ऑनररी मॅजिस्ट्रेटचें काम अगर सहकारी खात्यानें नेमलेले जिल्हा ऑर्गेनायझर्स अगर डिव्हिजनल ऑर्गेनायझरचें काम निदान दहा वर्षे करीत असलेले.

१४ मुंबई विश्वविद्यालयाची पदवी ज्यानें निदान दहा वर्षे धारण केली आहे असे.

१५ कलेक्टर यास अगदींच जरूरीचे वाटतील असे.

इतक्या प्रकारची लायकी, लक्षांत घेऊन जर कलेक्टरची यादी झाली तर वेगवेगळ्या दर्जाचे व वेगवेगळ्या शिक्षणाचे लोक यादीमध्यें येतील व बोर्डाच्या कामकाजासंबंधी आज जी चिंता आणि जिज्ञासा आहे ती पुष्कळ अंशानें कमी होईल.

(अपूर्ण)

---

### जर्मन कंपनीविरुद्ध दावा चालूं शकतो

मेहरसिंगनें नॅशनल जनरल इन्शुअरन्स कंपनी ह्या जर्मन कंपनीवर १० हजार रुपयांचा दावा केला होता. ही फर्म जर्मन असून तिची मालमत्ता कस्टोडिअन ऑफ एनिमी प्रॉपर्टीकडे आहे, ह्या मुद्यावर रावळपिंडी येथील सबजज्जानें तो दावा काढून टाकला होता. हायकोर्टाकडे अपील करण्यांत आलें त्यावेळीं न्यायमूर्ति भिडे ह्यांनीं दावा चालविण्यांत यावा असा निवाडा केला. "युद्धापूर्वी घडलेल्या गोष्टीबद्दल प्रस्तुत दावा करण्यांत आलेला आहे; तेव्हां तो चालविण्यांत युद्धाची आडकाठी येऊं शकत नाहीं. १९३९ ची एनिमी प्रॉपर्टी ऑर्डर अशा दाव्यांविरुद्ध नाहीं" असें ते म्हणाले.

### तटस्थ आयरा

ग्रेटब्रिटनच्या सर्वांत समीप असलेलें तटस्थ राष्ट्र म्हणजे आयरा हें होय. तेथील ३० लक्ष लोकसंख्येपैकीं दोनतृतीयांशांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे. उत्कृष्ट बोलणारे व अनेक भाषा जाणणारे म्हणून आयरिश लोकांची ख्याती आहे. आयरिश लोकांचें राजकारण धडाडीचें आहे. हे लोक धार्मिक प्रवृत्तीचे आहेत. इमॉन डी व्हॅलेरा ह्यानें आयरा स्वयंपूर्ण करण्याचा गेलीं कांहीं वर्षे अत्यंत मोठा प्रयत्न चालविला आहे. उद्योगधंदे वाढवून देशाचे, शेतीवरील अवलंबन कमी करण्याची त्याची खटपट आहे. आयर्लंडची मूळ भाषा गॅलिग आहे, तिचें त्यानें पुनरुज्जीवन केलें आहे. संबंद आयर्लंड वेट एकाच पार्लमेंटाचे सत्तेखालीं यावें अशी डी व्हॅलेराची सतत मागणी आहे.

———

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११२—९ |
| ५% १९४३ ... ... ... ... | १०४—९ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९४—० |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०२—२ |
| ३% ( १९६३-६५ ) ... ... ... | ९३—० |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९५-१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) — .. | ११८—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें मांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% ... ... | १३७—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०३-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४०—४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३०—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१३—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६४२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९८—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९९५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ७०२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २१९—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४५-१२ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ... | ४०—२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३८००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१०—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४९—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३६९—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८८०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १३७—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४१-१३-६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६१-१२-६ |


दि

बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना





मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.



दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

" जौहरे हुस्न " ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धीखातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबूत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.


सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ ( A. P. ) अमृतसर-Amritsar.

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खन्याखुन्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हंशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हंशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)



# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.



## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचें तेल
स्थापना १९०९

डोकें शांत रहातें. केंस मजबूत होतात.
गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.

धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. ४)



तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**For Collegians**
**Wooden & Iron Furniture**
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**

*Work-Shop Address:*
153 Kasaba,
Poona 2

*Branch No. 1*
Shevak Quarters,
near Fergusson College
Poona 4

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गांधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ८ जानेवारी, १९४१ अंक २

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या
अशक्ततेवर
रक्तवर्धक
वापरा.
सर्वत्र मिळतें.
—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
आयुर्वेद रसशाळा
पुणें, लि. पुणें ४.

"चिमणा नांव
खोड————"
यांतील मर्म जाणण्यासाठीं
यांतील रहस्य समजावून घेण्यासाठीं



लग्न पहावं करून
★
हा नवयुगचा संपूर्ण मराठी
विनोदी बोलपट पहा.
★
३ रा तुफान हास्याचा आठवडा
★
दिग्दर्शक : विनायक
भूमिका : दामुअण्णा मालवणकर
★
मिनर्व्हा — पुणें
मुंबई, नासिक, कोल्हापूर, सोलापूर
येथें सुरू आहे.

## विविध माहिती

### कागदाच्या आयातीचें नियंत्रण

युद्धापूर्वी कागद नॉर्वे, स्वीडन, जर्मनी व ऑस्ट्रिया ह्या देशांतून हिंदुस्थानांत येत होता. युद्धास प्रारंभ झाल्यानंतर ही आयात बंद पडली व अमेरिकेंतून कागद येऊं लागला. अमेरिकेंतील आपली क्रयशक्ति कायम राखण्याचे हेतूनें हिंदुस्थान सरकारनें तिकडून होणारी कागदाची व कार्डबोर्डची आयात नियंत्रित केली आहे. अमेरिकेंतील दरसाल एक कोटि रुपयांच्या हिंदी खरेदीचें त्यामुळें नियंत्रण होईल. छपाईचा कागद पूर्ववत येऊं शकेल.

### हिंदी युद्ध कर्ज रोख्यांची विक्री
(२८-१२-४० अखेर)

| | रु. |
|---|---|
| बिनव्याजाचे डिफेन्स बॉंडस | २,२५,८३,००० |
| पो. ऑ. सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें | १,७२,५८,००० |

### पुस्तकांची ग्रेट ब्रिटनमधून निर्गत

१९४० सालच्या पहिल्या नऊ महिन्यांत ग्रेट ब्रिटनमधून एकूण सुमारें ४ कोटि रुपये किंमतीच्या पुस्तकांची निर्गत झाली. ऑस्ट्रेलियानें सर्वांत अधिक पुस्तकें घेतलीं. त्याचे खालोखाल अमेरिकेनें घेतलीं. दक्षिण आफ्रिका, आयरा, कॅनडा, हिंदुस्थान व न्यूझीलंड ह्यांचा नंतर अनुक्रम लागतो. शेक्सपिअरचीं पुस्तकें व बायबल ह्यांचा खप सर्वांत अधिक झाला.

### २ कोटि ६० लक्ष पोत्यांची ऑर्डर

इंडियन ज्यूट मिल्स असोसिएशनला हिंदुस्थान सरकारची २ कोटि, ६० लक्ष वाळूच्या पोत्यांची ऑर्डर मिळाली आहे, ती फेब्रुवारी-मार्चमध्यें पुरी केली पाहिजे.

### दारूचा खप वाढविण्यासाठीं प्रयत्न

सिलोनमध्यें आपल्या देशांतील दारूचा खप कसा वाढवितां येईल, ह्यासंबंधीं चौकशी करण्याकरितां दक्षिण आफ्रिकेचा असिस्टंट ट्रेड कमिशनर सिलोनमध्यें गेला आहे.

### कर्नाटक सें. को. बँकेचीं कॅश सर्टिफिकिटें

धारवाड येथील कर्नाटक सेंट्रल को. बँकेनें तीन वर्षे मुदतीचीं, तिच्या रौप्य महोत्सवानिमित्त कॅश सर्टिफिकिटें काढलीं आहेत. २३ नोव्हेंबर, १९४१ रोजीं बँकेची ज्युबिली आहे. प्रत्येक १०० रुपयांस तीन वर्षांनीं १०९ रुपये मिळतील. बँकेचें वसूल भांडवल ५½ लक्ष रुपये असून एकूण खेळतें भांडवल ४३ लक्ष रुपये आहे.

### हिंदुस्थानाकडे निर्गत होणाऱ्या तांदुळावर पट्टी

ब्रह्मदेशांतून निर्गत होणाऱ्या तांदुळावर दर मणास २ आणे २ पै पट्टी घेण्यांत येते. हिंदुस्थानाकडे निर्गत होणाऱ्या तांदुळास ही पट्टी माफ होती. ती माफी ब्रह्मदेशाच्या सरकारनें आतां १ जानेवारी, १९४१ पासून काढून घेतली आहे.

### पेट्रोलच्या खपाचें नियंत्रण

पेट्रोलचा खप नियंत्रित करावा लागलाच तर त्यासंबंधींची तपशीलवार माहिती गोळा केलेली असावी, ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें एक परिषद भरविण्याचें योजिलें आहे. २० जानेवारीचे सुमारास तिची दिल्ली येथें बैठक होईल.

### स्वदेशांतच तयार होणारें अन्न खा.

"शक्य तितकें ग्रेट ब्रिटनमध्यें तयार होणारेंच अन्न खा. बटाटे ग्रेट ब्रिटनमध्यें तयार होतात, ते मुबलक खा. बाहेरून येणाऱ्या कणकेची रोटी करण्यांत येते, तेव्हां ती कमी खा," असा उपदेश अन्नपुरवठ्याचे ब्रिटिश मंत्रि, लॉर्ड वूल्टन, हे रेडिओवरील आपल्या भाषणांत नुकतेच म्हणाले.

### लोखंड व पोलाद ह्यांच्या आयातीस बंदी

हिंदुस्थान सरकारनें लोखंड व पोलाद ह्यांच्या आयातीस बंदी केली आहे.

### १९४० मधील सर्वांत प्रभावी मनुष्य

जागतिक घडामोडींवर सर्वांत प्रभावी परिणाम करणाराची निवड "टाइम" हें अमेरिकन साप्ताहिक दरसाल करीत असतें. १९३८ सालीं हिटलरला व १९३९ सालीं स्टॅलिनला हा मान मिळाला होता. यंदा मि. चर्चिल ह्यांस तो मान मिळाला आहे.

### बँकास सुटी

गुरुवार, ता. ९ रोजीं बकरीद निमित्त बँका बंद राहातील.

### हिंदी कोळशास मागणी

भूमध्य समुद्राचे सभोंवतालच्या युद्धपरिस्थितीचा फायदा हिंदी कोळशांचे खाणीस मिळत आहे: मध्य आशिया व पूर्व आशिया येथील देशांत हिंदी कोळशास मोठी मागणी येऊं लागली आहे.

### मोटारींचें उत्पादन बंद

ग्रेट ब्रिटनमध्यें खासगी वापराच्या मोटारगाड्यांचें उत्पादन बंद ठेवण्यांत आलें आहे. निर्गत करता येण्याजोग्या फक्त ४०० मोटारी ग्रेट ब्रिटनमध्यें शिल्लक आहेत. युद्धापूर्वी २० लक्ष मोटारी तेथें वापरांत होत्या; आतां १४ लक्ष मोटारी वापरांत आहेत. वापरलेल्या गाड्या मिळूं शकतात, परंतु त्यांची किंमतहि चढली आहे.

### छोटेखानी नोटा

ग्रेट ब्रिटनमध्यें २ शिलिंग, २½ शिलिंग व ५ शिलिंग किंमतीच्या चलनी नोटा छापून तयार ठेवलेल्या आहेत. नाणीं कमी पडलीं तर ह्या नोटा प्रचलित केल्या जातील. ग्रेट ब्रिटनमध्यें चांदीचा पुरवठा फार मोठा नाहीं व चांदी खरेदी करण्यासाठी अमेरिकन डॉलर्स खर्चण्याची ही वेळ नाहीं. "हिंदुस्थान सरकारनें ग्रेट ब्रिटनमध्यें व मुंबईंत बरीच चांदी विकली असली तर त्या सरकारजवळ अद्याप बरीच चांदी पडून आहे. तिची साम्राज्यांतर्गत देवघेव करणें सोईचें जाईल व त्यामुळें ग्रेट ब्रिटनच्या परराष्ट्रीय हुंडणावळीसहि ताण पडणार नाहीं" असें एकॉनॉमिस्ट ह्या ब्रिटिश साप्ताहिकानें सुचविलें आहे.

### बँकेचा व्यवहार सकाळींच पुरा करा

आतां दिवस लहान होत चालल्यामुळें ग्रेट ब्रिटनमधील बँकांच्या नोकरवर्गास कामावरून परत जाण्यास अतिशय विलंब होतो. विशेषतः बरेच नोकर दूर अंतरावर रहात असल्यानें सध्याच्या परिस्थितींत बँकांचे कामाचे तास बदलण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. लोकांनीं बँकिंगचे व्यवहार बँका उघडतांच पुरे करावे व उशीरा आलेल्या इतर बँकांवरील चेकसची वसुली बँकांनीं दुसऱ्या दिवशीं करावी, अशी सूचना लंडन क्लिअरिंग बँकर्सच्या कमिटीनें केली आहे. नाहीं तर, बँकांच सायंकाळीं लवकर बंद करणें भाग पडेल.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १४ | ५ महाराष्ट्रांतील स्वदेशी चळवळीचीं स्थित्यंतरें ... | १८ |
| २ हिंदी रुपयाचें सत्यस्वरूप | १५ | ६ गेल्या वर्षीचें आर्थिक समालोचन ... | २० |
| ३ हिंदी शेती ... | १६ | ७ बाजारभावांतील चढउतार | २० |
| ४ स्फुट-विचार ... केसरी-मराठा हीरक महोत्सव-युद्ध परिस्थितीचें स्वदेशी धंद्यास उत्तेजन बँबे को. कार्टेलीं—दिवंगत बाबासाहेब विद्वांस | १७ | ८ शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा ... | २१ |
| | | ९ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... | २२ |
| | | १० निवडक बाजारभाव ... | २२ |

**अर्थ**

बुधवार, ता. ८ जानेवारी, १९४१

## हिंदी रुपयाचें सत्यस्वरूप

### शंकानिरसन

"अर्था" च्या २५।१२।४० च्या अंकांतील 'नवे रुपये' हें सदर वाचून एका जिज्ञासू वाचकास कांहीं शंका आल्या त्यांविषयीं स्पष्टीकरण व्हावें अशी सूचना करण्यांत आल्यावरून खालील खुलासा आम्ही करीत आहों. त्याचा दुसऱ्या अनेक वाचकांस उपयोग होईल असें वाटतें. "रुपया हें प्रमाणभूत नाणें नाहीं" ह्या विधानावर 'मग प्रमाणभूत नाणें कोणतें' अशी मुख्य शंका; इतर प्रश्न आनुषंगिक आहेत. तिचें निरसन असें:—हिंदुस्थानांत सन १८९३ सालापर्यंत रुपयाचें नाणें "प्रमाणभूत" होतें, म्हणजे त्यांतल्या चांदीच्या वजनाइतकी चांदी टाकसाळींत नेऊन दिली असतां अल्पखर्चानें तिचीं रुपयाचीं नाणीं पाडून घेण्याचा हक्क नागरिकांस असे. विशिष्ट वजनाचें आणि कसाचें सोनें अगर चांदी हें प्रत्येक देशांत सर्व मोल मापण्याचें साधन मानण्यांत येतें. कागदाच्या नोटा चलन म्हणून सरकारनें किंवा मध्यवर्ती बँकेनें काढल्या तरी हीं प्रमाणभूत नाणीं त्यांच्या मोबदल्यांत कोणासहि हक्कानें मिळूं शकतात. गेल्या कांहीं वर्षांच्या परिस्थितींत हा हक्क सरकारनें काढून घेतला आहे. परदेशाचें देणें द्यावयाचें असतां व्यापारी हुंड्या बाजारांत मिळाल्या नाहींत किंवा मध्यवर्ती बँकेस त्या पुरवतां आल्या नाहींत तर त्यांसाठी योग्य किंमतीची परिमाणभूत धातू देण्याची जबाबदारी सरकारावर असते. तथापि नित्याच्या व्यवहारांत कागदाचें किंवा तांब्याचें चलन असणें आवश्यक वाटतें आणि त्यानें देवघेवीचाहि कार्यभाग होतो. ह्या कारणानें प्रमाणभूत असलेल्या नाण्यांचा बेताचा संग्रह सरकार किंवा मध्यवर्ती बँक ह्यांनीं संग्रहीं ठेवला असतां काम भागतें. ह्या नाण्यांच्याऐवजी कागदाचें किंवा हलक्या धातूंचें नाणें लोकांनीं वापरलें असतां खर्चांत बचतहि होते. व्यवहाराची सोय आणि सोन्या-चांदीची बचत असा दुहेरी फायदा ह्या व्यवस्थेपासून होतो.

जगांतील सर्व प्रमुख देशांत ही पद्धति मान्यता पावली आहे. हिंदुस्थानांत मात्र १८९३ सालापर्यंत सोन्याच्या नाण्याचे ऐवजीं चांदीचा रुपया प्रमाणभूत मानला जात असे. चांदीचा रुपया बनवून मिळणें आणि रुपयाच्या नाण्याची चांदी वितळवून करणें ह्या गोष्टी कायदेशीर व सोयीच्या असत. परंतु त्या सुमारास कित्येक वर्षें चांदीची किंमत सारखी उतरत चालली होती, ह्यामुळें कमी किंमतीची पण ठराविक वजनाची स्वस्त चांदी टाकसाळींत देऊन तिचे रुपये पाडून घेणें लोकांस शक्य होऊं लागलें. ह्यामुळें विलायती हुंडीचा दर उतरत राहिला आणि लंडनमधलें आपलें वार्षिक देणें देण्यास हिंदी सरकारास अधिक रुपये द्यावे लागून त्याचा खर्च भलताच वाढला. त्यावर उपाय म्हणून लोकांचा चांदीच्या मोबदल्यांत रुपये पाडण्याचा हक्क सरकारनें काढून घेतला आणि व्यवहारांत खेळणाऱ्या रुपयांचें प्रमाण हळुहळु मर्यादित केलें. रुपयांतल्या चांदीची बाजारी किंमत आणि त्या नाण्याची व्यवहारांतली किंमत ह्या दोहोंत जी एकवाक्यता होती ती आतां नाहींशी झाली. रुपया हें नाणें प्रतीक स्वरूपाचें होऊन त्याची अंगभूत धातुगत किंमत उतरली तरी त्याची दर्शनी किंमत तेवढी अबाधित राहिली. ह्याचाच अर्थ असा कीं रुपयाच्या नाण्यास कागदाच्या नोटेचें स्वरूप प्राप्त झालें. पण असलें प्रतीकस्वरूप नाणें, कागदी नोटा किंवा हलक्या धातूंचीं व अल्प किंमतीचीं नाणीं ह्यांचा संबंध कोणत्या तरी प्रमाणभूत नाण्याशीं हवाच. इंग्लंडच्या धर्तीवर सोन्याचें नाणें चालू करून तें प्रमाण कायद्यानें निश्चित करावें असा विचार सरकारनें केला. त्याप्रमाणें प्रत्यक्ष कृति झाली असती तर हिन्दी चलन पद्धति ब्रिटिश नमुन्याची झाली असती. तिकडचा सॉव्हरिन येथें परिमाण बनला असतां आणि त्याच्या प्रमाणांत सर्व प्रकारच्या चलनांच्या किंमती ठरल्या असत्या, सोनें हा धातु परिमाण बनला असता आणि रुपयाच्या नाण्यास ब्रिटिश शिलिंगाचें स्वरूप प्राप्त झालें असतें. पण सोनें हा धातू आणि त्याचें नाणें हें किंमतीचें मान करण्याचा सरकारचा विचार तसाच हवेमध्यें राहिला आणि रुपया मात्र चांदीच्या तुकड्यावर छापलेल्या नोटेसारखा प्रतीकस्वरूप चलन म्हणून राहिला. किती रुपये पाडावे व प्रचलित करावे ही गोष्ट सर्वस्वीं सरकारच्या हातीं असल्यानें, त्यांतल्या चांदीची किंमत कितीहि कमी-अधिक होवो, त्या नाण्याची दर्शनी किंमत निश्चित करणें सोपें झालें. परदेशांशीं होणाऱ्या व्यवहारांसाठी रुपयांच्या मोबदल्यांत लंडनवरच्या हुंड्या देण्याची व्यवस्था सरकारनें केली कीं कार्यभाग होत असल्यानें सोन्याचें नाणें किंवा त्याबद्दल धातूचा संग्रह ह्यांस महत्त्व राहिलें नाहीं. ब्रिटिश चलनांत रुपयाची किंमत अठरा पेन्स असें प्रमाण ठरवून टाकण्यांत आलें आणि त्यास अनुसरून जरूरीप्रमाणें रुपयांची अदलाबदल होण्याची व्यवस्था करण्यांत आली. ठराविक दराची ब्रिटिश पौंडांतली हुंडी हेंच रुपयाचें अंतिम प्रमाण बनलें.

हिंदी चलनाचा संबंध ब्रिटिश पौंडाशी जोडून त्यास ह्याप्रमाणें पौंडावर अवलंबावयास लावणें योग्य नाहीं आणि म्हणून रुपयाचें परिमाण विशिष्ट वजनाचें सोनें कायद्यानें ठरवावें अशी शिफारस हिल्टनयंग कमिशननें सरकारास केली. सोन्याच्या नाण्याची व्यवहारांत आवश्यकता नसल्यानें देशाच्या बाहेर पाठवण्यास पाहिजे असेल तेवढ्या किंमतीच्या सोन्याच्या चिपा ठराविक दरानें सरकारनें खरेदीदारास पुरवाव्या अशी कमिशनची सूचना होती. रुपया व सोनें ह्यांचा मोबदला होऊं शकतो ही गोष्ट हिंदी जनतेच्या लक्षांत ठळकपणानें यावी अशी तजवीजहि सरकारनें करावी असें त्याचें म्हणणें होतें. रुपयाचा संबंध सोन्याशी जोड-

ण्याचें महत्त्व किती आहे ह्याची स्पष्ट कल्पना कमिशनला होती. सोन्याच्या संचयाच्या मर्यादितपणामुळें सोन्याचें नाणें पाश्चात्य देशांतहि कित्येक वर्षे बंद झालें आहे. परराष्ट्रीय देण्या-घेण्यांतच काय तो त्याचा उपयोग करण्याची प्रथा अलीकडे पडली आहे. हिंदी रुपयास आज परिमाण ब्रिटिश पौंडाचेंच आहे आणि त्याच्या किंमतीचा सोन्याच्या किंमतीशी असलेला संबंध जसजसा बदलतो तसतशी रुपयाची परदेशीय किंमत बदलते. सर्व जगांत सोन्यास मान्यता आहे ह्या दृष्टीनें रुपयाचा संबंध प्रत्यक्षपणानें त्या धातूशीं जोडला जावा ही हिंदी लोकमताची कित्येक वर्षांची मागणी आहे. युद्ध-परिस्थितीनें जगांत सर्वत्र चलन-व्यवस्था कृत्रिम करून सोडली आहे आणि सर्व चलनांचा सोन्याशीं नाममात्रच संबंध राहिला आहे. हिंदी रुपया कृत्रिम व प्रतीकप्राय आहे. त्यांत चांदी किती आहे हा महत्त्वाचा प्रश्न नाहीं. देशांत सोन्याचा संचय मोठा असावा आणि त्याचा भरपूर आधार हिंदी चलनास मिळावा आणि तसेंच हुंडणावळीचा दर व्यापार व उद्योगधंद्यांतल्या देण्यास अनुकूल असा असावा ह्या मुख्याच्या गोष्टी आहेत. चलनास सोन्याचा भक्कम आधार असला म्हणजे रुपयांत चांदी किती आहे हा प्रश्न दुय्यम महत्त्वाचा ठरतो. नोटांचा कागद केवढ्या किंमतीचा आहे ह्या प्रश्नाप्रमाणेंच तो निरर्थक आहे. सुवर्णसंचय, रुपयाचा सोन्याशीं प्रत्यक्ष संबंध व हुंडणावळीचा योग्य दर ह्यांवरच हिंदी लोकमतानें विशेष जोर दिला आहे, तो ह्यामुळेंच होय. धातूचें व कागदी चलन हें देवघेवीचें साधन आहे आणि ह्या दृष्टीनेंच त्याकडे मुख्यत्वेंकरून पाहिलें पाहिजे. त्यास भरपूर सोन्याचा आधार असावा आणि त्याच्या संचयाचा विनियोग देशाच्या आर्थिक प्रगतीस पोषक होईल अशा रीतीनें केला जावा ह्याच गोष्टी पहिल्या प्रतीच्या महत्वाच्या आहेत.

---

## हिंदी शेती

### (२)

### गळिताचीं धान्यें : भुइमूग

हिंदी व्यापारी पिकांत गळिताच्या धान्यांस अतिशय महत्त्व आहे. त्या सर्वांत महत्त्वाचें पीक भुइमुगाचें होय. भुइमुगाखाली सुमारें ८० लक्ष एकर जमीन असून त्यांतून सुमारें ३० लक्ष टन भुइमूग निघतो. भुइमुगाची लागवड हिंदुस्थानांत केव्हां व कशी सुरू झाली हें सांगतां आलें नाहीं, तरी १९२४ नंतर ह्याची लागवड झपाट्यानें वाढत गेली, एवढें खरें.

भुइमुगाची लागवड व उत्पादन

| वर्ष | लागवड ( एकर ) हजार | उत्पादन ( टन ) हजार |
|---|---|---|
| १९२९–३० | ५,१७७ | २,१८० |
| १९३०–३१ | ६,०१४ | २,५९२ |
| १९३१–३२ | ५,०८१ | २,१५१ |
| १९३२–३३ | ६,८८७ | २,८४६ |
| १९३३–३४ | ७,५८६ | ३,१८६ |
| १९३४–३५ | ५,१४१ | १,७४० |
| १९३५–३६ | ५,१९७ | २,११४ |
| १९३६–३७ | ६,६६३ | २,७१४ |
| १९३७–३८ | ८,८९८ | ३,५०१ |
| १९३८–३९ | ८,५०६ | ३,२१९ |
| १९३९–४० | ८,११२ | ३,००२ |

चालू युद्धामुळें भुइमुगाचें परराष्ट्रांतील गिऱ्हाइक गेलें आहे व त्या कारणानें बाजारभाव फार खालीं गेले आहेत.

### आळशी

आळशीची लागवड मुख्यतः मध्यप्रांत, संयुक्तप्रांत व बिहार येथें होते. हिंदी शेती पावसावर अवलंबून असल्याकारणानें पाऊस वेळेवर न पडल्यास सर्वच पीक जाऊं नये, ह्यासाठी शेतकरी शेतांत एकापेक्षा अधिक वेगवेगळीं पिकें लावतात. म्हणजे, निदान एकादें तरी पीक निश्चित हातीं येतें. आळशीचें पीक ह्या प्रकारचें आहे, त्याकारणानें त्याच्या लागवडीचा निश्चित अंदाज करणें कठीण जाते.

लागवड, उत्पादन व निर्गत

| वर्ष | लागवड हजार (एकर) | उत्पादन हजार ( टन ) | निर्गत हजार ( टन ) |
|---|---|---|---|
| १९२९–३० | २,८०२ | ३८० | २४८ |
| १९३०–३१ | २,००९ | ३७७ | २५७ |
| १९३१–३२ | ३,३०९ | ४१६ | १२० |
| १९३२–३३ | ३,२९९ | ४०७ | ७२ |
| १९३३–३४ | ३,२६१ | ३७६ | ३८३ |
| १९३४–३५ | ३,४१० | ४२० | २४० |
| १९३५–३६ | ३,४५७ | ३८८ | १६५ |
| १९३६–३७ | ३,६७७ | ४२० | २९४ |
| १९३७–३८ | ३,८९० | ४६१ | २२६ |
| १९३८–३९ | ३,८६९ | ४४२ | ३१८ |
| १९३९–४० | ३,७१३ | ४६७ | ... |

### एरंडी

तुरी व तत्सम पिकांखाली ६० लक्ष एकर जमीन आहे. एरंडीची लागवड कोठेंहि होऊं शकते व त्यास कोणतीहि हवा चालते. निजाम हद्दींत त्याचें पीक मोठें आहे व तेथें इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चतर्फे त्या पिकाचे बाबत संशोधनकार्य चालू आहे. खालील तक्त्यांत ह्या पिकाचा तपशील दिला आहे.

| वर्ष | लागवड ( हजार एकर ) | उत्पादन ( हजार टन ) |
|---|---|---|
| १९२९-३० | १,२८५ | ११६ |
| १९३०-३१ | १,४५७ | १२० |
| १९३१-३२ | १,५८३ | १४६ |
| १९३२-३३ | १,६१७ | १५१ |
| १९३३-३४ | १,५३४ | १४३ |
| १९३४-३५ | १,४४८ | १०५ |
| १९३५-३६ | १,४३८ | १२१ |
| १९३६-३७ | १,४०९ | १२८ |
| १९३७-३८ | १,१४८ | १०४ |
| १९३८-३९ | १,१९९ | १११ |
| १९३९-४० | १,००९ | ९४ |

एरंडीची निर्गत पूर्वी अतिशय मोठ्या प्रमाणावर होत असे, ही आतां फार रोडावली आहे.

निर्गतींत घट

| वर्ष | निर्गत ( टन ) |
|---|---|
| १९३३–३४ | ८१,५५९ |
| १९३४–३५ | ६८,६४९ |
| १९३५–३६ | ५९,९६८ |
| १९३६–३७ | ४३,०८९ |
| १९३७–३८ | ४२,०७९ |
| १९३८–३९ | ७,६२१ |

एरंडीची पेंड हें एक उत्कृष्ट खत आहे व ह्या पिकाच्या किंमतींत सध्या विशेष घट झालेली नाहीं.

---

# स्फुट विचार

## केसरी–मराठा हीरक महोत्सव

केसरी आणि मराठा ह्या वृत्तपत्रांचा हीरक महोत्सव गेल्या आठवड्यांत साजरा झाला. ह्या प्रसंगीं त्यांचेवर चोहोंकडून अभिनंदनाचा वर्षाव झाला त्यावरून त्यांची लोकप्रियता आणि त्यांनीं केलेल्या व चालविलेल्या सार्वजनिक हिताच्या कामगिरी-विषयींची जनतेची हार्दिक गुणग्राहकता सिद्ध होते. केसरी आणि मराठा ह्या पत्रांच्या साठ वर्षांच्या चरित्रांत महाराष्ट्राचाच नव्हे तर सबंध हिंदुस्थान देशाचा राजकीय व सामाजिक इतिहास सारांश रूपानें साठवलेला आहे. वृत्तपत्राच्या धंद्याचे दृष्टीनेंहि केसरीनें उच्च स्थान मिळवलें आहे. त्याच्या यशाची गुरुकिल्ली त्याच्यामागे असलेल्या लोकमान्य टिळकांच्या विशिष्ट व्यक्तित्वांत आणि त्यांच्या परंपरेंत आहे. जाज्वल्य देशाभिमान, हिंदी राष्ट्राच्या उन्नतीविषयींचें उच्च ध्येयवादित्व, राष्ट्रीय ध्येयाच्या सिद्ध्यर्थ कर्तव्य वाटणारा स्वार्थत्याग करण्याची तयारी, लिखाणाच्या मागें असलेली विद्वत्ता आणि त्याचें परिणामकारित्व इत्यादि गुणांच्या समुच्चयामुळें लोकमान्यांच्या हातांत केसरीपत्र विलक्षण रीतीनें प्रभावी व यशस्वी झालें आणि त्यास राष्ट्रीय सार्वजनिक संस्थेचें स्वरूप प्राप्त झालें. त्यांच्यामागें केसरीच्या चालकांनीं आपल्यावर पडलेली जबाबदारी ओळखून त्यांच्या यशाची जिंदगी सुरक्षित राखून तीमध्यें भर घालण्याचा प्रयत्न केला आहे हें त्यांस भूषणावह आहे. केसरी व मराठा पत्रांच्या चालकांचें व संपादकवर्गाचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करतों आणि त्यांच्या हातून उत्तरोत्तर अधिक विस्तृत कामगिरी होऊन तिचा महाराष्ट्रास व सबंद राष्ट्रास वाढता उपयोग होवो असें आम्हीं इच्छितो.

---

## युद्ध परिस्थितीचें स्वदेशी धंद्यांस उत्तेजन

हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचा १९३९–४० सालाबाबतचा वृत्तांत नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत दिलेल्या माहितीमुळें ह्या देशाच्या औद्योगिक परिस्थितीवर युद्धाचे परिणाम होत आहेत, त्यांवर उद्‌बोधक प्रकाश पडला आहे. कित्येक प्रकारच्या युद्ध सामुग्रीचा पुरवठा करण्याचें कार्य हिंदी कारखान्यांवर येऊन पडलें आणि त्यांतल्या उत्पादनाचा विस्तार झाला हें स्वाभाविक आहे. तागाच्या गिरण्या आणि पोलादाचे कारखाने ह्यांच्या मालास पूर्वीच्या वर्षाचे मानानें अधिक मागणी आली. पोलादाचें उत्पादन ११ टक्क्यांनीं वाढून ८ लक्ष टन झालें. देशी कागदाचें उत्पादन २ लक्ष, ३२ हजार टनांनीं वाढलें आणि त्याचें परिमाण १४ लक्ष १६ हजार टनांपर्यंत गेलें. हिंदी खाणींतून निघालेल्या दगडी कोळशाचें परिमाण अडीच कोटि टनांवर चढलें. गेल्या दहा वर्षांत एवढा कोळसा कोणत्याहि सालीं बाहेर निघाला नव्हता. देशी साखरेचें उत्पादन १३-१४ लक्ष टनांपर्यंत वर गेलें. त्याच्या पूर्वीच्या वर्षी हा आकडा सुमारें साडेसात लाख टन एवढाच होता. युद्धामुळें औद्योगिक उत्पादनाचा हा जो विस्तार झाला, त्यास एक महत्त्वाचा अपवाद म्हटला म्हणजे कापसाच्या कापडाचा होय. ह्या धंद्याचें पाऊल पुढें पडण्याचेऐवजी मागेंच हटलें. १९३८–३९ मध्यें हिंदी कापडाच्या गिरण्यांत उत्पादन मोठ्या प्रमाणांत झालें होतें आणि त्यांचा पुष्कळसा माल पडून राहिला होता. ह्या कारणानें उत्पादनाच्या विस्ताराचा प्रश्नच उद्‌भवणें शक्य नव्हतें. मध्यम प्रमाणावरील धंद्यांसहि युद्धपरिस्थितीमुळें उत्तेजन मिळालें. लोकरीच्या कारखान्यांत तयार होणारा सर्व माल सरकारनें उचलला. कमावलेल्या कातड्याची निर्गत पूर्वीच्या वर्षाच्या मानानें पुष्कळच वाढली. कित्येक जातींचा माल बाहेरून येणें बंद झालें किंवा त्यांच्या किंमती वाढल्या ह्या कारणानें त्याच्या उत्पादनास येथें चालना मिळालेली आहे. ह्या रीतीनें युद्ध परिस्थितीचा परिणाम देशी उद्योग-धंद्यांच्या वाढीस सहायभूत झालेला आहे.

---

## बाँबे को–ऑपरेटिव्ह् क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा डिसेंबर १९४० चा अंक प्रसिद्ध झाला आहे. सोसायट्यांची यूनियन्स मार्फत देखरेख ह्या विषयावर क्वार्टर्लीचे प्रस्तुत अंकांत अत्यंत उद्‌बोधक लेख आले आहेत. सध्याची पद्धति काटकसरीचीहि नाहीं व असावी तितकी दोषरहितहि नाहीं. कामाची विभागणीहि नीट झालेली नाहीं. डिस्ट्रिक्ट बोर्ड्स ऑफ सुपरवायझिंग यूनियन्सचें उत्पन्न मर्यादित असल्यामुळें त्यांच्या नोकर वर्गाची स्थिति सुधारणें अशक्य होतें. नोकरीची अशाश्वति हीहि एक महत्त्वाची बाब आहे. मध्यवर्ती बँकांनींच देखरेखीची जबाबदारी पत्करली तर तें सोईचें होईल, असें मत व्यक्त केलें जात आहे. ह्या सर्व प्रश्नांचा विचार त्रैमासिकांतील लेखांत करण्यांत आलेला आहे. मद्रास सहकारी रिपोर्टावरील प्रो. काळे ह्यांच्या लेखाचा दुसरा भाग त्रैमासिकांत प्रसिद्ध झाला आहे. सेंट्रल बँकांच्या बोर्डावर वैयक्तिक भागीदारांचे प्रतिनिधि असण्याचें कारण नाहीं, अशी मद्रास कमिटीची सूचना आहे, तिचा परामर्श प्रो. काळे ह्यांनीं आपल्या लेखांत घेतला आहे. बडोद्यांतील शेतीच्या बँकांची माहिती "एक सहकारी" लेखकानें दिली आहे. श्री. शामण्णा ह्यांनीं आपल्या लेखांत सहकारी चळवळींतील सेंट्रल बँकांच्या महत्त्वाचें वर्णन केलें आहे. अंकांत नेहमींचीं उपयुक्त सदरें आहेतच.

---

## दिवंगत बाबासाहेब विद्वांस

केसरी-मराठा पत्राचे व्यवस्थापक श्री. बाबासाहेब विद्वांस ह्यांच्या मृत्यूमुळें महाराष्ट्रीय वृत्तपत्रांच्या धंद्याची मोठी हानि झाली आहे. वृत्तपत्रीय धंद्याचा त्यांचा अनेक वर्षांचा अनुभव, त्यांची निरलस उद्योगी वृत्ती आणि त्यांची स्वकर्तव्यावरील दृढ निष्ठा ह्यांचे योगानें बाबासाहेबांची केसरी–मराठा पत्रांच्या छापखान्यावर व कचेरीवर विलक्षण छाप असे. ह्या पत्रांवर अनेक संकटें आलीं असतां त्यांमधून त्यांस पार पाडण्यांत बाबासाहेबांनीं शिकस्त करून त्यांच्या प्रगतीस हातभार लावला. लोकमान्य टिळक आणि त्यांचें कुटुंब ह्यांस त्यांनीं सर्व तऱ्हेनें आधार दिला. त्यांची वृत्ति अखेरपर्यंत उल्हसित व निश्चयी असे आणि स्वतःच्या कामाच्या मर्यादेचे बाहेर ते सहसा जात नसत, ह्यामुळें सार्वजनिक जीवनांत लोकांस त्यांचा विशेष परिचय झाला नाहीं. तथापि केसरी–मराठा संस्थेस त्यांचें मोठें सहाय झालें आहे. त्यांच्या आत्म्यास ईश्वर शांति देवो.

## महाराष्ट्रांतील स्वदेशी चळवळीचीं स्थित्यंतरें

स्वदेशी चळवळीचे द्रष्टे, प्रणेते व कार्यकर्ते महाराष्ट्रांतच सर्वांच्या आधीं निघाले असून त्यांच्या योगानें महाराष्ट्रांत व्यवसायात्मक वातावरण उत्पन्न झालें. आर्थिक व्यवहार व औद्योगिक संस्था यांवर पांढरपेशा महाराष्ट्रीयांची सत्ता नसल्यामुळें बेकारीस आळा घालणें कठीण झालें. अलीकडे ही स्थिति बरीच पालटली आहे. तथापि मुंबई शहरांतील व्यापारांत व उद्योगधंद्यांत महाराष्ट्रीयांनीं अधिक प्रमाणांत शिरल्याशिवाय महाराष्ट्राचा उद्धार होणार नाहीं.

पाश्चात्य राष्ट्रें आणि जपान यांच्या मानानें हिंदुस्थान देश उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या बाबतींत मागासलेला आहे आणि ह्यासंबंधांत प्रगति घडवून आणण्याचे प्रयत्न, चर्चा, प्रचार व व्यवहार या मार्गांनीं आज दोन पिढ्यांचे वर हिंदी पुढाऱ्यांनीं चालवले आहेत. असमाधानकारक आर्थिक परिस्थिति, शेतीच्या धंद्याची दुःस्थिति, सामान्य जनतेची हलक्या दर्जाची राहाणी, सुशिक्षित वर्गांत वाढती बेकारी, कारखाने व व्यापारव्यवसाय ह्यांची मंद गति इत्यादि औद्योगिक मागसलेपणाचीं लक्षणें हिंदुस्थानच्या सर्वच विभागांत कमी अधिक प्रमाणांत दिसून येत आहेत; तथापि इतर प्रांतांचे बरोबरीनें महाराष्ट्राचें पाऊल पुढें पडत गेलेलें नाहीं अशी जी सामान्य समजूत आहे तींत पुष्कळ तथ्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आर्थिक उन्नतीच्या बाबतींतली महाराष्ट्रीय समाजाची उणीव हा नेहमीच्या चर्चेचा विषय आहे. उद्योगधंदे आणि व्यापार आधुनिक पद्धतीनें आणि मोठ्या प्रमाणावर अलीकडे हिंदुस्थानांत चालत आहे पण त्या क्षेत्रांत महाराष्ट्रीयांस मानाचें स्थान नाहीं ह्याची विचारी लोकांस खंत वाटत आहे. महाराष्ट्रांत स्वार्थत्याग आहे, तीव्र बुद्धि आहे, उत्तम शिक्षणप्रसार आहे, संस्कृतीचा अभिमान आहे, राष्ट्रीय प्रगतीची प्रबळ इच्छा आहे, पण कारखाने, धंदे, व्यापार, मोठ्या प्रमाणावरील शेती इत्यादि संपत्तीचीं साधनें महाराष्ट्रीयांच्या हातीं नाहींत, ह्या कारणानें त्यांची आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांतहि कुंचंबणा होत असल्याची ओरड वारंवार ऐकूं येते.

सांपत्तिक प्रगतीच्या बाबतींत महाराष्ट्र स्वतः मंदगति असला तरी मंदौत्सुक्य नाहीं आणि हिंदी राष्ट्राचें औद्योगिक धोरण प्रगतिपर करण्याचे कामीं महाराष्ट्रीय नेत्यांनीं पुढाकार घेतला आहे ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. इंग्लंडच्या खुल्या व्यापाराच्या तत्त्वाच्या दडपणाखालीं हिंदुस्थानांत सरकारी आर्थिक धोरण देशी उद्योगधंद्यांच्या प्रगतीस पोषक होऊं शकलें नाहीं. परदेशी मालास ह्या देशांत मुक्तद्वार असल्यामुळें येथील जुने उद्योगधंदे अवनतीच्या घसरगुंडीस लागले आणि आधुनिक पद्धतीच्या कारखान्यांस वाव मिळूं शकला नाहीं. युरोपांत, अमेरिकेंत आणि आशियामध्यें जपानांत खुल्या व्यापाराच्या ब्रिटिश धोरणास राष्ट्रीय सरकारांनीं घाव्यावर बसवलें आणि आपल्या लोकांस आधुनिक पद्धतींचे व्यवसाय चालवण्यास उत्तेजन दिलें. परदेशांतून येणाऱ्या मालावर जकाती बसवून त्याच्या आयातीस प्रतिकूल अशी परिस्थिति निर्माण करणें आणि त्या प्रकारचा माल स्वदेशांत निघण्यास अनुकूल वातावरण उत्पन्न करून त्यासाठीं आवश्यक त्या सवलती देणें, ही औद्योगिक संरक्षणाची सर्वमान्य पद्धति आहे. हिंदुस्थान सरकारच्या हातून ही राष्ट्रीय कामगिरी होण्याची शक्यता न दिसल्याकारणानें ती हिन्दी जनतेच्या पुढाऱ्यांस हातीं घ्यावी लागली. विचार, प्रचार आणि आचार असें त्रिविध प्रकारचें हें कार्य होतें आणि त्यांत महाराष्ट्रीय पुढारी अग्रस्थानीं होते ही महत्त्वाची गोष्ट येथें नमूद केली पाहिजे. स्वतः स्वदेशी माल वापरणें, त्याचेविषयीं लोकांचीं मनें वळवणें आणि देशी उद्योगधंदे स्थापण्यास सहाय्य करणें हीं तिन्हीं कामें त्यांनीं आघाडीस जाऊन केलीं हें महाराष्ट्रास भूषणावह आहे.

### स्वदेशीचे पाहिले द्रष्टे

स्वदेशी चळवळीचा इतिहास सांगण्याचें हें स्थळ नाहीं. तिचा पुरस्कार महर्षि दादाभाई नौरोजी, बाबू रमेशचंद्र दत्त इत्यादि अखिल भारतीय पुढाऱ्यांनीं केला. परंतु स्वदेशीचे पहिले द्रष्टे, प्रणेते व कार्यकर्ते महाराष्ट्रांतच निघाले, हें येथें विसरतां कामा नये. सार्वजनिक काकांची ह्या संबंधांतली निष्ठा व कार्य हीं सुप्रसिद्ध आहेत. पन्नास वर्षांमागें न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं खुल्या व्यापाराचें आणि अनियंत्रित वैयक्तिक स्पर्धेचें अर्थशास्त्रीय तत्त्व हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत लागू पडत नाहीं हें विद्वत्ताप्रचुर विवेचनाच्या सहाय्यानें सिद्ध करून दाखवलें आणि भारतीय अर्थशास्त्राची स्थापना केली. तसेंच औद्योगिक परिषदा व प्रदर्शनें ह्यांचा व्यवस्थित उपक्रम करून त्यांनीं व्यावहारिक स्वदेशीस उत्तेजन दिलें. श्री. नागपूरकर, श्री. माधवराव नामजोशी, इत्यादींनीं ह्याच क्षेत्रांत कार्य केलें. कित्येक औद्योगिक संस्था व धंदे त्यांच्या नेतृत्वामुळें निघाले आणि महाराष्ट्रांत व्यवसायात्मक वातावरण पसरलें. रे इंडस्ट्रिअल म्यूझियम् हें त्या काळच्या ह्या प्रयत्नांचें दृश्यफल आहे. श्री. अंताजी दामोदर काळे ह्यांनीं पैसाफंडाबाबत अविरत खटपट केली आणि महाराष्ट्रीय जनतेनें त्यांच्या प्रयत्नांस उत्तेजन दिलें तें स्वदेशीच्या प्रेमामुळेंच होय. काचेचा स्वदेशी धंदा ह्या देशांत दृढमूल होण्यास पैसाफंड काचशाळेचा झालेला उपयोग सर्वमान्य आहे. लोकमान्य टिळक, नामदार गोखले व रा. ब. ग. व्यं. जोशी ह्यांच्यासारख्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं स्वदेशीला भक्कम पाठिंबा दिल्यानें सर्व हिंदुस्थानभर त्या चळवळीस प्रोत्साहन मिळालें. 'केसरी'नें स्वदेशीचा पुरस्कार निःसीम निष्ठेनें आणि विलक्षण चिकाटीनें प्रथमपासून केला आहे ही गोष्ट महाराष्ट्र विसरणार नाहीं.

महाराष्ट्रांतील स्वदेशी चळवळीच्या इतिहासाच्या पहिल्या कालखंडांत कित्येक लहान-मोठे धंदे व संस्था स्थापन झाल्या, त्यापैकीं कांहीं आजहि विद्यमान आहेत. तथापि कित्येक वर्षें ही चळवळ कल्पनामूलक, प्रचारात्मक व शैक्षणिक अशीच राहिली. आमच्या पुस्तकी शिक्षणास शास्त्रीय, व्यापारी व हस्तव्यवसायात्मक वळण लावलें जाण्याची भाषा सर्वत्र ऐकूं येत होती आणि प्रिन्सिपॉल गोळे ह्यांच्या "ब्राह्मण आणि त्यांची विद्या" ह्या पुस्तकांत व्यक्त झालेल्या विचारांचा प्रतिध्वनि मधून मधून ऐकूं येत होता. तरीहि नवीन उद्योगधंद्यांत भांडवल घालणें, नवीन तऱ्हेचा माल तयार करणें, व्यापारव्यवसायांच्या निरनिराळ्या शाखांत प्रवेश व प्रगति करणें ह्या गोष्टी पांढरपेशा वर्गाच्या हातून घडल्या नाहींत. व्यापार आणि धंदे यांस हा वर्ग पारखा होता. मध्यम स्थितींतील लोकांच्या आवडीनिवडी व गरजा मात्र झपाट्यानें बदलत चालल्या होत्या पण त्यांचें समाधान करण्याचें उत्पादनसामर्थ्य महाराष्ट्रांत त्या मानानें उत्पन्न झालें नाहीं. कापड, साखर इत्यादि स्वदेशी मालच झीज सोसूनहि

वापरावयाचा महाराष्ट्रीयांनीं निश्चय केला; पण तो माल स्वतः तयार करण्याची त्यांची तयारी नव्हती. विमा उतरणें, बँकिंगचा व्यवहार करणें, मालाची घाऊक खरेदी-विक्री करणें ह्या बाबतींत महाराष्ट्रीय परावलंबी होते. सुशिक्षित लोकांचा धंदे व व्यापार ह्यांत हात मुठीच नव्हता असें म्हटलें तरी चालेल आणि त्यांमध्यें बेकारी मात्र वाढत चालली. आर्थिक व्यवहार व औद्योगिक संस्था ह्यांवर ज्यांची सत्ता, त्यांचेच हातीं नोकरी व काम मिळवून देण्याचा अधिकार असणें स्वाभाविक होतें; आणि ही सत्ता पांढरपेशा महाराष्ट्रीयांच्या हातीं नसल्यानें बेकारीस आळा घालणें कठिण झालें. पांढरपेशा वर्ग अजून सरकारी नोकऱ्यांमागे होता. जुन्या पद्धतीनें उद्योगधंदा करणारांचें कसेंबसें चाललें पण ज्यांस आर्थिक व्यवसायांत मागणी नाहीं अशा पदवीधरांचें काय होणार? जुन्या सवयीमुळें महाराष्ट्रीयांचे आचार-विचार झपाट्याच्या औद्योगिक प्रगतीस अनुकूल नव्हते आणि रोजचीं लिखाणें व भाषणें ह्यांवर बौद्धिक व पुस्तकी छाप अजूनहि राहिला आहे. महाराष्ट्राची सर्वांगीण प्रगति होण्यास त्यांतील बुद्धिमान् लोकांनीं जुन्या चाकोरीच्याबाहेर जाणें आवश्यक होतें; पण तसें झालें नाहीं. स्वसंस्कृतिरक्षण आणि बौद्धिक व्यवसाय ह्या गोष्टी प्रत्येक समाजास अत्यंत महत्त्वाच्या आहेत आणि या बाबतींत महाराष्ट्रानें आपलें अग्रेसरत्व सोडलें नाहीं ही अभिमानाची गोष्ट आहे यांत शंका नाहीं. तथापि आर्थिक संपन्नता हें संस्कृतीचें महत्त्वाचें अंग आहे आणि संपत्तीचीं साधनें हातीं नसणें हें सामाजिक वैगुण्य आहे हें विसरतां कामा नये. जुन्या पद्धतींत वाढलेल्या लोकांच्या आचार-विचारांत बदल होणें कठिण असतें, पण बेकारीचा हिसका सोसावा लागत आहे तो तरुण पिढीस. ह्या कारणानें आर्थिक प्रश्नानें आज उग्र स्वरूप धारण केलें असून जुन्या पिढीतहि चिंता उत्पन्न केली आहे. पण ही स्थिति पालटण्याचीं चिन्हें अलीकडे दिसूं लागलीं आहेत ही गोष्ट उत्तेजनकारक आहे. धंदे व व्यापार यांचेवांचून तरणोपाय नाहीं ह्याच्या जाणिवेनें विधायक कृतीस प्रारंभ झाला आहे. (अपूर्ण)

" केसरी "च्या हीरकमहोत्सव विशेषांकांतील प्रो. वा. गो. काळे ह्यांचा लेख.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९४० अखेर संपलेल्या वर्षी, गेल्या वर्षातील ८ लक्ष, ८ हजार रुपये शिलकी नफा धरून, एकूण ३८ लक्ष ५५ हजार रुपये नफा झाला. जून, १९४० अखेरच्या सहामाहीचे ६% करमाफ इंटेरिम डिव्हिडंड वाटले होते. आतां दुसऱ्या सहामाहीचे ८% करमाफ डिव्हिडंड वाटण्यांत येणार आहे. म्हणजे, वर्षाचे ७% डिव्हिडंड पडले. भागीदारांस ह्याशिवाय २% बोनसहि देण्यांत यावयाचा आहे. नफ्यांतून वरीलप्रमाणें वाटणी करण्याचा डायरेक्टरबोर्डाचा विचार आहे.

### बँक ऑफ इंडिया, लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९४० अखेर संपलेल्या वर्षी, गेल्या वर्षातील ८ लक्ष, ८६ हजार रुपये शिलकी नफा धरून, एकूण २८ लक्ष, ४५ हजार रुपये नफा झाला. जून, १९४० अखेरच्या सहामाहीचे ११% करमाफ इंटेरिम डिव्हिडंड वाटलें होतें; आतां दुसऱ्या सहामाहीचे पुनः ११% करमाफ डिव्हिडंड वाटण्यांत येणार आहे. म्हणजे, सबंध वर्षाचें ११% डिव्हिडंड झालें. वरीलप्रमाणें वाटणी करण्याचा डायरेक्टरबोर्डाचा विचार आहे.


दि

बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो

बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी

लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट

पुणें शाखा — डेक्कन जिमखाना






मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.



दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

" जौहरे हुस्न " ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धीखातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबूत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ता:—लंडन कमर्शिअल कंपनी

पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर-Amritsar.

## गेल्या वर्षाचें आर्थिक समालोचन

(१)

दरसाल प्रमाणें मुंबई येथील शेअर, स्टॉक व फिनॅन्स ब्रोकर्स मेसर्स आर. आर. नावर आणि कंपनी ह्यांनीं १९४० मधील घडामोडींचा आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. गेलें वर्ष हें अत्यंत आणीबाणीचें गेलें. हिंदुस्थानांत औद्योगिक चलती होईल व शेअर्सचे भाव चढतील, ही अपेक्षा फोल ठरली. सर्व देशांतील लष्करी खर्चांत वाढ झाली व त्यामुळें औद्योगिक उत्पादन वाढलें, तरी गेल्या वर्षी हिंदी परिस्थिति फारशी सुधारली नाहीं. सध्याची युद्धविषयक वार्ता आतांपर्यंतपेक्षा अतिशय समाधानकारक आहे. अमेरिकेचें ग्रेटब्रिटनला प्रभावी रीतीनें सहाय मिळूं लागलें आहे. ग्रेट ब्रिटनचा रोजचा युद्धखर्च ८½ कोटि रुपयांवरून २४ कोटि रुपयांवर गेला आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या युद्धप्रयत्नांस हिंदुस्थानाची सर्व प्रकारांनीं मदत व्हावी ह्या दृष्टीनें डिफेन्स ऑफ इंडिया नियमांखाली आर्थिक व्यवहार नियंत्रित करण्यांत आले व त्यामुळें बाजारांत भरमसाट चलबिचल होण्यास प्रतिबंध झाला.

वर्षाचे प्रारंभींच कपाशीचे भाव घसरले व जादा नफ्यावरील कराचे घोषणेनें त्यास अधिक घसरगुंडी लागली. पुढें मे व जून मध्यें युरोपांतील प्रमुख देश जर्मनीच्या ताब्यांत गेले व सर्व मालाचे बाजारभाव एकदम खाली गेले. लवकरच ग्रेटब्रिटनच्या यशस्वी प्रतिकारानें बाजार सुधारले व विश्वासाचें वातावरण निर्माण झालें. ग्रेटब्रिटन व त्याचीं दोस्त राष्ट्रें ह्यांस मालाचा पुरवठा चालू रहावा ह्याकरितां हिंदुस्थान सरकारनें अगदी प्रारंभींच हिंदुस्थानचा तटस्थ राष्ट्रांशीं चालणारा व्यापार नियंत्रित केला, परंतु वर्षाचे मध्याचे सुमारास सबंध मध्ययुरोपच शत्रुपक्षाचे हातीं गेला. माल वहातुकीस अडचण भासूं लागली व केप ऑफ गुड होपला वळसा घालण्याचा मार्ग आगबोटींस अवलंबावा लागला. त्याकारणानें निर्गत व्यापारांत थोडी घट झाली. हिंदुस्थानाचें सुमारें ३१ कोटि रुपयांच्या निर्गत व्यापाराचें नुकसान झालें असावें, असा अंदाज आहे. कपास, ताग, गळिताचीं धान्यें, इत्यादि पेरणाऱ्या शेतकऱ्यांस त्यामुळें विशेष झळ लागली. शेतीच्या मालाची निर्गत कमी झाली तरी तयार मालाची निर्गत पुष्कळच वाढली. परदेशांतून हिंदुस्थानांत माल येणें अवघड झालें व त्यांतच हिंदुस्थानाचें परराष्ट्रांकडूनचें येणें युद्ध प्रयत्नासाठीं कायम राखण्याचें व त्या क्रयसाधनाचा उपयोग नियंत्रित करण्याचें धोरण सरकारनें अंगिकारलें. आयात अर्थातच रोडावली. यंत्रसामुग्रीच्या आयातीच्या अडचणीमुळें हिंदी कारखानदारांस थोडा त्रास झाला; बाकी विशेष प्रतिकूल परिणाम झाला नाहीं. शक्य तितक्या आगबोटी हिंदुस्थानाचे संरक्षणासाठीं उपयोगांत आणण्यांत आल्या व वहातुकीचे दरहि वाढले, त्यामुळें अंतर्गत व्यापार कमी झाला.

पैशाचा पुरवठा स्वस्त व मुबलक राहिला. बँक रेट ३% कायम होता. बँकांच्या रिझर्व्ह बँकेकडे ८ डिसेंबर, १९३९ रोजीं १४¾ कोटि रुपयांच्या ठेवी होत्या, त्या ६ डिसेंबर, १९४० रोजीं ४८¾ कोटींवर गेल्या व शेड्यूल्ड बँकांजवळील ठेवींची रकम २४६ कोटींची २७७ कोटि झाली. व्याजाचे दर चढूं न देण्याचें सरकारचें वाजवी धोरण आहे. रेल्वेचे दरांत वाढ, साखरेवरील एक्साइज पट्टींत वाढ, इन्कम टॅक्सवर सरचार्ज, जादा नफ्यावरील कर, इत्यादि दिशांनीं सरकारनें करांचें उत्पन्न वाढवलें.

## बाजारभावांतील चढउतार

सन १९४० मध्यें शेअर्स व कर्जरोखे ह्यांच्या किंमतींत चढउतार कसा झाला, हें खालील तक्ता दर्शवितो :—

| | १९३९ अखेर (२३-१२-३९) | १९४० सर्वांत अधिक | १९४० सर्वांत कमी | १९४० अखेर (२०-१२-४०) | वाढ अगर घट |
|---|---|---|---|---|---|
| बाँबे डाइंग | ११३०-१ | १२१२-८ | ८६०-० | १०४८-१२ | - ८१-४ |
| सेंचुरी | ४१३-८ | ४३४ | २५० | ३६७-८ | - ४६-० |
| कुलाबा | २१६-८ | २३० | १२५ | १६७-८ | - ४९-० |
| गोकाक | २३१-० | २५१-८ | १७० | २०९-८ | - २१-८ |
| कोहिनूर | ४५०-० | ४६६ | ३११ | ३८५-० | - ६५-० |
| न्यू ग्रेट | ४६२-० | ४९७-८ | ३१० | ३८४-० | - ७८-० |
| सिंप्लेक्स | १३५-८ | १४८ | ९० | १०१-० | - ३४-८ |
| स्वदेशी | ३४६-० | ३९३ | २१५ | १६४-० | - ८२-० |
| बाँबे ट्रामवे | १३१-८ | १३४ | १२२ | १३१-० | - ०-८ |
| आंध्र व्हॅली | १९९०-० | १६५७-८ | १४३५ | १६३५-० | +१४५-० |
| टाटा हायड्रो | १५५-८ | १७८ | १४७ | १७५-० | + १९-८ |
| टाटा पॉवर | १३७६-४ | १५२७-८ | १२१५ | १५००-० | +१२३-१२ |
| टाटा स्टील ऑर्डि. | ४१५-८ | ४३६ | ३०५ | ३७१-० | - ४४-८ |
| टाटा स्टील डि. | २२१२-८ | २३९० | १६०० | १८९०-० | -३२२-८ |
| बेलापूर | २५८-० | २६५ | १६५ | २१८-० | - ४०-० |
| असोसिएटेड सिमेंट | १३८-८ | १४० | १०७-८ | १४०-० | + १-८ |
| इंपीरिअल बँक | १४९७-८ | १५८५-० | १४१२-८ | १५८५-० | + ८७-८ |
| रिझर्व्ह बँक | १०७-० | ११०-४ | ९७ | १०५-४ | - १-१२ |
| सेंट्रल बँक | ३३-१४ | ४०-६ | ३१ | ४०-६ | + ६-८ |
| न्यू इंडिया विमा | ३५-२ | ४०-४ | ३३ | ४०-० | + ४-१४ |
| ३½% रोखे | ८७-१० | ९५-७ | ८४-१२ | ९४-० | + ६-६ |
| ५% १९४५-५५ रोखे | ११०-६ | ११२-१० | १०४-० | ११२-६ | + २-० |
| ४% १९६०-९० रोखे | १०२-४ | १०९-० | ९८-१२ | १०७-८ | + ५-४ |

**डॉ. एन. आर. राजोपाध्ये**
यांचे
ॲशगोल or पौष्टिक पिल्स घ्या. किंमत १२ आ. फक्त
सोल एजंट: "वेलणकर वनौषधालय", तुळशीबाग रस्ता, पुणें.
एजन्सी देणें आहे. एक आण्याचा स्टँप पाठवून विचारावें.

डॉ. एन. आर. राजोपाध्ये यांचे खास देखरेखीखालीं चाललेलें
**"वेलणकर वनौषधालय"**
येथें सर्व तऱ्हेच्या वनस्पति व सिद्धौषधी मिळतात व १ पैशापासून सिद्ध औषधीपर्यंत मिळतात. हें पुण्यांतील पहिलेंच दुकान होय. येथें रोगी तपासून औषध देण्याचीही सोय आहे. व दम्यावर दर रविवारीं मोफत औषध दिलें जातें. उघडण्याची वेळ:-सकाळीं ८॥ ते १२ व दुपारीं ३॥ ते ८ पर्यंत.
पत्ता : "वेलणकर वनौषधालय" तुळशीबाग रस्ता, पुणें.

## शेतकऱ्यांच्या कर्जफेडीच्या कायद्याखाली प्रसिद्ध केलेले कानू आणि त्यासंबंधानें सूचना (२)

लेखक—विनायक गणेश तिखे

### कलेक्टरची यादी व सरकारचा अधिकार

कलेक्टरनें तयार केलेली यादी, सरकारकडे दाखल व्हावयाची आहे व अशी यादी दाखल झाल्यानंतर त्या यादींतील नांवें कमी करणें, अगर त्यांमध्यें अधिक नांवें दाखल करणें, याबद्दल प्रांतिक सरकारनें आपल्याकडे अधिकार ठेवला आहे, " (पहा, कानू नं. ६ पो. कानू नं. २)." या अधिकारामुळें कलेक्टरच्या यादीचा विचार सरकारकडून व्हावयाचा आहे.

### बोर्ड आणि बोर्डाकरिता संस्था

मूळ कायद्याचें कलम ४ पोट कलम २ ब, प्रमाणें एकाद्या संस्थेला बोर्ड म्हणून नेमतां येईल.

या संस्था कोणत्या असाव्यात, याचा विचार कानू नं. ५ पो. कानू नं. ३ यामध्यें केला आहे. खालील संस्था लायक ठरविल्या आहेत.

(१) सन १९१३ सालच्या कंपनी ॲक्ट खाली नोंदलेली संस्था, (२) सन १९१२ अगर १९२५ च्या सहकारी कायद्याखाली नोंदलेली संस्था, (३) सन १८६० च्या सोसायटीज ॲक्ट खाली नोंदलेली संस्था अशी मान्यता दिलेली आहे. यांत नवीन संस्था सुचविण्याचें कारण दिसत नाहीं, परंतु या संस्थांतील निवड कशी करावी या संबंधीं सुचविलें तर गैरवाजवी दिसणार नाहीं. ही सूचना अशीः—

८ सूचना—'कानू नं. ५ पो. कानू, नं. ३ च्या शेवटीं यापुढील मजकूर घालावा, " आणि ज्या क्षेत्राकरितां बोर्ड नेमावयाचें असेल त्या सर्व क्षेत्रामध्यें प्रत्यक्ष काम करीत असल्याशिवाय आणि शेतकऱ्यांच्या व्यवहाराशीं प्रत्यक्ष संबंध असल्याशिवाय नेमण्यांत येणार नाहीं." ही सूचना मंजूर झाली म्हणजे लगेच एकाद्या लहानसान संस्थेची अगर संबंध नसणाऱ्या संस्थेची नेमणूक होणार नाहीं. या सूचनेची व्यवहाराच्या दृष्टीनें विशेष जरूरी उत्पन्न होणार नाहीं, परंतु नियमाच्या दृष्टीनें जरूरी आहे.

### बोर्ड स्थापन झाल्याचें जाहीर करण्याची रीत

ही रीत कानू नं. ४ मध्यें दिली आहे. ती अशीः—सरकारी गॅझिटांत प्रसिद्ध होईल त्याची एक एक प्रत कलेक्टर, मामलेदार, महालकरी यांच्या कचेरींत, सबजज्ज कोर्टांत प्रसिद्ध केली जाईल, गांवची चावडी, अगर प्रमुख ठिकाण, येथें डकविली जाईल. गांवामध्यें ढोलें वाजवून अगर सोयीस्कर अशा दुसऱ्या रीतीनें जाहीर केली जाईल. तसें त्या क्षेत्राशीं संबंध येणाऱ्या वर्तमानपत्रांत निदान चार वेळां बोर्ड स्थापन झाल्यापासून एक महिन्यांत कलेक्टर प्रसिद्ध करील.

अशी ही रीत आहे. या रीतीकडे पाहिल्यास आणखी कांहीं सूचना करण्याचें कारण नाहीं, मात्र या रीतीची अंमलबजावणी चांगल्या रीतीनें होते किंवा नाहीं त्याच्याकडे लोकांनीं लक्ष देणें जरूर आहे.

### बोर्डाच्या सभेचीं ठिकाणें

यासंबंधींचा नं. ८ चा कानू असा आहेः—प्रत्येक बोर्डाकरिता सरकारनें ठरविलेलें एक ऑफिस असेल, आणि त्या ठिकाणीं, बोर्डाच्या सर्वसाधारण सभा भरल्या जातील. संबंध येणाऱ्या पक्षकारास नोटीस देऊन आणि पहिल्या वर्गाच्या सबजज्जाची संमति घेऊन बोर्डाच्या अधिकारांतील कोणत्याहि ठिकाणीं बोर्डाला सभा भरवितां येतील, असा नियम आहे. आणि तो पुरेसा आहे. जर बोर्डाच्या या फिरतीच्या सभा पक्षकारास त्रासदायक वाटत असतील तर त्यास पहिले वर्गाच्या सब-जज्जाकडे अर्ज करतां आला पाहिजे, तशी सोय कानूमध्यें नाहीं, म्हणून त्यासाठीं पुढील सूचना दिली पाहिजे.

८ सूचना—कानू नं. ८ च्या शेवटीं पुढील मजकूर अधिक घालावा " मात्र ही संमति देतांना त्या बाबतींत कोणाची कांहीं तक्रार असल्यास त्याचा विचार त्या पहिला वर्ग सब-जज्जानें करावा.

### बोर्डाच्या सभेचें कामकाज

प्रत्येक बोर्डाच्या सभेचें अध्यक्षस्थान चेअरमन स्वीकारतील आणि कामकाज चालवितील, असा कानू नं. ९ आहे. हा कानू मूळ कायद्याचें ४ पोट कलम ६ यांस थोडेसा विसंगत होणारा आहे. या कलमामध्यें, चेअरमनच्या अभावी व्हाईस चेअरमन काम चालवितील, चेअरमन आणि व्हाईसचेअरमन गैरहजर असतील तर सभासद आपल्यांतून चेअरमन निवडतील; ज्यावेळीं चेअरमन, व्हाईसचेअरमन वगैरे गैरहजर राहतील त्यावेळीं, त्या क्षेत्रांतील पहिला वर्ग सबजज्जानें चेअरमन निवडावयाचा आहे. कानू नं. ९ मध्यें प्रत्येक सभेचें काम चेअरमन चालवील असें म्हटलें आहे. आणि कानू २ पोट कानू २ मध्यें चेअरमनची व्याख्या सरकारनें नेमलेला असा आहे, कानू २ पोट कानू २ मुळें बोर्डाच्या सभासदाचा चेअरमन निवडण्याचा हक्क नाहींसा होत आहे. तसेच पहिला वर्ग सबजज्जाचा हक्कही नाहीसा होत आहे. म्हणून हा कानू मूळ कायद्याच्या हेतूच्या विरुद्ध आहे. तेव्हां या कामीं पुढील सूचना आहे.

९ सूचना—कानू नं. ९ रद्द करावा, अगर कानू नं.१० च्या शेवटी मूळ कायद्याचें कलम ४, पो. कलम ६ मधील, सर्व मजकूर घालावा.

किंवा कानू नं. २ पो. क. २ (I) यामध्यें दुरुस्ती करण्याकरितां पुढील सूचना करावी.

१० सूचना—कानू नं. २ पो. कानू नं. २ (II) च्या शेवटीं पुढील मजकूर घालावा "अगर कायद्याचे कलम ४ पो. क. ६ यास पात्र असून चेअरमन आणि व्हाइसचेअरमन असतील."

या सूचनेमुळें चेअरमन आणि व्हाइसचेअरमनच्या जागेचा प्रश्न उत्पन्न होणार नाहीं.

### बोर्डाच्या सभेच्या तारखा, वेळ व ठिकाण

कानू नं. १०—सभेच्या तारखा चेअरमन ठरवितील.

कानू नं. ११—बोर्डाच्या सभेची वेळ व ठिकाण हे संबंध येणारासच कळविलें जाईल.

यांत सूचना करण्याचें कारण नाहीं.

### एका माणसाच्या बोर्डाचे अधिकार कोणी चालवावयाचें

कानू नं. ७—या कानूंत विशेष रीतीनें सांगितलें असल्याशिवाय बाकीचे सर्व अधिकार व चालवितां येतील असे अधिकार हे ज्या इसमास बोर्ड म्हणून नेमलें असेल त्यानें चालवावयाचें आहेत.

यांतही सूचना करण्याचें कांहीं नाहीं.

### बोर्डाच्या दप्तराची भाषा

कानू नं. १३:—बोर्डाच्या दप्तराची भाषाही इंग्रजी अगर पहिला वर्ग सबजज्जाच्या कोर्टाची जी भाषा असेल ती, अशी असेल.

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

( ले. वा. चिं. भानु, पुणें )

**सहकारी दूध पुरवठाः**—कलकत्ता येथें दुधाचा पुरवठा सहकारी तत्वावर करणाऱ्या सोसायट्यांचा एक संघ १९२९ सालापासून अस्तित्वांत आलेला आहे. हा संघ आपल्या सभासद सोसायट्यांचे व्यक्तिशः सभासदांच्या गरजा भागविणेस भांडवल पुरवितो व त्यांचे दूध किंवा त्यापासून होणारे पदार्थ म्हणजे क्रीम, लोणी, खवा, इत्यादींना गिऱ्हाईक पाहून देतो. या संघांत १२३ सोसायट्या सामील झालेल्या असून त्यांचे व्यक्तिशः सभासद सुमारें ८,००० आहेत. या सोसायट्या कलकत्त्यापासून १२ ते ४८ मैलांच्या टापूंत आहेत. हा संघ दररोज सामान्यतः १०५ मण दुधाची उलाढाल करितो. संघाकडे येणाऱ्या दुधाची शास्त्रीयरीत्या तपासणी करण्यांत येऊन त्यांतील चरबीचे प्रमाणावर प्रतवारी लावण्यांत येतें. तसेंच यांत्रिक साधनांनीं तें जंतुरहित करून बाटल्यांतून किंवा डब्यांतून भरण्यांत आल्यानंतर गिऱ्हाइकांना देण्यांत येते. मोठाले दवाखाने, बालसंगोपनगृहें, हॅाटेल्स व व्यक्तिशः गिऱ्हाइकांनीं आपले रतीब या संघाकडे लावलेले आहेत. त्यामुळें दररोज दुधाचा खप सहजी होतो. या संघानें ५१,००० रुपये खर्चून एक स्वतःच्या मालकीची भव्य इमारत बांधली असून दुधाच्या यांत्रिक व शास्त्रीय तपासणीस लागणारी साधनसामुग्री सज्ज ठेवलेली आहे. कलकत्ता कार्पोरेशननें ( म्युनिसिपालिटीनें ) या संघास प्रथम रु. ५०,००० चें भांडवल बिनव्याजी दिलें होतें. शिवाय सरकारी शेतकी आणि सहकारी खात्यांतील तज्ज्ञ अंमलदारांचा सल्ला व मदत या संघास लागेल तेव्हां सहज मिळूं शकते. कारण त्या सरकारी खात्यांतीलच कांहीं अंमलदार संघांत कार्यवाहांचें काम करीत असतात.

* * *

लखनौ मध्येंही गेल्या २–३ वर्षांपासून असाच एक संघ दूध पुरवठ्याचें काम करीत आहे. कलकत्ता शहरांत दररोज सामान्यतः ३,००० मण दूध खपतें त्यापैकी संघामार्फत फक्त १०५ मण खपतें; तर लखनौमध्यें दररोज ३०० मण दूध खपतें. त्यांपैकी तेथील संघ ४० मणाचा पुरवठा करितो. यावरून लखनौ संघाच्या कारभाराची तुलनात्मक कल्पना येईल. कलकत्ता संघाला दवाखाने, हॅाटेलें व बालसंगोपनगृहें अशीं घाऊक बांधील गिऱ्हाइकें लाभलीं आहेत, तशीं अद्याप लखनौ संघाला मिळालेलीं नाहींत. १०५ मणांपैकी ७० मण दूध हींच गिऱ्हाइकें घेतात! कलकत्याकडील सोसायट्या पगारी नोकरांकडून दूध काढून घेतात, तर लखनौमध्यें स्वतः सभासदच हें काम करितो व त्यावर पंचकमिटीची देखरेख असते. नियोजित केंद्रस्थानीं दुभतीं जनावरें जमवून तेथें दूध काढण्यांत येतें. त्यामुळें स्वच्छता, आरोग्य इत्यादि बाबींकडे सहज लक्ष पुरविलें जातें. पण कलकत्याप्रमाणें यांत्रिक साधनें लखनौ संघाला अद्याप उपलब्ध झालेलीं नाहींत. लखनौ म्युनिसिपालटीनें सहानुभूति दाखविल्यास तेंही शक्य होईलच.

* * *

मद्रास इलाख्यांत दुधाचा पुरवठा करणाऱ्या ५१ सोसायट्या असून त्यांचे ६ संघ आहेत. या सोसायट्यांत १६११ सभासद आहेत. सभासदांचेकडून दूध गोळा करून तें संघाकडे पाठविणें हें सोसायट्यांचें प्रमुख काम. याप्रमाणें जमणाऱ्या दुधाची विक्री करणें हें संघाचें काम समजलें जातें. खुद्द मद्रास शहरांतील संघानें १९३८–३९ सालांत रु. २,०५,००० चें दूध खरेदी केलें व तें रु. २,४०,००० ला विकलें. सर्व खर्चवेंच वजा जातां यूनियनला रु. १३,९१५ चा निवळ फायदा झाला.

* * *

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—९ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९४—३ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९३—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९६—५ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०६–१२ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११३—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितोः)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३८—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४०–१४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५७३–१२ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०६—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३०—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१३—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६४२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९८—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९९५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ७१३–१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २१७—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४६—० |
| शिंदा स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ४०—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३८००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २११—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४९—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३७०—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८७०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १३९–१२ |


#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–१–३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६२–२–० |

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हंशील वेगळें.

**फुकट**—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारास सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हंशील माफ.

पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ ( A. P. ) अमृतसर (India.)



# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

**Prop. M. V. Risbud, B. A.**
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.



## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

कास्मगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचे तेल
स्थापना १९०९
डोकें शांत रहातें, केंस मजबूत होतात,
गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.
धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग क. (मुंबई नं. ४)



तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अति स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
टूथ पावडर
पोरवाल अँड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स अॅकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

For Collegians
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
SHEVAK BROS.
*Work-Shop Address:* 153 Kasaba, Poona 2
*Branch No. 1* Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १५ जानेवारी, १९४१ अंक ३

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

' पायोनियर डाइंग हाऊस '

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दानेवाडी, पुणें.

डॉ. एन. आर. राजोपाध्ये

यांचे

ॲशगॉल or पौष्टिक पिल्स घ्या. किंमत १२ आ. फक्त

सोल एजंटः "वेलणकर वनौषधालय", तुळशीबाग रस्ता, पुणें.

एजन्सी देणें आहे. एक आण्याचा स्टँप पाठवून विचारावें.

देशी औषधें तयार करणारा

महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना

पंडु, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

अशक्ततेवर

रक्तवर्धक

वापरा.

सर्वत्र मिळतें.

—ः केंद्रें ः—

पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

आयुर्वेद रसशाळा

पुणें, लि. पुणें ४.

मिनिट मिनिटाला

हंसविणारा बोलपट !

नवयुगचा मराठी बोलपट

लग्न पहावं

करून

नवयुग चित्र

दिग्दर्शक : विनायक

भूमिका : दामुअण्णा मालवणकर

४ था आठवडा

खेळाच्या वेळा नेहमींच्या !

मिनर्व्हा – पुणें

मुंबई, कोल्हापूर, सोलापूर, नासिक

येथें सुरू आहे.

डॉ. एन. आर. राजोपाध्ये यांचे खास देखरेखीखालीं चाललेलें

" वेलणकर वनौषधालय "

येथें सर्व तऱ्हेच्या वनस्पति व सिद्धौषधी मिळतात व १ पैशापासून सिद्ध औषधींपर्यंत मिळतात. हें पुण्यांतील पहिलेंच दुकान होय. येथें रोगी तपासून औषध देण्याचीही सोय आहे. व दम्यावर दर रविवारीं मोफत औषध दिलें जातें. उघडण्याची वेळः—सकाळीं ८॥ ते १२ व दुपारीं ३॥ ते ८ पर्यंत.

पत्ता : "वेलणकर वनौषधालय" तुळशीबाग रस्ता, पुणें.

## विविध माहिती

### १९३८ मध्यें विम्याची प्रगति

हिंदी विम्याच्या धंद्याचे सर्वांत ताजे म्हणजे १९३८ चे आकडे १९३९ च्या इंडियन इन्शुअरन्स इयर बुकांत प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून असें समजतें कीं, १९३८ सालीं हिंदी कंपन्यांनीं एकूण ४३ कोटि, ३० लक्ष रुपयांचे २,९६,००० विमे उतरविले. त्यांच्या वार्षिक हप्त्यांची रक्कम २ कोटि, २८ लक्ष रुपये भरते. १९३८ अखेर, हिंदी कंपन्यांकडे एकूण १०३/४ कोटि रुपये वार्षिक हप्त्यांच्या, २०४ कोटि रुपये किंमतीच्या १२ लक्ष, ४० हजार पॉलिसी चालू होत्या. विदेशी कंपन्यांकडील काम लक्षांत घेतलें, तर १९३८ अखेरच्या कामाचा तपशील १५ कोटि, ५७ लक्ष रुपये वार्षिक हप्ता, २९८ कोटि रुपयांचे विमे व १५ लक्ष, ५७ हजार विमापत्रकें असा होतो. हिंदी विमा कायदा लागू असणाऱ्या ३६० कंपन्यांपैकी २१७ हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या असून बाकीच्यांची स्थापना परदेशांत झालेली आहे. मुंबई प्रांतांत ६७ कंपन्या, बंगालमध्यें ५० कंपन्या, मद्रासमध्यें ३९ कंपन्या, अशी कंपन्यांची प्रमुख प्रांतांतील वाटणी होती.

### पोस्ट आणि तार खात्याचें उत्पन्न

१९३९–४० सालीं हिंदी पोस्ट आणि तार खात्याचें उत्पन्न खर्चापेक्षा अधिक होऊन ८९ लक्ष, ५९ हजार रुपयांचा वाढावा उरला. पोस्ट ऑफिसांनीं ३५३/४ लक्ष रुपयांचा वाढावा दाखविला, टेलिफोन्सनीं खर्च भागवून ३५३/४ लक्ष रुपये दिले व तार खात्यास २,२८१ रुपये नुकसान आलें. तारांच्या संख्येंत १९३९–४० मध्यें अतिशय वाढ झाली. १९३९–४० मध्यें रजिस्टर्ड व इन्शुअर्ड पत्रें व व्ही. पी. वगैरे खेरीज सर्व व्यवहार १९३८–३९ चे मानानें अधिक झाले. ३१ मार्च, १९४० रोजीं पोस्ट आणि तार खात्यांतील नोकरांची संख्या १,१८,०२० होती.

### महागाई भत्ता

जमशेटपूर येथील टाटा आयर्न अँड स्टील कंपनींतील, दरमहा १२५ रुपयांपेक्षा कमी पगाराच्या सर्व नोकरांस १ ऑगस्ट, १९४० पासून महागाई भत्ता देण्यांत येणार आहे. ५० रुपयांपेक्षा कमी पगाराच्या नोकरांस दरमहा किमान २ रु. ८ आ. व १०० ते १२५ रुपये पगारवाल्यांस कमाल ४ रु. भत्ता ह्या योजनेप्रमाणें मिळेल.

### टाटा वीज कंपन्यांचें विजेच्या विक्रीचें उत्पन्न

| | १९३९ रु. | | १९४० रु. | |
|---|---|---|---|---|
| | लक्ष | हजार | लक्ष | हजार |
| टाटा हायड्रो | १६ | ८१ | १७ | ८९ |
| आंध्र व्हॅली | २४ | २४ | २४ | ५७ |
| टाटा पॉवर | ४० | ७५ | ३८ | १३ |

तीन्ही कंपन्यांची मॅनेजिंग एजन्सी टाटा हायड्रो इलेक्ट्रिक एजन्सीज लि. कडे आहे.

### जी. आय. पी. रेल्वेचें उत्पन्न

| १९३९ | १९४० |
|---|---|
| १०,१६,३५,००० रु. | १२,००,८४,००० रु. |

### बी. बी. अँड सी. आय. रेल्वेचें उत्पन्न

| १९३९ | १९४० |
|---|---|
| ८,४३,९८,००० रु. | ९,३९,६४,००० रु. |

### त्रावणकोर नॅशनल अँन्ड क्विलॉन बँक

त्रावणकोर नॅशनल अँन्ड क्विलॉन बँकेच्या लिक्विडेटरनें तिच्या त्रावणकोरमधील येणीं वसूल केलीं आहेत, तीं त्रावणकोरमधील ठेवीदारांस रुपयांत सोळा आणे परत देण्यास पुरेशीं आहेत. त्रावणकोरमधील व बाहेरील ठेवीदारांस मिळावयाच्या रकमेंत एकवाक्यता असावी, ह्या दृष्टीनें रुपयांत आठ आण्यांपेक्षां अधिक रकम लिक्विडेटरनें अदाय वाटलेली नाहीं.

### लॉर्ड हॅलिफॅक्स ह्यांस विशेष दर्जा

ग्रेट ब्रिटनचे अमेरिकेंतील नवे वकील लॉर्ड हॅलिफॅक्स, ह्यांस ते ग्रेट ब्रिटनमध्यें आले असतांना त्यांस मंत्रिमंडळाच्या सभासदाचा दर्जा प्राप्त होईल, असें मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं जाहीर केलें. ह्याचा अर्थ, मुख्य प्रधानास त्यांच्याशीं बोलणीं परराष्ट्रीय मंत्र्यांचे मार्फत करावीं लागणार नाहींत. लॉर्ड हॅलिफॅक्स ह्यांचेकडे सोपविलेल्या कामगिरीच्या महत्वाचें व त्यांचेवरील जबाबदारीचें हें निदर्शक आहे.

### पेट्रोलच्या वापराचें नियंत्रण

पेट्रोलच्या वापराचें नियंत्रण करण्याची हिंदुस्थानांत पाळी आल्यास, त्यासंबंधांतील योजना तयार असावी, ह्या दृष्टीनें प्रांतिक सरकारें व संस्थानें ह्यांची एक परिषद २० जानेवारी रोजीं दिल्ली येथें भरून त्याविषयीं खल करणार आहे.

### रिक्शावाल्यांस उपदेश

चिनी सरकारच्या परराष्ट्रीय मंत्र्यांनीं सिंगापूरला नुकतीच भेट दिली, त्यावेळीं त्यांनीं आपल्या तेथील देशबांधवांस रिक्शावाल्याचा धंदा सोडून देऊन अधिक चांगला धंदा सुरू करण्याचा उपदेश केला. सिंगापूरमध्यें रिक्शा ओढून सुमारें ७,००० चिनी लोक आपलें पोट भरतात.

### बर्लिनमध्यें जपानी लष्करी प्रतिनिधि

जपानचे लष्करी प्रतिनिधि रशियाचे मार्गानें जर्मनींत दाखल झाले असून त्यांच्या जर्मन प्रतिनिधींशीं लष्करी वाटाघाटी लवकरच सुरू होतील.

### अमेरिकेची लोकसंख्या

१९३० ते १९४० ह्या मुदतींत अमेरिकेची लोकसंख्या ७% वाढली. त्यापूर्वीच्या १० वर्षांत ती १६·१% वाढली होती. अमेरिकेची आजची लोकसंख्या १३ कोटि, १५ लक्ष आहे. लोकसंख्येच्या वाढीची गति उतरत चालली आहे.

### अमेरिकेंत कपाशीची लागवड

१९४१ मधील अमेरिकेंतील कपाशीच्या लागवडीचा अंदाज प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून २ कोटि, ६७ लक्ष एकरांत तेथें कपास लावली जाईल, असें समजतें. गेल्या वर्षी २ कोटि, ७०३/४ लक्ष एकर कपाशीखाली होते.

### ट्रेझरी बिलांवर १४ आ. २ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यावर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १४ आ. २ पै इतका पडला.

### बँक ऑफ बरोडा लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९४० अखेर संपलेल्या वर्षी ८,५९,९९२ रुपये नफा झाला. भागीदारांस १०% करमाफ डिव्हिडंड मिळेल.

### इंपीरिअल बँकेचे नवे डायरेक्टर

रायबहादूर रामशरणदास ह्यांची इंपीरिअल बँकेचे डायरेक्टर बोर्डावर नेमणूक करण्यांत आली आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २६ | ६ महाराष्ट्रांतील स्वदेशी चळवळीची स्थित्यंतरें ... | ३० |
| २ प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांची धडाडीची योजना ... | २७ | ७ गेल्या वर्षाचें आर्थिक समालोचन ... | ३२ |
| ३ हिंदी शेती ... | २८ | ८ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... | ३२ |
| ४ बँक ऑफ इंडियाच्या नफ्याची वाटणी ... | २८ | ९ सातारा स्व. क. कं. ... | ३३ |
| ५ स्फुट–विचार ... | २९ | १० नागपूर प्री. को. हौ.सो.... | ३३ |
| स्वदेशी साखरेच्या बाजाराचें नियंत्रण व स्थैर्य–ग्रेगरी–मीक चौकशीचा वृत्तांत—मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्न-खर्चांत तूट | | ११ चांदी-सोन्याच्या किंमतींत चढउतार ... | ३३ |
| | | १२ हिंदी गिरण्यांची स्थिति... | ३३ |
| | | १० निवडक बाजारभाव ... | ३४ |


# अर्थ

बुधवार, ता. १५ जानेवारी, १९४१

## प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांची धडाडीची योजना

अमेरिकेचें युद्धसहाय इंग्लंडला आतां निश्चितपणानें आणि वाढत्या प्रमाणावर मिळत जाणार ह्यांत शंका राहिलेली नाहीं. प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं आपल्या मनाशीं असें ठरविलें कीं जर्मनीचा युरोपमध्यें जय होणें म्हणजे अमेरिकेच्या स्वातंत्र्यास धोका उत्पन्न होणें होय आणि ह्या संकटापासून आपल्या लोकांचें आणि जगांतील लोकशाहीचें रक्षण करण्यास प्रथम इंग्लंडला सर्व तऱ्हेचें सहाय देणें अगत्याचें आहे. ह्या दोन सिद्धातांविषयीं त्यांच्या मनाचा निश्चय झाला तेव्हां त्यास अनुसरून प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं आपलें धोरण आखलें आणि अमेरिकेच्या राष्ट्रीय धोरणास इष्ट असें वळण दिलें. प्रस्तुत युद्धांत अमेरिकेनें तटस्थ रहावें आणि त्यांत कोणत्याहि एका पक्षाची बाजू घेतली असें वाटण्यास कारण होईल ह्या प्रकारचें कसलेंहि कृत्य करूं नये ह्या मताचे कांहीं पुढारी अमेरिकन मुत्सद्यांमध्यें होते आणि अजूनहि असतील. अमेरिकेनें युद्धसामुग्री रोखीनेंच विकावी आणि कोणत्याहि राष्ट्रास पूर्वींचे कर्ज येणें असल्यास नव्यानें कर्ज देऊं नये असे कायदे तटस्थपणाच्या सिद्धयर्थ करण्यांत आले होते. त्या कायद्यांचा भंग न करतांहि प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं इंग्लंडला आजपर्यंत मदत दिली आहे. परंतु ती आतां फार मोठ्या प्रमाणावर देणें आवश्यक झाल्याकारणानें त्याकरितां नवें धोरण स्पष्टपणानें पुढें मांडून त्यास अमेरिकन काँग्रेसची संमति घेणें अगत्याचें झालें आहे.

प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं अलीकडे भाषणें केलीं आहेत आणि आपल्या योजना जनतेपुढें मांडल्या आहेत. त्यामुळें अमेरिकेचें युद्धविषयक धोरण आरशासारखें स्वच्छ झालें आहे. अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्रानें इंग्लंडला जरूर तो सर्व कच्चा–पक्का माल पुरवून युद्धांत विजय मिळवण्यास सहाय देण्याचें ठरवल्यानें जर्मनी व जपान ह्या राष्ट्रांचें धाबें दणाणलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. इंग्लंडनें हिटलरशाहीविरुद्ध चालवलेलें युद्ध आपल्या संरक्षणासाठीच चालवलेला अत्यंत कठिण असा संग्राम आहे असें प्रेसिडेंट रूझवेल्ट आपल्या लोकांस सांगत आहेत. शेंकडों, नव्हे हजारों कोटि रुपये खर्चावे लागले तरी तो स्वार्थत्याग करणें आवश्यक आहे असें म्हणून लढाऊ सामुग्री तयार करण्याची आणि अमेरिकेचें सर्व प्रकारचें आरमारी, वैमानिक व लष्करी बळ वाढवण्यास त्यांनीं कंबर कसली आहे. ह्या खर्चाची तजवीज होण्यास कराचें ओझें वाढवावें लागेल आणि कर्जाचा बोजाहि अधिक जड करावा लागेल ह्याविषयीं त्यांस शंका नाहीं. तथापि, युद्धसामुग्री प्रचंड प्रमाणावर बनवण्यांत आर्थिक फायदा होणार आहे त्याचाहि ह्या ताळेबंदांत विचार केला पाहिजे आणि लोकशाहीचें संरक्षण होऊन न्याय आणि शांतता ह्यांची प्रस्थापना भक्कम पायावर केली जाण्याची शक्यता उत्पन्न होणार आहे त्याचाहि योग्य हिशेब झाला पाहिजे अशी प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांची विचारसरणी आहे. त्यांनीं योजलेलें धोरण अत्यंत उत्साहजनक असून त्याचें स्वागत जगभर सर्वत्र झाल्यावांचून रहाणार नाहीं.

अमेरिकेस "लोकशाहीचें शस्त्रागार" बनवणें हें ध्येय प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं स्वतःच्या डोळ्यांपुढें ठेवलें आहे. नाझी जुलुमापासून लोकशाहीप्रिय राष्ट्रांचा बचाव करण्याकरितां त्यांस लढाऊ साधनें पुरवणें हा तें ध्येय साध्य करण्याचा त्यांचा व्यावहारिक मार्ग आहे. त्यांच्या मतें 'एक पंथ दो काज' ह्या न्यायानें हा उपाय दुहजबी उपयोगी पडणार आहे. त्यास अमेरिकन जनतेची म्हणजे काँग्रेसची संमति मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. लढाऊ सामुग्री तयार करून लोकशाहीच्या शत्रूंशीं लढणाऱ्या राष्ट्रांस पुरवण्याचा कार्यक्रम प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं आंखला आहे आणि स्थूलमानानें जाहीर केला आहे. तो अंमलांत आणण्याचा अधिकार काँग्रेसनें प्रेसिडेंटांस द्यावा लागेल आणि त्याविषयींच्या कायद्याचा मसुदा अमेरिकन विधिमंडळापुढें मांडण्यांत येईल. शस्त्रास्त्रें तयार करण्याचे अनेक कारखाने काढावे लागतील, ते खाजगी मालकीचे असतील. त्यांनीं सरकारास माल पुरवण्यांत भरमसाठ नफेबाजी करूं नये ह्याविषयीं खबरदारी घेण्यांत येणार आहे. अमेरिकेच्या संरक्षणाची सर्वांगीण व्यवस्था केली जाईल आणि त्यासाठी जी लढाऊ सामुग्री तयार होईल तींपैकी बरीचशी इंग्लंडला भाड्यानें देण्यांत येईल. इंग्लंडची पत अमेरिकेंत एवढी मोठी आहे कीं, अशा तऱ्हेचा व्यवहार होण्याच्या मार्गांत विशेष अडचण येणार नाहीं. मागच्या महायुद्धांत युरोपिअन राष्ट्रांस अमेरिकेनें कर्जें दिलीं त्यांची प्रतफेड होण्याची मारामार पडल्याकारणानें ह्या खेपेचे व्यवहार निराळ्या पद्धतीनें करण्यांत येत आहेत. मागील प्रसंगाच्या मानानें चालू युद्धांत स्वातंत्र्यावरील संकट अमेरिका खंडाच्या अधिक जवळ आलें आहे. म्हणून तें निवारण्यासाठी लोकशाहीच्या बाजूनें लढणाऱ्या राष्ट्रांस लढाऊ सामानाचा पुरवठा अमेरिकेनें करण्याचें आगत्य विशेष आहे. अमेरिकेच्या संरक्षणासाठी तयार केलेलीं शस्त्रास्त्रें परत देण्याच्या अटीवर गरजू राष्ट्रांस पुरवण्याचा अधिकार काँग्रेसकडून प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांस हवा आहे. ह्या कामीं लागणाऱ्या पैशाची तरतूद करण्याच्या योजना ते वेळोवेळीं काँग्रेसपुढें संमतीसाठी मांडतील. प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं जाहीर केलेल्या योजनांमुळें ग्रेटब्रिटन व त्यास सहाय करणारीं सर्व राष्ट्रें, त्याचप्रमाणें शत्रुपक्षानें पादाक्रांत केलेलीं स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रें; ह्यांत उत्साह व आत्मविश्वास निर्माण होणें स्वाभाविक आहे.

## हिंदी शेती

(३)

### सरकी

हिंदुस्थानांत सरकीचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होतें परंतु त्याची निर्गत फार लहान आहे:

| वर्ष | सरकीची निर्गत (टन) |
|---|---|
| १९३०–३१ | ४१,३५० |
| १९३१–३२ | ११,६५५ |
| १९३२–३३ | २३,३८९ |
| १९३३–३४ | ५,५७५ |
| १९३४–३५ | ६३६ |
| १९३५–३६ | ७३० |
| १९३६–३७ | ९,००३ |
| १९३७–३८ | ५,००८ |
| १९३८–३९ | ४६५ |

### गहूं

गव्हाचे लागवडीखालीं सुमारें ३१⁄२ कोटि एकर जमीन असून गव्हाचें एकूण उत्पादन सुमारें १ कोटि टन होतें. पंजाब, सिंध व संयुक्त प्रांत येथें विशेषतः गव्हाची लागवड होते. खालील तक्त्यांत गव्हाची लागवड, उत्पादन व निर्गत ह्यांसंबंधीं तपशील दिला आहे:—

| वर्ष | लागवड (हजार एकर) | उत्पादन (हजार टन) | गहूं |
|---|---|---|---|
| १९२९–३० | ३१,६५४ | १०,४६९ | १३ |
| १९३०–३१ | ३२,१८९ | ९,३०६ | १९७ |
| १९३१–३२ | ३३,८०३ | ९,०२४ | २० |
| १९३२–३३ | ३३,९७६ | ९,४५५ | २ |
| १९३३–३४ | ३६,०७७ | ९,३७० | २ |
| १९३४–३५ | ३४,४९० | ९,७२९ | ११ |
| १९३५–३६ | ३३,६३९ | ९,४३४ | १० |
| १९३६–३७ | ३३,२१५ | ९,७५२ | २३२ |
| १९३७–३८ | ३५,६४० | १०,७६४ | ४६० |
| १९३८–३९ | ३५,२९१ | ९,९३४ | २७९ |
| १९३९–४० | ३४,००३ | १०,७८४ | ... |

हिंदुस्थानांतून होणारी गव्हाची निर्गत गव्हाच्या जागतिक बाजारभावावर अवलंबून रहाते. १९००–०१ मध्यें गहूं निर्गत झाला नाहीं, १९०४–०५ मध्यें त्याची निर्गत २१ लक्ष टनांवर झाली. १९०८–९ मध्यें ती १ लक्ष टनांवर झाली. गेल्या महा युद्धकालांत ती १७ लक्ष टनांवर गेली. त्यानंतर ती जवळ जवळ बंद झाली. १९२९–३० मध्यें फक्त १३ हजार टन गहूं निर्गत झाला. १९३०–३१ मध्यें १ लक्ष ९७ हजार टन; १९३२–३३ मध्यें २ हजार टन व १९३७–३८ मध्यें ४ लक्ष ६० हजार टन, ह्याप्रमाणें त्याची निर्गत झाली.

### तांदूळ

सर्व पिकांत तांदुळानें अधिक क्षेत्र व्यापलें आहे. तथापि, त्यांतील २३⁄४ कोटि टनांचें उत्पादन लोकांची गरज भागवूं शकत नाहीं व सुमारें २० लक्ष टन तांदूळ ब्रह्मदेशांतून येतो. तांदुळामध्यें अनेक जाती आहेत. सिंध व मद्रासमध्यें पाटाच्या पाण्यावर तांदूळ लावला जातो; मुंबई व बंगाल प्रांतांत तांदळाचें पीक पावसावर येतें. केवळ पावसावर अवलंबून रहावयाचें म्हटल्यास, वार्षिक किमान ५० इंच तरी पाऊस पडला पाहिजे. इतर देशांचे मानानें हिंदुस्थानांत तांदळाचें दर एकरी उत्पादन फार कमी आहे.

## बँक ऑफ इंडिया, लि.

३१ डिसेंबर, १९४० अखेर संपलेल्या वर्षी बँक ऑफ इंडियास मागील वर्षातून ओढलेले ८,८६,३३६ रु. ८ आ. धरून.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| एकूण झालेला नफा:— ... | २८,४५,२८४–७–११ |
| चालू वर्षातील इनकम् टॅक्स् व सुपर टॅक्स ह्यांसाठी तरतूद:— | २,५०,०००–०–० |
| ३० जून, १९४० रोजीं पहिल्या सहामाहीचें ११ टक्के दरानें डिव्हिडंड जाहीर केलें त्याबद्दल दिलेली रक्कम:— | ५,५०,०००–०–० |
| नफा वाटणीकरितां आतां २०,४५,२८४ रु. ७ आ. ११ पै रहातात. ३१ डिसेंबर, १९४० अखेरच्या सहामाहीचें ११ टक्के दरानें करमाफ डिव्हिडंड देण्याचें डायरेक्टर बोर्डानें योजिलें आहे, त्यास लागणारी रक्कम:— | ५,५०,०००–०–० |
| बँकेच्या मालमत्तेचे खाती वर्ग:— | २,५०,०००–०–० |
| बँकेच्या रिझर्व्ह फंडाकडे वर्ग:— | २,५०,०००–०–० |
| पुढील वर्षांत ओढण्याकरितां (नोकर वर्गास बोनस दिल्यास तो ह्यांतून द्यावयाचा आहे.) | ९,९५,२८४–७–११ |

## १९४१ ची खानेसुमारी

प्रत्येक दहा वर्षांनीं हिंदुस्थानची खानेसुमारी होते. एका ठराविक रात्रीं सर्व मोजणी पुरी करण्याची आजवर पद्धति होती, ती यंदा अंमलांत आणलेली नाहीं. कांहीं प्रांतांत खानेसुमारीस प्रारंभ झालेला आहे व बाकीच्यांत तो लवकरच होईल. फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशीं मोजणीचें सर्व काम पुरें होईल. यंदाच्या खानेसुमारींत प्रश्नांची संख्या कमी केली आहे, त्यामुळें मोजणीचें काम सोपें होत आहे. मोजणीचेसाठी सुमारें १५ लक्ष स्वयंसेवक लागतात. चालू खानेसुमारीचे वेळीं कागदाची शक्यतोंवर बचत केली असली तरी ४७० टन कागद एकूण लागेल असा अंदाज आहे. सर्व कामास एकूण खर्च सुमारें ५० लक्ष रुपये येईल. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजीं आगगाड्यांतील उतारू, रस्त्यावरच रहाणारे लोक, भटके लोक इत्यादींची नोंद केली जाईल.

## हिंदी चहाच्या धंद्यासंबंधीं ताजे आकडे

| | १९३७ | १९३८ |
|---|---|---|
| चहाची लागवड (एकर) | ८,३४,३०० | ८,३२,८०० |
| चहाचे मळे | ६,३८१ | ६,३२४ |

| | १९३८ | १९३९ |
|---|---|---|
| चहाचें उत्पादन (कोटि पौंड) | ३७ | ३८·२ |
| चहाची निर्गत „ „ | ३५·३ | ३२·६ |

| | १९३८-३९ | १९३९-४० |
|---|---|---|
| उत्पादन (सप्टें ऑगस्ट) (कोटि पौंड) | ३६·१ | ४०·९ |
| निर्गत „ „ | ३४·१ | ३४·३ |
| निर्गत (एप्रिल-मार्च) „ | ३४·८ | ३६·० |
| हिंदुस्थानांत उठाव „ „ | ९·५ | १०·१ |

## स्फुट विचार

### स्वदेशी साखरेच्या बाजाराचें नियंत्रण व स्थैर्य

संयुक्त प्रांत आणि बिहार येथील सरकारांनीं आपल्या प्रांतांतील कायद्याच्या अनुरोधानें स्थानिक साखरेच्या कारखान्यांच्या व धंदेवाल्यांच्या व्यवहारांचें नियंत्रण करण्याचें ठरवल्यापासून साखरेच्या बाजारभावांत स्थैर्य रहाण्यास सहाय झालें आहे. उसाच्या कारखानदारांनीं शेतकऱ्यांस द्यावयाच्या किंमती, साखरेच्या उत्पादनाचें परिमाण, साखरेच्या विक्रीचे भाव इत्यादि सर्व बाबतीमध्यें वरील प्रांतांतील सरकारांनीं नियंत्रण चालवलें असल्यानें बाजारांत अनपेक्षित व वारंवार चढउतार व गोंधळ होण्याच्या प्रवृत्तीस आळा बसला आहे. उत्तर हिंदुस्थानांतील साखर-कारखान्यांच्या आणि कानपूर येथील साखर बाजाराच्या परिस्थितीवर दक्षिणेंतील साखरेच्या धंद्यांची स्थिति अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे. इकडील साखरेच्या किंमती उत्तर हिंदुस्थानांतून येणाऱ्या मालानें मर्यादित होत असतात. ह्या उत्तरेकडील मालाची स्पर्धा दक्षिणी साखरेचे भाव निश्चित होण्यांत प्रभावी ठरते. उत्तर हिंदुस्थानांतून येणाऱ्या साखरेच्या किंमतीपेक्षा अधिक भावानें येथील साखर विकली जाणें अशक्य आहे. ह्या कारणानें संयुक्त प्रांत व बिहार येथील सरकार स्थानिक साखरेच्या कारखान्यांस किती माल विकूं देतात आणि त्यांचें भाव किती ठरवतात ह्यांकडे दक्षिणेंतील कारखानदारांचें लक्ष लागून रहाणें स्वभाविक आहे. गेल्या हंगामांतली शिल्लक राहिलेली साखर जाहीर केलेल्या दरापेक्षा कमी भावानें कोणाहि कारखानदारानें विकतां कामा नये असें संयुक्त प्रांताच्या सरकारनें जाहीर केलें आहे. हाच नियम चालू हंगामांतील साखरेस लागू करण्यांत आला आहे. साखरेच्या निरनिराळया जाती, कारखान्यांचें मुख्य बाजारापासूनचें अंतर, विकावयाच्या मालाचें परिमाण व प्रमाण आणि साखरेचे किमान भाव ह्या सर्व बाबींचें नियंत्रण करण्यांत आलें आहे. ह्या योगानें साखरेच्या धंद्यास स्थैर्य प्राप्त झालें असून बाजारभाव पडण्याचें बंद झालें आहे.

### ग्रेगरी-मीक चौकशीचा वृत्तांत

ग्रेगरी-मीक ही तज्ञांची जोडी हिंदुस्थान सरकारच्या वतीनें अमेरिकेस गेली होती आणि त्या देशांत हिंदी मालाचा खप होण्यास किती वाव आहे ह्याची चौकशी करून परत आली आहे. चालू युद्धाच्या परिस्थितींत एका बाजूस इंग्लंड व दुसऱ्या बाजूस तुर्कस्तान हे दोन देश सोडले असतां हिंदी मालाचें युरोपमधील सर्व गिऱ्हाइक नाहींसें झालें आहे. हिंदुस्थानच्या कच्च्या मालास युरोप खंडांत जी मागणी होती ती बंद झाल्यानें दुसऱ्या बाजारपेठा शोधणें आवश्यक झालें आहे. युरोपांत सुमारें तीस कोटी रुपये किंमतीचा हिंदी माल खपत असे, त्यास सर्वे गिऱ्हाइक उभें न राहिल्यानें कपास, गळिताचीं धान्यें, ताग, कापूस इत्यादि शेतीच्या पदार्थांच्या किंमती खाली गेल्या आहेत, त्या डोकें वर काढीत नाहींतशा झाल्या आहेत. ह्या स्थितीवर उपाय काढावा म्हणून हिंदुस्थान सरकारनें आपले दोन तज्ञ अमेरिकेस पाठवले होते. अमेरिका हाच संपन्न व मोठा देश युद्धाच्या कक्षेच्या बाहेर राहिला असून त्यांत हिंदुस्थानच्या मालाचा खप वाढवणें शक्य आहे कीं काय हें पहाणें आवश्यक होतें. ग्रेगरी-मीक चौकशीचा वृत्तांत प्रसिद्ध झाला त्यावरून हिंदी मालाच्या उठावास अमेरिकेंत म्हणण्यासारखा वाव आहे असें दिसत नाहीं. कपास, गहूं इत्यादि माल अमेरिकेंत मोठ्या प्रमाणावर तयार होत असल्यानें तसल्या कच्च्या हिंदी मालास तेथें मागणी येण्याचा संभव नाहीं. लढाऊ सामुग्री तयार करण्यास लागणारा कांहीं हिन्दी माल अमेरिकेंत खपेल. मँगॅनीज, मायका, लाख असल्या किरकोळ मालाचा खप तिकडे होईल. पण त्या योगानें हिन्दी शेतीच्या मालाचा उठाव आणि त्याच्या किंमतींत जरूर असलेली वाढ ह्यांविषयींचा प्रश्न सुटण्यास विशेष सहाय होण्यासारखें नाहीं.

### मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्न-खर्चांत तूट

हिंदी मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्न-खर्चाचा तपशील मागें दरमहा प्रसिद्ध होत असे, परंतु त्यांत दाखल झालेल्या आकड्यांवरून निघणारा अर्थ कित्येक वेळां चुकीचा होई. सरकारास मिळणारें वार्षिक उत्पन्न बाराहि महिन्यांत सारख्या हप्त्यांनीं जमा होत नाहीं व विशेषतः प्रांतिक सरकारांच्या व खात्यांच्या येण्या-देण्याचे व व्याजाचे हिशेब वर्ष अखेर एकदाच केले जातात. कांहीं महिन्यांपूर्वीं सरकारानें ह्या मासिक तक्त्यांची पद्धति बंद केली व नवीन पद्धतीच्या तक्त्यांचे स्वरूपांत हिशेब प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें नोव्हेंबर, १९४० अखेरचे हिशेब आतां प्रसिद्ध झाले आहेत. एप्रिल १९४० ते नोव्हेंबर १९४० ह्या आठ महिन्यांत हिंदुस्थान सरकारास १९३९ च्या तत्सम आठमाहीपेक्षा सुमारें ५ कोटि रुपये उत्पन्न कमी झालें. कस्टम्सचें उत्पन्न ५ कोटींनीं घटलें. कॉर्पोरेशन टॅक्सनें २४ लक्ष रुपये कमी दिलें व मिठाच्या कराचें उत्पन्न २½ कोटींनीं कमी झालें; ह्या उलट एक्साइज ड्यूटींत १ लक्ष, ८४ हजार रुपये, प्राप्तीवरील करांत ५१ लक्ष रुपये व इतर करांत १९ लक्ष रुपये ह्याप्रमाणें वाढ झाली. हिंदुस्थान सरकारचा खर्च १९३९ च्या पहिल्या आठ महिन्यांत ६९ कोटि, ९५ लक्ष रुपये झाला होता. १९४० च्या पहिल्या आठ महिन्यांत तो ७७ कोटि, ६१ लक्ष रुपये झाला आहे. खर्चांतील मुख्य वाढ लष्करी खर्चांतीलच आहे. पोस्ट आणि तारखातें व रेल्वेज ह्यांचेकडील निवळ उत्पन्न वाढलें, त्या कारणानें एकूण तूट ५ कोटि रुपयेच आली; नाहींतर ती जास्तच आली असती. एकूण सर्व व्यवहार हिशेबांत घेतां, तूट १ कोटि रुपयांचीच दिसते. कांहीं झालें तरी येत्या बजेटाच्या वेळीं नव्या करवाढीची तयारी लोकांनीं ठेवली पाहिजे.

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया

वरील बँकेस, ३१ डिसेंबर, १९४० अखेर संपलेल्या वर्षीं ७२,९६,४०० रुपये नफा झाला. भागीदारांस १२% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

बँका व कचेऱ्या यांस उपयुक्त असा एक
ब्रीफ साईज
टाइपरायटर
कोरा असून
स्वस्त विकाऊ आहे.
चौकशी कराः-
अवर होम, ६१९ शनवार पुणें. टेलिफोन नं. ९/११५.

## महाराष्ट्रांतील स्वदेशी चळवळीची स्थित्यंतरें

(मागील अंकावरून समाप्त)

### गेली दहापंधरा वर्षें

गेल्या दहा–पंधरा वर्षांचा महाराष्ट्रांतील स्वदेशीचा काळ हा औद्योगिक संघटनाच्या व विधायक कार्याच्या उपक्रमाचा काळ आहे असें म्हणतां येईल. बँकिंग, विमा, कांचसामान, कापड, लोखंड इत्यादि संबंधांतले व्यवहार संघटित स्वरूपांत व मोठ्या प्रमाणांत महाराष्ट्रांत चालले असल्याचें दृश्य आज दिसत आहे. आयुष्याचा विमा उतरणें, बँकिंगच्या सवलती उपलब्ध करून घेणें, कांचेच्या व लोखंडी सामानाच्या, उत्कृष्ट साखरेच्या आणि विशिष्ट जातीच्या कापडाची गरज भागवणें इत्यादि बाबतींत महाराष्ट्रीयांस दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची आवश्यकता राहिलेली नाहीं. कागद, औषधें, साबण, तेलें वगैरे नित्याच्या उपयोगाचे जिन्नसहि महाराष्ट्रीय बनावटीचे आज उपलब्ध होत आहेत. चित्रपटाच्या नवीन धंद्यांतहि महाराष्ट्रीयांनी नांव मिळवलें आहे. ह्या धंद्यास लागणारा पैसा बहुतेक संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांच्या मार्गानें गोळा होत आहे आणि त्याचा उपयोग करणारे कुशल व धडाडीचे लोक पुढें येत आहेत. सरकारी कर्जरोख्यांत सर्वस्वी गुंतणारा पैसा वाढत्या प्रमाणांत नवीन उद्योग–धंद्यांकडे वळत आहे आणि मंडळ्यांचे भाग, विम्याच्या पॉलिसींचा पैसा आणि बँकेंतल्या व कारखान्यांतल्या ठेवींच्या रकमा महाराष्ट्रांत लक्षांनीं व कोटींनीं मोजण्यास हरकत नाहीं. विश्वासानें विश्वास वाढतो आणि अनुभवाने तो दृढ होतो ह्याची सत्यता पटूं लागली आहे. व्यापारी शिक्षणाचा प्रसार होऊं लागला असून तरुणांचें लक्ष उद्योगधंद्यांतल्या कामाकडे वेधलें जात आहे. औद्योगिक प्रगति फुकट मिळत नाहीं, तिला किंमत द्यावी लागते याची कल्पना लोकांस येऊं लागली आहे; आणि व्यवहाराच्या मांडवाखालून अधिकाधिक लोक संचालक ह्या नात्यानें जात आहेत. धंद्यांत घातलेला पैसा सरकारी रोख्यांत गुंतविलेल्या पैशाइतका सुरक्षित नसतो, पण पहिल्यापेक्षा दुसऱ्या व्यवहारांत फायद्याची शक्यता अधिक असते हा अनुभव जगभर सर्वत्र येत आहे. पैसा गुंतवण्याच्या दुसऱ्या प्रकाराचा अवलंब केल्यावांचून व्यापार-उदीम शक्य नाहीं, संपत्तीचें वाढतें उत्पादन नाहीं आणि मिळकतीचें साधन नाहीं. औद्योगिक धोक्यास न बुजता आपल्या बचतीचा कांहीं अंश व्यापार–उदीमांत घालणें म्हणजे चालू व पुढील पिढ्यांच्या आर्थिक जीवनाची तरतूद करणें होय ही गोष्ट हळुहळू पैसेवाल्या लोकांस पटत आहे. प्रत्यक्ष रीतीनें उत्पादक असलेल्या विधायक आणि संघटित महाराष्ट्रीय स्वदेशीचा हा उपक्रम आहे असें वर म्हटलेंच आहे. मुंबई हे आधुनिक व्यापाराचें व उद्योगधंद्यांचें मोठें केंद्र आहे. तेथें हिंदुस्थानांतील लांबलांबच्या ठिकाणांहून परस्थ लोक व्यवहार करीत आहेत आणि संपत्ति मिळवीत आहेत. ह्या क्षेत्रांत महाराष्ट्रीयांची प्रगति कांहींच झालेली नाहीं असें म्हटलें असतां त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. अलीकडे ह्या दिशेने कांहीं प्रयत्न चालले आहेत आणि कित्येक महाराष्ट्रीय औद्योगिक संस्था व धंदेवाले मुंबईच्या बाजारांत घुसत आहेत, हें अभिनंदनीय आहे. तथापि आयात-निर्गत व्यापार, बँकिंग, स्टॉक एक्सचेंज, गिरण्या, लहानमोठे कारखाने, सोन्या-चांदीचा व्यवहार इत्यादि अनेक किफायतशीर आर्थिक क्षेत्रांच्या बाहेरच महाराष्ट्रीय आज आहेत. त्या मार्गांतलें त्यांचें प्रत्येक पाऊल खऱ्या प्रगतीचें गमक समजलें पाहिजे. बाहेर ज्या मानानें औद्योगिक व व्यापारी संघटन होईल, त्या मानानें मुंबईत प्रगति घडवून आणण्यास उत्तेजन मिळेल. या दोन गोष्टी परस्परपोषक अशा आहेत हें लक्षांत ठेवावें.

### नवीन उपक्रमाचें स्वरूप

महाराष्ट्रीय स्वदेशीच्या ह्या नवीन उपक्रमांत संघटन, धोरण व रोजचे व्यवहार ह्यांचे संबंधांत अवघड प्रश्न, अडचणी, मतभेद भानगडी इत्यादि उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. औद्योगिक व व्यापारी अनुभव किंमत देऊन विकत घ्यावा लागतो; ही किंमत योग्य असावी, भलती असतां कामा नये, इतकेंच. धंद्यांत पैसा घालणारे, त्याचा उत्पादक विनियोग करणारे, त्यांवर देखरेख करणारे, त्यासंबंधांत धोरण ठरवणारे ह्या सर्वांवर सारखीच जबाबदारी असून आपापल्या परी त्यांनीं ती तडजाडी वृत्तीनें पण सचोटीनें पार पाडली पाहिजे. इतर समाजांत धंदेवाईकपणाची परंपरा अनेक पिढ्यांची जुनी आहे. महाराष्ट्रीयांमध्ये ती परंपरा अजून मूळ धरावयाची आहे. उदीम व्यापाराचे आधुनिक प्रघात महाराष्ट्रीयांनी आत्मसात करणे आवश्यक आहे. असें होईल तरच त्यांस तीव्र स्पर्धेमध्ये टिकाव धरतां येईल. एक ऋतु संपून दुसऱ्या ऋतूस प्रारंभ होण्याचे वेळीं लोकांस आपल्या प्रकृतीस जपावें लागतें आणि अर्भकांचे व वृद्धांचे बाबतींत तर विशेषच काळजी घ्यावी लागते. त्याप्रमाणे महाराष्ट्रीय स्वदेशीचे विधायक क्षेत्रांत संक्रमण चालू असतां सावधगिरीने पाऊल टाकलें पाहिजे. ही धोक्याची सूचना देणें आगत्याचें आहे. इतर समाजांचे लोक कोट्यावधि रुपयांचे व्यवहार सुरळीत रीतीनें वर्षानुवर्ष करूं शकतात, ह्याचें रहस्य समजून घेऊन आपलें धोरण महाराष्ट्रीयांनी त्याप्रमाणें ठेवणें इष्ट आहे. इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या मंडळ्यांचा धंदा हजारों मैल दूर असलेल्या देशांमध्यें पिढ्यानुपिढ्या बिनबोभाट चालतो. ह्यापासून महाराष्ट्रीयांनी योग्य तो बोध घेतला पाहिजे. मोठे धंदे अनेकांचें भांडवल एकत्र झाल्यावांचून चालू शकत नाहींत. हा पैसा जमवणें, तो सुरक्षित व फायदेशीर रीतीनें वापरणें आणि सर्व व्यवहार समजूतदारपणानें करणें ह्या गोष्टींस सहकार्य, संघटन, कार्यक्षमता व देवाण-घेवाणीची वृत्ति ह्यांची आवश्यकता आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक व्यवहारांत हे गुण प्रतीत होऊन महाराष्ट्रीय स्वदेशीचें पाऊल निश्चितपणाने पुढें पडेल अशी काळजी सर्वांनी घेतली पाहिजे.

---

## बारावा बालदिन

ह्या बालदिनानिमित्त समंग काजूच्या १०,००० पुड्या पुणें येथील व्यापारी श्री. महादेव गोविंद कुलकर्णी यांनीं तयार करून पुरविल्या. श्री. कुलकर्णी यांनीं चालू सालीं, सुक्या मेव्याऐवजीं समंग काजूची नवीन तऱ्हा निर्माण केली असून, तिचा खपहि चांगल्या प्रमाणावर चालला आहे. काजू हा पौष्टिक असून त्याच्या पुड्या स्वतांचे देखरेखीखालीं घरींच त्यांनीं तयार केल्या आहेत. शाळेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं हा काजू पसंत केला असून पुणें व पुण्याबाहेरहि त्यास मागणी चांगली येत आहे.

## गेल्या वर्षाचें आर्थिक समालोचन

(२)

(मुंबई येथील शेअर, स्टॉक व फिनॅन्स ब्रोकर्स,मेसर्स आर. आर. नाबर आणि कंपनी, ह्यांनीं १९४० मधील आर्थिक घडामोडींचा अहवाल प्रसिद्ध केला आहे, त्यावरून गेल्या अंकांत माहिती दिली होती. तिचाच हा उत्तरार्थ आहे.)

१९३९ चे मध्याचे सुमारास रुपयांचा संग्रह करून ठेवण्याची प्रवृत्ति बळावली, तरी बँकांजवळ पुरसे तरते पैसे होते व त्यांस ठेवी परत देण्यास बिलकुल अडचण भासली नाहीं. १० मे ते २८ जून ह्यांचे दरम्यान शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी सुमारें १०३ कोटि रुपयांनीं कमी झाल्या. नोटांचें रुपयांत रूपांतर करून घेण्याचीहि लोकांची घाई सुरू झाली. १० मे ते २१ जून ह्या मुदतींत १६३ कोटि रुपये किंमतीच्या नोटांची रुपयांत मोड केली गेली. जरूरीपेक्षा आधिक रुपये जमविणें डिफेन्स ऑफ इंडिया नियमांखाली बेकायदा ठरविण्यांत आलें तरी रुपयांस मागणी कायम राहिली व रिझर्व्ह बँकेजवळील रुपयांचा साठा कायद्यानें घालून दिलेल्या मर्यादेखाली गेला. सरकारनें एक रुपयाच्या नवीन नोटा काढून परिस्थिति आटोक्यांत आणली. अधेली व पावली ह्यांतील चांदीचें प्रमाणहि पुढें उतरविण्यांत आलें व वर्षअखेर रुपयांतील चांदीहि कमी करण्यांत आली.

हिंदुस्थान सरकार व पांच प्रांतिक सरकारें ह्यांनीं ट्रेझरी बिलांच्या स्वरूपांत रकमा उभारल्या. त्यांचे व्याजाचे दरांत मागें अतिशय तफावत दिसून येत असे, ती १९४० मध्यें कमी झाली. अंतर्गत हुंड्या व प्रॉमिसरी नोटा ह्यांवरील पट्टी सरकारनें कमी केल्यामुळें हुंड्यांची लोकप्रियता वाढण्यास सहाय झालें. रिझर्व्ह बँकेनें पैशाच्या वर्गावर्गीसहि सुलभता प्राप्त करून दिली व बँकिंग संस्थांवरील नियंत्रण वाढवलें. ४ जून रोजीं हिंदुस्थान सरकारनें १० वर्षांचीं डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें, ६ वर्षांचे डिफेन्स बाँड्स व ३ वर्षांचे बिन व्याजी डिफेन्स बाँडस विक्रीस काढले. पोस्टल कॅश सर्टिफिकेटांतील पैसे लोकांनीं काढून घेतले होते, त्याची भरपाई सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांनीं केली. डिफेन्स बाँडस विशेष लोकप्रिय झाले नाहींत. जुलैमध्यें १९४०-४६ चें ३% चें नवीन कर्ज काढण्यांत आलें, तें अजून मिळूं शकतें. १९४०-४३ चें कर्ज सरकारनें फेडून टाकलें. मद्रास, पंजाब, संयुक्तप्रांत व आसाम ह्या प्रांतिक सरकारनीं कर्जें काढलीं. मद्रास खेरीज बाकी सर्व प्रांतांचीं कर्जें खपण्यास अडचण पडली व अंडररायटं करणारांस तीं घ्यावीं लागलीं.

२३ फेब्रुवारी रोजीं हिंदुस्थान सरकारनें पौंडांतील हिंदी कर्ज-रोख्यांची रुपयांतील रोख्यांत बदली करण्याची योजना जाहीर केली. कांहीं लोकांनीं आपले रोखे तर बदललेच, परंतु रिझर्व्ह बँकेनें ३ कोटि पौंड किंमतीच्या रोख्यांबद्दल त्या किंमतीचे हिंदुस्थान सरकारचे रोखे दिले. ह्यामुळें हिंदुस्थान सरकारचें ग्रेट ब्रिटन-मधील देणें हळूहळू कमी होईल. निश्चित व्याज देणारे कंपन्यांचे शेअर्स, त्याचप्रमाणें बँका, विमा कंपन्या, रेल्वेज, वीज कंपन्या, इत्यादींच्या भागांस १९४० सालीं चांगली मागणी राहिली, व वर्षअखेर त्यांचे किंमतींत १०% वाढच झाली. किंमतीवर सरकारचें प्रभावी नियंत्रण असल्यामुळें औद्योगिक चलती घडून आली नाहीं. सरकारच्या ऑर्डरींवर नफा दहा टक्क्यांपेक्षा अधिक सुटत नाहीं व शेतीच्या मालास किंमत अल्प येत असल्यामुळें व कित्येक ठिकाणीं पावसाचा तुटवडा पडल्या-मुळें मालाचा अंतर्गत उठावहि कमी झाला. कारखान्यांस काम-गारांतील असंतोषाची झळ पहिल्या सहामाहींत लागली. रहाणीचा खर्च वाढल्याबरोबर कामगारांनीं महागाई भत्त्याची मागणी केली व कित्येक ठिकाणीं संपहि झाले. कांहीं बोनस देऊन कारखान-दारांनीं परिस्थिति आटोक्यांत आणली.


# दि गुड-वुइल ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.

मॅनेजिंग डायरेक्टर



## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१३,००,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद (भद्र ऑफिस), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के., के. टी. मि. ए. मेंडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## विचार प्रवर्तक सहकारी बातम्या

(ले.—वा. चिं. भानू.)

मुंबई इलाख्यांत सुरत येथें दुधाचा पुरवठा करणारी एक सहकारी संस्था रा. सा. व्ही. सी. जाधव यांच्या नेतृत्वाखाली नमुनेदारपणानें चाललेली मी पाहिली आहे. या संस्थेनें नुकतीच आपल्या स्वतःच्या मालकीची एक इमारत बांधली असून दुधाची शास्त्रीय रीत्या तपासणी करणें, दूध न तापवितां त्यांतून मलई बाजूस काढणें, दूध असेच्या तसेंच पुष्कळ वेळ टिकून राहील अशी व्यवस्था करणें, लोणी काढणें हीं कामें यांत्रिक साधनांनीं तेथें करण्यांत येतात. गिऱ्हाईकें बांधलेलीं आहेत व तिकीट-पद्धतीनें दूध विकलें जातें. ही संस्था सभासद गवळ्यांना दुभत्या जनावरांसाठी भांडवल पुरविते व दर आठवड्यास होणाऱ्या दुधाचे हिशेबांतून कर्जाचे हप्ते कापून घेते. ज्या गवळयाचें दूध अधिक घट्ट व कसदार निघेल त्याला सवलती आहेत व ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा तें कमी कसदार निघाल्यास दंड आहे म्हणजे भावांत चढउतार आहे. संस्था नमुनेदार आहे.

* * *

आपल्या पुण्यांत दररोज कितीतरी मण दूध खपत असेल. पण दूध-पुरवठ्याचा असा शास्त्रीय साधनांनीं युक्त असा प्रयत्न लष्कीच्या सरकारी डेअरी शिवाय अन्य असल्याचें ऐकिवांत नाहीं. 'दुधांत पाणी किती घातलेस' असें विचारण्याऐवजी 'पाण्यांत दूध किती घातलेस' असाच प्रश्न पुण्यांतील गवळयांना हमेशा घरोघर विचारला जातो! वनस्पती आहार करणाऱ्या बहुजन समाजाला दूध हेंच एक पोषक अन्न आहे. पण तें शुद्ध आणि निर्मळ मिळण्याची मात्र मारामार. जोगेश्वरीच्या अड्ड्यावर रुपयास १६ शेरापासून ३-३॥ शेरापर्यंत भावानें दूध विकलें जातें. पण त्याची खात्री मात्र कोणासच देतां येत नाहीं. 'डिग्री' लाऊन देखील दूध देतात, पण इतर पदार्थांप्रमाणें भेसळीच्या शास्त्राचा उपयोग दुधावरही करण्यांत दूधवाले मग ते गवळी पेशाचे असोत किंवा 'डेअरी' या आधुनिक नांवाखाली मिरविणारे धंदेवाले असोत, येतो. त्यामुळें 'डिग्री'चा उपयोग फक्त शपथे पुरताच हें आतां जाणत्यांना माहीत झालेलें आहे! मुंबईप्रमाणें पुण्यास चाऱ्याची किंवा दुभत्या गुरांचे गोठवाडे बांधण्याची अडचण उद्भवणारी नाहीं. मोटारच्या वाहतुकीच्या साधनांनीं २०-२५ मैलांवर गोळवाडा ठेऊन तेथून सांज-सकाळ दुधाचा पुरवठा करणें व तें शास्त्रीय साधनांनीं तपासून गिऱ्हाईकांना हस्तस्पर्शरहित पद्धतीनें घरपोंच पुरविणें, मलई, शुद्ध लोणी व ताक यांची विक्री करणें हीं कामें सहकारी पद्धतीनें करण्याचें कोणी उद्योगप्रिय गृहस्थानें हातीं घेण्यासारखें आहे. सहकारी पद्धतीनें उभारणी केल्यास भांडवलाच्या पुरवठ्याची अडचण बहुधा पडणार नाहीं; कलकत्ता कार्पोरेशनप्रमाणें पुण्याची राष्ट्रीयवृत्तीची म्युनिसिपल कमिटी सक्रीय सहानुभूति दाखवीलच. सहकारी खात्यामार्फत प्रयत्न केल्यास सरकारी इस्पितळांचें मोठें व कायमचें गिऱ्हाईक हस्तगत होण्यासारखें आहे. प्रथम १०-१५ डेअरी मालकांनीं एकत्र होऊन प्रयत्न केल्यास यशाचा मार्ग दूर नाहीं!

---


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं

असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | १८ अकलूज (जि. सोलापूर) |
| २ सातारा („ सातारा) | १९ विरमगांव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | २० धुळें („ प. खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | २१ दोंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | २२ शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी („ „) | २३ शहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २४ नंदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २५ साक्री („ „) |
| ९ वांई („ „) | २६ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २७ तळोदें („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २८ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २९ सटाणा („ „) |
| १३ बेलापूर („ „) | ३० कळवण („ „) |
| १४ राहुरी („ „) | ३१ लासलगांव („ „) |
| १५ भिवंडी („ ठाणें) | ३२ नांदगांव („ „) |
| १६ पालघर („ „) | ३३ दोहद („ पंचमहाल) |
| १७ कल्याण („ „) | ३४ कालोल („ „) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

### सातारा स्वदेशी कमर्शिअल कं. लि.

वरील बँकेस ३० जून, १९४० अखेर संपलेल्या वर्षी २,७५२ रुपये नफा झाला, त्यांत मागील सालचा शिल्लक नफा मिळविला म्हणजे ३,३१३ रुपये होतात. त्यांतून १ हजार रुपये रिझर्व्ह फंडांत टाकावे, साधारण भागीदारांस करमाफ ८% व अग्रहक्काचे भागीदारांस ६% व ५% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी १,९४६ रुपयांचा विनियोग करावा व पुढील सालाकरितां ३६७ रुपये शिल्लक ठेवावे, असें बँकेच्या १५-१२-४० रोजां भरलेल्या वार्षिक सभेंत ठरलें. बँकेचें वसूल भांडवल २८,७७० रुपये असून रिझर्व्ह व इतर फंडांत मिळून ३०,९०० रुपये आहेत. बँकेकडे १७ लक्ष, ५८ हजारांच्या ठेवी आहेत. तिनें सुमारें ६½ लक्ष रुपये कर्जाऊ दिले असून तिचेजवळ ११ लक्ष, १३ हजारांचे रोखे, डिबेंचर्स, रेल्वे शेअर्स, प्रेफरन्स व इतर भाग वगैरे आहेत. १९०७ सालीं बँक स्थापन झाली. श्री. वा. ग. चिरमुले ह्यांचे नेतृत्वाखाली तिची प्रगती होत आहे. ताळेबंदावरून बँकेच्या सुरक्षित व्यवहाराची कल्पना येते.

---

### नागपूर प्रीमियर को. हौसिंग सोसायटी लि., नागपूर

वरील सोसायटीचा ३० जून, १९४० अखेरचा अहवाल आमचेकडे आला आहे. अहवालाचे मुदतींत सोसायटीच्या सभासदांची संख्या ३३९ ची ३८४ झाली व भाग भांडवल १,००,१०० चें १,०२,६०० रुपये झालें. अहवालाचे वर्षी सोसायटीनें प्रांतिक सहकारी बँकेकडून १ लक्ष, ५६½ हजार रुपये घेतले व १ लक्ष, १८½ हजार रुपये फेडले. जून १९४० अखेर सोसायटीनें बँकेचे सुमारें ६३ हजार रुपये देणें आहेत. ह्यांस १ लक्ष, १८ हजार रुपयांच्या किंमतीच्या गहाणाचें व ३ हजारांच्या मुदती ठेवींच्या लावून देण्याचें तारण आहे. सोसायटीकडे सभासदांच्या २ लक्ष, ४३½ हजारांच्या मुदतीच्या ठेवी आहेत. सेव्हिंग्ज बँक-खात्यांत १४ हजार रुपये आहेत. अहवालाचे वर्षी सोसायटीनें आपल्या सभासदांस १ लक्ष, ३०½ हजार रुपये कर्जाऊ दिले व ९५ हजारांची परतफेड झाली. एकूण ३ लक्ष, ८० हजार रुपये येणें आहेत, त्यांचे पोटीं ९½ लक्ष रुपयांची मालमत्ता व ५५ हजारांच्या पॉलिसी हीं लावून घेतलेलीं आहेत. वर्षअखेर सोसायटीस सुमारें ११ हजार रुपये नफा झाला. नफ्याचा एक चतुर्थांश भाग रिझर्व्ह फंडांत टाकून भागीदारांस ५½% दरानें डिव्हिडंड देण्याकडे ५,६४५ रुपयांचा विनियोग करावा व कर्जदार भागीदारांस व्याजांत ½% सूट देण्याकडे १,८८९ रुपये खर्च करावे, असें सोसायटीच्या ता. ३ नोव्हेंबर, १९४० रोजीं भरलेल्या वार्षिक साधारण सभेंत ठरलें. सोसायटीनें आपले पैसे तरते ठेवले आहेत. गेल्या दहा वर्षांतील सोसायटीची प्रगति अत्यंत समाधानकारक आहे. श्री. जी. ए. मोघुले, बी. कॉम. हे सोसायटीचे अध्यक्ष असून श्री. कोलते व श्री. फडनवीस हे सेक्रेटरी आहेत.

---

### नाशिक जिल्हा सें. को. बँकेच्या ठेवीदारांच्या ठेवीची परतफेड

नाशिक जिल्हा सें. को. बँक लिक्विडेशनमध्यें आहे, तिच्या ठेवीदारांस रुपयांत १½ आण्याचें दुसरें डिव्हिडंड देण्यास लिक्विडेटर, श्री. जी. के. प्रधान, जी. डी. सी. ए., ह्यांनीं प्रारंभ केला आहे. लोकांनीं बँकेंत जाऊन आपल्या वाटणीची रकम घेऊन जावी.

### चांदीच्या व सोन्याच्या किंमतीमधील चढ-उतार

चांदीच्या बाजारावर, ग्रेट ब्रिटननें युद्ध जाहीर केल्याचा तात्काळ परिणाम झाला व चांदीची किंमत एका दिवसांत सुमारें १० रुपयांनीं चढली. खालील तक्त्यांत मुंबई बाजारांतील चांदीच्या किंमतीचा चढउतार दाखविला आहे:—

| चांदी | १९३९ | १९४० |
|---|---|---|
| | रु. आ. पै | रु. आ. पै |
| सरासरी किंमत | ५४ २ १० | ६० १२ ६ |
| कमाल किंमत | ६८ ४ ० | ६४ १३ ० |
| किमान किंमत | ४४ ७ ६ | ५४ १० ० |
| वर्षअखेर मुंबई बाजारांत शिल्लक | ५० हजार पाटल्या | ७ हजार पाटल्या |

( किंमती १०० तोळ्यांच्या आहेत )

सोन्याच्या किंमतींतहि अशीच एकदम भरमसाट वाढ झाली.

| सोनें | १९३९ | १९४० |
|---|---|---|
| | रु. आ. पै | रु. आ. पै |
| सरासरी किंमत | ३८ ९ ५ | ४२ ५ १०½ |
| कमाल किंमत | ४३ ८ ० | ४८ ८ ० |
| किमान किंमत | ३६ ९ ० | ४० २ ६ |
| वर्षअखेर मुंबई बाजारांत शिल्लक | २ लक्ष तोळे | ५० हजार तोळे |

( किंमती १ तोळयाच्या आहेत )

---

### हिंदी गिरण्यांची परिस्थिति सुधारली

चालू युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी मुंबईच्या कपास कापडाच्या गिरण्यांची परिस्थिति अत्यंत वाईट झाली होती व ज्यास्त ज्यास्त खराब होत चालली होती. युद्धामुळें गिरण्यांस पुनः चांगले दिवस कसे येत आहेत, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| | मार्च १९३९ अखेर | ऑगस्ट १९३९ अखेर | आतां |
|---|---|---|---|
| बंद चात्या | २,९९,९०० | ६,०६,८०३ | ४,३०,७३९ |
| बंद माग | ५,६१४ | ८,७१६ | ५,६०५ |
| दोन पाळया चालणाऱ्या जात्या | १३,४३,००० | १०,९४,२९० | १४,८०,८१५ |
| दोन पाळया चालणारे माग | ३१,३१२ | २५,७२५ | ३६,६६२ |
| कापडाच्या हातीं असलेल्या ऑर्डरी (गांठी) | १,९०,१६२ | १,४२,४५३ | २,७९,५२५ |
| गिरण्यांत शिल्लक कापड ( गांठी ) | १,३६,००० | १,७९,००० | ६३,००० |
| शर्टिंगची किंमत ( पौंडास ) | ९ आ. | ८ आ. | ९ आ. ९ पै |
| २०नंबरच्या सुताची किंमत ( पौंडास ) | ६ आ. ३ पै | ६ आ. | ८ आ. ३ पै |

---

### परीक्षकांसाठीं उत्तरांच्या वह्या

मुंबई विश्वविद्यालयानें १९४१ च्या परीक्षांस लागणाऱ्या, उत्तरांच्या वह्यांच्या, ग्राफ पेपरच्या व टिपकागदांच्या पुरवठ्याचीं टेंडरें मागविलीं आहेत. उत्तराच्या वह्या ९ लक्ष हव्या आहेत, ग्राफ पेपर ५० हजार पाहिजेत व टिपकागदांचीं १०० रिमें हवीं आहेत. हे सर्व कागद देशी असले पाहिजेत.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११२—४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—९ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९४—९ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०१-१५ |
| ३% ( १९६३-६५ ) ... ... ... | ९३—७ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९६—५ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०७—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) ... .. | ११३—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% ... ... | १३९—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४१—८ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५७२—८ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०६—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३०—४ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४६२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६३२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९८—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९९०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ७००—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २१४—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४५—४ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—१ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ... | ४०-१० |
| ओरिएंटल विमा (. २०० ) १२५ रु. ... | ३८००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१५—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४९—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३६३—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | ४८३०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १३८—४ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४१-१५-३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६२-३-० |


दि
बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना




मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस


"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धीखातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबूत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

**सूचना**—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारास टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ता:—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर-Amritsar.

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट




१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकमागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हंशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बाक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बाक्षिस आणि टपाल हंशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)



# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.



## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

कामगार ब्राम्ही तेल
हिरेमणि तेल
आवळ्याचे तेल
स्थापना १९०६
डोकें शांत रहातें. केंस मजबूत होतात.
गळ्याचे बंद होतात व मुक्त रहातात.
धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं.४)



तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अतीस्वच्छ व चकचकीत ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

For Collegians
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
SHEVAK BROS.

| Work-Shop Address: | Branch No. 1 |
| --- | --- |
| 153 Kasaba, | Shevak Quarters, near Fergusson College |
| Poona 2 | Poona 4 |

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

अर्थशास्त्र
लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख २२ जानेवारी, १९४१ अंक ४

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

**डॉ. एन. आर. राजोपाध्ये**
यांचे
ॲस्गॉल or पौष्टिक पिल्स घ्या. किंमत १२ आ. फक्त
सोल एजंटः "वेलणकर वनौषधालय", तुळशीबाग रस्ता, पुणें.
एजन्सी देणें आहे. एक आण्याचा स्टँप पाठवून विचारावें.

**देशी औषधें तयार करणारा**
**महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना**
पंडु, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

**रक्तवर्धक**

**वापरा.**

**सर्वत्र मिळतें.**

—: केंद्रं :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा**
**पुणें, लि.** पुणें ४.

**५वा आठवडा**
नवयुगचा मराठी विनोदी बोलपट

**लग्न पहावं करून**

दिग्दर्शक : विनायक
भूमिका : दामुअण्णा मालवणकर

नवयुग चित्र

क्षणाक्षणाला तुम्हांस हंसवून सोडणारा बोलपट—

**मिनर्व्हा — पुणें**

डॉ. एन. आर. राजोपाध्ये यांचे खास देखरेखीखालीं चाललेलें

**" वेलणकर वनौषधालय "**

येथें सर्व तऱ्हेच्या वनस्पति व सिद्धौषधी मिळतील. १ पैशापासून ते सिद्धौषधींपर्यंत मिळण्याचें हें पुण्यांतील पहिलेंच दुकान होय. येथें रोगी तपासून औषध देण्याचीही सोय आहे. दम्यावर दर रविवारीं सकाळीं मोफत औषध दिलें जातें.

उघडण्याची वेळः—सकाळीं ८॥ ते १२ व दुपारीं ३॥ ते ८ पर्यंत.

पत्ता : "वेलणकर वनौषधालय" तुळशीबाग रस्ता, पुणें.

बँका व कचेऱ्या यांस उपयुक्त असा एक
ब्रीफ साईज
**टाइपरायटर**
कोरा असून
**स्वस्त विकाऊ आहे.**
चौकशी कराः—
अवर होम, ६१९ शनवार पुणें. टेलिफोन नं. ९/११५.

## विविध माहिती

### पंजाबांत ३ कोटींच्या ऑर्डरी

हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्यानें पंजाबमध्यें माल पुरवठ्याच्या सुमारें ३ कोटि रुपयांच्या ऑर्डरी नुकत्याच दिल्या आहेत. त्यामुळें, तेथील कारखाने तेजींत आहेत.

### विदेशी कपाशीच्या आयातींत वाढ

नोव्हेंबर, १९४० अखेर संपलेल्या आठमाहींत हिंदुस्थानांत ६३ॱ कोटि रुपयांची कपास बाहेरून आली. १९३९ च्या तत्सम आठ महिन्यांतील कपाशीची किंमत ५½ कोटि रुपये होती. हिंदी कपाशीची निर्गत १९४० च्या पहिल्या आठ महिन्यांत झाली, तिची किंमत १६ कोटि रुपये भरली. म्हणजे, निर्गतीच्या किंमतींत २¼ कोटि रुपयांची घट झाली. ह्याचा अर्थ हिंदी कपाशीची निर्गत कमी होऊन उलट विदेशी कपाशीनें हिंदुस्थानांत अधिक प्रवेश केला.

### हिंदी विमा कायद्यांत दुरुस्ती

हिंदी विमा कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल सरकार मध्यवर्ती असेंब्लीच्या येत्या बैठकींत मांडणार आहे, त्याची सर्व वाचनें त्या बैठकींतच पुरीं होतील.

### स्वदेशी थर्मामीटर्स

हिंदुस्थान सरकारनें एक हजार डॉक्टरी थर्मामीटरची ऑर्डर कलकत्ता येथील एका फर्मला दिली. तिनें पुरविलेलीं थर्मामीटर्स समाधानकारक असल्याचें आढळून आलें.

### ब्रिटिश सरकारास आर्थिक सहाय

ब्रिटिश साम्राज्यांतील देश, संस्थानिक, खासगी संस्था व व्यक्ती ह्यांनीं ब्रिटिश सरकारास १९४० अखेर युद्ध-कार्यासाठी एकूण सुमारें २७ कोटि रुपयांची रोखीनें मदत केली.

### लॉर्ड वेकफील्ड

सी. सी. वेकफील्ड आणि कंपनी ह्या सुप्रसिद्ध पेट्रोल तेलाच्या कंपनींचे गव्हर्निंग डायरेक्टर, लॉर्ड वेकफील्ड, हे नुकतेच आपल्या वयाच्या ८१ व्या वर्षी मरण पावले. त्यांनीं कोट्यवधि रुपये सत्कार्य करणाऱ्या संस्थांस दिले.

### दोन रुपये रोजावर डॉक्टराची नेमणूक

सुरत म्युनिसिपॅलिटीनें आपल्या परेल इस्पितळांत एका एल. सी. पी. एस. डॉक्टराची दोन रुपये रोजावर नेमणूक केली आहे. पहिल्या दर्जाच्या म्युनिसिपॅलिटीस अशा रीतीनें नेमणूक करणें कमीपणाचें आहे, अशी टीका तिचेवर म्युनिसिपॅलिटीच्या जनरल बोर्डाचे सभेंत करण्यांत आली, परंतु बोर्डानें नेमणूक कायम केली.

### युद्धविषयक धोक्याच्या विम्याची अंमलबजावणी

युद्धविषयक धोक्याच्या सक्तीच्या विम्याची अंमलबजावणी कोणी चुकवत नाहींना, ह्याविषयीं चौकशी करण्यासाठी इन्स्पेक्टर्स नेमण्यांत आले आहेत. श्री. एम. एस. जयकर ह्यांची ह्या कामीं मुंबई प्रांताकरितां नेमणूक झाली आहे.

### हेन्री फोर्ड ह्यांचें पत्रक

मि. हेन्री फोर्ड हे आतांपर्यंत तटस्थ होते. ग्रेट ब्रिटनला युद्ध-कार्यांत अमेरिकेनें शक्य ती मदत द्यावी, असें त्यांनीं एक पत्रक काढून जाहीर केलें आहे.

### लष्करभरतीसाठी गव्हर्नरांच्या अध्यक्षतेखाली सभा

मुंबई प्रांतांतील लष्करभरतीविषयीं मुंबईचे गव्हर्नर पुणें येथें ता. २२ रोजीं भरविण्यांत येणाऱ्या सभेंत भाषण करणार आहेत. महाराष्ट्रांतील व कर्नाटकांतील सुमारें ३५० लोकांना सभेस हजर रहाण्यासाठी निमंत्रणें गेलीं आहेत.

### पोलंडमधील कालव्यांची सुधारणा

आपल्या ताब्यांतील पोलंडमधील रेल्वे व वहातुकीचे कालवे ह्यांची पुनर्रचना करण्यांत तेथील जर्मन अधिकारी गुंतले आहेत. जर्मनींतील कालव्यांशीं पोलंडमधील कालवे जोडण्यांत येतील.

### आयराची परिस्थिति

“गेल्या १५ महिन्यांत चालू युद्धाचे दुष्परिणाम आयराला फारसे भोगावे लागले नाहींत, हें सुदैव होय. आपले देशांत साखरेचा पुरवठा भरपूर आहे. सिमेंट तर निर्गतहि करतां येईल. कपड्यांची उणीव नाहीं. माल आयात करणाऱ्या आगबोटींतील कांहीं आगबोटी बुडत असल्याकारणानें पेट्रोलचा पुरवठा अगदी वक्तशीर नाहीं. चहासंबंधीं तूर्त काळजीचें कारण नाहीं व त्याचा पुरवठा नियंत्रित करण्याचें प्रयोजन नाहीं. परंतु जरूर पडल्यास सर्वच प्रकारच्या मालाच्या पुरवठ्याचें नियंत्रण करावें लागेल. आयराजवळ सहा महिने पुरेल इतका गहूं आहे, परंतु अन्नाचें उत्पादन वाढविलें नाहीं तर उपासमारीचा प्रसंग ओढवेल.” आयर्लंडचे पुरवठा खात्याचे मंत्रि, मि. लेमास ह्यांचें आयराच्या विधिमंडळांतील भाषण.

### मुंबई कॉर्पोरेशनचें अंदाजपत्रक

मुंबई कॉर्पोरेशनला १९४१–४२ मध्यें ३ कोटि, ५२¾ लक्ष रुपये उत्पन्न होईल व ३ कोटि, ६७½ लक्ष रुपये खर्च होऊन १५ लक्ष, ४३ हजारांची तूट येईल असा अंदाज आहे.

### आगाखानांची हीरकतुला

ना. आगाखान ह्यांनीं इस्माइली मुसलमानांचें धर्मगुरुत्व पत्करल्याला १९४५ मध्यें ६० वर्षे पुरीं होतात, त्या प्रसंगीं त्यांची हीरकतुला करण्यांत येणार आहे, त्यास सुमारें ७ कोटि रुपये लागतील. १९३५ सालीं त्यांची सुवर्ण ज्युबिली साजरी झाली. त्यावेळीं त्यांची नैरोबी व मुंबई येथें सुवर्णतुला झाली होती.

### अहमदाबाद येथील गिरण्या

अहमदाबादमधील कपास कापडाच्या ६८ गिरण्यांपैकी ५१ गिरण्यांत रात्रपाळी चालू आहे. कांहीं गिरण्यांत दोन ऐवजी तीन पाळ्या चालू होण्याचा संभव आहे.

### मनिऑर्डरी

हिंदुस्थानांतून १९३९-४० सालीं जितक्या रुपयांच्या मनिऑर्डरी बाहेर गेल्या त्यापेक्षा ५ कोटि, ६६ लक्ष अधिक रुपयांच्या मनिऑर्डरी परदेशांतून हिंदुस्थानांत आल्या. म्हणजे, देण्याघेण्यांत, इतक्या रकमेची अनुकूल तफावत पडली. ब्रह्मदेशांतून मनिऑर्डरीनें ३½ कोटि रुपये आले. मलायानें १¾ कोटि रुपये पाठविले. हिंदुस्थानांतील पोस्ट ऑफिसांतून एकूण ७६ कोटि रुपयांच्या मनिऑर्डरी केल्या गेल्या, त्याबाबत पोस्ट खात्यास कमिशनचे रूपानें १ कोटि, ६ हजार रुपये मिळाले.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३८ |
| २ हिंदुस्थानांत युद्धसामुग्रीचे वाढते कारखाने ... | ३९ |
| ३ इंग्लंडला अमेरिकेंत सहाय ... | ३९ |
| ४ उद्योगधंद्यांस बँकांचें सहाय ... | ४० |
| ५ स्फुट–विचार ... उसाची पैदास मोठी, परंतु साखरेचें उत्पादन नियंत्रित–संयुक्त प्रांताची तोड–जपानची हिंदी बाजारपेठ–ग्रेटब्रिटनमधील सहकारी दुकानें—सध्याची त्यांची परिस्थिति. | ४१ |
| ६ मुंबई येथील सोन्या-चांदीचा बाजार ... | ४३ |
| ७ न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि. | ४३ |
| ८ प्रॉमिसरी नोटसिंबंधीं एक निवाडा ... | ४४ |
| ९ सहकारिता आणि क्रिकेट | ४४ |
| १० निवडक बाजारभाव ... | ४६ |



# अर्थ

बुधवार, ता. २१ जानेवारी, १९४१


## हिंदुस्थानांत युद्धसामुग्रीचे वाढते कारखाने

आधुनिक पद्धतीच्या सैन्यामध्यें, सुधारलेल्या यांत्रिक शस्त्रास्त्रांचा भाग फार महत्त्वाचा असतो. चिलखती गाड्या आणि विमानें ह्यांचा किती विस्तृत उपयोग चालू युद्धांत झाला आहे आणि होत आहे हें प्रत्यक्ष दिसतच आहे. दारूगोळा, तोफा, बंदुका ह्यांच्या बाबतींत सुधारणा सारखी होत आहे आणि नवीन, नवीन प्रकारचीं अधिकाधिक नाशकारक व गतिवान शस्त्रास्त्रें बनवण्यांत येत आहेत. हिंदुस्थानांतील सैन्य कार्यक्षम होण्यास त्याचें आधुनीकरण ह्या तऱ्हेनें होणें आवश्यक आहे. जुनीं शस्त्रास्त्रें वापरणाऱ्या फौजेचें आधुनिक सामुग्री वापरणाऱ्या सैन्यापुढें कांहीं चालणार नाहीं हें उघड आहे. आघात आणि बचाव ह्या दोन्हीं बाबतींत सैन्याचें यंत्रीकरण होणें अपरिहार्य झालें आहे हें सिद्ध करण्याची आवश्यकता नाहीं. तसेंच, येथें हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं कोणत्याहि देशाच्या फौजेचें आधुनीकरण व्हावयाचें म्हणजे त्यास जरूर असलेली सुधारलेलीं युद्धसामुग्री बनवण्याची स्वतंत्र व भरपूर व्यवस्था होणें अगत्याचें आहे. चालू युद्धाच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतली फौज वाढवणें आवश्यक आहे, एवढेंच नव्हें तर, त्याच्या आधुनीकरणाची समाधानकारक तरतूद करणें अगत्याचें आहे. हिंदुस्थानच्या सैन्याच्या आधुनीकरणाचे बाबतींत चॅटफील्ड कमिटीनें मागें शिफारसी केल्या होत्या त्यांस मूर्तस्वरूप देण्याची आतां तयारी झाली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. दारूगोळा आणि शस्त्रास्त्रें बनवण्याच्या कारखान्यांचे प्रीत्यर्थ चार कोटि रुपये खर्च व्हावयाचे आहेत.

ह्यासंबंधांतल्या उत्पादन योजनेप्रमाणें दारूगोळ्यांच्या कारखान्यांत वीस टक्क्यांनीं विस्तार व्हावयाचा असून त्यांमध्यें अनेक प्रकारची अगदीं अलीकडच्या पद्धतीची लढाऊ सामुग्री बनवली जाणार आहे. विमानांतून टाकावयाचे बॉंब, विमानांच्या हल्ल्यांपासून बचाव करणाऱ्या तोफा इत्यादींचा ह्या सामुग्रींत समावेश होईल. ह्या कामीं लागणारी यंत्रसामुग्री इंग्लंडमधून पुरवली जाण्याचें निश्चित झालें आहे आणि तो चालवण्यास लागणारे कुशल कारागीर जरूर ती कला शिकणें व आपल्या कामाचा अनुभव मिळवणें ह्याकरितां विलायतेस पाठविण्यांत आले आहेत. चॅटफील्ड कमिटीच्या शिफारशींस ब्रिटिश सरकारची मान्यता मागेंच मिळाली असल्यानें नवीन कारखाने उभे करण्याचें कार्य सुकर झालें आहे. चालू युद्धाच्या गरजांच्या दृष्टीनें लढाऊ कारखान्यांचा विस्तार त्या कमिटीच्या सूचनांच्या किती तरी पुढें गेला आहे. शस्त्रास्त्रांचे कांहीं भाग बिनसरकारी कारखान्यांमध्यें बनवण्याची व्यवस्था झाल्यानें आधुनीकरणाची गति वाढली आहे. शिपायांस लागणाऱ्या कपड्याच्या कारखान्यांतलें उत्पादन अनेक पटींनीं वाढलें आहे. मद्रास, मुंबई, कलकत्ता व पंजाब येथें असले कारखाने आतां चालू झाले आहेत. गेल्या महायुद्धाच्या सर्वांत अधिक पैदाशीच्या वर्षांत म्हणजे १९१७ सालीं सबंद बारा महिन्यांत ह्या प्रकारचें जेवढें उत्पादन झालें तेवढें उत्पादन आतां एका महिन्यांत होण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. युद्ध चालू होण्यापूर्वी लढाऊ सामुग्रीच्या कारखान्यांची जोराची तयारी झालेली नव्हती. परंतु त्यांचा विस्तार युद्धाच्या प्रारंभानंतर झपाट्यानें झाला आहे आणि त्यांतले उत्पादन सारखें वाढत आलें आहे. लढाऊ सामुग्रीच्या उत्पादनाच्या जय्यत तयारीचें महत्त्व हिंदुस्थानाच्या बचावास किती आहे हें वर सांगितलेंच आहे. तूर्त पश्चिम रणांगणांवर चाललेल्या युद्धांत ब्रिटिश सरकारास हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या लढाऊ सामुग्रीचा चांगला उपयोग होत आहे. वाढलेल्या व वाढणाऱ्या उत्पादन सामर्थ्याचा जरूर पडल्यास हिंदुस्थानास स्वतःस उत्कृष्ट उपयोग होईलच. ह्या दृष्टीनें पहातां लढाऊ कारखान्यांचा विस्तार आपल्या देशास लष्करी आणि आर्थिक दृष्टीनें उपकारच होणार आहे त्यांत संशय नाहीं. आजची इंग्लंडची सोय ही वस्तुतः हिंदुस्थानची सोय आहे. लष्करी संरक्षण आणि लढाऊ सामुग्रीचा पुरवठा ह्यांचे बाबतींत हिंदुस्थानास स्वावलंबी होणें तर इष्टच आहे. त्या ध्येयाच्या पूर्तीस सध्या अमलांत येणाऱ्या उत्पादन योजनांचें सहायच होणार आहे.

## इंग्लंडला द्यावयाच्या सहायाविषयीं अमेरिकेंत कायदा

इंग्लंडला प्रस्तुत युद्धांत लढाऊ सामुग्री पुरवून सर्वतोपरी सहाय देण्याविषयींच्या प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्या धोरणास कायद्याचें स्वरूप देण्याचा प्रयत्न अमेरिकन कॉंग्रेसमध्यें चालला आहे. अमेरिकन खंडाच्या बाहेर होणाऱ्या युद्धासारख्या भानगडींमध्यें न पडतां अमेरिकन लोकांनीं तटस्थ रहावें ह्या मताचा एक पक्ष आहे आणि प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्या धोरणास विरोध करण्याची खटपट त्यानें चालवली आहे. कॉंग्रेसपुढील बिलाविषयीं व्यक्त केल्या जाणाऱ्या मतांच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत, त्यांवरून नियोजित कायद्याच्या मसुद्यांत सुचवण्यांत येत असलेल्या दुरुस्त्यांची कल्पना येते. इंग्लंडला लढाऊ सामुग्री पुरवली पाहिजे ह्यांत सर्वांचें एकमत आहे. पण ती केवळ रोखीनेंच पुरवावी का तारण घेऊन द्यावी, तसेंच प्रेसिडेंटास ह्यासंबंधांत सर्वाधिकार एकदाच देऊन टाकावे किंवा काय आणि अमेरिकेचें लष्करी संरक्षण व चालू युद्धांत इंग्लंडला द्यावयाचें सहाय ह्यांची सांगड घातली जाणें इष्ट आहे किंवा कसे हे वादाचे मुद्दे आहेत असें दिसतें. सध्याच्या युद्धांत इंग्लंडला यश मिळण्यावर अमेरिकेचें संरक्षण अवलंबून आहे हें तत्व एकदां मान्य झालें असतां बाकीचे वादाचे प्रश्न सुटण्यास अडचण पडावयाची नाहीं. जर्मनी, इटली व जपान ह्यांच्या त्रिकुटाचे डाव चालू असतां अमेरिकेनें सात्विक तटस्थपणाची वृत्ति स्वीकारणें आत्मघातकीपणाचें आहे, ह्या प्रेसिडेंट रूझव्हेल्ट यांच्या मतास अमेरिकन जनतेनें मान्यता देणें अगत्याचें आहे.

## उद्योगधंद्यांस बँकांचें सहाय्य

### हिंदुस्थानांतील आजची परिस्थिति

मोठ्या कारखान्यांस व गिरण्यांस भांडवल मुख्यतः दोन प्रकारांचें लागतें. ( १ ) दीर्घ मुदतीचें व ( २ ) अल्प मुदतीचें. जमीन, इमारती, यंत्रसामुग्री ह्यांसाठीं पहिल्याचा उपयोग होतो व चालू भांडवलाकरितां अल्प मुदतीचें भांडवल लागतें. दीर्घ मुदतीचें भांडवल उभारण्याची सर्वांत सोईस्कर पद्धति म्हणजे नियमित जबाबदारीच्या तत्वावर जॉइंट स्टॉक कंपनी काढणें ही होय. ह्या संबंधांत बँका शेअरविक्रीस व डिबेंचरें खपविण्यास मदत करूं शकतात. प्रथम शेअर्स अगर डिबेंचरें अंडरराइट करून तीं नंतर पैसे गुंतविणाराकडे वर्ग करण्याचें काम करणाऱ्या खास स्वतंत्र संस्था इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांत आहेत. जर्मनीमध्यें व्यापारी बँकांहि हें काम करतात. भागांच्या खरेदी–विक्री सुलभतेनें करतां येण्याच्या सोई हिंदुस्थानांत नीटशा उपलब्ध नसल्याकारणानें भाग खपण्यास अडचण पडते, व अंडरराइट करणाऱ्या संस्थांचे अभावी भागांच्या विक्रीचें काम अत्यंत जिकीरीचें होतें.

उद्योगधंद्यांत दीर्घ काल गुंतून पडणारें भांडवल गुंतविण्याचें काम व्यापारी बँकांचें नाहीं, ह्या धोरणानें त्या ह्या व्यवहारांत पडत नाहींत. म्हणजे, फक्त खेळत्या भांडवलाचा प्रश्न उरला. हिंदी कारखाने मुख्यतः कर्जाऊ रकमा घेऊनच तो प्रश्न सोडवतात. मॅनेजिंग एजंटांनीं कर्ज देऊन, जनतेच्या ठेवी स्वीकारून, सावकारांचें खासगी कर्ज घेऊन अगर व्यापारी बँकांकडून पैसे घेऊन उद्योगधंद्यास खेळत्या भांडवलाची तरतूद होते. मुंबई व अहमदाबाद येथील कपास कापडाच्या गिरण्यांचें एकूण खेळतें भांडवल कसें जमविलेलें आहे, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| | मुंबई (६४ गिरण्यांसंबंधीं आंकडे) | | अहमदाबाद (५६ गिरण्यांसंबंधीं आंकडे) | |
|---|---|---|---|---|
| | रु. | एकूण भांडवलाशीं प्रमाण% | रु. | एकूण भांडवलाशीं प्रमाण% |
| मॅनेजिंग एजंटांनीं दिलेलें | ५,३२,००,००० | २१ | २,६४,००,००० | २४ |
| जनतेकडील ठेवी | २,७३,००,००० | ११ | ४,२६,००,००० | ३९ |
| बँकांचीं कर्जें | २,२६,००,००० | ९ | ४२,००,००० | ४ |
| भाग भांडवल | १२,१४,००,००० | ४९ | ३,४०,००,००० | ३२ |
| डिबेंचर्स | २,३८,००,००० | १० | ८,००,००० | १ |

वरील आंकडे १९३० सालाबाबत आहेत. मुंबईच्या गिरण्यांचे एकूण भांडवलांपैकीं फक्त ९% भांडवल बँकांनीं दिलेलें आहे. अहमदाबादमध्यें त्याचें प्रमाण ४% पडतें. १९३० मध्यें मंदीस प्रारंभ झाला व बँकांनीं आपले पैसे आंखडते घेतले. नंतर पुनः चांगले दिवस आले तरी १९३६ मध्यें त्यांत सुधारणा झालेली आढळत नाहीं.

**कपास कापडाच्या गिरण्यांचें भांडवल**

| | मुंबई | | अहमदाबाद | | सोलापूर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ५६ गिरण्या | | ७३ गिरण्या | | ५ गिरण्या | |
| | रु. | एकूण भांडवलाशीं प्रमाण% | रु. | एकूण भांडवलाशीं प्रमाण% | रु. | एकूण भांडवलाशीं प्रमाण% |
| मॅनेजिंग एजंट्स | ७,४६,००,००० | ५९.७ | ३,२९,००,००० | ३१.७ | २१,००,००० | १५.४ |
| जनतेच्या ठेवी | १,२७,००,००० | १०.२ | ५,२९,००,००० | ५८.९ | १५,००,००० | ११.० |
| बँका | १,१९,००,००० | ९.५ | ५८,००,००० | ५.६ | २५,००,००० | १८.४ |
| डिबेंचर्स | १,७०,००,००० | १३.५ | ... | ... | ४४,००,००० | ३२.४ |
| इतर | ८९,००,००० | ७.१ | १,२३,००,००० | ११.८ | ३१,००,००० | २२.८ |
| एकूण | १२,५१,००,००० | १०० | १०,३९,००,००० | १०० | १,३६,००,००० | १०० |

### बँका कोणत्या पद्धतीनें पैसे देतात ?

कॅश क्रेडिटच्या पद्धतीनें बँका बहुधा पैसे देतात. पैसे घेणारानें बँकेंत खातें उघडावयाचें व ठराविक कमाल मर्यादेपर्यंतच्या रकमेचे त्यानें चेक काढावयाचे, अशी ही योजना असते. बँक माल आपले ताब्यांत घेते अगर लावून घेते. दररोज बँकेचे जेवढे पैसे वापरावे, त्यावरच कर्जदारास व्याज द्यावें लागतें. रकम वापरलेली असो अगर नसो कांहीं किमान व्याज बँकांस बहुधा द्यावें लागतें. बँकांचा मुख्य भर ज्या मालाचे पैसे सहज उभे रहातील अशांचें तारण घेण्याकडे असतो; कर्जदाराच्या वैयक्तिक पतीस त्या विशेष महत्त्व देत नाहींत. इमारती, यंत्रसामुग्री वगैरे सारख्या मौल्यवान जिंदगीकडेहि त्या लक्ष देत नाहींत. मॅनेजिंग एजंटांच्या वैयक्तिक पतीवर बँकांनीं माल दिला, तरी त्या मालाचें तारण पुनः त्या घेतातच. कच्चा माल व तयार माल ह्यांच्या किंमतीच्या ७०% ते ७५% रकम व तयार होत असलेल्या मालाच्या ५०% पेक्षा बँका अधिक रकम कर्जाऊ देत नाहींत. आपल्या रकमा वक्तशीर परत येण्याकडे बँकांचें लक्ष असतें, व बहुधा त्या पुनः नवीन कर्जें मंजूर करतात. परंतु, कर्जदारांस सहाजीकच थोडी भीति वाटत असते. कर्जदारांची खरी आर्थिक किंमत करणें बँकांस जड जातें, त्यामुळें कर्जें देतांना त्यांनीं इतकी काळजी घेणें स्वाभाविक असतें. कारखानदार एकाच बँकेकडून कर्जें घेतात असें नाहीं व बँकांस त्यासंबंधीं माहिती पुरविण्यास ते तत्पर नसतात. बँका त्यामुळें साशंक होतात. उद्योगधंद्यास पैसे पुरविण्यास हिंदी बँकांजवळ पुरेशा रकमा नसतात, असें नाहीं. मुख्य प्रश्न आहे, तो ठेवीदारांच्या बँकेवरील विश्वासासंबंधींचा आहे. उद्योगधंद्यांत पैसे गुंतविणाऱ्या बँकांनीं प्रथम आपल्या ठेवीदारांचा विश्वास संपादन केला पाहिजे.

इं. इं. बँकर्सचें ( त्रैमासिकांवरून )

## स्फुट विचार

### उसाची पैदास मोठी, परंतु साखरेचें उत्पादन नियंत्रित

चालू मोसमांत साडेसात लक्ष टनांच्यावर साखरेचें उत्पादन जाऊं नये असें संयुक्त प्रांत व बिहार येथील सरकारांनीं ठरविलें आहे आणि त्याप्रमाणें कारखान्यांत होणाऱ्या मालाचें नियंत्रण होणार आहे. साखरेचें उत्पादन मर्यादित झालें म्हणजे उसाचा त्यांमध्यें होणारा खपहि मर्यादित होणार हें उघड आहे. चालू सालांतली उसाची पैदास मात्र मर्यादित झालेली नाहीं ह्या कारणानें कारखान्यांत न गळणाऱ्या उसाचें काय होणार हा प्रश्न उपस्थित होतो. ह्या उसाचा गूळ करतां येईल पण तरीहि पुष्कळ ऊस शिल्लक राहून वाया जाईल. ह्यामुळें तो पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचें नुकसान होईल ही मोठीच अडचण आहे. सगळा ऊस कारखान्यांत गाळण्याची परवानगी द्यावी तर साखरेचें उत्पादन फाजील वाढेल आणि गेल्या हंगामांतला माल पडून राहिला आहे त्यांत नवीन साखरेची भर पडून सबंद धंद्याचा नाश होईल. साखर शिल्लकेंत बाळगण्याचें त्राण अनेक कारखान्यांत नाहीं आणि नवीन उत्पादनाचा बोजा त्यास सहन व्हावयाचा नाहीं.

---

### संयुक्त प्रांताची तोड

ह्या अडचणीवर संयुक्त प्रांताच्या सरकारनें तोड काढली आहे ती अशी. प्रांताच्या पश्चिम विभागांत गूळ मोठ्या प्रमाणावर होतो. तेथें हंगामाचे अखेर, क्वचित् अपवाद सोडल्यास, ऊस शिल्लक रहाण्याची भीति नाहीं. गोग्रा नदीच्या पूर्वेकडील विभागांत मात्र ही भीति आहे आणि कारखान्यांस ऊस पुरवणाऱ्या तेथील शेतकऱ्यांस फाजील उरणाऱ्या त्यांच्या पिकाबद्दल नुकसान भरपाई द्यावी लागेल. शेतांत उभें पीक शिल्लक राहील त्याचा अंदाज एप्रिलमध्यें पटवाऱ्यांचे मार्फत केला जाईल. सुरू उसापेक्षा खोडव्यास कमी दरानें नुकसान भरपाई दिली जाईल. त्या दोन जातींच्या उसासाठीं दर एकरी १५ व १० रुपये अनुक्रमें द्यावे असा विचार आहे. उसावर लहानशी पट्टी आकारण्यांत यावयाची आहे. तिची रकम साखरेचे कारखाने 'फाजील उसाबद्दल भरपाई' खात्यावर जमा करून ठेवतील आणि ती सुमारें १७ लक्ष रुपये इतकी होईल, असा अंदाज आहे. गोग्रा नदीच्या पूर्वेकडील प्रदेशांत शेतकऱ्यांमध्यें वांटण्यास ही रकम पुरेशी होईल. पश्चिमेकडील भागांत उसाचे दर कमी करण्यांत आलेले नसल्यानें तेथें नुकसान भरपाई देण्याचें कारण नाहीं. कांहीं ठिकाणीं भरपाई करण्याची जरूर भासल्यास दुष्काळ फंडांतून ती केली जावी अशी योजना आहे. संयुक्तप्रांत आणि बिहार ह्या प्रांतांत ऊस व साखर ह्यांचे विषयींचा धंदा किती गुंतागुंतीचा व अडचणीचा झाला आहे ह्याची कल्पना वरील योजनेवरून येईल. पण तेथील सरकारांस शेतकरी, कारखानदार व साखर विकत घेणारी जनता ह्या सर्वांच्या हिताचा मेळ घालणें अगत्याचें आहे हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

---

### जपानची हिंदी बाजारपेठ

नोव्हेंबर, १९४० अखेर संपणाऱ्या १९४०—४१ च्या पहिल्या आठ महिन्यांतील हिंदुस्थान व जपान ह्यांचेमधील व्यापाराचे आंकडे पाहिले, तर असें आढळून येतें कीं, जपानमधून हिंदुस्थानांत अधिकाधिक माल येऊं लागला आहे. विशेषतः यंत्रसामुग्री, रंग, इत्यादींची आयात वाढली आहे. जपाननें हिंदुस्थानाकडे ह्या आठ महिन्यांत १३ कोटि रुपयांचा माल पाठविला; १९३९-४० च्या तत्सम मुदतींत ११ कोटि, १५ लक्ष रुपये किंमतीच्या जपानी मालाची हिंदुस्थानांत आयात झाली होती. हिंदुस्थानानें १९३९-४० च्या पहिल्या आठ माहींत जपानकडे ८३/४ कोटि रुपयांचा माल पाठविला होता. १९४०-४१ च्या पहिल्या आठ महिन्यांतील निर्गत फक्त ५१/२ कोटि रुपयांचीच आहे. जपानमधून येणाऱ्या मालांत कपास कापडाचेंच प्राधान्य असलें तरी त्या कापडाची आयात हळुहळू कमी होऊं लागली आहे. जपान हिंदुस्थानकडे जितका माल पाठवितो, त्यापेक्षां हिंदी मालाची जपानकडे होणारी निर्गत कमी असल्याकारणानें हिंदुस्थानास जपानचें देणें द्यावें लागतें, त्याची व्यवस्था करण्याकरितां विशेष व्यवस्था करावी लागते. जपानी येन व ब्रिटिश पौंड ह्यांचें नातें ठरवून दिलेलें नसल्याकारणानें थोडी अडचण भासते, कारण रुपयाचा पौंडाशीं संबंध निश्चित ठरविलेला आहे. त्यासंबंधीं कांहीं मामुली व्यवस्था अंमलांत आहे व तिचेप्रमाणें देण्याघेण्याची व्यवस्था सध्या चालू आहे. एकंदरीनें जपान हें राष्ट्र हिंदुस्थानास यंत्रसामुग्री वगैरेच्या पुरविण्याचे संबंधांत युरोपियन राष्ट्रांची जागा हळुहळू घेऊं लागलें आहे.

---

### ग्रेट ब्रिटनमधील सहकारी दुकानें

ग्रेट ब्रिटनमध्यें आज सहकारी चळवळींत जितके लोक आहेत, तितके पूर्वी कधीच नव्हते. १७९० मध्यें इंग्लंड व वेल्स ह्यांची जेवढी लोकसंख्या होती, तितके म्हणजे सुमारें ९० लक्ष लोक सहकारी संस्थांचे आतां सभासद आहेत. त्यांतील बहुतेकांचीं स्वतःचीं घरें आहेत. प्रत्येक कुटुंबांत तीन माणसें आहेत, ह्या हिशेबानें सुमारें २३/४ कोटि लोकांच्या गरजा सहकारी तत्त्वावर चाललेल्या संस्थांकरवी भागविल्या जातात, असा हिशेब होतो. युद्धकाळांत मालाचा पुरवठा अपुरा पडून महागाई होते व भांडवलदार, व्यापारी आणि कारखानदार ह्या संधीचा फायदा घेतात; आणि तें स्वाभाविकहि आहे. सरकार त्यास पायबंद घालण्याचा शक्य तोंवर प्रयत्न करतें. हिंदुस्थान सरकारनें युद्ध सुरू झाल्यानंतर, अशाच प्रकारें किंमतीचें नियंत्रण करून भरमसाट नफेबाजीस आळा घातला व त्यामुळें किंमती स्थिर राहिल्या, हें सर्वांच्या लक्षांत आहेच. तथापि, सहकारी दुकानांचें जाळें सर्व देशभर पसरलेलें असेल, तर गिऱ्हाइकांचें हितसंरक्षण करण्याचें काम अधिक प्रभावी रीतीनें पार पडेल, हें उघड आहे. व्यापारी व कारखानदार ह्यांच्या सहकार्यानेंच सरकारास युद्ध-प्रयत्न चालू ठेवावयाचा असतो; तेव्हां त्या वर्गास सरकार विशेष नाउमेद करूं शकत नाहीं. परंतु, त्यांच्या भरमसाट नफ्यास आळा घालण्याचें कार्य मात्र संघटित सहकारी दुकानें उत्कृष्टरीतीनें पार पाडूं शकतील. सहकारी दुकानें ह्या बाबतींत किती उपयुक्त ठरतात, ह्याचा अनुभव ग्रेट ब्रिटनमध्यें आलेला आहे. तेथें विक्रीच्या १,०७७ स्वतंत्र सोसायट्या असून त्यांचे पटावर ८६३/४ लक्ष सभासद आहेत. एकूण २३/४ लक्ष नोकर त्यांत काम करतात. सोसायट्यांनीं चालविलेल्या दुकानांत १०,६६० वाण्याचीं, ५०१५ मटनाचीं, १२४९ फळ-भाज्यांचीं, ४२० दुधाचीं, २१०१ कापडाचीं, ७२८ शिंप्यांचीं, १२३६ बुटांचीं, १०१३ फर्निचर, रेडिओ वगैरेचीं, ४२१ औषधांचीं, ५० चष्म्यांचीं, २५९

तंबाखूचीं व १४४ केस कापेण्याचीं दुकानें आहेत. इतर प्रत्येक ३० दुकानांस १ सहकारी दुकान, असें प्रमाण पडतें. सहकारी दुकानांची १९३९ मध्यें एकूण विक्री सुमारें ४ अब्ज रुपयांची झाली.

### सध्याची त्यांची परिस्थिति

ग्रेटब्रिटनमध्यें, युद्धास प्रारंभ झाल्यानंतर अन्नपुरवठा नियंत्रित करण्यांत आला, त्यावेळीं सहकारी दुकानांस एकूण पुरवठ्याच्या २७% लोणी, २५% बेकन, ३०% साखर व १३% मांस मिळालें. को-ऑपरेटिव्ह होलसेल सोसायटी व स्कॉटिश को. होलसेल सोसायटी ह्या संस्था किरकोळ सहकारी दुकानांच्या केंद्रस्थानीं आहेत व त्या उत्पादन, आयात व्यापार, घाऊक विक्री, भांडवल-पुरवठा, इत्यादि महत्त्वाचीं कामें करतात व करवून घेतात. को-ऑपरेटिव्ह होलसेल सोसायटीनें १९३९ मध्यें स्वतःचें ७० कोटि रुपयांचें उत्पादन विकलें; तिचे पटावर ६०,७६९ नोकर आहेत. स्कॉटिश सोसायटी १४,२६४ नोकरांस काम देते व तिचें उत्पादन ७½ कोटि रुपये किंमतीच्या मालाचें होतें. सर्व प्रकारच्या मालाचा व विशेषतः अन्नसामुग्रीचा पुरवठा ग्रेटब्रिटनमध्यें सरकारनें नियंत्रित केला असल्यानें नफ्याचें प्रमाण कमी झालेलें आहे. सहकारी सोसायट्यांस त्यामुळें आपलें डिव्हिडंड कमी करणें भाग पडलें आहे. डिव्हिडंडचा दर आणखी खालीं जाणें संभवनीय आहे, तथापि मिळणारें डिव्हिडंड हा सभासद-गिऱ्हाइकाचा नफाच आहे, हें विसरतां कामा नये. डिव्हिडंड कमी पडूं लागलें. तर, तर सहकारी-चळवळीच्या भांडवलांत होत चाललेल्या अखंड वाढीस थोडी आडकाठी येईल. कित्येक लोकांनीं स्थलांतर केलें, त्यामुळें सोसायट्यांचें गिऱ्हाइक कमी झालें व जाणाऱ्या सभासदांनीं सोसायट्यांतील आपल्या ठेवीहि परत मागितल्या. कांहीं सोसायट्यांस त्या तात्काळ परत करणें थोडें कठीण गेलें, परंतु एकंदरीनें पहातां विशेष अडचण कोणासच भासली नाहीं. सहकारी विक्रीचे बाबतींत हिंदुस्थान पुष्कळच मागासलेला आहे. सहकारी पतपेढ्यांचा प्रसार येथें बराच झाला असला, तरी कंझूमर्स सोसायट्यांची प्रगति अत्यल्प झालेली आहे. सहकारी दुकानांस ब्रिटिश व्यापारांत केवढें महत्त्वाचें स्थान आहे व सहकारी चळवळीचें जाळें तेथें कसें पसरलेलें आहे, हें वरील माहितीवरून स्पष्ट होईल. युद्धकाळांत सहकारी दुकानें जनतेच्या हिताचें कसें संरक्षण करूं शकतात, हें त्यावरून दिसून येईल.

### युरोपियन देशांनीं अमेरिकेंत गुंतविलेले पैसे

युरोपांतील देशांनीं अमेरिकेंत बरेंच पैसे गुंतविलेले आहेत, त्यासंबंधांतील १९३९ अखेरचा तपशील फॉरिन कॉमर्स विकली ह्या अमेरिकन साप्ताहिकानें दिला आहे.—

| देश | गुंतविलेली रक्कम (दशलक्ष डॉलर्स) |
|---|---|
| बेल्जम | ३१२ |
| फ्रान्स | ६३३ |
| जर्मनी | ११० |
| इटली | ७९ |
| नेदरलँड्स | १,०९८ |
| स्वित्सरलंड | १,१२८ |
| ग्रेट ब्रिटन | २,८०३ |
| युरोपांतील इतर देश | ५२५ |
| | ६,६९८ |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## मुंबई येथील सोन्याचांदीचा बाजार

### चांदी

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, आफ्रिका, चीन, मेक्सिको इत्यादि देशांत सोनें व चांदी हीं सांपडतात. त्यांचे पाटले तयार केले जातात व त्यावर सरकारी टांकसाळ अगर नामवंत बँका, ब्रोकर्स इत्यादींचे शिक्के मारले गेल्यावर ते विक्रीस येतात. चांदीची शुद्धता हजारांत ९९६ ते ९९९ इतक्या दर्जाची असते. पाटल्यावर त्यांचें वजन औंसांत मांडलें जातें. साधारणतः प्रत्येक पाटला ९५० ते १,१५० औंस वजनाचा असतो. मुंबईच्या बाजारांत, हिंदुस्थानांतील व ब्रह्मदेशांतील चांदीस इंडियन सिल्व्हर व विदेशी चांदीस इंग्लिश सिल्व्हर असें म्हणतात. चांदीची किंमत प्रत्येक १०० तोळ्यांची असते व २,८०० तोळ्यांचा साधारणतः पाटला असतो. खरेदी-विक्रीच्या सोईसाठी एकादें मध्यवर्ती ठिकाण असावें म्हणून बाँबे बुलिअन एक्सचेंजची स्थापना झाली आहे. त्याचे सभासदांस बुलिअन ब्रोकर्स असें म्हणतात व ते आपल्या गिऱ्हाइकांतर्फे खरेदी-विक्री करतात. खरेदी-विक्रीचा करार झाल्यानंतर चांदीची प्रत्यक्ष देवघेव तात्काळ अगर आठवड्यांत होते. विकत घेणारानें वायद्याच्या किंमतीचा हिशेब खालीलप्रमाणें केला जातोः—पाटल्यावर औंसांत वजन लिहिलेलें असतें, त्याचें १ औंस=२$\frac{2}{3}$ तोळे ह्या कोष्टकानें तोळ्यांत रूपांतर करण्यांत येतें. ह्या तोळ्यांस शंभरानें भागून भागाकारास किंमतीनें गुणण्यांत येतें. समजा, पाटल्याचें वजन १,००३·१० औंस आहे.

१,००३·१० × २$\frac{2}{3}$ = २६७४·९३ तोळे.

| | |
|---|---|
| "अ" दलालाची खरेदीची अगर "ब" दलालाची विक्रीची किंमत | ६१ रु. ९ आ. × २६७४·९३<br>= १६४६·७५३७<br>= १६४६ रु. १२ आ. |
| "अ" दलालाची विक्रीची किंमत अगर "क्ष" गिऱ्हाइकाची खरेदीची किंमत | ६१ रु. १० आ. ६ पै × २६७४·९३<br>= १६४९ रु. ४ आ. ३ पै |
| म्हणजे, "अ" दलालाचें कमिशन | २ रु. ८ आ. ३ पै |

"क्ष" गिऱ्हाइक आपला पाटला घेतेवेळीं चेक देतो. "अ" दलालानें "ब" दलालास अगोदरच खरेदीची किंमत दिलेली असते. अशा रीतीनें हा व्यवहार पुरा होतो.

चालू महिना आणि येता महिना ह्यांमध्यें करावयाच्या देवघेवींचे करारही आज होऊं शकतात. ह्या व्यवहाराबाबत कांहीं विशेष अटी असतात. २,५०० तोळ्यांपेक्षा कमी वजनाचे व ३,२०० तोळ्यांपेक्षा अधिक वजनाचे पाटले ह्यांचे वायद्याचे व्यवहार केले जात नाहींत. २,८०० तोळ्यांचे पाटले त्यांस उत्तम. ह्यांपेक्षा वजन थोडें कमी-अधिक असल्यास त्याची किंमत बुलियन एक्सचेंज ठरवील त्या दरानें यावी घ्यावी लागते. एकाद्यास पहिल्या अगर दुसऱ्या वायद्याचे ५ पाटले घेणें असेल, तर तो त्याप्रमाणें दलालाशीं करार करतो. दुसऱ्या वायद्याची चांदीची किंमत ५६ रुपये आहे, व ५ पाटल्यांचें वजन १४,५८८·२६ तोळे आहे व ठराविक मामुली वजनापेक्षा कमी-अधिक असणाऱ्या वजनाबद्दल देण्या-घेण्याचा एक्सचेंजनें ठरविलेला दर ५७ रु. २ आणे आहे. असें मानल्यास खालीलप्रमाणें हिशेब होतोः—

५ पाटले, प्रत्येकीं २,८०० तोळे=१४,००० हें त्यांचें करारासाठी मामुली वजन.

प्रत्येक १०० तोळ्यांस ५६ रु.

१४,००० तोळ्यांस $\frac{१४,००० \times ५६}{१००}$ = ७,८४० रु. ० आ. ० पै

एकूण वजन १४,५८८·२६ तोळे आहे.

म्हणजे, ५८८·२६ तोळे अधिक आहे.

त्यांचे $\frac{५८८·२६ \times ५७ \text{ रु. } २ \text{ आ.}}{१००}$ = ३२६ रु. ९ आ. ० पै

एकूण देणें रकम ... ८१७६ रु. ९ आ. ० पै

वायद्याच्या ठराविक दिवशीं, विकत घेणारा दलाल विक्री करणाऱ्या दलालास वरील रकम देऊन ५ पाटले घेऊन ठेवतो, व गिऱ्हाइक त्या दिवशीं आपल्या दलालास रकम देऊन ते पाटले हातीं घेतें. विकत घेणारानें पाटले घेण्यास विलंब केला तर एक्सचेंजनें ठरविलेल्या दराप्रमाणें व्याजाची आकारणी केली जाते. देणाऱ्या-घेणाऱ्यापैकी एकास आपला करार पुरा करतां आला नाहीं, तर दुसरा एक्सचेंजच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार करतो. हे अधिकारी मूळ कराराचा लिलांव करूं शकतात व ज्याची चूक असेल, त्यावर झालेलें नुकसान लादूं शकतात. (इं. मं. चें. च्या मासिकावरून)

### न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि., मुंबई.

वरील नांवाची संयुक्त भांडवलाची खासगी कंपनी मुंबई येथें स्थापन झाली आहे. श्री. ग. स. मराठे ह्यांच्या मालकीचा "न्यू इंडिया इंडस्ट्रीज" ह्या नांवानें चालू असलेला धंदा ही कंपनी विकत घेईल. सर्व तऱ्हेच्या रबरी मालाचें उत्पादन करणें हा ह्या कंपनीचा प्रमुख उद्देश आहे. कंपनीचें भांडवल २ लक्ष रुपये असून तें प्रत्येकीं २० रुपयांचे २,५०० ऑर्डिनरी भाग, प्रत्येकीं ५० रुपयांचे १,००० ऑर्डिनरी भाग, व प्रत्येकीं १०० रुपयांचे १,००० ६% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भाग, ह्याप्रमाणें विभागलेलें आहे. मेसर्स मराठे आणि कंपनी हे प्रस्तुत लिमिटेड कंपनीचे मॅनेजिंग एजंट्स आहेत. श्री. ग. स. मराठे (ॲक्चुअरी), श्री. गणेश कृष्ण चितळे, बी. कॉम., व श्री. पुरंधर गणेश मराठे हे कंपनीचे पहिले डायरेक्टर आहेत. न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि. ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी असल्याकारणानें, तिच्या शेअर्सच्या विक्रीसाठी प्रॉस्पेक्टस वगैरे काढण्यांत येणार नाहीं.

### मोटारी

१ जानेवारी, १९४० रोजीं वेगवेगळ्या देशांत किती मोटारी होत्या, हें खालील तक्ता दर्शवितोः—

| देश | एकूण मोटारी | प्रत्येक मोटारीशीं लोकसंख्येचें प्रमाण |
|---|---|---|
| अमेरिका | ३०,१८०,२२५ | ४ |
| कॅनडा | १,४२०,९२४ | ८ |
| ग्रेट ब्रिटन | २,६०८,५०१ | १८ |
| फ्रान्स | २,२६८,९८५ | १८ |
| जर्मनी | १,९११,७८९ | ४२ |
| इटली | ४७५,००० | ९३ |
| रशिया | ७५०,००० | २५२ |
| जपान | १८०,००० | ३८९ |
| हिंदुस्थान | १८५,००० | १,९०८ |

## प्रॉमिसरी नोटीमध्यें पैसे कोठें द्यावयाचें यासंबंधीं कांहींच योजना नसल्यास दावा कोठें करावा ?

### कलकत्ता हायकोर्टातील दावा

**श्रीलाल सिंघानियां वादी वि... अनंतलाल मोन्दाल... प्रतिवादी**

प्रस्तुतचा दावा वादीनें (श्रीलाल सिंघानिया) प्रतिवादी (अनंतलाल मोन्दाल) कडून रुपये २०१९ प्रॉमिसरी नोटीवरून वसूल करण्याकरतां लाविलेला आहे. ही प्रॉमिसरी नोट मूळ कोणीएक शामलराम झुंझुणवाला याने प्रतिवादीकडून तारीख १५ सप्टेंबर १९३५ रोजीं लिहून घेतली व ती पुढें त्यानें तारीख २ नोव्हेंबर १९३८ रोजीं वादीच्या नांवे करून दिली. तारीख २७ सप्टेंबर १९३५ रोजीं प्रतिवादीनें या नोटीच्या पोटीं ५० रुपये वसूल दिला व तो त्यानें सदर प्रॉमिसरी नोटीवर मांडून देऊन त्यावर सही केली. प्रतिवादीने कित्येक तक्रारी केल्या, परंतु या निवाड्यापुरती महत्त्वाची अशी तक्रार म्हणजे दावा मुदतींत नाहीं ही होय.

हा दावा तारीख ७ नोव्हेंबर, १९३८ रोजीं कलकत्ता हायकोर्टांत दाखल केलेला आहे. दाव्यांतील नोट लिहून देतांना लिहून घेणाराचें वर्णन असें केलें आहे—" श्री. बाबू शामलराम झुंझुणवाला राहणार–बाजार ख्रुजगुंज, याची लिहून देणार वगैरे " या प्रॉमिसरी नोटीमध्यें प्रतिवादीनें पैसे कोठें द्यावयाचें यासंबंधीं मुळींच कांहीं योजना केलेली नाहीं. खरोखरी प्रॉमिसरी नोट लिहून घेणार हा भागलपूर येथें राहात नसून तो कलकत्ता येथेंच व्यापार धंदा करून राहात असतो व त्याचा वर्षापैकी पुष्कळ काळ कलकत्त्यांत घालविला जातो. तेव्हां ज्याअर्थी नोटीमध्यें भागलपूर येथें राहण्याचें ठिकाण म्हटलें आहे त्याअर्थी दावा भागलपूर येथेंच आणावयास पाहिजे होता व तो तसा आणला असतां म्हणजे प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणें दाव्याची शेवटची मुदत तारीख २७ सप्टेंबर १९३८ रोजीं संपत होती व त्या तारखेस भागलपूर येथील कोर्ट सुरू होतें तेव्हां, दाव्यास मुदतीची हरकत आहे.

वादीतर्फे म्हणणें असें कीं, 'प्रॉमिसरी नोटीचे पैसे देण्याचें ठिकाण कलकत्ता हेंच होय. कारण सदर झुंझुणवाला हा कलकत्ता येथें खरोखरी राहात होता आणि कलकत्ता हायकोर्ट हें सुटीमुळें ता. २७ सप्टेंबर १९३८ रोजीं बंद झालें तें ७ नोव्हेंबर १९३८ रोजीं उघडलें. तेव्हां दाव्यास मुदतीची हरकत येऊं शकत नाहीं, कारण ज्या कोर्टांत दावा करावयाचा तें कोर्टच सुटीमुळें बंद असल्यानें कोर्ट ज्या दिवशीं सुरू झालें त्या दिवशीं दाखल केलेला दावा मुदतींत आहे.' म्हणजे दावा कलकत्ता येथें आणतां येतो असें असल्यास दावा मुदतींत आहे, एरवीं नाहीं.

मुद्दा:—प्रॉमिसरी नोटीमधील सावकार कलकत्ता येथें राहातो, हें जरी शाबीत झालेलें असलें तरी दावा कलकत्त्याच्या कोर्टांत आणतां येतो काय हा प्रश्न आहे.

६३ कलकत्ता ७२६ या निवाड्यामध्यें असें मानण्यांत आलें आहे कीं, ज्यावेळीं एखाद्या करारावरून दावा करावयाचा असतो त्यावेळीं तो करार ज्या ठिकाणीं अंमलांत आणावयाचा असतो त्या ठिकाणीं त्या करारावरून दावा करावा लागतो आणि देण्याघेण्याच्या व्यवहारामध्यें सावकार ज्या ठिकाणीं राहात असेल त्या ठिकाणीं कर्ज फेडण्याचा करार असतो असें मानावयाचें असतें. कारण ऋणकोनें धनकोला शोधून त्यास त्याचें कर्ज भागवावयाचें असा सर्वसाधारण कायद्याचा नियम आहे.

कराराचा कायदा क. ४९ यामध्यें अशी योजना केली आहे कीं, ज्यावेळीं एखादा करार होतो त्यावरून दावा करणें झाल्यास त्या करारांत तो कोणत्या ठिकाणीं पुरा करावयाचा याचा जो ठराव असेल त्या ठिकाणच्या कोर्टांतच त्या करारावरून दावा आणला पाहिजे. मात्र ज्यावेळीं असें ठिकाण करारांत नमूद नसेल त्यावेळीं ऋणकोनें कोणच्या जागीं करार पुरा करावयाचा हें धनकोस विचारलें पाहिजे. अशी योजना केली म्हणजे ऋणकोनें धनकोच्या ठिकाणीं जाऊन त्यास त्याचें कर्ज दिलें पाहिजे हा सर्वसाधारण कायद्याचा दंडक सदर क. ४९ मध्यें रद्द केला आहे.

कराराच्या कायद्यामधील हा नियम प्रॉमिसरी नोटीवरील दाव्यांत लागू होणार नाहीं, शिवाय या नोटीमध्यें पैसे मागेल तेव्हां परत देण्याचा करार आहे. याप्रमाणेंच ३१ मद्रास २२३ या निवाड्यांत मानलेलें आहे. तेव्हां प्रस्तुतचा दावा वादीनें कलकत्ता हायकोर्टांत केला आहे तें बरोबर आहे आणि म्हणून दावा मुदतींत आहे.

सारांश:—ज्यावेळीं प्रॉमिसरी नोटींत पैसे कोठें द्यावयाचें यासंबंधीं करार नसेल त्यावेळीं नोट जर " मागाल त्यावेळीं " देण्याच्या कराराची असेल तर ज्या ठिकाणीं वादी राहतो तेथील कोर्टांत दावा आणतां येतो.

---

### हिंदी कपाशीची परिस्थिति

हिंदी कपाशीचे बाजारभाव खाली गेले आहेत, ते चढत नाहींत अशी हाकाटी एकीकडे ऐकूं येत आहे तर दुसरीकडे बाहेरून हिंदुस्थानांत येणाऱ्या कपाशीची आयात अलीकडे वाढली आहे ही बातमी प्रसिद्ध झाली आहे. उंची जातींचें कापड बनवण्यास हिंदी गिरण्यांस परदेशी कापसाची आवश्यकता भासते. असल्या परदेशी कापडाची आयात बंद होण्यास त्याची जागा स्वदेशी मालानें घेतली पाहिजे हें उघड आहे. पण त्या योगानें देशी कपाशीचा उठाव कमी होऊन तिच्या किंमती पडलेल्या रहातात. गेल्या नोव्हेंबरमध्यें पुऱ्या झालेल्या आठ महिन्यांच्या अवधींत सुमारें पावणेसात कोटि रुपये किंमतीचा कापूस हिंदुस्थानांत आला. त्या पूर्वीच्या वर्षाचे मानानें ही आयात दीड कोटि रुपयांनीं अधिक होती. इकडे कापसाची आयात ह्याप्रमाणें वाढली आणि हिंदी कापसाची निर्गत दोन कोटींनीं घटून सोळा कोटि रुपये भरली. हिंदी कापसाचा स्वदेशी गिरण्यांतला खपहि गेल्या सप्टेंबरअखेर पुऱ्या झालेल्या सहामाहींत थोडा कमी झालेला दिसला. स्वदेशांतील खपाची आणि परदेशांत होणाऱ्या निर्गतीची हिंदी कपाशीची स्थिति कशी आहे, हें वर दिलेल्या आकड्यांवरून स्पष्ट होईल. आयात झालेला कापूस बहुतांशीं इजिप्त व पूर्व आफ्रिका ह्या देशांतून आलेला आहे. हिंदी कपाशीचा खप वाढवण्याचा आणि तिच्या किंमती किफायतशीर रहातील अशी व्यवस्था करण्याचा प्रश्न महत्वाचा असून तो सोडवण्याचा प्रयत्न होणें अगत्याचें आहे.

## सहकारिता आणि क्रिकेट

( लेखकः—श्री. बा. चिं भानु )

वास्तविक पाहतां सहकारिता आणि क्रिकेटचा खेळ यांचा अर्थाअर्थी काय संबंध ? एक अर्थशास्त्राशीं निकटचा संबंध आणि नातेगोते असणारा विषय, तर दुसरा करमणुकीखातर खेळावयाचा व खेळला जाणारा खेळ. एकामध्यें अर्थ निर्माण करण्यासाठी भांडवलाची जमवाजमव करणें, तर दुसऱ्याचा अर्थनिर्मितीशीं संबंधही नाहीं, उलट खर्चाचींच तोंडें फार. पण अमळ सूक्ष्मतेनें पाहिल्यास सहकारिता आणि तिच्या संस्था व क्रिकेटचा खेळ आणि तिच्या संस्था यांमध्यें साम्यही पुष्कळच आहे असें दिसून येईल.

दोन्हीही बाबी संघशक्तीच्या अमोघ तत्वावरच अधिष्ठित झालेल्या आहेत. सहकारी संस्थांचें कामकाज आणि यश जसें एकोपा, एकमत आणि एकहेतूवर अवलंबून असतें तसेंच क्रिकेटच्या खेळांतही पण असावें लागतें.एकांड्या शिलेदाराच्या एकट्यादुकट्या प्रयत्नांची महती सहकारी क्षेत्रांत महत्वाची ठरत नाहीं तद्वतच क्रिकेटच्या खेळांतही व्यक्तिगत पराक्रमाला इतरांची सक्रिय सहानुभूति नसेल तर त्याचा तितकासा उपयोग होत नाहीं. सहकारी चळवळीचें आधुनिक स्वरूप व संस्था ज्याप्रमाणें परदेशांतूनच इकडे आल्या आहेत तसाच क्रिकेटचा खेळही परदेशांतूनच गेल्या ४०—५० वर्षांत आपल्या देशांत आलेला आहे. सहकारी चळवळी संबंधींचा आरंभीचा पुरस्कार आणि प्रसार सरकारी कृपेनें झाला, स्पेशल मामलेदार नेमून सरकारनें केला तसेंच क्रिकेटच्या खेळास लोकप्रियता मिळवून देण्यासाठी इलाखापति लॉर्ड हॅरिस, लॉर्ड विलिंग्डन इत्यादि गव्हर्नरांनीं पुढाकार घेतला होता. सहकारी चळवळींत पडलेल्यांवर जशी सरकारी अंमलदारांची मर्जी एकवेळ होती तद्वतच क्रिकेटच्या खेळांत भाग घेणाऱ्यांना जी. आय. पी. किंवा बी. बी. सी. आय. रेल्वेचे ऑफिसांतून नोकऱ्या मिळत होत्या. अजूनहि, शिक्षण-संस्थांत प्रवेश मिळण्यास क्रिकेटनैपुण्य उपयोगी पडते. सहकारी चळवळींत कर्णधार म्हणून गोपाळराव देवधरांनीं नांव मिळविलें तसेंच क्रिकेटच्या खेळांत दिनकरराव देवधरानीं देखील आपली कीर्ति भरतखंडभर पसरविली आहे !

व्यावहारिक दृष्टीनें सुद्धां पहातां हें साम्य अधिकच स्पष्ट होतें. हें सहकारित्वाचें ब्रीद-वाक्य क्रिकेटच्या टीममध्यें रोमरोमांतून बिंबलेलें असावें लागतें तरच टीममध्यें जिवंतपणा व सामन्यामध्यें यश मिळतें. सहकारी संस्थांचे घटनेंत जसे सभासद,पंच कमिटी,चेअरमन व सेक्रेटरी तसेंच क्रिकेटमध्यें देखील प्रेक्षक व कॅप्टन. सहकारी संस्थांचे ऑडिटर्स क्रिकेटमधील अंपायर्स. आर्थिक व्यवहाराची अनुभवपूर्ण माहिती असणारे,गांवांत वजनदार म्हणून निवडून त्यांना पंच म्हणून नेमणें हें जसें सहकारी संस्थेंत, तसेंच वक्तिवगार व उमेदीचे खेळाडू निवडून टीम बनविणें हें क्रिकेटमध्यें कर्तव्य समजलें जातें. जात गोत, वग वशिला किंवा श्रीमंतीकडे लक्ष देऊन निवडलेले पंच जसे निकामी ठरतात तसेंच जातगोताकडे आणि वर्ग वशिल्याचे जोरावर टीममध्यें घुसविलेले पिचे डोईजड झाल्यानें निरुपयोगी होतात. केवळ जुनाट पंच म्हणून नेमलेल्या चेअरमनाप्रमाणेंच वयानें वृद्ध झालेला कॅप्टन निष्प्रभावी ठरतो. चेअरमन प्रमाणेंच कॅप्टन हा टीमचा आत्मा आहे. पंचांनीं जसें स्वतः पुरतेंच पाहून चालणार नाहीं तसेंच टीममधील प्रत्येक खेळाडूनें आपल्या एकट्याच्या खेळापुरतेंच पाहून चालणार नाहीं. आपल्या कौशल्याचा जास्तींत जास्त फायदा टीमला देण्याचें त्यांचें धोरण हवें. पंच कमिटी ही जशी संस्थेचें कामकाज शिकण्याची शाळा नव्हे तसेंच टीममध्यें घुसुन मग क्रिकेटच्या खेळाची तत्त्वें शिकूं पहाणें वेडेपणाचें आहे.निवडून आलेल्या पंचांनीं सर्वज्ञतेचा टेंभा वेळीं अवेळीं मिरविणें मूर्खपणाचें, तद्वत्च टीममधला प्रत्येक जण खेळाच्या सर्व बाजूंत पारंगत असतो असें समजणें वृथाभिमानाचें द्योतक आहे. शेवटीं सहकारी संस्थांचा ऑडिटर जसा निर्भीड, निष्ठुरतेनें हिशेब तपासणारा असावयास हवा तसाच अंपायरही निःपक्षपाती व निष्ठुर सत्य सांगणारा हवा. ऑडिटरप्रमाणेंच तो मर्मज्ञ आणि विषयांत पारंगत असला तर अन्याय होण्याची भीती नसते.

या तुलनेवरून सहकारी चळवळींत कामें करणारांना क्रिकेटच्या खेळांतील मर्म व क्रिकेटच्या खेळाडूंना सहकारी व्यवहारांतील व संस्थांमधील आत्मा कशांत आहे हें स्पष्ट होईल अशी आशा आहे.

---

### वॉर बाँडसच्या स्वरूपांत बक्षिसें

मुंबई आर्ट सोसायटीच्या युद्धकालीन दुसऱ्या कलाप्रदर्शनाचें उद्‌घाटन मुंबईच्या गव्हर्नरांनीं गेल्या शुक्रवारीं केलें. यशस्वी कलावंतांस बिन व्याजी वॉर.बाँड व पोस्टल कॅश सर्टिफिकेटें ह्यांचे स्वरूपांत बक्षिसें देण्यांत आलीं.

### दारूबंदीविषयीं फेडरल कोर्टाकडे अपील–परवानगी नाकारली

अबकारी ॲक्टाखालीं एक जाहीरनामा काढून मुंबई सरकारनें दारूबंदी अंमलांत आणली. ह्यासंबंधीच्या कायदेशीरपणाचा प्रश्न मुंबई हायकोर्टापुढें आला, तेव्हां हायकोर्टानें प्रस्तुत जाहीरनामा अबकारी कायद्याचें कक्षेंत येत नाहीं, असा निर्णय दिला. मुंबई सरकारनें त्यानंतर एक गव्हर्नर्स ॲक्ट जाहीर करून, दारूबंदी अबकारी कायद्याचे कक्षेंत आणली, व पूर्वीचाच पुनः जाहीरनामा काढला. दारुबंदीचा कायदाच मुळीं प्रांतिक सरकारचे अधिकारांत नाहीं, असें हायकोर्टानें आधीच मत दिलें होतें, परंतु तो त्याचा निवाडा नव्हता. फेडरल कोर्टाकडे अपील करण्यास प्रांतिक सरकारनें परवानगी मागितली, परंतु अपील करण्यास मुद्दाचे नसल्यानें हायकोर्टानें परवानगी सर्टिफिकेट देण्याचें नाकारलें.

### आगपेट्यांच्या किंमती कां वाढल्या ?

सरकारची युद्धविषयक मागणी पुरी केल्यामुळें आगपेट्यांचा पुरवठा कमी पडला. परंतु दोन आठवड्यांत पुरेसा पुरवठा होईल.

### जर्मन सैनिकांसाठी डच सिगार

हॉलंडमधील सिगारच्या कारखानदारांस जर्मन लष्करास दरमहा ५ कोटि सिगार पुरवावे लागतात. त्यापैकीं ४ कोटि सिगार सध्या हॉलंडमध्येंच असलेल्या जर्मन सैनिकांस लागतात, असें म्हणतात. १ कोटि सिगार बेल्जम व फ्रान्समध्यें पाठविण्यांत येतात.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | ११२—५ |
| ४% १९४३ | १०४—९ |
| ३½% बिनमुदत | ९५—१ |
| ३½% १९४७-५० | १०२—० |
| ३% ( १९६३-६५ ) | ९३—७ |
| २¾% १९४८-५२ | ९६—५ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७-१२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) | ११३—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००-५०) ११% | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०५-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४५-१५ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५७०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०५-१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | १३०—४ |
| कराची ( १०० ) ९% | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १५०७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १६४०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% | १०२—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) १½% | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९९०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६८७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २०५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. | ४६—० |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. | २०—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. | ४१—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३९०५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१५—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४९—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३६४—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै | १८२५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १४२—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२-१-० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६३-२-६ |


दि
बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना




मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धीखातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबूत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.


सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ ( A. P. ) अमृतसर-Amritsar.

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट · फुकट · फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात, आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ३५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हंशील वेगळें.

**फुकट**—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॅचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हंशील माफ.

**पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी**
**पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)**

---

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

**वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी**

**Prop. M. V. Risbud, B. A.**
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

---

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.




तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
व्हाईट टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी**, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

**For Collegians**
**Wooden & Iron Furniture**
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**

| *Work-Shop Address:* | *Branch No. 1* |
|---|---|
| 153 Kasaba, Poona 2 | Shevak Quarters, near Fergusson College Poona 4 |

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
# महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख २९ जानेवारी, १९४१ अंक ५

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

**डॉ. एन. आर. राजोपाध्ये**
**यांचे**
ॲस्गॉल or पौष्टिक पिल्स घ्या. किंमत १२ आ. फक्त
सोल एजंटः "वेलणकर वनौषधालय",तुळशीबाग रस्ता, पुणें.
एजन्सी देणें आहे. एक आण्याचा स्टँप पाठवून विचारावें.

**देशी औषधें तयार करणारा**
**महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना**
पंडु, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

# रक्तवर्धक

**वापरा.**

**सर्वत्र मिळतें.**

—ः केंद्रें ः—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा**
**पुणें, लि.** पुणें ४.

**डॉ. एन. आर. राजोपाध्ये यांचे खास**
**देखरेखीखालीं चाललेलें**
**" वेलणकर वनौषधालय "**
येथें सर्व तऱ्हेच्या वनस्पति व सिद्धौषधी मिळतील. १ पैशापासून ते सिद्धौषधीपर्यंत मिळण्याचें हें पुण्यांतील पहिलेंच दुकान होय. येथें रोगी तपासून औषध देण्याचीही सोय आहे. दर्म्यावर दर रविवारीं सकाळीं मोफत औषध दिलें जातें.
उघडण्याची वेळः—सकाळीं ८॥ ते १२ व दुपारीं ३॥ ते ८ पर्यंत.
पत्ता : "वेलणकर वनौषधालय" तुळशीबाग रस्ता, पुणें.

**६ वा आठवडा**

**खऱ्या करमणुकीचा आनंद देणारा**
**नवयुगचा मराठी बोलपट**

★

# लग्न पहावं करून

नवयुग चित्र

दिग्दर्शक : विनायक
भूमिका : दामुअण्णा मालवणकर

★

**मिनर्व्हा — पुणें**

# त्रिविध माहिती

### भाताच्या पिकाचें उत्पादन

पिकांच्या वाढीस नैट्रोजन, फॉस्फरस व पोटॅश हीं तीन द्रव्यें मुख्यतः लागतात. तांदळाचे पिकास पहिलीं दोन द्रव्यें पुरेशीं होतात.

### स्पेनला ब्रिटिश गव्हाचा पुरवठा

ग्रेट ब्रिटन व स्पेन ह्यांचेमध्यें नुकताच एक करार झाला आहे, त्या अन्वयें ग्रेट ब्रिटननें स्पेनला आपला कॅनडामधील गहूं देण्याचें मान्य केलें आहे. स्पेननें हा गहू स्वतःच्या आगबोटींतून न्यावयाचा आहे.

### स्पेनला जर्मन कागदाचा पुरवठा

"जर्मनी व स्पेन ह्यांचेमध्यें एक व्यापारी करार झाला आहे. जर्मनीनें स्पेनला ५० लक्ष मार्क्स किंमतीचा कागद व कागदाचा रांधा द्यावयाचा आहे.

### टांकसाळीचें काम

नाण्यांस असलेली वाढती मागणी पुरी करण्याकरितां मुंबई येथील टांकसाळ दररोज २० तास चालू आहे. युद्धास प्रारंभ झाल्यापासून चिल्लर नाण्यांस मागणी अतिशय वाढली आहे.

### ८०० पदवीधरांपैकीं ४०५ एलएल.बी.

मुंबई विश्वविद्यालयाचा पदवीदान समारंभ गेल्या शनिवारीं झाला, त्यावेळीं ८०० पदवीधरांस त्यांच्या पदव्या देण्यांत आल्या. ह्या ८०० पैकीं ४०५ एलएल. बी. आहेत.

### ब्लँकिटें

संयुक्त प्रांतास युद्ध खात्यासाठीं ६०,००० ब्लँकिटांची ऑर्डर मिळाली आहे. संयुक्त प्रांतांतील विणकर दरमहा सुमारें २०,००० ब्लँकिटें तयार करतात.

### हिंदुस्थानाकडे येणारें टपाल नष्ट

एडन, ब्रह्मदेश व हिंदुस्थान ह्याकडे पाठविण्यासाठीं, ९ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबरचे दरम्यान ग्रेट ब्रिटनमध्यें पोस्टांत टाकलेलें टपाल शत्रूच्या कारवाईमुळें नष्ट झालें आहे.

### ऑस्ट्रेलियांतील कारखान्यांकरितां ब्रिटिश कामगार

ऑस्ट्रेलियांत नवे उद्योगधंदे स्थापन करण्याकरितां कार्यक्षम ब्रिटिश कामगार आणविण्यांत यावयाचे आहेत.

### आय. सी. एस. च्या उमेदवारांच्या संख्येचें नियंत्रण

आय. सी. एस. ला बसणाऱ्या उमेदवारांची संख्या ह्यापुढें ३०० पेक्षा अधिक होऊं दिली जाणार नाहीं. ह्यांपैकीं २७५ उमेदवार वेगवेगळ्या प्रांतांस वाटून जातील. संयुक्त प्रांताच्या वाट्यास ५७ उमेदवार आले असून मद्रासला ५०, बंगालला ४५ व मुंबई प्रांतास २२ उमेदवार वाटणीस आले आहेत. प्रत्येक प्रांतांतील अर्जदारांपैकीं ठराविक उमेदवारांची निवड प्रांतिक कमिट्या करतील. ह्या कमिट्यांच्या सभासदांपैकी बहुसंख्य सरकारनियुक्त असतील. ह्या नवीन योजनेमुळें स्पर्धेला वाव कमी उरणार आहे.

### कॉफीचा खप

कॉफीचा दर माणशीं वार्षिक खप ग्रेट ब्रिटनमध्यें १ पौंड, जर्मनींत ६ पौंड, फ्रान्समध्यें १० पौंड, स्वीडनमध्यें १६ पौंड व ब्राझीलमध्यें २० पौंड होतो. जगांतील कॉफीच्या एकूण झाडांपैकी निम्म्यापेक्षां अधिक एकट्या ब्राझीलमध्येंच आहेत.

### बिड्यांवर जकात

ब्रह्मदेशांत आयात होणाऱ्या बिड्यांवर तेथील सरकार जकात बसविणार आहे. ह्याचा परिणाम मद्रासमधील बिड्यांच्या व्यापाऱ्यावर होईल, कारण तेथून दरसाल सुमारें १० लक्ष रुपयांच्या बिड्या ब्रह्मदेशाकडे जातात.

### १ लक्ष टनांच्या आगबोटी

युद्धसमाप्तीनंतर उपयोगांत आणण्यासाठीं ३ हजार उतारु मावतील एवढ्या प्रत्येकीं १ लक्ष टनांच्या आगबोटी बांधण्याची पूर्वतयारी अमेरिकेंत चालू आहे.

### राणिछाप रुपये

व्हिक्टोरिया राणीच्या छापाचे रुपये सरकारी तिजोऱ्यांत ३० सप्टेंबर १९४१ अखेर घेतले जातील, असें समजतें.

### लोकसंख्या वाढविण्याची योजना

जपानची लोकसंख्या १९६० अखेर १० कोटि तरी करण्याचा जपानी मंत्रिमंडळाचा मानस आहे. त्या देशाची आजची लोकसंख्या ७ कोटि आहे. पुरुषाचे २५ व्या वर्षी व स्त्रीचे २१ व्या वर्षी लग्न व्हावें व प्रत्येक कुटुंबांत निदान ५ मुलें असावीं ह्या दृष्टीनें विवाहांस व संततीस उत्तेजन देण्यांत येणार आहे व अविवाहितांवर कर बसविण्यांत येणार आहे.

### "मेहरबानी" ची किंमत

तारेंतील मजकुरांत "प्लीज" (कृपा करून) हा शब्द घातल्यामुळें अमेरिकन लोकांस दरसाल सुमारें ३० कोटि रुपये खर्च अधिक येतो.

### माल्टा

माल्टा हें बेट पूर्वी अनेक राष्ट्रांच्या मालकीचें होतें. कार्थेजिनिअन्स, ग्रीक्स, रोमन्स, गॉथ्स, स्पॅनिअर्डस, फ्रेंच, ह्या सर्वांनीं त्यावर अंमल चालविलेला आहे. १८१४ सालीं तें ब्रिटिशांच्या ताब्यांत आलें, तें अजून ब्रिटिश मालकीचेंच आहे.

### अमेरिकन मुलींची महत्त्वाकांक्षा

६०,००० अमेरिकन तरुण मुलींना प्रश्न विचारून त्यांच्या मनाचा कल अंदाजला, त्यावेळीं असें आढळून आलें कीं, पूर्वी साधारणपणें प्रत्येक मुलीस नाटकांत अगर सिनेमांत काम करून अथवा विमानोड्डाण करून कीर्ति मिळवावी, असें वाटत असे, त्या ऐवजीं आतां विवाह करून चांगली नोकरी मिळवावी, प्रवास करावा अगर अभ्यास करावा असें तिला वाटूं लागलें आहे.

### कलकत्त्याची वाढती लोकसंख्या

कलकत्ता शहराची प्रास्तविक स्वरूपाची शिरगणती करण्यांत आली तेव्हां त्यामधील लोकसंख्या १९३१ सालीं ११ लक्ष होती ती दहा वर्षांत १७ लक्ष पर्यंत वाढली असल्याचें आढळून आलें. घरांची संख्याहि त्याप्रमाणें वाढली आहे.

### करवंट्यांस मागणी

नारळाच्या करवंट्याच्या राखेचा उपयोग विषारी वायूपासून संरक्षण होण्यासाठीं वापरण्यांत येणाऱ्या मुखत्राणाचे बनावटींत करण्यांत येतो. ह्या मालास इंग्लंडमध्यें मोठी मागणी असून त्रावणकोर, म्हैसूर व मद्रासमधील एक कंपनी ह्यांचेकडून पुरी करण्यांत यावयाची आहे.

### इटलीची पीछेहाट

उत्तर आफ्रिकेंत लिबिया, इरिट्रिया व ॲबिसिनीया ह्या प्रदेशांमध्यें इटालिअन फौजांची सारखी पीछेहाट होत चालली आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... ५० | ६ औद्योगिकरणाशिवाय जगणेंहि अशक्य | ... ५५ |
| २ हिंदी विमाव्यवसाय | ... ५१ | ७ बँकेनें चेक परत केल्याबद्दल नुकसानभरपाई | ५५ |
| ३ मुंबई येथील सोन्याचांदीचा व्यापार | ... ५२ | ८ मराठा चेंबरचें पत्रक | ... ५६ |
| ४ कालव्यांखालील वाढतें क्षेत्र | ५२ | ९ इतिहास व अर्थशास्त्रविषयक संस्थेचा रौप्यमहोत्सव | ... ५६ |
| ५ स्फुट–विचार | ... ५३ | १० विमा कंपन्यांचें सरकारजवळील डिपॉझिट | ... ५७ |
| प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचा लोकशाहीचा पुरस्कार—मुंबईत भरलेली सहकारी कार्यकर्त्यांची परिषद्–सहकारी परिषदेचे मुख्य ठराव–हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज | | ११ निवडक बाजारभाव | ... ५८ |


# अर्थ

बुधवार, ता. १९ जानेवारी, १९४१

## हिंदी विमाव्यवसाय

हिंदी विमा कायद्यान्वयें प्रत्येक विमा कंपनीस आपल्या व्यवहारासंबंधीं माहितीचे तक्ते सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सकडे पाठवावे लागतात. १९३८ संबंधींचे तक्ते सुपरिंटेंडेंटकडे १९३९ मध्यें जाऊन त्यावरून त्यानें तयार केलेला रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून असें दिसतें कीं नवीन आयुर्विमा कंपन्यांच्या स्थापनेस आतां आळा बसलेला आहे. हिंदी आयुर्विमा कंपन्यांचें काम कसें वाढत चाललें आहे, हें खालील तक्ता दर्शवितोः—

| वर्ष | नवीन काम | | वर्षअखेर चालू काम | एकूण वार्षिक उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|
| | रु. | | रु. | रु. | |
| | कोटि | लक्ष | कोटि | कोटि | लक्ष |
| १९२९ | १७ | २९ | ८२ | ४ | ९२ |
| १९३० | १६ | ५० | ८९ | ५ | ४० |
| १९३१ | १७ | ७६ | ९८ | ५ | ८७ |
| १९३२ | १९ | ६६ | १०७ | ६ | ८८ |
| १९३३ | २४ | ८३ | ११९ | ८ | १५ |
| १९३४ | २८ | ९२ | १३७ | ८ | ३४ |
| १९३५ | ३२ | ८१ | १५२ | ९ | ३३ |
| १९३६ | ३७ | ८० | १७५ | ११ | ३५ |
| १९३७ | ४१ | ७४ | १९७ | १२ | ०२ |
| १९३८ | ४६ | ६८ | २१९ | १४ | १३ |

विमा कंपनीचें उत्पन्न १०० रुपये आलें असें मानलें, तर तें कोठून आलें, ह्याची वर्गवारी येथें दिली आहे:—

उत्पन्न

| वर्ष | विम्याचे हप्ते | व्याज, डिव्हिडंड व भाडें | इतर बाबी |
|---|---|---|---|
| १९२९ | ७९·३ | १९·५ | १·२ |
| १९३२ | ७५·३ | १८·१ | ६·६ |
| १९३५ | ७९·८ | १७·२ | ३·० |
| १९३८ | ८१·४ | १७·० | १·६ |

समजा, खर्च १०० रुपये झाले, तर त्याची वाटणी मुख्यतः कशी झाली, हें खालील तक्ता दर्शवितोः—

| वर्ष | क्लेम्स | व्यवस्थेचा खर्च | डिव्हिडंड | विमा-खाती फंडांत वाढ |
|---|---|---|---|---|
| १९२९ | ३३·२ | २४·० | ·५ | ३१·९ |
| १९३२ | २९·५ | २१·६ | ·४ | ३८·२ |
| १९३५ | ३०·१ | २४·८ | ·५ | ३७·४ |
| १९३८ | २८·५ | २५·८ | ·७ | ३८·६ |

सर्व विमा कंपन्यांचा एकूण लाइफ फंड १९२९ मध्यें १८$\frac{3}{4}$ कोटि रुपये होता, तो १९३२ मध्यें २५ कोटि रुपये झाला. १९३५ मध्यें तो ३५ कोटि रुपयांवर गेला व १९३८ अखेर तो ५०$\frac{3}{4}$ कोटि रुपये झाला आहे. विमा कंपन्यांना व्याजाचा निवळ दर किती पडला, हें खाली दिलेले आकडे स्पष्ट करतील:—

| वर्ष | व्याजाचा पडलेला दर |
|---|---|
| १९३५ | ४·९३ |
| १९३६ | ४·६९ |
| १९३७ | ४·७६ |
| १९३८ | ५·१५ |

१९३८ च्या रिपोर्टांत ज्या कंपन्यांचे आकडे दाखल झालेले आहेत,अशा १८६ आयुर्विमा कंपन्यांपैकीं १३० कंपन्यांच्या ताज्या मूल्यमापनांची माहिती त्यांत दिलेली आहे. त्यांपैकी निम्म्यापेक्षा अधिक कंपन्यांचीं एकापेक्षा ज्यास्त मूल्यमापनें अद्याप झालेलीं आहेत. उरलेल्यांचीं मूल्यमापनें झालेली नाहींत. एकूण ९५ कंपन्यांच्या मूल्यमापनांत वाढावा आढळून आला व ३४ कंपन्यांनीं तूट दर्शविली. एकूण वाढावा ४ कोटि, ६८ लक्ष रुपये आला, त्यांपैकीं ४ कोटि २१ लक्ष रुपये विमेदारांस व ३१ लक्ष रुपये भागीदारांस मिळाले. बाकीची राहिलेली रकम रिझर्व्ह म्हणून टाकण्यांत आली अथवा पुढें ओढण्यांत आली. तूट दाखविणाऱ्या ३४ कंपन्यांनीं एकूण १४$\frac{3}{4}$ लक्ष रुपये तूट दर्शविली, त्यांपैकीं २५ कंपन्यांच्या भाग भांडवलानें ती भरून काढली. बाकीच्या कंपन्यांस तूट भरून काढतां आली नाहीं.

पोस्ट खात्यांतील नोकर वर्गाकरितां सरकारनें १८८३ मध्यें पोस्ट ऑफीस इन्शुअरन्स फंडाची योजना केली. हळुहळु, बहुतेक सर्व सरकारी नोकरांचे विमे त्यांत उतरतां येऊं लागले. ३१ मार्च, १९३९ अखेर संपलेल्या वर्षी ह्या फंडानें ९६$\frac{1}{2}$ लक्ष रुपयांच्या ४,९७१ नव्या पॉलिसी दिल्या. ह्या तारखेस फंडाकडे २० कोटि, ९० लक्ष रुपयांच्या ९७,७५१ पॉलिसी चालू होत्या.

हिंदी कंपन्यांनीं गुंतविलेल्या रकमांची छाननी केली, तर असें आढळून येतें कीं, त्यांनीं आपल्या एकूण जिंदगीच्या ७०% रकम स्टॉक एक्सचेंजवरील रोख्यांत गुंतविलेली आहे. ३२ कोटि रुपये सरकारी रोख्यांत असून ५$\frac{1}{2}$ कोटि म्युनिसिपल, पोर्ट व इं. ट्रस्टच्या रोख्यांत आहेत. हिंदी कंपन्यांचें ४ कोटि, ३८ लक्ष रुपयांचे भाग त्यांनीं घेतले असून सुमारें ४ कोटि रुपयांची त्यांची मालमत्ता आहे. मालमत्तेचे तारणावर हिंदी कंपन्यांनीं २ कोटि रुपये दिले असून पॉलिसींचे तारणावर ५$\frac{1}{2}$ कोटि रुपये दिले आहेत.

## मुंबई येथील सोन्या-चांदीचा बाजार

### चांदी

#### तेजीचा व्यवहार

कित्येक व्यापाऱ्यांस पैसे देऊन चांदीच्या पाटल्यांचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची इच्छा नसते. कराराची तारीख व वायद्याची तारीख ह्यांमधील मुदतींत होणाऱ्या किंमतीमधील चढउताराचा त्यांस फायदा घ्यावयाचा असतो. बाजारभाव वाढला तर आज केलेला करार खरेदीचा करार समजावा व वाढलेल्या दरानें चांदी विकून फायदा मिळवावा, असा हक्क देणारा करार म्हणजे 'तेजी' चा व्यवहार होय. समजा, आज चांदीचा भाव १०० तोळयांस ६३ रुपये आहे व व्यवहार एका पाटल्याचा होत आहे. दलाल आपल्या गिऱ्हाइक व्यापाऱ्याशीं करार करून, तेजीचें कमिशन १२ आणे ठरवून व दुसऱ्या दलालाबरोबर विक्रीची व्यवस्था करून "तेजी" चा धंदा करतो. वायद्याच्या म्हणजे सेटलमेंटच्या तारखेचे आंत चांदीची किंमत ६३ रु. १२ आणे वर गेली तर गिऱ्हाइकास ती विकून नफा मिळवितां येतो. समजा, बाजारभाव ६४ रु. ८ आ. झाला, तर मूळ करार खरेदीचा पक्का होऊन व १२ आणे कमिशन धरून गिऱ्हाइकास १२ आ. नफा उरेल. म्हणजे, एका पाटल्यामागें त्यास २१ रु. मिळतील. परंतु ६३ रुपयांवर भाव गेला नाहीं, तर तो दलाल प्रत्येक १०० तोळयांमागें १२ आणे प्रमाणें २१ रुपये देईल. ६३ रुपयांपेक्षा जितका दर वर जाईल, त्यामानानें गिऱ्हाइकास कमी रकमेचा भुर्दंड पडेल.

#### मंदीचा व्यवहार

तेजीचे व्यवहाराचे विरुद्ध हा व्यवहार आहे. बाजारभाव उतरला, तर आज केलेला करार विक्रीचा करार समजावा व उतरलेल्या दरानें चांदी खरेदी करून नफा मिळवावा, असा हक्क देणारा करार म्हणजेच मंदीचा करार होय. समजा, वायद्याचा दर ६१ रुपये आहे आणि एका पाटल्याचा मंदीचा व्यवहार केला. ६१ रु. उणे १२ आणे कमिशन: ६० रु. ४ आणे. ह्यापेक्षा कमी भाव झाला, तर गिऱ्हाइकास प्रस्तुत कराराप्रमाणें चांदी विकत घेतां येते. समजा, सेटलमेंटपूर्वी बाजारभाव ५९ रुपये झाला: त्या दिवशीं गिऱ्हाइकानें दलालास त्या दरानें चांदी घेण्यास सांगितली, तर त्या गिऱ्हाइकास प्रत्येक तोळयामागें १ रु. ४ आ. प्रमाणें ३५ रुपये मिळतील. ६१ रुपयांखालीं भाव गेला नाहीं, तर गिऱ्हाइकाकडून दलालास २१ रुपये मिळतील. ज्यामानानें भाव कमी खाली गेलेला असेल, त्यामानानें गिऱ्हाइकासहि अल्प भुर्दंड बसेल.

#### ऑप्शन

वरील तेजीच्या अगर मंदीच्या व्यवहारांतील कमिशनच्या दुपटीच्या दरानें कमिशन देऊन, (१) पुढें बाजारभाव वाढल्यास मूळ व्यवहार हा खरेदीचा करार समजून पुढें विक्री करून नफा मिळविण्याचा अधिकार व (२) पुढें बाजारभाव खालीं गेल्यास मूळ व्यवहार हा विक्रीचा करार समजून पुढें खरेदी करून नफा मिळविण्याचा अधिकार, असे दोन्ही अधिकार ज्यांत समाविष्ट असतात, त्या करारास तेजी-मंदी ऑप्शन असें म्हणतात. म्हणजे बाजारभाव चढो अगर उतरो, गिऱ्हाइक व्यापाऱ्यास नफा मिळवितां येतो. समजा, आजचा वायद्यांच्या दर १०० तोळयांस ५८ रुपये आहे व एकाद्या गिऱ्हाइकानें आपल्या दलालाशीं ५ पाटल्यांच्या ऑप्शनचा करार केला. मधल्या मुदतींत किंमत ६१ रुपये झाली, तर गिऱ्हाइक चांदीचे पाटले विकून टाकून प्रत्येक १०० तोळयांमागें १ रु. ८ आ. (कमिशन १ रु. ८ आणे वजा जाऊन) ह्याप्रमाणें २१० रुपये नफा मिळवील. उलट, किंमत ५४ रुपयांवर आली, तरी त्यास प्रत्येक १००तोळयांमागें २ रु. ८ आ. नफा मिळेल. बाजारांतील परिस्थितीप्रमाणें तेजी-मंदीच्या ऑप्शनच्या प्रीमिअमचा (कमिशनचा) दर कमी अधिक होतो.

---

## कालव्यांखालील वाढतें क्षेत्र

हिंदी सरकारी कालव्यांच्या पाण्यावर १९३७-३८ मध्यें एकूण १ अब्ज, ५ कोटि रुपयांचीं पिकें ब्रिटिश हिंदुस्थानांत काढण्यांत आलीं. १८७८-७९ मध्यें १ कोटि, ५ लक्ष एकर जमीन कालव्यांचे पाण्याखाली होती; आतां ३ कोटि, २४½ लक्ष एकर जमीन त्यांखाली आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांत लागवडीखाली असलेल्या जमिनीपैकी एक सप्तमांश जमीन कालव्यांचे पाण्यानें भिजते. इरिगेशनचे कामावर भांडवली खर्च १ अब्ज, ५०½ कोटि रुपये झालेला असून व्यवस्थेचा सालिना खर्च ४ कोटि, ४६ लक्ष रुपये येतो. भांडवलावर ५·९१% व्याज सुटतें.

#### पंजाबचा पुढाकार

पंजाबमध्यें कालव्यांचें पाणी सर्वांत अधिक खेळतें. तेथें, सुमारें १½ कोटि एकर जमीन कालव्यांचे पाण्यानें भिजते. मद्रास प्रांताचा अनुक्रम दुसरा व संयुक्त प्रांताचा व सिंधचा अनुक्रम बरोबरीनें तिसरा लागतो. मद्रासमध्यें ७५ लक्ष एकरांस कालव्यांचें पाणी मिळतें; संयुक्त प्रांत व सिंध येथें कालव्यांखाली प्रत्येकी ५० लक्ष एकर जमीन आहे. एकूण लागवडीशीं कालव्यांखालील जमिनीचें प्रमाण सिंधमध्यें सर्वांत मोठें पडतें. तेथें तें ८९·१% आहे. पंजाबांत तें ३८·८%, मद्रासमध्यें २०·५% व सरहद्द प्रांतांत १८·३% आहे. पंजाबमध्यें, इरिगेशनमध्यें गुंतविलेल्या भांडवलावर सर्वांत अधिक, म्हणजे १४·९९% व्याज सुटलें. नंतर सरहद्द-प्रांत (११·३%), मुंबई प्रांत (९.४%), मद्रास प्रांत (६·३६%) व संयुक्त प्रांत (५·३%) असा अनुक्रम लागतो.

#### १९३७-३८ मधील नवीन कामें

१९३७-३८ मध्यें कृष्णा ईस्ट बँक कालवा पुरा करण्यांत आला. मद्रास प्रांतांतील ह्या कालव्याचा अंदाजी खर्च २८¾ लक्ष रुपये असून ह्या कालव्याचे पाण्यानें ८४,००० एकर जमीन भिजावयाची आहे. मुंबई प्रांतांतील निरा राईट बँक कालवा पुरा झाला आहे. ह्या कालव्यानें १ लक्ष, ३२ हजार एकरांस पाणी मिळूं शकतें. सोलापूर जिल्ह्याच्या दुष्काळी पश्चिम भागास ह्या कालव्यामुळें पाणी मिळूं लागलें आहे. संयुक्त प्रांतांत गंगा नदीचे खोऱ्यांत ट्यूब विहिरी खणण्याची योजना चालू आहे. १९३७-३८ मध्यें अशा २५८ विहिरी खोदण्यांत आल्या. म्हणजे, एकूण विहिरींची संख्या १,४५४ झाली. त्यांवरील एकूण भांडवली खर्चाची रकम १ कोटि, ३० लक्ष रुपयांवर गेली.

#### खडकवासलें येथील संशोधनकेंद्र

खडकवासलें येथील हायड्रो डायनॅमिक संशोधनकेंद्र चालू ठेवण्यास मुंबई सरकार तयार नव्हतें, तेव्हां हिंदुस्थान सरकारनें तें आपल्याकडे घेतलें. सबंध हिंदुस्थानास उपयुक्त होईल, अशा प्रकारचें नद्यांच्या प्रवाहासंबंधीं व पुलांच्या बचावासंबंधीं संशोधन-कार्य तेथें चालतें.

# स्फुट विचार

## प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचा लोकशाहीचा पुरस्कार

मि. रूझवेल्ट ह्यांची अमेरिकेचे प्रेसिडेंट म्हणून तिसऱ्यांदा निवडणूक होऊन कांहीं काळ लोटला असला तरी त्यांची त्या पदावर प्रस्थापना औपचारिक रीतीनें गेल्या आठवड्यांत झाली, त्या वेळचा समारंभ साधा पण थाटाचा होता. एकाच माणसाची प्रेसिडेंटच्या जागीं तिसऱ्यांदा निवडणूक होणें हा योग अपूर्व होता. प्रस्तुत युद्धांत इंग्लंडला सर्वतोपरी सहाय देण्याचें त्यांनीं प्रकट केलेलें धडाडीचें धोरण अमेरिकन जनतेला पटवून देण्यांत त्यांनीं चालवलेला चिकाटीचा प्रयत्न आणि त्याचा जर्मनी व जपान या राष्ट्रांवर होत असलेला परिणाम ह्या सर्व गोष्टींमुळें गेल्या आठवड्यांतील प्रस्थापनेच्या समारंभास विशेषच महत्व प्राप्त झालें होतें. ह्या अपूर्व प्रसंगीं प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं केलेलें भाषणहि तसेंच अपूर्व होतें. अमेरिकन राष्ट्र हें स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचें माहेरघर समजण्यांत येतें आणि ह्या तत्वांचा पुरस्कार त्यांनीं ठासून केला. त्यानें हिटलरच्या नाकास मिरच्या झोंबल्या असतील आणि जपानमध्यें तर त्यानें खळबळ उडवून दिली आहे. रानदांडगेपणा आणि जुलूम ह्यांच्या लाटा युरोपांत व पूर्व आशिया खंडांत पसरत आहेत, ह्यावरून लोकशाही व स्वातंत्र्य यांचा चोहोकडे अंत होणार, ह्या कांहीं लोकांच्या भ्रममूलक कल्पनेचा त्यांनीं निरास केला. वैयक्तिक आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य ह्यांचें मानवजातीस बाळकडू मिळालें असून त्यांचा विजय होणें ही मनुष्यसमाजाची प्रकृति आहे. अमेरिकन जनतेस मिळालेली ती अत्यंत मोलवान अशी वडिलार्जित मालमत्ता आहे. ती सुरक्षित ठेवणें आणि तिची वाढ करणें हें अमेरिकन राष्ट्राचें कर्तव्य आहे असें प्रेसिडेंटनीं आपल्या देशबांधवांस बजावलें. लोकशाहीचा संहार करण्याचा जर्मनी व इटली ह्यांनीं सपाटा लावला आहे, त्याचा प्रतिकार केला गेला पाहिजे आणि ह्या मोहिमेंत अमेरिका मागें हटणार नाहीं किंवा स्वस्थ बसणार नाहीं अशा अर्थाचे त्यांनीं काढलेले निश्चयाचे उद्गार लोकशाहीच्या सर्व चहात्यांस उत्तेजन दिल्यावांचून रहाणार नाहींत.

---

## मुंबईंत भरलेली सहकारी कार्यकर्त्यांची परिषद

अखिल भारतीय प्रांतिक सहकारी बँका आणि इन्स्टिट्यूट्स ह्यांच्या कार्यकारी समित्यांची संयुक्त परिषद मुंबईस गेल्या १८ व १९ तारखांस भरली होती. तिचें अध्यक्षस्थान श्री. रामदास पंतलू ह्यांनीं स्वीकारलें होतें. त्यांनीं व प्रांतिक सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. सरय्या ह्यांनीं सहकारी संस्थांच्यापुढें असलेल्या प्रश्नांची चर्चा केली. सध्या जगभर युद्ध आणि वितुष्ट ह्यांचें वातावरण पसरलें आहे त्यावर तोडगा सहकारी वृत्तीचा प्रसार हा आहे असें श्री. पंतलू ह्यांनीं सांगितलें. सहकारी कार्यकर्त्यांचें लक्ष मुख्यत्वें-करून शेतीच्या धंद्याच्या स्थितीकडे लागलेलें असल्यानें शेतीच्या मालाच्या किंमती पडणार नाहींत अशी व्यवस्था सरकारनें केली पाहिजे असें त्यांचें मत आहे, त्याचा त्यांनीं उल्लेख केला. अनेक हिन्दी प्रांतांच्या सरकारांनीं शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणासंबंधानें सहाय्यकारक असे कायदे केले आहेत त्यांची सहकारी संस्थांच्या दृष्टीनें छाननी होण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादलें आणि त्या संस्थांस पुष्कळ भरीव कामगिरी बजावतां येण्यासारखी आहे असा विश्वास प्रकट केला. प्रांतिक सहकारी बँकांस अपेक्षित सहाय्य रिझर्व्ह बँकेकडून न मिळण्याविषयीं श्री. पंतलू ह्यांनीं तक्रार केली. सुपरटॅक्सच्या बाबतींत सहकारी संस्थांस देण्यांत आलेल्या सवलतीबद्दल त्यांनीं हिंदुस्थान सरकारचे आभार मानले आणि जादा नफ्याच्या कराची माफी मिळावी अशी सूचना केली. बंगालच्या कायदेमंडळानें अलीकडे मंजूर केलेल्या सहकारी कायद्यानें तीव्र मतभेदाची खळबळ उडवून दिली आहे तिच्या संबंधानें श्री. पंतलू म्हणाले कीं, सरकारी अधिकाऱ्यांस दिलेल्या सत्तेपेक्षा लोकांच्या मताचा प्रभाव सहकारी संस्थांच्या सुस्थितीवर पडणें स्वाभाविक आहे. मद्रासच्या चौकशी समितीच्या सूचनांचा निष्कर्षहि त्यांनीं थोडक्यांत सांगितला. जनतेच्या आर्थिक उत्कर्षाचे विषयीं जगांत ज्या नव्या योजना व पद्धति पसरत आहेत, त्या लक्षांत घेतल्या जाऊन त्यांच्या दिशेनें हिंदी सहकारी चळवळीस इष्ट तें वळण लागणें आवश्यक असून आम्हीं जुन्या व आकुंचित कल्पनांस चिकटून राहण्यांत अर्थ नाहीं असें सांगून श्री. पंतलू ह्यांनीं आपलें भाषण संपविलें.

---

## सहकारी परिषदेचे मुख्य ठराव

वरील सहकारी परिषदेनें मंजूर केलेल्या ठरावांतील प्रमुख विषयांचा निर्देश येथें करणें जरूर आहे. सरकारी तिजोऱ्यांमार्फत विशिष्ट मर्यादेंत पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं मोफत पाठवण्याची सवलत सहकारी संस्थांस अनेक वर्षें होती. ती अलीकडे काढून घेतली असल्याचें रिझर्व्ह बँकेनें जाहीर केलें आहे. ह्या संबंधांतला खर्च हिंदुस्थान सरकार सोसण्यास तयार नसल्यानें शेतकरी वर्गाच्या हिताच्या दृष्टीनें तो प्रांतिक सरकारांनीं सहन करावा असें परिषदेनें सुचवलें आणि शेड्यूल्ड बँकांस देण्यांत येणाऱ्या पैसा ने-आण करण्याबाबतच्या सवलती सहकारी बँकांस मिळाव्या अशीहि सूचना तिनें केली. पैसा वर्ग करण्याचा रिझर्व्ह बँक आकारणार असलेला खर्च लहान सहकारी बँकांस झेपणार नाहीं आणि गोरगरीबांस व्याजाचा जास्त बोजा सहन करावा लागेल हा मुद्दा त्या सूचनेच्या समर्थनार्थ पुढें मांडण्यांत आला आहे. शेतीच्या मालाच्या किंमती घसरल्यामुळें शेतकरी वर्गाची स्थिति सावरण्याच्या मार्गांत अडचण येत आहे; तरी युद्ध परिस्थितीमुळें ह्या मालाचे बाजारभाव थोडे चढल्यास त्यास सरकारनें प्रतिबंध करूं नये असा परिषदेच्या एका ठरावाचा आशय होता. परिस्थितीचा अवास्तव फायदा घेण्याच्या हेतूनें व्यापाऱ्यांनीं सामान्य उपयोगाच्या पदार्थांच्या किंमती चढवल्या असतां त्यांच्या कारवायांस आळा घातला जाऊं नये असें सांगण्याचा परिषदेचा उद्देश अर्थातच नव्हता. पण कपास, गळिताचीं धान्यें इत्यादींच्या किंमती इतक्या खालीं गेल्या आहेत कीं त्या चढणेंच बहुसंख्य जनतेच्या हिताच्या दृष्टीनें इष्ट आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. शेतकरी वर्गाच्या कर्जबाजारीपणावर उपाय योजले जात आहेत ते निष्फळ व्हावयाचे नसतील तर त्याची मिळकत वाढली पाहिजे आणि ती वाढण्यास बाजारभाव वर जाणें आवश्यक आहे, हें उघड आहे. शेतकऱ्यांच्या कर्ज निवारणासाठी प्रांतिक सरकारांनीं कोणता कार्यक्रम हातीं घ्यावा ह्याचें दिग्दर्शन परिषदेच्या एका ठरावांत केलें आहे. सहकारी संस्थांच्या नोकर वर्गाचा पगार, रजा, लायकी, इत्यादि बाबतींत योजनात्मक नियम केले जावे अशीहि शिफारस तिनें केली आहे. खेडेगावी सहकारी पेढ्यांची पुनर्घटना कोणत्या तऱ्हेनें करावी

ह्याची कल्पना देणारा ठराव करण्यांत आला आहे. तसेंच, सहकारी सांवत्सरिक प्रसिद्ध करण्याची योजना परिषदेनें मान्य केली आहे. बँकांच्या जवळील कर्जरोख्यांचे बाजारभाव उतरले आहेत, त्यासंबंधांत मुंबई प्रांतांत एक योजना अमलांत आणण्याचें ठरलें आहे, ती सर्व प्रांतांत उपयोगांत आणावी असें परिषदेनें ठरवलें. मुदतबंद रोख्यांची खरेदीची किंमत त्यांच्या दर्शनी किंमतीपेक्षां अधिक असेल तेव्हां त्यांतल्या तफावतीची व्यवस्था वर्षानुवर्ष नफ्यांतून करावी अशी ही योजना आहे हें आमच्या वाचकांच्या लक्षांत असेल.

---

### हिंदुस्थान सरकारचें नवीन कर्ज

हिंदुस्थान सरकारनें ३% व्याजाचें, १९४९–५२ मध्यें परत फेडीचें नवें कर्ज जाहीर केलें आहे. १ फेब्रुवारी, १९४१ पासून पुढें पुनः जाहीर करीपर्यंत ह्या कर्जासाठीं अर्ज स्वीकारले जातील. रोख रकमांच्या स्वरूपांतच अर्जदारांस भरणा करतां येईल. १ ऑगस्ट, १९४९ रोजीं अगर त्यानंतर केव्हांहि तीन महिन्यांची नोटीस देऊन सरकार कर्जफेड करूं शकेल, परंतु कांहीं झालें तरी १ ऑगस्ट, १९५२ रोजीं ते परत केलें जाईल. १ ऑगस्ट व १ फेब्रुवारी रोजीं कर्जावरील व्याज दिलें जाईल. व्याजास प्राप्तीवरील कराची माफी नाहीं. कर्जरोख्यांची किंमत विक्रीच्या तारखेस अनुसरून, खालीलप्रमाणें राहील:—

| | प्रत्येक १०० रुपयांच्या रोख्यांची किंमत रु. आ. पै. |
|---|---|
| १ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी | १००–०–० |
| १० „ ते १५ „ | १००–०–९ |
| १७ „ ते २२ „ | १००–१–६ |
| २४ „ ते १ मार्च | १००–२–३ |

त्यानंतर प्रत्येक आठवड्यास ९ पै ह्याप्रमाणें किंमतींत वाढ होत राहील. कर्ज घेणारांस स्टॉक अगर प्रॉमिसरी नोटा ह्यांपैकीं कोणत्याहि स्वरूपांत कर्जरोखे मिळूं शकतील. प्रॉमिसरी नोटा १०० रु., २०० रु., ५०० रु., १,००० रु., ५,००० रु., १०,००० रु., २५,००० रु., ५०,००० रु. व १,००,००० रुपये किंमतीच्या दिल्या जातील. २५ जुलै, १९४० रोजीं सरकारनें ३% चे १९४६ सालच्या परतफेडीचें कर्ज विक्रीस काढलें, त्याची विक्री २५ जानेवारी, १९४१ पासून बंद करण्यांत आली आहे. नवीन कर्ज रोख्यांवरील व्याज करमाफ नसलें, तरी निदान तें देतें वेळीं कापून न घेण्याची सवलत सरकारनें दिली असती, तर मध्यम वर्गांतील लोकांना ह्या कर्जरोख्यांत पैसे गुंतविणें अधिक सोईचें झालें असतें, असें मत कांहीं ठिकाणीं व्यक्त करण्यांत आलें आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें अशी सवलत देण्यांत आलेली आहे, असें समजतें. नवीन कर्जावरील व्याजाचा दर ३% च असल्याकारणानें पैशाच्या बाजारांत चलबिचल होण्याचें कांहींच कारण नाहीं.

---

### लिमिटेड कंपन्यांची कचेरी

प्रत्येक लिमिटेड कंपनीची, ज्या पत्त्यावर सर्व पत्रव्यवहार करतां येईल अशी एक नोंदलेली कचेरी असली पाहिजे. कंपनी रजिस्टर झाल्यापासून २८ दिवसांत अगर कंपनी व्यवहार प्रारंभ करते त्या दिवशीं ही कचेरी नोंदण्यांत आली पाहिजे. नोंदलेल्या कचेरीचा पत्ता व त्या पत्त्यांत होणारा फरक ह्याची माहिती तसा फरक झाल्यापासून २१ दिवसांचे आंत रजिस्ट्रारला कळविण्यांत आली पाहिजे.


दि
बँक ऑफ महाराष्ट्र,
लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना



मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

"जौहरे कुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धीखातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबूत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ता:—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर-Amritsar.

## औद्योगीकरणाशिवाय नुसतें जगणेंहि अशक्य आहे

सर अर्देशिर दलाल, आय. सी. एस. (रि.) ह्यांचें इंडियन सायन्स कॉंग्रेसमधील अध्यक्षीय भाषण

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून हिंदुस्थान परराष्ट्रीय व्यापाराच्या बऱ्याच मोठ्या भागास मुकला आहे. जो कांहीं माल पूर्वी निर्गत होत असे, त्याचा हिंदुस्थानांतच उपयोग करण्यास शास्त्रीय संशोधन हातभार लावूं शकेल. उदाहरणार्थ, गळिताच्या धान्यांपासून वंगणाचीं तेलें काढण्याबाबत सध्यां प्रयोग चालू आहेत. ह्या धान्यांची निर्गत आतां रोडावलेली असून त्यामुळें शेतकऱ्यांची मिळकत कमी झाली आहे. यंत्रसामुग्री, रसायनें इत्यादींची आयात खुंटल्यामुळें अधिकच बिकट प्रश्न निर्माण झाला आहे. हिंदुस्थानाच्या आर्थिक व औद्योगिक जीवनास लागणाऱ्या जिनसांचें बाबतींत हिंदुस्थान स्वयंपूर्ण होणें आवश्यक आहे. असें झालें, म्हणजे गेल्या व चालू युद्धाचे वेळीं आलेल्या परिस्थितीची पुनरावृत्ति होणार नाहीं. ह्या कामीं शास्त्रीय संशोधन महत्त्वाची कामगिरी बजावूं शकेल. संशोधन हा उद्योगधंद्यांचा पाया आहे. कांहीं उद्योगधंद्यांची स्थापना पूर्वी संशोधनाशिवाय झाली असली, तरी आज सर्व उद्योगधंद्यांचें अस्तित्व व त्यांची वाढ हीं सर्वांशीं शास्त्रें व संशोधन ह्यांवर अवलंबून आहे, हें उघड आहे. हल्लीच्या सुधारणांचे युगांत कोणतेंहि राष्ट्र, मग तें कितीहि शांततावादी असो, त्याचे मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण झाल्याविना जगणेंहि शक्य नाहीं, असें अनुभव सांगतो. औद्योगिक सामर्थ्याचें युद्धविषयक सामर्थ्यांत रूपांतर करतां येतें व ज्या राष्ट्राचें औद्योगिक सामर्थ्य मोठें व ज्या राष्ट्रास त्याचें औद्योगिक सामर्थ्यांत तत्परतेनें रूपांतर करतां येतें त्या राष्ट्रास जय मिळण्याचा संभव सर्वांत अधिक, हें स्पष्ट आहे. यांत्रिक सामर्थ्याचे जोरावर चालू असलेल्या युद्धांत मनुष्यबळापेक्षा विमानें, रणगाडे, तोफा, आगबोटी, कारखाने, वर्कशॉप्स, इत्यादींचेंच महत्त्व अधिक आहे. हिंदुस्थानानें ह्या गोष्टीचा धडा घेतला पाहिजे; त्यांत हेळसांड झाली, कीं नाश होणारच म्हणून समजावें. हिंदुस्थानाचें मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण होणें हें त्याच्या जीवनास अत्यावश्यक आहे.

### संशोधन शास्त्रज्ञांकडे सोपवा

हा धडा प्रथम गेल्या महायुद्धानें शिकविला. जर्मनीचें शास्त्रीय संघटन दोस्त राष्ट्रांचे संघटनापेक्षा अधिक चांगलें असल्याकारणानें जर्मनी त्यांशी दीर्घकाल टक्कर देऊं शकला. त्या युद्धाचे पूर्वी, इंग्लंडजवळ युद्धास आवश्यक अशा बऱ्याच गोष्टी नव्हत्या, त्या करण्यास इंग्लंडनें तात्काळ प्रारंभ केला. शास्त्रीय व औद्योगिक संशोधनासाठीं इंग्लंडनें एक स्वतंत्र कार्यक्षम खातेंच निर्माण केलें. ह्या खात्यांत शास्त्रज्ञांचा भरणा करण्यांत आलेला असून खात्याचें काम ज्याच्या देखरेखीखालीं चालतें, त्या सल्लागार मंडळांत सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ व दोन-तीन प्रमुख कारखानदार आहेत. २१ व्या सायन्स कॉंग्रेसमध्यें भाषण करतांना लॉर्ड रुदरफर्ड ह्यांनीं काढलेले उद्गार हिंदुस्थान सरकारास मार्गदर्शक होण्याजोगे आहेत. ते तेव्हां म्हणाले, "ग्रेट ब्रिटनमध्यें संशोधनाचें कार्य आखण्याचें काम, संशोधनाचा सर्व खर्च सरकार स्वतः करीत असलें तरी सुद्धा, संशोधन कमिट्यांकडे असते. ह्या कमिट्यांचे सभासदांत शास्त्रज्ञ व कारखानदार ह्यांचाच मुख्यतः भरणा असतो. अशाच प्रकारची संस्था हिंदुस्थानांत स्थापन करावयाची असल्यास, येथील विश्वविद्यालयांतील शास्त्रज्ञ व उद्योगधंद्यांतील पुढारी ह्यांचा त्यांत प्रामुख्यानें समावेश होणें जरूर आहे. जे प्रश्न सोडवावयाचे, त्यांतील तज्ज्ञ लोकांकडेच त्याच्या संशोधनाच्या आखणीचें काम सोपविणें रास्त होईल. ब्रिटिश संशोधन क्षेत्रांत राजकीय वातावरणाचा गंधहि नसतो परंतु संशोधनास पैसे पुरविण्याचें काम शेवटी सरकारचेंच असतें, हें स्पष्ट आहे."

शास्त्रीय संशोधन सरकारी खात्यांमार्फतच चालण्याची हिंदुस्थानांतील आजवरची प्रथा आहे. आतांपर्यंत त्यांनीं बरेंच महत्त्वाचें संशोधन केलें आहे. परंतु नियोजित औद्योगिक संशोधन शक्य तोंवर शास्त्रज्ञांकडे सोपविणें अधिक इष्ट आहे. आपण दिलेल्या ग्रँटचा उपयोग नीट होत आहेना, इकडे मात्र सरकारनें जरूर लक्ष द्यावें.

## बँकेनें चेक परत केल्याबद्दल नुकसानभरपाई

### व्यापाऱ्यास २५० पौंड मिळाले

बार्कलेज् बँकेवर एका व्यापाऱ्यानें १७ डिसेंबर, १९३८ रोजीं २ पौंड १५ शि. ८ पे. चा चेक काढला. त्याच्या आदल्याच दिवशीं त्यानें आपल्या ७ पौंड, १५ शि. ९ पे. चा चेक न वटविण्याविषयीं बँकेस लिहिलें होतें. बँकेनें त्याकडे लक्ष न देतां, ह्या चेकचे पैसे देऊन टाकले, त्यामुळें १७ डिसेंबर रोजीं व्यापाऱ्याचे बँकेंतील खात्यावर २ पौंड १५ शि. ८ पे. उरले नाहींत व तो चेक बँकेनें "खात्यावर रकम पुरेशी नाहीं" असा शेरा लिहून परत पाठविला. व्यापाऱ्यानें बँकेवर अब्रुनुकसानीचा दावा आणला. "खात्यावर रकम पुरेशी नाहीं" ह्या शेऱ्यांत अब्रू जाण्यासारखें कांहीं नाहीं व बँकेनें दिलेला शेरा तिच्या अधिकारांतलाच आहे, असा बँकेतर्फे बचाव करण्याचा यत्न करण्यांत आला. चेकचे पैसे देण्यास पुरेशी रकम खात्यावर नाहीं अशी चुकीची समजूत करून घेऊन नंतर वरीलप्रमाणें शेरा मारण्याचें कर्तव्य करीत असण्याचा प्रसंग व्यवहारास धरून नाहीं, असा कोर्टानें निवाडा करून व्यापाऱ्यास २५० पौंड अब्रुनुकसानी देवविली.

### इतरांस मामुली नुकसानभरपाई

वरील प्रकारच्याच परिस्थितींत, गिऱ्हाइक व्यापारी नसेल, तर नाममात्र नुकसान भरपाई मिळते, हें खालील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

मिसेस गिबन्सनें आपल्या घरमालकास भाड्याचे ९ पौंड १६ शि. वेस्टमिन्स्टर बँकेवर चेक काढून दिले. बाईचे खात्यावर पुरेशी रकम नाहीं, ह्या कारणास्तव बँकेनें चेक परत केला. बाईनें वास्तविक पुरेसे पैसे बँकेंत भरले होते, परंतु कारकुनाच्या चुकीमुळें चेक परत केला गेला. मिसेस गिबन्सनें बँकेकडून नुकसानभरपाई मागितली. बँकेनें आपली चूक कबूल केली, परंतु तिनें वादीस २१ शिलिंग देऊन तडजोड केली असें सांगितलें. आपण व्यापारी पेशाचें नसल्याचें वादीनें कबूल केलें. वादीनें आपल्या तक्रारीच्या पूर्ण समाधानाबद्दल २१ शिलिंग घेतले, हें ज्यूरीस पटलें नाहीं व तिला ५० पौंड भरपाई दिली गेली. जज्जानें आपल्या निकालांत असें म्हटलें कीं वादी व्यापारी नसल्याकारणानें तिला फक्त मामुली नुकसानभरपाईच मिळण्याचा हक्क आहे. तिला ४० शिलिंग नुकसानभरपाईदाखल मिळाले.

## दि मराठा चेम्बर ऑफ कॉमर्स अँण्ड इण्डस्ट्रीज, पुणें २

### कार्यवाहांचें पत्रक

फेडरेशन ऑफ इंडियन चेम्बर्स ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्रीज या व्यापारी संस्थांच्या मध्यवर्ति संघाचें वार्षिक अधिवेशन चालू सालीं असेंब्ली हॉल, अलीपूर रोड, नवी दिल्ली, येथें मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत अगर ईस्टरच्या सुटीच्या दिवसांत भरणार आहे. फेडरेशनच्या प्रत्येक सदस्य-संस्थेला अधिवेशनाला हजर राहण्यासाठी चार प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार असतो. तरी चेंबरच्या सभासदांस प्रतिनिधि म्हणून जाण्याची इच्छा असल्यास चालू महिना अखेरपर्यंत कळवावें. अधिवेशनाची प्रतिनिधि वर्गणी रु. २० व प्रवासखर्च प्रतिनिधींनें करावयाचा आहे. सदर मुदतींत ज्या सभासदांकडून फेडरेशनच्या अधिवेशनाला प्रतिनिधि म्हणून उपस्थित राहण्यासाठीं आपलीं नांवें कळविण्यांत येतील त्यांपैकीं चार जणांची चेम्बरच्या कार्यकारी मंडळाकडून प्रतिनिधि म्हणून निवड करण्यांत येईल. सदर अधिवेशनाला चेम्बरच्या शिफारशीनें प्रेक्षक म्हणून सभासदांस उपस्थित होतां येईल. अशा सभासदांस स्वखर्चानें दिल्लीस जावें लागेल. प्रेक्षकांना फक्त अधिवेशनालाच उपस्थित राहातां येतें. फेडरेशनचे इतर जे कार्यक्रम प्रतिनिधीपुरतेच मर्यादित असतात त्यांस प्रेक्षकांना निमंत्रण करण्यांत येत नाहीं. फेडरेशनच्या अधिवेशनांत मांडण्यासाठी कांहीं ठराव पाठविणें असल्यास ते वरील मुदतींत पाठवून द्यावे. ज्यांत देशी उद्योगधंद्यांसंबंधीच्या अडीअडचणी प्रतीत होतील व ज्यांचें निराकरण करण्याचा प्रयत्न करतां येईल असे ठराव असावे.

---

### ग्रेट ब्रिटनची आगबोटीविषयक परिस्थिति

"जर्मनीच्या ताब्यांत फ्रेंच बंदरें जाण्यापूर्वी ग्रेट ब्रिटनच्या सरासरीनें ४१ हजार टनांच्या आगबोटी प्रत्येक आठवड्यास बुडत असत. त्यानंतरची सरासरी ९० हजार टनांची आहे. तथापि, १९३९ मध्यें ग्रेट ब्रिटनजवळ जितक्या टनांच्या आगबोटी शिल्लक होत्या, त्यांपैकीं ९७% टनांच्या आगबोटी अद्याप शिल्लक आहेत. म्हणजे ग्रेट ब्रिटनच्या फक्त ३% आगबोटींचेंच नुकसान झालें आहे. ह्या संबंधांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आतां पूर्वींइतक्याच ठराविक वेळांत आगबोटींतून कमी मालाची वाहतुक होते. आगबोटींच्या संरक्षणासाठीं केलेल्या योजनांमुळें ये-जास विलंब लागतो व बऱ्याच आगबोटी सैनिक, त्यांस लागणारा माल, वगैरे पुरविण्यासाठी लागतात. युद्धापूर्वी, ग्रेट ब्रिटनची एक तृतीयांश आयात विदेशी आगबोटींतून होत असे. आतां अमेरिकन आगबोटी ग्रेट ब्रिटनकडे येत नाहींत. ह्या परिस्थितीस तोंड देण्याचा आम्हीं शक्यतों यत्न करीत आहों. परराष्ट्रीय व्यापाराचा त्याग करावा लागला, तरी तो आम्हीं करीत आहों. मिळतील त्या आगबोटी विकत घेऊन व नवीन बांधून आम्हीं त्या समुद्रांत कामास लावीत आहोंत. नाश होत असलेल्या आगबोटींची जागा भरून काढतां आली, तर पुढील यशाबद्दल चिंता रहाणार नाहीं. अमेरिकेनें मागील युद्धांत झपाट्यानें आगबोटी बांधल्या तशा आतां बांधल्या पाहिजेत." ग्रेट ब्रिटनच्या शिपिंग खात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी सर आर्थर साल्टर ह्यांनीं दिलेली मुलाखत.

---

## पुणें को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग क्लास

बॉम्बे को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशनचे विद्यमानें, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे देखरेखीखाली, पुणें शहरांतील सहकारी सोसायट्या व बँकांमध्यें प्रत्यक्ष काम करीत असलेल्या नोकर वर्गाच्या शिक्षणासाठी सुरू करण्यांत आलेल्या "सहकारी शिक्षणाच्या" वर्गाचें उद्घाटन प्रि. धनंजयराव गाडगीळ यांचे हस्तें, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मुख्य द्विाणखान्यांत शनवार ता. १८–१–१९४१ रोजीं दुपारीं ५ वाजतां करण्यांत आलें. सदर प्रसंगीं सुमारें ७५ ते ८० पर्यंत सहकारी चळवळींत आस्थापूर्वक काम करणारी मंडळी हजर होती. पुणें सें. को. बँकेचे चेअरमन श्री. ना. वि. भोंडे वकील, यांनीं प्रास्ताविक भाषण करून सुरू होणाऱ्या वर्गाचे प्रारंभा बाबतची पार्श्वभूमि सांगून शिक्षणक्रम काय पद्धतीनें व कशाप्रकारें चालू ठेवण्याबाबत या वर्गाच्या चालक वर्गाची मनीषा आहे त्याबाबत खुलासा केला व शिक्षणक्रमासंबंधींच्या तपशीलाबाबत ठोकळ माहिती सांगितली. पुणें सें. को. बँकेच्या डायरेक्टर मंडळींनी हा वर्ग भरविण्याच्या योजनेस आस्थापूर्वक चालना दिली व बॉम्बे को. बँक्स असोसिएशननें या योजनेस मान्यता दिली; एवढेंच नव्हे तर, तिनें ती स्वीकृत केली, या बाबतचा गौरवपर उल्लेख त्यांनीं आपल्या भाषणांत केला व सरते शेवटीं प्रि. धनंजयराव गाडगीळ यांच्यासारख्या सुविद्य, शिक्षणतज्ज्ञ व सहकारी व आर्थिक विषयासंबंधीं अधिकारी गृहस्थांकडून या वर्गाची सुरवात होत आहे; ही बाब अतिशय महत्वाची व औचित्यपूर्ण आहे असें सांगून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. प्रि. धनंजयराव गाडगीळ यांनीं या उद्घाटनप्रसंगीं जें भाषण केलें त्याचा मुख्य विषय "मध्यवर्ती सहकारी बँकांची सद्य:स्थिति व कार्य" हा होता. त्यांनीं आपल्या भाषणांत मध्यवर्ती बँकांनीं सहकारी चळवळीचें पाऊल प्रगतीपर पडण्याचे दृष्टीनें किती जबाबदारीनें, कार्यक्षमतेनें व आत्मीयतेनें काम केलें पाहिजे याची रूपरेषा अत्यंत स्पष्ट शब्दांत व फार गंभीरपणें श्रोतृवृंदावर ठसविली. आपले भाषणाचे शेवटीं त्यांनीं पुणें सें. को. बँकेचे यंदाचे उत्साही चेअरमन श्री. ना. वि. भोंडे यांनीं हा वर्ग सुरू करणेबाबत जी चिकाटी दाखविली व दीर्घ प्रयत्न केले त्याबद्दल त्यांचें व त्यांच्या बँकेच्या बोर्डावरील सहकाऱ्यांचें हार्दिक अभिनंदन करून या सहकारी वर्गात दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून जास्त जास्त कार्यक्षम अशी कामगिरी पार पडून त्यायोगें सहकारी चळवळीचें पाऊल निसंशयपणें प्रगतीपर मार्गावर पडेल अशी सदिच्छा प्रगट करून हा वर्ग सुरू झाल्याचें जाहीर केलें.

सरतेशेवटीं पुणें सें. को. बँकेचे डायरेक्टर श्री. के. व्ही. केळकर, वकील यांचें आभारप्रदर्शनार्थ भाषण होऊन हा समारंभ समाप्त झाला.

### इतिहास व अर्थशास्त्रविषयक संस्थेचा रौप्यमहोत्सव

पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजांतील इतिहास आणि अर्थशास्त्रविषयक असोसिएशनच्या स्थापनेस चालू वर्षी २५ वर्षे पुरीं होतात. प्रो. वा. गो. काळे ह्यांनीं ही संस्था स्थापन केली व तिचे ते प्रथमपासून अध्यक्ष आहेत. संस्थेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त असोसिएशनच्या कांहीं प्रमुख विद्वान सभासदांनीं लिहिलेल्या निबंधांचा ग्रंथ प्रो. काळे ह्यांस ता. २ फेब्रुवारी रोजीं नजर करण्यांत येणार आहे. त्याचवेळीं, कै. प्रो. हरिभाऊ लिमये व प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या तैलचित्रांचें अनावरणहि होणार आहे. सर मनोहरलाल, बार ॲट लॉ, कलकत्ता विश्वविद्यालयाचे माजी मिंटो प्रोफेसर व हल्लीचे पंजाब प्रांताचे फडनवीस, हे समारंभाचें अध्यक्षस्थान मंडित करणार आहेत.

## विमा कंपन्यांचें सरकारजवळील डिपॉझिट

### विमा कायद्यांतील तरतूद व नवीन सवलत

प्रत्येक आयुर्विमा कंपनीनें रिझर्व्ह बँकेजवळ दोन लक्ष रुपये रोख अगर सरकारमान्य रोख्यांचे स्वरूपांत अनामत ठेवले पाहिजेत, अशी सक्ती हिंदी विमा कायद्यानें केलेली आहे. २७ जानेवारी, १९३७ पूर्वी ज्या कंपन्या चालू होत्या, अशा कंपन्यांनीं हें डिपॉझिट सात हप्त्यांत ठेवलें तरी चालेल; एकूण डिपॉझिटच्या एक चतुर्थांशा इतका तरी पहिला हप्ता भरला पाहिजे; उरलेल्या बाकी डिपॉझिटच्या एक शष्ठमांशाइतका तरी दुसरा हप्ता विमा कायदा अंमलांत आल्यापासून चार महिन्यांचे आंत भरण्यांत आला पाहिजे, उरलेले हप्ते दुसऱ्या हप्त्यापेक्षा लहान असतां कामा नयेत व ते प्रत्येक वर्षी १ जानेवारीच्या आंत भरले पाहिजे, असें विमा कायद्यानें सांगितलें आहे. विम्याचेंच केवळ काम करणाऱ्या कंपन्यांना दहा हप्त्यांत डिपॉझिट पुरें करतां येईल; पहिला हप्ता एक चतुर्थांश रकमेचा; दुसरा व त्यापुढील हप्ते उरलेल्या तीन चतुर्थांश रकमेच्या किमान एक नवमांशाइतके, अशी त्या संबंधांत व्यवस्था आहे.

२७ जानेवारी १९३७ नंतर स्थापन होणाऱ्या अगर व्यवहारास प्रारंभ करणाऱ्या कंपनीनें पहिला हप्ता एक चतुर्थांश रकमेचा भरावयाचा आहे. व्यवहारास प्रारंभ केल्यानंतर बाकीपैकीं किमान एक तृतीयांश रकम भरली पाहिजे. उरलेल्या बाकीच्या किमान एक द्वितीयांश रकम दोन वर्षांचे आंत व शेवटचा हप्ता तीन वर्षांचे आंत भरला पाहिजे, असें विमा कायद्यानें ठरविलेलें आहे.

### नवीन सवलत

विमा कायद्यानें ठरवून दिलेले उपरनिर्दिष्ट हप्ते नवीन, लहान कंपन्यांस रिझर्व्ह बँकेकडे भरण्यास कठीण जात आहे. युद्धपरिस्थितीमुळें त्यांच्या कामांत वाढ होत नाहीं व जुन्या पॉलिसी रद्द होतात, त्या कारणानें कायद्यानें ठरविलेले हप्ते त्या भरूं शकत नाहींत, असें सरकारास आढळून आलें आहे. युद्ध चालू असेपर्यंत व त्यानंतर एक वर्ष हे हप्ते कमी करण्याचा सरकारचा विचार आहे व त्यासाठीं तें असेंब्लींत एक बिल मांडणार आहे. कंपन्या ह्या सवलतीचा दुरुपयोग करणार नाहींत, अशी खबरदारी घेण्यांत येणार आहे.

### नांव प्रसिद्ध करण्याची पद्धति

प्रत्येक लिमिटेड कंपनीनें आपल्या व्यवहाराच्या ठिकाणाचें बाहेरील बाजूस आपलें नांव लावलें पाहिजे. ही पाटी प्रमुख ठिकाणीं असणें जरूर आहे. अक्षरें सुवाच्य आणि इंग्रजींत पाहिजेत. कंपनीचें रजिस्टर्ड ऑफिस हायकोर्टाच्या ऑर्डिनरी ओरिजिनल दिवाणी स्थानिक अधिकार क्षेत्राच्या बाहेर असेल, तर त्या ठिकाणीं चालू असणाऱ्या एकाद्या देशी भाषेंतहि पाटी लावली पाहिजे. कंपनीच्या सिलावर कंपनीचें नांव स्पष्ट उमटलें पाहिजे. बिलें, नोट पेपर, नोटिसा, जाहिराती, हुंड्या, प्रॉमिसरी नोटा, चेक, पावत्या, इत्यादींवर कंपनीचें नांव इंग्रजी अक्षरांत लिहिलें पाहिजे. कंपनीच्या कोठल्याहि नोटिशींत, जाहिरातींत, वगैरे ठिकाणीं जेथें अधिकृत भांडवलाची रकम लिहिलेली असेल, तेथें तितक्याच प्रामुख्यानें खपलेलें भांडवल व वसूल झालेलें भांडवल हीं लिहिण्यांत आलीं पाहिजेत, असा कायदा आहे.


**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**The Co-operators' Book Depot.**
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
The Only Book Depot of its Kind in India.
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

**..." रम्य वाचनालय "...**
म्हणजेच
आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचीं मनें व बुद्धि यांच्या विकासाचें व रंजनाचें केन्द्र
यांचीं वैशिष्टयें:—(१) सर्व लेटेस्ट स्टॉक. (२) कादंबऱ्या, नाटकें, चरित्रें इत्यादि. (३) इंग्रजी मराठी मासिकें, तशींच वर्तमानपत्रें
वर्गणी:—(१) स्वतः वाचनालयांतून घरीं नेणारास दर महिना सहा व चार आणे. (२) घरीं पोंचविण्यास दोन आणे जास्त. (३) मेंबर न होतां वाचनालयांतच वाचणारांस प्रत्येक वेळेस पाव आणा.
शेवक क्वार्टर्स, फर्ग्युसन रोड, पुणें ४. — व्यवस्थापक, C. R. & Co., रम्य वाचनालय.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११२—६ |
| ४% १९४३ | १०४–१० |
| ३½% बिनमुदत | ९५—६ |
| ३½% १९४७–५० | १०२—४ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९४—० |
| २¾% १९४८–५२ | ९६—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६३) | ११३—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०५–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४३–१४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५६७—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | १३०—४ |
| कराची ( १०० ) ९% | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १५०७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १६४०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९८७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६९५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २०१—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४६—४ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २०—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ४१–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३९६०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१५—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४९—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३६४—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १८३७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १३३—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२–१–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६३–२–६ |


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.


पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक
निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.

अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठीं तेल किं. १२ आणे. टपाल हंशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॅचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हंशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. १७ (A. P.) अमृतसर (India.)



# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.



## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

कामगार ब्राम्ही तेल
हिरेमणि तेल
आवळ्याचें तेल
स्थापना १९०९
डोकें शांत रहातें. केंस मजबूत होतात.
गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.
धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. ४)





तमाम दंत रोगांचा नाश करून दांत स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲण्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA
सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

For Collegians
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
SHEVAK BROS.
Work-Shop Address: 153 Kasaba, Poona 2
Branch No. 1 Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

अर्थशास्त्र
लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ मांगुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांगुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गानिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ५ फेब्रुवारी, १९४१ अंक ६

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दानेवाडी, पुणें.

**डॉ. एन. आर. राजोपाध्ये**
यांचे
अॅसमॉल् or पौष्टिक पिल्स घ्या. किंमत १२ आ. फक्त
सोल एजंटः "वेलणकर वनौषधालय", तुळशीबाग रस्ता, पुणें.
एजन्सी देणें आहे. एक आण्याचा स्टँप पाठवून विचारावें.

**देशी औषधें तयार करणारा**
**महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना**
पंडु, (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

**रक्तवर्धक**

**वापरा.**

**सर्वत्र मिळतें.**

—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा**
**पुणें, लि.** पुणें ४.

हास्य—विनोद—करमणूक
म्हणजेच

**लग्न पहावं करून**

दिग्दर्शक : विनायक
भूमिका : दामुअण्णा मालवणकर

**७ वा आठवडा**

**मिनर्व्हा — पुणें**

डॉ. एन. आर. राजोपाध्ये यांचे खास
देखरेखीखालीं चाललेलें

**" वेलणकर वनौषधालय "**

येथें सर्व तऱ्हेच्या वनस्पति व सिद्धौषधी मिळतील. १ पैशापासून ते सिद्धौषधीपर्यंत मिळण्याचें हें पुण्यांतील पहिलेंच दुकान होय. येथें रोगी तपासून औषध देण्याचीही सोय आहे. दम्यावर दर रविवारीं सकाळीं मोफत औषध दिलें जातें.
उघडण्याची वेळः—सकाळीं ८॥ ते १२ व दुपारीं ३॥ ते ८ पर्यंत.
पत्ता : "वेलणकर वनौषधालय" तुळशीबाग रस्ता, पुणें.

बँका व कचेऱ्या यांस उपयुक्त असा एक
ब्रीफ साईज

**टा इ प रा य ट र**

कोरा असून
**स्वस्त विकाऊ आहे.**
चौकशी कराः—
अवर होम, ६११ शनवार पुणें. टेलिफोन नं. ९/११५.

## विविध माहिती

### बँकांस सुटी

शनिवार, ता. ८ रोजीं मोहरमनिमित्त बँका बंद राहातील.

### इमर्जन्सी कमिशन

हिंदी लष्करांतील इमर्जन्सी कमिशनसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची पहिली परीक्षा मुंबई प्रांताच्या प्रत्येक विभागाच्या केंद्रांत, म्हणजे अहमदाबाद, पुणें अगर बेळगांव, येथें प्रथम घेण्यांत येईल. त्यासाठी एक स्थानिक कमिटी नेमण्यांत येईल.

### आय. सी. एस. अधिकारी गव्हर्नरांचे हाताखालीं या

ब्रह्मदेशांत नेमण्यांत आलेल्या काटकसर कमिटीच्या शिफारसी प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत. भारतमंत्र्यांचे हाताखालील नोकरवर्ग गव्हर्नरांचे नियंत्रणाखालीं असावा व ह्या नोकरवर्गाची निवड ह्यापुढें ब्रह्मी लोकांतूनच व्हावी, हायकोर्ट जज्जांची संख्या कमी करण्यांत यावी, वगैरे सूचना कमिटीनें केल्या आहेत.

### ग्रीसला देणगी

व्हाइसरॉयांच्या युद्धविषयक फंडांतील ५ लक्ष रुपयांचा विनियोग ग्रीस देशास कपास कापड नजर करण्याकडे केला जाणार आहे. कापडाच्या गिरण्याहि तितकेंच कापड आपण होऊन नजर करतील, अशी अपेक्षा असून वेगवेगळ्या गिरणी-मालक संघांकडे त्याबाबत पत्रव्यवहार चालू आहे.

### ट्रेझरी बिलांवर ११ आ. ६ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ११ आ. ६ पै पडला.

### रेडिओ परवाना फीचें उत्पन्न

जुलै ते सप्टेंबर, १९४० ह्या तीन महिन्यांत रेडिओ लायसेन्सचें एकूण उत्पन्न २,९४,३१० रुपये झालें. १९३९ च्या तत्सम सहामाहींत तें २,०९,२९२ रुपये झालें होतें.

### रेडिओच्या आयातीवरील जकात

रेडिओ व त्यांस लागणारें सामान ह्यांच्या आयातीवरील जकातीचें उत्पन्न जुलै ते सप्टेंबर, १९३९ ह्या तिमाहींत ४,४७,००० रुपये झालें. १९३९ सालीं ह्याच तिमाहींत तें ४,२७,००० रुपये झालें होतें.

### ग्रेटब्रिटनची चहाची खरेदी

ग्रेट ब्रिटन हिंदुस्थानांतून चालू वर्षी २७ कोटि पौंड चहा विकत घेणार आहे. ह्यांपैकी २२½ कोटि पौंड चहा उत्तर हिंदुस्थानांतील मळ्यांचा घेण्यांत येईल.

### मालवहातुकीच्या मोटारलॉरींची सक्तीनें खरेदी

मालवहातुकीच्या मोटारी लष्करी उपयोगासाठी, म्हणजे मुख्यतः त्या चालविण्यास शिकविण्याकरितां, कमी पडत आहेत. म्हणून, हिंदुस्थान सरकार अशा मोटारी विकत घेणार आहे. पुरेशा मोटारी मिळाल्या नाहींत, तर सक्तीनें त्या विकत घेतल्या जातील.

### हिंदी टपाल सुरक्षित

हिंदुस्थानांतून ग्रेटब्रिटनकडे जाणारें टपाल शत्रुपक्षाच्या कारवाईनें नाश पावल्याची माहिती अद्याप आलेली नाहीं, असें कॅप्टन वॉटरहाउस ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

### भुइमुगाच्या लागवडीचें नियंत्रण

भुइमुगास परदेशांत मागणी कमी झाल्यामुळें त्याची हिंदुस्थानांतील लागवड कमी करणें आवश्यक झालें आहे. जे शेतकरी लागवडीचें क्षेत्र मर्यादित करतील, त्यांची भरपाई करण्यांत यावी, अशी त्या संबंधांत एक सूचना आहे. १४ फेब्रुआरी रोजीं दिल्ली येथें मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांची एक परिषद भरणार आहे, तीमध्यें ह्या प्रश्नांचा विचार केला जाईल.

### कामकरी वर्गाच्या हिताचे प्रश्न

प्रांतिक मंत्र्यांच्या दिल्ली येथें भरलेल्या परिषदेंत हिंदुस्थान सरकारचे मंत्री, सर ए. रामस्वामी मुदलियार, ह्यांनीं सांगितलें कीं, युद्ध चालू असतांनाहि कामकरी वर्गाच्या हिताच्या प्रश्नांचा विचार होणें अगत्याचें आहे.

### युद्धोत्तर सामाजिक घटना

ब्रिटिश सरकारचे मंत्री, मि. डेव्हिस, नुकतेच म्हणाले कीं सध्याची आर्थिक व सामाजिक घटना युद्धाचे समाप्तीनंतर बदलली जाऊन अधिक समतेची व न्यायाची होणें अपरिहार्य आहे.

### जपानची राज्यतृष्णा

पूर्व एशियांत जपानचें वर्चस्व स्थापन झालें पाहिजे आणि त्याच्या मार्गांत अमेरिका आल्यास आपण योग्य तो उपाय अमलांत आणल्यावांचून रहाणार नाहीं अशी धमकी जपानी मुत्सद्दी व वृत्तपत्रें देत आहेत. ह्याच्या उलट, जपानची राजकीय महत्वाकांक्षा जगाच्या शांततेस घातुक असल्याचें चिनी पुढारी सांगत आहेत.

### आणखी एक बजेट

ग्रेट ब्रिटनचा युद्धखर्च वाढत आहे, त्याची तरतूद करण्याकरितां कॉमन्स सभेची आणखी करवाढीस संमति मिळविण्याकरितां १०० कोटि पौंडांचें बजेट ब्रिटिश फडनवीस, सर किंग्जले वुड, हे त्या सभेस लवकरच सादर करतील. चालू वर्षींतील हें तिसरें बजेट आहे.

### गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्ड

मुंबई, कलकत्ता, व मद्रास येथील टेलिफोन कंपन्यांचे व्यवहार हिंदुस्थान सरकार स्वतःकडे घेणार असल्याचें मागेंच प्रसिद्ध झालें आहे. त्यासाठी वरील नांवानें एक सरकारी कंपनी स्थापन करण्यांत आली आहे. तिचे, पोस्ट व तार खात्याचे डायरेक्टर जनरल हे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम पहातील. ह्या कंपनीच्या नांवानें सरकार मुंबई, कलकत्ता व मद्रास ह्या कंपन्यांचे भाग विकत घेईल. हिंदुस्थान सरकारची योजना ह्या कंपन्यांचे भागीदारांपुढें मांडण्यांत येईल व ती तीन चतुर्थांश भागीदारांनीं मान्य केली तर पुढील व्यवहार पुरा केला जाईल.

### प्रवाह बदलण्याची योजना

सिंधू नदीचा प्रवाह लारखाना शहरापाशीं बदलून तो ५० फूट रुंद व ८ फूट खोल असें एक पात्र खणून त्यांतून नेण्याची योजना सिंध सरकारपुढें आहे. लारखान्याजवळील पाण्याचें धरण व कालवा ह्यांचें त्यामुळें संरक्षण होईल, अशी अपेक्षा आहे. नवा प्रवाह खैरपूर संस्थानांतून जाईल, त्यास त्या संस्थानाचा विरोध आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ६२ |
| २ शेतकऱ्यांच्या आर्थिक दुःस्थितीचें निवारण ... | ६३ |
| ३ मुंबई येथील सोन्या-चांदीचा बाजार ... | ६४ |
| ४ वर्षासनें ... | ६४ |
| ५ स्फुट-विचार ... हिटलरची अमेरिकेस धमकी—अमेरिकन मालाचा राशियामार्फत जर्मनीस पुरवठा — हिंदुस्थानांत जपानी मालाची वाढती आयात—नवीन कारखान्यांची खेडेगांवांत स्थापना—नागाचे जोडे. | ६५ |
| ६ औद्योगिक संशोधनाच्या कार्याचा विस्तार ... | ६६ |
| ७ हिस्टॉरिकल अँड एकनॉमिक असोसिएशन | ६७ |
| ८ ऐतिहासिक व अर्थशास्त्र-विषयक निबंध ... | ६८ |
| ९ कागदाचें हिंदुस्थानांत उत्पादन ... | ७० |
| १० निवडक बाजारभाव ... | ७० |


# अर्थ

बुधवार, ता. ५ फेब्रुवारी, १९४१

## शेतकऱ्यांच्या आर्थिक दुःस्थितीचें निवारण*

हिंदी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा प्रसिद्धच आहे. त्यांच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा होण्यावर देशाची औद्योगिक प्रगति थोड्याफार अंशांनीं अवलंबून आहे व औद्योगिक प्रगति झाल्याविना हिंदी लोकांचें शेतीवरील अवलंबन कमी होणें शक्य नाहीं, असा शेती व उद्योगधंदे ह्यांचा परस्पर संबंध आहे. हिंदी शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीकडे पाश्चात्य राष्ट्रांतील कारखानदारांचेंहि लक्ष असतें, कारण त्यांचा माल हिंदुस्थानांत खपणें ही गोष्ट हिंदी शेतकऱ्यांच्या विक्रय सामर्थ्याशीं निगडित आहे. मँचेस्टर येथील गिरण्यांच्या कापडाचा उठाव, हिंदुस्थानांत दोन-चार प्रांतांत दुष्काळ पडला तर होऊं शकत नाहीं; मग हिंदी कारखानदारांच्या मालाचे खपावर त्याचा परिणाम झाल्याखेरीज कसा राहील! हिंदुस्थानांतील बहुसंख्य लोक शेतीवरच आपली उपजीविका करतात, ह्या दृष्टीनें आणि त्यांच्या स्वतःच्या योगक्षेमाचे दृष्टीनेंहि त्यांच्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न विशेष महत्त्वाचा आहे, हें उघड आहे.

" हिंदी शेतकरी जन्मतःच कर्जबाजारी असतात, ते कर्जांतच आयुष्य कंठितात व मृत्युनंतरहि आपल्या वंशजांवर कर्जाचा बोजा शिल्लक ठेवतात, " असें त्यांच्या कर्जबाजारीपणाचें वर्णन शेतकी कमिशननें यथार्थपणें केलें आहे. १९३० सालच्या बँकिंग कमिटीनें, हिंदी शेतकऱ्यांचा कर्जाचा अंदाजी आकडा ९०० कोटि रुपये सांगितला होता. त्यानंतर आलेल्या मंदीमुळें शेतीच्या मालाचे बाजारभाव एकदम उतरले व त्या कारणानें शेतकऱ्यांचें उत्पन्न कमी होऊन त्यांची परतफेड करण्याची पात्रता नाहींशी झाली व पैशाचे मापांत व्यक्त होणारा कर्जाचा बोजा कायमच राहिला. सावकारांनीं आपल्या पैशाच्या वसुलीसाठी कुळांस तगादा लावला व कित्येकांच्या जमिनी लिलावास निघाल्या. उदरनिर्वाहाचें साधन न उरल्याकारणानें सार्वजनिक शांततेस धोका उत्पन्न होण्याइतकी गंभीर परिस्थिति निर्माण झाली व प्रांतिक सरकारांस कर्जनिवारणाचा प्रश्न तातडीनें हातीं घेणें अत्यावश्यक झालें. शेतकऱ्यांस प्राप्तपरिस्थितींत थोडीफार कर्जफेडीची तहकुबी मिळावी, हा प्रांतिक सरकारांच्या कायद्यांचा मूळ उद्देश होता. परंतु, हळुहळू त्या कायद्यांस व्यापक स्वरूप प्राप्त होत जाऊन, शेतकरी व सावकार ह्यांच्यामधील व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्याचा व त्यांचे संबंध कायमचे निश्चित करण्याचा प्रयत्न सुरू झाला. १९३९ चे अखेर युद्धास प्रारंभ झाल्यानंतर बहुसंख्य प्रांतांच्या लोकनियुक्त प्रांतिक प्रधान मंडळांनीं राजीनामे दिले व शेतकऱ्यांचा कर्जनिवारणाचा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न थोडे मंदगतीनें झाले. ह्यामुळें, गेल्या दहा वर्षांतील त्या संबंधांतील प्रयत्नांचा एकसमयावच्छेदेंकरून विचार करण्यास व त्यांतील असलेले दोष कसे सुधारतां येतील ह्याची चर्चा करण्यास हा समय अत्यंत सोईचा आहे. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या संशोधन खात्यातर्फे श्री. एन. जी. अभ्यंकर एम. एससी. ( लंडन ) ह्यांनीं शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणाच्या प्रांतिक कायद्यांची छाननी करणारें एक सुमारें १०० पृष्ठांचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे, तें ह्या प्रश्नांत लक्ष घालणारांस अत्यंत उपयुक्त वाटेल. कर्जनिवारणाबाबत कायद्यांपैकी कांहीं अल्पकालीन सूट देणारे आहेत व कांहीं दीर्घकालीन सूट देणारे आहेत. ह्या दोन्ही प्रकारच्या कायद्यांचे हेतु मुख्यतः तीन म्हणजे (१) कर्जाची रक्कम कमी करून त्याचा बोजा हलका करणें, (२) सावकारीच्या धंद्याचें नियंत्रण करणें व भांडवल पुरविणाऱ्या सुनियंत्रित संस्था स्थापन करणें आणि ( ३ ) सावकारांच्या गैरवाजवी कारवायांपासून शेतकऱ्यांचें सर्व तऱ्हेनें (विशेषतः मालमत्तेचें) संरक्षण करणें, हे होत. ह्यांपैकी, कर्जाचा बोजा हलका करण्याचें काम एकदाच करावयाचें आहे. तें चालू रहाणारें काम नाहीं व त्यासंबंधांतील कायदा अल्पकालीन अंमलबजावणीचा असणें स्वाभाविक आहे. बाकीच्या गोष्टी साध्य करणारे कायदे दीर्घकाल चालू राहणें अवश्य आहे.

श्री. अभ्यंकर ह्यांनीं आपल्या पुस्तकांत प्रथम कर्जनिवारक कायद्यांचें वरील मुद्द्यांस अनुसरून विवेचन केलें आहे व नंतर त्या कायद्याच्या अंमलबजावणीची हकीकत दिली आहे. शेतकऱ्यांस कर्जें देणाऱ्या सावकारांचे व्यवहार रिझर्व्ह बँकेचे कक्षेंत येत नाहींत व त्यामुळें देशाच्या बँकिंगचे क्षेत्रांत त्यांस स्थान मिळत नाहीं, ही अडचण नाहींशी होण्याची आवश्यकता लेखकानें प्रतिपादन करून नंतर आणखी असेंही सांगितलें आहे कीं, केवळ भांडवल-पुरवठ्याचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटून भागणार नाहीं. शेती सुधारणेचा व्यापक प्रश्न हातीं घेऊन त्यासंबंधांत सर्वव्यापी व सुसंबद्ध योजना अंमलांत आणणें अत्यंत महत्त्वाचें आहे. सध्या शेतीच्या धंद्यांत शेतकऱ्यांस पुरेसें धान्यहि मिळण्याची मारामार पडत आहे. जमिनीच्या विभक्त मालकीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण, शेतीच्या पद्धतींत सुधारणा, विक्रीची पद्धतशीर व्यवस्था, इत्यादि प्रश्न येथें उद्भवतात. शेतीचा धंदा प्रथम किफायतशीर बनला पाहिजे. ही गोष्ट घडवून आणणें महाप्रयासाचें काम आहे. उत्पादन अधिक कार्यक्षम करून त्यांत विविधता आणण्याचा नंतर प्रयत्न केला पाहिजे. विक्रीची पद्धतशीर योजना करून, शेतकऱ्यांस त्यांच्या मालास योग्य तो भाव मिळण्याची व्यवस्था करण्याचें महत्त्वहि फार मोठें आहे. केवळ कर्जनिवारक कायद्यांनीं शेतकऱ्यांचा आर्थिक प्रश्न सुटणार नाहीं व एकदा कर्जाचा बोजा कमी केला म्हणजे तो पुनः वाढणार नाहीं ह्याची कांहीं तरी योजना केल्याविना कर्ज कमी करण्याचा कांहींहि उपयोग होणार नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. शेतकऱ्यांची उत्पादनशक्ति व त्यांचें उत्पन्न वाढविणें हें काम अधिक अवघड परंतु तितकेंच अगत्याचें आहे.

*" प्रॉव्हिन्शिअल डेट लेजिस्लेशन इन रिलेशन टु रूरल क्रेडिट." लेखकः—श्री. एन. जी. अभ्यंकर. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, न्यू दिल्ली. पृ. सं. १०२.

## मुंबई येथील सोन्याचांदीचा बाजार

### तेजीबदला कसा करतात ?

व्यापारी लोक वायद्याचे व्यवहार करतात, परंतु ठराविक दिवशीं पैसे देऊन चांदी घेण्याचा अगर पैसे घेऊन चांदी देण्याचा त्यांचा हेतु असतोच असें नाहीं. किंमतींच्या चढउतारांतील तफावतहि ते देत–घेत नाहींत; परंतु त्यापुढील वायद्याचे तारखेपर्यंत आपला व्यवहार त्यांस लांबणीवर टाकावयाचा असतो व त्यासाठी लागणाऱ्या पैशाची तरतूद दलाल करतो. समजा, "अ"नें मार्गशीर्षाच्या वायद्याचे ६० रुपये दरानें १० पाट घेतले आहेत. पैसे देण्याची वेळ आली; तेव्हां त्यानें हा व्यवहार पुढच्या म्हणजे पौषाच्या सेटलमेंटपर्यंत पुढें ढकलण्यास दलालास सांगितलें. दलाल काय करतो ? तो आपल्या गिऱ्हाइकातर्फे १० पाट चालू दरानें मार्गशीर्ष वायद्याचे विकतो व पौष वायद्याचे तेवढेच पाट विकत घेतो. मूळ किंमत ६० रुपये, व्यवहार पुरा करण्याच्या वेळची मार्गशीर्ष वायद्याची किंमत ५८ रु. व पौष वायद्याची किंमत ५८ रु. ४ आ. होती, असें मानल्यास गिऱ्हाइकानें मार्गशीर्ष महिन्याच्या वायद्याचे किंमतीमधील तफावत म्हणजे ६० रु. – ५८ रु. = २ रु. × २८ × १० = ५६० रुपये भरले पाहिजेत. त्याची नवी खरेदी ५८ रु. ४ आ. ची आहे. पौष सेटलमेंटचे पूर्वी गिऱ्हाइकास आपले १० पाट किंमत वाढल्यास विकतां येतील, अगर वरीलप्रमाणेंच पुढच्या वायद्याचे तारखेपर्यंत व्यवहार पुढें ढकलतां येईल. वरप्रमाणेंच त्यास रकम भरावी लागेल. ह्यास तेजी बदला असें म्हणतात.

### मंदी–बदला कसा करतात ?

समजा, वरील उदाहरणाचे उलट, एकाद्या व्यापाऱ्यानें मार्गशीर्ष वायद्याचे, ५९ रु. दरानें १० पाट विकण्याचा करार केला आहे. सेटलमेंटच्या दिवशीं, आपला विक्रीचा करार पुरा न करतां तो पुढच्या पौष सेटलमेंटपर्यंत पुढें ढकलण्यास व्यापारी सांगतो. ह्या वेळींहि, आपल्या गिऱ्हाइकातर्फे दलाल दोन करार करतो. (१) मार्गशीर्ष वायद्याचे १० पाट ठरलेल्या किंमतीस घेणें व (२) १० पाट पौष वायद्यासाठी बाजारभावानें विकणें. विकत घेतांना त्यास ५६ रु. पडले व विक्रीचा भाव ५६ रु. ४ आ. होता, ह्या हिशेबानें, गिऱ्हाइकास

५९ रु. – ५६ रु. = ३ रु. × २८ × १० = ८४० रुपये मिळतील. पौष वायद्यासाठी त्याचा ५६ रु. ४ आ. विक्रीचा करार कायम राहीलच.

पहिल्या उदाहरणाप्रमाणें ह्या वेळींहि गिऱ्हाइकास विकल्प रहातील. मंदी-बदला म्हणतात, तो हाच.

### बदल्यांत पैसे कसे गुंतवितात ?

बँकर व श्रीमंत लोक ह्यांस वरील प्रकारच्या बदल्यांचे व्यवहारांत पैसे किफायतशीर गुंतवितां येतात. दलालाजवळ बदला व्यवहारास लागणारी पुरेशी रकम असतेच असें नाहीं व असली तरी तो त्यांत गुंतवीलच असेंहि नाहीं. म्हणून, तो आपल्या गिऱ्हाइकांस भांडवलवाला गाठून देतो. तेजी-बदल्यांतील मार्गशीर्ष वायद्याची १० पाट चांदी विकत घेण्याचा व पौष वायद्याची १० पाट चांदी विकण्याचा एकदम व्यवहार करणारा मनुष्य त्यास हवा असतो. बँक हा व्यवहार करते. समजा, मार्गशीर्ष वायद्याचा दर ५८ रु. आहे. तर मग, दलाल बँकेस ५८ रु. दरानें चांदी विकील व पौष वायद्याची ५८ रु. ४ आ. दरानें चांदी तिचेकडून विकत घेईल. म्हणजे, बँक १६,२४० रुपये देऊन दलालाकडून चांदीचे पाट ताब्यांत घेते व पौष वायद्याचे सेटलमेंटचे वेळीं १६,३१० रुपये घेऊन ते पाट परत देते. म्हणजे, १६,२४० रुपयांच्या भांडवलावर बँकेस एका महिन्यांत ७० रुपये मिळाले, ह्या हिशेबानें व्याजाचा दर ४½% ते ५% पडला, असा अर्थ होतो.

मंदी-बदल्याचे वेळींहि बँकर अशाच रीतीनें व्याज मिळवितो. दलाल आपल्या गिऱ्हाइकातर्फे बँकेकडून मार्गशीर्ष वायद्याचे १० पाट विकत घेतो व पौष वायद्याचे १० पाट विकतो. मार्गशीर्ष वायद्याचा दर ५८ रुपये असल्यास, ५८ रु. ४ आ. दरानें बँक चांदी विकील, म्हणजे १० पाट देऊन ५८ रु. ४ आ. × २८ × १० = १६,३१० रुपये प्रत्यक्ष घेईल व पौष सेटलमेंटचे वेळीं फक्त १६,२४० रुपये देऊन पाट पुनः परत घेईल व एका महिन्यांत ७० रुपये मिळवील. चांदीच्या बाजारभावांत फरक पडला तरी बँकेचें नुकसान होत नाहीं व मुद्दल सुरक्षित रहातें. कर्जरोख्यांच्या तेजी–मंदी बदल्यांत ह्याच प्रकारानें पैसे चांगल्या रीतीनें व्याजी लावतां येतात. त्यांत सट्टेबाजी नाहीं.

## वर्षासनें

आपल्या म्हातारपणाची तरतूद करण्याचा एक सोइस्कर मार्ग म्हणजे विमा कंपनीकडून वर्षासन घेणें, हा होय. एक ठराविक रकम एकदम देऊन अथवा कांहीं ठराविक वर्षे हप्ते भरूनहि विमा कंपनीकडून वर्षासन घेतां येतें. वर्षासनाची रकम दरमहा अगर दर तिमाहीस मिळावी, अशीहि व्यवस्था करतां येते. आज ठराविक रकम भरून, आजच्या तारखेपासूनच वर्षासन घेतां येते, अथवा अर्जदाराच्या ठराविक वयापासून पुढें तें मिळण्याचीहि तरतूद होऊं शकते. वर्षासन आमरण अथवा ठराविक निश्चित वर्षें, कराराप्रमाणें मिळतें. कित्येक लोक आपल्या मृत्युपत्रांत पैसे ठेवून, त्यांचा विनियोग आपल्या नातलगांस अगर नोकरांस वर्षासन मिळवून देण्याकडे करावा, अशी त्यांत व्यवस्था करतात.

हिंदुस्थानांत आयुर्विम्याचा प्रसार बराच झाला असला, तरी वर्षासनांची कल्पना अद्याप दृढमूल झालेली नाहीं. १९३८ संबंधाचे हिंदी विमा कंपन्यांबाबतचे आकडे हें स्पष्ट करतील.

१९३८ मध्यें ३० विमा कंपन्यांनीं मिळून वर्षासनांचे एकूण १६५ करार केले. ह्या वर्षासनांची वार्षिक रकम १५,७८३ रुपये भरते. कांहीं वर्षासनें ठोक रकमा घेऊन देण्यांत आलीं व कांहींचे बाबत हप्ते घेण्यांत येत आहेत. एकूण १,३१,२७८ रुपये रोख घेण्यांत आले असून वार्षिक हप्ते ४,७८० रुपयांचे आहेत. १९३८ अखेर १,८८,४६७ रुपयांच्या वर्षासनांचे १,७३७ करार चालू होते. मेथॉडिस्ट ॲन्युइटंट सोसायटीनें १९३८ सालीं सर्वांत अधिक म्हणजे १११ वर्षासनांचे करार केले व तिचेकडे वार्षिक ३२,८३२ हजार रुपयांच्या हप्त्यांचे ९७३ करार चालू आहेत. ओरिएंटलनें १९३८ सालीं ४४,७१६ रुपये घेऊन ३,५७४ रुपये वर्षासनांचे ११ करार केले. तिचेकडे ४४,९१८ रुपये हप्त्यांचे ७२,६०८ रुपये वर्षासनांचे १०८ करार चालू आहेत. ह्याच वर्षी कॉमनवेल्थनें वर्षासनाचा १ व वेस्टर्न इंडियानें २ करार केले. वेस्टर्न इंडियाकडे १९३८ अखेर ६,२३६ रुपये वर्षासनांचे ४३ करार चालू होते; कॉमनवेल्थचे व इंडियन प्रोग्रेसिव्हचे तत्सम आकडे ६१६ रुपये व ५ करार आणि ३६० रुपये व १ करार, असे आहेत.

# स्फुट विचार

## हिटलरची अमेरिकेस धमकी

प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकन कायदेमंडळ इंग्लंडला युद्धसहाय्य देण्याविषयींची योजना मान्य करण्यांत गुंतलें असतां हिटलरनें नुकत्याच केलेल्या भाषणांत अमेरिकन राष्ट्रास धमकी देऊन बजावलें कीं तें इंग्लंडच्या बाजूनें युद्धांत पडेल तर त्या बाबतींत जर्मनीस आपलें धोरण बदलावें लागेल. अमेरिकेस शत्रू समजून त्याच्या जहाजांवर हल्ला करण्यास आपण मागेंपुढें पहाणार नाहीं असा ह्या धमकीचा स्पष्ट अर्थ आहे. येत्या वसंत ऋतूमध्यें आपली इंग्लंडवरची स्वारी होईल असें हिटलरनें जाहीर केलें आहे. जर्मनीचा हा बेत इंग्लंडला चांगला माहीत असून त्यास तोंड देण्यास तें राष्ट्र सिद्ध आहे. इंग्लंडवर जर्मनीनें हल्ला केलाच तर त्याच्या लढाया अत्यंत निकराच्या होतील, ह्यांत शंका नाहीं. पण त्यांत हिटलरला यश येण्याचा संभव नाहीं, एवढेंच नव्हे तर त्याचा हल्ला परतवला जाऊन जर्मनीच्या शेवटच्या पराजयाचा प्रारंभच त्या लढायांत होईल. इंग्लंडची बाजू मजबूत होण्यास अमेरिकेचें लढाऊ सहाय मिळत आहे आणि त्या सहायाच्या धोरणावर अमेरिकन कायदेमंडळाच्या संमतीचें शिक्कामोर्तब होत आहे ही गोष्ट हिटलरच्या डोळ्यांत सलत आहे. अमेरिका लोकशाहीच्या बचावासाठी लागेल तो स्वार्थत्याग करावयास तयार आहे ह्या गोष्टीचें वैषम्य हिटलरला वाटत आहे आणि तो आपल्या जुलमी सत्तेच्या कारवायांवर पांघरूण घालूं पहात आहे. त्यानें शांतताप्रियतेचें व न्यायीपणाचें कितीहि सोंग आणलें तरी त्यानें अमेरिकन राष्ट्र फसण्याचा मुळीच संभव नाहीं.

## अमेरिकन मालाचा रशियामार्फत जर्मनीस पुरवठा ?

इंग्लंडनें जर्मनीच्या परराष्ट्रीय व्यापाराची नाकेबंदी केली आहे तिच्यामुळें त्या देशास युद्धोपयोगी माल बाहेरून मिळणें कठीण झालें आहे. इटलीचीहि तीच अवस्था आहे. पादाक्रांत केलेल्या शेजारच्या देशांस लुबाडून जर्मनी आज आपला चरितार्थ चालवीत आहे. रशियाशीं व्यापारी करार करून मात्र कांहीं मालाची देवघेव होण्याची तजवीज जर्मनीनें केली आहे. जर्मनीकडून यंत्रसामुग्रीसारखा पक्का माल घ्यावा आणि त्याच्या मोबदल्यांत कांहीं जातींचा कच्चा माल त्या राष्ट्रास पुरवावा अशी व्यवस्था रशियानें केली असली पाहिजे. अशा स्वरूपाचा व्यापारी करार जर्मनी व रशिया ह्यांचे दरम्यान झाला असल्याचें मागेंच प्रसिद्ध झालें होतें. अमेरिकेचा व्यापार रशियाशीं मामुली रीतीनें चाललेला आहे. ह्या व्यापाराच्या ओघांत रशियामध्यें अमेरिकन माल जातो, त्यांतला कांहीं भाग रशियाकडून जर्मनी घेतो आणि अशा तऱ्हेनें जर्मनीस युद्धोपयोगी सामुग्री मिळते असें वाटण्यास कारण होण्यासारखी माहिती अलीकडे बाहेर आली आहे. ही गोष्ट इंग्लंडच्या वतीनें अमेरिकन सरकारच्या नजरेस आणण्यांत आली आहे. एका बाजूनें अमेरिका इंग्लंडला बुद्धिपुरःसर युद्धसहाय देत आहे आणि अप्रत्यक्ष रीतीनेंहि आपल्या मालाची मदत जर्मनीस व्हावी हें त्या राष्ट्रास पटणार नाहीं. रशियाशीं वाटाघाट करून त्याच्यामार्फत जर्मनीस युद्धसामुग्री मिळणार नाहीं अशी तजवीज होण्याचा प्रयत्न अमेरिका करील ह्यांत शंका नाहीं. जर्मनीस अप्रत्यक्षपणें पोचणारा माल थोड्या प्रमाणांत आहे असें समजलें तरी तो दरवाजाहि बंद होणें इष्ट आहे. ह्या संबंधांत अमेरिका कोणता उपाय योजते तें पहावें.

## हिंदुस्थानांत जपानी मालाची वाढती आयात

युद्धपरिस्थितीच्या योगानें जगांतील बाजारपेठा आणि त्यांतली गिऱ्हाइकें ह्यांच्या मागणी-पुरवठ्याची दिशा व परिणाम ह्यांमध्यें महत्त्वाचे फेरबदल होतात. ह्याचें एक उदाहरण हिंदुस्थानच्या जपानशीं होणाऱ्या व्यापारांत आढळतें. इंग्लंड व इतर युरोपिअन राष्ट्रें युद्धाच्या धामधुमींत सापडल्यानें त्यांचे कडून हिंदुस्थानास यंत्रसामुग्री, रंग, कारखान्यांस लागणारें सामान इत्यादि माल मिळणें बंद झालें आहे. युरोपांतील शत्रु-राष्ट्रांचा तर प्रश्नच नाहीं. इंग्लंडचे कारखाने युद्धसामुग्री बनवण्यांत गुंतले असल्यानें त्या राष्ट्रास यंत्रें, रंग ह्यांसारखा माल बाहेर पाठवणें शक्य नाहीं. तसेंच, समुद्रावरील वहातुक विनलष्करी हालचालींस मोकळी नाहीं. अमेरिकन व्यापाराच्या मार्गांत लांब अंतराची अडचण आहे. ह्या सर्व गोष्टींचा फायदा जपानला मिळाला असून त्या राष्ट्रानें हिंदुस्थानास विशिष्ट जातींचा माल पुरवणाऱ्या देशांमध्यें महत्त्वाचें स्थान पटाकावलें आहे. गेल्या नोव्हेंबर अखेर पुऱ्या झालेल्या आठ महिन्यांत जपाननें ह्या देशांतून माल नेला त्यापेक्षा अधिक माल आम्हांस पुरवला. आयात कमी करून निर्गत वाढवावयाच्या जपानच्या धोरणाचें हें लक्षण आहे. वरील आठ महिन्यांत, पूर्वीच्या वर्षातील तत्सम अवधीपेक्षा सुमारें दीड कोटि रुपयांचा अधिक माल जपाननें हिंदुस्थानास पाठवला आणि हिंदुस्थानाकडून सुमारें पावणेतीन कोटि रुपयांचा कमी माल घेतला. ह्या योगानें आयातनिर्गत व्यापारांतली तफावत जपानच्या बाजूनें अनुकूल रीतीनें वाढली. जपानी कापडाची आयात कमी होत असली तरी तिचें एकूण व्यापारांतील प्रमाण अजून मोठें आहे. वाढलेल्या किंमती हिशेबांत घेतल्या तरी जपानी यंत्रें, रंग इत्यादि माल हिंदुस्थानांत अधिकाधिक येत असल्याचें स्पष्ट दिसतें. जपानी चलन-व्यवस्था ब्रिटिश पौंडाशीं संलग्न नसल्यामुळें जपानी मालाची किंमत हिंदुस्थाननें देण्याची खास व्यवस्था करावी लागत आहे. ह्या बाबतींतल्या स्थिर योजनेची चर्चा लंडनमध्यें चालली आहे असें समजतें.

## नवीन कारखान्यांची खेडेगांवांत स्थापना ?

हिंदुस्थानचे माजी फडनवीस, सर जॉर्ज शूस्टर, ह्यांनीं कॉमन्स सभेंत सेक्रेटरी ऑफ स्टेट, मि. एमेरी, ह्यांस ह्या देशांत नवीन स्थापन होणाऱ्या कारखान्यांबाबत एक महत्त्वाचा प्रश्न विचारला, त्याचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. युद्धसामुग्री मोठ्या प्रमाणांत तयार करण्याचे नवीन कारखाने हिंदुस्थानांत निघत आहेत आणि निघावयाचे आहेत. मोठमोठ्या शहरांच्या हद्दींत स्थापन झालेल्या कारखान्यांतील कामगार लोकांस गर्दीच्या वसतींत रहाणें भाग पडून आरोग्याच्या दृष्टीनें ही गोष्ट अनिष्ट ठरते असा आजपर्यंतचा अनुभव आहे. कामकरी लोकांस रहाण्यासाठी स्वस्त, सोयीचीं व आरोग्याचे दृष्टीनें चांगलीं अशीं घरें शहरांत मिळत नाहींत. जुन्या कारखान्यांचे संबंधांत ह्याविषयीं सुधारणा करणें अवघड होत आहे. आतां कारखाने नवीनच निघावयाचे असल्यानें कामकऱ्यांच्या सोयीसाठी खेडेगांवीं, शुद्ध वातावरणांत त्यांची स्थापना प्रारंभींच करणें आणि गर्दीची व घाणीची अड-

चण दूर करणें शक्य आहे. हिंदुस्थान सरकारनें व प्रांतिक सरकारांनीं बिनसरकारी लोकांच्या संमतीने नवीन कारखान्यांचीं ठिकाणें खेडेगांवांच्या आसपास निश्चित करावीं अशी सूचना सर जॉर्ज ह्यांनीं आपल्या प्रश्नाच्या द्वारें केली आणि तिला संमतीवजा उत्तर मि. एमरी ह्यांनीं दिलें. मद्रास व मुंबई ह्या प्रांतांत विजेचें उत्पादन विस्तृत प्रमाणावर होत असल्यानें तेथें खेडेगांवांच्या मोकळ्या प्रदेशांत व हवेंत नवीन कारखाने प्रस्थापित करणें सोयीचें होईल असें सर स्टॅन्ले रीड ह्यांनीं सांगितलें आणि मि. एमरी ह्यांनीं त्यास पुष्टी दिली.

## तागाचे जोडे

बंगालमध्यें तागाच्या पिकावर तेथील शेतकरीवर्ग बहुतांशीं अवलंबून असतो आणि तागास मागणी आणि बाजारभाव येईल त्या मानानें त्या वर्गाची मिळकत कमीअधिक होते. कलकत्त्यास तागाच्या गिरण्या आहेत, त्यांमध्यें कच्च्या तागाचा बराच उठाव होतो. तथापि, युद्धपरिस्थितीमुळें कच्च्या व पक्क्या तागाच्या मालाची निर्गत मर्यादित होऊन गेली आहे. बंगालमधील तागाच्या लागवडीचें क्षेत्र कमी करून त्यांतील पिकाची किंमत वाढण्यास मदत करावी असा विचार प्रांतिक सरकार करीत आलें आहे. तागाचा उपयोग दुसऱ्या कामासाठी करतां आला तर त्यास नवी मागणी उत्पन्न होण्यासारखी आहे. ह्या दृष्टीनें बाटानगर येथील बुटांच्या कारखान्यांत होणाऱ्या प्रयोगांचे महत्त्व आहे. बुटांचा तळवा तागाच्या दोऱ्यांचा बनवण्याची पद्धति आहे आणि ती आर्जेंटाइनमध्यें विशेष रूढ आहे. मध्यवर्ती तागाच्या समितीचे चिटणीस मि. मुजुमदार, ह्यांनीं बाटानगर येथील कारखान्याच्या व्यवस्थापकाचें लक्ष ह्या गोष्टीकडे वेधलें असतां काथ्याच्या तळाचे बूट अलीकडे आपण बनवीत असून ते प्रयोगावस्थेंत असल्याचें सांगितलें. बुटाच्या वरच्या भागांत कापूस व ताग बाटाच्या कारखान्यांत आजहि वापरण्यांत येत आहे आणि ह्या बनावटीचा माल स्वस्त व लोकप्रिय आहे असा अनुभव त्यांनीं निवेदन केला. सबंध बुटास तागच वापरण्याचा प्रयोग करून पहाण्याची आपली तयारी बाटाच्या व्यवस्थापकांनीं दाखविली. ह्या कामीं तागाची मध्यवर्ती समिती बाटाशीं पूर्ण सहकार्य करील असें आश्वासन मि. मुजुमदार ह्यांनीं दिलें.

## हिंदी विमागणित्यांत ॲक्चुअरी मराठे ह्यांचें प्रमुख स्थान

हिंदी आयुर्विमा कंपन्यांपैकी ताज्या मूल्यमापनांचा तक्ता १९३९ च्या इंडियन इन्शुअरन्स इअर बुकांत प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यावरून असें दिसतें कीं १३० कंपन्यांपैकी ६१ कंपन्यांचें मूल्यमापन श्री. ग. स. मराठे, एम्. ए., ए. आय. ए., ॲक्चुअरी, ह्यांनीं केलेलें आहे. ॲक्चुअरींचीं नांवें व त्यांनीं केलेल्या मूल्यमापनांची संख्या ह्यांची माहिती खालीं दिली आहे:—

| ॲक्चुअरी | मूल्यमापनांची संख्या |
|---|---|
| ग. स. मराठे | ६१ |
| के. बी. माधव | २४ |
| जे. सी. सेन | १० |
| एच. के. सेन | ९ |
| एल. एस. वैद्यनाथन | ८ |
| इतर १६ ॲक्चुअरी मिळून | १८ |
| | १३० |

म्हणजे, एकूण मूल्यमापनांपैकी सुमारें निम्मीं मूल्यमापनें श्री. ग. स. मराठे ह्यांनीं केलेलीं आहेत. दुसरे एक महाराष्ट्रीय विमागणिती, श्री. के. वाय. जोशी, ह्यांनीं एक मूल्यमापन केलेलें आहे, तें त्यांच्या स्वतःच्याच म्हणजे वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचें आहे. ह्या दोघांखेरीज आणखी कोणताहि महाराष्ट्रीय ॲक्चुअरी यादींत सापडत नाहीं.

## औद्योगिक संशोधनाच्या कार्याचा विस्तार

( सर अर्देशिर दलाल ह्यांचें इंडियन सायन्स कॉंग्रेसमधील अध्यक्षीय भाषण. )

अमेरिका व ब्रिटिश साम्राज्यांतर्गत अनेक देश ह्यांत औद्योगिक संशोधनास गेल्या महायुद्धानें शिकविलेल्या धड्यांनीं चालना दिली. त्याचप्रमाणें हिंदुस्थानाचें परावलंबित्व गेल्या महायुद्धानें सिद्ध केलें. "हिंदुस्थान देशाचें औद्योगिक राष्ट्रांत रूपांतर करण्यांत त्यास सरकारचें शक्य तेवढें सहाय मिळालें पाहिजे, अशी त्याची वास्तविक मागणी आहे" अशा अर्थाचें एक पत्र हिंदुस्थान सरकारनें भारतमंत्र्यांस पाठविलें व तें धोरण त्यांस पसंत पडलें. लवकरच, सर टॉमस हॉलंड ह्यांच्या अध्यक्षत्वाखाली इंडियन इंडस्ट्रिअल कमिशनची नेमणूक करण्यांत आली. महायुद्धानें उद्योगधंद्यांस दिलेली चालना थोड्याच वर्षांत थंडावली व युद्धकालांत स्थापन झालेले कित्येक कारखाने बंद पडले. नव्या जागतिक युद्धाच्या पडछायेनें हिंदी शास्त्रज्ञांचें लक्ष ह्या प्रश्नाकडे पुनः वेधलें व त्याचा परिणाम म्हणजे शास्त्रीय व औद्योगिक संशोधनासाठी ग्रेट ब्रिटनमध्यें स्थापन झालेल्या स्वतंत्र खात्याप्रमाणें हिंदुस्थानांतहि खातें निर्माण करण्याची आवश्यकता अनेकवार प्रतिपादली गेली. अखेर, अशा प्रकारचें बोर्ड नेमण्यांत आलें.

ह्या बोर्डाचें धोरण युद्धविषयक परिस्थिति व गरजा ह्यांच्यापुरतें मर्यादित असतां कामा नये. युद्धविषयक गरजांस, अर्थातच, प्राधान्य देणें आवश्यक आहे; परंतु हिंदी उद्योगधंद्यांबाबत दीर्घकालीन गरजा नजरेसमोर ठेऊन त्यांना परिपोषक होईल अशाच रीतीनें संशोधनाचा कार्यक्रम आखला पाहिजे. युद्धविषयक तातडीच्या गरजा भागल्यानंतर, कदाचित्, बोर्डाची रचना अधिक व्यापक दृष्टीनें पुरी करण्यांत येऊन, बोर्डाचें अंतिम ध्येय साध्य होण्यास सहाय होईल, अशी अपेक्षा आहे. गेल्या महायुद्धाचे वेळीं स्थापन झालेले व भरभराट पावलेले उद्योगधंदे महायुद्धानंतर बंद पडले, ह्याचें कारण त्यांस सरकारकडून आवश्यक तें उत्तेजन व संरक्षण मिळालें नाहीं, हें होय. सध्याचें युद्ध समाप्त झाल्यानंतर, आतां सुरू करण्यांत येणाऱ्या उद्योगधंद्यांस योग्य तें संरक्षण सरकारकडून मिळेल, असें आश्वासन मिळाल्याविना, बोर्डाच्या स्थापनेचा उद्देश फलद्रूप होणार नाहीं व नवे उद्योगधंदे निर्माण होणार नाहींत.

बोर्डाच्या कामाची प्रगति जितकी शीघ्र असावयास पाहिजे तेवढी ती नाहीं. बोर्डाचें काम हिंदुस्थान सरकारच्या एका खात्यामार्फत पुरें व्हावयाचें असतें व बोर्डाचे सहायास दिलेला नोकरवर्ग पुरेसा नाहीं, ह्या दोन कारणांमुळें प्रगति जोरानें होत नाहीं. प्रारंभ करावयास सुद्धा पांच लक्ष रुपयांची ग्रँट अत्यंत अपुरी आहे व ह्यावरून एकंदर कार्याच्या विस्तारासंबंधीं अज्ञान दिसून येतें, असें म्हटलें पाहिजे. ग्रेट ब्रिटनमध्यें, युद्धापूर्वी, संशोधनावर दरसाल ९ कोटि रुपये खर्च होत असत, त्यापैकी निम्मा खर्च औद्योगिक संशोधनासाठी होई. अमेरिकेच्या तत्सम खर्चाचा आकडा १ अब्ज रुपयांवर जाईल. रशियाहि अत्यंत मोठ्या प्रमाणावर संशोधनासाठी खर्च करितो. अमेरिका व रशिया हे देश सोडले, तर विविध नैसर्गिक देणग्यांची अनुकूलता इतक्या मोठ्या प्रमाणावर असणारा देश हिंदुस्थानाविना दुसरा कोणताहि नाहीं. वर निर्दिष्ट केलेल्या देशांच्या संशोधनावरील खर्चाचे मानानें हिंदुस्थानानें अत्यल्प खर्च जरी त्यासाठीं केला, तरी येथील नैसर्गिक अनुकूलतेचें औद्योगिक प्रगतीस सहाय्य होऊन हिंदुस्थानास औद्योगिक राष्ट्रांत महत्त्वाचें स्थान प्राप्त होऊं शकेल.

## हिस्टॉरिकल अँड एकॉनॉमिक असोसिएशन, फर्ग्युसन कॉलेज, पुणें.

### रौप्य महोत्सव

वरील हिस्टॉरिकल अँड एकानॉमिक असोसिएशनचा रौप्य महोत्सव रविवार, ता. २ फेब्रुवारी रोजीं मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. ह्या महोत्सवाप्रीत्यर्थ असोसिएशनचे अनेक प्रमुख माजी सभासद दूरदूरच्या ठिकाणांहून मुद्दाम आले होते, त्यामुळें ह्या उत्सवांत माजी सभासदांचें संमेलनहि झालें. कलकत्ता विश्वविद्यालयाचे अर्थशास्त्राचे माजी प्रोफेसर व सध्याचे पंजाब प्रांताचे फडनवीस, सर मनोहरलाल, ह्यांनीं समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें व मुद्दाम लाहोरहून पुण्यास ते त्यासाठी आले होते. महोत्सवाचा मुख्य भाग म्हणजे दुपारीं ३–३० वाजतांचीं सभा, हा होय. ह्या वेळीं, असोसिएशनच्या आजी व माजी सभासदांप्रमाणें शहरांतील अनेक प्रमुख शिक्षणतज्ज्ञ नागरिक हजर होते. प्रो. द. गो. कर्वे ह्यांनीं प्रथम भाषण करून सर्वांचें स्वागत केल्यानंतर, असोसिएशनचे विद्यमान चिटणीस, श्री. अभ्यंकर, ह्यांनीं समारंभास यश चिंतणाऱ्या संदेशांची यादी व कांहीं संदेशांचा मतितार्थ ह्यांचें वाचन केलें. हिंदुस्थानांतल्या सर्व प्रमुख अर्थशास्त्रज्ञांचे संदेश आले होते. प्रो. काळे ह्यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या असोसिएशनच्या कार्याची त्यांत प्रशंसा होती व प्रो. काळे ह्यांचें हिंदी अर्थशास्त्रज्ञांतील प्रमुख स्थान, राष्ट्रीय आर्थिक धोरणाचा त्यांनीं अहर्निश केलेला पुरस्कार, त्यांनीं तयार केलेली शिष्यपरंपरा इत्यादींबद्दल त्यांत आदर व्यक्त केलेला होता व प्रो. काळे ह्यांच्या सत्कारांत सहभागी होण्याची उत्कट इच्छा प्रकट केलेली होती. प्रो.कोगेकर ह्यांनीं नंतर असोसिएशनच्या गेल्या २५ वर्षांतील कामगिरीचा आढावा घेतला व पुढील कार्याची नियोजित दिशा दर्शविली. प्रो. काळे ह्यांनीं ही संस्था २५ वर्षांपूर्वी स्थापन करून विद्यार्थ्यांस आर्थिक व ऐतिहासिक प्रश्नांचा अभ्यासपूर्ण व स्वतंत्र बुद्धीनें विचार करण्यास शिकविलें. ह्या संस्थेच्या नमुन्याप्रमाणें आतां अनेक कॉलेजांतून संस्था स्थापन झालेल्या आहेत. प्रो. कोगेकर ह्यांच्या भाषणानंतर, संस्थेचे पहिले उपाध्यक्ष कै. प्रो. हरिभाऊ लिमये व प्रथमपासूनचे अध्यक्ष प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण करण्याची अध्यक्षांस विनंति करणारे डॉ. परांजपे, डॉ. महाजनी, प्रो. पी. एम. लिमये, प्रो. बेरी व श्री. बर्वे, आय. सी. एस. ह्यांचीं भाषणें झालीं. या सर्वांनीं कै. प्रो. लिमये व प्रो. काळे ह्यांचें गुणवर्णन करून, आपल्या कांहीं जुन्या आठवणी निवेदन केल्या. त्यानंतर सर मनोहरलाल ह्यांनीं टाळ्यांच्या गजरांत दोन्ही तैलचित्रांचें अनावरण केलें.

### सर मनोहरलाल ह्यांचें भाषण

तैलचित्रांच्या अनावरणानंतर प्रस्तुत रौप्य महोत्सवाचे निमित्तानें प्रो. कर्वे ह्यांनीं संपादित केलेला, असोसिएशनच्या प्रमुख विद्वान् माजी सभासदांच्या ऐतिहासिक व अर्थशास्त्रविषयक निबंधांचा ग्रन्थ प्रो. काळे ह्यांस असोसिएशनतर्फे सर मनोहरलाल ह्यांचे हस्तें सादर अर्पण करण्यांत आला. ह्या ग्रन्थाची माहिती ह्याच अंकांत दिलेली आहे. सर मनोहरलाल ह्यांनीं त्या नंतर भाषण करून कै. प्रो. लिमये व प्रो. काळे ह्यांच्याविषयीं गौरवपर उद्गार काढले. प्रो. काळे ह्यांनीं अर्थशास्त्राची रानड्यांची परंपरा अखंड चालू ठेवून हिंदुस्थानांतील अर्थशास्त्रांत पहिलें स्थान पटकावलें व आपल्या शिष्यांकरवीं तें कार्य पुढेंहि चालू राहील अशी स्फूर्ती त्यांत निर्माण केली, ह्याबद्दल सर मनोहरलाल ह्यांनीं धन्योद्गार काढले. हिंदी आर्थिक प्रगतीसंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, ह्यापुढें औद्योगिकरणाखेरीज आपला तरणोपाय नाहीं. हिंदुस्थानाचें भवितव्य उद्योगधंद्यांच्या वाढीवरच अवलंबून आहे.

### रानडे ह्यांची परंपरा

प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रथम सर मनोहरलाल ह्यांचे आभार मानले. त्यांस नजर करण्यांत आलेल्या ग्रन्थाच्या लेखकांनीं व्यक्त केलेली निष्ठा व असोसिएशननें घडवून आणलेला महोत्सव ह्याबद्दल त्यांनीं प्रशंसोद्गार काढले. नंतर ते म्हणाले, “न्या. रानडे ह्यांस हिंदुस्थानाच्या उज्वल भवितव्याबद्दल विश्वास वाटत होता. उत्क्रांतिमय प्रगतीचे ते पुरस्कर्ते होते व उद्योगधंद्यांच्या वाढीबद्दल त्यांचा एकसारखा प्रयत्न चालू होता. त्यांनीं हिंदी अर्थशास्त्राचा ५० वर्षांपूर्वी पाया घातला व राष्ट्रीय आर्थिक धोरणाचा पुरस्कार केला, त्याचें फळ आतां दिसत आहे. रानडे ह्यांनीं साखरेच्या हिंदी कारखान्यांचे वाढीसाठी ५० वर्षांपूर्वी प्रयत्न केला, त्याचप्रमाणें शेतीच्या बँकांच्या स्थापनेसाठीं खटपट केली.आतां त्यांचें धोरण अंमलांत येत आहे व त्यांनीं तेव्हां नव्यानें सांगितलेल्या गोष्टी आज स्वाभाविक वाटत आहेत.रानड्यांची शिकवण आतां चांगली रुजली असून त्यांच्या परंपरेस मान्यता मिळाली आहे. असोसिएशनचें कार्य हें रानड्यांच्या शिकवणीचेंच व्यावहारिक फळ आहे. असोसिएशनचा उत्कर्ष होवो.” श्री.अभ्यंकर व प्रो. शर्मा ह्यांनीं सर्वांचे आभार मानले व वंदेमातरम्च्या गीतानंतर सभा विसर्जन पावली. सभेच्या नंतर निमंत्रित पाहुणे व असोसिएशनचे सभासद ह्यांसाठी थाटाचा उपहार समारंभ झाला.

## हिंदुस्थानांत रेडिओची वाढती लोकप्रियता

१९२७ सालीं हिंदुस्थानांत एकूण ३,६०० लोकांजवळ रेडिओ होता. १९३५ सालीं २५,००० लोकांजवळ रेडिओचा परवाना होता. सध्या रेडिओ बाळगणारे १,२७,००० लोक असून त्यांत दरमहा ४ हजारांची भर पडत आहे. कांहीं प्रमुख देशांत प्रत्येक १० हजार लोकवस्तीशीं किती रेडिओ सेट्स पडतात, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| देश | दर दहा हजार वस्तीस किती रेडिओ |
|---|---|
| हिंदुस्थान | ३.६ |
| जपान | २२० |
| रशिया | २४५ |
| ग्रेटब्रिटन | १,७६० |
| अमेरिका | २,१०० |

वरील माहितीवरून हिंदुस्थानांत रेडिओचा प्रसार होण्यास किती वाव आहे, हें कळून येईल. हिंदी लोकांचें दारिद्र्य व रेडिओची भारी किंमत ह्यांमुळें रेडिओ सेट्सचा खप फार झपाट्यानें होऊं शकत नाहीं. हिंदुस्थानांत १ हजार ते २ हजार रुपये वार्षिक उत्पन्न असणारे ५ लक्षांपेक्षा अधिक लोक आहेत, त्यांच्या आवाक्याच्या किंमतींत रेडिओ सेट मिळूं लागला, तर ते खचित रेडिओ विकत घेतील. २ हजार ते ३½ हजार रुपये उत्पन्नाचे आणखी २½ लक्ष लोक आहेत, ३½ ते ८ हजार रुपये उत्पन्नाचे १¾ लक्ष लोक असून त्यापेक्षा अधिक उत्पन्नाचे सुमारे २ लक्ष लोक आहेत. हे सर्व लोक रेडिओचे अपेक्षित ग्राहकच समजले पाहिजेत. ह्याखेरीज, रेडिओ परवडणारे ५–१० लाख शेतकरी व जमिनदार-इनामदार सापडूं शकतील.

एक नवीन ग्रंथ

## ऐतिहासिक व अर्थशास्त्रविषयक निबंध

फर्ग्युसन कॉलेजांतील हिस्टॉरिकल अँड एकॉनॉमिक असोसिएशनच्या कांहीं सभासदांनीं अभ्यासपूर्ण लिहिलेल्या निबंधांचा एक संग्रह प्रो. द. गो. कर्वे ह्यांनीं संपादिला असून, तो असोसिएशनचे प्रथमपासून गेलीं २५ वर्षें असलेले अध्यक्ष, प्रो. वा. गो. काळे, ह्यांस असोसिएशनच्या रौप्य महोत्सवाचे प्रसंगीं सर मनोहरलाल ह्यांचे हस्तें नजर करण्यांत आला. ह्या ग्रन्थाचीं एकूण २३८ पृष्ठें असून तीं ऐतिहासिक, राजशासन व अर्थशास्त्र अशा तीन विभागांत वाटलेलीं आहेत. ऐतिहासिक विभागांत सहा लेख आहेत, त्यांत पहिलें स्थान प्रो. द. वा. पोतदार ह्यांच्या "शूर बुंदेल्यांच्या प्रदेशांत बाजीराव" ह्या लेखास देण्यांत आलेलें आहे. श्री. द. वि. आपटे ह्यांनीं आपल्या लेखांत बाजीरावाचें राजकारण व विकासपद्धति ह्यांचें मार्मिक परीक्षण केलें आहे. प्रो. कामदार ह्यांनीं आपल्या लेखांत महाराष्ट्र व गुजरात ह्यांचा सांस्कृतिक दुवा कसा पूर्वीपासूनचा आहे, हें विशद केलें आहे. प्रो. ओतुरकरांच्या लेखांत मराठा अंमलाखालील सामाजिक जीवनाचें वर्णन आलें आहे. सासवडवर मराठ्यांचा अंमल दीर्घकाल अखंड होता, तेव्हां तेथील मूळ कागदपत्रांच्या आधारानें काढलेल्या निष्कर्षांस महत्त्व आहे, हें उघड आहे. श्री. एम. जी. दीक्षित ह्यांनीं पूर्वकालीन काठेवाडांतील वल्लभी विश्वविद्यालयाचें वर्णन केलें आहे. ग्रन्थाच्या राजशासन विभागांत तीन निबंधांचा संग्रह आहे. प्रो. एम. आर. पाळंदे ह्यांनीं आपल्या निबंधांत व्यक्ती व राष्ट्र ह्यांच्या परस्पर संबंधांची चर्चा केली असून, व्यक्तींचें व्यक्तित्व तर राहिलें पाहिजे व व्यापक हितासाठीं करावा लागणारा स्वार्थत्याग त्यावर लादला जातां कामा नये अशी व्यवस्था आदर्श राज्यव्यवस्थेंत होणें अशक्य नाहीं, असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. हिंदी संस्थानांच्या प्रश्नाचें अभ्यासपूर्ण विवेचन प्रो. आर. एच. केळकर ह्यांच्या निबंधांत आढळतें. राजशासन शास्त्राच्या मर्यादेची आखणी करून त्या शास्त्राच्या अभ्यासाची शास्त्रीय व पायाशुद्ध पद्धति ठरविण्याची आवश्यकता प्रो. एस. व्ही. कोगेकर ह्यांनीं प्रतिपादिली आहे.

ग्रंथाच्या तिसऱ्या विभागांत १३ निबंध आलेले आहेत. प्रो. एस्. जी. बेरी ह्यांनीं आपल्या निबंधांत किमान रहाणीस पुरेशा वेतनाच्या मूळ तत्त्वांचा विचार केला आहे. किमान मजुरी ठरविण्याचा हेतु, किमान मजुरी ठरविण्यांत येणाऱ्या अडचणी, ती ठरविण्याची पद्धति, इत्यादि गोष्टींची चर्चा करून, हिंदुस्थानांतील त्यासंबंधांतील परिस्थिति सांगून त्यांनीं त्यावरील उपाय योजनेचाहि उहापोह केला आहे. प्रो. पी. एम. लिमये ह्यांनीं मध्यम वर्गीतील बेकारीच्या प्रश्नावर निबंध लिहिला आहे. जमीन महसूल शेतीच्या नफ्याचे प्रमाणांत बसविला पाहिजे, असें श्री. डी. व्ही. दिवेकर ह्यांनीं प्रतिपादलें आहे. लोकसंख्या व आर्थिक प्रगति ह्या विषयांवरील प्रो. द. गो. कर्वे ह्यांचा लेख त्यांच्या ह्या विषयावरील दीर्घ व्यासंगाचा निष्कर्ष आहे. प्रो. अंजारिया ह्यांनीं आपल्या लेखांत "हिंदी" अर्थशास्त्राची उत्पत्ति व त्याची प्रगति ह्याचें वर्णन केलें आहे. प्रो. एम. आर. व श्री. बी. आर. ढेकणे ह्यांनीं आपल्या लेखांत हिंदी वैमानिक प्रगतीची माहिती दिली आहे. प्रो. टी. एम. जोशी ह्यांचा "मार्शल नंतरचें अर्थशास्त्र" हा लेख अभ्यासू वाचकांस अत्यंत उपयुक्त वाटेल. त्याचप्रमाणें, प्रो. मावळणकर ह्यांनीं अर्थशास्त्र 'शास्त्र' कसें बनत गेलें, ह्याची आजपर्यंतची माहिती उत्कृष्ट रीतीनें सांगितली आहे. अर्थशास्त्राकडे बघण्याची दृष्टी कशी पालटत गेली व अर्थशास्त्राच्या मर्यादा कशा बदलत गेल्या, हें त्यांच्या लेखावरून स्पष्ट होतें. श्री श्री. वा. काळे ह्यांनीं आपल्या लेखांत, मध्यम वर्गांतील तरुणांस उद्योगधंद्यांत नव्यानें पडतांना काय अनुभव व व्यावहारिक अडचणी येतात, ह्याचें वर्णन केलें आहे. श्री. एस. जी. बेरी ह्यांनीं भांडवलशाही व कम्युनिझम ह्यांतील वादांतून पुढें लवकरच तडजोडीचें तत्त्व प्रत्यक्ष व्यवहारांत अमलांत येईल, असें मत प्रदर्शित केलें आहे. श्री. एन. जी. अभ्यंकर ह्यांनीं, हिंदुस्थानांत गुंतविण्यांत येणाऱ्या परदेशी भांडवलाच्या प्रश्नाचा विचार करून, परदेशी भांडवलाचा ओघ थांबविण्याऐवजी, त्याचा उपयोग हिंदी उद्योगधंद्याच्या वाढीकडे कसा करतां येईल हा त्या संबंधांतील खरी महत्त्वाची व विचारार्ह बाब आहे, असें सांगितलें आहे. श्री. आर. सी. जोशी ह्यांनीं राष्ट्रीय स्वयंपूर्णतेच्या तत्त्वाच्या हिंदुस्थानांतील अंमलबजावणीसंबंधीं आपले विचार प्रदर्शित केले आहेत. श्री. पी. व्ही. आगाशे ह्यांनीं आपल्या लेखांत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाच्या बाबींचा विचार केला आहे.

वरील वर्णनावरून, ग्रंथांतील निबंधांचें स्वरूप ध्यानांत येईल. ह्या निबंधांचे लेखक हे हि. व ए. असोसिएशनचे केवळ माजी सभासद नसून त्यांनीं त्या त्या विषयावर अभ्यास केलेला आहे. प्रो. पोतदार, श्री. द. वि. आपटे, प्रो. बेरी, प्रो. कर्वे, इत्यादि कांहीं लेखक, विद्वान् ग्रंथकार व प्रथितयश लेखक म्हणून आहेत, परंतु बाकीच्यांचे निबंधहि ह्या ग्रंथांत शोभतील इतक्या तोडीचेच आहेत. संस्थेच्या ज्युबिलीचे निमित्तानें प्रसिद्ध झालेल्या ह्या ग्रंथाची ह्या विषयांवरील वाङ्मयांत चांगलीच भर पडेल, ह्यांत संशय नाहीं.

---

### कामगारांची पहिली तुकडी

हिंदुस्थानांतील कित्येक कामगारांस ग्रेटब्रिटनमध्यें नेऊन त्यांस तेथील कामगारांबरोबर रहाण्याची व काम शिकण्याची संधी देण्याची ब्रिटिश मजूरमंत्रि, मि. बेव्हिन, ह्यांची योजना मागेंच प्रसिद्ध झाली आहे. ह्या तरुण कामगारांची यादी आतां प्रसिद्ध झाली आहे, त्यांत १० लोक मुंबई प्रांतांतील आहेत. बंगालचे वाट्यास ९, मद्रासला ७, पंजाबला ७, सिंधला ७, संयुक्त प्रांतास ६, बिहार व ओरिसास ५, आणि मध्यप्रांतास ४, ह्याप्रमाणें जागा इतर प्रांतांच्या वाट्यास आल्या आहेत. मुंबईच्या यादींत श्री. के. एन. बापट (फोर्ड मोटर्स) व श्री. एन. डी. केतकर हीं नांवें आढळतात. कामगारांच्या तुकडीस निरोप देण्यासाठीं हिंदुस्थान सरकारच्या लेबरखात्याचे सेक्रेटरी, मि. हैदरी, हे मुंबईस मुद्दाम येणार आहेत. विवाहित कामगारांच्या कुटुंबास दरमहा ३५ रुपये अलावन्स मिळावयाचा आहे.

---

### हिंदुस्थानांत मोटार-गाड्यांची आयात

| वर्ष | संख्या (हजार) | किंमत (कोटि, लक्ष रु.) |
|---|---|---|
| १९२९–३० | १७ | ३,३६ |
| १९३०–३१ | १३ | २,५८ |
| १९३१–३२ | ७ | १,४८ |
| १९३२–३३ | ६ | १,२९ |
| १९३३–३४ | १० | १,७७ |
| १९३४–३५ | १४ | २,५९ |
| १९३५–३६ | १४ | २,५१ |
| १९३६–३७ | १३ | २,४३ |
| १९३७–३८ | १६ | २,९८ |
| १९३८–३९ | ११ | २,१७ |
| १९३९–४० | ... | २,०७ |

## कागदाचें हिंदुस्थानांत उत्पादन

१९३७–३८ मध्यें हिंदुस्थानांत कागदाचें उत्पादन १० लक्ष, ७६ हजार हंड्रेडवेट इतकें झालें होतें. १९३८–३९ मध्यें उत्पादनाचा आकडा ११ लक्ष, ८४ हजार हंड्रेडवेट झाला व १९३९–४० मध्यें उत्पादन १४ लक्ष, १६ हजार हंड्रेडवेट झालें. नॉर्वे, स्वीडन, इत्यादि देशांचा व्यापार बंद पडल्यामुळें हिंदुस्थानांत कागदाची आयात कमी झाली व त्या कारणानें परदेशी कागदाची स्पर्धा जाणवली नाहीं. कागदाचे बाजारभाव वाढले व त्या बरोबरच तो तयार करण्यास लागणाऱ्या जिनसांचीहि किंमत वाढली, तरी हिंदी कागद कारखान्यांस नफा चांगला सुटला. छपाईच्या कागदाची आयात बहुंशीं स्वीडन–नॉर्वेमधून होत असे. ती बंद पडली तरी अमेरिका–कॅनडा ह्या देशांतून तो येऊं लागला. कांहीं जातींच्या कागदासाठीं मात्र गिऱ्हाइकांस स्वदेशी उत्पादनावरच अवलंबून रहाणें भाग आहे. हें उत्पादन सुरू होईपर्यंत ह्या जातींच्या कागदाचा तुटवडा भासणें स्वाभाविक आहे. युद्ध-परिस्थितीमुळें कागदाच्या कारखान्यांच्या भागांची किंमत कशी सुधारत गेली, हें खालील आकडे दर्शवितील. १९२८–२९ मधील त्यांची सरासरी किंमत १०० होती, असें येथें गृहीत धरलें आहे.

कागद कारखान्यांच्या भागांच्या किंमतीस तेजी

| | भागांच्या किंमतीचा दर्शक आकडा |
|---|---|
| १९२८-२९ | १०० |
| सप्टेंबर, १९३९ | १८९ |
| डिसेंबर, १९३९ | ३२५ |
| जानेवारी, १९४० | २९० |
| फेब्रुवारी, १९४० | ३१५ |
| मार्च, १९४० | २९५ |

म्हणजे मार्च १९३९ ते मार्च १९४० ह्या मुदतींत कागद कारखान्यांच्या भागांची किंमत ७४% वाढली.

१९३९–४० अखेर हिंदुस्थानांत कागदाचे १३ कारखाने चालू होते. ह्या वर्षीं प्रामुख्यानें कागदाच्या बनावटीसाठी २२ लक्ष रुपयांचा २ लक्ष, २४ हजार हंड्रेडवेट रांधा आयात झाला. कागद व कार्डबोर्ड ह्यांची आयात एका वर्षांत ३१ लक्ष हंड्रेडवेटवरून २७ लक्ष हंड्रेडवेटवर आली, परंतु किंमतींत वाढ झाल्या कारणानें आयातीची किंमतहि ३ कोटि, २३ लक्ष रुपयांची ३ कोटि ४६ लक्ष रुपये झाली. छपाईचा कागद पूर्वींपेक्षा अधिक आला, परंतु लिहिण्याचा कागद, पाकिटें, रद्दी कागद, कार्डबोर्ड, इत्यादींची आयात उतरली. अमेरिका आणि जपान आतां पूर्वींपेक्षा बऱ्याच मोठ्या प्रमाणांत हिंदुस्थानाकडे कागद पाठवूं लागले आहेत.

---

### मुंबई सरकारचें अबकारी उत्पन्न

मुंबई सरकारचें १९३९-४० मध्यें अबकारी उत्पन्न सुमारें ८८ लक्ष रुपयांनीं कमी झालें. १९३८–३९ मध्यें तें २ कोटि, ८७¾ लक्ष रुपये झालें होतें; १९३९–४० तें १ कोटि, ९९ लक्ष रुपये भरलें. दारूचा खप पुष्कळच कमी झाला. अहमदाबाद, भडोच, मुंबई उपनगर, मुंबई व कारवार येथें दारूबंदीचें धोरण अंमलांत होतें, तेथेंच अर्थात दारूचा खप विशेष कमी झाला. परंतु, दारूबंदीच्या क्षेत्रास लागून असलेल्या विभागांत दारूची विक्री बरीच वाढली.

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.




**मधुमेहावरील औषध**

**तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७**

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

**दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस**

"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धीखातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबूत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

**सूचना**—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर–Amritsar.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४–१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९५—६ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—८ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... ... | ११४—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | १०५–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४३–१४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६७—८ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३०—४ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५०७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६४०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९८७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६९५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २०१—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४६—४ |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ४१–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३९६०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१५—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४९—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३६४—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८३७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १३३—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–१–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३–४–० |


**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद



**“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.

२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.

३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.

२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.



**पुण्यांत आल्यावर**

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.


अवर होम,

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल
ऑटोमॅटिक
रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर
नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. सच्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत १ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हंशिल वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हंशिल माफ.

पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

---

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

बक्कशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

---

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचे तेल
डोकें शांत रहातें. केंस मजबूत होतात.
गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.
स्थापना १९०९



धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग क. (मुंबई नं. ४)

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
लॅकटूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**For Collegians**
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**
*Work-Shop Address:* 153 Kasaba, Poona 2
*Branch No. 1* Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १२ फेब्रुआरी, १९४१ अंक ७

सर्व तऱ्हेचें कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
' पायोनियर डाइंग हाऊस '
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दारूवाला पुलाजवळ, पुणें.

डॉ. एन. आर. राजोपाध्ये
यांच्या
अॅस्ट्रॉल or शक्तिवर्धक पिल्स घ्या. किंमत १२ आ. फक्त.
सोल एजंटः "वेलणकर वनौषधालय", तुळशीबाग रस्ता, पुणें.
एजन्सी देणें आहे. दोन आण्याचे स्टँप्स पाठवून विचारावें.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु, (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या
अशक्ततेवर
रक्तवर्धक
वापरा.
सर्वत्र मिळतें.
—ः केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
आयुर्वेद रसशाळा
पुणें, लि. पुणें ४.

हास्य—विनोद—करमणूक
म्हणजेच
लग्न पहावं करून
दिग्दर्शक : विनायक
भूमिका : दामुअण्णा मालवणकर
नवयुग चित्र
८ वा आठवडा
मिनर्व्हा — पुणें

डॉ. एन. आर. राजोपाध्ये यांचे खास देखरेखीखालीं चाललेलें
" वेलणकर वनौषधालय "
येथें सर्व तऱ्हेच्या खात्रीच्याच वनस्पति व सिद्धौषधी मिळतील. १ पैशापासून ते सिद्धौषधीपर्यंत मिळण्याचें हें पुण्यांतील पहिलेंच दुकान होय. येथें चूर्णे, सप्तकाच्या काढ्याच्या पुड्याही ऑर्डर-प्रमाणें करून दिल्या जातात. येथें रोगी तपासून औषध देण्याची सोय आहे. त्याकरितां चार्ज रोज फक्त एकच आणा.
उघडण्याची वेळः—सकाळीं ८॥ ते १२ व दुपारीं ३॥ ते ८ पर्यंत.
पत्ता : "वेलणकर वनौषधालय" तुळशीबाग रस्ता, पुणें.

बँका व कचेऱ्या यांस उपयुक्त असा एक
ब्रीफ साईज
टाइपरायटर
कोरा असून
स्वस्त विकाऊ आहे.
चौकशी कराः—
अवर होम, ६१९ शनवार पुणें. टेलिफोन नं. ९/१२५.

# विविध माहिती

### धूमकेतु

सध्या आकाशांत धूमकेतु दृष्टीस पडतो. धूमकेतूची माहिती फार प्राचीन काळापासून लोकांस असावी, असें दिसतें. धूमकेतूची नियमबद्धता सिद्ध झालेली आहे. धूमकेतूचें पुच्छ ताऱ्याच्या ज्या बाजूस सूर्य असतो, त्याच्या उलट बाजूस असतें. कांहीं केतूंचें पुच्छ लक्षावधि मैल असतें. इ. स. १८११ च्या केतूचें पुच्छ ११ कोटि मैल होतें. पुच्छ पारदर्शक असतें. त्याची जाडी ५० हजार मैल असली, तरी त्यापलीकडील नक्षत्रें दिसूं शकतात. ज्या धूमकेतूंची कक्षा दीर्घवर्तुलाकार असते, ते कालांतरानें पुनः दृष्टीस पडतात. पॅराबोलाचे आकाराची ज्यांची कक्षा असते, असे केतु पुनः नजरेस पडत नाहींत. हॅलेच्या धूमकेतूची ७६ वर्षांतून एकदां वारी होते.

### टेलिफोन्सचें उत्पन्न

१९३९–४० मध्यें सरकारी टेलिफोन्सला भाड्याचे ५६ लक्ष, १६ हजार रुपये व टेलिफोनवर बोलण्याच्या फीचे ५७ लक्ष, ९२ हजार रुपये मिळाले. १९३८–३९ चे तत्सम आकडे ५० लक्ष, ३३ हजार रुपये व ४३ लक्ष, १५ हजार रुपये असे होते.

### अमेरिकेशीं व्यापार वाढत चालला

हिंदुस्थान व अमेरिका ह्यांचेमधील व्यापार वाढत आहे. १९३९–४० मध्यें हिंदुस्थानांतून निर्गत २७ कोटि, १८ लक्ष रुपयांची झाली व हिंदुस्थानांत आयात १४ लक्ष, ८८ हजारांची झाली. १९३८–३९ मध्यें अमेरिकेनें १४ कोटि, २९ लक्षांचा हिंदी माल घेतला होता व ९ कोटि, ७८ लक्षांचा आपला माल हिंदुस्थानकडे पाठविला होता.

### तारांच्या संख्येंत वाढ

१९३८–३९ च्या मानानें १९३९–४० मध्यें हिंदुस्थानांत एकूण २० लक्ष अधिक तारा पाठविल्या गेल्या. देशांतल्या देशांतील तारांची संख्या १ कोटि, ५७ लक्ष भरली व त्यांचें कमिशन १ कोटि, ६५ लक्ष झालें. परदेशांकडे २९ लक्ष, ३९ हजार तारा पाठविण्यांत आल्या, त्यांत ३ कोटि, ८० लक्ष शब्द होते. शुभप्रसंगाच्या "ग्रीटिंग्ज" तारांची संख्या १ लक्ष, ९० हजार झाली. १९३९–४० अखेर एकूण ९,९९३ तार–ऑफिसें होतीं त्यांपैकीं ४,०८६ जोड तार-पोस्ट ऑफिसें व ५,५७९ रेल्वे तार-ऑफिसें होतीं.

### लॉर्ड लॉइड ह्यांचा मृत्यु

मुंबई इलाख्याचे एक माजी गव्हर्नर, लॉर्ड लॉइड, हे गेल्या आठवड्यांत निवर्तले. हिंदी राज्यघटनेच्या बिलास त्यांनीं लॉर्डांच्या सभेंत कसून विरोध केला होता. १९१८ ते २३ पर्यंत ते मुंबईचे गव्हर्नर होते.

### युद्धफंड

मुंबई युद्धफंडाची रकम आतां ३४ लक्ष, १० हजारांवर गेली आहे.

### ट्रेझरी बिलांवर ११ आणे व्याजाचा दर

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शें. ११ आणे इतका पडला.

### हिंदी हाय कमिशनर

हिंदुस्थानाचे ग्रेटब्रिटनमधील हाय कमिशनर ह्यांच्या नेमणुकीची मुदत आणखी एका वर्षानें वाढविण्यांत आली आहे.

### तेजी–मंदी प्रीमियम

मुंबई येथील सोन्याचांदीचा बाजार ह्या लेखमालेंत तेजी-मंदी प्रीमियम (कमिशनचा) उल्लेख केलेला आहे. गेल्या आठवड्यांतील तेजी–मंदी प्रीमियमचे दर खालीं दिले आहेतः—

| | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|
| चांदी, पहिला वायदा | ० | १२ | ० |
| चांदी, दुसरा वायदा | १ | ४ | ० |
| सोनें, पहिला वायदा | ० | २ | ६ |
| सोनें, दुसरा वायदा | ० | ५ | ६ |

### शिरगणतीसाठीं सुट्या

शुक्रवार, ता. २८ फेब्रुवारी व शनिवार, ता. १ मार्च रोजीं सर्व सरकारी कचेऱ्या बंद रहातील. कचेऱ्यांतील नोकरवर्ग शिरगणतीचे कामासाठीं लागेल.

### उमेदवाराची निवड

एका औद्योगिक संस्थेस २२ ते २६ वर्षें वयाचे होतकरू हिंदी तरुण निवडून काढावयाचे आहेत. निवडलेल्या उमेदवारांस २ वर्षें मामुली पगारावर शिक्षण देण्यांत येईल व त्यानंतर त्यांची नेमणूक केली जाईल. उमेदवारांची निवड अतिशय कसोशीनें केली जाईल. उमेदवारानें प्रथम खालील गोष्टी पाठवावयाच्या आहेत.:—

(१) वय, धर्म, बापाचा धंदा, इत्यादींचा तपशील. (२) शिक्षणक्रमाची माहिती. (३) उमेदवारासंबंधीं चांगली माहिती देऊं शकतील, अशा तिघांचीं नांवें व पत्ते. (४) "येत्या दहा वर्षांतील हिंदी, राजकीय, औद्योगिक व सामाजिक घडामोडींचा अंदाज" ह्या विषयावर निबंध. (५) माझें वैयक्तिक ध्येय ह्या विषयावर निबंध. (६) स्वतःचा फोटो. (७) संस्थेची जाहिरात वाचल्यावर उमेदवाराचे मनांत आलेले विचार नमूद करणारें, त्याच्या स्वतःच्या हस्ताक्षरांतील पत्र.

### ताप्ती व्हॅली रेल्वेची खरेदी

हिंदुस्थान सरकारचा ताप्ती व्हॅली रेल्वेबरोबरचा करार ३१ मार्च, १९४२ अखेर संपतो. त्यानंतर सरकार ती रेल्वे विकत घेणार आहे.

### सावकारीच्या धंद्यास लायसेन्स

सरकारी परवाना जवळ असल्याविना सावकारी धंदा करणें बंगाल प्रांतांत १ मार्च, १९४१ नंतर बेकायदा ठरणार आहे. लायसेन्स फी १५ रुपये असून लायसेन्स ३ वर्षें अंमलांत राहील.

### स्पेनला अन्नसामुग्रीचा पुरवठा

स्पेनला अन्नसामुग्रीचा तुटवडा अतिशय भासत आहे, ह्या कारणानें स्पेन व अर्जेंटाइन ह्यांमध्यें नुकत्याच झालेल्या कराराबद्दल तेथें विशेष समाधान वाटत आहे. त्या करारान्वयें स्पेनला कपाशीच्या १ लक्ष, २० हजार गांठी मिळणार आहेत. ५ लक्ष टन गहूं व १½ हजार टन मांस मिळण्याबाबत वाटाघाटी चालू आहेत.

### धूमकेतूचें पृथ्वीपासून अंतर

सध्या आकाशांत दिसणाऱ्या धूमकेतूचें पृथ्वीपासूनचें अंतर अवघें ४ कोटि मैल आहे असा एका तज्ज्ञाचा अंदाज आहे. त्याच्या डोक्याचा परिघ २५ हजार मैल आणि शेपटाची लांबी २० लक्ष मैल असावी असा अजमास त्यानें केला आहे!

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ७४ |
| २ शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणाचा प्रयत्न ... | ७५ |
| ३ मुंबई येथील सोन्या-चांदीचा बाजार ... | ७६ |
| ४ हिंदुस्थानांतील औद्योगिक वांधे ... | ७६ |
| ५ स्फुट-विचार ... इटलीची आफ्रिकेंतून हकालपट्टी—हिटलेरच्या कारवाया—हिंदी कामगारांचें प्रयाण—हिंदुस्थान-ब्रह्मदेश व्यापारी करार—प्राप्तीवरील कराच्या वसुलीचा कारभार—भिन्न प्रांतांतील परिस्थिति | ७७ |
| ६ हिंदू गृहस्थाशी होणारे व्यवहार ... | ७९ |
| ७ मुद्रण शास्त्रांतील पॉइंट पद्धति ... | ७९ |
| ८ वनस्पतिजन्य तुपाचे कारखाने ... | ७९ |
| ९ हिंदुस्थानाचें औद्योगीकरण ... | ८० |
| १० ब्रिटिश पौंडांतील हिंदी कर्जांचें रूपांतर ... | ८१ |
| ११ निवडक बाजारभाव ... | ८३ |

अर्थ

बुधवार, ता. १२ फेब्रुवारी, १९४१

## शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणाचा प्रयत्न

### प्रांतिक सरकारांनीं केलेले कायदे

शेतकऱ्यांच्या आर्थिक दुःस्थितीच्या निवारणासाठी प्रांतिक सरकारांनीं गेल्या दहा वर्षांत जे कायदे केले, त्यांची छाननी करणारें एक पुस्तक श्री. एन. जी. अभ्यंकर ह्यांनीं लिहिलें आहे, त्याची सर्वसाधारण रूपरेषा गेल्या अंकांत देण्यांत आली आहे. कर्जनिवारक कायद्यांपैकीं कांहीं कायदे अल्पकालीन सूट देणारे व कांहीं दीर्घकालीन सूट देणारे आहेत. त्यांतील पहिल्या प्रकारच्या कायद्यांचा विचार आतां येथें करावयाचा आहे. प्रांतिक सरकारांनीं अल्पकालीन सूट देणारे जे कायदे केले, त्यांची विभागणी खालीलप्रमाणें करतां येईल:—

( १ ) कर्जदार शेतकऱ्यांच्या कर्जाच्या वसुलीच्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी तहकूब करणें.

( २ ) थकलेल्या व्याजांत सूट देऊन कर्जदार शेतकऱ्यांकडील बाकी कमी करणें.

( ३ ) बाकी मुद्दलाची रकम कमी करणें व उरलेल्या येण्याच्या वसुलीसाठी सोइस्कर हप्ते ठरवून इतर सवलती देणें.

१९२९ सालानंतरच्या आर्थिक मंदीचे काळांत शेतीच्या मालाचे बाजारभाव एकदम खाली गेले, त्यामुळें शेतकऱ्यांस आपलीं देणीं देतां येण्याचें साधन नाहींसें झालें. शेतांत पूर्वीपेक्षा सवापट पीक आलें, तरी त्यास किंमत पूर्वीपेक्षा कमी यावी, अशी परिस्थिति निर्माण झाली; देणीं मात्र पूर्वीच्या मापानेंच मोजलीं जाऊं लागलीं. सावकारांनीं आपल्या पैशाची वसुली करण्यास जारीनें प्रारंभ केला व शेतकऱ्यांस त्यापासून संरक्षण देणें प्रांतिक सरकारांस भाग पडलें. कर्जनिवारणाच्या व्यापक योजनांचा विचार होऊन त्या अंमलांत येण्याची वाट पहाण्यास सवड नसल्याकारणानें, शेतकऱ्यांची जमीन स्वस्त किंमतीस दुसऱ्याचे हातीं जाऊं नये अशी त्वरित व्यवस्था प्रांतिक सरकारांस करावी लागली. मुंबई प्रांताचा १९३८ चा स्मॉल होल्डर्स टेंपररी रिलीफ ॲक्ट हा ह्यासंबंधांतील कायदा होय. ज्या शेतकऱ्याच्या मालकीची ६ एकरांपेक्षा अधिक पाण्याखालील जागा नाहीं अगर १९ एकरांपेक्षा अधिक बिगर पाण्याखालील जागा नाहीं अशा शेतकऱ्याची जमीन, घर, उभें पीक, धान्यसामुग्री, दोन दुभतीं जनावरें इ. जप्त करणें अगर विकणें ह्यास प्रस्तुत कायद्यानें बंदी केली. इतर प्रांतिक सरकारांनींहि योग्य अशी उपाययोजना केली. कर्जदार शेतकऱ्यांनीं, कर्ज तडजोडीसाठीं निर्माण केलेल्या बोर्डाकडे अर्ज केला असतां त्यांच्यावरील दावे तहकूब व्हावे, अशीहि सर्वत्र व्यवस्था करण्यांत आली.

कर्जदार शेतकऱ्यास शेतकरी म्हणून जिवंत राखण्यासाठी वरील तरतुदीचा उपयोग झाला. त्यापुढील गोष्ट म्हणजे त्यांच्या कर्जाचा बोजा हलका करणें, ही होय. १९१८ च्या युझरियस लोन्स ॲक्टाचा उद्देश कोठेंच सफळ झालेला दिसत नव्हता. जे व्यवहार गैरवाजवी होते व ज्यांत व्याजाचा दर अतिशय भारी होता, अशा दाव्यांतील मूळ करारांची पार्श्वभूमिका लक्षांत घेण्याचा ह्या ॲक्टानें कोर्टास अधिकार दिलेला होता व कोर्टानें त्या अधिकाराचा उपयोग करणें न करणें सर्वस्वी त्यांच्या इच्छेवरती अवलंबून असे. ह्या ॲक्टांत बहुतेक प्रांतांनीं सुधारणा करून वरील प्रकारें चौकशी करण्याची कोर्टास सक्ती केली व व्याजाचे दर निश्चित ठरवून दिले. मंदीच्या काळांत दिलेलीं व त्यापूर्वीं दिलेलीं कर्जें ह्यांवरील व्याजांचे दरांत कांहीं प्रांतांनीं फरक केला. मुंबई प्रांताच्या ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्टानें खालील प्रमाणें तरतूद केली:—

(अ) १ जानेवारी, १९३१ पूर्वीच्या कर्जांवर डेटरिलीफ बोर्डांनीं १२% व्याजास परवानगी द्यावी.

(ब) १ जानेवारी, १९३१ पूर्वी कर्ज काढलेलें असेल, तर १ जानेवारी, १९३१ अखेरच्या देणें व्याजांत ४०% सूट द्यावी व १ जानेवारी १९३० ते १ जानेवारी १९३१ चे दरम्यान तें काढलेलें असेल, तर व्याजांत ३०% सूट द्यावी.

(क) १ जानेवारी, १९३२ नंतर ९% अगर ठरलेला असेल तो, ह्यापैकीं कमी असलेल्या दरानें व्याजाचा हिशेब करावा.

मूळ कर्जाच्या रकमेपेक्षा अधिक व्याज सावकारास घेतां येऊं नये, असा कायदा बहुतेक प्रांतांनीं केला. ह्या दामदुपटीच्या कायद्यामुळें कर्जदार शेतकऱ्यांस बरीच सूट मिळाली.

थकलेल्या व्याजाचा बोजा कमी करून केवळ भागणें अशक्य असल्याकारणानें, मुद्दल कर्जाच्या रकमेंतहि शेतकऱ्यांस सूट देणें आवश्यक झालें व त्यासाठीं कर्ज तडजोड बोर्डांची स्थापना करणें व सक्तीनें मुद्दल कर्ज कमी करणें, ह्या गोष्टी प्रांतिक सरकारांनीं तावडतोब हातीं घेतल्या. कर्जदार शेतकऱ्यांच्या परतफेडीच्या पात्रतेच्या ८०% इतक्या रकमेइतक्याच कर्जफेडीची जबाबदारी त्याचेवर ठेवणें, हा हेतु साध्य करण्याचा तडजोड बोर्डांनीं प्रयत्न करावा, अशी तरतूद मुंबई प्रांतांत करण्यांत आली. कमी केलेलें कर्ज कर्जदाराच्या मालमत्तेच्या किंमतीच्या ५०% असेल, तर सावकारास कमी केलेल्या कर्जाची रकम प्रांतिक लँड मार्गेज बँकेच्या बाँडसचे स्वरूपांत मिळावी अशीहि डेटर्स रिलीफ ॲक्टानें व्यवस्था केली. कर्जदारांकडून ही रकम कमाल २५ हप्त्यांत वसूल करतां यावी, अशीहि त्यांत तरतूद होती. इतर प्रांतांनींहि स्थानिक परिस्थितीस अनुसरून योग्य ते कायदे केले. त्या सर्वांचा

मुख्य हेतु, शेतकरी आपल्या जमिनींस मुकूं नयेत व त्यांनीं आपल्या आवाक्याबाहेर कर्जें काढूं नयेत, हा होता. कांहीं प्रांतांनीं कर्जदार शेतकऱ्यांच्या जमिनींची रास्त किंमत ठरविण्याचा अधिकार कोर्टास दिला, तर कांहीं प्रांतांनीं कर्जदार शेतकऱ्यांस नादार ठरविण्याचा अधिकार तडजोड बोर्डास दिला. ह्यानंतरचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सावकारीच्या धंद्याचें नियंत्रण, हा होय. सावकारांची नोंद ठेऊन त्यांस लायसेन्स देणें, हिशेबाची पद्धति ठरवून टाकणें व व्याजाचा दर निश्चित करणें, ह्या त्या नियंत्रणांतील प्रमुख बाबी आहेत. परवान्याविना सावकारीचा धंदा करणें हा मुंबई प्रांताच्या मनीलेंडर्स बिलानें गुन्हा ठरविला आहे. सावकारांनीं कर्जदार शेतकऱ्याच्या अडचणीचा फायदा घेऊन त्यास त्रास देऊं नये व त्याची सर्व मालमत्ता गिळंकृत करूं नये,अशी व्यवस्था बहुतेक प्रांतिक सरकारांनीं केली.

---

## मुंबई येथील सोन्याचांदीचा बाजार

### सोनें

ज्या व्यापाऱ्यास सोनें विकावयाचें अगर विकत घेण्याचें असेल, तो व्यापारी दलालाकडे जातो व हा दलाल दुसऱ्या दलालाकरवीं व्यवहार पुरा करतो. अर्थातच दलाली द्यावी लागते. गिऱ्हाइक पैसे देऊन सोनें घेतें अगर सोनें देऊन पैसे घेतें. १०० नंबरी कसाच्या सोन्यावर खरेदी-विक्रीचे व्यवहार आधारलेले असतात. सरकारी टाकसाळ अगर सुप्रसिद्ध बँकर अथवा ब्रोकर ह्यांचा सोन्याच्या वजनाबाबत व कसाबद्दल दाखला सोनें देतेवेळीं अवश्य लागतो. समजा, 'अ' नें 'ब' दलालाकडून ५०० तोळे सोनें ३० रु. ८ आ. तोळा ह्या दरानें खरेदी केलें आणि सोनें ९४ नंबरच्या कसाचें आहे. 'अ' ला खालीलप्रमाणें किंमत द्यावी लागेल:—

५०० तोळे ( ९४ नंबरी ) = ४७० तोळे ( १०० नंबरी )
४७० × ३० रु. ८ आ. = १४,३३५ रुपये किंमत.

वायद्याचे व्यवहार २५० तोळ्यांच्या गटांचे केले जातात; त्याचे खाली नाहीं. प्रमाणभूत सोनें अर्थातच १०० नंबरी असतें. चांदीप्रमाणेंच पहिल्या व दुसऱ्या वायद्याच्या किंमती जाहीर होतात, व चांदीप्रमाणेंच पैसे देऊन सोन्याचा ताबा घेण्याचा अथवा न घेण्याचा विकल्प ठेवणारे करार असूं शकतात. १०० नंबरापेक्षा कमी नंबरचें सोनें आहे, असें सोनें घेतेवेळीं आढळलें, तर त्या मानानें त्याचें वजन कमी समजून बुलियन एक्सचेंजनें ठरविलेल्या दराप्रमाणें तुटीचा आकडा निश्चित केला जातो. १०० ते ९४ नंबराचें सोनें वायद्याचे व्यवहारास चांगलें समजलें जातें; अर्थात वर सांगितल्याप्रमाणें किंमत ठरवितांना हिशेब केला जातो. ९४ ते ९० नंबरच्या सोन्यास, प्रत्येक तोळ्यास अर्धा आणा ह्याप्रमाणें किंमत कमी येते. ९० नंबराखालील सोन्याचा वायद्याचा व्यवहार होत नाहीं. रोखीच्या व्यवहारास तें चालतें; परंतु ९० नंबराच्या खालीं त्याचा जितका नंबर असेल, त्या प्रत्येक नंबरास एक आणा ह्या दरानें किंमत घटते. समजा, 'अ' नें 'ब' दलालाकडून पहिल्या सेटलमेंटचें ९२ नंबरी कसाचें ५०० तोळे सोनें २९ रु. ४ आ. ६ पै दरानें घेण्याचा करार केला, तर ठराविक दिवशीं त्यास खालील हिशेबानें पैसे द्यावे लागतील:—

सोन्याचा कस ९२ नंबरी आहे, असें मानल्यास सोन्याचें वजन ९२×५००=४६० तोळे झालें. बुलियन एक्सचेंजनें ठरविलेल्या करारापेक्षा कमी अधिक होणाऱ्या सोन्याच्या मेळाचा दर २८ रु. ४ आ. ६ पै. आहे. करारांतील दर २९ रु. ४ आ. ६ पै असला, तरी हिशेब २९ रु. ४ आ. नें होईल, कारण प्रत्येक तोळ्यामागें अर्धा आणा कापला जाईल. २९ रु. ४ आ.×४६० तोळे=१३,४५५ रु. एकूण वजन ४० तोळे ( ५००—४६०=४० ) कमी पडत आहे, त्याचे ४०×१ रु. ( २९ रु. ४ आ. ६ पै. २८ रु. ४ आ. ६ पै=१ रु. ) ४० रुपये होतात. तेव्हां, खरेदीची किंमत १३,४९५ रुपये होते.

तेजी, मंदी, तेजी बदला, मंदी बदला इत्यादि सर्व व्यवहार चांदीचे व्यवहाराप्रमाणें सोन्याचेहि होतात. व्याजाचा हिशेबहि त्याप्रमाणें होतो.

---

## हिंदुस्थानांतील औद्योगिक वांधे

### एप्रिल ते जून, १९४०

एप्रिल ते जून, १९४० या मुदतींत हिंदुस्थानांत एकूण १०१ औद्योगिक वांधे झाले. त्यांत २ लक्ष, ६९ हजार कामगारांचे कामाचे २४ लक्ष, ७४ हजार दिवस बुडाले; एकूण वांध्यांपैकीं ३१ वांध्यांत कामगार यशस्वी झाले व १८ मध्यें त्यांस थोडेंफार यश आलें. ४७ वांध्यांत त्यांस यश आलें नाहीं.

**वांध्यांची प्रांतवार वांटणी**

| प्रांत | वांध्यांची संख्या | त्यांतील कामगार | बुडालेले दिवस |
|---|---|---|---|
| आसाम | २ | १,६३१ | १०,८६२ |
| बंगाल | ३५ | ६१,९८२ | २,१२,२०९ |
| बिहार | ४ | १२,०८६ | ३,७९,३८१ |
| मुंबई | २५ | १६३,२१८ | १४,२८,३९५ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | ७ | १७,४५७ | २,३८,६६१ |
| मद्रास | १२ | ७,७११ | १,२९,२६८ |
| ओरिसा | १ | ३८ | ५७० |
| पंजाब | ९ | १,०१९ | ४,२९३ |
| सिंध | २ | १७८ | २,५६४ |
| संयुक्त प्रांत | ४ | ३,२६० | ६८,०६० |
| एकूण | १०१ | २६८,५८० | २४,७४,२६३ |

**उद्योगधंद्यांवार वांटणी**

| उद्योगधंदे | वांधे | त्यांतील कामगार | बुडालेले दिवस |
|---|---|---|---|
| कपास व लोकर गिरण्या | ३८ | १८७,४९५ | १७,१५,९८० |
| तागाच्या गिरण्या | ८ | ३५,०४६ | २,२७,००७ |
| इंजिनिअरिंग वर्कशॉप्स | ४ | १,४७० | ४,४९० |
| रेल्वेज | २ | ३५० | १२,५०० |
| खाणी | ४ | ९,९६९ | २,५४,०४१ |
| इतर | ४५ | ३४,२५० | २,६०,२४५ |
| एकूण | १०१ | २६८,५८० | २४,७४,२६३ |

# स्फुट विचार

## इटलीची आफ्रिकेंतून हाकालपट्टी

ब्रिटिश फौजांच्या सार्वत्रिक चढाईमुळें इटलीचें आफ्रिकेमधील साम्राज्य क्रमाक्रमानें संपुष्टांत येत चाललें आहे. लिबियामध्यें समुद्र किनाऱ्याच्या बाजूनें इटलीच्या फौजांस सारखी पीछेहाट करावी लागत असून इटालिअन बंदरें एकामागून एक ब्रिटिश सैन्य काबीज करीत आहे. कोठल्याहि महत्त्वाच्या ठाण्यापाशीं उभें राहून प्रतिस्पर्ध्याच्या हल्ल्यास तोंड देण्याचें सामर्थ्य इटलीमध्यें राहिलेलें नाहीं. इटालिअन लष्कर उघड उघड नाउमेद होऊन गेलें असून रणांगणामधून पळ काढण्यावांचून त्यास दुसरा मार्ग सुचेनासा झाला आहे. ह्या परिस्थितींत ब्रिटिश सेनानींनीं इटलीच्या इतर मुलुखांतहि घुसून शत्रूस मागें रेटण्याचा क्रम चालू ठेवला असल्यानें इटलीची तारांबळ उडाली आहे. तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यालगत इटलीचे इरिट्रिया, ॲबिसिनिया व सोमाली लँड हे तीन प्रांत आहेत. त्या तीघांमध्यें ब्रिटिश फौजा पुढें चाल करून चालल्या आहेत. ॲबिसीनियांत तेथील माजी बादशहानें आपल्या अनुयायांच्या मदतीनें रान उठवलें आहे आणि त्यास सर्व प्रकारचें सहाय इंग्लंड देत आहे. आफ्रिकेंत मुसोलीनीच्या साम्राज्याचा डोलारा ह्या प्रमाणें ढासळून पडत असतां हिटलरला त्यास कांहींच मदत देतां आलेली नाहीं. मुसोलीनीच्या सैन्याची आफ्रिकेमधून होणारी हकालपट्टी आणि तेथील इटालिअन साम्राज्याचा नाश हा वस्तुतः हिटलरचाच पराभव आहे. आपलें पुढील युद्धधोरण यशस्वी करण्यासाठी त्यानें आफ्रिकेंत इटलीचा बळी दिला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. इकडे आल्बेनियांत ग्रीक सैन्याची प्रगति सारखी होतच आहे.

## हिटलरच्या कारवाया

अमेरिकेच्या सहायानें आणि स्वतःच्या वाढत्या लढाऊ तयारीमुळें इंग्लंडचें सामर्थ्य सारखें वाढत आहे. इंग्लंडवर जोराचा हल्ला एकदोन महिन्यांत चढवण्याचा आपला निश्चय हिटलरनें तर जाहीर केला आहे. अमेरिकेस त्यानें धमकी देऊन पाहिलें आणि त्या बाजूनें इंग्लंडला मदत येऊन पोहोचूं नये ह्याविषयीं तो खटपट करीतच आहे. आशिया खंडांत जपानची उठावणी करून अमेरिकेस व इंग्लंडला शह देण्याचा त्याचा प्रयत्न चालू आहे. परंतु इंग्लंडवर स्वारी करण्याचा आपला बेत त्यास सोडून देतां येत नाहीं आणि तो अमलांत आणण्याची त्याची तयारी मात्र होत नाहीं. तथापि, इंग्लंडवर व ग्रीसवर चोहोंकडून एकदम हल्ला करण्याची पूर्वतयारी हिटलरनें चालविली असली पाहिजे अशी शंका त्याच्या अलिकडच्या कारवायांवरून येण्यास जागा उत्पन्न झाली आहे. व्हीशीच्या फ्रेंच राज्यकर्त्यांवर वजन पाडून त्यांचें आरमार व सैन्य ह्यांचा उपयोग इंग्लंडच्या विरुद्ध करण्याचा त्याचा हेतु उघड होत आहे. मार्शल पेटाँ ह्यांचेमध्यें राष्ट्रीय अभिमान आहे तो इतर फ्रेंच मुत्सद्यांचे मदतीनें दडपून टाकण्यासाठी हिटलर मॉ. लाव्हालसारख्या जर्मनीस अनुकूल असलेल्या पुढाऱ्यांस हातीं धरीत आहे. बाल्कन्समध्यें रुमानिया जर्मनीच्या तावडींत सांपडला आहे. इटलीमध्यें जर्मन फौजा जमा झाल्या आहेत आणि होत आहेत. त्यांचा उपयोग इटलीची पीछेहाट थोपवून धरण्याकरितां आणि भूमध्य समुद्रांत गडबड करण्याच्या हेतूनें झाला तर पहावा असा हिटलरचा बेत असण्याचा संभव आहे. त्याची योजना कांहीं असो, तिचा प्रतिकार करण्यास इंग्लंड सज्ज आहे. जर्मन स्वारीची तयारी ज्या युरोपियन बंदरांत होणार आहे, त्यांवर ब्रिटिश विमानें स्फोटकारक गोळे टाकून त्यांचा नाश करीत आहेत. हिटलरनें कोणत्याहि कारवाया केल्या तरी त्यांची कल्पना इंग्लंडला असल्यामुळें त्याचे बेत निर्वेधपणानें सिद्धीस जाण्याची भीति नाहीं.

## हिंदी कामगारांचें इंग्लंडला शिक्षणासाठी प्रयाण

हिंदुस्थानांत नवीन कारखान्यांत यांत्रिक कौशल्याचें काम करणाऱ्या लोकांस आधुनिक पद्धतीची माहिती असणें अगत्याचें आहे. युद्धसामुग्रीच्या कारखान्यांतलें काम त्यांच्या अंगवळणी पडण्यास त्यांस त्याचा प्रत्यक्ष अनुभव असला पाहिजे. बाहेरून कुशल यांत्रिक कामगार येथें आणून त्यांच्या हाताखालीं हिंदी लोक तयार करणें सध्याच्या युद्धपरिस्थितींत शक्य नाहीं. ही अडचण दूर व्हावी म्हणून ब्रिटिश कामकरी खात्याचे मंत्रि, मि. बेव्हिन, ह्यांनीं अशी योजना सुचविली कीं हिंदुस्थान सरकारनें होतकरू कुशल कारागीर निवडून त्यांस इंग्लंडमध्यें पाठवून द्यावें म्हणजे त्यांस सहा महिनेपर्यंत ब्रिटिश कारखान्यांत यांत्रिक शिक्षण व अनुभव मिळवण्याची संधी देण्यांत येईल. ही योजना हिंदुस्थान सरकारनें पसंत केली आणि पन्नास कारागीर निवडले. ते नुकतेच इंग्लंडला पाठवण्यांत आले असून त्यांच्या प्रवासाची, तेथें रहाण्याची व कामाचा अनुभव मिळवण्याची नीट व्यवस्था करण्यांत आली आहे. मुंबईंत ह्या पन्नास लोकांस औपचारिक रीतीनें निरोप देण्यांत आला, तेव्हां हिंदुस्थान सरकारच्या आणि बिनसरकारी मंडळींच्या वतीनें त्यांच्या कार्यक्रमांत त्यांस यश चिंतण्यांत आलें. यांत्रिक कलेचें उत्कृष्ट शिक्षण त्यांस इंग्लंडमध्यें मिळेल एवढेंच नव्हे तर, हिंदी कामगार ब्रिटिशांच्या बरोबरीनें कारखान्यांत कौशल्य दाखवूं शकतात हा आत्मविश्वास त्यांचेमध्यें निर्माण होईल असें त्याप्रसंगीं सांगण्यांत आलें. त्याचप्रमाणें ब्रिटिश कामगारांच्या चळवळींची त्यांस प्रत्यक्ष माहिती होऊन तिचा उपयोग पुढें हिंदी कामकरी वर्गाच्या संघटनेकडे करतां येईल अशी इच्छाहि प्रकट करण्यांत आली. हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाच्या प्रगतीसहि आधुनिक पद्धतींचें यांत्रिक शिक्षण इंग्लंडमध्यें घेऊन आलेल्या हिंदी लोकांचें सहाय होण्यासारखें आहे.

## हिंदुस्थान-ब्रह्मदेश व्यापारी करार

ब्रह्मदेश अनेक वर्षेपर्यंत हिंदुस्थानचा एक भाग होता, तेव्हां त्यामध्यें आयात–निर्गत व्यापारावरील जकातींच्या स्वतंत्र व्यवस्थेचा प्रश्नच उद्भवणें शक्य नव्हतें. परंतु अलीकडे ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून विभक्त करण्यांत आल्यामुळें त्यांचे व्यापारी संबंध कसे असावें हें ठरवणें आवश्यक झालें आहे. हिंदुस्थानचें बरेंच भांडवल त्या देशांत गुंतलेलें आहे आणि अनेक हिंदी कुटुंबें तेथें कायमची वसती करून राहिलीं आहेत. परंतु अलीकडे हिंदी लोकांच्या संबंधानें ब्रह्मी लोकमत प्रतिकूल झालें असून त्यांचे परस्पर-संबंध बिघडले आहेत. तथापि, ही स्थिति सुधारून हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांची मैत्री जोडली जावी अशी सदिच्छा दोन्ही बाजूंमध्यें निर्माण झाली आहे आणि ती पूर्ण होण्यास व्यापारी कराराच्या चर्चेनें चांगली संधी दिली आहे. हिंदुस्थान सरकार आणि ब्रह्मी सरकार ह्यांच्या प्रतिनिधींच्या वाटाघाटींस गेल्या

आठवड्यांत दिल्ली येथें आरंभ झाला. ब्रह्मदेशाचा माल ह्या देशांत येतो त्या मानानें त्या देशांत जाणारा हिंदी माल कमी किंमतीचा असतो. पण ब्रह्मी सरकारच्या उत्पन्नांत भर पडावी म्हणून त्यास हिंदी आयात मालावर जकाती बसवण्याची जरूर भासूं लागली आहे. ह्या जकातींचा परिणाम हिंदी व्यापारावर प्रतिकूल होण्यासारखा असल्यास हिंदुस्थान सरकारला त्या बाबतींत सवलती मागाव्या लागतील. हिंदी लोकांस ब्रह्मदेशांत चांगल्या रीतीनें वागविलें जावें अशा सूचनेचाहि विचार दिल्ली येथें झाल्यावांचून रहाणार नाहीं. हिंदुस्थान आणि सिलोन ह्यांच्यामध्यें झालेल्या व्यापारी करारांच्या वाटाघाटी फिस्कटल्या हें लक्षांत घेतां प्रस्तुत चर्चा यशस्वी होण्याचें महत्त्व विशेष आहे हें सांगावयास नको. ब्रह्मदेशाचे वतीनें हिंदुस्थानला योग्य व न्याय्य सवलती देण्यांत येतील अशी अपेक्षा आहे.

---

### प्राप्तीवरील कराच्या वसूलीचा कारभार

हिंदी प्राप्तीवरील करवसूलीबाबतचा १९३८–३९ सालाचा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून असें दिसून येतें कीं कारभाराच्या दक्षतेमुळें सरकारचें उत्पन्न सुमारें ३ कोटि रुपयांनीं त्या वर्षीं अधिक झालें. कर देणारांनीं स्वतः दिलेल्या प्राप्तीच्या रकमा अधिकाऱ्यांनीं मान्य केल्या असत्या आणि त्यांची छाननी करून गळलेल्या उत्पन्नाच्या बाबी हिशेबांत घेतल्या नसत्या तर वसुलीमध्यें तेवढी घट झाली असती. अधिकाऱ्यांच्या सावधगिरीच्या योगानें एकूण सरकारी उत्पन्नाचा सुमारें चवथा हिस्सा तिजोरीमध्यें आला नसता तो येऊं शकला. प्राप्तीवरील कर देण्यास पात्र नसलेल्या ३१ हजार नागरिकांचीं नांवें यादींतून वगळण्यांत आलीं, पण ३२ हजार नव्या लोकांची तीमध्यें भर घातली गेली. म्हणजे करास पात्र असलेल्यांची संख्या अखेर पूर्वसालापेक्षा वाढलीच. कर चुकवण्याच्या लोकांच्या युक्त्या, हिशेब दोन तऱ्हेनें वेगळे ठेवणें, खरेदी अधिक आणि विक्री वाजवीपेक्षा कमी दाखवणें, प्राप्तीच्या बाबी वगळणें, नामधारी व्यक्तींच्या नांवानें हिशेब ठेवणें अशा होत्या असें आढळून आलें. प्राप्तीवरील कर आणि जादा प्राप्तीवरील कर ह्यांची एकूण हिशेबी रकम अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें २१ कोटि रुपये होती; तीमधून परत देण्याचे ३ कोटि रुपये वजा केले तेव्हां वसुलीची निवळ रकम १८ कोटि रुपयांची झाली. हे आकडे १९३७–३८ सालाच्या मानानें प्रत्येकीं १ कोटि रुपयांनीं अधिक होते. १९३८–३९ मध्यें वसूली १७ कोटि रुपये झाली. त्यापूर्वींच्या वर्षीतला हा आकडा १६ कोटि होता.

---

### भिन्न प्रांतांतील परिस्थिति

वसूलीच्या बाबतींत निरनिराळया प्रांतांतली परिस्थिति भिन्न भिन्न होती. शेतीच्या पिकांची व व्यापाराची स्थानिक स्थिति ह्या भिन्नतेच्या मुळाशी असलेली आढळते. मद्रास प्रांतांत पिकें चांगलीं नव्हतीं. तथापि, पूर्व वर्षाच्या मानानें स्थिति थोडी अनुकूल असल्यानें वसुलींची कांहीं वाढ झाली. मुंबई प्रांतांत बाजारभाव चढलेले असल्यानें प्राप्तीच्या रकमा बऱ्या होत्या. कपाशीचा भाव उतरला, पण गिरण्यांस फायदा चांगला झाला. पोलादाचा धंदा सुस्थितींत होता आणि रोखे बाजारांत व्यवहार वर्षभर चालले होते. बंगाल प्रांतांत उद्योगधंदे व व्यापार ह्यांची स्थिति चांगली होती. तागाच्या किंमती पडल्या परंतु चहाच्या वाढल्या. संयुक्त प्रांतांत व्यापाराची मंदी होती आणि साखरेच्या कारखान्यांस विशेष नफा झाला नाहीं. पंजाबला आर्थिक दृष्टीनें प्राप्तीवरील कराचें वर्ष बरें गेलें नाहीं. कांहीं धंदे सुस्थितींत होते आणि कपाशीच्या धंद्यांस तेजी आली. बिहार व मध्यप्रांत ह्यांमध्यें एकंदरीनें परिस्थिति वाईट नव्हती. आसाम प्रांतांतली स्थिति चांगली होती. चहा, भूमिगत द्रव्यें व रेलवेजनीं त्या प्रांतांतल्या प्राप्तीस हात दिला. सावकारी करणाऱ्या वर्गाची सांपत्तिक स्थिति एकंदरीनें पहातां सबंद देशभर प्रतिकूल स्वरुपाची होती.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं

असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदु गृहस्थाशी होणारे व्यवहार

(लेखकः—श्री. के. बा. गजेंद्रगडकर, बी. ए., एलएल. बी. वकील सातारा)

हिंदु अविभक्त कुटुंबपद्धति ही व्यापारास व देवघेवीस विघातक आहे. एखाद्या मुसलमान, पारशी वगैरे अहिन्दु गृहस्थाशी गहाण, खरेदी व्यवहार करणें झाल्यास, सदर गृहस्थ त्या मिळकतीचा पूर्ण मालक आहे एवढीच खात्री सावकारानें करून घेतली म्हणजे पुरें होतें. एखाद्या अविभक्त हिंदु कुटुंबीय गृहस्थाशी जर व्यवहार करावयाचा असेल तर सावकारानें फार बारकाईनें चौकशी केली पाहिजे. कायद्याच्या सूक्ष्म दृष्टीनें विचार करितां अशा गृहस्थाशी गहाण अगर खरेदीचा व्यवहार करितांना खालील गोष्टी सावकारानें विचारांत घेतल्या पाहिजेत.

(१) ऋणकोनें आपल्या कुटुंबांतील बायकासुद्धां सर्व व्यक्तींची वंशावळ देऊन त्यांपैकीं सज्ञान कोण व अज्ञान कोण ह्याचा खुलासा केला पाहिजे.

(२) एकत्र कुटुंबाच्या मिळकतींतून पोटगीचा हक्क सांगणाऱ्या व्यक्तींचीं नांवें सावकारास माहित पाहिजेत व अशा व्यक्तींच्या पोटगीची व्यवस्था ऋणकोनें काय केली आहे ह्याचा खुलासा सावकारानें ऋणकोपासून करून घेतला पाहिजे.

(३) त्याचप्रमाणें कुटुंबाच्या मिळकतींतून पोटगी व विवाहखर्चाचा अधिकार असणाऱ्या कुमारिकांची संख्या व त्यांच्या त्यासंबंधींच्या खर्चाबद्दल ऋणकोनें केलेली व्यवस्था सावकारास माहित पाहिजे.

ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी कायद्याच्या नवीन दुरुस्त झालेल्या कलम ३९ प्रमाणें कुटुंबांतील व्यक्तींच्या पोटगीचा अगर विवाहाच्या खर्चाचा बोजा आहे ह्याची नोटीस सावकारास असली तर त्यांनीं गहाण अथवा खरेदी घेतलेल्या मिळकतीवर सदर बोजा पडण्याचा संभव असतो. सबब सदर व्यक्तींची माहिती सावकारांस असणें जरूर आहे.

(४) जर कुटुंबांतील एखादा सहभागीदार १४ एप्रिल, १९३७ नंतर मृत झाला असल्यास त्याची विधवा पत्नी हयात आहे की काय याची माहिती सावकारास पाहिजे. कारण नवीन झालेल्या देशमुख कायद्यानें अशा विधवांना कुटुंबीय मिळकतींत, त्यांच्या ह्यातीपर्यंत कां होईना हिस्सा दिला असून सदर हिस्सा पृथक् विभागून मागण्याचा हक्क वरील विधवांना प्राप्त झाला आहे. त्यामुळें एकत्र कुटुंबांतील मिळकतीचा व्यवहार करितांना सावकारास अशा विधवांची माहिती असणें जरूर आहे.

(५) कुटुंबांतील एखाद्या गृहस्थानें विशिष्ट विवाहाच्या कायद्यान्वयें (स्पेशल मॅरेज ॲक्ट) विवाह केला असल्यास विवाह केल्या वेळेपासून तो कुटुंबापासून विभक्त झाला असें कायद्यानें ठरविलें आहे. ही माहिती सावकारास जर नसेल तर त्याचा कुटुंबाच्या मिळकतींत हिस्सा असलेमुळें कुटुंबांतील ऋणकोनें केलेला व्यवहार अशा माणसाच्या हिश्यावर बसणार नाहीं; सबब ही माहिती सावकारानें करून घेणें जरूर आहे.

(६) कुटुंबांतील सहभागीदाराची विधवा स्त्री गरोदर असल्यास किंवा कुटुंबांतील एखाद्या विधवेनें दत्तक घेतला आहे काय अगर घेण्याच्या विचारांत आहे काय याची माहितीहि सावकारास पाहिजे.

(७) ऋणकोस मिळकत विकण्याची कायदेशीर जरूरी आहे काय? व्यवहार योग्य व कायदेशीर आहे अशी खात्री सावकारानें करून घेतली पाहिजे व ऋणको जर बाप किंवा कुटुंबाचा कर्ता असेल तर हा व्यवहार पूर्वींचें कर्ज फेडण्याकरितां ऋणको करीत आहे ही माहिती सावकारानें काढली पाहिजे. वरीलप्रमाणें एकत्र कुटुंबीय व्यक्तींशी व्यवहार करण्यामध्यें कायदेशीर अडचणी उत्पन्न होण्याचा संभव असतो. सबब अशा माणसांशी व्यवहार करितांना बँका, सहकारी संस्था व सावकार ह्यांनीं फार काळजीपूर्वक व कसून चौकशी केली पाहिजे.

## मुद्रणशास्त्रांतील 'पॉइंट पद्धति'

(इंडियन प्रिंट ॲन्ड पेपर ह्या इंग्रजी त्रैमासिकानें घातलेल्या प्रश्नाचें श्री. भ. दि. कुलकर्णी ह्यांनीं लिहिलेलें उत्तर)

प्रश्नः—'पॉइंट-पद्धति' म्हणजे काय हें सांगून ती प्रचारांत कां आली हें सांगा.

उत्तरः—'पॉइंट' हें सर्वसामान्य एकमान धरून त्याची गणिताच्या पद्धतीनें होणारी वाढ विचारांत घेऊन तिला अनुसरून टाईप पाडण्याची जी पद्धति तिला 'पॉइंट-पद्धति' असें म्हणतात. या पद्धतींत, मुद्रणजगतांतील मोजमापाचें जें एकमान पायका, त्याचे सारखे बारा भाग केले आणि त्या प्रत्येक भागाला 'पॉइंट' हें नांव दिलें. याप्रमाणें प्रत्येक टाइपाचा आकार हा या सर्वसामान्य एकमानांचा कांहींतरी पण पूर्ण गुणक बनून राहिला; आणि यामुळें टाइपांच्या आकारांत एक प्रकारची पद्धतशीर आनुक्रमिकता उत्पन्न झाली.

सर्वसामान्य व्यवहारांतील मोजमापांशी या मोजमापाचें प्रमाण खालीलप्रमाणें जमतें.

१ पॉइंट= ·०१३८३७ इंच
१२ पॉइंट=पायका एम्= ·१६६०४४ इंच
६ एम्=१ इंच
१२ इंच=१ फूट

### पॉइंट-पद्धति प्रचारांत येण्याचीं कारणें

जुन्या (बॉडी) पद्धतीनें पाडल्या जाणाऱ्या टाइपांमध्यें कोणत्याच प्रकारचा अनुक्रम किंवा प्रमाण नसल्यामुळें तो एक प्रकारें सतत त्रास असे. विशेषतः वेगवेगळ्या फौंड्रीचे टाईप घेतले म्हणजे त्यांची एकत्र जुळणी करणें फार कठीण होत असे. कारण त्यांच्यांत कोणत्याच प्रकारची आनुक्रमिकता नव्हती. त्यामुळें जुळणिसास, त्यांतल्या त्यांत कोठाकाम (Job-work) करणाऱ्या जुळणिसास, फार त्रास होत असे आणि त्यामुळें कोठाकामें नीट करतां येत नसत. अशा प्रकारचा त्रास आणि गैरसोय टाळण्याकरितां आणि टाइप पाडतांना ठेवण्यांत येणारा फरक काढून टाकण्याकरितां 'पॉइंट-पद्धति' प्रचारांत आली. —"मुद्रण प्रकाश"वरून.

## वनस्पतिजन्य तुपांचे कारखाने

हिंदुस्थानांत वनस्पतिजन्य तुपाचे सध्या खालीलप्रमाणें कारखाने आहेतः—

| | रोजचें उत्पादन (टन) |
|---|---|
| हिंदुस्थान वनस्पति मॅन्युफॅक्चरिंग कं. लि., मुंबई | १०० |
| इंडियन व्हेजिटेबल प्रॉडक्ट्स लि., मुंबई | १५ |
| स्वस्तिक ऑईल मिल्स लि., मुंबई | १० |
| गणेश फ्लोअर मिल्स लि., कानपूर | २० |
| गणेश फ्लोअर मिल्स लि., लायलपूर | १० |
| मोदी वनस्पति मॅ. कं. लि., दिल्ली | १० |
| म्हैसूर ऑईल प्रॉडक्ट्स लि., बंगलोर | ५ |
| टाटा ऑईल मिल्स कं. लि., कालिकत | १० |

ह्यासेरीज रोजचे एकूण ५० टन उत्पादनाचे ४ कारखाने स्थापन होत आहेत, त्यांपैकीं २ कारखाने मुंबईस सुरू होतील.

## हिंदुस्थानाचें औद्योगीकरण

( सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरय्या ह्यांचें म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्समध्यें नुकतेंच झालेलें भाषण )

हिंदुस्थानाचें औद्योगीकरण तावडतोब व्हावयास पाहिजे व तें तसें होण्यास नियोजन करणें अत्यंत आवश्यक आहे, ह्याचा उच्चार–पुनरुच्चार सर एम्. विश्वेश्वरय्या सतत करीत आहेत. कांहीं दिवसांपूर्वी बंगलोर येथें म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्सपुढें या प्रश्नावर त्यांनी विचार प्रकट केले. त्यांचा गोषवारा खालील-प्रमाणें आहे:—

कोणत्याहि देशाच्या मूलभूत गरजा तीन असतात. अंतर्गत सुव्यवस्था, परचक्रापासून संरक्षणाची तयारी आणि देशांतील उद्योगधंदे. ह्यांच्यावरच राष्ट्राची प्रगति अवलंबून असते. राष्ट्र स्वयंसिद्ध होण्यास, त्यांतील लोकांना काम मिळून आर्थिक सुबत्ता होण्यास आणि रहाणीचें विशिष्ट मान टिकविण्यास व वाढविण्यास उद्योगधंदेच उपयोगी पडतात.

कोणतेंहि कृषिप्रधान राष्ट्र सामर्थ्यवान आणि संपत्तिमान झालेलें नाहीं. अमेरिका, रशिया, जपान इत्यादींचीं उदाहरणें डोळ्यांसमोरच आहेत. हिंदुस्थानांत शिक्षितांचें एकूण लोक-संख्येशीं प्रमाण शेकडा अवघें ८ टक्के पडतें. नवीन कल्पना ग्रहण करण्यास, नवीन उद्योग–धंदे चालविण्यास व ते आत्मसात् कर-ण्यास शिक्षणाची आवश्यता आहे.

हिंदुस्थानांत शेतीचा व्यवसाय करणारांचें एकूण लोकसंख्येशी प्रमाण शेकडा ६७ टक्के आहे तर अमेरिकेंत तें २२ टक्के व ग्रेट-ब्रिटनमध्यें ८ टक्के आहे. उलट, उद्योगधंद्यांत असणारांचें प्रमाण अनुक्रमें १०,३२ व ४७ टक्के पडतें. उद्योगधंद्यांपासूनचे दर माणशीं वार्षिक उत्पन्न हिंदुस्थानांत १२ रुपये, अमेरिकेंत ८३० रुपये व ग्रेटब्रिटनमध्यें ४६३ रुपये आहे. हिंदुस्थानाचें दारिद्य या आकड्यांनीं होतें व प्रगतीची दिशा स्पष्ट होते. हिंदु-स्थानाच्या अवनतीचें आणि दारिद्याचें मुख्य कारण उद्योगधंद्यां-कडे कळत–नकळत झालेलें आपलें दुर्लक्ष, हें आहे.

उत्पन्न वाढवावयाचें म्हणजे उत्पादन वाढविलें पाहिजे. नुसत्या माणसांच्या मेहनतीनें उत्पादन वाढण्याची मर्यादा ठराविक अतएव मर्यादित आहे. निरनिराळ्या राष्ट्रांतील दररोजच्या उत्पादनाचे १९२९ चे आकडे उद्बोधक आहेत:—

( अश्वशक्ति × कामाचे तास हें माप धरलें आहे व आकडे लक्षांचे आहेत. )

| | अमेरिका | ग्रेटब्रिटन | हिंदुस्थान |
|---|---|---|---|
| मनुष्यबळ | ४०० | १५० | १०६० |
| कोळसा | १०,०१० | २७०० | ३४० |
| पेट्रोल | ४८१० | २८३ | ८० |
| पाणी | १२१० | ४० | ३० |
| एकूण | १६४३० | ३१७३ | १५१० |
| लोकसंख्या | १२२७ | ४७७ | ३१८९ |
| दरमाणशीं रोजचें उत्पादन ( अश्वशक्ति × तास ) | १३·३८ | ६·६५ | ०·४७ |

हिंदुस्थानांत एकूण उत्पादनांत यंत्रापेक्षा मनुष्यबळाचाच अधिक उपयोग होतं असला तरी कित्येकांस वर्षांतून चार ते सहा महिने काम नाहीं म्हणून केवढें तरी मनुष्यबळ फुकट जात आहे! उलट अमेरिकेंत ४ कोटि, ९० लक्ष लोकसंख्येपैकी ३ कोटि, ५० लक्ष लोक दररोज किमान आठ तास तरी खपत आहेत व ते यंत्रांचें सहाय घेत आहेत. यांत्रिक शक्तीनें अधिक उत्पादन करणें आणि अधिक माणसांना काम देणें असा दुहेरी प्रश्न हिंदुस्थानला भेडसावीत आहे.

आपल्या देशाला स्वतंत्र दृष्टिकोन नाहीं, ध्येय नाहीं, निश्चित आखलेला कार्यक्रम नाहीं. यांवर तोडगा म्हणून सर एम्. विश्वे-श्वरय्या प्रादेशिक नियोजन सुचवितात.

प्रत्येक जिल्ह्यांत तीस लक्ष रुपयांहून अधिक भांडवल लागणारे कारखाने असावेत; सर्वसाधारण लोकांस घरबसल्या करतां येतील असे धंदे सुरू करावेत.या सर्वांस लागणारें भांडवल सरकारनें व धनिकांनीं द्यावें. सरकारचा पाठिंबा असला म्हणजे इतरांना पैसे गुंतविण्यास धास्ती वाटणार नाहीं. परदेशांत चालविण्यांत येणाऱ्या उद्योग-धंद्यांची आणि व्यापारउदिमाची माहिती देणारें साप्ताहिक सुरू करावें. औद्योगीकरणाचा कार्यक्रम ठरविल्या-प्रमाणें पार पडत आहे कीं नाहीं ह्याची वेळोवेळीं चौकशी कर-ण्यांत येऊन नवीन सूचना देण्यांकरितां, सरकारी नवीन खातें निर्माण करण्यांत यावें. या पद्धतीवर नियोजन केलें असतां हिंदुस्थानचें औद्योगीकरण झपाट्यानें होईल असा सर एम्. विश्वेश्वरय्यांना विश्वास वाटतो.

---

**जपान व मँच्युक्युओकडे विमानमार्गें टपाल**

ब्रिटिश ओव्हरसीज एअरवेजनें बँकॉकपर्यंत व तेथून थाइलँड-जपान-मँच्यूक्युओ मार्गानें मँच्युक्युओपर्यंत विमानांतून टपाल जाण्याची व्यवस्था आतां झाली आहे. एका आठवड्यांत टपाल इष्ट स्थळीं पोचूं शकेल.

---


## नोटीस

### दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागीदारांची सहावी साधारण सभा रविवार, ता. २३ फेब्रुवारी १९४१ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां ( स्टँ. टा. ) बँकेचे रजिस्टर्ड ऑफिस, काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मी रोड, पुणें शहर, या ठिकाणीं खालील कामासाठीं भरेल.

( १ ) बँकेचा ता. ३१ डिसेंबर १९४० अखेरचा ताळेबंद, नफातोटापत्रक, आणि डायरेक्टरबोर्डाचा व ऑडिटर्सचा रिपोर्ट यांचा विचार करणें.

*( २ ) डिव्हिडंड मंजूर करणें.

( ३ ) निवृत्त होणाऱ्या ( फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या ) तीन डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टरांची निवडणूक करणें.

( ४ ) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

( ५ ) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें.

बोर्डाच्या हुकुमावरून,
पुणें शहर: ता. २६-१-१९४१. एम्. व्ही. गोखले मॅनेजर

वि. सू.–बँकेचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें ता. २०-२-४१ ते २७-२-४१ ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.

* डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तें शुक्रवार ता. १४ मार्च १९४१ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंटस् भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यांवर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

## ब्रिटिश पौंडांतील हिंदी कर्जाची परतफेड

### पौंडांतील कर्जरोखे

हल्लीं हिंदुस्थान सरकारास हिंदुस्थानांतच कर्जे उभारणें अवघड जात नाहीं. पूर्वी हिंदुस्थान सरकारनें रेल्वेजवर व पाटबंधाऱ्यांवर मोठाले खर्च केले, त्यासाठी लागणारी रकम बहुंशीं ग्रेट ब्रिटनमध्येंच उभारावी लागली. त्यांपैकी कांहींची परतफेड झाली आहे, परंतु अद्याप कांहीं कर्जे शिलक आहेत. गेल्या महायुद्धाचे वेळीं व त्यानंतर हिंदुस्थान सरकारनें हिंदुस्थानांतच कर्जे उभारलीं व सरकारास पुरेशा रकमाहि मिळाल्या. महायुद्धापूर्वी, एका वर्षांत मिळालेल्या रुपयांतील कर्जाची सर्वांत मोठी रकम ४½ कोटींचे वर गेलेली नव्हती. त्यानंतर, हिंदुस्थानांतच अधिकाधिक कर्जे मिळत गेलीं. ज्या कर्जरोख्यांची रकम ग्रेट ब्रिटनमध्यें उभारण्यांत आली असून ज्यांचें मुद्दल व व्याज पौंडांत फेडावयाचें आहे, ते पौंडांतील कर्जरोखे होत. ह्याचे उलट, रुपयांतील कर्जरोखे आहेत.

### परतफेडीची व्यवस्था

ब्रिटिश सरकारच्या सहकार्यानें आणि मदतीनें हिंदुस्थान सरकार आपलें ग्रेट ब्रिटनमधील १ अब्ज, २० कोटि रुपयांचें कर्ज आतां फेडून टाकणार आहे. ह्याचा अर्थ, हिंदुस्थान सरकारच्या ब्रिटिश पौंडांतील कर्जरोख्यांची जागा रुपयांतील कर्जरोखे घेतील, हा होय. युद्धास प्रारंभ झाल्यापासून रिझर्व्ह बँकेनें ग्रेट ब्रिटनमध्यें शिल्लक वाढविली आहे, तिचा उपयोग कर्ज फेडण्याचे कामीं होईल. ब्रिटिश सरकारनें, तेथील लोकांनीं आपले पौंडांतील हिंदी कर्जरोखे परत केलेच पाहिजेत, असा जाहीरनामा काढला आहे. हे कर्जरोखे धारण करणारांस सरकारनें ठरवून दिलेल्या किंमतीप्रमाणें रकम मिळेल. हिंदुस्थान सरकारनेंहि, डिफेन्स ऑफ इंडिया रूल्सखाली ऑर्डर काढून, ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांजवळचे पौंडांतील हिंदी कर्जरोखे परत मागितले आहेत. ब्रिटिश सरकारनें ठरवून दिलेल्या किंमतीचें १ शि. ६ पे. = १ रुपया ह्या दरानें रुपयांत रूपांतर करून तेवढी रकम हे कर्जरोखे धारण करणारांस मिळेल. अथवा, ७ पौंड १० शि. = १०० रुपये ह्या दरानें तेवढ्या दर्शनी किंमतीचे रुपयांतील कर्जरोखेहि त्यांस घेतां येतील.

### रिझर्व्ह बँक कायद्यांतील सध्याची तरतूद

ब्रिटिश पौंडांतील कर्जरोख्यांची परतफेड वरीलप्रमाणें घडवून आणण्यांत येईल. हिंदुस्थान सरकारनें त्यासाठीं एक ऑर्डिनन्स काढून, रिझर्व्ह बँक कायद्यानें बँकेवर घातलेले निर्बंध दूर केले आहेत. हिंदी रिझर्व्ह बँकेच्या बाबतींत, नोटांकरितां जो निधि असावयाचा, त्याचे घटक कोणते असावेत व ते कोणत्या प्रमाणांत असावेत ह्याची व्यवस्था रिझर्व्ह बँक कायद्याच्या ३३ व्या कलमानें केलेली आहे. सोनें, सोन्यांतील नाणीं, पौंडांतले रोखे, रुपये व रुपयांतले रोखे, ह्या सर्वांची बेरीज एकूण नोटांच्या किंमतीइतकी असली पाहिजे. ह्यांपैकी, हिंदुस्थान सरकारच्या कर्जरोख्यांची किंमत एकंदर जिंदगीच्या एक चतुर्थांशापेक्षा किंवा ५० कोटि रुपयांपेक्षा अधिक असतां कामा नये, असा सध्याचा कायदा आहे. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिलच्या मंजुरीनें ही रकम १० कोटींनीं वाढवितां येते. एकंदर निधीच्या दोन तृतियांशापेक्षा कमी नाहीं, इतक्या रकमेचें सोनें, सोन्याचीं नाणीं किंवा पौंडातले रोखे असावे व त्यांपैकी सोनें आणि सोन्याचीं नाणीं ४० कोटि रुपये किंमतीपेक्षां कमी असतां कामा नये, असा निर्बंध आहे.

### ऑर्डिनन्सनें केलेली दुरुस्ती

ऑर्डिनन्सनें ह्या सर्वांत दुरुस्ती केली आहे. आतां नव्या व्यवस्थेप्रमाणें, जिंदगीच्या दोन पंचमांशापेक्षां अधिक रकम सोनें, सोन्याचीं नाणीं व ब्रिटिश पौंडांतील रोखे, ह्यांत गुंतविलेली असली पाहिजे व सोन्याची किंमत ४० कोटिपेक्षां अधिक असली पाहिजे एवढेच निर्बंध आहेत. ह्याचा अर्थ रुपयांतील रोख्यांची, रुपयांची व अंतर्गत बिलांची किंमत एकूण जिंदगीच्या तीन पंचमांशापर्यंत असली तरी चालेल; त्यापेक्षा अधिक चालणार नाहीं. मूळ कायद्यांत सांगितलेला ५० कोटींचा निर्बंध आतां राहिलेला नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या पौंडांतील कर्जरोख्यांचें रूपांतर हिंदी रुपयांतील रोख्यांत करण्यास वरील दुरुस्तीचा उपयोग होणार आहे.

### श्री. चुनीलाल वी. मेथा ह्यांचें मत

" ब्रिटिश पौंडांतील कर्जरोख्यांचें रूपांतर करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारास, रिझर्व्ह बँकेकडून कदाचित् कर्जाऊ रकम घ्यावी लागेल व नंतर ती परत फेडण्यासाठीं कर्ज उभारावें लागेल; तसेंच रिझर्व्ह बँकेजवळील सुवर्ण संचयाची किंमत तोळयास २१ रु. ४ आ. दरानें धरण्यांत आली आहे, ती चालू दरानें धरण्यांत येण्याचा संभव आहे. त्यामुळें जुन्या किंमतीचें ४४ कोटि रुपयांचें सोनें ८८ कोटि रुपयांचें होईल. हिंदुस्थानाखेरीज बाकी बहुतेक सर्व देशांनीं सोन्याच्या किंमतींतील वाढीस अनुसरून आपल्या चलन खात्यांतील सोन्याची किंमत पुनः ठरविलेली आहे. " असें मत श्री. चुनीलाल मेथा ह्यांनीं व्यक्त केलें आहे.

कर्जरोख्यांच्या रूपांतरामुळें ब्रिटिश सरकारास तेवढी रकम युद्धखर्चास उपयोगी पडेल. परराष्ट्रीय कर्जरोख्यांचा विनियोग युद्धखर्चासाठीं करण्याची सोय ग्रेट ब्रिटनला उपलब्ध आहे, तशी शत्रुपक्षास नाहीं. ग्रेट ब्रिटननें पूर्वी इतर राष्ट्रांत गुंतविलेल्या रकमांचा त्या देशास आतां महत्त्वाचे प्रसंगीं चांगला उपयोग होत आहे. हिंदुस्थानचें परराष्ट्रीय देणें आतां त्यामुळें नाहीसें होत आहे, हा त्याचा फायदाच आहे.

---

## ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.

पुणें येथील दि ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनीनें १९४० सालीं एकंदर रु. ७,३६,०२२ इतक्या रकमेचें नवीन काम मिळविलें. त्यांपैकीं रु. ५,८३,१८२ रकमेचें काम पूर्ण होऊन त्यांचें पॉलिसींत रूपांतर झालें. गेल्या ३ वर्षांतील कंपनीच्या कामाचे आकडे खालीं दिले आहेत; त्यावरून कंपनीची प्रगति दिसून येते:

| साल | एकंदर मिळवलेलें काम<br>रु. | पुरें झालेलें काम<br>रु. |
|---|---|---|
| १९३८ | ४,६८,७७५ | ३,७४,९३८ |
| १९३९ | ५,८५,५५२ | ४,०७,५२० |
| १९४० | ७,३६,०२२ | ५,८३,१८२ |

---

### खग्रास सूर्यग्रहण

२१ सप्टेंबर रोजीं चीनमधील आठ प्रांतांतील लोकांना खग्रास सूर्यग्रहण पहाण्यास मिळेल.

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जे इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिति अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | ११२—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९५—१४ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—८ |
| ३% (१९६३–६५) ... ... ... | ९४—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) ... ... | ११४—६ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें मांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १४३—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% ... | ४४—४ |
| इंपिरिअल बँक (५००) १२% ... ... | १५६०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०५—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३% ... ... | १३०—४ |
| कराची (१००) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १५०७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १६४०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा–जामनेर (१००) १½% ... ... | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९८७—८ |
| तापी व्हॅली (५००) ८% ... ... ... | ६९५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. ... ... ... | २०१—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. ... ... | ४६—४ |
| शिंदिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | २०—२ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ... | ४१–१२ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ३९६०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २१५—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) १८ रु. १० आ. ... | १४९—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३६४—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८३७—८ |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | १३३—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–१–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३–४–० |

**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**"अर्थ" ग्रन्थमालेंतील पुस्तकें**
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरूं केलेल्या
**OUR HOME**
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
**उतरण्यास या.**
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचे तेल
स्थापना १९०९
डोकें शांत रहातें. केंस मजबूत होतात.
गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.

धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. ४)

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल ब्लॅकटूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
PARADKAR TAILORING ACADEMY POONA
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

**For Collegians**
**Wooden & Iron Furniture**
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**
*Work-Shop Address:* 153 Kasaba, Poona 2
*Branch No. 1* Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १९ फेब्रुवारी, १९४१ अंक ८

सर्व तऱ्हेचीं कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

## ' पायोनियर डाइंग हाऊस '

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

९ वा आठवडा

नवयुग चित्र

## लग्न पहावं करून

दिग्दर्शक : विनायक

भूमिका : दामुअण्णा मालवणकर

मिनर्व्हा—पुणें

देशी औषधें तयार करणारा महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना

पंडु, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

अशक्ततेवर

## रक्तवर्धक

वापरा.

सर्वत्र मिळतें.

—ः केंद्रें ः—

पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

पुणें ४.

*For Collegians*—

Wooden & Iron Furniture

FOR SALE & HIRE

*Your Popular Old Shop*

**SHEVAK BROS.**

*Work-shop Address:*
153. KASABA POONA 2

*Branch No. 1*
SHEVAK QUARTERS
*Near Fergusson College. POONA 4*

## विविध माहिती

**बँकास सुटी**

सोमवार ता. २४ फेब्रुवारी रोजीं महाशिवरात्रीनिमित्त बँका बंद राहतील.

**चीन-ब्रह्मदेश रस्ता**

आपल्या बाँबच्या वर्षावामुळें चीन-ब्रह्मदेश रस्ता वहातुकीस निरुपयोगी झाला आहे, हें जपानी सरकारचें म्हणणें चूक असून त्या रस्त्यावरून पूर्ववत् वहातूक चालू आहे असें मॉस्को येथील रेडिओवरून जाहीर करण्यांत आलें आहे.

**चेक्सची देवघेव**

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें ७ फेब्रुवारीअखेर संपलेल्या आठवड्यांत १८३/४ कोटि रुपये किंमतीच्या १,२१,३५८ चेक्सची देवघेव झाली.

**सूचना पाठविण्याची मुदत वाढविली**

मुंबई सरकारनें शेतकरी कर्जनिवारणाच्या बिलास अनुसरून नियम तयार केले आहेत, त्यासंबंधीं सूचना अगर तक्रारी पाठविण्याची मुदत ३१ मार्च अखेर होती, ती आतां सरकारनें १५ मार्चपर्यंत वाढविली आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार**

स्थानिक स्वराज्य संस्थांचा करवसुलीचा कारभार अत्यंत ढिला आहे. आळंदी व खेड येथील म्युनिसिपॅलिट्यांची वसुली बिलकूल थकलेली नाहीं. तथापि सिंदखेडें, होनावर, इंद्रापूर, यावल, फैजपूर इत्यादि ठिकाणीं थकलेली बाकी एकूण येण्याच्या ६०% पेक्षा अधिक आहे. मालेगांव व धारवाड येथील म्युनिसिपॅलिट्यांच्या एकूण येण्याचे मानानें ५०% येणें कर थकलेला आहे. १९३९-४० च्या लोकल ऑडिट खात्याच्या अहवालांत वरील माहिती आढळते.

**रेल्वे रुळांचा युद्धकार्यासाठीं उपयोग ?**

सहा लहान रेल्वे रस्ते तूर्त उखडून टाकण्यांत आले आहेत, कारण ते किफायतशीर होत नाहींत, असें वहातुक मंत्र्यांनीं असेंब्लींत सांगितलें. काढून टाकलेले रूळ हिंदुस्थानाबाहेर युद्धकार्यासाठीं उपयोगांत आणले गेले, तर त्याच्या किंमतीची भरपाई ब्रिटिश सरकार करील, असेंहि ते म्हणाले.

**शर्यतींचें युद्धफंडासाठीं उत्पन्न**

ता. ८ रोजीं मुंबई येथील शर्यतीच्या मैदानावर युद्धफंडासाठीं शर्यतींचा कार्यक्रम झाला, त्यावेळीं १ लक्ष १५ हजार रुपये फंडास मिळाले.

**ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. ११ आणे व्याज**

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ११ आणे पडला.

**कर्जरोख्यांचें रूपांतर**

" हिंदुस्थानच्या ब्रिटिश पौंडांतील कर्जरोख्यांचें रुपयांतील रोख्यांत रूपांतर केल्यामुळें हिंदुस्थान सरकारचे व्याजाचे १३/४ ते २ कोटि रुपये वांचतील. कारण रुपयांतील कर्जरोख्यांवरील व्याजांचा दर अल्प राहील. ह्या रूपांतरामुळें, नवीन कर्ज नाहीं काढलें, तरी सरकारचें भागेल. " असें ना. शांतिलाल आस्कुरण ह्यांचें मत आहे.

**८० हजार ट्रॅक्टर्स**

ग्रेट ब्रिटनमध्यें शेतीचें उत्पादन वाढविण्याची शिकस्त चालू आहे. ८० हजार ट्रॅक्टर्स त्यांत गुंतले आहेत.

**बजेट जवळ आलें**

मध्यवर्ति असेंब्लीच्या बजेट अधिवेशनास ता. १२ रोजीं प्रारंभ झाला.

**डिफेन्स सर्टिफिकिटें गहाण ठेवतां येतील**

५ वर्षें मुदतीचीं पोस्ट ऑफिस कॅश सर्टिफिकिटें गहाण ठेवतां येतात, त्याप्रमाणेंच नवीं डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकिटेंहि ठेवतां येतील, असें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.

**नागपूर येथें रेडिओगृह**

हिंदुस्थानांत नवीन रेडिओगृहें स्थापन करण्याचा प्रश्न सरकार विचारांत घेईल, त्यावेळीं नागपूरचें नांव ध्यानांत ठेवलें जाईल, असें सर ॲन्ड्र्यू क्लो ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

**हिन्दी लष्करी अधिकारी**

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत डेहराडून येथील २१६ उमेदवारांस लष्करांत कमिशनें देण्यांत आलीं आहेत. १२८ उमेदवारांचें शिक्षण तेथें चालू आहे. युद्धास प्रारंभ झाल्यापासून आजतागायत कमिशन मिळालेले, शिक्षण घेत असलेले व शिक्षणासाठीं निवडलेले असे १७५२ हिंदी तरुण आहेत.

**युद्धकैदी**

हिंदुस्थानांत जर्मन युद्धकैदी एकहि नाहीं, परंतु सहस्रावधि इटालिअन युद्धकैदी येथें आहेत, अशी माहिती डिफेन्स सेक्रेटरीनें असेंब्लींत सांगितली.

**ग्रेटब्रिटनमधील हिंदी विद्यार्थी**

हिंदुस्थानाकडे परत येऊं इच्छिणारे कांहीं हिंदी विद्यार्थी ग्रेटब्रिटनमध्यें आहेत, परंतु त्यांचेसाठीं वहातुकीची सोय अद्याप झालेली नाहीं. दोन आगबोटींतून बरींच हिंदी मुलें आणण्यांत आलीं आहेत.

**तांदळाच्या किंमतींत निष्कारण चलबिचल होण्याचें प्रयोजन नाहीं**

मध्य आशियांतील युद्धाच्या रागरंगावरून असें दिसतें, कीं ब्रह्मदेश व हिंदुस्थान ह्यांचेमधील वहातुकीसाठीं आगबोटींचा पुरवठा तात्पुरता थोडा कमी पडेल. ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत तांदळाची आयात होण्याचीहि हीच वेळ आहे. हिंदुस्थानांतील कांहीं ठिकाणीं तांदळाचें उत्पादन नेहमींइतकें आलेलें नाहीं. तांदळाच्या किंमतीमध्यें निष्कारण चलबिचल होऊं नये, ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें ही परिस्थिति स्पष्ट केली आहे व आगबोटींचा तुटवडा तात्पुरताच असून लवकरच वहातुकीची सर्व व्यवस्था होईल, असें जाहीर केलें आहे.

**हिंदुस्थान सरकारचा उत्पन्न खर्च**

डिसेंबर, १९४० अखेरच्या नऊ महिन्यांत हिंदुस्थान सरकारास गेल्या वर्षीच्या तत्सम मुदतीमधील उत्पन्नापेक्षा ८ कोटि रुपये उत्पन्न कमी झालें. खर्च मात्र ९ कोटि रुपयांनीं अधिक झाला. उत्पन्नांतील घटीचें कारण मुख्यतः कस्टम्सच्या उत्पन्नांत ७ कोटींची आलेली तूट, हें होय. खर्चांत वाढ झाली, तीहि मुख्यतः लष्करी खर्चांतच झाली. उत्पन्न व खर्च ह्यांत ३५ कोटींचा फरक पडला आहे. रेल्वेज, पोस्ट व तार खातें व इतर बाबी ह्यांचेकडून मिळणारें उत्पन्न वरील हिशेबांत दाखल नाहीं.

**चीनकडे कपाशीची निर्गत**

१९३९-४० मध्यें हिंदुस्थानानें चीनकडे ६ कोटि, ६८ लक्ष रुपये किंमतीची १ लक्ष २२ हजार टन कपास पाठविली. त्यापूर्वीच्या वर्षी फक्त ३४ हजार टन कपाशीची निर्गत झाली होती.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ८६ |
| २ हिंदी साखरेचें मध्यवर्ती नियंत्रण हवें काय ? | ८७ |
| ३ बँक ऑफ महाराष्ट्र | ८८ |
| ४ स्फुट–विचार | ८९ |
| हिटलरचे नवे डावपेच— आणि त्यांचा प्रतिकार जपान काय करणार ? | |
| ५ लिमिटेड कंपन्यांच्या नांवाची पाटी | ९० |
| ६ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या | ९१ |
| ७ हातमागाच्या धंद्याची पाहणी | ९२ |
| ८ लिटिमेड कंपन्यांस ओव्हरड्राफ्ट देण्याची पद्धत | ९२ |
| ९ हिंदुस्थान-ब्रह्मदेश व्यापार | ९३ |
| ११ निवडक बाजारभाव | ९५ |


# अर्थ

बुधवार, ता. १९ फेब्रुवारी, १९४१

## हिंदी साखरेचें मध्यवर्ती नियंत्रण हवें काय ?

संयुक्त प्रांत आणि बिहार येथील सरकारांनीं स्थानिक साखरेचे कारखाने व उंसाची लागवड ह्यांचें नियंत्रण करण्याचें धोरण अंगिकारल्यामुळें तिकडील कारखान्यांच्या हितसंबंधांमध्यें खळबळ उडाली आहे. हिंदुस्थानच्या इतर भागांत उंसाचें पीक व साखरेचें उत्पादन ह्यांचा विस्तार झाला आहे व होत आहे. ह्याचें कारण गेल्या दोन वर्षांत साखरेस आलेला चांगला भाव आणि इकडील नियंत्रणाचा अभाव हें आहे असें त्यांस वाटत आहे. दोन प्रांतांच्या सरकारांनीं स्थानिक साखरेच्या व उंसाच्या उत्पादनावर नियंत्रण घालावें आणि दुसरीकडे ह्या बाबतींत लोकांस पूर्ण स्वातंत्र्य असावें ह्याचें त्यांस वैषम्य वाटत असून हिंदुस्थान सरकारनें मध्यवर्ती राष्ट्रीय राजकीय सत्ता ह्या नात्यानें त्या प्रकरणीं हस्तक्षेप करावा आणि हिंदी साखरेच्या धंद्यांत एकसूत्रीपणा उत्पन्न करावा अशा सूचना पुढें येत आहेत. सबंध धंद्याच्या दृष्टीनें, कारखान्यांची वाढ होऊन साखरेच्या उत्पादनांत वर्षानुवर्ष भर पडत जावी आणि साखरेचे भाव खाली जाऊन सर्वांचेंच नुकसान व्हावें हें अनिष्ट आहे. हा युक्तिवाद त्या सूचनांच्या मुळाशी आहे. दक्षिणेकडील साखरेचे कारखानदार व प्रांतिक सरकारें ह्यांनीं ह्या विषयाकडे लक्ष पुरवून आपल्या हिताची जोपासना वेळींच केली पाहिजे. साखरेच्या राष्ट्रीय धंद्याच्या हिताशी दक्षिणेकडील ऊंस पिकवणारे शेतकरी व साखरेचे कारखानदार ह्यांचें हित निगडित झालेलें आहे, ह्यांत शंका नाहीं. तथापि प्रत्येक प्रांत व संस्थान ह्यांच्या आर्थिक परिस्थितीची जबाबदारी तेथील राज्यकर्त्यांवर व जनतेवर असल्यानें मध्यवर्ती औद्योगिक धोरण स्वतःस बाधक होऊं न देण्याची काळजी त्यांनीं घेतली पाहिजे. अंतर्गत स्पर्धा वाढत चालली आहे तीमध्यें आपला टिकाव ह्यापुढें कसा लागेल ह्याचा विचार कारखानदारांनीं केला पाहिजे.

मध्यवर्ती सरकारनें किंवा एखाद्या मध्यवर्ती प्रातिनिधिक मंडळानें स्वदेशी साखरेच्या धंद्याचें नियंत्रण करून अंतर्गत स्पर्धेमुळें त्यावर आपत्ति ओढवणार नाहीं अशी व्यवस्था करावी ह्या आशयाची वर निर्दिष्ट केलेली सूचना कोणत्या मुद्यांवर आधारलेली आहे ह्याची फोड थोडीशी तपशीलवार करणें आवश्यक आहे. स्वदेशी साखरेच्या धंद्यास संरक्षण १९३२ सालीं देण्यांत आलें. त्याबरोबर ह्या कारखान्यांत फायदा आहे ह्या समजुतीनें भांडवलवाले पुढें सरसावले आणि कारखान्यांचा विस्तार होऊं लागला. परस्पर चढाओढीनें धंद्याचें नुकसान होऊं नये म्हणून कारखानदारांनीं आपला इंडियन शुगर मिल्स असोसिएशन ह्या नांवाचा संघ स्थापिला आणि साखर विक्रीची सर्वमान्य योजना अमलांत आणण्याचा प्रयत्न चालू केला. १९३६-३७ सालीं हिंदुस्थानांत जनतेस लागणारी सर्व साखर देशामध्येंच तयार करण्याचें सामर्थ्य स्वदेशी कारखान्यांत उत्पन्न झालेलें आढळून आलें. १९३७ सालीं टारिफ बोर्डाची चौकशी झाली, तीमध्यें हिंदी कारखान्यांत जरूरीच्या मानानें फाजील साखर उत्पन्न होणार ही गोष्ट स्पष्ट दिसून आली. त्यानंतर साखरेचे नवीन कारखाने देशांत निघाले आणि जुन्यांचा विस्तार झाला. तथापि, संयुक्त प्रांत व बिहार ह्यांमध्यें दोन वर्षें उंसाचें पीक खराब झाल्याकारणानें तेथील साखरेचें उत्पादन कमी झालें आणि मंदीच्या भावाची व नुकसानीची कारखान्यांची आपत्ती टळली. १९३९-४० सालीं ऊंस व साखर ह्यांचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणांत झाल्यानें त्या संकटानें पुन्हां डोकें वर उचललें. १९३८-३९ मध्यें केलेल्या एका अंदाजाप्रमाणें हिंदी कारखान्यांचें ऊंस गाळण्याचें सामर्थ्य रोजीना १ लक्ष टन होतें. साखरेचा सरासरीचा उतारा ९½ टक्के व कारखान्यांचे कामाचे दिवस वर्षांतून १३० धरले तर हिंदुस्थानची एकूण उत्पादन शक्ति १३ लक्ष ४२ हजार टन इतकी होते. ह्या अजमासानंतर नवीन साखरेचे कारखाने निघाले आहेत व जुन्यांत विस्तार झाला आहे. त्यामुळें हें उत्पादन सामर्थ्य आतां १४ लक्ष टन आहे असें मानण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांत साखरेस एकूण मागणी किती आहे त्याचा नक्की आकडा सांगतां आला नाहीं. तरी १२ लक्ष टनांपेक्षा अधिक साखर येथें खपूं शकत नाहीं असें मानण्यास जागा आहे. गुळापासून व खांडसारी पद्धतीनें बनवलेल्या साखरेचा ह्या १२ लक्षांमध्यें अंतर्भाव होतो, हें विसरतां कामा नये. म्हणजे दर वर्षीं दोन-तीन लक्ष टनांची शिल्लक राहील अशी पुरवठा मागणीची परिस्थिति आहे.

स्वदेशी साखरेचें मामुली वार्षिक उत्पादन १४ लक्ष टन आणि वर्षाचा मामुली खप १२ लक्ष टन अशी स्थिति असतांहि उत्पादन वाढत गेलें आहे ह्याचें कारण वर नमूद करण्यांत आलेंच आहे. खप कायम राहून उत्पादन दोन वर्षें घटलें, ह्या कारणानें साखरेला तेजी होती आणि धंद्यांतल्या फायद्याच्या अपेक्षेनें त्यांत अधिक भांडवल घातलें गेलें. संयुक्त प्रांत आणि बहार ह्यांमधील प्रांतिक सरकारांनीं साखर कारखान्यांवर नियंत्रण घातलें, पण इतरत्र अशा नियंत्रणाच्या अभावीं धंद्याचा विस्तार झाला. ह्या योगानें स्वदेशी कारखानदारांत परस्पर स्पर्धा उत्पन्न होऊन साखरेचे भाव उतरणें आणि धंद्यांतला नफा घटणें अपरिहार्य झालें. कांहीं काळपर्यंत कित्येक प्रांतांतल्या नवीन कारखान्यांस फायदा झाल्यासारखें वाटलें तरी साखरेच्या धंद्याकडे सबंद राष्ट्राच्या दृष्टीनें पाहिलें तर उत्पादनाची वाढ व घटींचे भाव ह्या गोष्टी हानिकारकच आहेत. ह्यासाठीं अखिल भारतीय स्वरूपाचें ह्या धंद्याचें नियंत्रण अगत्याचें झालें आहे. संयुक्त प्रांत व बिहार येथील कारखानदारां-

च्या वतीनें ही सूचना करण्यांत आली आहे. ह्या प्रांतांत चालू व पुढच्या हंगामांतहि १९३९-४० सालाच्या निम्म्या इतकेंच साखरेचें उत्पादन व्हावें असा नियम प्रांतिक सरकारांनीं केला आहे. ह्याचा परिणाम इतर प्रांतांत साखरेचे कारखाने धाढण्यास उत्तेजन मिळण्यांत होईल असें तक्रार करणाऱ्या लोकांचें म्हणणें आहे. ते हें विसरतात कीं वरील सरकारांनीं साखरेचे भाव पडूं नयेत, स्थिर रहावे, अशी व्यवस्था केली असून ती साखरेच्या धंद्यास फायदेशीर आहे. दुसरे असें आहे कीं हिंदुस्थानासारख्या मोठ्या देशांत एक दोन प्रांतांतच एखादा धंदा मर्यादित होऊन इतर प्रांतांस त्यांवर अवलंबून रहावें लागणें अन्यायाचें व अनिष्ट आहे. अनुकूल परिस्थितींत कोणताहि धंदा स्थापण्याची संधि सर्वांस मिळणें योग्य आहे. तिच्या विरुद्ध ओरड करणें योग्य नाहीं.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

( वार्षिक सभा, २३-२-४१ सायंकाळीं ५ वाजतां )

वरील बँकेस, ३१ डिसेंबर, १९४० असेर संपलेल्या वर्षी मागील सालांतील शिल्लक ३८० रुपये धरून २०,६९२ रु. ५ आ. ८ पै नफा झाला. त्याची वाटणी डायरेक्टरांनीं खालील-प्रमाणें सुचविली आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| रिझर्व्ह फंड ( सदर फंड आतां रु. १५,००/-होईल ) | रु. ४,१०० | ० | ० |
| कॉन्टिन्जन्सी फंड ( सदर फंड आतां रु. २४,०००/-होईल ) | रु. ७,००० | ० | ० |
| संशयित आणि बुडीत कर्जांकरितां रिझर्व्ह (सदर फंड आतां रु. २०००/-होईल) | रु. १,००० | ० | ० |
| शेअरबद्दल भरलेल्या रकमेवर ता. ३१ डिसेंबर १९४० रोजीं पूर्ण होणाऱ्या वर्षासाठीं द. सा. द. शे. ४ टक्केप्रमाणें प्राप्तीवरील कर-माफ डिव्हिडंड देणें | रु. ६,५१८ | ० | ० |
| नोकर वर्गास बोनससाठीं | रु. १,४०० | ० | ० |
| पुढील सालच्या हिशेबांत ओढण्यास | रु. ६७४ | ५ | ८ |
| | रु. २०,६९२ | ६ | ८ |

बँकेनें १९३८ सालीं मुंबई येथें एक शाखा उघडली. पुणें येथें डेकन जिमखान्यावर ९-मे, १९४० रोजीं बँकेनें एक स्थानिक शाखा सुरू केली. ह्या दोन्ही शाखांची प्रगति व्यवस्थित चालू आहे.

शनिवार ता. ८ फेब्रुवारी, १९३६ रोजीं बँकेची स्थापना सर सोराबजी पोचखानवाला ह्यांचे हस्तें झाली. पहिल्या वर्षअसेर बँकेचें १लक्ष ४½ हजारांचें वसूल भांडवल जमलें व तिचेकडे ७ लाखांवर ठेवी आल्या. पहिल्याच वर्षी बँकेस ६३५ रुपये नफा झाला, त्याचा विनियोग रिझर्व्ह आणि प्राथमिक खर्च ह्यांकडे करण्यांत आला. दुसऱ्या वर्षअसेर भरणा झालेलें भांडवल १ लक्ष, १२½ हजार रुपये झालें, ठेवींचा आकडा १२ लाखांवर गेला व निव्वळ नफा १३¾ हजार रुपये उरला. भागीदारांस करमाफ ३½% डिव्हिडंड मिळालें व त्यानंतर तें दरसाल मिळत गेलें. तिसऱ्या वर्षअसेर बँकेचें वसूल भांडवल १½ लक्ष रुपये झालें व ठेवींचा आकडा १७ लाखांवर गेला. ३१ डिसेंबर, १९३८ असेर, तिसऱ्या वर्षी, तिला१७½ हजार रुपये नफा झाला. बँकेच्या चवथ्या वर्षअसेर वसूल भांडवलाची रक्कम १½ लाखांवर गेली व आतां१९४० असेर तें भांडवल १ कोटि, ८१ हजार रुपये झालें आहे. ठेवींचा आकडाहि २७½ लाखांवर गेला आहे. दुसऱ्या वर्षापासून बँकेनें ३½% करमाफ डिव्हिडंड दिलें व आतां १९४० सालचें ४% करमाफ डिव्हिडंड देण्यांत येणार आहे. बँकेच्या ताळेबंदांत खर्चातून तयार केलेला जिंदगीचा आकडा कोणताहि नाहीं. रिझर्व्ह फंड, कॉन्टिन्जन्सी फंड व संशयित आणि बुडीत खर्चासाठी फंड ह्यांची रक्कम मिळून १९४० असेरचा ताळेबंद मंजूर झाला, म्हणजे ४१ हजार रुपयांवर जाईल.

### १९४० च्या ताळेबंदांतील प्रमुख आकडे

**भांडवल व देणें**

| | रुपये |
|---|---|
| वसूल भांडवल | १,८१,२२५ |
| रिझर्व्ह फंड | ११,००० |
| कॉन्टिन्जन्सी फंड | १७,००० |
| संशयित व बुडीत कर्ज फंड | १,००० |
| ठेवी | २७,५२,३७५ |
| १९४० सालचा निव्वळ नफा | २०,३१२ |
| **जिंदगी व देणें** | |
| कर्जें, कॅश क्रेडिट, ओव्हरड्राफ्ट व इतर कर्जें | १३,०५,५५८ |
| इन्व्हेस्टमेंट्स ( सरकारी रोखे ) | ६,८१,६२९ |
| „ ( डिबेंचर्स, शेअर्स इ. ) | ४,५२,५५६ |
| बँकांत व रोख शिल्लक | ५,०२,५४७ |

### विमापॉलिसीचे तारणावर कर्ज कसें द्यावें ?

आयुर्विमा पॉलिसीचे तारणावर कर्ज देण्यापूर्वी बँकरनें, पॉलिसी ज्या विमा कंपनीची असेल, तिच्या परिस्थितीबद्दल व दर्जाबद्दल खात्री करून घ्यावी. पॉलिसी चांगल्या कंपनीची नसल्यास ती स्वीकारूं नये. हप्त्याची शेवटची पावती त्यानें पहाण्यासाठी मागून घ्यावी. विमेदाराचें वय कंपनीनें मान्य केलें आहे किंवा नाहीं हें पाहून तें केलेलें नसल्यास करवून घ्यावें. पॉलिसीची सोडकिंमत किती आहे ह्याची चौकशी करावी व ती पॉलिसी कोठें लावून दिलेली नसल्याविषयीं खात्री करून घ्यावी. विमेदाराचे मृत्यूचीच ती सरळ पॉलिसी आहेना, हें बँकरनें नीट पहावें. सोडकिंमतीपेक्षा कमी रकम बँकरनें देऊं करावी व बँकेचे नांवानें पॉलिसी बेचन करून घ्यावी. बेचनाची नोंद विमा कंपनींत करवून घेतली पाहिजे. कर्जदाराकडून बँकरनें प्रॉमिसरी नोटहि घ्यावी व "ठराविक वेळीं मी हप्ते भरीन व ते तसे न भरल्यास बँकरला ते भरण्यास व त्यांची रकम माझे नांवें मांडण्यास अधिकार आहे," अशा अर्थाचें पत्र कर्जदाराकडून लिहून घ्यावें. विमा पॉलिसीचे तारणासारख्या सुरक्षित तारणावर कर्ज देते वेळीं इतक्या प्रकारचे कागदपत्र करण्याची आवश्यकता नाहीं असें कर्जदार नेहमींच म्हणेल, परंतु बँकरनें आपल्या पैशाच्या सुरक्षिततेसाठी शक्य तों प्रयत्न करणें, हें त्याचे दृष्टीनें योग्यच आहे.

## स्फुट विचार

### हिटलरचे नवे डावपेंच आणि त्यांचा प्रतिकार

मुसोलिनीनें संधिसाधूपणानें फ्रान्सच्या अडचणीचा फायदा घेतला आणि जर्मनीच्या बाजूनें युद्धांत उडी घातली. हिटलरच्या विजयाचें फळ आपल्या तोंडांत अनायासें पडेल ही त्याची कल्पना खोटी ठरली आहे इतकेंच नव्हे तर, त्यास आफ्रिकेंतील आपल्या मुलखांतून पलायन करावें लागलें आहे. भूमध्य समुद्रांत इंग्लंडला पायबंद घालण्यासाठीं इटलीचा उपयोग करण्याचा हिटलरचा बेत होता तो सपशेल फसला आहे. मुसोलिनी व हिटलर ह्यांनीं इंग्लंडच्या विरुद्ध दोस्ती केली असली तरी ते एकमेकांविरुद्ध डावपेंच करीत आहेत आणि परस्परांचे हेतु ओळखून आहेत. इटलीस रणांगणांत स्वतःच्या मनगटाच्या जोरावर कांहींच करतां आलेलें नाहीं. ग्रीस विरुद्ध मुसोलिनीनें निष्कारण युद्ध पुकारलें, पण त्यांतहि त्यास माघार खावी लागली आहे. ह्या असहाय व फजितीच्या स्थितींत इटलीस जर्मनीची मदत मागणें अपरिहार्य झालें असून आणि आपल्या दोस्ताच्या सहाय्यास धांवणें हिटलरलाहि आवश्यक आहे. ह्या मदतीच्या योगानें हिटलरची इटलीवरील पकड घट्ट होणार असून ब्रिटिशांस भूमध्यसमुद्रांत त्रास देण्याचें साधन त्याच्या हातीं येणार आहे. अमेरिकेचें सहाय्य उघडपणानें व भरपूर रीतीनें इंग्लंडला मिळणार हें आतां निश्चित झाल्याकारणानें युद्धांतला मुळचा डाव टाकण्याची त्याची तयारी चालली आहे. इंग्लंडवर हल्ला चढवण्याच्या प्रसंगीं फ्रान्स, स्पेन व बाल्कन्स मधलीं राष्ट्रें आणि त्याचप्रमाणें जपान ह्यांस एकाच वेळीं उठवण्याचा हिटलरचा बेत असावा असा तर्क आहे. रुमानिया जर्मनीनें पचवलाच आहे आणि आतां बल्गेरियामध्यें घुसण्याची त्याची तयारी चालली आहे. इकडे व्हिशी येथील मंत्र्यांस फ्रेंच बंदरें व आरमार आपल्या हातीं देण्यास भाग पाडण्याच्या कारवाया तो करीत आहे. आणि स्पेनलाहि गुंतवण्याची त्याची खटपट आहे. फ्रँको व मुसोलिनी ह्यांची मुलाखत ह्याच हेतूनें घडवून आणली गेली आहे फ्रान्स आफ्रिकेंतील फ्रेंच सत्ता व स्पेन ह्यांच्या संगनमताचें भूमध्य समुद्रांतलें राजकारण हिटलरला लढावयाचें आहे असा रंग दिसतो. मि. चर्चिल ह्यांनीं त्याचे हे डावपेंच आपण जाणून आहों हें स्पष्ट दर्शवून इंग्लंडला कोणत्या प्रकारची तयारी केली पाहिजे ह्याची कल्पना ब्रिटिश जनतेस नुकतीच दिली आहे. जलनौकांच्या सहाय्यानें इंग्लंडचीं व्यापारी जहाजें बुडवून ब्रिटिशांस घेरून टाकण्याची हिटलरनें धमकी दिली आहे. अमेरिकेची मदत वाढत्या प्रमाणांत येऊं लागेल त्या मानानें हल्ल्याच्या भीतीची तीव्रता कमी होणार आहे. हल्ल्याची तरवार ब्रिटनच्या डोक्यावर सारखी लटकत ठेवण्याचाहि हिटलरचा बेत असूं शकेल. पण ही परिस्थिति फार वेळ टिकूं शकणार नाहीं. ब्रिटिश लढाऊ विमानें केवळ संरक्षक कार्य करून स्वस्थ बसलेलीं नाहींत. त्यांचें चढाईचें धोरण अधिकाधिक प्रभावी होत आहे व त्यांच्या हल्ल्यांचा प्रसाद विस्तृत प्रमाणांत जर्मनीस मिळत आहे. इटलीच्या पराभवामुळें हिटलरच्या लढाऊ योजनांत बदल करावा लागला असला पाहिजे, आणि त्याच कारणानें इंग्लंडवरील त्याचा हल्ला लांबणीवर पडला आहे. फ्रान्स, स्पेन, बाल्कन राष्ट्रें आणि जपान ह्यांची एकत्र मोट बांधण्याचा प्रयत्न करण्याचा प्रसंग त्याचेवर आला आहे. ह्याच्या मुळाशीं ब्रिटिशांचा आफ्रिकेंतील पराक्रम व इटलीची तेथें झालेली फजिती हींच कारणें आहेत. स्वातंत्र्य व लोकसत्ता ह्यांचे संरक्षणार्थ लढणारीं राष्ट्रें एका बाजूस आणि जुलमी व एकतंत्री राज्यकर्ते दुसऱ्या बाजूस असा लढा आतां स्पष्टपणें चालू झाला आहे आणि त्यांत स्वातंत्र्येच्छू लोकांस जय मिळणार ह्यांत शंका नाहीं. त्यांनीं निष्ठेनें व निश्चयानें मात्र लढलें पाहिजे. ह्याची जाणीव अमेरिकेस चांगली आहे.

---

### जपान काय करणार ?

जर्मनी, इटली व जपान ह्यांच्या त्रिकुटानें परस्परांस सहाय्य देऊन स्वतांचें हित साधण्याचा बेत केला आहे. जपानच्या मनांत चीनमध्यें आपली सत्ता स्थापून स्वतःच्या साम्राज्याचा विस्तार करावयाचा आहे. चीनमधील जपानी युद्ध अमेरिकेस पसंत नाहीं आणि पॅसिफिक महासागरांत जपानची सत्ता वाढणें अमेरिकन संघाच्या स्वातंत्र्यास बाधक आहे अशी त्या राष्ट्राची समजूत आहे. अमेरिकेकडून इंग्लंडला होणाऱ्या मदतींत व्यत्यय यावा आणि ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व हिंदुस्थान ह्यांचे बाजूस इंग्लंडचें सामर्थ्य दुभंगावें ह्या हेतूनें हिटलरनें जपानच्या महत्वाकांक्षेस उत्तेजन दिलें आहे. जपानलाहि पॅसिफिक महासागरांत हातपाय पसरण्याची संधी हवीच आहे. ह्या रीतीनें जर्मनी व जपान आपलें स्वार्थी धोरण प्रस्तुत युद्धांत संगनमतानें चालवीत आहेत. ह्याची अमेरिकेस पूर्ण जाणीव आहे आणि प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं ती नुकतीच स्पष्टहि केली आहे. जपानशीं अमेरिकेचें सख्य रहावें अशी त्यांची इच्छा आहे, पण विशिष्ट मर्यादेच्या बाहेर जपान आपलें घोडें दामटूं लागल्यास त्याचा समाचार घेणें अमेरिकेस भाग पडणार आहे. अमेरिकन नागरिकांनीं जपान सोडून स्वदेशीं परत यावें असा सल्ला देण्यांत येत आहे, त्याचा उद्देश स्पष्ट आहे. चीनच्या स्वातंत्र्याविषयींची इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांची सहानुभूति प्रसिद्ध आहे आणि चीनला स्वस्वातंत्र्यरक्षणार्थ त्यांच्याशीं सख्य व सहकार्य राखणें क्रमप्राप्तच आहे. ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड हे ब्रिटिश साम्राज्याचे घटक जपान देशाच्या जवळ आहेत आणि तेथील मंत्री प्रसंग आल्यास स्वतःचें संरक्षण करून जपानला तोंड देण्यास समर्थ असल्याचें त्यांनीं बोलून दाखविलें आहे. हिटलरचा बाल्कन्समध्यें आणि पॅसिफिक महासागरांत युद्धाचें जाळें पसरण्याचा डाव आहे. त्या बाबतींत त्याचें व जपानचें रशियाशीं कांहीं संगनमत झालें आहे कीं काय हें समजण्यास मार्ग नाहीं. पूर्व एशियांत युद्धाच्या ज्वाळा पसरण्यापूर्वी जपाननें दूरवर विचार केला पाहिजे. युरोप व आफ्रिका या खंडांत चाललेल्या युद्धाच्या गंगेंत हात धुवून घेण्याचा जपानचा प्रयत्न त्याच्या अंगलट आल्यावांचून राहणार नाहीं हें त्यानें पक्कें ध्यानांत ठेवावें. अमेरिका आणि इंग्लंड ह्यांच्या संयुक्त बळास त्यास तोंड द्यावें लागणार असून हिटलरच्या नादानें त्यानें अविचारास बळी पडतां कामा नये. पॅसिफिक महासागरांत आपण दंगल केल्यास अमेरिकेचें इंग्लंडला होणारें सहाय्य मर्यादित होईल आणि ह्या रीतीनें हिटलरशीं केलेल्या कराराच्या जबाबदारीमधून आपण मोकळे होऊं अशी जपानची समजूत असेल तर ती खोटी आहे. स्वतःची महत्त्वाकांक्षा आवरून धरण्यांतच जपानचें हित आहे. इंग्लंड व अमेरिका ह्यांच्याशीं वागण्याच्या योग्य मर्यादेचें अतिक्रमण करणें हा आत्मनाशाचा मार्ग आहे हें जपाननें पक्कें लक्षांत ठेवावें. आशिया खंडांतली जपानविषयींची सहानुभूतीची भावना केव्हांच नष्ट झालेली आहे. ह्या स्थितींत त्या राष्ट्रानें वेळींच सावध व्हावें हें उचित आहे.

## लिमिटेड कंपन्यांच्या नांवाची पाटी

(ले.:—श्री. पी. सी. वेंद्रे, बी. ए., एलएल. बी. वकील, पुणें)

अलीकडे बऱ्याच कंपन्या स्थापन होत आहेत व कंपनीचे व्यवस्थेसंबंधीं नवीन कायदे होत आहेत. कंपनीचे कायद्यांत वारंवार झालेल्या सुधारणा माहीत नसल्यामुळें कंपनी चालविणाऱ्या लोकांस, तसेंच सर्वसाधारण जनतेसहि बराच त्रास होतो. अशा स्थितींत मुंबई हायकोर्टानें लिमिटेड कंपनीनें आपले नांवाची पाटी लावणेसंबंधीं दिलेला निर्णय पुष्कळच उपयुक्त व बोधप्रद होईल.

डॉ. एच. एल. बाटलीवाला सन्स आणि कंपनी, लिमिटेड ह्या नांवाची प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नोंदण्यांत आली व मि. कैकोबाद् व त्यांचे वडील मि. कावाशां हे कंपनीचे डायरेक्टर झाले. कंपनीचे रजिस्टर्ड ऑफिस कंपनीच्या मालकीच्या "सकलात व्हिला" या नांवाचे बंगल्यांत होतें. कंपनीनें आपले नांवाची जी पाटी लाविली होती ती रस्त्यावरून दिसण्यासारखी नव्हती. बंगल्याचे हद्दीमधून इमारतीचे हद्दींत आल्याशिवाय सदरची पाटी वाचतां येणें शक्य नव्हतें. त्याबद्दल कंपनी ॲक्टाचे ७३ (अ) कलमाप्रमाणें पाटी लाविली नाहीं म्हणून कंपनी व तिचे डायरेक्टर यांजवर खटला होऊन मॅजिस्ट्रेटनें त्यांजवर गुन्हा शाबीत करून दंडाची शिक्षा केली. रस्त्यावरून जाणारे लोकांस कंपनीचें ऑफिस कोठें आहे हें कळण्याकरितां नांवाची पाटी रस्त्यावरून दिसली पाहिजे; त्याशिवाय ऑफिसची नक्की जागा लोकांस कळणार नाहीं म्हणून नांवाची पाटी कांपाउंडचे बाहेर बंगल्याचे फाटकावर लावणें जरूर आहे असा त्यांनीं निर्णय दिला.

या निकालावर मुंबई हायकोर्टाकडे रिव्हिजन अर्ज होऊन हायकोर्टानें खालील कोर्टाचा निकाल फिरवून आरोपींस सोडून दिले. सदरहु फिर्यादींत कलम ७३ (अ) याचा अर्थ लावणें हाच महत्त्वाचा मुद्दा होता. हायकोर्टाचे मताप्रमाणें नांवाची पाटी कंपनीचे ऑफिसचे खोलीबाहेर लावली म्हणजे कायद्याप्रमाणें पुरे आहे. त्याकरितां फाटकावर पाटी लावणेचें कारण नाहीं. ऑफिसचे बाहेर अगर जेथें कंपनीचें काम चालतें त्या जागेचे बाहेर (outside the office or place where the business is carried on) म्हणजे कांपाउंडचे हद्दीपलीकडे असा अर्थ होत नाहीं. ऑफिसबाहेर नांवाची पाटी लावण्यांत कंपनीचें ऑफिस कोठें आहे हें रस्त्यावरून जाणारे येणारे लोकांस कळावें अगर कंपनीचे ऑफिसची नक्की जागा लोकांना माहीत व्हावी असा हेतु नसून कंपनीकडे कामानिमित्त येणारे इसमास सदर कंपनी ही लिमिटेड कंपनी आहे व आपण लिमिटेड कंपनीशीं व्यवहार करीत आहोंत हें कळावें व तशा सावधगिरीनें लोकांस व्यवहार करतां येऊन कंपनीतर्फे व्यवहार करणाऱ्या लोकांची व्यक्तिशः जबाबदारीची मर्यादा त्यांचे नजरेसमोर कंपनीशीं व्यवहार करीत असतांना असावी, हाच हेतु कंपनीचे नांवाची पाटी ऑफिसचे बाहेर लावण्यांत आहे.

या दृष्टीनें विचार करतां बाटलीवाला सन्स अँड को. लिमिटेड यांनीं लावलेली पाटी ही जरूरीस पुरेशी आहे असेंच सर्वांचें मत पडेल.


# दि गुड-वुइल ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.

मॅनेजिंग डायरेक्टर



## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१३,००,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद (भद्र ऑफिस), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., के. टी.; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

( ले. वा. चिं. भानु )

**देखरेखीचा प्रश्न:**—सहकारी पतपेढ्यांचे कामकाजावर देखरेख कोणी कशी व करावी या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाची जोराची उठावणी, अनेक कारणानें सुप्रसिद्ध झालेल्या थॅामस कमेटीनें केल्यापासून त्यावर सर्वस्वी समाधानकारक व इष्ट असें उत्तर सांपडलेलें नाहीं. सुपरविजन कमिटी नेमून सरकारनें उत्तर काढण्याचा आटोकाट प्रयत्न केला, व त्या कमिटीच्या बहुमतानें जो निर्णय दिला त्याला अनुसरून योजनाहि जारी केली. पण हुकमी बहुमतानें कांहीं प्रश्न सुटत नसतात त्याचप्रमाणें हा देखरेखीचा प्रश्न संपला नाहीं. तो पुनः डोकें वर काढूं लागला आहे आणि आतां मुंबईच्या को. बँकस असोसिएशननें एक नवा इलाज मे. रजिस्ट्रार साहेबांच्या सहविचारें योजला आहे. याच-वेळीं मुंबईच्या को-आपरेटिव्ह क्वार्टर्लीचे चालकांनीं कांहीं तज्ज्ञ मंडळींचे या प्रश्नाबाबत अभिप्रायहि मागविले आहेत. गुजराथ प्रांतांतील सहकारी चळवळींतले भीष्माचार्य दिवाण बहादूर मळजी शेट यांनीं आपला अभिप्राय त्यांच्या नेहमीच्या सडेतोड भाषेंत दिला असून तो क्वार्टर्लीच्या ताज्या ( डिसेंबर १९४० ) अंकांत प्रसिद्धहि केला आहे. हा सर्वच लेख विचारप्रवर्तक आहे तथापि त्यांतील कांहीं महत्त्वाचा भाग या ठिकाणीं देतों.

"देखरेखीच्या धोरणाबाबत गेल्या दहा-बारा वर्षांत फेरबदल करण्यांत येत आहेत, व त्या फेरबदलांची अंमलबजावणी मात्र कसून होत नसल्यामुळें एकाचें फल दिसूं लागण्यापूर्वीच दुसरा बदल जारी झाल्यानें केवळ प्रयोगांतच कार्यहानि होतें आहे! आतां डि. युनियन बोर्डांचें भवितव्य कांहीं फारसें आशादायक दिसत नाहीं. खेडा जिल्हा बोर्ड रद्द करण्यांत आलेलें आहे. पंचमहाल जिल्हा बोर्डांत फक्त दोन व युनियन्स आहेत. अहमदाबाद जिल्हा बोर्डाला नियोजित दरापेक्षा ( ½ टक्का ) जास्त दरानें वर्गणीची खंडणी देतांना जिल्हा बँक टेकीस आली असून डेप्युटी रजिस्ट्रारनें हा बँकेवरचा बोजा कमी करण्यांत यावा असा अभिप्रायही दिलेला आहे. भडोच जिल्हा बोर्डाला सन १९४०–४१ सालांत ऑफिस भाडें, सेक्रेटरीचा पगार, शिपायाचा पगार वगैरे आवश्यक खर्च भागविणेची मोठी पंचाईत पडलेली आहे. सुरत जिल्हा बोर्डाला जरी सरकारी तपासणी यादींत वर्ग लाभला असला तरी रु. २,७७२ चा तोटा ताळेबंदांत दिसतो व पंचमहाल जिल्हा बोर्ड रु. १,२४४ चा तोटा दाखवितें. यावरूनच बँकांची वर्गणी घेऊनही बोर्डाचा योगक्षेम कसा नीट भागत नाहीं हें उघड दिसतें व आतां सरकारनें ( ठराव नं. १८०५६/२८ ता. १५–४–३६ अन्वयें ) ऑडिट फीमधून इतके दिवस गोळा केलेल्या रकमांतून भरपूर देणग्या देणें क्रमप्राप्त झालेलें आहे. आतां १९३६ सालीं सरकारनें दिलेल्या वचनाप्रमाणें देणग्या न दिल्या तर हीं जिल्हा बोर्डें यापुढे टिकाव धरून राहूं शकणार नाहींत."

"कांहीं बँका पूर्वीं युनियन्सना खर्चाच्या ½ पर्यंत देणग्या देत होत्या. पण सुपरव्हिजन कमिटीच्या रिपोर्टावरून जारी झालेल्या सरकारी हुकुमानंतर सोसायट्यांकडे गुंतलेल्या भांडवलावर ⅛ टक्का दरानें वर्गण्या देऊं लागल्या. कांहीं बँका सरकारी देणग्या इतक्याच रकमांची वर्गणी देतात, तर कांहीं रद्द झालेल्या सोसायट्यांकडील कर्जांच्या बाकया वगळून जेवढें कर्ज येणें असेल त्यावरच ⅛ टक्का दरानें वर्गणी देतात. सारांश, वर्गणीबाबत निश्चित व सरसहा एक असें धोरण आढळत नाहीं. तेव्हां सर्वांस सारखें धोरण लागू करून सरकारनें येणारा तोटा स्वतःच्या देणगीनें भरून काढल्याशिवाय युनियन्स व बोर्ड कार्यक्षम होणार नाहींत."

"कांहीं जिल्ह्यांत सोसायट्यांकडून वसूल केली जाणारी वर्गणी जिल्हाबोर्डाकडे एकत्रित केली जाते व मग तालुका युनियन्सचा खर्च बोर्ड भागवितें, तर कांहीं तालुका युनियन्स जमविलेली वर्गणी स्वतः जवळच ठेवतात! हा जिल्हाबोर्डाच्या पोटनियमांचा उघड उघड भंग आहे. पण त्यावर जरूर तो इलाज वरिष्ठ अधिकारी करीत नाहींत. उलट अशा युनियन्सना सरकारी तपासणींत 'अ' वर्गही मिळूं शकतो!"

"युनियन बोर्डावर बँक व इन्स्टिट्यूटचे प्रतिनिधि घेण्याचा पोटनियम आहे. अलीकडे इन्स्टिट्यूट ह्या जिल्ह्यांतील संस्था नामशेष करण्यांत आल्यानें मुंबईच्या इन्स्टिट्यूट मार्फत प्रतिनिधी पाठविणें भाग पडतें. पण या दोघां प्रतिनिधींचा प्रवासभत्ता देण्यामध्येंहि एक वाक्यता नाहीं. कांहीं जिल्ह्यांत तालुका युनियन्स व जिल्हा बोर्ड प्रवासखर्च देतात, तर कांहीं जिल्ह्यांत ज्या संस्थांचेतर्फे हे प्रतिनिधी येतात त्या संस्थांना खात्याच्या हुकमावरून द्यावा लागतो. इन्स्टिट्यूटनें आतां नुकतेंच प्रवास भत्ते कोणाला मिळणार नाहींत असे हुकूम काढले आहेत. म्हणजे प्रतिनिधीवर दुहेरी बोजा येणार. एक आपला उद्योगधंदा सोडून वेळ मोडून युनियनच्या अगर जिल्हाबोर्डाच्या सभेला जायचें. व जाण्या-येण्याचा व जरूर पडल्यास खाण्या-जेवणाचा खर्च स्वतःच सोसायचा! यामुळें अहमदाबाद, सुरत आणि पंचमहाल जिल्ह्यांत इन्स्टिट्यूटचा प्रतिनिधि म्हणून युनियन्सवर कोणीही जात नाहीं!"

"बँका आणि इन्स्टिट्यूट यांचे प्रतिनिधित्व युनियन्स व जिल्हाबोर्डांतून अजीबात कमी करावें व सरकारी सब् ऑडिटर्स यांना युनियन सुपरवायझर म्हणून नेमावे असा एक विचार प्रकट केला जात आहे. पण जोपर्यंत तालुका युनियन्स व जिल्हा युनियनबोर्ड यांच्या पोटनियमांत सरकारी खातें बदल करीत नाहीं तोपर्यंत हा विचार, विचारक्षेत्रांत घेण्याचें कारण नाहीं. सरकारनें तपासणीचें काम जरी आपल्या हातीं घेतलें तरी देखरेख ही युनियन्सच्याचकडे असली पाहिजेत. देखरेख ही स्वावलंबनाचें तत्त्वावर अधिष्ठित आहे. स्वतःचा कारभार स्वतः चालविणें हेंच तें तत्त्व. सब् ऑडिटराकडून सोसायट्यांवर देखरेख करविणें हें सुपरविजन कमिटीच्या शिफारशीविरुद्ध आहे."

"देखरेखीचें काम बँकांनीं घ्यावें असेंही सुचविण्यांत येत आहे. हें काम घेण्यास बँका तावडतोब तयारही होतील, व त्यांत वावगें असें फारसें कांहीं नाहीं. पण कर्जें देणाऱ्या संस्थेची देखरेख स्वतःचें भांडवल सुरक्षित राहण्यापुरती म्हणजे कोती असेल, आणि सुपरव्हिजन कमिटीच्या रिपोर्टांत म्हटल्याप्रमाणें "परिपूर्ण नसणार व उलट एकांगी असणार." म्हणून देखरेख ही एका वेगळ्याच संस्थेकडे असणें बरें."

"सोसायट्यांचे नार्मल क्रेडिट पत्रकाची छाननी करण्याचें काम युनियन्सकडे इतःपर ठेवूं नये अशीहि एक सूचना करण्यांत येत आहे. पण सुपरवायझरांच्या कर्तव्यापैकीं एक तें छाननीचें काम आहे. बँकांच्या इन्स्पेक्टरांना ते नीटसें जमणार नाहीं कारण त्यांना तितकीशी स्थानिक माहिती नसल्यानें तें अपुरेंच होईल!"

* * *

दिवाणबहादुरांची वरीलपैकीं कांहीं मतें सर्वांना सर्वस्वी तंतोतंत पटतील अशीं जरी नसलीं तरी या देखरेखीच्या व युनियन्सच्या कामकाजाच्या बाबत विचार करण्यास भाग पाडतील अशीं मात्र खात्रीनें आहेत याबद्दल कोणाचेंही दुमत होणार नाहीं.

## हातमागाच्या धंद्याची पहाणी.

यांत्रिक युगास प्रारंभ होण्यापूर्वी हिंदी कापडाची निर्गत परदेशी मोठ्या प्रमाणावर होत असे. डाक्क्याची मलमल आणि बनारसचे शालू यांची प्रसिद्धी पूर्वीपासूनचीच आहे. परंतु यंत्रांमुळें प्रचंड प्रमाणावर उत्पादन करणें शक्य झाल्यामुळें परदेशांत माल स्वस्त दरानें निघूं लागला. त्यांतच हिंदुस्थानच्या आयात-निर्गतींत खुल्या व्यापारी तत्त्वाचा पुरस्कार केला गेल्यामुळें हिंदी कापड-निर्गत घटून परदेशी माल हिंदी बाजार पेठेंत उतरूं लागला. यंत्रावर तयार झालेल्या कापडाशीं एकाच वेळीं गुणानें व किंमतीनेंहि टक्कर देणें हातमागावर तयार होणाऱ्या कापडास शक्य नव्हते. त्यामुळें ह्या धंद्यावर उपजीविका करणाऱ्या कामगारांची स्थिति कठीण होऊं लागली. पुढें हिंदुस्थानांतच कापडाच्या गिरण्या निघाल्या. त्यामुळें हातमागावर काम करणारांचा प्रश्न विकटच झाला.

ह्याचीं प्रमुख कारणें दोन-तीन आहेत. गिरणींत यंत्रांवर काम करतांना हातमागावर काम करणाराचें कौशल्य फारसें उपयोगी पडत नाहीं असा अनुभव आहे. ह्यामुळें नोकरी करावयास नाखूष असलेले कामगार गिरण्या निघूनहि आपल्याच धंद्याला चिकटून बसण्यास उत्सुक झाले. शिवाय असें कीं हातमागाचा धंदा शेतीचा जोड-धंदा या दृष्टीनें केला जात असल्यामुळें त्या वर्गांतील कामगारांना स्वतःचें घर-दार व शेती-वाडी सोडून जाणें अशक्य होतें. आजहि कित्येक कामगार हिंदुस्थानभर पसरलेल्या लहान लहान खेड्यांत हातमागाचा धंदा नेकीनें चालवीत आहेत.

परंतु त्यांची स्थिति अत्यंत विकट आहे. सूत खरेदी करण्यास पुरेसा पैसा नाहीं; मालविक्रीचा प्रश्नहि तितकाच कठीण आहे. बरें स्वतः माल पाठीवर मारून विक्रीकरितां बाहेर पडावें तर उत्पादन अडतें नी गिरणींच्या स्वस्त व दिसावयास सुरेख मालापुढे हातमागाचा माल घेणार कोण हाहि प्रश्नच असतो. शिवाय, ज्यांनीं सुताकरितां पैसे दिले त्यांच्याशीं तयार माल-विक्रीचा करारहि अगोदरच करावा लागतो. त्यामुळें ते स्वातंत्र्यहि नसतें. ह्या सर्व परिस्थितीची जाणीव सरकारास व हिंदी विचारवंत पुढारी व अर्थशास्त्रज्ञ यांना असल्याचें दिसतें. प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं बाविसाव्या हिंदी आर्थिक परिषदेंत आपल्या अध्यक्षीय भाषणांत हिंदी हातमागाच्या धंद्याचा कळकळीनें उल्लेख केला आहे. तत्पूर्वी लखनौ येथें भरलेल्या बाराव्या औद्योगिक परिषदेंत या धंद्यासंबंधीं चर्चा होऊन त्याची पहाणी करण्याकरितां समिति नेमण्यांत येण्याबद्दल सूचना करण्यांत आली होती. त्या सूचनेस अनुसरून मद्रास विद्यापीठाचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. पी. जे. टॉमस ह्यांचे अध्यक्षत्वाखालीं समिति आतां नेमण्यांत आली आहे. कलकत्त्याचे राय बहादुर हृशीकेष मुकर्जी हे ह्या समितीचे सभासद असून अलाहाबादचे श्री. बी. पी. आढारकर हे सेक्रेटरी आहेत.

समितीचें काम खालील मुद्यांस धरून व्हावयाचें आहे:—

१. प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या मदतीनें त्या त्या प्रांतांतील व संस्थानांतील हातमागाच्या धंद्याची पाहणी करून हातमागावर तयार होणाऱ्या कापडाच्या निरनिराळ्या प्रकारांचा आणि त्या धंद्यांतील कामगारांच्या संख्येचा अंदाज करणें.

२. विणकरांना खरेदी करावयास लागणाऱ्या सुताच्या तसेंच त्यांनीं तयार केलेल्या मालाच्या उठावाच्या बाजार पेठा व पद्धती यांवर मत देणें.

३. हातमागावर तयार झालेल्या मालाची गिरण्यांत तयार होणाऱ्या कापडाबरोबर तुलना करून त्या त्या प्रांतांत हातमागावरील कापड व गिरण्यांत तयार होणारें कापड यांमध्यें असलेल्या स्पर्धेचें स्वरूप स्पष्ट करणें.

४. हातमाग चालविणारे कामकरी कोणत्या प्रकारचें सूत वापरतात व त्यापासून कोणत्या प्रकारचा माल तयार करतात याची चौकशी करणें.

५. खालच्या नंबरचें सूत गिरण्यांनीं वापरूं नये अशी योजना केली असतां हातमागाच्या मालाचें उत्पादन टिकण्यास कितपत मदत होईल ?

वरील मुद्यांवरून समितीच्या कार्याची दिशा स्पष्ट होते. समितीनें पहाणी करून रिपोर्ट करावयाचा आहे.

---

## लिमिटेड कंपन्यांस ओव्हरड्राफ्ट देण्याची पद्धत

एकाद्या जॉइंट स्टॉक कंपनीचे नांवानें बँकेंत ओव्हरड्राफ्ट खातें उघडण्यापूर्वी बँकेनें कंपनीकडून खालील कागदपत्र मागवून घ्यावे व त्यांची नोंद करावी.

( १ ) मेमोरँडम व आर्टिकल्स ऑफ असोसिएशन ह्यांची छापील प्रत. ह्या प्रतीनंतर त्यांत दुरुस्ती केलेली असूं नये, ह्यासाठी मागविलेली प्रत अगदीं ताजी असल्याबद्दल कंपनीचा सेक्रेटरी अथवा मॅनेजिंग एजंट ह्यांची सही घ्यावी.

( २ ) कंपनीच्या नोंदणीचें मूळ सर्टिफिकेट.

( ३ ) कंपनीस व्यवहार करण्यास प्रारंभ करण्यास परवानगी देणारें रजिस्ट्रारचें मूळ सर्टिफिकेट.

( ४ ) कंपनीच्या डायरेक्टरांच्या ज्या सभेंत ओव्हरड्राफ्ट खात्यासंबंधीं ठराव मंजूर झाला, त्या सभेच्या अध्यक्षाचे सहीखालीं ठरावाची नक्कल व जे खातें चालविणार, त्यांच्या नमुन्याच्या सह्या. ह्या सह्या त्यांच्याच असल्याबद्दल दाखला.

बँकरनें ज्या कंपनीस ओव्हरड्राफ्ट हवा असेल, तिच्या मेमोरँडम व आर्टिकल्समधील कलमें प्रथम नीट वाचावीं. कंपनीतर्फे कर्ज काढण्यास डायरेक्टरांस अधिकार असल्याविषयीं बँकरनें खात्री करून घ्यावी. ओव्हरड्राफ्ट मंजूर करावा, अशा अर्थाचा बोर्डाचा ठराव कंपनीकडून त्यानें करून घ्यावा व त्यांत अडव्हान्सची रकम व तिच्या परतफेडीची व्यवस्थाहि नमूद करून घ्यावी. कंपनीचें रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट व व्यवहारास प्रारंभ करण्यास मंजूरी देणारें सर्टिफिकिट हीं मागण्याचें प्रयोजन चटकन लक्षांत येत नाहीं, परंतु हीं सर्टिफिकिटें कंपनीस मिळण्यापूर्वी डायरेक्टरांनीं केलेले व्यवहार त्यांच्या अधिकाराबाहेरच ठरून बँकेनें दिलेले पैसे परत मिळणें कठीण जाण्याचा संभव असतो. त्यासाठी ही दक्षता बाळगणें जरूर असतें.

ओव्हरड्राफ्टसंबंधींच्या ठरावाचा नमुना ओव्हरड्राफ्टच्या अर्जाबरोबरच बँक देते. हा अर्ज पुरा झाल्याविना व ठरावासंबंधींचे कागद बँकेच्या हातीं आल्याविना बँकरनें खातें उघडूं नये. ह्या सर्व मामुली गोष्टी झाल्या, म्हणजे महत्त्वाचा प्रश्न ओव्हरड्राफ्टच्या तारणासंबंधींचा रेतो. हें तारण सोईस्कर ठरल्यास, त्याचे शेंकडा किती टक्क्यांइतकें कर्ज मंजूर करावयाचें एवढाच प्रश्न उरतो.


## हिंदुस्थान-ब्रह्मदेश व्यापारी करार

"१९३७ मध्यें, ब्रह्मदेश व हिंदुस्थान विभक्त करण्यांत आले त्या वेळेपासून अस्तित्वांत असलेल्या इन्डो–बर्मा ट्रेड ऑर्डरीची मुदत येत्या मार्चअखेर संपत असल्यानें, या व्यवस्थेचे बदली एक नवीन व्यापारी करार या दोन देशांत व्हावा एतदर्थ हिंदुस्थान व ब्रह्मदेश सरकारचे प्रतिनिधि यांमध्यें दिल्ली येथें वाटाघाटी सुरू झालेल्या आहेत.

"हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांमधील व्यापाराची परिस्थिति थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे. १९३९–४० सालचे आंकड्यावरून असें दिसून येतें कीं, या देशाची निर्यात ढोबळपणें १४ कोटि रुपयांपर्यंत असून आयात ३३ कोटि रुपयांची आहे. या आकड्यांची तत्पूर्वीच्या दोन वर्षांची सरासरी घेतल्यास ती अनुक्रमें २५½ व १०½ कोटि रुपये आहे. अर्थात् ही परिस्थिति एकतर्फी असून ब्रह्मदेशाचे दृष्टीनें ती जास्त फायदेशीर अशी आहे. ब्रह्मदेशांत गुंतलेल्या हिंदी भांडवलावर मिळणारा नफा व तेथें वसाहत करून असलेल्या लोकांनीं पाठविलेला पैसा हीं येथें जमेस धरलेलीं नाहींत.

"ब्रह्मदेशाचा जवळ जवळ ८० टक्के निर्यात व्यापार या देशाशीं आहे व त्यांत मुख्यत्वेंकरून (१) केरोसिन, पेट्रोल, लुब्रिकेटिंग ऑइल्स, (२) तांदूळ, (३) टीक व इतर जातीचें लांकूड यांचा समावेश होतो. केरोसिन, पेट्रोल व इतर तेलें इतर देशांतून आपणांस योग्य बाजारभावांत सहज मिळूं शकतील. या तेलांचे बाबतींत ब्रह्मदेशाला आपली बाजारपेठ मिळाली आहे, ह्याचें कारण म्हणजे आयात जकातींबाबत त्या देशास मिळत असलेली सवलत, हें होय. येथून ब्रह्मदेशांत मुख्यत्वेंकरून कापसाचें कापड व सूत, लोखंड व पोलादाचा माल, पाटाचें कापड, पोतीं, वगैरे, कोळसा, कणीक, कच्चा व तयार तंबाखू, मीठ, मासळी व भुइमुगाचें तेल ह्या जिनसा निर्यात होतात. या मालावर त्या देशांत आयात जकात द्यावी लागत नसून या निर्यातीचे जिनसांत पहिले तीन वस्तूंचेंच पमाण मोठें आहे. ज्याचे योगानें दोन्ही देशांचा फायदा होईल अशाच तऱ्हेचा नवीन करार उभय देशांच्या गरजा ध्यानांत घेऊन घडविण्यांत येईल." (महाराष्ट्र चेंबरच्या ता. १२–२–४१ च्या त्रैमासिक साधारण सभेंत चेंबरचे उपाध्यक्ष श्री. द. रा. नाईक ह्यांचें भाषण.)


दि
बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड
सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे
मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.
मुंबई शाखा
दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा
डेक्कन जिमखाना


मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

The Co-operators' Book Depot.
9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.
The Only Book Depot of its Kind in India.
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—३ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४–१० |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९५—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—८ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४–२½ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६३) — .. | ११४—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १४४—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०८—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४३–१२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६०—० |
| धुंबई प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३३—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५६७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १८१०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९७७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६५०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २०८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४६–१२ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१—२ |
| न्यू इंडिया विमा ( ४५–१५ ) १ रु. ... | ४१—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३९५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४९—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३७५—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८९२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १३५—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–७–३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३–५–० |


**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें**
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
**OUR HOME**
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक
निवास भोजनालयांत
**उतरण्यास या.**
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचे तेल
स्थापना १९०९
डोकें शांत रहातें. केंस मजबूत होतात.
गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.
धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. ४)



तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
व्हॅक्टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA
सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख २६ फेब्रुवारी, १९४१ अंक ९

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

**देशी औषधें तयार करणारा**
**महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना**
पंडु, (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या
**अशक्ततेवर**

# रक्तवर्धक

**वापरा.**
**सर्वत्र मिळतें.**
—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.** पुणें ४.

# १० वा आठवडा

**नवयुग चित्र**

## लग्न पहावं करून

दिग्दर्शक : विनायक
भूमिका : दामुअण्णा मालवणकर

**मिनर्व्हा — पुणें**

**. डॉ. एन. आर. राजोपाध्ये**
यांच्या
अॅस्ट्रॉल्‌ or शक्तिवर्धक पिल्स घ्या. किंमत ११ आ. फक्त.
सोल एजंटः "वेलणकर वनौषधालय", तुळशीबाग रस्ता, पुणें.
एजन्सी देणें आहे. दोन आण्याचे स्टँप्स् पाठवून विचारावें.

**डॉ. एन. आर. राजोपाध्ये यांचे खास देखरेखीखालीं चाललेलें**
**" वेलणकर वनौषधालय "**
येथें सर्व तऱ्हेच्या खात्रीच्याच वनस्पति व सिद्धौषधी मिळतील. १ पैशापासून ते सिद्धौषधीपर्यंत मिळण्याचें हें पुण्यांतील पहिलेंच दुकान होय. येथें चूर्णें, सप्तकाच्या काढ्याच्या पुड्याही ऑर्डर-प्रमाणें करून दिल्या जातात. येथें रोगी तपासून औषध देण्याची सोय आहे. त्याकरितां चार्ज रोज फक्त एकच आणा.
उघडण्याची वेळः—सकाळीं ८॥ ते १२ व दुपारीं ३॥ ते ८ पर्यंत.
पत्ता : "वेलणकर वनौषधालय" तुळशीबाग रस्ता, पुणें.

# विविध माहिती

### ब्रिटिश आगबोटींवर रेडिओ

१,६०० टनांखालील प्रत्येक ब्रिटिश आगबोटीवर एक वायरलेस सेट असलाच पाहिजे, अशी व्यवस्था आतां करण्यांत आली आहे. ह्या रेडिओंतून ब्रिटिश बातम्या ऐकतां येतील, अशी तरतूद असली पाहिजे.

### जपानचा पोलादाचा पुरवठा

जपानचा पोलादाचा व पेट्रोलचा पुरवठा अगदी असमाधानकारक नाहीं, असें जनरल होशिमा ह्यांनीं नुकतेंच जाहीर केलें. इतके दिवस अमेरिकेंतून येणाऱ्या मोडीपासून पोलाद तयार करण्यांत येत असे, परंतु अमेरिकेनें मोड पाठविण्याचें बंद केलें आहे.

### जर्मनीमधील संशोधन कार्य

" जर्मनीमध्यें संशोधनाचें कार्य बहुतेक बंद पडलें असून, प्रत्येक प्रयोगशाळेंत युद्धविषयक प्रश्नांचाच विचार चालू आहे. महत्त्वाचे शोध आतांपर्यंत लागले, ते संशोधक स्वेच्छेनें प्रयोग करीत असतां सहजी लागलेले आहेत. बहुतेक सर्व शोध १८ ते २४ वयाच्या शास्त्रज्ञांचेच आहेत. जर्मनीमधील ह्या वयाचे सर्व लोक राष्ट्रीय नियंत्रणाखाली सरकारी प्रयोग शाळेंत अगर सैन्यांत काम करीत आहेत, तेव्हां तो देश शास्त्रीय संशोधनांत मागें पडणें स्वाभाविक आहे. शास्त्रज्ञांस आपलें स्वतःचें संशोधन चालू ठेवण्यास जर्मनींत वावच नाहीं. हिटलरनें कित्येक नामवंत शास्त्रज्ञांस ते स्वतः ज्यू होते अगर त्यांचा विवाह ज्यू स्त्रियांशीं झाला होता म्हणून हद्दपार केलेलें आहे. कित्येक " आर्यन " शास्त्रज्ञांनीं आपण होऊन देशत्याग केला. निर्गत करण्यास पुरेशी अक्कल आपले देशांत आहे, अशी कोणीहि मिजास मारूं नये. " ( ब्रूस ब्लिव्हेन )

### गंधक

गंधकाचें महत्त्व उद्योगधंद्यांत विशेष आहे. सलफ्यूरिक ॲसिड त्यापासूनच करतात. हिंदुस्थानांत दरसाल २० हजार टन गंधकाची आयात होते व त्यासाठी १८ ते २६ लक्ष रुपये परदेशी पाठवावे लागतात. युद्धास प्रारंभ झाल्यापासून हा आकडा ४५ लक्षांवर गेला आहे. गंधकाचा पुरवठा बंद पडला, तर कित्येक हिंदी कारखाने बंद करावे लागतील. दारुगोळ्याचे उत्पादनास व साखर तयार करण्यास गंधक अत्यावश्यक आहे. सरकारनें नेमलेल्या बोर्ड ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्चनें एक " गंधक कमिटी " नेमली आहे, परंतु तिचा उपयोग होईल असें वाटत नाहीं. वाया जाणाऱ्या कांहीं गॅसेसमधून गंधक काढण्याची इतर कित्येक देशांनीं अवलंबिलेली पद्धत हिंदुस्थानांत सुरू करण्यास हरकत नाहीं.

### युद्धविषयक मालाचें प्रदर्शन

हिंदी सरकारी दारूगोळ्यांच्या कारखान्यांत तयार होत असलेल्या मालाचें प्रदर्शन कानपूर येथें मार्चच्या शेवटच्या आठवड्यांत भरवण्यांत येणार आहे. ह्या मालापैकीं कांहीं माल खासगी कारखान्यांत करतां आला, तर त्या मानानें सरकारी कारखान्यांवरील ताण कमी होईल, हा प्रदर्शन भरविण्याचा उद्देश आहे.

### भुइमुगाच्या लागवडीचें नियंत्रण

हिंदुस्थानांत भुइमुगाची लागवड मुख्यतः मद्रास व मुंबई प्रांत आणि हैद्राबाद संस्थान ह्यांमध्यें होते. हिंदुस्थान सरकार व हीं तीन सरकारें ह्यांच्या प्रतिनिधींची एक परिषद् दिल्ली येथें नुकतीच भरली होती. तिचेमध्यें भुइमुगाची किंमत आतां उतरली आहे, त्यास तोंड देण्याच्या प्रश्नाचा विचार झाला. भुइमुगाची लागवड मर्यादित करण्याचें परिषदेंत ठरलें. परंतु त्याची सक्ती करणें व्यवहार्य होणार नाहीं, असा परिषदेचा अभिप्राय झाला. शेतकऱ्यांस भुइमूग लावण्यापासून परावृत्त करण्याचे प्रयत्न करण्याचें ठरलें. उतरलेल्या बाजारभावामुळें भुइमुगाच्या लागवडीस पायबंद बसणार आहेच.

### ऑस्ट्रेलियाचें आगबोटींचें उत्पादन

आस्ट्रेलियानें मोठ्या प्रमाणावर आगबोटी बांधण्याची योजना हातीं घेतली आहे.

### कृत्रिम कॉफी

जर्मनीला नैसर्गिक कॉफी मिळणें अशक्य झालें असल्यामुळें ट्यूलिपच्या कांद्यांपासून कॉफी तयार करण्यास त्या देशानें प्रारंभ केला आहे. हॉलंडमध्यें लागणाऱ्या कॉफीसाठी त्या देशांत ट्यूलिपची लागवड वाढविण्यांत आली आहे. ह्या कांद्यांचे बारीक तुकडे करून ते भाजण्यांत येतात व त्यांत चिकरी मिसळली जाते. ह्या मिश्रणांत थोडी खरी कॉफी टाकली, कीं जर्मन कॉफी तयार होते.

### ट्रेझरी बिलांवर ११ आ. १ पै व्याज

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ११ आ. १ पै इतका पडला.

### बी. बी. अँड सी. आय. चें डिव्हिडंड

बी. बी. अँड सी. आय. रेल्वेनें १९४०-४१ चें ७% दरानें डिव्हिडंड दिलें. डिव्हिडंड कर माफ नाहीं.

### औद्योगिक पुनर्घटना

युद्धसमाप्तीनंतर औद्योगिक घडी नीट कशी बसवावी, ह्याविषयींच्या प्रश्नांची चौकशी करण्याचें काम ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडच्या प्रेसिडेंटनें सर चार्लस इनिस ह्यांचेकडे सोंपविलें आहे.

### युद्धखर्च — प्रत्येक मृत्यूची किंमत

युद्धांत एक मनुष्य ठार करण्यास पूर्वी जितका खर्च येत असे, त्याच्या मानानें तो आतां कितीतरी पट येतो ! एका अमेरिकनानें ह्या खर्चाचा अंदाज केला आहे, तो खालीलप्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| सीझरचे युद्धांत | २३/४ रुपये |
| नेपोलिअनिक युद्धांत | ८ हजार रुपये |
| अमेरिकन सिव्हिल वॉरमध्यें | १४ हजार रुपये |
| गेल्या महायुद्धांत | ६० हजार रुपये |
| चालू युद्धांत ( अंदाज ) | १३/४ लक्ष रुपये |

युद्धांतील दर माणशी मृत्यूचा खर्च इतका प्रचंड झाला असला, तरी हिटलरला ठार करण्यास ही किंमत कांहीं भारी नाहीं, असें त्या लेखकाचें म्हणणें आहे.

### इटालिअन युद्धकैदी

हिंदुस्थानांतील इटालिअन युद्धकैद्यांची संख्या १६ हजारांवर गेली आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ९८ | लोकसंख्येची वाढ— | |
| २ हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक | ९९ | ६ बँक ऑफ महाराष्ट्राची वार्षिक सभा ... | १०३ |
| ३ उत्पन्न–खर्चाचे आंकडे | १०० | ७ बँकेची पंचवार्षिक प्रगति | १०३ |
| ४ फळांच्या साठवणीचे प्रयोग | १०० | ८ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... | १०४ |
| ५ स्फुट–विचार ... | १०१ | ९ वाळवंटांतील मोटारी... | १०४ |
| मध्यवर्ती सरकारच्या बजटाचा रागरंग—स्वदेशी साखरेच्या धंद्याचें नियमन— | | १० रेल्वे बजेटावरील भाषण | १०५ |
| इकडील कारखान्यांच्या हिताचें संरक्षण—हिंदी | | ११ आकडेशास्त्र म्हणजे काय? | १०५ |
| | | १२ निवडक बाजारभाव... | १०७ |

# अर्थ

बुधवार, ता. २६ फेब्रुवारी, १९४१

## हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक

हिंदी मध्यवर्ती असेंब्लीस वहातुक खात्याचे प्रमुख, सर ॲन्ड्र्यू क्लो, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत हिंदी सरकारी रेल्वेजचें १९४१-४२ चें अंदाजपत्रक सादर केलें. तें करतांना त्यांनीं चालू वर्षाचा आढावा घेतला व येत्या वर्षासंबंधींच्या अंदाजाचा तपशील सांगितला. गेल्या वर्षी केलेल्या अंदाजाप्रमाणें चालू वर्षी १०३ कोटि रुपये उत्पन्न होईल अशी अपेक्षा होती. तथापि तें उत्पन्न १०९ कोटि, २५ लक्षांवर जाईल, असा आजचा अजमास आहे. हा आकडा १९३९–४० च्या प्रत्यक्ष उत्पन्नापेक्षा ११½ कोटि रुपयांनीं जास्त आहे. गेल्या वर्षी रेल्वेचे दर वाढविण्यांत आले, त्याचा हा प्रत्यक्ष परिणाम आहे. ह्या वाढलेल्या दरांचें वर्षअखेर जादा उत्पन्न ६½ कोटि रुपयांवर जाईल. बाकीच्या अपेक्षित ५ कोटींच्या वाढाव्याचें कारण वहातुकींत झालेली प्रत्यक्ष वाढ, हें आहे. १९४०–४१ च्या हिशेबांतील वाढाव्यापैकी सुमारे १० कोटि रुपये मध्यवर्ती सरकारास दिलें जातील. सध्याच्या विशिष्ट परिस्थितींत रेल्वेजच्या नफ्याचा उपयोग रिझर्व्ह वाढविण्याकडे करणें उचित होणार नाहीं; हा वाढावा जितक्या मोठ्या प्रमाणांत हिंदुस्थान सरकारास देतां येईल, त्या मानानें कर भरणारावरील ओझें सुसह्य होईल; असें सर ॲन्ड्र्यू ह्यांनीं सांगितलें. रेल्वेजच्या अंतिम भरभक्कमपणापेक्षा सरकारच्या जरूरीच्या नडीकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे, हा त्याचा अर्थ आहे. हिंदी रेल्वेज व हिंदुस्थान सरकार ह्यांचेमधील १९२४ च्या कराराप्रमाणें व त्यानंतर रेल्वेजना दिलेल्या सवलतींस अनुसरून १९४०-४१ च्या १४ कोटि, ५९ लक्ष रुपये वाढाव्यापैकी ७ कोटि, १५ लक्ष रुपये सरकारास द्यावयास हवेत. म्हणजे, रेल्वेजवळ ७ कोटि, ४४ लक्ष रुपये उरतात. तथापि, सध्याची आणीबाणीची वेळ लक्षांत घेऊन, १९४२-४३ सालीं सरकारास द्यावयाच्या रकमेपैकी १ कोटि, ८२ लक्ष आतांच अडव्हान्स म्हणून देण्यांत यावयाचे आहेत. म्हणजे, ५ कोटि, ६२ लक्ष रुपये उरतात. हिंदी रेल्वेजनीं मध्यवर्ती सरकारास असलेलें देणें अंशतः भागविण्यासाठीं २ कोटि, ८१ लक्ष रुपयांचा विनियोग केला, म्हणजे रेल्वेजच्या स्वाधीन २ कोटि, ८१ लक्ष रुपये उरतात. चालू वर्षीं खणून टाकलेल्या रेल्वेजमुळें जिंदगी कमी झाली आहे, ती हिशेबांतून कमी करण्यासाठीं १ कोटि रुपयांचा उपयोग केला जाणार आहे. म्हणजे, रेल्वे रिझर्व्हजच्या वाट्यास अखेर १ कोटि, ८१ लक्ष रुपये येतात. १९४०–४१ मध्यें हिंदुस्थान सरकारच्या वाट्यास ९ कोटि, ९६ लक्ष रुपये येतील व १९४१–४२ मध्यें, आगाऊ द्यावयाचे १ कोटि, ८२ लक्ष रुपये धरून, १० कोटि, १८ लक्ष रुपये येतील.

येत्या वर्षीच्या उत्पन्नाचा अंदाज चालू वर्षाच्या उत्पन्नाच्या अपेक्षेपेक्षा १ कोटि रुपयांनीं कमी धरण्यांत आला आहे. म्हणजे, येत्या वर्षी १०८¼ कोटि रुपयांचें उत्पन्न अपेक्षित आहे. ७८ लाखांचें किरकोळ उत्पन्न त्यांत मिळविलें म्हणजे उत्पन्नाची बेरीज १०९ कोटि, ३ लक्ष रुपये होते. चालू वर्षी रेल्वेचे दरांतील वाढ अंमलात आहे, तीमध्यें कोणताहि महत्त्वाचा फरक करण्यांत येणार नाहीं. रेल्वेज चालविण्याच्या खर्चाचा आकडा, घसारा धरून, ६८ कोटि, ६० लक्ष रुपये इतका अंदाजण्यांत आला आहे. म्हणजे, खर्च चालू वर्षातील प्रत्यक्ष खर्चाचे मानानें १ कोटि, ८९ लक्ष रुपयांनीं वाढणार आहे. खर्चाच्या आकड्यांत २८ कोटि, ६० लक्ष रुपये व्याजाचे मिळवले पाहिजेत. म्हणजे अपेक्षित खर्चाची रकम ९७ कोटि, २० लक्ष होते. अखेर, उत्पन्न-खर्चांत ११ कोटि, ८३ लक्ष रुपयांची अनुकूल तफावत पडेल, अशी अपेक्षा आहे. ह्या वाढाव्यांतून १९४१–४२ सालीं हिंदुस्थान सरकारास १० कोटि १८ लक्ष रुपये मिळतील व रेल्वेजच्या रिझर्व्हमध्यें ३ कोटि, ४७ लक्षांची भर पडेल.

चालू वर्षाच्या व येत्या वर्षाच्या दुरुस्त व कच्च्या अंदाजपत्रकांतील वरील आकड्यांवरून हिंदी रेल्वेजच्या सध्याच्या किफायतशीर कारभाराची कल्पना येईल. रेल्वेजना उरलेला मोठा नफा हा मुख्यतः रेल्वेजच्या दरांतील वाढीचा व युद्धजन्य जादा वहातुकीचा परिणाम आहे. रेल्वेजच्या कारभारांत आणखी काटकसर करण्यास भरपूर वाव आहे व दर वाढवून नफा दर्शविणें हें योग्य नाहीं, असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. जितकी वहातुक वाढली, तिचे मानानें उत्पन्न अधिक वाढलें आहे. मालाच्या वहातुकीच्या दरांपासून चालू वर्षी बरेंच अधिक उत्पन्न झालें, हें हिंदी जनतेच्या आर्थिक उत्कर्षाचें एक लक्षण आहे, असें सर ॲन्ड्र्यू क्लो म्हणाले. परंतु हिंदी लोकांची आर्थिक परिस्थिति सुधारली असल्याचा हा दाखला मान्य करण्यापूर्वी इतर बाबींचाहि विचार केला पाहिजे. रेल्वेजवरील वहातुक वाढण्यास समुद्रावरील आगबोटींची अंशतः बंद पडलेली वहातुकहि कारणीभूत झाली आहे व मोटारी आणि रेल्वेज ह्यांमधील स्पर्धा कमी करण्याचें सरकारचें पद्धतशीर धोरण अमलांत आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. हिंदी निर्गत युद्धपरिस्थितीमुळें थोडी कमी झाली तरी युद्धविषयक मालाच्या वहातुकीमुळें रेल्वेजचें उत्पन्न कमी न होतां तें वाढलेलें आढळतें. ह्यापुढें, ही वहातुक आणखी वाढेल व रेल्वेजना अधिक उत्पन्न मिळेल, अशींच लक्षणें दिसत आहेत. अशा परिस्थितींत पुष्कळ वेळां काटकसरीकडे दुर्लक्ष होतें व न कळत फुगत चाललेला खर्च वाढत्या उत्पन्नास खाऊन टाकतो. युद्धसमाप्तीनंतर दुरुस्तीची व नव्या खरेदीची आवश्यकता एकदम उत्पन्न होते, त्याची तरतूद वेळींच केली जाणें आवश्यक असतें. ह्या सर्व प्रश्नांकडे काळजीपूर्वक लक्ष देणें अगत्याचें आहे.

## सरकारी रेल्वेजच्या उत्पन्न–खर्चाचे आंकडे

| उत्पन्न | लक्ष रुपये | | | |
|---|---|---|---|---|
| | पक्के १९३९-४० | १९४०-४१ अंदाज | १९४०-४१ दुरुस्त अंदाज | अंदाज १९४१-४२ |
| **वहातुकीचें उत्पन्न** | | | | |
| सरकारी रेल्वेज | ९७,६५ | १,०३,०० | १,०५,२५ | १,०८,२५ |
| सरकारनें चालविलेल्या रेल्वेज | ५,०८ | ५,१९ | ५,४७ | ५,५३ |
| **रेल्वेजचा खर्च** | | | | |
| सरकारी रेल्वेज | ६४,८५ | ६६,६४ | ६६,७१ | ६८,६० |
| सरकारनें चालविलेल्या रेल्वेज | २,५१ | २,६२ | २,५६ | २,६२ |
| चालविलेल्या रेल्वेजना द्यावयाची रक्कम | २,५७ | २,५७ | २,९१ | २,९१ |
| (अ) वहातुकीचें निवळ उत्पन्न | ३२,८० | ३६,३६ | ४२,५४ | ३९,६५ |
| **इतर** | | | | |
| इतर उत्पन्न | १,७१ | १,९६ | १,९९ | २,२४ |
| इतर खर्च | १,०७ | १,२१ | १,२० | १,४६ |
| (ब) इतर निवळ उत्पन्न | ६४ | ७५ | ७९ | ७८ |
| अ+ब निवळ उत्पन्न | ३३,४४ | ३७,११ | ४३,३३ | ४०,४३ |
| व्याज देणें | २९,११ | २८,८२ | २८,७४ | २८,६० |
| वाढावा | ४,३३ | ८,२९ | १४,५९ | ११,८३ |

## प्राप्तीवरील करासंबंधीं एक निवाडा

### सॉलिसिटरला मिळालेली देणगी

इंडियन आयर्न अँड स्टील कंपनीचे मॅनेजिंग एजंट मेसर्स मार्टिन आणि कंपनी, हे एका नवीन पोलादाच्या उत्पादनाचे कंपनीविषयीं वाटाघाट करीत होते. त्या संबंधांत श्री. सुशीलचंद्र सेन, कलकत्ता येथील सॉलिसिटर, ह्यांस श्री. खांडवाल ( कंपनीचे एक भागीदार ) ह्या आपल्या अशिलातर्फे कंपनीच्या सभेस हजर रहावें लागलें. श्री. सेन ह्यांस मार्टिन आणि कंपनीच्या भागीदारांसहि भेटावें लागलें. अखेर, एक योजना उभयपक्षी संमत झाली, त्यामुळें त्यांच्या अशिलाची बाजू ५०% उचलून धरली गेली. इतरहि भागीदारांचा पुष्कळ नफा झाला व त्यांचेतर्फे कोणीतरी श्री. सेन ह्यांस १० हजार रुपये देणगी म्हणून दिले. ह्या रकमेवर प्राप्तीवरील कर घेतला जाऊं नये, ती केवळ देणगी आहे, असें श्री. सेन ह्यांचें म्हणणें होतें. बंगालच्या कमिशनर ऑफ इन्कम् टॅक्सनें हा प्रश्न हायकोर्टाकडे सोपविला. "ह्या प्रकरणांत श्री. सेन ह्यांस मिळालेले पैसे हे त्यांच्या धंद्यांतील वेतनाचेच आहेत; ते स्वतः सॉलिसिटर नसते, तर त्यांस ती रकम मिळाली नसती." असें कमिशनर ऑफ इन्कम् टॅक्सचें म्हणणें होतें, तें हायकोर्टानें मान्य केलें.

### अँग्लो इंडियनांस जादा पगार

रेल्वेवरील ज्या जागेच्या नोकरास तो हिंदी असल्यास सुरवातीस २० ते ३० रुपये दिले जातात, तीच अँग्लो इंडिअन असल्यास त्यास ५५ रुपये दिले जातात, हें खरें आहे काय? असा प्रश्न डॉ. सर झिआउद्दिन अहमद ह्यांनीं असेंब्लींत विचारला, त्यास उत्तर देतांना रेल्वे मेंबर सर अँन्ड्र्यू क्लो ह्यांनीं हिंदी राज्यघटनेच्या कायद्याच्या २४२ व्या कलमाचा आधार दाखविला. "कस्टम्स, पोस्ट आणि तार खातें, ह्यांमधील नोकरभरतीचेवेळीं नियम करतांना अँग्लो इंडियन जातीचा त्या खात्याशीं आजवर असलेला निकट संबंध, त्या जातीचे लोकांकडे असलेल्या जागांचा दर्जा व त्यांची संख्या, आणि त्यांस पूर्वी मिळत असलेला पगार ह्या सर्वांचा विचार करण्यांत यावा" असें तें कलम आहे. युरोपिअन्सना हिंदुस्थानांत काम करण्याबद्दल "ओव्हर सीज्" भत्ता मिळतो. मौलाना झाफर अलीखान ह्यांनीं, "मुसलमानांच्या रहाणीचें मानहि अँग्लो इंडिअनांप्रमाणेंच उच्च आहे कीं नाहीं?" असा प्रश्न विचारला, त्यावर "कोणत्याच जातीच्या रहाणीचे मानाविषयीं मला मत देतां येणार नाहीं" असें सर अँन्ड्र्यू क्लो हे म्हणाले.

## फळांच्या साठवणीचे प्रयोग–कोल्ड स्टोरेज

हिंदी फळ व भाज्या ह्यांची थंड हवेंत कशा रीतीनें साठवण करतां येईल व ती किफायतशीर होईल किंवा नाहीं ह्यासंबंधीं संशोधन इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या पैशानें गणेशखिंड येथील मुंबई सरकारच्या बागेंतील कोल्ड स्टोरेज मध्यें चालू आहे, त्यास आतां सात वर्षें होतील. ह्या योजनेस एप्रिल, १९४२ अखेर इंपीरियल कौंसिलची मंजुरी मिळालेली आहे. १९३९–४० मध्यें केलेल्या प्रयोगांचा निष्कर्ष खालीलप्रमाणें आहे:—

**हापूस आंबे:**—६८° फॅ. उष्णतामानांत विरळ हवेंत आंबे ठेवले असतां ते अधिक सावकाश पिकतात. ५२° फॅ. उष्णतामानांत पिकलेले आंबे ठेवले, तेव्हां कोईजवळ येणारा तांबुसपणा आढळला नाहीं व फळें एक महिना चांगलीं टिकलीं.

**नागपुरी संत्रीं:**—५२° फॅ. व ४०° फॅ. उष्णतामानांत तीन महिने ठेवलेल्या ह्या संत्र्यांतील 'सी' व्हिटॅमिन ( ओज द्रव्य ) नाहींसें झालें नाहीं. तीन महिन्यानंतर हीं संत्रीं रेल्वेनें नागपूरला पाठविलीं, तेव्हां फळांच्या रसास थोडा अंबुस वास येऊं लागला. ह्याचा अर्थ, हीं फळें पाठविण्यास कमी उष्णतामान कायम राखणारे डबे पाहिजेत.

**राजेळी केळीं:**—५२° फॅ. उष्णतामानांत वसईचीं केळीं गारठलीं, परंतु ५६° फॅ. ला दोन-तीन आठवड्यांनीं तीं पिकलीं. पिकल्यानंतर तीं तीन चार दिवसांपेक्षा अधिक टिकलीं नाहींत; त्यांच्या पिवळ्या सालींवर तांबुस ठिपके दिसूं लागले, व केळीं घडाच्या दांड्यापासून विभक्त होऊं लागलीं. सुटीं केळीं अथवा त्यांच्या फण्या कोल्ड स्टोरेजमध्यें ठेवल्या, त्यांच्या देठाशीं बुरसा आला. देठाशीं व्हॅसेलिन व पातळ मेण ह्यांचें मिश्रण लावलें, तेव्हां बुरसा थांबला.

**इतर फळें:**—काश्मिरी सफरचंदें चार महिने ३२° फॅ. मध्यें उत्कृष्ट टिकलीं. तयार अंजीर ३२° फॅ. व ३५° फॅ. उष्णतामानांत एक महिना चांगले टिकले. ६८° फॅ. उष्णतामान पोपयांस चाललें नाहीं. ५२° फॅ. मध्यें कागदी लिंबें दोन महिने चांगलीं राहिलीं. कच्चे टामाटू ५२° फॅ. ला पिकले व एका महिन्यांत त्यांस चांगला रंग भरला.

# स्फुट विचार

## मध्यवर्ती सरकारच्या बजेटाचा रागरंग

दरवर्षी ह्या वेळेच्या सुमारास हिंदुस्थान सरकारचें पुढील सालाबाबतचें उत्पन्न–खर्चाचें अंदाजपत्रक मध्यवर्ती कायदे मंडळास सादर होण्याचा प्रसंग जवळ आला असतां त्यामध्यें कोणत्या विशेष बाबी अंतर्भूत झालेल्या असतील ह्याविषयीं लोकांमध्यें कुतूहल उत्पन्न होऊन त्यांचे तर्क चालू होतात. सध्याच्या युद्धकाळांत सरकारच्या तिजोरींत निवळ शिलकी उत्पन्नाची भर पडण्याची अपेक्षा असणें संभवनीय नाहीं, ह्यामुळें वाढाव्याचा उपयोग कसा केला जातो ह्याचा मामुली परिस्थितींतल्याप्रमाणें विचार होण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. उलट, युद्धखर्च वाढता असणार आणि तो भागवण्यास पुरा पडेल इतका वाढावा उत्पन्नांत होणार नाहीं ह्याची स्पष्ट कल्पना लोकांस असते. ह्याकरितां उत्पन्न–खर्चांतली तफावत भरून काढण्यास फडनवीस कोणते उपाय योजतात ह्याच्या अंदाजाचा खेळ ते खेळतात. हा कर वाढतो, का तो कर वाढतो ह्याविषयीं केवळ तर्क करण्यापेक्षां त्यांच्या कल्पनेची अधिक मजल जात नाहीं. रेलवेजचें अंदाजपत्रक कांहीं दिवस अगोदर प्रसिद्ध झालेलें असल्यानें त्यावरून दिसून येणारी मध्यवर्ती तिजोरीस व्हावयाची प्राप्ती तेवढी कळलेली असते. जनतेच्या तर्कांस आधार म्हटला म्हणजे सरकारनें प्रसिद्ध केलेल्या नऊ महिन्यांच्या उत्पन्न–खर्चांच्या आकड्यांचाच तेवढा असतो. गेल्या डिसेंबर महिन्यांत उत्पन्नाच्या प्रमुख बाबींचा वसूल पूर्वींच्या वर्षाच्या ह्याच महिन्याचे मानानें तीन कोटि रुपयांनीं कमी झाला, पण खर्च मात्र एक कोटीनें वाढला. चालू वर्षाचे पहिले नऊ महिने घेतले तर उत्पन्न पूर्व सालाच्या त्याच नऊ महिन्याच्या मानानें आठ कोटि रुपयांनीं घटलें असें दिसून येतें. ह्यापैकीं बहुतेक म्हणजे सात कोटि इतकी घट कस्टम्सच्या वसुलीमध्यें झाली. ह्या नऊ महिन्यांत खर्च नऊ कोटींनीं वाढला आणि ह्या वाढाव्याचें कारण संरक्षण खात्यावर झालेला जादा खर्च हें होय. चालू वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत कायमच्या कर्जांत १५ कोटि रुपयांची वाढ झाली. युद्ध कर्जाचा पैसा सरकारकडे येत असला तरी १९४०–४३ सालांच्या मुदतीच्या कर्जरोख्यांची गेल्या सप्टेंबर महिन्यांत परतफेड करण्यांत आल्यामुळें १९ कोटि रुपये जनतेस द्यावे लागले. सबंद वर्षाच्या सांपत्तिक स्थितीचा अंदाज करतां रेलवेज, पोस्ट इत्यादि बाबींची जमा पूर्वींच्या वर्षाचे मानानें व अंदाजपत्रकाशीं तुलना करतां अधिक असली तरी सर्व खात्यांच्या हिशेबाअंतीं तूट येणें अपरिहार्य आहे. लष्करी खर्च वाढत्या प्रमाणांत असल्यानें उत्पन्नाची बाजू बळकट करण्याकडे फडनवीसांस लक्ष पुरवणें प्राप्त आहे. उत्पन्नांत किती वाढ आवश्यक आहे आणि ते कोणत्या बाबींतून हा वाढावा काढण्याचें योजतात हें लवकरच दिसेल. उद्योगधंदे व व्यापार ह्यांस बाधक होणार नाहीं अशीच कर योजना त्यांनीं करावयास पाहिजे. युद्धपरिस्थितीमुळें ज्यांस जादा फायदा होत असेल, त्यांचेकडून योग्य प्रमाणांत वाढाव्याचा अंश सरकारी तिजोरीनें घेणें गैर होणार नाहीं. सामान्य जनतेच्या सांपत्तिक स्थितीवर मात्र प्रतिकूल परिणाम होणार नाहीं असें करांचें धोरण असावयास पाहिजे. हें तत्त्व फडनवीस ध्यानांत बाळगतील अशी आशा आहे. कारण देशांतील व बाहेरील एकंदर युद्ध परिस्थिति आणि सरकारी तिजोरीच्या निकडीच्या गरजा ह्यांचा मेळ त्यांस घालावा लागेल.

———

## स्वदेशी साखरेच्या धंद्याचें नियमन ?

निरनिराळे प्रांत आणि संस्थानें ह्यांचेमध्यें साखरेच्या कारखान्यांचा विस्तार झाला आहे आणि होत आहे. त्याचें नियंत्रण मध्यवर्ती सरकारानें किंवा दुसऱ्या एखाद्या अखिल भारतीय अधिकारी संस्थेनें करावें, नाहीं तर ह्या स्वदेशी धंद्याची धडगत नाहीं अशा आशयाची ओरड संयुक्त प्रांत व बिहार येथील हितसंबंधी लोकांनीं चालविली असल्याचें आम्हीं " अर्था "च्या मागील एका अंकांत दर्शवलें होतें. ह्या तक्रारीला आतां स्पष्टपणानें आणि अधिकारी रीतीनें आतां तोंड फुटलें आहे. साखरेच्या धंद्याचें नियमन् करणाऱ्या इंडिअन शुगर सिंडिकेट ह्या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. आंबेगांवकर, ह्यांनीं तिच्या नियामक मंडळानें केलेले ठराव हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी व फडनिशी खात्यांकडे पाठवले आहेत आणि त्यांत अशी विनंति केली आहे कीं, अखिल भारतीय स्वरूपाच्या नियंत्रणाखाली हिंदी साखरेचा धंदा आणला जावा आणि हें शक्य न झाल्यास संयुक्तप्रांत व बिहार ह्यांच्या बाहेरील कारखानदारांस अखिल भारतीय विक्रीसंघाचे सभासद होण्यास भाग पाडावें. स्वदेशी साखरेस सध्या मिळत असलेलें संरक्षण कमी करण्यांत यावें आणि अडचणीच्या वेळीं तें वाढवण्याचा अधिकार सरकारनें स्वतःकडे घ्यावा अशीहि सूचना सिंडिकेटनें केली आहे. उत्तर हिंदुस्थानाच्याबाहेर साखरेच्या कारखान्याचा अनियंत्रित रीतीनें विस्तार झाला आहे त्याचे परिणाम देशी साखरेच्या व उंसाच्या धंद्यास घातुक झाल्यावांचून रहावयाचे नाहींत. संयुक्तप्रांत आणि बिहार येथील कारखान्यांवर प्रांतिक सरकारांनीं नियंत्रण घातलें आहे, पण इतरत्र त्याचा अभाव असल्यानें साखरेचें उत्पादन भरमसाटपणानें चालून साखरेच्या किंमती पडल्या आहेत आणि सबंद राष्ट्रीय धंद्यावर संकट ओढवलें आहे. हा वर निर्दिष्ट केलेल्या ठरावांतील मुख्य मुद्दा आहे. सरकारनें दिलेल्या संरक्षणामुळें स्वदेशी साखरेचा धंदा वाढला असल्यानें त्याचें नुकसान व अंतिम नाश होणार नाहीं, त्याविषयीं वेळींच खबरदारी घेणें हें त्यांचें काम आहे असें त्यांस निक्षून सांगण्यांत येत आहे. हिंदुस्थान सरकारावर हें जबाबदारीचें ओझें टाकण्याचें कारण संयुक्त प्रांत आणि बिहार येथील सरकारांनीं उंसाच्या व साखरेच्या किंमतींच्या नियमनाचा त्या धंद्यांच्या स्थैर्याच्या दृष्टीनें चालवलेला प्रयत्न हें होय. तेथील परिस्थितींत इतर प्रांतांतील कारखानदार व सरकार ह्यांनीं अंशभागी व्हावें अशी त्या प्रांतांतील हितसंबंधी धंदेवाल्यांची इच्छा आहे आणि स्वतःचा उद्देश हिंदुस्थान सरकारचे मार्फत सिद्ध करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

———

## इकडील कारखान्यांच्या हिताचें संरक्षण

हिंदुस्थानांतील १४५ साखर कारखान्यांपैकीं १०६ कारखाने इंडियन शुगर सिंडिकेटचे सभासद आहेत. गेल्या वर्षाच्या जून महिन्यांत साखरेची किंमत दर मणास अडीच रुपये ह्याप्रमाणें उतरली गेल्यामुळें त्या संस्थेच्या अनेक सभासद कारखान्यांचा माल विकणें अशक्य होऊन सिंडिकेटच्या डोक्यावर त्यांचें देणें होऊन बसलें. हा बोजा हलका करण्याच्या प्रयत्नांस अजून यश आलेलें नाहीं. आणि सिंडिकेट ही संस्था गुंडाळण्यांत यावी कीं काय ह्या प्रश्नाचीहि चर्चा झाली आहे. असल्या प्रयत्नांत पैशाचा व काळाचा अपव्यय होऊन त्याचा कोणासच उपयोग होणार नाहीं असें सर्व साधारण मत व्यक्त करण्यांत

## सरकारी रेल्वेजच्या उत्पन्न-खर्चाचे आंकडे

| उत्पन्न | लक्ष रुपये | | | |
|---|---|---|---|---|
| | पक्के १९३९-४० | १९४०-४१ अंदाज | १९४०-४१ दुरुस्त अंदाज | अंदाज १९४१-४२ |
| **वहातुकीचें उत्पन्न :** | | | | |
| सरकारी रेल्वेज | ९७,६५ | १,०३,०० | १,०९,२५ | १,०८,२५ |
| सरकारनें चालविलेल्या रेल्वेज | ५,०८ | ५,१९ | ५,४७ | ५,५३ |
| **रेल्वेजचा खर्च** | | | | |
| सरकारी रेल्वेज | ६४,८५ | ६६,६४ | ६६,७१ | ६८,६० |
| सरकारनें चालविलेल्या रेल्वेज | २,५१ | २,६२ | २,५६ | २,६२ |
| चालविलेल्या रेल्वेजना द्यावयाची रक्कम | २,५७ | २,५७ | २,९१ | २,९१ |
| (अ) वहातुकीचें निवळ उत्पन्न | ३२,८० | ३६,३६ | ४२,५४ | ३९,६५ |
| **इतर** | | | | |
| इतर उत्पन्न | १,७१ | १,९६ | १,९९ | २,२४ |
| इतर खर्च | १,०७ | १,२१ | १,२० | १,४६ |
| (ब) इतर निवळ उत्पन्न | ६४ | ७५ | ७९ | ७८ |
| अ+ब निवळ उत्पन्न | ३३,४४ | ३७,११ | ४३,३३ | ४०,४३ |
| व्याज देणें | २९,११ | २८,८२ | २८,७८ | २८,६० |
| वाढावा | ४,३३ | ८,२९ | १४,५५ | ११,८३ |

## प्राप्तीवरील करासंबंधीं एक निवाडा

### सॉलिसिटरला मिळालेली देणगी

इंडियन आयर्न अँड स्टील कंपनीचे मॅनेजिंग एजंट मेसर्स मार्टिन आणि कंपनी, हे एका नवीन पोलादाच्या उत्पादनाचे कंपनीविषयीं वाटाघाट करीत होते. त्या संबंधांत श्री. सुशीलचंद्र सेन, कलकत्ता येथील सॉलिसिटर, ह्यांस श्री. खांडवाल ( कंपनीचे एक भागीदार ) ह्या आपल्या अशिलातर्फे कंपनीच्या सभेस हजर रहावें लागलें. श्री. सेन ह्यांस मार्टिन आणि कंपनीच्या भागीदारांसहि भेटावें लागलें. अखेर, एक योजना उभयपक्षी संमत झाली, त्यामुळें त्यांच्या अशिलाची बाजू ५०% उचलून धरली गेली. इतरहि भागीदारांचा पुष्कळ नफा झाला व त्यांचेतर्फे कोणीतरी श्री. सेन ह्यांस १० हजार रुपये देणगी म्हणून दिले. ह्या रकमेवर प्राप्तीवरील कर घेतला जाऊं नये, ती केवळ देणगी आहे, असें श्री. सेन ह्यांचें म्हणणें होतें. बंगालच्या कमिशनर ऑफ इन्कम टॅक्सनें हा प्रश्न हायकोर्टाकडे सोपविला. "ह्या प्रकरणांत श्री. सेन ह्यांस मिळालेले पैसे हे त्यांच्या धंद्यांतील वेतनाचेच आहेत; ते स्वतः सॉलिसिटर नसते, तर त्यांस ती रकम मिळाली नसती." असें कमिशनर ऑफ इन्कम टॅक्सचें म्हणणें होतें, तें हायकोर्टानें मान्य केलें.

### अँग्लो इंडियनांस जादा पगार

रेल्वेवरील ज्या जागेच्या नोकरास तो हिंदी असल्यास सुरवातीस २० ते ३० रुपये दिले जातात, तोच अँग्लो इंडिअन असल्यास त्यास ५५ रुपये दिले जातात, हें खरें आहे काय? असा प्रश्न डॉ. सर झिआउद्दिन अहमद ह्यांनीं असेंब्लींत विचारला, त्यास उत्तर देतांना रेल्वे मेंबर सर अँन्ड्र्यू क्लो ह्यांनीं हिंदी राज्यघटनेच्या कायद्याच्या २४२ व्या कलमाचा आधार दाखविला. "कस्टम्स, पोस्ट आणि तार खातें, ह्यांमधील नोकरभरतीचेवेळीं नियम करतांना अँग्लो इंडियन जातीचा त्या खात्याशीं आजवर असलेला निकट संबंध, त्या जातीचे लोकांकडे असलेल्या जागांचा दर्जा व त्यांची संख्या, आणि त्यांस पूर्वी मिळत असलेला पगार ह्या सर्वांचा विचार करण्यांत यावा." असें तें कलम आहे. युरोपिअन्सना हिंदुस्थानांत काम करण्याबद्दल "ओव्हर सीज्" भत्ता मिळतो. मौलाना झाफर अलीखान ह्यांनीं, "मुसलमानांच्या रहाणीचें मानहि अँग्लो इंडिअनांप्रमाणेंच उच्च आहे कीं नाहीं?" असा प्रश्न विचारला, त्यावर "कोणत्याच जातीच्या रहाणीचे मानाविषयीं मला मत देतां येणार नाहीं" असें सर अँन्ड्र्यू क्लो हे म्हणाले.

## फळांच्या साठवणीचे प्रयोग--कोल्ड स्टोरेज

हिंदी फळ व भाज्या ह्यांची थंड हवेंत कशा रीतीनें साठवण करतां येईल व ती किफायतशीर होईल किंवा नाहीं ह्यासंबंधीं संशोधन इंपीरिअल कौन्सिल ऑफ अॅग्रिकल्चरल रिसर्चच्या पैशानें गणेशखिंड येथील मुंबई सरकारच्या बागेंतील कोल्ड स्टोरेज मध्यें चालू आहे, त्यास आतां सात वर्षे होतील. ह्या योजनेस एप्रिल, १९४२ अखेर इंपीरियल कौंसिलची मंजुरी मिळालेली आहे. १९३९-४० मध्यें केलेल्या प्रयोगांचा निष्कर्ष खालीलप्रमाणें आहेः—

**हापूस आंबेः**—६८° फॅ. उष्णतामानांत विरळ हवेंत आंबे ठेवले असतां ते अधिक सावकाश पिकतात. ५२° फॅ. उष्णतामानांत पिकलेले आंबे ठेवले, तेव्हां कोईजवळ येणारा तांबुसपणा आढळला नाहीं व फळें एक महिना चांगलीं टिकलीं.

**नागपुरी संत्रींः**—५२° फॅ. व ४०° फॅ. उष्णतामानांत तीन महिने ठेवलेल्या ह्या संत्र्यांतील 'सी' व्हिटॅमिन ( ओज द्रव्य ) नाहींसें झालें नाहीं. तीन महिन्यानंतर हीं संत्रीं रेल्वेनें नागपूरला पाठविलीं, तेव्हां फळांच्या रसास थोडा अंबुस वास येऊं लागला. ह्याचा अर्थ, हीं फळें पाठविण्यास कमी उष्णतामान कायम राखणारे डबे पाहिजेत.

**राजेळी केळींः**—५२° फॅ. उष्णतामानांत वसईचीं केळीं मारठलीं, परंतु ५६° फॅ. ला दोन-तीन आठवड्यांनीं तीं पिकलीं. पिकल्यानंतर तीं तीन चार दिवसांपेक्षा अधिक टिकलीं नाहींत; त्यांच्या पिवळ्या सालींवर तांबुस ठिपके दिसूं लागले, व केळीं घडाच्या दांड्यापासून विभक्त होऊं लागलीं. सुटीं केळीं अथवा त्यांच्या फण्या कोल्ड स्टोरेजमध्यें ठेवल्या, त्यांच्या देठाशीं बुरसा आला. देठाशीं व्हॅसेलिन व पातळ मेण ह्यांचें मिश्रण लावलें, तेव्हां बुरसा थांबला.

**इतर फळेंः**—काश्मिरी सफरचंदें चार महिने ३२° फॅ. मध्यें उत्कृष्ट टिकलीं. तयार अंजीर ३२° फॅ. व ३५° फॅ. उष्णतामानांत एक महिना चांगले टिकले. ६८° फॅ. उष्णतामान पोपयास चाललें नाहीं. ५२° फॅ. मध्यें कागदी लिंबें दोन महिने चांगलीं राहिलीं. कच्चे टामाटू ५२° फॅ. ला पिकले व एका महिन्यांत त्यास चांगला रंग भरला.

## स्फुट विचार

### मध्यवर्ती सरकारच्या बजेटाचा रागरंग

दरवर्षी ह्या वेळेच्या सुमारास हिंदुस्थान सरकारचें पुढील सालाबाबतचें उत्पन्न—खर्चाचें अंदाजपत्रक मध्यवर्ती कायदे मंडळास सादर होण्याचा प्रसंग जवळ आला असतां त्यामध्यें कोणत्या विशेष बाबी अंतर्भूत झालेल्या असतील ह्याविषयीं लोकांमध्यें कुतूहल उत्पन्न होऊन त्यांचे तर्क चालू होतात. सध्याच्या युद्धकाळांत सरकारच्या तिजोरींत निवळ शिलकी उत्पन्नाची भर पडण्याची अपेक्षा असणें संभवनीय नाहीं, ह्यामुळें वाढाव्याचा उपयोग कसा केला जातो ह्याचा मामुली परिस्थितींतल्याप्रमाणें विचार होण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. उलट, युद्धखर्च वाढता असणार आणि तो भागवण्यास पुरा पडेल इतका वाढावा उत्पन्नांत होणार नाहीं ह्याची स्पष्ट कल्पना लोकांस असते. ह्याकरितां उत्पन्न—खर्चांतली तफावत भरून काढण्यास फडनवीस कोणते उपाय योजतात ह्याच्या अंदाजाचा खेळ ते खेळतात. हा कर वाढतो, का तो कर वाढतो ह्याविषयीं केवळ तर्क करण्यापेक्षां त्यांच्या कल्पनेची अधिक मजल जात नाहीं. रेलवेजचें अंदाजपत्रक कांहीं दिवस अगोदर प्रसिद्ध झालेलें असल्यानें त्यावरून दिसून येणारी मध्यवर्ती तिजोरीस व्हावयाची प्राप्ती तेवढी कळलेली असते. जनतेच्या तर्कास आधार म्हटला म्हणजे सरकारनें प्रसिद्ध केलेल्या नऊ महिन्यांच्या उत्पन्न—खर्चाच्या आकड्यांचाच तेवढा असतो. गेल्या डिसेंबर महिन्यांत उत्पन्नाच्या प्रमुख बाबींचा वसूल पूर्वीच्या वर्षाच्या ह्याच महिन्याचे मानानें तीन कोटि रुपयांनीं कमी झाला, पण खर्च मात्र एक कोटीनें वाढला. चालू वर्षाचे पहिले नऊ महिने घेतले तर उत्पन्न पूर्व सालाच्या त्याच नऊ महिन्याच्या मानानें आठ कोटि रुपयांनीं घटलें असें दिसून येतें. ह्यापैकीं बहुतेक म्हणजे सात कोटि इतकी घट कस्टम्सच्या वसुलीमध्यें झाली. ह्या नऊ महिन्यांत खर्च नऊ कोटींनीं वाढला आणि ह्या वाढाव्याचें कारण संरक्षण खात्यावर झालेला जादा खर्च हें होय. चालू वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत कायमच्या कर्जांत १५ कोटि रुपयांची वाढ झाली. युद्धकर्जाचा पैसा सरकारकडे येत असला तरी १९४०—४३ सालांच्या मुदतीच्या कर्जरोख्यांची गेल्या सप्टेंबर महिन्यांत परतफेड करण्यांत आल्यामुळें १९ कोटि रुपये जनतेस द्यावे लागले. संबंद्ध वर्षाच्या सांपत्तिक स्थितीचा अंदाज करतां रेलवेज, पोस्ट इत्यादि बाबींची जमा पूर्वीच्या वर्षाचे मानानें व अंदाजपत्रकाशीं तुलना करतां अधिक असली तरी सर्व खात्यांच्या हिशेबाअंतीं तूट येणें अपरिहार्य आहे. लष्करी खर्च वाढत्या प्रमाणांत असल्यानें उत्पन्नाची बाजू बळकट करण्याकडे फडनवीसांस लक्ष पुरवणें प्राप्त आहे. उत्पन्नांत किती वाढ आवश्यक आहे आणि ते कोणत्या बाबींतून हा वाढावा काढण्याचें योजतात हें लवकरच दिसेल. उद्योगधंदे व व्यापार ह्यांस बाधक होणार नाहीं अशीच कर योजना त्यांनीं करावयास पाहिजे. युद्धपरिस्थितीमुळें ज्यांस जादा फायदा होत असेल, त्यांचेकडून योग्य प्रमाणांत वाढाव्याचा अंश सरकारी तिजोरीनें घेणें गैर होणार नाहीं. सामान्य जनतेच्या सांपत्तिक स्थितीवर मात्र प्रतिकूल परिणाम होणार नाहीं असें करांचें धोरण असावयास पाहिजे. हें तत्त्व फडनवीस ध्यानांत बाळगतील अशी आशा आहे. कारण देशांतील व बाहेरील एकंदर युद्ध परिस्थिति आणि सरकारी तिजोरींच्या निकडीच्या गरजा ह्यांचा मेळ त्यांस घालावा लागेल.

———

### स्वदेशी साखरेच्या धंद्याचें नियमन ?

निरनिराळे प्रांत आणि संस्थानें ह्यांचेमध्यें साखरेच्या कारखान्यांचा विस्तार झाला आहे आणि होत आहे. त्याचें नियंत्रण मध्यवर्ती सरकारानें किंवा दुसऱ्या एखाद्या अखिल भारतीय अधिकारी संस्थेनें करावें, नाहीं तर ह्या स्वदेशी धंद्याची घडगत नाहीं अशा आशयाची ओरड संयुक्त प्रांत व बिहार येथील हितसंबंधी लोकांनीं चालविली असल्याचें आम्हीं "अर्था"च्या मागील एका अंकांत दर्शवलें होतें. ह्या तक्रारीला आतां स्पष्टपणानें आणि अधिकारी रीतीनें आतां तोंड फुटलें आहे. साखरेच्या धंद्याचें नियमन करणाऱ्या इंडिअन शुगर सिंडिकेट ह्या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. आंबेगांवकर, ह्यांनीं तिच्या नियामक मंडळानें केलेले ठराव हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी व फडनिशी खात्यांकडे पाठवले आहेत आणि त्यांत अशी विनंति केली आहे कीं, अखिल भारतीय स्वरूपाच्या नियंत्रणाखाली हिंदी साखरेचा धंदा आणला जावा आणि हें शक्य न झाल्यास संयुक्तप्रांत व बिहार ह्यांच्या बाहेरील कारखानदारांस अखिल भारतीय विक्रीसंघाचे सभासद होण्यास भाग पाडावें. स्वदेशी साखरेस सध्या मिळत असलेलें संरक्षण कमी करण्यांत यावें आणि अडचणीच्या वेळीं तें वाढवण्याचा अधिकार सरकारनें स्वतःकडे घ्यावा अशीहि सूचना सिंडिकेटनें केली आहे. उत्तर हिंदुस्थानाच्याबाहेर साखरेच्या कारखान्याचा अनियंत्रित रीतीनें विस्तार झाला आहे त्याचे परिणाम देशी साखरेच्या व उंसाच्या धंद्यास घातुक झाल्यावांचून रहावयाचे नाहींत. संयुक्तप्रांत आणि बिहार येथील कारखान्यांवर प्रांतिक सरकारांनीं नियंत्रण घातलें आहे, पण इतरत्र त्याचा अभाव असल्यानें साखरेचें उत्पादन भरमसाटपणानें चालून साखरेच्या किंमती पडल्या आहेत आणि सबंद राष्ट्रीय धंद्यावर संकट ओढवलें आहे. हा वर निर्दिष्ट केलेल्या ठरावांतील मुख्य मुद्दा आहे. सरकारनें दिलेल्या संरक्षणामुळें स्वदेशी साखरेचा धंदा वाढला असल्यानें त्याचें नुकसान व अंतिम नाश होणार नाहीं, त्याविषयीं वेळींच खबरदारी घेणें हें त्यांचें काम आहे असें त्यांस निक्षून सांगण्यांत येत आहे. हिंदुस्थान सरकारावर हें जबाबदारीचें ओझें टाकण्याचें कारण संयुक्त प्रांत आणि बिहार येथील सरकारांनीं उंसाच्या व साखरेच्या किंमतींच्या नियमनाचा त्या धंद्यांच्या स्थैर्याच्या दृष्टीनें चालवलेला प्रयत्न हें होय. तेथील परिस्थितींत इतर प्रांतांतील कारखानदार व सरकार ह्यांनीं अंशभागी व्हावें अशी त्या प्रांतांतील हितसंबंधी धंदेवाल्यांची इच्छा आहे आणि स्वतःचा उद्देश हिंदुस्थान सरकारचे मार्फत सिद्ध करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

———

### इकडील कारखान्यांच्या हिताचें संरक्षण

हिंदुस्थानांतील १४५ साखर कारखान्यांपैकीं १०६ कारखाने इंडियन शुगर सिंडिकेटचे सभासद आहेत. गेल्या वर्षाच्या जून महिन्यांत साखरेची किंमत दर मणास अडीच रुपये ह्याप्रमाणें उतरवली गेल्यामुळें त्या संस्थेच्या अनेक सभासद कारखान्यांचा माल विकणें अशक्य होऊन सिंडिकेटच्या डोक्यावर त्यांचें देणें होऊन बसलें. हा बोजा हलका करण्याच्या प्रयत्नांस अजून यश आलेलें नाहीं. आणि सिंडिकेट ही संस्था गुंडाळण्यांत यावी कीं काय ह्या प्रश्नाचीहि चर्चा झाली आहे. असल्या प्रयत्नांत पैशाचा व काळाचा अपव्यय होऊन त्याचा कोणासच उपयोग होणार नाहीं असें सर्व साधारण मत व्यक्त करण्यांत

आलें आहे. गेल्या वर्षांतील एप्रिल ११ च्या अखेर पुऱ्या झालेल्या मुदतींतील शिल्लक साखरेपैकीं सुमारें निम्म्या मालाची किंमत दर मणास साडेतीन रुपये ह्या दरानें कमी करून ती निकालांत काढावी अशी एक सूचना पुढें आली आहे. सिंडिकेटच्या सभासदांनीं आपल्या येण्याबावत थोडासा स्वार्थत्याग करावा आणि ह्या रीतीनें धंद्यावर आलेलें संकट दूर करण्याचा प्रयत्न व्हावा असेंहि सुचवण्यांत येत आहे. उत्तर हिंदुस्थानांतील साखर कारखान्यांची सांपत्तिक परिस्थिति किती गुंतागुंतीची आणि नाजुक झाली आहे ह्याची वरील माहितीवरून कल्पना येईल. तथापि, संयुक्तप्रांत व बिहार येथील कारखान्यांच्या हलाखीचा व ती नाहींशी करण्यासाठीं चाललेल्या स्थानिक उपायांचा प्रतिकूल परिणाम दक्षिणेकडील व इतर ठिकाणच्या कारखान्यांवर होणार नाहीं ह्या विषयींची काळजी हिंदुस्थान सरकारनें घेतली पाहिजे. ह्या बाजूच्या कारखानदारांनीं वेळींच जागरुकत्व दाखवून स्वतःच्या हितसंबंधांचें योग्य संरक्षण होईल अशी व्यवस्था करणें अगत्याचें आहे.

---

### हिंदी लोकसंख्येची वाढ

हिंदुस्थानची १९४१ सालाची दशवार्षिक शिरगणति चालू आहे. १९३१ सालीं हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांची मिळून लोकसंख्या ३५ कोटि, २० लक्ष होती. चालू वर्षी एकट्या हिंदुस्थानाचीच लोकसंख्या ४० कोटींवर जाईल, असा अंदाज आहे. १८७२ सालीं हिंदुस्थानची पहिली शिरगणति झाली. हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशाच्या मोठ्या लोकसंख्येची शिरगणति करणें सोपें काम नाहीं. लोकांचें अज्ञान, गणति करणारांमध्यें कार्यतत्परतेचा व जबाबदारीच्या जाणिवेचा अभाव, देशांतील लोकांमधील वैचित्र्य, इत्यादि गोष्टी अचुक गणतीस पोषक नाहींत. तथापि वाढत्या अनुभवानुसार हिंदी शिरगणति अधिकाधिक बरोबर होऊं लागली आहे. गोळा केलेल्या आकड्यांपासून लोकसंख्येच्या प्रवृत्तीचा निष्कर्ष काढण्यास तर कांहींच प्रत्यवाय नाहीं. हिंदुस्थानच्या क्षेत्रांत १९ व्या शतकांत एकसारखी वाढ होत होती, ह्यामुळें १९०१ पर्यंतचे आकडे त्या प्रमाणांत वाढलेले आहेत. शिरगणतीची पद्धतहि तोंपर्यंत नीट बसलेली नव्हती. खालील तक्त्यांत लोकसंख्येच्या वाढीचे आकडे दिले आहेत:—

| वर्ष | एकूण लोकसंख्या | | लोकसंख्येंत वाढ | | वाढीचें |
|---|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष | प्रमाण% |
| १८७२ | २० | ६२ | — | — | — |
| १८८१ | २५ | ३९ | ४ | ८० | ·२४ |
| १८९१ | २८ | ७३ | ३ | ३५ | १३·४ |
| १९०१ | २९ | ४४ | ० | ७० | २·४ |
| १९११ | ३१ | ५२ | २ | ५ | ७·० |
| १९२१ | ३१ | ८९ | | ३८ | १·२ |
| १९३१ | ३५ | २८ | ३ | ४० | १०·६ |

गेल्या तीस वर्षांत ( १९०१ ते १९३१ ) हिंदी लोकसंख्येंत २०% वाढ झाली. हिंदी संस्थानी प्रजेंत २१% वाढ झाली, तर ब्रिटिश हिंदी प्रजा १७% नीं वाढली. एकूण हिंदी लोकसंख्येपैकीं ६७% लोक शेतीच्या व्यवसायांत आहेत; सर्व पुढारलेल्या देशांतील लोक मुख्यतः उद्योगधंद्यांत गुंतलेले आहेत. ग्रेट ब्रिटनमधील २०% लोक खेड्यांत रहातात; हिंदुस्थानांतील ८९% लोक खेड्यांतीलच आहेत.


दि

बँक ऑफ महाराष्ट्र,

लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो

बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना

---




मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

---

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची वार्षिक सभा

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची पांचवी वार्षिक सभा रविवार ता. २३ फेब्रुवारी रोजीं सायंकाळीं ५ वाजतां बँकेच्या नोंदलेल्या कचेरींत भरली होती. सभेस सुमारें ६० भागीदार उपस्थित होते. बँकेचे मॅनेजर, श्री. म. वि. गोखले ह्यांनीं सभेची नोटीस वाचून दाखविल्यावर बँकेचे अध्यक्ष, प्रो. वा. गो. काळे, ह्यांनीं बँकेचा ३१ डिसेंबर, १९४० अखेरचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व डायरेक्टर बोर्डाचा रिपोर्ट हीं भागीदारांकडे अगोदरच रवाना केलेलीं असल्यामुळें सभेंत त्यांचें वाचन करण्याची आवश्यकता नाहीं, असें सुचविलें व त्यास सभेनें अनुमति दिली. त्यानंतर त्यांनीं खालीलप्रमाणें भाषण केलें.

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

"बँकेच्या पंचवार्षिक प्रगतीच्या आकड्यांवरून, बँकेचें भाग भांडवल, तिचेकडील ठेवी, बँकेनें दिलेलीं कर्जें, कर्जरोख्यांत गुंतविलेली रकम, रोख ठेवलेली रकम, ठेवींच्या खात्यांची संख्या, कर्जखात्यांची संख्या, इत्यादींबाबतची तुलनात्मक सर्व माहिती आपणांस मिळाली. रिझर्व्ह बँकेनें घालून दिलेल्या आदर्शाप्रमाणेंच बँकेचा सर्व व्यवहार चालू आहे. सध्यासारख्या अनिश्चित परिस्थितींत हाताशी येण्याजोग्या तरत्या रकमा ठेवणें इष्ट आहे व त्यामुळें व्याजाचें थोडेंफार नुकसान झालें तरी प्रत्यवाय नाहीं. बँकेनें सेव्हिंग्ज ठेवींवरील व्याजाचा दर अर्ध्या टक्क्यानें उतरविला तरीसुद्धा ठेवींमध्यें अखंड वाढ होत चालली आहे, हें आकड्यांवरून स्पष्ट दिसत आहे. वाढत्या खेळत्या भांडवलाचे मानानें नफ्याचें प्रमाण वाढलेलें दिसत नाहीं, ह्याचें कारण हाताशी राखलेली मोठी रकम हें होय. बँकेच्या नोकरवर्गावर पडणाऱ्या जबाबदारीचे व कामाचे मानानें त्यास वेतन मिळणें आवश्यक आहे ह्याची जाणीव बोर्डास आहे. नोकर वर्गासाठीं केलेली प्रॉव्हिडंट फंडाची योजना व त्याच्या पगारांत केलेली वाढ ह्यांचे योगानें बँकेचा खर्च थोडा वाढलेहि. सरकारी कर्जरोख्यांतील घसारा भरून काढण्यासाठी बँकेनें बाजूस काढलेले फंड पुरेसे आहेत व घसाऱ्याचें प्रमाण मागील वर्षीच्या मानानें आतां पुष्कळच कमी आहे, ही परिस्थिति अत्यंत समाधानकारक आहे. कायद्याप्रमाणें काढावयाचा रिझर्व्ह फंड हा सालोसाल वाढतच आहे. बँकेच्या संचालकांना आपली बँक ही एक आदर्श संस्था करावयाची आहे व त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न चालू आहेत. भागीदार, ठेवीदार व सामान्य जनता ह्यांच्या सहकार्यामुळेंच बँकेस आजचा दर्जा प्राप्त झाला आहे, त्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत."

वरीलप्रमाणें भाषण करून, ताळेबंद, नफातोटा पत्रक व डायरेक्टर बोर्डाचा रिपोर्ट ह्यांस सभेनें अनुमति द्यावी असें त्यांनीं सुचविलें व त्यास श्री. धोंडूमामा साठे ह्यांनीं अनुमोदन दिलें.

ह्या सूचनेवर श्री. आ. रा. भट ह्यांनीं व इतर कांहीं भागीदारांनीं भाषण करून संचालकांचें बँकेच्या सावधगिरीयुक्त प्रगतिपर धोरणाबद्दल अभिनंदन केलें. ही सूचना मंजूर झाली. डायरेक्टर बोर्डानें सुचविलेलें ४% करमाफ डिव्हिडंड सभेनें मंजूर केलें व निवृत्त होणाऱ्या तिघांहि डायरेक्टरांची ( प्रो. काळे, श्री. धोंडूमामा साठे व श्री. न. ग. पवार ) फेरनिवड केली. श्री. द. ग. जोशी, श्री. गो. द. आपटे व मेसर्स कुलकर्णी आणि खानोलकर ह्या तिघांची ऑडिटर्सचे जागीं निवड झाली. वरील सर्व ठराव सर्वानुमतें मंजूर झाले. आभार प्रदर्शनानंतर सभेचें काम संपलें.

### बँकेची पंचवार्षिक प्रगति

| | १९३६ | १९३७ | १९३८ | १९३९ | १९४० |
|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| खेळतें भांडवल ... ... | ८,२६,४७८ | १३,३९,८७४ | १८,५५,६२७ | २३,१३,३१० | ३०,३३,७७० |
| वसूल भांडवल ... ... | १,०४,४९५ | १,१२,४४० | १,२५,३८० | १,५१,७२५ | १,८१.२७५ |
| चालू ठेवी ... ... | १,६४,५७५ | ३,२४,५२० | ५,५२,६८९ | ६,२७,०८९ | ७,१६,८०८ |
| सेव्हिंग्ज ठेवी ... .. | ३,२२,४३३ | ५,७२,२५१ | ६,९५,१११ | ९,४८,९८१ | १३,५६,५११ |
| मुदतीच्या ठेवी ... ... | २,३३,९१५ | ३,१६,६१५ | ४,५७,५१५ | ५,०७,२७५ | ६,७९,०५५ |
| दिलेलीं कर्जें ... ... | १,९७,२५८ | १,९९,५५१ | ३,२९,८०७ | ३,७०,४८१ | ४,३५,२६५ |
| कॅश क्रेडिट्स ... ... | ६३,५९९ | ३,००,५२९ | ३,५४,५८५ | ७,०५,६१३ | ८,२२,३६६ |
| कर्जरोख्यांत गुंतविलेली रक्कम ... | ४,८०,४६२ | ६,९८,३६५ | ८,८९,३१६ | ८,८१,५०६ | ११,४६,७४० |
| निवळ नफा ... ... | ६३५ | १३,७५२ | १७,५१५ | १९,२०० | २०,३१२ |

### खात्यांची वर्गवारी

| | १९३६ | १९३७ | १९३८ | १९३९ | १९४० |
|---|---|---|---|---|---|
| चालू खातीं ... ... | २४६ | ३२० | ३८२ | ५११ | ५९८ |
| सेव्हिंग्ज खातीं ... ... | ६०१ | १२३३ | १५६५ | १९६० | २६०४ |
| कर्ज खातीं ... ... | ७५ | १३० | १८२ | २०६ | २२१ |
| कॅश क्रेडिट् खातीं ... ... | ३१ | ६८ | ११९ | १५७ | १८७ |

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

( ले.—वा. चिं. भानु )

**गोसाबाची वसाहतः—**सहकारी चळवळीच्या माहितीसाठी असो किंवा इतर कोणत्याही हेतूनें असो, बंगाल प्रांताची सफर करणारांनीं,कलकत्त्याजवळच असलेल्या सुंदरबनानजीक गोसाबाची वसाहत पाहिल्याशिवाय राहूं नये. मनांत तीव्र तळमळ, उदात्त हेतू व सोज्वळ पद्धति असल्यास, एकादी व्यक्ती समाजांतील महत्त्वाचे प्रश्न सहकारी मार्गानें कसे सोडवूं शकते याचा दाखला हवा असेल तर ही गोसाबाची वसाहत म्हणून दाखविण्यास हरकत नाहीं, अशी ग्वाही आग्रा प्रांताचे असिस्टंट रजिस्ट्रार श्री. चतुर्वेदी यांनीं इंडियन को–ऑपरेटिव्ह रिव्ह्यूमध्यें एका मनोरंजक प्रवासवृत्तांत दिली आहे.

***

मरहूम सर डॅनियल हॅमिल्टन यांनीं सरकारकडून अदमासें २२,००० एकरांचें रान वसाहतीसाठी घेतलें व त्यापैकीं १६,४०० एकर शेतीखालीं आणलें. 'सतत्–शिला', रंगुबालिया व गोसाबा हीं या टुमदार वसाहतींचीं केंद्रें असून गोसाबा हें सर्वांत मुख्य आहे. ही वसाहत करीत असतां, तीव्र स्वरुपाचा मलेरिया, अरण्यांतले वाघ व भयंकर विषारी सर्प यांचा प्रथम बंदोबस्त करण्यास अरण्य तोडून साफ करण्यापासून कामें करावीं लागलीं आहेत. सांप्रत या वसाहतीमध्यें २,००० कुटुंबें राहात आहेत. त्यांत सर्व धर्मांचा व जातींचा समावेश झालेला आहे. त्यामुळें ही वसाहत जातिविशिष्ट म्हणून समजली जात नाहीं.

***

या वसाहतीमध्यें पहिली को. के. सोसायटी १९१६ सालीं स्थापन झाली. तिचे प्राथमिक भांडवल वसाहतीचे जमीनदार सर डॅनियल यांनींच पुरविलें होतें. हल्लीं तेथें अशा २१ सोसायट्या असून त्यांत ७७४ सभासद आहेत. या पतपेढ्यांना आरंभींच्या काळीं सर डॅनियल हेंच भांडवलाचा पुरवठा करीत असत. इ. स. १९२४ सालीं या वसाहतीमध्यें एक सेंट्रल बँक स्थापन करण्यांत आली. सहकारी तत्वावरच्या या संस्थांनीं खासगी सावकारांना वसाहतींत बिलकुल वाव मिळूं दिलेला नाहीं.

***

येथील सहकारी पेढ्या सभासदांना शेतीच्या कामासाठीं लागणारें कर्ज देतात. शेतांतून पिकणारा सर्व माल 'ज्यामिनी राईस मिल' खरेदी करते. या गिरणीचे सर्व भाग वसाहतींतल्याच सर्व शेतकऱ्यांमध्यें खपविलेत आलेले आहेत. गिरणी इतरत्र असणाऱ्या बाजारभावानेंच माल खरेदी करिते व ज्यांच्या मालाची विक्री झाली असेल त्यांना सेंट्रल बँकेमार्फत मालाची किंमत पोहोंचविते.

शेतकऱ्यांना माळविक्रीचा पैसा प्रत्यक्ष देताना बँक, त्या शेतकऱ्यांचा सोसायटीचा सव्याज हप्ता व जमिनीचा खंड कापून घेऊन उरणारी बाकी रोख देते. या अशा चक्राकार पद्धतीमुळें शेतकऱ्यांना मालाची किंमत भरपूर मिळते, सोसायटीचा हप्ता कधींही थकत नाहीं, जमिनदार सर डॅनियल यांचा खंड बिनभोभाट वसूल होतो, आणि बँकेचें सोसायटीकडील कर्जही वेळच्या वेळीं वसूल होतें. म्हणून शेतकऱ्यांस पुनः ऐन गरजेच्या वेळीं शेतकामासाठीं भरपूर भांडवल सोसायट्याहि हुकमी देऊं शकतात.

***

याप्रमाणें शेतीच्या मालाची विक्री व शेतकऱ्यांना भांडवलाचा पुरवठा यांची सांगड, सेंट्रल को. बँकेच्या मार्फतीनें राईस मिलबरोबर करण्यांत आल्याकारणानें सोसायट्यांकडे किंवा सभासदांकडे कर्जें थकत नाहींत. खरेदी केलेला माल राईस मिल कलकत्ता किंवा असल्याच मोठ्या बाजारांत घाऊक पद्धतीनें विकून याच बँकेमार्फत आपला पैसा मोकळा करिते.

***

अशाच तऱ्हेची कांहीं योजना आपल्या इकडच्या भागांत ज्वारी, बाजरी, करडी व गहूं या धान्यांबाबत करण्याचें सहकारी बँकांनीं, सरकार आणि सहकारी खातें यांच्या सक्रिय मदतीनें ठरविल्यास थकबाकीच्या बर्फाचे डोंगर वितळूं लागतील व 'सूट' आणि 'सवलती' या अनिष्ट अन् घरबुडव्या पद्धतीस चटावलेले कर्जदार, ऋणमुक्त होण्याच्या खऱ्या व टिकावू मार्गाला लागतील असें माझें प्रामाणिक मत आहे.

या वसाहतीमध्यें वरील सोसायट्याशिवाय, सहकारी तत्त्वावर चालविण्यांत आलेली एक वखारही आहे. वसाहतींतील शेतकऱ्यांना ही वखार, संसारांत नेहमीच्या लागणाऱ्या सर्व वस्तू व माल माफक भावानें पण रोखीनें देते. ज्या मचव्यांतून तांदूळ किंवा भात कलकत्त्यास जातें त्याच मचव्यांतून वखारीला लागणारा माल कलकत्त्याहून वसाहतींत आणला जातो. यामुळें वाहतुकीचा खर्च कमी पडून कलकत्त्याच्य भावानेंच वसाहतींतील शेतकऱ्यांना हा माल मिळूं शकतो.

शिक्षणप्रसाराच्या दृष्टीनेंही वसाहतीनें केलेली प्रगति स्पृहणीय आहे. १६ प्राथमिक शिक्षणाच्या शाळा, २ दुय्यम शिक्षणाच्या शाळा, एक मुलींची शाळा व एक मिडल क्लास इंग्लिश स्कूल अशा संस्था चालूं आहेत. शिवाय प्रौढ शिक्षणाचे दृष्टीनें २–३ रात्रीच्या शाळाही चालविण्यांत येत आहेत. या शाळांतून ग्रॅमोफोन, मॅजिक लँटर्न इत्यादि आधुनिक उपकरणें व वाचनालयेंही आहेत. शाळांना जोडून शेतीचें व्हावहारिक शिक्षण देण्याचे वर्ग चालविण्यांत येतात. त्यांतून होणारे प्रयोग व मिळणारे धडे वसाहतीच्या इतर शेतकऱ्यांनाही मार्गदर्शक होतात. हातमागावर कामें करण्याचें शिक्षण देणारे वर्गही कांहीं शाळांना जोडलेले आहेत. शिवाय एक 'सेंट्रल हँडलूम फॅक्टरी' (हातमागांचा विणकर कारखाना) वसाहतींत चालला असून त्यावर देखरेख करण्याची कामगिरी सेंट्रल बँकेवर सोपविलेली आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. भांडवलाचा पुरवठा अर्थातच बँकेनें केलेला असणार हें वेगळें सांगण्याचें कारण नाहीं.

### वाळवंटांतील मोटारी

लिबियाच्या वाळवंटांत ब्रिटिशांपुढें इटालियन फौजेस पळ काढावा लागला, ह्याचें श्रेय कार्यक्षम यांत्रिक मोटारींचे ताफ्यांस पुष्कळसें आहे. ह्या मोटारींस मोठ्या आकाराच्या व कमी हवा भरलेल्या टायर्स लागतात. कढत वाळूंवरील चालीमुळें टायरमध्यें उष्णता उत्पन्न होते व त्यांतील हवेचा दाब वाढतो. टायर टणक होत चालली, म्हणजे तिचा कमी कमी भाग जमिनीवर टेकूं लागतो व टायर वाळूंत रुतते. वाळवंटांत पाण्याचें दुर्भिक्ष्य असल्यामुळें, इंजनांभोवतालचें पाणी उकळूं लागल्यास त्याच्या वाफेपासून पुनः पाणी करून तें रेडिएटरमध्यें सोडण्याची व्यवस्था मोटारींत करावी लागते. वाळूच्या कणांनीं कारब्युरेटर भरून जातात, तें टाळण्यासाठी फिल्टरमधून हवा घ्यावी लागते. इंजनें अत्यंत भक्कम व साधीं असणें तर अत्यावश्यक आहे. मऊ वाळूंतून बाहेर पडण्यास लागणारीं सर्व साधनें मोटारींत बाळगावीं लागतात.

## रेल्वे बजेटावरील सर अँन्ड्र्यू क्लो ह्यांचें भाषण

### कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रकाश

बॉंबे बरोडा अँड सेंट्रल इंडिया रेल्वेच्या खरेदीसाठी २ कोटि, ६७ लक्ष रुपयांची व आसाम–बेंगाल रेल्वेच्या खरेदीसाठी २ कोटि रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

***

उतारूंच्या व मालवहातुकीच्या दरांत फेरबदल होण्याचा संभव नाहीं; परंतु कोळशावरील सरचार्ज एप्रिल ते ऑक्टोबर अखेर ५% कमी करण्यांचा सरकारचा विचार आहे.

***

१९४०–४१ च्या हिशेबांत मोठा वाढावा आढळला असला, तरी त्याचा विनियोग रिझर्व्ह निर्माणकडे मुख्यतः करण्यांत येणार नाहीं. १४३ कोटींपैकीं १० कोटि मध्यवर्ती सरकारास मिळतील.

***

आगगाडीचीं इंजनें करण्यासाठीं काढलेलें वर्कशॉप आतां युद्ध-विषयक गोष्टींच्या उत्पादनासाठीं उपयोगांत आणलें जात आहे.

***

परदेशीं पाठविण्यासाठी रुळांची आवश्यकता आहे, त्याकरितां १८ रेल्वे रस्ते उखडण्यांत यावयाचे आहेत, त्यांपैकीं ९ रेल्वे रस्ते आतांपर्यंत बंद करण्यांत आले आहेत.

***

सरकारी रेल्वेजपैकीं ज्या रेल्वे उखडून टाकल्या आहेत, त्यांत १ कोटि, ९० लक्ष रुपयांचें भांडवल गुंतलेलें होतें.

***

येत्या वर्षी नवीन रेल्वे फाट्यांचें कोणतेंच काम हातीं घेतलें जाणार नाहीं.

***

हिंदी रेल्वेजमध्यें सुमारें ७ अब्ज, ६१ कोटि रुपये भांडवल गुंतलेलें आहे.

***

बी. बी. अँड सी. आय. रेल्वेच्या भाग भांडवलापैकीं ९६% भांडवल सरकारचेंच आहे. आतां तिच्या खरेदीसाठीं फक्त २ कोटि, ६७ लक्ष रुपये द्यावयाचे आहेत.

***

जानेवारी, १९४० मध्यें एक ट्रॅन्सपोर्ट अडव्हायसरी ऑफिसर नेमण्यांत आला. त्याचे साहाय्यामुळें माल वहातुकीस अधिक वॅगन्स पुरविणें शक्य झालें. ईस्ट इंडियन व बेंगाल नागपूर रेल्वेनें जानेवारी ते एप्रिल ह्या पांच महिन्यांत त्या वर्षापूर्वीच्या तत्सम मुदतीमधील पुरवठ्यापेक्षां ४८ हजार वॅगन्स अधिक पुरवल्या.

***

उतारूंची संख्या वाढण्याच्या मानानें त्यांच्या तिकिटांचें उत्पन्न पुष्कळच अधिक झालें. रिकामे डबे वाढत्या उतारूंच्या संख्येनें भरले; त्यासाठी जादा खर्च आला नाहीं.

***

जानेवारी, १९४१ मध्यें उतारूंची संख्या एकदम वाढली व त्यामुळें त्यांच्या तिकिटांचें उत्पन्न अनपेक्षितपणें वाढलें.

***

## आकडेशास्त्र म्हणजे काय ?

( डॉ. सुखात्मे ह्यांच्या, पुणें येथील रिसर्च वर्कर्स असोसिएशनमधील एका भाषणाचा सारांश )

" कोणतीहि गोष्ट घडण्यास अनेक कारणें असूं शकतात. जमिनीचा सकसपणा, हवामान, कीड, बियांचा प्रकार, लागवडीची पद्धत, इत्यादि अनेक गोष्टींवर पिकांचें उत्पादन अवलंबून असतें. प्रयोग करणारा शास्त्रज्ञ बाकी सर्व कारणें नियंत्रित करून एकाच कारणांत फेरबदल करून त्याचे परिणामांचा अभ्यास करीत असतो. उदाहरणार्थ, उष्णतामान कायम ठेवून, एकाद्या पदार्थाचें घनफळ दाबाप्रमाणें कसें बदलतें, हें बॉइल्स लॉ सांगतो. प्रत्यक्ष व्यवहारांत, इतके नियंत्रित प्रयोग करणें कठीण असतें. दोन शेतांत घातलेल्या खतांचा त्यांत येणाऱ्या पिकांवरील परिणाम बघावयाचा आहे, असें आपण समजूं. हीं दोन्हीं शेतें शक्य तितकीं एकसारखीं केलीं, तरी तीं पूर्णपणें सारखीं होणें अशक्य आहे. प्रयोगशाळेंतहि, मनुष्याच्या दृष्टीनें मोजावयाच्या गोष्टींत थोडीफार चूक आढळतेच. परंतु ही चूक अत्यल्प असल्या कारणानें, प्रयोगाचा निष्कर्ष काढतेवेळीं ती लक्षांत घेतली नाहीं तरी बिघडत नाहीं. परंतु शेतीच्या संशोधनाचे बाबतींत किंवा इतर प्रयोगांत मात्र ही चूक लक्षांत न घेणें घातुक ठरेल.

### आकडेशास्त्राचीं प्रमुख कामें

" ज्या प्रश्नांचे संबंधांत दिलेल्या अगर गृहीत धरलेल्या गोष्टी बरोबर अथवा चूक असणें अनेक कारणांवर अवलंबून असतें, अशा प्रश्नांचे विचाराचे वेळीं आकडेशास्त्राची विशेष मदत होते. ( १ ) ज्यापासून बरोबर सिद्धांत काढतां येईल, असे प्रयोग आखणें व ( २ ) प्रयोगांतून निष्पन्न होणाऱ्या गोष्टी योग्य रीतीनें मांडून त्यांपासून बरोबर अनुमान काढणें, हीं आकडेशास्त्राचीं दोन प्रमुख कामें आहेत. ज्यांचें नियंत्रण करतां येत नाहीं अशा कारणांच्या परिणामांस योग्य तें महत्त्व देणें जरूर असतें, हें उघड आहे. निष्पन्न होणाऱ्या गोष्टींपासून ज्या पद्धतीनें सिद्धांत काढतात, त्यास आकडेशास्त्राची पद्धत म्हणतां येईल; ज्या तत्त्वांवर ही पद्धत आधारलेली असते, त्यास आकडेशास्त्राचें मूल तत्त्व म्हणतां येईल व ज्यांचे आधारानें ही पद्धत काढली, तें गणितशास्त्र होय. "

डॉ. सुखात्मे ह्यांनीं नंतर आकडेशास्त्राच्या दोन प्रमुख कार्यांचे स्पष्टीकरणार्थ उदाहरणें दिलीं व आपलें ध्येय साध्य करण्याकरितां आकडेशास्त्रज्ञ कशी योजना करतात, त्याचेंहि वर्णन केलें. आकडेशास्त्राचा त्यांनीं इतिहास निवेदन केला. पुढें ते म्हणाले:—"प्रत्येक शास्त्रांतील कांहीं जुने सिद्धांत आजच्या नव्या विवेचक परीक्षेस उतरत नाहींत व त्यांची जागा नवे सिद्धांत घेत आहेत. जुनें शिकलेलें विसरण्याची पाळी येत आहे. आकडेशास्त्र तरी त्यास अपवाद कसें ठरणार ? प्रत्येक शास्त्रज्ञास आकडेशास्त्राच्या पद्धतीनेंच अनुमानें काढावीं लागतात. प्रत्येक तरुण शास्त्रज्ञानें आकडेशास्त्राची चांगली माहिती करून घेतली पाहिजे."

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या मार्यंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—१ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९५—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—४ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४—० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९६–१४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११४—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४५—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०९—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४३—६ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६१—४ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३४—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५६७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १८२५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% ... ... | ६३—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) ११½% | ९२०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. ... ... ... | २०६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४६–१२ |
| शिंधा स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४१—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३९५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४८—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३७४—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८९०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १४०—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–१४–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६२–१५–० |


**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.

२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.

३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

*  *  *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.

२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

**पुण्यांत आल्यावर**

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

**अवर होम,**

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.




फोन नं. ७७१ व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकॅडेमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचें माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ५ मार्च, १९४१ अंक १०

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

दि
**बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड**

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

अशक्ततेवर

**रक्तवर्धक**

वापरा.
सर्वत्र मिळतें.

—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.** पुणें ४.



**मधुमेहावरील औषध**

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

# विविध माहिती

### शेड्यूल्ड बँका

१९४० सालीं शेड्यूल्ड बँकांची संख्या ६१ ची ६२ झाली. युनायटेड इंडस्ट्रिअल बँक, दिनाजपूर बँक व बँक ऑफ कम्युनिकेशन्स ह्या तीन बँका शेड्यूल्ड बँकांचे यादींत नव्यानें आल्या, परंतु दोन बँका यादींतून गळाल्या.

### हिंदी बँकांच्या शाखांत वाढ

हिंदी बँकांच्या शाखांची संख्या १९४० च्या पहिल्या नऊ महिन्यांत १२७७ ची १३३४ झाली. म्हणजे, शाखांचे संख्येंत ५७ ची भर पडली. १९३९ च्या तत्सम मुदतींत १२७ शाखांची भर पडली होती.

### रेल्वेवरील मालवहातुकींत वाढ

हिंदी रेल्वेजवरील मालाच्या वहातुकींत कशी वाढ झाली आहे, हें त्यासाठी उपयोगांत आणलेल्या रेल्वे वॅगन्सच्या संख्येवरून तात्काळ लक्षांत येईल:—

| | एप्रिल ते ऑक्टोबर | | |
|---|---|---|---|
| | १९३८ | १९३९ | १९४० |
| कोळसा | ६,५११,०३१ | ६,७८,८४७ | ७,४६,०४१ |
| धान्य, डाळी | ४,१३,०५३ | ४,७३,०१३ | ४,४१,६६१ |
| गळिताचीं धान्यें | १,२७,३२९ | १,०१,४२० | १,००,७३६ |
| कपास | ७०,१६४ | ७४,६५० | ७५,५४५ |

### अहमदाबाद म्युनिसिपॅलिटीचें नवें कर्ज

रकमः—४ लक्ष रुपये

व्याजाचा दर ४%

टेंडरें पाठविण्याची मुदतः—६ मार्च अखेर

टेंडरबरोबर अनामत रकमः—मागितलेल्या डिबेंचर्सच्या ५%.

### ट्रेझरी बिलावर ११ आ. ४ पै व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारनें १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ११ आ. ४ पै इतका पडला.

### विमा कंपन्यांचें एकत्रीकरण

दिल्ली येथील फेडरल इंडिया अॅशुअरन्स कं. लि. चें मुंबई येथील फॉरवर्ड अॅशुअरन्स कं. लि. शीं एकत्रीकरण होणार आहे. प्रभात व मॉडर्न ह्या दोन विमा कंपन्या फॉरवर्डशीं मागेंच एकत्रित झालेल्या आहेत. १९३८ अखेर प्रभातकडे ३ लक्ष, ८१ हजार रुपयांचे ३२९ विमे चालू होते व मॉडर्नकडे २ लक्ष ५१ हजारांचे २९३ विमे चालू होते. १९३८ अखेर फेडरल इंडियाकडे ३ लक्ष, १६ हजारांच्या ३०० पॉलिसी होत्या. त्याच वर्षअखेर फॉरवर्डचे आकडे ३८८ विमे व त्यांची ३ लक्ष, ९८ हजार रुपये किंमत असे आकडे होते

### सिंध प्रांताचें मध्यवर्ती सरकारास देणें

सक्करचें धरण व त्याखालील कालवे ह्यांसाठी सिंध सरकारनें १ एप्रिल १९३९ रोजीं, मध्यवर्ती सरकारचें घेतलेले एकूण २४ कोटि, ८१¼ लक्ष रुपये व इतर कारणासाठी घेतलेले ४ कोटि, १४½ लक्ष, मिळून २८ कोटि, ९६ लक्ष रुपये देणें लागत होतें, तें आतां अनुक्रमें २४ कोटि, ४६ लक्ष व ४ कोटि, ७०¾ लक्ष रुपयांवर आलें आहे.

### हिंदुस्थानाचा युद्ध-खर्च

हिंदुस्थानचा प्रत्यक्ष युद्धखर्च येत्या वर्षी ३५ कोटि रुपये होईल. चालू वर्षीचा तत्सम आकडा २४ कोटि रुपये आहे.

### रिझर्व्ह बँकेच्या बोर्डाची सभा

रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डाची सभा ३ मार्च रोजीं दिल्ली येथें भरली होती.

### पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक व्याजाच्या दरांत उतार

१८८२ सालीं पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँका प्रथम उघडण्यांत आल्या, त्यावेळीं ह्या बँकांतील ठेवींवरील व्याजाचा दर ३¾% ठरविण्यांत आला. १८९४ सालीं तो ३⅛% व १९०५ सालीं ३% करण्यांत आला. ३१ आक्टोबर, १९३३ अखेर तो ३% च होता. १ नोव्हेंबर, १९३३ रोजीं व्याजाचा दर २½% वर आणण्यांत आला, १ जुलै १९३६ रोजीं तो २% केला गेला व १ डिसेंबर १९३८ रोजीं तो १½% पर्यंत खालीं आणण्यांत आला. सध्याचा दर १½% च आहे. व्याजाचा दर ह्याप्रमाणें उतरत गेला, तरी पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकांची लोकप्रियता कायम राहिली आहे.

### चित्रपट गृहें

हिंदुस्थानांत सुमारें १,२०० चित्रपट गृहें आहेत, त्यांपैकी २५० एकट्या पंजाबांत आहेत. चित्रपटगृहांच्या बाबतींत ह्या रीतीनें हिंदी प्रांतांमध्यें पंजाबचा बराच वर नंबर लागतो. लाहोर शहरांत १२ चित्रपट गृहें आहेत.

### कर्जरोख्यांचें रूपांतर

ब्रिटिश पौंडांतील हिंदी कर्जाची परतफेड सक्तीनें करण्यांत येत आहे. ह्या कर्जाबद्दल रोख रुपये मिळणार अथवा तितक्या किंमतीचे हिंदी सरकारचे कर्जरोखे मिळणार. रोख रुपये घेणें म्हणजे परदेशांतून उत्पन्न आणणें, असा अर्थ केला जाणार नाहीं व त्यावर इनकम टॅक्स आकारला जाणार नाहीं, असें सरकारनें जाहीर केलें आहे.

### बॅरिस्टरीची परीक्षा

ट्रिनिटी बारची परीक्षा पुणें येथें येत्या मे महिन्यांत घेतली जाईल.

### पो. ऑ. डिफेन्स सेव्हिंग्ज बँक

युद्धकार्यास मदत व्हावी, ह्या दृष्टीनें पो. ऑ. सेव्हिंग बँकेचें हें एक नवीन खातें १ एप्रिल पासून सुरू करण्यांत येणार आहे. ह्या खात्यांत ठेवलेले पैसे युद्धसमाप्तीनंतर एक वर्षानें परत मिळतील; त्यापूर्वी नाहीं. ठेवीदार मयत झाला, तर ते परत मिळूं शकतील. ठेवींवर २½ % व्याज मिळेल. ठेवीची कमाल मर्यादा १० हजार रुपयांची आहे.

### महागाई भत्ता

महागाई भत्ता रेल्वे कामगारांस दिला, तरी तो सरकारी इतर कनिष्ठ नोकरांस दिला जाईलच असें नाहीं. रेल्वे कामगारांची गोष्ट वेगळी आहे, असें सुर अॅन्ड्र्यू क्लो ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

### लढाऊ विमानांची देणगी

"इंडियन पोस्ट" ह्या नांवाचें एक लढाऊ विमान हिंदी पोस्ट खात्यानें ब्रिटिश सरकारास देणगी म्हणून १ जानेवारी रोजीं दिलें. तार-खात्यानें आतां "इंडियन टेलिग्राफ" नांवाचें विमान देण्यास लागणारी रकम जमविली आहे.

### मुंबई युद्ध-फंड

वरील फंडाची रकम आतां ३८ लाखांवर गेली आहे.

### प्राप्तीवरील कराचा प्रांतिक सरकारांचा वाटा

चालू वर्षी प्रांतिक सरकारांस मध्यवर्ती सरकाराकडून त्यांच्या वाट्याच्या प्राप्तीवरील कराचे ३ कोटि, ७१ लक्ष रुपये आले. १९४१-४२ मध्यें ही रकम ४ कोटि, ४६ लक्ष रुपये होईल.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ११० | ५ हिंदी मोटार कारखान्यांचा प्रश्न | ११४ |
| २ हिंदुस्थान सरकारचें नवें अंदाजपत्रक | १११ | ६ कारखानदारांची परिषद् | ११४ |
| ३ मध्यवर्ती सरकारचें बजेट | ११२ | ७ दावा कोठें लावावा ! | ११५ |
| ४ स्फुट-विचार | ११३ | ८ सरकारी बातम्या | ११५ |
| रेल्वे इंजनांचें हिंदुस्थानांत उत्पादन—पो. ऑ. कॅश सर्टिफिकिटें — रेल्वेजचे वहातुकीचे दर — मुंबई प्रांतांतील रेल्वे फाटे | | ९ कपाशीच्या लागवडीचा अंदाज | ११६ |
| | | १० मुंबई प्रांतांतील आरोग्य | |
| | | ११ निवडक बाजारभाव | ११६ |


# अर्थ

बुधवार, ता. ५ मार्च, १९४१

## हिंदुस्थान सरकारचें नवें अंदाजपत्रक

युद्ध सुरू झाल्यापासून सरकारी खर्च वाढत्या प्रमाणावर होत असून उलट परराष्ट्रीय व्यापार घटल्यानें जकातींचें उत्पन्न मात्र कमी येऊं लागलें आहे. ह्या परिस्थितींत सरकारी जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें दुरापास्त होऊन कर्ज व नवे कर ह्या द्वारां युद्धखर्च भागविणें भाग पडणार हें स्पष्ट दिसत होतें. हिंदुस्थान सरकारच्या फडणिसांनीं नव्या वर्षाचें जें अंदाजपत्रक गेल्या आठवड्यांत सादर केलें आहे, त्यावरून ही अपेक्षा सार्थ ठरली आहे.

नव्या अंदाजपत्रकाचें स्थूल स्वरूप पुढीलप्रमाणें आहे. सध्यां अंमलांत असलेल्या उत्पन्नाच्या बाबींमधून १९४१–४२ सालीं १०६ कोटी, ३९ लक्ष उत्पन्न येईल असा अंदाज आहे. खर्च मात्र नव्या वर्षी १२६ कोटी, ८५ लक्ष होण्याची अपेक्षा आहे. २० कोटी ४६ लक्षांची ही तूट भरून काढण्यास फडणिसांनीं अनेक मार्ग सुचविले आहेत. युद्धकालीन जादा नफ्यावरील कराचा दर सध्या शेकडा ५० आहे तो वाढवून शे. ६६⅔ तो करून २॥ कोटींनीं उत्पन्न वाढण्याची अपेक्षा आहे. प्राप्तीवरील करावर बसलेली पट्टी २५ टक्क्यांवरून ३३⅓ टक्क्यांवर चढविल्यानें उत्पन्न १ कोटी, ९० लक्षांनीं वाढणार आहे.

अप्रत्यक्ष करांमध्येंही वाढ करण्याचें फडणिसांनीं योजलें आहे. काड्यांच्या पेट्यांवर सध्यां असलेला कर दुप्पट करून उत्पन्न १॥ कोटींनीं वाढविण्यांत येणार आहे. कृत्रिम रेशमाच्या आयातीवरील जकात पौंडास ३ आण्यांवरून ५ आणेपर्यंत वाढविल्यानें तिजोरींत ३६ लक्षांची भर पडेल अशी अपेक्षा आहे. मोटरींच्या टायर्सवर शेकडा १० अंतर्गत जकात बसविल्यानें उत्पन्न ३॥ लाखांनीं वाढणार आहे. नव्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचें उत्पन्न अशा रीतीनें वाढवून ६ कोटी, ८१ लक्षांचीच भरती होणार आहे. उरलेली १३ कोट ८५ लक्षांची तूट सरकार कर्ज उभारून भरून काढणार आहे.

लष्करी खर्च ३७ कोटींवरून ८४ कोटींवर गेल्यानंतर करांचा बोजा ६–७ कोटींनींच वाढला एवढ्यावरच कांहीं लोक समाधान मानत आहेत. परंतु सर्व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांमध्यें गेल्या १०–१२ वर्षांत जी एकसारखी वाढ होत आहे ती ध्यानांत घेतल्यास हें नवें ओझें असह्य होत चाललें आहे असेंच म्हटलें पाहिजे. युद्धविषयक खर्च करांमधून न भागवितां तो कर्जाच्या रूपानें भागवावा असा सर्वमान्य प्रघात असून इंग्लंडमध्यें त्याचेंच अवलंबन केलें जातें. तथापि येथील वाढत्या खर्चापैकीं पुष्कळ मोठा भाग करांनीं भरून काढण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे.

नवे कर म्हटले म्हणजे ते प्रत्यक्षपणें उद्योगधंद्यांवर व अप्रत्यक्षतः गरीब प्रजाजनांवर पडतात. युद्धकालीन संधीचा फायदा येथील उद्योगधंद्यांस मिळावयाचा असला तर त्यांजवर नव्या अंदाजपत्रकानें जेवढा बोजा लादला आहे तेवढा लादणें योग्य नाहीं. धंद्यांवर करवाढ झाल्यानें मालाच्या किंमतींची वाढ होण्यास पायबंद बसतोच असें नाहीं. उलट उत्पादनास आळा बसून पुरवठा कमी झाल्यानें त्या वाढण्याचाच संभव अधिक असतो. शेतकीच्या मालाच्या किंमती उतरंडीला असतां तयार मालाच्या किंमती चढीच्या असण्यानें शेतकऱ्याचें दुहेरी नुकसान होत आहे. ह्यापेक्षां वाढत्या मागणीमुळें होणारी बाजारभावांची योग्य वाढ होऊं देणेंच योग्य ठरेल.

वाढता खर्च करांनीं भरून काढण्याचा प्रयत्न करतांच अप्रत्यक्ष करांचें ओझें वाढत जातें. ज्यांना युद्धापासून मिळकतीस कांहींच फायदा नाहीं अशा वर्गांवर काड्यांच्या पेट्यांवरील अगर टायरवरील करांच्या द्वारां ओझें टाकणें समर्थनीय नाहीं. ह्यापेक्षां नवीन लादलेल्या करांपैकीं कोणताही कर न लादतां २० कोटी रुपये कर्ज काढून सरकारला आपली गरज भागवितां आली असती. वाढत्या उत्पन्नामुळें लोकांच्या हातांत येणारा पैसा युद्धकार्यार्थ ओढून घेण्याचें कार्य कर्जाच्या योजनेनेंही पूर्ण होतें. परंतु करांत अवास्तव वाढ केल्यानें धंदेवाले व गरीब जनता ह्यांचें निष्कारण नुकसान होतें. नामदार फडणिसांनीं आपल्या योजना सध्यांपुरत्यां नेमस्त ठेवल्या असल्या तरी युद्ध परिस्थितींत बदल होईल त्याप्रमाणें त्यांस अधिक अधिक रकमा उभाराव्या लागतील. कर्जापेक्षा कर बरे, हें आपलें जुनें ब्रीदवाक्य सध्यांच्या असाधारण परिस्थितींत सरकारनें बदललें पाहिजे. युद्धविषयक सर्व खर्च कर्ज काढून भागविण्यांत यावा व कांहीं कर लादावयाचे झाल्यास ज्यांच्या उत्पन्नांत युद्धामुळें अवास्तव वाढ झाली आहे असें मानण्यास जागा आहे, अगर ज्यांस कर्ज देण्याचें सामर्थ्य आहे अशांवरच ते लादले जावे.

### मद्रास कॉर्पोरेशनचा विमा कंपन्यावर कर

मद्रास शहराबाहेर ज्या विमा कंपन्यांची मुख्य कचेरी आहे, परंतु मद्रास शहरांत ज्यांचा व्यवहार चालू आहे, अशा विमा कंपन्यांवर मद्रास कॉर्पोरेशननें कर बसविण्याची योजना तयार केली आहे. कर आकारणीच्या पूर्वीच्या वर्षी कंपन्यांस मद्रास शहरांत मिळालेल्या उत्पन्नास अनुसरून कराचा हिशेब केला जाईल. पहिल्या ५,००० रुपये उत्पन्नावर दर सहामाहीस २५ रुपये, १० हजारांपर्यंत ५० रुपये, २० हजारांपर्यंत १०० रुपये व त्यावरील प्रत्येक ५ हजारांच्या उत्पन्नावर २५ रुपये, असा कराचा दर आहे. कांहीं झालें तरी कराची एकूण रक्कम १,००० रुपयांवर जाणार नाहीं.

———

## मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक

१९४०-४१ सालचा दुरुस्त अंदाज

| | कोटि | लक्ष |
|---|---|---|
| उत्पन्न | १०३ | ७१ |
| खर्च | ११२ | १३ |
| तूट | ८ | ४२ |

१९४१-४२ सालचा अंदाज

| | कोटि | लक्ष |
|---|---|---|
| उत्पन्न | १०६ | ३९ |
| खर्च | १२६ | ८५ |
| तूट | २० | ४६ |

जादा करांच्या उत्पन्नाचा अंदाज

| | कोटि | लक्ष |
|---|---|---|
| जादा नफ्यावरील कर | २ | ५० |
| प्राप्तीवरील करावरची पट्टी | १ | ९० |
| काड्यांच्या पेट्यांवरील पट्टी | १ | ५० |
| कृत्रिम रेशमावरील पट्टी | ० | ३६ |
| करांचें एकूण उत्पन्न | ६ | ६१ |
| नवीन कर्ज | १३ | ८५ |
| तूट भरून काढण्यासाठी एकूण जमा | २० | ४६ |

चालू साल व पुढील वर्ष ह्यांमध्यें मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्न-खर्चाची परिस्थिति कशी होईल ह्याविषयींची माहिती हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांनीं गेल्या आठवड्यांत आपल्या अंदाजपत्रकांत दाखल करून ती कायदेमंडळापुढें मांडली. तिचे निदर्शक त्रोटक आकडे वर दिले आहेत आणि येणारी तूट भरून काढण्याच्या त्यांच्या करांच्या नियोजित योजनांचें आकडेमय स्वरूप दिग्दर्शित केलें आहे. ह्या महिन्याचे अखेर पुऱ्या होणाऱ्या बारा महिन्यांतील तूट सुमारें ८½ कोटि रुपये भरेल आणि १९४१-४२ सालांतली तूट सुमारें २०½ कोटि रुपयांपर्यंत जाईल असा फडनवीसांचा अंदाज असल्याचें त्यांवरून लक्ष्यांत येईल. चालू आणि येत्या वर्षांचीं हिंदुस्थान सरकारचीं अंदाजपत्रकें तुटीचीं आहेत, ह्यांत नवल वाटण्यासारखें कांहीं नाहीं. युद्ध परिस्थितींत देशाच्या संरक्षणाची तयारी कर्तव्य असतां मामुली लष्करी खर्चापेक्षा अधिक पैसा सरकारला ओतावा लागून ह्या जादा रकमेचे परिणाम आणि ती उभी करण्याचे मार्ग ह्यांविषयींच मुख्य प्रश्न उरतो. ह्या दृष्टीनेंच सर जेरेमी रेसमन ह्यांच्या अंदाजपत्रकाकडे पाहिलें पाहिजे. दुसराहि महत्त्वाचा प्रश्न येथें विचार करण्यासारखा आहे आणि तो म्हटला म्हणजे योजलेल्या खर्चांत बचत कोठें करतां येणें शक्य आहे आणि होणाऱ्या खर्चाचा पूर्ण फायदा देशाच्या उद्योगधंद्यांस व व्यापारास मिळत आहे, कीं नाहीं ह्या संबंधाचा होय. तिसरी आणि शेवटची लक्षांत घ्यावयाची गोष्ट ही आहे कीं युद्धामुळें करावा लागणारा जादा पैसा कर्जाच्या मार्गानें किती व करांच्या द्वारें किती उभारला जाणार आहे आणि ह्या संबंधांतल्या योजना कोणत्या सुचवल्या गेल्या आहेत ह्या बाबतींत खोल विचार होणें अगत्याचें आहे.

युद्धासंबंधांतला म्हणजे लष्करी खर्च वाढल्यामुळें तूट येते आणि त्या बाबतींतले १९४१-४२ च्या अंदाजपत्रकांतले आकडे खाली दिल्याप्रमाणें आहेत: —

संरक्षण खात्याचा अंदाजी खर्च

| | कोटी | लक्ष |
|---|---|---|
| मामुली खर्च | ३६ | ७७ |
| महागाईमुळें वाढावा | ३ | ५५ |
| युद्ध योजना | ३५ | ४० |
| नॉन इफेक्टिव्ह | ८ | ४१ |
| एकूण | ८४ | १३ |

## शेतीच्या धंद्यांतला खर्च

### प्रिन्सिपॉल गोखले ह्यांचा पाषाण येथील प्रयोग

इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट (आकडे शास्त्र मंडळ) च्या पुणें येथील शाखेच्या सभासदांची सभा शेतकी कॉलेजचे माजी प्रिन्सिपॉल, श्री. गोखले, ह्यांच्या पाषाण गांवांतील शेतावर गेल्या रविवारीं भरली होती. प्रोफेसर्स काळे, गाडगीळ, कर्वे, डॉ. घाडगे, प्रोफेसर्स ओतुरकर, आपटे, चंद्रात्रे, कोगेकर व मावळंकर हे सभासद उपस्थित होते. प्रि. गोखले त्यांनीं पाषाणच्या हद्दींत ३८ एकरांचें एक शेत विकत घेऊन व तेथें कायमचें वास्तव्य करून शेती चालवली आहे आणि गेलीं तीन वर्षें त्या संबंधांत पद्धतशीर रीतीनें उत्पन्न खर्चाचे तपशीलवार हिशेब ठेवले आहेत. शेतीचा आपला तीन वर्षांचा आलेला अनुभव एका निबंधांत आकड्यांनिशी ग्रथित करून तो त्यांनीं गेल्या रविवारच्या सभेंत वाचला. सामान्य शेतकऱ्यांच्या पद्धतीनें परंतु व्यवस्थित रीतीनें शेती करून त्यांत नफा तोटा काय होतो हें पहाण्याचा हेतु आहे. गेलीं तीन वर्षें झीज सोसून त्यांनीं हें काम चालवलें आहे. त्यांत त्यांस तोटाच आला आहे. चालू केलेल्या सुधारणांबरोबर शेतीचें उत्पादन हळुहळु वाढत आहे असें दिसून येतें. तथापि बेताचा खर्च धरला असला तरीहि शेतकऱ्यास जेमतेम मजुरीहि उरत नाहीं असा अनुभव त्यांस आतांपर्यंत आला आहे असें त्यांनीं दिलेल्या आकड्यांवरून दिसून आलें. बाजारभाव वाढतील तर परिस्थिति सुधारेल असें मानण्यास त्यांत जागा आहे. आणखी एक दोन वर्षांचा अनुभव पाहून ठाम अनुमानें काढण्यास सहाय होईल असा निष्कर्ष चर्चेमध्यें निघाला.

### पार्लमेंटचे लढाऊ सभासद

ब्रिटिश लॉर्डांच्या सभेचे १६६ आणि कॉमन्स सभेचे ११६ सभासद सध्यां युद्धांत काम करीत आहेत. ह्या एकूण २८२ सभासदांपैकीं २२५ फौजेंत आहेत, ३१ आरमारांत आहेत, व २६ वैमानिक दलांत आहेत.

### अमेरिकेंत लढाऊ विमानांचें वाढतें उत्पादन

लढाऊ विमानें बनावणाऱ्या अमेरिकन कारखान्यांत गेल्या जुलै महिन्यांत ७८ हजार माणसें कामावर होतीं. ही संख्या अलीकडे अडीच लक्ष झाली असून येत्या जूनमध्यें ती ५ लक्ष पर्यंत जाईल असा अंदाज आहे.

## स्फुट विचार

### रेल्वे इंजनांचें हिंदुस्थानांत उत्पादन

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें रेल्वे बजेटावरील चर्चेचे वेळीं हिंदुस्थानांत रेल्वे इंजनें तयार करण्याच्या प्रश्नावर थोडा वादविवाद झाला. सरकारनें इंजनांच्या उत्पादनाचा प्रश्न लांबणीवर टाकल्याबद्दल, सरदार संतसिंग ह्यांनीं बजेटांत काट सुचवून नापसंति व्यक्त केली. रेल्वेजचें प्रचंड जाळें असलेल्या हिंदुस्थानासारख्या देशानें इंजनांचे बाबतींत परावलंबी रहावें, हें अत्यंत अनुचित आहे, असें त्यांनीं सांगितलें. सर हेन्री गिडने ह्यांनीं " गतं न शोच्यं " असें सांगून, निदान युद्धसमाप्तीनंतर तरी सरकार इंजनांच्या उत्पादनाचा प्रश्न धडाडीनें हातीं घेईल, असें आश्वासन सरकारकडे मागितलें. इंजनांची आयात ह्यापुढें बिकट होत जाणार, तेव्हां त्यांचें उत्पादन करण्यास प्रारंभ करण्यासाठी प्रस्तुत वेळ अत्यंत सोईची आहे, असें कांहीं सभासदांनीं सांगितलें. वहातुक खात्याचे प्रमुख, सर अँन्ड्र्यू क्लो, ह्यांनीं चर्चेस उत्तर देतांना, हिंदुस्थान सरकारनें आजवर इंजनें बाहेरून मागविलीं, त्यांत हिंदुस्थानाचा फायदाच झाला, असें ते म्हणाले. हें गृहीत धरलें तरी महत्त्वाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्यास त्यामुळें हिंदुस्थानास अडचण येत आहे. हा तोटा लक्षांत घेतला, तर नफा-तोट्यांत तोटाच अधिक भरेल. तसेंच सर अँन्ड्र्यू ह्यांची विचारसरणी कापडाच्या गिरण्या, साखरेचे कारखाने, पोलादाचे कारखाने, ह्यांसहि लावतां येण्याजोगी आहे. केवळ आजच्या स्वस्ताईच्याच फायद्याचा विचार करावयाचा असेल, तर संरक्षक धोरणाच्या पुरस्काराचें मूळच शिल्लक रहात नाहीं. सध्या तज्ज्ञ कामगारांचा तुटवडा पडत आहे, इतकेंच नव्हे, तर शिकाऊ उमेदवारहि पुरेसे पुढे येत नाहींत व उत्पादनास लागणारा मालहि मिळूं शकत नाहीं, असें सर अँन्ड्र्यू म्हणाले. ह्यापुढील परिस्थिति अधिक आशाजनक होईल,असा विश्वास त्यांनीं प्रकट केला.

---

### पो. ऑ. कॅश सर्टिफिकिटें

गेल्या महायुद्धाचे वेळीं खर्चासाठी पैसे उभे करण्यासाठीं पोस्ट ऑफिस कॅश सर्टिफिकेटांची ५ वर्षें मुदतीची योजना १९१७ साली प्रथम अंमलांत आणली. त्यावेळीं ह्या कॅश सर्टिफिकेटांवर द. सा. द. शे. ५½ चक्रवाढ व्याज पडत असे. पहिल्याच वर्षी १० कोटि रुपयांचीं कॅश सर्टिफिकिटें खपलीं, परंतु हा खपाचा आकडा १९२१-२२ पर्यंत हळुहळु उतरत गेला. १९२२-२३ मध्यें त्यांत थोडी वाढ झाली. २ एप्रिल, १९२३ पासून व्याजाचा दर सुमारें ६% करण्यांत आला, त्यामुळें कॅश सर्टिफिकेटांचा खप एकदम वाढून ७ कोटींवर तो गेला. व्याजाच्या दरांत पुढें खालीलप्रमाणें बदल होत गेला:—

| | |
|---|---|
| १ एप्रिल, १९२६ | ५½% |
| १ जुलै, १९२७ | ५⅔% |
| १ ऑगस्ट, १९२९ | ५⅓% |
| १६ सप्टेंबर, १९३० | ६% |

ह्यानंतर व्याजाच्या दरांत एकसारखा उतार होत गेला. १ जुलै, १९३६ पासून २¾% दर चालू आहे. कॅश सर्टिफिकेटांची विक्री त्या त्या वर्षीतील आर्थिक परिस्थितीप्रमाणें व इतर मिळणाऱ्या व्याजाच्या दरांस अनुसरून कमी अधिक होते, व त्यांची मुदत संपण्याचे वेळीं चालू असणाऱ्या दरांचे अनुरोधानें कॅश सर्टिफिकेटांचे पैसे परत त्यांतच गुंतविले जातात अगर त्यांतून ते काढून घेतले जातात. १९३५-३६ नंतर कॅश सर्टिफिकेटांत गुंतलेल्या रकमेंत थोडी घटच झालेली दिसते. चालू युद्धाचे प्रारंभीं कांहीं लोकांनीं आपलीं कॅश सर्टिफिकिटें मोडून त्यांचे पैसे केले. कॅश सर्टिफिकेटांस तारण म्हणजे हिंदुस्थान सरकारचे करापासून होणारें उत्पन्न, हें होय.

---

### रेल्वेजचे वहातुकीचे दर

हिंदी रेल्वेजच्या अंदाजपत्रकाची चर्चा मध्यवर्ती असेंब्लीमध्यें गेल्या आठवड्यांत झाली, त्या प्रसंगीं रेल्वेकारभाराबाबत सभासदांनीं कित्येक प्रश्न उपस्थित करून त्यावर टीका केली. मालाच्या वहातुकीचे दर रेल्वेजवर आकारण्यांत येतात, ते व्यापाराच्या सोयीस व विस्तारास अनुकूल नाहींत, ही जुनी तक्रार असेंब्लीपुढें पुन्हां मांडण्यांत आली. निरनिराळ्या प्रकारांच्या मालाविषयींचे किमान व कमाल दर सरकारनें ठरवून टाकले असले तरी कित्येक रेल्वेजवरचे दर सयुक्तिक नसून लांब अंतरावरील वहातुकीस सवलती मिळत नाहींत अशी तक्रार करण्यांत आली. हिंदी मालाच्या परदेशी पेठा युद्धपरिस्थितीनें मर्यादित केल्या असल्यामुळें हिंदुस्थानांतल्या अंतर्गत व्यापारास उत्तेजन मिळावें म्हणून रेल्वेजचे वहातुक दर कमी करणें अगत्याचें आहे अशीहि सूचना करण्यांत आली. युद्धामुळें सरकारचें उत्पन्न वाढवणें आवश्यक झालें असलें तरी ही निकड नाहींशी होतांच रेल्वेजचे तात्पुरते वाढवलेले दर पुन्हां पूर्वस्थळीं आणून ठेवण्यांत यावे आणि असें करण्याचें आश्वासन सरकारनें आतांच यावें असें सर फ्रेडरिक जेम्स ह्यांनीं सुचवलें. ह्या टीकेस उत्तर म्हणून सर अँड्र्यू क्लो ह्यांनीं असें सांगितलें कीं सध्या मालाची हालचाल मोठ्या प्रमाणांत चालली आहे आणि वाढीच्या दरांनीं रेल्वेजना चांगलें उत्पन्न मिळत आहे ह्या दृष्टीनें पहातां चालू धोरण बदलणें इष्ट होणार नाहीं व रेल्वेजची सांपत्तिक स्थिति मजबुतीची होण्यास सध्याचें धोरणच इष्ट आहे असा त्यांच्या भाषणाचा रोख होता. रेल्वेजचे वहातुकीचे दर सर्वत्र सारखे करावे ह्या सूचनेसंबंधानें बोलतांना ते म्हणाले कीं हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशांत स्थानिक परिस्थिति इतकी भिन्नभिन्न असते कीं दरांच्या कोष्टकांत एकदां फेरफार करावयाचे म्हटल्यास त्यांत विलक्षण गोंधळ उत्पन्न होण्याची भीति आहे. आहे तीच वहातुकीच्या दरांची व्यवस्था चालू ठेवणें शहाणपणाचें आहे असें आपलें मत सर अँड्र्यू ह्यांनीं दिल्यानें ह्या प्रश्नाबाबतच्या सर्व सूचना असेंब्लींत बहुमतानें अमान्य झाल्या.

---

### मुंबई प्रांतांतील रेल्वे फाटे

मुंबई प्रांतांतील रेल्वे फाट्यांसंबंधीं माहिती खालील तक्त्यांत दिली आहे. त्यांत हिंदी संस्थानी हद्दींतील फाट्यांचा समावेश नाहीं.

| रेल्वे | ब्रॉडगेज (मैल) | मीटर गेज (मैल) | नॅरो गेज (मैल) | एकूण (मैल) |
|---|---|---|---|---|
| बी. बी. अँड सी. आय. | ५३१ | १२१ | १४३ | ७९५ |
| जी. आय. पी. | ८२२ | ...... | ६२ | ८८४ |
| एम. एस. एम. | ...... | ५८८ | ...... | ५८८ |
| बार्शी लाइट | ...... | ...... | ११३ | ११३ |
| माथेरान लाइट | ...... | ...... | १३ | १३ |
| भावनगर स्टेट | ...... | ४९ | ८ | ५७ |
| गायकवाड बरोडा | १० | ३५ | २३ | ६८ |
| | १,३६३ | ७९३ | ३६२ | २,५१८ |

## हिंदी मोटार कारखान्याचा प्रश्न

मुंबईंत ३,५०० रुपयांना विकल्या जाणाऱ्या अमेरिकन मोटारीची फॅक्टरींत किंमत फक्त १,४०० रुपये असते. वहातुक, विमा, कमिशन व इतर किरकोळ खर्च २,१०० रुपयांचा होतो. हिंदुस्थानांत मोटारी बनविण्याचे कारखाने निघाले तर मोटारी स्वस्त दरानें विकतां येतील. मोटारीच्या मूळ किंमतीच्या २½ पट किंमत हिंदुस्थानांत द्यावी लागणार नाहीं.

हिंदुस्थानांत मोटारी बनविण्याच्या शक्याशक्यतेचा विचार सुमारें ५॥–६ वर्षांपूर्वी करण्यांत आला. सर एम. विश्वेश्वरअय्या यांनीं जगांतील निरनिराळे कारखाने पाहून १९३६ च्या एप्रीलमध्यें एक रिपोर्ट प्रसिद्ध केला. तथापि त्यावेळीं त्याचा सरकारकडून आस्थेवाईकपणानें विचार झाला नाहीं. मुंबई प्रांतांत काँग्रेसनें अधिकार-स्वीकार केल्यानंतर ह्या प्रश्नास चालना मिळून मुंबई सरकारनें त्यास सहानुभूति दर्शविली व कांहीं अटीवर १½ कोटि रुपयांच्या भांडवलावर ३–३॥ टक्के व्याज दहा वर्षेपर्यंत देण्याचें कबूल केलें. श्री. वालचंद हिराचंद यांनीं कंपनी चालविण्याची तयारी दाखविली. श्री. पी. बी. अडवानी, डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज्, मुंबई, यांनीं अमेरिकेंत जाऊन पहाणी व व बोलणीं केलीं. दरवर्षी ११,००० मोटारीं तयार करण्याकरितां २½ कोटि रुपयांचें भांडवल लागेल असा अंदाज करण्यांत आला. मोटारीचे कांहीं विशिष्ट भाग परदेशातून आणावे लागतील. त्यावरील जकात हिंदुस्थान सरकारनें माफ केल्यास दर मोटारीमागें ७५० रुपये बचत होईल. तथापि ती सोडून दिली तरी किमान २० टक्के तरी फायदा होईल असा अंदाज आहे.

मोटारीच्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या कौशल्याबद्दल कांहीं ठिकाणीं शंका प्रदर्शित करण्यांत येते. तथापि ह्या शंका अस्थानीं आहेत. निरनिराळे भाग घेऊन मोटारी जोडण्याचे कारखाने हिंदुस्थानांत चालू आहेत. त्यांत हिंदी कामगारांनीं आपलें कौशल्य दाखविलें आहे. तसेंच दुसरें असें आहे कीं, या धंद्यांतील बहुतेक सर्व गोष्टी यंत्रानेंच होत असून कामगारांच्या कामगिरीचा प्रश्न अगदीं दुय्यम झाला आहे.

मोटारी तयार करण्याबाबत रशिया व ऑस्ट्रेलिया यांचीं उदाहरणें उद्बोधक आहेत. सुमारें आठ वर्षांपूर्वी फोर्ड कंपनीच्या सहायानें रशियानें न्यूयॉर्कमध्यें ऑफिस उघडून तेथून रशियांत मोटारी जोडण्याकरितां लागणारे निरनिराळे भाग पाठविण्यास सुरवात केली. ह्याप्रमाणें पहिल्या वर्षी रशियांत ५,००० मोटारगाड्या तयार करण्यांत आल्या; दुसऱ्या वर्षी ५० टक्केच भाग अमेरिकेंत खरेदी करण्यांत येऊन बाकीचे रशियांत बनविण्यांत येऊं लागले. ह्याप्रमाणें त्या वर्षी १०,००० मोटारी तयार झाल्या. तिसऱ्या वर्षी २५ टक्के भाग अमेरिकेंत विकत घेऊन २०,००० मोटारगाड्या तयार केल्या; चवथ्या वर्षी ४०,००० मोटारी तयार केल्या; १९३८ मध्यें रशियन बनावटीच्या २,१५,००० मोटारी निर्माण करण्यांत आल्या.

ऑस्ट्रेलियन सरकारनें धंदा सुरू करण्यास लागणाऱ्या प्राथमिक व्यवस्थेसहि प्रारंभ न केलेल्या ऑस्ट्रेलियन कन्सॉलिडेटेड इंडस्ट्रीज् लि. या स्थानिक कंपनीला सहानुभूति दाखवून तेथील पार्लमेंटमध्यें पास झालेल्या मोटर व्हिहिकल एन्जीन बाउंटी ॲक्टान्वयें कंपनीशीं करार केला. त्यांतील मुख्य कलमें अशीं—

१. पहिल्या ६०,००० मोटारी चालविण्याचीं इंजीनें तयार करण्याकरितां सरकारकडून १५ लक्ष पौंडाची मदत.

२ वसूल झालेल्या भांडवलापैकी ६६⅔% भांडवल ऑस्ट्रेलियनांतील रहिवाशांचें असावें.

३. परदेशी कंपन्यांनीं ऑस्ट्रेलियांत कारखाने काढून स्थानिक कंपनीशीं स्पर्धा करूं नये. याबाबत स्थानिक कंपनीच्या हितसंबंधांचें संरक्षण सरकारकडून होईल.

४. परदेशी आयातीमुळें स्थानिक मालास स्पर्धा होऊं नये म्हणून आयात–जकातीवर सरकारकडून नियंत्रण केलें जाईल.

५. पहिल्या ५ वर्षेपर्यंत स्थानिक कंपनीच्या उत्पादनांतील बराच मोठा भाग सरकार घेईल.

६. जी मशिनरी ऑस्ट्रेलियांत सहज तयार करतां येणार नाहीं तिच्या आयातीवरील जकात कांहीं वर्षें माफ करण्यांत येईल.

७. मोटारीचे विशिष्ट भाग परदेशाहून आणावे लागतील तर त्यावरील आयात–जकातीबाबत विचार करण्यास सरकार तयार असल्याची ग्वाही देण्यांत आली.

मोठमोठ्या धंद्यांचा पसारा मोठा; त्यांना लागणारें भांडवल प्रचंड, त्यांचे प्रश्नहि विविध असतात. देशांत उद्योगधंदे सुरू करून देण्यास सरकार अनेक तऱ्हेनें मदत करूं शकते. ह्याचें निदर्शन रशिया व ऑस्ट्रेलिया यांच्या मोटार धंद्याबाबतच्या धोरणावरून स्पष्ट होतें.

## कारखानदारांची परिषद

हिंदी कारखानदारांची एक परिषद गेल्या आठवड्यांत मुंबई येथें सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. विशेषतः मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी उपाय योजणें आणि त्यांच्याबाबतच्या प्रश्नांकडे सरकार व जनता ह्यांचें लक्ष वेधणें हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. सध्याच्या युद्ध परिस्थितीचा पूर्ण फायदा घेऊन सरकारनें देशी उद्योगधंद्यांच्या संघटनेस व उन्नतीस पद्धतशीर सहाय्य द्यावें आणि लोकांनींहि ह्या कामीं आपल्या परी सर्व तऱ्हांचे प्रयत्न करावे असें सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. यंत्रें, विमानें, चिलखती गाड्या, रंग, रेयॉन इत्यादि धंद्यांचा माल हिंदुस्थानांत तयार करण्यासाठी कारखाने काढण्यास सध्याची संधि अत्यंत अनुकूल आहे आणि इतर देशांच्या मानानें येथील उद्योगधंदे अत्यंत मागसलेले असल्यानें तिचा पूर्ण फायदा घेणें अगत्याचें आहे, असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. हिंदुस्थानच्या दारिद्र्यावर देशाचें झपाट्याचें औद्योगीकरण हाच उपाय असल्यानें सरकारची मदत त्यासाठी अवश्य मागा, पण ती न मिळाल्यास स्वावलंबनाच्या जोरावर त्या उपायाचा शक्यतितका अवलंब करा हा त्यांच्या भाषणाचा मुख्य संदेश होता. परिषदेनें अनेक महत्त्वाचे ठराव मान्य केले ते हिंदी उद्योगधंद्यांच्या मार्गांतील अडचणी दूर करण्याविषयीं आणि देशी कारखान्यांस उत्तेजन देण्याचे संबंधांत सूचना व विनंत्या करण्याबाबत होते. ह्या ठरावांतील सूचनांचा सरकारनें योग्य परामर्श घेणें आणि देशी धंद्यांच्या उन्नतीचा उपयोग युद्धांत विजय मिळवण्याकडे करणें उचित आहे.

## दावा कोठें लावावा ?

हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स कंपनीमध्यें सन १९१० सालांत नथ्थू ह्यानें आपल्या आयुष्याचा विमा उतरविला. विमा कंपनीचें मुख्य ऑफिस कलकत्त्याला होतें. नागपूरला कंपनीचें एक शाखा ऑफिस होतें. विम्याबाबत कंपनीशीं कांहीं वांधा उत्पन्न झाला म्हणून नथ्थूनें नागपूरच्या कोर्टांत कंपनीवर दावा आणला. नागपूर येथील कोर्टाला दावा चालविण्याचा अधिकार नाहीं, कारण त्या कोर्टाचे स्थलसीमेंत दाव्याचें कारण घडलें नाहीं व प्रतिवादी कंपनी आपला व्यवहार करीत नाहीं अशी कंपनीतर्फे तक्रार करण्यांत आली ती खालच्या कोर्टानें अमान्य केली म्हणून कंपनीनें रिव्हिजन अपील केलें होतें.

नागपूर कोर्टाला हा दावा चालविण्याचा अधिकार आहे किंवा काय हा प्रश्न उपस्थित झाला आहे. वादीनें तीन कारणांस्तव नागपूरच्या कोर्टांत दावा आणला. (१) कंपनीच्या एजंटशीं नागपूर मुक्कामीं विम्याबाबत करार झाला. (२) त्या करारानुसार वादीनें प्रतिवादीला वेळोवेळीं रकमा दिल्या व (३) कराराचे व दाव्याचेवेळीं कंपनी आपल्या शाखेमार्फत नागपूर मुक्कामीं व्यवहार करीत होती.

ज्या कोर्टाचे स्थलसीमेंत (१) प्रतिवादी रहात असेल, व्यवहार अथवा उद्योग करून पैसे मिळवीत असेल अथवा (२) पूर्णतः अथवा अंशतः दाव्याचें कारण घडलें असेल त्या कोर्टांतच वादीनें दावा आणला पाहिजे असें सिव्हिल प्रोसिजर कोडच्या क. २० मध्यें म्हटलें आहे. प्रतिवादी कंपनी नागपूर कोर्टाचे स्थलसीमेंत आपला व्यवहार करते किंवा काय अथवा नागपूर कोर्टाचे स्थलसीमेंत दाव्याचें कारण पूर्णतः अथवा अंशतः घडलें किंवा काय हा प्रश्न आहे.

"दाव्याचें कारण नागपूर मुक्कामीं घडणें शक्य नाहीं, कारण विम्याचा करार नागपूर मुक्कामीं झाला असें म्हणतां येत नाहीं. नागपूर मुक्कामीं वादीनें भरलेला विम्याचा फॉर्म कलकत्त्याला प्रतिवादी कंपनीच्या हेड ऑफिसकडे पाठविण्यांत आला व तो तेथेंच स्वीकारण्यांत आला असल्यामुळें करार कलकत्त्याला झाला असेंच म्हटलें पाहिजे. ज्याअर्थी नागपूर मुक्कामीं करार झाला नाहीं त्याअर्थी दाव्याचें कारण पूर्णतः अथवा अंशतः नागपूर कोर्टाचे स्थलसीमेंत घडूंच शकत नाहीं. "दाव्याचें कारण" अशा प्रकारें निकालांत निघाल्यामुळें नागपूर कोर्टाचे स्थलसीमेंत प्रतिवादी कंपनी आपला व्यवहार करते किंवा काय हें पहावयाचें आहे. दाव्याच्या तारखेला प्रतिवादी कंपनीनें नागपूरला एक शाखा ऑफिस होतें, मध्यप्रांत व वऱ्हाडकरितां कंपनीनें एक मुख्य एजंट नागपूर मुक्कामीं नेमला होता, विमेदारांची तपासणी करण्याकरितां कंपनीनें नागपूर मुक्कामीं एक डॉक्टर नेमला होता, वादी आपल्या विम्याचे हप्ते कंपनीच्या एजंटला नागपूर मुक्कामीं देत होता, नागपूरच्या बँकेंत कंपनीचें खातें आहे वगैरे बाबी पुराव्यानें सिद्ध झाल्या आहेत. त्या सर्व बाबी विचारांत घेतल्यास आपल्याला असेंच म्हटलें पाहिजे कीं, नागपूर कोर्टाचे स्थलसीमेंत प्रतिवादी कंपनी आपला व्यापार करते, सबब नागपूर कोर्टाला हा दावा चालविण्याचा अधिकार आहे असें आम्ही ठरवितों. वरील कारणास्तव आम्ही हें रिव्हिजन खर्चासह काढून टाकतों." असा हायकोर्टानें निवाडा केला. त्याचा अर्थ, ज्या कोर्टाचे स्थलसीमेंत (१) दाव्याचें पूर्णतः अथवा अंशतः कारण घडलें असेल अथवा (२) प्रतिवादी जातीनें रहात असेल, व्यापार करीत असेल अथवा इतर प्रकारचे व्यवहार करून पैसे मिळवीत असेल त्या कोर्टांत दावा आणला पाहिजे. विमा कंपनीवर दावा आणावयाचा असेल तर ज्या कोर्टाचे स्थलसीमेंत कंपनी आपला व्यापार करीत असेल त्या कोर्टांत दावा आणावा. ज्या ठिकाणीं कंपनीनें आपलें शाखा ऑफिस उघडलें असेल, एजंट नेमून त्यांना हप्ते वसूल करण्याचा अधिकार दिला असेल; विमेदारांच्या तपासणीसाठीं डॉक्टरची नेमणूक केली असेल, बँकेंत आपलें खातें ठेविलें असेल त्या ठिकाणीं कंपनी आपला व्यापार करते असें समजलें जाईल व तेथील कोर्टांत कंपनीवर दावा आणतां येईल. कंपनीचें मुख्य ऑफिस ज्या ठिकाणीं असेल त्या ठिकाणीं विम्याचा करार झाला असें समजलें जाईल. विम्याचा फॉर्म जेथें भरण्यांत आला असेल तेथें विम्याचा करार झाला असें म्हणतां येत नाहीं. "न्यायबोध"वरून

---

## सहकारी बातम्या

—बिहार आणि यू. पी. प्रमाणेंच, लागवड केलेल्या उंसाची किमान किंमत येत्या हंगामांत मुक्रर करण्यांत यावी, अशा बद्दलची योजना बंगाल प्रांताचे सरकारनें औद्योगिक पहाणीसाठी नेमलेल्या कमिटीकडे चौकशीसाठी सोंपविली आहे.

—शेतकी आणि औद्योगिक खात्याचे दिवाणांचे नेतृत्वाखालीं १८ सभासदांची एक कमिटी बंगाल सरकारनें नेमली आहे. बंगाल प्रांतांतील शेतकी व जनावरांची जोपासना यांमध्यें सुधारणा करण्याचें दृष्टीनें या कमिटीचा सल्ला सरकार घेणार आहे. शिवाय जनावरांची पैदास उत्तमोत्तम कशी होऊं शकेल, चांगलें बीं-बियाणें कसें फैलावतां येईल, पाटबंधारे इत्यादि साधनें कशीं विपुल होतील, जमिनींचा कस कसा टिकेल, व पिकावर पडणाऱ्या रोगांचें अजिबात निर्मूलन कसें करितां येईल, निदान त्यापासून जास्तींतजास्त बचाव कसा होईल, याबद्दल व्यावहारिक स्वरूपाच्या सूचनाही या कमिटीनें सरकारपुढें मांडावयाच्या आहेत.

—ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या रिझर्व्ह बँकेच्या धर्तीवर हैद्राबाद संस्थानासाठी एक संस्थानची बँक स्थापन करण्याच्या दृष्टीनें निजाम सरकारच्या वार्षिक अंदाजपत्रकांत जरूर ती तरतूद करण्यांत आली आहे. निजामसरकारच्या रुपयांची बाजारी किंमत टिकवून धरणें व नाण्याचा आवश्यक पुरवठा करून त्याचें नियमन करणें हे जसे त्या बँकेचे मुख्य उद्देश आहेत तसेंच शेतीच्या मालाची पद्धतशीर विक्री आणि पैदास करण्यास सहकारी बँकांना भांडवल पुरविणें हाही उद्देश आहे. संस्थानची चलन पद्धतीहि या बँकेकडे सुपूर्त व्हावयाची आहे.

—गिरण्या आणि हातमाग यांचेमधील चुरस एकमेकांस मारक न होतां उपकारक कशी होईल व हातमागाच्या धंद्याला निश्चित स्थाईकपणा कसा प्राप्त होईल याचा विचार हिंदुस्थान सरकार हल्लीं करीत आहे.

—मद्रास सहकारी सोसायट्यांचे कायद्याखालील कानूंमध्यें कांहीं दुरुस्त्या मद्रास सरकारनें करण्यासाठी प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांत, सहकारी सोसायट्यांमध्यें पगारी नोकरांच्या नातेवाइकांनीं त्या सोसायटीमध्यें डायरेक्टर म्हणून निवडणुकीस उभें राहतां कामा नये अशा अर्थाची एक दुरुस्ती सुचविली आहे.

## कपाशीच्या लागवडीचा अंदाज

| | |
|---|---|
| चालू वर्षी एकूण हिंदुस्थानांतील लागवड | २ कोटि, २० लक्ष एकर |
| गेल्या वर्षातील लागवड | २ कोटि, ५ लक्ष एकर |
| लागवडींत वाढ | ७ % |
| चालू वर्षाच्या उत्पादनाचा अंदाज | ५२ लक्ष, ६४ हजार गाठी |
| गेल्या वर्षीचें उत्पादन | ४३ लक्ष, ७८ हजार गाठी |
| उत्पादनांत वाढ | २० % |

**चालू वर्षांतील लागवड व अपेक्षित उत्पादन ह्यांचे प्रमुख प्रांतवार आकडे**

| प्रांत अगर संस्थान | क्षेत्र | उत्पादन | दर एकरी उत्पादन |
|---|---|---|---|
| **प्रांत** | (हजार एकर) | ४००पौंडाच्या गाठी | पौंड |
| मुंबई | ५,५५१ | १,०५६ | ७६ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | ३,४३९ | ७८९ | ९२ |
| पंजाब | ३,२४७ | १,३०८ | १५६ |
| मद्रास | १,८७४ | ४१० | ८८ |
| सिंध | ९३५ | ३७५ | १६० |
| संयुक्त प्रांत | ४११ | १५० | १४६ |
| बंगाल | १०८ | ३२ | १२२ |
| **संस्थान** | | | |
| हैद्राबाद | ३,२६५ | ५५७ | ६८ |
| मध्य हिंदुस्थान | १,०७५ | १६४ | ६१ |
| बडोदें | ८११ | १९० | ९४ |
| ग्वाल्हेर | ५१६ | ८१ | ६३ |
| रजपुताना | ४२६ | ९८ | ९२ |
| म्हैसूर | ८६ | १३ | ६० |

एकूण हिंदी लागवडीपैकीं २५·१% लागवड मुंबई प्रांतांत, १६·२% मध्यप्रांत-वऱ्हाडांत, १४·४% पंजाबांत, ९·८% मद्रासमध्यें, ३·६% सिंधमध्यें व २·६% संयुक्त प्रांतांत आहे. हैद्राबाद संस्थानाचे वाट्यास १२·८% लागवड येते.

गेल्या पांच मोसमांत समुद्रमार्गानें हिंदी कपाशीची निर्गत किती झाली, हे खालील तक्ता दर्शवितो. १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट हा कपाशीचा मोसम असतो.

| — | | | गाठी ( प्रत्येकी ४०० पौंडाच्या ) |
|---|---|---|---|
| १९३५–३६ | ... | ... | ३,६२६ |
| १९३६–३७ | ... | ... | ४,२१५ |
| १९३७–३८ | ... | ... | २,०५३ |
| १९३८–३९ | ... | ... | ३,२७४ |
| १९३९–४० | ... | ... | २,३४५ |


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

अधिकृत भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,१५,५०,०००

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., के. टी.; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.



# दि गुड–वुइल

## ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस

भरपूर सवलती माफक हप्ते

**ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.**

पत्रव्यवहार करावा

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.

मॅनेजिंग डायरेक्टर

## मुंबई प्रांतांतील आरोग्य

### १९३९ सालचा सरकारी अहवाल

या वर्षांत एकूण ७,७५,५४५ जन्म झाल्याबद्दल नोंद झाली आहे. म्हणजे सन १९३८ सालच्या संख्येपेक्षां १७,०५० जन्म अधिक झाले आहेत.

सन १९३८ ची मृत्युसंख्या (५,४७,३८७) तसेंच मागील पांच वर्षांची सरासरी मृत्युसंख्या (५,१०,७९३) या दोन्ही संख्यांशीं तुलना करतां रिपोर्टाच्या वर्षांत झालेल्या मृत्यूंची संख्या (४,९४,८९७) घटलेली आहे. प्रांताची सध्यांची अंदाजें लोकसंख्या १,९८,६८,५६२ इतकी आहे तर तीच सन १९३१ च्या खानेसुमारींत १,७९,६७,०५० इतकी होती. खानेसुमारी-प्रमाणें हिशोब करतां या वर्षाचें मृत्यूचें प्रमाण २७·५५ पडतें व अंदाज केल्याप्रमाणेंच्या एकूण लोकसंख्येप्रमाणें हिशोब करतां तें २४·९१ इतकें पडतें.

एक वर्षाच्या आंतील वयाच्या बालकांची मृत्युसंख्या १,१८,४२५ होती. तर तीच १९३८ सालीं १,३२,१०० इतकी होती. म्हणजे १३,६७५ मृत्यु कमी झाले.

रिपोर्टाच्या वर्षांत सर्वसाधारणपणें आरोग्यमान चांगलें होतें. जन्माच्या प्रमाणांत वाढ झाली, मृत्यूचे प्रमाणांत घट झाली आणि बालमृत्यूंच्या प्रमाणांतहि घट झाली. परंतु मृत्यूचें प्रमाण १९३२ सालीं अगदीं कमी म्हणजे २३·०४ झालें होतें तितकें तें या वर्षी घटलें नाहीं. पण इतर बाबतींतील संख्यामान, उदा. बालमृत्यूंचें प्रमाण व मृतजातांचें प्रमाण, १९३२ या अपवादात्मक आरोग्य-पूर्ण वर्षाच्या प्रमाणांपेक्षां कमी होतें. जवळजवळ प्रत्येक सदराखालीं येणाऱ्या मृत्यूंच्या प्रमाणांत घट झाल्यामुळें एकंदर मृत्यूंच्या प्रमाणांत घट झाली; याला अपवाद म्हणजे फक्त देवीनें आणि प्लेगनें झालेल्या मृत्यूंच्या प्रमाणांतील वाढ ही होय.

प्रांतांतील जन्मांचें प्रमाण ४३·१६ होतें तर तेंच सन १९३८ मध्यें ४२·२२ होतें म्हणजे त्यांत ०·९४ वाढ झाली. १९४१ सालीं खानेसुमारी करण्याच्या वेळीं लोकसंख्या शेंकडा १० पेक्षां अधिक होईल ही अपेक्षा ह्या वाढीमुळें अधिक बळकट झाली आहे. एके काळीं फार मोठें जन्मांचें प्रमाण हें देशाच्या भरभराटीचें चिन्ह समजण्यांत येत असे. रोगट लोकांमध्यें साह-जिकच जन्मांचें फार मोठें प्रमाण असणार नाहीं. परंतु एखाद्या समृद्ध आणि आरोग्यसंपन्न देशांत तुलनात्मकदृष्ट्या पाहतां जन्मांचें कमी प्रमाण असणें अशक्य नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे. वास्तविक प्रांतांतील कित्येक जिल्ह्यांमध्यें जन्मसंख्येचें प्रमाण ५० पेक्षांहि जास्त भरण्याइतकें बेसुमार वाढत आहे त्यापेक्षां जन्मसंख्येचें बेतशीर प्रमाणच सार्वजनिक आरोग्यदृष्ट्या अधिक चांगलें ठरतें.

### सांथीचे रोग

प्लेग—सन १९३३ मध्यें प्लेगच्या मृत्युसंख्येचा कळस झाला व त्यानंतरच्या पांच वर्षांत प्लेगमुळें होणाऱ्या मृत्युसंख्येंत झपाट्यानें घट झाली. सन १९३६ ते १९३८ पर्यंत प्लेगमुळें झालेल्या मृत्युसंख्येनें दरवर्षी सुमारें ५०० इतकी किमान मर्यादा गांठली. सन १९३९ मध्यें प्लेगमुळें झालेल्या मृत्यूंच्या संख्येंत १,४७२ वाढ झाली तर तीच संख्या सन १९३८ मध्यें ४०६ होती. रिपोर्टाचे वर्षी नियतकालिक फेऱ्याप्रमाणें प्लेगच्या मृत्युसंख्येंत जरी वाढ झाली असली तरी प्लेगच्या मृत्युसंख्येंत क्रमशः घटच होत चालली आहे असें दिसून येतें. गेल्या २० वर्षांत तीनदां प्लेगची मृत्युसंख्या कळसास पोहोंचली, प्रथम १९२३ सालीं ३३,००० मृत्य झाले, दुसऱ्यानें १९२९ सालीं १८,००० मृत्यु झाले, आणि तिसऱ्यानें १९३३ सालीं २४,००० मृत्यु झाले, तरी ह्या वर्षी किंवा नंतरच्या वर्षांत होणाऱ्या मृत्युसंख्येचा सर्वांत मोठा आंकडा मागील सांथीच्या उच्चांकाइतका होणार नाहीं अशी अपेक्षा आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे प्लेगमुळें होणाऱ्या मृत्युसंख्येचा झोंक क्रमशः घट होण्याकडे आहे. मात्र तिच्यामध्यें नियतकालिक वाढ ही होतेच; अशी प्रत्येक वाढ मागील वाढीपेक्षां सौम्य स्वरूपाची आहे आणि हल्लींची वाढसुद्धां मागील वाढीप्रमाणेंच असेल असें मानावयास हरकत नाहीं.

कॉलरा—या वर्षांत कॉलऱ्यामुळें झालेल्या मृत्यूंची संख्या १,७८६ होती तर १९३८ मध्यें ती ३,८१३ होती. या वर्षी कॉलऱ्याची सांथ फार सौम्य स्वरूपाची होती. १९३३ नंतरच्या वर्षांतील आंकड्यांत या वर्षीचा मृत्युसंख्येचा आंकडा सर्वांत कमी आहे. सन १९३४ पासून सन १९३७ पर्यंत सांथीचे प्रमाण चढउतार न होतां सारखेंच राहिलें यावरून असें सिद्ध होतें कीं, परिस्थिति सांथीला अनुकूल असली तरी हल्लींच्या कसोशीच्या उपायानें कॉलऱ्यानें होणारी मृत्युसंख्या आटोक्यांत ठेवतां येईल आणि जुन्या काळीं होणारा साथीचा व्यापक फैलाव टाळतां येईल. परंतु जिच्यामुळें कॉलऱ्याचा प्रादुर्भाव होणें अशक्य होईल अशातऱ्हेची परिस्थिति विशेषतः खेड्यापाड्यांत तरी नसते. सामान्य जनतेमध्यें मुबलक पाणी-पुरवठा, आरोग्यरक्षणाची उत्कृष्ट उपाययोजना व आरोग्यानुकूल संवयी यांमुळें पाहिजे असलेली सुधारणा घडवून आणतां येईल आणि असें करण्याचाच प्रयत्न केला पाहिजे. खेडेगांवांना पाणी-पुरवठा करण्याची दहा लाख रुपये खर्चाची योजना सरकारनें सुरू केली आहे आणि त्याकरितां जमिनींची पाहणी करण्याचें काम जोरांत चालू आहे.

देवीः—रिपोर्टाचे वर्षी देवीच्या रोगामुळें ६,७६९ मृत्यु झाले तर सन १९३८ मध्यें ४,३५५ इतके मृत्यु झाले होते. पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश व नाशिक ह्या जिल्ह्यांत इतर जिल्ह्यांचे मानानें या रोगाचा अधिक उपद्रव झाला. या वर्षी देवी आलेल्या रोग्यांपैकीं मृत्यूंचें शेंकडा प्रमाण २१·१४ होतें तर तेंच सन १९३८ मध्यें २४·९७ इतकें होतें. जरी या वर्षांत रोगाचा फैलाव जास्त झाला असला तरी मृत्यूंची संख्या घटली आहे व त्यावरून असें दिसतें कीं,या प्रांतांत हल्लीं देवीच्या रोगाची तीव्रता कमी झाली आहे. देवी बालपणीं टोंचल्यामुळें व पुनः टोंचल्यामुळें समाजांतील रोगनिर्भयता वाढत आहे आणि जनतेकडून अधिक सहकार्य मिळाल्यास रोगास परिणामकारकपणें आळा घालतां येईल.

हिंवताप (मलेरिया):—या वर्षांत हिंवतापामुळें २८,८३३ मृत्यु झाले तर सन १९३८ मध्यें २९,७९० मृत्यु झाले होते. प्रांतांतील ज्या भागांत हिंवतापाचा उपद्रव विशेष होत असतो त्या भागांतील खेडेगांवांत जाऊन तेथें आढळणाऱ्या हिंव-तापाच्या रोग्यांना औषधोपचार करण्याकरितां सरकारनें या वर्षी ४४ सबॉर्डिनेट मेडिकल सर्व्हिसमधील ऑफिसर नेमले होते.

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—०० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४–१० |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९४–१० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४—५ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९६–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... ... | ११४—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४४—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११०—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४२–१४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५५०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०४–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३४—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५६७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १८२५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% ... ... | ६३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९९०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६६२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २०७—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४७—८ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०–१५ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४१—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३९५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१३–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४८—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३८०—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | ११२५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १४१—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४३–११–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३—३–६ |


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. २ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक
निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.




फोन नं. ७७९ व्यवस्थापक







सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४ .
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख १२ मार्च, १९४१ | अंक ११

**डॉ. एन. आर. राजोपाध्ये**
यांच्या
ॲस्गॉल or शक्तिवर्धक पिल्स घ्या. किंमत १२ आ. फक्त.
सोल एजंट: "वेलणकर वनौषधालय", तुळशीबाग रस्ता, पुणें.
एजन्सी देणें आहे. दोन आण्याचे स्टँम्प्स पाठवून विचारावें.

**डॉ. एन. आर. राजोपाध्ये यांचे खास देखरेखीखालीं चाललेलें**
**" वेलणकर वनौषधालय "**
येथें सर्व तऱ्हेच्या खात्रीच्याच वनस्पति व सिद्धौषधी मिळतील. १ पैशापासून ते सिद्धौषधींपर्यंत मिळण्याचें हें पुण्यांतील पहिलेंच दुकान होय. येथें चूर्णे, सप्तकाच्या काढ्याच्या पुड्याही ऑर्डर-प्रमाणें करून दिल्या जातात. येथें रोगी तपासून औषध देण्याची सोय आहे. त्याकरितां चार्ज रोज फक्त एकच आणा.
उघडण्याची वेळ:-सकाळीं ८॥ ते १२ व दुपारीं ३॥ ते ८ पर्यंत.
पत्ता : "वेलणकर वनौषधालय" तुळशीबाग रस्ता, पुणें.

**देशी औषधें तयार करणारा महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना**
पंडु, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या
**अशक्ततेवर**
**रक्तवर्धक**
**वापरा.**
**सर्वत्र मिळतें.**
—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.** पुणें ४.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
**' पायोनियर डाइंग हाऊस '**
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—
भिकारदास मारुती रोड, दानेवाडी, पुणें.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड**
सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे
मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.
मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना



**मधुमेहावरील औषध**
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

# विविध माहिती

### मदुरा मिल्स कं. लि.

मदुरा मिल्स कं. लि. नें १९४० सालीं ३ कोटि, ९०½ लक्ष रुपयांची विक्री केली. १९३९ सालीं २ कोटि, ९४ लक्ष रुपयांची विक्री झाली होती. एकूण २ कोटि, ९३ लक्ष रुपयांच्या कपाशीचा गिरणींत उपयोग करण्यांत आला. वर्ष असेर ९ लक्ष, ९९ हजार रुपये नफा उरला. मदुरा मिल्सचें साधें व होजिअरीचें सूत सुप्रसिद्ध आहे.

### अहमदाबाद प्रांतज रेल्वे कं. लि.

बी. बी. अँड सी. आय. रेल्वेची सरकार खरेदी करणार असलें तरी ह्या रेल्वेच्या देखरेखीखाली चाललेल्या अहमदाबाद-प्रांतज रेल्वेची व्यवस्था १९४६ असेर पूर्वीप्रमाणेंच चालेल. त्या वर्षअखेर अहमदाबाद प्रांतजचा सरकारबरोबरचा करार संपतो व कराराची मुदत वाढविण्याची त्यांत तरतूद नाहीं. त्यावेळीं प्रत्येक ५०० रुपयांचा भाग ७०६ रुपयांस सरकार विकत घेईल.

### सेंट्रल बँकेची नवी शाखा

सेंट्रल बँक ऑफ इंडिया ट्यूटिकोरिन येथें आपली एक शाखा उघडणार आहे.

### मुंबई शहराची लोकसंख्या १४ लक्ष, ६७ हजार

मुंबई शहराची लोकसंख्या १९३१ सालीं ११ लक्ष, ६१ हजार होती, ती आतां १४ लक्ष, ६७ हजार झाली आहे.

### देवास व इंदूर

वरील दोन संस्थानांची लोकसंख्या आतां अनुक्रमें ८९½ हजार व १५ लक्ष झाली आहे.

### सांगली शहर

सांगली शहराची लोकसंख्या गेल्या दहा वर्षांत २५% वाढून ती ३८ हजार झाली.

### कोयनेलचा साठा

हिंदुस्थान सरकारजवळील कोयनेलचा साठा कमी होत होत ९० हजार पौंडांवर आला होता. आतां आणखी १½ लक्ष पौंड कोयनेल घेण्यांत आलें आहे.

### मद्रास

मद्रास शहराची लोकसंख्या १९३१ सालीं ६ लक्ष, ४७ हजार होती. आतां ती ७ लक्ष ७७ हजार झाली आहे.

### अहमदाबाद

अहमदाबादच्या लोकसंख्येंत गेल्या १० वर्षांत १½ लाखांची भर पडली आहे. अहमदाबादची आतांची लोकसंख्या ५ लक्ष, ९२ हजार आहे.

### चहाची खरेदी

ब्रिटिश सरकारच्या १९४१ सालांतील चहाच्या खरेदीपैकी २७ कोटि, २० लक्ष पौंड खरेदी हिंदी चहाची आहे. सिलोनांतून १३ कोटि, ८० लक्ष पौंड चहा घेण्यांत येईल. डच ईंडीज व ब्रिटिश पूर्व आफ्रिका ह्यांचेकडून अनुक्रमें ४८ लक्ष पौंड व २७ लक्ष पौंड चहा घेतला जाईल.

### रेडिओ सेटसची निर्गत

ग्रेट ब्रिटननें १९४० सालीं सुमारें ३ कोटि रुपयांचे रेडिओ सेट्स परदेशीं निर्गत केले.

### पार्सल जप्त

ग्रेटब्रिटनकडे बाहेरून पाठविण्यांत येणारें दोन पौंडांपेक्षा अधिक चहाचें कोणतेंहि पार्सल जप्त केलें जातें.

### देवकरण नानजी बँकिंग क. लि.

वरील शेड्यूल्ड बँकेच्या ठेवींत दोन वर्षांचे अवधींत ४००% वाढ होऊन, ठेवींची रकम २०½ लाख झाली. बँकेच्या मुंबई शहरांतच तीन शाखा आहेत. बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आकडे खालीलप्रमाणें आहेतः—वसूल भांडवलः ११ लक्ष, ३० हजार; ठेवीः २० लक्ष, ६० हजार; रोख व बँकांत शिलक ९ लक्ष, ०४ हजार; भाग व रोखेः ७ लक्ष, २४ हजार; कर्जेः ५ लक्ष, ५२ हजार; चांदीच्या चिपाः १ लक्ष, २२ हजार; इमारती व इतर मालमत्ताः ७ लक्ष, ४५ हजार; गुडवुइलः १ लक्ष. १९४० सालीं बँकेस १० हजार रुपये नफा झाला.

### बिगर-तिकीट प्रवास

रेल्वेनें बिगर तिकिट प्रवास करणारास कैदेची शिक्षा सांगणारें बिल मध्यवर्ती असेंब्लीनें मंजूर केलें. चर्चेचे वेळीं सर अॅन्ड्र्यू क्लो ह्यांनीं त्यांस भिकारी लोकांची सोसायटी व बिगर तिकिट प्रवास करणारांची असोसिएशन ह्यांचेतर्फें आलेलें पत्र वाचून दाखविलें. तें खालीलप्रमाणें होतें:—

नेहेमींच्या गुन्हेगारांबरोबर तुरुंगांत संबंध येणें आम्हांस पसंत नाहीं. तिकीट न काढतां प्रवास केल्याखेरीज आम्हांस गत्यंतरच नाहीं. बिगर तिकिटाच्या प्रवाशांचे परिषदेचें अध्यक्षस्थान आपण स्वीकारावें. "असेंब्लींतील कामामुळें मला हें आमंत्रण स्वीकारतां येत नाहीं," असें सर अॅन्ड्र्यू हे म्हणाले.

### यात्रेकरूंच्या गर्दीवर नियंत्रण

यात्रेचे वेळीं यात्रेकरूंची गर्दी होते व त्यामुळें कॉलऱ्याचा उपद्रव होतो, तो टाळण्याची एक योजना संयुक्त प्रांत सरकारपुढें आहे. लस टोचली असल्याचा दाखला ज्याचेजवळ असेल, त्यासच यात्रेच्या ठिकाणाचें रेल्वे तिकीट मिळावें व संयुक्त प्रांताबाहेरील लोकांजवळ हा दाखला नसल्यास यात्रेचे ठिकाणाच्या १० मैलांचे परिघांतील स्टेशनाचें तिकीट त्यास मिळूं नये, अशी त्यांत तरतूद आहे.

### जर्मनीमधील हिंदी युद्ध कैदी

"जर्मनींतील हिंदी युद्ध-कैद्यांनीं लिहिलेलीं तीन-चार खासगी पत्रें मी पाहिलीं आहेत, त्यांवरून तेथें त्यांस समाधानकारक रीतीनें वागविण्यांत येत असल्याचें दिसतें" असें मि. ऑजिल्व्ही ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

### ट्रेझरी बिलांवर ११ आ १ पै व्याज

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ११ आ. १ पै इतका पडला.

### इटॅलियन युद्ध कैदी

फेब्रुवारी, १९४१ असेर हिंदुस्थानांतील इटालियन युद्धकैद्यांची संख्या ३० हजारांपर्यंत गेली आहे. त्यांत २१ जनरल आहेत व १ अॅडमिरल आहे.

### पंजाबी खलाशी

हिंदी आरमारांतील खलाशांपैकीं निम्मे पंजाबी आहेत. हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावरील लोकांनीं नांवें नोंदविण्याची उत्सुकता दाखविलेली नाहीं.

### बँकांस सुटी

गुरुवार, ता. १३ मार्च रोजीं होळीनिमित्त बँका बंद रहातील.

### आगीच्या विम्याचे हप्ते

मुंबई येथील प्रॉपर्टी ओनर्स असोसिएशननें विनंति केल्यावरून मुंबई फायर इन्शुअरन्स असोसिएशननें आगीच्या विम्याच्या हप्त्यांची रकम १५% नें कमी केली आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १२२ | युद्धसहाय—हिटलरनें बल्गेरियाचा बळी घेतला—स्वदेशी धंद्यांच्या संरक्षणाचें महत्त्व | |
| २ मध्यवर्ती असेंब्लींत अंदाजपत्रकाची चर्चा | १२३ | ७ गंधयुक्त बोलपट लवकरच येणार | १२७ |
| ३ बॉंबे टेलिफोन कं. लि. | १२४ | ८ प्राप्तीवरील कर कसा चुकविला ? | १२७ |
| ४ बुधगांव बँक लि. | १२४ | ९ "फुटूरा" | १२८ |
| ५ इंडस्ट्रिअल इ. ट्रस्ट लि. | १२४ | १० निवडक बाजारभाव... | १३१ |
| ६ स्फुट-विचार ... | १२५ | | |
| युद्धाच्या नाटकांतील नवा प्रवेश-इंग्लंडला अमेरिकेचें | | | |


# अर्थ

बुधवार, ता. १२ मार्च, १९४१

## मध्यवर्ती असेंब्लींत अंदाजपत्रकाची चर्चा

### बाहेरच्या कर्जाची घरच्या कर्जांत अदलाबदल

हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडमध्यें काढलेल्या मुदतबंद कर्जाचें रूपांतर त्या सरकारच्या ह्या देशांत फेडावयाच्या कर्जांत करण्याचें ठरलें आहे. त्या व्यवहाराची आवश्यकता आणि स्वरूप काय आहे ह्याचें विवेचन आम्हीं मागें केलेंच आहे. मध्यवर्ती असेंब्लींत अंदाजपत्रकांतल्या रकमांच्या मंजूरीचा विचार चालू असतां कपातीच्या एका सूचनेच्या संबंधांत सदरहु प्रश्नाच्या चर्चेस चालना मिळून फडनवीसांनीं त्याविषयीं स्पष्टीकरण केलें. हिंदुस्थान सरकारनें आजवर जरूरीप्रमाणें इंग्लंडमध्यें व ह्या देशांत कर्जें काढलेलीं आहेत. इंग्लंडमध्यें काढलेल्या कर्जांची परतफेड तिकडील चलनांत अर्थातच करावी लागते आणि त्यावरचें व्याजहि तेथेंच द्यावें लागतें. हिंदुस्थानांत काढलेल्या कर्जांची फेड हिंदी चलनांत होते. सध्याचें युद्ध चालू असतांना ह्या देशास इंग्लंडला मोठमोठ्या रकमांचा माल पुरवावा लागत आहे आणि ही गोष्ट हिंदी व्यापारास अनुकूल अशीच आहे. हिंदुस्थानास इंग्लंडचें देणें निघतें त्यापेक्षा इंग्लंडनें हिंदुस्थानास द्यावयाचें देणें अधिक होत आहे. ह्या दोन देशांच्या परस्पर देण्याघेण्याची वजावाट होऊन हिंदुस्थान धनको आणि इंग्लंड ऋणको अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. इंग्लंडकडे हिंदुस्थानची बाकी निघत आहे ती लंडनमध्यें ह्या देशाच्या खात्यावर जमा होत आहे आणि ह्या रीतीनें हिंदुस्थानच्या मालकीच्या मोठमोठ्या रकमा लंडनमध्यें पौंड स्टर्लिंग ह्या चलनांत पडून रहात आहेत. हा पैसा इंग्लंडमधून ह्या देशांत कसा आणावयाचा हा येथें प्रश्न आहे. इंग्लंडला इकडे सोनें-चांदी पाठवण्याची युद्ध-काळांत सोय नाहीं. तेव्हां त्या देशानें हिंदुस्थानला देणें असलेल्या रकमांचे कर्जरोखे लिहून दिले पाहिजेत. पण हिंदुस्थाननें इंग्लंडमधील आपल्या कर्जाचे बाबतींत स्टर्लिंगमध्यें रोखे दिलेले आहेत. ह्या दोहोंची अदलाबदल झाल्यास हिंदुस्थानास आपलें येणें इंग्लंडकडून मिळेल आणि त्याचबरोबर ह्या देशास इंग्लंडचें पूर्वीचें देणें आहे तें ह्या येण्याच्या प्रमाणांत फेडलें जाईल. सुमारें १२० कोटि रुपये किंमतीचे स्टर्लिंगमधले हिंदुस्थाननें इंग्लंडला द्यावयाच्या कर्जाचे रोखे गोळा करण्यांत येऊन त्यांच्या मोबदल्यांत ब्रिटिश नागरिकांस इंग्लंडमधील सरकार स्वतःचे रोखे देईल आणि त्यांच्या हिंदी धारण करणारांस हिंदुस्थान सरकार त्याच मुदतींचे व व्याजाचे येथील रोखे किंवा त्यांची रोकड मागणारांस चलन देईल. ह्या अदलाबदलीमध्यें एका रुपयास अठरा पेन्स ह्या दरानें हिशोब केला जाऊन मुदत व व्याज ह्यांचे बाबतींत कोणताच फरक केला जाणार नाहीं. हिंदुस्थानांत लोकांच्या व बँकांच्या हातांत किती किंमतीचे स्टर्लिंग रोखे आहेत, हें समजण्यास आज मार्ग नाहीं. तथापि, त्यांच्या बदल्यांत रोकड द्यावी लागली असतां चलनाचा विस्तार होऊन त्याचे योगानें किंमती आणि व्याजाचे दर ह्यांवर अनिष्ट परिणाम घडून न येण्याविषयीं सरकार खबरदारी घेईल असें अभिवचन सर जेरेमी रेस्मन यांनीं मागें दिलें आहे.

सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं स्टर्लिंगमधील कर्जाबाबत मध्यवर्ती असेंब्लीमध्यें केलेल्या खुलाशाचें स्पष्टीकरण वर दिलें आहे. हिंदुस्थान सरकारच्या युद्धावर होणाऱ्या खर्चाचे संबंधांत असेंब्लींत उपसूचना आल्या त्यांवर बोलतांना श्री. अणे ह्यांनीं स्टर्लिंगमधील रोख्यांच्या अदलाबदलीचा प्रश्न उपस्थित केला होता. युद्धाचे परिस्थितींत प्रत्येक सरकार आपल्या जवळच्या सांपत्तिक साधनांचा व पैशाचा हात राखून उपयोग करीत असतें आणि हिंदुस्थान सरकारची शिल्लक लंडनमध्यें वाढली असतां ती तेथें कायम न ठेवतां तिचा विनियोग जुनीं कर्जें फेडण्याकडे तें करीत आहे ह्याचा अर्थ काय ? ह्या आशयाचा प्रश्न श्री. अणे ह्यांनीं विचारला होता. युद्धकाळीं नाइलाजानें नवीं कर्जें काढावीं लागतात, ती वेळ कर्जें फेडण्याची नसते असें म्हणण्याचा त्यांचा रोख होता. लंडनमध्यें जमा झालेल्या आपल्या पैशाचा उपयोग हिंदुस्थाननें कसा करावयाचा ? तो तेथें रोख्यांत गुंतविणें, तेथें माल खरेदी करून त्याची किंमत देऊन टाकण्यांत खर्च करणें किंवा तो चांदी-सोन्याच्या स्वरूपांत परत आणणें हे तीन मार्ग येथें संभवतात. त्यांपैकीं दुसरा व तिसरा मार्ग सध्याच्या स्थितींत अव्यवहार्य आहे हें उघड आहे. पहिल्या मार्गासंबंधानें हें लक्षांत आणलें पाहिजे कीं लंडनमध्यें रोख्यांत पैसे गुंतवण्यापेक्षा ते देऊन आपलें जुनें कर्ज तेथें फेडणें हें हिंदुस्थानास अधिक श्रेयस्कर होय. सुमारें एकशेवीस कोटि रुपये किंमतीचे इंग्लंड स्वतः धारण करीत असलेले ह्या देशाचे रोखे फाडून देत आहे हा स्टर्लिंग रोख्यांच्या प्रस्तुत व्यवहाराचा सरळ अर्थ आहे. एवढ्या रकमेनें हिंदुस्थाननें इंग्लंडला द्यावयाचें देणें कमी होत आहे आणि बाहेरचें ह्या देशाचें कर्ज फिटत आहे. हिंदुस्थान सरकारास ब्रिटिश सरकारच्या वतीनें ह्या देशांत आणखी कोट्यवधि रुपये खर्चावे लागणारच आहेत आणि त्या देण्याचा पैसा लंडनमध्यें हिंदुस्थानच्या खात्यावर स्टर्लिंगमध्यें पुन्हां जमा होणार आहे. हें आपलें येणें लंडनमध्यें साचूं द्यावयाचें का त्याची विल्हेवाट वरील अथवा दुसऱ्या एखाद्या रीतीनें लावावयाची हा प्रश्न आणखी एक-दोन वेळां उपस्थित होण्याचा संभव आहे. ह्या दृष्टीनें पहातां श्री. अणे ह्यांनीं असेंब्लींत केलेली सूचना विचारप्रवर्तक झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मध्यवर्ती अंदाजपत्रकाच्या चर्चेत असेंब्लीमध्यें सभासदांच्या निरनिराळ्या गटांच्या वतीनें भिन्न-भिन्न विचार प्रकट करण्यांत आले. वादाचा मुख्य विषय युद्धखर्चाची तरतूद कोणत्या मार्गानें करणें युक्त आहे ह्या संबंधानेंच अर्थात् होता. युद्ध-खर्च वाढत आहे, त्यासाठीं नवे कर बसवण्याची व कर्ज काढण्याची सरकारची योजना आहे. पण कर आणि कर्ज ह्यांमध्यें परस्पर-प्रमाण काय असावें ह्या बाबतींत मतभेद व्यक्त करण्यांत आला आहे. हिंदी धंदेवाल्यांचे मतें फाजील नफ्यावरील करामुळें स्वदेशी धंद्यांस उत्तेजन मिळण्याच्या ऐवजी त्यांची कुचंबणा होईल. युरोपिअन गटाचा नवीन करांस पाठिंबा आहे इतकेंच नव्हे तर युद्धामध्यें करांचा बोजा वाढणें स्वाभाविक असून आणखी कर बसले तरी ते अपरिहार्य असून त्यांचा स्वीकार करणें आवश्यक आहे असा अभिप्राय त्यांच्या वतीनें प्रकट करण्यांत आला. करांपेक्षा कर्जाचे मार्गानेंच युद्धखर्च भागवणें इष्ट आहे असेंहि कांहीं सभासदांनीं सुचवलें. ह्या रीतीची परस्पर-विरुद्ध स्वरूपाची सरकारी अंदाजपत्रकावर टीका झाल्यानें, फडनवीस, सर जरेमी रेसमन, ह्यांचें तिला उत्तर देण्याचें कार्य सुलभ झालें. कर विरुद्ध कर्ज ह्या प्रश्नासंबंधानें ते म्हणाले कीं, खर्चाच्या मानानें उभी करावयाची रकम अल्प असेल तर ती सबंद करांच्या मार्गानें उभारणें योग्य आहे; परंतु हा खर्च मोठा असेल तर करांचा आश्रय सर्वस्वी करणें अव्यवहार्य आहे. युद्धामुळें कित्येक लोकांच्या मिळकती वाढत असतां त्यांतला वाढता अंश सरकारी तिजोरींत ओढून न घेणें म्हणजे सरकारनें आपलें कर्तव्य करण्यास चुकणें होय. अशा आशयाचें समर्थन फाजील नफ्यावरील वाढवलेल्या कराचें त्यांनीं केलें. ह्या करवाढीचा प्रतिकूल परिणाम हिंदी धंदेवाले म्हणतात तसा होणार नाहीं असें फडनवीसांनीं सांगितलें. काड्यांच्या पेट्यांवरील पट्टी वाढवली गेली आहे तिच्या योगानें ह्या मालाच्या किंमती अवास्तव रीतीनें वाढवल्या जाणार नाहींत ह्या विषयीं सरकार खबरदारी घेईल असें त्यांनीं आश्वासन दिलें. कृत्रिम रेशमावरील कराचें समर्थन त्यांनीं ह्या धंद्यास संरक्षणाची आवश्यकता नाहीं असें म्हणून केलें. पौंड-स्टर्लिंगमधल्या कर्जरोख्यांचें रूपांतर करण्यांत येत आहे त्या योजनेमुळें चलनाचा विस्तार होऊन व्याजाचे दर भडकण्याची भीति आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे. ह्यासंबंधानें सर जरेमी ह्यांनीं असें उत्तर दिलें कीं, व्याजाचे दर हलके राखण्यांत सरकारचा स्वतःचाच फायदा असल्यानें व्यक्त करण्यांत आलेली भीति निराधार आहे. बाजारभावांत विशेष चलबिचल होऊं न देतां ते स्थिर ठेवण्याचा प्रयत्न सरकारनें करावा ह्या सूचनेप्रमाणेंच सरकारचें धोरण राहील असेंहि आश्वासन त्यांनीं दिलें.

## जोग, रानडे आणि कंपनी

(आमच्या प्रतिनिधीकडून)

पुणें येथील डेकन जिमखान्यावर, फर्ग्युसन कॉलेजच्या रस्त्यावर ज्या कांहीं सोई आहेत त्यांत काल्टेक्स पेट्रोल विकणारी वरील कंपनी होय. गेल्या दोन वर्षांपासून या कंपनीनें गिऱ्हाकांची सोय शक्य तेवढी करण्याचा प्रयत्न केला आहे. ऐस पैस जागा, मोटारी धुण्याची सोय व बाहेरगांवच्या गाड्या आल्यास त्या ठेवण्यास मोफत जागा देण्याची सोय कंपनीनें केली आहे. कंपनीचे मालक व नोकर लोक आपलेपणानें काम करतात. यामुळें सदर कंपनी बरीच लोकप्रिय झाली आहे. काल्टेक्स कंपनीचीं सर्व तऱ्हेचीं तेलें येथें विकत मिळतात.

## बॉंबे टेलिफोन कंपनी लि. सरकार विकत घेणार

बॅंगॉल, बॉंबे व मद्रास ह्या तीन टेलिफोन कंपन्या हिंदुस्थान सरकार विकत घेणार आहे. १९४३ अखेर ह्या कंपन्यांचे परवाने नवे करण्याची वेळ येत आहे तोंपर्यंत गव्हर्मेंट टेलिफोन बोर्ड लि.कडे त्यांची व्यवस्था राहील. सरकारनें देऊं केलेली किंमत शेकडा ७५ भागीदारांस पसंत पडली तर चार महिन्यांनंतर कंपन्यांचा ताबा सरकारी टेलिफोन बोर्ड लि. कडे जाईल, अशी व्यवस्था आहे. ह्या सरकारी लिमिटेड कंपनीची व्यवस्था, पोस्ट व तारखात्याचे डायरेक्टर जनरल, मॅनेजिंग डायरेक्टर ह्या नात्यानें पहातील.

बॉंबे टेलिफोन कंपनीची स्थापना १९२३ सालीं झाली. तिचें भरणा झालेलें भांडवल १,२०,१५,५५० रुपये आहे. प्रत्येक ऑर्डिनरी भाग ५० रुपयांचा, पूर्ण रकम भरलेला आहे. कंपनीचे टेलिफोन मुंबई, वसई, ट्रॉम्बे, कराची व अहमदाबाद येथें आहेत. १९३४ सालापासून कंपनी ८% डिव्हिडंड दरसाल देत आली आहे. सरकारनें कंपनीच्या भागीदारांस प्रत्येक भागीदारांस प्रत्येक भागाबद्दल रु. देऊं केले आहेत.

## दि बुधगांव बँक लि., बुधगांव

वरील बँकेचा सातव्या वर्षाचा ३०-१०-४० अखेरचा अहवाल आमचेकडे आला आहे. बँकेचें वसूल भांडवल ५० हजार रुपये असून एकूण फंड ११½ हजार रुपयांचे आहेत. ठेवींची रकम १ लक्ष, ९१½ हजार रुपये आहे. बँकेजवळील व इतर बँकांच्या खात्यावरील शिलक रिपोर्टाचे दिवशीं ७१½ हजार रुपये असून इन्व्हेस्टमेंट खातीं ३४½ हजार रुपये आहेत. त्यांपैकीं १६ हजार रुपये मिरजमळे संस्थानकडे गुंतविलेले आहेत. कर्जें व इतर येणीं १ लक्ष, ५६½ हजारांचीं आहेत, त्यांपैकीं १७½ हजार रुपये संशयित दर्शविलेले आहेत. वर्ष अखेर बँकेस ६,४५४ रुपये नफा झाला. त्यांतून भागीदारांस ५% प्रमाणें डिव्हिडंड देण्यासाठी २,४५० रुपयांचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. बँकेच्या गुडगेरी व संडाळी येथील शाखा नफ्यांत चालू आहेत. बँकेचें सध्याचें वर्ष कार्तिक शु. १ ते आश्विन वद्य ३० असें आहे, तें १ जानेवारी ते ३१ डिसेंबर, असें करण्यांत यावयाचें आहे.

## इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लि.

(वार्षिक सभा : २५-३-४१)

ह्या कंपनीचें वसूल भांडवल ५० लक्ष रुपये आहे. कंपनीची स्थापना १९३३ सालीं झाली. १९३५ पासून तिनें करमाफ ४% डिव्हिडंड कायम दिलें आहे. १९४० अखेरच्या बारमाहींत तिला २ लक्ष, ३८½ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस ४% करमाफ डिव्हिडंड मिळेल. कंपनीजवळील सरकारी रोखे व भाग ह्यांची बाजारभावाची किंमत ताळेबंदांत दाखविलेल्या किंमतीपेक्षा अधिक आहे. कंपनीजवळील रोख्यांपैकीं ११·११% किंमतीचे सरकारी कर्जरोखे व डिबेंचर्स, २४·४४% किंमतीचे प्रेफरन्स भाग व ६४·४६% किंमतीचे ऑर्डिनरी भाग व स्टॉक आहेत. रोख्यांची वर्गवारी दुसऱ्याहि प्रकारें करतां येईल. १६·४३% रकम तागाच्या कंपन्यांत, १५·६५% वीज वगैरेच्या कंपन्यांत, ८·३९% लोखंड व पोलादाच्या कंपन्यांत, ९·९४ कपास कापडाच्या कंपन्यांत, ८% रेल्वे कंपन्यांत, ५·४३% बँकांत व ५·१९% साखरकंपन्यांत गुंतविलेली आहे.

# स्फुट विचार

## युद्धाच्या नाटकांतील नवा प्रवेश–इंग्लंडची जय्यत तयारी

लंडनमध्यें भाषण करतांना हिंदुस्थानचे सेक्रेटरी ऑफ स्टेट, मि. एमरी, म्हणाले:—" जर्मनीच्या चिलखती गाड्या आणि तोफा ह्यांच्या खणखणाटांत जागतिक युद्ध-नाटकांतील एका नवीन प्रवेशाचा पडदा वर जात आहे आणि हा प्रवेश निर्णायक ठरणार आहे. " बल्गेरियामधून ग्रीस व तुर्कस्तान ह्यांच्या दिशेनें जर्मन सैन्यें चालली असून पूर्वेकडील रणक्षेत्रांत विजय मिळवून इंग्लंडचें बळ कमी करण्याचा हिटलरचा बेत आहे. त्याच्याशीं मि. एमरी ह्यांच्या वरील उद्गारांचा संबंध आहे. आफ्रिकेंत व भूमध्य समुद्रांत इटालियन फौजांचा व आरमारांचा धुव्वा उडाला असून जर्मनीचें युद्धयंत्र त्या क्षेत्रांत बंद पडलें आहे. ह्या अपयशाचें परिमार्जन करण्याच्या हेतूनें आणि इटलीची बाजू उचलून धरण्याच्या हेतूनें हिटलरनें बल्गेरियामधून काळया समुद्राकडे आणि ग्रीसच्या बाजूनें आपल्या फौजा चालवल्या आहेत. ह्या जर्मन स्वारीमुळें इंग्लंडचें लढाऊ बळ दुभंगेल आणि आपला ब्रिटनवर स्वारी करण्याचा बेत सहज सिद्ध होईल अशी हिटलरची कल्पना आहे. शत्रूचे पुढचे डाव-पच अगोदरच ओळखून ते विफळ करण्याची तयारी ठेवणें हें यशाचें नेहमी लक्षण असतें. पूर्व रणांगणाकडे इंग्लंडचें लक्ष वेधून इकडे पश्चिम भागांत नियोजित स्वारीचा वार उडवून द्यावयाचा ही हिटलरची कल्पना ब्रिटिश सरकार ओळखून आहे हें स्पष्टपणें सांगण्याचा मि. एमरी ह्यांच्या वरील भाषणाचा मुख्य हेतु आहे. ब्रिटिश मुत्सद्यांच्या युद्धविषयक धोरणाचा एक लक्षांत ठेवण्यासारखा विशेष आहे आणि तो हा कीं शत्रूचें बळ कधीहि कमी लेखावयाचें नाहीं आणि उत्पन्न होणाऱ्या अवघड परिस्थितीची यथार्थ कल्पना लोकांस करून द्यावयाची. कोणतींहि संकटें आलीं तरी त्यांस तोंड देण्याची राष्ट्राची तयारी असावी आणि तें बेसावध राहूं नये हा वरील धोरणाचा उद्देश असतो. मि. एमरी ह्यांच्या भाषणांत अखेरीस हिटलरच्या कल्पित हल्ल्याचा प्रतिकार करण्याची इंग्लंडमध्यें कशी जय्यत तयारी झाली आहे ह्याचें वर्णन आलें आहे. सशस्त्र सैन्य, लढाऊ साधनांचा पुरवठा व जनतेचा निर्धार ह्यांवर इंग्लंडनें भिस्त ठेवून जर्मनीचा हल्ला येईल तेव्हां तो परतवण्यास सिद्ध असावें असें त्यांचें आपल्या बांधवांस सांगणें आहे. नॉर्वेच्या किनाऱ्यालगत ब्रिटिश आरमारानें शत्रूच्या जहाजांचा नाश केल्याची बातमी नुकतीच आली आहे तीवरून इंग्लंडच्या नाविक बलाची साक्ष पटत आहे. इंग्लंड केवळ जागरूकच आहे असें नसून शत्रूवर उलट हल्ला करण्यास समर्थ आहे ह्याचा वरील आरमारी हल्ला हा भरपूर पुरावा आहे. वसंतऋतूंत आपण इंग्लंडवर स्वारी करणार अशी वल्गना हिटलरनें मार्गे केली आहे आणि आतां पूर्वरणांगणांत जर्मन सैन्यानें पुढें पाऊल टाकलें आहे. इंग्लंड बेसावध नसून शत्रूचा योग्य समाचार घेण्यास समर्थ आहे ह्याविषयीं लोकांनीं विश्वास बाळगावा अशी परिस्थिति आहे. पुढें येणाऱ्या अडचणींची यथार्थ कल्पना असणें हीच विजयाची पूर्वतयारी आहे.

---

## इंग्लंडला अमेरिकेचें युद्ध-सहाय-बिल मंजूर झालें

अमेरिकन राष्ट्रास प्रस्तुत युद्धापासून सर्वस्वी अलिप्त ठेवण्याच्या धोरणाचा पुरस्कार त्यांतले कांहीं नागरिक करीत होते. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं प्रथमपासून इंग्लंडला सर्व तऱ्हेचें सहाय देण्याचा आपला निश्चय प्रसिद्ध केला होता. अमेरिका प्रत्यक्षपणानें युद्धांत पडणार नाहीं; परंतु जर्मनी, इटली व जपान ह्या राष्ट्रांच्या त्रिकुटानें चढाईचीं युद्धें स्वतंत्र लोकांच्या विरुद्ध चालवलीं आहेत, त्यांमध्यें स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आवश्यक असलेलें सर्व सहाय देण्यास आपलें राष्ट्र मागेंपुढें पहाणार नाहीं ह्याविषयीं त्यांनीं असंदिग्धपणानें अभिप्राय व्यक्त केला होता. राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश राष्ट्र निकरानें लढत असल्यानें त्यास शस्त्रास्त्रें व इतर सामुग्री पुरवण्यानें अमेरिका स्वतःच्या संडाचे संरक्षणाची तयारी करीत असल्याचेंहि त्यांनीं बोलून दाखवलें होतें. ह्या आपल्या धोरणास अमेरिकन कायदेमंडळाची संमति मिळवण्याच्या उद्देशानें कायद्याचा आधार मिळवण्यासाठीं प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं एक बिल काँग्रेसपुढें मांडलें होतें. इंग्लंडला पुरवावयाच्या लढाऊ सामुग्रीची किंमत रोख मिळवण्यासारखी नसल्यानें ती तारण घेऊन व उसनी द्यावी हें सदरहु बिलाचें तत्व होतें. विरोधकांनीं सेनेटमध्यें व हाउस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हसमध्यें कित्येक उपसूचना पुढें मांडल्या आणि त्याचा जोर खच्ची करण्याची शिकस्त केली. कित्येक दिवस कडाक्याचा वाद्-विवाद होऊन अखेर बिल आतां दोन्हीं सभांत मंजूर होऊन प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्या संमतीसाठीं गेलें आहे. प्रेसिडेंटांच्या धोरणाचा विजय झाला आहे त्यामुळें इंग्लंडची बाजू भक्कम होऊन शत्रु राष्ट्रांस धास्ती उत्पन्न झाली आहे. इंग्लंडला अमेरिकेचे सैनिक नको आहेत, युद्धसामुग्री हवी आहे; आणि ती उघड रीतीनें भरपूर मिळण्याची व्यवस्था झाली आहे. अमेरिकेसारखा सुसंपन्न देश त्याच्या पाठीमागें असल्यानें ब्रिटिश राष्ट्रास नवा हुरूप चढणें स्वाभाविक आहे. विमानें, जहाजें, इत्यादि लढाऊ सामुग्रीचा ओघ इंग्लंडकडे अव्याहत वाहूं लागला म्हणजे ह्या बाबतींत आपलें पारडें जड असल्याविषयींची हिटलरची घमेंड उतरणार आहे. अमेरिकन काँग्रेसपुढें असलेलें बिल वादविवादाचा विषय होतें तोंपर्यंत अमेरिकेच्या धोरणाविषयीं वाटत असलेली सर्व शंका आतां दूर झाली आहे, ही गोष्ट समाधानकारक आहे.

---

## हिटलरनें बल्गेरियाचा बळी घेतला

बाल्कन प्रदेशांत हळुहळु घुसून ग्रीस व तुर्कस्थान ह्यांचे बाजूस आपलें घोडें सरकवावयाचें असें कारस्थान हिटलरनें कित्येक आठवडे गुप्त रीतीनें चालवलें होतें. बल्गेरियानें तटस्थपणाचा देखावा आजवर केला आणि तुर्कस्थानशीं ह्याबाबत करार नुकताच केला. पण जर्मनीशीं बोलणीं बल्गेरिअन मंत्र्यांनीं आंतून चालवलीं असल्याचें आतां उघड होतें. शेजारच्या लहान राष्ट्रांस धमकी देऊन त्यांचें स्वातंत्र्य नष्ट करण्याच्या हेतूनें त्यांचेकडून आपणांस सोयीच्या वाटतील त्या करारांवर सह्या घ्यावयाच्या हा हिटलरी खाक्या आतां सर्वांच्या परिचयाचा झालेला आहे. ह्या देशांचा ताबा आपण ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली ते जाऊं नयेत ह्या हेतूनें घेत आहों असें सोंग जर्मनी नेहमींच आणीत असतो आणि बल्गेरियाचे संबंधांत ह्याच युक्तीचा आश्रय हिटलरनें केला आहे. बल्गेरिया स्वतःच्या तटस्थपणास जागेल ह्या

कल्पनेनें ब्रिटिश सरकारनें अखेरपर्यंत वाट पाहिली. अखेर जर्मनीनें व बल्गेरियानें शांततेच्या धोरणाचा बुरखा झुगारून दिला आहे. बाल्कन राष्ट्रांच्या रक्षणासाठी जर्मन फौजा बल्गेरिया व्यापून बसल्या असल्याची बतावणी जर्मनी करीत आहे. तुर्कस्थानच्या सरकाराकडे हिटलरनें एक खास दूत पाठवला असून तेथेंहि बल्गेरिया प्रमाणेंच कारवाया करण्याचा त्याचा बेत दिसतो. तुर्की राज्यकर्ते आजपर्यंत मोठ्या सावधगिरीनें वागत आहेत आणि हिटलरी हिकमतीस ते दाद देणार नाहींत असें मागण्यास जागा आहे. तुर्की सरकार व मि. ईडन ह्यांच्या वाटाघाटी अगदीं अलीकडे झाल्या असून ब्रिटन व तुर्कस्तान ह्यांनीं एकवटून जर्मन हालचालींस कसें तोंड द्यावयाचें ह्याविषयीं त्यांचा निश्चय झालाच असला पाहिजे. ह्या सर्व भानगडींत रशियानें स्तब्धपणाची वृत्ति स्वीकारली असल्यानें त्याचें धोरण काय आहे ह्याचा पत्ता लागत नाहीं. जर्मनीची चढाई रशियास पसंत नाहीं असें म्हणतात, पण त्याविषयीं निश्चित असें कांहीं प्रसिद्ध झालें नाहीं.

---

### स्वदेशी धंद्यांच्या संरक्षणाचें महत्व

सर जरेमी रेस्मन ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लीमध्यें अंदाजपत्राच्या चर्चेंत झालेल्या टीकेस उत्तर देतांना एक महत्वाचा मुद्दा पुढें मांडला त्याचा परामर्श येथें घेणें आवश्यक आहे. राष्ट्राच्या आर्थिक समृद्धतेचा पाया असणारे असे धंदे हिंदुस्थानांत मागेंच स्थापन होण्यास सरकारनें उत्तेजन दिलें असतें तर आज युद्धकाळांत लढाऊ सामान तयार करण्याचे बाबतींत स्वदेशी कारखान्यांचा तुटवडा व मागसलेपणा प्रत्ययास येत आहे तो प्रसंग टळला असता आणि देशाचा औद्योगिक विस्तार युद्धविषयींच्या गरजांस अनुसरून तात्काळ व सुकर रीतीनें होऊं शकला असता अशी टीका लोकप्रतिनिधींच्या बाजूनें करण्यांत आली आहे. तिच्या संबंधांत सर जरेमी ह्यांचा पहिला मुद्दा असा आहे कीं जर्मनी दुसऱ्या राष्ट्रावर हल्ला करण्याच्या तयारींत गुंतला होता, त्यावेळीं इंग्लंड व हिंदुस्थान ह्या देशांतील लोक शांततेचा पुरस्कार करीत होते ही गोष्ट नैतिक दृष्ट्या त्यांस अनुकूल अशीच आहे. दुसरा मुद्दा असा कीं युद्धापूर्वी सरकारनें मोठमोठ्या कारखान्यांस आपल्या तिजोरीचें नुकसान करून आणि जनतेवर करांचा व भारी किंमतीचा बोजा टाकला असता तर त्या धोरणाविरुद्ध चोहोंकडून गिल्ला झाला असता. औद्योगिक संरक्षणाच्या धोरणाविरुद्ध अगोदरच ओरड झाली आणि तिला आणखी जागा देणें केव्हांही श्रेयस्कर झालें नसतें. युद्धाची आपत्ति जर्मनीनें आपणांवर आणली आहे आणि तिला तोंड देण्यासाठी स्वार्थत्याग करूनहि नवे स्वदेशी धंदे स्थापन करणें अपरिहार्य झालें आहे. सर जरेमी ह्यांनीं वरील आशयाचा असेंब्लींत केलेला युक्तिवाद समाधानकारक वाटण्यासारखा नाहीं आणि तो दूरदर्शीपणाच्या अभावाचा द्योतक आहे. आग लागल्यावर आड खणावयास लागण्याविषयींच्या म्हणीचें त्यावरून स्मरण होतें. प्रत्येक राष्ट्राच्या स्वतंत्र जीवितासाठी कांहीं मूलभूत स्वरूपाचे धंदे अगत्याचे असतात आणि त्यांच्या अस्तित्वाची किंमत त्यामधील लोकांनीं देणें प्राप्त होतें. संरक्षणाचे संबंधांत हिंदी राष्ट्र स्वावलंबी असण्याची आवश्यकता मागच्या महायुद्धांत सिद्ध झाली होती आणि त्या प्रसंगाच्या अनुभवानें सरकारनें शहाणें व्हावयास हवें होतें हें सांगण्याचा टीकाकारांचा हेतु असून ह्या टीकेस सर जरेमी ह्यांचा कोटिक्रम उत्तर होऊं शकत नाहीं. पोलादाच्या हिंदी धंद्यास जनतेवर ओझें घालूनहि वेळींच संरक्षण दिलें गेलें नसतें तर आज हिंदुस्थानांत काय परिस्थिति झाली असती ह्याची कल्पनाच केली पाहिजे. कागद, साखर, काड्यांच्या पेट्या इत्यादि मालासंबंधानें असेंच सांगतां येईल. सारांश, महत्वाच्या स्वदेशी धंद्यांस झीज सोसूनहि उत्तेजन देणें म्हणजे पुढें येणाऱ्या नुकसानीच्या आपत्तीविषयीं आगाऊ तरतूद करणें होय.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोव्हद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## गंधयुक्त बोलपट लवकरच येणार

चित्रपटांच्या निर्मितीस प्रारंभ होऊन फार काळ लोटलेला नाहीं. अगदीं पहिले चित्रपट अत्यंत सामान्य दर्जाचे होते व त्यांत दोषहि अनेक असत. चित्रपटांच्या युगास प्रारंभ झाला, त्याची आठवण जुन्या पिढीस अद्याप आहे. ते चित्रपट मुके व फक्त काळे-पांढरे होते. चित्रपट चालू असतांना फिल्म तुटणें ही नित्याचीच गोष्ट होती. रंगीत चित्रपटांस लवकरच सुरवात झाली, परंतु २५ वर्षांपूर्वी विलायतेंतहि रंगीत चित्रपट अपवादात्मक होते व त्यांच्या तिकिटांचा दरहि भारी असे. १२ वर्षांपूर्वी चित्रपटांस आवाज प्राप्त झाला. चित्रपटांच्या पहिल्या स्वरूपावरून त्यांच्यांत आजच्याइतकी सुधारणा घडून येईल व त्यांच्या निर्मितीच्या धंद्यास अतिशय महत्त्व प्राप्त होईल, असें भविष्य वर्तविलें असतें, तर तें त्यावेळीं धारिष्ट्याचें वाटलें असतें.

सिनेमांत दाखविण्यांत येणारे प्रसंग शक्य तितके स्वाभाविक व निसर्गास धरून असणें आवश्यक आहे. व्यवहारांतील गोष्टी दिसतात, ऐकूं येतात तसा त्यांचा वासहि येतो. तेव्हां, पडद्यावर दिसणाऱ्या प्रसंगांस अनुसरून थिएटरांतील प्रेक्षकांस वासहि आला, तर फिल्मनें त्यांची अधिक करमणूक होईल, हें उघड आहे. पडद्यावरील चित्रानुसार थिएटरांत वासयुक्त हवा खेळविण्याच्या अनेक कल्पना निघाल्या, परंतु त्यांस विशेष यश प्राप्त झालें नाहीं. थिएटरांतील विड्या-सिगारेट्सचा व माणसांच्या शरीराचा घाण वास जरी नाहींसा करतां आला, तरी लोकांना त्यापासून आनंद होईल व त्यांचें मन प्रफुल्लित होईल. तेव्हां, प्रत्यक्ष बोलपटच गंधयुक्त करतां आले, तर प्रेक्षकांचें चित्त उल्हसित होईल, ह्यांत नवल कोठलें ?

न्यूयॉर्क येथील जागतिक प्रदर्शनाच्या स्विस विभागांत गेल्या ऑक्टोबरमध्यें एक गंधयुक्त बोलपट दाखविण्यांत आला, तो अत्यंत यशस्वी ठरला. चित्रपटगृहांत प्रसृत केलेला पहिला वास घालवून त्याचे जागीं दुसरा वास आणण्याचें काम अत्यंत अवघड व महत्त्वाचें आहे व त्याच्या यशावरच गंधयुक्त चित्रपटांचें भवितव्य अवलंबून आहे. प्रस्तुत प्रयोगांत, तीस मिनिटांचे अवधींत सुमारें ५० वेगवेगळे गंध दरवळण्यांत आले, व ते सर्व स्वाभाविक वाटले. ज्या लहरींतून ते प्रसृत केले जातात, त्यांस इलेक्ट्रो-ऑस्मिक लहरी असें नांव देण्यांत आलें आहे. पडद्यावरील फुलें बदललीं, कीं ह्या लहरी त्याप्रमाणें गंध प्रसृत करीत. कॉफीच्या वासामुळें तर लोकांच्या तोंडास पाणी सुटलें. इस्पितळांतील देखावा दृष्टीस पडतांच फिनेलचा मंद वास येऊं लागला. देखाव्यापेक्षा किंवा आवाजापेक्षा वासानें मनुष्याच्या मनावर अधिक परिणाम होतो, असा अनुभव आहे. तळ्यांतील शेवाळ्याचाहि वास आतां आपणांस येऊं शकेल.

### प्रगतिपर सुगंधींच्या धंद्यास नवें दालन

बोलपटांस गंधाची जोड मिळाल्यास सुगंधींच्या धंद्यास विशेष स्थान व महत्त्व प्राप्त होईल, हें उघड आहे. विदेशी गंधयुक्त बोलपटांतील वास हिंदुस्थानांत लोकप्रिय होतीलच असें नाहीं. देशी बोलपटांचे निर्मात्यांस आपल्या प्रेक्षकांच्या आवडीनिवडी पाहूनच आपले गंध निवडावे लागतील. लोकांतहि त्यासंबंधांत चिकित्सक वृत्ति निर्माण होऊन सुगंधींच्या धंद्यास नवें दालन मिळेल. नव्या प्रकारच्या मागणीस योग्य असे गंध निर्माण करण्यासाठी त्यांस विशेष प्रयोग करावे लागतील व संशोधन हातीं घ्यावें लागेल. सुगंधींच्या अत्तरांस व तेलांस बोलपटांतील गंधांस अनुसरून अधिकाधिक मागणी येऊं लागेल. बोलपटांमुळें व रेडिओमुळें आतां ज्याप्रमाणें संगीताची आवड वाढली आहे, त्याचप्रमाणें सुवासिक अत्तर तेलांसहि अधिक लोकप्रियता प्राप्त होईल. ह्या धंद्याचा विस्तार पुढें किती व कसा होईल, ह्याचा अंदाज आज करतां येणें शक्य नाहीं.

## प्राप्तीवरील कर कसा चुकविला ?

उत्पन्नावरील कर चुकविण्याकरितां अनेक क्लृप्त्या लढविण्यांत येतात. हिशेबाची दोन निरनिराळीं पुस्तकें ठेवणें, खरेदी पुष्कळ दाखवून विक्री कमी दाखविणें, उत्पन्नाचीं खातीं हिशेबांतच न घेणें, खोट्या नांवावर हिशेब लिहिणें, सर्वी खोटे हिशेब लिहिणें असे प्रकार करून कर चुकविण्याचे प्रयत्न केले जातात.

गेल्या वर्षी कांहीं हिंदी लोकांनीं प्राप्तीवरील कर चुकविण्यासाठी ज्या युक्त्या केल्या त्यांचे नमुने येथें दिले आहेत. कांहीं व्यापाऱ्यांनीं त्यांना धंद्यांत थोडा फायदा होतो असें दाखविलें. परंतु अनपेक्षित वेळीं त्यांचे दुकानीं जाऊन हिशेबाचीं पुस्तकें पाहण्यांत आल्यावर वस्तुस्थिति निराळी असल्याचें उघडकीस आलें.

विटांच्या एका व्यापाऱ्यानें त्याला खरेदी कराव्या लागणाऱ्या कोळशाची किंमत भरमसाट चढवून लिहिली. पुढें शोध करतां खऱ्या हिशेबाचीं पुस्तकें सापडलीं.

ब्रिटिश हिंदुस्थानाच्या बाहेर कांहीं रकम ठेव म्हणून ठेवली असल्याचें एकाच्या वह्यांत लिहिलें होतें. खरी गोष्ट अशी होती कीं, त्याचेकडे त्या रकमा ब्रिटिश हिंदुस्थानांत बाहेरून आल्या होत्या.

एका खाटिकानें, खरेदी केलेल्या जनावरांची किंमत वाढवून दाखविली आणि विकलेल्या मालाची किंमत कमी दाखविली. अर्थात् हा प्रयत्न फसलाच.

एका ठिकाणीं मालक नोकराच्या नांवावर धंदा करीत असल्याचें आढळलें. तर दुसऱ्या ठिकाणीं उत्पन्नांतील कांहीं भाग नोकरांच्या नांवावर जमा करण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

हिंदी संस्थानांत व्यापार-धंदा करून झालेला नफा ब्रिटिश हिंदुस्थानांत असलेल्या मुख्य कचेरीच्या हिशेबाच्या पुस्तकांत न दाखविल्यामुळें कर चुकवितां येईल अशा समजुतीनें एका ठिकाणीं हिशेब लिहिण्यांत आले हेतु साध्य झाला नाहीं तें निराळें.

भागींत धंदा करून झालेला नफा न दाखविण्याचा प्रकारहि आढळतो; उलट, झालेला नफा व्यक्तिगत खाजगी झाल्यावर जमा करून नफा न झाल्याचें दाखविण्याचा प्रयत्नहि अन्यत्र आढळतो.

एका फर्मनें आपलें उत्पन्न ५,००० रुपये असल्याचें दाखविलें. हिशेबाच्या वह्या तपासून पाहातां असें आढळलें कीं खरेदी-विक्री कमी दाखविण्यांत आली होती; आणि उत्पन्नाच्या कांहीं बाबी हिशेबांत घेण्यांतच आल्या नव्हत्या.

एका गिरणी मालकानें ७,००० रुपयांचे व्याजाचें उत्पन्नच दाखविलें नाहीं. दुसऱ्या एका श्रीमंत गृहस्थानें रॉयल्टी म्हणून मिळालेली जवळजवळ १ लक्ष रुपयांची रकम तसलमात खात्यावर टाकली होती

वर्ष अखेरीस शिल्लक असलेल्या मालाची यादी बनावट करण्याचेहि प्रकार आढळतात.

एका सावकारानें जवळ जवळ १$\frac{1}{2}$ लक्ष रुपयांचे व्यवहार हिशेबांचे पुस्तकांत दाखविलेच नाहींत.

### दि विजय टेक्स्टाइल्स लि.

वरील कंपनीच्या कारखान्याच्या इमारतीचा पाया खोदण्याचा समारंभ रविवार ता. ९ रोजीं सायंकाळीं ५–१५ वाजतां पार पडला. कंपनीचे अध्यक्ष, श्रीमंत साळवेकर, ह्यांनीं भूमिपूजन केलें. समारंभास कंपनीचे डायरेक्टर्स व इतर निकटसंबंधी मंडळी उपस्थित होती. दोन महिन्यांचे अवधींत इमारत पुरी होऊन कारखान्यास प्रारंभ होईल, अशी अपेक्षा आहे. मेसर्स अभ्यंकर आणि जोशी ह्यांचेकडे इमारतीचें बांधकाम सोपविलेलें आहे.

## "फुटूरा"

### सहकारी संघटनेचा एक उत्कृष्ट नमुना

( ले.:—श्री. बा. चिं. भानु, पुणें )

**शेतीच्या मालाची विक्री**—काश्मीर प्रांताच्या सहकारी खात्यांतील श्री. जे. एल. रायना यांनीं नुकताच इंडियन को-ऑपरेटिव्ह रिव्ह्यूमध्यें एक माहितीपूर्ण लेख लिहून, हंगेरी देशानें आपल्या देशांतील गव्हाच्या विक्रीबाबत कशी व्यवस्था केली व राष्ट्रीय दृष्टीनें हंगेरीच्या शेतकरी वर्गाला कसा आधार दिला हें मोठ्या मनोरंजक रीतीनें निवेदन केलें आहे. देशाच्या आर्थिक सुस्थितीची घडी सहकारी पद्धतीनें कशी उत्कृष्ट बसवितां येतें हें जसें त्या लेखावरून समजतें, तसेंच राष्ट्राचें स्वतःचें आर्थिक धोरण स्वतःच्याच हातीं असेल तरच सहकारी तत्त्वांचा पुरेपूर फायदा त्या राष्ट्राला कसा मिळूं शकतो याचेंही दिग्दर्शन त्या लेखामधून ठिकठिकाणीं विखुरलेलें आढळून येतें. जी गोष्ट हंगेरीच्या शेतकऱ्यांना करितां आली, जें आर्थिक धोरण राष्ट्रहिताच्या दृष्टीनें हंगेरीच्या सरकारला तात्काळ स्वीकारतां आलें तसें आपल्या हिंदुस्थान देशांत घडवून आणणें अशक्य कां आहे, याबद्दल मनांत विचार उचंबळून येतात.

इ० स० १९१८ सालीं युरोपमधील महायुद्ध आटोपल्यानंतर शेतीच्या मालाचे बाजारभावांत जीं कल्पनातीत आंदोलनें झालीं त्याचे परिणाम इतर राष्ट्रांबरोबरच हंगेरीलाही सहन करावे लागलेच. सोव्हिएट रशियानें जगड्व्याळ योजना आंखून त्याप्रमाणें रशियन शेतीचें क्षेत्र अफाट वाढविलें व जगाच्या बाजारांत रशियन धान्य—गहूं—अपरिमितपणें येऊं लागल्यानें मागणी आणि पुरवठा या अर्थशास्त्रांतील न्यायानुरूप गव्हाचा बाजारभाव मंदावला. हंगेरीच्या गव्हाला कुणी विचारीनासें झालें. तेव्हां ऑस्ट्रियानें आणि हंगेरीनें इटलीबरोबर एक व्यापारी करार केला. 'रोमचा करार' या नांवानें तो ओळखला जातो. या करारानें एक अंतरराष्ट्रीय कमिटी नेमण्यांत आली व शेतीच्या मालाचे बाजारभाव घसरणार नाहींत अशी योजना कमिटीनें केली. त्यामुळें गव्हाचा भाव थोडासा चढला. महायुद्धानें हंगेरीच्या रयतेचें दारिद्र्य अतिशय वाढलें होतेंच. ही परिस्थिति असतांनाच हंगेरीयन सरकारला लागणारा गहूं जी एक खासगी कंपनी पुरवीत होती, तिच्याकडून हें काम काढून खुद्द सरकारच्या नियंत्रणाखालीं अस्तित्वांत आलेल्या 'फुटूरा' या मध्यवर्ती सहकारी संस्थेकडे तें देण्यांत आलें. त्याबरोबर गव्हाच्या किंमतीची कमाल मर्यादा ठरविण्याचें सरकारचे धोरण बंद पडून फुटूरा ठरवील ती किमान मर्यादा मुक्रर होऊं लागली. त्यामुळें खासगी शेतकऱ्याला आपला माल त्या किमान मर्यादेपेक्षां जास्त दरानें विकतां येऊं लागला. ही किमान मर्यादा १९३६ सालपर्यंत अंमलांत होती व त्यानंतर जगाचेच बाजारभाव सुधारल्यानें असें नियंत्रण ठेवण्याचें हंगेरीला कारण उरलें नाहीं. पण जर कोणी एकादा बडा व्यापारी गव्हाचा सर्वच माल खरेदी करून बाजारभाव वाढवूं पाहूं लागला तर मात्र त्याला बंदी करण्याचा अखत्यार या फुटूरा संस्थेस पूर्णत्वानें देण्यांत आलेला आहे.

फुटूरा या संस्थेस प्रथम मध्यवर्ती सहकारी बँकांकडूनच आरंभींच्या दिवसांत भांडवलाचा पुरवठा होत असे. पण १९२५ सालीं हंगेरियन सरकारनें आपल्या राष्ट्राचा व्यापार—उदीम आणि खरेदी—विक्रीचा धंदा जोरकस होण्यासाठीं ४ टक्के दरानें पुष्कळच मोठें कर्ज या संस्थेला दिलें. त्या संस्थेचे ८० लाख भागांचें भांडवल. त्यांपैकीं ६० लाखाचे भाग हंगेरियन् सरकारनेंच खरेदी केले. उरलेले २० लाख मध्यवर्ती बँकांनीं घेतले. फुटूरा ही नियमित जबाबदारीवर उभारलेल्या सहकारी खरेदी—विक्रीचा व्यवहार करणाऱ्या संस्थांची यूनियन आहे. या युनियनचे डायरेक्टरांचें बोर्ड १४ सभासदांचें असून त्यांपैकीं एक जागा हंगेरियन राष्ट्राचा शेतकी व फायनॅन्स खात्याचा मुख्य प्रधान यांनीं स्वीकारलेली आहे. मध्यवर्ती बँकांचे २ प्रतिनिधी असून उरलेले सर्व भागिदारांनीं बहुमतानें निवडून दिलेले आहेत.

आपल्या देशांतील गव्हाचे आणि शेतीच्या मालाचे बाजारभाव स्थिर ठेवणें हें फुटूराचें मुख्य धोरण आहे त्यामुळें देशांतील कानाकोपऱ्यांतल्या शेतकऱ्याला आपल्या मालाची योग्य अशी किंमत हमखास मिळूं शकते. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळें बाजारभावाला हेलकावे मिळूं लागले तरी त्यांचे धक्के हंगेरियन बाजाराला बसूं नयेत अशी तजवीज ही फुटूरा संस्था करिते हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यामुळें अर्थात्च हंगेरियन शेतकऱ्याला नुकसान येत नाहीं. याचवेळीं फुटूरा फर्मावील तशाच प्रतीचा आणि नमुन्याचा माल आपल्या शेतांतून निर्माण करून फुटूराला पुरविण्याचीं जबाबदारी हंगेरियन शेतकऱ्यावर ठेवण्यांत आलेली आहे व ती ते उत्तम तऱ्हेनें पाळतात. हंगेरियन शेतकऱ्यांनीं पिकविलेल्या मालाची निवड करणें, प्रतवारी लावणें, ठिकठिकाणीं माल गोळा करणें व मध्यवर्ती बाजारपेठांतून मालाची ने—आण करणें हीं कामें फुटूरा वेगवेगळया सहकारी संस्थांमार्फतच करवून घेते. याप्रमाणें खुद्द हंगेरी देशाला आवश्यक असेल इतका माल साठविल्यानंतर मग जेवढा जास्त माल उरेल तेवढाच इतर राष्ट्रांच्या बाजारांत पाठविण्यांत येतो. घरची गरज प्रथम भागविणें व मग शिल्लक माल बाहेरच्या बाजारांत खपविणें इकडे सरकारचेंच लक्ष असल्यानें शेतकरी वर्ग सुखी आहे.

हंगेरियन स्टेट बँक वेगवेगळया सहकारी बँकांमार्फत शेतकी पतपेढीच्या सभासदांना शेतीचे कामासाठीं दरसाल भांडवलाचा भरपूर पुरवठा करिते व हंगामांत शेतकऱ्यांचा माल रूढ असलेल्या बाजारभावानें फुटूरा खरेदी घेते. पतपेढ्यांच्या रकमा बिनबोभाट मोकळया होतात. प्रथमारंभीं फुटूरा थेट खेडेगांवाच्याच पतपेढ्यांमार्फत व्यवहार करीत असे. पण आतां मध्यवर्ती बँकाहि फुटूराच्या सभासद झाल्या असल्यानें भांडवलाचा पुरवठा व शेतीच्या मालाची विक्री यांची अभेद्य साखळी बनली आहे.

राष्ट्राच्या व्यापाराला सहकारी पद्धतीनें नीटनेटकें स्वरूप येऊं लागतांच खासगी लहानमोठे व्यापारी यांच्या पोटांत दुखूं लागले. त्यांनीं शक्य तेवढे भगीरथ प्रयत्न करून ही सहकाराची भक्कम सांखळी तोडण्याचा खटाटोप केला, आणि शक्य तेथें विरोधही केला. पण राष्ट्रीय दृष्टीनें प्रेरित झालेल्या सरकारचा पाठिंबा फुटूराला असल्यानें सहकारी संघशक्तीपुढें खासगी व्यक्तींचा मतलबी प्रयत्न फोलच ठरला. त्यामुळें खासगी व्यापाऱ्यांना आपापलें भांडवल मध्यवर्ती बँकांमध्यें ठेवण्याशिवाय व फुटूरा ठरवील तें माल विक्रीचें धोरण मान्य केल्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं.

देशाचा व्यापार खंबीर पायावर उभारणें व टिकवून धरणें याला

सरकारचा सक्रिय पाठिंबा अवश्य हवा असतो. हंगेरियन सरकारनें असा पाठिंबा दिलेला आहे. ज्यावेळीं कल्पनातीत तेजी किंवा मंदी होते तेव्हां सरकारी पाठिंबा लागतो. इ० स० १९२८ सालीं उद्‌भवलेल्या मंदीचे वेळीं गव्हाचा भाव आणखी खालीं घसरूं नये म्हणून हंगेरियन सरकारनें फुदूराला गहूं खरेदी करण्यास सुचविलें. तेजीच्या बाजारभावांत फुदूरानें सांपडेल तेवढा गहूं खरेदी केला व सांठवून ठेवला; आणि मग ज्या ठिकाणीं गव्हाला मागणी आली तेथें अमळ वाढत्या भावानें विक्रीला काढला. इतकेंच नव्हे तर जरूर ती यंत्रसामुग्री विकत घेऊन गव्हापासून होणारे इतर पदार्थही बाजारांत विक्रीला ठेवले. त्यामुळें परदेशाच्या बाजारांत हंगेरियन गव्हाला कायमची मागणी येऊं लागली. त्याचा फायदा हंगेरियन शेतकऱ्यांला हमखास मिळूं लागला.

हंगेरियन सरकारनें फुदूराच्या हालचालीला कशी सक्रिय मदत केली याचें आणखी एक ढळढळीत उदाहरण आहे. १९३२ सालीं लीग ऑफ नेशन्स व स्ट्रेसा कॉन्फरन्सच्या शिफारशीवरून हंगेरीनें जवळपासच्या इतर राष्ट्रांबरोबर एक आर्थिक तहनामा केला तो रोमचा तहनामा म्हणून प्रसिद्ध आहे. या तहान्वयें आंतरराष्ट्रीय बाजारांत हंगेरियन गव्हाचा बाजारभाव निश्चित ठरविणेंत आला आणि त्या भावानेंच इटली व आस्ट्रिया यांनीं दरसाल हंगेरियन गहूं कमीतकमी किती विकत घेतलाच पाहिजे त्याचा करार झाला. त्याचे मोबदल्यांत हंगेरीनें त्या देशापासून इमारतीचें लाकूड खरेदी करावयाची कबुली दिली. याप्रमाणें जो गव्हाचा पुरवठा हंगेरियन सरकारला करावा लागे तो करण्याचें काम अर्थातच फुदूराला मिळालें. त्यामुळें हंगेरियन शेतकऱ्यांच्या गव्हाला कायमची मागणी मिळाली. हंगेरियन शेतकऱ्याला कांहीं नुकसान आल्यास त्याची भरपाई करितां यावी म्हणून सरकारनें चहा व कॉफी या परदेशाच्या वस्तूंवर आयात जकाती बसाविल्या.

येणेप्रमाणें फुदूरा घाऊक मालाची खरेदी हंगेरियन सरकारसाठी करिते. किमान भाव सरकार मुक्रर करून देतें. त्यामुळें मालाच्या वेगवेगळ्या प्रती ठरविणें व त्याप्रमाणें ज्या प्रतीला ज्या देशांत मागणी असेल तीच माल सतत पुरविणें व त्या मालाची पैदास करणाऱ्या हंगेरियन शेतकऱ्याला लागेल ती मदत करणें आणि त्यांच्या मालाला ठराविक गिऱ्हाईक आणून देणें या कामगिरीमुळें हंगेरियन शेतकरी जसा फुदूराला दुवा देतो तसाच हंगेरियन सरकारला देतो. आपल्या हिंदुस्थान देशांत सुद्धा सरकारनें मनावर घेतल्यास हिंदी शेतकऱ्याच्या हिताचे एकमेव दृष्टीनें अशीच कामगिरी सरकारला सहज करिता येईल. हिंदुस्थान सरकारचें आर्थिक धोरण हिंदी शेतकऱ्यास सहानुभूतीचें असणें आवश्यक आहे. हिंदी शेतकरी कर्जांत बुडाला असून वर डोकें काढण्यास त्याला वाव नाहीं ! अशा स्थितींत नुसत्या सहकारी संस्थांची वाढ किंवा कमिट्या—कमिशनें आणि त्यांचे लठ्ठ लठ्ठ अहवाल हें हिंदी राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें निरुपयोगींच ठरत नाहींत कां ?

### व्हाइसरॉयांचें आश्वासन

सध्याच्या युद्ध परिस्थितींत हिंदी संस्थानीं हद्दींत जरूर असलेल्या व स्थापन होणाऱ्या विशिष्ट उद्योगधंद्यांचें युद्ध समाप्तीनंतर तत्सम परदेशी उद्योगधंद्यांच्या चढाओढीपासून संरक्षण करण्यांत येईल, असें व्हाइसरॉयांनीं आश्वासन दिलें आहे.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| आधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, नागपुर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., के. टी.; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्यांज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.



# दि गुड—वुइल ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस

भरपूर सवलती माफक हप्ते

**ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.**

पत्रव्यवहार करावा

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.

मॅनेजिंग डायरेक्टर

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४–१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९५—२ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९६–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... ... | ११४—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४४—४ |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | १११—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४३—० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५४०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०४—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३२—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २२५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५६७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १८१५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८७०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६६५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २०६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४७–१२ |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०–१५ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४१—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३९५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१३–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४८—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३७७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १९१२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १३९—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४३—५—० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३—२—० |


**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें**
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

**पुण्यांत आल्यावर**
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
**OUR HOME**
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
**उतरण्यास या.**
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.




फोन नं. ७७९ व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अति स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
येथें मिळेल
पोरवाल ॲण्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY. POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख १९ मार्च, १९४१ | अंक १२

## डॉ. एन. आर. राजोपाध्ये

यांच्या
ॲस्गॉल्‌ or शक्तिवर्धक पिल्स घ्या. किंमत १२ आ. फक्त.
सोल एजंटः "वेलणकर वनौषधालय",तुळशीबाग रस्ता, पुणें.
एजन्सी देणें आहे. दोन आण्याचे स्टँप्स् पाठवून विचारावें.

## डॉ. एन. आर. राजोपाध्ये यांचे खास देखरेखीखालीं चाललेलें
## " वेलणकर वनौषधालय "

येथें सर्व तऱ्हेच्या खात्रीच्याच वनस्पति व सिद्धौषधी मिळतील. १ पैशापासून ते सिद्धौषधीपर्यंत मिळण्याचें हें पुण्यांतील पहिलेंच दुकान होय. येथें चूर्णें, सप्तकाच्या काढ्याच्या पुड्याही ऑर्डर-प्रमाणें करून दिल्या जातात. येथें रोगी तपासून औषध देण्याची सोय आहे. त्याकरितां चार्ज रोज फक्त एकच आणा.
उघडण्याची वेळः—सकाळीं ८॥ ते १२ व दुपारीं ३॥ ते ८ पर्यंत.
पत्ता : "वेलणकर वनौषधालय" तुळशीबाग रस्ता, पुणें.

## देशी औषधें तयार करणारा महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना

पंडू, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

## अशक्ततेवर

# रक्तवर्धक

## वापरा.

## सर्वत्र मिळतें.

—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

पुणें ४.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

## ' पायोनियर डाइंग हाऊस '

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा
दलाल स्ट्रीट, कोट

पुणें शाखा
डेक्कन जिमखाना



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२१ ए, सदाशिव, पुणें २.

# विविध माहिती

### भाषाकोविदांची युद्धकार्यासाठी मदत

खालील ११ युरोपियन व इतर १२ भाषांपैकीं एक अथवा अधिक भाषा जाणणारांची यादी हिंदुस्थान सरकार करणार आहे, त्यांत लोकांनीं आपण होऊन नांवें नोंदविण्याचीं आहेत:—

युरोपिअन भाषा:—इटॅलिअन, रुमेनिअन, अल्बेनिअन, माल्टीज, एस्टोनिअन, लिथ्वेनिअन, बास्क, वेल्श, अर्स, बल्गेरिअन व इङ्गिश.

इतर भाषा:—सिरिॲक, आसामांतील डोंगरी, मलई, माल्दिनिअन, कोरिअन, थाई, जाव्हानीज, हिब्रू, पर्शिअन, जपानीज, आसामीज, मोपलान व ब्रह्मी.

### कॉमन्स सभेंत १४ स्त्री-समासद

मिसेस बिएट्रिस रॅथ्बोन ह्या ब्रिटिश कॉमन्स सभेंत निवडून आल्या. कॉमन्स सभेंत आतां १४ स्त्री-सभासद झाल्या. मिसेस रॅथ्बोन ह्या जन्मानें अमेरिकन आहेत.

### इटालिअन युद्धकैदी

हिंदुस्थान सरकारनें ४४ हजार इटालिअन युद्धकैद्यांची सोय करण्याची हमी घेतली आहे. त्यांपैकीं ३० हजार युद्धकैदी हिंदुस्थानांत दाखल झालेले आहेत.

### सर सी. व्ही. रमण ह्यांचा गौरव

फिलॅडेल्फिया येथील फ्रॅंकलिन इन्स्टिट्यूटनें सर सी. व्ही. रमण ह्यांस "फ्रॅंकलिन मेडल ऑफ मेरिट" हें पदक देऊन त्यांचा गौरव केला आहे. सर चंद्रशेखर ह्यांस विज्ञानशास्त्रांतील त्यांच्या संशोधनाबद्दल सुप्रसिद्ध नोबेल बक्षीस मागेंच मिळालेलें आहे. त्यांच्या गौरवामुळें हिंदुस्थानचाहि गौरव झाला आहे.

### कोहिनूर मिल्स लि.

वरील कंपनीनें गेल्या वर्षीं २३½ लक्ष रुपयांचें कापड व सूत विकलें. कंपनीनें आपल्या गिरणीशेजारीलच एक गिरणी विकत घेतली आहे. गिरणीच्या चात्यांत लवकरच ९,०९३ चात्यांची भर पडेल. भागीदारांस गेल्या वर्षाबद्दल १०% डिव्हिडंड व ६% बोनस (दोन्हीं करमाफ) मिळालें. कंपनीची मॅनेजिंग एजन्सी किलिक, निक्सन आणि कंपनीकडे आहे.

### फ्रेंच कारखान्यांत जर्मन कच्चा माल

फ्रेंच कारखान्यांस कच्चा माल पुरविण्याचा करार जर्मनीनें केला आहे, असें प्रसिद्ध झालें आहे.

### खोटे रुपये पाडणारी टोळी

खोटे रुपये तयार करणाऱ्या २५ लोकांच्या एका टोळीस पंजाबांत अटक करण्यांत आली आहे. १९२९ सालापासून ही टोळी प्रस्तुत कामांत गुंतलेली आहे व तिनें आतांपर्यंत सुमारें २ लक्ष खोटे रुपये खपवले आहेत. ह्या टोळीनें त्यासाठी ठिकठिकाणीं दलाल नेमले होते. "मी आठ आण्यांस एक रुपया ह्या दरानें ३० हजार रुपये विकत घेतों," असा बहाणा करून एका गुप्त पोलिस अधिकाऱ्यानें टोळीस अटक केली.

### दक्षिण आफ्रिकेचा युद्धखर्च

चालू युद्धावर दक्षिण आफ्रिकेचें सरकार १९४१-४२ मध्यें सुमारें ११० कोटि रुपये खर्च करणार आहे. १९४०-४१ मध्यें त्या सरकारनें ९० कोटि रुपये खर्च केला होता. ११० कोटींपैकीं सुमारें ४४ कोटि रुपये उत्पन्नांतून व ६४ कोटि रुपये कर्जांतून खर्चिले जातील.

### ट्रेझरी बिलांवर ११ आ. ६ पै व्याज

हिंदुस्थान सरकारनें गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेच्चीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ११ आ. ६ पै इतका पडला.

### मुंबई प्रांतांतील गव्हाची लागवड

मुंबई प्रांतांत लागवडीखालीं असलेल्या जमिनीपैकीं सुमारें ६% जमीन गव्हाच्या वांट्यास येते. गव्हाच्या एकूण लागवडीपैकीं सुमारें ११% लागवड पाटाखालीं आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर, १९४० मध्यें पेरलेल्या गव्हाच्या लागवडीचा अंदाज खालीलप्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| ब्रिटिश हिंदुस्थान : | १६½ लक्ष एकर |
| संस्थानी हद्द : | ३½ लक्ष एकर |
| एकूण लागवड : | १९½ लक्ष एकर |

एकूण लागवड गेल्या वर्षीच्या लागवडीचे मानानें ७·६% नीं कमी आहेत.

### म्हैसूर संस्थानाची लोकसंख्या

म्हैसूर संस्थानाची लोकसंख्या आतां ७१ लक्ष, ८२ हजार इतकी झाली आहे. म्हणजे, गेल्या १० वर्षांत ती सुमारें ६½ लाखांनीं वाढली आहे.

### बंगालमधील होजिअरीचे कारखाने

बंगालमधील होजिअरीचा पहिला कारखाना १८९३ सालीं स्थापन झाला. पाटणा, कलकत्ता, डाक्का व हौरा हीं होजिअरीच्या कारखान्यांचीं केंद्रें आहेत.

### रंगकामासाठीं पळसाचीं फुलें व बेलफळें

कापडाच्या गिरण्यांतील रंगकामासाठीं झाडांच्या साली, फुलें, फळें, इत्यादींचा उपयोग कितपत करतां येईल, ह्याविषयीं मुंबई सरकारचें उद्योग-खातें प्रयोग करीत आहे. व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट व विश्वविद्यालयाचें केमिकल टेक्नॉलाजीचें खातें, येथें पळसाचीं फुलें व बेलफळ ह्यांच्या उपयुक्ततेविषयीं प्रयोग सुरू आहे.

### नॉर्वे देश हा जर्मनीची वसाहत होणार

नॉर्वे देशास आपल्या वसाहतीसमान मानण्याचा जर्मनीचा विचार दिसतो. नॉर्वेतील विजेच्या उत्पादनाचा उपयोग युद्धविषयक मालाच्या कारखान्यांची वाढ करण्याकडे केला जाईल, असें दिसतें.

### मोटारींचें उत्पादन

अमेरिकेंत दरसाल सुमारें ३५ लक्ष मोटारींचें उत्पादन होतें. ग्रेटब्रिटनमध्यें ५ लक्ष, जर्मनींत ३½ लक्ष, कॅनडांत १½ लक्ष, रशियांत २ लक्ष, ह्याप्रमाणें दरसाल मोटारी तयार होतात. हिंदुस्थानांत अद्याप एकाहि मोटारीचें उत्पादन झालेलें नाहीं.

### प्रतवारी लावलेल्या फळांस अधिक किंमत येते

ॲगमार्क योजनेप्रमाणें प्रतवारी लावलेल्या संत्र्यांस ३६% अधिक किंमत येते, व ग्रेपफ्रूटला २५% अधिक किंमत येते, असा अनुभव पंजाब प्रांतांत आला आहे.

### हिंदी चहाची निर्गत

१९४१-४२ मध्यें हिंदुस्थानांतून ३४ कोटि, ४९ लक्ष पौंड चहाची निर्गत होण्यास परवानगी आहे.

### बँकेची नवी शाखा

देवकरण नानजी बँकिंग कंपनी लि. ची मांडवी येथील शाखा ता. २८ मार्च रोजीं सुरू होईल.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १३४ | ७ यूनियन बँक ऑफ इंडिया लि. ... | १३९ |
| २ स्वदेशी साखरेचा धंदा | १३५ | ८ चिलिअन नैट्रेट ऑफ सोडा | १३९ |
| ३ म्हैसूरमधील ग्रामोद्धार | १३६ | ९ हातमागाचा धंदा ... | १४० |
| ४ स्फुट–विचार ... स्वदेशी साखरेच्या उत्पादनाचा अंदाज–प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचे खणखणित उद्गार–ब्रिटिश सरकारचें येतें अंदाजपत्रक——फिनॅन्स बिलाची चर्चा | १३७ | १० गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्म ... | १४१ |
| ५ फळांचे बाजारभाव ... | १३८ | ११ हिंदुस्थानांतील दुभतीं जनावरें ... | १४१ |
| ६ हाफकिन इन्स्टिट्यूटचें कार्य ... | १३९ | १२ लँकेशायरच्या उत्कर्षांत खंड ... | १४१ |
| | | १३ जागतिक व्यापार ... | १४१ |
| | | १४ निवडक बाजारभाव... | १४३ |


# अर्थ

बुधवार, ता. १९ मार्च, १९४१

## स्वदेशी साखरेचा धंदा

### शुगर सिंडिकेटची अदूरदर्शी सूचना

एखाद्या कार्यांत विशिष्ट कारणामुळें स्वतःच्या अंगावर बाजू आली म्हणजे त्याच्या दोषाचें खापर दुसऱ्याच्या डोक्यावर फोडावयाचें आणि ह्या केवळ स्वार्थी धोरणाचा घातक परिणाम इतरांस व सबंध कार्यास भोगावा लागेल याचा विचार करावयाचा नाहीं अशी कांहीं जणांची अदूरदृष्टीची प्रवृत्ति असते. नित्याच्या व्यवहारांतला हा अनुभव, उत्तर हिंदुस्थानांतील स्वदेशी साखरकारखान्यांत ज्यांचे हितसंबंध निकट रीतीनें गुंतले आहेत अशा धंदेवाल्यांनीं दक्षिणेकडील कारखान्यांविरुद्ध आणि देशी साखरेस मिळत असलेल्या संरक्षणाचे विरुद्धहि प्रचार चालवला आहे त्यापासून मिळत आहे. संयुक्तप्रांत आणि बिहार येथील साखरकारखानदारांनीं दक्षिणेमधील कारखान्यांच्या विस्ताराविरुद्ध ओरड करून हिंदुस्थान सरकारानें स्वदेशी साखरेच्या धंद्याचें मध्यवर्ती रीतीनें नियंत्रण करावें अशी सूचना केली आहे. तिचा परामर्ष आम्हीं "अर्था"त मागेंच घेतला आहे. आपल्या प्रांतिक सरकारांनीं संयुक्तप्रांत व बिहार येथील कारखान्यांतल्या उत्पादनास मर्यादा घातली आहे आणि उसाच्या व साखरेच्या किंमती ठरवून टाकल्या आहेत, पण इतर प्रांतांत विशेषतः दक्षिणेकडील प्रांत व संस्थानें ह्यांमध्यें कोणत्याच प्रकारचें नियंत्रण नसल्या कारणानें तेथें साखरेचें उत्पादन वाढून तिच्या स्पर्धेचे परिणाम आपणांस सोसावे लागत आहेत असा गिल्ला उत्तरेकडील कारखानदारांनीं केला आहे. ते त्याच्याहि पुढें गेले असून संरक्षणामुळें देशी साखर महागते आणि तिचे भाव चढल्यानें दक्षिणेकडे कारखान्यांचा विस्तार होण्यास उत्तेजन मिळून सबंध धंद्यावर संकट येतें. एवढ्यासाठी हिंदुस्थान सरकारनें स्वदेशी साखरेस मिळत असलेलें संरक्षण कमी करावें अशी सूचनाहि गंभीरपणानें करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. आपला धंदा नीट चालत नाहीं तेव्हां त्यांतले दोष दूर करण्याऐवजीं इतरांस दोष देण्याच्या वृत्तीनें त्यांस घेऊन स्वतः पडण्यांत आत्मघातकीपणा आहे हें त्या लोकांच्या लक्षांत येणें आवश्यक आहे.

संयुक्तप्रांत व बिहार ह्या प्रांतांत कोणत्या परिस्थितींत साखरेचा धंदा उदयास आला, देशाच्या इतर भागांत ऊस व साखर यांच्या उत्पादनाची नैसर्गिक व इतर स्थिति कशा प्रकारची आहे, हिंदुस्थानासारख्या मोठ्या देशांत कोणताहि धंदा एकाच क्षेत्रांत मर्यादित होणें कसें अनिष्ट आहे, येथील सर्व प्रांतांस व संस्थानांस स्वतःच्या अनुकूल परिस्थितीचा पूर्ण फायदा करून घेण्याची संधि देणें कसें योग्य व न्याय्य आहे, ह्या गोष्टींचा शांत मनानें विचार झाला पाहिजे. शुगर सिंडिकेटनें अखिल भारतीय नियंत्रणाची योजना हिंदुस्थान सरकारपुढें मांडली आहे, तिच्या दूरगामी परिणामांची आणि तिच्या मुळाशीं असलेल्या युक्तिवादाची उत्कृष्ट छाननी मुंबई येथें प्रसिद्ध होणाऱ्या "कॉमर्स" ह्या व्यापारास वाहिलेल्या पत्रांत नुकतीच करण्यांत आली आहे. सिंडिकेटनें पुढें मांडलेल्या मुद्यांस त्या पत्रानें उत्तरें दिलीं आहेत, त्यांचा गोषवारा येथें दिला असतां तो उपयुक्त होईल. उसाच्या किमान किंमती संयुक्तप्रांत व बिहारप्रमाणें इतर क्षेत्रांत निश्चित केलेल्या नाहींत ह्या तक्रारीचें महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास निराकरण असें आहे कीं, ह्या भागांत साखरेचे कारखाने स्वतःचा ऊस पिकवतात, तेव्हां उसाच्या किंमतीचा प्रश्नच येथें उद्भवत नाहीं. उसाच्या किंमतीबाबत उत्तरेकडील प्रांतांतल्या सरकारांस विशिष्ट धोरण अंमलांत आणावें लागलें तें इतरत्र अनावश्यक व अव्यवहार्य आहे हें उघड आहे. भिन्नभिन्न परिस्थितींत सर्व देशभर उसाच्या किंमतीविषयीं एकच धोरण कसें स्वीकारतां येईल ? उत्तर हिंदुस्थानांत उसाच्या किंमती चढीच्या पातळीवर बसवल्यानें साखर महागली आणि ह्या गोष्टीचा फायदा इतर प्रांतांनीं आपल्या कारखान्यांचा विस्तार करून घेतला ह्यांत महाराष्ट्रीय कारखानदारांनीं कोणती चूक केली ? इकडील भागांत चांगल्या प्रतीचा आणि सकस ऊस तयार होण्यास नैसर्गिक परिस्थिति विशेष अनुकूल असल्यानें धंदेवाल्यांनीं संरक्षणाचा उपयोग करून घेण्यासाठीं साखरकारखान्यांचा विस्तार केला ही गोष्ट सरळ व स्वाभाविक अशीच झाली आहे. संयुक्तप्रांत व बिहार ह्या प्रांतांत कारखान्यांची गर्दी झाली आहे. तिच्यावर प्रांतिक व स्थानिक उपायच योजले पाहिजेत आणि तिची जबाबदारी सर्व देशावर टाकणें योग्य नाहीं. वरील प्रांतांतलें उत्पादन त्याच्या खपाच्या मानानें मर्यादित होण्यावांचून गत्यंतर नाहीं. संरक्षणाचें प्रमाण सरकारनें कमी केलें असतां साखरेच्या किंमती खाली येतील आणि कारखान्यांस उत्पादन खर्च मर्यादित करावा लागून विस्तारास आळा बसेल ही सिंडिकेटची सूचना आश्चर्यकारक आहे असें "कॉमर्स"नें म्हटलें आहे. टारिफ बोर्डाची चौकशी झाल्यावांचून संरक्षणाचें मान कमी-जास्त करावयाचें नाहीं असें ठरलें असून युद्धपरिस्थितीमुळें ही चौकशी लांबणीवर पडली आहे हें प्रसिद्ध आहे. आणखी पांच वर्षेंपर्यंत साखरेच्या धंद्यास संरक्षण देण्यास सरकार बांधलेलें आहे. युद्धोत्तर काळांतल्या परिस्थितींत ह्या धंद्यास किती संरक्षण द्यावें लागेल कीं नाहीं ह्याचा रीतसर विचार पुढें होईल. दरम्यान संरक्षणाचें मान चौकशीवांचून कमी करूं पहाणें चुकीचें ठरणार आहे. सिंडिकेटनें उत्तर हिंदुस्थानांतील कारखान्यांच्या कार्यपद्धतींत सुधारणा व खर्चांत काटकसर घडवून आणण्याच्या प्रयत्नास लागावें हेंच उचित आहे अशी सूचना "कॉमर्स"नें अखेरीस केली आहे. साखरेच्या किंमती कमी करण्याचा, धंद्यास मिळत असलेलें संरक्षण मर्यादित करणें हा मार्ग नव्हे असें त्याचें निक्षून सांगणें आहे. आपण सरकारपुढें मांडलेल्या योजनेचा परिणाम इतर प्रांत व संस्थानें यांमधील साखरकारखान्यांवर काय होईल हें सिंडिकेटनें लक्षांत घ्यावयास नको काय ?

## म्हैसूरमधील ग्रामोद्धार

( ले. श्री. वा. चिं. भानु )

**ग्रामपंचायती:**—म्हैसूर सरकारनें संस्थानची प्रगति निवेदन करण्यासाठी एक नियतकालिक चालविलें असून त्याच्या एका ताज्या अंकांत ग्रामोद्धाराचें कार्य कसें विकसित होत आहे याचा वृत्तांत दिला आहे. "अर्था"च्या वाचकांसाठी थोडक्यांत त्याचा मतलब दिल्यास तुलनात्मक दृष्टीनें तो पुष्कळ जणांस विचारप्रवर्तक होईल. स्वराज्य झालें तरी तें टिकाऊ सुराज्य होण्यास खेडेगांवें सुसंघटित व स्वयंशासित होणें आवश्यक आहे हें निर्विवाद होय. म्हैसूरमध्यें ११,९४१ गांवांमधून ग्रामपंचायती स्थापन झालेल्या असून ८९,६६६ ग्रामस्थ कारभार करीत आहेत. या संस्थांजवळ १९३९-४० सालचे आरंभीं रु. २७,०१,७६४ ची रोख शिल्लक होती. सालांत ९,९६४९२ चें उत्पन्न जमा होऊन रु. १२,५१,४७८ चा खर्च झाला. या संस्थांना सालाचे आरंभीं रु. ४५,९०,०५० ची थकलेली येणें-बाकी वसूल करावयाची होती, शिवाय चालू सालचा हप्ता रु. १२,५५,३०२ अशी एकूण बाकी रुपये ५८,४५,३५२ वसुलीस होती त्यापैकी फक्त रु. १०,९७,०१६ येवढेच वसूल झाले व सालअखेरीस ४७,४८,३३६ येणे बाकी थकलेली उरली आहे! ग्रामपंचायतींनीं एकूण केलेल्या रु. १२,५१,४७८ चे खर्चांत रु. ५,०४,६१५ ची रक्कम खेडेगांवाची सुधारणा करण्यासाठीच झालेली आहे. या एकंदर आंकड्यांवरून या संस्थांची सांपत्तिक स्थिति व सामान्य जनतेंत जबाबदारीची जाणीव कितपत आहे याची साधारण कल्पना येईल!

* * *

**पंचायतींचें कार्य:**—खेडेगांवाचें आरोग्य आणि स्वच्छता वाढविण्याचे दृष्टीनें या संस्था पुष्कळ खटपट करीत आहेत. गेल्या सालांत त्यासाठी रु. ५६,८६० खर्ची पडले आहेत. गांवांतील घाण झाडून टाकणें, सार्वजनिक शौचकूपांची योजना करणें, गटारें खोदून तीं नेहमीं स्वच्छ ठेवणें, निवडुंगासारखीं झुडुपें नाहींशीं करणें इत्यादि कामांकडे पंचायतींचें पूर्ण लक्ष आहे. आदि कर्नाटक किंवा इतर अस्पृश्य वर्गांसाठी स्वतंत्र वस्त्याहि करण्यांत आल्या आहेत. याशिवाय ग्रामपंचायतींसाठी सभागृहें, खेडेगांवें मुख्य रस्त्याला जोडणारे रस्ते तयार करणें, गटारांची बांधणी, व आधुनिक पद्धतीच्या नमुन्याप्रमाणें खेडेगांवच्या मांडणीची पुनर्घटना इत्यादि महत्त्वाचे विषय ग्रामपंचायतींनीं हातीं घेतलेले आहेत. पाणीपुरवठ्याचे योजनांसाठी या वर्षांत रु. ३,६२,७३२ खर्च करण्यांत आले असून, हातीं घेतलेल्या ३,२१३ विहिरींपैकीं, १,०६३ चीं कामें परिपूर्ण झालीं आहेत. त्यांत २६५ विहिरी आदि कर्नाटक ( अस्पृश्य वर्ग ) मंडळीसाठी खास आहेत. याप्रमाणें आजवर १३,०४० खेडेगांवांना पाणीपुरवठ्याची सोय ग्रामपंचायतींनीं करून दिलेली आहे.

* * *

**सुधारणांचें स्वरूप:**—आदर्शासें ४०२ ग्रामपंचायतींनीं शेतीचीं औतें व निवडक बीं-बियाणांचा शेतकऱ्यांना पुरवठा केला. ३६० ग्रामपंचायतींनीं उत्तम जनावरांची पैदास करण्यासाठी वळू ठेवले होते. कित्येक ग्रामपंचायतींनीं आपापल्या गांवांत सार्वजनिक बागा व मैदानें तयार केलीं तर कांहींनीं घनदाट छायेचीं किंवा फळांचीं झाडें लावलीं आहेत. १,३१२ पंचायतींच्या गांवांत वाचनालयें अगर पुस्तकालयें सुरू करण्यांत आलेलीं असून कानडी मासिकें व वर्तमानपत्रें वाचण्यास गांवकरी आस्थेनें येतात. कोलार जिल्ह्यांतील मेलूर व व्होकालेरी गांवांच्या पंचायतींनें सार्वजनिक उपयोगासाठीं रेडियोसेटहि आणले आहेत. याचप्रमाणें तुमकूर व बंगलोर जिल्ह्यांतल्याहि कांहीं पंचायतींनीं रेडियो आणलें आहेत. त्यामुळें गांवकऱ्यांना करमणुकीबरोबरच जगांत काय चाललें आहे ह्याचें ज्ञान सहजगत्या मिळूं शकतें. रेडियोसेटची योजना फारच लोकप्रिय झालेली आहे. १५१ ग्रामपंचायतींनीं आपल्या गांवांत विजेच्या दिव्यांची व ४६ पंचायतींनीं विजेच्या शक्तीनें लहानसहान कारखाने किंवा शेतीचीं कामें करण्याचीही योजना केली असून ती यशस्वी झालेली आहे. सरकार व जिल्हाबोर्ड रयतेला वैद्यकीय मदतीसाठी दवाखाने चालवितेच पण त्याशिवाय कांहीं ग्रामपंचायतींनीं देखील गरीब रयतेला औषधपाणी व वैद्यकीय सल्ला मिळवून देण्याची व्यवस्था आपापल्या गांवांमधून केली आहेच. आयुर्वेद व युनानी पद्धतीवर चालविलेल्या वैद्य-शाळांना ग्रामपंचायतींनीं आर्थिक मदत म्हणून रु. ५,२९५ खर्च केले आहेत. ३६ खेडेगांवांमध्यें प्रसूतिगृहें स्थापन करण्यांत आलीं आहेत.

* * *

ग्रामपंचायतीच्या सभासदांना विचारविनिमय करितां यावा, म्हणून त्यांच्या तालुका व जिल्हा परिषदा भरविण्यांत येतात. जमलेल्या प्रतिनिधींमध्यें साधकबाधक दृष्टीनें मोठी उद्बोधक चर्चा होते. खेडेगांवचें जीवन जास्तींत जास्त सुखी व स्वावलंबी कसें होईल, कारभार करणारांवर व कारभारी निवडून देणाऱ्या मतदारांवर कोणची जबाबदारी असते, इत्यादि महत्त्वाच्या अनेक विषयांचा अंतर्भाव या परिषदांमधून होतो. चिकमंगलूर, तुमकूर, मंड्या हसन व चितलदुर्ग येथें भरलेल्या परिषदांबरोबरच औद्योगिक व शेतकीविषयक प्रदर्शनें भरविण्यांत आलीं होतीं त्यांचाहि फार मोठा उपयोग खेडोपाड्याच्या मंडळींना झाला.

* * *

या एकंदर हकीकतीवरून म्हैसूर संस्थानचें सरकार ग्रामपंचायतीसारख्या राष्ट्र सुसंघटित व संवीर करणाऱ्या संस्थांची जोपासना व वाढ कशा पितृप्रेमानें करीत आहे हें सहज दिसून येईल. ज्या सुखसोयी इतरत्र मोठमोठ्या शहरांना लाभल्या नाहींत त्या म्हैसूरमधील खेडेगांवांना उपलब्ध झालेल्या आहेत, अंगावर थोडीफार जबाबदारी टाकल्याशिवाय जनतेंत जबाबदारीची जाणीव तरी कशी निर्माण होणार? कामें केल्याशिवाय पात्रता येत नाहीं व पात्रता झाल्याशिवाय कामें करूं द्यावयाचीं नाहींत अशा पेचांतून मार्ग काढला पाहिजे. तथापि निराश न होतां एकटील ग्रामपंचायतींनीं खेडेगांवें सुधारण्यासाठीं मिळणाऱ्या संधीचा पूर्ण उपयोग केल्यास जी मजल म्हैसूर ग्रामपंचायतींनीं ५ वर्षांत मारली, तेवढी आपण खालसातले, १५ वर्षांत तरी गांठू अशा तऱ्हेचा आशावाद ग्रामसंस्थानीं व तिच्या कारभारी मंडळींनीं धरून कामास लागलें पाहिजे.

---

### बिगर तिकिटाचे रेल्वे उतारू

हिंदुस्थानांतील आगगाड्यांतून बिनतिकिटानें प्रवास करणारांची संख्या एकसारखी वाढत आहे. १९३९-४० सालीं अशा एकूण ३० लक्ष, ८५ हजार लोकांची नोंद झाली.

## स्फुट विचार

### स्वदेशी साखरेच्या उत्पादनाचा अंदाज

देशी साखरेचें उत्पादन वाढलें असल्यामुळें भाव उतरून साखरकारखान्यांची सांपत्तिक स्थिति बिघडून जाण्याची भीति उत्पन्न झाली आहे. तिच्या संबंधांत चालू हंगामांतील पैदाशीच्या अंदाजाचे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत, ते उद्‌बोधक आहेत. आधुनिक पद्धतीच्या, उसापासून सरळ साखर करण्याच्या हिंदी कारखान्यांत चालू हंगामांत सुमारें १० लक्ष टन साखर तयार होईल असा अंदाज इंपीरिअल शुगर टेक्नालॉजिकल इन्स्टिट्यूटच्या डायरेक्टरांनीं केला आहे. १९३९–४० सालीं कारखान्यांत तयार झालेली साखर १२ लक्ष टन भरली आणि १९४०–४१ मध्यें ती २ लक्षांनीं कमी होईल असें त्यांचें म्हणणें आहे. संयुक्तप्रांत व बिहार येथें प्रांतिक सरकारांच्या नियंत्रणामुळें साखरेचें उत्पादन ७ लक्ष २० हजार टन होईल. पण इतर प्रांतांत तें ३ लक्ष टन भरेल असा अंदाज आहे. गेल्या हंगामाचे मानानें हा आंकडा ४० हजार टनांनीं अधिक आहे. डायरेक्टरांच्या मतें संयुक्तप्रांत व बिहार येथें ७ लक्ष १५ हजार टन एवढेंच उत्पादन होईल, कारण कांहीं कारखाने त्यांस घालून दिलेल्या मर्यादेच्या आंतच ऊस गाळतील असें वाटतें. चालू कारखान्यांची संख्या १९३९–४० मध्यें १४५ होती ती यंदा १४८ होईल असा हिशेब करण्यांत आलेला आहे. वरील अंदाजावरून एका काळीं भीति वाटत होती त्यामुळें हिंदी साखरेचें उत्पादन मर्यादेबाहेर जाणार नाहीं असें दिसतें.

---

### प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांचे खणखणीत उद्‌गार

अमेरिकन कायदेमंडळानें इंग्लंडला अमेरिकेनें द्यावयाच्या युद्धसहायाविषयींचा कायदा पास केल्याबरोबर त्याची अंमलबजावणी चालू झाली. हा कायदा अखेर पास होण्याविषयीं प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांस मुळींच शंका नव्हती आणि इंग्लंडला सर्व प्रकारांची युद्धसामुग्री पुरवण्याची तयारी त्यांनीं ठेवली होती. कर्ज-उसनवारीच्या कायद्यावर सही करून लगेच त्यास अनुसरून अंमलास त्यांनीं प्रारंभ केला. त्यासंबंधांत प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं परवां भाषण केलें तें तत्वनिष्ठा, करारीपणा, धैर्य व स्पष्टवक्तेपणा ह्यांनीं ओतप्रोत भरलें होतें. लोकशाहीचें रक्षण आणि अमर्याद सत्तेच्या उन्मत्तपणाचा पाडाव हा दुहेरी उद्देश साध्य करण्यास आणि त्याकरितां इंग्लंड व ग्रीस ह्या राष्ट्रांस युद्धसहाय देण्यास अमेरिका तयार झाल्याचें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. अमेरिकेचा हा निश्चय एका व्यक्तीच्या हटवादीपणाचा किंवा लहरीचा परिणाम नसून तो तेरा कोटि अमेरिकन नागरिकांच्या दृढ इच्छेचा द्योतक आहे असें ते म्हणाले. हिट्लर किंवा मुसोलिनी ह्यांच्या राज्यांत व्यक्तिस्वातंत्र्य नाहीं आणि जनतेच्या मतास किंमत नाहीं. ह्याच्या उलट, अमेरिकेचें धोरण लोकशाही पद्धतीनें साधक-बाधक चर्चा होऊन ठरलें आहे आणि त्यामुळें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांचे उद्‌गार म्हणजे अमेरिकन राष्ट्राचे उद्‌गार होत. इंग्लंड व ग्रीस स्वातंत्र्यासाठीं जुलमाशीं झुंजत असल्यानें त्यांस अमेरिका तीं राष्ट्रें मागतील तीं आणि मागतील तेवढी मदत देणार असें त्यांनीं खणखणीत विधान केलें आहे. त्यानें इंग्लंडमध्यें लोकांस हुरूप येणें साहजिक आहे. त्याचप्रमाणें, त्यामुळें जर्मनीच्या नाकास मिरच्या झोंबल्या आहेत ही गोष्ट अपेक्षित अशीच आहे.

---

### ब्रिटिश सरकारचें येतें अंदाजपत्रक

ग्रेट ब्रिटनच्या वार्षिक बजेटाची वेळ आतां आली असून ह्या अंदाजपत्रकांतील तूट भरून काढण्याकरितां नवे कर कोणते बसणार, ह्याविषयीं तर्कवितर्क सुरू झाले आहेत. अमेरिका ग्रेटब्रिटनसाठीं युद्धसाहित्य करून देणार आहे, त्याची तरतूद बजेटांत दिसून येणार नाहीं. युद्धसमाप्तीपर्यंत, अमेरिकेचा हिशेब स्वतंत्र राखण्यांत येईल व तो प्रसिद्ध केला जाणार नाहीं. प्रत्यक्ष करांत वाढ होण्यास ग्रेट ब्रिटनमध्यें आतां फारसा वाव उरलेला नाहीं; तेव्हां अप्रत्यक्ष करांचा अवलंब करणें ब्रिटिश फडनवीस, सर किंग्जले वुड, ह्यांस क्रमप्राप्त होणार आहे, असें दिसतें. रेल्वेवहातुक, उपहारगृहांतील खाणें, इत्यादींवर आतां करपट्टी बसेल असा अंदाज करण्यांत येत आहे. वाढत्या सरकारी खर्चाचा परिणाम चलनाच्या अवास्तव विस्तारांत होणार नाहीं, अशी काळजी ग्रेट ब्रिटनमध्यें घेण्यांत येत आहे. वाढत्या ब्रिटिश युद्धखर्चाची वेळोवेळ तरतूद करण्यासाठीं चालू सालीं तीन बजेटें कॉमन्स सभेपुढें आलीं, हें वाचकांस स्मरत असेलच.

---

### फिनॅन्स बिलाची चर्चा

नवीन वर्षाच्या सरकारी अंदाजपत्रकांत दाखल केलेल्या खर्चाच्या योजना पुऱ्या पडाव्या ह्याकरितां जरूर त्या करांची तरतूद करावी लागते आणि ते कर बसवण्यास कायदेमंडळाची संमति घ्यावी लागते. ह्यासाठीं नियोजित करांचा अंतर्भाव करून सरकार आपलें फिनॅन्स बिल कायदेमंडळापुढें मांडतें. ह्या पद्धतीस अनुसरून हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेस्मन, ह्यांनीं मध्यवर्ती कायदेमंडळापुढें फिनॅन्स बिल मांडलें असून त्याची चर्चा गेल्या आठवड्यांत चालू झाली. त्या चर्चेचे प्रसंगीं कायदेमंडळाच्या सभासदांनीं आपलीं भाषणें केवळ करांच्या विषयास मर्यादित न करतां सरकारच्या धोरणावर सर्वसाधारण स्वरूपाची टीका करण्यास हरकत नसते. त्याप्रमाणें यंदाच्या फिनॅन्स बिलावर असेंब्लींत भाषणें झालीं. त्यांमध्यें देशांतल्या राजकीय परिस्थितीवर विचार प्रदर्शित करण्यांत आले आणि सरकारच्या सांपत्तिक व व्यापारविषयावर टीका करण्यांत आली. जादा नफ्यावरील कर केवळ युद्धामुळेंच होणाऱ्या फायद्यांतून घेण्यांत यावा आणि मामुली कारणांमुळें कोणाचा नफा वाढला असेल तर त्यावर ह्या कराचा बोजा टाकण्यांत येऊं नये अशी सूचना करण्यांत आली. युद्धामुळें झालेला आणि युद्ध–परिस्थितीशीं ज्याचा प्रत्यक्ष संबंध नाहीं असा ह्याप्रमाणें जादा नफ्यामध्यें फरक करणें अशक्य आहे असें सर जेरेमी ह्यांनीं सांगितलें. ह्या दोन प्रकारांच्या नफ्यांचें वर्गीकरण करणें सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हिन्यू ह्यांस कठिण जाऊं नये असें त्यावर उत्तर देण्यांत आलें. कृत्रिम रेशमावर बसवलेल्या कराविरुद्ध, तो विणकरांच्या धंद्यास जाचक होणार ह्या मुद्यावर तक्रार करण्यांत आली. काड्यांच्या पेट्यांवरील जादा कराचे संबंधांत विधायक सूचना करण्यांत आल्या. भांडवली खर्चांत काटकसर, युद्धकाळांत विस्तार पावलेल्या व्यापाराचा कायमपणा टिकवण्याची आवश्यकता, औद्योगिक संरक्षणाबाबतचें धोरण कार्यक्षम रीतीनें निश्चित करतां यावें अशी तजवीज, लहान धंद्यांची जोपासना इत्यादि विषयांवर सभासदांनीं विचार व्यक्त केले.

## दी पूना इंडस्ट्रिअल एजन्सीज

वरील संस्थेचा पहिला वाढदिवस, पुणें येथील तपकिरी कारखान्याचे मालक श्री. वर्तक यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. वाढदिवसानिमित्त निमंत्रित मंडळींमध्यें व्यापारी, कारखानदार इत्यादि मंडळी हजर होती. प्रथम श्री. के. पी. जोशी यांनीं आपला अनुभव सांगून कोणत्याही धंद्यास येणाऱ्या अडचणी धंदेवाईकानें धिमेपणानें निभाऊन नेऊन, विश्वास उत्पन्न केला पाहिजे असें सांगितलें. रूरल प्रॉडक्ट्स कंपनीचे श्री. आपटे यांनीं पुणें येथील छोटेखानी कारखाने अखेरपर्यंत न टिकतां मध्यंतरींच बंद कसे पडतात याचीं कारणें सांगून कोणतेंहि कार्य संघटनेशिवाय होत नाहीं व अशी संघटना करण्यास व्यापारी अगर कारखानदार यांचा एकोपा लागतो व तो आपण केला पाहिजे असें सांगितलें, नंतर श्री. दि. ब. बर्वे यांनीं आपला परदेशांतील अनुभव सांगून आपण सरकारची अगर ज्या ठिकाणीं आपण धंदा करतो तेथील म्युनिसिपालिटी वगैरेंची मदत घेऊन नेटानें धंदा केल्यास कारखाने यशस्वी होतील असें सांगितलें. अध्यक्ष वर्तक यांनीं आपला वीस वर्षांचा अनुभव सांगून जाहिरात, एजन्सी यांचे सहायानें मालाचा उठाव कसा करावा व उधारी ठेवल्यानें प्रत्यक्ष नुकसानी कशी येतें हें उदाहरणें देऊन सांगितलें.

शेवटीं इंडस्ट्रिअल एजन्सीचे प्रोपायटर श्री. एन्. एन्. क्षीरसागर यांनीं सर्वांचे आभार मानले.

## गेल्या आठवड्यामधील मुंबईतील घाऊक बाजारभाव

### फळें व भाज्या

| | प्रत | | रु. आ. | | रु. आ. |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रत्येक ६ डझनास किंमत | | |
| मुसंबी | जुना बहार | उत्कृष्ट | ३—० | ते | ३—८ |
| ,, | ,, | मध्यम | २—८ | | ३—० |
| ,, | ,, | लहान | २—० | | २—८ |
| ,, | नवा बहार | उत्कृष्ट | २—० | | २—८ |
| ,, | ,, | मध्यम | १—४ | | २—० |
| ,, | ,, | लहान | १—० | | १—४ |
| संत्री | पुणें | उत्कृष्ट | २—० | | |
| ,, | ,, | मध्यम | १—८ | | ०—० |
| ,, | खानदेश | उत्कृष्ट | १—४ | | १—८ |
| ,, | ,, | मध्यम | १—० | | १—४ |
| ,, | ,, | लहान | ०—१२ | | १—० |
| | | | प्रत्येक ११६ च्या शेकड्यास | | |
| ,, | नागपूर | मोठीं | २—० | | २—८ |
| ,, | ,, | मध्यम | १—८ | | २—० |
| ,, | ,, | लहान | १—० | | १—८ |
| | | | प्रत्येक १३५० च्या शेकड्यास | | |
| लिंबें | ,, | चांगलीं | ९—० | | १०—० |
| ,, | ,, | मध्यम | ७—० | | ८—० |
| | | | ८२६/७ पौंडाच्या मणास | | |
| बटाटे | तळेगाव | उत्कृष्ट | ३—५ | | ३—११ |
| ,, | ,, | मध्यम | २—१५ | | ३—५ |
| कांदे | नाशिक | (तांबडे) | २—२ | | २—४ |
| ,, | लोणंद | ,, | २—४ | | २—६ |
| ,, | पांढरे | ,, | २—१० | | |

### बँक ऑफ बरोडा लि.

बडोदा बँकेच्या नव्या इमारतीचा उद्घाटन समारंभ बडोद्याच्या महाराजांचे हस्तें गेल्या आठवड्यांत झाला. ह्या बँकेचें मूळ भांडवल २० लक्ष रुपये होतें, तें १९२१ सालीं प्रत्येकीं १०० रुपयांचे ४० हजार नवे भाग काढून ६० लक्ष रुपये करण्यांत आलें. १९३९ मध्यें असेच आणखी १ लक्ष, ८० हजार भाग काढण्यांत आले व त्यांपैकी पूर्वीच्या भागीदारांस ६० हजार भाग देण्यांत आले. प्रत्येक १०० रुपयांच्या भागास बँकेस ४५ रुपये प्रीमिअमदाखल अधिक मिळाले. बँकेचें डिव्हिडंट १०% अनेक वर्षे कायम आहे.

### गोडबोले आणि सन्स लि.

वरील नांवाची एक खासगी लिमिटेड कंपनी पुणें येथें नुकतीच स्थापन झाली आहे. तिचें अधिकृत भांडवल २½ लक्ष रुपये आहे. प्रत्येक भाग १०० रुपयांचा आहे. २,५०० भागांपैकी १,००० ऑर्डिनरी व १,५०० रिडीमेबल प्रेफरन्स आहेत. श्री. पी. के. गोडबोले, एन. एस. गोडबोले व व्ही. एस. गोडबोले ह्यांनीं व्यक्तिशः अथवा मिळून चालविलेला धंदा व व्यवहार हातीं घेणें, पैसे किफायतशीर गुंतविणें व सर्वसाधारण व्यापार, खरेदी-विक्री, इत्यादि धंदा करण्यासाठी कंपनीची स्थापना झालेली आहे. श्री. पी. सी. बेंद्रे, बी. ए., एलएल. बी., वकील, हे कंपनीचे अध्यक्ष असून श्री. एन. एस. गोडबोले बी. ए. हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. ह्या दोघांखेरीज श्री. व्ही. एस. गोडबोले हेहि कंपनीचे डायरेक्टर आहेत.

### शेतकरी कर्जनिवारणाचा कायदा

१९३९ च्या बॉंबे ॲग्रिकल्चरल डेट्‌र्स रिलीफ ॲक्टान्वयें मुंबई सरकारनें कानू केले ते ५ डिसेंबर, १९४० च्या गॅझिटांत प्रसिद्ध करण्यांत आले. त्या कानूंसंबंधीं लोकांकडून सूचना मागविण्यांत आल्या. सूचना पाठविण्याची मुदत आतां वाढविण्यांत आली असून, ३१ मार्चपर्यंत लोकांनीं सूचना पाठवाव्या, असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. कानू इंग्रजी, मराठी, कानडी व उर्दू भाषांत छापलेले आहेत. त्याची प्रत विनामूल्य मिळूं शकते.

**L. S. G. D.** Training classes for officers of Local Self Government Service under the auspices of the Government of Bombay and the Local Self Government Institute, will begin from ***1st May, 1941 at Bombay, Ahmedabad and Poona.***

**Fees Rs. 75**

***Apply for Prospectus to:***

THE HONORARY SECRETARY,
**410 Shanwar, Poona 2**
or
THE DIRECTOR,
**11, Elphinstone Circle, Fort, BOMBAY**

## हाफकिन इन्स्टिटयूटचें कार्य

### प्लेगप्रतिबंधक लशीचें उत्पादन

परळ येथील हाफकीन इन्स्टिटयूटमध्यें खालीलप्रमाणें लशी १९३९ मध्यें तयार करण्यांत आल्याः—

| | |
|---|---|
| प्लेगची | २८,८७,५२७ सी. सी. |
| कॉलऱ्याची | ४,०४,७९८ सी. सी. |
| टायफॉइडची | १७,२०७ सी. सी. |
| पिसाळलेल्या कुत्र्याची | ७,३३,८०५ सी. सी. |

### प्लेग निवारक औषधें

ब्युबॉनिक प्लेगवर आजवर औषध माहीत नव्हतें, तें आतां जवळजवळ सांपडलें आहे. उंदरांस मुद्दाम प्लेग आणवून त्यांस परळ येथें तयार केलेलें औषध दिलें, तेव्हां असें आढळलें कीं, शेकडा ८० ते ९० उंदीर बचावले. दुसरें एक औषधहि यशस्वी झालें, परंतु उंदरास प्लेग झाल्याबरोबर तें दिलें, तेव्हांच फक्त त्याचा गुण दिसला. प्लेग झाल्यानंतर ७२ तासांनीं तें दिलें, तेव्हां शेकडा १० उंदीर फक्त बचावूं शकले. बिहारमध्यें प्लेगदूषित माणसांवर वरील औषधांचे प्रयोग करण्यांत आले, ते बरेच यशस्वी ठरले. हीं औषधें मुखावाटें द्यावयाचीं असतात, करण्यास स्वस्त पडतात व सांठवणीस सोईस्कर असतात. प्लेगप्रतिबंधक लस तयार करणें खर्चाचें असतें. ती लस शिरांत टोंचावी लागते. व ती सांठवणें अवघड असते. हिंदुस्थानांत प्लेगप्रतिबंधक लशीपेक्षा प्लेगनिवारक औषधेंच अधिक उपयुक्त ठरतील. हींच औषधें न्युमोनिया, रक्तदोष, इत्यादींवरहि रामबाण आहेत.

### पिसाळलेल्या कुत्र्यांचे चावण्याची विषबाधा

पिसाळलेल्या कुत्र्यांच्या चावण्यामुळें विषबाधा होते, तावर उपचार करणारीं एकूण १०१ केंद्रें मुंबई प्रांतांत आहेत.

### उंदरांची तपासणी

मुंबई शहर म्युनिसिपॅलिटी दररोज आपल्या हद्दीमधील २ हजार उंदीर पकडते. प्रत्येक उंदराचे शेपटास एक लेबल अडकवून, त्यावर उंदीर शहराचे कोणत्या भागांत सांपडला, हें लिहिण्यांत येतें. हे सर्व उंदिर हाफकिन इन्स्टिटयूटकडे तपासणीसाठी पाठविण्यांत येतात. अशाप्रकारें, इन्स्टिटयूटकडे १९३९ मध्यें ७ लक्ष, ८१ हजार उंदीर दाखल झाले, त्यापैकी ४ लक्ष, ५१ हजार जिवंत व ३ लक्ष, ३० हजार मेलेल्या स्थितींत होते.

## यूनियन बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९४० सालीं ४ लक्ष, १० हजार रुपये नफा झाला. एका वर्षांत ठेवींचा आकडा १ कोटि ४४½ लाखांवरून १ कोटि, ९६½ लाखांवर गेला. तथापि, दिलेल्या कर्जाची रकम १९३९ सालअखेर ९६½ लक्ष होती, ती १९४० अखेर ६७ लाखांवर आली. व्यापार व उद्योगधंदे ह्यांसाठी पैशाची मागणी मंद राहिली, त्याचा हा परिणाम आहे. बँकेस त्यामुळें आपले पैसे सहकारी रोखे, भाग, इत्यादींत अधिक ठेवावे लागले.

ह्या बँकेची स्थापना १९१९ सालीं ५ कोटि रुपये अधिकृत भांडवलानें झाली. १९२३ सालीं बँकेचा प्रत्येक ५० रुपयांचा भाग १५ रुपयांचा करावा लागला व १९२५ मध्यें त्याची किंमत ५ रुपये करण्यांत आली. प्रारंभींचे काळीं बँकेची स्पर्धेमुळें व इतर कांहीं कारणांमुळें विशेष वाढ झाली नाहीं. विशेषतः तिची इमारत तिला फार महागांत पडली होती व कांहीं गुंतविलेल्या रकमांवर घसारा फार काढावा लागला होता. हळूहळू बँकेची पुढें वाढ होत गेली. १९२३ सालीं सेंट्रल बँकेनें यूनियनचे बरेच भाग खरेदी केले व तिची मॅनेजिंग एजन्सी स्वतःकडे घेतली. बँकेची आतां अखंड प्रगति होत आहे.

## चिलिअन नैट्रेट ऑफ सोडा

### अत्यंत उपयुक्त खत

नैट्रोजन वायूनें हवेचा चार पंचमांश भाग व्यापलेला आहे. त्या वायूची स्वतंत्र राहण्याची प्रवृत्ति जबर आहे. तो इतर द्रव्यांशीं सहजीं मिसळत नाहीं. ह्या कारणानें, रसायनशास्त्रांत नैट्रोजनला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. नैट्रोजनयुक्त पदार्थांतून निसटण्याचा त्या वायूचा विकाटीचा प्रयत्न सतत चालू असतो. कोरड्या नैट्रोजन-आयोडाइडवरून माशी चालली, तरी एकदम स्फोट होतो!

वाढत्या झाडांस नैट्रोजनची आवश्यकता असते. हवेंत तो मुबलक प्रमाणांत असला, तरी झाडास तो तसाच परस्पर घेतां येत नाहीं. कांहीं झाडें, मातीमधील आपल्या मुळास चिकटलेल्या जंतूंच्या सहायानें नैट्रोजनचें क्षारांत झालेलें रूपांतर मुळयांतून शोषून घेऊं शकतात. परंतु कांहीं झाडांस नैट्रोजनयुक्त द्रव्यें मुद्दाम घालावीं लागतात. हीं द्रव्यें पाण्यांत विरघळलीं, म्हणजे मुळांतून तीं शोषून घेतां येतात. चिलियन नैट्रेट ऑफ सोडा हें अशा प्रकारचें एक महत्त्वाचें नैट्रोजनयुक्त खत आहे.

### नैट्रेटचा शोध कसा लागला?

दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील अरुंद पट्टीचा चिली हा देश वरील खतासाठी प्रसिद्ध आहे. असें सांगतात कीं, सुमारें २०० वर्षांपूर्वी कांहीं प्रवासी त्या देशांत प्रवास करीत असतांना त्यांनीं जमिनींत खड्डा खणून शेकोटी पेटवली तेव्हां त्यांस निळ्या ज्वाला दिसूं लागल्या व आजू बाजूच्या जमिनीस भेगा पडूं लागल्या. हे प्रवासी घाबरून शेजारच्या गांवी गेले व एका उपाध्यायास घेऊन आले. त्यानें भिण्याचें कारण नाहीं म्हणून सांगितलें. त्यानें खड्ड्यांतील कांहीं माती घरीं नेली व बागेंत टाकली, तेव्हां त्या ठिकाणच्या झाडांची वाढ उत्कृष्ट झालेली त्यास आढळली. पुढें ह्या मातींतील सत्त्वाबद्दल लोकांची खात्री पटली व चिलिअन नैट्रेट ह्या खताचा सर्व जगभर प्रसार झाला.

हें नैट्रेट चिलीमध्यें ३०० मैल लांबीच्या व १२ ते १८ मैल रुंदीच्या पट्टींत मुबलक सापडतें. ह्या ठिकाणीं पावसाचा अभाव असल्या कारणानें नैट्रेटचा अंश पाण्यानें धुवून जात नाहीं. चिलिअन नैट्रेटमध्यें अल्प प्रमाणांत इतरहि द्रव्यें आढळतात व तीं झाडांच्या वाढीस अत्यंत उपयुक्त असतात. अयोडाईन, झिंक, मँगेनीज, बोरोन, इत्यादि तीं द्रव्यें होत.

१८३० सालापासून आतांपर्यंत चिलीमधून ९ कोटि टनांपेक्षा अधिक चिलिअन नैट्रेट काढण्यांत आलें आहे. ह्या नैट्रेटचा साठा फार काळ पुरणार नाहीं, अशी भीति ३० वर्षांपूर्वी वाटत होती. परंतु शेतकऱ्यांच्या आणखी कांहीं पिढ्यांस तरी भीतीचें प्रयोजन नाहीं, असें आतां आढळून आलें आहे.

### प्राप्तीवरील करावरील जादा पट्टी

"इनकमटॅक्सवरील सरचार्ज मोठ्या उत्पन्नांसच फक्त लागू केला जाणें आवश्यक आहे. १० ते १५ हजारांवरील उत्पन्नावर ही पट्टी बसविण्यास हरकत नाहीं. त्याखालील उत्पन्नाचे लोकांवर वाढत्या खर्चाच्या रहाणीचा भार अगोदरच पडलेला आहे." मध्यवर्ती असेंब्लीमधील फिनॅन्स बिलावरील चर्चेचे वेळीं सर यामिनखान ह्यांनीं वरील आशयाचें भाषण केलें.

## हातमागाचा धंदा

हिंदुस्थानांत गिरण्यांमध्यें कपास-कापड तयार होऊं लागल्यास पाऊणशें वर्षें झालीं. देशी गिरण्या चालाव्यात व परदेशी कापडाशीं देशी गिरण्यांच्या कापडास टक्कर देतां यावी म्हणून परदेशी कापडांवर आयात जकाती चढवून नियंत्रण घालण्याचे प्रयत्न करण्यांत आले. असें असूनहि हिंदी गिरण्यांची प्रगति विशेष झालेली दिसत नाहीं. उलट, हातमाग व खादी या मुख्यतः खेडेगांवी धंद्यांना सरकारी संरक्षण नसतांनाहि ते धंदे जीव धरून आहेत, एवढेच नव्हें तर १९३९-४० मध्यें हिंदुस्थानांतील एकूण ५९६ कोटि वार कापडाच्या उत्पादनापैकीं १६९ कोटि वार कापड हातमागावर तयार झालेलें आहे. हिंदुस्थानांत दरवर्षी खपणाऱ्या कापडांत हातमागावर तयार झालेल्या कापडाचें प्रमाण साधारणतः शेकडा २२ टक्के पडतें. यावरून असें दिसून येईल कीं, गिरण्यांच्या उत्पादनानें राष्ट्रांतील क्रयशक्ति वाढत नाहीं; ती वाढत असेल तर ती खादीसारख्या हातमागावरील उत्पादनानेंच होय. बहुजन समाजांत पैसा खेळावयाचा असेल तर ज्यामुळें अधिक माणसांना काम मिळेल, ज्यामुळें राष्ट्रांत संपत्ति उत्पन्न करण्याची त्यांची शक्ति अधिक उपयोगांत आणिली जाईल असेच व्यवसाय असावयास पाहिजेत. हिंदुस्थानांत निवळ अधिक उत्पादन हा प्रश्न नसून अधिक लोकांना काम व त्यांच्या फुकट जात असलेल्या शक्तीचा उपयोग अधिक उत्पादनाकडे करण हा प्रश्न मुख्य आहे.

गिरणी-कापडाचें उत्पादन व खादीचें उत्पादन यांचे १९३७ सालांत जमा केलेले पुढील आंकडे उद्बोधक आहेतः—खादीच्या व गिरणीच्या कापडाच्या उत्पादनांत अनुक्रमें २ लक्ष १७ हजार आणि ४ लक्ष १७ हजार कामगार गुंतले होते. खादीच्या व गिरणीच्या कापडाचें उत्पादन अनुक्रमें ७२ कोटि ५० लक्ष व ३५७ कोटि १० लक्ष वार झालें. म्हणजे १ लक्ष वार खादीचें कापड तयार करण्यांत ३० हजार कामगारांना काम मिळालें; तर गिरणींत तें काम करण्यास फक्त ११७ कामगार लागतात. १ लक्ष रुपयांचें भांडवल गुंतविलें असतां खादीच्या धंद्यांत ३३,४९९ कामगारांना काम मिळतें; तर गिरणींत फक्त १,४८५ कामगारांनाच काम मिळतें.

खादीच्या उत्पादनाच्या किंमतींतील ७० टक्के रकम कामगारांना वेतन म्हणून मिळते; तर गिरणींत २० टक्के रकम कामगारांना वेतन मिळते. असें असूनहि खादीच्या व गिरणीच्या कापडाच्या एकूण उत्पादन किंमतींत फारसा फरक आढळून येत नाहीं. ह्याचा अर्थ असा असला पाहिजे कीं, यंत्रें, त्यांतील दुरुस्त्या व नवीन यंत्रांची जोड, त्यांवरील घसारा, धंद्यांवर बसणारा व्यवस्थेचा मोठा खर्च व नफा यांतच सारा पैसा जातो. यंत्रांकरितां द्यावी लागणारी प्रचंड रकम युरोपमधील यंत्रें तयार करणाऱ्या कारखानदारांकडेच जात असते.

गिरण्यांचें कापड स्वस्त पडतें ही गोष्ट खरी आहे. तथापि हें स्वस्त कापड घेण्यास बहुजन समाजांत क्रयशक्ति असावी लागते. ती नसेल तर ती वाढवावयास पाहिजे. त्यासाठीं बहुजन समाजास किफातशीर व्यवसाय दिला पाहिजे. मग जरा महागाईच्या दरानें विकली जाणारी खादीहि विकत घेतां येईल. बहुजन समाज सुस्थितींत असणें हेंच राष्ट्राच्या अंतिम हिताचें आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## गिलिंगन कॅटल ब्रीडिंग फार्मचें अपूर्व यश

**चवथें अखिल भारतीय गोप्रदर्शन, न्यू दिल्ली १९४१**
दिल्ली येथें ता. १७ ते २२ फेब्रुवारी रोजीं भरलेल्या चौथ्या अखिल भारतीय गोप्रदर्शनांत नेमाडी जातींच्या उत्कृष्ट जनावरां-करितां इंदूर नरेशांनीं ठेवलेला ५०० रु. किंमतीचा "होळकर गव्हर्मेंट चॅलेंज कप" जळगांव तालुका डेव्हलपमेंट असोसि-एशननें चालविलेल्या पिंपळे फार्मावरील "कुंडल" नांवाच्या गाईनें मिळविला. हा कप ह्या फार्मनें गेल्या लागोपाठ तीनही वर्षी मिळविलेला आहे.

वरील प्रदर्शनांत नेमाडी जातीकरितां ठेवलेली सर्व ४१५ रु. रोख किंमतीचीं दहाही बक्षिसें ह्या फार्मातील जनावरांनाच मिळालीं आहेत ही विशेष अभिनंदनाची गोष्ट आहे. वरील असो-सिएशननें एका वर्षापूर्वी काढलेल्या मॉडेल पोल्ट्री फार्माच्या एका व्हाईट लेगहार्न कोंबड्याला "अखिल भारतीय पोल्ट्री शो"मध्यें एक बक्षिस व एक सर्टिफिकेट मिळालें आहे. पिंपळे फार्मास व्हाइस-रॉय लॉर्ड लिन्लिथगो यांनीं ता. १८-८-४० रोजीं भेट दिली होती. त्या वेळींही त्यांनीं खानदेशांतील जनावरांच्या सुधारणेचें जें स्पृहणीय कार्य ह्या फार्मनें चालविलेलें आहे तें पाहून व फार्मांचीं जनावरें अवलोकून अत्यंत समाधान व्यक्त केलें आहे.

शेतकीप्रधान हिंदुस्थानास उत्तम जनावरांची अत्यंत जरूरी आहे. परंतु उत्तम जनावरांची निपज करून ती शेतकऱ्यांना पुरविणें ही अत्यंत खर्चाची बाब आहे. पिंपळे फार्मचे चालक श्री. टी. टी. साळुंके ह्यांनीं हें बिकट काम अत्यंत मेहनतीनें, कळकळीनें व हुशारीनें चालविलेलें आहे. त्याबद्दल त्यांचें अभि-नंदन केलें पाहिजे. १९३२ सालापासून या कार्याकरितां दरसाल सुमारें १० हजार रुपये खर्च होतो. तरी सरकार, डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड व डिस्ट्रि. रुरल डेव्ह. बोर्ड यांनीं सढळ हातानें या कार्यास मदत करून अखिल भारतीय प्रदर्शनांत वाखाणलेल्या कार्यास उत्साह व जोम आणून देऊन देशकल्याणाला हातभार लावावा.

---

## हिंदुस्थानांतील दुभतीं जनावरें

"जगांतील दुभत्या जनावरांच्या एकूण संख्येपैकी अदमासें ½ जनावरें हिंदुस्थानांत आहेत." १९३६-४०मध्यें गोळा केलेल्या आकड्यांवरून जगांतील दुभत्या जनावरांची संख्या ६९ कोटि भरते. त्यांपैकी १८ कोटि, ८० लक्ष जनावरें हिंदुस्थानांत आहेत. त्यांचेमुळें हिंदी राष्ट्राच्या वार्षिक उत्पन्नांत किमान १,००० कोटि रुपयांची भर पडते ती खालीलप्रमाणें:—

- **रु. ३०० कोटि—दूध व त्याचे पदार्थांची किंमत**
- **रु. ४० कोटि—कांतडी**
- **रु. ३०० ते ४०० कोटि—शेतकींत उपयोग केलेल्या जनावरांच्या शक्तीची किंमत**
- **रु. २७० कोटि—खत**

दुभत्या जनावरांच्या संख्येंत हिंदुस्थानच्या खालोखाल राशिया व अमेरिका यांचा अनुक्रम लागतो. त्या देशांत हिंदुस्थानच्या ½ दुभतीं जनावरें आहेत.

## लँकेशायरच्या उत्कर्षांत खंड

**कापडाची निर्गत**

| वर्ष | कापड (कोटि वार) | किंमत (कोटि पौंड) |
|---|---|---|
| १८४० | ७९ | १·६३ |
| १८९० | ५१२ | ५·४१ |
| १९१० | ६०१ | ७·८७ |
| १९२० | ४७६ | ३१·५७ |
| १९३० | २४९ | ६·१३ |
| १९३८ | १४५ | ३·२० |

**ग्रेट ब्रिटन, हिंदुस्थान व जपान ह्यांतील चात्या**
(आंकडे हजारांचे आहेत)

| | ग्रेट ब्रिटन | हिंदुस्थान | जपान |
|---|---|---|---|
| १९१४ | ५५,९७१ | ६,३९७ | २,३८८ |
| १९२९ | ५५,९१७ | ८,७०४ | ६,५३० |
| १९३८ | ३६,८७९ | ९,७३१ | १२,५५० |

गेल्या आठ वर्षांत ग्रेट ब्रिटनमधील कपास कापडाच्या गिर-ण्यांची संख्या १,५०० वरून ९४४ वर आली. ५५६ गिरण्या बंद पडल्या. प्रत्येक गांवांतील एक तृतीयांश काम बंद आहे.

---

## जागतिक व्यापार

राष्ट्रसंघाच्या व्यापारी मासिकाच्या ताज्या अंकांत खालील उपयुक्त माहिती आढळते. अमेरिकेंत गव्हाची किंमत २२ टक्यांनीं वाढली असून मका ४० व लोकर २५ टक्यांनीं वाढली आहे. धातू ०.१८, कापूस २, रबर ९, कोको २ टक्के हें वाढीचें प्रमाण आहे, तर कातडी ५, साखर ७, कच्चें रेशीम ५ व कॉफी १ टक्का या प्रमाणांत किंमती कमी झाल्या आहेत. सर्वांत अधिक किंमती हिंदुस्थानांत वाढल्या. १९३९ च्या अखेरीस तागाची किंमत तिप्पट वाढली तर लाखेची किंमत १६० टक्यांनी वाढली. अमे-रिकेंत टिन, रबर व कच्चा कापूस यांच्या किंमतींवर नियंत्रण नसल्यानें त्या अनुक्रमें १०,४० व ६० टक्यांनीं वाढल्या आहेत. डेन्मार्कमधील लोण्याची किंमत युद्ध सुरू होतांच बेसुमार वाढली. पुढें ती हळूहळू कमी होऊं लागली, परंतु जर्मनीनें डेन्मार्कमध्यें प्रवेश करतांच पुनः ही किंमत ६० टक्यांनी वाढली. तरीपण अलीकडे या किंमती प्रमाणांत येत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. औद्योगिक क्षेत्रांतही अशीच वाढ आढळते. गेल्या ऑगस्टमध्यें रबराची वाढ १२२ हजार मेट्रिक टनपर्यंत गेली. हा १९३४ नंतरचा उच्चांक आहे. सप्टेंबरपासून गोल्ड कोस्ट, कॅनडा, जपान, अर्जेंटाईन व स्वित्सर्लंडमधील निर्यात कमी होत आहे. सप्टेंबर व आक्टोबरमध्यें सेंट्रल बँकेचा व्याजाचा दर बल्गेरियांत ६ वरून ५.५० वर डेन्मार्कमधील ४.५० वरून ४ वर, हंगेरींत ४ वरून ३ वर व रुमेनियांत ३.५० वरून ३ वर आला. डेन्मार्क, ग्रेट ब्रिटन, इटली, स्वीडन व स्वित्सर्लंडमधील सरकारी रोख्यांचें प्रमाण कमी होत असून औद्योगिक शेअर्सची किंमत वाढत आहे. बल्गेरिया व हंगेरीमधील नोटांचें प्रमाण सप्टेंबरमध्यें अनुक्रमें १० व १३ टक्यांनीं वाढलें.

---

## उपयुक्त पुस्तकें

युद्धामुळें राष्ट्रसंघाचें वाङ्मय पूर्वीइतकें छापल्यानें निघत नसलें व हिंदुस्थानांत येत नसलें तरी नुकतींच कांहीं महत्वाचीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यामध्यें वार्षिक सांवत्सरिक (दि स्टॅटिस्टिक ॲन्युअल १९३९-४०) व शस्त्रास्त्रविषयक सांवत्सरिक (आर्मामेंट्स इयर बुक), वर्ल्ड एकॉनॉमिक सर्व्हे वगैरे पुस्तकें आहेत.

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केलया आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४–१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९५–१४ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—४ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९५—० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९६–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... ... | ११४—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४३—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | १०८—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४३—० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५५२—८ |
| बांबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बांबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३५–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २२५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५८०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १८१०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६३—० |
| अहमदाबाद प्रांतज ( ५०० ) ११½% | ८१७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६६२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २०७—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४८—४ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०–१३ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४१—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३९३५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१३–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४९–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३८४—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै... | १९४७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १३९—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४४—०—९ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३—४—० |


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडेमी,** ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**महायुद्धाची जाणीव!** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

**जाहीरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख २६ मार्च, १९४१ | अंक १३

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

**L. S. G. D.** Training classes for officers of Local Self Government Service under the auspices of the Government of Bombay and the Local Self Government Institute, will begin from ***1st May, 1941 at Bombay, Ahmedabad and Poona.***

**Fees Rs. 75**

***Apply for Prospectus to:***

THE HONORARY SECRETARY,
410 Shanwar, Poona 2
or
THE DIRECTOR,
11, Elphinstone Circle, Fort, BOMBAY

**देशी औषधें तयार करणारा**
**महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना**
पंडु, (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

# रक्तवर्धक

**वापरा.**

**सर्वत्र मिळतें.**

—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा**
**पुणें, लि.** पुणें ४.




**मधुमेहावरील औषध**

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

**K. K. & Co.**
**Photographic Dealers**
POONA.

# विविध माहिती

### गांजासंबंधींचा मद्रास सरकारचा कायदा

गांजा अजिबात जवळ बाळगतां कामा नये असा नियम करणारा मद्रास सरकारचा कायदा प्रांतिक विधिमंडळाच्या कक्षे-बाहेरचा आहे, असा मद्रास हायकोर्टानें निकाल दिला आहे.

### वैद्यकीय शिक्षण पुरें करण्याची अमेरिकेंत सोय

ग्रेट-ब्रिटनमधील वैद्यकीय शिक्षणाचे विद्यार्थी आपला अभ्यासक्रम पुरा करण्याकरितां अमेरिकेंत जाणार आहेत. रॉकफेलर फौंडेशनच्या सहायानें ही व्यवस्था होत आहे. अमेरिकेंतील व कॅनडांतील सुमारें २५ वैद्यकीय संस्थांनीं ह्या विद्यार्थ्यांस दाखल करून घेण्यास संमति दिली आहे.

### तापी रेल्वे कंपनी लि.

तापी रेल्वे कंपनीस गेल्या वर्षी ११ लक्ष, ९४ हजार रुपये निवळ नफा झाला. भागीदारांस ८% डिव्हिडंड व बोनस मिळालें. ह्या कंपनीचें वसूल भांडवल १ कोटि, ३२ लक्ष रुपये आहे. कंपनीच्या रेल्वेचें गेज ५½ फूट आहे. रेल्वेच्या फाट्याची लांबी १५६ मैल असून तो तापी नदीचे खोऱ्यांतून जातो. सुरत व अंमळनेर हीं ह्या रेल्वेच्या टोंकाचीं स्टेशनें आहेत.

### आयर्लंडचा तटस्थपणा

आयरा अखेरपर्यंत तटस्थ रहाणार, अशी घोषणा मि. डी. व्हॅलेरा ह्यांनीं नुकतीच केली.

### हिंदी रेल्वेजची खरेदी

हिंदी रेल्वेजनीं १९३९-४० मध्यें, १९३८-३९ च्या मानानें ९५ लक्ष रुपये अधिक किंमतीचा माल हिंदुस्थानांत खरेदी केला. आयात केलेल्या मालाची किंमत ९ लक्ष रुपयांनीं कमी भरली.

### विमानांचें उत्पादन

विमानांचें उत्पादन करणाऱ्या तीन प्रमुख अमेरिकन कंपन्यांचें उत्पादन गेल्या सवा वर्षांत तेरापट वाढलें आहे.

### वानरांची जंगलांत रवानगी

कानपूर म्युनिसिपॅलिटीनें आपल्या हद्दीमधील वानरें पकडून तीं दूर नेऊन जंगलांत सोडण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेस सुमारें ८०० रुपये खर्च येईल.

### सिमेंटची ऑर्डर

४२,००० टन पोर्टलंड सिमेंटची ऑर्डर एका ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशाकडून हिंदी कारखान्यांस मिळाली आहे.

### हिंदी युद्धविषयक म्यूझियम

युद्धसहायाच्या हिंदी प्रयत्नांचें एक म्यूझियम करण्यांत यावयाचें आहे. ग्रेट ब्रिटनमधील इंपीरिअल वॉर म्यूझियमचे अधिकारी ह्यासंबंधांत सहकार्य करणार आहेत.

### जमिनींसंबंधीं माहिती

हिंदी जमिनींसंबंधींची उपलब्ध माहिती संकलित करण्याचें इंपीरिअल कौन्सिल ऑफ अग्रिकल्चरल रिसर्चनें ठरविलें आहे. दोन वर्षेपर्यंत हें काम चालेल.

### बडोदा स्टेट रेल्वे

बडोदें संस्थानच्या मालकीच्या रेल्वेजना १९३९-४० मध्यें २०½ लक्ष रुपये नफा झाला. म्हणजे, त्या रेल्वेजमध्यें गुंतविलेल्या ५ कोटि रुपये भांडवलावर ४·१% व्याज पडलें. नफ्याची सर्व रकम संस्थानाचें उत्पन्न म्हणून घेण्यांत येईल.

### हिंदी गिरण्यांतील देशी कपाशीचा उठाव

(४०० पौंड वजनाच्या गांठी)

| जानेवारीमधील उठाव | ब्रि. हिंदुस्थान | संस्थानें | एकूण |
|---|---|---|---|
| १९४० | २,२१,८०१ | ४६,७५० | २,६८,५५१ |
| १९४१ | २,५५,९९७ | ५६,४२५ | ३,१२,४२२ |

### सातारा

सातारा शहराची लोकसंख्या १९३१ सालीं २४,०२७ होती, आतां ३०,७१६ झाली आहे.

### सिंधमधील कपाशीची लागवड

सिंधमध्यें सुधारलेल्या जातींच्या लांब धाग्याच्या कपाशीची लागवड आतां पुष्कळच वाढली आहे. सक्करच्या धरणामुळें कपाशीच्या लागवडीस उत्तेजन मिळालें आहे. अमेरिकन कपाशीची व देशी कपाशीची लागवड भिन्न राखण्यासाठीं योग्य ते नियम करण्यास आतां वेळ सोईची आहे.

### बोर्डिंग व लॉजिंग हौसच्या दरांचें नियंत्रण

जबलपूर येथील बोर्डिंग व लॉजिंग गृहांच्या दरांवर नियंत्रण ठेवणारा एक कायदा तेथील प्रांतिक सरकारनें जाहीर केला आहे. कोणत्याहि गृहाचे दर फाजील असल्याचें आढळून आल्यास, त्यासंबंधीं तातडीनें चौकशी करून योग्य दर ठरविण्याचा अधिकार तेथील असिस्टंट इंजिनिअरास देण्यांत आला आहे. त्यावर अपील करावयाचें असल्यास तें डेप्युटि कमिशनरकडे करावयाचें आहे.

### युद्धाच्या धोक्याचा विमा

युद्धविषयक धोक्याच्या विम्याच्या सक्तीची अंमलबजावणी मार्गेच सुरू झाली आहे. ह्या विम्याचे हप्ते दर तीन महिन्यांनीं पुनः ठरविण्याचा अधिकार सरकारास आहे. सध्याचा दर प्रत्येक १०० रुपयांस दरमहा अर्धा आणा, असा आहे. तो १ एप्रिल १९४१ पासून पुढें एक आणा करण्यांत येईल.

### पेटिट इन्स्टिट्यूट लायब्ररी, मुंबई

वरील संस्थेच्या पटावर ४,९४३ सभासद आहेत. गेल्या वर्षी लायब्ररीनें ९,१०४ रुपयांचीं १,६९५ नवीं पुस्तकें घेतलीं व १४,२०० रुपये वार्षिक वर्गणीची ४३९ नियतकालिकें चालू ठेवलीं. सभासदांनीं एकूण ८५ हजार पुस्तकें वाचण्यासाठीं नेलीं. त्यांपैकीं मराठी पुस्तकांची संख्या ४१४ होती.

### संरक्षक जकातींची मुदत वाढविली

लोखंड, पोलाद, साखर, इत्यादिवरील संरक्षक जकातींची मुदत चालू महिनाअखेर संपत होती, ती एका वर्षानें वाढविणारें एक बिल सरकारनें असेंब्लींत आणलें आहे. संरक्षणाची ह्यापुढें आवश्यकता आहे किंवा नाहीं आणि ती तशी असल्यास संरक्षण किती देण्यांत यावें, ह्याचा विचार करण्यास सध्याचा समय सोईस्कर नाहीं.

### सहकार्याची आवश्यकता

सरकार, गिरणी मालक व कामगार ह्यांच्या सहकार्यावरच ब्रिटिश लोकांचें सामर्थ्य व उद्दिष्ट हीं आधारलेलीं आहेत असें इंटर नॅशनल लेबर ऑफिसचे माजी डायरेक्टर, मि. विनेंट, ह्यांनीं आपल्या रिपोर्टांत म्हटलें आहे.

### संशोधनाच्या १४ योजनांसाठीं ५२ हजार रुपये

हिंदुस्थान सरकारला सल्ला देणाऱ्या बोर्ड ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्चनें संशोधनाच्या १४ योजनांस मिळून ५२ हजार रुपये मंजूर केले आहेत.

## अनुक्रमणिका

पृष्ठ

१ विविध माहिती ... १४६
२ हिंदी उद्योगधंद्यांविषयींचें धोरण ... ... १४७
३ बटाटे ... ... १४८
४ बार्क्लेज् बँक ... १४८
५ स्फुट–विचार ... १४९
मुंबई सरकारच्या हिशेबांत वाढावा—येत्या वर्षांतील वाढाव्याचा विनियोग—कर का कर्ज !—ओगले ग्लास वर्क्स लि.
६ मुंबई येथील औद्योगिक परिषद ... ... १५१
७ सहकारी दिन ... १५२
८ डायरेक्टरांचा मेहनताना १५२
९ घाटांचे सूट... ... १५३
१० खतांतील द्रव्यें ... १५३
११ निवडक बाजारभाव... १५४

# अर्थ

बुधवार, ता. २६ मार्च, १९४१

## हिंदी उद्योग-धंद्यांविषयींचें धोरण

मध्यवर्ती असेंब्लींत फिनॅन्स बिलाची चर्चा चालू असतांना व्यापारमंत्री, सर रामस्वामी मुदलियार, ह्यांनीं हिंदी उद्योगधंद्याचे संबंधांत कित्येक महत्त्वाच्या बाबींविषयीं सरकारच्या धोरणाचा खुलासा केला. ह्यांतली पहिली महत्त्वाची बाब स्वदेशी साखरेच्या धंद्याविषयींची होती, ह्या धंद्याच्या परिस्थितीचा विचार करून त्या बाबतींत सूचना करण्यासाठी एक मध्यवर्ती सल्लागार मंडळ नेमण्याचा सरकारचा विचार असल्याचें त्यांनीं सांगितलें. साखरेच्या धंद्याचें नियमन हिंदुस्थान सरकारनें स्वतःच्या हातीं घ्यावें अशा आशयाच्या सूचना करण्यांत आल्या आहेत, त्यांचें विवेचन आम्हीं "अर्था" मध्यें केलेंच आहे. प्रस्तुतचा युद्धाचा काळ टारिफ बोर्डाच्या चौकशीस अनुकूल नाहीं आणि सूक्ष्म चौकशी-वांचून सरकारास नियंत्रणाचें किंवा इतर प्रकारचें अन्य धोरण अंगिकारणें शक्य नाहीं. ह्या कल्पनेनें त्या सूचनांचा स्वीकार करण्याचें त्यांनीं नाकारलें आहे. परंतु त्याचबरोबर निरनिराळे प्रांत व संस्थानें ह्यांमधील साखरेच्या धंद्याचे बाबतींत धोरणाचा योग्य मेळ घातला जावा ह्या हेतूनें सल्लागार मंडळाची योजना सरकारनें पसंत केली आहे असें दिसतें. प्रांतिक व संस्थानी सरकारांकडे ती योजना पाठवण्यांत आली असून तिला त्यांची संमति मिळेल अशी सर रामस्वामी ह्यांस आशा वाटत आहे. नियोजित मध्यवर्ती सल्लागार मंडळांत मुख्यत्वेंकरून ह्या सरकारांचे प्रतिनिधी घेण्यांत येतील आणि ऊंस पिकवणारे व साखरेचे कारखानदार ह्यांचेहि प्रतिनिधी थोड्या प्रमाणांत त्यावर असतील. सेंट्रल कॉटन कमिटीप्रमाणेंच ह्या सल्लागार मंडळाकडे विचारविनिमय आणि साखरेच्या धंद्याची सुव्यवस्था होण्याविषयीं सरकारास सूचना, हीं कामें देण्यांत येतील असें वाटतें. हितसंबंधी प्रांत आणि संस्थानें ह्यांच्या प्रतिनिधींस सल्लागार मंडळांत स्थान मिळणार असल्यानें त्यांच्या सूचना एकतर्फी होण्याची भीति नाहीं. मध्यवर्ती नियंत्रणाचे ऐवजीं सहविचाराची कल्पना सरकारनें स्वीकारली आहे ही गोष्ट साखरेच्या धंद्याचे दृष्टीनें चांगली आहे असें म्हटलें पाहिजे. ऊंस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांस त्यांच्या मालास कारखानदारांनीं काय किंमत द्यावी ह्याविषयीं बहुतेक सरकारांचें एकमत झालें आहे. ही किंमत सबंद हंगामांत एका ठराविक दरानें देण्यांत येईल, पण कारखान्यांच्या नफ्याचे विशिष्ट प्रमाणांत शेतकऱ्यांस तिच्याशिवाय बोनसहि दिलें जाईल.

सर रामस्वामी मुदलियार ह्यांच्या भाषणांतील दुसरा मुद्दा युद्धकाळांत निघालेल्या किंवा विस्तार पावलेल्या धंद्यांचें युद्धाच्या नंतरचे काळांत भवितव्य ह्या संबंधांतला होता. युद्ध-समाप्तीनंतर कांहीं कारखान्यांतलें उत्पादन बंद किंवा मर्यादित होऊन त्यांतले अनेक कामगार बेकार होतील. ह्या घटनेवरच्या उपाय-योजनेचा विचार एव्हांपासून केला पाहिजे आणि त्याविषयीं आपले आर्थिक सल्लागार चौकशी करीत आहेत असें त्यांनीं सांगितलें. युद्धोत्तर काळांतील हिंदुस्थानच्या औद्योगिक घटनेची घडी योजनात्मक पद्धतीनें बसवणें जरूर आहे आणि त्याविषयींची चौकशीची व विचारविनिमयाची तयारी चालू करण्यांत येत आहे असें आश्वासनहि त्यांनीं दिलें. हिंदी धंद्यांस द्यावयाच्या संरक्षणाचे बाबतींत टारिफ बोर्डाची चौकशी होऊन त्याच्या शिफारशींची अंमलबजावणी होण्यांत पुष्कळ वेळ जातो. ही दिरंगाई कशी टाळतां येईल ह्या प्रश्नाचा विचार योग्य वेळीं करण्याचें अभिवचन सर रामस्वामी ह्यांनीं दिलें. अशी एक सूचना सरकारला करण्यांत आली आहे कीं एखाद्या धंद्यास संरक्षण मिळाल्यानंतर टारिफ बोर्डाच्या शिफारशीस अनुसरून त्याची प्रगति होत आहे किंवा नाहीं इकडे लक्ष देण्याची तरतूद सध्या नाहीं, ती करणें आवश्यक आहे. ह्या संबंधांतहि आपण कांहीं तरी योजना अंमलांत आणण्याचा विचार करूं असें ते म्हणाले.

हिंदुस्थानचे औद्योगीकरणाविषयीं लोकांची जोराची मागणी आहे, तिला अनुलक्षून व्यापारमंत्र्यांनीं अशी विचारसरणी पुढें मांडली कीं स्वदेशी उद्योगधंद्यांस उत्तेजन द्यावयाचें तें अशा बेतानें दिलें पाहिजे कीं युद्धानंतरच्या काळांत कारखाने व शेतीचा धंदा ह्यांच्या स्थितीचा परस्पर मेळ बसला पाहिजे. शेतीच्या मालास बाहेरच्या देशांमध्यें गिऱ्हाइक मिळून निर्गत व्यापार चालू रहाण्यास आयात माल परदेशांतून येणें अपरिहार्य आहे. तेव्हां हिंदुस्थानास सर्वस्वी स्वावलंबी होतां येणार नाहीं आणि परदेशांशीं व्यापारविनिमय चालू ठेवावा लागेल. हिंदी धंदेवाल्यांनीं औद्योगीकरणाच्या बाबतींत भलत्या अपेक्षा व मागण्या करूं नयेत असें सांगून त्यांनीं आपणांस होणाऱ्या फायद्याचा विनियोग पुढें उपस्थित होणाऱ्या परिस्थितीच्या दृष्टीनें करावा असा सल्ला सर रामस्वामींनीं दिला. मध्यम व लहान प्रमाणावरील धंदे हवेत तसें अस्तित्वांत नसल्यानें त्यांच्या उत्पादनावर अवलंबून असणाऱ्या मोठ्या कारखान्यांची कुचंबणा होते ह्या गोष्टी-कडेहि त्यांनीं लक्ष वेधलें. सर अलेक्झांडर रोजर ह्यांनीं औद्योगिक पहाणी केली आहे, तीच्यामधून निघालेल्या माहितीचा उपयोग लहान प्रमाणावरील धंद्यांस द्यावयाच्या उत्तेजनाचे बाबतींत करतां येईल आणि त्या संबंधांत योग्य ते उपाय योजले जातील असें त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानची औद्योगिक परिस्थिति आणि भवितव्य ह्यांचेविषयीं सर रामस्वामी ह्यांनीं अनेक महत्त्वाचे विचार प्रकट केले, त्यांमध्यें कित्येक धोरणाविषयींचें व मूलभूत तत्त्वासंबंधाचे होते. ह्या कारणानें त्यांपैकीं कांहीं मुद्दे मतभेदाचा विषय होणें स्वाभाविक आहे. देशाची आर्थिक घडी युद्धोत्तर काळांत कशी बसेल हा येथें जिव्हाळ्याचा प्रश्न असून त्याची छाननी एव्हांपासून चालू होत आहे ही गोष्ट प्रस्तुत विवेचनांत समाधानकारक आहे.

## बटाटे

शंभर वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत बटाट्यांची माहितीहि नव्हती; आतां आपल्या देशांत दरसाल ९३ कोटि रुपये किंमतीचे बटाटे तयार होतात. सुमारें ४३ लक्ष एकर जमिनींत बटाट्यांची लागवड होते. गेल्या दहा वर्षांत लागवडीचें क्षेत्र सुमारें १२% वाढलें आहे. वार्षिक अंदाजी उत्पादन ५ कोटि मण आहे. कित्येक ठिकाणीं लावण्यांत येणाऱ्या बटाट्यांचें बीं इटलींतून येतें. सध्याच्या युद्धामुळें तें येऊं शकणार नाहीं व तेथील लागवड कमी पडेल असा अंदाज आहे. गेल्या महायुद्धाचे वेळीं इटालिअन बियाच्या अभावामुळें बटाट्याची लागवड कमी झाली होती. १९१४-१५ मध्यें पुणें जिल्ह्यांत ६,३२५ एकर बटाट्याखाली होतें; १९१८-१९ मध्यें ही लागवड २,३४५ एकरांपर्यंत खाली उतरली. बटाट्यांची साठवण व त्यांची वहातूक ह्यांत दरसाल सुमारें १३ कोटि रुपयांचें नुकसान होतें; कारण बटाटा हा लवकर खराब होतो ह्यामुळें, शेतकरी स्वतःचें बीं पुढील वर्षाकरितां ठेवण्याचा यत्न करीत नाहींत व त्याचा परिणाम उत्पादन-खर्च वाढण्यांत होतो. साठवणीच्या सध्याच्या पद्धतींत सुधारणा झाली, म्हणजे ह्या खर्चांत बचत होऊं शकेल.

### आयात व निर्गत

हिंदुस्थानांत दरसाल सुमारें ३३ लक्ष रुपये किंमतीच्या ११३ लक्ष मण बटाट्यांची आयात होते. मुख्यतः ब्रह्मदेशांतूनच बटाटा येतो. इटलीचा आयातीमधील हिस्सा २०% आहे, त्याचा विनियोग लागवडीसाठीं बीं म्हणूनच मुख्यतः होतो. केनियांतून होणारी आयात सालोसाल वाढत आहे. १९३८-३९ मध्यें केनियानें हिंदुस्थानाकडे ४३ लक्ष रुपये किंमतीचे बटाटे पाठविले. ब्रह्मदेशानें पाठविलेल्या बटाट्यांची किंमत सुमारें २५ लक्ष रुपये होती. हिंदुस्थानानें २ लक्ष, ८१ हजार रुपयांचे ९४ हजार मण बटाटे निर्गत केले.

हिंदुस्थानांत बटाट्यांचा उपयोग मुख्यतः खाण्याकडेच होतो; औद्योगिक उत्पादनाकडे होत नाहीं. एकूण वार्षिक पुरवठ्यापैकीं सुमारें १६·२% बियासाठीं ठेवले जातात, ०·२% चीं निर्गत होते, व उरलेले ८३·६% म्हणजे सुमारें ४ कोटि, २० लक्ष मण बटाटे खाण्यांत येतात. १०% बटाटे खराब झाले असें मानलें, तर ३ कोटि, ७८ लक्ष मण बटाट्यांचा खाद्य म्हणून उपयोग होतो. म्हणजे दर माणशीं बटाट्याचा खप ४३ शेर होतो.

### संशोधन व प्रगतीची दिशा

बटाट्यांची निवड करून प्रतवारी लावण्याची हिंदुस्थानांत अत्यंत आवश्यकता आहे, "ॲगमार्क" योजनेप्रमाणें प्रतवारी लावण्यासाठीं अधिकाधिक व्यापारी पुढें येत आहेत, साठवणीच्या अव्यवस्थितपणामुळें दरवर्षी सुमारें १ कोटि, ६६ लक्ष रुपये किंमतीचे ८५३ लक्ष मण बटाटे वाया जातात; हा नाश थांबविण्यास कोल्ड स्टोरेजचा उपयोग होईल. जगांतील इतर देशांचे मानानें हिंदुस्थानांत बटाट्याचें दर एकरीं उत्पादन अत्यल्प आहे. कनिष्ठ दर्जाचें बीं, रोगराईचें मोठें प्रमाण, खताचें दुर्भिक्ष्य, व स्थानिक परिस्थितीस अनुरूप योग्य जातींच्या बटाट्यांचा अभाव, हीं त्याचीं प्रमुख कारणें आहेत. इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें बटाट्यांच्या संबंधांत संशोधन सुरू केलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

## बार्कलेज बँक
### (डोमीनिअन, कलोनिअल ॲंड ओव्हरसीज)

वरील बँकेची वार्षिक सभा नुकतीच लंडनमध्यें भरली होती, त्यावेळीं तिचे अध्यक्ष सर जॉन कॉलकट ह्यांनीं जागतिक व्यापारविषयक परिस्थितीचा आढावा घेतला. ग्रेट ब्रिनवरील कंपन्यांवर जागतिक परिस्थितीचा केवढा मोठा परिणाम होत असतो, हें त्यावरून लक्षांत येईल. बार्कलेज बँकेकडे सुमारें २ अब्ज रुपयांच्या ठेवी आहेत.

### अध्यक्षांचें भाषण

"दक्षिण आफ्रिकेंत, युद्धास प्रारंभ झाल्यानंतर प्रथम थोडी गडबड उडाली, परंतु आतां परिस्थिति निवळली आहे. द. आफ्रिकेची लोकर व मेंढ्या ह्यांची युरोपाकडे मोठ्या प्रमाणावर निर्गत होत असे; ह्या दोन्ही गोष्टी आतां ग्रेट ब्रिटन विकत घेत आहे. १९३९-४० मधील न्यासालँडमधील चहाचें सर्व उत्पादन ग्रेटब्रिटननें घेतलें आहे. मॉरिशसमधील सर्व साखर ग्रेट ब्रिटननेंच खरेदी करण्याचा करार केला आहे. पूर्व आफ्रिकेस गेलें वर्ष विशेष चांगलें गेलें नाहीं. इजिप्तमधील कपाशीचे उत्पादक व व्यापारी ह्यांची युद्धपरिस्थितीमुळें झालेली कुचंबणा ग्रेट-ब्रिटननें सर्व कपास खरेदी करून दूर केली. वेस्ट इंडीज व ब्रिटिश ग्वायना येथील सर्व साखर ग्रेट-ब्रिटननें घेतली आहे. त्रिनिदाद, जमेका व ब्रिटिश होनडुरास येथील नारिंगेंहि ग्रेट-ब्रिटननें मिळविलीं आहेत. ब्रिटिश पश्चिम आफ्रिकेंतील कोकोचें पीकहि ग्रेट ब्रिटनसाठीं राखून ठेवलेलें आहे. वरील सर्व देशांत बार्कलेज बँकेच्या व्यवहारांचें जाळें पसरलें आहे. ब्रिटिश सरकारनें त्या देशांतील मालाच्या उठावास योग्य ती किंमत देऊन सहाय केल्याकारणानें तेथील उत्पादकांस बाजारपेठ शोधत बसण्याचें प्रयोजन उरलेलें नाहीं. युद्धकाळांत किंमती वाढूं न देण्याचें धोरण अंमलांत असल्याकारणानें युद्धसमाप्तीनंतर पूर्वस्थिति प्राप्त होईल त्या वेळीं एकदम मंदी येण्याची भीति नाहीं. ह्या सर्व घडामोडींत बार्कलेज बँक तिच्या महत्त्वाच्या स्थानास अनुरूप अशी कामगिरी बजावीत आहे."

### पॅलेस्टाइनमधील नारिंगें

पॅलेस्टाईनमधील एक चतुर्थांश लोकांचें पोट तेथील नारिंगें, ग्रेपफ्रूट व लिंबें ह्यांवर अवलंबून आहे. पॅलेस्टाइनच्या निर्गतीपैकीं तीन चतुर्थांश निर्गत ह्या फळांची असते. ह्या फळांची निर्गत करणाऱ्या देशांत पॅलेस्टानचा अनुक्रम दुसरा लागतो; पहिला स्पेनचा आहे. पॅलेस्टाइनच्या फळांपैकीं दोन तृतियांश फळें ग्रेट ब्रिटनमध्यें खपतात. बाकीचीं युरोपमधील देशांकडे जातात. भूमध्यसमुद्र आतां वाहतुकीस बंद झाल्याकारणानें पॅलेस्टाइनच्या फळांची निर्गत अवघड झाली आहे. निर्गतीसाठीं पुरेशा आगबोटी मिळणेंहि कठीण आहे. फळें डब्यांत भरणें, त्यांचा मोरंबा तयार करणें, त्यांपासून पेक्टीन, जनावरांसाठीं सात्विक अन्न, खतें व अल्कोहोल तयार करणें, इत्यादि मार्गांचा अवलंब आतां करणें क्रमप्राप्त होईल. परंतु त्यास थोडा वेळ लागेल. पॅलेस्टाइनजवळच्या देशांत ब्रिटिश फौजा आहेत, त्यांचे रोजचे खाण्यांत नारिंगांचा समावेश केल्यास वहातुकीची अडचण दूर होईल, असें सुचविण्यांत येत आहे. नारिंगांत सत्वांश मोठा असतो व ब्रिटिश सैनिकांस नारिंगासारख्या फळांच्या आहाराची संवय आहे.

# स्फुट विचार

### मुंबई सरकारच्या चालू वर्षातील हिशेबांत वाढावा

मुंबई सरकारचें १९४१–४२ चें अंदाजपत्रक प्रसिद्ध झालें आहे. चालू वर्षाचे आरंभींची शिल्लक १०२ लक्ष रुपये होती व चालू वर्षअखेर सुमारें ½ लक्ष रुपयांचा वाढावा उरेल, अशी अपेक्षा होती. आतांच्या दुरुस्त अंदाजाप्रमाणें, हा वाढावा १०३ लाखांवर जाईल, असें दिसतें. आरंभींच्या १०२ लाखांच्या शिलकेस हात न लावतां हा आणखी वाढावा रहाणार आहे. हा इतका वाढावा कसा आला ? प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नांतील हिस्सा प्रांतिक सरकारांस दरसाल मिळत असतो. चालू वर्षी मुंबई प्रांताच्या वाट्यास त्या उत्पन्नांतील ६० लक्ष रुपये येतील अशी अपेक्षा होती, परंतु वर्षअखेर सुमारें ८३ लक्ष रुपये येतील, असा संभव दिसतो. रेल्वेजच्या उत्पन्नांत वाढ, इन्कमटॅक्सचे दरांत वाढ, इन्कमटॅक्सच्या वसुलींत सुधारणा, इत्यादि कारणांमुळें कराच्या प्रांतिक वाट्यांत भर पडली. सरकारी मालकीच्या रेल्वेजकडून मध्यवर्ती सरकारास मिळावयाची रकम व इन्कमटॅक्सची प्रांतिक सरकारांत वाटणी करून मध्यवर्ती सरकारजवळ उरलेली रकम ह्यांची बेरीज १३कोटि रुपये तरी झाली पाहिजे, अशी नीमायर योजना आहे. तथापि युद्धामुळें मध्यवर्ती सरकारचा युद्ध-तयारीचा खर्च वाढला आहे, त्या मानानें प्रांतिक सरकारांचा वाढलेला नाहीं. त्याचप्रमाणें मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्नाची मुख्य बाब, म्हणजे कस्टम्सचें उत्पन्न, त्यांत बरीच घट झालेली आहे. ह्या परिस्थितींत, १३ कोटींवरील सर्व रकम प्रांतांत वाटणें योग्य होणार नाहीं. ह्या दृष्टीनें गेल्या वर्षी नीमायर योजनेंत दुरुस्ती करण्यांत आली. असें असूनहि, प्रांतिक सरकारांचा इनकम–टॅक्सचे उत्पन्नाचा वाटा वाढला आहे व पुढील वर्षी ह्या मार्गानें ८९ लक्ष रुपये मुंबई प्रांतास मिळतील अशी अपेक्षा आहे. चालू सालीं मुंबई सरकारचें एक्साइजचें उत्पन्न मूळ अंदाजापेक्षा ५० लाखांनीं अधिक झालें, हेंहि अपेक्षेपेक्षां मोठा वाढावा उरण्याचें एक प्रमुख कारण आहे. सरकारच्या वेगवेगळ्या खात्यांनीं बजेटाप्रमाणें रकमा खर्च केल्या नाहींत त्याचीहि वाढावा वाढण्यास मदत झाली आहे.

---

### येत्या वर्षातील वाढाव्याचा विनियोग

येत्या वर्षी बजेटांत मोठा वाढावा अपेक्षित आहे, हें वर सांगितलेंच आहे. ह्या वाढाव्याचा विनियोग खालील प्रमाणें करण्यांत येणार आहे. सरकारच्या दारूबंदीच्या धोरणांतील बदलामुळें येणाऱ्या जादा उत्पन्नाचा उपयोग मालमत्तेवरील कर कमी करण्यांकडे केला जाईल, असें आश्वासन मुंबई सरकारनें गेल्या जुलैमध्यें दिलें होतें. येत्या वर्षी, त्या आश्वासनास अनुसरून, मालमत्तेवरील कर २०% कमी करण्यांत येणार आहे. म्हणजे, कराचा दर पूर्वी १०% व ५% होता तो आतां अनुक्रमें ८% व ४% करण्यांत येईल. दारूबंदीचें धोरण जरा सढळ केल्यामुळें येत्या वर्षी सुमारें २४ लक्ष रुपये अधिक मिळतील, तितकीच सूट वरील कर कमी केल्यामुळें घरमालकांस मिळणार आहे. दारूबंदीचें धोरण आणखी सैल करणें म्हणजे ताडी व देशी दारू ह्यांवरील बंदी उठवणें होय व ह्या प्रकारच्या दारूपासूनच सरकारास विशेष उत्पन्न मिळतें. दारूबंदीच्या क्षेत्रांत ताडी व देशी दारू ह्यांस बंदी आहे, ती उठवल्याखेरीज मालमत्तेवरील कर आणखी कमी करतां येणार नाहीं, हें उघड आहे. दारूबंदीमुळें होणारें सरकारचें नुकसान मालमत्तेवरील कर आज भरून काढीत असलें, तरी त्या दोन्हींचा निकटचा संबंध कायमचा चिकटविणें कितपत योग्य आहे, ह्याचा विचार केला पाहिजे. मालमत्तेवरील करांतून धर्मादाय ट्रस्ट मुक्त नाहींत, त्यांचें नुकसान भरून काढण्यासाठी येत्या वर्षी २ लक्ष रुपये बाजूस काढून ठेवण्यांत आले आहेत. अनपेक्षित अडचणींसाठी तरतूद म्हणून मुंबई सरकार कांहीं रकम बाजूस काढणार आहे. प्रारंभींची १११ लक्ष रुपयांची शिल्लक अडीअडचणींसाठी म्हणूनच वेगळी हातीं ठेवण्याचा सरकारचा विचार आहे. ज्या खर्चाची बजेटांत तरतूद नाहीं, परंतु जो खर्च करणें सध्याच्या युद्धपरिस्थितींत आवश्यक होईल, अशासाठी ह्या रकमेचा विनियोग केला जाईल. उदाहरणार्थ, सरकारनें आपल्या कनिष्ठ नोकरांस महागाईभत्ता देण्याचें ठरविलें आहे, त्याचा बारा महिन्यांचा खर्च सुमारें १२ लक्ष रुपये येईल, तो वरील फंडांतूनच भागविला जाईल.

---

### कर का कर्ज ?

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें फिनॅन्स बिलावर चर्चा झाली तीमध्यें युद्धाचे कारणामुळें जादा खर्च होत आहे त्याचा पैसा करांच्या मार्गानें का कर्जाच्या योजनेनें उभारावा ह्याविषयीं भिन्न भिन्न मतें प्रदर्शित करण्यांत आलीं. कोणत्याहि युद्धाचे चांगले, वाईट परिणाम दीर्घगामी असतात. ह्यास्तव त्याच्या खर्चाचा बोजा तें चालू असतां सर्वच्या सर्व सध्याच्या कर देणाऱ्यांनीं उचलावा हें केव्हांहि न्याय्य होणार नाहीं. युद्ध-खर्चाची तरतूद कर्ज उभारून केली असतां त्याचें व्याज व मुद्दल ह्यांचें ओझें चालू व पुढची पिढी ह्यांच्यामध्यें वाटलें जातें आणि ही विभागणी न्याय्य मानली जाते. तथापि, चालू पिढीनें युद्ध-खर्चाच्या बोजास मुळीच हातभार न लावतां तो आपणांमागून येणारांवर सबंद ढकलावा हें अयोग्य होईल. ह्यासाठी कर विरुद्ध कर्ज असा प्रश्न उपस्थित न करतां ह्या दोहोंचें परस्पर-प्रमाण काय असावें ह्याचाच विचार होणें आवश्यक आहे. हें प्रमाणहि अगदी काटेकोरपणानें ठरवणें अवघड असल्यानें तारतम्यानें त्याचा निश्चय होणें प्राप्त आहे. उद्योगधंदे व व्यापार ह्यांचेवर राष्ट्रीय जीवित अवलंबून असल्यामुळें त्यांची हानी होणार नाहीं अशा बेतानें कर बसवण्यांत यावे आणि जो पैसा अशा रीतीनें मिळणें व्यवहार्य नाहीं, तो कर्जाच्या मार्गानें उभारला जावा हें तत्व सरळ व न्याय्य दिसतें. युद्धामुळें ज्यांची मिळकत वाढेल त्यांचेवर करांचा अधिक बोजा टाकण्यास कांहींच हरकत नाहीं. त्याचप्रमाणें गरीब व सामान्य स्थितींतल्या जनतेस सहन होणार नाहींत असे कर टाळले गेले पाहिजेत हें उघड आहे. अशा प्रकारची प्रमाणबद्धता सर्वसाधारणपणानें सरकारच्या सांपत्तिक धोरणांत आहे किंवा नाहीं, हें प्रस्तुत प्रश्नाचा विचार होत असतां पाहिलें पाहिजे.

---

### ओगले ग्लास वर्क्स, लि.

**( वार्षिक सभा : ३० मार्च, १९४१ )**

वरील कंपनीचा १९४० अखेरचा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे, त्यावरून ओगले ग्लास वर्क्सच्या अभिनंदनीय प्रगतीची चांगली कल्पना येते. प्रभाकर कंदील ओगले ग्लास वर्क्सनें मार्गेच यशस्वी करून दाखविले, परंतु योग्य त्या संरक्षणाचें अभावीं परदेशी अनिष्ट व फाजील स्पर्धेस त्यांस तोंड देतां

आले नाहीं. आपल्या धंद्यास संरक्षण मिळावें ह्यासाठीं ओगले बंधूंनीं सतत प्रयत्न चालविले, परंतु त्यांच्या न्याय्य मागणीची चौकशीहि होण्याची वेळ आली नाहीं. त्या कारणानें, ओगले ग्लास वर्क्सला परदेशी कंदिलांच्या अवास्तव स्पर्धेची झळ सोसावी लागली व अनेक वर्षे हलाखींत काढावीं लागलीं. त्या काळांत कारखाना टिकवून धरण्यांत ओगले बंधूंनीं जी चिकाटी दाखविली व प्रगतीचे प्रयत्न चालविले, त्याचें चीज आतां होत आहे, ही अतिशय समाधानाची गोष्ट आहे. चालू युद्धाच्या प्रारंभानंतर बाजारभावांत सुधारणा झाली आहे. त्याचा फायदा कारखान्यास मिळत आहेच, परंतु त्या बरोबरच कारखान्याचें उत्पादनहि आतां पूर्वीपेक्षां पुष्कळ मोठ्या प्रमाणावर होऊं लागलें आहे. अनुकूल परिस्थितीची वाट पहाण्यांत ओगले बंधूंनीं जो आत्मविश्वास दाखविला, त्याचें फळ आतां दिसत आहे. १९३४ सालापासून चालू वर्षापर्यंत ओगले ग्लास वर्क्सला आपल्या मालमत्तेवर घसारा हि काढतां आला नाहीं, परंतु गेल्या एका वर्षाच्या नफ्यांतूनच सात वर्षांचा ४७½ हजार रुपये घसारा कंपनी काढूं शकली व तो काढून १९४० सालाचा २९,३३० रुपये नफा राहिला. त्यांत १९३९ च्या नफ्यांतून पुढें ओढलेले ७,०३८ रुपये मिळवले म्हणजे नफावाटणीस ३६३६८ रुपये उरतात. त्यांतून भागीदारांस ६% दरानें डिव्हिडंड द्यावें, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. उत्पादनाची पद्धत सुधारणें व तींत शक्य तेवढी काटकसर करणें, ह्या दृष्टीनें मॅनेजिंग एजंटांचा प्रयत्न चालू असून त्यांत त्यांस यश येत आहे. युद्धपरिस्थितीमुळें मिळालेल्या संधीचा फायदा घेण्यास ओगले ग्लास वर्क्स क्षम आहे, इतकेंच नव्हे तर युद्धसमाप्तीनंतर ही प्रगति अखंड टिकविण्याची त्याची शक्ति आहे. ह्या कंपनीचे नेतृत्त्वाखालीं चाललेल्या म्हैसूर ग्लास अँड एनॅमेल वर्क्स लि.चीहि प्रगति चांगली चालू आहे. ओगले बंधूंनीं दाखविलेल्या चिकाटीचें व कर्तबगारीचें चीज होत आहे, ह्याबद्दल सर्वांसच समाधान वाटेल. ओगले ग्लास वर्क्सची अखंड प्रगति होण्यास फक्त अनुकूल परिस्थितीचाच अभाव होता, परंतु ती आतां प्राप्त झाली आहे. तेव्हां तिचा पुरेपूर उपयोग करून पुढील मार्ग आक्रमण्याचें कार्य ओगले बंधू यशस्वी रीतीनें करतील, असा विश्वास आहे.

---

## कर्जदारांची सचोटी

अमेरिकेंतील एका विश्वविद्यालयानें बँकांच्या कर्जदारांच्या सचोटीसंबंधीं म्हणजे त्यांच्या कर्जफेडीच्या चोखशीरपणासंबंधी माहिती मिळवून त्यापासून खालीलप्रमाणें निष्कर्ष काढला आहे. एकूण १०० गुणांपैकीं ऑफिसांतील कारकुनांस सर्वांत अधिक म्हणजे ९२ गुण मिळतात, सर्वांत कमी म्हणजे ३८ गुण रंगाऱ्यांचे वाट्यास येतात. किरकोळ दुकानदारांस ९०, शाळामास्तरांस ८६, डॉक्टर लोकांस ७५, वकीलांस ६१, गिरणी कामगारांस ७१, पोलिसांस ५८, ह्याप्रमाणें गुण दिलेले आहेत. गिरणी-कामगारांत स्त्री-कामगारांची सचोटी पुरुष कामगारांपेक्षा १०%कमी आहे.

---

## सिनेमा ऑपरेटर्सची परीक्षा

मद्रास प्रांतांतील सिनेमा ऑपरेटर्सना ह्यापुढें एक सरकारी परीक्षा द्यावी लागेल. ही परीक्षा घेण्यासाठी त्या सरकारनें एक बोर्ड निर्माण केलें आहे.

## हिंदी विमा व्यवसायाचा उत्कर्ष कसा होईल ?

" हिंदुस्थानांतील विमा व्यवसाय कांहीं विशिष्ट पद्धतीस अनुसरून आजवर चालविण्यांत आलेला आहे. इंग्लंडमधल्या विमा पद्धतीची बरोबरी अथवा विमा गणिताच्या तत्वांची शब्दशः अंमलबजावणी हिंदी विमा व्यवसाय एकाएकी करूं शकणार नाहीं. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सला दिलेले भरमसाट अधिकार, विमापत्रकांच्या देण्यांची ५५% रकम सरकारी व तत्सम रोख्यांत गुंतविण्याची सक्ती, विमा कायद्यानुसार केलेले मूल्यमापनासंबंधीं कडक नियम, वाढलेला प्राप्तीवरील कर व सुपर टॅक्स आणि युद्धपरिस्थितीमुळें घटत चाललेलें नवें काम ह्या सर्व गोष्टी हिंदी विमा व्यवसायाचे प्रगतीस पोषक होतील, असें दिसत नाहीं. सध्या हिंदी विमा व्यवसाय ज्या स्थितींत आहे, त्याच स्थितींत ब्रिटिश व कॅनेडिअन विमा व्यवसाय एका काळीं होता व त्या वेळीं त्यास सरकारी मदत मिळाली नसती, तर इंग्लंडमधील व कॅनडांतील आजच्या मोठ्या कंपन्यांचें वैभव दृष्टीस पडलें नसतें. कंपन्यांचें वय, आर्थिक परिस्थिति, इत्यादींचा विचार न करतां त्या सर्वांचें एकाच पद्धतीनें नियमन करण्याचा ब्रिटिश कायद्यानें प्रयत्न केला नाहीं. विमा गणित्यांस जबाबदार व्यक्ती म्हणून तेथें गणण्यांत येत होतें व त्यांस नियमांनीं बांधून न टाकतां त्यांस थोडी मोकळीक देण्यांत आली होती. हिंदुस्थानांत विमा व्यवसायाचा उत्कर्ष व्हावयाचा असेल, तर सरकारनें त्याकडे अधिक सहानुभूतीनें पाहिलें पाहिजे. ":—इंडियन लाइफ असोसिएशनचे अध्यक्ष, मि. जे. एम. कॉर्डिरो, ह्यांचें भाषण.

---

## शत्रुपक्षीयाच्या मालकीचे ट्रेडमार्क

शत्रुपक्षाच्या ट्रेडमार्कचे ब्रिटिश हिंदुस्थानांतील हक्क इतर मालकी हक्काप्रमाणेंच, कस्टोडिअन ऑफ एनिमी प्रॉपर्टी इन इंडियाकडे देण्यांत आले आहेत, असें हिंदुस्थान सरकारनें मागें प्रसिद्ध केलें होतें. ट्रेडमार्कविषयीं हक्क हा व्यापारी गुडविलचाच एक विशिष्ट प्रकार आहे व गुडविलच्या हक्काची वर्गावर्गी झाली तरच ट्रेडमार्कची होऊं शकते; ट्रेडमार्कचा हक्क स्वतंत्रपणें देतां-घेतां येत नाहीं, असें आतां प्रसिद्ध झालें आहे. कस्टोडिअनकडे शत्रुपक्षीयाचा सर्वच व्यवहार सोपविलेला नसेल व केवळ त्याचा माल त्याचे स्वाधीन केलेला असेल तर ट्रेडमार्कवरील मालकी हक्क कस्टोडिअनला प्राप्त होत नाहीं. शत्रुपक्षीयाचा ट्रेडमार्क वापरणारावर इंडियन पीनल कोडाखालीं खटला भरतां येईल किंवा नाहीं, हें फसवणुकीच्या शक्याशक्यतेवर अवलंबून राहील.

---

## कंपनी कायद्याखालील नवे नियम

इंडियन कंपनीज ॲक्टांतील १५१ व्या कलमान्वयें, ॲक्टास जोडलेल्या पहिल्या परिशिष्टांतील टेबल्स व फॉर्म्स बदलण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल इन कौन्सिलला आहे. तथापि शेड्यूलमध्यें सांगितलेल्या, रजिस्ट्रारला द्यावयाच्या फीची रकम वाढविण्याचा अधिकार त्यास नाहीं. केलेला फरक गॅझिटांत प्रसिद्ध केला, म्हणजे त्यास कायदेशीर स्वरूप प्राप्त होतें. ह्या कलमास अनुसरून, हिंदुस्थान सरकारनें कांहीं नवीन नियम केले आहेत, ते १ एप्रिल, १९४१ रोजीं अमलांत येतील व त्या तारखेपासून पूर्वीचे नियम रद्द होतील. कांहीं विशिष्ट तक्ते रजिस्ट्रारकडे दाखल करण्यास सध्यां ५ रुपये फी पडते, ती ह्यापुढें ३ रुपये करण्यांत आली आहे.

## मुंबई येथील अखिल भारतीय औद्योगिक परिषद व महाराष्ट्रांतील संघटना

(लेखकः—श्री. एन्. जी. आपटे, बी. एजी., जलशास्त्रपारंगत, मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्टस् कं. लि. पुणें)

मुंबई येथें नुकतीच अखिल भारतीय औद्योगिक परिषद भरली. या परिषदेंत प्रामुख्यानें मध्यम व लहान धंद्यांचाच विचार झाला. या विचारांत अर्थातच सर्वसाधारण ज्या तक्रारी आहेत त्यांचाच विचार होणें अपरिहार्य होतें व त्याप्रमाणेंच घडलें. परिषदेचे अध्यक्ष सर विश्वेश्वरअय्या यांचा बराचसा कटाक्ष परिषद यशस्वी होऊन त्यानंतरचें कार्य नेटानें व चिकाटीनें होण्यावर होता. त्यास अनुसरूनच त्यांनीं चालकांना वेळोवेळीं सूचना दिल्या होत्या. परिषदेंतील सर्वच ठराव महत्वाचे व अत्यंत समयोचित होते. परंतु महाराष्ट्राच्या दृष्टीनें विचार करतां मात्र त्यांतील दोन चारच महत्वाचे होते व त्याच ठरावांवर फक्त महाराष्ट्रांतील परिषदेस गेलेले कारखानदारांचे, मराठी चेंबरचे व छापखानदार संघाचे प्रतिनिधी बोलले.

### प्रादेशिक संघटना

महाराष्ट्राचा सर्वसाधारण विचार केला तर औद्योगिक उन्नतीचा प्रयत्न नुकताच सुरू झाला आहे व ज्याचे भांडवल १० लाखांचे आहे असे कारखाने बोटावर मोजण्याजोगेच भरतील. १ लाख ते १० लाख या सदरांत १०।१५ पर्यंत येतील्से वाटतें. बाकीचे त्यांच्या आंतच आहेत, एकंदर सुमारें २५० कारखान्यांपैकीं फारच थोडे कारखाने वरीलप्रमाणें मोठे असल्यानें महाराष्ट्रांत सध्यां बहुतेक कारखाने लहानच आहेत. त्या दृष्टीनेंच महाराष्ट्रांतील औद्योगिक संघटनेचा विचार करावयास पाहिजे ही गोष्ट अगदीं उघड आहे. हे कारखाने नवीनच असल्यानें त्यांना सर्वच प्रकारच्या संरक्षणाची व मदतीची अपेक्षा आहे. आणि त्यासाठीं प्रथमतः संघटनेची आवश्यकता आहे. मुंबई एथें जे २।४ महत्वाचे ठराव म्हणून झाले त्यात हा संघटनेचा ठराव होता. या ठरावाप्रमाणें एक अखिल भारतीय संघटना निर्माण करावयाची व त्या संघटनेमार्फत औद्योगिक बाबींतील अडचणी वगैरेंचें निवारण करावयाचें अशा आशयाचा होता. या अखिल भारतीय संघटनेचे घटक म्हणून प्रादेशिक समित्या निर्माण करावयाच्या व या प्रादेशिक समित्यांनीं आपल्या प्रदेशांतील सर्व कारखानदारांची चौकशी करून त्यांच्या अडचणी अ. भा. सभेमार्फत सरकार अगर जनता अथवा परदेश यांचे पुढें मांडून त्यांची विल्हेवाट लावण्याची खटपट करावयाची. या प्रादेशिक समितीनें अ. भारत समितीमार्फत वरीलप्रमाणें कार्य करून घेत असतांना आपल्या प्रदेशांत काय काय होणें शक्य आहे, कच्चा माल कोणता आहे त्याचा जास्तीत जास्त उपयोग आपल्या प्रदेशाचे उन्नतीकडे कसा करून घेता येईल व त्यामुळें आपल्या देशाची संपत्ति कशी वाढेल, याचाही विचार करावयाचा आहे. त्याचप्रमाणें आपल्या प्रदेशांतील भागाचे लहान लहान घटकापर्यंत ही संघटना कशी पसरविता येईल याचाही विचार करून त्याप्रमाणें कार्य करावयाचें आहे, व ही संघटना शेवटीं तालुके व शहरें यापर्यंत पोहोचवावयाची आहे. अशा संघटनेची आवश्यकता तर आहेच; परंतु नसल्यास यापुढें नुकसान मात्र होण्याचा संभव आहे. अशा प्रकारे या परिषदेतून एक महत्वाची संघटना निर्माण होत आहे. त्याचा महाराष्ट्रानें फायदा घेणें आवश्यक व अगत्याचें आहे. परिषदेत आणखी महत्वाचा ठराव म्हणजे तयार झालेल्या मालाच्या विक्रीच्या योजनेचा होय.

### विक्रीचें मध्यवर्ती केंद्र

महाराष्ट्रांतील लहान लहान धंद्यांचा विचार करता त्यांपैकीं प्रत्येकाला स्वतंत्र विक्रीची संघटना निर्माण करता येण्याजोगी नाहीं ही गोष्ट अगदीं उघड आहे. अशा परिस्थितींत एक मध्यवर्ती विक्री करणारी संस्था असल्यानें फारच फायदा होणारा आहे. या प्रकारचा प्रयत्न करीत असतांना संघटित जाहिरात, संघटित खरेदी, संघटित यंत्रनिर्मिति, संघटित प्रचार वगैरे गोष्टी या मध्यवर्ती संस्थेमार्फत आपोआपच होतील. या संस्थेचें मुख्य काम म्हणजे कारखानदारांचा माल पाहून तो चांगल्या मगदुराचा आहे किंवा नाहीं तें ठरवून त्याच्या खपाची हमी देऊन विकत घेणें हें होय. त्याचप्रमाणें अशा कारखानदारांना कच्चा माल घाऊक भावानें घेऊन पुरवठा केला पाहिजे. कारखानदारांच्या मालाचीं जिल्हानिहाय केंद्रें काढून त्यांच्या विक्रीची व्यवस्था करावयास पाहिजे व त्या ठिकाणीं तात्कालिक व कायम प्रदर्शनें व प्रात्यक्षिकें दाखविलीं पाहिजेत व वर्षभर या कारखानदारांचा माल समाजाच्या नजरेपुढें कायम राहील, अशी व्यवस्था केली पाहिजे. (अशा प्रकारचा प्रयत्न पुणें एथें सध्या लेखकानें चालविला आहे. त्यांत सुमारें २५ कारखानदारांचा माल आहे.)

इतरहि अनेक ठराव परिषदेनें मंजूर परंतु त्यांपैकीं बहुतेकांचा आशय सरकारला विनंती करावी असाच होता. व तोही रास्तच होता. आज सरकावर दडपण आणून कार्यभाग उरकावा हें म्हणणेंच शक्य नाहीं. कारण तशी प्रभावी संघटनाच अस्तित्वांत नाहीं. यासाठींच संघटनेचा ठराव अत्यंत महत्वाचा असें वर म्हटलें आहे. या संघटनेसाठीं पैसा आवश्यक आहे आणि तो पैसा कारखानदारांच्या मालाची विक्री झाल्याशिवाय मिळणार नाहीं. यासाठीं परिषदेंतील दोन ठराव परिणामीं फारच महत्वाचे ठरतील. महाराष्ट्राचा विचार करतां महाराष्ट्रानें आपली प्रादेशिक समिती स्थापन करणें अत्यंत अवश्यक आहे. महाराष्ट्रांत सध्यां उणेपुरे २००।२५० लहान लहान धंदे आहेत. या सर्वांना महाराष्ट्राची प्रादेशिक संघटना आवश्यक एवढेंच नव्हे पण अपरिहार्य आहे. अशा प्रकारची संस्था निर्माण झाली तर पुढील गोष्टी यथाक्रम होतीलच. या प्रकारच्या प्रादेशिक संघटनेचें काम, परिषदेचे वेळीं लेखकानें त्याची आवश्यकता पाहून करण्याचें, संघटणेच्या ठरावास पुष्टी देतांना सांगितलें आहे. महाराष्ट्रांतील कारखानदारांनीं वरील विचार ध्यानांत घेऊन या संघटनेंत भाग घ्यावा. संघटना करण्यास कोणीतरी प्रारंभ करणें अवश्यक असल्यानें सध्या माहिती जमा करण्याचें काम करण्यास सुरवात केली आहे. तरी महाराष्ट्रांतील कारखानदारांनीं आपली समग्र माहिती व पत्ता वगैरे माझेकडे वरील पत्त्यावर पाठवावा. त्याचप्रमाणें वरील परिषदेंतील विचारसरणीबाबत स्वतःचेंहि मत कळवावें व महाराष्ट्राच्या संघटनेबाबत कांहीं सूचनात्मक लिहावयाचें असल्यासहि लिहावें. ही समग्र माहिती जमविल्यावर महाराष्ट्रांतील कारखानदारांची एक परिषद भरवून या प्रादेशिक संघटनेची निश्चित योजना ठरविण्यांत येईल. तरी महाराष्ट्रांतील कारखानदारांनीं परिषदेसंबंधीं आपलें मत, आपली समग्र माहिती व पत्ता इतकी माहिती मजकडे ९२३ पू सदाशिव या पत्त्यावर पाठवावी.

## सहकारी दिनाची सभा

रविवार ता. ९-३-४१

**स्थळ :** नंदुरबार म्युनिसिपल हॉल. वेळ: सायंकाळीं ६ वाजतां.

सभेस नंदुरबार म्युनिसिपल सर्व्हंटस को. सोसायटी, नंदुरबार मुस्लिम अर्बन को. सोसायटी, नंदुरबार चर्मकार, आणि नंदुरबार अर्बन अशा चार स्थानिक सहकारी संस्थांचे सभासद, प्रॉव्हिन्शिअल को. ऑ. बँकेचे सीनिअर इन्स्पेक्टर, इन्स्पेक्टर, एजंट, क्लार्क, श्री. आर. डी. कुलकर्णी, बी. ए., ट्रेझरी ऑफिसर नंदुरबार व इतर स्थानिक सभ्य गृहस्थ असे एकंदर ५० लोक उपस्थित होते.

श्री. दुसाणेवाला यांनीं आजच्या सभेचें अध्यक्षस्थान श्री. डी. के. जहागिरदार यांनीं स्वीकारावें अशी सूचना मांडली तीस श्री. शेख मुनीर शेख दगू यानीं अनुमोदन दिलें.

ईशस्तवन झाल्यावर सभेच्या कामास सुरुवात झाली.

अध्यक्षांनीं सुचविल्यावरून श्री. धारप, सीनिअर इन्स्पेक्टर यांनीं संदेश वाचून दाखविला. नंतर निरनिराळ्या सोसायट्यांचे अहवाल वाचून दाखविण्यांत आले.

सवलतीच्या योजनेबद्दल श्री. धारप यांनीं स्पष्टीकरण करून शेतकी सोसायट्यांनीं या योजनेचा कसा फायदा घेतला हें सांगितलें. अर्बन सोसायट्यांनाहि, त्यांनीं जर खात्याकडे मागणी केली तर अशा तऱ्हेची योजना मंजूर करून घेतां येणें शक्य आहे. तरी जरूर वाटल्यास त्यांनीं त्याप्रमाणें मागणी करावी.

इतर वक्त्यांना बोलण्याबद्दल अध्यक्षांनीं विनंति केल्यावरून श्री. संढागळे, बँक इन्स्पेक्टर, यांनीं सहकारी चळवळीबद्दल विवेचन केलें. त्यांनीं सांगितलें कीं, सहकारी तत्त्वाचा समावेश ' भांडवलशाही ' किंवा ' मजुरशाही ' यांत न होतां ती चळवळ ' एकासाठीं सर्व आणि सर्वांसाठीं एक ' या तत्त्वावर आधिष्ठित आहे. हिंदुस्थानांतील ऋणग्रस्त शेतकऱ्यांना आपली सर्वतोपरी उन्नति करून घेण्यास सहकार्याशिवाय दुसरा तरणोपाय नाहीं. सहकारी संस्था यशस्वी आणि कार्यक्षम व्हाव्यात असें वाटत असेल तर अशा संस्थांची वसुली वक्तशीर आणि चांगली झाली पाहिजे. यापुढें सर्वांनीं, विशेषतः शेतकऱ्यांनीं, सहकारी चळवळीस आपलें जीवन समजावयास पाहिजे.

नंतर श्री. आर. डी. कुलकर्णी यांनीं सांगितलें कीं, सहकारी चळवळीचें स्वरूप प्रत्येक देशांत स्थानिक गरजांप्रमाणें असतें. युरोपमध्यें ही चळवळ स्टोअर्सच्या रूपानें अवतरली. आपल्याकडे ती शेतकी पतपेढ्यांच्या स्वरूपांत दिसत आहे. पेढ्यांच्या सभासदांनीं संस्था आपली आहे, अशा भावनेनें तिच्याशीं वागावें. सहकारी संस्थेंत व्यवहाराचें शिक्षण मिळून मनुष्य हिशेबी बनतो. चालकांच्या अंगीं त्यागवृत्ति बाणते. ज्या प्रमाणांत प्रत्येक सभासदाचे अंगीं संस्थेबद्दल आपुलकी आणि तिच्यासाठीं त्याग करण्याची तयारी उत्पन्न होईल तितक्या प्रमाणांत सहकारी संस्था यशस्वी होतील.

शेवटीं अध्यक्षांनीं खालील आशयाचें भाषण केलें:—

आतां या ठिकाणीं वाचलेल्या सोसायट्यांच्या अहवालांपैकीं नंदुरबार मुस्लीम अर्बन सोसायटीच्या अहवालांत दिसून आलेली तिची प्रगति कौतुकास्पद आहे. या सोसायटींतील सभासदांमध्यें एकी आणि संघटना असून तिचें कर्णधारत्व श्री. इनामदार यांच्यासारख्या निःस्वार्थी आणि निरलस कार्यकर्त्यांकडे आहे आणि त्यामुळेंच तिची सालोसाल प्रगति होत आहे. या सोसायटींतील सभासदांना सोसायटीपासून फायदा होत आहे. इतर सोसायट्यांनींहि या सोसायटीचा आदर्श आपल्यापुढें ठेवावा आणि आपली प्रगति करून घ्यावी. नंदुरबार अर्बन बँकेंतहि वसुलीचे बाबतींत सुधारणा दिसून येत आहे. ही बँकहि लौकरच आपली जास्त प्रगति करील अशी आशा आहे.

### सहकाराची नैतिक बाजू

पूर्वीची ' उत्तम शेती ' ही म्हण मागें पडली याला कारण शेती नसून आपल्या अंगीं बाणलेला आळस, आपण करीत असलेला बेरवाजवी खर्च हा आहे आणि म्हणून शेती कनिष्ठ झाली. सहकारी चळवळ ही आर्थिक असून शिवाय तीस नैतिक पाठबळहि आहे. पण अलीकडे या चळवळीचा नैतिक ऱ्हास होत असल्यामुळें ती व्हावी तितकी यशस्वी होत नाहीं. ती पूर्णपणें यशस्वी व्हावी असें वाटत असेल तर तिच्या नैतिक बाजूवर जोर द्यावयास हवा. कर्ज काढणें आणि परत वसुली करणें यांत प्रामाणिकपणा हवा; नुसती यांत्रिक पद्धत नको. सावकार आणि पतपेढी हीं बाह्यात्कारी एक दिसलीं तरी त्यांच्यांत अंतर आहे. सावकार कुळाची ऐपत पाहून कर्ज देतो पण पेढी पत पाहून देते, सावकाराचें कर्ज भरमसाट असतें, पेढीच्या कर्जास बंधन असतें. सहकारी चळवळीमुळें शिस्त, संघटन, एकोपा यांचें शिक्षण मिळून व्यवहारवृत्ति अंगीं बाणते, उत्पन्न पाहून खर्च करावा अशी शिकवण मिळते आणि अशा तऱ्हेनें ही चळवळ मनुष्याच्या उन्नतीस पोषक ठरते. सोसायटीपासून होणारा नफा सावकाराच्या नफ्यासारखा एकट्याच्या मालकीचा न राहतां सर्वांच्या मालकीचा राहतो. अशा तऱ्हेच्या या चळवळीपासून सर्वांनीं आपला फायदा करून घ्यावा.

शेवटीं श्री. दुसाणेवाला यांनीं अध्यक्षांचे आणि जमलेल्या सर्व सभासदांचे आणि सभ्यगृहस्थांचे आभार मानले. पानसुपारी होऊन समारंभ संपला.

## डायरेक्टरांचा मेहनताना

लिमिटेड कंपन्यांच्या आर्टिकलसमध्यें तशी तरतूद नसेल, अथवा भागिदारांनीं साधारण सभेंत संमति दिलेली नसेल तर डायरेक्टरांस त्यांच्या कामाबद्दल मेहनताना घेतां येणार नाहीं. डायरेक्टरांस खालीलपैकीं कोणत्याहि रीतीनें फी घेतां येते:—

(१) आर्टिकल्सनीं ठरविलेली एकूण रक्कम आपआपसांत वाटून घेणें.

(२) आर्टिकल्सनीं ठरविलेली प्रत्येक डायरेक्टरास व अध्यक्षास द्यावयाची रकम त्याप्रमाणें घेणें.

(३) आर्टिकल्सनीं ठरविल्याप्रमाणें सभेस हजर राहिल्याबद्दल रकम घेणें अथवा एकूण रकम डायरेक्टरांनीं त्यांच्या हजेरीच्या प्रमाणांत वाटून घेणें.

(४) ठराविक मेहनतान्याचे ऐवजी अथवा त्याखेरीज आणखी रकम नफ्याचे ठराविक प्रमाणांत घेणें.

(५) कंपनीची साधारण सभा ठरवील, त्याप्रमाणें मेहनताना घेणें.

सभांच्या हजेरीच्या प्रमाणांत फी घेण्याचा प्रघात साधारणतः आढळतो. ही फी हें त्यांस कंपनीचें देणें लागतें व इतर घेणेंदारांप्रमाणेंच त्यांची भूमिका रहाते. आर्टिकल्सनीं डायरेक्टरांस बोर्डाच्या सभेस हजर रहाण्यासाठीं प्रवासखर्च देण्याची तरतूद केलेली असेल, तरच त्यांस तो मिळूं शकतो. नाहींतर फीमध्येंच त्या खर्चाची व्यवस्था केलेली आहे, असें समजलें जातें.

## बाटांचे बूट

बाटा बूट जगप्रसिद्ध आहेत. बाटाचे कारखाने जगाच्या प्रत्येक भागांत आहेत. हिंदुस्थानांत बाटांच्या बुटांचा कारखाना बाटानगर येथें १९३२ मध्यें सुरू झाला. दहा वर्षांच्या कालावधींत प्रत्येक महत्त्वाच्या शहरांत बाटा कंपनीचीं स्वतंत्र दुकानें थाटण्यांत आलेलीं दिसतात.

टॉमस बाटा यांनीं वयाच्या बवदाव्या वर्षी शाळा सोडून बूट तयार करण्याच्या वडिलांच्या धंद्यांत प्रवेश केला. त्यानंतर बाटांनीं स्वतंत्र धंदा करण्याचा प्रयत्न केला. त्यांत अननुभव व भांडवलाचा अभाव या दोन कारणांनीं त्यांना अपयश आलें. परत वडिलांकडे जाऊन त्यांनीं धंद्यास सुरवात केली. त्यांत हळूहळू यशहि येऊं लागलें. पुढें कामगारांची संख्या कामाचे मानानें अपुरी पडूं लागली म्हणून हातानें चालविण्याचीं यंत्रें बसविण्यांत आलीं. भांडवलाची सोय झाल्यावर उत्पादन अखेरीस पुरेशा यंत्रशक्तीनेंच करण्यांत येऊं लागलें. त्यानंतर बाटांनीं युरोपमधून अमेरिकेस प्रयाण करून तेथील बुटांच्या कारखान्यांत प्रत्यक्ष काम केलें. त्याचा उपयोग त्यांना पुढें अतिशय झाला.

१९३१ मध्यें हिंदुस्थानांत धंद्याच्या दृष्टीनें पाहाणी करण्याकरितां बाटा आले असतांना बाटांनीं म्हटलें आहे:—" ३५ कोटि हिंदी लोकांपैकीं फक्त १ (एक) कोटि माणसांनाच पादत्राण विकत घेऊन वापरण्याचें सामर्थ्य आहे. आणि बाकीचीं ३४ कोटि माणसें अनवाणी चालतात. युरोपांत बर्फावरून अनवाणी चालण्यापेक्षां हिंदुस्थानांतील उन्हानें चरचरणाऱ्या जमिनीवरून चालणें अधिक क्लेशाचें आहे."

बाटांचा हिंदुस्थानांतील कारखाना बाटानगर येथें आहे. बाटानगर ही झेकोस्लोव्हाक मंडळींनी नदीकांठीं वसविलेली, बागा उद्यानांनीं नटलेली आणि औद्योगिक हालचालींनीं गजबजणारी एक नमुनेदार वसाहत आहे.

## मुख्य मुख्य खतांतील द्रव्यें.

| खताचें नांव. | सत्त्वांश—शेंकडा प्रमाण. नायट्रोजन | पोटॅश | फॉस्पेरिक ॲसीड | किंमती अदमासें |
|---|---|---|---|---|
| सल्फेट ऑफ अमोनिया. | २० | ... | ... | ११ रु. पोतें, २२४ पौंड. |
| नायट्रेट ऑफ सोडा ... | १५½ | ... | ... | १३ रु. „ |
| सुपर-फॉस्पेट ... | ... | ... | २० | ६ रु. „ |
| सल्फेट ऑफ पोटॅश ... | ... | ४८ | ... | १२ रु. „ |
| हाडांचा चूर (बोनमील). | ३ ते ४ | ... | २३ | ८ रु. „ |
| भुईमुगाची पेंड ... | ६ ते ७ | [illegible] | १¼ | ७॥ ते ८ रु. पल्ला, २४० पौंड. |
| करडईची पेंड ... | ६ ते ७ | १½ | २½ | „ |
| एरंडीची पेंड ... | ३½ ते ४ | १ | १½ | ५ ते ६ रु. पल्ला. |
| मासळी ... | ५½ ते ६ | [illegible] | ३½ | „ |
| शेणखत ... | ½ ते ¾ | [illegible] | ¼ | गाडीस ८ आणेपासून २ रु. पर्यंत. |
| गुरांचें मूत्र ... | ¾ ते १ | ½ | थोडें | „ |
| सोनखत ... | ४/५ | १ २/५ | २ २/५ | „ |
| घरगुती राख ... | १ ते २ | ३ ते ३½ | २ २/५ | „ |
| लेंडीखत ... | ७ | ६ | ४ | „ |


दि

बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो

बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी

लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट

पुणें शाखा — डेक्कन जिमखाना



DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,

FORT, BOMBAY.

The Only Book Depot of its Kind in India.

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | ११२—० |
| ४% १९४३ | १०४-१० |
| ३½% विनमुदत | ९६—० |
| ३½% १९४७-५० | १०२—४ |
| ३% ( १९६३-६५ ) | ९५—० |
| २¾% १९४८-५२ | ९६-१५ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) | ११४—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०८—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४३—० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५५२—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ७½% | १३६—८ |
| कराची ( १०० ) ९% | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २२५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १६०२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १८१०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% | १०४—४ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) १½% | ६३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८४५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६७०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २०८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. | ४८—८ |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. | २१—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ८ आ. | ४१—९ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३९३५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१३-१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४९—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३९२—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १९६०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १३९—८ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४३-१२-६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६३—२-६ |


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

"अर्थ" ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

## रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदाजवळ, पुणें २.

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख २ एप्रिल, १९४१ | अंक १४

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाउस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

**L. S. G. D.** Training classes for officers of Local Self Government Service under the auspices of the Government of Bombay and the Local Self Government Institute, will begin from ***1st May, 1941 at Bombay, Ahmedabad and Poona.***

**Fees Rs. 75**

***Apply for Prospectus to:***

THE HONORARY SECRETARY,
410 Shanwar, Poona 2
or
THE DIRECTOR,
11, Elphinstone Circle, Fort, BOMBAY

**देशी औषधें तयार करणारा**
**महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना**
पंडु, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

# रक्तवर्धक

**वापरा.**

**सर्वत्र मिळतें.**

—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा**
**पुणें, लि.** पुणें ४.




**मधुमेहावरील**
**औषध**

**तीन आठवड्यांचे**
**औषधास फक्त रु. ७**

— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

**K. K. & Co.**
**Photographic Dealers**
POONA.

# विविध माहिती

### रहाणीच्या खर्चाचे मानांत वाढ

मुंबई शहरांतील कामगारांच्या रहाणीच्या खर्चाचें मान वाढत चाललें आहे. जून, १९३४ अखेरच्या वर्षाचें सरासरी खर्चाचें मान १०० मानलें, तर १५ जानेवारी अखेरच्या महिन्यांत ११७ होतें व १५ फेब्रुवारी अखेरच्या महिन्यांत ११९ झालें.

### साखरेची हिंदुस्थानांत आयात

| | | टन |
|---|---|---|
| १९३७–३८ | एप्रिल ते मार्च | १३,७१५ |
| १९३८–३९ | " | ३२,७१५ |
| १९३९–४० | " | २,५१,७०६ |
| १९३९–४० | एप्रिल ते सप्टेंबर | १,८८,५२६ |
| १९४०–४१ | " | १२,७४६ |

### टाऊन प्लॅनिंग योजना

टाऊन प्लॅनिंगचा कायदा १९१५ सालीं मुंबई प्रांतांत अंमलांत आला, तेव्हांपासून टाऊन प्लॅनिंगच्या एकूण ७३ योजना हातीं घेण्यांत आल्या, त्यापैकीं ३८ योजनांस सरकारची मंजुरी मिळालेली आहे. उरलेल्या ३५ योजनांपैकीं १३ योजना स्थानिक स्वराज्य संस्थांनीं परत घेतल्या अथवा सरकारनें त्यांस मंजुरी दिली नाहीं. २२ योजनांची अद्याप पूर्ण तयारी झालेली नाहीं.

### हैद्राबाद येथें कांचकारखाना निघणार

दक्षिण हैद्राबाद येथें एक कांचकारखाना लवकरच स्थापन होण्याचा संभव आहे. कारखान्यास लागणाऱ्या २५ लक्ष रुपये भांडवलापैकीं २० लक्ष रुपये निजाम सरकार देईल व ५ लक्ष रुपयांचें भांडवल लोकांस घेतां येईल, असें समजतें.

### उसाची लागवड

हिंदुस्थानांतील उसाच्या एकूण लागवडीपैकीं ५३·१% लागवड संयुक्तप्रांतांत, ११·९% पंजाबांत, १०·५% बिहारमध्यें, ७·८% बंगालमध्यें, ३% मुंबई प्रांतांत, २·८% मद्रास प्रांतांत, १·५% सरहद्द प्रांतांत व १% आसामांत होते. चालू मोसमांतील एकूण लागवड ४५ लक्ष, ५९ हजार एकरांत झालेली आहे, म्हणजे गेल्या वर्षाचे मानानें ती २५% वाढली आहे. गुळाच्या उत्पादनांत २३% वाढ अपेक्षित आहे. मुंबई प्रांतांतील अंदाजी लागवड १३ लक्ष एकर इतकी आहे.

### स्वदेशी कॉटन मिल्स कं. लि. कानपूर

वरील कंपनीस डिसेंबर १९४० अखेर २० लक्ष, ९६ हजार रुपये नफा झाला. त्यांतून करासाठीं तरतूद म्हणून ७½ लक्ष रुपये व घसाऱ्याचे ८½ लक्ष रुपये बाजूस काढून ठेवण्यांत आले. भागीदारांस प्रेफरन्स भागांवर कर माफ ६% व ऑर्डिनरी भागांवर करमाफ ५% डिव्हिडंड देऊन ८ लक्ष, १६ हजार रुपये पुढील वर्षाचे हिशेबांत ओढण्यांत यावयाचे आहेत. कंपनीचे भांडवल ३५ लक्ष रुपये आहे.

### आय. सी. एस. उमेदवारांचें शिक्षण

हिंदी सनदी नोकरीसाठीं निवडलेल्या उमेदवारांस प्रत्यक्ष नोकरीवर घेण्यापूर्वी शिक्षण दिलें जातें, तें आजवर ग्रेट ब्रिटनमध्येंच दिलें जाई. युद्धपरिस्थितीमुळें तें यंदा हिंदुस्थानांत देण्यांत येत आहे. हा प्रयोग यशस्वी होत आहे असें दिसतें. २९ उमेदवार सध्यां डेहराडून येथें शिक्षण घेत आहेत.

### हिंदी मोटारींचा कारखाना

श्री. वालचंद हिराचंद हे मोटारगाड्यांचा कारखाना हिंदुस्थानांत काढणार असल्याचें मागेंच जाहीर झालें आहे. ह्या कारखान्याचें ठिकाण म्हैसूरमध्यें आहे. तेथील सरकारनें १½ कोटि रुपयांच्या भांडवलाची व गुंतलेल्या भांडवलावर १० वर्षें पर्यंत ३½% व्याजाची हमी घेतली आहे. मोटार कंपनी येत्या महिन्यांत म्हैसूरमध्यें नोंदली जाईल, तिचे श्री. वालचंद हिराचंद, श्री. तुळशीदास सिलाचंद व श्री. धरमसी खटाव हे मॅनेजिंग एजंट होतील. पहिली हिंदी मोटार चालू वर्षअखेर तयार होईल, अशी अपेक्षा आहे.

### व्हिक्टोरिया राणीछाप रुपये

व्हिक्टोरिया छापाचे रुपये ३१ मार्च १९४१ पासून कायदेशीर चलन राहिलेले नाहींत. तथापि, ३१ सप्टेंबर १९४१ पर्यंत ते सरकारी तिजोऱ्यांत स्वीकारले जातील, व त्यांचे बदली तेथें चालू चलन मिळूं शकेल. पोस्ट ऑफिसांत ते रुपये देऊन कार्डें, पाकिटें, इत्यादि घेतां येतील. ३१ सप्टेंबर नंतर मात्र रिझर्व्ह बँकेच्या मुंबई व कलकत्ता येथील शाखांत ते चालतील. सरकारी रेल्वेजच्या स्टेशनांवर राणीछाप रुपये दिले असतां तिकीट मिळूं शकेल.

### सिव्हिक गार्ड

१ फेब्रुवारी, १९४१ अखेर सबंद हिंदुस्थानांत मिळून ४८७०० सिव्हिक गार्ड नोंदण्यांत आले आहेत. पंजाब, मद्रास व बंगाल या प्रांतांत सर्वांत अधिक, प्रत्येकांत १० हजारापेक्षां अधिक सिव्हिक गार्ड आहेत.

### औरंगाबाद येथें रेडिओगृह

औरंगाबाद येथील रेडिओगृहांतून ब्रॉडकास्टिंग करण्यास ४ एप्रिल रोजीं प्रारंभ होईल.

### पालकांची तक्रार

बनारस हिंदु विश्वविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेचे इंग्रजी विषयांतील प्रश्न अवघड काढल्याबद्दल, उमेदवारांच्या पालकांनीं विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे.

### फाटक्या नोटा बदलून घेण्याची सोय

फाटलेल्या अथवा चुरगळलेल्या रुपयावाल्या नोटांचे बदली दुसरें चलन मिळण्याची सध्यां भासत असलेली अडचण दूर करण्याचे उद्देशानें सरकारी ट्रेझरी ऑफिसें व इंपीरिअल बँकेच्या शाखा ह्यांत त्या स्वीकारल्या जाण्याची व्यवस्था आतां करण्यांत आली आहे.

### मद्रास सरकारचें अंदाजपत्रक

मद्रास सरकारच्या १९४१–४२ च्या अंदाजपत्रकाप्रमाणें येत्या वर्षाच्या हिशेबांत १२½ लक्ष रुपयांचा वाढावा अपेक्षित आहे.

### सेंचरी स्पिनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

वरील कंपनीस १९४० सालीं २ लक्ष, २० हजार रुपये नफा झाला. भागीदारांस १२% डिव्हिडंड मिळेल. कंपनीच्या 'कर' रिझर्व्ह फंडांत ३ लक्ष, ३६ हजार रुपये आहेत.

### टाटा केमिकल्स लि.

वरील कंपनी सोडा ॲश, कॉस्टिक सोडा, ब्लीचिंग पावडर, क्लोरिन, इत्यादींच्या उत्पादनासाठी मिठापूर येथें कारखाना बांधीत आहे. आवश्यक ती जमीन बडोदें सरकारनें अक्वायर करून कंपनीस दिली आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... १५८ | याचा जर्मनीशी करार–हिट-लरची हिकमत फसली. | |
| २ पोलाद, साखर व जरतार ह्यांस संरक्षण | ... १५९ | ६ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या | ... १६३ |
| ३ हवापाण्याचें शास्त्र | ... १६० | ७ नीमायर योजना व प्राप्ती-वरील कराची वाटणी | ... १६५ |
| ४ हातमागाचा धंदा व तो कसा सुधारावा | ... १६० | ८ न्यू प्रॉव्हिडंट इं. कं. लि. | १६५ |
| ५ स्फुट–विचार व्यवसाय-कर–युद्धसामानाचा पुरवठा व मुंबई–युगोस्लाव्हि- | ... १६१ | ९ निवडक बाजारभाव... | १६६ |

अर्थ

बुधवार, ता. २ एप्रिल, १९४१

## पोलाद, साखर व जरतार ह्यांस संरक्षण एक वर्ष चालू

हिंदी स्वदेशी धंद्यांस जकातींचें संरक्षण देण्यांत आलें आहे त्यास कालमर्यादा घातलेली असून जरूरीप्रमाणें तें कमीअधिक केलें जाण्याचीहि तजवीज आहे. पोलाद, साखर व जरतार ह्या धंद्यांच्या संरक्षणांत बदल करण्याचा प्रसंग आला असतां मध्य-वर्ती असेंब्लींत तें तूर्त चालू रहावें अशा आशयाची सूचना आंत असलेलें बिल सर रामस्वामी मुदलियार ह्यांनीं पुढें मांडलें. त्या-संबंधानें उलट सुलट मुद्यांनीं भरलेलीं भाषणें झालीं आणि अखेर सरकारची सूचना मान्य झाली. बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठवावें अशी कालहरणकारक व विरोधी उपसूचना असेंब्लींत चर्चेसाठीं पुढें आली होती आणि तिच्या अनुषंगानें औद्योगिक संरक्ष-णाच्या धोरणावर बरीच भवति न भवति झाली. सभासदांचे मुद्दे आणि कोटिक्रम आणि त्यांस व्यापारमंत्र्यांनीं दिलेलीं उत्तरें ह्यांचें स्वरूप ध्यानांत येण्यासाठीं त्यांचा गोषवारा येथें देण्यांत येत आहे. कोणत्याहि धंद्यास संरक्षण देण्यांत आलें असतां त्याची अंमलबजावणी देशाच्या सर्व भागांत नीट होत आहे कीं नाहीं, इकडे मध्यवर्ती सरकारनें लक्ष पुरवावें आणि तें संरक्षण अपुऱ्या काळाचें नसावें. साखरेच्या कारखान्यांचें केंद्रीकरण विशिष्ट प्रांतांत झालें आहे, त्यांच्या सरकारांचें धोरण सदरहु धंद्याच्या इतर ठिकाणीं होणाऱ्या विस्तारास प्रतिकूल असतां कामा नये. संरक्षित धंद्यांच्या परिस्थितीची पूर्ण माहिती असेंब्लीच्या सभा-सदांस मिळणें आवश्यक आहे आणि तिचेवांचून सरकारी सूचनेबाबत मत बनवणें त्यांस अवघड होणार आहे. टाटांच्या कारखान्याचा हा विशेष आहे कीं त्यांत कामकरी लोकांच्या, इतरत्र नाहींत अशा सोयी करण्यांत आलेल्या आहेत. तथापि, पोलादाच्या धंद्यास संरक्षण आणखी वर्षभर चालू ठेवण्याची आवश्यकता आहे काय ?. टाटांच्या कारखान्याची भरभराट एवढी झाली आहे कीं त्याचें संरक्षणाशिवाय चालण्यासारखें आहे. तथापि सध्यांच्या युद्धपरिस्थितींत तें एकदम बंद होणें योग्य नाहीं. टारिफ बोर्डाच्या अंदाजाच्या मानानें टाटा कंपनीचें पोलादाचें उत्पादन साडेसहा लाख टन व्हावयाचें पण प्रत्यक्ष उत्पादनाचा आकडा ८ लक्ष टन झाला असून कार्यक्षम-तेच्या वाढीबरोबर कारखान्याचा खर्च कमी झाला आहे. युद्ध-सामुग्रीपैकीं अनेक प्रकारांचा नवीन माल टाटा कंपनी काढीत आहे. कांहीं काळपर्यंत संरक्षण मिळाल्यानंतर धंद्यास असल्या साहाय्याची जरूर राहूं नये ही कल्पना त्या कंपनीनें स्वतःच्या उदाहरणानें खरी करून दाखवली आहे.

आपल्या बिलावर झालेल्या नरम–गरम टीकेस उत्तर देतांना सर रामस्वामी मुदलियार ह्यांनीं पोलादावरील संरक्षक जकाती चालू रहाव्या अशी टाटांची मागणी नाहीं, परंतु युद्धाच्या परि-स्थितींत निरनिराळ्या जातींच्या पोलादी मालावर सरकारी उत्पन्नासाठीं मामुली जकात किती आकारावी हें निश्चित करणें कठीण आहे असें सांगितलें. युद्धाच्या समाप्तीनंतरच्या काळांत उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीस तोंड देण्याची तयारी कारखान-दारांनीं एव्हांपासून ठेवली पाहिजे. ह्या आपल्या पूर्वीं दिलेल्या सूचनेचें त्यांनीं असेंब्लीस स्मरण करून दिलें. युद्धोत्तर काळांत दुसऱ्या देशांतून पोलादाचा माल येथें स्वस्त येऊन पडेल आणि त्यावेळीं टाटा कंपनी सरकाराकडे संरक्षणाची मागणी करूं लागल्यास तिनें भरभराटीच्या काळांत मिळालेल्या नफ्याचा विनियोग कसा केला ह्याची चौकशी करावी लागेल. प्रतिकूल टीकेस जागा राहूं नये ह्या रीतीनें पोलादाच्या कारखान्यांनीं आपलें धोरण आतांपासूनच ठेवलें पाहिजे असें त्यांनीं त्यांस निक्षून सांगितलें. साखरेच्या धंद्याचे बाबतींत ते म्हणाले कीं तिच्या उत्पादकांनीं कारखान्यांच्या विस्तारावर नजर ठेवून किंम-तींचा निष्कारण बोजा जनतेवर पडणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. संरक्षक जकातींमुळें साखरेपासून सरकारास व्हावयाचें कस्टम्सचें उत्पन्न पन्नास कोटी रुपयांपर्यंत बुडलें आहे. ह्या कित्येकांनीं केलेल्या टीकेस उत्तर देतांना सर रामस्वामींनीं ह्या धंद्याच्या वाढीमुळें सरकारास इतर बाजूंनीं उत्पन्न मिळालें आहे तें हिशेबांत घेतलें पाहिजे ही गोष्ट नजरेस आणिली. आपल्या सल्लागार मंडळाच्या स्थापनेविषयींच्या योजनेबाबत गैरसमज उत्पन्न झाला असून तिचा उद्देश साखरेच्या धंद्याचें नियंत्रण करण्याचा आहे अशी कल्पना पसरली आहे ती चुकीची आहे, असेंहि आश्वासन त्यांनीं दिलें. ह्या सल्लागार मंडळाची घटना आणि त्याचें कार्य ह्याविषयीं आपला अखेरचा निश्चय झालेला नाहीं; पण साखरेच्या धंद्याच्या हिताच्या प्रश्नांचा विचार करणारें मध्यवर्ती व प्रातिनिधिक मंडळ अस्तित्वांत असल्यास त्याचा उपयोग होईल एवढेंच आज आपणांस सांगतां येईल असें सर रामस्वामी म्हणाले. आपल्या बिलाचा विचार सिलेक्ट कमिटीकडे सोंपवल्यापासून कांहीं फायदा नसून विवक्षित धंद्यांस मिळत असलेलें संरक्षण तूर्त चालू रहावें एवढेंच सरकारचें म्हणणें आहे असा खुलासा त्यांनीं अखेर केल्यावर बिलास असेंब्लीनें मान्यता दिली. सरकारच्या व्यापारी मंत्र्यांनीं संरक्षित धंद्यांस मिळत असलेल्या संरक्षणाचे संबंधांत इशारा दिला आहे आणि त्याचा पुन्हां पुन्हां उच्चार केला आहे तो हितसंबंधी धंदे-वाल्यांनीं व कारखानदारांनीं नीट लक्षांत घेणें अगत्याचें आहे. युद्धसमाप्तीनंतर औद्योगिक मंदी येईल, त्यावेळीं आपले धंदे सुस्थितींत रहावे ह्याविषयीं काळजी एव्हांपासून घेण्यांत आली पाहिजे.

## हवापाण्याचें शास्त्र

हवापाण्याचें ( वायुचक्रशास्त्र ) हें शास्त्र १७ व्या शतकांत शास्त्र म्हणून गणलें जाऊं लागलें. तोंपर्यंत, लोक हवामानाची चर्चा करीत, परंतु त्यास शास्त्रीय स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. ॲरिस्टॉटलनें ह्या शास्त्रावर लिहिलेला ग्रन्थ हा १७ व्या शतकापर्यंत प्रमाण मानला जात असे. पृथ्वीवर भोवतालच्या हवेच्या आवरणाचा दाब पडतो तो मोजतां येतो, हें गॅलिलिओनें शोधून काढलें. हवेचा दाब मोजणारें बॅरॉमीटर व उष्णता मोजणारें उष्णतामापक यंत्र, ह्यांचे शोधापासून ह्या हवापाण्याचे शास्त्रास नवें वळण लागलें. १६३९ सालीं युरोपांतील पहिलें रेनगेज ( पाऊस मोजणारें यंत्र ) एका इटालिअननें तयार केलें. १६५३ सालीं टस्कनीच्या ड्यूकनें उत्तर इटलींत ठिकठिकाणीं रेनगेज बसविलीं. १८ व्या शतकापर्यंत हवापाण्याच्या शास्त्राची प्रगति जरा मंदगतीनेंच चालू होती. तथापि, नवीं नवीं यंत्रें तयार करण्यांत येऊन त्यामुळें वेगवेगळीं मोजमापें अधिकाधिक बिनचुक होऊं लागलीं होतीं. १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंतचा काल मिळालेल्या माहितीपासून तर्कयुक्त अनुमानें काढण्याच्या प्रयत्नांत मुख्यतः गेला. तक्त्यांचें स्वरूपांत तीं मांडण्यास नंतर प्रारंभ झाला. रोजची ठिकठिकाणची माहिती एकत्रित करण्यास पुढें विद्युत्संदेशांचा उपयोग करण्यांत येऊं लागला. १८७० नंतर हवापाण्याच्या शास्त्राची प्रगति द्रुतगतीनें झाली. माहिती जमा करण्यांत अचुकपणा, त्यापासून अनुमान काढण्यांत शास्त्रशुद्धता, हवामान-खात्यांची वेगवेगळ्या देशांत स्थापना, हवेच्या वरच्या आवारणांतील परिस्थितीचें संशोधन, ढगांचे वेग व त्यांच्या भ्रमणाची दिशा ह्यांचें संशोधन, इत्यादि बाबतींत हें शास्त्र आतां पुढें गेलेलें आहे. ह्या शास्त्राचा पदार्थविज्ञान शास्त्राशी अत्यंत निकटचा संबंध आहे. पदार्थ विज्ञानांतील मूलभूत सिद्धांतांचें स्पष्टीकरण वातावरणांतील प्रत्यक्ष घडामोडींत दिसून येतें.

### त्याची व्यावहारिक उपयुक्तता

हवापाण्याच्या शास्त्राची व्यावहारिक उपयुक्तता आतां सिद्ध झालेली आहे. मनुष्यप्राण्याचें जीवित व समाजाची प्रगति हीं हवापाण्याच्या अनुकूलतेवरच अवलंबून असते. पाऊस अजिबात पडला नाहीं, अथवा तो वक्तशीर आला नाहीं, तर कसा दुष्काळ पडतो व अतिवृष्टीमुळें कसा हाहाःकार होतो, ही गोष्ट हिंदुस्थानांत परिचित आहे. ज्या शास्त्राचे योगानें शेतकऱ्यास आगाऊ आपत्तीची कल्पना मिळूं शकते,तें शास्त्र अत्यंत उपयुक्त नाहीं का ? वादळाची पूर्वसूचना मिळाल्यामुळें आगबोटींची सुरक्षितता कितीतरी वाढली आहे. अर्थात, हवामान खात्याच्या सूचनांकडे लक्ष दिलें तरच त्यांचा उपयोग होणार, हें उघड आहे. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत वैमानिक प्रगति झपाट्यानें झाली आहे. वातावरणांतील फरकांचा विमानांचे उड्डाणावर केवढा परिणाम होतो, हें स्पष्ट करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. युद्ध-कालांत तर हवामान खात्यांची मदत अतिशय होते. हवामानासंबंधींची बरोबर माहिती जर्मनीस मिळाली नसती, तर १९१८ सालीं पॅरीसवर बॉंब टाकणें त्यास अशक्य झालें असतें. सध्याचें युद्ध तर मुख्यतः वैमानिक युद्ध आहे. तेव्हां त्यास हवामानाच्या सूक्ष्म माहितीची अतिशय जरूरी आहे. सर्वसामान्य माणसासहि हवापाण्याच्या शास्त्राचा अत्यंत उपयोग आहे, परंतु तो करून घेण्यास त्याचा शैक्षणिक दर्जा उच्च असणें आवश्यक आहे. अजाण व शकुनभोळ्या लोकांसाठी हें शास्त्र नाहीं. हवापाण्याचा परिणाम लोकांच्या आरोग्यावरहि होत असतो. ह्या दृष्टीनें, आरोग्याधिकाऱ्यांनीं ह्या शास्त्राची माहिती करून घेतली पाहिजे.

## हातमागांचा धंदा व तो कसा सुधारावा

( श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी., मुंबई यांनीं फॅक्ट फाइंडिंग कमिटीचे अध्यक्ष डॉ. थॉमस यांजपुढे निवेदन केलेल्या हकिगतीचा सारांश. )

हातमागांच्या धंद्याची स्थिति गेलीं २० वर्षें खालावत चालली आहे, हें मुंबई शहर व रत्नागिरी जिल्हा येथील हातमागांच्या धंद्यांचें निरीक्षण केलें असतां दिसून येतें. याला मुख्य कारणें म्हणजे जपानची स्पर्धा, देशी गिरण्यांचें वाढतें उत्पादन, कृत्रिम रेशमाचा उपयोग, गिऱ्हाइकाची बदलणारी आवड इ. गोष्टी होत. हिंदुस्थानांत दर वर्षी खपणाऱ्या कापडापैकीं सुमारें २० ते २२ टक्के कापड हातमागावर तयार झालेलें असतें. यावरून देशाच्या आर्थिक घटनेंत या धंद्याचें महत्त्व दिसून येईल. विणकर वर्गाची खालावलेली आर्थिक स्थिति खालील मार्गांनीं सुधारतां येईलः—

( १ ) पंचे व इतर कांहीं विशिष्ट जाड कापड यांची निपज केवळ हातमागांवरच व्हावी. हें कापड गिरण्यांना किंवा पॉवरलूम्सना काढावयास प्रतिबंध असावा. विशिष्ट कापडाचें उत्पादन करण्याचा एकमेव अधिकार हातमागांना मिळाल्यास, विणकरांची आर्थिक स्थिति थोडीशी सुधारेल. त्याचे दुष्परिणाम किमतीवर होणार नाहींत. कारण गिऱ्हाइकांना व उत्पादकानां कापडाची योग्य किंमत काय हें गिरण्यांच्या कापडाच्या दरामुळें दिसून येईल.

( २ ) गेलीं कांहीं वर्षें हातमागावर होणाऱ्या उच्च कापडाची ( सोंवळयाचीं वस्त्रें, रेशमी उपरणीं, शालू इ. ) स्थिति खालावली आहे. पुष्कळ विणकरांनीं उच्च दर्जाचे कापड तयार करण्याचें बंद केलें आहे. तरी सरकारनें असलें उच्च कापड तयार करणाऱ्या विणकरांना ठराविक प्रमाणांत निदान तीन वर्षें तरी मदत द्यावी. ह्या मदतीचा उद्देश जुन्या केलेचें पुनरुज्जीवन करणें हा होय.

( ३ ) सरकारनें आपल्या उपयोगाकरितां लागणारें कापड शक्य तितकें हातमागांवर तयार झालेलेंच घ्यावें.

( ४ ) सुताचा पुरवठा करण्यासाठीं सरकारच्या औद्योगिक खात्यानें मुख्य केंद्रांचे ठिकाणीं दुकानें उघडावीं व विणकरांनीं सकहारी तत्त्वावर आपल्या मालाच्या विक्रीसाठीं दुकानें काढावीं.

( ५ ) जपानची मारक स्पर्धा शक्य तितकी कमी करावी.

( ६ ) कांहीं खेडेगांवांतून शेतकऱ्यांना कित्येक दिवस शेतीचें काम नसल्यामुळें स्वस्थ बसावें लागतें. उदाहरणार्थ, भातशेतीसाठीं प्रसिद्ध असलेला कुलाबा जिल्हा. तरी अशा गांवांतून हातमागांचा धंदा हा शेतकऱ्यांना दुय्यम धंदा म्हणून उपयुक्त ठरेल. तरी अशा ठिकाणीं सरकारनें व स्थानिक संस्थांनीं हातमागांचा प्रचार करावा.

( ७ ) लोकांच्या बदलणाऱ्या आवडी, व तदनुसार धंद्यांत सुधारणा करणें यांकडे विणकर वर्गाचें लक्ष पाहिजे.

### महागाई भत्ता

प्रांतिक सरकारांच्या हद्दींत काम करणाऱ्या मध्यवर्ती सरकारच्या कनिष्ट नोकरांस प्रांतिक कनिष्ट नोकरांइतकाच भत्ता देण्याच्या प्रश्नाचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. ह्या भत्त्याची वार्षिक रकम २० लक्ष रुपये होईल.

# स्फुट विचार

## व्यवसाय–कर

मध्यवर्ती असेंब्लींत सर फ्रेडरिक जेम्स, युरोपियन गटांतले मद्रासचे प्रतिनिधि ह्यांनीं एक कायद्याचा मसुदा पुढें मांडला. धंदे, व्यवसाय, उद्योग ह्यांवर प्रांतांमध्यें कर घेण्यांत येतो. त्यांची वार्षिक कमाल मर्यादा कोणाहि इसमाचे बाबतींत ५० रुपये असावी असा निर्बंध घालणें हें त्यांच्या बिलाचें उद्दिष्ट आहे. १९३९ सालीं पार्लमेंटनें दुरुस्ती कायदा पास केला त्यांत प्रांतिक कायदे मंडळांस धंदे–व्यवसाय करणारांवर ५० रुपयांपर्यंत दर माणशीं, दरवर्षीं कर बसण्याची मुभा दिली. १९३९ च्या मार्च ३१ पूर्वीं ज्या ठिकाणीं ह्यापेक्षा अधिक दरानें कर आकारला जात असे त्यांस ह्या कायद्याचे अपवाद म्हणून समजलें जावें अशी तरतूद त्यांत करण्यांत आली. ह्या अपवादाचा असा परिणाम झाला कीं मद्रास शहरांतील १,००० रुपये व बाहेर ५५० रुपये ही कराची कमाल मर्यादा कायम झाली. सर फ्रेडरिक ह्यांच्या मतें हा कर निराळ्या स्वरूपांतला प्राप्तीवरील करच होय आणि कांहीं जणांच्या बाबतींत त्याचें प्रमाण २५ टक्के इतकें होतें. मद्रासप्रमाणें इतर प्रांतांतही लोकांचें गाऱ्हाणें असल्यास त्या सर्वांची दाद लागावी ह्या हेतूनें आपण मध्यवर्ती कायदे मंडळांत आपलें बिल आणलें असल्याचें त्यांनीं सांगितलें. ह्यासंबंधांत सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं बिल लोकमत अजमावण्यासाठीं फिरवण्यांत यावें असें सुचविलें आणि ती सूचना असेंब्लीनें मान्य केली. प्राप्तीवरील कर बसवणें हा मध्यवर्ती सरकारचा खास हक्क आहे आणि त्याचें अतिक्रमण निरनिराळ्या मार्गांनीं होत असल्याची जाणीव आपणांस आहे, पण सर फ्रेडरिक ह्यांच्या बिलाशीं प्रांतिक सरकारें आणि स्थानिक स्वराज्य संस्था त्यांचे हितसंबंध निगडित झाले असल्यानें त्यांचे विचार मागवून मग असेंब्लीनें आपलें मत बनवणें योग्य होईल ही फडनविसांची कल्पना असेंब्लीस पटली आणि तें बिल आतां लोकमतप्रदर्शनार्थ प्रसिद्ध केलें जाईल. व्यवसाय व धंदे यांच्या अनुषंगानें कर बसवण्याची मुभा सध्याच्या घटना कायद्यानें प्रांतिक सरकारांस व स्थानिक संस्थांस दिली आहे. तिच्या मर्यादा कोणत्या आणि हा कर व प्राप्तीवरील कर यांचा परस्पर संबंध कसा असावा हाच येथें महत्त्वाचा प्रश्न आहे.

## युद्धसामानाचा पुरवठा आणि मुंबई

मुंबईच्या युरोपियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वार्षिक सभेंत भाषण करतांना नामदार गव्हर्नर, सर रॉजर लम्ले, यांनीं युद्ध सामुग्रीच्या पुरवठ्यांत आपल्या प्रांताच्या वांट्यास किती हिस्सा आला ह्याविषयीं माहिती दिली ती उद्बोधक आहे. गेल्या फेब्रुवारी अखेरच्या अकरा महिन्यांत मध्यवर्ती सरकारच्या दोन पुरवठा खात्यांच्या मार्फत सुमारें ६० कोटी रुपये किंमतीचा माल खरेदी करण्यांत आला. त्यांत मुंबईचा वांटा १५ कोटी इतका भरला. हा आकडा अंदाजी असला तरी ढोकळ मानानें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं मुंबईनें एक चतुर्थांश माल मध्यवर्ती सरकारास पुरवला. मुंबईहून होणाऱ्या पुरवठ्याचें वैशिष्ट्य ह्या प्रांतामधून खरेदी झालेल्या गिरणी कापडांत आहे. गिरण्यांच्या मालास आणखी अधिक मागणी येण्याचा रंग दिसत आहे युद्धोपयोगी गाड्यांचें बांधणी काम हें मुंबईनें केलेल्या पुरवठ्याचें दुसरें महत्त्वाचें अंग आहे. रेल्वेजवर वाघणींचा तुटवडा भासतो ह्याचें प्रमुख कारण लढाऊ गाड्यांची मोठ्या प्रमाणावर चाललेली वहातुक हें असून मुंबईनें लष्करी गाड्या बांधण्याचें कामीं मोठी कामगिरी चालवली असल्याचें सर रॉजर ह्यांनीं अभिमानपूर्वक सांगितलें. दिसावयास किरकोळ पण महत्त्वाच्या अशा अनेक जिनसा मुंबई पुरवीत असल्याविषयींचीं त्यांनीं कित्येक उदाहरणें दिलीं. दारूगोळ्यासारख्या लढाऊ मालाचें उत्पादन बिनलष्करी कारखान्यांत चालू आहे ह्या गोष्टीचाहि निर्देश त्यांनीं केला. लष्करी कारखान्यावरचें ओझें ह्या रीतीनें हलकें झालें असून त्यांतहि सबंध हिंदुस्थानांतल्या कामाचा चवथा हिस्सा मुंबईच्या वांट्यास आला आहे. बिनलष्करी कारखान्यांत विशिष्ट जातींचा दारूगोळा आणि आनुषंगिक माल तयार होण्याच्या कामीं स्वाभाविक रीतीनें येणाऱ्या अडचणी दूर केल्या जात असून हें उत्पादन सारखें वाढत आहे. पोलादी बांधकाम करण्याचा धंदा मुंबईत विशेष महत्त्वाचा नसूनहि त्याबाबतींतहि १९४० साल अखेर एकून ६० हजार टनांच्या ऑर्डरी सर्व हिंदुस्थानांत मिळून देण्यांत आल्या, त्यांपैकीं ११ हजार टन मुंबईच्या वांट्यास आल्या आणि त्यांची किंमत ३५ लक्ष रुपये झाली. ह्या रीतीनें युद्धसामुग्रीच्या निमित्तानें उद्योग–धंद्यांचा हिंदुस्थानांत विस्तार चालला आहे त्याचा हिंदी आर्थिक उन्नतीवर कायमचा अनुकूल परिणाम झाल्यावांचून रहावयाचा नाहीं असा अभिप्राय सर रॉजर ह्यांनीं व्यक्त केला.

## युगोस्लाव्हियाचा जर्मनीशीं करार

आफ्रिकेंत व आल्बेनियांत इटलीच्या सैन्याचा धुव्वा उडाला असून ॲबिसीनिया व इरिट्रिया ह्या इटालियन प्रदेशांत ब्रिटिशांची प्रगति झपाट्यानें चालली आहे. इटालिअन सोमालीलँडमध्यें आतां शत्रूचा मागमूसहि राहिलेला नाहीं. आल्बेनियांत ग्रीक फौजांची सरशी चालू आहे आणि इटालिअनांचे हल्ले परतवण्यांत येत आहेत. मुसोलिनीच्या साम्राज्याचा डोलारा ह्याप्रमाणें जमीनदोस्त झाल्याकारणानें हिटलरला आपल्या दोस्ताच्या सहायार्थ कांहीं तरी हालचाल करणें प्राप्त होतें. ग्रीसच्या विरुद्ध आपल्या फौजा पाठवणें हाच मार्ग आक्रमणें त्यास आवश्यक असल्यानें त्याचे प्रयत्न त्या दिशेनें चालले होते. त्यासाठीं बाल्कन देशांत जर्मनीची बाजू बळकट करणें ही पहिली व महत्त्वाची गोष्ट त्यास साधावयाची होती. रुमानिया व बल्गेरिया ह्या देशांत आपली सत्ता त्यास धमक्या देऊन त्यानें प्रस्थापित केली आणि युगोस्लाव्हियाच्या राजकारणास हात घातला. जर्मनी, इटली व जपान ह्यांच्या त्रिकुटांत त्या देशास सामील करून घ्यावयाचें आणि त्याचा उपयोग ग्रीसवरील हल्ल्यांत करावयाचा हा हिटलरचा बेत होता. त्यानें तेथेंहि आपल्या नेहमीच्या हिकमती चालवल्या. युगोस्लाव्हियाच्या मंत्रिमंडळास धमक्या देणें, त्यांत फूट पाडणें इत्यादि युक्त्यांचा अंगिकार त्यानें केला. युगोस्लाव्ह जनतेस जर्मनीच्या कारवायांचा चांगला अनुभव आलेला असल्यानें आपल्या मंत्रिमंडळानें त्याच्याशीं कसलाहि करार करूं नये असें आपलें मत तिनें स्पष्ट व्यक्त केलें. इंग्लंड व तुर्कस्तान ह्यांनीं युगोस्लाव्ह सरकारास जर्मनीच्या सूचनांचे विरुद्ध सावधगिरीच्या सूचनाहि दिल्या. तें सरकार हिटलरच्या धमक्या व अभिवचनें ह्यांचा योग्य परामर्श घेऊन आपलें स्वातंत्र्य

अबाधित ठेवण्यांत यश मिळवील अशी आशा एकाकाळीं वाटत होती. परंतु शेवटीं हिट्लरनें आपला डाव साधून युगोस्लाव्ह सरकारास करार करण्यास भाग पाडलें आहे. हा करार वरून दिसण्यास विशेष कडक नसला तरी हिट्लरी हिकमती सर्व जगास कळून चुकल्या असल्यानें युगोस्लाव्हियाचें स्वातंत्र्य त्यानें नष्ट झालें आहे असेंच प्रत्येकास वाटत आहे. युगोस्लाव्हियाच्या स्वातंत्र्यास आपण धक्का लावणार नाहीं ह्या जर्मन मुत्सद्यांच्या वचनास किती किंमत द्यावयाची ह्याविषयीं जर्मनीबाहेर कोणासच शंका वाटत नाहीं. युगोस्लाव्हियानें आपलें स्वातंत्र्य विकलें तरी जर्मनीस तोंड देण्याचा स्वतःचा निश्चय ग्रीसनें व्यक्त केला आहे आणि त्यास इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांचा पूर्ण पाठिंबा आहे.

### हिटलरची हिकमत फसली

धाकदपटशा व लालूच दाखवून आणि फंदफितुरीचा अवलंब करून हिटलर व त्याचे साथीदार ह्यांनीं युगोस्लाव्ह सरकारची मित्रत्वाच्या करारावर सही घेऊन पुढील डावपेंचांचा वर वर्णिल्याप्रमाणें विचार चालवला. तथापि कराराच्या कागदावरची शाई वाळली नाहीं तोंच युगोस्लाव्हियांत राज्यक्रांति एकाएकीं होऊन हिटलरच्या राजकारणाचा डोलारा खालीं आला. त्रिकूट राष्ट्रांशीं झालेला करार युगोस्लाव्हियाच्या स्वातंत्र्यास व इभ्रतीस विघातक असल्याचें त्या देशांत बहुमत होतें. सैन्याचे व इतर अधिकारी आणि जनता ह्यांस तो सर्वस्वी अमान्य होता. हा अपमान सहन करावयाचा नाहीं असें ठरवून त्यांनीं मंत्रिमंडळ उधळून लावलें आणि पीटर राजांनीं राज्यसूत्रें स्वतःच्या हातीं घेतल्याचें जाहीर केलें. युगोस्लाव्हिया आपल्या पंजाखालीं आणून ग्रीसवरील आक्रमण सुलभ करावयाचें हा जर्मनीचा बेत फसल्यामुळें हिटलरच्या सर्व योजनांमध्यें गोंधळ उडून गेला आहे. युगोस्लाव्हियाच्या नव्या राज्यकर्त्यांवर अर्थातच जर्मनीचा घुस्सा झाला आहे आणि त्यानें करार मोडल्याचा आरोप त्या राष्ट्रावर करण्यांत येत आहे. हिटलरच्या कारवाया व डावपेंच ह्यांस मध्ययुरोपांत आतांपर्यंत यश मिळत गेल्या कारणानें जर्मनीविषयीं तिकडील राष्ट्रांस भीति वाटत होती, ती परिस्थिति बदलली आहे आणि जर्मनानें पादाक्रांत केलेल्या देशांतील लोकांस उत्तेजन मिळालें असलें पाहिजे. जर्मनीच्या चढाईस चांगला धक्का बसला आहे आणि ब्रिटिश धोरणास सर्वस्वी अनुकूल अशी परिस्थिति निर्माण झाली आहे.

### बॉंबे इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रामवे कं. लि.

वरील कंपनीस १९४० सालीं १ कोटि, ८७ लक्ष रुपये नफा झाला. १ कोटि, १४ लक्ष रुपये खर्च वजा जातां ७३ लक्ष रुपये नफा उरला, त्यापैकीं नफा वाटणीसाठीं ४५१/२ लक्ष रुपये राहिले. क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागांस ७% व 'ऑर्डिनरी भागास प्रत्येकीं ६ रुपये डिव्हिडंड मिळालें. युद्धपरिस्थितीमुळें सरकारनें मुंबईतील रात्रींच्या उजेडावर नियंत्रण घातलें, त्याचा परिणाम विजेच्या खपवर प्रतिकूल झाला. तथापि, औद्योगिक उत्पादन वाढल्यामुळें हें नुकसान जाणवलें नाहीं. लष्करी हालचाली व औद्योगिक चलती ह्यामुळें वहातूक वाढली व त्याचें उत्पन्नहि अधिक मिळालें. कंपनीस लागणाऱ्या मालाची किंमत वाढत चालली आहे. कामगार वर्गानेंहि महागाई भत्ता मिळवलेला आहे. दिवाळीचे वेळीं मुंबई शहरांत ४ लक्ष जादा युनिट्स वीज खपते; गेल्या दिवाळींत इमारतींचे बाहेर रोषणाईस मनाई होती. ट्रामवेच्या उतारूंत २१३/४ लाखांची वाढ झाली. ट्रामवेच्या रुळांची जरूर तेवढीच दुरुस्ती करण्यांत आली; माल मिळण्याच्या अडचणीची तरतूद करण्यासाठी ही खबरदारी घ्यावी लागली. बसेसच्या उतारूंची संख्या ४४ लक्षांनीं वाढली.

### लोक चहा कां पितात ?

लोक चहा कां पितात, ह्याविषयीं ग्रेटब्रिटनमध्यें चौकशी केली होती, त्यावेळीं हजारों लोकांनीं दिलेल्या उत्तरांचें सार खालीं दिलें आहे. स्त्रियांपैकीं ३५% स्त्रिया संवय म्हणून चहा पितात; पुरुषांत तें प्रमाण ४०% आढळलें. चहाचा स्वाद २८% स्त्रियांस आवडतो. २७% पुरुषांसही तो पसंत पडतो. २७% स्त्रियांस चहा उत्साहवर्धक वाटतो व त्यासाठी मुख्यतः त्या चहा पितात; फक्त १८% पुरुषांसच चहाचा हा गुण विशेष पसंत पडतो.


दक्षिण कोंकणांतील राष्ट्रीय बाण्याचें

प्रमुख साप्ताहिक

**हिंद–सेवक**

संपादक—सदानंद शांताराम भांडारकर

प्रकाशक—मधुकर यशवंत भांडारकर

हिंदसेवकमध्यें दर गुरुवारीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व घडामोडींची विस्तृत माहिती मिळते.

व्यवस्थापक—'हिंद–सेवक', मालवण, जि. रत्नागिरी.

**ग्रामोद्योग करून पैसा मिळवा.**

देशी रंगारी शिक्षक—विदेशी रंग महागले ना ? मग वनस्पतीपासून रेशीम, सूत, लोकर रंगविणें व चिटें छापण्याची सोपी माहिती शिका. किं. १॥ रु.

नजरबंद शिक्षक—जादूच्या ८० चमत्कारिक खेळांची सचित्र माहिती मागवून जादुगार व्हा ! किं. १॥ रु.

बुटपालिश शिक्षक—कातडयाला लावण्याची घट्ट व पातळ निराळ्या रंगाची पॉलिश घरीं बनवा ! किं. ।॥ ट.

ह. निराळा. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

**जाहिरात**

लिमिटेड कंपनीच्या कामाची माहिती असलेला G. D. C. अगर D. Com पास झालेला व कामाचा अनुभव असलेला कारकून पाहिजे.

भेटण्याची वेळ—दुपारीं २ ते ४ पर्यंत

नोकरीवर रुजू होण्याची तारीख ७ एप्रिल

विजय टेक्स्टाईल्स लि.

५१३ शनवार, पुणें

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

(ले.—श्री. वा. चिं. भानु, पुणें)

विविध कार्यकारी सोसायट्या:—सहकारी चळवळीव्यतिरिक्त अन्य हेतूनें अस्तित्वात आलेल्या रिझर्व बँकेनें जीं फर्मानें जाहीर केलीं आहेत त्यामधूनच या ' मल्टिपर्पज ' सोसायट्यांचा जन्म झालेला आहे, आणि तेव्हांपासूनच त्यांचा वेळीं अवेळीं उदो उदो करण्याची संधि सहकारी खात्यांतील वरिष्ठ अंमलदार वाया दवडीत नाहींत! मीरत येथें यु. पी. ची २३ वी प्रांतिक सहकारी परिषद् सर टी. विजयराघवाचार्य यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सर विजयराघवाचार्य हे मद्रास इलाख्यांतील एक नामवंत सहकारी आहेत. मद्रास इलाख्यांतील सहकारी चळवळीचा आढावा घेऊन, त्यांत काय सुधारणा कालमानाप्रमाणें करतां येणें शक्य आहे व जरूर आहे, तें अधिकारीवाणीनें सांगण्यासाठी मद्रास सरकारनें जी एक चौकशी कमेटी नेमली होती तिचें अध्यक्षस्थान सर विजयराघव यांना देण्यांत आलेलें होतें. यावरूनच त्यांचे सहकारी चळवळीतलें स्थान स्पष्ट होण्यासारखें आहे. मीरत येथील परिषदेच्या अध्यक्षीय भाषणांत सर साहेबांनीं ' मल्टिपर्पज ' सोसायट्या रानोमाळ स्थापन करण्याची सहकारी अंमलदारांकडून जी घिसाडघाई होत आहे त्या संबंधानें ते म्हणतात " रिझर्व बँकेच्या फर्मानामुळें विविध कार्यकारी सोसायट्या स्थापन करण्याचें मोठें पीक आलें आहे! एकाच संस्थेच्या कार्यक्षेत्रांत, अनेक स्वरूपाचे व्यवहारांची गुंतागुंत केल्यानें शेतकऱ्याच्या आर्थिक जीवनाच्या मानसिक तत्वज्ञानांत क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न करणाराबद्दल आश्चर्य वाटतें. वेगवेगळ्या स्वरूपाचे व्यवहार करण्यास वेगवेगळी स्वतंत्र व परिपूर्ण योजना करणें हा जीवनशास्त्राचा कायदा असतांना ते वेगवेगळे व्यवहार खेचून एकाच संस्थेत घुसडणें कितपत योग्य ठरेल? ज्या हल्लींच्या सहकारी प्राथमिक संस्थांत वेगवेगळे व्यवहार अंगावर घेण्याला पोटनियमाप्रमाणें पूर्ण मुभा असताही किती संस्थांना ते सर्व व्यवहार हातीं घेतां आले आहेत? व त्याचें कारणही उघडच आहे कीं, स्वाभाविक परिस्थितीची अनुकूलता नाहीं, अपुरीं साधनें व स्वयंस्फूर्तीनें जबाबदारीची जाणीव जागृत ठेवून काम अंगावर घेण्यास पुढें येणारीं माणसें नाहींत! हा अनुभव पदोपदीं आला असताही केवळ रिझर्व बँकेच्या फर्मानी दंडुक्यानें या अनेक उपद्व्यापी संस्था निर्माण करूं पहाणें शुद्ध वेडेपणाचें ठरणार आहे."

* * *

विविध कार्यकारी ऊर्फ अनेक उपद्व्यापी संस्थांची प्रारंभीचीच प्रगति लक्षांत घेतां तशा धर्तीच्या नवीन संस्था स्थापन करण्याबद्दल " हळुंहळूं घ्यावा " असा इषारा दिल्लीस भरलेल्या रजिस्ट्रार्स कॉन्फरन्समध्यें देण्यांत आलेला आहे, त्यावरून सर विजयराघवाचार्य यांच्या अनुभविक शब्दांचें महत्त्व वाचकांच्या लक्षांत येईल. सहकारी खात्यांतील दुय्यम अंमलदारांचे हाताखालीं रूरल-डेव्हलपमेंट इन्स्पेक्टरांचा जो वर्ग निर्माण करून देण्यांत आलेला आहे व फक्त कागदपत्र तयार करून हातीं सांपडेल त्या गांवीं विविध कार्यकारी सोसायट्या स्थापन करण्याचा चंग बांधण्यांत आलेला आहे, त्यांचे लगाम सहकारी खात्यानें अमळ खेचून धरिले पाहिजेत. मुंबई इलाख्यानें लौकरच धडा घेतला हें समाधानाचें वृत्त कळविण्यास आनंद होतो.

* * *

प्राथमिक पतपेढ्यांचे सभासदांना त्या संस्थांनीं फक्त चालू शेतीच्या गरजाच भागविण्यासाठी भांडवल पुरवावें. लांब मुदतीचीं कर्जें लँडमार्गेज बँकांनीं द्यावीत मालाची खरेदी विक्री करण्यास स्वतंत्र संस्था निर्माण व्हाव्यात, उसांची लागवड करणारे, फळबागांची लागवड करणारे, कापूस निर्माण करणारे, दूध पुरविणारे, अंडीं गोळा करणारे अशा एकाच शेतकऱ्याच्या वेगवेगळ्या व्यवहारासाठी वेगवेगळ्या स्वतंत्र संस्था करून विभागी करण्याचें तत्त्व एका तोंडानें प्रतिपादीत असतां, पुन: अनेकावध कार्यें करणाऱ्या एकाच संस्थेचें जाळें निर्माण करून व्यवहारांचें केंद्रीकरण करण्याचा उपद्व्याप करणें शहाणपणाचें होणार नाहीं, असा सर विजयराघव यांचा स्पष्ट अभिप्राय आहे.

* * *

नागपूर येथील मध्य प्रांताचे सहकारी पतपेढ्यांचे शिक्षणविषयक इन्स्पेक्टर श्री. पुंडलिक, मल्टिपर्पज सोसायट्यांबद्दल अभिप्राय देतात कीं, " या प्रांतांतील विविध कार्यकारी पेढ्या अद्याप नवीन आहेत, आणि ज्याअर्थी त्या मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर उभारलेल्या आहेत त्याअर्थी, त्या आर्थिक परिस्थितीमुळें अडचणींत येण्याचा संभव फारच कमी आहे! दुसरें असें कीं, या पतपेढ्यांचे सभासदांना मालाच्या तारणावर तेवढें भांडवल लागतें. कार्यक्षेत्र विस्तृत आणि मर्यादित जबाबदारी, ह्यामुळें सभासदांचा भरणा पुष्कळ होतो. म्हणून या विविध कार्यकारी संस्था सहकारी पद्धतीनें सभासदांचें आर्थिक जीवन उज्वल करून खेडेगांवांची पुनर्घटना नमुनेदार करितील असा भरंवसा आहे."

* * *

श्री. पुंडलिक साहेबांचा आशावाद फलद्रूप झाला तर त्यांना होणाऱ्या आनंदापेक्षा यत्किंचितही कमी आनंद आम्हांला होणार नाहीं. पण नुसतें विस्तृत क्षेत्र व मर्यादित जबाबदारी यामुळें हिंदी शेतकऱ्यांचें आर्थिक जीवन सुखमय होईल हा कार्यकारण भाव आम्हांस पटत नाहीं. रिझर्व बँकेनें काढलेल्या फर्मानामधून जन्म घेणाऱ्या या संस्था यशस्वी होण्यास, सर्वसामान्य शेतीचा धंदा व्यावहारिक दृष्टीनें नफातोट्याच्या दृष्टीनें खंबीर पायावर जोपर्यंत बसूं शकत नाहीं, जोपर्यंत हिंदी शेतकऱ्याला नशिबावर हवाला ठेवावा लागतो व जोपर्यंत शेतकरी वर्गांत जमाखर्चाचें अंदाजपत्रक करण्याची संवय हाडींमाशीं खिळली जात नाहीं तोपर्यंत हा आशावाद फलद्रूप होण्याबद्दल जबरदस्त शंका वाटते!

* * *

मुंबई प्रांतांतही अशा विविध कार्यकारी पतपेढ्या स्थापन करण्याचे प्रयत्न कित्येक रूरल डेव्हलपमेंट इन्स्पेक्टरांनीं चालविले होते. तालुक्याच्या नकाशामध्यें दिसणारीं चार दोन गांवें हुडकून काढावींत, मामलेदारमार्फत सभा भरवावी, पोटनियमांचा गठ्ठा व अंगठ्याचा ठसा उमटविणारें शाईचें पॅड जवळ बाळगावें व चार चार पत्रकें बनवून संस्था नोंदविण्यास पाठवावी; मग त्यांत सभासद कोण होणार आहेत, त्यांचा पूर्वेतिहास काय आहे, विविध कार्यें कोणचीं, त्याची सभासदांना किती जाणीव आहे हें पडताळून न बघतांच संस्था रजिस्टर झाल्या. रिझर्व्ह बँकेचे फर्मानास विरोध दर्शविण्याचें धाष्टर्य कोण करणार? परिणाम असा दिसून आला कीं, जुन्या शेतकी पतपेढ्यांतून लवाद हुकुमनामे होऊन जमिनी गमावून ज्यांचा कायदेशीर मार्गानें

वसूल करावा लागला होता असेच कित्येक लोक भराभर या अनेकविध कार्यकारी पेढ्यांत सभासद झालेले आढळले ! मर्यादित जबाबदारीचे तत्त्वावर ह्या संस्था उभारल्या असल्यानें त्यांनीं जमविलेल्या भांडवलायेवढेंच भांडवल सहकारी बँका देऊं लागल्या. पण सभासदांना ५ रु. ची प्राथमिक ठेव कापून देऊन १००रु.कर्ज या प्रमाणांत कर्जें उचलण्याची इच्छा ! तेव्हां अर्थातच कोंडमारा होऊं लागला व व्यवहार सुरूं करणेंच प्रायः कठीण झाले. तेव्हां सहकारी खात्यानें देणग्या देऊन प्राथमिक खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं पिशवीचीं तोंडें सैल केलीं. परंतु देणग्यावर कां या संस्था चालणार ? देणगीची रकम संपली कीं व्यवहार आटोपला.कार्यकारी जिवंत झरा लागतो; खुद्द संस्थाचे चालकांना देणग्या मिळूं शकतात ही जाणीवच आळशीवृत्तीला पुष्टी देते. त्यामुळें या संस्था हल्लीं खुरटूं लागलेल्या आहेत.

* * *

'मल्टिपर्पज' संस्था स्थापन करीत असतांच शेतकऱ्यांचे शेतांतल्या मालाची विक्री हमखास होईल अशी तरतुदीची सांखळी खेडेगांवच्या आठवडा बाजारापासून तो थेट पुण्या–मुंबईच्या टर्मिनल मार्केटपर्यंत अगोदर करावयास हवी. संस्थेमार्फत मालविक्रीची सोय नाहीं अन् माल न विकणारास ५०रु.दंड ही अट ! अर्थात् ही अट फोल ठरली, सैल करावी लागली. सभासदांनीं नियमांचें पाणी ओळखलें. खात्याचीं सर्क्युलरें व पोटनियम अमलांत न आणले तरी चालतात. हें त्यांच्या पुनः अनुभवास आलें. रेव्हेन्यू खात्याचे हुकूम ज्या पद्धतीनें अमलांत आणण्याची कोषीस सरकार करिते ती पद्धत सहकारी खात्याची नाहीं हा अनुभव पदोपदीं येत आल्यानें या संस्थांचें भवितव्य आशादायक दिसत नाहीं, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.

* * *

त्यांतल्या त्यांत थोडी आनंदाची बातमी आली आहे कीं,मुंबईस सहकारी माल विक्रीची व्यवस्था करण्याचा पूर्व विचारविनिमय करण्यासाठीं कांहीं अनुभविक तज्ज्ञांची एक सभा राजिस्ट्रार साहेबानीं बोलावली होती. या सभेंत विचारविनिमय होऊन योजना कदाचित् ठरेल व मग खेड्याचे बाजारांत विक्री न होणारा माल मुंबईला विकण्यासाठीं पाठविण्याची हमखास सोय होईल. असें झाल्यास मात्र चळवळीला नवचैतन्य प्राप्त होईल, पण मुंबईच्या सभेची तपशीलवार हकीकत समजेपर्यंत गप्प बसणें जरूर आहे.

---

—कोचीनमधील लँडमॉर्गेज बँकेला स्थापन होऊन ५ वर्षें नुकतींच झालीं. हल्लीं तिचे २१५४ सभासद व ७८९४०रु. जमविलेलें भागांचें भांडवल आहे. सरकारनें ५ लाखपर्यंत भांडवल द्यावयाचें कबूल केलेलें असल्यानें बँकेला डिबेंचर्स खपविण्याचें कारण पडलें नाहीं. अहवालाचे सालीं बँकेस निव्वळ नफा रु. ९८२६ झाला.

—संयुक्त प्रांतांमध्यें इंडस्ट्रियल फायनन्स कार्पोरेशन (उद्योगधंद्यासाठी भांडवलाचा पुरवठा करणारें मंडळ ) ही जी संस्था कॉंग्रेससरकारच्या अमदानींत सुरू करण्यांत आली तिचें प्रांतिक बँकेंत रूपांतर करण्याची एक योजना हल्लींच्या सरकारपुढें विचारासाठी आलेली आहे. छोट्या छोट्या उद्योगधंद्यांना भांडवलाचा पुरवठा सहकारी पद्धतीनें करणें हा मूळचा हेतू मात्र बदलण्यांत येणार नाहीं, अशी अंमलबजावणी झाली तरच या रूपांतराची खरी उपयुक्तता !


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

### नीमायर योजनेप्रमाणें प्राप्तीवरील कराची वांटणी

प्राप्तीवरील कराची वाटणी मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांत व्हावी, हें तत्त्व हिंदी घटना–कायद्यानें मान्य केलेलें आहे. सर ओटो नीमायर ह्यांनीं आपली ह्या वाटणीसंबंधीं योजना तयार केली, त्यावेळीं मध्यवर्ती सरकारची आर्थिक परिस्थिति विशेष समाधानकारक नव्हती. रेल्वेजकडून अपेक्षित उत्पन्न सरकारास मिळत नव्हतें; उलट कांहीं प्रांतांस मध्यवर्ती सरकारास दरसाल मदत द्यावी लागत होती. पांच वर्षांचे अवधींत ही परिस्थिति सुधारेल, अशी सर ओटो ह्यांची अपेक्षा होती. म्हणून हीं पांच वर्षे मध्यवर्ती सरकारनें रेल्वेजकडून मिळणारें उत्पन्न व प्राप्तीवरील कर मिळून होणाऱ्या रकमेपैकीं १३ कोटि रुपये स्वतःकडे ठेवावे, असें त्यांनीं सुचविलें. पांच वर्षांनंतर सहा वर्षेपर्यंत दरसाल एक षष्ठमांशानें ही रकम कमी करण्यांत यावी, म्हणजे प्रांतिक सरकारांस प्राप्तीवरील कराचा पुरा वाटा मिळेल, अशी सर ओटो ह्यांची योजना होती. प्रत्येक प्रांताची वाटणी कोणत्या प्रमाणांत व्हावी, हेंहि त्यांनीं सुचविलें. प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नापैकीं ५०% उत्पन्न प्रांतांच्या वास्तविक वाट्यास यावयाचें, परंतु वर सांगितल्याप्रमाणें पहिली पांच वर्षे मध्यवर्ती सरकारनें उत्पन्नाचा निश्चित भाग स्वतःकडे राखून ठेवला. एप्रिल, १९३९ मध्यें ह्या संबंधांत दुरुस्ती करण्यांत आली व रेल्वेजकडून मध्यवर्ती सरकारास मिळावयाची रकम हिशेबांत अजीबात न घेण्याचें ठरविण्यांत आलें. ह्याखेरीज, प्रांतिक सरकारांच्या वाट्यापैकीं ४½ कोटि रुपये मध्यवर्ती सरकारास मिळावे, असेंहि ठरविलें गेलें. ही व्यवस्था १९४१–४२ अखेर चालू रहावयाची आहे. त्यानंतर त्यांत दरसाल एक षष्ठमांशानें घट होत जाईल. म्हणजे, रेल्वेजकडून मिळणारें उत्पन्न मध्यवर्ती सरकारास मिळून शिवाय आणखी त्यास प्रांतिक सरकारांच्या वाटणीचीहि खालीलप्रमाणें रकम मिळेल:—

| वर्ष | लक्ष रु. |
|---|---|
| १९४१–४२ | ४५० |
| १९४२–४३ | ३७५ |
| १९४३–४४ | ३०० |
| १९४४–४५ | २२५ |
| १९४५–४६ | १५० |
| १९४६–४७ | ७५ |

---

### दि न्यू प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कं. लि.

वरील नांवाची एक कंपनी पुणें येथें स्थापन झाली आहे. सामान्य जनतेस प्रॉव्हिडंट व इंडस्ट्रिअल विम्याचा फायदा उपलब्ध करून देण्याचा तिचा उद्देश आहे. कंपनीच्या बोर्डाचे श्री. एन. जी. पवार, बी. ए., बी. ई., हे अध्यक्ष असून बोर्डाच्या सभासदांत श्री. दाजीसाहेब पटवर्धन, दिवाण बहादुर लिमये, श्री. आर. जी. कुबेर अॅडव्होकेट, श्री. एम. पी. सोमण (वर्ल्ड-वाईड) इत्यादि नांवें आढळतात. कंपनीचे विमा-सल्लागार श्री. ग. स. मराठे हे आहेत. डायरेक्टरांनीं प्रत्येकीं एक हजाराचे भाग घ्यावयाचे आहेत. कंपनीचें अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल ५० हजार रुपये आहे. प्रत्येक भाग ५० रुपयांचा आहे.


## “ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.

२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.

३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.

२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.



## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## कर्जनिवारण कायदा व खंडकरी कायदा

### अंमलबजावणीस प्रारंभ

मुंबई प्रांतिक विधिमंडळानें मंजूर केलेला शेतकरी कर्ज-निवारण कायदा व खंडकरी कायदा ह्यांच्या अंमलबजावणीस प्रांतांतील कांहीं निवडक भागांत प्रारंभ करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्या दोन्ही कायद्यांतील कलमें अत्यंत गुंतागुंतीचीं असून त्यांची अंमलबाजावणी सोपी नाहीं. त्यांच्यामुळें प्रांतांच्या आर्थिक जीवनांत बरीच मोठी क्रांति घडून येईल. सबंद प्रांतांत एकदमच त्यांचा अंमल सुरू केला, तर घोटाळा उडून जाईल. सध्याच्या परिस्थितींत तें इष्ट नाहीं तेव्हां प्रांताच्या कांहीं विशिष्ट भागांतच त्यांच्या अंमलबजावणीस तूर्त प्रारंभ करण्याचें सरकारनें योजिलें आहे. खंडकरी कायदा सुरत, ठाणें, पश्चिम खानदेश व धारवाड जिल्हा ह्यांमध्यें व पश्चिम खानदेश, पुणें, सोलापूर, भडोच आणि धारवाड जिल्हा ह्यांमध्यें कर्जनिवारण कायदा अंमलांत यावयाचा आहे. कोणत्या तारखेस अंमलबजावणीस प्रारंभ होणार, तें अद्याप ठरावयाचें आहे.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | १११-१० |
| ४% १९४३ | १०४-१० |
| ३½% बिनमुदत | ९५-१०-६ |
| ३½% १९४७-५० | १०२—७ |
| ३% ( १९६३-६५ ) | ९५—० |
| २¾% १९४८-५२ | ९६-१५ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) | ११५—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% | १४१—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% | १०७—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४४—६ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५५७—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०५—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ७½% | १३७—८ |
| कराची ( १०० ) ९% | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २२५-१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १६१०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १८२०—० |


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक
निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

दि
बँक ऑफ महाराष्ट्र,
लिमिटेड
सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे
मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.
मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक







सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर | **महिंद्रकर ब्रदर्स** तयार कपड्याचे व्यापारी | बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

**दुसरी आवृत्ति**

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

**Prop. M. V. Risbud, B. A.**
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख ९ एप्रिल, १९४१ | अंक १५

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

# रक्तवर्धक

**वापरा.**

**सर्वत्र मिळतें.**

—ः केंद्रें ः—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा**
**पुणें, लि.** पुणें ४.

**दि सदर्न निटिंग वर्क्स, लि.**
[ २६४ शनिवार, पुणें २. ]
यांनीं बनविलेली



**"पूना होजिअरी"**

उन्हाळ्यासाठी गंजीफ्रॉक, अंडरवेअर्स
वगैरे हरतऱ्हेचा

**जाळीचा माल**

तयार होत आहे

आपल्या व्यापाऱ्याकडे चौकशी करा

★

ठेवी : मुदतीप्रमाणें ४॥ ते ६ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

★

माहितीसाठीं वरील पत्त्यावर लिहा

# विविध माहिती

### १९४१ मधील कॉलऱ्याच्या सांथीचा अंदाज

सन १९०० ते १९४० ह्या मुदतीमधील मुंबई प्रांतांतील कॉलऱ्याच्या साथीच्या प्रसाराचा आढावा होतां, ह्या साथीची लाट १९४० मध्यें सर्वांत खाली गेलेली आढळते. १९४१ मध्यें ती लाट पुनः वर येणार असा संभव दिसतो. मुंबई प्रांतांतील कांहीं जिल्ह्यांत सध्याच कॉलऱ्याचा फैलाव झालेला आढळतो. साखर कारखाने व गुऱ्हाळें येथें कामावर आलेले हंगामी कामगार कॉलऱ्याचा उपद्रव होतांच ठिकठिकाणीं पसरतात व आपल्या बरोबर रोग नेतात. एकंदर हवापाण्याच्या परिस्थितीवरून १९४१ सालांतलि कॉलऱ्याच्या प्रसाराचा सरकारी अंदाज जिल्हेवार खालीलप्रमाणें आहे:—

अहमदनगर, सोलापूर, सातारा व नाशिक : साथीचा भयंकर फैलाव.

पुणें, पूर्व खानदेश व पश्चिम खानदेशः साथीचा मोठा फैलाव.

विजापूर व धारवाडः साथीचा साधारण फैलाव.

### ४० हजार राजकीय कैद्यांची मुक्तता

जनरल फ्रँको ४० हजार राजकीय कैद्यांस बंधमुक्त करणार आहे. हे लोक रिपब्लिकन पक्षाचे सैनिक अथवा नागरिक होते.

### जर्मनींतील ब्रिटिश युद्धकैदी

जर्मनीमधील सुमारें ७ हजार ब्रिटिश अधिकारी युद्ध-कैद्यांचें पोलंडमध्यें स्थलांतर करण्यांत आलें आहे. कॅनडामधील अधिकारी युद्धकैद्यांच्या तळांतील परिस्थिति समाधानकारक नाहीं ह्या सबबीवर जर्मनीनें पोलंडमधील कमी प्रतीच्या तळांत ब्रिटिश अधिकारी युद्ध-कैदी नेऊन ठेवले आहेत. ग्रेट-ब्रिटननें कॅनडांतील तळाविषयींच्या विधानाचा इनकार केला असून जर्मनीकडे जोराची तक्रार केली आहे.

### हिंदी फेडरल कोर्टाचे कामास १५ एप्रिल रोजीं प्रारंभ

हिंदी फेडरल कोर्टाचें येतें अधिवेशन ता. १५ एप्रिल रोजीं सुरू होईल; त्यापूर्वी सर शहा सुलेमान ह्यांच्या मृत्यूमुळें फेडरल कोर्टाच्या एका न्यायाधिशाची जागा रिकामी झाली आहे, ती भरण्यांत येईल.

### गेल्या आठवड्यांतील आगबोटींचा नाश

ता. २३-२४ मार्चच्या मध्यरात्रीं संपलेल्या आठवड्यांत शत्रुपक्षानें ब्रिटिश व इतर राष्ट्रांच्या ५९,१२१ टनांच्या १७ आगबोटी बुडवल्या. पूर्वीच्या तीन आठवड्यांतील आकड्यांपेक्षां हा आकडा पुष्कळच लहान आहे. "ह्या गतीनें जाऊन हिटलरला १९४१ सालीं विजय मिळविणें अशक्य आहे. ॲटलांटिकवर सार्वभौमत्व मिळविल्यासेरीज त्यास यश प्राप्त होणार नाहीं" असें लेफ्टनंट कमांडर फ्लेचर हे नुकतेच म्हणालें.

### हिंदुस्थान-ब्रह्मदेश व्यापारी करार

हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांमधील व्यापारी कराराच्या प्रमुख मुद्यांवर दोन सरकारांची एकवाक्यता झाली असून करारावर त्या सरकारांच्या प्रतिनिधींच्या सह्याहि झाल्या आहेत. हिंदुस्थान व ब्रह्मदेश हे दोघेहि वाटेल त्या जकाती बसवूं शकतील, परंतु एकमेकांचे मालास जकातीचे बाबतींत ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देशांच्या मालापेक्षां १०% व परदेशी मालापेक्षा १५% सवलत मिळावयाची आहे. प्रस्तुत करारास विधिमंडळाच्या मान्यतेची आवश्यकता नाहीं. ह्या करारामुळें ब्रह्मदेशास जकातींचें मोठें उत्पन्न मिळणार आहे.

### मद्रास युद्धफंडानें एक कोटि रुपयांची मर्यादा ओलांडली

मद्रास प्रांतांतील युद्धफंड आतां एक कोटि रुपयांचेवर गेला आहे.

### बंगलोर येथील म्यूझियम

म्हैसूर सरकारच्या बंगलोर येथील म्यूझियमला १९३९-४० मध्यें एकूण २ लक्ष, ८५ हजार लोकांनीं भेट दिली.

### तांदुळाचा तुटवडा

गेल्या कांहीं महिन्यांत ब्रह्मदेशांतून तांदुळाची आयात होऊं न शकल्या कारणानें मुंबई प्रांतांत तांदुळाचा तुटवडा पडण्याची भीति वाटूं लागली आहे. ह्या प्रांतांत खपणाऱ्या तांदुळापैकीं ४५% तांदूळ रंगूनचा असतो ह्यावरून परिस्थितीची कल्पना येईल. मुंबईतील तांदुळाचा बाजारभाव गेल्या वर्षाच्या मानानें आतां दीडपट झालेला आहे. बंगाल, मद्रास, इत्यादि ठिकाणचा रंगून तांदूळ इकडे आणविण्याचा प्रयत्न मुंबईमधील व्यापारी करीत आहेत. परंतु रेल्वेच्या वाघिणी मिळण्याच्या अडचणींमुळें ह्या मार्गानें फार तांदूळ येण्याचा संभव नाहीं; ब्रह्मदेशांतून इकडे तांदूळ आणण्यासाठी लागणाऱ्या आगबोटींचा तुटवडा येत आहे. मुंबईमधील व्यापाऱ्यांकडे उत्तर हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांच्या मोठमोठ्या ऑर्डरी येत आहेत. कोकण व गुजरात येथेंहि तांदूळ हवा आहे.

### कालव्याखालील जमीन

मुंबई प्रांतांत १९३९-४० मध्यें एकूण ३,०४,८८९ एकर जमीन कालव्याचे पाण्यानें भिजली. १९३८-३९ मध्यें २,७०,६५० एकरांस पाणी मिळालें होतें. १९३८-३९ सालापेक्षां १९३९-४० मध्यें पाणीपट्टीचें उत्पन्न ४ लक्ष ५ हजारांनीं अधिक मिळून तें १९ लक्ष ३२ हजार रुपये झालें. पाणीपुरवठ्याच्या प्रमुख योजनांवर खालीलप्रमाणें व्याज सुटलें:—

| | |
|---|---|
| निरा लेफ्ट बँक कॅनॉल व शेटफळ टँक | ३·६८% |
| मुठा कॅनॉल व मतोबा टँक | ३·४३% |
| गोदावरी कॅनॉल्स | १·९५% |
| कडवा रिव्हर वर्क्स | ०·०२% |
| प्रवरा रिव्हर वर्क्स | २·५५% |
| कृष्णा कॅनॉल | ०·१०% |
| गोकाक कॅनॉल | ३·१०% |

### मंत्र्यांचा पगार वाढला

सिंध प्रांताच्या मंत्र्यांचा पगार दरमहा ५०० होता. तो आतां १५०० करण्यांत आला आहे. विधिमंडळाच्या अध्यक्षांचा पगारहि ८०० चा १२५० केला आहे. विधिमंडळाच्या सभासदांस दरमहा ७५ रुपये मिळत असे तो १५० रुपये करावा, ह्या सूचनेसंबंधीं ऐकमत्य नाहीं.

### पंजाबांत घरभाड्याचें नियंत्रण

शहरांतील भाड्यांचें नियंत्रण करणारा कायदा पंजाबच्या कायदे मंडळानें पास केला आहे. हा कायदा पांच वर्षें अंमलांत रहावयाचा आहे.

### जर्मन आणि इटालियन जहाजांचा नाश

दक्षिण अमेरिकेमधील देशांतील बंदरांत असलेल्या जर्मन व इटालियन जहाजांचा त्यांतील लोकांकडूनच नाश करण्यांत येत आहे. पिंजऱ्यांत सापडलेल्या उंदरांप्रमाणें आपली स्थिति झाली आहे असें त्यांस वाटत असावें.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १७० | रमधील सहकारी पुनर्घटना | |
| २ औद्योगिक प्रगतीची पुनः चर्चा ... | १७१ | ७ जंगम मालाच्या जप्तीचे अधिकार ... | १७४ |
| ३ क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स मार्गावरील डिव्हिडंड | १७२ | ८ खंडकरी कायदा ... | १७५ |
| ४ ॲगमार्क योजना ... | १७२ | ९ हिंदुस्थान सरकारचीं संरक्षण कर्जें ... | १७५ |
| ५ आयुर्विमा कंपन्यांनीं मिळवलेलें काम ... | १७२ | १० नवीन धंद्यांना सरकारी संरक्षण ... | १७५ |
| ६ स्फुट विचार ... | १७३ | ११ ऋणविमोचन कायद्याच्या अंमलबजावणीची मागणी | १७६ |
| इटलीची हकालपट्टी—जर्मनीनें युगोस्लाव्हियाशीं युद्ध पुकारलें-ब्रिटिश बजेटाची चढती कमान—ब्रिहा- | | १२ हिंदुस्थानांतील रस्ते-सुधारणा ... | १७६ |
| | | १३ निवडक बाजारभाव | १७८ |



# अर्थ

बुधवार, ता. ९ एप्रिल, १९४१


## औद्योगिक प्रगतीच्या प्रश्नाची पुनः चर्चा

स्वदेशी औद्योगिक प्रगतीचा प्रश्न हिंदी लोकमतास इतक्या जिव्हाळयाचा वाटत आहे, कीं कायदे मंडळांत, व्यापाऱ्यांच्या व धंदेवाल्यांच्या सभांत व वृत्तपत्रांत त्याचा उहापोह वारंवार होत असून त्याबाबत सरकारास सारखी टोचणी लावण्यांत येत आहे. मध्यवर्ती असेंब्लींत ह्या विषयाची चर्चा झाली, तिचें स्वरूप मागें आम्हीं दिग्दर्शित केलेंच आहे. कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें त्या चर्चेचा प्रतिध्वनि नुकताच उठला. युद्ध-परिस्थितीचा हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाकडे अधिक विस्तृत रीतीनें व पद्धतशीरपणानें उपयोग करण्यांत यावा अशी लोकप्रतिनिधींची सरकारकडे मागणी आहे. ह्या बाबतींत शक्य तें सर्व आपण करीत आहों असें त्यावर सरकारचें म्हणणें आहे.

कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें पंडित कुंझरू ह्यांनीं गेल्या आठवड्यांत एक ठराव पुढे मांडला, त्यांत हिंदुस्थानांत अलीकडे झालेल्या प्रगतीचा आढावा घेण्यांत येऊन स्वदेशी धंद्यांचा योजनात्मक उत्कर्ष होईल अशी व्यवस्था सरकारनें करावी ह्या आशयाची सूचना होती. देशाच्या उद्योगधंद्यांचा विकास होण्याबाबत सरकार आणि जनता ह्यांचें एकमत आहे. पण हा विस्तार अनेकांगीं व त्वरित व्हावयास पाहिजे तसा तो होत नसल्याची तक्रार पंडित कुंझरू ह्यांनीं केली. ईस्टर्न ग्रुप पुरवठा समितीच्या कार्याची दिशा हिंदुस्थानास विशेष अनुकूल होणार नाहीं अशी भीति त्यांनीं व्यक्त केली आणि औद्योगिक विस्ताराविषयींच्या सरकारी धोरणांतील अनेक उणीवांकडे दाखले देऊन लक्ष वेधलें.

जहाजें बांधण्याचा धंदा ऑस्ट्रेलियांत व कॅनडामध्यें ब्रिटिश सरकारच्या विद्यमानें चालला आहे. पण हिंदुस्थानांत हा धंदा युद्धोपयोगी गणला जात नाहीं. वहातुकीच्या जहाजांचा येथें उलट तुटवडा भासत आहे; यांत्रिक हत्यारें बनवण्याची व्यवस्था नाहीं आणि मोटारींचे भाग बनवण्याची सोय नाहीं. मोटार गाड्या बनवण्याचा कारखाना एका हिंदी संस्थानांत स्थापन झाला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. पाण्याच्या जोरानें वीज तयार करणें, औषधांच्या बनावटीस उत्तेजन देणें, शास्त्रीय शोधास मदत करणें व औद्योगिक संरक्षणाविषयींच्या अटी सैल करणें ह्या गोष्टी हातीं घेण्याचें महत्त्व पं. कुंझरू ह्यांनीं प्रतिपादलें आणि सरकारनें त्या दृष्टीनें आपलें धोरण आखावें असें सुचवलें. युद्धोत्तर काळांत हिंदी धंदे तगून रहातील अशी तजवीज सरकारनें आतांपासून करावी असें इतर वक्त्यांनीं प्रतिपादलें.

हिंदुस्थान सरकारची बाजू पुढे मांडतांना सर रामस्वामी मुदलियार ह्यांनीं प्रस्तुत विषयावरील असेंब्लीमधील आपल्या भाषणाचा निर्देश केला. हिंदी धंद्यांच्या भवितव्याचा प्रश्न सरकारपुढे आहे आणि सरकारी खात्यांच्या प्रतिनिधींची एक समिती त्याचा विचार करण्याकरितां नेमण्याचें घाटत आहे असें त्यांनीं सांगितलें. युद्धोपयोगी सामुग्रीची निकड असल्यास ती मिळेल तेथून घेणें अपरिहार्य असून नवीन कारखाने ह्या देशांत स्थापन होण्याची वाट पहाणें शक्य नाहीं असें म्हणून जहाजें बांधण्याच्या धंद्याचा त्यांनीं उल्लेख केला. हा धंदा माल पुरवूं लागण्यास काळ लोटावा लागणार असल्यानें त्याचा युद्धकाळांत प्रत्यक्ष उपयोग होण्यासारखा नाहीं असा सरकारतर्फेचा युक्तिवाद व्यापार मंत्र्यांनीं पुढें मांडला. तथापि ह्या धंद्यास शक्य तेवढें सहाय सरकार देत आहेत असें त्यांनीं सांगितलें. औषधांच्या बनावटीचा धंदा ह्या देशांत दृढमूल होणार असून मेडिकल खात्याचे अधिकारी त्याचा माल घेण्याचें धोरण युद्धसमाप्तीनंतरहि चालू ठेवतील असें आश्वासन त्यांनीं दिलें.

सर ॲलन लॉइड ह्यांनीं पंडित कुंझरू ह्यांच्या ठरावाच्या मर्यादा फार व्यापक असल्यानें त्या आकुंचित करण्याची आवश्यकता प्रतिपादिली आणि ह्या धोरणास अनुसरून स्वतःची एक दुरुस्ती त्याच्या जागीं पुढे मांडली. सरकारी खात्यास लागणारीं औषधें बंगलोरच्या बनावटीचीं घेण्याचें अभिवचन देतां येत नाहीं असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. पण परिस्थिति अनुकूल झाल्यास हिंदी साखर इंग्लंडमध्यें पाठवण्याची व्यवस्था केली जाईल असें ते म्हणाले. उद्योगधंदे हा प्रांतिक सरकारांच्या कक्षेतला विषय आहे आणि त्यांत मध्यवर्ती सरकारास हात घालतां येत नाहीं ही अडचणहि त्यांनीं पुढे केली. जहाजें बांधण्याचें काम युद्धाच्या तयारीचा भाग म्हणून हातीं घेणें ही गोष्ट सरकारनें मान्य करण्यास त्यांनीं नकार दिला. शेवटीं सर ॲलन ह्यांची दुरुस्ती पंडित कुंझरू ह्यांनीं पत्करली आणि तीच कौन्सिलनें मंजूर केली.

युद्धपरिस्थितीमुळें ह्या देशांत कांहीं धंदे नव्यानें निघत आहेत व कांहींचा विस्तार होत आहे. हा औद्योगिक विकास कोणत्या रीतीनें चालला आहे, त्याचें पर्यवसान युद्धोत्तर काळांत कसें होईल, कोणत्या धंद्यास संरक्षण चालू ठेवावें लागेल आणि कोणत्यास दुसऱ्या उद्योगांची जोड द्यावी लागेल इत्यादि बाबींचा व्यापक रीतीनें विचार होण्याची आवश्यकता सरकारासहि पटली पाहिजे. कारण, ह्या बाबतींत योजनात्मक धोरण आखणें व्यवस्थित व सुरक्षित औद्योगिक उन्नतीच्या दृष्टीनें अगत्याचें आहे. सर ॲलन लॉइड ह्यांनीं लोकमताची ही बाजू नीट ध्यानांत घेतली असती तर पंडित कुंझरू ह्यांच्या ठरावाचें मर्म त्यांस पटण्यास अडचण भासली नसती. औद्योगिक स्वयंपूर्णतेची त्यांची मागणी नव्हती; हिंदी औद्योगिक घटना निर्दोष व्हावी आणि तीमध्यें एकांगीपणा उत्पन्न होऊं नये एवढेंच त्यांचें म्हणणें होतें.

## क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागांवरील डिव्हिडंड

लिमिटेड कंपन्यांच्या भागांचे मुख्य दोन प्रकार, म्हणजे प्रेफरन्स व ऑर्डिनरी हे होत. कंपनीच्या आर्थिक परिस्थितीप्रमाणें ऑर्डिनरी भागांवरील डिव्हिडंड कमी-अधिक होतें व एकादे वेळेस तें मिळतहि नाहीं. प्रेफरन्स भागीदारांस त्यांच्या भागांवर ठराविक दरानें डिव्हिडंड दिल्यावर नफ्यापैकी जी रकम उरेल, तिच्यांतून ऑर्डिनरी भागीदारांत वाटणी होते. प्रेफरन्स भागांवरील डिव्हिडंडचा दर मुळांतच ठरविलेला असतो, परंतु ऑर्डिनरी भागांवरील डिव्हिडंडची गोष्ट तशी नसते. प्रेफरन्स भागांतहि दोन प्रकार आहेत. प्रत्येक वर्षी कंपनीस प्रेफरन्स भागीदारांस नफा देतां येईलच असें नाहीं व पुरेशा नफ्याचे अभावीं ठराविक डिव्हिडंड देतां येणें अशक्यहि होईल.

ही तूट पुन्हा कंपनीस नफा होईल त्यांतून अगोदर भरून काढली पाहिजे व नंतरच इतर भागीदारांच्या डिव्हिडंडचा विचार केला पाहिजे, अशी अट ज्या प्रेफरन्स भागांचे संबंधांत असते, त्यांस क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भाग असें म्हणतात. ह्या भागांवर कांहीं वर्षे जरी डिव्हिडंड मिळालें नाहीं, तरी त्यावरील भागीदारांचा हक्क कायम रहातो. नॉन-क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागांवरील डिव्हिडंडला प्राधान्य त्या वर्षापुरतेंच असतें. क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागांवरील डिव्हिडंडची तूट भरून येईपर्यंत कंपनीच्या नफ्यावर त्या भागाच्या मालकांचा अग्र हक्क रहातो. लिमिटेड कंपन्यांचे भाग लोकांनीं घ्यावेत, ह्यासाठी त्यांस नफावाटणीची कांहीं तरी शाश्वति पटावी लागते. क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भाग धारण करणारांस नफ्यांत अग्रहक्क मिळतो, ह्या दृष्टीनें त्या प्रकारचे भाग काढण्याची नव्या कंपन्यांची प्रवृत्ति दिसून येते. क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागांसंबंधीं अनेक वेळां अपुऱ्या माहितीमुळें गैरसमज उत्पन्न होतो, तो दूर व्हावा या दृष्टीनें येथें माहिती देण्यांत येत आहे.

डायरेक्टरांनीं तशी शिफारस केल्याविना डिव्हिडंड वाटतां येणार नाहीं अशी कंपनीच्या आर्टिकल्समध्यें तरतूद असल्यास व कोणतेंहि डिव्हिडंड देण्यापूर्वी रिझर्व्ह निर्माण करण्याचा डायरेक्टर बोर्डास अधिकार असल्यास क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागांवरील डिव्हिडंड द्यावें असा डायरेक्टरांचा ठराव होईपर्यंत त्या डिव्हिडंडची बाकी हें कंपनीचें "देणें" ह्या सदरांत येऊं शकणार नाहीं. कंपनीस नफा झाला व तो क्यु. प्रे. भागांस वाटण्याचें डायरेक्टरांनीं ठरविलें तरच बाकी डिव्हिडंड हें कंपनीचें "देणें" होतें. डायरेक्टर तसा ठराव करणारहि नाहींत ! जी गोष्ट करण्याचें अगर न करण्याचें सर्वस्वी डायरेक्टरांवर अवलंबून आहे, ती गोष्ट "देणें" ह्या निश्चित संज्ञेस पात्र होत नाहीं. एकादी कंपनी लिक्विडेशनमध्यें जाण्यापूर्वी तिच्या डायरेक्टरांनीं पुरेसा नफा झाला असतांहि, प्रेफरन्स भागांवर नफा वाटला नाहीं, तर त्या भागांचे मालकांस आपल्या डिव्हिडंडची बाकी मिळूं शकणार नाहीं व सर्व वाढावा ऑर्डिनरी भागीदारांसच मिळेल, असा त्याचा अर्थ होतो. तथापि प्रेफरन्स भागांवरील डिव्हिडंड देणें न देणें डायरेक्टरांचे मर्जीवर अवलंबून नसलें व नफा झाला कीं त्या भागीदारांस तो मिळालाच पाहिजे अशी तरतूद असली, तर क्यु. प्रे. भागीदारांचें डिव्हिडंडचें बाकी देणें हें पुढें उपस्थित होणारें खरें "देणें" असतें व त्याप्रमाणें ताळेबंदांत त्याची नोंद करावी लागते. कंपन्यांच्या आर्टिकल्समध्यें ह्या संबंधांत योग्य ती खबरदारी घेतलेली बहुधा असतेच व डायरेक्टरांनीं डिव्हिडंड सुचविल्याविना तें भागीदारांस मिळूं नये, अशी तरतूद आर्टिकल्समध्यें केलेली असते. कंपनीच्या ताळेबंदांत क्यु. प्रे. भागांवरील डिव्हिडंडची बाकी देणें रकम ती देणें अगर न देणें डायरेक्टरांच्या मर्जीवर अवलंबून असलें तरी, नमूद करणें इष्ट आहे. क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागीदारांचे डिव्हिडंडबाबत अधिकार काय आहेत ह्याचा वरील विवेचनावरून खुलासा होईल.

### ॲगमार्क योजना

शेतीच्या मालाची प्रतवार लावून त्याचा उठाव करण्यास मदत करण्यासाठीं "ॲगमार्क"ची योजना अंमलांत आली. मार्केटिंग अधिकाऱ्यांचे देखरेखेखालीं मालाची निवड करून त्याची प्रत लावली जाते, त्यामुळें चांगल्या मालास किंमत भरपूर येऊं शकते व गिऱ्हाइकासहि विश्वासानें माल घेतां येतो. १९३७ च्या ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस ग्रेडिंग ॲंड मार्केटिंग ॲक्टाचे अन्वयें निवडून प्रत लावलेल्या मालावर "ॲगमार्क" हें लेबल लावण्यांत येतें. १९४० चे प्रारंभीं हें लेबल लावण्याची परवानगी असणारे १२० अधिकृत लोक होते. त्यांची संख्या १९४० अखेर ३३४ झाली आहे. प्रतवार लावून पॅकिंग करण्याचीं केंद्रें १९३६ सालीं होतीं, तीं १९३९ मध्ये १९७ झालीं. १९४० अखेर तीं ४०० झालीं आहेत. खालील तक्त्यांत कांहीं प्रमुख मालासंबंधीं प्रतवारीचा तपशील दिला आहे:—

| | १९४० | | १९३९ | |
|---|---|---|---|---|
| मालाचें नांव | किती ? | किंमत (रु.) | किती ? | किंमत (रु.) |
| तूप | ७७ हजार मण | ४२ लक्ष | ८१½ हजार मण | ४३ लक्ष |
| अंडीं | १¼ कोटि; | ३ लक्ष.६ | १ कोटि; | २½ लक्ष |
| कातडीं | २½ लक्ष; | १६ लक्ष | २ लक्ष; | ८½ लक्ष |
| तांदुळ | २¼ लक्ष मण; | १०½ लक्ष | ८२ हजार; | ३¾ लक्ष |
| बटाटे | ४३½ हजार मण; | १ लक्ष,८३ | १२ हजार मण; | ४३ हजार |
| तंबाखू | २३ हजार मण; | ३½ लक्ष | ३१ हजार मण; | २¼ लक्ष |
| द्राक्षें | ६२२ मण; | ६९७५ रु. | ७१२ मण; | ७१२० |

### विमा कंपन्यांनीं मिळविलेलें काम (१९४०)

| | रुपये |
|---|---|
| नॅशनल इं. ... ... | १,५४,८०,७७० |
| भारत ... ... | १,५०,६७,८७१ |
| बॉंबे लाइफ ... ... | १,२२,०७,६५० |
| युनायटेड इंडिया ... ... | ९७,००,००० |
| मेट्रॉपॉलिटन ... ... | ७१,००,००० |
| न्यू एशियाटिक ... ... | ६०,००,००० |
| बॉंबे कोऑपरेटिव्ह ... | ४०,००,००० |
| इंडियन म्युच्युअल ... | ३१,००,००० |
| रूबी जनरल ... ... | ३०,००,००० |
| फ्री इंडिया जनरल ... | १४,१७,७८९ |
| आर्यस्थान ... ... | १३,००,००० |
| कॅनरा म्यूच्युअल... ... | ८,००,००० |
| न्यू स्वस्तिक ... ... | ८,००,००० |
| ट्रस्ट ऑफ इंडिया ... | ५,८०,००० |
| इंडो यूनियन ... ... | ७,०१,४५० |

## स्फुट विचार

### इटलीची हकालपट्टी

आफ्रिकन मुलखामधून इटलीची हकालपट्टी आतां पुरी झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सोमाली लँड, इरिट्रिया, लिबिया हे प्रदेश इटलीनें गमावले आहेत आणि अबिसिनियामध्यें त्याच्या फौजांचा चोहोंकडून कोंडमारा होऊन ह्या देशाची पारतंत्र्यांतून मुक्तता झाली आहे. आपल्या इटालियन दोस्ताच्या सहायास धावून येण्याचा हिट्लरचा बेत ऐनवेळीं फिस्कटला. जर्मन फौजा व विमानें इटलींत तळ देऊन राहिल्याच्या बातम्या मध्यंतरीं येत होत्या आणि तेथून आफ्रिकेंत आपलें सैन्य पाठविण्याची तयारी हिट्लर करीत होता. पूर्वेच्या बाजूस इटलीची फौज घेरली गेली असतां पश्चिमेकडून ब्रिटिशांस पायबंद घालावा आणि त्या रीतीनें आपल्या दोस्तास अप्रत्यक्ष सहाय द्यावें असा त्याचा हेतु असावा असें उघड दिसतें. लिबियामधील इटालियन सैन्याची लांडगेतोड करून ब्रिटिशांनीं मोठ्या तडफेनें बेंगाझी काबीज केलें. जर्मनीनें त्या बाजूस हळुहळू फौजेची जमवाजमव केली तेव्हां ब्रिटिशांनीं बेंगाझी सोडून दिलें आणि आपलें ठाणें दुसऱ्या मजबूत ठिकाणीं प्रस्थापित केलें आहे. इटलीचें आफ्रिकेंतील साम्राज्य आतां नष्ट पावलें असल्यानें बेंगाझीच्या बाजूनें चाललेली जर्मनीची खटपट त्यांचे बाबतींत फलद्रूप होण्याचा संभव नाहीं. जर्मन फौजेच्या संबंधांत लिबियांत सावधगिरी बाळगून पूर्वेकडील ब्रिटिश सैन्य इतर रणांगणांवर लढण्यास मोकळें होणार आहे.

---

### युगोस्लाव्हियाशी जर्मनीनें युद्ध पुकारलें

युगोस्लाव्हियांत राज्यक्रांति होऊन तेथील मंत्रिमंडळानें जर्मनीशी केलेला करार फेटाळण्यांत आल्यामुळें हिट्लर चिडून गेला. आपल्या युद्ध-योजनांमध्यें त्या देशास सामील करून घेण्याचा त्याचा बेत फसला म्हणून युगोस्लाव्हियाच्या नव्या सरकारास फितुरी समजून त्याचे विरुद्ध हिट्लरनें युद्ध पुकारलें आहे. त्याचबरोबर ग्रीसवरहि स्वारी त्यानें आरंभली आहे. स्वतःच्या स्वातंत्र्याचें संरक्षण करण्याचा युगोस्लाव्हिया व ग्रीस ह्यांचा निर्धार हाच जर्मनीच्या दृष्टीनें त्यांचा गुन्हा आहे. जर्मनी-इटली-जपान ह्या त्रिकुटास बाल्कन राष्ट्रांनीं मिळून त्यांचे अंकित व्हावें ही हिट्लरची महत्वाकांक्षा आहे. तिला बळी पडण्यास नकार देणारीं युरोपिअन राष्ट्रें जर्मनीच्या दृष्टीनें पादाक्रांत झालींच पाहिजेत. इतर युरोपिअन राष्ट्रांस दंडुकेशाहीचा न्याय जर्मनीनें लागू केला तोच न्याय आतां युगोस्लाव्हियास लावला जात आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी झगडण्याचा विडा इंग्लंड आणि अमेरिका ह्यांनीं उचलला आहे आणि बाल्कन्समध्यें जर्मनीनें चालू केलेल्या अन्यायमूलक युद्धांत हिट्लरच्या नियोजित बळींस सहाय देण्याचें त्यांनीं आश्वासन द्यावें हें स्वाभाविक आहे. त्याप्रमाणें ब्रिटिश आणि अमेरिकन कुमक युगोस्लाव्हिया व ग्रीस ह्यांस मिळेल ह्यांत संशय नाहीं. नुकत्याच झालेल्या घडामोडीमुळें युद्धाचें क्षेत्र पूर्व-युरोपाकडे पसरत आहे.

---

### ब्रिटिश बजेटाची चढती कमान

गेल्या वर्षी एप्रिलमध्यें ब्रिटिश बजेट पार्लमेंटपुढें मांडण्यांत आलें तेव्हां २६६ कोटि पौंड खर्च होईल असा अंदाज करण्यांत आला होता. पुढें जुलै मध्यें हा आकडा वाढवण्यांत येऊन तो ३४६ कोटि पौंड झाला आणि वर्षअखेर तो ४० कोटींनीं वाढून ३८६ कोटींपर्यंत चढला. रुपयांमध्यें हा हिशेब सुमारें ५,००० कोटींच्यावर जातो. येत्या वर्षीच्या खर्चाचा अंदाज सुमारें ७,८०० कोटि रुपयांच्या आसपास जाईल असा रंग आज दिसत आहे. ब्रिटिश राष्ट्रास प्रस्तुत युद्धाप्रीत्यर्थ केवढा प्रचंड खर्च व स्वार्थ-त्याग करावा लागत आहे ह्याची कल्पना वरील आकड्यांवरून येण्यासारखी आहे. ह्या बाबतींत वस्तुस्थिति काय आहे ह्याची विश्वसनीय व तपशीलवार माहिती सर किंगस्ले वुड, ब्रिटिश फडनवीस, ह्यांनीं आपलें अंदाजपत्रक प्रकट केलें त्यावेळीं उपलब्ध झाली.

---

### बिहारमधील सहकारी पुनर्घटना

सहकारी संस्थांची दुःस्थिति कमी-अधिक प्रमाणांत हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत आर्थिक मंदीमुळें झाली आहे. कांहीं प्रांतांत ही परिस्थिति विशेष कठिण होऊन गेली असून सरकारच्या मध्यस्थीची व उदार सहायाची आवश्यकता निकडीनें भासली आहे. प्राथमिक पतपेढ्यांच्या सभासदांचीं कर्जें थकून त्यांस शेतीच्या कामास नवीन कर्जें मिळण्याची पडलेली पंचाइत, मध्यवर्ती बँकांनीं त्या पेढ्यांस दिलेलीं कर्जें वसूल न झाल्याकारणानें त्यांची उडालेली तारांबळ आणि प्रांतिक सहकारी बँकेस अशा स्थितींत आपलें कार्य करण्याची आलेली अडचण ही दुःस्थितीची साखळी आहे. थकलेलीं कर्जें वसूल होईपर्यंत व तो वसूल होण्यास मदत म्हणून सहकारी चळवळींत लांब मुदतीचा पैसा आला पाहिजे आणि तो प्रांतिक सरकारावांचून दुसरें कोण देणार? बिहार प्रांतांतील सहकारी संस्था ह्या पेंचांत सापडून त्यांची सुधारणा व पुनर्घटना करण्याची खटपट गेलीं कांहीं वर्षे चालली आहे. पुनर्घटनेची एक योजना ह्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां नेमलेल्या समितीनें सुचवली होती आणि तिला मूर्त स्वरूप देण्याचें बिहार सरकारनें ठरविलें असल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. ह्या योजनेस अनुसरून प्रांतिक सरकारास पांच वर्षांच्या मुदतींत ४९ लक्ष रुपयांची तरतूद करावी लागेल. त्यापैकीं १९४१-४२ सालाकरितां १७ लक्ष रुपयांची तजवीज सरकारनें करून ठेवली आहे. सहकारी पतपेढ्या आणि मध्यवर्ती बँका ह्यांस पैसा पुरविण्याची जबाबदारी प्रांतिक बँकेवर पडावयाची आहे आणि त्याकामीं त्या संस्थेस नुकसान येईल त्याची भरपाई म्हणून १८ लक्ष रुपये खर्चण्याची तयारी सरकारनें ठेवली आहे. आपणांस ह्या बाबतींत व्यवस्थित नियंत्रण करतां यावें म्हणून त्यांनीं बँकिंगचा सल्लागार नेमण्याचें ठरवलें आहे. हा अधिकारी प्रांतिक बँकेचा मॅनेजिंग डायरेक्टर ह्या नात्यानें काम करील. मध्यवर्ती बँकांनीं द्यावयाच्या ठेवींच्या रकमांस सरकार मर्यादा घालील आणि ह्या रीतीनेंहि त्यांच्या व्यवहारावर सरकारी नियंत्रण राहील. सहकारी संस्थांची पुनर्घटना व्हावयाची असतां प्रांतिक सरकारनें आपल्या जबाबदारीचा वांटा उचलावा लागतो आणि पैशाची हमी द्यावी लागते ही गोष्ट बिहार प्रांताच्या सरकारनें आखलेल्या धोरणानें सिद्ध केली आहे आणि मुंबई सरकारनें ती लक्षांत घेणें अगत्याचें आहे. आमच्या प्रांतिक सरकारापुढें सहकारी बँकांनीं ही महत्त्वाची बाब मागेंच मांडली आहे आणि बिहारच्या उदाहरणानें तिला चांगला आधार मिळत आहे.

---

## जंगम मालाच्या जप्तीचे अधिकार

मे. कलेक्टर साहेब जिल्हा पुणें यांनीं लँड रेव्हेन्यू कोडचे कलम १५४ अन्वयें नं. A. G. R. ३६२ ता. १३-२-४१ चे हुकुमानें पुणें सेंट्रल को-आपरेटिव्ह बँकेच्या व जिल्ह्यांतील को-आपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियनच्या खाडील अंमलदारांना त्यांचेकडील विशिष्ट हद्दींत थकबाकीदारांच्या जंगम मालाची जप्ती करण्याचा अधिकार दिला असल्याचें जाहीर केलें आहे.

| नांव व हुद्दा. | कार्यक्षेत्र. |
|---|---|
| १ मे. एस. एम. भावे, एजंट-इन्स्पेक्टर दौंड शाखा पुणें सेंट्रल को. बँक. | दौंड पेटा. |
| २ मे. के. डी. कुलकर्णी, इन्स्पेक्टर, बारामती पुणें सेंट्रल को. बँक. | भिमथडी तालुका. |
| ३ मे. आर. ए. कुलकर्णी, एजंट इन्स्पेक्टर, इंदापूर शाखा पुणें सेंट्रल को. बँक | इंदापूर तालुका. |
| ४ मे. डी. ए. सावंत, सुपरवायझर खेड वं जुन्नर सुपरवायझिंग यूनियन. | खेड व जुन्नर तालुके व आंबेगांव पेटा. |
| ५मे. के. डी. कुलकर्णी, सुपरवायझर, हवेली शिरूर मावळ सुपरवायझिंग यूनियन. | हवेली व मावळ तालुके आणि शिरूर व मुळशी पेटा. |
| ६ मे. के. बी. देशिंगकर, सुपरवायझर भि. व इंदापूर ता.. सुपरवायझिंग यूनियन. | भिमथडी व इंदापूर तालुके. |

### ट्रेझरी बिलांवर १३ आ. ११ पै व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. १३ आणे ११ पै एवढा व्याजाचा दर बसला.

### बंगाल दुकानदारांच्या नोकरांचा कायदा

कलकत्ता आणि हावरा येथें बंगाल प्रांताचा दुकानदारांच्या नोकरांचे कामाचे तास नियंत्रित करणारा कायदा गेल्या १ एप्रिल पासून अमलांत आला. ह्या कायद्याअन्वयें दुकानें सकाळीं ८ ते रात्रीं ८ वाजेपावेतों उघडीं रहातील आणि त्यांच्या नोकरांस दर आठवड्यास दीड दिवसांची सुटी मिळेल.

### ग्रामसुधारणेसाठी बक्षिस

मुंबई प्रांतांत ग्रामसुधारणेस उत्तेजन देण्याचे हेतूनें प्रत्येक जिल्ह्यांतील एका गांवास दरवर्षी शंभर रुपयांचें एक बक्षिस देण्याचें ठरवलें आहे. ग्रामसुधारणेच्या निरनिराळ्या बाबींत कमाल सुधारणा घडवून आणणाऱ्या खेडेगांवास तें दिलें जाईल. जिल्ह्याच्या कलेक्टरचे शिफारसीवर कमिशनर हें बक्षिस देतील. बक्षिसाचें स्वरूप खेडेगांवांच्या सूचना लक्षांत घेऊन निश्चित करण्यांत येईल.

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न वाढलें

१ एप्रिल, १९४० ते २० मार्च १९४१ च्या मुदतींत हिंदी रेल्वेजना १०७ कोटी ४२ लक्ष रुपये इतकें उत्पन्न मिळालें. पूर्वीच्या वर्षाच्या ह्याच मुदतींत झालेल्या उत्पन्नापेक्षा हा आकडा १२ कोटी, ३० लक्ष रुपयांनीं अधिक आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाइंचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ येलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## लवकरच अंमलांत यावयाचा खंडकरी कायदा

सुरत, ठाणें, पश्चिमखानदेश व धारवाड ह्या जिल्ह्यांत मुंबई सरकारचा खंडकरी कायदा लवकरच अंमलांत येणार आहे. ह्या कायद्याप्रमाणें, कोणत्याहि खंडाची मुद्दत १० वर्षांपेक्षां कमी असूं शकणार नाहीं. दीर्घकाळ जमीन आपल्या हातीं राहील, अशा खात्रीमुळें खंडकऱ्यास जमिनींत सुधारणा घडवून आणण्यास उत्तेजन मिळेल, अशी अपेक्षा आहे. जमीनमालकांस नजर, बक्षीस, इत्यादि कांहींहि घेतां येणार नाहीं व खंडकऱ्याकडून कांहीं कामेंहि सक्तीनें करवून घेतां येणार नाहींत. असें केल्याचें सिद्ध झाल्यास तो १ हजार रुपयांपर्यंत दंडास पात्र होईल. कांहीं विभागांसाठीं सरकार खंडाची कमाल मर्यादा ठरवून देईल, त्यापेक्षा अधिक खंड मालकास घेण्याचा अधिकार रहाणार नाहीं. सरकारनें जमीनमहसुलाचे वसुलीस तहकुबी अथवा माफी दिली तर त्याचा फायदा खंडकऱ्यास मिळालाच पाहिजे. पिकाच्या वाटणीचे तत्त्वावर खंड ठरलेला असेल, तर त्यास हा नियम लागू नाहीं. खंडाची मुद्दत चालू असेपर्यंत खंडकऱ्यानें लावलेल्या पिकावर व झाडांचे लाकडांवर खंडकऱ्याचा हक्क आहे व खंडाची मुद्दत संपल्यानंतर त्यांच्या नुकसानभरपाईचाहि त्यास अधिकार आहे. खंडकरी कायदा अंमलांत आल्यानंतर केलेल्या खंडचिठ्ठ्यांचे बाबतींत असा कायदा आहे, कीं हीं झाडें मालकाचे परवानगीनें लावलेलीं असतील, तरच खंडकऱ्यांस नुकसानभरपाई मिळूं शकते. खंड न दिल्यास खंडचिठ्ठी रद्द होते. परंतु, ह्या संबंधांत कोर्टातील निवाड्याचे वेळीं खंडकऱ्यानें खंड भरला अथवा तो भरण्यासाठीं योग्य जामीन दिला तर, खंडचिठ्ठी रद्द होण्याचें टळतें. खंडकऱ्यानें जमीन खराब केली, तरीहि खंडचिठ्ठी रद्द होऊं शकते, परंतु तशी ती रद्द केल्याचें मालकानें कळविल्यापासून एका वर्षांत खंडकऱ्यानें जमीन पूर्वस्थितींत आणली तर खंडचिठ्ठी कायम राहूं शकते. जमीन मालकानें खंड पोचल्याची योग्य पावती खंडकऱ्यास दिली पाहिजे. खंडकरी कायद्यानें खंडकऱ्यानें सध्याचे सर्व हक्क कायम राखले आहेत. वरील दिलेले हक्क सर्व खंडकऱ्यांस मिळावयाचे आहेत. परंतु खंडकरी कायद्यानें कांहीं संरक्षित खंडकरी अथवा कुळें निर्माण केलेलीं आहेत.

### संरक्षित कुळें

१ जानेवारी, १९३८ च्या पूर्वी लागून किमान ६ वर्षे जो स्वतः जमीन धारण करून कसत होता, त्यास संरक्षित खंडकरी म्हणण्यांत येणार आहे. त्यास ती जमीन वारशानें दुसऱ्याकडून मिळाली असेल, तर दुसऱ्यानें कसलेलीं वर्षेंहि हिशेबांत घेतलीं जातील. उदाहरणार्थ, बापानें चार वर्षें जमीन कसली व त्याच्या मृत्यूनंतर मुलानें दोन वर्षें ती कसली, तर मुलगा संरक्षित खंडकरी बनतो. १९३८ पूर्वी ६ वर्षें एकाच मालकाच्या, एकाच गांवांतील निरनिराळ्या जमिनी कसणाऱ्या खंडकऱ्यासहि "संरक्षित" म्हणण्यांत येईल. संरक्षित खंडकऱ्याचा खंडाचा करार फक्त खालील प्रसंगींच रद्द होईलः—

(१) ज्या वर्षी कायदा अंमलांत येईल, त्यापूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्चला संपणाऱ्या वर्षाचा खंड त्यानें कायदा अमलांत आल्यावरहि चार महिन्यांत दिला नाहीं, तर

(२) जमीन महसुलाचा शेवटचा हप्ता भरण्याच्या तारखेनंतर १५ दिवसांत त्या त्या वर्षाचा त्यानें खंड दिला नाहीं, तर

(३) जमिनीचें कायमचें नुकसान होईल असें त्यानें कृत्य केलें, तर

(४) त्यानें जमीन पोटखंडानें दिली अथवा स्वतः कसली नाहीं, तर

(५) बिगर शेतीचे कामीं त्यानें जमीन वापरली, तर

मालकासच स्वतः कसण्यासाठीं व स्वतःचे उपयोगासाठीं अगर बिगर शेतीचे कामासाठी जमीन पाहिजे असेल तर ह्याकरितां मालकानें खंडकऱ्यास १२ महिन्याची नोटीस दिली पाहिजे.

खंडकऱ्यास जमीन सोडावी लागली तर त्यानें जमिनींत केलेल्या सुधारणांबद्दल त्यास भरपाई मिळाली पाहिजे. गैरकायदा त्यास घालवून देण्यांत आलें तर त्यासाठीं आणखी नुकसानभरपाई त्यास मिळाली पाहिजे.

इनामी, तालुकदारी व खोती गांवांतील खंडकऱ्यांच्या संरक्षणाचीहि आणखी तरतूद कायद्यानें केलेली आहे. खंडकरी कायदा एकाद्या टापूंत अंमलांत आला कीं, १९३८ चा बॉंबे स्मॉल होल्डर्स रिलीफ ॲक्ट तेथें रद्द होईल.

### हिंदुस्थान सरकारचीं संरक्षण कर्जे

हिंदुस्थान सरकारनें काढलेल्या संरक्षण कर्जांपैकीं ३८ कोटि, २० लक्ष रुपयांचीं संरक्षण कर्जें १९४० अखेर खपलीं. त्यापैकीं बंगालमध्यें १६ कोटि, ८१ लक्ष; मुंबईत १३ कोटि, ९ लक्ष आणि पंजाबमध्यें २ कोटि, ५९ लक्ष रुपयांचीं कर्जें खपलीं. ह्या आंकड्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे.

| | ३ टक्के डिफेन्स बॉंड | व्याज–विना बॉंड | डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| बंगाल | १६,२६,००,००० | ३४,००,००० | २१,००,००० |
| मुंबई | १२,११,००,००० | ५५,००,००० | ४३,००,००० |
| पंजाब | २,२४,००,००० | ७,००,००० | २८,००,००० |
| इतर(संस्थानें धरून) | ३,६९,००,००० | १,३१,००,००० | ७१,००,००० |
| | ३४,३०,००,००० | २,२७,००,००० | १,६३,००,००० |

### नवीन धंद्यांना सरकारी सवलत

कापड, विजेचें सामान, स्टोअर्स, इंजिनिअरिंगचें व बिल्डिंगचें सामान, निरनिराळे धातू व खनिज पदार्थ, तेलें, पेंट्स, व्हार्निशें इत्यादि अनेक पदार्थ तपासून त्यांतील गुणाची योग्य ती संभावना करणारें प्रशस्तीपत्र देण्याची व्यवस्था अलिपूर, कलकत्ता, येथील हिंदुस्थान सरकारच्या टेस्ट हाऊसमध्यें करण्यांत आली आहे. तथापि त्याकरितां फीच्या रूपानें सरकारांत भरावी लागणारी रक्कम नवीन धंद्यांत परवडणारी नसल्यामुळें त्यांना अडचण भासते. ही अडचण दूर करण्याच्या उद्देशानें प्रयोग म्हणून एक वर्षपर्यंत अशा नवीन धंद्यांना सवलत म्हणून फीचा आकार कमी करण्यांत यावा अशी योजना सरकारपुढें आहे. ही योजना मंजूर झाल्यास मालाच्या उठावाच्या दृष्टीनेंहि नवीन धंद्यांना फार मदत होईल.

## ऋणविमोचन कायद्याच्या अंमलबजावणीची मागणी

**श्रीयुत वैकुंठराय मेहता यांच्या नगर जिल्ह्यांतील सहकारी संस्थांना भेटी.**

तारीख २६-३-४१ रोजीं सात्रळ ( ता. राहुरी ) को. बेटर फार्मिंग सोसायटीची विशेष साधारण सभा श्री. वैकुंठराय मेहता यांचे अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली. सभेस सात्रळ व धानोरे सोसायटींचे सभासद, गांवांतील पुढारी, शेतकरी वर्ग व आसपासच्या खेड्यांतील शेतकरी समाज उपस्थित होता.

सभेमध्यें सोसायटीच्या सभासदांना पेंड, सल्फेट वगैरे सारखा लागणारा माल साठविण्यासाठीं व गूळ आणि शेतीचा इतर माल साठवून ठेवण्यासाठीं गुदाम बांधण्याबद्दल सरकारकडे रु. १५०० ग्रांटची मागणी करण्याबद्दल व इरिगेशन खात्यानें शेतकऱ्यांना आठमाही पाणी देण्याचें बंद केलें आहे तें पूर्वीप्रमाणेंच देण्यांत यावें व चालू सालीं आठमाही पाणी बंद केल्यामुळें उभे ऊंस वाळून जाऊं नयेत म्हणून शेतकऱ्यांनीं पंचनाम्यावर पाणी घेतल्यामुळें त्यांचे जादा रकमेचे पंचनामे झाले आहेत, ते माफ होऊन नेहमींप्रमाणेंच पंचनामे व्हावेत अशी इरिगेशन खात्याला विनंती करण्याबद्दलचे ठराव पास झाले. तसेंच कॉंग्रेस प्रधानमंडळाचे वेळीं एकदीड वर्षापूर्वी शेतकऱ्यांच्या फायद्यासाठीं ऋणविमोचन कायदा पास केला होता त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नसल्यामुळें तो अंमलांत येण्याचे बाबतींत इतर लोकांकडून अडथळे उत्पन्न केले जात आहेत. करितां तो कायदा शक्य तितक्या लवकर अंमलांत आणावा म्हणून सरकारकडे विनंति करण्यांत यावी असाही ठराव पास झाला.

श्री. मेहता हे आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले कीं, आपल्या देशासारखाच शेतीप्रधान जो आयर्लंड देश त्या देशामध्यें सहकारी चळवळ पहिल्यांदा सुरू झाली व तेथील शेतकऱ्यांनीं उत्तम शेती, उत्तम धंदा व उत्तम रहाणी हें ध्येय आपल्या पुढें ठेवून तें गांठण्यासाठीं त्यांनीं सहकार्यानें व संघटितपणें प्रयत्न केले. नुसती शेतीची मशागत केली म्हणजेच कांहीं चांगला धंदा होत नाहीं. उत्तम प्रतीचा माल जरी तयार झाला तरी तो किफायतशीरपणें विकण्याची व्यापारी कुशलता अंगीं आणली पाहिजे व व्यापार वगैरे धंदे संघटितपणें करण्याचें ध्येय सतत पुढें ठेविलें पाहिजे. उधळेपणा न करणें, नेहमीं स्वच्छता राखणें व शिक्षण वाढवून आपली प्रगति करून घेणें याचाच अर्थ उत्तम रहाणी.

शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठीं खेडेगांवांत लहानलहान सहकारी बँका म्हणजे पतपेढ्या असल्या म्हणजे त्यांना वेळेवर कर्ज मिळेल व पोस्टल सेव्हिंग्ज बँकेप्रमाणें लोकांनी जर आपला बचत झालेला पैसा या बँकेंत ठेवला तर त्याचा उपयोग आपल्या गांवांतच होईल व आपल्या बँकेंतील भांडवलावर आपले उद्योगधंदे वाढवितां येतील. नाहीं तर खेड्यांतील लोकांनीं बचत केलेल्या पैशाचा उपयोग सरकार व शहरांतील लोक करून घेतील व आपणांस मात्र भारी व्याजाच्या दरानें पैसा आणून आपल्या गरजा भागवाव्या लागतील. म्हणून शेतकऱ्यांनीं व इतर लोकांनीं आपली बचत आपल्याच गांवीं असलेल्या पतपेढीमध्यें ठेवण्याबद्दल समाजांत प्रचार करण्याची फारच आवश्यकता आहे.

श्री. मेहता यांनीं दुपारीं सुपरवायझींग युनियनला भेट दिली व त्यावेळीं गुळाचा भाव घसरल्यामुळें सोसायटींतील बागाईतदार सभासदांना येणाऱ्या अडचणीबद्दल व त्यांच्या सोसायटीवर होणाऱ्या परिणामाबद्दल युनियन बोर्ड मेंबर्स व सोसायटीचे सभासद यांचेशीं विचारविनिमय केला. संध्याकाळीं श्री. मेहता यांनीं ममदापूर को. फार्मिंग सोसायटीला भेट दिली.

रात्रीं त्यांनीं वडाळामहादेव को. क्रे. सोसायटीला भेट दिली त्यावेळीं २५० ते ३०० शेतकरी समुदाय जमला होता. तसेंच युनियन बोर्डाचे सर्व मेंबर्स, परचेस व सेल सोसायटीचे चेअरमन व वडाळा येथील प्रमुख कॉंग्रेस कार्यकर्ते श्री. तयबजी हेही हजर होते. सदर प्रसंगीं युनियन प्रेसिडेंट श्रीयुत तिखे यांनीं सांगितलें कीं शेतीचा अवाढव्य धंदा हलगर्जीपणानें करण्यापेक्षा शेतकऱ्यांनीं थोडा धंदा कां होईना पण तो उत्तम तऱ्हेनें केला तर उत्पन्नांत ज्यास्त भर पडेल. तसेंच कोणतेंही कार्य सहकार्यानें व संघटितपणें केल्यास तें सर्वांच्याच हिताचें टिकाऊ असेंच होतें हें त्यांनीं फारच मार्मिकपणें समजावून सांगितलें. श्री. तयबजी म्हणाले कीं शेतकऱ्यांनीं आपसांतील हेवा देवा विसरून सहकार्यानें कार्य केल्यास आपल्या गांवची व देशाची संपत्ती व संघशक्ती वाढवितां येईल. दुसऱ्याचें अनिष्ट चिंतल्यामुळें आपला उत्कर्ष होत नाहीं. पण दुसऱ्याच्या उत्कर्षामुळें आपणांला प्रोत्साहन व शिक्षण मिळेल.

श्री. मेहता यांनीं शेवटीं आपले मननीय विचार शेतकऱ्यांपुढें मांडले. ते म्हणाले कीं अलीकडे सहकारी सोसायटींत एक प्रकारची ग्लानी आली आहे. याचें मुख्य कारण जरी शेतकऱ्यांची हलाखीची आर्थिक परिस्थिति असली तरी त्यांचेतील शिक्षणाचा अभाव, जोडधंद्यांची पिछेहाट, समाजांतील विस्कळीतपणा वगैरेही अनेक कारणें आहेत. या बाबतींत राष्ट्रांतील बऱ्याच लोकांनीं विचार केला आहे. आपण निराश होतां कामा नये. कारण सहकारी संस्थांपासूनच शेतकरी समाजाची व लहान लहान धंदेवाल्यांची आर्थिक उन्नति होणार आहे.

शेतीची सुधारणा, एकत्रित माल पुरवठा व तयार मालाची संघटितपणें विक्री या गोष्टी करून शेतकऱ्यांनीं आपली सर्वांगीण उन्नति करून घेतली पाहिजे. जगांत असा एकही देश नाहीं कीं त्या देशांत सर्वजण शेतीवरच अवलंबून असतात. याकरितां आपणांला जोडधंद्यांची वाढ केली पाहिजे. शेतकऱ्यांचा प्रश्न कठीण आहे. परंतु वरील गोष्टींचा अवलंब करून तो आपण सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## हिंदुस्थानांतील रस्ते सुधारणा

कांहीं दिवसांपूर्वी दिल्ली येथें भरलेल्या रस्ते-सुधारणा-स्टँडिंग कमिटीच्या सभेंत २० लक्ष रुपयांच्या निरनिराळ्या योजना मंजूर झाल्या. मुंबई इलाख्यांतील मुंबई-आग्रा रस्त्यावरील पुलांची डागडुजी करून ते अधिक बळकट करणें; पंजाबमध्यें तेलगंज ते मुसारवेल, आणि घोक पठाण तेलंगज पर्यंत नवीन रस्ते बांधणें; वायव्य सरहद्दप्रांतांत लुनी नदीवर पूल बांधणें, खुद्द दिल्लींत सुधारणा करण्याकरितां ५ लक्ष रुपये खर्च करणें; व मुंबई-आग्रा रस्त्यावर मध्य हिंदुस्थानांत एक पूल बांधून घाट-दुरुस्ती करणें ह्या प्रमुख योजना संमत झाल्या आहेत.

## सात्रळ ग्रुप शेतकी सुधारणा सहकारी बेटर फार्मिंग सोसायटी, लि., ता. राहुरी, जि. नगर

ही अहमदनगर जिल्ह्यांतील पहिली बेटर फार्मिंग सोसायटी होय. ही सोसायटी प्रथम सन १९२६ सालीं उसाचें बीं-बियाणें पुरविण्याच्या उद्देशानेंच फक्त स्थापन झाली होती, व या सोसायटीनें सुधारलेल्या उसाच्या जातींचा प्रचार करून सुरवातीचे तीन वर्षांचे मुदतींत शेतकऱ्यांना या कामीं एकूण रु. ६३३ ची मदत ग्रँट सरकारकडून मिळवून दिली. सभासदांना शेती सुधारण्याचें महत्त्व पटल्यामुळें त्यांनीं आपल्या या संस्थेच्या उद्देशांत व कार्यक्षेत्रांत वाढ करण्याचें ठरविलें व तिचें शेतीसुधारणा बेटर फार्मिंग सोसायटींत रूपांतर करून घेतलें.

या सोसायटीचे उद्देश सुधारलेल्या शेतीच्या पद्धतींचा अवलंब करण्यास शेतकरी सभासदांना शिकविणें, सुधारलेल्या खतांचा, बीं-बियाण्यांचा, औतांचा शेतकऱ्यांमध्यें प्रसार करणें, तीं त्यांना विकण्याची व्यवस्था करणें व औतें भाड्यानें सवलतीच्या दरानें देण्याची सोय करणें, सभासदांचा माल फायदेशीर रीतीनें कमिशन पद्धतीवर विकणें, दुय्यम धंदे, गुळाची जोपासना, दूध-दुभतें, यांत सुधारणा करणें, आरोग्य शिक्षण यांची वाढ करून त्यांच्यांत सहकारी तत्त्वांचा प्रसार करणें हे आहेत. व या उद्देशास अनुसरून या सोसायटीनें कार्य चालविलें आहे, व सदर कामीं सहकारी खातें व ग्रामसुधारणा खातें यांच्या अधिकाऱ्यांचा सल्ला, सोसायटी वारंवार घेत असते. या सोसायटीच्या कार्यक्षेत्रांत सात्रळ धानोरे व सोनगांव धानोरे, हणमंतगांव आणि पाथरे हीं ५ गांवें असून तीं १ मैलाचे टापूंत आहेत व सोसायटीच्या सभासदांची एकूण संख्या २७ आहे. सोसायटीचें खेळतें भांडवल रु. १४७७ चें आहे. त्यांत भागांचें भांडवल रु. २३५ रिझर्वफंड रु. ६४८, व्यापारी कर्ज ४८९, इतर फंड रु. १०५ यांचा समावेश होतो.

गेल्या सालीं सोसायटीनें हार्टिकल्चरल क्लास तारीख २३ ते ते ३०।४।४० पर्यंत ७ दिवस भरविला होता. या क्लासमध्यें फळझाडांची जोपासना, रोगांचें निवारण कसें करावें यासंबंधीं माहिती, सुधारलेल्या फळझाडांच्या जाती फळांची वगैरे उपयुक्त माहिती, तसेंच फळें टिकविण्याची पद्धत व जेली कशी करावी याची माहिती देण्यांत आली. ही माहिती १०० ते १२५ शेतकऱ्यांनीं घेतली. लहान लायब्ररी सोसायटीनें ठेविली आहे. या शिवाय उसाच्या सुधारलेल्या लागवडीचा व सुधारलेल्या जातींचा प्रसार सोसायटीनें सारखा चालू ठेवला आहे. त्याचें फळ म्हणजे कित्येक सभासदांना दर एकरीं ६० ते ६५ पल्ले गुळाचा माल पडला हें होय. सोसायटीचा ऑडिट वर्ग ब आहे. सोसायटी स्थापन करून ती चांगल्या तऱ्हेनें चालविण्याचें श्रेय सोसायटीचे चेअरमन रा. रावो गंगाधर सोनार व सेक्रेटरी रा. बापू बापाजी पाटील तसेंच पंचकमिटींतील सभासद रावजी पांडुरंग पाटील, चंद्रभान नारायण पाटील, शंकर रामचंद्र पाटील व धोंडिबा रावजी ढुके यांना आहे. या मंडळींनीं सतत प्रयत्न व चालू ठेवून संस्थेची उन्नति केली आहे.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| आधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के, नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. - रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज—दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

दक्षिण कोंकणांतील राष्ट्रीय बाण्याचें

प्रमुख साप्ताहिक

## हिंद—सेवक

संपादक—सदानंद शांताराम भांडारकर

प्रकाशक—मधुकर यशवंत भांडारकर

हिंदसेवकमध्यें दर गुरुवारीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व घडामोडींची विस्तृत माहिती मिळते.

व्यवस्थापक—'हिंद—सेवक', मालवण, जि. रत्नागिरी.

## ग्रामोद्योग करून पैसा मिळवा.

**देशी रंगारी शिक्षक**—विदेशी रंग महागले ना ? मग वनस्पतीपासून रेशीम, सूत, लोकर रंगविणें व चिटें छापण्याची सोपी माहिती शिका. किं. १॥ रु.

**नजरबंद शिक्षक**—जादूच्या ८० चमत्कारिक खेळांची सचित्र माहिती मागवून जादूगार व्हा ! किं. १॥ रु.

**बुटपालिश शिक्षक**—कातड्याला लावण्याची घट्ट व पातळ निराळ्या रंगाची पॉलिश घरीं बनवा ! किं. ॥ ॰ ट.

ह. निराळा. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ३% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १११–१२ |
| ४% १९४३ | १०४–९ |
| ३½% बिनमुदत | ९५–१४–६ |
| ३½% १९४७–५० | १०२–१० |
| ३% ( १९६३–६५ ) | ९५—४ |
| २¾% १९४८–५२ | ९६–१५ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११५—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४२—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०८—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४४–१० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५६०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% | १३९—० |
| कराची ( १०० ) ९% | २१८–१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २२५–१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १६३२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १८४५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% | ६३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८३८–१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६४२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २०७—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४७—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. | २०–७–४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ४२–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३९६०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१४—६ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४९—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३८५—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १८७७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १३९—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४३–१२–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६३—२–६ |

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक
निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.


मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल लकी टूथ पावडर

पोरवाल ॲण्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

जर्निमन टेलर व्हा.

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

परांडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख १६ एप्रिल, १९४१ | अंक १६

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

**देशी औषधें तयार करणारा**
**महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना**
पंडु (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

**रक्तवर्धक**

**वापरा.**

**सर्वत्र मिळतें.**

—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा**
**पुणें, लि.** पुणें ४.

**दि सदर्न निटिंग वर्क्स, लि.**
[ २६४ शनिवार, पुणें २. ]
यांनीं बनविलेली



**"पूना होजिअरी"**

उन्हाळ्यासाठी गंजीफ्रॉक, अंडरवेअर्स वगैरे हरतऱ्हेचा

**जाळीचा माल**

तयार होत आहे

आपल्या व्यापाऱ्याकडे चौकशी करा

★

**ठेवी :** मुदतीप्रमाणें ४॥ ते ६ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

★

माहितीसाठीं वरील पत्त्यावर लिहा

# विविध माहिती

### विदेशी वस्तूंवर मूळ देशाचें नांव

परदेशी बनावटीच्या पुष्कळ वस्तु, त्या कोठें केलेल्या आहेत, हें न समजण्याजोग्या पद्धतीनें हिंदुस्थानांत विकल्या जातात, अशी तक्रार हिंदुस्थान सरकारकडे करण्यांत आलेली आहे. इंडियन मर्चेंडाइज मार्क्स अमेंडमेंट ॲक्टानें ही तक्रार नाहींशी होण्याची सोय केली आहे. ज्या बाबतींत मूळ देशाचें नांव आवश्यक आहे, अशी सरकारची खात्री होईल, त्या बाबतींत त्याची सक्ती करण्याचा सरकारास अधिकार मिळाला आहे. व्यापारी व कारखानदार वर्गानें ह्या संबंधांत सरकारकडे सूचना पाठवाव्या, असें सरकारनें प्रसिद्ध केलें आहे.

### नव्या हिंदी लिमिटेड कंपन्या

हिंदी लिमिटेड कंपन्यांबाबत सर्वांत ताजे म्हणजे सप्टेंबर १९४० चे आकडे उपलब्ध आहेत. ह्या महिन्यांत १ कोटि, १२ लाख रुपये अधिकृत भांडवलाच्या ६१ नव्या कंपन्या निघाल्या व ४२ लाख रु. अधिकृत भांडवलाच्या २८ कंपन्या लिक्विडेशनमध्यें गेल्या.

### स्वस्त रेडिओंच्या आयातीस परवानगी

अमेरिकेंतून स्वस्त रेडिओंची हिंदुस्थानांत आणखी आयात होण्यास हिंदुस्थान सरकारनें परवानगी दिली आहे. ३० जून, १९४१ पूर्वी हे रेडिओ अमेरिकेंतून निघाले पाहिजेत.

### हिंदी तंबाखूस मागणी

इजिप्तमध्यें हिंदी व्हर्जिनिआ तंबाखूची आयात होण्यास आतां मोठा वाव आहे. ॲलेक्झँड्रिया येथील हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधीनें तंबाखू आयात करणारांची व निर्गत करणाऱ्या हिंदी व्यापाऱ्यांची गाठ घालून दिली आहे.

### हिंदुस्थानास मोटारी पुरविण्याचा मक्ता अमेरिकेस द्या !

ब्रिटिश व हिंदुस्थान सरकारनें अमेरिकन सरकारास हिंदुस्थानांत रस्ते तयार करण्याचे कामीं पैशाची यंत्रसामुग्रीची व देखरेखीची मदत करावी. त्याचे मोबदल्यांत २५ वर्षें हिंदुस्थानास मोटारी पुरविण्याचा एकमेवाद्वितीय अधिकार द्यावा, अशी मि. रसि जेफ्रेज ह्यानीं कांहीं महिन्यांपूर्वी सूचना केली होती. " जगांतील एकूण सोन्यापैकीं ७५% सोनें एकट्या अमेरिकेजवळ आहे. हिंदुस्थानांतील सुवर्णसंचयाचा मोठा भाग गेल्या कांहीं वर्षांत लंडन मार्गें अमेरिकेकडे गेला आहे. हें सोनें अमेरिकेंत नुसतें पडून राहिल्यास त्याचा कांहीं उपयोग नाहीं. हिंदुस्थानांतील रस्ते सुधारण्यांत त्याचा विनियोग करण्यांत यावा व त्यासाठी अमेरिकेस रस्त्यांवरील मोटारवहातुकीचा कांहीं वर्षांचा मक्ता द्यावा. मोटारी लॉऱ्या, ट्रॅक्टर्स इत्यादि स्वस्त मिळूं शकल्यास हिंदुस्थानांतील कित्येक शेतकऱ्यांस त्यांचा उपयोग करतां येईल व त्यामुळें शेतकऱ्यांच्या राहणीचा दर्जा सुधारेल " असें मि. जेफ्रेज ह्यांचें म्हणणें आहे. बाँबे मोटार मर्चंटस असोसिएशननें मि. जेफ्रेज ह्यांस उत्तर पाठवून त्यांच्या म्हणण्यास आपला विरोध दर्शविला आहे.

### म्हैसूरमध्यें विजेचा प्रसार

म्हैसूर संस्थानांतील दरमाणशी विजेचा खप ३२ यूनिटस आहे. एकूण १९६ गांवांस वीज पुरविली जाते. विजेच्या उत्पादनाच्या योजनांत गुंतविलेल्या ५ कोटि ७० लक्ष भांडवलावर ८.६९%. व्याज सुटलें.

### कोळशाचा हिंदुस्थानांत उठाव

१९३६ सालीं हिंदुस्थानांत कोळशाच्या खपाचें दर माणशीं प्रमाण $\frac{1}{10}$ मेट्रिक टन, इतकें होतें. ग्रेट ब्रिटन, अमेरिका व बेल्जम ह्या देशांत तें ३½ ते ४ मेट्रिक टन इतकें पडलें. जर्मनींत व कॅनडांत तें २½ टन पडलें. कोळशाचा खप व औद्योगिक प्रगति ह्यांचा निकटचा संबंध आहे. वरील आकड्यांवरून हिंदुस्थानचा मागसलेपणा स्पष्ट होतो.

### म्हैसूर संस्थानांतील सोन्याच्या खाणी

म्हैसूर संस्थानांतील सोन्याच्या खाणींपासून म्हैसूर सरकारास १९३९-४० मध्यें मक्त्याबद्दल २३ लक्ष ६० हजार रुपये मिळाले. खाणींत काम करणारांची संख्या २६,४९९ होती.

### म्हैसूरची लोकसंख्या

म्हैसूर संस्थानाची लोकसंख्या आतां ७३ लक्ष, २९ हजार झाली आहे. १९३१ सालीं ती ६५ लक्ष, ५७ हजार होती. बंगलोर शहराची लोकसंख्या २ लक्ष, ४७ हजार आहे. सिव्हिल व मिलिटरी स्टेशनमध्यें १ लक्ष, ४७ हजार व म्हैसूर शहरांत १ लक्ष, ५० हजार लोकसंख्या आहे. एकूण ७३¼ लक्ष लोकसंख्येपैकीं ८ लक्ष, ९६ हजार लोकांस लिहितां वाचतां येतें.

### हिंदुस्थानांत कापडाचा खप

हिंदुस्थानांत खपणाऱ्या कापडापैकीं ६५% कापड हिंदी गिरण्यांचें, २६% कापड हातमागाचें व ९% कापड आयात झालेलें असतें.

### मद्रास अँड कर्नाटक रेल्वे

मद्रास अँड सदर्न मराठा रेल्वेनें आपलें नांव बदलून तें मद्रास अँड कर्नाटक रेल्वे असें करावें, अशी विनंति बंगळोर येथील कन्नड साहित्य परिषदेनें केली आहे.

### पुणें इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि.

वरील कंपनीनें गेल्या वर्षीच्या नफ्यांतून भागीदारांस ५% करमाफ डिव्हिडंड दिलें आहे.

### आय. एम. एस. मधील अधिकारी

इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्यें चालू युद्धाचे पूर्वी दोन तृतीयांश युरोपियन व एक तृतीयांश हिंदी लोक होते. आतां हें प्रमाण १:२ असें झालें आहे.

### हिंदुस्थानांतील सर्वांत लांब काँक्रीटचा रस्ता

त्रिवेंद्रम् ते केप कामोरिन हा हिंदुस्थानांतील सर्वांत लांब काँक्रीटचा रस्ता लवकरच तयार होईल. त्याची लांबी ५४ मैल असून त्यावर १४ लक्ष रुपये खर्च झाले आहेत.

### बडोदें संस्थानांतील कारखाने व कामगार

३१ जुलै, १९३९ अखेर संपलेल्या वर्षी बडोदें संस्थानांत १३० कारखाने चालू होते व त्यांत ३४,३१५ कामगार होते. ह्यांपैकीं ३०,३४८ कामगार एकट्या कपास कापडाच्या गिरण्यांतच होते.

### जबलपूर

जबलपूरची लोकसंख्या गेल्या दहा वर्षांत १¼ लाखांची १ लक्ष, ८४ हजार झाली आहे.

### नॅ. प्रॉ. बँकेचे २ हजार नोकर लष्करांत दाखल

ग्रेट ब्रिटनमधील नॅशनल प्रॉव्हिन्शिअल बँकेच्या पटावर युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी जेवढे पुरुष नोकर होते, त्यांपैकीं सुमारें २ हजार म्हणजे २८% नोकरांनीं लष्करांत प्रवेश केला आहे. त्यांतील ३६० लोकांना कमिशन मिळालें आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १८२ | ५ ट्रूस्ट ऑफ इंडियांतील समारंभ ... | १८७ |
| २ अटलांटिक महासागरांतलें युद्ध ... | १८३ | ६ हातमागाचा धंदा कसा सुधारेल ? ... | १८७ |
| ३ मुंबई प्रांतांतील पाटबंधारे | १८४ | ७ म. का. संघाचे कामास प्रारंभ ... | १८७ |
| ४ स्फुट विचार ... | १८५ | ८ खेडेगांवांत सहकारी शिक्षणाची योजना ... | १८८ |
| ग्रेट ब्रिटनचें वार्षिक अंदाजपत्रक-युगोस्लाव्हिया आणि ग्रीस—शेतीच्या धंद्याचा शास्त्रीय विचार— | | ९ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... | १८९ |
| मुंबई प्रांतांतील मजूर संघ | १८६ | १० निवडक बाजारभाव | १९० |



# अर्थ

बुधवार, ता. १६ एप्रिल, १९४१.


## अटलांटिक महासागरांतलें युद्ध

युद्ध-परिस्थितीची माहिती आपल्या देशबांधवांस देतांना कोणत्याहि प्रकारच्या अतिशयोक्तीचा अंगिकार करावयाचा नाहीं आणि अनुकूल-प्रतिकूल बाबींविषयीची वस्तुस्थिति जशीच्यातशी जनतेसमोर मांडावयाची हें ब्रिटिश मुत्सद्यांचें धोरण अभिनंदनीय आहे. इंग्लंडचे मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं या कामीं स्पष्टोक्तीचें उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें आहे. आपणांस विजयप्राप्तीसाठीं किती मोठे स्वार्थत्याग करावे लागतील हें सांगून ते लोकांचा उत्साह वाढवतात आणि निश्चय दृढ करतात. ब्रिटिश आरमारी खात्यामार्फत शत्रूनें बुडविलेल्या जहाजांसंबंधाचे आकडे दर आठवड्यास प्रसिद्ध होतात त्यांवरून त्यांच्या मुळाशीं असलेली निर्भय वृत्ति आणि सत्यकथनाविषयींची इच्छा हीं स्पष्टपणें प्रकट होतात. जर्मनीनें फ्रान्सच्या बंदरांचा ताबा घेतला तेव्हां त्यांचेमधून शत्रूचीं लढाऊ विमानें व पाणबुड्या नावा अटलांटिक महासागरांत संचार करून ब्रिटिशांच्या व्यापारी जहाजांस उपद्रव देणार हें उघड झालेंच होतें. ह्या हल्ल्याच्या स्वरूपाची यथार्थ कल्पना ब्रिटिशांस होती आणि अटलांटिक महासागरांतलें युद्ध आपण लवकरच जिंकल्यावांचून राहाणार नाहीं असें मि. चर्चिल यांनीं कांहीं दिवसांमागें ठासून सांगितलें होतें. ब्रिटिश व्यापारी जहाजांचें पूर्णपणें संरक्षण करण्याचे कामीं मोठ्या अडचणी असल्यानें हा विजय मिळण्यास कांहीं काळ लोटला पाहिजे हें उघड आहे. ज्यांमधून शत्रूच्या पाणबुड्या व विमानें तयार होऊन बाहेर पडतात अशा बंदरांचा नाश करण्याचा सपाटा ब्रिटिश वैमानिकांनीं चालू ठेवला आहे. युद्धकाळांत शत्रूच्या प्रयत्नामुळें एकूण ५६ लक्ष टन वजनाचीं जहाजें बुडालीं आणि त्यांतलीं निवळ ब्रिटिश अशीं सुमारें ३५ लक्ष टनांचीं होतीं अशीं माहिती प्रसिद्ध करण्यांत आली आहे. जहाजांच्या ह्या नाशाची यथार्थ कल्पना ब्रिटिश लोकांस करून देण्यांत आली आहे आणि त्यास तोंड देण्याचे सर्व उपाय ब्रिटिश सरकार योजीत आहे. अमेरिकेचें सहाय ह्या कामीं अत्यंत उपयोगी होत आहे आणि वाढत्या प्रमाणावर तें कार्यक्षम होणार आहे. जहाजांची हानी हा युद्धांत येणाऱ्या अडचणींचा एक प्रकार आहे आणि त्याचा प्रतिकार करण्यास झटणें हा शत्रूचा पराभव करण्याच्या मार्गांपैकीं एक मार्ग आहे असें समजून चालणें आवश्यक आहे.

कॉमन्स सभेंत मि. चर्चिल यांनीं युद्ध परिस्थितीचा आढावा गेल्या आठवड्यांत घेतला. त्यांत शत्रूनें चालवलेल्या व्यापारी जहाजांच्या संहाराचा उल्लेख त्यांनीं प्रामुख्यानें केला. ब्रिटिश जहाजांच्या एकूण शक्तीच्या मानानें त्यांचा झालेला नाश विशेष नसला तरी पुढच्या सालीं इंग्लंडची युद्धसामुग्रीची आयात पुरेशा प्रमाणांत कशी चालू रहाणार हा महत्वाचा प्रश्न त्यांनीं उपस्थित केला. अमेरिकेंत जहाजें बांधण्याचा अवाढव्य कार्यक्रम हातीं घेण्यांत आला, त्यामधलीं जहाजें इंग्लंडच्या वहातुकीसाठीं मिळतील तेव्हां हा प्रश्न सुटेल असें त्यांनींच उत्तर दिलें आहे. आपला माल अटलांटिक महासागरांतून इंग्लंडला सुरक्षित रीतीनें जरूर जाऊन पोंहोचावा ह्या विषयींची खबरदारी अमेरिका घेईल असा विश्वास त्यांनीं प्रकट केला. आपण मोठ्या मेहनतीनें तयार केलेला माल 'समुद्रास्तृप्यंतु' व्हावा ही गोष्ट मानी अमेरिकन राष्ट्रास कधींहि खपणार नाहीं असें ते म्हणाले. बाल्कन्समध्यें व पूर्वेच्या बाजूस हिटलरचे बेत कांहीं असोत,-अटलांटिक महासागरांतली त्यानें चालवलेली लढाई एकदा फसली कीं अमेरिकेकडून मिळणाऱ्या सहाय्याच्या जोरावर आपण त्याचा पिच्छा पुरवूं असा इंग्लंडचा कृतनिश्चय मि. चर्चिल यांनीं व्यक्त केला.

जर्मनीच्या व्यापाराची नाकेबंदी ब्रिटिश आरमारानें केली आहे ती हिटलरला चांगली जाणवत आहे. त्याच्या वर्चस्वाखालीं युरोपांतील अनेक देश आले आहेत आणि त्यांतील अन्नसामुग्री व कच्चा माल ह्यांवर तो डल्ला मारीत आहे, तरी जर्मनींत अनेक निकडीच्या गरजा भागवणें त्यास कठिण जात आहे. बाल्कन्समध्यें जर्मनी हातपाय पसरण्याचा प्रयत्न करीत आहे त्याचा हेतुहि युद्धसामुग्रीचा पुरवठा हस्तगत करणें हाच आहे. ब्रिटिशांनीं जर्मनीची नाकेबंदी यशस्वी रीतीनें केलेली आहे तिचा सूड घेण्यासाठीं तोडीस तोड म्हणून अटलांटिक महासागरांत हिटलर ब्रिटिश व्यापारी जहाजें बुडवीत आहे. पुढच्या सालांत होणाऱ्या युद्धाची भाषा मि. चर्चिल ह्यांनीं वापरली आहे तीवरून अमेरिकेकडून सर्व प्रकारची सामुग्री आणि जहाजें मिळतील एवढेंच नव्हे तर ही सामुग्री व हीं जहाजें अमेरिकेच्या देखरेखीखालीं रहातील असा साधार विश्वास त्यांस वाटत आहे. युद्ध अल्पकाळांत संपण्यांत हिटलरचें हित आहे. पण इंग्लंड व अमेरिका पुढच्या वर्षाची तयारी दूरदृष्टीनें करीत आहेत हें त्यांच्या आपणांस मिळणाऱ्या अंतिम विजयाविषयींच्या विश्वासाचें स्पष्ट निदर्शक आहे. मि. चर्चिल ह्यांनीं घेतलेल्या आढाव्यांत इतर रणक्षेत्रांतील परिस्थितीचें समालोचन आहे, तेंहि स्पष्टोक्तिपूर्ण आहे. त्यांत ब्रिटिश वैमानिक दलाच्या वाढत्या पराक्रमाचें वर्णन आहे. विशेषतः जर्मन मुलखांत त्यांचे जोरदार हल्ले प्रत्यहीं चालले आहेत त्यांचा उल्लेख आहे तो लक्षांत घेण्याजोगा आहे. युद्धांतल्या हालचालींविषयीं आलेल्या ताज्या बातम्यांचा परामर्श आम्हीं आजच्या अंकांत इतरत्र घेतला आहे.

# मुंबई प्रांतांतील पाटबंधारे

## नदीवरील धरणें व त्यांतून निघणारे कालवे

मुंबई प्रांतांतील कालव्यांनीं भिजणारी जमीन एकत्रित नाहीं. उसासारख्या मौल्यवान पिकांस कालव्यांचें व तळ्यांचें पाणी मिळतें व इतरहि पिकांस त्याचा उपयोग होतो. कांहीं लहान कालवे, व बंधारे पूर्वीपासून शेतीस पाणी देत आले आहेत. तळ्यांस मातीचाच बांध असतो, व मोठ्या तळ्यांतील पाण्यानें प्रत्येकीं १,२०० एकरापर्यंत जमीन भिजते. लहान नद्यांस बांध घालून व बाजूनें पाट काढून पिकांस पाणी दिलें जातें. अशा बंधाऱ्यांतील पाण्यानें प्रत्येकीं ८०० एकर भिजूं शकतात. ह्या लहान योजनांतच हल्लींच्या मोठ्या इरिगेशनच्या योजनांचें मूळ आहे. दुष्काळचा प्रतिबंध करण्याचे कामीं त्यांचा चांगला उपयोग झाला आहे.

सिंध, पंजाब, इजिप्त, मेसापोटेमिया इत्यादि ठिकाणची पाणीपुरवठ्याची व्यवस्था व मुंबई प्रांतांतील दक्षिण विभागामधील पाण्याची व्यवस्था ह्यांत फरक आहे. सह्याद्रीच्या डोंगरांचे पूर्वेस जमीन हळुहळु उतरत जाते. सह्याद्रीची रांग समुद्रकिनाऱ्यास समांतर असून, तिचे पश्चिमेस एकदम उतार आहे. पर्वताचे कांहीं शिखरांवर चार महिन्यांत २७० इंच पाऊस पडतो, परंतु जसजसें पूर्वेकडे जावें तसें पावसाचें मान कमी होत जातें. नद्यांचा उगम पर्वताच्या रांगांचे खोऱ्यांत असून त्यांचें पाणी पूर्वेस वहात जातें. पावसाळ्याखेरीज बाकीच्या महिन्यांत ह्या नद्या कोरड्याच असतात. ह्या नद्यांचें पाणी साठविण्याची कृत्रिम योजना केली नाहीं, तर तें पाणी सरळ समुद्राकडे धावत जाईल व मधली जमीन कोरडी राहील.

डेकनमधील पाणीपुरवठ्याच्या योजना साधारणपणें एकाच प्रकारच्या आहेत. नदीच्या वरच्या भागास पाणी साठवण्याचें धरण बांधून त्यांत पावसाळ्यांत पाणी साठवणें व तें पाणी नदीच्या खोऱ्यांतील शेतींत पुरवणें, ही पद्धति सर्व योजनांत आहे. धरणाचे खालीं कांहीं मैलावर नदीस एक लहानसा बांध घालून धरणांतून सोडलेलें पाणी त्यांतून कालव्यांत नेण्याची योजना केलेली असते. खडकवासल्याचे धरणांतूनच फक्त पाणी एकदम कालव्यांत नेलेलें आहे. नदीपेक्षा कालव्यास उतार कमी असतो तेव्हां कालव्यांतून नदीचे दोन्हीं बाजूस दूरवर पाणी नेतां येतें.

## पाटबंधारे व त्यांवर सुटणारें व्याज

१९३९-४० सालीं मुंबई प्रांतांतील पाटबंधाऱ्यांनीं एकूण ३ लक्ष, ५ हजार एकर जमिनीस पाणी पुरवलें. पाणीपट्टीच्या एकूण येण्यापैकीं ३३ लक्ष, ८७ हजार रुपये वसूल झाले. व्यवस्थेचा खर्च १४ लक्ष, ५५ हजार रुपये झाला. ह्या खर्चापैकीं ५ लक्ष, ९१ हजार रुपये दुरुस्तीसाठीं लागले व ७ लक्ष, ६४ हजार रुपये नोकरांच्या पगारासाठीं खर्च झाले.

निरा लेफ्ट बँक कॅनॉलवर भांडवली खर्च १ कोटि, ४६ लक्ष रुपये झाला आहे. त्यावर १९३९-४० सालीं ३.६८% व्याज सुटलें. निरा राइट बँक कालव्यावर केलेला भांडवली खर्च ४ कोटि, १२ लक्ष रुपये आहे. त्यावर ०.८२% व्याज सुटलें. मुठा नदीवरील कालव्यांचा भांडवली खर्च व त्यांवरील व्याज अनुक्रमें ७० लक्ष रुपये व ३.४३% असा हिशेब आहे. गोदावरी कॅनॉल्सनीं आपल्या १ लक्ष, ६ हजार रुपयांच्या भांडवली खर्चावर १.९५ व्याज दिलें. प्रवरा कालव्यांवरील १ कोटि, ५१ लक्ष रुपये भांडवली खर्चावर २.५५% व्याज सुटलें.

## मुठा नदीवरील कालवे

मुठा नदीवरील कालवे १८७४-७५ मध्यें तयार झाले, त्यांस ६५½ लक्ष रुपये खर्च आला. खडकवासल्याच्या धरणास पडलेली किंमत ह्यांत समाविष्ट आहे. हें धरण १०७ फूट उंच असून त्यांत ३९६ कोटि घनफूट पाणी राहूं शकतें. ह्यापैकीं ५१ कोटि घनफूट पाणी पुणें शहरास पाणीपुरवठ्यासाठीं राखून ठेवलेलें आहे. धरणांतील पाण्याचा उपयोग पुण्यांत पिण्याकडे व घरगुती उपयोगासाठीं होतो व बाकीच्या पाण्यावर पीक निघतें. मुठा राइट बँक कालव्याची लांबी ७० मैल व लेफ्ट बँक कालव्याची लांबी १८ मैल आहे. खडकवासला धरणांतील पाणी पुरें पडत नाहीं, तेव्हां त्याची उंची वाढविण्याची योजना चालू आहे. १९३९-४० मध्यें मुठेच्या दोन्ही कालव्यांवर मिळून १६,२११ एकर जमीन भिजली, पाणीपट्टीचें उत्पन्न १ लक्ष, ७६ हजार रुपये झालें; ह्या जमिनीवरील शेतसारा ३ लक्ष, ८७ हजार एकर भरला; व्यवस्थेचा खर्च ९९ हजार रुपये आला; वसुली ३ लक्ष, ४० हजारांची झाली; पाऊस १४.१९ इंच पडला. कालव्यांच्या पाण्यावर २,२२५ एकर ऊस भिजला. पुणें शहर व कँटोन्मेंट ह्यांस अनुक्रमें ३१९ कोटि गॅलन व १३३ कोटि गॅलन पाणी मिळालें.

## साखर कारखान्यांस मिळणारें कालव्यांचें पाणी

मुंबई प्रांतांतील डेकन इरिगेशन विभागांतील कालव्यांचे पाण्यावर दहा साखर कारखान्यांचे उसाचे मळे आहेत. त्या सर्व मळ्यांत मिळून १९३९-४० सालीं २२,९९० एकरांत ऊस लावलेला होता, त्यास सरकारी कालव्यांचें पाणी मिळालें.

| कारखान्याचें नांव | कितीं एकर उसास पाणी देण्याची हमी ? | कारखान्याची रोजची उत्पादनशक्ति |
|---|---|---|
| | एकर | टन |
| बेलापूर ( प्रवरा ले. बँक ) | ३,०५० | ६५० |
| महाराष्ट्र ( „ „ ) | ४,२५० | १,००० |
| मार्सलंड प्राइस आणि कं. ( निरा रा. बँक ) | ३,५०० | १,२५० |
| फलटण ( निरा रा. बँक ) | २,५०० | ५०० |
| सासवड माळी ( निरा रा. बँक ) | १,६०० | ३७० |
| रावळगांव ( गिरणी ) | १,४०० | ४५० |
| बृहन्महाराष्ट्र ( निरा रा. बँक ) | १,६०० | ४५० |
| बेलवंडी ( विसापूर ) | ( विसापूर तलावांतील ½ पाणी. एकरांची हमी नाहीं ) | २५० |
| गोदावरी ( गोदावरी रा. व ले. बँक ) | २,८५० | ७५० |
| श्री. चांगदेव (गोदावरी रा. बँक) | १,००० | उभारणीचें काम चालू. |

# स्फुट विचार

### ग्रेट ब्रिटनचें वार्षिक अंदाजपत्रक

ब्रिटिश फडनवीस, सर किंग्जले वुड, ह्यांनीं कॉमन्स सभेस ब्रिटिश सरकारचें १९४१-४२ चें बजेट नुकतेंच सादर केलें, त्यावरून युद्धजन्य खर्चांत किती वाढ झाली आहे व त्याचा केवढा थोरला बोजा ग्रेट ब्रिटनमधील नागरिकांवर पडत आहे. ह्याची कल्पना येते. गेल्या वर्षीं ब्रिटिश सरकारचें उत्पन्न सुमारें २१ अब्ज रुपये झालें व खर्चाचा आंकडा सुमारें ५८ अब्ज रुपये झाला. म्हणजे, सुमारें ३७ अब्जांची तूट आली, ती कर्ज काढून भरून टाकावी लागली. येत्या वर्षीचा अपेक्षित खर्च सुमारें ६३ अब्ज रुपये आहे. वाढत्या खर्चाची तरतूद करण्याकरितां मोठी करवाढ फडनवीसांनीं सुचविली आहे. प्राप्तीवरील कर सालिना १२० पौंड उत्पन्नावर होता, तो आतां ११० पौंड उत्पन्नावर करण्यांत यावयाचा आहे. त्यामुळें २० लक्ष अधिक लोक ह्या कराचे कक्षेंत येतील. प्राप्तीवरील कराचा मामुली दर पौंडांत १० शिलिंग म्हणजे उत्पन्नाच्या ५०% करण्यांत आला आहे. अर्थात् कमी उत्पन्नवाल्यांस तो कमी पडेल, परंतु त्याबरोबरच मोठ्या उत्पन्नवाल्यांस आपल्या १ पौंड उत्पन्नापैकीं १९½ शिलिंग म्हणजे ९७½% उत्पन्न कराचे रूपानें सरकारास द्यावें लागेल. दरसाल ७५ हजारांचें निवळ उत्पन्न हातीं येण्यास नागरिकास सुमारें १० लाखांचें उत्पन्न असावें लागेल ! कमी उत्पन्नवाल्या लोकांनीं भरलेल्या करापैकी मोठा भाग युद्धसमाप्तीनंतर त्यांच्या पोस्टांतील खात्यांत जमा केला जाईल. उत्पन्नाची रकम वाढत जाईल त्या मानानें ही परतपेढीची रकम कमी कमी होत जाईल. युद्धामुळें कारखान्यांस होणाऱ्या जादा नफ्यापैकीं सर्व नफा सरकार स्वतःकडे घेणार आहे. युद्धजन्य नफ्याचा फायदा कांहीं थोड्या लोकांसच मिळूं नये, ह्या तत्त्वास धरूनच ही योजना आहे. युद्धसमाप्तीनंतर कारखान्यांच्या पुनर्रचनेस पैसा लागेल, त्यासाठी वसूल झालेल्या जादा करापैकी २०% रकम त्यांस परत करण्यांत यावयाची आहे. करवसुली व सक्तीची बचत ह्यांची घातलेली सांगड, हें प्रस्तुत बजेटाचें वैशिष्ट्य आहे. मि. केन्स ह्यांनीं सक्तीच्या काटकसरीचीं कल्पना कांहीं महिन्यांपूर्वीं सुचविली होती, तिचेच आधारावर नवीन करयोजना केलेली दिसते. युद्धांत विजय मिळविण्यासाठी ग्रेट ब्रिटन कसे नेटानें यत्न करीत आहे व त्यासाठी ब्रिटिश नागरिक केवढा मोठा स्वार्थत्याग करीत आहेत, हें वरील बजेट दर्शवितें. श्रीमंत लोकांवर बसविलेले भारी कर करवसुलीच्या दृष्टीनें क्रमप्राप्त असले तरी ब्रिटिश नागरिकांच्या हितसंबंधाच्या एकवाक्यतेचें तें लक्षण आहे, हें उघड आहे. कराचा बोजा उचलण्याची ब्रिटिश जनतेची तयारी वाखाणण्यासारखी आहे. करभार प्रचंड असला तरी तो ध्येयसिद्धीचे दृष्टीनें सुसह्यच आहे, असें मत ब्रिटिश वृत्तपत्रांनीं व्यक्त केलें आहे.

### युगोस्लाव्हिया आणि ग्रीस

इंग्लंडचे मुख्य प्रधान, मि. चर्चिल, यांनीं कॉमन्स सभेंत युद्धाच्या अगदीं अलीकडच्या परिस्थितीचा आढावा नुकताच घेतला, त्यांतील एका महत्त्वाच्या बाबीचें विवेचन आजच्या आमच्या अग्रलेखांत करण्यांत आलें आहे. त्यावरून सदरहु भाषणाचा रोख काय होता ह्याची कल्पना येईल. ह्या भाषणांत युगोस्लाव्हियाचे संबंधानें मि. चर्चिल ह्यांनीं काढलेले उद्गार विचारप्रवर्तक आहेत. त्यांचे योगानें हिटलरच्या बाल्कन राष्ट्रांबाबतच्या धूर्त धोरणावर आणि ह्या राष्ट्रांच्या अदूरदर्शीपणावर उत्कृष्ट प्रकाश पडतो. धाकदपटशा दाखवून हिटलरनें हंगेरी, रुमानिया, बल्गेरिया, झेकोस्लाव्हेकिया हे देश एकामागून एक आपल्या पंजाखालीं त्यानें आणले. ह्या अनुभववानें युगोस्लाव्हियानें शहाणें व्हावयास पाहिजे होतें. किंबहुना, रुमानिया व इतर बाल्कन राष्ट्रें एकजुटीनें आपल्या स्वातंत्र्याचे संरक्षणासाठी वागतीं तर आज त्यांवर जर्मनीचे दास बनण्याचा प्रसंग आला आहे तो टळला असता. युगोस्लाव्हियाच्या राज्यकर्त्यांनीं ग्रीस व इंग्लंड ह्यांच्याशीं वेळींच सहकार केला असता तर त्या राष्ट्रास जर्मनीच्या हल्ल्यास यशस्वीपणानें तोंड देतां आलें असतें. ह्या संबंधांत इंग्लंडच्या वतीनें युगोस्लाव्हियास सूचना करण्यांत आली होती तिच्याकडे त्या देशाच्या मंत्रिमंडळानें दुर्लक्ष केलें. पुढें युगोस्लाव्हियांत राज्यक्रांती झाली तेव्हां नवीन सरकारानें जर्मनीशी पूर्वीच्या मंत्रिमंडळानें केलेला अपमानकारक करार धुडकावून लावला आणि आपलें स्वातंत्र्य व तटस्थपणा अबाधित राखण्याचा निश्चय केला. जर्मनीनें युगोस्लाव्हियाशीं तात्काळ युद्ध पुकारलें आणि त्यास स्वसंरक्षणाची व लढण्याची तयारी करण्यास वेळ दिला नाहीं. ह्या कारणानें इंग्लंडची मदत युगोस्लाव्हियास वेळीं मिळूं शकली नाहीं आणि जर्मन फौजांस त्या देशांत व ग्रीसमध्यें झपाट्यानें शिरकाव करतां आला. युगोस्लाव्हियांत फूट पाडून त्या देशाचे लचके तोडण्याची संधि जर्मनी व हंगेरी आतां साधीत आहेत. बाल्कन राष्ट्रांमधले अंतःकलह त्यांपैकीं प्रत्येकाच्या नाशास कसे कारणीभूत होत आहेत, हें युगोस्लाव्हियांतील अलीकडच्या घडामोडीवरून दिसून येत आहे. रुमानिया व बल्गेरिया हीं राष्ट्रें अगोदरच जर्मनीच्या धमक्या व कारवाया ह्यांस बळी पडलीं होतीं. युगोस्लाव्हियाचा काटा काढून टाकून ग्रीसच्या विरुद्ध इटलीच्या बाजूनें जर्मनीस आपलें सैन्य पाठवावयाचें होतें. युगोस्लाव्हियांतले नवे राज्यकर्ते आपल्या सांगण्याप्रमाणें वागण्यास तयार नाहींत असें दिसतांच हिटलरनें बेलग्रेडवर विमानें पाठवून तें शहर उध्वस्त व बेचिराख करून टाकलें आणि आपल्या फौजा पुढें घुसवल्या. त्याप्रमाणेंच ग्रीसवर स्वारी करून सॅलोनिकापर्यंत जर्मन सैन्य थडकलें आहे. असें आहे तरी ग्रीक व युगोस्लाव्ह फौजा निकरानें लढत असून ब्रिटिशांचें सहाय त्यांस मिळत आहे.

### शेतीच्या धंद्याचा शास्त्रीय विचार

अर्थशास्त्राच्या दृष्टीनें शेतीविषयक प्रश्नांचा विचार करण्याच्या हेतूनें स्थापन झालेल्या अखिल भारतीय संस्थेच्या परिषदेचें अधिवेशन गेल्या आठवड्यांत लाहोर येथें सर टी. विजयराघवाचारिआर ह्यांचे अध्यक्षतेखाली भरलें होतें. सहकारी संघटनाचा उपयोग ग्रामसुधारणेच्या कामीं कसा करून घेतां येईल ह्या विषयावर त्यांचें अध्यक्षीय भाषण मुख्यत्वेंकरून झालें. चांगल्या दर्जाचें बीबियाणें शेतकऱ्यांमध्यें वाटून धान्याची पैदास वाढवण्याच्या महत्त्वावर त्यांनीं विशेष जोर दिला. शेती खात्याचे देखरेख करणारे नोकर सहकारी खात्याच्या दिमतीस देण्याची व्यवस्था मुंबई प्रांतांत केलेली आहे तिच्यावर टीका करून त्यांनीं असें सांगितलें कीं, शेतीच्या संबंधांत सुधारलेल्या पद्धतीचें प्रात्यक्षिक, प्रचार व शास्त्रीय संशोधन ह्यांची ताटातूट होतां कामा नये आणि हीं तिन्हीं कार्यें एकत्र व एकाच अधिकारा-

खाली चाललीं पाहिजेत. खेडेगावी सहकारी पतपेढ्यांच्या कार्याचा विस्तार होऊन त्यांच्या हातून लोकांच्या स्थितीची सुधारणा घडून येईल अशी तजवीज होण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली. पंजाबचे अर्थमंत्री सर मनोहरलाल ह्यांनीं वरील परिषदेंत काढलेल्या उद्गारांकडे लक्ष वेधणें येथें आवश्यक आहे. शेतकरी वर्गाच्या कर्जाचा बोजा हलका होण्याच्या दृष्टीनें निरनिराळ्या प्रांतांत अनेक कायदे जरा घाईनें करण्यांत आले आहेत, त्यांचा उद्देश योग्य असला तरी त्यांचे योगानें शेतीच्या धंद्यास चालू भांडवल मिळण्याची अडचण पडून शेतकरी वर्गाची कुचंबणा होण्याची भीति आहे. ह्यासाठी योग्य व्यवस्था झाली पाहिजे, नाहींतर वरील प्रकारच्या कायद्यांपासून हित होण्याच्या ऐवजीं अनहितच होईल असा इषारा त्यांनीं दिला.

---

## मुंबई प्रांतांतील मजूर-संघ

### ( १९३९-४० चा अहवाल )

३१ मार्च, १९३९ रोजीं मुंबई प्रांतांत एकूण ५३ मजूर-संघ होते. अहवालाचे वर्षी ३२ नवे संघ नोंदले गेले. १ एप्रिल १९४० रोजीं पटावर ७३ संघ राहिले. १९३९-४० संबंधीं माहितीपत्रक न धाडल्याबद्दल रद्द केलेले संघ १३ होते. फक्त बारा संघांचे पटावर प्रत्येकी २,००० वर सभासद होते. सर्व संघांचे मिळून एकूण १,०५,७९९ सभासद होते. म्हणजे एका वर्षांत ५०,९९७ सभासद अधिक झाले. सभासदांची वर्गवारी खालीलप्रमाणें होती:—

| | |
|---|---|
| रेल्वेज: | २,७८७ |
| ट्राम्वे: | १,७७९ |
| कापडगिरण्या: | ५६,२३३ |
| छापखाने: | १,७५३ |
| म्युनिसिपल: | ८,०५४ |
| खलाशी: | २१,९७३ |
| गोदी व पोर्टट्रस्ट: | ३,५६८ |
| इतर: | ९,५८९ |
| मालकांच्या संस्था: | ६३ |

स्त्री सभासदांची संख्या १९३८-३९ मध्यें १५०२ होती, ती १९३९-४० मध्यें ६,७१३ झाली. सर्व संघांच्या फंडाची बेरीज १,८७,८६६ रुपये भरली. सात संघांनीं मिळून ५८,८६२ रुपये सरकारी कर्ज रोख्यांत गुंतविलेले होते. एकूण जिंदगीपैकीं ३३% जिंदगी, म्हणजे थकलेली वर्गणी होय.

---


या नव्या शोधानें सर्व जगभर खळबळ उडवून दिली आहे.

# दहा हजार रुपये अगदी फुकट.

अमृतसरमध्यें २॥ रु. तोळा सोनें

मिनर्व्हा गोल्डची घरोघर प्रशंसा ! मिनर्व्हा गोल्ड हा नकली सोन्याचा अगदी नवा शास्त्रीय आविष्कार होय. त्यानें केवळ वैज्ञानिकांनाच आश्चर्यानें थक्क करून सोडलें एवढेंच नव्हें, तर सर्वसाधारण लोकांची एक अत्यंत मोठी उणीव भरून काढली आहे. सर्व स्त्रिया त्याच्या दागिन्यावर बेहद्द खूष होतात. ज्या घरांत हें सोनें एकदां शिरलें तेथून दोनदोनदा तीनतीनदा त्यांस मागण्या येत आहेत.

मेहेरबान लाला विद्यारतनसाहेब, म्युनिसिपल कमिशनर, पठानकोटाहून २५ आक्टोबरला लिहितात—“ काल आपल्या सोन्याचें पार्सल मिळालें; धन्यवाद ! आपण हा नवीन पदार्थ तयार करून जगाची एक मोठीच उणीव भरून काढली आहेत. उलट टपालीं आणखी तीन तोळे सोनें पाठवावें. ”

याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रें उदाहरणार्थ रियासत, कॉंग्रेस, स्वस्तिक, अलामान, जमीनदार, गुरुघंटाल प्रताप, इत्यादींनीं प्रशंसोद्गार खुषीनें छापले आहेत.

हें सोनें कसास लावलें तर अस्सल सोन्याचाच रंग दाखवतें आणि अस्सल सोन्याप्रमाणेंच ठोकलें व गाळलें जातें. याचे हरएक प्रकारचे दागिने बनवता येतात. नापसंत पडल्यास किंमत परत मिळण्याची गॅरेंटी आहे; खास प्रसारासाठीं किंमत १ तोळयास २॥ रु.; ३ तोळयास ७ रु.; ६ तोळयास १३ रु.; व ४० तोळयास ८० रु.

मिनर्व्हा गोल्डचे बनवलेले दागिने

मिनर्व्हा गोल्डच्या बनवलेल्या बांगड्या दर जोडीला २ रु.; कानांतील सोन्याचे डूल दर जोडीला २ रु.; खड्याची अंगठी २ रु.; साधी मुंबई फॅशनची अंगठी २ रु.; जाळीच्या बांगड्या दर जोडीला ५ रु.; ( नेकलेस ) माळ १२ रु.; लॉकेट ६ रु.; दस्तबंद दर जोडीला १४ रु.

माल पसंत पडला नाहीं तर परतबोलीची खात्री. पोस्टाचा खर्च फक्त ८ आणे पडतो.

या गोष्टी खोट्या ठरवून देणारास दहा हजार रुपये फुकट दिले जातील. याशिवाय दर तीन तोळे सोनें खरेदी करणारास टिकाऊपणा व सौंदर्य याची १० वर्षे गॅरंटी असलेलें एक फॅन्सी रिस्टवॉच फुकट दिलें जाईल; गॅरंटीचा कागद प्रत्येक घड्याळाबरोबर धाडला जातो.

मिळण्याचा पत्ता—मॅनेजर अमेरिकन मिनर्व्हा गोल्ड हाऊस, ( A. P. ) K. C. अमृतसर.

## दि ट्रस्ट ऑफ इंडियाच्या मुंबई शाखेंतील समारंभ

### सर मोरोपंत जोशी यांची भेट.

दि ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशु. कंपनीचे मुंबईचे चीफ एजन्ट्स मेसर्स पी. जी. रानडे आणि ए. जे. करमरकर ह्यांनीं गुरुवार ता. ३ रोजीं सायंकाळीं ६॥ वाजतां कंपनीचे संस्थापक, डायरेक्टर सर मोरोपंत जोशी यांच्या सन्मानार्थ चहापार्टी दिली. त्या प्रसंगीं धूतपापेश्वर प्रासादाच्या गच्चीवर कंपनीचे पॉलिसीहोल्डर्स व हितचिंतक मिळून सुमारें १०० वर मंडळी उपस्थित होती. या मंडळींत नागपूरच्या ऑल इंडिया रिपोर्टरचे चालक श्री. वामनराव चितळे, पनवेलचे श्रीमंत नानासाहेब पुराणीक, सॉलिसिटर जोशी, न्यू सिटीझन बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. डी. डी. देशपांडे, माधवाश्रमाचे श्री. महाजन, कल्याण म्युनिसिपालिटीचे चेअरमन श्री. ओक व मुंबईतील वृत्तपत्र व्यवसायांतील अनेक साहित्यिक प्रामुख्यानें दिसत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानीं कंपनीचे चेअरमन सरदार जगन्नाथमहाराज ह्यांची योजना करण्यांत आली होती.

समारंभाचे अध्यक्ष सरदार जगन्नाथ महाराज ह्यांनीं कंपनीच्या स्थापनेपासूनचा इतिहास सांगून कंपनीची प्रगति समाधानकारक होत असल्याचें आंकडेवार सिद्ध केलें. जागतिक युद्धानें निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितींतही कंपनीचे एजंट्स् धडाडीनें काम करीत असून उत्तरोत्तर महाराष्ट्राच्या विश्वासाला कंपनी कशी पात्र होत आहे ह्याचें चित्र त्यांनीं उभें केलें.

त्यानंतर सर मोरोपंत जोशी यांनीं कंपनीच्या चोख व्यवस्थेची प्रशंसा करून तिच्या आर्थिक परिस्थितीबद्दल समाधान व्यक्त केलें. चालू वर्षी कंपनीचे मुख्य कचेरीसाठीं पुण्यास स्वतःची इमारत बांधण्याचा विचार असल्याचा प्रामुख्यानें त्यांनी उल्लेख केला. ह्या कंपनीला लोकांनीं आपला आश्रय देण्याइतकी ही एक आदर्श कंपनी आहे हें आपलें मत त्यांनीं जाहीर करून आपलें भाषण संपविलें.

त्यानंतर अध्यक्ष व सर मोरोपंत ह्यांना पुष्पहार अर्पण करण्यांत येऊन नागपूरचे चीफ एजंट श्री. भाऊसाहेब फाटक यांनीं सर्वांचे अन्तःकरणपूर्वक आभार मानले. त्यानंतर अल्पोपाहार होऊन हा गोड समारंभ पुरा झाला.

## हातमागाचा धंदा कसा सुधारेल

### बंगालच्या गिरणीमालक संघाचें मत

( १ ) कोष्टयांना भांडवलाचा पुरवठा सवलतीनें व्हावा. ( २ ) सुताच्या धंद्यांतील गैरवाजवी गोष्टींचा कायद्यानें प्रतिकार करावा. ( ३ ) सहकारी सोसायट्या व तत्सम संस्थांचे मार्फत सूत, रंग, इत्यादींची घाऊक खरेदी करावी. ( ४ ) वरीलप्रमाणेंच विक्रीची व्यवस्था करावी. ( ५ ) उत्पादनाच्या पद्धतींत सुधारणा सुचविण्याचें काम औद्योगिक खात्यांनीं करावें. ( ६ ) यांत्रिक शक्तीचा उत्पादनाचे कांहीं बाबतींत उपयोग करावा. ( ७ ) वीज स्वस्त दरानें मिळण्याची व्यवस्था करावी. ( ८ ) कोष्टयांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्यासाठी एक प्रातिनिधिक संस्था स्थापावी.

## महाराष्ट्र कारखानदार संघाचे कामास प्रारंभ

महाराष्ट्र कारखानदार संघाचे अध्यक्ष श्री. शं. बं. सहस्रबुद्धे, बालोद्यान प्रेस, यांचे निमंत्रणावरून महाराष्ट्रांतील कारखानदारांची सभा ता. २८ मार्च रोजीं वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तानें महाराष्ट्र सहाय्यक संघाचे कचेरींत संध्याकाळीं पांच वाजतां भरली. नवीन संघ काढण्यापेक्षां जुना संघच पुढें चालवावा हा विचार सर्वानुमतें मंजूर झाला. संघाचे जे कांहीं कागद असतील ते घेऊन कामास सुरवात करावी असें ठरलें. पूर्वीच्या सर्व नियमांचा वगैरे विचार करून कांहीं सुधारणा हव्या असल्यास त्या सुचवाव्या याप्रमाणें चर्चा झालेवर श्री. न. गं. आपटे यांनीं अध्यक्षांचे सांगणेवरून मुंबई येथील अ. भा. कारखानदार परिषदेची व त्यानंतरच्या प्रयत्नांची माहिती सांगितली. नंतर त्या परिषदेच्या मजकुरास मिळालेली प्रसिद्धी व त्याच्याच अनुरोधानें लोकमान्य स्वदेशी समितीचा चिटणीस म्हणून प्रसिद्ध केलेल्या महाराष्ट्र संघटनेच्या बाबतच्या प्रसिद्धी पत्रकांची माहिती त्यांनीं सांगितली व अशा प्रकारचा संघ असणें आवश्यक आहे असें सांगितलें. श्री. घारे यांनीं संघाचें सभासदत्व तेथील जिल्हानिहाय संघांतर्फे असावें असें सुचविलें. परंतु हा प्रश्न संघटनेचा विचार करून मग निश्चित करण्याचें ठरलें.

प्रथमतः अस्तित्वांत असलेली सर्व माहिती जमा करावी. नंतर बाकीच्या गोष्टींचा विचार करावा असें श्री. ग. रा. साठे, बिस्किटांचे कारखानदार यांनीं सुचविलें व तें मंजूर झालें. संघाचें कार्यासाठी पुढील कार्याधिकाऱ्यांची निवड झाली. श्री. शं. ब. सहस्रबुद्धे ( अध्यक्ष), श्री. द. भा. फाटक (उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष ) श्री. न. गं. आपटे व श्री. न. के. परांजपे ( चिटणीस ) अशी निवड करण्यांत आली. शेवटीं रूरल प्रॉ. कंपनीचे संत्राष्ट्रिक पान होऊन सभा ७ वाजतां संपली. सभेस निमंत्रितांपैकीं तीन सेरीज २१ कारखानदार हजर होते. तिघांपैकीं २ परगांवीं गेले होते व एक कामामुळें आले नाहींत. याखेरीज परगांवाहून ३ कारखानदारांची अनुमति व जमलेल्याजेरीज ६।७ येथील कारखानदारांची या प्रकारच्या कार्यास अनुमति मिळाली आहे.

यापुढें संघाची कचेरी श्री. न. गं. आपटे यांनीं चालविलेल्या महाराष्ट्रांतील कारखानदारांचे कायम प्रदर्शनाचे जागेंत ९२३ अ सदाशिव पेठ, पुणें येथें राहील. तरी सर्व पत्रव्यवहार चिटणीस, महाराष्ट्र कारखानदार संघ ९२३ अ सदाशिव, पुणें या पत्त्यावर करावा.

शं. ब. सहस्रबुद्धे
अध्यक्ष, महाराष्ट्र कारखानदार संघ

### टेलिफोनचे बाबतींत काटकसर

टेलिफोनचें साहित्य युद्ध कार्यासाठीं राखून ठेवण्याकरितां टेलिफोनचे नवे वर्गणीदार करून न घेण्याचें धोरण सरकारनें अंगिकारलें आहे. नवीन टेलिफोन हवे असतील, त्यांनीं युद्ध कार्यास त्यांचा उपयोग होईल, असें सरकारास दाखवून दिलें पाहिजे. हिंदुस्थानांत सुमारें ३०० सरकारी टेलिफोन एक्सचेंज असून टेलिफोनच्या वर्गणीदारांची संख्या ३० हजार आहे. तीन मोठ्या टेलिफोन कंपन्यांचे बाबतींत हा नियम नाहीं. म्हणजे, पांच प्रमुख शहरांत टेलिफोनचे नवे वर्गणीदार होण्यावर प्रतिबंध नाहीं. तथापि, ह्या कंपन्या लवकरच सरकार विकत घेणार आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

## खेडेगांवांत सहकारी शिक्षणाची योजना

( लेखकः–श्री. डी. ए. सावंत, सुपरवायझर )

सहकारी सोसायटींत हल्लीं असलेले व नवीन येणारे सभासद हे अशिक्षित व अज्ञानी असतात. त्यांना नुसते लिहितां वाचतां येत नाहीं,मग त्यांच्यांत सहकारी चळवळीच्या ज्ञानाचा प्रसार होणें तर दूरच राहिलें. कोणी इसम सहकारी सोसायटीचा सभासद होण्या-पूर्वी त्यास सहकाराचें तत्व, सोसायटीचा व्यवहार, सभासदाचे हक्क व जबाबदारी, सोसायटीविषयीं आपलेपणा, याची जाणीव होणें आवश्यक आहे. परंतु वरील गोष्टींचा अभाव असल्यामुळें त्याचा परिणाम सोसायटीचे कामकाजावर होऊन त्या चांगल्या रीतीनें चालत नाहींत असें अनुभवास येत आहे. सदर बाबतींत शिक्षण द्यावयाचें म्हटलें तर त्यासही अनेक अडचणी येतात. सहकारी शिक्षण देण्याचें कार्य प्रथम ऑनररी ऑर्गेनायझर करीत असत व पुढें तें कार्य यशस्वी रीतीनें चालण्याकरितां इन्स्टिट्यूटच्या प्रचारक अंमलदाराकडे सोपविण्यांत आलें. परंतु सदर प्रचारक अंमलदाराच्या हातीं कोणत्याहि प्रकाराची अंमलबजावणीची सत्ता नसल्यामुळें ते प्रचाराप्रीत्यर्थ गांवीं गेले असतां फारसे सभासद हजर राहात नसत व तेथें त्यांच्या जाण्याचा विशेष फायदा होत नसे असें कित्येक वेळां अनुभवास आलें. हल्लीं हे प्रचारक अधिकारीहि बहुतेक ठिकाणीं कमी झालेले आहेत त्यामुळें त्यांच्या हातुन होणारा प्रचारहि बंद झालेला आहे. कदाचित् एथून पुढें असे प्रचारक अंमलदार पुन्हां नेमले जाण्याचा संभव आहे व त्यावेळींहि हाच अनुभव प्रत्ययास येईल, असें वाटतें.

आलिकडे जिल्हा यूनियन बोर्डे स्थापन झालेलें आहे व सदर बोर्डाच्या पोट नियमांत "सहकारी शिक्षणाचा प्रसार करणें" हें कार्य बोर्डाच्या उद्देशांत दर्शित केलेलें आहे व सुपरवायझर-कडून सदर शिक्षणाचा प्रचार व्हावा अशी अपेक्षा केली जात आहे. शेतकी सोसायट्यांच्या सभासदांच्या वारंवार भेटी घेणारे व विशेष परिचयाचे अंमलदार म्हणजे सुपरवायझर हे होत व त्यांचेकडून हें शिक्षणाचें काम सहजासहजीं होईल अशी अपेक्षा असणें कदाचित् साहजिक आहे. परंतु सदर अंमलदाराकडे पुष्कळशीं कामें असतात व त्या कामांपैकीं "वसुलावर भर देणें" हें मुख्य काम गणलें जातें. त्यायोगें हे अंमलदार सोसायटीचे गांवीं जाऊन वसुलाचें काम करीत असतात. "वसूल केव्हां देणार?" "तहकुबी देता येत नाहीं", "लवाद दावा करावा लागेल," "हुकूमनामा बाजावणीस पाठवूं", "वसूल न झाल्यास पंच कमिटी सस्पेंड केली जाईल," अशा प्रकारची व धाकदडपशाची भाषा त्यांना वापरावी लागते. याप्रमाणें दडपणाची व करडी भाषा बोलल्यानंतर त्याच अंमलदारानें "सहकार्य करा, प्रेमानें वागा, एकमेकांस साहाय करा, एक सर्वांकरितां व सर्व एकाकरितां, हें तत्त्व शिका" अशा तऱ्हेची शिकवणुकीची मवाळ भाषा पुन्हां सुरू केल्यास ऐकणाऱ्या इसमास बुचकळ्यांत पडल्यासारखें होतें व त्याचप्रमाणें तो बोलणारा इसमही गोंधळून जातो. एकाच गृहस्थानें प्रथम करडेपणाची भाषा वापरायची आणि नंतर ममतालूपणानें शिक्षण द्यावयाचें हीं दोन्हीं कार्यें करतां येत नाहींत. करडेपणाचे भाषेमुळें सदर अंमलदाराचा सभासदांना तिटकारा येतो व ते सहसा या अंमलदारापुढें हजर राहण्याची टाळाटाळ करीत असतात आणि मवाळपणाचे भाषेमुळें वसुली बाबत वचक बसत नाहीं. अशाप्रकारें एका अंमलदाराकडे दुहेरी काम सोपविल्यामुळें वसूल व प्रचारकार्य यांत दुप्पट फायदा होण्याऐवजीं वसूलही होत नाहीं व प्रचारहि वाढत नाहीं, असा दुहेरी तोटा मात्र होत असतो असें कित्येक वेळां नजरेस येतें.

सहकारी चळवळीचा प्रसार हल्लीं खेडेगावांत करण्याचें काम चालू आहे व हें शिक्षणाचें कार्य यहिपेक्षां जास्त वाढविण्याचें काम कदाचित् हातीं घ्यावें लागणार आहे. या चळवळीचें शिक्षण देण्याचें कार्य एकाद्या प्रचारक अंमलदाराकडे सोपविल्यानें फारसा प्रसार होईल असें वाटत नाहीं; त्यापेक्षां तें कार्य शाळाखात्यानें हातीं घेतल्यास त्याचा प्रसार अधिक यशस्वी रीतीनें होऊं शकेल.

खेडेगावांतील प्राथमिक शाळेंतून मराठी चौथे इयत्तेपासून सातवी इयत्तेपर्यंत सहकार्य हा विषय शिकवला जावा व त्यांत सहकार्याची प्राथमिक तत्त्वें व शेतकी सोसायट्यांचें कामकाज या विषयाचें शिक्षण दिलें जावें, व सदर विषयाची परीक्षा घेण्या-करितां मराठी सातवे इयत्तेकरितां एक स्वतंत्र पेपर काढण्याची व्यवस्था व्हावी. त्याचप्रमाणें इंग्लिश पांचवीपासून मॅट्रिकपर्यंत या विषयाचे दुय्यम दर्जाचें सहकारी शिक्षण देऊन मॅट्रिकचे परीक्षेकरितां एक स्वतंत्र पेपर ठेवून परीक्षा घेण्यांत यावी. अशी योजना आखल्यास सहकारी शिक्षणाचा प्रसार समाजांत आपो-आपच वाढूं लागेल. परंतु या योजनेस कदाचित् कांहीं अडचण येऊन ती लांबणीवर पडण्याचा संभव असल्यास ती योजना अंमलांत येईपर्यंत खालीलप्रमाणें एक तात्कालिक योजना हातीं घेण्यासारखी आहे.

प्रत्येक शेतकी सोसायटीची वार्षिक साधारणसभा अगर स्पेशल साधारणसभा वर्षांतून एकदोन वेळा भरते व त्या सभेचें काम एकदोन तास चालत असतें. सदर सभेच्या वेळीं त्या गांवच्या शाळेंतील तिसऱ्या इयत्तेच्या वरील विद्यार्थी व शाळेंतील मास्तर हजर राहतील अशी व्यवस्था व्हावी अगर सदर सभा शाळेंत भरविण्याची तजवीज व्हावी व त्या दिवशीं सोसायटीच्या नफ्यां-तून जास्तींत जास्त पांच रुपयांपेक्षां जास्त नाहीं इतक्या रकमेचा खाऊ आणून विद्यार्थ्यांस वाटण्यांत यावा. त्यायोगें सभेचें कामकाज विद्यार्थ्यांस समजून येईल, गांवांतील लोकांच्या ओळखी होतील, विद्यार्थ्यांमध्यें सभाधीटपणा येईल व सोसायटी व तिचें महत्त्व समजून घेण्याचें औत्सुक्य विद्यार्थ्यांमध्यें आपोआपच निर्माण होईल.

सभेच्या वेळीं खाऊ मिळत असल्यानें बहुतेक सर्व विद्यार्थी न चुकतां त्या सभेस हजर राहतील व आस्ते आस्ते सोसायटी-विषयीं त्यांच्या मनांत आपलेपणा वाढत जाईल. हेच विद्यार्थी त्या खेड्यांतील भावी नागरिक होणार असून यदाकदाचित् सोसायटीचे आधारस्तंभाहि होतील. म्हणून त्यांना सहकारी तत्त्वांचें बाळकडू पाजण्याची व्यवस्था प्रथमपासून झाल्यास तीं तत्त्वें त्यांना आपोआप समजूं लागतील. अशा सभेस सुपरवायझर व बँक इन्स्पेक्टर यांनीं हजर राहून सहकारी सोसायटी व देव-घेवीचा व्यवहार, यावर सोप्या भाषेंत एक व्याख्यान द्यावें. त्यायोगें विद्यार्थ्यांमध्यें एकदां कुतूहल उत्पन्न झाल्यानंतर त्या व्याख्यानाचा स्पष्टार्थ इतर दिवशीं शाळामास्तरांनीं त्या मुलांस समजेल अशा मार्गेत सांगितल्यास सहकारी तत्व अधिक पचनीं पडेल. तरी वरील योजनेच्या बाबतींत सहकारी खातें व शिक्षण-खातें यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं लक्ष घातल्यास हें एक उपयुक्त कार्य सहज साध्य होऊं शकेल.

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

ले. बा. चिं. भानु, पुणें

**म्हैसूर संस्थानमधील सहकारी चळवळः**—सन १९३९-४० सालचे अखेरीस संस्थानमध्यें १८९५ पतपेढ्या होत्या. यद्यपि सभासदांची संख्या थोडीशी वाढली असली तरी ठेवी व भागाचें भांडवल मात्र थोडें कमी झालेलें दिसतें. परंतु व्यवहाराची उलाढाल, कामचलाऊ भांडवल, रिझर्व्ह फंड यांमध्यें मात्र निश्चित वाढ झालेली आहे.

* * *

म्हैसूर प्राव्हिन्शियल को. बँकेला व्यवहार करीत असतां उपयुक्त व्हावें म्हणून म्हैसूर सरकारनें रु. ५ लाखांचें कॅश क्रेडिट मंजूर केलेलें आहे. त्यामधून बँकेनें फक्त रु. २ लाखांची जरूरीप्रमाणें उचल केली. अशा रीतीनें सरकारनें भांडवलाचा पुरवठा केल्यानें बँकेच्या कामकाजालाही चांगलाच जिवंतपणा आलेला आहे. तुंबलेल्या, संशयित व बुडित कर्जदारांबरोबर तडजोडी करून त्यांना भरपूर सूट देण्याचे प्रयत्न जोरानें चालू आहेत. अशा ४०० सोसायट्यांपैकी १८६ सोसायट्यांनीं ही सवलतीची योजना अमलांत आणली.

* * *

म्हैसूर संस्थानांत १२ मल्टिपर्पज सोसायट्या स्थापन झालेल्या असून अंजीर, केळीं, अंडीं, भात, बटाटे, सुंठ, नारिंगें, नारळ, मध, वेलदोडे वगैरे मालाची विक्री सोसायट्यांमार्फत झाली आहे. तसेंच सभासदांना कपाशीचें नामांकित व शुद्ध बीं, सुधारलेलीं खतें व आउतें त्यांनीं पुरविलीं आहेत. हा पुरवठा शेतकी खात्याच्या खास शिफारशीप्रमाणेंच करण्यांत आला. त्याचप्रमाणें सभासदांना लागणारें कापडही पुरविणेंत आलें. मालनाड सुपारी-विक्री सोसायटीनें शिमोगा व कडूर जिल्ह्यांत पुष्कळच प्रगति केली आहे. या सोसायटीच्या ६८२ सभासदांपैकी ५४८ सभासदांनीं सोसायटीमार्फत सुपारीची जी २६,०३५ मणांची विक्री केली यापैकीं ८,०५४ मणांला ६४,४३२ रुपयें किंमत आली. या कामासाठीं सोसायटीनें बळ्ळारी येथें विक्रीचें केंद्र उघडलें होतें. या सोसायटीला प्राथमिक खर्चासाठी म्हैसूर सरकारनें रु. ३,००० ची देणगी दिली होती.

* * *

म्हैसूर संस्थानांतील ३० तालुक्यांत व इतरही कांहीं भागांत लँडमार्गेज बँकेची योजना अमलांत आलेली असून तिचा आणखी प्रसार संस्थानभर करण्यासाठी सरकारनें एक स्वतंत्र असिस्टंट रजिस्ट्रारची नेमणूक केली आहे.

* * *

सेंट्रल मार्गेज बँकेचें कामही समाधानकारक चाललेलें आहेच. सरकारच्या मंजुरीनें ३½ टक्के दरांचीं डिबेंचर्स या बँकेनें काढलीं. रु. १,२५००० चीं डिबेंचर्स लगोलग खपलीं. या बँकेनें दिलेल्या कर्जाची वसुलीही अशीच समाधानकारक असल्याचें रिपोर्टावरून दिसतें. सालांत वसुलीस पात्र झालेल्या रु. १,०५,१९५ पैकी रु. १,०२,५२५ वसूल झाले. म्हणजे थकबाकीचें प्रमाण अवघें २·५४ पडतें. गेल्या सालीं हें प्रमाण १०·९५ होतें. अशा रीतीनें हमखास कर्जवसुली होण्यास त्या बँकेनें काय व्यवस्था केली आहे याचा मात्र रिपोर्टांत तपशीलवार खुलासा नाहीं, तथापि आपल्या भागांतील अशा लँडमार्गेज बँकांच्या चालकांनीं तिकडून माहिती आणविल्यास ती पुष्कळच उपयुक्त ठरेल. इकडील लँडमार्गेज बँकांना थकबाकीचा प्रश्न मोठा जाचक होत चालला आहे. म्हैसूर सरकारनें लँडमार्गेज बँकेला रु. ५,००० ची देणगी चालू सालींही दिलेली आहेच.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्टस् :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंटसप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

दक्षिण कोंकणांतील राष्ट्रीय बाण्याचें

प्रमुख साप्ताहिक

## हिंद—सेवक

संपादक—सदानंद शांताराम भांडारकर

प्रकाशक—मधुकर यशवंत भांडारकर

हिंदसेवकमध्यें दर गुरुवारीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व घडामोडींची विस्तृत माहिती मिळते.

व्यवस्थापक—'हिंद—सेवक', मालवण, जि. रत्नागिरी.

## ग्रामोद्योग करून पैसा मिळवा.

**देशी रंगारी शिक्षक**—विदेशी रंग महागले ना ? मग वनस्पतीपासून रेशीम, सूत, लोकर रंगविणें व चिटें छापण्याची सोपी माहिती शिका. किं. १॥ रु.

**नजरबंद शिक्षक**—जादूच्या ८० चमत्कारिक खेळांची सचित्र माहिती मागवून जादूगार व्हा ! किं. १॥ रु.

**बुटपालिश शिक्षक**—कातड्याला लावण्याची घट्ट व पातळ निराळ्या रंगांची पॉलिश घरीं बनवा ! किं. ।॥ ट.

ह. निराळा. मो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १११–१२ |
| ४% १९४३ | १०४–९ |
| ३½% विनमुदत | ९५–१४–६ |
| ३½% १९४७–५० | १०२–१० |
| ३% ( १९६३–६५ ) | ९५—४ |
| २¾% १९४८–५२ | ९६–१५ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११५—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४२—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% | १०८—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४४–१० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५६०—० |
| बाँबे मॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% | १३९—० |
| कराची ( १०० ) ९% | २१८–१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २२५–१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १६३२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १८४५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% | ६३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८३८–१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६४२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २०७—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४७—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २०–७–४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ४२–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३१६०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१४—६ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४९—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३८५—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै | १८७७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १३९—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४३–१२–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६३—२–६ |


**कोरोना पोर्टेबल विकणें आहे.**

कोरोना पोर्टेबल टाइपरायटर उत्तम स्थितींतला खासगी कामासाठीं वापरलेला, विकणें आहे.

" क्ष " C/o अर्थ.

**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

पुण्यांत आल्यावर

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक

निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

अवर होम,

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.



**मधुमेहावरील औषध**

तीन आठवड्यांचे

औषधास फक्त रु. ७


— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स

कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल लक्ष्मी टूथ पावडर

पोरवाल अँड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

जर्निमन टेलर व्हा.

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महेंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख २३ एप्रिल, १९४१ अंक १७

सर्व तऱ्हेचीं कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**'पायोनियर डाइंग हाऊस'**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दाणेवाडी, पुणें.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

# रक्तवर्धक

**वापरा.**

**सर्वत्र मिळतें.**

—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.** पुणें ४.

**दि सदर्न निटिंग वर्क्स, लि.**
[ २६४ शनिवार, पुणें २. ]
यांनीं बनविलेली



**"पूना होजिअरी"**

उन्हाळ्यासाठी गंजीफ्रॉक, अंडरवेअर्स वगैरे हरतऱ्हेचा

**जाळीचा माल**

तयार होत आहे

आपल्या व्यापाऱ्याकडे चौकशी करा

★

**ठेवी** : मुदतीप्रमाणें ४॥ ते ६ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

★

माहितीसाठीं वरील पत्त्यावर लिहा

# विविध माहिती

### सिंध-बलुचिस्तान रस्ता

सिंध, बलुचिस्तान व पंजाब ह्यांस जोडणारा एक मोठा रस्ता तयार करण्यांत येत आहे. त्यावर सिंध सरकार २१ लक्ष रुपये खर्च करणार आहे.

### रेल्वे रस्ते

सबंद जगांत मिळून एकूण ७ लक्ष, ८८ हजार मैल लांबीचे रेल्वे रस्ते आहेत, त्यांपैकीं दोन तृतीयांश लांबीचे रेल्वे रस्ते एकट्या अमेरिकेंतच आहेत.

### मालगाड्या

अमेरिकेंत प्रत्येक ५.७ सेकंदांस एक मालगाडी सुटते.

### ब्रिटिश विमानांचा प्रवास

ब्रिटिश बिनलष्करी विमानांनीं १९४० सालीं ५० लक्ष मैल प्रवास केला व ३ कोटि एअर मेलचीं पत्रें वाहिलीं.

### अफू

३० सप्टेंबर, १९४० अखेर संपलेल्या वर्षी सरकारी अफू खात्यास १ लक्ष, १३ हजार रुपये नफा झाला. अफूचा खप सर्वच प्रांतांत कमी झाला. अल्कलॉइडला सरकारी युद्धखात्याची मोठी मागणी आली. एकूण ७,८३७ बिघ्यांतून अफूचीं लागवड झालेली होती.

### ऑस्ट्रेलियाचें नवें कर्ज

ऑस्ट्रेलियन सरकार लवकरच सुमारें ५० कोटि रुपयांचें कर्ज काढणार आहे. त्यांपैकीं चार पंचमांशाचा विनियोग युद्धकार्याकडे होईल व बाकीच्यांतून महत्त्वाचे रेल्वे रस्ते व मोटार रस्ते तयार केले जातील. व्याजाचा दर मुदतीप्रमाणें २½% ते ३½% राहील.

### युद्ध-धोक्याच्या विम्याचा दर

मालाच्या युद्ध-धोक्याच्या विम्याचा दर एप्रिलपासून वाढविण्यांत आला आहे, त्यासंबंधीं सरकारकडे बऱ्याच तक्रारी गेल्या. ही विम्याची योजना म्हणजे एक प्रकारची करयोजनाच होऊं पहात आहे, असें तीसंबंधीं कांहीं लोक म्हणूं लागले. सरकारनें सर्व परिस्थितीचा विचार करूनच दरांत वाढ केलेली आहे व लोकांच्या तक्रारी निराधार आहेत, असें जाहीर केलें आहे.

### हिंदी तांदळाचें पीक

**( १९४०-४१ चा सरकारी अंदाज )**

एकूण लागवडः ७ कोटि, २२ लक्ष एकर
एकूण उत्पादनः २ कोटि, १८½ लक्ष टन
दर एकरीं उत्पादनः ६७८ पौंड
लागवडीचें क्षेत्रः बंगाल २९%, मद्रास १३%, बिहार १३%, मध्यप्रांत १०%, संयुक्तप्रांत ९५%, आसाम ७%, ओरिसा ७%, मुंबई ३%
मुंबई प्रांतांतील लागवडः २३ लक्ष, ३५ हजार टन
मुंबई प्रांतांतील उत्पादनः ९ लक्ष, ३८ हजार टन

### स्वदेशी साबण

हिंदुस्थानांत सध्या सुमारें १ हजार साबणाचे कारखाने असून त्यांत दरसाल सुमारें ३ कोटि रुपये किंमतीचा ७५ हजार टन साबण निघतो.

### परीक्षेच्या निकालाच्या प्रतीसाठी ७० रुपये

संयुक्त प्रांतांतील हायस्कूल व इंटरमीजिएट परीक्षेच्या बोर्डानें आपल्या परीक्षांच्या निकालाच्या प्रतीसाठी वर्तमानपत्रांकडून प्रत्येकीं ७० रुपये घेण्याचें ठरविलें आहे. वर्तमानपत्रांच्या कचेरींत निकालाची प्रत पोचविणाऱ्या कारकुनाचा प्रवासखर्चहि वर्तमानपत्रानें द्यावयाचा आहे. स्वतःच्या परीक्षांच्या निकालाच्या प्रसिद्धीसाठी बोर्ड वर्तमानपत्रांकडून कर वसूल करणार आहे!

### ५०% डिव्हिडंड

ससून सिल्क मिल लि.नें १९४० च्या नफ्यांतून ५०% डिव्हिडंड वाटलें आहे, कंपनीच्या २ लक्ष रुपये भांडवलावर १ लक्ष, ७३ हजार रुपये नफा झाला. कंपनीचे रिझर्व्ह व इतर फंडांत ४ लक्ष, ८४ हजार रुपये आहेत.

### लक्ष्मी खाटंग मॅ. कं. लि.

वरील कंपनीची विक्री १९४० सालीं ३५ लक्ष, ७४ हजार रुपयांची झाली. गिरणींत १८ लक्ष, ७२ हजार रुपयांची कपास खपली. कपाशीची खरेदी महागाईच्या भावानें झाल्यामुळें नफा कमी उरला. भागीदारांस ६% डिव्हिडंड मिळेल व ते देण्यास गेल्या वर्षीचा नफा पुरणार नाहीं, मागील वर्षांतून ओढलेल्या बाकीचा उपयोग करावा लागेल.

### विष्णु कॉटन मिल्स कं. लि.

वरील कंपनीची १९४० सालीं विक्री ४२¾ लक्ष रुपयांची झाली. गिरणींत २२¾ लक्ष रुपयांची कपास खपली. भागीदारांस ८२% डिव्हिडंड देण्यास डिव्हिडंड फंडांतून रकम घ्यावी लागली. कपाशीची महाग भावानें झालेली खरेदी, हेंच ह्या कंपनीस कमी नफा होण्याचें कारण आहे.

### ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड स्टँप ह्यांचा विमान-हल्ल्यांत मृत्यु

गेल्या आठवड्यांत लंडनवर शत्रूच्या विमानांनीं प्रचंड बॉंबफेक केली, त्यांत लॉर्ड स्टँप लेडी स्टँप व लॉर्ड ऑफलंड हे मरण पावले. जेशिया चार्लस स्टँप, हें लॉर्ड स्टँप ह्यांचें मुळचें नांव. लॉर्ड स्टँप हे अत्यंत नामांकित अर्थशास्त्रज्ञ होते. अनेक महत्वाच्या कमिट्यांवर व कमिशनांवर त्यांनीं कामें केलेलीं आहेत. इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज, लंडन मिडलंड अँड स्कॉटिश रेल्वे, बँक ऑफ इंग्लंड इत्यादींचे ते डायरेक्टर अथवा अध्यक्ष होते. सरकारचे ते आर्थिक सल्लागार होते. अर्थशास्त्रावरील त्यांचे ग्रन्थ सुप्रसिद्ध आहेत.

### इंडियन टी मार्केट एक्सपान्शन बोर्ड

वरील बोर्डाचा १ ऑक्टोबर १९३९ ते ३० सप्टेंबर, १९४० अखेरचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांत बोर्डानें केलेल्या कामाची माहिती देण्यांत आली आहे. मुंबई, कलकत्ता इत्यादि ठिकाणच्या गिरण्यांत चहाच्या दुकानांचा प्रसार, वर्तमानपत्रांतून प्रचार, कांहीं देशी वृत्तपत्रांत पूर्वीपेक्षां अधिक जाहिरातीं, आकडे जमा करण्याचें प्रयत्नांत सुधारणा, इत्यादि गोष्टींची माहिती रिपोर्टांत दिलेली आहे.

### दरमहा ४ हजार विमानें

१९४२ मध्यें अमेरिका ग्रेटब्रिटनला दरमहा ४ हजार युद्ध-विमानें पुरवूं शकेल, असें न्यू यॉर्क जर्नल हें वृत्तपत्र म्हणतें.

### शर्यत मैदानावरील घोडे

मुंबईच्या शर्यत मैदानावरील शर्यतींत भाग घेणाऱ्या ८०० घोड्यांपैकीं २०० घोडे देशी अवलादीचे आहेत. चारपांच वर्षांपूर्वी त्यांची संख्या ३०-४० सुद्धां नसे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १९४ | ७ मुंबई शहराचा कपाशीचा बाजार ... ... | १९८ |
| २ ब्रिटिश बँकांची कामगिरी | १९५ | ८ हिन्दी बँकिंगसंबंधीं ताजे आकडे ... ... | १९९ |
| ३ सहामाही डिव्हिडंड केव्हां देतात ? ... | १९६ | ९ अ. भा. चरखा संघ | २०० |
| ४ अमेरिकेंत पोलादाचें उत्पादन ... ... | १९६ | १०. पेट्रोलची काटकसर | २०१ |
| ५ राकेल तेलाचें उत्पादन | १९६ | ११ निवडक बाजारभाव | २०१ |
| ६ स्फुट विचार ... युद्धाच्या हालचाली— रशिया–जपान करार– १९४१ ची पहिली तिमाही | १९७ | १२ शिरगणतीचे कांहीं आकडे ... ... | २०२ |
| | | १३ आल्बेनिया ... | २०२ |



# अर्थ

बुधवार, ता. २३ एप्रिल, १९४१


## ब्रिटिश बँकांची कामगिरी

इंग्लंडमधील जनता युद्धामुळें येणाऱ्या संकटांस रात्रंदिवस केवढ्या नेटानें व स्वार्थत्यागानें तोंड देत आहे याची कल्पना, त्या देशांतून येणाऱ्या बातम्यांवरून स्पष्ट येत आहे. खाजगी रहात्या घरांवर जर्मन विमानें बाँब फेकून त्यांस आगी लावीत आहेत आणि निरुपद्रवी बायका-मुलांवर आपत्ति आणीत आहेत. अशा भीषण परिस्थितींतहि ब्रिटिश जनतेचा प्रत्येक घटक शांत-वृत्तीनें व निश्चयानें आपापलें कर्तव्य करीत आहे. धंदेवाले, व्यापारी, कारखानदार ह्यांच्या व्यवहारास शत्रूच्या हल्ल्यांमुळें व्यत्यय येत आहे तरी ते स्वतःचे उद्योग धिमेपणानें चालवीत आहेत. देशाचें संरक्षण आणि शत्रूचा पराजय करण्याचे जे उपाय ब्रिटिश सरकार योजीत आहे त्या सर्वांचे बाबतींत ग्रेट-ब्रिटनमधील निरनिराळ्या वर्गांचे व दर्जांचे लोक पूर्ण सहकार्य करीत आहेत. खाजगी व सार्वजनिक जीवनाचा गाडा युद्धसंकटाच्या काळांत सुरळीत चालावा ह्या उद्देशानें त्याचा संघटित व नेटाचा यत्न चालला आहे.

धंदेवाल्यांमध्यें बँकिंगचा व्यवसाय करणारांचें काम अत्यंत नाजुक, जबाबदारीचें व जोखमीचें असतें. लोकांच्या ठेवी सुरक्षित बाळगून, त्यांचे देवघेवींचे व्यवहार नित्याप्रमाणें सोयीनें व सहज चालतील अशी व्यवस्था बँकांस करावी लागते. मोठमोठ्या बँकांच्या शाखा ग्रेट ब्रिटनभर चोहोंकडे लहानमोठ्या ठिकाणीं विखुरलेल्या आहेत. शत्रूच्या विमानांनीं बाँब टाकले तरी तेथें बँकिंगचे नित्याचे व्यवहार निर्धास्तपणानें चालावें अशी तजवीज बँकांच्या चालकांनीं दूरदर्शीपणानें केली असून जनता व सरकार ह्यांचें काम कोठेंहि अडूं नये अशाविषयीं पूर्ण खबरदारी घेतली आहे ती कौतुकास्पद आहे. बँकांच्या संचालक मंडळाच्या अध्यक्षांचीं भाषणें यंदाच्या विशिष्ट अवघड परिस्थितींत भागीदारांस ताळेबंदाबरोबर अगाऊच वाटण्यांत आलीं होती. त्यांतील कांहीं महत्त्वाच्या बाबींचा निर्देश येथें करण्याचें आम्हीं योजिलें आहे.

बँकांचे अनेक नोकर लष्करी व बिनलष्करी कामगिरीवर गेल्यामुळें त्यांचीं कामें करून घेण्यासाठी सेवानिवृत्त लोक व स्त्रिया ह्यांची नेमणूक करण्यांत आली आहे आणि त्यांनीं आपापलीं कर्तव्यें चांगल्या रीतीनें बजावलीं असल्याचें अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत सांगितलें आहे. हिशेब व कागदपत्र ह्यामध्यें शत्रूच्या हल्ल्यामुळें गोंधळ उडूं नये म्हणून बँकांनीं दूरदृष्टीपणानें दुहेरी व्यवस्था केली आहे. जनतेच्या बचतीचा सर्व पैसा युद्धाचे कामीं लागावा ह्याविषयीं ब्रिटिश सरकारानें निश्चित धोरण अंगिकारलें आहे. त्यांत बँकांचें पूर्ण सहकार्य होत आहे. ह्याचा एक परिणाम बँकांमधील लोकांच्या ठेवींत आणि बँकांनीं सरकारी रोख्यांत गुंतवलेल्या रकमांत मोठी वाढ होण्यांत झाला आहे. बार्कलेज बँक ह्या एका संस्थेचेंच उदाहरण घेतलें तर असें दिसून येतें कीं, गेल्या वर्षांत तिच्याकडे आलेल्या ठेवींत शंभर कोटि रुपयांच्यावर वाढ झाली. जनतेचा अधिक पैसा बँकांकडे आला आणि तो सरकारला कर्जाऊ देण्यांत आला, ह्यांत बँकांस विशेष खर्च न पडतां फुकट फायदा मिळाला अशी टीका होण्याचा संभव आहे, तीला उत्तर देण्याचा प्रयत्न कांहीं बँकांच्या अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत केला आहे तिकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे.

बार्कलेज बँकेचे अध्यक्ष म्हणतात:—" आपलें देणें देण्याची जबाबदारी पार पाडण्याच्या बँकेच्या शक्तीवर लोकांचा विश्वास असेल तरच तिचें काम चालू शकेल आणि बँकेकडून मिळणाऱ्या सोयी जनतेस पसंत पडतील तरच लोक तिच्यामध्यें आपल्या ठेवी ठेवतील. ह्या सोयी करणें व ठेवींवर व्याज देणें ह्या गोष्टी खर्चाच्या आहेत. ठेवींचा पैसा बँकेनें व्याजानें गुंतवला असतां तो तिला फुकट वापरावयास सांपडला असें म्हणतां येणार नाहीं. लोकांच्या सोयी जादा खर्चावांचून करतां येत नाहींत आणि ह्या खर्चाची भरपाई बँकांस करून मिळाली पाहिजे. ठेवींत वाढ म्हणजे नफ्यांत वाढ असें नाहीं. " आपल्या बँकेंतील ठेवींपैकी ४४ टक्के इतका पैसा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें अल्पमुदतीच्या व अल्पव्याजाच्या सरकारी रोख्यांत गुंतलेला आहे आणि त्यावर मिळणारें व्याज खर्चाच्या मानानें अपुरें आहे असें त्यांनीं सांगितलें. रोकड, दुसऱ्या बँकांतील शिल्लक, ट्रेझरी बिलांच्या तारणावर दिलेली अत्यल्प मुदतीचीं कर्जें, ट्रेझरी बिलसचें डिस्कौंट व ट्रेझरी डिपॉझिट रिसिट्स ह्या पांच मार्गांनीं बँका अगदीं थोड्या व्याजानें वर निर्दिष्ट केलेल्या रीतीनें पैसा मोठ्या प्रमाणांत गुंतवीत आहेत. सरकारी रोख्यांत बँकांनीं गुंतवलेल्या पैशांत वाढ झाली आहे आणि युद्धसामुग्री पुरवणाऱ्या आपल्या गिऱ्हाइकांस त्या भांडवल कर्जाऊ देत आहेत. ह्या रीतीनें युद्ध यशस्वी करण्याचे कामीं स्वतःचे वांट्यास येणारी कामगिरी बँका उत्कृष्ट रीतीनें बजावीत आहेत आणि आपलें राष्ट्रीय महत्त्व प्रत्यक्ष कृतीनें सिद्ध करीत आहेत.

इतर ब्रिटिश बँकांच्या अध्यक्षांच्या भाषणांतहि ठेवी व सरकारी रोख्यांतील गुंतवण ह्यांमधील वाढ आणि गिऱ्हाइकांस दिलेल्या कर्जांच्या रकमांत घट ह्यांचा प्रामुख्यानें निर्देश करण्यांत आला आहे. युद्धाच्या निकडीमुळें ग्रेटब्रिटनचें सर्व आर्थिक जीवन सरकारनियंत्रित होणें अपरिहार्य असल्यानें बँकांच्या व्यवहारांसहि नवीन राष्ट्रीय वळण लागणें स्वाभाविक आहे. वुइल्यम डीकन्स बँकेच्या अध्यक्षांनीं असें म्हटलें आहे कीं, त्यांच्या संस्थेंत एका वर्षांत ठेवीच्या रकमेंत २२ टक्के वाढ झाली आणि एवढीच रकम सरकारी रोख्यांत अधिक गुंतली. आयात, निर्गत व स्थानिक व्यापार आणि जहाजांची वहातुक ह्यांवरील सरकारी नियंत्रणामुळें बँकांत लोकांचा फालतू पैसा आला आणि व्यक्ती व कंपन्या ह्यांनीं धंद्यांतील फायद्याच्या रकमा आपल्या व्यवहारांतच गुंतवून ठेवण्याचें धोरण स्वीकारलें ह्या प्रवृत्तीचाहि उल्लेख वुइल्यम डीकन्स बँकेच्या अध्यक्षांचे भाषणांत करण्यांत आला आहे.

## सहामाही डिव्हिडंड केव्हां देतात?

सबंद वर्षाचे हिशेब पुरे झाल्यावर त्यांत नफा आढळला, तर त्यांतून कंपन्यांचें डिव्हिडंड दिलें जातें, हें सर्वांस माहीत आहेच. कंपनी कायद्याप्रमाणें लिमिटेड कंपनीच्या डायरेक्टरांना आपल्या भागीदारांस इंटेरिम डिव्हिडंडहि देतां येतें. परंतु बँकांसारख्या संस्थांस साधारणपणें एकजात एकसारखा नफा होत रहातो व त्यांचे डायरेक्टर वर्षभर वाट न पहातां पहिल्या सहामाहीचे नफ्यांतून त्या सहा महिन्यापुरतें इंटेरिम डिव्हिडंड देऊन टाकतात व वर्षानंतर पक्के हिशेब झाल्यावर पुढील सहामाहीचें डिव्हिडंड देऊन सबंद वर्षाचें डिव्हिडंड पुरें करतात. कंपनीची स्थिति हें सहामाहीचें इंटेरिम डिव्हिडंड देण्याजोगी आहे किंवा नाहीं, हा प्रश्न अर्थातच फार महत्त्वाचा आहे. सहा महिन्यांनीं सर्व हिशेब करून, घसारा काढून, बुडीत व संशयित कर्जाची तरतूद करून जो नफा उरेल त्यांतून भागीदारांस किती द्यावयाचा, हा प्रश्न येतो. प्रेफरन्स भाग असतील व नफा भरपूर असेल तर सहामाहीचें त्यांवरील सबंद डिव्हिडंड देऊन टाकण्यास हरकत नसते. परंतु, ऑर्डिनरी शेअरवर पहिल्या सहामाहीचें डिव्हिडंड अपेक्षित वार्षिक डिव्हिडंडच्या दरापेक्षां बऱ्याच कमी दरानें द्यावें, म्हणजे पुढें अडचण येण्याचा संभव नसतो. पहिल्या सहामाहीच्या डिव्हिडंडपेक्षां दुसऱ्या सहामाहीचे डिव्हिडंड कमी दराचें जाहीर झाल्यास, कंपनीच्या भागांची बाजारांतील किंमत पडते, असा अनुभव आहे. सबंद वर्षाच्या डिव्हिडंडचाच इंटेरिम डिव्हिडंड हा एक भाग आहे. पहिल्या सहामाहीचें इंटेरिम डिव्हिडंड भागीदारांस दिलें, परंतु वर्षअखेरच्या हिशेबांत नुकसान दिसून आलें तर इंटेरिम डिव्हिडंड हें भांडवलांतून दिलें गेलें असा अर्थ होईल. कंपनीचा व्यवहार व सर्वसाधारण परिस्थिति हीं लक्षांत घेऊनच इंटेरिम डिव्हिडंड द्यावयाचें किंवा नाहीं, हें डायरेक्टरांनीं ठरवावें. कंपनीस नफा झाला, परंतु पुरेसा पैसा हातीं नसला, तर इंटेरिम डिव्हिडंड न देणें श्रेयस्कर होय. ज्या कंपनीचा व्यवहार एकमार्गी असतो व जिच्या नफ्यांत फार आंदोलनें होत नाहींत, अशा कंपनीच्या पहिल्या सहामाहीच्या नफ्याचा अंदाज करणें अवघड नसतें. केवळ कंपनीजवळ भरपूर रोख पैसा आहे, ह्याचा अर्थ तिचा नफा मोठा आहे व सहामाही डिव्हिडंड देण्यास हरकत नाहीं, असा समज होऊं देतां कामा नये. भाग भांडवल अथवा कर्ज ह्यांच्या रकमा खर्च न होतां शिलक राहिल्या, तर रोख रकम मोठी दिसते; उलट भांडवली स्वरूपाचा मोठा खर्च झाला असेल तर प्रत्यक्ष नफ्याचे मानानें रोख रकम लहानहि दिसूं शकते. रोख रकमेच्या आंकड्यांवरून नफ्या-तोट्याचा अंदाज करणें चुकीचें होईल.

बँक ऑफ बरोडा, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंपीरिअल बँक, इंडियन बँक इत्यादींचें डिव्हिडंड वर्षांतून दोनदां, प्रत्येक वेळीं एका सहामाहीचें मिळतें. कित्येक विमा कंपन्यांचें डिव्हिडंड त्यांच्या मूल्यमापनांत आढळणाऱ्या वाढाव्यावर अवलंबून असतें व मूल्यमापनानंतर एकदम साठलेलें डिव्हिडंड देण्यांत येतें. ज्या कंपन्यांजवळ डिव्हिडंडची वेगळी तरतूद असते अशा कंपन्या सालोसालहि डिव्हिडंड देतात. कापडाच्या गिरण्या वार्षिक डिव्हिडंड देतात; रेल्वे कंपन्यांची स्थिति बँकांप्रमाणेंच असते.

## अमेरिकेंत पोलादाचें प्रचंड उत्पादन

अमेरिकेंत १९४० सालीं ६६५ लक्ष टन (१ टन=२ हजार पौंड) वजनाचें पोलाद तयार करण्यांत आलें. १९३९ सालाच्या मानानें हें उत्पादन २७ टक्क्यांनीं अधिक होतें. अर्धवट व पूर्ण स्थितीतल्या पोलादापैकीं १८ टक्क्यांइतका माल विक्री व निर्गत ह्यांचे साठी तयार झाला होता आणि त्यांतला निम्मा माल इंग्लंडमध्यें गेला. कच्च्या स्थितींतल्या पोलादाचें उत्पादन अमेरिकेंत आतां ८५० लक्ष टनांपर्यंत आलें आहे. लोखंड-पोलादाच्या अमेरिकन कारखान्यांत उत्पादनाची सुधारणा व विस्तार करण्याच्या हेतूनें गेल्या दहा वर्षांत सुमारें ५०० कोटि रुपये घालण्यांत आले आहेत. ह्या कारखान्यांचा विस्तार अजून चालूच आहे.

## राकेल तेलाचें जागतिक उत्पादन

अमेरिका व रशिया ह्या देशांत राकेल तेलाचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होतें. बाकीच्या देशांतला राकेलचा धंदा त्याच्या निर्गत व्यापारावर अवलंबून असतो. युद्धामुळें हा व्यापार मर्यादित झाला आहे तरी राकेलच्या जागतिक पुरवठ्यांत घट झालेली नाहीं. जागतिक उत्पादनाचे आंकडे खालीं दिले आहेत.

राकेल तेलाचें उत्पादन
(दशलक्ष पिंपांचे आंकडे)

| देश | १९३९ | १९४० |
|---|---|---|
| अमेरिका | १,२५५ | १,३४५ |
| रशिया | २१६ | २२४ |
| वेनेझुएला | २०८ | १८९ |
| इराण | ७७ | ७६ |
| डच ईस्ट इंडिज | ६८ | ६८ |
| रुमानिया | ४५ | ४२ |
| मेक्सिको | ४२ | ४३ |
| इराक | ३० | ४५ |
| कोलंबिया | २३ | २६ |
| अर्जेंटिना | १८ | २० |
| त्रिनिदाद | १९ | २० |
| इतर | ६१ | ६७ |
| एकूण | २,०६८ | २,१५० |

## निर्गत व्यापार आणि युद्ध-प्रयत्न

(ब्रिटिश-अमेरिकन टोबॅको कंपनीच्या अध्यक्षांचें, कंपनीच्या वार्षिक सभेच्या वेळचें भाषण.)

"शक्य तितक्या नोकरवर्गास आम्हीं लष्करांत जाऊं दिलें आहे. आपल्या कंपनीचा व्यवहार हा राष्ट्रीय महत्त्वाचा आहे. कारण तो मुख्यतः निर्गत व्यापाराचा आहे. निर्गतीमुळें सरकारास परदेशी हुंडणावळ मिळूं शकते. निर्गतीचा ओघ अखंड चालू ठेवण्यासाठी कांहीं महत्त्वाच्या जागांवरून लष्करी नोकरीस लायक असलेल्या आपल्या नोकरांस जाऊं न देणें हेंच राष्ट्रीय दृष्टीनें महत्त्वाचें आहे. आपल्या नोकरांपैकी कांहींचा प्राण युद्धांत अर्पण झालेला आहे. त्यांच्या नातेवाइकांच्या व जे नोकर युद्धकैदी झाले आहेत त्यांच्याहि नातेवाइकांच्या दुःखांत आपण सहभागी आहोंत. आपल्या व्यापाराचे धागेदोरे सबंद जगांत पसरलेले आहेत. परराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरांतील चढउतार अर्थातच अनिश्चित आहे. बहुतेक देशांत करवाढ मोठ्या प्रमाणावर होत आहे. तथापि आपली प्रगति अखंड चालू राहील, अशी आशा आहे."

# स्फुट विचार

## युद्धाच्या हालचाली

युरोपांत व आफ्रिकेमध्यें युद्धाच्या दोन मुख्य रणक्षेत्रांत लढाया चालू आहेत. जर्मनीनें युगोस्लाव्हिया व ग्रीस ह्यांच्या विरुद्ध चालवलेली मोहीम मंदगतीनें पुढें पाऊल टाकूं शकली आहे. युगोस्लाव्हिया प्रस्तुत युद्धास तयार नव्हता अशा स्थितींत जर्मनीनें त्याचेवर स्वारी केली ही गोष्ट लक्षांत घेतली असतां त्या राष्ट्राच्या फौजांस सपाट प्रदेश सोडून डोंगराळ मुलखाचा आश्रय कां करावा लागला आहे हें तेव्हांच समजेल. ही संधि साधून युगोस्लाव्हियाचे शेजारी, हंगेरी, रुमानिया व बल्गेरिया ह्यांनीं त्या देशाचे लचके तोडण्यास प्रारंभ केला आहे. त्यांचे तोंडावर प्रदेशाचे तुकडे फेकले असतां आपलें कार्य सुकर होईल ह्या बुद्धीनें जर्मनी हंगेरीच्या कृत्यास उत्तेजन देत आहे. रशियानें ह्या प्रकरणीं विशेष हरकत घेतलेली नाहीं. आल्बेनियांत व युगोस्लाव्हियांत जर्मनीची व इटलीची फौज एकत्र यावी असा मुसोलिनीचा बेत दिसतो. जर्मनीच्या यांत्रिक सेनेस थोपवून धरण्याची ग्रीस शिकस्त करीत असून ब्रिटिश वैमानिकांचें ह्या बाबतींत उत्कृष्ट सहकार्य होत आहे. युगोस्लाव्हियाच्या क्रोएटिआ हा भाग फुटून निघाला आहे आणि त्याच्या स्वातंत्र्यास जर्मनीनें मान्यता दिली आहे. युगोस्लाव्हियाचे तुकडे उडावे आणि त्याचें स्वातंत्र्य व सामर्थ्य पूर्ण नष्ट व्हावें असें हें जर्मनीचे धोरण आहे. बाल्कन्समध्यें आणि आफ्रिकेंतहि जर्मनी इटलीस मदत देत आहे. सिसिलीमधून ट्रिपोलींत रणगाडे व सैनिक पाठवून हिटलरनें आपल्या दोस्तास कुमक पोहोंचवली आहे. ब्रिटिश फौज ॲबिसीनियामध्यें गुंतली आहे आणि कांहीं ग्रीस व युगोस्लाव्हिया ह्यांचे मदतीस धावून गेली आहे. ह्या संधीचा फायदा घेऊन जर्मन व इटालिअन सैन्यानें आफ्रिकन किनाऱ्याच्या लगते असलेल्या रस्त्यानें बेंगाझीपासून इजिप्तच्या सरहद्दीपर्यंत चाल केली आहे. टोब्रुक आणि सोलम येथें ब्रिटिशांची फौज शत्रूशीं लढत आहे आणि तिनें त्याची प्रगति थांबवली आहे. ब्रिटिश वैमानिक शत्रूवर हल्ले चढवून शक्य तेथें त्याचा समाचार घेत आहेत आणि ह्या कामांत ब्रिटिश आरमार सहकार्य करीत आहे. भूमध्य समुद्रांत त्या आरमाराचें पूर्ण वर्चस्व असल्यानें त्यानें अलीकडे इटलीचीं लढाऊ सामान नेणारीं जहाजें बुडवलीं आहेत आणि आफ्रिकेंत शत्रूस कुमक पोहोंचवली जाऊं नये ह्या विषयीं तें खबरदारी घेत आहे. तांबड्या समुद्रांतून अमेरिकेची व्यापारी जहाजें जाण्यास प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं मान्यता दिली आहे आणि तिकडील सबंद प्रदेशामधून इटलीची पूर्ण हकालपट्टी झालेली आहे. ही सर्व परिस्थिति ब्रिटिशांस अनुकूल अशी आहे आणि लिबिया व इजिप्तची सरहद्द ह्यांचे बाजूकडे शत्रूस तोंड देणें त्यांस सोपें झालें आहे. जर्मनीचे विमानी हल्ले ग्रेटब्रिटनवर सारखे चालू आहेत आणि तेथें इमारती व मनुष्यप्राण ह्यांचा नाश करण्याचा क्रम जर्मनीनें चालू ठेवला आहे. तथापि, ह्या संकटास ब्रिटिश जनता धैर्यानें व नेटानें तोंड देत आहे आणि तिची शिस्त व निश्चयी वृत्ति हीं वाखाणण्यासारखीं आहेत. ब्रिटिश वैमानिक दलानें शत्रूच्या प्रदेशावर हल्ले चढवून आपला पराक्रम त्यास जाणवेल अशा रीतीनें कामगिरी चालू ठेवली आहे. ग्रेट ब्रिटनचें लढाऊ सामर्थ्य सारखें वाढत आहे आणि अमेरिकेचें सहाय अधिकाधिक प्रमाणांत उपयोगी पडत आहे. व्यापारी जहाजें, दारूगोळा, शस्त्रास्त्रें इत्यादि सर्व बाबतींत अमेरिका इंग्लंडला सढळ हातानें सहाय देत आहे. ह्या एकूण परिस्थितीचा परिणाम शत्रूस लवकरच जाणवूं लागेल ह्यांत शंका नाहीं.

---

## रशिया-जपान करार

जपानचे परराष्ट्रीय मंत्री मात्सुओका युरोपमध्यें सफर करून बर्लिन, रोम व मॉस्को येथें राजकारणाच्या वाटाघाटी आटोपून टोकिओला परत गेले आहेत. जर्मनी, इटली व जपान ह्यांचें त्रिकूट बनलें असून आपल्या झपाट्यांत सापडतील त्या परदेशांत स्वतःची सत्ता दांडगाईनें स्थापन करण्याचा त्यांचा निश्चय झाला आहे. त्याप्रमाणें युरोपांत व आफ्रिकेंत जर्मनी व इटली ह्यांनीं उद्योग चालवला आहे आणि चीनमध्यें जपाननें त्याच धोरणानें दीर्घकालीन युद्ध मांडलें आहे. जगाची "नवी घडी" बसवण्याचें कार्य वरील त्रिकुटानें हातीं घेतलें आहे. तें लहानमोठ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यास विघातक असल्यानें त्याचा प्रतिकार करून तें हाणून पाडण्याचें कर्तव्य सर्वांनीं बजावणें अगत्याचें झालें आहे. इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं पुढाकार घेऊन जर्मनी व इटली ह्यांचें पारिपत्य करण्याचा कार्यक्रम हातीं घेतला आहे आणि अमेरिकेची जपानशी असलेली तेढ वाढत आहे ह्याचें कारण जपाननें स्वीकारलेलें अन्याय्य चढाईचें धोरण हेंच होय. युरोप व आफ्रिका खंडांत आपल्या दोस्तांनीं चालवलेल्या युद्धास एशियामध्यें गडबड करून जपान कसें सहाय अप्रत्यक्षरीतीनें देऊं शकेल ह्याविषयीं चर्चा करण्यासाठीं मात्सुओका बर्लिन व रोम येथें जाऊन आले. परंतु एशियांतील जपानी राजकारण यशस्वी होण्यास रशियाची सहानुभूति मिळणें आवश्यक असल्यानें त्यांनीं टोकिओस परत जाण्यापूर्वीं मॉस्को येथें वाटाघाटी केल्या आणि रशियाशीं करावयाचा तटस्थपणाचा करार खिशांत घालून ते स्वदेशीं गेले. एशियांत रशियन हितसंबंधांस बाध येणार नाहीं ह्या रीतीनें जपाननें हातपाय पसरले तर मॉस्कोनें स्वस्थ बसावें हाच त्या कराराचा मथितार्थ दिसतो. चालू युद्धांतलें रशियाचें परराष्ट्रीय धोरण काय आहे हें समजणें कठिण झालें आहे. तें एक मोठें गूढ होऊन बसलें आहे. बाल्कन्समध्यें जर्मनी धुमाकूळ घालीत असतां रशिया स्वस्थ आहे आणि युगोस्लाव्हियाशीं त्याचा झालेला मैत्रीचा करार व्यर्थ झाला आहे. अशाच प्रकारची वृत्ति रशियानें जपानच्या कराराचे बाबतींत स्वीकारली आहे असें वाटतें. जपानी राजकारणावर अमेरिकेची नजर आहे आणि अमेरिकन खंडांतलीं राष्ट्रें त्यासंबंधांत जागरूक आहेत. जपानच्या कारवायांकडे त्यांचें चांगलें लक्ष आहे.

---

## १९४१ ची पहिली तिमाही

जानेवारी १९४१ ते मार्च १९४१ ह्या तिमाहींत बाजारांत पैशास मागणी अत्यल्प होती त्या कारणानें व्याजाचे दर मंद राहिले व शेड्यूल्ड बँकांजवळील शिलकांत वाढ झाली. ट्रेझरी बिलांवर व्याजाचा दर १९४० च्या जानेवारींत १ रु. १३ आणे होता, तो १९४१ च्या जानेवारींत १३ आ. ७ पैंवर आला व फेब्रुवारींत तो १० आ. ५ पै झाला. पैशाच्या मुबलकपणाचें हें द्योतक आहे. शेड्यूल्ड बँकांच्या व्यवहारासंबंधीं सविस्तर माहिती देणारे आकडे दुसरीकडे दिले आहेत त्यावरून असें दिसून येईल, कीं रिझर्व बँक कायद्याप्रमाणें शेड्यूल बँकांनीं रिझर्व्ह बँकेजवळ ११ कोटि रुपये ठेवले असते तरी चाललें असतें, परंतु प्रत्यक्ष त्यांनीं ४२ कोटि रुपये ठेवलेले होते. शेड्यूल्ड बँकांकडील चालू ठेवींतहि वाढ झालेली आढळते. हिंदुस्थान सरकारच्या ब्रिटिश पौंडांतील रोख्यांची सक्तीची विक्री, ही गेल्या तिमाहींतील एक महत्त्वाची गोष्ट झाली. ब्रिटिश पौंडांतील रोख्यांची जागा रुपयांतील रोख्यांनीं घेतल्यामुळें रिझर्व्ह बँकेच्या चलन विभागांतील रुपयांतील कर्जरोख्यांचें प्रमाण वाढणें स्वाभाविक आहे. हें प्रमाण वाढून तें रिझर्व्ह बँक कायद्यानें घालून दिलेल्या मर्यादेबाहेर जाऊं नये, म्हणून त्या कायद्यांतच दुरुस्ती करण्यांत आली.

---

## मुंबई शहराचा कपाशीचा व्यापार

सन १८८७ सालीं ईस्ट इंडिया कंपनीनें डॉ. होन ह्यांस हिंदी कपाशीचें पीक व कपाशीचा व्यापार ह्यांचा अभ्यास करण्यासाठीं हिंदुस्थानांत पाठविलें. त्यावेळींहि कपाशीची निर्गत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होत असे. तेव्हां उत्कृष्ट कपाशीचा भाव ६० रुपये खंडी अथवा १¼ आणे पौंड असा होता. एकूण उत्पादनाचा अंदाज करणें अर्थातच अवघड होतें, तथापि बंगालमध्यें दरसाल ४ कोटि, ३० लक्ष पौंड कपाशीची आयात होते, असा १८०२ सालीं अजमास करण्यांत आला होता. ह्या सर्व कपाशीपासून हातमागांवर कापड काढण्यांत येत असे.

मुंबई येथील कपासबाजार त्यावेळीं सध्याच्या टाऊन हॉलसमोर असे. नंतर तो तेथून हालवून १८४४ सालीं कुलाब्यास नेण्यांत आला. तेथें त्याचा मुक्काम १९२३ पर्यंत होता. १९२३ सालीं त्याचे शेवरीस स्थलांतर करण्यांत आलें. कुलाब्यापेक्षा शेवरीचें गिरण्यांपासूनचे व गोदींपासूनचें अंतर थोडें आहे.

मुंबईच्या कपासबाजाराचा आशिया खंडांत दुसरा अनुक्रम लागतो. कपाशीच्या पिकाचें उत्पादनांत हिंदुस्थानाचा दुसरा नंबर आहे. हिंदी उत्पादनापैकीं निम्म्या पिकाचा उठाव मुंबई बाजारांतून होतो. सर्वसाधारणपणें, प्रत्येक मोसमांत सुमारें ३० लक्ष गाठी कपास मुंबईत येते. त्यापैकीं २० लक्ष गाठींची निर्गत होते व उरलेली कपास मुंबई शहरांतील बंदरांत खपते. म्हणजे, मुंबई हें व्यापारीदृष्ट्याच केवळ महत्वाचें नसून, त्या शहरांतील गिरण्यांत कपाशीचा उठावहि मोठ्या प्रमाणावर होतो. मुंबई बाजारांतील वायद्याच्या व्यवहारांचें प्रमाण जगांतील कोणत्याहि बाजारांतील वायद्याच्या व्यवहारांचे मानानें हलकें नाहीं.

### वायद्याच्या व्यवहारांच्या देण्याघेण्याचा हिशेब

१९१८ पूर्वी वायद्याच्या व्यवहारांत निघणारें देणें-घेणें वर्षांतून एकदाच पुरें केलें जाई. त्यामुळें, सट्टे करणारांचें देणें लाखांवर जाऊन, त्याच्याशीं व्यवहार करणें धोक्याचें होई.

भडोच कपाशीचा दर ७०० रुपयांवर गेला, त्यावेळीं ह्या गोष्टींतील धोका स्पष्टपणें लोकांच्या नजरेस आला व दर पंधरा दिवसांनीं देणीं-घेणीं पुरीं करण्यासाठीं क्लिअरिंग हाऊसची योजना करण्यांत आली. १९१८–१९ मध्यें ह्या क्लिअरिंग हाऊसमध्यें १४½ कोटि रुपयांचा व्यवहार झाला. तो कांहीं वर्षें कमीअधिक झाला तरी सरासरीनें दरसाल पांच–सात कोटींची उलाढाल क्लिअरिंग हाऊसमध्यें होई. १९३९–४० मध्यें १३ कोटि, ८५ लक्ष रुपयांची उलाढाल त्यांत झाली. २८ ऑक्टोबर, १९२१ रोजीं एकाच सेटलमेंटचे वेळीं १ कोटि, ६३ लक्ष रुपयांची उलाढाल झाली. ३० नोव्हेंबर, १९२३ रोजीं १ कोटि, ८८ लक्षांची झाली, १३ डिसेंबर, १९३९ रोजीं १ कोटि ४४ लक्षांची झाली व २९ जानेवारी, १९४० रोजीं ती सर्वांत मोठी म्हणजे १ कोटि, ९७½ लक्षांची झाली.


## कोरोना पोर्टेबल विकणें आहे.

कोरोना पोर्टेबल टाइपरायटर उत्तम स्थितींतला खासगी कामासाठीं वापरलेला, विकणें आहे.

" क्ष " C/o अर्थ.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), वांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष) श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

दक्षिण कोंकणांतील राष्ट्रीय बाण्याचें

प्रमुख साप्ताहिक

## हिंद–सेवक

संपादक—सदानंद शांताराम भांडारकर

प्रकाशक—मधुकर यशवंत भांडारकर

हिंदसेवकमध्यें दर गुरुवारीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व घडामोडींची विस्तृत माहिती मिळते.

व्यवस्थापक–'हिंद–सेवक', मालवण, जि. रत्नागिरी.

## ग्रामोद्योग करून पैसा मिळवा.

देशी रंगारी शिक्षक—विदेशी रंग महागले ना ? मग वनस्पतीपासून रेशीम, सूत, लोकर रंगविणें व चिटें छापण्याची सोपी माहिती शिका. किं. १॥ रु.

नजरबंद शिक्षक—जादूच्या ८० चमत्कारिक खेळांची सचित्र माहिती मागवून जादूगार व्हा ! किं. १॥ रु.

बुटपालिश शिक्षक—कातड्याला लावण्याची घट्ट व पातळ निराळ्या रंगाची पॉलिश घरीं बनवा ! किं. ॥ ट. ह. निराळा.

प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

# हिंदी बँकिंगसंबंधीं ताजे आकडे

### नव्या शेड्यूल्ड बँका

३१ मार्च असेरच्या तिमाहींत दोन बँका शेड्यूल्ड बँकांचे यादींत सामील झाल्या, त्यांची माहिती येथें दिली आहेः—

| बँक | मुख्य कचेरी | शाखा |
|---|---|---|
| १ लक्ष्मी बँक लि. | अकोला | मुंबई, नागपूर, गोंदिया, खामगांव, अमरावती |
| ... | ... | |
| २ इंटरनॅशनल बँक ऑफ इंडिया लि. | अहमदाबाद | नडियाद, आनंद, धोलका |

### शेड्यूल्ड बँकांची संख्या

| | ३१-३-४० | ३१-१२-४० | ३०-९-४० | ३०-६-४० |
|---|---|---|---|---|
| एक्स्चेंज बँका | २६ | २० | २० | १९ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ४४ | ४२ | ४२ | ४० |

### शेड्यूल्ड बँकांच्या शाखा

(मुख्य कचेऱ्या, पे ऑफिसें व सब-ऑफिसें धरून)

| | ३१-१२-४० | ३१-३-४० |
|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ३९० | ३८४ |
| पांच प्रमुख जॉइंट स्टॉक बँका | ३०४ | २९० |
| एक्स्चेंज बँका | १०३ | १०० |
| इतर शेड्यूल्ड बँका | ५५४ | ५१६ |

### पैशाच्या वर्गावर्गीची ३० बँकांस सवलत

ऑक्टोबर, १९४० मध्यें पैशाच्या वर्गावर्गीसंबंधीं नवीन योजना अंमलांत आली, त्याअन्वयें कांहीं विशिष्ट ३० बिगर-शेड्यूल्ड बँकांना व २ देशी सावकारांच्या पेढ्यांस वर्गावर्गीचे दरांत सवलत देण्यांत आली. ह्या यादींत बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें, सुप्रीम बँक ऑफ इंडिया लि., बेळगांव, युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा, बँक ऑफ नागपूर लि., वर्धा, युनियन बँक ऑफ विजापूर अँड सोलापूर, लि., हीं नांवें आढळतात. सावकारी पेढ्यांचीं नांवें मेसर्स दुर्गाशहा मोहनलालशहा, बँकर्स, राणिखेट व मेसर्स बाळकराम द्वारकादास, सिमला, अशीं आहेत.

### शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति

| | २८-३-१९४१ | २७-१२-१९४० | २९-३-१९४० | १-९-१९३९ |
|---|---|---|---|---|
| शेड्यूल्ड बँकांची संख्या ... | ६३ | ६२ | ५९ | ५९ |
| एकूण ठेवी ... | २८५,६३,००,००० | २७५,७१,००,००० | २५९,२६,००,००० | २४७,८६,००,००० |
| चालू खात्यावरील ठेवी ... | १८०,९९,००,००० | १७४,९५,००,००० | १५०,३८,००,००० | १४१,४०,००,००० |
| एकूण ठेवींशीं प्रमाण ... | ६३·३७% | ६३·४५% | ५८·००% | ५७·०५% |
| मुदतीच्या ठेवी ... | १०४,६४,००,००० | १००,७६,००,००० | १०८,८८,००,००० | १०६,४६,००,००० |
| एकूण ठेवींशीं प्रमाण ... | ३६·६३% | ३६·५५% | ४२·००% | ४२·९५% |
| रिझर्व्ह बँकेकडे ठेवी ... | ४४,१०,००,००० | ५७,०८,००,००० | २४,३८,००,००० | ३२,५८,००,००० |
| एकूण ठेवींशीं प्रमाण ... | १५·४४% | २०·७०% | ९·४०% | १३·१४% |
| डिस्कौंट केलेल्या हुंड्या व अडव्हान्सेस ... | १३०,८०,००,००० | १०३,८५,००,००० | १६३,११,००,००० | १०९,५२,००,००० |
| एकूण ठेवींशीं प्रमाण ... | ४५·७९% | ३७·६७% | ६२·९१% | ४४·१९% |
| कायद्यानें आवश्यक असलेल्यापेक्षा जास्त ठेवलेल्या रिझर्व्ह बँकेकडील ठेवी ... | २२,३६,००,००० | ३६,४९,००,००० | ७,४७,००,००० | १६,०८,००,००० |

### रिझर्व्ह बँक—चलन खातें

| | २८-३-१९४१ | २७-१२-१९४० | २९-३-१९४० | १-९-१९३९ |
|---|---|---|---|---|
| **देणीं** | | | | |
| बँकिंग खात्यांतील नोटा ... | ११,५९,००,००० | १३,९४,००,००० | १३,६६,००,००० | ३५,०४,००,००० |
| एकूण खेळत्या नोटा ... | २६९,२५,००,००० | २५५,१९,००,००० | २५२,२१,००,००० | २१७,१८,००,००० |
| **मालमत्ता व येणीं** | | | | |
| अ सोनें व सोन्याचीं नाणीं ... | ४४,४१,००,००० | ४४,४१,००,००० | ४४,४१,००,००० | ४४,४१,००,००० |
| ब्रिटिश रोखे ... | १०२,२४,००,००० | १३१,५०,००,००० | ११३,५०,००,००० | ५९,५०,००,००० |
| ब रुपये ... | ३४,७१,००,००० | २९,६६,००,००० | ५५,९४,००,००० | ७५,८७,००,००० |
| हिंदुस्थान सरकारचे रोखे ... | ८७,८८,००,००० | ४९,६१,००,००० | ३८,३५,००,००० | ३७,३९,००,००० |
| हुंड्या ... | ... | ... | ... | ... |
| एकूण देण्यांशीं 'अ'चें प्रमाण ... | ५४·४७% | ६८·९४% | ६२·६१% | ४७·८५% |

## रिझर्व्ह बँक—बँकिंग खातें

| | | २८-३-१९४१ | २७-१२-१९४० | २९-३-१९४० | १-९-१९३९ |
|---|---|---|---|---|---|
| **देणीं** | | | | | |
| ठेवी:– | | | | | |
| अ हिंदुस्थान सरकार | ... | ५,०९,००,००० | १०,६०,००,००० | ८,२२,००,००० | ८,९६,००,००० |
| ब ब्रह्मदेश सरकार | ... | ४,८८,००,००० | २,२३,००,००० | ३,४७,००,००० | १,९२,००,००० |
| क इतर सरकारी खातीं | ... | १२,४४,००,००० | ३,६०,००,००० | १०,५६,००,००० | ४,०२,००,००० |
| ड बँका | ... | ३५,४९,००,००० | ४७,९३,००,००० | १७,५९,००,००० | २६,९१,००,००० |
| **येणीं** | | | | | |
| रोख | ... | ११,७१,००,००० | १४,०५,००,००० | १३,७७,००,००० | ३५,१५,००,००० |
| डिस्कौंट केलेलीं बिलें:– | | | | | |
| अ अंतर्गत | ... | ... | ... | ... | ... |
| ब बाहेरचीं | ... | ... | ... | ... | ... |
| क ट्रेझरी बिलें | ... | ३,००,००० | ... | १,२०,००,००० | १,१६,००,००० |
| परदेशांतील रकमा | ... | ४२,२५,००,००० | ५७,१५,००,००० | २८,४९,००,००० | १०,०८,००,००० |
| सरकारांस कर्जें | ... | १६.००,००,००० | ९,००,००० | ... | ३१,००,००० |
| इतर कर्जें | ... | ६,००,००० | ५,००,००० | १८,००,००० | ... |
| गुंतविलेल्या रकमा | ... | ७,१७,००,००० | ६,७१,००,००० | ७,७६,००,००० | ६,८१,००,००० |

## मुंबईमधील व्याजाचे दर

| | | ३१-३-१९४१ | ३०-१२-१९४० | ३१-३-१९४० |
|---|---|---|---|---|
| बँकांचा एकमेकांसाठी व्याजाचा दर (कॉल मनी) | ... | १/४% | १/४% | २ % |
| मुदतीच्या ठेवीवरील व्याज:– | | | | |
| ३ महिने | ... ... ... ... | ३/४% | ३/४% | २ १/२% |
| ६ महिने | ... ... ... ... | १ १/४% | १ १/४% | २ १/४% |
| १२ महिने | ... ... ... ... | १ ३/४% | १ ३/४% | २ % |
| बँक रेट | ... ... ... ... ... | ३ % | ३ % | ३ % |

## अखिल भारतीय चरखा संघ

### संघाचे मिळकतीस प्राप्तीवरील कराची माफी नाहीं

आखिल भारतीय चर्खा संघाचें उत्पन्न व त्यास होणारा नफा ह्यास प्राप्तीवर कर लागू आहे किंवा नाहीं असा प्रश्न कमिशनर ऑफ इन्कम टॅक्सनें मुंबई. हायकोर्टाकडे निवाड्याकरितां सोपविला. त्याचा विचार हायकोर्टानें करून आपला निवाडा दिला आहे.

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

" संघाची स्थापना १९२५ सालीं झाली व तो १९३७ मध्यें राजिस्ट्रेशन ॲक्टाखालीं नोदण्यांत आला. १९३८ च्या मार्चमध्यें संघाकडे त्यास १९३६-३७ मध्यें झालेल्या ८८,६०१ रुपये नफ्यावरील प्राप्तीवरील कराची मागणी करण्यांत आली, त्या संबंधांत वरील प्रश्न निघाला. इन्कम टॅक्स ॲक्टानें कांहीं विशिष्ट उत्पन्नास कराची माफी दिलेली आहे, त्यांत संघाचें उत्पन्न पडतें, असें त्याचें म्हणणें होतें. धार्मिक अथवा परोपयोगी कार्य करणाऱ्या संस्थेसाठीच मिळणाऱ्या एखाद्या मिळकतीच्या उत्पन्नास—जें उत्पन्न कायद्यानें दुसऱ्या कोणासहि मिळूं शकणार नाहीं—प्राप्तीवरील कर द्यावा लागत नाहीं. गरीबांस मदत, शिक्षण, वैद्यकीय सहाय व सार्वजनिक हिताची कोणतीहि बाब, ह्यांचा समावेश परोपयोगी कार्यांत होतो. ट्रस्ट अथवा तत्सम कायदेशीर पद्धतीनें राखून ठेवलेल्या मिळकतीपासून चरखा संघास उत्पन्न मिळालें, असें दाखविण्याची जबाबदारी संघावर आहे. चरखा संघानें ट्रस्ट डीड केलेलें नाहीं. १९३७ पूर्वी, म्हणजे संघ रजिस्टर होण्यापूर्वीं, त्यास कायदेशीर अस्तित्वच नव्हतें. बोर्ड ऑफ ट्रस्टीजवरील व एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलवरील लोकांच्या नांवांवरून संघाच्या स्थापनेचा कॉंग्रेस पक्षाशीं संबंध आहे, हें मात्र दिसून येत होतें. संघाच्या उद्देशांत त्याच्या नफ्यावर नियंत्रण घातलेलें नाहीं. गरीब शेतकऱ्यांस कापूस कातण्याचें व खादी विणण्याचें काम देणें हें संघाचें कार्य असलें, तरी ज्या मालमत्तेंतून नफा उरतो ती मालमत्ता म्हणजे हातमागावर विणलेलें कापड, हें ट्रस्टींचे ताब्यांत असावयास पाहिजे, व त्याचा विनियोग धार्मिक अथवा परोपयोगी कामाव्यतिरिक्त होणार नाहीं, असें त्यांवर बंधन पाहिजे. खादीच्या विक्रीपासून होणाऱ्या नफ्याचा विनियोग कसा करावा, ह्यासंबंधी नियंत्रक नियम संघाचे नाहींत. संघ आपल्या उत्पन्नाचा विनियोग परोपयोगी कामाकडे प्रत्यक्ष करीत आहे, एवढ्यानें भागत नाहीं. संघावर तशी कायदेशीर सक्ती असणें आवश्यक आहे. म्हणून संघास प्राप्तीवरील कर माफ होऊं शकत नाहीं."

### पेट्रोलची काटकसर कशी करावी ?

(१) मोटारीच्या पेट्रोलची टाकी फार भरूं नये. टाकीवरील बूच पक्कें बसवावें.
(२) ब्रेक चाकांस घासत नाहींत ना, हें पहावें.
(३) धावांमधील हवेचा दाब योग्य तेवढा कायम राखावा.
(४) इंजन चालू ठेवून मोटार विनाकारण उभी करूं नये.
(५) शहरांतून शक्य तेवढी मोटार कमी हकावी.
(६) दर ताशी २८ ते ३५ हा वेग सर्वांत काटकसरीचा आहे. ह्यापेक्षां अधिक वेग दिल्यास पेट्रोल अधिक लागूं लागतें.
(७) ऋतुप्रमाणें योग्य तें वंगणाचें तेल वापरावें.
(८) तात्काळ मोटार चालू करण्याची कला शिकावी. चोकचा उपयोग अगदी जरूरीपुरताच करावा.
(९) पहिल्या-दुसऱ्या गिअरमध्यें फार वेग देऊं नये.
(१०) वळणाचे ठिकाणीं फार वेगानें गिरकी घेऊं नये. त्यानें धावाहि अतिशय झिजतात.
(११) कोठें थांबावयाचें, तें अगोदर लक्षांत आणून, ब्रेकचा उपयोग शक्य तेवढा कमी करून मोटार थांबवावी.
(१२) पेट्रोल गळूं नये, ह्यासाठी पेट्रोल वहाणाऱ्या नळया नीट तपासाव्या.
(१३) पेट्रोल पंपावरून पेट्रोल घेतांना, पेट्रोल फार दाबानें येत नाहीं ना, इकडे लक्ष द्यावें. नाहीं तर कारब्युरेटरमध्यें पेट्रोल जातें.

---

### इंदूरमधील कपास कापडाच्या गिरण्या

इंदूर संस्थानांत दरसाल सुमारें ७ लक्ष एकरांत कापूस लावण्यांत येतो व त्यापासून १ लक्ष, ५० हजार गाठी कापूस निघतो. ह्यापैकीं स्थानिक गिरण्यांत ७० हजार गाठींचा उठाव होतो. बाकीच्या ८० हजार गाठी निर्गत होतात. इंदूरमध्यें सात मोठ्या गिरण्या असल्या तरी संस्थान दरसाल ५० लाखांचें कापड आयात करतें. १९१७ सालीं संस्थानांतील गिरण्यांत २,३४१ माग होते व ८०,९१२ चात्या होत्या व कामावर ३४,४२५ कामगार होते. १९३९ चे तत्सम आंकडे ६,०७९ माग, २,०२,००७ चात्या व २८,२८१ कामगार असे आहेत. १९१७ सालीं एकूण ८४½ लक्ष पौंड कापडाचें उत्पादन झालें; १९३९ सालीं ४ कोटि, ७० लक्ष पौंड कापड निघालें.

---

### पाट-बंधाऱ्यांच्या पाण्यावरील पिकें

पाट-बंधाऱ्यांचे पाण्यावर मुख्यतः खालील पिकें मुंबई प्रांतांत लावलीं होतीं:—

| पीक | एकर |
|---|---|
| बागा व फळ बागा | ७,८६५ |
| ऊस | ६३,४५० |
| गहूं | ११,४२४ |
| तांदूळ | ४,०७३ |
| ज्वारी | ६३,७५० |
| बाजरी | ११,६४४ |
| तूर, वगैरे | ११,४६५ |
| भुइमूग | १४,४६५ |
| कपास | १२,९४३ |

पाण्याखालील पिकांची अंदाजी किंमत ३ कोटि, ९६ लक्ष रुपये भरली.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) | १११—२ |
| ४% १९४३ | १०४–९ |
| ३½% विनमुदत | ९५—० |
| ३½% १९४७–५० | १०२—८ |
| ३% (१९६३–६५) | ९४–१० |
| २¾% १९४८–५२ | ९७—२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) | १०८—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) | १०८—० |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) | ११५—६ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) | १२५—० |

### मंडळयांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% | १४१—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०७—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% | ४३—२ |
| इंपिरिअल बँक (५००) १२% | १५३७—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% | १०२–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) ११% | १३६—० |
| कराची (१००) ९% | २१६—४ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% | २२५–१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% | १५५१—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% | १८३०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर (१००) ३½% | ५८—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८४२—८ |
| तापी व्हॅली (५००) ८% | ६३८–१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. | २०३—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. | ४७—० |
| शिंद्या स्टीम (१५) १ रु. | १९–१२ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ८ आ. | ४२—६ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. | ३९६०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% | २१४—६ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) १८ रु. १० आ. | १४८—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. | ३५५—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १७२५—० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. | १३०–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास | ४३–१–3 |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६२–१४ |

## शिरगणतीचे कांहीं आंकडे

नुकत्याच झालेल्या शिरगणतींत गोळा करण्यांत आलेली माहिती ठोकळ रीतीनें प्रसिद्ध होत असून गेल्या दहा वर्षांत लोकसंख्येंत एकंदरीनें कशी वाढ झाली आहे हें त्यांवरून दिसून येत आहे.

मुंबई शहराची लोकसंख्या दहा वर्षांत २८ टक्क्यांनीं अधिक झाली आणि ती १४ लक्ष, ९० हजार भरली.

मुंबई प्रांताची एकूण लोकसंख्या २ कोटी ९ लक्ष आहे. तीमध्यें दहा वर्षांच्या अवधींत सुमारें १६ टक्के भर पडली.

अहमदाबाद शहराची संख्या ५ लक्ष ९२ हजार ( ३७ टक्के वाढ ), पुण्याची २ लक्ष ३८ हजार आणि सोलापूरची २ लक्ष ४ हजार आहे. सुरतेच्या संख्येंत २७ टक्के वाढ झाली.

मुंबई शहर धरून मुंबई प्रांताच्या २० जिल्ह्यांपैकी ११ ची लोकसंख्या प्रत्येकीं १० लक्षांपेक्षा अधिक आहे. रत्नागिरी सर्वांत मोठा जिल्हा आहे ( १३ लक्ष, ७० हजार ) आणि कानडा ( ४ लक्ष ४१ हजार ) सर्वांत लहान आहे.

उत्तरेकडील जिल्ह्यांचे मानानें दक्षिणेकडील जिल्ह्यांत वाढ कमी झाली आहे. धारवाड, रत्नागिरी, कुलाबा व कानडा ह्या जिल्ह्यांतली वाढ १० टक्क्यांपेक्षा कमी आहे.

दक्षिण संस्थानांतील एकूण लोकसंख्या २८ लक्ष आहे. त्यांत झालेली वाढ सुमारें १३½ टक्के आहे. सर्वांत मोठी संख्या कोल्हापूरची ( ११ लक्ष ) आहे.

## आल्बेनिया

इटलीनें कांहीं काळामागें आल्बेनियाच्या स्वातंत्र्याचा बळी घेऊन त्या देशामधून ग्रीसशीं युद्ध आरंभिलें. ग्रीसनें हा हल्ला परतवला आणि आल्बेनियांत इटलीस मागें हाटवीत नेलें. ह्या रीतीनें आल्बेनिया हें मोठें रणक्षेत्र होऊन बसलें आहे. दोन हजार वर्षांमागें हा देश रोमन साम्राज्याचा एक भाग बनला. पुढें १५ व्या शतकांत तुर्कांनीं तो जिंकला आणि आपल्या साम्राज्यास जोडला. तुर्की साम्राज्याच्या अवनतीच्या काळांत प्रमुख युरोपिअन राष्ट्रांच्या विद्यमानें १९१२ सालीं एक जर्मन संस्थानिक आल्बेनियाचा राजा झाला. पण अनेक बंडें होऊन अखेर झोग ह्या तद्देशीय राज्याच्या हातीं राज्यसूत्रें गेलीं. ह्या देशाचें क्षेत्रफळ सुमारें १० हजार चौरस मैल व लोकसंख्या १० लक्ष आहे. आल्बेनिया बहुतेक डोंगराळ आहे आणि शेती व उद्योगधंद्यांचे बाबतींत अत्यंत मागासलेला आहे. निम्म्याचे 'वर प्रजा मुसलमान आहे. गुरांची पैदास व मेंढ्या हीं उपजीविकेचीं मुख्य साधनें आहेत. राकेलचें उत्पन्नही येतें. जंगलें मोठीं आहेत आणि त्यांत चांगल्या जातीचें लाकूड आहे. आल्बेनियाच्या नैसर्गिक संपत्तीचा उपयोग अजून फारसा झालेला नाहीं.


या नव्या शोधानें सर्व जगभर खळबळ उडवून दिली आहे.

# दहा हजार रुपये अगदी फुकट.

### अमृतसरमध्यें २॥ रु. तोळा सोनें

मिनर्व्हा गोल्डची घरोघर प्रशंसा ! मिनर्व्हा गोल्ड हा नकली सोन्याचा अगदी नवा शास्त्रीय आविष्कार होय. त्यानें केवळ वैज्ञानिकांनाच आश्चर्यानें थक्क करून सोडलें एवढेंच नव्हें, तर सर्वसाधारण लोकांची एक अत्यंत मोठी उणीव भरून काढली आहे. सर्व स्त्रिया त्याच्या दागिन्यावर बेहद्द खूष होतात. ज्या घरांत हें सोनें एकदां शिरलें तेथून दोनदोनदा तीनतीनदा त्यांस मागण्या येत आहेत.

मेहेरबान लाला विद्यारतनसाहेब, म्युनिसिपल कमिशनर, पठानकोटाहून २५ आक्टोबरला लिहितात—" काल आपल्या सोन्याचें पार्सल मिळालें; धन्यवाद ! आपण हा नवीन पदार्थ तयार करून जगाची एक मोठीच उणीव भरून काढली आहेत. उलट टपालीं आणखी तीन तोळे सोनें पाठवावें. "

याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रें उदाहरणार्थ रियासत, काँग्रेस, स्वस्तिक, अलामान, जमीनदार, गुरुघंटाल प्रताप, इत्यादींनीं प्रशंसोद्गार खुषीनें छापले आहेत.

हें सोनें कसास लावलें तर अस्सल सोन्याचाच रंग दाखवतें आणि अस्सल सोन्याप्रमाणेंच ठोकलें व गाळलें जातें. याचे हरएक प्रकारचे दागिने बनवता येतात. नापसंत पडल्यास किंमत परत मिळण्याची गॅरंटी आहे; खास प्रसारासाठीं किंमत १ तोळ्यास २॥ रु.; ३ तोळ्यास ७ रु.; ६ तोळ्यास १३ रु.; व ४० तोळ्यास ८० रु.

**मिनर्व्हा गोल्डचे बनवलेले दागिने**

मिनर्व्हा गोल्डच्या बनवलेल्या बांगड्या दर जोडीला २ रु.; कानांतील सोन्याचे डूल दर जोडीला ३ रु.; खड्याची अंगठी ३ रु.; साधी मुंबई फॅशनची अंगठी २ रु.; जाळीच्या बांगड्या दर जोडीला ५ रु.; ( नेकलेस ) माळ १२ रु.; लॉकेट ६ रु.; दस्तबंद दर जोडीला १४ रु.

माल पसंत पडला नाहीं तर परतबोलीची खात्री. पोस्टाचा खर्च फक्त ८ आणे पडतो.

या गोष्टी खोट्या ठरवून देणारास दहा हजार रुपये फुकट दिले जातील. याशिवाय दर तीन तोळे सोनें खरेदी करणारास टिकाऊपणा व सौंदर्य याची १० वर्षे गॅरंटी असलेलें एक फॅन्सी रिस्टवॉच फुकट दिलें जाईल; गॅरंटीचा कागद प्रत्येक घड्याळाबरोबर धाडला जातो.

मिळण्याचा पत्ता—मॅनेजर अमेरिकन मिनर्व्हा गोल्ड हाऊस, ( A. P. ) K. C. अमृतसर.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल

व्हॅक्टूथपावडर

पोरवाल ॲण्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

जर्निमन टेलर व्हा.

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

परांडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# गरीबांचें प्रेम हें असं असतं—

## पण श्रीमंतांना त्याचें काय ?




[ हिंदी व मराठी ]

गरीब आणि श्रीमंत यांमधील झगड्याचें हृदयस्पर्शी
नवयुग चित्र

★

दिग्दर्शक : विनायक, कथासंवाद: वि. स. खांडेकर,
फोटोग्राफी : पांडुरंग नाईक.

★

भूमिका : मीनाक्षी, ललिता पवार, बेबी देवी, बाबूराव पेंढारकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, मा. विठ्ठल आणि विनायक.

## न्यू वेस्ट एण्ड मध्यें येणार !

---

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

**Prop. M. V. Risbud, B. A.**
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

---

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.


---

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ३० एप्रिल, १९४१ अंक १८

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

**रक्तवर्धक**

**वापरा.**

सर्वत्र मिळतें.

—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.** पुणें ४.

**दि सदर्न निटिंग वर्क्स, लि.**
[ २६४ शनिवार, पुणें २. ]
यांनीं बनविलेली

**"पूना होजिअरी"**

उन्हाळ्यासाठी गंजीफ्रॉक, अंडरवेअर्स वगैरे हरतऱ्हेचा

**जाळीचा माल**

तयार होत आहे

आपल्या व्यापाऱ्याकडे चौकशी करा

★

**ठेवी :** मुदतीप्रमाणें ४॥ ते ६ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

★

माहितीसाठीं वरील पत्त्यावर लिहा.

# विविध माहिती

### वेस्टर्न इंडिया मॅच कं. लि.

वरील कंपनीचे सर्व कारखाने १९४० सालीं चांगल्या तऱ्हेनें चालले. इमारतीच्या व यंत्रांच्या घसाऱ्यासाठी ४ लक्ष, २० हजार रुपये बाजूस काढूनहि कंपनीस ३० लक्ष, ८८ हजार रुपये नफा झाला. त्याची भागीदारांस ७% डिव्हिडंड व २% बोनससाठीं ६ लक्ष, ३० हजार रुपये; ५ लक्ष रुपये कच्चा मालावरील घसाऱ्यास; १ लक्ष, ७२ हजार रुपये मॅनेजिंग एजंटांना जादा कमिशन व २५ लक्ष, १४ हजार रुपये शिलक, अशी वाटणी होणार आहे. शिलक राखलेली रकम खूपच मोठी दिसते. त्यांतून कंपनीस द्यावा लागणारा कर भरला जाईल. कंपनीचे संग्रहीं कच्चा माल भरपूर आहे. कंपनीस १९३८ सालीं विक्रीचें उत्पन्न २ कोटि, ४५ लक्ष रुपये झालें. उत्पादनाचा खर्च ७१ लक्ष रुपये आला. कंपनीनें एक्साइज ड्यूटी १ कोटि, १५ लक्ष रुपये भरली. १९३८ सालीं कंपनीस ४½ लक्ष रुपये व १९३९ सालीं १३½ लक्ष रुपये नफा झाला होता. १९४० च्या नफ्याचा आकडा ३० लक्ष, ८८ हजार रुपये आहे.

### पुणें शहर म्युनिसिपॅलिटीचें नवें कर्ज

मुंबई सरकारच्या संमतीनें पुणें शहर म्युनिसिपॅलिटीनें ७० हजार रुपयांच्या कर्जासाठीं टेंडरें मागविलीं आहेत. नंबर दोनच्या शहर सुधारणा योजनेसाठी हें कर्ज उभारण्यांत येत आहे. कर्जावर ४% व्याज मिळेल. मुदलाची फेड ५ वर्षांनीं केली जाईल. ५ मे पर्यंत टेंडर्स पाठविण्याची मुदत आहे. १०० रुपयांखालील कर्जरोख्यांचे अर्ज चालणार नाहींत. अर्जाबरोबर मागितलेल्या कर्जरोख्यांच्या १०% रकम पाठविली पाहिजे.

### डॉक्टरांस विनंति

ग्रेटब्रिटनमधील लष्करी व बिन लष्करी इस्पितळांतून कामें करण्याची अमेरिकेंतील डॉक्टरांस विनंति करणारें एक पत्रक प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं काढलें आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें १८ एप्रिल, १९४१ अखेर संपलेल्या आठवड्यांत १८ कोटि, १० लक्ष रुपये किंमतीच्या १,२५,५१५ चेक्सची देवघेव झाली.

### आगी

अमेरिकेंतील जंगलांत शेकडो आगी घरादारांची व जमिनींची नासधूस करीत आहेत. त्यांनीं अनेक माणसांचा बळी घेतला आहे.

### एअर ग्राफ

बाल्कन्समधील सैनिकांचा ग्रेट ब्रिटनमधील लोकांशीं पत्रव्यवहार सुलभतेनें चालू रहावा, ह्यासाठीं एअर ग्राफ पत्रांची योजना करण्यांत येणार आहे. सैनिकांच्या पत्राचा एका छोट्या फिल्मवर फोटो घेण्यांत येईल. ही फिल्म विमानानें ग्रेटब्रिटनकडे पाठविण्यांत येईल. तेथें फिल्म एनलार्ज करून त्यापासून फोटो छापून तो इष्ट स्थळीं धाडण्यांत येईल. ४,५०० फिल्म्सचें वजन अर्धा शेर भरेल. म्हणजे, कमी वजनांत अधिक पत्रें पाठविण्याची सोय होईल. ग्रेटब्रिटनमधूनहि अशीं पत्रें पाठविण्याची व्यवस्था लवकरच करण्यांत येईल.

### शेतकरी कर्जनिवारण कायदा–शिक्षणवर्ग

हा वर्ग जळगांव येथें ता. ३ मे १९४१ पासून चार दिवस श्री. विनायक गणेश तिसे हे चालविणार आहेत. या वर्गामध्यें या कायद्याची माहिती चर्चात्मक रीतीनें सांगोपांग देण्यांत येईल. विशेष माहिती जळगांव सें. को. ऑ. बँकेंत मिळेल, असें व्यवस्थापक कळवितात.

### जपानचें जर्मनीकरण ?

"जपानी राष्ट्रीय जीवनास, शक्य तर उद्यांपासून, जर्मनीमधील नियंत्रण पद्धतीचें वळण लावीन" असें मि. मात्सुओका, जपानचे परराष्ट्रीय मंत्रि, हे युरोपांतून जपानमध्यें परत आल्यावर म्हणाले.

### मोटारींचा कारखाना मद्रासमध्यें काढा

म्हैसूरमध्यें स्थापन होत असलेला मोटारींचा कारखाना मद्रास प्रांतांत स्थापला जावा, अशी हिंदुस्थान व मद्रास सरकारास विनंति करणारा ठराव सदर्न इंडिया चेंबर ऑफ कॉमर्सनें केला आहे.

### दारूच्या जाहिरातींवरील बंदी उठली

मुंबई प्रांतांत प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांस दारूच्या जाहिराती छापण्यास सरकारनें बंदी केली होती. तथापि, विदेशी दारूबाबत मुंबई सरकारास सवलतीचें धोरण अंगीकारावें लागल्यानंतर त्यांच्या जाहिरातींवरील बंदी कायम ठेवण्याचें प्रयोजन उरलें नाहीं, ह्या दृष्टीनें सरकारनें ही बंदी आतां उठवली आहे.

### कपड्यांचें उत्पादन

हिंदुस्थानांतील कपड्यांच्या कारखान्यांत दरमहा २२ लक्ष नग तयार होतात. गेल्या महायुद्धाचे वेळीं १९१७ मध्यें सर्वांत अधिक कपडे दरमहा तयार होत असत, त्यापेक्षां सध्याचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर आहे.

### आय. सी. एस. मधील हिंदी नोकर

हिंदुस्थानच्या सनदी नोकरींत व तत्सम दर्जाच्या नोकरींत ६१७ हिंदी व ५८५ युरोपियन लोक आहेत. ह्या ६१७ पैकीं १२१ नोकर प्रांतिक सिव्हिल सर्व्हिस अथवा वकील वर्ग ह्यांतून वर घेतलेले आहेत.

### हिंदी सरकारी रेल्वेजचें उत्पन्न

| | | रोख |
|---|---|---|
| १–४–३९ ते ३१–३–४० | ( नक्की ) | ९८,४३,००,००० |
| १–४–४० ते ३१–३–४१ | (अंदाजे) | १,११,२०,००,००० |

### मॅट्रिकचे उमेदवार

मुंबई विश्वविद्यालयाची मॅट्रिकची परीक्षा झाली, तिला एकूण २६,८८४ विद्यार्थी बसले होते. गेल्या वर्षीपेक्षा यंदा उमेदवारांची संख्या सुमारें ३,७०० अधिक आहे.

### युद्ध फंड

मुंबई प्रांताच्या युद्धफंडाचा आकडा आतां ६०¾ लाखांवर गेला आहे.

### साक्षर स्त्रिया

१९३१ सालीं मुंबई प्रांतांत २ लक्ष, ४४ हजार स्त्रिया साक्षर होत्या. आतां त्यांची संख्या ८ लक्ष, ६७ हजार झाली आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २०६ | आणि निर्गत व्यापार | |
| २ लल्लूभाई सामळदास ह्यांचें चरित्र ... | २०७ | ५ मेंढ्यांची सुधारणा | २११ |
| ३ आयुर्विम्यासंबंधीं एक निवाडा ... ... | २०८ | ६ कोंबड्यांचे संबंधांत संशोधन ... ... | २११ |
| ४ स्फुट विचार ... | २०९ | ७ फळांवरील प्रयोग | २११ |
| बाल्कन्समधील हालहवाल — युद्धपरिस्थितीवर प्रकाश— कॅनडाच्या हुंडणावळीस अमेरिकेचें सहाय– ब्रिटिश आरमाराची भूमध्य समुद्रांत कामगिरी–एक्सचेंज बँका | | ८ बँका व युद्धपरिस्थिति | २१२ |
| | | ९ निवडक बाजारभाव | २१३ |
| | | १० "आग" म्हणजे काय? ... ... | २१४ |



# अर्थ

बुधवार, ता. ३० एप्रिल, १९४१


## लल्लूभाई सामळदास ह्यांचें चरित्र

जुन्या पिढीच्या संस्कारांस नवीन विचारांचें वळण लावण्याची उदार बुद्धि, सार्वजनिक हिताचीं कामें करण्याची हौस, आबालवृद्धांशीं खेळीमेळीनें वागण्याची हातोटी, स्वदेशी उद्योगधंद्यांच्या उत्कर्षासाठीं संघटित प्रयत्नांस सहाय देण्याची तयारी, गरीब व मागसलेल्या शेतकरी वर्गाकरितां सहकारी संस्था स्थापून त्यांच्या हितार्थ झटण्याची वृत्ति, राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीस स्वतःच्या शक्तीप्रमाणें हातभार लावण्याची सदिच्छा, निरलसपणें सतत उद्योग करीत रहाण्याची मानसिक व शारीरिक पात्रता, इत्यादि अनेक गुणांच्या एकत्र साहचर्याचे योगानें दिवंगत सर लल्लूभाई सामळदास ह्यांनीं मुंबई प्रांताच्या जीवनांत महत्त्वाचें स्थान स्वतःसाठी निर्माण केलें होतें. मि. एस. नटराजन ह्यांनीं त्यांचें बोधकारक अल्पचरित्र * इंग्रजी भाषेंत नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे, त्यावरून सर लल्लूभाई ह्यांचा स्वभाव आणि कौटुंबिक व सार्वजनिक जीवन ह्यांची चांगली ओळख पटते.

भावनगरच्या राजकारणी कुटुंबांमध्यें लल्लूभाईंच्या वाडवडिलांची गणना प्रामुख्यानें होत असे. त्यांचे आजे, वडील व चुलते संस्थानांत मोठ्या हुद्यावर नोकर होते. त्यांचे पिते संस्थानचे दिवाणहि झाले. लल्लूभाई जुन्या वळणाच्या नागरसमाजांत जन्मले व वाढले तरी शिक्षणानें, उपजत बुद्धीनें व विचारानें त्यांच्या कल्पनांस नवी व उदारमतवादित्वाची दिशा लागली. मुंबई येथें एलफिन्स्टन कॉलेजांत ते भावनगरहून शिकावयास गेले पण तेथें त्यांचा शिक्षणक्रम पुरा होऊं शकला नाहीं. भावनगरच्या संस्थानी कारभारांत त्यांस जागा मिळाली आणि राज्यव्यवस्थेच्या कामाचा अनुभव त्यांस आला. नानाप्रकारचे ग्रंथ वाचण्याचा त्यांस नाद ह्याच वेळीं लागला आणि त्या काळच्या स्वतंत्र मतवादी इंग्रजी लेखकांच्या विचारांशीं त्यांचा परिचय झाला. विविधप्रकारांच्या ज्ञानाच्या आवडीचा त्यांच्या पुढील चरित्रावर मोठा व इष्ट असा परिणाम झाला. जमीनमहसूल व रेलवेज, ह्या दोन खात्यांच्या कारभारांत त्यांनीं विशेष लक्ष घातलें पण एकवीस वर्षांच्या वयांत त्यांस पत्नी व पिता ह्यांच्या निधनाचा धक्का सोसावा लागला. त्यांचे बंधु, विठ्ठलदास, हे भावनगरचे दिवाण झाले आणि आपले पिते सामळदास, ह्यांच्या स्मारकाच्या व्यवस्थेचें काम दरबारनें त्यांचेकडे सोपवलें. सामळदास कॉलेज स्थापण्याची कल्पना लल्लूभाईंची ती अनेक अडचणींस तोंड देऊन त्यांनीं पुरी केली. ह्यापुढें सोळा वर्षें दोघां बंधूंनीं भावनगरचा राज्यकारभार चांगल्या रीतीनें केला, पण संस्थानच्या गादीवर नवीन महाराजांची स्थापना होतांच लल्लूभाईंस आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन मुंबई येथें सन १९०० मध्यें स्वतःच्या चरित्राच्या दुसऱ्या प्रकरणास आरंभ करावा लागला.

कित्येक जुन्या मित्रांच्या सहायानें लल्लूभाईंनीं मुंबईच्या व्यापारी, औद्योगिक व शैक्षणिक जगांत पदार्पण केलें आणि शेतकऱ्यांच्या सोयीसाठीं एक बँक स्थापन करण्याच्या कल्पनेपासून त्यांच्या सहकारविषयक सार्वजनिक कामगिरीस प्रारंभ झाला. हिंदुस्थान सरकारच्या मदतीनें एक मोठी अखिल भारतीय बँक काढण्याची कांहीं परकीय भांडवलवाल्यांची योजना होती. देशी भांडवल व साहस ह्यांचा लल्लूभाईंनीं पुरस्कार करून सर विठ्ठलदास ठाकरसी ह्यांच्या नेतृत्वानें त्यांनीं मुंबईची प्रांतिक सहकारी बँक स्थापन करून तिला सरकारचा पाठिंबा मिळवला. हिंदी सहकारी चळवळीचे आद्य प्रणेते ह्या नात्यानें लल्लूभाईंनीं अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. तिचें अखेरचें निदर्शक म्हटलें म्हणजे मुंबई प्रांतिक जमीनगहाणाच्या बँकेच्या स्थापनेंत त्यांनीं घेतलेला पुढाकार हें होय. सर्व हिंदुस्थानभर त्यांच्या पोक्त व अनुभवी सल्ल्याचा फायदा सरकारी व बिनसरकारी सहकारी कार्यकर्त्यांस अखेरपर्यंत होत राहिला.

औद्योगिक, व्यापारी, विम्याच्या वगैरे मंडळ्या स्थापण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला आणि सिंधा नॅव्हिगेशन, टाटा आयर्न अँड स्टील, इंडियन सिमेंट, बॉंबे लाईफ इन्शुअरन्स इत्यादि कंपन्यांशीं त्यांचा उत्पादक व संचालक म्हणून निकटसंबंध आला. होतकरू लोकांस हाताशीं धरून व त्यांचेवर विश्वास टाकून स्वदेशी धंद्यांचा विस्तार घडवून आणण्याचे कामीं त्यांनीं आपला वेळ, बुद्धि व पैसा खर्चीं घातला. ह्या बाबतींत योग्य व कार्यक्षम कार्यकर्त्यांच्या अभावीं त्यांच्या पदरीं अनेक वेळां निराशा आणि तोटा ह्यांचें बक्षीस पडलें, पण त्यांनीं अशा आघातांनीं आपल्या मनाची शांतता बिघडूं दिली नाहीं. तत्त्वज्ञानाचे दृष्टीनें जगाकडे पहाण्याची संवय त्यांनीं स्वतःस लावून घेतली होती, तिचें हें फळ होय. वाढत्या वयांतहि त्यांनीं इंग्लंडचा व जपानचा प्रवास केला ह्यावरून त्यांचें मन शेवटपर्यंत तरुण असल्याचें दिसून येतें. सार्वजनिक कार्याच्या विविधक्षेत्रांत त्यांनीं एवढी विस्तृत कामगिरी केली आहे कीं, लल्लूभाईंचें मि. नटराजन ह्यांनीं चरित्र लिहिलें आहे त्यापेक्षां कितीतरी पटीनें मोठें चरित्र प्रसिद्ध होणें आवश्यक आहे असें आम्हांस वाटतें. तथापि प्रस्तुत छोटेखानी पुस्तकांत लेखकानें लल्लूभाईंचें स्वभाववैशिष्ट्य उत्तम रेखाटलें आहे ह्यांत संशय नाहीं. प्रस्तुत लेखकाचा "लल्लूकाका" आणि त्यांच्या कुटुंबांतील मंडळी ह्यांच्याशीं अनेक वर्षें अत्यंत घरोब्याचा संबंध होता. ह्या कारणानें मि. नटराजन ह्यांनीं लल्लूभाई ह्यांच्या गुणांचें व कामगिरीचें केलेलें वर्णन त्यास उत्कृष्टरीतीनें पटलें आहे. लल्लूभाई ह्यांच्या चिरंजीवांनीं आपल्या वडलांचें औद्योगिक कार्य पुढें चालू ठेवलें आहे. आणि श्री. वैकुंठराय ह्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक चालवलेली जनसेवा प्रसिद्धच आहे.

* "Lalubhai Samaldas" by Mr. S. Natarajan: Yeshanand Publications Ltd. Price As. 8/-

## आयुर्विम्यासंबंधीं एक निवाडा

**थोरल्या भावानें धाकट्या भावाच्या नांवानें आयुष्याचा विमा काढल्यास धाकट्या भावाचे मृत्यूनंतर त्या विम्याचे पैसे थोरल्या भावाला मिळतील काय ?**

हकीकत

डॉ. मणीशंकरला जी. एस. पंड्या ह्या नांवाचा एक धाकटा भाऊ होता. जी. एस. पंड्या सावकारी करीत असे व फावल्या वेळांत डॉ. मणीशंकरकडे कंपाऊंडरचें काम करीत असे. डॉ. मणीशंकरला जी. एस्. पंड्याचे आयुष्याचा विमा काढावयाचा होता म्हणून त्यांनीं रिस्पॉंडर बॅंकेकडून विम्याचा फॉर्म मागविला व तो स्वतः लिहून त्यावर आपली सही करून बॅंकेकडे ( विमा कंपनीकडे ) पाठविला. डॉ. मणीशंकरला जी. एस्. पंड्याचे आयुष्यांत विमा काढण्यालायक हित नाहीं. ह्या मुद्यावर विमा कंपनीनें तो फॉर्म परत पाठविला व त्यावर जी. एस्. पंड्यानें आपली सही केली पाहिजे असें कळविलें. नंतर डॉ. मणीशंकरनें दुसरा फॉर्म भरून त्यावर जी. एस. पंड्याची सही घेऊन तो विमा कंपनीकडे पाठविला. विमा २०,००० रुपयांचा होता. विम्याचे हप्ते डॉ. मणीशंकर चेकचे द्वारें पाठवीत असे. विमा काढल्यानंतर जी. एस. पंड्याचे नांवाची पॉलिसी आली. ती पॉलिसी जी. एस्. पंड्यानें डॉ. मणीशंकरला असाईन ( लिहून दिली ) केली. विमा काढल्यापासून थोडेच दिवसांचे आंत जी. एस्. पंड्या मरण पावला म्हणून डॉ. मणीशंकरनें विम्याच्या रकमेची मागणी केली. डॉ. मणीशंकरला विम्याची रक्कम देण्याचें विमा कंपनीनें नाकारलें व ज्या पॉलिसीबद्दल मागणी करण्यांत आली होती, ती रद्द करण्याकरितां चालू दावा आणला. खालच्या दोन्ही कोर्टांत विमा कंपनीतर्फे निकाल झाला म्हणून डॉ. मणीशंकरनें हें अपील केलें होतें.

मुद्दे व विवेचन

विमा कंपनीचे मुद्दे असे आहेत—

"डॉ. मणीशंकरनें धोकेबाजीनें व कंपनीचा गैरसमज करून वादांतील विम्याचा करार घडवून आणला असल्यामुळें तो रद्द आहे. त्या कराराशी जी. एस्. पंड्याचा फक्त नांवापुरता संबंध होता. डॉ. मणीशंकरला जी. एस्. पंड्याचे आयुष्यांत विमा काढण्यालायक कोणतेंही हित नव्हतें. विम्याचा करार केवळ जुगाराच्या स्वरूपाचा होता."

डॉ. मणीशंकरचा बचाव असा आहे—

"त्यानें कंपनीशी धोकेबाजी केली नाहीं अथवा कंपनीचा गैरसमज देखील करविला नाहीं. जी. एस्. पंड्या आपल्याकडे कंपौंडरचें काम करीत असल्यामुळें त्याचे आयुष्यांत विमा काढण्यालायक आपल्याला हित होतें. विम्याचा करार जुगाराच्या स्वरूपाचा नव्हता."

ह्या अपिलाचा निकाल 'विमा काढण्यालायक हित' ह्या शब्दप्रयोगाच्या अर्थावर अवलंबून आहे. इंग्लिश इन्शुअरन्स ॲक्टमध्यें ह्या शब्दप्रयोगाची दिलेली व्याख्या फार आकुंचित असल्यामुळें अमेरिकन ॲक्ट चालू मुकदम्याला लागू करण्यांत यावा, असा डॉ. मणीशंकरतर्फे आमच्यासमोर युक्तिवाद करण्यांत आला आहे. अमेरिकन ॲक्ट लागू केला तरी त्यापासून डॉ. मणीशंकरला फायदा होण्याचा मुळींच संभव नाहीं. त्या कायनुसार झालेल्या निवाड्यांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं, विमा 'काढण्यालायक हित' ( इन्शुअरेबल इंटरेस्ट ) प्राप्त होण्यासाठीं ज्यानें विमा काढला तो ज्याचा विमा काढला त्याच्यावर अवलंबून असला पाहिजे. खालच्या कोर्टांनीं असें ठरविलें आहे कीं, जी. एस. पंड्या स्वतंत्रपणें सावकारीचा धंदा करीत असे व डॉ. मणीशंकरला तो कोणत्याही प्रकारची मदत करीत नसे केव्हां केव्हां जी. एस. पंड्या डॉ. मणीशंकरच्या कंपौंडरचें काम करीत असे. ह्यावरून असें दिसून येईल की, डॉ. मणीशंकर जी. एस. पंड्यावर अवलंबून नव्हता व जी. एस्. पंड्याचें आयुष्य वाढल्यास त्यापासून डॉ. मणीशंकरला भरीव फायदाही होण्यासारखा नव्हता. आपल्या कंपौंडरच्या आयुष्याच्या विमा काढण्याचे हेतूनें डॉ. मणीशंकरनें जी. एस्. पंड्याच्या आयुष्याचा विमा काढला नाहीं असें गृहीत धरून चालण्यास मुळींच हरकत नाहीं. जी. एस्. पंड्या मध्येंच नाहींसा झाल्यास त्याच्या विम्याचे पैसे आपल्याला मिळतील ह्या आशेनें डॉ. मणीशंकरनें जी. एस्. पंड्याचे आयुष्याचा विमा काढला ह्याबद्दल आम्हाला शंका नाहीं. ही आशा जुगाराच्या संदर्भात खास येते.

डॉ. मणीशंकरतर्फे अशी हरकत आणण्यांत आली आहे कीं, जी. एस्. पंड्यानें आपल्या आयुष्याचा विमा काढला होता ही गोष्ट विमा कंपनी आतां नाकबूल करूं शकत नाहीं, कारण विम्याच्या फॉर्मवर जी. एस्. पंड्याची सही आहे. शिवाय जी. एस्. पंड्याच्या विम्याचे हप्ते भरण्यास विमा कंपनीनें डॉ. मणीशंकरला केव्हांही बंदी केली नाहीं. लेखी व तोंडी पुरावा विचारांत घेऊन खालच्या कोर्टांनें असें ठरविलें आहे कीं, विम्याच्या फॉर्मवर केवळ आपली सही करण्यापलीकडे जी. एस्. पंड्यानें कांहीं एक केलें नाहीं. सर्व कांहीं डॉ. मणीशंकरनें केलें. डॉ. मणीशंकरनें आपल्या स्वतःच्या हितासाठी व फायद्यासाठी जी. एस्. पंड्याचे आयुष्याचा विमा काढला ह्याबद्दल आम्हाला मुळींच शंका नाहीं. कारण त्याचा असा उद्देश नसता तर एवढा खटाटोप करण्याची व विम्याचे हप्ते जवळून भरण्याची डॉ. मणीशंकरला मुळींच गरज नव्हती.

निकाल

सबब हें अपील खर्चासह काढून टाकून खालच्या कोर्टांनीं दिलेले निकाल आम्हीं कायम ठेवतों व ह्या निकालावर लेटर्स पेटंट अपील करण्याची अपिलंटला परवानगी देतों.

सारांश

विमा कंपनीशीं धोकेबाजी करून अथवा तिचा गैरसमज करवून घडवून आणलेला विम्याचा करार रद्द करून मागण्याचा विमा कंपनीला अधिकार असतो. स्वतःचा फायदा करून घेण्यासाठीं दुसऱ्याच्या आयुष्याचा विमा काढल्यास विमा कंपनी तो विम्याचा करार रद्द करवूं शकते. अशा परिस्थितींत असें सिद्ध केलें पाहिजे कीं, ज्यानें खरोखर विमा काढविला त्याला ज्याचा विमा काढविला त्याचें आयुष्यांत विमा काढण्यालायक हित होतें हें सिद्ध करण्यासाठी ज्यानें विमा काढविला तो ज्याचा विमा काढला मेला त्याच्यावर अवलंबून होता असा पुरावा दिला पाहिजे. एका नातलगानें दुसऱ्या नातलगाच्या अथवा एका भावानें दुसऱ्या भावाच्या आयुष्याचा विमा काढल्यास ज्यानें विमा काढला त्याला ज्याचा विमा काढला त्याचे मृत्यूनंतर त्या विम्याचे पैसे मिळतील असें समजूं नये. अशा प्रकारचा विम्याचा करार विमा कंपनी रद्द करवूं शकते. परंतु वर दिलेल्या गोष्टी सिद्ध केल्यास तो करार रद्द होणार नाहीं. "न्यायबोध"वरून

# स्फुट विचार

## बाल्कन्समधील हालहवाल

युगोस्लाव्हियाचे राजे पीटर आणि त्यांचे मंत्रि शत्रूच्या हातांतून निसटून बाहेर पडले आहेत. स्वतःचा देश आपणांस कोणत्या परिस्थितींत सोडावा लागला ह्याचें वर्णन करून युगोस्लाव्हिया पुन्हां स्वतंत्र होईपर्यंत आपण झगडत रहाणार असें त्यांनीं निश्चयात्मक आश्वासन स्वतःच्या लोकांस दिलें आहे. युगोस्लाव्हियाची युद्धाची तयारी नव्हती आणि जर्मनीच्या प्रचंड सेनेपुढें त्याचा टिकावहि लागला नसता. अशा स्थितींत एका बाजूनें इटली व दुसऱ्या बाजूनें जर्मनी ह्यांच्या कचाटींत तो देश सापडला असतां तेथील लढाया बंद होणें क्रमप्राप्त होतें. हंगेरी, बल्गेरिया व इटली ह्यांनीं गिधाडांप्रमाणें पडलेल्या युगोस्लाव्हियावर उड्या घातल्या आहेत आणि त्याची वाटणी आपापसांत करून घेण्याविषयींच्या त्यांच्या वाटाघाटी चालू झाल्या आहेत. वरील राष्ट्रांपैकीं प्रत्येक जण ऐसपैस पाय पसरूं पहात आहे आणि स्वतःस सोयीचे प्रदेश निवडून काढून आपापल्या मुलखास जोडूं पहात आहे. अड्रिॲटिक समुद्रांत आपलें वर्चस्व निर्धास्त राहील अशा रीतीनें इटलीस वाटणींत हिस्सा पाहिजे आहे. बल्गेरियानें स्वतःची पश्चिम सरहद्द पुढें सारली आहे व ग्रीसच्या थ्रेसपैकीं भाग त्यास हवा आहे. ग्रीसनें मात्र इंग्लंडच्या सहायानें आपल्या सैन्याची फळी फोडूं न देतां शत्रूशीं निकरानें युद्ध चालू ठेवलें. बाल्कन्समधील राष्ट्रांनीं एकी न केल्या कारणानें जर्मनीनें त्यांचें सर्वांचें स्वातंत्र्य नष्ट करून त्यांस स्वतःच्या सत्तेखालीं आणलें आहे. ग्रीस व इंग्लंड ह्यांच्या पराक्रमामुळें जर्मनीच्या योजना पूर्वसंकल्पाप्रमाणें सिद्धीस गेल्या नाहींत आणि हिटलरला जबरदस्त नुकसान सोसावें लागलें आहे. जर्मनीच्या झंझावातापुढें ग्रीक सैन्याचा टिकाव लागणें शक्य नव्हतें आणि अखेरीस ग्रीक सरकारास आपलें ठाणें क्रीट येथें हालवावें लागलें आहे. ग्रीससारख्या चिमुकल्या राष्ट्रानें दाखवलेलें धैर्य व त्याचा अतुल पराक्रम ह्यांचेविषयीं त्याचें सर्वत्र होणारें अभिनंदन योग्यच आहे.

## युद्धपरिस्थितीवर प्रकाश

हिटलरच्या पुढील डावपेचांचा अंदाज बांधून ब्रिटिश सेनांनीं ग्रीसमध्यें जर्मन हल्ल्यांस तोंड दिलें आणि शत्रुसैन्याची प्रगति शक्य तितकी कुंठित केली. स्पेन व तुर्कस्थान ह्यांस धाकदपटशा दाखवून आणि फ्रेंच मुत्सद्यांवर दडपण टाकून तसेंच, जपानची पूर्व आशियांतील महत्त्वाकांक्षा प्रदीप्त करून, युद्धाच्या ज्वाला दूरवर भडकवण्याचा हिटलरचा बेत असावा असा तर्क करण्यांत येत आहे. हिटलरची आजवरची कारस्थानें पाहिलीं असतां अशा प्रकारचे प्रयत्न करण्यास तो मागेंपुढें पहाणार नाहीं ह्याविषयीं शंका नाहीं. प्रस्तुत युद्ध लांबणें हिटलरच्या फायद्याचें नाहीं. अमेरिकेची मदत सारखी वाढत्या प्रमाणावर इंग्लंडला पोहोंचत असून ब्रिटिशांचें युद्धसामर्थ्य झपाट्यानें वाढत आहे. हिटलरच्या भावी हालचालींची व कारवायांची कल्पना ब्रिटिश मुत्सद्यांस आहे आणि इराकमध्यें त्यांनीं फौज नुकतीच पाठवली आहे हें त्या गोष्टीचें गमक आहे. प्रसंग पडल्यास तुर्कस्थानला एशियामधून मदत मिळावी अशी ही व्यवस्था आहे. टोब्रुकमध्यें राहून ब्रिटिशांनीं जर्मन फौज इजिप्तच्या सरहद्दीपर्यंत कशी येऊं दिली गेली ह्याचें गूढ कित्येकांस पडलें होतें. त्याविषयींचा खुलासा प्रसिद्ध झाला आहे त्यावरून ब्रिटिश सेनानींच्या आफ्रिकेंतील धोरणावर चांगला प्रकाश पडतो. युगोस्लाव्हिया जर्मनीपुढें मुळींच टिकाव धरूं शकणार नाहीं अशी कल्पना करणें प्रथम अशक्य होतें. पण युगोस्लाव्हियांत कठिण परिस्थिति निर्माण होऊन जर्मन सैन्य ग्रीसमध्यें झपाट्यानें घुसूं लागल्या कारणानें ब्रिटिश सेनानींस आफ्रिकेंतील आपली फौज तिकडे तातडीनें नेणें भागच होतें. हें अवघड काम चाललें असतां जर्मन व इटालियन सैन्य इजिप्तच्या सरहद्दीच्या मार्गानें त्वरित चालून गेलें. त्याची गति तेथें मंद झाली असून टोब्रुक येथें ब्रिटिशांनीं शत्रूची तारांबळ उडवली आहे ह्यावरून जर्मनीनें आफ्रिकेंत कांहीं विशेष साधलें असें म्हणतां येणार नाहीं. उलट; पूर्व आफ्रिकेंतून इटालिअन फौजेची हकालपट्टी झाली आहे आणि ॲबिसीनियांतहि तीस आतां कसलाच आधार राहिलेला नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ग्रीसला वेळीं ब्रिटिश कुमक पोंहोचूं नये हा जर्मनीच्या पश्चिम आफ्रिकेंतील हालचालींचा मुख्य उद्देश होता. तो यशस्वी झाला नाहीं. ब्रिटिश फौज ग्रीसमध्यें आपल्या दोस्ताच्या खांद्यास खांदा लावून लढली आहे. सारानैका व लिबिया येथें जर्मन फौजेची थोडी प्रगति झाली आहे तिला, एकंदर युद्धपरिस्थितीचा विचार करतां फारसें महत्त्व नाहीं हें सूक्ष्म विचाराअंतीं सहज ध्यानांत येईल. ब्रिटिश वैमानिक दल आणि आरमार ह्यांनीं चालवलेल्या वाढत्या कामगिरीकडे पाहिलें म्हणजे परिस्थिति आटोक्यांत आहे असेंच म्हणावें लागेल.

## ब्रिटिश आरमाराची भूमध्य समुद्रांत कामगिरी

ब्रिटिश सत्तेचें समुद्रावर वर्चस्व एवढें प्रचंड आहे कीं, त्याविरुद्ध जर्मनीनें चालवलेले प्रयत्न विफल झाले आहेत. एका बाजूस जिब्राल्टर व दुसऱ्या बाजूस अलेक्झांड्रिया ह्या दोन टोकांच्यामध्यें ब्रिटिश आरमार भूमध्य समुद्रांत आपलें वर्चस्व गाजवीत आहे. इटलीचें दक्षिणेकडील बंदर कटाना येथून उत्तर आफ्रिकेंतील ट्रिपोली केवळ ३१० मैल आहे. तेवढें अंतर अंधेरांत तोडून जर्मन व इटालियन जहाजांनीं लढाऊ सामुग्री आफ्रिकेंत नेली आणि तिच्या जोरावर सोलमपर्यंत शत्रूनें चाल केली. कटाना-ट्रिपोलीच्या जलमार्गापासून ब्रिटिश आरमाराचीं मुख्य ठिकाणें फार दूर आहेत. अगदीं जवळचें ठाणें माल्टा हें होय. पण तें अलेक्झांड्रियापासून ८२७ मैल आणि जिब्राल्टरपासून ९९१ मैल आहे. टोब्रुकहि ट्रिपोलीपासून ५७० मैल दूर आहे. ब्रिटिश आरमाराची नजर चुकवून शत्रूची युद्धसामुग्री ट्रिपोलीस गेली तरी ती त्या आरमाराच्या माऱ्यांतून सुटूं शकत नाहीं. आफ्रिकेंतील रणांगणाचा सबंद रस्ता समुद्रकिनाऱ्यालगत आहे आणि तो ब्रिटिश आरमाराच्या माऱ्याच्या पल्ल्यांत आहे, ह्या कारणानें शत्रूच्या हालचाली केवळ विमानदलच बंद पाडीत नसून त्यावर ब्रिटिश आरमाराचेहि हल्ले चालले आहेत. शत्रूच्या चिलखती गाड्या समुद्र ओलांडून आल्या आणि त्यांनीं इजिप्तची सरहद्द गाठली तरी त्या ब्रिटिश आरमाराच्या तडाख्यांत आहेत ह्याची जाणीव त्यांस आरमारी लोकांनीं करून देण्याचा क्रम चालू ठेवला आहे.

### कॅनडाच्या हुंडणावळीस अमेरिकेचें सहाय

लोकशाही नियंत्रित राष्ट्रें जर्मनीच्या विरुद्ध स्वतःच्या व पर्यायानें इतरांच्या स्वातंत्र्यासाठी स्वार्थत्यागपूर्वक झगडत आहेत, त्या सर्वांस युद्धसामुग्री पुरवण्याची जबाबदारी अमेरिकेनें स्वतःच्या शिरावर घेतली आहे. ह्या रीतीनें अमेरिकन राष्ट्र लढाऊ सामुग्रीचें कोठार बनलें आहे. इंग्लंडला पुरवावयाच्या मालाच्या किंमती त्या राष्ट्रास रोखीनें देतां येत नसल्यानें तो माल उसनवारीनें व भाड्यानें देतां यावा अशी तजवीज अमेरिकन कायद्यानें केली आहे. इंग्लंडसाठी कॅनडामध्यें युद्धसामुग्री मोठ्या प्रमाणावर बनवली जात आहे आणि तिला लागणारा अर्धापक्का माल अमेरिका पुरवीत आहे ह्या व्यवहारांत कॅनडानें अमेरिकेस द्यावयाचें देणें निघतें त्याची भरपाई कशी व्हावी हा प्रश्न अलीकडे उपस्थित झाला तेव्हां कॅनडाचे मुख्य प्रधान. मि. मॅकेंझी किंग ह्यांनीं वॉशिंगटन येथें जाऊन अमेरिकन अधिकाऱ्यांशीं वाटाघाटी केल्या आणि हुंडणावळीचा प्रश्न समाधानकारक रीतीनें निकालांत काढला. अमेरिका खंडाच्या संरक्षणाची योजना कॅनडा व अमेरिकन राष्ट्र ह्यांनीं सहकार्यानें आणि परस्परांस जरूर तो माल पुरवून करावी अशी योजना आतां मान्य करण्यांत आली आहे. कॅनडाच्या विशिष्ट जातींच्या मालाच्या मोबदल्यांत अमेरिकेनें यंत्रांसारखा माल पुरवावा आणि तो इंग्लंडच्या नांवें लिहिला जावा हें प्रस्तुत योजनेंतलें मूलभूत तत्त्व आहे. सुमारें शंभर कोटि रुपये किंमतीच्या मालाच्या मोबदला ह्याप्रमाणें प्रतिवर्षी कॅनडा व अमेरिका ह्यांचे दरम्यान होऊन इंग्लंडला आवश्यक असलेली युद्धसामुग्री सोईनें पुरवली जाऊन हुंडणावळीची अडचण नाहींशी होईल. ह्या व्यवस्थेस मि. मॅकेंझी किंग ह्यांनीं विशेष महत्त्व दिलें आहे ह्याचें कारण युद्धसामुग्री पुरवठ्याच्या मार्गांत हुंडणावळीस येणारा अडथळा तिच्या योगानें दूर झाला आहे हें होय. चीन देशाची चलनव्यवस्था जपानच्या कारवायांमुळें बिघडली आहे, तिला स्थैर्य यावें म्हणूनहि अमेरिका चिनी सरकारास पैसा पुरवीत आहे. ह्या पैशाच्या आधारानें चिनी चलन व हुंडणावळ हीं स्थिर रहातील अशी व्यवस्था केली जात आहे.

### एक्सचेंज बँका आणि निर्गत व्यापार

कोणत्याहि देशाच्या परराष्ट्रीय देवघेवींमध्यें निर्गत व्यापारास विशेष महत्त्व असतें. ह्या व्यापारांत निघणाऱ्या हुंड्यांच्या साहाय्यानेंच आयात व्यापारामधलें परराष्ट्रीय देणें भागवतां येत असल्याकारणानें निर्गतीकडे मध्यवर्ती बँका व सरकार ह्यांस लक्ष पुरवावें लागतें. युद्ध–परिस्थितींत हुंडणावळ व परराष्ट्रीय देवघेव ह्यांचें नियंत्रण केल्यावांचून गत्यंतर नसतें. आज इंग्लंडमध्यें ह्या बाबतींत कडक नियंत्रण अर्थातच घालण्यांत आलें आहे. कोणत्या मालाच्या आयात-निर्गतीस वाव किंवा सवलत द्यावी हें राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें सरकारास ठरवावें लागतें. निर्गत व्यापारास उत्तेजन देऊन त्या बाबतच्या हमीचाहि स्वीकार करणें सरकारास आवश्यक वाटतें. हाच नियम हिंदुस्थानच्या निर्गत व्यापारास लागू आहे. एक्सचेंज बँकांच्या हुंडणावळी संबंधांतल्या धोरणाविषयीं कलकत्त्याच्या व्यापारी मंडळींनीं रिझर्व्ह बँकेकडे तक्रार केल्याचें प्रसिद्ध झालें आहे, त्या बाबतींत खुलाशाचे दोन शब्द लिहिणें आवश्यक आहे. हुंडणावळीचे दोन महिन्यांच्या मुदतीचे दर युद्ध चालू होतांच रिझर्व्ह बँकेनें निश्चित केले. दोन महिन्यांच्या मुदतीचे व्यवहार करणें आपणांस कठिण आहे, अशी तक्रार व्यापाऱ्यांनीं केली तेव्हां सरकारनें ही मुदत सहा महिन्यांपर्यंत वाढवून दिली आणि हुंडणावळीचा दर रुपयास आठरा पेन्स असा ठरवून टाकला. परराष्ट्रीय व्यापारी हुंड्यांचे व्यवहार एक्सचेंज बँकांचे कक्षेंत येत असल्यानें त्यांनीं रिझर्व्ह बँकेच्या विद्यमानें जरूर ती व्यवस्था केली आणि दर रुपयास एक बत्तिसांश पेनी ह्या प्रमाणें नफा आकारून व्यवहार चालवला. व्यापारी मंडळीच्या मतें हा दर योग्य होता. पण आतां एक्सचेंज बँका एक सोळांशाच्या दरानें हुंडणावळीवर नफा घेऊं इच्छित आहेत अशी त्यांची तक्रार आहे. निर्गत व्यापारांतील हुंड्यांच्या पैशाबाबत एक्सचेंज बँकांवर नुकसानीची जबाबदारी येत नसून त्याविषयींची हमी रिझर्व्ह बँकेनें घेतली असल्याकारणानें बँकेस नफ्याच्या दरांत वाढ करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. व्यापारी लोक निर्गतीचा व्यवहार करतात तो कित्येक प्रसंगीं सध्याच्या परिस्थितींत इष्ट वाटण्यासारखा नाहीं, असें बँकेच्या वतीनें सांगण्यांत येत आहे. परंतु ज्याअर्थीं सरकारनें हुंड्यांची मुदत दोन महिन्यांची सहा महिनेपर्यंत लांबवली आहे त्याअर्थीं बँकेच्या ह्या म्हणण्यांत कांहीं तथ्य नाहीं असें व्यापारी मंडळीचें बँकेच्या युक्तिवादास उत्तर आहे. निर्गत व्यापार व हुंडणावळ ह्यांविषयींचे प्रश्न युद्ध-परिस्थितींत अत्यंत नाजुक आणि जिव्हाळ्याचे असल्यानें हिंदुस्थान सरकार कलकत्त्याच्या व्यापारी मंडळीच्या तक्रारीचा विचार योग्य रीतीनें करील ह्यांत शंका नाहीं.

### लोकल बोर्डांचा उत्पन्न खर्च

मुंबई प्रांतांतील लोकल बोर्डांच्या १९३९-४० मधील उत्पन्न-खर्चाचे आंकडे खालीं दिले आहेतः— रु.

| | |
|---|---|
| एकूण उत्पन्नः | १ कोटि, ७७ लक्ष. |
| एकूण खर्चः | १ कोटि, ७८ लक्ष. |

| | शिक्षणावर खर्च लक्ष रु. | वैद्यकीय मदतीसाठी खर्च लक्ष रु. | रस्ते वगैरे साठी खर्च लक्ष रु. |
|---|---|---|---|
| उत्तर भागः | ३१$\frac{1}{3}$ | ३ | १२$\frac{1}{4}$ |
| मध्य भागः | ५२$\frac{1}{2}$ | ४ | १६$\frac{1}{2}$ |
| दक्षिण भागः | ३५ | २$\frac{3}{4}$ | ८$\frac{3}{4}$ |

**औषधाशिवाय रोगमुक्त व्हा !**

आरोग्य चिकित्सा शिक्षक—डॉक्टर, वैद्यांच्या औषधाला कंटाळलेले रोगी निसर्गसिद्ध सुलभ उपायांनीं सहज बरे करून आरोग्याचा अखण्ड सुखोपभोग घ्या ! पैसा वांचवा ! किं. १॥ रु.

लंघन–चिकित्सा शिक्षक—प्लेग, कॉलरा, व इतर हट्टी रोग औषधाशिवाय फक्त लंघनें करून रोगमुक्त व्हा ! वज्रदेही बना ! नवी तिसरी आवृत्ति. किं. १॥ रु. ट. ह. शिवाय. यादी फुकट. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

## मेंढ्यांची सुधारणा.

प्रांतांतील गुरांढोरांच्या सुधारणेसंबंधीं कामांत, भांबुर्डा, पुणें, येथील शीप् ब्रीडिंग रीसर्च स्कीम ही अन्वयें करण्यांत आलेल्या कामाचा विशेष उल्लेख करणें जरूर आहे. या योजनेवर सरकारच्या लाइव्हस्टॉक् एक्सपर्टचें नियंत्रण असून तीस आर्थिक मदत मुख्यतः इंपीरियल कौन्सिल ऑफ् ॲग्रिकल्चरल रीसर्चकडून होत असते. या योजनेअन्वयेच्या कामाचा रोख मेंढ्यांच्या दख्खनी जातीची सुधारणा, (१) निवड करून व (२) दक्षिण आफ्रिकेंतील मेंढ्यांच्या मेरीनो जातीशीं तिचा संकर करून, करण्याकडे आहे. १९३९-४० मध्यें या दोनहि दिशांनीं पुष्कळच प्रगति करण्यांत आली व शिवाय, लोंकरीची प्रतवारी लावणें व निवड करणें, ती कातणें व रंगविणें ह्या योगानें स्थानिक धनगरांस आपल्या मालाची अधिक चांगली किंमत मिळणें शक्य व्हावें म्हणून लोकरीच्या उपयोगाबाबत केलेल्या प्राथमिक चौकशीवरून महत्त्वाचे व आर्थिकदृष्ट्या मूल्यवान असे निष्कर्ष मिळविण्यांत आले आहेत.

## कोंबड्यांचे संबंधांत संशोधन

इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्च हें प्रांतांतील कोंबड्यांच्या संशोधनाबाबत शास्त्रीय कामाच्या खर्चाखातरहि रकम देत असतें. हें काम सरकारी सेंट्रल पोल्ट्री फार्म, खडकी, येथें केंद्रित झालें आहे. कोंबड्या बाळगण्याच्या धंद्याच्या आर्थिक प्रश्नाकडे या स्टेशनांत विशेष लक्ष्य देण्यांत येतें; तसेंच या स्टेशनांत कोंबड्या बाळगण्याच्या धंद्यांत कोंबड्यांची उत्पत्ति, खाणेंपिणें व व्यवस्था यांसंबंधीं शास्त्रीय प्रश्नाबाबत व लाइव्हस्टॉक धंद्यांतील या शाखेच्या विद्यार्थ्यांना व्यावहारिक शिक्षण देण्याबाबत कामांतहि हें स्टेशन गुंतलेलें आहे. गुरांच्या उत्पादनासंबंधीं शास्त्रीय कार्य, चरोडी [ कांक्रेज जात ] व बांकापूर [ अमृतमहाल जात ] येथील सरकारी कॅटल फार्मांत व मुंबईची गोरक्षक मंडळी [ गीर जात ] यांसारख्या बिनसरकारी संस्थांच्या सहकार्यानें चालूं होतें. महत्त्वाच्या नेमाड व डांगी जाती यांसंबंधीं अशाच स्वरूपाचें कार्य योग्य केंद्रांत लवकरच सुरू करण्यांत येईल.

## फळांवरील प्रयोग

खडकी येथील सरकारी फळांवरील प्रयोगासंबंधीं स्टेशन येथें इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्चकडून मदत मिळत असलेल्या कोल्ड स्टोरेज रीसर्च योजनेअन्वयेच्या कामाचें सहावें वर्ष पुरें झालें व चालू असलेल्या कामाच्या कार्यक्रमांत, निरनिराळ्या फळांच्या गॅस स्टोरेजसंबंधीं प्रयोगाचें काम हें आतां ज्यास्त जोडण्यांत आलें आहे. प्रांतांतील मुख्य फळांच्या पिकांसंबंधानें खतांचें, पाटाचें पाणी देण्याबाबतचे व मशागतीचे प्रयोग या स्टेशनांत समाधानकारक रीतीनें पार पाडण्यांत आले.

## युद्धविषयक कापडाचें उत्पादन

सरकारच्या युद्धविषयक ऑर्डरी पुऱ्या करण्याचें काम कांहीं कापड गिरण्या करीत आहेत, त्यांस इतर गिरण्यांइतका नफा उरत नाहीं, अशी तक्रार आहे. सप्लाय खात्याकडून त्यांस कांहीं सवलतीहि हव्या आहेत. युद्धविषयक कापडाच्या उत्पादनाचे संबंधांतील प्रश्नांची चर्चा करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें कापडाच्या गिरण्यांचे मालकांची एक परिषद् भरविण्याचें ठरविलें आहे. ही परिषद् मुंबई येथें ता. ९ मे रोजीं भरेल.


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक
निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

## बँकांचे कार्यांत युद्धपरिस्थितीनें खोळंबा होत नाहीं.

( मिडलंड बँकेचे अध्यक्ष, राइट ऑनरेबल मॅकेना, ह्यांचें भाषण. )

" मिडलंड बँकेचे २३ हजार नोकर लष्करांत दाखल झाले आहेत. म्हणजे, पांचांपैकीं एक जण लष्करांत गेलेला आहे. २७ लोकांचा युद्धानें बळी घेतला असून तिघांचा अद्याप पत्ता लागलेला नाहीं. ह्याखेरीज संरक्षक दलांत शेकडो नोकर आपलें रोजचें काम संभाळून, काम करीत आहेत. बँकेच्या इमारतींची नासधूस, विमान हल्ल्यांच्या खबरीमुळें कामाच्या तासांचें नुकसान, येण्या-जाण्यांत होणारा खोळंबा, इत्यादि अडचणींतूनहि बँकेनें आपली कार्यक्षमता कायम राखली आहे व तात्पुरत्या गैरसोईपलीकडे अधिक विशेष झालेलें नाहीं. बॉंब-हल्ल्यांपासून रक्षण व्हावें, ह्यासाठीं केलेल्या तरतुदीचा उपयोग होत आहे. युद्धास प्रारंभ झाल्यापासून नोकरवर्गापैकीं जे लष्करांत दाखल झाले, त्यांची जागा घेण्यासाठीं १,९०० लोकांना नोकरीवर घेतले आहे. ह्या नोकरांस शक्य तितक्या लवकर कार्यक्षम करण्यासाठीं ठिकठिकाणीं बँकेनें ट्रेनिंग शाळा काढल्या आहेत."

### युद्धामुळें खर्चांत वाढ

( लॉइड्स बँक लि. च्या अध्यक्षांचें भाषण )

" आपला खर्च बराच वाढला आहे, कारण जे आपले नोकर लष्करांत दाखल झाले आहेत, त्यांचीं नांवें पटावरून आम्हीं काढलेलीं नाहींत. त्यांस मिळणाऱ्या लष्करी पगारापेक्षा आणि भत्त्यापेक्षां त्यांचा मूळ पगार जेवढा जास्त होता, तेवढी रकम आम्ही त्यांस दरमहा देतों. लोक नवीन नेमले आहेत, त्यांचा पगारहि द्यावा लागतो. युद्धजन्य इतर खर्चहि कमी नाहीं. वाढत्या खर्चाच्या तोंडमिळवणीसाठी जादा भत्ते, कामाचीं ठिकठिकाणीं वाटणी, दप्तराच्या अनेक प्रति करून ठेवण्याची आवश्यकता, बॉंबहल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी योजना, इत्यादि अनेक कारणांमुळें बँकेचा खर्च वाढला आहे.

### युद्धप्रयत्नांची कमाल केली पाहिजे

( नॅशनल प्रॉव्हिन्शिअल बँकेच्या अध्यक्षांचें भाषण )

" सन १९४० चें सिंहावलोकन केलें, तर असें दिसून येतें कीं, गेलें वर्ष अनेक प्रयोग करण्यांत, चुका सुधारण्यांत गेलें. १९४१ सालीं लष्करी हालचाली काय होतील, हें आज सांगतां येणार नाहीं. तथापि आपणांस कितीहि विजय मिळाले, तरी आपली कसोटी पणास लावण्याची वेळ येईल, हें उघड आहे. आपल्या देशाचें सर्व बळ युद्धोपयोगी मालाच्या उत्पादनाचे कामीं उपयोगांत आणलें जात आहे. परंतु अद्याप त्यांत सुधारणा होण्यास वाव आहे. नागरिकांच्या रोजच्या गरजा भागविण्यास पुरेसा माल मिळणार नाहीं व त्यामुळें होणाऱ्या कच्च्या मालाचा व कामगारांच्या वेळेचा विनियोग युद्धकार्याकडे केला जाईल. आपला निर्गत व्यापार वाढविण्याची आवश्यकता ह्यापुढें आणखी तीव्र होईल. विशेषतः अमेरिकेकडे आपण अधिक माल पाठविला पाहिजे. त्या देशाचे लोक आपल्या युद्धप्रयत्नांस उत्कृष्टपणें हातभार लावीत आहेत. "


दि
बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना

दक्षिण कोंकणांतील राष्ट्रीय बाण्याचें
प्रमुख साप्ताहिक
हिंद-सेवक
संपादक—सदानंद शांताराम भांडारकर
प्रकाशक—मधुकर यशवंत भांडारकर
हिंदसेवकमध्यें दर गुरुवारीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व घडामोडींची विस्तृत माहिती मिळते.
व्यवस्थापक-' हिंद-सेवक ', मालवण, जि. रत्नागिरी.



मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

कोरोना पोर्टेबल विकणें आहे.
कोरोना पोर्टेबल टाइपरायटर उत्तम स्थितींतला खासगी कामासाठीं वापरलेला, विकणें आहे.
" क्ष " C/o अर्थ.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | ११०—४ |
| ४% १९४३ | १०४-५ |
| ३½% विनमुदत | ९४—२ |
| ३½% १९४७-५० | १०२—८ |
| ३% ( १९६३-६५ ) | ९४-१२ |
| २¾% १९४८-५२ | ९६-१४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०७—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२५—० |

### मंडळयांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% | १३७—८ |
| बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०% | १०७-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४१—२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५२०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०३—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% | १३२—० |
| कराची ( १०० ) ९% | २१५—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २२५-१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १५४५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १८४०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% | १०४—४ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) १½% | ५८—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८४६—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६४१—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | १९८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. | ४५—० |
| सिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | १८—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ८ आ. | ४१—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३९४०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४७—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३४५—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै | ११६६—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १२८—८ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२-९-६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६२-१३ |

प्रेमामृताचा अखंड झरा वहात असे या गरीबांच्या झोपडींत—

पण गरीब लोक म्हणजे समाजाचे गुन्हेगार !




नवयुगचा कोंकणच्या नयनरम्य सौंदर्यसृष्टीच्या पार्श्वभूमीवरील नवीन सामाजिक बोलपट

★

: दिग्दर्शक : विनायक
: कथासंवाद : खांडेकर
: फोटोग्राफी पां. नाईक

: भूमिका :

मीनाक्षी, ललिता पवार, बेबी देवी, बाबुराव पेंढारकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, मा. विठ्ठल आणि विनायक

★

न्यू वेस्ट एण्ड

मध्यें लौकरच येणार !

' पिअरलेस प्रकाशन '

## " आग " म्हणजे काय ?

### विमाविषयक कायदेशीर अर्थ

मालाचा, आगीच्या धोक्याचा विमा उतरण्याची पद्धत इंग्लंडमध्यें गेलीं दोनशें वर्षें चालू आहे. पण आग या शब्दाचा विमाविषयक कायदेशीर अर्थ मात्र इंग्लिश हायकोर्टांत अगदीं अलीकडेच ठरविला गेला. मिसेस हॅरिस या बाईनीं आपल्या घरांतील हरेक चीजवस्तूंचा, चोरीचा, दरोड्याचा व आगीचा विमा उतरविला होता. बाईंना चोरीची भीति विशेष वाटे म्हणून बाहेर जातेवेळीं त्यांनीं दागिने व रोकड मिळून ५०० पौंड किंमतीचा माल दिवाणखान्यांतील शेगडींत दडवून ठेविला. परत आल्यावर त्यांनीं धांदरटपणें तशीच शेगडी पेटविली. आणि जें व्हावयाचें तेंच झालें. बाईनीं विमा कंपनीकडे ५०० पौंडांची मागणी केली. कंपनीनें बाईच्या मागणीस नकार दिला; कंपनीचें म्हणणें असें कीं " पॉलिसींतील शब्दप्रयोगाच्या अर्थाप्रमाणें " आग म्हणजे वाटेल ती आग नसून 'हद्दीबाहेर भडकून नुकसान करणारा जाळ' तीच फक्त आग होय.

कंपनीनें केलेली आगीची व्याख्या कंपनीच्याच डोक्यांतून निघाली असें नाहीं; इंग्लंडमध्यें आतांपर्यंत आगीच्या विम्या-वरील मोठ्या अधिकृत ग्रंथांनीं व जाड्या कायदेपंडितांनीं अशाच तऱ्हेची मल्लीनाथी केली होती. पण बाईनीं हायकोर्टांत दाद मागितली व कोर्टानें असें ठरविलें कीं " वाक्प्रचारा-प्रमाणें आग म्हणजे सर्व तऱ्हेची आग. 'हद्दीबाहेर' जाळ जाण्याची अट विमाविषयक कायद्यांतच आली कोठून ? शेगडीबाहेर जाळ जाऊन दिवाणखान्यांतील पडदा पेटल्यास ती " आग " पण पडदा वाऱ्यानें शेगडीवर येऊन जळल्यास ती " आग " नाहीं असें थोडेंच म्हणतां येईल ? "

वरील निवाड्यानें 'आग' विषयक कायद्याचें समाधानकारक स्पष्टीकरण झालें आहे, तथापि आश्चर्याची गोष्ट ही कीं हें होण्यास २५० वर्षें लागलीं ! याचें कारण असें कीं आगीच्या विम्याविषयींचा कायदा सूत्रबद्ध नसून बहुतेक व्यवहार पूर्व-निर्णयाधारावरच चालतात. आणि आगीच्या विम्याच्या पॉलि-सींतील लवाद-कलमान्वयें बहुतेक तंटे परस्पर लवादातर्फेंच तोडले जात असल्यामुळें अनेक कायदेशीर प्रश्नांचा कोर्टातर्फें अधिकृत निवाडा अद्याप झालेला नाहीं.


या नव्या शोधानें सर्व जगभर खळबळ उडवून दिली आहे.

# दहा हजार रुपये अगदी फुकट.

### अमृतसरमध्यें २॥ रु. तोळा सोनें

मिनर्व्हा गोल्डची घरोघर प्रशंसा ! मिनर्व्हा गोल्ड हा नकली सोन्याचा अगदी नवा शास्त्रीय आविष्कार होय. त्यानें केवळ वैज्ञानिकांनाच आश्चर्यानें थक्क करून सोडलें एवढेंच नव्हे, तर सर्वसाधारण लोकांची एक अत्यंत मोठी उणीव भरून काढली आहे. सर्व स्त्रिया त्याच्या दागिन्यावर बेहद्द खूष होतात. ज्या घरांत हें सोनें एकदां शिरलें तेथून दोनदोनदा तीनतीनदा त्यांस मागण्या येत आहेत.

मेहेरबान लाला विचारतनसाहेब, म्युनिसिपल कमिशनर, पठानकोटाहून २५ आक्टोबरला लिहितात—" काल आपल्या सोन्याचें पार्सल मिळालें; धन्यवाद ! आपण हा नवीन पदार्थ तयार करून जगाची एक मोठीच उणीव भरून काढली आहेत. उलट टपालीं आणखी तीन तोळे सोनें पाठवावें. "

याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रें उदाहरणार्थ रियासत, कॉंग्रेस, स्वस्तिक, अलामान, जमीनदार, गुरुघंटाल प्रताप, इत्यादींनीं प्रशंसोद्गार खुषीनें छापले आहेत.

हें सोनें कसास लावलें तर अस्सल सोन्याचाच रंग दाखवतें आणि अस्सल सोन्याप्रमाणेंच ठोकलें व गाळलें जातें. याचे हरएक प्रकारचे दागिने बनवता येतात. नापसंत पडल्यास किंमत परत मिळण्याची गॅरंटी आहे; खास प्रसारासाठीं किंमत १ तोळ्यास २॥ रु.; ३ तोळ्यास ७ रु.; ६ तोळ्यास १२ रु.; व ४० तोळ्यास ८० रु.

मिनर्व्हा गोल्डचे बनवलेले दागिने

मिनर्व्हा गोल्डच्या बनवलेल्या बांगड्या दर जोडीला २ रु.; कानांतील सोन्याचे झूल दर जोडीला ३ रु.; खड्याची अंगठी ३ रु.; साधी मुंबई फॅशनची अंगठी २ रु.; जाळीच्या बांगड्या दर जोडीला ५ रु.; (नेकलेस) माळ १२ रु.; लॉकेट ६ रु.; दस्तबंद दर जोडीला १४ रु.

माल पसंत पडला नाहीं तर परतबोलीची खात्री. पोस्टाचा खर्च फक्त ८ आणे पडतो.

या गोष्टी खोट्या ठरवून देणारास दहा हजार रुपये फुकट दिले जातील. याशिवाय दर तीन तोळे सोनें खरेदी कर-णारास टिकाऊपणा व सौंदर्य याची १० वर्षें गॅरंटी असलेलें एक फॅन्सी रिस्टवॉच फुकट दिलें जाईल; गॅरंटीचा कागद प्रत्येक घड्याळाबरोबर धाडला जातो.

मिळण्याचा पत्ता—मॅनेजर अमेरिकन मिनर्व्हा गोल्ड हाऊस, (A. P.) K. C. अमृतसर.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट
ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बेंबाचे माडीवर | महिंद्रकर ब्रदर्स तयार कपड्याचे व्यापारी | बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

**Prop. M. V. Risbud, B. A.**
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ६१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ६२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख ७ मे, १९४१ | अंक १९

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

**देशी औषधें तयार करणारा महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना**
पंडु (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

# रक्तवर्धक

**वापरा.**

**सर्वत्र मिळतें.**

—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.** पुणें ४.

**दि सदर्न निटिंग वर्क्स, लि.**
[ २६४ शनिवार, पुणें २. ]
यांनीं बनविलेली



**"पूना होजिअरी"**

उन्हाळ्यासाठी गंजीफ्रॉक, अंडरवेअर्स वगैरे हरतऱ्हेचा

**जाळीचा माल**

तयार होत आहे

आपल्या व्यापाऱ्याकडे चौकशी करा

★

**ठेवी** : मुदतीप्रमाणें ४॥ ते ६ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

★

माहितीसाठीं वरील पत्त्यावर लिहा.

# विविध माहिती

### मासे

ग्रेट ब्रिटनमध्यें प्रत्येक मनुष्य दरसाल सरासरीनें २५ शेर मासे खातो. मासे पकडण्याचे धंद्यांत, चालू युद्धापूर्वी, २० हजार लोक गुंतलेले होते. ग्रेट ब्रिटनमध्यें दरसाल सुमारें १५ कोटि रुपये किंमतीच्या माशांची आयात होत असे.

### चहाचा प्रभाव

१७६७ सालीं चहावर अमेरिकेनें जकात बसविली, त्याचा परिणाम अखेर युद्धांत व अमेरिकेच्या स्वातंत्र्यांत झाला. चहाच्या ह्या प्रभावाचे अभावीं आज जागतिक प्रदेशांची वाटणी वेगळी झाली असती.

### डोक्याचा आकार

मनुष्याच्या डोक्याचा आकार थोडा थोडा लहान होत चालला आहे.

### नाविक अधिकाऱ्यास समुद्रप्रवासाचें औषध

एका इटॅलिअन नाविक अधिकाऱ्यास बरें वाटत नव्हतें. त्यानें आपल्या डॉक्टरास प्रकृति दाखविली, परंतु डॉक्टरला रोग-निदान होईना. अखेर डॉक्टरला एकदम कांहींतरी सुचलें व तो म्हणाला: "तुम्हांला काय झालें आहे तें मला बरोबर समजतें. तुम्हीं आपल्या प्रकृतीसाठीं थोडा समुद्रप्रवास करा!"

### पृथ्वीची गति

पृथ्वीचा स्वतःभोंवतीं फिरण्याचा वेग तासास १ हजार मैल आहे. समुद्रांतील लाटांचें पृथ्वीशी घर्षण होतें त्यामुळें व पृथ्वीवर दरसाल लक्षावधि उल्का पडतात त्यामुळें पृथ्वीचें वजन वाढतें. त्यामुळें पृथ्वीची गति मंद होत चालली आहे. ह्याचे उलट, उष्णतामान कमी होत चालल्या कारणानें पृथ्वीचा आकार लहान होत आहे, त्याचा परिणाम तिची गति वाढण्यांत होत आहे. गतीच्या वाढीचे मानानें ती कमी होण्याची प्रवृत्ति अधिक आहे व हजारो वर्षांत ह्या वेगामध्यें विशेष फरक पडलेला नाहीं.

### विवाहांचे संख्येंत वाढ

इंग्लंड व वेल्समध्यें १९४० सालीं एकूण ४ लक्ष, ८२ हजार विवाह झाले. १९३९ सालांतील विवाहांची संख्या ह्यापेक्षां २८,५७२ नीं लहान होती.

### संयुक्त प्रांतांतील शहरांचा पाणीपुरवठा

"संयुक्त प्रांतांतील लोकसंख्या वाढत आहे, परंतु तीस पाणीपुरवठा समाधानकारक रीतीनें करणें अवघड होत आहे. शहरांतील ड्रेनेजची व्यवस्था चांगली नाहीं. शहरांजवळ नद्यांचें पाणी त्यांत सांडपाणी मिसळल्यामुळें खराब होतें, त्यास प्रतिबंध केला पाहिजे.": संयुक्त प्रांताच्या पब्लिक हेल्थ इंजिनिअराचा रिपोर्ट

### सिंधू नदीच्या पाण्याची वाटणी

सिंधु नदीच्या पाण्याचे वाटणीसंबंधीं सिंध व पंजाब प्रांतांचे सरकारांमध्यें वांधा उत्पन्न झाला आहे, त्याची चौकशी करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें एक ट्रिब्यूनल नेमलें आहे. चौकशीच्या कामास सप्टेंबरमध्यें प्रारंभ होईल.

### मँचेस्टर शिप कॅनॉल कंपनी

वरील कंपनीस १९४० सालीं सुमारें ३½ कोटि रुपये उत्पन्न झालें. हा आकडा १९३९ मधील उत्पन्नाचे मानानें बराच मोठा आहे. खर्चांतहि पुष्कळ वाढ झाली. कालव्यांतील वहातुक बरीच वाढलेली दिसते.

### सिंध प्रांतांत खादीचा प्रसार

सिंध प्रांतांतील खादीचे प्रसारासाठीं अखिल भारतीय चरखा संघानें ३० हजार रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे.

### गुळापासून साखर

१९४१ सालीं सबंद हिंदुस्थानांत मिळून ४२,७०० टन साखर गुळापासून बनविण्यांत आली. १९४० मधील तत्सम उत्पादनापेक्षां हें उत्पादन ४४% अधिक आहे. एकट्या संयुक्त प्रांतांतील उत्पादन ८९% वाढलें.

### मध्यभागांतील लोकल बोर्डांचा कारभार

मुंबई प्रांताच्या मध्यभागांतील लोकलबोर्डांची संख्या सात आहे. त्यांचें क्षेत्रफळ ३७,१६७ चौ. मैल असून त्यांतील लोकसंख्या ६० लक्ष, ६० हजार आहे. लोकलबोर्डांच्या एकूण ५४ सभा झाल्या, त्यांच्या हजेरीचें प्रमाण ८७.२१% पडलें. लोकलबोर्डांचें एकूण उत्पन्न ७२ लक्ष, ६५ हजार रुपये झालें व त्यांनीं ७८ लक्ष, ७३ हजार रुपये खर्च केला. त्यापैकीं शिक्षणावर खर्च ५३ लक्ष, ४० हजार रुपये झाला.

### अज्ञानांच्या इस्टेटींची सरकारतर्फे व्यवस्था

३१ जुलै, १९४० अखेर संपलेल्या वर्षीं मुंबई प्रांतांत उत्तर भागांत एक, मध्य भागांत एक व दक्षिण भागांत सात अशा नऊ इस्टेटी मुंबई सरकारच्या व्यवस्थेखालीं होत्या. मध्य भागांतील इस्टेट म्हणजे नाशिक जिल्ह्यांतील वणी देशपांडे इस्टेट ही होय. तिचें उत्पन्न ८०५ रुपये झालें. इस्टेट एकूण ४२८ एकरांची आहे, त्यापैकीं ४१५ एकर लागवडीजोगे आहेत. शेतसारा ३६८ रुपये आहे. गेल्या वर्षीं ७९० रुपये खंड वसूल झाला.

### इंडो बर्मा पेट्रोलियम कं. लि.

### १९४० चा व्यवहार

| | |
|---|---|
| एकूण उत्पन्न: | ३ कोटि, ४४⅔ लक्ष रु. |
| एकूण खर्च: | २ कोटि, ८९ लक्ष रु. |
| नफा: | ६५⅔ लक्ष रु. |
| करासाठीं तरतूद: | २५ लक्ष रु. |
| घसारा: | १९ लक्ष रु. |
| निवळ नफा: | २१⅔ लक्ष रु. |
| ऑर्डिनरी भागांवर डिव्हिडंड: | १७½% |
| वसूल भांडवल: | ५० लक्ष रु. |
| रिझर्व्ह फंड: | ३१⅔ लक्ष रु. |

### सन लाइफचे व्यवहारावर युद्धाचा परिणाम

सन लाइफ अॅशुअरन्स कंपनी ऑफ कॅनडानें उतरविलेल्या एकूण विम्यांपैकीं फक्त १३% विमे ग्रेटब्रिटनमधील आहेत. युरोपांत कंपनी काम करीत नाहीं. युद्धपरिस्थितीमुळें एकूण फक्त ११९क्लेम्स कंपनीकडे अधिक आले;म्हणजे एकूण क्लेम्सच्या ते२% पेक्षां कमी होते. कंपनीवर युद्धपरिस्थितीचा कांहींहि परिणाम झालेला नाहीं.

### "वॉर्डन हाउस"

अहमदाबाद येथील वॉर्डन इं. कंपनीच्या मुंबई येथील इमारतीचें उद्घाटन सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांचे हस्तें नुकतेंच झालें. कंपनीच्या मुख्य कचेरीचें आतां मुंबई येथें स्थलांतर करण्यांत आलें आहे. कंपनी आयुर्विम्याखेरीज इतर विमेहि लवकरच स्वीकारण्यास प्रारंभ करणार आहे.

### कॅनडांतील प्रदर्शन

टोरॅंटो येथें कनेडिअन नॅशनल प्रदर्शन ऑगस्ट अखेर भरणार आहे, त्यांत हिंदुस्थान भाग घेणार आहे. हिंदुस्थानसाठीं एक स्वतंत्र विभाग राखून ठेवण्यांत येईल.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २१८ |
| २ हिंदुस्थानच्या लंडनमधील कर्जांची फेड | २१९ |
| ३ कर्जदाराच्या परत-फेडीची शक्ती ... | २२० |
| ४ सुशिक्षितांच्या बेकारीचें निवारण ... | २२० |
| ५ स्फुट विचार ... अमेरिकेंत "गोठलेला" परदेशी पैसा—साम्राज्य सैन्य ग्रीसमधून सुरक्षित परतलें—अमेरिकेच्या युद्ध-धोरणांत त्वरित प्रगति—जर्मनीची नवीन कारस्थानें—हिंदी चहाचा इंग्लंडमध्यें खप | २२१ |
| ६ म्हशीवरील कराची आकारणी ... | २२३ |
| ७ बॉंबे को. कार्टेलीं ... | २२३ |
| ८ हिंदी कारखाने व त्यांतील कामगार ... | २२४ |
| ९ बेल्जन सोन्याची लूट | २२४ |
| १० निवडक बाजारभाव | २२५ |
| ११ सरकीचें आइसक्रीम | २२६ |

अर्थ

बुधवार, ता. ७ मे, १९४१

## हिंदुस्थानच्या लंडनमधील कर्जांची फेड

लंडनच्या बाजारांत हिंदुस्थानासाठी वेळोवेळीं कर्जें काढण्यांत आलीं आहेत, त्यांपैकीं सात मुदतबंदी कर्जांची फेड करून टाकण्याचें सरकारनें गेल्या फेब्रुवारींत ठरवलें, त्या योजनेची अंमलबजावणी कशी झाली आहे ह्याविषयींची माहिती नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. ग्रेटब्रिटनची साम्राज्यांतील देशांशीं देवघेव होते, तीमध्यें युद्ध सुरू झाल्यापासून इंग्लंडनें त्यांचें देणें निघत आहे आणि तो पैसा लंडनमध्यें पडून रहात आहे. हिंदुस्थानची शिलक त्याप्रमाणें पुष्कळच फुगली आणि तो पैसा ह्या देशास परत कसा आणावयाचा असा प्रश्न निघाला. हिंदुस्थानास देण्याची वजावाट लंडनमध्यें काढलेल्या हिंदी कर्जाशीं करावयाची योजना ब्रिटिश सरकारनें आखली आणि ब्रिटिश नागरिकांनीं आपल्या जवळचे विशिष्ट हिंदी रोखे तिजोरींत आणून द्यावे असा हुकम काढला. ह्या हिंदी रोख्यांच्या मोबदल्यांत ब्रिटिश रोखे द्यावयाचे आणि त्यांच्या किंमतीइतकें हिंदी कर्ज रद्द करावयाचें हा बेत सिद्धीस जाणें सोपें झालें. ह्याचें कारण वर सांगितलें आहे आणि लंडनमध्यें हिंदुस्थानच्या मालकीची जमलेली मोठी शिलक हें तें होय. आपलें वाढतें देणें लंडनमध्यें साचूं देणें हिंदुस्थान सरकारास गैरसोयीचें होतें, त्याचप्रमाणें बाहेरच्या देशांची शिलक आपल्या येथें वाढूं देणें ब्रिटिश सरकारास इष्ट नव्हतें. ह्यामुळें ह्या घेण्यादेण्याची वजावाट करण्याची योजना दोहीं बाजूंस सोयीची होतें. हिंदुस्थानच्या लंडनमधील सरकारी देण्या-घेण्याचे व्यवहार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्फत होतात आणि तिला आपल्या तेथील शिलका हलक्या व्याजानें तात्पुरत्या गुंतवल्यावांचून गत्यंतर नव्हतें. एका बाजूस थोड्या मुदतीचीं इंग्लंडमध्यें वाढलेलीं कर्जें व दुसऱ्या बाजूस अल्प मुदतीनें गुंतविलेली शिलक असा येथें हिंदुस्थानचा हिशेब होता.

आपल्या मामुली व्यवहाराकरितां आणि हिंदी चलनव्यवस्थेचा आधार म्हणून बाळगाव्या लागणाऱ्या निधीसाठी रिझर्व्ह बँकेस लंडनमध्यें शिलक बाळगावी लागते आणि तीपैकी कांहीं अल्प मुदतीच्या रोख्यांत गुंतवलेली असते. तथापि, ह्या शिलकेस मामुली मर्यादा आहे आणि युद्धपरिस्थितींत ती ओलांडली जाणें स्वाभाविक आहे. रिझर्व्ह बँकेच्या लंडनमधील रकमा अलीकडे कशा वाढत गेल्या आहेत, हें खाली दिलेल्या आकड्यांवरून स्पष्ट होईल.

| | दश लक्ष रुपये | | |
|---|---|---|---|
| | पौंडातले रोखे | पौंडातली शिलक | एकूण |
| १ सप्टेंबर, १९३९ | ५९·५ | १०·१ | ६९·६ |
| ६ सप्टेंबर, १९४० | १३१·५ | ३०.७ | १६२·२ |
| ३१ जानेवारी, १९४१ | १३५·५ | ३७·० | २०२·५ |

ब्रिटिश जनतेनें धारण केलेल्या हिंदी कर्जांची फेड ह्या लंडनमधील शिलकेंतून होईल. हिंदी कर्जांचे रोखे ब्रिटिश सरकाराकडे त्याच्या हुकमाप्रमाणें जमा होतील ते हिंदुस्थान सरकारच्या स्वाधीन करण्यांत येतील. ह्या देशांतहि धारण केलेले पौंडांतले रोखे येथील सरकाराकडे येतील. सदरहू रोख्यांच्या मोबदला हिंदी म्हणजे रुपयांत फेड होण्याचे रोखे लोकांस दिले जातील आणि रिझर्व्ह बँक ते धारण करील. त्या बँकेच्या संग्रहांत विशिष्ट मर्यादेपर्यंत ब्रिटिश रोख्यांच्या जागीं हिंदुस्थान सरकारचे रोखे येतील असा बदल होणार हें उघड आहे.

रोख्यांच्या वर वर्णिलेल्या अदलाबदलीची माहिती आतां प्रसिद्ध झाली आहे ती थोडक्यांत अशी आहे. मुदतबंदी कर्जरोख्यांची एकूण किंमत फेब्रुवारीच्या प्रारंभीं ८४ दशलक्ष पौंड होती आणि त्यांची बाजारची किंमत ८९ दशलक्ष पौंडांवर होती. ह्या ८४ दशलक्ष पौंडांच्या रोख्यांपैकी ५६ दशलक्ष पौंडांच्या दर्शनी किंमतीचे रोखे ब्रिटिश सरकारच्या स्वाधीन इंग्लंडमधील लोकांनीं केले आणि ते रद्द करण्यांत आले आहेत. दोन दशलक्षांचे रोखे अजून रद्द व्हावयाचे राहिले आहेत. ह्या देशांतील रहिवाशांकडून हिंदुस्थान सरकारकडे त्याच्या हुकमास अनुसरून ८½ दशलक्ष पौंडांचे रोखे येऊन ते रद्द झाले आहेत आणि ३ दशलक्षांचे रोखे अजून रद्द व्हावयाचे आहेत. सरकारच्या स्वाधीन व्हावयाचे सर्व रोखे इंग्लंडमध्यें व ह्या देशांत आले आहेत असें समजण्यास हरकत नाहीं आणि त्यांची रकम अनुक्रमें करून ५९ दशलक्ष व ११ दशलक्ष पौंड आहे. एकूण ८४ दशलक्ष पौंडांतून ही दोन्ही मिळून होणारी ७० दशलक्षांची रकम वजा केली म्हणजे १४ दशलक्ष पौंड शिलक रहातात. ग्रेटब्रिटन व ब्रिटिश हिंदुस्थान यांच्या बाहेरील रहिवाशांच्या हातीं ह्या रकमेचे रोखे असावे असें अनुमान सहजच निघतें.

रोखे धारण करणारांस ६२ दशलक्ष पौंड म्हणजे सुमारें ८२ कोटि रुपये देण्यांत आले असून आणखी ४ कोटि रुपयांची भरपाई करावी लागेल. हिंदुस्थानांत सुमारें १० कोटि रुपयांचे हिंदी रोखे मोबदल्यांत देण्यांत आले आहेत. आणखी ३ कोटि रुपये तसेच द्यावे लागतील असा अंदाज आहे. रोकड मागणारांस द्यावयाची रकम १½ कोटि रुपयांचे वर जाणार नाहीं असें वाटतें. म्हणजे हिंदुस्थान सरकारास सुमारें ८० कोटि दर्शनी किंमतीच्या रोख्यांसाठी ८८ कोटि रुपयांची तरतूद करावी लागणार. ह्या एकूण रकमेचे सुमारें निम्म्या किंमतीचे हिंदी रोखे रिझर्व्ह बँकेच्या स्वाधीन करण्यांत आले आहेत आणि बाकीचे पैसे सरकारच्या तात्पुरत्या शिलकेंतून घेतले गेले आहेत. ह्या रीतीनें एवढ्या मोठ्या प्रमाणावरील रोख्यांच्या आदलाबदलीचा व्यवहार पुरा करण्यांत आला आहे. हिंदुस्थानचें बाहेरचें देणें मोठ्या रकमेनें कमी झालें असून त्याची जागा हिंदी कर्जरोख्यांनीं घेतली आहे.

## कर्जदारांची परतफेडीची शक्ति

### लँडमॉर्गेज बँकेचा व्यवहार

एकूण उत्पन्नांतून सर्व खर्च वजा केला असतां शेतकऱ्यांजवळ जी बाकी शिल्लक रहाते तिचे रकमेचे प्रमाणांतच प्राथमिक लँड मॉर्गेज बँका कर्जे देऊं शकतात. ही शक्ति बिनचूकपणें ताडण्याचें अवघड काम लँड व्हॅल्यूएशन अधिकाऱ्यांस करावयाचें असतें. कर्ज मागणाऱ्या शेतकऱ्याजवळ कर्जाचे रकमेच्या दुपटीइतक्या किंमतीची तरी जमीन मालकीची असली पाहिजे व कर्जफेडण्याजोगी त्याची परिस्थिति असावयास पाहिजे. जमिनीची किंमत नीट अंदाजली किंवा नाहीं, हें ती जमीन विक्रीस काढण्याचा प्रसंग आला तरच समजून येईल. तथापि कर्जफेडीच्या शक्तीचा अंदाज चुकला, तर पहिल्या हप्त्याच्या प्रसंगींच ती चूक नजरेस येईल. लँड व्हॅल्युएशन अधिकाऱ्यांस शेतीची माहिती असेल, त्यांस वेगवेगळया जमिनींत धान्य किती पिकतें ह्याचा अंदाज असेल, शेतीच्या खर्चाची कल्पना असेल, धान्याच्या बाजारभावाशीं परिचय असेल व शेतकऱ्यांच्या सर्वसाधारण आर्थिक परिस्थितीची व रहाणीची त्यांस कल्पना असेल तर त्यांस आपलें काम समाधानकारक रीतीनें करतां येईल. उत्पन्नाचा व खर्चाचा अंदाज करतांना सरासरी उत्पन्न व खर्च हींच हिशेबांत धरलीं पाहिजेत. शेतकऱ्याच्या सावकाराशीं चालू असलेल्या देण्याघेण्याचाहि विचार केला पाहिजे. पांच वर्षांच्या ह्या हिशेबावरून साधारणपणें शेतकऱ्याचा धंदा नफ्यांत आहे किंवा नाहीं हें कळून येईल.

नाशिक जिल्हा लँड मॉर्गेज बँकेचे व्हॅल्युएशन ऑफिसर, श्री. आर. जी. सप्रे, ह्यांनीं प्रस्तुत विषयावर बाँबे को. कार्टर्लीच्या ताज्या अंकांत एक लेख लिहिला आहे, त्यावरूनच ही माहिती देण्यांत येत आहे. शेतकऱ्यांच्या सरासरी उत्पन्न-खर्चाबरोबरच बाजारभावांतील चढउतार इत्यादि हिशेबांत घेऊन आपल्या बँकेकडे येणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष परिस्थितीचे अनुभवांवरून, श्री. सप्रे ह्यांनीं खालील आकडे दिले आहेत:—

उत्पन्न

| पिकाचें दर एकरीं सरासरी उत्पन्न | चालू बाजारभाव | एकूण उत्पन्न |
|---|---|---|
| बाजरी २ ते ३ मण | ७ रु. | १४ ते २१ रु. |
| गहूं १½ ते २ मण | १० रु. | १५ ते २० रु. |
| भुइमूग ३ ते ४ पल्ले | ५ रु. | १५ ते २० रु. |
| तूर २ ते ३ मण | ६ रु. | १२½ ते १८ रु. |
| बागाइत पिकें | | |
| कांदे १०० पोतीं | १ रु. ४ आ. | १२५ रु. |
| ऊंस(मोटेवर)३०ते४०पल्ले | १५ रु. | ४५० ते ६०० रु. |
| ऊंस(पाटावर)४०ते६०पल्ले | १५ रु. | ६०० ते ९०० रु. |

खर्च

१ जमीनमहसूल व लोकलफंड.

२ वार्षिक नोकरांचे पगार. प्रत्येक ३० एकरांस प्रत्येक नोकरास १०० रु.

३ जमीन लावण्याचा खर्च ३ ते ५ रु. एकरी.

४ कुटुंब पोषणाचा खर्च दरसाल दरमाणशी ४० ते ५० रु. कुटुंबाचा किमान खर्च १०० रु. कुटुंबांतील लोकांची संख्या वाढेल त्या मानानें दरमाणशीं खर्च ३० ते ४० रु. पर्यंत उतरेल.

५ पाणपट्टी

ज्याचेजवळ ३० एकर जमीन आहे, अशा शेतकऱ्याच्या उत्पन्न खर्चाचे आकडे येथें दिले आहेत. त्यास ३५ रुपये सारा द्यावा लागतो, त्याचे ५ एकर विहिरीचे पाण्याखाली आहेत व त्याचे कुटुंबांत ६ मंडळी आहेत, असें गृहीत धरलें आहे.

| उत्पन्न | | खर्च | |
|---|---|---|---|
| बाजरी ३० मण दर ७ रु. | २१० रु. | सारा | ३५ रु. |
| गहू १५ मण दर १० रु. | १५० रु. | १ सालदार | १०० रु. |
| तूर, मूग | ५० रु. | बीं इ. | १०० रु. |
| कांदे १½ एकर | १५० रु. | मोट, नाडा इ. | १५ रु. |
| मिरच्या, इ. | ४० रु. | कुटुंबाचा खर्च | २५० रु. |
| एकूण | ६०० रु. | एकूण | ५०० रु. |
| | | वाढावा | १०० रु. |
| | | उणे किरकोळ अनपेक्षित खर्चासाठी | १५ रु. |
| | | परतफेडीची शक्ति | ८५ रु. |

गेल्या पांच वर्षांत शेतकऱ्यानें सावकारास किती पैसे दिले, त्याचा ह्यावरील आकड्याशीं पडताळा पाहिला पाहिजे. त्यानें सावकारास ४०० रुपये दिले असले व लग्नकार्यावर १०० रुपये खर्चले असले तर, वार्षिक सरासरी १०० रुपये येते. म्हणजे, तो शेतकरी वर्षांत ८५ रुपये फेडूं शकेल असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं.

श्री. सप्रे ह्यांनीं दिलेल्या माहितीवरून लँड मॉर्गेज बँकांस किती जपून व्यवहार करावा लागतो, ह्याची कल्पना येईल. भलत्या शेतकऱ्यांस कर्ज दिलें तर तें नियमित परत येणें अशक्यच आहे. लँड व्हॅल्युएशन अधिकाऱ्यानें आपलें काम अत्यंत जबाबदारीनें केलें पाहिजे. लहान-सहान शेतकऱ्यांस आपला खर्चच भागवतां आला नाहीं, तर त्यांचे मदतीस लँड मॉर्गेज बँक जाऊं शकणार नाहीं, हें उघड आहे.

## सुशिक्षितांच्या बेकारीचें निवारण

### म्हैसूर सरकारचा प्रयोग

सुशिक्षित बेकारांस पोटापाण्यास लावण्यासाठी आयर्विन कालव्यावर सुशिक्षित बेकारांची शेतकी वसाहत करण्याचा म्हैसूर सरकारचा प्रयत्न चालू आहे. एकूण २० उमेदवारांची निवड केली जाईल. प्रत्येकानें १,००० रुपयांचा रोख जामीन दिला पाहिजे. तो देतां आला नाहीं, तर त्याच्या दुप्पट किंमतीची जमीन अथवा दोन लायक जामीनदार त्यानें आणले पाहिजेत, म्हणजे त्यास सरकार कर्ज देईल. ९२ अर्जदारांपैकीं आतांपर्यंत १० अर्जदारांची निवड झाली आहे, त्यांनीं प्रत्येकीं १ हजार रुपये भरले आहेत.

# स्फुट विचार

## अमेरिकेंत "गोठलेला" परदेशी पैसा

जर्मनीनें युरोपांतील अनेक देश पादाक्रांत करून त्यांस आपले अंकित बनवलें आहे. ह्या जित देशांतील लोकांच्या मालकीचा पैसा अमेरिकेंत गुंतवलेला होता, तो जर्मन सरकारच्या हातीं लागू नये ह्याविषयीं खबरदारी घेण्यांत आली आहे. अमेरिकन सरकारच्या हुकमानें हा सर्व पैसा अडकावून ठेवण्यांत आला असून त्याची एकूण रकम सुमारें ४३७ कोटि डॉलर्स होते. ह्यापैकी सुमारें १६० कोटि डॉलर्स किंमतीचे अमेरिकन व परराष्ट्रीय रोखे आहेत आणि बाकीची रकम सोनें व बँकांतील ठेवी ह्यांच्या स्वरूपांत आहे. हा बहुतेक सर्व पैसा जर्मनीनें व्यापलेल्या देशांचा आहे. तो मोकळा होऊं देणें म्हणजे जर्मनीस सहाय करणें होय आणि ही गोष्ट जित राष्ट्रांतील लोकांच्या हितास बाधक आहे. ह्यासाठी एवढी मोठी रकम अमेरिकन सरकारनें "गोठूं" दिली आहे. हॉलंड व बेल्जम ह्या देशांतील लोकांच्या वतीनें लंडनमध्यें मंत्रिमंडळें स्थापन झालेलीं आहेत, त्यांच्या जरूरीप्रमाणें त्यांचा पैसा मोकळा करण्यांत येतो हा अपवाद आहे. अमेरिकेंत "गोठलेल्या" पैशाची वाटणी खालीं दिल्याप्रमाणें आहे:—

| | दशलक्ष डॉलर |
|---|---|
| फ्रान्स | १,५९३ |
| हॉलंड | १,६१९ |
| बेल्जम | ७०० |
| नॉर्वे | १७५ |
| डेन्मार्क | ९२ |
| रुमानिया | ५८ |
| लक्सेंबर्ग | ४८ |
| बाल्टिक देश | २९ |
| एकूण | ४,३६९ |

## साम्राज्य सैन्य ग्रीसमधून सुरक्षित परतलें

चिमुकल्या ग्रीक सैन्यास जर्मन रणगाड्यांच्या लोंढ्यापुढें टिकाव धरणें शक्य नव्हतें आणि ग्रीक सेनानींनीं माघार घेण्याचें ठरवून त्याप्रमाणें आपल्या ब्रिटिश दोस्तांस निरोप पाठवला. ग्रीक फौजांनीं आपल्या देशांत लढण्याचें बंद केलें आणि ग्रीक सरकारनें आपलें ठाणें क्रीट बेटांत नेलें. अशा परिस्थितींत ब्रिटिश, ऑस्ट्रेलियन व न्यूझीलंड या सैन्याच्या तुकड्या ग्रीसमधील रणांगणांतून बाहेर काढण्याचा बिकट प्रश्न उत्पन्न झाला. जर्मनीपाशीं विमानदळ मोठें असून तें जोरानें पुढें चाल करून येत होतें आणि त्यास तोंड देऊन ब्रिटिश सैन्यास समुद्रकिनारा गाठावयाचा होता. ह्या अडचणींतून साम्राज्य फौज कशी बाहेर पडते ह्याविषयीं कांहीं दिवस चिंता वाटत होती. परंतु अलीकडे आलेल्या ताज्या बातम्यांनीं ती दूर केली आहे. साम्राज्य सैन्य मोठ्या शिताफीनें ग्रीसच्या दक्षिण भागांतून निसटलें आहे आणि आपल्या नियोजित स्थळांस परत येऊन पोहोचलें आहे. त सैन्य आढवून धरण्याची जर्मनांनीं शिकस्त केली, पण ब्रिटिश आरमार व विमानदल ह्यांच्या उत्कृष्ट सहकार्यानें तें सहीसलामत परत आलें आहे. सैन्याची पांगापांग झाली असतां जड सामान टाकून देणें त्यास प्राप्त होतें आणि त्यांतलीं कांहीं माणसें मागें राहणें स्वाभाविक होतें. तथापि ग्रीसमधून साम्राज्य सैन्यानें स्वतःची सुटका करून घेतली, तिची वर्णनें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांवरून ह्या लोकांचें धैर्य, चिकाटी, व हुषारी हीं स्पष्ट होतात. ग्रीस देश शत्रूच्या हातीं गेला असला तरी ग्रीक व साम्राज्य फौजांनीं त्यास दिलेल्या निकराच्या लढाईच्या योगानें हिटलरच्या युद्ध-योजनांत गोंधळ उडाला आहे आणि त्याचा उपयोग ब्रिटिश सेनानींस इतर रणक्षेत्रांत झाला आहे.

## अमेरिकेच्या युद्धधोरणांत त्वरित प्रगति

आतां अमेरिकेनें प्रत्यक्षपणानें युद्धांत उडी घालण्याची वेळ आली आहे असें स्पष्ट मत अमेरिकन वृत्तपत्रें व पुढारी व्यक्त करीत आहेत. इंग्लंडास युद्धसहाय देणें म्हणजे स्वतःस सहाय करणें होय ह्याची जाणीव अमेरिकन जनतेस झाली आहे. जर्मनीचा विजय झाला असतां अमेरिकन खंडाचें स्वातंत्र्य नष्ट होऊन सर्व जगावर हुकूमशाहीची आपत्ति कोसळणार ह्याविषयीं तिला खात्री पटली आहे. अमेरिकेंतून अटलांटिक महासागराच्या मार्गानें इंग्लंडला कुमक पोहोचत आहे ती बंद पाडण्याची जर्मनीनें पराकाष्ठा चालवली आहे. पण प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं इंग्लंडला सर्व प्रकारचें सहाय देण्याविषयींच्या आपल्या घडाडीच्या धोरणाविषयीं कोणीहि शंका बाळगण्याचें कारण शिल्लक ठेवलेलें नाहीं. ब्रिटिश व्यापारी जहाजें अटलांटिक महासागरांत बुडवून त्या राष्ट्राची रसद तोडावयाचा चंग हिटलरनें बांधला आहे. त्यावर तोड म्हणून अमेरिकेनें इंग्लंडच्या निम्म्या मार्गापर्यंत स्वतःच्या आरमाराच्या संरक्षणाखालीं माल पोंहोचवण्याची जबाबदारी स्वीकारली आहे, हें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं धिटाईनें पुढें टाकलेलें आणखी एक पाऊल आहे. अटलांटिक महासागरांतील युद्धक्षेत्रांत अमेरिकन जहाजें आल्यास त्यांचाहि नाश करण्यास आम्हीं सोडणार नाहीं अशी धमकी हिटलरच्या प्रभावळीनें दिली आहे. पण अमेरिकन युद्धसामुग्री इंग्लंडला अमेरिकेंतून पाठवण्यांत येते, ती जर्मनीनें समुद्रांत बुडवण्यासाठीं नाहीं असा रोखठोक जबाब ह्या धमकीस देण्यांत आला आहे. अटलांटिक महासागरांतील युद्धास मि. चर्चिल ह्यांनीं आपल्या भाषणांत विशेष महत्व दिलें आहे त्याचें रहस्य ध्यानांत येणें अवघड नाहीं.

## जर्मनीचीं नवीन कारस्थानें

युगोस्लाव्हिया व ग्रीस ह्यांच्यावर एकीकडे स्वाऱ्या चालू असतांना आफ्रिकेंत इटलीच्या मदतीस सैन्य पाठवून देण्याचा हिटलरचा बेत फारसा यशस्वी झाला नाहीं. टोब्रुकचें ठाणें शत्रूस हस्तगत करतां आलें नाहीं आणि सोलूमच्या पुढें त्याची प्रगति खुंटली. ग्रीस देश पादाक्रांत झाल्यावर कोणता डाव शत्रु आतां खेळणार ह्याचा अंदाज करण्यांत येत आहे आणि त्याच्या कांहीं हालचालींवरून भावी युद्ध-क्षेत्राची कल्पना येण्यासारखी आहे. स्पेनला चिथवून त्यानें जिब्राल्टर परत मागावा किंवा त्यावर हल्ला करण्यास जर्मनांस वाव द्यावा अशी जर्मनीची खटपट चालली असल्याचें दिसतें. जिब्राल्टरचा किल्ला अधिक मजबूत करून त्याच्या संरक्षणाची जय्यत तयारी ब्रिटिश सरकार करीत आहे. भूमध्य समुद्राचें जिब्राल्टरचें एक टोक हातीं घेऊन सुएझ कालव्याच्या दुसऱ्या टोकाचा समाचार घ्यावयाचा आणि अशा

रीतीनें हा समुद्र स्वतःच्या वर्चस्वाखाली आणावयाचा हें शत्रूचें मनोराज्य असावें. त्याचप्रमाणें एशियांतील तुर्की मुलखाकडे गडबड करून त्या बाजूनें इंग्लंडला शह बसवावयाचा अशीहि हिटलरची योजना असावी. इराकमध्यें पूर्वी मान्य झालेल्या व्यवस्थेप्रमाणें ब्रिटिश फौज उतरली असतां तेथील सरकारनें इंग्लंडशी तंटा सुरू केला आहे, त्याच्या बुडाशी जर्मनीचीं कारस्थानें आहेत, ह्यांत शंका नाहीं. फितुरी पुढाऱ्यांनीं इराकमध्यें राजकीय सत्ता लष्कराच्या जोरावर बळकावली असून जर्मनीचें सहाय मागितलें असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. राकेल तेलाच्या पुरवठ्याचे दृष्टीनें इराकचें महत्व किती आहे हें सांगावयास नको. तेथें चाललेल्या कारस्थानांचें रहस्य वेळींच ओळखून ब्रिटिश सरकारनें आपली फौज बसरा येथें पाठवली हें अत्यंत दूरदर्शीपणाचें धोरण होतें ह्यांत शंका नाहीं.

### हिंदी चहाचा इंग्लंडमध्यें खप

शांततेच्या काळांत जगांतील दुसऱ्या कोणत्याहि देशापेक्षां इंग्लंडमध्यें अधिक चहा खपत असे. युद्ध-परिस्थितीमुळें ब्रिटिश सरकारनें लोकांनीं प्यावयाच्या चहास मर्यादा घातली आहे. आयात व्यापारांत प्रत्यक्षरीतीनें युद्धोपयोगी असणाऱ्या मालास प्राधान्य देण्याचें धोरण त्या सरकारास अंगिकारावें लागलें आहे. त्यास अनुसरून चहाच्या इंग्लंडमधील आयातीवर नियंत्रण बसलें आहे. चहाच्या किंमतीहि सरकार ठरवतें आणि त्याचा व्यापार करणाऱ्या लोकांस वेळोवेळ व्यवहाराबाबत मर्यादा घालून देतें. हिंदुस्थानच्या चहाचा खप इंग्लंडमध्यें मोठ्या प्रमाणावर होत असतो,आणि ह्या मर्यादेच्या आंत हिंदी चहास योग्य स्थान देण्यांत येत आहे. चहाच्या व्यापारी मंडळयास युद्धापूर्वी ज्या किंमती सरासरीनें मिळत असत त्या ध्यानांत घेऊन सरकारनें अलीकडे किंमती निश्चित केल्या आहेत. ब्रिटिश सरकारनें चहाच्या खपाचे संबंधांत नुकर्तीच नवीन व्यवस्था केली आहे तीमध्यें हिंदुस्थाननें २७ कोटि व सिलोननें १४ कोटी पौंड चहा पुरवावयाचा आहे. जाव्हा व सुमात्रा यांच्या वांट्यास सुमारें ४३/४ कोटि पौंड आणि पूर्व आफ्रिकेचा २३/४ कोटी पौंड आले आहेत.ह्या योजनेंतले आकडे पूर्वीच्या कराराच्या मानानें घटलेले आहेत. उदाहरणार्थ, हिंदुस्थानचा पूर्वीचा वाटा ३२ कोटि पौंड व सिलोनचा १७ कोटि पौंड होता. नवीन करारांत किंमतीमध्यें मात्र घट करण्यांत आलेली नाहीं.खाण्यापिण्याच्या जिनसावर सर्वसाधारणपणें इंग्लंडमध्यें कडक नियंत्रण आहे, त्या दृष्टीनें हिंदी चहास तेथें मर्यादित गिऱ्हाइक मिळत आहे ही गोष्ट समाधानकारच समजली पाहिजे.

### म्हैसूरमध्यें हातमागाच्या धंद्याची पहाणी

आपल्या संस्थानांतील हातमागाच्या धंद्याची पहाणी करण्याकरितां म्हैसूर सरकारनें हिंदुस्थान सरकारच्या कमिटीचे स्वरूपाची एक कमिटी नेमली आहे, तिचे सहकारी खात्याचे रजिस्ट्रार हे अध्यक्ष आहेत.

### "ॲगमार्क" छापाच्या मालाची लोकप्रियता

"ॲगमार्क" छापाच्या मालाची लोकप्रियता वाढत आहे. १९३९ सालीं ह्या छापाच्या, ६१ लक्ष रुपये किंमतीचा माल खपला. १९४० सालीं १०२३/४ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची विक्री झाली.

## निजाम स्टेट रेल्वे

निजाम स्टेट रेल्वे व निजाम सरकारचीं मोटार वहातुक व विमान वहातुक खातीं ह्या सर्वांचें मिळून १९४०-४१ मध्यें सुमारें ३ कोटि, ५ लक्ष रुपये उत्पन्न झालें. त्यांतून १ कोटि, ५८ लक्ष रुपये व्यवस्थेचा खर्च वजा जातां निव्वळ नफा १ कोटि, ४७ लक्ष उरला. रेल्वेवरील ५८मैल लांबीच्या हिंदुस्थान सरकारच्या फाट्याचें निव्वळ उत्पन्न ८ लक्ष रुपये त्यांतून वजा केलें पाहिजे. गेल्या वर्षी, त्या पूर्वीच्या वर्षाचे मानानें, रेल्वेजचें उत्पन्न १७ लाखांनीं वाढलें. एकूण ८८ लक्ष उतारूंनीं रेल्वेप्रवास केला. मालाच्या वहातुकींत थोडी घट झाली, ह्याचें कारण मनमाड व वाडी मार्गानें निजाम रेल्वेवरून जाणाऱ्या मालावर जी. आय. पी. नें नियंत्रण घातलें, हें होय. इंजनांत बिघाड होण्याचें प्रमाण १ लक्ष ९० हजार मैलांच्या प्रवासास १ असें पडलें. हें प्रमाण त्यापूर्वीच्या तीन वर्षांतील प्रमाणापेक्षा समाधानकारक आहे. उतारूंच्या व मालाच्या वहातुकीचीं १८७ कन्सेशन्स चालू होतीं. प्रचारासाठी रेल्वेनें इंग्रजी, उर्दू व तेलगू भाषेंत पत्रकें प्रसिद्ध केलीं. रेल्वे नोकरांस लढाईची ताजी माहिती मिळावी ह्यासाठी साप्ताहिक बातमी-पत्रें त्यांस वाटण्यांत आलीं.

### मोटार वहातुक

निजाम हद्दींतील ४,१४२ मैल लांबीच्या १३१ रस्त्यांवर सरकारी नियंत्रणाखालीं मोटार वहातुक चालू आहे. ह्या मोटारींतून गेल्या वर्षी १ कोटि, ३५ लक्ष उतारूंनीं प्रवास केला. एकूण उत्पन्न ३५ लक्ष रुपये झालें व निवळ नफा ४१/२ लक्ष रुपये उरला. शेकडा ९८% प्रवास वक्तशीर झाले.

### विमान वहातुक

बेगमपेट, अदिलाबाद व औरंगाबाद येथें विमानें उतरण्याची व्यवस्था आहे. बिदर येथें एका विमानगृहाचें काम चालू आहे. हैद्राबाद–बंगलोर-मद्रास विमान वहातुक ९ एप्रिल ते ७ जुलै, १९४० चालू होती. विमानांनीं एकूण १,७५९ तास उड्डाण केलें.

### दि इंडियन ऑटोमोबाइल कं. लि., म्हैसूर

शेठ वालचंद हिराचंद ह्यांच्या नेतृत्वाखालीं बंगलोर येथें स्थापन होणाऱ्या मोटारींच्या वरील कारखान्याच्या भांडवलाची व्यवस्था खालीलप्रमाणें होणार आहे असें समजतें.

| | |
|---|---|
| विक्रीस काढावयाचें भांडवल : | २२५ लक्ष रु. |
| प्रत्येक ऑर्डिनरी भागाची किंमत : | १०० रु. |
| एकूण ऑर्डिनरी भाग : | २ लक्ष, २५ हजार |
| रकम भरण्याची पद्धत : | |

अर्जाबरोबर २० रु. अर्जमंजुरीनंतर २० रु. बाकीचे ६० रु. मागणी केल्यावर.

**भांडवलाची उभारणी**

| | |
|---|---|
| म्हैसूर सरकार : | ४० लक्ष रु. |
| इतर हिंदी संस्थानें : | ५० लक्ष रु. |
| मॅनेजिंग एजंट्स : | ३० लक्ष रु. |
| मोटारींचे व्यापारी : | ३० लक्ष रु. |
| लोकांकडून जमा : | ३५ लक्ष रु. |

ह्या ७५ लाखांपैकीं ५० लक्ष रुपयांचे भाग दलालांनीं राखून ठेवले आहेत.

म्हैसूर सरकारनें भांडवलावर १० वर्षेपर्यंत ३१/२% व्याजाची हमी घेतली आहे. प्रत्येक डायरेक्टरानें किमान ५० हजारांचे भाग घेतले पाहिजेत. मेसर्स वालचंद तुळशीदास खटाव लि. हे कंपनीचे मॅनेजिंग एजंट्स आहेत.

## प्राप्तीवरील कराची आकारणी

### युद्धापूर्वी व आतां द्यावा लागणारा कर

( खालील तक्त्यांतील आंकड्यांत इनकम टॅक्स, सुपर टॅक्स व सरचार्ज ह्या सर्वांचा समावेश होतो. )

| | कराची मूळ आकारणी | | (सध्याची आकारणी ३३% सरचार्ज सकट) | |
|---|---|---|---|---|
| वार्षिक उत्पन्न | कर | % | कर | % |
| रु. | रु. | | रु. | |
| २,००० | ... | ... | ... | ... |
| २,१५० | ३० | १.४ | ४१ | १.९१ |
| २,५०० | ४७ | १.९ | ९३ | २.५२ |
| २,७०० | ५६ | २.० | ७५ | २.७७ |
| ३,००० | ७० | २.३ | ९४ | ३.१३ |
| ३,२५० | ८२ | २.५ | १०९ | ३.३५ |
| ३,५०० | ९४ | २.७ | १२५ | ३.५७ |
| ३,७५० | १०६ | २.८ | १४१ | ३.७६ |
| ४,००० | ११८ | ३.० | १५६ | ३.९० |
| ४,५०० | १४१ | ३.१ | १८८ | ४.१८ |
| ५,००० | १६४ | ३.३ | २१९ | ४.३८ |
| ६,००० | २४२ | ४.० | ३२३ | ५.३९ |
| ८,००० | ३९८ | ५.० | ५३१ | ६.६४ |
| १०,००० | ५५५ | ५.६ | ७४० | ७.४० |
| १५,००० | १,१८० | ७.९ | १,५७३ | १०.४९ |
| २०,००० | १,९६१ | ९.८ | २,६१५ | १३.०१ |
| ३०,००० | ३.८३६ | १२.८ | ५,११५ | १७.०५ |
| ४०,००० | ६,३३६ | १५.८ | ८,४४८ | २१.१२ |
| ५०,००० | ९,१४८ | १८.३ | १२,१९८ | २४.४० |
| ६०,००० | १२,२७४ | २०.५ | १६,३६५ | २७.२८ |
| ७०,००० | १५,७१२ | २२.४ | २०,९४९ | २९.९३ |
| ८०,००० | १९,१४९ | २३.९ | २५,५३१ | ३१.९७ |

### बॉंब को. क्वार्टर्ली

ह्या त्रैमासिकाचा मार्च, १९४१ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यांत " सहकारी घाऊक विक्रीच्या सोसायटीची आवश्यकता " ह्या डॉ. शिरनामे ह्यांच्या लेखास अग्रस्थान देण्यांत आलें आहे. दोहदमधील भिल्ल वस्तीच्या भागांतील खरेदी-विक्रीच्या सोसायट्यांचें वर्णन श्री. डी. जे. नाईक ह्यांनीं आपल्या लेखांत केलें आहे. " सुपरवायझिंग यूनियन्स "वर दि. ब. गांधी व एक सहकारी ह्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. आरोग्याच्या सहकारी सोसायट्यांपासून होणारे फायदे व त्या सोसायट्यांचें स्वरूप, ह्यावर श्री. एन. एन. कौल ह्यांनीं लेख लिहिला आहे. सहकाराच्या प्रचाराविषयीं श्री. कवि ह्यांचा लेख आहे. प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांकडून पैसे घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या परतफेडीच्या पात्रतेविषयीं श्री. आर. जी. सप्रे ह्यांनीं आकडेवार माहिती दिली आहे. ह्या पात्रतेवरच लँड मॉर्गेज बँकांची यशस्विता अवलंबून आहे. ताज्या पुस्तकांवर अभिप्राय, संपादकीय स्फुटें, सहकाराची प्रगति, सहकारी बातम्या, हिंदुस्थानांतील व इतर देशांतील सहकार, रजिस्ट्रारचीं सर्क्युलरें, सरकारी ठराव, इत्यादि नेहमींचीं उपयुक्त सदरें अंकांत आहेतच.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कन्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदी कारखाने व त्यांतील कामगार

हिंदुस्थानांतील कारखाने

| | संख्या |
|---|---|
| १९३८ | १०,७८२ |
| १९३९ | ११,६३० |

कारखान्यांतील कामगार

| | |
|---|---|
| १९३८ | १७ लक्ष, ३८ हजार |
| १९३९ | १७ लक्ष, ५१ हजार |

कपास कापडाच्या गिरण्यांतील कामगार

| | |
|---|---|
| १९३८ | ५ लक्ष, १२ हजार |
| १९३९ | ४ लक्ष, ८९ हजार |

स्त्री कामगार

| | |
|---|---|
| १९३८ | २ लक्ष, ४१ हजार |
| १९३९ | २ लक्ष, ३९ हजार |

स्त्री कामगारांचें एकूण कामगारांशीं प्रमाण

| | |
|---|---|
| १९३८ | १३·७% |
| १९३९ | १३·८% |

मुलांचें एकूण कामगारांशीं प्रमाण

| | |
|---|---|
| १९३८ | ·५४% |
| १९३९ | ·६२% |

अपघात

| | |
|---|---|
| १९३८ | ३३,४५४ |
| १९३९ | ३६,००६ |

दर लाख कामगारांशीं अपघातांचें प्रमाण

| | |
|---|---|
| १९३८ | १,९२७ |
| १९३९ | २,०५६ |

---

## जर्मनीनें केलेली बेल्जन सोन्याची लूट

आपल्या कबज्यांत आणलेल्या देशांत जर्मनीनें कशी शिस्तवार लूट चालवली आहे ह्याचें उदाहरण बेल्जमच्या राष्ट्रीय बँकेच्या सोन्यावर त्यानें मारलेल्या डल्ल्यावरून मिळण्यासारखें आहे. हॉलंड, बेल्जम, डेन्मार्क, नॉर्वे वगैरे देशांतील संपत्तीचा उपयोग तेथील लोकांच्या हिताकडे न पहातां स्वतःच्या फायद्यासाठी करण्याचा जर्मनीचा सारखा प्रयत्न आहे. ह्या कामीं व्हिशी येथील मंड्यांसारखे लोक त्यास सहाय देत आहेत. बेल्जमवर जर्मनीची स्वारी होण्यापूर्वीच तेथील नॅशनल बँकेचा सुवर्ण-निधि पॅरिसला बँक ऑफ फ्रान्सच्या संरक्षणाखालीं ठेवण्यासाठी पाठवण्यांत आला होता. हें सोनें सुमारें ८० कोटि रुपये किंमतीचें होतें आणि तें बँक ऑफ फ्रान्सच्या निधीबरोबर पश्चिम फ्रेंच आफ्रिकेंत डाकर येथें पाठवण्यांत आलें. आपला सुवर्ण-निधि लंडनला पाठवला जावा अशी बेल्जन बँकेची इच्छा होती, पण तीस न जुमानतां फ्रेंच सरकारनें तें आफ्रिकेंत पाठवलें. ब्रुसेल्स येथील नॅशनल बँक ऑफ बेल्जमच्या शाखेनें बँक ऑफ फ्रान्सकडून आपला सुवर्णनिधि परत मागितला आहे. पण ह्या मागणीच्या मागें जर्मन सरकार आणि त्याचे व्हिशी येथील हस्तक आहेत ह्यांत संशय नाहीं. कारण, हें सोनें बेल्जमला परत जाईल तेव्हां तें नेमकें जर्मनीच्या हातीं पडेल हें सांगावयास नको. बेल्जमच्या स्वतंत्र सरकारानें ह्या कारवाईचा निषेध केला असून बँक ऑफ फ्रान्सचें सोनें अमेरिकेंतील फेडरल रिझर्व्ह बँकेंत आहे त्यांतून जरूर तेवढें सोनें अडकवून ठेवलें जावें अशी विनंति अमेरिकेस केली आहे. ती मान्य होऊन अमलांत आली तरी जर्मनीस सोन्याची लुट फ्रान्सच्या मार्फत मिळणार ती वाचत नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे.


**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

' Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**औषधाशिवाय रोगमुक्त व्हा !**

**आरोग्य चिकित्सा शिक्षक**—डॉक्टर, वैद्यांच्या औषधाला कंटाळलेले रोगी निसर्गसिद्ध सुलभ उपायांनीं सहज बरें करून आरोग्याचा अखण्ड सुखोपभोग घ्या ! पैसा वांचवा ! किं. १॥ रु.

**लंघन-चिकित्सा शिक्षक**—प्लेग, कॉलरा, व इतर हट्टी रोग औषधाशिवाय फक्त लंघनें करून रोगमुक्त व्हा ! वज्रदेही बना ! नवी तिसरी आवृत्ति. किं. १॥ रु. ट. ह. शिवाय. यादी फुकट. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.




**मधुमेहावरील औषध**

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

**K. K. & Co.**

**Photographic Dealers**

**POONA.**

**कोरोना पोर्टेबल विकणें आहे.**

कोरोना पोर्टेबल टाइपरायटर उत्तम स्थितींतला खासगी कामासाठीं वापरलेला, विकणें आहे.

" क्ष " C/o अर्थ.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११०—५ |
| ४% १९४३ | १०४–५ |
| ३½% बिनमुदत | ९४—७ |
| ३½% १९४७–५० | १०२—०  |
| ३% ( १९६३–६५ ) | ९४—० |
| २¾% १९४८–५२ | ९७—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०७—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १३६—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४०—० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५१५—० |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०२–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% | १३०—० |
| कराची ( १०० ) ९% | २१५—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २२५–१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १५१५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १७९५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% | ५८—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८५१—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६४१—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | १९७—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४५—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | १८—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ४०—६ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३९२०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१४—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४६—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३५०—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १६८०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १२९—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२-११-८ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६२-१३-६ |

**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें**
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
**OUR HOME**
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
**उतरण्यास या.**
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

### सरकीचें आइसक्रीम

सरकी हें गाय, म्हैस, बैल ह्यांसारख्या जनावरांचें पौष्टिक अन्न आहे पण तिचा उपयोग मनुष्याच्या खाद्यवस्तू बनवण्यांत करतां येईल अशी कल्पना थोड्यांसच आली असेल. मानवी सुखांसाठी पदार्थांचा निरनिराळा उपयोग वाढवण्यांतच संपत्तीच्या उत्पादनाचा विस्तार होत असतो. ह्या नियमास अनुसरून कापसाच्या सरक्यांचा उपयोग त्यांमधील बिया आइसक्रीममध्यें घालून तें स्वादिष्ट व पौष्टिक बनवण्याकडे अमेरिकेंत केला जात आहे. सरकीच्या मगजाचें पीठ बनवण्यांत येतें आणि त्यांतल्या पौष्टिक द्रव्याचे व्हिटॅमिनचे गुण आइस्क्रीममध्यें उतरतात. साखर व दूध ह्यांच्याशीं ह्या पिठाचें मिश्रण केलें जातें, त्याची कृति अजून गुप्त असून ती एका अमेरिकनासच माहीत आहे. ह्या बाबतींतले प्रयोग दीड वर्षभर चालले होते आणि त्यास आतां चांगलें यश आलें आहे असें एका अमेरिकन वृत्तपत्रावरून समजतें. सरकीमध्यें आणखी कोणते गुण आहेत ह्याविषयींची अधिक चौकशी झाली असतां तिचा उपयोग अनेक प्रकारांच्या खाद्य पदार्थांत तिचा गीर घालण्याकडे करतां येईल, अशी आशा प्रगट करण्यांत येत आहे. मागणीच्या मानानें कपाशीची पैदास अमेरिकेंत मोठ्या प्रमाणांत होत असल्यानें सरकीच्या वाढत्या उपयोगानें ह्या कामीं थोडी मदत होईल असेंहि कांहीं लोकांस वाटत आहे. ज्यास कापूस येणार नाहीं असें कपाशीचें झाड बनवण्याच्या हेतूनें शास्त्रीय प्रयोग अमेरिकेंत कित्येक ठिकाणीं चालू आहेत आणि कापसासाठी नाहीं तर केवळ सरकीसाठी तें उपयोगी पडावें असा त्यांत हेतु आहे असें सांगण्यांत येत आहे. सरकीस पुढेंमागें सोयाबीनचा उच्च दर्जा प्राप्त होतो कीं काय हें पहावें. जनावरांप्रमाणें माणसांस सरकीचा खुराक देतां आला नाहीं तरी तिच्यामधलें सत्व काढण्याची आणि त्याचा उपयोग पौष्टिक अन्न बनवण्याकडे करण्याची कला साधली तर तें हिंदुस्थानांत आर्थिक दृष्ट्या अत्यंत उपयुक्त होईल हें सांगावयास नको.

### रेल्वे फाटे बंद होणार

साउथ इंडिया रेल्वेवरील तिरुपथुर-कृष्णागिरी व धर्मपुरी-होसुर हे फाटे बंद होणार आहेत.

### युद्धकर्जें

हिंदी युद्ध कर्जाची रकम आतां सुमारे ५५ कोटि रुपये झाली आहे.

### हिंदुस्थान-अमेरिका व्यापार

अमेरिकेकडे माल पाठविणाऱ्या देशांत हिंदुस्थानाचा अनुक्रम सातवा लागतो.


या नव्या शोधानें सर्व जगभर खळबळ उडवून दिली आहे.

## दहा हजार रुपये अगदी फुकट.

**अमृतसरमध्यें २॥ रु. तोळा सोनें**

मिनर्व्हा गोल्डची घरोघर प्रशंसा! मिनर्व्हा गोल्ड हा नकली सोन्याचा अगदी नवा शास्त्रीय आविष्कार होय. त्यानें केवळ वैज्ञानिकांनाच आश्चर्यानें थक्क करून सोडलें एवढेंच नव्हे, तर सर्वसाधारण लोकांची एक अत्यंत मोठी उणीव भरून काढली आहे. सर्व स्त्रिया त्याच्या दागिन्यावर बेहद्द खूष होतात. ज्या घरांत हें सोनें एकदां शिरलें तेथून दोनदोनदा तीनतीनदा त्यांस मागण्या येत आहेत.

मेहेरबान लाला वियारतनसाहेब, म्युनिसिपल कमिशनर, पठानकोटाहून २५ आक्टोबरला लिहितात—"काल आपल्या सोन्याचें पार्सल मिळालें; धन्यवाद! आपण हा नवीन पदार्थ तयार करून जगाची एक मोठीच उणीव भरून काढली आहेत. उलट टपालीं आणखी तीन तोळे सोनें पाठवावें."

याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रें उदाहरणार्थ रियासत, काँग्रेस, स्वस्तिक, अलामान, जमीनदार, गुरुघंटाल प्रताप, इत्यादींनीं प्रशंसोद्गार खुषीनें छापले आहेत.

हें सोनें कसास लावलें तर अस्सल सोन्याचाच रंग दाखवतें आणि अस्सल सोन्याप्रमाणेंच ठोकलें व गाळलें जातें. याचे हरएक प्रकारचे दागिने बनवता येतात. नापसंत पडल्यास किंमत परत मिळण्याची गॅरंटी आहे; खास प्रसारासाठीं किंमत १ तोळयास २॥ रु.; ३ तोळयास ७ रु.; ६ तोळयास १३ रु.; व ४० तोळयास ८० रु.

**मिनर्व्हा गोल्डचे बनवलेले दागिने**

मिनर्व्हा गोल्डच्या बनवलेल्या बांगड्या दर जोडीला २ रु.; कानांतील सोन्याचे डूल दर जोडीला ३ रु.; सड्याची अंगठी ३ रु.; साधी मुंबई फॅशनची अंगठी २ रु.; जाळीच्या बांगड्या दर जोडीला ५ रु.; (नेकलेस) माळ १२ रु.; लॉकेट ६ रु.; दस्तबंद दर जोडीला १४ रु.

माल पसंत पडला नाहीं तर परतबोलीची खात्री. पोस्टाचा खर्च फक्त ८ आणे पडतो.

या गोष्टी खोट्या ठरवून देणारास दहा हजार रुपये फुकट दिले जातील. याशिवाय दर तीन तोळे सोनें खरेदी करणारास टिकाऊपणा व सौंदर्य याची १० वर्षें गॅरंटी असलेलें एक फॅन्सी रिस्टवॉच फुकट दिलें जाईल; गॅरंटीचा कागद प्रत्येक घड्याळाबरोबर धाडला जातो.

मिळण्याचा पत्ता—मॅनेजर अमेरिकन मिनर्व्हा गोल्ड हाऊस, (A. P.) K. C. अमृतसर.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल लवंग टूथ पावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

जर्मिन टेलर व्हा.

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

**Prop. M. V. Risbud, B. A.**
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १४ मे, १९४१ अंक २०

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

' पायोनियर डाइंग हाऊस '

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दाणेवाडी, पुणें.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या
अशक्ततेवर
रक्तवर्धक
वापरा.
सर्वत्र मिळतें.
—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
आयुर्वेद रसशाळा
पुणें, लि. पुणें ४.

दि सदर्न निटिंग वर्क्स, लि.
[ २६४ शनिवार, पुणें २. ]
यांनीं बनविलेली
"पूना होजिअरी"
उन्हाळ्यासाठी गंजीफ्रॉक, अंडरवेअर्स वगैरे हरतऱ्हेचा
जाळीचा माल
तयार होत आहे
आपल्या व्यापाऱ्याकडे चौकशी करा
★
ठेवी : मुदतीप्रमाणें ४॥ ते ६ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
★
माहितीसाठी वरील पत्त्यावर लिहा.

# विविध माहिती

### निजाम हैद्राबाद संस्थानची लोकसंख्या

| | |
|---|---|
| एकूण लोकसंख्या : | १ कोटि, ६२ लक्ष |
| गेल्या दहा वर्षांतील वाढ : | १७ लक्ष, ५८ हजार |
| हैद्राबाद शहराची लोकसंख्या : | ७ लक्ष, २८ हजार |
| गेल्या दहा वर्षांतील वाढ : | २ लक्ष, ६२ हजार |
| १० वर्षांपूर्वीचें हैद्राबाद शहराचें क्षेत्रफळ : | ५३ चौ. मैल |
| आजचें क्षेत्रफळ : | ७९ चौ. मैल |
| संस्थानांतील एकूण साक्षर : | ११ लक्ष, ११ हजार |
| १० वर्षांपूर्वीचे साक्षर : | ५ लक्ष, ९६ हजार |
| साक्षर स्त्रियांची संख्या : | १ लक्ष, ७२ हजार |
| १० वर्षांपूर्वीची साक्षर स्त्रियांची संख्या : | ६८ हजार |

### मुगद

धारवाड जिल्ह्यांतील मुगद गावास १९३९ ची सर फ्रेड्रिक साइक्स ग्रामसुधारणा ढाल मिळाली आहे.

### सॅकरीनचा शोध कसा लागला ?

एक शास्त्रज्ञ घरीं येऊन भाकर खाऊं लागला, तेव्हां त्यास ती फार गोड लागूं लागली. त्यानें जिभेस बोट लावलें, तें तर फारच गोड लागलें. साखरेस तर त्यानें स्पर्शहि केला नव्हता. रसायन शाळेंत त्याचे कोळशाचे डांबरासंबंधीं प्रयोग चालू होते व डांबरापासून निघालेल्या "सॅकरीन"मुळें त्याचे हात गोड झाले. फॉलबर्गच्या हातून सॅकरीनचा अशा रीतीनें अनपेक्षित शोध लागला. साखरेच्या अनेक पट सॅकरीन गोड असतें. परंतु त्यामध्यें साखरेचे बाकीचे सर्व गुण नसतात.

### भाषा

सबंद जगांतील भाषांची संख्या ६,७६० आहे, त्यांतील केवळ २,७९६ भाषा चालू आहेत. श्वेतवर्णीयांत सर्वांत अधिक लोक इंग्रजी भाषा बोलतात. बाकीच्यांत चिनी भाषा सर्वांत अधिक बोलली जाते.

### ऑस्ट्रेलियाची लोकर जपानला मिळणार नाहीं

जपान ऑस्ट्रेलियाकडून दरसाल २½ लक्ष गाठी लोकर घेतो. ह्यापेक्षा अधिक लोकर ऐनजिनसी देवघेवीच्या तत्त्वावर आपणास मिळावी, असें जपानचें म्हणणें होतें, परंतु ऑस्ट्रेलियानें तें मान्य केलें नाहीं.

### ट्रेझरी बिलांवर १२ आणे व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १२ आणे पडला.

### ग्वाल्हेरमधील कपाशीचें पीक

ग्वालेर संस्थानांतील ५ लक्ष, ६६ हजार एकर जमीन कपाशी-खालीं आहे. म्हणजे, गेल्या वर्षापेक्षा ९% लागवड अधिक झाली आहे. १५ लक्ष एकरांत गहूं लावलेला आहे.

### रशियाकडे निर्गत बंद

अमेरिकेनें रशियाकडे युद्धास उपयुक्त गोष्टींच्या उत्पादनास सहाय करणारा कोणत्याहि प्रकारचा माल न पाठविण्याचें ठर-विल्याकारणानें सुमारें १०० रशियन खरेदी-दलाल अमेरिका सोडून जात आहेत.

### आंध्र व्हॅली पॉवर कं. लि.

वरील कंपनीचें अधिकृत भांडवल वाढवून तें ३½ कोटि रुपये करण्यांत आलें आहे. कंपनीच्या भागीदारांस नवीन काढलेल्या १४ हजार भागांपैकी ५,३१९ भाग मिळण्याचा अग्रहक्क आहे. ऑर्डिनरी भाग धारण करणारांसच हा हक्क देण्यांत आला आहे; प्रेफरन्स भागवाल्यांना नाहीं. ह्याचें कारण कंपनीचे खरे मालक ज्यांवर कंपनीच्या व्यवहाराचा मुख्य परिणाम होणार ते ऑर्डि-नरी भाग धारण करणाराचे आहेत. आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी मुंबईमधील कित्येक प्रमुख गिरण्यांस आणि जी. आय. पी. व बी. बी. ॲन्ड सी. आय. ह्या दोन रेल्वेस वीज पुरविते व ती पुरविणाऱ्या कित्येक कंपन्यांस घाऊक दरानें वीज देते. १९३३ सालापासून कंपनीनें ७½% डिव्हिडंड दिलें आहे.

### कर्जरोख्यांची परतफेड

म्हैसूर सरकारच्या १९४१–५१ च्या ६½% दराच्या कर्ज-रोख्यांची परतफेड १ नोव्हेंबर १९४१ रोजीं करण्यांत येईल. १९४१–५१ चे कर्जरोखे, ह्याचा अर्थ असा कीं १९४१ नंतर १९५१ पर्यंत केव्हांहि योग्य वेळीं सरकारास कर्जाची परतफेड करतां येते. सध्याची व्याजाच्या अल्प दराची संधी म्हैसूर सरकार परत फेडीसाठी साधीत आहे व आपला व्याजाचा बोजा कमी करीत आहे.

### ग्रेट ब्रिटन-अमेरिका व्यापार

अमेरिकेहून ग्रेट ब्रिटनकडे माल घेऊन जाणाऱ्या २०५ आग-बोटींपैकी फक्त ८ आगबोटी १९४१ च्या पहिल्या तिमाहींत जर्मनी बुडवूं शकला.

### युद्धफंडांस एक लक्ष रुपयांची देणगी

सर खुसरू व सर नेस वाडिया ह्यांनीं युद्धफंडास १ लक्ष रुपयांची देणगी दिली आहे. त्यांतील ५० हजारांचा विनियोग हिंदी सैनि-कांच्या कुटुंबांच्या पोषणासाठीं व ५० हजारांचा विनियोग लंडन, लिव्हरपूल, मँचेस्टर, कोव्हेन्ट्री व ग्लासगो येथील बाँबहल्ल्यांत सांपडलेल्या लोकांचे मदतीसाठी करावयाचा आहे.

### ब्रिटिश पार्लमेंटची गुप्त बैठक

"आर्थिक युद्धा" वर ब्रिटिश पार्लमेंटचे ११ तारखेचे बैठकींत गुप्त रीतीनें चर्चा झाली.

### सहकारी भांडारें

बडोदें संस्थानांत विद्यार्थ्यांचीं २१ सहकारी भांडारें आहेत व त्यांचे सभासद १,७७२ आहेत. ह्या भांडारांत एकूण ४,८३५ रुपयांची विक्री झाली.

### कपाशीचें जागतिक उत्पादन व खप

१९३९–४०

जागतिक उत्पादन : २ कोटि, ७५ लक्ष गाठी

त्यापैकी अमेरिकेंत उत्पादन : १ कोटि, १५ लक्ष गाठी

जागतिक खप : २ कोटि, ८५ लक्ष गाठी

शिलक कपास : २ कोटि, ५ लक्ष गाठी

अमेरिकन कपाशीचा गिरण्यांतून खप १९३९–४० मध्यें त्यापूर्वीच्या वर्षाचे मानानें बराच अधिक झाला.

### रेल्वे पास

रेल्वेवरील प्रवासाचे ३३,९०० व इतर रेल्वेजवरचे २,८०० फुकट पास निजामस्टेट रेल्वेनें गेल्या वर्षीं दिले.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २२० |
| २ अमेरिकेची ग्रेटब्रिटनला प्रभावी मदत ... | २३१ |
| ३ किर्लोस्कर बंधूंचा नवीन उपक्रम ... | २३२ |
| ४ हिंदी साखरेचे कारखाने | २३२ |
| ५ स्फुट विचार ... | २३३ |
| मि. चर्चिल ह्यांचें भाषण- युद्धाची आर्थिक बाजू- ब्रिटिश विमानदलाचें वाढतें बिल. | |
| ६ मुंबई प्रांतांतील वाचनालयांची वाढ व सुधारणा | २३४ |
| ७ जबाबदारी मर्यादित, परंतु लिमिटेड शब्द नाहीं | २३६ |
| ८ निवडक बाजारभाव | २३७ |
| ९ हिंदी साखरेचें उत्पादन | २३८ |


# अर्थ

बुधवार, ता. १४ मे, १९४१


## अमेरिकेची ग्रेट ब्रिटनला प्रभावी मदत

युद्धासंबंधानें आपल्या राष्ट्राचें धोरण कोणत्या प्रकारचें असावें ह्याविषयीं अमेरिकन मुत्सद्यांचे विचार अलीकडे प्रसिद्ध झाले आहेत,त्यांवरून इंग्लंड व अमेरिका ह्यांचें जर्मनी व त्याचे सांथीदार ह्यांचेविरुद्ध पूर्ण सहकार्य होणार हें स्पष्ट होत आहे. इंग्लंडला युद्ध सामुग्री पुरवून भरपूर सहाय द्यावें ह्याकरितां प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं अमेरिकन जनतेचा पाठिंबा मिळवला आणि त्यांनीं आतां प्रस्तुत युद्धाच्या कक्षेबाहेर अमेरिका राहूं शकत नाहीं ह्याविषयीं तिची खात्री पटवून दिली आहे. युरोपाच्या राजकीय भानगडींमध्यें आपण पडूं नये अशी अमेरिकन लोकांची सामान्य वृत्ति आज अनेक वर्षांची आहे. तरीहि गेल्या महायुद्धांत शेवटीं अमेरिकेस पडावें लागलें आणि अमेरिकन फौज युरोपच्या रणक्षेत्रांत प्रत्यक्षपणें लढलीहि. एवढेंच नव्हे, तर प्रेसिडेन्ट वुइल्सन ह्यांच्या नेतृत्वाखालीं महायुद्धाच्या समाप्तीनंतरचे तह होऊन राष्ट्रसंघाची स्थापना झाली. प्रेसिडेंट वुइल्सन ह्यांचीं लोकशाही, शांतता व आंतरराष्ट्रीय संबंध ह्यांचे बाबतींतलीं उदात्त तत्वें व उच्च भूमिका हीं जगाच्या इतिहासांत चिरस्मरणीय झालीं आहेत. अमेरिकेची ही ऐतिहासिक परंपरा चालू ठेवण्याचें महत्व, त्या राष्ट्रांतील लोकांस प्रस्तुत युद्धांत पडण्यास किंचित् कालावधि लागला असला तरी पटून त्याविषयीं आतां त्यांचेमध्यें मतैक्य झालें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. इंग्लंडला द्यावयाचें सहाय तात्काळ आणि भरपूर दिलें गेलें पाहिजे आणि ह्या कामीं मुळीच दिरंगाई होऊन चालणार नाहीं असें लोकमत अमेरिकेंत पसरलें आहे हा प्रस्तुत युद्धाचा विशेष आहे.

जर्मनीनें प्रत्याघाताच्या कितीहि धमक्या दिल्या तरी त्यास भीक न घालण्याचा अमेरिकन पुढाऱ्यांचा निश्चय झाला आहे. अमेरिकन राष्ट्राच्या विचारसरणीस हें विधायक व निश्चयात्मक वळण लागलें आहे ह्याचें श्रेय प्रामुख्यानें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांची दूरदृष्टि आणि उच्च मनोवृत्ति ह्यांस देणें योग्य होईल. अमेरिकन राजकारणाचें कर्णधारण त्यांनीं अत्यंत कुशलतेनें चालवलें आहे ह्याची ओळख सबंद जगास आतां पटली आहे. त्यांची भूमिका दोन भक्कम मुद्यांवर आधारली आहे. (१) प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांचा पहिला मुद्दा असा आहे कीं जर्मनी व त्याचे साथीदार ह्यांनीं अनेक राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा बळी घेतला असून ह्या सोटेशाहीची साथ ते युरोपाबाहेर पसरीत आहेत. तिला तोंड देऊन तिचें निर्मूलन करण्याची जबाबदारी एकट्या ब्रिटिश राष्ट्राच्या शिरावर येऊन पडली असतां त्यास वेळेवर जरूर ती सर्व मदत न मिळाल्यास जर्मनीस रान मोकळें होऊन सबंद जगाच्या स्वातंत्र्यावर व संस्कृतीवर गदा आल्यावांचून रहाणार नाहीं. ह्यासाठी ब्रिटिश लोकशाहीचें संरक्षण हें जगांतील सर्व लोकांच्या स्वातंत्र्याचें व माणुसकीचें रक्षण होय. (२) दुसरें असें कीं, अमेरिकन खंडास जर्मनीच्या सोटेशाहीचा उपद्रव होण्यास काळ लागणार नाहीं, म्हणून तिच्यावर वेळीच उपाय योजले पाहिजेत आणि त्यांतला प्रमुख उपाय म्हणजे इंग्लंडला सहाय देऊन त्या राष्ट्राची चालू असलेल्या लढायांत बाजू भरभक्कम करणें हा होय. आज जर्मनीच्या मार्गांत इंग्लंडचा अडथळा असून त्या राष्ट्रास अमेरिकेनें पुरवलेली युद्ध-सामुग्री जाऊन पोहोंचणार नाहीं अशी शत्रूची खटपट आहे. अटलांटिक महासागरांत इंग्लंडकडे अमेरिकन माल घेऊन जाणारीं जहाजें बुडवण्याचा क्रम जर्मनीनें चालू ठेवला आहे. त्याचा प्रतिकार यशस्वी रीतीनें झाला नाहीं तर अमेरिकेची इंग्लंडला दिलेली मदत व्यर्थ आहे हें उघड आहे.

अमेरिकन राष्ट्रानें स्वतःच्या किनाऱ्यालगतच्या समुद्रांत व्यापाराचें संरक्षण केल्यानें काम भागण्यासारखें नाहीं हें ध्यानांत आल्यावरून प्रेसिडेंट रूझव्हेल्टनीं ही मर्यादा अटलांटिक महासागरांत इंग्लंडच्या मार्गावर दूरवर लांबवली आहे. अमेरिकेचा माल रोकड देऊन इंग्लंडनें खरेदी करावा आणि स्वतःच्या जबाबदारीवर तो वाहून न्यावा ह्या पद्धतीपासून प्रारंभ झाला. इंग्लंडजवळ द्यावयास पुरेशी रोकड नसल्यास अमेरिकेनें माल उसना किंवा भाड्यानें द्यावा ह्या आशयाचा कायदा पुढें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं पास करून घेतला. अमेरिकेच्या तटस्थपणाचें मूळचें धोरण हळुहळु सैल होत गेलें असून आतां तें नावास मात्र राहिलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. अमेरिकन युद्ध खात्याचे चिटणीस मि. स्टिम्सन, ह्यांनीं नुकतेंच एक सडेतोड भाषण केलें आणि त्यांत त्यांनीं आपल्या सरकारची बदललेली भूमिका विशद केली. इतर अमेरिकन पुढाऱ्यांनींहि असें स्पष्ट म्हटलें आहे कीं अमेरिकन माल अमेरिकेच्या आरमाराचे संरक्षणाखालीं इंग्लंडला पोंचवला जाणें आवश्यक झालें आहे. आटलांटिक महासागराचा हमरस्ता जर्मनीच्या वर्चस्वाखालीं जाऊं देणें म्हणजे त्यास अमेरिकन खंडावर आक्रमण करण्यास आमंत्रण देण्यासारखें आहे. ह्यासाठी कोणतीहि शंका मनांत न बाळगतां अमेरिकेनें आपल्या आरमाराचें संरक्षण देऊन व जहाजें पुरवूनहि युद्धसामुग्री इंग्लंडला पोहोचवावी अशी सूचना असंदिग्धपणें पुढें मांडण्यांत आली आहे. प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचा या योजनेस पूर्ण पाठिंबा असल्यानें त्याची अंमलबजावणी होण्यास अडचण पडणार नाहीं. हें सहाय इंग्लंडला अत्यंत महत्त्वाचें वाटेल आणि त्याचा युद्धावर अनुकूल परिणाम होईल ह्याविषयीं संशय नाहीं.

### पायतणांचा खप

हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्य दरसाल पायतणाची १⁄६ जोडी वापरतो. हिंदुस्थानामधील पायतणांचा वार्षिक खप ७ कोटि जोड्यांइतका आहे, तो ८० कोटींवर तरी जाणें शक्य आहे, असें बाटा आणि कं. चें मत आहे. शंभरांतील फक्त दहा लोक आज पायतण वापरतात व बाकीचे अनवाणी चालतात. लोकांची पायतण विकत घेण्याची ऐपतच नाहीं.

## किर्लोस्कर बंधूंचा नवीन उपक्रम

### हरिहर येथें यांत्रिक हत्यारांचें उत्पादन

### दि म्हैसूर किर्लोस्कर, लि. हरिहर

दि म्हैसूर किर्लोस्कर, लि. ह्या नांवाची एक नवीन कंपनी किर्लोस्कर बंधू लि. नीं म्हैसूर संस्थानांत काढली आहे. मशीन टूल्सचें उत्पादन करणें, हा त्या कंपनीचा प्रमुख हेतु आहे. हरिहर येथें १०६ एकर जागा कारखान्यासाठी घेण्यांत येईल. ह्या जागेजवळूनच तुंगभद्रा नदी वहाते. हरिहर हें गांव म्हैसूर हद्दींत म्हैसूर–ब्रिटिश सीमेवर असून पुणें ते हरिहर हें अंतर ४१५ मैल आहे. किर्लोस्करवाडीपासून हरिहर २७९ मैल आहे.

हिंदुस्थानांतील वेगवेगळया कारखान्यांत मशीन टूल्सला प्रचंड मागणी आहे. लेथ, ड्रिलिंग मशीन्स, शेपिंग-मिलिंग-कटिंग मशीन्स, प्लेनर्स, क्रँक प्रेस इत्यादि अनेक प्रकारचीं टूल्स गिरण्या, कारखाने, खाणी, रेल्वेज, डॉक्स, इत्यादींस लागतात. युद्धामुळें त्यांची आयात बंद पडली आहे, ह्या दृष्टीनें हिंदुस्थानांत त्यांच्या उत्पादनास प्रारंभ करण्यास प्रस्तुत समय सोईचा आहे.

दि म्हैसूर किर्लोस्कर, लि. चे कांहीं भाग म्हैसूर सरकारनें घेतले असून त्यानें अनेक सवलती कंपनीस दिल्या आहेत. कंपनीची प्रत्यक्ष व्यवस्था मेसर्स किर्लोस्कर ब्रदर्स लि. ह्यांचेकडे राहील. किर्लोस्कर ब्रदर्स लि. ह्या कंपनीस नव्या कंपनीची मॅनेजिंग एजन्सी मिळालेली आहे. मॅनेजिंग एजंट कंपनीनें नव्या कंपनीचे बरेंच भांडवल घेतलेलें आहे. मेसर्स बाटलीबॉय आणि कंपनी (मुंबई) ही फर्म गेलीं ३० वर्षें मशीन टूल्सचा धंदा करीत आहे. त्यांचेकडे म्हैसूर किर्लोस्कर लि. च्या विक्रीचें काम सोंपविण्यांत आलेलें आहे. कंपनीच्या मशीन्स टूल्सचे सबंद हिंदुस्थानाचे "सोल डिस्ट्रिब्यूटर्स" म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत येईल.

मॅनेजिंग एजन्सीचा करार पुढीलप्रमाणें आहे. मॅनेजिंग एजंटास म्हणजे किर्लोस्कर बंधू लि. ह्या कंपनीला दरसाल ६ हजार रुपये ऑफिस अलावन्स मिळेल. ह्या खेरीज निवळ नफ्यापैकीं १५½ नफा त्यास मिळेल. किमान ५ हजार रुपये नफा तरी मॅनेजिंग एजंटांस मिळालाच पाहिजे. मॅनेजिंग एजंटास म्हैसूर किर्लोस्कर लि. च्या बोर्डावर दोन डायरेक्टर नेमतां येतील.

म्हैसूर किर्लोस्कर लि. च्या डायरेक्टरांनीं प्रत्येकीं २½ हजार रुपयांचे तरी भाग घेतले पाहिजे. कारखान्याची उभारणी होईपर्यंत वेळ जाऊं नये, ह्यासाठी मशीन टूल्सला लागणारी कास्टिंग्ज किर्लोस्करवाडी येथें ओतून तयार ठेवण्याचें काम चालू राहील.

कंपनीचें अधिकृत भांडवल १० लक्ष रुपये असून तूर्त विक्रीस काढलेलें भांडवल ५ लक्ष रुपये आहे. प्रत्येक भाग १०० रुपयांचा आहे. २½ लाखांचें भांडवल खपलें कीं, कंपनीस व्यवहारास प्रारंभ करतां येईल, अशी आर्टिकल्समध्यें तरतूद आहे. म्हैसूर सरकार मॅनेजिंग एजंसट् व मेसर्स बाटलीबॉय आणि कंपनी ह्यांनीं मिळून ३½ लाखाचे भाग घेण्याचें कबूल केलें आहे व उरलेले १½ लाखांचे भाग विक्रीस शिल्लक राहिले, परंतु ते सर्व खपून गेले आहेत.

मॅनेजिंग एजंटांनीं श्री. व्ही. पी. वर्दे (नाबर आणि कं. चे) ह्यांस व श्री. एम्. बी. जांभेकर ह्यांस आपले प्रतिनिधी म्हणून बोर्डावर पाठवले आहे. त्यांपैकीं श्री. जांभेकर हे किर्लोस्कर सन्स आणि कं. चे म्हणजे किर्लोस्कर ब्रदर्स लि. च्या मॅनेजिंग एजंट फर्मचे एक भागीदार असून ते नव्या कंपनीचा प्रत्यक्ष व्यवहार पहातील. श्री. एस. एल. किर्लोस्कर व श्री. एन. डब्ल्यू. गुर्जर हे आणखी दोघेजण किर्लोस्कर सन्स आणि कंपनीचे भागीदार नव्या कंपनीचे बोर्डावर आहेत. बाटलीबॉय आणि कं. चे एक भागीदार श्री. व्ही. एम. परेख हेहि बोर्डावर आहेत. श्री. किर्लोस्कर, श्री. गुर्जर व श्री. परेख हे व्यक्तिशः डायरेक्टर आहेत. मॅनेजिंग एजन्सीचे प्रतिनिधि म्हणून नव्हे. श्री. एम. वेंकटरमणय्या हे म्हैसूर सरकारचे बोर्डावरील प्रतिनिधी असून बोर्डाचे अध्यक्ष आहेत.

दि म्हैसूर किर्लोस्कर, लि. चा कारभार कसा चालेल, ह्याची थोडक्यांत रूपरेषा येथें दिली आहेः—

दि म्हैसूर किर्लोस्कर लि., हरिहर

|

वरील कंपनीचें डायरेक्टर बोर्ड

|

डायरेक्टर बोर्डाच्या देखरेखीखाली मॅनेजिंग एजंट्स
(किर्लोस्कर ब्रदर्स लि. ही कंपनी)

|

किर्लोस्कर ब्रदर्स लि. चे तर्फे तिचे मॅनेजिंग एजंट्स
(मेसर्स किर्लोस्कर सन्स आणि कं. ही पेढी)

|

वरील पेढीचे तर्फे तिचे एक सभासद, श्री. जांभेकर
एक्स ऑफिशिओ डायरेक्टर.

किर्लोस्कर बंधू लि. च्या नव्या कारखान्यास सर्व दृष्टींनीं अनुकूल परिस्थिति आहे. किर्लोस्कर बंधूंनीं आपल्या धंद्यांत चांगलें यश मिळविलेलें आहे व त्यावरून त्यांचा नवा उपक्रम यशस्वी होईल ह्याविषयीं शंका वाटत नाहीं.

### हिंदी साखरेचे कारखाने

हिंदी साखरेच्या कारखान्यांचें, त्यांच्या उत्पादनशक्तीप्रमाणें, वर्गीकरण खाली केलें आहे:—

| रोजची उत्पादनशक्ती (टन) | १९३१-३२ | १९३४-३५ | १९३६-३७ | १९३८-३९ |
|---|---|---|---|---|
| १- २०० | ५ | ३० | २२ | २४ |
| २०१- ४०० | ८ | ३० | २८ | २४ |
| ४०१- ६०० | ७ | ४१ | ३० | १३ |
| ६०१- ८०० | ६ | ११ | ३६ | ३९ |
| ८०१-१००० | २ | ८ | ९ | ३५ |
| १००१-१२०० | ... | ३ | ७ | ७ |
| १२०१-१४०० | ... | १ | २ | ६ |
| १४०१-१६०० | ... | १ | २ | ३ |
| १६०१-१८०० | ... | ... | १ | ४ |
| १८०१-२००० | ... | १ | २ | २ |
| | २८ | १३४ | १३९ | १५७ |

१९३२-३३ सालीं, हिंदुस्थानांतील एकूण साखर कारखान्यांपैकी ९६% कारखाने संयुक्त प्रांत व बिहार ह्यांत होते. १९३८-३९ मध्यें हें प्रमाण ७०% वर आलें. १९३४-३५ नंतर बिहारमधील कारखान्यांच्या संख्येंत वाढ झालेली नाहीं. कारखान्यांची उत्पादनशक्ति वाढविण्यांत येण्याची सर्वसाधारण प्रवृत्ति वरील तक्त्यावरून दिसून येईल. संयुक्त प्रांत व बिहार ह्या दोन प्रांतांतच मोठ्या उत्पादन शक्तीचे कारखाने मुख्यतः आढळतात. संयुक्त प्रांतांतील कारखान्यापेक्षा बिहारमधील कारखाने प्रथमपासून मोठे आहेत. इतर प्रांतांतील कारखाने ह्या दोन प्रांतांतील कारखान्यांच्या मानानें निम्म्या उत्पादन शक्तीचे भरतील.

# स्फुट विचार

## मि. चर्चिल ह्यांचें भाषण.

ब्रिटिश हाउस ऑफ कॉमन्समध्यें मि. चर्चिल आणि त्यांचें प्रधानमंडळ ह्यांचेवर विश्वासाचा ठराव, प्रचंड बहुमतानें मान्य झाला ही अत्यंत महत्त्वाची प्रस्तुत युद्धांतली गोष्ट होय. त्यांच्या नेहमींच्या पद्धतीनें मि. चर्चिल ह्यांनीं युद्धांतील अलीकडच्या घडामोडींचा आढावा प्रांजलपणानें व स्पष्टोक्ती करून घेतला. उत्तर आफ्रिकेंतील परिस्थिति, ग्रीसमध्यें झालेल्या लढाया, ब्रिटिश प्रधानमंडळाचें परराष्ट्रीय राजकारण, इत्यादि बाबतींत त्यांनीं कोणताहि आड पडदा न ठेवतां वस्तुस्थिति कॉमन्स सभेपुढें मांडली आणि आपल्या धोरणाविषयीं पसंती–नापसंती निर्भीडपणानें कॉमन्स सभेनें दर्शवावी असें त्यास सांगितलें. मंत्रिमंडळावर झालेल्या टीकेस मि. चर्चिल ह्यांनीं व्यवस्थित उत्तरें दिलीं आणि जर्मनीचा पाडाव करण्याचा आत्मविश्वास असंदिग्धपणानें प्रकट केला. अमेरिकेच्या सहायानें इंग्लंड आपलें वर्चस्व शत्रूवर क्रमाक्रमानें प्रस्थापित करील ह्याविषयीं आश्वासन देऊन सध्या ब्रिटिश राष्ट्रापुढें कोणत्या अडचणी आहेत ह्याचेंहि वर्णन त्यांनीं केलें. कोणत्याहि प्रकारची अतिशयोक्ति न करतां किंवा दोषांवर पांघरूण न घालतां धडाडीनें आपलें बळ वाढवीत जावयाचें आणि येणाऱ्या संकटांस धैर्यानें व चिकाटीनें तोंड देऊन शत्रूस नामोहरम करावयाचें हें मि. चर्चिल ह्यांचें धोरण आहे. त्यांचा आत्मविश्वास, कर्तृत्वशक्ति व संघटन सामर्थ्य हीं दांडगीं आहेत आणि त्यांचें नेतृत्व इंग्लंडला आज बहुमोल आहे. मि. चर्चिल ह्यांच्या भाषणाचा सुपरिणाम चोहोंकडे झाला आहे. त्याचे योगानें इंग्लंड, अमेरिका व इतर राष्ट्रें ह्यांमध्यें उत्साह उत्पन्न झाला आहे. हिट्लरनें आपल्या सद्धेतूंचा पाढा पुन्हां अलीकडे वाचला आहे, पण त्यानें जगांत कोणीहि फसणें शक्य नाहीं. त्यानें जगावर आपत्ति आणली आहे. तिची जाणीव पूर्णपणानें आतां सर्वांस झाली आहे. मि. चर्चिल आणि प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्या नेतृत्वाखाली हिटलरशाही नष्ट होण्याची इच्छा लहान-मोठ्या सर्व राष्ट्रांस आहे. जर्मनी, इटली व जपान ह्यांच्या त्रिकुटाचे जगाच्या विजयाचे बेत हाणून पाडण्यांत माणुसकी, स्वातंत्र्य व संस्कृति ह्यांच्या संरक्षणाचें बीज आहे हें आतां सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट झालें आहे. ह्या दृष्टीनें पहातां मि. चर्चिल ह्यांचें भाषण उत्तेजनकारक व स्फूर्तिदायक आहे असें म्हटलें पाहिजे.

---

## युद्धाची आर्थिक बाजू

बेळगाव येथील वसंत व्याख्यानमालेंत गेल्या शनिवारीं प्रो. काळे ह्यांनीं युद्धाची आर्थिक बैठक ह्या विषयावर व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं प्रथम मागचें महायुद्ध आणि चालू जागतिक युद्ध ह्यांचेमध्यें ठळक भेद कोणते आहेत त्यांचें दिग्दर्शन करून युद्धांत पडलेल्या राष्ट्रांत आर्थिक स्वरूपाचे अत्यंत अवघड व गुंतागुंतीचे प्रश्न कसे सोडवावे लागत आहेत, ह्याचें सुबोध विवेचन केलें. इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या युद्धखर्चाचे आकडे एवढे प्रचंड आहेत कीं, हिन्दी लोकांस त्यांचें आकलन केवळ कल्पनेनेंच होण्यासारखें आहे. अमेरिकेचा चालू वर्षांतला युद्धखर्च सुमारें सात हजार कोटि रुपये होईल असा अंदाज प्रसिद्ध झाला असून ब्रिटिश सरकारास जवळ जवळ तेवढीच रकम खर्चावी लागेल. इंग्लंडमध्यें सरकारनें लोकांवर जबर कर बसवले असले तरी त्यांचे मार्गानें जमा होणारा पैसा एकूण होणाऱ्या खर्चाच्या एक-तृतीयांश इतकाहि भरणार नाहीं असें सांगून प्रो. काळे ह्यांनीं त्या सरकारनें जनतेच्या बचतीमधून जरूर तो पैसा जमवण्याची कशी व्यवस्था केली आहे ह्याचें वर्णन केलें. देशांत खेळणाऱ्या चलनाचें नियंत्रण करून पदार्थांच्या किंमती स्थिर राखण्याची व्यवस्था, जनतेनें खाण्यापिण्याचे व इतर जिन्नस उपयोगांत आणावयाचे त्यांचें प्रमाण निश्चित करून शिलकी रहाणारी प्राप्ती सार्वजनिक कर्जांत ओढून घेण्याची योजना आणि अमेरिकन हुंडणावळीचा दर कह्यांत ठेवण्यासाठी करण्यांत आलेली तजवीज ह्यांची माहिती व्याख्यात्यांनीं दिली आणि मागील महायुद्धांत आलेल्या कटु अनुभवावरून योग्य बोध कसा घेण्यांत येत आहे ह्याची स्पष्ट कल्पना श्रोत्यांस करून दिली. युद्धसामुग्रीचा भरपूर पुरवठा चालू रहावा म्हणून आयात–निर्गत व्यापाराचें चाललेलें नियंत्रण आणि त्यांतून उद्भवणारे प्रश्न ह्यांचें दिग्दर्शन करून प्रो. काळे ह्यांनीं हिंदी चलनाच्या युद्धकाळांतील परिस्थितीची माहिती दिली. इंग्लंडला अमेरिकेचें देणें युद्धसामुग्रीच्या पुरवठ्यामुळें होत आहे त्याच्या फेडीची तजवीज करण्यांत आली आहे तिची रूपरेखा पुढें मांडून हिंदुस्थानच्या इंग्लंडमधील कर्जाची अदलाबदल अलीकडे झाली आहे तिचें रहस्य त्यांनीं समजावून सांगितलें. युद्धपरिस्थितीमुळें उद्योगधंद्यांची इंग्लंडमध्यें व ह्या देशांतहि नवी घडी बसत आहे ही गोष्ट युद्धोत्तर काळांतहि अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे असें सांगून प्रस्तुत युद्धांत इंग्लंड व अमेरिका ह्यांचें संयुक्त आर्थिक बळ कसें प्रभावी ठरणार आहे ह्याचें रहस्य व्याख्यात्यांनीं स्पष्ट केलें. चलन, हुंडणावळ, सरकारी जमाखर्च, सार्वजनिक कर्जें, आयात–निर्गत व्यापार, युद्धसामुग्रीचें उत्पादन व पुरवठा, बाजारभाव इत्यादि बाबींचें योजनात्मक नियंत्रण करण्यांत ब्रिटिश सरकारनें अत्यंत सावधगिरीचें धोरण अंगिकारलें असल्यानें युद्ध जिंकण्याची सर्वांगीण तयारी आर्थिक दृष्टीनें पायाशुद्ध कशी झाली आहे ह्याची स्थूल कल्पना श्रोत्यांस येण्यास त्यांच्या व्याख्यानानें मदत केली.

---

## ब्रिटिश विमानदलाचें वाढतें बळ

निरनिराळ्या क्षेत्रांत सध्या लढाया चालू आहेत, त्यांचें सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण केलें असतां ब्रिटिश विमानदलाचें सारखें वाढत असलेलें बळ नजरेंत भरतें. प्रस्तुत युद्धाची तयारी हिटलरनें अनेक वर्षें पद्धतशीर रीतीनें केली असल्यानें जर्मनीचें विमान दल प्रारंभीं फार मोठें होतें आणि त्या मानानें ब्रिटिश विमानांची संख्या अपुरी होती. ग्रेटब्रिटननें आपलें विमानांचें उत्पादन हळुहळु वाढवण्याचा उपक्रम केला आणि अमेरिकन विमानांची भर त्यांच्या पुरवठ्यांत पडत आहे. ह्या कारणानें जर्मन विमानांचें संख्याधिक्य कमी होऊन ब्रिटिश विमानदल शत्रूची आतां बरोबरी करण्याच्या परिस्थितीस येऊन पोहोचलें आहे. एवढेंच नव्हे तर अमेरिकेकडून इंग्लंडला मिळणारीं लढाऊ विमानें सुधारलेल्या घाटाचीं व प्रचंड शक्तीचीं आहेत. त्यांच्या पराक्रमाची साक्ष ब्रिटिश विमानदलानें अलीकडे जर्मनीचीं बंदरें व औद्योगिक शहरें ह्यांजवर भयंकर हल्ले चढवून तेथें विस्तृत नाश केला आहे त्यावरून सहज पटण्यासारखी आहे. ब्रिटिश विमानदलाची वाखाणण्याजोगी कामगिरी भिन्न भिन्न व दूरदूरच्या रणक्षेत्रांमध्यें चालली आहे. भूमध्यसमुद्र, उत्तर आफ्रिका, इराक, इत्यादि ठिकाणीं त्यानें केलेला पराक्रम आतां प्रसिद्धच आहे. ह्याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे जर्मन बंदरें व व्यापारी शहरें ह्यांचेवर ब्रिटिश विमानांचे दररोज चाललेले प्रचंड हल्ले ही होय. जर्मनीस त्यांचें वाढतें बळ जाणवूं लागलें आहे ह्याचा पुरावा अलीकडील युद्धाच्या बातम्यांवरून स्पष्ट मिळत आहे.

# मुंबई प्रांतांतील वाचनालयांची वाढ व सुधारणा

लेखकः—श्री. र. श. पारखी

राष्ट्राची संस्कृति टिकविण्यास व बहुजनसमाजाची शैक्षणिक सुधारणा करण्यास वाचनालयांचा किती महत्त्वाचा उपयोग होतो, हें अर्वाचीन पाश्चिमात्य राष्ट्रांच्या प्रगतीचें बारीक निरीक्षण केल्यानें सहज समजून येण्याजोगें आहे. मनुष्याला आपलें जीवित सुखावह करण्यास ज्ञानप्राप्तीसारखें दुसरें साधन नाहीं व तें ज्ञान वाचनालयांच्या मदतीविना प्राप्त होणें शक्य नाहीं. निरनिराळ्या शास्त्रांचे शोध, विविध धंद्यांची सांगोपांग माहिती, मनुष्याच्या जीवनाला पोषक अशा ज्ञानाचा संग्रह, अशी अनेकविध माहिती वाचनालयांतील विविध ग्रंथांतून ग्रथित केलेली असते. ती माहिती जनतेस सुलभ रीतीनें प्राप्त व्हावी म्हणून वाचनालयांचा प्रसार सर्वांत मोठ्या शहरापासून अगदीं लहान खेड्यापर्यंत व्हावयास पाहिजे आणि याचकरितां ह्या इलाख्यांतील वाचनालयांची वाढ व सुधारणा व्हावी म्हणून ह्या प्रश्नाचा सखोल विचार करून एक योजना तयार करण्याकरितां मुंबई सरकारनें पुढील विद्वान् व अनुभविक सद्गृहस्थांचें एक मंडळ नेमलें होतें:—

मुंबईच्या सरकारी लॉ कॉलेजचे प्रिन्सिपॉल बॅरिस्टर फैजी, मुंबई युनिव्हर्सिटीचे लायब्रेरियन डॉ. जोशी, बॉंबे ब्रँच रॉयल एशियाटिक सोसायटीचे लायब्रेरियन श्री. कापडी, व मुंबई सरकारी लॉ कॉलेजचे रजिस्ट्रार श्री. कर्वे.

या मंडळानें इलाख्यांतील प्रमुख वाचनालयांची पाहणी करून, १,८०० व्यक्तींना व संस्थांना प्रश्नपत्रिका पाठवून व स्थानिक पुढाऱ्यांबरोबर विचारविनिमय करून पाश्चिमात्य वाचनालयांच्या चळवळीच्या धर्तीवर एक उत्कृष्ट योजना तयार केली आहे व त्या योजनेचा अहवाल सरकारनें नुकताच प्रसिद्ध केला आहे.

प्रथमतः मुंबई शहरांत एक मध्यवर्ती वाचनालय व महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक या विभागांकरितां पुणें, अहमदाबाद व धारवाड या शहरांतून प्रांतीय वाचनालयें स्थापन केलीं पाहिजेत. हीं वाचनालयें स्वतंत्र रीतीनें स्थापावयाचीं झाल्यास सरकारला बराच खर्च येईल व ही महत्त्वाची बाब अशक्य कोटींतील होऊं नये म्हणून मंडळानें मुंबईतील बॉंबे ब्रँच रॉयल एशियाटिक सोसायटीचें वाचनालय हें मध्यवर्ती वाचनालय करावें व पुण्यांतील नगर वाचन मंदिर, अहमदाबाद मधील शेठ माणेकलाल जेठाभाई म्युनिसिपल वाचनालय, व धारवाडमधील विद्यावर्धक संघाचें वाचनालय हीं प्रादेशिक वाचनालयें करावींत अशी शिफारस केली आहे.

## प्रगतीचे सहा टप्पे

वाचनालयांचा प्रसार प्रांतांत सर्वत्र योग्य कालावधींत होण्यास मंडळानें सहा टप्पे योजिले आहेत.

पहिला टप्पा:—

एक मध्यवर्ती वाचनालय व तीन प्रांतीय वाचनालयें. मध्यवर्ती वाचनालयास प्रतिवर्षी ३०,००० रु. व प्रांतीय वाचनालयास प्रत्येकीं प्रतिवर्षी रु. १०,००० ग्रँट सरकारनें द्यावयाची आहे. याप्रमाणें पहिल्या टप्प्यांत सरकारला प्रतिवर्षी रु. ६०,००० खर्च करावे लागणार आहेत.

दुसरा टप्पा:—

या टप्प्यांत प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य शहरांत एक एक वाचनालय असलें पाहिजे. ह्या इलाख्यांत एकंदर २० जिल्हे आहेत. पैकीं मुंबई शहर व मुंबई सबर्बन हे दोन जिल्हे समजले जातात. त्यांत वाचनालयांचा प्रसार करण्याची जबाबदारी मुंबई कॉर्पोरेशननें घ्यावी अशी शिफारस मंडळानें केली आहे. अहमदाबाद, पुणें व धारवाड या शहरांतून प्रांतीय वाचनालयें पहिल्या टप्प्यांत स्थापावयाचीं आहेतच. म्हणून अखेरीस पांच जिल्हे वजा जातां १५ जिल्हे राहतात. ह्या प्रत्येक जिल्ह्याच्या वाचनालयाला प्रतिवर्षी रु. ३,००० सरकारी ग्रँट मिळावी अशी शिफारस मंडळानें केलेली आहे. ह्या टप्प्यांत मध्यवर्ती वाचनालय व प्रांतीय वाचनालयें यांची जबाबदारी बरीच वाढेल व त्या मानानें त्यांचा खर्चहि वाढेल. तसेंच महाराष्ट्राचें केंद्र पुणें शहर येथील प्रांतीय वाचनालयावर इतरांपेक्षां जास्त जबाबदारी पडेल; कारण इलाख्यांतील मुंबई शहर व मुंबई सबर्बन हे दोन जिल्हे सोडून बाकीच्या १८ जिल्ह्यांपैकीं महाराष्ट्राचे १० जिल्हे आहेत; आणि गुजराथी व कानडी भाषांपेक्षां मराठी भाषेंत प्रतिवर्षी बरेंच जास्त प्रमाणांत वाङ्मय प्रसिद्ध होत आहे. ह्या सर्व बाबींचा विचार करून मंडळानें दुसऱ्या टप्प्यांत सरकारी ग्रँट पुढीलप्रमाणें देण्यांत यावी अशी शिफारस केली आहे.

| | | |
|---|---|---|
| मध्यवर्ती वाचनालय | | ४०,००० रु. |
| २ प्रांतीय वाचनालयें ( अहमदाबाद व धारवाड) प्रत्येकीं | १५,००० रु. | ३०,००० रु. |
| १ प्रांतीय वाचनालय ( पुणें ) | | २०,००० रु. |
| १५ जिल्हा वाचनालयें, प्रत्येकीं | ३,००० रु. | ४५,००० रु. |
| | एकूण | १,३५,००० रु. |

तिसरा टप्पा:—

ह्या टप्प्यांत प्रत्येक तालुक्याला अथवा पेट्याला एक-एक वाचनालय असलें पाहिजे. ह्या इलाख्यांत एकंदर १८५ तालुके आहेत. त्यांपैकीं १८ तालुक्यांना दुसऱ्या टप्प्यांत वाचनालयांची योजना झालेली असल्यामुळें, आतां बाकीच्या १६७ तालुक्यांचा विचार करावयाचा आहे. प्रत्येक तालुका वाचनालयाला प्रतिवर्षी ५०० रु. ग्रँट सरकारनें द्यावी अशी शिफारस मंडळानें केली आहे. तालुका गांवांशिवाय त्या गांवांएवढीच सवंध इलाख्यांत इतर १०० गांवें आहेत. त्या गांवीं सुद्धा अशीं वाचनालयें स्थापावयास पाहिजेत; व त्यांना सुद्धा प्रतिवर्षी रु. ५०० ग्रँट मिळाली पाहिजे. शिवाय ह्या योजनेप्रमाणें मोठाल्या वाचनालयांवरील जबाबदारी वाचनालयांच्या प्रसाराबरोबर वाढत जाणार म्हणून त्यांची ग्रँट सुद्धा ह्या टप्प्यांत वाढवावी लागणार. वरील सर्व बाबींचा विचार करून मंडळानें ह्या टप्प्यांत सरकारी ग्रँटची पुढीलप्रमाणें शिफारस केली आहे:—

| | |
|---|---|
| मध्यवर्ती वाचनालय | रु. ६०,००० |
| २ प्रांतीय वाचनालयें ( अहमदाबाद व धारवाड ) | रु. ३६,००० |
| १ प्रांतीय वाचनालय ( पुणें ) | रु. २४,००० |
| १५ जिल्हा वाचनालयें ( प्रत्येकीं रु. ४,५०० ) | रु. ६७,५०० |
| १६७ तालुका वाचनालयें (प्रत्येकीं रु. ५००) | रु. ८३,५०० |
| १०० तालुका गांवांएवढ्याच इतर गांवांचीं वाचनालयें ( प्रत्येकीं रु. ५०० ) | रु. ५०,००० |
| एकूण | रु. ३,२१,००० |

चौथा टप्पा:—

ह्या टप्प्यांत २,००० पासून ५,००० पर्यंत लोकवस्ति असलेल्या प्रत्येक खेडेगांवांत वाचनालय स्थापावयाचें आहे. अशीं ९७९ खेडेगांवें ह्या प्रांतांत आहेत. अशा खेडेगांवांतील प्रत्येक वाचनालयाला रु. १०० सरकारी ग्रँट मिळावी अशी शिफारस मंडळानें केलेली आहे. ह्या टप्प्यांत तालुका वाचनालयांची जबाबदारी वाढणार; परंतु तिसऱ्या टप्प्यांत निवेदन केलेल्या इतर १०० गांवांच्या वाचनालयांची जबाबदारी तशी वाढणार नाहीं.

म्हणून ह्या टप्प्यांतील सरकारी ग्रँटची योजना पुढीलप्रमाणें केलेली आहे:—

| | |
|---|---|
| मध्यवर्ती वाचनालय | रु. ६०,००० |
| २ प्रांतिक वाचनालयें (अहमदाबाद व धारवाड) (वाढ नाहीं) प्रत्येकीं रु. २०,००० प्रमाणें | रु. ४०,००० |
| १ प्रांतिक वाचनालय ( पुणें ) | रु. २५,००० |
| १५ जिल्हा वाचनालयें, प्रत्येकीं रु. ५,००० प्र. | रु. ७५,००० |
| १०० तालुका गांवांएवढीच असलेल्या गांवांचीं वाचनालयें, प्रत्येकीं रु. ५०० प्रमाणें | रु. ५०,००० |
| १६७ तालुका अथवा पेठा वाचनालयें, प्रत्येकीं रु. ८०० प्रमाणें | रु. १,३३,४०० |
| ९७९ मोठ्या खेड्यांचीं वाचनालयें, प्रत्येकीं रु. १०० प्रमाणें | रु. ९७,१०० |
| एकूण | रु. ४,८१,५०० |

पांचवा टप्पा:—

ह्या टप्प्यांत १,००० ते २,००० लोकवस्तीच्या खेड्यांत वाचनालयें स्थापावयाचीं आहेत. अशीं खेडीं इलाख्यांत २,६९६ आहेत, त्यांना प्रत्येकाला वाचनालयांकरितां सरकारी ग्रँट रु. ५० मिळावी अशी शिफारस मंडळानें केली आहे.

ह्या टप्प्यांत सरकारला पुढीलप्रमाणें खर्च येईल.—

| | |
|---|---|
| मध्यवर्ती वाचनालय | रु. ६०,००० (वाढ नाहीं) |
| ३ प्रांतिक वाचनालयें | रु. ६५,००० (वाढ नाहीं) |
| १५ जिल्हा वाचनालयें, प्रत्येकीं रु. ६,००० प्रमाणें | रु. ९०,००० |
| १६७ तालुका वाचनालयें, प्रत्येकीं रु. १,००० प्रमाणें | रु. १,६७,००० |
| १०० तालुका गांवांएवढीच असलेल्या गांवांचीं वाचनालयें, प्रत्येकीं रु. ५०० प्रमाणें | रु. ५०,००० |
| ९७९ खेड्यांचीं वाचनालयें, प्रत्येकीं रु. १२५ प्रमाणें | रु. १,२२,३७५ |
| २,६९६ खेड्यांचीं वाचनालयें, प्रत्येकीं रु. ५० प्रमाणें | रु. १,३४,८०० |
| एकूण | रु. ६,८९,१७५ |

सहावा टप्पाः —

ह्या टप्प्यांत राहिलेल्या १,००० हून कमी लोकवस्ति असलेल्या १,७७,७४३ खेड्यांतून वाचनालयें स्थापावयाचीं आहेत. अशा खेड्यांतील वाचनालयांना प्रत्येकीं प्रतिवर्षी रु. २५ सरकारी ग्रँट द्यावयाची आहे. म्हणून सरकारला ह्या टप्प्यांत पुढीलप्रमाणें खर्च येईल:—

| | | |
|---|---|---|
| मध्यवर्ती वाचनालय... | रु. ६०,००० | (वाढ नाहीं) |
| ३ प्रांतिक वाचनालयें | रु. ६५,००० | („) |
| १५ जिल्हा „ | रु. ९०,००० | („) |
| १६७ तालुका „ | रु. १,६७,००० | („) |
| १०० तालुका गांवांएवढ्याच गांवांची वाचनालयें | रु. ५०,००० | („) |
| ९७९ खेड्यांचीं वाचनालयें (२०००-५०००) प्रत्येकीं रु. १५० प्रमाणें | रु. १,४६,८५० | |
| २,६९६ खेड्यांची वाचनालयें (१,०००-२०००) रु. १०० प्रमाणें | रु. २,६९,६०० | |
| १७,७४३ खेड्यांचीं वाचनालयें (१,०००हून कमी लोकवस्ति) प्रत्येकीं रु. २५ प्रमाणें | रु. ४,४३,५७५ | |
| एकूण | रु. १२,९२,०२५ | |

### श्री. गणपुले ह्यांस बडोदें सरकारची मदत

बडोदे सरकारनें श्री. पी. वी. गणपुले ह्यांस बडोदें येथें चिनीमातीच्या भांड्यांचा कारखाना काढण्याकरितां ५० हजार रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. पहिल्या दोन वर्षांत कर्जावर व्याज आकारलें जाणार नाहीं. १२ वर्षांत कर्जाची परतफेड करावयाची आहे. फाइली व बूट ह्यांच्या लेसेस तयार करण्याचा कारखाना काढण्याकरितां बडोदें सरकारनें दुसऱ्या एकास ५ हजार रुपये मंजूर केले आहेत.

**L. S. G. D.** Class at Poona has begun its work from 5th May, 1941. Admission available upto 15th May, 1941. Please apply for prospectus (free) to the following address—.

**Hon. Secretary & Treasurers,**

410, Shanwar Peth,

POONA 2

## जबाबदारी मर्यादित परंतु "लिमिटेड" शब्द नाहीं

### कंपनी कायद्यामधील तरतूद

मर्यादित जबाबदारीचे तत्वावर शेअर भांडवल उभारून, कंपनी स्थापन केली, म्हणजे तिच्या नांवाचे अखेर "लिमिटेड" हा शब्द आलाच पाहिजे, असा कंपनी कायदा आहे. परंतु कांहीं विशिष्ट बाबतींत अपवाद सांगितलेला आहे. व्यापार, कला, शास्त्रें, धर्म, इत्यादींच्या संवर्धनार्थ एकादि संस्था नियामित जबाबदारीचे तत्त्वावर स्थापन होत असेल व तिला होणारा नफा व उत्पन्न ह्यांचा विनियोग ती संस्था वरील उद्देशांकडेच करणार असेल आणि आपल्या भागीदारांस डिव्हिडंड मिळणार नाहीं, असा तिनें नियम केला असेल, तर प्रांतिक सरकार त्या संस्थेस "लिमिटेड" हा शब्द आपल्या नांवापुढें न लावण्यास परवानगी देऊं शकतें. अशी संस्था "लिमिटेड" ह्या अन्त्य शब्दाविना नोंदण्यांत येते. हा परवाना देण्याचे वेळीं प्रांतिक सरकारास अशा संस्थांवर कांहीं निर्बंध व अटी घालण्याचा अधिकार आहे. हे निर्बंध व अटी संस्थेवर बंधनकारक रहातात व प्रांतिक सरकारनें तसें सांगितल्यास, त्यांचा अंतर्भाव मेमोरँडम व आर्टिकल्समध्येंहि संस्थेला करावा लागतो. अशा रीतीनें संस्था नोंदण्यांत आली, म्हणजे लिमिटेड कंपनीस मिळणाऱ्या सर्व सवलती तिला मिळतात व लिमिटेड कंपनीचीं बंधनेंहि तिचेवर येतात. हा परवाना सरकारास केव्हांहि रद्द करतां येतो. तो रद्द झाला, म्हणजे संस्थेच्या नांवास "लिमिटेड" हा शब्द जोडावा लागतो. परवाना रद्द करण्यापूर्वी सरकार आपला हेतु संस्थेस कळवितें व संस्थेस आपलें म्हणणें मांडण्यास संधि देतें. हा परवाना रद्द झाला, कीं संस्था लिमिटेड कंपनीचे सदरांत येते.

"दि चित्पावन उद्योग प्रवर्तक मंडळ" या नांवाचें मर्यादित जबाबदारीचें परंतु नांवामध्यें "लिमिटेड" असे शब्द नसलेलें, नवीन स्थापन होणारें मंडळ नोंदण्यांत यावें म्हणून दि इंडियन कंपनीज् ॲक्ट, १९१३, चें कलम २६ प्रमाणें परवाना मिळणेचा अर्ज सरकारकडे आलेला आहे.

ज्या उद्देशासाठीं मंडळ स्थापन केलें जात आहे त्यापैकीं मुख्य उद्देश खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:—

(१) व्यापारविषयक धंदे, घरगुती धंदे व शेती व फळबाग यांसुद्धां खेडेगांवचे धंदे स्थापन करणें, त्यांची जोपासना करणें, त्यांना उत्तेजन देणें, सदरचे धंदे वाढविणें व त्यांना मदत करणें.

(२) चालू असलेल्या अगर नवीन अशा कोणत्याहि व्यापारविषयक धंद्यास व कारखान्यास, सिंडिकेटमार्फत अगर अन्य तऱ्हेनें पैशाचे दृष्टीनें मदत करणें, त्यांस भांडवल देणें व उत्तेजन देणें व अशा प्रकारचे धंदे व कारखानें स्थापन करणें व स्थापन करण्याचे कामीं व भांडवल देणेंचे कामीं मदत करणें.

(३) चित्पावन ज्ञातीसाठीं वाचनालयें, ग्रंथालयें, सभागृहें अगर चित्पावन ज्ञातीच्या फायद्यासाठीं अशाच स्वरूपाच्या इतर सोयी करणें.

जो कोणी इसम, कंपनी, फर्म अगर कॉर्पोरेशन यांस सदरचे अर्जास हरकती घ्यावयाच्या असतील त्यानें आपल्या हरकती सेक्रेटरी टू गव्हर्मेंट, फिनॅन्स डिपार्टमेंट, सेक्रेटॅरिएट, मुंबई यांचेकडे पत्रानें ता. ७ जून इ. सन १९४१ रोजीं अगर त्यापूर्वी कळवाव्यात, असें जाहीर करण्यांत आलें आहे.


**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**औषधाशिवाय रोगमुक्त व्हा !**

**आरोग्य चिकित्सा शिक्षक**—डॉक्टर, वैद्यांच्या औषधाला कंटाळलेले रोगी निसर्गसिद्ध सुलभ उपायांनीं सहज बरें करून आरोग्याचा अखण्ड सुखोपभोग घ्या ! पैसा वांचवा ! किं. १॥ रु.

**लंघन-चिकित्सा शिक्षक**—प्लेग, कॉलरा, व इतर हट्टी रोग औषधाशिवाय फक्त लंघनें करून रोगमुक्त व्हा ! वज्रदेही बना ! नवी तिसरी आवृत्ति. किं. १॥ रु. ट. ह. शिवाय. यादी फुकट. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

**मधुमेहावरील औषध**




**तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७**

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

**K. K. & Co.**

**Photographic Dealers**

POONA.

**कोरोना पोर्टेबल विकणें आहे.**

कोरोना पोर्टेबल टाइपरायटर उत्तम स्थितींतला खासगी कामासाठीं वापरलेला, विकणें आहे.

"क्ष" C/o अर्थ.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११०–१५ |
| ४% १९४३ | १०४–५ |
| ३½% विनमुदत | ९५—२ |
| ३½% १९४७–५० | १०२—७ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९४—४ |
| २¾% १९४८–५२ | ९७—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १३९—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४१–१० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५५०—० |
| धांचे मॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०२—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| चौंचे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% | १२९—८ |
| कराची ( १०० ) ९% | २१५—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २२५–१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १५३७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १८०२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४— ४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% | ५८—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८७१—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६४५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २०१—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४४—० |
| शिंया स्टीम ( १५ ) १ रु. | १९—० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ४२—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३९२०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१४—६ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४६—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३६०—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १७३०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १३६—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२–१–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६२-१०-६ |


**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.

२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.

३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

*   *   *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.

२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

**अवर होम,**

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

### हिंदी साखरेचें उत्पादन

हिंदी साखर कारखान्यांत १९४०-४१ मध्यें एकूण १० लक्ष टन साखरेचें उत्पादन होईल, अशी अपेक्षा आहे. १९३०-४० सालीं १२ लक्ष टन साखर तयार झाली होती. संयुक्त प्रांत व बिहार येथें उत्पादनांत घट दिसते; मद्रास व मुंबई प्रांतांत उत्पादन वाढलें आहे. संयुक्त प्रांत व बिहार हे प्रांत वगळून बाकीच्या प्रांतांतील उत्पादन सुमारें ३ लक्ष टन म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा ४० हजार टन अधिक भरेल. १९३९-४० मध्यें ह्या दोन प्रांतांत १० लक्ष टन साखर तयार झाली. परंतु त्यास मागणी पुरेशी नव्हती. १९४०-४१ च्या मोसमाचे प्रारंभीं साखरेचा मोठा साठा शिल्लक होता. १९४०-४१ मध्यें साखरेचें उत्पादन पूर्ववत चालू राहिलें असतें, तर कठिण परिस्थिति निर्माण झाली असती. त्या प्रांतांच्या सरकारांनीं शुगर फॅक्टरीज कंट्रोल ॲक्टाखालीं साखरेचें उत्पादन नियंत्रित करण्याचें धोरण अवलंबिलें. प्रत्येक कारखान्यानें किती साखर तयार करावयाची, हें सरकारांनीं ठरवून दिलें. १९४०-४१ चे आरंभीं ३½ ते ४ लक्ष टन साखर कोठारांत शिल्लक होती; हा साठा ४ लाख टनांवर जाऊं नये ह्या बेतानें उत्पादनाचें नियंत्रण करण्यांत आलें. अशा तऱ्हेचें धंद्याचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याचें हिंदुस्थानांत हें पहिलेंच उदाहरण आहे. जे कारखाने सरकारनें ठरवून दिलेल्यापेक्षा अधिक प्रमाणांत ऊंस गाळतील, त्यास जबर दंड करण्याचा बिहार व संयुक्त प्रांत सरकारांना अधिकार आहे. बिहारनें ४ लक्ष, ८५ हजार टन व संयुक्त प्रांतानें २ लक्ष, ३५ हजार टन साखर तयार करावी, ह्या योजनेस अनुसरून वैयक्तिक कारखान्यांचें कमाल उत्पादन निश्चित करण्यांत आलें. तथापि, कांहीं कारखाने मिळालेल्या परवान्याइतका ऊंस गाळणारहि नाहींत. बिहारमध्यें ४ लक्ष, ८३ हजार टन व संयुक्त प्रांतांत २ लक्ष, ३२ हजार टन साखर तयार होण्याचा रंग दिसतो. मुंबई व बंगाल ह्या प्रांतांखेरीज बाकी सर्व प्रांतांत साखरेचा उतारा चांगला पडेल.

### आगकाड्यांत बचत

ग्रेट ब्रिटनमध्यें दरसाल १२५ अब्ज आगकाड्या ओढल्या जातात, त्यांस लागणाऱ्या लाकडांत बचत कशी करावी, ह्यासंबंधीं अनेक सूचना करण्यांत आल्या आहेत. सिगारेटचें टोक घासलें असतां त्या पेटाव्यात अशी सुधारणा; कॉंक्रिटच्या आगकाड्या, दोन्हीं बाजूंस गूल असणाऱ्या काड्या, नेहमींच्या निम्म्या लांबीच्या आगकाड्या, पातळ आगकाड्या, इत्यादि सुधारणा त्यांत सुचविलेल्या आहेत.


या नव्या शोधानें सर्व जगभर खळबळ उडवून दिली आहे.

# दहा हजार रुपये अगदी फुकट.

**अमृतसरमध्यें २॥ रु. तोळा सोनें**

मिनर्व्हा गोल्डची घरोघर प्रशंसा ! मिनर्व्हा गोल्ड हा नकली सोन्याचा अगदी नवा शास्त्रीय आविष्कार होय. त्यानें केवळ वैज्ञानिकांनाच आश्चर्यानें थक्क करून सोडलें एवढेंच नव्हे, तर सर्वसाधारण लोकांची एक अत्यंत मोठी उणीव भरून काढली आहे. सर्व स्त्रिया त्याच्या दागिन्यांवर बेहद्द खूष होतात. ज्या घरांत हें सोनें एकदां शिरलें तेथून दोनदोनदा तीनतीनदा त्यांस मागण्या येत आहेत.

मेहेरबान लाला विथारतनसाहेब, म्युनिसिपल कमिशनर, पठानकोटाहून २५ आक्टोबरला लिहितात—"काल आपल्या सोन्याचें पार्सल मिळालें; धन्यवाद ! आपण हा नवीन पदार्थ तयार करून जगाची एक मोठीच उणीव भरून काढली आहेत. उलट टपालीं आणखी तीन तोळे सोनें पाठवावें."

याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रें उदाहरणार्थ रियासत, कॉंग्रेस, स्वस्तिक, अलामान, जमीनदार, गुरुघंटाल प्रताप, इत्यादींनीं प्रशंसोद्गार खुषीनें छापले आहेत.

हें सोनें कसास लावलें तर अस्सल सोन्याचाच रंग दाखवतें आणि अस्सल सोन्याप्रमाणेंच ठोकलें व गाळलें जातें. याचे हरएक प्रकारचे दागिने बनवता येतात. नापसंत पडल्यास किंमत परत मिळण्याची गॅरंटी आहे; खास प्रसारासाठीं किंमत १ तोळयास २॥ रु.; ३ तोळयास ७ रु.; ६ तोळयास १३ रु.; व ४० तोळयास ८० रु.

**मिनर्व्हा गोल्डचे बनवलेले दागिने**

मिनर्व्हा गोल्डच्या बनवलेल्या बांगड्या दर जोडीला २ रु.; कानांतील सोन्याचे डूल दर जोडीला ३ रु.; खड्याची अंगठी ३ रु.; साधी मुंबई फॅशनची अंगठी २ रु.; जाळीच्या बांगड्या दर जोडीला ५ रु.; (नेकलेस) माळ १२ रु.; लॉकेट ६ रु.; दस्तबंद दर जोडीला १४ रु.

माल पसंत पडला नाहीं तर परतबोलीची खात्री. पोस्टाचा खर्च फक्त ८ आणे पडतो.

या गोष्टी खोट्या ठरवून देणारास दहा हजार रुपये फुकट दिले जातील. याशिवाय दर तीन तोळे सोनें खरेदी करणारास टिकाऊपणा व सौंदर्य याची १० वर्षे गॅरंटी असलेलें एक फॅन्सी रिस्टवॉच फुकट दिलें जाईल; गॅरंटीचा कागद प्रत्येक घड्याळाबरोबर धाडला जातो.

मिळण्याचा पत्ता—मॅनेजर अमेरिकन मिनर्व्हा गोल्ड हाऊस, (A. P.) K. C. अमृतसर.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अतिस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

## दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तन्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

**Prop. M. V. Risbud, B. A.**
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ६१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख २१ मे, १९४१ अंक २१

दक्षिण कोंकणांतील राष्ट्रीय बाण्याचें
प्रमुख साप्ताहिक
## हिंद–सेवक
संपादक—सदानंद शांताराम भांडारकर
प्रकाशक—मधुकर यशवंत भांडारकर
हिंदसेवकमध्यें दर गुरुवारीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व घडामोडींची विस्तृत माहिती मिळते.
व्यवस्थापक—' हिंद–सेवक ', मालवण, जि. रत्नागिरी.

## ग्रामोद्योग करून पैसा मिळवा.
देशी रंगारी शिक्षक—विदेशी रंग महागले ना ? मग वनस्पतीपासून रेशीम, सूत, लोकर रंगविणें व चिटें छापण्याची सोपी माहिती शिका. किं. १॥ रु.
नजरबंद शिक्षक—जादूच्या ८० चमत्कारिक खेळांची सचित्र माहिती मागवून जादूगार व्हा ! किं. १॥ रु.
बुटपालिश शिक्षक—कातड्याला लावण्याची घट्ट व पातळ निराळया रंगाची पॉलिश घरीं बनवा ! किं. ॥ ट.
ह. निराळा. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

## दोन जगें—

★ एक गरीबांचें व दुसरें श्रीमंतांचें !
एक माडासारखें उंच व दुसरें गवतासारखें लहान !

★ परमेश्वरानें निर्माण करतांना एकच जग निर्माण केलें मग त्याचीं हीं अशीं छकलें कोणी पाडलीं !

★

: भूमिका :
*मीनाक्षी, ललिता पवार, बेबी देवी,*
*बाबुराव पेंढारकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर,*
*मा. विठ्ठल आणि विनायक*

दिग्दर्शक : विनायक कथा–संवाद : खांडेकर
फोटोग्राफी : पां. नाईक

★

अमृत
नवयुगचा नवा सामाजिक बोलपट
( हिंदी व मराठी )

शनिवार ता. २४ रोजीं | मिनर्व्हा, पुणें व न्यू वेस्ट एण्ड, मुंबई

# विविध माहिती

### युद्धविषयक धोक्याचा विमा

कित्येक लोकांनीं आपल्या मालाचा युद्धविषयक धोक्याचा विमा उतरविला आहे, परंतु मालाच्या सऱ्या किंमतीपेक्षा कमी किंमतीची पॉलिसी घेतलेली आहे. मागील काळाबद्दल, मागून हप्ता भरला तरी त्याच मालाचा जादा रकमेचा विमा उतरण्यांत येणार नाहीं, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

### विक्रम संवतचा द्विदशसांवत्सारिक उत्सव

राजा विक्रमादित्याचे नांवानें चालू असलेल्या विक्रम संवताचा द्विदश सांवत्सरिक उत्सव उज्जैन येथें मार्च, १९४३ मध्यें साजरा करण्यांत येणार आहे.

### टपालाचा नाश

१ ते १३ जानेवारीचे दरम्यानचें पश्चिमेकडे जाणारें टपाल शत्रूचे कारवाईमुळें नाश पावलें आहे, असें सरकारी रीत्या प्रसिद्ध झालें आहे.

### सीलोनचा लष्करी खर्च

सीलोन सरकारनें चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत लष्करी खात्यासाठीं ४४ लक्ष रुपयांची तरतूद केली होती. त्यांत आतां २७ लाखांची वाढ होणार आहे.

### लॉर्ड इंचकेप ह्यांची सीलोनमधील मालमत्ता

सुमारें एक वर्षापूर्वी लॉर्ड इंचकेप हे मरण पावले, त्यांनीं सीलोनमध्यें ठेवलेल्या इस्टेटीची किंमत ८लक्ष, ४०हजार रु. भरली.

### कोयनेलचा पुरवठा

कोयनेलला येत असलेल्या वाढत्या मागणीप्रमाणें पुरवठा होत नसल्याकारणानें, बंगाल सरकारनें कोयनेलचा वार्षिक पुरवठा ५० हजार पौंडांचा १ लक्ष पौंड करण्याचें ठरविलें आहे.

### पश्चिम आफ्रिकेस हिंदी कापडाचा पुरवठा

गोल्ड कोस्ट व नैगेरिया (पश्चिम आफ्रिका) इकडे कापड पाठविण्यासाठी कापड तयार मिळेल किंवा नाहीं, ह्याविषयीं चौकशी हिंदुस्थान सरकारनें बंगाल गिरणी मालक संघाकडे केली आहे.

### वायरमेनच्या परीक्षा

इलेक्ट्रिक सुपरवायझर व वायरमेन ह्यांच्या परीक्षास मुंबई, पुणें व अहमदाबाद येथें २८ जुलै रोजीं प्रारंभ होईल.

### मर्यादेबाहेर ऊंस गाळल्याबद्दल दंड

संयुक्त प्रांतांतील सऱ्हाणपूर येथील साखर कारखान्यास प्रांतिक सरकारनें ९५ हजार रुपये दंड केला आहे. ठरवून दिलेल्या मर्यादेबाहेर ऊंस गाळल्याबद्दल हा दंड करण्यांत आला आहे. दंड वसुलीसाठी कारखान्याच्या मालमत्तेवर टाच आणण्यांत आली आहे.

### बलुची लोकरीस बाजारपेठ

बलुचिस्तान मधील लोकरीस बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे.

### युद्धविषयक धोक्याच्या विम्याच्या हप्त्यांची रकम

आक्टोबर १९३० ते मार्च, १९४१ ह्या मुदतींत सबंद हिंदुस्थानांत मिळून मालाच्या युद्धविषयक धोक्याच्या हप्त्यांची वसूल रकम सुमारें ३० लक्ष, ३१ हजार रुपये भरली.

### लिमिटेड कंपन्या-ताजे उपलब्ध आकडे

ऑक्टोबर, १९४० मध्यें २ कोटि, २ लक्ष रुपये भांडवलाच्या ८६ कंपन्या नोंदल्या गेल्या, त्यांपैकी बंगालचा वांटा ८० लाखांच्या ३१ कंपन्यांचा आहे. ७३ लाखांच्या ३१ कंपन्या लिक्विडेशनमध्यें गेल्या.

### ऊंस लावण्याचें थांबत कां नाहींत ?

संयुक्त प्रांतांत उसाची लागवड फाजील झाली असली व उसाची किंमत मणास साडे चार आणे, इतकी खाली गेली असली, तरी तेथील शेतकरी उंस लावण्याचें कां बंद करीत नाहींत ? ह्या प्रश्नाचें उत्तर "स्टेट्समन"च्या एका खास बातमीदारानें दिलें आहे. तो म्हणतोः—"साडेचार आणे मण ऊंस झाला तरी शेतकऱ्यास ऊंस लावणेंच सर्वांत फायदेशीर वाटतें. विशेषतः कालव्याच्या पाण्याखाली जेथें जमिनी आहेत, तेथें दुसऱ्या कोणत्याहि स्वस्त पिकास पाणीपट्टी झेपत नाहीं. स्वाभाविकपणेंच शेतकरी ऊंसच लावतात." सरकारनें उंसाची लागवड कमी व्हावी ह्यासाठी प्रचार केला, त्याचा सुपरिणाम दिसून येत आहे.

### टायर-ट्यूब्जवर जकात

त्रावणकोर संस्थाननें आपल्या संस्थानांत तयार होणाऱ्या रबर टायर्स व ट्यूब्ज ह्यांवर १०% एक्साइज पट्टी बसविली आहे. ही पट्टी १ एप्रिल, १९४१ पासून अंमलांत येईल.

### उद्घाटन समारंभ

शिंदा स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या विजगापट्टम येथील आगबोटी बांधण्याच्या धक्काचा उद्घाटन समारंभ २१ जून रोजीं श्री. राजेंद्र प्रसाद ह्यांचे हस्तें होणार आहे.

### अलाहाबाद बँक लि.

वरील बँकेनें, १९४१ सालीं, गुंतविलेल्या रकमांवर ३९ लक्ष, ५८ हजार रुपये व्याज मिळविलें. कमिशन, डिस्कौंट, इत्यादींच्या स्वरूपांत बँकेस ६ लक्ष, ४८ हजार रुपये मिळाले. बँकेनें ठेवीदारांस १४ लक्ष, ८ हजार रुपये व्याज दिलें. बँकेच्या व्यवस्थेस खर्च २०लक्ष,५५ हजार रुपये आला. निवळ नफा ९ लक्ष, ७१ हजार रुपये उरला. भागीदारांस १२% डिव्हिडंड व ६% बोनस मिळालें. बँकेचें भांडवल ३५½ लक्ष रुपये असून रिझर्व्ह फंड ५४ लक्ष रुपयांचा आहे. ठेवी १२ कोटि, ३६ लाखांच्या आहेत. दिलेल्या कर्जाचें एकूण ठेवींशीं प्रमाण ४५% पडतें; म्हणजे बँकेनें एकूण ५ लक्ष, ५८ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. बँकेजवळील ४ कोटि, ९१ लक्ष रुपयांच्या रोख्यांपैकीं ९१% रोखे हिंदुस्थान सरकारचे आहेत.

### विमा कायद्याखालील नियमांत सरकारनें सुचविलेली दुरुस्ती

विमा कंपनीच्या बोर्डावर निवडून येण्यास सध्या २ हजारांचा विमा डायरेक्टरानें उतरलेला असावा लागतो, तो ह्या पुढें ३ हजारांचा विमा करण्यांत यावयाचा आहे. ५ वर्षांपेक्षा जुन्या कंपन्यांचे बाबतींत हा नियम लागू केला जाईल. प्रॉव्हिडंट फंड सोसायट्यांच्या(?) बाबतींत किमान मर्यादा ५०० रुपयांची आहे.

### मद्रास शेतकरी कर्जनिवारण कायदा

मद्रास ॲग्रिकल्चरिस्ट्स डेट रिलीफ ॲक्ट अंमलांत आला त्यास मार्च, १९४१ अखेर ३७ महिने पुरे झाले. ह्या मुदतींत एकूण ६ कोटि, ८ लक्ष रुपयांचा हितसंबंध असलेल्या १ लक्ष, ५९ हजार बाबी वरील कायद्यास अनुसरून निकालांत काढण्यांत आल्या, त्यामुळें शेतकऱ्यांस त्यांच्या कर्जांत २ कोटि, ८७ लक्ष रुपयांची सूट मिळाली.

अनुक्रमणिका


| पृष्ठ | | पृष्ठ | |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... २४२ | ५ हवाई हल्ल्यापासून संरक्षण व प्राप्तीवरील कर | ... २४६ |
| २ हिंदी निर्गत व्यापाराचा प्रश्न | ... २४३ | ६ मच्छमारीचा धंदा | ... २४७ |
| ३ ताळेबंदांत मालाची किंमत | ... २४४ | ७ वाचनालयाची वाढ व सुधारणा | ... २४८ |
| ४ स्फुट विचार | ... २४५ | ८ ब्रिटिश रोख्यांवरील व्याज | २४८ |
| रुडोल्फ हेस—कॉमन्स सभेचें वादविवाद गृह-युद्धक्षेत्र पसरलें | | ९ निवडक बाजारभाव | २४९ |
| | | १० सहकारी संस्था | ... २५० |



# अर्थ

बुधवार, ता. २१ मे, १९४१


## हिंदी निर्गत व्यापाराचा प्रश्न

शत्रुराष्ट्रांनीं बहुतेक सर्व युरोपखंड व्यापल्यासारखें करून टाकलें आहे आणि त्यामधील देशांशीं होणारा हिंदुस्थानचा व्यापार बंद पडला आहे. अमेरिका आणि इंग्लंड व साम्राज्यांतील इतर देश ह्यांतील पेठाच कायत्या हिंदी व्यापारास खुल्या आहेत. त्यांचे बाबतींतहि समुद्रावरील नाविक वहातुकीच्या साधनांचे बाबतींत अडचणी मार्गांत येणें स्वाभाविक आहे. दुसरें असें कीं, युद्ध-परिस्थितींत लढाऊ उपयोगाच्या मालासच व्यापारांत प्राधान्य मिळणें अपरिहार्य आहे. हिंदुस्थानच्या निर्गत व्यापारांत कच्च्या मालाचाच भरणा असतो आणि त्याचा खप परदेशांत मर्यादित झाला असतां हिंदी शेतकरी वर्गाच्या प्राप्तीवर प्रतिकूल परिणाम होतो. ह्या सर्व अडचणींतून मार्ग काढून हिंदी मालाचा खप वाढवणें हें व्यापारी आणि सरकार ह्यांचें कर्तव्य होऊन बसतें. तें पार पाडलें जावें म्हणून हिंदुस्थान सरकारनें निर्गत व्यापार सल्लागार मंडळ गेल्या वर्षी नेमलें. ह्या मंडळाची सभा सिमला येथें नुकतीच भरली होती. तीमध्यें हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री, सर ए. रामस्वामी मुदलियार, ह्यांनीं सल्लागार मंडळ नेमण्यांत सरकारच्या मनांत असलेला उद्देश स्पष्ट करून सांगितला. युद्धक्षेत्राच्या विस्तारामुळें हिंदी निर्गत व्यापाराच्या मार्गांतील अडचणी वाढल्या असल्या तरी निर्माण होणाऱ्या परिस्थितींत सरकार आणि व्यापारी ह्यांनीं आपणांस शक्य आहेत त्या उपायांनीं हा प्रश्न सोडवला पाहिजे असें ते म्हणाले. त्यांनीं दोन बाबी सभेपुढें प्रामुख्यानें मांडल्या. युद्धस्थितीच्या योगानें व्यापार व देवघेव ह्यांवर बसणारें नियंत्रण स्वाभाविक व अपरिहार्य आहे ह्याची जाणीव सर्वांनीं बाळगली पाहिजे ही त्यांनीं सांगितलेली पहिली गोष्ट होय. दुसरी बाब युद्धाच्या दृष्टीनें प्रत्येकानें करावयाच्या स्वार्थत्यागाविषयींची आहे. हा स्वार्थत्याग आपखुषीचा किंवा नाइलाजानें करावा लागणारा असा असणार हें उघड आहे. हिंदुस्थानांतील व्यापारी वर्गास हा विचार पटला असल्याविषयीं सर रामस्वामी ह्यांनीं समाधान व्यक्त केलें. व्यापारावर कितीहि नियंत्रण बसलें तरी युद्धाच्या निकडीच्या गरजांच्या दृष्टीनें तें मान्य केलेंच पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. सल्लागार मंडळाच्या वतीनें बोलतांना श्री. चुनीलाल मेथा ह्यांनीं हिंदी व्यापारी वर्गास युद्धामुळें उत्पन्न झालेल्या अडचणी अवगत असून युद्धाप्रीत्यर्थ व्हावयाच्या प्रयत्नांत सरकारास त्याचा पूर्ण पाठिंबा आहे असें आश्वासन दिलें.

निर्गत व्यापारावर पुष्कळ अंशीं अवलंबून असलेला हिंदी माल म्हटला म्हणजे गळिताचीं धान्यें, कपास, ताग, इत्यादि प्रकारांचीं पिकें होत. उदाहरणार्थ, भुइमुगास परदेशीं असलेली मामुली मागणी पुष्कळच घटली असून साम्राज्य सरकार हा माल घेईल तेवढाच देशाबाहेर खपण्याची शक्यता उरली आहे. त्या सरकारनें हिंदी शेंगदाण्याचा उठाव करण्याचे संबंधांत परिमाण व किंमती ह्यांचे करार केले आहेत. ह्या व्यवहारांत हिंदी शेतकऱ्यांस चांगला भाव मिळण्याची आवश्यकता सरकारास अवगत आहे. हिंदुस्थान सरकारानें साम्राज्य सरकाराचें लक्ष ह्या गोष्टीकडे वेधलें आणि करारांत नमूद असलेले शेंगदाण्याचे भाव आणि प्रत्यक्ष बाजारांतील भाव ह्यांच्यामधील फरकाचा फायदा हिंदी शेतकऱ्यास मिळण्याची व्यवस्था व्हावी असें सुचवलें होतें ती सूचना ब्रिटिश सरकारानें मान्य केली असल्याची माहिती सर रामस्वामींनीं निर्गत व्यापार सल्लागार मंडळास दिली आहे. निर्गत व्यापारांत घट झाल्या कारणानें उद्भवलेल्या परिस्थितींत भुइमूग पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या पदरांत योग्य भाव पडावा हें सयुक्तिक आहे ही गोष्ट साम्राज्य सरकारास पटली आहे हें समाधानकारक आहे. त्या सरकारनें केलेल्या करारांतील दासल किंमती व प्रत्यक्ष बाजारभाव ह्यांतील फरका इतक्या रकमेचा फंड हिंदुस्थान सरकारच्या खात्यावर जमा केला जात आहे आणि त्याचा उपयोग, इतर रकमांची त्यांत भर पाडून, हिंदी शेतकऱ्यांच्या हितासाठी व्हावा असें ठरलें आहे. जानेवारी १२ ते एप्रिल अखेर ह्या अवधींत सुमारें १३ लक्ष रुपये ह्या फंडांत जमले आहेत. अळशीच्या पिकाचे बाबतींत असाच प्रश्न उपस्थित करण्यांत आला होता आणि हिंदुस्थान सरकारनें तो हातीं घेण्यापूर्वीच ब्रिटिश सरकारनें शेंगदाण्याप्रमाणेंच त्याचा निकाल आपण होऊन लावला आहे आणि त्या संबंधांतल्या फंडांत सुमारें २ लक्ष रुपये जमा झाले आहेत. लोकरीची निर्गत अमेरिकेंत होण्याविषयींची व्यवस्था हिंदुस्थान सरकारनें केली असल्याची आणि वीस हजार जादा गाठी पाठवण्याबद्दलची सवलत हिंदी व्यापाऱ्यांस दिली असल्याची माहिती सर रामस्वामी ह्यांनीं दिली.

सिमला येथें भरलेल्या निर्गत व्यापार सल्लागार मंडळाच्या सभेंत कित्येक प्रश्नांची चर्चा झाली त्यांमध्यें हिंदी कातड्यांच्या व्यापारा विषयींचा प्रश्न होता. दक्षिण आफ्रिकेंत हा माल खपण्यास वाव आहे, परंतु त्या देशांत आयात मालाचे बाबतींत निर्बंध घालण्यांत आले असल्यानें अडचणी उत्पन्न झाल्या आहेत असें सांगण्यांत आलें. ह्या प्रश्नाकडे सरकार लक्ष देत आहे असा खुलासा त्यावर करण्यांत आला. हिंदी मायक्यास अमेरिकेंत वाव आहे पण तेथें ब्राझिल देशाची स्पर्धा आढवी येत आहे. ह्या अडचणी लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकार स्वतःच हिंदी मायका खरेदी करून तो अमेरिकेस पाठवीत आहे अशी माहिती देण्यांत आली आहे. हिंदी बनावटीच्या विशिष्ट प्रकारांच्या मालास अमेरिकेंत चांगली मागणी असल्याचा उल्लेख मीक-ग्रेगरी रिपोर्टांत आहे. त्यास उद्देशून ह्या मालाचा वाण व प्रत ह्यांचें संरक्षण व नियंत्रण होण्याची

व्यवस्था सरकारच्या सहायानें केली जावी असें सिमल्याच्या सभेंत ठरलें. सध्याच्या अडचणीच्या परिस्थितींत हिंदुस्थान सरकारचे व्यापार मंत्री आणि त्यांचें खातें हिंदी मालाच्या निर्गतीस उत्तेजन व सहाय देण्यासाठीं करीत असल्याच्या प्रयत्नाविषयीं समाधान व्यक्त करणारा ठरावहि सभेनें मंजूर केला. हिंदुस्थानच्या कच्च्या-पक्क्या मालाच्या परराष्ट्रीय खपाचा प्रश्न युद्ध-परिस्थितीमुळें खरोखरच बिकट झाला आहे. तथापि, हिंदुस्थान सरकार व त्याचें सल्लागार मंडळ ह्यांनीं तो नेटानें सोडवण्याचा यत्न केल्यास व्यापाराचे मार्गांतील कांहीं अडचणी दूर होण्यासारख्या आहेत ही गोष्ट आतांपर्यंतच्या अनुभवानें सिद्ध झाली आहे. व्यापारास मदत हें एका प्रकारचें युद्धसहायच होय ही गोष्ट ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे. प्रत्यक्ष युद्धपरिस्थितीमुळेंच येणाऱ्या व्यापाराच्या अडचणी मात्र विसरून चालावयाचें नाहीं, इतकेंच.

---

## ताळेबंदांत शिलकी मालाची किंमत किती धरावी?

कारखान्यास अगर व्यापारी संस्थेस नफा—तोटा किती झाला ह्याचा बरोबर हिशेब होणें हें कारखान्याच्या ताळेबंदांत दाखविण्यांत येणाऱ्या मालाचे किंमतीच्या अचुकपणावर बऱ्हंशीं अवलंबून असतें. इतर जिंदगीची किंमत जितक्या निश्चितपणें ठरवितां येते, तितका निश्चितपणा मालाचे किंमतीचे बाबतींत येऊं शकत नाहीं. प्रत्यक्ष माल जागेवर आहे किंवा नाहीं हें स्वत: तपासून पहाणें ऑडिटरचे कार्यक्षेत्रांत येत नाहीं. तसेंच, मालाची किंमत बरोबर ठरवणें हेंहि त्यास शक्य होणार नाहीं; कारण तो प्रत्येक धंद्यांत तज्ज्ञ असणें अशक्य असतें. अर्थात्, ऑडिटरला दिलेल्या कागदपत्रांवरूनच त्यास आपलें काम पहावें लागतें.

ताळेबंदाचे तारखेस सर्व मालाची मोजमाप् करण्यांत यावी. कांहीं माल प्रत्यक्ष जागेवर नसतो, परंतु तो वास्तविक कारखान्याचे मालकीचाच असतो, अशा मालाचीहि मोजदाद होणें जरूर असतें. वाट चालत असलेला माल, धक्क्यावर पडलेला माल, एजंटांकडील व गिऱ्हाइकांजवळील शिलकी माल व शाखांकडील माल, ह्या सर्वांची यादी केली पाहिजे. ज्या मालाचे इनव्हॉइस कारखान्याचे पुस्तकांत दाखल झालेले असतील, अशा मालाचाच अंतर्भाव यादींत होईल. कांहीं माल विकला असला तरी तो गिऱ्हाइकानें नेला नसेल व जो माल दुसऱ्याचे मालकीचा असून त्याचेतर्फे कारखान्याचे जागेवर असेल असा माल यादींत येतां कामा नये.

मालाची यादी केल्यानंतर त्याची किंमत ठरविण्याचा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. पडलेली किंमत व चालू बाजारभावानें होणारी किंमत ह्यापैकीं जी किंमत कमी भरेल, ती धरणें हा चोख हिशेबाचे दृष्टीनें योग्य मार्ग होय. पडलेल्या किंमतीपेक्षा बाजारभाव अधिक असला व बाजारभावानें मालाची किंमत केली, तर मालाची विक्री होण्यापूर्वीच कारखान्यास नफा मिळाल्यासारखें होईल. ह्याकरितां पडलेल्या किंमतीपेक्षा अधिक किंमत धरणें इष्ट नाहीं. कारखान्यास लागणाऱ्या कच्च्या मालावर यावी लागणारी जकात, कर, इत्यादींची रकम त्याचे किंमतीवर चढवणें युक्त आहे. वेगवेगळया वेळीं निरनिराळया दरानें माल घेतला असला, तर सरासरी किंमत धरणें सोईचें होईल. मात्र, बाजार भावापेक्षां ती जास्त असतां कामा नये.

उत्पादन कार्यांत कांहीं माल अडकून राहून यंत्रांवरहि कांहीं माल असेल. कच्च्या मालाची किंमत, मजुरी व उत्पादनाचे इतर खर्च आणि नोकरवर्गाच्या पगाराचा कांहीं भाग ह्यांची बेरीज केली म्हणजे उत्पादनांतील मालाची किंमत ठरेल. ताळेबंदाचे तारखेस मजुरीचे व इतर दर उतरलेले असले, तर त्या मानानें किंमत कमी धरावी लागेल. पक्क्या मालाची किंमत ठरवितांना ह्याच तत्त्वाचा अवलंब करावा लागतो. भाडें, कर, विजेचें बिल, यंत्रांवरील घसारा, व्यवस्थापकांचा पगार, गुंतलेल्या रकमेवर व्याज, इत्यादि गोष्टी हिशेबांत घेण्याचा कारखानदारांचा नेहमी प्रयत्न असतो. तयार मालाची विक्रीची किंमत ठरवितांना ह्या सर्व गोष्टींचा जरूर विचार केला पाहिजे. परंतु पक्क्या मालाची ताळेबंदाकरितां किंमत ठरवितांना त्यांचेकडे विशेष लक्ष न देणें हें अधिक सावधगिरीचें असतें. कोणती बाब हिशेबांत घ्यावी व कोणती घेऊं नये, हें प्रत्येक धंद्याच्या वैशिष्ट्यावर अवलंबून असतें. बाजारांत ज्या दरानें माल मिळतो, त्याच दरापेक्षा अधिक दरानें कारखान्याच्या पक्क्या मालाची किंमत ठरविणें अर्थातच चुकीचें ठरेल. कारखान्याच्या उत्पादनास नव्यानेंच सुरवात झाली असली तर सहाजीकपणेंच त्याच्या उत्पादनाचा खर्च वाजवीपेक्षा अधिक असतो व कित्येक प्रसंगीं त्यास बाजारांत मिळणाऱ्या मालाचे किंमतीपेक्षा अधिक किंमत माल तयार करण्यास लागते. अशा वेळीं, उत्पादनाच्या खर्चावरून मालाची ताळेबंदांतील किंमत ठरवणें चुकीचें होईल.

---

### सिंधमध्यें शिक्षणाचा प्रसार

सिंधमध्यें शंभरांत फक्त १३ पुरुष व २ स्त्रिया साक्षर आहेत. शेकडा ५½ लोक शिक्षण घेतात. मुसलमानांचें लोकसंख्येंत प्रमाण ७२·८% आहे, परंतु शिक्षण घेणारे मुसलमान फक्त ३·३% आहेत. हिंदूंत तें प्रमाण १०·३% आहे. सिंध प्रांतानें १८३८-३९ मध्यें शिक्षणावर ६७ लक्ष, ७४ हजार रुपये खर्च केला.

### डिफेन्स खात्याच्या कचेऱ्यांचें काम

हिंदुस्थान सरकारच्या डिफेन्स खात्याच्या कचेऱ्यांस रविवारीं सुटी नाहीं. आठवड्याचे सातहि दिवस पुरा वेळ त्याच्या कचेऱ्या चालू रहातात. अधिकाऱ्यांस व कारकुनांस आठवड्यांतून एक दिवस आळीपाळीनें सुटी मिळते.

### बॉंबे टॉकिज

बोलपट काढणाऱ्या वरील कंपनीस १९४० सालीं ९०,७३७ रुपये नफा झाला. १ नोव्हेंबर, १९३६ ते ३१ ऑक्टोबर, १९३९ ह्या मुदतीचें ७% दराचें डिव्हिडंड प्रेफरन्स शेअरवाल्यांना देण्याचें ठरलें. नोकरवर्गास अर्ध्या महिन्याचा पगार बोनस म्हणून मिळाला.

### आखूड धाग्याची कपास

हिंदुस्थानांत मुख्यत: आखूड धाग्याची कपास होते, परंतु हिंदी गिरण्या लांब धाग्याची विदेशी कपास मोठ्या प्रमाणावर वापरतात व देशी कपाशीचा उठाव होत नाहीं. आखूड धाग्याची कपास वापरण्याची हिंदी गिरण्यांत सक्ती करण्यासंबंधींच्या प्रश्नाचा विचार हिंदुस्थान सरकारपुढें असून त्यानें बंगाल गिरणी-मालक संघाचें त्यासंबंधांत मत मागविलें आहे.

## मुंबई प्रांतांतील मच्छीमारीचा धंदा
## ( १९३९–४० )

दर्यावरील मच्छीमारीचा धंदाः—मासळीच्या धंद्यामध्यें लॉंचेस वापरण्याचा प्रघात पाडण्याचा प्रयोग पूर्वीप्रमाणेंच यशस्वीपणें चालू होता; या वर्षी मच्छीमारीच्या लॉंचेसमध्यें एका लॉंचची वाढ होऊन त्यांची एकूण संख्या नऊ झाली.

या वर्षी नऊ लॉंचेसनीं मिळून २५,०४,४७९ पौंड मासळी आणली. मागील वर्षी १५,०५,५८९ पौंड आणली होती.

मच्छीमारीच्या धंद्याची वाढ होण्यामधील मोठी अडचण म्हटली म्हणजे मुंबई शहरांत मच्छी उतरवून घेण्याच्या अद्ययावत् सोयीच्या ठिकाणाची उणीव आहे हें होय. अशा उताराच्या ठिकाणासाठी जागा मिळविण्याच्या प्रश्नाबद्दल हिंदुस्थान सरकार व पोर्ट ट्रस्ट यांच्या दरम्यान वाटाघाटी चालू आहेत.

उमेद्वारः—लॉंचेस चालविण्याची माहिती असणारे उमेद्वार तयार करण्याच्या योजनेची या वर्षी आणखी प्रगति झाली.

मच्छीमारीच्या सुधारलेल्या पद्धति, मरीन ॲक्वेरियम्, मच्छीमारीच्या शाळा इत्यादींसंबंधीं कित्येक योजना सरकारला सादर करण्यांत आल्या; परंतु पैशाच्या ओढाताणीमुळें वगैरे त्या मंजूर करतां आल्या नाहींत. मागील वर्षाप्रमाणें या वर्षीहि फिशरीज इन्फॉर्मेशन ब्यूरो उपयुक्त कार्य करीत होता.

गोड्या पाण्यांतील मच्छीमारीः—गोड्या पाण्यांतील मच्छीमारीच्या धंद्याच्या वाढीच्या योजनेकडे खात्याचें लक्ष या वर्षीहि होतें.

गोड्या पाण्यांतील मासे गुटगुटीत करण्याच्या उद्देशानें त्या माशांच्या निरनिराळ्या जातींवर प्रयोग करण्यांत आले. मुंबई नजिकच्या तळ्यांमध्यें माशांच्या कांहीं नवीन जाती सोडून देण्याची तजवीज करण्यांत आली. या तजविजीचा काय परिणाम होतो इकडे बारकाईनें लक्ष ठेवण्यांत आलें आहे. गेल्या चार वर्षांत या योजनेचा जो परिणाम झाला त्यासंबंधीं आंकडे संकलित करण्यांत येत आहेत.

मासे खारविण्याचीं आवारें ( यार्डस् ):—मासे खारविण्याच्या यार्डांची संख्या पूर्वीइतकीच म्हणजे ३२ होती. यांपैकीं १८ रत्नागिरी जिल्ह्यांत आहेत व १४ उत्तरकानडा जिल्ह्यांत आहेत. यांपैकी ११ यार्डांचें काम १२ महिने चालू होतें, १५ यार्डांचें ९ महिने चालू होतें आणि बाकीचीं सहा किरकोळ यार्ड आहेत. ताजे व खारविलेले मासे तसेंच किनाऱ्यावर वाळून तयार होणारें खत यांच्या किंमती सामान्यतः कमी होत्या.

या वर्षी एकूण ३,३१,६७३ मण ताजे मासे यार्डांमध्यें आणण्यांत आले व ९१,४१६ मण मीठ खारविण्याच्या कामीं वापरलें गेलें. एकूण २,४९,८२५ मण खारविलेले मासे यार्डांबाहेर गेले.

मागील वर्षी रत्नागिरी जिल्ह्यांत मालवण येथें व कानडा जिल्ह्यांत मजली येथें मासे खारविण्याचीं नमुनेदार छपरें बांधण्यांत आलीं, तीं या वर्षी वापरण्यासाठीं खुलीं झालीं. या नमुनेदार छपरांचा कोळ्यांना फार उपयोग होतो.

मासे खारविण्याचीं उत्कृष्ट प्रकारचीं पात्रें वापरण्याचा उपक्रम व्हावा म्हणून त्रावणकोर येथून ६ झिलईदार भांडीं मागविण्यांत आलीं; पण तीं जानेवारी महिन्याच्या अखेर आलीं म्हणून मच्छीमारीच्या हंगामांत त्यांचा उपयोग करणें शक्य नव्हतें.


## कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कं. लि. पुणें
# विमेदारांकरितां नोटीस.

नोटीस देण्यांत येते कीं, १९३८ च्या विमा कायद्यान्वयें, या कंपनीच्या विमेदारांची सभा पुणें येथें कंपनीच्या रजिस्टर्ड कचेरींत कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८० सदाशिव पेठ, पुणें, रविवार ता. २२ जून १९४१ रोजीं दुपारीं तीन वाजतां पुढील कामांकरितां भरेल.

( अ ) मतदार–विमेदारांतर्फे संचालक–मंडळावर एक डायरेक्टर निवडणें.

( १ ) जे विमेदार डायरेक्टर म्हणून निवडून येण्यास पात्र असतील व ज्यांची निवडणुकीस उभे राहण्याची इच्छा असेल अशा विमेदारांनीं आपापले अर्ज कंपनीकडे पाठवावेत अशी विनंति आहे. असे अर्ज कंपनीच्या मुख्य कचेरींत सभेच्या तारखेच्या आधीं निदान दहा दिवस पोंचतील अशा बेतानें रजिस्टर्ड पोस्टानें पाठवावेत. अशा प्रकारचे अर्ज इंग्रजी अगर मराठी भाषेमधून केले पाहिजेत.

( २ ) विमेदारांतर्फे होणाऱ्या डायरेक्टरांच्या निवडणुकीमध्यें उमेद्वार म्हणून लायक ठरण्यास खालील गोष्टींची पूर्तता होणें आवश्य आहे.

( अ ) या कंपनींत अेन्डोमेन्ट अगर होल लाइफ विमा असावा. असा विमा स्वतःच्या नांवावर बेचन केलेला अगर बदलून घेतलेला चालणार नाहीं. मात्र ज्यानें विमा घेतला असेल, त्याच्या नांवावर विमा बेचन केला असल्यास चालेल.

( आ ) अशा विम्याची एक अगर अनेक पॉलिसीज मिळून एकूण रक्कम त्यावर निवडणुकीपूर्वी मिळालेल्या बोनससह रुपये दोन हजारांपेक्षा कमी नसावी.

( इ ) असा विमा कमींत कमी तीन वर्षें चालू असलेला पाहिजे; व त्यावर कसल्याहि प्रकारचा बोजा असतां कामा नये.

( ई ) असा विमेदार कोणत्याहि कंपनीचा डायरेक्टर, मॅनेजर, कायद्याचा किंवा टेक्निकल सल्लागार, मॅनेजिंग एजन्ट, विमा एजन्ट अगर नोकर किंवा विमा एजन्टांना नोकरीस ठेवणारा इसम नसावा.

( ३ ) सभेस हजर राहूं इच्छिणाऱ्या प्रत्येक विमेदारास सभेंत प्रवेश मिळण्याकरिता जरूर असलेल्या दाखल्यासाठीं अर्ज केला पाहिजे व असा अर्ज सभेच्या तारखेच्या आधी निदान पंधरा दिवस कंपनीच्या मुख्य कचेरींत येऊन पोचला पाहिजे.

( ४ ) विमेदारांनीं आपलीं मतें सभेस समक्ष हजर राहून द्यावींत किंवा प्रॉक्झीनें द्यावींत. प्रॉक्झीनें मतें द्यावयाचीं झाल्यास मात्र अशा प्रॉक्झी सभेच्या तारखेच्या आधीं निदान सहा दिवस कंपनीच्या मुख्य कचेरींत दाखल झाल्या पाहिजेत. प्रॉक्झी फॉर्म लेखी व विमेदाराच्या नांवाचा असावा. ज्यांना सभेच्या तारखेपूर्वी सहा महिने अगोदर कंपनीनें पॉलिसी दिल्या आहेत व ज्यांच्या पॉलिसीज सभेच्या तारखेपूर्वी सहा महिने चालू आहेत अशा विमेदारांस मत देतां येईल.

( ब ) आर्टिकल नं. १०८ प्रमाणें भागिदारांच्या सभेनें येत्या वर्षाकरितां नेमणूक करण्यासाठीं किमान दोन ऑडिटर्सचीं नांवें सुचविणें. सध्यांचे ऑडिटर्स मे. जी. डी. आपटे, बी. ए., जी. डी. ए., आर. ए. हे निवृत्त होत असून फेरनेमणुकीस पात्र आहेत.

बोर्डाच्या हुकुमावरून

पुणें | एम. एन. भागवत,
ता. १४–५–४१ | ॲक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडंट

## मुंबई प्रांतांतील वाचनालयांची वाढ व सुधारणा

लेखकः—श्री. र. श. पारखी
( मागील अंकावरून समाप्त )

ही योजना मंडळानें अत्यंत विचारपूर्वक केलेली आहे असें बारीक निरीक्षण केलें असतां वाचकांचे सहज लक्षांत येईल. ह्या योजनेंत सर्वांत लहान खेड्याच्या वाचनालयाला प्रतिवर्षी सरकार ग्रँट रु. २५ व पुढें जास्त मोठ्या खेड्यांना, तालुका गांवांना व जिल्हा गांवांना त्यांच्या गरजांप्रमाणें अधिकाधिक ग्रँट मिळावी अशी शिफारस केलेली आहे. ही सबंध योजना अमलांत आल्यावर १,००० वर लोकवस्ति असलेल्या खेड्याला प्रतिवर्षी रु. १००; २,००० पासून ५,००० पर्यंत लोकवस्तीच्या खेड्याला रु. १५०; त्यापेक्षां जास्त वस्तीच्या गांवाला रु. ५००; तालुका गांवाला रु. १,०००; जिल्हा वाचनालयाला रु. ६,०००, प्रांतिक वाचनालयाला रु. २०,००० अथवा रु. २५,००० व मध्यवर्ति वाचनालयास रु. ६०,००० मिळावयाचे आहेत.

मंडळाच्या शिफारशीप्रमाणें सरकारनें वाचनालयांचा प्रसार प्रांतभर करण्याचें ठरविल्यास बहुजन समाजाची फार मोठी सोय होणार आहे व साक्षरता प्रसाराला यामुळें चांगलीच मदत होऊं शकेल. या बाबतींत स्थानिक पुढाऱ्यांनीं आतांपासून चालू असलेल्या वाचनालयांची सुधारणा करण्यास व जेथें वाचनालयें नाहींत तेथें तीं स्थापण्यास सुरवात करणें इष्ट आहे. हें काम बऱ्याच अंशीं लोकांच्या सहकार्यावर अवलंबून आहे. लोकांमध्यें ज्या प्रमाणांत या चळवळीची उत्सुकता दिसून येईल त्या प्रमाणांत सरकारला या बाबतींत पुढाकार घेतां येईल. मनुष्याच्या सर्व सुधारणांमध्यें ज्ञानाची सुधारणा ही मुख्य आहे व ती झपाट्यानें होण्यास वाचनालयांचा विशेष उपयोग आहे; म्हणून ह्या सुसंधीचा फायदा मुंबई प्रांतांतील जनता घेईल अशी पूर्ण आशा आहे.

### ब्रिटिश रोख्यांच्या व्याजावर हिंदी इन्कमटॅक्स

ज्या ब्रिटिश पौंडांतील रोख्यांवरील व्याज ब्रिटिश कायद्यान्वयें प्राप्तीवरील कर कापून न घेतां दिलें जातें, अशा १ एप्रिल १९३८ नंतर विक्रीस काढलेल्या स्टर्लिंग रोख्यांवरील व्याजांतून हिंदी प्राप्तीवरील करहि कापून घेतला जाणार नाहीं, असें भारतमंत्र्यांनीं कॉमन्स सभेंत नुकतेंच जाहीर केलें. "हिंदी पोर्ट ट्रस्टसनीं ग्रेटब्रिटनमध्यें उभारलेल्या कर्जरोख्यांवरील व्याजांतून मुळांतच हिंदी प्राप्तीवरील कर कापून घेतां येतो, असा हिंदी इन्कम टॅक्सचा कायदा आहे. त्यांत दुरुस्ती न करतां, वरीलप्रमाणें सवलती जाहीर करणें हिंदुस्थान सरकारच्या अधिकारांत नाहीं. हिंदुस्थानांत इन्कम टॅक्सच्या कायद्याची अंमलबजावणी अत्यंत कसोशीनें केली जाते व करवसुलीसाठीं कायद्याचा अत्यंत कसोशीनें अर्थ लावला जातो. तथापि, ग्रेटब्रिटनमधील नागरिकांचे बाबतींत मात्र सवलत देण्यांत आली, हें इष्ट नाहीं." इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सनें वरीलप्रमाणें टीका केली आहे.

### लँड मॉर्गेज बँकांसाठी सवलतीच्या व्याजाचें कर्ज

प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांना कर्ज देण्यासाठीं मध्यवर्ती लँड मॉर्गेज बँकेस मद्रास सरकारनें ५ लक्ष रुपये देण्याचें ठरविलें आहे. ह्या रकमेवर ३% व्याज सरकार घेईल.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष) श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; मि. आर. एल. फेराई.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—डी. आर. लालवाणी.

## औषधाशिवाय रोगमुक्त व्हा !

**आरोग्य चिकित्सा शिक्षक**—डॉक्टर, वैद्यांच्या औषधाला कंटाळलेले रोगी निसर्गसिद्ध सुलभ उपायांनीं सहज बरें करून आरोग्याचा अखण्ड सुखोपभोग घ्या ! पैसा वांचवा ! किं. १॥ रु.

**लंघन-चिकित्सा शिक्षक**—प्लेग, कॉलरा, व इतर हट्टी रोग औषधाशिवाय फक्त लंघनें करून रोगमुक्त व्हा ! वज्रदेही बना ! नवी तिसरी आवृत्ति. किं. १॥ रु. ट. ह. शिवाय. यादी फुकट. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

## K. K. & Co.
**Photographic Dealers**
**POONA.**

## कोरोना पोर्टेबल विकणें आहे.

कोरोना पोर्टेबल टाइपरायटर उत्तम स्थितींतला खासगी कामासाठीं वापरलेला, विकणें आहे.

" क्ष " C/o अर्थ.

# स्फुट विचार

## रूडोल्फ हेस

नाझी पक्षाचा कट्टा अनुयायी आणि हिटलरच्या प्रभावळींतील एक प्रमुख मूर्ति, रूडॉल्फ हेस, हा अनपेक्षित रीतीनें स्कॉटलंडमध्यें विमानांतून अचानक उतरला आणि ब्रिटिश सरकारचा कैदी झाला ही अलीकडच्या युद्धाच्या घडामोडींमधील विचित्र घटना होय. हेस ह्यानें स्वतः विमान हाकलें आणि तो छत्रीच्या सहायानें त्यांतून खाली आला. अशा रीतीनें जर्मनींतून बाहेर पडून इंग्लंडमध्यें जाण्यांत त्याचा काय हेतु होता, ह्याविषयीं अनेक तर्क चालले आहेत. हेसचें डोकें अलीकडे ठिकाणावर नव्हतें आणि वेडाच्या लहरींत तो इंग्लंडला गेला असला पाहिजे असें नाझी लोक भासवीत आहेत. आपला जीव जर्मनींत धोक्यांत आल्या कारणानें नाझी लोकांच्या पकडींतून बाहेर पडून सुरक्षित स्थळीं जाण्याचा त्यानें विचार केला असला पाहिजे अशी कल्पना इतरत्र करण्यांत येत आहे. वेडाच्या लहरींत हेससारखा मनुष्य स्वतः विमान चालवून इंग्लंडमध्यें नेमका उतरेल हें संभवनीय दिसत नाहीं. हेसला हिटलरचें अलीकडील धोरण नापसंत असलें पाहिजे आणि जर्मनींत नाझी पक्षाशीं मतभेद प्रकट करणें म्हणजे स्वतःवर मरण ओढून घेणें असल्यामुळें त्यानें आपली सुटका करून घेतली असली पाहिजे. पण तो इंग्लंडलाच कां गेला, दुसरीकडे कोठें कां गेला नाहीं अशी शंका येथें उद्भवते. इतर ठिकाणांपेक्षा इंग्लंडमध्येंच आपण सुरक्षित राहूं ह्या समजुतीनें त्यानें इंग्लंडला उड्डाण केलें असावें असा तर्क आहे. जर्मनीचे युद्धांतले गुप्त बेत तो आतां फोडतो कीं काय अशी भीति नाझी पक्षास पडली आहे. म्हणून त्याचें डोकें फिरलें असल्याची गप्प त्यानें पिकवली आहे. जर्मनींत नाझी पक्षांत तीव्र मतभेद उद्भवले आहेत आणि असंतोष वाढत आहे असें अनुमान हेसच्या उड्डाणावरून सहजच निघतें.

## कॉमन्स सभेचें वादविवादगृह

ब्रिटिश कॉमन्स सभेच्या वादविवादगृहावर जर्मन बॉंब पडून त्याचा नाश झाला आहे. अलीकडे जर्मनीच्या विमानांचे मोठ्या प्रमाणावर अहर्निश हल्ले चालले आहेत आणि त्यांत शत्रूचें वाढतें नुकसान होत आहे. लंडनमध्यें बॉंब टाकून पळून जाण्यांत जर्मन विमानांस आतां यश मिळत नाहीं आणि त्यांपैकीं अनेक खालीं पाडण्यांत येत आहेत. तथापि, जर्मन विमानांच्या झुंडी लंडनवर हल्ला करतात तेव्हां त्यांतले बॉंब वाटेल तेथें पडतात. त्यांपैकीं कांहीं बॉंब कॉमन्स सभेवर पडून त्यांतलें वादविवादगृह निरुपयोगी झालें आहे. ह्या आपत्तीचा कॉमन्स सभेवर कांहींच प्रतिकूल परिणाम झालेला नाहीं. तिचीं अधिवेशनें दुसऱ्या सोइस्कर इमारतींत रीतसर चालू आहेत. कॉमन्स सभेचें इतिहासप्रसिद्ध गृह जळून नष्ट झालें तरी त्या संस्थेचें नित्याचें काम सुरळीतपणानें चाललें आहे ही गोष्ट ब्रिटिश जनतेची चिकाटी, धैर्य व शिस्त ह्यांची निदर्शक आहे. ह्या संबंधांत ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं काढलेले उद्गार नमुनेदार आहेत. ते एका प्रश्नास उत्तर देतांना म्हणाले कीं, कॉमन्सच्या सभागृहाची झालेली नासधुस दुरुस्तीनें दूर करण्याच्या मर्यादेपलीकडे गेली आहे, परंतु सध्या उपयोगांत आणलेल्या जागेस कांहीं बरें-वाइट झाल्यास वापरतां यावें म्हणून तिसऱ्या गृहाची तयारी आम्हीं करीत आहों. शत्रूच्या हल्ल्यांनीं ब्रिटिश राजकीय संस्थांच्या मामुली कार्यांत खंड पडणार नाहीं अशी तजवीज होत असल्याचें त्यांनीं सांगितलें. लॉर्डांच्या सभागृहाचा उपयोग कॉमन्सला करतां येईल ह्या सूचनेस उत्तर देतांना ते म्हणाले कीं त्या सभेसहि विशिष्ट ऐतिहासिक महत्त्व असल्यानें तें गृह त्या संस्थेकडेच राहिलें पाहिजे.

## युद्धक्षेत्र पसरलें

ग्रीसमधील लढाई संपतांच भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमारी बलाचा समाचार घ्यावयाचा आणि सुएझच्या कालव्यावर हल्ला चढवून ब्रिटिश सत्तेच्या मुळासच हात घालावयाचा असा बेत हिटलरनें केला असल्याचें अलीकडच्या जर्मन कारस्थानांवरून स्पष्ट दिसतें. फ्रेंच सरकारास पेचांत धरून सीरियामध्यें त्याच्या संमतीनें शिरकाव करावयाचा आणि जिब्राल्टरच्या बाजूस त्याचवेळीं गडबड माजवावयाची अशी जर्मनीची दुहेरी योजना उघड होते. इराकमध्यें फंदफितुरी करून ब्रिटिश सत्तेस आणि तिच्या तेलाच्या पुरवठ्यास तिकडून शह देण्याचाहि घाट जर्मनीनें घातला. रशीदअल्लीशीं जर्मनीनें संधान बांधलें आणि ब्रिटिशांशीं कुरापत काढण्यास त्यास फूस दिली. ब्रिटिश फौज बसरा येथें वेळींच जाऊन पोहोंचली आणि तिनें रशीदअल्लीनें चालवलेल्या गडबडीस पायबंद घातला. पूर्वीच्या तहाप्रमाणें आपलें सैन्य इराकमधून नेण्यास ब्रिटिशांस अधिकार असतां रशीदअल्लीनें त्यास विरोध केला. खुद्द इराकी लोकांचा त्यास पाठिंबा नसतां जर्मनीच्या चिथावणीनें त्यानें उचल खाल्ली. व्हिशी येथील फ्रेंच सरकारच्या संमतीनें सीरियामधील विमानगृहांचा उपयोग जर्मनीनें करण्यास प्रारंभ केला आहे. सीरियांत फ्रेंच सरकारास वास्तविक आतां रीतसर सत्ता नाहीं. तथापि, जर्मनीच्या भीतीनें तें सरकार आपल्या जुन्या दोस्ताच्या म्हणजे इंग्लंडच्याविरुद्ध वागावयास उद्युक्त झालें आहे. आज कित्येक आठवडे जर्मनी व फ्रान्स ह्यांचेमध्यें वाटाघाटी चालू होत्या आणि व्हिशी येथील दुबळें फ्रेंच सरकार जर्मनीच्या डावपेचांस आतां बळी पडलें आहे. व्हिशी येथील मंत्रिमंडळास कांहीं सवलती देण्याचें आमिष दाखवून इंग्लंडविरुद्ध त्याचें सहाय हिटलरनें मिळवलें आहे. ह्या सवलती कोणत्या आणि व्हिशी सरकारनें दिलेलीं अभिवचनें कोणतीं हें अजून स्पष्ट झालेलें नाहीं. परंतु हिटलरच्या धमक्या व आमिषें ह्यांस धुडकावण्याचें धैर्य मार्शल पेटॉं ह्यांस झालेलें नाहीं हें उघड होत आहे. सीरियामध्यें जर्मन विमानांवर हल्ले करून त्यांचा नाश करण्याची धडाडी ब्रिटिश वैमानिकदलानें दाखवली आहे. जर्मनीच्या फौजेचें व इतर सहाय इराकमध्यें रशीदअल्लीस जाऊन पोहोचूं नये हा ह्या हल्ल्याचा उद्देश आहे. तुर्कस्थानशीं जर्मनीचीं बोलणीं चाललींच आहेत. पण तें राष्ट्र शत्रूस बधणार नाहीं. भूमध्यसमुद्राच्या पूर्वभागांत युद्धक्षेत्र पसरवण्याचा व पश्चिम एशियांत गडबड उडवून देण्याचा व्यूह हिटलरनें रचला आहे. तथापि, ऑफ्रिकेंत जर्मनी व इटली ह्यांची प्रगति होण्याचें थांबलें आहे, एवढेंच नव्हे तर सोलूमच्या बाजूस त्यांस माघार घ्यावी लागली आहे. आफ्रिकेंत ब्रिटिशांचें बळ संघटित होत आहे आणि शत्रूस व्यवस्थित रीतीनें तोंड देण्याची त्यांची तयारी आहे.

## हवाई हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी केलेला खर्च

### त्यावर प्राप्तीवरील कराची आकारणी

व्यापार अथवा उद्योगधंदे ह्यांसाठी वापरण्यांत येणाऱ्या माल-मत्तेचें हवाई हल्ल्यांपासून संरक्षण व्हावें, ह्याकरितां एकाद्यानें कांहीं रकम खर्च केली, तर ती रकम प्राप्तीवरील कराचे आकारणींतून वजा करतां येते किंवा नाहीं, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. ह्या संबंधांत सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूनें खालील पत्रक काढलें आहे. प्राप्तीवरील कराचे संबंधांतील सर्वसाधारण तत्त्व असें आहे कीं, एखाद्या खर्चामुळें जिंदगी निर्माण होत असेल, तर तो खर्च भांडवली खर्चाचे सदरांत येतो व त्यावर प्राप्तीवरील कर माफ होऊं शकत नाहीं. परंतु, हवाई हल्ल्यांपासून बचाव करण्याचे संबंधांतील योजना दीर्घकालीन स्वरूपाची नसेल, तर त्यासाठी केलेल्या खर्चास कराची माफी देंण्यास हरकत नाहीं. हवाई हल्ल्यांचे संबंधांतील विषयावर व्याख्यानें देण्यासाठी फी देणें, त्यांवरील वाङ्मय विकत घेणें, इत्यादींस माफी मिळेल. शिट्या, मुखत्राणें, इत्यादि वस्तू कांहीं वर्षे टिकतील, तेव्हां त्यांस भांडवली खर्च म्हणावा कीं काय, अशी शंका येणें शक्य आहे. त्यांस शिलकी माल समजणें व त्यांची वर्षअखेर किंमत ठरवणें, हाच युक्त मार्ग दिसतो. ह्या युद्धविषयक खर्चांचा इतका काटेतोलपणें विचार करूं नये, असें बोर्डाचें मत आहे. इमारतीस केलेल्या दुरुस्त्या, सुधारणा, इत्यादींचा उपयोग युद्धसमाप्तीनंतर होणार नसेल तर त्यांवरील खर्च मान्य केला जावा. तथापि युद्धसमाप्तीनंतरहि ह्या बाबी उपयोगी येणार असतील, तर त्यांवरील खर्च भांडवली स्वरूपाचा समजून त्यांवर घसारा काढूं द्यावा. जादा नफ्यावरील कराची आकारणीसहि हें तत्त्व लागू करण्यांत यावयाचें आहे.

### पर्सनल प्रेस सर्व्हिस

पुणें पत्रकारसंमेलनासाठी आलेल्या पत्रकारांनीं पर्सनल प्रेस सर्व्हिसच्या कचेरीस सोमवार ता. १९ मे रोजीं सकाळीं ८ ते १० भेट दिली. विविध भाषांतील सुमारें २०० नियतकालिकांतून वेगवेगळ्या विषयांवर कात्रणें कशी पद्धतशीर पाठविलीं जातात हें सर्व्हिसचे चालक श्री. ना. तु. ठाकूर यांनीं पाहुण्यांना समजाऊन सांगितलें. या प्रसंगीं स्थानिक व बाहेरील अनेक पत्रांचे प्रतिनिधी आले होते.

### शेतकरी कर्जनिवारण व कुळसंरक्षण कायदा शिक्षण वर्ग

हा वर्ग सिंदखेडा जि. प. खा. येथें ता. २५ मे १९४१ पासून चार दिवस श्री. विनायक गणेश तिखे हे चालविणार आहेत. या वर्गांत या कायद्याची माहिती चर्चात्मक रीतीनें सांगोपांग देण्यांत येईल. तरी शेतकरी, सावकार, जमिनीचे मालक, शेतकऱ्यांचे हितचिंतक यांनीं या कायद्याची माहिती जरूर करून घ्यावी. विशेष चौकशी सिंदखेड येथें को. ऑ. सुपरवायाझिंग युनियनमध्यें करावी असें क्लासचे व्यवस्थापक श्री. वासुदेव रामचंद्र वाणी कळवितात.

### बडोदे को. इन्शुअरन्स सोसायटी

१९३९-४० सालीं वरील सोसायटीनें १ लक्ष २ हजार रुपयांचे २०० विमे स्वीकारले.

देशी औषधें तयार करणारा महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना

पंडु (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

अशक्ततेवर

रक्तवर्धक

वापरा.

सर्वत्र मिळतें.

—: केंद्रें :—

पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

आयुर्वेद रसशाळा पुणें, लि. पुणें ४.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,७९,७०० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,८९,८५० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११०–१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४–५ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९५—४ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२–१० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४–१० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १३८–१२ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०६—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४१–१२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५४७—८ |
| मुंबई प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०२–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| मुंबई ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १३०—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २२५–१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५३०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १८१५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ५८—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८७१—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६४५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | १९९—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४४—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९—५ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४१–१४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३९२०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१३–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४७—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३५२—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै... | १७०२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १३३—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–४–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६२–८–६ |

**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें**
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
**OUR HOME**
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
**उतरण्यास या.**
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

**उंब्रज मल्टिपर्पज को. सोसायटी, लि.**
**( कऱ्हाड, जि. सातारा )**

वरील सोसायटीचे पटावर २२ सभासद आहेत. मॅनेजिंग कमिटीचे सर्व सभासद साक्षर आहेत. सभासदांना एकूण ४५० रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. सोसायटीनें मालाच्या विक्रीवर एकूण ९४ रु. १ आ. ६ पै कमिशन मिळवलें. १ मे, १९४१ चा ताळेबंद १,१३९ रुपयांचा आहे. सोसायटी १-६-१९४० रोजीं नोंदण्यांत आली, त्या मानानें तिची प्रगति चांगली चालली आहे. सोसायटीच्या सर्व सभासदांनीं व ४ बिगर सभासदांनीं तिचा फायदा घेतला आहे. इतर सोसायट्यांचे सभासद व लँड मॉर्गेज बँकेचे सभासद ह्यांवर उंब्रज मल्टिपर्पज को. सोसायटीमार्फतच आपला माल विकण्याची सक्ति करावी, अशी सूचना करण्यांत आली आहे. सहकारी खात्याचे डेप्युटी रजिस्ट्रार आपल्या शेऱ्यांत लिहितातः— " विक्रीचा व्यवहार वाढावयास पाहिजे. सभासदांच्या गरजा भागविण्याचे संबंधांत पुष्कळ सुधारणा होण्यास वाव आहे. भाग भांडवल अपुरें आहे. सभासदांची संख्याहि थोडी वाढली पाहिजे. कमाल चरक व नांगर ह्यांच्या खरेदीसाठी सोसायटीनें रूरल डेव्हलपमेंट बोर्डाकडे प्रयत्न करावा. सोसायटीचे चालक, विशेषतः अध्यक्ष व सेक्रेटरी, सोसायटीचे व्यवहारांत विशेष लक्ष पुरवीत आहेत. " सोसायटीचें ऑडिट २६-८-४० रोजीं झालें. ती " ब " वर्गांत आहे.

---

**परस्पर सहकारी मंडळी, अनलिमिटेड, दुधोंडी**

वरील संस्थेचा १-६-३९ ते ३१-५-४० अखेरचा वृत्तांत आमचेकडे आला आहे. वर्षअखेर मंडळीच्या पटावर ३०४ सभासद आहेत. मंडळीकडे सभासदांच्या १३,४७९ रुपयांच्या व बिगर-सभासदांच्या २३,२६९ रुपयांच्या, मिळून ३६,७४८ रुपयांच्या ठेवी आहेत. साल अखेरीस ३७,२२६ रुपये कर्ज येणें असून त्यांत थकबाकी ५,०२३ रुपये आहे. मंडळीचा रिझर्व्ह खंड ५,७४५ रुपये व इमारत फंड १,२५० रुपये आहे. अहवालाचे वर्षी मंडळीस ८५१ रुपये नफा झाला. मंडळीनें बँकेकडून कर्ज घेतलेलें नाहीं. संस्थेच्या सभासदांची, बोजे वजा जातां, जिंदगी सुमारें तीन लक्ष रुपयांची आहे असें समजतें. मंडळीची रौप्यज्युबिली मे, १९३५ मध्यें झाली, त्यावेळीं ठेवी २१ हजारांच्या, रिझर्व्ह फंड ३९३० रुपयांचा व इमारत फंड ० रुपये होता. पांच वर्षांत खेळतें भांडवल २५,१८३ रुपयांचें आतां ४४,६०३ रुपये झालें आहे. वरील सर्व माहितीवरून संस्थेच्या प्रगतीची कल्पना येईल.


या नव्या शोधानें सर्व जगभर खळबळ उडवून दिली आहे.

## दहा हजार रुपये अगदी फुकट.

**अमृतसरमध्यें २॥ रु. तोळा सोनें**

मिनर्व्हा गोल्डची घरोघर प्रशंसा ! मिनर्व्हा गोल्ड हा नकली सोन्याचा अगदी नवा शास्त्रीय आविष्कार होय. त्यानें केवळ वैज्ञानिकांनाच आश्चर्यानें थक्क करून सोडलें एवढेंच नव्हे, तर सर्वसाधारण लोकांची एक अत्यंत मोठी उणीव भरून काढली आहे. सर्व स्त्रिया त्याच्या दागिन्यावर बेहद्द खूष होतात. ज्या घरांत हें सोनें एकदां शिरलें तेथून दोनदोनदा तीनतीनदा त्यांस मागण्या येत आहेत.

मेहेरबान लाला वियारतनसाहेब, म्युनिसिपल कमिशनर, पठानकोटाहून २५ आक्टोबरला लिहितात—" काल आपल्या सोन्याचें पार्सल मिळालें; धन्यवाद ! आपण हा नवीन पदार्थ तयार करून जगाची एक मोठीच उणीव भरून काढली आहेत. उलट टपालीं आणखी तीन तोळे सोनें पाठवावें. "

याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रें उदाहरणार्थ रियासत, कॉंग्रेस, स्वस्तिक, अलामान, जमीनदार, गुरुघंटाल प्रताप, इत्यादींनीं प्रशंसोद्गार खुषीनें छापले आहेत.

हें सोनें कसास लावलें तर अस्सल सोन्याचाच रंग दाखवतें आणि अस्सल सोन्याप्रमाणेंच ठोकलें व गाळलें जातें. याचे हरएक प्रकारचे दागिने बनवता येतात. नापसंत पडल्यास किंमत परत मिळण्याची गॅरंटी आहे; खास प्रसारासाठीं किंमत १ तोळयास २॥ रु.; ३ तोळयास ७ रु.; ६ तोळयास १३ रु.; व ४० तोळयास ८० रु.

**मिनर्व्हा गोल्डचे बनवलेले दागिने**

मिनर्व्हा गोल्डच्या बनवलेल्या बांगड्या दर जोडीला २ रु.; कानांतील सोन्याचे डूल दर जोडीला ३ रु.; खड्याची अंगठी ३ रु.; साधी मुंबई फॅशनची अंगठी २ रु.; जाळीच्या बांगड्या दर जोडीला ५ रु.; ( नेकलेस ) माळ १२ रु.; लॉकेट ६ रु.; दस्तबंद दर जोडीला १४ रु.

माल पसंत पडला नाहीं तर परतबोलीची खात्री. पोस्टाचा खर्च फक्त ८ आणे पडतो.

या गोष्टी खोट्या ठरवून देणारास दहा हजार रुपये फुकट दिले जातील. याशिवाय दर तीन तोळे सोनें खरेदी करणारास टिकाऊपणा व सौंदर्य याची १० वर्षें गॅरंटी असलेलें एक फॅन्सी रिस्टवॉच फुकट दिलें जाईल; गॅरंटीचा कागद प्रत्येक घड्याळाबरोबर धाडला जातो.

मिळण्याचा पत्ता—मॅनेजर अमेरिकन मिनर्व्हा गोल्ड हाऊस, ( A. P. ) K. C. अमृतसर.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अतिस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी**, ६७१ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख २८ मे, १९४१ | अंक २२

## परमेश्वरानें एकच जग निर्माण केलें—परंतु माणसानें त्याचीं दोन जगें बनविलीं—एक श्रीमंतांचें एक गरीबांचें.

पहिल्याच्या वांट्याला अमृत आलें
दुसऱ्याच्या वांट्याला विष आलें.

कोंकणच्या रमणीय पार्श्वभूमीवर नवयुगचें
नवीन सामाजिक कलाचित्र

# अमृत

[ हिंदी–मराठी ]

: भूमिका :
मीनाक्षी, ललिता पवार, बेबी देवी, बाबूराव पेंढारकर,
साळवी, मा. विठ्ठल व विनायक

दिग्दर्शक : विनायक,
कथा-संवाद : खांडेकर,
फोटोग्राफी : पां. नाईक,

★

शनिवार ता. २४ पासून सुरू.

पुणें—मिनर्व्हांत,

खेळाच्या वेळा—शनि. रवि. सोम.–३–१५, ६–३०, १०. रोज–६–३०, १०.
कॉंप्लिमेंटरी पासीस सर्वस्वीं बंद.

# विविध माहिती

### पंजाबमधील मॅट्रिक परीक्षेचे विद्यार्थी

पंजाब युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेस यंदा तीस हजार विद्यार्थी बसले होते, त्यांपैकी साडेबावीस हजार उत्तीर्ण झाले. पास होणाऱ्या उमेदवारांचें प्रमाण ७५ टक्के पडलें. गेल्या सालचें हें प्रमाण ७० टक्के होतें.

### पंजाबच्या लोकसंख्येंत २० टक्के वाढ

पंजाब प्रांताच्या लोकसंख्येंत दहा वर्षांच्या अवधींत २० टक्के वाढ झाली असल्याचें १९४१ च्या शिरगणतीवरून आढळून आलें आहे.

### निजाम सरकारचें नवें कर्ज

निजाम सरकारनें आपल्या उत्पन्नाच्या आणि जिंदगीच्या तारणावर एक कर्ज उभारण्याचें योजिलें आहे, त्याच्या अटी खालीलप्रमाणें आहेत.

व्याजाचा दरः ३ %

परत फेडः ८ ऑगस्ट १९५१ ते ८ ऑगस्ट १९६१ चे दरम्यान केव्हांहि

विक्रीची किंमतः शंभराच्या रोख्यास ९९ रु. ८ आ. रोख

विक्रीची मुदतः ८ जुलै ते ६ ऑगस्ट १९४१

रोख कर्जाची मर्यादाः १ कोटि रुपये.

### सहकारी सल्लागार कमिटी

म्हैसूर संस्थानाच्या सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारला सल्ला देण्याकरितां तेथील सरकारनें एक स्टँडिंग ॲडव्हायसरी कमिटी नेमली आहे. ह्या कमिटीच्या वर्षांतून दोन सभा होतील.

### हैद्राबाद संस्थानाचा १९३८-३९ मधील आयात-निर्गत व्यापार

निर्गत : १३ कोटि, ६० लक्ष रु.

आयात : १३ कोटि ३७ लक्ष रु.

### चेक्सची देवघेव

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें ९ मे रोजीं संपलेल्या आठवड्यांत १० कोटि, ८६ लक्ष रुपये किंमतीच्या १,२२,१७० चेक्सची देवघेव झाली.

### पोस्टाचीं नवीं तिकिटें

सध्याच्या चित्राचीं २ आणे, ३½ आणे, ४ आणे, ६ आणे, ८ आणे व १२ आणे किंमतीचीं तिकिटें छापण्याचें बंद करून चित्रें नसलेलीं नवीं तिकिटें काढण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. ३ आणेवालीं तिकिटें बंद करण्यांत येतील. १½ आण्याचें चित्रवालें नवें तिकिट काढण्यांत येईल. चित्रवाल्या तिकिटांचा सांठा संपेपर्यंत त्यांची विक्री चालू राहील.

### गैरसमजासंबंधीं खुलासा

लष्करांत दाखल झालेल्या लोकांचे कपडे त्यांच्या घरीं परत करण्यांत येतात, तेव्हां कित्येक प्रसंगीं अशी समजूत होते कीं, त्याचे मालक म्हणजे सैनिक मृत झालेले असले पाहिजेत. शिक्षणक्रम संपवून त्यांस फौजेंत घेतलें म्हणजे किंवा त्यांस परदेशीं धाडण्यांत आलें म्हणजे घरगुती कपडे अनावश्यक होतात व हे कपडे घरीं परत धाडण्यांत येतात, असा खुलासा मुंबई सरकारनें प्रसिद्ध केला आहे.

### युद्धसामुग्रीचा मुंबईमधून पुरवठा

गेल्या मार्च अखेर पुऱ्या झालेल्या तिमाहींत मुंबई विभागांत युद्ध सामुग्रीबद्दल ४ कोटि रुपयांच्या ऑर्डरी पुरवठा खात्याकडून आल्या; ह्यांपैकी एक कोटि रुपयांचा माल ब्रिटिश सरकारनें घेतला आणि तीन कोटींच्या मालास दुसरीकडून मागणी आली. युद्धसामुग्रीच्या पुरवठ्याचे बाबतींत तजवीज करण्यासाठी प्रांतिक सल्लागार समिती नेमण्यांत आली आहे तिच्या मि. नाइट ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या सभेंत वरील माहिती नुकतीच देण्यांत आली. कांहीं जातींच्या मालाच्या पुरवठ्याची व्यवस्था नवीन ठिकाणांहून व नवीन मार्गांनीं केली जात असल्याचीहि माहिती त्या प्रसंगीं देण्यांत आली.

### गोकाक मिल्स लि.

वरील कंपनीच्या कपास कापडाच्या गिरणीनें १९३८ सालीं २८½ लक्ष रुपयांचें, १९३९ सालीं ४२ लक्ष रुपयांचें व १९४० सालीं ५४ लक्ष रुपयांचें कापड खपविलें. परंतु गिरणींत खपलेल्या कापसाचे किंमतींत १६½ लाखांपासून २२ लाख व तेथून ३७½ लाख अशी वाढ झाली व नफा अनुक्रमें २ लक्ष, ९८ हजार; ५ लक्ष, ४५ हजार व २ लक्ष, ४७ हजार असा उरला. कपाशीची भारी दरानें केलेली खरेदी व नंतर आलेली मंदी हें ह्या परिस्थितीचें कारण आहे. १९३९ सालीं कंपनीनें ५० हजार रुपये रिझर्व्ह फंडांत टाकले. चालू वर्षी उलट १ लक्ष रुपये त्यांतून काढून घेण्याची पाळी आली आहे. १९३८ सालीं कंपनीनें ४% डिव्हिडंड दिलें; १९३९ सालीं तें ९% झालें; १९४० चें डिव्हिडंड ७% आहे.

### शाळांतून चहाचा प्रसार

सिलोनमधील ५८ शाळांतील विद्यार्थ्यांस दररोज एक पेला चहास लागेल एवढा चहा व साखर देण्याची योजना तीन वर्षांपूर्वी अंमलांत आली तिला मिळालेल्या यशाच्या अनुभवावरून ही योजना आतां १ हजार शाळांस लागू करण्यांत येणार आहे. सिलोनमध्यें चहाचा खप वाढत आहे १९४० सालीं सिलोनमध्यें १ कोटि, २१½ लक्ष पौंड चहा खपला; १९३२ सालीं फक्त २० लक्ष पौंड चहा खपला होता.

### ५ लक्ष पोतीं

कलकत्ता येथील तागाच्या गिरण्यांस ५ लक्ष पोत्यांची ऑर्डर हिंदुस्थान सरकारनें नुकतीच दिली आहे. त्यांपैकीं २ लक्ष पोतीं जूनमध्यें व बाकीचीं जुलै अखेर यावयाचीं आहेत.

### ट्रेझरी बिलांवर १३ आ. २ पै व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १३ आ. २ पै इतका पडला.

### हिंदी टपाल

१३ ते १७ फेब्रुवारीचें हिंदी टपाल लंडन येथें १७ मे रोजीं वाटलें गेलें.

### आइसलंडचें स्वातंत्र्य

आइसलंडनें आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें आहे. डेन्मार्कशीं त्याचा आतां कांहींहि संबंध उरलेला नाहीं.

### कस्टम्सचें उत्पन्न

हिंदुस्थान सरकारास एप्रिल १९४१ मध्यें कस्टम्सचें उत्पन्न ३ कोटि, ४८ लक्ष रुपये झालें. पेट्रोल, केरोसीन, साखर, आगपेट्या, इत्यादींवरील एक्साइज पट्टीनें ८४ लक्ष रुपये दिले. एप्रिल १९४० चे तत्सम आकडे ३ कोटि ६९ लक्ष रुपये व ५४ लक्ष रुपये असे आहेत.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २५४ | उत्पादन—साम्राज्यांतर्गत देशांचें उत्पादन-सहाय | |
| २ क्रीटमधील अपूर्व संग्राम | २५५ | ५ मुंबई प्रांतांतील पिकांची सुधारणा ... | २५९ |
| ३ मालाची खरेदी-विक्री कशी होते ? ... | २५६ | ६ शिवण्याचें मशीन जप्तीस पात्र ? ... | २६० |
| ४ स्फुट विचार ... | २५७ | ७ निवडक बाजारभाव | २६१ |
| व्हीशीच्या मंत्रिमंडळाची लाचारी— " बोलविता धनी वेगळाची "— इंग्लंडमधील वाढतें लढाऊ | | ८ उद्योगधंद्यांस मुंबई सरकारची मदत ... | २६२ |



# अर्थ

बुधवार, ता. २८ मे, १९४१


## क्रीटमधील अपूर्व संग्राम

भूमध्य समुद्रांतील बेटांमध्यें क्षेत्रफळाच्या दृष्टीनें क्रीटचा चौथा नंबर लागतो. त्याचें महत्त्व प्रस्तुत युद्धांत इजिप्तच्या संरक्षणाचे दृष्टीनें माऱ्याचें ठिकाण ह्या नात्यानें मोठें आहे. क्रीट बेट दीडशें मैल लांब व पस्तीस मैल रुंद असून असें वसलें आहे कीं त्याचा ताबा ज्याच्या हातांत असेल त्या राष्ट्रास भूमध्य समुद्राच्या पूर्वभागांत वर्चस्व स्थापणें सोपें व्हावें. त्यांतलि विमानगृहांचा उपद्रव इजिप्तला व सुएझच्या कालव्यास होण्याची भीति आहे, ही गोष्ट ब्रिटिश प्रथमपासून जाणून आहेत. ग्रीस जर्मनांच्या ताब्यांत गेल्यापासून क्रीट बेटांत ग्रीक सरकारनें आपलें ठाणें दिलें आहे. हें बेट अरुंद असून त्यांत सूडाच्या आखातांशिवाय जहाजांस सोइस्कर अशीं बंदरें नाहींत. बेटावर विमानांच्या सोयींचीं ठिकाणेंहि थोडीं आहेत. तथापि युद्धाच्या दृष्टीनें त्याचें असलेलें महत्त्व लक्षांत घेऊन जर्मनीनें त्यावर चांगली पूर्व तयारी करून हल्ला चढवला. नजीकच्या ग्रीसच्या किनाऱ्यावरील बंदरांत व विमानगृहांत जर्मनीनें क्रीटवरील स्वारीची तयारी कित्येक आठवडे चालवली होती. ब्रिटिश वैमानिकांचे हल्ले ह्या विमानगृहावर सारखे होत होते ह्याचें कारण सदरहु तयारीची जाणीव हें होय. शत्रूचा क्रीटवरील हल्ला विशिष्ट तऱ्हेच्या योजनात्मक पद्धतीनें करण्यांत आला आणि त्यानें नॉर्वेवरील स्वारीचें स्मरण करून दिलें. बॉंबर विमानें, सैनिक घेऊन जाणारीं विमानें, विमानी छत्र्यांच्या सहायानें उतरणारे सैनिक, लढाऊ जहाजें ह्या सर्वांचा उपयोग एकाच वेळीं करून प्रतिस्पर्ध्यास घेरावयाचें अशी क्रीटवरील हल्ल्याची योजना आहे. ह्या स्वारीचा प्रतिकार ब्रिटिश फौज निकरानें करीत असून जर्मनीची योजना निष्फळ करण्याचा त्यांचा निश्चयात्मक प्रयत्न आहे. सध्याच्या यांत्रिक युगांत युद्धामध्येंहि नवे,नवे प्रकार उपयोगांत येणें स्वाभाविक आहे. आधुनिक शास्त्रीय शोधांचा व प्रगतीचा फायदा मानवी सुखाच्या वृद्धीप्रीत्यर्थ न होतां मनुष्य समाजास अधोगतीस नेण्यांत घेतला जात आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे आणि असल्या राक्षसी वर्तनाचा कायमचा अंत करणें हा चालू युद्धांतला जर्मनीच्या प्रतिस्पर्ध्यांचा मुख्य उद्देश आहे. प्रचंड विमानांतून सशस्त्र सैनिक व युद्धसामुग्री नेऊन त्यांस क्रीटमध्यें सोडावयाचें आणि अशा पुन्हां पुन्हां फेऱ्या करून आकाशनौकांनीं हजारो शिपायांची फौज तेथें उभी करावयाची; त्याचबरोबर छत्रीवाले सशस्त्र सैनिक बेटाच्या निरनिराळ्या भागांत उतरून तेथें ठाणीं धरून बसावयाचें व नासधूस करावयाची; तसेंच जहाजांची व बॉंब टाकणाऱ्या विमानांची हालचाल सामुग्री व शिपाई नेण्यासाठी करावयाची हें प्रस्तुत लढाईतलें अपूर्व दृश्य आहे. येत्या पिढींतल्या मानवी जीविताचें आणि सुधारलेल्या यांत्रिक युगाचें चित्र मि. वेल्स ह्यांनीं आपल्या प्रसिद्ध पुस्तकांत रेखाटलें आहे त्याचें स्मरण रॉयटरच्या बातमीदारास क्रीटमधील लढाईचें वर्णन करतांना झालें आहे ह्यांत नवल नाहीं. क्रीटमध्यें चाललेल्या अपूर्व संग्रामाची माहिती मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत यथातथ्य दिली आहे तीवरून ह्या लढाईची अपूर्वता व महत्व हीं लक्षांत येण्यासारखीं आहेत.

मि. चर्चिल ह्यांनीं क्रीटमधील लढाईसंबंधानें खालील उद्गार काढले:—" एक अत्यंत विलक्षण आणि तुमुळ युद्ध चालू आहे. आमच्या बाजूस विमानांचा पाठिंबा नाहीं कारण आमच्या ताब्यांत विमानगृहें नाहींत. शत्रूच्याजवळ तोफखाना किंवा चिलखती गाड्या नाहींत. दोन्ही बाजूंस परत जाण्याचीं साधनें नाहींत. ही लढाई निकराची आहे आणि भूमध्य समुद्रांतील युद्धावर तिचा परिणाम होणार आहे." सैनिकांची वहातुक करणाऱ्या विमानांच्या येरझाऱ्या क्रीट व ग्रीसचा किनारा ह्यांचे दरम्यान चालल्या असतांना जहाजांचाहि उपयोग त्याकामीं करण्याचा शत्रूचा प्रयत्न होता पण तो ब्रिटिश आरमारानें हाणून पाडला आणि वहातुक करणाऱ्या त्यांच्या जहाजांच्या काफिल्यास त्यानें पिटाळून लावलें. जर्मनीचे छत्रीवाले शिपाई आणि विमानांतून आणण्यांत येणारे सैनिक क्रीटच्या किनाऱ्यावर निरनिराळ्या ठिकाणीं उतरण्यांत येत असतां त्यांचा समाचार ब्रिटिश फौजा घेत होत्या आणि त्यांशीं बेटावरील रहिवाशांचें उत्कृष्ट सहकार्य होत होतें. विमानगृहांच्या अभावीं ब्रिटिश फायटर विमानें काढून घेण्यांत आलीं, पण बॉंबर विमानांची कामगिरी चालूच होती.

ब्रिटिश फायटर विमानांच्या उपयुक्त कार्याचा उल्लेख अगदी अलीकडे आलेल्या बातम्यांत होत आहे त्यावरून तीं क्रीटच्या बाहेरील सोइस्कर तळांपासून पाठवण्यांत येत असावीं असें दिसतें. जर्मनीची धडपड बेटाचा पश्चिम भाग काबीज करण्याचा असावा असा अंदाज आहे. त्याचप्रमाणें शत्रूनें क्रीटमधील मुख्य शहरांवर बॉंबफेक चालवली आहे. ह्यावरून पूर्वेकडील बंदरें स्वतः हस्तगत करण्याचे बाबतींत त्याची निराशा झाली असली पाहिजे. लढाऊ व अन्नसामुग्री जहाजांतून आणण्याची त्याची खटपट व्यर्थ गेली आहे. कांहीं नावा व होडगी ह्यांचा या कामीं थोडाबहुत उपयोग त्यानें केला असावा इतकेंच वहातुकीच्या विमानांतून कांहीं जर्मन तोफा उतरल्या आहेत. पण चिलखती गाड्या आणण्याचे कामीं शत्रूस अडचण भासली आहे. ब्रिटिश फौजा व विमानें अत्यंत निकरानें व शौर्यानें लढत असून त्यांनीं शत्रूची क्रीटबेट थोड्या अवधींत पादाक्रांत करण्याची मूळची योजना हाणून पाडली आहे आणि. त्याची हानी मोठ्या प्रमाणावर चालवली आहे.

## भागांची खरेदी-विक्री कशी होते ?

### शेअर बाजारांतील पद्धति

भांडवलाचा एक विशिष्ट हिस्सा म्हणजे भाग अथवा शेअर होय. शेअरची सर्व रकम पूर्णपणें भरली गेली असली म्हणजे त्या शेअरला स्टॉक असेंहि म्हणतात. एखाद्यानें पैसे देऊन कंपनीचे शेअर घेतले व तो शेअरवरील वार्षिक नफा घेत राहिला तर शेअर बाजाराची आवश्यकता उपस्थित होणार नाहीं. पैसे देऊन शेअर घेणारे व शेअर देऊन पैसे घेणारे असे नेहमीं अनेक लोक असतात, ते शेअर बाजाराच्या सोईमुळें एकत्र येऊं शकतात. शेअरची खरी किंमत त्याच्या दर्शनी बाजूवर लिहिलेल्या रकमेवर अवलंबून नसते. ती शेअरवर व्याज किती सुटतें व सुटेल ह्यावर अवलंबून रहाते. शेअरबाजारांत शेअर्सची ही खरी किंमत रोजच्या देवघेवीमुळें मागणी पुरवठ्याच्या नियमानें निश्चित होते. शेअर व स्टॉक ब्रोकर आपल्या गिऱ्हाइकांतर्फे बाजारांत खरेदी-विक्रीचा व्यवहार करतात व त्यासाठीं कांहीं कमिशन आकारतात. ह्या दलालांचे व्यवहार त्यांच्या संस्थेनें घालून दिलेल्या नियमांनुसारच चालावे लागतात. मुंबई शहरांतील नेटिव्ह शेअर अँड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशन सुप्रसिद्ध आहे.

### रोखीचा व्यवहार

एकाद्यास आपल्या जवळील भाग विकावयाचे असल्यास, तो शेअर बाजाराच्या दलालामार्फत आपलें काम करतो. गिऱ्हाइकांकडून ऑर्डर मिळाली कीं दलाल त्या दिवशींच्या बाजारभावानें तो भाग दुसऱ्या दलालास विकतो, व त्याचा करार तयार करून त्यावर मिळालेली किंमत व दलाली ही लिहितो. कराराचे कागदावर किंमतीच्या रकमेस अनुसरून सरकारी स्टँपहि लावावा लागतो; केव्हां केव्हां, दलालाच्या एका गिऱ्हाइकाच्या शेअरला त्याच्याच दुसऱ्या गिऱ्हाइकाकडून मागणी असते.अशा वेळीं दुसऱ्या दलालाचे मार्फत व्यवहार न करतां, तो स्वतःच तो पुरा करतो. गिऱ्हाइकास विकावयाचा असलेला भाग दलालास स्वतःच विकत घ्यावयाचा असला, तर कराराचा "बी" फार्म तयार करण्यांत येतो. अशा व्यवहारांवर दलाली नसते. ज्या व्यवहारांत प्रत्यक्ष दलालच खरेदीदार व विकणार असतो, त्यास 'जॉबिंगचा व्यवहार' म्हणतात. जेव्हां शेअर बाजाराच्या दोन दलालांचे दरम्यान व्यवहार होतात, तेव्हां त्यांचेमधील व्यवहाराचे स्टँपवरील करार करीत नाहींत. विकत घेणारा विकणाराचे करारपुस्तकांत व विकणारा विकत घेणाराचें करारपुस्तकांत असोसिएशनच्या नियमांप्रमाणें सही करितो.

समजा "अ" ह्या गिऱ्हाइकास सिंधा स्टीम कंपनीचें १०० भाग विकत घ्यावयाचे आहेत व त्यासाठीं त्यानें "ब" ह्या दलालास ऑर्डर दिली आहे. 'ब' हा 'क' ह्या दलालाकडून आपल्या गिऱ्हाइकासाठीं प्रत्येक भागास २२ रु. ह्या दरानें ते विकत घेतो व २२ रु. २ आ. ह्या दरानें करार "अ"कडे पाठवून देतो. वर सांगितल्याप्रमाणें त्यास स्टँप लावण्यांत येतो. 'क'नें भाग विकलेलें असतात तो 'ब'कडे शेअर वर्ग करण्यासाठीं लागणारे कागदपत्र पाठवून देतो.हे कागद त्यास त्याचे गिऱ्हाइकानें योग्य त्या प्रकारें सही करून दिलेलेच असतात. विकणाऱ्या दलालास साधारणतः एक आठवड्यांत भागांच्या वर्गावर्गीचे कागद खरेदी करणाऱ्या दलालास द्यावे लागतात. ठराविक दिवशीं 'क' व हा 'ब'च्या हवालीं शेअर सर्टीफिकिटें करतो व त्याचे बदली २,२०० रुपये घेतो. 'ब' हा "अ" ला २,२१२ रु. ८ आण्याचें बिल पाठवितो व ही रकम हातीं आली म्हणजे त्याचे हवाली शेअर सर्टीफिकिटें करतो. अशा रीतीनें "ब"ला ह्या व्यवहारांत १२ रु. ८ आ. दलाली मिळते. त्याचप्रमाणें 'क' 'ब' ह्यांचेमधील व्यवहार प्रत्येक भागास २१ रु. १४ आ. ह्या हिशेबानें पुरा होतो.

### वायद्याचा व्यवहार

कांहीं कंपन्यांच्या भागांची खरेदी-विक्री रोखी बरोबर वायद्यानेंहि होते. चालू महिन्यांत खरेदी-विक्रीचा करार करावयाचा, परंतु तो पुढच्या महिन्यांत सेटलमेंटचे दिवशीं पुरा करण्याचा हक्क ठेवून घ्यावयाचा, ह्यास वायद्याचा व्यवहार म्हणतात. समजा, एका 'अ' गिऱ्हाइकास टाटा आयर्नचे २० भाग विकत घ्यावयाचे आहेत व त्याच कंपनीचे ५ डिफर्ड भाग विकावयाचे आहेत. १० मार्च रोजीं त्यानें "ब" ह्या दलालास त्या संबंधांत ऑर्डर दिली. एप्रिल सेटलमेंटचा वायदा करावयाचा आहे. "ब" दलाल आपल्या अधिकृत कारकुनास हे व्यवहार करण्यास सांगतो. समजा "ब" ह्या दलालाकडून २० ऑर्डिनरी भाग प्रत्येकीं ३७५ रुपयांस घेतले व ५ डिफर्ड भाग प्रत्येकीं १,९४२ रुपयांस "ड" ह्या दलालास विकले. "ब" हा दलाल पूर्वी सांगितल्याप्रमाणें करारपत्रक तयार करून आपल्या गिऱ्हाइकाकडे पाठवितो "ब" "क" व "ड" ह्यामधील करार त्यांचे जवळील करार पुस्तकांत सह्या करून पुरे होतात. एप्रिलच्या सेटलमेंटचा व्यवहार संपला, म्हणजे "ब" दलाल आपला "अ" गिऱ्हाइकाकडे खालीलप्रमाणें हिशेब पाठवितो.–

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| जमा ५ शेअर्स टाटाडिफर्ड प्रत्येकीं १,९३५ रु. | ९,६७५ | ० | ० |
| नांवें २० ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं ३७६रु.४आ. | ७,५२५ | ० | ० |
| "अ"ला द्यावयाची रकम | २,१५० | ० | ० |

वरील हिशेबांत ऑर्डिनरी शेअरवर १ रु. ४ आ. व डिफर्ड शेअरवर ५ रु. ब्रोकरेज अंतर्भूत आहे. गिऱ्हाइकास वरील तक्ता मिळाला म्हणजे तो ५ डिफर्ड शेअर्स व ते वर्ग करण्याचे सर्व कागद 'ब' दलालाकडे लावून देतो. "ब" दलाल त्याचा तक्ता क्लिअरिंग हाउसकडे पाठवितो. ५ डिफर्ड शेअर्स द्यावयाचे आहेत व २० ऑर्डिनरी शेअर्स घ्यावयाचे आहेत असें तो क्लिअरिंग हाउसला कळवितो. "क" दलालहि २० शेअर्सच्या विक्रीचे व ५ शेअर्सच्या खरेदीचे कागद पाठवितो. क्लिअरिंग हाउस देण्याघेण्याचे व्यवहार पुरा करते. दलालांमधील परस्पर देण्याघेण्याचें काम ह्या योजनेमुळें सुलभ होते. "क" दलालास क्लिअरिंग हाउसचे मार्फत २० ऑर्डिनरी भाग व त्यासंबंधांतील पुरे झालेले कागद मिळतात व त्याबरोबर ५ टाटा डिफर्ड व २० टाटा ऑर्डिनरी ह्यांच्या विक्री-खरेदींतील तफावतीचे २,२०० रुपयेहि त्यास मिळतात. तो मग आपल्या गिऱ्हाइकास २,१५० रुपयांचा चेक पाठवून देतो व अशा रीतीनें आपली ५० रुपयांची दलाली मिळवितो.

( इं. मं. चें त्या त्रैमासिकांतील लेखावरून )

# स्फुट विचार

## व्हीशीच्या मंत्रिमंडळाची लाचारी

फ्रान्समध्यें व्हीशी येथील मंत्रिमंडळ जर्मनीपुढें इतकें लाचार झालें आहे कीं त्यास आचार विचाराचें स्वातंत्र्य राहिलें नसून हिटलरकडून येणाऱ्या मागण्यांस मान्यता द्यावी लागत आहे. कित्येक आठवडे जर्मनी व अंकित फ्रान्स ह्यांच्यामध्यें वाटाघाटी चालल्या होत्या आणि त्या दोघांचें इंग्लंड विरुद्ध सहकार्य व्हावें हा त्यांच्या चर्चेचा विषय होता. फ्रान्समधील कारखाने, फ्रेंच आरमार वगैरेंचें सहाय जर्मनीस हवें आहे आणि ह्या विषयींची मागणी नाकारण्याचें धैर्य पेटा ह्यांच्या मंत्रिमंडळांत नाहीं. युरोपाबाहेरील फ्रेंच वसाहतींचा उपयोग करण्याची मुभा आपणांस असावी असेंहि जर्मनीचें म्हणणें होतें. तें अखेर व्हीशी सरकारनें मान्य केलें असल्याचें स्पष्ट दिसत आहे. सीरियामधून जर्मन विमानांस संचार करण्यास व्हीशी सरकारनें परवानगी दिली असून इराकमध्यें चाललेल्या युद्धांत उघडपणानें तें जर्मनीस सहाय करीत आहे. जर्मनीच्या पंजाखाली सापडलेल्या फ्रेंच मंत्रिमंडळाच्या सहकार्यानें आफ्रिकेमधील फ्रान्सच्या वसाहतींवरहि हिटलर ताबा चालवल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या रीतीनें जर्मनीच्या आक्रमणास अमेरिकन खंडाकडचा मार्ग मोकळा होण्यास फ्रेंच मंत्रिमंडळ सहाय देत असल्यानें अमेरिकेस स्वतःच्या संरक्षणाचे उपाय योजणें प्राप्त झालें आहे. डिगॉलच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र फ्रेंच लोक व्हीशीच्या धोरणास पद्धतशीरपणानें विरोध करीत आहेत. सीरियामध्यें व्हीशी सरकारनें उघड रीतीनें ब्रिटिशांच्या विरुद्ध युद्ध पुकारलें आहे आणि जर्मनीनें तिकडील युद्धक्षेत्रांत चालवलेल्या हालचालींस सहाय देण्याच्या धोरणाचा अंगिकार केला आहे. व्हीशी मंत्रिमंडळास कोणत्याहि सवलती देण्याचें आमिष जर्मनीनें दाखवलें असलें तरी फ्रान्सचें आरमार, व्यापारी जहाजें व वसाहती ह्यांचा उपयोग करण्याची मुभा इंग्लंडच्या शत्रूस त्यानें दिली आहे हें कृत्य फ्रेंच राष्ट्राच्या नांवास कालिमा आणणारें आहे असें स्वातंत्र्यवादी फ्रेंच पुढारी म्हणत आहेत तें उद्बोधक आहे. युद्ध तहकुबीच्या जर्मनीशी झालेल्या कराराच्या मर्यादेपलीकडे व्हीशीचें मंत्रिमंडळ गेलें आहे अशी अमेरिकेचीहि तक्रार आहे.

---

## " बोलविता धनी वेगळाची "

व्हिशी येथील दुर्बल सरकार जर्मनीच्या कह्यांत पूर्णपणें गेल्याविषयीं शंका उरलेली नाहीं. मि. ईडन ह्यांनीं कॉमन्स सभेंत ही गोष्ट बोलून दाखवल्यानंतर त्यांस ॲडमिरल डॉर्लां ह्यांनीं उत्तर दिलें त्यावरून ही गोष्ट अगदीं स्पष्ट झाली आहे. त्यांच्या उद्गारांचा "बोलविता धनी वेगळाची" हें इतकें उघड झालें आहे कीं, त्याचा निराळा पुरावा देण्याची आवश्यकता उरलेली नाहीं. व्हिशी येथील मुत्सद्दी हिटलरचे हुकूम मानीत आहेत एवढेंच नव्हे तर त्याची स्तुति करीत आहेत ह्यापेक्षा त्यांचा अधःपात आणखी काय व्हावयाचा राहिला आहे ? फ्रेंच कारखाने जर्मनीसाठी युद्धसामुग्री तयार करण्यांत गुंतले आहेत आणि व्हीशीचें सरकार जर्मनीस इतर मार्गांनीं सर्व सहाय देण्यास तयार झालें आहे आणि हें सर्व फ्रान्सच्या स्वातंत्र्यासाठीं व इभ्रतीसाठीं आहे असें तें सांगत आहे. युरोपांत जर्मनी जी नवी राजकीय घडी बसवीत आहे तिला हातभार लावण्यांत व्हिशीचे पुढारी सज्ज झाले आहेत. हें त्यांचें नामुष्कीचें धोरण फ्रेंच जनतेस सर्वस्वी अमान्य असल्याचें तिच्याकडून दर्शविलें जात आहे. जर्मनीनें आक्रमिलेला फ्रान्सचा भाग व त्याच्या बाहेरचा भाग असा भेद आतां उरला नसून तो देश सबंद शत्रूच्या ताब्यांत गेला आहे असें समजून व्हिशी येथील सरकारास शत्रु लेखण्यावांचून इंग्लंडला गत्यंतर नाहीं. जर्मनीच्या जुलमामुळें व्हिशी येथील मंत्र्यांस कित्येक गोष्टी नाइलाजानें कराव्या लागतात ही सबब पुढें करतां येणें अशक्य झालें आहे आणि त्यांनीं आपलें इंग्लंडशीं वैर उघड केलें आहे. ह्या गोष्टीची दखलगिरी अमेरिकेसहि घेतली पाहिजे हें ओघानेंच प्राप्त होतें.

## इंग्लंडमधील वाढतें लढाऊ उत्पादन

जर्मनीच्या हवाई हल्ल्यांमुळें इंग्लंडमधील लढाऊ कारखान्यांतलें उत्पादन घटलें आहे, अशी बढाई गोअरिंग आपल्या लोकांपुढें मारीत आहे. परंतु अधिकृत माहितीवरून असें समजतें कीं तोफा व चिलखती सशस्त्र रणगाडे ह्यांचें तेथील उत्पादन चालू सालच्या पहिल्या तिमाहींत गेल्या वर्षाच्या कोणत्याहि तिमाहीच्या मानानें ५० टक्के अधिक झालें. यंत्रें व त्यांचे भाग ह्यांच्याकडूत अधिक काम घेण्यांत येत आहे. कांहीं जातींच्या लढाऊ सामानाचा पुरवठा अपेक्षेपेक्षा किती तरी ज्यास्त होत आहे. कारखान्यांत काम करणाऱ्या लोकांच्या दांडग्या उत्साहास ह्या प्रगतीचें श्रेय दिलें पाहिजे. शत्रूच्या बाँब गोळ्यांचा परिणाम त्यांचेवर होत नाहीं. उलट, त्यांचे योगानें ती द्विगुणित होते असा अनुभव आहे. इंग्लंडचें युद्धसामुग्री बनवण्याचें सामर्थ्य कमालीच्या परिमाणावर येऊन पोहोंचत आहे. ब्रिटिश सरकारच्या दृष्टीनें कारखान्यांत उत्पादन आणखी वाढावयास हवें आहे आणि त्यासंबंधांत जनतेचें पूर्ण सहकार्य होत आहे ही गोष्ट उत्तेजनकारक आहे. इंग्लंडमध्यें नुकताच एक शस्त्रसप्ताह साजरा करण्यांत शस्त्रास्त्रांच्या उत्पादनास सहाय देण्यासाठीं फंड जमा करणें हा त्याचा उद्देश होता आणि दहा कोटि पौंड म्हणजे एकशेंपस्तीस कोटी रुपये जमण्याचा त्यांत संकल्प होता. सप्ताहाची मुदत पुरी होण्यापूर्वींच संकल्पित रकम फंडांत जमा झाली. ह्यावरून ब्रिटिश राष्ट्राचा युद्ध जिंकण्याचा निश्चय किती करारी बाण्याचा आहे हें सिद्ध होतें. अमेरिकेचें युद्धसहाय इंग्लंडला वाढत्या प्रमाणांत मिळत आहे, पण खुद्द इंग्लंडमध्यें युद्धसामुग्रीच्या उत्पादनाचें प्रमाण सारखें वाढत आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे.

---

## साम्राज्यांतर्गत देशांचें उत्पादन–सहाय

युद्ध सामुग्रीच्या बनावटीबाबतचा उत्साह आणि त्या संबंधांत आवश्यक असलेला स्वार्थत्याग करण्याची तयारी हीं वर वर्णिल्याप्रमाणें केवळ इंग्लंडमध्येंच प्रत्ययास येत आहेत असें नाहीं. ब्रिटिश साम्राज्याच्या निरनिराळया भागांतहि ह्या गोष्टी स्पष्टपणें दिसून येत आहेत. ब्रिटिश कॉमन्स सभेंत सर किंग्स्ले वुड ह्यांनीं नुकतीच कॅनडाच्या कामगिरीविषयीं माहिती दिली, तिचा उल्लेख येथें केला असतां वरील विधानाची सत्यता सहज पटेल. इंग्लंड कॅनडामध्यें मालाची खरेदी करीत आहे त्याच्या किंमतीचा पैसा पुरवण्याची जबाबदारी त्या देशाच्या सरकारनें स्वतःच्या अंगावर घेतली आहे. ही रक्कम तीनशें चारशें कोटि रुपयांपर्यंत जाण्याचा संभव आहे. कॅनडाच्या मालाचा पुरवठा इंग्लंडला प्रचंड प्रमाणांत होत आहे, त्या देवघेवींत हुंडणावळीचा अवघड प्रश्न उपस्थित होतो. तो सोडवण्याचे कामीं कॅनडाचें सरकार

मनापासून सहाय देत आहे. त्या सरकारचें एकूण उत्पन्न गेल्या-सालीं झालें तें सुमारें दोनशें सत्तर कोटि रुपये होतें. आपल्या सांपत्तिक शक्तीच्या मानानें कॅनडा युद्धसामुग्री पुरवण्याच्या आणि त्या करितां लागणाऱ्या पैशाची तरतूद करण्याच्या कांमांत किती महत्त्वाची कामगिरी करीत आहे ह्याची कल्पना ह्यावरून सहज येईल. ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड ह्या देशांत युद्धसामुग्रीच्या बनावटीसाठी बाहेरून माल आणावा लागत असून त्याच्या किंमतीच्या हुंडणावळीचा प्रश्न सोडवणें प्राप्त झालें आहे. कॅनडाप्रमाणें त्यांतहि करांचा लोकांवरचा बोजा कितीतरी वाढला आहे. आणि तेथील जनता तो निमुटपणें सहन करीत आहे. दक्षिण आफ्रिकेचा सोन्याचें उत्पादन आणि हिंदुस्थानचा युद्धसामुग्रीचा पुरवठा ह्यांचे बाबतींत सर किंग्स्ले वुड ह्यांनीं गौरवपूर्वक उल्लेख केला.

## १९३९-४० चा साखरेचा मोसम

### महत्त्वाच्या गोष्टी

१ सर्वांत अधिक ऊंस गाळला.

२ साखरेचें उत्पादन सर्वांत अधिक झालें.

३ साखरेच्या बाजारभावांत कमालीची चढउतार झाली.

४ सर्वांत अधिक ऊंस कारखान्यांत गाळला गेला.

५ सर्वांत अधिक कारखाने चालू होते.

६ एक्साइज ड्यूटी सर्वांत अधिक बसली.

७ संयुक्त प्रांत व बिहार येथें सरकारी नियंत्रणाची कमाल झाली.

८ संयुक्त प्रांत व बिहार येथें उत्पादनाच्या प्रभावी नियंत्रणास प्रारंभ झाला.

९ पॉवर अल्कोहोलच्या उत्पादनास प्रारंभ झाला.

१० जादा नफ्यावरील कराची पट्टी बसली.

### एल्जिन मिल्स कं. लि.

मार्च, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीचे ६७¾ लक्ष रुपयांचें कापड खपलें. नफा ११¾ लक्ष रुपये उरला.

### लायसेन्स मिळालेले विमा एजंट

३१ मार्च, १९४१ अखेर खालीलप्रमाणें लायसेन्स मिळालेले विमा एजंट आहेतः—

| प्रांत | संख्या |
|---|---|
| बंगाल | २१,८१० |
| आसाम | ३,३१३ |
| बिहार | ३,८०० |
| ओरिसा | ५३० |
| मद्रास | २३-५२६ |
| मध्यप्रांत | ३,३०३ |
| सरहद्द प्रांत | ४६३ |
| मुंबई | १९,०७९ |
| पंजाब | ६,०१५ |
| सिंध | २,११० |

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## मुंबई प्रांतांतील पिकांची सुधारणा

( शेतकी खात्याचा ताजा अहवाल )

### तांदूळ

मुंबई प्रांतांतील तांदुळाचें पीक सुधारण्याबाबत शास्त्रीय संशोधनाचें काम निरनिराळ्या ठिकाणीं विशेषेकरून कुलाबा व ठाणें जिल्ह्यांतील तांदुळांकरितां कर्जत येथें, दक्षिण महाराष्ट्रांतील तांदुळांकरितां मुगड येथें आणि कोंकणांतील तांदुळाचें पिकांकरितां कुमठा व रत्नागिरी येथें केलें जात आहे.

दक्षिण विभागांत तांदुळांमध्यें सुधारणा करण्याबाबत मुगड राईस ब्रीडिंग स्टेशनमध्यें काम चालू होतें. आणि तांदुळांतली अर्ली दोड्या नांवाच्या जातीच्या सात प्रकारांची कसोटी घेण्यांत आली. मुगड आणि अंतर्साळ जातीच्या तांदुळांच्या सुधारलेल्या प्रकारांचाहि अभ्यास चालूं होता आणि ज्यांतून चांगली निष्पत्ति होईल अशा तऱ्हेचें साहित्य पुढच्या कामासाठी शिल्लक ठेविलें होतें. स्थानिक तांदुळाच्या प्रदेशांत कांहीं विशिष्ट वातावरणाच्या स्थितींत तयार होणारे मुंबई इलाख्याबाहेरील प्रांतांतून आयात केलेले तांदुळाचे प्रकार उपयुक्त ठरतील असें मुंबई प्रांताबाहेरील तांदुळाच्या जातीवरील प्रयोगांवरून दिसून येतें. मुगडला सुधारून शोधून काढलेल्या भाताचे जिल्हावार प्रयोग चालू होते आणि स्थानिक ( तांदुळांपेक्षा ) अशा प्रकारचा तांदूळ केव्हांहि सरस होता हें सिद्ध झालें. कोंकणांतले तांदूळांचा प्रयोग अशाच तऱ्हेनें कुमठा फार्मवर चालू होता आणि मस्कती, जेडू, तांबडा व पांढरा हलगा आणि मुगिन बेल्डा वगैरे तांदुळांच्या सुधारलेल्या जाती शोधून काढण्यांत आल्या. जिल्ह्यांतून त्यांवर प्रयोग चालूं आहेत. ह्या सुधारलेल्या जाती स्थानिक जातींपेक्षा निश्चित रीतीनें जास्त पीक देणाऱ्या आहेत व ह्या सुधारलेल्या जाती स्थानिक जातींऐवजी आणण्याचा उद्देश आहे.

कर्जतच्या राईस ब्रीडिंग स्टेशनमध्यें झिन्या जातीच्या तांदुळांचे चार निवडक प्रकार जास्त उत्पन्नाच्या दृष्टीनें आशादायक असे सांपडले आहेत. परंतु विस्तृत भागांतून जमवून आणलेल्या नमुन्यांत निवड करण्याचें काम चालू आहे. भडस कडा, जिरबुटी आणि पहाडी वगैरे कोंकणांतल्या तांदुळांच्या जातींमध्यें निवड करण्याचें कामहि चालू होतें. त्याचप्रमाणें आशा करतां येण्यासारखें साहित्य पुढच्या कामासाठी मिळवून ठेविलें आहे. अशाच प्रकारचें तांदुळांच्या बाबतींत निवडशोध करण्याचें काम कोंकणाबाहेरील तांदुळांच्या जातींच्या बाबतींतहि विशेषतः पश्चिम खानदेशांतील साठी, ठाण्यामधील सुतरसाळ आणि कांहीं सुवासिक अशा तांदुळांच्या जाती ह्यांचे बाबतींत चालू होतें. मिश्र कोळंब्याच्या भाताचें फार्मवर संशोधन करण्याचे प्रयोग चालू होते.

---

### लॉऱ्यांच्या वहातुकींत वाढ

लॉऱ्यांच्या वहातुकींत प्रचंड वाढ झाली आहे, असें दिल्ली येथें नुकत्याच गोळा केलेल्या आकड्यावरून दिसून येतें. गेल्या पांच वर्षांपूर्वीच्या परिस्थितीशीं तुलना केली असतां, दिल्लीस जाणाऱ्या चार हमरस्त्यांवरून जाणाऱ्या लॉरींची रोजची संख्या ७३६ ची आतां १२१९ झाली आहे. त्यांची प्रत्येकी सरासरी वजन वाहाण्याची शक्ति २·८ टनाची ४·२ टन झाली आहे, असें समजतें.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| आधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष) श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; मि. आर. एल. फेरार्ड.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

---

## औषधाशिवाय रोगमुक्त व्हा !

**आरोग्य चिकित्सा शिक्षक**—डॉक्टर, वैद्यांच्या औषधाला कंटाळलेले रोगी निसर्गसिद्ध सुलभ उपायांनीं सहज बरें करून आरोग्याचा अखण्ड सुखोपभोग घ्या ! पैसा वांचवा ! किं. १॥ रु.

**लंघन-चिकित्सा शिक्षक**—प्लेग, कॉलरा, व इतर हट्टी रोग औषधाशिवाय फक्त लंघनें करून रोगमुक्त व्हा ! वज्रदेही बना ! नवी तिसरी आवृत्ति. किं. १॥ रु. ट. ह. शिवाय. यादी फुकट. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

---

# K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA.**

---

## कोरोना पोर्टेबल विकणें आहे.

कोरोना पोर्टेबल टाइपरायटर उत्तम स्थितींतला खासगी कामासाठीं वापरलेला, विकणें आहे.

" क्ष " C/o अर्थ.

## शिंप्याचें शिवण्याचें मशीन जप्तीस पात्र असतें काय ?

### अलाहाबाद हायकोर्टाचा निवाडा

कानिझाक जोहरा ह्या (हरकतदार) बाईनें अहमद सय्यद (अर्जदार) याजविरुद्ध एक पैशाचा हुकूमनामा मिळविला आणि तो बजावणीच्या कामी अर्जदाराच्या शिवणकामाच्या दुकानांतील सहा शिवण्याचीं यंत्रें ( मशिन्स ) जप्त केलीं. पुढें असें झालेलें दिसतें कीं, त्यापैकीं दोन यंत्रें ( मशिन्स ) जप्तींतून खुलीं केलीं परंतु तींही अर्जदारानें विकून टाकलीं. अर्जदारानें सिव्हिल प्रोसिजर कोड क. ६० ( १ ) ( ड ) प्रमाणें राहिलेलीं चार मशिन्स जप्तीस पात्र नाहींत तरी तीं परत मिळावीं अशी हरकत उपस्थित केली. ती हरकत खालच्या कोर्टानें नामंजूर करून असें नमूद केलें कीं " अर्जदार हल्लीं दुसऱ्याच्या दुकानांत काम करतो; त्याला काम करावयास एक मशीन पुरेसें होतें व त्यावर त्याचा निर्वाह भागला असता; जप्तींतून खुलीं केलेलीं मशिन्स विकण्याचें त्यास कारण नव्हतें. "

या निकालावर प्रस्तुतचा अर्ज हायकोर्टाकडे अर्जदारानें केला आहे.

मुद्दे व विवेचन:-सिव्हिल प्रोसिजर कोड कलम ६० ( १ ) ( ड ) प्रमाणें कोणाहि कारागिराचें हत्यार जप्तीस पात्र नाहीं. त्या ठिकाणीं असें म्हटलेलें नाहीं कीं, जीं हत्यारें कारागिराच्या निर्वाहास आवश्यक असतात तेवढींच जप्तीस पात्र नाहींत. 'कामगार' याचा वेब्स्टरच्या आंतरराष्ट्रीय शब्दकोशांत अर्थ असा दिला आहे कीं, जो मनुष्य यांत्रिक कलाकौशल्याचा उद्योग करतो असा हस्तव्यवसायी किंवा तत्सम शारीरिक काम करणारा. शिंपीकाम करणारा कायद्यानें 'कारागीर' या संज्ञेंत बसतो याबद्दल शंकाच नको. आणि अशा 'कारागिराचें' शिवण्याचें मशीन हें कायद्यानें 'कारागिराचें हत्यार' आहे हें उघड आहे. शिंपी हा कारागीर असून त्याचें मशीन कारागिराचें हत्यार आहे असें ६५ इंडियन केसेस ४१६ या निवाड्यांत नागपूर हायकोर्टानेंही मानलें आहे. खालच्या कोर्टाचें मतें त्याला इतरत्र काम आहे व दोन मशिन्स जप्तींतून सोडलीं होतीं म्हणून बाकीचीं मशिन्स खुलीं करून मागतां येत नाहींत. असें आहे. तें चूक आहे. अशा जप्तीच्या हरकत कामामध्यें जप्तीच्यावेळीं हरकतदार काय करत होता हें पाहिलें पाहिजे आणि त्याहि दृष्टीनें जप्त केलेलीं सहा मशिन्स अर्जदाराच्या दुकानांत कामास लागत होतीं. तेव्हां तीं सर्व मशिन्स जप्तीच्यावेळीं कायद्याच्या अर्थानें " कारागिराचीं हत्यारें " होतीं. तेव्हां तीं जप्ती होण्यास पात्र नाहींत म्हणून खालच्या कोर्टाचा हुकूम रद्द करण्यांत येत आहे.

अर्ज मंजूर.

सारांश:—शिवणकाम करणाऱ्या मनुष्यास कायद्यानें 'कारागीर' म्हणतां येतें व त्याचें मशीन कायद्यानें त्याचें 'हत्यार' असतें, म्हणून हुकुमनाम्याचे बजावणीचें कामीं शिंपी कामाचें मशीन जप्त करतां येत नाहीं. ( असाच निर्णय नागपूर ज्यु. क. कोर्टानें १९ ना. लॉ रि. २२ मध्यें दिला आहे. )

—" न्यायबोध" वरून.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या
अशक्ततेवर
रक्तवर्धक
वापरा.
सर्वत्र मिळतें.
—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
आयुर्वेद रसशाळा
पुणें, लि. पुणें ४.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,७९,७०० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,८९,८५० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

डायरेक्टर्स
प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.
बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टके करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.
म. वि. गोखले
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११०–१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४–५ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९५–४ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२–१० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४–१० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७–८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८–० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७–८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... ... | ११५–० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२५–० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३८–१२ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०६–४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४१–१२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५४७–८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३–८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०२–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% ... ... | १३०–० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५–४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २२५–१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५३०–० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १८१५–० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४–४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ५८–० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८७१–४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६४५–० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | १९९–० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–६० ) २ रु. ... ... | ४४–० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९–५ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४१–१४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३९२०–० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१३–१२ |
| टाटा आयर्न डु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४७–४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३५२–८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १७०२–८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १३३–४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–४–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६२–८–६ |


**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

**पुण्यांत आल्यावर**

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक
निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.

**अवर होम,**
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

### उद्योगधंद्यांस मुंबई सरकारची मदत

मुंबई प्रांताच्या औद्योगिक खात्यानें सरकारकडे सादर केलेल्या उद्योगधंद्यांस सरकारी मदत देण्याबाबतच्या सुधारलेल्या कानूंचा सरकारकडून विचार करण्यांत आला आणि असें ठरविण्यांत आलें कीं हे कानू तुर्त मंजूर करण्यांत येऊं नयेत, परंतु सदरहू कानूंतील तत्त्वें, जरूर त्या प्रसंगीं, सरकारी मदतीसाठी करण्यांत येणाऱ्या विवक्षित अर्जांस लागू करण्यांत यावींत. १९३९–४० सालीं सरकारी मदत मिळण्यासाठीं बरेचसे अर्ज आले व त्यांची विल्हेवाट लावण्यांत आली. चार बाबतींत ५४,३८० रुपये एकूण किंमतीचीं कर्जें मंजूर करण्यांत येऊन अहवालाचे सालीं देण्यांतहि आलीं. ज्या कारखान्यांस कर्जाऊ रकमा देण्यांत आल्या ते कारखाने म्हणजे,—

(१) केमिकल व फार्मास्युटिकल प्रॉडक्ट्स तयार करणारी फर्म; (रु. ४८,०००).

(२) तराजू व वजनें, लॅबोरेटरींतील साधनसामुग्री व शास्त्रीय उपकरणें वगैरें तयार करणारी फर्म; (रु. ४०००).

(३) पाळणे, वगैरे लहान प्रमाणांत तयार करणारा कारखाना (रु. ४८०); आणि

(४) कॅमेरे तयार करणारी फर्म (रु. १,९००). मंजूर करून देण्यांत आलेल्या या कर्जाऊ रकमांसेरीज १,०३,३०० रुपये किंमतीचीं आणखी कर्जें अहवालाचे सालीं मंजूर करण्यांत आलीं, परंतु गहाणखत वगैरे करण्याबाबतची तत्पूर्वींची व्यवस्था वर्ष संपण्यापूर्वीं पुरी होऊं न शकल्यामुळें तीं वांटून देतां आलीं नाहींत.

एका गृहस्थानें वनस्पतिजन्य तेलाचा दिवा शोधून काढला आहे; खेडेगांवांतून त्याचा उपयोग करतां येईल अशा रीतीनें त्यांत फेरफार करण्यासाठी आणखी संशोधनकार्य करण्याकरितां सदरहु गृहस्थास ३,००० रुपयांची ग्रँट मंजूर करून देण्यांतहि आली. या संबंधींचे प्रयोग चालू आहेत.

---

### ८४ हजार युद्धकैद्यांची सोय

हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश सरकाराचे वतीनें ८४ हजार युरोपियन युद्धकैद्यांची सोय करण्याची जबाबदारी पत्करली आहे. आतांपर्यंत ३० हजार युद्धकैदी हिंदुस्थानांत दाखल झाले आहेत त्यांपैकीं ३ हजार अधिकारी आहेत. हिंदुस्थानांत एकहि जर्मन युद्धकैदी नाहीं. अडकवून ठेवलेले जर्मन नागरिक वेगळे.


या नव्या शोधानें सर्व जगभर खळबळ उडवून दिली आहे.

## दहा हजार रुपये अगदी फुकट.

**अमृतसरमध्यें २॥ रु. तोळा सोनें**

मिनर्व्हा गोल्डची घरोघर प्रशंसा! मिनर्व्हा गोल्ड हा नकली सोन्याचा अगदी नवा शास्त्रीय आविष्कार होय. त्यानें केवळ वैज्ञानिकांनाच आश्चर्यानें थक्क करून सोडलें एवढेंच नव्हे, तर सर्वसाधारण लोकांची एक अत्यंत मोठी उणीव भरून काढली आहे. सर्व स्त्रिया त्याच्या दागिन्यावर बेहद्द खूष होतात. ज्या घरांत हें सोनें एकदां शिरलें तेथून दोनदोनदा तीनतीनदा त्यांस मागण्या येत आहेत.

मेहेरबान लाला विद्यारतनसाहेब, म्युनिसिपल कमिशनर, पठानकोटाहून २५ आक्टोबरला लिहितात—"काल आपल्या सोन्याचें पार्सल मिळालें; धन्यवाद! आपण हा नवीन पदार्थ तयार करून जगाची एक मोठीच उणीव भरून काढली आहेत. उलट टपालीं आणखी तीन तोळे सोनें पाठवावें."

याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रें उदाहरणार्थ रियासत, काँग्रेस, स्वस्तिक, अलामान, जमीनदार, गुरुघंटाल प्रताप, इत्यादींनीं प्रशंसोद्गार खुषीनें छापले आहेत.

हें सोनें कसास लावलें तर अस्सल सोन्याचाच रंग दाखवतें आणि अस्सल सोन्याप्रमाणेंच ठोकलें व गाळलें जातें. याचे हरएक प्रकारचे दागिने बनवता येतात. नापसंत पडल्यास किंमत परत मिळण्याची गॅरंटी आहे; खास प्रसारासाठीं किंमत १ तोळ्यास २॥ रु.; ३ तोळ्यास ७ रु.; ६ तोळ्यास १३ रु.; व ४० तोळ्यास ८० रु.

**मिनर्व्हा गोल्डचे बनवलेले दागिने**

मिनर्व्हा गोल्डच्या बनवलेल्या बांगड्या दर जोडीला २ रु.; कानांतील सोन्याचे डूल दर जोडीला ३ रु.; खड्याची अंगठी ३ रु.; साधी मुंबई फॅशनची अंगठी २ रु.; जाळीच्या बांगड्या दर जोडीला ५ रु.; (नेकलेस) माळ १२ रु.; लॉकेट ६ रु.; दस्तबंद दर जोडीला १४ रु.

माल पसंत पडला नाहीं तर परतबोलीची खात्री. पोस्टाचा खर्च फक्त ८ आणे पडतो.

या गोष्टी खोट्या ठरवून देणारास दहा हजार रुपये फुकट दिले जातील. याशिवाय दर तीन तोळे सोनें खरेदी करणारास टिकाऊपणा व सौंदर्य याची १० वर्षें गॅरंटी असलेलें एक फॅन्सी रिस्टवॉच फुकट दिलें जाईल; गॅरंटीचा कागद प्रत्येक घड्याळाबरोबर धाडला जातो.

मिळण्याचा पत्ता—मॅनेजर अमेरिकन मिनर्व्हा गोल्ड हाऊस, (A. P.) K. C. अमृतसर.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
लवंक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ४ जून, १९४१ अंक २३

दक्षिण कोंकणांतील राष्ट्रीय बाण्याचें
प्रमुख साप्ताहिक

## हिंद–सेवक

संपादक—सदानंद शांताराम भांडारकर
प्रकाशक—मधुकर यशवंत भांडारकर

हिंदसेवकमध्यें दर गुरुवारीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व घडामोडींची विस्तृत माहिती मिळते.

व्यवस्थापक–'हिंद–सेवक', मालवण, जि. रत्नागिरी.

## ग्रामोद्योग करून पैसा मिळवा.

**देशी रंगारी शिक्षक**—विदेशी रंग महागले ना ? मग वनस्पतीपासून रेशीम, सूत, लोकर रंगविणें व चिटें छापण्याची सोपी माहिती शिका. किं. १॥ रु.

**नजरबंद शिक्षक**—जादूच्या ८० चमत्कारिक खेळांची सचित्र माहिती मागवून जादूगार व्हा ! किं. १॥ रु.

**बुटपालिश शिक्षक**—कातड्याला लावण्याची घट्ट व पातळ निराळ्या रंगाची पॉलिश घरीं बनवा ! किं. ॥० ट.

ह. निराळा. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

## पुण्यांत अमृताचा वर्षाव होत आहे—

नवयुगचा मराठी
सामाजिक बोलपट

# अमृत

दिग्दर्शक : विनायक
कथा-संवाद : खांडेकर
फोटोग्राफी : पांडुरंग नाईक

२ रा आठवडा

मिनर्व्हा–पुणें— तुफान गर्दींत सुरू आहे.

रोज : ६॥ व १०. शनि. रवि. सोम. जादा शो ३॥ वा.
प्रकाशक : पिअरलेस पिक्चर्स, ११६ चर्नीरोड, मुंबई ४

# विविध माहिती

### म्हैसूरमधील विजेचा प्रसार

म्हैसूर संस्थानांतील विजेच्या ग्राहकांची संख्या पांच वर्षांपूर्वी ३१,१९० होती, ती आतां ४६,४८७ झाली आहे. गेल्या वर्षी म्हैसूरच्या वीज खात्याचें उत्पन्न सुमारें ७०-लक्ष रुपये झालें. गुंतलेल्या भांडवलावर ८.६९% व्याज सुटलें. एकूण ९१६ गांवांस वीज पुरवठा झालेला आहे.

### म्हैसूर सरकारची नवीन कारखान्यांस मदत

म्हैसूर सरकारच्या सहायानें १९३९-४० मध्यें तीन नव्या कंपन्या स्थापन झाल्या. दि म्हैसूर क्रोम टॅनिंग कंपनीचे १ लक्ष, ३ हजार रुपयांचे भाग सरकारनें घेतले. बंगलोर ट्रॅन्सपोर्ट कंपनीचे पाऊण लाखांचे भाग सरकारनें खरेदी केले आहेत. म्हैसूर मॅच कंपनीचे ५० हजारांचे भाग सरकार घेणार आहे. औद्योगिक प्रयत्नांसाठी २२ अर्जदारांना ३९ हजार रुपये मंजूर करण्यांत आले.

### म्हैसूरचा साबण कारखाना

म्हैसूरच्या साबण कारखान्याची विक्री गेल्या वर्षी ५ लक्ष, ४० हजार रुपयांची झाली.

### "ऑस्टिन" मोटारींचा जनक

"ऑस्टिन" ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश मोटारींचे कारखानदार लॉर्ड ऑस्टिन हे वयाच्या ७५ व्या वर्षी नुकतेच मरण पावले. विशेषतः "बेबी" गाड्यांच्या उत्पादनांत सर हर्बर्ट ऑस्टिन ह्यांस उत्कृष्ट यश मिळालें.

### संततीस पद्धतशीर प्रोत्साहन

जननाचें प्रमाण वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न जपानमध्यें चालू आहे. १९४५ पूर्वी जपानची लोकसंख्या १० कोटींपर्यंत नेण्याचा जपानी सरकारचा प्रयत्न आहे. शारीरिक व्यंग नसलेल्या ३० वर्षांखालील पुरुषांस व २० वर्षांखालील स्त्रियांस प्रत्येकीं ५०० ते १,००० रुपयांचीं कर्जें देण्यांत यावयाचीं आहेत. कर्जाची रक्कम मासिक हप्त्यांनीं १० वर्षांत फेडण्यांत यावी, अशी व्यवस्था केली जाईल. ह्या मुदतींत चार अपत्यें झालीं, तर कर्जफेडीचें कारण नाहीं. प्रत्येक अपत्यामागें एक चतुर्थांश कर्ज माफ होईल.

### फील्ड मार्शल स्मट्स

दक्षिण आफ्रिकेचे मुत्सद्दी पुढारी जनरल स्मट्स ह्यांस त्यांच्या ७१ व्या वाढदिवसाचे दिवशीं बादशहांनीं फील्ड मार्शलचा दर्जा बहाल केल्याचें जाहीर झालें आहे. बोअर युद्धांत जनरल स्मटसचे नेतृत्वाखालीं केप कॉलनींतील सबंद बोअर फौज होती. दक्षिण आफ्रिकेच्या वसाहतींच्या एकीकरणाचे कामीं त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले. जनरल स्मटस हे वनस्पतिशास्त्रांतहि प्रवीण आहेत. राष्ट्रसंघाच्या घटनेचा त्यांचा मसुदा सुप्रसिद्धच आहे.

### युद्धाच्या धोक्याचा विमा--सल्लागार मंडळाची नेमणूक

हिंदुस्थान सरकारनें युद्धाच्या धोक्याचे विम्यासंबंधांतील सक्तीविषयीं ऑर्डिनन्स काढलेला असून त्याखालीं नियमहि केलेले आहेत. त्यांची अंमलबजावणी, ऑर्डिनन्समध्यें दुरुस्ती, इत्यादींविषयीं सरकारास सल्ला देण्यासाठी सरकारनें एक कमिटी नेमली आहे. मि. कॉर्बेट राइट, मि. टी. सी. एफ. बुसर, श्री. देसाई, मि. लिशमन, श्री. सेटलवाड व मि. लीथ हे त्या कमिटीचे सभासद आहेत.

### रूझवेल्ट हे ज्यू रक्ताचे आहेत ?

अमेरिकेचे अध्यक्ष, मि. रूझवेल्ट हे स्वतः व त्यांचे सर्व प्रमुख सल्लागार ज्यू रक्ताचे आहेत, असा प्रचार करण्यास जर्मन वृत्तपत्रांनीं प्रारंभ केला आहे.

### आयुर्विमा कंपन्यांचे फंड

"हिंदी विमा कायद्यानें हिंदी आयुर्विमा कंपन्यांनीं आपले पैसे कसे गुंतवावे, हें सांगितलेलें आहे. सरकारी व सरकारमान्य रोख्यांत त्यांनीं निदान ५५% रकम गुंतविली पाहिजे, अशी सक्ती करण्यांत आली आहे, परंतु ह्या रोख्यांवर व्याजाचा दर फारच अल्प पडतो. भांडवलाची सुरक्षितता कायम राहून, त्यावर अधिकांत अधिक व्याज मिळावें, ह्या दृष्टीनेंच विमा कंपन्यांनीं पैसे गुंतविणें इष्ट आहे. हिंदी विमा कायद्यांतील ह्याविषयींची योजना सदोष असून, सरकारी व निमसरकारी रोख्यांतील गुंतवणूक अनुक्रमें १५% व १०% वर आणून तो दोष नष्ट केला पाहिजे.":—झेनिथ लाइफ इं. कं. चे जनरल मॅनेजर व इंडियन लाइफ ऑफिसेस असोसिएशनचे अध्यक्ष.

### हातमागाच्या धंद्यास संरक्षण

अम्मापेठ (जिल्हा सालेम, मद्रास) येथें कोष्ट्यांची एक परिषद नुकतीच भरली होती. धोतरें, पातळें, इत्यादि विणण्यास हिंदुस्थान सरकारनें गिरण्यांस प्रतिबंध करावा व तो अधिकार केवळ हातमागांसच असावा, कोष्टी लोकांच्या सहकारी सोसायट्यांस सरकारनें कर्ज सढळ हातानें द्यावें, विदेशी रेशीम व रेशमी कापड ह्यांवर जबर जकात बसवून स्थानिक उत्पादनास संरक्षण द्यावें, इत्यादि ठराव परिषदेनें मंजूर केले.

शेठ रामनिरंजन आनंदीलाल पोद्दार कॉलेज ऑफ कॉमर्स

शिक्षण प्रसारक मंडळीचें, वरील नांवानें मुंबई येथें निघणारें व्यापारी शिक्षणाचें कॉलेज ता. २० रोजीं सुरू होईल.

### पावसाळ्यास प्रारंभ

मलबारमध्यें पावसाळ्यास प्रारंभ झाल्यानंतर सुमारें दहा दिवसांनीं महाराष्ट्रांत पाऊस पडूं लागतो, ह्या दरसालच्या अनुभवावरून यंदा पावसाळा जूनचे पहिल्या आठवड्यांत सुरू होईल असें दिसतें. मे १९३६ सालीं ज्याप्रमाणें हवामान होतें, तसेंच चालू वर्षी मे महिन्यांत होतें व त्या वर्षी ५ जूनला पाऊस सुरू झाला होता.

### विजेचा पुरवठा बंद पडला तर ?

अडीअडचणीचे वेळीं शत्रुपक्षाच्या कारवायांमुळें विजेचा पुरवठा तुटला गेला, तर निदान आवश्यक त्या ठिकाणीं तरी वीज चालू रहावी, ह्याकरितां बंगाल सरकार विजेच्या ग्राहकांची छाननी करून त्या संबंधांत उपाय योजना करीत आहे.

### हिंदी कपाशीचा वाढता खप

कपास कापडाच्या हिंदी गिरण्यांत देशी कपाशीचा खप वाढत्या प्रमाणावर होत आहे. मार्च १९४० मध्यें तो २ लक्ष ५ हजार गाठी व मार्च १९४१ मध्यें २ लक्ष ९६ हजार गाठी झाला. मुंबई प्रांतांत मार्च १९४० मध्यें ५३ हजार गाठी खपल्या. मार्च १९४१ मध्यें १ लक्ष, ३१ हजार गाठींचा खप झाला.

### पंजाब विश्वविद्यालयाची मॅट्रिक परीक्षा

पंजाब विश्वविद्यालयाच्या मॅट्रिकच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. ३०,०४२ उमेदवारांपैकी २२,५९४ उमेदवार यशस्वी झाले. म्हणजे, शेकडा ७५.०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २६६ | ५ मालांची खरेदी-विक्री कशी होते ? ... | २७० |
| २ जगाची आर्थिक पुनर्घटना ... ... | २६७ | ६ हैद्राबाद संस्थानांतील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा ... | २७१ |
| ३ मराठा चेंबरची वार्षिक सभा ... | २६८ | ७ वकीलाकडे जाऊं नका | २७२ |
| ४ स्फुट विचार ... अमेरिकन प्रेसिडेंटांचें ठसठशीत भाषण—समुद्रावरील वहातुकीचें स्वातंत्र्य—विमा पॉलिसीच्या तारणावर कर्जें. | २६९ | ८ निवडक बाजारभाव | २७३ |
| | | ९ युद्धफंडास सहाय्य ... | २७४ |



# अर्थ

बुधवार, ता. ४ जून, १९४१


## जगाची आर्थिक पुनर्घटना

मानवी संस्कृतीस लाज आणणाऱ्या सध्यासारख्या हानिकारक युद्धाची आपत्ति जर्मनीस प्रस्तुतच्या प्रगतीच्या व सुधारणेच्या युगांत जगावर आणणें शक्य व्हावें आणि स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रांस असल्या राष्ट्राचा प्रतिकार करण्यासाठी आपलें शक्तिसर्वस्व वेचावें लागावें ही गोष्ट कोणाहि विचारी माणसास बुचकळ्यांत टाकल्यावांचून रहात नाहीं. शांतताप्रिय व निरपराधी बहुसंख्य लोकांचें जीवित धोक्यांत यावें आणि शस्त्रास्त्रांच्या जोरावर स्वतःस सुधारलेले म्हणवणाऱ्या राष्ट्रांनीं इतरांस आपले दास बनवावें ही परिस्थिति कशी निर्माण झाली आणि तिचीं कारणें कोणत्या मार्गांनीं दूर करतां येतील ह्याविषयीं सत्प्रवृत्त विचारवंतांनीं चर्चा करावी हें स्वाभाविक आहे. जर्मनी-इटली-जपान त्रिकुटानें जगांतील राष्ट्रांची पुनर्घटना करण्याचें कार्य स्वतःच्या अंगावर घेतलें आहे आणि त्यांच्या कल्पना व मार्ग ह्यांची माहिती आतां सर्वांस झाली आहे. प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांनीं अमेरिकेवर येऊन ठेपलेल्या संकटाचें निवारण होण्यासाठी करावयाच्या तयारीस अनुलक्षून जाहीरनामा नुकताच काढला आहे, त्यांत प्रस्तुत युद्धांत जर्मनीचा मुख्य हेतु जगांतील लोकनियंत्रित राज्यव्यवस्था नष्ट करून स्वतःची सत्ता सर्वत्र स्थापावयाची हा असल्याचें स्पष्ट म्हटलें आहे. तेव्हां जगाची पुनर्घटना चालू युद्धासारखी मानवी संकटं अशक्य करण्यासाठी कशा रीतीनें व्हावी ह्या प्रश्नाचा विचार केला जाणें साहजिकच नव्हे तर आवश्यक आहे. ह्या बाबतींतल्या निरनिराळ्या लोकांच्या कल्पना भिन्नभिन्न असणें स्वाभाविक आहे, त्याप्रमाणें प्रस्तुत रोगाचें निदान आणि त्यावरील उपाययोजना ह्यांचे संबंधांत मतवैचित्र्य दिसून येतें.

हिंदुस्थान सरकारचे कायदेमंत्री, सर महमद झाफरुल्लाखान, ह्यांनीं अलीकडे जागतिक पुनर्घटनेच्या विषयावर सिमला येथें रेडिओवर भाषण करून आपले विचार पुढें मांडले, त्यांतील मुख्य मुद्यांचा निर्देश येथें करणें जरूर आहे. जर्मनीसारख्या देशांत आर्थिक प्रगति इतकी झपाट्यानें झाली आहे कीं तें राष्ट्र युद्धास उद्युक्त झाल्याचें कारण इतर संपन्न देशांविषयींच्या राजकीय सत्तेविषयीं वाटणारा हेवा हें असून त्यास सांपत्तिक कारण जबाबदार नाहीं. ह्या निदानास अनुसरून सर महमद ह्यांची उपाययोजना आहे. जगाची खरी सुधारणा होण्यास राज्यघटनेची पुनर्रचना हा उपाय नसून मानवी मनाची ठेवण बदलणें हा त्यांचा तोडगा आहे. व्यक्ति आणि समाज ह्यांस ज्याप्रमाणें नैतिक बंधनांची आवश्यकता असते तशीच आवश्यकता आंतरराष्ट्रीय संबंधांत आहे असें त्यांचें म्हणणें आहे. जगांतील राजकर्त्यांनीं सर्वत्र नीतीनें वागून एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न सोडला पाहिजे ह्या भूमिकेवरून त्यांनीं कित्येक सूचना केल्या आहेत.

राष्ट्रांतील आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांतील द्रव्यलालसा नाहींशी व्हावी एवढ्यासाठी कर्जावर व्याज घेण्याची पद्धति चोहोंकडे बंद करण्यांत यावी अशी त्यांची पहिली सूचना आहे. व्याजावर व्यक्ति आणि राष्ट्रें गबर होतात आणि पैशाच्या जोरावर सत्ता मिळवून तिचा दुरुपयोग करतात असा ह्या सूचनेच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं युक्तिवाद पुढें मांडला आहे. व्याज बंद करावें हें म्हणणें फार सोपें आहे, पण त्याचा उगम काय आणि कार्य कोणतें ह्याचा विचार केला असतां ती सूचना किती अव्यवहार्य आहे ह्याची कल्पना येईल. व्याज व नफा ह्यांस आळा घालणें इष्ट असलें तरी त्यांस बंदी करणें म्हणजे उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या मुळावर कुऱ्हाड घालणें होय. रशियामध्यें आज व्याज आणि नफा यांचें उच्चाटन झालें आहे, पण त्यायोगानें त्या राष्ट्राची हाव व महत्वाकांक्षा हीं मर्यादित झालेलीं दिसत नाहींत. भांडवलवाल्यांनीं गरीब कर्जदारांची पिळवणूक करूं नये या उद्देशानें अलीकडे सरकारांनीं कायदे केले आहेत आणि ते योग्य आहेत. त्याच्यापुढें सर महमद ह्यांच्या सूचनेप्रमाणें त्यांना जाणें आज व्यवहार्य नाहीं. त्यांची दुसरी सूचना अशी आहे कीं, श्रीमान् लोकांनीं जमवलेल्या संपत्तीवर जबर कर घेण्यांत यावे आणि त्यांच्या राजकीय सत्तेचें मूळ ह्या रीतीनें कापून काढावें. ह्या जालीम उपायासंबंधानें वरील आशयाचेंच उत्तर देणें योग्य होईल. प्राप्तीवरील व तसले इतर कर बसवून सरकारानें श्रीमान लोकांच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा स्वतःच्या तिजोरींत ओढून घ्यावा हें तत्त्व सामान्यतः मान्य झालें असून त्याची अंमलबजावणी सर्व देशांत चालली आहे. मृत माणसाची मालमत्ता वडील मुलास मिळण्याची पद्धति जेथें चालू असेल तेथें ती बंद व्हावी अशी सर महमद ह्यांची तिसरी सूचना आहे. तिचा उद्देशहि संपत्ति मूठभर लोकांच्या हातांत न जाऊं देणें हा आहे. त्यांनीं पुढें असेंहि सुचवलें आहे कीं माणसा-माणसांत आणि राष्ट्रा-राष्ट्रांत दिसून येणारी विषमता नाहींशी करण्यांत आली पाहिजे. प्रत्येक नागरिकास अन्नवस्त्रादि जरूरीच्या जिनसा किमान प्रमाणांत मिळाल्याच पाहिजेत अशी तजवीज सरकारनें करावी अशी त्यांची पाचवी सूचना आहे. व्यवहारांत चलनाचा उपयोग विनिमयाचें साधन म्हणून आज होतो तो बंद होऊन ऐनजिनसी देवघेव व्हावी असें त्यांचें शेवटचें म्हणणें असून ह्या योगानें श्रीमान व बलवान राष्ट्रें गरीब देशाची पिळवणूक करूं शकणार नाहींत हा त्यांचा त्या बाबतींतला मुद्दा आहे. बाल्कन राष्ट्रांशी जर्मनीनें अलीकडे केलेले व्यापारी करार ऐनजिनसी विनिमयाच्या स्वरूपाचेच असून त्यांवरची आपली आर्थिक मगरमिठी दृढ करण्यासाठी नाझी राजकर्त्यांनीं ह्या युक्तीचा उपयोग केला आहे हें येथें निदर्शनास आणणें अगत्याचें आहे. सर महमद झाफरुल्लाखान ह्यांच्या जागतिक पुनर्घटनेच्या योजनेविषयींच्या विचारांचें वर दिग्दर्शन केलें आहे. त्यावरून त्यांच्या सूचनांत कांहीं तथ्य असलें तरी त्यांतल्या कल्पना अपक्व स्वरूपाच्या व पुष्कळशा अव्यवहार्य आहेत असें दिसून येईल. खोल विचार, काळजीपूर्वक अभ्यास आणि व्यवहाराची जाणीव ह्यांचा त्यांमध्यें अभाव दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून रहात नाहीं.

## मराठा चेंबरची वार्षिक सभा

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजची सातवी वार्षिक सभा शुक्रवार ता. ३० मे १९४१ रोजीं केसरी–मराठा संस्थेच्या सभागृहांत भरली होती. चेंबरचे अध्यक्ष, प्रो. वा. गो. काळे, हे अध्यक्षस्थानीं होते. शके १८६२ चा जमाखर्च व अहवाल मंजूर झाल्यानंतर शके १८६३ करितां अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यवाह, कार्यकारी मंडळ, सल्लागार मंडळ, खजिनदार व हिशेबतपासनीस ह्यांच्या निवडणुकी झाल्या. प्रो. काळे हे चेंबरचे पहिल्यापासून कार्याध्यक्ष व तीन वर्षांपूर्वी अध्यक्ष व कार्याध्यक्ष ही जागा एक केल्यापासून ते अध्यक्ष होते; तेव्हां आतां येत्या वर्षी पुनः अध्यक्ष होण्यास त्यांनीं संमति न दिल्याकारणानें उपाध्यक्ष श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी ह्यांची त्यांचे जागीं निवड झाली व श्री. मराठे ह्यांचे जागीं श्री.ग.रा.साठे,बिस्किट कारखानदार,हे उपाध्यक्ष निवडले गेले. श्री. आ.रा. भट व श्री.गो. द. आपटे ह्यांची कार्यवाह म्हणून फेरनिवड झाली. चेंबर स्थापन झाल्यास आतां सात वर्षें झालीं असून तिचें कार्यक्षेत्रहि बरेंच वाढलें आहे आणि त्याबरोबर चेंबरचा खर्चहि अधिक झाला आहे. तेव्हां चेंबरचें उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीनें सदस्यत्वाच्या वर्गणीच्या रकमेंत कांहीं फेरफार कार्यकारी मंडळानें सुचविले; ते वार्षिक सभेनें मान्य केले; त्याचप्रमाणें, घटनेंत आणखीहि कांहीं दुरुस्त्या करण्यांत आल्या.

### अध्यक्षांचें भाषण

अध्यक्ष, प्रो. काळे, ह्यांनीं आपल्या भाषणांत सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळें उद्योगधंद्यांस येत असलेल्या अडचणींचा उल्लेख केला व येणाऱ्या परिस्थितीस तोंड देण्याची सर्वांनीं तयारी ठेवली पाहिजे, असें सांगितलें. व्यापारउद्दीमाचा पाया म्हणजे पत व विश्वास हा होय, व त्यांची जोपासना व संवर्धन हीं केल्याविना आपला तरणोपाय नाहीं, असें ते म्हणाले. उद्योगधंद्यांतील अडचणी दूर करणें एक वेळ सोपें असतें, परंतु भांडवलाचा पुरवठा कायम राहील, ह्या दृष्टीनें आपल्या संस्थांवरील जनतेचा विश्वास अढळ राहील, असा प्रत्येकानें प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्र हा उद्योगधंद्याचे क्षेत्रांत नव्यानेंच प्रवेश करीत आहे; टक्केटोणपे खाण्याचे व ते पचविण्याचे अनुभव त्यास अद्याप आलेले नाहींत. युद्धपरिस्थिति अद्याप निवळलेली नाहीं. अशा प्रसंगीं, सर्वांनीं आपल्या व्यापारी व उद्योग संस्थांचें जतन योग्य प्रकारें करून त्यांवरील जनतेचा विश्वास कायम राहील अशी खटपट करणें आवश्यक आहे, असें त्यांनीं प्रतिपादन केलें. आभारप्रदर्शन व कॉफीपान ह्यानंतर सभेचें काम संपलें.

---

### हिंदुस्थान सरकारचें कस्टम्सचें उत्पन्न

१९३९–४०

| | | |
|---|---|---|
| एकूण उत्पन्न : | ( रु. ) | ४८ कोटि ३७ लक्ष |
| गेल्या वर्षाचें एकूण उत्पन्न: | ( रु. ) | ४३ कोटि ७३ लक्ष |
| उत्पन्नांत वाढ | ( रु. ) | ४ कोटि ५४ लक्ष |
| व्यवस्थेचा खर्च | ( रु. ) | ८३ लक्ष |

उत्पन्नांत भर कोणी घातली ? साखर ( २½ कोटि रु. ) पेट्रोल केरोसीन, इ.

कोणत्या जकातींत घट झाली ? रेशीम, कटलरी, लोखंडी सामान, यंत्रसामुग्री.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## स्फुट विचार

### अमेरिकन प्रेसिडेंटांचें ठसठशीत भाषण

प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं गेल्या आठवड्यांत केलेलें महत्त्वाचें भाषण आणि अमेरिकेवर येणाऱ्या नात्सी संकटाच्या निवारणार्थ करावयाच्या तयारीसंबंधानें त्यांनीं काढलेला जाहीरनामा ह्या गोष्टी प्रस्तुत युद्धाच्या इतिहासांतल्या अत्यंत परिणामकारक घटना समजल्या जातील. हिटलरशाहीचें भूत युरोपमध्यें थैमान घालूं लागल्यापासून लोकशाहीच्या त्या शत्रूविरुद्ध आपण भयसूचना कशा देत गेलों ह्याविषयींचा इतिहास त्यांनी प्रथम सांगितला आणि स्वातंत्र्याच्या रक्षणाकरितां झगडणाऱ्या इंग्लंडला युद्धसामुग्री पुरवण्यासाठी आपण कोणत्या योजना अमलांत आणल्या त्यांचा वृत्तांत प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं कथन केला. लोकशाही राष्ट्रांस दिलेली मदत अमेरिकेच्या अंतिम संरक्षणाप्रीत्यर्थ देण्यांत आली आहे हें त्यांनीं स्पष्ट केलें. सहायासाठी खर्चलेल्या प्रत्येक डॉलरचा उपयोग सर्व प्रकारच्या लढाऊ सामुग्रीचें उत्पादन वाढवण्यांत येत आहे हा अमेरिकेचा फायदा आहे. इंग्लंडला दिल्या जाणाऱ्या मदतींत अमेरिकेचा स्वार्थ आहे ही गोष्ट प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनी उघडपणें कबूल केली आणि ती इंग्लंडला व जर्मनीसहि माहीत आहे हेंहि त्यांनी सांगितलें. हिटलरनें युरोपमध्यें आपल्या जुलमाचें जूं अनेक स्वतंत्र राष्ट्रांच्या मानेवर घातलें आहे आणि अमेरिकन खंडांत ह्याच हिकमतीचा उपयोग करण्याचा त्याचा बेत असून तो हाणून पाडण्याचा आपण निश्चय केला आहे असें त्यांनी जाहीर केलें. जर्मनी-इटली-जपान त्रिकुटास क्रमाक्रमानें सर्व जग जिंकावयाचें आहे आणि त्याकरितां त्यास समुद्राचें वर्चस्व प्रथम हवें आहे. इंग्लंड हा ह्या हेतूच्या पूर्तीच्या मार्गांतला जबरदस्त अडथळा असून तो दूर करण्याची जर्मनीची धडपड चालली आहे. इंग्लंडचा पराभव म्हणजे अमेरिकन खंडावर स्वारी करण्यास जर्मनीस दिलेलें आमंत्रण होय. प्रेसिडेंटच्या भाषणाचा मुख्य भर ह्या विचारसरणीवर होता. अमेरिकन राष्ट्रानें युरोपमध्यें चाललेल्या युद्धांत पडणें शहाणपणाचें नाहीं असें प्रतिपादन करणाऱ्या आपल्या देशबांधवांस ठसठशीत उत्तर देणें हा त्यांचा मुख्य उद्देश होता.

---

### समुद्रावरील वहातुकीचें स्वातंत्र्य

पृथ्वीवरील सर्व खंडें आपल्या वर्चस्वाखाली आणण्याच्या जर्मनीच्या उद्दिष्टाचें महत्त्वाचें साधन समुद्रावरील वर्चस्व आहे ही गोष्ट स्पष्ट करून प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनी अलीकडे जर्मनीनें अटलांटिक महासागरांत चालवलेल्या ब्रिटिश व्यापारी जहाजांच्या संहाराची कल्पना आपल्या श्रोत्यांस दिली. गेल्या महायुद्धाचे मानानें प्रस्तुत युद्धांत जहाजें बुडवण्याचें जर्मनीचें सामर्थ्य अनेक पटींनीं वाढलें आहे. पाणबुड्या नावांच्या बरोबरीनें वरून बॉंब टाकणाऱ्या विमानांचा उपद्रव ह्या युद्धांत विलक्षण वाढला आहे. जर्मनीनें चालवलेल्या जहाजांचा नाश विस्तृत क्षेत्रांत होत असल्यानें त्याचें संकट अमेरिकेजवळ आलें आहे. इंग्लंड जितकी नवीन जहाजें बांधीत आहे त्याच्या तिप्पट जहाजें जर्मनी बुडवीत आहे. म्हणजे इंग्लंडचा जहाजांचा पुरवठा क्रमाक्रमानें कमी होत चालला आहे आणि त्या योगानें त्या राष्ट्राचा योगक्षेम चालण्यास वाढती अडचण येणार आहे हें स्पष्ट आहे. इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या जहाजें तयार करण्याच्या एकत्रित सामर्थ्याच्या दुप्पटीनें जहाजांचा नाश होत आहे ही गोष्ट प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं जाहीर रीतीनें सांगितली. ह्या संहाराचा प्रतिकार करण्याच्या योजना अंमलांत आल्या पाहिजेत आणि नवीन जहाजें अधिक मोठ्या प्रमाणावर बांधलीं गेलीं पाहिजेत. अमेरिकेनें हल्ला झाला असतां स्वतःच्या संरक्षणासाठीं शक्य ते उपाय योजण्याची आवश्यकता वारंवार प्रतिपादली आहे. परंतु हा हल्ला शत्रूनें प्रत्यक्ष अमेरिकन मुलखावर करण्याची वाट पहावयाची असा आपल्या भयसूचनेचा अर्थ नसून प्रस्तुत युद्धांत जर्मनीस अमेरिकन खंडापासून दूर ठेवणें जरूर आहे असें त्यांनीं आपल्या श्रोत्यांस बजावलें. म्हणूनच अमेरिकन आरमारानें अटलांटिक महासागरांत आपल्या टेहळणीचें क्षेत्र विस्तृत केलें आहे आणि इंग्लंडला युद्धसामुग्री सुरक्षितपणानें पोहोचेल अशी तजवीज चालवली आहे.

### विमा पॉलिसींच्या तारणावर कर्जें काढूं नका

विमेदारांनीं आपल्या पॉलिसींचे तारणावर शक्य तों करून कर्जें काढूं नयेत, अशी कळकळीची विनंति सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांनीं ओरिएंटलच्या वार्षिक सभेचे वेळीं आपल्या भाषणांत केली. अशाच प्रकारची सूचना मागेंहि त्यांनीं केलेली होती. पांच वर्षांपूर्वीं ओरिएंटल विमा कंपनीच्या विमेदारांनीं पॉलिसींचे तारणावर कंपनीकडून ४२३ लक्ष रुपये घेतले होते. १९३९ सालीं तो आंकडा ६२ लक्ष रुपये झाला व १९४० अखेर तो ८० लाखांवर गेला आहे. विमा पॉलिसीवर कर्ज घेणें हा ती लॅप्स होण्याची पहिली पायरीच बहुतेक प्रसंगीं ठरतें व त्यामुळें विमेदाराच्या कौटुंबीयास विम्याच्या संरक्षणास मुकावें लागतें. सध्यासारख्या कठीण प्रसंगीं विमे चालू ठेवणें अत्यंत महत्त्वाचें आहे. सर पुरुषोत्तमदास ह्यांनीं केलेली वरील सूचना सर्वच विमेदारांनीं मनन करण्याजोगी आहे. विमा कंपनीचे दृष्टीनें, विमा पॉलिसीवरील कर्जे सर्वांत सुरक्षित समजलें जातें, परंतु ह्या कर्जाचा परिणाम विमेदाराचे हितास पोषक होत नसेल, तर विमा कंपनीचें उद्दिष्ट साध्य होणें अशक्य होईल हें उघड आहे. विमापॉलिसीवरील कर्जांमुळें विमे रद्द होण्याचा संभव वाढतो ही गोष्टहि कंपन्यांचे दृष्टीनें इष्ट नाहीं. विमेदारांचें खरें व अंतिम हित कोणतें हें लक्षांत ठेवूनच त्यांनीं व्यवहार केला पाहिजे. विमा पॉलिसीवर कर्ज काढणें हें कित्येक प्रसंगीं त्यांच्या फायद्याचेंहि ठरेल; सर पुरुषोत्तमदास ह्यांचा रोख सरसकट कर्ज काढून, विम्यांपासून मिळणाऱ्या रक्षणास मुकणाऱ्या बहुसंख्य विमेदारांच्या आत्मनाशी प्रवृत्तीकडे होता.

---

### शत्रुपक्षीयाचे देशांत अडचणमध्यें सांपडलेल्यांस पैसे कसे पाठवावे ?

जर्मनी, जर्मनीचे अंकित प्रदेश, इटली व फ्रान्स ह्यांत अडकून पडलेल्या आपल्या मित्रांस व नातेवाइकांस पैसे पाठविण्याची खालीलप्रमाणें व्यवस्था करण्यांत आली आहे. ज्यांची इच्छा स्वदेशीं परत येण्याची आहे परंतु ज्यांस येणें अशक्यमय झालें आहे-अशा लोकांकडेच पैसे पाठवितां येतात,

जर्मनीमधील मनुष्याकडे दरमहा १५ पौंड, फ्रान्समधील मनुष्याकडे १२३ पौंड, इटलीमध्यें ९०० लिरा व इतरत्र १० पौंड पाठविण्याची परवानगी आहे. अमेरिकेच्या वकिलांनीं लंडनकडे रिपोर्ट केल्यास, विशेष अडचणीचे प्रसंगीं जास्त रकमा पाठविण्याची सवलत आहे. पैसे पाठवूं इच्छिणारांनी रकमेची हमी घेतली म्हणजे हिंदुस्थान सरकार त्याबाबत शिफारस करील व त्यास अनुसरून ब्रिटिश सरकार अमेरिकन वकिलातीमार्फत पैसे पोचवील. पैसे पाठवूं इच्छिणारांनीं हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय खात्याकडे अर्ज करावा.

## भागांची खरेदी-विक्री कशी होते ?

कित्येक लोक प्रत्यक्ष पैसे देऊन अगर घेऊन शेअर्स घेण्याचें अगर देण्याचें पुढें ढकलूं इच्छितात. बाजारभावांतील होणाऱ्या आंदोलनांचा फायदा मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. समजा, गेल्या अंकांत दिलेल्या वायद्याच्या उदाहरणांतील "अ" ह्या गिऱ्हाइकास आपला सौदा पुरा करावयाचा नाहीं. तो आपल्या दलालाला ३० मार्च रोजीं एप्रिल सेटलमेंटचे २० टाटा ऑर्डिनरी भाग विकण्यास व ५ डिफर्ड भाग खरेदी करण्यास सांगतो व अशा रीतीनें आपल्या पहिल्या व्यवहारांतील नफ्या-तोट्याची भीति कमी करतो. समजा, डिफर्डचा भाव २ हजार रुपये व ऑर्डिनरीचा ४०० रुपये झाला आहे, दलाल नेहमींप्रमाणें अनुक्रमें ५ रु. व १ रु. ४ आ. दलाली घेऊन खरेदी-विक्रीचा व्यवहार करतो. एप्रिल सेटलमेंटच्या देण्याघेण्याचे दिवशीं तो आपल्या गिऱ्हाइकास खालीलप्रमाणें हिशेब व रकमेचा चेक पाठवितोः—

| | नांवें | जमा |
|---|---|---|
| १०-३-४१ २० टाटा आर्डिनरी विकत घेतले. दर ३७६ रु. ४ आ. | | |
| ३०-३-४१ विकले दर ३९८ रु. १२ आ. | | |
| दोहोंतील फरक | | ४५० |
| १०-३-४१ ५ टाटा डिफर्ड विकत घेतले दर २,००५ रु. | | |
| ३०-३-४१ विकले दर १,९३५ रु. | | |
| दोहोंतील फरक | ३५० | |
| बाकी | १०० | |
| | ४५० | ४५० |

"अ" ला दलालाचें देणें—शंभर रुपये.

वरील व्यवहारांत, बाजारभाव हा गिऱ्हाइकास फायदेशीर रीतीनें बदललेला आहे. अपेक्षेचे उलट, तो नुकसानकारकहि होणें अगदीं शक्य आहे. अशा प्रसंगीं दलालाकडून गिऱ्हाइकाकडे पैशाचा चेक जाण्याचे ऐवजीं दलाल गिऱ्हाइकाकडूनच येणें रकमेची मागणी करतो व ती वसूल करतो. खरेदी-विक्रीचे पुरे व्यवहार करण्याऐवजीं तो करार पुढें ढकलण्याचीहि सवलत असते, तिचा उपयोग कित्येक गिऱ्हाइक करतात. बाजारभाव आपल्यास अनुकूल होईल ह्या अपेक्षेनें अथवा वायद्याच्या पैशाची व्यवस्था करण्यासाठी हा बदल्याचा व्यवहार करण्याची पद्धति आहे. कांहीं लोक शेअर्सच्या विक्रीचा करार करितात, परंतु त्यांचा शेअर देऊन पैसे घेण्याचा इरादा बिलकुल नसतो. सेटलमेंटचे मुदतींत शेअरचा बाजारभाव खाली जाईल व त्यावेळीं शेअर खरेदी करून मध्यें नफा मिळवितां येईल, अशी त्यांची अपेक्षा असते. अपेक्षेविरुद्ध बाजारभाव चढला, तर त्यास भारी दरानें शेअर्सची खरेदी करावी लागून नुकसान सोसावें लागतें. अशा विक्रीचा करार पुढील सेटलमेंटपर्यंत पुढें ढकलणें, ह्यास मंदी बदला असें म्हणतात. चालू सेटलमेंटमध्यें विकून पुढील सेटलमेंटमध्यें खरेदी करण्याचा करार करणारे लोक मंदी बदलावाल्यांची सोय करतात व त्यांस तेजी बदलावाला असें म्हणतात. आपण घेतलेल्या उदाहरणांतील "अ" गिऱ्हाइकानें मार्च-अखेर आपल्या दलालास आपल्या ५ टाटा डिफर्ड शेअर्सचा मे महिन्याचा बदला करण्यास सांगितलें असें समजूं. एप्रिल वायद्याचा दर १,९६० रुपये व मे वायद्याचा दर १,९७० रुपये असल्यास, दलाल आपल्या गिऱ्हाइकास खालीलप्रमाणें कराराचा कागद तयार करून देईलः—

१०-३-४१ ५ टाटा डिफर्ड १,९३५ रुपये दरानें विकले.

३०-३-४१ ५ टाटा डिफर्ड १,९६२ रुपये ८ आ. दरानें खरीदले.

फरक १३७ रु. ८ आ. दलालाकडे गिऱ्हाइकाचें येणें राहिलें.

कांहीं गिऱ्हाइक शेअर्स पैसे देऊन प्रत्यक्ष खरेदी करण्याचे नसतांनाहि, पुढें बाजारभाव वाढून घेतलेले शेअर्स नफा मिळवून विकतां येतील, ह्या अपेक्षेनें खरेदीचा व्यवहार करतात. अंदाजाचे विरुद्ध भाव उतरला कीं, तोटा वाट्यास येतो. हा तेजीचा धंदा झाला. असे खरेदीचे व्यवहार पुढील सेटलमेंटपर्यंत ढकलणें, ह्यास तेजी बदला म्हणतात. चालू सेटलमेंटला खरेदी करून पुढील सेटलमेंटला विक्रीचा व्यवहार करणारे मंदी बदलावाले ह्या नांवानें ओळखले जातात. आपण घेतलेल्या उदाहरणांतील २० टाटा ऑर्डिनरी शेअर्सचा बदला व्यवहार खालीलप्रमाणें होईलः—

१०—३—४१ २० टाटा ऑर्डिनरी प्रत्येकी ३७६ रु. ४ आ. घेतले.

३१—३—४१ २० टाटा ऑर्डिनरी ३८१ रु. १४ आ. विकले.

फरक ११२ रु. ८ आ. दलालाकडे गिऱ्हाइकाचें येणें राहिले.

२० टाटा ऑर्डिनरीच्या बदल्याची व्यवस्था करावयाची म्हणजे दलालास वरील २० भाग एप्रिल सेटलमेंटसाठी घेणारा व मे सेटलमेंटसाठी विकणारा दुसरा दलाल शोधावा लागतो. दलालाजवळ स्वतःचें पुरेसें भांडवल नसेल अथवा त्यास तें गुंतविण्याचें नसेल तरी बँका व पैसे किफायतशीर गुंतवूं इच्छिणारे श्रीमान लोक आपले पैसे अल्प मुदतीनें व्याजानें देण्यास तयार असतात. समजा, बँकेनें "अ" कडून एप्रिल सेटलमेंटचे १,००० टाटा ऑर्डिनरी प्रत्येकी ३८२ रु. ८ आ. दरानें विकत घेण्याचा व मे सेटलमेंटचे प्रत्येकी ३८४ रुपये दरानें विकण्याचा करार केला, तर बँकेस ३,८२,५०० रुपये द्यावे लागतात व ३,८४,००० रुपये मिळतात. म्हणजे ३,८२,५०० रुपयांच्या भांडवलावर एका महिन्यांत तिला १,५०० रुपये मिळतात. ह्याचा अर्थ द. सा. द. शे. ५ टक्के व्याज सुटतें. बदल्याचा व्यवहार महिनोमहिने चालू ठेवला तर प्रत्यक्ष शेअर्स देण्याची पाळी येणार नाहीं. दलाल आणि बदलावाला ह्यांचेमध्यें शेअर्सच्या किंमतीचें घेणें देणें उपस्थितच होणार नाहीं. खरेदी-विक्रीच्या किंमतीमधील फरक दिला म्हणजे झालें.

( इं. मं. चें च्या त्रैमासिकांतील लेखावरून )

### मालाच्या खरेदी विक्रीची सहकारी सोसायटी

शेतीच्या मालाच्या खरेदी–विक्रीची एक होलसेल सहकारी सोसायटी मुंबई येथें स्थापन होण्याचें घाटत आहे. ह्या सोसायटीचें भांडवल १ लक्ष रुपये असावें व तें कोणाही व्यक्तीस अथवा सोसायटीस घेतां यावें, अशी योजना आहे. शेतकऱ्यांचा तयार माल शक्य तितक्या किफायतशीरपणें विकणें व त्यांस बीं, खतें, इत्यादि स्वस्तांत स्वस्त मिळवून देणें, हा ह्या सोसायटीचा उद्देश आहे. मुंबईमधील घाऊक मालाचे व्यापारी सोसायटीशी सहकार्य करण्यास कितपत तयार आहेत, ह्यावर तिचें यश अवलंबून राहील.

## हैद्राबाद संस्थानमधील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा

### सरकारी उपाययोजना

हैद्राबाद संस्थानमधील शेतकऱ्यांच्या कर्जाचा आंकडा सर्वसाधारणपणें अंदाज करतां शंभर कोट रुपयांच्या जवळ जवळ निघतो. सन १९३५-३६ मध्यें झालेल्या चौकशीच्या निष्कर्षांत ज्या कांहीं गोष्टी आढळून आल्या त्यांपैकींच ही एक गोष्ट होय. ज्या इतर गोष्टी चौकशींत उघडकीस आल्या, त्यांवरून असें दिसून आलें कीं एवढा कर्जाचा अवाढव्य आंकडा असतांहि कर्ज फेडण्याची लायकी शेतकऱ्यांत आहे. जमीनीच्या अधिक येणाऱ्या उत्पन्नांतून स्वतःचें कर्ज त्यांस फेडतां येणें शक्य आहे, आणि शेतीच्या जमीनीची किंमत जमीनधाऱ्याच्या सव्वीसपट आहे. त्या वेळेची परिस्थिति सुधारण्याकरितां सरकारतर्फे ताबडतोबीच्या आणि योग्य अशा उपाययोजना केल्या जाव्यात,यावर तत्प्रसंगीं विशेष भर देण्यांत आला होता. जमीनविक्री थांबविणें, कर्ज देण्याच्या पद्धतीवर नियंत्रण, सरकारी संरक्षणाखालीं कर्जांचा प्रश्न आपसांत मिटवून टाकणें, शेतकऱ्यांस काटकसर करण्यास उत्तेजन देणें; अशा कांहीं दृष्टींनें उपाययोजना अमलांत आणण्याचें कार्य सरकारनें केलें.

संस्थानमधील शेतकी-जमीनींबद्दल आतांपावेतों असलेल्या सर्विक वादग्रस्त पद्धतीशिवाय मालकी हक्क प्रस्थापित करणें या हेतूनें केलेला, 'हक्क नोंदणी कायदा" ( रेकॉर्ड ऑफ राईट्स ॲक्ट ), सावकाराबाबत कायदा ( मनी लेंडर्स ॲक्ट ), लवादकोर्ट कायदा ( डेट कन्सिलिएशन ॲक्ट ) आणि जमीनविक्रीबाबत कायदा, या नुकत्याच अमलांत आणलेल्या उपाययोजना होत. शेतकऱ्यांचा सावकारापासून बचाव करणें, त्यांचा नायनाट करणाऱ्या या पुरातन कर्जभारापासून त्यांची सुटका करणें आणि वाडवडिलांपासून आलेल्या जमीनीवरील त्यांचा ताबा सुरक्षित ठेवणें हा या शेवटच्या तीन उपाययोजनांचा एकंदरींत उद्देश आहे. परंतु या उपाययोजना अमलांत आणण्यासाठीं एक मोठी उणीव दृष्टोत्पत्तीस येऊं लागली. "हैद्राबाद जमीन तारण पतपेढी कायद्या" नुसार ही उणीव आतां भरून काढण्यांत आली आहे. या नवीन उपाययोजनांचा उद्देश संस्थानाकरितां जमीन तारण पतपेढी स्थापण्याचा आहे. संस्थानमधील शेतकऱ्यांचा भाग्योदय करण्यासाठीं सरकारी प्रयत्नांत या संस्थेचें किती महत्त्व आहे हें पुढील गोष्टींचा विचार करतां कळून येईल. ज्यांना कर्जफेड करावयाची आहे आणि ज्यांच्यापासून सुटका करून घ्यावयाची आहे अशा सावकारांसेरीज करून जरूर असलेले पैसे मिळण्याचा दुसरा कोणताच मार्ग नाहीं, अशा शेतकरी सभासदांना दीर्घ मुदतीचें कर्ज कमी व्याजाच्या दरांत व सोईस्कर परत फेडीच्या अटीवर देण्याचें मुख्य काम या योजिलेल्या पतपेढीचें आहे.

परंतु फक्त याच एका उपयोगी कामांत पतपेढी आपलें उत्पन्न खर्च करणार नाहीं. शेतकऱ्यांना उच्च प्रतीचें बियाणें व आधुनिक शेतकी हत्यारें वापरून शेती सुधारण्याकरितां आणि अप्रत्यक्षरीत्या त्यांच्यांत काटकसर व स्वावलंबी वृत्ति निर्माण होण्याकरितांही ही पतपेढी मदत करील. ही पतपेढी जमीन-खरेदीसाठीं देखील पैसे कर्जाऊ देईल. अशा खरेदीमुळें शेतकऱ्यांस आर्थिक दृष्ट्या फायदा होईल. याशिवाय ही पतपेढी, ज्यांच्या जमिनी गहाण असून ज्यांना आधींच कर्जाऊ रक्कम दिलेली आहे, अशा सभासदांना चालू शेतकी कामकाजांत आर्थिक साहाय्य करील.

### स्टेट बँकेशीं या नवीन बँकेची जोड

भावी कालांत लवकरच संस्थापिल्या जाणाऱ्या "स्टेट बँके"शीं ही नवीन पतपेढी जोडली जाईल. जरी हिच्या कार्यावर सरकारचें थोडेंफार नियंत्रण आणि देखरेख असली तरी ही संस्था स्वतंत्रच राहील. या बँकेचें भांडवल २० लाख रुपये असून, प्रत्येक भाग २५ रुपयांचा याप्रमाणें ८०,००० भागांत हें भांडवल विभागलें जाईल. वेळोवेळीं पांच वर्षांत तिचें उत्पन्न आणि गहाण आलेल्या स्थावर मालमत्तेच्या तारणावर; सरकारच्या आगाऊ घेतलेल्या परवानगीनुसार एकूण ५० लाख रुपयांचे कर्जरोखे काढतां येतील. या सर्व दिलेल्या कर्जरोख्यांची व त्यावरील व्याजाची हमी सरकारनें घेतली आहे असें नमूद करण्यांत आलें आहे.

या बँकेच्या कामाची व्यवस्था "रजिस्ट्रार"कडे राहील. त्यांना मदतनीस म्हणून रजिस्ट्रार धरून सात सभासद असलेलें एक संचालक मंडळ असेल. जर बँकेनें सरकारकडून आर्थिक मदत मिळविली तर सरकार संचालक मंडळांत आणखी जास्त दोन सभासद नेमील.

प्रथमतः जरी बँक आपलें कार्य हैद्राबाद शहरांत सुरू करील तरी व्यवहाराच्या सोयीसाठीं संस्थानांत इतर ठिकाणीं शाखा काढण्याची योजना कायद्यांत केलेली आहे.

### कांहीं प्रमुख उपाययोजना

कायद्यांत केलेल्या दुसऱ्या एका महत्त्वाच्या योजनेप्रमाणें, बँकेनें एका वर्षांतून मिळविलेला नफा अगत्रीं कमींत कमी, निव्वळ नफ्याची शेंकडा २५ टक्के रक्कम राखीव निधींत जमा केल्याशिवाय, भागीदारांस बोनस, नफा अथवा इतर रूपानें कोणत्याही वर्षीं वाटतां येणार नाहीं.


गहाण जमीनीची आणि अशा जमीनीपासून मिळालेल्या उत्पन्नाची जप्ति व विक्री करण्याबाबतच्या पद्धति, अनियमितपणा आणि अपराधाबाबत बँकेच्या अधिकारी व नोकरांना देण्यांत येणारी शिक्षा, जेव्हां बँकेच्या अथवा तिच्या शाखेच्या व्यवहाराची सरकारी तपासणी करावयाची असते अशा वेळेस अनुसरावयाची पद्धति यांबद्दल इतर कायद्याप्रमाणें याही कायद्यांत निर्देश केलेला आहे.जे या बँकेचे सभासद म्हणजे भागीदार आणि कर्जरोखे धारण करणारे असतील अशांना या बँकेचा उपयोग करून घेण्याचा हक्क आहे.

---

### वकिलाकडे जाऊं नका

फॅक्टरी ॲक्ट, पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट व बॉंबे इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्ट ह्यांसारखे वकिलांच्या माध्यमासेरीज कामगारांचे हितसंरक्षण करणारे कायदे त्यांस उपलब्ध असतांनाहि, ते वकिलांमार्फत आपलीं गाऱ्हाणीं दूर करून घेण्याचा यत्न करतात, ही प्रथा बरोबर नाहीं, असें मुंबई गिरणी कामगार संघाच्या टेक्निकल ॲडव्हायसरी सब कमिटीचें मत आहे. कामगारांना पुनः कामावर घेण्यासंबंधीं अथवा त्यांस नोटीशीचे ऐवजीं पगार देण्याविषयीं ते वकिलांमार्फत गिरणी मालकांस पत्रें लिहितात. ह्या संबंधांत गिरणी मालकांनीं कोणतें धोरण ठेवावें या प्रश्नाचा विचार कमिटीनें केला व अशा पत्रांस उत्तर देतांना "सरकारी लेबर ऑफिसरकडे आपल्या अशिलाचें गाऱ्हाणें कळवा" यापेक्षा अधिक लिहूं नये असें ठरलें.

# रक्तवर्धक




अत्यंत शक्तिवर्धक

**रक्तवर्धक**

आयुर्वेद रसशाळा

पुणें लि. पुणें ४.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,७९,७०० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,८९,८५० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.



# दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; मि. आर. एल. फेरार्ड.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.



# औषधाशिवाय रोगमुक्त व्हा !

**आरोग्य चिकित्सा शिक्षक**—डॉक्टर, वैद्यांच्या औषधाला कंटाळलेले रोगी निसर्गसिद्ध सुलभ उपायांनीं सहज बरें करून आरोग्याचा अखण्ड सुखोपभोग घ्या ! पैसा वांचवा ! किं. १॥ रु.

**लंघन-चिकित्सा शिक्षक**—प्लेग, कॉलरा, व इतर हट्टी रोग औषधाशिवाय फक्त लंघनें करून रोगमुक्त व्हा ! वज्रदेही बना ! नवी तिसरी आवृत्ति. किं. १॥ रु. ट. ह. शिवाय. यादी फुकट. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.



# K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.



# कोरोना पोर्टेबल विकणें आहे.

कोरोना पोर्टेबल टाइपरायटर उत्तम स्थितींतला, खासगी कामासाठी वापरलेला, विकणें आहे.

" क्ष " C/o अर्थ.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११०–१५ |
| ४% १९४३ | १०४–५ |
| १½% विनमुदत | ९५–१४ |
| ३½% १९४७–५० | १०२–१२ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९५—० |
| २¾% १९४८–५२ | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४०—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०६—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४४—० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५५७—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (.१०० ) ३½% | १०३–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% | १३०—० |
| कराची ( १०० ) ९% | २१५—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २२५–१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १५३०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १८१५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% | ५८—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८६५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६४५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | ११८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४४—० |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. | १९–११ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ४२–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४,०००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १५०—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | २५८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १८२६—४ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १३७—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२–४–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६२–८–६ |


**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.

२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.

३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

*  *  *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.

२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

**पुण्यांत आल्यावर**

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

अवर होम,

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

## युद्धफंडास सहाय्य

| जिल्हा | वॉरगिफ्ट फंड | रेडक्रॉस इ. | डिफेन्स सार्टिफिकिट | ३% डिफेन्स बाँड | बिनव्याजी बाँड |
|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | ७१,९५९ | १३,७६८ | ६४,५३० | ६५,१०० | ४,३०० |
| पू. खानदेश | १,१०,५७५ | १७,६५४ | ५१,४८० | २,८३,२०० | ६,२०० |
| प. खानदेश | ६३,१६२ | ९,०७४ | ७१,२३० | २,७८,८०० | १२,८३१ |
| नाशिक | ५१,०५१ | १,४८० | १,१२,५७७ | १,२८,८४२ | ४,३०० |
| पुणें | १,५१,१९१ | १५,८०२ | ४,७५,५२० | १५,१४,४०० | २,२८,८७९ |
| सातारा | १,२६;२२५ | ७,७८७ | २,०६,१३० | ८७,५६१ | २०० |
| सोलापूर | १,४८,२५१ | ६१,७०५ | ९७,३३० | २,०५,४०० | १,०५१ |
| विजापूर | ६९,७९६ | ७,२५५ | २१,३५० | ८३,३०० | ३,२०० |
| धारवाड | १,४७,५४२ | १८,७५४ | १,६०,३१० | ३,६०,०७२ | ३६,३१५ |
| कुलाबा | ५१,९८५ | ४,८७५ | १,३८,६६४ | १,९०,९०० | १०,००१ |
| रत्नागिरी | ८३,२३३ | १,२६४ | १,३९,६२० | ८०,४०० | १,४५७ |

### युद्धोत्तर युरोप

" युरोपांतील लहान लहान देशांच्या विशिष्ट गटांचें फेडरेशन अशा रीतीनें बनविण्यांत यावें कीं त्यामुळें कोणत्याहि गटाच्या हातीं भलती सत्ता जाऊं नये " अशा प्रकारची युद्धोत्तर युरोपची व्यवस्था करण्यांत यावी, असें मत अमेरिकेंत व्यक्त केलें जात आहे.

### रद्दी कागदापासून शाई व कागद

रद्दी कागदापासून एका रासायनिक क्रियेनें शाई व कागदाचा रांधा काढण्याची युक्ति सापडली आहे. ८ रुपये किंमतीच्या एक हंड्रेडवेट रद्दीपासून ६ रुपयांची शाई व २५ रुपयांचा रांधा मिळूं शकतो.


या नव्या शोधानें सर्व जगभर खळबळ उडवून दिली आहे.

# दहा हजार रुपये अगदी फुकट.

### अमृतसरमध्यें २॥ रु. तोळा सोनें

मिनर्व्हा गोल्डची घरोघर प्रशंसा ! मिनर्व्हा गोल्ड हा नकली सोन्याचा अगदी नवा शास्त्रीय आविष्कार होय. त्यानें केवळ वैज्ञानिकांनाच आश्चर्यानें थक्क करून सोडलें एवढेंच नव्हे, तर सर्वसाधारण लोकांची एक अत्यंत मोठी उणीव भरून काढली आहे. सर्व स्त्रिया त्याच्या दागिन्यावर बेहद्द खुष होतात. ज्या घरांत हें सोनें एकदां शिरलें तेथून दोनदोनदा तीनतीनदा त्यांस मागण्या येत आहेत.

मेहेरबान लाला वियारतनसाहेब, म्युनिसिपल कमिशनर, पठानकोटाहून २५ आक्टोबरला लिहितात–" काल आपल्या सोन्याचें पार्सल मिळालें; धन्यवाद ! आपण हा नवीन पदार्थ तयार करून जगाची एक मोठीच उणीव भरून काढली आहेत. उलट टपालीं आणखी तीन तोळे सोनें पाठवावें. "

याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रें उदाहरणार्थ रियासत, कॉंग्रेस, स्वस्तिक, अलामान, जमीनदार गुरुघंटाल प्रताप, इत्यादींनीं प्रशंसोद्गार खुषीनें छापले आहेत.

हें सोनें कसास लावलें तर अस्सल सोन्याचाच रंग दाखवतें आणि अस्सल सोन्याप्रमाणेंच ठोकलें व गाळलें जातें. याचे हरएक प्रकारचे दागिने बनवता येतात. नापसंत पडल्यास किंमत परत मिळण्याची गॅरेंटी आहे; खास प्रसारासाठीं किंमत १ तोळ्यास २॥ रु.; ३ तोळ्यास ७ रु.; ६ तोळ्यास १३ रु.; व ४० तोळ्यास ८० रु.

### मिनर्व्हा गोल्डचे बनवलेले दागिने

मिनर्व्हा गोल्डच्या बनवलेल्या बांगड्या दर जोडीला २ रु.; कानांतील सोन्याचे डूल दर जोडीला ३ रु.; खड्याची अंगठी ३ रु.; साधी मुंबई फॅशनची अंगठी २ रु.; जाळीच्या बांगड्या दर जोडीला ५ रु.; (नेकलेस) माळ १२ रु.; लॉकेट ६ रु.; दस्तबंद दर जोडीला १४ रु.

माल पसंत पडला नाहीं तर परतबोलीची खात्री. पोस्टाचा खर्च फक्त ८ आणे पडतो.

या गोष्टी खोट्या ठरवून देणारास दहा हजार रुपये फुकट दिले जातील. याशिवाय दर तीन तोळे सोनें खरेदी करणारास टिकाऊपणा व सौंदर्य याची १० वर्षें गॅरंटी असलेलें एक फॅन्सी रिस्टवॉच फुकट दिलें जाईल; गॅरंटीचा कागद प्रत्येक घड्याळाबरोबर धाडला जातो.

मिळण्याचा पत्ता—मॅनेजर अमेरिकन मिनर्व्हा गोल्ड हाऊस, (A. P.) K. C. अमृतसर.

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अतिस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲण्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द्. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ११ जून, १९४१ अंक २४

दक्षिण कोंकणांतील राष्ट्रीय बाण्याचें
प्रमुख साप्ताहिक

**हिंद–सेवक**

संपादक—सदानंद शांताराम भांडारकर
प्रकाशक—मधुकर यशवंत भांडारकर

हिंदसेवकमध्यें दर गुरुवारीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व घडामोडींची विस्तृत माहिती मिळते.

व्यवस्थापक–' हिंद–सेवक ', मालवण, जि. रत्नागिरी.

**ग्रामोद्योग करून पैसा मिळवा.**

देशी रंगारी शिक्षक—विदेशी रंग महागले ना ? मग वनस्पतीपासून रेशीम, सूत, लोकर रंगविणें व चिटें छापण्याची सोपी माहिती शिका. किं. १॥ रु.

नजरबंद शिक्षक—जादूच्या ८० चमत्कारिक खेळांची सचित्र माहिती मागवून जादूगार व्हा ! किं. १॥ रु.

बुटपालिश शिक्षक—कातड्याला लावण्याची घट्ट व पातळ निराळ्या रंगाची पॉलिश घरीं बनवा ! किं. ·॥· ट.

ह. निराळा. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

**' अमृत 'चा ओजस्वी संदेश**

अखिल महाराष्ट्राला जगाकडे माणुसकीनें पहावयास शिकवत आहे—

★ अमृत ★

नवयुगचा मराठी सामाजिक बोलपट

: दिग्दर्शक : विनायक
: कथा–संवाद : वि. स. खांडेकर
: फोटोग्राफी : पांडुरंग नाईक

रोज : ६॥ व १०, शनि· रवि· सोम· जादा खेळ ३। वा·

**मिनर्व्हा–पुणें— ३ रा आठवडा**

# विविध माहिती

### मालास उद्योगखात्याचें सर्टिफिकेट

मुंबई प्रांतांतील कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाची प्रत निश्चित करण्याची व त्यास सर्टिफिकिटें देण्याची व्यवस्था सरकारनें करावी अशी सूचना इकॉनॉमिक अॅन्ड इंडस्ट्रिअल सर्व्हे कमिटीनें केली होती. तिला अनुसरून प्रयोगादाखल व्यवस्था म्हणून साबण, शाई, टुथ पेस्ट, टुथ पावडर, केसांचीं तेलें, सिलाची लाख, डिंक, इत्यादि तपासून सर्टिफिकिटें देण्याचें काम उद्योगखात्याकडे देण्यांत आलें आहे. सर्टिफिकिटांसाठी घेण्यांत यावयाची फी अद्याप ठरलेली नाहीं.

### फोर्ड गाड्या

मुंबईच्या फोर्ड मोटार कारखान्यांत मे महिन्यांत जेवढ्या गाड्या तयार झाल्या, तितक्या ह्यापूर्वी कधींच कोणत्याहि महिन्यांत झाल्या नव्हत्या.

### पैशाच्या निर्गतीबद्दल शिक्षा

रिझर्व्ह बँकेच्या परवान्याशिवाय ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर २२० येन व १५७ रुपये निर्गत करण्याच्या प्रयत्नाचे आरोपाबद्दल मुंबईतील एका जपानी हॉटेलाचे मालकास चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनीं १ महिना सक्त मजुरीची शिक्षा दिली.

### कपडे खरेदीवर नियंत्रण

ग्रेट ब्रिटनमधील लोकांना ह्यापुढें सरकारनें ठरवून दिलेल्या कपड्यांपेक्षा अधिक कपडे विकत घेतां येणार नाहींत.प्रत्येक स्त्रीस, पुरुषास अगर मुलास वर्षातील खरेदीसाठी ६६ कुपनें देण्यांत येतील. पुरुषाच्या सबंध पोषाकास २६ कुपनें व स्त्रीच्या पोषाकास ११ कुपनें लागतील. बुटांचे जोडीसाठी ६ कुपनें व मोज्यांसाठी ३ कुपनें द्यावीं लागतील. ४ वर्षांखालील मुलांच्या कपड्यांस कुपनांचा नियम लागू नाहीं. एकाचीं कुपन्स दुसऱ्यास चालणार नाहींत.युद्ध परिस्थितीमुळें लोकसंख्येच्या प्रादेशिक वाटणींत घडून आलेल्या फरकामुळें कपड्यांचा पुरवठा अव्यवस्थित होऊं नये, हा वरील योजनेचा प्रमुख हेतु आहे.

### सिंधची लोकसंख्या

सिंधची लोकसंख्या आतां ४५ लक्ष, २० हजार झाली आहे. त्यापैकी १० लक्ष, ६५ हजार हिंदु व ३१ लक्ष, ९२ हजार मुसलमान आहेत.

### अन्नसामुग्री येण्यास प्रारंभ

अमेरिकेनें लीज अँड लँड अॅक्टान्वयें पाठविलेल्या अन्नसामुग्रीनें भरलेली पहिली आगबोट ग्रेट ब्रिटनला ३१ मे रोजीं पोचली. ह्या आगबोटींत १ हजार टन कणीक, ४० लक्ष अंडीं व १ लक्ष, २० हजार पौंड चीज, इतका माल होता. ग्रेट ब्रिटनचे अन्नपुरवठ्याचे मंत्री, लॉर्ड वूल्टन, ह्यांनीं आगबोटीचें ब्रिटिश सरकारतर्फे स्वागत केलें, त्यास उत्तर देतांना अमेरिकेचे प्रतिनिधि, मि. हॅरिमन, हे म्हणाले:—"बंदुकीस जसा दारूगोळा, विमानास जसें पेट्रोल, तसें मनुष्यास उत्कृष्ट अन्न अत्यंत आवश्यक आहे, हें प्रेसिडेंट रूझवेल्ट ओळखतात. ब्रिटिश लोकांना शक्य तें सहाय देण्याची अमेरिकनांची तयारी आहे."

### लॉर्ड कॅडमन

लॉर्ड कॅडमन हे गेल्या आठवड्यांत मरण पावले. इराकमधून भूमध्य समुद्रापर्यंत पेट्रोल पोचविणाऱ्या १२०० मैल लांबीच्या नळांच्या योजनेचें श्रेय मुख्यतः त्यांसच आहे.

### छपाईचा कागद

युद्धविषयक साहित्याचे खालोखाल कॅनडामध्यें छपाईच्या कागदास प्राधान्य दिलें जातें व वहातुकीच्या साधनांचा अभाव इतर मालाप्रमाणें छपाईच्या कागदासहि भासत आहे असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

### देशाबाहेर जाण्यास बंदी

१६ ते ६० वर्षांच्या दरम्यानच्या वयाच्या कोणत्याहि स्त्रीस ऑस्ट्रेलियांतून बाहेर जाण्यास बंदी करण्यांत आली आहे. सरकारी कामासाठी अथवा विशेष कारणासाठी जाणाऱ्या स्त्रीचे बाबतींत अपवाद केला जाईल. नर्सिंगसारख्या कामाकरितां स्त्रियांचा तुटवडा पडूं नये, ह्याकारणाकरितां वरील नियम केलेला आहे.

### हिंदुस्थानांतील को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायट्या

(१९३८-३९)

| | |
|---|---|
| संख्या : | ११ |
| सभासद : | २६, ५७४ |
| चालू विमे : | १ कोटि, ७७ लक्ष रु. |
| फंड : | ७ लक्ष, ७२ हजार रु. |

### बॉंबे टेलिफोन कं. लि.

सरकारी टेलिफोन बोर्डानें मुंबई टेलिफोन कंपनीचे भाग खरेदी करण्यासंबंधीं केलेली योजना भागीदारांच्या हिताची आहे व त्यांनीं आपले भाग देण्यास हरकत नाहीं, असा अभिप्राय मुंबई शेअर होल्डर्स असोसिएशनच्या कमिटीनें व्यक्त केला आहे.

### पेट्रोलच्या विक्रीवर नियंत्रण

पेट्रोलचा पुरवठा मोजून देण्याची 'रेशनिंग' ची योजना आतांपर्यंत हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्याकडे होती. ती आतां व्यापारी खात्याकडे गेली आहे. हिंदुस्थानांत पेट्रोलच्या विक्रीवरील नियंत्रणास केव्हां व कसा आरंभ करावयाचा ह्याचा विचार चालू आहे. पेट्रोल व रॉकेल ह्यांची किंमत निश्चित करण्यासाठी व्यापारी खातें व त्या धंद्यांतील प्रमुख ह्यांची सहामाही बैठक सिमला येथें २० जून रोजीं भरेल.

### कपड्यांवर नियंत्रण

ऑस्ट्रेलियांत कपड्यांच्या विक्रीवर लवकरच नियंत्रण घालावें लागेल असें समजतें.

### गोडबोले मोटार सर्व्हिस लि. सातारा

वरील नव्या खासगी लिमिटेड कंपनीचे श्री. जी. एन्. गोडबोले हे डायरेक्टर आहेत. कंपनीचें भांडवल ५० हजार रुपये आहे.

### स्वदेशी प्रॉव्हिडंट इ. कंपनी लि.

माणेकलाल प्रेमचंद ह्यांचे नेतृत्वाखालीं ही कंपनी मुंबई येथें निघाली आहे. तिचें भांडवल १ लक्ष रुपये आहे.

### यंत्रसामुग्रीची हिंदुस्थानांत आयात उतरत चालली

| | १९३८-३९ | १९३९-४० | १९४०-४१ |
|---|---|---|---|
| इंजनें | १८७ | १६९ | ८५ |
| विजेचीं यंत्रें | ३७२ | २३६ | १७१ |
| कपास „ | २६७ | १९६ | १३७ |
| ताग „ | ७१ | ४६ | ६१ |
| इतर कापडाचीं „ | ४१ | २६ | २८ |

### जनरल अॅश्युअरन्स सोसायटी लि.

वरील आयुर्विमा कंपनीनें १९४० सालीं ६८½ लक्ष रुपयांचे ४,१३७ विमे स्वीकारले.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... २७८ |
| २ मुंबईच्या गिरणी कामगारांच्या स्थितीविषयीं चौकशी | ... २७९ |
| ३ हिंदुस्थानांतील प्रमुख ग्रंथालयें | ... २८० |
| ४ स्फुट विचार | ... २८१ |
| क्रीटच्या लढाईपासून बोध – इटलीचें साम्राज्य संपलें – सीरियांत युद्धक्षेत्र – खेडेगांवांच्या तोंडाचे रस्ते | |
| ५ जळगांव ता. डे. असोसिएशन | ... २८३ |
| ६ ओरिसा प्रांतांतील लँड-मॉर्गेज बँक | ... २८३ |
| ७ एक्सचेंजचा उपयोग | २८४ |
| ८ संशोधन आणि औद्योगिक प्रगति | ... २८५ |
| ९ निवडक बाजारभाव | २८६ |

अर्थ

बुधवार, ता. ११ जून, १९४१

## मुंबईच्या गिरणीकामगारांच्या स्थितीविषयीं चौकशी

मुंबईतील कापसाच्या गिरण्यांतील कामगारांच्या कामाचे तास, वेतन इत्यादि बाबतींत वारंवार वांधे व संप होऊं लागल्या कारणानें त्या संबंधांत त्या सर्व प्रश्नांची तपशीलवार व पद्धतशीर चौकशी होण्याची आवश्यकता प्रांतिक सरकारास वाटली आणि त्यांनीं ऑक्टोबर १९३७ मध्यें त्या कामासाठीं एक कमिटी नेमली. ह्या समितीमध्यें प्रा. धनंजयराव गाडगीळ, श्री. वैकुंठराय मेथा व मि. ब्रेलवी हे प्रमुख सभासद होते. गिरणी धंद्यांतील तांत्रिक विषयांवर तज्ज्ञ सल्ला तिला देण्यासाठीं दुसरी एक कमिटी नेमण्यांत आली होती. मध्यंतरी गिरणी-कामगारांच्या वेतनांत तात्काळ वाढ करणें योग्य होईल काय, ह्या प्रश्नावर सरकारनें कमिटीचा अभिप्राय विचारला आणि तिच्या शिफारसीस अनुसरून १९३८ मध्यें मजुरीच्या दरांत तात्काळ वाढहि करण्यांत आली. कमिटीचा सबंध रिपोर्ट गेल्या वर्षीं जुलै महिन्यांत सादर झाला आणि तो आतां लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध झाला आहे. रिपोर्ट विस्तृत असून त्यांत कमिटीनें गिरण्यांच्या धंद्याच्या सर्व अंगांचा परामर्श घेतला आहे. इतर धंद्यांतील व प्रांतांतील कामगारांच्या वेतनाचा निकट संबंध त्यांतील सूचनांशीं येत असल्यानें त्यांस अत्यंत व्यापक स्वरूप प्राप्त झालें आहे.

कमिटीचा रिपोर्ट सादर होऊन पुष्कळ काळ लोटल्यावर तो आतां प्रसिद्ध झाला आहे ह्यास मुंबई सरकारच्या मतानें कित्येक महत्त्वाचीं कारणें आहेत. रिपोर्टांतल्या व्यापक शिफारसींचें वर्गीकरण, त्यांचा परामर्श मध्यवर्ती किंवा प्रांतिक सरकारनें, तसेंच, गिरणी-मालकांनीं, कामगारवर्गानें किंवा ह्या दोहोंच्या सहकार्यानें घेतां येईल, ह्या विचारानें करण्यांत आलें आहे. कामकऱ्यांस विशिष्ट किमान वेतन मिळण्याचें अगत्य आणि बेकारीच्या विम्याची आवश्यकता ह्या संबंधांतल्या कमिटीच्या सूचना हिंदुस्थान देशाच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितींत अव्यवहार्य आहेत असें सरकारचें मत आहे. आजारीपणाचा विमा, पगारी सुट्ट्या इत्यादि विषयांचे प्रश्न प्रांतिक मर्यादेबाहेर जातात आणि अखिल भारतीय क्षेत्रांत पडतात. मध्यवर्ती सरकारनें प्रांतिक कामगारमंत्र्यांच्या परिषदा दिल्ली येथें १९४० व १९४१ ह्या सालीं भरवून त्यांमध्यें असल्या प्रश्नांची चर्चाहि केलेली आहे. कारखान्यांच्या कामांत कार्यक्षमता, मजुरीच्या दरांत एकसूत्रीपणा, कामगारांच्या तक्रारींच्या निर्णयासाठीं न्यायाधिशी व्यवस्था इत्यादि प्रश्नांबाबत कमिटीनें शिफारसी केल्या आहेत, त्या दूरगामी परिणाम करणाऱ्या आहेत आणि त्यांचा काळजीपूर्वक विचार व्हावा लागेल. कमिटीच्या इतर सूचनांचें महत्त्व भविष्यकाळांत करावयाच्या सुधारणांत दिसून यावयाचें आहे.

कमिटीच्या शिफारसींची अशी पार्श्वभूमि असल्यानें मुंबई सरकारच्या मतानें त्यांस मूर्त स्वरूप देण्याच्या कामीं मोठ्या अडचणी आहेत. कामगारांच्या स्थितींत सुचवलेल्या सुधारणा अंमलांत आणावयाचें म्हटल्यास सरकार व गिरण्यांचा धंदा ह्यांवर पुष्कळ खर्चाचा बोजा पडणार आहे. कमिटीच्या सूचनांस अंशतःहि मूर्तस्वरूप दिलें जाण्यापूर्वी इतर प्रांत व देशी संस्थानें ह्यांच्या संमतीनें कांहीं योजना निश्चित व्हाव्या लागतील. मुंबई प्रांतांत खर्चाच्या कांहीं सुधारणा अंमलांत आणल्यास येथील गिरण्यांस बाहेरील धंद्यांची स्पर्धा भोवल्यावाचून रहावयाची नाहीं. ह्या प्रांतांत अगोदरच कामगारांच्या हिताविषयींच्या कांहीं तजविजी अंमलांत आणलेल्या आहेत आणि त्यांची अंमलबजावणी इतरत्र न झाल्यास मुंबईच्या गिरणधंद्याचें नुकसान होणार आहे. अखिल भारतीय क्षेत्रांत येणाऱ्या सुधारणांचा विचार सर्व प्रांतांनीं मिळून करणें इष्ट होईल आणि त्यांपैकी कित्येक हिंदुस्थान सरकारच्या कक्षेंतल्या आहेत. कमिटीच्या बाकीच्या सूचनांची तपशीलवार चर्चा आपण करणार आहों असें मुंबई सरकारचें म्हणणें आहे. कमिटीचा पांचशें पानांचा रिपोर्ट प्रसिद्ध करतांना आम्हीं वर दिलेल्या आशयाची प्रस्तावना व स्पष्टीकरण त्यांनीं केलें आहे. कमिटीचा रिपोर्ट हा एक अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. त्यामध्यें कापसाच्या गिरण्यांतील कामाची छाननी सूक्ष्म रीतीनें, अभ्यासू पद्धतीनें व विस्तृतपणानें केलेली आहे. सरकार, कायदेमंडळें व जनता ह्या सर्वांचे दृष्टीनें प्रस्तुत रिपोर्ट उद्बोधक व कार्यप्रवण असा झाला आहे. ह्याबद्दल प्रि. धनंजयराव गाडगीळ व श्री. वैकुंठराय मेथाप्रभृति सभासदांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. कमिटीपुढें आलेले प्रश्न अवघड व गुंतागुंतीचे होते; त्यांचा निकट संबंध धंदेवाल्यांच्या रोजच्या कार्यपद्धतीशीं येणारा होता. निरनिराळ्या क्षेत्रांत मजुरीचे किमान दर काय असावे ह्या विषयींचीच बाब घ्या. तिच्याविषयीं तपशीलवार माहिती काढून निर्णय करणें सोपें नव्हतें. हीच गोष्ट दुसऱ्याहि कांहीं प्रश्नांची आहे. कामगारांच्या पगारवाढीसंबंधांतल्या कमिटीनें तातडीनें केलेली चौकशी व तिच्या सूचनांची सरकारनें तात्काळ केलेली अंमलबजावणी ह्यांचा उल्लेख वर आलाच आहे. त्यावरूनहि कमिटीच्या कामगिरीच्या महत्त्वाची कल्पना येण्यासारखी आहे. कमिटीच्या प्रमुख शिफारसींची चर्चा स्वतंत्र रीतीनें करावी लागेल. तिच्या रिपोर्टाचें सामान्य स्वरूप आणि त्यासंबंधांतली मुंबई सरकारची भूमिका ह्यांचेंच दिग्दर्शन येथें केलें आहे.

## हिंदुस्थानांतील प्रमुख ग्रंथालयें

### बंगाल

इंपीरियल लायब्ररी ही बंगालमधील प्रमुख लायब्ररी आहे. तिचेमध्यें ३ लक्ष पुस्तकें आहेत. हिंदुस्थान सरकार व बंगाल सरकार ह्या दोघांचेंहि तिला सहाय मिळतें. कलकत्ता विश्वविद्यालय, रॉयल एशिॲटिक सोसायटी, सरकारी कमर्शिअल डिपार्टमेंट, इंडियन म्यूझियम, इत्यादींचीं ग्रंथालयेंहि मोठीं आहेत. ढाका विश्वविद्यालयाच्या लायब्ररींत बरीच सुधारणा होत चालली आहे.

### संयुक्त प्रांत

ह्या प्रांतांत अलाहाबाद,अलिगड, आग्रा, बनारस व लखनौ हीं पांच विश्वविद्यालयें असून त्या प्रत्येकाचीं ग्रंथालयें आहेत. बनारस येथील नागरी प्रचारिणी सभा व हरिद्वार येथील गुरुकुल ह्यांचीं ग्रंथालयेंहि चांगलीं आहेत. विशेषतः लहान गांवांतून ग्रंथालयें व वाचनालयें ह्यांची वाढ व्हावी ह्यासाठी सरकारचा प्रयत्न चालू आहे.

### मध्यप्रांत व वऱ्हाड

१९२८-२९ मध्यें प्रांतिक सरकारनें लहान गांवांत स्थापन करावयाच्या २२ सार्वजनिक ग्रंथाऽयांच्या स्थापनेची योजना आखली. ग्रंथालयांची संख्या १९३७-३८ मध्यें दुप्पट करण्यांत आली व त्यानंतर तीमध्यें आणखी वाढ केली गेली. नागपूर विश्वविद्यालयाची नागपूर येथें महाकोशल रिसर्च सोसायटीची विलासपूर येथें व विदर्भ साहित्य संघाची यवतमाळ येथें लायब्ररी आहे.

### आसाम

शिलाँग येथें एक सरकारी सार्वजनिक मोफत लायब्ररी आहे. शाळा-कॉलेजांच्या ग्रन्थालयांखेरीज आणखी विशेष ग्रन्थालयें नाहींत.

### बिहार

बंकीपूर येथील खुदाबक्ष ओरिएंटल लायब्ररींत अरबी व फारशी हस्तलिखितांचा संग्रह उत्कृष्ट आहे. पाटणा येथें तेथील विश्वविद्यालयाची लायब्ररी आहे. इतरहि दोन ग्रन्थालयें तेथें आहेत.

### पंजाब

लायब्ररींच्या प्रश्नास महत्त्व देणारा हा आद्य प्रांत आहे. म्युनिसिपाल्टिया, स्थानिक स्वराज्य संस्था, इत्यादींस ग्रन्थालयांच्या स्थापनेसाठीं सरकार प्रोत्साहन देतें. विश्वविद्यालयाची लायब्ररी, पंजाब पब्लिक लायब्ररी, पीपल ऑफ इंडिया सोसायटीची लायब्ररी व द्वारकादास लायब्ररी, हीं लाहोरमधील महत्त्वाचीं ग्रन्थालयें आहेत.

### त्रावणकोर

एकूण ४५ वाचनालयें व ग्रन्थालयें ह्यांस सरकारी मदत मिळते. सरकारी शिक्षण खात्यामार्फत, ग्रन्थालयांच्या वाढीस प्रोत्साहन मिळतें.

### बडोदें

बडोद्यांतील ग्रन्थालयांचा इतिहास सुप्रसिद्ध आहे. सरकारचा लायब्ररी खात्यावर वार्षिक खर्च १ लक्ष रुपये होतो. सेंट्रल लायब्ररी हें ग्रन्थालयांच्या प्रसाराचें केंद्र आहे. संस्थानांतील ३ हजार खेड्यांपैकी २,८०० खेड्यांस लायब्ऱ्यांचा फायदा मिळतो. ह्या खेड्यांत एकूण २,६०० शाळा आहेत. ४६ शहरी ग्रन्थालयें व १,२०० खेडेगावी ग्रन्थालयें आहेत. ३९० फिरतीं ग्रन्थालयें असून वर्तमानपत्रांचीं वाचनालयें २२२ आहेत.

### मद्रास

१९३८-३९ मध्यें मद्रास प्रांतांत १,१२५ ग्रन्थालयें होतीं, त्यांपैकी ३ स्त्रियांसाठी, ८०२ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व्यवस्थेखाली, ३९ म्युनिसिपॅलिट्यांच्या व्यवस्थेखाली, ४१ सहकारी सोसायट्यांस जोडलेलीं व २४३ खासगी व्यवस्थेखालीं होतीं. कांहीं शाळांच्या ग्रंथालयांचा फायदा नागरिकांसहि मिळण्याची सोय आहे. मद्रास लायब्ररी असोसिएशन हें ग्रंथालयांच्या प्रसाराचें फार उत्कृष्ट कार्य करीत आहे.

### मुंबई

मुंबई प्रांतांतील ग्रंथालयांची चळवळ मुख्यतः खाजगी प्रयत्नांची आहे. पुरेसा पैसा ह्या कारणासाठी सरकारजवळ उपलब्ध नसल्यामुळें असें झालें असेल. अहमदाबाद म्युनिसिपॅलिटीची एक मोठी लायब्ररी आहे. इतर कोणत्याहि म्युनिसिपॅलिटीची लायब्ररी नाहीं. मुंबई प्रांतांतील प्रमुख ग्रंथालयें खालीलप्रमाणें आहेतः—

बाँबे ब्रँच, रॉयल एशिॲटिक सोसायटी, मुंबई.
मुंबई विश्वविद्यालय, मुंबई.
जे. एन. पेटिट इन्स्टिट्यूट, मुंबई.
म्युनिसिपॅलिटी, अहमदाबाद.
सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी, पुणें.
भांडारकर ओ. रि. इन्स्टिट्यूट, पुणें.
गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद.
भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें.
फिलॉसॉफिकल इन्स्टिट्यूट, अंमळनेर.
मराठी ग्रन्थालय, पुणें.
अंजुमान इस्लाम लायब्ररी, मुंबई.
कामा ओरिएंटल इन्स्टिट्यूट, मुंबई.

ह्याखेरीज, शेतकी कॉलेज, इंजिनिअरिंग कॉलेज, कॉमर्स कॉलेज, रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, युनिव्हर्सिटीचें केमिकल टेक्नॉलॉजीचें खातें,व्ही. जे. टी.इन्स्टिट्यूट, मेडिकल कॉलेजें, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, लॉ कॉलेजें इत्यादींच्या विशिष्ट विषयांच्या लायब्ऱ्या आहेतच.


## विम्याचें काम करणारांस अपूर्व संधि

बाँबे को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी लि. साठीं महाराष्ट्राच्या व ग्वाल्हेरच्या सर्व विभागांत ऑर्गनायझर व स्पेशल एजंटचे जागांसाठीं अर्ज मागविण्यांत येत आहेत. १५० रुपयांपर्यंतच्या पॉलिसी देण्याचा सोसायटीस अधिकार आहे. खेडेगांवांत व उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत काम करणारांस उत्कृष्ट संधि. खेडेगांवांतील जनतेशीं व सहकारी संस्थांशीं संबंध असणाऱ्या लोकांस प्राधान्य मिळेल. स्वतःविषयीं संपूर्ण माहिती देऊन कुळकर्णी आणि कं., चीफ ऑर्गनायझर्स, नवसरी बिल्डिंग, हॉर्नबी रोड, फोर्ट, मुंबई, ह्या पत्त्यावर अर्ज करावा.

# स्फुट विचार

## क्रीटच्या लढाईपासून बोध

क्रीटमधून ब्रिटिश फौजांस माघार घ्यावी लागली ह्या घटनेची चर्चा इंग्लंडमधील वर्तमानपत्रांत चालली आहे. ह्या फौजांस मोठ्या मिनतवारीनें भयंकर संकटें सोसून परत यावें लागल्या-कारणानें ह्यापुढें ब्रिटिश सेनानींनीं लढायांच्या बाबतींत कशा प्रकारची खबरदारी घेणें अगत्याचें आहे ह्याची चर्चा चालू आहे. ब्रिटिश आरमारानें पराक्रम करून शिताफीनें आपल्या फौजा क्रीटमधून इजिप्तमध्यें आणून पोहोंचवल्या ह्याविषयीं धन्यवाद देण्यांत येत आहेत तें उचितच आहे. जर्मनी वहातुकीच्या विमानांतून आणि छत्र्यांच्या सहायानें हजारो सैनिक क्रीटवर उतरवील अशी कल्पना ब्रिटिश सेनानींस नव्हती असें दिसतें. तसेंच, बेटावर पुरेशीं विमानगृहें नसल्यानें ब्रिटिश विमानांस सुरक्षित तळ मिळाले नाहींत आणि शत्रूच्या बाँबर पासून त्यांस स्वतःच्या सैनिकांचें संरक्षण करतां आलें नाहीं. ग्रीसचा किनारा व क्रीट ह्यांचेमध्यें केवळ पाउणशें-शंभर मैलांचें अंतर आहे. पण ब्रिटिश विमानांस आफ्रिकेच्या किनाऱ्यापासून चारशें मैलांचें अंतर तोडावें लागत होतें. शत्रूच्या विमानांचा प्रतिकार करण्याचें ब्रिटिशांचें साधनशस्त्र ह्या योगानें बोथट झालें. जर्मन युद्धसामुग्री ब्रिटिश आरमाराच्या सावधगिरीमुळें जहाजांतून क्रीटला जाऊं शकली नाहीं. तथापि, त्या आरमारास आकुंचित जागेंत वावरावें लागलें आणि शत्रूच्या बाँब फेकणाऱ्या विमानांपासून उपद्रव सोसावा लागला. यांत्रिक शस्त्रास्त्रांचा भरपूर पुरवठा असल्यावांचून सैनिकांच्या शौर्याचा कांहीं उपयोग होत नाहीं आणि विशेषतः जर्मनीसारख्या शत्रूस सामना द्यावयाचा असतां ही गोष्ट प्रामुख्यानें अनुभवास येते, ही गोष्ट क्रीटच्या लढाईवरून सिद्ध झाली आहे. क्रीटच्या लढाईंत जर्मनीस जय मिळाला असला तरी सीरियामध्यें दंगल करण्यास आणि रशीदअलीस कुमक पोहोंचवण्यास त्या लढाईमुळें त्यास सवड झालेली नाहीं आणि इराकमध्यें ब्रिटिशांचें वजन अबाधित राहिलें आहे ही गोष्ट येथें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

## इटलीचें साम्राज्य संपलें

मुसोलिनीनें हिटलरची बाजू उचलली तेव्हां त्यास जर्मन-विजयांत मोठा हिस्सा अनायासें मिळेल अशी अपेक्षा होती. पण वस्तुस्थिति अशी झाली आहे कीं, हिटलर तुकडे तोंडावर फेकील त्यांवर इटलीस समाधान मानणें प्राप्त झालें आहे. ग्रीसशीं झालेल्या युद्धांत इटलीचें भयंकर नुकसान झालें आहे आणि त्याची भरपाई हिटलरनें इटलीस युगोस्लाव्हियाच्या दिलेल्या तुकड्यानें झालेली नाहीं. मुसोलिनी हिटलरचा परावलंबी हस्तक बनला आहे आणि त्याचे सल्लावजा दिलेले हुकूम त्यास मानणें भाग आहे. प्रस्तुत युद्धांत इटलीच्या वांट्यास काय आलें आहे? मनुष्यांची व द्रव्याची हानि पदरांत पाडून घेऊन इटालिअन राष्ट्र मुसोलिनीच्या घमेंडखोर मूर्खपणामुळें आपल्या आफ्रिकन साम्राज्यास मुकलें आहे. चालू वर्षाच्या प्रारंभीं पूर्व आफ्रिकेंत इटलीची तीन लाख फौज होती आणि तिचा ३ रा हिस्सा इटालिअन होते. एक हजार तोफा, शेकडो चिलखती सशस्त्र गाड्या, रणगाडे व लढाऊ विमानें ह्या इटालिअन मुलखांत होतीं. इटलीनें गमावलेला प्रदेश सबंध एशियामायनर एवढा आणि इंग्लंडच्या सातपट आहे. पूर्व आफ्रिकेंतून इटालिअन सैन्याची हकालपट्टी झाली असून खालील यादींत दर्शवलेली हानि इटलीस भोगावी लागली आहे.

| | | |
|---|---|---|
| सैनिक कैदी झाले | | १,२०,००० |
| सैनिक फरारी व चुकले | | १,२५,००० |
| सैनिक मेलेले व भटके | | ५५,००० |
| लष्करी सामुग्री | : | सबंध नाश |
| मुलूख गमावला | : | ७ लक्ष चौरस मैल |

## सीरियांत युद्धक्षेत्र

हिटलरच्या सवलतींच्या अभिवचनास बळी पडून व्हीशी येथील मंत्रिमंडळानें इंग्लंडविरुद्ध जर्मनीशीं सहकार्य करण्याचें ठरवलें असल्याचें स्पष्ट दिसतें. क्रीटची लढाई संपल्यानंतर हिटलर स्वस्थ बसणें शक्य नाहीं आणि त्यानें आपल्या नेहमींच्या युक्त्या लढवण्याचा क्रम चालू ठेवला आहे. युरोप खंडाच्या राजकीय पुनर्घटनेचा व शांततेचा प्रश्न उपस्थित करून इंग्लंड व अमेरिका ह्यांचें लक्ष युद्धापासून दुसरीकडे खेचावयाचें आणि आपली पुढच्या स्वारीची लढाऊ तयारी गुप्तपणें पूर्ण करावयाची ही त्याची हिकमत आहे. सीरिया, इराक व इजिप्त ह्यांच्या दिशेनें जर्मन विमानें व फौजा क्रमाक्रमानें चाल करून जाणार हें उघड आहे. सीरियामध्यें जर्मन विमानें व शस्त्रास्त्रें नेण्यांत येत असल्याच्या बातम्या आल्या आहेत. त्यांचा व्हीशी येथील मंत्रिमंडळानें इन्कार केला असून आपण फ्रेंच मुलखाचें संरक्षण करण्यास जरूर ते सर्व उपाय योजूं अशी धमकीहि दिली आहे. स्वतंत्र फ्रेंच राष्ट्राचे पुढारी ज. डि गॉल ह्यांनीं जर्मनीचा व व्हीशी सरकारचा कावा ओळखला असून ब्रिटिशांच्या सहायानें त्यांनीं सीरियांत फौजेनिशीं शिरकाव केला आहे. व्हीशीचें मंत्रिमंडळ स्वतःच जर्मनीचें अंकित झाल्यामुळें तें सीरियाचें स्वातंत्र्य अबाधित राखण्यास असमर्थ आहे. त्यानें इंग्लंडविरुद्ध जर्मनीस मदत देण्याचें धोरण स्वीकारल्या कारणानें सीरियांत त्याच्या प्रतिकाराची तयारी वेळींच करणें अगत्याचें आहे. युद्धाच्या सद्यःपरिस्थितींत सीरिया व पॅलेस्टाइन हे देश अत्यंत महत्त्वाचे आहेत आणि जर्मनीचें पाऊल त्यांमध्यें रोवलें जाणार नाहीं अशी खबरदारी इंग्लंडनें घेतलीच पाहिजे. फ्रेंच राष्ट्राच्या स्वातंत्र्याची आस्था वाटणारे फ्रेंच सेनानी त्या भागांत युद्धाचा पुढाकार घेत आहेत आणि त्यांस ब्रिटिशांचा पूर्ण पाठिंबा आहे.

## खेडेगावांच्या तोंडाचे रस्ते

हिंदुस्थानांतील खेडेगावांच्या रहिवाशांच्या रहाणींत ज्या अनेक अडचणी आहेत त्यांपैकीं बाहेरील रस्त्यांस जोडणाऱ्या गावांच्या रस्त्यांचा अभाव ही एक प्रमुख आहे. गावांचें दळणवळण एकमेकांशीं व शहरांशीं सुलभ रीतीनें होण्यास गावें आणि हमरस्ते यांच्यामध्यें जोड रस्ते आवश्यक आहेत. प्रांतिक किंवा लोकल बोर्डाचे रस्ते खेडेगावांपासून अंतरावर असतात. तेथून गावांकडे जाण्यास रस्ते नसल्यानें वहातुकीची कुचंबणा होते. खेडेगावांच्या शेतीचा माल बाहेर जावयाचा आणि बाहेरील माल त्या गावांत यावयाचा तर असला व्यापार चालण्यास रस्ते पाहिजेत. रस्त्यांच्या अभावीं पावसाळ्यांत खेडेगांवीं लोकांची किती गैरसोय होते ह्याची कल्पनाच शहरवासीयांस सहज येणार नाहीं. खेडेगावांचा आर्थिक योगक्षेम व्यवस्थित चालावयास त्यांस बाहेरच्या रस्त्यांस जोडणारे रस्ते तयार होणें अगत्याचें आहे. मुंबई

इलाख्यांतील खेडेगावांची वरील अडचण दूर व्हावी ह्या संबंधानें चर्चा अलीकडे झाली आहे. ग्रामसुधारणेच्या कार्यक्रमांतलाच तो एक भाग आहे. खेडेगावी रस्त्यांचा प्रश्न लोकल बोर्डाच्या कार्यकक्षेत येतो. पण ह्या संस्थांची सांपत्तिक स्थिति समाधानकारक नाहीं, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. त्या कारणानें खेडेगावांच्या तोंडाचे रस्ते तयार करणें कितीहि महत्त्वाचें असलें तरी त्यांच्या हातून तें कार्य पैशाच्या अभावीं होऊं शकत नाहीं. प्रांतिक सरकारनें बोर्डास ग्रँटस दिल्या तरच रस्त्याचें काम आपल्या कार्यक्रमांत त्यांस घालतां येईल. ही परिस्थिति लक्षांत घेऊन मुंबई सरकारनें चालू सालाकरितां ३० लक्ष २० हजार रुपयांची खास ग्रँट देण्याचें ठरवलें आहे. उत्तर विभागांत ८६ हजार रुपये, मध्य विभागांत १ लक्ष ४६ हजार रुपये व दक्षिण विभागांत ८८ हजार रुपये अशी ग्रँटच्या रकमेची वाटणी होणार आहे.

## हिंदी कोळशाच्या खाणींतील मजुरांची परिस्थिति

"हे अद्याप गैरशिस्त, निरक्षर, धर्मभोळे, असे असून त्यांस वक्तशीरपणा माहीत नाहीं व कामाच्या पाळ्या, नोंदी इत्यादींविषयीं ते बेफिकीर असतात. ज्या परिस्थितींत ते वाढतात व काम करतात, त्याचा हा परिणाम आहे. सरकारनें अगर त्यांच्या मालकांनीं त्यांस शिक्षण देण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. त्यांच्या रहाणीचें मान सुधारत तर नाहींच; उलट गेल्या चारपांच वर्षांत तें खालीं गेलें आहे. त्यांचें वेतन त्यांचें पोट भरण्यासहि पुरत नाहीं व त्यांच्या अन्नांत सत्वहि फार असूं शकत नाहीं. जे आपल्या मुलाबाळांसह रहातात, त्यांस चपराशी, काबुली वगैरेकडून कर्जे काढावीं लागतात अथवा उधारी वाढवावी लागते. त्यांचा कर्जबाजारीपणा वाढत्या प्रमाणावर आहे. परंतु मिळकत घटत आहे. दारिद्र्यामुळें त्यांस भरमसाट व्याजानें कर्ज काढावें लागतें आणि त्या कारणानें कर्जबाजारीपणा पुनः वाढतो. त्यांच्यांत कार्यक्षमतेचा अभाव असणें क्रमप्राप्तच आहे. कोळशाच्या खाणींतील मजूरवर्ग प्रायः शेती करतो; मजुरी हा त्याचा दुय्यम धंदा आहे. खाणींतील काम आकर्षक होण्याइतकी त्यांतील मजुरांची परिस्थिति नाहीं. इतर देशांतील मजुरीचे मानानें हिंदुस्थानांत मजुरी अत्यल्प आहे. कार्यक्षमतेचा अभाव हें त्याचें मुख्य कारण असलें तरी त्यास मजुरा इतका मालकहि जबाबदार आहे. खाणींत स्त्री-मजुरांना बंदी केली, त्यामुळें मजुरांच्या कुटुंबास पुरेल इतकें उत्पन्न त्यांस मिळेनासें झालें. मंदी संपल्यानंतर ही बंदी अमलांत आली असती तर बरें झालें असतें. मजुरांचें आरोग्य व स्वच्छता, ह्या संबंधांत सुधारणेस पुष्कळ वाव आहे. मजुराचें पोट भरलें, तरी खाद्य सकस नसतें, ह्याचें कारण दारिद्र्य हें होय. कामगारांच्या सुधारणेकडे मालकांनीं लक्ष पुरवलेलें नाहीं. मजुरांची रहाण्याची सोय, रजेची सवलत, इत्यादि गोष्टींकडेहि लक्ष दिलें पाहिजे."

[डॉ. बलराज सेठ ह्यांचें "हिंदी कोळशाच्या खाणींतील मजूर" हें इंग्रजी पुस्तक.

## सरकारी कर्जरोख्यांची अदलाबदल

हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडमध्यें काढलेल्या कर्जापैकीं कांहीं मुदतबंद कर्जाची त्या देशाला फेड करून टाकून त्याच्या मोबदला ह्या देशांत कर्जरोखे काढण्याची योजना कांहीं महिन्यांमागें अमलांत आली, तिची माहिती आम्हीं सविस्तर दिलीच आहे. इंग्लंडच्या पौंड स्टर्लिंगमधील रोख्यांच्या मोबदल्यांत हिंदुस्थान सरकारनें त्यांत नमूद असलेल्या मुदतीचे व व्याजाच्या दराचे स्वतःचे रुपयांचे रोखे काढले व दिले. ही व्यवस्था अदलाबदलीचा व्यवहार सुकर व्हावा ह्या हेतूनें तात्पुरती अमलांत आणली गेली होती. स्टर्लिंग पौंडांतील रोख्यांच्या ऐवजी काढलेले हिंदी रोखे तसेच ठेवण्याचा सरकारचा उद्देश नव्हता. त्यांचें रूपांतर योग्य वेळीं मामुली हिंदी रोख्यांत करण्याची योजना सरकारच्या मनांत होती, ही गोष्ट सर जरेमी रेस्मन ह्यांनीं चालू सालचें अंदाजपत्रक मध्यवर्ति कायदेमंडळापुढें मांडतांना स्पष्ट केली होती. ह्या कल्पनेस मूर्त स्वरूप आतां देण्यांत येत असून ४½ टक्के १९५०-५५ आणि ४½ टक्के १९५८-६८ ह्या दोन रोख्यांची अदलाबदल ३ टक्के १९५१-५४ व ३ टक्के १९६३-६५ ह्या रोख्यांत विशिष्ट अटींवर करण्याची आपली योजना आतां सरकारनें प्रसिद्ध केली आहे. सुमारें ५६ कोटि रुपये वरील दोन ४½ टक्के व्याजाच्या रोख्यांत गुंतलेले असून त्यांचेंच रूपांतर केलें जात आहे.

### युद्धोत्तर मंदीची तरतूद करा

"उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें आज कॅनडामध्यें चलती दिसत असली, बेकारी नाहींशी झाली असली व उत्पादन वाढत असलें तरी युद्धसमाप्तीनंतर आपणांस परिस्थितीस अनुसरून थोडासा आखडता हात घ्यावा लागेल, हें विसरतां कामा नये. युद्धांत जय मिळावा ह्याकरितां शक्य तो प्रयत्न केलाच पाहिजे. खासगी व सरकारी खर्चात काटकसर केली पाहिजे व ज्या योजना युद्धविषयक नाहींत, त्या पुढें ढकलल्या पाहिजेत"—बँक ऑफ मॉन्ट्रिअल (कॅनडा) चे अध्यक्ष, मि. हँटले आर. ड्रमंड

## Willingdon College, Sangli.

Reopens for the academic year on 20th June 1941. The registration of names commenced on 6th June. The College provides for instruction in the Arts and Science Courses in the first two years, for B. A. Degree courses, Pass and Honours, and for post-graduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, inexpensiveness and efficiency are the special features of the College.

The Tuition fees are Rs. 60 per term, and the room rent per term is Rs. 12 for a double room and Rs. 15 for a single room. Further information can be had on application.

Separate accommodation for lady students is available in the Sakhubai Gokhale Hostel on the College premises.

V. K. Gokak,
Principal.

## जळगाव तालुका ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट असोसिएशन

### वार्षिक साधारण सभा

रविवार ता. १८ मे रोजीं दुपारीं ३ वाजतां जळगांव येथील नटवर थिएटरांत जिल्हाधिपति मि. जे. बूथ, आय. सी. एस्. यांच्या अध्यक्षतेखालीं वरील शेतकी संस्थेची ३१ वी वार्षिक सभा भरली होती. सभेस तालुक्यांतील पुष्कळ शेतकरी सभासद हजर होते; तसेंच शेतकी खात्यांतील अनेक अधिकारी व जळगावांतील अनेक शेतकरी पुढारीहि हजर होते.

आरंभीं संस्थेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व अंदाजपत्रक संस्थेचे चालक श्री. भाऊसाहेब साळुंके यांनीं वाचून दाखविल्यावर तो सर्वानुमतें मंजूर झाला.

नंतर इ. स. १९४१–४२ सालासाठीं रावसाहेब भोयटे यांची प्रेसिडेंटचे जागीं निवडणूक झाली. तसेंच व्हाइस प्रेसिडेंटचे जागीं श्री. बापूजी ऊर्फ दोघू गरवड पाटील, सेक्रेटरीचे जागीं श्री. बापूसाहेब चित्रे वकील व श्री. भाऊसाहेब सावंत या दोघांची सर्वानुमतें निवड झाली. तसेंच ११ सभासदांचे व्यवस्थापकमंडळाचीहि निवड झाली.

गेले वर्षभर तालुक्यांतील सर्व पाटीलतलाटी व सोसायट्यांचे चेअरमन व सेक्रेटरी यांनीं असोसिएशनला स्वतःची संस्था या दृष्टीनें सर्व प्रकारें शक्य ती मदत केली. त्यांत जास्तींत जास्त मदत करणाऱ्यांस उत्साह यावा म्हणून १२ इसमांना उत्तम काम केल्याबद्दल अध्यक्षांचे हस्तें रौप्य पदकें देण्यांत आलीं.

संस्थेचे सेक्रेटरी श्री. बापूसाहेब चित्रे यांनीं असा ठराव मांडला कीं, "श्री. टी. टी. भाऊसाहेब साळुंके यांनीं आजवर जीवापाड श्रम करून ही संस्था नामवंत केली, म्हणून त्यांचें ही संस्था हार्दिक अभिनंदन करते." हा ठराव सर्वानुमतें पास झाल्यावर अध्यक्ष मि. जे. बूथ यांचें अध्यक्षीय भाषण झालें. या संस्थेच्या पिंपळे फार्मास अहवालाचे सालीं हिंदुस्थानचे व्हाइसरॉयांनीं भेट देऊन जनावरांची पहाणी केली व संस्थेबद्दल जे गौरवोद्गार काढून शुभ आशीर्वाद दिला त्याबद्दल व दिल्ली येथें भरलेल्या अखिल भारतीय पशुप्रदर्शनांत सतत तीन वर्षें ५०० रु. किंमतीचा होळकर सरकारचा चॅलेंज कप जिंकून संपादन केलेलें सुयश या गोष्टीबद्दल मी संस्थेचें अभिनंदन करतों. अशाप्रकारची शेतकऱ्यांना सन्मार्गदर्शक व वाढत्या वैभवाचें शिखर गांठलेली ही आदर्श संस्था मी प्रथमच पाहात आहें. या असोसिएशनचे आधारस्तंभ लोकप्रिय श्री. टी. टी. साळुंके यांच्या परिश्रमाचें हें फळ आहे. म्हणून मी त्यांचें हार्दिक अभिनंदन करीत आहे असें त्यांनीं सांगितलें. आभार प्रदर्शन व पानसुपारी होऊन ही सभा बरखास्त झाली.

### ग्वाल्हेर लाइट रेल्वे

वरील रेल्वेच्या इंजनास गेल्या वर्षी प्रत्येक मैलाच्या प्रवासास सरासरीनें ३५·१८ पौंड कोळसा लागला; १९३८–३९ मध्यें तो ३८·३२ पौंड लागला होता. १९३९–४० मध्यें रेल्वेला एकूण उत्पन्न ८ लक्ष, १३ हजार रुपये झालें व खर्च ५ लक्ष, ७१ हजार रुपये झाला. निवळ नफा २ लक्ष ४२ हजार रुपये उरला. रेल्वेंत गुंतविलेल्या भांडवलावर २·४३% व्याज सुटलें. १९३९-४० मध्यें ह्या रेल्वेवर एकहि अपघात झाला नाहीं.

## ओरिसा प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँक, लि.

ह्या बँकेच्या व्यवहारास प्रारंभ होऊन २ वर्षे लोटलीं. ओरिसा सरकारनें बँकेच्या शेअर भांडवलापैकी निम्में भांडवल घेतलें आहे. बँकेच्या सध्या दोन शाखा आहेत–बऱ्हानपूर व कटक. बँक आपल्या सभासदांस २०० रु. ते ५०० रुपयांपर्यंत कर्ज देतें. व्याजाचा दर ७% असून परतफेड २० वर्षांत वार्षिक हप्त्यांनीं करावयाची असते. जमिनीच्या किंमतीच्या ४०% रकम कर्जाऊ दिली जाते.

### ओरिसामधील सहकारी चळवळ

| | १९४० | १९३९ |
|---|---|---|
| एकूण सोसायट्या : | १,५७९ | १,५५१ |
| अनियमित जबाबदारीच्या शेतकी पतपेढ्या | १,३१५ | १,३२४ |
| एकूण सभासद : | ६०,०४४ | ६१,६२४ |
| शेतकी पतपेढ्यांचे सभासद : | ३९,१६६ | ४१,१८२ |
| एकूण खेळतें भांडवल : (रु.) | ८३,४४,९१४ | ८८,२१,३५२ |
| ( १९३८ सालीं तें ९०,२०,२८० रु. होतें ). | | |
| सभासदांस दिलेलीं नवीन कर्जें : (रु.) | ९,३८,८८४ | ९,६०,०१२ |
| वसुली : (रु.) | १०,३३,७३५ | ९,८२,७०१ |
| लँड मार्गेज बँकांतील वसुली : (रु.) | १५,१२६ | १९,०७९ |
| व्यक्तिशः ( शेतकी ) सभासदांकडून येणें : (रु. | १४,३१,७४४ | १६,४६,६७५ |
| ( ९३% थकलेलें ) | | |
| व्यक्तिशः ( बिगर शेतकी ) स. येणें : (रु.) | १९,२८,६३० | १९,१६,४४१ |
| ( ४२% थकलेलें ) | | |
| लँड मॉर्गेज बँकेच्या सभासदांकडून येणें : (रु.) | २,६०,७५२ | २,९०,६५९ |
| ( ९८% थकलेलें ) | | |
| सर्व सोसायट्यांचे रिझर्व्ह : (रु.) | १५,१४,९१७ | १५,५०,५६६ |
| सेंट्रल बँका : | १८ | १८ |
| लँड मॉर्गेज बँका : | ५ | ५ |

बाकी वसूल होत नाहीं. नवीन ठेवी येत नाहींत. बँकांची परिस्थिति खालावलेली आहे. लँड मॉर्गेज बँका उपयुक्त कार्य करूं शकत नाहींत. सभासद कमी होत आहेत. भांडवलही कमी होत आहे, अशी परिस्थिति ओरिसांतील सहकारी चळवळीची झाली आहे.

### आल्बर्ट गोल्ड मेडल

राष्ट्रीय स्वायत्तता व वैयक्तिक स्वातंत्र्य ह्यांचा निर्भय पुरस्कार करण्याबद्दल अमेरिकेचे अध्यक्ष, मि. रूझवेल्ट, ह्यांस लंडन येथील रॉयल सोसायटी ऑफ आर्टसनें सोसायटीचें आल्बर्ट सुवर्णपदक दिलें आहे. महाराणी व्हिक्टोरिया, बादशहा सातवे एडवर्ड, बादशहा पंचम जॉर्ज, संशोधक टॉमस एडिसन, ऑर्व्हिल राइट, लुई पॅश्चर, मार्कोनी, मॅडॅम क्युरी, इत्यादींस हें पदक आतांपर्यंत मिळालेलें आहे.

**एक्सचेंजचा मालाचे उठावास उपयोग कसा होतो :**

न्यूयॉर्क येथील कॉटन एक्सचेंज अमेरिकन कपाशीच्या पिकाचा उठाव करण्याचे कामीं किती महत्त्वाचें कार्य करीत आहे, ह्याची माहिती चित्रपटाचे सहायानें न्यूयॉर्क कॉटन एक्सचेंजचे अर्थशास्त्रज्ञ, मि. गारसाइड, ह्यांनीं आपल्या एका भाषणांत नुकतीच सांगितली. ते म्हणाले:—"अमेरिकेंतील ९०% कपाशीच्या पिकाचा उठाव केला जातो, त्या व्यवहारांत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीनें वायद्याच्या व्यवहाराचें सहाय घ्यावें लागतें आणि त्यापैकीं बहुतेक सर्व व्यवहार न्यूयॉर्क कॉटन एक्सचेंज-वरच होतो. अमेरिकेंतील ८५% गिरण्या व इतर देशांतीलहि बहु-संख्य गिरण्या कॉटन फ्यूचर मार्केटचाच अवलंब करितात. कपाशीच्या बाजारभावांत होणाऱ्या चढउताराचा दुष्परिणाम टाळण्याचें न्यूयॉर्क कॉटन एक्सचेंज हें महत्त्वाचें साधन आहे. ह्या एक्सचेंजवरील व्यवहारांचा उपयोग कपाशीची प्रत्यक्ष देवघेव करण्यांत होत नाहीं; त्यासाठी वेगळे बाजार आहेतच. किंमतींमधील चढउतारामुळें होणारें नुकसान टाळण्यासाठी फ्यूचरचा व्यवहार करतात, त्यास " हेजिंग " असें म्हणतात व तो यशस्वी होण्यासाठी मार्केटमधील उलाढालींचें परिमाण जेवढें मोठें तितकें चांगलें असतें. वायद्याच्या खरेदीमुळें, वायद्याच्या विक्रीनें होणारे परिणाम नाहींसे होतात व तितक्या प्रमाणांत नुकसानीचा धोका टळतो. परंतु त्यांत तफावत पडली, तर त्या प्रमाणांत सट्ट्यांचे व्यवहार व्हावे लागतात. म्हणजे सट्ट्यांसिरीज हेजिंगचे व्यवहारांची पूर्तता होत नाहीं. कॉटन एक्सचेंजवरील हेजिंगच्या व्यवहारामुळें उत्पादकांस चांगली किंमत तर मिळतेच, परंतु त्याबरोबर खरेदीदारांसच कपास किफायतशीर पडते, ह्याचें कारण पिकाच्या खरेदीविक्रींतील अंतर एक्सचेंजचे माध्यमामुळें लहान होऊन व बाजारभावांतील आंदोलनांचा दुष्परिणाम टळून कमींत कमी खर्चांत पिकाचा उठाव कार्यक्षम रीतीनें होतो."

**जर्मन अंकित देशांत अन्नाचा तुटवडा**

युरोपांतील बहुतेक देशांत, पुढील मोसमांतील पीक हातीं येई-पर्यंत पुरण्याजोगा अन्नाचा साठा आहे, असें प्रसिद्ध झालें आहे. अर्थात् प्रत्येकाच्या वाट्यास येणारा पुरवठा नेहेमीच्या मानानें अत्यल्प आहे. जर्मनींत अन्नपुरवठ्याची ओरड नसली तरी जर्मनीनें अंकित केलेल्या बेल्जम, हॉलंड, फ्रान्स, इत्यादि देशांत तो फार कमी पडत आहे. गेल्या महायुद्धाचे वेळेचे मानानें सध्या जर्मन सैनिक व नागरिक ह्यांचें पोषण चांगलें होत आहे. इटलीमधील परिस्थिति ह्यापेक्षा कमी समाधानकारक आहे.

**हिंदी बकऱ्यांच्या कातड्यांचे अमेरिकन जोडे**

हिंदी बकऱ्यांच्या कातड्यांच्या वार्षिक होणाऱ्या निर्गतींपैकीं निम्मी निर्गत अमेरिकेकडे होते. ह्या कातड्यांपासून बूट बनविण्यांत येतात. हीं कातडीं मोठ्या आकाराचीं व समान प्रतीचीं असल्यास, त्यांची निर्गत अधिक किफायतशीर होईल. ह्या कातड्यांचा उपयोग बुटांच्या आंत लायनिंग घालण्याकडे व वरील भाग जोडण्याकडे होतो व त्या दृष्टीनें " अमृतसर " व " कलकत्ता " अशा दोन नांवांनीं तीं अनुक्रमें ओळखलीं जातात. चीनमधूनहि कातड्यांची निर्गत मोठ्या प्रमाणावर होत असे. ती चीन-जपान युद्धापासून थंडावली आहे. अमेरिकेंत बकऱ्यांची सुमारें ५ कोटि कातडीं कमावलीं जातात; जगांतील इतर सर्व देशांत मिळूनहि एवढीं कातडीं कमावण्यांत येत नाहींत.


# आयुर्वेद महाविद्यालय, पुणें.

नवीन वर्षाचे वर्ग सोमवार तारीख २३ जूनपासून सुरू होतील. कोणत्याहि विद्यापीठाची प्रवेश-परीक्षा ( मॅट्रिक्युलेशन ) संस्कृत व इंग्रजी हे विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश मिळेल. मुंबई सरकारच्या देशी वैद्यक बोर्डानें मान्य केल्या-प्रमाणें अभ्यासक्रम पांच वर्षांचा आहे.

**प्रत्यक्ष शिक्षणाच्या सोयी**

( १ ) प्रयोग शाळा—पदार्थ विज्ञान, रसायन, इंद्रिय विज्ञान यांचे प्रत्यक्ष शिक्षणाकरितां.

( २ ) शवच्छेदन शाळा व शरीर वस्तुसंग्रह— ( म्युझिअम ) शारिर ( ॲनॉटमी ) या विषयाचे प्रत्यक्ष शिक्षणाकरितां.

( ३ ) आयुर्वेद रसशाळा पुणें लि.-औषधी तयार करण्याचे प्रत्यक्ष शिक्षणाकरितां.

( ४ ) ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय हॉस्पिटल, पुणें–रोगनिदान व चिकित्सा ( काय व शल्य ) यांचे प्रत्यक्ष शिक्षणाकरितां उत्तम शस्त्रकर्म मंदिर-संप्राप्ति विज्ञानशाळा ( पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरी ) व " क्ष " शिक्षणशाळा यांनीं सुसज्ज अशा ६५ राहत्या रोग्यांचें हॉस्पिटल व रोज अडीचशेंवर बाहेरचे रोग्यांचा धर्मार्थ दवाखाना.

( ५ ) प्रसूतिगृह—प्रसूति तंत्राच्या शिक्षणाकरितां १२ सूतिकांची सोय असलेलें स्वतंत्र सूतिकागृह.

फी, अभ्यासक्रम, प्रवेश अर्ज वगैरे सविस्तर माहितीसाठी दीड आण्याचीं तिकिटें पाठवून माहितीपत्रक मागवावें. मर्यादित विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय केलेली आहे. प्रथम वर्षात मर्यादित संख्या गुणानुसार घेणें असल्यानें प्रवेशेच्छु विद्यार्थ्यांनीं नमुन्यावर शक्य तों लवकर अर्ज करावेत.

पत्ता-आयुर्वेद महाविद्यालय, २२ निहाल पेठ, पुणें २ | वा. चिं. लागू, अधिपति



# Sir Parashurambhau College, Poona 2.

The College opens on June 20,1941. Students should secure their admission early by enrolling their names in the College office. The College Prospectus giving all necessary information and containing the required application forms (for the hostels—both for men and women) will be sent gratis on request.

Prospectus for the T. D. Course of the University of Bombay will also be supplied free on request.

R. D. Karmarkar,
Principal.

## संशोधन आणि औद्योगिक प्रगति

सरकार, शास्त्रज्ञ व कारखानदार ह्यांचें संशोधन व औद्योगिक उन्नति ह्यांबाबतच्या प्रयत्नांत सहकार्य झाल्याविना हिंदुस्थानाची आर्थिक प्रगति होणार नाहीं. ह्या प्रत्येकाच्या स्वतंत्र प्रयत्नांस मर्यादा आहेत. परंतु त्या तिघांचें सहकार्य प्रभावी झाल्यावांचून रहाणार नाहीं. आतांपर्यंत उद्योगधंद्यांच्या वाढीस आवश्यक असलेल्या औद्योगिक संरक्षणावर भर देण्यांत आला, परंतु उद्योगधंद्यांच्या अभिवृद्धीस जरूर असलेल्या संशोधनाकडे लक्ष पुरविण्यांत आलेलें नाहीं. देशांतील औद्योगिक प्रगति ही तेथील संशोधनाच्या कार्यानें मोजली जाते. ग्रेट ब्रिटन, अमेरिका, राशिया, इत्यादि देश औद्योगिक संशोधनावर प्रतिवर्षी फार मोठा खर्च करतात. कित्येक हिंदी विश्वविद्यालयांत संशोधन चालू आहे, परंतु त्याचा औद्योगिक उपयोग अद्याप फारसा होत नाहीं. संशोधन संस्थांचें परस्परांत सहकार्य दिसत नाहीं; त्याचप्रमाणें त्या संस्था व कारखाने ह्यांचाहि निकट संबंध येत नाहीं. चालू युद्धास प्रारंभ झाल्यानंतर बोर्ड ऑफ सायंटिफिक ॲन्ड इंडस्ट्रिअल रिसर्च व त्याच्या उपसमित्या स्थापन झालेल्या आहेत आणि इंडस्ट्रिअल रिसर्च युटिलिझेशन कमिटीहि काम करूं लागली आहे. परंतु संशोधनकार्याचा व्याप लक्षांत घेतां वार्षिक ६ ते ७ लाखांची ग्रँट ही फारच अल्प आहे. तथापि आहे. ह्या परिस्थितींतहि बोर्ड शक्य तेवढें उपयुक्त कार्य करीत आहे. शास्त्रीय प्रगति व औद्योगिक प्रगति ह्यांमधील अंतर आतां दूर होत चाललें असून, शास्त्रीय संशोधनाकडे उद्योगधंद्यांचें नेतृत्व आलें आहे."

[ इन्स्टिट्यूट ऑफ केमिस्ट्स ( इंडिया ) मध्यें श्री. जी. एल. मेहता ह्यांचें भाषण. ]

### चेक्सची देवघेव

३० मे रोजीं संपलेल्या आठवड्यांत मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें १५ कोटि ८१ लक्ष रुपयांच्या ९०,९८८ चेक्सची देवघेव झाली.

### तांदळाचा पुरवठा

मद्रास प्रांतांत, एक दोन ठिकाणें सोडलीं असतां, सर्वत्र तांदळाचा साठा पुरेसा आहे. ब्रह्मदेशांतून ६० हजार टन तांदूळ नुकताच आला व आणखी येत आहे.


## FERGUSSON COLLEGE, POONA

Opens on 20th June, 1941. Students should apply to the Principal in time for admission (both to the classes and to Hostel) on prescribed forms with the necessary fee. There is accommodation for 56 students in the Women's Hostel. Details will be found in the prospectus supplied free on request. Admissions will be granted on working days ( 12 noon to 3 p. m. )

The Vasanji Laxmidas Scholarship is available to a poor deserving Hindu ( preferably a Bhatia ).

G. S. MAHAJANI
Principal.

## Deccan Institute of Commerce, Poona.

( Recognised by Government ).

Opens for the 1941-42 Session on Monday the 16th June, 1941. Students coached up for the following Examinations :

1. Government Diploma in Commerce ( G. D. C. )
2. D. Com. Diploma of the Indian Merchants' Chamber, Bombay, in Specialised Company Secretarial, Banking, Insurance, Accountancy and Business Organisation.
3. London Chamber of Commerce.
4. The Indian Institute of Bankers ( for Bank employees only ).
5. R. A. ( 1st Part ) *for Graduates only.*
6. G. D. C. & A. ( Government Diploma in Co-operation and Accountancy ) *for Graduates only.*

Special arrangements in SHORTHAND & TYPEWRITING. Highly qualified and experienced staff. Admission upto 15th July. For particulars see personally or apply to :

592/3 Budhwar Peth,
Opp. New English School,
Poona.

SECRETARY.

S. P. MANDALI'S

## INSTITUTE OF COMMERCE, POONA 2

NEAR GOKHALE HALL

( *Formerly known as School of Commerce* )

Established : 1933

The first Institution in Poona recognised by the Government of Bombay to prepare students for the Government Diploma and Certificate examinations in Commerce. One year's ideal course in Banking, Accountancy, Commercial Correspondence, Commerce and Finance, Typewriting etc.

New Course of G. D. C. & A. (Government Diploma in Co-operation and Accountancy) to be started from the coming session; admission to this course is open to Graduates only.

New session to commence from 23rd June, 1941. Minimum qualification for admission to Diploma and Certificate Course—Matriculation.

For fees and other particulars apply to

SUPERINTENDENT.

Office hours : 8 a.m. to 11 a.m.
Enrolment from 1st June, 1941.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | १११—२ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४-५ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६—० |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०२-१२ |
| ३% ( १९६३-६५ ) ... ... ... | ९५—० |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) — .. | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% ... ... | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०७-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% — | ४५-१४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५७६—४ |
| बॉबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०४—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% ... ... | १३०—४ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१३—२ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५९०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६०७—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) १½% ... ... | ५८—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८८१—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६४५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २०५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४४—० |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ८ आ. ... | ४४-१४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४,२००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १५०-१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३६८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. १ पै ... | १८९७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १३९—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२-४-३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६२-८-६ |


रक्तवर्धक




अत्यंत शक्तिवर्धक

रक्तवर्धक

आयुर्वेद रसशाळा

पुणें लि. पुणें ४.




मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक







सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर | **महिंद्रकर ब्रदर्स** तयार कपड्याचे व्यापारी | बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्यें वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १८ जून, १९४१ अंक २५


सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

' पायोनियर डाइंग हाऊस '

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

रक्तवर्धक




अत्यंत शक्तिवर्धक

रक्तवर्धक

आयुर्वेद रसशाळा

पुणें लि. पुणें ४.

दि सदर्न निटिंग वर्क्स, लि.

[ २६४ शनिवार, पुणें २. ]

यांनीं बनविलेली



"पूना होजिअरी"

उन्हाळ्यासाठी गंजीफ्रॉक, अंडरवेअर्स वगैरे हरतऱ्हेचा

जाळीचा माल

तयार होत आहे

आपल्या व्यापाऱ्याकडे चौकशी करा

★

ठेवी : मुदतीप्रमाणें ४॥ ते ६ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

★

माहितीसाठी वरील पत्त्यावर लिहा.

# विविध माहिती

### म्हैसूर लँप वर्क्स लि.

१९३७ अखेर वरील कंपनीच्या व्यवहारास प्रारंभ झाला. पहिलीं दोन वर्षे अपुरें खेळतें भांडवल, कमी यंत्रसामुग्री, इत्यादींमुळें विशेष चांगलीं गेलीं नाहींत. उत्पादनशक्ति आणखी वाढविण्यांत येणार आहे. १९३९ व १९४० मध्यें कंपनीला बरा नफा झालेला आहे.

### डॉ. विन्स्टन चर्चिल

अमेरिकेंतील रॉचेस्टर विश्वविद्यालय ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांस 'डॉक्टर ऑफ सिव्हिल लॉ' ही पदवी देणार आहे. रेडिओवर भाषण करून मि. चर्चिल ह्या पदवीचा स्वीकार करतील व त्यांचे तर्फे मि. नोल हॉल हे प्रत्यक्ष डिप्लोमा अमेरिकेंत घेतील.

### रिझर्व्ह बँकेचे नवीन डायरेक्टर

मि. सी. ई. जोन्स ह्यांची हिंदी रिझर्व्ह बँकेचे डायरेक्टर म्हणून नेमणूक जाहीर झाली आहे.

### हिंदी युद्ध-फंड

| | ७ जून, १९४१ अखेर |
|---|---|
| ३% व्याजाचे रोखे | ५३ कोटि रु. |
| बिन व्याजाचे रोखे | २ कोटि, ४२ लक्ष रु. |
| पो. ऑ. डिफेन्स सर्टिफिकिटें | २ कोटि, ८५ लक्ष रु. |

### ग्रेट ब्रिटनमधील अन्नपुरवठा

युद्ध सुरू होऊन आतां २१ महिने झाले असले तरी ग्रेट ब्रिटनमधील अन्नपुरवठा समाधानकारक आहे, असें लॉर्ड वूल्टन ह्यांनीं आपल्या रेडिओवरील भाषणांत नुकतेच सांगितलें.

### सिंध लाइट रेल्वेज लि.

वरील कंपनीला मार्च,१९४१ अखेर संपलेल्या वर्षीं ७९,३२१ रुपये नफा झाला. रेल्वेचें उत्पन्न घटलें आहे व करभार वाढला आहे. गेल्या वर्षीं मारवाडांत दुष्काळ पडला होता, तेथें धान्य नेण्याचें काम रेल्वेला मिळालें होतें, त्यामुळें नफा ज्यास्त उरला होता.

### नॅशनल सेव्हिंग्ज बँक लि.

वरील बँक मुंबई येथें नोंदण्यांत आली आहे. तिचे मि.नानकचंद खोराना हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

### स्टोअरकीपरचीं कर्तव्यें

" स्टोअरकीपर हा पद्धतशीर विचाराचा व आचाराचा मनुष्य पाहिजे. तो मुख्यतः व्यवहारी पाहिजे. वर्कशॉपमध्यें काम करण्याची संधि त्याला मिळालेली असली, तर फार उत्तम. जरूर तो माल भांडारांत ठेवण्याची त्याचेवर जबाबदारी आहे. फाजील साठा उपयोगी नाहीं, साठवणूक पद्धतशीर पाहिजे, खरेदी काटकसरीनें होईल अशा रीतीनें नवीन माल मागविला पाहिजे, हिशेब बिनचूक पाहिजे व महत्त्वाच्या वस्तू संपतांच त्या तात्काळ भरल्या पाहिजे. भांडारांतील मालाचे आगीपासून, गंजापासून व चोरीपासून संरक्षण केलें पाहिजे. जरूर तो माल दाखल करणें व मालाच्या अभावीं कामाची खोटी होऊं न देणें हें स्टोअरकीपरचें कर्तव्य आहे. ":—मि. हेनमन, कंट्रोलर ऑफ स्टोअर्स, बी. बी. अँड सी. आय. रेल्वे, ह्यांचें भाषण.

### भुइमूग

युद्धामुळें भुइमुगाची निर्गत कमी झाली. परंतु त्याची लागवड मात्र गेल्या कांहीं वर्षांत वाढलेली आहे. ही लागवड कमी करण्याचा प्रचार व भुइमुगाचा उठाव वाढविण्याचा प्रयत्न हिंदुस्थान सरकार प्रांतिक सरकारांच्या सहायानें करणार आहे.

### ट्रेझरी बिलांवर १३ आ. ९ पै व्याज

गेल्या आठवड्यांत हिंदी रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १३ आ. ९ पै इतका पडला.

### मुंबई येथील बँकिंग क्लिअरिंग हाउस

वरील क्लिअरिंग हाउसमध्यें ६ जून अखेर संपलेल्या आठवड्यांत १९ कोटि, ८३ लक्ष रुपये किंमतीच्या १,०८,३८९ चेक्सची देवघेव झाली.

### आयातीवर नियंत्रण

एकूण ६८ जिनसांच्या आयातीवर हिंदुस्थान सरकारनें मे, १९४० मध्यें नियंत्रण घातलें. आतां आणखी ४९ जिनसांवर तें घालण्यांत आलें आहे. म्हणजे, एकूण ११७ जिनसांची आयात नियंत्रित आहे. नव्यानें ज्यांची आयात नियंत्रित केली आहे, अशांत लोणी, तूप, दूध, भाज्या, कॉफी, कोको, चॉकोलेट, कातडी सामान, छापील पुस्तकें, नकाशे, चित्रें, कांचेचें सामान, विजेचे दिवे, कटलरी, टाइपरायटर्स, शिवण्याचीं यंत्रें, विजेचे पंखे, फोटोचीं साधनें, ब्रश, सिमेंट, रंग, इ. जिनसा आहेत.

### अंकित देशांकडून जर्मनीची खंडणी

नॉर्वे ते फ्रान्स ह्या अंकित देशांकडून निरनिराळया स्वरूपांत जर्मनी १०५ कोटि पौंडांची वार्षिक खंडणी उकळीत आहे. गेल्या महायुद्धाचे अखेर जेत्या राष्ट्रांनीं जर्मनीवर लादलेली खंडणी अधिकांत अधिक १२३ कोटि पौंड होती !

### बँक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नरांस पोलिसमनचा सल्ला

बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर, मि. मॉंटेग्यू नॉर्मन, शत्रूच्या बॉंबमुळें बँकेच्या इमारतीचे शेजारीं झालेल्या खड्ड्याची पाहणी करीत होते. व्यवस्थित दाढी राखलेल्या त्या गृहस्थाविषयीं शंका येऊन एका पोलिसमननें त्यांस तेथें काय काम आहे असें विचारलें. आपण एका बँकेंत काम करीत असतों असें मि. नॉर्मन ह्यांनीं उत्तर दिलें. " तर मग बँकेचें कांहीं काम करण्यास तिकडे गेलांत तर बरें नाहीं कां होणार ? " असें पोलिसमननें त्यांस सुचवलें.

### युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटना

युद्धसमाप्तीनंतर उत्पन्न होणाऱ्या औद्योगिक व व्यापारी परिस्थितीस तोंड देतां यावें म्हणून तिच्या संबंधांतील प्रश्नांचा विचार करून उपाययोजना सुचवण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें अधिकाऱ्यांची एक समिती नेमली आहे.

### गव्हाचें जागतिक उत्पादन

यंदाच्या हंगामाचें जागतिक उत्पादन ( रशिया वगळून ) गेल्या पांच वर्षांपेक्षा अधिक झालें आहे. युद्ध-परिस्थितीमुळें गव्हाचा आंतरराष्ट्रीय व्यापार बिघडून गेला आहे, आणि त्याचा बाजारभाव उतरला आहे.

अनुक्रमणिका

पृष्ठ
१ विविध माहिती ... २९०
२ युद्ध परिस्थिति आणि व्याजाचे दर ... २९१
३ शेअर आणि रोखे ह्यांचा बाजार ... २९२
४ स्फुट विचार ... २९३
हिंद-ब्रह्मदेश वाटाघाटी—मि. चर्चिल ह्यांचें विजयी भाषण—अमेरिकेचें युद्ध-सहाय—भारत सेवक समाज.
पृष्ठ
५ सांगली बँक लि. ... २९४
६ मध्य प्रांतांतील सहकाराची परिस्थिति ... २९५
७ पवित्र मंदिरांत चहाचा प्रवेश ... २९५
८ उंटाच्या पोटांतील अफू २९५
९ क्रीडा साहित्याचें हिंदुस्थानांत उत्पादन ... २९६
१० निवडक बाजारभाव २९८

# अर्थ

बुधवार, ता. १८ जून, १९४१

## युद्धपरिस्थिति आणि व्याजाचे दर

युद्धाचे परिस्थितींत सरकारचा म्हणजे राष्ट्रीय खर्च बेसुमार वाढतो आणि पुरवठ्याचे मानानें भांडवलास अधिक मागणी उत्पन्न झाल्यामुळें त्याची किंमत अर्थात् व्याजाचे दर ह्यांमध्यें वाढ होते. करांच्या मार्गानें आपलें उत्पन्न वाढवण्याची शिकस्त सरकार करतें. परंतु त्यानें कार्यभाग होत नाहीं आणि सार्वजनिक कर्जांचा अवलंब करणें त्यास प्राप्त होतें. कर आणि कर्ज ह्यांशिवाय उत्पन्नांत वाढ करण्याचा तिसरा एक मार्ग सरकारास खुला असतो आणि तो म्हटला म्हणजे चलनाचा विस्तार होय. तारणावांचून कागदी चलन व्यवहारांत खेळवण्यास खर्च थोडा लागून (खर्च नाहींच म्हटला तरी चालेल) वाटेल तेवढा पैसा सरकारास उभा करतां येतो खरा, परंतु हा उपाय अत्यंत अनिष्ट असा आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. विनतारणी चलनाचा प्रसार करण्याचा मोह सरकारनें आवरला नाहीं तर त्याचे दुष्परिणाम त्यास तात्काळ भोगावे लागतात. फाजील चलनाच्या पुरवठ्यामुळें बाजारभाव चढतात, मजुरीचे दर वाढवावे लागतात, उद्योगधंद्यांस अधिक खर्च येतो आणि सरकारास युद्धसामुग्री चढीच्या किंमती देऊन खरेदी करावी लागते. जनतेची रहाणी महागाईची झाल्याकारणानें देशामध्यें असमाधान पसरतें आणि ही गोष्ट युद्धाच्या दृष्टीनें अनिष्ट ठरते. हा कडु अनुभव मागील युद्धांत आल्यामुळें त्यापासून सरकारांनीं योग्य तो बोध घेतला आहे आणि चलनाच्या पुरवठ्याविषयीं आणि कर्जाचे बाबतींत सावधगिरीचें धोरण स्वीकारलें आहे.

पदार्थांच्या किंमती निश्चित करणें, खाण्यापिण्याच्या जिनसांच्या वापरास मर्यादा घालणें, शिलकी भांडवलाचा ओघ युद्धोपयोगी धंदे व सार्वजनिक कर्जे ह्यांचेकडे वळवून घेणें इत्यादि उपायांनीं सरकार स्वतःस जरूर असलेला पैसा आकर्षू शकतें. जनतेस रोजच्या खर्चास लागणाऱ्या पैशासच मर्यादा बसली म्हणजे तिची बचत होणें अपरिहार्य आहे आणि ह्या भांडवलाचा विनियोग करण्याचे इतर मार्ग उपलब्ध नसल्यानें तें सरकारी तिजोरींत कर्जांच्या स्वरूपांत जातें. लोकांच्या प्राप्तीपैकीं मोठ्या भागाची बचत होईल अशी परिस्थिति निर्माण करून ती आपल्याकडे खेचणें ह्या सरकारी धोरणाचा परिणाम भांडवलाचा पुरवठा आणि त्यास असलेली मागणी ह्यांचा मेळ बसण्यांत होतो आणि त्या योगानें व्याजाचे दर मर्यादित रहातात. चालू युद्धांत व्याजाचे दर चढले नाहींत ह्या गोष्टीचें रहस्य वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. जर्मनीमध्येंहि व्याजाचे दर हळुहळु उतरवण्यांत आले आहेत. त्या देशांत युद्धापूर्वींहि जनतेच्या जीवनाचें नियंत्रण सरकारनें केलें होतें, हें प्रसिद्ध असून युद्धकाळांत तर तें नियंत्रण अधिक तीव्र झालें आहे. प्रसिद्ध केलेलें असें जर्मन राष्ट्राचें कर्ज युद्धाचे प्रारंभीं ३,७३३ कोटि मार्क होतें तें गेल्या सप्टेंबरमध्यें ६,९६६ कोटि मार्क झालें आणि आतां तें ८,००० कोटि मार्कच्या घरांत गेलें असलें पाहिजे. तथापि, व्याजाचे दर चढण्याचे ऐवजी उतरले आहेत, ह्याचीं कारणें वर नमूद केलीं आहेत.

व्याजाचे दर उतरण्याच्या विरुद्ध तक्रारी होतात त्या विमा मंडळ्या व व्याजाच्या उत्पन्नावर जगणारा वर्ग ह्यांचेकडून होतात. आपले ठेवींवरचे आणि द्यावयाच्या कर्जांवरील व्याजाचे दर कमी-अधिक करून बँका आपल्या व्यवहाराची घडी विस्कटूं देत नाहींत. विमा मंडळ्यांस व्याजाचें उत्पन्न कमी मिळतें आणि त्यांच्या धंद्यास परिस्थिति प्रतिकूल होते. ही गोष्ट खरी असली तरी एकंदर राष्ट्राच्या गरजा आणि युद्धखर्चाची निकड हीं लक्षांत घेतलीं असतां हलके व्याजाचे दर समर्थनीयच ठरतात. युनायटेड किंग्डम टेंपरन्स अँड जनरल प्रॉव्हिडंट इन्स्टिट्यूशन ह्या संस्थेच्या सभेंत भाषण करतांना सर अर्नेस्ट बेन ह्यांनीं हलक्या व्याजाच्या दराविषयींच्या सरकारी धोरणावर प्रतिकूल टीका केली, ह्यासंबंधानें एकॉनॉमिस्ट ह्या इंग्रजी साप्ताहिकानें आश्चर्य प्रदर्शित केलें आहे. सर अर्नेस्ट ह्यांचें म्हणणें असें आहे कीं एक टक्क्यानें व्याजाचा दर कमी करून सरकारनें राष्ट्रीय खर्चांत फारच थोडी काटकसर केली आहे. अल्प मुदतीचीं कर्जे मोठ्या प्रमाणांत काढावीं लागल्यामुळें बिनमुदतीच्या सरकारी रोख्यांस मर्यादित मागणी येत आहे आणि व्याजाचे दर चढीचे असते तर सरकारास कर्जांच्या द्वारें अधिक पैसा सहज मिळाला असता. सर अर्नेस्ट बेन ह्यांची ही विचारसरणी सयुक्तिक नाहीं. जनतेच्या जवळचा पैसा आकर्षून घेण्यास तीन टक्क्यांच्यावरील व्याजाच्या उंच दराचें आमिष जरूर नसतां तो दर चार किंवा पांच टक्के ठेवणें म्हणजे सरकारनें आपला खर्च विनाकारण वाढवणें आणि राष्ट्राच्या डोक्यावरचा देण्याचा बोजा जड करणें होय. जनतेच्या प्राप्तीचा विनियोग सरकारी नियंत्रणामुळें मर्यादित झाला असतां लोकांच्या हातांत बचत अधिक रहाते आणि तिची विल्हेवाट करण्याचा सार्वजनिक कर्जांत तो पैसा गुंतवणें एवढाच मार्ग लोकांस मोकळा रहातो. अशा स्थितींत सरकारनें व्याजाचे दर कां उतरवूं नये आणि कांहीं लोकांस अधिक व्याज कां देत रहावें ? आम्हीं वर दर्शविल्याप्रमाणें जर्मनींतहि सरकारी कर्जरोख्यांचे व्याजाचे दर कमी करण्यांत आले आहेत. सरकारास कमी व्याजानें पैसा कर्जाऊ मिळत असतां त्यानें व्याजाचा दर चढीचा ठेवणें केव्हांहि शहाणपणाचें होणार नाहीं.

### मुंबई येथील व्हेटरिनरी कॉलेज

मुंबई येथील व्हेटरिनरी कॉलेज हें हिंदुस्थानांतील तत्सम कॉलेजांतील सर्वांत जुनें कॉलेज आहे. तें १८८६मध्यें स्थापन झालें. मि. जॉन हेन्री स्टील हे त्याचे पहिले प्रिन्सिपॉल होते. त्याच जागेवर रा. ब. फडके हे १९३२ ते ३७ पर्यंत होते.

## शेअर आणि रोखे ह्यांचा बाजार

### भागांची खरेदी-विक्री

डिव्हिडंड जाहीर करण्यापूर्वी कांहीं दिवस कंपन्या आपल्या भागांच्या तबदिलीचें काम बंद ठेवतात. हें काम ज्या दिवसापासून बंद असतें त्या दिवशीं भाग धारण करणारांसच डिव्हिडंड मिळतें. म्हणून, त्या दिवसापासून डिव्हिडंड देईपर्यंतच्या मुदतीमध्यें भागांची किंमत बाजारांत ठरते ती कम्-डिव्हिडंड असते; म्हणजे किंमतीमध्यें डिव्हिडंडचा अंतर्भाव झालेला असतो. ह्याचा अर्थ, भाग विकत घेणारा भागाच्या किंमतींतून डिव्हिडंडची रकम उणें करून पैसे देतो व भाग विकत घेणारास डिव्हिडंड कंपनीकडून मिळतें. डिव्हिडंड वॉरंटला कंपनीनें सरकारास नफ्यावरील कर भरलेला आहे अथवा ती भरील, अशा अर्थाचें एक सर्टिफिकेट जोडलेलें असतें. भाग विकणारास ह्या सर्टिफिकेटचा उपयोग करून रिफंड घेतां येणार नाहीं, कारण भागाची विक्री कम्-डिव्हिडंड झाली व डिव्हिडंड जाहीर झालें त्यावेळीं तो भागांचा मालक नव्हता. भागांची खरेदी करणाराच ह्यावेळीं मालक होता. भागाची विक्री करणारानें हें सर्टिफिकेट योग्य शेरा मारून दलालामार्फत खरेदीदाराकडे पोचतें केलें पाहिजे. वायद्याचे व्यवहारांत हेलकावे खाणारे प्रमुख शेअर्स म्हणजे आयर्न व कॉटन मिल्सचे भाग होत. इतर कंपन्यांच्या भागांच्या किंमती ह्या भागांच्या आंदोलनाबरहुकूम बहुधा कमीअधिक होतात. व्यक्तिशः भागांच्या किंमतींत चढउतार होण्याचीं कारणें इतर आणखी असणार, हें उघड आहे.

### सरकारी कर्जरोखे

हिंदुस्थान सरकारनें व प्रांतिक सरकारांनीं वेगवेगळया वेळीं काढलेलीं कर्जे असतात, त्यांची दर्शनी किंमत विवक्षित वेळीं परत यावयाची असते व त्यांचा व्याजाचा दरहि निश्चित असतो. हिंदुस्थान सरकारचीं कांहीं कर्जे इंग्लंडमध्येंहि उभारलेलीं होतीं, त्यांचें आतां हिंदीकरण करण्यांत आलेलें आहे. सरकारी कर्जरोख्यांवरहि व्याज वर्षांतून दोनदां दिलें जातें व तें देतांना प्राप्तीवरील कर कापून घेतला जातो. कांहीं कर्जरोख्यांच्या व्याजावर प्राप्तीवरील कर नाहीं. सरकारी रोख्यांत गुंतवलेलें भांडवल कायम टिकतें व त्यावरील व्याज निश्चितपणें व वक्तशीरपणें मिळतें. विमा कंपन्यांना आपल्या जिंदगीपैकी कांहीं ठराविक भाग सरकारी रोख्यांत गुंतवावाच लागतो व बँकाहि आपला शिलकी पैसा रोख्यांतच बव्हंशीं गुंतवितात. सरकारी रोख्यांचे रोख रकमेंत रूपांतर करण्यास वेळ लागत नाहीं व खर्चीहि फार येत नाहीं. त्यांचे तारणावर कर्जेहि तात्काळ मिळूं शकतें. ह्या सर्व कारणांमुळे सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री अतिशय मोठ्या प्रमाणावर चालते. कित्येक दलाल रोख्यांच्या खरेदी-विक्रीचाच धंदा केवळ करतात, परंतु रोख्यांचा व्यवहार न करणारे दलाल जवळ जवळ नाहींतच. समजा, "अ" मिस्डाइकास ३½% च्या ५० हजारांच्या सरकारी प्रॉमिसरी नोटा घ्यावयाच्या आहेत. त्याची ऑर्डर तो "ब" दलालास १८ मार्च १९४१ रोजीं देतो. "ब" हा "क" दलालाकडून शेकडा ९५ रु. २ आ. दरानें त्याच दिवशीं त्या विकत घेतो व "अ" ला ९५ रु. ४ आ. दराचा करार पाठवून देतो. २ आणे हें कमिशन असतें. हिशेब खालीलप्रमाणें केला जातो.

| | रु. |
|---|---|
| ५० हजारांचे रोखे दर शेकडा ९५ रु. ४ आ. १ महिना व १७ दिवसांचें साठलेलें व्याज (ह्या रोख्यांवर १ फेब्रुवारी व १ ऑगस्ट रोजीं व्याज दिलें जातें.) | ४७,६२५-०-० |
| रु. २२८-७-४ | |
| उणें रुपयास ३२ पै ह्या दरानें इनकम टॅक्स ३८-९-६ | |
| | १८९-१३-१० |
| 'अ'नें द्यावयाची रकम | ४७,८१४-१३-१० |


३½ टक्क्यांच्या रोख्यांच्या खरेदी-विक्रीप्रमाणेंच इतर रोख्यांचे व्यवहार होतात. शेअर्सचे वायद्याचे व्यवहार होतात त्याच पद्धतीनें रोख्यांचे वायद्याचे होतात; फरक इतकाच कीं, शेअर्सच्या बाबतींत सेटलमेंट मासिक असते ती येथें पाक्षिक असते व शेअर्सच्या व्यवहाराप्रमाणेंच तफावत दिली-घेतली जाते. बदला व्यवहारहि केला जातो. सरकारी कर्जरोख्यांच्या किंमतींत चढउतार फार होत नाहीं ह्याचें कारण व्याज, मुदत इत्यादि गोष्टी निश्चित असतात. तथापि पैशाच्या बाजारांतील परिस्थिति, राजकीय स्थित्यंतरें, दीर्घ अथवा अल्प मुदतीच्या कर्जास मागणी इत्यादि गोष्टींचें प्रतिबिंब रोखे बाजारांत पडतें. (इं. म. चें. च्या मासिकावरून)

### मोटारींच्या उत्पादनाचें नियंत्रण

अमेरिकेंतील मोटारगाड्यांचें उत्पादन येत्या ऑगस्टपासून शेकडा २० टक्क्यांनीं कमी करण्यांत यावयाचें आहे. मोटार कारखान्यांतील कामगारांची विमानें व रणगाडे ह्यांचे कारखान्यांत बदली केली जाईल.

### युद्धाच्या धोक्याचा मालाचा विमा

जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर १९४१ ह्या तिमाहींत वरील विम्याच्या हप्त्यांचा दर, दर शेंभर रुपयांस दरमहा एक आणा, असाच कायम राहील; त्यांत वाढ होणार नाहीं.


व्हॉलीबॉल्स, रेनिकॉइट रिंग्ज्, बॅडमिंटनचीं फुलें, कॅरमबोर्डस्, पत्ते, पी. टी. शूज्, पिंगपॉंग बॅट्स, बॉल्स, वगैरे सामान किफायतशीर रीतीनें मिळण्याचें एकमेव ठिकाण म्हणजे—

**साठे-स्पोर्टस्,**

डेक्कन जिमखाना पोस्टाजवळ, पुणें ४.

# स्फुट विचार

### हिंद-ब्रह्मदेश वाटाघाटी

ब्रह्मदेशांत अलीकडे हिंदी लोकांच्या तेथील वास्तव्या विरुद्ध लोकमत अनिष्ट रीतीनें व्यक्त झालें आहे. सिलोनप्रमाणें ब्रह्मदेशाची औद्योगिक व व्यापारी प्रगति हिंदुस्थानांतून तिकडे गेलेल्या कामगारांच्या व धंदेवाल्यांच्या धाडसामुळें झाली आहे. पण आर्थिक मंदी व बेकारी ह्यांच्या योगानें ह्या दोन्ही देशांत हिंदी लोकांच्या जाण्यास प्रतिबंध केला जावा अशी जोराची मागणी होत आहे. ब्रह्मदेश ह्या देशापासून विभक्त करण्यांत येण्यापूर्वीच ह्या प्रश्नास तोंड लागलें होतें आणि त्याची चौकशी एका कमिशननें केली होती. त्यानंतर हिंदी लोकांच्या विषयीं ब्रह्मी जनतेच्या मनांतील आढी ब्रह्मदेशांत झालेल्या दंग्यांत स्पष्टपणें उघड झाली. न्यायमूर्ति ब्राउंड ह्यांनी त्या दंग्यांची चौकशी केली तेव्हां त्यांस असें आढळून आलें कीं, ब्रह्मी जनतेच्या डोळ्यांत हिंदी कामगार व धंदेवाले सलत होते आणि त्यांची संख्या कमी केली जावी व त्यांच्या आयातीवर निर्बंध घालण्यांत यावे अशी तिची मागणी होती. हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांच्या मधील स्नेहसंबंध कायम रहाण्याचा दृष्टीनें ब्रह्मी लोकांच्या ह्या भावनेचा विचार होण्याची आवश्यकता न्यायमूर्ति ब्राउंड ह्यांनी प्रतिपादली होती. त्यांच्या सूचनेप्रमाणें मि. बॅक्स्टर ह्यांनीं चौकशी करून रिपोर्ट सादर केला आहे. त्याचा विचार हिंदुस्थान सरकार व ब्रह्मदेशाचे सरकार दोघेहि करीत आहेत. हिंदुस्थान सरकारनें मध्यवर्ती कायदेमंडळाच्या सभासदांची स्टँडिंग एमिग्रेशन कमिटी आहे तिचा ब्रह्मदेशाचे बाबतींत सल्ला घेतला. सरकारनें स्वतःच्या धोरणाची दिशा ठरविली आहे ती कमिटीस मान्य आहे असें समजतें. ब्रह्मदेशांत जे हिंदी लोक कायमचे रहिवाशी झाले आहेत त्यांस न्यायानें वागवण्यांत आलें पाहिजे असा सरकारचा आग्रह आहे. हिंदी लोकांनीं ब्रह्मदेशांत जाऊन गर्दी करूं नये हें सरळ आहे आणि त्यासंबंधांत कांहीं बंधनें घालण्यास हरकत नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदी सरकारचे मंत्री, सर गिरिजाशंकर बाजपेय आणि इतर अधिकारी ब्रह्मदेशास तेथील सरकारच्या प्रतिनिधींशीं वरील प्रश्नांची चर्चा करण्यास गेले आहेत आणि त्यांच्या वाटाघाटीचा निकाल ह्या देशास समाधानकारक असा होईल अशी अपेक्षा आहे.

---

### मि. चर्चिल ह्यांचें विजयी भाषण

क्रीटमधून ब्रिटिश फौजा काढून घ्याव्या लागल्या त्याचीं कारणें आतां प्रसिद्ध झालीं आहेत. तथापि, इंग्लंडमध्यें त्या बाबतींत बरीच प्रतिकूल टीका होऊन मंत्रिमंडळास तिला उत्तर देणें प्राप्त होतें. कॉमन्स सभेंत ह्या उत्तराची जबाबदारी मुख्य प्रधान, मि. चर्चिल, यांचेवर अर्थातच येऊन पडली. ती त्यांनीं यशस्वी रीतीनें पार पाडली आणि कॉमन्स सभेचा मंत्रिमंडळावरील विश्वास दृढ केला ह्याचें श्रेय त्यांचा स्पष्टवक्तेपणा व ब्रिटिश जनतेचा समंजसपणा ह्यांस दिलें पाहिजे. भूमध्य समुद्राच्या पूर्वभागांत चाललेल्या युद्धांतला क्रीटमधील लढाई हा एक भाग आहे ह्या दृष्टीनें तिच्याकडे पाहिलें पाहिजे असें ते म्हणाले. क्रीटच्या लढाईमुळें हिटलरचे इराकमधील डावपेच फसले व त्या लढाईंत जर्मनींचेंहि अतोनात नुकसान झालें आहे ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. लष्करी अधिकारी व मंत्रिमंडळ ह्यांनीं विचारविनियम करून एखाद्या लढाईचा बेत केला आणि विशिष्ट कारणांमुळें तिच्यामध्यें अपेक्षेप्रमाणें यश आलें नाहीं तर लागलीच त्या लोकांवर टीकाकारांनी तुटून पडावें हें योग्य नाहीं.ही विचारसरणी मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्ससभेपुढें मांडली. क्रीटमध्यें न्यूझीलंडचे सैनिक मोठ्या प्रमाणांत खपले ह्याविषयींच्या भडक बातम्या प्रसिद्ध करून शत्रूनें लोकमतांत फूट पाडण्याचा प्रयत्न चालवला होता, त्यास मि. चर्चिल ह्यांनीं प्रस्तुत युद्धांत इंग्लंडचेच सैनिक फार मोठ्या प्रमाणांत कामास आले आहेत हें आकडे देऊन सिद्ध केलें. एकंदरीनें ब्रिटिशांची युद्धांत निश्चितपणानें प्रगति चालली आहे हेंहि त्यांनीं दाखवून दिलें. लोकांच्या मनांत भलत्या अपेक्षा उत्पन्न न करतां व त्यांस नाउमेद न करतां वस्तुस्थितीचें चित्र रंगवण्यांत मि. चर्चिल ह्यांचा हातखंडा आहे हें त्यांनीं आपल्या भाषणानें पुन्हां एकवार सिद्ध केलें. त्यांचा निश्चय व करारीपणा दुर्दम आहे आणि त्यांच्या हातीं ब्रिटिश राष्ट्राचें नेतृत्व सध्याच्या आणीबाणीच्या प्रसंगीं आलें आहे, ही सुदैवाची गोष्ट आहे, असें म्हटलें पाहिजे.

---

### अमेरिकेचें युद्धसहाय

हिटलरशाहीच्या विरुद्ध इंग्लंडला युद्धसहाय सर्व प्रकारांनीं देण्याचा आपला निश्चय मि. रूझव्हेल्ट ह्यांनीं अनेक वेळां जाहीर केला आहे. त्याच्या विरुद्ध जर्मनीनें तक्रार केली असून जपानलाहि तें धोरण नापसंत आहे; कारण अमेरिका चीनला उघड रीतीनें मदत देत आहे. मि. रूझवेल्ट ह्यांनीं इंग्लंडला दिल्या जाणाऱ्या सहायाची माहिती प्रसिद्ध करतांना काढलेले उद्गार महत्वाचे आहेत. लढाऊ सामान इंग्लंड व चीन ह्या देशांस जाऊन पोहोंचेल ह्याविषयीं आपण खबरदारी घेऊं असें त्यांनीं निक्षून सांगितलें आणि जर्मनीच्या त्या संबंधांतल्या धमक्यांस भीक घालणार नाहीं असें सुचवलें. वहातुकीचीं जहाजें अमेरिकेकडून इंग्लंडला पुरवण्यांत येत आहेत. नवीन जहाजें बांधणें,इंग्लंडचीं जुनीं जहाजें दुरुस्त करणें इत्यादि कामासाठी पैशाचा पुरवठा होत आहे. गेल्या वर्षाच्या पहिल्या पांच महिन्यांत इंग्लंडला जितकीं विमानें व विमानांचीं इंजनें पुरवण्यांत आलीं होतीं त्यांच्या दसपट व बारापट विमानें व इंजनें चालू वर्षाच्या पांच महिन्यांत पुरवलीं गेलीं असल्याची माहिती प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं दिली आहे. त्याचप्रमाणें दारूगोळा, तोफा, बंदुका इत्यादि सामुग्रीहि मोठ्या व वाढत्या प्रमाणावर अमेरिकेंतून इंग्लंडला पोहोंचती करण्यांत आली आहे.जर्मनीस माहितीचा उपयोग करतां येऊं नये ह्या बेतानें पण तपशीलवार रीतीनें ह्या बाबतींतले आकडे त्यांनीं प्रसिद्ध केले आहेत. त्यांच्या मतानें युद्ध-सामुग्री पुरवठ्याइतकीच महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे हिटलरशाहीच्या पाडावास भरपूर सहाय करण्याचा अमेरिकन राष्ट्राचा निर्धार,ही आहे.

---

### भारत सेवक समाज

कै.वा. नामदार गोखले ह्यांनीं १९०५ सालीं स्थापलेल्या भारत सेवक समाजानें राष्ट्रसेवा देशकार्याच्या अनेक क्षेत्रांत अव्याहत रीतीनें चालवली आहे हें ह्या संस्थेच्या १९४०-४१ विषयींच्या वृत्तांतावरून दिसून येतें. १२ जून हा ह्या समाजाच्या स्थापनेचा दिन असल्यानें त्या निमित्तानें त्यानें चालवलेल्या कामगिरीचा गौरवपूर्वक उल्लेख करणें आवश्यक आहे. सांपत्तिक आणि इतर अडचणींस तोंड देऊन भारत सेवक समाजाच्या सभासदांनीं

राष्ट्रीय हिताचे प्रश्न हातीं घेऊन स्वार्थत्यागपूर्वक ते सोडवण्याचे प्रयत्न चालू ठेवले आहेत याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. राजकीय,सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक कार्य समाजाचे सभासद देशाच्या निरनिराळ्या प्रांतांत करीत आहेत. ग्रामसुधारणा व हरिजनांची उन्नति हें राष्ट्रीय कार्य जितकें महत्त्वाचें आहे तितकेंच तें अवघड आहे. परंतु आपल्या समाजाचें उच्च राष्ट्रीय ध्येय डोळ्यापुढें ठेवून त्याचे सभासद ह्या कार्याचा पाठपुरावा करीत आहेत. १९४०-४१ सालच्या भारत सेवक समाजाच्या कार्याच्या वृत्तांतावरून ह्या संस्थेच्या मार्गांत सांपत्तिक अडचणी उत्पन्न झाल्या आहेत आणि तिच्या उत्पन्नांत तूट आलेली आहे असें दिसतें. भारत सेवक समाजाच्या महत्त्वाच्या कार्याकडे लक्ष देऊन तिला द्रव्यसहाय्य देणें देशाच्या हिताविषयीं आस्था बाळगणाऱ्या लोकांचें व धनिकांचें कर्तव्य आहे.

---

### दि सांगली बँक लि., सांगली

वरील बँकेचा ३१ डिसेंबर, १९४० अखेरचा २४ व्या वर्षाचा अहवाल बँकेच्या ता. ४ जून रोजीं भरलेल्या वार्षिक सभेनें मंजूर केला. बँकेचें सर्व भाग भांडवल ( २ लक्ष रु. ) वसूल झालेलें आहे. जनरल रिझर्व्ह ५५ हजार रुपये, संशयित व बुडीत कर्जासंबंधीं रिझर्व्ह २२½ हजार रुपये, इमारतफंड ४० हजार रुपये, इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंड २० हजार रुपये, इत्यादि मिळून १ लक्ष, ३८ हजारांचे फंड आहेत. नोकरांचा प्रॉ. फंड ११¾ हजार रुपायांचा आहे. ठेवींची रकम २४½ लाखांपर्यंत गेली आहे. अहवालाच्या सालांत ठेवी सुमारें ६ लाखांनीं वाढल्या व म्हणून ठेवीचे व्याजाचे दर बोर्डाला कमी करावे लागले. बँकेजवळ इतर बँकांत ७½ लक्ष रुपये शिलक असून तिचे १२ लक्ष, ९१ हजार रुपये सरकारी रोखे, ट्रेझरी बिलें, पो. ऑ. कॅश सर्टिफिकेटें इत्यादींत गुंतविलेले आहेत व ३० हजारांचे कंपन्यांचे भाग आहेत. ६ लक्ष, ८९ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. संशयित व बुडीत कर्जासंबंधीं फंडाची बँक योग्यप्रकारें वाढ करीत आहे. मंगळवेढें, विलिंग्डन कॉलेज व तुपारी येथें बँकेनें शाखा उघडल्या. म्हणजे, तालुक्याच्या सर्व ठिकाणीं बँकेच्या शाखा झाल्या आहेत. शाखांची संख्या आठ आहे. अहवालाचे वर्षअखेर बँकेस मागील सालचा पुढें ओढलेला शिलकी नफा धरून ३७,३३२ रुपये नफा झाला, त्यांतून रिझर्व्ह फंडांत ७,५०० रुपये, इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांत २,५०० रुपये, संशयित व बुडीत कर्ज-फंडांत ५,०६८ रुपये, कॉंटिंजेंट फंडांत १,१०० रुपये, डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंडांत १,७०० रुपये, ज्युबिली फंडांत ५०० रुपये, ह्याप्रमाणें रकमा टाकून बँकेनें ७% डिव्हिडंड व १% बोनस दिलें आहे. बँकेची प्रगति उत्कृष्ट होत आहे. चालू वर्ष हें बँकेचें ज्युबिली वर्ष आहे, तेव्हां तिच्या उत्कर्षाचा दुसरा टप्पा आतां सुरू होईल. रावसाहेब एच. बी. कुलकर्णी, बी. ए. हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. पी. एस. मोकाशी हे मॅनेजर आहेत.

---

### हिंदी इनकमटॅक्स कायद्यांत दुरुस्ती

इनकमटॅक्स ॲक्टाचे अंमलबजावणींत दिसून येणाऱ्या अडचणी दूर करण्याचे उद्देशानें त्या कायद्यांत कांहीं दुरुस्त्या सुचविण्यांत येणार आहेत. हें दुरुस्त्यांचें बिल मध्यवर्ती असेंब्लीच्या येत्या अधिवेशनांत दाखल केलें जाईल.


एकाची अपरंपार श्रीमंती—

म्हणजे हजारो गरीब कुटुंबांची धुळधाण!

कोंकणच्या नयनरम्य पार्श्वभूमीवर नवयुगचें

नवीन सामाजिक चित्र

अमृत

: दिग्दर्शक : विनायक
: कथासंवाद : खांडेकर
: फोटोग्राफी : पां. नाईक

: भूमिका :

मीनाक्षी, ललिता पवार, बेबीदेवी, बाबूराव पेंढारकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, मा. विठ्ठल आणि विनायक.

मिनर्व्हा, पुणें—

४ था

आठवडा

★

रोज ६॥ व १०

शनि. रवि. सोम. जादा खेळ ३॥ वा.

'पिअरलेस' प्रकाशन

## मध्यप्रांतांतील सहकारी परिस्थिति

### दि मेहकर को. सें. बँक लि.

वरील बँकेचा १-७-१९३७ ते ३०-६-१९४० अखेरचा अहवाल आमचेकडे आला आहे. गेल्या तीन वर्षांत बँकेचे भागीदारांस एकहि अहवाल सादर करतां आला नाहीं. ह्या बँकेच्या परिस्थितीवरून मध्यप्रांत वऱ्हाडांतील सहकारी चळवळीच्या परिस्थितीची उत्कृष्ट कल्पना येईल, म्हणून तिची माहिती आम्हीं विस्तारानें देत आहों:—

"गेल्या तीन वर्षांत प्रांतांतील सहकारी चळवळींत अत्यंत महत्त्वाच्या घडामोडी झाल्या. कांहीं बँकांनीं आपले व्यवहार बंद केले. त्यामुळें ठेवीदार वर्ग गडबडून गेला व चालू बँकेंतील ठेवीहि काढून घेण्याचा त्यांनीं उपक्रम सुरू केला. सहकारी चळवळीचें तारू खडकावर आपटून बुडतें, तरतें किंवा कोणत्या दिशेकडे वहात जातें याची कल्पनाच करतां येणें अशक्य होतें. परिस्थितीची भीषणता व लोकांची निकडीची मागणी लक्षांत घेऊन प्रांतिक सरकारनें श्री. रा. रा. दादासाहेब गोळे यांच्या अध्यक्षतेखालीं एक चौकशी कमिटी नेमली. चौकशीकमिटीचें प्रतिवृत्त व त्यावरील सरकारी शिफारशी प्रसिद्ध होईपर्यंत बँकांनीं आपल्या सभा भरवूं नयेत असा मे. रजिस्ट्रारसाहेबांनीं सर्व बँकांना सल्ला दिला व त्याला अनुसरून सर्वसभा स्थगित केल्या गेल्या. चौकशी कमिटीचा रिपोर्ट झाल्यानंतर प्रांतिक सरकारनें आपल्या शिफारसी व त्याबरोबर एक निर्णायक योजना प्रसिद्ध केली. सदर्हू सरकारी योजना आपल्या बँकेला लागू न झाल्यामुळें, या सालीं मामुली वहिवाटीप्रमाणें व बँकेच्या पोटनियमाप्रमाणें आज रोजीं सभा भरविण्यांत येत आहे. दुसऱ्या पुष्कळशा बँकांच्या सभा स्थगित केल्या गेल्या असतां ह्या बँकेची सभा भरत आहे ही लक्षांत घेण्यासारखी महत्त्वाची गोष्ट आहे. वरील कारणांमुळें गेल्या तीन वर्षांच्या बँकेच्या कामकाजाचा अहवाल आढावा व नफा-तोट्याचें पत्रकासह आपणापुढें आज सादर करण्यांत येत आहे."

बँकेकडे गेल्या तीन वर्षांत आलेल्या व बँकेंतून परत गेलेल्या ठेवींचे आंकडे (रु.) खालीं दिले आहेत:—

| | मुदतीच्या ठेवी | | सेव्हिंग ठेवी | |
|---|---|---|---|---|
| वर्ष | आल्या | गेल्या | आल्या | गेल्या |
| १९३७-३८ | ५२,४१८ | ५३,२४० | ३३,०२९ | ४४,१२७ |
| १९३८-३९ | ११,३९२ | ४९,५५६ | ३६,७८३ | ४२,६९७ |
| १९३९-४० | १०० | ८८,७६२ | १०,२१२ | ४१,९९६ |

वरील आकड्यांवरून मेहकर बँक केवढ्या दिव्यांतून पार पडली, तें दिसून येईल. "नवीन ठेवी येणें अजीबात बंद झाल्यामुळें पेढ्यांकडून येणारी कर्जवसुली, जमिनीची विक्री, या दोन गोष्टींवरच बँकेचें भवितव्य बव्हंशीं अवलंबून आहे." "ठेवीदारांनीं भराभर ठेवी काढण्याकरितां जी सुरवात केली त्याकरितां गंगाजळीचा बँकेस उपयोग करावा लागला." ३०-६-१९३८ रोजीं गंगाजळीची रकम ६८,८१९ रुपये होती ती ३०-६-१९४० अखेर २२,३२२ रुपये झाली. बँकेला १९४०-४१ मध्यें ८६,४८१ रुपयांच्या, १९४१-४२ मध्यें २३,३१३ रुपयांच्या, १९४२-४३ मध्यें १,०५,४०५ रुपयांच्या, १९४३-४४ मध्यें ९,८४१ रुपयांच्या व १९४४-४५ मध्यें १०० रुपयांच्या मुदतीच्या ठेवी परत करावयाच्या आहेत. "जमीन ठेवण्यांत मुळींच फायदा नाहीं, म्हणून बँकेनें शक्य तितकी जमीन रोख किंमतीला विकण्याचें ठरविलें आहे व त्या प्रयत्नांत यशहि बरें आलें आहे. ज्या सभासदांनीं वसूल दिला, त्यांना पुनः कर्ज देण्यांत आलें."

"ठेवीदारांच्या सर्व ठेवी व हिश्यांचें भांडवल सर्व परत केल्यावर देखील बँकेजवळ ९६,३१४ रुपये शिल्लक राहतात. ठेवी करितां हिश्यांचें भांडवलही जबाबदार आहे. संस्था चालू असे तोंपर्यंत हिश्यांचें भांडवल परत मागतां येत नाहीं. सबब देण्याचे बाजूस दाखविलेली हिश्यांच्या भांडवलाची रकम हिशेबांतून तूर्त वगळणें जरूर आहे. तशी ती वगळली तर बँकेच्या देण्यापेक्षां घेणें १,५४,७१८ रुपयांनीं जास्त आहे."

नवीन ठेवींचा अभाव, जुन्या ठेवींची फेड, पेढ्यांची दुःस्थिति, वसुलीचें असमाधानकारक प्रमाण, पेढ्यांचा ढिलाईचा कारभार, इत्यादि अडचणींतहि मेहेकर बँकेनें अत्यंत सावधगिरीनें संस्थेचा कारभार चालविला आहे, हें भूषणावह आहे. बँकेच्या अडचणींतून ती नीटपणें पार पडेल असा विश्वास बोर्ड ऑफ डायरेक्टर्सना वाटत आहे, तो योग्य असाच आहे. बँकेची सांपत्तिक स्थिति आहे ह्या परिस्थितींत समाधानकारक वाटेल. सध्याची मंदी जाऊन बँकेची भरभराट होवो, असें आम्हीं इच्छितों.

---

### पवित्र मंदिरांत चहाचा प्रवेश

त्रिचनापल्ली येथील श्रीरंगम देवालय अतिशय पवित्र म्हणून सुप्रसिद्ध आहे. त्या देवळांत चहाचा प्रवेश कसा झाला, ह्याची माहिती ताज्या इंडियन टी बुलेटिनमध्यें प्रसिद्ध झाली आहे. चहाच्या प्रचारास देऊळहद्दींत परवानगी मिळण्यास आजूबाजूचे सनातनी लोक विरुद्ध होते, परंतु देवालयाच्या व्यवस्थापकांनीं ती परवानगी दिली. देवालयाच्या आवारांतच चहाची खोली देवालयाच्या व्यवस्थापकांचें हस्तें उघडण्यांत आली. चहाची सवय लागल्यानें लोकांचे कल्याणच होईल, ह्या खात्रीनेंच इंडियन टी मार्केट एक्सपॅन्शन बोर्डास देवालयाचे आवारांत चहापानाचा प्रसार करण्यास परवानगी देण्यांत आली, असें त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. देवालयाच्या एका विश्वस्तानेंहि, चहाच्या प्रसारास देवालयाचे अधिकारी मदत करतील, असें सांगितलें. ह्या खोलींतून उपाध्यायांस चहा देण्यांत येतो व त्यांचा कित्ता इतर जुन्या वळणाचे लोक गिरवितील, अशी टी-एक्सपॅन्शन बोर्डाची अपेक्षा आहे.

### उंटाच्या पोटांतील अफू

उंटांच्या पोटांतून मादक द्रव्यांच्या पेट्या नेऊन त्यांचा चोरून व्यापार करणारे लोक इजिप्तमध्यें बरेच आहेत, परंतु कोणत्या उंटांच्या पोटांत तीं द्रव्यें लपविलेलीं आहेत, हें शोधून काढणें तेथील सरकारास आजवर शक्य नव्हतें. कमी किंमतीच्या उंटांस भारी किंमत आली, तरी त्यांचे मालक उंट विकण्यास तयार होत नसत, ह्यामुळें शंका येऊं लागली. असे कांहीं उंट मारून त्यांचें पोट फाडलें, तेव्हां आंत मादक द्रव्यें लपविलेलीं आढळलीं. २५० ग्रॅम वजनापर्यंतची अफू अशा तऱ्हेनें उंटांच्या पोटांत माऊं शकते व त्यास त्रास न होतां चालतां व काम करतां येतें. "क्ष" किरणांच्या सहायानें उंटांच्या पोटांचें परीक्षण करण्याचें आतां इजिप्शन सरकारनें ठरविलें आहे.

## क्रीडासाहित्याचें हिंदुस्थानांत उत्पादन

### सिआलकोटचें महत्त्व

पाश्चिमात्य खेळ हिंदुस्थानांत खेळले जाऊं लागल्यापासून त्या खेळांच्या साहित्याचें उत्पादन केंद्र म्हणून सिआलकोटची प्रसिद्धी आहे. अगदीं पूर्वी लोखंडाच्या वस्तूंसाठी सिआलकोटची ख्याति होती; मोगल अमदानींत तेथें कपास कापड व तंबू ह्यांचें उत्पादन होऊं लागलें; नंतर कागदाच्या उत्पादनास प्रारंभ झाला आणि आतां खेळांच्या साहित्याचें तें उत्पादन केंद्र झालें आहे. ह्या धंद्यावर सुमारें ५० हजार लोकांची उपजीविका चालते. सुमारें तीन ते चार हजार कारखाने तेथें चालू असून त्यांतील तीस कारखाने लिमिटेड कंपन्यांचे आहेत.

सिआलकोट येथें हा धंदा कसा सुरू झाला, ह्याची हकीकत मनोरंजक आहे. १८७७ सालीं मि. डग्लस हा एका पलटणीचा अधिकारी ह्या नात्यानें सिआलकोटला आला, तेव्हां त्यानें येतांना टेनिसची एक बॅट आणली. एका दिवशीं त्यानें आपल्या पलटणीमधील नूरदिन नांवाच्या मिस्त्रीस, "तुला बॅट दुरुस्त करतां येईल काय?" असें विचारलें; तेव्हां त्यानें "नाहीं" असें सांगितलें. तथापि, मि. डग्लस ह्यांच्या उत्तेजनानें त्यानें ह्या कामांत लक्ष घातलें. पुढें, नौशेरा येथील एका कॅप्टननें मि. डग्लस ह्यांजकडे कांहीं बॅटी मागितल्या, त्यांतच ह्या धंद्याच्या प्रारंभाचें खरें मूळ आहे. मि. डग्लस ह्यांनीं नूरदिनकडून तुतीच्या झाडाच्या लाकडाची एक बॅट करवून घेतली व ती त्यानें कॅप्टनकडे पाठविली. त्या कामाचे मिस्त्रीस १५ रुपये मिळाले. त्यानें पुढें आणखी सहा बॅटी करून ९० रुपये कमावले. कांहीं वर्षांनीं, त्यानें आपली नोकरी सोडून देऊन बॅटी करण्याचाच किफायतशीर धंदा सुरू केला. फझलदिनशीं मिस्त्रीच्या मुलीचें लग्न झालें. तेव्हांपासून फझलदिनहि ह्या धंद्यांत लक्ष घालूं लागला. मेसर्स युवेरॉय लि. चे प्रमुख कै. सरदार गंडासिंग हे त्यावेळीं शाळेंतील विद्यार्थी होते, त्यांनीं नूरदिनकडे ५ रुपये पगारावर कारकुनी पत्करली. नूरदिनच्या गिऱ्हाइकांचे पत्ते त्यांनीं टिपून घेतले. नूरदिनच्या मृत्यूनंतर गंडासिंगानें मूळ मालकाच्या मुलाकडे १०० रुपयांपेक्षा कमी पगारावर काम करण्याचें नाकारलें व स्वाभाविकपणेंच त्यास नोकरी सोडावी लागली. पुढें फझलदिन व त्याचा भाऊ ह्यांतहि वितुष्ट येऊन हा धंदा मोडकळीस आला. ही संधी साधून गंडासिंगनें आपल्या बंधूच्या मदतीनें "दि पंजाब स्पोर्टस् वर्क्स" ची स्थापना केली. पुढें दोघे भाऊ स्वतंत्र झाले. १९१० सालीं गंडासिंगनें विलायतचा प्रवास करून हिंदी मालास व्यापारपेठ मिळविण्याची खटपट केली.

इंग्लंडमधील कंपन्यांनीं गंडासिंगास उत्तेजन दिलें व गंडासिंगांचे कारखान्यांत अनेक प्रकारचा माल निघूं लागला. गंडासिंगानीं १९१० सालीं आपल्या फर्मचें नांव बदलून "युवेरॉय अँड कंपनी" हें नवें नांव घेतलें. त्याची १९२५ सालीं लिमिटेड कंपनी झाली.

### "युरोपियन देखरेख"

क्रिकेटच्या बॅटी तयार करण्यास त्यांनीं पुढें प्रारंभ केला. पूर्वी क्रिकेटचे चेंडू फक्त मिरत येथेंच हबीबुल्ला यांचे कारखान्यांत तयार होत असत. हबीबुल्ला व त्याचा कारकून गणेशीलाल ह्यांचा खटका उडून गणेशीलाल गंडासिंगांकडे आला व तेथें त्यानें "नॉर्थर्न इंडिया बॉल मॅन्युफॅक्चरिंग कंपनी" काढली. पुढें गंडासिंगानींहि चेंडूंच्या उत्पादनास प्रारंभ केला. ह्या चेंडूंची इंग्लंडकडे मोठ्या प्रमाणावर निर्गत होऊं लागली. बॅडमिंटनच्या फुलांच्या उत्पादनासहि सिआलकोट येथें नंतर सुरवात झाली. फुलांचीं पिसें इंग्लंड, फ्रान्स व पोलंड येथून आणून त्यांचीं फुलें करून तीं विक्रीसाठीं पुनः युरोपकडे पाठविण्यांत येऊं लागलीं. गंडासिंगांनीं आपल्या कंपनींत कांहीं युरोपियन नोकरीस ठेवून "युरोपियन देखरेखीखालीं चाललेला कारखाना" अशी आपल्या धंद्याची जाहिरात केली व युरोपियन अधिकारी वर्गांत गिऱ्हाइक मिळवलें. सहाजिकच, युवेरॉय लि. ला लष्करी पलटणींस माल पुरविण्याचा एकमेवाद्वितीय अधिकार मिळणें सुलभ झालें.

### हिंदी मालाच्या परराष्ट्रीय बाजारपेठा

चालू युद्धास प्रारंभ होतां क्षणींच मालाची निर्गत बंद होऊन अनेक कामगार बेकार झाले. सिआलकोट येथें तयार होणाऱ्या टेनिस व बॅडमिंटन बॅटीपैकीं ९०% बॅटी इंग्लंड, अमेरिका इत्यादि देशांकडे निर्गत होतात. अमेरिकेशीं व्यापार अद्याप चालू आहे. परंतु युरोपकडे माल आतां जात नाहीं. टेनिसच्या बॅटींच्या तारांच्या उत्पादनापैकीं ५०% उत्पादन मेसर्स स्लॅझेंजर्झ ही ब्रिटिश कंपनीच एकटी विकत घेते. तारांची निर्गत आतां अर्थातच बंद आहे. लक्षावधि फुटबॉल, रग्बी बॉल, बास्केट बॉल, व्हॉली बॉल, इत्यादि युद्धापूर्वी निर्गत होत असत. हॉकीच्या काठ्यांचे उत्पादनापैकीं २४% उत्पादनाची निर्गत ऑस्ट्रेलिया, अमेरिका, इंग्लंड, न्यूझीलंड, इत्यादि देशांकडे होत असे. पूर्व गोलार्धातच हा खेळ विशेष लोकप्रिय असल्याकारणानें, हॉकीच्या काठ्यांचे उत्पादनास युद्धामुळें अडचण आलेली नाहीं. क्रिकेटच्या बॅटींचें उत्पादन आतां फारच मंदावलें आहे. युद्धापूर्वी क्रीडासाहित्यापैकी ९०% सामान इंग्लंडमधून हिंदुस्थानांत येई. जपान व अमेरिका ह्या देशांतून अजून माल येतो. सिआलकोट येथील कामगारवर्गांत संघटनेचा पूर्ण अभाव आहे व कामगारांची परिस्थिति अत्यंत वाईट आहे. युद्धामुळें धंदा मंदावून कामगार पोटापाण्यास मुकणार, इतक्यांत लष्करी खात्याकडून आजारी माणसांस लागणाऱ्या लहान फळ्या करण्याची ऑर्डर सिआलकोटला मिळाली. कुऱ्हाडींच्या मुठी, तंबू ठोकण्यासाठी लाकडी हातोडे, हिंदी वैमानिकांसाठी ग्लव्हज्, इत्यादींचें उत्पादन आतां सिआलकोटला मोठ्या प्रमाणावर चालू आहे. शवच्छेदनाचीं उपकरणेंहि तेथें होऊं लागलीं आहेत. क्रीडासाहित्याच्या परदेशी निर्गतीचे आकडे खालीं दिले आहेत, ते उद्बोधक आहेत:—

### खेळाच्या सामानाची निर्गत

| वस्तू | १९३७ | १९३८ | १९३९ |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| हॉकीच्या काठ्या | ८४,२५९ | ६९,९७४ | ६५,८६३ |
| क्रिकेट बॅटी | १,२९,१३३ | २,०४,९८४ | १,४९,५५० |
| टेनिस बॅटी | १,६१,००७ | १,०४,४५४ | २,७१,३४४ |
| टेनिस तारा | ८,२१७ | १३,७९९ | ९,५०७ |
| फुटबॉल इ. | २२,८६४ | ३,४०,१७० | ३,६९,१७२ |
| बॅडमिंटन | ७८,९१४ | १,५६,५६६ | २,५७,४५३ |
| इतर | ३,०६,३५७ | २,९०,५७७ | ३,३६,८२२ |
| हॉकी व क्रिकेट बॉल | ५३,४२५ | ६१,०२५ | ७०,२५९ |
| एकूण | ९,२२,६७६ | १२,४१,५४९ | १४,८०,०७० |

## Willingdon College, Sangli.

Reopens for the academic year on 20th June 1941. The registration of names commenced on 6th June. The College provides for instruction in the Arts and Science Courses in the first two years, for B. A. Degree courses, Pass and Honours, and for post-graduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, inexpensiveness and efficiency are the special features of the College.

The Tuition fees are Rs. 60 per term, and the room rent per term is Rs. 12 for a double room and Rs. 15 for a single room. Further information can be had on application.

Separate accommodation for lady students is available in the Sakhubai Gokhale Hostel on the College premises.

V. K. GOKAK,
Principal.

## Deccan Institute of Commerce, Poona.

( Recognised by Government ).

Opens for the 1941-42 Session on Monday the 16th June, 1941. Students coached up for the following Examinations :

1. Government Diploma in Commerce ( G. D. C. )
2. D. Com. Diploma of the Indian Merchants' Chamber, Bombay, in Specialised Company Secretarial, Banking, Insurance, Accountancy and Business Organisation.
3. London Chamber of Commerce.
4. The Indian Institute of Bankers ( for Bank employees only ).
5. R. A. ( 1st Part ) *for Graduates only.*
6. G. D. C. & A. ( Government Diploma in Co-operation and Accountancy ) *for Graduates only.*

Special arrangements in SHORTHAND & TYPEWRITING. Highly qualified and experienced staff. Admission upto 15th July. For particulars see personally or apply to :

592/3 Budhwar Peth,
Opp. New English School,
Poona.
SECRETARY.

## कोरोना पोर्टेबल विकणें आहे.

कोरोना पोर्टेबल टाइपरायटर उत्तम स्थितींतला खासगी कामासाठीं वापरलेला, विकणें आहे.

" क्ष " C/o अर्थ.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,७९,७०० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,८९,८५० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्रीं. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १११—१ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४–४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९५–१५ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२–१२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९५—६ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) — ... | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४३—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०८—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४४—८ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८०—० |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०४—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% ... ... | १३२–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१३–१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१३–१२ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६२०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६१—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) ११½% | ८९३–१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६४७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २०१—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४४—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९–१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४४—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४,२००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१५–१० |
| टाटा आयर्न डु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १५२—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३६६—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८९५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १३९—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–३–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६२-१३-६ |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७१ गणपती चौक व्यवस्थापक







सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

**Prop. M. V. Risbud, B. A.**
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।


—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख २५ जून, १९४१ | अंक २६

सर्व तऱ्हेचें कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
' पायोनियर डाइंग हाऊस '
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

रक्तवर्धक



पंडुरोग (अॅनीमिया) यावर उत्कृष्ट गुणकारी

अत्यंत शक्तिवर्धक
रक्तवर्धक
आयुर्वेद रसशाळा
पुणें लि. पुणें ४.

दि सदर्न निटिंग वर्क्स, लि.
[ २६४ शनिवार, पुणें २. ]
यांनीं बनविलेली



"पूना होजिअरी"
उन्हाळ्यासाठी गंजीफ्रॉक, अंडरवेअर्स वगैरे हरतऱ्हेचा
जाळीचा माल
तयार होत आहे
आपल्या व्यापाऱ्याकडे चौकशी करा
★
ठेवी : मुदतीप्रमाणें ४॥ ते ६ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
★
माहितीसाठी वरील पत्त्यावर लिहा.

## विविध माहिती

### हिंदी व ब्रिटिश लष्करी अधिकारी

हिंदी व ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांचा अधिक निकट संबंध यावा, ह्यासाठीं बंगलोर येथें शिक्षण घेत असलेले १०० ब्रिटिश अधिकारी मह्रू येथें व मह्रू येथें शिक्षण घेत असलेले १०० हिंदी अधिकारी बंगलोर येथें पाठविण्यांत आले आहेत.

### जर्मनीची कबुली

आयर्लंडमध्यें ३१ मार्च रोजीं बॉंब टाकून प्राणहानी व मालमत्तेचें नुकसान केल्याबद्दल जर्मनीनें खेद व्यक्त केला असून त्याचें नुकसान भरून देण्याचें कबूल केलें आहे.

### टपालाचा नाश

ब्रह्मदेशाचें २१ जानेवारी ते १ फेब्रुवारी ह्या मुदतींतील ग्रेट ब्रिटनकडे जाणारें टपाल शत्रूच्या कारवायांमुळें नाश पावलें आहे, असें जाहीर करण्यांत आलें आहे.

### युद्धकर्ज

हिंदी युद्धकर्जाचा आकडा ६० कोटि रुपयांवर गेला आहे.

### दुग्धपान

प्रत्येक हिंदी मनुष्य दररोज सरासरीनें ६·६ औंस दूध पितो. इतर देशांतील सरासरी ह्याच्या किमान पांच पट आहे. सिंधमधील सरासरी २२ औंस व पंजाबमधील १८·७ औंस आहे. आसाममधील सरासरी सर्वांत कमी म्हणजे १·२ औंस आहे. शहरांतील लोक खेडेगांवांतील लोकांपेक्षा अधिक दूध पितात. दुभत्या जनावरांची संख्या हिंदी लोकसंख्येचे प्रमाणांत वाढत नसल्यामुळें दूध पिण्याचें प्रमाण कमी होत चाललें आहे. वरील आकड्यांत दुधामध्यें तुपाचाहि समावेश केलेला आहे.

### नवीन चलनी नोटा

नवीन जरा मोठ्या आकाराच्या एक रुपयाच्या नोटा लवकरच व्यवहारांत खेळूं लागतील. त्यांची लांबी ४ इंच व रुंदी २½ इंच राहील.

### आगबोटींचा नाश

मे महिन्यामध्यें ब्रिटिश व दोस्त राष्ट्रांची मिळून ४ लक्ष, ६१ हजार टनांच्या ९८ आगबोटींचा नाश झाला. मार्च व एप्रिल महिन्यांतील नाशापेक्षा हा नाश बराच कमी आहे. १० मे ते १० जून ह्या मुदतींत शत्रूच्या सुमारें ३ लक्ष टनांच्या आगबोटी बुडाल्या.

### लाहोर

लाहोर शहराची लोकसंख्या १९३१ मध्यें ४ लक्ष होती, ती आतां ६ लक्ष, ३२ हजार झाली आहे.

### मि. बी. जे. पादशहा

मि. बी. जे. बादशहा हे आपल्या वयाच्या ७७ व्या वर्षी मुंबई येथें मरण पावले. मि. जमशेटजी टाटांचा ते उजवा हात असून, टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचें काम ते प्रारंभापासून १९३१ पर्यंत पहात होते.

### बेल्जममध्यें अन्नाचा तुटवडा

युरोपांतील सर्व देशांपैकीं बेल्जममध्यें अन्नपुरवठा अत्यंत असमाधानकारक आहे. युद्धाचे पूर्वी प्रत्येकाचे वाट्यास जेवढा पुरवठा येत असे, त्याच्या आतां अर्धा ते पाऊण हिस्सा फक्त येतो.

### पावसाचा अंदाज

गुजराथ, कोंकण, महाराष्ट्र, मध्यप्रांत, हैद्राबाद, इत्यादि ठिकाणीं पाऊस नेहमीच्या सरासरीच्या पावसाचे ९०% पर्यंत पडेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे.

### म्युनिसिपॅलिट्यांचा उत्पन्न-खर्च

१९३९–४० मध्यें मुंबई प्रांतांतील म्युनिसिपॅलिट्यांचें एकूण उत्पन्न २ कोटि, २३ लक्ष रुपये झालें व खर्च २ कोटि, २३ लक्ष रुपये झाला. १९३८–३९ चे तत्सम आकडे अनुक्रमें २ कोटि, ४ लक्ष व २ कोटि २३ लक्ष, असे आहेत.

### हिंदुस्थानांत चिनी बँकांच्या शाखा

आतांपर्यंत हिंदुस्थानांत एकहि चिनी बँकेची शाखा नव्हती. बँक ऑफ चायना व बँक ऑफ कम्युनिकेशन्स ह्या दोन चिनी बँकांच्या शाखा कलकत्ता येथें लवकरच सुरू होणार आहेत, असें समजतें.

### वाचकांची आवड

कलकत्ता येथील इंपीरिअल लायब्ररींतून वाचनासाठीं नेलेल्या पुस्तकांची छाननी केली असतां, वाङ्मयाचीं पुस्तकें सर्वांत लोकप्रिय असलेलीं आढळतात. त्याचे खालोखाल इतिहास व कायदा हे विषय येतात. भूगोल आणि प्रवासवर्णनें ह्यांचा अनुक्रम चौथा लागतो. भूगर्भशास्त्राचा नंबर नंतर येतो.

### हिशेब तपासनीसांचें सल्लागार मंडळ

युद्धविषयक कंत्राटांतील अटी, पैसे देण्याची पद्धति, उत्पन्नाची किंमत काढतांना विचारांत घ्यावयाचे मुद्दे, नफ्याचें प्रमाण, कंत्राटदारांचे हिशेबाची तपासणी इत्यादींचे संबंधांतील प्रश्नांवर हिंदुस्थान सरकारास सल्ला देण्याकरितां सरकारनें दहा प्रमुख अकौंटंट्सचें एक सल्लागारमंडळ नेमलें आहे. त्यांत मुंबईच्या मेसर्स फर्ग्युसन अँड कंपनीचे मि. व्हिटबी, मेसर्स बिलिमोरिआ अँड कंपनीचे सर शापुरजी बिलिमोरिआ व मेसर्स के. एस. अयर अॅन्ड कंपनीचे मि. बी. के. एस. अयर हीं नांवें आहेत. सल्लागार मंडळाची पहिली सभा ता. १४ जुलै रोजीं दिल्ली येथें भरेल.

### युद्धकैदी

ब्रिटिशांच्या ताब्यांत सुमारें २ लक्ष, ४४ हजार इटालियन युद्धकैदी आहेत. इटालिअन फौजांबरोबर लढणाऱ्या आफ्रिकन सैनिकांपैकीहि ६६ हजार युद्धकैदी झाले आहेत.

### हिंदुस्थानांतील कारखाने

| | १९३८ | १९३९ |
|---|---|---|
| कारखान्यांची संख्या | १०,७९२ | ११,६३० |
| कामगारांची संख्या | १७,३७,७५५ | १७,५१,१३७ |
| कपास कापडाच्या गिरण्यांतील कामगार | ५,१२,२२८ | ४,८८,५५४ |
| तागाच्या गिरण्यांतील कामगार | २,९५,१६२ | २,९८,९६७ |
| अपघातांची संख्या | ३३,४९४ | ३६,००६ |
| प्राणघातक अपघात | २१० | २२१ |
| किरकोळ अपघात | २७,२२० | २९,९४८ |
| जबर अपधात | ६,०६४ | ५,८३७ |
| अपघातांचें दर लक्ष कामगारांशीं प्रमाण | १,९२७ | २,०५६ |

### नवे कारखाने

१९३९ सालीं हिंदुस्थानांत जेवढे कारखाने व कामगार होते, तितके ते ह्यापूर्वी कधींच नव्हते. १९३९सालीं महत्त्वाचे पुढील नवे कारखाने निघाले:—ओरिसामध्यें कागद कारखाना, लाहोर येथें आगपेट्यांचा कारखाना, रावळपिंडी येथें तेलाचा कारखाना, मोटार टायर्सचा मुंबई येथें कारखाना, व वनस्पतिजन्य तुपाचा संयुक्त प्रांतांत कारखाना.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३०२ |
| २ जर्मनीची रशियावर स्वारी ... ... | ३०३ |
| ३ हिंदी मुहमुगाचें पीक | ३०४ |
| ४ स्फुट विचार ... | ३०५ |
| तुर्कस्तान व जर्मनी ह्यांचा करार—कराराचें रहस्य-हिंदी मालकीच्या आगबोटी बांधण्यास प्रारंभ—इंडियन प्रोग्रेसिव्ह इं. कं. लि.—हैद्राबाद संस्थानातील सहकारी चळवळ | |
| ५ कापडाच्या गिरण्यांतील रात्रपाळी ... ... | ३०७ |
| ६ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... | ३०८ |
| ७ १९३९–४० हें वर्ष शेतीस कसें गेलें ! ... | ३०८ |
| ८ १९४१-४२ चीं अंदाजपत्रकें ... | ३०९ |
| ९ निवडक बाजारभाव | ३१० |

# अर्थ

**बुधवार, ता. २५ जून, १९४१**

## जर्मनीची रशियावर स्वारी

रूसो-जर्मन संबंधाचें अलीकडे पडलेलें कोडें उकलण्यास फारसा काळ लोटावा लागलेला नाहीं. ताज्या आलेल्या बातम्यांवरून जर्मनीचा मनसुबा उघडा झाला आहे. रशियन सरहद्दीवर जर्मनीच्या सुसज्ज फौजा आज कित्येक महिनेपर्यंत तयार ठेवण्यांत आल्या होत्या त्या आतां रशियन मुलखांत शिरल्या आहेत. जर्मनीनें रशियाशी केलेल्या मित्रत्वाचा करार अशा रीतीनें एकाएकी धाब्यावर बसवण्यास हिटलरला कारण तरी काय झालें ? रशियानें आपणांस कांहीं विशेष सवलती देऊन इंग्लंडशी चाललेल्या युद्धांत सहाय करावें असा तगादा हिटलरनें स्टॅलिनला लावला होता अशा बातम्या मध्यंतरीं प्रसिद्ध झाल्या होत्या. रशियन मुत्सद्दी ह्या मागण्यांचा स्वीकार करून जर्मनीच्या वजनाखालीं आपल्या राष्ट्रास दडपून घेण्यास तयार नसल्यानें हिटलरनें चिडून जाऊन स्वतःस एक नवीन शत्रु उत्पन्न केला आहे. तुर्कस्तानशीं नुकताच जर्मनीनें मित्रत्वाचा करार केला त्याचें रहस्य रशियावरील त्याच्या प्रस्तुत स्वारीनें स्पष्ट केलें आहे. पश्चिम युरोपांत, भूमध्य समुद्रांत व आफ्रिकेंत इंग्लंडशी निकराचा संग्राम चाललेला असतांना रशियाची मैत्री राखणें हा जर्मनीच्या दृष्टीनें शहाणपणाचा मार्ग झाला असता असें कोणासहि वाटणें सहाजिक आहे. चालू युद्धांत आपलें लढाऊ सामर्थ्य दुभंगूं न देण्यांत जर्मनीचें हित होतें आणि तें ओळखूनच त्यानें रशियाशी मैत्रीचा करार केला होता, अशी सामान्य समजूत होती. जर्मन नात्सी आणि रशियन बॉल्शेव्हिक ह्यांचें विळयाभोपळयासारखें सख्य होतें आणि जर्मनीस रशियाच्या समाजसत्तावादाचें विलक्षण वावडें होतें. असें असतां नात्सी व बॉल्शेव्हिक ह्यांचें सख्य कसें जमलें ? पश्चिमेकडे इंग्लंडविरुद्ध युद्ध चालू असतां पूर्व सरहद्दीकडे आपणांस भीति नसावी हाच त्या मैत्रीचा उद्देश होता. आतांच एकाएकी रशिया मित्राचा शत्रु कसा बनला ?

वरील प्रश्नाचें उत्तर हिटलर आणि त्याचे हस्तक ह्यांनीं जाहीर घोषणा करून देण्याचा प्रयत्न केला आहे. हिटलरच्या घोषणेंत रशियानें आजवर जर्मनीच्या हिताविरुद्ध केलेल्या कृत्यांचा पाढा वाचण्यांत आला आहे. त्याचा मुख्य आरोप असा आहे कीं जर्मनी आपल्या शत्रूशीं लढत असतां रशिया त्यास आंतून अप्रत्यक्ष रीतीनें सहाय देत असून चालू युद्धाचा अन्याय्य फायदा घेत आहे. पोलंडवर जर्मनीनें स्वारी केली तेव्हां त्या देशाचा पूर्व भाग रशियानें व्यापला. रुमानियापैकी कांहीं मुलूख असाच त्यानें घेतला. उत्तरेच्या बाजूस इस्टोनिया, लाट्व्हिया, फिनलंड इत्यादि देश पादाक्रांत करतांना रशियाची अशीच वृत्ति होती. रशियाचें बोल्शेव्हिक पुढारी आपल्या आंतरराष्ट्रीय समाजसत्तावादाचें विष युरोपांत पसरीत आहेत असाहि हिटलरचा रशियाविरुद्ध आक्षेप आहे. युरोपची पुनर्घटना करण्याची हिटलरची योजना आहे तीमध्यें रशिया बसूं इच्छित नाहीं आणि जर्मनीचें आशियामध्यें आपली सत्ता पसरण्याचे प्रयत्न चालू आहेत त्यांस रशियन मुत्सद्यांचें पाठबळ मिळत नाहीं ह्या गोष्टींत प्रस्तुत आक्रमणाचा उगम आहे असें दिसतें. बाल्कन्समध्यें जर्मनीचें वर्चस्व स्थापन झालें तें रशियाच्या सुरक्षिततेस बाधक आहे ह्यांत संशय नाहीं. जर्मनीचें प्रस्थ तुर्कस्थान व सीरिया ह्यांच्या बाजूस वाढूं लागलें असतां तेंहि रशियास अपायकारक आहे ह्याची जाणीव रशियन मुत्सद्यांस झालेली हिटलरला अवगत आहे. आपल्या फौजेस तोंड देण्याचें रशियांत सामर्थ्य नाहीं ह्या कल्पनेनें त्या देशाविरुद्ध चढाईचें धोरण हिटलरनें प्रस्तुत स्वीकारलें आहे असें दिसतें.

रशियावर जर्मनीनें झडप घातली आहे तीमध्यें हिटलरनें आपल्या दोस्ताचा विश्वासघात केला आहे. आपल्या लढाऊ बेताच्या रशियास सुगावा लागूं न देतां हिटलरनें आपल्या फौजांस त्याच्या सरहद्दी ओलांडून जाण्यास हुकूम दिला, ह्या जर्मनीच्या कृत्यासंबंधानें भाषण करतांना मि. चर्चिल ह्यांनीं नात्सी अमानुष लुटारूपणाच्या ह्या नवीन उदाहरणाचें रहस्य स्पष्ट करून सांगितलें आणि त्या बाबतींतल्या इंग्लंडच्या धोरणाचा असंदिग्धपणानें आविष्कार केला. नॉर्वे, हॉलंड, बेल्जम इत्यादि देशांवर जर्मनीनें आक्रमण केलें तेव्हां एक वर्षामागें त्यांनीं रशियासहि धोक्याची सूचना देऊन जर्मनीच्या शब्दावर कोणीहि विश्वास ठेवू नये असें सर्वांस बजावलें होतें. हिटलरशाहीचा नाश करण्याचा इंग्लंड व अमेरिका ह्यांचा निश्चय कायम आहे एवढेंच नव्हे तर तो जर्मनीनें रशियावर हल्ला चढवण्यानें द्विगुणित झाला आहे असें त्यांनीं सांगितलें. हिटलरचा प्रत्येक शत्रू तो आपला मित्र आहे आणि त्याचा मित्र तो आपला शत्रू आहे असें म्हणून जर्मनीशीं अधिक जोरानें व चिकाटीनें युद्ध चालवून त्याचा नायनाट करण्याचा इंग्लंडचा कृतसंकल्प त्यांनीं जाहीर केला.

पूर्व युरोप्रांत रशियाचा समाचार घेतल्यानंतर जर्मन फौजा पश्चिमेस इंग्लडकडे वळवणें सोयीचें होईल ह्या कल्पनेनें हिटलरनें त्या राष्ट्राविरुद्ध युद्ध चालू केलें आहे. अमेरिकेची लढाऊ मदत मोठ्या प्रमाणांत इंग्लंडला पोहोचण्यास थोडा अवधि आहे, त्या काळांत रशियाचा काटा काढून टाकावयाचा असाहि त्याचा विचार आहे. ह्या गोष्टींची आपणांस जाणीव आहे असें म्हणून नात्सी जर्मनीस संधि मिळेल तेथें ठेचणें हें इंग्लंडचें ध्येय कायम राहील ह्या आशयाचे उद्गार मि. चर्चिल यांनीं काढले. रशियास शक्य ती मदत इंग्लंड देईल असें अभिवचनहि त्यांनीं दिलें. ह्या भाषणाचा उत्कृष्ट परिणाम अमेरिकेंत व इतरत्र झाला आहे. जर्मनीच्या रशियन स्वारीनें जपानला मात्र गोंधळांत टाकल्यासारखें झालें आहे. हिटलरची महत्वाकांक्षा वहावत मर्यादेच्या बाहेर जात चालली आहे हेंच त्याच्या नाशाचें मूळ आहे. रशिया बॉलशेव्हिक आहे हें हिटलरला आजचें कळलें असें नाहीं. त्या राष्ट्राशी जर्मनीनें १९३९ मध्यें मित्रत्वाचा करार केला त्यास हिटलरनें हरताळ फासला आहे आणि त्या योगानें नात्सी लोकांचा प्रामाणिकपणा व दानत ह्यांवर झगझगित प्रकाश पडला आहे.

## हिंदी भुइमुगाचें पीक

हिंदुस्थानांतील शेतीच्या कित्येक पिकांस युद्ध–परिस्थितीमुळें बाहेरच्या देशांत मागणी राहिली नाहीं आणि त्यांच्या किंमती घटून शेतकरी वर्गाची स्थिति अडचणीची झाली आहे. हिंदी शेतकऱ्यास रोकडीचें उत्पन्न देणाऱ्या पिकांमध्यें भुइमुगास बरेंच महत्त्वाचें स्थान आहे. मद्रास प्रांतांत आणि मुंबईतहि भुइमुगाची लागवड मोठ्या प्रमाणांत होते. त्या पिकास जरूर ती मागणी उत्पन्न करणें, त्याचे बाजारभाव वाढवणें किंवा त्याची लागवड मर्यादित करणें ह्या गोष्टी अखिल भारतीय महत्त्वाच्या असल्यानें हिंदुस्थान सरकारास त्यांकडे लक्ष द्यावें लागलें आहे. भुइमुगाच्या पिकाची वरील परिस्थिति लक्षांत घेऊन तिचा पद्धतशीर अभ्यास मद्रास प्रांतांतील अन्नमलय विश्वविद्यालयाचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक, डॉ. नारायणस्वामी नायडू, ह्यांनीं करून आपले त्यावर आधारलेले विचार एका पुस्तकांत ग्रथित केले आहेत. (Goundnut: Annamalai University Economic Series No.7, General Editor, Prof. B.V. Narayanswami Naidu–Published by the University, Annamalainagar )

डॉ. नायडू ह्यांनीं मद्रास प्रांतांतील दक्षिण अर्कॉट जिल्ह्यामधील भुइमुगाच्या पिकाची तपशीलवार माहिती गोळा करून ती ह्या पुस्तकांत प्रसिद्ध केली आहे. त्यांची चौकशी ह्याप्रमाणें मर्यादित असली तरी त्यांनीं सबंद हिंदुस्थानांतील पिकाच्या प्रश्नाचा विचार केला असून त्यांच्या सूचना सर्व प्रांतांस बोधप्रद होण्यासारख्या आहेत. ह्या दृष्टीनें आम्हीं ह्या लेखांत भुइमुगाबाबत सर्व साधारण माहिती आणि तिला अनुसरून अखिल भारतीय महत्त्वाच्या सूचना देण्याचें योजलें आहे.

भुइमुगाच्या पिकाचें क्षेत्र हिंदुस्थानांत सारखें वाढत आलें आहे. त्याबाबतींत मद्रासचा पहिला नंबर असून त्याच्या खालोखाल मुंबई प्रांत येतो. ह्या पिकास युद्धापूर्वी इतर देशांत चांगली मागणी होती, पण युद्ध चालू झाल्यावर ती कमी होऊन भुइमुगाच्या किंमती घसरल्या तेव्हां हिंदुस्थान सरकार त्या प्रश्नाचा विचार करूं लागलें. त्याचे आर्थिक सल्लागार डॉ. ग्रेगरी यांचा अभिप्राय असा पडला कीं त्या पिकाचें क्षेत्र मर्यादित केल्यावांचून त्याच्या किंमतीचा प्रश्न सुटणें शक्य नाहीं. पण हिंदी शेतकरी वर्गाची परिस्थिति अशी आहे कीं, ही सूचना अंमलांत येणें अत्यंत कठीण आहे. मध्यवर्ती सरकारनें दिल्ली येथें भरवलेल्या परिषदेंतहि बहुमत सक्तीनें भुइमुगाचें क्षेत्र मर्यादित करण्यास अनुकूल नव्हतें. किंमती खाली गेल्या कीं, शेतकरी लोक आपोआपच कमी भुइमूग पेरतील असें कित्येकांस वाटत होतें. हिंदी शेतकऱ्यांस व व्यापाऱ्यांस सहाय देण्याच्या हेतूनें ब्रिटिश सरकारनें ठराविक किंमतीस हिंदी भुइमूग खरेदी करावा अशी व्यवस्था हिंदुस्थान सरकारनें त्यांच्याशी केली. परंतु ह्या योजनेचा फायदा मध्यस्थांस झाला आणि नवीन पिक बाजारांत आलें तेव्हां भुइमुगाची किंमत शेतकऱ्यांच्या हातांत पडूं लागली ती दरखंडीस १२–१३ रुपयांच्यावर जाईना. तीस आणि वीस रुपयांच्या मानानें हा भाव शेतकऱ्यांस भयंकर तोट्याचा वाटला ह्यांत नवल नाहीं. ह्या स्थितींतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यांत आला. भुइमूग परदेशी पाठवणाऱ्या व्यापाऱ्यांकडून पट्टी जमा करून ती शेतकऱ्यांमध्यें मदत म्हणून वाटण्याची सरकारची योजना ह्या पिकाचा पुरवठा मर्यादित होत नसल्यानें निरुपयोगी ठरणारी होती. तिचा फायदा फारच थोड्या शेतकऱ्यांस मिळाला असता आणि सोडवावयाचा मुख्य प्रश्न तसाच राहिला असता.

डॉ. नारायणस्वामी ह्यांच्या मतानें पिकाचें क्षेत्र मर्यादित करणें व भुइमुगाचें उत्पादन कमी करणें हे उपाय हिंदी शेतकऱ्याची सांपत्तिक स्थिति लक्षांत घेतां अग्राह्य आहेत. दोनच विधायक सूचना ह्या संबंधांत करतां येतील. भुइमुगाच्या ऐवजी दुसरें पीक लावणें व भुइमुगाचा खप देशांतल्या देशांत वाढेल अशी व्यवस्था करणें ह्या त्या होत. ह्यापैकीं पहिली, डॉ. नायडू म्हणतात, अव्यवहार्य आहे. भुइमुगाच्या पिकाला ज्या तऱ्हेची जमीन लागते, त्या तऱ्हेच्या जमिनींत दुसरीं उत्पन्न देणारीं पिकें चांगलीं निघूं शकतील असें नाहीं. शिवाय दुसऱ्या पिकांची अवस्थाहि, किंमतीच्या दृष्टीनें भुइमुगासारखीच झालेली आहे. डॉ. नायडू ह्यांचें असें म्हणणें आहे कीं, भुइमुगास हिंदुस्थानांतच वाढती मागणी येईल अशी तजवीज करणें म्हणजे त्या पिकाचा कच्चा माल म्हणून दुसरें पदार्थ बनवण्याकडे उपयोग होईल असे धंदे काढणें हाच प्रस्तुत प्रकारणी विधायक व इष्ट उपाय आहे. सध्याचा काळ असे धंदे काढण्यास अनुकूल असा आहे आणि ही संधि त्यांच्या मतानें वाया जाऊं देतां कामा नये. भुइमुगाच्या विक्रीच्या चालू पद्धतींत कित्येक सुधारणा आवश्यक आहेत. त्यांचें विवेचन डॉ. नायडू ह्यांनीं केलें आहे. भुइमुगाच्या पिकाची लागवड, त्याचा खर्च इत्यादि बाबींचें विवेचनहि त्यांनीं केलें आहे तें बोधप्रद आहे. त्यांनीं आपल्या चौकशीच्या योगानें उपस्थित केलेला प्रमुख प्रश्न हिंदुस्थानच्या आर्थिक योगक्षेमाच्या दृष्टीनें जिव्हाळ्याचा असून त्याच्याकडे सरकार व जनता ह्यांचें लक्ष जाणें अगत्याचें आहे.


अखिल महाराष्ट्रांत
गाजत असलेलें
नवयुग चित्र

अमृत

[ मराठी ]
दिग्दर्शक : विनायक
कथा–संवाद : खांडेकर
फोटोग्राफी : पां. नाईक

: भूमिका :
मीनाक्षी, ललिता पवार, वेबीदेवी, बाबूराव पेंढारकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, मा. विठ्ठल आणि विनायक.

मिनर्व्हा, पुणें–
५ वा आठवडा
रोज ६॥ व १०

# स्फुट विचार

## तुर्कस्तान व जर्मनी ह्यांचा करार

भूमध्य समुद्राचा पूर्वभाग, सीरिया व आफ्रिका येथील युद्ध-क्षेत्रांत निकराच्या लढाया जर्मनी व व्हीशीचें मंत्रिमंडळ ह्यांच्याशीं इंग्लंडनें चालवल्या असतां तुर्कस्तान व जर्मनी ह्यांच्या दरम्यान मित्रत्वाचा करार झाल्याची बातमी प्रसिद्ध झाल्यानें जगांत सर्वत्र कुतूहल उत्पन्न झालें आहे. फॉन पॅपन ह्या आपल्या वकिलाचे मार्फत हिटलर तुर्कस्तानास स्वतःच्या राजकारणाच्या जाळ्यांत अडकावण्याचा प्रयत्न बरेच दिवस करीत आहे. इंग्लंड व तुर्कस्तान ह्यांचे स्नेहाचे संबंध बिघडवून स्वतःच्या कक्षेंत तुर्कस्तानास ओढून घेण्याचा त्याचा बेत तुर्की राज्यकर्त्यांनीं मोठ्या सावधगिरीनें यशस्वी होऊं दिला नाहीं. जर्मनीनें ग्रीस, क्रीट व भूमध्य-समुद्राच्या पूर्व-भागांतील कित्येक बेटें पादाक्रांत केल्यामुळें हिटलरला तुर्कस्तानच्या मागें मित्रत्वाच्या कराराचा लकडा लावण्यास चांगली संधि मिळाली. इंग्लंडच्या विरुद्ध चाललेल्या युद्धांत आपणास तुर्कस्तानचें सहाय मिळावें ही हिटलरची इच्छा पुरी करण्यास तुर्की राज्यकर्ते तयार नव्हते आणि आजहि नाहींत. आपली तटस्थपणाची वृत्ति कायम ठेवण्याचा त्यांचा निर्धार अबाधित आहे. त्याचप्रमाणें इंग्लंडशीं मागेंच झालेल्या करारास बाध येणार नाहीं असें धोरण तुर्कस्ताननें अंगिकारणें हें त्या राष्ट्राच्या हिताचें आहे. प्रस्तुत प्रकरणांत तुर्कस्तानची भौगोलिक स्थिति लक्षांत घेणें आवश्यक आहे. एका बाजूनें जर्मनी व त्यानें पादाक्रांत केलेले देश तुर्कस्तानच्या सरहद्दीस येऊन भिडले आहेत. दुसऱ्या बाजूनें रशियाचें युद्ध-धोरण काय राहील हें अनिश्चित आहे आणि तिसऱ्या बाजूनें सीरिया व इराक हे देश रणक्षेत्रें बनले आहेत. ह्या तिरंगी घटनेंत तुर्की राज्यकर्त्यांवर आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याची अवघड जबाबदारी येऊन पडली आहे. जर्मनीशीं त्यांनीं नुकत्याच केलेल्या कराराकडे ह्या दृष्टीनें पहावें लागेल.

## करारांचें रहस्य

जर्मनी व तुर्कस्तान ह्यांचे दरम्यान करार झाला आहे त्यांत तीन कलमें आहेत. परस्परांच्या देशांचें क्षेत्र अबाधित रहाण्याच्या विरुद्ध कोणतीहि कृति प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें आपण करणार नाहीं असें बंधन दोन्ही राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं स्वतःवर घातलें आहे. दोन राष्ट्रांत मतभेद उत्पन्न झाल्यास त्यांचा निकाल मित्रत्वाच्या भावनेनें व तडजोडीनें केला जाईल अशी दुसरी अट करारांत आहे. करार बर्लिनमध्यें कायम व्हावा आणि त्याची मुदत निदान दहा वर्षांची असावी ह्या आशयाची तिसरी अट आहे. जर्मनी व तुर्कस्तान ह्यांचे आर्थिक संबंध अधिक दृढ व फलदायक होण्यासंबंधानें वाटाघाटी चालू व्हाव्या असें वरील करारावरोबरच ठरलें आहे. तुर्कस्तानच्या आर्थिक प्रगतीस लागणारें भांडवल व इतर सामुग्री त्या राष्ट्रापाशीं नसल्यामुळें त्यास आजवर फ्रान्स व इंग्लंड ह्या देशांवर अवलंबून रहावें लागलें आहे. फ्रान्सकडून आतां ह्या बाबतींत सहाय मिळणें अशक्य आहे. जर्मनीनें अंकित केलेल्या देशांच्या सरहद्दी तुर्कस्तानास आतां येऊन मिळाल्या असल्या कारणानें त्यांची परस्पर देवघेव सोयीची झाली आहे ही सबब हिटलरला आर्थिक कराराच्या समर्थनार्थ पुढें करणें सोयीचें झालें आहे. तुर्की परराष्ट्रीय मंत्री, एम्. सरायोग्लू ह्यांनीं जर्मनीशीं झालेल्या करारावर भाष्य केलें, त्यांत ते म्हणतात कीं तो देश आणि तुर्कस्तान ह्यांच परस्पर संबंध शेकडो वर्षे स्नेहाचे असे राहिलेले असून त्या स्नेहभावाची वृद्धि प्रस्तुतच्या करारानें झाली आहे एवढेंच त्याचें रहस्य आहे. करारासंबंधानें त्यांनीं समाधान व्यक्त केलें आणि जर्मन वकील फॉन पॅपेन ह्यांच्या त्या संबंधांतल्या कामगिरीचा उल्लेख केला. इंग्लंडशीं तुर्कस्ताननें मागें करार केले आहेत त्यांस नव्या जर्मन करारानें बाध येऊं नये ह्याविषयीं तुर्की सरकारनें दक्षता बाळगली आहे. तुर्कस्तानला आपल्या त्रिकुटांत ओढण्याचा जर्मनीचा प्रयत्न यशस्वी झालेला नाहीं आणि कराराच्या बाबतींत फॉन पॅपेन ह्यांच्याशीं चाललेल्या बोलण्यांची माहिती तुर्की मुत्सद्यांनीं इंग्लंडला वेळोवेळ दिलेली आहे ह्या कारणानें नवीन करारांचें ब्रिटिश सरकार व जनता ह्यांस आश्चर्य वाटत नाहीं. परराष्ट्रीय राजकारणांत मिळवलेला हा मोठा विजय आहे अशा आशयाचा प्रचार जर्मनी करील; पण त्याची पूर्वपीठिका व पार्श्वभूमि लक्षांत आणली असतां ह्या वल्गना व्यर्थ आहेत अशी कोणाचीहि खात्री पटेल. व्यापारी करारांच्या साधनानें जर्मनीनें आजपर्यंत बाल्कन राष्ट्रांस आपले आर्थिक गुलाम बनवलें आहे. ह्या कटु अनुभवानें तुर्की मुत्सद्यांनीं सावध होणें मात्र अगत्याचें आहे. तसेंच ग्रेट ब्रिटनच्या विरुद्ध स्वतःच्या देशाचा उपयोग त्यांनीं जर्मनीस करूं देतां कामा नये. ह्या संबंधांत जागरूक रहाण्याची आवश्यकता पूर्वीपेक्षां आतां किती तरी पटींनीं अधिक तीव्र झाली आहे ह्याची जाणीव त्यांनीं ठेवली पाहिजे.

## हिंदी मालकीच्या आगबोट वहातुकीचें महत्त्व

हिंदुस्थानच्या किनाऱ्याची लांबी ४३ हजार मैल आहे. तांदूळ, कोळसा, लाकूड, मीठ, तेलें, इत्यादि मिळून सुमारें ७० लक्ष टन मालाची वहातुक दरसाल ह्या किनाऱ्यानें होते. पश्चिम किनाऱ्यावर सुमारें १५ लक्ष उतारूंची व हिंदुस्थान आणि ब्रह्मदेश ह्यांचे दरम्यान ५ लक्ष उतारूंची वहातुक आगबोटींतून होते. परदेशांशीं होणारा व्यापार व चालणारी वहातुक लक्षांत घेतली, तर वरील आकड्यांत २५० लक्ष टन मालाची व २ लक्ष उतारूंची वाढ होईल. एवढा प्रचंड व्यापार व वहातुक हीं हिंदी मालकीच्या आगबोटींतून होणें अत्यंत इष्ट आहे. राष्ट्राच्या स्वतःच्या आगबोटी असल्याखेरीज, त्याचें सध्यासारख्या बिकट परिस्थितींत निभणें शक्य नाहीं, हें आतां स्पष्ट झालें आहे. ही वहातुक करणाऱ्या कंपन्या हिंदी मालकीच्या व हिंदी व्यवस्थेखालीं असल्या, तरच व्यापार, उद्योगधंदे, ह्यांची वाढ होण्यास सहाय मिळून हिंदी संपत्ति स्वदेशांत रहाण्यास आणि हिंदी लोकांस चरितार्थाचें एक महत्त्वाचें साधन प्राप्त होण्यास संधि मिळेल, हें उघड आहे. ग्रेट ब्रिटन जवळील आगबोटी १ कोटि ७९ टनांच्या आहेत, परंतु हिंदी आगबोटी फक्त १ लक्ष, ३२ हजार टन आहेत. हिंदी किनाऱ्यावरील आगबोटींच्या वहातुकींत ब्रिटिश कंपन्यांचा वाटा ७९ % आहे. ग्रेट ब्रिटनचा एकूण व्यापार हिंदी व्यापाराच्या फक्त ५३ पट आहे. परंतु ग्रेट ब्रिटन जवळील आगबोटींची माल वहाण्याची शक्ति १३५ पट आहे. ग्रेट ब्रिटन आपल्या स्वतःच्या आगबोटी वाढवून व्यापारी वहातुक स्वतःकडे राखण्याची शिकस्त करीत आहे, परंतु हिंदुस्थानांत खासगी प्रयत्नांसहि मिळावें तसें प्रोत्साहन मिळत नाहीं, अशी फार जुनी तक्रार आहे.

### विजगापट्टम येथें आगबोटी बांधण्यास प्रारंभ

हिंदी आगबोट वहातुकीच्या वाढीचे प्रीत्यर्थ शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी व श्री. वालचंद हिराचंद ह्यांनीं चालविलेले प्रयत्न प्रशंसनीय आहेत व त्यांचें दृश्य फल म्हणजे हिंदी आगबोटी बांधण्यासाठीं विजगापट्टम येथें तयार होत असलेल्या शिपयार्डचा मुहूर्त गेल्या आठवड्यांत करण्यांत आला, हें होय. बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांचे अध्यक्षतेखालीं पायाचा दगड बसविण्याचा समारंभ ता. २१ रोजीं मोठ्या थाटानें पार पडला. शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीतर्फे प्रास्ताविक भाषण करतांना श्री. वालचंद ह्यांनीं प्रस्तुत उपक्रमास आजची स्थिति प्राप्त होण्याचे मार्गांत किती अडचणी आल्या, हें सांगितलें. लवकरच, विजगापट्टम येथील शिपयार्डमध्यें दरसाल १६ आगबोटी तयार होऊं लागतील व त्यासाठीं १० हजार कामगारांची नेमणूक केली जाईल. युद्ध प्रयत्नांत आगबोटी बांधण्याचे धंद्याची गणना करण्यास हिंदुस्थान सरकारनें नकार दिला, युद्धामुळें विलायतेतून मागविलेले तज्ज्ञ व यंत्रसामुग्री हीं येऊं शकलीं नाहींत, इत्यादि अडचणींतून मार्ग काढून शिंदिया कंपनीनें आपलें काम चालू ठेवलें आहे. शिपयार्डसाठीं आयात होणाऱ्या कांहीं मालास वहातुकींत प्राधान्य मिळत असलें तरी तें टिकेलच असें नाहीं. अशा तऱ्हेच्या असंख्य अडचणींतून व निराशाजनक परिस्थितींतून हा धंदा स्थापन करण्याचा शिंदिया कंपनीचा व शेठ वालचंद ह्यांचा निर्धार कौतुकास्पद आहे. उपक्रमाचें महत्त्व अतिशय मोठें आहे व त्याच्या यशाकडे सर्वांचे डोळे लागून रहातील, ह्यांत नवल नाहीं.

### दि इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कं. लि.

वरील कंपनीचा ३१ डिसेंबर १९४० अखेरचा डायरेक्टरांचा रिपोर्ट व ताळेबंद आणि ३१ डिसेंबर १९४० अखेरच्या त्रैवार्षिक मूल्यमापनाचा ॲक्चुअरीचा रिपोर्ट आमच्याकडे आला आहे. १९४० मध्यें कंपनीनें १८,८४५ रुपये वार्षिक हप्त्यांच्या ३,६७,७७५ रुपयांच्या पॉलिसी दिल्या म्हणजे, १९३९ चे मानानें कंपनीच्या कामांत ५२ हजार रुपयांची वाढ झाली. लॅप्सचें प्रमाण २०% पेक्षा कमी आहे. अहवालाचे वर्षी कंपनीला एकूण ६०,०५८ रुपये उत्पन्न झालें. त्यांतून सर्व खर्च भागून लाइफ फंडांत २१,२६९ रुपयांची भर पडून तो फंड ६३,३४१ रुपये झाला. व्यवस्थेच्या खर्चाचें हप्त्यांच्या उत्पन्नाशीं प्रमाण ५१·८७% पडलें, म्हणजे तें २·१६% नीं कमी झालें. कंपनीच्या देण्याचे बाजूस ५६,१९५ रुपये भांडवल, ५,७६३ रुपये इनव्हेस्टमेंट फलक्चुएशन फंड, २५० रुपये कॉन्टिन्जन्सी रिझर्व्ह फंड, २,८४५ रिझर्व्ह फॉर कमिशन, ६३,३४१ रुपये लाईफ फंड, ३५,५८७ रुपये विमेदारांच्या मुदती ठेवी, इत्यादि बाबी आहेत. जिंदगीचे बाजूस २२,७७६ रुपयांचीं कर्जे, १,०८,२३८ रुपयांचे रोखे, डिबेंचर्स इ., ९,९६१ रुपये रोख व बँकांत, ३,१२५ रुपये फर्निचर व डेडस्टॉक, ४,७७१ रुपये प्राथमिक खर्च, ८,३०० रुपये ऑर्गनायझेशन खर्च, वगैरे बाबी आहेत. कंपनीचें ३१ डिसेंबर १९३९ अखेरचें मूल्यमापन श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी, ह्यांनीं केलेलें आहे. सदर मूल्यमापन ४% व्याजाच्या दरानें केलें असून पुढील खर्चाकरितां व बोनसकरितां शेंकडा १५ इतक्या रकमेची तरतूद त्यांत केलेली आहे व मूल्यमापनांत ८२० रुपयांचा वाढावा निघालेला आहे. जरी कंपनी डिव्हिडंड अगर बोनस देऊं शकली नाहीं तरी मूल्यमापनावरून निदर्शनास येणारी परिस्थिति समाधानकारकच वाटेल ह्यांत संशय नाहीं. मूल्यमापनाचें आधारभूत खर्चाचें प्रमाण कांहीं वर्षांत १५% येण्यास हरकत नाहीं व कांहीं वर्षांचे अवधींत कंपनीस ४½% व्याजहि सुटेल असा ॲक्चुअरींचा विश्वास आहे. कंपनीच्या चालकांच्या परिश्रमानें, ॲक्चुअरीनें अपेक्षा केल्याप्रमाणें, कंपनीची परिस्थिति आणखी सुधारून तिला लवकरच आघाडीचें स्थान मिळो, अशी इच्छा आहे. मूल्यमापनाच्यासंबंधीं कंपनीचे व्हाइस चेअरमन, श्री. एच.जी.घारपुरे (आय.सी.एस.रि.) ह्यांच्या सहीनें प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टांतील माहितीवरून सध्याच्या बिकट परिस्थितींतहि कंपनीनें गेल्या चार वर्षांत मिळविलेल्या यशाची व अपेक्षित प्रगतीची चांगली कल्पना येते. कंपनीचा व्यवहार काटकसरीनें चालविण्याचें चालकांचें धोरण योग्य असून कंपनीचे सेक्रेटरी श्री. गाडगीळ व श्री. कळंत्रे ह्यांचा उत्साह व खटपट प्रशंसनीय आहे.

### हैद्राबाद संस्थानांतील सहकारी चळवळ

गेल्या वर्षी ३३६ नवीन सोसायट्या नोंदण्यांत आल्या व १५ जुन्या सोसायट्या रद्द झाल्या. एकूण सोसायट्यांची संख्या ३,९५८ होऊन त्यांचे सभासद १ लक्ष, ५४½ हजार झाले. त्यापूर्वीच्या वर्षीचे तत्सम आकडे ३,६३८ सोसायट्या व १ लक्ष, ३८ हजार सभासद, असे होते. सहकारी चळवळींतील खेळतें भांडवल एका वर्षांत २ कोटि, ७३½ लाखांचें २ कोटि, ७७½ लाख रुपये झालें. भरणा झालेल्या भांडवलाचे व रिझर्व्ह फंडांचे आकडे अनुक्रमें ६३ लक्ष, ४५ हजार व ५७ लक्ष, ४२ हजार असे होते. डोमिनियन बँकेचें वसूल भांडवल ५ लक्ष, ६१ हजार रुपये व रिझर्व्ह ९ लक्ष, ३ हजार रुपये होते. बँकेनें सरकारी नोकरांना घरें बांधण्यासाठी ४ लक्ष, २५ हजार रुपये दिले. सेंट्रल बँकांच्या सभासदांची संख्या ४,६८५ ची ४,८४३ झाली व त्यांचें खेळतें भांडवल ६५ लक्ष, १० हजारांचें ६६ लक्ष, ९८ हजार रुपये झालें. सरकारनें वाईट परिस्थितींतील सेंट्रल बँकांना ५ वर्षें मुदतीनें ८ लक्ष रुपये बिनव्याजी व १० वर्षें मुदतीनें ३% दरानें ७ लक्ष रुपये कर्जाऊ दिले. 'धान्य' सोसायटींची संख्या ७५ ची ९० झाली. बिगर शेतकी सोसायट्यांची प्रगतीहि समाधानकारक होत आहे. कोऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटीच्या सभासदांची संख्या १ हजाराची २½ हजार झाली व उतरलेल्या विम्यांची रकम १५ लक्ष, ७८ हजार झाली. सोसायटीस १ लक्ष ४७½ हजार रुपये उत्पन्न झालें. त्यापूर्वीच्या वर्षी तें ७८, ८५६ रुपये झालें होतें. सोसायटीस १०,३९५ रु. नफा झाला. सेंट्रल को. यूनियनचें शैक्षणिक कार्य चालूच होतें.


## GOKHALE INSTITUTE OF POLITICS AND ECONOMICS

**Servants of India Society's Home, Poona 4**

**ADMISSIONS TO STUDENTS**

reading for the M. A. Examination by papers or by thesis in Economics. Two scholarships of Rs. 25 P. M. to be awarded to research students.

D. R. GADGIL,
Director.

## कापडाच्या गिरण्यांतील रात्रपाळी

मुंबई प्रांतांतील कपास कापडाच्या गिरण्यांत मागें रात्रपाळी मधून मधून चालत असे, परंतु गेल्या चार-पांच वर्षांत रात्रपाळी ही एक नित्याची बाब होऊन बसली आहे. १९१८ सालीं सर नेस वाडिया ह्यांच्या गिरणींत रात्रपाळी प्रथम सुरू झाली. अहमदाबादेंत १९२४ सालीं रात्रपाळीस प्रारंभ झाला. सोलापूर येथें १९३८ चे पूर्वी रात्रपाळी अपवादात्मकच होती. खालील तक्त्यांत रात्रपाळी चालविणाऱ्या गिरण्यांत वाढ कशी होत गेली, हें दाखविलें आहे:—

| | मुंबई | | अहमदाबाद | |
|---|---|---|---|---|
| | गिरण्या | कामगार | गिरण्या | कामगार |
| १९३० | १६ | ३,५९२ | १८ | ६,९५४ |
| १९३२ | १० | १०,१०७ | १८ | ६,२९३ |
| १९३५ | ३४ | २७,६८० | ३३ | १२,०३० |
| १९३८ | ५२ | ३३,०५९ | ५६ | ३४,६१८ |
| १९३९ | ४० | ३२,४११ | ४३ | २४,९५४ |

सबंध मुंबई प्रांतांत मिळून १९३५ सालीं २ लक्ष, ३६ हजार कामगार दिवस पाळीवर व ५३ हजार कामगार रात्रपाळीवर होते. १९३८ चे तत्सम आकडे २ लक्ष, ३९ हजार व ९८ हजार असे आहेत. जेथें काम अखंड चाललें पाहिजे, अशा ठिकाणीं रात्रपाळी आवश्यक आहे. स्थायी खर्चांत बचत करून, जादा भांडवली खर्च करावा न लागतां उत्पादनांत वाढ करण्याची शक्ति रात्रपाळींत आहे. मागणीमध्यें होणाऱ्या तात्कालिक वाढीस रात्रपाळी हा सोइस्कर उपाय आहे. यंत्रसामुग्रींत झपाट्यानें वाढ होत आहे, ह्या दृष्टीनें त्यांतून अधिकांत अधिक उत्पादन शक्य तितक्या लवकर काढून घेतल्यानें खर्चांत व व्याजांत मोठी बचत होऊं शकते.

कित्येक गिरण्यांच्या मॅनेजिंग एजंटांचें वेतन उत्पादनाच्या परिमाणावर अवलंबून असतें व उत्पादन वाढावें ह्यासाठी रात्रपाळीचा अवलंब केला जाणें अस्वाभाविक नाहीं. रात्रपाळीमुळें उत्पादनखर्च कमी पडून मालाचा खप वाढवितां येतो असेंहि सांगण्यांत येतें. तथापि, रात्रपाळींत काम दिवसाइतकें चांगलें होतें किंवा नाहीं हा महत्त्वाचा प्रश्न आहे. दूरताशीं उत्पादनांतहि कांहीं फरक पडतो कीं काय, हेंहि पाहिलें पाहिजे. मध्यरात्रीपर्यंत काम चांगलें होतें, परंतु त्यानंतर तें खराब होऊं लागतें, असा अनुभव आहे. रात्रपाळीचे वेळीं काम चांगलें व भरपूर मिळण्यास गिरणींत चांगला उजेड व खेळती हवा असणें अगत्याचें आहे. कांहीं गिरण्यांत उजेड कमी असतो, तर कांहींत तो फार चकचकीत असतो. जेवणासाठी चांगल्या व पुरेशा जागेची जरूरी रात्रपाळीचे वेळीं विशेष भासते. रात्रपाळीचा कामगारांचे प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होण्याचें प्रमाण किती आहे, हें सांगतां आलें नाहीं, तरी रात्रपाळी करणारांमध्यें आजारीपणा, डोळ्याचे विकार, पोटाचीं दुखणीं, इत्यादि ज्यास्त आढळतात. रात्रपाळीमुळें जेवणाच्या वेळांत अनिष्ट फरक पडतो, त्याचा दुष्परिणाम कामगारांचे प्रकृतीवर होतो. कामगारांना रात्रीं काम केल्यानंतर दिवसा अखंड गाढ झोप व विश्रांति मिळणें आवश्यक आहे, परंतु त्यांच्या खोल्यांतून ती त्यांच्या नशिबीं येणें अशक्यप्राय आहे, "मनुष्याच्या स्वाभाविक संवयींत फेरफार केल्यास त्याच्या शारीरिक क्रियांवर त्याचा परिणाम होणें स्वाभाविक आहे. रात्रपाळीमुळें मनुष्याची झोप पुरी होत नाहीं. दिवसाचा प्रखर प्रकाश, वेगवेगळे आवाज, इकडेतिकडे जाण्याचा मोह, घरगुती कामें, मुलें संभाळणें, जेवणें, कपडे धुणें, ह्या सर्व गोष्टी झोपेच्या आड येतात." रात्रपाळीमुळें घरची सर्व घडी बिघडते, मुलांची आबाळ होते, आरोग्यसंवर्धक गोष्टी करतां येत नाहींत, शैक्षणिक प्रगति खुंटते, इत्यादि मुद्देहि महत्त्वाचे आहेत.

रात्रपाळी हानिकारक आहे, हें कामगारास समजतें. परंतु बेकारीच्या निवारणाची दुसरी कोणतीहि दुसरी सोय नसल्याकारणानें त्याचा इलाज चालत नाहीं. तात्पुरत्या वाढत्या मागणीच्या पुरवठ्यासाठी केव्हां केव्हां रात्रपाळी आवश्यकहि असते. रात्रीच्या कामासाठी जास्त मजुरी देणाऱ्या गिरण्यांची संख्या एक–दोन पेक्षां अधिक नाहीं. बहुतेक देशांत रात्रपाळीस जास्त मजुरी देण्याची पद्धति नाहीं, रात्रपाळीचें योग्य नियंत्रण करून कामगारांच्या हिताचें रक्षण होईल अशी तजवीज केली तर हिंदुस्थानांतहि रात्रपाळीस जास्त मजुरी देण्याची आवश्यकता नाहीं, असा टेक्स्टाइल लेबर इन्क्वायरी कमिटीचा अभिप्राय आहे. रात्रपाळी दिवसपाळीपेक्षा कमी तासांची असावी काय असा एक महत्वाचा प्रश्न आहे. जेथें तीन पाळया चालू नाहींत अशा ठिकाणीं रात्रीं १२ ते सकाळीं ७ गिरणी अजीबात बंद ठेवावी व दोन्हीं पाळयांचे कामाचें तास ८½ तास ठेवावेत म्हणजे गिरणीमालक व कामगार ह्या दोघांचेंहि हित साधेल, असें कमिटीचें म्हणणें आहे. रात्रपाळी किती काळ अखंड चालावी, हाहि महत्त्वाचा प्रश्न आहे. तो काळ एक महिन्याचा असावा व रात्रपाळीसाठी गिरण्यास लायसेन्स घेण्यास लावावें म्हणजे त्यावर योग्य नियंत्रण होईल, अशीहि कमिटीची सूचना आहे. रात्रपाळीचें नियंत्रण हिंदुस्थानांत एकाच तत्त्वावर केलें जाणें अगत्याचें आहे, परंतु त्यासाठी मुंबई प्रांतानें वाट न पहातां, पुढाकार घेणें इष्ट आहे.

सिंगल व डबल पाळी ही मुंबई प्रांतांतील गिरण्यांत आढळते. कांहीं गिरण्यांत तीन पाळया असतात. अहमदाबादमधील कांहीं गिरण्यांत रिले पद्धत चालू आहे, तीमध्यें विश्रांतीचे वेळींहि काम चालू असतें. कामगारांचे दोन अगर अधिक गट करून त्यांच्या विश्रांतीच्या वेळा वेगवेगळ्या ठरवून हें साधतां येतें. एका गटाच्या विश्रांतीचे वेळांत दुसऱ्या गटाचें काम चालू असतें.

दोन पाळयांच्या वेळा खालीलप्रमाणे असूं शकतील:—

पहिली पाळी—

सकाळीं ६ ते सकाळीं ११ }<br>
दुपारीं ३ ते रात्रीं ७ } ९ तास

दुसरी पाळी—

सकाळीं ११ ते दुपारीं ३ }<br>
रात्रीं ७ ते रात्रीं १२ } ९ तास

ह्यापेक्षांहि दुसरी पद्धत असूं शकेल:—

| गट सुरवातीची वेळ | काम संपण्याची वेळ | विश्रांतीची वेळ |
|---|---|---|
| अ सकाळीं ६-३० | रात्रीं ७-३० | सकाळीं ९-३० ते दुपारीं १-३० |
| ब | ,, ,, | दुपारीं १२-३० ते ४-३० |
| क ,, | दुपारीं ४-३० | दुपारीं १२-३० ते १-३० |
| ड सकाळीं ९-३० | रात्रीं ७-३० | दुपारीं १२-३० ते १-३० |

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

(ले.: —वा. चिं. भानु)

जमिनींचें संयोगीकरण;—हिंदी शेतकऱ्याची आर्थिक स्थिति सुधारण्याच्या कार्मी ज्या अनेक अडचणी दत्त म्हणून पुढें उभ्या राहतात त्यांत, जमिनींची होणारी चिरफाड ही एक फार मोठी अडचण आहे, असे उद्गार श्री. कृष्णसिंह, बिहार प्रांताचे कॉंग्रेसपक्षीय माजी दिवाण, यांनीं एका सहकारी परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून काढले. त्याचा विचार सहकारी कार्यकर्त्यांनीं व हिंदुस्थान सरकारनेंहि विशेष आस्थेवाईकपणानें करावयास हवा आहे. आज अनेक पिढ्यान्‌पिढ्या वारसा हक्कानें बापापासून मुलाला वडिलार्जित जमिनी मालकीनें येत असतां हिस्सेदारीनें जमिनींची चिरफाड कशी बेसुमार होत आली आहे हें आतां नव्यानें कोणास सांगण्याचें कारण नाहीं. अशा तुकड्यांची खरेदी-विक्रीहि फायदेशीरपणानें होत असल्यानें एकाच गांवांत एका शेतकऱ्याला पांच-पंचवीस जमिनींचे तुकडे असतात; पण तें सलग नसल्यानें त्यांची मेहनत, मशागत करणें, त्यांत पिकें काढणें, ती राखणें, त्यांतील माल विक्रीसाठी एकत्र करणें या मामुली कामासाठी त्याला करावा लागणारा खर्च उत्पन्नाच्या मानानें जबर पडतो व शेतीचा धंदा किफायतशीर होत नाहीं, असा प्रत्यही अनुभव येत आहे. तेव्हां शेतकऱ्याची उन्नति घडवून आणण्यास जे अनेक दिशांनीं प्रयत्न करावयाचे त्यांत त्याच्या जमिनी सलग होतील, त्याच्या विखुरलेल्या तुकड्यांचें संयोगीकरण होईल इकडे प्रथम लक्ष देणें हें शेतकऱ्यांच्या कैवाऱ्यांचें आद्य कर्तव्य आहे.

सुमारें १३—१४ वर्षांपूर्वी मुंबई प्रांताचे एक नामवंत फडणीस सर चुनीलाल मेथा, यांनीं असा एक प्रयत्न केला होता. असलेल्या तुकड्यांचें एकत्रीकरण करणें व नवीन तुकडे बेसुमार न पडतील अशी कायद्यानें तरतूद करणें हा सर चुनीलाल यांचा हेतु होता. कांहीं मंडळींनी हा केवळ सरकारी प्रयत्न म्हणूनच हाणून पाडण्याच्या एकाच दृष्टीनें जनतेची दिशाभूल केली, नामदार मेथांच्या हेतूंचा विपर्यास केला व त्यामुळें हिंदी शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचें काम लांबणीवर पडलें. तथापि कार्यकर्त्यांनीं निराशा न होतां सहकारी पद्धतीनें पुन: तो प्रयत्न हातीं घेतलाच पाहिजे. शेतजमिनी तुकड्यांचें सयोगीकरण केल्यास परिणामीं तें शेतकऱ्याला कसें फायदेशीर होतें हें पंजाब प्रांतानें केलेल्या कामगिरिवरून आतां स्पष्ट झालें आहे. जवळ जवळ ९ लाख एकर जमिनीचें संयोगीकरण, संबंध असलेल्या शेतकऱ्याचे संमतीनें करण्यांत पंजाब प्रांतानें पुढाकार घेतलेला आहे आणि त्यामुळें आतां अवश्य त्या ठिकाणीं सक्तीचें तत्वही लागू करण्यास पंजाब प्रांताचें रेव्हेन्यू खातें तयार झालें आहे. आरंभीच्या काळांत यासाठीं होणारा खर्च पंजाब सरकारनें सोसला आहे. पण आतां एकाच मालकाच्या विखुरलेल्या जमिनींचे तुकडे एकत्र करण्यापासून होणारे फायदे त्या शेतकऱ्यांना उघड उघड दिसूं लागल्या कारणानें असें संयोगीकरण करण्यासाठी दर एकरीं ८ ते १० आणे पर्यंत खर्चही आपखुषीनें अंगावर घेण्यास ते तयार होत आहेत.

अशी सहानुभूतीची अनुकूल परिस्थिति निर्माण झाली असल्यानें कायद्याच्या दंडुक्याचा वचक दाखविण्याचा प्रसंग पंजाब प्रांताच्या रेव्हेन्यू खात्यावर येत नाहीं, पण जर कोणी हटवादीपणा करूं लागला तर त्याला आतां सक्तीनें संयोगीकरण करण्यास भाग पाडण्यासाठी पंजाब सरकारनें कायद्याचेंहि पाठबळ घेतलेलें आहे. पण पुष्कळसें काम शेतकऱ्यांना फायदे कसे होतात तें स्पष्ट करून, उदाहरणें दाखवून, त्यांचें मन वळवून खेळीमेळीनेंच करण्यांत येत असल्यानें प्रत्यक्ष कायद्याचा बागुलबोवा दाखविण्याचा प्रसंग क्वचित येतो. पंजाब प्रांतानें ज्या प्रमाणें हें महत्वाचें कार्य अंगिकारलें तसेंच त्याचें अनुकरण इतर प्रांतांच्या सरकारांनींहि केलें पाहिजे व सहकारिता ही शाब्दिक चळवळ नसून ती प्रत्यक्ष कृतीची चळवळ आहे हें दाखविण्याची संधि वाया न घालविली पाहिजे.

संयोगीकरण केलेल्या जमिनींमधून शेकडा १० ते २५ टक्के पर्यंत निवळ उत्पन्नांत भर पडते असा पंजाब प्रांतांत अनुभव येत आहे.

* * * *

हातमागाच्या धंद्याची सखोल चौकशी करून 'सत्याचे शोध' करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें नुकतीच कमेटी नेमली आहे. मद्रास युनिव्हर्सिटीचे आर्थिक विभागाचे प्रो. जे. थॉमस यांच्या अध्यक्षत्वाखालीं ही कमेटी काम करीत असून अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे प्रो. बी. पी. आडरकर हे कमेटीचे सेक्रेटरी नेमण्यांत आलेले आहेत.

* * *

मद्रास इलाख्यांतील नॉर्थ अर्काट जिल्ह्यांत शेतीच्या कामकाजासाठी विजेच्या साह्यानें चालणारे पंपाचा पुरवठा करणारी एक सहकारी तत्वावर संस्था उभारण्यांत आलेली आहे. या दिशेनें हा अगदीं पहिलाच प्रयत्न आहे. सरकारच्या मदतीवर असे कांहीं प्रयत्न यशस्वी झाल्याचें आढळून आल्यानेंच सहकारी तत्त्वावर हा प्रयत्न करण्यांत आला आहे.

* * *

खेडेगांवची सुधारणा करून दाखवितील अशा गांवाना उत्तेजन मिळावें म्हणून मुंबई सरकारनें रु. १०० चें एक बक्षीस ठेवलें असून तें दरसाल प्रत्येक जिल्ह्यांतील खेडेगांवाला मिळावयाचें आहे.

## १९३९—४० हें वर्ष शेतीस कसें गेलें?

### मुंबई प्रांतांतील परिस्थिति

गेलें वर्ष मुंबई प्रांतांतील शेतीस साधारणपणें बरें गेलें, परंतु १९३८—३९ चे मानानें तें वाईटच गेलें असें म्हटलें पाहिजे. पावसांत वरचेवर पडलेले मोठाले खंड व मान्सून पावसाचें लवकर बंद होणें, ह्यामुळें पिकांची वाढ खुंटली. ऑगस्टअखेर व सप्टेंबरचे प्रारंभीं सर्व प्रांतभर पाऊस पडला. त्यानें परिस्थिति सावरली व रब्बी पिकांची लागवडहि शक्य केली. तथापि, अखेरच्या पावसांनीं दगा दिलाच. गुजराथ व महाराष्ट्र येथील ज्वारीची लागवड वाढली, परंतु कर्नाटकांतील बाजरीची लागवड २ लक्ष, २३ हजार एकरांनीं कमी होऊन ६२ हजार ज्यास्त एकरांत ज्वारी लावण्यांत आली. तांदळाच्या लागवडींत व गव्हाच्या लागवडींत अनुक्रमें १ लक्ष, ५५ हजार एकरांची व १ लक्ष, ७५ हजार एकरांची घट झाली. कपास, तंबाखू, गळिताचीं धान्यें, ह्यांची लागवड ४७ हजार एकरांनीं कमी झाली. १९३८—३९ मध्यें, कालव्याखाली ११ लक्ष, ४७ हजार एकर जमीन होती, ती १९३९—४० मध्यें १२ लक्ष, १५ हजार झाली.

## १९४१–४२ चीं अंदाजपत्रकें

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत )

| सरकार | उत्पन्न | खर्च | वाढावा | तूट |
|---|---|---|---|---|
| मध्यवर्ती सरकार | १,४५,०४·८३ | १,५८,८९·३८ | ... | १३,८४·५५ |
| प्रांत | | | | |
| मद्रास | १८,२१·३७ | १८,८८·६२ | १२·७५ | ... |
| संयुक्त प्रांत | १४,३४·३० | १४,२९·४६ | ४·८४ | ... |
| बंगाल | १४,०३·१४ | १५,३७·३८ | ... | १,३४·२४ |
| मुंबई | १३,५६·६५ | १३,५६·०० | ·६५ | ... |
| पंजाब | १३,२८·६७ | १२,५६·३५ | ७२·३२ | ... |
| बिहार | ६,११·०८ | ५,७९·८२ | ३१·२६ | ... |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | ५,१०·७६ | ५,०८·७८ | १·९८ | ... |
| सिंध | ४,३५·४७ | ४,३४·४७ | १·०० | ... |
| आसाम | ३,१३·०१ | ३,२४·९० | ... | ११·८९ |
| ओरिसा | १,९२·७४ | १,९०·५९ | २·१५ | ... |
| सरहद्द प्रांत | १,९१·२५ | १,९०·९३ | ·३२ | ... |

## ग्रामोद्धारखात्यानें काय केलें ?

ग्रामसुधारणेकडे खास लक्ष पुरवून, ग्रामीण प्रगति घडवून आणण्यासाठी एक जबाबदार खातें म्हणून १९३९ सालच्या एप्रीलपासून हें खातें मुंबई इलाख्यांत उघडण्यांत आलें होतें व अवघ्या दीड वर्षांतच त्याच्या बाल्यावस्थेंत हें खातें यंदाच्या जानेवारीपासून पुनः बंद करण्यांत आलें. एवढ्या अवधींत या खात्यानें साखर, गूळ, आंबे, सफरचंद व काजू हा माल खपविण्याच्या दृष्टीनें पाहणी केली. पुण्याच्या आजूबाजूस भाजीपाला विक्रीच्या दृष्टीनें सोसायट्या काढण्याकरितां पाहणी केली. धंद्याच्या वाढीच्या दृष्टीनें, बाजारभावाची माहिती वगैरे गोष्टींची माहिती या खात्यानें जमविली. त्याचप्रमाणें या खात्यामार्फत १९३९-४० सालीं ३००० पेक्षां जास्त प्रात्यक्षिकें. झालीं, सुमारें दहा लक्ष पौंड चांगल्या प्रतीचें बीं शेतकऱ्यांना या खात्यानें दिलें आणि मागसलेल्या भागांतून धान्याचीं कोठारें जोरानें सुरू करून, १७१ कोठारें उघडलीं व सुमारें एक हजार गावांना कोठारांचा फायदा दिला.

सर्वांगीण ग्रामसुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनें हें खातें सर्वस्वीं जबाबदार होतें व त्यासाठी नाना तऱ्हेनें पाहणी करून निरनिराळ्या योजना या खात्यामार्फत तयार होत होत्या. हें खातें अधिक काळ टिकलें असतें तर त्याचा उपयोग लक्षांत आला असता व ग्रामसुधारणेच्या प्रगतीवरून या खात्याचे गुणदोष कळले असते. परंतु सरकारनें घाई करून अवघ्या दीड वर्षानंतरच हें खातें बंद केलें व त्याचीं छकलें केलीं. त्यामुळें आतां ग्रामसुधारणेच्या निरनिराळ्या अंगांची जबाबदारी वेगवेगळ्या खात्यांकडे पुन्हां गेली आहे. आतां ग्रामसुधारणेचें काम हें सर्वांचें काम होऊन बसलें आहे. या दृष्टीनें ग्रामसुधारणेचें जबाबदार खातें अधिक दिवस टिकलें असतें तर बरें झालें असतें.

—' शेती आणि शेतकरी '


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,७९,७०० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,८९,८५० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.





# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.



# K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १११—१ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४–४ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९६–० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२–१२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९५—० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) — .. | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( फंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४३—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | १०९—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४५—४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८२—८ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% ... ... | १३२–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २९३–१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१३–१२ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६२०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% ... ... | ६१—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८९२—८ |
| तापी व्हॅली ( १०० ) ८% ... ... ... | ६४५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २०१—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४४—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९–१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४६—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४२०२—८ |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१५–१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १५४—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३३१—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३०॥) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | ११९५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १४४—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–२–३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३–०–० |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल अ‍ॅण्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स अ‍ॅकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख २ जुलै, १९४१ | अंक २७

## नव्या कंपनीचें जुन्या कंपन्यांप्रमाणें स्पृहणीय यश

**डिसेंबर १९४० अखेरच्या प्रगतीचे बोलके आकडे**

१. शेअर भांडवल रोख जमा झालेलें रु. ५६,१०० चे वर.
२. आयुर्विमानिधी रु. ६३,३४० चे वर.
३. एकूण जिंदगी रु. १,५९,३०० चे वर.
४. खर्चाचें प्रमाण शें. ४९·७१ व लॅप्स प्रमाण शें. २० चे आंत.
५. आयुर्विमानिधी व इतर रिझर्व्हचे दर हजारी प्रमाण ५३.
६. रिझर्व्ह बँकेकडे डिपॉझिट सरकारी दर्शनी नोटा रु. १,१०,०००
७. ३१-१२-१९३९ अखेरच्या मूल्यमापनाप्रमाणें दिसून येणारी समाधानकारक सांपत्तिक स्थिति. नवीन विमा कायद्याच्या कसोटीस कंपनी पूर्णपणें उतरलेली आहे. कांहीं भागांत चीफ एजन्सीज देणें आहेत. खटपटी गृहस्थास सुवर्ण संधी.

सेक्रेटरी,
**इंडियन प्रोग्रेसिव्ह विमा कंपनी लि., पुणें नं. २.**

## सत्ताविसाव्या वार्षिक रिपोर्टांतील

## विशेष गोष्टी

वर्षासनाची रकम सोडून १९४० मध्यें पुरें झालेलें नवें काम

**६,६७,०००**

**६६,५०,०००** रुपयांहून अधिक

रुपयांहून अधिक रकम विमेदारांना आणि त्यांच्या इच्छित वारसांना क्लेम्सच्या रूपानें आणि बोनस म्हणून दिली· या रकमेपैकीं शें· ५८ इतकी रकम विमेदारांना त्यांच्या हयातींतच मिळाली·

**१६,४६,०००**

रुपयांहून अधिक रकम कंपनीच्या लाइफ फंडांत भर टाकण्यांत आली, आणि त्यामुळें एकंदर आयुर्निधि

**१,२७,९२,०००**

रुपयांहून अधिक झाला.

## वेस्टर्न इंडिया

**आयुर्विमा कंपनी लि. सातारा**

पुणें शाखा : १७९ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें शहर.

# विविध माहिती

### चालुक्यांचें प्राचीनत्व

विजापूर जिल्ह्यांत बदामी येथील किल्ल्यामध्यें एक शिलालेख सांपडला आहे, त्यावर शके ४६५ असा वर्षाचा उल्लेख आहे. शके ४६५ म्हणजे सन ५४३ होय. शिलालेखांत चालुक्य घराण्याचा संस्थापक पहिला पुलकेशी, ह्यास अनुलक्षून उल्लेख आहे व त्यांत त्याला "चालुक्य", "वल्लभेश्वर" इत्यादि नांवानें संबोधिलेलें आहे. चालुक्यांच्या कोणत्याहि शिलालेखापेक्षा हा आधींचा आहे व त्यावरून चालुक्यांच्या सार्वभौमत्वाचें आणखी पुरातनत्व सिद्ध होत आहे. शकाचें कालगणन दक्षिण हिंदुस्थानांत किती पुरातनकालापासून आहे तेंहि त्यावरून दिसतें. बदामी येथील किल्ल्याच्या बांधणीचाहि शिलालेखांत उल्लेख आहे.

### इटालिअन मजकुराचें इंग्रजी भाषांतरकार पाहिजेत

इटालिअन भाषेंतील मजकुराचें कोशाचें सहाय न घेतां इंग्रजी भाषांतर करतां येणारे कांहीं लोक सरकारास नेमावयाचे आहेत. इटालिअन युद्धकैद्यांचे संबंधांतील काम त्यांचेकडे सोपविलें जाईल. पगार दरमहा २०० रुपये मिळेल. मुख्य सेन्सॉर, हिंदुस्थान, इंपीरिअल सेक्रेटारिएट, न्यू दिल्ली ह्या पत्त्यावर अर्ज करावयाचे आहेत.

### परराष्ट्रीय क्रय साधन दडवून ठेवलें

सुमारें ६,६५५ पौंड किंमतीचे २६,८२२ अमेरिकन डॉलर सरकारास विकण्याचे टाळल्याबद्दल एका स्कॉटिश शेतकऱ्यास ब्रिटिश कोर्टानें १५ हजार पौंड दंड केला. "ह्या देशाच्या शत्रू इतकाच तूं अपराधी आहेस" असें सर रॉबर्ट टमेट ह्यांनीं दंड करतेवेळीं सांगितलें.

### इराणचा तटस्थपणा

चालू युद्धांत इराण तटस्थ राहील, असें इराणच्या मॉस्को येथील वकिलानें रशियास कळविलें आहे.

### युद्धकैदी

जर्मनीमध्यें एकूण १६ लक्ष फ्रेंच युद्धकैदी आहेत, त्यांपैकी कांहीं कैद्यांची फ्रान्समधील पिकाच्या कापणीस मदत करण्यासाठी मुक्तता करण्यांत येईल, अशी अपेक्षा आहे.

### जपानमध्यें अडकून पडलेले जर्मन

जर्मनी व रशिया ह्यांचेमध्यें युद्ध सुरू झाल्यामुळें ट्रॅन्स-सैबेरिअन रेल्वेनें जर्मनांस प्रवास करतां येणें अशक्य झालें आहे आणि त्या कारणानें जपानमधील जर्मन लोक अडकून पडले आहेत. अमेरिका नेदरलंड्स ईस्ट इंडीज इत्यादि ठिकाणचे जर्मन जपानमध्यें दाखल झाले आहेत, त्यांचीहि तीच गत झाली आहे.

### विमा सल्लागार समिति

विमाविषयक प्रश्नांवर सरकारास सल्ला देण्याकरितां एक मध्यवर्ती कमिटी नेमण्यांत येणार आहे. तिचे सभासदांचीं नांवें लवकरच जाहीर होतील. व्यापारमंत्री, सर रामस्वामी मुदलियार व इन्शुअरन्स सुपरिंटेंडेंट, मि. टॉमस हे त्या कमिटीचे अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष होतील. कमिटीच्या सभासदांची संख्या दहा राहील.

### मध्यवर्ती असेंब्ली

मध्यवर्ती असेंब्लीची आयुर्मर्यादा आणखी एका वर्षानें वाढविण्यांत आली आहे. असेंब्लीच्या येत्या बैठकीस बहुधा २८ ऑक्टोबर रोजीं प्रारंभ होईल.

### कॉमन्स सभेची गुप्त बैठक

ता. २५ रोजीं ब्रिटिश कॉमन्स सभेची एक गुप्त बैठक झाली, तिचेमध्यें ग्रेट ब्रिटनच्या आगबोटीविषयक परिस्थितीचा खल झाला, असें समजतें.

### शेतीच्या उत्पन्नावर इनकमटॅक्स

शेतीच्या उत्पन्नावर प्राप्तीवरील कर बसविण्याचा बंगाल सरकारचा विचार आहे. त्यासंबंधी एक बिल लवकरच तेथील विधिमंडळांत सरकार मांडील. २ हजारांवरील शेतीच्या उत्पन्नास हा कर द्यावा लागेल. कराचें उत्पन्न ७५ लक्ष ते १ कोटि रुपये होईल अशी अपेक्षा आहे. बिहार आणि आसाम ह्या प्रांतांत शेतीच्या उत्पन्नावर सध्या इनकमटॅक्स आहे; इतर प्रांतांत नाहीं.

### हिंदुस्थान सरकारच्या कस्टम्सच्या उत्पन्नांत वाढ

| | रुपये |
|---|---|
| मे, १९४१ | ३,८३,००,००० |
| एप्रिल, १९४१ | ३,४८,००,००० |
| मे, १९४० | ३,६८,००,००० |
| एप्रिल-मे, १९४१ | ९,००,००,००० |
| एप्रिल-मे, १९४० | ८,५२,००,००० |

### कॉफीचा प्रचार

सध्याच्या युद्ध-परिस्थितींतहि हिंदी कॉफीचा प्रचार लंडनमध्यें चालू आहे व त्यामुळें आपल्या कॉफीची लोकप्रियता वाढत आहे.

### हिंदी उमेदवारांची बडदास्त

ग्रेट ब्रिटनमध्यें यांत्रिक काम शिकण्याकरितां गेलेल्या हिंदी उमेदवारांस चांगलें व पुरेसे कपडेलत्ते, अन्न इत्यादि मिळत असून ब्रिटिश नागरिकांप्रमाणेंच त्यांस दर्जा व सवलती दिल्या जात आहेत, असें ब्रिटिश मजूर मंत्रि, मि. टॉमलिनसन ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

### ड्यूक ऑफ विंडसरचा मुक्काम

बर्मुडा बेटांतील अतिशय कडक उन्हाळा टाळण्यासाठी ड्यूक आणि डचेस ऑफ विंडसर हे कल्गेरी (अल्बर्टा) येथें दोन महिने काढणार आहेत.

### युद्ध-प्रयत्नांची माहिती देणारा चित्रपट

ऑस्ट्रेलियांत चालू असलेल्या युद्ध-प्रयत्नांची माहिती देणारा एक चित्रपट सिमला येथें नुकताच दाखविण्यांत आला.

### अमेरिकेच्या अध्यक्षाचा अधिकार

डॉलरमधील सोन्यांत घट करण्याचा, अमेरिकेचे अध्यक्ष, मि. रूझवेल्ट, ह्यांस असलेला अधिकार काढून घेण्याचा प्रयत्न अमेरिकेच्या सीनेटमध्यें करण्यांत आला, परंतु तो अयशस्वी झाला.

### सरकारी नोकरांस महागाई भत्ता

दिल्ली, बलुचिस्तान, अजमीर-मेरवाड, कूर्ग आणि अंदमान व निकोबार बेटें येथील मध्यवर्ती सरकारच्या नियंत्रणाखालील प्रदेशांमधील आपल्या नोकरांस महागाई भत्ता देण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. दरमहा ३० रुपये अगर त्यापेक्षा कमी पगार मिळणाऱ्या नोकरांस १ ते ३ रुपयांपर्यंत भत्ता मिळेल. कांहीं ठराविक मर्यादेपलीकडे स्थानिक महत्त्वाच्या धान्याचे भाव गेले म्हणजे महागाईच्या प्रमाणांत भत्ता दिला जाईल.

### दिल्ली येथील नवें रेडिओ गृह

नवी दिल्ली येथें नवीन रेडिओ गृहाच्या बांधकामास प्रारंभ झाला आहे. ह्या गृहाच्या बांधणीस सुमारें ९$\frac{1}{2}$ लक्ष रुपये खर्च होईल.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३१४ |
| २ युद्धोत्तर आर्थिक घडीची पूर्वतयारी ... | ३१५ |
| ३ जागतिक घडामोडींची दिशा ... | ३१६ |
| ४ शत्रुपक्षीयाचे देशांतील नातेवाइकांस पत्र... | ३१६ |
| ५ स्फुट विचार ... रोख्यांच्या अदलाबदलीचा निकाल–मँगेनीजचा पुरवठा–वेस्टर्न इंडिया विमा-कंपनी–जर्मनीची रशियन मोहीम–सुकी केळीं आणि इंग्लंड | ३१७ |
| ६ मुंबई प्रांतांतील जमीन गहाणाच्या बँका | ३१९ |
| ७ मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीचा अहवाल | ३१९ |
| ८ हिंदी साखरेचे कारखाने | ३२० |
| ९ गिरणी कामगारांच्या चाळी | ३२१ |
| १० निवडक बाजारभाव | ३२२ |



# अर्थ

बुधवार, ता. २ जुलै, १९४१


## युद्धोत्तर आर्थिक घडीची पूर्वतयारी

### पुनर्घटना समितीची स्थापना

गेल्या महायुद्धाचा अनुभव सध्याच्या युद्धांत फारसा उपयोगी पडत नसला आणि त्यावेळच्या परिस्थितींत आणि चालू परिस्थितींत बराच फरक आढळून येत असला, तरी गेल्या महायुद्धानें शिकविलेल्या धड्यांपासून बोध घेऊन त्याचे आधारावर औद्योगिक व आर्थिक धोरण आखणें प्रत्येक राष्ट्रास आवश्यक आहे हें उघड आहे. चलनाची स्थिरता, व्याजाचे अल्प दर, इत्यादि गोष्टी आज आपणांस नित्याच्या वाटतात, परंतु गेल्या महायुद्धाचे वेळच्या अनुभवाचा फायदा घेतल्यामुळेंच त्या शक्य झाल्या आहेत. युद्ध चालू असतांना युद्धोपयोगी मालाचें व दारुगोळ्याचें अत्यंत मोठ्या प्रमाणावर उत्पादन चालू असतें व राष्ट्राचें सर्वस्व हें उत्पादन अखंड चालू ठेवण्याकडे खर्च केलें जातें. लक्षावधि लोकांना युद्धकाळांत नवीन व्यवसाय प्राप्त होतो. प्रत्यक्ष लष्करांत दाखल झालेले सैनिक हे वेगळेच. अशा रीतीनें युद्धकाळांत उद्योगधंदे चलतीत असतात व बेकारीसहि थोडा आळा बसतो. हे सर्व व्यवहार "परवडण्या" च्या कसोटीस उतरतातच असें नाहीं; प्राप्त परिस्थितींत ते करावेच लागतात. तथापि, युद्धसमाप्तीनंतर परिस्थिति एकदम पालटते. दारूगोळ्यांची आवश्यकता कमी होते, युद्धोपयोगी मालाची मागणी नाहींशी होते, सैन्यांत दाखल झालेले लोक परत आपल्या गांवीं येतात आणि देशाची आर्थिक घडी विस्कटून जाते. युद्ध चालू झाल्यानंतर युद्धोपयोगी मालाच्या उत्पादनास गति मिळण्यास थोडा काळ लागतो त्यापेक्षा किती तरी पट काळ युद्धपूर्व शांततेच्या मामुली परिस्थितीप्रत जाण्यास लागतो. हें स्थित्यंतर घडून येण्याचे मार्गांत अडचणीहि बहुविध असतात. दुसरा देश जिंकण्याची तयारी करतेवेळीं तो जिंकल्यानंतर त्याचेवर प्रभावी हुकमत गाजविण्याची व्यवस्थाहि अगोदर करून ठेवावी लागते; तद्वतच युद्ध-समाप्तीनंतर शांततेचा काळ आल्यावर राष्ट्राची आर्थिक घडी नीट कशी बसेल, ह्याची योजनाहि आगाऊ करून ठेवणें दूरदर्शीपणाचें असतें. गेल्या महायुद्धानंतरच्या परिस्थितीचा अनुभव लक्षांत घेऊन, हिंदुस्थान सरकारनें त्या संबंधांत तयारी चालविली आहे.

सध्या सहेतुक उत्तेजन ज्यांस देण्यांत येत आहे, असे उद्योगधंदे युद्धसमाप्तीनंतर जोरानें चालणें शक्य नाहीं; युद्ध खात्याच्या ऑर्डरी त्यांस पुढें मिळणार नाहींत. ह्या उद्योगधंद्यांत गुंतलेले कामगार सहाजिकच बेकार होतील, त्यांची दुसरीकडे तात्काळ सोय लागणार नाहीं. युद्धासाठी तयार केलेला माल व साठवलेला माल हा निरुपयोगी होईल, त्याची विल्हेवाट कशी लावावयाची, हाहि प्रश्न उपस्थित होईल. सैन्यांतून निवृत्त होणाऱ्या लोकांस उद्योग मिळवून देण्याचें बिकट कामहि त्यावेळीं करावें लागेल. ह्या सर्व गोष्टींची आयत्यावेळीं व्यवस्था करण्याऐवजीं आजच त्यांचा विचार करणें इष्ट व सोईस्कर होईल, ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें आपल्या व्यापार मंत्र्याच्या अध्यक्षतेखालीं एक "पुनर्घटना समिति" नेमली आहे. सरकारी आर्थिक सल्लागार त्या समितीचे सभासद आहेत. ह्या खेरीज सरकारी प्रमुख खात्यांचे प्रतिनिधीहि त्या समितीवर आहेत. परंतु मध्यवर्ती सरकारच्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणासहि त्या समितींत स्थान नाहीं. मध्यवर्ती समितीनें चार उपसमित्यांच्या कामांत मार्गदर्शन करून त्यांचे रिपोर्ट एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलकडे पाठवावयाचे आहेत. मध्यवर्ती, प्रांतिक व संस्थानी सरकारांचे प्रतिनिधी, त्याचप्रमाणें कांहीं व्यापारी, कारखानदार व कामगार पुढारी ह्यांचा उपसमित्यांत समावेश करण्यांत आला आहे. मध्यवर्ती समितीच्या सभासदांची संख्या वाढविण्यापेक्षा, विशिष्ट प्रश्नांवर तज्ज्ञांशीं समितीनें विचारविनिमय करणें अधिक सोईचें होईल, असा हिंदुस्थान सरकारचा अभिप्राय आहे. सर्व उपसमित्यांचे अध्यक्ष सरकारी अधिकारीच आहेत. अशा रीतीनें, पुनर्घटनेच्या कामीं हिंदुस्थान सरकारनें स्वतःवर फार मोठी जबाबदारी घेतलेली आहे. बिगर सरकारी तज्ज्ञ लोकांचें सहकार्य त्या कार्यांत अधिक मिळण्याची व्यवस्था सरकारनें केली असती, तर बरें झालें असतें. अजूनहि, त्यासंबंधांत सुधारणा करतां येणें शक्य आहे.

सैन्यांतून सैनिकांची निवृत्ति झाल्यानंतर त्यांची सोय लावून देण्याचें काम एका उपसमितीकडे आहे, तिचे अध्यक्ष डिफेन्स सेक्रेटरी हेच स्वतः आहेत. औद्योगिक व्यवसायांत निवृत्त, सैनिकांची पोटापाण्याची व्यवस्था करण्याचें काम नीट करण्यास डिफेन्स सेक्रेटरींना मुरब्बी कारखानदारांची मदत घ्यावी लागेल. सप्लाय खात्याचे सेक्रेटरी ह्यांचेकडे, चालू उत्पादनाची गति कमी करून त्याची घडी नीट बसविण्याचें कार्य सोपविलेल्या उपसमितीच्या अध्यक्षत्वाचें काम आहे. युद्धसमाप्तीनंतर वरींच मोठीं बांधकामें हातीं घ्यावीं लागतील, त्यांच्या महत्त्वाचा अनुक्रम इत्यादि ठरविणें हें तिसऱ्या उपसमितिकडे सोपविण्यांत आलेलें आहे. व्यापार आणि शेती ह्यासंबंधांतील प्रश्न चौथ्या उपसमितीनें सोडविण्याचा आहे. आयात, निर्गत, संरक्षणाचें परिमाण, कच्च्या मालाचा उठाव, त्याच्या उत्पादनांत भरमसाट वाढ होऊं न देण्याचा प्रयत्न, इत्यादि प्रश्नांचा विचार चौथ्या उपसमितीनें करावयाचा आहे. ह्या उपसमित्यांचें मार्गदर्शन मध्यवर्ती पुनर्घटना समिति करणार आहे व पुनर्घटना समितीच्या सल्ल्यानें करण्यांत येणाऱ्या सूचनांचा विचार एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल करील. उपसमित्यांच्या चार अध्यक्षांपैकीं तिघेजण एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे सभासद आहेत. अशा रीतीनें, पुनर्घटनेचें महत्त्वाचें काम कांहीं प्रमुख सरकारी अधिकाऱ्यांचे नेतृत्वाखाली चालणार आहे, हें दिसून येईल. हे अधिकारी कितीहि दूरदर्शी, हुषार व कार्यक्षम असले, तरी कार्याच्या दृष्टीनें त्यांचेवर वाजवीपेक्षां अधिक जबाबदारी पडत आहे, असेंच म्हणावें लागतें.

## जागतिक घडामोडींची दिशा

### प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान


अंधेरी येथील इस्माईल युसफ कॉलेजमधलें यंदाचें प्रास्तविक व्याख्यान गेल्या आठवड्यांत प्रो. काळे यांनीं प्रिन्सिपॉल डॉ. रहमान ह्यांच्या अध्यक्षतेखाली दिलें. महत्त्वाच्या जागतिक घडामोडी कोणत्या दिशेनें चालल्या आहेत हें लक्षांत घेऊन सर्वांच्या पुढील कर्तव्याची जाणीव करून देणें हा त्यांच्या व्याख्यानाचा मुख्य उद्देश होता. त्यांच्या भाषणाचा गोषवारा येथें आम्ही देत आहों. आधुनिक शास्त्रांच्या प्रगतीच्या योगानें जग जणूं काय लहान होत चाललें असून त्याच्या एका भागांत घडणाऱ्या गोष्टी व व्यक्त झालेले विचार ह्याचा परिणाम तात्काळ सर्वत्र होतो. प्रस्तुतच्या युद्धासंबंधीं मागील महायुद्धाचे मानानें ह्या विधानाची सत्यता तेव्हांच पेटेल. पंचवीस वर्षांमागच्या युद्धाचे पूर्वी जगांतील प्रमुख राष्ट्रांमध्यें राजकीय अहमहमिका व आर्थिक स्पर्धा जोरानें चालली होती. त्याच्या अखेर राष्ट्रसंघाची स्थापना झाली तेव्हां आंतरराष्ट्रीय सहकारिता व शांततामय राष्ट्रीय प्रगति ह्यांच्या नव्या मनूस प्रारंभ झाल्यासारखें वाटलें. परंतु आंतरराष्ट्रीय वितुष्टानें पुन्हां लवकरच डोकें काढलें आणि सहकार व शांतता ह्यांबाबतचे प्रयत्न निष्फळ झाले. जर्मनीनें युद्धाची व स्वतःचें वर्चस्व जगांत स्थापण्याची खटपट पद्धतशीरपणानें चालू केली आहे. इटली आफ्रिकेंतील स्वतःचें साम्राज्य स्थापण्याच्या मार्गे लागला आणि जपाननें चीनशीं युद्ध मांडलें.

ह्या आंतरराष्ट्रीय फाटाफुटीबरोबर राष्ट्रीय सरकारांस आर्थिक स्वावलंबनाचा आश्रय स्वतःच्या संरक्षणासाठीं करणें प्राप्त झालें. ह्या कारणानें जगाची आंतरराष्ट्रीय सहकाराची आर्थिक घडी विसकटली. जर्मनीची चढाईची तयारी चालू झाल्यानें आणि नाझीपक्षानें जर्मन समाज व आर्थिक घटना ह्यांची रचना त्या दिशेनें चालवल्या कारणानें इतर राष्ट्रांस स्वसंरक्षणासाठीं स्वावलंबनाचे उपाय योजावे लागले. प्रस्तुत युद्धांत वैयक्तिक व राष्ट्रीय स्वातंत्र्य ह्यांचेवर जर्मनी—इटली—जपान ह्या त्रिकुटानें हल्ले चढवले आहेत आणि मनुष्यप्राण व संपत्ति ह्यांच्या नाशाची आपत्ति जगावर आणली आहे. जगांतील राष्ट्रांस स्वतःच्या बचावासाठीं संपत्ति पाण्यासारखी ओतावी लागत आहे आणि राष्ट्रीय कर्जाचे डोंगर वाढत आहेत. उद्योगधंदे व व्यापार केवळ शस्त्रास्त्रें वनवण्याकडे वळवावा लागला आहे ह्या प्रवृत्तीचे आर्थिक, सामाजिक व राजकीय परिणाम काय होतील ह्याची कल्पनाच केली पाहिजे. वैयक्तिक व राष्ट्रीय स्वातंत्र्य ह्यांची जोपासना होऊन आंतरराष्ट्रीय सहकार्य व शांतता ह्यांची स्थापना भक्कम पायावर केली जाईल अशी जागतिक पुनर्घटना बनणें अगत्याचें आहे. ह्या बाबतींत हिंदुस्थानचें स्थान व कार्य कोणतें आहे ह्याचा प्रत्येकानें विचार करण्याची जबाबदारी तुमच्यावर व माझ्यावर, सर्वांचेवर येऊन पडली आहे. सांपत्तिक दृष्ट्या हा देश मागासलेला आहे. त्यास राजकीय व आर्थिक पुनर्घटनेंत योग्य स्थान मिळवण्याचे नेटाचे प्रयत्न झाले पाहिजेत. युद्धामुळें व युद्धोत्तर जी परिस्थिति निर्माण झाली आहे आणि होणार आहे तीमध्यें प्रत्येकानें स्वतःचें कर्तव्य करण्यास चुकतां कामा नये. व्यक्तीचें व राष्ट्राचें स्वातंत्र्य आणि बहुजन समाजाची आर्थिक व सांस्कृतिक स्थिति सुधारण्यासारखी व्यवस्था ह्यांचेविषयीं खबरदारी घेणें जरूर आहे. हिटलरशाहीची जागतिक पुनर्घटनेची कल्पना काय आहे हें सुप्रसिद्धच आहे. ती हाणून पाडणें आणि वैयक्तिक व राष्ट्रीय उन्नतीच्या तत्त्वाचे पायावर जागतिक पुनर्घटनेची उभारणी करणें हें जिव्हाळ्याचें काम सर्वांनीं करावयाचें आहे. त्यास सहाय देण्याची संधि तरुण पिढीस मिळाली आहे, तिचा तिनें पूर्ण उपयोग केला पाहिजे.

---

## शत्रुपक्षीयांचे देशांतील नातेवाइकास पत्र कसें लिहावें ?

रेड क्रॉस पोस्टल मेसेज सर्व्हिसमार्फत शत्रुपक्षीयाचे देशांतील नातेवाइकांस पत्र पाठवितां येतें. मात्र हे नातेवाइक युद्धकैदी अथवा नजरकैदेंत ठेवलेले नागरिक असतां कामा नयेत. बेल्जम, झेकोस्लोव्हाकिया, डॅन्झिग, डेन्मार्क, जर्मनी, हॉलंड, इटली, इटलीच्या अंकित देश, लक्झेंबर्ग, नॉर्वे, पोलंड, चॅनेल आयलंड्स व जर्मनीनें व्यापलेला फ्रान्स ह्या देशांकडे पत्रें पाठविण्याची व्यवस्था आहे. वॉर सप्लाइज डेपो, टॉउन हॉल, मुंबई येथें अधिक माहिती मिळेल. पाठविण्याच्या पत्रांत फक्त वैयक्तिक व घरगुती मजकूरच असला पाहिजे; व्यापारविषयक तो असतां कामा नये व त्यांतून पैसे पाठवितां कामा नयेत. मजकूर इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटॅलियन, नॉर्वेजिअन, डॅनिश अथवा डच भाषेंत पाहिजे व त्याचें इंग्रजींत भाषांतर त्यास जोडलेलें असलें पाहिजे. पत्रांत फक्त २५ शब्दांचाच मजकूर लिहितां येईल. पत्र ठराविक फॉर्मवरच लिहिलें पाहिजे व त्यावर पत्र पाठविणाराचें व घेणाराचें संपूर्ण नांव व पत्ता लिहिला पाहिजे. पत्र पाठविणाराचें तें घेणाराशीं असलेलें नातें स्पष्ट केलें पाहिजे व त्याविषयीं समाधानकारक खुलासा केला पाहिजे. आजोबा, आजी, आई, पति, पत्नी, मूल, नातू, बंधु, बहीण, काका, मामा, काकी, मामी, व ज्याच्याशीं लग्न ठरलें आहे, असा प्रत्यक्ष इसम ह्यांचा नातेवाइकांत समावेश होतो. रेडक्रॉस पोस्टल मेसेज सर्व्हिस हें पत्र एका स्वतंत्र पाकिटांत घालून तें इंटर नॅशनल रेडक्रॉस ब्यूरो, जिनिव्हा ह्या पत्त्यावर धाडील व तेथून तें नातेवाइकाच्या पत्त्याकडे रवाना होईल. पोस्टाचा व इतर किरकोळ खर्च रेडक्रॉस ब्यूरोला तें पत्र पाठविणारानें दिला पाहिजे.


व्हॉलीबॉल्स, टेनिकॉइट रिंग्ज्, बॅडमिंटनचीं फुलें, कॅरमबोर्डस्, पत्ते, पी. टी. शूज्, पिंगपाँग बॅटस्, बॉल्स, वगैरे सामान किफायतशीर रीतीनें मिळण्याचें एकमेव ठिकाण म्हणजे—

**साठे-स्पोर्टस्,**

डेक्कन जिमखाना पोस्टाजवळ, पुणें ४.

# स्फुट विचार

### रोख्यांच्या अदलाबदलीचा निकाल

स्टर्लिंग रोख्यांच्या बदल्यांत देण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें त्यांच्याच मुदतींचे व व्याजाच्या दराचे स्वतःचे रोखे काढले होते. त्यापैकीं ४½ टक्के दरांच्या दोन प्रकारांच्या रोख्यांच्या मोबदल्यांत ३ टक्के दरांचे आपले मामुली रोखे देण्याची योजना गेल्या १६ ते २१ तारखांच्या अवधींत अमलांत आणण्याचें सरकारनें जाहीर केलें होतें. त्याप्रमाणें ज्यांनीं स्टर्लिंग रोख्यांच्या जागीं काढलेले रोखे तात्पुरते घेतले होते, त्यांस त्यांचें रूपांतर ३ टक्क्यांच्या रोख्यांत करून घेण्याची संधि देण्यांत आली. कोणत्या प्रमाणांत रोख्यांची ही अदलाबदल झाली ह्या विषयींचे आकडे रिझर्व्ह बँकेनें आतां प्रसिद्ध केले आहेत, ते असेः—

४½% १९५०–५५ चें रूपांतर ३% १९५१–५४ मध्यें रकम= १५ कोटि, १६ लक्ष रुपये.

४½% १९५८–६८ चें रूपांतर ३% १९६३–६५ मध्ये रकम= १३ कोटि, ४० लक्ष रुपये.

ह्या रीतीनें सुमारें २८½ कोटि रुपयांच्या ३% रोख्यांत अदलाबदल होऊन तितके तात्पुरते काढलेले रोखे सरकारनें हाता-वेगळे केले आहेत. स्वतः जवळचे व रिझर्व्ह बँकेकडून आलेले बाकीचे कामचलाऊ रोखे सरकारनें रद्द करून टाकले आहेत. हे रोखे निरनिराळ्या मुदतींचे व व्याजाच्या दरांचे ( स्टर्लिंग रोख्यांच्या जागीं काढलेले ) होते. ह्या रद्द केलेल्या रोख्यांचे आकडे खाली दिल्याप्रमाणें आहेतः—

५% १९४२–४७ = सुमारें १० कोटि, ७३ लक्ष रुपये.
४% १९४८–५३ = सुमारें ९ कोटि, ४८ लक्ष रुपये.
३% १९४९–५२ = सुमारें ४ कोटि, १४ लक्ष रुपये.
४½% १९५०–५५ = सुमारें २१ कोटि, ७६ लक्ष रुपये.

ह्यांच्या किंमतीची एकूण बेरीज सुमारें ४६ कोटि होते, आणि वर नमूद केलेले २८½ कोटि रुपयांचे रोखे त्यांत मिळवले म्हणजे सुमारें ७५ कोटि रुपयांचा हिशेब होतो. तात्पुरत्या काढलेल्या रोख्यांपैकीं बहुतेकांची ह्याप्रमाणें कायमची व्यवस्था आतां लागली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. बाकी थोड्या राहि-लेल्या रोख्यांचा जरूरीप्रमाणें मोबदला करण्याची सवड सरकारनें लोकांस ठेवलीच आहे.

---

### मँगेनीजचा पुरवठा

जगांतील निरनिराळ्या देशांत मिळून १९३८ सालीं ५८ लक्ष टन इतकें मँगेनीज धातूचें उत्पादन झालें होतें. ह्यापैकीं सुमारें निम्में रशियांत झालें. काळ्या समुद्राच्या मार्गानें त्याची निर्गत परदेशांत होत असे. त्या बाजूस आतां युद्ध चालू झाल्यानें आणि रशियास त्यामध्यें पडावें लागल्याकारणानें हा पुरवठा तात्पुरता बंद होणार आहे. मँगेनीज धातूचा उपयोग पोलादाच्या कारखान्यांत होतो. तथापि, इंग्लंड किंवा अमेरिका ह्यांस रशियन मँगेनीजच्या पुरवठ्यावर अवलंबावें लागत नाहीं ही गोष्ट समाधानकारक आहे. गेल्या पंचवीस वर्षांत ब्रिटिश साम्राज्यामध्यें मँगेनीजचें उत्पादन वाढलें आहे. हिंदुस्थानांत १५लक्ष टनांइतकें वार्षिक उत्पादन होतें. गोल्ड कोस्ट, दक्षिण आफ्रिका, मलाया, इजिप्त इत्यादि देशांतून मँगेनीज इंग्लंडला मिळूं शकतें. ब्रॅझिल, क्यूबा वगैरे देशांत मँगेनीज निघतें आणि त्याचा पुरवठा तेथून अमेरिकेस होऊं शकतो. कांहीं वर्षामागें रशियन मँगेनीज मोठ्या प्रमाणांत अमेरिकेंत जात असे. परंतु अलीकडे ह्या धातूचा पुरवठा जगांतील इतर निरनिराळ्या ठिकाणांहून होऊं लागला आहे. मँगेनीजच्या पुरवठ्याचे बाबतींतलें हिंदुस्थानचें महत्त्वाचें स्थान ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

---

### वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि.

३१ डिसेंबर, १९४०रोजीं संपणाऱ्या वर्षांतील वरील कंपनीच्या कामाचा अहवाल आमचेकडे आला आहे. ह्या वर्षी कंपनीनें एकूण ६६½ लक्ष रुपयांचे विमे दिले, त्यांच्या वार्षिक हप्त्यांची रकम ३ लक्ष, ४८ हजार रुपये भरते. चालू युद्धाचा वाढता व्याप व नवीन विमा कायद्याच्या कांहीं जाचक अटी, ह्यांमुळें मुख्यतः कामांत घट झाली असली, तरी वेस्टर्न इंडियाच्या भक्कम परिस्थितीमुळें लवकरच तिचे कामांत चांगली वाढ होईल अशी अपेक्षा करण्यास प्रत्यवाय नाहीं. अहवालाचे वर्षी कंपनीचा विमा खातीं फंड १६ लक्ष, ४६ हजारांनीं वाढून तो १ कोटि, २८ लक्ष रुपये झाला. कंपनीजवळील रोख्यांच्या हिशेबी नोंदलेल्या किंमतीपेक्षा त्याची बाजारभावानें होणारी किंमत सुमारें १२ लक्ष रुपये अधिक आहे. परंतु ती हिशेबांत धरलेली नाहीं; वेस्टर्न इंडियाच्या सुस्थितीचें तें निदर्शक आहे. १९४० सालीं कंपनीचे लाइफ फंडावर ४·३२% व्याज पडलें; १९३९ सालीं तें ४·५९% पडलें होतें, परंतु १९३८ अखेरच्या मूल्यमापनांत फक्त ४% दर गृहीत धरलेला असल्यामुळें, कंपनीस मिळत असलेला व्याजाचा दर अपेक्षित दरापेक्षा अधिकच आहे. १९३९ सालीं कंपनीचें खर्चाचें प्रमाण २४.७२% होतें तें अहवालाचे वर्षी २२.५१% झालें. काटकसरीच्या कारभाराबद्दल कंपनीचा लौकिक कायम राहिला आहे. कंपनीच्या रिझर्व्ह व इतर फंडांत मिळून ६ लक्ष, १२ हजार रुपये आहेत. डिव्हिडंड ईकलायझेशन फंडांत ६४ हजार रुपये आहेत. त्यांतून १९४० सालाचें २०% दरानें इन्कम टॅक्स धरून डिव्हिडंड देण्यांत आलें आहे. कंपनीनें पुरस्कार केलेली युनायटेड वेस्टर्न बँकहि चांगली प्रगति करीत आहे. हिंदी अग्रेसर कंपन्यांत मानाचें स्थान मिळविलेल्या वेस्टर्न इंडिया कंपनीची सर्वांगीण प्रगति अभिमानास्पद आहे.

---

### जर्मनीची रशियन मोहीम

कांहीं तरी कुरापत काढून जर्मन सैन्यें हिटलरनें रशियामध्यें घुसवलीं, त्याचा हेतु आपलें शक्तिसर्वस्व माजी दोस्तावर एक-वटून जर्मनीची पूर्वेच्या बाजूची सरहद्द बळकट करावयाची व मिळेल तेवढा त्याचा मुलूख गिळून स्वस्थ बसावयाचें हा आहे, असें उघड दिसतें. प्रस्तुतची लढाई जर्मनी, रुमानिया व रशिया ह्यांच्या सबंद सरहद्दीवर चालली असून फिनलंड, रुमानिया, हंगेरी ह्या देशांवर दडपण आणून त्यांच्या सहायानें हिटलरनें ती चाल-वली आहे. उत्तर, दक्षिण व ह्या दोहोंमधील सरहद्दीचा भाग ह्या तिन्हीं ठिकाणीं जर्मनी रशियांत घुसूं पहात आहे. जर्मनीची स्वारी अगोदर तयारी केलेली आणि विमानें, रणगाडे ह्यांनीं सुसज्ज अशी असल्याकारणानें रशियन सेनानींस ती सरहद्दीच्या सर्व भागांत थोपवून धरणें शक्य झालें नसल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. उत्तरेच्या भागांत व जुन्या पोलंडमध्यें जर्मन फौजांची प्रगति झपाट्यानें होऊन रशियाच्या स्वतःच्या

मुलुखांत त्या शिरल्या असल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत त्यांचें रहस्य सहज लक्षांत घेण्यासारखें आहे. रशियाचें आतोनात नुकसान आपण केलें असल्याविषयींच्या बढाया जर्मनीचीं ध्वनि-क्षेपक यंत्रें मारीत आहेत. एक आठवडाभर युद्धाच्या हालचालींच्या हकीकती जर्मनीमध्यें प्रसिद्ध करण्यांत आल्या नाहींत आणि आठ दिवसांनीं एकदम आपल्या विजयाचीं भडक चित्रें जर्मन अधिकाऱ्यांनीं मोठ्या थाटानें रंगवलीं आहेत; ह्यावरून हिटलरच्या अपेक्षेप्रमाणें लढाईंत जर्मन सैन्याची गति झालेली नाहीं आणि रशियानें त्याची पुष्कळ हानी केली आहे असें अनुमान सहज निघतें. लढाईच्या प्रारंभीं थोडेबहुत यश मिळालें तरी रशियाचा पराभव करून त्या राष्ट्रास निस्तेज करून टाकणें आपणांस शक्य नाहीं ह्याची जाणीव जर्मन लोकांस झालीच असली पाहिजे. प्रस्तुत लढाईचा निर्णयात्मक आणि निश्चित परिणाम घडून येण्यास बराच काळ लोटावा लागेल.

---

### सुकी केळीं आणि इंग्लंड

युद्धामुळें समुद्रावरील वहातुकीचा प्रश्न बिकट झाला नव्हता तेव्हां इंग्लंडमध्यें केळयांच्या घडांची मायात फार मोठ्या प्रमाणावर होत असे. परंतु व्यापारी जहाजांतल्या जागेची काटकसर करणें आणि लोकांच्या जीवितास अत्यावश्यक अशा खाद्य व पेय पदार्थांस अग्रतेचें स्थान देणें ब्रिटिश सरकारच्या अन्ननियंत्रण खात्यास प्राप्त झालें आहे. शत्रूच्या कारवायांमुळें वहातुकीच्या जहाजांस धोका उत्पन्न झाला असल्यानें नाविक जागेचा उपयोग हात राखूनच करावा लागत आहे. अन्नसामुग्रीमध्यें ज्या पदार्थांस महत्त्व द्यावयाचें त्यांत केळयांची प्रत बरीच खालीं लागते. ह्यामुळें केळयांच्या आयातीवर इंग्लंडमध्यें सरकारी निर्बंध बसला आहे. जमेका व कॅमेरून्स ह्या वसाहतींत केळयांचें पीक वाया जात आहे आणि त्यांचा उपयोग इंग्लंडला करतां येत नाहीं. ह्या परिस्थितीवर असा उपाय सुचवण्यांत आला आहे कीं केळयांच्या घडांचे ऐवजीं त्यांचीं सुकीं केळीं बनवलीं जाऊन तींच इंग्लंडमध्यें आयात करावीं. त्यांस जहाजांमध्यें फार थोडी जागा पुरते आणि त्यांस बर्फांत घालून नेण्याची आवश्यकता नाहीं. खाद्यपदार्थ म्हणून सुक्या केळयांस महत्त्व नाहीं असें नाहीं. सुकी केळीं बनवण्याची कृतीहि सोपी आहे. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतां केळयांच्या इंग्लंडमधील आयातीचा प्रश्न युद्धपरिस्थितींत समाधानकारक रीतीनें सोडविण्याबाबतची करण्यांत आलेली सूचना अन्नपुरवठा खात्यास पटण्यासारखीच आहे.

---

### हिंदी पार्श्वभूमीवरील छोटे चित्रपट

हिंदी पार्श्वभूमीवर कांहीं छोट्या सिनेमा फिल्म्स घेण्याकरितां मि. लँकेस्टर हे हिंदुस्थानांत आले आहेत. " मार्च ऑफ टाइम्स " ह्या नांवाच्या छोट्या फिल्म्स तयार करणारी कंपनीच हिंदुस्थानांत हे चित्रपट काढणार आहे. " मार्च ऑफ टाइम्स " चे चित्रपट जगांतील १२ हजार सिनेमागृहांत दाखविले जातात, ह्यावरून त्याचें शैक्षणिक महत्त्व ध्यानांत येईल.

### जर्मन सैनिकांस स्वीडनमधून वाट

कांहीं जर्मन सैनिक नॉर्वेमधून फिनलंडला स्वीडनमार्गें पाठविण्यास स्वीडिश सरकारनें अनुमति दिली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

### कॉमनवेल्थ विमा कंपनी लि.

कोर्टांतील दाव्याचा निकाल अखेर कंपनीविरुद्ध झाला, तर ह्या सभेंतील काम रद्द समजलें जाईल, अशा अर्थाचा ठराव वार्षिक सभेनें मंजूर केल्यास सभेचें काम पुढें चालण्यास हरकत नाहीं असा डिस्ट्रिक्ट कोर्टानें हुकूम केल्यानंतर कॉमनवेल्थची वार्षिक साधारण सभा ता. २२ जून रोजीं भरली होती. उपरिनिर्दिष्ट ठरावावरील मतमोजणीचा निकाल जाहीर होऊन वरील ठराव मंजूर झाल्यास पुढें काम चालविण्याकरितां ह्या सभेचें काम २९ जूनपर्यंत तहकूब केलेलें होतें. त्याप्रमाणें तहकूब सभा ता. २९ जून रोजीं भरली. डिस्ट्रिक्ट कोर्टानें पाठविलेला ठराव मंजूर झाला असल्याचें अध्यक्षांनीं प्रारंभीं जाहीर केलें व नंतर डायरेक्टरांचा रिपोर्ट व ताळेबंद ह्यांस सभेनें मान्यता दिली. पाळीप्रमाणें निवृत्त होत असलेले तिघे डायरेक्टर पुनः निवडले गेले. इंटेरिम बोनसचा दर ठरविण्यांत आला व कंपनीच्या माजी मॅनेजिंग एजंटावर फौजदारी करण्यांत येऊं नये, अशा अर्थाची शिफारस सभेनें डायरेक्टर बोर्डास केली. नंतर ऑडिटरांचीहि निवड झाली आणि सभेचें काम संपलें.

---

### युद्धसामुग्री देऊं, पण जर्मनीचा प्रतिकार करणार असाल तर

आयर्लंडनें अमेरिकेकडे युद्धसामुग्रीची मदत मागितली आहे, परंतु जर्मनीनें हल्ला केला तर आयर्लंड त्याचा प्रतिकार करील, असें आश्वासन अमेरिकेस आयर्लंडकडून अद्याप मिळालेलें नाहीं. तें मिळाल्याखेरीज युद्धसामुग्री पाठवितां येणार नाहीं, असें प्रेसिडेंट रूझवेल्ट नुकतेच एका मुलाखतींत म्हणाले.

---

श्रीमंती न्यायाची असते काय ?
कोंकणच्या सुंदर पार्श्वभूमीवरील
नवयुग चित्र—
अमृत
दिग्दर्शक : विनायक
लेखक : खांडेकर
छाया : पां. नाईक
मिनर्व्हा, पुणें—
६ वा आठवडा

## मुंबई प्रांतांतील जमीन गहाणाच्या बँका

१९३९-४० अखेर मुंबई प्रांतांत एकूण १७ जमीन गहाणाच्या बँका चालू होत्या; ह्या वर्षी तीन नवीन बँका नोंदण्यांत आल्या व आणखी दोन बँकांची पूर्वतयारी झाली होती. परंतु आहेत त्या बँकांची परिस्थिति सुधारल्याविना नवीन बँका न काढण्याचें धोरण सरकारनें अंगिकारल्यामुळें त्या योजनांची पुढें प्रगति झाली नाहीं.

बँकांच्या सभासदांच्या एकूण संख्येंत वाढ होऊन ती ९,०९५ ची १०,२८४ झाली. सभासदांकडील येणें कर्जाचा आकडा २० लक्ष, ९१ हजार रुपयांचा २६ लक्ष, २९ हजार झाला. १९३९-४० सालीं प्राथमिक सहकारी लँडमॉर्गेज बँकांकडे कर्जमागणीचे एकूण १,०८३ अर्ज आले, त्यापैकीं ६०५ अर्ज प्रांतिक बँकेकडे मंजुरीसाठीं पाठविण्यांत आले. पश्चिम खानदेश बँकेचें सभासदांकडील येणें कर्ज सर्वांत अधिक म्हणजे ४ लक्ष, ११ हजार रुपये आहे. पुणें जिल्ह्याच्या बँकेच्या सभासदांकडे तिचे २ लक्ष, ५० हजार रुपये आहेत. धारवाड आणि पाचोरा ह्या दोन जुन्या बँकांची थकबाकी अतिशय मोठी आहे. नव्या बँकांपैकीं पुणें जिल्ह्याच्या बँकेची थकबाकी (२०,२०१ रुपये) उल्लेखनीय आहे. "प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांच्या सभासदांनीं परतफेड वक्तशीर करण्यावरच त्या बँकांचें यश अवलंबून आहे. ह्या प्रांतांतील बँकांचें व्यवहारक्षेत्र साधारणतः फार मोठें असतें व त्यांचेजवळ वसुली करण्याची स्थानिक व्यवस्था असते. नियमबाह्य थकलेल्या हप्त्यांच्या वसुलीसाठी त्यांस विशेष अधिकार देण्याची गरज भासूं लागली आहे." १९३९-४० सालीं धारवाड, भडोच व पुणें येथील बँकाखेरीज बाकीच्या सर्व बँकांनीं नफा दाखविला. प्राथमिक बँकांच्या तडजोड बोर्डानीं ह्यावर्षी तडजोडीमध्यें १ लक्ष, ३६ हजार रुपयांची सूट कर्जदारांस मिळवून दिली. "सावकारास आपणांपुढें हजर होण्यास लावण्यास व त्यांस त्यांचे हिशेब व कागद दाखविण्यास सांगण्यास ह्या बोर्डास कायदेशीर अधिकार नसल्याकारणानें त्यांच्या कामांत बराच व्यत्यय येतो."

प्रांतिक लँडमॉर्गेज बँकेजवळ प्राथमिक लँडमॉर्गेज बँकांस देण्यास चार महिने पैसेच शिल्लक नव्हते; त्यामुळें व ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्टामुळें आपणांस अधिक सवलती मिळतील अशी शेतकऱ्यांची समजूत झाल्यामुळें १९३९-४० मध्यें लँडमॉर्गेज बँकांचा व्यवहार फार झालेला दिसून येत नाहीं. प्रांतिक लँडमॉर्गेज बँकेचें वसूल भांडवल १९३९-४० अखेर ४ लक्ष, ४६ हजार रुपये झालें. ह्या बँकेनें प्राथमिक बँकांना एकूण ६ लक्ष, ७ हजार रुपये दिले, त्यांचा तपशील असाः—

| कर्जाचा उद्देश | कर्जांची संख्या | रकम (रु.) |
|---|---|---|
| जुन्या कर्जाची फेड | ४१८ | ५,९२,२५० |
| जमिनींची खरेदी | ४ | ६,५०० |
| जमीनसुधारणा | ८ | ६,९०० |
| संयुक्त उद्देश | ३ | १,८०० |
| | ४३३ | ६,०७,४५० |

जमिनींच्या सुधारणेसाठीं कर्जमागणी येत नाहीं, ह्यासाठी जमीन सुधारण्यासाठीं देण्यांत यावयाच्या कर्जावरील व्याजाचा दर थोडा कमी ठेवण्यांत आला आहे. प्रांतिक बँकेची मुद्दलाची वसुली ७७·५% व व्याजाची वसुली ९८·१% झाली. थकबाकीपैकी बराच मोठा भाग (१६,८०१ रुपये) पुणें जिल्हा बँकेचा आहे. मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या लँडमॉर्गेज खात्याकडील जिंदगी–कर्जे मुंबई प्रांतिक सहकारी लँडमॉर्गेज बँकेकडे वर्ग करण्याचें काम चालू आहे. अल्प व्याजाच्या दरानें दीर्घ मुदतीचीं कर्जे मिळण्यावर लँडमॉर्गेज बँकांची प्रगति अवलंबून आहे. युद्धपरिस्थितीमुळें प्रांतिक बँकेचा डिबेंचर्सवरील व्याजाचा दर वाढला व त्यामुळें ह्या बँकेस व प्राथमिक बँकांसहि आपल्या कर्जावरील व्याजाचा दर वाढवावा लागला आणि परतफेडीची मुदतहि २० वर्षांची १५ वर्षे करावीं लागलीं. ह्या कारणानें कर्जाचा व्यवहार थोडा आखडला गेला आहे.

## मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीचा अहवाल (१९३९-४०)

बरसातीच्या अनिश्चितपणामुळें पावसाच्या पाण्याची सर्व भागांत सारखी वाटणी झाली नाहीं व या गोष्टीचा गुजराथेंतील कांहीं भागांत अतिशय अनिष्ट परिणाम झाला हें खरें असलें तरीहि मोसम एकंदरींत समाधानकारक होता. युरोपांत युद्ध उद्भवल्यावर लौकरच इकडे बाजारभावांत वाढ होण्याचा रंग दिसूं लागला आणि या वाढीमुळें शेतकऱ्यांना चांगला भरीव फायदा होईल अशी अपेक्षा होती; पण ही अपेक्षा पूर्णपणें फलद्रूप झाली नाहीं. कारण, तेजीच्या काळाच्या मागोमाग मंदीचा काळ आला आणि त्याचा अपरिहार्य परिणाम असा झाला कीं, अधिक चांगल्या किंमती येण्याच्या आशेनें ज्यांनीं माल सांठवून ठेवला होता अशा कांहीं शेतकऱ्यांना अखेर तो कमी किंमतीला विकून टाकावा लागला. अशा प्रकारची परिस्थिति असूनहि व देण्यांच्या वसुलीस प्रतिबंधक अशीं दुसरीं कित्येक कारणें घडलीं असूनहि यां वर्षी शेतकऱ्यांच्या क्रेडिट सोसायट्यांच्या वसुलींत गेल्या वर्षाच्या मानानें १५ लक्ष रुपयांची वाढ झाली. अलीकडे तीन वर्षांपेक्षां जास्त मुदतींत सोसायट्यांस येणें असलेल्या रकमांची फेड करवून घेण्याची जी क्रिया चालू आहे तिला या गोष्टीचें बरेचसें श्रेय आहे. मागील वर्षाच्या मानानें कर्जाच्या एकूण रकमेंत ५ लाख रुपयांची घट झाली व थकबाकीच्या आंकड्यांत १० लाख रुपयांची घट झाली. या गोष्टीवरून शेतकरी वर्गाची पत वाढविण्याची चळवळ हळूहळू सुदृढ होत चालल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. नवीन गुंतविलेलें भांडवल रु. ६०,६८,८३७ झालें म्हणजे गेल्या वर्षाच्या मानानें त्यांत दोन लाख रुपयांची घट झाली; याचें एक कारण असें कीं भांडवल पुरविणाऱ्या मध्यवर्ती संस्था व सोसायट्या यांनीं सावधगिरीचें धोरण ठेवलें आणि दुसरें असें कीं सभासदांना नवीन भांडवल पुरवितांना शेतीविषयक चालू गरजा भागविण्याकडे प्रथम लक्ष देण्यांत आलें. बँकांची शिल्लक कर्जे, सभासदांच्या अनामत रकमा व इतर बाहेरच्या जबाबदाऱ्या यांमधील घटीमुळें एकूण खेळतें भांडवलहि घटलें, तरीहि रिझर्व्ह व इतर फंड व नफा यांबाबतींत या वर्षी समाधानकारक वाढ झाली.

## हिंदी साखरेचे कारखाने

### १९४०-४१ चा मोसम

१९४०-४१ च्या मोसमांतील हिंदी साखर कारखान्यांतील साखरेच्या उत्पादनाचा अंदाज १०.८ लक्ष टन इतका आहे. संयुक्त प्रांत व बिहार येथें साखरेच्या उत्पादनावर नियंत्रण होतें, त्यामुळें तेथील कारखान्यांनीं डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी व मार्च ह्या महिन्यांतच ऊंस गाळला. कारण ह्या महिन्यांत साखरेचा उतारा चांगला मिळतो.

१९४०-४१ मधील उत्पादनाचा अंदाज

| प्रांत | कारखाने | गाळलेला ऊंस | तयार साखर | उतारा |
|---|---|---|---|---|
| | | टन | टन | |
| संयुक्त प्रांत | ७० | ५,१७५,७०० | ५१०,२०० | ९.८५ |
| बिहार | ३२ | २,४७२,६०० | २४५,४०० | ९.९२ |
| पंजाब, सिंध, सरहद्द प्रांत | ४ | २३१,४०० | २०,७०० | ८.९४ |
| मद्रास | १० | ४२८,१०० | ३९,८०० | ९.३० |
| मुंबई | ८ | ८४९,५०० | ८६,२०० | १०.१५ |
| बंगाल व आसाम | ९ | ५८४,००० | ५०,००० | ८.५६ |
| ओरिसा | २ | ३४,२०० | ३,००० | ८.७७ |
| हिंदी संस्थानें | १२ | १,३२३,९०० | १२७,२०० | ९.६० |
| एकूण | १४७ | ११,०९९,४०० | १,०८२,५०० | ९.७५ |
| ब्रह्मदेश | ३ | २८४,८०० | २९,२०० | १०.२५ |

## निजाम संस्थानची शिरगणति

संस्थानची एकूण लोकसंख्या आतां १६,१९४,३१३ आहे. ती १९३१ सालीं १४,४३६,१४८ होती. त्यांत १२.२ टक्क्यांनीं वाढ झाली आहे.

* * *

पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी आहे. पुरुषांची व स्त्रियांची संख्या अनुक्रमें ८,२६२,२७० व ७,९६२,०४३ आहे.

* * *

हैद्राबाद शहराच्या लोकसंख्येंत सर्वांत विशेष वाढ झाली आहे. आतां या शहराची लोकसंख्या ७२८,४१९ असून ती सन १९३१ च्या लोकसंख्येपेक्षां २६१,५२५ नीं अथवा ५६.५ टक्क्यांनीं वाढली आहे.

* * *

१,०००,००० वर लोकसंख्या असलेले पुढील जिल्हे आहेत. करीमनगर ( १,३५४,२०८ ); गुलबर्गा ( १,३०७,९४५ ); वरंगल ( १,३०४,३८२ ); नलगोंडा ( १,२७२,१४३ ); महबूबनगर ( १,०७७,११४ ); औरंगाबाद ( १,०६१,४०४ ); रायचूर ( १,०३१,७०९ ); आणि बिदर ( १,००६,३६५ ).


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

## गिरणी कामगारांच्या चाळी

गिरणी कामगारांस रहाण्यासाठीं स्वस्त व चांगली जागा मिळणें आवश्यक आहे. २० वर्षांपूर्वींच इंडियन इंडस्ट्रिअल कमिशननें ह्या प्रश्नाचा विचार करून त्यासंबंधांत सुधारणा होण्याचें महत्त्व प्रतिपादलें आहे. राहाण्याची जागा व आरोग्य ह्यांचा संबंध निकटचा आहे आणि आरोग्यावर कामगारांची तत्परता व कार्यक्षमता अवलंबून रहाते. जपान व हिंदुस्थान ह्या दोन देशांतील कामगारांची तुलना करतेवेळीं त्या दोन ठिकाणच्या कामगारांना रहाव्या लागणाऱ्या बिऱ्हाडांतील फरक बहुधा लक्षांत घेतला जात नाहीं. हिंदी मजुरांच्या परिस्थितीची चौकशी करण्याकरितां रॉयल कमिशनची नेमणूक झाली होती. त्या कमिशननें दाखवून दिलेल्या सुधारणेच्या गोष्टींकडेहि लक्ष दिलें गेलेलें नाहीं. मुंबई व अहमदाबाद येथें ज्या मानानें कामगारांची संख्या वाढली त्या मानानें त्यांच्या रहाण्याची सोय झालेली नाहीं. भाडें कमी झालेलें नाहीं व सोईचा अभाव कायम आहे. सोलापूर येथें भाडें कमी असलें तरी बाकीच्या तक्रारी तेथें आहेतच. गिरण्यांच्या वेगवेगळ्या केंद्रांत गिरणी मालकांनीं आपल्या कामगारांच्या रहाण्याची काय सोय केलेली आहे, हें खालील तक्ता दाखवितो.

**गिरणी कामगारांच्या रहाण्याची सोय मालकांनीं किती केली ?**

| केंद्र | रहाण्याची व्यवस्था करणाऱ्या मालकांची संख्या | बिऱ्हाडांची संख्या | त्यांपैकी एक खोलीवालीं बिऱ्हाडें |
|---|---|---|---|
| मुंबई | २१ | ४,३०१ | ३,३५४ |
| अहमदाबाद | २८ | २,७४९ | २,२८२ |
| सोलापूर | ५ | १,५४७ | १,२३८ |
| अमळनेर | १ | २६६ | २६६ |
| धुळें | १ | ३३५ | ३१५ |
| बार्शी | १ | ११६ | ११६ |
| टिकेकरवाडी | १ | ७० | ७० |
| गोकाक | १ | १,२३० | …… |
| हुबळी | १ | २५६ | २५६ |
| गदग | १ | ४० | ४० |

मुंबई शहरांतील गिरण्यांच्या चाळी बहुधा एका खोलीच्या बिऱ्हाडांच्या आहेत. १६६ चाळींपैकीं १०१ चाळींत नहाणी आहेत व १०३ चाळींत खोल्यापुढें सज्जे आहेत. एका गटांतील ५०४ खोल्यांच्या बिऱ्हाडांतून विजेचे दिवे आहेत. बाकीच्या चाळींत फक्त जाण्यायेण्याच्या वाटांवर व जिन्यांत विजेचे दिवे आहेत. बहुतेक खोल्या १० फूट लांब व १० फूट रुंद अथवा १५ फूट लांब व १२ फूट रुंद असून त्यांचें मासिक भाडें ३ ते ५ रुपये पडतें. एका बिऱ्हाडांत सरासरीनें ३ ते ४ लोक रहातात. एकूण १५८ चाळी बांधण्यास ५७ लक्ष रुपये खर्च आला. त्यावर दरसाल सरासरीनें १·३% ते ३% व्याज सुटतें. ४% वर व्याज कोठल्याच चाळीस सुटत नाहीं. सोलापूर येथील बहुतेक सर्व गिरण्यांच्या थोड्याफार चाळी आहेत. तेथें प्रत्येक खोलीचें भाडें साधारणतः १ रु. ८ आ. पडतें. गोकाक मिलसनें आपल्या कामगारांसाठी केलेली बिऱ्हाडांची व्यवस्था सर्वांत उत्कृष्ट आहे. तेथील १२३० बिऱ्हाडांपैकीं १०८१ दोन खोल्यावालीं व १४९ तीन अगर जास्त खोल्यावालीं आहेत. विरमगांव येथील एका गिरणीच्या चाळींतील व्यवस्था सबंध मुंबई प्रांतांत अत्यंत वाईट आहे.

सर्व तऱ्हेचें कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
'पायोनियर डाइंग हाऊस'
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

रक्तवर्धक




अत्यंत शक्तिवर्धक
रक्तवर्धक
आयुर्वेद रसशाळा
पुणें लि. पुणें ४.

मधुमेहावरील औषध




तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११९—८ |
| ४% १९४३ | १०४–४ |
| ३½% बिनमुदत | ९६–१ |
| ३½% १९४७–५० | १०२–१२ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९५-०-६ |
| २¾% १९४८–५२ | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०८–१४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०८—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११५-५-४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२७—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४६—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११०—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४५—४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५८३—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०६—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% | १३२–१२ |
| कराची ( १०० ) ९% | २१३–१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१३–१२ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १५८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १६२०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% | ६४—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८९२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६४६—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २०२—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४५—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २०–१० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ४५–१४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४२३०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१५–१० |
| टाटा आयर्न डु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १५४—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३७७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १४३ रु.१४ आ. ७ पै. | ११६०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १४१–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२–२–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६३–०–६ |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं

असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव्ह् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग

९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( ,, सातारा ) | १९ विरमगांव ( ,, अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( ,, ,, ) | २० धुळें ( ,, प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( ,, ,, ) | २१ दोंडाईचें ( ,, ,, ) |
| ५ तासगांव ( ,, ,, ) | २२ शिरपूर ( ,, ,, ) |
| ६ किर्लोस्करवाडी( ,, ,, ) | २३ शहादें ( ,, ,, ) |
| ७ शिराळें ( ,, ,, ) | २४ नंदुरबार ( ,, ,, ) |
| ८ कोरेगांव ( ,, ,, ) | २५ साक्री ( ,, ,, ) |
| ९ वाई ( ,, ,, ) | २६ शिंदखेडें ( ,, ,, ) |
| १० अहमदनगर ( ,, अहमदनगर ) | २७ तळोदें ( ,, ,, ) |
| ११ शेवगांव ( ,, ,, ) | २८ मालेगांव ( ,, नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( ,, ,, ) | २९ सटाणा ( ,, ,, ) |
| १३ बेलापूर ( ,, ,, ) | ३० कळवण ( ,, ,, ) |
| १४ राहुरी ( ,, ,, ) | ३१ लासलगांव ( ,, ,, ) |
| १५ भिवंडी ( ,, ठाणें ) | ३२ नांदगांव ( ,, ,, ) |
| १६ पालघर ( ,, ,, ) | ३३ दोहद ( ,, पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( ,, ,, ) | ३४ कालोल ( ,, ,, ) |

**या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात**

आणि

**इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.**

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व चकचकीत
ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
परांडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

# महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख ९ जुलै, १९४१ | अंक २८

निरनिराळ्या जिल्ह्यांत मुख्य ठिकाणीं व निरनिराळया केंद्रांवर प्रमुख एजंट व प्रतिनिधी पाहिजे आहेत. अर्ज त्वरित करावेत.

# महाराष्ट्राची पहिली म्यूच्युअल विमा कं.

धी औंध म्यूच्युअल लाइफ ॲशुअरन्स सोसायटी लिमिटेड.

**संस्थेचीं वैशिष्टयें**

- कंपनी ब्रिटिश हिंदुस्थानांत रजिस्ट्रार ऑफ कंपनीज व सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स यांजकडे रजिस्टर झाली आहे.
- कंपनींत शेअर-होल्डर्स नसून मिळणारा १००% नफा विमेदारांसच मिळतो.
- श्रीमंत राजेसाहेब औंध हे संस्थेचे आश्रय-दाते आहेत.
- प्रत्येक विमेदार, मालक गणला जातो व त्यास भागिदाराचे सर्व हक्क प्राप्त होतात.
- सोसायटीनें जरूर ती ठेव रिझर्व्ह बँकेकडे ठेविली आहे.
- सोसायटीस लागणारें मूळ भांडवल औंध स्टेट बँकिंग व इन्शुअरन्स कं. या संस्थेनें पुरविलें असून देखील कंपनीचे व्यवहारावर तिचा अगर औंध संस्थानचा ताबा नाहीं.
- कार्यकारी मंडळाचे सभासद हे १०० टक्के विमेदारांचे प्रतिनिधी असतात.
- सोसायटी १०० रु. पासून वाटेल त्या रकमेचे विमे उतरते.

● ● ● डॉक्टरी तपासणीखेरीज १,००० रु. पर्यंत विमे उतरले जातात. ● संपूर्णपणें स्वदेशी, काटकसरीची, अद्यावत शास्त्रशुद्ध तत्त्वावर चालणारी ही महाराष्ट्राची पहिली व एकच म्यूच्युअल विमा संस्था आहे.

माहितीसाठीं लिहा. मॅनेजिंग डायरेक्टर,

**औंध म्युच्युअल लाइफ ॲशु. सोसायटी लि.**

६२ सरस्वती-विलास, पुणें २.

सरळ व सोप्या अटी मिळून अभिमानानें आपली संस्था म्हणून काम करण्यास निवडण्यास योग्य अशी ही संस्था आहे.

# विविध माहिती

### वालुकामय प्रदेशांचें आक्रमण

मानस आणि सरस्वती ह्या नद्यांस भरपूर पूर येऊन आजूबाजूची वाळू त्यांतून वाहून जाण्याचें गेलीं दहा वर्षे पुरेशा पर्जन्याचे अभावीं बंद झाल्यामुळें आजूबाजूच्या रुक्ष प्रदेशाचा व्याप वाढत आहे. कच्छच्या रणांत दरसाल दोन फर्लांगाची भर पडत आहे. हें असेंच चालू राहिलें, तर तीस वर्षांत सबंध उत्तर गुजराथ वालुकामय होऊन जाईल. श्री. सतीशचंद्र सेन ह्या भूगर्भशास्त्रवेत्त्याचें हें मत असून, सिंधू नदीचें पाणी वरील दोन नद्यांत कालव्यांतून आणून सोडवें, अशी उपाययोजना त्यांनीं सुचविली आहे.

### युद्धफंड

व्हाइसरॉयांच्या युद्ध फंडाचा आकडा ३१ मेअखेर ४ कोटि, २७ लक्ष, ८४ हजार रुपये झाला आहे. त्यांत फंडाच्या रकमेवर मिळालेल्या ५९ हजार रुपये व्याजाचाहि समावेश होतो.

### मोडलेल्या जर्मन विमानाचें प्रदर्शन

मोडलेल्या एका जर्मन विमानाच्या बंगलोर येथील प्रदर्शनास तेथील ब्रिटिश रेसिडेंट ले. क. गॉर्डन ह्यांच्या समवेत मद्रासच्या गव्हर्नरांनीं भेट दिली.

### २५० अब्ज रुपयांच्या बिलावर सही

सुमारें २५० अब्ज रुपयांच्या लष्करी खर्चाची तरतूद करणाऱ्या बिलास अमेरिकेच्या अध्यक्षांनीं नुकतीच संमति दिली. एवढ्या मोठ्या रकमेस मंजुरी देणारें जगांतील हें पहिलेंच बिल आहे.

### व्यापारी दानत !

एका धंदेवाल्याच्या मुलानें आपल्या बापाला विचारलें:—"व्यापारी दानत, दानत —लोक म्हणतात तें काय आहे ?" मुलाच्या वडिलांनीं उत्तर दिलेः—"हें पहा, तुझ्या दुकानांत एखाद्या गिऱ्हाइकानें पांच रुपयांच्या एका नोटेच्या ऐवजीं चुकून दोन नोटा दिल्या तर तुझ्या पुढें प्रश्न येऊन पडेल, 'मी हें माझ्या भागीदारास कळवूं का त्यापासून छपवून ठेवूं ?"

### बडोदें संस्थानची आर्थिक स्थिति

१९३९-४० अखेर बडोदें संस्थानाची जिंदगी १० कोटि, ९४ लक्ष रुपये होती. ह्यापैकी ५ कोटि, ३३ लक्ष रुपये रेल्वेमध्यें, ३७ लक्ष रुपये वीजगृहांत, ४७ लक्ष रुपये ओखा बंदरांत व १६ लक्ष रुपये इतर ठिकाणीं गुंतलेले आहेत. २ कोटि, ५० लाखांचा रिझर्व्ह फंड आहे, त्यांतील व्याजांतून फायदेशीर भांडवली खर्च करतां येतो. लँड रेव्हेन्यू इक्वलायझेशन फन्डांत ५० लक्ष रुपये आहेत. गुंतविलेल्या एकूण रकमेवर १९३९-४० मध्यें ३.६३% व्याज सुटलें.

### ग्वालेरमधील रस्ते

ग्वालेरच्या पब्लिक वर्क्स खात्यानें १९३९-४० मध्यें २, ३७६ मैल लांबीचे रस्ते दुरुस्त ठेवण्यासाठी ८३/४ लक्ष रुपये खर्च केले. १६ नवीन रस्त्यांचें काम हातीं घेण्यांत आलें, त्यांपैकी ९ रस्ते पुरे झाले.

### प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचें प्रचंड टपाल

जगांतील प्रमुख राज्यकर्ते आणि मुत्सद्दी ह्यांस येणाऱ्या खासगी पत्रांचा विचार करतां प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचें टपाल सर्वांत मोठें आहे असें समजतें. त्यांस दररोज सरासरीनें ३,५०० ते ४,००० पत्रें येतात.

### आर्मी ॲन्ड नेव्ही स्टोअर्स लि.

वरील कंपनीची वार्षिक सभा एप्रिल १९४१ मध्यें इंग्लंडमध्यें भरली होती. कंपनीची विक्री गेल्या वर्षी पुष्कळ कमी झाली, तरी तिला १२ लक्ष रुपये नफा झाला. भागीदारांस ७१/२ डिव्हिडंड मिळालें. कंपनीजवळील शिल्लक मालाची किंमत सुमारें १ कोटि रुपये आहे. स्टोअर्सच्या हिंदुस्थानांतील शाखांनीं मोठ्या प्रमाणावर व्यवहार केला. त्यांनीं सरकारकडून कंत्राटें मिळविलीं व जीं गिऱ्हाइकें इंग्लंडकडे जावयाचीं, तीं हिंदुस्थानांतच राहिल्यामुळें हिंदी शाखांचा खप वाढला. हिंदी शाखांचा ह्या वाढलेल्या खपामुळेंच कंपनीची सुस्थिति इतकी चांगली राहिली. स्टोअर्सनें सिमला येथें एक शाखा नुकतीच उघडली आहे. कंपनीच्या नोकरांपैकी ५०० नोकर युद्धकार्यासाठी गेले आहेत.

### चेक्सची देवघेव

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें २७ जून अखेर संपलेल्या आठवड्यांत १९ कोटि, २५ लक्ष रुपये किंमतीच्या १ लक्ष, १५ हजार चेक्सची देवघेव झाली.

### विजेचें उत्पादन

टाटा हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी, आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी आणि टाटा पॉवर कंपनी ह्यांच्या अनुक्रमें खोपोली, भिवपुरी आणि भिरा येथील वीजगृहांत मिळून १ जानेवारी ते २४ जून अखेर विजेचें खालीलप्रमाणें एकूण युनिट्स उत्पादन झालें:—

१ जानेवारी ते २४ जून

| १९३९ | १९४० | १९४१ |
|---|---|---|
| ३३ कोटि, ८३१/२ लक्ष; | ३४ कोटि, १८ लक्ष; | ४५ कोटि, ७३ लक्ष |

### नॅनकिंग सरकारास मान्यता

चीनमधील जपाननें पुरस्कार केलेल्या नॅनकिंग येथील "राष्ट्रीय" चिनी सरकारास जर्मनी, इटली, बल्गेरिया, हंगेरी, स्पेन, ह्या देशांनीं कायदेशीर मान्यता दिली आहे.

### नुकसान भरपाई

जर्मन पाणबोटीनें अमेरिकेची रॉबिनमूर ही आगबोट बुडविली, त्याबद्दल अमेरिका जर्मनीकडे १० लक्ष डॉलर नुकसानभरपाई मागत आहे.

### भेसळ तूप

भेसळ तुपाचा प्रसार अतिशय झपाट्यानें होत आहे. खेडेगांवांतील लोकहि तुपांत भेसळ करण्यास शिकले आहेत. मुंबई मार्केटिंग अधिकाऱ्यांच्या दौऱ्यांत त्यांना शुद्ध तूप नमुन्यादाखल सुद्धां पहावयास मिळालें नाहीं, असें समजतें.

### एस. व्ही. सुपनेकर, कुलकर्णी ॲंड सन्स लि.

वरील नांवाची खासगी लिमिटेड कंपनी नुकतीच रजिस्टर झाली आहे. तिचें अधिकृत भांडवल ५ लक्ष रुपये असून, तें ऑर्डिनरी, प्रेफरन्स व डिफर्ड भागांत विभागलेलें आहे. श्री. एस. व्ही. सुपनेकर, श्री. आर. जी. कुलकर्णी व श्री. व्ही. ए. सुपनेकर हे कंपनीचे कायम डायरेक्टर आहेत. कंपनीच्या मेमोरँडम व आर्टिकल्सवर सदर्न बिटिंगचे अध्यक्ष श्री. काकुभाई बखारिया, प्रिन्सिपॉल धनंजयराव गाडगीळ, दिवाणबहादुर शेटे, श्री. आर. जी. कुबेर, इत्यादींच्याहि सह्या आहेत.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३२६ | भाषण-रशियन मुलखांतील लढाया- दि बेळगांव बँक लि.-शुद्ध दुधाचा पुरवठा | |
| २ ब्रिटिश विमा कंपन्या संकटांस तोंड कसें देत आहेत? | ३२७ | ५ ४ जुलै, १७७६ | ३३१ |
| ३ सरकारी कर्जरोख्यांची अदलाबदल | ३२८ | ६ निजाम संस्थानांतील सोन्याच्या खाणी | ३३२ |
| ४ स्फुट विचार ... | ३२९ | ७ विचार-प्रवर्तक सहकारी बातम्या | ३३३ |
| अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन-पावसाची हालहवाल-स्टालिनचें स्फूर्तिदायक | | ८ निवडक बाजार भाव | ३३४ |

अर्थ

बुधवार, ता. ९ जुलै, १९४१

## ब्रिटिश विमाकंपन्या संकटांस तोंड कसें देत आहेत?

### हिंदुस्थानांत घ्यावयाचा बोध

युद्धाचे प्रतिकूल परिणाम सर्वच आर्थिक व्यवसायांवर कमी-अधिक प्रमाणांत होणें अपरिहार्य आहे. ह्या व्यवसायांमध्यें विम्याचें क्षेत्र असें आहे कीं, प्रत्यक्ष युद्धांत पडलेल्या देशांत ह्या धंद्याची स्थिति विशेष अडचणीची झाल्यावांचून रहाणें शक्य नाहीं. अशा अडचणींवर खास व राष्ट्रीय स्वरूपाच्या उपायांची योजना होणें क्रमप्राप्तच आहे. युद्धपरिस्थितींतून उद्भवणारे परिणाम हिन्दी आयुर्विम्याच्या धंद्यावर झाल्यावांचून रहाणार नाहींत. तथापि, ह्यासंबंधांत ग्रेटब्रिटनचें उदाहरण विचारप्रवर्तक आहे. ब्रिटिश लोक बाहेरच्या क्षेत्रांत प्रत्यक्ष लढत आहेत आणि आयुष्याच्या घातुक धोक्यास कसून तोंड देत आहेत, एवढेंच नव्हे तर त्यांच्याच देशांत शत्रु-विमानांच्या हल्ल्यांमुळें नाश होत आहे. ह्या योगानें ब्रिटिश विमाकंपन्यांपुढें कोणते विकट प्रश्न येऊन उभे राहिले आहेत त्याची कल्पना येण्यास त्यांपैकीं कांहींच्या वार्षिक सभांचे प्रसंगीं प्रसिद्ध झालेल्या माहितींतल्या ठळक बाबींचा उल्लेख करणें आवश्यक आहे. ह्या कंपन्या किती चिकाटीनें, निश्चयानें व कर्तृत्वबुद्धीनें आपला उद्योग चालवीत आहेत हें रिफ्यूज ॲशुअरन्स कंपनीच्या सत्त्याहत्तराव्या वार्षिक सभेच्या वेळीं तिच्या अध्यक्षांनीं काढलेल्या उद्गारांवरून दिसून येतें. अडचणींच्या प्रसंगीं कंपन्यांनीं कोणतें धोरण स्वीकारलें पाहिजे आणि संकटांस न भितां त्यांस धैर्यानें कसें तोंड दिलें पाहिजे ह्या विषयींचा बोध त्यावरून हिंदुस्थानांत लोकांस घेतां येण्यासारखा आहे. ह्या दृष्टीनें खालीं दिलेल्या माहितीचें विशेष महत्त्व आहे.

रिफ्यूज ॲशुअरन्स कंपनीपैकीं सुमारें एकोणीसशे लोक युद्धांत गुंतले आहेत. त्यांपैकीं सुमारें पंधराशे कंपनीस बाहेरून काम आणून देणारे व देखरेख करणारे आहेत आणि अडीचशे मुख्य कचेरींतले नोकर आहेत. युद्धावर गेलेल्या लोकांच्या बायका त्यांचे जागीं काम करीत आहेत आणि कित्येक पेन्शनर कामावर परत आले आहेत. मुख्य कचेरींतील कामास कात्री लावण्यांत आली आहे. शत्रूच्या वैमानिक हल्ल्यांमुळें पॉलिसी होल्डर्सची पांगापांग झालेली आहे तरी त्यास शोधून काढून कंपनी प्रीमियम गोळा करणें आणि विम्याच्या पैशाची भरपाई करणें हीं कामें मामुली रीतीनें करीत आहे. शत्रूच्या हल्ल्यांमुळें कंपनीच्या इमारतींस इजा झाली तरी तिच्या योगानें रोजच्या कामांत व्यत्यय येणार नाहीं अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. आयुर्विम्याच्या राष्ट्रीय आणि वैयक्तिक महत्वास अनुलक्षून कंपनीचे अध्यक्ष म्हणाले, "शांततेच्या काळापेक्षा युद्ध परिस्थितींत राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक जीवनांत आयुर्विम्याचें उपयुक्त कार्य फार मोठें आहे. सर्व देशभर विम्याचा प्रसार सारखा चालू आहे आणि त्याच्या मार्गांत अडचणी व नियंत्रणें असलीं तरीहि आपणांवर अवलंबून असणाऱ्या माणसांच्या संरक्षणासाठीं आयुर्विम्याच्या योगानेंच तात्काळ जिंदगी निर्माण होते ह्या तत्वाची जाणीव जनतेस वाढत्या प्रमाणावर होत आहे.... आयुर्विमा हा लोकांनीं केलेल्या बचतीचा एक प्रकार असून त्याचें राष्ट्रीय युद्ध-कामगिरीस मोठें सहाय होत आहे, कारण विमा कंपन्यांचा पुष्कळसा पैसा सरकारी कर्जरोख्यांत गुंतवला जातो."

वरील कंपनीच्या पॉलिसीजमध्यें युद्धाच्या धोक्यांच्या विशेष अटी युद्धाचे पूर्वी दाखल केलेल्या आहेत. तरीहि ह्या पॉलिसींच्या पैशाच्या संबंध रकमा देण्याचें तिनें ठरवलें आहे आणि नवीन पॉलिसीजमध्यें कांहीं सवलती देण्यांत येणार आहेत. ह्या कंपनीच्या ८७ लक्ष पॉलिसीज चालू आहेत आणि योग्य वेळीं त्यांचे पैसे दिले जातात. त्यांची दररोजची सरासरी साडेतीन लक्ष रुपये भरते. युद्धावर गेलेल्या नोकरांस देण्यांत येणाऱ्या सवलतींचा जादा खर्च कंपनी सोशीत आहे. युद्धामुळें एका बाजूनें व्यवस्थेचा खर्च वाढत आहे तर दुसऱ्या बाजूनें रोख्यांत वगैरे गुंतवलेल्या पैशावरच्या व्याजाचें उत्पन्न घटलें आहे.

वेस्लेयन अँड जनरल ॲशुअरन्स कंपनीची स्थापना होऊन शंभर वर्षें लोटलीं आहेत. तिच्या अध्यक्षांनीं कंपनीच्या शताब्दि-पूर्तीच्या प्रसंगीं युद्धपरिस्थितीच्या तीन महत्त्वाच्या परिणामांचा उल्लेख केला. (१) व्याजाचे दर, (२) मृत्यूंचें प्रमाण व (३) व्यवस्थेचा खर्च ह्या त्या बाबी होत. नवीन व्याजाचे दर उतरले आहेत, पण प्रातीवरील कराचे चढले आहेत. सध्या चालू असलेल्या पॉलिसीमध्यें मृत्यूचें प्रमाण गृहीत होतें त्या मानानें सध्या तें वाढलें आहे, आणि तें आधिक वाढण्याचा संभव आहे. युद्धामुळें व्यवस्थेचा खर्च वाढला आहे आणि तो कमी होण्याचा रंग नाहीं. वाढलेला चालू खर्च, मिळणारें कमी काम व पैशाच्या गुंतवणुकीवर पडणारा व्याजाचा हलका दर ह्या तिन्ही गोष्टी हिन्दी विमा कंपन्यांच्या मार्गांत अडचणी उत्पन्न करीत आहेत. त्यांस बोनसचे दर कमी करावे लागत आहेत, त्याचें कारण विशिष्ट युद्ध परिस्थिति हेंच आहे. वेस्लेयन कंपनीच्या जिंदगीपैकीं निम्मी कर्जरोख्यांतील गुंतवण आहे आणि रोख्यांपैकी ७८ टक्के रोखे ग्रेटब्रिटनमधले आहेत. स्थावर मालमत्तेच्या तारणावर दिलेलीं कर्जें एकूण जिंदगीच्या ½ इतकीं आहेत. त्यांपैकी छप्पनशें कर्जें पॉलिसी होल्डर्सना स्वतःचीं घरें बांधण्याकरितां दिलेलीं आहेत. जिंदगीचे रोख्यांतील गुंतवणुकीचे व गहाणावरील कर्जांचे वरील आकडे उद्बोधक आहेत. रिफ्यूज ॲशुअरन्स कंपनीनें आपल्या एकूण जिंदगीपैकीं ४० टक्के रक्कम ब्रिटिश सरकारच्या रोख्यांत घातली आहे. त्याचा परिणाम कंपनीचें व्याजाचें उत्पन्न घटण्यांत झाला आहे. तथापि ही गुंतवण ब्रिटिश रोख्यांत असल्यानें त्यांची बाजारभावानें होणारी किंमत ताळेबंदांत दाखवलेल्या किंमतीच्या मानानें अधिक आहे. ब्रिटिश विमा कंपन्या आपल्यापुढें येणाऱ्या अवघड प्रश्नांचा निकाल कसा करीत आहेत आणि आपलें स्थान कसें स्थिर ठेवीत आहेत ह्याचें दोन कंपन्यांच्या उदाहरणांवरून वर दिग्दर्शन केलें आहे, तिकडे हिन्दी विमा कंपन्यांचें लक्ष जाणें आवश्यक आहे.

## सरकारी कर्जरोख्यांची अदलाबदल

### प्रो. काळे ह्यांचें मुंबई रेडिओवर भाषण

( मुंबई रेडिओ स्टेशनच्या डायरेक्टरांचे कृपेमुळें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. )

चालू महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकार आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ह्यांनीं विशिष्ट सरकारी रोख्यांच्या अदलाबदलीची एक योजना जाहीर केली आणि तिची अंमलबजावणी गेल्या १६ ते २१ ह्या तारखांच्या अवधींत करण्यांत आली. ह्या अदलाबदलीचें स्वरूप, उद्देश व परिणाम ह्यांविषयींची माहिती सामान्य हिंदी नागरिकांस होणें अगत्याचें आहे. सरकारी कर्जाचा संबंध राष्ट्रीय संपत्तीशीं निकट रीतीनें येतो आणि सध्याचा युद्ध परिस्थितींत तर ह्या प्रश्नाचें महत्त्व विशेषच आहे. कांहीं प्रकारचे आपले कर्जरोखे परत घेऊन त्यांच्या मोबदल्यांत दुसऱ्या प्रकारचे रोखे देण्याची आवश्यकता सरकारास कां वाटली असें कोणीहि विचारील आणि त्यास समाधानकारक उत्तर देणें आवश्यक आहे. पण हें स्पष्टीकरण करण्यापूर्वी प्रस्तुत योजनेची पूर्वपीठिका सांगितली पाहिजे आणि हेंच विवेचन महत्त्वाचें आहे.

### इंग्लंडमध्यें कर्ज कां काढलें ?

रेल्वेज, कालवे, इत्यादि कामांस भांडवल लागतें किंवा युद्धाप्रीत्यर्थ अवाढव्य खर्च होतो. ह्या पैशाचा पुरवठा कोणत्याहि राष्ट्रीय सरकारास आपल्या मामुली उत्पन्नामधून किंवा करांच्या मार्गानें करतां येणें शक्य नसतें आणि त्यास देशांत किंवा देशाबाहेर कर्ज काढून जरूर तो पैसा उभारावा लागतो. ह्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें कोट्यवधि रुपयांचीं कर्जें ह्या देशांत व इंग्लंडमध्यें काढलीं आहेत. कांहीं वर्षांमागें सरकारास लागणारा पैसा सबंद ह्या देशांत कर्जाऊ मिळण्यास अडचण पडे आणि त्यास लंडनच्या नाणेबाजाराचा आश्रय करावा लागे. अलीकडे ही परिस्थिति बदलली आहे आणि हिंदुस्थान सरकारास देशांतल्या देशांत पुरेसें कर्ज मिळतें. तथापि, लंडनमध्यें मागें उभारलेलीं कर्जें शिलक असून त्यांवरील व्याज व त्यांचें मुद्दलहि तेथें पौंड-स्टर्लिंगच्या चलनांत द्यावीं लागतात. ह्या कर्जांपैकी कांहीं मुदतबंदी व कांहीं बिनमुदतबंदी असतात. परदेशांत काढलेल्या कर्जाच्या बाबतींत एक अडचण असते आणि ती परराष्ट्रीय चलनांत त्यांच्या फेडीची व त्यांवरील व्याजाच्या देण्याची तजवीज करण्याचे संबंधांत उद्भवते. परराष्ट्रीय व्यापाराची स्थिति आणि हुंडणावळीचा दर ह्यांचेवर परदेशी देण्याची परिस्थिति अवलंबून रहाते आणि राष्ट्रीय चलन व्यवस्थेशीहि तिचा संबंध येतो. देशांतल्या देशांत सरकारी कर्ज काढलेलें असलें तर त्यावरील व्याज बाहेर पाठवावें लागत नाहीं आणि त्याची विभागणी आपल्याच लोकांमध्यें होते ही गोष्टहि येथें लक्षांत ठेवली पाहिजे. परराष्ट्रीय कर्जाच्या जागीं स्वदेशांत काढलेलें कर्ज दाखल करतां आलें तर तें राष्ट्रीय दृष्ट्या फायदेशीर होईल हें स्पष्ट आहे. नवीन कर्ज देशाबाहेर न उभारण्याची व्यवस्था करतां येईल, पण पूर्वी काढलेल्या परराष्ट्रीय कर्जाचें रूपांतर व स्थलांतर कसें करतां येईल ? हा प्रश्न येथें उद्भवतो आणि त्याचें उत्तर देणें जरूर आहे.

### आपल्या मालकीचा परराष्ट्रांतील पैसा

मुदतबंदी कर्जाची मुदत संपण्याचे वेळीं त्यांचा पैसा लंडनमध्यें देऊन टाकावयाचा आणि तेवढ्या रकमेचें कर्ज ह्या देशांत काढावयाचें हा रोख्यांच्या अदलाबदलीचा एक प्रकार आहे असें म्हणतां येईल. तसेंच आपले रोखे परराष्ट्रीय बाजारांत विकत घेऊन त्यांची फेड केव्हांहि करतां येणें शक्य आहे. तथापि, परदेशी कर्जरोख्यांचें मुद्दल देऊन टाकावयाचें म्हणजे लंडनसारख्या रोखे बाजारांत आपल्या मालकीचा पैसा जमा झालेला असला पाहिजे, आणि मुख्य अडचण नेहमीं येते ती आपला पैसा बाहेर पाठवून ठेवण्यांत येते. बाहेरच्या व्यापारी क्षेत्रांत आपली राष्ट्रीय शिलक जमा होण्यास आपल्या देशाचें व्यापारी व इतर आंतरराष्ट्रीय देवघेवींत येणें निघणें आवश्यक आहे. हिंदुस्थानच्या निर्गत व्यापाराची किंमत आयात व्यापाराच्या किंमतीपेक्षा सामान्यतः अधिक असल्याकारणानें ह्या देशाचें येणें लंडनमध्यें जमा होत असतें आणि त्यामधून आमच्या सरकारचें तेथील देणें भागवलें जातें आणि ह्याचमुळें हुंडणावळीचा दर स्थिर रहाण्यास सहाय होतें. परदेशी कर्जरोख्यांची फेड करून त्यांच्या ऐवजी स्वदेशी रोखे आपल्या लोकांस द्यावयाचे म्हणजे राष्ट्रीय सरकारची शिलक लंडनसारख्या प्रमुख नाणें बाजारांत जमा झालेली असली पाहिजे आणि ही जमा आयात-निर्गत व्यापाराची अनुकूलता व हुंडणावळीची समाधानकारक स्थिति ह्यांवर अवलंबून रहाणार हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

### अनुकूल परिस्थिति

हिंदुस्थान सरकारनें लंडनमध्यें काढलेलीं मुदतबंदी कर्जें शिलक आहेत त्यांच्या जागीं ह्या देशांत काढलेल्या कर्जाची स्थापना करावयाची तर ह्या अदलाबदलीच्या संबंधांत चालू युद्धांत काय परिस्थिति आहे ती आतां पाहूं. युद्धक्षेत्र हळुहळु विस्तार पावल्यामुळें हिंदुस्थानचा निर्गत व्यापार घटला आहे. त्याचप्रमाणें आयात व्यापारहि अत्यंत संकुचित झाला आहे. हिंदुस्थानचीं युरोपांतील व इतर गिऱ्हाइकें येथील मालास बंद झालीं आहेत आणि समुद्रावरील वहातुक धोक्याची व खर्चाची होऊन आयात व्यापार मर्यादित होऊन गेला आहे. युद्धोपयोगी मालाच्या निर्गतीस प्राधान्य देणें अगत्याचें असल्यानें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश व अमेरिका ह्यांच्याशीं हिंदुस्थानचा व्यापार चालू आहे आणि त्यानें शत्रु राष्ट्रांशीं शांततेच्या काळीं देवघेव होत असे तिची जागा घेतली आहे. युद्धोपयोगी कच्चा-पक्का माल पुरवण्याचें हिंदुस्थान हें प्रमुख क्षेत्र बनलें आहे, ह्या कारणानें निर्गत-आयात व्यापाराचें पूर्वीचें प्रमाण टिकलें आहे. तथापि येथें महत्त्वाची गोष्ट सांगावयाची आहे ती ही कीं हिंदुस्थान सरकार साम्राज्य सरकारच्या वतीनें विविध प्रकारांच्या मालाची खरेदी करून त्याचा पुरवठा करीत आहे. ह्या मालाची किंमत हिंदुस्थानच्या खात्यावर लंडन येथें जमा होते आणि ही रकम हळुहळु फुगणें स्वाभाविक आहे. हिंदुस्थान सरकारचे पैशाच्या देवघेवीचे व्यवहार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्फत होतात आणि त्या बँकेंत सरकारच्या लंडनमधील खात्यांत साम्राज्य सरकारकडून येणाऱ्या रकमा जमा होतात व त्या तात्पुरत्या गुंतवल्या जातात. रिझर्व्ह बँकेनें आपल्या चलन निधींतील कांहीं विशिष्ट किमान भाग लंडनमध्यें स्टर्लिंग रोख्यांत गुंतवलाच पाहिजे असा कायद्याचा निर्बंध आहे. परंतु वर सांगितलेल्या कारणामुळें ही मर्यादा ओलांडली जाऊन तिकडील शिलका विलक्षण फुगल्या. १९३९ सालच्या सप्टेंबर महिन्याच्या प्रारंभीं बँकेच्याजवळ लंडन येथें शिलक होती ती चालू वर्षाच्या जानेवारी अखेर जवळ जवळ तिप्पट झाली. एवढा सरकारी पैसा लंडनमध्यें अडकून पडूं देणें रिझर्व्ह बँकेस गैरसोयीचें झालें. इंग्लंडलाहि हिंदुस्थानचें हें मोठें देणें झालें त्याची व्यवस्था ह्या देशानें ब्रिटिश रोख्यांत पैसे लंडनमध्यें गुंतवून करावी का काय असा प्रश्न येथें उद्भवला.

( अपूर्ण )

# स्फुट विचार

## अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन

यंदाच्या अमेरिकेंतील स्वातंत्र्यादिनास विशेष महत्त्व प्राप्त झालें होतें. गेल्या चवथ्या तारखेस प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं अमेरिकन जनतेस उद्देशून भाषण केलें, त्यांत सध्याच्या युद्धपरिस्थितींत स्वातंत्र्यदिनाचें रहस्य आपल्या राष्ट्रास व सबंद जगास किती जिव्हाळयाचें आहे ह्याचें गंभीर वाणीनें वर्णन केलें. अमेरिकन लोकांनीं १७७६ सालीं स्वतःचें स्वातंत्र्य जाहीर केलें आणि आजवर तें टिकवलें आहे. नात्सी जर्मनीनें युरोपांत जो धुमाकूळ अलीकडे चालवला आहे, त्याचे परिणाम अमेरिकेस भोगावे लागणार असल्यानें हिट्लरशाहीचा प्रतिकार करणें अमेरिकेचें आद्य कर्तव्य आहे असें त्यांनीं सांगितलें. जगांतील इतर राष्ट्रांचें स्वातंत्र्य जर्मनीनें नष्ट केलें असतां अमेरिकेचें स्वातंत्र्य टिकणें शक्य नसल्यानें अमेरिकन लोकांनीं जुटीनें, निश्चयानें व स्वार्थत्यागपूर्वक जर्मनींतील हुकूमशाहीचें निर्मूलन करण्याच्या कामास लागलें पाहिजे असा संदेश प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं आपल्या लोकांस दिला आहे. युरोपमध्यें चालवलेल्या युद्धाशीं आपणांस काय करावयाचें आहे अशी मनोवृत्ति अमेरिकेंत कांहीं लोकांची दिसते, तिला त्यांनीं झणझणित उत्तर दिलें आहे. हुकुमशहांनीं बाकीचें जग उजाड करून टाकलें असतां त्यांत अमेरिकन राष्ट्र तेवढें स्वतंत्र व सुखी राहील ही कल्पना किती वेडेपणाची आहे हें त्यांनीं स्पष्ट केलें. मि. वुइंडेल वुइल्की ह्या प्रसिद्ध अमेरिकन मुत्सद्यानें स्वतःच्या स्वातंत्र्याचें रक्षण व्हावयाचें असेल तर प्रथम इंग्लंडनें हिटलरशाहीशीं चालवलेल्या निकराच्या झगड्यांत अमेरिकेनें त्या राष्ट्रास सर्व प्रकारचें सहाय सढळ हातांनीं दिलें पाहिजे असें स्वातंत्र्य दिनासंबंधानें भाषण करतांना सांगितलें. इंग्लंड हा आज राष्ट्रीय स्वातंत्र्याचा बालेकिल्ला आहे आणि त्यावर हिटलर हल्ले चढवीत आहे. तो किल्ला शत्रूनें सर केला असतां अमेरिकेचें स्वातंत्र्य धोक्यांत येणार हें निश्चित असल्यानें इंग्लंडचें युद्ध तें आपलें युद्ध असें अमेरिकन लोकांनीं समजलें पाहिजे, हा मि. वुइल्की त्यांच्या भाषणाचा मथितार्थ होता.

## पावसाची हालहवाल

शेतीच्या धंद्याच्या म्हणजे हिंदी राष्ट्राच्या आर्थिक सुस्थितीच्या दृष्टीनें पाऊसपाणी पुरेसें व व्यवस्थित होणें अगत्याचें असतें आणि उन्हाळा संपल्यापासून सर्वांचें लक्ष पावसाकडे असतें. चालू सालीं पाऊस चांगला होईल असें भविष्य सरकारच्या हवामान खात्यानें वर्तवल्यामुळें लोकांस समाधान वाटत होतें. त्याप्रमाणे शेतीच्या हंगामास प्रारंभ बरा झाला. परंतु पहिल्या एखाद्-दुसऱ्या पावसानंतर तीन आठवड्याच्या वरचा काळ कोरडा गेला आणि जनतेस काळजी वाटूं लागली. मद्रास व बंगाल प्रांत यांमध्यें अतिवृष्टि झाल्याच्या बातम्या येत होत्या, त्याच वेळीं मुंबई प्रांतांत पावसानें ओढून धरलें होतें. गेल्या महिन्याचे असेरीस शेवटीं पाऊस पडण्यास प्रारंभ होऊन जनतेच्या चिंतेचा निरास झाला. एकंदरीनें हा पाऊस ह्या प्रांतांत सर्वत्र चांगला झाला आहे. तथापि, अतिवृष्टीची आपत्ति विविध भागांवर आलेली आहे. मुंबई-पुणें मधील बोरघाटांत अतिवृष्टीमुळें आगगाडीच्या वहातुकीस अडथळे दरवर्षी कमीअधिक प्रमाणांत येतात आणि कल्याण जवळच्या भागांत पूर लोटतो असा अनुभव मधून मधून येतो. परंतु यंदा जी. आय. पी. रेल्वेवर अतिवृष्टीमुळें रस्ते वाहून गेले, त्याबरोबर बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वेवर तशीच स्थिति झाल्यानें मुंबई शहराचा बाहेरच्या प्रदेशाशीं असलेला संबंध तुटून जनतेची विलक्षण गैरसोय झाली. माणसांची व मालाची वहातूक कित्येक दिवस बंद पडली एवढेंच नव्हे, तर तारेचें व टेलिफोनचें दळणवळण अशक्य झालें. प्रवासास निघालेलीं माणसें दोन्ही रेल्वेजवर जागजागीं अडकून पडलीं. मुंबईचीं वर्तमानपत्रें बाहेर लोकांस तीन दिवस मिळालीं नाहींत. पुण्याहून मुंबईचें साचलेलें टपाल व तारा हीं विमानानें न्यावीं लागलीं ह्यावरून अतिवृष्टीनें उद्भवलेल्या घोटाळ्याची कल्पना येण्यासारखी आहे. अनेक वर्षांत असा अनुभव न आल्यानें त्यास एक प्रकारचें अपूर्वत्व प्राप्त झालें. रेलवेचे अधिकारी रस्ते दुरुस्त करून वहातूक पुनः चालू होण्याबद्दल शिकस्त करीत आहेत. बी. बी. अँड सी. आय. रेलवेवर नादुरुस्ती अधिक मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळें तीवरील वहातूक पूर्ववत् होण्यास जास्त अवधि लागणार आहे.

## स्टालिनचें स्फूर्तिदायक भाषण

युरोपच्या इतर भागांतील आपलें चढाईचें धोरण यशस्वी होईपर्यंत रशियाशीं मित्रत्वाचें धोरण वरकांती रीतीनें चालू ठेवावयाचें आणि तिकडचा कार्यभाग आटोपला कीं बॉल्शेव्हिकांचा समाचार घ्यावयाचा असा हिटलरचा बेत होता हें आतां स्टालिनच्या लक्षांत आलें आहे. युरोपमध्यें जर्मन नात्सींची सत्ता एकमेवाद्वितीयम् स्थापावयाची ही हिट्लरची महत्त्वाकांक्षा आहे आणि या वर्चस्वाच्या जोरावर एशिया, आफ्रिका व अमेरिका ह्या खंडांत हातपाय पसरून दिग्विजय संपादन करावयाचा असाहि त्याचा हेतु आहे. पूर्व एशियांत जपानला हातीं धरलें असतां आपला उद्देश सहज रीतीनें तडीस जाईल असें वाटून हिट्लरनें त्या राष्ट्राशीं जगाची नवी घडी बसवण्यासाठी इटलीस बरोबर घेऊन त्रिकुटाचा करार केला. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं जर्मनीचा हा कावा मार्गेच ओळखून अमेरिकन खंडाच्या संरक्षणासाठी इंग्लंडला सहाय देण्याचें ठरवलें. रशियन बॉल्शेव्हिक मात्र जर्मनीशीं झालेल्या मित्रत्वाच्या करारावर विसंबून बेफिकीर राहिले. हिट्लरच्या शब्दावर टाकलेल्या विश्वासाचें फळ रशियास आतां मिळालें आहे. रशियावर जर्मनीनें स्वारी आरंभिली तेव्हां हिटलरची ह्या चढाईची कित्येक महिन्यांची जय्यत तयारी झालेली होती आणि बॉल्शेव्हिक बेसावध होते. शिवाय ही स्वारी रशियाच्या सबंध पश्चिम सरहद्दीवर एकदम चालू झाली आणि ती जर्मनीच्या ठराविक पवित्र्यानें मोठ्या व विस्तृत प्रमाणावर झाली. ह्या कारणानें सरहद्दीवरील पांच निरनिराळ्या टापूंमध्यें जर्मन फौजा घुसूं शकल्या. बॉल्शेव्हिक सैन्यानें शत्रूचा प्रतिकार जोरानें करून त्याचें पुष्कळ नुकसान केलें. स्टालिननें नुकतेंच एक जाहीर भाषण केलें त्यांत जर्मन फौजांची रशियन मुलखांत झालेली प्रगति प्रांजलपणानें कबूल करण्यांत आली आहे. बॉल्शेव्हिकांच्या तत्त्वाविरुद्ध आपली मोहीम आहे असें हिट्लर आतां म्हणत आहे, त्यास स्टालिननें उत्तर दिलें असून नेपोलियनचा मार्गें जसा रशियांत नाश झाला तसाच नाश हिट्लरचा आपण केल्यावांचून रहाणार नाहीं असें स्टालिननें म्हटलें आहे. जर्मनी अजिंक्य नाहीं ही गोष्ट गेल्या महायुद्धांत सिद्ध झाली आहे. त्यावेळीं अँग्लो-फ्रेंच सहकारानें जर्मनीस पराभूत केलें आणि प्रस्तुत प्रसंगीं अँग्लो-रशियन सहकार्य हिट्लरला लोळवल्यावांचून रहाणार नाहीं

असा आत्मविश्वास त्यांनीं प्रकट केला. युद्ध जोरानें व नेटानें चालवण्यांत सर्व रशियन जनतेनें उत्साहानें भाग घ्यावा आणि शत्रूस अंगावर घेऊन त्यास उलथा पाडावा असा संदेश स्टालिननें आपल्या लोकांस अखेरीस दिला.

### रशियन मुलखांतील लढाया

रशियाच्या मुलखांत शिरून उत्तरेस बाल्टिक समुद्र व दक्षिणेस काळा समुद्र ह्या दोन टोकांमधील त्या देशाच्या सबंध पश्चिम भागांत जर्मनीनें जोराचे हल्ले चढविले आहेत. उत्तरेच्या बाजूस फिनलंड आणि दक्षिणेकडे रुमानिया ह्यांच्या सैन्याची मदत घेऊन जर्मनीनें रशियन मुलखांत बऱ्याच अंतरापर्यंत मुसंडी मारून चाल केली आहे.जर्मन सेनानींचे रशियन स्वारींतले लष्करी डावपेच फ्रान्समध्यें त्यांनीं यशस्वी रीतीनें चासवलेल्या डावपेचाच्या धर्तीवर आहेत. चिलखती गाड्या व विमानें त्वरेनें शत्रूच्या मुलखांत घुसवून त्यास स्वसंरक्षणास अवसर द्यावयाचा नाहीं हें जर्मनीचें लष्करी धोरण आहे. रशियन मुलखाच्या पश्चिम भागांत ह्याप्रमाणें पांच निरनिराळ्या क्षेत्रांत जर्मनी एकाच वेळीं पुढें चाल करून जात आहे. तुलनात्मक दृष्टीनें पहातां जर्मनीनें पादाक्रांत केलेले पश्चिम युरोपांतले देश आकारानें लहान असल्यानें त्यांचें आक्रमण इतकेंसें अवघड नव्हतें. रशियाची गोष्ट त्याचिहून निराळी आहे. रशिया हा देश अफाट आहे. गर्दी करून तो व्यापून टाकणें जर्मनीस शक्य नाहीं. उलट,जर्मन सैन्यें जितक्या अंतरावर त्यांत घुसतील तितक्या अंतराच्या योगानें त्यांच्या अडचणी वाढणार आहेत. स्वदेशांतून लांब अंतरावरून रसद आणणें जर्मन सेनानींस अवघड जाईल आणि रशियन लोक जर्मन फौजांस मागून, बाजूनें व पुढून सतावून सोडल्यावांचून रहाणार नाहींत. शत्रूस मागून-पुढून घेरून जरूर पडल्यास देश उजाड करून टाका आणि त्याच्या हातीं कोणतीहि युद्धोपयोगी सामुग्री पडणार नाहीं असें करा, अशा आशयाचा संदेश स्टालिननें आपल्या लोकांस दिला आहे. कांहीं अंतर तोडून पुढें गेल्यावर जर्मन फौजांस रशियाचा प्रतिकार जाणवेल अशा रीतीनें होऊं लागला आहे. जर्मन सैन्याची चाल मंदावली आहे आणि रशियन सैन्यांचे उलट हल्ले त्याच्यावर होऊं लागले आहेत, अशा बातम्या येत आहेत, त्यांचें रहस्य स्टालिनच्या लढण्याच्या धोरणावरून स्पष्ट होत आहे. शत्रूची प्रगति आणि स्वतःची झालेली हानि स्टालिननें नाकबूल केलेली नाहीं. जर्मनीचीं सैन्यें व लढाऊ साधनें ह्यांचा रशियानें केलेला नाशहि येथें हिशेबांत घेतला पाहिजे. हिटलरनें आखलेल्या रशियन स्वारीच्या योजनेप्रमाणें जर्मन सैन्यांस यश मिळालेलें नाहीं, ही गोष्ट येथें लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं.

### दि बेळगांव बँक लि., बेळगांव

वरील बँकेचा ३१ मार्च १९४१ अखेरचा ११ वा वार्षिक रिपोर्ट व ताळेबंद आमचेकडे आला आहे. बँकेचें भाग भांडवल आतां ७४,०८० रुपये झालें आहे, म्हणजे गेल्या वर्षीच्या मानानें त्यांत १२,७४४ रुपयांची वाढ झाली आहे. बँकेकडील ५ लक्ष, ७२ हजारांच्या ठेवींपैकीं ३ लक्ष, ८१ हजार रुपये मुदती ठेवींत व १ लक्ष, ४ हजार रुपये सेव्हिंग्ज ठेवींत आहेत. ठेवींवरील व्याज बँकेनें कमी केलें तरी ठेवींच्या रकमेंत ७३ हजारांची भर पडली,हें जनतेच्या वाढत्या विश्वासाचें निदर्शक आहे.बँकेचा रिझर्व्ह फंड १०,०७८ रुपयांचा असून आतां त्यांत १ हजार रुपयांची वाढ झाली आहे. बुडीत कर्ज फंड, डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंड, इत्यादि फंड मजबूत करण्याचें बँकेचें धोरण आहे बँकेचीं कर्जें, कॅश क्रेडिट्स इत्यादींमध्यें ५ लक्ष, २७ हजार रुपये आहेत. बँकेची संकेश्वर येथील नवीन शाखा चालू वर्षे अखेर आपल्या पायावर चांगल्या रीतीनें उभी राहूं शकेल, इतकेंच नव्हे तर ती ताळेबंदास बळकटी आणील, असा डायरेक्टर्सांस विश्वास वाटत आहे. होसूर येथील शाखाहि बऱ्या स्थितींत चालली आहे. अहवालाचे वर्षअखेर बँकेस निवळ नफा ४,६१५ रुपये उरला, त्यांतून भागीदारांस द. सा. द. शे. ६ रु. १४ आ. (कर वजा करून) डिव्हिडंड देण्याकडे ३,३५० रुपयांच्या विनियोग करण्यांत आला. १९३२-३३ सालापासून आतांपर्यंत बँकेनें द. सा. द. शे. ६ रु. ४ आ. पेक्षा कमी डिव्हिडंड कधींच दिलेलें नाहीं व तीन वर्षे तर तिनें १० रु. दरानें डिव्हिडंड वाटलें होतें. वरील माहितीवरून बँकेची प्रगति कशी होत आहे, हें दिसून येईल. श्री. एन. रामराव हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. एच. एस. कुळकर्णी हे मॅनेजर आहेत.

### शुद्ध दुधाचा पुरवठा

शुद्ध व सकस दुधाच्या पुरवठ्याचा प्रश्न समाधानकारक कसा सोडवितां येईल, ह्याविषयीं हिंदुस्थान सरकारच्या ॲग्रिकल्चरल मार्केटिंग सल्लागार अधिकाऱ्यानें सरकारकडे सूचना पाठविल्या आहेत, त्या उद्बोधक आहेत. गलिच्छ गोठे, दुधांची मोठ्या प्रमाणावर भेसळ आणि लहान सहान दूधवाल्यांमार्फत दूध घरोघर पोचविण्याची अव्यवस्थित पद्धत ह्या तिन्ही कारणांमुळें चांगल्या दुधाचा पुरवठा अशक्यप्राय झाला आहे. दूध पुरवठ्याचा प्रश्न इतर देशांत राष्ट्रीय महत्त्वाचा समजला जातो, परंतु हिंदुस्थानांत त्याचेकडे दुर्लक्ष केलें जातें. शहरांतून गोठ्यांचें उच्चाटण करून खेडेगांवांतील दूध गोळा करून तें शहरी लोकांस पुरविण्याचें काम कार्यक्षमतेनें केलें, तर हा प्रश्न सुटण्यासारखा आहे. हें काम अनेकांनीं न करतां एका मध्यवर्ती संस्थेनें हें हातीं घेणें अधिक सोईचें होईल. कराची, दिल्ली, मुंबई, मद्रास, कलकत्ता, कानपूर आणि नागपूर ह्या शहरांत हा प्रयोग प्रथम करून पहावा व व त्यासाठी लागणारें भांडवल प्रांतिक सरकारनें अगर म्युनिसिपॅलिटीनें द्यावें अशी मार्केटिंग सल्लागार अधिकाऱ्याची शिफारस आहे.


### व्यवस्था फुकट गेली

गेल्या रशियन राज्यक्रांतीच्या सुरवातीस एका अमेरिकन पत्राचा बातमीदार मॉस्को येथें गेला. न्यूयॉर्क सोडण्यापूर्वी त्यानें पत्राच्या संपादकास, " मी रशियांत असतांनाच लेनिन मरण पावणें शक्य आहे. ही बातमी बाहेर फुटूं दिली जाणार नाहीं. परंतु,मी आपल्या पत्रास ' खर्चासाठी पैसे पाहिजेत, १०० डॉलर पाठवा ' अशी तार करीन " असें सांगितलें व संपादकानें ह्या व्यवस्थेस संमति दिली. कांहीं महिन्यांनीं लेनिन मरण पावला व ठरल्याप्रमाणें बातमीदारानें तार केली. परंतु संपादकाच्या लक्षांत त्या तारेचा खरा अर्थ आला नाहीं व त्यानें परत तार करून बातमीदाराची उधळपट्टीबद्दल हजेरी घेतली ! कांहीं आठवड्यांनीं लेनिनच्या मरणाची बातमी बाहेर आली, तेव्हां संपादकास चूक कळून आली व एवढी मोठी बातमी हातीं आली असतां, तिचा उपयोग करतां आला नाहीं, ह्याबद्दल त्यास वाईट वाटलें.

( दि वीक मॅ. )

## ४ जुलै, १७७६

ग्रेट ब्रिटनमधील लोक अमेरिकेंत प्रथम व्यापार व वसाहत ह्यांसाठी उतरले, परंतु पहिला जेम्स आणि पहिला चार्लस ह्यांच्या अमदानींतील धार्मिक छळास कंटाळून प्युरिटन लोकांनीं इंग्लंड सोडलें. ट्यूडर घराण्याच्या अमदानींतील व्यापाऱ्यांचा आणि रॅले, डेलावेर, बाल्टिमर इत्यादींचा वसाहती करण्यांतील हेतु पैसा मिळविणें अगर ब्रिटिश सत्तेचा विकास करणें हा होता. तेथील स्थानिक रानटी लोकांस सुधारण्यासाठी आम्ही जात आहों, असें त्यांनीं सांगितलें, तरी तो मुद्दा महत्त्वाचा नव्हता. परंतु पहिल्या जेम्सच्या अमदानीचे अखेरचे काळांत ज्यांनीं अमेरिकेकडे प्रयाण केलें, ते सर्व आपलें धार्मिक स्वातंत्र्य कायम राखण्याकरितां गेले. साहजिकच त्यांस इंग्लंडबद्दल फारसा ओलावा वाटत नव्हता. ह्या वसाहतवाल्यांनीं अमेरिकेंत अत्यंत कठीण प्रसंगांस तोंड देऊन आपलीं घरेंदारें स्थापन केलीं. त्यामुळें त्यांचेवर व त्यांचे वंशजांवर स्वाभिमान, एककल्लीपणा, स्वातंत्र्यप्रियता, इत्यादींची पकड बसली. दुसऱ्या जेम्सचे कारकीर्दींत वसाहतवाले व इंग्लंड ह्यांचेमध्यें सटका उडून अमेरिका स्वतंत्र होण्याची वेळ आली होती. परंतु त्या राजास तक्तावरून वेळींच दूर करण्यांत आल्यामुळें स्वातंत्र्ययुद्ध शंभर वर्षांनीं पुढें ढकललें गेलें. तेव्हांपासून तिसऱ्या जॉर्जच्या अमदानीपर्यंत न्यू इंग्लंडच्या व्यवस्थेंत इंग्लंडनें ढवळाढवळ केली नाहीं. व्यापाराविषयक कायद्यांच्या अंमलबजावणींत इंग्लंडनें कडकपणा दाखविला नाहीं, तोंपर्यंत वसाहतींना तक्रारीस फारसा वावहि नव्हता. सप्तवार्षिक युद्धाचा शेवट इंग्लंडला अनुकूल होईपर्यंत अमेरिकेंतील वसाहतींना स्वातंत्र्याचें स्वप्नहि पडणें अशक्य होतें. फ्रान्सचें लष्करी सामर्थ्य उत्तरेकडून व पश्चिमेकडून त्यांस भीति दर्शवित होतें. परंतु सप्तवार्षिक युद्धांत फ्रान्सचा पराभव झाल्यामुळें वसाहतवाल्यांवरील दडपण नाहींसें झालें. वसाहतीमधील सैनिक फ्रेंचांविरुद्ध इंग्लंडच्या सैनिकांच्या बरोबरीनें लढले व त्या वेळीं वसाहतवाल्यांमध्यें आत्मविश्वास निर्माण झाला. तिसऱ्या जॉर्जचे अमदानीचे प्रारंभीं वसाहतींची लोकसंख्या १५ ते २० लाख, म्हणजे इंग्लंडच्या लोकसंख्येचे जवळजवळ एक चतुर्थांशइतकी होती. अमेरिकेंतील ही परिस्थिति नीट ध्यानांत न घेतली गेल्यामुळेंच पुढें इंग्लंडला आपल्या वसाहतींस मुकावें लागलें. सप्तवार्षिक युद्धाच्या खर्चामुळें झालेलें कर्ज भरून काढण्यासाठी इंग्लंडला करवाढ करावी लागली. हें युद्ध अंशत: अमेरिकन वसाहतवाल्यांच्या हितासाठीच होतें, ह्या दृष्टीनें त्यांनीं कांहीं करभार उचलला पाहिजे अशा मुद्यावर वसाहतींवर स्टँप ॲक्टान्वयें कर बसविण्यांत आला त्यास वसाहतींनीं विरोध केला. ब्रिटिश पार्लमेंटनें पुढें ॲक्ट रद्द केला परंतु कर बसविण्याचा आपला अधिकार कायम असल्याचें जाहीर केलें. इतर कर पुढें बसविण्यांत आले व हें प्रकरण चिघळलें. आपल्या मूळ देशापासून स्वतंत्र व्हावें, अशी इच्छा वसाहतवाल्यांत अद्याप प्रबळ झालेली नव्हती, परंतु हळुहळु ती वाढत गेली. ब्रिटिश सरकारनेंहि कडक धोरण स्वीकारलें. वसाहतींमध्यें राजनिष्ठ लोक बहुसंख्य होते, परंतु ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठणारांनीं युद्धांत विजय मिळवून अमेरिकेस स्वतंत्र केलें. ४ जुलै, १७७६ रोजीं अमेरिकेंतील १३ वसाहतींनीं फिलॅडेलफिया येथें स्वातंत्र्याची घोषणा केली, व "युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिका." हें नवें राष्ट्र स्थापन केलें. फ्रान्सलाहि इंग्लंडवर सूड घेण्याची त्यामुळें संधी मिळाली व फ्रान्स आणि अमेरिका हे देश एक झाले, आणि फ्रेंच आरमाराचें सहाय अमेरिकेस मिळालें. अखेर, १७८२ सालीं इंग्लंडनें अमेरिकेचें स्वातंत्र्य मान्य केलें. तें १७८३ च्या व्हर्साइच्या तहानें मामुली रीतीनें पक्कें झालें. ४ जुलै हा स्वातंत्र्यदिन अमेरिकेंत नुकताच साजरा झाला, त्यास यंदाचे वर्षीं विशेष महत्त्व प्राप्त झालें. जर्मनीच्या जगड्व्याळ राज्यतृष्णेपासून आपला बचाव करण्याचा सर्व राष्ट्रें प्रयत्न करीत आहेत, त्यांस अमेरिकेकडून मनःपूर्वक सहाय मिळत आहे.


व्हॉलीबॉल्स, टेनिकॉइट रिंग्ज्, बॅडमिंटनचीं फुलें, कॅरमबोर्डस्, पत्ते, पी. टी. शूज्, पिंगपाँग बॅटस्, बॉल्स, वगैरे सामान किफायतशीर रीतीनें मिळण्याचें एकमेव ठिकाण म्हणजे—

**साठे—स्पोर्टस्,**
डेक्कन जिमखाना पोस्टाजवळ, पुणें ४.

**पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें**
**संग्रह करा**
**कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट**
**पाचकवटी, पंचकोलासव**
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
**—: रक्तवर्धक :—**
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें
**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

## निजाम संस्थानांतील सुवर्ण–खाणींचें खोदकाम

सुवर्ण–खाणी–खोदनाच्या अतिशय फायदेशीर धंद्याच्या पुनरुज्जीवनास हैद्राबादेंत सुरवात होत आहे. सरकारनें १,००,००० पौंड खर्च करून सुवर्ण संशोधनाच्या गेल्या तीन वर्षांत केलेल्या कामाची फलनिष्पत्ति फारच समाधानकारक आणि उत्तेजनक आहे. तज्ज्ञांनीं अशी खात्री दिली आहे कीं, सुवर्णखाणींचें खोदकाम फायदेशिर रीतीनें पुनः सुरू करणें शक्य आहे. त्याप्रमाणें रायचूर जिल्ह्यांतील हट्टी विभागांत हा धंदा पुनः सुरू करण्यास लागणाऱ्या खर्चासाठीं निजाम सरकारनें आणखी २,५०,००० पौंड मंजूर केले आहेत.

अलीकडे सोन्याचा भाव वाढल्यानें संस्थानांत—विशेषतः रायचूर जिल्ह्यांतील मस्की-हट्टी विभागांत—सुवर्ण-खाणींचें खोदकाम पुनः चालू करण्याकडे सरकारचें लक्ष गेलें आहे. पुरातन काळीं हा मस्की-हट्टी विभाग दक्षिणेंत असलेल्या सुवर्ण-खाणींच्या महत्त्वाच्या केंद्रांपैकीं एक केंद्र होतें. एका खाजगी कंपनीनें यांपैकीं कित्येक खाणी खोदण्याचें काम पुनः सुरू केलें. हें काम सन १९२० पर्यंत म्हणजे जवळजवळ २० वर्षें चाललें. परंतु वाहतुकीच्या अडचणीमुळें सदरील काम फायदेशीर होत नसल्याकारणानें बंद करावें लागलें. वरील काळांत या खाणींतून १,५१,१७६ औंस वजनाचें सोनें निघालें. हट्टी येथील सोन्याची खाण पुरातन काळीं ६४९ फूट खोल होती. परंतु जेव्हां ही खाण सदरील कंपनीनें बंद केली त्या वेळेस तिची खोली आणखी ३,४०० फुटांनीं जास्त वाढली.

### मोठ्या प्रमाणावर पहाणीचें काम

त्यानंतर हैद्राबाद भूगर्भशास्त्र खात्यानें रायचूर आणि गुलबर्गा जिल्ह्यांतील जेथें सुवर्ण आहे अशा ठिकाणच्या खेड्यांची व्यापक प्रमाणावर पाहणी केली. या पाहणींत पुरातन काळीं खणलेल्या सोन्याच्या पुष्कळ खाणींचा शोध लागला आणि हट्टी व देवदुर्ग भागांत सुवर्ण खाणी शोधून काढण्याचें काम हातीं घेतलें गेलें. यावरून या खात्यानें असा निष्कर्ष काढला कीं सदरील क्षेत्राची संभाव्य शक्ति यापूर्वीं केव्हांच यथार्थ रीतीनें अजमावली गेली नाहीं. यानंतर सरकारनें यासंबंधीं तज्ज्ञांचें मत मागविलें व तज्ज्ञांनीं दिलेल्या मताच्या अधिकारावर सन १९३७ मध्यें संस्थानांत व्यापारदृष्ट्या सोन्याच्या खाणी शोधून काढण्याचें काम सुरू करण्याचें ठरविलें.

### सुवर्ण–खाणी शोधून काढण्याचें काम

यासाठी सुरवातीस ५०,००० पौंडांची रक्कम मंजूर केली आणि स्टेट रेल्वे बोर्डाच्या नेतृत्वाखालीं हें काम सुवर्ण खोदकाम करणाऱ्या तज्ज्ञांच्या एका सुप्रसिद्ध कंपनीकडे सोंपविण्यांत आलें होतें. साधारण पृष्ठभागावरील भूगर्भांतील सुवर्ण-खाणी शोधून काढणें, अशुद्ध धातूच्या पाटाची अखंडता किती खोल आहे हें पाहण्यासाठीं हिऱ्यांना भोंक पाडणें, उपलब्ध माहितीविषयीं खात्री करून घेण्यासाठीं एका लहान खाणींतून बंबानें पाणी उपसून काढणें आणि भूगर्भांतील परिस्थितीचा अभ्यास करणें, या सर्व बाबींचा हातीं घेतलेल्या कामांत समावेश होतो.

वरील कामाची फलनिष्पत्ति फारच आशाजनक होती, म्हणून निजाम सरकारनें या कामाचा विकास करण्यासाठीं आणखी ५०,००० पौंड मंजूर केले. हें विकासकार्य करण्याकरितां मदत मिळावी म्हणून मोठीं व अधिक कायम स्वरूपाचीं यंत्रें हट्टी येथील खाणीच्या 'ओकले शॅफ्ट' येथें बसविलीं गेलीं.

याच वेळीं शोरापूर तालुक्याच्या लगत असलेल्या जुन्या मंगळूर नांवाच्या खाणीच्या उत्तर क्षेत्रांतील बूदनि व हट्टीमधील डोंगराळ प्रदेश आणि पुरातन वडली नांवाची खाण व तिच्या आसपास असलेल्या भागांत सुवर्ण खाणी शोधून काढणाऱ्या मंडळानें नवीन खाणींचा शोध लावला. यानंतर जवळच असलेल्या इतर संभाव्य भागांतहि खाणीचा शोध लावण्याचें काम हातीं घेतलें होतें.

सुवर्ण खाणी शोधून काढणें व त्यांचा विकास करणें या सर्वांपासून जी फलनिष्पत्ति झाली ती—विशेषतः हट्टी येथें—फारच समाधानकारक नि खात्रीदायक असून भूगर्भशास्त्रज्ञ व सुवर्ण खाणीच्या निष्णात एंजिनियर्सनीं आपलें स्वतंत्र मत देऊन वरील कामापासून काढलेल्या निर्णयाच्या खरेपणाविषयीं खात्री दिली.

### आणखी लागणारा खर्च मंजूर

या दृष्टीनें सरकारनें सुवर्ण खाणी खोदण्याच्या धंद्यास पुनः सुरवात करण्यासाठीं आतां आणखी २,५०,००० पौंडांची रक्कम मंजूर केली आहे. हट्टी क्षेत्रांतील भूगर्भांत झालेल्या कामाची वाढ करण्यासाठी व सोनें तयार करण्याकरितां एक गिरणी उभारण्याच्या कामाकडे या रकमेचा विनियोग व्हावयाचा आहे.

पुणें–मिनर्व्हा
७ वा आठवडा
समाजाच्या विषमतेवर झगझगीत प्रकाश पाडणारा
नवयुगचा प्रभावशाली बोलपट
अमृत
दिग्दर्शक : विनायक
लेखक : खांडेकर
छाया : पां. नाईक
: भूमिका :
मीनाक्षी, ललिता पवार, बेबी देवी, बाबुराव पेंढारकर,
साळवी, दामुअण्णा मालवणकर, मा. विठ्ठल, विनायक
मुंबई–सेंट्रल सिनेमा
३ रा आठवडा
शिवाय अखिल महाराष्ट्रांत सुरू आहे !

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

( ले. श्री. वा. चिं. भानू )

हिंदुस्थान सरकारचे मार्केटिंग ( विक्रय विषयक ) सल्लागार यांनीं ब्रह्मदेश व हिंदुस्थानांतील बटाट्यांचा क्रयविक्रय या विषयावर एक रिपोर्ट लिहिला आहे त्यांत ते म्हणतात कीं, बटाटा हें एक धनोत्पादक पीक आहे. साला कोटी ९३ कोटी किंमतीचा बटाटा होतो. दिवसेंदिवस तें पीक करण्याकडे शेतकऱ्यांची प्रवृत्ति वाढत आहे. पण जगांतील इतर देशांच्या मानानें हिंदुस्थानांत दर एकरीं बटाट्याचें पीक येण्याचें प्रमाण फारच थोडें आहे. हिंदुस्थानांत बटाटा हा फक्त खाण्यासाठींच उपयोगांत आणला जातो. इतर देशांप्रमाणें बटाट्यापासून इतर पदार्थ निर्माण करण्याचे प्रयत्न आपल्या देशांत होत नाहींत. आपल्या पुणें जिल्ह्यांत खेड तालुक्यांत बटाट्याचें पीक प्रामुख्यानें काढतात. पण माफक किंमतीस निर्लेप बेणें न मिळणें व पिकाला जरूर असणारा पाणीपुरवठा भरपूर नसणें या अडचणींनें तिकडचा शेतकरी दिवसेंदिवस अधिक कर्जबाजारी होत आहे. कीड पडून माल खराब होतो व अशा नासलेल्या मालाला किंमत येत नाहीं. अशा वेळीं बटाट्यापासून कोणचे इतर औद्योगिक पदार्थ निर्माण करतां येतात त्याची माहिती इंपीरियल अॅग्रिकल्चरल कौन्सिलनें इकडच्या भागांतील शेतकऱ्यांना दिल्यास बरीच मदत होईल.

* * *

ग्रामीण उद्योगधंद्यांना ऊर्जितावस्था आणण्यासाठीं सहकारी संस्था, रजिस्टर्ड न झालेल्या संस्था व औद्योगिक बाबींकडे विशेष कल असलेल्या खाजगी व्यक्ती यांना जरूरी प्रमाणें भांडवलाचा पुरवठा करण्याचें संयुक्त प्रांताच्या सरकारनें ठरविलें आहे. सहकारी संस्थांना रु. ५००० व खासगी व्यक्ती व अनरजिस्टर्ड संस्था यांना प्रत्येकीं रु. १५०० पर्यंत सरकार भांडवल देणार आहे. या भांडवलाची फेड ७ वर्षांत करावयाची असून ३½ टक्के हून कमी नाहीं इतक्या दरानें व्याज आकारावयाचें सरकारनें ठरविलें आहे. याप्रमाणें इतर प्रांतिक सरकारांनींहि आपापल्या प्रांतांत सढळ हातानें भांडवलाचा पुरवठा केल्यास ग्रामीण उद्योगधंदे सुधारतील व बेकारी कमी होईल यांत शंका नाहीं. पण दळणवळणाचे मार्ग, वहातुकीचा खर्च, परदेशच्या मालाबरोबर होणारी चढाओढ यामुळें लहानसहान धंद्यांना जो पायबंद बसतो तो सरक्षक जकाती बसविण्याचें हिंदुस्थान सरकारनें मनावर घेतल्याशिवाय सुटणार नाहीं, व लहान-मोठे धंदे आपल्या देशाला किफायतशीर होतील याचाही विचार प्रांतिक सरकारला करण्यास लोकहितदक्ष पुढाऱ्यांनीं भाग पाडलें पाहिजे तरच अशा भांडवलाचा खरा उपयोग होईल.

* * *

डिसेंबर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या ३४ महिन्यांचे अवधींत मद्रास इलाख्यांत शेतकरी ऋणमुक्तेच्या कायद्यान्वयें १,५३,००० अर्जदारांच्या मागणीचा विचार झाला व त्यांचेकडील येणें कर्जबाकी रु. ५,७८,८०,८८३ बद्दल तडजोडी निकालांत निघाल्या. अदमासे शेंकडा ४७·३ प्रमाणांत सूट सवलत देण्यांत आली !


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

"अर्थ" ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११९—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६—१ |
| ३½% १९४७—५० ... ... ... | १०२—१३ |
| ३% ( १९६३—६५ ) ... ... ... | ९५-०-६ |
| २¾% १९४८—५२ ... ... ... | ९७—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—१४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) — .. | ११५—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२७—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००—५० ) ११% ... ... | १४६—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | १११—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४५—४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% ... ... | १३२—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १६२५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६३०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा—जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६४—८ |
| अहमदाबाद् प्रांतज (५००) ११½% | ८९२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ३% ... ... ... | ३४६—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २०९—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४५—० |
| शिंदया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—११ |
| न्यू इंडिया विमा ( ७५—१५ ) १ रु. ८ आ. ... | ४६—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४२३०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १५४—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३७७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १४३ रु.१४ आ. ७ पै ... | १९४७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १४२—४ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२—६—३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६३—०—६ |


सर्व तऱ्हेचें कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.



**मधुमेहावरील औषध**

**तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७**

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
लंकेटूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडेमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रा. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांताचें विवेचन केलें आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तन्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिन्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदाजवळ, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

# अर्थ

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.


वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख १६ जुलै, १९४१ | अंक २९

दक्षिण कोंकणांतील राष्ट्रीय बाण्याचें
प्रमुख साप्ताहिक
## हिंद—सेवक
संपादक—सदानंद शांताराम भांडारकर
प्रकाशक—मधुकर यशवंत भांडारकर
हिंदसेवकमध्यें दर गुरुवारीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व घडामोडींची विस्तृत माहिती मिळते.
व्यवस्थापक—'हिंद-सेवक', मालवण, जि. रत्नागिरी.




व्हॉलीबॉल्स, रेनिकॉइट रिंग्ज्, बॅडमिंटनचीं फुलें, कॅरमबोर्ड्स, पत्ते, पी. टी. शूज्, पिंगपाँग बॅट्स्, बॉल्स, वगैरे सामान किफायतशीर रीतीनें मिळण्याचें एकमेव ठिकाण म्हणजे—
## साठे—स्पोर्टस्,
डेक्कन जिमखाना पोस्टाजवळ, पुणें ४.

## पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
## संग्रह करा
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
## —: रक्तवर्धक :—
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा
मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें
## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

## "अर्थ" ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

# विविध माहिती

**व्हाइसरॉयांचा दौरा**

मद्रास आणि मुंबई प्रांतांतील युद्ध-प्रयत्नाची प्रगति समक्ष पहाण्याकरितां व्हाइसरॉय ह्या दोन्ही प्रांतांस जुलैच्या अखेर व ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत भेट देणार आहेत, असें समजतें.

**सेव्हिंग्ज ठेवीवर १% व्याज**

बँक ऑफ इंडियानें आपल्या सेव्हिंग बँक खात्यांतील ठेवींवरील व्याजाचा दर १½% चा १% करण्याचें ठरविलें आहे. ३१ ऑगस्टपासून नवा दर अंमलांत येईल

**ट्रेझरी बिलांवर १३ आ. ९ पै व्याजाचा दर**

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं एकूण ९ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १३ आ. ९ पै इतका पडला.

**अमेरिकेंतील कपाशीची लागवड**

अमेरिकेंत कपाशीखाली एकूण २ कोटि, ३५ लक्ष एकर जमीन आहे. गेल्या वर्षी २ कोटि,५०½ लक्ष एकरांत कपास पेरलेली होती. म्हणजे, चालू वर्षी कपाशीच्या लागवडींत १५% घट झालेली आहे.

**युगोस्लाव्हियांची वाटणी**

युगोस्लाव्हिया देशाची जर्मनी व इटली यांचेमध्यें वाटणी करणाऱ्या करारावर त्या दोन देशांच्या नुकत्याच सह्या झाल्या. वाटणीची सरहद्द ठरविणारी रेषा निश्चित करण्याचें काम दोन्ही देशांच्या एका कमिशनकडे सोपविण्यांत येईल.

**इराकचें लष्करी संरक्षण**

इराकच्या लष्करी संरक्षणाचें काम हिंदी कमांडर-इन-चीफकडे सोपविलेलें आहे.

**एक लाख वसतीचीं शहरें**

प्रत्येकीं १ लक्षापेक्षा अधिक वस्ती असलेलीं सबंद हिंदुस्थानांत मिळून फक्त ३४ शहरें आहेत.

**तीन मैल लांबीचीं विड्याचीं थोटुकें**

विड्या ओढणाऱ्या सामान्य इसमाच्या चाळीस वर्षांच्या हयातींत त्यानें ओढलेल्या एकूण विड्यांच्या थोटुकांची लांबी मोजली तर ती तीन मैल भरेल असा एकानें हिशेब केला आहे.

**वृत्तपत्रांचीं बांधलेलीं साडेतीन लाख पुस्तकें**

ब्रिटिश म्यूझियम ह्या जगप्रसिद्ध ग्रंथसंग्रहांत वृत्तपत्रांचीं पुस्तकें बांधून ठेवण्यांत येतात. अशीं साडेतीन लाख पुस्तकें तेथें आहेत आणि त्यांमध्यें दरवर्षी पांच हजार पुस्तकांची भर पडते.

**पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट**

पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टाचा फायदा सुमारें ८ लक्ष, १० हजार रेल्वे कामगारांस मिळत आहे.

**प्राथमिक शिक्षणाचा प्रसार**

म्हैसूर संस्थानांत आतांपर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थेची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर होती, ती आतां सरकारनें स्वतःवर घेतली आहे. त्यामुळें प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होण्यास मदत होईल. एक हजार नव्या शाळा लवकरच स्थापन होतील.

**प्राथमिक शाळागृहांस सरकारी ग्रँट**

प्राथमिक शाळांना इमारती बांधण्यास मदत देण्याकरितां मुंबई प्रांतिक सरकारनें २ लक्ष, ५५ हजार रुपये चालू वर्षी खर्च करण्याचें योजिलें आहे. जिल्हा लोकल बोर्डांनीं सरकारी ग्रँटच्या सहायानें स्वतःच्या खर्चानें इमारती बांधावयाच्या आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या वाट्यास १२,७५० रुपयांची सरकारी ग्रँट येईल.

**मध्यवर्ती विधिमंडळाची मुदतवाढ**

१ ऑक्टोबर, १९४२ पर्यंत मध्यवर्ती असेंब्ली आणि कौन्सिल ऑफ स्टेट ह्यांची मुदत वाढविण्यांत आली आहे.

**जपानचा ब्रह्मी भाषेंतील ब्रॉडकास्ट**

ब्रह्मी भाषेंतून करण्यांत येणारा जपानी रेडिओवरील प्रचार अथवा ब्रह्मी भाषेंतून सांगण्यांत येणाऱ्या जपानी रेडिओवरील बातम्या सार्वजनिक ठिकाणीं ऐकण्यास ब्रह्मदेशांत बंदी करण्यांत आली आहे.

**मुंबई प्रांतांत युद्धविषयक ऑर्डरी**

हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्यानें मे, १९४१ मध्यें मुंबई प्रांतांत ४१½ लक्ष रुपयांचीं युद्धपुरवठ्याचीं कंत्राटें दिलीं.

**स्वातंत्र्य-दिनाचे सुटींत ३१८ लोकांचा अपघातामुळें मृत्यु**

अमेरिकेच्या स्वातंत्र्य-दिनाचे संबंधांत त्या देशांत दोन दिवस सार्वजनिक सुटी होती, त्या वेळीं झालेल्या अपघातांत ३१८ लोक मरण पावले !

**१७७६**

इंग्लंडला युद्धसामुग्रीचा पुरवठा कायदेशीर रीतीनें करतां यावा ह्या हेतूनें अमेरिकन काँग्रेसनें बिल पास केलें त्याचा अनुक्रम नंबर १७७६ आहे. अमेरिकेनें स्वतःच्या स्वातंत्र्याची घोषणा करून तें इंग्लंडकडून लढून मिळवलें तें वर्षहि १७७६ आहे. हा आकड्याचा योगायोग चमत्कृतिजनक आहे खरा.

**बँक ऑफ बरोडा, लि.**

वरील बँकेस ३० जून १९४१ अखेर संपलेल्या सहामाहींत, मागील हिशेबांतील शिलकी नफा धरून, ४ लक्ष, ८३ हजार रु. नफा झाला. करमाफ १०% इंटेरिम डिव्हिडंड भागीदारांस मिळेल.

**हिटलर व गोअरिंग ह्यांचेमध्यें तंटा**

रशियावरील स्वारीचे संबंधांत हिटलर व गोअरिंग ह्यांचेमध्यें तीव्र मतभेद झाला, नवीन चढाई करण्याची आपली तयारी नाहीं, असें गोअरिंगनें सांगितलें, हिटलरनें त्याला भ्याड म्हटलें वगैरे माहिती मॉस्को रेडिओनें जाहीर केली आहे.

**तंबाखूची लागवड**

युद्धावर गेलेल्या सैनिकांस सिगरेट्स फार मोठ्या प्रमाणावर लागतात, त्यांस आवश्यक असलेल्या तंबाखूस अर्थातच मागणी वाढली आहे. संयुक्तप्रांत सरकारनें तंबाखूची लागवड वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालविला आहे.

**ब्रिटिश तिजोरींतून खर्च**

इराकच्या लष्करी संरक्षणाचें काम हिंदुस्थानच्या कमांडर-इन-चीफकडे सोपविलेलें असलें, तरी त्यासंबंधांतील खर्च ग्रेट ब्रिटनच सोसणार आहे.

**स्नान-भस्म आणि भस्म-स्नान**

एक : "आम्हीं नवीन बनवलेलें स्वदेशी "स्नान-भस्म" (आंघोळीच्या पाण्यांत मिसळावयाची पूड) तुम्हीं वापरून पाहिलेंत; कसा काय गुण आला?"

दुसरा : "तुमचें तें भस्म चवीला चांगलें आहे. पण तें घेण्यापेक्षां नेहमींप्रमाणें पाण्यानें स्नान केलेलें बरें वाटतें !"

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३३८ | अँग्लो–रशियन युद्ध–सहकार्य | |
| २ हातमागांच्या धंद्यास संरक्षण ... | ३३९ | ५ टेलिफोनच्या दराची आकारणी ... | ३४२ |
| ३ सरकारी कर्जरोख्यांची अदलाबदल | ३४० | ६ व्यवसायांवरील प्रांतिक कर ... ... | ३४३ |
| ४ स्फुट विचार ... | ३४१ | ७ चेक्स व हुंड्या ह्यांच्या पैशाची वर्गावर्गी ... | ३४४ |
| अमेरिकेची युद्धमार्गातील प्रगति–सिरियांत ब्रिटिश विजय–ब्रिटिश विमान-दलाचा वाढता पराक्रम–रशियांत जर्मनीची चढाई मंदावली–हिरड्याची निर्गत | | ८ बँक ऑफ इंडिया ... | ३४४ |
| | | ९ टाटा कंपनीच्या शेअर्स-वरील डिव्हिडंड ... | ३४५ |
| | | १० निवडक बाजारभाव . | ३४६ |


# अर्थ

बुधवार, ता. १६ जुलै, १९४१

## हिंदी हातमागाचा धंदा

हिंदुस्थानांतील हातमागांच्या धंद्याचें पुरातनत्व, त्या धंद्याचें हिंदी आर्थिक जीवनांत महत्त्वाचें स्थान, त्या धंद्यावर प्रत्यक्षपणें अवलंबून असलेल्या लोकांची अत्यंत मोठी संख्या, आयात होणाऱ्या व मोठ्या गिरण्यांत तयार होणाऱ्या मालाची हातमागाच्या कापडाशीं चालणारी अत्यंत तीव्र स्पर्धा, विणकरांची निकृष्टावस्था, आपला धंदा सोडून देऊन उपजीविकेच्या साधनास मुकण्याची त्यांचेवर आलेली पाळी, यांत्रिक मागांमुळें हातमागांच्या स्पर्धाशक्तींत आणखी झालेली घट, इत्यादि गोष्टी आतां लोकांच्या पूर्ण परिचयाच्या आहेत. हातमागांचा धंदा सुधारला पाहिजे व टिकवला पाहिजे, ह्याबद्दल मतभेद नाहीं; तथापि यंत्रीकरण व औद्योगिक प्रगति ह्यांच्या काळामध्यें, पिढ्यानपिढ्या चालू असलेल्या जुन्या पद्धतीच्या हातमागाचा टिकाव कसा लागणार, हा येथें महत्त्वाचा प्रश्न आहे. एकीकडे कापडाच्या गिरण्यांस संरक्षण चालू ठेवून, त्या गिरण्यांच्या स्पर्धेमुळें मागें पडत चाललेल्या हातमागांच्या धंद्याचेंहि स्पर्धेपासून दुसरीकडे संरक्षण करण्याचा हा बिकट प्रश्न आहे.

हिंदुस्थान सरकारनें ह्या संबंधांत नेमलेल्या फॅक्ट फाइंडिंग कमिटीनें हातमागांच्या धंद्यासंबंधी प्राथमिक चौकशी करून प्रश्नमालिका तयार केली, तीस अनुलक्षून मुंबईच्या गिरणीमालक संघानें आपलें म्हणणें व प्रश्नांस उत्तरें तयार करून तीं कमिटीकडे रवाना केलीं आहेत. गिरणीमालक संघाचें म्हणणें गिरणीवाल्यांच्या हितास पोषक असणार हें उघड आहे. तेव्हां त्या संघाच्या म्हणण्याचा विचार ही गोष्ट गृहीत धरूनच केला पाहिजे. गिरणीमालक संघाची पहिली तक्रार अशी आहे कीं, हातमागांच्या धंद्याचा विस्तार व त्याची परिस्थिति ह्यांविषयीं विश्वसनीय माहितीच उपलब्ध नाहीं. १९२१ सालीं सबंद हिंदुस्थानांतील हातमागांची संख्या मोजण्याचा यत्न करण्यांत आला होता व त्यानंतरहि कांहीं प्रांतांनीं हातमागांच्या धंद्यासंबंधीं माहिती गोळा केली. मुंबई सरकारनें नेमलेल्या बॉंबे एकनॉमिक आणि इंडस्ट्रिअल सर्व्हे कमिटीनेंहि ह्याबाबत चौकशीची थोडी खटपट केली, परंतु हातमागांची संख्या किती आहे, ह्याचा बरोबर अंदाज करणें त्या कमिटीस शक्य झालें नाहीं. हातमागांच्या धंद्याच्या निकृष्टावस्थेविषयीं एकमत असलें, तरीं त्या धंद्याच्या विस्ताराविषयीं अद्याप पुरेशी माहिती संकलित होऊं शकलेली नाहीं. ह्या धंद्याच्या सर्व अंगोपांगांची तपशीलवार माहिती गोळा करणें हें त्या धंद्याच्या संरक्षणाचा विचार करण्यापूर्वीचें महत्त्वाचें व आवश्यक काम आहे, असें गिरणीमालक संघाचें म्हणणें आहे. हें प्रचंड काम प्रांतिक सरकारांकडे सोपवून भागणार नाहीं; त्यासाठी स्वतंत्र अखिल भारतीय योजनाच आखली पाहिजे, असें तो संघ म्हणतो. हें गणतीचें काम महत्त्वाचें असलें, तरी त्याची वाट बघण्याचें कारण नाहीं. हातमागाच्या धंद्यांतील अडचणींचें अस्तित्व सिद्ध करण्याची जरूरी राहिलेली नसल्या कारणानें त्याच्या मदतीचा विचार तातडीनें चालू करणें इष्ट होईल, हें त्यास सरळ उत्तर आहे. शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनाच्या योजना, त्यांच्या कर्जबाजारीपणासंबंधीं व त्यांच्या शेतीच्या धंद्याविषयीं पुरेपूर माहिती मिळवीपर्यंत, जशा स्थगित करण्याचें प्रयोजन नाहीं, तद्वतच हातमागांच्या धंद्याची स्थिति आहे.

हातमागांच्या धंद्यास संरक्षण दिलें म्हणजे गिरण्यांवर त्याचा भार पडणार, अशी गिरणीमालक संघास भीति वाटत आहे. गिरणीच्या कापडानें हातमागांवरील कापडाशीं स्पर्धा करूं नये, ह्यासाठी दोन्हींच्या बाजारपेठा निश्चित कराव्यात व जरूर तर गिरणी-कापडावर पट्टी बसवावी असें एकनॉमिक आणि इंडस्ट्रिअल सर्व्हे कमिटीनें सुचविलें आहे, तें गिरणीमालक संघास अर्थातच मान्य नाहीं. कापडाच्या गिरण्यांस हिंदुस्थान सरकारनें संरक्षण दिलें आहे, तें तज्ज्ञांच्या टॅरिफ बोर्डानें शिफारस केल्यावरूनच दिलेलें आहे. तेव्हां, ह्या संरक्षणाचें परिमाण कमी होईल, अशी कोणत्याहि योजनेस गिरणीवाले तयार होणार नाहींत हें उघड आहे. हिंदी गिरण्यांस संरक्षण देण्यापूर्वी त्या धंद्याविषयीं जशी चौकशी करण्यांत आली, त्याच प्रकारची चौकशी हातमागांच्या धंद्याविषयीं करण्यांत आली पाहिजे व हिंदी गिरण्यांचें वाजवी हितसंरक्षण झालें पाहिजे, अशी गिरणीमालक संघाची मागणी आहे. एखाद्या धंद्यास नव्यानें संरक्षण देतांना, त्यामुळें दुसऱ्या एखाद्या संरक्षित धंद्यावर प्रतिकूल परिणाम होत नाहींना, हें पाहिलें पाहिजे, ह्या दृष्टीनें वरील मागणींत निःसंशय तथ्य आहे. तथापि, सध्या चालू असलेली चौकशी केवळ माहिती गोळा करण्याकरितांच आहे आणि त्या माहितीच्या आधारानेंच सरकार हातमागांच्या धंद्यास संरक्षण कसें व किती देईल हें ठरवील अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. केवळ सावधगिरीच्या दृष्टीनेंच गिरणीवाल्यांनीं ओरड केली आहे असें दिसतें.

हातमागांचा धंदा म्हणजे हातानें चालविण्यांत येणाऱ्या मागांचा धंदा; विजेच्या अगर इतर शक्तीनें चालविण्यांत येणाऱ्या मागांचा नव्हे; व फक्त पहिल्या प्रकारच्याच मागांच्या धंद्याचे संरक्षणाविषयीं प्रश्न आज आहे हें गिरणीमालक संघानें आपल्या उत्तरांत स्पष्ट केलें आहे. गिरण्या, पॉवरवर चालणारे माग व खेडेगांवांतील खरेखुरे हातमाग ह्यांचेमध्यें तिरंगी स्पर्धा आज चालू आहे, ह्या सर्वांच्या हिताचें संवर्धन होईल, अशी योजना सरकारनें आखली पाहिजे. त्यांपैकी, हातमागांच्या धंद्याच्या पुनर्जीवनाचा प्रश्न हातीं घेण्यांत आला आहे, तो सोडवितांना इतरांस थोडा स्वार्थत्याग करावा लागणार, हें उघड आहे. गिरण्यांचा धंदा सुसंघटित, तर हातमागांचा धंदा मागसलेला व विस्कळित असा आहे. तेव्हां राष्ट्रीय जिव्हाळ्याच्या, अशा ह्या विणकरांच धंद्यास प्रोत्साहन देऊन गिरणीवाल्यांनीं जरा सहानुभूतीचें धोरण स्वीकारलें पाहिजे. केवळ आधुनिक प्रकारच्या औद्योगीकरणाच्या मागें लागून भागणार नाहीं; प्रत्यक्ष परिस्थिति पाहूनच योग्य ते उपाय योजिले पाहिजेत. हातमागाच्या धंद्यास संरक्षण देणें, म्हणजे तो विस्कळितपणें चालू रहाण्यास प्रोत्साहन देणें नव्हे. ह्या धंद्याच्या पुनर्रचनेविषयींहि जोमानें प्रयत्न चालवावे लागतील, हें विसरून चालणार नाहीं.

## सरकारी कर्जरोख्यांची अदलाबदल

### प्रो. काळे ह्यांचें मुंबई रेडिओवर भाषण

( मुंबई रेडिओ स्टेशनच्या डायरेक्टरांचे कृपेमुळें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. )

इंग्लंड अमेरिकेकडून युद्धसामुग्री मोठ्या प्रमाणांत खरेदी करीत आहे, त्या बाबतींतल्या देण्याची फेड कांहीं मर्यादेपर्यंत तरी कशी करण्यांत आली आहे हें पाहिलें असतां प्रस्तुत प्रश्नावर प्रकाश पडेल. त्या बाबतींत योजण्यांत आलेला उपाय हिंदुस्थानच्या संबंधांत बऱ्याच अंशीं लागू होईल. ग्रेट ब्रिटनमधील लोकांनीं अमेरिकेच्या कर्जरोख्यांत व कंपन्यांच्या भागांत पैसा गुंतवलेला आहे तितक्यापुरतें अमेरिकेचें इंग्लंडला द्यावयाचें डॉलरमधलें देणेंच झालें. हे अमेरिकन डॉलर रोखे व भाग ब्रिटिश सरकारानें आपल्या प्रजाजनांकडून गोळा केले आहेत आणि त्यांच्या मोबदल्यांत त्यांस स्वतःचे रोखे दिले आहेत. ब्रिटिश सरकारानें अमेरिकन सरकाराच्या स्वाधीन हे रोखे जमा केले असतां त्यांच्या किंमतीइतकें अमेरिकेचें देणें इंग्लंडनें फेडलें असें झालें. ह्या व्यवहारांत काय गोष्टी झाल्या तें पहा. ब्रिटिश लोकांस त्यांनीं धारण केलेल्या अमेरिकन रोख्यांचा मोबदला मिळाला; ब्रिटिश सरकारास आपलें अमेरिकेचें देणें फेडण्याचें साधन उपलब्ध झालें, आणि अमेरिकन सरकारास स्वतःच्या देशाच्या रोख्यांत इंग्लंडकडून येण्याची परतफेड झाली.

### परतफेड कशी केली ?

हेंच तत्त्व आतां आपण हिंदुस्थानच्या लंडनमध्यें जमा झालेल्या शिलकेस लावूंया. आमच्या सरकारनें इंग्लंडमध्यें, स्टर्लिंगमध्यें काढलेल्या कर्जांचे रोखे ब्रिटिश नागरिकांच्या हातांत व मालकीचे आहेत. ते ब्रिटिश सरकारनें जमा करून त्यांच्याऐवजी स्वतःच्या कर्जाचे रोखे योग्य किंमतीनें लोकांस दिले म्हणजे व्यवहाराचा एक भाग पुरा झाला. हे रोखे ब्रिटिश सरकारनें रिझर्व्ह बँकेच्या स्वाधीन करावयाचे आणि त्यांची किंमत आणि आपल्या लंडन येथील साचलेली शिलक ह्यांची बँकेनें वजावाट करून टाकावयाची. असें झालें म्हणजे स्टर्लिंग रोखे रद्द झाले आणि इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचें तितक्यापुरतें देणें-येणें भागलें. शेवटची करावयाची गोष्ट राहिली ती रिझर्व्ह बँकेच्या लंडनमधील कमी झालेल्या शिलकेच्या जागीं हिंदुस्थान सरकारचे रुपयांतील रोखे ह्या देशांत ठेवून द्यावयाचे ही होय.

आपल्या स्टर्लिंगमधील मुदतबंदी कर्जापैकीं १२० कोटि रुपये किंमतीचें कर्ज फेडून टाकून त्याच्या जागीं रुपयांतले हिंदी कर्जरोखे काढण्याची आपली योजना हिंदुस्थान सरकारनें गेल्या फेब्रुवारी महिन्यांत जाहीर केली. हिंदुस्थानच्या विशिष्ट कर्जांचे स्टर्लिंगमधील रोखे ते धारण करणारांनीं आपल्या स्वाधीन करावे म्हणजे त्यांच्या मोबदल्यांत आपल्या कर्जाचे त्याच मुदतीचे व व्याजाच्या दराचे रोखे मोबदल्यांत दिले जातील असा जाहीरनामा ब्रिटिश सरकारनें काढला आणि आमच्या सरकारनें येथील स्टर्लिंग रोखे धारण करणारांस ह्याच आशयाचा हुकूम काढला. रिझर्व्ह बँकेच्या निधींत हिंदी कर्जरोखे किती असावे ह्याची कायद्याची मर्यादा घातलेली होती; पण स्टर्लिंग रोख्यांच्या जागीं हिंदी रोखे अधिक प्रमाणांत येणार असल्यानें हिंदुस्थान सरकारनें ऑर्डिनन्स काढून ही मर्यादा विस्तृत केली. मे महिन्याच्या मध्यापर्यंत ७ कोटि पौंड किंमतीचे स्टर्लिंग रोखे इंग्लंडमध्यें व ह्या देशांत मिळून सरकारकडे लोकांकडून दाखल झाले होते. ह्या रोख्यांच्या मोबदल्यांत उपयोगांत आणण्याकरितां म्हणून हिंदुस्थान सरकारनें त्यांच्या निरनिराळ्या मुदतींचे व व्याजाच्या दराचे रुपयांत व्यक्त केलेले हिंदी रोखे काढले होते आणि ह्या देशांत सुमारें १२ कोटि रुपयांचे हे रोखे लोकांस देण्यांत आले आहेत. हे नवे हिंदी रोखे अर्थातच कृत्रिम स्वरूपाचे आहेत आणि त्यांची योजना सरकारनें कायमची व्यवस्था होईपर्यंत तात्पुरती केली होती.

### सरकारचे नवीन रोखे

एकूण ९३ कोटि रुपयांच्या नवीन काढलेल्या रोख्यांपैकीं ८० कोटींचे रोखे रिझर्व्ह बँक व हिंदुस्थान सरकार ह्यांनीं निम्मे-निम्मे आपणांमध्यें वांटून घेतले आहेत. स्टर्लिंग रोखे धारण करणाऱ्या हिंदी लोकांच्या सोयीसाठी व रोख्यांच्या अदलाबदलीची समाधानकारक आणि कायमची योजना अमलांत आणण्यास वेळ मिळावा म्हणून बदलावयाच्या मूळच्या रोख्यांच्या मुदतीचे व व्याजाचे आपले स्वतःचे रोखे सरकारनें काढले होते. लोकांची ज्यांस साधारणपणें बरी मागणी असते अशा रोख्यांत त्यांची तबदिली होण्याची व्यवस्था आतां सरकारनें केली आहे. रद्द करण्यांत आलेले स्टर्लिंगमधले रोखे ३ टक्के ते ५ टक्के व्याजाच्या दरांचे व निरनिराळ्या मुदतींचे आहेत, त्यांचेपैकी ४½ टक्के दराचे दोन प्रकाराचे रोखे सुमारें ५५ कोटि रुपये किंमतीचे आहेत आणि या दोन जातींच्या रोख्यांची अदलाबदल ३ टक्के व्याजाच्या मामुली रोख्यांशीं होण्याची व्यवस्था सरकारनें केली. नवीन काढलेल्या ८० कोटि रुपयांचे रोखे खपण्यास कालावधि लागणार हें उघड आहे आणि आज नाहीं उद्यां त्या सर्वांची तबदिली मामुली प्रकारच्या रोख्यांत करावी लागेल. असें करतांना नवीन रोखे धारण करणारांच्या हितास बाध येणार नाहीं आणि ते रोखे पुढें विकण्याच्या किंवा बदलून घेण्याच्या मार्गांत अडचणी येणार नाहींत ह्याविषयीं सर्व प्रकारची खबरदारी सरकार घेत आहे.

### परराष्ट्रीय कर्ज कमी झालें

इंग्लंडमध्यें काढलेल्या कर्जाची रकम संधि मिळेल त्याप्रमाणें कमी करीत जाण्याचें धोरण हिंदुस्थानांत सर्वसंमत असेंच आहे. सरकारनेंहि अलीकडे ह्या धोरणाची अंमलबजावणी हळूहळू चालवलीच होती. तथापि, १२० कोटि रुपयांचें स्टर्लिंगमधील कर्ज एकदम रद्द करण्याची योजना हातीं घेऊन ती पार पाडण्याचे प्रयत्न हिंदुस्थान सरकार कसोशीनें करीत आहे, ही गोष्ट येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. युद्धपरिस्थितीची संधि ब्रिटिश सरकार व हिंदुस्थान सरकार ह्यांनीं सहकार्यानें साधली आहे आणि त्यांत इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांची सोय झाली आहे. युद्धसामुग्रीचा पुरवठा ह्या देशांतून होण्यांत हिंदी उद्योगधंदे व व्यापार ह्यांचा फायदा आहे. हिंदी युद्धसामुग्रीची किंमत ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थान सरकारास देऊन टाकण्यांत स्टर्लिंग रोख्यांच्या अदलाबदलीच्या योजनेचा उपयोग झाला आहे आणि त्या बाबतींत ब्रिटिश सरकारास तिचें सहाय झालें आहे. हिंदुस्थानचें परराष्ट्रीय कर्ज मोठ्या प्रमाणांत कमी झालें आहे हा राष्ट्रीय फायदा आहेच आहे.

( समाप्त )

# स्फुट विचार

## अमेरिकेची युद्धाच्या मार्गांतील प्रगति

प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं, स्वतःचा देश व सबंद अमेरिका खंड ह्यांच्या संरक्षणासाठी इंग्लंडला युद्धसहाय देण्याचा आपला निश्चय असून हिटलरशाहीचा नाश होण्यांत जगाचें हित असल्यामुळें त्या कामीं जरूर असलेलें सहाय देऊं ह्या आशयाची घोषणा केली आहे. ह्या गोष्टी प्रत्यक्ष युद्धांत न पडतां अमेरिकन राष्ट्रास करतां येतील ह्या भूमिकेवर ते आपलें धोरण अमलांत आणीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं आइसलंड बेटांत तेथील लोकांच्या संमतीनें अमेरिकेचें ठाणें दिलें आहे. अटलांटिक महासागरांत ब्रिटिश जहाजें बुडवण्याचा सपाटा जर्मनीनें चालवला असून हें कृत्य अमेरिकेच्या समुद्रावरील वहातुकीस व व्यापारास विघातक आहे. ह्या कारणानें त्या महासागरांतील आइसलंड हें मोक्याचें ठिकाण आपल्या हातीं राहूं देणें आणि तेथें जर्मनीच्या कारवाया न चालू देणें अगत्याचें आहे असें त्यांचें म्हणणें आहे. इंग्लंडला पोंचवावयाची युद्धसामुग्री त्या देशास सुरक्षितपणानें मिळेल ह्याविषयींची अमेरिकेनें वाढती जबाबदारी स्वतःच्या अंगावर घेतली आहे. त्या राष्ट्रानें हें पुढें टाकलेलें पाऊल जर्मनीस अर्थातच रुचलेलें नाहीं. तटस्थपणाच्या पांघरुणाखालीं अमेरिका इंग्लंडच्या बाजूनें वस्तुतः विरुद्ध लढूं लागली आहे, आणि आपण अमेरिकेचीं जहाजें बुडवलीं तर त्याची जबाबदारी सर्वस्वी प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्या शिरावर राहील अशी धमकीहि जर्मनीनें दिली आहे. परंतु अमेरिकन मुत्सद्दी प्रत्येक पाऊल विचारपूर्वक पुढें टाकीत असून ते जर्मनीच्या धमक्यांस भीक घालणार नाहींत.

---

## सीरियांत ब्रिटिश विजय

सीरियांतील ब्रिटिश मोहीम पुरी होऊन तीमध्यें व्हिशीच्या पदरीं अपयश आलें आहे. ह्या युद्धांत ब्रिटिश फौजांस आपल्या एकाकाळच्या दोस्तांशीं लढणें नाइलाजानें प्राप्त झालें. त्याहिपेक्षां अवघड स्थिति जनरल डिगॉल आणि त्यांचें फ्रेंच सैन्य ह्यांची झाली. त्यांस तर आपल्या देशबांधवांशींच लढणें प्राप्त झालें. जर्मनीच्या पंजाखालीं असलेल्या व्हिशी सरकारनें ब्रिटिश व स्वतंत्र फ्रेंच फौजांस सीरियामध्यें विरोध करण्याचें ठरवलें. ग्रीस व क्रीट पादाक्रांत केल्यानंतर सुएझचा कालवा व सीरिया ह्यांकडे मोर्चा वळवण्याचा जर्मनीचा बेत होता. स्वतः मागें राहून व्हिशी व त्याचे प्रतिस्पर्धी ह्यांचा झगडा लावून दिला असतां आपलें सीरियामध्यें वर्चस्व स्थापण्याचें कार्य आपोआपच होईल अशी हिटलरची अपेक्षा होती. फ्रेंच लोकांच्यामधील दोन पक्षांमध्यें चाललेल्या युद्धांत आपण पडूं इच्छित नाहीं, असाहि बहाणा करण्यास त्यानें सवड ठेवली होती. इराकमध्यें जर जर्मनीनें इंग्लंड विरुद्ध कट रचण्यास रशीदअलीस चिथावलें तर सीरियाचे बाबतींत हिटलर तटस्थ किंवा बेफिकीर होता असें म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. जर्मनीचें सीरियन युद्धांत आपणांस यत्किंचितहि सहाय मिळालें नाहीं ही गोष्ट व्हिशी सरकारनें लक्षांत ठेवली पाहिजे. पण तें सर्वस्वी जर्मनीच्या कह्यांत गेल्याकारणानें त्यास आचार-विचाराचें स्वातंत्र्य राहिलेलें नाहीं. सीरियांतील विजयानें स्वातंत्र्यप्रेमी फ्रेंच लोकांस हुरूप येईल आणि ब्रिटिशांच्या आफ्रिकेंतील परिस्थितीस बळकटी येईल. ह्या बाजूस आतां जर्मनीचें धोरण कोणतें स्वरूप धारण करील हें रशियांतील त्याच्या मोहिमेचें काय होईल ह्यावर अवलंबून राहील. रशियांत जोराचा विजय मिळून जर्मनीची पूर्वेकडे प्रगति झाल्यास सीरियाचा समाचार यथाक्रम सहज घेतां येईल असा हिटलरचा विचार कदाचित् असेल. सध्या तरी भूमध्यसमुद्राच्या पूर्वभागांत जर्मनीची बाजू दुर्बळ झाली आहे ह्यांत संशय नाहीं.

---

## ब्रिटिश विमानदलाचा वाढता पराक्रम

इंग्लंडमध्यें लढाऊ विमानांचें उत्पादन झपाट्यानें वाढत आहे आणि अमेरिकन कारखान्यांतहि अधिकाधिक व सुधारलेलीं विमानें तयार होत आहेत. ह्या योगानें ब्रिटिश विमानदलाच्या शत्रुदेशांवरील झडपांची संख्या व त्यांचें विघातक कार्य ह्यांच्यांत सारखी वाढ चालली आहे. गेल्या एकदोन आठवड्यांत आलेल्या बातम्यांवरून, जर्मनीवर व फ्रान्सच्या बंदरांवर ब्रिटिश विमानांनीं प्रतिदिवशीं केलेल्या हल्ल्यांचे दृश्य परिणाम शत्रूस जाणवतील असे झाले असल्याचें दिसून येतें. आजपर्यंत जर्मनीवरील हे हल्ले जुजबी प्रकारचे आहेत असें वाटण्यास जागा होती आणि शत्रुरेडिओ निदान तसें भासवीत होता. पण आतां ब्रिटिश विमानांनीं चालवलेला संहार नाकबूल करणें जर्मनीसहि कठिण जाईल. जर्मन जहाजांचा व कारखान्यांचा नाश होत आहे त्या योगानें शत्रूचें लढाऊ बळ घटण्यास सहाय होणार आहे. विशेषतः जर्मनीचीं विमानें रशियांतील लढायांत गुंतलीं आहेत अशा वेळीं पश्चिमेच्या बाजूस त्यावर जोराचे हल्ले चढवण्याची उत्कृष्ट संधि आली आहे आणि तिचा पूर्ण फायदा घेण्यांत येत आहे. उत्तर आफ्रिका व इटली येथेंहि शत्रूच्या ठिकाणांवर बॉंबचा प्रसाद देण्याचा क्रम ब्रिटिश वैमानिक दलानें चालू ठेवला आहे. इंग्लंडवर जर्मन विमानांच्या स्वाऱ्या होतात त्यापेक्षा मोठ्या व अधिक घातुक प्रमाणावर ब्रिटिश विमानांचे हल्ले बर्लिनवर होतील असें सांगण्यांत येत आहे. वैमानिक शक्तीच्या बाबतींत जर्मनीस अनुकूल परिस्थिति आतांपर्यंत होती, पण तें पारडें आतां फिरत आहे आणि ब्रिटिश विमानांच्या पराक्रमाची चढती कमान आहे.

---

## रशियांत जर्मनीची चढाई मंदावली

रूसो-जर्मन युद्धाच्या पहिल्या आठवड्यांत जर्मनीच्या फौजा रशियांत झपाट्यानें पुढें घुसल्या आणि सोव्हिअट सैन्यास क्रमाक्रमानें माघार घ्यावी लागली. जर्मनीची लढण्याची तयारी दांडगी होती आणि त्यास एका बाजूस रुमानिया व दुसऱ्या बाजूस फिनलंड ह्यांचें सहकार्य मिळालें होतें. ह्या कारणानें पंधराशे मैल लांबीच्या सरहद्दीवर जर्मनीस एकदम चाल करतां आली. जर्मनीच्या हल्ल्यापुढें रशियन सैन्यें मागें हटलीं तरी त्यांनीं शत्रूचे सैनिक आणि रणगाडे व विमानें ह्यांचा मोठ्या प्रमाणांत नाश केला. बॉल्शेव्हिक सैन्यें कल्पनेपेक्षा अधिक नेटानें व निकरानें लढलीं ही गोष्ट जर्मनीसहि कबूल करावी लागली आहे. युद्धक्षेत्राच्या लांबलचक फळीच्या मध्यभागीं जर्मन फौजा बऱ्याच मोठ्या अंतरापर्यंत आंत पूर्वेच्या बाजूस घुसल्या आहेत आणि त्यांचा मोर्चा मॉस्कोच्या दिशेनें आहे. बाकीच्या रणक्षेत्रांत जर्मनीची प्रगति विशेष झालेली नाहीं. जाळपोळ व नासधूस करून शत्रूच्या हातीं कांहीं लागू द्यावयाचें नाहीं आणि त्यास आजूबाजूच्या व पिछाडीच्या गुप्त हल्ल्यांनीं सतावून सोडावयाचें हें धोरण स्टालिनच्या हुकुमावरून रशियन जनतेनें व सैन्यानें अंगिकारलें

आहे. संधि सांपडेल तेथें शत्रूवर उलट हल्ले चढवण्याचा क्रम बॉल्शेव्हिक सेनानींनीं चालू केला आहे. ह्या डावपेचांचा परिणाम जर्मन फौजेची प्रगति तात्पुरती थांबण्यांत झाला आहे. रशियाचे चार लक्ष शिपाई कैद झाले, पांच-सहा हजार चिलखती गाड्या व विमानें आपल्या हातीं आलीं किंवा नाश पावलीं, अशा बातम्या जर्मनी प्रसिद्ध करीत आहे. टाकलेलीं पावलें रशियन मुलखांत खोल रुतवून नंतर पुढें जाण्याची तयारी जर्मनी करीत आहे. तथापि शत्रूच्या मंदावलेल्या गतीचा रशिया फायदा घेत आहे व स्वतःची तयारी त्यानेंहि चालवली आहे.

### हिरड्याची निर्गत

अमेरिकेंतील कातड्याचा धंदा बहुंशीं हिंदी हिरड्यांवर अवलंबून आहे. हिरड्यांचे बाबतींत हिंदुस्थानाशीं स्पर्धा करणारा दुसरा देश नाहीं, परंतु अमेरिकेची मागणी त्यास पुरवितां येईल किंवा नाहीं व हिरड्यांचे ऐवजीं दुसरा एकादा पदार्थ उपयोगांत येऊं लागेल किंवा काय, असा प्रश्न आहे. अमेरिकेस सर्वोत्कृष्ट हिरड्यांची आवश्यकता आहे. लहान, काळ्या हिरड्यांतून टॅनिन फार थोडें निघतें व त्याचा रंग काळसर असतो. अमेरिकेस मोठा, टणक, पिवळसर-हिरवा हिरडा पाहिजे असतो. हिरड्याचा सत्वांश काढून त्याची निर्गत करतां येणें शक्य आहे, परंतु त्यांत एकजातपणा आला पाहिजे, तो तसा येत नाहीं, अशी तक्रार आहे. हिरड्याची प्रतवारी लावून मग त्याची निर्गत केल्यास खपास मदत होईल. हिरड्यास प्रतिस्पर्धी नसल्याकारणानें त्यास विशेष स्थान प्राप्त झालें आहे, परंतु त्याच्या किंमतींत भरमसाट वाढ झाली तर हिरड्याऐवजीं दुसऱ्या कशाचा तरी उपयोग करतां येईल काय, ह्याविषयीं प्रयोग जोरानें सुरू होतील. अमेरिकेंत असें संशोधन चालूच आहे. कातडे कमावण्यास लागणारें टॅनिन हिरड्याप्रमाणें इतरहि कित्येक सृष्टिजन्य पदार्थांत आढळतें, परंतु हिरडा दोन प्रकारांनीं उपयोगी पडतो. कातडे कमावण्यास त्याचा उपयोग होतो व त्यांत ॲसिडचा अंश असल्याकारणानें क्वेब्रॅको, चेस्टनट, इत्यादि कातडें कमाविण्यास उपयुक्त पदार्थांशीं त्याचें मिश्रण केलें असतां, त्या पदार्थांकडून हिरडा अधिक काम करवून घेतो. ह्या कारणानें, हिरड्याचें कातड्याच्या धंद्यांत फार महत्त्व आहे. मुंबई प्रांतांतील जंगलांत हिरडा मोठ्या प्रमाणावर आढळतो व तो जसाच्या तसा निर्गत होतो. त्याऐवजीं, चांगला हिरडा निवडून त्याचा सत्वांश काढून त्याच्या विटा निर्गत करणें हा अत्यंत किफायतशीर होण्याजोगा धंदा आहे. महाराष्ट्रांत असा प्रयत्न होणार असून, कारखान्यास लागणारी यंत्रसामुग्री लवकरच उभी राहील इतकी त्या उपक्रमाची प्रगति झाली आहे, असें समजतें.

### ॲंग्लो-रशियन युद्ध-सहकार्य

व्हिशीच्या वतीनें सीरियामध्यें युद्ध-तहकुबीविषयीं ब्रिटिश सेनानीकडे विनंति करण्यांत आली तेव्हां त्या देशांत जर्मनीनें चालवलेल्या कारवाया कायमच्या बंद पडल्या. हिटलरला नाखुष करावयाचें नाहीं ह्या बेतानें पेटॉं मंत्रिमंडळानें युद्ध-तहकुबीविषयीं स्वतः हुकूम देण्याचें टाळून त्यासंबंधांतली जबाबदारी सीरियांतील आपल्या सेनानीवर टाकली. लष्करी दृष्टीनें युद्ध पुढें चालू ठेवणें शक्य नाहीं अशी त्या सेनानीची खात्री झाली आहे ह्यामुळें व्हिशी सरकारच्या सीरियांतील लष्करी प्रतिकाराचा ग्रंथ आटोपला आहे. रशियाच्या सबंद सरहद्दीच्या मुलखांत पुन्हां लढाया निकरानें चालू झाल्या असल्याच्या ताज्या बातम्या आल्या आहेत. जर्मन सैन्यांनीं बाल्टिक समुद्रापासून दक्षिणेस युक्राइनपर्यंत चार-पांच महत्त्वाच्या रणक्षेत्रांत उचल खाल्ली आहे. रशियन सैन्येंहि स्वस्थ बसलेलीं नाहींत. त्यांनीं शत्रूचे हल्ले परतवणें व उलट हल्ले करणें हीं कामें कसून चालवलीं आहेत. त्यांनीं शत्रूचीं विमानें व रणगाडे ह्यांचा नाश केला आहे आणि लक्षावधि जर्मन सैनिक घायाळ, मृत किंवा कैदी झाले आहेत. रशियांतील लढायांसंबंधांतली अत्यंत महत्त्वाची ताजी बातमी म्हटली म्हणजे इंग्लंड व रशिया ह्यांचेमध्यें व्हावयाच्या पूर्ण सहकार्याच्या कराराबाबतची होय. हिटलरशाहीचा नाश करण्यासाठीं करावयाच्या प्रयत्नांत इंग्लंड व रशिया एकमेकांस सहाय देतील आणि युद्ध-तहकुबी किंवा तह ह्यांचे संबंधांत परस्परांच्या संमतीवांचून कांहींहि करणार नाहींत. तातडीनें नुकत्याच झालेल्या रूसो-ब्रिटिश कराराच्या ह्या अटी आहेत. इंग्लंड व रशिया ह्यांस वेगवेगळे एकटे गाठून त्यांवर हल्ला करण्याचा हिटलरचा बेत ह्या करारानें फसणार आहे आणि त्या दोन प्रचंड व बलवान राष्ट्रांशीं एकाच वेळीं त्यास सामना द्यावा लागणार आहे.

**पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें शहर.**

## नोटीस.

या बँकेच्या सन १९४१–४२ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठीं व्यक्तिशः मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा कचेरींत नोटीस बोर्डावर निवडणुकीचा नियम नं. ३ प्रमाणें लाविली आहे. तरी निवडणुकीसाठीं लायक उमेदवारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवारांच्या लेखी संमतीनें ता. ९ ऑगस्ट १९४१ रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वीं बँकेच्या पुणें कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवावींत. सदर बाबत कोणास जास्त माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं बँकेच्या कचेरीच्या वेळांत चौकशी करावी म्हणजे ती त्यांना देण्यांत येईल.

पुणें शहर, ता. १० जुलै १९४१ — द. दि. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.


अन्यायी समाजस्थिति
रेखाटणारें नवयुग चित्र

# अमृत



दिग्दर्शक : विनायक
कथा : खांडेकर
छाया : पांडुरंग नाईक

: भूमिका :
मीनाक्षी, ललिता पवार, बेबी देवी, बाबुराव पेंढारकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, मा. विठ्ठल व विनायक

८ वा यशस्वी आठवडा

मिनर्व्हा–पुणें

## टेलिफोनच्या दराची आकारणी

पुणें, कानपूर, अमृतसर, जालंदर व डेहराडून येथील टेलिफोन-वाल्यांकडून ३० सप्टेंबर, १९४१ नंतरच्या एका विशिष्ट तारखेपासून "मेसेज रेट" पद्धतीनें पैसे घेण्यांत येतील, असें सरकारनें कांहीं महिन्यांपूर्वी जाहीर केलें होतें. सध्या "फ्लॅट रेट" पद्धतीनें पैशाची आकारणी केली जाते; म्हणजे टेलिफोनवाल्यानें कितीहि वेळा टेलिफोनचा उपयोग केला, तरी त्यास ठराविक वार्षिक अथवा मासिक दरापेक्षा अधिक पैसे द्यावे लागत नाहींत. "मेसेज रेट" पद्धतींत किमान मासिक अगर वार्षिक दर निश्चित असतो. परंतु प्रत्येक कॉलसाठी आणखी स्वतंत्रपणें पैसे द्यावे लागतात. "मेझर्ड रेट" पद्धतींत वरील प्रमाणेंच किमान दर ठरलेला असतो, तथापि त्या दरांत कांहीं किमान वेळां टेलिफोन वापरण्याची परवानगी असते. त्यापेक्षा अधिक वेळां टेलिफोनचा उपयोग केला, तरच त्या मानानें वेगळा आकार पडतो. टेलिफोन बसविणें व ते चालू राखणें ह्यांस खर्च येतो, त्यापैकीं कांहीं भांडवली स्वरूपाचा असतो व कांहीं चालू स्वरूपाचा असतो. टेलिफोन किती वेळां करण्यांत येतो त्यावर भांडवली खर्च अवलंबून नसतो, परंतु चालू खर्च हा टेलिफोन्सच्या वापराचे प्रमाणांत बदलत असतो. टेलिफोनची पद्धत नव्यानेंच सुरू करतेवेळीं, पैशाची आकारणी "फ्लॅट" रेटनें करणें सोईचें पडतें, कारण त्यावेळीं लोकांना टेलिफोनची सवय झालेली नसते. लोकांना टेलिफोनची चटक लागली म्हणजे पुरेसें कारण नसतांहि लोक टेलिफोन करूं लागतात. चालू खर्च त्यामुळें वाढतो आणि टेलिफोनचे दरहि वाढवावे लागतात. ज्यांस टेलिफोनचा उपयोग फार वेळां करावा लागतो, अशांस सोई उपलब्ध करतांना टेलिफोनचा वापर थोड्या प्रमाणांत करणारांवर निष्कारण बोजा टाकावा लागतो. इतर सर्व देशांत "फ्लॅट रेट" पद्धति त्याज्य ठरविण्यांत आलेली आहे व टेलिफोन-च्या वापराचे प्रमाणांत आकारणी करणारी "मेसेज रेट" पद्धति श्रेयस्कर ठरली आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें १९२० सालापर्यंत "फ्लॅट रेट" पद्धति चालू होती. आतां तेथें "मेसेज रेट" पद्धति चालू आहे. हिंदुस्थान सरकारनें सुचविलेले दर खालीलप्रमाणें आहेतः—

| | |
|---|---|
| ( १ ) कनेक्शन फी ( सध्याप्रमाणेंच ) | १० रुपये |
| ( २ ) वर्षाची वर्गणी आगाऊ | १० रुपये |
| अथवा दरमहाची वर्गणी | १० रुपये |
| ( सध्याची वर्गणी वार्षिक १९२ रुपये अथवा मासिक २० रुपये आहे. ) | |
| ( ३ ) प्रत्येक १४ वेळां टेलिफोन करण्यास | १ रुपया |
| वक्तशीर पैसे देणारास १२½% सूट, म्हणजे, प्रत्येक कॉलला | १ आणा |
| ( सध्या कॉलला वेगळा आकार नाहीं. ) | |

ह्या नवीन दरांचा वसुलीवर काय परिणाम होईल, हें आजच सांगतां येणार नाहीं. टेलिफोनचा वापर मोठ्या प्रमाणावर करणारास नवीन दरानें अधिक पैसे द्यावे लागतील. परंतु किमान वर्गणी माफक असल्यामुळें लहान असामीसहि टेलिफोन बाळगतां येईल. म्हणजे, टेलिफोनच्या तारांचें जाळें विस्तृत होईल. निष्कारण कॉल करण्याची लोकांची संवय मोडेल व फुकटच्या लोकांची गैरसोय होईल. टेलिफोनवाल्यांस त्यामुळें आपल्या टेलिफोनकडून अधिक चांगलें काम मिळूं शकेल. टेलिफोनवाल्यानें स्वतः कॉल केला, तरच त्यानें पैसे द्यावयाचे आहेत; आलेल्या कॉलचे पैसे त्यास द्यावे लागणार नाहींत. सरकारजवळ कॉल मोजण्याचे मीटर पुरेसे नाहींत. म्हणून कांहीं ठिकाणींच ही नवी पद्धत अमलांत आणली जात आहे. ज्या शहरांत टेलिफोनचा फुकट उपयोग फार मोठ्या प्रमाणावर केला जातो अगर जेथें नवी पद्धत अनेकांस सोईची वाटेल, अशींच शहरें ह्या प्रयोगासाठी प्रथम निवडण्यांत आलीं आहेत. पुरेसे मीटर मिळतांच इतर शहरांतहि नवी पद्धत सुरू केली जाईल. तथापि त्यापूर्वी पहिल्या पांच शहरांतील प्रयोगाचा अनुभव काय येतो, हें पाहिलें जाईल.

— इंडियन इन्फर्मेशन

## व्यवसायावरील प्रांतिक कर

### सर्वत्र ५० रुपयांची मर्यादा लागू करण्याचा उद्देश

१९४० च्या इंडिया अँड बर्मा ( मिसलेनिअस अमेंडमेंटस् ) ॲक्टान्वयें १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टामध्यें १४२ अ हें कलम घालून सदर ॲक्टांत ७ व्या शेड्यूलमध्यें प्रांतिक विषयांची जी यादी दिली आहे त्यांतील ४६ व्या बाबीसंबंधीं ( व्यवसाय, व्यवहार, जीवनसाधन व रोजगार यांवरील कर ) पार्लमेंटचा काय उद्देश आहे त्याचा खुलासा करण्यांत आला आहे. या नव्या कलमान्वयें व्यवसाय, व्यवहार, जीवनसाधन किंवा रोजगारांवर कर बसविण्याचा प्रांतांचा हक्क अबाधित ठेवण्यांत आला असला तरी त्याची मर्यादा एका इसमाचे बाबतींत वर्षास ५० रुपयांवर जाऊं नये अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. तथापि एकाद्या प्रांतांत ३१ मार्च १९३९ पूर्वी जर हा कर त्यापेक्षां जास्त असेल तर फेडरल कायदेमंडळानें कायदा केल्याखेरीज सदर प्रांताच्या त्या मर्यादेपर्यंत कर बसविण्याच्या हक्कास बाध येणार नाहीं.

याचा परिणाम असा झाला कीं, बहुसंख्य प्रांतांतून या कराची मर्यादा माणशीं ५० रुपये ठरली गेली; पण कांहीं कांहीं प्रांतांतून तो पूर्वी १,००० रुपयांपर्यंत होता तेथें ती मर्यादा तशीच राहिली. तेव्हां या बाबतींत सर्व प्रांतांत एकसूत्रीपणा यावा म्हणून एका बिनसरकारी सभासदांनीं मध्यवर्ती असेंब्लींत एक बिल आणलें आहे. ज्या प्रांतांचे बाबतींत १४२-अ कलमाच्या ( २ ) पोटकलमांतील शर्तींमुळें ५० रुपयांची कमाल मर्यादा लागू पडत नाहीं त्यांचे बाबतींत १४२-अ कलमाच्या ( १ ) पोट कलमांतील कमाल मर्यादा लागू करण्याचा या बिलाचा उद्देश आहे.

या बिलासंबंधीं लोकमत काय आहे हें जाणण्याची हिंदुस्थान सरकारची इच्छा आहे. बिलाचे उद्देश व कारणें यांसह बिल मुंबई सरकारच्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

### बडोदें लँड मॉर्गेज बँकेचीं डिबेंचर्स

बडोदें लँड मॉर्गेज बँकेनें ३½% व्याजाचीं ५ लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स काढण्याचें ठरविलें आहे, त्यास बडोदें सरकारनें मंजुरी दिली आहे. २५ वर्षांत त्यांची परतफेड व्हावयाची आहे. सरकारनें डिबेंचर्सच्या मुद्दलाची व व्याजाची हमी घेतली आहे. डिबेंचर्स हीं ट्रस्टी सिक्युरिटीज म्हणून गणलीं जातील. डिबेंचर्स-वर स्टँप व रजिस्ट्रेशन फी आणि इन्कमटॅक्स हीं घेतलीं जाणार नाहींत.

## चेक्स व हुंड्या ह्यांचेमार्फत पैशाची वर्गावर्गी

मुंबई प्रांतांतील जिल्ह्यांमधील सहकारी बँकांमार्फत चेक्सच्या व हुंड्यांच्या मार्फत पैशांची वर्गावर्गी १९३९–४० मध्यें कोणत्या प्रमाणावर झाली हें खालील तक्त्यांवरून समजून येईलः—

### चेक्स

| विभाग | रकम पाठविली: चेक्सची संख्या | रकम पाठविली: रकम लक्ष रु. | रकम आणली: चेक्सची संख्या | रकम आणली: रकम लक्ष रु. |
|---|---|---|---|---|
| धारवाड | १०,२०७ | ४४ १/२ | १९,७१५ | ५६ |
| बेळगांव | २०,५२४ | ८५ ३/४ | १५,१६४ | ७७ |
| सोलापूर | १४,४७१ | ४३ | ५,६०९ | १८ १/२ |
| सातारा | २१,७५९ | ७७ | ६,५९८ | १८ ३/४ |
| पुणें | ६४,३८७ | १७५ १/४ | ६३,६२२ | १०७ १/४ |
| मुंबई | ९१,८०७ | २२० | २६,३०६ | ११९ ३/४ |
| सुरत | १४,८८२ | ७७ | ३४,६५२ | १८२ |
| अहमदाबाद | ४,७१५ | २९ | ११,२५९ | ३० |
| धुळें | ३,०९९ | ८ १/२ | १,७६२ | २ ३/४ |
| जळगांव | ३,१५१ | १८ | ८,५५९ | ४० |
| एकूण | २,४८,९३३ | ७७८ | १,९३,२४६ | ७२९ |

### हुंड्या

| विभाग | रकम पाठविली: हुंड्यांची संख्या | रकम पाठविली: रकम लक्ष रु. | रकम आणली: हुंड्यांची संख्या | रकम आणली: रकम लक्ष रु. |
|---|---|---|---|---|
| धारवाड | १,७६७ | २५ ३/४ | ७९३ | ४ १/२ |
| बेळगांव | २,३०५ | २५ १/२ | १,८४४ | ७ |
| सोलापूर | ४,२८९ | १७ ३/४ | २,७५९ | १३ १/२ |
| सातारा | १,०३६ | ८ १/४ | ३,६५२ | ११ १/२ |
| पुणें | ३३७ | २ १/२ | १५३ | १ |
| मुंबई | ६६१ | २ १/४ | २०५ | १/२ |
| सुरत | २,२६६ | १३ | ३,१६९ | १६ १/२ |
| अहमदाबाद | १,२१७ | ७ ३/४ | ११८ | १ |
| धुळें | ४१४ | ३ ३/८ | २१३ | १ १/४ |
| जळगांव | २,१०७ | ३६ | १,७३९ | ६ १/४ |
| एकूण | १६,३९० | १४३ | १४,७२६ | ६२ १/२ |

### बँक ऑफ इंडिया, लि.

| | रु. आ. पै |
|---|---|
| १९४० च्या पहिल्या सहामाहीचा नफा ११,६३,५२४ रु. ६ आ. १ पै त्यांतून इनकमटॅक्स व सुपरटॅक्ससाठी वजा १,५०,००० रु. | |
| उरलेला निवळ नफा | १०,१३,५२४–६–१ |
| मागील सालाच्या हिशेबांतील शिलकी नफा | ८,९८,७८४–७–११ |
| एकूण | १९,१२,३०८–१४–० |

बँकेचें भरणा झालेलें भाग भांडवल १ कोटि रुपये आहे, त्यावर ११% दरानें (प्रत्येक भागास २ रु. १२ आ.) करमाफ पहिल्या सहामाहीचें इंटेरिम डिव्हिडंड देण्याचें डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे, त्यास ५ लक्ष, ५० हजार रुपये लागतील. उरलेली १३,६२,३०८ रु. १४ आ. ही रकम पुढील सहामाहीच्या हिशेबांत ओढण्यांत येईल.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

**शेतकऱ्यांची प्रांतिक बँक**

म्हणजेच

**बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.**

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ नळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## टाटा कंपनीच्या शेअर्सवरील डिव्हिडंड

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें, ३१ मार्च १९४१ अखेर संपलेल्या वर्षाकरितां, खालीलप्रमाणें डिव्हिडंड वाटण्याची शिफारस केली आहे.

| भागांचा प्रकार | डिव्हिडंड |
|---|---|
| क्युम्युलेटिव्ह फर्स्ट प्रेफरन्स | प्रत्येक भागास ९ रुपये ( त्यांतून कर वजा ) |
| क्युम्युलेटिव्ह सेकंड प्रेफरन्स | प्रत्येक भागास ७½ रुपये ( त्यांतून कर वजा ) |
| ऑर्डिनरी | प्रत्येक भागास २९ रुपये |
| डिफर्ड | प्रत्येक भागास १७२ रु. १० आ. |

प्रत्येक ६% फर्स्ट प्रेफरन्स भाग १५० रुपयांचा, ७½% सेकंड प्रेफरन्स भाग १०० रुपयांचा, ऑर्डिनरी भाग ७५ रुपयांचा व डिफर्ड भाग ३० रुपयांचा आहे. कंपनीचें एकूण वसूल भांडवल सुमारें १० कोटि, ४७ लक्ष रुपये आहे व त्याची वाटणी खालीलप्रमाणें आहे:—

| भाग | भागांची संख्या | एकूण वसूल भांडवल |
|---|---|---|
| ६% क्यु. प्रेफरन्स | ५०,००० | ७५,००,००० |
| ७½% क्यु. प्रेफरन्स | ६,९३,८१९ | ६,९३,८१,९०० |
| ऑर्डिनरी | ३,५०,००० | २,६२,५०,००० |
| डिफर्ड | ४८,७५० | १४,६२,५०० |

भागांची सर्व रकम वसूल करण्यांत आलेली आहे. रद्द केलेल्या ६,१८१ सेकंड प्रेफरन्स शेअर्सची रकम ९७,५६९ रुपये वरील आकड्यांत मिळविली पाहिजे. कंपनीच्या ऑर्डिनरी, फर्स्ट प्रेफरन्स व डिफर्ड भागास प्रत्येकी एक मत आहे. परंतु, पांच सेकंड प्रेफरन्स भागांच्या प्रत्येक गटास फक्त एकच मत आहे.

पहिल्या प्रेफरन्स भागास ६% व सेकंड प्रेफरन्स भागास ७½% डिव्हिडंड दिल्यावर उरलेल्या नफ्याची वाटणी पुढीलप्रमाणें होते:—

ऑर्डिनरी भागांस ८%

डिफर्ड भागांस २५%

व नंतर उरलेली रक्कम दोहोंमध्यें समसमान विभागली जाते. ह्या कारणामुळेंच, डिफर्ड भागांच्या खरेदी-विक्रीमध्यें मोठ्या प्रमाणावर सट्टे चालतात. ४८,७५० डिफर्ड भागांस व ३,५०,००० ऑर्डिनरी भागांस सारखेंच डिव्हिडंड वाटणीस येतें !

ऑर्डिनरी व डिफर्ड भागांस डिव्हिडंड कसें मिळत गेलें, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| वर्ष | ऑर्डिनरी (प्रत्येक भाग=७५ रु.) % | डिफर्ड (प्रत्येक भाग=३० रु.) % |
|---|---|---|
| १९३३ | — | — |
| १९३४ | — | — |
| १९३५ | — | — |
| १९३६ | ८ | २५ |
| १९३७ | १३¾ | १२०·७३ |
| १९३८ | २०⅓ | २५२·३० |
| १९३९ | २४ | ३१२·३३ |
| १९४० | ३३ | ४३९·७ |
| १९४१ | ३८·६६ | ५७३·३३ |

( शिफारस केलेलें )


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; मि. आर. एल. फेरार्ड.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,८८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,९४,०३५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १११—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४–० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६–१ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३—० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७–१० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०९—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) — ... | ११५—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२८—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४६—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १११—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४५—० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८३–१२ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% ... ... | १३३—४ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५–१० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १६५७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६७१—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६६—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८९२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ८४६—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २१२—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४५—४ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४६–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४२३०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २२१–१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १५६—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३९०—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १४३ रु.१४ आ.७ पै... | २०४२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १४६—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–२–९ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ९२-१५-६ |


सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




**मधुमेहावरील औषध**

**तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७**

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

**The Co-operators' Book Depot.**

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडेमी, ६७१ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र


संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख २३ जुलै, १९४१ अंक ३०

दक्षिण कोंकणांतील राष्ट्रीय बाण्याचें
प्रमुख साप्ताहिक
## हिंद—सेवक
संपादक—सदानंद शांताराम भांडारकर
प्रकाशक—मधुकर यशवंत भांडारकर
हिंदसेवकमध्यें दर गुरुवारीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व घडामोडींची विस्तृत माहिती मिळते.
व्यवस्थापक—'हिंद—सेवक', मालवण, जि. रत्नागिरी.

## पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
## संग्रह करा
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
## —: रक्तवर्धक :—
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें
## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.



व्हॉलीबॉल्स, टेनिकॉइट रिंगज्, बॅडमिंटनचीं फुलें, कॅरमबोर्डस्, पत्ते, पी. टी. शूज्, पिंगपाँग बॅटस्, बॉल्स, वगैरे सामान किफायतशीर रीतीनें मिळण्याचें एकमेव ठिकाण म्हणजे—
## साठे—स्पोर्टस्,
डेक्कन जिमखाना पोस्टाजवळ, पुणें ४.

## " अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

# विविध माहिती

### साडेतीन हजार विमानें

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत अमेरिकेनें एकूण ३½ हजार विमानें ग्रेटब्रिटनकडे पोंचतीं केलीं आहेत.

### धान्याचे डेपो

रत्नागिरी रूरल डेव्हलपमेंट बोर्डानें धान्याचे डेपो उघडण्यासाठी चालू वर्षाकरितां २० हजार रुपये मंजूर केले आहेत. गेल्या वर्षी १० डेपो सुरू केले होते, त्यांत यंदा आणखी दहाची भर पडेल.

### म्हैसूर विश्वविद्यालय

म्हैसूर विश्वविद्यालयाचें वार्षिक अंदाजपत्रक १४ लक्ष रुपयांचें आहे.

### अर्जेंटिनाशीं वाटाघाट

कांहीं महत्त्वाच्या धातूंच्या खरेदीसंबंधीं अमेरिका अर्जेंटिना देशाशी वाटाघाट करीत आहे.

### अमेरिकेचे वैमानिक तळ

अर्जेंटिना (न्यू फौंडलंड) व त्रिनिदाद येथें वैमानिक तळ स्थापन करण्याचें अमेरिकेनें ठरविलें आहे. ह्या तळांच्या जागा अमेरिकेस इंग्लंडकडून विनाशिकांच्या विनिमयांत मिळालेल्या आहेत. अर्जेंटिना व त्रिनिदाद तळांस प्रत्येकीं सुमारें २२ कोटि रुपये खर्च येईल.

### टेलिफोन कंपन्या सरकारच्या मालकीच्या होणार

मुंबई, कलकत्ता व मद्रास येथील टेलिफोन कंपन्या हिंदुस्थान सरकार खरेदी करणार आहे. कलकत्ता कंपनीच्या जरूर तितक्या भागीदारांनीं तेथील कंपनीच्या नव्या व्यवस्थेस संमति दिली आहे. मुंबई येथील कंपनीच्या भागीदारांची संमति मिळण्यास अडचण पडणार नाहीं. परंतु मद्रास येथील कंपनीच्या बाबतींत थोडा कालावधि लागेल, असें समजतें.

### आइसलंडमध्यें अमेरिकन फौजा

आइसलंडकडे प्रेसिडेंट रुझवेल्ट ह्यांनीं अमेरिकन फौजा पाठविल्या, त्यास अमेरिकेंतील प्रमुख शहरांमधील ६०% लोकांनीं संमति दर्शविली आहे. २०% लोकांनीं त्यास विरोध दर्शविला व १९% लोक तटस्थ राहिले.

### तुर्कस्तान-जर्मनी करार

तुर्कस्तानाशी एक नवीन करार करण्याचा जर्मनीचा प्रयत्न चालू आहे.

### ग्रेटब्रिटन-अमेरिका सहकार्य

ग्रेटब्रिटन, ब्रिटिश साम्राज्यांतील देश व अमेरिका ह्यांचेमधील आर्थिक सहकार्य दिवसानुदिवस वाढत आहे असें ब्रिटिश परराष्ट्रीय व्यापार खात्याचे सेक्रेटरी ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

### कर्ज तडजोड बोर्डें

शेतकऱ्यांच्या कर्जांची तडजोड करणारीं १४ बोर्डें इंदूर संस्थानांत स्थापन करण्यांत आलेली आहेत.

### युद्धफंड

म्हैसूर संस्थानानें सुमारें २२½ लक्ष रुपये युद्धफंडास दिले आहेत.

### ग्रेट ब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापार

अमेरिकेच्या लीज अँड लेंड ॲक्टाचा दुरुपयोग करून, ग्रेट ब्रिटन आपला परराष्ट्रीय व्यापार वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे आणि त्याचा अमेरिकेच्या परराष्ट्रीय व्यापारावर परिणाम होत आहे, अशी तक्रार कांहीं अमेरिकन पत्रांनीं केली, ती सर्वस्वी निराधार आहे, असें वॉशिंग्टन येथील ब्रिटिश वकिलातीनें जाहीर केलें आहे.

### आगबोटींच्या नाशाचें उतरतें प्रमाण

जर्मनीनें चालविलेल्या ब्रिटिश आगबोटींच्या नाशाचें प्रमाण उतरत चाललें आहे. जूनमधील नाशाचा आकडा जानेवारीखेरीज गेल्या बारा महिन्यांतील कोणत्यहि महिन्यांतील आकड्यापेक्षा लहान आहे. सध्याप्रमाणें वरचेवर आकडे ह्यापुढें प्रसिद्ध केले जाणार नाहींत.

### ट्रेझरी बिलांवर १३ आ. ८ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं एकूण २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १३ आ. ८ पै इतका पडला.

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९४१ च्या पहिल्या सहामाहींत ४२ लक्ष, ११ हजार रुपये नफा झाला; त्यांत मागील सहामाहींतील शिल्लकी नफा मिळविला म्हणजे ८० लक्ष, ७२ हजार रुपये होतात. भागीदारांस त्यांतून १२% करमाफ इंटेरिम डिव्हिडंड मिळणार आहे.

### शेड्यूल्ड बँकांची संख्या

| | ३०-६-४१ | ३१-१२-४० | ३०-६-४० |
|---|---|---|---|
| एक्सचेंज बँका | २० | २० | १९ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ४४ | ४२ | ४० |

### अमेरिकेमधील उत्पादन

राष्ट्रसंरक्षक धंद्यांत अमेरिकेचे २७ लक्ष कामगार गुंतलेले आहेत. गेल्या वर्षी त्यांची संख्या ४ लक्ष होती; येत्या वर्षी ती ५७ लक्ष होईल.

### रेडिओची वाढती लोकप्रियता

जून १९४१ मध्यें एकूण १०,२९८ रेडिओ परवाने लोकांस देण्यांत आले. जून १९४० चा तत्सम आकडा ८,८६२ असा होता. जून, १९४१ अखेर एकूण १ लक्ष, ३२ हजार परवाने चालू आहेत. जून, १९४० अखेर त्यांची संख्या १ लक्ष, ६ हजार होती.

### ग्रेटब्रिटनसाठी अमेरिकन विमानें

अमेरिकेनें मे १९४१ मध्यें ग्रेटब्रिटनसाठीं ५११ विमानें निर्गत केलीं, त्यांची किंमत १२ कोटि रुपयांपेक्षा अधिक आहे. एप्रिलमध्यें १४ कोटि रुपयांच्या ५७१ विमानांची निर्गत झाली होती.

### अमेरिका व कॅनडा

अमेरिका व कॅनडा ह्यांचे प्रतिनिधींमध्यें दोन्ही देशांच्या आर्थिक प्रगतीसंबंधीं प्राथमिक विचारविनिमय चालू आहे. शत्रूचा प्रतिकार व युद्धोत्तर धोरणाची दिशा ह्यांचा मुख्यतः त्यांत खल होईल.

## अनुक्रमणिका

पृष्ठ
१ विविध माहिती ... ३५०
२ कारखान्यांच्या स्थानाची निवड ... ... ३५१
३ अवाढव्य युद्धखर्चाची तरतूद कशी करतात ? ३५२
४ स्फुट विचार ... ३५३
हिंदी कपाशीचें भवितव्य—वरील बाबतींत तज्ज्ञांचे कांहीं मतभेद—रशियन रणांगणें—जपानचें नवें धोरण—यांत्रिक शिक्षणाची मोठ्या प्रमाणावर व्यवस्था—ग्रेटब्रिटन चीनमधील खास हक्क सोडून देणार—अमेरिका व हिंदुस्थान ह्यांचा व्यापारी संबंध—व्यापारी व औद्योगिक प्रश्नांवर चर्चा
५ प्रिव्ही कौन्सिलकडील अपिलें ... ... ३५६
६ आयुर्वेद रसशाळा पुणें लि. ३५६
७ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... ... ३५७
८ निवडक बाजारभाव ३५८

अर्थ

बुधवार, ता. २३ जुलै, १९४१

## कारखान्यांच्या स्थानाची निवड

कारखान्यांची जागा निश्चित करण्याचें काम केवळ यदृच्छेवर सोपवून उपयोगी नाहीं; कारखाने योग्य ठिकाणीं स्थापन होण्यावर राष्ट्रीय औद्योगिक व आर्थिक प्रगति मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते, ही गोष्ट पुढारलेल्या देशांत पटलेली आहे. उत्पादन-खर्च कमी राखणेंच केवळ नव्हे, तर अनेक लोकांचें भावी सुख कारखान्यांसाठी योग्य जागा योजिण्यानें साधतां येतें. ज्या ठिकाणीं कच्च्या मालाचा मुबलक पुरवठा असून स्वस्त वीज, कोळसा, इत्यादींचें सान्निध्य आहे, जेथें कामगार, भांडवल इत्यादींचा पुरवठा चांगला होईल, जेथून बाजारपेठा अगदीं जवळ आहेत व वहातुकीचा खर्च अत्यल्प आहे, असें ठिकाण कारखाना स्थापण्यास अत्यंत योग्य असतें. अर्थात्, प्रत्यक्ष व्यवहारांत ह्या सर्वच गोष्टी साधतां येतील असें नाहीं. ह्याचें कारण उत्पादकांचें अज्ञान अथवा त्यांचेमध्यें दीर्घदृष्टीचा अभाव, हें असूं शकेल. त्याचप्रमाणें, आज योग्य वाटणारी जागा कालांतरानें गैरसोयीची वाटूं लागेल, कारण आर्थिक घडामोडी परिस्थितींत बदल घडवून आणीत असतात. हिंदुस्थानांतील कपाशीच्या गिरण्या, व साखरेचे आणि कागदाचे कारखाने ह्यांच्या केंद्रांचा वरील दृष्टीनें विचार डॉ. पी. सी. जैन, ह्यांनीं आपल्या एका लेखांत नुकताच केला आहे. त्यांच्या मत वरील कारखाने सध्यापेक्षा अधिक सोइस्कर ठिकाणीं कांढतां येणें शक्य होतें. सिमेंटचे कारखानेहि विस्कळितपणें इकडे तिकडे निघाले होते, परंतु असोसिएटेड सिमेंट कंपनी व शेठ डालमिया ह्यांचे सहकार्यानें त्यांत बरीच सुधारणा घडून आलेली आहे. मद्रास, म्हैसूर आणि बंगाल ह्या प्रांतांस आणखी साखरेचे कारखाने हवे आहेत, तर महाराष्ट्रांतील कारखान्यांविरुद्ध उत्तर हिंदुस्थानांत जेथें त्यांची दाटी आहे अशा प्रांतांचा प्रचार चालू आहे. बंगालमध्यें आणखी कपास कापडाच्या गिरण्या निघूं पहात आहेत, तर संयुक्त प्रांतांत तागाच्या गिरण्यांची मागणी आहे. सबंद हिंदुस्थानांत कोणकोणत्या ठिकाणीं कोणते धंदे निघाले म्हणजे ते एकमेकांस पोषक होऊन सर्वांचीच भरभराट होईल, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. राष्ट्रीय आर्थिक नियोजनांत प्रांतिक आर्थिक नियोजनाचाहि विचार केला पाहिजे, हें विसरून चालणार नाहीं.

संयुक्त प्रांत आणि बिहार येथें साखर कारखान्यांची दाटी झालेली आहे, हें आतां सर्वांस माहीत झालेलें आहे. दररोज ४०० ते ६०० टन ऊस गाळणाऱ्या २५ नव्या कारखान्यांस बंगालमध्यें जागा आहे, असें त्या प्रांताचें म्हणणें आहे. सध्या तेथें एकूण ४ हजार टनांचे १० कारखाने आहेत. बंगालमध्यें साखर कारखाने काढले म्हणजे वहातुकीच्या खर्चांत बचत होईल व स्थानिक शेतकऱ्यांस ऊस लावतां येईल, असा ह्या म्हणण्याचे समर्थनार्थ युक्तिवाद करण्यांत येतो. दक्षिण हिंदुस्थानांतील लोकांची मागणी ह्याच मुद्यावर आधारलेली आहे. दाक्षिणेकडे ऊस चांगला येतो व त्यापासून साखर अधिक निघते; त्याचप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील कारखान्यांपेक्षा अधिक दिवस तेथील कारखाने चालवितां येतात. आणखी एक मुद्दा ते पुढे आणतात. महाराष्ट्रांतील जमीन उसास अत्यंत योग्य असून बहुतेक सर्व कारखाने स्वतःच ऊस लावतात; त्याचप्रमाणें उसाच्या कारखान्यांचे स्थापनेस उत्तेजन देण्याचें मुंबई सरकारचें फार पूर्वींपासूनचें धोरण आहे, असें मुंबई प्रांतांतील कारखानदार म्हणतात.

मुंबई प्रांतांत कपास कापडाच्या गिरण्या बऱ्याच आढळतात, परंतु त्यांस संरक्षण दिलें म्हणजे त्यांचा बोजा इतर प्रांतांतील लोकांवरहि बसतो, अशी तक्रार नेहेमी ऐकूं येते. हीच गोष्ट इतर कारखान्यांस देण्यांत येणाऱ्या संरक्षणाचे बाबतींतहि लागू आहे. विशेषतः बंगालमध्यें कपास कापडाच्या गिरण्या अधिक निघाव्यात, असें तेथील लोकांस वाटतें. बंगालच्या मागणीचे मानानें त्या प्रांतांत एक चतुर्थांश इतकेंहि कापड तयार होत नाहीं. कपास कापडाचे बाबतींत बंगाल स्वयंपूर्ण झाला, तर बंगाली कामगारांस काम मिळेल व तेथील भांडवल किफायतशीर गुंतूं शकेल, हा मुद्दा इतर प्रांतांनाहि लागू पडतो. प्रत्येक प्रांत स्वयंपूर्णतेच्या मागें लागला, तर हिंदुस्थानाचे वेगवेगळे आर्थिक घटक निर्माण होऊन सबंद देशाचा साकल्येंकरून विचारच होणें कठिण पडेल, हें उघड आहे. तागाच्या गिरण्या नवीन काढण्याची संयुक्त प्रांताची इच्छा आहे व निर्गत व्यापारांतहि स्थान मिळविण्याची त्याची खटपट आहे. नवीन कारखान्यांची आपल्या प्रांतांत स्थापना व वाढ व्हावी, हें म्हणतांना सबंद हिंदुस्थानाचा विचार केला नाहीं, तर अत्यंत कठीण परिस्थिति निर्माण होईल. अगोदरच होत असलेल्या फाजील उत्पादनांत नव्या उत्पादनाची भर पडेल आणि नव्या कारखान्यांस जुन्या कारखान्यांशीं स्पर्धा करणें कठीण जाईल. परिणामीं सर्वच कारखाने संकटांत येतील. ज्या उद्योगधंद्यांत फाजील उत्पादनामुळें कूस रहात नाहीं, असे धंदे वाढविणें श्रेयस्कर होणार नाहीं. कांहीं नवे कारखाने कांहीं जुन्यापुराण्या कारखान्यांपेक्षा अधिक कार्यक्षम ठरतील, हें लक्षांत घेतलें, तरीहि नव्या कारखान्यांस एकूण क्षेत्रांत किती वाव आहे हें नीट समजून घेतलें पाहिजे. परस्पर-स्पर्धा उत्पादनाची कार्मक्षमता वाढविण्यास सहायकारक होत असली तरी उद्योगधंद्यांची प्रगति नीट अखंड चालावी, त्यांस धक्के बसूं नयेत, अशी व्यवस्था होणें अगत्याचें असतें.

## अवाढव्य युद्धखर्चाची तरतूद कशी करतात?

### प्रो. काळे ह्यांचें मुंबई रेडिओवर भाषण

(मुंबई रेडिओ स्टेशनच्या अधिकाऱ्यांचे कृपेमुळें प्रसिद्ध करण्यांत येत आहे.)

चालू युद्धांत सर्वच राष्ट्रांना मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागत आहे. त्यांतून तटस्थ म्हणवणारीं राष्ट्रेंहि सुटलेलीं नाहींत. युद्धांत प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या व अमेरिकेसारख्या स्वतःच्या व आपल्या शेजाऱ्यांच्या संरक्षणाची जय्यत लष्करी तयारी करणाऱ्या राष्ट्रांच्या सरकारांस लढाऊ सामुग्रीच्या पुरवठ्याप्रीत्यर्थ पाण्यासारखा पैसा ओतावा लागत आहे. मनुष्यप्राणाची हानि व मालमत्तेचा नाश प्रत्यहीं प्रचंड प्रमाणावर चालला आहे तो बाजूस ठेवला तरी फौजा, आरमार व विमानदल ह्यांच्या योगक्षेमासाठी कोट्यवधि रुपये खर्ची पडत आहेत. नुसती इंग्लंडचीच गोष्ट घेतली तर तेथील सरकारचा रोजचा खर्च पंधरा कोटि रुपयांवर गेला आहे. वर्षाचा हा पांच सहा हजार कोटि रुपयांचा खर्च प्रत्यक्ष रीतीनें ब्रिटिश सरकार करीत आहे ही वस्तुस्थिति नसती तर त्याचें अवाढव्य प्रमाण ध्यानांत येण्यास कल्पनाशक्तीस बराच ताण द्यावा लागला असता.

### मामुली नियम गैरलागू

वर्षाचे पांच सहा हजार कोटि रुपये खर्चले जावयाचे असतां एवढ्या रकमेचा पुरवठा कसा होतो आणि त्यासाठी लागणाऱ्या चलनाच्या सहायानें मालाची विक्री-खरेदी व पैशाची देवघेव कशी होते? हे प्रश्न येथें उद्भवतात. ब्रिटिश सरकार युद्धासाठी अवाढव्य खर्च करतें, त्यास लागणाऱ्या पैशाचा उगम ब्रिटिश जनतेची प्राप्ति हाच आहे. हिटलरशाहीचा नाश करून राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही ह्यांची सुरक्षित स्थापना करण्याचा चंग ब्रिटिश व अमेरिकन सरकारांनीं बांधला असतां त्या कामीं लागणारा खर्च करण्यास कोणीहि मागेंपुढें पाहून चालणार नाहीं. खर्चामध्यें काटकसर अत्यावश्यक व इष्ट असली तरी युद्धसामुग्रीसाठी लागणारा सर्व पैसा वेळच्या वेळीं आणि भरपूर पुरवलाच गेला पाहिजे. ह्या विषयींची व्यवस्था करण्याची जबाबदारी फडनवीसांची असते. ब्रिटिश चॅन्सेलर ऑफ दि एक्सचेकर, सर किंग्सले वुड, ह्यांनीं कॉमन्स सभेंत चालू वर्षाचें आपलें अंदाजपत्रक मांडून युद्धखर्चाच्या तजविजीसंबंधानें माहिती नुकतीच दिली, तीवरून ब्रिटिश सरकार व जनता युद्धखर्चाचा बोजा व्यवस्थित रीतीनें कसा उचलीत आहेत, ह्याची कल्पना येते. सरकारी उत्पन्न-खर्चाविषयींचे मामुली नियम युद्धकाळांत लागू करतां येत नाहींत. शांततेच्या परिस्थितींत सरकारचा खर्च त्याच्या वार्षिक उत्पन्नांतून भागलाच पाहिजे आणि हें उत्पन्न बहुतांशीं जनतेवर बसवलेल्या करांच्या वसुलींतून निघालें पाहिजे असा दंडक आहे. परंतु युद्धाचे काळांत सरकारी उत्पन्न-खर्चाची नेहमीप्रमाणें तोंडमिळवणी होऊंच शकत नाहीं. वाढलेला खर्च भागवण्यासाठी सरकार करांची संख्या व त्यांचें प्रमाण वाढवतें. तरीहि त्यांच्या योगानें जरूर असलेली उत्पन्नाची रकम फक्त अंशतःच उभी रहाते. बाकीच्या रकमेइतकें कर्ज काढावें लागून सरकारास उत्पन्न खर्चाचा मेळ घालावा लागतो. म्हणजे, बजेटांत तूट आणि राष्ट्रीय कर्ज ह्या दोन गोष्टी युद्धकाळच्या सरकारी उत्पन्न खर्चांत अपरिहार्य आहेत असें होतें. कर आणि कर्ज ह्यांचें प्रमाण काय असावें आणि कर्जाचें स्वरूप कोणतें असावें हें विशिष्ट परिस्थितीस अनुलक्षून फडनवीसांस ठरवावें लागतें. तसें करतांना व्याजाचे दर आणि चलनाचा फैलाव व बाजारभाव ह्या संबंधांतल्या अवघड प्रश्नांचा विचार करणें आवश्यक असतें.

### गेल्या युद्धाचा अनुभव

ह्या बाबतींत चालू युद्धांत दोन महत्वाच्या गोष्टी ठळकपणानें नजरेंत भरतात. गेल्या युद्धाच्या काळांतला अनुभव असा आहे कीं मोठ्या प्रमाणांत सरकारास कर्जें काढावीं लागल्यामुळें पुरवठ्याचे मानानें पैशास जोराची मागणी आल्याकारणानें त्याची किंमत चढते म्हणजे व्याजाचे दर वाढतात. सरकारी कर्जावरील व्याज अखेर जनतेकडूनच करांच्या मार्गानें यावयाचें असतें आणि त्याचे दर चढले तर लोकांच्या डोक्यांवरचा सरकारी देण्याचा बोजा जड होतो. तसेंच, सरकारी रोख्यांवरील व्याजाचा फायदा समाजांतील थोड्या श्रीमान लोकांस मिळतो आणि त्या योगानें विषमता उत्पन्न होते. दुसरी गोष्ट जिनसांच्या किंमतीसंबंधाची आहे. युद्ध-खर्च वाढला म्हणजे चलनाचा प्रसार वाढत्या प्रमाणावर होतो. त्याचबरोबर, युद्ध-परिस्थितीच्या योगानें मालाचा पुरवठा मर्यादित झालेला असतो आणि ह्या दोन कारणांचा परिणाम सर्व वस्तूंचे बाजारभाव वर जाण्यांत होतो. अशा रीतीनें उत्पन्न झालेली महागाई जनतेस जाचक होते. तसेंच, कारखानदारांस मजूरीचे दर वाढवावे लागून त्यांच्या उत्पादन-खर्चांत भर पडते, आणि ते आपल्या मालाच्या किंमती चढवतात. ह्या योगानें सरकारचाहि खर्च वाढतो आणि त्यास करांचें उत्पन्न वाढवणें व जादा कर्ज उभें करणें प्राप्त होतें. ह्या परस्परावलंबी गोष्टी सबंध राष्ट्राच्या नुकसानीस कारणीभूत होत असल्यानें त्या फडनवीसांस टाळाव्या लागतात.

### कागदी चलनाचा योग्य व मर्यादित पुरवठा

चालू युद्धाच्या खर्चाविषयींच्या तजविजीचा विशेष हा आहे कीं बाजारभाव स्थिर व निश्चित आहेत. व्याजाचे दर चढले नसून हलके आहेत आणि सरकारास जरूर वाटणारें कर्ज लोकांकडून सहज मिळत आहे. युद्धाचे परिस्थितींत कांहीं राज्यकर्त्यांस कागदी चलनाचा भरमसाट प्रसार करून फुकट उत्पन्न वाढवण्याचा मोह होतो. शांततेच्या काळांतील पायाशुद्ध चलनव्यवस्थेंत मध्यवर्ती बँकेनें कागदी चलन किती काढावें आणि व्यवहारांत खेळवावें ह्यास कायद्याच्या मर्यादा असतात. ह्या चलनाच्या मोबदल्यांत लोकांच्या मागणीस अनुसरून रोकड देतां यावी म्हणून सोन्याचा निधि आणि सरकारी कर्जरोखे विशिष्ट प्रमाणांत जवळ ठेवावे लागतात. ह्या प्रकारचा निधि कागदी चलनाचा प्रसार झपाट्यानें केला जात असतां त्यास आधार म्हणून बाजूस काढून ठेवणें अशक्य होतें आणि बिनतारणाचें चलन प्रचारांत आणणें जरूर होतें. योग्य मर्यादेंत, देवघेवींच्या व्यवहाराचे मानानें चलनाचा विस्तार होणें आवश्यक असतें आणि हें वाढलेलें चलन बिनतारणाचें कागदी नोटांचें असलें तरी हरकत नाहीं. परंतु कर्ज काढावें न लागतां हातीं पैसा फुकट येण्याचें साधन म्हणून तें प्रचलित केलें गेल्यास त्याचा परिणाम बाजारभाव भडकण्यांत व लोकांचा चलनावरचा विश्वास उडून जाण्यांत होतो. युद्धासारख्या नाजूक प्रसंगीं असें होणें ही राष्ट्रीय आपत्तिच होय. म्हणून ब्रिटिश सरकारसारखे जबाबदारीची जाणीव असणारे राज्यकर्तें असलें चलन भरमसाटपणानें काढीत नाहींत, एवढेंच नव्हे तर आपल्या राष्ट्रीय चलनाचा उच्च दर्जा अबाधित रहावा ह्यासाठी नोटांचा पुरवठा योग्य मर्यादेंत ठेवण्याची शिकस्त करतात. (अपूर्ण)

---

## स्फुट विचार

### हिंदी कपाशीचें भवितव्य

इंडिअन स्टॅटिस्टिकल इन्स्टिटयूटच्या मुंबई शाखेचे विद्यमानें सर होमी मेथा ह्यांनीं नुकत्याच केलेल्या भाषणांत त्यांनीं कपाशीच्या जागतिक परिस्थितीचा आढावा घेतला आणि हिंदी कपाशीच्या भवितव्याविषयीं विचार प्रकट केले. कपाशीच्या पुरवठ्याचे बाबतींत जगांतील राष्ट्रांस सर्वस्वी अमेरिकेवर अवलंबून रहाण्याची पाळी एक वेळ आली होती, परंतु अलीकडे ही स्थिति बदलली आहे. कृत्रिम रेशीम किंवा रेयॉन ह्याची कापसाशी स्पर्धा अलीकडे वाढली आहे. जर्मनी व जपान ह्यांनीं रेयॉनचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर करून कापसास खो देण्यांत बरेंचसें यश संपादलें आहे. अमेरिकन सरकारनें आपल्या कापसाच्या किंमती चढवून ठेवल्यामुळें रेयॉन महाग असतांहि त्याचें प्रस्थ माजलें आहे असें सर होमी म्हणाले. कापसाच्या गिरण्यांच्या धंद्यांत इंग्लंडचें स्थान पुष्कळ खालावलें आहे आणि जपाननें कापड बनवण्याच्या धंद्यांत झपाट्यानें प्रगति केली आहे. हिंदुस्थानांत कपाशीच्या पिकांत वाढ झाली आहे पण त्यांत व्हावी तितकी व तशी सुधारणा झालेली नाहीं. हिंदी शेतकऱ्यांनीं उंची जातीची कपास पिकवली तरी त्यांस तिची योग्य किंमत मिळत नाहीं आणि चांगल्या-वाईट कापसाची भेसळ करण्याची येथील लोकांची प्रवृत्ति अनिष्ट आहे अशी सर होमी ह्यांनीं टीका केली. हिंदुस्थानांत कापडाच्या गिरण्यांचा विस्तार होत आहे. कच्चा माल, कामकरी व गिऱ्हाइक ह्यांचें बाबतींत त्यांस सर्वस्वी अनुकूल परिस्थिति असतां परदेशांतून कापड येथें कां यावें ह्याचें त्यांनीं आश्चर्य प्रकट केलें. जपानचें उदाहरण पुढें ठेवून गिरणीवाल्यांनीं कापसाच्या खरेदीची आपली व्यवस्था सुधारावी असें त्यांनीं सुचवलें. परदेशी कापसावर ५० रुपये खंडीची आयात जकात आहे ती काढून टाकण्यांत यावी आणि हिंदी गिरण्यांस तलम सुताचें कापड विणण्यास उत्तेजन मिळून उंची जातीचें कापड परदेशांतून येण्याचें बंद व्हावें असेंहि त्यांचें म्हणणें पडलें. कपाशीची पैदास आणि कापडाचें उत्पादन ह्यांच्या पद्धति सध्यापेक्षा अधिक कार्यक्षम झाल्यास ह्या दोन्ही बाबतींत हिंदी धंद्याचें भवितव्य उज्वल आहे असा सर होमी ह्यांचा अभिप्राय आहे. युद्धोत्तर काळांत कपास व कापसाचें कापड ह्यांस चांगली मागणी येईल, परंतु कापसाच्या किंमती कृत्रिम रीतीनें चढवण्याचें आपलें धोरण अमेरिकन सरकारनें सोडून दिलें पाहिजे असें त्यांनीं बजावलें.

### वरील बाबतींत तज्ज्ञांचे कांहीं मतभेद

सर होमी मेथा ह्यांच्या वरील भाषणाचे प्रसंगीं सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास अध्यक्ष होते. कपाशीच्या धंद्याचे बाबतींत ते अधिकारानें बोलूं शकतात. त्यांनीं कांहीं बाबतींत व्याख्यात्यांच्या विचारांशीं आपण सहमत नसल्याचें स्पष्ट रीतीनें सांगितलें. युद्धोत्तर काळांतहि कापसाच्या पुरवठ्याचे व खपाचे संबंधांत हिंदुस्थानचें स्थान अबाधित राहील ह्या विषयींचा आपला विश्वास त्यांनीं व्यक्त केला. कपाशीचे बाजारभाव उचलून धरण्याचें धोरण प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं अंमलांत आणलें आहे त्यावर सर होमी मेथांनीं केलेली टीका आपणांस पसंत नसल्याचें त्यांनीं सांगितलें. कापसाच्या जागतिक बाजारपेठांतलें अमेरिकेचें महत्त्व कमी होईल असें त्यांस वाटत नाहीं. तसेंच कापसाच्या किंमतींविषयींचें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचें धोरण चुकलें आहे असें म्हणण्यासहि ते तयार नाहींत. केवळ किंमती वाढवणें हा त्या धोरणाचा हेतु नसून अमेरिकन शेतकऱ्यांस आपल्या कपाशीची योग्य किंमत मिळावी हें त्यांचें साध्य होतें. तें चुकीचें होतें कीं काय ह्याचा निर्णय आज करतां येणें शक्य नाहीं. हिंदी कापसांत चांगल्या-वाईट मालाची भेसळ होते, ह्या विषयींच्या सर होमी यांच्या तक्रारीस उद्देशून सर पुरुषोत्तमदास म्हणाले कीं, ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनसारख्या संस्थांच्या प्रयत्नानें भेसळीचा अनिष्ट प्रकार बहुतेक बंद झालेला आहे. आखूड धाग्याच्या कपाशीचें पीक ह्या देशांत होऊं देऊं नये, ही सर होमींची सूचना त्यांनीं अमान्य केली. हिंदुस्थानांत कित्येक प्रदेश असे आहेत कीं त्यांमध्यें लांब धाग्याची कपास पिकूच शकत नाहीं आणि आखूड धाग्याच्या कपाशीस तेथें बंदी केल्यास स्थानिक शेतकऱ्यांचा धंदाच नाहींसा होईल. दुसरी अशीहि महत्त्वाची गोष्ट आहे कीं कांहीं जातींच्या कापडास आखूड धाग्याचाच कापूस लागतो आणि त्याकरितां हलक्या दर्जाच्या कपाशीचें पीक आवश्यक आहे. हिंदी कपास व कापडाचा धंदा ह्यांच्या सारख्या महत्त्वाच्या विषयावर सर होमी मेथा व सर पुरुषोत्तमदास असल्या तज्ज्ञांचे विचार एकत्र प्रकट झाले हें बोधप्रद आहे.

### रशियन रणांगणें

लेनिनग्राड, मॉस्को व कीएव्ह ह्या रशियांतील तीन मान्याच्या ठिकाणांवर नेम धरून त्यांच्या मार्गानें जर्मन फौजा पुढें चालल्या होत्या. बाल्टिक समुद्रांचें वर्चस्व लेनिनग्राड घेतल्यानें जर्मनीच्या हातीं जाऊन रशियन आरमार लंगडें पडणार आणि जर्मन युद्धसामुग्रीची वहातुक त्या बाजूनें सोपी होणार. रशियाचें लढाऊ बळ खच्ची करण्यास उत्तरेकडील मोहिमेचा रोख लेनिनग्राडवर धरण्याचा हेतु ह्यावरून उघड होतो. मॉस्को तर बोलून चालून रशियाचें मर्मस्थान आणि तें हातीं आलें कीं बोल्शेव्हिकांचा बोजवारा उडाला ही हिटलरची कल्पना. तसेंच, दक्षिणेच्या बाजूस कीएव्ह घेतलें कीं युक्राइनचा महत्त्वाचा प्रदेश पादाक्रांत होऊन पूर्व रशियाचा मार्ग खुला होणार. ही तिहेरी मोहीम थोड्या काळांत उरकून इंग्लंडचा समाचार घेण्यास सरसावयाचें ही हिटलरची मूळची योजना होती. परंतु ह्या बाबतींतले त्याचे सर्व अंदाज खोटे ठरले आहेत. रशियन फौजा कल्पनेच्यापेक्षा अधिक चिकाटीनें लढत असल्यानें जर्मनीची पूर्व रणांगणांतली प्रगति मंदावली. रशियांतलें युद्ध सुरू होऊन एक महिना लोटल्यावरहि त्याचा शेवट लांबला आहे आणि जर्मनीच्या दृष्टीनें अनिश्चित झाला आहे. आपण रशियाचें भयंकर नुकसान केलें असल्याचें जर्मनी सांगत आहे. पण रशियानें प्रतिकार व उलट हल्ले करून जर्मनीचीहि अतोनात हानी केली आहे ह्यांत संशय नाहीं. रशियांतली मोहीम आपल्या पोलंड, बेल्जम किंवा फ्रान्समधील लढायांसारखी नाहीं ह्याचा अनुभव जर्मनीस आतां चांगला आला आहे. रशियन फौजांची पुरी तयारी नव्हती तेव्हां प्रारंभीं जर्मन सैन्यांची चाल झपाट्यानें होऊन त्यांनीं रशियाच्या राज्याचा लांब पट्टा पादाक्रांत केला आणि त्यांची गति रशियन फौजा थांबवूं शकल्या नाहींत तरी बोल्शेव्हिकांचा पाडाव

एक दोन महिन्यांत करण्याचा हिटलरचा बेत ढांसळला आहे ह्यांत शंका नाहीं. जर्मनीची प्रगति तात्काळ थांबेल किंवा त्यास पीछेहाट करावी लागेल असें रशियन सेनानीहि म्हणत नाहींत. पण हिटलरला अखेरचा जय आपण मिळूं देणार नाहीं एवढेंच नव्हे तर निकरानें आणि चिकाटीनें लढून शेवटीं त्याचा पराभव व नाश आपण करणार अशी उमेद रशियन पुढाऱ्यांस असून त्यांनीं ती असंदिग्धपणानें व्यक्त केली आहे. इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांचें पाठबळ रशियास असल्यानें त्यास अंतिम विजयाची खात्री वाटत आहे हें योग्यच आहे.

---

### जपानचें नवें धोरण

जर्मनीनें रशियावर स्वारी केली आणि अमेरिकेचें युद्धाच्या बाबतींत पुढें पुढें पाऊल पडत चाललें आहे ह्या दोन महत्त्वाच्या घडामोडींमुळें जपानी राजकारणांत खळबळ उडाली असल्यास नवल नाहीं. जर्मनीशीं केलेल्या दोस्तीच्या करा-राचा एक भाग म्हणून आपल्या साथीदारानें रशियांत युद्ध आरंभल्यामुळें पूर्व एशियांत गडबड करून इंग्लंडला त्रास देणें हें आपलें कर्तव्य आहे असें जपानी मुत्सद्यांस वाटत असलें पाहिजे. अशा प्रकारचें धोरण जपाननें अमलांत आणावें म्हणून जर्मनी त्यास टोचणीहि लावीत असला पाहिजे. दाक्षिणेकडे हातपाय पस-रण्यास प्रस्तुतची संधि चांगली आहे असें जपानला स्वतःस वाटत असलें पाहिजे आणि स्वार्थ व जर्मनीस सहाय ह्या दोन्ही गोष्टी साध्य करण्याचा विचार जपानी पुढाऱ्यांच्या डोक्यांत शिरला असावा. तीच विचारसरणी अमेरिकेच्या बाबतींत लागू होण्या-सारखी आहे. अमेरिका इंग्लंडला वाढत्या प्रमाणांत युद्धसहाय करीत असतां आणि ह्या दोन्ही राष्ट्रांचें लक्ष दुसरीकडे वेधलें असतां पूर्व एशियांत जपाननें दक्षिणेच्या बाजूस आक्रमण चालू केलें तर तो प्रयत्न यशस्वी होण्याचा चांगला संभव आहे आणि म्हणून ही संधी वायां घालवतां कामा नये असें कांहीं जपानी पुढारी म्हणत असले पाहिजेत. जपानच्या राजकारणांत ह्याप्रमाणें विचारवैचित्र्य उत्पन्न होऊन जपानी मंत्रिमंडळाच्या धोरणाबाबत तीव्र मतभेद व चर्चा चालू झाली असल्यास आश्चर्य नाहीं. ह्या परिस्थितीचा परिणाम जपानी मंत्रिमंडळाचा राजीनामा व त्याची पुनर्घटना होण्यांत झाला आहे. ह्या घडामोडींत जपानचें परराष्ट्रीय धोरण बदललें कीं काय आणि पूर्व एशियांत असल्या बदलाच्या योगानें युद्धाच्या ज्वाला पसरतात कीं काय हा प्रश्न सर्वत्र विचारण्यांत येत आहे. जपाननें जर्मनीशीं स्नेह केल्यापासून त्या राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय महत्वाकांक्षेसंबंधानें शंका उद्भवली आहे. त्या राष्ट्रानें पूर्व एशियांत लढाऊ धोरण स्वीकारल्यास त्याचा प्रतिकार करण्याची इंग्लंड व अमेरिका ह्यांची तयारी आहेच. पण तसा प्रसंग येऊं नये अशी त्यांची स्वाभाविक इच्छा आहे.

---

### यांत्रिक शिक्षणाची मोठ्या प्रमाणावरील व्यवस्था

कारखान्यांतील हस्तव्यवसाय-कौशल्याचें शिक्षण देण्याची हिंदुस्थानांत पद्धतशीर सोय नाहीं आणि हिंदी तरुण पिढीस मिळणारें शिक्षण केवळ बौद्धिक व घोकीव प्रकारचें असतें अशी तक्रार आज अनेक वर्षें केली जात आहे. औद्योगिक प्रगति आणि शिक्षणपद्धतीचा विकास ह्यांचा परस्पर संबंध अत्यंत निकट आहे. शिक्षणाचें ध्येय विश्वविद्यालयाच्या पदव्या मिळवून नोक-रींत शिरणें किंवा वाकलीसारखा पेशा पत्करणें हेंच आहे अशी परंपरागत कल्पना ह्या देशांत रूढ झाली आहे. मोठमोठाले कार-खाने देशांत थोडे असल्यानें त्यांत काम करण्यास यांत्रिक शिक्षण घेतलेल्या तरुणांस विशेष मागणी नव्हती. युद्धपरिस्थितीमुळें शिक्षणपद्धति व कारखानी धंदे ह्यांच्यामध्यें असलेली खिंड भरून निघूं पहात आहे. असल्या धंद्यांचा विस्तार होण्याची आवश्यकता युद्धसामुग्रीच्या भरपूर पुरवठ्यासाठी भासूं लागली तेव्हां त्यांस काम करण्यास जरूर असलेले कुशल कामगार कोठून आणावे हा प्रश्न उपस्थित झाला. नवीन कारखा-न्यांत दारूगोळा इत्यादि लढाऊ सामान बनवण्याचीं यंत्रें उभीं झालीं तर तीं चालवण्यास वाकबगार माणसें पाहिजेत. ह्या कारखा-न्यांतल्या बऱ्याचशा कामाचा अनुभव ह्या देशांत मिळण्यासारखा नसल्यानें कांहीं निवडक होतकरू तरुण त्याकरितां इंग्लंडला पाठवण्यांत आले आहेत. तथापि कुशल यांत्रिक कारागिरांस एवढी मोठी मागणी आहे कीं ती पुरी होण्यास ह्या देशांतच शिक्षणाची व्यवस्था करणें अपरिहार्य झालें. विविध प्रकारचें यांत्रिक शिक्षण देण्यासाठी दिल्ली येथें मध्यवर्ती संस्था हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें चालू झाली आहे ही त्या बाबतींतली व्यावहा-रिक कृति आहे. ह्या यांत्रिक शिक्षणाच्या संस्थेंत ५६४ उमेदवारांची भरती होण्याची तजवीज झाली आणि त्याशिवाय आणखी ४८० उमेदवार पाहिजे असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. शिक्षणासाठी फी घेण्यांत यावयाची नसून निवडलेल्या शिकाऊ लोकांस महि-न्याचा २०–२५ रुपये मेहनताना मिळावयाचा आहे. विद्या-र्थ्यांची शिकण्याची आणि रहाण्याची वगैरे सोइस्कर तजवीज करण्यांत आलेली आहे. त्यांचा शिक्षणक्रम पुरा झाला म्हणजे त्यांस लढाऊ किंवा बिनलढाऊ कारखान्यांत काम दिलें जाईल. युद्धसमाप्तीनंतरहि दिल्ली येथें स्थापन झालेली यांत्रिक शिक्षणाची संस्था चालू ठेवण्याचा सरकारचा विचार आहे आणि त्यावेळीं शांततेच्या परिस्थितींतहि उपयोगी पडतील अशीं यांत्रिक व हस्तव्यवसायांचीं कामें शिकवण्याची व्यवस्था केली जाईल. यांत्रिक कामाचें शिक्षण आणि उदरनिर्वाहाचें साधन हीं दोन्हीं उपलब्ध होण्याच्या ह्या संधीचा फायदा लायक तरुणांनीं घेणें आवश्यक आहे.

---

### ग्रेट ब्रिटन चीनमधील खास हक्क सोडून देणार

पूर्ववत् शांतता प्रस्थापित झाली, म्हणजे चीनमधील व्यापारविषयक खास हक्क सोडून देण्याविषयीं ग्रेट ब्रिटन अमेरिकेप्रमाणेंच विचार करील, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. चीनमधील कित्येक महत्त्वाचीं बंदरें त्यांसंबंधांतील करारांस अनुसरून परराष्ट्रीय व्यापारास खुलीं आहेत, त्यांमध्यें ग्रेट ब्रिटन व इतर कांहीं देश ह्यांस विशेष अधिकार व सवलती आहेत. तेथील कांहीं भाग तर त्यांचेच अमलाखालीं आहेत. ह्यापैकीं कांहीं बंदरें चीनला परत देण्यांत आलीं आहेत व उरलेलीं बंदरें परत देण्यासंबंधीची वरील बातमी आतां प्रसिद्ध झाली आहे. ईस्ट इंडिया कंपनी १७ व्या शतकापासून चीनशीं कँटन बंदरांतून व्यापार करीत होती. कंपनीबरोबर नवा करार झाला, तेव्हां कंपनीचा व्यापार करण्याचा एकमेवाद्वितीय अधिकार संपुष्टांत आला. अखेर, १८३४ सालीं इंग्लंडमधून एक खास अधिकारी व्यापारा-वर देखरेख ठेवण्यासाठीं चीनकडे पाठविण्यांत आला. चिनी सर-कारचे अधिकारी व ब्रिटिश व्यापारी ह्यांचेमध्यें वारंवार

बांधे येत. अखेर, १८३९ मध्यें उघड युद्ध जुंपलें, तें १८४२च्या नॅनकिंग तहानें संपविलें. ह्या तहाचे अन्वयें हाँगकाँग ग्रेट ब्रिटनकडे कायमचें आलें व चीनमधील पांच बंदरें ग्रेट ब्रिटनला व्यापारासाठी खुलीं करण्यांत आलीं. १८५६ व १८६० सालीं पुनः युद्धें झालीं व ग्रेट ब्रिटनला आणखी अधिकार प्राप्त झाले. युरोपियनांस चीनशी खुला व्यापार हवा होता आणि चिनी लोकांना बाह्य जगापासून अलिप्त रहावयाचें होतें एवढाच दोहोंमध्यें वांधा होता. पाश्चात्य राष्ट्रांना त्यामुळें चीनमध्यें बळजबरीनें आपला प्रवेश करून घ्यावा लागला. रशिया, जर्मनी, इत्यादिकांनीहि ह्यामध्यें वाटा उचलला. चीन हा दाट वस्तीचा, उद्यमप्रिय लोकांचा प्रदेश असतांना व त्यांतील संस्कृति अत्यंत दीर्घकालीन, तेथील धर्म प्राचीन व तेथील राज्यव्यवस्था स्वयंपूर्ण असतांना त्यांच्या वाटेस जाण्याचें युरोपियन राष्ट्रांस प्रयोजन काय? ह्या प्रश्नास "जगाचे जर वेगवेगळे अगदी स्वतंत्र भाग करून टाकले, तर त्याची प्रगति कशी होईल? सर्व भूपृष्ठाचा अधिकांत अधिक व उत्तमांत उत्तम उपयोग व्हावा, अशी मागणी करण्याचा जगास अधिकार आहे." हेंच उत्तर देण्यांत आलें आहे. चीनमधील खास हक्कांची पूर्वपीठिका अशा प्रकारची आहे.

---

### अमेरिका व हिंदुस्थान ह्यांचा व्यापारी संबंध

हिटलरशाहीविरुद्ध झगडणाऱ्या सर्व स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांचें अमेरिका हें शस्त्रास्त्रागार झालें आहे. प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं या बाबतींत अनेकवार घोषणा केल्या असून अमेरिकन लढाऊ सामुग्री इंग्लंडला सुरक्षितपणें पोंहोचण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे. हिंदुस्थानासहि वाढत्या लढाऊ तयारीकरितां अमेरिकन मालाची आवश्यकता आहे आणि हिंदी मालास अमेरिका हें मोठें गिऱ्हाइक आहे. ह्या परिस्थितींत हिंदुस्थानास जरूर असलेल्या मालाची खरेदी व आयात करण्याची व्यवस्था कार्यक्षम रीतीनें होण्याचें मोठें महत्व आहे. ह्या कार्यासाठी हिंदुस्थान सरकारनें सर षण्मुखम चेट्टी ह्यांची योजना केली असून त्यांनीं गेल्या आठवड्यांत अमेरिकेकडे प्रयाण केलें. सर षण्मुखम हे हुषार कारभारी आहेत आणि त्यांस व्यापारविषयक व्यवहारांचा चांगला अनुभव आहे. इंग्लंडला अमेरिकेकडून आज माल मिळत आहे त्या पद्धतीनें हिंदुस्थानास सवलतीनें अमेरिकन माल मिळण्याचा प्रयत्न करणें हें त्यांचें मुख्य काम राहील. अमेरिका व हिंदुस्थान ह्यांचे नवीन व्यापारी संबंध जोडले जात आहेत, ते आणखी दृढ होण्याचा उद्देशानें ह्या दोन देशांनीं आपापले खास प्रतिनिधी परस्परांकडे पाठवावे असेंहि आतां ठरलें आहे. हिंदुस्थानच्या वतीनें व्हाइसरॉय यांच्या कार्यकारी मंडळाचे एक मंत्रि, सर गिरिजाशंकर बाजपेय, ह्यांची एजंट जनरल ह्या नात्यानें नेमणूक झाली आहे. अमेरिकेच्या प्रतिनिधीचे जागीं ह्या देशांत कोणाची नेमणूक होते हें लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

---

### व्यापारी व औद्योगिक प्रश्नांवर चर्चा

हिंदुस्थान सरकारच्या व्यापार खात्याचे प्रमुख, सर रामस्वामी मुदलियार, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत मुंबईस भेट देऊन तेथील व्यापारी वर्गाबरोबर महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा केली. इंडियन इन्शुअरन्स कंपनीज असोसिएशनचे अध्यक्ष, मि. जे. सी. सेटलवाड, ह्यांनीं चीफ एजंटांचें कमिशन, कायद्यानें मर्यादित करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. सुपरिंटेंडंट ऑफ इन्शुअरन्सला कळविल्याबिना विमा कंपन्यांनीं आपले विम्याचे दर बदलूं नयेत, अशी व्यवस्था करणें अगत्याचें आहे, असें ते म्हणाले. हिंदी कंपन्यांच्या पॉलिसी अमान्य करण्याच्या, एक्सचेंज बँकांच्या धोरणाचा त्यांनीं उल्लेख केला व त्या बँका हिंदी कंपन्यांकडून डिपॉझिट मागतात, ही गोष्ट हिंदी कंपन्यांच्या हितास पोषक नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. आगबोट–वाहतुकीच्या विम्याच्या फक्त अमेरिकन व ब्रिटिश कंपन्यांच्याच पॉलिसी स्वीकारल्या जातात, हें योग्य नाहीं. इंडियन लाइफ ॲशुअरन्स ऑफिसेस असोसिएशनचे अध्यक्ष, मि. बेरामजी होर्मसजी ह्यांनीं आयुर्विमा कंपन्यांनीं पैसे गुंतविण्यासंबंधीं जाचक कायदेशीर अटी, हिंदी संस्थानांशीं परस्पर सवलतीच्या व्यवस्थेचा अभाव, भाग भांडवल कमी करण्याचे संबंधांतील अडचणी, इत्यादि गोष्टी सर रामस्वामींचे पुढें मांडल्या. देशी भाषांत प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांच्या असोसिएशनच्या अध्यक्षांनीं व्यापार मंत्र्यांचे नजरेस कागदाच्या नियंत्रणांतील अडचणी आणल्या, त्यासंबंधीं बोलतांना सर रामस्वामी ह्यांनीं सरकारी धोरणाचा खुलासा करून सरकारनें व्यापारी व वर्तमानपत्रकार ह्यांच्या दोघांच्याहि हिताकडे पाहिलें आहे, असें सांगितलें. इंडियन मर्चंटस चेंबर व महाराष्ट्र चेंबर ह्यांच्या कार्यकारी मंडळांबरोबर चर्चा करतांना सर रामस्वामी ह्यांनीं आयात–निर्गतीसंबंधीं सरकारी धोरणाचें स्पष्टीकरण केलें. युद्धविषयक धोक्याच्या विम्याचा बोजा व्यापारी वर्गास जाचक वाटत आहे, त्यासंबंधांत त्यांस कांहीं सूचना करण्यांत आल्या. आयात होणाऱ्या सर्व मालावर मूळ देशाचें नांव घालण्यांत आलेंच पाहिजे अशी सक्ती करण्यांत यावी; कारण हिंदुस्थानांतील कांहीं विदेशी कंपन्या आपल्या मालावर परदेशाचाच पत्ता छापतात व त्यामुळें तो खरोखर विलायती माल आहे, असा समज होऊन देशी मालाशी त्याची अयोग्य स्पर्धा होते, अशीहि तक्रार करण्यांत आली. हिंदी कच्च्या मालाच्या परराष्ट्रीय बाजारपेठा नाहींशा झाल्या आहेत, तेव्हां त्या मालास नवीन पेठा उपलब्ध करून देण्याची आवश्यकताहि सर रामस्वामींचे कानांवर घालण्यांत आली. आगबोट बांधण्याच्या हिंदी उपक्रमास सरकारनें पाठिंबा द्यावा, अशी त्यांस विनंति करण्यांत आली. हिंदुस्थान सरकारच्या व्यापार खात्याचे प्रमुखास अशा रीतीनें महत्त्वाच्या व्यापार व उद्योगविषयक अडचणींची प्रत्यक्ष माहिती मिळाली. तिचा इष्ट तो उपयोग होईल, अशी आशा आहे.

---

## ज़मीनमहसुलाची आकारणी

#### प्रत्येक चौरस मैली व दरमाणशी प्रमाण

| | प्रत्येक चौरस मैलास | | | दरमाणशी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै | रु. | आ. | पै |
| हैद्राबाद् | ३७८ | ६ | ५ | १ | १२ | ० |
| म्हैसूर | ३९६ | ० | ० | १ | १२ | ६ |
| त्रावणकोर | ४५८ | ९ | ७ | ० | ११ | ० |
| बडोदें | १,००४ | ० | ० | ३ | ५ | ४ |
| कोचीन | ८०८ | १ | ७ | १ | ० | ० |
| इंदूर | ५९७ | १ | ७ | ४ | ८ | ० |
| बिकानेर | ३६४ | १२ | १० | ० | १५ | ० |
| मद्रास | ३४२ | ८ | ० | १ | १ | ६ |
| मुंबई | ४३९ | ११ | २ | १ | १३ | ९ |
| बंगाल | ३८४ | ८ | ० | ० | १० | ० |

## प्रिव्ही कौन्सिलकडे निष्कारण केलीं जाणारीं अपिलें

### हिंदुस्थानांतील वकिलांस इशारत

प्रिव्ही कौन्सिलच्या ज्युडीशिअल कमिटीपुढें फौजदारी निकालाविरुद्ध अपिल करण्यास परवानगी मागणारे हिंदुस्थानांतील तेराहि अर्ज ज्युडीशिअल कमिटीनें ता. १६ जुलै रोजीं नामंजूर केले. नामंजूर करतेवेळीं लॉर्ड चॅन्सलरनीं हिंदी कायदेपंडितांस जरा कडक भाषेंत उपदेश करून निष्कारण करण्यांत येणाऱ्या अपिलांबद्दल नापसंती खालील शब्दांत व्यक्त केली:—"अर्जदारास प्रिव्ही कौन्सिलकडे जाण्यास पुरेसें कारण आहे. असें ह्या तेराहि अर्जांत म्हटलें आहे. परंतु एकातेरीज बाकी सर्व अर्जांस तसें कारण मुळींसुद्धां दिसत नाहीं. ही अत्यंत विचार करण्याजोगी बाब आहे. अर्जांस आपलें सर्टिफिकेट देणाऱ्या वकिलांचेवर त्यामुळें शिंतोडे तर उडतातच, परंतु त्याबरोबर न्यायाच्या मार्गांतहि निष्कारण व्यत्यय येतो. गेल्या मेमध्यें असेच नऊ अर्ज आले होते, तेहि सर्व पोकळच होते. फौजदारी निकालावर ज्युडीशिअल कमिटी कोणत्या मुद्यावर अपील स्वीकारते, ह्या विषयीं विशेषतः पंजाबांत गैरसमज झालेला दिसतो. ज्युडीशिअल कमिटी हें मामुली अपील कोर्ट नाहीं. फौजदारी दावा कमिटीपुढें पुनः चालत नाहीं. ती पुरावा विचारांत घेत नाहीं अगर साक्षींमधील तफावती लक्षांत घेत नाहीं. कोर्टास कांहीं बाबतींत आपलें मत चालवतां येतें. अशा बाबतींतहि ज्युडीशिअल कमिटी फेरविचार करीत नाहीं. कित्येक अर्जांत, ज्युडिशिअल कमिटीनें अपील विचारांत कां घ्यावें, हें सांगतांना कारणें दिलेलीं असतात, तीं पाहिलीं म्हणजे सर्टिफिकेट देणाऱ्या वकीलाला ज्युडिशिअल कमिटीच्या कार्यक्षेत्राचें आकलनच झालेलें नाहीं, असें म्हणावें लागतें. फारच थोड्या बाबतींत ज्युडिशिअल कमिटीकडे अपील होऊं शकतें. कोर्टानें आरोपीचें म्हणणेंच नीट ऐकून घेतलें नाहीं, त्याचे गैरहजेरींत खटला चालविण्यांत आला, त्यास योग्य ते साक्षीदार आणूं दिले नाहींत. गैरवाजवी गोष्टींचा कोर्टावर परिणाम झाला, दाव्याचें काम ज्या भाषेंत चाललें ती भाषा कोर्टास समजली नाहीं, कोर्टास दावा ऐकण्यास अथवा शिक्षा देण्यास अधिकारच नव्हता, इत्यादि जबरदस्त कारणांकरितां प्रिव्ही कौन्सिलच्या ज्युडीशिअल कमिटीकडे अपील करतां येईल. ज्यामुळें न्यायाचा पायाच नष्ट झाला आहे, अशी एकादी गोष्ट घडून आली, तरच प्रिव्ही कौन्सिलनें त्यांत हात घालावा त्यापेक्षा कमी महत्त्वाच्या बाबी ज्युडीशिअल कमिटीचे कक्षेंत येत नाहींत. ज्युडीशिअल कमिटीच्या कार्याचें इतक्या तपशीलवार स्पष्टीकरण केल्यानंतरहि, हिंदुस्थानांतून निष्कारण अपिलांचे अर्ज येऊं लागले, तर त्या संबंधांत हिंदी हायकोर्टाचें लक्ष वेधणें कमिटीस प्राप्त होईल."

### शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची संख्या

( मुख्य कचेऱ्या, पे ऑफिसें व सब ऑफिसें धरून )

| | ३१-३-४१ | ३०-९-४० | ३१-३-४० |
|---|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ३९३ | ३८९ | ३८४ |
| पांच प्रमुख जॉइंट स्टॉक बँका | ३१३ | ३०२ | २९० |
| एक्सचेंज बँका | १०३ | १०३ | १०० |
| इतर शेड्यूल्ड बँका | ५७६ | ५४० | ५१६ |
| एकूण... | १,३८५ | १,३३४ | १,२९० |

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

### मालकीच्या नव्या इमारतींत प्रवेश : कामास प्रारंभ

पुणें येथें कर्वे रोडवर कंपनीनें स्वतःच्या मालकीची जी नवी, भव्य व प्रशस्त इमारत बांधली आहे तिच्या प्रवेशाचा धार्मिक समारंभ गेल्या गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर झाल्याचें सर्वांस माहित आहेच. तारीख ८ जुलै रोजीं श्री धन्वंतरीच्या मूर्तीची स्थापना वैद्य कुलकर्णी दुधगांवकर यांचे हस्ते होऊन कारखान्याच्या कामास सुरवात झाली. ता. १३ जुलै रोजीं श्रीमत् शंकराचार्य यांचे अध्यक्षतेखाली धार्मिक होमहवन होऊन श्रींनीं या कार्यास शुभआशीर्वाद दिला.

कंपनीनें आपल्या कारखान्याच्या योग्यतेनुरूप चौसोपी अशी इमारत बांधली आहे. इमारतीचें प्रवेशद्वार उत्तराभिमुखी असून पूर्व बाजूसहि वाहनें येण्याजाण्यास मोठा रस्ता ठेविला आहे. दरवाजांत जातांच डावे बाजूस सेक्रेटरीचें व हिशेबाचें ऑफिस असून त्या लगत डायरेक्टर बोर्डाच्या सभेचा हॉल आहे. त्या बाजूनें पुढें गेलें असतां कचीं द्रव्यें ठेवण्याच्या मोठ्या दोन खोल्या असून त्यामध्यें वर्णानुक्रमाप्रमाणें कच्चा माल ठेवून दिला असून त्याचे पलीकडे या द्रव्यांचीं रूपांतरें होतात. दक्षिण बाजूस तळघर काढलें असून त्यामध्यें विजेच्या शक्तीनें चालणारीं यंत्रें बसविलीं असून त्या यंत्रानें घोटीव द्रव्यें प्रमाणशीर घोटलीं जातात. तळघराचे वरचे मजल्यावर बाटल्या साफ करणें, लेबलें लावणें प्रमाणशीर औषधें भरणें वगैरे कामें होऊन नंतर तीं पॅकिंग करणाराकडे रवाना होतात. नंतर त्यांचा हिशोब करून बिलें व किंमती वगैरे होण्याकरितां पुढें रवाना होतात. सारांश, शेवटची उजवे हाताची खोली पाहिली कीं, कच्च्या मालापासून तयार होऊन येणाऱ्या मालाची यादीच तयार मिळते. भट्टी बांधणें, चुलाण करणें वगैरे कामें पूर्ण होऊं लागलीं आहेत. इमारतीचे दक्षिण बाजूस मोठी विहीर काढून तिच्या पाण्याचा कारखान्याकडे उपयोग करणार आहेत. विहिरीचें काम चालू आहे.

### पैशाच्या वर्गावर्गीची सवलत

पैशाच्या वर्गावर्गीसंबंधीं नवीन योजना अमलांत आली, त्याअन्वयें आणखी खालील बिगर-शेड्यूल्ड बँकांस व देशी सावकारांच्या पेढ्यांस वर्गावर्गीचे दरांत सवलत देण्यांत आली:—

बँका

( १ ) हिमालय बँक लि., कांगरा, पंजाब.
( २ ) सातारा स्वदेशी कमर्शिअल कं. लि., सातारा.
( ३ ) हिरा बुलियन बँक लि., मीरत.
( ४ ) नैनीताल बँक लि., नैनीताल.
( ५ ) त्रिचनापल्ली तंजोर हिंदु परमनंट फंड लि., त्रिचनापल्ली.
( ६ ) कर्नाटक बँक लि., मंगलोर.
( ७ ) बर्मा बुद्धिस्ट ऑर्फनेज असोसिएशन बँक लि., मंडाले.

सावकारी पेढ्या

( १ ) रणछोडभाई भाईचंदभाई सुरा, मुंबई.

### प्राप्तीवरील कराचें दरमाणशी प्रमाण

| | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|
| म्हैसूर | ० | ६ | ११ |
| त्रावणकोर | ० | ३ | ३ |
| बडोदें | ० | ४ | १ |
| काश्मीर | ० | १ | २ |
| ब्रिटिश हिंदुस्थान | ० | ९ | ८ |

## विचार-प्रवर्तक सहकारी बातम्या

( लेखकः—श्री. वा. चिं. भानु, पुणें. )

काँग्रेस सरकारचे बिहार प्रांतीय दिवाण, श्री. श्रीकृष्ण सिंह यांच्या अध्यक्षतेखालीं २२ वी बिहार प्रांतिक सहकारी परिषद नुकतीच भरली होती. आपल्या अध्यक्षीय भाषणांत नामदार साहेबांनीं सहकारी चळवळीसंबंधानें कांहीं विचार प्रकट केले आहेत. वास्तविक पहातां श्री. सिंह यांचा सहकारी चळवळीशीं प्रत्यक्ष असा संबंध जरी थोडाच आलेला असला तरी त्यांचें भाषण कोणाहि नामवंत कार्यकर्त्याला शोभून दिसेल असेंच आहे. सहकारी चळवळीची बिहार प्रांतांत पीछेहाट झाली त्याचीं कारणें त्यांनीं खालीलप्रमाणें दिलीं आहेत. ( १ ) " उत्पादक कारणाऐवजीं खाऊन फस्त करण्याचे साठींच बहुतेक कर्जे घेण्यांत आलीं. ( २ ) अल्प मुदतीच्या ठेवींमधून जुन्या कर्जफेडीसाठीं भांडवलाचा पुरवठा करण्यांत आला. ( ३ ) सावकारांच्या कचाट्यांत नसलेल्या सभासदांचा अभाव. ( ४ ) विशेष विचार न करितां दिसेल त्या गावीं सोसायट्या स्थापन करण्याचें वेड, हीं प्रमुख कारणें असून त्यांत १९२९-३० सालापासून आलेली जागतिक मंदीनें पडलेली भर; एका रात्रींत बाजारभाव निम्यानें घसरले, कर्जें दुप्पट वाढलीं, पत ढासळली, शेतीच्या मालाची मातीमोलानें खरेदीविक्री होऊं लागली व शेतकरी वर्गाची दैना उडाली ! आणि या अंतर्गत आपत्तीला सरकारनें हिंदी राष्ट्रीय दृष्टीनें कोणच्याहि प्रकारची प्रतिबंधक योजना अमलांत आणली नाहीं. उलट इंग्लंडच्या हितार्थ हुंडणावळीचा भाव कृत्रिम उपायांनीं चढविला."

श्री. श्रीकृष्णसिंह पुढें म्हणतात, " सहकारी चळवळीनें वेगवेगळ्या देशांत अंतर्गत परिस्थित्यनुरूप वेगवेगळें स्वरूप धारण केलेलें आहे. आपल्या देशांत सहकारी चळवळ क्रेडिट, पत किंवा विश्वास यांभोंवतीं केंद्रीभूत झाली. राष्ट्राच्या आर्थिक उन्नतीच्या योजनेंत 'क्रेडिट' ला मोठें महत्त्वाचें स्थान आहे. त्यामधून क्रेडिट वगळा मात्र, सारा सांगाडा पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें कोसळून पडेल! आपला भारतवर्ष शेतकीप्रधान देश आहे. शेतीचा धंदाच असा आहे कीं त्यांत क्रेडिटशिवाय लहान मोठ्या शेतकऱ्याचें भागत नाहीं. आणि मग ज्या प्रांतांतील किंवा विभागांतील शेतकरी पूर्वापार डोईजड झालेल्या कर्जाखालीं जमीनदोस्त झालेला आहे किंवा कसाबसा जीव धरून आहे तेथें क्रेडिटशिवाय त्याला तरणोपायच नाहीं. बेणें खरेदीसाठीहि त्याला कर्ज काढावें लागतें अशी हलाखीची त्याची स्थिति आहे. तेव्हां शेतीच्या कामकाजांत नवे नवे लागणारे शोध, साधनें आणि उपाय व खतें-औतें यांची जोड त्याला करून यावयाची झाली, जुन्या पद्धती आणि विचार सोडून देण्याबद्दल त्याला शिकवण यावयाची झाली, नवीन नवीन प्रयोग त्यानें करावयाचे म्हटलें कीं तेथें प्रथम भांडवलाचा प्रश्न दत्त म्हणून उभा रहाणार व तो क्रेडिटशिवाय कसा सुटणार ? "

" पण असें क्रेडिट देताना फार काळजीपूर्वक विचार करावयास हवा. क्रेडिट अतिशय सवंग केलें तर त्यापासून हितापेक्षा अनहितच जास्त होतें असा आपल्या देशांत स्पष्ट अनुभव आलेला आहे. ईजिप्त देशांतहि हाच अनुभव आलेला आहे. आपल्या देशांतील सांप्रतची सहकारी चळवळ अपेशी झाल्यासारखी दिसते याचें मुख्य कारण निष्काळजीपणानें व चिकित्सेशिवाय भरमसाटपणें भांडवलाचा पुरवठा होत गेला, 'पुरेसें भांडवल' याचा अतिरेक होऊन अगोदरच कर्जांत बुडून गेलेला शेतकरी या नव्या भांडवलाच्या राशींत पुरून गेला हेंच होय ! एक साधा अर्ज दिला किंवा पतपेढीच्या सेक्रेटरीला नुसतें तोंडी सांगितलें कीं सोसायटींतून हवा तेवढा पैसा सहज घरीं बसल्या बसल्या मिळतो असें आरंभीच्या काळांत दिसून आल्यानें, ज्या कोणाला सावकार दाराशीं उभा करीत नव्हता असे शेकड्यानें सोसायटींत शिरले व तेच पुढें व्यवस्थापक कमेट्यांत घुसले. कोण कुणाबद्दल आक्षेप घेणार ? कोण कुणाचे दोष दाखविणार ? सारांश, मागणी करणाऱ्या सभासदांची लायकी, पत, व्यवहार किंवा त्यांचें कर्जाचें कारण काय याची चौकशी काळजीपूर्वक करण्यांत आली नाहीं. त्याचींच फळें आज सहकारी चळवळीला निस्तरावीं लागत आहेत ! थकबाकीचे हिमालय सारखे वाढत आहेतच ! म्हणून यापुढें तरी पूर्वीची जुनी घाण काढून टाकीत असतां नव्या सभासदांना भांडवल पुरवितांना त्यांचे व्यवहार, त्यांची कुवत व कर्जाचीं कारणें यांची निष्ठुरपणानें छाननी केल्याशिवाय एक पैसाहि देतां कामा नये."

सहकारी चळवळीला क्रेडिटचें महत्त्व याप्रमाणें दर्शविल्यानंतर ते म्हणतातः—"क्रेडिट म्हणजे रोखीनें भांडवलाचा पुरवठा करीत असतां सहकारी कार्यकर्त्यांनीं हिंदी शेतकऱ्याच्या सांपत्तिक स्थितींत सुधारणा करून भर घालण्यासाठीं त्याच्या रोजच्या गरजा भागविण्याचीहि व्यवस्था केली पाहिजे. निवडक बींबियाणें, सुधारलेलीं औतें आणि शेतकीविषयक सुधारलेली पद्धति अमलांत आणण्यासाठी त्यांचीं मनें वळविलीं पाहिजेत. तसेंच त्यांचा शेतीचा उत्पन्न होणारा माल एकत्र साठवून सहकारी पद्धतीनेंच त्याची विक्री करण्यास त्यांना उत्तेजन दिल्याशिवाय त्यांना मालाची पुरेपूर किंमत मिळणार नाहीं. शेतीचा माल एकत्र करितांना मालाची प्रत लावणें, माल निवडून स्वच्छ करणें, उत्तम; मध्यम व कनिष्ठ प्रकारच्या मालाची अलग विक्री करण्यानें चढीचे भाव कसे मिळतात याचें महत्त्व शेतकऱ्यांना पटविणें हें कार्यकर्त्यांचें आजचें एक कर्तव्य आहे. तसेंच कोरडवाहू शेतकऱ्यांना कांहीं दुय्यम धंद्याची माहिती करून देणें अवश्य आहे. कारण वर्षाच्या काठीं त्यांचा पुष्कळ वेळ वाया जात असतो ! अशा फुरसतीच्या वेळीं त्याच्या उत्पन्नांत थोडीफार भर पडेल अशीं कांहीं कामें घरबसल्या करण्याची प्रवृत्ति त्यांच्यामध्यें निर्माण करणें अगत्याचें आहे. वैयक्तिक प्रयत्नाला तितकेसें यश लाभणार नाहीं. सबब सहकारी तत्त्वावरच दुय्यम जोड धंद्यांचा पुरस्कार शेतकरी वर्गाकडून करून घेणें जरूर आहे."

सहकारी चळवळीसंबंधानें वरील अर्थाचे विचारप्रवर्तक उद्गार काढल्यानंतर, श्री. श्रीकृष्ण सिंह यांनीं चळवळीला जें एक सांप्रत निराशाजनक स्वरूप आलेलें आहे त्याचें निराकरण करण्यासाठीं बिहार सरकारनें 'बोर्ड ऑफ एक्सपर्ट्स'—तज्ज्ञांची कमिटी नेमली होती व तिनें चळवळीचें पुनरुज्जीवन करण्याचे हेतूनें एक योजना सुचविलेली आहे त्याबद्दल जे विचार प्रकट केले आहेत तें निवेदन करण्याचें काम एका स्वतंत्र लेखांतच करणें अधिक श्रेयस्कर होईल.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २९ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १११–१० |
| ४% १९४३ | १०४–१ |
| ३½% विनमुदत | ९६–१ |
| ३½% १९४७–५० | १०३––० |
| ३% ( १९६३–६५ ) | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ | ९७–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०९––८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९––८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११५––८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२७—८ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% | १४६––८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १११—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% | ४५—६ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५५६—४ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०६–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% | १३४–१२ |
| कराची ( १०० ) ९% | २१५–१० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१७––८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १६३५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १६८७—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% | ६६—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८९०––० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६५२––८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २२२—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४६—४ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. | २१—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ४५—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४२००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २२१–१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १५६—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३९४—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १४३ रु.१४ आ.७ पै | २०९०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १४८–१२ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२–३–३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६३–०–६ |


सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

' पायोनियर डाइंग हाऊस '

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

The Only Book Depot of its Kind in India.

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

पोरवाल ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी
ठेवणारी सर्वांत उत्तम!




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**महायुद्धाची जाणीव!** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें.

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ मांपुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांपुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ३० जुलै, १९४१ अंक ३१

अर्थ ग्रन्थमाला—पुस्तक ४ थें

## सहकार

### ( हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

★

लेखकः—प्रो. वा. गो. काळे
श्री. श्री. वा. काळे

पुस्तक ता. १ ऑगस्ट रोजीं प्रसिद्ध होईल.

अर्थ ग्रन्थमाला
दुर्गाधिवास, पुणें ४.

कोऑपरेटर्स बुकडेपो
९ बेकहाऊस लेन, फोर्ट, मुंबई

# विविध माहिती

### निऑन गॅसचा उजेड

निऑन गॅसच्या उजेडांत झाडें लवकर वाढतात, असें आढळून आलें आहे. बीं लावून त्यांची रोपटीं करण्यास तो उजेड फारच उपयुक्त आहे.

### कॅल्शियम कार्बाइडचा उपयोग

कॅल्शियम कार्बाइडचे रेशमी मोजे करतां येतात. कॅल्शियम कार्बाइड पाण्यांत मिसळला म्हणजे ॲसिटलीन गॅस निघतो. ह्या गॅसमध्यें पाणी मिसळलें, म्हणजे ॲसिटल डीहाइड तयार होतो, त्याचा ऑक्सिजनशीं संकर झाला, म्हणजे ॲसिटिक ॲसिड निघतें. त्यापासून ॲसिटिक अनहैड्राइड काढून तें सेल्यूलोजमध्यें मिसळलें म्हणजे सेल्युलोज ॲसिटेट तयार होतें. तें दाबाखालून काढलें, म्हणजे रेशमी धागे निघतात; त्याचा मोजे करण्याकडे उपयोग करतां येतो.

### युकॅलिप्टसचा नवीन उपयोग

पेट्रोलमध्यें युकॅलिप्टसचा अर्क (निलगिरी तेल) मिसळलें असतां मोटार दर गॅलनास तीन–चार मैल अधिक जाते, असें आढळून आलें आहे.

### टोळधाडीची भीति

जर्मन लढाऊ विमानांच्या धाडी रशिया, आफ्रिका व इंग्लंड ह्या देशांवर चालल्या आहेत आणि त्या हाणून पाडण्याचे यशस्वी प्रयत्न करण्यांत येत आहेत. ह्याच वेळीं इजिप्त, सुदान, अरबस्तान, सीरिया वगैरे भागांत खऱ्याखुऱ्या टोळधाडी येण्याची भीति उत्पन्न झाली आहे. ह्या वालुकामय देशांत गेलीं सहा वर्षे टोळांची निपज झाली नाहीं, पण अलीकडे त्यांच्या उत्पत्तीस अनुकूल अशी नैसर्गिक परिस्थिति निर्माण झाली असल्याचें तज्ज्ञ सांगतात.

### नाशिक देवळाली ट्रॅन्स्पोर्ट कं. लि.

वरील नांवाची मोटार बस कंपनी नोंदण्यांत आली आहे.

### क्लेम सेटलमेंट एजन्सी लि.

आगीचा, आयुष्याचा, इत्यादि विम्याच्या क्लेमचे पैसे मिळवून देण्याच्या उद्देशानें निघालेल्या ह्या कंपनीचे मॅनेजिंग एजंट्स मेसर्स पी. टी. अँड कं. हे आहेत. कंपनीची मुख्य कचेरी पुणें येथें बुधवार पेठेंत आहे.

### युध्दविषयक मालाच्या ऑर्डरी

हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्यामार्फत आतांपर्यंत ७६ कोटि रुपयांच्या युद्धविषयक मालाच्या ऑर्डरी देण्यांत आल्या.

### आगगाडींत पाळणे

स्त्रियांच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत मुलांसाठी पाळण्यांची व्यवस्था करण्याचा उपक्रम साउथ इंडियन रेल्वेनें त्रिवेंद्रम एक्सप्रेसमध्यें केला, तो यशस्वी झाला. मलबार एक्सप्रेसमध्येंहि आतां पाळणे लावण्यांत येतील.

### अटलांटिकमधील व्हातूक

जून व जुलै महिन्यांत लंडनला आतांपर्यंतपेक्षां सर्वांत अधिक आगबोटी सुखरूप पोचल्या.

### फेडरल कोर्ट

१९४० च्या शेवटच्या तिमाहींत हिंदी फेडरल कोर्टानें पंधरा दाव्यांचे निवाडे केले.

### कामगारांस बोनस

टाटा आयर्न अँन्ड स्टील कंपनीच्या कामगारांस कंपनीच्या गेल्या वर्षाच्या नफ्यांतून ४८ लक्ष रुपये बोनस मिळणार आहे.

### ३% १९४९–५२ कर्जरोख्यांची किंमत

३% १९४९–५२ च्या कर्जरोख्यांची किंमत १ ऑगस्टनंतर पुढीलप्रमाणें राहील:—

| विक्रीचा दिवस | प्रत्येक शंभराच्या रोख्याची किंमत रु. आ. पै |
|---|---|
| १ ऑ. ते ९ ऑ. | १००–०–० |
| ११ ऑ. ते १६ ऑ. | १००–०–९ |
| १८ ऑ. ते २३ ऑ. | १००–१–६ |
| २५ ऑ. ते ३० ऑ. | १००–२–३ |

त्यानंतर दर आठवड्यास दर शेकडा ९ पै ह्याप्रमाणें वाढ होत जाईल.

### हिंदी लष्करी अधिकारी

हिंदुस्थानांतील कमिशनधारी लष्करी अधिकाऱ्यांच्या संख्येंत दरसाल दोन हजारांची भर पडणार आहे.

### मुंबई प्रांताचा युध्द-फंड

मुंबई प्रांताच्या युद्धफंडाचा आकडा आतां ६४ लक्ष रुपये झाला आहे.

### ग्रेट ब्रिटनमधील गाढवें कमी झालीं

ग्रेट ब्रिटनमधील गाढवांच्या जननाचें प्रमाण उतरत चाललें आहे, त्यामुळें गाढवांची किंमत वाढत आहे. समुद्रकिनाऱ्याची हवा खाण्याच्या ठिकाणीं दिवसानुदिवस कमी गाढवें आढळतात. दोन वर्षांपूर्वी ब्लॅकपूल येथें २४८ गाढवांना लायसेन्स होता. कांहीं ठिकाणीं गाढवांचे कामाचे तासांवर नियंत्रण आहे. हीं गाढवें प्रथम मेसापोटेमियांतून ग्रेट ब्रिटनमध्यें आणण्यांत आलीं, तीं ट्यूडर घराण्याच्या कारकीर्दींत लोकप्रिय झालीं.

### जगांतील पहिलें नाणें

जगांतील चलन एकाएकी नाहींसें केलें, तर सर्व व्यवहार एकदम बंद पडतील. कांहीं शतकांपूर्वी पैसे अस्तित्वांत नव्हते; कातडीं, तांबें, इत्यादींचा पैशाचे जागीं उपयोग केलेला आढळतो. अगदी पहिलें नाणें ख्रिस्त शकापूर्वी ७०० व्या वर्षी, म्हणजे सुमारें २,६५० वर्षांपूर्वी ओतण्यांत आलें, असा अंदाज आहे. गुरेंढोरें हीच माणसाची संपत्ति असे, त्यावेळीं गुराढोरांच्या किंमती मूलभूत धरूनच परस्पर विनिमय होत असे.

### सिंधमध्यें रेडिओगृह

सिंधमध्यें कोणत्या ठिकाणीं रेडिओगृह स्थापन करणें सोइस्कर आहे, ह्याची चौकशी करून जागा निश्चित करण्याकरितां ऑल इंडिया रेडिओचे मुख्य इंजिनिअर लवकरच सिंधला भेट देणार आहेत.

### निर्वाहाचें साधन

मध्यम वर्गांतील गरीब स्त्रियांस निर्वाहाचें साधन प्राप्त करून देण्याकरितां छोटेखानी उद्योगधंदे सुरू करण्याची योजना म्हैसूर सरकारनें आखली आहे.

### संपत्ति आणि सुख

"संपत्तीपासून सुख होत नाहीं असें वेदांती म्हणतात, त्यांत सत्य असेल; तथापि, सुखाचीं साधनें असून दुःखी होण्यांत तिची माणसास मदत होते, ह्यांत शंका नाहीं."

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३६२ |
| २ अमेरिकेनें इंग्लंडला कर्ज दिलें ... ... | ३६३ |
| ३ अवाढव्य युद्धखर्चाची तरतूद कशी करतात ! | ३६४ |
| ४ स्फुट विचार ... | ३६५ |
| हिंद-ब्रह्मदेश करार—हिंदी कारखान्यांत वाढतें युद्धसामुग्रीचें उत्पादन—इंडोचायनांत जपान—जपानविरुद्ध प्रतिकार योजना—यांचे कोर्टेली—आधुनिक व्यापार पद्धति— | |
| ५ रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ... ... | ३६६ |
| ६ हातमागावरील ब्लॅकेटें ... ... | ३६७ |
| ७ हिंदुस्थानांतील बँकांसंबंधीं ताजे आकडे | ३६८ |
| ८ कामगार नुकसान भरपाई ... ... | ३६९ |
| ९ निवडक बाजारभाव... | ३७० |

अर्थ

बुधवार, ता. ३० जुलै, १९४१

# अमेरिकेनें इंग्लंडला कर्ज दिलें

इंग्लंडला अमेरिकेकडून युद्धसामुग्रीचा पुरवठा सारखा वाढत्या प्रमाणांत होत आहे हें आतां सुप्रसिद्धच आहे. ह्या मालाची किंमत देणें इंग्लंडला सुलभ जावें ह्या विषयींची व्यवस्था अमेरिकेनें सोइस्कर रीतीची केली आहे. ह्या दोन राष्ट्रांच्या देवघेवींत इंग्लंडनें अमेरिकेस द्यावयाचें देणेंच अधिकाधिक निघणार आणि त्याची फेड करण्यास लागणाऱ्या पैशाची तरतूद करणें स्वाभाविक रीतीनेंच कठिण आहे. इंग्लंडला युद्धसहाय द्यावयाचें एकदा ठरवल्यावर अमेरिकेनें त्याची सवलतीची योजना आखणें जरूर होतें. "लीज अँड लेंड" ह्या नांवाचा प्रसिद्ध कायदा पास करून अमेरिकेनें इंग्लंडकडून द्यावयाच्या पैशाच्या देण्याची समाधानकारक तजवीज केली. कांहीं जातींचा माल इंग्लंडला विकला आहे असें न समजतां तो भाड्यानें वापरावयास दिला आहे असें कल्पून तो परत येण्याच्या निश्चितीसाठी तारण घ्यावयाचें अमेरिकेनें ठरवलें आहे. अमेरिकन खंडाच्या बाजूचीं कांहीं महत्वाचीं ठाणीं तारण म्हणून अमेरिकेस वापरावयास इंग्लंडनें द्यावयाचीं आणि जहाजांसारखा माल वापरून झाल्यावर परत करावयाची ही योजना आहे. परंतु हा नवा कायदा अंमलांत येण्यापूर्वी इंग्लंडनें कांहीं माल अमेरिकेकडून घेण्याचा करार केला होता. त्याच्या किंमतीची फेड कशी करावयाची हा अवघड प्रश्न उपस्थित झाला तेव्हां त्यावर कांहीं तरी समाधानकारक तोड काढणें प्राप्त झालें. ह्या बाबतींतला युद्धपरिस्थितींतला मामुली उपाय ब्रिटिश जनतेच्या मालकीचे अमेरिकन रोखे जमा करून ते ब्रिटिश सरकारनें अमेरिकन सरकारच्या स्वाधीन करावयाचे हा होय. तथापि, असल्या रोख्यांच्या परिमाणास मर्यादा आहे आणि शिवाय कोट्यवधि डॉलर्स किंमतीचे अमेरिकन रोखे न्यूयॉर्कच्या रोखे बाजारांत एकदम विक्रीसाठीं आले असतां त्यांचा भाव पडून इंग्लंडचें किंमतींत होणाऱ्या ह्या घटीच्या इतकें नुकसान होणार हें उघड आहे. ह्या दुहेरी अडचणींतून मार्ग काढण्यास इंग्लंडला सहाय करण्याचें अमेरिकन सरकारनें ठरवलें आणि जरूर त्या रकमेइतकें कर्ज देण्याची योजना आखली. उभय पक्षांस ती मान्य झाली असून तिला आतां मूर्तस्वरूप देण्यांत येत आहे. साडेबेचाळीस कोटि डॉलर्सचें (सुमारें दीडशे कोटि रुपये) कर्ज एका रकमेनें देणें ही गोष्ट कांहीं लहान-सहान नव्हे. पण ह्या मोठ्या रकमेच्या कर्जाची आणि त्याच्या तारणाची तजवीज करण्यांत आली आहे आणि त्यासंबंधांत जरूर असलेला अधिकार ब्रिटिश मंत्रिमंडळास पार्लमेंटकडून मिळण्यासाठी खास कायद्याची तातडीची व्यवस्था झाली आहे.

फेडरल लोन ॲडमिनिस्ट्रेटर्स ह्यांच्या विनंतीवरून आणि प्रेसिडेंटांच्या संमतीनें अमेरिकेच्या रीकन्स्ट्रक्शन फिनॅन्स कॉर्पोरेशननें इंग्लंडला ४२½ कोटि डॉलर्सचें कर्ज देण्याचें ठरवलें असल्याचें जाहीर झालें आहे. इंग्लंडला कर्ज देण्याचा अधिकार नुकत्याच पास झालेल्या एका कायद्यानें वरील कॉर्पोरेशनला मिळाला आहे. अमेरिकेंतील आपले रोखे येईल त्या किंमतीनें विकून त्या देशांतील आपलें देणें भागवण्याचा प्रसंग ब्रिटिश सरकारावर येऊं नये म्हणून ही कर्जाची योजना कायद्यानें मंजूर केली आहे. न्यूयॉर्कच्या रोखेबाजारांत ज्यांच्या किंमती जाहीर केल्या जातात असे २० कोटि डॉलरचे अमेरिकन रोखे इंग्लंडला मिळावयाच्या कर्जास तारण दिले जातील. इतर ११ कोटि डॉलरचे रोखे आणि अमेरिकेंत धंदा करणाऱ्या ४१ ब्रिटिश विमा कंपन्यांचें १८ कोटि डॉलरचें भांडवलहि तारण म्हणून राहील. ह्या कंपन्यांची मालकी व व्यवस्थेचें स्वातंत्र्य अबाधित रहावयाचें आहे. ह्याशिवाय अमेरिकेंत रजिस्टर न झालेल्या ब्रिटिश विमा कंपन्यांच्या अमेरिकन शाखांची प्राप्तीहि जादा तारण होईल. तारण रीकन्स्ट्रक्शन फिनॅन्स कॉर्पोरेशनला देण्यांत येईल आणि हे रोखे फेडरल रिझर्व्ह बँकेपाशी ठेवण्यांत येतील. ह्या रोख्यांचें व्याज आणि डिव्हिडंड व वर निर्दिष्ट केलेल्या ४१ ब्रिटिश विमा कंपन्यांच्या अमेरिकन शाखांची प्राप्ति ह्यांचा विनियोग अमेरिकन कर्जावरचें व्याज व त्याचें मुद्दल ह्यांची फेड करण्याकडे होईल. कर्जास ३ टक्के व्याज राहील आणि त्याची मुदत १५ वर्षांची आहे. ही मुदत संपण्यापूर्वी दोन-तृतीयांश मुद्दल परत करण्यांत आलें असेल तर ती आणखी पांच वर्षांनीं वाढवतां येईल. ब्रिटिश फडनवीस सर किंग्जस्ले वुड ह्यांनीं कॉमन्स सभेंत कर्जाच्या वरील शर्तींचा उल्लेख केला आणि त्या समाधानकारक असल्याचें सांगितलें.

अमेरिकन कर्जाच्या संबंधांतील बिलाचें समर्थन करतांना सर किंग्जस्ले वुड ह्यांनीं त्या व्यवहाराविषयींची तपशीलवार माहिती दिली. इंग्लंडला अमेरिकेचें होणारें सर्वच देणें "लीज अँड लेंड" कायद्यास अनुसरून भागणें शक्य नाहीं आणि त्याची फेड करण्यास कर्ज काढलेंच पाहिजे व त्यास तारण दिलें पाहिजे. ब्रिटिश कंपन्यांच्या शाखा अमेरिकेंत आहेत त्यांची जिंदगी विकावयास काढावी तर तिची किंमत अल्प येणार आणि तेथील कायद्याप्रमाणें ह्या शाखांचा मालकी हक्क त्यांचा धंदा करणाऱ्या स्थानिक कंपन्यांस विकतां येत नाहीं. तेव्हां हे हक्क आणि शाखांची मिळकत कर्जास तारण देणें हा मार्ग उरला आणि तो अलीकडच्या एका अमेरिकन कायद्यानें मान्य झाला असल्यानें प्रस्तुतचा कर्जाचा व्यवहार शक्य झाला ही गोष्ट ब्रिटिश फडनवीसांनीं विशद करून सांगितली. तीन हप्त्यांचा कर्जावरील व्याजाचा दर अगदीं बेताचा आहे, असेंहि ते म्हणाले. ब्रिटिश तारण जसजसें दिलें जाईल तसतशी कर्जाची रकम हिशेबांत येईल आणि दर महिन्यास दहा कोटि डॉलर्सचा तिचा आंकडा होईल. अमेरिकेंतील ब्रिटिश कंपन्यांच्या रोख्यांचें व्याज व त्यांची एकूण रकम सबंद कर्ज मुदतींत फेडण्यास पुरेशी होईल अशी अपेक्षा आहे. म्हणजे ह्या कंपन्यांच्या अस्तित्वास हात न लागतां ब्रिटिश सरकारचा कार्यभाग उरकला जाणार आहे असा ह्या सबंद व्यवहाराचा रोख आहे.

## अवाढव्य युद्धखर्चाची तरतूद कशी करतात ?

### प्रो. काळे ह्यांचें मुंबई रेडिओवर भाषण

( मुंबई रेडिओ स्टेशनच्या अधिकाऱ्यांचे कृपेमुळें प्रसिद्ध करण्यांत येत आहे )

सरकारास युद्ध-खर्चाकरितां पैसा लागतो तो जनतेच्या मिळकतींतून कर व कर्ज ह्यांच्या दुहेरी स्वरूपांत मिळावयाचा असल्यानें या प्राप्तीपैकी अत्यावश्यक असाच भाग खाजगी व बिनळढाऊ उपजीविकेसाठी लोकांनीं उपयोगांत आणावा आणि बाकीच्या प्राप्तीची बचत व्हावी अशी व्यवस्था करावी लागते. शस्त्रास्त्रें व दारूगोळा ह्यांच्या उत्पादनास आणि लोकांच्या चरितार्थास आवश्यक असलेल्या कच्चा-पक्क्या मालाची पैदास व आयात यांस सरकार प्राधान्य देतें. ह्या योगानें जनतेच्या हातून व्हावयाचा जिनसांचा वापर मर्यादित होतो. ब्रिटिश सरकारनें जनतेनें वापरावयाच्या पेट्रोल, साखर, चहा, कपडे इत्यादि जिनसांचें प्रमाण निश्चित करून टाकलें आहे. ह्या कारणानें जनतेच्या प्राप्तीपैकी बराच भाग खर्चला जाणें अशक्य होतें आणि त्याची बचत होते. त्याप्रमाणें अनेक जिनसांच्या किंमतीहि सरकारनें ठरवून दिल्या आहेत. ह्या कारणानें महागाई होण्याचा संभव रहात नाहीं, अत्यंत आवश्यक असेल तेवढाच खर्च जनतेनें करणें व बाकीची शिल्लक टाकणें हें युद्धपरिस्थितींत तिचें स्वदेशाभिमानाचें कर्तव्य ठरतें आणि तें अत्यंत महत्त्वाचें असें युद्ध-सहाय्य होतें. निरनिराळ्या जिनसांचा वापर व भांडवलाचा खाजगी उपयोग, प्रत्यक्ष युद्धास उपयोगी नाहीं असल्या मालाची आयात इत्यादींचें नियमन व नियंत्रण ब्रिटिश सरकार करीत आहे ह्याचा हेतु राष्ट्राचें वित्तसर्वस्व व शक्तिसर्वस्व युद्ध यशस्वी करण्यास एकवटावें हा आहे आणि तो सिद्धीस जाण्यास सरकार व जनता ह्यांचें पूर्ण सहकार्य होणें अगत्याचें असतें. निरनिराळ्या प्रकारांचा माल खरेदी करून तो उपयोगांत आणण्याचें पैसा हें साधन आहे. माल व चलन ह्या दोहोंच्याहि उपयोगाचें नियमन सरकारनें केलें म्हणजे महागाई होण्याचा संभव रहात नाहीं आणि लोकांच्या बचतीचा जरूर तो भाग त्यांस युद्धखर्चास कर व कर्ज ह्या दुहेरी स्वरूपांत उपलब्ध होतो,

### चालू वर्षाचें ब्रिटिश अंदाजपत्रक

आतांपर्यंत वर्णिलेल्या धोरणाचें प्रतिबिंब सर किंग्जले वुड ह्यांच्या चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत कसें दिसून येतें हें आतां पाहू या. ब्रिटिश सरकारचा चालू वर्षातील एकूण खर्च ४२० कोटि पौंड म्हणजे सुमारें सात हजार कोटि रुपये होईल असा अदमास त्यांनीं केला आहे. ह्या रकमेपैकी १७६ कोटि पौंड म्हणजे सुमारें २,३०० कोटि रुपये करांच्या उत्पन्नांतून येतील. उरलेली मोठी रकम इतर मार्गांनीं म्हणजे मुख्यतः कर्जाच्या स्वरूपांत उभारावी लागेल. येथें फडनवीसांस अवघड प्रश्न सोडवावयाचा आहे तो, ब्रिटिश सरकार प्रचंड रकमेचा युद्धखर्च करीत असतांना मोठमोठ्या रकमा जनतेच्या हातीं जाणार, त्यांचा विनियोग मालाच्या खाजगी खरेदीकडे झाल्यास बाजारभाव चढतील, ह्या प्रवृत्तीस आळा घालण्याबाबतचा आहे. ब्रिटिश जनतेच्या वार्षिक प्राप्तीचे अंदाज करण्यांत आले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं, त्या रकमेपैकी ४० टक्के प्राप्ती सरकारच्या तिजोरींत त्याच्या खर्चासाठी कर व कर्ज ह्यांच्या मार्गांनीं जाते. सरकारचा खर्च होतो, तेवढ्या मानानें लोकांच्या हातांत चलन म्हणजे पदार्थ विकत घेण्याची शक्ति व अधिकार हीं जातात. ही शक्ति अत्यावश्यक अशा खाजगी खर्चाच्या प्रमाणास मर्यादित करून बाकीची शिल्लक जनतेची बचत म्हणून रहावी ह्या हेतूनें उपाययोजना करण्याचें अवघड काम फडनवीसांवर येऊन पडलें असतांना त्यांनीं आपल्या तिजोरींत अधिक पैसा आकर्षण्यासाठी प्राप्तीवरील कराच्या दरांत वाढ केली आहे आणि त्याच्याहि पुढें जाऊन मध्यम स्थितींतल्या लोकांस प्राप्तीवरील कराचे बाबतींत असलेल्या सवलती तात्पुरत्या काढून घेतल्या आहेत. सवलती व माफ्या दूर झाल्यामुळें प्राप्तीवरील कराचा अधिक वसूल होईल तो तत्संबंधी लोकांच्या सेव्हिंग्ज खात्यांवर जमा करण्यांत यावयाचा असून युद्धसमाप्तीनंतर सोयीप्रमाणें ह्या बचतीच्या रकमा ज्यांच्या त्यांस परत देण्यांत येतील. लोकांच्या हातीं येणाऱ्या विशिष्ट मर्यादेपलीकडील आर्थिक शक्तीचा उपयोग मालाची खाजगी खरेदी होण्यांत केला जाऊन त्या योगानें बाजारभाव चढणें व चलनाचा समतोलपणा बिघडणें हे अनिष्ट परिणाम घडून येऊं नयेत हा वरील योजनेचा हेतु आहे हें लक्षांत घेणें आवश्यक आहे. फाजील चलन म्हणजे क्रयशक्ति व्यवहारांत खेळण्याचे दुष्परिणाम टाळण्याचा हा स्तुत्य व इष्ट असा प्रयत्न आहे; आणि तो अभिनंदनीय आहे ह्यांत शंका नाहीं. ह्या संबंधांतले ताळेबंदाचे तपशीलवार आकडे देण्याचें प्रयोजन नाहीं. राष्ट्रीय संपत्तीच्या व चलनाच्या योग्य विनियोगाची फडनविशी व्यवस्था चालू युद्धांत कोणती आहे ह्याचें रहस्य स्थूलमानानें स्पष्ट करणें हाच येथें मुख्य उद्देश आहे.

### हलक्या व्याजानें कर्ज-पुरवठा

चालू युद्धांत सर्व देशांमध्यें अगदी हलक्या व्याजाच्या दरानें राष्ट्रीय सरकारांस वाटेल तितका पैसा कर्जाऊ मिळत आहे ह्या वैशिष्ट्यासंबंधानें दोन शब्द आतां सांगावयाचे आहेत. सर्वच देशांत राष्ट्रीय सरकारांचीं अंदाजपत्रकें तुटीचीं आहेत आणि अल्प प्रमाणापलीकडे करांच्या साधनानें तूट भरून काढतां येणें शक्य होत नाहीं. तुटीपैकी पुष्कळशा भागाइतकें कर्ज काढावयाचें तर तें लांब मुदतीचें किंवा कायमचें काढण्यास सवड व सोय नाहीं. जरूर पडेल त्याप्रमाणें बँकांकडून व राष्ट्रीय तिजोरीचे रोखे देऊन अल्प मुदतीचीं कर्जें घेणें सरकारांस सोपें जात आहे. दुसऱ्या बाजूनें पहातां लोकांसहि आपली बचत लांब मुदतीच्या रोख्यांत अडकून ठेवणें इष्ट वाटत नाहीं. भावी परिस्थितीच्या अनिश्चितपणामुळें अल्प मुदतीच्या रोख्यांत पैसा घालून तो तरता ठेवण्याची लोकांची सहाजिक प्रवृत्ति आहे. देवघेवीच्या विविध व्यवहारांवर राष्ट्रीय सरकारांनीं नियंत्रणें घातल्या कारणानें जनतेस खर्च करण्यास फारसा वावच उरलेला नाहीं आणि तिच्यापाशी शिलका पडून रहात आहेत. ह्या रीतीनें कर्जाऊ देतां येण्याजोग्या पैशाचा पुरवठा विपुल आहे आणि म्हणूनच त्यास विशेष किंमत द्यावी लागत नाहीं. ह्याचाच अर्थ असा कीं हलक्या दरानें अल्प मुदतीचीं कर्जें सरकारास दिलीं जात आहेत ह्यांत कर्ज घेणारा व देणारा ह्या दोघांची सोय आहे. युद्धाच्या प्रारंभापूर्वी बँक ऑफ इंग्लंडचा व्याजाचा दर ४ टक्के होता, तो लवकरच ३ टक्क्यांवर खालीं आणला गेला आणि तो तसाच स्थिर राहिला आहे. ह्या तऱ्हेचे हलके व्याजाचे दर अमेरिका, जपान इत्यादि सर्व प्रमुख राष्ट्रांत रूढ झाल्यासारखे दिसत आहेत. युद्धखर्चास लागणारा पैसा पुरवण्याची ब्रिटिश सरकारची व्यवस्था कार्यक्षम व पायाशुद्ध असून तीमध्यें जनतेचा पूर्ण सहकार फडनविशीं खात्याशी होत आहे.

# स्फुट विचार

## हिंद-ब्रह्मदेश करार

हिंदुस्थानचें भांडवल आणि कामकरी ह्यांच्या सहायानें ब्रह्मदेशाचे उद्योगधंदे व व्यापार ह्यांची वाढ झालेली आहे. अनेक वर्षें ब्रह्मदेश हिंदुस्थानचा एक भाग होता आणि इतर प्रांतांप्रमाणें त्याच्याशीं दळणवळण निर्वेधपणानें चाललें होतें. रेलवेज, चलन व्यवस्था, कस्टम्स इत्यादि बाबतींत हिंदुस्थानचें सर्वसामान्य राष्ट्रीय धोरण ब्रह्मदेशांत अंमलांत होतें, परंतु अलीकडे हिंदुस्थानापासून तो देश अलग व स्वतंत्र झाल्यापासून हिंदी लोकांसंबंधानें ब्रह्मी लोकांच्या मनांत विलक्षण तेढ उत्पन्न झाली आहे. हिंदी व्यापारी, मजूर व धंदेवाले आपल्या संपत्तीच्या साधनांचा स्वार्थासाठीं दुरुपयोग करतात असें ब्रह्मी लोकांच्या मनानें घेतलें आणि कांहीं वर्षांमागें ही तेढ विकोपास गेली. ब्रह्मदेशांत स्थाइक झालेल्या हिंदी लोकांस पूर्ण संरक्षण देणें अगत्याचें होतें आणि त्याबरोबरच ब्रह्मदेशास आंत येणाऱ्या हिंदी मजुरांवर नियंत्रण घालण्याचा हक्क बजावूं देणें ओघानेंच प्राप्त झालें. उभय देशांच्या प्रतिनिधींमध्यें परस्परांचे संबंध निश्चित होण्याबाबत वाटाघाटी चालू होऊन अखेर करारांत त्यांचें पर्यवसान आतां झालें आहे. ब्रह्मदेशांत जाणाऱ्या मजुरांवर ह्या करारान्वयें, कडक निर्बंध घालण्यांत आले आहेत; आणि ते निमूटपणें मान्य करणें हिंदुस्थानास प्राप्त झालें आहे. 'जें दुसणें बरें करतां येत नाहीं, तें सोसणें भाग आहे' ह्या इंग्रजी म्हणीची येथें आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. सिलोन व हिंदुस्थान ह्यांचे दरम्यान अशाच प्रकारचा वांधा उत्पन्न झाला होता हें येथें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. ब्रह्मदेशानें घातलेले निर्बंध जाचक आहेत, ह्यांत संशय नाहीं, पण ते पत्करण्यावांचून हिंदुस्थानास गत्यंतर नाहीं, ह्याच भावनेनें हिंदुस्थान सरकारनें बिनसरकारी सल्लागारांच्या संमतीनें त्यांस मान्यता दिली आहे.

---

## हिंदी कारखान्यांत वाढतें युद्धसामुग्रीचें उत्पादन

ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड इत्यादि पूर्वेच्या बाजूच्या देशांचे प्रतिनिधी हिंदुस्थानांत एकत्र येऊन युद्धसामुग्रीच्या पुरवठ्याविषयींची योजना त्यांनीं निश्चित केली. त्यांची कार्यकारी समिति आहे, तिचें काम ह्या योजनेची अंमलबजावणी नीट चालली आहे किंवा नाहीं ह्यावर लक्ष ठेवण्याचें आहे. ह्या समितीवरील न्यूझीलंडचे प्रतिनिधी, मि. पिकॉट, ह्यांनीं हिंदुस्थानांत युद्धसामुग्रीचें उत्पादन करण्यांत गुंतलेल्या कारखान्यांची नुकतीच तपासणी केली आणि त्यासंबंधांत स्वतःचे विचार व्यक्त केले. हिंदुस्थानची सुप्त स्थितींतली उत्पादनशक्ती प्रचंड आहे आणि तिची हळुहळु पण स्पष्टपणानें प्रचीति येत आहे असें ते म्हणाले. कच्चा माल व कापड ह्यांचा पुरवठा हा देश मोठ्या प्रमाणांत आजवर करीत आला आहे, पण त्याची यांत्रिक शक्ती मर्यादित होती. तथापि, हिंदी लोकांच्या मार्गांतल्या औद्योगिक विस्ताराच्या बाबतींतल्या अडचणी दूर झाल्या आहेत आणि ते आतां स्थानिक लोखंडापासून तोफा, रणगाडे, दारूगोळा व इतर प्रकारांची लढाऊ सामुग्री तयार करीत आहेत ह्या विषयींची माहिती स्वतःच्या तपासणीच्या आधारानें मि. पिकॉट ह्यांनीं दिली आहे. त्यांनीं गेल्या नोव्हेंबरमध्यें कारखाने पाहिले होते, त्या मानानें अलीकडे त्यांत विलक्षण प्रगति झालेली आहे. लढाऊ सामानाच्या एका महत्त्वाच्या कारखान्यांत ह्या मुदतींत कामगारांची संख्या दोन हजारांची बारा हजार झाली आहे आणि अशाच तऱ्हेचा विस्तार देशभर दुसऱ्या अनेक कारखान्यांत झाला आहे असें त्यांनीं सांगितलें. युद्धसामुग्रीच्या उत्पादनाचे विषयीं हिंदी कारखान्यांत सर्वत्र उत्साहाचें व निश्चयाचें वातावरण असल्याचा आपला अनुभव त्यांनीं निवेदला.

---

## इंडोचायनांत जपान

पश्चिमेकडे चाललेल्या निकराच्या व वाढत्या युद्धाची संधि साधून आपल्या राजकीय वर्चस्वाचा विस्तार करावा असें जपानला आज बरेच दिवस वाटत होतें. जगाची नवीन आंतरराष्ट्रीय घडी बसवण्याच्या हिटलरच्या योजनेंत पूर्व एशियांतील कामगिरी आपणांकडे आली आहे असें जपानचें म्हणणें आहे. आपली सत्ता शक्य तेवढी वाढवण्याची महत्त्वाकांक्षा हिटलरनें धरली आहे; आतां ह्या संबंधांतल्या त्याच्या कारस्थानांत जपानी राष्ट्र सामील झालें आहे. चीनला चोंहोंकडून घेरण्याच्या कार्यक्रमास पोषक असा सत्तेचा विस्तार फ्रेंच इंडोचायना व थायलँड ह्यांच्या बाजूस करतां येणें शक्य आहे असें जपानी राज्यकर्त्यांनीं ठरवलें. ह्या अतिक्रमानें पॅसिफिक महासागरांत अमेरिकेस शह बसेल आणि इंग्लंडची लढाऊ शक्ति दुभंग होईल हा जपानचा तर्क आहे. ह्या कृत्याच्या योगानें हिटलरला सहाय दिल्याचें श्रेयहि आपणांस मिळेल असें त्यांस वाटत आहे. स्वतःच्या बचावाचे दृष्टीनें फ्रेंच इंडोचायनामधील महत्त्वाचीं बंदरें व विमानांचे अड्डे आपल्या ताब्यांत देणें अगत्याचें आहे ह्या सबबीवर व्हिशी येथील सरकारकडे त्यासंबंधांत जपाननें मागणी केली. व्हिशीचें मंत्रिमंडळ तर सर्वस्वी हिटलरच्या मुठींत आहे. जपान व हिटलर ह्यांचें संगनमत होऊन जपानची फ्रेंच इंडोचायनाच्या बाबतींतली मागणी मान्य करण्यांत यावी असें ठरून जपाननें आपली राजकीय महत्त्वाकांक्षा तृप्त करण्याच्या मार्गांत एक पाऊल पुढें टाकलें आहे. इंडोचायनांत ब्रिटिश सत्ता वाढणें आपल्या रास्त व न्याय्य आंतरराष्ट्रीय धोरणास विघातक आहे असा बहाणा करून जपानी सरकारनें प्रस्तुतचें तेथील कारस्थान रचलें आहे. युद्धाच्या ज्वाला पूर्व एशियांत पसराव्या अशी अमेरिकेची किंवा इंग्लंडची इच्छा अर्थातच नाहीं. तथापि, जपाननें पॅसिफिक महासागराच्या राजकारणांत आतां नवा डाव टाकला आहे, त्याकडे अमेरिकेस सर्वस्वीं दुर्लक्ष करतां येणार नाहीं. इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांस प्रस्तुत प्रकरणीं सावधगिरीचें व स्वसंरक्षणाचें धोरण अंगिकारावें लागणार आहे.

---

## अमेरिका व इंग्लंड ह्यांची जपानविरुद्ध प्रतिकार-योजना

फ्रेंच इंडोचायनांत व्हीशी सरकारच्या संमतीनें जपाननें आक्रमण आरंभतांच अमेरिकेनें व इंग्लंडनें प्रतिकाराचें शस्त्र उचललें आहे. जपानची अमेरिकेंतली मालमत्ता रोखून ठेवली जावी असा हुकूम प्रे. रूझवेल्ट ह्यांनीं सोडला आहे. त्याअन्वयें अमेरिकन बंदरांतील जपानी जहाजें थोपवून धरण्यांत यावयाचीं आहेत. चीनलाहि ही योजना लागू व्हावयाची असल्यानें त्या देशांतील जपानी मालमत्ताहि जागच्या जागीं गोठून जाईल. इंग्लंड व ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देशांत हेंच प्रतिकाराचें धोरण अमलांत आलें आहे. अमेरिकेंत अडकून पडणारा जपानी पैसा

१३ कोटि डॉलर्स असावा, असा अंदाज आहे. इंग्लंडनें जपानशीं केलेले व्यापारी करार आतां रद्द झाले असें समजावयाचें आहे. जपानी वृत्तपत्रें, अमेरिकेनें पॅसिफिक महासागरांतली शांतता बिघडवणें बरें नाहीं असें म्हणून त्या राष्ट्रास दम भरीत आहेत. अमेरिका व ब्रिटिश देश ह्यांचा जपानशीं होणारा व्यापार बंद पडला असतां जपानचें पुष्कळच नुकसान होणार आहे. आपलें अतिक्रमाचें कृत्य पचून जाईल आणि अमेरिका आपल्या-विरुद्ध शस्त्र उचलणार नाहीं ह्या कल्पनेनें जपाननें, फ्रेंच इंडो-चायनामधील आगळीक केली असावी. त्याचप्रमाणें, इंग्लंड व अमेरिका ह्या दोघांस मिळूनहि पश्चिमेकडे हीं राष्ट्रें युद्धांत गुंतलीं असतांना आपणांविरुद्ध विशेष कांहीं करतां येणार नाहीं अशीहि जपानची कल्पना असावी. कांहीं झालें तरी अमेरिका आतां स्वस्थ बसणार नाहीं आणि प्रसंग येईल त्याप्रमाणें जपानच्याविरुद्ध लढाऊ योजना अंमलांत आणल्यावांचून रहाणार नाहीं असें स्पष्ट दिसत आहे.

## बॉम्बे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा जून १९४१ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील "सहकारी मध्यवर्ती बँकांपुढील प्रश्न" ह्या लेखांत दि. ब. गांधी ह्यांनीं सेंट्रल बँका व सहकारी खात्याचें धोरण, त्यांचे-जवळील शिलकी पैशाची गुंतवणूक, इनकमटॅक्स व सुपरटॅक्स, सोसायट्यांस दीर्घ मुदतीचीं कर्जें, सरकारी ऑडिट फी, इत्यादि बाबींची चर्चा केली आहे, ती बोधप्रद आहे. "शेती पतपेढ्यांची देखरेख" ह्या विषयावरील श्री. पी. जी. केतकर ह्यांचा लेखहि बोधप्रद आहे. "मुंबई प्रांतांत हातमागांवर ब्लँकिटांचें उत्पादन" ह्या माहितीपूर्ण लेखाचा मथितार्थ आजच्या "अर्था"चे अंकांत देण्यांत आला आहे. श्री. गजेंद्रगडकर, वकील, ह्यांनीं लवादा-समोरील कामकाजास लिमिटेशन ॲक्ट लागू पडतो किंवा नाहीं, ह्या विषयावर लेख लिहिला आहे. पुस्तकपरीक्षण, संपादकीय स्फुटें, सहकाराची प्रगति, रजिस्ट्रारचीं सर्क्युलरें, इत्यादि उपयुक्त सदरें अंकांत नेहमींप्रमाणें आहेतच.

## आधुनिक व्यापार पद्धति

("Modern Business Methods." by J. C. Bahl and E. R. Dhongde.) किंमत ३ रु. ४ आ.

आधुनिक पद्धतीवर चालणारा व्यापार व उद्योगधंदे ह्यांची माहिती देऊन औद्योगिक व व्यापारी मंडळ्या ह्यांच्या व्यवहा-राशीं परिचय करून देणारें "व्यापारी उलाढाली" ह्या नांवाचें अर्थग्रन्थमालेंत पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे, त्याच धर्तीवरील हें इंग्रजी पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. व्यापारी परीक्षांस बसणाऱ्या विद्यार्थ्यांस तें उपयुक्त व्हावेंच, परंतु इतरांसहि त्याचा उपयोग व्हावा, अशी त्याची मांडणी करण्यांत आली आहे. व्यापार म्हणजे काय, व्यापारी संघटनाचे प्रकार, भागी-दारी, जॉइंट स्टॉक कंपन्या, त्यांची उभारणी, सभा, खासगी कंपन्या, व्यापारी संस्थेची कचेरी, त्यांतील व्यवहारांचें यंत्री-करण, बँकेचे व्यवहार, चेक्स, हुंड्या, प्रॉमिसरी नोटा, विक्रीचे करार, पैशाचे हिशेब, किरकोळीचा व्यापार, स्टोअर्स, सहकारी सोसायट्या, एजंट्स इत्यादींचे मार्फत अंतर्गत व्यापाराची व्यवस्था, बाजारपेठा, वहातुकीचीं साधनें, मालाची आयात व निर्गत, विमा व त्याचे प्रकार, पोस्ट व तार खातें, व्यापारी व्यवहारांतील कांहीं संज्ञा, इत्यादि विषयांवर प्रस्तुत पुस्तकांत पद्धतशीरपणें भरपूर माहिती देण्यांत आली आहे. पुस्तकाच्या विषयाच्या ह्या परिचयावरून त्यांतील विविधता दिसून येईल. पुस्तकाचे अखेर सूचि आहे, तिचेमुळें पुस्तकाची उपयुक्तता वाढली आहे. E. E., Ex. Div., P/A, x-d. अशा प्रकारच्या नेहमीं आढळणाऱ्या शब्दांचे खुलासेवार अर्थहि पुस्तकांत देण्यांत आले आहेत. व्यापारी घडामोडींशीं संबंध येणाऱ्या व त्यांत प्रवेश मिळवूं इच्छिणारास प्रस्तुत पुस्तक अत्यंत उपयुक्त वाटेल, ह्यांत संशय नाहीं. पृष्ठसंख्या २८३.

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया लि.

रिझर्व्ह बँकेला ३० जून, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी २ कोटि, ७९$\frac{1}{2}$ लक्ष रुपये नफा झाला. त्यांतून भागीदारांस ३$\frac{1}{2}$% दरानें डिव्हिडंड देण्याकडे १७$\frac{1}{2}$ लक्ष रुपयांचा विनियोग केला जाईल. म्हणजे, २ कोटि, ६१$\frac{1}{2}$ लक्ष रुपये हिंदुस्थान सरकारच्या वाट्यास येतील. ३१ डिसेंबर, १९३९ अखेरच्या बारमाहींत बँकेला फक्त २३ लक्ष रुपये नफा झाला होता व मध्यवर्ती सरकारच्या वाट्यास ५ लक्ष रुपये आले होते. युद्धपरिस्थितीमुळें बँकेचें काम वाढलें, त्याचा परिणाम वाढत्या नफ्यांत दिसून येतो. १ एप्रिल, १९३५ पासून ३० जून, १९४१ अखेरची बँकेची प्रगति खालील तक्ता दर्शवितो:—

(आकडे लक्ष रुपयांचे आहेत)

| | १-४-३५ ते ३१-१२-३५ | ३१-१२-३६ अखेर | ३१-१२-३७ अखेर | ३१-१२-३८ अखेर | ३१-१२-३९ अखेर | ३०-६-४० अखेर | ३०-६-४१ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्पन्नः— व्याज, डिस्कौंट एक्सचेंज कमिशन, इ. | १,२६ | १,५५ | १,२७ | १,३७ | १,२३ | ८४ | ३,८२ |
| खर्च | ७० | १,०२ | ९९ | ९९ | १,०० | ५५ | १,०३ |
| निवळ नफा | ५६ | ५३ | २८ | ३८ | २३ | २९ | २,७९ |
| डिव्हिडंडसाठी रकम | १३ | १८ | १८ | १८ | १८ | ९ | १९ |
| मध्यवर्ती सरकाराचा वाटा | ४३ | ३५ | १० | २० | ५ | २० | २,६१ |

बँकेच्या उत्पन्नाच्या मानानें खर्च वाढलेला नाहीं, हें वरील आंकड्यावरून दिसून येईल. ३०-६-४० अखेरचे आकडे सहा महि-न्यांच्या व्यवहाराचे व ३१-१२-३५ अखेरचे नऊ महिन्यांच्या व्यवहाराचे आहेत.

## हातमागावरील ब्लँकेटें

युद्धास प्रारंभ झाल्यानंतर सैनिकांस घोंगड्या (ब्लँकेटें) पुरविण्याचा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला. हिंदुस्थान सरकारनें युद्धविषयक मालाच्या पुरवठ्यासाठीं सप्लाय खातें निर्माण केलें व ह्या खात्यानें घोंगड्यांच्या उत्पादनास जोरानें चालना दिली. हिंदी फौजांसाठीं घोंगड्या हव्या होत्या, इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानाबाहेरील इतर सैनिकांसहि घोंगड्या पाहिजे होत्या व त्यांच्या पुरवठ्याचें काम हिंदुस्थान सरकारकडे आलें. गिरण्यांत एवढ्या प्रचंड मालाचें उत्पादन होण्याचें चिन्ह दिसेना, तेव्हां सरकारनें हातमागांवर घोंगड्या करवून घेण्याकडे लक्ष पुरविलें. ह्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां दिल्ली येथें प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या प्रतिनिधींची एक परिषद् फेब्रुवारी १९४० मध्यें भरविण्यांत आली, त्यावेळीं मि. डौ म्हणाले, "हिंदुस्थानास घोंगड्यांची ऑर्डर मिळाली आहे ती पुरी पाडणें हिंदुस्थानांतील गिरण्यांचे शक्तीबाहेर आहे. तेव्हां, हातमागांवर घोंगड्या करवून घेण्याचा सरकारनें विचार सुरू केला. हातमागावरील घोंगड्यांत एकसारखेपणा नसतो, तो आणणें इष्ट आहे. कारखान्यांतील उत्पादनाइतकें हातमागांवरील उत्पादन एकसारखें होणें शक्य नाहीं. त्याबाबत बरीच खटपट करतां येण्याजोगी आहे." घोंगड्यांचा आकार, वजन, हीं नंतर निश्चित करण्यांत आलीं. प्रांतांतील औद्योगिक खात्यांच्या प्रमुखांनीं घोंगड्यांच्या उत्पादनाचें काम चांगले कंत्राटदार, सहकारी सोसायट्या अगर स्वतःचें खातें ह्यांचेमार्फत करून घ्यावें असें ठरलें. दिल्ली येथील परिषदेमधील ठरलेल्या व्यवस्थेप्रमाणें मुंबई प्रांतांत कामास प्रारंभ झाला. हातमागावर काढलेल्या घोंगड्यांचे नमुने कानपूर येथील चीफ इन्स्पेक्टर ऑफ स्टोर्स अँड क्लोदिंग, ह्यांचेकडे धाडण्यांत आले; त्यांनीं हे नमुने मंजूर केले व सप्लाय खात्याकडे मुंबई प्रांतांत ऑर्डर देण्यासंबंधीं शिफारस केली. १९४० च्या सप्टेंबरांत सहा हजार घोंगड्यांची ऑर्डर मिळाली, ती अहमदनगर व हुबळी येथील दोन सहकारी संस्थांत वाटण्यांत आली. सूत काढण्याचें काम मुख्यतः स्त्रिया करतात. तज्ज्ञ स्त्री सहा तासांत दीड ते दोन पौंड सूत काढूं शकते. सूत एकसारखें व सारख्या पिळाचें काढण्याची त्यांस दक्षता बाळगावी लागते. घोंगड्या विणण्यापर्यंतच्या सर्व क्रिया पुऱ्या करून व घोंगड्या स्वच्छ करून त्या अहमदनगरला पाठविण्यांत येतात. तेथें त्या शिवणें, घुणें, इस्त्री करणें, तपासणें, पॅक करणें, इत्यादि कामें होतात. ज्या सहकारी संस्थांकडे हातमागावर घोंगड्या काढण्याचें काम दिलेलें आहे, त्यांस हिंदुस्थान सरकारकडून मदत मिळते. संस्थांचे सभासद स्वतः विणकरच आहेत व त्या मुंबई को. सोसायटीज ॲक्टाखालीं नोंदलेल्या आहेत. मुंबई प्रांतिक सहकारी बँक व कर्नाटक सेंट्रल को. बँक, धारवाड, ह्या दोन बँका ह्या संस्थांना भांडवल पुरवितात. प्रथम नगर जिल्ह्यामध्यें तीन केंद्रांत उत्पादन कार्य सुरू केलें व नंतर केंद्रें वाढविण्यांत आलीं. सध्या खालील ठिकाणीं उत्पादन चालू आहे:—

(१) अहमदनगर जिल्हाः—

| तालुका | गांव |
|---|---|
| राहुरी | सोनगांव, धानोरे, हनतगांव, राहुरी, केनदळ, खांबें |
| संगमनेर | पिंपरी, साकुर |
| कर्जत | मिरजगांव, येशवाडी |
| जामखेड (महाल) | ब्रम्हगांव |
| नगर | सारोळें, भिंगार |

(२) पुणें जिल्हाः—

| | |
|---|---|
| इंदापूर | बोरी, घोरपडवाडी, इंदापूर, पळसदेव |
| भिमथडी | बारामती |

(३) सोलापूरः—

| | |
|---|---|
| करमाळे | चिखलठाण, केम, कोंढेज, टकळी |
| माळशिरस | नातेपुतें, फोंडशिरस |

(४) साताराः—

| | |
|---|---|
| माण (पेटा) | महिमानगड, म्हसवड, व रकुटे, दहिवडी |

(५) नाशिकः—

| | |
|---|---|
| सिन्नर | दुबेर, मानेगांव, सायखेडे, वावी, सोनगांव, पाठारें |
| निफाड | धरणगांव |

(६) विजापूरः—

| | |
|---|---|
| विजापूर | दरगा, इब्राहिमपूर |

(७) धारवाडः—

| | |
|---|---|
| राणेबेन्नुर | मेडलेरी |
| नवलगुंद | कोन्नूर |

घोंगड्यांस आणखी मागणी आल्यास इतर ठिकाणींहि केंद्रें उघडण्यांत येतील. प्रथम, विणकरांच्याकडून नमुन्याबरहुकूम काम करून घेणें फार अवघड गेलें. घोंगडी विणण्याबद्दलचे पैसे रोखीनें दिले जातात, ही गोष्ट त्यांस फार सोईची वाटते. कांबळी करून तीं खपविण्यासाठीं साप्ताहिक बाजाराची वाट बघण्याचें अगर उधारीनें देण्याचें विणकरांस आतां कारण उरलेलें नाहीं. घोंगड्या करण्याचें किफायतशीर काम विणकरांस आतां मिळालें आहे, त्यामुळें त्यांची परिस्थिति सुधारत आहे.

## मराठा चेंबरमधील अल्पोपाहार समारंभ

### श्री. चुनिलाल बी. मेहता ह्यांचें भाषण

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या कार्यकारी मंडळानें फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष, श्री. चुनिलाल बी. मेहता ह्यांचे सन्मानार्थ ता. २६ जुलै रोजीं सें. को बँकेंचे दिवाणखान्यांत एक अल्पोपाहाराचा समारंभ घडवून आणला.त्यावेळीं चेंबरचे सभासद व निमंत्रित मंडळी मिळून सुमारें पाऊणशे लोक हजर होते. चेंबरचे अध्यक्ष, श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी ह्यांनीं अल्पोपाहार झाल्यावर श्री. मेहता ह्यांची समयोचित ओळख करून दिल्यानंतर, श्री. मेहता ह्यांचें भाषण झालें. चेंबरनें चालविलेल्या कार्याबद्दल त्यांनीं आनंद प्रदर्शित केला व कांहीं उपयुक्त सूचनाहि केल्या. "बँकिंगच्या धंद्यांतील हिंदुस्थानाच्या मागसलेपणाचें दिग्दर्शन करून त्यांत वाढ होण्यास अद्याप पुष्कळ वाव आहे, असें त्यांनीं सांगितलें. सध्याचें करांचें ओझें उद्योगधंद्यांस असह्य आहे; युद्धोत्तर मंदीस तोंड देण्यास त्यामुळें सवड उरणार नाहीं; सध्याची परिस्थिति नव्या उपक्रमांस अनुकूल आहे; हिंदुस्थान सरकारचें जकातविषयक धोरण हिंदी उद्योगधंद्यांस पोषक होणें आवश्यक आहे; देशाच्या प्रत्येक विभागांत कांहीं विशिष्ट उद्योगधंद्यास अनुकूल परिस्थिति असते, ह्या दृष्टीनें महाराष्ट्राची पहाणी करून नवीन उद्योगधंदे काढल्यास महाराष्ट्र इतर प्रांतांच्या बरोबरीनें येऊं शकेल" असें ते म्हणाले. आपण स्वतः व्यक्तिशः व फेडरेशनतर्फे त्यांनीं मराठा चेंबरला उपयुक्त सल्ला देण्याचें आश्वासन दिलें. चेंबरचे एक चिटणीस श्री. आ. रा. भट ह्यांनीं पाहुण्यांचे आभार मानले.

# हिंदुस्थानांतील बँकांसंबंधीं ताजे आकडे

## रिझर्व्ह बँक—चलन खातें

( कोटि रुपये )

| | २७–६–१९४१ | २८–३–१९४१ | २८–६–१९४० | १–९–१९३९ |
|---|---|---|---|---|
| **देणीं** | | | | |
| बँकिंग खात्यांतील नोटा ... ... ... | १४·१७ | ११·५९ | ९·०२ | ३५·०४ |
| खेळत्या नोटा ... ... ... | | | | |
| ( अ ) हिंदुस्थानांत ... ... ... | २५८·८० | २४०·५५ | २३४·२९ | १७२·३७ |
| ( ब ) ब्रह्मदेशांत् ... ... ... | १८·१३ | १७·११ | १२·६५ | ९·७७ |
| एकूण नोटा ... ... ... | २९१·१० | २६९·२५ | २५५·९६ | २१७·१८ |
| **मालमत्ता व येणीं** | | | | |
| ( अ ) सोनें व सोन्याचीं नाणीं ... ... | ४४·४१ | ४४·४१ | ४४·४१ | ४४·४१ |
| ब्रिटिश रोखे ... ... ... | ११८·८० | १०२·२४ | १२९·५० | ५९·५० |
| ( ब ) रुपये ... ... ... | ३६·५७ | ३४·७१ | ३३·४५ | ७५·८७ |
| हिंदुस्थान सरकारचे रोखे ... ... ... | ९१·३२ | ८७·८८ | ४८·६० | ३७·३९ |
| हुंड्या ... ... ... | | | | |
| एकूण देण्यांशीं ‘ अ ’चें प्रमाण ... ... | ५६·०७ % | ५४·४७ % | ६७·९५ % | ४७·८५ % |

## रिझर्व्ह बँक—बँकिंग खातें

( कोटि रुपये )

| | २७–६–१९४१ | २८–३–१९४१ | २८–६–१९४० | १–९–१९३९ |
|---|---|---|---|---|
| **देणीं** | | | | |
| ठेवी:— | | | | |
| ( अ ) हिंदुस्थान सरकार ... ... | ५·२७ | ५·०९ | ६·७२ | ८·९६ |
| ( ब ) ब्रह्मदेश सरकार ... ... ... | २·३४ | ४·८८ | १·४८ | १·९२ |
| ( क ) इतर सरकारीं खातीं ... ... | ४·६९ | १२·४४ | ४·०४ | ४·०२ |
| ( ड ) बँका ... ... ... | ३०·३५ | ३५·४९ | २०·८८ | २६·९१ |
| **येणीं** | | | | |
| रोख | १४·३० | ११·७१ | ९·१४ | ३५·१५ |
| डिस्कौंट केलेलीं बिलें | | | | |
| ( अ ) अंतर्गत ... ... ... | ... | ... | ... | ... |
| ( ब ) बाहेरचीं .... ... ... | ... | ... | ... | ... |
| ( क ) ट्रेझरी बिलें ... ... ... | ... | ०·०३ | ४·०९ | १·१६ |
| परदेशांतील रकमा ... ... ... | ३७·०६ | ४२·२५ | २२·१६ | १०·०८ |
| सरकारांस कर्जें ... ... ... | ०·१५ | १६·०० | ०·१० | ०·३१ |
| इतर कर्जें ... ... ... | ... | ०·०६ | ०·१५ | ... |
| गुंतविलेल्या रकमा ... ... ... | ८·४४ | ७·१७ | ८·४४ | ६·८१ |

## मुंबईमधील व्याजाचे दर

| | ३०–६–१९४१ | ३१–३–१९४१ | २९–६–१९४० |
|---|---|---|---|
| बँकांचा एकमेकांसाठी व्याजाचा दर ( काल मनी ) ... ... | १/४ % | १/४ % | १/४ % |
| मुदतीच्या ठेवीवरील व्याज ... ... ... | ३/४ % | ३/४ % | १ ३/४ % |
| ३ महिने ... ... ... ... ... ... | १ १/४ % | १ १/४ % | १ ३/४ % |
| ६ महिने ... ... ... ... ... ... | १ ३/४ % | १ ३/४ % | १ ३/४ % |
| १२ महिने ... ... ... ... ... ... | ३ % | ३ % | ३ % |
| बँक रेट ... ... ... ... ... ... | | | |

### शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति
( कोटि रुपये )

| | २७–६–१९४१ | २८–३–१९४१ | २८–६–१९४० | १–९–१९३९ |
|---|---|---|---|---|
| शेड्यूल्ड बँकांची संख्या … … … | ६४ | ६३ | ५९ | ५९ |
| एकूण ठेवी … … … … | ३०२·३१ | २८५·६३ | २५१·७० | २४७·८६ |
| चालू खात्यावरील ठेवी … … … | १९४·९० | १८०·९९ | १४३·९४ | १४१·४० |
| एकूण ठेवींशीं प्रमाण … … … | ६४·४७% | ६३·३७% | ५७·१९% | ५७·०५% |
| मुदतीच्या ठेवी … … … … | १०७·४१ | १०४·६४ | १०७·७५ | १०६·४६ |
| एकूण ठेवींशीं प्रमाण … … … | ३५·५३% | ३६·६३% | ४२·८१% | ४२·९५% |
| रिझर्व्ह बँकेकडे ठेवी … … … | ४१·६९ | ४४·१० | ३१·३२ | ३२·५८ |
| एकूण ठेवींशीं प्रमाण … … … | १३·७९ | १५·४४% | १२·४४% | १३·१४% |
| ॲडव्हान्सेस व डिस्कौंट केलेल्या हुंड्या … | १३३·२२ | १३०·८० | १४५·२५ | १०९·५२ |
| एकूण ठेवींशीं प्रमाण … … … | ४४·०७% | ४५·७९% | ५७·७१% | ४४·११% |
| कायद्यानें आवश्यक असलेल्यापेक्षां जास्त ठेवलेल्या रिझर्व्ह बँकेकडील ठेवी … … | ११·८९ | २२·३६ | १०·९५ | १६·०८ |

### क्लिअरिंग हाउसचे आकडे
( लक्ष रुपये )

| | मे १९४० | | मे १९४१ | |
|---|---|---|---|---|
| | चेक्सची संख्या | रकम | चेक्सची संख्या | रकम |
| मुंबई … … … … | ४,७१,१३० | ९१,३१ | ५,०५,५९२ | ७८,७५ |
| कलकत्ता … … … … | ५,५१,६०५ | ९७,५८ | ५,४२,९६६ | ९०,९२ |
| कानपूर … … … … | १७,४८६ | १,१७ | १७,२६८ | २,०९ |
| दिल्ली … … … … | ४७,८२३ | २,०६ | ५३,६९९ | २,७५ |
| कराची … … … … | ४१,२२६ | ३,६८ | ५०,५७५ | ४,१५ |
| लाहोर … … … … | ३२,०९६ | ९९ | ३५,६१७ | १,८५ |
| मद्रास … … … … | १,१४,८५० | १०,१४ | १,२३,४०३ | १०,६८ |
| रंगून … … … … | ७८,६९१ | ९,९८ | ८३,६७७ | १४,१६ |
| एकुण … | १३,५५,३७० | २१७,४५ | १४,१२,७९७ | २०५,३५ |

## कामगारास नुकसानभरपाई

### मालकास नोटीस केव्हां दिली पाहिजे ?

लोखंडाच्या कारखान्यांत काम करणाऱ्या मगनलाल केशवलाल पांचाळ ह्या कामगाराच्या डोळ्यांत ता. ५ जुलै १९३९ रोजीं एक कण गेला. या अपघाताची त्यानें मालकास म्हणजे दि अहमदाबाद आयर्न वर्क्स लि. ला नोटीस दिली नाहीं. मात्र दुसरे दिवशीं तो कामावर गेला नाहीं, परंतु आपल्या बरोबरीचा कामगार अंबालाल याला न येण्याचें कारण सांगून तें मिस्त्रीला सांगण्यास सांगितलें. नंतर डॉक्टरकडे जाऊन डोळ्यास औषध घेतलें; नंतर डोळा फार दुखूं लागला व त्यास दिसेनासें झालें. नंतर त्या कामगाराचें म्हणणें असें कीं, आपण कारखान्यांत गेलों व मिस्त्रीला डोळ्याला दुखापत झाल्याचें कळविलें; परंतु ती गोष्ट मिस्त्रीनें मालकाला कळविली नाहीं. नंतर ता. १८ जुलै १९३९ रोजीं म्हणजे अपघात झाल्यावर तेरा दिवसांनीं त्या कामगारानें फॅक्टरी इन्स्पेक्टरला नोटीस दिली आणि नंतर फॅक्टरी इन्स्पेक्टरनें मालकाला कळविलें. कमिशनरपुढें काम चालून कमिशनर यांनीं कामगारास ४४८ रुपये अपघाताची नुकसान-भरपाई देवविली. या कमिशनरच्या निकालाविरुद्ध अपील करण्यांत आलें होतें.

### हायकोर्टाचा निर्णय

"कामगार-नुकसानभरपाई कायद्याप्रमाणें अपघात झाल्याबरोबर शक्यतों लवकर अपघाताची खबर कामगारानें मालकास दिली पाहिजे व जर खबर देण्यास उशीर झाला तर तो उशीर योग्य कारणानें झालेला असल्यास मगच भरपाई मिळूं शकते. नोटीस आवश्यक करण्याचा हेतु असा कीं, मालकाला, अपघात झाला असें समजल्यावर डॉक्टरला आणून अपघातामुळें जास्त नुकसान होऊं देऊं नये अशी तजवीज मालकाला करतां येईल. कोणत्याहि क्षुल्लक किरकोळ अपघाताची खबर मालकाला द्यावयास पाहिजेच असें नाहीं असें ३५ मुंबई लॉ रि. २९३ मध्यें मानलेलें आहे. परंतु तो क्षुल्लक अपघात गंभीर स्वरूप धारण करूं लागल्यास मात्र कामगारानें मालकास शक्यतों लवकर त्या गोष्टीची खबर द्यावयास हवी. डोळ्यांत कण गेल्यावर तीन दिवसांच्या आंत तें दुखणें विकोपास गेलें असें त्या कामगाराच्या व त्याच्या डॉक्टर-च्या पुराव्यावरून दिसतें. परंतु त्या गोष्टीची कायद्याप्रमाणें नोटीस कामगारानें योग्य वेळीं दिली नाहीं व न देण्यासहि योग्य कारण दाखविण्यांत आलेलें नाहीं तेव्हां कमिशनरनें केलेला निकाल चुकीचा आहे.

" कामगाराला क्षुल्लक दुखापत झाल्यास त्यानें ती मालकास कळविली पाहिजे असें नाहीं; तरी पण ती गंभीर स्वरूप धारण करूं लागल्यास मात्र शक्य त्या तातडीनें मालकास लेखी नोटिशीनें कळविलें पाहिजे. नाहींतर त्या नुकसानीबद्दल त्यास भरपाई मिळूं शकणार नाहीं."

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १११—६ |
| ४% १९४३ | १०४—० |
| ३½% बिनमुदत | ९६—१ |
| ३½% १९४७–५० | १०३—० |
| ३% ( १९६३–६५ ) | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ | ९७–१० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) | ११५—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२७—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४२—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% | ११२—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% | ४५—४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५५७—८ |
| बॉबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०३—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% | १३५—० |
| कराची ( १०० ) ९% | २१५–१० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १६३२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १६७५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% | ६६—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८९०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६५२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २२२—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४७—८ |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. | २१–१० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ४५—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४२००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २२१—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १५५–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३८६—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १४३ रु. १४ आ. ७ पै. | २०५७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १४८–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४१–१५–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६३—१–६ |


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| आधिकृत भांडवल | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), वांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; मि. आर. एल. फेराई.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही असेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**हेड ऑफिस : पुणें शहर.**

**स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.**

**मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,८८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,९४,०३५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० असेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टके करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
संग्रह करा
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
—: रक्तवर्धक :—
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा
मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें
आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
'पायोनियर डाइंग हाऊस'
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.



मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स
वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी
Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान
एम्ब्रॉयडरी मार्ट
६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
व्हॅक्टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ६ ऑगस्ट, १९४१ अंक ३२

## प्रगतीचीं प्रतीकें ( १९४० )

दि ट्रस्ट ऑफ इंडियाची प्रगति स्थैर्याकडे लक्ष पुरवूनच होत आहे.

| सन | आलेलें काम | पूर्ण झालेलें काम |
|---|---|---|
| १९३८ | ४,६८,७७५ | ३,७४,९३८ |
| १९३९ | ५,८५,५५२ | ४,०७,५२० |
| १९४० | ७,३६,०२२ | ५,८३,१७२ |

हप्त्याचें उत्पन्न, खर्च व कार्याचा विस्तार यांचा योग्य मेळ बसाविल्यामुळें पहिल्याच मूल्यमापनांत कंपनी फायदा दाखवूं शकली.

| सन | हप्त्याचें उत्पन्न | लाइफ फंड |
|---|---|---|
| १९३८ | ४५,००४-७-० | ३७,८०१-१४-१ |
| १९३९ | ७०,६५६-७-० | ४८,७०६-५-५ |
| १९४० | ७३,७९४-१-१ | ६१,४५५-१-११ |

नामवंत कंपन्यांच्या उत्पन्नाशीं पडणाऱ्या खर्चाच्या प्रमाणांतच कार्याचा विस्तार होत असल्यानें लाईफ फंडांत व्यवस्थित वाढच होत आली आहे.

- त्रैवार्षिक बोनस हजारीं ३० व ३६ रु.
- सरकारी रोखे १ लाख ४० हजारांपेक्षां जास्त ( २० जून १९४१ पर्यंत ).
- चालू वर्षी स्वतःच्या इमारतीची योजना.

### दि ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशुअरन्स
### कंपनी, लिमिटेड, पुणें.

उपशाखा व प्रचार-केंद्रें

मुंबई : नगर, सोलापूर, सातारा. कोल्हापूर, बेळगांव, मध्यप्रांत-वऱ्हाड : नागपूर, अकोला, सांवनी, खांडवा, मध्य-हिंदुस्थान : ग्वाल्हेर, इंदूर, मद्रास, नेलोर, बेझवाडा, बंगाल : मेहेरपूर, पुरुलिया, इत्यादि.

दि ट्रस्ट ऑफ इंडियाची एजन्सी घेऊन आपली प्राप्ति व प्रतिष्ठा वाढवा.

# विविध माहिती

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

सेंट्रल बँकेचे चेअरमन, सर होमी मोदी, ह्यांचे जागीं श्री. हरिदास माधवदास ह्यांची निवडणूक झाली आहे. मि. कॅप्टन हे जनरल मॅनेजर होते, त्यांस मॅनेजिंग डायरेक्टर करण्यांत आलें आहे.

### रशिया व पोलंड ह्यांचेमधील करार

रशिया व पोलंड ह्यांचेमधील करारावर लंडन येथें मि. चार्चिल ह्यांचे अध्यक्षतेखाली दोन्ही राष्ट्रांतर्फे सह्या झाल्या. १९३९ च्या जर्मनी व रशिया ह्यांचेमधील करारानें पोलंडची केलेली फाळणी वरील करारानें रद्द केली आहे.

### हिंदी जखमी सैनिक

डिसेंबर १९४० ते ८ जुलै १९४१ ह्या मुदतींत आफ्रिकेंतील लढायांत एकूण ६,४२७ हिंदी सैनिक जखमी झाले व त्यांतील अतिशय थोडे मृत्यू पावले. ह्याच मुदतींत दोन लाखांपेक्षा अधिक इटालिअन सैनिक जखमी झाले.

### इराणची बाजारपेठ

इराणमध्यें हिंदी मालास कितपत वाव आहे ह्याची पहाणी करण्याकरितां मोंबासा येथील माजी हिंदी ट्रेड कमिशनर, मि. इस्माइल, ह्यांस तिकडे पाठविण्यांत येणार आहे.

### "लष्करी विषय वर्ज करा"

"कृपाकरून येथें लष्करी विषयावर बोलूं नका" अशा पाट्या सिमला येथील सर्व हॉटेलांत, क्लबांत व खाणावळींत लावण्यांत आल्या आहेत. अशीं बोलणीं बंद न झाल्यास, लष्करांतील सैनिकांच्या व अधिकाऱ्यांच्या गिऱ्हाइकीस त्यांस मुकावें लागेल.

### रेडिओसाहित्यावरील जकात

ब्रिटिश हिंदुस्थानांत जून, १९४१ मध्यें आयात झालेल्या रेडिओ साहित्यावरील जकात २ लक्ष, १० हजार रुपये भरली.

### जपानवरील आर्थिक बहिष्कार

जपानवरील आर्थिक बहिष्काराचे आर्थिक परिणाम बरेच दूरगामी होतील. जपानमधील ३०० हिंदी रहिवाशांची ८० लक्ष रुपयांची मालमत्ता जपानमध्यें अडकून पडली आहे. जपानी मालाची मुंबई बाजारांतील किंमत भडकली आहे. हिंदुस्थानांतील जपानी मालमत्तेची किंमत सुमारें ३ कोटि रुपये असून त्यापैकी २ कोटि रुपयांची मालमत्ता एकट्या मुंबई शहरांत आहे. मुंबईमध्यें ३० जपानी पेढ्या व ३ जपानी बँका आहेत.

### सिमेंटचा नवीन कारखाना

त्रावणकोर संस्थानांत सिमेंटचा एक नवीन कारखाना स्थापन होणार आहे.

### हिंदी साखरेची निर्गत

३१ डिसेंबर, १९४१ अखेरपर्यंत २ लक्ष टन साखर ग्रेट ब्रिटनकडे निर्गत करण्याची परवानगी हिंदुस्थान सरकारनें इंटरनॅशनल शुगर कौन्सिलकडे मागितली आहे. गेल्या वर्षी अशी परवानगी मिळाली होती, परंतु किंमतीसंबंधीं वांधा आल्यामुळें साखरेची निर्गत होऊं शकली नाहीं. हिंदी साखरेची अफगाणिस्तानाकडे निर्गत चालू आहे, परंतु कांहीं साखर कनिष्ठ दर्जाची आहे, अशा मुद्यावर ती उतरवून घेण्याचें अफगाण शुगर कंपनीनें नाकारलें आहे.

### बँकांस सुट्टी

बुधवार, ता. ६ ऑगस्ट रोजीं नारळी पौर्णिमेनिमित्त बँका बंद रहातील.

### ट्रेझरी बिलांवर ११ आ. ९ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत एक कोटि रुपयांचीं हिंदुस्थान सरकारचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर ११ आ. ९ पै इतका पडला.

### हिंदुस्थान-जपान व्यापार

३१ मार्च, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी हिंदुस्थानानें जपानकडे ९ कोटि रुपये किंमतीचा माल निर्गत केला व जपानकडून २१३/४ कोटि रुपयांचा माल घेतला.

### पेट्रोलची काटकसर

पेट्रोलच्या वापरावरील नियंत्रणामुळें हिंदुस्थानांत खपणाऱ्या पेट्रोलमध्यें २०% बचत होईल, अशी अपेक्षा आहे.

### पेट्रोलवरील जकात व इक्साइज

१९४०-४१ मध्यें हिंदुस्थान सरकारास पेट्रोलच्या जकातीचे ६ कोटि रुपये व इक्साइजचे १३/४ कोटि रुपये मिळाले. १९४१-४२ च्या बजेटांतील अंदाज अनुक्रमें ५ कोटि, ४० लक्ष व १ कोटि, ९० लक्ष रुपयांचा आहे.

### विश्रांति

अमेरिकेचे अध्यक्ष, मि. रूझवेल्ट, हे एक आठवडाभर विश्रांति घेणार आहेत.

### निजाम सरकारची युद्धकर्जांतील रक्कम

निजाम सरकारनें युद्धकर्जांत आणखी ७५ लक्ष रुपये गुंतविण्याचें ठरविलें आहे. म्हणजे, निजाम सरकारनें युद्धकर्जांत गुंतविलेली एकूण रक्कम आतां १३/४ कोटि रुपये झाली आहे.

### मुंबईचें टपाल

मुंबईहून समुद्रमार्गानें १५ मे रोजीं निघालेलें टपाल १ ऑगस्ट रोजीं लंडन येथें वाटण्यांत आलें. २९ व ३१ मेचें टपाल २ ऑगस्ट रोजीं लंडनला पोचलें.

### सैनिक पेन्शनर

१९१४-१८ च्या महायुद्धांत काम केलेले असे ८ लक्ष, १८ हजार ब्रिटिश लोक अजून जिवंत असून त्यांस ब्रिटिश सरकार पेन्शन देत आहे. त्यांस आतांपर्यंत सुमारें २१ अब्ज रुपये पेन्शन मिळालें आहे. ४४६ पेन्शनरांनीं सुमारें २३/४ लक्ष रुपयांचें पेन्शन चालू युद्धास मदत म्हणून सोडून दिलें आहे. गेल्या महायुद्धांत गुंतलेल्या कोणत्याहि राष्ट्रांतील सैनिक पेन्शनरांस ब्रिटिश पेन्शनरांइतकें सढळ हातानें पेन्शन मिळत नाहीं.

### असेंब्लीचें अधिवेशन

मध्यवर्ती असेंब्लीच्या अधिवेशनास ता. २७ ऑक्टोबर रोजीं प्रारंभ होईल. १० दिवस सरकारी कामासाठी व ४ दिवस बिनसरकारी कामासाठी राखून ठेवण्यांत आले आहेत.

### निवडणुकी पुढें ढकलल्या

हिंदी प्रांतिक असेंब्लीची आयुर्मर्यादा पांच वर्षांची आहे. ही मर्यादा युद्धसमाप्तीनंतर बारा महिन्यांपर्यंत वाढविण्याचा अधिकार देणारें एक बिल लॉर्डांच्या सभेंत मांडण्यांत आलें आहे. विधिमंडळ फुटेल तेव्हां बरखास्त करण्याचा गव्हर्नरांचा अधिकार हा मात्र कायम रहाणार आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३७४ |
| २ लहान बँकांच्या अडचणी | ३७५ |
| ३ पेट्रोलच्या वापरावर नियंत्रण ... ... | ३७६ |
| ४ युद्धाची आजची परिस्थिति ... ... | ३७६ |
| ५ स्फुट विचार ... अमेरिकेंत बाजारभावाचें नियंत्रण–रशियांत जर्मनीची कुंठित गति–संधिसाधू जपान–बँकासंबंधीं तपशिलवार माहिती–रिझर्व्ह बँकेचा कारभार व कार्यपद्धति. | ३७७ |
| ६ तगाई कर्जाची वसुली | ३७९ |
| ७ रिझर्व्ह बँकेचे भाग व भागीदार ... ... | ३७९ |
| ८ गव्हाची लागवड ... | ३८० |
| ९ मुंबई प्रांतांतील हातमाग | ३८० |
| १० बार्शी सें. को. बँक लि. | ३८० |
| ११ बँक ऑफ सिटिझन्स लि. | ३८० |
| १२ सांगली संस्थानांतील सहकारी चळवळ ... | ३८१ |
| १३ फिल्मी टपाल ... | ३८१ |
| १४ निवडक बाजारभाव ... | ३८२ |



# अर्थ

बुधवार, ता. ६ ऑगस्ट, १९४१


## लहान बँकांच्या अडचणी

### बंगालमधील अनुभव

हिंदुस्थानांत, मोठमोठीं शहरें वगळल्यास, सामान्यतः व्याजाचे दर उंचीचे असतात, अशी तक्रार आहे. बडे कारखानदार व व्यापारी ह्यांची बाजारांत पत चांगली असल्यानें त्यांस हलक्या दरानें पैसा मिळूं शकतो, पण सामान्य स्थितींतले लोक व विशेषतः शेतकरी वर्ग ह्यांस जबर व्याज दिल्यावांचून कर्ज मिळत नाहीं. ही हिंदुस्थानांतली सर्वसाधारण परिस्थिति झाली; पण कोहीं प्रांतांत इतर ठिकाणांपेक्षा व्याजाचे दर विलक्षण उंचीचे असतात असें दिसून येतें. सहकारी बँका व पतपेढ्या ह्यांमध्येंहि हें प्रांतिक वैशिष्ट्य आढळतें. उदाहरणार्थ, १५ टक्के व्याजाचा दर बंगालमध्यें मामुली समजला जातो, तोच ह्या प्रांतांत कडक मानण्यांत येतो. बंगालमध्यें सावकार नियंत्रणाचा कायदा चालू झाला आहे आणि त्यानें बँकांनींहि आपल्या कर्जावर आकारावयाच्या दरांस मर्यादा घातली आहे. ह्या निर्बंधाचा अनिष्ट परिणाम लहान आकाराच्या समाइक भांडवलाच्या व्यापारी बँकांस भोवत असल्याची तक्रार होत आहे, ह्यावरून आम्हीं त्या प्रांताचे संबंधांत वर केलेल्या विधानाचें रहस्य लक्षांत येईल. दहा टक्क्यांची कमाल मर्यादा घालून त्यावर व्याज सावकारांनीं व बँकांनीं घेऊं नये असें कायद्यानें ठरवलें असतां तें बँकांसहि जाचक वाटावें ह्यावरून त्या संस्थांची सांपत्तिक स्थिति व प्रांतिक पैशाच्या बाजाराची परिस्थिति ह्यांवर उद्बोधक प्रकाश पडतो. कलकत्त्यांत प्रसिद्ध होणाऱ्या " फिनॅन्शल टाइम्स " ह्या इंग्रजी मासिकाच्या जुलैच्या अंकांत ' सिटॅडल बँक लि. 'चे मॅनेजर, श्री. घोषदस्तिदार ह्यांनीं ' लहान बँका आणि पैशाची गुंतवण ' ह्या विषयावर लेख लिहिला आहे, त्यांतील मुद्दे विचार-प्रवर्तक असून ह्या प्रांतांतील बँकांस बोधप्रद वाटण्यासारखे आहेत.

श्री. घोषदस्तिदार ह्यांच्या लेखाचा मथितार्थ येणेंप्रमाणें आहे:– १९४० च्या सावकारी नियंत्रणाच्या कायद्यामुळें आपला पैसा फायदेशीर रीतीनें कसा गुंतवावा हा कठीण प्रश्न लहान आकाराच्या बँकांपुढें उभा राहिला आहे. मोठ्या आकाराच्या बँकांवर लोकांचा इतका पक्का विश्वास बसलेला आहे कीं त्यांस अल्प व्याजानें भरपूर पैसा मिळूं शकतो. जनतेचा ओढा ह्या प्रथितयश बँकांकडे इतका असतो कीं आपल्या पैशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें तो ठेवींच्या स्वरूपानें त्यांच्याकडे हलक्या व्याजाच्या दरानें लोक ठेवतात. ह्या पैशाचा कांहीं भाग स्वतःकडे आकर्षून घेण्यासाठी लहान बँकांस नाइलाजानें भारी व्याज ठेवींवर द्यावें लागतें. ह्या कारणानें स्वतःचा मामुली कारभाराचा खर्च भागवून त्यांस फायदेशीरपणानें पैसा गुंतवतां येत नाहीं. ४–५ टक्क्यांनीं पैसा घेऊन तो ८-१० टक्क्यांनीं त्यांनीं गुंतवला असतां ३ टक्यांचा फरक रहातो, तो खर्चास जेमतेम पुरणार. सध्याच्या स्पर्धेच्या काळांत बँका भडक जाहिराती दैनिकांत व नियतकालिकांत देतात आणि त्यांस धंदा वाढवण्यासाठी खास तरतूद करावी लागते. ह्या सर्व बाबींचा खर्च भागून नफ्याची कूस रहावी म्हणून बँकांस हलक्या दरानें ठेवी आकर्षल्या पाहिजेत. ह्या दर कांहीं झालें तरी ४ टक्क्यांचे वर जाऊं नये. पण कितीहि जाहिरात केली आणि धंदा वाढवण्यासाठी धडपड केली तरी ठेवीदार मोठ्या बँकांकडे जातातच आणि लहान बँकांस ठेवींचा किंवा भागांचा पैसा मिळत नाहीं. ह्या परिस्थितीवर उपाय काय ? वाटेल तें व्याज देऊन कर्जे घेणारे लोक मिळतात. पण ज्यास्त व्याज घेऊन पैसा लहान बँकांस देणारे ठेवीदार पुढे येत नाहींत. सावकारी नियंत्रणाचा कायदा ह्या फायदेशीर व्यवहाराच्या आड येतो, ही अडचण तर पुढे उभीच आहे.

श्री. घोषदस्तिदार ह्यांची वरील कठिण परिस्थितीवर तोड अशी आहे:—लहान बँकांनीं सोन्याचे दागिने, ' सोडकिंमत ' असलेलीं आयुर्विमा पत्रकें, चांगल्या व्यापारी हुंड्या ह्यांच्या तारणावर आपल्या गिऱ्हाइकांस कर्जे द्यावीं आणि हेंच तारण मोठाल्या बँकांस देऊन त्यांचेकडून ४ ते ५ टक्के व्याजाच्या दरानें पैसा घ्यावा. अशा प्रकारच्या व्यवहारांत लहान बँकांस हवा तो पैसा मिळून तो तरता राहील आणि घ्यावयाच्या व द्यावयाच्या व्याजांत ३ ते ४ टक्के फरक राहील. श्री. दस्तिदार ह्यांच्या मतानें मोठ्या बँकांस ह्या धंद्यांत गिऱ्हाइक मिळून शिवाय लहान बँकांस सहाय दिल्याचें श्रेयहि प्राप्त होईल. सोन्यासारख्या उत्कृष्ट तारणावर हलक्या व्याजानें मोठ्या बँकांकडून कर्ज मिळण्यासारखें असतां गिऱ्हाइकांनीं भारी व्याज भरून लहान बँकांकडून पैसा कां घ्यावा ? ह्या प्रश्नास त्यांचें असें उत्तर दिसतें कीं, मोठ्या बँकांनीं लहान-मोठ्या ठिकाणीं शाखा चालवण्याचे ऐवजी असले व्यवहार लहान बँकांवर सोपवावे आणि सहकार्यानें परस्परांचें हित साधावें हें योग्य आहे. दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीच्या तारणावर दिलेल्या कर्जावर व्याज चांगलें सुटतें, पण त्यांत पैसा अडकून पडतो आणि पैसा नेहमी तरता रहाणें ह्यांत बँकांच्या यशाचें रहस्य आहे. पैसा कर्जांत अडकून बसला कीं लहान बँकांवर आपत्ति येणार हें निश्चित असल्यानें त्यांनीं असल्या व्यवहारांपासून शक्य तितकें दूर राहिलें पाहिजे. सरकारी रोखे, विमापत्रकें, चांगल्या कंपन्यांचे भाग इत्यादि प्रकारच्या तारणांवर त्यांनीं कर्जे द्यावीं म्हणजे बँकांचा पैसा तरता राहील असें श्री. दस्तिदार म्हणतात, पण हें पहिल्या प्रतीचें तारण देणारीं कितीशीं गिऱ्हाइकें लहान बँकांकडे येतील ? ह्याचा खुलासा त्यांनीं केलेला नाहीं; पण प्रस्तुत बाबतींतली त्यांची सूचना सर्वांशीं ग्राह्य करण्यासारखी आहे असें म्हणतां येत नाहीं आणि अगतिकतेवर उपाय ह्या नात्यानेंच ती त्यांनीं केली असली पाहिजे.

त्यांची सूचना अशी आहे:–लहान आकाराच्या बँकांनीं रोखे, सोनें इत्यादि पहिल्या प्रतीच्या तारणावर मोठ्या बँकांइतकेंच "मार्जिन" ठेवून प्रथम कर्जें द्यावीं आणि पुढें हें मार्जिन कमी कमी करीत जाऊन त्यायोगानें हीं अपुऱ्या तारणाचीं कर्जें होतील म्हणून त्यांवर १० टक्के दरानें व्याज आकारावें. मोठ्या बँकांनींहि लहान बँकांवर विश्वसून त्यांचेकडून येणाऱ्या अपुऱ्या पतारणाचा स्वीकार करून त्यांस पुऱ्या रकमांचीं कर्जें अल्प व्याजानें द्यावीं. मर्यादेबाहेरील मार्जिनवर देण्यांत येणारीं कर्जें विशिष्ट प्रमाणांत अंगावरचीं कर्जें होणार हें उघड आहे आणि अंतिम सुरक्षितपणाच्या दृष्टीनें तीं कोणास व किती रकमेपर्यंत द्यावीं हें प्रत्येक बँकेस अत्यंत दक्षतेनें ठरवावें लागेल. अधिक व्याजाच्या आमिषामुळें दिलेलीं हीं कर्जें बँकांच्या आवाक्याबाहेर जाण्याची भीति आहे ती दृष्टी-आड करून भागणार नाहीं. तसेंच, मोठ्या बँकांस त्यांच्याविषयीं खात्री न वाटल्यामुळें त्या आपलें मार्जिन कमी करण्यास तयार होतील किंवा कसें हा प्रश्नच आहे. अपुरें तारण म्हणून लहान बँका विशिष्ट कर्जांवर अधिक व्याज आपल्या गिऱ्हाइकांकडून घेणार असल्यानें मोठ्या बँकांनींहि त्याच कारणासाठी अधिक व्याजाचा आग्रह धरल्यास तें चुकीचें आहे असें म्हणतां याव-याचें नाहीं. असें झालें म्हणजे लहान बँकांस नफ्याची कूस कशी रहाणार? वरील भूमिकेवर लहान आकाराच्या बँका व मोठ्या बँका ह्यांचेमध्यें सहकार्यानें व सहानुभूतीनें व्यवहार व्हावे असें दस्तिदार ह्यांचें म्हणणें आहे तें चोख व सरळ व्यवहार्यतेच्या कसोटीस किती उतरेल ह्याचा विचार त्यांनीं केला आहे असें दिसत नाहीं.

## पेट्रोलच्या वापरावर नियंत्रण

पेट्रोलचा पुरवठा मोजून देण्याची 'रेशनिंग' ची योजना हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्याकडे होती. ती नुकतीच व्यापारी खात्याकडे वर्ग करण्यांत आली आहे. हिंदुस्थानांत पेट्रोल-विक्रीवरील नियंत्रणास केव्हां व कसा आरंभ करावयाचा, ह्याचा विचार कित्येक महिने चालू होता. १५ ऑगस्टपासून ह्या नियंत्रणास प्रारंभ होईल असें आतां जाहीर झालें आहे. ब्रह्मदेश व इतर देश ह्यांतून आजपर्यंत पेट्रोल आणतां आलें व त्याचा भरपूर पुरवठा कायम ठेवतां आला, तरी ह्यापुढें ही परिस्थिति टिकेलच असें नाहीं. त्याचप्रमाणें लष्करी कामासाठी अधिक पेट्रोल लागण्याचा संभव आहे. ह्या दृष्टीनें पेट्रोलच्या वापरांत शक्य तेवढी बचत करणें दूरदृष्टीचें होणार आहे. ह्यासंबंधांत हिंदुस्थान सरकारनें आतां मोटर स्पिरिट रेशनिंग ऑर्डर काढली आहे. आवश्यक त्या वापरास पेट्रोलचा तुटवडा पडूं नये, परंतु एकंदरीनें पेट्रोल कमी वापरलें जावें, अशी योजना त्यांत करण्यांत आली आहे.

कांहीं लष्करी व बिनलष्करी खातीं ह्यांस विशिष्ट पावत्या, म्युनिसिपॅलिट्या व इतर स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांस विशिष्ट कूपन्स व सर्वसाधारण लोकांस साधीं कूपन्स देण्यांत येतील, तीं पेट्रोलच्या पंपवाल्यास देऊन त्यांनीं आपल्या मोटारींत पेट्रोल भरावयाचें आहे. शेतीसाठी अगर कारखानदारीसाठी ज्यांस पेट्रोल लागतें, अशांना खास परवाना मिळूं शकेल. कूपन्स व पावत्या हीं हिंदुस्थानांत कोठेंहि चालूं शकतील. ज्या संस्थानां-बरोबर सरकारनें परस्पर व्यवस्था केली असेल, अशा संस्थानांतहि तीं चालतील.

शहरांत चालणाऱ्या बसेसना आपल्या पेट्रोलच्या वापरांत फारशी काटकसर करावी लागणार नाहीं. खासगी मोटारींच्या चालीवर नियंत्रण आलें, म्हणजे बसेसमधून उलट अधिक लोक प्रवास करूं लागतील. इतर ठिकाणच्या बसेसना मात्र पेट्रोलवरील नियंत्रण चांगलेंच जाणवेल. कांहीं ठिकाणीं जरूरीपेक्षा अधिक बसेस आज विनाकारण फिरत आहेत व त्यांत घातुक स्पर्धा होत आहे, तिला प्रस्तुत नियंत्रणानें आळा बसेल. सर्वच रस्त्यांवरील बसेसच्या पेट्रोल-पुरवठ्यास कात्री लावली जाईल, परंतु कोकणासारख्या ठिकाणीं बसेसखेरीज जेथें दुसरीं वहातुकीचीं साधनेंच नाहींत, अशा ठिकाणीं पुरवठ्याचें नियंत्रण करतांना सढळपणा दाखविला जाईल. मालाच्या लॉऱ्यांस त्यांचे वजनाचे प्रमाणांत पेट्रोल दिलें जाईल व महत्त्वाच्या जिनसांची वहातुक करणाऱ्या लॉऱ्यांस प्राधान्य मिळेल. खासगी मोटारी दरमहा २०० मैल जाऊं शकतील, इतकें त्यांस पेट्रोल मिळेल. राष्ट्रीय महत्त्वाच्या कार्यासाठी, (उ: सरकारी नोकरांचें सरकारी काम, रोग्यांकडे जाणारे डॉक्टर, कचेरीला जाणारे धंदेवाले, इत्यादींस) अर्थातच अधिक पेट्रोल मिळेल, परंतु त्यासाठी अर्ज केला पाहिजे. रेशनिंगच्या कूपन्स-साठी मोटार मालकांनीं अर्ज कोठें व केव्हां करावयाचे, इत्यादी-संबंधीं तपशीलवार माहिती प्रसिद्ध झाली आहे.

## युद्धाची आजची परिस्थिति

युद्धाच्या हालचालींबावत सध्या तीन मुख्य दिशांकडे लक्ष पुरवणें आवश्यक आहे. ह्यांपैकी सर्वांत महत्त्वाचें युद्धक्षेत्र अर्थातच रशियामधलें आहे. येथें युक्राइनमध्यें विशेष जोर करून कीएव्ह हें तेथील मुख्य ठिकाण घेण्याची जर्मन फौजांची धडपड चालली असल्याचें ताज्या बातम्यांवरून दिसतें. रणांगणाच्या मध्यविभागांत म्हणजे स्मॉलेन्स्कच्या टापूंत दोन आठवड्यांचे वर घनघोर संग्राम होऊन रशियन सैन्यांनीं शत्रूस थोपवून धरलें आहे आणि त्याचें अतोनात नुकसान केलें आहे. उत्तरेच्या बाजूस लेनिनग्राडच्या बाजूसहि रशियनांचा प्रतिकार शत्रूची प्रगति कुंठित करण्यास समर्थ झाला आहे आणि बाल्टिक समुद्रांत रशियन आरमारास जर्मन जहाजें बुडवण्यांत यश येत आहे. ब्रिटिश वैमानिक दलाचा पराक्रम जर्मनीस वाढत्या प्रमाणावर जाणवूं लागला असून त्या दलानें शत्रूच्या जहाजांचा, कारखान्यांचा व गोद्यांचा नाश परिणामकारक रीतीनें चालवला आहे. व्हिशी येथील मंत्रिमंडळास धाकदपटशा दाखवून त्याचेकडून आफ्रिकेंतील फ्रेंच बंदरांचा ताबा मिळवण्याची हिटलर सारखी खटपट करीत आहे असें दिसतें. स्पेनलाहि आपल्या बाजूनें युद्धांत खेचण्याचा त्याचा प्रयत्न आहे. पूर्व एशियांत जपानला त्यानें चिथवलेंच आहे आणि इंडोचायनाचा ताबा मिळवून थायलंड आपल्या पंजाखालीं आणण्याच्या युक्त्या जपानी मुत्सद्दी लढवीत आहेत. इंग्लंड व अमेरिका ह्यांस शह देण्याची ही हिकमत आहे आणि ती जपानला प्रत्यक्ष फायद्याची असून हिटलरला उपकारक आहे. अमेरिका व ब्रिटन ह्यांनीं आर्थिक नाकेबंदीचें अस्त्र जपानविरुद्ध तूर्त सोडलें आहे आणि त्या राष्ट्राच्या पुढील हालचालींकडे त्यांचें लक्ष आहे. एशियामध्यें चाललेल्या या अलीकडील घडामोडींचा आर्थिक परिणाम दूरगामी झाल्यावांचून रहावयाचा नाहीं. रशियाच्या सरहद्दीकडे जपान कोणत्या धोरणाचा स्वीकार करणार हें अजून स्पष्ट झालेलें नाहीं. युद्ध आपल्याजवळ येऊं लागलें ह्या जाणीवेनें हिंदुस्थान व ऑस्ट्रेलिया ह्यांस आपलें धोरण विधायक रीतीनें व दूरदर्शीपणानें आखणें आतां अगत्याचें झालें आहे.

## स्फुट विचार

### अमेरिकेंत बाजारभावांचें नियंत्रण

युद्धपरिस्थितींत लढाऊ सामुग्रीच्या उत्पादनाप्रीत्यर्थ अमर्याद पैसा खर्चावा लागतो आणि तो समाजांतील निरनिराळ्या वर्गांतील लोकांच्या हातीं त्यांच्या प्राप्तीच्या रूपानें जातो. हा पैसा म्हणजे जनतेची हरतऱ्हेचे पदार्थ विकत घेण्याची शक्ति होय. ही शक्ती वाढत असतां तिच्या सहायानें विकत घ्यावयाच्या पदार्थांचा पुरवठा युद्धपरिस्थितीमुळें वाढत नाहीं आणि ह्या दोहोंतली प्रमाणबद्धता विघडली म्हणजे बाजारभाव चढतात. ह्या महागाईचे अनिष्ट परिणाम काय होतात आणि ते टाळण्यासाठी राष्ट्रीय सरकारांस कोणते उपाय योजावे लागतात, ह्याचें विवेचन प्रो. काळे ह्यांनीं मुम्बई रेडिओवर गेल्या महिन्याच्या १५ तारखेस केलेल्या भाषणांत सविस्तर आलें असून तें भाषण आम्हीं "अर्था"च्या दोन अंकांत दिलें आहे. अमेरिका सध्या संरक्षणाच्या लढाऊ कामासाठीं दररोज सुमारें ११ कोटि रुपये खर्चीत असून एवढा पैसा जनतेच्या हातीं खेळण्याचा परिणाम बाजारभाव चढण्यांत होत असल्याचें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं काँग्रेसच्या निदर्शनास आणलें आहे आणि अशा रीतीनें होणाऱ्या महागाईस आळा घालण्यासाठीं उचित उपाय योजण्याच्या अधिकाराची मागणी केली आहे. पदार्थांचे भाव चढले म्हणजे मजूरींचे दर त्या प्रमाणांत वाढवावे लागतात आणि मजूरीचे दर चढले असतां उत्पादन-खर्च अधिक होऊन बाजारभाव पुन्हां चढतात, असें हें चमत्कारिक चक्र आहे. ह्याकरितां त्याची गति वेळींच नियंत्रित करावी लागते. बाजारभाव स्थिर राहण्यांत कामकरी वर्गाचें हित आहे असें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं म्हटलें आहे तें योग्य आहे; कारण वाढवलेल्या मजूरीच्या दरांचा फायदा वाढणाऱ्या बाजारभावांमुळें त्यास मिळत नाहीं.

### रशियांत जर्मनीची कुंठित गति

शेजारच्या देशांत सैनिकांच्या व शस्त्रास्त्रांच्या मोठ्या जमावानें शिरून गर्दीनें आंत घुसावयाचें ह्या लष्करी डावपेचांत पोलंड, बेलजम, फ्रान्स व ग्रीस इत्यादि रणांगणांत जर्मनीस यश आलें आणि तेच डावपेच रशियांत यशस्वी होतील अशी हिटलरची कल्पना होती. रशियन राष्ट्र वरील शेजाऱ्यांच्या मानानें विस्तृत व बलवान असलें तरी त्याची लढाऊ तयारी दिखाऊ आहे असा तर्क त्यानें बांधला होता. त्याप्रमाणेंच दीड हजार मैल लांबीच्या पट्ट्यावर एकाच वेळीं बल्गेरिया, रुमानिया, हंगेरी, फिन्लंड ह्यांच्या सहायानें हल्ला चढवला गेला असतां त्याच्या माऱ्यापुढें रशियन फौजांस कच खावी लागेल अशी हिटलरची अपेक्षा होती. म्हणूनच त्यानें नवीन शत्रू स्वतःस उत्पन्न करण्याचा घाट घातला. पहिल्या दोन. तीन आठवड्यांत जर्मन फौजांची त्वरित प्रगति झाली तिच्यामुळें हिटलरचे बेत योग्य होते असें वाटावयास लागलें होतें. परंतु रशियन सेनानींनीं धडाडी, चिकाटी वगैरे गुण दाखवले तेव्हां जर्मन सैन्याची गति मंदावली आणि हिटलरच्या प्रचारकांस आपल्या बातम्यांचा सूर बदलावा लागला. पहिल्या तीन-चार आठवड्यांत जर्मनीचे अधिकृत बातमीदार शत्रूचीं सैन्यें, विमानें, रणगाडे वगैरेंचा धुव्वा उडवल्याचें व मॉस्कोची राजधानी आपल्या तडाख्यांत आल्याविषयींची घमेंड मारीत होते. ठिकठिकाणीं उलट हल्ले चढवून शत्रूस मार्गें रेटण्याचा व त्याच्या हातीं कांहीं मालमत्ता लागू नये अशी व्यवस्था करण्याचा रशियाचा उपक्रम चालू झाला तेव्हां प्रस्तुत युद्ध अनेक अडचणींमुळें नेहमीप्रमाणें त्वरित शेवटास जाणार नाहीं अशी भाषा हिटलरच्या गोटांमधून ऐकूं येऊं लागली. हिटलरच्या अनेक अनुभवी सल्लागारांनीं रशियन युद्धाविरुद्ध अभिप्राय दिला असतां तो झिडकारून त्यानें आपला हट्ट चालवला असल्याचें आतां प्रसिद्ध झालें आहे. कितीहि हानी झाली तरी हिटलर आपला आग्रह चालवीत आहे ह्या कारणानें जर्मन फौजा तिन्हीं महत्त्वाच्या रणक्षेत्रांत खुंटून पडल्यासारखें झालें आहे. रशियाचें आरमार व विमानदलहि आपला पराक्रम सारखा दाखवीत आहे. इंग्लंड व अमेरिका ह्यांचा त्यास पूर्ण पाठिंबा आतां मिळाल्यामुळें रशियाची लढाऊ परिस्थिति प्रारंभापेक्षा कितीतरी सुधारली आहे.

### संधिसाधू जपान

इंडोचायनाच्या संरक्षणासाठी आपणांस योग्य बंदोबस्त केला पाहिजे असा बहाणा करून इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या निषेधास न जुमानतां जपाननें त्या देशांत आपली मोठी फौज उतरवली आहे आणि तेथील लढाऊ महत्वाच्या ठिकाणांचा ताबा घेतला आहे. ह्यांत संधिसाधुपणा आणि जर्मनीस सहाय दिल्याचें श्रेय मिळवण्याची इच्छा ह्या दोन गोष्टींचें मिश्रण आहे. पश्चिमेकडे चाललेल्या युद्धाचा फायदा घेऊन आपल्या राजकीय वर्चस्वाचा विस्तार करण्याचा जपानचा उद्देश ह्या धोरणांत स्पष्ट आहे. व्हीशी सरकारनें हिटलरला खुष करण्यासाठी इंडोचायनाचा ताबा जपाननें घेण्यास परवानगी दिली आहे आणि इंग्लंडला अप्रत्यक्ष रीतीनें त्रास देण्याची ही त्या सरकारची युक्ती आहे. थायलंडमध्येंहि गडबड करण्याचा जपानचा बेत आहे असा दाट संशय येण्यास जागा उत्पन्न झाली आहे. सयाम, ब्रह्मदेश, फिलिपाइन्स ह्यांच्या बाजूस इंग्लंड व अमेरिका ह्यांस उपद्रव देण्याचीं साधनें जपान हस्तगत करीत आहे. जपानच्या ह्या अन्यायी चढाईचा निषेध व प्रतिकार म्हणून ह्या दोन राष्ट्रांनीं आर्थिक हत्यार त्याविरुद्ध तूर्त उचललें आहे. जपानशी व्यापार त्यांनीं बंद केला आहे. जिंकावयाच्या देशाशी आर्थिक व लष्करी करारांचीं बोलणीं सुरू करावयाचीं आणि त्यानें आपला तटस्थपणा सोडण्याची तयारी दाखवली नाहीं कीं त्यावर बळजबरी करावयाची हा हिटलरी पवित्रा जपाननें थायलंडच्या बाबतींत केला असल्याच्या बातम्या ऐकूं येत आहेत. तज्ञ ह्या नात्यानें जर्मन दुसऱ्या देशांत पाठवून तेथें लोकांत बुद्धिभेद उत्पन्न करण्याचा दुसरा हिटलरी डाव आहे तो इराणमध्यें खेळला जात असल्याचें इंग्लंडच्या निदर्शनास आलें असून त्या संबंधांत भयसूचना इराणी सरकारास देण्यांत आली आहे. इराकमध्यें जो डाव फसला तो इराणमध्यें खेळण्याचा खेळ नाझी लोक खेळत आहेत. इराणी सरकार वेळींच सावध होऊन जर्मनीच्या कारवाया बंद पाडील अशी अपेक्षा आहे. बिनलढाऊ व 'तज्ञ' नात्सींनीं इतर तटस्थ देशांत काय गोंधळ उडवून दिला ह्या विषयींची माहिती त्या सरकारास नसेल असें नाहीं. इंग्लंड व रशिया ह्यांनीं इराणला भयसूचना दिली आहे तिचा योग्य स्वीकार केला जाणें त्या राष्ट्राच्या हिताचें आहे. थायलंडच्या बाबतींत इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं आपलें धोरण स्पष्ट करून तो देश जपानच्या महत्वाकांक्षेस नाइलाजानें बळी पडणार नाहीं अशी तजवीज केली पाहिजे. इंडो-चायना व थाय-

लंड ह्यांच्या सरहद्दीवर जपानचीं विमानी ठाणीं येऊन बसलीं आहेत आणि परिस्थिति अनुकूल आहे असें दिसतांच जपान कोपरानें खणण्यास प्रारंभ केल्यावांचून रहाणार नाहीं.

---

### बँकांसंबंधीं तपशीलवार माहिती

हिंदुस्थानांतील बँकांच्या संबंधीं आकडेवार माहिती मागें " डिपार्टमेंट ऑफ कमर्शिअल इंटेलिजन्स ॲन्ड स्टॅटिस्टिक्स " ह्या सरकारी खात्यामार्फत प्रसिद्ध होत असे. १९३९ पासून हें काम रिझर्व्ह बँकेकडे आलें आहे. १९३९ व १९४० ह्या दोन वर्षांची माहिती रिझर्व्ह बँकेनें नुकतीच प्रसिद्ध केली आहे व ह्यापुढें दरसालची माहिती वक्तशीर प्रसिद्ध केली जाईल. रिझर्व्ह बँकेनें आकडे देण्याचे पद्धतींत व तक्त्यांत बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या आहेत. शेड्यूल्ड बँकांसंबंधीं आकडे स्वतंत्रपणें देण्यास तिनें प्रारंभ केला आहे. १ लक्ष रुपयांपेक्षा कमी भागभांडवलाच्या बँकांसंबंधींची माहितीहि संकलित करण्यांत आली आहे. सहकारी बँकांसंबंधींहि माहिती त्यांत दिलेली आहे. लिक्विडेशनमध्यें गेलेल्या बँकांची यादी, क्लिअरिंग हाउसमधील चेक्सची उलाढाल, बँकांच्या शाखांची यादी, हिंदुस्थानांतील बँकांच्या लंडनमधील प्रतिनिधींचीं नांवें, क्लिअरिंग हाउसेसच्या सभासद-बँकांची यादी, रिझर्व्ह बँकेच्या योजनेप्रमाणें अमलांत असलेली पैशाच्या वर्गावर्गींची योजना, इत्यादि गोष्टींची माहिती परिशिष्टांत तपशीलवार दिलेली आहे. पुस्तकांत दिलेल्या तक्त्यांचें स्पष्टीकरण उपोद्घातांत करण्यांत आलें आहे. रिझर्व्ह बँकेचा हिंदी बँकांशीं निकटचा संबंध येत असल्याकारणानें त्या संस्थेनें ह्या पुस्तकाचें संपादन हातीं घेणें औचित्याचें आहे. कोणासहि नीट समजेल अशाच रितीनें तक्त्यांची मांडणी केलेली आहे. शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या व शाखा, बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या व शाखा, रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्याचें येणें-देणें, एक्सचेंज बँकांच्या कचेऱ्या व शाखा, इंपीरियल बँकेच्या कचेऱ्या व शाखा, शेड्यूल बँकांच्या रिझर्व्ह बँकेकडील ठेवी, सहकारी बँका, बँकिंग यूनियन्स, लँड मार्गेज बँका, अर्बन बँका, इत्यादींच्या कचेऱ्या व शाखा, ह्या सर्वांची माहिती देणारे नकाशे पुस्तकास जोडलेले आहेत, ते अत्यंत बोधप्रद आहेत. पुस्तकाची किंमत ३ रु. ८ आ. आहे.

---

### रिझर्व्ह बँकेचा कारभार व कार्यपद्धति

रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली, त्यास सहा वर्षे लोटलीं, तरी अद्यापि ह्या मध्यवर्ती बँकेचें कार्य, कारभार व कार्यपद्धति ह्यासंबंधीं लोकांस पूर्णपणें माहिती झालेली नाहीं. रिझर्व्ह बँकेचा नाणेंबाजार, बँकिंगचे व्यवहार, चलनव्यवस्था, इत्यादींशीं निकटचा संबंध आहे आणि त्यामुळें सबंध हिंदुस्थानाच्या आर्थिक घडामोडींवर रिझर्व्ह बँकेच्या धोरणाचा परिणाम होत असतो. रिझर्व्ह बँकेस हिंदी आर्थिक क्षेत्रांत अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे व तिच्या ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्यामार्फत तिचा शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीशीं संबंध पोहोचतो. बँकेची घटना व तिचें कार्य, तिची अंतर्गत व्यवस्था, सरकारची बँकर ह्या नात्यानें तिचें काम, शेड्यूल्ड व बिगर-शेड्यूल्ड बँका, रिझर्व्ह बँकेची साप्ताहिक व इतर पत्रकें, ॲग्रिकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंट, हुंडणावळीचें नियंत्रण करणारें खातें, इत्यादि प्रकरणांतून रिझर्व्ह बँकेसंबंधीं माहिती देणारें एक छोटेंसें पुस्तक तिनें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे, तें अत्यंत उपयुक्त आहे. रिझर्व्ह बँकेच्या कार्याची कल्पना ह्या पुस्तकाचे वाचनानें उत्कृष्ट येऊं शकेल. पुस्तकाची किंमत १२ आणे आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली ).

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

**शाखा**

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## तगाई कर्जाची वसुली

### पहिल्या बोजांचे हक्कसंबंध

जमीन-सुधराई कायद्याप्रमाणें जमीन सुधारण्याकरितां सरकारकडून काढलेल्या तगाई-कर्जाच्या वसुलीच्या कामीं जमीन विकली गेल्यास सदर जमिनीवर बोजे असणाऱ्या बोजांचें काय होतें ?

प्रतिवादी शंकरय्या यानें तारीख २९ ऑगस्ट १९१९ रोजीं अपिलांस वादीचा बाप चनमल्लप्पा याचेकडून ८,००० रुपये कर्जाऊ काढून तारण म्हणून आपल्या कांहीं जमिनी गहाण लाऊन दिल्या, त्यांपैकीं सर्वे-नं. ९४ ही एक जमीन होती. पुढें ता. १ फेब्रुवारी १९२१ रोजीं शंकरय्यानें स. नं. ९४ ही जमीन सुधारण्यासाठीं सरकारकडून तगाई-कर्ज शंकरय्यानें दिलें नाहीं म्हणून सरकारनें सदर स. नं. ९४ ची जमीन विक्रीस काढली व ती विकली जाऊन प्रतिवादी नं. ४ यानें विकत घेतली.

तारीख ३ जानेवारी १९३६ रोजीं अपिलंट वादीनें गहाणावरून आपली येणें रक्कम वसूल करण्यासाठीं दावा आणून स. नं. ९४ जमिनीसुद्धां सर्व जमिनींची विक्री करून मागितली. प्रतिवादी नं. ४ नें अशी तक्रार केली कीं, सदर जमीन आपण सरकारनें तगाई कर्जाच्या वसुलीचे कामीं केलेल्या विक्रींत विकत घेतली आहे तेव्हां गहाणाचा बोजा स. नं. ९४ वरील नष्ट झालेला आहे, तेव्हां त्याचेविरुद्ध वादीला कांहींहि दाद मागतां येत नाहीं. खालच्या कोर्टानें प्रतिवादी नं. ४ चें म्हणणें बरोबर मानून त्याचेविरुद्ध दाद देवविली नाहीं, म्हणून वादीनें प्रस्तुतचें अपील हायकोर्टाकडे केलें.

तगाई-कर्जाच्या वसुलीच्या कामीं सरकारनें एकाद्याची जमीन विकल्यास सदर जमिनीवर असणारे पूर्वीचे बोजे नाश पावतात काय ?

" अपिलांटतर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला आहे कीं, अपिलंटच्या गहाणाचा बोजा तगाई-कर्ज काढण्यापूर्वीच्या तारखेचा आहे आणि तगाई कर्जाच्या वसुलीच्या विक्रीमुळें तो बोजा नाश होत नाहीं. जमीन-सुधराई-कायदा क. ७ च्या अपवादामध्यें असें सांगितलें आहे कीं, तगाई-कर्ज वसुलीच्या विक्रींत जमीन विकली गेल्यास ती जमीन तिऱ्हाईताचे पूर्वी उत्पन्न झालेले हक्क सोडून गहाणदारांच्या बोजांतून मुक्त होते; तें गहाण तगाई-कर्जाच्या पूर्वीचें असलें तरीसुद्धां तें नष्ट होतें. त्या अपवादाचा अर्थ एवढाच कीं, तिऱ्हाईत म्हणजे ज्यांचा हक्कसंबंध मालकाविरहित उत्पन्न झालेले असतात. उदा०—कायम कुळें वगैरे यांच्या हक्कास बाध येत नाहीं. परंतु मालकामार्फत उत्पन्न झालेले गहाणदार यांचेसारखे हक्कदार यांचे हक्क नाश होतात. तेव्हां खालच्या कोर्टाचा निकाल बरोबर आहे." असा हायकोर्टानें निवाडा केला.

जमीन—सुधराई—कायद्याप्रमाणें एखाद्यानें सरकारकडून तगाई-कर्ज काढल्यास व त्याची परत फेड न झाल्यास ती जमीन सरकारकडून विकण्यांत आली तर त्या जमिनीवर असणाऱ्या गहाणावर पूर्वीच्या गहाणदारासारख्या हक्कदारांचा हक्क नष्ट होतो. तरी सावकारांनीं ऋणकोनें तगाई-कर्ज काढलें असल्यास तें फेडलें जाईल इकडे लक्ष ठेवावें म्हणजे त्यांचे हक्कास बाध येणार नाहीं.

## रिझर्व्ह बँकेचे भाग व भागीदार

रिझर्व्ह बँकेचे भाग कमी, कमी लोकांच्या हातांत एकत्रित होण्याची प्रवृत्ति अद्याप कमी झालेली नाहीं. गेल्या वर्षांत दर माणशी भागांचें पडणारें प्रमाण ८·९ भागांचें ९·४ भाग इतकें झालें. भागीदारांची संख्या ५६,०५७ ची ५३,४६८ झाली. मुंबई व कलकत्ता येथील भागीदारांची यादी वाढत आहे.

| यादी | भागांची संख्या ३०-६-४० रोजीं | भागांची संख्या ३०-६-४१ रोजीं |
|---|---|---|
| मुंबई | २,१०,५१५ | २,१२,८२३ |
| कलकत्ता | १,१९,६७१ | १,२१,५०१ |
| दिल्ली | ९१,०६३ | ८७,१६८ |
| मद्रास | ६०,२४९ | ५९,८२६ |
| रंगून | १८,५०२ | १८,६८२ |
| एकूण | ५,००,००० | ५,००,००० |

| यादी | भागीदारांची संख्या ३०-६-४० अखेर | भागीदारांची संख्या ३०-६-४१ अखेर |
|---|---|---|
| मुंबई | १९,८१५ | १९,०७२ |
| कलकत्ता | १२,८४९ | १२,२४६ |
| दिल्ली | १३,७१९ | १२,८१३ |
| मद्रास | ८,२३७ | ७,७९३ |
| रंगून | १,४३७ | १,३६४ |
| | ५६,०५७ | ५३,४६८ |


**बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

**( स्थापना १९०६ )**

**—: जाहिरात :—**

तारीख १ माहे सप्टेंबर १९४१ पासून पुन्हां फेरफार करीपर्यंत ह्या बँकेमध्यें खाली दिल्याप्रमाणें ठेवींवर व्याज दिलें जाईल.

| ठेवीचा प्रकार | व्याजाचा दर दरसाल दरशेंकडा |
|---|---|
| १ चालू ठेव | ॥ |
| २ सेव्हिंग बँक | १॥ |
| ३ कायम ठेव मुदत १ वर्ष | २ |
| " " " २ वर्षें | २॥ |
| " " " ३ वर्षें | ३ |
| " " " ५ वर्षें | ३॥ |

कायम ठेवीची मुदत संपल्यावर ती पुन्हां ठेवल्यास ( Renewal ) ती पूर्वीच्याच दरानें रिन्यू केली जाईल. नवीन ठेव वर दिलेल्या दरानें स्वीकारली जाईल.

बार्शी, ३०-७-४१ — र. प. पटवर्धन, मॅनेजर.

## हिंदुस्थानांत गव्हाची लागवड

### १९४०–४१ चा सरकारी अंदाज

| | |
|---|---|
| एकूण लागवड | ३,४४,९९,००० एकर |
| गेल्या वर्षीची लागवड | ३,३६,७३,००० एकर |
| वाढ | २% |
| अपेक्षित उत्पादन | ९९,६९,००० टन |
| गेल्या वर्षीचें उत्पादन | १०६,४१,००० टन |
| घट | ६% |

### लागवडीचे प्रांतवार आंकडे

| प्रांत अगर संस्थान | लागवड हजार एकर | उत्पादन हजार टन | दर एकरीं उत्पादन (पौंड) |
|---|---|---|---|
| पंजाब | ११,२१४ | ३,७९७ | ७५८ |
| संयुक्त प्रांत | ८,०६८ | २,९११ | ८०८ |
| मध्यप्रांत–वऱ्हाड | ३,३०२ | ५८५ | ३९७ |
| मुंबई | २,०१७ | ३७५ | ४१६ |
| सिंध | १,३२० | ३५१ | ५९६ |
| बिहार | १,०९७ | ४०५ | ८२७ |
| सरहद्द प्रांत | १,१२२ | २९९ | ५९७ |
| मध्यहिंदुस्थान | २,२१३ | ३७८ | ३८३ |
| ग्वाल्हेर | १,५३२ | ३३८ | ४९४ |
| रजपुताना | १,२०८ | ३०२ | ५६० |
| हैद्राबाद | १,०८६ | १४९ | ३०७ |
| एकूण | ३४,४९९ | ९,९६९ | ६४७ |

एकूण लागवडीपैकीं ३०·९% लागवड पंजाबांत, २२·४% लागवड संयुक्त प्रांतांत, ९·८% लागवड मध्यप्रांत–वऱ्हाडांत आणि ६·२% लागवड मुंबई प्रांतांत होते. ग्वालेरच्या व हैद्राबादच्या वाट्यास अनुक्रमें ४·५% व ३·६% लागवड येते.

### गव्हाची निर्गत व आयात

| | निर्गत (टन) | आयात (टन) |
|---|---|---|
| १९३७–३८ | ४,५९,८०० | " |
| १९३८–३९ | २,७९,२०० | १,०४,८०१ |
| १९३९–४० | ७,८०० | ६१,८७७ |
| १९४०–४१ (पहिले दहा महिने) | ३७,००० | ८,६४८ |

### मुंबई प्रांतांतील हातमाग

मुंबई प्रांतांतील हातमागांची संख्या किती आहे, ह्याचा नक्की आकडा सांगतां येत नाहीं, वेगवेगळया वेळीं करण्यांत आलेले अंदाज खालीं दिले आहेतः—

| मागांची संख्या | वर्ष | अंदाज कोणी केला ? |
|---|---|---|
| ८५,८०० | १९२८ | श्री. तेलंग |
| १,००,००० | १९३२ | टारिफ बोर्ड |
| १,१०,१८३ | १९३६ | स्पेशल टारिफ बोर्ड |
| ७२,००० ते १,००,००० | १९३८ | बॉंबे ए. अँड इं. सर्व्हे कमिटी |

## बार्शी सेंट्रल को. बँक लि.

### ( वार्षिक सभा : २४–८–४१ )

वरील बँकेच्या पटावर ९२८ सभासद असून त्यांपैकीं ५१ सोसायट्या व ८७७ व्यक्ती आहेत. बँकेचें भाग भांडवल ७३,९२० रुपये असून तिचा रिझर्व्ह फंड ५४ हजार रुपये, बिल्डिंग फंड ५ हजार रुपये, बॅड डेट फंड ४३/४ हजार व डिव्हिडंड ई. फंड १३/४ हजार रुपये आहे. बँकेकडील एकूण ठेवींची बेरीज सुमारें ५ लक्ष रुपये आहे. अहवालाचे वर्षी ठेवींची रकम ८० हजारांनीं वाढली आहे. बँकेच्या पैशांपैकी २ लक्ष, ४० हजार रुपये रोख व इतर बँकांकडे असून ३९३/४ हजार रुपये डिबेंचर्स, बँकांचे भाग, सरकारी कर्जरोखे, इत्यादींत आहेत. बँकेनें ३ लक्ष, ५७ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. बँकेची सुमारें १५ हजारांची स्वतःची इमारत आहे. अहवालाचे वर्षी ठेवींची रकम८०हजारांनीं वाढून कर्जाची रकम ६१ हजार रुपयांनीं कमी झाली, ह्यामुळें बँकेच्या एकूण खेळत्या भांडवलाशीं कर्जाच्या रकमेचें पडणारें प्रमाण अधिक अनुकूल झालें आहे. रिझर्व्ह फंडाची रकम बँकेच्या व्यवहाराबाहेर गुंतविण्याचें काम चालू आहे. ती तशी एकदम गुंतविली तर बँकेच्या उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होईल तो टाळण्याचें कार्यकारी मंडळाचें धोरण आहे. बँकेच्या वैराग शाखेचें काम समाधानकारक चाललें आहे. अहवालाचे सालीं पांगरी येथें बँकेची उपकचेरी उघडण्यांत आली आहे. तिचेमार्फत नाममात्र सभासदांस बीं पुरविणें व त्यांचे मालाची विक्री करणें, असा तिचा उद्देश आहे. बँकेची प्रगति समाधानकारक चाललेली आहे. अहवालाचे वर्षी संस्थेस ७,६९५ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस द. सा. द. शे. ५ रु. १० आ. दरानें डिव्हिडंड देण्याकडे ४,१६२ रुपयांचा विनियोग करावा अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. श्री. गणेश रामचंद्र साने, वकील हे बँकेचे चेअरमन असून श्री. र. प. पटवर्धन हे तिचे मॅनेजर आहेत.

## दि बँक ऑफ सिटिझन्स, लि. बेळगांव

### ( वार्षिक सभा : ३-८-४१ )

वरील बँकेचें खपलेलें भांडवल ९३,९०० रुपये व भरणा झालेलें भांडवल ४५,८२० रुपये आहे. तिचा रिझर्व्ह फंड ५०० रुपये व बिल्डिंग फंड ५० रुपये आहे. बँकेकडील ठेवींची रकम २ लक्ष, ८ हजार रुपये आहे. बँकेनें १ लक्ष, ८२ हजार रुपये कर्जाऊ दिलेले असून तिचे ११,१०० रुपये सरकारी रोख्यांत आहेत. बँकेचे ६३१/२ हजार रुपये रोख व इतर बँकांत शिलक आहेत. ३० जून अखेर संपलेल्या चौथ्या वर्षी बँकेस ३,०६५ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ५% करमाफ डिव्हिडंड देण्याकडे २०,६५ रुपयांचा विनियोग करावा, कायद्याप्रमाणें ६२० रुपये रिझर्व्ह फंडांत टाकावे व १५० रुपये इमारत फंडाकडे वर्ग करावे, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे, सध्याच्या व्याजाचे दराच्या परिस्थितींत, ५% करमाफ डिव्हिडंड भागीदारांस आकर्षक वाटेल, ह्यांत संशय नाहीं. बँकेचें भाग भांडवल वाढण्यास त्याचा उपयोग झाला, तर त्यामुळें बँकेची बळकटी वाढेल. श्री. बंडो रघुनाथ कुलकर्णी हे बँकेचे चेअरमन असून श्री. जी. डी. सराफ हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

## सांगली संस्थानांतील सहकारी चळवळ

सांगली संस्थानांतील सहकारी चळवळीचा इतिहास सुमारें ३० वर्षांचा आहे. ब्रिटिश हद्दींत ही चळवळ त्यापूर्वी कांहीं काळ ( सुमारें ४०।४५ वर्षांपासून ) सुरू झाली. या चळवळीची उपयुक्तता पटल्यानें संस्थानचे त्या काळचे ॲडमिनिस्ट्रेटर कॅप्टन बर्क यांनीं सन १९०९ सालीं संस्थानांत १९०४ चा को. ॲक्ट लागू करून चळवळीस प्रारंभ केला. इतर खात्यांप्रमाणें हें खातें स्वतंत्र न ठेवितां असि. चीफ रेव्हिन्यु ऑफिसर यांना रजिस्ट्रारचे अधिकार देऊन कामास सुरवात केली. संस्थानचे पहिले रजिस्ट्रार कै. गणेश रामचंद्र कमतनूरकर हे होत.

सन १९१० अखेर पतपेढ्यांची संख्या ७ झाली. विद्यमान पतपेढ्यांपैकीं कसबे-डिग्रज, दोद्वाड, कवठे-महांकाळ, दुधोंडी, छब्बी या पतपेढ्या जुन्यांपैकीं होत. सन १९२३।२४ पर्यंत या चळवळीची प्रगति अत्यंत अल्प प्रमाणांत झाली. पतपेढ्यांची संख्या या काळांत २४ पर्यंत गेली.

ता. २०।३।२६ रोजीं संस्थाननें सहकारी खातें स्वतंत्र करून रजिस्ट्रार म्हणून श्री. तळवळकर यांची नेमणूक केली. तसेंच असि. रजिस्ट्रार, ऑडिटर वगैरे मदतनिसांच्या नेमणुकाहि करण्यांत आल्या. रिपोर्टांत सुचविलेप्रमाणें शेतमाल खरेदी-विक्रीकरतां श्रीगणपति को. सेलशॉप व भांडवल पुरवण्याकरितां सें. को. बँक या संस्था अनुक्रमें ता. ६।११।२६ व ता. २८।३।२७ रोजीं सुरू करण्यांत आल्या. सहकारी खातें स्वतंत्र झाल्यापासून पतपेढ्यांची बरीच वाढ झाली. १९२८ अखेर पतपेढ्यांची संख्या २४ वरून ५० पर्यंत गेली. तसेंच बँकेच्या व्यवहारांतहि बरीच प्रगति झाली.

ता. ९।१०।२७ रोजीं संस्थानचे दिवाण श्री. आठवले यांच्या अध्यक्षतेखालीं ' सांगली संस्थान पहिली सहकारी परिषद ' भरली. या परिषदेंत सें. को. बँकेच्या व सेलशॉपच्या तालुकानिहाय शाखा काढणें, जुन्या कर्जफेडीसाठीं लांब मुदतीनें कर्जें देण्याकरितां लँड मॉर्गेज बँक काढणें, सहकारी चळवळीच्या प्रसारार्थ ऑर्गेनायझर नेमणें वगैरे या चळवळीस सर्वथैव पोषक असे ठराव पास झाले.

१९३१ सालीं ' सांगली स्टेट सें. को. इन्स्टिट्यूट ' ची स्थापना झाली. या संस्थेमार्फत १९३३ सालीं सांगली येथें सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास उघडण्यांत येऊन त्याचा उपयोग सुमारें ५० उमेदवारांनीं घेतला. तसेंच याच सालीं मंगळवेढें तालुक्यांत या संस्थेनें प्रचारकांमार्फत ९ पतपेढ्या नवीन स्थापन केल्या. या पतपेढ्यांना भांडवल पुरविण्याकरितां व सहकारी तत्त्वावर बँकिंगचा व्यवहार करून त्याचा उपयोग खेडेगांवांतील जनतेस व्हावा, म्हणून ता. १२।१।३३ रोजीं मंगळवेढें ता. को. बँक लि. हीं संस्था मंगळवेढें येथें उघडण्यांत आली.

याच सुमारास पतपेढ्यांची स्थिति समाधानकारक नसल्यानें ती सुधारून कायम देखरेख राहण्याकरितां व थकबाकी वसुलासाठी कांहीं योजना ठरवणें जरूर झाल्यानें ता. १।७।३४ रोजीं कवठे-महांकाळ येथें " कुची तालुका सहकारी परिषद " भरविण्यांत आली. या परिषदेंत वरील गोष्टी साध्य होण्याकरितां को. सुपरवायझिंग युनियनची स्थापना करण्याचा महत्त्वाचा ठराव पास करण्यांत आला; व त्याप्रमाणें र. नं. १०० येथें ता. २९।८।३४ रोजीं " मिरजप्रांत कुची ता. को. सु. युनियन " संस्था रजिस्टर होऊन ता. १।११।३४ पासून तिच्या प्रत्यक्ष कामास प्रारंभ झाला. यानंतर ता. ४।११।३५ रोजीं सांगली येथें ' अर्बन को. बँकेची स्थापना झाली. पतपेढ्यांची सुधारणा होण्यास पंच व सेक्रेटरीवर्ग कार्यक्षम असणें जरूरीचें आहे. या दृष्टीनें सेक्रेटरीवर्गास अवश्य तें शिक्षण देण्याकरितां १९३६ सालीं कवठेमहांकाळ येथें युनियनमार्फत ' सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास ' काढण्यांत आला, या क्लासचा उपयोग सेक्रेटरी व स्वतंत्र उमेदवार मिळून ५० उमेदवारांनीं घेतला. मुख्यतः दप्तरकामासंबंधीं जरूर ती माहिती यावेळीं देण्यांत आली. युनियनचे स्थापनेमुळें दप्तरकामांत बरीच सुधारणा होऊन थोडी थकबाकीहि वसूल येऊं लागली. यु. स्थापनेचे वेळीं सें. को. बँकेचें पतपेढ्यांकडे रु. २३९०२२ येणें असून थकबाकी शें. ८३ प्रमाणें होती. पतपेढ्यांची सभासदांकडील कर्जें सर्वच थकलेलीं होतीं, युनियनच्या प्रयत्नानें ही थकबाकी कमी होण्यास सुरवात झाली, परंतु अन्य उपाय योजणें अवश्य वाटून खात्याकडून १९३५ सालीं ऑडिटर व को. सु. युनियनचे सुपरवायझर यांना स्वतंत्र लवाद ऑफिसर नेमण्यांत आले. आजवर असे लवाद स्वतः रजिस्ट्रार चालवीत असत. या योजनेनें वसुलावर परिणाम होऊन थकबाकीचें प्रमाण शें. ८३ वरून १९३७ अखेरीस शें. ६० वर आलें.

मंगळवेढें तालुक्यांतील शेतकऱ्यांची स्थिति हलाखीची होऊन कर्जाचा बोजा वाढल्यानें त्यांचे सोईकरतां दरबारनें ' शेतकरी संरक्षण कायदा ' लागू केला, व ऋणमुक्ततेस मदत होण्याकरितां ता. २५।५।३६ रोजीं ' मंगळवेढें ता. को. लँड मॉर्गेज बँक ' स्थापन केली. हा भाग सतत दुष्काळी असल्यानें बँकेचा उद्देशाप्रमाणें फारसा उपयोग झाला नाहीं.

१९३७ सालअखेरीस असमाधानकारक व्यवहारामुळें ६ संस्था लिक्विडेशनमध्यें काढण्यांत आल्या. १९३१ सालीं स्थापन झालेली इन्स्टिट्यूट बंद झाल्यानें या वर्षी दुसरी 'सांगली स्टेट को. इन्स्टिट्यूट' ही संस्था ता. ७।९।३७ रोजीं रजिस्टर करण्यांत आली.

मिरजप्रांत व कुची तालुक्यांतील बहुतेक खेड्यांतून पतपेढ्या स्थापन झाल्या आहेत. इतर तालुक्यांतून त्या मानानें त्यांचा प्रसार झालेला नाहीं. ही अडचण लक्षांत घेऊन युनियनचें कार्यक्षेत्र वाढवणें, सहकारी परिषद भरवणें, आणि हस्तपत्रकांच्या द्वारें त्या त्या भागांत सहकारी चळवळीची आवड उत्पन्न करणें, वगैरे प्रयत्न करण्यांत आले आहेत. राहिलेल्या विभागांतून हळुहळु पतपेढ्या निघून रयतेस त्यांचा उपयोग होईल असा भरवसा आहे; त्याचप्रमाणें मोठ्या गांवीं अर्बन सो. निघण्याचा उपक्रम होणें जरूरीचें आहे.

### फिल्मी टपाल

आफ्रिकेंतील युद्धक्षेत्रामधील टपाल त्वरित व अल्प खर्चानें इंग्लंडला पोहोंचावें ह्यासाठी एक खुबीची योजना करण्यांत आली आहे. पत्र पाठवूं इच्छिणारा इसम विशिष्ट आकाराच्या कागदावर मजकूर लिहून खालीं पत्राचा पत्ता लिहितो. ह्या लिखाणाचें छायाचित्र फिल्मच्या एका टिकलीवर घेण्यांत येतें. अशा टिकल्या विमानांमधून इंग्लंडला पोहोंचल्या म्हणजे त्यांचा ५ × ४ इंच ह्या आकाराच्या फिल्ममध्यें विस्तार करण्यांत येतो. ही फिल्म लिफाफ्यांत घातली जाते आणि त्यावरील कापलेल्या जागेंत आंत दिलेला पत्ता येऊन बसतो. नेहमीच्या साध्या पत्रांप्रमाणें हीं पत्रें वाटण्यांत येतात. साडेचार हजार फिल्मी टिकल्यांचें वजन फक्त एक पौंड भरतें. एवढ्या मामुली पत्रांचें वजन दीड हंड्रेडवेट होईल. ह्यावरून वरील युक्तीमुळें जागा व वजन ह्यांची केवढी बचत होते ह्याची कल्पना येईल.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १११—७ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३—० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% म्हेसूर कर्ज ( १९५३–६३) — .. | ११५—० |
| ५% म्हेसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२६—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११३—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% ... | ४८—८ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६०—० |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १६८—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५–१० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १६९०—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १७१५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ७२—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८८६—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६५२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २३५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४७–१२ |
| शिंदा स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २२—५ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४५—६ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४२००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २२१—४ |
| टाटा आयर्न डु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १५७—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३९६—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १४३ रु.१४ आ.७ पै ... | २१३२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १५०—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२—१—० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६२–१३–० |

अर्थ ग्रन्थमाला–पुस्तक ४ थें

# सहकार

( हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

★

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें

संग्रह करा

कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट

पाचकवटी, पंचकोलासव

तसेंच

पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी

—: रक्तवर्धक :—

सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें

आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेचीं कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दानेवाडी, पुणें.



मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल लकी टूथ पावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

जर्निमन टेलर व्हा.

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

पराडकर टेलर्स ॲकेडेमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १३ ऑगस्ट, १९४१ अंक ३३

अर्थ ग्रन्थमाला—पुस्तक ४ थें

## सहकार

## हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

★

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### ऑस्ट्रेलियन सैनिक

ऑस्ट्रेलियांतील १ लक्ष, ६० हजार लोक साम्राज्य सैन्यांत दाखल झाले आहेत, त्यापैकी ९० हजार सैनिक युद्धासाठी ऑस्ट्रेलिया-बाहेर नेण्यांत आले आहेत. ह्याखेरीज, २ लक्ष सैनिक स्वदेश-रक्षणासाठी जय्यत तयार आहेत.

### इक्वेडारमधील जपानी लोक

इक्वेडारमधील जपानविरोधी लोकमतास आळा घालण्यासंबंधीं एक खलिता इक्वेडारसरकारकडे पाठविण्यांत आला आहे. इक्वेडार हें राष्ट्र दक्षिण अमेरिका खंडांत पश्चिम किनाऱ्यावर पॅसिफिक महासागराचे बाजूस आहे.

### फिनलंड

फिनलंड हें शत्रुराष्ट्र असल्याचें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

### जपानमधील हिंदी नागरिक

जपानमध्यें वास्तव्य करीत असलेले तीस हिंदी नागरिक हिंदुस्थनकडे परत येत आहेत.

### अरबाची युद्धफंडास देणगी

एडनमधील एका अरबानें आपल्या जवळील एकूण ८०० रुपयांपैकीं ३०० रुपये स्थानिक युद्धफंडास दिले, परंतु फंड-जमविणारानें फक्त २५ रुपयेच स्वीकारले, कारण त्या अरबाची परिस्थिति इतकी मोठी रकम देण्याइतकी चांगली नव्हती. अर-बानें नंतर दुसऱ्या एकाजवळ पुनः ३०० रुपये युद्धफंडासाठीं दिले. ही हकीकत एका ब्रिटिश वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली आहे.

### गहूं

ग्रेट ब्रिटन, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया व अर्जेंटिना ह्या पांच गव्हाचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या देशांचे प्रतिनि-धींची अमेरिकेंत बैठक चालू आहे. गव्हासंबंधींचा जागतिक प्रश्न सोडवून, गव्हाचा पुरेसा अखंड साठा राखण्याच्या दृष्टीनें त्यांचा विचारविनिमय झाला व ह्या पांच राष्ट्रांनीं करावयाच्या कराराचा मसुदा त्यांनीं तयार केला.

### १३⁄४ लक्ष रुपयांचीं कुलुपें

लष्करांतील सैनिकांसाठी १३⁄४ लक्ष रुपयांचीं कुलुपें पुरविण्याची ऑर्डर संयुक्त प्रांत सरकारास मिळाली आहे. अलिगड येथें हीं कुलुपें तयार करून घेतलीं जातील.

### जर्मनीजवळील पेट्रोल

जर्मनींत लवकरच पेट्रोलचा भयंकर तुटवडा पडेल, अशा आशेवर राहूं नका, असें एका ब्रिटिश अधिकारी तज्ज्ञानें नुकतेच सांगितलें. तूर्त तरी हिटलरला पेट्रोलची चणचण भासत नाहीं. कृत्रिम पेट्रोलचें उत्पादन जर्मनींत वाढत आहे, परंतु ब्रिटिशांच्या वैमानिक हल्ल्यामुळें ही वाढ खुंटली आहे.

### जर्मन गुप्त हेरांस देहांत शासन

दोन जर्मन गुप्त हेरांस इंग्लंडमध्यें नुकतेंच देहांत शासन करण्यांत आलें. हे दोघे घडीच्या रबरी बोटींतून स्कॉटलंडमध्यें उतरले होते. परंतु ती बोट पुढें उघडकीस आल्यामुळें त्यांचें ग्रेट-ब्रिटनमधील अस्तित्व समजून आलें. दोघांचेहि जवळ वायरलेस सेट्स ( संदेश पाठविण्याचें व घेण्याचें, दोन्हींचीं यंत्रें ), ब्रिटिश नाणीं, खाद्य पदार्थ व परदेशांचे पासपोर्ट आढळले. दोघांसहि इंग्रजी बोलतां येत होतें.

### कपाशीच्या पिकाची खरेदी

येत्या हंगामांतील कपाशीच्या पिकापैकीं निम्में पीक इजिप्तचें सरकार विकत घेणार असून त्यासाठी तें कर्ज काढणार आहे.

### न्यूयॉर्ककडे ५५५ ज्यू जात आहेत

जर्मनी, रुमेनिया, बेल्जम, इत्यादि युरोपिअन देशांतील ५५५ वयस्क ज्यू स्त्री–पुरुष एका स्पॅनिश आगबोटींतून न्यूयॉर्ककडे जात आहेत.

### दररोज ४ गॅलन पेट्रोल द्या

पेट्रोलच्या रेशनिंगचे योजनेप्रमाणें मोटार टॅक्सींना दररोज दोन गॅलन पेट्रोल मिळणार आहे, त्याचेऐवजीं चार गॅलन मिळावें अशी मुंबईमधील टॅक्सी ड्रायव्हर्स युनियननें सरकारला विनंति केली आहे. दोन गॅलन पेट्रोलवर धंदा करून टॅक्सीचा खर्च भागणार नाहीं, असें टॅक्सीवाल्यांचें म्हणणें आहे.

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया

इंपीरिअल बँक ऑफ इंडियास ३१–१२–४० अखेरच्या सहा-माहींतील शिलकी नफ्याचे ३८ लक्ष, ६१ हजार रुपये धरून, ३० जून अखेरच्या वर्षी ८० लक्ष, ७१३⁄४ हजार रुपये नफा झाला. त्यांतून भागीदारांस १२% करमाफ डिव्हिडंड देण्या-साठीं ३३ लक्ष, ७५ हजार रुपये लागतील. पेन्शन फंडाकडे १ लक्ष, ३४३⁄४ हजार रुपये वर्ग केल्यावर, पुढील सहामाहीसाठीं ४५ लक्ष, ६२ हजार रुपये उरतात.

### मिसेस रूझवेल्ट इंग्लंडला येणार !

मिसेस रूझवेल्ट ह्या विमानमार्गें येत्या सप्टेंबरमध्यें लंडनला येणार आहेत, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे, परंतु लंडनमधील अमेरिकन वकिलातींत तिला दुजोरा मिळत नाहीं.

### मुसोलिनीच्या मुलास अपघात

मुसोलिनीचा मुलगा ब्रूनो हा इटलीमध्यें पिसा शहराजवळ विमानाच्या अपघातांत मरण पावला.

### मुंबई शहरांतील जपानी व्यापारी संस्था

मुंबई शहरांतील जपानी व्यापारी संस्था आपला व्यवहार आवरता घेण्याच्या मार्गांत आहेत. कांहींनीं धंदा अजिबात बंद करण्याचें ठरविलें आहे. परत घरीं जाण्यासाठीं जपानकडे जाणा-ऱ्या आगबोटींवरील जागा भरून जात आहेत.

### टाटा कंपनीचे नवे अधिकारी

टाटा कंपनी व हिंदुस्थान सरकार ह्यांचे दरम्यान मध्यस्थाचें काम करण्यासाठी टाटा कंपनीनें सर फ्रेड्रिक जेम्स ह्यांची योजना केली आहे. दिल्ली व सिमला येथें राहून ते हें कार्य करतील.

### " वॅगन्स फिरत्या ठेवा "

रेल्वेच्या वॅगन्स फिरत्या ठेवून म्हणजे वॅगन्सकडून शक्य तेवढें अधिक काम करवून घेऊन युद्धजन्य वाढत्या वहातुकीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न हिंदी रेल्वेज करीत आहेत. वॅगन्सच्या पुर-वठ्यासंबंधींचा विचार रेल्वे बोर्डानें एका कमिटीकडे सोपविला व त्या कमिटीचे सूचनांस अनुसरून व्यवस्था होत आहे. मार्च, १९४० अखेर संपलेल्या वर्षी ब्रॉड गेजवर वॅगन्सनीं दररोज सरा-सरीनें ४०·२ मैल व मीटर गेजवर ३०·९ मैल प्रवास केला. गेल्या वर्षीचे ( १९४१ ) तत्सम आकडे ४१·३ मैल व ३२·९ मैल असे आहेत. चालू वॅगन्स व दुरुस्तीसाठी बंद ठेवलेल्या वॅगन्स ह्या सर्वांचा वरील आकड्यांत समावेश झालेला आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३८६ |
| २ पौष्टिक आहाराचें राष्ट्रीय महत्त्व. ... ... | ३८७ |
| ३ रिझर्व्ह बँकेचें नफा-तोटा पत्रक. ... ... | ३८८ |
| ४ हातमागावर तयार होणारें कापड. ... ... | ३८८ |
| ५ स्फुट विचार ... विमा कंपन्यांचे सरकारी रोख्यांतील पैसे—कानूनमध्यें दुरुस्ती—मुंबईत आनंदाचें दूध—युद्धाचा गेला आठवडा—जर्मनी आणि रशिया. | ३८९ |
| ६ विचार-प्रवर्तक सहकारी बातम्या. ... | ३९१ |
| ७ लोकसंख्या वाढविण्याचा प्रयत्न. ... | ३९२ |
| ८ महाड को. अ. बँक. | ३९२ |
| ९ इन्शुरन्स ॲ. कमिटी. | ३९२ |
| १० गिरणी कामगारांस महागाई-भत्ता ... | ३९३ |
| ११ आगपेटींची किरकोळ किंमत ... | ३९३ |
| १२ निवडक बाजारभाव ... | ३९४ |

अर्थ

बुधवार, ता. १३ ऑगस्ट, १९४१

## पौष्टिक आहाराचें राष्ट्रीय महत्त्व

पुरेसें व पौष्टिक अन्न हा प्रत्येक व्यक्तीच्या व राष्ट्राच्या जीवनाचा पाया आहे. ह्या विधानांत नवें किंवा विशेष असें कांहीं नाहीं. तथापि, पौष्टिकपणाच्या दृष्टीनें खाण्यापिण्याच्या पदार्थांचा समाजांतील निरनिराळ्या वर्गांस पुरवठा होत आहे किंवा नाहीं ह्याचा पद्धतशीर रीतीचा विचार क्वचितच झालेला आढळतो. मानवी शरीराची वाढ व जोपासना होण्यास अन्नपाण्यांत कोणतीं द्रव्यें आवश्यक आहेत आणि त्यांचा पुरवठा जनतेस होत आहे कीं नाहीं ह्या विषयांची चर्चा अलीकडे होऊं लागली आहेत. युद्धाच्या काळांत तर ह्या विषयाचें महत्व अपूर्व आहे. नित्याच्या आहारांत वापरले जाणारे जिन्नस युद्धपरिस्थितींत व्यापार मर्यादित झाल्याकारणानें दुर्मिळ होतात. अशा वेळीं आहाराचा शास्त्रीय पद्धतीनें विचार होऊन अत्यावश्यक खाद्यवस्तूंचा पुरवठा जनतेस होईल अशी व्यवस्था राष्ट्रीय सरकारांस करावी लागते. पदार्थांच्या नियंत्रित वाटणीची योजना इंग्लंडसारख्या देशांत आज अंमलांत आली आहे, तीमध्यें वरील प्रकारची तरतूद करण्यांत आली आहे. तथापि, राष्ट्रीय आहाराचा प्रश्न युद्धकालापुरताच महत्त्वाचा नसून त्याचा विचार शांततेच्या परिस्थितींतहि होणें अगत्याचें आहे. आहाराच्या किमान पदार्थांतून कमाल पौष्टिक द्रव्यें काढणें हा त्या बाबतींतल्या योजनात्मक धोरणाचा उद्देश असला पाहिजे. ह्या दृष्टीनें सर्व पुढारलेल्या राष्ट्रांत शास्त्रीय संशोधन चाललें आहे आणि प्रत्यक्ष व्यवहारांत त्याचा उपयोग केला जात आहे.

इतर बाबतींत हिंदुस्थान देश मागसलेला आहे, तसा तो ह्याहि बाबतींत आहे. डॉ. म्हसकर ह्यांनीं गेल्या आठवड्यांत मुंबई येथें ह्या विषयावर व्याख्यान दिलें. त्यांत ह्या प्रांतांतल्या सामान्य जनतेस पुरेसें व पौष्टिक अन्न मिळत नाहीं असें त्यांनीं सांगितलें. लहान मुलें व बाळंतिणी आणि खेडेगांवी लोक ह्यांच्या आरोग्यासंबंधानें कार्य करणाऱ्या संस्थेच्या वितमानें त्यांनीं अत्यंत महत्त्वाचे प्रयत्न चालवले आहेत. लोकांस दुखणीं व रोग होतात, त्यांच्या मुळाशी पोषक अन्नाचा अभाव हें मुख्य कारण असल्याचें त्यांनीं स्वानुभवावरून सांगितलें. पाश्चात्य देशांत सात्विक अन्नाविषयींच्या माहितीचा प्रसार केला जात आहे, पण ह्या देशांतील जनतेच्या मागासलेपणामुळें व भिन्न परिस्थितीमुळें त्या ज्ञानाचा उपयोग येथें होण्यासारखा नाहीं. त्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ डॉ. म्हसकर ह्यांनीं अनेक उदाहरणें दिलीं. हिंदुस्थानांतील बहुसंख्य लोक मांसाहारी आहेत, पण त्यांच्या अन्नांत मांस किंवा दूध सणावारींच दिसून येतें. असल्या पौष्टिक पदार्थांच्या पुरवठ्यास पैसा लागतो तो त्यांच्या आवाक्यांत नसल्यानें निकस अन्नावरच त्यांस संतुष्ट रहावें लागतें. समुद्रकाठच्या जनतेस मासे मिळतात, पण दूध हें अत्यंत महत्त्वाचें अन्न असूनहि तें क्वचितच उपलब्ध होतें. खेडेगांवांत जनतेस एक दोन जातींच्या धान्यावर गुजारा करावा लागतो. त्यांच्या आहारांत विविधता नसते आणि व्हिटॅमिन्स असलेला भाजीपाला त्यांस मिळत नाहीं. म्हणजे खाण्यापिण्यांत पौष्टिक द्रव्यांचा अभाव असल्यानें खेडेगांवी लोकांत रोगांस तोंड देण्याचें सामर्थ्य उत्पन्न होत नाहीं.

ह्या असमाधानकारक परिस्थितीवर उपाययोजना डॉ. म्हसकर ह्यांनीं सुचवली आहे. देशांत सहज उपलब्ध होणाऱ्या खाण्यापिण्याच्या पदार्थांचें शास्त्रीय संशोधन होऊन त्यांचा अधिकांत अधिक कार्यक्षम उपयोग कसा करतां येईल हें ठरवण्यांत यावें असें त्यांचें म्हणणें आहे. लोणी काढून टाकलेलें दूध, भुइमूग, तांदुळाचा कोंडा हे पदार्थ आज मोठ्या प्रमाणांत वाया जात आहेत. त्यांचा आहारांत उपयोग केला जाईल तर अन्नाच्या पुरवठ्याचा खर्च कमी होऊन लोकांस पौष्टिक आहार मिळूं शकेल. दुधदुभत्याच्या धंद्याचें संघटन अत्यंत असमाधानकारक असून लंडनमध्यें शुद्ध दूध ज्या भावानें मिळतें त्यापेक्षा अधिक किंमत त्यासाठी मुंबईत द्यावी लागते. दुभतीं जनावरें मुंबई शहरांत बाहेरून आणतात, पण तीं भाकड झालीं कीं, कसाईखान्यांत त्यांची रवानगी होते, ह्या गोष्टीकडे लक्ष पुरवलें गेलें पाहिजे, असें डॉ. म्हसकर ह्यांचें म्हणणें आहे. लोणी काढलेलें दूध गुजराथेंत फेकून देण्यांत येतें. फळें, भाज्या वगैरे त्वरित खराब होणाऱ्या खाण्याच्या जिनसांचा ह्याप्रमाणेंच योग्य उपयोग केला जात नाहीं. डॉ. म्हसकर ह्यांनीं ह्या परिस्थितीकडे सरकारचें लक्ष वेधलें आहे, आणि लोकांच्या आहाराचे संबंधांत दिसून येणाऱ्या उणिवा दूर करण्याचे कामीं त्यांनीं जरूर ते प्रयत्न करावे असें म्हटलें आहे. सरकारच्या सहायावांचून लोकांनीं चालवलेल्या संस्थांच्या हातून होणाऱ्या प्रचाराचा व शिक्षणाच्या प्रसाराचा फारसा उपयोग होणार नाहीं असें त्यांचें मत आहे.

जपानमधील आहारविषयक व सरकारी प्रयोगशाळेच्या कार्याची माहिती एका इंग्रजी साप्ताहिकांत नुकतीच प्रसिद्ध झाली आहे ती बोधप्रद झाल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या संस्थेचे मुख्याधिकारी, डॉ. सायकी, ह्यांच्या मतें जपानी लोकांस अत्यंत अल्प खर्चांत आहार मिळण्यासारखा असतो. अज्ञानामुळें, उपलब्ध असलेल्या खाण्यापिण्याच्या जिनसांचा अधिकांत अधिक उपयोग ते करीत नाहींत. त्यांनीं हजारों प्रयोग करून लोकांनीं कोणत्या अन्नाचें सेवन करावें हें ठरवलें असून त्या विषयींची माहिती त्यांच्या संस्थेमार्फत प्रसिद्ध केली जाते. राष्ट्रीय नैसर्गिक साधनांचा काटकसरीनें उपयोग करून जनतेचें आरोग्य सुधारणें हा त्यांच्या प्रयत्नांचा हेतु असून तो पुष्कळ अंशांनीं साध्य होत आहे. डॉ. म्हसकर ह्यांनीं याच दृष्टीनें सूचना केल्या आहेत आणि त्यांचा विचार सरकार आणि सार्वजनिक कार्यकर्ते ह्यांनीं करणें अगत्याचें आहे.

## रिझर्व्ह बँकेचें नफा-तोटा पत्रक

**नफा मोठा झाला, तरी डिव्हिडंड ३½% च कां?**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा ३० जून, १९४१ अखेरचा वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. अहवालाचे वर्षी बँकेस २,७९,२६,४४७ रुपये निवळ नफा झाला. बँकेच्या नफा-तोटा पत्रकावरून तिच्या अवाढव्य कारभाराची कल्पना येईल.

| जमा | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| व्याज, डिस्कौंट, एक्सचेंज, कमिशन इ. | ३,८१,७९,०८१ | १ | ९ |
| | ३,८१,७९,०८१ | १ | ९ |
| **खर्च** | | | |
| नोकरांचा पगार | ३६,३८,६९० | १५ | ० |
| डायरेक्टर व लोकलबोर्डांचे सभासद ह्यांची फी व भत्ता | ९२,११५ | ५ | ६ |
| ऑडिटरांची फी | १२,००० | ० | ० |
| कर, पट्टी, विमा, दिवाबत्ती | ४,३२,२०४ | ० | १ |
| वकिलांची फी, इ. | ५,३५५ | १४ | ९ |
| टपाल व तार खर्च | ९३,२६६ | २ | ४ |
| पैशाची वर्गावर्गी | २०,७३,७५३ | ७ | ९ |
| स्टेशनरी, इ. | १,०३,३६८ | ६ | २ |
| चेक, नोटा, इ. ची छपाई | ५,९५,३४६ | ११ | १० |
| मालमत्तेवर घसारा व दुरुस्ती | ३,५६,९६४ | ११ | ११ |
| एजन्सी खर्च | २५,०५,३४० | १३ | ३ |
| नोकर वर्गाचे फंडांतील बँकेचा वाटा | ७५,४०० | ० | ० |
| इतर खर्च | २,६८,८१७ | ५ | ११ |
| निवळ नफा | २,७९,२६,४४७ | ३ | ३ |
| | ३,८१,७९,०८१ | १ | ९ |

अहवालाचे वर्षी बँकेस एवढा मोठा नफा झाला, त्याचें कारण बँकेच्या जिंदगींत झालेली वाढ, हें होय. चलनाचा विस्तार झाल्या कारणानें नोटांची संख्या वाढली व त्या मानानें बँकेचें देणेंहि वाढलें. त्यास तारण म्हणून बँकेनें सरकारी रोखे ठेवले त्यावर व्याजाचा दर चांगला मिळाला.

रिझर्व्ह बँकेस सुमारें २ कोटि, ८० लक्ष रुपये नफा झाला, तरी भागीदारांस ३½% दरानें फक्त १७½ लक्ष रुपयेच मिळावयाचे आहेत. म्हणजे, एकूण नफ्यापैकीं रुपयांत एक आणा भागीदारांस मिळेल व उरलेले पंधरा आणे म्हणजे २ कोटि, ६१¾ लक्ष रुपये हिंदुस्थान सरकारास मिळतील. बँकेचा वार्षिक खर्च १ कोटि रुपयांच्या आसपास कायम आहे. बँकेनें आतांपर्यंत ३½% दरानें डिव्हिडंड दिलें आहे व तिच्या स्थापनेपासून ३० जून, १९४० अखेर तिनें मध्यवर्ती सरकारास त्याचा नफ्यांतील वाटा म्हणून १½ कोटि रुपये दिले आहेत. चालू वर्षाचा मध्यवर्ती सरकारचा वाटा २ कोटि, ६१¾ लक्ष रुपये होत आहे! रिझर्व्ह बँकेच्या नफ्याची वाटणी कशी करावी, हें बँकेच्या कायद्यांतील ४७ व्या कलमानें सांगितलें आहे. प्रथम भागीदारांस ३½% क्युम्युलेटिव्ह डिव्हिडंड मिळावें व नंतर नफा उरला, तर त्याचा कांहीं अंश डिव्हिडंड देण्याकडे खर्च करावा व उरलेला अंश मध्यवर्ती सरकारास मिळावा, अशी योजना आहे.

रिझर्व्ह फंडाची रकम भांडवलाचे रकमेपेक्षा कमी असेल, तर किमान ५० लक्ष रुपये रिझर्व्ह फंडांत टाकले पाहिजेत. जोंपर्यंत भांडवल ५ कोटि रुपये आहे, तोंपर्यंत डिव्हिडंडसाठीं कोणत्याप्रकारें रकम खर्चावी, हेंहि त्या कलमांत सांगितलें आहे. ४ कोटींवरील रकमेवरील पहिल्या १½ कोटींचा १/३२ वा हिस्सा डिव्हिडंडसाठीं खर्चावा, व नंतरच्या १½ कोटींचा १/४८ वा हिस्सां डिव्हिडंडसाठीं मिळावा, त्यावरील १½ कोटींचा पुनः १/९६ वा हिस्सा मिळावा, अशी ही योजना आहे. ३½% पेक्षां अधिक यावयाचा डिव्हिडंडचा दर ¼ % च्या प्रमाणांतच वाढत गेला पाहिजे. गेल्या वर्षीच्या नफ्यांतून बँकेनें ३½% डिव्हिडंड दिल्यानंतर ४ कोटींपेक्षां अधिक रकम उरत नाहीं. तेव्हां भागीदारांस अधिक डिव्हिडंड मिळणार नाहीं. रिझर्व्ह फंड ५ कोटींचा अगोदरच झालेला असल्याकारणानें त्यांतहि भर पडावयाची नाहीं.

नोटा काढण्याचा व चलनाची व्यवस्था करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारनें रिझर्व्ह बँकेस दिला आहे, त्या कारणानें नोटा काढण्यामुळें होणारा फायदा रिझर्व्ह बँकेच्या पदरांत पडत आहे. ज्या मानानें चलनाचा विस्तार होऊन नोटांची संख्या वाढेल त्या मानानें रिझर्व्ह बँकेचा नफा वाढत जाईल, हें उघड आहे. नोटा काढतांना ठेवावयाचें तारण तितक्या किंमतीचें सोनेंच असावें लागलें असतें, तर अर्थातच ह्या व्यवहारांत नफा उरणें अशक्य झालें असतें. बिगर तारणाच्या अगर अपुऱ्या तारणाच्या नोटांची संख्या ज्या मानानें अधिक असते, त्या मानानें नोटा काढणाऱ्या संस्थेस नफा अधिक होतो. हिंदुस्थान सरकारनें चलनाचें काम रिझर्व्ह बँकेस देऊन आपलें नफ्याचें साधनहि तिला दिलें असलें, तरी डिव्हिडंडच्या वाटणींत सरकारनें स्वतःकडे मोठा हिस्सा राखून ठेवला आहे. पुरेसा रिझर्व्ह फंड व किमान दरानें (३½%) डिव्हिडंडची तरतूद झाली, म्हणजे हिंदुस्थान सरकारास नफ्याचा मोठा हिस्सा मिळावा, अशी कायद्यानें तरतूद केलेली आहे.

## हातमागावर तयार होणारें कापड

### उत्पादनाचा अंदाज

हिंदुस्थानांतील हातमागाचा धंदा सुसंघटित नाहीं; तेव्हां हातमागांवरील कापडाच्या उत्पादनाचा अंदाज कसा करतात, असा प्रश्न उपस्थित होतो. सुताचा गिरण्यांतील उठाव नक्की माहिती पडूं शकतो, तो सोडला म्हणजे उरलेलें सूत हातमागांवर वापरण्यांत येतें व १ पौंड सुतापासून ४ वार कापड निघतें ह्या हिशेबानें हातमागावरील कापडाचें उत्पादन निश्चित केलें जातें. हिंदी गिरण्यांत तयार होऊन हिंदुस्थानांतच राहिलेल्या सुतांत हिंदुस्थानांत आयात होऊन पुनः बाहेर न गेलेलें सूत मिळवलें व त्यांतून हिंदी गिरण्यांत वापरलेलें सूत उणें केलें म्हणजे हातमागांवर वापरलेलें सूत आपणांस कळूं शकतें. १०० पौंड सुतापासून गिरणींत ११२ पौंड वजनाचें कापड निघूं शकतें व त्याची लांबी १ पौंड वजनास ४·७८ वार इतकी साधारणतः भरते. हातमागावर किती कापड तयार होतें ह्याचा अचुक अंदाज करणें अत्यंत अवघड आहे. हातमागांवर फक्त कपाशीच्या सुताचेंच कापड निघत नसल्याकारणानें, केवळ त्या सुताच्या खपावरून एकूण उत्पादनाचा अंदाज करणें बरोबर ठरणार नाहीं. कृत्रिम रेशीम, खरें रेशीम, लोकर, ताग, इत्यादींचा हातमागांवर किती उपयोग केला जातो, तोहि लक्षांत घेतला जाणें जरूर आहे.

# स्फुट विचार

## विमा कंपन्यांचे सरकारी रोख्यांतील पैसे

विमाविषयक नवीन कायद्यानें विशेषतः हिंदी आयुर्विमा कंपन्यांनीं आपले पैसे कसे गुंतवावे ह्यासंबंधीं नियम घालून दिलेले आहेत. हे नियम अत्यंत जाचक असून, त्यामुळें कंपन्यांच्या उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होत आहे, अशी तक्रार सर्वत्र ऐकूं येते. आयुष्याच्या विमा कंपनीस रिझर्व्ह बँकेकडे २ लक्ष रुपये रोख अगर रोख्यांचे स्वरूपांत अनामत ठेवावे लागतात. तसेंच, कंपनीस आपल्या विमेदारांचे क्लेम देण्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेपैकीं बरीच मोठी रकम तिला विमा कायद्याच्या २७ व्या कलमानुसार गुंतवावी लागते. एकूण देण्यांतून वरील अनामत रकम व विमेदारांस पॉलिसीच्या सोड किंमतीचे आंत दिलेल्या कर्जाची रकम ही वजा करून, राहिलेल्या रकमेपैकीं २५% पैसे सरकारी रोख्यांत व ३०% पैसे सरकारी रोख्यांत अगर सरकारनें मान्य केलेल्या रोख्यांत ठेवावे लागतात. कंपन्यांवरील ह्या नियंत्रणामुळें त्यांचे पैसे सुरक्षित रहाण्यास सहाय झालें असलें, तर कमी व्याजाच्या रोख्यांत रकम गुंतल्यामुळें कंपन्यांचें उत्पन्न घटून त्याचा परिणाम त्यांचें बोनसवर व नवीन व्यवहारावर होऊं लागला आहे. विशेषतः नवीन कंपन्यांना कायद्यांतील २७ वें कलम बरेंच जाचक वाटत आहे. ह्या प्रश्नाचा विचार फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या कार्यकारी मंडळानें नुकताच केला व त्यानें ह्यासंबंधांत सरकारकडे गाऱ्हाणें नेण्याचें ठरविलें. सध्याच्या युद्धपरिस्थितींत सरकारी रोख्यांतील सक्तीच्या गुंतवणुकीचें प्रमाण कमी करतां येणें सरकारास अशक्य वाटलें, तरी निदान सरकारमान्य रोख्यांचे बाबतींत तरी सरकारनें नियम थोडा ढिला करावा व सरकारमान्य रोख्यांच्या व्याख्येची मर्यादा विस्तृत करावी, म्हणजे तिचे कक्षेंत सर्व ट्रस्ट रोखे व कंपन्यांच्या मुख्य कचेऱ्यांच्या इमारती येऊं शकतील, असें कमिटीचें मत आहे. कायद्याच्या कलमांत फेरबदल न करण्याचें सरकारचें धोरण असेल, तर निदान ७ व्या कलमान्वयें ठेवलेली अनामत रकम व विमेदारांस दिलेलीं कर्जें ह्यांचा समावेश २३ व्या कलमाखालील गुंतवणुकींत करावा, म्हणजे कंपन्यांवरील बोजा थोडा हलका होईल, असें इंडियन लाइफ इंशुअरन्स असोसिएशनच्या कमिटीनें हिंदुस्थान सरकारचे व्यापार खात्याचे प्रमुख, सर रामस्वामी मुदलियार, ह्यांस सांगितलें. विशेषतः लहान कंपन्यांस ही सवलत अत्यंत फायदेशीर होईल, हें उघड आहे.

## विमा कायद्याखालील कानूंमध्यें दुरुस्ती

हिंदी विमा कायद्याखालील कानूंमध्यें सुधारणा लवकरच करण्यांत येणार आहे व दुरुस्त्यांचा कच्चा खर्डा तयार आहे. सध्याच्या नियमाप्रमाणें मॅनेजिंग डायरेक्टर, मॅनेजर, कायद्याचा सल्लागार, मॅनेजिंग एजंट, विमा एजंट, कोणत्याहि विमा कंपनींतील नोकर इत्यादींस विमेदारांतर्फे डायरेक्टर होतां येत नाहीं. हा नियम नव्या खर्ड्यांतून वगळण्यांत आलेला आहे. एजंटांशीं कंपनीचे करार होत असतात. असा हितसंबंध असलेल्या एजंटांची बोर्डावरील उपस्थिति कंपनीच्या दृष्टीनें हितावह होणार नाहीं; त्याचप्रमाणें प्रतिस्पर्धी कंपन्यांच्या प्रतिनिधींना इतर कंपन्यांचे व्यवहारांत ढवळाढवळ करण्यास संधी मिळणें इष्ट नाहीं असें मत इंडियन इन्शुअरन्स कंपनीज असोसिएशननें व्यक्त केलें आहे. सध्याच्या नियमाप्रमाणें एका कंपनीचा डायरेक्टर दुसऱ्या कंपनीच्या बोर्डावर विमेदारांतर्फे डायरेक्टर निवडून येऊं शकत नाहीं. हा नियम इष्ट असाच आहे व तो रद्द करण्याचें प्रयोजन नाहीं असा बॉंबे शेअरहोल्डर्स असोसिएशनचाहि अभिप्राय आहे. कंपनीच्या मॅनेजरची नेमणूक डायरेक्टर बोर्ड करतें व त्या बोर्डाच्या हुकमतीखालीच त्यानें काम करावयाचें असतें. हाच मॅनेजर विमेदारांतर्फे डायरेक्टर म्हणून निवडून आला तर त्यास डायरेक्टरचा म्हणजे बोर्डावरील इतर सभासदांच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त होईल ही गोष्ट कारभाराच्या दृष्टीनें इष्ट होणार नाहीं. कारण मॅनेजरवरील बोर्डाच्या हुकमतीस त्यामुळें बाध येण्याचा संभव आहे. हीच गोष्ट कायद्याचा सल्लागार, मॅनेजिंग एजंट, इत्यादींस लागू आहे. विमा एजंटांना तर कोणत्याहि कारणानें विमेदारांतर्फे डायरेक्टर होतां येऊं नये असें शेअरहोल्डर्स असोसिएशनचें ठाम मत आहे. विमेदारांतर्फे निवडून यावयाच्या डायरेक्टराचे निवडणुकीचे वेळीं मताचा अधिकार असलेल्या विमेदारांची यादी उमेदवारास मिळण्याची आज तरतूद झालेली नाहीं. ही यादी उमेदवारास कांहीं फी दिल्यानंतर मिळावी अशी नियमांत तरतूद करण्यासंबंधीं असोसिएशननें सूचना केली आहे. विमेदारांतर्फे डायरेक्टर बोर्डावर इष्ट प्रमाणांत प्रतिनिधी असावेत, हें निर्विवाद आहे. परंतु ह्या प्रतिनिधींची निवड योग्य प्रकारें होण्याचें महत्त्व दृष्टीआड करून भागणार नाहीं. मोठ्या विमा कंपन्यांचे सहस्रावधि विमेदार मतदार असणार, त्यांच्या याद्या उमेदवारास तयार करून देणें सोपें काम नाहीं. विमा कंपन्यांवरील कामाचा बोजा निष्कारण वाढूं न देतां त्या कार्यक्षम रीतीनें चालून मुख्यतः विमेदारांचें हितसंरक्षण होईल, अशी व्यवस्था झाली पाहिजे, हें अर्थात् विसरतां कामा नये.

## मुंबईत आनंदाचें दूध

आजच्या अग्रलेखांत दूध, भाजीपाला, फळफळावळ इत्यादि पोषक पदार्थांचा स्वस्त पुरवठा करणें राष्ट्रीय आरोग्याच्या दृष्टीनें किती महत्त्वाचें आहे ह्याचें विवेचन केलें आहे, ह्यासंबंधांत विधायक कार्य कसें करतां येईल ह्याचें उदाहरण, गुजराथेंतील आनंदाच्या टापूंतून मुंबई शहरांत शुद्ध व स्वस्त दूध आणण्याची योजना अमलांत आणण्याची खटपट चालली आहे, तिच्या संबंधांतलें देतां येईल. दुधाच्या पैदाशीचें आनंद हें सुप्रसिद्ध क्षेत्र आहे तें मुंबई शहरापासून १६० मैलांचे अंतरावर आहे. तेथून आगगाडीनें दूध आणून मुंबईच्या जनतेस तें शुद्ध स्थितींत कसें पुरवतां येईल हा प्रश्न शास्त्रीय पद्धतीनें सोडवण्याचे प्रयत्न चालले आहेत. विशिष्ट शास्त्रीय क्रियेनें दुधांतली उष्णता काढून टाकतां येतें आणि कोरड्या बर्फानें तें आच्छादलें असतां तें लांबच्या आगगाडीच्या वहातुकींत उत्कृष्ट रीतीनें टिकतें असें अनुभवास आलें आहे. प्रयोगादाखल कित्येक मण दूध दररोज आनंदहून मुंबईस आणण्यांत येत आहे आणि हा धंदा मोठ्या प्रमाणावर करतां येईल अशी तज्ज्ञांची अपेक्षा आहे. इंग्लंड, अमेरिका, जपान इत्यादि देशांत फळें वगैरे अल्पकाळ टिकणाऱ्या पदार्थांची वहातूक वर निर्दिष्ट केलेल्या पद्धतीनें करून ते दूरदूरच्या बाजारांत उपलब्ध होण्याची व्यवस्था यशस्वी रीतीनें धंदेवाल्यांनीं केली आहे. तिचाच अवलंब आनंदाचें दूध मुंबईस नेण्याच्या योजनेंत

केला जावयाचा आहे. ही योजना मोठ्या प्रमाणांत फायदेशीर झाल्यास फळें, भाजीपाला, ह्यांचे बाबतींतहि ती अंमलांत येऊं शकेल आणि राष्ट्रीय आहाराचा प्रश्न सोडवण्याचे कामीं ती सहायकारक ठरेल.

---

## युद्धाचा गेला आठवडा

थायलंडच्या संबंधांतल्या जपानच्या चढाईच्या धोरणाचा अनिश्चितपणा हा गेल्या आठवड्याचे प्रारंभीं अत्यंत आणीबाणीचा युद्धविषय होता. फ्रेंच इंडोचायना व्हीशी सरकारच्या संमतीनें पूर्णपणें व्यापून झाल्यावर थायलंडमध्यें आपलें वर्चस्व स्थापण्याचा बेत जपाननें केला. पूर्व एशियांत आंतरराष्ट्रीय घडी बसवण्याची जबाबदारी पुढारीपणानें स्वतःच्या शिरावर घेऊन आपली सत्ता विस्तृत करण्याची सध्याची संधि उत्कृष्ट आहे असें जपानी मुत्सद्यांनीं ठरवून थायलंडला अंकित करण्याचा घाट त्यांनीं घातला. थायलंडच्या स्वातंत्र्यावर इंग्लंडचा डोळा असल्यानें जपाननें त्या देशाचें संरक्षण करणें आवश्यक असल्याचा बहाणा करून आपल्या जय्यत फौजा त्या देशाच्या सरहद्दीवर आणून उभ्या केल्या. जपानच्या आक्रमणास तोंड देण्याचें सामर्थ्य थायलंडमध्यें अर्थातच नाहीं; तथापि, आपल्या तटस्थ वृत्तीचें रक्षण करण्याचा निश्चय त्यानें जाहीर केला. चढाईच्या धोरणाचा हेतु इंग्लंडच्या माथीं मारण्याचा प्रयत्न म्हणजे थायलंडमध्यें कांहीं तरी कुरापत काढून जपानी सत्ता तेथें स्थापण्याचा जपानचा डाव होय. इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं थायलंडच्या बाबतींतली स्वतःची भूमिका स्पष्ट केली. जपाननें त्या देशांत आक्रमण केल्यास तो आपल्या महत्त्वाच्या हितसंबंधांवर हल्ला आहे असें आपणांस समजावें लागून ह्या कृत्याचा प्रतिकार करावा लागेल ह्याची त्यांनीं जपानला जाणीव करून दिली. ह्या सूचनेस भीक न घालतां जपानी मुत्सद्दी थायलंडमध्यें आपलें घोडें दामटीत राहिले आणि इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांस येणाऱ्या लढाऊ प्रसंगास तोंड देण्याची तयारी करावी लागली. पश्चिमेकडील युद्धाच्या ज्वाळा ह्याप्रमाणें एशियामध्यें पसरण्याची परिस्थिति निर्माण झाली.

---

## जर्मनी आणि रशिया

रशियावर स्वारी करून लेनिनग्राड, मॉस्को व कीएव्ह हीं महत्त्वाचीं ठिकाणें एक-दोन महिन्यांत सर करण्याचा आणि ह्या रीतीनें बॉल्शेव्हिकांचा बीमोड करण्याचा हिटलरचा बेत ढासळला आहे ह्यांत आतां शंका राहिलेली नाहीं. जर्मन पुढाऱ्यांनीं आपल्या फौजांनीं रशियन मुलखांत केलेल्या पराक्रमाचीं भपकेदार वर्णनें प्रसिद्ध केलीं आहेत. परंतु रशियाच्या बाजूनें येणाऱ्या बातम्यांवरून लेनिनग्राड व स्मॉलेन्स्कच्या जर्मन सैन्यांचें अतोनात नुकसान होऊन त्यांची गति कुंठित झाली आहे हें स्पष्ट दिसतें. प्रत्यक्ष जर्मनीच्या फुशारक्यांवरूनहि हीच गोष्ट सिद्ध होत आहे. रशियांतली मोहीम झटपट पुरी करण्याची आशा आतां हिटलरलाहि सोडून द्यावी लागली आहे. युक्राइनमध्यें जर्मन फौजांचीं थोडीशी प्रगति झाली आहे. पण तेथेंहि शत्रूचीं हाडें खिळखिळीं करण्याचा रशियन सेनानींचा क्रम यशस्वी रीतीनें पार पाडला जात आहे. जर्मनीनें पादाक्रांत केलेल्या देशांतले लोक हिटलरशाहीविरुद्ध उचल खाण्याचा प्रयत्न करीत असल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. त्याचप्रमाणें ब्रिटिश विमानदलाचे जर्मनीच्या औद्योगिक शहरांवर व बंदरांवर प्रत्यहीं हल्ले चालले आहेत, तेहि हिटलरला चांगले जाणवत आहेत. रशियन रणांगणांवर जर्मनीची हानि एवढ्या मोठ्या प्रमाणावर होत आहे कीं सैनिक व लढाऊ सामुग्री ह्यांचा शत्रूस तुटवडा पडण्याचा रंग दिसत आहे. इंग्लंडचें लष्करी सामर्थ्य सारखें वाढत आहे आणि जर्मनीचें घटत आहे. रशियन मोहीम हिटलरच्या अंगलट येण्याची स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. इंग्लंड व अमेरिका ह्यांचें राशियाशीं होणारें वाढतें सहकार्य परिणामकारक झाल्यावांचून रहाणार नाहीं.

---

## ३% १९४१ चे सरकारी रोखे

३% १९४१ चे सरकारी रोखे धारण करणारांस ३% १९४९–५२ ( दुसरें डिफेन्स कर्ज ) अथवा ३% १९६३–६५ ह्यांपैकी कोणत्याहि कर्जांत आपलें येणें वर्ग करण्याची सवलत सरकारनें दिली आहे, तिचा उपयोग १८ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट ह्या मुदतींत त्यांनीं करावयाचा आहे. ह्यांपैकी पहिलें कर्ज १००% व दुसरें कर्ज ९५% ह्या किंमतींत मिळेल. स्टॉक सर्टिफिकेट अथवा प्रॉमिसरी नोट ह्यांपैकी कोणत्याहि स्वरूपांत नवीन रोखे घेतां येतील. ३% १९४१ चे रोखे १९३४ सालीं सरकारनें ४½% १९३४ च्या कर्जाचे बदली दिले होते व १५ सप्टेंबर, १९४१ ही ह्या कर्जाच्या परतफेडीची तारीख आहे. ३% १९४१ च्या रोख्यांत एकूण १० कोटि, ६७¾ लक्ष रुपयांचें कर्ज अंतर्भूत आहे.

---

### गव्हर्मेंट सोप फॅक्टरी, बंगलोर

बंगलोर येथील म्हैसूर सरकारच्या कारखान्याच्या मालकीचें रूपांतर लिमिटेड कंपनीच्या मालकींत करण्यांत येणार आहे व त्यासाठी १२ लाख रुपयांची एक कंपनी स्थापन करण्यांत येईल.

### व्हिक्टोरिया क्रॉस

सेकंड लेफ्टनंट प्रेमेंद्रसिंग भगत ह्यांस व्हिक्टोरिया क्रॉस मिळाल्याचें पूर्वींच जाहीर झालें आहे. शौर्याच्या कृत्यासाठी मिळणारा ब्रिटिश साम्राज्यांतील हा सर्वांत मोठा मान आहे. महाराणी व्हिक्टोरियानें १८५६ सालीं हें पदक देण्यास प्रारंभ केला. आतांपर्यंत १,१०० लोकांना तें पदक मिळालेलें आहे. त्यांपैकी ५८१ पदकें गेल्या महायुद्धांतील पराक्रमाबाबतचीं आहेत. क्रिमिअन युद्धांत सेव्हॅस्टोपूल येथें रशियन सैन्याकडून काबीज केलेल्या तोफांच्या धातूचा व्हिक्टोरिया क्रॉस केलेला असतो.

### म्हैसूर सरकारचे रोखे

नव्या विमाविषयक कायद्याच्या दुसऱ्या कलमांतील तिसऱ्या परिच्छेदांत सांगितलेल्या 'सरकार मान्य' रोख्यांत म्हैसूर सरकारच्या रोख्यांचा समावेश करण्यांत आला आहे, असें हिंदुस्थान सरकारच्या ता. २ ऑगस्टच्या गॅझिटांत प्रसिद्ध झालें आहे.

### इंडिया पेपर पल्प कं. लि.

३१ मार्च, १९४१ अखेरच्या सहामाहींत वरील कंपनीची विक्री २० लक्ष, ३० हजार रुपयांची झाली. निव्वळ नफा १ लक्ष रुपये, ४७ हजार रुपये उरला. डिव्हिडंड ७% देण्यांत आलें. पक्क्या मालाचे किंमतीचे मानानें उत्पादन खर्च वाढला.

### पेट्रोलनें चालणारी आगगाडी

पेट्रोलनें चालणाऱ्या आगगाडीचा प्रयोग गोध्रा–लुनावडा रेल्वे फाट्यावर गुजरात रेल्वेज कंपनी करणार आहे. मोटार वाहतुकीच्या स्पर्धेस तोंड देण्यासाठी ही व्यवस्था आहे.

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

( ले. श्री. वा. चिं. भानु )

**मद्रास कमिटीचा अहवाल:**—मद्रास इलाख्यांतील सहकारी चळवळीचा एकंदर आढावा घेऊन, बाजारभाव मंदीमुळें ढासळत चाललेला तिचा पाया भक्कम कसा करितां येईल या संबंधानें व रिझर्व्ह बँकेनें केलेल्या कांहीं सूचनांचा विचार करून उपाययोजना सुचविणेसाठीं मद्रास सरकारनें १९३८ सालीं एक कमिटी नेमण्याचें जाहीर केलें होतें. त्याप्रमाणें श्री. सुब्रह्मण्यम्, डेप्युटी रजिस्ट्रार यांची स्पेशल नेमणूक करून कमिटीची पूर्वतयारी करण्यांत आली. त्यांनीं सहकारी चळवळीबाबत उपस्थित झालेल्या अनेक निकडीच्या मुद्यांचें एक टांचण तयार केलें व त्यावरून भली दांडगी प्रश्नावली उभारली. सरकारनें ही प्रश्नावली इलाख्यांतील सहकारी चळवळीशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध असणाऱ्या संस्था व व्यक्ती यांचेकडे पाठविली. अशा रीतीनें गेलेल्या ७०० प्रतींतून फक्त १६९ जणांकडून उत्तरें आलीं !

* * *

याप्रमाणें पूर्वतयारी झाल्यावर मद्रास सरकारनें १० फेब्रुवारी १९३९ रोजीं २१ सभासदांची एक कमिटी नेमल्याचें जाहीर केलें. या शिवाय जरूरीप्रमाणें शेतकी व औद्योगिक खात्यांचे डायरेक्टरांनाहि सभासद करून घेण्याचा हक्क कमिटीस दिला. नामदार व्ही. रामदास पंतलू हे कमिटीचे सभासद होते. त्यांनीं इंडियन रिव्ह्यूच्या एका अंकांत सदर कमिटीबद्दल म्हटलें आहे "ही कमिटी तज्ज्ञांची म्हणून म्हणावी तर फारच लहान होती ! मोठी होती अन् ती परिषद समजावी तर फारच लहान ! सरकारला कायदेमंडळांतील सर्व पक्षोपपक्षांचा चांगुलपणा घ्यावयाचा असल्यानें ज्या हेतूनें ही चौकशी व्हावयाची होती तिकडे लक्ष न देतां सर्वांना संतोष देतील असे प्रतिनिधी नेमण्याकडेच सरकारचें धोरण होतें !" अर्थात् यामुळें माहितगारापेक्षां जातवारी मतवारी वगैरेंचाच भरणा कमिटींत फार होता, असा कोणी निष्कर्ष काढल्यास तो फारसा चूक ठरणार नाहीं !

* * *

कमिटीनें ठिकठिकाणीं हिंडून प्रत्यक्ष माहिती उपलब्ध करून घेण्याची किंवा निरीक्षण करण्याची यातायात घेतलेली नाहीं. तोंडी जबान्या व त्यावर उलटतपासणीच्या किचकट पण छाननीच्या महत्वाचे अंगाचाहि उपसर्ग कमिटीला लागलेला नाहीं. सरकारी खात्याचे एकदोन वरिष्ठ अंमलदार वगळल्यास तोंडीं साक्षी व पुरावे कमिटीनें घेतलेले नाहींत. प्रश्नावलीस लेखी आलेल्या उत्तरांवरच कमिटीची सारी मदार आहे. त्यामुळें लेखी जबान्या फेरतपासणीच्या माऱ्यापुढें कितपत टिकल्या असत्या याबद्दल कमिटीच्या कांहीं सभासदांनींच शंका प्रगट केली आहे. त्यांनीं भिन्नमतपत्रिका जोडल्या आहेतच. या परिस्थितीमुळें वस्तुस्थितीपेक्षां तात्त्विक दृष्टीनेंच कमिटीचा उहापोह अधिक झालेला आहे असें मत श्री. वैकुंठराय मेथा यांना वाटें लागलें आहे !

* * *

कमिटीचा रिपोर्ट ३४९ भरगच्च पृष्ठांचा आहे व त्याला ९ सभासदांनीं ५६ पृष्ठांची स्वतंत्र मतभिन्नता दाखविणारे रिपोर्ट पुस्ती म्हणून जोडले आहेत. एकमतानें लिहिलेल्या रिपोर्टांत ज्या शिफारसी केल्या आहेत त्यांची संख्या ३४० आहे. म्हणजे सरसकट पाहिल्यास दरेक पृष्ठांत निदान एक तरी शिफारसवजा सूचना पडते. यानंतर रिपोर्टाला ५ परिशिष्टें जोडण्यांत आलेलीं आहेत त्यांत इतर माहितीबरोबर कमिटीनें सादर केलेली अधिकृत प्रश्नावलीहि दिलेली आहे. एकूण १६५ प्रश्न दाखल आहेत; व त्या प्रश्नांवर आलेल्या उत्तरांचें मंथन करून कमिटीनें जो निष्कर्ष काढला आहे तोच कमिटीचा रिपोर्ट होय.

* * *

या कमिटीच्या रिपोर्टावर गुणदोष दाखविणारे लेख प्रसिद्ध झाले आहेत व होतहि आहेत. कमिटींतल्या सभासदांची संख्या बरीच मोठी असल्यानें सर्वांची एकवाक्यता होऊन निर्णयात्मक निकाल घेण्यास बरीच अडचण येत होती, व त्यामुळेंच हा रिपोर्ट तयार होण्यास बराच कालावधि लागला असला पाहिजे. "हा रिपोर्ट यद्यपि मद्रास इलाख्याच्या गरजांच्या दृष्टीनें तयार झाला असला तरी इतर प्रांतांनाहि त्यामधून घेण्याजोग्या बऱ्याच गोष्टी आहेत" असें संयुक्त प्रांताचे आसिस्टंट रजिस्ट्रार यांनीं आपलें अधिकृत मत प्रकट केलें आहे तेंहि विचारप्रवर्तकच आहे यांत बिलकूल शंका नाहीं.

* * *

पुढील लेखांकांत कमिटीनें केलेल्या ३४० सूचनांपैकीं महत्त्वाच्या बाबी निर्देश करण्याचें ठरवून आज येथेंच थांबणें बरें.

---

### लष्करी बाणा

"मुलानें हिंदी लष्करांत दाखल होण्यास आई-बापांचा विरोध असतो, असें उमेदवारांस प्रश्न विचारले असतां आढळून येतें. मध्यम वर्गांतील तरुणांना लष्करी नोकरी नवीन असल्या कारणानें व दीर्घकाल त्यांचा लष्कराशीं संबंधच न आल्यामुळें असें होणें अस्वाभाविक नाहीं. ही अडचण दूर होण्यास अनेक वर्षें लागतील. सैन्यांतील नोकरी तरुणांस पसंत पडत नाहीं व व्हाइसरॉयांचें कमिशन हें त्यांस आपल्या दर्जास न शोभणारें वाटतें"—अलाहाबाद मध्यवर्ती रिक्रूटिंग बोर्डाचे अध्यक्ष, सर डिग्बी ड्रेक-ब्रॉकमन ह्यांचे उद्गार.

### अमेरिकन रोख्यांचा तारण म्हणून उपयोग

ग्रेटब्रिटननें अमेरिकेकडून प्रचंड कर्ज घेतलें आहे, त्यास तारण म्हणून ग्रेटब्रिटननें अमेरिकेचे स्वाधीन ब्रिटिशांनीं धारण केलेले अमेरिकन रोखे करावयाचे आहेत. लोकांनीं ब्रिटिश सरकारास कोणते अमेरिकन रोखे द्यावयाचे, ह्याची यादी ब्रिटिश सरकारनें प्रसिद्ध केली आहे. रोखे घेतेवेळीं सरकार त्याबद्दल पावती देईल. रोख्यांचें तारण म्हणून काम संपतांच, ज्याचे त्यास रोखे परत केले जातील. सरकारनें ते विकत घेण्याचें ठरविलें तर अथवा अमेरिकेचें कर्ज ठरल्याप्रमाणें फिटलें नाहीं, तर रोख्यांच्या मालकास त्यांची किंमत चालू बाजारभावानें पौंडांत दिली जाईल. तोपर्यंत, रोख्यांवरील डिव्हिडंड वगैरे मालकांस बक्कशीर पोचतें केलें जाईल, तेंहि पौंडामध्येंच.

### हैद्राबाद संस्थानांत विजेचा प्रसार

विजेच्या उत्पादनाच्या मोठ्या योजना हैद्राबाद संस्थाननें आखल्या आहेत. ह्या दहा योजनांस ६५ कोटि रुपये खर्च येईल. ह्या योजना पुऱ्या झाल्या, म्हणजे हैद्राबाद संस्थान विजेच्या पुरवठ्याचे बाबतींत म्हैसूरच्याहि पुढें जाईल. लहानमोठ्या उद्योगधंद्यांस स्वस्त वीज मिळाली, म्हणजे त्यांच्या उत्कर्षास सहाय होईल. प्रस्तुत योजनामुळें २६ लक्ष एकर जमिनीस पाणीपुरवठाहि होणार आहे.

## लोकसंख्या वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न

### जपान आपली लोकसंख्या १० कोटींवर नेणार

१९२० सालीं जपानमध्यें जननाचें प्रमाण दर हजारीं ३६ होतें, तें १९३६ सालीं दर हजारीं ३० झालें व १९३८ सालीं तें २८ वर आलें. जपानमधील मृत्यूचें प्रमाणहि उतरत चाललें आहे. १९१८ सालीं तें दर हजारीं २७ होतें. १९३७ सालीं तें १७ पर्यंत उतरलें. म्हणजे, मृत्यूच्या उतरत्या प्रमाणाबरोबर जननाचें प्रमाण कमी होत चाललें असलें, तरी लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण कायम राहिलें आहे. इटलीमध्यें जननाचें प्रमाण २३, जर्मनींत १९, अमेरिकेंत १७, व फ्रान्स आणि इंग्लंडमध्यें १५ आहे. म्हणजे ह्या सर्व पाश्चात्य देशांपेक्षा जपानमध्यें जननाचें प्रमाण मोठें आहे. चीनमध्यें व रशियांत तें ४० व हिंदुस्थानांत ४१ आहे. चीन, रशिया व हिंदुस्थान ह्या देशांतील प्रचंड लोकसंख्या लक्षांत घेतली म्हणजे जननाच्या मोठ्या प्रमाणाच्या परिणामाची चांगली कल्पना येते.

जपानमधील मृत्यूचें प्रमाण पाश्चात्य देशांतील मृत्यूंच्या प्रमाणापेक्षा भारी आहे. ह्याचें कारण बालमृत्यू व क्षयरोग हें आहे. बालमृत्यूंचें प्रमाण उतरत चाललें आहे. जपान व चीन ह्यांचेमधील लढ्यामध्यें अनेक जपानी सैनिक गुंतलेले असल्यामुळें जननाची संख्या कमी झाली आहे व मृत्यूंची संख्या वाढली आहे. सहाजींकच लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण उतरलें आहे. जपानची आजची लोकसंख्या ७ कोटि, २० लक्ष आहे. ती १९६० चे आंत १० कोटींवर नेण्याचा त्या देशानें निश्चय केला आहे. लोकांची शारीरिक व मानसिक उन्नति करण्याचाहि प्रयत्न केला जाणार आहे.

जननाचें प्रमाण वाढविण्यासाठी, लोकांस लवकर विवाह करण्यास प्रवृत्त करण्यांत येईल व प्रत्येक दांपत्यास पांच तरी अपत्यें असावींत असा प्रचार केला जाईल. सध्या, सर्वसाधारणपणें, जपानी पुरुषाचा २८ व्या वर्षी व जपानी स्त्रीचा २४ व्या वर्षी विवाह होतो. १९२० सालीं हींच वयें अनुक्रमें २६½ व २३½ अशीं होतीं. लोकांना ह्याहिपेक्षा कमी वयांत विवाह करावयास उद्युक्त करण्याकरितां विवाह फंड, कौटुंबिक रहाणीस प्रोत्साहन, बाळंतिणींची शुश्रुषा, २० वर्षांवरील स्त्रियांस नोकरी देण्यास प्रतिबंध, संततिनियमनाचें नियंत्रण, बहुसंख्य अपत्यें असणाऱ्या दांपत्यांस मदत, विवाह घडवून आणण्यासाठी पद्धतशीर योजना, इत्यादि उपायांची योजना करण्यांत येत आहे. बालमृत्यूंचा प्रतिबंध व्हावा, क्षयरोगाचें उच्चाटन व्हावें, लोकांस सकस अन्न मिळावें, इत्यादिसाठींहि प्रयत्न केले जातील. जपानच्या एकूण लोकसंख्येपैकीं ४०% संख्या जपान-मँच्युक्युओ व चीन येथें शेतीमध्यें गुंतली पाहिजे, अशी जपानची खटपट आहे. लोकसंख्येच्या वाढीकरितां प्रयत्न कोणत्या मार्गांनीं चालू ठेवले पाहिजेत, ह्यासंबंधीं शास्त्रीय संशोधन करण्याकरितां व माहिती जमा करण्यासाठी केंद्रेंहि स्थापन केलीं जातील.

### युद्धकाळांत विवाहांची संख्या वाढली

१९४० सालीं इंग्लंड व वेल्समध्यें मिळून ४,६८,२३७ विवाह झाले. १९३९ सालांतील विवाहांचे संख्येपेक्षां ही संख्या २८,५७३ नीं मोठी आहे.

## महाड को. अर्बन बँक लि., महाड

### वार्षिक सभा : २४-८-४१

वरील बँकेच्या समासदांची संख्या २६१ आहे. अहवालाचे वर्षी तिचें भाग भांडवल २,६७५ रुपयांनीं वाढून तें सुमारें २५ हजार रुपये झालें. बँकेकडील ठेवींतहि ८० हजारांची भर पडली आहे, व ठेवींची रकम १४३ हजारांवर गेली आहे. इतर फंडांत मिळून १,२७५ रुपये आहेत. बँकेच्या पैशापैकी १ लक्ष ३३½ हजार रुपये रोख व इतर बँकांत आहेत व ३२ हजार रुपये सरकारी रोख्यांत आहेत. कॅश क्रेडिट खातें व कर्ज खातें ह्यांतील येण्यांची रकम अनुक्रमें २,५०३ व ८,०९९ रुपये आहे. म्हणजे बँकेच्या पैशाचा अत्यंत मोठा भाग तरता व सुरक्षित आहे आणि दिलेल्या कर्जाऊ रकमेचा आकडा अगदी लहान आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ३,५१६ रुपये नफा झाला, त्यांत गेल्या सालचा शिल्लक नफा मिळवला, म्हणजे ३,५३६ रुपये होतात, त्यांतून भागिदारांस ५% दरानें डिव्हिडंड देण्यास १,१८० रुपये लागतील. रिझर्व्ह फंडांत ८८० रुपये, सिक्युरिटीज डिप्रिसिएशन फंडांत २५० रुपये, डिव्हिडंड ई. फंडांत २५० रुपये व बॅडडेट रिझर्व्ह फंडांत २५० रुपये टाकावेत, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. बँकेची परिस्थिति समाधानकारक आहे. श्री. द. ना. वैद्य, बी. ए., एलएल. बी. हे बँकेचे चेअरमन असून श्री. वी. गो. मेहता, बी. ए., एलएल. बी. हे ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. बँकेचा कारभार अत्यंत काटकसरीनें चालविला जात असल्याचें दिसतें.

### इन्शुअरन्स अडव्हायसरी कमिटी

१९३८ च्या विमाविषयक कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित रीतीनें व्हावी, ह्या दृष्टीनें सरकारला त्यासंबंधांत सल्ला देण्याकरितां वरील नांवाची एक समिति स्थापन करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. समितीची सभा प्रत्येक सहामाहींत एकदा तरी भरेल. समितीची घटना खालीलप्रमाणें आहे:—

अध्यक्ष व उपाध्यक्ष:—सरकारनें नेमलेले.

तीन सभासद :—इंडियन लाईफ अॅशुअरन्स ऑफिसेस असोसिएशन, मुंबई; इंडियन इं. कंपनीज असोसिएशन मुंबई व फेडरेशन ऑफ इं. कंपनीज, दिल्ली, ह्यांनीं प्रत्येकीं निवडलेला एक प्रतिनिधि.

एक सभासद:—असोसिएशन ऑफ लाइफ ऑफिसेस इन इंडिया, कलकत्ता व कलकत्ता इं. असोसिएशन, कलकत्ता, ह्यांनीं मिळून यावयाचा एक प्रतिनिधि

एक सभासद:—प्रॉव्हिडंट इं. कं. असोसिएशन, मुंबई व प्रॉ. इं. कं. असोसिएशन, कलकत्ता, ह्यांनीं मिळून यावयाचा एक प्रतिनिधि.

तीन सभासद:—ज्या हितसंबंधांचे प्रतिनिधी समितीवर आलेले नाहींत, अशांचे तीन प्रतिनिधि सरकार नेमणार.

प्रत्येक सभासद समितीवर दोन वर्षें राहील. हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी खात्याचे प्रमुख व इन्शुअन्स सुपरिंटेंडेंट हे अनुक्रमे समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून काम करतील.

## गिरणी कामगारांस महागाई भत्ता

महागाईत एकाएकी वाढ झाल्या कारणानें मुंबई शहरांतील गिरणी कामगारांच्या रहाणीचा खर्चहि वाढला आहे. मुंबईच्या गिरणी मालक संघानें सरकारशीं विचारविनिमय करून कामगारांचें वेतन वाढविण्याचें ठरविलें आहे व महागाई भत्त्याच्या रकमेचें महागाईच्या तीव्रतेशीं प्रमाण बसवून दिलें आहे. १ डिसेंबर, १९३९ पासून कामगारांस कांहीं विशिष्ट पद्धतीनें रोजीं दोन आणे महागाई भत्ता मिळत आहे. जून, १९३४ अखेर संपलेल्या वर्षांतील रहाणीच्या खर्चाचें मान १०० असें धरून, त्याचेशीं तुलना करणारे आकडे दरमहा प्रसिद्ध केले जातात. रहाणीच्या खर्चाचें मान १०५ ते १२३ ह्यांचेमध्यें राहिलें, तर त्यांस वरील भत्ता मिळावा, अशी ती योजना आहे. रहाणीच्या खर्चाचें मान १२३ च्यावर गेल्यानंतर तीन महिन्यांनीं भत्त्याच्या रकमेसंबंधीं फेरविचार व्हावा, असें ठरलें होतें, परंतु ह्या तीन महिन्यांची वाट न पहातां १२४ ते १४३ ह्यांचे दरम्यान रहाणीचें मान जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत कामगारांस खालील तक्त्याप्रमाणें महागाई भत्ता मिळावा, असें आतां ठरलें आहे, कारण रहाणीच्या खर्चाच्या मानाचा आकडा आतां १२६ वर गेला आहे व महागाई आणखी वाढण्याचा संभव आहे.

| रहाणीचा खर्च (इंडेक्स नंबर) | दरमहाचा महागाई भत्ता रु. | आ. | पै |
|---|---|---|---|
| १२४ | ४ | ८ | ० |
| १२५ | ४ | १२ | ० |
| १२६ | ५ | ० | ० |
| १२७ | ५ | ३ | ० |
| १२८ | ५ | ७ | ० |

ह्याप्रमाणें महागाई भत्ता वाढत जाऊन १४३ ह्या इंडेक्स नंबराचे वेळीं तो ९ रुपये होईल. ह्या भत्त्यामुळें वाढत्या महर्गतेची झळ कामगारांस लागणार नाहीं, अशी अपेक्षा आहे. महागाई भत्त्यामुळें कपासकापडाच्या गिरण्यांचा मजुरीचा खर्च येत्या बारा महिन्यांत १½ ते २ कोटि रुपयांनीं वाढणार आहे. कामगार कायम असो अथवा हंगामी असो, त्यास महागाई भत्ता मिळणार आहे. कपास कापडाच्या गिरणी मालकांचा कित्ता इतर उद्योगधंद्यांतील मालक लोकांनींहि गिरवावा, अशी सरकारची सूचना आहे. महागाई भत्त्याची योजना वेळींच जाहीर करण्यांत गिरणी मालक संघानें औचित्य दाखवलें आहे.

### आगपेटीची किरकोळ विक्रीची किंमत

आगपेट्यांवरील जकातीच्या वसुलीचे सोईसाठी सध्यां ४०, ६० अथवा ८० काड्या पेट्यांतून भरल्या जातात. परंतु जकातीच्या दरांतील बदलामुळें आगपेट्या थोड्या महागल्या तरी त्यांचा किरकोळ विक्रीचा दर एकदम चढतो. एका पेटीस एक पैसा पूर्वी पडत असे, त्याचेऐवजीं आतां दोन पैसे पडतात, परंतु ही वाढ जकातीच्या मानानें भरमसाट आहे. ४० ते ६० काड्या असलेल्या पेट्यांस ४० काड्यांवाल्या पेटीइतकी जकात भरावी लागते व ६१ ते ८० काड्या असलेल्या पेट्यांस ८० काड्यांवाल्या पेटीइतकी जकात द्यावी लागते. ५० काड्यांवाल्या पेट्या ह्यापुढें तयार केल्या जातील, परंतु तोंपर्यंत ग्रोसास २ रु. ८ आ. ह्या दरानेंच एक्साइजच्या पट्टीची आकारणी होईल, असें सरकारनें जाहीर केलें आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबओी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबओी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,८८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,९४,०३५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | प्रो. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. वो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१५,५०,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), वांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाईव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; मि. आर. एल. फेराई.

### करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १११—८ |
| ४% १९४३ | १०४—० |
| ३½% बिनमुदत | ९६—० |
| ३½% १९४७–५० | १०३—२ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९५—३ |
| २¾% १९४८–५२ | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हेसूर कर्ज ( १९५३–६३) | ११५—० |
| ५% म्हेसूर कर्ज ( १९५५ ) | १२६—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११४—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% | ४७–१२ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १५६७—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०६—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% | १४०—० |
| कराची ( १०० ) ९% | २१५–१० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १६९५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १७१७—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% | ७२—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८९०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६५६—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २३५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४७–१२ |
| शिंया स्टीम ( १५ ) १ रु. | २१–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ४६–१४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४१९५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | १५५—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | २२१–१४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३९८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १४३ रु.१४ आ.७ पै. | २१०७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १५३—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२—०—९ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६२–१२–६ |


**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें**
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
४ सहकार : किं. २ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
**OUR HOME**
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
**उतरण्यास या.**
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें

संग्रह करा

कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट

पाचकवटी, पंचकोलासव

तसेंच

पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी

—: रक्तवर्धक :—

सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान–गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें


आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व नम्नेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




मधुमेहावरील

औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदाजवळ, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अतीस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
व्हाईट टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स अ‍ॅकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख २० ऑगस्ट, १९४१ | अंक ३४

अर्थ ग्रन्थमाला–पुस्तक ४ थें

## सहकार

## हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

★

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

**(1)** We stock and supply Educational books, General books & Library books.

**(2)** We supply Government of Bombay and Government of India publications.

**(3)** We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

**(4)** We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### बी. बी. अँड सी. आय. रेल्वे

१ जानेवारी, १९४२ नंतर बी. बी. अँड सी. आय. रेल्वे-विरुद्ध दावे करावयाचे असतील, ते गव्हर्नर जनरल इन कौन्सिलच्या नांवानें लावावे, रेल्वे कंपनीच्या नांवानें नाहीं, असें जाहीर करण्यांत आलें आहे.

### पाऱ्याचे आयातीवर नियंत्रण

पाऱ्याचे आयातीवर नियंत्रण घालण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे, त्याचा उद्देश अमेरिकन डॉलर हुंडणावळीची बचत, हा आहे.

### अमेरिकन कपाशीच्या उत्पादनाचा अंदाज

| ऑगस्ट | गाठी | दर एकरी उत्पन्न |
|---|---|---|
| १९४० | १,०८,१७,००० | २२२·३ पौंड |
| १९४१ | १,२४,२९,००० | २२४·४ पौंड |

### फॅक्टरी ॲक्ट

फॅक्टरी ॲक्टाच्या कक्षेंत सध्या न येणाऱ्या कांहीं जागांस फॅक्टरी ॲक्ट लागू करण्याचा प्रांतिक सरकारांस अधिकार देणारी दुरुस्ती त्या कायद्यांत करण्यांत येणार आहे.

### वॅगन्स

१९४०–४१ मध्यें एकूण ७५ लक्ष, ८९ हजार वॅगन्सभर मालाची हिंदी सरकारी रेल्वेजनीं वहातूक केली. १९३७–३८, १९३८–३९ व १९३९–४० चा तत्सम आकडा ७१ लक्ष, ६० हजार वॅगन्स, ७२ लक्ष, २४ हजार वॅगन्स व ७५ लक्ष, १० हजार वॅगन्स असा आहे.

### पोलिश कैद्यांची मुक्तता

रशियाचे हद्दींत कोणत्याहि कारणानें तुरुंगांत असलेल्या सर्व पोलिश लोकांची रशियन सरकारनें मुक्तता केली आहे.

### मुंबई टेलिफोन कं.

गव्हर्मेंट टेलिफोन बोर्ड लि. नें बाँबे टेलिफोन कं. लि. चे सर्व भाग घेण्यास त्या कंपनीच्या जेवढ्या भागीदारांची संमति मिळावयास पाहिजे होती, तेवढ्यांची मिळाली असल्याकारणानें, मुंबईची टेलिफोन कंपनी आतां सरकारी व्यवस्थेखालीं चालणार आहे.

### उद्योगधंद्यांच्या वाढीस वाव

"हिंदुस्थानांत उद्योगधंद्यांच्या वाढीस पुष्कळ वाव आहे. भांडवलवाल्यांनीं कामगारांस नीट वागवलें पाहिजे. कामगारांनीं आपल्या वेतनाचा पुरा मोबदला दिला पाहिजे. भांडवलाचा ओघ आटणार नाहीं ह्या बेतानें सरकारनें कामगारांकडे सहानुभूतिपूर्वक लक्ष पुरवलें पाहिजे. केवळ उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टीनें त्यानें उद्योगधंद्यांवर करभार टाकतां कामा नये. सबंद जगभर पसरलेली भांडवलशाही, वरील अटी पाळल्या गेल्या तर हिंदुस्थानांत फायदेशीर झाल्याविना रहाणार नाहीं." व्हाइसरॉयांच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे नवे सभासद, सर होमी मोदी, ह्यांचें भाषण.

### सिंधमध्यें टोळधाड

दादु जिल्ह्यांत टोळधाड आली आहे, ती आणखी पसरूं नये, अशी व्यवस्था सिंध सरकार करीत आहे.

### जपानमधील हिन्दी नागरिक

जपानमधील ३०० हिन्दी नागरिकांस सुरक्षित परत आणविण्याची सरकारनें व्यवस्था करावी, अशी एक तार मुंबईच्या सिल्क मर्चंट्स असोसिएशनच्या अध्यक्षांनीं हिंदुस्थान सरकारकडे पाठविली आहे.

### बंगालमधील हिंदु-मुसलमानांचें प्रमाण

बंगालमधील एकूण लोकसंख्येशी मुसलमानांचें प्रमाण ५४·८% पडतें. हें प्रमाण १९३१ सालच्या प्रमाणाइतकेंच आहे. हिंदूंचें प्रमाणहि कायम राहिलें आहे.

### त्रावणकोरमध्यें स्टँडर्ड टाइम

त्रावणकोरमधील सर्व घड्याळें १६ ऑगस्टच्या मध्यरात्रीं २३ मिनिटें पुढें करण्यांत आलीं. म्हणजे, आतां त्रावणकोरमध्यें स्टँडर्ड टाइमला प्रारंभ झाला.

### पॉवर अल्कोहोल

पॉवर अल्कोहोलच्या उत्पादनास सरकारनें परवाने द्यावे व पेट्रोलमध्यें तें पेट्रोल मिसळण्याची सक्ती करावी असा ठराव इंडियन शुगर मिल्स असोसिएशनच्या वार्षिक सभेनें नुकताच मंजूर केला. पेट्रोलच्या खपावरील नियंत्रणामुळें ही गोष्ट तातडीनें करणें आवश्यक झालें आहे.

### मद्रास युद्धफंड

मद्रास प्रांताच्या युद्धफंडाचा आकडा १ कोटि, ३६ लक्ष रुपये झाला आहे.

### भद्रावती आयर्न वर्क्स

भद्रावती आयर्न वर्क्सकरितां म्हैसूर सरकारनें इंग्लंडमध्यें यंत्रसामुग्री नुकतीच खरेदी केली, तिची किंमत सुमारें २५ लक्ष रुपये भरेल. युद्धास लागणाऱ्या पोलादाचे उत्पादनासाठीं ही यंत्रसामुग्री लागणार असल्यामुळें तिला वहातुकीचे बाबतींत प्राधान्य मिळणार आहे.

### कॅनडाचा युद्धखर्च

कॅनडाचा रोजचा युद्धखर्च ४½ ते ६ कोटि रुपयांचा आहे. जुलैमध्यें कॅनडाचा युद्धखर्च १६० कोटि रुपये झाला.

### विजेचें उत्पादन

निजामसागर धरणांतील पाण्याच्या साठ्याचा उपयोग विजेच्या उत्पादनाकडे करण्याचें निजाम सरकारनें ठरविलें आहे. ह्या योजनेस ५० लक्ष रुपये खर्च येईल. सध्याचा विद्युत्पुरवठा वाढत्या मागणीस पुरेसा पडणारा नाहीं.

### पेट्रोलची बचत

आठ सिलिंडर्सच्या मोटारीचें चार सिलिंडर्सच्या मोटारींत रूपांतर केल्यास पेट्रोलची बरीच बचत होईल. हें रूपांतर करण्यांत सुमारें २०० रुपये खर्च येतो.

### बाजारभावाचें नियंत्रण

देशांतील वाढती महागाई लक्षांत घेतां, बाजारभावाच्या नियंत्रणाचा पुनः विचार करण्याची वेळ आलेली आहे. त्याकरितां प्राईस कंट्रोल कॉन्फरन्स शक्य तितक्या लवकर भरविण्यांत येईल, असें समजतें.

### युद्धाच्या धोक्याचा विमा

मालाच्या, युद्धाच्या धोक्याच्या विम्याचे हप्ते गोळा करण्यांत आले त्यांची रकम ऑक्टोबर १९४० ते मार्च १९४१ ह्या सहा महिन्यांत ३० लक्ष, ३१ हजार रुपये भरली.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३९८ | ह्यांची घोषणा—हस्त-व्यवसायास नवी संधी—ग्रेट ब्रिटन कर्ज कसें फेडणार | |
| २ हिंदी बँकिंग ... | ३९९ | ६ जपान ... | ४०३ |
| ३ नोटा व नाणीं ... | ४०० | ७ सहकारी बँकांचे अहवाल ... | ४०४ |
| ४ इंपीरिअल बँकेचें नफातोटापत्रक ... | ४०० | ८ कमर्शिअल बँक लि० | ४०५ |
| ५ स्फुट विचार ... | ४०१ | ९ निवडक बाजारभाव ... | ४०६ |
| व्हीशी सरकार हिटलर-शाहीस शरण—प्रेसिडेंट रुझवेल्ट व मि. चर्चिल | | | |



# अर्थ

बुधवार, ता. २० ऑगस्ट, १९४१


## हिंदी बँकिंग

### सर जेम्स टेलर ह्यांनीं घेतलेला आढावा

रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं त्या बँकेचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, ह्यांनीं १९४०–४१ सालांत हिंदी बँकिंगच्या परिस्थितींत झालेल्या घडामोडींचें सिंहावलोकन केलें. चवदा महिन्यांमागें युद्धपरिस्थिति बिघडल्यासारखें झालें होतें तेव्हां हिंदी बँकांवर त्यांनीं स्वीकारलेल्या ठेवींस एकदम मागणी उत्पन्न होऊन संकट येतें कीं काय अशी भीति वाटली होती. रोकड रुपयांस चोहोंकडे मागणी येऊन चलनी नोटा मोडण्याकडे लोकांची प्रवृत्ति वाढली होती. त्यावेळीं व्यवहारास जरूर नसलेलें नाणें लोकांनीं भीतीमुळें उगाच संग्रहीं ठेवूं नये ह्यासाठी सरकारनें तातडीचे व परिणामकारक उपाय योजले आणि सरकारी सेव्हिंग्ज बँका व कॅश सर्टिफिकिटें ह्यांच्या बाबत जादा रोकडीची तरतूद करावी लागली तरी बँकांस ह्या संबंधांत विशेष अडचण भासली नाहीं. युद्धपरिस्थिति सुधारतांच जनतेनें तात्पुरता काढून घेतलेला पैसा पुन्हां जाग्यावर परत आला. बँकांनीं आपला पैसा तरता ठेवण्याची खबरदारी दूरदर्शीपणानें घेतली असल्याबद्दल सर जेम्स ह्यांनीं त्यांचें अभिनंदन केलें आहे. रोकड व तरता पैसा युद्धपरिस्थितीच्या अडचणींस अनुलक्षून बँकांस नेहमींपेक्षा अधिक मोठ्या प्रमाणावर ठेवावा लागला तरी एकंदरीनें त्यांस बरा नफा झाला असल्याविषयीं समाधान व्यक्त केलें आहे. बँकांच्या सुस्थितीचें लक्षण म्हणून, त्यांच्या शाखांच्या संख्येंत १९३५ नंतर ७२३ पासून १,४०४ पर्यंत वाढ झाली आहे ह्या गोष्टीचा त्यांनीं आपल्या भाषणांत उल्लेख केला.

हिंदी बँकिंगच्या प्रगतीविषयीं उत्तेजनकारक उद्गार काढून सर जेम्स ह्यांनीं त्यांच्या बाबतींतल्या कांहीं ठळक वैगुण्यांचा निर्देश केला आहे. रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या (शेड्यूल्ड) बँकांनीं त्यांच्या जवळील ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत त्या मध्यवर्ती संस्थेपाशीं रोकड ठेवली पाहिजे असा कायद्याचा दंडक आहे आणि तो नियम मोडणाऱ्या संस्थेस त्यास अनुसरून दंड भरावा लागतो. हें नियंत्रण अपुरें असल्याचें अनुभवावरून दिसून आल्यानें त्याचा स्क्रू आवळण्यासाठीं सरकारनें कडक उपाय योजल्यामुळें त्या संबंधांतली स्थिति आतां सुधारली असल्याचा निर्वाळा सर जेम्स टेलर ह्यांनीं दिला आहे. तरीहि अपुरी रोकड शिल्लक बाळगणाऱ्या कित्येक बँका असल्याचें त्यांनीं सांगितलें. भागांचें भांडवल व रिझर्व्ह मिळून पाच लाख किमान रकम असणारी बँक शेड्यूल्ड बँकांच्या यादींत नमूद केली जाण्यास पात्र होते. तथापि, हें भांडवल खरेखुरें नसून कागदी मेळ कसाबसा घालून कांहीं बँका तें दिखाऊ पद्धतीनें उभें करीत असल्याचें दृष्टोत्पत्तीस आल्यावरून सरकारनें त्या बाबतींत विशेष छाननी करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेस दिला आहे. शेड्यूल्ड बँकांचे यादींत आपलें नांव घालावें म्हणून कित्येक बँकांनीं केलेले अर्ज ह्या छाननीच्या कसोटीस उतरलेले नाहींत आणि ते नामंजूर करण्यांत आले आहेत. कांहीं बँकांत वरील प्रकरणीं लटपटीचे कागदी व्यवहार आढळून आल्यानें शेड्यूल्ड बँकांच्या पटावर ज्यांचीं नांवें आहेत अशा बँकांच्या व्यवहारांचीहि तपासणी व्हावी आणि त्यांत दोष दिसल्यास आणि त्यांनीं जरूर त्या त्रुटी समाधानकारक रीतीनें पुऱ्या केलेल्या नाहींत असें सिद्ध झाल्यास त्यांचीं नांवें पटावरून दूर करावीं असेंहि सरकारनें ठरवलें आहे. पद्धतशीर व चोख व्यवहाराच्या सीमेवर असलेल्या असमाधानकारक व्यवस्थेच्या बँका असल्या उपायांमुळें वगळल्या जाऊन हिंदी बँकिंगचा दर्जा उच्च राहण्यास सहाय होईल अशी आशा सर जेम्स ह्यांनीं व्यक्त केली आहे.

पदार्थांचे बाजारभाव विशेष खालीं-वर न जाऊं देतां देवघेवीच्या व्यवहारास लागणारा बेताचा पैसा चलनाच्या स्वरूपांत पुरवणें युद्धपरिस्थितींत मध्यवर्ती बँकांस अत्यंत अवघड होतें. तथापि, व्यवहारांत जरूरी इतकेंच चलन खेळवून बाजारभावांत होईल तितकी स्थिरता राखणें युद्धकाळांत फार महत्त्वाचें असतें. एका बाजूनें युद्धसामुग्रीच्या पुरवठ्यावर सरकारचा खर्च मोठ्या प्रमाणांत व्हावा लागतो आणि त्यासाठीं व्यवहारांत अधिक चलन खेळणें अपरिहार्य होतें. पण दुसऱ्या बाजूनें सरकारास युद्धकर्जाच्या मार्गानें जनतेकडून अल्प व्याजाच्या दरानें पैसा आकर्षावा लागतो. समाजांत बाजवीपेक्षा अधिक चलन खेळल्यास पदार्थांस मागणी अधिक येते आणि बाजारभाव चढतात. ह्याचा परिणाम मजुरींचे दर व उत्पादन खर्च वाढण्यांत होऊन व्यापारांत व उद्योगधंद्यांत सट्टेबाजी उत्पन्न होते. शेतीच्या मालाच्या किंमती हिंदुस्थानसारख्या कृषिप्रधान देशांत पडूं देणेंहि श्रेयस्कर होत नाहीं. चलन, बाजारभाव मजूरीचे दर, बहुजन समाजाची प्राप्ति व सरकारी कर्जावरील व्याज इत्यादि बाबींची विलक्षण गुंतागुंत कशी असते हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. ह्या बाबतींत समतोलपणा राखणें व चलनाचा पुरवठा फुगीर होऊन त्याचे दुष्परिणाम समाजास भोगावे लागणार नाहींत ह्या विषयीं मध्यवर्ती बँक व सरकार ह्यांस दक्षता बाळगावी लागते. ह्या कारणानें रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक सभेंत तिचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, ह्यांच्या भाषणांत प्रस्तुत विषयाचा उल्लेख प्रामुख्यानें होणें अपरिहार्य व अपेक्षित होतें. एकंदरीनें पहातां गेल्या वर्षी बाजारभावांची प्रवृत्ति चढण्याकडे होती, तरी सट्टेबाजी तिला कारणीभूत झालेली नाहीं आणि युद्धपरिस्थितींत मागणी-पुरवठ्याच्या होणाऱ्या घडामोडी तिच्या मुळाशीं असल्याचें त्यांनीं सांगितलें. जिनसांचा पुरवठा योग्य प्रमाणांत ठेवून कर व कर्जें ह्यांच्या साधनानें जनतेची बचत स्वतःच्या तिजोरींत आकर्षण्याचें धोरण सरकार चालू

ठेवील तोंवर चलनाच्या पुरवठ्यांत फुगीरपणा उत्पन्न होण्याचें कारण नाहीं आणि ह्या संबंधांत समतोलपणा राखण्याचे कामीं रिझर्व्ह बँक रोखे-बाजाराचें नियमन करून सहाय देत आहे अशी माहिती त्यांनीं दिली. आपला पैसा तरता ठेवून इतर बँका सहकार्य करीत असल्याविषयीं त्यांनीं समाधान व्यक्त केलें. हें सर्व झालें तरी युद्धपरिस्थितीचा अनिश्चितपणा ध्यानांत घेऊन सर्वांनीं जागरूकपणानें व्यवहार केले पाहिजेत असें त्यांनीं बजावलें. युद्धोत्तर काय अवघड प्रश्न उपस्थित होतील ते होवोत, पण युद्ध चालू असतांहि आर्थिक स्थित्यंतरें घडून येण्याचा संभव आहे. त्यांस तोंड देण्याची आपली तयारी असली पाहिजे अशी त्यांनीं सूचना दिली ती ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे. इंग्लंड-मध्यें चलन म्हणजे पदार्थ विकत घेण्याची जनतेची शक्ति मर्यादित करण्यासाठी उपाय योजण्यांत आले आहेत, त्यांचें विवेचन प्रो. काळे ह्यांनीं मुंबईच्या रेडिओवरून गेल्या महिन्यांत केलेलें भाषण आम्हीं "अर्थांत" मागें प्रसिद्ध केलें आहे, त्यांत आलेलेंच आहे. हिंदुस्थानांतहि तसल्या उपायांची अंमलबजावणी व्हावी लागेल. जिनसांचा वापर व त्यांच्या किंमती ह्यांचें नियंत्रण, लोकांच्या हातांत खेळणाऱ्या चलनास मर्यादा, कर व सरकारी कर्जें ह्यांच्या योग्य योजना, इत्यादि बाबी ह्या नियंत्रणाच्या कार्यक्रमांत येतात, ह्याची आठवण येथें करून देणें इष्ट आहे.

---

## नोटा व नाणीं

### प्रचलित चलनी नोटा

वेगवेगळ्या नोटांचा व्यवहारांतील प्रसार दर्शविणारा तक्ता रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केला आहे, त्यांत रुपयाच्या नोटेच्या आयुष्याची माहिती देण्यांत आलेली नाहीं, कारण त्या नोटा म्हणजे प्रत्यक्ष रुपयेच समजण्यांत येत आहेत. १९४०-४१ मध्यें नोटांचे रुपये करून घेण्याची प्रवृत्ति वाढली होती, त्यामुळें ५ व १० रुपयेवाल्या नोटांचें व्यवहारांतील खेळत्या नोटांच्या संख्येशीं असलेलें प्रमाण घटलें. एकूण काढलेल्या नोटांपैकीं ४०·६% किंमतीच्या नोटा १० रुपयेवाल्या आहेत, कारण ह्याच नोटा सर्वांत अधिक लोकप्रिय आहेत. त्यानंतर १०० रुपयेवाल्या नोटांचें प्रमाण ३३·४% व ५ रुपयेवाल्या नोटांचें प्रमाण १८·३% पडलें. ३१ डिसेंबर, १९४० रोजीं खालीलप्रमाणें नोटा प्रसारांत होत्याः-

| नोटेची किंमत ( रु. ) | प्रचलित नोटांची एकूण किंमत ( लक्ष रु. ) |
|---|---|
| १ | ३२ |
| २½ | १ |
| ५ | ४४,०३ |
| १० | ९७,८३ |
| २० | १ |
| ५० | ६१ |
| १०० | ८०,४४ |
| ५०० | ३३ |
| १,००० | १७,६४ |

### फाटक्या नोटांचे बदली पैसे दिले

गहाळ झालेल्या अगर नाश पावलेल्या, तुकडे झालेल्या व चुरगळलेल्या नोटांचे बदली पैसे मिळावेत, असे रिझर्व्ह बँकेकडे अर्ज आले, त्यांपैकी खालीलप्रमाणें अर्जदारांस पैसे देण्यांत आलेः—

| नोटा | एकूण मंजूर अर्ज | एकूण नोटा | एकूण रकम दिली (रु.) |
|---|---|---|---|
| गहाळ झालेल्या अगर | | | |
| नाश पावलेल्या | १३२ | २८४ | ३७,७०० |
| तुकडे झालेल्या | ५३७ | ६३६ | ३७,०९० |
| चुरगळलेल्या | २४,२५३ | ६४,४८८ | ५,४९,०२२½ |

### खोट्या नोटा

१९४०-४१ मध्यें एकूण १,१९८ खोट्या नोटा बँकेकडे दाखल झाल्याः—

| | १ रु. | ५ रु. | १० रु. | १०० रु. | १,००० रु. |
|---|---|---|---|---|---|
| खोट्या नोटांची संख्या | ७ | ११७ | ९८२ | ८९ | ३ |

खोट्या नोटा करण्यासंबंधीं एकूण ५७ नवे खटले करण्यांत आले. २० आरोपी दोषमुक्त ठरले व २१ आरोपींना शिक्षा झाली.

### खोटीं नाणीं

सरकारी तिजोऱ्या व रेल्वेस्टेशन येथें मिळून १९४०-४१ सालीं २,८१,१८३ खोटीं नाणीं आढळलीं, त्यांचा तपशील खालीं दिला आहे :—

| | रुपये | अधेल्या | पावल्या | चवल्या | आणेल्या |
|---|---|---|---|---|---|
| चांदीचीं नाणीं | १,७७,३४४ | १८,५७३ | ९,३०४ | ४९६ | ... |
| कथलाचीं नाणीं | ... | ८१ | १०,७१० | ४३,९०३ | २०,८७२ |

ह्या वर्षी खोटीं नाणीं पाडण्याबद्दल ६२५ फिर्यादी करण्यांत आल्या. ६१९ लोकांना शिक्षा झाली.

---

### इंपीरिअल बँकेचें नफातोटापत्रक

( ३० जून १९४१ अखेरचें वर्ष. )

| जमा. | रु. आ. पै |
|---|---|
| मागील शिलकी नफा | ३९,६२,५६६—९-८ |
| वर्षांतील नफा | २,२१,०५,३९२-१४-९ |
| एकूण | २,६०,६७,९५९—८-५ |

| खर्च | रु. आ. पै |
|---|---|
| पगार | १,०४,१८,५१४—१-० |
| डायरेक्टर्स व लोकलबोर्ड सभासद ह्यांची फी | १,२३,००३-१२-९ |
| ऑडिटर्स फी | ४६,९१६-१२-५ |
| कर, भाडें, विमा, दिवाबत्ती इ. | १२,४५,९१९—२-१ |
| राखणदारांचा पगार | १,९७,६१२—१-८ |
| मालमत्तेवरील घसारा | ६,५६,२३३—९-६ |
| कायद्याच्या सल्लागारांचा खर्च | ३०,१४७-१०-७ |
| पोस्टेज व तारा | ५,९३,८९०—७-३ |
| स्टेशनरी | ५,००,३१९—३-६ |
| किरकोळ | ५,८९,०७३—५-८ |
| एकूण | १,४५,६०,५३६-१५-११ |
| निवळ नफा | १,१५,०७,४२२—८-६ |
| एकूण | २,६०,६७,९५९—८-५ |

# स्फुट विचार

## व्हीशी सरकार हिटलरशाहीस शरण

युद्धाचे संबंधांत गेल्या आठवड्यांत घडलेल्या दोन महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. त्यांपैकीं पहिली बाब व्हीशी प्रधान मंडळाच्या धोरणाविषयीं मार्शल पेटॉं व अॅडमिरल डार्लो ह्यांनीं केलेल्या घोषणेसंबंधाची आहे. व्हीशीच्या सत्तेची सीरिया मधून हकालपट्टी झाल्यापासून हिटलरनें मार्शल पेटॉं ह्यांस त्यांनीं उत्तर आफ्रिकेंत इंग्लंड विरुद्ध उचल खावी असा तगादा लावला होता. त्याचप्रमाणें, पश्चिम ऑफ्रिकेंतील फ्रेंच बंदरांत त्यांनीं गडबड करावी आणि उघड रीतीनें इंग्लंड व अमेरिका ह्यांचे विरुद्ध हालचाली कराव्या असें त्याचें म्हणणें होतें. फ्रेंच इंडोचायनांत जपानला हातपाय पसरूं देऊन व्हीशी मंत्रिमंडळानें अप्रत्यक्ष रीतीचें सहाय जर्मनीस दिलेंच आहे. त्यानें आपल्या आफ्रिकन वसाहतींमध्यें व भूमध्य समुद्रांत इंग्लंड व अमेरिका ह्यांचे विरुद्ध आक्रमण करावें असें हिटलरचें म्हणणें होतें. अॅडमिरल डार्लो हा हिटलरचा जवळ जवळ हस्तकच आहे आणि जर्मनीच्या सर्व मागण्या मान्य करण्याची त्याची तयारी होती. परंतु मार्शल पेटॉं मात्र त्याच्या धोरणास पाठिंबा देण्याचे कामीं कचरत होता. फ्रेंच जनतेंत व्हीशी सरकाराविषयीं अप्रियता वाढत चालली आहे आणि त्याच्या जर्मनीस सर्वस्वीं शरण जाण्याच्या धोरणास तिचा विरोध आहे. हिटलरचा धाकदपटशा व अभिवचनें आणि डार्लोच्या कारवाया ह्यांचा परिणाम मार्शल पेटॉंवर अखेर होऊन व्हीशीचें सरकार हिटलरशाहीस सामील झाल्यासारखें आहे. अमेरिकेनें त्या बाबतींत व्हीशीच्या अधिकाऱ्यांस भयसूचना दिली, पण तिचा कांहीं उपयोग झालेला दिसत नाहीं. अॅडमिरल डार्लोच्या हातांत लष्करी व इतर सत्ता देण्यांत आली आहे आणि मार्शल पेटॉं हा नामधारी मुख्य राहिला आहे. व्हीशीचें सरकार आतां हिटलरचें बाहुलें बनलें आहे आणि फ्रेंच जनतेच्या स्वातंत्र्यावर गदा आली आहे. युरोपच्या पुनर्घटनेची हिटलरची योजना आहे तिचा एक महत्त्वाचा घटक फ्रेंच राष्ट्र बनलें आहे. हिटलरचे अंकित होऊन व्हीशीच्या पुढाऱ्यांनीं आपला स्वाभिमान, स्वातंत्र्य व संस्कृति ह्यांवर पाणी सोडलें आहे.

---

## प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व मि. चर्चिल ह्यांची संयुक्त घोषणा

गेल्या आठवड्यांत घडलेली दुसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे प्रेसिडेंट रूझव्हेल्ट आणि मि. चर्चिल ह्यांची झालेली गुप्त भेट ही होय. अमेरिका व इंग्लंड ह्या दोन राष्ट्रांच्या मुख्य अधिकाऱ्यांची तीन-चार दिवस वाटाघाट होणें हा प्रसंग अपूर्वच समजला पाहिजे. व्हीशीच्या मंत्रिमंडळानें हिटलरला दिलेली शरणचिठ्ठी आणि त्याच्या आज्ञा मानण्याची त्या सरकारची तयारी आणि पूर्वेकडे जपाननें चालवलेलें आक्रमण ह्यांचे योगानें युद्धास नवीन रंग चढला असल्याकारणानें इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं एकविचारानें पुढें पाऊल टाकणें अगत्याचें झालें आहे. जर्मनी स्वतः रशियांतील घनघोर संग्रामांत गुंतला असल्याकारणानें इंग्लंड व अमेरिका ह्यांस निरनिराळ्या दिशांनीं जितके शत्रू उभे करतां येतील तितके हिटलरच्या मनांत उभे करावयाचे आहेत. ह्या दोन प्रतिस्पर्ध्यांचें सामर्थ्य त्यास दुभंग करावयाचें असल्यानें त्यानें आपल्या कारवाया चोहोंकडे एकाच वेळीं चालू ठेवल्या आहेत. जर्मनीनें अंकित केलेल्या राष्ट्रांस धीर यावा आणि हिटलरच्या खोट्या प्रचारानें त्यांनीं फसूं नये म्हणून प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व मि. चर्चिल ह्यांनीं प्रस्तुत युद्धांतले आपले अंतिम हेतु काय आहेत आणि हिटलरशाहीचा पाडाव करून आपण जगाची पुनर्घटना कोणत्या तत्त्वावर घडवून आणूं पहात आहों ह्या विषयींची स्पष्ट घोषणा केली आहे. सर्व राष्ट्रांस स्वातंत्र्य व समता ह्यांची प्राप्ति होऊन आर्थिक जीवनाबाबत त्यांस जरूर त्या सवलती मिळाव्या आणि जगामध्यें आंतरराष्ट्रीय स्नेह व सहकार्य नांदून शस्त्रास्त्रांच्या उपयोगावर कडक नियंत्रण बसावें हें आपलें उद्दिष्ट असल्याचें ह्या दोन प्रसिद्ध मुत्सद्यांनीं जाहीर केलें आहे. इंग्लंड व अमेरिका ह्या दोन प्रबळ लोकसत्तानियंत्रित राष्ट्रांच्या वतीनें केलेली ही महत्त्वाची घोषणा आहे. जित राष्ट्रांस हुरूप येण्यास तिचा उपयोग होईल अशी अपेक्षा आहे. "तुमचे युद्धाचे मूळ हेतु काय आहेत, ते स्पष्ट करा" असें म्हणणारांस उत्तर देण्याचाहि तो यत्न आहे. हिटलरशाहीचा पाडाव होण्यासाठी अंमलांत येणाऱ्या योजनांचें महत्त्व अगोदर विशेष आहे, तरी त्या योजनांस प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व मि. चर्चिल ह्यांचा संदेश स्फूर्तिदायक व सहाय्यकारक होईल अशी त्याची मूलभूत कल्पना आहे.

---

## हस्तव्यवसायास नवी संधि

युद्धाच्या कामासाठीं इतक्या निरनिराळ्या वस्तू लागतात कीं त्या तयार करण्याची व्यवस्था मोठाल्या कारखान्यांत होऊं शकत नाहीं आणि त्यांच्या उत्पादनाची तजवीज भिन्न भिन्न ठिकाणीं व भिन्न भिन्न प्रकारांनीं करावी लागते. कांहीं जिनसांचें उत्पादन प्रचंड यंत्रांच्या सहायानें व विजेच्या किंवा वाफेच्या शक्तीनें होणें अपरिहार्य आहे. दारूगोळा, तोफा, विमानें, चिलखती गाडे इत्यादि सामुग्री ह्या प्रकारची आहे. परंतु अनेक जातींचा लढाऊ माल हातानें व लहान प्रमाणावर होऊं शकतो, एवढेंच नव्हे, तर ह्याच मार्गानें तो बनवला जाण्याची व्यवस्था करणें श्रेयस्कर ठरतें. ह्या पद्धतीनें मालाचें उत्पादन अनेक ठिकाणीं वांटून देतां येतें आणि त्या हस्तव्यवसायांत हजारों खेडेगांवी कुटुंबांस काम मिळतें. तंबूचें सामान, खाटा, नवारी, ब्लँकेटें वगैरे वगैरे जिन्नसांचें उत्पादन त्या वर्गांत येतें आणि प्रस्तुत युद्धास लागणाऱ्या सामानाची बनावट अशा रीतीनें करून घेण्याचें महत्त्व व्यवहारांत पटलेंहि आहे. संयुक्त प्रांतांत तंबूंस लागणारे निरनिराळे जिन्नस तयार करण्याचें काम खेडेगांवांत वांटून देण्यांत आलें असून त्याच्या उत्पादनाची व्यवस्था सहकारी पद्धतीनें करण्यांत येत आहे. उत्पादनाच्या सहकारी संस्था स्थापन झाल्या आहेत आणि त्यांस कच्च्या मालाचा व पैशाचा पुरवठा सहकारी बँका करतात. माल खपण्याचा किंवा त्याच्या किंमतीचा प्रश्नच येथें उद्भवत नाहीं. हा सहकारी पद्धतीच्या उत्पादनाचा उपक्रम अभिनंदनीय असून त्याचें अनुकरण ह्या व इतर प्रांतांत होणें अगत्याचें आहे. लहान प्रमाणावरील हस्तव्यवसायाचें उत्पादन, खेडेगांवीं कारागिरांस मिळणारा उद्योग आणि सहकारी पद्धतीच्या व्यवहारांचें संघटन ह्या तीन उपयुक्त गोष्टी वरील उपक्रमानें साधत असल्यानें त्याचें विशेष महत्त्व आहे. अनेक उपयुक्त जिनसांस असलेली मागणी कारखान्यांस पुरवतां येणें शक्यच नसल्यानें हस्तव्यवसायास उत्कृष्ट संधि प्राप्त झाली आहे, तिचा पूर्ण फायदा घेण्यांत आला पाहिजे.

---

### ग्रेट ब्रिटन कर्ज कसें फेडणार ?

ग्रेट-ब्रिटनची औद्योगिक प्रगति इतर राष्ट्रांचे मानानें पुष्कळच अगोदर झालेली आहे व ग्रेटब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापारहि फार दीर्घ काळ चालत आलेला आहे. ग्रेट-ब्रिटनच्या नागरिकांनीं बचत केलेला पैसा जगभर गुंतविण्यांत आलेला आहे, त्याचें व्याज दरसाल ग्रेट-ब्रिटनमध्यें येत असतें. ग्रेट-ब्रिटनमध्यें अन्न, कच्चा माल अगर पक्का माल ह्यांची आयात करणाऱ्या प्रत्येक पांच आगबोटींपैकी एका आगबोटींतील माल ग्रेट-ब्रिटनला फुकट मिळत असे, असें म्हणतात, त्याचें कारण हेंच होय. आतां ग्रेट-ब्रिटनची परराष्ट्रांतील शिलक संपुष्टांत येऊं लागली आहे व उलट त्या राष्ट्रास इतर देशांत देणें निर्माण होऊं लागलें आहे. युद्धसमाप्तीपर्यंत बरीचशीं ब्रिटिश येणीं त्या देशास वसूल करून घ्यावीं लागतील. अमेरिकेंत आतांपर्यंत माल विकत घेतला, त्याची किंमत अमेरिकन रोखे मोडूनच चुकती करण्यांत आली. परंतु ह्यापुढें मात्र उधारीनेंच माल घ्यावा लागेल. त्याची व्यवस्था अमेरिकेच्या "लीज ॲन्ड लेंड" कायद्यानें करून दिली आहे. युद्धसमाप्तीनंतर ग्रेट-ब्रिटननें अमेरिकेचें देणें कसें फेडावयाचें, हा प्रश्न तेव्हां उपस्थित होईल. आतांपर्यंत ग्रेट-ब्रिटनच्या एकूण आयातींपैकी एकपंचमाश आयातीसाठी त्या देशास पैसे मोजून द्यावे लागत नसत; युद्धसमाप्तीनंतर ब्रिटिश माल अमेरिकेकडे पाठवावा लागेल, त्याच्या बदली दुसरा माल न मिळतां फक्त कर्जफेडीकडे त्याचा विनियोग होईल. म्हणजे प्रत्येक पांच आगबोटींपैकीं एक आगबोटभर माल ग्रेट ब्रिटनला फुकट निर्गत करावा लागेल! ही परतफेड मालाचे स्वरूपांत घेणें अमेरिकेस सोईचें होईल किंवा नाहीं, हा प्रश्न अर्थातच उपस्थित होईल. कांहीं विशिष्ट प्रकारचा खास माल अमेरिका ग्रेटब्रिटनकडून घेण्यास तयार होईल व अशा प्रकारचा माल उत्पादन करण्यासाठीं ब्रिटिश सरकारास खास योजना आखाव्या लागतील. युद्धानंतरच्या काळांतहि सरकारचें उद्योग-धंद्यांवरील नियंत्रण लवकर ढिलें होणार नाहीं, असा रंग दिसतो. ग्रेटब्रिटनची धनकोची भूमिका जाऊन ऋणकोची भूमिका होईल व अशा परिस्थितींत निर्गत व्यापाराची वृद्धि करण्याचें कार्य ह्या राष्ट्रास करावें लागेल.

---

### मुंबई युद्धफंड

मुंबई युद्धफंडाचा आंकडा ७२ लक्ष रुपयांवर गेला आहे.

### रेडियो बिगरपरवाना बाळगल्याबद्दल शिक्षा

१९४१ च्या पहिल्या सहामाहींत, बिगर परवाना रेडिओ सेट्स बाळगल्याबद्दल ३२१ लोकांना शिक्षा झाली त्यांपैकीं मुंबई प्रांतांतील २२ व मध्यप्रांतांतील १२ लोक होते.

### थायलंडमध्यें जपान्यांची गर्दी

थायलंडमध्यें जपान्यांनीं गर्दी करून सोडली आहे. जेथें जावें तेथें जपानी लोक दिसूं लागले आहेत.

### दररोज दोन आगबोटी

दररोज दोन आगबोटी ह्याप्रमाणें येतीं दोन वर्षें आगबोटी बांधण्याचा अमेरिकेचा कार्यक्रम आहे.

### अमेरिकेचें मनुष्यबळ

अमेरिकेच्या मनुष्यबळाची ग्रेट ब्रिटनला आवश्यकता नाहीं असें लॉर्ड बीव्हरब्रुक हे आपल्या भाषणांत नुकतेच म्हणाले.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

**शाखा**

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## जपान

जपान ह्या राष्ट्राचें क्षेत्रफळ १,४७,२०१ चौरस मैल आहे. जपानच्या आजूबाजूचीं त्याचीं बेटें लक्षांत घेतलीं, तर क्षेत्रफळ १,५२,००० चौरस मैल भरेल. ग्रेटब्रिटनचें क्षेत्रफळ १,२१,६०० चौरस मैळ आहे. हिंदुस्थानचें क्षेत्रफळ १८ लक्ष चौरस मैलांपेक्षा अधिक आहे. जपानमधील बराच मोठा मुलुख डोंगराळ आहे, त्यांतून वहाणाऱ्या नद्यांच्या पाण्याचे सहायानें वीज निर्माण करून कारखाने वाढविण्याचा जपानचा प्रयत्न चालू आहे. युरोपचे पश्चिम बाजूस ग्रेटब्रिटनचीं बेटें आहेत, त्याचप्रमाणें एशिआचे पूर्वेस जपानी बेटें आहेत. ग्रेटब्रिटनप्रमाणेंच जपानचा किनारा करवतेच्या धारेसारखा आहे, त्यामुळें तेथें पुष्कळ उत्कृष्ट बंदरें आहेत. मासेमारीचा धंदा जपानचे किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर चालतो. जपानमधील हवामान उद्योगधंद्यांच्या वाढीस अनुकूल आहे. स्वतःच्या देशांत लोकांस पुरेल इतकें धान्य तेथें पिकत नाहीं, तरी जपानी सरकार लोकसंख्या वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे; तथापि वाढत्या लोकसंख्येस वसाहतीसाठीं बाहेर जाण्यास वाव नाहीं. अर्थातच, परराष्ट्रीय व्यापारावर जपानचें आर्थिक जीवन अवलंबून आहे. प्रो. वकील व श्री. मालुस्ते ह्यांच्या "कमर्शिअल रिलेशन्स बिट्वीन इंडिया अँड जपान" ह्या पुस्तकांत या विषयांची चांगली माहिती देण्यांत आली आहे.

१९ व्या शतकाचे मध्यापर्यंत जपान हें राष्ट्र जवळ जवळ अज्ञातच होतें. एकलकोंडेपणाची वृत्ति त्या राष्ट्राची होती आणि आपल्या नागरिकांनीं बाहेर जाऊं नये, व इतर राष्ट्रांतील लोकांनीं आपल्या देशांत येऊं नये, असें जपानी सरकारचें धोरण होतें. जपानला १८५४ सालीं अमेरिकेशीं नाइलाजानें व्यापारी करार करावा लागला व अशाच तऱ्हेचे करार त्यानें पुढें ग्रेट ब्रिटन, रशिया व हॉलंड ह्या देशांशीं केले. १८५८ सालीं जपाननें तीन प्रमुख बंदरें परदेशी व्यापारास खुलीं केलीं व तेव्हांपासून जपानच्या धोरणास नवें वळण लागलें. १८६८ सालीं राजाची सत्ता पुनः प्रस्थापित करण्यांत आली आणि त्यानंतर एका पिढीचे अवधींत मागसलेल्या जपानास पुढारीपणाचें व मानाचें स्थान प्राप्त होऊं शकलें ! विदेशीयांच्या व्यापारी व लष्करी हिकमतीस तोंड देण्याच्या तयारीनें जपाननें आपला कार्यक्रम आखला. शासनपद्धति सुधारण्यांत आली व राजकीय स्वातंत्र्य व समता ह्यांच्या पायावर कारभार सुरू झाला. जपानी लोकांची देशभक्ति व एकी विलक्षण आहे. व्यापार, उद्योगधंदे, राजकारण, ह्या सर्व बाबतींत त्यांची एकीची भावना अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. नवीन गोष्टी आत्मसात करण्याची त्यांची शैलीहि अपूर्व आहे. प्रथम जपाननें पाश्चिमात्य देशांचें अंधानुकरण केलें, परंतु आतां जपानची प्रगति विशिष्ट रीतीनें होत आहे. जपानच्या आर्थिक उत्कर्षास त्याचे सरकारनें फार मोठा हातभार लावलेला आहे. भांडवल पुरवठा, जकातींचें धोरण, शिक्षणक्रमांत सुधारणा, वहातुकीची व्यवस्था, बँकिंगची प्रगति, आगबोटींच्या धंद्यास प्राधान्य, उद्योगधंद्यांस पैशांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत, इत्यादि बाबतींत जपानी सरकारनें पुढाकार घेऊन फार महत्त्वाची कामगिरी बजावली. १८९४–९५ मधील जपान व चीन ह्यांमधील युद्ध, १९०४–०५ मधील जपान व रशिया ह्यांमधील युद्ध व १९१४–१८ चें महायुद्ध ह्यांची जपानच्या आर्थिक प्रगतीस अतिशय मदत झालेली आहे व विशेषतः गेल्या महायुद्धाचा जपाननें पुरेपूर फायदा घेतला आहे. आपला परराष्ट्रीय व्यापार वाढविला आहे. उद्योगधंद्यांचें जपानला अतिशय महत्त्व असलें, तरी शेतीचें महत्त्व तेथें अद्याप कायम आहे. कच्चें रेशीम वगळल्यास, जपानी कारखान्यांस लागणारा सर्व कच्चा माल बाहेरून यावा लागतो. ह्या कारणानें, कच्च्या मालाच्या पुरवठ्यासाठीं व पक्क्या मालाच्या उठावासाठी जपानला परदेशांवर सर्वस्वी अवलंबून रहावें लागतें, आणि ह्या बाबतींत परिस्थिति दिवसानुदिवस जपानला प्रतिकूल होत चालली आहे. आहे त्या लोकसंख्येस पुरेल इतक्या अन्नवस्त्राची तरतूद करणें कठीण जात असतांना लोकसंख्या वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न तेथील सरकारनें करावा, हें चमत्कारिक नाहीं काय ? जपान व्यापारी पेठा एकामागून एक गमावूं लागला आहे, ह्याचें कारण इतर देशांतहि उद्योगधंदे वाढूं लागले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापारी पेठांत जपानचा प्रवेश फार उशीरा झालेला आहे व तो देश आपलें स्थान दीर्घ काळ टिकवूं शकणार नाहीं. मुलुखगिरीच्या त्या राष्ट्राच्या धोरणाचें बीज ह्या परिस्थितींत आढळतें.

हिंदुस्थान व जपान ह्यांचेमधील व्यापारी कराराची मुदत संपुष्टांत आल्यानंतर, ह्या दोन देशांवर नवीन परिस्थितीचा काय परिणाम होईल, ह्याचा अंदाज करतां येणें अवघड नाहीं. हिंदुस्थानांतून जपानकडे कपास व ताग ह्यांची मोठ्या प्रमाणावर निर्गत होते व जपानकडून आपण कपास-कापड, सूत, कृत्रिम रेशीम, कृत्रिम रेशमी कापड, रंग, रसायनें इत्यादि घेतों. खालील तक्त्यांत ही माहिती दिली आहे:—

### हिंद–जपान व्यापार

हिंदुस्थानांत आयात

| मालाचें नांव | १९३९–४०. | १९४०–४१. |
|---|---|---|
| | ( रुपये ) | |
| रंग | २४,६९,००० | ४८,७८,००० |
| यंत्रें | १८,९४,००० | ३४,६९,००० |
| कपास कापड | ५,१२,७६,११९ | ५,६५,६८,८९१ |
| कपास सूत | २,४२,१०,६८१ | १,३४,८४,०२९ |
| लोकरी कापड | १४,०९,००० | ४०,७९,००० |
| लोकरी सूत | ४४,९१,७८५ | ४०,८९,६६१ |
| कृत्रिम रेशमी सूत | १,५६,६३,००० | २,५३,९४,००० |
| कृत्रिम रेशमी कापड | २,१५,८५,६९९ | २,४६,७३,९२३ |
| काच माल | ५३,५४,३९८ | ५०,८७,४८६ |

हिंदुस्थानांतून जपानकडे निर्गत

| मालाचें नांव | १९३९–४०. | १९४०–४१. |
|---|---|---|
| | ( रुपये ) | |
| कपास | १०,७६,५०,००० | ७,०४,८५,००० |
| ताग | ४३,२४,४०७ | २९,१२,९१९ |

### हिंदुस्थान सरकारचें कर्ज

हिंदुस्थान सरकारनें ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान ह्या दोन्ही ठिकाणीं कर्ज काढलेलें आहे. ३१ मार्च १९४० रोजीं हिंदुस्थान सरकारचें ग्रेट ब्रिटनमधील देणें २८ कोटि पौंड होतें, तें ३१ मार्च १९४१ रोजीं २० कोटि पौंडांवर आलें. हिंदुस्थानांतील कर्ज ह्याच मुदतींत ४५० कोटि रुपयांचें ५७७ कोटि रुपये झालें. हिंदुस्थान सरकारनें काढलेलीं डिफेन्स कर्जे व पौंडांतील रोख्यांचें रुपयांतील रोख्यांत रूपांतर हें ह्या बदलाचें कारण आहे.

# सहकारी बँकांचे अहवाल

### इस्लामपूर को. पीपल्स बँक लि.
( वार्षिक सभा : ३०–८–४१ )

वरील बँकेचें भाग भांडवल २४,९०० रुपये असून रिझर्व्ह व इतर फंडांत तिचे सुमारें १२ हजार रुपये आहेत. तिचेकडे एकूण सुमारें २५ हजारांच्या ठेवी आहेत. प्रांतिक बँकेकडून तिनें १४½ हजारांचीं कर्जे घेतलीं आहेत. बँकेचे सुमारें १०½ हजार रुपये हौरा व्रिज लोन, यू. पी. लोन, रिझर्व्ह बँकेचे भाग, इत्यादींत आहेत. येणें कर्जांत ५४½ हजार साधें व ६½ हजार कॅश क्रेडिटचें दाखविलेलें आहे. "चौकशी तारखेपासून कर्जांचा आकडा ५२½ हजारांनीं घटला व व्याजादाखल २२ हजार रुपये वसूल झाले. वेळच्या वेळीं झालेल्या वसुलीच्या योगें मागण्या मोठ्या असतांनाहि त्या पुऱ्या करण्यास बँक समर्थ झाली. ५–५–४१ रोजीं असिस्टंट रजिस्ट्रार ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ठेवीदारांची सभा भरली असतां, त्यांनीं बँक चालू ठेवण्यांत ठेवीदारांचें व सभासदांचें हित कसें आहे, हें स्पष्ट केलें." त्यास अनुसरून ठेवीदार मुदतीच्या ठेवीची मुदत वाढवून देत आहेत व आपल्या चालू आणि सेव्हिंग्ज ठेवी मुदतीनें ठेवीत आहेत, ही गोष्ट इतरांनीं अनुकरण करण्याजोगी आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ३,९६४ रुपये नफा झाला. दंड व्याजाची रकम बुडित कर्जनिवारण फंडाकडे वर्ग केल्यानंतर, थकबाकीवरील व्याजाबाबत ३,८६३ रुपयांची तरतूद केल्यानंतर आणि गुदस्ताचा तोटा ९०२ रुपये वजा जातां व नफावाटणी खात्यांतील शिलक ११०६ रुपये मिळवतां ९८८ रुपये नफा आढळून येतो. व्यवस्थेच्या खर्चांत बँकेनें काटकसर केली आहे, त्यामुळें पुढील वर्षी अधिक नफा दिसेल, अशी आशा आहे. भागीदारांनीं व ठेवीदारांनीं सहकार्यानें प्रयत्न केल्यास बँकेची अडचण सत्वर दूर होऊन ती पुनः प्रगतीच्या मार्गास लागेल, ह्यांत संशय नाहीं. बँकेच्या संचालक मंडळास व तिच्या कार्यकर्त्यांस पुरेसें पाठबळ मिळेल, अशी आशा आहे.

### इंदूर परस्पर सहकारी पेढी, मर्यादित
( वार्षिक सभा : ३–८–४१ )

वरील बँकेचा ३१-३-१९४१ अखेरचा अहवाल आमचेकडे आला आहे. वृत्तांताचे वर्षी व्यवस्थापक मंडळाच्या ८९ बैठकी झाल्या व त्यांत ५२२ ठराव झाले. वर्षअखेर पेढीचे पटावर १,४९१ सभासद होते व त्यांनीं घेतलेल्या भांडवलाची रकम ९९,२८४ रुपये होती. पेढीच्या गंगाजळींत ५८,५२७ रुपये असून, स्पेशल रिझर्व्हज ३०,७५८ रुपयांचे आहेत. पेढीकडील ठेवी ६,३७,७४० रुपयांच्या आहेत. येणें कर्ज ३,३७,८८९ रुपये आहे, त्यापैकीं थकलेली बाकी १,१०,३४८ रुपये आहे. अहवालाचे वर्षी १,९७८ रुपये रकमेची व्याजांत सूट देण्यांत आली. सरकारी रोख्यांत पेढीचे २,४१,८३४ रुपये आहेत. तिनें इतर बँकांत मुदतीनें १,७०,९२६ रुपये व सेव्हिंग व करंट खात्यावर ४९,५५६ रुपये ठेवले आहेत. वर्षअखेर पेढीस १२,४७३ रुपये नफा झाला. त्यांतून भागीदारांस द. स. ५½% डिव्हिडंड देण्याकडे ६ हजार रुपये लागले, ३,११२ रुपये गंगाजळींत गेले व इतर निधींतहि रकमा टाकण्यांत आल्या. म्हणजे, आतां पेढीचे सर्व फंड मिळून ९४,०९८ रुपयांची रकम होते, तिचें भांडवलाशीं प्रमाण ९४·१% पडतें. पेढीचें काम काज चांगलें चाललें असल्याचें तिच्या वृत्तांतावरून दिसून येईल. चालू युद्धपरिस्थितीमुळें इमारती सामानाचे भाव वाढले असल्यामुळें इमारतींत वाढ करण्याचा प्रश्न व्यवस्थापक मंडळानें तूर्त तहकूब केला आहे. सभासदेतर जामीनदारांकडून कर्जवसुली करण्यांत येणाऱ्या अडचणींतून बँकेनें मार्ग काढण्याचा इंदूर सरकार सहानुभूतिपूर्वक विचार करीत आहे. १९४०-४१ मध्यें श्री. दत्तात्रय रामचंद्र पिंगे हे व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष व श्री. विष्णु गणेश फडके, एम्. एस्सी. हे चिटणीस होते.

### रावेर पीपल्स को. बँक लि.
( वार्षिक सभा: ७।९।४१ )

वरील बँकेचे २७८ सभासद असून वसूल भांडवल २०,०२५ रुपये आहे. खपलेल्या भांडवलापैकीं कर्ज घेणाऱ्या सभासदांचे ६,६७५ रुपयांचे २६७ भाग आहेत व कर्ज न घेणाऱ्या सभासदांचे १३,३५० रुपयांचे ५३४ भाग आहेत. बँकेच्या रिझर्व्ह व इतर फंडांत ४,२१५ रुपये आहेत व तिचेकडे एकूण १,०६,१०० रुपयांच्या ठेवी आहेत. अहवालाचे वर्षअखेर १७४ सभासदांकडे मिळून ५४,४५२ रुपये कर्ज येणें आहे, १७९२२ रुपये सरकारी रोखे व भाग ह्यांत गुंतविलेले आहेत व ५८,९५६ रुपये रोख अथवा इतर बँकांचे खात्यावर आहेत. "वक्तशीर कर्जाची फेड करणारे सभासदांस व्याजांत १ रुपयास ०–१–० प्रमाणें सूट देण्याबद्दल मॅनेजिंग कमिटीनें शिफारस केली आहे. अद्यापि पाहिजे तितकी वक्तशीर कर्जांची फेड होत नाहीं." अहवालाचे वर्षी ते बँकेस १,६५० रुपये नफा झाला, त्यांतून ६% दरानें डिव्हिडंड देण्याकडे १२०१ रुपयांचा विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. प्रस्तुत संस्था "बँक" ह्या सदरांत कायम राहिली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

### चतुःशृंगी को. क्रे. सोसायटी, लि., पुणें
( वार्षिक सभा : २४–८–४१ )

वरील सोसायटीच्या २२५ भागीदारांनीं ३९७ भाग घेतलेले आहेत. २२५ सभासदांपैकीं १६३ सभासद आर्यभूषण व ज्ञानप्रकाश मुद्रणालयांतील आहेत. भागभांडवल ५,९५८ रुपये, रिझर्व्ह फंड ४,७८३ रुपये, ठेवी ११ हजार रुपये, ह्याप्रमाणें नांवेंखातीं रकमा असून सोसायटीनें १८,८०० रुपयांचें कर्ज आपल्या भागीदारांस दिलेलें आहे, अहवालाचे वर्षअखेर सोसायटीस ५९८ रुपये निवळ नफा झाला, त्यांतून नफावाटणीसाठीं ३५९ रुपये रकमेचा विनियोग होईल. १९४०–४१ सालअखेर थकलेलें असें एकहि कर्ज नाहीं. सोसायटीच्या आश्रयानें चाललेल्या श्री. वामनराव पटवर्धन लायब्ररींत ८३० पुस्तकें असून त्यांचा उपयोग सभासदांस चांगल्या प्रकारें होत आहे.


## पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड पुणें शहर.

## नोटीस

या बँकेची २४ वी वार्षिक साधारण सभा रविवार तारीख ७ सप्टेंबर १९४१ रोजीं दुपारीं २–३० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे दिवाणखान्यांत भरून अहवाल, ताळेबंद, नफ्याची वांटणी करणें, हिशेब–तपासनीस नेमणें, डायरेक्टर्स, चेअरमन व व्हा. चेअरमन यांची निवडणूक करणें, पोट नियमांत दुरुस्त्या करणें, हिशेब तपासनीसांचे नेमणुकीबाबत नियम मंजूर करणें वगैरे कामें नेहमीप्रमाणें करण्यांत येतील. तरी सर्व सभासदांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंति आहे. डायरेक्टरांच्या निवडणुकीची वेळ मात्र सकाळीं ८ ते १२ च फक्त ठरविलेली आहे.

द. दि. चितळे,

ता. ९।८।४१. मॅनेजिंग डायरेक्टर.

### दि कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर

( वार्षिक सभाः ३०-८-४१ )

३० जून, १९४१ अखेर संपलेल्या पांचव्या वर्षी वरील बँकेच्या खपलेल्या भांडवलांत ११,६६० रुपयांची वाढ होऊन वसूल भांडवल ३०,०१० रुपये झालें. रिझर्व्ह व इतर फंडांत २,२५० रुपये आहेत. बँकेकडील ठेवींत १ लक्ष रुपयांची वाढ होऊन ठेवींची रक्कम २ लक्ष, ७९ हजार रुपये झाली, त्यामुळें ठेवींवरील व्याजाचे दर बँकेला थोडे उतरवितां आले व तारणावरील कर्जाचे दरहि उतरवून त्याचा फायदा खातेदारांना देतां आला. बँकेनें २ लक्ष, १७ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत व सरकारी रोख्यांत १५,७८२ रुपये गुंतविलेले आहेत. इतर बँकांच्या खात्यांवर व रोख हातांत ८० हजार रुपये आहेत. "कर्जफेडीस लागणारी रक्कम रोजच्या हप्त्यांनीं जमा करून ठेवतां येणाऱ्या योजनेचा फायदा सुमारें एक हजारावर सभासद घेत आहेत." सुमारें २० ते २५ हजार रुपये बँकेकरितां इमारत अगर जागा खरेदी करण्यांत गुंतविण्याचें बोर्डानें ठरविलें आहे. प्राथमिक खर्चाची मालमत्तेचे बाजूची बाब अहवालाचे वर्षी काढून टाकण्यांत आली आहे. वर्षअखेरचा ३५ रुपये शिलकी नफा धरून, बँकेस ४५,२९ रुपये नफा झाला, त्यांतून १ हजार रुपये रिझर्व्ह फंडांत टाकावे, २,११८ रुपये द. सा. द. शे. ८‍= करमाफ डिव्हिडंड देण्याकडे खर्च करावे, ४०० बॅड डेट व कॉन्टिन्जन्सी फंडांत घालावे, इत्यादि शिफारसी बोर्डानें केल्या आहेत. सध्याच्या परिस्थितींत डिव्हिडंडचा दर बराच सढळ दिसतो. ॲडव्होकेट एस. जी. दाभोळकर, बी. ए., एलएल. बी. हे डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष असून मेसर्स काळोखे आणि कंपनी हे सेक्रेटरीज, ट्रेझरर्स व एजंट्स ( मॅनेजिंग एजंटस ) आहेत.

---

### सनदी नोकर

गेल्या जानेवारींत झालेल्या आय. सी. एस्. च्या परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या सात उमेदवारांची यादी मागेंच प्रसिद्ध झाली. आतां, भारतमंत्र्यांनीं नेमलेल्या सात सनदी नोकरांची यादी जाहीर झाली आहे. त्यांत सहा मुसलमान आहेत. इतर अल्पसंख्याक जातींतील लायक उमेदवार न मिळाल्यामुळें, परीक्षेंत आठवा आलेल्या उमेदवारास सनदी नोकरींत प्रवेश मिळाला आहे.

### ब्रिटिश सैनिकांची प्रकृति

पश्चिम एशियांतील व उत्तर आफ्रिकेंतील ब्रिटिश सैनिकांची प्रकृति उत्कृष्ट रहावी, अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. त्यामुळें त्यांचेमधील आजारीपणाचें प्रमाण अत्यल्प आहे. गेल्या महायुद्धाच्या वेळचे मानानें चालू युद्धाचे वेळीं सैनिकांचें आरोग्य अनेक पटींनीं चांगलें राहिलें आहे.

### कापडाचें नवें मार्केट

अहमदाबाद येथें कापडाच्या एका नवीन मार्केटाच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ श्री. कस्तुरभाई लालभाई ह्यांचे हस्तें नुकताच पार पडला. ह्या इमारतीस सुमारें २५ लक्ष रुपये खर्च येईल.

### धोतरांच्या किंमतींचें नियंत्रण

संयुक्त प्रांतांत धोतरांची किंमत नियंत्रित केली जाणार आहे. त्यासाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजनीं धोतरांचे व्यापारी व व्यापारी संस्थांचे प्रतिनिधी, ह्यांची एक सभा बोलाविली होती.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी** : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा** : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा** : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स** : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स** : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; मि. आर. एल. फेराई.

**करंट डिपॉझिट अकाउंटस** :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.


---


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**हेड ऑफिस : पुणें शहर.**

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,८८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,९४,०३५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. नौ. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १११—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३—२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... ... | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२६—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १४२—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११४—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% ... | ४७—८ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६७—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०८—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% ... ... | १४२–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५–१० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १६९५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १७१७—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| धोंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% ... ... | ८४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८८७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६५३–१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २१५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४९—४ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २३–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४६—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४१९५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २२१–१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) ७½% रु. ... ... | १५५–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३९७—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु. १० आ. ७ पै. ... | २०९०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १५०—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२—२–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६२–११–० |


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
४ सहकार : किं. २ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक
निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें

संग्रह करा

कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट

पाचकवटी, पंचकोलासव

तसेंच

पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी

—: रक्तवर्धक :—

सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें

आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जंर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि घर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख २७ ऑगस्ट, १९४१ अंक ३५

अर्थ ग्रन्थमाला–पुस्तक ४ थें

## सहकार

( हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

★

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents.**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### कुलाबा वेधशाळा

कुलाबा येथील वेधशाळेचें ठिकाण १८२३ सालीं निश्चित झालें व १८२६ सालीं वेधशाळा बांधण्यांत आली. तथापि, वेधशाळेचें काम १८४१ सालीं व्यवस्थितपणें सुरू झालें. १८९९ सालीं वेधशाळा मुंबई सरकारचे हातांतून मध्यवर्ती सरकारचे नियंत्रणाखालीं गेली. १८४१ सालीं बसविलेला बॅरोमिटर व रेनगेज हीं अद्याप उत्तम काम देत आहेत !

### नाताळाची पूर्वतयारी

नाताळची भेट म्हणून ब्रिटिश युद्ध-कैद्यांस पाठविण्यांत यावयाचीं पार्सलें लंडनमध्यें तयार होत आहेत. न्यूझीलंडचे मुख्य प्रधान, मि. पिटर फ्रेजर, ह्यांनीं अशीं ७२ हजार पार्सलें बांधण्यांत येतांना प्रत्यक्ष पाहिलीं.

### इंटरनॅशनल बँक ऑफ इंडिया, लि.

वरील बँकेची मुंबई येथें शाखा नुकतीच उघडण्यांत आली. बँकेची मुख्य कचेरी अहमदाबाद येथें आहे. यंदाचे वर्षींच ही बँक शेड्यूल्ड बँकांचे यादींत दाखल झाली. बँकेचें वसूल भांडवल ६ लक्ष, ४२ हजार रुपये असून तिचेकडे एकूण १७ लक्ष, ७६ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेचीं दोन वर्षें नुकतीच पुरीं झालीं.

### रौप्य ज्युबिली

बनारस हिन्दू विश्वविद्यालयाची रौप्य ज्युबिली वसंत पंचमीचे मुहूर्तावर साजरी केली जाणार आहे.

### मिस ॲमी जॉनसन

मिस ॲमी जॉनसन ह्या सुप्रसिद्ध स्त्री-वैमानिकेच्या आयुःक्रमाची फिल्म तयार करण्यांत येणार आहे.

### अहमदाबादमधील गिरण्या

बी. बी. अँड सी. आय. रेल्वेवरील वहातूक बंद पडल्यामुळें अहमदाबाद येथील कपास कापडाच्या गिरण्यांस कोळशाचा भयंकर तुटवडा भासूं लागला आहे. पावसामुळें रेल्वे लाईन आणखी नादुरुस्त झाली तर कांहीं गिरण्यांस कोळशाच्या आभावीं उत्पादन थांबवावें लागेल. विदेशी कपास वापरणाऱ्या गिरण्यांसहि हीच अडचण भासत आहे.

### युद्ध जिंकण्याची तयारी

जरूर पडल्यास १९४३ सालअखेरहि युद्ध चालू राहील, आणि त्या वर्षी लागणाऱ्या मालाच्या उत्पादनासंबंधीं ग्रेट ब्रिटन व अमेरिका सहकार्यानें विचार करतील, असें प्रेसिडेंट रूझवेल्ट एका मुलाखतींत म्हणाले.

### पदवीदान समारंभ

ईस्टर्न ग्रुप कौन्सिलवरील ऑस्ट्रेलियन प्रतिनिधि, सर बर्ट्रॅम स्टीव्हन्स, हे म्हैसूर विश्वविद्यालयाच्या पदवीदानप्रसंगीं उपदेशपर भाषण करणार आहेत.

### रेडिओची वाढती लोकप्रियता

गेल्या जुलैअखेर ब्रिटिश हिंदुस्थानांत एकूण १ लक्ष ३४ हजार रेडिओचे परवाने अंमलांत होते. पूर्वीच्या वर्षाच्या मानानें हा आकडा २५,७१६ एवढ्यानें अधिक आहे. जुलै महिन्यांत ११,९११ परवाने देण्यांत आले, त्यांपैकी ४,३४२ नवे होते.

### कर हा विम्याचा हप्ताच होय !

" वाढता कराचा बोजा हा आपलें सर्वस्व नाहींसें होऊं नये, ह्यासाठीं उतरलेल्या विम्याचा हप्ताच होय, असें समजलें पाहिजे व त्या दृष्टीनें हप्त्याची रकम अवास्तव आहे, असें म्हणतां येणार नाहीं.":—इंपीरिअल बँकेच्या अध्यक्षांचें भाषण

### पगारवाढ

मद्रास सरकारनें आपल्या नोकरांच्या पगारांत दरमहा एक रुपया अशी वाढ केली आहे. मद्रास शहरांतील ५० रुपये पगाराखालील व मद्रास शहराबाहेरील ३० रुपये पगाराखालील नोकरांस ही पगारवाढ मिळेल.

### गरीबांचें दुकान

वीस व त्यापेक्षा कमी नंबरांच्या सुताचें वीस प्रकारचें कापड मार्च, एप्रिल अथवा मे महिन्यांतील दरानें विकण्यासाठी एक 'गरीबांचें दुकान' उघडण्याचें मंगळोर येथील कापड व्यापाऱ्यांनीं ठरविलें आहे.

### रशियास कर्ज

रशियानें अमेरिकेकडे कर्ज मागितलेलें नाहीं, परंतु अप्रत्यक्ष रीतीनें त्यानें तसें सुचविलें आहे.

### पारशी विवाह

१९४० सालीं एकूण ५९४ पारशी विवाह मुंबई प्रांतांत नोंदण्यांत आले.

### स्पेशल मॅरेज ॲक्ट

स्पेशल मॅरेज ॲक्टान्वयें म्हणजे नोंदणी पद्धतीनें मुंबई प्रांतांत १९४० सालीं २७० विवाह झाले.

### मृत्युपत्रें

१९४० सालीं मुंबई प्रांतांत एकूण १,९०८ मृत्युपत्रांची नोंद झाली. १९३९ सालाचा तत्सम आकडा १,८६१ आहे.

### सैनिकांसाठी विड्या

ॲमिनिटीज् फॉर ट्रुप्स फंडानें जानेवारी, १९४१ पासून आतांपर्यंत हिंदी सैनिकांसाठीं एक कोटि विड्या परदेशीं पाठविल्या आहेत.

### सिव्हिक गार्ड

मुंबई प्रांतांतील सिव्हिक गार्डांची संख्या ४,८३० आहे.

### मुंबई प्रांतांतील मोटार चालविण्याचे परवाने

| | जुने, पुनः दिले | नव्यानें दिले |
|---|---|---|
| १९३८–३९ | ४५,७१३ | ९,४७९ |
| १९३९–४० | ४३,०७३ | ९,९६५ |

### ३% १९४१ चे कर्ज-रोखे

सरकारच्या ता. ११ ऑगस्टच्या जाहीरनाम्यास अनुसरून ३% १९४१ चे एकूण ८ कोटि, २६ लक्ष रुपयांचे कर्ज-रोखे इतर कर्जरोख्यांत रूपांतर होण्यासाठीं दाखल झाले. म्हणजे, २ कोटि, ४१ लक्ष रुपयांच्या कर्ज-रोख्यांची परतफेड रोखीनें होईल.

### चीनसाठी अमेरिकन विमानें

बर्मा रोडवरील वहातुक जपानी बाँबगोळ्यांस बळी पडण्याचा संभव आहे, तेव्हां त्या भागांतून वहातुक करण्यासाठी ३५ लष्करी विमानें चीनला पुरविण्याचें अमेरिकेनें ठरविलें आहे. हीं ३५ विमानें ८५० मोटार लॉऱ्यांचें काम करतील.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४१० | व्यापाराच्या नियंत्रणाची योजना—सर्वांत बचत करण्याचें महत्त्व | |
| २ रशियाचें लढाऊ धोरण | ४११ | ५ लवादाचा कायदा ... | ४१५ |
| ३ युद्ध आणि हिंदुस्थानची आर्थिक व्यवस्था ... | ४१२ | ६ बंद पडलेल्या बँका | ४१६ |
| ४ स्फुट विचार ... | ४१३ | ७ सहकारी बँकांचे अहवाल ... | ४१७ |
| सर मॉरिस ग्वायर यांचें भाषण—शिक्षणाचा प्रश्न कसा सुटेल?—आयात | | ८ विविध माहिती ... | ४१८ |



# अर्थ

बुधवार, ता. २७ ऑगस्ट, १९४१


## रशियाचें विलक्षण चिकाटीचें लढाऊ धोरण

लेनिनग्राड, मॉस्को व किएव्ह हीं शहरें डोळ्यांपुढें ठेवून जर्मनीनें रशियामध्यें आपल्या फौजा पुढें दामटण्याची शिकस्त चालवली आहे. एकदा हातीं घेतलेली रशियन मोहीम वरील ठिकाणें गाठलीं जाईपर्यंत बंद ठेवणें हिटलरला शक्य नाहीं. ह्यासाठी आपल्या फौजा व लढाऊ सामुग्री ह्यांचा रशियाकडून होत असलेल्या जबरदस्त नाशाची पर्वा न करतां त्यानें उत्तरेपासून दक्षिणेपर्यंतच्या सबंद समरांगणावर चढाई चालू ठेवली आहे. लेनिनग्राड व युक्रेन ह्यांच्या बाजूस चाललेल्या लढायांत रशियन सैन्यांनीं दाखवलेलें शौर्य व चिकाटी ही खरोखर आश्चर्यकारक आहेत. युक्रेनचा प्रदेश सुपीक असून त्यांत रशियाचे लोखंडाचे वगैरे मोठे कारखानेहि आहेत. त्याचप्रमाणें, काळ्या समुद्रावरील निकोलेव्ह व ओडेसा हीं महत्त्वाचीं बंदरेंहि त्यांत आहेत. ह्यामुळें जर्मन सेनानींचा मुख्य प्रयत्न युक्रेन प्रांत हस्तगत करण्याचा आहे. ह्या मोहिमेंत जर्मनीनें रुमानिया, हंगेरी वगैरे देशांच्या फौजा आपल्या मदतीस घेतल्या आहेत. प्रतिस्पर्ध्याच्या फौजेस एका बाजूनें वेढा घालावयाचा म्हणजे तो दुसऱ्या बाजूनें कात्रींत धरतां येतो हें जर्मनीचें रणांगणावरील धोरण आहे. युक्रेनमध्यें उत्तर व पूर्व ह्या दिशांनीं रशियन फौजांस घेरण्याचा जर्मन सेनानींचा बेत होता. पण व्यवस्थित रीतीनें आपल्या फौजा दक्षिणेकडून काढून घेऊन माघार घेण्यांत रशियन लष्करी अधिकाऱ्यांनीं विलक्षण कौशल्य दाखवलें आहे. हळुहळु मागें हटून आपल्या फौजेची फळी शत्रूस फोडूं द्यावयाची नाहीं ह्या प्रकारच्या लष्करी डावपेचांत रशियन सेनाधिकाऱ्यांनीं चांगलें यश संपादन केलें आहे. शत्रूच्या हातीं कोणताहि उपयुक्त जिन्नस लागूं नये अशी त्यांची तजवीज असते, ह्या कारणानें जर्मन फौजेची प्रगति झाली तरी तिचा जर्मनीस उपयोग होत नाहीं. अमेरिका व इंग्लंड ह्यांचें सहाय रशियास पोंचूं लागल्याकारणानें पूर्वेकडील युद्ध लवकर संपवून मोकळे होण्याची हिटलरची कल्पना होती, ती विफल झाली आहे. रशियामध्यें मनुष्यबळ विपुल आहे आणि तो देश अफाट आहे. बेल्जम किंवा फ्रान्स ह्यांच्यासारखी तेथें परिस्थिति नाहीं. हिटलरशाहीचा पूर्ण नाश होईपर्यंत प्रस्तुत युद्ध चालणार ह्यांत शंका राहिलेली नाहीं आणि रशियन मोहिमेंत जर्मनीची कितीहि प्रगति झाली तरी ती हिटलरला उपकारक न होतां अपायकारकच ठरणार आहे. रशियन मुलखांत जर्मन फौजा लांब घुसतील त्या मानानें हिटलरच्या अडचणी वाढणार आहेत. पादाक्रांत केलेल्या इतर देशांत मागें लोकांचें असमाधान वाढत चाललें असून तेथें त्यानें उभा केलेला सत्तेचा डोलारा डळमळूं लागला आहे. प्रत्यक्ष जर्मनीमध्यें ब्रिटिश व रशियन विमानांच्या हल्ल्यांमुळें कारखान्यांचें व बंदरांचें अतोनात नुकसान होत असून तें सहन करण्याची शक्ति जर्मन जनतेमध्यें शिल्लक रहावयाची नाहीं. बाहेरील विजयाच्या भपकेदार बातम्यांवर आपल्या लोकांस झुलत ठेवण्यांत हिटलरला किती वेळ यश येणार? प्रेसिडेन्ट रूझवेल्ट व मि. चर्चिल ह्यांच्या भेटींत झालेली चर्चा आणि त्यांनीं आखलेले युद्धाचे कार्यक्रम ह्यांचे योगानें हिटलरच्या चढाईच्या योजनांस सो बसणार आहे. तसेंच, फ्रान्स व जपान ह्यांची इंग्लंड व अमेरिका ह्यांचे विरुद्ध उठावणी करण्याचे त्याचे बेत हाणून पाडले जाणार आहेत.

रशियांतील मोहीम चालली असतांना अमेरिका व इंग्लंड ह्यांचें सहाय आपल्या प्रतिस्पर्ध्यांस पोंचूं नये ह्या हेतूनें हिटलरनें जी खटपट चालवली आहे तिचा एक महत्त्वाचा भाग म्हणून जर्मनी व व्हिशी सरकार ह्यांचेमध्यें तह झाल्याची बातमी आली आहे तिच्याकडे बोट दाखवितां येईल. आफ्रिकेंतील फ्रेंच बंदरें जर्मनीच्या स्वाधीन करण्यांत यावीं म्हणजे तेथून इंग्लंडला व अमेरिकेस आपणांस उपद्रव देतां येईल ह्या उद्देशानें त्याविषयींची अट हिटलरनें वरील करारांत घातली आहे. इतर फ्रेंच वसाहतींतील कच्च्या मालाचा फायदा फ्रान्स व जर्मनी ह्यांनीं सहकार्यानें घ्यावा, आल्सेस व लॉरेन हे प्रांत जर्मनीस परत मिळावे, त्याच्या मोबदल्यांत फ्रान्सला बेल्जमचा एक तुकडा तोडून दिला जावा आणि फ्रान्समधून पुष्कळसें जर्मन सैन्य परत नेण्यांत यावें अशा अर्थाच्या अटी नवीन होणाऱ्या तहांत आहेत असें म्हणतात. रशियाचा समाचार घेतल्यानंतर जर्मनी आफ्रिकेंत मोहीम चालू करणार आणि इजिप्त जिंकून तो देश इटलीचा वाटा म्हणून मुसोलिनीस बक्षिस देणार असाहि त्या तहांत एक बेत दाखल असल्याची वंदता आहे. रशियास घेरण्याचा दुसऱ्या दिशेनें जर्मनीचा यत्न चालला आहे तो इराणच्या बाजूनें आहे असें दिसतें. इराणमध्यें जर्मन लष्करी अधिकारी इराकप्रमाणें लुडबुड करीत असल्याची बातमी समजल्यावरून रशिया व इंग्लंड ह्यांनीं इराणच्या सरकारास त्या बाबतींत निक्षून सूचना केली आहे. जर्मनी इराणला रशिया व इंग्लंड ह्यांचे विरुद्ध चिथावीत असल्याचा दाट संशय आहे. लेनिनग्राडवर जर्मन व फिनिश सैन्यें गर्दी करीत आहेत, पण त्या शहराचा निकराचा बचाव करण्याचा आपला निश्चय रशियन सेनानींनीं जाहीर केला आहे. रशियन मोहीम हिटलरचीं हाडें खिळखिळीं केल्यावांचून रहात नाहीं हें तिच्या विषयींच्या ताज्या बातम्यांवरून स्पष्ट दिसत आहे.

## युद्ध आणि हिंदुस्थानची आर्थिक व्यवस्था

**प्रो. काळे ह्यांनीं मुंबईच्या रेडिओवरून केलेलें भाषण**

( ऑल इंडिया रेडिओ, मुंबईचे डायरेक्टर ह्यांच्या परवानगीनें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. )

हिटलरशाहीनें युरोपांतील लहान-मोठ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा बळी घेऊन इटली व जपान ह्या दोस्तांच्या सहायानें आपल्या सत्तेचा विस्तार आफ्रिका, एशिया व अमेरिका ह्या खंडांमध्यें करण्याचा घाट घातला, तेव्हां हिंदुस्थानच्या मध्यवर्तित्वामुळें लढाऊ सामुग्रीच्या पुरवठ्याचे बाबतींत ह्या देशास अत्यंत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें. विविध प्रकारांच्या लढाऊ मालाच्या उत्पादनाची तरतूद ह्या देशांत मोठ्या प्रमाणावर चालू करण्यांत आली. गेल्या वर्षांत युद्धाचें क्षेत्र युरोपांतून पूर्वकडे पसरत गेलें असून तें हिंदुस्थानाच्या सरहद्दीस भिडूं पहात आहे. हिटलरशाहीच्या पाडावाची तयारी इंग्लंड, अमेरिका व ब्रिटिश साम्राज्यांतील देश ह्यांनीं सहकार्यानें व योजनात्मक पद्धतीनें चालू केली. सबंद जगास व्यापूं पहाणाऱ्या प्रस्तुत युद्धाचे स्वाभाविक परिणाम हिंदुस्थानच्या व्यापार, उद्योगधंदे व सरकारी उत्पन्न-खर्च ह्यांवर होणें तर अपरिहार्यच होतें. तथापि, ह्या देशानें हिटलरशाहीशीं चाललेल्या संयुक्त संग्रामांत स्वतःचें कर्तव्य म्हणून विशिष्ट कार्य करण्याची जबाबदारी उचलली, तिच्या योगानें हिंदी आर्थिक घटनेचा व व्यवहारांचा योग्य मेळ युद्ध परिस्थितीशीं घालण्याची कामगिरी येथील राष्ट्रीय सरकारास यशस्वी रीतीनें पार पाडावी लागत आहे. अंतर्गत देवघेव, बाहेरच्या देशांशीं व्यापार, बाजारभाव, चलन, परराष्ट्रीय हुंडणावळ, सरकारी कर व कर्जे इत्यादि विविध आर्थिक बाबतींत युद्धपरिस्थितीमध्यें विलक्षण घडामोडी होत असतात. त्यांचे धागेदोरे नीट हातीं ठेवून आर्थिक व्यवहारांचें नियमन सरकारास आणि मध्यवर्ती बँकेस करावें लागतें. सरकारी पैशाचे व्यवहार ह्या बँकेचे मार्फत होत असल्यानें राष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थेस बदलणाऱ्या युद्ध परिस्थितींत योग्य वळण लावून व्यापार, चलन, हुंडणावळ, कर्जे ह्यांचे संबंधांत निरनिराळ्या घडामोडींचा मेळ तिला कुशलतेनें घालावा लागतो.

हें अत्यंत महत्वाचें कार्य कसें चाललें आहे ह्याची ताजी माहिती रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें स्वतःच्या व्यवहारांचा गेल्या वर्षाबाबतचा वृत्तांत नुकताच प्रसिद्ध केला आहे त्यावरून मिळण्याचें उत्कृष्ट साधन जनतेस उपलब्ध झालें आहे. त्या बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं तिचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, ह्यांनीं दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत भाषण केलें त्यामध्यें सदरहू माहितींतील प्रमुख बाबींचें विस्तृत विवेचन आलें आहे. तसेंच, चलन, हुंडणावळ, व्यापार, सरकारी कर्जे ह्यांचे संबंधांत गेल्या वर्षाविषयींचा अहवाल रिझर्व्ह बँकेच्या मार्फत अलीकडेच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत सविस्तर माहिती आकड्यांसहित देण्यांत आली आहे. युद्धकार्य व युद्धपरिस्थिति ह्यांचे संबंधांत आर्थिक महत्वाच्या कोणत्या घडामोडी झाल्या आणि हिंदुस्थान आलेल्या तद्विषयक प्रसंगास कसें तोंड देत आहे ह्याची कल्पना येण्यास रिझर्व्ह बँकेनें जनतेच्या उपयोगासाठी प्रसिद्ध केलेल्या निरनिराळ्या रिपोर्टांचे योगानें भरपूर सहाय मिळालें आहे. ह्या संबंधांतील ठळक बाबींचा आतां विचार करूं.

### किमतींत वाढ

हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश असल्यानें शेतीच्या मालाच्या किंमती पडणें बहुजन समाजाच्या प्राप्तीच्या व राष्ट्राच्या रोजच्या राहणीच्या दृष्टीनें अनिष्ट असतें. प्रस्तुत युद्धाच्या परिस्थितींत कपास, ताग, गळिताचीं धान्यें इत्यादि कच्च्या मालाचें युरोपांतील गिऱ्हाईक तुटलें आहे आणि ह्या कारणानें नेहमीची मागणी मर्यादित होऊन त्याच्या किंमती घटणें स्वाभाविक होतें. गेल्या वर्षाच्या म्हणजे १९४० च्या जून महिन्यांत फ्रान्समध्यें जर्मनीचा विजय झाला तेव्हां हिंदी बाजारावर मंदीची छाया पसरली, पण हळुहळु किमतीचें मान थोडें चढत गेलें! युद्ध सामुग्रीचा पुरवठा वाढवण्याचे प्रयत्न ह्या देशांत जसजसे अधिकाधिक होत गेले, तसतशी मालाला स्थानिक मागणी वाढूं लागून बाजारभाव चढूं लागले. कच्च्या व पक्क्या सर्व जातीच्या मालाच्या किंमतींत चढ सारखा झाला नाहीं. कच्च्या मालापेक्षा पक्क्या मालाच्या किंमती अधिक चढल्या आणि कच्च्या मालाचे संबंधांतहि प्रत्येक प्रकाराच्या मालाचे मागणी-पुरवठ्याचे परिस्थितीस अनुसरून कमी-अधिक चढ-उतार झाला. मागील महायुद्धाचे पूर्वीचे वर्षातील मालाच्या घाऊक किमतीची सरासरी १०० होती असें मानलें तर १९४० सालाच्या जून महिन्यांतला हा तुलनात्मक तत्सम आंकडा ११४ झाला, नोव्हेंबरांत १२२ पर्यंत चढला आणि पुढील महिन्यांत ११९ ते १२१ ह्या आकड्यांचे मध्यें राहून अखेर जून १९४१ मध्यें तो १३८ वर गेला. खाण्याच्या धान्यांच्या किंमतीचा निदर्शक आकडा १९४० च्या जूनमध्यें ९५ होता, तो १९४१ च्या जूनमध्यें ११४ झाला आणि डाळींच्या किंमतीचा आकडा ९७ चा ९९ झाला. हिंदी साखरेचें उत्पादन, विशेषतः संयुक्त प्रांतांत, मर्यादेच्या बाहेर वाढल्याकारणानें तिच्या किंमतींत घट झाली परंतु चहाचा इंग्लंडमध्यें चांगला खप झाल्यामुळें त्याच्या किमतींत विलक्षण वाढ झाली. हिंदुस्थानाच्या व्यापारांत कपाशीस महत्त्वाचें स्थान आहे, परंतु ह्या मालाच्या किमतींत गेल्या जून अखेर थोडी घट झाली. तथापि कापसाच्या व तागाच्या मालास सरकारची युद्धसामुग्री बाबतची मागणी आली म्हणून त्याची किंमत आणखी खाली गेली नाहीं. कापसाच्या व तागाच्या पक्क्या मालाच्या किंमती मात्र चढल्या.

### परराष्ट्रीय व्यापार

हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराकडे लक्ष दिलें असतां त्यावर युद्धक्षेत्राच्या विस्ताराचे झालेले परिणाम स्पष्ट दिसतात. मे, १९४१ अखेरच्या ११ महिन्यांचे मुदतींत हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांच्या बिनसरकारी निर्गतीची एकूण किंमत सुमारें १८० कोटि रुपये भरली. त्यापूर्वीच्या त्याच ११ महिन्यांतील निर्गतीचा आकडा २१६ रुपये इतका होता. वरील मुदतींतले ह्या दोन देशांच्या आयात व्यापाराच्या किंमतीचें एकत्रित तत्सम आंकडे अनुक्रमें करून १३२ कोटि व १३८ कोटि रुपये असे होते. अमेरिका, इंग्लंड, ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देश व दोस्त राष्ट्रें ह्यांसच हिंदुस्थानचा व्यापार मर्यादित होणें युद्ध परिस्थितीमुळें अपरिहार्य आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. तसेंच, वहातुकीच्या मार्गांतील अडचणीमुळें बाहेरील व्यापाराच्या व्यवहारांत अडथळा उत्पन्न झाला आहे हेंहि विसरतां कामा नये. ह्या देशाच्या आयातीपेक्षा निर्गतीची किंमत नेहमी अधिक असते. ती १९४०-४१ मध्यें तशीच होती, पण १९३९-४० सालाच्या मानानें ह्या दोहोंतला फरक सुमारें ३३ कोटि रुपयांनी कमी गेल्या वर्षी झाला. (अपूर्ण)

# स्फुट विचार

## सर मॉरिस ग्वायर ह्यांचें भाषण

हिंदुस्थानांतील शिक्षणासंबंधानें कोणीहि बोलूं लागला कीं ह्या देशांतील तरुणांचा पदव्यांविषयींचा हव्यास आणि विद्यापीठांचें स्वतःच्या उच्च ध्येयाकडे व मुख्य उद्देशाकडे दुर्लक्ष ह्या विषयांचा उल्लेख करणें त्यास अपरिहार्य वाटतें असा अनुभव आहे. सर मॉरिस ग्वायर ह्यांनीं गेल्या आठवड्यांत मुंबई विश्वविद्यालयाच्या पदवीदान समारंभाचे प्रसंगीं भाषण केलें त्यांत ह्या प्रश्नावर आपले ह्या तऱ्हेचे विचार त्यांनीं व्यक्त केले. शिक्षणदान हा हिंदुस्थानांत कित्येक लोकांचा फायदेशीर धंदाच होऊन बसला आहे आणि त्यामुळें त्यांतून नफा उकळण्याच्या उद्योगांत शिक्षणाचें उच्च ध्येय टिकवण्याचें कार्य त्यांचे हातून घडूं शकत नाहीं असें ते म्हणाले. पदव्यांच्या मागें लागून कॉलेजांकडे धाव घेणाऱ्या हिंदी तरुणांनीं दुसरें काय करावें हें सांगण्याची जबाबदारी फारच थोडे टीकाकार स्वतःवर घेतात. पोटापाण्याचा व्यवसाय हस्तगत होण्यास सहाय ह्या दृष्टीनें विश्वविद्यालयाच्या पदव्यांकडे तरुण पहातात ह्यांत संशय नाहीं. परंतु द्रव्यार्जनाचे दुसरे मार्ग त्यांस मोकळे झाल्यावांचून कॉलेजांत विद्यार्थ्यांची गर्दी होत राहणें अपरिहार्य आहे. देशाची आर्थिक स्थिति झपाट्यानें सुधारणें आणि व्यापार व उद्योगधंदे ह्यांमध्यें शिरकाव होण्याची संधि हिंदी तरुणांस लाभणें हाच त्यांची कॉलेजांत गर्दी होण्यावर उपाय आहे. शिक्षकांचा व शिक्षणाचा दर्जा चढला पाहिजे ह्या बाबतींत सर मॉरिस ग्वायर ह्यांच्या सारखेंच सर्वांचें मत आहे, पण हाहि प्रश्न पुन्हां पैशाचा आहे. युद्धकाळांतहि शिक्षणावरील खर्चास कात्री लावली जाऊं नये एवढेंच नव्हे तर तो वाढला तरी तें इष्टच आहे हें त्यांचें म्हणणें सर्वांस पटण्यासारखें आहे. सर्व वर्गांच्या व भिन्नभिन्न स्थितींतल्या लोकांच्या जीवनास इष्ट वळण लावण्याची जबाबदारी त्यांनीं विश्वविद्यालयांवर टाकली आहे पण केवळ तरुणांना पदव्या मिळवणें अवघड केल्यानें हा हेतु कसा साध्य होईल हें समजत नाहीं.

## शिक्षणाचा प्रश्न कसा सुटेल ?

हिंदी विश्वविद्यालयांतून दर वर्षी बाहेर पडणाऱ्या तरुणांची वाढती संख्या व त्यांचेमध्यें पसरणारी बेकारी, कॉलेजांत वाढणारी विद्यार्थ्यांची गर्दी, शिक्षण व शिक्षक ह्यांची असमाधानकारक स्थिति, शिक्षणानें व्हावयाच्या मानसिक व नैतिक इष्ट परिणामांचा अभाव इत्यादि दोष सामान्यतः नजरेंत भरण्यासारखे आहेत आणि त्यांकडे सर मॉरिस ह्यांनीं लक्ष वेधलें. कोणत्या विद्यार्थ्यांस कॉलेजांमध्यें प्रवेश मिळावा ह्याविषयींची कसोटी विश्वविद्यालयांनीं कठिण केल्यास पदव्या मिळवूं इच्छिणाऱ्या तरुणांची संख्या मर्यादित होईल आणि बेकार पदवीधरांचा प्रश्न सुटल्याचा भास होईल हें खरें. तसेंच, विश्वविद्यालयीन शिक्षण घेण्याची पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांसच कॉलेजांत प्रवेश मिळून उच्च शिक्षणाचा दर्जा वर जाईल ह्यांत संशय नाहीं. तथापि, ह्या उपायानें शिक्षणाचा व बेकारीचा प्रश्न सुटण्यास सहाय होणार नाहीं. त्याकरितां शिक्षणक्रमांत व शिक्षण पद्धतींत आमूलाग्र बदल व्हावा लागेल. कारकुनी पेशाची लायकी देणारें शिक्षण हायस्कुलांत सर्रहा मिळतें त्याच्या ऐवजी निरनिराळ्या व्यवसायांचें, यांत्रिक व व्यापारी शिक्षण देण्याची सार्वत्रिक तजवीज व्हावी लागेल. सध्याची मॅट्रिक परीक्षा हा पोटापाण्याच्या उद्योगाचा दरवाजा आहे अशी आजची प्रचलित कल्पना जाऊन तिच्या जागीं शेती, व्यापार, कारखानदारी, हस्तव्यवसाय ह्यांची तरुणांस गोडी लागेल व त्यांकडे त्यांची प्रवृत्ति होईल अशी व्यवस्था झाली पाहिजे. मुंबई प्रांतांत कांहीं सरकारी हायस्कुलांचें रूपांतर ह्या मार्गानें सरकारनें केलें आहे. तो उपक्रम भावी सुधारणेचा सूचक आहे. सारांश, शिक्षण पद्धतीची सुधारणा व्यापक व विविध स्वरूपांत झाली पाहिजे. केवळ विश्वविद्यालयाचे हातून हा अवघड प्रश्न सुटणार नाहीं.

## आयात व्यापाराच्या नियंत्रणाची योजना

सध्यासारख्या सर्व जगास व्यापणाऱ्या युद्धांत इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार मर्यादित झाला तर त्यांत आश्चर्य नाहीं, एवढेंच नव्हे तर राष्ट्रीय सरकारास युद्ध सामुग्रीच्या पुरवठ्यास व्यापारांत अग्रस्थान द्यावें लागतें आणि परराष्ट्रीय हुंडणावळीची योग्य व्यवस्थाहि करावी लागते. हिंदुस्थान सरकारनें आयात व्यापाराच्या नियंत्रणाची योजना केली आहे तिच्याकडे ह्याच दृष्टीनें पहाणें आवश्यक आहे. आयात होणाऱ्या मालाच्या दोन याद्या तयार करण्यांत आल्या आहेत. पहिल्या यादींतील जिनसांच्या आयातीचें नियंत्रण त्यांच्या संबंधांतील घाऊक व्यापाऱ्यांच्या मार्फत करणें सोयीचें असल्याचा अनुभव आहे. रंग, वर्तमानपत्रांचा कागद, अल्यूमिनियम इत्यादि माल ह्या सदरांत येतो. दुसऱ्या यादींतील यंत्रसामुग्रीसारखा माल ह्या पद्धतीनें नियंत्रित करतां येत नाहीं. ह्या मालाचा पुरवठा आतां बहुतेक अमेरिकेंतून होणें अपरिहार्य झालें आहे आणि त्या देशाची हुंडणावळीच्या संबंधांत खास स्वतंत्र योजना करावी लागली आहे. ह्या कारणानें हिंदुस्थानांत कोणास यंत्रसामुग्रीसारखा दुसऱ्या यादींमधला माल बाहेरून आणावयाचा असेल तर त्या विषयींची माहिति हिंदुस्थान सरकारास देऊन त्यांच्या परवानगीनें आयातीचा व्यवहार झाला पाहिजे असें जाहीर करण्यांत आलें आहे. युद्ध परिस्थितींत कोणत्या मालाच्या आयातीस प्राधान्य द्यावें हें सरकारानें ठरवलें पाहिजे. ह्याकरितां ज्यांस विशिष्ट जातीचा माल आयात करावयाचा असेल त्यांस न्यू दिल्ली येथील चीफ कंट्रोलर ऑफ स्टोअर्स ह्यांचेकडे अर्ज करावे लागतील, धंदेवाल्यांचें व व्यापाऱ्यांचें ह्या नवीन सरकारी योजनेकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे.

## खर्चांत बचत करण्याचें महत्त्व

व्यवहारांत योग्य मर्यादेच्या बाहेर चलन खेळण्याचे दुष्परिणाम राष्ट्रास भोगावे लागतात ह्याचा कटु अनुभव मागें आल्यामुळें जगांतील सर्व देशांत ह्यासंबंधांत तेथील सरकारांकडून विशेष दक्षता बाळगण्यांत येत आहे. जनतेच्या हातांत चलन खेळणें म्हणजे पदार्थ विकत घेण्याची शक्ति तिला त्या मानानें प्राप्त होणें होय. युद्ध-परिस्थितींत सामान्य लोकांनीं खरेदी करावयाच्या जिनसांचा पुरवठा मर्यादित होत असतो आणि ह्या मर्यादित प्रमाणांतील मालास अमर्याद मागणी आली असतां त्याच्या किंमती भडकतात आणि राष्ट्राची आर्थिक घडी बिघडून जाते. युद्ध-सामुग्रीवर राष्ट्राचा सर्व मुख्यत्वेंकरून केला जाणें अगत्याचें असल्यानें चलन म्हणजे पदार्थ विकत घेण्याचें सामर्थ्य राष्ट्रीय सरकारच्या हातीं एकवटणें आवश्यक

आहे. कॉमन्स सभेंत आपलें अंदाजपत्रक पुढें मांडतांना ब्रिटिश फडणवीसांनीं कर, सरकारी कर्ज व जनतेची बचत ह्यांचे परस्पर संबंध स्पष्ट करून लोकांनीं आपल्या खर्चांत काटकसर घडवून आणण्याचें महत्व त्यांनीं प्रतिपादलें होतें. त्यांच्या ह्या विवेचनाची आठवण इंपीरिअल बँक ऑफ इंडियाच्या मद्रास येथें गेल्या आठवड्यांत झालेल्या वार्षिक सभेचे प्रसंगीं तिचे अध्यक्ष, मि. हॉडसन, ह्यांनीं करून दिली आणि हिंदुस्थानांत लोकांनीं पैशाची बचत करण्याची आवश्यकता किती आहे ह्याचें स्पष्टीकरण केलें. युद्ध-परिस्थितींत देशाचे आर्थिक व्यवहार कोणत्या तत्वावर चालावे ह्याची फोड करून सांगतांना ते म्हणाले कीं, "लोकांनीं उत्पादन वाढवावें आणि स्वतःच्या मालाचा वापर मर्यादित करावा" ही युद्धकाळांतली यशाची गुरुकिल्ली आहे. चलन वाढून बाजारभाव भडकावयाचे नसतील तर व्यक्तींच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारांचें नियंत्रण झालें पाहिजे आणि तें लोकांनीं स्वार्थत्यागपूर्वक स्वतःच करणें इष्ट होय असें त्यांनीं सांगितलें. जनतेच्या प्राप्तीपैकीं मोठा भाग करांच्या मार्गानें सरकार स्वतःच्या तिजोरीकडे आकर्षून घेतें आणि लोकांनीं वापरावयाच्या जिनसांचें नियंत्रण करून त्यांची क्रयशक्ती मर्यादित करतें. युद्धपरिस्थितींत लोकांच्या खर्चिकपणास पायबंद घालणें हें सरकारी करांचें सर्वमान्य धोरणच असतें. तथापि, जनतेनें स्वतःच आपला खर्च समजूतदारपणानें मर्यादित केल्यास युद्ध कार्यास ती अत्यंत उपयुक्त मदत होते. चलनाचा समाजांत होणारा फैलाव, त्यायोगें बाजारभाव भडकण्याची भीति आणि जनतेनें स्वतःचा खर्च कमी करून ही आपत्ति येऊं न देण्यास सहाय करण्याचें महत्त्व ह्या गोष्टींचा परस्पर संबंध मि. हॉडसन ह्यांनीं आपल्या भाषणांत विशद केला त्याकडे सर्वांचें लक्ष वेधलें जाणें अगत्याचें आहे. त्यांनीं सुचवलेली बचत लोकांनीं न केल्यास होणारे दुष्परिणाम त्यांसच सोसावे लागल्यावांचून रहाणार नाहींत, हें त्यांनीं विसरूं नये.

---

### श्री. न. गं. आपटे, ह्यांची निवड

इंपीरिअल कौन्सिल ऑफ अग्रिकल्चरल रिसर्चच्या गव्हर्निंग बॉडीवर मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळाचे सभासद श्री. न. गं. आपटे यांची फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीतर्फे निवडणूक झाली आहे. शेतकी विषयक संशोधनाचें कार्य हातीं घेणाऱ्या ह्या संस्थेचे अडव्हायसरी बोर्ड व गव्हर्निंग बॉडी असे दोन विभाग आहेत. गव्हर्निंग बॉडीचे, प्रांतिक शेतकी खात्याचे मंत्री, मध्यवर्ती विधिमंडळाचे तीन सभासद, युरोपियन व्यापारी गटाचा एक प्रतिनिधि, हिंदी व्यापारी संस्थांच्या फेडरेशनचा एक प्रतिनिधि, ॲडव्हायसरी बोर्डातर्फे दोन प्रतिनिधी, इत्यादि सभासद असतात व व्हाइसरॉयांच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे शेतकी खात्याचे सभासद हे गव्हर्निंग बॉडीचे अध्यक्ष असतात. हिंदी व्यापारी वर्गाचें गव्हर्निंग बॉडीवरील प्रतिनिधित्व मराठा चेंबरतर्फे उभे राहिलेले श्री. आपटे ह्यांस मिळालें, ही गोष्ट विशेष अभिनंदनीय आहे.

### मुंबई प्रांतांतील मोटारींचे अपघात

१९३९-४० मध्यें मुंबई प्रांतांत मोटारींचे ७,९०३ अपघात झाले. त्यांपैकीं ५,६०५ एकट्या मुंबई शहरांत घडले.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; मि. आर. एल. फेराई.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,८८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,९४,०२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## लवादाचा कायदा

लेखकः—श्री. के. बा. गजेन्द्रगडकर, बी. ए., (ऑनर्स) एलएल्. बी.

खेडेगांवांतील अज्ञ जनतेच्या आर्थिक हलाखीचें कर्जेदलाली हें एक प्रमुख कारण आहे. क्षुल्लक कारणांकरितां गांवांतील कलहप्रिय गुंड लोकांचे नादीं लागून, अज्ञ लोक विनाकारण कोर्टाकडे धांव घेऊन आपल्या व आपल्याबरोबर इतरांच्या संपत्तीचा, वेळेचा व मानसिक शक्तीचा ऱ्हास करून घेतात. हें कर्जेदलालीचें वेड नाहींसें होण्यास सार्वत्रिक शिक्षणप्रसार हा उपाय आहे व ह्या उपायाचा अवलंब करण्याचा प्रयत्न हल्ली होत आहे ही संतोषाची गोष्ट होय. जनता शिक्षणानें सुसंस्कृत झाली म्हणजे तिला आपलें हित-अहित कळूं लागेल व मग लोक गांवांतील गुंड लोकांच्या थापांस भुलणार नाहींत. वास्तविक खेडेगांवांमध्यें खरोखर पाहिलें असतां कोर्ट—दरबारी कज्जे लढविण्याचा प्रसंगच कां यावा हें कळत नाहीं. आपला भाऊ दुर्दैवानें मयत झाला असतां त्याच्या अनाथ विधवेस आपल्या चरितार्थाकरितां, नवऱ्याच्या नातेवाईकांकडून पोटगी मागण्याकरितां कोर्टाकडे धांव कां घ्यावी लागावी, हें कळणें दुरापास्त आहे. उधार माल दुकानदारांकडून आणिला असतां त्याचे पैसे वसूल होण्याकरितां दुकानदारास कोर्टाकडे धांव घ्यावी लागते. प्रॉमिसरी नोट लिहून देऊन पैसे घेतले असतां सावकारास त्याकरितां दावा आणावा लागतो. भावाभावांस वांटणीकरितां कोर्ट—दरबार करून आपल्या संपत्तीचे पुष्कळ वेळां वाटोळें करण्याचा प्रसंग येतो. अशी कितीतरी उदाहरणें देतां येतील. ह्या सर्व परिस्थितींत उभयबाजूच्या लोकांमध्यें तंट्याचें कारण पुष्कळ वेळां असूं शकेल; नाहीं असें नाहीं. परंतु हे तंटे दोघांच्या पूर्ण विश्वासांतील त्रयस्थ लोकांकडून मिटविल्यास त्यामुळें दोघांचाहि वेळ, पैसा व श्रम वाचून दोघांची एकमेकांविषयीं मनामध्यें उत्पन्न होणारी द्वेषबुद्धि कमी होणार नाहीं काय? व त्यामुळें अप्रत्यक्षरीत्या देशाचें कल्याणच होईल ह्यांत शंका नाहीं. अशाप्रकारें निकाल करून घेण्यास न्यायकोर्टें व कायदेमंडळें ह्यांचें एकप्रकारें प्रोत्साहनच आहे व त्या दृष्टीनेंच नवीन प्रचलित झालेल्या लवादाच्या कायद्याचें ज्ञान जनतेस असणें फार जरूर आहे.

आपल्यामधील तंट्याचा निकाल तिऱ्हाईत इसमाकडून करून घेण्याची पद्धत आपल्या देशामध्यें फार दिवसापासून सुरु होती. गांवांमध्यें पंचायत भरवून तिच्यापुढें आपलें गाऱ्हाणें मांडून पंचायतीकडून दिलेला हा न्याय मान्य करण्याची पद्धत पूर्वीं असे. गांवांतील पांच योग्य माणसांनीं दिलेला निर्णय सदसद्विवेकबुद्धीस धरून योग्यच असणार अशी सर्वांची खात्री असे. "पांचामुखी परमेश्वर" ह्या म्हणीचा अर्थही तोच आहे. लवाद कायद्यानें ह्या पद्धतीसच कायदेशीर स्वरूप दिलें आहे.

हल्लींचा लवाद कायदा (Arbitration Act) हा हिंदुस्थान सरकारनें पास केलेला १९४० चा दहावा कायदा होय व तो १ जुलई, १९४० पासून देशामध्यें अमलांत आला आहे. हा कायदा पास होण्यापूर्वी लवादाकडून निर्णय करून घेण्यासंबंधीं दोन कायदे अस्तित्वांत होते. एक लवादाचा कायदा (१८९९ चा ९ वा) व दुसरा कायदा म्हणजे दिवाणी कायद्याला (सिव्हिल प्रोसिजर कोड) जोडलेलें दुसरें परिशिष्ट होय. ह्या दुसऱ्या परिशिष्टामध्यें लवादाकडून तंट्याचा निर्णय करून घेण्यासंबंधीं नियम दिले आहेत. लवादाचा कायदा हा फक्त मुंबई, मद्रास, कलकत्ता वगैरे इलाख्याच्या राजधानीच्या शहरांतील व्यवहारासच बहुतेक लागू होत असे. बाकीच्या सर्व ठिकाणांना दिवाणी कायद्याचे दुसऱ्या परिशिष्टांतील नियम लागू होते. याप्रमाणें लवादाकडून तंटा मिटवून घेण्यासंबंधीं हिंदुस्थानांत दोन कायदे प्रचलित होते. ह्या दोनहि कायद्यामध्यें बरीच वैगुण्यें होतीं व लवादाचा कायदा सुधारून ह्या दोन कायद्यांऐवजीं सर्व हिंदुस्थानासच लागू होईल असा सर्वव्यापी एकच कायदा होणें जरूर आहे अशी मागणी व्यापारी संस्थांकडून फार दिवस केली जात आहे. हायकोर्टाच्या न्यायाधिशांनीहि हा लवादाचा कायदा दुरुस्त होणें जरूर आहे असें आपलें मत कित्येक ठिकाणीं प्रदर्शित केलें आहे. लवादाचे दोन कायदे जे देशांत प्रचलित होते त्यामध्यें काय दोष आहेत, ह्या दोषांमुळें खाजगी लवादाकडून त्वरित न्याय मिळविण्याचा जो मार्ग त्या मार्गामध्यें कसे अडथळे उत्पन्न होऊं शकतात ह्यांचें सविस्तर वर्णन दिवाणी न्यायासंबंधीं नेमलेल्या कमिटीनें (Civil Justice Committee) नें आपल्या रिपोर्टामध्यें १३ व्या 'लवाद' (Arbitration) ह्या प्रकरणांत केलें आहे, (पानें २०८ ते २२४ पहा). जिज्ञासूंनीं ह्या कमिटीच्या रिपोर्टांतील हा भाग अवश्य वाचवा.

ह्यासंबंधीं आलेल्या सर्व सूचनांचा विचार करून सर्वव्यापी व सर्व हिंदुस्थानास लागू होणारा असा लवादाचा कायदा हिंदुस्थान सरकारनें हल्लीं प्रचलित केला आहे व त्याचा अंमल ता. १ जुलई १९४० पासून सुरू झाला आहे. ह्या नवीन कायद्यानें पूर्वींच्या लवादाचा कायदा व दिवाणी कायद्याचें दुसरें परिशिष्ट (Second Schedule to the Civil P. Code) हे लवाद-निवाड्यासंबंधीं कायदे रद्द केले आहेत व आतां १९४० चा दहावा लवादाचा कायदा हाच लवाद-निवाड्याचा एकच कायदा प्रचलित केला आहे. हा कायदा अगदीं लहान असून त्याचीं फक्त ४९ कलमें आहेत. ह्या कायद्यानें कोर्टांत कज्जा चालू असला तरी आमचा तंटा त्रयस्थाच्या मध्यस्थीनें तोडण्यास आमची कबुली आहे असा एकमेकांच्या विरुद्ध असलेल्या उभयपक्षकारांनीं अर्ज दिला असतां कोर्ट दोघांच्या संमतीचा लवाद नेमून त्याचेकडे तंटा सोपवितें व लवादानें दिलेला निर्णय मान्य करून त्याप्रमाणें कोर्ट आपला निर्णय देतें. त्याचप्रमाणें कोर्टांत दावा दाखल होण्यापूर्वी उभयपक्षकारांनीं आपला पसंतीचा पंच नेमून त्यानं दिलेला निर्णय कोर्टांत दाखल करावयाचा व त्या निर्णयास धरून कोर्ट आपला हुकूमनामा करतें. उभयपक्षकारांनीं मिळून एकच पंच नेमावा किंवा प्रत्येकानें एक असे दोन पंच स्वतंत्र नेमावयाचे व दोघांचें एकमत न झाल्यास त्या दोघा पंचांनीं एक तिसराच सरपंच नेमून त्याचेकडे काम सोपवावयाचें व ह्या सरपंचाचा निकाल अखेरचा समजला जाईल व तोच कोर्टांत दाखल होऊन त्याप्रमाणें कोर्ट आपला हुकूमनामा करील. ह्याप्रमाणें थोडक्यांत पंचाच्या नेमणुकीसंबंधीं कायद्यांत योजना आहे. काम करण्याबद्दल पंचांना कांहीं मेहेनताना देण्याबद्दल कायद्यानें तरतूद केली आहे. कोर्टाप्रमाणेंच शपथेवर पुरावा घेणें, कमिशन काढणें वगैरे कोर्टाचे अधिकार पंचाला कायद्यानें दिले आहेत. पंचानें ठराविक मुदतींतच आपला निर्णय जाहीर करावा असें त्यांचेवर बंधन घातलें आहे. (अपूर्ण)

## बंद पडलेल्या बँका

१९३९ सालीं सबंध हिंदुस्थानांत मिळून ८६ बँका लिकिडेशनमध्यें गेल्या अगर गुंडाळण्यांत आल्या. त्यांचें अधिकृत भांडवल १ कोटि, ८१ लक्ष रुपये, खपलेलें भांडवल १९ लक्ष, १६ हजार रुपये व वसूल भांडवल १० लक्ष, ६ हजार रुपये होतें. १९४० सालीं ६० बँका बंद पडल्या, त्यांचें अधिकृत, खपलेलें व वसूल भांडवल अनुक्रमें ५ कोटि, ९१ लक्ष; ११ लक्ष, ६५ हजार व ६ लक्ष, ८२ हजार ह्याप्रमाणें होतें. ह्या आंकड्यांवरून वसूल भांडवलाचें अत्यल्प प्रमाण दिसून येतें. मुंबई प्रांतांतील बंद पडलेल्या बँकांचा तपशील खालीं दिला आहे:—

| १९३९ | अधिकृत भांडवल (हजार रु.) | खपलेलें भांडवल (हजार रु.) | वसूल भांडवल (हजार रु.) |
|---|---|---|---|
| १ विजापूर ट्रिनिटी बँक | २० | १½ | १½ |
| २ सरस्वती बँकिंग अँड इन्शुअरन्स युनियन | १० | ८¼ | ३⅓ |
| ३ परफेक्ट बँक ऑफ बाँबे | १०० | १५ | १५ |
| ४ नोबल बँकिंग अँड इं. कं. | १० | ८½ | १¾ |
| ५ इं. मॉर्टगेज लोन्स | ५०० | ४२ | २० |
| ६ सदर्न इंडिया बँकिंग कॉर्पोरेशन | २० | ¾ | ¾ |
| ७ न्यू उत्तेजक बँक | २० | ½ | ½ |
| ८ प्रीमिअम बँक | १०० | १२¼ | ३ |
| ९ जानी बँक | ५०० | १३ | ५ |
| १० बागलकोट कमर्शिअल बँक | २०० | २४ | १७ |
| एकूण | १,४८० | १,२५ | ५८ |
| **१९४०** | | | |
| १ हेल्पिंग बँक ऑफ इंडिया | १०० | १२ | १२ |
| २ श्री. सत्यनारायण बँक | २० | २¼ | १ |
| ३ रामकृष्ण बँकिंग युनियन | ५० | ३० | २½ |
| | १७० | ४४¼ | १५½ |

### रोजंदारीनें काम करणारांस गुमास्ता कायदा लागू आहे काय?

रोजंदारीनें काम करणारांस मुंबई गुमास्ता कायदा लागू आहे काय? असा प्रश्न मुंबई हायकोर्टांत नुकताच उपस्थित झाला आहे. हसनअली गुलामअली पाटणवाला ह्यांच्या मालकीच्या हॉटेलांत त्यांनीं वरील कायद्यास अनुसरून याद्या लावल्या नाहींत, ह्या आरोपावरून त्यांस चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनीं १० रुपये दंडाची शिक्षा केली होती, तिचेवर हायकोर्टाकडे रिव्हिजन अपील करण्यांत आलें आहे. आपले सर्व नोकर रोजंदारीनें काम करणारे आहेत व त्यांस गुमास्ता कायदा लागू नाहीं, असें अर्जदारातर्फे खालच्या कोर्टांत सांगण्यांत आलें होतें. अपिलाचें काम चालू आहे.

### ॲबिसिनियाची राणी

ॲबिसिनियाची राणी आदिस आबाबांत लवकरच दाखल होईल.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें सें. को. बँक लि.

( वार्षिक सभा: ७-९-४१ )

वरील बँकेचे एकूण २,५१६ व्यक्ती व २६५ सोसायट्या सभासद असून भागांचें वसूल भांडवल ३ लक्ष, ८२½ हजार रुपये आहे. रिझर्व्ह फंडाची रकम १ लक्ष, ४२ हजार रुपये आहे. त्याखेरीज प्रॉव्हिडंट फंडांत ५४ हजार रुपये, इमारत घसारा फंडांत ५६ हजार रुपये, डिव्हिडंड ई. फंडांत ११½ हजार रुपये, बुडीत व संशयित कर्ज-फंडांत २४½ हजार रुपये. ह्या प्रमाणें रकमा आहेत. १९३९-४० अखेर ठेवींची रकम ४४ लक्ष, ९१ हजार रुपये होती. ती आतां ५० लक्ष, २२ हजार रुपये झाली आहे. बँकेचे ५½ लक्ष, रुपये रोख अगर इतर बँकांत शिल्लक असून ३५ लक्ष ८७ हजार रुपये सरकारी खर्जरोखे इत्यादींत गुंतविलेले आहेत. त्यांची बाजारभावानें होणारी किंमत ३६ लक्ष, ४२½ हजार रुपये भरते. इंडियन ट्रस्ट ॲक्टान्वयें बँकेची गुंतलेली रकम १ लक्ष, ८८ हजार रुपये आहे. बँकेचे ११ लक्ष ३ हजार रुपये सोसायट्यांकडून कर्ज. येणें आहे. म्हणजे, ह्या येण्यांत १ लक्ष रुपयांपेक्षा अधिक रकमेची घट झालेली आहे. " गेलीं कांहीं वर्षे सोसायट्यांचा वसूल पिकाचे मानानें सुद्धा जसा व्हावयास पाहिजे तसा होत नाहीं, असें आढळून आल्यावरून व त्यामुळें सोसायटीचा बँकेकडेहि समाधानकारक वसूल येत नाहीं, असें आढळून आल्यावरून अहवालाचे सालीं वसुलीच्या हंगामापुरतेंच खेड, सासवड, दौंड ह्या शाखांच्या कार्यक्षेत्रांत एकेक वसुली कारकून बोर्डानें नेमला होता. पुढील सालींहि तशीच योजना चालू ठेवण्यांत यावी, अशी बोर्डाची शिफारस आहे."

सोसायट्यांच्या सभासदांवर सोसायटीनें लवाद हुकूमनामे मिळवून जे रेव्हेन्यू खात्याकडे बजावणीला पाठविलेले असतात त्यांच्या बाबतींत प्रसंगविशेषीं जंगम मालाची जप्ती करण्याचे प्रसंग येतात. अशा वेळीं रेव्हेन्यू खात्याच्या अंमलदारांना मदत व्हावी म्हणून कलेक्टरांनीं आपल्या जिल्ह्यांतील कांहीं यूनियन्सचे सुपरवायझर व बँकेचे इन्स्पेक्टर्स यांना लॅन्ड रेव्हेन्यू कोड कायद्याचें कलम १५४ अन्वयें जंगम मालाची जप्ती रेव्हेन्यू अंमलदाराचे संमतीनें करण्याचा अधिकार दिला आहे. याचाहि वसुलीवर बराच इष्ट परिणाम होण्यासारखा आहे. अहवालाचे सालअखेरीस हा अधिकार बँकेच्या इन्स्पेक्टरांना मिळाला असल्यानें त्याचे दृश्य परिणाम यंदाच्या वसुलीवर होऊं शकले नाहींत.

बँकेचें व्यक्तिशः सभासदांकडून कर्ज येणें १ लक्ष, ६० हजार रुपये आहे, व व्यक्तिशः सभासदांकडून ओव्हरड्राफ्ट येणें रकम १ लक्ष, ७३ हजार रुपयांची आहे. इमारतीची ताळेबंदांतील किंमत १ लक्ष, १५ हजार रुपये आहे. बँकेचा सेफ कस्टडी व्हॉल्ट दिवसानुदिवस लोकप्रिय होत चालला आहे. अहवालाचे वर्षअखेर बँकेस ३३,४०१ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ४% दरानें डिव्हिडंड देण्यासाठीं १५,६०० रुपयांचा विनियोग होईल. " बँकेचा स्थावर मिळकतीवरील व्यवहार कमी होत आहे व लवादी कर्जें, कोठार कर्जें व लिकिडेशनमध्यें गेलेल्या सोसायट्यांकडील कर्जें ह्यांवर व्याज चालू नाहीं. नवीन किफायतशीर व्यवहाराचे मार्ग चोखाळणें आवश्यक झालें आहे, परंतु ते सध्या तरी दृष्टिपथांत येत नाहींत. अशा परिस्थितींत सरकारी कर्जरोख्यांत नैमित्तिक स्वरूपाचा फायदा झाल्यामुळें यंदा जरी ४ टक्के डिव्हिडंड दिलें तरी तशी अनुकूल परिस्थिति दरसाल येईलच असा भरवसा धरतां येत नाहीं."

सहकारी सोसायट्यांच्या सभासदांनीं, शेतांतून तयार केलेल्या मालाची किफायतशीर विक्री करून देण्याची योजना केल्याशिवाय त्यांचा खरा फायदा होत नाहीं, हें तत्त्व हिंदुस्थान सरकारनें मान्य करून दरेक प्रांतानिहाय चीफ मार्केटिंग ऑफिसर नेमून त्यांचें एक स्वतंत्र खातेंच निर्माण केलें आहे. मालाची विक्री करून देणाऱ्या खरेदीविक्रीच्या स्वतंत्र संस्था जिल्ह्यांतील प्रमुख बाजारपेठांच्या गांवीं स्थापन होऊन जिल्हा बँकांनीं प्रयोगादाखल म्हणून आपल्या कार्यक्षेत्रांत प्रारंभीचा प्रयत्न करून पहावा, असा सहकारी खात्यानें सल्ला दिल्यावरून, बोर्डानें इंदापूर, दौंड व केडगांव येथें अडत दुकानें सुरू केलीं आहेत. या दुकानांनीं अडतीवर फक्त शेतींतल्या मुसार मालाची बाजाररिवाजाप्रमाणें विक्री करून द्यावयाची आहे. हा व्यवहार रंगरूपास येण्यासाठीं व तो कायदेकानूंच्या कक्षेंत असण्यासाठीं नॉमिनल ( नाममात्र ) मेंबर करून घेण्याची पोटनियमांत तरतूद व्हावयास हवी आहे.

सहकारी बँकांच्या नोकरांना सहकारी संस्थांच्या कारभाराची, कायद्याची व तपशीलवार व्यवहाराची माहिती करून देण्यासाठीं मुंबई को. बँक्स असोशिएशनचे वतीनें पुणें सें. को. बँकेनें एक ट्रेनिंग क्लास चालू केला असून, त्यांना शिक्षण देण्यासाठीं बोर्डावरील अनुभवी सभासदांनीं व इतर तज्ज्ञ सद्गृहस्थांनीं वेळांत वेळ काढून वर्ग चालविला आहे.

पुणें सें. को. बँकेवर लोकांचा चांगला विश्वास असल्याकारणानें, ठेवींची रकम वाढत चालली आहे. तथापि बँक आपल्या ६० लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकीं शेतकी सोसायट्या, हाउसिंग सोसायट्या व बिगर शेतकी मंडळ्या, त्याचप्रमाणें कोठारें ह्यांत मिळून फक्त ११ लक्ष, ३ हजार रुपयेच गुंतवूं शकली व ३७ लक्ष ७५ हजार रुपये तिला सरकारी रोख्यांत ठेवावे लागले ह्यावरून बँकेच्या व्यवहारामध्यें परिस्थितीमुळें कसा बदल झाला आहे, हें दिसून येईल. बँकेचा मुख्य हेतु शेतकी संस्थांस भांडवल पुरवणें हा असला, तरी त्या संस्थांवरच अवलंबून रहाणें दिवसेंदिवस बँकेस अवघड जात आहे. शेतकरी ऋणविमोचनाचा कायदा पुणें जिल्ह्यांतील एक-दोन तालुक्यांत प्रयोगादाखल अंमलांत येणार आहे, अशी वदंता आहे. तसें झाल्यास, त्याचा परिणाम बँकेवर कांहीं दृष्टींनीं अनुकूल व कांहीं दृष्टींनीं प्रतिकूल होईल, तथापि त्याचा आज अंदाज कांहींच करतां येणार नाहीं. बँकेची प्रगति २४ वर्षें अखंड रीतीनें चालू आहे व तिची रौप्य ज्युबिली लवकरच साजरी होईल, त्याच्या खर्चाची तरतूद नफ्यांतून करून ठेवण्याचें बोर्डाचें धोरण अभिनंदनीय आहे. श्री. न. वि. भोंडे, बी. ए., एलएल. बी. हे बँकेचे चेअरमन असून श्री. द. दि. चितळे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

### रशियाची अमेरिकेंत खरेदी

रशियाच्या अमेरिकेंतील येण्यांची बेरीज ४ कोटि डॉलर्सपेक्षा अधिक भरत नसल्याकारणानें, त्यापेक्षा अधिक किंमतीच्या मालाची तेथें रोखीनें खरेदी करणें रशियाला अवघड जाईल. आपण सर्व खरेदी रोखीनें करूं, असें रशियानें मागें सांगितलेलें आहे. रशियास किमान १ अब्ज डॉलर्सचा युद्धविषयक माल पाहिजे आहे.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १११—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३—२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९५—१ |
| २½% १९४८–५२ ... ... ... | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% म्हेसूर कर्ज ( १९५३–६३) ... ... | ११५—० |
| ५% म्हेसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२६—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४२—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११४—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% ... | ४७—८ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६७—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०८—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% ... ... | १४२–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५–१० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १६९५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १७१७—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ८४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८८७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६५३–१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २१५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४९—४ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २३–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४६—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४१९५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २२१–१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) ७½% रु. ... ... | १५५–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३९७—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु. १० आ. ७ पै ... | २०९०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १५०—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२—२—० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६२–११–० |


**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद



**“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
४ सहकार : किं. २ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.



**पुण्यांत आल्यावर**

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

**अवर होम,**

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
संग्रह करा
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
—: रक्तवर्धक :—
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा
मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें
आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
'पायोनियर डाइंग हाऊस'
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—
भिकारदास मारुती रोड, दानेवाडी, पुणें.


मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स
वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी
Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान
एम्ब्रॉयडरी मार्ट
६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७१ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
लवंग टूथ पावडर
पोरवाल ॲण्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

PARADKAR TAILORING ACADEMY. POONA

N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. बा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख ३, सप्टेंबर १९४१ | अंक ३६

**अर्थ ग्रन्थमाला–पुस्तक ४ थें**

# सहकार

## ( हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

**लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे**

★

## The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

**बँकांस सुटी**

गुरुवार, ता. ४ व शुक्रवार, ता. ५ सप्टेंबर रोजीं पारशी वर्षारंभानिमित्त बँका बंद रहातील.

**मि. मेंझिस**

आस्ट्रेलियाचे मुख्य प्रधान मि. मेंझिस ह्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला असला, तरी नवे मुख्य प्रधान, मि. फॅडन, ह्यांचे नेतृत्वाखालीं प्रधान-मंडळांत ते काम करणार आहेत.

**शत्रुपक्षीय आगबोटी**

दक्षिण अमेरिकेंतील २१ देशांनीं त्या देशांचे बंदरांत आश्रयास आलेल्या शत्रुपक्षीय शंभर आगबोटींचा उपयोग माल वहातुकीकडे करण्याचें ठरविलें आहे. ब्रिटिश सरकारनें त्यास कांहीं अटींवर संमति दिली आहे.

**रेल्वेजचें सरकारी नियंत्रण**

ग्रेट ब्रिटनमधील सर्व रेल्वेजचें नियंत्रण सरकारनें स्वतःकडे घेतलें आहे.

**कोळशाच्या पुरवठ्याची तरतूद**

ब्रिटिश कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या कित्येक कामगारांनीं इतरत्र जास्ती वेतनावर काम पत्करलें आहे, त्यांस परत खाणींत पाठविण्यांत येणार आहे. कोळशाचा तुटवडा पडूं नये ह्यासाठी ही योजना आहे.

**गुमास्ता कायदा**

मुंबई गुमास्ता कायदा, ज्या दुकानांत नोकर नाहीं अशा दुकानांसहि लागू आहे व दुकानाच्या मालकानें रात्रीं ९ च्या पुढें दुकान उघडें ठेवतां कामा नये व इन्स्पेक्टरसाठी व्हिजिट पुस्तक त्यानें ठेवलें पाहिजे, असा मुंबई हायकोर्टानें निर्णय दिला आहे.

**३ % १९४१ चे कर्जरोखे**

वरील कर्जरोख्यांची परत फेड ता. १५ सप्टेंबर रोजीं केली जाईल. त्यानंतर कर्जरोख्यांवर व्याजाची आकारणी होणार नाहीं.

**डफरिनवर शिक्षण घेतलेले उमेदवार**

डफरिन बोटीवर शिकून तयार झालेल्या ३५० उमेदवारांपैकी ३४२ उमेदवारांना रॉयल इंडियन नेव्ही, बंगाल पायलट सर्व्हिस, मर्कंटाइल मरीन ह्यांत अगर इतरत्र नोकरी लागली आहे.

**थायलंडकडे जपानी सोनें जाणार**

थायलंडनें जपानकडून सुमारें ३½ कोटि रुपये किंमतीचें सोनें विकत घेण्याचें ठरविलें आहे. हें सोनें आपल्या देशाबाहेर निर्गत होऊं देण्यासाठी जपानी सरकार परवानगी देणार आहे.

**स्विस बँका अधिक पसंत**

दक्षिण अमेरिकेंतील कित्येक जर्मनांनीं आपले पैसे स्वित्सरलंडमध्यें वर्ग केले आहेत. स्वीडनमधील बँकांपेक्षां स्वित्सरलंडमधील बँका जर्मनांस अधिक सुरक्षित वाटतात.

**सरकारी कचेऱ्या**

हिंदुस्थान सरकारच्या कचेऱ्या सिमल्याहून दिल्लीस ता. १३ ऑक्टोबर रोजीं येतील.

**दैनिक कार्यक्रमाची फिल्म**

ग्रेट ब्रिटनचे राजेसाहेब, राणी व त्यांच्या कन्या ह्यांचा दैनिक आयुष्यक्रम चित्रित केलेली एक फिल्म तयार करण्यांत आली आहे, ती लवकरच सर्वांस बघावयास मिळेल.

**हिंदी रेल्वेजचा किफायतशीर व्यवहार**

१९४०-४१ मध्यें हिंदी रेल्वेजच्या कारभारांत १८ कोटि ४६ लक्ष रुपयांचा वाढावा दिसून येत आहे. ह्यापैकी, हिंदुस्थान सरकारास १२ कोटि, १९ लक्ष रुपये मिळतील व बाकीची रकम रेल्वे रिझर्व्ह फंडांत दाखल होईल. १९३८-३९ मध्यें रेल्वेजनीं १ कोटि, ३७ लक्ष रुपयांचा वाढावा दाखविला होता व त्यांच्या १९३९-४० च्या हिशेबांत ४ कोटि, ३३ लक्ष रुपये शिलक राहिले होते.

**अफगाणिस्तानांतील जर्मन लोक**

अफगाणिस्तानांत सुमारें १०० जर्मन लोक आहेत, त्यांपैकी बहुतेक पब्लिक वर्क्स खातें, साखर व कापड ह्यांचे कारखाने, इत्यादींत आहेत. इराणमध्यें जर्मन लोक महत्त्वाच्या जागांवर आहेत, तशी परिस्थिति अफगाणिस्तानांत नाहीं. अफगाणिस्तान सोडून जाण्यास जर्मनांनीं अद्याप प्रारंभ केलेला नाहीं.

**बॅरिस्टरीची परीक्षा**

१९४१ ची मायकेलमास बार परीक्षा लंडन येथें ऑक्टोबर, १९४१च्या दुसऱ्या आठवड्यांत घेतली जाईल, त्याच वेळीं दिल्ली येथेंहि ती घेण्यांत येईल. ज्या विद्यार्थ्यांनीं अभ्यासक्रम पुरा केला आहे, परंतु ज्यांस युद्धपरिस्थितीमुळें लंडनला जातां येत नाहीं, अशांनाच दिल्ली येथील परीक्षेस बसतां येईल.

**३० हजार शिंपी**

हिंदी सैनिकांसाठी कपडे शिवण्यांत ३० हजार शिंपी गुंतलेले आहेत. युद्धास प्रारंभ होण्याचे आधी ८०० शिंप्यांचें काम पुरें पडत असे.

**पेरूंची प्रतवारी**

पेरूंची प्रतवारी लावण्यासाठी अलाहाबाद जिल्ह्यांत एक केंद्र स्थापन करण्यांत आलें होतें. त्यांत प्रतवारी लावलेल्या पेरूंस सर्वसाधारणपणें ११% अधिक किंमत आली.

**साखर कारखान्यांतील यंत्रसामुग्रीचा उपयोग**

साखर कारखाने वर्षांतून अनेक महिने बंद असतात. ह्या वेळांत कारखान्यांतील यंत्रसामुग्रीचा युद्धविषयक उत्पादनासाठीं कसा उपयोग करून घेतां येईल, ह्याचा विचार सप्लाय खातें करीत आहे.

**बॉंबे मॉ. को. मार्केटिंग सोसायटी**

वरील सोसायटीच्या स्थापनेची पूर्व तयारी पुरी झाली आहे. सोसायटीच्या योजनेस पाठबळ चांगलें मिळालें आहे.

**आगबोटींचा नाश कमी होत चालला**

ब्रिटिश व दोस्त राष्ट्रांच्या बुडालेल्या आगबोटींची संख्या जुलै १९४१ मध्यें जेवढी कमी भरली तेवढी युद्धास प्रारंभ झाल्यानंतर फक्त दोनदांच भरली होती.

**जमीन महसुलाची वसुली**

१९३९-४० मध्यें मुंबई प्रांतांत एकूण ३ कोटि, ७० लक्ष रुपये सारा वसूल झाला. ७९½ लक्ष रुपयांची तहकुबी व २२½ लक्ष रुपयांची सूट देण्यांत आली.

**जुलै महिन्यांतील युद्धप्रयत्न**

जुलै, १९४१ मध्यें पुणें जिल्ह्यांत युद्धफंडास ३,९१५ रुपये व रेडक्रॉस फंडास ३५४ रुपये मिळाले. ३१,५२० रुपयांचीं डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेटें खपलीं. ३% डिफेन्स बॉंड्स २ लक्ष, ४½ हजार रुपयांचे खपले. बिनव्याजाचे रोखे २ हजारांचे लोकांनीं घेतले.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४२२ | ५ युद्ध आणि हिंदुस्थानची आर्थिक व्यवस्था | ४२६ |
| २ युद्धाचीं दोन वर्षें पुरीं झालीं | ४२३ | ६ लवादाचा कायदा | ४२७ |
| ३ सहकारी चळवळींत उत्साहवर्धन | ४२४ | ७ विटे मर्चंट्स को. बँक लि. | ४२७ |
| ४ स्फुट विचार ... | ४२५ | ८ कांतडीं कमाविण्याचा धंदा | ४२८ |
| इराणमध्यें जर्मनीस पायबंद—युरोपांत जर्मनीचा वाढता द्वेष—हिंदी रेल्वेजचें वाढलेलें उत्पन्न. | | ९ सांगली अर्बन को. बँक लि. | ४२९ |
| | | १० मिरज स्टेट बँक लि. | ४२९ |
| | | ११ निवडक बाजारभाव | ४३० |


# अर्थ

बुधवार, ता. ३ सप्टेंबर, १९४१

## युद्धाचीं दोन वर्षें पुरीं झालीं

जर्मनीनें पोलंडवर हल्ला करून प्रस्तुत युद्धास प्रारंभ केला त्यास आतां दोन वर्षें झालीं असून तिसऱ्या वर्षास सुरवात झाली आहे. गेल्या दोन वर्षांच्या अखेरीस युद्धपरिस्थितीचा आढावा घेऊन हिटलरशाहीशी लोकशाहीच्या चहात्या राष्ट्रांनीं चालविलेल्या झगड्यास यश येण्यासाठी संयुक्त प्रयत्नांस कोणतें वळण लावण्याची आवश्यकता आहे ह्याचा विचार होणें अगत्याचें आहे. पूर्वतयारीच्या व लढाऊ सामानाच्या भरपूर पुरवठ्याच्या जोरावर जर्मनीनें आपल्या सत्तेचें जूं युरोपांतील आपल्या शेजारच्या राष्ट्रांच्या मानेवर ठेवलें आहे. इंग्लंडवर स्वारी करण्याचा हिटलरचा बेत कल्पना-क्षेत्रांतच अजून राहिला आहे ह्याचें कारण ब्रिटिश लोकांची स्वसंरक्षणाची जय्यत व्यवस्था हें आहे. तसेंच, पूर्व युरोपांत रशियाचा काटा एकदा काढून टाकला असतां इंग्लंड व ब्रिटिश साम्राज्य ह्यांचा समाचार घेणें सोपें जाईल ह्या विचारानें जर्मनीनें रशियन मोहिमेस प्रारंभ केला. जर्मन फौजांनीं रशियन मुलखांत बरीच प्रगति केली असली आणि त्या लेनिनग्राडच्या जवळ जात असून त्यांनीं युक्रेनमध्यें कांहीं महत्त्वाचीं ठिकाणें घेतलीं असलीं तरी त्यांचें अतिशय नुकसान झालें आहे आणि रशियाचा दम कायम आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. रशियन फौजांनीं व विमानांनीं केलेला निकराचा प्रतिकार स्वतःस विलक्षण हानिकारक झाला असून त्या योगानें आपले रशियाचा पाडाव अल्प काळांत करण्याचे बेत फसले आहेत ह्याविषयींची कबूली जर्मन पुढाऱ्यांस अप्रत्यक्ष रीतीनें यावी लागली आहे. रशियन मोहिमेंत जर्मनीचे लक्षावधि सैनिक मृत्यु पावले व कैद झाले आहेत आणि त्याची युद्धसामुग्री अतिशय मोठ्या प्रमाणावर खर्ची पडली आहे. ह्या कारणानें शत्रूचें बळ एकीकडे पुष्कळ कमी झालें आहे तर दुसऱ्या बाजूनें रशियाच्या दोस्तांचें बळ वाढत आहे आणि त्यांचें युद्धसहाय त्यास उपलब्ध होण्याची तजवीज कार्यक्षम रीतीनें होत आहे.

रशियन मोहिमेंत जर्मन शक्ति एकवटली असतां ब्रिटिश वैमानिकांनीं पश्चिम जर्मनी व फ्रान्सचीं बंदरें ह्यांवर हल्ले सारखे चालू ठेवले आहेत. भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमार शत्रूच्या जहाजांचा योग्य समाचार घेत असून त्या बाजूस जर्मनी व इटली ह्यांच्या लष्करी हालचालींवर नियंत्रण बसलें आहे. सीरिया, इराक व इराण ह्या देशांत ढवळाढवळ करून तिकडून इंग्लंडला परस्पर शह देण्याचा हिटलरचा डाव सपशेल फसला आहे. जपानची उठावणी करून पूर्व आशियांत व पॅसिफिक महासागरांत इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या लढाऊ सामर्थ्यास पायबंद घालण्याचा हिटलरचा प्रयत्न त्या राष्ट्रांनीं वेळींच ओळखून त्याबाबत जय्यत तयारी ठेवली आहे. अमेरिकेनें रशियास सहाय देण्याचें ठरवल्यामुळें आणि इंग्लंडला युद्धसामुग्री मोठ्या प्रमाणांत त्या राष्ट्राकडून पुरवली जात असल्यानें जर्मनीच्या योजना लटपटूं लागल्या आहेत. जर्मनी फ्रान्सचा उपयोग स्वतःचा हस्तक म्हणून करूं पहात आहे, पण त्या बाबतींतहि त्यास यश मिळण्याची फारशी आशा नाहीं. एवढेंच नव्हे, तर युरोपांत जर्मनीविरुद्ध असंतोष वाढत चालला असून त्याचा अढथळा सारखा वाढत जाणार आहे. अटलांटिक महासागरांत जर्मनीनें ब्रिटिश व्यापारी जहाजांचा नाश चालवला आहे त्यास अलीकडे बराच आळा बसला आहे आणि ब्रिटिश व्यापाराची नाकेबंदी व इंग्लंडची उपासमार करण्याचा हिटलरचा हेतु साध्य झालेला नाहीं, एवढेंच नाहीं तर प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व मि. चर्चिल यांनीं एकत्र चर्चा करून ठरवलेल्या संयुक्त धोरणाच्या योजनेमुळें स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांत नवीन उत्साह उत्पन्न झाला आहे. आतां रशियन मोहिमेचा जर्मनीस फायदा मिळूं नये आणि त्याचें पाऊल पुढें पडूं नये अशी व्यवस्था झाली पाहिजे. रशियन राष्ट्राचा ह्या संबंधांत निश्चय झालेला असून हिटलरशाहीचा पूर्ण नाश होईपर्यंत तें लढत रहाणार आहे ह्यांत संशय नाहीं. सध्याचें युद्ध खुद्द जर्मनीच्या विरुद्ध उलटवण्याची वेळ लवकरच येत आहे. त्यासाठी इंग्लंड, अमेरिका व इतर स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रें ह्यांमध्यें युद्धसामुग्रीचें उत्पादन झपाट्यानें व वाढत्या प्रमाणावर झालें पाहिजे आणि त्यांनीं सध्यापेक्षाहि अधिक स्वार्थत्याग करणें अगत्याचें आहे ह्या आशयाच्या घोषणा युद्ध तिसऱ्या वर्षांत पदार्पण करीत असतां होत आहेत ह्याचें स्वारस्य लक्षांत येणें अवघड नाहीं. हिटलर आणि मुसोलिनी ह्यांनीं एकत्र येऊन नुकतीच चर्चा केली आणि पुढील युद्धयोजनेचा विचार केला. त्यांचे बेत हाणून पाडण्याचा आजचा एकच मार्ग म्हटला म्हणजे युद्धसामुग्रीचा पुरवठा वाढवणें हा होय असें ब्रिटिश व अमेरिकन पुढारी म्हणत आहेत. त्यांचें धोरण असें आहे कीं जर्मनीच्या लढाऊ शक्तीस ओहोटी लागली आहे' अशा वेळीं हिटलरशाहीच्या प्रतिस्पर्ध्यांनीं आपलें स्वतःचें सामर्थ्य एकवटल्यास युद्धाचें तिसरें वर्ष संपण्यापूर्वीच जर्मनीच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेचा डोलारा ढांसळून जमीनदोस्त होऊं शकेल आणि हिटलरची रशियांतील मोहीम हा त्याच्या पराजयाचा प्रारंभच आहे ह्याविषयीं खात्री पटूं लागेल.

## सहकारी चळवळींत उत्साहवर्धन

सहकारी कार्याविषयींचा आढावा घेऊन त्याचा प्रचार करण्याच्या हेतूनें दर वर्षी सहकार-दिन साजरा करण्याचा प्रघात हिंदुस्थानांत आणि मुंबई प्रांतांत अस्तित्वांत आहे. हिंदी सहकारी समित्यांचें अखिल भारतीय मध्यवर्ती मंडळ आहे त्याचेकडून प्रतिवर्षी ह्या बाबतींत संदेश येतो आणि तो ठिकठिकाणीं सभा भरवल्या जातात त्यांत वाचला जातो आणि त्या प्रसंगाच्या निमित्तानें चर्चा व भाषणें होण्याची वहिवाट चोहोकडे प्रस्थापित झाली आहे. अलीकडे आमच्या इकडे सहकार दिनानिमित्त समारंभ, सभा व भाषणें होण्याच्या बाबतींत थोडेसें शैथिल्य आलेलें आहे. तें नाहींसें होऊन सहकारी चळवळीस सहकार दिनाच्या सहायानें प्रोत्साहन मिळावें ह्या कल्पनेनें असिस्टंट रजिस्ट्रार, श्री. भागवत, ह्यांनीं सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींची व इतर निमंत्रितांची एक सभा गेल्या शनिवारीं बोलावली होती ती पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिवाणखान्यांत बँकेच्या बोर्डाचे अध्यक्ष, श्री. भोंडे वकील, ह्यांचें अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेस अनेक ठळक कार्यकर्ते उपस्थित होते.

सहकारी चळवळींत अधिक कार्यकर्त्यांनीं लक्ष घालावें आणि तिच्या संबंधांत योग्य प्रचार व्हावा ह्यासाठी यंदाचा सहकार दिन व्यवस्थित रीतीनें पार पाडण्याच्या कार्याकरितां एक प्रातिनिधिक समिती नेमावी अशी सूचना असिस्टंट रजिस्ट्रार साहेबांनीं चर्चेसाठी सभेपुढें मांडली, तिच्यावर अनेक भाषणें झालीं. बिनसरकारी कार्यकर्त्यांनीं पुढें येऊन सहकारी चळवळी बाबत जनतेंत उत्साह निर्माण करावा आणि तिला नवीन चालन द्यावें आणि त्या कामांत सहकारी खातें व सरकार सहाय देईल असा श्री. भागवत ह्यांच्या भाषणाचा मथितार्थ होता. सहकार दिन साजरा करण्यासाठी सभेनें एक समिति नेमावी ह्या त्यांच्या योजनेच्या मुळाशी वर निर्दिष्ट केलेला हेतु मुख्यत्वेंकरून होता हें झालेल्या चर्चेत त्यांनीं स्पष्ट केलें. सभेस जमलेल्या निमंत्रित मंडळीच्या वतीनें विचार प्रदर्शित करण्यांत आले त्यांत सहकार दिनाचें महत्त्व व तो साजरा करण्याची आवश्यकता ह्यांचे बाबतींत असिस्टंट रजिस्ट्रार साहेबांशीं ऐक्यमत्य असलेलें दिसून आलें. सहकार दिनाचे बाबतींत पूर्ण सहकार्य करण्याची तयारी सर्वांनीं दर्शविली. नियोजित कार्य करण्याच्या पद्धतिसंबंधानें मात्र तीव्र मतभेद प्रकट करण्यांत आला.

बहुतेक वक्त्यांनीं खालील बाबींवर विशेष जोर दिला. (१) सहकार दिन मामुली रीतीनें व औपचारिक रीतीनें साजरा करण्यापासून विशेष कार्यभाग साधण्यासारखा नाहीं. तें काम पुण्यांतले सहकारी कार्यकर्ते सहज करूं शकतील आणि त्यासाठी स्वतंत्र समितीची आवश्यकता नाहीं. (२) प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटची जिल्हा शाखा बंद झाल्याकारणानें प्रचार करणारी स्थायी व अधिकारी संस्था राहिलेली नाहीं, पण तिच्या जागीं इन्स्टिट्यूटचें कार्य करणारी सुपरवायझिंग युनिअन्सचें जिल्हा बोर्ड ही संस्था आली असल्यानें तिनेंच प्रचाराची व सहकार दिन साजरा करण्याची योजना हातीं घ्यावी. बोर्डाशीं सर्व प्रकारचें सहकार्य जिल्ह्यांतील सहकारी संस्था आनंदानें करतील. (३) सहकार दिन हेंच केवळ कार्याचें ध्येय असूं नये. विधायक व सतत होणाऱ्या कार्याचा तो विशेष व नैमित्तिक भाग समजला जावा. इन्स्टिट्यूटची घटना आणि त्याच्या कार्याचें स्वरूप व व्याप ह्यांविषयीं निश्चित योजना सरकारनें अजून मान्य केलेली नाहीं. त्या संबंधांत पुढें काय होणार असेल तें होवो, त्याविषयीं वाद घालीत न बसतां आहे त्या परिस्थितींत सुपरव्हायजिंग युनिअन्सच्या जिल्हाबोर्डानें विधायक कार्याचा उपक्रम करून योग्य वाटतील त्या बिनसरकारी कार्यकर्त्यांचें सहाय घ्यावें.

सहकार दिन ही प्रचाराची एक चांगली संधि आहे ह्यांत वाद नाहीं. पण ती साधली जाऊन सहकारी अधिकारी आणि बिनसरकारी प्रातिनिधिक व इतर कार्यकर्ते ह्यांच्यां सहकारानें भरीव व सतत अमलांत रहाणारी कार्ययोजना हातीं घेण्याचा उपक्रम झाल्यास तें सर्वस्वीं इष्ट होईल असें सभेचें मत पडलें. हा उपक्रम करण्यास युनिअन्सचें जिल्हाबोर्ड ही स्थायी संस्था आहे ती केवळ सहकार दिनासाठी निवडलेल्या समितीपेक्षां केव्हांहि अधिक योग्य असल्यानें त्या बोर्डानें सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांचें सहाय घ्यावें आणि स्वतःची समिति नेमून तिच्या विद्यमानें कार्यास लागावें ही कित्येक वक्त्यांनीं केलेली सूचना अखेर सभेनें सर्वानुमतें मान्य केली. असिस्टंट रजिस्ट्रार साहेबांच्या नेतृत्वाखालीं जिल्हा बोर्डाची पंच मंडळी सभेंतील चर्चेच्या अनुरोधानें उपयुक्त कार्याचा उपक्रम करील अशी आशा आहे. गेल्या शनिवारच्या सभेंत कांहीं तीव्र मतभेद स्पष्ट दिसून आला व व्यक्त झाला तरी एकंदरीनें खेळीमेळीचें वातावरण होतें आणि चर्चा सहकारी मित्रत्वाच्या वृत्तीनें झाली. ह्याविषयीं निमंत्रित प्रतिनिधी, कार्यकर्ते, सभेचे अध्यक्ष व असिस्टंट रजिस्ट्रार साहेब ह्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. मतभेदाच्या बाबींपेक्षा मतैक्याच्या गोष्टींकडेच अधिक लक्ष देण्याची सूचना सभेचे अध्यक्ष श्री. भोंडे ह्यांनी केली आणि श्री. भागवत ह्यांनीं चर्चेंत खेळाडू वृत्ति दाखवली व सभेंतील बहुमतास मान दिला, ह्या कारणानें सभेचा कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पडला हें येथें नमूद केलें पाहिजे.

### राष्ट्रीय प्रार्थनादिन

युद्धास प्रारंभ झाल्यास दोन वर्षे पुरीं झाल्यानंतरचा पहिला रविवार ता. ७ सप्टेंबर रोजीं येतो. तो दिवस हिंदुस्थानांतील सर्व धर्मीयांनीं ब्रिटिश लोकांप्रमाणेंच राष्ट्रीय प्रार्थनादिन म्हणून पाळावा, अशी व्हाइसरॉयांनीं विनंति केली आहे.

### वेड्यांच्या इस्पितळांतील व्यथितांची संख्या

मुंबई प्रांतांतील वेड्यांच्या इस्पितळांतील व्यथितांची रोजची सरासरी संख्या १९४० सालीं ३,६३६ भरली. त्यांत २,४७३ पुरुष व १,१६३ स्त्रिया होत्या.

## दि कराड अर्बन को-ऑ. बँक लि. कराड

## नोटीस

कराड अर्बन को-ऑ-बँकेच्या भागीदारांची चोविसावी वार्षिक साधारण सभा रविवार ता. १४।९।४१ रोजीं सकाळीं ८ वाजतां बँकेच्या इमारतींत भरणार आहे. सन १९४०-४१ सालचा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे तीन सभासदांची निवडणूक करणें व पोटनियम दुरुस्ती मंजूर करणें वगैरे कामे सदर वेळीं होणार आहेत. तरी सर्व सभासदांनी सभेस अगत्य यावें. कळावें.

कराड, तारीख १०-८-४१ } व्ही. पी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर.

## स्फुट विचार

### इराणमध्यें जर्मनीस पायबंद

लहान देशांत त्यांस तज्ज्ञांची मदत देण्याच्या निमित्तानें आपलीं माणसें पेरून त्यांच्याकरवी तेथें फंदफितुरी करावयाची आणि ते देश स्वतःच्या काबूंत आणून ठेवावयाचे ही जर्मनीची युद्धनीति आतां सर्वांच्या परिचयाची झाली आहे. ह्या धोरणास युरोपमध्यें यश आल्याकारणानें त्याचा प्रयोग इराणमध्यें करण्याचा हिटलरचा प्रयत्न चालू होता. ह्या संबंधांत ब्रिटिश मुत्सद्दी धोक्याची सूचना देत आले आहेत. सीरिया व इराक ह्या देशांत ब्रिटिश फौजांनीं जर्मनीच्या गुप्त कारवायांचा वेळींच प्रतिकार केला नसता तर एशियाच्या पश्चिम भागांत त्या देशाचें प्रस्थ पसरलें असतें. रशियांत जर्मनीची मोहीम चालली आहे, तिला मदत म्हणून इराणमध्यें ढवळाढवळ करण्याचा आणि तेथील तेलाच्या पुरवठ्यावर ताबा मिळवण्याचा हिटलरनें व्यूह रचला होता. त्या संबंधांत इंग्लंडनें इराणी सरकारास अनेक वेळां भयसूचना दिली होती. तज्ज्ञांचें पांघरूण घेऊन इराणमध्यें कारवाया करणाऱ्या जर्मनांस काढून टाकणें इष्ट आहे असें त्या सरकारास कळवण्यांत आलें असतां त्या संबंधांत त्यानें उडवाउडवच केली, ह्या कारणानें अखेर रशिया व इंग्लंड ह्यांस आपल्या फौजा इराणमध्यें पाठवून तेथील राकेलच्या विहिरी व इतर मान्याचीं ठिकाणें आपल्या संरक्षणाखालीं घेणें प्राप्त झालें आहे. उत्तरेच्या बाजूनें रशियाचें सैन्य आणि दक्षिण व पश्चिम ह्या बाजूंनीं ब्रिटिश फौजा इराणमध्यें चालून गेल्या आहेत. इराणचें स्वातंत्र्य व इराणचा मुलूख हीं अबाधित रहातील असें आश्वासन इंग्लंड व रशिया ह्यांनीं इराणी सरकारास दिलें आहे आणि इराणचा उपयोग प्रस्तुत युद्धांत जर्मनीस करतां येऊं नये अशी व्यवस्था काय ती आपणांस करावयाची आहे असें त्यास त्यांनीं कळवलें आहे. आपला इराणमधला डाव फसला ह्याविषयीं जर्मनीस अर्थातच विषाद वाटत असून त्यासंबंधांत दुसऱ्या हिकमती लढवण्याचे हिटलरचे प्रयत्न चालू होणार ह्यांत संशय नाहीं. तथापि, इराणमध्यें घडाडीचें धोरण अवलंबल्याबद्दल इंग्लंड व रशिया ह्यांचें चोंहोंकडे अभिनंदनच होईल. त्या योगानें तीन-चार महत्त्वाचे हेतु साध्य झाले आहेत. पश्चिम एशियांत जर्मनीस पायबंद बसला आहे ही पहिली गोष्ट आहे. हिंदुस्थानच्या संरक्षणास त्यानें मदत झाली आहे ही दुसरी बाब आहे. रशियास युद्धसामुग्री पुरवण्याचा सुरक्षित मार्ग त्यामुळें मोकळा झाला आहे हाहि येथें महत्त्वाचा परिणाम आहे. इराणमधील तेलाचा पुरवठा निश्चित होऊन रशियाची पिछाडीची बाजू बळकट बनली आहे हा मोठा फायदा आहे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. इराणी सरकारनें वेळींच जागें होऊन इंग्लंड व रशिया ह्यांच्यांशीं सहकार्य करणें त्या देशाच्या व इतरांच्या हिताचें आहे ही गोष्ट त्यास पटेल असा भरंवसा वाटतो. आपल्या फौजांस न लढण्याविषयीं हुकूम इराणी सरकारनें काढले असून इंग्लंड व रशिया ह्यांनीं सुचवलेल्या व्यवस्थेच्या अटी मान्य करण्याची त्याची तयारी आहे हें ह्या परिस्थितीचें निदर्शक आहे.

---

### युरोपांत जर्मनीचा वाढता द्वेष

जर्मनीनें युरोपांतील ज्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य पायाखालीं तुडवलें आहे, त्यांमधील लोकांमध्यें हिटलरशाहीविषयीं वसत असलेला तिटकारा सुप्तावस्थेंत असला तरी तो तसाच फार वेळ टिकूं शकत नाहीं. त्या राष्ट्रांत जर्मनीची सत्ता बंदुकांच्या जोरावर स्थापन झाली आणि त्याच जोरावर ती टिकवण्यांत येत आहे. त्यांची आर्थिक स्थिति हलाखीची झाली आहे. आपणांस युद्धासाठीं लागणारा कच्चा पक्का माल जर्मन सरकार पादाक्रांत केलेल्या देशांतून उचलून नेत आहे आणि तेथील लोकांस आचार-विचार, भाषण ह्यांचें कांहींच स्वातंत्र्य उरलेलें नाहीं. त्यांतला असंतोष जर्मनीनें दाबून टाकण्याचा प्रयत्न केला तरी तो आंत धुमसत आहे आणि संधि मिळतांच तो पेट घेतल्यावांचून राहावयाचा नाहीं हें निश्चित आहे. फ्रान्समध्यें व्हीशीचें सरकार जर्मनीच्या ताटाखालचें मांजर बनलें आहे आणि आपल्या लोकांचा मधून मधून डोकें वर काढणारा असंतोष क्रूरपणानें हाणून पाडीत आहे. लाव्हाल हे जर्मनीचे हस्तक बनल्यामुळें ते व त्यांचे सहकारी ह्यांच्या विरुद्ध फ्रेंच जनता सत्रळत चालली आहे. लाव्हाल व त्यांचे साथीदार ह्यांवर नुकत्याच गोळ्या झाडण्यांत आल्या तो प्रसंग ह्या वाढत्या असंतोषाचा निदर्शक आहे. फ्रान्सच्या स्वातंत्र्याचे चहाते हे राष्ट्राचे शत्रू आहेत असें भासवून व्हीशी सरकारानें आपल्या बाजूस नसलेल्या लोकांवर दडपशाहीचें शस्त्र उचललें आहे. जर्मनीच्या विरुद्ध युरोपांत चोहोंकडे द्वेष पसरला आहे तो धुमसत आहे आणि त्याच्या ज्वाला लवकरच भडकणार व पसरणार असा रंग दिसत आहे. रशियन मोहिमेंत जर्मनीचें भयंकर नुकसान होत आहे ती आपत्ति नात्सी पक्षास आपल्या लोकांपासून झाकून ठेवणें कठीण आहे. ब्रिटिश व रशियन विमानांचे जर्मनींतील महत्त्वाच्या शहरांवर हल्ले चालले आहेत त्यांचा कटु अनुभव ह्या लोकांस तर प्रत्यक्षच येत आहे. हिटलरशाहीस आंतून व बाहेरून अशी दुहेरी कात्री लागल्यानें तिचा शेवट जवळ येत चालला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मागें इराकमध्यें व आतां इराणांत जर्मनीस चांगली थप्पड बसली आहे तिचाहि परिणाम त्याच प्रकारचा झाल्यावांचून रहावयाचा नाहीं.

### हिंदी रेलवेजचें वाढलेलें उत्पन्न

हिंदी रेलवेजचे १९४०–४१ सालचे हिशेब पुरे झाले आहेत त्यांवरून सदरहू वर्षांत त्यांस निवळ उत्पन्न मोठ्या प्रमाणांत मिळालें असल्याचें दिसून येतें. माणसांच्या व मालाच्या वहातुकीचे रेलवेजचे दर वाढविण्यांत आले असून युद्धपरिस्थितीमुळें त्यांवरील ने-आण वाढली आहे. ह्या कारणांमुळें रेलवेजच्या उत्पन्नांत वाढ होणें स्वाभाविक आहे. १९४०-४१ सालीं हिंदी रेलवेजच्या खर्चापेक्षा उत्पन्न १८ कोटि ४६ लक्ष रुपयांनीं अधिक झालें आहे. मध्यवर्ती पब्लिक अकौंटस कमिटीस ह्या बाबत माहिती देण्यांत आली आहे. उत्पन्नांतल्या ह्या वाढाव्याची वाटणी रेलवेजचा रिझर्व्ह फंड व हिंदुस्थान सरकार ह्यांचे दरम्यान विशिष्ट प्रमाणांत व्हावयाची असते. त्या व्यवस्थेस अनुसरून वरील वाढाव्यापैकी हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीस १२ कोटि, १९ लक्ष रुपये मिळतील आणि बाकीची रकम रेलवेजच्या रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत येईल. सध्याच्या युद्धपरिस्थितींत मध्यवर्ती सरकारच्या तिजोरींत उत्पन्नाची जेवढी भर पडेल तेवढी इष्टच आहे. १९३८–३९ सालीं हिंदी रेलवेजच्या उत्पन्नांत १ कोटि ३७ लक्षांची शिल्लक राहिली होती, ती १९३९–४० मध्यें ४ कोटि ३३ लक्ष रुपयांवर गेली. १९४०–४१ सालीं हा आकडा १८ कोटि ४६ लक्ष रुपयांपर्यंत चढला आहे. ह्या तुलनात्मक आकड्यांवरून हिंदी रेलवेजच्या उत्पन्न-खर्चाच्या परास्थितीवर बोधदायक प्रकाश पडत आहे.

## युद्ध आणि हिंदुस्थानची आर्थिक व्यवस्था

### प्रो. काळे ह्यांनीं मुंबईच्या रेडिओवरून केलेलें भाषण

( ऑल इंडिया रेडिओ, मुंबईचे डायरेक्टर ह्यांच्या परवानगीनें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. )

परराष्ट्रीय व्यापाराची स्थिति ह्या प्रमाणें होती तरी लंडनवरील पौंड स्टर्लिंगमधल्या हुंड्या मिळण्यास रिझर्व्ह बँकेस कांहींच अडचण भासली नाहीं आणि हुंडणावळीचा दर सबंद वर्षभर स्थिर राहिला. हिंदुस्थान सरकार आणि ब्रह्मदेशचें सरकार ह्यांस सुमारें २३⁄४ कोटि पौंड लंडनला आपलें तेथील देणें भागवण्यासाठी पाठवावयास हवे होते. परंतु ब्रिटिश सरकाराच्या वतीनें हिंदुस्थान सरकार ह्या देशांत पैसा खर्च करीत आहे त्याची रक्कम सुमारें ४१⁄२ कोटी पौंडाचे वर झाली आणि ती त्या सरकाचे खात्यावर लंडनमध्यें जमा झाली. त्यामुळें सुमारें २१⁄२ कोटी पौंड वरील दोन सरकारांच्या स्टर्लिंगमधील देण्यापेक्षा अधिक तेथें शिल्लक राहिले. देण्या-घेण्याच्या व्यवहारांत हिंदुस्थानचें परराष्ट्रांकडून येणें निघतें त्याचा उपयोग युद्धसामुग्रीच्या परराष्ट्रीय खरेदीसाठी मुख्यत्वें करून व्हावा म्हणून हिंदुस्थान सरकार व रिझर्व्ह बँक यांनीं परराष्ट्रीय हुंड्यांच्या खरेदी विक्रीवर कडक नियंत्रण घातलें आहे. अमेरिकेवरील डॉलर हुंड्यांचे बाबतींत त्या देशांत होणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील खरेदीच्या किमतीची भरपाई करण्यास सुलभ जावें या हेतूनें विशेष खबरदारी घेण्यांत आली आहे.

ब्रिटिश सरकारासाठीं हिंदुस्थान सरकार त्या देशांत खर्च करीत आहे, त्याची फेड लंडनमध्यें होत असल्यानें रिझर्व्ह बँकेच्या पौंड स्टर्लिंगमधल्या तिकडील शिलका वाढल्या त्यांपैकी कांहीं लंडनमध्यें अल्प मुदतीनें गुंतवण्यांत आल्या. ही गुंतवण गेल्या सालअखेर १६४ कोटी रुपयांपर्यंत गेली आणि मध्यंतरीं गेल्या मार्चमध्यें तिचा आकडा २१७ कोटी रुपयांवर चढला. रिझर्व्ह बँकेच्या त्या लंडनमधील मोठ्या शिलकेचा उपयोग हिंदुस्थान सरकारचें पौंड स्टर्लिंग मधलें मुदतीचें कर्ज फेडून टाकण्याकडे करतां आला ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट गेल्या वर्षी घडली. बँकेनें ८८ कोटी रुपये किमतीइतकी पौंडांतली रक्कम हिंदुस्थान सरकारास कर्जफेडीसाठी सहज दिली तरी तिची लंडनमधील शिल्लक मोठ्या प्रमाणांत राहिली आहे. आतांपर्यंत १३४ कोटी रुपये किमतीचें पौंडातलें हिंदुस्थान सरकारचें कर्ज फेडण्यांत आलें आहे आणि त्याच्या जागीं हिंदुस्थानांतील कर्ज रोख्यांची अदलाबदल करण्यांत आलीं आहे ती त्या देशास फायदेशीर आहे.

### जनतेचा सरकारी रोख्यांवरील विश्वास

जून १९४० मध्यें हिंदुस्थानांतील सरकारी कर्ज रोख्यांच्या किंमती घटल्या परंतु त्या हळूहळू सुधारत गेल्या आणि एकंदरीनें त्या रोख्यांचे भाव वर्षभर चढीचे राहिले. साडेतीन टक्क्यांच्या प्रॉमिसरी नोटेची किंमत ८५ रुपयेपर्यंत उतरली होती ती अखेर ९६ रुपयांवर चढली.नाणें बाजारांत पैशाचा पुरवठा भरपूर राहिला आणि सरकारनें काढलेल्या कर्जास लोकांकडून चांगला आश्रय मिळाला. जनतेचा सरकारी रोख्यांवरचा विश्वास १९४०–४१ मध्यें कसा कायम राहिला हें पोस्टल कॅश सर्टिफिकिटांच्या व्यवहारांवरून दिसून येतें. १९४० सालाच्या मे ते जुलै ह्या महिन्यांत कॅश सर्टिफिकिटांचे ६१⁄२ कोटि रुपयांचे वर पैसे परत द्यावे लागले आणि सर्टिफिकिटांतली नवी गुंतवण घटली. तथापि, जुलै महिन्यानंतर स्थिति सुधारली. पूर्वीचे वर्षाचें मानानें कॅश सर्टिफिकिटांची १९४०–४१ मधील विक्री बरीचशी कमी झाली तर दहा वर्षे मुदतीचीं डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स जून १९४० मध्यें काढण्यांत आलीं आणि १९४१ मार्च अखेर सुमारें २१⁄२ कोटि रुपयांच्या ह्या सर्टिफिकिटांचा खप झाला. पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेच्या व्याजाचा दर दीड टक्का सबंध वर्षभर कायम होता. १९४० च्या मे–जून महिन्यांत ह्या बँकेतून ठेवी मोठ्या प्रमाणांत काढण्यांत आल्या, तथापि, जुलै पासून पैसे काढण्याची लोकांची प्रवृत्ति मर्यादित झाली. १९३९–४० सालाच्या मानानें १९४०–४१ मधील परत दिलेल्या लोकांच्या ठेवींचा आकडा थोडासा कमीच होता. युद्ध परिस्थितीमुळें लोकांच्या मनाची झालेली चलबिचल गेल्या वर्षाच्या प्रारंभीं अल्पकालिक होती आणि सरकारी रोखे व नाणें बाजारांतील व्यवहार ह्यांवरचा जनतेचा विश्वास पुन्हां स्थिर झाला हें आतांपर्यंत दिलेल्या माहितीवरून ध्यानांत आलेंच असेल. ह्याच प्रकारचा अनुभव बँकांकडच्या ठेवी आणि चलनी नोटा ह्यांचे बाबतींत आला हें नमूद करणें आवश्यक आहे.

### बँकांचा अनुभव

कांहीं काळपर्यंत ठेवी परत करण्याचा ताण कांहीं बँकांवर पडला पण त्यांनीं यशस्वी रीतीनें ह्या परिस्थितीस तोंड दिलें आणि हा पैसा त्यांचेकडे पुन्हां परतला. युद्ध काळांत असे प्रसंग येणें अपरिहार्य आहे हें जाणून आपला पैसा होईल तितका तरता ठेवण्याचें धोरण बँकांनीं स्वीकारलें आहे ह्याविषयीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर जेम्स टेलर, ह्यांनीं नुकतेंच समाधान व्यक्त केलें आहे. १९४० सालच्या जून अखेर शेड्यूल्ड ( रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या ) बँकांजवळील ठेवींची एकूण रक्कम सुमारें २५१ कोटि रुपये होती ती १९४१ च्या जून महिन्याचे अखेरीस ३०२ कोटि रुपये झाली. रिझर्व्ह बँकेकडे ह्या बँकांची रोकड शिल्लक असते तीहि गेल्या साली ९ कोटि रुपयांनीं वाढली. त्यांनीं दिलेल्या कर्जांत सुमारें १२ कोटि रुपयांची घट झाली. ह्या आकड्यांवरून असें दिसून येईल कीं नाणें बाजारांत पैशाचा पुरवठा भरपूर आहे. युद्ध परिस्थितींत चलनास वाढती मागणी असते आणि ह्यामुळें एकूण चलनी नोटांची किंमत १९३९–४० साल अखेर सुमारें २५९ कोटि रुपये होती, ती १९४०–४१ अखेर २९१ कोटि रुपयांपर्यंत चढली. एक रुपया किमतीच्या नोटा वाढत्या प्रमाणांत प्रचलित होत आहेत. त्यांनीं रुपयाच्या नाण्यांची जागा घेतली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलांची १९४०–४१ मध्यें सुमारें ११४ कोटि रुपयांची विक्री झाली आणि त्यांवरील व्याजाचा दर सरासरीनें दरसाल दर शें. १२ आणे ९ पै इतकाच पडला. पूर्वीच्या सालीं १२० कोटी रुपयांचीं ट्रेझरी बिल्स विकलीं होतीं. तीं त्यांवरील सरासरीच्या व्याजाचा दर १ रु. १० आणे ३ पै इतका होता. बदलणाऱ्या युद्धपरिस्थितीशीं हिंदुस्थानच्या आर्थिक व्यवस्थेचा मेळ कसा पद्धतशीर व यशस्वी रीतीनें घातला जात आहे त्याचीं भरपूर उदाहरणें आतांपर्यंत दिलेल्या माहितीमध्यें सांपडतील ह्यांत संशय नाहीं. ( संपूर्ण )

## लवादाचा कायदा

लेखकः—श्री. के. बा. गजेंद्रगडकर, बी. ए. ( ऑनर्स ), एलूएल्. बी.

( मागील अंकावरून समाप्त )

पंचानें दिलेल्या निर्णयासंबंधीं पक्षकारास निराळा दावा आणतां येत नाहीं. पंचानें दिलेला ठराव हा योग्य नाहीं, तो बेकायदा ठरवावा असा फक्त अर्जच कोर्टाकडे पक्षकारास करतां येतो. लवाद-निवाडा सकृद्दर्शनीं अपूर्ण असून एखादी उघड चूक निवाड्यामध्यें असेल किंवा पंचानें आपल्याकडे सोपविलेल्या बाबीपेक्षां जास्त गोष्टींबद्दल लवादानें निवाडा दिला असेल तर कोर्टास निवाड्यामध्यें दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे, त्याचप्रमाणें लवादांनीं दिलेला निर्णय अपूर्ण असेल किंवा कांहीं बाबींवर निर्णय दिलाच नसेल तर कोर्टास निवाडा फेर-विचाराकरितां लवादाकडे परत पाठवितां येतो. लवादानें आपल्या कामांत गैरवर्तन केलें असेल किंवा लवादनिवाडा अयोग्य रीतीनें केला असेल तर सदर निवाडा कोर्टास अजिबात रद्द करतां येतो. साधारणपणें लवादापुढें काम कसें चालतें ह्याची रूपरेषा श्री. देशपांडे यांनीं आर्बिट्रेशन ॲक्ट ह्या पुस्तकांत पान १७ वर दिली आहे. येणेंप्रमाणें ह्या कायद्याचें स्थूलस्वरूप आहे.

लवादापुढें चालणाऱ्या कामास मुदतीचा कायदा लागू होतो असा स्पष्ट उल्लेख ह्या कायद्यामध्यें केला आहे. निवाडा कोर्टांत दाखल झाल्यावर त्या निवाड्यास अनुसरून कोर्ट आपला ठराव करतें व त्या ठरावानुसार हुकूमनामा होतो. ज्या कोर्टांत फिर्याद चालली असती त्याच कोर्टांत निवाडा दाखल करावयाचा आहे.

उभय पक्षकारांनीं आपणामध्यें असलेला अगर केव्हांहि पुढें होणारा तंटा लवादानें मिटवावा अशा तऱ्हेचा करार तंटा उत्पन्न होण्यापूर्वींहि पक्षकारांना करतां येतो व अशा उभय पक्षकारांचा करार लेखी झाला पाहिजे व पुढें ज्यावेळेस तंटा उपस्थित होईल त्यावेळीं तंट्याचें प्रकरण लवादाकडे सोपवावयाचें असतें. हा जो पक्षकारांमध्यें लेखी करार होतो त्याला राजीनामा म्हणतात. हल्लीं बँका अनेक व्यापाऱ्यास रकमा कर्जाऊ देतात अगर त्यांचीं देवघेवीचीं खातीं ठेवतात. असें खातें ठेवण्याचे वेळींच किंवा रकम कर्जाऊ देण्याचे वेळींच दोघांमध्यें तंट्याचा प्रसंग आल्यास त्यांचा निकाल पंचामार्फत करावयाचा त्याकरितां कोर्टांत जावयाचें नाहीं असा करार करून ठेवणें योग्य आहे. कारण ह्यावेळीं ऋणको गरजू असतो व असा करार करून तंट्याचा निर्णय करून घेणें त्याचे दृष्टीनेंहि श्रेयस्कर असतें, त्यामुळें पुष्कळ वेळ व खर्च वाचतो. साधारणपणें खालील प्रकारचा करार ऊर्फ राजीनामा उभय पक्षकारांनीं लिहून ठेवावाः—

१. एकपक्षी सावकार अगर कोणी इसम व दुसरेपक्षी ऋणको अगर दुसरा इसम यांच्या दरम्यान हल्लीं अस्तित्वांत असलेले किंवा पुढें उत्पन्न होणारे वाद किंवा तंटे यांचा खालीं लिहिल्याप्रमाणें निकाल करून घेण्यास आमची खुषी व कबुली आहे.

२. रा. ( येथें लवादाचें नांव घालावें ) यांनीं स्वतः अगर ते नेमतील त्या पंचांनीं निकाल करावा.

३. लवादपंचांकडून जो निवाडा होईल तो उभयतांस कबूल व मान्य आहे तसेच लवाद पंचायतीचे खर्चास व पंचास योग्य मेहेनताना देण्यास आमची कबुली आहे. हा राजीनामा स्वसंतोषानें लिहून दिला.

साक्ष सह्या
१.................... १....................
२.................... २....................

याप्रमाणें कोणताहि व्यवहार करतेवेळींच असा राजीनामा करून घेतल्यास पुढें जिकीर होणार नाहीं. हल्लीं कोर्टामध्यें जे कज्जे चालू आहेत, त्यापैकीं फार थोड्या कज्ज्यामध्येंच अगदीं कायद्याच्या कलमांचा कीस काढून भांडणें भाग पडतें. पुष्कळच खटले मामुली स्वरुपाचे असून त्यांचा निकाल कोणत्याहि समंजस माणसास समता, न्यायबुद्धि व न्याय यांच्या तत्त्वास अनुसरून करणें अवघड नाहीं. त्यायोगें पक्षकारांचा पुष्कळच फायदा होईल ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. शिवाय लवादपंचास कायद्याच्या मुद्यासंबंधीं विचार करणें झाल्यास त्या कायद्याच्या मुद्यावरच पंचास कोर्टाकडून निर्णय मागण्याचा हक्क ह्या लवाद-कायद्यानें दिला आहे.

सरकारचा उद्देशहि लोकांनीं लवादामार्फत आपल्या तंट्यांचा निर्णय करून घ्यावा, असाच दिसतो. सहकारी संस्थांचें जाळें देशामध्यें हल्लीं फार पसरत आहे व बहुशः प्रत्येक खेड्यांत सहकारी को-ऑपरेटिव्ह सोसायटी असतेच; ती आपल्या सभासदास कर्जाऊ रकमा देते. सदर सोसायटीस आपल्या रकमेच्या वसुलीबद्दल कोर्टाकडे जातांच येत नाहीं. सोसायटीनें आपल्यामधील व सभासदांमधील तंटे लवादामार्फतच चालविले पाहिजेत. त्याबाबतींत दिवाणी कोर्टास अजिबात अधिकार नाहीं असा स्पष्ट निर्देश सहकारी संस्थेसंबंधीं जो कायदा आहे त्यामध्यें आहे, त्यामुळें गरीब रयतेचा पुष्कळच फायदा आहे. नामदार हायकोर्ट जज्जांचेंहि मत लोकांनीं आपले तंटे लवादामार्फत निकालांत आणावेत, असाच दिसतो; कारण Civil Court Manual सहावें प्रकरण लवाद ( Arbitration ) असें आहे. त्यामध्यें म्हटलें आहे. "In their Lordship's opinion while the substitution of arbitration by private bodies or persons for expensive and protracted litigation in the Civil Courts is in itself not only reasonable but desirable." ह्याप्रमाणें लवादामार्फत तंट्याचा निकाल करून घेणें हें श्रेयस्कर आहे, ह्याबद्दल आतां एकमत आहे व पूर्वीच्या कायद्यामध्यें असलेलीं वैगुण्यें दूर करून सर्व हिंदुस्थानास लागू होणारा लवाद-कायदा सरकारनें प्रसृत केला आहे. त्याचें ज्ञान सर्व लोकांस असणें अत्यंत जरूर आहे. (' न्यायबोध 'वरून )

## विटें मर्चंट्स को. बँक लि.

वरील बँकेचे पटावर १४७ सभासद असून त्यांनीं ७,२४० रुपयांचे भाग घेतलेले आहेत. २० हजार रुपये भांडवल जमल्याखेरीज बँकेचा व्यवहार पुढें पूर्ववत् चालू शकणार नाहीं, असा नियम झाल्यामुळें बँक हें नांव राखून धंदा करतां येईल किंवा नाहीं ह्याची शंका वाटूं लागली. तथापि, पुरेसें भांडवल जमविण्याचा भागीदारांचा प्रयत्न चालू असून जरूर तेवढें भांडवल जमेल, असा विश्वास वाटूं लागला आहे. बँकेचे एकूण फंडस ११८५ रुपयांचे असून ४१½ हजारांच्या तिचेकडे ठेवी आहेत. बँकेनें ६ हजार रुपये सरकारी रोख्यांत गुंतवले असून २५½ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. वर्षा अखेर बँकेस ५३८ रुपये निवळ नफा झाला. भागीदारांस ५% दरानें डिव्हिडंड देण्यास ३०२ रुपये लागतील. भाग भांडवल वाढल्यावर त्यावरील डिव्हिडंडची रकमहि वाढेल, ह्या दृष्टीनें नफावाटणीकडे बँकेचें व्यवस्थापक मंडळ लक्ष पुरवीलच.

## कातडीं कमाविण्याचा धंदा

### निजाम सरकाची पंचवार्षिक सुधारणा योजना

वरील पंचवार्षिक सुधारणेची योजना करण्यांत आल्या-कारणानें आतांपावेतों संस्थानांतील प्राचीन पद्धतीनें करण्यांत येणाऱ्या कातडीं कमाविण्याच्या धंद्यास चांगलीच चालना मिळाली आहे. निजाम सरकारनें या योजनेस मंजुरी दिली असून तीस एक लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. यापैकीं निमी रक्कम वरचेवर खर्च पडणार नाहीं. या योजनेप्रमाणें सोईस्कर अशा केंद्रांच्या ठिकाणीं कातडीं कमाविण्यासाठी पंधरा शेड्स ( छपरें ) उभारण्यांत येणार आहेत. येथें या धंद्यांत काम करणारे चांभार व ढोर यांना तज्ज्ञ कामगारांकडून वरील धंद्याचें शिक्षण देण्यांत येईल. कातडीं कमाविणारा एक इन्स्पेक्टर, कातडीं सोलून काढणारा, हातानें तासकाम करणारा, ढोर व मोची इतके लोक वरील तज्ज्ञ मंडळींत राहतील. कातडीं सोलून काढणें, तीं वाळवून खारवून ठेवणें, नंतर तीं कमाविणें व त्यांचे जिन्नस बनविणें या सर्व गोष्टी शास्त्रीय पद्धतीनें वरील मंडळी करतील.

गुरेंढोरें आणि मेंढरें हीं हिंदुस्थानांतील इतर भागांतील खेडुतांप्रमाणें, हैद्राबाद ग्रामीण जनतेचीहि महत्त्वाची मालमत्ता आहे हें समजलें म्हणजे वरील योजनेचें महत्त्व पटेल. याचा परिणाम असा होईल कीं, कातडीं सोलून काढणें व तीं कमाविण्याच्या सध्याच्या पद्धतींत सुधारणा होऊन, त्यांची किंमत वाढल्यास खेडुतांचें उत्पन्न साहजिकच जास्त वाढेल. कातडीं वाळवून खारविणें, कमाविणें व त्यांची विक्री करणें या सर्वांच्या दृष्टीनें संस्थानांतल्या या धंद्याच्या स्थितीची पहाणी थोड्या दिवसांपूर्वींच करण्यांत आली. या निरीक्षणांत असें आढळून आलें कीं दरवर्षी १६,५०,००० कातडीं तयार होतात व यांपैकीं $\frac{1}{10}$ कातडीं हत्त्या केलेल्या जनावरांचीं असून बाकीचीं मृत जनावरांचीं असतात. वरील पाहणी करण्यानें हें निदर्शनास आलें कीं, कातडीं सोलून काढणें व कमाविणें या दोन्हींची पद्धत अगदीं पुरातन काळाची असल्यानें त्यांची किंमत त्यामुळें कमी येते. प्रतिवर्षी एकंदर ३०,००० कमावलेल्या कातड्यांपेक्षां जास्त कातडीं निर्यात होत नव्हतीं. याचें मुख्य कारण हें होतें कीं, यांत फार हलक्या दर्जाचीं कातडीं असत. मेलेल्या जनावरांच्या कातड्यांचा मोठा हिस्सा खेड्यांतील चांभार व ढोर लोक कमावीत असत असें आढळून आलें व या तयार झालेल्या कातड्यांचे चप्पल, खोंड, मोटा, वगैरे किरकोळ प्रकारचे जिन्नस ग्रामीण विभागांत तयार करण्यांत येत आहेत.

### योजना

अगोदर दर्शविल्याप्रमाणें, सरकारी योजनेतहत या धंद्याच्या पुढील सर्व अवस्थेंत सुधारणा घडवून आणावयाची आहे:—

( १ ) कातडीं सोलून काढणें व तीं वाळवून खारविणें,
( २ ) कातडीं कमाविणें आणि,
( ३ ) त्यांचा माल तयार करणें.

सध्यां स्थापन करण्यांत येणारे कातडीं कमाविण्याचे आदर्श कारखाने व त्यांचें मार्गदर्शन, आणि त्यांवर नियंत्रण करण्याचें काम या बाबतींत नेमलेले अधिकारी करतील. नोकर मंडळी व कातडीं कमाविणारे लोक यांच्या मदतीनें सदरील ऑफिसर कातडीं सोलणें, तीं वाळवून खारविणें व कमाविणें हीं कामें योग्य रीतीनें करण्यांत यावींत म्हणून प्रचार करतील. जिल्ह्यांतून या धंद्यासंबंधींचें आणखी निरीक्षण करून कारखान्यांच्या मालकांनाहि ते सल्ला देतील.

कातडीं सोलून काढण्याच्या विभागाची व्यवस्था करण्यांत आली आहे. कातडीं सोलण्याचें काम करणारा मनुष्य आपलें काम या ऑफिसरच्या देखरेखीखालीं करील, व तो आंखलेल्या कार्यक्रमाप्रमाणें शहर व खेड्यांतील कारखान्यांना भेट देऊन कातडीं न फाडतां तीं सोलून काढण्याची योग्य पद्धति त्यांना शिकवील. कातडीं वाळविण्याची व खारविण्याची आधुनिक पद्धतहि हा मनुष्य त्यांना शिकवील.

तिसऱ्या विभागांत कातड्यांचा माल तयार करण्यांत येईल. सध्यां संस्थानांत तयार होणारा कातड्याचा माल, संयुक्तप्रांत, मद्रास नि मुंबई येथें तयार होणाऱ्या मालाशीं तुलना केल्यास, अतिशय हलक्या दर्जाचा आहे. प्रयोग म्हणून कातडीं कमाविण्याच्या एका विभागास 'मोची' विभाग जोडला जाईल व एक सुशिक्षित व या धंद्यांत शिकून पारंगत झालेला व ज्यांस त्यासंबंधीं प्रत्यक्ष अनुभव आहे अशा गृहस्थाच्या देखरेखीखालीं हा मोची-विभाग काम करील. कातडीं कमाविणें, व चप्पल, जोडे, सूटकेसेस ( कपडे ठेवण्याच्या पेट्या ) इ. कातड्याचा माल तयार करण्याबाबत तो खेडुतांना शिक्षण देईल.

### आणखी प्रोत्साहन

चांभार व ढोर लोकांनीं सुधारलेल्या पद्धतीचा अवलंब करावा म्हणून त्यांचें मन वळविण्यासाठी प्रथम त्यांना सरकारी कातडीं कमाविण्याच्या कारखान्यांत मजुरी देऊन कातडीं कमाविण्याचें काम करण्यास सांगण्यांत येईल. या योजनेप्रमाणें देण्यांत येणाऱ्या पैशांतून लागणारीं कातडीं खरेदी करावयाचीं आहेत. अशा तऱ्हेनें ३-४ महिने काम शिकल्यानंतर त्यांना आपल्या स्वतःच्या मालकीचीं कातडीं कमाविण्यासाठीं या कारखान्यांत आणण्याची परवानगी दिली जाईल व तज्ज्ञ कातडीं कमाविणाऱ्यांच्या देखरेखीखालीं ती स्वखर्चानें त्यांना तेथें कमावितां येतील.

### प्रचारक पथकें

आशिक्षित चांभार व ढोर यांना शक्य तितक्या लवकर कातडीं कमाविण्याच्या सुधारलेल्या पद्धतीचें महत्त्व समजावें या मुख्य उद्देशानें वरील कामांचा कार्यक्रम हातीं घेण्यांत येईल. या योजनेप्रमाणें स्थापण्यांत येणारें कातडीं कमाविण्याचें केंद्र जवळजवळ एक वर्षपावेतों एकाच ठिकाणीं काम करील. जर ही सुधारलेली पद्धत शिकण्याची इच्छा असणाऱ्यांची संख्या जास्त वाढेल तर वरील मुदत दोन वर्षांपर्यंतहि वाढविण्यांत येईल. उभारण्यांत येणाऱ्या पांच पथकांपैकीं प्रत्येक पथक पुढील पांच वर्षांच्या अवधींत तीन केंद्रांच्या ठिकाणीं काम करील अशी अपेक्षा आहे. म्हणून प्रत्येक पथकाकरितां तीन 'शेड्स' उभारण्याची या योजनेनुसार व्यवस्था केली जाईल. या योजनेनुसार उभारण्यांत येणाऱ्या वरील पांच पथकांपैकीं तेलंगण विभागांत २ आणि मराठवाडा नि कर्नाटक विभागांत अनुक्रमें २ व १ अशीं पथकें स्थापण्यांत यावयाचीं आहेत.

### आणखी एक अंग

या योजनेचें तितकेंच महत्त्वाचें दुसरें अंग हें आहे कीं, प्रत्येक केंद्राच्या ठिकाणीं जर चांभार व ढोर लोकांची पुरेशी संख्या

ही नवीन पद्धत शिकून तयार होईल तर तेथील कुंड्यासह असलेली 'शेड्'त्यांच्या स्वाधीन करण्यांत येईल. नंतर त्यांचें उत्पन्न जसजसें वाढेल त्याप्रमाणें कातडीं कमाविणाऱ्या लोकांचा सहकार संघ स्थापणें व या संघाच्या प्रत्येक सभासदाकडून 'शेड्' व कुंड्यांचा उपयोग केल्याबद्दल भाडें वसूल करणें आणि वरील 'शेड्' नि कुंड्या व्यवस्थित ठेवण्याकडे हें भाडें खर्चिणें या सर्व गोष्टी करण्याचें योजिलें आहे.

### मुख्य पदार्थांचे अंगभूत पदार्थ

मेलेल्या जनावरांचा आणखी उपयोग करण्याची संभाव्यता आहे याचा येथें उल्लेख केला पाहिजे. मांसापासून शिरस, आणि रोजच्या उपयोगाचे जिन्नस व हाडांचें खत मोठ्या प्रमाणावर तयार करतां येणें शक्य आहे. कातडीं कमाविण्याचा धंदा ज्यांच्यामध्यें मुख्यतः केन्द्रित झाला आहे अशा हरिजन वर्गाचें अधिक मिळकतीचें साधन म्हणून, योग्य वेळीं, वरील माल तयार करण्याचें काम हातीं घेण्यांत येईल.

### ग्रामोद्धाराच्या कक्षेंत येणाऱ्या खेड्यांसाठी योजना

याबरोबरच मुख्य योजनेप्रमाणें उभारण्यांत येणाऱ्या आदर्श कातडीं कमाविण्याच्या 'शेड्स' पासून ज्या ग्रामोद्धाराच्या कक्षेंत येणाऱ्या खेड्यांचा प्रत्यक्ष फायदा होणें अशक्य आहे, अशांकरितां त्यासंबंधींच्या खास कामासाठी कांहीं सूचना सरकारकडे सादर केल्या आहेत. सुरवातीस पटंचरू ग्रामीण केन्द्राजवळील या कामासाठी एका खेड्याची निवड करणें व तेथें शिकून तयार झालेला एखादा चांभार किंवा ढोर दरमहा ५० रुपयांवर नेमणें हा वरील कामाचा उद्देश आहे. ग्रामोद्धाराचें कार्य करण्यासाठी योजिलेल्या तीन अथवा चार निवडक खेड्यांत कातडीं कमाविण्याच्या प्रत्येक अवस्थेंतील आधुनिक पद्धत दाखविणें हें या नोकराचें काम राहील.

### मिरज स्टेट बँक, लि., मिरज

( वार्षिक सभा: २१-९-४१. )

मिरज स्टेट बँक लि. चें खपलेल्या भागांचें भांडवल १ लक्ष रुपये व मागणी केलेल्या भागांचें वसूल झालेलें भांडवल २० हजार रुपये आहे. रिझर्व्ह फंडांत २० हजार रुपये, बिल्डिंग फंडांत ३,१०० रुपये, इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांत २५ हजार रुपये, डिव्हिडंड तरतूद फंडांत २,२०० रुपये, बुडीत व संशयित येणीं फंडांत ६५½ हजार रुपये, ह्याप्रमाणें रकमा आहेत व आतां त्यांत अनुक्रमें ५ हजार रुपये, ५०० रुपये, १ हजार रुपये, ५०० रुपये व ९½ हजार रुपये ह्याप्रमाणें भर पडणार आहे. वरील आकड्यांवरून बँकेच्या भक्कमपणाची कल्पना येईल. बँकेकडील ठेवींची रक्कम १७ लक्ष, ६३ हजार रुपये भरते. म्हणजे गेल्या दोन वर्षांत ठेवींची रक्कम ६ लक्ष रुपयांनीं वाढली आहे. मुख्य कचेरी, शाखा व इतर बँका ह्यांत ५ लक्ष रुपये असून, ५ लक्ष, ४८ हजार रुपये सरकारी कर्जरोखे व भाग ह्यांत गुंतविलेले आहेत. बँकेच्या मालकीच्या रोख्यांची ताळेबंदांतील किंमत त्यांस पडलेल्या किंमतीपेक्षा १३,१३१ रुपयांनीं जास्त आहे, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. बँकेनें एकूण ८ लक्ष ६४ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत, त्यापैकी १ लक्ष, ४०हजार सोनें गहाणावर, ४ लक्ष, ८ हजार माल गहाणावर, ९० हजार सिक्युरिटीजवर व ९६ हजार स्थावर मिळकत गहाणावर, दिलेले आहेत. "रामप्रताप हरिचंद ह्या पेढीकडे बॅलन्स शीटमध्यें जें संशयित येणें दाखवलें आहे,त्याबद्दल अलाहिदा माजी मॅनेजर यांचेवर ७६,०५८-८-०चा दावा केला असून पुढील तजवीज चालू आहे." डायरेक्टरांनीं भागीदारांस १२% डिव्हिडंड देण्याबद्दल सुचविलें आहे, त्यासाठी २,४०० रुपये लागतील. बँकेचे फंड मजबूत असून डिव्हिडंडचा दर मोठा असला तरी तें देण्यासाठी रकम मोठी लागत नसल्याकारणानें, नफ्यांतून वेगवेगळ्या फंडांत मोठ्या रकमा टाकणें शक्य होत आहे, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. बँकेची प्रगति चांगली होत आहे. श्री. विष्णु पांडुरंग बेडेकर, बी. एससी., बी. ई. हे संस्थानतर्फे चेअरमन असून श्री. लक्ष्मण गणेश मराठे, जी. डी. ए. हे मॅनेजर आहेत.

### अर्बन को. बँक लि., सांगली

( वार्षिक सभा: २९-८-४१ )

वरील बँकेचें वसूल भांडवल ३३,४२५ रुपये असून तिचा रिझर्व्ह फंड २,७५८ रुपयांचा आहे व इतर फंडांत २,४०४ रुपये आहेत. बँकेकडे २ लक्ष, ८८ हजार रुपयांच्या ठेवी आहेत. रोख व इतर बँकांत मिळून बँकेचे १ लक्ष, ७९ हजार रुपये आहेत व तिनें डिबेंचर्स व भाग ह्यांत २६½ हजार रुपये गुंतवले आहेत. बँकेनें अंगावर ६४½ हजार रुपये व तारणावर ६६½ हजार रुपये दिलेले आहेत. सालअखेर थकबाकी १३,१०४ रुपये आहे. "थकबाकी बुडीत होण्याचा संभव नाहीं. भरपूर तारण व लायक जामीन आहेत." नफावाटणीसाठी ३,०२२ रुपये आले, त्यांतून ६¼% डिव्हिडंडसाठी १,८३६ रुपये मंजूर करण्यांत आले व बाकीची रक्कम रिझर्व्ह व इतर फंडांत टाकण्यांत आली. बँकेची प्रगति होत असल्याचें रिपोर्टावरून दिसून येतें.

### मराठा चेंबरची त्रैमासिक सभा

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजूची चालू वर्षाची पहिली सर्वसाधारण त्रैमासिक सभा रविवार ता. ३१ ऑगस्ट रोजी भरली होती. त्यावेळीं चेंबरचे अध्यक्ष, श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी, ह्यांनीं चेंबरच्या तीन महिन्यांतील कामाचें सिंहावलोकन केलें व अवर्षणामुळें फार मोठा दुष्काळ पडण्याचा संभव आहे, त्याच्या आपत्तीची तीव्रता कमी करण्याचा आतांपासूनच प्रयत्न केला पाहिजे, असें ते म्हणाले. पेट्रोल नियंत्रणामुळें होणाऱ्या अडचणींचाहि त्यांनीं उल्लेख केला. श्री. मा. रा. जोशी ह्यांनीं टेलिफोनच्या नवीन दरासंबंधीं चेंबरनें केलेल्या पत्रव्यवहाराविषयीं माहिती विचारली, ती चेंबरचे कार्यवाह, श्री. आ. रा. भट, ह्यांनीं दिली. श्री. न. गं. मापटे ह्यांच्या इंपीरिअल कौन्सिल ऑफ अॅग्रिकल्चरल रिसर्चच्या गव्हर्निंग बॉडीवरील निवडणुकीबद्दल त्यांचें हार्दिक अभिनंदन करणारा ठराव सभेनें मंजूर केला. चहापानानंतर सभेचें काम संपलें.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड पुणें.

आमचे हेड-ऑफिस व शाखा-कचेऱ्यांमध्यें सेव्हिंग्ज बँकेंत ठेवलेल्या ठेवींवर हल्लीं द. सा. द. शे. दीड टक्का दरानें व्याज देण्यांत येत असतें. परंतु तें ता. १-१०-१९४१ पासून एक टक्का दरानें देण्यांत येईल.

द. वि. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | १११—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३—२ |
| ३% (१९६३–६५) ... ... ... | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) — ... | ११५—० |
| ५% म्हैसूर क़र्ज (१९५५) ... — | १२६—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १४३—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११३—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ९% ... | ४७–१२ |
| इंपीरिअल बँक (५००) १२% ... ... | १५८१—४ |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०९—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १२% ... ... | १४१–१२ |
| कराची (१००) ९% ... ... ... | २१५–१० |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १७२०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १७२१—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर (१००) ३½% ... ... | ८०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८९७–०–० |
| तापी व्हॅली (५००) ८% ... ... ... | ६६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. ... ... ... | २१६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. ... ... | ४८–१२ |
| शिंया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | २४–१४ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ८ आ. ... | ४७—८ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ४११५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २१४—२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) ७½% रु. ... ... | १४८—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३७२—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) १७२ रु. १० आ. ७ पै ... | ११९२—८ |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | १४६–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२—२—९ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६२–१४–० |

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
४ सहकार : किं. २ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक
निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें

संग्रह करा

कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट

पाचकवटी, पंचकोलासव

तसेंच

पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी

—: रक्तवर्धक :—

सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें

आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.

सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल लॅक टूथ पावडर

पोरवाल अँड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

जर्निमन टेलर व्हा.

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास

फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

पराडकर टेलर्स अॅकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

**वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख १०, सप्टेंबर १९४१ | अंक ३७**




**१८७१** सालापासून आतांपर्यंत उपयुक्त सेवेच्या गेल्या सत्तर वर्षांच्या काळांत सन लाइफ ऑफ कॅनडानें ३,८०,७६,१४,६६ रुपये देऊन विमेदारांची सेवा केली आहे.

**१९४० मधील कामाच्या प्रत्येक दिवशीं** विमेदार व त्यांचे कुटुंबीय ह्यांस ९,२०,००० रुपये अथवा सबंद वर्षांत २५,८०,०९,५३९ रुपये मिळाले. ह्या रकमेपैकीं ७३% पेक्षां अधिक रकम विमेदारांस त्यांचे ह्यातींतच देण्यांत आली व बाकीची रकम, विमेदारांचे मृत्युनंतर त्यांचेवर अवलंबून असलेल्यांस दिली गेली.

**४६,४४,०७,६९५ रुपयांचीं विमापत्रें** गेल्या वर्षी देण्यांत आलीं. म्हणजे **विम्याच्या संरक्षणाची एकूण रकम** वाढून ती **८,११,९७,५०,२२१ रुपये झाली.** चालू असलेल्या **विमापत्रकांची संख्या** ( ग्रुप सर्टिफिकिटें धरून ) बारा लाखांपेक्षा अधिक आहे **कंपनीची एकूण जिंदगी** १,६०,४९,१६,०७३ रुपयांची आहे. जिंदगीचा कंपनीच्या इतिहासांतील हा सर्वांत मोठा आकडा आहे.

पी. व्ही. लाड—यूनिट ऑर्गनायझर फॉर डेक्कन,
लक्ष्मीरोड पुणें, २.

"ASSURES SECURITY FOR OVER ONE MILLION PARTNERS"

**SUN LIFE OF CANADA**

( कॅनडामध्यें १८६५ सालीं स्थापन झालेली लिमिटेड कंपनी )

# विविध माहिती

### बँकांस सुट्टी

बुधवार ता. १० रोजीं खोरदाद साल निमित्त बँका बंद रहातील.

### पोलिस कायद्यांत दुरुस्ती

रस्त्यावरून जाणारें वाहन थांबविण्याचा कायदेशीर अधिकार पोलिसला नसल्या कारणानें पोलिसानें थांबण्याचा दिलेला इषारा न मानतां अनेक मोटार ड्रायव्हर तसेच पुढें जातात. कोणत्याहि कायद्याचा भंग करण्यांत येत नाहींना, हें पहाण्याचे दृष्टीनें पोलिसला कोणतेंहि वाहन तात्पुरतें थांबवितां यावें, ह्या दृष्टीनें पोलिस कायद्यांत मुंबईच्या गव्हर्नरांनीं दुरुस्ती केली आहे.

### बल्गेरिया, रशिया व जर्मनी

बल्गेरिया व रशिया ह्यांचेमधील पूर्वापार चालत आलेले मैत्रीचे संबंध लक्षांत घेतां बल्गेरिया रशियाविरुद्ध युद्ध पुकारूं शकत नाहीं, असें बल्गेरियानें जर्मनीला कळविलें आहे.

### "तें आमचें काम नाहीं"

"आम्हीं जिंकलेल्या देशांतील लोकांस खाऊं घालण्याचें काम आमचें नाहीं. जिंकणाऱ्या देशानें अंकित देशांत शांतता राखली म्हणजे झालें व त्यासाठी ठेवलेल्या लष्कराच्या जेवणाखाण्याची तरतूद अंकित राष्ट्रानेंच केली पाहिजे, असा आंतरराष्ट्रीय कायदा आहे, व त्याप्रमाणेंच जर्मनी वागत आहे." जर्मनीच्या धोरणाचें समर्थन वरीलप्रमाणें नात्सी पुढारी करीत आहेत.

### जपानमधील हिंदी नागरिक

जपानमधील ब्रिटिश व हिंदी नागरिकांस स्वदेशीं परत आणण्याची व ब्रिटिश साम्राज्यांतील जपानी नागरिकांस जपानांत पोंचविण्याची व्यवस्था दोन्ही सरकारांच्या सहकार्यानें करण्यांत आली आहे. आपल्या नागरिकांस आणण्यासाठी एक ब्रिटिश आगबोट याकोहामा येथें लवकरच जाणार आहे.

### टेलिफोनच्या द्वारें गायनाचें शिक्षण

घरबसल्या गायनाचें शिक्षण मिळवूं इच्छिणारांस तें टेलिफोनच्या द्वारें देण्याची सोय न्यूयॉर्कमध्यें करण्यांत आली आहे.

### दिल्लीमधील टांगे

दिल्ली म्युनिसिपॉलिटीनें आपल्या हद्दींतील टांगे सुधारण्याचें व त्यांची संख्या वाढविण्याचें ठरविलें आहे. पेट्रोलवरील नियंत्रणामुळें वहातुकीच्या इतर साधनांत सुधारणा घडवून आणणें आवश्यक झालें आहे.

### वहातुकीचे दर कमी करा

जपानकडे जाणाऱ्या कपाशीची निर्गत थांबल्यामुळें १५ लक्ष गांठी कपास तिकडे जाऊं शकणार नाहीं. तेव्हां, सरकारनें रेल्वे वहातुकीचे दर उतरवावेत; निदान आखुड धाग्याच्या वहातुकीस तरी सवलत द्यावी आणि अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इत्यादि देशांकडे माल पाठविण्यासाठी आगबोटींत जागा उपलब्ध करावी, अशी विनंति कराची येथील कपाशीच्या व्यापाऱ्यांनीं सर रामस्वामी मुदलियार, हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्रि, ह्यांस केली आहे.

### जर्मनांस आसरा देऊं नका

इराणमधील जर्मनांना आपल्या तेहरान येथील वकिलातींत आसरा न देण्याविषयीं तुर्की परराष्ट्रीय खात्यानें इराणमधील वकिलास कळविलें आहे.

### युद्धाचा दोन वर्षांचा आढावा

गेल्या दोन वर्षांच्या अवधींत युद्धाच्या संबंधांत हिंदुस्थानामध्यें सामुग्री व सैनिक ह्यांचे बाबतींत झालेल्या घडामोडींची माहिती प्रसिद्ध झाली आहे. १९३९ च्या सप्टेंबर महिन्यांत म्हणजे युद्धास प्रारंभ झाला तेव्हां हिंदुस्थानांत अधिकारी व शिपाई मिळून एकूण फौजेची गणती २,३७,००० एवढी होती. आज हा आकडा ७,००,००० पर्यंत चढला आहे. ह्यांपैकीं गेल्या बारा महिन्यांत ४,६०,००० इतका वाढावा झाला. दर महिन्यास सरासरीनें ४०,००० सैनिकांची भरती फौजेमध्यें होत आहे. सुमारें १,८०,००० हिंदी सैनिक ह्या देशाबाहेर युद्ध कामाकरितां गेले आहेत आणि त्यांची संख्या सारखी वाढत आहे. गेल्या दोन वर्षांत ३४,००० लढाऊ वाहनांची भर पडली आहे. लष्करी कामकऱ्यांची संख्या २२,००० पर्यंत आली आहे. लष्कराच्या उपयोगासाठी निरनिराळ्या जातींचे ४१,००० जिन्नस हिंदुस्थानांत तयार होत आहेत.

### जर्मन विमानांची हानी

रशियन मोहिमेंत दोन महिन्यांच्या अवधींत जर्मनीचीं ४,००० विमानें नाश पावलीं. गेल्या वर्षी जर्मन विमानांची इंग्लंडमध्यें जोराची चढाई झाली तेव्हां चार महिन्यांत ३,०३८ शत्रु-विमानें नष्ट झालीं होतीं. युद्धाच्या पहिल्या दोन वर्षांत, रशिया व पोलंड मधील लढाया बाजूस ठेवल्या असतां सर्व रणांगणांवर मिळून एकंदर ८,०२० जर्मन विमानांची हानी झाली. ह्याच्या उलट वरील काळांत इंग्लंडच्या ३,०८९ विमानांचा नाश झाला.

### श्रीगणेश मोफत वाचनालय, पुणें

वरील संस्थेची ग्रन्थालय शाखा नवीन पुलाजवळ १ सप्टेंबरपासून सुरू झाली. वाचकांना ग्रन्थालयाचा उपयोग मोफत करतां येतो. वेळ रोज सायंकाळीं पांच ते साडेसात अशी आहे.

### अभेद्य इस्पितळ

बॉंब, विषारी वायू, इत्यादींपासून सुरक्षित राहील, असें जिब्राल्टर येथें एक अभेद्य इस्पितळ बांधण्यांत येत आहे, त्यांत ८०० रुग्णांची सोय होईल.

### रॉकेलमिश्रित पेट्रोल

पेट्रोलमध्यें रॉकेल मिसळून तें वापरणाऱ्या मोटार बसवाल्यांची संख्या वाढत आहे. ही प्रवृत्ति थांबली नाहीं, तर रॉकेलवरील ड्यूटी वाढवून ती पेट्रोलवरील ड्यूटी इतकी करावी लागेल, असें सरकारनें जाहीर केलें आहे. रॉकेल मिश्रित पेट्रोल वापरल्यामुळें मोटार इंजन खराब झालें, तर त्याचे जागीं नवीन इंजीन मिळण्याची अशक्यता लोकांचे नजरेस आणण्यांत आली आहे.

### कोचीन संस्थानचे नवे दिवाण

सर आर. के. षण्मुखम् चेट्टी ह्यांचे जागीं मि. डिक्सन, आय. सी. एस. ह्यांची कोचीनचे दिवाण म्हणून नेमणूक झाली आहे.

### सेल्स टॅक्स बेकायदा ?

मद्रास सरकारनें बसविलेला सेल्स टॅक्स जर त्या प्रांतांत तयार होणाऱ्या मालाचे पहिल्या विक्रीवर लावण्यांत आला, तर तो बेकायदा होईल, कारण असा कर घेणें प्रांतिक विधिमंडळाचें कक्षेंत येत नाहीं, असा निवाडा मद्रास हायकोर्टानें केला आहे. ह्या निवाड्यावर फेडरल कोर्टाकडे अपील केलें जाईल.

### सूर्यग्रहण

ता. २१ सप्टेंबर रोजीं होणारें सूर्यग्रहण पहाण्यासाठी रशियन तज्ज्ञांचें एक मंडळ कीव्ह येथें जाणार आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४३४ |
| २ युद्धोत्तर आर्थिक परिस्थिति आणि अर्थशास्त्रज्ञांचा सल्ला ... | ४३५ |
| ३ व्यापारास अर्थशास्त्राची बैठक ... | ४३६ |
| ४ मुदतीचा कायदा | ४३६ |
| ५ स्फुट विचार ... | ४३७ |
| रशियांतील रणांगणें—हिंदुस्थान, मलदेश व सिलोन—उद्योगधंद्यांचें प्रादेशिक संघटन—जिल्हा कौन्सिलांचें काम—ब्रिटिश युद्धखर्च व स्वार्थत्याग | |
| ६ सहकारी संस्थांचे अहवाल ... | ४३९ |
| ७ सहकारी संघटन आणि सहकारी दिन ... | ४४० |
| ८ जागतिक व्यापार ... | ४४० |
| ९ कामगारविषयक कायदे | ४४० |
| १० सन लाइफ ऑफ कॅनडा | ४४१ |
| ११ निवडक बाजारभाव | ४४२ |



# अर्थ

बुधवार, ता. १० सप्टेंबर, १९४१


## युद्धोत्तर आर्थिक परिस्थिति आणि हिंदी अर्थशास्त्रज्ञांचा सल्ला

सध्याच्या युद्धाच्या परिस्थितींत सर्वंद जगांतली आर्थिक घटना विस्कटून गेली आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार, राष्ट्रीय उद्योगधंदे, सरकारी कर्जें, नाणेंबाजार ह्या सर्वांवर युद्धाचे विलक्षण परिणाम होत आहेत. विस्कटलेली ही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक घडी पुन्हां नीट बसवावी लागेल. युद्धसमाप्तीनंतर हें कार्य करावें लागणार असलें तरी त्यासंबंधांत विचार एव्हांपासून करीत रहाणें अगत्याचें आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांचें स्वरूप कसें असावें ह्याविषयीं प्रेसिडेंट रूझवेल्ट व मि. चर्चिल ह्यांनीं संयुक्त घोषणा नुकतीच केली, ह्यावरून युद्धोत्तर परिस्थितीच्या बाबतींत मूलभूत तत्त्वांचें विवेचन युद्ध चालू असतांनाच होण्याची आवश्यकता स्पष्ट होत आहे. इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानांतहि युद्धाच्या निकडीच्या गरजांस अनुलक्षून राष्ट्राच्या आर्थिक जीवनाच्या घटनेंत महत्त्वाचे फेरफार करावे लागत आहेत. नवीन धंदे व कारखाने अस्तित्वांत येत आहेत, अंतर्गत व परराष्ट्रीय देवघेवीस नवें वळण लागत आहे, सरकारी कर्ज वाढत आहे व चलनाचा विस्तार चालला आहे. ह्या सर्व घडामोडी युद्धपरिस्थितींत अपरिहार्य आहेत. युद्धोत्तर काळांत त्यांचा योग्य मेळ घालणें आणि हिंदी आर्थिक घटना जागतिक आर्थिक संघटनेच्या चौकटींत नीट रीतीनें बसवणें ह्या अवघड कामाची पूर्वतयारी एव्हांपासून झाली पाहिजे. पुढें येणाऱ्या अडचणींची व्यावहारिक छाननी करीत राहून त्या दूर करण्याच्या तजवीजीची योजना डोळ्यांपुढें ठेवणें अगत्याचें आहे. युद्धोत्तर काळांत सध्याचे कित्येक धंदे व कारखाने निकामी होतील, व्यापाराची दिशा बदललेली दिसेल, व अनेक औद्योगिक क्षेत्रांत बेकारी माजेल, ह्या प्रकारच्या घडामोडीस तोंड देण्याची सरकारची तयारी हवी. ह्यासाठी हिंदी अर्थशास्त्रज्ञांचा सल्ला घेतला जावा अशी हिंदुस्थान सरकारास सूचना करण्यांत आली होती आणि ती स्वीकारण्यांत आली असल्याचें आतां प्रसिद्ध झालें आहे. हिंदी अर्थशास्त्रज्ञांची समिति सरकारनें नेमली असून तिची पहिली सभा पुढच्या महिन्यांत होण्याचें ठरलें आहे. ह्या कमिटींत हिंदी विश्वविद्यालयांतील अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांची नेमणूक करण्यांत आली आहे. पंजाब, अलाहाबाद, कलकत्ता, ढाका, मुंबई, मद्रास, अन्नमलयनगर, पाटणा, लखनौ व म्हैसूर ह्या विश्वविद्यालयांचे अर्थशास्त्रज्ञ प्रतिनिधी ह्या समितीमध्यें आहेत. सर्व महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांवर चर्चा करण्याची त्यांस संधि देण्यांत येईल आणि त्यांच्या सल्ल्याचा पूर्ण उपयोग सरकार करून घेईल अशी आम्हांस आशा आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक हिताविषयींचे प्रश्न सोडवण्याचे कामीं नाणावलेल्या व अनुभवी हिंदी अर्थशास्त्रज्ञांचें सहाय घेण्याच्या कल्पनेस हिंदुस्थान सरकारनें मूर्तस्वरूप दिलें आहे हें प्रगतीचें अभिनंदनीय लक्षण आहे. ह्या बाबतींत परस्पर-विश्वासाचें वातावरण निर्माण झालें आहे आणि कार्यकारी सरकार व स्वतंत्र विचाराचे हिंदी अर्थपंडित ह्यांचें सहकार्य होत आहे. ही घटना आशाजनक आहे ह्यांत शंका नाहीं.

आजच्या अंकांत दुसरीकडे सिडेनहॅम कॉलेजांत प्रो. काळे ह्यांनीं गेल्या आठवड्यांत दिलेल्या व्याख्यानाचा सारांश प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्या व्याख्यानांत व्यक्त करण्यांत आलेले विचार आणि हिंदुस्थान सरकारनें नेमलेली हिंदी अर्थशास्त्रज्ञांची सल्लागार समिति ह्यांचा अनपेक्षित व अनिच्छित संबंध हा एक प्रकारचा योगायोगच समजला पाहिजे. अर्थशास्त्र हें केवळ तात्त्विक शास्त्र नसून सर्वसाधारण सिद्धांतांच्या बरोबरीनें त्यास व्यवहाराची महत्त्वाची बाजू आहे आणि हिंदी आर्थिक परिस्थिति व गरजा ह्यांचा स्वतंत्र रीतीनें पण आर्थिक तत्त्वांच्या दृष्टीनें व्यापक राष्ट्रीय दृष्टीनें विचार झाला पाहिजे हें प्रो. काळे ह्यांच्या व्याख्यानाचें सार होतें. ही त्यांच्या व्याख्यानांतली मुख्य भूमिका हिंदुस्थान सरकारनें स्वीकारून नुसत्या अर्थशास्त्राच्या नव्हे तर भारतीय अर्थशास्त्राच्या व्यावहारिक महत्त्वास मान्यता दिली आहे. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय प्रगतीच्या मार्गांतलें हें एक पाउलच आहे असें आम्ही वर म्हटलें आहे त्याचें स्वारस्य प्रो. काळे ह्यांच्या व्याख्यानाचा संबंध हिंदी अर्थशास्त्रज्ञ समितीशी जोडला असतां सहज पटण्यासारखें आहे. सरकारनें निवडलेले अर्थपंडित विद्वान्, कर्तव्यनिष्ठ, स्वतंत्र वृत्तीचे व अनुभवी आहेत. सरकारास म्हणजे हिंदी राष्ट्रास जे अवघड पण जिव्हाळ्याचे आर्थिक प्रश्न सोडवावयाचे आहेत, त्या सर्वांचे बाबतींत त्यांचा अभिप्राय व सूचना सरकारनें घेणें आवश्यक आहे. समितीचा आकार जरा मोठा आहे ही तिच्या मार्गांतली एक अडचण आहे. तसेंच, अनेक शास्त्रज्ञ एकत्र जमले असतां मतभेदांची गर्दी उडून कोणत्याहि महत्त्वाच्या प्रश्नावर निश्चित एकमत होण्यास कठिण जातें ह्या गोष्टी खऱ्या आहेत. हिंदुस्थानचे आर्थिक सल्लागार, डॉ. ग्रेगरी ह्यांचें नांव जाहीर झालेल्या समितींत दिसत नाहीं तथापि ते ह्या समितीचे अध्यक्ष रहातील असें समजतें. हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या समितीचें कार्य भरीव होऊन हिंदी राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीस तिचें व्यावहारिक सहाय होईल तरच तिच्या नेमणुकीचा खरा उपयोग आहे. अनेक तज्ज्ञांच्या चर्चेमधून तावून सुलाखून निघालेल्या सूचना ग्राह्यतेच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाच्या होतील ह्यांत शंका नाहीं.

## व्यापारास अर्थशास्त्राची बैठक

**प्रो. काळे ह्यांचें सिडेनहॅम कॉलेजांत व्याख्यान**

सिडेनहॅम कॉलेजच्या विद्यार्थी मंडळ व व्यापार-अर्थशास्त्र मंडळ ह्या संस्थांच्या विद्यमानें प्रो. काळे ह्यांनीं गेल्या बुधवारीं वरील मथळ्यांत नमूद केलेल्या विषयावर व्याख्यान दिलें. व्यापारी शिक्षणाच्या बरोबर अर्थशास्त्राचेंहि शिक्षण मिराळें देण्याची व्यवस्था सिडेनहॅम कॉलेजांत आहे तिचा उद्देश विद्यार्थ्यांच्या लक्षांत आणून देणें आणि अर्थशास्त्राच्या अभ्यासाचें महत्त्व व्यापारांत शिरणाऱ्या व असणाऱ्या लोकांस किती आहे ह्याचें विवेचन करणें हा त्यांच्या भाषणाचा मुख्य विषय होता. ते आपल्या व्याख्यानांत म्हणाले:—कमी श्रमानें प्राप्ती मिळवणें किंवा आपला इतर उद्देश साध्य करून घेणें हा मनुष्याचा स्वभावधर्मच आहे. अल्प श्रमानें उद्दिष्ट साध्य व्हावें ह्यासाठी उद्योगधंद्यांत यंत्रें, अवजारें ह्यासारखीं साधनें अधिकाधिक कार्यक्षम रीतीनें उपयोगांत आणण्यांत आलीं आहेत. बँकिंग, आयात-निर्गत, व्यापार, रोखे बाजारांतले व्यवहार, ह्या प्रत्येकांतलें विशिष्ट तंत्र आहे आणि तें उपयोगांत आणण्याची पात्रता ह्या कॉलेजांत विद्यार्थ्यांनीं प्राप्त करून घ्यावयाची आहे. प्रत्येक धंद्यांत प्रत्यक्ष अनुभवाचें महत्त्व मोठें असलें तरी व्यावहारिक शिक्षणाचें महत्त्व त्यामुळें कमी होतें असें नाहीं. व्यापारी पदव्यांस तुच्छ लेखण्याची प्रवृत्ति कित्येक धंदेवाल्यांत दिसून येते पण ती वास्तविक रीतीनें असमर्थनीय आहे. धंद्यांतलें विशिष्टीकरण दिवसानुदिवस वाढत आहे आणि त्यांतल्या कार्यपद्धतीची पूर्ण माहिती विद्यार्थ्यांनीं करून घेतली पाहिजे. तथापि व्यावहारिक तंत्राची म्हणजे व्यापाराच्या धंदेवाइक पद्धतीची अर्थशास्त्रीय पार्श्वभूमि अभ्यासणें अगत्याचें आहे.

अर्थशास्त्राची भूमिका धंद्यांच्या तंत्रापेक्षा अधिक व्यापक आहे. अर्थशास्त्र हें सामाजिक शास्त्र आहे. एखाद्या व्यक्तीनें किंवा गटानें आपल्या धंद्यांत तांत्रिक सुधारणांच्या योगानें पुष्कळ फायदा कमावला म्हणजे त्याचा उद्योग समाजाच्या किंवा राष्ट्राच्या दृष्टीनें हितावह ठरेलच असें नाहीं. अर्थशास्त्रास स्वतःचें असें ध्येय नाहीं, पण कोणतेंहि उद्दिष्ट साध्य होण्यासाठी उपयोगलेलीं साधनें सबंद समाजाच्या हिताच्या दृष्टीनें योग्य आहेत कीं नाहीं ह्याविषयीं निर्णय देणें हें त्या शास्त्राचें काम आहे. अर्थशास्त्राच्या कक्षेंत हें कार्य येत नाहीं असें प्रतिपादणारांचें मत अग्राह्य आहे. राज्यकर्त्यांस व्यापारी व औद्योगिक धोरणाबाबत योग्य शास्त्रीय सल्ला देतां आला पाहिजे. सध्यासारख्या युद्धाच्या काळांत सार्वजनिक हितसंबंधाचे कितीतरी अवघड व गुंतागुंतीचे प्रश्न सोडवावे लागत आहेत आणि व्यक्ति व गट ह्यांचा स्वार्थ बाजूस ठेवून त्यांचा निकाल लावण्याचे कामीं अर्थशास्त्राचें सहाय अमोलिक झाल्यावांचून रहावयाचें नाहीं.

हिंदुस्थानांत व्यक्तिस्वार्थ व अनियंत्रिक स्पर्धा ह्यांवर आर्थिक संघटन आधारून चालावयाचें नाहीं. येथील विशिष्ट परिस्थिति व गरजा ह्यांस अनुसरून आर्थिक धोरण निश्चित केलें गेलें पाहिजे. भारतीय अर्थशास्त्राचें हेंच कार्य आहे. शेतकरी वर्गाचें ऋणविमोचन, सावकारी धंद्याचें नियंत्रण, औद्योगिक संरक्षण इत्यादि संबंधांत अलीकडे कायदे झाले आहेत, त्यांचें रहस्य धंद्यांच्या अर्थशास्त्रीय पार्श्वभूमीवरूनच ध्यानांत येणार आहे. युद्धसमाप्तीनंतर जगाची नवी घडी बसवण्याविषयीं चर्चा चालू आहे. तिच्यामध्यें राष्ट्रांच्या आर्थिक स्वातंत्र्यास महत्त्वाचें स्थान देण्यांत येत आहे, त्याचें स्वारस्य येथें लक्षांत घेणें आवश्यक आहे. अर्थशास्त्रविषयक ग्रंथांमध्यें आर्थिक विकासाचा इतिहास, आर्थिक सिद्धांत व आर्थिक व्यावहारिक धोरण असें त्रिविध विवेचन करण्यांत येतें ह्याचा उद्देश आतांपर्यंतच्या विवेचनानें स्पष्ट होण्यासारखा आहे. सिडेनहॅम कॉलेजासारख्या व्यापारी शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांनीं अर्थशास्त्राच्या अभ्यासाचें आणि त्याच्या सिद्धांतांच्या व्यावहारिक उपयोगाचें महत्त्व मोठें आहे ह्या दृष्टीनें त्या शास्त्राचें अध्ययन करावें अशी माझी सूचना आहे.

---

## मुदतीच्या कायद्यासंबंधीं मद्रास हायकोर्टाचा निर्णय

**मुवरकंडी अच्युतन नायर ... अर्जदार**

वि०

**थळीयतुथील अच्युतन नायर ... हरकतदार**

**हकीकतः**—दाव्यांतील प्रॉमिसरी नोटीवर मलायलम कालगणनेप्रमाणें असणारी तारीख १५ नोव्हेंबर १९३४ या तारखेशीं जुळणारी असून इंग्रजी तारीख पण लिहिलेली होती पण ती मात्र १६ नोव्हेंबर १९३४ ही होती. सदर नोटीवरून दावा तारीख १६ नोव्हेंबर १९३७ रोजीं आणण्यांत आला. हा दावा मुदतींत नाहीं, म्हणून खालच्या कोर्टानें रद्द केला. या निकालावर प्रस्तुतचा तपासणी अर्ज केला आहे.

**मुद्दाः**—दावा मुदतींत आहे काय व मुदत कोणत्या तारखेपासून मोजावयाची ?

**विवेचनः**—अर्जदारातर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, मुदतीचा कायदा क. २५ प्रमाणें मुदत मोजावयाची ती इंग्रजी पद्धतीनें मोजावयाची असा दंडक घातला आहे, तेव्हां प्रस्तुत दावा मुदतींत आहे हें म्हणणें चूक आहे कारण सदर कलमांतील योजना एवढेंच सांगतें कीं, मुदत मोजतांनाच फक्त इंग्रजी पद्धत घ्यावयाची आहे. त्याचा अर्थ असा नाहीं कीं, देशी मिति व इंग्रजी तारीख अशा दोन्ही घातल्या असतांना इंग्रजी तारीखच मुदत मोजतांनाच लक्षांत घ्यावयाची. वस्तुस्थिति काय होती हेंच या ठिकाणीं पहावयास हवें. पुराव्याचा कायदा, क. ९६ यामध्यें असें सांगितलें आहे कीं, खरी मिति अगर तारीख कोणती होती हें वस्तुस्थिति व संभाव्यता यावरून पहावयास पाहिजे. खालच्या कोर्टानें पुढें आणलेला पुरावा पूर्णपणें पारखून बरोबर मिति देशी मलायलम पद्धतीची होती असें धरलें आहे.

**निर्णयः**—त्या निर्णयास चूक म्हणणें तपासणीच्या अर्जाचे कामीं बरोबर व इष्ट नाहीं. दावा मुदतींत नाहीं हा निकाल बरोबर आहे. अर्ज नामंजूर.

**सारांशः**—प्रॉमिसरी नोटीवर एक देशी व दुसरी इंग्रजी अशा दोन वेगळ्या तारखा असल्यास पुरावा पाहूनच खरी तारीख ठरवावयाची असते. ('न्यायबोध' वरून)

---

### ग्रामसुधारणेसाठी बक्षिसें

ग्रामसुधारणेंत प्रगति दाखविणाऱ्या मुंबई प्रांतांतील दहा गांवांना प्रत्येकीं १०० रुपयांचीं बक्षिसें मिळालीं आहेत. त्यांत जानुगडवाडी (सातारा), डिंग्रस (अहमदनगर), तुरभें (ठाणें), पाटण (पुणें) ह्या गांवांचीं नांवें आढळतात.

## स्फुट विचार

### रशियांतील रणांगणें

लेनिनग्राड, स्मॉलेन्स्क व ओडेसा ह्या तीन रणांगणांवर रशिया-मध्यें निकराच्या लढाया चालल्या आहेत. हजार-पंधराशे मैल लांबीच्या पट्ट्यावर एकाच वेळीं लढाई चालू ठेवण्याचा जर्मन सत्ताधाऱ्यांचा उद्देश रशियाच्या फौजांचें बळ कोठेंहि एकवटूं द्यावयाचें नाहीं हा होता. त्यांच्या मूळ कल्पनेप्रमाणें उत्तरेस लेनिनग्राड व दक्षिणेस ओडेसा हीं शहरें दोन महिन्यांच्या आंत पडतील आणि त्याचबरोबर स्मॉलेन्स्कच्या बाजूनें मध्य रणांगणावरून मॉस्को शहरावर हल्ला चढवतां येईल. पण तिन्ही युद्ध क्षेत्रांत रशियन सेनानींनीं विलक्षण चिकाटी व कौशल्य दाखवून शत्रूची वरील योजना निष्फळ केली आहे. रशियन प्रतिकार सर्वत्र इतक्या निकराचा झाला आहे कीं हिटलरला नष्ट होणाऱ्या आपल्या पलटणींच्या जागीं नवीन पलटणी सारख्या पाठवाव्या लागत आहेत. फिनलंडचा प्रदेश रशियानें मागें काबीज केला होता तो पुन्हां हस्तगत झाला असल्यानें त्या राष्ट्रास युद्ध चालू ठेवण्याचें कारण राहिलेलें नाहीं, पण जर्मनीनें त्यास लढत रहाण्याविषयीं टोचणी लावली आहे. दक्षिणेकडे रुमानियन सैन्याची भयंकर हानि झाली असून इटालियन फौजा आपल्या कुमकेस पाठवण्याचा तगादा हिटलर मुसोलिनीस करीत आहे. लेनिनग्राड चोहोंकडून घेरण्याची शिकस्त आतां त्यानें चालवली आहे, पण ह्या प्रसिद्ध शहराचें रक्षण निकरानें करण्याचा निश्चय रशियन सत्ताधाऱ्यांनीं केला आहे. त्यांनीं जर्मन विमानें व फौजा ह्यांचा मोठ्या प्रमाणांत नाश चालवला असून त्यांचे शत्रूवर उलट हल्लेहि होत आहेत. ह्यावरून रशियन मोहिमेच्या जर्मनीच्या योजना कशा फसत जात आहेत हें दिसून येतें.

### हिंदुस्थान, ब्रह्मदेश व सिलोन

हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांचेमध्यें सर गिरिजाशंकर बाजपेयी ह्यांच्या प्रयत्नानें ठरलेल्या व्यवस्थेबाबत ह्या देशांत सर्व जबाबदार संस्थांनीं व पुढाऱ्यांनीं असमाधान व्यक्त केलें आहे. ब्रह्मदेशांत कायमची वसती करून राहिलेले व त्या देशांत कामानिमित्त जाणारे हिंदी लोक ह्यांस कशा रीतीनें वागवण्यांत यावें ह्या विषयींची तरतूद त्या योजनेंत आहे. हिंदी लोकांच्या ब्रह्मदेशांत जाण्यावर व तेथें राहून उद्योग करण्यावर निष्कारण कडक निर्बंध घालण्यांत आले आहेत ते असमर्थनीय आहेत आणि ह्या दोन देशांच्या पूर्वापार चालत आलेल्या परस्परसंबंधाच्या दृष्टीनें अन्यायाचे आहेत असें हिंदी पुढाऱ्यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थान सरकारानें ह्या प्रतिकूल टीकेचा विचार करून ब्रह्मदेशासंबंधानें अंमलांत यावयाच्या व्यवस्थेंत इष्ट असे फेरफार घडवून आणले पाहिजेत. सिलोनसंबंधानें व्हावयाच्या व्यवस्थेच्या बाबतींत वाटाघाट करण्यासाठी सर गिरिजाशंकर बाजपेयी ह्यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ सिलोनमध्यें गेलें आहे. त्या देशांत हिंदी लोकांस जाण्याचे व रहाण्याचे कोणत्या प्रकारचे हक्क असावे हा चर्चेचा मुख्य विषय आहे. दोन्ही पक्षांनीं मित्रत्वाच्या भूमिकेवर व समजूतदारपणानें वादविषयक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असें होईल तर प्रस्तुत वाटाघाटीचा समाधानकारक निकाल लागेल हें उघड आहे. ब्रह्मदेशाच्या संबंधांतल्या करारांचें काय झालें हें ध्यानांत ठेवून सिलोनच्या बाबतींत दोन बाजूचे प्रतिनिधी योग्य व्यवस्था घडवून आणतील अशी आशा आहे. ब्रह्मदेश व सिलोन ह्या दोन देशांत उद्योगधंदे व व्यापार ह्यांची वृद्धि करण्यास हिंदी लोकांनीं किती सहाय केलें आहे हें येथें विसरून चालणार नाहीं. तसेंच, हिंदुस्थानच्या लगत असलेल्या ह्या दोन देशांचे संबंध ह्या देशाशीं स्नेहाचे असले पाहिजेत ही साधी गोष्ट सर्वांनीं ध्यानांत बाळगली पाहिजे.

### उद्योगधंद्यांचें प्रादेशिक संघटन

मार्च, १९४१ मध्यें मुंबई येथें सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांचे अध्यक्षतेखाली अखिल भारतीय कारखानदार परिषद भरली होती. त्यावेळीं परिषदेच्या कार्याला कायम स्वरूप देण्यासाठी एक मध्यवर्ती समिति स्थापन करावी व तिच्या मार्फत परिषदेनें आखलेला औद्योगिक संघटनेचा कार्यक्रम अमलांत आणावा असें ठरलें होतें. त्याप्रमाणें मध्यवर्ती समिति स्थापन झाली आहे, तिचे सर एम. विश्वेश्वर अय्या हे अध्यक्ष, श्री. अमृतलाल ओझा व श्री. साकळचंद शहा हे उपाध्यक्ष आणि श्री. जी. एस. बानर्जी, श्री. मुरारजी जे. वैद्य व डॉ. जरीवाला हे चिटणीस आहेत. मुंबई येथें समितीची मुख्य कचेरी असून, प्रादेशिक बोर्डें, कौन्सिलें व कमिट्या स्थापन करण्यांत येत आहेत व त्यांचे मार्फत परिषदेचें काम चालू ठेवण्यांत येणार आहे. महाराष्ट्रासाठी प्रादेशिक समिति स्थापन करण्यापूर्वी पुढील कामाची रुपरेषा समजावून देण्यासाठी मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे गेल्या रविवारीं पुणें येथें आले होते. त्यांचेबरोबर महाराष्ट्र कारखानदार संघ, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें कारखानदार संघ, प्रेस ओनर्स असोसिएशन व लोकमान्य स्वदेशी समिति ह्यांच्या कार्यकारी मंडळांनीं विचारविनिमय केला. पाहुण्यांनीं प्रादेशिक समित्यांचें कार्य समजावून सांगितलें. प्रत्येक विभागांतील वजनदार पुढाऱ्यांनीं औद्योगीकरणासाठी स्थापन करावयाच्या समितीचें काम आपल्या शिरावर घेतलें पाहिजे; प्रत्येक जिल्ह्यानें आपल्या आकाराच्या व मगदुराच्या प्रमाणांत पांच ते पन्नास लाख रुपये उभे करावे अथवा निदान लायक धंद्यांस पैसे देण्याची बँकांकडून तरी व्यवस्था करावी; प्रत्येक विभागांतील उद्योगधंद्यांची सध्याची परिस्थिति समजून घेण्यासाठीं तपशीलवार आंकडे गोळा करावे व हें काम प्रथम हातीं घेण्यांत यावें, अशी सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांची योजना आहे.

### जिल्हा कौन्सिलांचें काम

प्रत्येक जिल्ह्यांतून निदान बारा तरी लायक व वजनदार कार्यकर्ते ह्या कामासाठी पुढें आले पाहिजेत व त्यांतील एकादा गळाला, तर त्याची जागा घेण्यासाठी आणखी लोकांची यादी तयार पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. नवीन उद्योगधंद्यांची स्थापना करणें, जुने धंदे वाढविणें, औद्योगिक पहाणी करणें, उत्पादनविषयक आंकडे जमा करणें, कंपन्या, भागिदाऱ्या, इत्यादींची संख्या वाढविणें, यंत्रसामुग्रीच्या उपयोगास उत्तेजन देणें, नवीन योजनांची यादी करणें, विनावेतन काम करण्यास तयार असलेल्यांची यादी ठेवणें, ऑफिस खर्चाच्या तरतुदीसाठी रिझर्व्ह फंड निर्माण करून तो वाढविणें, भांडवल कोठें व किती गुंतलें आहे हें पहाणें, शिस्त, संघटन व काटकसर ह्यांच्या वाढीसाठी प्रयत्न करणें, प्रदर्शनें, यात्रा इत्यादि भरवून औद्योगिक

प्रगतीस हातभार लावणें, इत्यादि कामें जिल्हा समित्यांनीं प्रादेशिक समितीच्या नेतृत्वाखालीं करावयाचीं आहेत. प्रत्येक प्रदेशानें आपली उन्नति स्वतःच करून घ्यावयाची आहे व भांडवल वगैर स्वतःच उभें करावयाचें आहे. मध्यवर्ती समितीकडून सल्लामसलत मिळूं शकेल. अखिल भारतीय औद्योगिक संघटनाची रूपरेषा वरील प्रमाणें आहे. सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांनीं वरील माहिती पुणें येथील कार्यकर्त्यांस सांगितली. निश्चितपणें ह्या कार्यास वाहून घेणाऱ्या बारा लोकांच्या नांवांची मागणी त्यांनीं केली, तीं मागाहून त्यांस कळविण्यांत येतील, असें सांगण्यांत आलें. महाराष्ट्रांत पैशाचे अभावीं स्वार्थत्यागपूर्वकच क करावें लागेल व त्यास थोडा वेळहि लागेल; तथापि महाराष्ट्राकरितां स्वतंत्र प्रादेशिक संघटना करण्याचा प्रयत्न करण्याचें आश्वासन पाहुण्यांस देण्यांत आलें.

---

### ब्रिटिश युद्धखर्च व स्वार्थत्याग

जर्मनीच्या चढाईस पूर्वेकडील रणांगणांत रशियानें धीरानें तोंड दिलें आहे, त्याचा उपयोग पश्चिम रणक्षेत्रांत इंग्लंडला चांगला झाला आहे ह्यांत शंका नाहीं. जर्मनीचें लढाऊ सामर्थ्य पूर्वेकडे खर्चीं पडत असतां ब्रिटिश वैमानिक दलानें जर्मनीमध्यें लष्करी उपयोगाच्या कारखान्यांचा विध्वंस करून टाकण्याचा सपाटा लावला आहे आणि ह्या रीतीनें एका दृष्टीनें पहातां त्यानें हिटलरला दोन आघाड्यांवर एकाच वेळीं लढण्यास भाग पाडलें आहे. अमेरिकेचें इंग्लंडला होत असलेलें सहाय तर बिनमोलच आहे. तथापि, प्रस्तुत युद्धांत मिळवावयाच्या विजयाची अंतिम जबाबदारी ब्रिटिश राष्ट्रावर आहे ह्याची जाणीव त्यांच्या राज्यकर्त्यांस आहे आणि हें कर्तव्य पार पाडण्यांत त्यांस सर्व जनतेचें हार्दिक सहाय मिळत आहे. ब्रिटिश फडणवीस, सर किंग्स्ले वुड, ह्यांनीं एडिंबरो येथें नुकतेंच एक भाषण केलें त्यांत युद्धखर्चाच्या बाबतींतली परिस्थिति त्यांनीं थोडक्यांत वर्णिली ती बोधप्रद आहे. ग्रेट ब्रिटनचा अलीकडचा खर्च दररोज १६–१७ कोटी रुपये पर्यंत चालू आहे. तरी रशियास लागेल तेवढी द्रव्याची मदत देण्याचे ब्रिटिश सरकारनें ठरविलें असून त्याप्रमाणें तजवीज करण्यांत आली आहे. रशियास हवें असलेलें कर्ज इंग्लंड त्यास देत आहे. ब्रिटनचा खर्च एवढ्या अवाढव्य प्रमाणावर चालला आहे तरी त्यासाठी चालू वर्षीं जादा कर बसवण्याची आवश्यकता नाहीं असें ब्रिटिश फडणवीसांनीं सांगितलें. तथापि ब्रिटिश जनतेनें आपल्या खाजगी खर्चांत काटकसर व बचत करून रहाणारी शिल्लक लोकांनीं सरकारच्या स्वाधीन केली पाहिजे अशी सूचना त्यांनीं केली. सरकारचा खर्च भागण्यासाठीं उत्पन्न पाहिजे. तें करांच्या व कर्जाच्या अशा दुहेरी मार्गानें येणार हें उघड आहे. ब्रिटिश जनता करांचा अवजड बोजा सहन करीतच आहे, परंतु सरकारचें उत्पन्न खर्चाच्या मानानें अपुरें पडणार, त्या मर्यादेपर्यंत म्हणजे चालू सालीं सुमारें २,७०० कोटि रुपये फडणवीसांस लोकांनीं केलेल्या लहानमोठ्या बचतीमधून मिळणें अगत्याचें आहे ही गोष्ट त्यांनीं स्पष्ट केली. ब्रिटिश जनतेच्या स्वार्थत्यागाची त्यांनीं स्तुति केली आणि साम्राज्यांतील इतर देशांकडून मिळणाऱ्या सहायाचा गौरवपूर्वक उल्लेख केला. दररोजचा ब्रिटिश सरकारचा १६-१७ कोटि रुपयांचा खर्च असून त्यांपैकी १४ कोटि रुपये निवळ युद्धाप्रीत्यर्थ खर्चीं पडत आहेत. एवढी मोठी रक्कम कर व कर्ज ह्या उपायांनीं उभी करणें ही सामान्य गोष्ट नव्हे. पण ती ब्रिटिश जनतेचा ध्येयवाद, स्वार्थत्याग व शिस्त ह्यांचे योगानेंच साध्य होत आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे.

---


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), वांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइंट (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; मि. आर. एल. फेरार्ड.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.


---


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**हेड ऑफिस : पुणें शहर.**

**स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.**

**मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,८८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,९४,०२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

# सहकारी संस्थांचे अहवाल

## दि मराठा मार्केट पीपल्स को. बँक लि.

( वार्षिक सभा : १४-९-४१ )

वरील बँकेचे ६८४ सभासद व तिचें भाग भांडवल २३,७०० रुपये असून तिचा रिझर्व्ह फंड ३,६४२ रुपयांचा आहे. बँकेकडे सभासदांच्या ९४½ हजारांच्या व इतरांच्या ४८ हजारांच्या ठेवी आहेत. " जुलै, १९३५ पासून जून १९४१ पर्यंत सभासदांना एकूण कर्ज ६ लक्ष, ९४ हजार रु. देण्यांत आलें आहे. वरील रकम बाहेरील सावकारांकडून कर्जाऊ काढली असती तर त्यांना पावणेदोन लक्ष रुपये व्याज द्यावें लागलें असतें, पण बँकेनें रु. १ लक्ष, ४५ चे व्याजाची बचत केली आहे." १९४०-४१ मध्यें एकूण ३०५ सभासदांनीं १ लक्ष, १३ हजार रुपयांचें कर्ज नेलें, त्यांपैकीं ८० हजार रुपये फळांच्या व्यापारासाठीं, ९¾ हजार रुपये कर्जफेडीसाठीं, १४½ हजार रुपये तरकारी व्यापारासाठीं व ३½ हजार रुपये केळ्यांच्या व्यापारासाठीं होते. मागील सालापेक्षा थकबाकीचें प्रमाण यंदा कमी झालें आहे.बँकेनें १ लक्ष, ८ हजार रुपये सरकारी व बिनसरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत, त्यांची बाजारभावानें होणारी किंमत खरेदी किंमतीपेक्षा थोडी जास्तच भरत आहे. वर्षअखेर बँकेस ३,६५१ रुपये नफा झाला, त्यांतून ९१३ रुपये रिझर्व्ह फंडांत टाकावे, ५% दरानें डिव्हिडंड देण्याकडे १,१३८ रुपयांचा विनियोग करावा, नियमित कर्ज फेडल्याबद्दल १३७ सभासदांस रुपयास २ आणे प्रमाणें १७४ रुपयांचें व्याज रिबेट द्यावे, इत्यादि शिफारशी बोर्डानें केल्या आहेत. वरील वृत्तांतावरून बँकेच्या उपयुक्त कार्याची कल्पना येईल. बँकेच्या सभासदांस तिचा आणखी फायदा घेतां येण्याजोगा आहे. बँकेच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष श्री. भास्करराव जाधव हे असून श्री. खंडेराव दौंडकर, ॲडव्होकेट हे बोर्डाचे अध्यक्ष आहेत आणि श्री. स. शि. खैरे हे ऑ. सेक्रेटरी आहेत. ही बँक मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे मार्फत मुंबई येथील क्लिअरिंग हाउसची उपसभासद झालेली आहे, ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे.

## नाशिक जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

( वार्षिक सभा : २८-९-४१ )

वरील बँकेचें भाग भांडवल २१,१८० रुपये आहे व तिच्या रिझर्व्ह फंडांत २,९६४ रुपये आहेत. १९३५ ते १९४१ अखेर बँकेनें एकूण २७८ अर्जदारांस ३ लक्ष, १½ हजार रुपये कर्ज दिलेलें आहे, त्यांपैकीं ३० अर्जदारांस २३½ हजार रुपये १९४०-४१ मध्यें दिलेले आहेत. बँकेनें मुं. प्रां. को. लँड मॉर्गेज बँकेचा २५ हजारांचा हप्ता मुदतीच्या आंत भरला आहे. " कर्ज रकमेची परतफेड करण्याची जास्तीत जास्त मुदत २० वर्षांची होती, ती सरकारी ठरावानुसार १५ वर्षांची केली गेली. तसेंच व्याजाचा दरहि ६ टक्यावरून ६॥ टके पर्यंत वाढविला गेला आहे. यामुळें सहाजिकच बँकेच्या या वर्षाच्या कामकाजावर अत्यंत अनिष्ट परिणाम झाला आहे. सन १९३९ च्या शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनाच्या कायद्यामुळें, कुळांस सावकारांकडून मिळणाऱ्या कायदेशीर सुटीचें आमीष, लँड मॉर्गेज बँकेकडून होणाऱ्या तडजोडींतील सुटीपेक्षा निःसंशय जास्तच असल्यानें, कर्जनिवारणासाठीं येणाऱ्या अर्जांचा आंकडा यापुढें घटत जाईल, हें यंदा आलेल्या अत्यंत कमी अर्जांच्या आंकड्यावरून दिसून येईलच. गेल्या सालीं, मुंबई प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँकेनें सुमारें ४ महिने पर्यंत रकमेच्या अभावीं, कर्जमंजुरीचीं प्रकरणें तहकूब ठेविलीं होतीं. या संधीचा दुरुपयोग करून कांहीं सावकारांनीं " बँकेनें कर्ज देण्याचें आतां बंद केलें आहे " असा गैरसमज उत्पन्न केला, यामुळें साहजिकच त्या त्या विभागांतून अर्ज येण्याचें बंद झालें. या जिल्ह्यांतील ( विशेषतः नाशिक विभागांतील ) सर्व साधारण सोसायट्या निकृष्टावस्थेंतच आहेत. तशांत बँकेच्या थकबाकीदारांची संख्या दरसाल एकसारखी वाढतच आहे. मालेगांव विभागांतील सहकारी चळवळ कांहींशी प्रगतिपर आहे. परंतु सदरहु भागास नाशिकचा प्रवास लांब पल्ल्याचा वाटत असल्यानें त्या भागांतूनहि अर्ज येण्याचें प्रमाण सर्वसाधारणपणें कमीच आहे. या सर्व गोष्टींमुळें अहवालाचे सालांत बँकेस अपेक्षेप्रमाणें प्रगति करतां आली नाहीं. बँकेच्या प्रचाराकरितां व जरूर ती माहिती व मदत मिळविण्याकरितां पोट मंडळ स्थापन करण्याचा विचार चालू आहे."

अहवालाचे वर्षी बँकेस ५२१ रुपये नफा झाला. बँक 'अ' वर्गांत आहे. रावबहादुर आर. व्ही. वैडकर हे बँकेचे चेअरमन आहेत.

## पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

( वार्षिक सभा: २७-९-४१ )

वरील बँकेचें वसूल भांडवल २२,१५८ रुपये असून तिचा रिझर्व्ह फंड २,३०२ रुपये आहे. १९४०-४१ मध्यें बँकेनें १८ अर्जदारांस मिळून १३ हजार रुपये कर्ज दिलें, म्हणजे आतांपर्यंत तिनें २५८ अर्जदारांस २ लक्ष, ८९ हजार रुपये कर्ज दिलें आहे. " मुंबई प्रांत शेतकरी ऋणविमोचन कायदा १९३९, हा कांहीं भागास लागू होण्याचें जाहीर झाल्यापासून नवीन कर्जमागणीचे अर्ज कमी येऊं लागले. गतवर्षी प्रांतिक बँकेचा हप्ता थकल्यामुळें नवीन कर्ज देणेचें तात्पुरतें बंद केलें होतें. " यापूर्वीच्या कोणत्याहि वर्षापेक्षा अहवालाचे सालीं वसुली अधिक झाली. " २४९ सभासदांपैकीं १६० सभासदांकडे दोन अथवा दोन पेक्षा जास्त हप्ते थकले होते. गतवर्षी थकबाकी मागणीच्या ८० टक्के वाढल्यामुळें बँकेची परिस्थिति चिंताजनक झाली होती.या सर्व परिस्थितीमुळें अहवालाचे सालांत सदर परिस्थिति आटोक्यांत आणण्याकडे सर्व प्रयत्न केंद्रीभूत करणें भाग होतें."थकबाकीचें वाढतें प्रमाण पुरंदर, हवेली व आंबेगांव या भागांत ज्यास्त दिसून येतें. अहवालाचे वर्षी बँकेस ४,७३५ रुपये नफा झाला, परंतु गेले सालीं बँकेस झालेल्या ५,४४९ रुपयांच्या तोट्यांतून सदर नफा वजा जातां ताळेबंद पत्रकास निवळ तोटा ७१४ रुपये दर्शविला आहे. पुरंदर व हवेली तालुक्यांतील वसुली उशीरा आल्यानें मुख्यतः सदर तोटा झाला. गतवर्षी वसूल व्याजाची रकम ९,०३१ होती. चालू सालीं ती १८,२०३ रुपये आहे. तसेंच थकबाकीहि मोठ्या प्रमाणांत कमी झाली असून रास्त मुद्दलहि वसूल १६,००० रुपयांचा झालेला आहे, " सन १९३८-३९ सालीं येणें परंतु वसूल न झालेलें व्याज ६,०४७ रुपये नफ्यासाठी घेण्यांत आलेलें होतें. वस्तुतः तें नफ्यासाठी घेण्यास पात्र नव्हतें. त्यामुळें, त्यावर्षी दर्शविलेला नफा बरोबर नव्हता. तरी, ही रकम पुढील कांहीं वर्षांत मिळून विभागून, नफातोटा-पत्रकांत लिहून टाकणें आवश्यक आहे." असा लोकल ऑडिटरांचा अभिप्राय आहे. श्री. ग. म. गुप्ते, बी. ए, एलएल. बी. हे बँकेचे चेअरमन आहेत, त्यांचे गैरहजेरींत व्हाइस चेअरमन श्री. ज. तु. सावंत यांनीं अहवाल सादर केलेला आहे. श्री. भ. ग. साबणे, बी. कॉम. हे मॅनेजर आहेत.

## पूना मर्चंटस को. बँक लि.

(वार्षिक सभाः १४-९-४१)

वरील बँकेच्या पटावर ६८५ सभासद असून त्यांनीं ७०,०२० रुपयांचे भाग घेतलेले आहेत. बँकेचा रिझर्व्ह फंड १९ हजारांचा, संशयित व बुडीत कर्ज फंड ५ हजारांचा, रीबेट फंड ५½ हजारांचा, इमारत फंड १ हजाराचा, डिव्हिडंड ई. फंड २ हजारांचा व इनव्हेस्ट रिझर्व्ह फंड २ हजारांचा आहे. बँकेकडे एकूण ३ लक्ष, १४½ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेनें ६६ हजार रुपये सरकारी रोखे व डिबेंचरें ह्यांत गुंतविलेले आहेत. एकूण २ लक्ष, ७९ हजारांचीं कर्जे दिलेलीं आहेत. "रिकरिंग डिपॉझिट या नांवाचें नवीन खातें बोर्डानें सुरू केल्याचें मागील रिपोर्टांत नमूद आहेच. या खात्यावर २,२०० रुपयांच्या ठेवी अहवालाचे सालीं बँकेकडे आल्या. बोर्डाच्या अपेक्षेप्रमाणें या खात्याचा व्यवहार झाला नाहीं. या खात्याची उपयुक्तता सभासदांना जितकी पटावी तितकी पटली नाहीं, असें दिसतें." "थकबाकी वसूल करण्याचे काम जारीनें चालू आहे. बऱ्याच प्रकरणांत थकबाकी स्थावर इस्टेट विकून वसूल करावी लागणार असल्यामुळें वसुली होण्यास सहाजिकच वेळ लागणार आहे. बँकेचा अंतर्गत कारभार अहवालाचे सालीं आणखी पुष्कळ सुधारल्याचें सरकारी हिशेब तपासनिसांच्या यादीवरून आपणांस कळून येईल." अहवालाचे वर्षी बँकेस ४,१९१ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ४% डिव्हिडंड देण्याकडे १,०५० रुपयांचा विनियोग करावा अशी बोर्डाची शिफारस आहे. अहवालाचे वर्षी श्री. दा. वा. पोतदार हे बँकेचे चेअरमन होते व एक डायरेक्टर श्री. वा. न. जोशी ह्यांनीं ऑनररी एजंट म्हणून काम पाहिलें. श्री. वि. म. देवल, बी. कॉम, हे मॅनेजर आहेत.

---

## सहकारी संघटन आणि सहकार दिन

तारीख ३० ऑगस्ट १९४१ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिवाणखान्यांत असिस्टंट राजिस्ट्रार मध्यभाग, पुणें यांच्या विनंतिवरून पुण्यांतील सहकारी संस्थांचे प्रतिनिधी व सहकारी चळवळींत प्रामुख्यानें भाग घेणारे सद्गृहस्थ यांची सभा झाली. सभेचे अध्यक्ष श्री. ना. वि. भोंडे हे होते. सभेंत सहकार-दिन साजरा करण्यासंबंधानें बरीच भवति न भवति होऊन प्रो. वा. गो. काळे यांनीं सुचविलेला खालील ठराव एकमतानें मंजूर झालाः—

"पुणें जिल्ह्यांत सहकारी चळवळीसंबंधानें उत्साह उत्पन्न करून विधायक कार्यास उत्तेजन यावें या हेतूनें जिल्ह्यांतील सहकारी कार्यकर्त्यांचा विचारविनिमय व्हावा आणि विधायक कार्यक्रम आखला जावा या करितां जिल्हा सुपरवायझिंग युनियन बोर्डानें पुढाकार घेऊन एक प्रातिनिधिक समिति नेमावी. या समितीनें सहकार-दिन साजरा करण्याची व्यवस्था करावी आणि सहकारी चळवळीच्या तत्त्वांचा जिल्ह्यांत प्रचार व संघटण ह्या महत्वाच्या कार्यांचा एक भाग म्हणून जिल्ह्यांतील निरनिराळ्या ठिकाणीं सहकार-दिन साजरा करण्यांत यावा."

सूचकः—प्रो. वा. गो. काळे

अनुमोदकः—श्री. दा. वा. पोतदार

पुष्टीः—श्री. वाय. आर. दाते

## जागतिक व्यापार

राष्ट्रसंघाच्या व्यापारी मासिकाच्या जुलै अंकांत खालील उपयुक्त माहिती आढळते. पदार्थांच्या किंमतींवर नियंत्रण सुरुवातीपासून ठेवण्यांत आल्यामुळें या युद्धांत बऱ्याच आपत्ती टळल्या आहेत. कांहीं वस्तूंचा तुटवडा पडणें, कांहीं जरूरीच्या वस्तु न मिळणें वगैरे गोष्टी फारशा आढळत नाहींत. जर्मनीसारख्या युद्धमान राष्ट्रांत रहाण्याच्या किंमतींत मे १९४१ पर्यंत फक्त ६ टक्के वाढ झाली आहे. याच्या उलट कापडाच्या किंमतीवर नियंत्रण नसल्यामुळें युद्धाच्या सुरुवातीलाच एकदम १७ टक्के वाढ झाली. इतर राष्ट्रांतील या वाढीचें प्रमाण पहातां बल्गेरियांत एप्रिलमध्यें ३५%, डेन्मार्कमध्यें मार्चमध्यें ७२%; फिनलंड एप्रिल ५९%, हंगेरी एप्रिल २८%, आयर्लंड फेब्रुवारी ३६%, स्वित्सर्लंड जून ४९%, ग्रेट ब्रिटन मार्च ७२%, स्वीडन जून ५३%, नॉर्वे ५९%, तुर्कस्थान मार्च ४०%, व युगोस्लाव्हियात जूनपर्यंत १०३ टक्यांनीं वाढ झाली. उष्णतेसाठी व प्रकाशासाठी लागणाऱ्या जिनसांचे भाव १९३९ च्या मानानें हल्ली खालीलप्रमाणें वाढले आहेत. डेन्मार्क मार्च ११३%, फिनलंड एप्रिल ६४%, स्वीडन जून ६०%, आयर्लंड फेब्रुवारी ४५%, नार्वेत कोळसा, कोक, लाकूड, पेट्रोल वगैरेच्या किंमती जूनमध्यें १६० टक्यांनी वाढल्या असून ग्यास व विजेची किंमत सारखीच टिकली आहे. हंगेरी, फिनलंड, स्पेन या युरोपियन राष्ट्रांत व बाहेर जपान, हिंदुस्थान, दक्षिण आफ्रिका व पेरूंत इतर पदार्थांपेक्षा फळफळावळांची किंमत फार वाढली आहे. दक्षिण व मध्य अमेरिकेंत कांहीं देशांत तर युद्धानंतर मालांच्या किंमती उतरलेल्या दिसतात. अशा देशांत अर्जेंटाइन, कोलंबिया, कोस्टा रिका, मेक्सिको व व्हेनेझुअेला हीं राष्ट्रें आहेत. राहात्या जागांच्या भाड्यांतही सर्वत्र नियंत्रणामुळें फारसा फरक आढळत नाहीं. नॉर्वेत मॉर्चपासून ५ टक्के भाडें कमी झालेलें आहे. स्वीडनमध्यें औद्योगिक उत्पादन कमी होत असतांना नॉर्वे व डेन्मार्कमध्यें तें वाढत आहे. मशीनची संख्या ग्रेट ब्रिटनमध्यें मार्च ते मेपर्यंत नेहमीपेक्षा ११ टक्यांनीं वाढली. क्यानडा, ग्रेटब्रिटन, अर्जेंटाईन, हिंदुस्थान व नेदरलंड इंडीज या देशांत मालांच्या किंमती सारख्या कमीजास्त होत असल्यामुळें नियंत्रण जास्त कडक ठेवणें भाग पडलें.

---

## कामगारविषयक कायदे

हैद्राबाद संस्थानांत फॅक्टरी ॲक्ट आणि वर्कमेन्स कॉंपेंसेशन ॲक्ट पास झालेले आहेत. पेमेंट ऑफ वेजेस बिल व ट्रेड यूनियन्स बिल हीं लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें दाखल झालेलीं आहेत. कामगारांबाबत सर्व कायद्यांचा एकसमुच्चयेंकरून विचार करण्याकरितां एक खास योजना आतां आखण्यांत आली आहे. हिंदुस्थानांत इतरत्र तशा प्रकारचे कायदे अंमलांत आहेत त्यांचा विचार करून व त्यांत वरचेवर होणाऱ्या सुधारणा ध्यानांत घेऊन, हैद्राबाद संस्थानांतील कायदे कसे सुधारणें इष्ट आहे, हें प्रस्तुत योजनेचें महत्त्वाचें काम राहील. कामगारविषयक कायद्यांचा तौलनिक अभ्यास करून त्यांतील आधुनिक प्रवाहांचा अभ्यास करणें हेंहि कार्य त्या योजनेंत समाविष्ट आहे.

## सन लाइफ अॅशुअरन्स कंपनी ऑफ कॅनडा

### १९४० चा अहवाल

### युद्धजन्य मृत्यूंच्या दुष्परिणामांची कंपनीस झळ लागली नाहीं

सन लाइफ अॅशुअरन्स कंपनी ऑफ कॅनडाची ७० वी वार्षिक सभा ११ फेब्रुवारी, १९४१ रोजीं कंपनीच्या मुख्य कचेरीमध्यें कॅनडांत मॉंट्रिअल येथें, कंपनीचे अध्यक्ष व मॅनेजिंग डायरेक्टर मि. आर्थर बी. वुड ह्यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. त्यासमयीं अध्यक्षांनीं सन लाइफच्या जिंदगीची वाढ कशी होत आहे, ह्याचा आढावा घेतला. त्यावरून गेल्या ७० वर्षांतील कंपनीच्या प्रगतीची उत्कृष्ट कल्पना येते. मि. वुड म्हणाले, कीं पहिली पॉलिसी दिल्यानंतर ३० वर्षांनीं, म्हणजे १९०० सालीं, कंपनीची जिंदगी फक्त १०५ लक्ष डॉलर होती. पहिल्या महायुद्धास प्रारंभ झाला त्यावेळीं, १९१४ मध्यें, ती ६४० लक्ष डॉलर झाली व युद्धसमाप्तीचे वेळीं, १९१८ सालीं, ती ९७० लक्षांपेक्षा अधिक डॉलर झाली. १९३० अखेर जिंदगीचा आकडा ५८ कोटि, ८० लक्ष डॉलरवर गेला. आतांपर्यंत कोणत्याहि जागतिक मंदीपेक्षा मोठ्या मंदीचे कालाचे अखेर व चालू युद्धाचे सोळा महिने पुरे झाल्यानंतरहि, जिंदगींत वाढ होऊन ती ९५ कोटि डॉलर झालेली आहे.

जागतिक साथी, चलती व मंदी ह्या सर्वांस तोंड देऊनहि सन लाइफची वरील प्रमाणें असंड प्रगति होत गेली, हा आयुर्विम्याच्या भरभक्कमपणाचा पुरावा असून, सर्व काळीं व सर्व परिस्थितींत विमा संस्थांचें कार्य अविरत चालू शकतें हें त्यावरून सिद्ध होतें, असें मि. वुड ह्यांनीं सांगितलें. १९४० च्या अहवालांतील आकडे समजावून सांगतांना मि. वुड म्हणाले, "१९४० सालीं कंपनीच्या जिंदगीचा आकडा अब्ज डॉलरचे समीप आला. १९४० मध्यें तो ९५ कोटि डॉलर झाला, म्हणजे, अहवालाचे वर्षी जिंदगींत ३ कोटि, ६० डॉलरची भर पडली व एकूण संख्या अभूतपूर्व झाली. विमेदारांस ९ कोटि, ४० लक्षांपेक्षा अधिक डॉलर देण्यांत आले. म्हणजे, हा आकडाहि ४० लाखांनीं वाढला आहे. चालू कामांत २३ कोटींची भर पडून, तें ३ अब्ज डॉलरच्या घरांत गेलें.

"१९४० सालीं १७ कोटि डॉलरचें नवें काम पुरें झालें. हप्त्यांचें उत्पन्न ११ कोटि, १० लक्ष डॉलरपेक्षा अधिक भरलें व एकूण उत्पन्न १९३९ च्या उत्पन्नापेक्षा अधिक होऊन त्याचा आकडा १६ कोटि, ७० लक्ष डॉलरवर गेला. एकूण १२ कोटि, ४० लक्ष डॉलरचा व्यय झाला. सरकारी, म्युनिसिपल, पब्लिक युटिलिटी व इतर रोख्यांतच मुख्यतः कंपनीनें पैसे गुंतविलेले आहेत. ह्या रोख्यांत तिचे ५० कोटि, ७० लक्ष डॉलर आहेत; म्हणजे १९३९ चे मानानें हा आकडा ४ कोटि, ६० लाखांनीं मोठा आहे. रिझर्व्हमध्यें आणखी रकम टाकून व जिंदगीची किंमत कमी धरूनहि, सरप्लस व कॉंटिन्जन्सी रिझर्व्ह २ कोटि, ८० लक्ष रुपये झाला आहे. चालू विमापत्रें व ग्रुप सर्टिफिकिटें ह्यांची संख्या १२ लक्ष झाली आहे. गेल्या सत्तर वर्षांत सनलाइफ ऑफ कॅनडानें विमेदारांस व त्यांचे वारसांस १ अब्ज, ३९ कोटि रुपयांची प्रचंड रकम दिलेली आहे."

सप्टेंबर १९३९ सालापासून प्रस्तुत युद्ध युरोप खंडांत व इतरत्र चालू आहे, तरी १९४० सालीं कंपनीच्या ग्रेट ब्रिटन अगर कॅनडा येथील विमेदारांतील मृत्यूचे प्रमाणापेक्षां अमेरिकेंतील विमेदारांमधील मृत्यूचें मामुली प्रमाण अधिक भरलें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. युद्धामुळें आलेले मृत्यु लक्षांत घेतले असतांहि हें घडून आलेलें आहे. एकूण क्लेम्समध्यें युद्धजन्य क्लेम्सचें प्रमाण शेंकडा दोन सुद्धां पडत नाहीं. उलट, अपघातामुळेंच शेंकडा ९ क्लेम्स उद्भवतात, असा अनुभव आहे. उदाहरणार्थ, मोटारींच्या अपघातामुळें उपस्थित होणाऱ्या क्लेम्सचें एकूण क्लेम्सशीं प्रमाण ४% असतें. युद्धपरिस्थितीचा कंपनीवर जवळ जवळ कांहींच परिणाम झालेला नाहीं, हें ह्यावरून स्पष्ट होतें. कंपनीच्या एकूण व्यवहारांपैकीं फक्त १३% व्यवहार ग्रेटब्रिटनमध्यें असून युरोपमध्यें ती काम करीतच नाहीं. युद्धास गेलेल्या विमेदारांच्या क्लेम्सची रक्कम २,८९,०७२ डॉलर फक्त भरली व त्यांतील सुमारें निम्या रकमेस अपघात व रोगराई हेच जबाबदार आहे. वैमानिक हल्ल्यांत मृत्यु पावलेल्या नागरिकांचे क्लेम्स ५८,३४५ डॉलरचे भरले व समुद्रावर मरण पावलेल्या नागरिकांचे १,४६,०५५ डॉलरचे क्लेम आले. अशा रीतीनें, युद्धजन्य क्लेम्सची एकूण संख्या ११९ झाली, व त्यांची रकम ५ लक्षांपेक्षा कमी डॉलर भरली. म्हणजे, एकूण क्लेम्सच्या फक्त २%पेक्षा कमी त्यांची संख्या होती.

### पुणें सें. को. बँक लि.

वरील बँकेची वार्षिक सभा ता. ७ रोजीं झाली, त्यावेळीं व्यक्तिशः मतदारांतर्फे श्री. ना. वि. भोंडे, श्री. म. धों. विद्वांस, श्री. श्री. रा. पाळंदे, श्री. ग. म. गुप्ते, राव. पां. शा. कुलकर्णी, श्री. मा. पं. सोमण व श्री. हां. द. रवडे हे डायरेक्टर निवडून आले. त्यांपैकीं श्री. म. धों. विद्वांस ह्यांची अध्यक्ष व सोसायट्यांतर्फे निवडून आलेले श्री. रा. ह. तुपे ह्यांची उपाध्यक्ष म्हणून निवडणूक झाली. श्री. दा. ग. बापट ह्यांची लोकल ऑडिटरचे जागीं नेमणूक झाली. सभेचें काम ता. ७ रोजीं पुरें न झाल्याकारणानें, सभा ता. २६ आक्टोबरपर्यंत तहकूब करण्यांत आली.

### भेदाभेद नष्ट करा

अमेरिकन सरकारच्या नोकरींत वंश, धर्म, वर्ण, इत्यादिसंबंधाचे भेदाभेद अजीबात नष्ट करण्याविषयीं हुकूम प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं काढला आहे. युद्धविषयक कामांत निग्रो लोकांस वगळण्यांत येतें, अशी तक्रार प्रेसिडेंटचे कानांवर गेली, त्याचा हा परिणाम आहे.

### हिटलरनें भाषण तहकूब केलें

हिटलरनें आपलें युद्धपरिस्थितीवरील भाषण तहकूब केलें आहे. अपेक्षेप्रमाणें पूर्व आघाडीवर त्यास विजय मिळत नसल्यामुळें त्याचेजवळ उत्साहवर्धक बातमी सांगण्याजोगी नाहीं, हें त्या तहकुबीचें कारण असावें, असें प्रसिद्ध झालें आहे.

### आसाम-बंगाल रेल्वे

हिंदुस्थान सरकार वरील रेल्वे १ जानेवारी, १९४२ रोजीं खरेदी करणार आहे.

### लॉर्ड लिनलिथगो ह्यांचे मागून कोण येणार!

व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो, ह्यांची मुदत एप्रिल, १९४२ मध्यें संपते. त्यांचेनंतर त्यांचे जागीं कोणाची नेमणूक होईल, ह्याविषयींच्या तर्कवितर्कांस प्रारंभ झाला आहे.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १११—८ |
| ४% १९४३ | १०४—० |
| ३½% बिनमुदत | ९६—० |
| ३½% १९४७–५० | १०३—२ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ | ९७—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५१–६१ ) | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२६—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४५—८ |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% | ११३—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% | ४९—० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १५९०—० |
| बाँबे मॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | ११०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% | १४२—० |
| कराची ( १०० ) ९% | २०६—६ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १७३२—८ |
| आंध्र व्हॅली-ऑर्डि. ( १००० ) ७½% | १७२१—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% | ८०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८९७–८–० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २२१—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४९—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २५–१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ५०—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४१९५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१३—२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) ७½% रु. | १५१—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३७७—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु. १० आ. ७ पै. | २०५७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १५२—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२—३—० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६२–१४–६ |

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
४ सहकार : किं. २ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
संग्रह करा
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
—: रक्तवर्धक :—
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें
आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
'पायोनियर डाइंग हाऊस'
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.


मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स
वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी
Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान
एम्ब्रॉयडरी मार्ट
६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲण्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी.
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख १७, सप्टेंबर १९४१ | अंक ३८

अर्थ ग्रन्थमाला–पुस्तक ४ थें

## सहकार

### ( हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

★

### The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

### DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### प्रॉक्झीपत्रकावर दोन आणे ड्यूटी

विमा कंपनीच्या डायरेक्टर बोर्डावर विमेदारांचे प्रतिनिधी निवडण्यासाठीं त्यांची सभा भरते, त्यावेळीं प्रॉक्झी देऊन विमेदार दुसऱ्या विमेदारास मत देण्याचा अधिकार वर्ग करूं शकतो. ह्या प्रॉक्झीवर इंडियन स्टँप ॲक्टाप्रमाणें असलेली ड्यूटी ह्यापुढें २ आणे करण्यांत येणार आहे.

### धरणीकंप

तुर्कस्थानच्या पूर्व भागांत धरणीकंपामुळें शेंकडो लोक मरण पावले.

### २७½ हजार रुपये नुकसानभरपाई

एका सेवानिवृत्त सनदी नोकराच्या पत्नीस बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वेचे जनरल ट्रॅफिक मॅनेजर, मि. आल्डस, ह्यांच्या मोटारीमुळें घडलेल्या अपघातांत झालेल्या नुकसानीबद्दल सदरहु स्त्रीस मुंबई हायकोर्टांत २७½ हजार रुपये मिळाले. तिनें १ लक्ष रुपये मागितले होते व प्रतिवादी १० हजार रुपये देण्यास तयार होता.२७½ हजारांवर प्रकरण मिटून त्याप्रमाणें हायकोर्टानें निकाल दिला. खर्च वजा जातां उरलेली रकम धर्मादाय व विशेषतः युद्धफंडास दिली जाईल, असें वादीनें सांगितलें.

### बरसातीची सुवार्ता

महाराष्ट्रांत पर्जन्याचे अभावीं मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडणार, अशीं चिन्हें सर्वत्र दिसूं लागलीं होतीं. आतां पाऊस पडण्यास प्रारंभ झाला असून अनेक ठिकाणीं बरा पाऊस झाल्याची वार्ता आली आहे. त्यामुळें पाण्याचें दुर्भिक्ष्य नाहींसें होईल, अशी आशा आहे.

### हिंदुस्थान सरकारचें नवें खातें

सर अकबर हैदरी ह्यांच्या हातीं "डिपार्टमेंट ऑफ इन्फर्मेशन अँड ब्रॉडकास्टिंग" हें हिंदुस्थान सरकारचें नवें खातें देण्यांत येणार आहे. रेडिओची व्यवस्था हल्लीं पोस्ट खात्याकडे आहे ती ह्या नव्या खात्याकडे जाईल.

### सक्तीचा विमा

मालाचा, युद्धविषयक धोक्याचा विमा उतरविण्याची सक्ती करणारा ऑर्डिनन्स अमलांत आला, त्यास बरेच महिने झाले. तेव्हां ह्या ऑर्डिनन्सबरहुकूम विमा न उतरविणाराविरुद्ध कायदेशीर इलाज करण्यास आतां सरकारनें प्रारंभ केला आहे. सुरवातीस खटले भरण्यांत येत नव्हते.

### पात्र बदललें

सकर जिल्ह्यांत सिंधू नदीचें पात्र बदलून तें २ मैल सरकलें आहे. त्यामुळें भयंकर नुकसान होत आहे.

### हिंदी कपाशीचा निर्गत व्यापार आणि कराची येथील व्यापारी

कपाशीचा व्यापार करणाऱ्या कराची येथील धंदेवाल्यांनीं आपल्या बंदरामधून हा व्यवहार फार मोठ्या प्रमाणांत होत असल्याचें हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री सर ए. रामस्वामी मुदलियार, ह्यांचे निदर्शनास नुकतेंच आणलें. हिंदी कपाशीच्या निर्गतीचा निम्मा हिस्सा कराचीच्या वांट्यास येतो असें त्यांनीं सांगितलें. सुमारें वीस लक्ष गाठी कापूस कराची बंदरांतून प्रतिवर्षी बाहेर जातो.

### इंग्लंडचा जपानशीं व्यापार संपुष्टांत आला

युद्धसामुग्रींत उपयोगी पडेल असा कोणताच माल इंग्लंडमधून गेल्या तीन महिन्यांत जपानला गेलेला नाहीं. जपानला जावयाच्या मालासाठी सरकारी परवाना लागतो आणि असे परवाने अलीकडे देण्यांत आलेले नाहींत आणि ते ह्यापुढें दिले जाण्याचा संभव दिसत नाहीं.

### हवेंत "उडणारा किल्ला"

लांब अंतर तोडणारें व बाँब फेकणारें अत्यंत भक्कम असें नव्या बनावटीचें वरील नांवाचें लढाऊ विमान अमेरिकेच्या कारखान्यांत तयार होत असून त्यास जर्मन विमानांशीं लढण्यांत निश्चित यश मिळालें आहे. ह्यामुळें सदरहु विमानांचें "उडता किल्ला" हें नांव सार्थ झालें आहे.

### मोटारींच्या उत्पादनांचें नियंत्रण

कॅनडामधील मोटारगाड्यांचें उत्पादन नियंत्रित करण्यांत आलें आहे. १९४० सालीं तेथें ९९,५०० गाड्यांचें उत्पादन झालें होतें. १९४२ सालीं त्याच्या ४४% उत्पादनासच परवानगी मिळणार आहे. मोटार गाड्यांचें उत्पादन अजिबात बंद ठेवण्याचा अधिकार सरकारनें घेऊन ठेविला आहे.

### नॅशनल सेव्हिंग्ज बँक लि. मुंबई

वरील बँकेचें उद्घाटन गेल्या आठवड्यांत झालें. श्री. सांखळचंद शहा हे बँकेच्या बोर्डाचे अध्यक्ष आहेत. बँक २८ मे रोजीं बँक जॉइंट स्टॉक कंपनी म्हणून नोंदण्यांत आली व तिचा व्यवहार सुरू करण्यास परवानगी १४ ऑगस्ट रोजीं मिळाली. बँकेकडे २०० खातीं चालू झालीं असून त्यांत १० लाखांवर रकम आहे. २½ लक्ष रुपयांचे भाग खपले असून, खेळतें भांडवल ११ लक्ष रुपये झालें आहे.

### मद्रास युद्धफंड

मद्रासच्या गव्हर्नरांच्या युद्धफंडाचा आकडा १ कोटि, ४८ लक्ष रुपये झाला आहे.

### सार्डिनिया

सार्डिनिया हें भूमध्य समुद्रांतील इटलीच्या मालकीचें एक बेट आहे. तें कोर्सिकाच्या पश्चिमेस ७½ मैलांवर असून त्याचें क्षेत्रफळ ९,२९९ चौरस मैल आहे. जर्मन सैनिकांनीं तें आतां आपल्या ताब्यांत घेतलें असून इटालिअनांस तेथें परवानगीशिवाय प्रवेश मिळत नाहीं.

### रशियांतील पीक

रशियामध्यें चालू वर्षी उत्कृष्ट पीक आलें आहे.

### तुर्कस्तानांत नवीन रस्ते

तुर्कस्तानांत नवे रस्ते करण्याची मोठी योजना तेथील सरकारनें आखली आहे. ६,२०० मैल लांबीचे नवीन रस्ते करण्यांत येणार आहेत. तुर्कस्तानानें वहातुकीसाठी नुसते रस्ते तयार करून उपयोगी नाहीं, मोटार लॉरींच्या उत्पादनासहि त्यानें प्रारंभ केला पाहिजे, असें तेथील एका प्रमुख वृत्तपत्रानें म्हटलें आहे. त्यांचें परदेशांवरील अवलंबन ह्यामुळें नष्ट होईल.

### डॉन ऑफ इंडिआ लाईफ अॅ. कं. लि.

सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सच्या अर्जावरून, मुंबई हायकोर्टानें डॉन ऑफ इंडिया विमा कंपनी गुंडाळण्यांत यावी व त्यासाठीं ऑफिशिअल लिक्विडेटरला लिक्विडेटर नेमण्यांत यावें, असा हुकूम ता. १ सप्टेंबर रोजीं दिला.

## अनुक्रमणिका

पृष्ठ

१ विविध माहिती ... ४४६
२ युद्धाकरितां कापडाचा पुरवठा ... ४४७
३ हिंदुस्थानांत परदेशी सुपारी किती खपते ? ४४८
४ स्फुट विचार ... ४४९
काटकसर व बचत ह्यांची आवश्यकता—शास्त्रज्ञांची लंडन येथें परिषद्—इंग्लंडमध्यें युद्धसामुग्रीचा पुरवठा—पेट्रोल रेशनिंग व मोटारींचा विमा
५ सहकारी संस्थांचे अहवाल ... ४५०
६ पेट्रोल रेशनिंग व मोटारींचा विमा ... ४५१
७ हिंदी अंड्यांचा निर्गत व्यापार ... ४५२
८ असोसिएटेड केमिकल्स लि. ... ४५३
९ निवडक बाजारभाव... ४५४

अर्थ

बुधवार, ता. १७ सप्टेंबर, १९४१

# युद्धाकरितां कापडाचा पुरवठा

## मुंबईच्या परिषदेंत चर्चा

सैनिकांच्या उपयोगासाठी निरनिराळ्या जातींचें कापड लागतें, त्याचा भरपूर पुरवठा वक्तशीर होणें अगत्याचें असतें. ह्या कापडाच्या पुरवठ्याचे बाबतींत माहीतगारांचे, किंमतींचे, खरेदीचे वगैरे अनेक प्रश्न उद्भवतात त्यांचा समाधानकारक निकाल लावणें कापड—पुरवठ्याच्या व्यवस्थेच्या दृष्टीनें आवश्यक असल्यामुळें हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी व कापडाच्या गिरण्यांच्या मालकांचे संघ ह्यांची एक परिषद् गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भरली होती आणि तिच्यामध्यें दीर्घ चर्चा होऊन महत्त्वाच्या बाबींचा निर्णय करण्यांत आला. हिंदुस्थान सरकारचे कार्यकारी मंत्री सर होमी मोदी परिषदेचे अध्यक्ष असून सर ए. रामस्वामी मुदलियार हेहि उपस्थित होते. कापडाचा पुरवठा करणाऱ्या सरकारी खात्याचें कार्यक्षेत्र, कापडाच्या पुरवठ्याची गिरण्यांमध्यें योग्य वांटणी, कापडाच्या किंमती ठरवण्याची पद्धति व सरकारास ह्या सर्व बाबतींत सल्ला देण्याकरितां प्रातिनिधिक तज्ज्ञ—मंडळ ह्या प्रश्नांची चर्चा व निकाल परिषदेनें केला आणि तो सरकार व गिरणीवाले ह्या दोन्ही पक्षांच्या दृष्टीनें समाधानकारक लागला असें प्रसिद्ध झालें आहे.

मध्यवर्ती सरकारचें पुरवठा—खातें आहे, त्याचा कापड—विभाग दिल्लीहून हालवून त्याचें मुंबई येथें स्थलांतर करण्याचें ठरलें आहे. मुंबई प्रांतांत कापसाच्या कापडाच्या गिरण्या एकत्रित झालेल्या आहेत, तशा त्या इतरत्र नसल्या कारणानें मुंबई शहर हें कापडाच्या पुरवठ्याचें केंद्र करण्यांत आलें आहे तें सोयीच्या दृष्टीनें अत्यंत योग्य आहे. मुंबईस होणाऱ्या व्यवस्थेंत कित्येक कापडतज्ज्ञांची नेमणूक करण्यांत येईल आणि सैनिकांच्या उपयोगासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या मालाचे संबंधांत ते गिरणीवाल्यांस सल्ला देतील. विशिष्ट तऱ्हेचें कापड योग्य वेळीं कांहीं कारणामुळें तयार होणें कठिण आहे असें आढळून आल्यास त्या तऱ्हेमध्यें बदल करण्याविषयीं सल्ला देण्याचें काम हे तज्ज्ञ करतील. पुरवठा—खात्यानें खरेदी करावयाच्या किंमती ठरवणें अवघड आहे; तथापि, गेल्या महिन्यांत निश्चित झालेल्या बाजारभावांच्या विशिष्ट प्रमाणांत ह्या पुढील किंमती आकारल्या जातील. गिरण्यांच्या उत्पादन खर्चांत होणारा फेरबदल हिशेबांत घेतला जाऊन खरेदीच्या किंमती निश्चित होतील. ह्या व्यवस्थेमुळें गिरणीवाल्यांस योग्य किंमती मिळतील आणि सरकारास भलत्याच भावानें कापड खरेदी करावें लागणार नाहीं.

कापडाच्या पुरवठ्याच्या ऑर्डरींची वांटणी देशांतील निरनिराळ्या ठिकाणच्या गिरणीवाल्यांमध्यें समतेनें व्हावी आणि ह्या संबंधांत तक्रारीस जागा राहूं नये ही महत्त्वाची गोष्ट आहे. तिचे बाबतींत असें ठरलें आहे कीं गिरणीवाल्यांचें सल्लागार मंडळ नेमण्यांत येईल. त्यांत मुंबई, अहमदाबाद, कानपूर, कोइंबतूर, बडोदा व कलकत्ता ह्या औद्योगिक क्षेत्रांस प्रतिनिधित्व दिलें जावयाचें आहे. सरकारच्या ऑर्डरी सोइस्कर रीतीनें वांटल्या गेल्यास कापडाचा पुरवठा हवा तसा होऊं शकेल आणि सर्व गिरण्यांस पुरवठ्यांत योग्य हिस्सा मिळेल. कांहीं मुदतीनंतर पुरवल्या जाणाऱ्या कापडाच्या संबंधांत विशेष अडचण भासत नाहीं. परंतु तातडीनें विशिष्ट जातींच्या कापडाची जरूर वाटल्यास त्याचा पुरवठा होणें कठिण होतें, तथापि हिंदुस्थानांतील विविध क्षेत्रांतील गिरण्यांमध्यें मागणीची वांटणी झाली असतां ह्या प्रकारची अडचण उरणार नाहीं अशी अपेक्षा आहे. हातमागावर तयार होणाऱ्या कापडाचाहि उपयोग करण्याच्या प्रश्नाचा विचार मुंबई परिषदेनें केला आणि विशिष्ट जातींच्या मालाच्या ऑर्डरी विणकरांस देण्याची व्यवस्था करण्याचें ठरलें. माल तयार करणाऱ्या विणकरांस सुताचा पुरवठा होण्याच्या अडचणीचा प्रश्न येथें उपस्थित झाला आणि त्याबद्दलच्या योग्य व्यवस्थेविषयीं परिषदेंत चर्चा झाली. तिचा निष्कर्ष परिणामकारक होईल अशी आशा आहे.

कापडाच्या उत्पादनांत सध्याच्या परिस्थितींत युद्धोपयोगी मालास प्राधान्य दिलें जाणें स्वाभाविक व अपरिहार्य आहे. तथापि सामान्य जनतेच्या कापडाविषयींच्या गरजा भागवल्या जाण्याची शक्य तितकी तरतूद करणेंहि आवश्यक आहे. हा मामुली कापडाचा पुरवठा करण्याचा कार्यक्षम उपाय म्हणजे कापड व सूत ह्यांचें उत्पादन जास्तींत जास्त वाढवणें हा होय असा निर्णय परिषदेनें केला. सामान्य जनतेच्या नित्याच्या उपयोगाचें कापड बेताच्या किंमतीनें विकलें जाण्याच्या महत्त्वावर तिनें जोर दिला. युद्ध काळांत कापडासारख्या जिनसांच्या किंमती चढणार नाहींत अशी काळजी घेणें अगत्याचें असतें. हिंदुस्थानांतील कापड गिरण्यांस जकातीचें संरक्षण देण्यांत आलें आहे. ह्या औद्योगिक संरक्षणाचा बोजा हिंदी जनता सहन करीत आहे हा ह्याचा अर्थ आहे. संरक्षित धंद्यांवर ह्या बाबतींत विशिष्ट जबाबदारी असते. तथापि, गिरणीवाल्यांच्या जबाबदारीच्या भावनेवरच केवळ सरकारनें अवलंबून चालावयाचें नाहीं. कापडाच्या किंमतीच्या संबंधांत जनतेच्या हिताची जोपासना करण्याविषयीं सरकारनें जागरूक रहाणें इष्ट आहे.

## हिंदुस्थानांत परदेशी सुपारी किती खपते ?

सुपारी खाण्याचा प्रघात फक्त हिंदुस्थानांतच आहे. इतर देशांत कोठें सुपारी खात नाहीं. हिंदु लोकांत सर्व धार्मिक कृत्यांत सुपारी व नारळ अवश्य लागतात; जेवण झाल्यावर मुखशुद्धीकरितां पुष्कळ लोकांना सुपारी खाणें जवळजवळ जरूरच असतें. यावरून हिंदुस्थानांत रोजच्या व्यवहारांत सुपारीचें स्थान फार महत्त्वाचें आहे हें दिसून येईल. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, हिंदवासीयांच्या जरूरीपुरती सुपारी हिंदुस्थानांत मुळींच पिकत नाहीं. यासाठी ती परदेशांतून आणावी लागते. निरनिराळ्या देशांतून किती सुपारी हिंदुस्थानांत येते व तिची किती किंमत हिंदुस्थानाला द्यावी लागते, याची माहिती पुढील वक्तव्यावरून कळून येईल. "शेतकी आणि शेतकरी" ह्या मासिकांतील श्री. ह. पु. परांजपे, ह्यांच्या लेखावरून ही माहिती घेतली आहे.

### परदेशांतून हिंदुस्थानांत येणारी सुपारी

| देश | वजन हंड्रेडवेट १९३७–३८ | किंमत रुपये १९३७–३८ |
|---|---|---|
| सीलोन (मालदीव बेटें वगळून) | ६२,२५३ | ८,८९,३६१ |
| ब्रह्मदेश | १८,४२१ | ३,२१,९६२ |
| स्ट्रेट्स् सेटलमेंट्स् | १३,८०,९५३ | १,२९,१९,२०३ |
| फेडरेटेड मलाया स्टेट्स् | ९२ | १,११६ |
| झांझिबार व पेंबा | १,३५१ | १६,५९९ |
| सुमात्रा | ६,१०५ | ५०,३६२ |
| जावा | ९,०९० | ८५,४५१ |
| इतर किरकोळ | | २ |
| | १४,७८,२६५ | १,४२,८४,०५६रु. |

आतां आपण हा माल निरनिराळ्या बंदरांत किती उतरतो तें पाहूं:—

| बंदर | वजन हंड्रेडवेट १९३७–३८ | किंमत रुपये १९३७–३८ |
|---|---|---|
| कलकत्ता | ८,७७,६३१ | ७३,०५,१३७ |
| मुंबई | ३,०३,७८७ | ३०,८५,४८२ |
| कराची | ६३०१ | ९४,४३१ |
| मद्रास | २,९०,५४६ | ३७,९९,००६ |
| | १४,७८,२६५ | १,४२,८४,०५६ |

यावरून ३०३ हजार हंड्रेडवेटपेक्षा जास्त वजनाची व तीस लक्ष ८१ हजार रुपयांहून जास्त किंमतीची सुपारी मुंबई बंदरांत येते. ब्रिटिश साम्राज्यांतून जी सुपारी येते तिच्यावर शेंकडा ३७½ टक्के व ब्रिटिश साम्राज्याच्या बाहेरून जी सुपारी येते तिच्यावर शेंकडा ४५ टक्के आयात जकात द्यावी लागते. येवढी जकात देऊनहि परदेशी सुपारी हिंदुस्थानांत देशी सुपारीपेक्षा स्वस्त पडते.

### सुपारीखालील क्षेत्र

मुख्य मुख्य प्रांतांतलें सुपारीखालचें क्षेत्र पुढीलप्रमाणें आहे. बंगाल प्रांत २८१, ३२४ एकर. मद्रास प्रांत १०७, १६६एकर.

#### बंगाल प्रांत

| जिल्ह्याचें नांव | सुपारीचें क्षेत्र (एकर) |
|---|---|
| खुलना | ९०,००० |
| टिप्पेरा | १२४००० |
| नोआखाली | ४७००० |
| बाकरगंज | १६८०७ |
| इतर जिल्हे मिळून | ३५१७ |
| एकूण | २,८१,३२४ |

#### मद्रास प्रांत

| | |
|---|---|
| मलबार | ८५,१६३ |
| दक्षिण कॅनरा | १८,४७५ |
| कोईमतूर | १६५२ |
| सालेम | १,१०७ |
| इतर जिल्हे | ७६९ |
| एकूण | १,०७,१६६ |

#### मुंबई प्रांत

| | |
|---|---|
| कुलाबा | ३७६ |
| रत्नागिरी | ३८८४ |
| उत्तर कॅनरा | १८०१९ |
| ठाणें | ३९२ |
| इतर जिल्हे | २६ |
| एकूण | २२६९७ |
| जंजिरा संस्थान | १,३२० |
| म्हैसूर संस्थान | २७३५० |

म्हणजे बंगाल, मद्रास, मुंबई, व म्हैसूर संस्थान मिळून ४ लक्ष, ३९ हजार ८५७ एकर क्षेत्र सुपारीखालीं आहे; याशिवाय आसाम, त्रावणकोर कोचीन, कूर्ग व ओरिसा या प्रांतांत किती आहे तें माहीत नाहीं. हिंदुस्थानांत एवढें मोठें क्षेत्र असून सुद्धां १ कोटि, ४२ लक्ष, ८२ हजार रुपयांची सुपारी परदेशांतून आणावी लागते. हिंदुस्थानांतला एवढा पैसा वाचवायचा असेल तर सुपारीची फारच मोठ्या प्रमाणावर आणखी लागवड केली पाहिजे, किंवा आपण सुपारी खाण्याचें तरी सोडून दिलें पाहिजे; किंवा हल्ला अस्तित्वांत असलेल्या बागांची उत्तम मशागत करून व त्यांचें अनेक रोगांपासून जें भयंकर नुकसान होत आहे तें संशोधन करून टाळलें पाहिजे.

### लढाऊ सामुग्रीच्या सुधारणेच्या योजना

हिंदुस्थानांतील फौज, आरमार व विमानदल ह्यांस लागणाऱ्या सामुग्रींत सुधारणा करण्यासाठी नवीन योजना अनेक लोकांकडून हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय डेव्हलपमेंट कमिटीकडे आल्या असून त्यांचा तज्ज्ञांकडून विचार चालू झाला आहे. ह्या योजनांत हिंदुस्थानांत उपलब्ध होणाऱ्या कच्च्या मालास प्राधान्य देण्यांत येत आहे ही महत्त्वाची गोष्ट आहे.

# स्फुट विचार

### काटकसर व बचत ह्यांची आवश्यकता

इंपीरिअल बँकेच्या गेल्या वार्षिक सभेचे प्रसंगीं तिचे अध्यक्ष, मि. हॉडसन, ह्यांनीं गेल्या वर्षांतील परिस्थितीचा आढावा घेतला, तो अनेक दृष्टींनीं मननीय होता. सध्या, जगांतील बहुतेक सर्व देशांच्या आर्थिक धोरणावर युद्धपरिस्थितीची छाया पडलेली आहे, व तें स्वाभाविकहि आहे. जरूरीपेक्षा ज्यास्त चलनाचा कृत्रिमपणें फैलाव न होऊं देण्याची दक्षता सर्व देश घेत आहे. युद्धास लागणाऱ्या खर्चाची तरतूद, चलन फाजील न वाढवतां कर, काटकसर, व इतर मार्ग ह्या दिशेनेंच करण्यांत येत आहे. राष्ट्रीय उत्पादन वाढावें परंतु लोकांनीं कमी जिनसा वापराव्या, म्हणजे युद्ध प्रयत्नास मदत होईल. असें करतांना लोकांचें रहाणीचें मान खालीं जाईल, परंतु तें अपरिहार्य आहे, असें मि. हॉडसन हे म्हणाले. करवाढीमुळें ही गोष्ट अप्रत्यक्ष रीतीनें साध्य होते व रेशनिंगच्या म्हणजे वस्तू मोजून देण्याच्या योजनेनें सक्तीची काटकसर होते. पेट्रोलवरील नियंत्रणामुळें अशीच काटकसर घडून आलेली आहे. तथापि, सक्तीपेक्षा लोकांनीं आपण होऊन आपल्या गरजा मर्यादित कराव्या म्हणजे चलनाचा फाजील विस्तार होण्याची भीति उरणार नाहीं असें मि. हॉडसन ह्यांनीं सांगितलें. हिंदी नागरिकांवर अद्याप फारसा बोजा पडलेला नाहीं. तेव्हां आपण सर्वांनीं शक्य तितकी बचत करून युद्धफंडांस अगर युद्धकर्जास हातभार लावावा, अशी त्यांनी विनंति केली. काटकसरीमुळें युद्धप्रयत्नास सहाय होईल, त्याचप्रमाणें व्यक्तीचाहि फायदा होईल, हें उघड आहे. मि. हॉडसन ह्यांनीं काटकसर आणि बचत ह्यांच्या आवश्यकतेचें विवेचन केलें, त्याच धर्तीवर अमेरिकेच्या फडणिशी खात्याचे सेक्रेटरी मि. मॉर्गेनथौ ह्यांनीं अमेरिकन जनतेस विनंति केली आहे. फाजील चलनाच्या प्रसारास आळा बसावा ह्यासाठी कामगार, शेतकरी व व्यापारी ह्या सर्वांनीं राष्ट्राच्या हिताप्रीत्यर्थ आपल्या आकांक्षांस लगाम लावला पाहिजे व पगारवाढ आणि जादा नफा ह्यांचे मार्गें जातां कामा नये, असें त्यांनीं सांगितलें. जनतेवर कराचा बोजा अधिक टाकला पाहिजे, नागरिकांनीं सर्वांत काटकसर केली पाहिजे, पैशाची बचत मोठ्या प्रमाणावर केली पाहिजे व रोजच्या आयुष्यक्रमावर अधिकाधिक नियंत्रणें बसविलीं जातील त्यांचा विनतक्रार स्वीकार केला पाहिजे, असें मि. मॉर्गेनथौ ह्यांचें म्हणणें आहे.

---

### शास्त्रज्ञांची लंडन येथें परिषद

चालू महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत लंडन येथें शास्त्रज्ञांची एक जागतिक परिषद भरणार असून आधुनिक शास्त्रांतील शोधांचा उपयोग मानवी प्रगतीस व अभ्युदयास कसा करून घेतां येईल ह्याविषयीं ती चर्चा करणार आहे असें प्रसिद्ध झालें आहे. जगांतील सर्व प्रमुख देशांतील नामांकित शास्त्रज्ञ ह्या परिषदेस उपस्थित होणार आहेत. जर्मनीच्या तडाख्यांत सांपडलेल्या देशांचा अर्थातच ह्यास अपवाद आहे असें म्हणतात. युद्धपरिस्थितीमुळें ज्या निमंत्रित पंडितांस परिषदेच्या कार्यांत प्रत्यक्ष भाग घेतां येणार नाहीं, त्यांचीं भाषणें ध्वनिक्षेपक पद्धतीनें ऐकवलीं जावयाचीं आहेत. भौतिक सुधारणांचा उपयोग मानवी सुखाच्या वृद्धीस झाला आहे आणि तो वाढत्या प्रमाणांत होण्यासारखा आहे ह्यांत शंका नाहीं. तथापि शास्त्रीय शोधांचा जसा सदुपयोग करतां येतो, तसा दुरुपयोगहि होऊं शकतो हें प्रस्तुत चाललेल्या युद्धानें सिद्ध केलेंच आहे. मानवी हिताच्या दृष्टीनें जगांतील अनेक राष्ट्रांचें संघटन कसें करावें हा प्रश्न सोडवण्यास केवळ भौतिक शास्त्रें उपयोगी पडणार नाहींत. राष्ट्रांच्या परस्पर संबंधाच्या मनोवृत्तींत इष्ट बदल झाल्यावांचून आणि सामान्य मानवी अभ्युदयाचें ध्येय गाठण्यास सर्वांचें सहकार्य झाल्यावांचून जागतिक शांततेचा व प्रगतीचा प्रश्न सुटणार नाहीं. राष्ट्रीय सामाजिक व राजकीय व्यापक भूमिकेवर उभें राहून शास्त्रज्ञांनीं उपाय सुचवले आणि त्यांचा स्वीकार सार्वत्रिक व हार्दिक झाला तरच मानवी उत्कर्षाचें भवितव्य उज्ज्वल होईल.

---

### इंग्लंडमध्यें अन्नसामुग्रीचा पुरवठा

ब्रिटिश व्यापाराची नाकेबंदी करून इंग्लंडमध्यें खाण्यापिण्याच्या पदार्थांचा तुटवडा पाडण्याचा प्रयत्न जर्मनीनें जारीनें चालवला असतांना लोकांनीं वापरावयाच्या जिनसांचें नियंत्रण आणि त्यांचा शक्य तेवढा मोठा साठा करून ठेवण्याचें महत्त्व मोठें आहे हें उघड आहे. तें वेळींच ओळखून ब्रिटिश सरकारनें योग्य तजवीज युद्धाच्या प्रारंभापासूनच केलेली आहे. अटलांटिक महासागरांत जर्मन पाणबुड्या, नावा व लढाऊ विमानें ह्यांनीं कितीहि धिंगाणा घातला तरी अमेरिका खंडांतून व विशेषत: अमेरिकेमधून खाण्यापिण्याच्या जिनसांनीं भरलेलीं जहाजें इंग्लंडला सुरक्षित रीतीनें पोहोचत असल्याच्या बातम्या मधून मधून प्रसिद्ध होत असतात त्यांवरून ब्रिटिश सरकारच्या वर निर्दिष्ट केलेल्या तजवीजीची कल्पना येते. इंग्लंडचे अन्नसामुग्री मंत्री, लॉर्ड वूल्टन ह्यांनीं नुकतेंच एक भाषण केलें त्यांत ह्या विषयाबाबत समाधानाचे उद्गार काढले. जर्मनीच्या वर्चस्वाखाली असलेल्या युरोपांतील कोणत्याहि देशापेक्षा खाण्यापिण्याच्या पदार्थांच्या पुरवठ्याचे संबंधांत इंग्लंडची परिस्थिति किती तरी पटींनीं अधिक अनुकूल आहे. ब्रिटिश जनतेच्या रहाणीस आवश्यक असलेले अन्नाचे सर्व मुख्य पदार्थ इंग्लंडमध्यें पुरेसे आहेत ह्याविषयीं लॉर्ड वूल्टन ह्यांनीं आश्वासन दिलें. गव्हाचा पुरवठा तर एवढा मोठा होत आहे कीं हें धान्य साठवून ठेवण्याची व्यवस्था करण्याविषयीं अडचण भासत असल्याचें त्यांनीं सांगितलें. युद्धापूर्वीच्या काळाच्या मानानें इंग्लंडचा अन्नाचा पुरवठा मर्यादित झाला आहे ह्याचें कारण ज्या युरोपांतील देशांतून ते जिन्नस येत असत ते देश जर्मनीच्या ताब्यांत गेले आहेत. लोण्यासारख्या जिनसांचा पुरवठा यामुळें एकदम पंचावन्न टक्के घटला आहे आणि कांहीं पदार्थ चवदा हजार मैलांवरून आणावे लागत आहेत असा खुलासा त्यांनीं केला. जर्मनी, इटली व इतर युरोपिअन देशांस, कांहीं झालें तरी, इंग्लंडच्या अन्नपुरवठ्याविषयीं हेवा वाटला पाहिजे अशी आजची स्थिति आहे असें ते म्हणाले. ब्रिटिश सरकार आणि जनता युद्धपरिस्थितीस स्वार्थत्यागपूर्वक आणि निश्चयानें तोंड देत आहे हें लॉर्ड वूल्टन ह्यांच्या भाषणावरून स्पष्ट दिसून येतें.

# सहकारी संस्थांचे अहवाल

## मुंबई प्रांतिक को. लँड मॉर्गेज बँक लि.

( वार्षिक सभा : २४-९-४१ )

मुंबई प्रांतांतील प्राथमिक सहकारी लँड मॉर्गेज बँकांच्या अग्रभागीं असलेल्या ह्या बँकेच्या कारभारास सहा वर्षे पुरीं झालेलीं आहेत. प्रत्येक प्राथमिक बँकेनें तिनें प्रांतिक बँकेकडून जितकें कर्ज घेतलें असेल, त्याच्या ५% इतक्या रकमेचे प्रांतिक बँकेचे भाग धारण केले पाहिजेत, असा नियम असल्यामुळें बँकेचें भाग भांडवल वाढत आहे. तें आतां ४ लक्ष, ७२ हजार रुपये झालें आहे. ह्यापैकी प्राथमिक बँकांनीं घेतलेलें भांडवल १ लक्ष, ४२ हजार रुपये आहे. बँकेचे रिझर्व्ह व इतर फंड मिळून ७३ हजारांची रकम आहे. बँकेच्या डिबेंचरांची एकूण रकम ३० लक्ष रुपये आहे. ह्या डिबेंचरांची परत फेडीची तरतूद करण्याकरितां सिंकिंग फंड काढलेला आहे, त्याची रकम ३ लक्ष १४३ हजार रुपये भरते. ठरलेल्या हप्त्याचे रकमेपेक्षा अधिक रकम त्यांत टाकलेली आहे. ही रकम मुख्यतः सरकारी रोखे व अंशतः बँकेचीं स्वतःचीं डिबेंचर्स ह्यांत गुंतविण्यांत आलेली आहे. बँकेचे सुमारें २८ लक्ष रुपये प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांकडून येणें आहेत. अहवालाचे वर्षीं व्याजाची वसुली १०० टक्के झाली व मुदलाची वसुली ७८.९% झाली. " प्राथमिक बँकांकडून बँकेची व्हावयाची वसुली पूर्णपणें समाधानकारक होती. " " मद्रासच्या कायद्याप्रमाणें मुंबई प्रांताकरितां लँड मॉर्गेज बँक्स ॲक्ट केला म्हणजे वसुलीचें काम सुलभ होईल. वर्षअखेर प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांची संख्या १७ होती. डिबेंचर्स अंडरराईट करण्याचें कमिशन म्हणून ४ हजार रुपये व डिबेंचर्सवरील डिस्कौंट म्हणून १२,६२१ रुपये जिंदगीचें बाजूस आहेत. वर्षअखेर, नफावाटणीस २८,५७९ रुपये नफा राहतो, त्यांतून ३३% डिव्हिडंडसाठीं ११,४४६ रुपयांचा विनियोग करावा, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. ४,३०६ रुपये नियमाप्रमाणें रिझर्व्ह फंडांत जातील. "बँकेची प्रगति दीर्घ मुदतीनें परतफेड करावयाचें अल्प व्याजाचें मुबलक भांडवल मिळण्यावर अवलंबून आहे व युद्धकाळांत तें मिळणें कठीण आहे. " सर गोविंदराव प्रधान हे बँकेचे अध्यक्ष आहेत.

---

## सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

( वार्षिक सभा: २८-९-४१ )

वरील बँकेचे ८४२ 'अ' वर्ग कर्जदार व ५२ 'अ' वर्ग बिगर कर्जदार सभासद असून त्यांनीं ३६,०९० रुपयांचे भाग घेतलेले आहेत. अहवालाचे वर्षीं बँकेनें ५४ अर्जदारांस ४९,५०० रुपये कर्ज दिलें. बँकेनें आतांपर्यंत एकूण २७० अर्जदारांस ३ लक्ष, १३ हजार रुपयें कर्ज दिलेलें आहे. " वरिष्ठ बँकेचे धोरणांत झालेला फरक, शेतकरी ऋणविमोचन कायदा अंमलांत येण्याची अपेक्षा व जिल्ह्याचे बहुतेक भागांतून दिसून येणारी दुष्काळी छटा, यामुळें गेल्या वर्षापेक्षा चालू सालीं अर्जांची आवक व तपासणी बरीच कमी झालेली असून त्यामुळें बँकेचें उत्पन्नहि बरेंच घटलेलें दिसून येईल. " अहवालाचे वर्षीं बँकेनें ५२ सभासदांना व्याजमुद्दल मिळून ६३ हजारांत १०,१३७ रुपयांची सूट मिळवून दिली आहे. अत्यंत प्रतिकूल अशा दुष्काळी परिस्थितींतहि बँकेनें चालू हप्त्यांची ७४% व मागील थकबाकीपैकी ६०% बाकी वसूल केली. " सरकारी ठरावान्वयें थकलेलें सर्व व्याज ३,५५५ रुपये नफ्यांतून रिझर्व्ह करावें लागलें व त्यामुळें आपले बँकेस अहवालाचे सालीं १,७९५ रुपयांचा तोटा दासविणें भाग पडून बँकेचे प्रगतीची थोडीशी परंतु दिखाऊ पिछेहाट झाल्याचें दिसून येत आहे, त्याबद्दल बोर्डास खेद वाटत आहे." रावसाहेब आ. ना. कल्याणी, एम. एल. ए. हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. एम. एस. पुटाणी हे मॅनेजर आहेत.

---

## सांगली स्टेट सें. को. बँक लि.

( वार्षिक सभा : ७-९-४१ )

बँकेच्या खपलेल्या २,३१२ भागांपैकीं १६६५ भाग २४२ सभासदांनीं धारण केलेले असून ६४७ भाग ७२ सोसायट्यांकडे आहेत. व्यक्तिशः खपलेल्या भागांपैकीं १,००० भाग सांगली संस्थानानें घेतलेले आहेत. एकूण वसूल भांडवल ६७,०२० रुपये आहे. रिझर्व्ह फंड, इमारत फंड, संशयित कर्ज फंड, इनव्हेस्टमेंट फ्लु. फंड, इत्यादींत मिळून सुमारें ८२ हजार रुपये आहेत. बँकेकडे एकूण ४ लक्ष, ४२ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेचें सोसायट्यांकडील येणें २ लक्ष, ९४ हजार रुपये आहे. थकबाकीचें प्रमाण २३.६% पडतें; म्हणजे अहवालाचे वर्षी तें २.९% नीं कमी झालें आहे. " चालू सालची दुष्काळाची परिस्थिति लक्षांत घेऊन बोर्डानें दरसालपेक्षां जास्त रकम कर्जाऊ दिलेली आहे. नवीन दिलेलीं कर्जें फार कसोशीनें व छाननी करून योग्य मेंबरांना देण्याची दक्षता घेतलेली आहे." कॅश क्रेडिट व सोनें गहाण ह्या खातीं ६ हजार रुपये कर्ज येणें आहे. बँकेचे १ लक्ष, २१ हजार रुपये रोकड व इतर बँकांत असून १ लक्ष, ८४ हजार रुपये सरकारी व निमसरकारी रोख्यांत आहेत. वर्षअखेर नफा वाटणीसाठीं ७,४३४ रुपये उरतात; त्यांतून भागीदारांस द. सा. द. शें. ५ रु. १० आ. दरानें डिव्हिडंड देण्यासाठी ३,६५९ रुपयांचा विनियोग करण्यांत आला, व बाकी शिलक रिझर्व्ह व इतर फंडांत टाकण्यांत आली. फंड वाढविण्याचें व डिव्हिडंडचा दर योग्य राखण्याचें बँकेचें धोरण अनुकरणीय आहे. सांगली संस्थानाचे मंत्रि श्री. न. शि. कोरे हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. ना. पां. ठाणेकर हे मॅनेजर आहेत.

---

## कराड अर्बन को. बँक लि.

( वार्षिक सभा : १४-९-४१ )

वरील बँकेच्या पटावर ६९२ सभासद असून त्यांनीं ४२,६८० रुपयांचे भाग घेतलेले आहेत. रिझर्व्ह फंड १७ हजारांचा असून इतर फंडांत २३३ हजार रुपये आहेत. म्हणजे, बँकेचें स्वतःचें भांडवल सुमारें ८३३ हजारांचें आहे. बँकेकडे एकूण ४ लक्ष, १९ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेनें १ लक्ष, ९४ हजार रुपये सरकारी व तत्सम रोख्यांत व भागांत गुंतविलेले आहेत. मिळकत खरेदींत १४३ हजार रुपये असून ३ लक्ष, ३ हजारांचीं कर्जें तिनें दिलेलीं आहेत. थकबाकीचें प्रमाण १०.२% पडतें. बँकेच्या इमारतीचें काम सुरू होऊन तळमजल्याचें सर्व काम संपलें आहे. कराड येथील को. परचेस अँड सेल सोसायटीची व्यवस्था बँकेनें घेतली आहे, तेव्हांपासून म्हणजे ४-११-४० ते ३०-६-४१ अखेर तिचे संबंधांत बँकेस ८५५ रुपये कमिशन मिळालें आहे. अहवालाचे सालीं बँकेस नफा ९,६६८ रुपये झाला त्यांतून रोखे, इमारत व डेडस्टॉक ह्यांवरील घसाऱ्यासाठी बाजूस काढलेले १,२०० रुपये वजा करतां निवळ नफा ८,२८८ रुपये उरतो. त्यांतून भागीदारांस ७३% दरानें डिव्हिडंड देण्याकडे ३,१५० रुपयांचा विनियोग करण्यांत आला. रिझर्व्ह फंडांत २,०७५ रुपये टाकले व राहिलेल्या २,९६२ रुपयांची वाटणी पोटनियम ४२ (क) १ ते ५ ह्यांस अनुसरून केली. १९४२ चे जानेवारींत बँकेची रौप्यज्युबिली साजरी करण्यांत येईल. बँकेनें मिळविलेलें यश अभिनंदनीय आहे. बँकेच्या सुपरवायझिंग कमिटीचे श्री. पांडुआण्णा शिराळकर, एम. एल. ए. हे अध्यक्ष असून डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष श्री. ल. म. देशपांडे, इनामदार, हे आहेत. श्री. व्यंकटेश पांडुरंग जोशी हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

## पुणें सें. को. बँक स्टाफ को. क्रे. सोसायटी लि.

**( वार्षिक सभा: ५-९-४१ )**

वरील सोसायटीच्या सभासदांची संख्या ४६ असून त्यांनीं घेतलेल्या २३६ भागांचें वसूल भांडवल २,३६० रुपये आहे. रिझर्व्ह फंडांत ५६३ रुपये आणि संशयित व बुडीत- कर्जफंडांत ९२ रुपये आहेत. सोसायटीकडे १८½ हजारांच्या कायम ठेवी आहेत. मेंबरांकडून कर्ज येणें ६,३२६ रुपये असून सोसायटीचे १३,६५० रुपये पुणें सें. को. बँकेच्या भागांत गुंतविलेले आहेत. अहवालाचे वर्षी सोसायटीस २७५ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ६% प्रमाणें डिव्हिडंड देण्याकडे १४० रुपयांचा विनियोग करण्यांत आला. श्री. र. रा. जोशी हे अहवालाचे सालीं चेअरमन होते. नव्या वर्षाच्या व्यवस्थापक कमिटीचे श्री. वा. चिं. भानू हे चेअरमन असून श्री. मेढेकर, श्री. सुभेदार, श्री. प्रभुणे, व श्री. चितळे, ( बँकेचे मॅ. डायरेक्टर ) हे तिचे इतर सभासद आहेत. श्री. पुराणिक हे हिशेब तपासनीस व श्री. देशपांडे हे सेक्रेटरी आहेत.

---

## पूर्व खानदेश सहकारी संस्थांतील पगारदार नोकरांची सहकारी मंडळी लि. जळगांव

या सोसायटीची पांचवी वार्षिक सभा ता. १४।९।४१ रोजीं पार पडली. सभेस संस्थेचे मेंबर्स, सरकारी ऑडिटर, सेंट्रल बँकेचे डायरेक्टर, मॅनेजिंग डायरेक्टर, सिनिअर इन्स्पेक्टर इत्यादि अधिकारीहि हजर होते. या सोसायटीची आर्थिक परिस्थिति दरवर्षी प्रगतिपथावर असून तिनें आपला ऑडिट वर्ग प्रारंभापासून 'अ' हा कायम ठेविला आहे. सोसायटीचीच्या चेअरमनचें काम तिच्या सुरवातीपासून श्री. भाऊसाहेब साळुंखे करीत असून यंदाही त्यांचीच सर्वानुमतें चेअरमन म्हणून निवड करण्यांत आली आहे.

## पॉवर अल्कोहोल करण्यास परवाने द्या

पेट्रोलची वाढती लष्करी मागणी व पुढें-मागें उत्पन्न होणारी तेल वहातुकीच्या जहाजांची अडचण हीं ध्यानांत घेऊन सद्यःपरिस्थितींत सरकारनें पेट्रोलचा वापर ता. १५ ऑगस्ट १९४१ पासून मर्यादित केला. यामुळें उद्योगधंदे, व्यापार, शेती व वहातुक विशेषत: खेड्यापाड्यांतून मोटारींनें होणारी वहातुक, याबाबत अडचण उत्पन्न होणें अपरिहार्य आहे; यावेळीं देशांत उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा व कच्च्या द्रव्यांचा उपयोग करून मोटार वहातुकीसाठीं लागणारे पेट्रोलचा पुरवठा कसा वाढवितां येईल, याचा विचार करणें आवश्यक आहे. देशांतील साखरेचे कारखान्यांतून वायां जात असलेल्या "मोलॅसिस्" पासून पॉवर अल्कोहॉल तयार करण्यासाठीं अवश्य ते परवाने सरकारनें यावे एतदर्थ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सनें सरकारकडे लिहिलें आहे.

## पेट्रोल रेशनिंग व मोटारींचा विमा

पेट्रोल पुरवठ्याच्या नियंत्रणामुळें मोटारगाड्यांचा वापर कमी झाला आहे व कित्येकांस पूर्वींच्या मानानें एक तृतीयांशाइतकाहि मोटारचा उपयोग करतां येईनासा झाला आहे. मोटारीचा वेगहि बेतांत ठेवण्याची प्रवृत्ति वाढली आहे. अशा परिस्थितींत, मोटारींस घडणाऱ्या अपघाताचा संभव कमी होणें स्वाभाविक आहे. अपघाताच्या संभवाचे प्रमाणावर विम्याचा हप्ता अवलंबून असतो; तेव्हां पेट्रोल रेशनिंगचे काळांत मोटारींच्या विम्याचा हप्ता कमी केला जाणें अगत्याचें आहे, असें कांहीं मोटारवाले म्हणूं लागले आहेत. अपघाताचा संभव किती प्रमाणांत कमी झाला आहे, हें कळण्यास कांहीं अवधि पाहिजे, असें विमा कंपन्या म्हणणार हें उघड आहे. मोटारींच्या दुरुस्तीचा खर्च वाढला आहे व त्याचा बोजा विमा कंपन्यावर पडतो, असेंहि सांगण्यांत येईल. ब्लॅक-औटचा परिणामहि ध्यानांत घ्यावा लागेल. ह्याबाबत तपशीलवार आकडे जमवून त्याचा विचार करावा लागेल.


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१५,५०,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट्, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; मि. आर. एल. फेरार्ड.

करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,८८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,९४,०३५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पंवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## हिंदी अंड्यांचा निर्गत व्यापार

### साठवणूक, प्रतवारी, इत्यादि बाबत अडचणी

अंड्यांचा दरमाणशी वार्षिक खप हिंदुस्थानांत आठ आहे. कित्येक देशांत, हा खपाचा आकडा ह्याच्या तीस ते चाळीस पटीइतका आहे. हिंदी लोकांत शाकाहारी लोक पुष्कळ आहेत, त्यांचा हा मुख्यतः परिणाम असला, तरी मांसाहारी हिंदी लोकांतहि अंडीं खाण्याचें प्रमाण लहानच आढळतें. दारिद्र्यामुळें लोक अंड्यांसारख्या कसदार अन्नापेक्षा डाळींसारखें स्वस्त अन्नच पसंत करतात. विकत मिळणाऱ्या अंड्यांच्या चांगलेपणाची कांहींच खात्री बाळगतां येत नाहीं, हेंहि त्यांचा खप कमी होण्याचें एक कारण आहे. अंडीं फार लवकर खराब होतात, ह्यासाठी त्यांचा ताबडतोब उठाव होऊन तीं गिऱ्हाइकाचे हातीं दिरंगाई न होतां पडणें आवश्यक असतें. उत्पादकानें अत्युत्कृष्ट दर्जाच्या अंड्यांचें उत्पादन होईल, अशी खटपट केली पाहिजे, व घातलेल्या अंड्यांतील मूळ गुण कायम रहातील, अशी व्यवस्था त्यानें केली पाहिजे. उत्पादकापासून गिऱ्हाइकापर्यंत, प्रत्येकानेंच अंड्यांचा गुण कमी न होऊं देण्याची खबरदारी घेणें इष्ट आहे.

अंड्यांचें बाहेरून दिसणारें स्वरूप, अंडीं उजेडाकडे धरून दिसणारें त्यांचें अंतरंग, व त्यांतील बलकाचा रंग, वास, इत्यादिवरून अंडीं चांगलीं का वाईट हें सांगतां येतें. अंड्यांचें आकारमान, घडण, रंग, स्वच्छता, ह्या सर्व गोष्टी विक्रीच्या दृष्टीनें फार महत्त्वाच्या आहेत. मोठ्या अंड्यांस लहान अंड्यांपेक्षा नेहमींच ज्यास्त किंमत येते. व जनाप्रमाणें अंड्यांची प्रतवारी लावली, तर एकजात अंड्यांस किंमत अधिक मिळते. गिऱ्हाइकाची आवड भागविणें जरूर आहे, ह्या दृष्टीनें कवचाचा रंग व आंतील बलकाचा गुण ह्यांचा कांहीं संबंध नसला, तरी गिऱ्हाइकानें तांबूस अंडीं मागितलीं, तर तीं त्यास दिलीं पाहिजेत. कवचाचा रंग हा कोंबड्यांच्या अवलादीवर अवलंबून असतो; तेव्हां लोकांच्या आवडीस उतरणाऱ्या रंगाचीं अंडीं घालणाऱ्या कोंबड्या ठेवतां येणें उत्पादकास शक्य असतें. फुटलेलीं व पातळ कवचाचीं अंडीं उत्पादकानें स्वतः खावींत अगर स्थानिक बाजारांतच विकावींत. कांहीं वाईट अंड्यांमुळें बाकीच्या अंड्यांचाहि आकर्षकपणा नाहींसा होतो.

वाईट अंड्यांचें प्रमाण शक्य तेवढें कमी राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या अंड्यांपैकीं फारच थोड्या अंड्यांची परीक्षा करून प्रतवारी लावण्यांत येते, परंतु मार्केटिंग अधिकाऱ्यांच्या प्रयत्नामुळें ग्रेडिंगची लोकप्रियता आतां वाढत आहे. उत्पादक, मध्यस्थ व गिऱ्हाईक ह्या सर्वांसच चांगल्या दर्जाच्या जिनसांचें महत्त्व पटल्याखेरीज प्रतवारी लावण्याचा फारसा उपयोग होणार नाहीं. हिंदुस्थानांत अंड्यांचा उत्पादन खर्च अत्यल्प आहे, तथापि इतर देशांत त्यांचा प्रसार करण्याचा प्रयत्न अद्याप करण्यांत आलेला नाहीं. आपल्या देशांतील अंड्यांचा आकार लहान असल्यामुळें त्यांस गिऱ्हाईक मिळणें कठीण आहे. तथापि, लंडन येथें आक्टोबर ते जानेवारी मोठीं अंडीं मिळत नाहींत, त्यावेळीं हिंदी अंड्यांस तेथें बरा भाव मिळणें अगदीं शक्य आहे. हा धंदा किफायतशीर होण्यास चांगल्या अंड्यांचें उत्पादन, त्यांची प्रतवारी, समाधानकारक वहातुक, इत्यादींकडे लक्ष देणें आवश्यक आहे.

अंडीं घातल्याबरोबर उष्ण हवेंत तीं तात्काळ खराब होऊं लागतात. अंडीं दीर्घ काळपर्यंत चांगलीं कशीं ठेवतां येतील, हें पाहिलें पाहिजे. थंड हवेंत दोन ते तीन आठवडेपर्यंत अंडीं टिकतात, परंतु गरम हवेंत तीं एका आठवड्यांतच नासूं लागतात. गरम हवेंत तीं अधिक टिकविण्याची युक्ति अद्याप सापडलेली नाहीं. चीन देशानें अंड्यांतील बलक गारठवून तो निर्गत करण्याचा मोठा व्यापार चालविला आहे. चांगलीं अंडीं फोडून व आंतील बलक गारठवून तो सीलबंद डब्यांतून विकण्यांत येतो. असा धंदा हिंदुस्थानांत करतां येण्याजोगा आहे. जेथें मोठ्या प्रमाणावर अंड्यांचा पुरवठा होऊं शकतो, अशाच ठिकाणीं फक्त हा धंदा सुरू करतां येईल, कारण लहान प्रमाणावरील धंदा किफायतशीर होत नाहीं. अंड्यांतील बलकाची पूड करूनहि ती विकतां येते. ही पूड वर्षभरहि टिकते. चीनमधील होणारी आयात आतां बंद पडली असल्यामुळें ह्या धंद्याचे वाढीस हिंदुस्थानांत चांगला वाव आहे. मात्र, तज्ञांकरवीच ह्या सर्व गोष्टी करणें जरूर आहे.

"इंडियन फार्मिंग" वरून


## मुंबई, प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

असें जाहीर करण्यांत येतें कीं ह्या बँकेची ३० वी सर्वसाधारण सभा शनिवार ता. २७ सप्टेंबर १९४१ रोजीं दुपारीं २-३० वाजतां (स्टँ. टा.) तिच्या रजिस्टर्ड ऑफिसांत, सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाऊस लेन, कोट, मुंबई, खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

(१) ३० जून १९४१ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले हिशेब व डिरेक्टरांचा रिपोर्ट स्वीकारणें.
(२) नफ्याची वाटणी (डिव्हिडंड) ठरविणें.
(३) डिरेक्टरांची निवडणूक करणें.
(४) ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाच्या हुकुमावरून,

मुंबई, ता. २५-८-४१. वैकुंठ ल. मेहता, मॅनेजिंग डायरेक्टर.

भागांच्या तबदिलीचें काम (ट्रान्सफर बुकें) २९ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर १९४१ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.

## उपनाह

### छातीला लावावयाचा डबा

न्युमोनिआ व शरिराचे कोणत्याहि भागावर सूज आल्यास हें औषध लावावें व वर कापूस ठेवून तो भाग बांधून टाकावा. गळवें, मार लागणें, घसा आंतून सुजला असल्यास (बाहेरून) लेप लावावा. सूज कमी होते.

तसेंच आमचीं रक्तवर्धक वगैरे औषधें वापरा.

### आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

### दि असोसिएटेड केमिकल्स् लि., नागपूर

हैड्रोक्लोरिक ॲसिड, ग्लॉबर सॉल्ट, पोटॅशियम बायक्रोमेट, क्रोम ॲलम कॉस्टिक सोडा, सोडियम सल्फाईड, सल्फर ब्लॅक, इत्यादींचें उत्पादन करण्यासाठीं वरील कंपनी स्थापन झालेली आहे. "दि कोऑर्डिनेट केमिकल इंडस्ट्रीज" ह्या नांवानें नागपूर येथें श्री. एम. एस. बंगाली ह्यांच्या मालकीखाली सध्यां चालू असलेला धंदा कंपनी आपल्याकडे घेऊन तो वाढविणार आहे. पोटॅशियम बायक्रोमेट व क्रोम ॲलम ह्यांचें उत्पादन कंपनी प्रथम हातीं घेईल. बायक्रोमेट ऑफ पोटॅशचें कापडाच्या गिरण्यांत महत्त्व अतिशय आहे व सध्यां तर भरमसाट किंमत देऊनहि तें मिळणें दुरापास्त झालें आहे. सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट अँड सेशन्स जज्ज रावबहादुर मुंजे, श्रीमंत एम. एन. घटाटे, श्रीमंत एम. जी. चिटणीस, श्री. व्ही. डी. घनंवते, महाराष्ट्राचे संपादक श्री. ओगले, इत्यादि गृहस्थ कंपनीचे डायरेक्टर्स असून श्री. बंगाली हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. प्रारंभीं ८० हजार रुपयांचें भांडवल पुरें पडेल व वार्षिक १०% नफा सुटेल, असा त्यांस विश्वास वाटत आहे.

### वाढदिवस

कै. नानासाहेब सरपोतदार यांनीं स्थापन केलेल्या **पूना गेस्ट हाऊस** या संस्थेचा सहावा वाढदिवस गुरुवार ता. ४-९-४१ रोजीं कै. नानासाहेब यांच्या पत्नी श्रीमती सरस्वतीबाई यांच्या नेतृत्वाखाली थाटानें साजरा झाला. यानिमित्त दोन प्रहरीं सर्व मेंबर्संना व पाहुण्यांना मेजवानी देण्यांत आली व रात्रीं श्रीसत्यनारायणाची पूजा होऊन सर्वांस पानसुपारी व अत्तरगुलाब देऊन निरोप देण्यांत आला. सध्या संस्थेची सर्व व्यवस्था श्री. पी. एम. कुलकर्णी हे पहात असतात.

### कोयनेलची किंमत

मुंबई सरकारचें आरोग्यखातें इतर सरकारी खात्यांस व स्थानिक स्वराज्य संस्थांस प्रत्येकीं १,००० गोळ्यांस १४ रु. ६ आ. ह्या दरानें ५ ग्रेनच्या कोयनेलच्या गोळ्या विकीत असे. ही किंमत आतां १५ रुपये करण्यांत आली आहे. १०० गोळ्यांची किंमत १ रु. ७ आ. होती, ती आतां १ रु. ८ आ. घेण्यांत येईल.

### साऱ्याची फेरतपासणी

मुंबई प्रांतांतील तीनहि भागांतील कांहीं तालुक्यांतील रिव्हिजन सेटलमेंट १९३९ च्या लँड रेव्हेन्यु कोड अमेंडमेंड ॲक्टाप्रमाणें जानेवारी १९४० पासून चालू आहे.

### मशिनगन्सचें उत्पादन ४६% वाढलें

गेल्या वर्षाचे अवधींत अमेरिकेंत मशिनगन्सचें उत्पादन ४६% वाढलें आहे.

### दक्षिण अमेरिकेंत जर्मन प्रचार

दक्षिण अमेरिकेंत जर्मनीतर्फे प्रचार करण्यासाठीं तेथें बातमी देणाऱ्या कंपन्यांना जर्मन सरकार सढळ हातानें मदत करीत आहे.

### युद्धकर्जें

युद्धकर्जास सबंध हिंदुस्थानांत मिळून आतांपर्यंत ८६½ कोटि रुपये मिळाले आहेत. बिनव्याजी रोखे २ कोटि, ५२ लक्ष रुपयांचे खपले व पो. ऑ. ची १० वर्षांच्या डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांत लोकांनीं २ कोटि, ५८ लक्ष रुपये गुंतविले.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखाकचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १११—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—० |
| ३¾% बिनमुदत ... ... ... ... | ९६—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३—२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... ... | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२६—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४७—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% ... | ४९—४ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १६२०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११३—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% ... ... | १५८—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २०६—६ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १८०५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १७५५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ८५—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८९७–८–० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २४२—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४९—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २५—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ५४—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४१९५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१८–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) ७½% रु. ... ... | १५३—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३९३—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु.१० आ.७ पै ... | २०९२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १५१—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२—२—६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६२–१५–६ |


**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.

२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.

३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

४ सहकार : किं. २ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.

२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

अवर होम,

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

## पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
## संग्रह करा

कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी

## —: रक्तवर्धक :—

सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें
**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

---

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

---



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

---

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी
**Prop. M. V. Risbud, B. A.**
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

---

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक







सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

**जर्निमन टेलर व्हा.**

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

**पराडकर टेलर्स ॲकेडेमी,** ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. बा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

**तयार कपड्याचे व्यापारी**

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
‘ दुर्गाधिवास ’ पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

‘ अर्थ एव प्रधानः ’ इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख २४, सप्टेंबर १९४१ अंक ३९

*** विमाक्षेत्रांतील ‘कॉमनवेल्थ’ चें अढळ स्थान ***

**१९४० चें पूर्ण केलेलें काम........४५ लक्षांहून अधिक**

**★ बोलका—ढलपा ★**

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८२,००० |
| सरकारी कर्जरोखे गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१३,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

**• कॉमनवेल्थचीं वैशिष्ट्यें •**

( १ ) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरुकता
( २ ) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
( ३ ) काळजीपूर्वक काटकसरीची व्यवस्था
( ४ ) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
( ५ ) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

**कॉमनवेल्थ**

**ॲशुअरन्स कंपनी लि., पुणें २.**

—शाखा—

मुंबई—मद्रास—कलकत्ता—नाशिक—कराची—अहमदाबाद

एम्. एन्. भागवत, बी. ए.
*ॲक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडेंट.*

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### बंगलोर व म्हैसूर शहरांतील भिकारी

बंगलोर शहरांत ५,७४९ व म्हैसूर शहरांत २,८०० भिकारी आहेत. त्यांपैकी अनुक्रमें २,२०० व १,१९० म्हैसूर संस्थानच्या बाहेरून आलेले आहेत. म्हणजे प्रत्येक ५ भिकाऱ्यांत ३ भिकारी म्हैसूरी व २ भिकारी बाहेरील आहेत. बहुतेक भिकारी पहिल्यापासूनच भिक्षेवर चरितार्थ चालवीत आहेत. त्यांनीं दुसरा कोणताच धंदा केलेला नाहीं. बाहेरून येणारेच बहुतेक भिकारी घट्टेकट्टे आहेत व स्थानिक भिकाऱ्यांत दुबळ्यांचें प्रमाण अधिक आहे.

### झारापकर टेलरिंग कॉलेज

पुणें येथील झारापकर टेलरिंग कॉलेजला मुंबईच्या गव्हर्नरांचे सल्लागार व बॅकवर्ड क्लास बोर्डाचे अध्यक्ष ना. जे. ए. मदन, आय. सी. एस. यांनीं भेट देऊन तेथील शिक्षणपद्धतीविषयीं उत्कृष्ट अभिप्राय दिला. त्यांच्या भेटीच्या सन्मानार्थ संस्थेनें मागसलेल्या जातींच्या दोन गरीब विद्यार्थ्यांना ( गव्हर्मेंट सर्टिफिकेट कोर्स फी रु. १२५ ) मोफत शिक्षण देण्याचें जाहीर केलें आहे.

### अमेरिकेची रशियाला मदत

अमेरिकेंत युद्धसाहित्य विकत घेण्याकरितां अमेरिका रशियाला १० कोटि डॉलर एवढी रक्कम उपलब्ध करून देत आहे. अमेरिकेनें रशियाकडून मँगेनीज, क्रोमाइट, ॲस्बेस्टॉस, प्लॅटिनम, इत्यादि द्रव्यें विकत घ्यावीं व हीं द्रव्यें पाठविण्यापूर्वीच रशियास त्यांची रकम मिळावी आणि त्यांतून रशियानें अमेरिकेंत युद्धसहायाची खरेदी करावी, अशी ही योजना आहे.

### मि. मॉंटेग्यू नॉर्मन

मि. मॉंटेग्यू नॉर्मन हे १९२० सालापासून बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर आहेत. ७० वर्षांवरील भागीदारानें डायरेक्टरच्या जागेसाठी पुनः उभें राहूं नये, असा नियम आहे. त्याप्रमाणें मि. नॉर्मन ह्यांस पुनः उभें रहातां येत नाहीं, कारण त्यांचा जन्म १८७१ सालाचा आहे. कित्येक लायक लोक युद्धविषयक इतर कामगिरींत गुंतलेले असल्याकारणानें, वरील नियमाची अंमलबजावणी यंदा केली जाणार नाहीं व मि. मॉंटेग्यू नॉर्मन हेच गव्हर्नर रहातील. लॉर्ड स्टँप ह्यांचे जागीं मि. जे. एम. कीन्स हे डायरेक्टर म्हणून येतील.

### संप बेकायदा

सरकारच्या मजूर खात्याच्या नियंत्रणाखालीं होणाऱ्या मतनोंदणींत युद्धसाहित्याच्या कारखान्यांतील बहुसंख्य कामगारांनीं संपास अनुकूल मत दिलें तरच संप चालू दिला जाईल; नाहींतर तो बेकायदा ठरविला जाईल, असें कॅनडाच्या सरकारनें ठरविलें आहे. बेकायदा संप करणाऱ्या कामगारास ५०० डॉलर दंड अथवा १२ महिने कारागृहवास, अशी शिक्षा दिली जाईल.

### चेक्सची देवघेव

बॉम्बे बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें १२ सप्टेंबर, १९४१ रोजीं संपलेल्या आठवड्यांत २२ कोटि, ९ लक्ष रुपयांच्या १,५०,२७८ चेक्सची देवघेव झाली.

### विम्याचा हप्ता

मालाच्या युद्धविषयक धोक्याच्या विम्याचा हप्ता दर शंभर रुपयांस दरमहा एक आणा होता. तोच दर कायम ठेवण्यांत आला आहे.

### निर्गत व्यापारासाठीं संघटित प्रयत्न

कापड, साखर, सिमेंट, लोखंड, पोलाद, कागद, रसायनें, औषधें इत्यादि हिंदी मालाची परदेशी निर्गत वाढविण्याची खटपट करण्याची एक योजना इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीनें आखली आहे. त्यासाठीं पैसे खर्च करून बाहेर प्रतिनिधीहि पाठविण्याचा विचार आहे. अफगाणिस्तान, इराण, अरेबिया, पॅलेस्टाइन, ईजिप्त, ॲबिसिनिया, टांगानिका, पूर्व व दक्षिण आफ्रिका, सिलोन, ईस्ट इंडीज, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंडो चायना, इत्यादि देशांतील प्रमुख व्यापारी केंद्रांत व्यापारी प्रदर्शनें मांडून ठेवण्याचीहि कल्पना आहे. तूर्त कापडाच्या निर्गतीचाच प्रश्न हातीं घेण्यांत यावा व त्यासाठीं एक बोर्ड नेमण्यांत यावें आणि त्यांत कापडाच्या धंद्यांतील लोक व सरकारचे चार प्रतिनिधी असावे, अशी ही योजना आहे.

### अंड्यांची पूड

"अर्था"च्या गेल्या अंकांत, अंड्यांतील बलकाची पूड करून ती विकण्याचा धंदा करतां येतो, अशी माहिती दिली होती. ऑस्ट्रेलियांत, सिडने येथें अशी पूड करणारा एक कारखाना उभारण्यांत येत आहे, त्यास लागणारी यंत्रसामुग्री चीनमधून येणार आहे. दर आठवड्यास ३ लक्ष, ६० हजार अंड्यांची पूड त्या कारखान्यांत बनविण्यांत येईल व ती इंग्लंडकडे रवाना होईल.

### शत्रूच्या आगबोटींचा नाश

भूमध्य समुद्रांत ब्रिटिशांनीं सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत शत्रुपक्षाच्या १ लक्ष टनांच्या आगबोटी बुडविल्या. ऑगस्टमध्यें शत्रुपक्षाच्या १ लक्ष, ६८ हजार टनांच्या बोटींचा नाश झाला.

### म्हैसूर सरकारचें ६½% १९४१-१९५१ चें कर्ज

वरील कर्ज १ नोव्हेंबर रोजीं परत केलें जाईल.

### पेट्रोल साठवणुकीबाबत नियम

पेट्रोलच्या रेशनिंगमुळें कांहीं मोटारवाले आपल्या शिलक उरणाऱ्या कूपन्सचा पेट्रोल खरेदी करून तें साठवून ठेवण्याकडे उपयोग करण्याचा संभव आहे. मोटार मालकांस २० गॅलनपर्यंत पेट्रोल शिलक ठेवतां येतें. मोटारीच्या टाकींतील पेट्रोल वेगळेंच. तथापि, ६ गॅलन्सवरील पेट्रोलचा साठा स्वतंत्र जागेंतच केलेला असला पाहिजे; ज्या ठिकाणीं कोणीहि रहात नाहीं, काम करीत नाहीं अगर जमत नाहीं अशा ठिकाणींच तो साठा ठेवतां येतो. प्रत्येक डब्यांत ५ गॅलनपेक्षा अधिक पेट्रोल ठेवतां कामा नये. ह्या नियमांचें उल्लंघन करणारास पहिल्या गुन्ह्यास ५०० रुपये व पुढें प्रत्येक गुन्ह्यास २,००० रुपये, इतक्या दंडापर्यंतची शिक्षा सांगितलेली आहे.

### नवीन वीज योजना

म्हैसूर संस्थानांतील जोग फॉल्स हैड्रोइलेक्ट्रिक योजनेसाठीं तेथील सरकारनें २ कोटि, ८० लक्ष रुपयांचा खर्च मंजूर केला आहे. सुरवातीस तेथील विद्युद्गृहांत ३१ हजार अश्वशक्तीच्या विजेचें उत्पादन होईल.

### ऑस्ट्रेलियन सरकारचें नवें कर्ज

ऑस्ट्रेलियाचें युद्धविषयक दुसरें कर्ज लवकरच उभारण्यांत येईल. सुमारें १½ अब्ज रुपयांच्या ह्या कर्जापैकीं ४५ कोटि रुपये नवीन रकमेचे असून बाकी जुन्या कर्जरोख्यांच्या कन्व्हर्शननें मिळतील. १९४५-४६ मधील परतफेडीच्या कर्जावर २¼% व १९५०-५७ मधील परतफेडीच्या कर्जावर ३¼% व्याज मिळेल.

अनुक्रमणिका


| पृष्ठ | | पृष्ठ | |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४५८ | इराण— हिंदी निर्गत व्यापारास उत्तेजन— युद्धाची हालचाल | |
| २ हिंदुस्थानची लढाऊ कामगिरी ... | ४५९ | ५ मुंबईमधील कामगार वर्गाच्या रहाणीचें मान | ४६३ |
| ३ टाटा हैड्रो-इलेक्ट्रिक कंपन्या ... | ४६० | ६ सहकारी संस्थांचे अहवाल ... | ४६४ |
| ४ स्फुट विचार ... | ४६१ | ७ निवडक बाजारभाव... | ४६६ |
| अमेरिकेचें युद्धसहाय— अमेरिकेचें उद्दिष्ट व कार्य- | | | |



# अर्थ

बुधवार, ता. २४ सप्टेंबर, १९४१


## हिंदुस्थानची लढाऊ कामगिरी

प्रस्तुत युद्धाच्या घडामोडीमध्यें हिंदुस्थानास मध्यवर्तित्वाचें महत्त्व प्राप्त झालें आहे ह्याचा प्रत्यय दिवसानुदिवस अधिकाधिक येत आहे. पश्चिमेच्या बाजूस इंग्लंडच्या बाजूनें अमेरिकन राष्ट्र प्रचंड 'युद्धागार' बनलें आहे. पूर्वेकडे हिंदुस्थानास तसेंच स्थान मिळालें आहे. ह्या विषयांची माहिती वेळोवेळीं प्रसिद्ध होतच आहे. सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया मि. एमेरी ह्यांनीं लॅटिन अमेरिकेंतील राष्ट्रांस उद्देशून रेडिओवर अलीकडे एक भाषण केलें त्यांत हिंदुस्थानच्या लढाऊ कामगिरीचें वर्णन आलें आहे. हिंदुस्थान देश शस्त्रागार बनला असून त्यांत आज मितीस २५० कारखाने युद्धसामुग्री बनवीत आहेत. ह्या देशांत राजकीय स्वरूपाची चळवळ चालू असली तरी हिंदी लोक एकमुखानें हिटलरशाहीचा निषेध करीत आहेत आणि हिटलरचा जय म्हणजे आपल्या सर्व राष्ट्रीय आकांक्षांचा शेवट होय ह्याची त्यांस पूर्ण जाणीव आहे असें मि. एमेरी म्हणाले. हिंदी महासागराच्या आजूबाजूस ब्रिटिशांचा मुलूख आहे आणि हितसंबंध गुंतले आहेत. त्यांच्या केंद्रस्थानीं हिंदुस्थान असल्यानें त्या देशाचें युद्धसहाय अत्यंत मौलिक आहे. युद्ध चालू होतांच ईजिप्त, एडन व सिंगापूर इकडे हिंदी सैन्य एकदम पाठवण्यांत आलें. इरिट्रिया, ॲबिसिनिया व सीरिया ह्या देशांत त्यानें मोठे पराक्रम केले आहेत आणि इराक व इराण येथेंहि त्याची कामगिरी बहुमोल झाली आहे. सिंगापूरच्या माऱ्याच्या आरमारी ठिकाणाचें संरक्षण करण्यास मलायामध्यें ब्रिटिश व ऑस्ट्रेलिअन फौजांच्या बरोबरीनें हिंदी सैन्य जय्यत खडें आहे. त्या पूर्वीच्या युद्धांत त्यानें आपलें शौर्य दाखवलेंच आहे. पण आधुनिक शस्त्रास्त्रांच्या सध्याच्या अकांचक्रीच्या मामल्यांतहि त्याचा पराक्रम व कौशल्य हीं पूर्णपणानें कसोटीस उतरलीं असल्याचा पुरावा मि. एमेरी ह्यांनीं सादर केला. हिंदुस्थानची दोन लक्ष फौज दोन वर्षांत दहा लाखांपर्यंत येऊन पोंहोचली आहे. हे सर्व सैनिक खुषीनें फौजेंत शिरले असून दररोज हजार तरुण नवीन दाखल होत आहेत अशीहि माहिती त्यांनीं दिली. व्हाइसरॉयांच्या युद्धफंडांत सुमारें पावणेपांच कोटि रुपये जमले आहेत आणि चार कोटि रुपये ब्रिटिश विमानदलास विमानांसाठीं ह्या देशानें दिले आहेत ह्या गोष्टीचा उल्लेख त्यांनीं केला.

इंग्लंड व रशिया ह्यांस युद्धसामुग्री पुरवण्याची मोठी जबाबदारी अमेरिकेनें आपल्या शिरावर घेतली आहे. ह्या सामुग्रीच्या बनावटीस लागणारा बहुतेक कच्चा माल त्या देशांत मिळण्यासारखा आहे. तथापि, विशिष्ट जातींचा माल, विशेषतः वनस्पतिजन्य पदार्थ, हिंदुस्थानासारख्या एशियाटिक देशांत विपुल असल्यानें त्याचा पुरवठा योग्य प्रमाणांत केला जाणें अगत्याचें झालें आहे. ह्यासंबंधांत चौकशी करून एशियाटिक देशांत स्वतःस आवश्यक असलेला माल मिळण्याची व्यवस्था करण्याच्या हेतूनें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचे आर्थिक सल्लागार, डॉ. हेन्री ग्रॅडी, हे हिंदुस्थानांत येऊन आतां ते सिलोन, मलाया, दक्षिण चीन, ह्यांकडे सफर करणार आहेत. त्यांनीं हिंदुस्थानांतून पुरवल्या जावयाच्या मालाची पहाणी केली आहे आणि येथील संबंधीं अधिकाऱ्यांशीं चर्चाहि केली आहे. खनिज व वनस्पतिजन्य मालाचा भरपूर पुरवठा एशियाटिक देशांतून होण्यासारखा आहे असें त्यांचें मत आहे. युद्धसामुग्रीचें उत्पादन आतां सारखें वाढवावें लागणार असून त्यास लागणाऱ्या कच्च्या मालाची उणीव भासूं नये आणि तो शत्रुराष्ट्रांस मिळूं नये अशी तरतूद करावयाची आहे असें डॉ. ग्रॅडी ह्यांनीं एका मुलाखतींत कलकत्ता येथें सांगितलें. युद्धकार्याचे बाबतींत हिंदुस्थानचें मध्यवर्ती स्थान कसें महत्त्वाचें झालें आहे हें त्यांच्या पहाणीच्या उपक्रमावरूनहि दिसून येत आहे. हिंदी कच्च्या मालाचा पुरवठा अमेरिकेस तात्काळ मिळण्यास प्रारंभ व्हावा, ह्यासाठी त्यास पैशाची मदत अमेरिकेकडून कशी होऊं शकेल, ह्याचा विचार चालू आहे. कच्च्या मालाच्या उत्पादनाचीं व पुरवठ्याचीं कंत्राटें हिंदुस्थानांत देऊन अप्रत्यक्ष रीतीनें त्यांस पैसे पुरविणें व काम लवकर करून घेणें, ह्या स्वरूपांत बहुशः ही गोष्ट घडवून आणण्यांत येईल.

हिंदुस्थान सरकारच्या पुरवठा खात्याचे सभासद, सर एच. पी. मोदी, ह्यांनीं नुकतेच एका मुलाखतींत हिंदी मालाच्या उत्पादनाच्या व पुरवठ्याच्या समाधानकारक परिस्थितीबद्दल प्रशंसोद्गार काढले. युद्धास प्रारंभ झाला, त्यावेळीं हिंदुस्थानाची औद्योगिक तयारी मुळींसुद्धां नव्हती. ह्या दृष्टीनें, अल्पावधींत हिंदुस्थानांत केलेली प्रगति संतोषकारक समजली पाहिजे, असें ते म्हणाले. 'युद्धकामगिरीचा आपला वाटा हिंदुस्थान उत्कृष्टपणें उचलीत आहे, हें ह्यावरून दिसून येईल. सध्याच्या आणीबाणीच्या प्रसंगीं हिंदुस्थानानें कच्चा व पक्का माल पुरविण्याची तत्परता दाखविणें योग्यच आहे. तथापि हिंदुस्थानच्या स्वतःच्या संरक्षणाचे दृष्टीनें अद्याप बरेंच कार्य होणें आवश्यक आहे. युद्धोपयोगी उत्पादनाचे बाबतींत स्वयंपूर्ण होणें व सर्व तऱ्हेचा कच्चा माल स्वतःच तयार करणें, ह्या बाबी आगत्याच्या आहेत. प्रत्यक्ष हिंदुस्थानांत शत्रुपक्षीयांचे आघात होऊं लागले, तर त्यास प्रतिकार करण्याची तयारीहि जनतेनें करून ठेवणें आवश्यक आहे.' मि. सिमिंग्टन ह्यांनीं मुंबई येथें ह्या विषयावर नुकतेंच भाषण केलें, त्यांत त्यांनीं ह्या प्रश्नाचें विवेचन केलें. मुंबईसारख्या शहरावर हल्ला आला, तर त्याच्या अनिष्ट परिणामांपासून बचाव करण्याचा संघटित प्रयत्न लोकांनीं केला पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. इतर ठिकाणीं चालू असलेल्या युद्धासाठीं मनुष्यबळ व साहित्य पुरवून भागणार नाहीं, प्रत्यक्ष प्रसंग आला तर त्यास तोंड देण्यासाठी सावध रहाणें आणि त्याकरितां सर्वांनीं सहकार्यानें तयारी करणें आवश्यक आहे.

## टाटा हैड्रो-इलेक्ट्रिक कंपन्या

वरील गटांत टाटा पॉवर कंपनी, आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी व टाटा हैड्रो-इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी, अशा तीन कंपन्या येतात. ३० जून, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी ह्या तीनहि कंपन्यांचा व्यवहार वाढला, परंतु त्याबरोबर कराचा भारहि त्यांजवर अधिक पडला. १९३८-३९ मध्यें त्यांनीं ६२¾ कोटि यूनिटस वीज विकली होती; १९३९-४० मध्यें हा आकडा ६१ कोटि झाला, परंतु १९४०-४१ मधील खपाचा आकडा ७७¼ कोटि यूनिटसवर गेला.

### टाटा पॉवर कंपनी

घसाऱ्यासाठी १२ लक्ष, ७८ हजार रुपये व कर भरण्यासाठी ११ लक्ष, १ हजार रुपये अशी तरतूद केल्यावरहि कंपनीस ३० लक्ष, ६४ हजार रुपये निवळ नफा उरला. त्यांत मागील वर्षीतील बाकी नफा ५ लक्ष, ४३ हजार रुपये व प्रेफरन्स भागांवरील डिव्हिडंडमधून वजा केलेला प्राप्तीवरील कर १ लक्ष ६ हजार रुपये ह्या रकमा मिळविल्या, म्हणजे नफा वाटणीस ३७ लक्ष, १३ हजार रुपये उरतात. भागीदारांस प्रेफरन्स भागांवर ७½ % व प्रत्येक ऑर्डिनरी भागास ४५ रुपये ( करमाफ ) असें डिव्हिडंड देण्यांत येईल. प्रेफरन्स भागांवरील डिव्हिडंडमधून प्राप्तीवरील कर कापून घेण्यांत येईल.

### आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी

घसाऱ्यासाठी ६ लक्ष रुपयांची व करांसाठी ७ लक्ष, ७१ हजारांची तरतूद केल्यावर, वर्षअखेर कंपनीस १८ लक्ष, ४२ हजार रुपये निवळ नफा उरला. त्यांत शिलकी नफा ३ लक्ष, ७५ हजार रुपये व प्रेफरन्स भागांवरील डिव्हिडंडमधून कराचे कापलेले ५६ हजार रुपये मिळविले, म्हणजे एकूण नफा रुपये २२ लक्ष, ७४ हजार रुपये होतो. त्यांतून भागीदारांस प्रेफरन्स भागांवर ७½% ( त्यांतून कर कापून घेणेचा ) व प्रत्यक ऑर्डिनरी भागास ४५ रुपये ( करमाफ ) असें डिव्हिडंड मिळेल.

### टाटा हैड्रो-इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी

घसाऱ्यासाठी ३ लक्ष रुपये व करांसाठी ८ लक्ष, ९ हजार रुपये बाजूस काढून २२ लक्ष, ९४ हजार रुपये नफा उरतो, त्यांत शिलकी नफ्याचे व डिव्हिडंडमधून कापलेल्या कराचे अनुक्रमें २ लक्ष ५७ हजार व १ लक्ष २ हजार रुपये मिळवले, म्हणजे नफा वाटणीस २६ लक्ष, ५२ हजार रुपये होतात. भागीदारांस प्रेफरन्स भागांवर ७½% ( त्यांतून कर कापून घ्यावयाचा) व ऑर्डिनरी भागांवर ७½% करमाफ डिव्हिडंड मिळेल.

वरील तिन्ही कंपन्यांत टाटा हैड्रो-इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी ही सर्वांत जुनी आहे. तिची स्थापना १९१५ सालीं झाली. तिचें पॉवर हाऊस घाटाखाली खोपोली येथें आहे. त्यानंतर आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनीची स्थापना झाली. ही कंपनी टाटा हैड्रोला दरसाल आपल्या नफ्यापैकीं १५% रकम (किमान ५० हजार रुपये) देते. टाटा पॉवर कंपनीकडूनहि तिच्या नफ्याचा १०% भाग टाटा हैड्रोला मिळतो.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# स्फुट विचार

## अमेरिकेचें युद्धसहाय

अमेरिकन व्यापाराच्या समुद्रावरील मार्गांत जर्मनांचीं लढाऊ जहाजें किंवा विमानें आढळल्यास त्यांवर तात्काळ गोळीबार करण्यांत येईल अशी घोषणा प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं केल्यापासून युद्धाच्या घडामोडींस नवीन व महत्त्वाचें वळण लागलें आहे. अमेरिकेनें जर्मनीशीं प्रत्यक्ष युद्ध पुकारलें नसलें तरी त्या राष्ट्राच्या वर्तीनें जर्मनीस केलेलें आव्हान ही वस्तुतः युद्धाची ग्वाहीच आहे असा प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्या घोषणेचा ग्रंथ लावण्यांत येत असून त्याचें मर्म लक्षांत येणें अवघड नाहीं. अमेरिकन सरकाराची ह्या बाबतींतली भूमिका अगदी स्पष्ट आहे. हिटलरशाहीचा विजय होणें म्हणजे मानवी स्वातंत्र्याचा शेवट होणें होय. ह्याकरितां जर्मनीशीं झगडणाऱ्या सर्व देशांस अमेरिका सहाय देईल. अमेरिका खंडाच्या रक्षणाचाहि हा सरळ मार्ग आहे. आज युरोपियन राष्ट्रांवर जें अरिष्ट कोसळलें आहे तें हिटलरशाहीचा विजय झाल्यास उद्यां अमेरिकेवरहि येणार आहे आणि त्याचा वेळींच प्रतिकार करणें हें आपलें कर्तव्य आहे. ह्या धोरणांत स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही आहेत.' प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांची विचारसरणी अशा प्रकारची आहे. तीस अनुसरून अमेरिका इंग्लंड, चीन, रशिया इत्यादि राष्ट्रांस युद्धसामुग्री सढळ हातांनीं पुरवीत आहे. त्या संबंधांतले आकडे प्रसिद्ध होत आहेत त्यांवरून हें सहाय केवढ्या प्रचंड प्रमाणावर चाललें आहे ह्याची कल्पना येते. प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं जर्मनीस नुकतेंच आव्हान केलें आहे. त्याचा ब्रिटिश राष्ट्रास फार मोठा उपयोग होणार आहे. पश्चिम व पूर्व ह्या दोन्ही बाजूंच्या समुद्रावरचे निश्चित केलेले मार्ग व्यापारास खुले रहातील अशा रीतीनें त्यांचें संरक्षण करण्याचें अमेरिकेनें ठरवलें आहे. इंग्लंड, चीन व रशिया ह्यांस पोहोंचावयाच्या युद्ध सामुग्रीच्या सुरक्षितपणाची जबाबदारी अमेरिकेनें स्वतः घेतली असल्यानें त्या राष्ट्रांस जरूर असलेला युद्धोपयोगी माल त्यांस निर्वेध रीतीनें मिळेल एवढेंच नव्हे तर समुद्रावरील वहातुकीचें संरक्षण करण्याच्या कर्तव्याचा ब्रिटिश आरमाराचा बोजा हलका होऊन ब्रिटिश लढाऊ जहाजांचा उपयोग इतर युद्धक्षेत्रांत व युद्धकार्यांत करण्याची उत्कृष्ट संधि इंग्लंडच्या पदरीं पडेल. "लीज अँड लेंड" कायद्याअन्वयें पुरवण्यांत येणारा अमेरिकन माल ज्या त्या देशांस सुरक्षितपणानें पोहोंचवण्याची जोखीम अमेरिकेनें पत्करली आहे. ही प्रस्तुत युद्धांतली अत्यंत महत्वाची घटना आहे असें म्हटलें पाहिजे.

---

## अमेरिकेचें उद्दिष्ट व कार्य

अमेरिकेच्या कायदेमंडळानें "लीज अँड लेंड" कायदा मंजूर करून जर्मनी-इटली-जपान ह्या त्रिकुटाविरुद्ध झगडणाऱ्या राष्ट्रांस युद्धसामुग्री पुरवण्याचा मार्ग मोकळा करून दिल्यापासून गेल्या ऑगस्ट अखेर ४८ कोटि डॉलर किंमतीचा ( सुमारें १७० कोटि रुपये ) माल ह्या विशिष्ट पद्धतीनें अमेरिकेंतून बाहेर गेला असल्याची माहिती प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनी काँग्रेसला सादर केली आहे. युद्धसामुग्रीबाबत इतर मदत देण्यांत येत आहे तिचाहि त्या आंकड्यांत समावेश झालेला आहे. लढाऊ विमानें, चिलखती गाड्या, आगबोटी ह्यांचा ओघ अमेरिकेमधून वाहूं लागला आहे आणि त्याचा प्रवाह हळु हळु वृद्धिंगत होत जाऊन अखेर त्याच्या पुरामध्यें जगास जिंकूं पहाणाऱ्या हिटलरशाहीस जलसमाधि मिळेल असा विश्वास प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं आपल्या वृत्तांतांत प्रकट केला आहे. अमेरिकेचें युद्धसहाय प्रामुख्यानें इंग्लंडला होत असलें तरी त्याच्या मर्यादेंत बारा राष्ट्रें आलीं आहेत. त्यांच्या यादींत चीन, पोलंड, ग्रीस, युगोस्लाव्हिया, नॉर्वे, बेल्जम, नेदरलंडस, ब्राझील इत्यादि राष्ट्रांचीं नांवें असून कमी-अधिक प्रमाणांत त्या सर्वांस अमेरिकेची मदत झाली आहे व होत आहे. "दुसऱ्याविषयीं वाटणारी सहानुभूति किंवा परोपकार ह्याविषयींचा हा प्रश्न नाहीं. राष्ट्रांच्या स्वातंत्र्यावर होणाऱ्या हल्ल्याचा प्रतिकार एकट्या दुकट्याच्यानें होणें अशक्य आहे. युरोप खंडांत जर्मनीचें युद्धयंत्र धिंगाणा घालीत आहे त्याचा नाश व्हावयाचा असेल तर सर्व स्वातंत्र्यप्रेमी लोकांनीं आपली शक्ति एकवटली पाहिजे आणि जेथें जेथें हिटलरशाही गडबड करूं पाहील तेथें तेथें तिला ठेचून टाकलें पाहिजे." प्रेसिडेंट रूझवेल्टनीं काँग्रेसला पाठवलेल्या वृत्तांतांत आपलें मनोगत वरील आशयाच्या वाक्यांनीं ध्वनित केलें आहे. अमेरिकेच्या युद्धासंबंधाच्या धोरणाचें रहस्य पुष्कळ वेळां गूढमय आहे असें वाटतें. त्याचा उलगडा प्रेसिडेंट महाशयांनीं वारंवार काढलेल्या उद्गारांनीं होण्यासारखा आहे.

---

## इराण

जर्मनीनें आपल्या हस्तकांकरवीं इराणमध्यें एवढें वजन प्राप्त करून घेतलें होतें कीं तेथील शाहास इंग्लंड व रशिया ह्यांनीं केलेली त्यांच्या राज्यांतील जर्मन लोक काढून टाकण्याविषयींची मागणी पुरी करतां येणें शक्य झालें नाहीं आणि स्वतःसच राज्यत्याग करावा लागला. निरनिराळ्या उद्योगांतले तज्ज्ञ ह्या नात्यानें अनेक जर्मन इराणमध्यें महत्त्वाच्या जागा व्यापून बसले होते आणि संधि साधून इराणी राज्यसत्ता इंग्लंड व रशिया ह्यांच्याविरुद्ध उठवण्याचा त्यांच्या बेत होता. सीरिया व इराक ह्या देशांत जी गोष्ट साधली नाहीं ती इराणामध्यें यशस्वी करण्याचा जर्मनीचा बेत होता. राकेल तेलाचा इराणमधील मोठा साठा हस्तगत करणें आणि हिंदुस्थानच्या सरहद्दीच्या बाजूस गडबड माजवणें ही योजनाहि हिटलरच्या कार्यक्रमामध्यें होती. हा जर्मन व्यूह हाणून पाडण्यासाठी इंग्लंड व रशिया ह्यांस आपल्या फौजा इराणमध्यें पाठवाव्या लागल्या. त्यांच्याशीं न लढतां सामोपचारानें हें प्रकरण मिटवण्यास इराणचा शाहा थोडी अळंटळं करून अखेर तयार झाला आणि दोन पक्षांचे दरम्यान मित्रत्वाचा व परस्पर सहायाचा करार होण्याचें ठरलें. परंतु आपल्या राज्यांतील जर्मन इंग्लंड व रशिया ह्यांच्या स्वाधीन करण्याची इच्छा किंवा शक्ति त्यामध्यें नव्हती. त्याच्या कारभारासंबंधानेंहि मंत्रिमंडळ व प्रजा ह्यांचेमध्यें असमाधान होतें. राजकीय व आर्थिक सुधारणांविषयीं लोकांनीं ह्याच वेळेस मागणी केली. ह्या परिस्थितीस तोंड देण्याचें सामर्थ्य आपणांत नाहीं असें पाहून इराणच्या शाहानें शेवटीं राज्यत्याग करून आपल्या मुलाच्या हातीं सर्व अधिकार दिला. हा गोंधळ असाच चालू देणें म्हणजे इंग्लंड व रशिया ह्यांनीं आपलें काम अर्धवट करण्यासारखें झालें असतें. राज्यकारभाराची घडी नीट बसवून शांतता स्थापित करण्यास इराणी सत्ताधाऱ्यांस पाठिंबा देण्याकरितां त्यांनीं आपल्या फौजा इराणची राजधानी, तेहरान येथें पाठवल्या. इराणमधील ह्या घडामोडीमुळें इंग्लंडची

एशियामधील बाजू बळकट झाली असून जर्मनीच्या पाताळयंत्री राजकारणास चांगला शह बसला आहे.

### हिंदी निर्गत व्यापारास उत्तेजन

युरोपाच्या बाजूची हिंदी मालाची गिऱ्हाइकें बंद झाल्यामुळें आणि जपानशीं होणारी देवघेव बंद झाल्याकारणानें त्या मालाच्या खपासाठीं दुसऱ्या बाजारपेठा शोधून काढणें अगत्याचें झालें आहे. हिंदी निर्गत व्यापारास आशिया व आफ्रिका खंडांत किती वाव आहे ह्याची चौकशी करून ह्या बाजूच्या बाजारांत हिंदी मालाचा खप होईल अशी व्यवस्था करण्याच्या उद्देशानें एक योजना नुकतीच आखण्यांत आली आहे. इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीनें ह्या बाबतींत पुढाकार घेऊन कांहीं पद्धतशीर सूचना केल्या असून त्यांवर गिरणी मालकांच्या मंडळांचे अभिप्राय मागवले आहेत असें समजतें. निर्गत व्यापाराविषयींच्या वरील योजनेंत कापड, साखर, कागद, लोखंड, पोलाद, औषधें इत्यादि मालाचा अंतर्भाव करण्यांत आलेला आहे. असल्या मालास शेजारच्या देशांत किती मागणी आहे ह्याची चौकशी करून त्याच्या खपाची तरतूद करणें हें कार्य संघटनात्मक पद्धतीनें करण्याचें घाटत आहे. अफगाणिस्तान, इराण, तांबड्या समुद्रांतील बंदरें, अरेबिया, पॅलेस्टाइन, दक्षिण आफ्रिका, सिलोन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड इत्यादि देशांत हिंदी माल गिऱ्हाइकांच्या नजरेस आणणें, त्यांच्या गरजांची माहिती येथील कारखानदारांस देणें, परकी गिऱ्हाइकांस हिंदी मालाची माहिती होण्यासाठीं येथें व बाहेर संग्रहालयें थाटणें इत्यादि बाबी नवीन काढावयाच्या संस्थेच्या कार्यक्रमांत आहेत. त्या संस्थेच्या घटनेची रूपरेखा स्थूल मानानें आखण्यांत आली आहे. हा उपक्रम अभिनंदनीय आहे ह्यांत शंका नाहीं.

### युद्धाची हालचाल

सध्या रशियन आघाडीवर जर्मन फौजांची जोराची धडपड चालली आहे, ती लेनिनग्राड, किएव्ह व ओडेसा काबीज करण्यासाठीं आहे. लेनिनग्राडवर तर अत्यंत निकराचे हल्ले जर्मन सेनानी चढवीत आहेत. कांहीं झालें, कितीहि प्राणहानी झाली व लढाऊ सामुग्री कोणत्याहि प्रमाणांत नाश पावली तरी तें शहर हस्तगत करण्याचा त्यांनीं चंग बांधला आहे. तितक्याच निकरानें व निश्चयानें लेनिनग्राडभोवतालीं रशियन सैन्य लढत आहे. कितीहि स्वार्थत्याग करावा लागला तरी लेनिनग्राड शत्रूच्या हातीं पडूं द्यावयाचें नाहीं असा त्यानें संकल्प केला आहे. ह्या कारणानें जर्मन सैन्याची प्रगति त्या शहराच्या बाजूस मुंगीच्या पायानें होत आहे आणि त्यास पावलागणिक भयंकर नुकसान सोसावें लागत आहे. ओडेसाचें रक्षण रशियन फौज लेनिनग्राडप्रमाणेंच करीत आहे. कीएव्हला उत्तर व पूर्व ह्या बाजूंनीं घेरून तें काबीज करण्याचा शत्रूचा प्रयत्न असून युक्रेनच्या दक्षिणेकडे हाच प्रकार त्यानें चालवला आहे. क्रीमियाचें द्वीप व युक्रेन ह्यांची ताटातूट करून काळ्या समुद्रांत स्वतःचें वर्चस्व स्थापण्याचा जर्मनीचा बेत आहे असें दिसतें. तो यशस्वी झाला म्हणजे कॉकेशसकडे मोर्चा वळवण्याची त्याची योजना असली पाहिजे असा तर्क करण्यांत येत आहे. रशियांतील रणभूमीच्या मध्यावर स्मोलेन्स्कच्या बाजूस जर्मनीस माघार घ्यावी लागली आहे आणि ह्या पीछेहाटीचा अनुकूल परिणाम इतर रणांगणावर थोडाबहुत झाल्यावांचून रहावयाचा नाहीं. रशियांतलें युद्ध दीर्घकालीन होणार ह्याविषयीं जर्मनीसहि शंका उरलेली नाहीं. रशिया तर आपलें सैन्य वाढवीत असून त्यास अंतिम विजयाविषयीं मुळीच संशय वाटत नाहीं. त्याचें मनुष्यबळ सारखें वाढत जाणार असून युद्ध-सामुग्रीची मदत त्यास अमेरिका व इंग्लंड ह्यांचेकडून मिळावयास लागली आहे. युद्ध लांबणें ही गोष्ट जर्मनीच्या योजनांस प्रतिकूल असून त्यांत हिटलरशाहीच्या नाशाचें बीज आहे. जर्मनीनें व्यापलेल्या प्रत्येक देशांत नात्सी लोकांविषयींचा द्वेष पसरत आहे. अमेरिकेचें सहाय इंग्लंडला आतां निश्चित रीतीनें मिळण्याची व्यवस्था प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं प्रकट केलेल्या धोरणाप्रमाणें झाली आहे. पूर्व आशियांत इंग्लंड व अमेरिका ह्यांची स्वसंरक्षणाची जय्यत तयारी झाली असून स्वतःचे युद्धाचें धोरण आखणें जपानला कठिण वाटत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. पश्चिम एशिया व उत्तर आफ्रिका ह्यांचे बाजूस इंग्लंडनें शत्रूच्या हालचालींचा प्रतिकार करण्याची उत्कृष्ट व्यवस्था करून ठेवली आहे आणि ब्रिटिश विमानदलाचे हल्ले प्रत्यहि पश्चिम जर्मनीवर व फ्रान्सच्या किनाऱ्यावर होत आहेत. त्याच्या माऱ्यापुढें इटली तर हतबल होऊन गेला आहे. आणि भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमाराची पकड कायम आहे ह्या रीतीनें रशियन मोहीम हिटलरच्या आंगलट आल्यासारखें झालें असून त्याच्या सैन्याची प्रगति पूर्वेच्या बाजूस होत असली तरी तिला भयंकर किंमत द्यावी लागत आहे. ह्या कारणानें युद्धपरिस्थितीचा आढावा घेतला असतां हिटलरच्या नाशाचे दिवस जवळ येत चालल्याचें स्पष्ट दिसून येतें. अधिक काळपर्यंत कोणता पक्ष तग धरून रहाणार ह्यावर युद्धांतला जयापजय अवलंबून रहाणार आहे. ह्या दृष्टीनें विचार करतां ह्याच विचारास पुष्टी मिळते.

### दि न्यू प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कं. लि.

सामान्य जनतेस प्रॉव्हिडंट व इंडस्ट्रिअल विम्याचा फायदा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानें वरील कंपनीची स्थापना पुणें येथें झाली आहे. कंपनीच्या बोर्डाचे अध्यक्ष श्री. न. ग. पवार बी. ए., बी. ई. हे असून श्री. दाजीसाहेब पटवर्धन, बी. ए., दिवाण बहादुर नि. चिं. लिमये, बी. ए., एलूएल्. बी., श्री. रा. ग. कुबेर, बी. ए., एलएल्. बी., ॲडव्होकेट, श्री. शं. पां. गोखले, बी. ए., एलूएल्. बी. वकील व श्री. मा. पं. सोमण, एम. ए. (वर्ल्ड वाईड) हे डायरेक्टर आहेत. श्री. ह. र. नगरकर, बी. ए., बी. टी. हे मॅनेजिंग डायरेक्टर असून श्री. म. वा. गोळे व श्री. रा. य. रानडे, बी. ए., हे सेक्रेटरी आहेत. कंपनीची स्टॅट्यूटरी सभा ता. ३०-९-४१ रोजीं आहे. कंपनीनें अल्पावधींत प्रत्येकीं ५० रुपयांचा असे ४८२ ऑर्डिनरी भाग खपविले आहेत व त्यासाठीं ब्रोकरेज अगर इतर खर्च केलेला नाहीं. कंपनीच्या पुढील कामकाजावर प्राथमिक खर्चाचा मोठा बोजा पडणार नाहीं, कारण आजपर्यंतचा एकूण प्राथमिक खर्च फक्त ४१९ रुपयांचा असून त्यापैकीं सर्व रक्कम आवश्यक खर्चाची अशीच आहे. कंपनीच्या चालकांचें काटकसरीचें धोरण स्तुत्य आहे.

### युद्धसाहित्याचें उत्पादन

मुंबई विभागानें आतांपर्यंत ११ कोटि, ३१½ लक्ष रुपये किंमतीच्या युद्धविषयक मालाचें उत्पादन केलें आहे. ह्या विभागास एकूण ५,०३१ ऑर्डरी मिळाल्या.

## मुंबईंतील कामगारवर्गाच्या राहणीच्या खर्चाचें मान कसें आकारतात ?

मुंबईंतील कामगारवर्गाच्या राहणीचा खर्च आकारण्याची पद्धत काय आहे याविषयींचा लेख 'लेबर गॅझेट'च्या सन १९३७ च्या जून महिन्याच्या अंकांत आला होता. राहणीच्या खर्चाचा प्रमाणशीर आकडा या गॅझेटमध्यें दर महिन्याला प्रसिद्ध होत असतो. हा राहणीचा खर्च आकारण्याची पद्धत कशी असते यासंबंधानें कामगारांना माहिती व्हावी म्हणून जून १९३७ च्या लेबर गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालेला लेख "गिरणी समाचार"मधून याखालीं उद्धृत करीत आहोंत. त्यावरून, "अर्था"च्या ता. १३ ऑगस्टच्या अंकांतील महागाई भत्त्याविषयींचा मजकूर व तक्ता अधिक चांगल्या रीतीनें समजूं शकेल.

### इंडेक्स नंबर

मुंबईंतील कामगारवर्गाच्या राहणीचें प्रमाण दर्शविणारा आकडा (याला इंडेक्स नंबर म्हणतात.) प्रथमतः सन १९२१ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आला. हा इंडेक्स नंबर अहमदाबाद आणि सोलापूर येथील इंडेक्स नंबर ज्या पद्धतीवर आकारण्यांत आले होते, त्या पद्धतीवर आकारला नव्हता. इंडेक्स म्हणजे चरितार्थाला लागणाऱ्या पदार्थांची यादी व यादींतील निरनिराळ्या पदार्थांचें महत्त्व बरोबर कळण्यास मार्ग नसल्यामुळें सरसकट एकूण जिनसांच्या खपावर हें प्रमाण आकारण्यांत आलें होतें. म्हणून मुंबईंतील सर्वसाधारणपणें एका कामगाराच्या कुटुंबांत जे निरनिराळे पदार्थ लागतात त्यांच्या किंमतीच्या मानानें त्या पदार्थांचें महत्व बसविण्यांत आलें. हे पदार्थ किती लागतात यासंबंधानें प्राथमिक तपास लेबर ऑफिसनें केला. हा तपास मुंबई शहरांत मे १९३१ आणि एप्रिल १९३२ या दरम्यानची मुदत धरून केला आणि फेरतपास मे १९३२ आणि जून १९३३ या मुदतीच्या दरम्यानचा केला. हा जो दुसऱ्यांदा तपास केला, त्या तपासांत दिसून आलेला खर्च हा मुंबईच्या कामगारवर्गाच्या राहणीच्या खर्चाचें सुधारून बसविलेलें प्रमाण निश्चित करण्यासाठीं आधारभूत धरण्यांत आला. या इंडेक्समध्यें चरितार्थाचे जे जिन्नस धरण्यांत आले आहेत ते शक्यतोंवर आवश्यकतेला लागतील तेवढे सर्व धरण्याचा प्रयत्न केला आहे; आणि 'किरकोळ जिन्नस' हें सदर तोंपर्यंत धरण्यांत येत नव्हतें तेंही यांत धरण्यांत आलें आहे.

**किंमतीची आकारणी**—कपडे खेरीज करून बाकी चरितार्थाचे सर्व जिन्नस, चार जातींचे मासे, वांगीं आणि भोंपळा ही भाजी यांच्या किंमतीचे आंकडे निरनिराळ्या उद्योगधंद्यांच्या बारा शहरांतील दोन दुकानांतील लेबर ऑफिस लिहून घेतें. चोळीचे खण खेरीज बाकी सर्व खणांच्या किंमती शहरांत ज्या गिरण्यांचीं किरकोळ मालविक्रीचीं दुकानें आहेत, अशा निरनिराळ्या चार दुकानांकडून घेण्यांत येतात आणि मासे, वांगीं, भोपळे यांच्या किंमती मुंबई शहरांतील म्युनिसिपल मार्केटच्या सुपरिंटेंडेंटकडून घेण्यांत येतात. वर्तमानपत्रें आणि रेल्वेभाडें यांची माहिती त्या त्या ऑफिसकडून मिळविण्यांत येते.

**किंमतीची मूळ इयत्ता**—या किंमतीचें प्रमाण आकारतांना जुलई १९३३ पासून जुलई १९३४ दरम्यान ज्या किंमती होत्या, त्याप्रमाणें आकारण्यास मूळ आधार धरण्यांत आल्या आहेत.

**यादीचा (इंडेक्स) तपशील**—या इंडेक्समध्यें जे पदार्थ घेण्यांत आले आहेत, त्यांचे एकंदर पांच गट केले आहेत. (१) अन्न, (२) सरपण, (३) दिवाबत्ती, (४) कपडा आणि (५) भाडें व किरकोळ.

**अन्न**—अन्न या सदरांत पुढील २८ जिन्नस येतात. तांदूळ, पटणी, गहूं, ज्वारी, बाजरी, तूरडाळ, चणे, गूळ, साखर, चहा चार प्रकारचे मासे, मटण, दूध, तूप, मीठ, तांबडी मिरची, चिंच, हळद, बटाटे, कांदे, वांगीं, भोपळे, खोबरेल तेल, गोडें तेल आणि तयार केलेला चहा. यांत बाकीचीं कडधान्यें नाहींत, पण त्यांचा खर्च तांदूळ, पटणी, गहूं, ज्वारी आणि बाजरी यांत धरला आहे. चणे आणि तूरडाळ यांचा खर्च आपणास अमुक लागतो असें ज्या कुटुंबांचें म्हणणे आलें, त्या खर्चाएवढाच सरसकट धरला आहे आणि कडधान्याचा खर्च याच प्रमाणांत विभागला आहे. मेवामिठाईचा खर्च साखर आणि दूध याच खर्चात आकारलेला आहे. मटणाशिवाय इतर प्रकारचें मांस लागेल तर तो खर्च मटणांतच धरला आहे. मिरची, मसाला, याचा खर्च मिरची, चिंच, हळद यांच्या किंमतीच्या खर्चांत २:१:१ या प्रमाणांत आकारला आहे. बटाटे आणि कांदे यांचा खर्च चणे आणि तूरडाळ यांच्यासारखाच मानला आहे आणि इतर भाजीपाल्याचा खर्च वांगीं आणि भोपळे यांत आला असें मानलें आहे. डोकीच्या तेलांचा खर्च 'किरकोळ खर्च' या सदरांत धरण्यांत आला असून इतर तेलांचा खर्च खोबरेल आणि गोडें तेल यांत विभागण्यांत आला आहे. माशांचा खर्च सुकी आणि ताजी मासळी अशा दोन प्रकारचा १:२ या प्रमाणांत धरण्यांत आला आहे. फराळाचा खर्च 'तयार चहा' या सदरांत घेतला आहे. बाकी जिनसांचा खर्च अन्न सदरांतील बाकी २१ जिनसांवर आकारण्यांत आला आहे.

**सरपण आणि दिवाबत्ती**—या सदरांत कोळसा, जळाऊ लांकूड, केरोसीन तेल आणि आगपेट्या या जिनसा येतात. या चार जिनसा म्हणजे या सदराखालील एकंदर खर्चापैकीं शेंकडा ९८·२५ प्रमाणाच्या होत. (अपूर्ण)

---

### सांगली स्टेट सें. को. बँक लि.

या बँकेच्या स्थापनेस ५ ऑक्टोबर, १९४१ रोजीं २५ वर्षें पुरीं होतात. तिची रौप्य ज्युबिली ऑक्टोबरचे पहिल्या आठवड्यांत साजरी होणार आहे.

सांगली संस्थानाचे मंत्रि श्री. ब. शि. कोरे हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. ना. पां. ठाणेदार हे मॅनेजर आहेत.

बँकेसंबंधी "अर्था"च्या १७ सप्टेंबरचे अंकांतील मजकुरांत सरकारी रोख्यांतील १ लक्ष, ८४ हजार रुपयांऐवजी १ लक्ष, ७४ हजार असें वाचावें.

---

### नुकसानभरपाई

११ जून, १९४० च्या रात्रीं ब्रिटिश विमानांनीं चुकून ब्हॅाड व जिनीव्हा ह्यांवर बॉंब टाकले त्यामुळें झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून ब्रिटिश सरकारनें स्विस सरकारकडे ११ लक्ष फ्रँक पाठविले आहेत.

### अॅबिसिनियामध्यें गुलामगिरीचें उच्चाटण

अॅबिसिनियाच्या बादशहांनीं आपल्या देशांतील गुलामगिरीचें उच्चाटण करण्याचें ठरविलें आहे. कांहीं वर्षांपूर्वीच त्यांचा असें करण्याचा बेत होता, परंतु इटलीनें तो देश घेतल्यामुळें तें शक्य झालें नाहीं. अॅबिसिनियाच्या समाजव्यवस्थेंत एकदम फार फेरफार होऊं नये, अशा बेतानेंच सुधारणा घडवून आणण्यांत येईल.

# सहकारी संस्थांचे अहवाल

## कॉसमॉस को. अर्बन बँक लि.

( वार्षिक सभा : २८-९-४१ )

वर्षअखेर बँकेच्या सभासदांची संख्या २,२३९ आहे. भागांचें वसूल भांडवल ९१,०४० रुपये असून गंगाजळी ठेव ३९,६९८ रुपयांची आहे. इतर फंड १५ हजारांचे वर आहेत. बँकेकडे एकूण ५ लक्ष, ९५ हजार रुपयांच्या ठेवी आहेत, म्हणजे ठेवींची रकम ४० हजारांनीं वाढलेली आहे. अहवालाचे सालीं विशेष कर्जमागणी नव्हती. बँकेच्या जिंदगीचे बाजूस २४½ हजार रु. रोख शिल्लक, १ लक्ष, ९ हजार रु. इतर बँकांत ठेवी, १½ लक्ष रु. इतर बँकांत मुदतीच्या ठेवी, १ लक्ष २३ हजार सरकारी कर्जरोखे ( बाजार भावानें किंमत १ लक्ष, ३० हजार रु.), शेअर्स २५¾ हजार रु., मालमत्तेवर कर्ज ७४½ हजार रु. कर्जाची बाकी १ लक्ष, ८७ हजार रु., सोनें तारण कर्ज १५ हजार रु., ओव्हर-ड्राफ्टस ३६ हजार रु., इमारत १६ हजार रु., अशा रकमा आहेत. " अहवालाचे सालीं कर्जाची वसुली फार समाधानकारक झालेली आहे. " एकूण ३ लक्ष १३ हजारांच्या कर्जाच्या बाकीपैकीं २०½ हजार रुपये थकलेली बाकी आहे. " साध्या कर्जावरील वसुली तर उल्लेखनीय असून; गतवर्षापेक्षा अहवालाचे सालीं थकबाकीचें प्रमाण कमी झालें आहे. " ६½% च्या बाहेर बँकेची थकबाकी नाहीं. अहवालाचे वर्षी बँकेनें स्वतःच्या इमारतीकरितां लक्ष्मीरोडवर जागा विकत घेतली आहे, तिचेवर बांधकाम लवकरच सुरू होईल. अहवालाचे वर्षी बँकेस निवळ नफा ८,३७९ रुपये झाला, त्यांतून भागीदारांस ५% दरानें डिव्हिडंड देण्यासाठीं ४,५०० रुपयांचा विनियोग करावा, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. श्री. श्री. रा. पाळंदे, एम. ए., एलएल. बी. हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. मा. के. कुलकर्णी, बी. कॉम. हे मॅनेजर आहेत.

---

## राजवाडे मंडळ पीपल्स को. बँ. लि., धुळें

( वार्षिक सभा : २८-९-४१ )

बँकेच्या भागीदारांस दरसाल मिळणाऱ्या डिव्हिडंडपैकीं कांहीं अंश राजवाडे संशोधन मंडळास मिळावा, ह्या हेतूनें स्थापन झालेल्या वरील बँकेची प्रगति चांगली होत असून इष्ट हेतूप्रमाणें मंडळास द्रव्यसहाय होत आलें आहे व धुळें शहरांतील निरनिराळ्या प्रकारचा धंदा करणारांस व इतर नागरिकांना हलक्या व्याजानें कर्जाऊ रकमा मिळण्याची सोय झाली आहे. डिव्हिडंडपैकीं ¼ पेक्षां कमी नाहीं व ⅓ पेक्षां जास्त नाहीं इतकी रकम ( बँकेची मॅनेजिंग कमिटी ठरवील ती ) राजवाडे संशोधन मंडळास मिळते. बँकेच्या १३४८ सभासदांनीं ४३,०९० रुपयांचें भाग घेतले आहेत, रिझर्व्ह फंडांत ८¾ हजार रुपये व इतर फंडांत ११¼ हजार रुपये आहेत व ठेवींची रकम १ लक्ष, ७५ हजार झाली आहे. बँकेनें ६० हजारांचे सरकारी कर्जरोखे घेतले असून १ लक्ष, ८१ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. गतवर्षी थकबाकीची रकम ८१⅓ हजार रुपये होती, ती आतां ७१ हजार झाली आहे. नफा वाटणीची रकम ६,४२४ रुपये होते, त्यांतून डिव्हिडंड ५% दरानें दिलें म्हणजे २१२८ रुपयांची रकम होते. पोटनियमाप्रमाणें त्यांतील ¼ रकम ( ५३२ रुपये ) राजवाडे सं. मंडळास मिळेल. त्याखेरीज, मंडळास पोटनियमाप्रमाणें १३०७ रुपये मिळतील. बँकेची सुस्थिति कायम राहून ही गोष्ट साध्य होत आहे, ही गोष्ट अभिनंदनीय आहे. डॉ. भा. भ. कीर्तने, एम. बी. बी. एस. हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. शं. बा. जोग हे मॅनेजर आहेत.

---

## धुळें अर्बन को. बँक लि.

( वार्षिक सभा : २८-९-४१ )

वरील बँकेच्या पटावर १३८१ सभासद असून भागांचे पोटीं ८८,११५ रुपये जमा आहेत. ठेवींची रकम ३ लक्ष, ३४ हजार रुपये आहे. बँकेचा रिझर्व्ह फंड ( ७०½ हजार रु. ) व इतर फंड मिळून १ लक्ष, २५ हजारांची रकम होते. बँकेनें ८४ हजार रुपये रोख व इतर बँकांत ठेवलेले असून १ लक्ष, २७ हजार रुपये सरकारी रोखे, डिबेंचर्स, इत्यादींत गुंतवलेले आहेत. कर्जखातीं ३ लक्ष, ५६½ हजार रुपये येणें आहेत. कर्जपोटीं लिलावांत घेतलेल्या घरांची किंमत १४ हजार रुपये भरते. बँकेची स्वतःची इमारत १३½ हजारांची आहे. एकूण खेळत्या भांडवलाच्या ६ लक्ष, ३९ हजारांच्या रकमांपैकीं २ लक्ष, १३ हजार रुपये हें बँकेचें स्वतःचें ( भागभांडवल व रिझर्व्ह मिळून ) भांडवल आहे. ही परिस्थिति अत्यंत समाधानकारक आहे. " बँकेचें कर्जदार मेंबराकडे थकलेली बाकी १ लक्ष ६८½ हजार रुपये असून त्यापैकीं १ लक्ष, ३०½ हजार रुपयांची हुकुमनाम्याची बाकी १८३ कर्जदारांकडे आहे. गतवर्षीपेक्षां थकलेली बाकी २४½ हजार रुपयांनीं कमी आहे. " वर्षअखेर नफावाटणीसाठीं १४½ हजार रुपये राहिले, त्यांतून भागीदारांस ७% दरानें डिव्हिडंड देण्यासाठीं ६,०६८ रुपयांचा विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. श्री. शंकर शालु बडगुजर हे बँकेचे अध्यक्ष असून मि. शेख अम्मन शेख कासम मास्तर हे मॅनेजिंग डायरेक्टर व श्री. ए. एस. देशपांडे, बी. कॉम. हे मॅनेजर आहेत.

---

## वाई अर्बन को. बँक लि.

( वार्षिक सभा : २१।९।४१ )

वरील बँकेच्या २९८ सभासदांनीं २०,१५० रुपयांचे भाग घेतले आहेत. रिझर्व्ह फंड ११,३४३ रुपयांचा असून इतर फंडांत ४,२०९ रुपये आहेत. बँकेकडे एकूण ५३ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेनें ३९½ हजार रुपये रोख अगर इतर बँकांत ठेवले असून ५२ हजारांचीं कर्जे दिलीं आहेत. थकबाकीचें प्रमाण ५४·९% आहे. म्हणजे, हें प्रमाण १·५% नें वाढलें आहे. " सदर थकबाकींतून बँकेस लवकर मुक्त करणेस कर्जदारांची सहानुभूति मिळाल्यास थकबाकीचें प्रमाण कमी होऊन बँकेस वरचा वर्ग लाभेल. " बँकेस वाटणीकरितां निवळ नफा २,७९० रुपये रहात आहे, त्यांतून भागीदारांस ४½% दरानें डिव्हिडंड देण्यासाठी ८१७ रुपये मंजूर झाले. श्री. ग. पां. सावणे, बी. ए., एलएल.बी. हे बँकेचे अध्यक्ष आहेत व अं. गो. जोग, बी. ए. हे ऑनररी सेक्रेटरी आहेत.

---

### ग्वाल्हेरमधील सहकारी चळवळ

ग्वाल्हेर संस्थानांतील जिल्हा सहकारी इन्स्पेक्टरांची एक परिषद ग्वाल्हेर येथें सहकारी सोसायट्यांचे डायरेक्टर, श्री. पी. एस. मेहता, बी. ए., एलएल. बी. ह्यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच भरली होती. श्री. मेहता ह्यांनीं आपल्या सुरवातीच्या भाषणांत सोसायट्यांच्या सद्यःस्थितीचें विवेचन केलें व त्यांची स्थिति चिंतनीय आहे व त्यांची सुधारणा त्यांनीं आखून दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणें घडवून आणण्याचें महत्त्व अतिशय आहे, असें सांगितलें. इन्स्पेक्टरांनीं आपलें काम जनसेवेच्या उच्च ध्येयानें प्रेरित होऊन करावें, असेंहि त्यांनीं कळकळीनें सांगितलें. परिषदेमध्यें सहकारी खात्याचें धोरण व कार्यपद्धति, पैशाचा पुरवठा, वसुली, ऑडिट, पुनर्घटना व लिक्विडेशन, इत्यादि अनेक प्रश्नांची चर्चा झाली. शेतकी पतपेढ्यांच्या सभासदांस नवीन कर्जें द्यावयाचीं तीं त्यांच्या जिंदगीपेक्षा परतफेडीच्या पात्रतेकडे पाहून द्यावीत, हा ठराव मंजूर झाला. अध्यक्षांनीं समारोप केल्यावर व आभार-प्रदर्शनानंतर परिषदेचें काम संपलें.

---

### सहकारी दिन

अलीकडे सहकारी चळवळीचा प्रचार व शैक्षणिक कार्यांत शैथिल्य दिसून येऊं लागल्यामुळें सहकारी खात्याच्या प्रेरणेनें पुणें शहरांतील प्रमुख कार्यकर्त्यांची अनौपचारिक सभा नुकतीच बोलावण्यांत आली होती. तीमध्यें असें ठरलें कीं, हें कार्य डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ युनियनचे विद्यमानें व्हावें. यंदा सहकारी दिन मोठ्या प्रमाणांत साजरा व्हावा. या कामाकरितां डिस्ट्रिक्ट व युनियन बोर्डानें कांहीं प्रमुख कार्यकर्त्यांस कोऑप्ट करून घेतलें. त्या कमिटीनें पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन श्री. महादेव धोंडो विद्वांस यांस आपले चेअरमन म्हणून निवडलें आहे. या कमिटीनें असेंहि ठरविलें कीं सहकारी दिन साजरा करण्याची पूर्व तयारी करण्याकरितां सदर कमिटीचे सभासदांनीं दर शनिवारीं सायंकाळीं साडेपांच वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे हॉलमध्यें विचारविनिमय करण्याकरितां जमत जावें व या कार्याविषयीं आस्था बाळगणाऱ्या सर्व सहकारी बंधूंस जाहीर निमंत्रण देऊन पाचारण करावें. तरी सदर ठिकाणीं व सदर वेळीं सर्व सहकारी बंधूंनीं हजर राहात जावें व आपल्या सहकार्याचा फायदा या कार्यास द्यावा अशी सदर कमिटीचे चिटणीस विनंति करतात.

---

### ससून मिल ग्रुपमधील कामगारांच्या पतपेढ्या

ससून मिल ग्रुप ( मुंबई व ठाणें ) मधील कामगारांच्या एकंदर २० पतपेढ्या आहेत. कामगारांच्या पतपेढ्या सुरळीत व सुव्यवस्थित चालाव्या म्हणून कंपनीनें निरनिराळ्या सवलती दिलेल्या आहेत; त्यांत खालील गोष्टींचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे.

१ पगार-पत्रकांतून हप्तेवसुली

२ बँकेंतून पैसे ने-आणण्याची व्यवस्था.

३ मिलकॅशरमार्फत पैशांची देवघेव.

४ पतपेढीच्या कामकाजांत भाग घेण्यासाठी मिल अधिकाऱ्यांना देण्यांत आलेली सवलत.

५ देखरेख, सल्लामसलत यांसाठीं स्वतंत्र वेल्फेअर खात्याची योजना वगैरे.

---


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; मि. आर. एल. फेराई.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी


---


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड-ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,८८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,९४,०३५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. वो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) | १११—५ |
| ४% १९४३ | १०४—० |
| ३½% बिनमुदत | ९६—० |
| ३½% १९४७–५० | १०३—२ |
| ३% (१९६३–६५) | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ | ९७—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) | १२६—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% | १४६–१२ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ९% | ४८—८ |
| इंपीरिअल बँक (५००) १२% | १६१५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% | ११२—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १२% | १५८—० |
| कराची (१००) ९% | २०६—६ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% | १८०५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% | १७५५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर (१००) ३½% | ९३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८७३-१२-० |
| तापी व्हॅली (५००) ८% | ६६२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. | २५१—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. | ५४—० |
| शिंद्या स्टीम (१५) १ रु. | २३–१५ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ८ आ. | ५१—० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. | ४४७५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% | २१५—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) ७½% रु. | १५१–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. | ३९९—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) १७२ रु. १० आ. ७ पै. | २०९०—० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. | १५३—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास | ४२—५—६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६२–१५–३ |

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
४ सहकार : किं. २ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें

संग्रह करा

कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट

पाचकवटी, पंचकोलासव

तसेंच

पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी

—: रक्तवर्धक :—

सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें

आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तन्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोषाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.



मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहणची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल

लॅक टूथ पावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

जर्निमन टेलर व्हा.

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १, आक्टोबर १९४१ अंक ४०

अर्थ ग्रन्थमाला–पुस्तक ४ थें

## सहकार

### ( हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

★

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### जखमी जर्मनांस 'रामबाण औषध'

जे जखमी जर्मन सैनिक पुनः लढण्याजोगे बरे होण्याची आशा नाहीं, अशा सैनिकांस मृत्यु येणारें औषध देण्यासंबंधीं सूचना जर्मनीच्या लष्करी इस्पितळांच्या अधिकारी डॉक्टरांस देण्यांत आल्या आहेत, अशी माहिती रशियन रेडिओवर नुकतीच सांगण्यांत आली.

### कच्छचे दिवाण

मेजर वेब ह्यांची कच्छचे दिवाण म्हणून दरमहा ३,००० रुपये पगारावर तीन वर्षांच्या मुदतीची नेमणूक करण्यांत आली आहे.

### सिंधच्या उत्पन्न-खर्चांत वाढावा

सिंध प्रांताच्या १९४०-४१ च्या हिशेबांत १४ लक्ष रुपये वाढावा आढळून आला आहे. एकूण उत्पन्न ५ कोटि, १९½ लक्ष रुपये आलें व खर्च ५ कोटि, ५ लक्ष रुपये झाला.

### कोळसा आणि कोक साठवून ठेवा

कोळसा आणि कोक ह्यांचा साठा करून ठेवण्यासंबंधीं हिंदुस्थान सरकारनें सर्व व्यापारी संस्थांस कळविलें आहे. कारखान्यांचें काम कोणत्याहि परिस्थितींत अडूं नये, ह्याकरितां ही व्यवस्था करणें आवश्यक आहे.

### पैसे जप्त

मर्कंटाइल बँक ऑफ इंडिया मुंबई, लॉइड्स बँक लि. मुंबई व नॅशनल बँक ऑफ इंडिया लि. कराची ह्या बँकांतील "बँको डि रोमा, बगदाद "च्या खात्यावरील ठेवींची रकम कस्टोडिअन ऑफ एनिमी प्रॉपर्टीचे स्वाधीन करण्याविषयीं त्या बँकांस हुकूम देण्यांत आला आहे.

### ऑस्ट्रेलियांतील बँकांच्या ठेवींवरील व्याजाचे दर

२२ सप्टेंबर, १९४१ पासून खालीलप्रमाणें ऑस्ट्रेलियांतील बँकांचे व्याजाचे दर रहातील:—

| | |
|---|---|
| ३ महिने | १½% |
| ६ महिने | १¾% |
| १ वर्ष | २% |
| २ वर्षें | २¼% |

युद्धास प्रारंभ झाल्यापासून ऑस्ट्रेलियांत व्याजाचे दर उतरत आलेले आहेत.

### संयुक्त प्रांताची 'प्रांतिक सहकारी बँक'

संयुक्त प्रांतासाठी प्रांतिक सहकारी बँक काढण्याची योजना मागेंच तयार झालेली आहे. तिला रिझर्व्ह बँकेचीहि संमति आहे. ३ लक्ष रुपयांचे भाग घेण्यास लोक व सहकारी संस्था ह्यांची तयारी होती व प्रांतिक सरकारनेंहि प्राथमिक खर्चासाठी ५० हजार रुपयांची तरतूद केली होती. युद्ध उपस्थित झाल्यामुळे ही योजना मागें पडली, ती पुनः हातीं घ्यावी अशी गव्हर्नरांस विनंति करण्याकरितां एक शिष्टमंडळ त्यांची भेट घेणार आहे.

### कॅंप आणि कं. लि.

वरील कंपनीनें ३१-३-४१ अखेर संपलेल्या वर्षी २२½ लक्ष रुपयांची विक्री केली. म्हणजे, त्या पूर्वीच्या वर्षांच्या मानानें विक्रींत ४०% वाढ झाली. नफा १½ लक्ष रुपये झाला; त्यांतून ६० हजार करासाठी बाजूस काढून ठेवावे लागले. डिव्हिडंडचा दर ८% चा १२% करण्यांत आला आहे.

### अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला दिलेलें कर्ज

अमेरिकेनें चालू युद्धाचे प्रारंभापासून आतांपर्यंत ग्रेट ब्रिटनला एकूण सुमारें ४५ कोटि रुपये कर्ज दिलें आहे.

### हिंदी साखर कारखान्यांचें उत्पादन

| | १९३९-४० | १९४०-४१ |
|---|---|---|
| एकूण चालू कारखाने | १४५ | १४८ |
| ऊंस गाळला (टन) | १,३१,३१,७०० | १,१२,९०,९०० |
| साखर केली (टन) | १२,४१,७०० | १०,९५,४०० |
| मोलॅसेसचें उत्पादन (टन) | ४,८५,३०० | ४,२४,६०० |
| साखरेचा उतारा (%) | ९·४५ | ९·७० |
| मोलॅसेसचा उतारा (%) | ३·६९ | ३·७६ |

### डालमिया सिमेंट लि.

वरील कंपनीनें गेल्या वर्षी (१९४०) ५६ लक्ष रुपयांचें सिमेंट विकलें. नफा १०½ लक्ष रुपये झाला, त्यांतून ६ लक्ष ३९ हजार रुपये घसारा काढला. प्रेफरन्स भाग धारण करणारांस ६% डिव्हिडंड मिळेल, व त्यासाठी २ लक्ष, १० हजार रुपये लागतील. ऑर्डिनरी भाग धारण करणारांस डिव्हिडंड मिळणार नाहीं. १९४१ सालाकरितां पहिल्या सहामाहीचें प्रत्येक प्रेफरन्स भागास ३ रुपये व ऑर्डिनरी भागास ८ आणे इंटेरिम डिव्हिडंड जाहीर करण्यांत आलें आहे. प्रेफरन्स भाग १०० रुपयांचा व ऑर्डिनरी भाग १० रुपयांचा आहे.

### वैराग ऑईल मिल, लि.

वरील नांवाची एक खासगी कंपनी नुकतीच नोंदण्यांत आली आहे. श्री. एम. वाय. कुलकर्णी हे तिचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. वैराग हें गांव सोलापूर जिल्ह्यांत आहे.

### सारावाक

सारावाकचा शतसांवत्सरिक उत्सव गेल्या बुधवारीं साजरा झाला. सारावाक हा देश बोर्निओमध्यें असून त्याची ५०० मैल लांबीची पट्टी चिनी समुद्रास लागून आहे. मलायी व चिनी लोकच सारावाकमध्यें मुख्यतः आहेत. सर जेम्स ब्रुक ह्या इंग्रजानें तेथील सुलतानापासून हा प्रदेश १८४२ सालीं घेतला व तेव्हांपासून सर साहेबांचे वंशज तेथें राज्य करीत आहेत.

### दरमहा ५० हजार

हिंदुस्थानांत दरमहा ५० हजारांपेक्षा अधिक लोक लष्करामध्यें दाखल होत आहेत.

### ब्रिटिश मुलांस नाताळची भेट

बॉंबच्या वर्षावामुळें नुकसान पावलेल्या ब्रिटिश शहरांतील ५० हजार मुलांना अमेरिकन ज्युनिअर रेड क्रॉस ही अमेरिकेंतील संस्था नाताळच्या सणानिमित्त भेट पाठविणार आहे. साबण, टुथपेस्ट, पेन्सिली, नोटबुकें, खेळण्याचें सामान, इत्यादि वस्तू आकर्षक रीतीनें बांधण्याचें काम अमेरिकेंतील मुलें व मुली करीत आहेत. ह्या वस्तू ग्रेट ब्रिटनमध्यें १ डिसेंबरचे सुमारास दाखल होतील.

### व्यापारी वाटाघाटी

तुर्कस्तान व जर्मनी ह्यांचेमध्यें व्यापारासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत. तुर्कस्तानानें जर्मनीस क्रोम, तेल, कपास, तंबाखू, इत्यादींचा पुरवठा करावा व जर्मनीनें तुर्कस्तानास यंत्रसामुग्री व युद्धसाहित्य द्यावें अशी योजना आहे, असें समजतें.

### गव्हावरील पट्टी

गव्हाच्या आयातीवरील जकात कमी करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे.

अनुक्रमणिका


पृष्ठ

१ विविध माहिती ... ४७०
२ रशियाचा कणखरपणा व सहकार्याचा सवाल ४७१
३ हिंदी चित्रपटांचा धंदा ४७२
४ फॅक्टरी ॲक्टाची अंमलबजावणी ... ४७२
५ स्फुट विचार ... ४७३
अटलांटिक 'सनदे'स दोस्त राष्ट्रांचा पाठिंबा—जगाच्या आर्थिक पुनर्घटनेची तयारी—भौतिक शास्त्रें आणि मानवी अभ्युदय—पुणें सहकार सप्ताह समिति
६ कामगार वर्गाच्या रहाणीच्या खर्चाचें मान ४७४
७ शेतकरी व गिन्हाइक ह्यांमधील दुवा ... ४७५
८ हिंदी युद्धप्रयत्नांस अमेरिकेची मदत ... ४७६
९ सहकारी शिक्षणाची संधी ४७७
निवडक बाजारभाव... ४७८


# अर्थ

बुधवार, ता. १ आक्टोबर, १९४१

## रशियाचा कणखरपणा व सहकार्याचा सवाल

पूर्व युरोपांत रूसो-जर्मन झगडा चालला आहे त्यामध्यें रशियन फौजांनीं केलेली मर्दुमकी अत्यंत कौतुकास्पद असून ती जगभर सर्वत्र स्तुतीचा विषय होऊन गेली आहे. 'शेंडी तुटो कीं पारंबी तुटो' ह्या न्यायानें हिटलरनें आपलें लष्करी शक्तिसर्वस्व लेनिनग्राड, कीएव्ह व ओडेसा ह्या रशियाच्या जिव्हाळ्याच्या शहरांवर वेचलें आहे. तीन महिने होत आले तरी रशियन मोहिमेचा मुख्य हेतु रशियन सैन्यांनीं हिटलरला साध्य होऊं दिलेला नाहीं. जर्मनीची रशियामध्यें प्रगति झाली आहे तिची भयंकर किंमत हिटलरला द्यावी लागली आहे. युक्रेनमध्यें स्वतःस करावी लागलेली पीछेहाट रशियनांनीं कधींच झाकलेली नाहीं. जर्मनीनें बढाया मारल्या, प्रतिस्पर्ध्याच्या हानीचें भडक चित्र रंगवलें व निराशेनें त्यानें शस्त्र खालीं ठेवावें ह्या हेतूनें खोटा प्रचार केला तरी त्याची रशियन मोहीम अजून चालूच आहे व रशियन ठिकठिकाणीं उलट हल्ले करीत आहेत, ह्यावरून युद्धाचा खरा रंग काय आहे हें जगास दिसतच आहे. रशियाचा फ्रान्स करून टाकावयाचा हा हिटलरी बेत साफ फसला आहे ह्यांत आतां कोणासच शंका नाहीं.

जर्मनीच्या रशियन मोहिमेची भौगोलिक परिस्थितिच अशी झाली आहे कीं इंग्लंड व अमेरिका ह्यांस रशियास सहाय देण्याची इच्छा असून तिला मूर्तस्वरूप देणें कठिण झालें आहे. ब्रिटिश वैमानिकांनीं पश्चिम जर्मनींत व शत्रूनें पादाक्रांत केलेल्या देशांत त्यास चांगलाच पायबंद घातला आहे. त्याचप्रमाणें अमेरिकेची व इंग्लंडची युद्धसामुग्री रशियास आतां जाऊन पोहोंचूं लागली आहे. तथापि, कीएव्ह, क्रायमिआ इत्यादि बाजूंस जर्मन फौजांची प्रगति झाल्यापासून आपल्या फौजांची फळी न फोडूं देतां व्यवस्थेनें मागें हटून शत्रूस नेटानें तोंड देण्याची तयारी करण्यांत रशियन सेनानींनीं यश संपादलें आहे. लेनिनग्राडजवळ आपण जाऊन पोहोंचल्याच्या बातम्या जर्मनी कित्येक आठवडे प्रसिद्ध करीत आहे. तें शहर पडण्यास आतां फार दिवस लागावयाचे नाहींत, असा आभास उत्पन्न करण्याचा प्रयत्न जर्मनीनें चालू ठेवला आहे. स्मॉलेन्स्कच्या बाजूस तर जर्मन फौजेची पीछेहाटच झाली आहे. नाइलाज होईल तेव्हां बेताबेतानें मागें हटून आपल्या फौजेची फळी कायम ठेवावयाची आणि शत्रूस अंगावर घेऊन संधि मिळतांच त्याचेवर उलट हल्ले चढवून त्यास मागें रेटीत न्यावयाचें ह्या योजनेचा अवलंब रशियन सेनानींनीं केला आहे.

हें धोरण नीट पार पाडण्यास इंग्लंड व अमेरिका ह्या देशांचें सहाय रशियास मोठ्या प्रमाणावर होणें आवश्यक आहे. त्यासंबंधांत इंग्लंडनें जोराचा प्रयत्न चालू केला आहे. अमेरिकन व ब्रिटिश विमानें रशियास जाऊन मिळालीं आहेत आणि इतर लढाऊ सामुग्री शक्य तितक्या तातडीनें तिकडे पाठवण्यांत आली आहे व येत आहे. रशियाच्या मदतीसाठीं ब्रिटिश कारखान्यांत लढाऊ सामुग्री सिद्ध करण्याची खास खटपट चालली आहे. तथापि, जर्मनीची एवढी भयंकर हानि झाली आहे कीं, त्यास ह्या पुढें फार आठवडे लढाया चालू ठेवतां यावयाच्या नाहींत. हिंवाळा जवळ आला असून रशियांत एकदा बर्फ पडूं लागलें म्हणजे तेथील कडाक्याच्या थंडींत शत्रूची सर्व लढाऊ शक्ति गारठून जाईल अशा कल्पनांवर युद्धप्रयत्न शिथिल होऊं दिले जाणें इष्ट नाहीं हें उघड आहे.

रशियाचे लंडन येथील वकील, मॉ. मैस्की, ह्यांनीं आपल्या देशाची ह्या संबंधांतली भूमिका नुकतीच विशद करून सांगितली तिचा उल्लेख करणें आवश्यक आहे. रशियन रणांगणावर जर्मनीचे तीस लाख सैनिक मृत किंवा निकामी झाले असून शत्रूचीं साडे आठ हजार विमानें नाश पावलीं असल्याची माहिती देऊन ते म्हणाले, कीं ह्यावरून जर्मनींत आतां त्राण उरला नाहीं आणि युद्धाचा शेवट जवळ आला आहे अशी समजूत करून घेणें चुकीचें आहे. रशियाचेंहि पुष्कळ नुकसान झालें आहे; शत्रूनें त्याचे मोठमोठाल्या कारखान्यांचीं केंद्रें असलेले प्रदेश पादाक्रांत केले असून ह्या कारखान्यांचें स्थलांतर करण्यास अवधी लागणार आहे. दरम्यानच्या काळांत इतर स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांनीं रशियास सहाय दिलें पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. पावसाळा व हिंवाळा ह्यांचा युद्ध चालू ठेवण्यास मागें अडथळा होत असे. पण अलीकडच्या लढायांत असल्या नैसर्गिक अडचणी यंत्रसहायानें सहज दूर करतां येऊं लागल्यामुळें रशियानें आपणांस सारखें लढत रहावें लागणार आहे अशा कल्पनेनें आपल्या रणयोजना आखल्या आहेत. नात्सी जुलमाविरुद्ध झगडून यश मिळवण्यासाठीं रशियन राष्ट्र आपल्या रक्ताचा शेवटचा बिंदु खर्च करणार असून ह्या कामीं इतर राष्ट्रांचें सहाय मागण्याचा त्यास पूर्ण हक्क आहे, कारण हें सहाय रशिया इतकेंच त्या सर्व राष्ट्रांच्या संरक्षणासाठीं अगत्याचें आहे अशी विचारसरणी त्यांनीं पुढें मांडली. मॉ. मैस्की ह्यांनीं रशिया स्वातंत्र्यवादी असून प्रत्येक राष्ट्रास स्वयंनिर्णयाचा अधिकार असला पाहिजे असें त्यांचें मत असल्याचें सांगून आपल्या देशांत धार्मिक बाबतींत विचार व आचार ह्यांचें स्वातंत्र्य पूर्ण असल्याविषयींची माहिती दिली. बॉल्शेव्हिकांविरुद्ध नात्सी लोकांनीं चालवलेल्या प्रचारास उत्तर देऊन त्यांच्या धार्मिक जुलमाविषयीं पसरलेले समज दूर करून राजकीय व धार्मिक स्वातंत्र्याचे संबंधांत रशिया इंग्लंड व अमेरिका ह्यांचेबरोबर सहमत असल्याची सर्वांची खातरजमा करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. जर्मनीविरुद्ध स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांचें निःसंदेह सहकार्य व्हावें आणि त्यांनीं ह्या कामीं आपलें शक्तिसर्वस्व एकवटण्याची ही वेळ आहे ही गोष्ट त्यांस इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या मनावर ठसवावयाची होती. सर्व स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं गेल्या आठवड्यांत लंडन येथें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व मि. चर्चिल ह्यांच्या प्रसिद्ध आठ कलमी घोषणेस पाठिंबा दिला हें ह्यासंबंधांत लक्षांत घेण्यासारखें आहे.

## हिंदी चित्रपटांचा धंदा

हिंदुस्थानांतील धंद्यांमध्यें चित्रपटांच्या धंद्यानें बरेंच वरचें स्थान पटकावलें आहे ही गोष्ट आतां महशूरच आहे. त्या धंद्याचे गुणदोष व अडचणी ह्या संबंधाची चर्चा वृत्तपत्रांतून मधूनमधून होते. तिचा प्रतिध्वनि हिंदुस्थान सरकारचे माजी कायदेमंत्री सर एन. एन. सरकार ह्यांनीं सिमला येथें नुकत्याच केलेल्या एका भाषणांत उमटला. हिंदुस्थानांत दाखवण्यांत येणारे चित्रपट मूक होते तोंपर्यंत परदेशी चित्रपटांची येथील सिनेमागृहांत चलती होती. पण चित्रपट बोलके झाल्यापासून देशी चित्रपटांची सरशी झाली आहे. चित्रपटगृहांचें वार्षिक उत्पन्न हिंदुस्थानांत सुमारें तीन कोटि रुपये आहे, त्यांपैकीं दोन कोटि, चाळीस लक्ष रुपये हिंदी बनावटीच्या चित्रपटांपासून मिळतें आणि बाकीचें साठ लक्ष रुपये परदेशी चित्रपटांपासून होतें असा आजचा अंदाज आहे. ह्यावरून स्वदेशी चित्रपटांची प्रगति कशी झपाट्यानें झाली आहे ह्याची कल्पना सहज येईल. तथापि, हिंदी चित्रपटांच्या धंद्याच्या मार्गांत अडचणी नाहींत असा समज करून घेणें चुकीचें होईल असें सर एन. एन. सरकारांचें म्हणणें आहे. ह्या धंद्यास लागणारी बहुतेक सर्व सामुग्री परदेशांतून येते हें त्यांतलें मोठें वैगुण्य आहे. युद्धापूर्वी कच्च्या फिल्म्स जर्मनींतून मुख्यत्वेंकरून येत असत, त्या आतां इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतून आयात कराव्या लागत आहेत. चित्रपट बनवणारांमध्यें सहकार्य व संघटन नाहीं हा त्यांच्या मतानें दुसरा दोष आहे. तिसरी अडचण भिन्न भिन्न देशी भाषांच्या संबंधाची आहे. हिंदुस्थानी भाषा सोडुन दिली तर दर चारशे मैलांच्या अंतरावर ह्या देशांत भाषा बदलते, ह्या कारणानें देशी भाषांतील चित्रपटांचें गिऱ्हाइक मर्यादित होतें.

हॉलिवूडमध्यें किंवा इंग्लंडांत इंग्रजी भाषेंत काढलेल्या चित्रपटांस मागणी फार मोठ्या प्रमाणांत येत असल्यानें ते विशेष फायदेशीर होतात. अमेरिका, इंग्लंड व ब्रिटिश साम्राज्यांतील देश ह्यांत त्या चित्रपटांचा खप होतो. त्या मानानें हिंदी देशी भाषांतील चित्रपट फायदेशीर होऊं शकत नाहींत. हिंदुस्थानी भाषांतील चित्रपटहि ह्या देशाच्या सर्व भागांत लोकप्रियतेच्या दृष्टीनें मर्यादित कक्षेमध्यें फिरतात. पौराणिक कथांवर भर देण्याची हिंदी चित्रपटकर्त्यांची प्रवृत्ति अजून अनेक प्रांतांत कायम असून सामाजिक स्थितीवर आधारलेले पट जसे निघावे तसे निघत नाहींत असें सर एन. एन. सरकार ह्यांचें म्हणणें आहे. दक्षिण हिंदुस्थानांतील बोलपटांत गाण्यावरच मुख्य भर असतो आणि नटांच्या कौशल्यास त्यांमध्यें वाव नसतो अशीहि त्यांची तक्रार आहे. त्यांच्या भाषणानंतर सर बर्टरॅम स्टीव्हन्स ह्यांनीं ऑस्ट्रेलियांतील चित्रपटांच्या धंद्याचा आपला अनुभव निवेदन केला. तेथील धंदा सरकारच्या सहायामुळें विलक्षण जोरानें पुढें सरसावला असल्याचें त्यांनीं सांगितलें. ऑस्ट्रेलियांतील हवा त्या धंद्यास अनुकूल आहे आणि लेखक, नट व नटी ह्यांचा पुरवठा मुबलक आहे. युद्धामुळें ऑस्ट्रेलियन चित्रपटांच्या धंद्याच्या मार्गांत कांहीं अडचणी आल्या पण त्या आतां दूर झाल्या असून राष्ट्रीय सरकारच्या सहायावांचून चित्रपट मंडळ्या स्थापन झाल्या आहेत आणि त्यास चांगला नफा होत आहे अशी माहिती सर बर्टरॅम ह्यांनीं दिली. हिंदी बोलपटांच्या धंद्यांत संघटनास नुकताच प्रारंभ झाला आहे. त्यांत सहकार्यास किती तरी जागा आहे. ऑस्ट्रेलियन सरकाराप्रमाणें हिंदी सरकारनेंहि स्वदेशी चित्रपटांस उत्तेजन देणें अगत्याचें आहे. हा धंदा अधिक संघटित होईल तर त्याची प्रगति पायाशुद्ध होऊन त्याचा अभ्युदयहि निश्चित होईल.

---

## फॅक्टरी ॲक्टाची मुंबई प्रांतांत अंमलबजावणी

मुंबई प्रांतांत १९४० अखेर ३,३१८ कारखाने चालू होते, परंतु ज्यांस फॅक्टरी ॲक्ट लागू आहे, अशा चालू व बंद मिळून एकूण कारखान्यांची संख्या ३,६४० होती. ज्या ठिकाणीं उत्पादनासाठीं मनुष्याच्या खेरीज इतर शक्तीचें सहाय घेण्यांत येतें व ज्या ठिकाणीं २० अगर २० पेक्षा अधिक लोक काम करतात, अशा ठिकाणास फॅक्टरी म्हणतात. परंतु, वरीलप्रमाणें शक्तीचा उपयोग एखाद्या ठिकाणीं करण्यांत येवो अथवा न येवो व दहा अथवा दहापेक्षा माणसें कामास असलीं तरी त्या ठिकाणास फॅक्टरी ॲक्ट लागू करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास आहे. ह्याप्रमाणें, अनेक ठिकाणीं तो जारी करण्यांत आलेला आहे. वरील ३,६४० कारखान्यांत अशीं १,३८५ ठिकाणें आहेत. ॲक्ट लागू असलेल्यांपैकीं १६२ ठिकाणांची तपासणी एकदाहि १९४० मध्यें होऊं शकली नाहीं.

सर्व कारखान्यांत मिळून ४ लक्ष, ८० ½ हजार कामगार कामावर होते; म्हणजे त्यांच्या संख्येंत १९३९ च्या मानानें ३% ची वाढ झाली. एकूण ११,९३८ अपघातांची नोंद झाली, त्यांत ११,९९९ लोक जखमी झाले. १९३९ मध्यें १०,०२५ अपघातांत १०,०८६ लोक सापडले होते. युद्धामुळें वाढत्या कामाचा परिणाम अपघातांची संख्या वाढण्यांत झालेला दिसतो. स्त्रीकामगार व मुलें ह्यांची संख्या खाली दिली आहे.

| | | स्त्री कामगार | मुलें |
|---|---|---|---|
| १९३६ | एकूण पैकीं | ६२,६५२ | ९२२ |
| | मुंबईत | २३,९९० | ३८ |
| १९३८ | एकूण पैकीं | ७१,५९१ | ९४३ |
| | मुंबईत | २८,९८७ | ५१ |
| १९४० | एकूण पैकीं | ७०,८९८ | ७७० |
| | मुंबईत | २४,३०१ | ५० |

कापडाच्या गिरण्यांतील स्त्री कामगारांची संख्या गेल्या वर्षी २,११५ नें कमी झाली, परंतु रात्रपाळीचें प्रमाण वाढत असल्यामुळें स्त्रीकामगारांस मागणी अधिक येण्याचा संभव आहे.

### अपघात

१९४० सालीं मुंबई प्रांतांतील कारखान्यांत एकूण ११,९९३ अपघात झाले, त्यांपैकीं ३८ प्राणघातक, २४०७ भयंकर स्वरुपाचे व ९,५४८ किरकोळ स्वरुपाचे होते. १९३९ चे मानानें अपघातांची संख्या वाढली व अपघातांचें दर शंभर कामगारांशी पडणारें प्रमाण २·१६ चें २·४९ झालें.

### कपास कापडाच्या गिरण्यांतील कामगारांस दन्ड

| जिल्हे (कांहीं प्रमुख) | दंड करणाऱ्या गिरण्या | दंडाची रकम रुपये | दंडाचें एकूण मजुरीशीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| मुंबई | ६४ | ९१,८७२ | ·१६ |
| अहमदाबाद | ६७ | १,६७,३०० | ·४२ |
| पुणें | १ | २,८०८ | ·६७ |
| सोलापूर | ८ | ११,१८३ | ·१९ |

### गुऱ्हाळें

भाताच्या गिरण्या व गुऱ्हाळें ह्यांस फॅक्टरी ॲक्ट लावण्यांत आला आहे. विशेषतः अहमदनगर व पुणें ह्या जिल्ह्यांत गुऱ्हाळांची संख्या बरीच वाढली आहे. ह्या गुऱ्हाळांतील यंत्रसामुग्रीस कुंपण नीट लावलें जात नाहीं असा अनुभव आहे. तें यंत्रांपासून फार दूर उभें करण्याची प्रवृत्ति आढळते. लोक कुंपण व यंत्रें ह्यांचेमधून जाऊं लागले तर कुंपणाचा काय उपयोग ? सैल कपड्यांमुळें अपघातांची शक्यता ज्यास्तच वाढते.

## स्फुट विचार

### " अटलांटिक सनदे "स दोस्त राष्ट्रांचा पाठिंबा

अटलांटिक सनद ह्या नांवानें आतां प्रसिद्ध असलेल्या, प्रेसिडेंट रूझवेल्ट व मि. चर्चिल ह्यांच्या आठ कलमी घोषणेचा विचार दोस्त राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या परिषदेंत लंडनमध्यें गेल्या आठवड्यांत झाला. तीमध्यें रशियाचे इंग्लंडमधील वकील, मॉ. मैस्की, ह्यांनीं काढलेल्या उद्गारांचा उल्लेख आजच्या अग्रलेखांत आम्हीं केलाच आहे. ब्रिटिश वसाहती आणि पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, नॉर्वे, हॉलंड, ग्रीस, बेल्जम, स्वतंत्र फ्रान्स इत्यादि जर्मनीनें व्यापलेल्या देशांचे प्रतिनिधीहि परिषदेस उपस्थित होते. गेल्या जूनमध्यें दोस्त राष्ट्रांचे प्रतिनिधी एकत्र जमले होते, त्यावेळीं युद्धाचा यशस्वी शेवट करणें व कायमच्या शांततेची घडी बसवणें ह्या कार्यासाठीं आखावयाच्या योजनेचा विचार करावा लागेल अशी आशा आपण व्यक्त केली होती असें मि. ईडन ह्यांनीं प्रारंभीं सांगितलें. ह्या योजनेच्या पूर्वतयारीस स्वाभाविक थोडासा वेळ लागला आणि मध्यंतरीं जर्मनीनें रशियावर स्वारी केली असें स्पष्टीकरण त्यांनीं केल्यावर मॉ. मैस्की ह्यांनीं रशियन सरकारच्या वतीनें अटलांटिक सनदेच्या मूलभूत तत्त्वास जोराची पुष्टि दिली. युद्धोत्तर जगांत हिटलरशाहीसारख्या दरवडेखोरीच्या गुन्हेगारीस वाव मिळणार नाहीं आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या पायावर प्रस्थापित होईल अशी व्यवस्था झाली पाहिजे ह्या आशयाचा अभिप्राय व्यक्त करून प्रथम जर्मनीचा पूर्ण पाडाव करण्यास सर्वांनीं झटलें पाहिजे असें ते म्हणाले. ह्यानंतर परिषदेंत भाग घेणाऱ्या सर्व प्रतिनिधींचा अटलांटिक सनदेस मनःपूर्वक पाठिंबा देणारा ठराव बेल्जमचे मुख्य प्रधान मि. स्पाक, ह्यांनीं पुढें मांडला. त्यासंबंधानें बोलतांना, जगाच्या भवितव्याविषयीं पोलंड, झेकोस्लोव्हेकियासारख्या हिटलरशाहीनें बळी घेतलेल्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं आपल्या आकांक्षा स्पष्टपणानें व्यक्त करून ठरावाचें स्वागत केलें.

---

### जगाच्या आर्थिक पुनर्घटनेची तयारी

झेकोस्लोव्हेकियाचे प्रतिनिधी, मि. मेसारिक, ह्यांनीं आपल्या देशास आर्थिक पुनर्घटनेच्या कामीं मोठ्या राष्ट्रांकडून बरोबरीच्या नात्यानें सहकार्य मिळेल अशी आशा प्रदर्शित केली. आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यावर अनेक वेळां आघात झाले असल्याकारणानें युद्धाच्या समाप्तीनंतर सर्व राष्ट्रांचा शस्त्रसंन्यास होईल तेव्हां लहान व दुर्बल लोकांच्या संरक्षणाची योग्य तजवीज करावी लागेल असें त्यांनीं सुचवलें. नेदरलंड्सचे प्रतिनिधी, मि. कीफेन्स ह्यांनीं अटलांटिक सनदेच्या चवथ्या कमलाविषयीं थोडी स्पष्टोक्ति केली ती जागतिक व्यापार व कच्च्या सामुग्रीचा सर्व राष्ट्रांत समतेनें पुरवठा होण्याची व्यवस्था ह्यासंबंधानें आहे. युद्धामुळें अनेक देश उध्वस्त झाले आहेत त्यांचा पुनर्जन्म होण्यास ह्या प्रकारचें भरपूर सहाय लागेल त्याबाबत झेकोस्लोव्हेकियाच्या प्रतिनिधींप्रमाणें मि. कीफेन्स ह्यांचाहि विशेष कटाक्ष होता. " पूर्वीच्या जबाबदाऱ्या हिशेबांत घेतल्या जाऊन " सर्व राष्ट्रांस सारखेंच आर्थिक सहकार्य मिळेल असें वरील कलमांत म्हटलें आहे त्यास उद्देशून ते म्हणाले कीं, गेल्या महायुद्धाचे अखेर व्यापारासंबंधानें अशीच समतेच्या वाटणीची व्यवस्था होण्याचें निश्चित झालें होतें, पण शेवटीं राष्ट्रांनीं स्वतःच्या उद्योगधंद्यांच्या संरक्षणासाठीं आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रणें घातलीं. तसा प्रकार पुन्हां होऊं नये आणि जागतिक व्यापार निर्वेधपणानें चालावा ह्यासाठी सर्व राष्ट्रांनीं कसून प्रयत्न करावा असें स्वतःच्या राष्ट्राच्या तर्फेनें त्यांनीं सांगितलें. पोलंडच्या काउंट रेझिन्स्कि ह्या प्रतिनिधीनें आपला सबंद देश पूर्वीएवढा कायम केला जाऊन त्यास आर्थिक पुनर्घटनेस व प्रगतीस पूर्णपणें वाव दिला जाईल अशी आशा प्रकट केली. योग्य वाटणीसाठी सर्व स्वतंत्र राष्ट्रांनीं आपलीं आर्थिक साधनें एकत्रित करण्याची आवश्यकता मि. ईडन ह्यांनीं प्रतिपादली. त्यानें पादाक्रांत केलेल्या देशांतून जर्मनीची हकालपट्टी झाली म्हणजे त्यांतील लोकांच्या अन्नसामुग्री, कच्चा माल, भांडवल इत्यादि बाबतींतल्या गरजांची तरतूद करावी लागेल, तिची योजना एव्हांपासून आखणें अगत्याचें असल्यानें तिच्यासंबंधानें त्यांनीं एक ठराव परिषदेपुढें मांडला. युद्धक्षेत्रापासून दूर असलेल्या देशांत अन्नसामुग्रीचा पुरवठा आजच वाढत चालला आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेंत कपास व गहूं ह्यांचा साठा मोठा झाला आहे आणि त्याच्या देवघेवीची कांहीं व्यवस्था होणार असेल तर आपण तीमध्यें सहकार करूं असें आश्वासन अमेरिकन सरकारनें दिलें असल्याची माहिती मि. ईडन ह्यांनीं परिषदेस सांगितली. त्यांनीं सुचवलेल्या योजना आखण्यासाठीं नेमण्यांत येणाऱ्या समितींत सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधी असावे आणि सर्व योजना राष्ट्रीय सरकारांकडे माहितीसाठीं व अभिप्रायार्थ पाठवल्या जाव्या असें रशियाचे प्रतिनिधी मॉ. मैस्की ह्यांनीं आपलें मत सांगितलें. ह्या सूचनेस आपला विरोध नसल्याचें आश्वासन मि. ईडन ह्यांनीं दिलें.

---

### भौतिक शास्त्रें आणि मानवी अभ्युदय

आधुनिक शास्त्रीय शोधांचा व प्रगतीचा दुरुपयोग करून जर्मनीच्या नात्सी सत्ताधिकाऱ्यांनीं जगांतील स्वतंत्र राष्ट्रांवर युद्धाची भयंकर आपत्ति आणिली आहे. यंत्रांचा उपयोग मारण्याकडे होतो, तसा तो तारण्याकडेहि होऊं शकतो आणि तो ह्या दुसऱ्या तऱ्हेनें झाला तरच आधुनिक भौतिक शास्त्रांच्या शोधांचें खरें चीज आहे. प्राचीन काळीं शत्रूनें सोडलेलें अस्त्र निष्फळ करण्यासाठी त्याच्या उलट गुण असलेलें शस्त्र शत्रूवर सोडण्याचा युद्ध-परिपाठ होता, असें आपण ऐकतों. त्या प्रमाणेंच जर्मनीच्या लढाऊ शस्त्रास्त्रांचा प्रतिकार अधिक परिणामकारक शस्त्रास्त्रांनीं केल्यावांचून आज गत्यंतर नाहीं. तेथें "जशास तसें" हाच केवळ न्याय लागत नसून "इस्सेसे जादा"चा नियम लागू पडतो असें म्हटलें पाहिजे. ब्रिटिश शास्त्रज्ञांची परिषद् लंडन येथें भरली आहे, तिच्या प्रतिनिधींस उद्देशून इंग्लंडचे परराष्ट्रमंत्रि, मि. ईडन, ह्यांनीं हिटलरशाहीचा नाश करण्यासाठीं भौतिक शास्त्रज्ञांनीं सहाय द्यावें आणि युद्ध संपल्यावर जागतिक पुनर्घटनेच्या कामीं सहकार्य करावें असें सांगितलें. उदात्त तत्वांवर जगाची संघटना स्थापित व्हावयाची असेल तर तें कार्य केवळ भौतिक शास्त्रज्ञांच्या हातून होणार नाहीं हें उघड आहे. राजसत्ता गाजविणाऱ्या लोकांनीं समाजाची घडी अशी बसवली पाहिजे आणि भिन्न भिन्न राष्ट्रें व वर्ग ह्यांचे परस्पर संबंध अशा रीतीनें निश्चित केले पाहिजेत कीं आधुनिक शास्त्रीय शोधांचें सहाय शांतता, प्रगति व मानवी सुख ह्यांस सर्वस्वी पोषक होईल. हें उद्दिष्ट गाठण्यासाठी शास्त्रें व राजनीति ह्यांचें सहकार्य होणें अगत्याचें आहे ह्या गोष्टीचा मि.

ईडन यांनींहि उल्लेख केला. जागतिक पुनर्घटनेबाबत अनेक बिकट प्रश्न उपस्थित व्हावयाचे आहेत. ते समाधानकारक रीतीनें सुटावयाचे असतील तर सर्व राष्ट्रांतील पुढाऱ्यांनीं स्वातंत्र्य, समता, सहानुभूति व सहकार्य यांवर आपलें राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरण उभें केलें पाहिजे. यंत्रें मारक न होतां मानवी अभ्युदयास उपकारक कशीं होतील इकडे सत्ताधाऱ्यांनीं लक्ष पुरवून संधि येतांच त्या दिशेनें प्रयत्न करणें अगत्याचें आहे.

---

### पुणें सहकार सप्ताह समिति

अलीकडे सहकारी चळवळीचा प्रचार व शैक्षणिक कार्य यांत शैथिल्य दिसून येऊं लागल्यामुळें सहकारी खात्याच्या प्रेरणेनें पुणें शहरांतील प्रमुख कार्यकर्त्यांची अनौपचारिक सभा नुकतीच बोलावण्यांत आली होती. त्या सभेंत असें ठरलें कीं हें कार्य डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ् सुपरवाइझिंग यूनियन्सच्या विद्यमानें व्हावें व त्यास आरंभ यंदा 'सहकार दिन' अगर शक्य झाल्यास 'सहकार सप्ताह' हा विशेष प्रमाणांत साजरा करून व्हावा. या कामाकरितां डिस्ट्रिक्ट यूनियन्स बोर्डानें कांहीं प्रमुख कार्यकर्त्यांस स्वीकृत (Co-opt) करून घेतलें. सदर समितीनें असें ठरविलें आहे कीं, दिनांक २६ ऑक्टोबर १९४१ ते दिनांक १ नोव्हेंबर १९४१ या सात दिवसांत 'सहकार सप्ताह' पुणें शहरांत साजरा करावा. सदर आठवड्यांत वेगवेगळ्या दिवशीं वेगवेगळ्या सहकारी संस्थांचे चालक व प्रतिनिधी आणि सहकारी चळवळींतील कार्यकर्ते यांच्या ठिकठिकाणीं सभा भरवून त्यांत त्यांच्या अडीअडचणींच्या व व्हावयास पाहिजे असलेल्या सुधारणांचा सांगोपांग विचार करण्यांत येईल. श्री. म. गो. विद्वांस, एम. ए., एलएल. एम., पुणें सें. को. बँकेचे चेअरमन हे सप्ताह समितीचे अध्यक्ष असून श्री. ना. प. भागवत, एम. ए. एलएल बी., असिस्टंट रजिस्ट्रार व श्री. दा. द. चितळे, पुणें सें. को. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर हे दोघे तिचे चिटणीस आहेत.

---

### इराणच्या माजी शहांचें देशांतर

इराणच्या माजी शहांनीं अर्जेंटाइनकडे प्रयाण केलें आहे. अर्जेंटाइन हा देश दक्षिण अमेरिकेंत आहे.

### तारांचे दर उतरले

ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांनीं एकमेकांकडे पाठवावयाच्या वर्तमानपत्रांच्या तारांचे दर निम्म्यापेक्षाहि कमी करण्यांत आले आहेत.

### जपानमधील हिंदी व ब्रिटिश नागरिक

जपानमधील ५० ब्रिटिश व १६० हिंदी नागरिक स्वदेशीं येण्यासाठीं योकोहामाहून निघाले आहेत. जपानमध्यें आतां २०० ब्रिटिश व हिंदी नागरिक शिलक राहिले आहेत.

### कॅनेडिअन फौजांत अमेरिकन सैनिक

दहा हजार अमेरिकन सैनिक कॅनडाच्या लष्करांत दाखल झालेले आहेत.

### इटलीच्या आगबोटींचा नाश

इटलीमधून लिबियाकडे जाणाऱ्या प्रत्येक पांच आगबोटींपैकीं एक तरी बुडते. इटलीच्या व्यापारी आगबोटींपैकीं निदान ३०% बोटी नाश पावल्या असून आणखी २०% बोटी नादुरुस्त स्थितींत आहेत.

## मुंबईंतील कामगारवर्गाच्या राहणीच्या खर्चाचें मान कसें आकारतात ?

(२)

**कपडे**—मुंबईंतील पुरुष कामगारांकडून वापरण्यांत येणारे मुख्य कपडे म्हणजे धोतर आणि पैरण हे होत आणि स्त्रीकामगारांचे मुख्य कपडे म्हणजे लुगडें आणि चोळी हे होत. पैरणीसारख्या कपड्यांची किंमत निश्चित करतां येत नाहीं म्हणून ज्या कपड्यांना शिलाईचा खर्च येत नाहीं, असेच कपडे धरण्यांत आले आहेत. उदाहरणार्थ पैरण किंवा शर्ट यांऐवजीं शर्टचें कापड आणि चोळीऐवजीं खण याची किंमत धरण्यांत आली आहे. धोतर, कोटाचें कापड, शर्टचें कापड, इजारीचें कापड, लुगडीं आणि खण यांचा खर्च कुटुंबाला या सदरांत लागणाऱ्या एकंदर खर्चाच्या शेकडा ७९.५९ प्रमाणांत असतो.

**घरभाडें**—सन १९३२-३३ सालीं यासंबंधानें झालेल्या तपासांत घरभाड्याचें जें प्रमाण आढळून आलें, तेंच धरण्यांत आलें आहे.

**किरकोळ**—या सदराखालीं येणाऱ्या निरनिराळ्या वस्तूंच्या निश्चित किंमती ठरवणें कठीण आहे. तथापि पुढील सहा जिन्नस म्हणजे न्हावी (हजामत), कपड्यांचा साबण, औषधें, पानसुपारी, विडी, आपल्या गांवाला जाण्यायेण्याचा खर्च, वर्तमानपत्रें यांचा खर्च या सदरांतील एकंदर खर्चाच्या शेकडा ५४.९४ प्रमाणांत येतो, धोबी, साबण आणि पानसुपारी या सदराखालील खर्च साबण आणि पानसुपारी या खर्चांत धरला आहे. विडी आणि सिगरेट यांचा खर्च विडी या एकच सदरांत धरला आहे.

**खर्चाच्या आकारणीची पद्धतः**—खर्चाच्या आकारणीची पद्धत ब्रिटिश मिनिस्ट्री ऑफ लेबर यांच्या पद्धतीप्रमाणेंच ठेवलेली आहे. किंमतीचें प्रमाण मूळ ठरविलेल्या मुदतीच्या वेळच्या किंमती आणि चालू किंमती यांच्यामधील फरकाच्या शेकडा सरासरीवर बसवलेलें आहे. या शेकडेवारीच्या फरकाला वजनानें गुणण्यांत आलें आहे. यादींतील जिनसाची किंमत १०० मानून त्या किंमतीच्या प्रमाणांत वजन ठरवलें आहे आणि त्या वजनाच्या प्रमाणांत प्रत्येक जिनसाचा खर्च ठरवला आहे. प्रत्येक जिनसांचा गट ठरवितांना जिनसांची किंमत आणि वजन यांचा गुणाकार करून त्याला १०० या संख्येनें भागून ठरवला आहे.

याप्रमाणें आकारणी करून शेवटचा इंडेक्स नंबर ठरवतांना, प्रत्येक गटांतील इंडेक्स नंबर, खर्चाच्या शेकडेवारी विभागणीनें तोलून वजनाच्या बेरजेनें भागण्यांत आले आहेत. सन १९३२-३३ सालच्या कुटुंबाच्या खर्चाच्या तपासणींत दिसून आलेली शेंकडेवारी धरण्यांत आली आहे. फक्त 'किरकोळ खर्च' सदरांत वजन २५ ऐवजीं १४ धरण्यांत आलें आहे. हा १४ आंकडा म्हणजे कुटुंबांतल्या इतर एकंदर खर्चाच्या शेंकडा प्रमाणांचा होय. इंडेक्समधील एकंदर जिन्नसांची संख्या ४६ असून त्यांचा खर्च एकंदर खर्चाच्या शेंकडा ८६.८० प्रमाणांत आहे.

मुंबईचा सन १९३२ चा वजनमापांचा कायदा मुंबई शहरांत ता. १ ऑगस्ट सन १९३५ रोजीं अमलांत आला तो जे जिन्नस वजनानें विकतात आणि जे द्रव पदार्थ मापानें विकतात अशा जिनसांच्या बाबतींत लागू करण्यांत आला. आणि मापानें जे अन्नादि पदार्थ मीठ वगैरे जिन्नस विकण्यांत येतात त्यांच्या बाबतींत ता. १ जानेवारी सन १९३६ पासून लागू करण्यांत आला म्हणून जुन्या वजनामापांनीं आकारलेल्या किंमती नव्या वजनमापाशीं मेळाला पडतील अशा रीतीनें फेरफार करून हा नवीन इंडेक्स नंबर ठरविण्यांत आला आहे. (समाप्त)

## शेतकरी व गिऱ्हाइक ह्यांमधील दुवा

### खरेदी-विक्री संघाचें महत्त्व

दि सासवड माळी व कोपरगांव तालुका खरेदी विक्री संघ, कोपरगांव, या संस्थेची ९ वी वार्षिक साधारण सभा श्री. आर. जी. सरैया, बी. ए., बी. एस सी., जे. पी., चेअरमन मुंबई प्रॉ. को. बँक यांचे अध्यक्षतेखाली शनिवार तारीख २०-९-४१ रोजीं भरली होती. सभेस श्री. वैकुंठराय मेहता, मॅनेजिंग डायरेक्टर, दि बाँबे प्रॉ. को. बँक लि. मुंबई, हे हजर होते. सभेस सुमारें २५० ते ३०० शेतकरी व व्यापारी हजर होते. श्रीयुत सरैया यांनीं संस्थेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करून सहकारी खरेदी-विक्रीची आवश्यकता किती आहे व खरेदी-विक्रीची योजना कोणत्या मार्गानें व्यवस्थित होईल याविषयीं उद्बोधक असें भाषण केलें. त्याचा सारांश खाली दिला आहे.

### श्री. सरय्या यांचें भाषण

"शेतकी हा इतर औद्योगिक धंद्यांप्रमाणेंच एक धंदा आहे. कोणताहि धंदा म्हटला म्हणजे त्यांतील सर्व कामें एकट्यानें होऊं शकत नसतात. चालू युगांत श्रमविभागणी व त्या त्या कामांतील तज्ञांची योजना ह्यांच्या धोरणानें कामें चालतात व तें करणेंच किफायतशीर आहे. हल्लीच्या धंद्यामध्यें मूळ भांडवल, माल तयार करणें, त्याची जाहिरात करणें, माल विक्री करणें व पैसा पुरविणें अशीं निरनिराळीं अंगें आहेत. शेतकीचे बाबतींतहि तीच परिस्थिती आहे. आपल्याकडील शेतकऱ्यांना माल तयार करणें, हें कसें-बसें जमतें. तें सुद्धां सुधारलेल्या राष्ट्राप्रमाणें नव्हें, कारण इतर देशांत मालाची उत्पादनशक्ती आपल्यापेक्षां दुप्पटच काय पण चौपटीपेक्षांही जास्त आढळते. आपल्या देशांत शेतींत फार बचत राहात नाहीं त्याचीं कारणें निरनिराळीं आहेत. त्यापैकीं कांहीं सांगावयाचीं म्हणजे शेती करण्याची जुनी पद्धत, पावसाचा अनिश्चितपणा भांडवलावर पडणारें व्याज, व माल विक्रींत होणारी बूड. माल उत्पन्न करण्यास जेवढें भांडवल लागतें त्यापेक्षा मालाची होणारी रकम निदान सव्वापट तरी असते. यावरून नुसता पैशाचा व्यवहार जरी लक्षांत घेतला तरी व्याजांत सूट मिळण्यापेक्षां जर माल विक्रीची योग्य व्यवस्था होईल तर सव्वापट किंमत मिळेल. यावरून आपली खात्री होईल कीं, पैशाच्या पुरवठ्यापेक्षां माल विक्रीची योग्य सोय ही गोष्ट अधिक महत्त्वाची आहे. शिवाय प्रत्येक शेतकऱ्यास व्यापाराचें ज्ञान चांगलें असत नाहीं व असूं शकणारहि नाहीं. यासाठीं विश्वासू व योग्य दलाली घेऊन मालाची विक्री करून देणारा व्यापारी पाहिजे. त्यांतल्यात्यांत हा व्यापार माल उत्पादन करणाऱ्यासच करितां आला तर फार बरें. परंतु अगोदर सांगितल्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीस माल उत्पादन करणें व तो किफायतीनें विकणें हल्लीच्या काळांत जमणें शक्य नाहीं. म्हणून निरनिराळ्या कामासाठीं आपले निरनिराळे संघ बनविले पाहिजेत. अशा संघांपैकींच खरेदी-विक्री संघ हा एक आहे.

### प्रांतिक सहकारी खरेदी-विक्री संघ

"आपल्या प्रांतिक सरकारनें शेतकऱ्यांच्या फायद्याकरितां निरनिराळे कायदे व योजना केल्या आहेत. त्यांपैकीं शेतकरी ऋण-विमोचन कायदा व शेतकी माल विक्री कायदा हे नुकतेच केले आहेत. तसेंच पैशाच्या पुरवठ्यासाठी सहकारी पतपेढ्या, माल विक्री व पुरवठ्याकरितां विविध कार्य करणाऱ्या सहकारी मंडळ्या व खरेदी-विक्री संघ ह्यांची योजना आंखलेली आहे. सध्यां प्रांतिक सहकारी खरेदी-विक्री संघ स्थापन करण्याचें घाटत आहे. त्याला लवकरच मूर्त स्वरूप येईल अशी आशा आहे. प्रांतिक खरेदी-विक्री संघाची योजना चालू झाली तर ती योजना तुम्हां सर्वांना व तुमच्या संघाला अतिशय उपयोगी होईल अशी आमची आशा आहे. ह्या सर्व गोष्टी झाल्या हें ठीक आहे. परंतु केवळ कायद्यानें अगर योजनांनीं फायदा होऊं शकणार नाहीं म्हणजे खरें कार्य साधणार नाहीं. कारण हे कायदे व ह्या योजना ज्यांच्या हितासाठी करण्यांत आल्या आहेत त्यांनाच त्यांची उपयुक्तता पटली पाहिजे व त्यांनीं एकनिष्ठपणानें त्यांचा फायदा घेण्याचें ठरविलें पाहिजे. हें काम जितकें प्रचारानें होणें शक्य आहे त्यापेक्षा जास्त, संघाच्या कर्तबगारीवर व व्यवहारावर अवलंबून आहे. तरी ज्या प्रमाणांत पेठेंतील आवक माल आपला संघ स्वतःकडे खेंचील त्या मानानें तो शेतकऱ्यांस अधिक उपयुक्त व फायदेशीर होईल. कदाचित् दुकानांतील आवक ही केवळ व्यवहार करण्याच्या पद्धतीवर अवलंबून राहणार नाहीं. कारण कांहीं व्यापारी व अडते सावकार असतात व त्यांच्या कुळांचा माल आपोआप त्यांच्या दुकानींच जातो. कोणींहि असें नाहीं कीं ज्यास आपला नफा कळत नाहीं, ह्यासाठी संघाचा व्यवहार चांगला असेल तर गिऱ्हाइकांची गर्दी आपोआपच वाढेल. म्हणून चालक वर्गानीं या बाबतींत विचार करून आपल्या संघाची प्रगती वेळोवेळीं अजमावीत जावी. ती वाढविण्यासाठी आणखी कोणते प्रयत्न करावयास पाहिजेत ह्यासंबंधीं वेळोवेळीं योजना करीत जाव्यात.

### संघांचें व्यापक कार्य

"प्रत्येक इसमास सगळीं कामें करतां येणार नाहींत किंवा प्रत्येक धंद्याची त्यास उत्तम माहिती असणें शक्य नाहीं हें मी आपणांस सांगितलें आहेच. त्याकरितां शेतकऱ्यांनीं माल उत्पन्न केल्यावर तो किफायतशीर व बरोबर मापानें विकून देण्याची सोय केली पाहिजे. ह्यासाठी तर खरेदी विक्री संघ पाहिजे. पण घाऊक प्रमाणावर कोणताहि धंदा केल्यास त्यांत जास्त फायदा होऊन खर्चाची बचत होते हें सर्वांना माहित आहेच; म्हणून तसे संघ स्थापून खरेदी विक्रीचें काम केलें पाहिजे. हें सांगण्यांत माझा विशेष हेतु आहे तो असा कीं, व्यक्ति व्यक्तिंच्या मालाच्या विक्रीचा "अडत्या" म्हणून संघानें काम करण्यापेक्षां जर संघ हा सर्वांच्या मालाचा मालक बनेल, विक्रीस आलेल्या मालाची प्रतवारी लावून व जसजसा योग्य भाव मिळेल त्याप्रमाणें तो विकून, मालाची योग्य किंमत मिळवील व मालाच्या प्रतवारीनें व वर्षाच्या सरासरीच्या विक्रीनें पोट भागीदारास म्हणजे सभासदास ती किंमत वाटून देईल तरच संघानें संघरूपी काम केलें असें म्हणतां येईल, नाहींतर तो एक अडत्याप्रमाणें विश्वासू अडत्या आहे एवढेंच म्हणतां म्हणतां येईल. शिवाय खरोखर जर मधल्या, निरनिराळ्या वेळीं लागणाऱ्या दलालींची बचत करावयाची असेल व शेतकऱ्याचे पदरांत मालाची खरी किंमत टाकावयाची असेल, तर संघानें स्थानिक मालाचा ज्या ठिकाणीं भरपूर खप होतो, तेथें त्या मालाची वाहतूक करून खपविला पाहिजे. ही गोष्ट प्रत्येक मालाचे बाबतींत जरी करितां आली नाहीं, तरी कांहीं विशेष प्रकारचा माल, उदाहरणार्थ, या भागांत गूळ, भुईमूग, गहूं व कापूस ह्यांची वरीलप्रमाणें विकून देण्याची तजवीज केली

पाहिजे. त्याचप्रमाणें शेतीसाठी अगर घरगुती कामासाठी लागणारा माल-उदाहरणार्थ बीं बियाणें, पेंड, रासयनिक खतें, आऊतें, घासलेट, लोखंड, ठराविक जातीचा कपडा वगैरेंची सोय थोडी थोडी आपल्या जबाबदारीवर करण्याचें सुरू केलें पाहिजे. ह्या कामाकरितां प्रांतिक सहकारी खरेदी-विक्री संघ हा बराच उपयोगी पडण्यासारखा आहे. कारण त्यामार्फत जाहिरातींचें काम, निरनिराळ्या ठिकाणच्या व्यापाऱ्यांची पत अजमावण्याचें काम, कोणत्या मालाचा व त्याच्या कोणत्या जातीचा खप कोठें कोठें होतो व कोठला माल कोठें सोयीस्कर पडेल ह्याबद्दलचा सल्ला देण्याचें काम इत्यादि होऊं शकेल. तरी ह्याबाबतींत त्याचें सहकार्य स्थानिक संघांनीं घेण्याचें ठरविलें पाहिजे. शिवाय अशा संघांनीं कोणत्या प्रकारचीं पिकें कोणत्या वर्षी केल्यास फायदेशीर होण्याचा संभव आहे व तीं केव्हां व कशीं बाजारांत विक्रीस ठेवावीं ह्या बाबतींत शेतकऱ्यांस माहिती पुरविली पाहिजे व त्यासाठीं सुधारलेलें बीं पुरविणें वगैरे कामें केलीं पाहिजेत. मालाची योग्य किंमत येण्यास जेथें मालाचा खप होतो तेथें तो माल योग्य स्थितींत जाऊन पोहोचविणें, वाहतुकीचीं योग्य साधनें व तीं वेळेवर पुरविलीं जाणें ह्याही गोष्टीकडे लक्ष पुरविलें पाहिजे. चालू सालीं बरेच वेळां रेलवेनें मधून मधून वहातुक बंद केली होती. त्याचा परिणाम गुळाचे भावावर कांहीं काळ तरी होत होता व व्यापारास मंदपणा येत होता. ह्या बाबतींत मला करितां आला तो प्रयत्न मीं थोडासा केला होता. पण ह्या बाबतींत प्रत्येक शेतकऱ्यास व्यक्तिशः आपली दाद लावून घेणें शक्य नाहीं. शेतकऱ्यांच्या सहकारी संघानें जर सरकारकडे अगर रेलवेकडे ह्या बाबतींत योग्य ती खटपट केली तर आज नाहीं उद्यां तरी त्याची योग्य दाद लागणें शक्य आहे. ह्यावरून अशा संघाची उपयुक्तता आपणांस पटेलच. आपला संघ १९३२ सालीं स्थापन झाला त्यावेळीं त्याच्या भागांचें भांडवल अदमासें २,५०० रुपये होतें व सभासद ५१ होते. आज तें भांडवल ६,००० रुपये असून ९४ सभासद आहेत व त्यांपैकीं ९ सहकारी संस्था आहेत. रिझर्व्ह फंड व इतर फंड मिळून ८,९०० रुपये आहेत. संघाचीं आज लहान मोठीं चार दुकानें आहेत. गेल्या वर्षी जवळ जवळ चार लक्षांचा माल विक्रीस आला होता. ह्यावरून आपल्या संघाची दिवसेंदिवस प्रगति होत आहे हें पाहून मला फारच आनंद व समाधान होत आहे. हा संघ निघण्यापूर्वी बँकेनें येथें सहकारी संस्थांचे जबाबदारीवर एक दुकान चालविलें होतें. तें दुकान स्वतंत्र संघ निघाल्यावर कांहीं काळ बंद ठेवण्यांत आलें व ह्या संघाची प्रगति पाहून तें कायमचें बंद करितां आलें ह्याबद्दल मी संघाचें अभिनंदन करतों."

### चालक वर्गावरील जबाबदारी

"क्वचित् ठिकाणीं कांहीं संघांचे बाबतींत संघांची पंच मंडळी, संघाच्या हिताकडे दुर्लक्ष करून, व्यवस्थेंत आपल्या अधिकाराच्या जोरावर नियमबाह्य ढवळाढवळ करितात. नियमाविरुद्ध सभासदांस कर्जें देतात, अगर नोकर वर्गास तशीं कर्जें देण्यास भाग पाडतात व अशा कारणानें संघाची प्रगति खुंटते असें माझ्या निदर्शनास आलें आहे. अशीच परिस्थिति आपले येथेंही सन १९३५ सालीं थोडी बहुत झाली होती हें आपल्या लक्षांत असेलच. म्हणून या प्रवृत्तीस पूर्ण आळा बसविला पाहिजे अशी माझी आपणांस आग्रहाची विनंती आहे. तसेंच आपण ज्यांना माल विक्री करणार त्यांची पत पाहून योग्य ती मर्यादा ठरविणें फार महत्वाची बाब आहे. आपल्या संघाचा सध्याचा व्यवहार बराचसा समाधानकारक आहे हें नमूद करण्यास मला आनंद वाटत आहे. कोणत्याही सार्वजनिक संस्थेमध्यें चालक वर्ग ज्या प्रमाणांत जबाबदार रीतीनें व विश्वस्त नात्यानें जसा वागेल त्यावरच तिची भरभराट अवलंबून आहे हें मी सांगण्याची अवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं. आपल्या वाढत्या व्यवहाराचा विचार करतां व मीं आपणांस केलेल्या सूचनांचा हळु हळु कां होईना अंमल करावयाचें ठरविल्यास हल्लींचें आपलें भांडवल वाढविणें जरूर आहे व त्याचप्रमाणें सभासदांची संख्याही वाढविणें प्राप्त आहे. वसूल व्हावयाचें भांडवल ७,८०० रु. आपण लवकर वसूल केलें पाहिजे व सभासदांनीं तें दिलें पाहिजे. कारण स्वतःचें भांडवल जितकें जास्त जमेल तितकी कामाची वाढ होण्यास मदत होते. त्याचप्रमाणें प्रामाणिकपणें विक्रीसाठीं माल आणणाऱ्या गिऱ्हाईकास त्यांना आयत्यावेळीं लागणाऱ्या पैशाच्या पुरवठ्याची योजना केली पाहिजे. खरेदी विक्रीची सोय करण्यासाठी गोदामांची जरूरी भासते, नव्हे आवश्यकता असते. ह्याकरितां सहकारी खात्यानें थोड्या व्याजाच्या दरानें कांहीं प्रमाणांत कर्ज देण्याचें जाहीर केलें आहे. आपल्या संघानें अशा प्रकारचें गोदाम व ऑफिस बांधण्याकरितां जागेसाठी अर्ज मे. कलेक्टरसाहेबांकडे केला आहे त्यांत आपणांस यश येईल अशी मला आशा आहे. ऋणविमोचन कायदा अंमलांत आल्यानंतर, सहकारी पद्धतीनें मालविक्री करण्याची सोय जास्त प्रमाणांत करावी लागणार आहे. तशांत आपला हा भाग "कॅनाल" भाग असल्यामुळें ह्या पेठेवर विक्रीसाठी माल येणारच व संघाचें काम सदोदित चालू राहणारच. येथें अडतीची काय पद्धत आहे हें जरी मला ठाऊक नाहीं तरी पण मी एवढें सुचवितों कीं अडत, मालाचे वजनावर न घेतां मालाचे किंमतीवर घ्यावी. म्हणजे माल पिकविणाऱ्यास ज्याप्रमाणें किंमत मिळेल त्या प्रमाणांतच संघास अडत मिळेल.

"शेवटीं अगदीं थोडक्यांत समारोप करावयाचा म्हणजे सहकारी खरेदी विक्री संघ हा शेतकरी व गिऱ्हाईक ह्यांचेमधील खरा दुवा आहे. परंतु ह्या दुव्याचें अस्तित्व टिकवावयाचें असल्यास माझ्या मतानें ह्या संघानें माल विक्री करणारा शेतकरी ह्याचेकडून शक्य तितका कमी मेहनताना घेऊन व विक्रीचें काम कसोशीनें करून देऊन, माल खरेदीदारांसही कमी खर्चानें माल पुरविण्याची व्यवस्था केली पाहिजे. ह्या गोष्टी नीटपणें घडून येण्यास चालक वर्गामध्यें काम करण्याची कुवत व सचोटी अवश्य पाहिजे व संघाचे सभासद संघाशीं पूर्णपणें एकनिष्ठ असले पाहिजेत."

### हिंदुस्थानांतील युद्धप्रयत्नास अमेरिकेची पैशाची मदत

"अमेरिकेमध्यें तयार होणाऱ्या युद्धसाहित्यापैकीं निदान ५० टक्के, कदाचित ६० टक्केहि, उत्पादन ग्रेट ब्रिटनकडे पाठविण्यांत येत आहे. अमेरिकेंतील उत्पादन प्रत्यहीं वाढत आहे. अमेरिकन जनतेचा प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांस अधिकाधिक पाठिंबा मिळत आहे. शत्रुपक्षीयांस विजय मिळण्याची आशा नाहीं. स्वातंत्र्य व लहान राष्ट्रांचा स्वतंत्रपणें जगण्याचा हक्क ह्यासाठीं चालू असलेल्या प्रस्तुत युद्धाचा अंत समीप आलेला आहे. शत्रु आणखी नुकसान करूं शकला, तरी तो युद्ध जिंकणें शक्य नाहीं. अमेरिकेला आवश्यक असलेल्या कांहीं कच्च्या मालाच्या उत्पादनाच्या शक्याशक्यतेसंबंधीं मी चौकशी करीत आहे. कांहीं हिंदी मालाच्या उत्पादनास पैशाची मदत अमेरिका कशी करूं शकेल, ह्याचाहि विचार चालू आहे. कच्च्या मालाच्या पुरवठ्याचीं व उत्पादनाचीं कंत्राटें ह्या स्वरूपांत पैशाची मदत केली जाईल."—पूर्व आशियांत पाठविलेले, प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचे आर्थिक सल्लागार व फेडरल लोन एजन्सीचे प्रतिनिधि, डॉ. हेन्री ग्रेडी.

### सहकारी शिक्षणाची अमूल्य संधि

सहकारी चळवळीच्या प्रगतीच्या मार्गांत सहकारी तत्त्वांचें व कार्यपद्धतीचें अज्ञान हा एक अत्यंत मोठा अडथळा आहे. ही अडचण दूर करण्याकरितां सरकारनें प्रत्येक जिल्ह्यांत एज्युकेशनल सुपरवायझर्स नेमून सर्वांना सोइस्कर अशीं जिल्ह्यांतील गांवें शिक्षण केंद्रें म्हणून ठरविलीं आहेत. त्या ठिकाणीं एज्युकेशनल सुपरवायझर्स हे आजूबाजूच्या गांवांतील सोसायट्यांचे पंच व इतर सभासद ह्यांना सहकारी तत्त्वें व व्यवहार समजावून सांगतील. सहकारी शिक्षणाची आवड असणाऱ्या कोणासहि ह्या वर्गास हजर रहाण्याची मोकळीक आहे. हे वर्ग प्रत्येक केंद्रांत तीन ते पांच दिवस चालतील. शिक्षण मोफत देण्यांत येईल. तेथील आजूबाजूच्या सहकारी संस्थांस व स्थानिक सु. यू. च्या सुपरवायझरांस कार्यक्रम कळविण्यांत येतील. ठाणें जिल्ह्यांतील भिवंडी तालुक्यामधील एका गांवीं २२-९-४१ ते २५-९-४१ व २७-९-४१ ते ३०-९-४१ असे दोन वर्ग भरविण्यांत आले व त्याचा फायदा अनुक्रमें नऊ व आठ सोसायट्यांच्या प्रतिनिधींना मिळाला.

---

### सहकारी गणेशोत्सव, बारामती

वरील सहकारी गणेश उत्सवाच्या तिसऱ्या वर्षाच्या दहा दिवसांत अनेक कार्यक्रम करण्यांत आले. डॉ. बा. शि. मुंजे, श्री. ज. स. करंदीकर, श्री. करोडे ह्यांचीं व्याख्यानें, श्री. अंबिके व श्री. ठाकूर ह्यांचीं प्रवचनें. ह. भ. प. कराडकर व सौ. शांताबाई गोखले ह्यांचीं कीर्तनें, ह्या खेरीज पोवाडे, गायन, भजन, करमणूक इत्यादि कार्यक्रम उत्साहानें पार पडले. कार्यक्रम सर्वांस खुले होते. शेवटच्या दिवशीं उत्सवाचे सेक्रेटरी श्री. मं. गो. दळवी, ह्यांनीं उत्सवास मदत करणारांचे मनःपूर्वक आभार मानले.

---

### मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि.

वरील बँकेकडील चालू ठेवींत प्रामुख्यानें सुमारें २० लक्ष रुपयांची भर पडून एकूण ठेवींचा आंकडा २ कोटि, ५ लक्ष रुपये झाला. ३१ मार्च, १९१३ रोजीं बँकेनें काढलेलीं 'ए' सिरीजचीं ५ लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स परत फेडण्यास पुरेशी रकम सिंकिंग फंडांत जमली असल्यामुळें, रकम परत करण्यांत येत आहे. ठेवींची रकम वाढली, तरी कर्जें कमी प्रमाणांत दिलीं गेलीं. त्याचा परिणाम बँकेच्या नफ्यावर झाला. मागील वर्षाचा शिलकी नफा (१८, ६०२ रु.) धरून चालू वर्षी ६५, १४३ रुपये नफा झाला. भागीदारांस ३% डिव्हिडंड देण्याचें ठरलें, त्यास ३८, ९९५ रुपये लागतील. १०,०४२ रुपये पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढण्यांत येतील.

---

### वरंगळ सें. को. बँन्क

वरील बँकेची स्थापना २४ वर्षांपूर्वी झाली, त्यावेळीं तिचे पटावर ९५ सभासद होते; व तिचें खेळतें भांडवल १ लक्ष रुपये होतें. तिचें स्वतःचें भांडवल १०½ हजारांचें होतें. आतां तिच्या सभासदांची संख्या २०० झाली असून तिचें खेळतें भांडवल २½ लाखांवर गेलें आहे. स्वतःचें भांडवलहि १ लक्ष, २२ हजार रुपये झालें आहे. बँकेनें गेल्या वर्षी सोसायट्यांना १७½ हजारांची कर्जें दिलीं. येणें कर्ज १ लक्ष, ५२ हजार रुपये आहे. बँकेचा रिझर्व्ह फंड ७५½ हजार रुपये झाला आहे. गेल्या वर्षी बँकेस ४,१२१ रुपये नफा झाला. बँकेच्या स्थापनेपासून आतांपर्यंत तिनें २८¾ लक्ष रुपयांचा व्यवहार केलेला आहे.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्केअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**हेड ऑफिस : पुणें शहर.**

**स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.**

**मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,०२,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,९४,०३५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३२,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १११—५ |
| ४% १९४३ | १०४—० |
| ३½% बिनमुदत | ९६—२ |
| ३½% १९४७–५० | १०३—२ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ | ९७—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११६—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२७—१२ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४६—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% | ४८–१० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १६१०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०९—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% | १४७—० |
| कराची ( १०० ) ९% | २०६—१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १८०२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १७९०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% | ९३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८७३-१२-० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६६२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २३०—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ५०—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. | २५—८ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ५१–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४४७५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) ७½% रु. | १५२—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३८६—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु.१० आ.७ पै | २०४०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १४९—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२—५—६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६२–१५–३ |


**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.

२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.

३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

४ सहकार : किं. २ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.

२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

**पुण्यांत आल्यावर**

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

अवर होम,

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें

संग्रह करा

कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट

पाचकवटी, पंचकोलासव

तसेंच

पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी

—: रक्तवर्धक :—

सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें

आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोषाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हरं इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.



मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.

१२१ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ, हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अतीस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
येथे मिळेल
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ८ आक्टोबर, १९४१ अंक ४१

अर्थ ग्रन्थमाला—पुस्तक ४ थें

## सहकार

### ( हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

★

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.
The Only Book Depot of its Kind in India.

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### गव्हावरील जकात कमी केली

गव्हावरील आयात जकात दर हंड्रेडवेटास १ रु. ८ आ. होती ती दर हंड्रेडवेटास २ आणे केली असल्याचें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे. मध्य आशियांतील फौजांस गहूं पाठवावा लागल्यामुळें हिंदुस्थानांतील गव्हाचा साठा पूर्वीइतका भरगच्च राहणार नाहीं. ह्यासाठीं गव्हाच्या आयातीस उत्तेजन देणें आवश्यक झालें आहे. जकातीचा दर पुनः वाढविण्याचा सरकारास अधिकार आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई बॅन्कर्स क्लिअरिंग हाउसमध्यें २६ सप्टेंबर अखेर संपलेल्या आठवड्यांत १८ कोटि, ७३ लक्ष रुपये किंमतीच्या १,२३,९५० चेक्सची देवघेव झाली.

### रशियाला अमेरिकेंतून अन्न-पुरवठा

जर्मनीनें युक्राइनचा भाग व्यापल्यामुळें अमेरिकेस रशियाला अन्नपुरवठा करावा लागेल असें अमेरिकेंतील तज्ञ म्हणूं लागले आहेत.

### गव्हर्मेंट टेलिफोन बोर्ड लि.

बॉंबे, बेंगॉल व मद्रास ह्या तीन टेलिफोन कंपन्या घेण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें गव्हर्मेंट टेलिफोन बोर्ड लि. ची स्थापना केली. गव्हर्नर जनरल इन कौन्सिल व कांहीं सरकारी अधिकारी अधिकारपरत्वें त्याचे भागीदार आहेत. टेलिफोन बोर्डाला ह्या कंपन्या घेण्यासाठीं ४ कोटि, ५६ लक्ष रुपयांचें भांडवल गुंतवावें लागेल व त्यावर ११% व्याज सुटेल, अशी अपेक्षा आहे. १९४३ अखेर सध्याच्या कंपन्याच कारभार चालवितील. बॉंबे व बेंगॉल कंपन्यांच्या ७५% भाग धारण करणारांनीं आपले भाग टेलिफोन बोर्डाला विकण्यास संमति दर्शविली आहे. मद्रास कंपनीच्या भागीदारांपैकीं २५% पेक्षां अधिक भाग धारण करणारे अद्याप संमति देत नाहींत. परंतु ती लवकरच मिळेल अशी अपेक्षा आहे.

### नवीन बँक

मुंबईमध्यें २ कोटि अधिकृत भांडवलाची एक नवीन बँक लवकरच निघणार आहे. तिचा मुख्य हेतु हिंदी संस्थानांची आर्थिक प्रगति घडवून आणणें हा आहे. मध्य व पश्चिम हिंदुस्थानांतील कित्येक संस्थानिकांनीं बँकेस मदत करण्याचें आश्वासन दिलें आहे. खर्चासाठीं देणग्या, बँकेकडे संस्थानांच्या तिजोरीचें काम देणें, बँकेचे भाग घेणें, तिच्याकडे दीर्घ मुदतीच्या ठेवी ठेवणें, इत्यादि मार्गांनीं संस्थानिक बँकेस मदत करणार आहेत. मुंबईमधील कांहीं प्रमुख व्यापारी डायरेक्टर होणार आहेत. संस्थानांचे प्रतिनिधीहि डायरेक्टर बोर्डावर येतील.

### जपान्यांचें स्वदेशी गमन

कलकत्ता शहरांतील २१० जपान्यांपैकीं ७० जपानी २६ ऑक्टोबर रोजीं मुंबईस जाण्यास निघतील, तेथें त्यांस इतर ठिकाणांहून २०० जपानी येऊन मिळतील व ते १ नोव्हेंबर रोजीं जपानला जाण्याकरितां मुंबई बंदरांतून निघतील. त्यांस नेण्याकरितां जपानी सरकारनें पाठविलेली आगबोट ६ ऑक्टोबर रोजीं मुंबईस दाखल झाली.

### ५० पौंडांची देणगी

लॉर्ड बीव्हरब्रुक, ग्रेटब्रिटनचे सप्लाय खात्याचे मंत्रि, ह्यांचे नांवानें एक पाकिट पोस्टमननें आणून दिलें. त्यांत ५० पौन्डाची एक चलनी नोट होती, व त्यास जोडून एक चिठ्ठी होती, तिचेवर "हिटलरला मारण्याकरितां कोणतेंहि शस्त्र योजण्यासाठीं" असा मजकूर लिहिलेला होता. रकम पाठविणारानें आपलें नांव लिहिलें नव्हतें. रणगाड्यांच्या खरेदीकडे ह्या रकमेचा विनियोग करण्यांत येईल.

### इंडियन ओव्हरसीज बँक लि., मद्रास

वरील बँकेनें मुंबई येथें आपली एक शाखा उघडली आहे. ह्या बँकेच्या रंगून, सिंगापूर, पेनंग इत्यादि ठिकाणीं चार शाखा असून हिंदुस्तानांतहि दहा शाखा आहेत. इंडियन ओव्हिरसीज बँक ही शेड्यूल्ड बँक असून तिचें भरणा झालेलें भांडवल १२½ लक्ष रुपयांचे वर आहे. एकूण ठेवी सुमारें १½ कोटि रुपयांच्या आहेत.

### व्यापारी वाटाघाटी

जर्मनी व तुर्कस्तान ह्यांचेमध्यें व्यापारी वाटाघाटी चालू आहेत, त्यांत तुर्कस्तान जर्मनीस क्रोम विकण्यास तयार नाहीं असें सांगण्यांत आलें आहे, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे.

### पॅरिसमधील ज्यू लोकांवर सक्ति

पॅरिसमधील विभागांतील ज्यू लोकांनीं आपलीं नांवें पोलिसकडे नोंदविलीं पाहिजेत, अशी त्यांचेवर सक्ति करण्यांत आली आहे.

### रणगाड्यांचें उत्पादन

अमेरिकेंत रणगाड्यांचें उत्पादन वाढविण्यांत येत आहे. दरमहा ३ हजार रणगाडे तयार करण्याची योजना आहे, ती पूर्णपणें अंमलांत येण्यास १९४२ चा मध्य येईल.

### १९४० मधील जन्म-मृत्यु

१९४० सालीं इंग्लंड व वेल्समध्यें एकूण ४,६८,२६७ विवाह झाले. इतके विवाह आतांपर्यंत कोणत्याच वर्षी झाले. नव्हते. १९३९ सालांतील विवाहांची संख्या ४,३९,६९४ भरली होती. १९४० सालीं मृत्यूंची संख्या १९३९ मधील संख्येपेक्षा ७३,९१४ नें अधिक म्हणजे ५,७२,८८२ भरली.

### स्टॅच्यू ऑफ लिबर्टी

न्यू यॉर्क बंदराचे तोंडाशी स्वातंत्र्यदेवीचा पुतळा आहे. तो फ्रान्सनें अमेरिकेला १८८६ सालीं अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिनाचे शतसांवत्सरिक उत्सवाचे निमित्तानें बक्षीस म्हणून दिलेला आहे.

### म्हैसूर गव्हर्मेंट सोप फॅक्टरी

वरील कारखाना एका लिमिटेड कंपनीचे ताब्यांत देण्याविषयीं वाटाघाटी चालल्या होत्या. कारखाना पहिल्यापासून किफायतशीर चालला असल्यानें,नफ्याचा फायदा कांहीं भागीदारांसच न मिळतां सामान्य जनतेस तो मिळावा, ह्या दृष्टीनें वरील योजना तूर्त तहकूब झाली आहे. म्हैसूर सरकारास द्यावयाच्या गुडविलचाहि प्रश्न उपस्थित झाला होता.

### हिंदुस्थान को. इं. सोसायटी, लि.

वरील विमा कंपनीनें १९४० सालीं २ कोटि, ८२ लक्ष,८७ हजार रुपयांच्या १५,९२९ पॉलिसी दिल्या. ह्यांवरील वार्षिक हप्त्याची रकम १३ लक्ष, ९० हजार रुपये भरते. १९४० अखेर कंपनीकडे १८ कोटि, १६½ लक्ष रुपयांचे १,०५,५६८ विमे चालू आहेत.

### पॉवर अल्कोहोल

हैद्राबाद संस्थानांत दरसाल ५½ लक्ष गॅलन पॉवर आल्कोहोलचें उत्पादन होऊं शकतें. त्या संस्थानांतील पेट्रोलची वार्षिक आयात २५ लक्ष गॅलन्सची आहे. पॉवर अल्कोहोलमुळें संस्थानास दरसाल १ लक्ष रुपये फायदा होईल.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४८२ |
| २ मि. चर्चिल ह्यांचा युद्धाचा आढावा ... | ४८३ |
| ३ मुं. प्रां. को. बँक ... | ४८४ |
| ४ मुंबई प्रांतांत रेशमाची पैदास ... | ४८४ |
| ५ स्फुट विचार ... इंग्लंडचा वाढता युद्धखर्च— बाजारभावाचें नियंत्रण— दिल्ली येथें परिषद्— बँक ऑफ इंग्लंडच्या नोटा— हिटलरचें ठराविक साच्याचें भाषण—रशियांत घनघोर संग्राम. | ४८५ |
| ६ जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि ... | ४८७ |
| ७ बंगाल टाइम ... | ४८७ |
| ८ सहकारी संस्थांचे अहवाल ... | ४८८ |
| ९ निवडक बाजारभाव... | ४८९ |



# अर्थ

बुधवार, ता. ८ आक्टोबर, १९४१


## मि. चर्चिल ह्यांचा युद्धाचा आढावा

युद्धाच्या घडामोडींसंबंधानें पार्लमेंटमध्यें जबाबदार ब्रिटिश मुत्सद्यांनीं विवेचनात्मक भाषणें करणें हें अदूरदर्शीपणाचें लक्षण होय ही गोष्ट मि. चर्चिल ह्यांनीं अनेकवार स्पष्ट करून सांगितली आहे. तथापि वृत्तपत्रांमध्यें युद्ध-धोरणावर टीका येत रहाते आणि सरकारनें काय करावें व करूं नये ह्याविषयीं सूचना करण्यांत येतात. ह्यासंबंधानें आपल्या शंका दूर व्हाव्या आणि आपणांस विश्वसनीय माहिती मिळावी अशी ब्रिटिश जनतेची स्वाभाविक इच्छा असते. ही अपेक्षा व लोकांची सर्वसाधारण जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं मि. चर्चिल कॉमन्स सभेंत मधून मधून युद्ध-परिस्थितीचा आढावा घेत असतात. ह्या परिपाठास अनुसरून त्यांनीं गेल्या आठवड्यांत भाषण करून युद्धाबाबतच्या कित्येक प्रश्नांवर प्रकाश पाडला. हें त्यांचें विवेचन पहिल्या प्रतीचें अधिकारयुक्त असल्यानें त्याचा येथें थोडक्यांत परामर्श घेणें आवश्यक आहे. हिटलरनें अलीकडे मूकवृत्तीचा अंगीकार केला आहे तिचें रहस्य प्रथम समजावून सांगून त्यानें एकाकाळीं स्वतःच्या धोरणाचें आविष्करण केलें होतें तें प्रत्यक्ष कृतीमध्यें कसें फोल ठरलें आहे, ह्याचीं त्यांनीं उदाहरणें दिलीं. गेल्या तीन महिन्यांत शत्रूच्या हल्ल्यांपासून व्यापारी जहाजांचें संरक्षण करण्यांत ब्रिटिश आरमारास व विमानदलास कसें वाढतें यश आलें असून जर्मनीचीं स्वतःचींच जहाजें विस्तृत प्रमाणांत कशीं बुडवण्यांत आलीं आहेत ह्याचाहि उल्लेख त्यांनीं केला. ह्याचा उत्कृष्ट पुरावा म्हणून अन्नसामुग्रीच्या पुरवठ्याची व्यवस्था इंग्लंडमध्यें अलीकडे अधिक समाधानकारक झाली असल्याचें मि. चर्चिल ह्यांनीं सांगितलें आणि येत्या नाताळांत सण आनंदानें साजरा करण्याची संधि लोकांस मिळेल असें आश्वासन दिलें. मागील वर्षी इंग्लंडला एकट्यास जर्मनीशीं लढावें लागत होतें. सध्या रशिया समरांगणांत आल्यानें व अमेरिकेचें सहाय वाढत असल्यानें इंग्लंडची बाजू अधिक बळकट झाली आहे असें ते म्हणाले.

जर्मनी रशियन मोहिमेंत गळ्यापर्यंत बुडला असतां इंग्लंडनें त्याच्या मुलुखावर स्वारी करून रशियानें चालवलेल्या निकराच्या स्वसंरक्षणाचा फायदा घ्यावा अशा अर्थाच्या सूचना करण्यांत येत आहेत. त्यांस उत्तर देऊन शत्रूस इंग्लंडचें युद्ध-धोरण कळण्याचें साधन पुरवण्याचें मि. चर्चिल ह्यांनीं नाकारलें. हिटलर आतां कोणत्या बाजूकडे आपला मोर्चा वळवणार आहे हें तरी कोणास ठाऊक आहे? जर्मन सैन्य रशियामध्यें आणखी आंत जाणार का झालेलें नुकसान पुरें आहे असें म्हणून जिंकलेल्या प्रदेशांत संरक्षणाची भूमिका स्वीकारून तूर्त स्वस्थ बसणार ह्याचा अंदाज करणें कठिण आहे. हिटलरला अनेक मार्ग मोकळे आहेत. रशियन रणांगणांतून मोकळीं झालेलीं सैन्यें त्यास इजिप्तमध्यें नेतां येतील किंवा स्पेन-मधून उत्तर आफ्रिकेंत युद्ध मांडतां येईल किंवा आपली शक्ति पश्चिम रणांगणावर एकवटून इंग्लंडच्या स्वारीची तयारी त्यास करतां येईल. जर्मनीस लढाऊ विमानांचा तुटवडा पडणार आहे, पण इतर बाबतींत युरोपमध्यें त्याचें बळ अबाधित आहे ही वस्तुस्थिति मि. चर्चिल ह्यांनीं प्रांजलपणानें कबूल केली. जर्मनी किंवा रशिया ह्यांचे मानानें ब्रिटिश फौज लहान असली तरी ती उत्कृष्ट रीतीनें तयार केलेली असून हिटलरनें इंग्लंडच्या स्वारीचें धाडस केल्यास तो प्रयत्न हाणून पाडण्याचें सामर्थ्य तीमध्यें आहे असा विश्वास त्यांनीं प्रकट केला.

ब्रिटिश युद्ध-धोरणाचें दिग्दर्शन करणेंहि धोक्याचें असल्यानें त्याविषयीं विशेष विवेचन न करतां रशियास युद्धसामुग्री पुरवण्याचे जोराचे प्रयत्न कसे चालले आहेत ह्याचें मुख्य प्रधानांनीं वर्णन केलें. रशियास मदत देणें म्हणजे स्वतःच्या कार्यास मदत करणें आहे ह्या भावनेनें इंग्लंडनें आपल्या दोस्तास लढाऊ सामान पोंहोचवलें पाहिजे असें ते म्हणाले. ब्रिटिश मंत्रि-मंडळांत धडाडी नाहीं आणि त्याचें युद्धकार्य जोरकस नाहीं असें म्हणणाऱ्या टीकाकारांची त्यांनीं योग्य रीतीनें संभावना केली. इराणमध्यें रशियाच्या सहायानें इंग्लंडनें जर्मनीच्या कारवाया बंद पाडल्या आणि त्या देशाची दोस्ती संपादन केली हें ब्रिटिश सरकारचें यशस्वी कृत्य स्तुत्य झालें असल्याचें समर्थनहि त्यांनीं केलें. ह्याप्रमाणें एकंदरीनें पहातां युद्धपरिस्थिति पूर्वीच्या मानानें बरीच अनुकूल आहे तरी तिच्यासंबंधानें भलताच आशावाद आपण करूं शकत नाहीं असें मि. चर्चिल ह्यांनीं आपल्या श्रोत्यांस बजावलें. स्वतःच्या नेहमींच्या सावधगिरीच्या धोरणास अनुसरून त्यांनीं यंदाच्या हिंवाळ्यानंतर पूर्वेच्या बाजूस जोराच्या लढाया शत्रु करण्याचा संभव असून इंग्लंडवरील स्वारीची त्याची कल्पना नाहींशी झाली आहे असें नाहीं असेंहि ध्वनित केलें आणि पुढच्या वर्षांत होणाऱ्या घडामोडींस तोंड देण्याची जय्यत तयारी ब्रिटिश राष्ट्रानें ठेवणें अगत्याचें आहे असें अखेर सांगितलें. रशियन मोहिमेंत जर्मनीचें अतोनात नुकसान झालें असून हिटलरला पूर्वेकडे चाल करीत रहाणें किंवा जिंकलेल्या देशांत शांतता राखून युद्धाचें नवीन क्षेत्र निर्माण करणें हिटलरला शक्य नाहीं, ह्या समजुतीनें ब्रिटिश जनता व अमेरिका ह्यांचे युद्धप्रयत्न शिथिल होऊं नयेत अशा रीतीनें लोकांची मनोभूमिका तयार करणें हा मि. चर्चिल ह्यांच्या भाषणाचा मुख्य उद्देश होता. त्या भाषणांत सावधगिरी, करारीपणा व आशावाद ह्यांचें योग्य मिश्रण असल्याचें दिसून येतें. आपलें धोरण व डावपेंच ह्यांचें विवेचन व समर्थन करण्याची हुकूमशहा हिटलर ह्यावर जबाबदारी नाहीं. पण ब्रिटिश मुख्य प्रधानाची परिस्थिति त्याच्या उलट आहे. त्यास पार्लमेंटच्या संमतीनें व त्याचा विश्वास संपादन करून कारभार हाकावा लागतो. ब्रिटिशांच्या डावपेंचांचा सुगावा हिटलरला लागूं नये अशा बेतानें मि. चर्चिल ह्यांनीं भाषण केलें आहे त्याचें रहस्य ध्यानांत घेणें आवश्यक आहे. त्यांतील मुख्य मुद्यांचें दिग्दर्शन वर केलें आहे त्यावरून युद्ध परिस्थिति इंग्लंडला अनुकूल होत चालली असून जर्मनीच्या अडचणी वाढत आहेत ह्या विषयींची खात्री पटते. परंतु त्याबरोबरच रशियास युद्ध-सहाय देऊन शस्त्रास्त्रांचा पुरवठा वाढवणें हें महत्त्वाचें कार्य इंग्लंडला करावयाचें आहे ह्या विषयींचा निश्चय दृढ होण्याचें महत्त्व प्रतीत होतें.

## मुंबई प्रां. कोऑपरेटिव्ह बँक

### अध्यक्ष श्री. सरया ह्यांचें भाषण

मुंबई प्रांतिक को-ऑपरेटिव्ह बँकेची वार्षिक सभा गेल्या शनिवारीं तिचे अध्यक्ष, श्री. सरया, ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. त्या प्रसंगीं बँकेची सांपत्तिक परिस्थिति, तिच्या संबंधांत संचालकांनीं अंगिकारलेलें धोरण व पुढची व्यवस्था इत्यादि महत्वाच्या विषयांचें त्यांनीं आपल्या भाषणांत विवेचन केलें. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळें शेतीच्या मालाचे बाजार-भाव अनुकूल झालेले नसून त्यांचे संबंधांत उत्पादक वर्गाच्या हिताच्या दृष्टीनें योग्य धोरण आखलें पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. सरकारी रोख्यांच्या किंमतींचें सिंहावलोकन करून बँकेपाशीं असलेल्या रोख्यांचे संबंधांत काय तरतूद करण्यांत आली आहे तिचें त्यांनीं दिग्दर्शन केलें. कोठलाहि प्रसंग आला तरी त्यास तोंड देतां यावें म्हणून बँकेनें आपल्या पैशाचा मोठा भाग तरता ठेवला आहे; त्याचा परिणाम बँकेस कमी नफा होण्यांत झालेला आहे. मंद व्यवहारांच्या सोसायट्यांमध्यें अडकून पडलेला पैसा मोकळा करण्यासाठी व्याजाच्या भरपूर सवलती देण्यांत आल्या आहेत आणि थकलेलीं कर्जें वसूल करण्याची विशेष खटपट चाललेली आहे. बंद व्यवहारांच्या सोसायट्यांचा कारभार गुंडाळण्यांत वर्षानुवर्षें जातात, त्यावर उपाय म्हणून रजिस्ट्रारनीं बँकेसच अनेक सोसायट्यांचे लिक्विडेटर नेमलें आहे. थकलेलीं कर्जें लवकर वसूल होण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे.

संशयित कर्जासाठी रकमा बाजूस काढण्याच्या महत्वाच्या प्रश्नाचा उल्लेख करून त्या बाबतींत बँकेनें पुरेशी योजना अंमलांत आणली असल्याचे आंकडे देऊन श्री. सरया ह्यांनीं सांगितलें. शेतकरी कर्ज-निवारणाचा कायदा मुंबई सरकार कित्येक तालुक्यांत लागू करीत आहे. तेथें बँकेनें कर्जें दिलेलीं आहेत, त्यांचे विषयीं पैशाची कांहीं जबाबदारी तिच्यावर येऊन पडण्याचा संभव असल्यानें विशिष्ट बाबतींत सावधगिरी बाळगणें अगत्याचें आहे. ह्या संबंधांतल्या व्यवस्थेचा उल्लेख त्यांनीं केला. एका प्रश्नाचा त्यांनीं ह्या बाबीच्या अनुषंगानें निर्देष केला तो प्रश्न खेडेगांवीं लोकांच्या उन्नतीसाठी सर्वांगीण सुधारणा हातीं घेण्याच्या आवश्यकतेचा होय. शेतकऱ्यांचीं कर्जें कायद्यानें कमी केल्यानें इष्ट कार्यभाग व्हावयाचा नाहीं. ग्रामसुधारणा सरकारनें विस्तृत प्रमाणावर हातीं घेतली पाहिजे आणि त्या कार्यक्रमांत सहकारी बँकांचें नुकसान होईल त्याची भरपाई करण्याची तयारी सरकारनें ठेवली पाहिजे ह्या गोष्टीची आठवण त्यांनीं करून दिली. पांच लक्षांच्या बँकेनें काढलेल्या डिबेंचरांची मुदत संपल्यानें त्यांची फेड करून टाकली जात आहे. ह्या व्यवहाराची फोड करून, जमिन गहाणावर कर्जें देण्याचा उपक्रम अनेक वर्षांमागें बँकेनें केला, त्या व्यवहारांत आलेली तूट भरून काढण्याची जबाबदारी सरकारनें पुरी पाडली पाहिजे ह्यावर श्री. सरया यांनीं जोर दिला. सहकारी व्यवहारासाठी होणाऱ्या पैशाच्या हालचाली सरकारी तिजोऱ्यांमार्फत मोफत केल्या जात असत. ती सवलत आतां काढून घेण्यांत आली असून त्या बाबतींत रिझर्व्ह बँकेनें एक नवीन योजना अमलांत आणली आहे. तिच्या विषयीं प्रांतिक बँकेनें केलेल्या चर्चेचा उल्लेख करून रिझर्व्ह बँकेशीं प्रसंग पडल्यास तात्पुरत्या पैशाच्या मदतीची व्यवस्था झाली आहे तिचें स्वरूप त्यांनीं वर्णिलें. प्रांतिक बँकेचा नफा अलीकडे घटला आहे त्याचीं कारणें समजाऊन सांगून, त्या बाबतींतल्या परिस्थितीस ह्यापुढें कसें वळण लागण्याचा संभव आहे ह्याचें दिग्दर्शन श्री. सरया यांनीं असेरीस केलें. बँकेच्या नोकरवर्गाच्या कामाचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांस बोनस न देतां आल्याबद्दल त्यांनीं खेद प्रदर्शित करून आपलें भाषण संपवलें.

## मुंबई प्रांतांत रेशमाची पैदास

मुंबई प्रांतांत रेशमाच्या धंद्याची उन्नति कशी होईल याची पाहणी करण्याकरतां म्हैसूर संस्थानचे रेशमाच्या पैदाशीचे निपुण श्री. रामनाथ यांना मुंबई प्रांताच्या डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज यांनीं बोलावलें होतें, व मुंबई प्रांताच्या औद्योगिक खात्यातर्फे श्री. रामनाथ यांनीं पाहणी करून आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे. त्यांत ह्या धंद्यास या प्रांतांत पुष्कळ वाव असून १५ वर्षांत हा धंदा बराच भरभराटीस येईल असें आपलें मत दिलें आहे. १५ वर्षांचे शेवटीं या धंद्यावर सुमारें १० हजार कुटुंबांना काम मिळणार असून त्यांना दरवर्षी सुमारें ३ लक्ष रुपये म्हणजे कुटुंबास सालीना सुमारें ३० रु. मिळतील. मात्र या कुटुंबांना करावें लागणारें काम जोड धंद्याच्या स्वरूपाचें असून त्यांच्या वायां जाणाऱ्या वेळांत वरील उत्पन्न मिळणार आहे. या धंद्याच्या वाढीसाठी एक मध्यवर्ती फार्म बेळगांव येथें स्थापन करण्याची शिफारस त्यांनीं केली असून तेथून चांगल्या प्रतीच्या रेशमाच्या किड्यांच्या अंड्यांची तसेंच तुतीच्या उत्तम जातींची पैदास व रेशमी किड्यांच्या संवर्धनावर वगैरे प्रयोग करून त्याचा प्रसार व प्रचार करावा अशी या रिपोर्टांत शिफारस केली आहे. त्याचप्रमाणें या धंद्याच्या शिक्षणासाठी बेळगांव येथें विद्यार्थी घ्यावेत व त्यांना रेशमाच्या धंद्यासंबंधीं सर्व तऱ्हेचें शिक्षण द्यावें असें श्री. रामनाथ यांचें म्हणणें आहे. मुंबई इलाख्यांत रेशमाच्या किड्यांची जोपासना होण्यास नाशिक, पुणें, सातारा, अहमदनगर या जिल्ह्यांतील पश्चिम भाग, धारवाड व बेळगांव या जिल्ह्यांतील कांहीं भाग व ठाण्यानजीकचा कांहीं भाग हवामानाचे दृष्टीनें पोषक आहे. रेशमाच्या किड्यांना साधारणपणें ६५° ते ९५° फॅरनहीट इतकें उष्णतामान लागतें व तें ह्या जिल्ह्यांतून मिळण्यासारखें आहे. रेशमाची पैदास करण्यास मुख्यतः अनेक कसबी पण स्वस्त मजूर मिळावे लागतात. ही परिस्थिति ज्या देशांतून आहे त्या देशांतच म्हणजे चीन, जपानमध्यें या धंद्यास महत्त्व प्राप्त झालें आहे व तेथें तो धंदा भरभराटीस आला आहे.

तुतीची लागवड एकाद्या लहानशा तुकड्यांत करून फावल्या वेळांत किड्यांकडे लक्ष देऊन त्यांची घरांतल्या घरांत जोपासना करणें शेतकऱ्यांच्या कुटुंबांना सोपें आहे. म्हैसूर प्रांतांत हा धंदा मोठ्या प्रमाणांत चालला असून शेतकऱ्यांचीं कुटुंबें त्यांतील कसब शिकत आहेत. मात्र किड्यांचे कोषाटे विक्रीसाठी तयार झाल्यावर, त्यांपासून रेशीम तयार करण्यासाठी ते कारखान्यांत पोचविण्याचें काम त्रासदायक होतां कामा नये. ह्याकरतां रेशमाच्या कारखान्यांची पद्धतशीरपणें निरनिराळ्या ठिकाणीं वाढ झाली पाहिजे. म्हैसूर संस्थानांत हा धंदा उन्नतीस येण्याचे कामीं सरकारी सहाय्याचाच मुख्यतः उपयोग झाला असून त्यामुळेंच त्याची पद्धतशीर वाढहि होत आहे. त्याचप्रमाणें मुंबई प्रांतांतहि सरकारनेंच या गोष्टींत लक्ष घातलें पाहिजे. असें झालें तर सुमारें १५ वर्षांनीं हा धंदा मुंबई प्रांतांत भरभराटीस येईल, असें श्री. रामनाथ यांनीं म्हटलें आहे.

( शेतकी व शेतकरी )

# स्फुट विचार

## इंग्लंडचा वाढता युद्धखर्च

शंभर कोटि पौन्ड उभारण्याची परवानगी कॉमन्स सभेकडून घेतांना ब्रिटिश सरकारचे फडनवीस सर किंग्सले वुड ह्यांनीं आपला दररोजचा खर्च सध्या १२० लक्ष पौन्डपर्यंत चढला असल्याची माहिती दिली. युद्धाचें क्षेत्र वृद्धिंगत होत असून त्याबाबतची इंग्लंडची आर्थिक जबाबदारी वाढत आहे ह्यामुळें ब्रिटिश सरकाराच्या खर्चांत वाढ होणें स्वाभाविक आहे. युद्धखर्चासाठी कॉमन्स सभेनें ह्यापूर्वीच २०० कोटि पौन्ड मंजूर केले आहेत. कांहीं आठवड्यांमागें १०० कोटि पौन्ड मंजूर झाले होते. ते बहुतेक खर्ची पडले असल्यानें आणखी १०० कोटींची आतां मागणी करण्यांत आली आहे. गेल्या महायुद्धांत अधिकांत अधिक खर्च झाला तेव्हां युद्धखर्च सरासरीनें दररोज ७० लक्ष पौन्ड होत होता आणि रोजचा एकूण सरकारी खर्च ८० लक्ष पौन्ड होता. सध्याची १०० कोटि पौन्डाची मंजुरी येत्या डिसेंबर अखेरपर्यंत पुरेल आणि त्यानंतर पुन्हां जरूर त्या रकमेविषयीं मंजुरी घ्यावी लागेल. युद्धाच्या पहिल्या दोन वर्षांत ब्रिटिश सरकाराचा ७०१ कोटि पौन्ड (सुमारें ९,३५० कोटि रुपये) इतका खर्च झालेला आहे. त्यांपैकीं ४० टक्के इतकी रक्कम करांच्या वगैरे साधनांनीं त्यास मिळाली आणि बाकीची ६० टक्के कर्जाच्या मार्गानें उभी करावी लागली आहे. व्यवहारांत खेळणारें चलन व व्याजाचे दर मर्यादेंत राखून आतांपर्यंत ब्रिटिश सरकारानें बाजारभावांचें नियमन केलें आहे. त्यांत लोकांनीं आपला खाजगी खर्च कमी करून व आपली बचत सरकारास कर्जानें देऊन सहकार्य केलें आहे. युद्धामध्यें शक्य तितक्या लवकर विजय मिळण्यासाठी जनतेनें स्वार्थत्यागपूर्वक स्वतःच्या खर्चांत बचत करून युद्धकार्यास सहाय देणें अगत्याचें आहे असें सर किंग्सले वुड कॉमन्स सभेंत म्हणाले. त्यांचें सांपत्तिक धोरण आतांपर्यंत यशस्वी झालें आहे. त्यास जनतेचा स्वार्थत्याग बहुतांशीं कारणीभूत आहे.

---

## बाजारभावांचें नियंत्रण—दिल्ली येथें परिषद

चालू महिन्याच्या १६ तारखेस हिंदुस्थान सरकार प्रांतिक सरकारांच्या व कांहीं संस्थानांच्या प्रतिनिधींची एक परिषद दिल्ली येथें भरवून सध्या कित्येक जिनसांच्या किंमती वाढल्या आहेत त्यांच्या नियंत्रणाच्या प्रश्नाची चर्चा घडवून आणणार आहे. ह्या संबंधांत मध्यवर्ती सरकारानें व्यापारी मंडळांस एक पत्र पाठवलें असून बाजारभावांच्या बाबतींत सोडवावयाच्या मुख्य प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधलें आहे आणि त्यांचे अभिप्राय मागवले आहेत. सरकाराचें म्हणणें असें आहे कीं कित्येक जिनसांच्या किरकोळ विक्रीच्या किंमतीवर प्रांतिक सरकारांनीं मर्यादा घातलेल्याच आहेत. पण अलीकडे कारखानदार व घाऊक व्यापारी आपल्या मालाचे भाव चढवीत असल्याच्या तक्रारी ऐकूं येत असल्यानें त्यांचा विचार होणें अगत्याचें झालें आहे. धान्यें, सूत व कापसाचें कापड ह्यांच्या किंमती विशेषें करून चढल्या आहेत आणि त्यांच्याविषयीं ओरड होत आहे. ह्या किंमतींचें नियमन कसें करावें हा प्रश्न सध्या अगत्याचा झाला आहे आणि बाजारभावांच्या एकंदर परिस्थितीची चर्चा होईल तीमध्यें त्यास अग्रस्थान देणें आवश्यक आहे. दिल्ली येथें भरणाऱ्या परिषदेंत प्रांतिक सरकार व प्रमुख संस्थानें ह्यांचे प्रतिनिधी एकत्र विचारविनिमय करतील. धान्यें व कापड ह्यांचें उत्पादन व विनिमय निरनिराळ्या परिस्थितींत देशांच्या निरनिराळ्या भागांत होतात आणि ह्या मालाच्या किंमतींचें योग्य नियंत्रण व्हावयाचें तें ह्या परिस्थितीस अनुलक्षूनच झालें पाहिजे, हें उघड आहे. धान्य पिकविणारे शेतकरी आणि कापड तयार करणारे कारखानदार ह्यांचें नुकसान न होतां गिऱ्हाइकांस निष्कारण महागाईच्या भावानें माल विकत घ्यावा लागूं नये ह्या दृष्टीनें बाजारभावांचें नियंत्रण व्हावें लागेल. दिल्लीच्या परिषदेंतील चर्चा व निर्णय ह्याच भूमिकेवरून होतील अशी आशा आहे.

---

## बँक ऑफ इंग्लंडच्या नोटा

हिंदुस्थानांत बँक ऑफ इंग्लंडच्या चलनी नोटा कोणाजवळ असतील तर त्यांनीं त्या डिसेंबरच्या ४ तारखेच्या आंत रिझर्व्ह बँकेच्या स्वाधीन करून त्याच्या मोबदल्यांत हिंदी चलन घेतलें पाहिजे असा हुकूम हिंदुस्थान सरकारनें काढला आहे. जर्मनीनें युरोपांत अनेक देश पादाक्रांत केले तेव्हां त्याच्या हातीं तेथील लूट लागली तीमध्यें बँक ऑफ इंग्लंडच्या चलनी नोटा आहेत ह्यांत शंका नाहीं. ह्या नोटांच्या मोबदल्यांत दुसऱ्या देशांचें चलन मिळाल्यावांचून शत्रूस त्यांचा कांहीं उपयोग नाहीं हें स्पष्ट आहे. ह्यास्तव जर्मनी व इटली ह्यांचे हस्तक नोटा ब्रिटिश मुलखांत विकून त्याचा मोबदला मिळवण्याची खटपट करीत आहेत ती हाणून पाडणें अगत्याचें आहे. सरळ आणि कायदेशीर व्यवहाराच्या ओघांत ज्या लोकांच्या हातीं बँक ऑफ इंग्लंडच्या ब्रिटिश नोटा आल्या असतील त्यांनीं त्या रिझर्व्ह बँकेकडून वटवून घेतल्या पाहिजेत. म्हणजे शत्रूच्या हस्तकांनीं लबाडीनें ह्या देशांत आणलेल्या नोटा उघडकीस येऊन त्यांचा त्या वटवण्याचा प्रयत्न निष्फळ होईल. हिंदुस्थानांत येऊन जाणारे प्रवासी आणि नोटा व चलन ह्यांच्या अदलाबदलीचा धंदा करणारे अधिकृत व्यापारी ह्यांस हा सरकारचा हुकूम लागू नाहीं. डिसेंबर ४ च्या नंतर बँक ऑफ इंग्लंडच्या नोटा इतरांच्या जवळ आल्यास त्या जप्त केल्या जातील, असें सरकारी हुकमांत प्रसिद्ध झालें आहे. प्रवाशांची गैरसोय होऊं नये पण शत्रूच्या हस्तकांस ब्रिटिश नोटांचा उपयोग लबाडीनें करतां येऊं नये हा त्या हुकुमाचा उद्देश आहे.

---

## हिटलरचें ठराविक साच्याचें भाषण

हिवाळा जवळ येत चालला असल्यानें सामान्य जर्मन जनतेस कोळसा व गरम कपडे ह्यांचे बाबतींत सहाय देण्यासाठी पैसा उभा करण्याच्या निमित्तानें हिटलरनें आपल्या लोकांस उद्देशून भाषण केलें, तें ठराविक साच्याचेंच होतें. आपणांस युद्ध नको होतें, पण तें नाइलाजानें पत्करावें लागलें हें रडगाणें त्यानें पुन्हां गायलें. रशिया जर्मनीवर हल्ला करण्याच्या तयारींत असल्यानें आपणांस त्याचेविरुद्ध युद्ध पुकारण्याची भयंकर जबाबदारी घ्यावी लागली असें रशियन मोहिमेचें त्यानें समर्थन केलें तेंहि शिळेंच आहे. प्रत्यक्ष जर्मनीमध्यें लोक युद्धास कंटाळले असून रशियांत जी भयंकर हानी जर्मन फौजांची चालली आहे तिच्याविरुद्ध तेथील जनतेंत असमाधान पसरलें आहे. लोकांचा धीर तुटत चालला आहे आणि ते आपल्या राज्यकर्त्यांच्या हानिकारक धोरणास विटले आहेत. ह्यांवर तोडगा म्हणून हिटलरनें आपल्या भाषणांत जर्मन फौजांनीं रशियांत मिळविलेल्या विजयाचें वर्णन तिखट-मीठ लावून केलें आहे. पंचवीस लक्ष रशियन शिपाई

कैद झाले, हजारों तोफा व विमानें शत्रूकडून काबीज केल्या, इत्यादि अतिशयोक्तिपूर्ण माहिती त्यानें दिली असून सध्या रशियांत चाललेल्या लढाईनें जर्मनीस मोठा फायदा होणार असल्याचें मधाचें बोटहि त्यानें लावलें आहे. सगळ्या युरोपची संपत्ती आपल्या ताब्यांत आली आहे अशी बढाईहि त्यानें मारली आहे. झेकोस्लोव्हेकिया, नॉर्वे, पोलंड, फ्रान्स इत्यादि पादाक्रांत झालेल्या देशांत दडपशाहीनें स्थानिक असंतोष दडपून टाकण्यांत येत आहे ही गोष्ट त्यानें झाकून ठेवली तरी ती जर्मनीच्या परिस्थितीची खरी द्योतक आहे हें जग ओळखून आहे. हिटलर स्वतःच्या लोकांची तरी दिशाभूल किती दिवस करणार?

## रशियांतील घनघोर संग्राम

प्रस्तुत युद्धासंबंधांत आपल्या लोकांचा विश्वास तुटत चालला आहे हें पाहून त्यास धीर देण्याच्या हेतूनें हिटलरनें केलेल्या भाषणांत जर्मन सैन्यांनीं रशियाची लष्करी शक्ती जवळजवळ नाहींशी केली असल्याचें ध्वनित केलें आणि आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ कांहीं आकडे पुढें मांडले. जर्मनीनें अधिकारी रीतीनें प्रसिद्ध केलेली माहिती नेहमी वस्तुस्थितीस धरून शंभर टक्के सत्य असते अशी बढाई मारून तो म्हणाला कीं, आतांपर्यंत २५ लक्ष रशियन शिपाई कैद झाले आहेत, आणि २० हजार रशियन तोफा व १८ हजार रशियन चिलखती गाड्या नष्ट केल्या गेल्या आहेत. फिन्स, इटालिअन्स, रुमानिअन्स, हंगेरिअन्स इत्यादि आपल्या दोस्तांच्या सहायाचाहि त्यानें आभारपूर्वक उल्लेख केला. हें सर्व सांगण्याचा हेतु एकच होता आणि तो वर म्हटल्याप्रमाणें, जर्मनींतील लोकांस धीर देणें हाच होय. हिटलरच्या वल्गनांच्या उलट रशियाच्या सरकारी प्रसिद्धी खात्यामार्फत आकडे जाहीर झाले आहेत, ते पाहिले असतां रशियन मोहिमेंत जर्मनीची किती भयंकर हानि झाली आहे हें दिसून येतें. तसेंच रशियाच्या नुकसानीविषयींचे जर्मन प्रसिद्धी खात्याचे आकडे किती अतिशयोक्तिपूर्ण आहेत ह्याचीहि कल्पना येते. रशियन मोहीम चालू झाल्यापासून ३० लक्ष जर्मन मेले आहेत किंवा जाया झाले आहेत, आणि ११ हजार चिलखती गाड्या, १३ हजार तोफा व ९ हजार विमानें जर्मनीनें गमावलीं आहेत. मेलेले, जायबंदी झालेले व बेपत्ता मिळून सुमारें ११ लक्ष रशियन सैनिकांची बेरीज होते. सुमारें ९ हजार तोफा, ७ हजार चिलखती गाड्या व सवापांच हजार विमानें रशियाच्या बाजूनें नाश पावलीं आहेत. रशियांतल्या घनघोर संग्रामाची कल्पना येण्यास वरील आकडे पुरे होतील.

## इनकमटॅक्स संबंधीं एक निवाडा

मि. पेस्तनजी ई. पोलसन, पोलसन मॅन्युफॅक्चरिंग कंपनीचे मालक, ह्यांचा कॉफी, लोणी, मैदा, केसीन, इत्यादींचा धंदा होता. १९३९–४० सालीं त्यांस १९३८ मधील १,००,९८५ रुपयांच्या प्राप्तीवर कराची आकारणी करण्यांत आली. १ जानेवारी, १९३९ रोजीं मि. पोलसन ह्यांचा धंदा मेसर्स पोलसन लि. ह्या कंपनीनें घेतला. तेव्हां, मि. पोलसन ह्यांनीं इनकमटॅक्स ॲक्टाच्या २५ (३) ह्या कलमाचा आपणांस फायदा मिळावा, अशी मागणी केली, ती कमिशनर ऑफ इनकमटॅक्सनें अमान्य केली. परंतु हायकोर्टानें मि. पोलसन ह्यांचें म्हणणें मान्य केलें. एकाच धंद्यास त्याच उत्पन्नावर दोनदां कर भरावा लागूं नये, ह्या नियमाचा त्यांस फायदा मिळाला.


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,०२,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,०१,०२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३२,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि, भिवंडी

वरील कंपनीस ३० जून, १९४१ असेर संपलेल्या दुसऱ्या वर्षी १८,७५१ रुपये निवळ नफा झाला. १२,१८७ रुपयांचा घसारा काढल्यावर आणि नोकरवर्गासाठीं १ हजार रुपयांच्या बोनसची तरतूद केल्यावर हा नफा उरत आहे. त्या पूर्वीच्या वर्षीच्या निवळ नफ्याची रक्कम १२,४४० रुपये होती. म्हणजे गेल्या वर्षी नफा दीडपट झाला आहे. मागील ताळेबंदांतील शिलकी नफा १,३७३ रुपये व गेल्या वर्षीचा नफा १८,७५१रुपये मिळून नफावांटणीसाठीं २०,१२४ रुपये रहातात, त्याचा विनियोग खालीलप्रमाणें सुचविण्यांत आला:—

| | | रुपये |
|---|---|---|
| प्राथमिक खर्च लिहून टाकण्यासाठी | | ३,४८२ |
| गुडविल लिहून टाकण्यासाठी | | १,००० |
| इनकमटॅक्स व सुपरटॅक्ससाठी | | २,२१६ |
| डिव्हिडंडसाठी | रु. | |
| क्यु. प्रेफरन्स भागांवर ५% | २,६२० | |
| ऑर्डिनरी भागांवर ५% | ७,५४५ | |
| | १०,१६५ | १०,१६५ |
| पुढील वर्षांत ओढण्यासाठी | | ३,२५८ |
| | | २०,१२४ |

डिव्हिडंडमधून प्राप्तीवरील कर काढून घेतला जाईल. कंपनीच्या पहिल्या वर्षीच्या नफ्यांतून भागीदारांस अनुक्रमें ५% व ४% डिव्हिडंड मिळालें होतें. कंपनीजवळील शिलकी मालास मूळें पडलेली अथवा बाजारभावानें होणारी ह्यापैकीं कमी भरेल ती रक्कम ताळेबंदांत धरण्यांत आलेली आहे. ती पद्धत अत्यंत पायाशुद्ध आहे. कंपनीनें अहवालाचे वर्षी १ लक्ष, १५ हजार रुपयांची तयार माशिनरी विकली. कंपनीनें मिळविलेलें यश अभिनंनीय आहे, व त्याबद्दल मेसर्स दांडेकर इंजिनिअर्स लि. ह्या मॅनेजिंग एजन्सी कंपनीचे एकमेव डायरेक्टर, श्री. गोपाळ गणेश दांडेकर, ह्यांचा उल्लेख केला पाहिजे. श्री. व्ही. पी. वर्दे, बी. कॉम. हे कंपनीच्या बोर्डाचे अध्यक्ष आहेत. कंपनीची वार्षिक सभा भिवंडी येथें ५ ऑक्टोबर रोजीं भरली होती.

## बंगाल टाइम

कलकत्ता शहरांतील घड्याळांचे काटे १ ऑक्टोबर रोजीं ३६ मिनिटें पुढें लावण्यांत आले. घड्याळें पुढें करण्याचा हेतु असा,कीं नवीन टाइमप्रमाणें कचेऱ्या सूर्यास्ताचे अगोदर निदान एक तास तरी अगोदर सुटाव्या व लोकांना काळोख पडण्यापूर्वी घरीं पोचतां यावें. स्टँडर्ड टाइमसुद्धा एक तास पुढें करण्यांत यावी अशी सूचना बंगाल सरकारनें हिंदुस्थान सरकारास केली आहे. ती अंमलांत आली व पुण्यांतील कचेऱ्या घड्याळाप्रमाणें त्याच वेळेस भरल्या व सुटल्या, तर लोकांना सूर्योदयानंतर सध्यांपेक्षां लवकर कचेरीस जावें लागेल व संध्याकाळीं त्यांस एक तास अधिक मिळेल. युद्ध चालू असेंपर्यंत तरी घड्याळें एक तास पुढें करावीं, असें बंगाल सरकारचें म्हणणें आहे. हिंदुस्थानांत १९०४ पूर्वी प्रत्येक प्रमुख शहरीं वेगवेगळी टाइम चालूं होती. तथापि, मद्रास टाइमप्रमाणें रेल्वे व तार खात्यांचा व्यवहार चालत असे. मद्रास टाइम ही ग्रीनविच टाइमच्या पुढें ५ तास, २१ मिनिटें होती. हिंदुस्थान सरकारनें पुढाकार घेऊन हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणच्या घड्याळांत एकसूत्रीपणा आणण्याची आवश्यकता सर्वांस पटवून दिली व इंडियन स्टँडर्ड टाइमची स्थापना केली त्यासाठीं मद्रास टाइमवर चालणारीं घड्याळें ८ मिनिटें व ५० सेकंद पुढें करावीं लागलीं. स्टँडर्ट टाइम कलकत्ता टाइमचे २४ मिनिटें व अलाहाबाद टाइमचे २ मिनिटें मागें आहे; तर मुंबई टाइम ३९ मिनिटें पुढें आहे. हिंदुस्थानांतील स्टँडर्ट टाइमप्रमाणें ब्रह्मदेशाकरितां बर्मा स्टँडर्ट टाइमचीहि योजना करण्यांत आली. स्टँडर्ट टाइमची लोकांवर सक्ती करण्यांत आली नाहीं. कलकत्ता येथील लोक अद्याप लोकल (स्थानिक) टाइमप्रमाणेंच व्यवहार करितात. रेडिओच्या कार्यक्रमाच्या वेळा छापतांना इंडियन लिसनरमध्यें "कलकत्ता टाइमसाठी २४ मिनिटें मिळवा" असें लिहिलेलें असतें, त्याचा अर्थ वरील माहितीवरून समजून येईल. मुंबई कार्पोरेशनचीं घड्याळें स्टँडर्ट टाइमपेक्षां ३९ मिनिटें मागें आहेत व म्युनिसिपॅलिटीचा कारभार ह्या लोकल टाइमप्रमाणें चालतो. तथापि, बाकी सर्व मुंबई स्टँडर्ट टाइम पाळते. १ जून १९०६ रोजीं इंडियन स्टँडर्ट टाइम हिंदुस्थानांत व बर्मा स्टँडर्ट टाइम ब्रह्मदेशांत अंमलांत आली.

### मोठ्या आगपेट्या

चाळीस ते पन्नास आगकाड्या मावतील अशा आकाराच्या आगपेट्यांचे उत्पादनास व विक्रीस हिंदुस्थान सरकार सवलत देणार आहे. प्रत्येक ग्रोसला २ रु.८ आ. सरकारची ड्यूटी बसेल. आगपेट्यांवरील ड्यूटी वाढली, त्यामुळें त्यांची किंमत भरमसाट वाढूं नये व किरकोळीनें विकत घेणारांचें नुकसान होऊं नये, ह्यासाठी ही व्यवस्था आहे.

### मुंबई प्रांतांतील मोटार वाहनें

मुंबई प्रांतांत १९३९–४० मध्यें एकूण २७,८८० मोटार वाहनें नोंदलेलीं व चालू होतीं. त्यांचा तपशील खालीलप्रमाणें आहे—

| | संख्या |
|---|---|
| मोटार सायकली | १,६३८ |
| मोटार गाड्या | १७,६०४ |
| मोटार बसेस | ३,४०२ |
| मोटार टॅक्सी | १,३४६ |
| मोटार लॉऱ्या | ३,८९० |

एकूण १०,५५२ वेळां वाहनांच्या मालकीची वर्गावर्गी झाली.

### दंड

कपास कापडाच्या गिरण्यांचे मालक कामगारांस दंड करतात, त्याचे प्रमाणांत १९४० सालीं फरक झाला नाहीं. मुंबईतील सुमारें सहा गिरण्यांत दंडांचें प्रमाण अधिक आढळतें. मुंबईतील गिरण्यांपेक्षा गुजरातमधील गिरण्यांत दंड करण्याचा सपाटा फार मोठा असतो.

### स्वदेशी सायकली

बिर्ला ब्रदर्स लि. नें काढलेल्या हिंद सायकल्स लि. च्या सायकली लवकरच बाजारांत मिळूं शकतील. सुरवातीस, सरकारी ऑर्डरी पुरविण्याकडे कंपनी लक्ष पुरवील. तथापि, दिवाळीनंतर ह्या स्वदेशी सायकली रस्त्यांवर दिसूं लागतील.

### इराणी-चलनाची हुंडणावळ

१७४ इराणी रीलें (नाणीं)=१ ब्रिटिश पौंड अशी पूर्वी हुंडणावळ होती ती आतां १४० रीलें=१पौंड अशी करण्यांत आली आहे. ह्या नव्या हुंडणावळीमुळें, इराणमधील ब्रिटिश फौजांच्या खर्चास अधिक पौंड लागतील.

# सहकारी संस्थांचे अहवाल

### पू. खा. जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि., जळगांव

ह्या बँकेच्या सभासदांनीं ३२ हजार रुपयांचे भाग घेतलेले आहेत. सालअखेर एकूण १९३ सभासदांना २ लक्ष, ७९ हजार रुपयांचें कर्ज प्रत्यक्ष दिलेलें आहे. त्यांत ४० सभासदांना ५५½ हजार रुपये कर्ज १९४०-४१ मध्यें दिलेलें आहे. वसूल होणारे रकमेशी थकबाकीचें प्रमाण २३% पडत आहे. तडजोड करून केलेल्या सुटींचें प्रमाण दिलेल्या रकमेशी १६¾% पडत आहे. वर्षअखेर बँकेस १,४२८ रुपये निवळ नफा झाला.

### पुणें पोस्टल को. बँक लि., पुणें

१९४०-४१ अखेर वरील बँकेचें भागांचें वसूल भांडवल २७,६८३ रुपये असून तिच्या रिझर्व्ह फंडांत ११,४३९ रुपये आहेत. जामीन कसबा रिझर्व्ह फंड १,४९० रुपयांचा आहे. ठेवी ३८,३६० रुपयांच्या आहेत. काटकसर फंडांत १ लक्ष ५३ हजार रुपये असून येणें कर्ज १ लक्ष १५ हजारांचें आहे. बँकेला साध्या व्यवहारांत १,५०५ रुपये व जामीन कसब्याचे व्यवहारांत ६३२ रुपये नफा झाला. ५% दरानें डिव्हिडंड वाटण्यांत आलें. बँकेला स्वतःची इमारत बांधण्यास हेड पोस्ट ऑफिसचे आवारांत जागेची मंजुरी मिळाली असून इमारतीचा नकाशा, खर्चाचा अंदाज, इत्यादि तयार आहेत. इमारतीचें काम लवकरच सुरू होईल. जामीन कसब्याचा व्यवहार हा विम्यासारखा असल्यामुळें त्या कायद्याखाली लागणारें डिपॉझिट भरण्याबद्दल असि. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सकडून मागणी आली होती, परंतु हा व्यवहार गॅरंटीच्या कराराचे स्वरूपाचा आहे, असा निर्णय त्यांनीं आतां दिला आहे. तो विम्याचे व्यवहाराखाली येत नाहीं.

### तासगांव अर्बन को. क्रे. बँक लि. तासगांव.

बँकेचें शेअर भांडवल १०,९३० रुपये, फंड ६६३ रुपये, ठेवी २३,४०१ रुपये, ह्या बाबी देणें बाजूस असून जिंदगीमध्यें बँकांतील, हातांतील व हुंड्या-चेक खरेदींतील रकम १०,४९९ रुपये, कर्जे २२,४८५ रुपये, रोखे १,३०० रुपये, इत्यादि बाबी आहेत. थकबाकीचें गुंतविलेल्या कर्जाशी प्रमाण ५.७% पडतें. बँकेचें भांडवल २० हजारांपेक्षां कमी असल्यान संस्थेस बँक हें नांव रहाणार नाहीं व बँकिंगचे व्यवहारहि तिला करतां येणार नाहींत. वर्षअखेर बँकेस ४९९ रु. १२ आ. नफा झाला व भागीदारांस २% डिव्हिडंड मिळालें.

### अर्बन को. बँक लि., इसलामपूर

वर्षअखेर बँकेचें भांडवल ६,८५० रुपये झालें असून रिझर्व्ह फंड ८६४ रुपयांचा आहे. इतर फंडांत ६१८ रुपये आहेत. ठेवी सुमारें २५¾ हजार रुपयांच्या आहेत. बँकेजवळ रोख व इतर बँकांच्या खात्यांवर ११¾ हजार रुपये असून १,१०० रुपये सरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत. येणें कर्ज २१,१३५ रुपयांचें आहे. थकबाकी ७,२५२ रुपये आहे. वर्षअखेर बँकेस ५१७ रुपये नफा झाला. त्यांतून ३% डिव्हिडंडसाठी १९७ रुपये खर्च करण्यांत आले. शेअर भांडवल २० हजार रुपये झाल्याशिवाय संस्थेस बँक ह्या नांवानें व्यवहार करतां येत नाहीं; तेव्हां तिचें १-७-४१ पासून बँक हें नांव बदललेलें आहे.

### को. पीपल्स बँक लि., लिंब

भाग भांडवल ३,३५० रुपये रिझर्व्ह व इतर फंड ३,४९५ रुपये, ठेवी ६,०९८ रुपये, बँक कर्ज ३,०६३ रुपये असे देण्याच्या बाजूस आकडे असून येणें बाजूस १५,४७५ रुपये कर्ज, १,१४९ रुपये तारणावर कर्ज, इत्यादि बाबी आहेत. बँकेचा व्यवहार फार कमी झाला आहे. " प्रां. बँकेनें कॅश क्रेडिट बंद करून व्यवहाराची फार कुचंबणा केली आहे. थकबाकी वाढली असली तरी क्रेडिट मंजूर होऊन व्यवहार सुरू झाले शिवाय ती कमी होणार नाहीं, हेंही तितकेंच खरें आहे. " सरकारी ऑडिटरांनीं वर्ग 'क' दिला आहे. पूर्वी 'ड' होता. जून १९४० अखेरचा पुढें ओढलेला ७३४ रुपये नफा धरून एकंदर नफा १४४० रुपये झाला. बँकेची स्थिति सुधारण्याकरितां शिल्की नफा यंदाहि न वाटतां तो पुढें ओढावा असें ठरलें. श्री. त्रिं. मा. ठाकूर व श्री. बा. ग. अभ्यंकर ह्यांची अध्यक्ष व सेक्रेटरी अशी अनुक्रमें पुनः निवड झाली.

### इचलकरंजी सें. को. बँक लि.

वरील बँकेचें भरलेलें भांडवल ३१,९५० रुपये, असून एकूण फंड्स २९,२८८ रुपयांचे आहेत. एकूण ठेवी २ लक्ष, ५७ हजारांच्या आहेत. हातांतील व बँकांतील शिलक १ लक्ष, ६२½ हजार रुपये आहे व १२½ हजार रुपये सरकारी व इतर रोख्यांत आहेत. एकूण १लक्ष, २६ हजारांच्या कर्जांपैकीं हुकूमनामे झालेलीं १९ हजारांचीं व थकलेलीं १५½ हजारांची आहेत. बँकेची जागा व इमारत २१ हजारांची आहे. एकूण येण्याशीं थकबाकीचें प्रमाण २७% पडतें. वर्षअखेर बँकेस ५,०३७ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारास ६०% डिव्हिडंड देण्यासाठीं १,८९१ रुपयांचा विनियोग झाला.

### पेण को. अर्बन बँक लि.

खपलेलें भांडवल ३,४५० रुपये, फंड्स १,०५३ रुपये, ठेवी १०,८३१ रुपये असे आकडे देणें बाजूस असून कॅश सर्टिफिकेटस १,०२३ रुपये, कर्जे ४,२७९ रुपये, शिल्लक व इतर बँकांत ९,५६३ रुपये, असा जिंदगीचे बाजूचा तपशील आहे. ठेवीदारांची संख्या झपाट्यानें वाढत आहे. वर्षअखेर नफा २०० रुपये उरला. शेअरभांडवल २० हजारांचें न झाल्याकारणानें संस्थेस बँकिंगचा धंदा बंद करावा लागला.

### रेमंड वूलन मिल्स वर्कमेन्स अँड स्टाफ को. क्रे. सोसायटी लि., ठाणें

सोसायटीच्या देणें बाजूस भाग भांडवल ३१ हजार रुपये, ठेवी १६ हजार रुपये, रिझर्व्ह फंड ३½ हजार रुपये, अशा रकमा असून येणें बाजूस शिल्लक १४ हजार रुपये, डिफेन्स पो. से. सर्टिफिकिटें ५ हजार रुपये, मुदतीचें कर्ज ३२½ हजार रुपये, गरजेचें कर्ज १,०९० रुपये, विम्याचें कर्ज ११८ रुपये, अशा रकमा आहेत. ६५३ सभासदांपैकीं १६८ स्त्रिया आहेत. अहवालाचे वर्षी सोसायटीनें ४७ हजार रुपयांचें कर्ज ४४३ अर्जदारांस मंजूर केलें त्यांपैकीं २२½ हजार रुपये जुन्या कर्जफेडीसाठी, १५ हजार रुपये लग्नकार्यासाठी व ५ हजार रुपये जमीन व घर खरेदी, इत्यादींसाठी होते. नफा-वाटणीसाठी उरलेल्या १,५०७ रुपये नफ्यांतून भागीदारांस ४% डिव्हिडंड मिळालें त्यास १,११० रुपये लागले.

### बेळगांव पायोनिअर अर्बन को. क्रे. बँक लि., बेळगांव

बँकेचें भाग भांडवल १३ लक्ष रुपये असून तिच्या रिझर्व्ह फंडांत १ लक्ष, ५४ हजार रुपये, बूड व संशयित कर्ज फंडांत ४६३ हजार रुपये, इमारत फंडांत ५० हजार रुपये, डिव्हिडंड ई. फंडांत ९ हजार रुपये, इनव्हेस्टमेंट डि. फंडांत ६३ हजार रुपये, घरें-शेती रिझर्व्हमध्यें ३ हजार रुपये, ह्याप्रमाणें रकमा आहेत. बँकेकडे १० लक्ष, ६४ हजारांच्या ठेवी आहेत. " कमी व्याजानें पैसा मिळाला तरी तो फायदेशीर व सुरक्षित व्यवहारांत गुंतविणें कठीण आहे, म्हणून बँकेनें गेलीं ८।१० वर्षें मुदतीच्या ठेवी घेण्याचें बंद केलें आहे. " बँकेच्या भांडवलापैकीं ६ लक्ष, ४२ हजार रुपये कर्जाऊ दिलेले असून ६ लक्ष, ३० हजार रुपये इतर १० बँकांत ठेवलेले आहेत. बँकेचे १ लक्ष, ९१ हजार रुपये सरकारी व तत्सम रोख्यांत आहेत. त्यांची बाजारभावानें किंमत २ लक्ष रुपयांपेक्षा अधिक भरते. थकबाकीचें प्रमाण १९.८% पडतें. वर्षाअखेर बँकेस ३१,०२८ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ७१/२% डिव्हिडंडसाठी १२ हजार रुपये लागले. बँकेला ३५ वर्षें पुरीं झालीं आहेत. तिच्या सुस्थितीबद्दल तिच्या चालकांचें अभिनंदन केलें पाहिजे.

### नगर डिस्ट्रिक्ट अर्बन को. बँक, लि.

ह्या बँकेच्या भागीदारांचें भांडवल १ लक्ष, २४ हजार रुपये झालें असून तिच्या रिझर्व्ह फंडांत १ लक्ष ४८ हजार रुपये आहेत. व इतर फंड १ लक्ष, १३ हजारांचे आहेत. ठेवींची बेरीज १२ लक्ष ६९ हजार रुपये भरते. बँकेनें ६ लक्ष २५ हजार रुपये रोख व इतर बँकांत ठेवून ३ लक्ष, २९ हजार रुपये सरकारी व तत्सम रोख्यांत गुंतविलेले आहेत. सहकारी सोसायट्यांकडून १८ हजार रुपये व व्यक्तिशः सभासदांकडून ६ लक्ष ४५ हजार रुपये येणें आहेत. बँकेस विकत घ्याव्या लागलेल्या जमिनी व घरें ह्यांची किंमत ३५ हजार रुपये भरते. बँकेची इमारत ३० हजारांची असून ८ हजारांचा तिचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट आहे. वर्षअखेर झालेल्या २३,८१८ रुपयांच्या नफ्यांतून ६१/२% डिव्हिडंडसाठीं ७,६३१ रुपयांचा विनियोग करण्यांत आला. बँकेस ३१ वर्षें पुरीं झालीं आहेत.

### जुन्नर अर्बन को. क्रे. सोसायटी, लि.

वरील सोसायटीच्या सभासदांची संख्या १०० असून त्यांनीं घेतलेल्या भागांची संख्या २४१ आहे व वसूल भांडवल २,४१० रुपयांचें आहे. कर्जाचे बाजूस १,५६० रुपये मेंबर ठेव, २,२८६ रुपये बँक कर्ज, २४२ रुपये डिव्हिडंड, असे आकडे असून जिंदगीचे बाजूस ६,२७७ रुपये मेंबर कर्ज आहे. वर्षअखेर सोसायटीस १९४ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ५% दरानें डिव्हिडंड देण्यासाठी १३४ रुपयांचा विनियोग करण्याचें ठरलें. सोसायटीच्या नव्या वर्षासाठी श्री. पी. डी. खत्री ह्यांची कार्यकारी मंडळाचे चेअरमन म्हणून निवड झाली आहे. सुपरवायझिंग कमिटींत श्री. वाय. पी. वैद्य ( चेअरमन ) श्री. जी. एल. जोशी, बी. ए., एलएल. बी. व श्री. व्ही. एम. जोगळेकर हे आहेत.

### जुन्नर तालुका शेतकी सुधारणा संघ

वरील संघाच्या वार्षिक सभेंत श्री. वा. ह. टण्णु, बी.ए., एलएल. बी. वकील, हे अध्यक्ष, श्री. बबन नारायण शेट पुरवंत, बी. ए. हे उपाध्यक्ष व श्री. शंकर पंढरीनाथ पांडे हे सेक्रेटरी निवडून आले.

### लक्ष्मी को. बँक लि, सोलापूर

ह्या बँकेचें खपलेलें भांडवल २१,५५० रुपयांचें असून फंड्स ९,२२१ रुपयांचे आहेत. तिचेकडे ५४,७०० रुपयांच्या ठेवी आहेत. जिंदगीचे बाजूस ३३ हजार रुपये रोख व बँकांत शिल्लक, ५१/२ हजार रुपये इनव्हेस्टमेंट, ५१ हजार रुपये कर्जें, असे आकडे आहेत. अहवालाचे वर्षीं थकबाकी बरीच कमी झाली. वर्षअखेरच्या ३,२२७ रुपयांच्या नफ्यांतून भागीदारांस ५% डिव्हिडंड देण्यांत आलें.

### सातारा जिल्ह्यांत सहकारी सप्ताह

सातारा जिल्ह्यांतील सहकारी पुढाऱ्यांची सभा श्री. आर. एस. पाटील बी. एजी., जी. डी. सी. ए. असिस्टंट रजिस्ट्रार को. सोसायटीज बेळगांव विभाग यांचे अध्यक्षतेखाली ता. २९-९-१९४१ रोजीं सातारा येथें डि. यु. बोर्डाचे ऑफिसमध्यें भरून, सातारा जिल्हा सहकारी सप्ताह व परिषद् भरविणेबाबत विचारविनिमय होऊन ता. १।११।४१ रोजीं सहकारी दिन मुंबई प्रांताच्या गव्हर्नरांचें हस्तें साजरा करणेचें ठरलें. तसेंच सहकारी सप्ताह जिल्ह्यांतील सर्व सोसायट्यांचे गांवीं मोठ्या समारंभानें साजरा करून गव्हर्नरांचा संदेश खेडोपाडीं पोंहोंचविण्याची योजना आखण्यांत आली. सहकारी सप्ताहांत सातारा येथें एक सहकारी जिल्हा कॉन्फरन्स भरविण्याचेंहि निश्चित झालें. वरील समारंभाच्या पूर्ततेसाठी एक कार्यकारी मंडळ याच सभेंत निवडलें जाऊन त्याबद्दलचें बजेट करण्यांत आलें. सदर कार्यकारी मंडळाची पहिली सभा ता.५।१०।१९४१ रोजीं बोलावून त्यांत पुढील कामाची दिशा आखण्याचें ठरलें.

### सुपरवायझर्स ट्रेनिंग क्लास, हडपसर

सहकारी खात्यामार्फत भरलेला सद्रहू वर्ग ३ महिन्यांचे मुदतीनंतर ता. २९।९।४१ रोजीं संपला. महाराष्ट्रांतील सहा जिल्ह्यांतून एकूण १७ सुपरवायझर या वर्गास पाठविण्यांत आले होते. सुपरवायझरना अनेक विषय शिकविण्यांत आले. त्यांपैकीं ग्रामीण अर्थशास्त्र, शेतकीविषयक व सर्वसाधारण सहकार, शेतकऱ्यांचा ऋणविमोचन कायदा, रेग्युलेटेड मार्केट्स ॲक्ट वगैरे विषय महत्त्वाचे होते. २ महिन्यांचे मुदतींत रजिस्ट्रार मि. इक्रम व असि. रजिस्ट्रार श्री. भागवत यांनीं अनुक्रमें १ व ३ वेळां भेटी दिल्या. ता. २८-९-४१ रोजीं श्री. भागवत यांनीं समारोपाचें उपदेशात्मक भाषण केलें व सुपरवायझर यांनीं त्यांना मिळालेल्या ज्ञानाचा चांगला उपयोग करावा व ग्रामसुधारणा व सहकारी खरेदी-विक्री या बाबतींत विशेष लक्ष पुरवावें असें सुचविलें. त्याच वेळीं श्री. सावंत सुपरवायझर यांनीं वर्गाचा एकंदरींत चांगलाच फायदा झाला असें सांगून अध्यापक श्री. जोशी व श्री. देशपांडे यांचें आभार मानले. ता. २९-९-४१ रोजीं वर्ग बंद होण्याचे वेळीं अनेक सुपरवायझरांनीं वर्गांतील शिक्षणानें बुद्धी जास्त व्यापक व खोल झाल्याचें अनुभवास आल्याचें सांगितलें. तसेंच त्यांनीं आपल्या कामांतील अडचणी नाहींशा करण्याविषयीं व नोकरीस स्थैर्य आणण्यविषयीं अधिकारी वर्गास कांहीं सूचनाहि केल्या. श्री. राजारामपंत तुपे, व्हा. चेअरमन् पुणें सें. को. बँक, यांनींहि उपदेशात्मक चार शब्द सांगितल्यानंतर श्री. जोशी, ऑडिटर, यांनीं, कोणत्याहि व्यक्तीनें त्यानें करावयाचीं कामें कर्तव्यबुद्धीनें व कळकळीनें केल्यास अनेक प्रश्न सुटूं शकतील एवढ्या एकाच मुद्यावर जोर देऊन व वर्ग बंद झाल्याचें सांगून आपलें भाषण संपविलें.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १११—५ |
| ४% १९४३ | १०४—० |
| ३½% बिनमुदत | ९६—२ |
| ३½% १९४७–५० | १०३—२ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ | ९७—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) | ११६—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२७—१२ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४६—८ |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% | ४९—१५ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १६१०—० |
| मुंबई प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०९—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% | १४७—८ |
| कराची ( १०० ) ९% | २०६—६ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १७६०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १७९०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% | ९८—८ |
| अहमदाबाद प्रांतज ( ५०० ) ११½% | ८८१—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६४२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २५३—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ५१—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २७—६ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. | ५३—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४५३०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) ७½% रु. | १५३—१३ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ४०७—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु. १० आ. ० पै. | २०८२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १५४—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२—२—६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६२—१५—० |


**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.

२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.

३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

४ सहकार : किं. २ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.

२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

**पुण्यांत आल्यावर**

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

अवर होम,

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
संग्रह करा
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
—: रक्तवर्धक :—
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा
मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें
आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
'पायोनियर डाइंग हाऊस'
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.



मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स
वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी
Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ, हौदाजवळ, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान
एम्ब्रॉयडरी मार्ट
६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ल्यूकटूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडेमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १५ आक्टोबर, १९४१ अंक ४२

अर्थ ग्रन्थमाला–पुस्तक ४ थें

## सहकार

### ( हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

★

The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

The Only Book Depot of its Kind in India.

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### बँकांस सुट्टी

सोमवार आणि मंगळवार, ता. २० व २१ रोजीं, दिवाळीनिमित्त बँका बंद रहातील.

### बँक ऑफ इग्लंडचे नवे डायरेक्टर

बँक ऑफ इंग्लंडचे एक डायरेक्टर लॉर्ड स्टँप ह्यांच्या मृत्यूमुळे रिकाम्या झालेल्या जागीं मि. जे. एम. कीन्स ह्यांची निवड झाली आहे.

### २३% चे नवे ब्रिटिश वॉर बाँड

ग्रेट ब्रिटनमध्यें ता. ९ रोजीं २३% व्याजाचे नवे वॉर बाँड विकीस काढण्यांत आले. कर्जाची परतफेड १ ऑगस्ट, १९५१ रोजीं होईल, परंतु १ ऑगस्ट, १९४९ नंतर केव्हांहि ते परत देण्याची सरकारनें सवलत राखून ठेवली आहे.

### हैद्राबाद संस्थानाचें फसली १३५१ चें अंदाजपत्रक

| | रुपये |
|---|---|
| उत्पन्न | ९ कोटि, १५३ लक्ष |
| खर्च | ९ कोटि, १३३ लक्ष |
| वाढावा | २ लक्ष |

करामध्यें कोणतीहि वाढ सुचविण्यांत आलेली नाहीं.

### जपानकडे पेट्रोल पाठविणें बंद

अमेरिका, ग्रेट ब्रिटन व नेदरलंड ह्या देशांच्या सरकारांनीं जपानकडे पेट्रोल पाठविणें बंद केलें आहे. जपान व अमेरिका ह्यांमधील व्यापार बहुतेक सर्वच बंद आहे.

### युद्धाच्या धोक्याचा विमा

अटलांटिक महासागरांतून ब्रिटिश व दोस्त राष्ट्रांच्या आगबोटींतून जाणाऱ्या मालावरील युद्धाच्या धोक्याच्या विम्याचा हप्ता अमेरिकन विमा कंपन्यांनीं उतरविला आहे.

### सरकारी सिल्क फार्म

शेतकऱ्यांना दुय्यम धंदा म्हणून रेशमाचे किडे पाळतां येण्याची शक्यता किती आहे, ह्याची छाननी करण्यासाठी बेळगांव येथें १९४० सालीं सिल्क फार्म काढण्यांत आलें, त्याची मुदत ३१ मार्च, १९४४ अखेर वाढविण्यांत आली आहे.

### कलकत्ता शहरांतील टेलिफोन

कलकत्ता येथें दरवर्षी १,००० लोक नवे टेलिफोन घेतात. टेलिफोन वापरणारांची संख्या झपाट्यानें वाढत आहे. गेल्या बारा महिन्यांत १,२०० नवीन टेलिफोनचीं यंत्रें जोडण्यांत आलीं. लोकांची टेलिफोनच्या यंत्रांची वाढती मागणी पुरवणें अशक्य झालें आहे.

### दौंड बारामती रेल्वे कं. लि.

३१ मार्च, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीस इन्कम टॅक्स, सुपरटॅक्स, ३० सप्टेंबर, १९४० अखेरचें ४३% डिव्हिडंड (२३,३५७ रुपये) इत्यादि वजा जातां २५,५७१ रुपये उरले. सबंद वर्षाचें ४३% डिव्हिडंड जाहीर करण्यांत आलें.

### पर्सनल प्रेस सर्व्हिसचा वर्ष-दिन

पर्सनल प्रेस सर्व्हिस या वृत्तपत्रीय माहिती पुरविणाऱ्या संस्थेचा पांचवा वर्षदिन औंध संस्थानचे मुख्य मंत्रि ना. वें. अप्पासाहेब पंत यांचे अध्यक्षतेखाली ता. १५ ऑक्टोबर बुधवार रोजीं सायंकाळीं ५ वाजतां साजरा होईल.

### मुंबई पोर्ट ट्रस्टचें उत्पन्न व खर्च

(लक्ष रुपये)

| | उत्पन्न | खर्च |
|---|---|---|
| १९४०-४१ | २६५३ | २२९३ |

### हेलियम प्रॉडक्टस (इं.) लि. पुणें

वरील कंपनीचे कारखान्यांत ता. ५।१०।१९४१ रोजीं सायंकाळीं श्रीसत्यनारायणाची पूजा झाली, त्यावेळीं तीर्थप्रसादास व पानसुपारीस सुमारें ३०० निमंत्रित लोक हजर होते. कंपनीचे अध्यक्ष, डॉ. पी. जी. गोगटे ह्यांनीं पूजा केली.

### मद्रास प्रांतिक सहकारी परिषद

वरील परषदेचें २४ वें अधिवेशन मद्रास येथें ता. ११ व १२ रोजी अन्नमलाई युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर डॉ. बी. व्ही. नारायणस्वामी नायडू, एम. ए., बी. कॉम, पी.एच. डी., बार-ॲट-लॉ, ह्यांचे अध्यक्षतेखाली पार पडलें. परिषदेचें उद्घाटन प्रो. वा. गो. काळे ह्यांचे हस्तें झालें. परिषदेच्या १९३० साळच्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रो. काळे हे होते.

### मुंबई प्रांतांतील मोटार वाहनांचे अपघात

(१९३९-४०)

| | मुंबई शहर | मुंबई शहर वगळून बाकीचा प्रांत |
|---|---|---|
| एकूण अपघात | ५,६०५ | २,२९८ |
| प्राणघातक अपघातांची संख्या | ९४ | माहिती दिलेली नाहीं |
| इतर अपघात | ५,५११ | ” ” |
| मरण पावलेल्यांची संख्या | ९५ | १,१८१ |
| जखमी झालेल्यांची संख्या | २,४७३ | २,३१८ |

मुंबई शहरांतील अपघातांच्या आकड्यांत अगदी किरकोळ अपघातांचीहि (व्हिक्टोरिया, ट्रामगाडी, हातगाडी, इत्यादींशीं टक्कर) गणना केलेली आहे; इतर ठिकाणच्या अपघातांत तशी नोंद बहुधा नाहीं.

### श्री. पाटील ह्यांचा विक्रम

मुंबई येथें नुकतीच एक लघुलेखनाची चाचणी घेण्यांत आली, तिचेमध्यें श्री. डी. पी. पाटील हे पहिले आले. त्यांचा वेग मिनिटास २१५ शब्द, असा पडला. दुसरा नंबर मिस नेलनस ह्यांचा आला. त्यांचा वेग मिनिटास १८० इतका होता. लघुलेखनाचें जागतिक रेकॉर्ड मिनिटास ३२६ शब्दांचें आहे. श्री. पाटील ह्यांस त्यांच्या विक्रमाबद्दल एक सुवर्णपदक देण्यांत आलें.

### ॲबिसीनियाची स्वतःची फौज

ॲबिसीनियामध्यें आपली स्वतःची फौज आपल्या नियंत्रणाखाली आपण स्वतः तयार करणार असल्याचें त्याच्या बादशहांनीं जाहीर केलें आहे.

### वाहतुकीसाठी आगबोट

ऑस्ट्रेलियांतून हिंदुस्थानांत गहूं पोचविण्यासाठी ग्रेट ब्रिटननें एक आगबोट उपलब्ध करून दिली आहे.

### मनिऑर्डरींवर नियंत्रण

व्यापारी व्यवहारांतून गुप्त माहिती बाहेर फुटूं नये, ह्याकरितां पोस्टांतून परदेशी जाणाऱ्या मनिऑर्डरींवर जपानी सरकारनें नियंत्रण ठेवण्याचें ठरविलें आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४९४ | ५ युद्धसाहित्याच्या उत्पाद-नाची शिकस्त ... | ४९९ |
| २ विमा कंपन्यांचें परदेशांतील काम ... | ४९५ | ६ जमखंडी स्टेट सें. को. बँक ... | ४९९ |
| ३ सहकार आणि सरकार | ४९६ | ७ महालक्ष्मी को. बँक | ४९९ |
| ४ स्फुट विचार ... अमेरिकेच्या तटस्थपणास नवें वळण—साखरेच्या धंद्यास संशोधनाचें सहाय—ब्रह्मदेशांतला तांदूळ—निजाम सरकारचें अंदाजपत्रक. | ४९७ | ८ भुसावळ पीपल्स को. बँक | ५०० |
| | | ९ नागपूर प्री. को. हौ. सोसायटी ... | ५०० |
| | | १० पुण्यांत विजेचे दर उतरले | ५०१ |
| ५ दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि. ... | ४९८ | ११ भारत इं. कंपनी | ५०१ |
| | | १२ निवडक बाजारभाव... | ५०२ |


# अर्थ

बुधवार, ता. १५ आक्टोबर, १९४१

## विमा कंपन्यांचें परदेशांतील काम

### नफ्याची अदृश्य आयात–निर्गत

विमा कंपन्या हप्त्यांचे रूपानें दरसाल प्रचंड रकमा जमा करतात व त्यांतून खर्च भागवून व क्लेम्स देऊन मोठमोठे रिझर्व्ह आणि इतर फंड निर्माण करतात. अशा रीतीनें विमा कंपन्यांजवळ भांडवलाचा मोठा संचय होतो व त्यांस देशाच्या आर्थिक संघटनेंत महत्त्वाचें स्थान प्राप्त होतें. कंपन्यांनीं परदेशीं विम्याचें काम मिळविलें, म्हणजे तर त्यांचें कार्यक्षेत्र कसें जागतिक स्वरूपाचें होतें, ह्याची फोड एका ब्रिटिश साप्ताहिकानें नुकतीच केली आहे. परदेशांतील विम्याचें काम करणें, ह्याचा अर्थ विम्याच्या संरक्षणाची निर्गत करणें, असा होतो. म्हणजे, अदृश्य निर्गतीमध्यें वाढ होते. ह्याचे उलट, निरनिराळ्या देशांतून विम्याचे धंद्यांतील नफ्याचे स्वरूपांत आयात होत रहाते. विम्याची विक्रीची किंमत म्हणजे हप्त्यांची रकम ही होय व ती आगाऊ कळूं शकते. परंतु, विम्याचा उत्पादन खर्च म्हणजे क्लेमची रकम ही प्रत्यक्ष क्लेम उपस्थित होईपर्यंत कळूं शकत नाहीं. अनेक विम्यांच्या विक्रीची किंमत त्यांच्या उत्पादनाच्या किंमतीपेक्षा अधिक भरली म्हणजे झालें. ह्याचा अर्थ, हप्त्यांचें उत्पन्न हें क्लेम्सच्या खर्चापेक्षा अधिक भरलें पाहिजे. कांहीं वर्षे हें कदाचित् घडणार नाहीं, परंतु कोणताहि धंदा दीर्घ काळपर्यंत नुकसानींत चालवितां येणें अशक्य आहे व बरींच वर्षे विम्याचा धंदा चालला तर तो किफायतशीर होतो, असा अनुभव आहे. कंपन्यांनीं परदेशांत विम्याचें काम मिळविलें म्हणजे सहाजिकच इतर देशांतील चलन त्यांस उपयोग करण्यासाठी उपलब्ध होतें. १९३९ सालीं ग्रेट ब्रिटनमधील कंपन्यांस आगीच्या विम्याच्या हप्त्यांचे ८० कोटि रुपये मिळाले व त्यावर ८% नफा सुटला. ह्यापैकीं किमान निमी रकम परदेशांतून आली असली पाहिजे. म्हणजे त्यावर्षी ग्रेट ब्रिटननें एकट्या आगीच्या विम्याचे पायीं ३ कोटि रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या नफ्याची आयात केली, असा अर्थ झाला. परदेशांतील क्लेम्स भागवून व खर्च व कमिशनें देऊन उरलेल्या नफ्याची एवढी मोठी रकम होते, ही गोष्ट उद्बोधक आहे. ही रकम अदृश्य रीतीनें आयात होते, हें उघड आहे. केवळ नफ्याच्या रकमेनेंच परदेशांतील विम्याच्या कामापासून मिळणारा नफा मोजून भागणार नाहीं. विमा कंपन्यांना परदेशांत काम करावयाचें असल्यास तेथें बरेंच डिपॉझिट ठेवावें लागतें, त्याची एकूण बेरीज केवढी तरी होते. वर्षांत उद्भवणारे क्लेम्स देतां यावे म्हणून रिझर्व्ह निर्माण करावे लागतात व उपस्थित झालेल्या क्लेम्सची तरतूद करावी लागते. ह्या रिझर्व्हर्जची रकम एकूण वार्षिक हप्त्यांच्या ६५% पर्यंत सुद्धां होते. ज्या देशांत त्यांचा उपयोग करावयाचा, त्याच देशांतील पहिल्या प्रतीच्या रोख्यांत हे रिझर्व्हज् गुंतविण्यांत येतात. सहाजिकच ग्रेट ब्रिटनमधील विमा कंपन्यांचे हातीं परराष्ट्रांतील सरकारी रोखे येतात, त्यांचेवरील व्याजाची रकम बरीच मोठी असते. म्हणजे, एका अर्थी ब्रिटिश भांडवलाची निर्गतच झाल्याची परिस्थिति निर्माण होते. त्या भांडवलावर व्याज सुटतेंच; खेरीज विम्याचे धंद्यांत चांगला नफा सुटण्यास तें कारणीभूत होतें व अदृश्य रीतीनें पैशाच्या आयातीस प्रारंभ होतो. परदेशांत पैसे गुंतविणें व त्यावर व्याज आणि नफा मिळविणें, हा ग्रेट ब्रिटनमधील रहाणीच्या उच्च दर्जाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे, हें विसरून चालणार नाहीं. सध्यासारख्या आणीबाणीच्या युद्ध-परिस्थितींत ह्या रोख्यांचा उपयोग राष्ट्रीय हिताचे दृष्टीनें होऊं शकतो, हेंहि आतां स्पष्ट झालें आहे.

ह्यासंबंधांतील हिंदुस्थानाची परिस्थिति काय आहे हें पहाणें उद्बोधक होईल. हिंदुस्थानांत आयुर्विम्याचें काम मिळविणाऱ्या सुमारें ३७५ कंपन्यांपैकीं दीडशें कंपन्या परदेशांत स्थापन झालेल्या आहेत. एकूण सुमारें ३०० कोटि रुपयांच्या चालू विम्यांपैकीं २०० कोटि रुपयांचे विमे हिंदी कंपन्यांकडे आहेत. परदेशी कंपन्यांकडे चालू असलेल्या आयुर्विम्यांच्या हप्त्यांची वार्षिक रकम १०½ कोटि रुपयांपेक्षा अधिक भरते. ह्या उलट, हिंदी कंपन्यांकडे बाहेरील देशांतले चालू विमे १५ कोटि रुपयांचे असून त्याच्या हप्त्यांचें उत्पन्न ८० लाखांचें आहे. आयुर्विम्याव्यतिरिक्त इतर म्हणजे आग, आगबोट वहातुक, इत्यादींच्या हिंदुस्थानांतील पॉलिसींच्या हप्त्यांच्या उत्पन्नाची रकम १¾ कोटि रुपयांपेक्षां अधिक आहे व त्यांतील हिंदी कंपन्यांचा वांटा ९० लक्ष रुपयांचा सुद्धा नाहीं. आगीच्या विम्याच्या हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न १ कोटि, ४० लाखांचे सुमारास आहे, त्यापैकी ९५ लक्ष रुपये परदेशी कंपन्यांकडे जातात. मरीन इन्शुअरन्सच्या हप्त्यांच्या रकमेची वाटणी हिंदी कंपन्यांस १२ लक्ष रुपये व विदेशी कंपन्यांस ४० लक्ष रुपये अशी आहे. हिंदुस्थानांत विदेशी कंपन्यांची सुमारें ५० कोटि रुपयांची जिंदगी गुंतविलेली आहे, तिचेपैकीं सुमारें ३८ कोटि रुपये ग्रेट ब्रिटनमधील कंपन्यांचे व १२ कोटि रुपये ब्रिटिश साम्राज्यांतील देशांतील कंपन्यांचे आहेत. ह्या आकड्यांवरून विदेशी विमा कंपन्यांस हिंदुस्थानांत अद्याप किती महत्त्वाचें स्थान आहे व त्या हिंदुस्थानांतून नफ्याची कशी निर्गत करतात, हें कळून येईल. हिंदी कंपन्यांस अद्याप स्वदेशांतील सर्व काम मिळवावयाचें म्हटलें तरी किती तरी पल्ला गाठावयाचा आहे. मुलुखगिरीचा प्रश्न तर दूरच आहे. हिंदी कंपन्यांची प्रगति दिवसानुदिवस होत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. हिंदी विम्याचा धंदा भक्कम पायावर चालावा ह्या दृष्टीनें आतां कायदा झालेला असून त्यांत सुधारणाहि होत आहेत. देशी कंपन्यांची चांगल्या तऱ्हेनें वाढ होण्यावरच त्यांचेवरील विश्वास अवलंबून राहाणार हें उघड आहे.

## सहकार आणि सरकार

### प्रो. काळे ह्यांचें मद्रास येथील भाषण

मद्रासच्या प्रांतिक सहकारी परिषदेचें अधिवेशन गेल्या ११ व १२ तारखेस भरलें. त्याचें उद्घाटन करण्यास प्रो. काळे ह्यांस निमंत्रण करण्यांत आलें होतें. अनमलय विश्वविद्यालयाचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक श्री. नारायणस्वामी नायडू ह्यांनीं परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. उद्घाटनाचे वेळीं प्रो. काळे ह्यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश खालीं दिला आहे.

प्रांतिक सहकारी कार्यकर्त्यांची पुनर्भेट होऊन त्यांच्याशीं विचार-विनिमय करण्याची संधी मिळाल्याविषयीं समाधान व्यक्त करून मद्रासमधील चळवळीच्या बाबतींत चौकशी कमिटीनें गेल्या वर्षी सादर केलेल्या रिपोर्टाचा व प्रांतिक रजिस्ट्रारांच्या ताज्या वृत्तांताचा उल्लेख त्यांनीं केला. त्यांमधील विशिष्ट शिफारशींचा परामर्श घेणें हें परिषदेच्या अध्यक्षांच्या कक्षेंत येत असल्यानें त्या भानगडींत आपण पडत नाहीं असें ते म्हणाले. डॉ. नायडू ह्यांच्यासारख्या अर्थशास्त्रज्ञाची अध्यक्षस्थानीं योजना करण्यांत शास्त्रीय शोध व सहकारी चळवळीचे विविध प्रश्न ह्यांचा संबंध जोडला गेला ही अभिनंदनीय गोष्ट आहे. हिंदी विश्वविद्यालयांत खेडेगांवी जीवनाच्या अभ्यासाची हेळसांड होते असें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून होईल, पण त्या संबंधांत संशोधनाच्या कार्यास विपुल जागा आहे ह्यांत संशय नाहीं. सहकारी संस्थांसंबंधानेंच बोलावयाचें झाल्यास, आमच्या बँका शेतकऱ्यांस कर्जें देतात त्यांचा उपयोग कसा होतो, त्यांचा परिणाम कर्जें घेणारांच्या रहाणीवर अशा तऱ्हेनें घडून येतो, ह्याची बारकाईनें चौकशी किती ठिकाणीं झाली आहे? संशोधनाच्या आवश्यकतेचीं अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. मालाच्या विक्रीच्या सोसायट्यांनीं बाजारभावांत होणाऱ्या बदलांकडे लक्ष दिलें पाहिजे आणि ह्या कामीं आकडेशास्त्राचा उपयोग केला जावा असें मद्रासच्या रजिस्ट्रारनीं सुचविलें आहे. बँका, खातें व विश्वविद्यालयें ह्यांनीं त्यांत लक्ष घालावें असें त्यांचें म्हणणें आहे. त्यानें संशोधनाविषयींच्या वरील विधानास पुष्टी मिळते.

शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यासाठी वगैरे अलीकडे प्रांतिक कायदे झाले आहेत, त्यांचा परिणाम सहकारी सोसायट्या व बँका ह्यांवर कसा होतो ह्याचाहि काळजीपूर्वक विचार होणें जरूर आहे. मद्रासच्या शेतकरी ऋणमुक्ततेच्या कायद्यांत व्याजाचा कमाल दर ६½ टके निश्चित केलेला आहे. पण त्या दरांत बँका किंवा सावकार ह्यांस कर्जें देणें परवडत नाहीं, ह्यासाठी तो वाढवण्याचा प्रांतिक सरकारनें विचार करावा अशी रजिस्ट्रार यांची सूचना आहे.मुंबईतील ह्याच उद्देशानें झालेल्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळें बँकांस किती नुकसान सोसावें लागेल ह्यांचा अंदाज करणें कठीण आहे. तथापि, त्यासंबंधांत दक्षता बाळगण्याविषयीं सरकारास विनंति करण्यांत आली आहे.

सहकारी संघटन हें व्यक्ति-स्वातंत्र्य व परस्पर सहाय यांवर आधारलेलें आहे. युरोपांत फॅसिस्टांच्या अंमलाखाली व्यक्तिस्वातंत्र्य चिरडून गेलें आहे आणि सहकारी संस्थांवर अधिकारी वर्गाची हुकमत चालली आहे. युद्धोत्तर काळांत जगाची पुनर्घटना होईल तीमध्यें व्यक्तिस्वातंत्र्याचे पूर्ण संरक्षणाची तजवीज झाली पाहिजे. स्वातंत्र्य, स्वावलंबन व समता ह्या सहकारी मूलभूत तत्त्वांची हिंदुस्थानांतील सहकारी कार्यकर्त्यांनीं जोपासना करणें अगत्याचें आहे. इंस्टिट्यूट्स सारख्या संस्था नामशेष होऊं पहात आहेत. त्यांचें पुनरुज्जीवन होऊन त्या कार्यक्षम बनल्यावाचून हिंदी सहकारी संघटन बळकट होणें शक्य नाहीं. आमच्या चळवळींत अनेक लोक शिरले आहेत त्यांचा उल्लेख मद्रासच्या रजिस्ट्रारनीं आपल्या रिपोर्टांत केला आहे. बँकांचे डायरेक्टर गैरमाहितगार असतात, त्यांच्या व्यवस्थापकांचें ज्ञान मर्यादित असतें, सहकारी संस्थांत वशिलेबाजी चालते, व्यवहारांवर नजर नीट ठेवली जात नाहीं, अशीं अनेक वैगुण्यें त्यांनीं दाखवलीं आहेत. शिक्षणाचा सहकारी संस्थांत प्रसार होणें हा त्यांवर उपाय असून सहकारी कार्यकर्त्यांनींच तो अंमलांत आणला पाहिजे असें ते म्हणतात. सहकारी चळवळ सरकारच्या हातीं नसून सरकारचें सहाय तिनें मागणें अनुचित आहे असें त्यांचें निक्षून सांगणें आहे.

आपलें कार्य व त्याची पद्धति ह्यांतील दोष दाखवणाराचे आपण आभार मानले पाहिजेत. कारण दोष उघडकीस आले म्हणजे सुधारणेचा मार्ग मोकळा होतो. तथापि मद्रासच्या रजिस्ट्रारनीं आपलें खातें व सरकार ह्यांचेवरची जबाबदारी झाडून टाकून कानांवर हात ठेवले आहेत तें मात्र वस्तुस्थितीस धरून नाहीं हें स्पष्ट केलें पाहिजे. ह्या देशांत सहकारी चळवळ सरकारनें चालू केली आणि तिचा विस्तार केला. सहकारी संस्थांच्या कारभाराविषयींचीं धोरणें वेळोवेळ सहकारी खात्यानें निश्चित केलीं असून कित्येक वेळां बिन-सरकारी कार्यकर्त्यांचा सल्ला घेतला नाहीं किंवा मानला नाहीं. चळवळीस सरकारचा पाठिंबा आहे व तीवर खात्याचें नियंत्रण आहे अशी जनतेची सामान्य समजूत आहे. अशा स्थितींत खात्यानें जबाबदारीचा आपला हिस्सा नाकबूल करण्यांत काय हंशील आहे? ग्रामोद्धाराच्या कार्याचें महत्त्व ओळखून त्यास प्रांतिक सरकारांनीं अलीकडे हात घातला आहे आणि खेडेगांवी जनतेच्या उद्धाराविषयींची स्वतःची जबाबदारी मान्य केली आहे. सहकार हा त्या कार्याचाच एक भाग असल्यानें त्याच्या जबाबदारीचा वांटा सरकारकडे येतो. सहकारी कार्यकर्त्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक अडचणीच्या परिस्थितींतहि कामगिरी बजाविली आहे. ती वस्तुतः स्तुतीस पात्र आहे. सहकारी संस्थांस सरकाराकडून सवलती व सहाय्य मागण्याचा हक्कच आहे. कारण त्या अंशतः सरकारचें काम करीत आहेत. पण दोषांची वांटणी करण्याचा येथें प्रश्न नसून सरकार, खातें व कार्यकर्ते ह्या सर्वांनीं सहविचारानें व नेटानें विधायक कृति करण्याचा खरा प्रश्न आहे. दोषांची जाणीव ठेवून ते दूर करणें व चळवळीची प्रगति व सुधारणा घडवून आणणें हें सर्वांच्या पुढचें कार्य आहे. परिषदेमध्यें महत्वाच्या प्रश्नांची चर्चा या भावनेनें होईल आणि सहकारी चळवळीच्या सुधारणेस व प्रगतीस सहाय होईल अशी मी आशा करतों. डॉ. नायडू ह्यांच्या नेतृत्वाखाली परिषदेचें कार्य भरीव व परिणामकारक होईल ह्याविषयीं मला शंका वाटत नाहीं.

---

### रस्ते-बांधणींत किरकोळ सुधारणा

गांवें व खेडीं ह्यांतून जाणाऱ्या अगर त्यांच्या नजीकच्या रस्त्यांतून कोणत्या किरकोळ सुधारणा करतां येणें शक्य आहे व रस्ता करतांना कोणत्या गोष्टी टाळाव्या, ह्याविषयीं सोप्या सूचना करण्यासाठी मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली आहे, तिचे श्री. दप्तरी, उत्तर भागाचे सुपरिंटेंडिंग इंजिनिअर, हे अध्यक्ष आहेत.

## स्फुट विचार

### अमेरिकेच्या तटस्थपणास नवें वळण

हिटलरशाहीचा पाडाव व राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचें संरक्षण ह्या ध्येयानें प्रेरित झालेल्या प्रस्तुत युद्धांत अमेरिकेनें सर्वस्वी तटस्थ राहून दुरून "जें जें होईल तें तें पहावें", का त्या ध्येयाच्या सिद्धीस सहाय देऊन स्वतःच्या संरक्षणाची व्यवस्था सावधगिरीनें वेळींच करावी हा अवघड प्रश्न जनतेपुढें मांडून त्याचें उत्तर कसें द्यावें हें निश्चित करण्यांत प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांनीं मोठ्या मुत्सद्दीगिरीनें पुढाकार घेतला आहे. अमेरिकेनें शंभर टक्के तटस्थ रहावें ह्या मतास आतां अमेरिकेंत मान राहिलेला नाहीं. इंग्लंड व चीन ह्या देशांस चालू युद्धांत मदत करण्यानें तटस्थपणाच्या मामुली मर्यादांचें उल्लंघन अमेरिकेनें अगोदरच केलें आहे. अमेरिकन युद्धसाहित्य इंग्लंडला सुरक्षित रीतीनें पोहोचेल अशी तजवीज करण्याचें घोरण प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांनीं प्रकटपणानें स्वीकारलें आहे. अमेरिकन मालाची ने-आण करणाऱ्या व्यापारी जहाजांवर जर्मनीचे हल्ले होऊं लागल्यानें त्यांच्या संरक्षणाचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. तटस्थपणाचा कायदा अमेरिकेंत अंमलांत आहे, त्यास अनुसरून व्यापारी जहाजांवर तोफा डागणें व युद्धाच्या क्षेत्रांतहि त्यांची हालचाल होऊं देणें ह्या गोष्टी करतां येत नाहींत आणि कायद्याचे हे निर्बंध दूर झाल्याविना इंग्लंडला युद्ध-सहाय देण्याचें स्वीकृत घोरण फलद्रूप करतां येत नाहीं. हा पेच सोडवावयाचा म्हणजे तटस्थपणाच्या कायद्यांत योग्य दुरुस्ती झाली पाहिजे. तटस्थपणास ह्या प्रकारची मुरड घातली गेली असतां अमेरिकन राष्ट्र प्रत्यक्ष युद्धांत पडल्यासारखें होईल असा आक्षेप प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांच्या धडाडीच्या धोरणास विरोध करणारांकडून येणार. म्हणून काँग्रेसमधील पुढाऱ्यांचें मत अजमावून तें अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न त्यांनीं केला आहे. तटस्थपणाच्या धोरणास आणखी कलाटणी देणें आवश्यक झालें आहे असें सर्वसाधारणपणानें अमेरिकन जनतेस वाटत आहे. कायद्यांत दुरुस्ती कशी व कोठवर करावयाची इतकेंच आतां ठरावयाचें आहे.

---

### साखरेच्या धंद्यास संशोधनाचें सहाय

यांत्रिक पद्धतीनें साखर बनविण्यामध्यें जे अनेक प्रश्न उत्पन्न होतात त्याबाबत शास्त्रीय संशोधन करून साखरेच्या धंद्याची सुधारणा व्हावी ह्या हेतूनें त्यांत सुधारणा सुचवण्याचें कार्य करण्याकरितां हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें "इंपीरिअल इंस्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलजी" ह्या नांवाची संस्था कानपूर येथें स्थापन झालेली आहे. संशोधनासाठी तिनें कोणते प्रश्न हातीं घ्यावे ह्याविषयीं सूचना देऊन तिच्या कार्याचा वेळोवेळ आढावा घेण्याकरितां १९३६ सालापासून एक सल्लागार मंडळ तिला जोडण्यांत आलें आहे. साखरेच्या धंद्यांतल्या अडचणी कारखानदारांस विशेष रीतीनें भासतात आणि उत्पादनाच्या पद्धतींत निरनिराळ्या सुधारणा होण्याची आवश्यकता त्यांच्या नजरेस प्रामुख्यानें येते. सुधारणेसंबंधाचे प्रयोग करून पहाणें कारखानदारांस साधण्यासारखें नसतें म्हणून इंस्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलजी व कारखानदार ह्यांचा परस्परसंबंध निकट असणें अगत्याचें होतें. साखरेच्या उत्पादन-कृतीमध्यें कार्यक्षमता निर्माण कशी होईल ह्या विषयींचे प्रयोग करणें हें इंस्टिट्यूटचें मुख्य काम आहे आणि साखरेच्या धंद्याच्या प्रगतीच्या दृष्टीनें उत्पादनशक्ति वाढवण्यांत कारखानदारांचें व पर्यायानें देशाचें हित आहे. इंस्टिट्यूटचें कार्य व साखरेची बनावट ह्यांचा हा निकट संबंध लक्षांत घेतला जाऊन त्या संस्थेचें सल्लागार मंडळ आतां अधिक विस्तृत व प्रातिनिधिक करण्यांत आलें आहे. ह्या पुनर्घटनेंत इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचे उपाध्यक्ष मंडळाचे अध्यक्ष असतील आणि मध्यवर्ती सरकार, संयुक्त प्रांताचें सरकार, साखरेचे कारखानदार व व्यापारी इत्यादींचें मिळून तेरा सभासद त्यांचे सहकारी रहातील. पुनर्घटित मंडळाची मुदत तीन वर्षांची असून तिचा प्रारंभ चालू महिन्याच्या पहिल्या तारखेपासून होईल. इंस्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलजीचें कार्य ह्या पुनर्घटनेच्या योगानें साखरेच्या धंद्यास अधिक सहायकारक होईल अशी अपेक्षा आहे.

---

### ब्रह्मदेशांतला तांदुळ

हिंदुस्थानांतील कित्येक प्रांतांत तांदुळाचें मोठें पीक होत असलें तरी त्याचे योगानें देशाची सबंद मागणी भागवली जात नसल्यानें ब्रह्मदेशांतून पुष्कळसा तांदुळ इकडे आयात करावा लागतो. सामान्य स्थितींतल्या लोकांचा ह्या "रंगूनच्या हाळ्या"शीं चांगलाच परिचय आहे. ह्याप्रमाणें हिंदुस्थानांत ब्रह्मदेशीय तांदुळास मागणी असल्याकारणानें तो आयात करण्यांत इकडील व्यापाऱ्यांचा पुष्कळ पैसा गुंतलेला आहे. ब्रह्मदेशांतली सावकारी व व्यापार धाडसी हिंदी धंदेवाल्यांनीं आपल्या हातांत अनेक वर्षें ठेवला आहे. परंतु ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून विभक्त झाल्यापासून त्या व्यवहारांत अडचणी उपस्थित झाल्या आहेत. हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांच्या परस्पर आर्थिक संबंधाच्या कराराचा प्रश्न वादग्रस्त होऊन बसलाच आहे. त्यांत आतां तांदळाच्या व्यापाराच्या प्रश्नाची भर पडली आहे. ब्रह्मदेशाच्या सरकारानें तांदुळ व कपास ह्यांच्या व्यापाराचें नियमन सर्वस्वी स्वतःच्या हातीं घेतलें आहे, ह्या कारणानें विशेषतः ब्रह्मी तांदुळाच्या व्यापाराशीं अनेक वर्षांचा ज्यांचा संबंध आहे अशा हिंदुस्थानांतील धंदेवाल्यांस आपल्या व्यवहारावर गदा आली आहे असें वाटत आहे. ब्रह्मी शेतकऱ्यांस आपल्या मालाचा योग्य मोबदला मिळावा आणि ब्रह्मी तांदुळाची निर्गत पद्धतशीर रीतीनें व्हावी ह्या हेतूनें ब्रह्मदेशांतील सरकारानें त्याच्या व्यापाराचें नियंत्रण करण्याची योजना निश्चित केली आहे. ह्यामुळें आपल्या हातचा जुना धंदा जाणार व आपण त्यांत घातलेल्या पैशावर आपत्ती येणार अशी हिंदी व्यापाऱ्यांस भीति पडून त्या संबंधांतलें आपलें गाऱ्हाणें हिंदुस्थान सरकार व ब्रह्मदेशाचें सरकार ह्यांच्यापुढें त्यांनीं मांडलें आहे. ह्या व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींची एक सभा मुंबई येथें गेल्या आठवड्यांत झाली आणि तीमध्यें महत्वाचे ठराव मंजूर करण्यांत आले. आपल्या योग्य हितसंबंधांस बाध न आणतां ब्रह्मी सरकारनें तांदुळाच्या व्यापाराच्या नियमनाची योजना अंमलांत आणली तर आपली हरकत नाहीं असें व्यापाऱ्यांचें म्हणणें दिसतें. ब्रह्मी शेतकऱ्यांचें हित पहाणें हें ब्रह्मदेशच्या सरकाराचें आद्यकर्तव्य आहे हें खरें. त्याचप्रमाणें स्वतःच्या देशाच्या व्यापाराचें नियमन विशिष्ट पद्धतीनें करण्याचाहि त्यास अधिकार आहे ह्यांत संशय नाहीं. तरीहि अनेक वर्षें चालत आलेल्या व्यवहार पद्धतींत महत्वाचा बदल करतांना त्या व्यवहारांत गुंतलेल्या हिंदी हितसंबंधांस होईल तितका कमी धक्का लागेल इकडे

त्यानीं लक्ष देणें उचित होय. ह्यासाठी हिंदी तांदूळ-व्यापाऱ्यांचें म्हणणें हिंदुस्थान सरकारनें ब्रह्मी सरकारापुढें मांडून समाधानकारक तडजोड घडवून आणणें आवश्यक आहे.

---

### निजाम सरकारचें १९४१-४२ चें अंदाजपत्रक

युद्धविषयक आणि पावसाच्या प्रतिकूल परिस्थितींतहि निजाम सरकारला करवाढ न करतां १९४१-४२ चें अंदाजपत्रक वाढाव्याचें करतां आलें आहे. उत्पन्नाचे बाजूस २ कोटि, ७४ लक्ष रु. जमीन महसूल; १ कोटि २० लक्ष रु. कस्टम्स; १ कोटि, ७१ लक्ष रु. एक्साइज, असे आकडे आहेत. १९४०-४१ चे तत्सम आकडे ३ कोटि, १० लक्ष; १ कोटि, २० लक्ष, व १ कोटि, ७५ लक्ष, असे होते. एकूण अपेक्षित उत्पन्न ९ कोटि, १५३/४ लक्ष रुपये आहे. एकूण अपेक्षित खर्च ९ कोटि, ७३/४ लक्ष रुपयांचा आहे. व्याजामध्यें व कर्जफेडीच्या रिझर्व्हच्या हप्त्यांत ९ कोटि, ३२ लक्षांची बचत होत आहे. ह्याचें कारण नवीन कर्ज कमी दरानें मिळालें आहे. प्राथमिक शिक्षणावर १ लक्ष रुपये अधिक खर्च होणार आहेत व १ लक्ष, ९० हजार रुपये उस्मानिआ जनरल इस्पितळ, व्हिक्टोरिआ झनाना इस्पितळ व युनानि इस्पितळाचा झनाना विभाग ह्यांवर खर्चले जातील. गेल्या वर्षीच्या पावसाळ्यांत नादुरुस्त झालेल्या तळ्यांचें दुरुस्तीकरितां ३ लक्ष, ८९ हजारांची तरतूद आहे. भांडवली खर्चाची तरतूद पुढील प्रमाणें आहे:— सोन्याचा शोध : २८ लक्ष, ९४ हजार रुपये; लष्करी इमारती १५ लक्ष रुपये; सरकारी कचेऱ्यांच्या इमारती : १० लक्ष रुपये; उस्मानिया विश्वविद्यालयाच्या इमारती : १७१/२ लक्ष रुपये. सध्या ज्या इमारतींचें बांधकाम चालू आहे परंतु सद्यः परिस्थितींत जें तहकूब ठेवतां येईल, अशीं कामें बंद ठेवण्यांत यावयाचीं आहेत. अखेरची अपेक्षित शिल्लक १ कोटि, ११/४ हजार रुपये राहील. संस्थानाच्या एकूण कर्जाची रकम ९ कोटि, ६६ लक्ष रुपये आहे. परंतु सरकारची जिंदगी २६ कोटि, ६० लक्ष रुपयांपेक्षा अधिक आहे. म्हणजे कर्जापेक्षा जिंदगी तिपटीइतकी आहे. पाटबंधारे : ५ कोटि, ६५१/२ लक्ष रुपये; रेल्वेज : १८ कोटि ५८ लक्ष रुपये; वीजकाम : १ कोटि, २ लक्ष रुपये; टेलिफोन्सः २३१/२ लक्ष रुप्ये; छापखाने : १०१/२ लक्ष रुपये; इमारती : ९३ लक्ष रुपये, असा जिंदगीचा तपशील आहे, एकट्या रेल्वेजमधील १८१/२ कोटि रुपयांवर निजाम सरकारास निवळ १ कोटि, ३५ लाखांचें वार्षिक उत्पन्न मिळतें. वरील आकड्यांवरून निजाम सरकारच्या आर्थिक सुस्थितीची कल्पना येईल.

---

### आजारी व जखमी युद्धकैद्यांची देवघेव

अतिशय आजारी अथवा जखमी झालेले एकमेकांचे सर्व सैनिक युद्धमान राष्ट्रांनीं त्यांस प्रवासाजोगे बरे करून परत स्वदेशी पाठवावे, असा आंतरराष्ट्रीय कायदा आहे. ह्याप्रमाणें जर्मन व ब्रिटिश सैनिकांच्या देवघेवीविषयीं कित्येक महिने वाटाघाटी चालू होत्या. ग्रेट ब्रिटनमधील जर्मनीच्या सैनिकांस घेऊन आगबोटी निघणार इतक्यांत जर्मनीनें कळविलें कीं, जितके जर्मन तुम्हीं पाठवाल, तितकेच ब्रिटिश आम्हीं पाठवूं. जर्मनीचें हें म्हणणें त्यानें जुलै १९२९ मध्यें सही केलेल्या जिनीव्हा करारास सर्वस्वी सोडून आहे. पूर्वीची व्यवस्था मोडण्याचा जर्मनीचा आयत्या वेळचा हा प्रयत्न होता. ग्रेटब्रिटननें अर्थातच निघण्यास सुसज्ज असलेल्या आगबोटींतील आजारी व जखमी जर्मनांस खाली उतरवून घेतलें.

### दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.

वरील बँकेच्या व्यवहारास १ एप्रिल, १९३८ रोजीं प्रारंभ झाला. १९३८ अखेर तिचें रोख गोळा झालेलें शेअर भांडवल २ लक्ष, ६२ हजार रुपये झालें व तिच्याकडील ठेवी ६ लक्ष, ८६ हजार रुपयांचा झाल्या. १९३९ अखेर हेच आकडे अनुक्रमें ५ लक्ष, ६ हजार व १० लक्ष ५७ हजार असे झाले आणि खेळत्या भांडवलाचा आकडा १६ लक्ष, ५० हजारांवर गेला. ३१-३-४१ अखेर ठेवी १९ लक्ष, ८५ हजारांच्या होऊन खेळतें भांडवल २५ लाखांवर गेलें. अगदीं अलीकडील आकडे ५ लक्ष, ६६३/४ हजार रुपयांचें भाग भांडवल, २३ लक्ष, २० हजार रुपयांच्या ठेवी व २८ लक्ष, ९० हजारांचें खेळतें भांडवल असे आहेत. म्हणजे साडेतीन वर्षांचे अवधींत खेळतें भांडवल १ लक्ष, २४ हजारांचें सुमारें २९ लक्ष रुपये झालें आहे. ३१-३-४१ अखेरच्या डायरेक्टरांच्या रिपोर्टावरून व ताळेबंदावरून असें दिसतें कीं बँकेनें आपले पैसे अत्यंत तरते ठेवले त्याचा परिणाम थोडासा नफ्याचे रकमेवर झाला. बँकेचे पैसे जास्त नफ्याचे आशेनें गुंतविण्याची घाई न करतां सुरक्षितता व तरतेपणा राखण्याचें धोरणच सद्यःस्थितींत अवलंबिणें इष्ट आहे. बँकेनें ४ हजार रुपयांचा शाखा वाढविण्यासाठी केलेला खर्च जिंदगीमध्यें धरून, बँकेस वर्षअखेर १३१/२ हजार रुपये नफा झाला. त्यांतून १,२०० रुपये रिझर्व आणि कॉंटिजन्सी फंडांत टाकून; १,५०० रुपये बिझिनेस ऑर्गनायझेशन खर्चांतून काढून टाकून व बाकींत मागील शिलकी नफा १,५०६ रुपये मिळवून नफा वाटणीसाठी १२,६९३ रुपये आले. त्यांतून ३,६०० रुपयांची प्राप्तीवरील कराची तरतूद करून ५% क्यु. प्रेफरन्स भागीदारांस पहिल्या दोन वर्षांचें बाकी डिव्हिडंड देऊन टाकलें, त्यास ८,९०० रुपये लागले. बँकेच्या ताळेबंदाचे देणें बाजूस, ५ लक्ष, ६३/४ हजार रुपये भाग भांडवल, ३ हजार रुपये रिझर्व्ह व कॉंटिन्जन्सी फंड, १९३/४ लक्ष रुपये ठेवी, इत्यादि बाबी असून येणें बाजूस रोख व बँकांत ३ लक्ष, ९५ हजार रुपये; सरकारी रोखे, शेअर्स, डिबेंचर्स, मॉर्टगेज डिबेंचर्स, इत्यादींत १२ लक्ष, ४७ हजार रुपये; कर्जें ११ लक्ष, १२ हजार रुपये; प्राथमिक खर्च ८,७०० रुपये; शेअर कमिशन २३ हजार रुपये; बिझिनेस ऑर्गनायझेशन खर्च १८३/४ हजार रुपये इत्यादि आकडे आहेत. श्री. जमनादास मेहता, बार ॲट लॉ, हे बँकेचे अध्यक्ष असून उपाध्यक्ष व ठेवीदारांतर्फे डायरेक्टर श्री. ल. ब. भोपटकर हे आहेत. बँकेच्या स्थानिक ३ व इतर ठिकाणी ३ अशा ६ शाखा व एक पे ऑफिस आहे. मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. डी. डी. देशपांडे, बी. ए. ह्यांच्या परिश्रमाचेंच प्रस्तुत बँकेची प्रगति हें फळ आहे. मॅनेजिंग डायरेक्टरांची मेहनत, कळकळ इत्यादि वाखाणण्यासारखी आहे. महाराष्ट्राची पहिली शेड्यूल्ड बँक म्हणून बँकेनें मिळविलेल्या दर्जात तिच्या व्यवहारांत सत्वर मोठी भर पडून आणखी वाढ होवो.

---

### हिन्दी गिरण्यांतील उत्पादनाचें नियंत्रण

लष्करी कामासाठी लागणारें कापड सध्याचा पद्धतीनें हिंदी गिरण्यांकडून पुरेसें मिळूं शकत नाहीं. ह्याकरितां कापडाच्या गिरण्या सरकारी नियंत्रणाखाली जाण्याचा संभव आहे.

### युद्धसाहित्याच्या उत्पादनाची शिकस्त करा

" जर्मन राक्षसास तयारी करण्यास सवड मिळाली, कीं मध्य आशिया व ग्रेटब्रिटन ह्यांवर हल्ला होणें अगदीं संभवनीय आहे आणि त्याच्या संपविण्याच्या कामाचे यादींत अमेरिकेचें नांव आहे. नेहमींच्या काळांत कारखान्यांतील अपघातांमुळें फारसें नुकसान होत नाहीं, परंतु आजची परिस्थिति वेगळी आहे. भांडवलवाले अगर कामगार ह्यांनीं राष्ट्रीय संरक्षणास बाध आणून अयोग्य नफा मिळविण्यास प्रारंभ केला, तर त्यास माझा अति तीव्र विरोध आहे. अमेरिकेंत अपघातांची संख्या वाढत आहे; त्यामुळें १९४० सालीं कामाचे २ कोटि, ६८ लक्ष तास बुडाले. संपामुळें फक्त ६ लक्ष, ७० हजारच तास बुडाले. अपघात टाळण्याची व्यवस्था करणाऱ्या तज्ञांनीं आपलें काम फार नेटानें चालविलें पाहिजे. जर्मनीचें यशापयश हिटलरच्या शत्रूस आपण युद्धसाहित्य किती जलद पोंचवूं शकतों, ह्यावर अवलंबून आहे. लोकांनीं आपल्या मोटारी बेताच्या वेगानें चालवून पेट्रोलची बचत केली पाहिजे. जेवढ्या आगबोटी बांधल्या जात आहेत, त्यापेक्षा अधिक बोटी जर्मन पाणबोटी बुडवीत आहेत. तथापि अटलांटिकच्या युद्धाचा शेवट ब्रिटिश राष्ट्राच्या बाजूनें होत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. ग्रेटब्रिटनला पेट्रोलची आवश्यकता आहे. तेव्हां प्रत्येक गॅलनची आपण केलेली बचत ब्रिटन व अमेरिका ह्यांच्या बचावास मदत करणार आहे. जर्मनीचा पुरा पाडाव होईपर्यंत अमेरिकेंतील प्रत्येक कामगारानें आपलें काम व्यवस्थित केलें पाहिजे.":– अमेरिकेच्या आरमार खात्याचे सेक्रेटरी, कर्नल नॉक्स ह्यांचें शिकॅगो येथील भाषण.

### जमखिंडी स्टेट सें. को. बँक लि.

वरील बँकेचें ३१-७-४१ रोजीं पहिलें वर्ष संपलें. गेल्या दिवाळीचे पाडव्याचे शुभमुहूर्तावर बँकेचें उद्घाटन समारंभानें झालें. परंतु खऱ्या कामास गेल्या मार्चपासून प्रारंभ झाला. प्रथम विक्रीस काढलेले प्रत्येकीं २५ रुपयांचे २ हजार शेअर्स खपून जाण्याचा योग आलेला आहे. " बँक व्यापाऱ्यांप्रमाणें रयतांचेंहि उपयोगासाठी काढलेली आहे. सहकार्याचे मुख्य उद्देशास अनुसरून इतरांपेक्षा सहकारी पतपेढ्यांना व्याजाचा दर कमी म्हणजे फक्त आठ आणे ठेवला आहे. " अहवाल अखेर जमाखर्चाची तोंडमिळवणी होऊन थोडा नफा उरला आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. कुंदगोळ येथें बँकेची लवकरच शाखा निघणार आहे. ताळेबंदाचे तारखेस बँकेकडे ३५$\frac{1}{2}$ हजारांच्या ठेवी असून तिनें ३४ हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत. बँकेची प्रगति शीघ्र गतीनें होवो.

### श्री. महालक्ष्मी को. बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेच्या पटावर ७२८ सभासद आहेत व शेअर भांडवल ९,६७० रुपये झालें आहे. रिझर्व्ह व इतर फंड ४,०६३ रुपयांचे आहेत. बँकेकडे ९७,३६५ रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें रोख व इतर बँकांत मिळून सुमारें ४८ हजार रुपये ठेवले असून तिचे ९,८४८ रुपये रोख्यांत व भागांत गुंतविलेले आहेत. एकूण कर्ज येणें ५६$\frac{1}{2}$ हजार रुपयांचें आहे. गेल्या सालीं सुरू केलेला कॅश क्रेडिटचा व्यवहार उत्तरोत्तर वाढत आहे. थकबाकीचें येणें कर्जाशीं प्रमाण २·९% पडतें. वर्षअखेर बँकेस २,२११ रुपये निवळ नफा झाला. त्यांतून भागीदारांस ७$\frac{1}{2}$% डिव्हिडंड देण्यासाठीं ६९५ रुपयांचा विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. बँकेस आतां ८ वर्षें पुरीं झालीं असून तिचा व्यवहार वाढत आहे. श्री. विष्णु विनायक जोशी हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. दा. श्री. मुनीश्वर, बी. ए. हे ऑनररी सेक्रेटरी आहेत.

## मुंबई प्रांतांतील युद्धप्रयत्नाची प्रगति

ऑगस्ट १९४१ मधील जमा

| जिल्हा | युद्धफंड | रेडक्रॉस इ. | सिल्व्हर ट्रिंकेट फंड | डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें | ३% डिफेन्स बाँडस | बिनव्याजाचे रोखे | व्हाइसरॉय वॉरफंड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| **उत्तर भाग** | | | | | | | |
| अहमदाबाद | ५,८०४ | १,००६ | ... | २२,२४० | २,५१,४०० | १:० | .. |
| खेडा | २,५८२ | ३६ | ... | १०० | ... | ... | ... |
| भडोच-पंचमहाल | २,२८७ | ११ | ... | १,६३० | ७३,००० | ३०० | ३ |
| सुरत | १४,५३० | ... | ... | १,८५० | २८,३०० | ... | ... |
| ठाणे | २७२ | ५० | ... | ८,११० | ५,६०८ | ... | ... |
| मुंबई उपनगर | ३६५ | ... | .. | ... | २९५५,००० | ... | ... |
| **मध्य भाग** | | | | | | | |
| नगर | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| पूर्व खानदेश | ५०,८३६ | ३०९ | ... | २,८२० | ३,३०० | ... | ... |
| पश्चिम खानदेश | ८९७ | ८४ | ... | २,९०० | १ | ... | ... |
| नाशिक | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| पुणें | १,६७२ | ११९ | ... | २४,३५० | १,४७,६०० | ०,१०१ | ५० |
| सातारा | ४,१२२ | २० | ... | ८,८४० | ७०० | २५५ | ... |
| सोलापूर | १,५३१ | ४१ | ... | ३,२९० | २,५०० | ... | ... |
| **दक्षिण भाग** | | | | | | | |
| बेळगांव | १२,०२८ | १,२३४ | ... | १६० | १२,००२ | ६,९५० | २० |
| विजापूर | १७० | २९६ | ... | ५,२७० | १०० | ४ | ... |
| धारवाड | १७,२७० | १७ | ... | २५.६५० | १,२७,४८४ | ६,०० | ... |
| कानडा | १३९ | ... | ... | १,८१० | ३०० | ... | ... |
| कुलाबा | ३७८ | ९० | ... | ४५० | ५०० | ... | ... |
| रत्नागिरी | १,९६२ | ५ | ५ | ७,८२० | ... | ... | ... |

### भुसावळ पीपल्स को बँक लि.

वरील बँकेचें अधिकृत, खपलेलें व वसूल भांडवल ७५ हजार रुपये आहे व रिझर्व्हजूची एकूण बेरीज ७९¾ हजार रुपये आहे. बँकेकडे ५ लक्ष, ६०¾ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेचे ३½ लक्ष रुपये रोख व इतर बँकांत असून तिचें १ लक्ष, १०¾ हजार रुपये सरकारी रोखे व डिबेंचर्स इत्यादींत गुंतविलेले आहेत. बँकेकडे येणें कर्जें १ लक्ष, ९८½ हजार रुपयांचीं आहेत. येण्यांचे पोटीं बँकेनें घेतलेल्या जमीनी वगैरेंची किंमत २८½ हजार रुपये भरते व इमारतीची किंमत २६ हजारांवर आहे. थकबाकींची रकम ३८¾ हजार रुपये आहे, म्हणजे तिचें प्रमाण १९·५% पडतें. "बुडीत व संशयित फंडांतील रकम ह्यांतून वजा केली, तर हें प्रमाण १३·५% पडतें. बुडीत व संशयित येणीं ६½ हजारांचीं आहेत, परंतु त्यासाठी राखून ठेवलेल्या फंडांत १२,३४९ रुपये आहेत." बँकेच्या पटावर ६०१ सभासद असून तिचें खेळतें भांडवल ७½ लक्ष रुपये आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ११,८४४ रुपये नफा झाला. त्यांतून भागीदारांस ६% डिव्हिडंड देण्यासाठी ४,४६१ रुपयांचा विनियोग करण्यांत आला. बँकेस १६ वर्षे पुरीं झालीं आहेत.

---

### नागपूर पायोनियर को. हाउसिंग सोसायटी लि.

वरील सोसायटीचे पटावर ४३८ सभासद आहेत व त्यांनीं भागांत १,१२,५०० रुपये गुंतविलेले आहेत. सोसायटीचा रिझर्व्ह फंड १३,५१३ रुपयांचा आहे व तिच्या बिल्डिंग फंडांत १,९०६ रुपये आहेत. कॉन्टिंजंट फंड, चॅरिटी फंड, डिव्हिडंड ई फंड, फर्निचर डिप्रीसिएशन रिझर्व्ह फंड, इत्यादि वेगळे फंड आहेत. सोसायटीकडे ३ लक्ष, ६ हजारांच्या ठेवी आहेत, त्यांपैकीं २ लक्ष, ८८ हजारांच्या मुदतीच्या आहेत, त्यांतील १ लक्ष, ३८ हजार रुपये सभासदांचेच आहेत. ठेवींत वाढ झाली आहे. सोसायटीनें प्रांतिक सहकारी बँकेकडून ८६ हजार रुपये घेतले, १ लक्ष, ५० हजार रुपये परत केले व अशा रीतीनें ताळेबंदाचे तारखेस खातीं पूज्य केली. सोसायटीकडे सभासदांची ३ लक्ष, ५८ हजारांचीं कर्जें येणें आहेत. थकलेल्या कर्जांची रकम ३ हजार रुपयांहून कमी आहे. बुडीत अथवा संशयित असें कोठलेंच येणें नाहीं. दिलेल्या कर्जास ९½ लक्ष रुपयांची मालमत्ता व ४३ हजार रुपये दर्शनी किंमतीच्या पॉलिसी ह्यांचें तारण आहे. सर्व घरांचा आगीचा विमा उतरलेला आहे. ठेवींच्या मानानें भरपूर रकम सोसायटीनें तरती ठेवलेला आहे. वर्षअखेर सोसायटीस ९,७९३ रुपये नफा झाला. त्यांतून २,४४८ रुपये रिझर्व्ह फंडांत टाकून व ५,३०२ रुपयांचें डिव्हिडंड (५%) देऊन कर्जदारांस ३½% व्याजांत रिबेट देण्यांत आला. सोसायटीची वार्षिक सभा १४ सप्टेंबर रोजीं भरली होती. त्यावेळीं श्री. जी. ए. भोंसुले, बी. कॉम. ह्यांची मॅनेजिंग कमिटीचे अध्यक्षस्थानीं पुनः निवडणूक झाली व उपाध्यक्ष, श्री. एस. आर मंगरूळकर, बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट आणि सेक्रेटरी श्री. एच. एस. कोलते व श्री. के. बी. फडनवीस ह्यांचीहि फेर निवडणूक झाली. सोसायटीच्या प्रगतीची व सुस्थितीची वरील वृत्तांतावरून कल्पना येईल.

---

रेल्वे रुळ टाकण्यास ३ लक्ष रुपये

विजागापट्टम् बंदरांतील रेल्वे रुळांस आगबोट बांधण्याचा कारखाना जोडण्यास ३ लक्ष रुपये खर्च येईल.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेंक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुण्यांतील विजेचे दर उतरले

पुणें येथील इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीनें आपल्या ग्राहकांस जाहीर केलें कीं, जून १९४१ पासून विजेचे दर भरपूर प्रमाणांत कमी करून त्याप्रमाणें ह्यापुढें येणारीं महिन्यांचीं बिलें नवीन दराप्रमाणें येतील व त्यांमध्यें गेल्या जून आणि जुलै १९४१ ह्या महिन्यांच्या बिलांतील जुन्या दराप्रमाणें झालेली जादा आकारणी कमी करण्यांत येईल. त्याप्रमाणें ती कमी करूनच बिलें पाठविण्यांत आलीं हें ग्राहकांच्या नजरेस आलें असेलच.

पूर्वी घरांत अथवा दुकानांत दिवे, पंखे वगैरेकरितां प्रत्येक युनिटमागें सरकारी कराशिवाय सव्वा-तीन आणे द्यावे लागत, परंतु नवीन दराप्रमाणें युनिटमागें ३ पैसे कमी करून तो दर २॥ आण्यांपर्यंत केला आहे. दर महिन्याच्या बिलामध्यें, १५ दिवसांत भरणा केल्यास प्रत्येक पूर्ण रुपयामागें १ आणा सूट मिळेल.

त्याचप्रमाणें घरांत किंवा धंद्यानिमित्त विजेचीं मोठीं उपकरणें (Major Appliances) वापरण्यासाठी पूर्वी ४ रु. ठरीव आकारणींत ३२ युनिटच वीज वापरतां येत असे, परंतु आतां त्याच ४ रुपयांत दुप्पट म्हणजे ६४ युनिट वीज वापरतां येऊन त्याच्यापुढें झालेल्या विजेच्या खपाबद्दल प्रत्येक युनिटमागें फक्त १ आणा आकारला जाईल. बिलाचा भरणा ताबडतोब केल्यास प्रत्येक पूर्ण रुपयामागें अर्धा आणा सूट मिळेल व ह्या योजनेला (Power Meter) सरकारी कर माफ आहे. ही नवीन दराची योजना आणि विजेच्या प्रकाशाची योग्य माहिती आपल्या ग्राहकांस समजावून देण्याकरतां कंपनीनें प्रतिनिधींची योजना केली आहे व त्यामुळें ग्राहकांची अतिशय सोय झाली आहे.

एकंदरींत कंपनीनें सध्यांच्या महागाईच्या दिवसांत दर कमी करून आपल्या ग्राहकांशीं आपुलकी निर्माण केली आहे. या स्तुत्य उपक्रमाबद्दल कंपनीचे व्यवस्थापक अभिनंदनास पात्र आहेत.

### भारत इन्शुअरन्स कं. लि.

वरील कंपनीनें १९४० सालीं १ कोटि, ५०३ लक्ष रुपयांच्या ७,८०६ पॉलिसी दिल्या. त्या वर्षी कंपनीस एकूण उत्पन्न ४८ लक्ष, १८ हजार रुपये झालें, त्यांपैकीं ३९ लक्ष, ८९ हजार रुपये हप्त्यांच्या रूपानें आलें. खर्चाचें हप्त्यांच्या उत्पन्नाशीं प्रमाण ३६·६% पडलें; १९३९ सालीं तें ४५·८% पडलें होतें. कंपनीच्या डायरेक्टरांनीं कंपनीच्या जिंदगीची मेसर्स ए. एफ. फर्ग्युसन आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंट्स, ह्यांचेकडून तपासणी व किंमतहि करवून घेतली व त्यास अनुसरून डायरेक्टरांनीं बुडीत कर्जे लिहून टाकून व संशयित कर्जासाठीं तरतूद करून येणें रकम योग्य रीतीनें दाखविली आहे. गेल्या मूल्यमापनांत भागीदारांसाठी राखून ठेवलेल्या वाढाव्यांतून ३% डिव्हिडंड देण्यांत आलें. १९४० सालीं कंपनीनें १९ लक्ष, २२ हजार रुपयांचे क्लेम्स दिले.

### व्हिक्टोरिया मेमोरिअल लायब्ररी, मालवण

वरील संस्था उपयुक्त कार्य करीत असल्याचें तिच्या १९४०-४१ च्या अहवालावरून दिसून येतें. लायब्ररींत सुमारें ४६ मासिकें, साप्ताहिकें, दैनिकें इत्यादि चालू आहेत. श्री. पां. रा. पई, बी. ए., एलएल्. बी. हे लायब्ररीचे अध्यक्ष असून श्री. रा. वा. कामत हे कार्यवाह आहेत.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. | ४,०२,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. | २,०१,०२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. | ३२,००,००० |

डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१५,५०,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५-५५) ... ... | १११—३ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६—० |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०३—४ |
| ३% (१९६३-६५) ... ... ... | ९५—१ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९७—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३-६३) ... .. | ११६—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... — | १२७—१२ |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००-५०) ११% ... ... | १४८—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ९% ... | ४९—१२ |
| इंपीरिअल बँक (५००) १२% ... ... | १६१०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०९—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १२% ... ... | १४६—८ |
| कराची (१००) ९% ... ... ... | २०६—६ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १८२५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १७८५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती (१००) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा-जामनेर (१००) ३½% ... ... | ९८—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% ... | ८७२—८ |
| तापी व्हॅली (५००) ८% ... ... ... | ६४७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. ... ... ... | २४२—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु. ... ... | ५२—० |
| शिंद्या स्टीम (१५) १ रु. ... ... ... | २५—९ |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु. ८ आ. ... | ५३—० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ४५३०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २१७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) ७½% रु. ... ... | १५२—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३९१—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) १७२ रु. १० आ. ० पै. ... | २०३२—८ |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | १५२—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२—३—९ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६३—०—० |


## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद



## " अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.

२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.

३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

४ सहकार : किं. २ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.

२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.



## पुण्यांत आल्यावर

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

# OUR HOME

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

## उतरण्यास या.

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

अवर होम,

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
संग्रह करा
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
—: रक्तवर्धक :—
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा
मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें
आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
'पायोनियर डाइंग हाऊस'
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.


मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स
वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी
Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ, हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान
एम्ब्रॉयडरी मार्ट
६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक







सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७१ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

**तयार कपड्याचे व्यापारी**

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

**जाहीरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख २२ आक्टोबर, १९४१ अंक ४३





पुण्यांतील

## कापडाचे व्यापारी यांना

★ अपूर्व संधी ★

## "विजय टेक्स्टाईल्स् लि."

एरंडवणें, पुणें ४

सर्व तऱ्हेचें कापड आमचे कारखान्यांत विणलें जातें.

★ ★ ★

स्पेशल घाऊक ऑर्डर्स व्यापाऱ्यांचे मागणीप्रमाणें घेतल्या जातात.

★ ★ ★

**एक वेळ अवश्य भेट देऊन कारखाना पहावा.**

★

आमचे हितचिंतकांस नवें वर्ष सुखदायी होवो !

# शेअर विक्री चालू आहे.




पूर्ण माहितीकरितां लिहा अगर समक्ष भेटा.

सी. जी. आगाशे
बी. ए. एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंट

१८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २.

कॅप्टन हिज् हायनेस श्रीमंत सर चिंतामणराव धुंडिराज ऊर्फ आप्पासाहेब पटवर्धन, के.सी.आय.ई.,
राजेसाहेब संस्थान सांगली, यांच्या आश्रयाखालील

# सांगली बँक लिमिटेड.

[स्थापना ५ आक्टोबर १९१६]

१९३६ सालीं बँकेनें आपली स्वतांची भव्य इमारत बांधली. इमारतीमध्यें—
' सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ' बांधून बँकेनें जनतेची फार मोठी सोय केली आहे.
विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे ' महाराष्ट्र व दक्षिण-महाराष्ट्र ' मिळून " सिल्व्हर ज्युबिली साजरी करणारी " ही पहिलीच जॉइंट-स्टॉक बँक होय.

तारीख ३०।९।४१ रोजीं २५ वर्षें पुरीं होऊन दसऱ्याच्या सुमुहूर्तावर
**रौप्य-ज्युबिली** साजरी करणेंत आली.

अधिकृत, काढलेलें व भरलेलें भांडवल ... २,००,००० रुपये
रिझर्व फण्डस ... १,७०,००० रुपये ... ठेवी.... २५,००,००० रुपये


बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**हेड् ऑफीस सांगली** S. M. C.

शाखाः—
(१) शहापूर (बेळगांव), (२) रबकवी, (३) तेरदळ, (४) कवठे (महांकाळ)
(५) मंगळवेढें, (६) शिरहट्टी, (७) तुपारी (ताकारी M. S. M. Ry.)
(८) विलिंग्डन कॉलेज (मि. टेरिटरी.)

मॅनेजरः—
पु. श्री. मोकाशी
B. A.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.,



पुणें शहर.
[टेलिफोन नं. ४८३]

या बँकेनें केलेल्या नवीन सोईचा म्हणजे
**सेफ डिपॉझिट व्हॉल्टचा जरूर फायदा घ्या.**

**फक्त एक रुपयांत**

आपल्या मौल्यवान जिनसा वगैरे भक्कम कप्प्यांत

★ **सुरक्षित ठेवा.** ★

बँकेंत येऊन समक्ष पहा व खात्री करून घ्या. सुट्टीखेरीज केव्हांही उघडतां येतें.
जास्त माहिती
मॅनेजिंग डायरेक्टरकडे, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें.

" प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग " पुणें.

| | |
|---|---|
| अभिकृत भांडवल रु. १०,००,००० | विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल रु. २,६३,१०० | वसूल भांडवल ... ... रु. ६३,३२५ |

... बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ...

| | |
|---|---|
| रा. ग. रा. साठे, चेअरमन. | रा. दा. ग. बापट, व्हा. चेअरमन |
| रा. श्री. म. जोशी, | रा. स. के. भावे, |
| रा. ग. उ. चितळे, | रा. ल. रा. घडफळे, |
| रा. वा. पां. वैद्य, | रा. चिं. त्रिं. चितळे, |

रा. स. गो. केणी—खातेदारांतर्फें डायरेक्टर.

## बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. डी. जोगळेकर,
बी. ए. (ऑ.) बी. कॉम. एल्एल्. बी.,
मॅनेजर.

चिं. त्रिं. चितळे,
मॅ. डायरेक्टर.

# वेस्टर्न लाइफ इन्शुरन्स कंपनी लि॰ इण्डिया

कंपनीचे विमेदार व हितचिंतक यांना दिवाळी सुखाची जावो.

हेड ऑफिस : सातारा सिटी.

पुणें शाखा :
१७९ बुधवार, लक्ष्मी रोड, पुणें नं. २

# अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ५१० |
| २ स्वतःस 'बँक' म्हणविणाऱ्या संस्थांची जबाबदारी ... | ५११ |
| ३ स्फुट विचार ... | ५१२ |
| दिवाळी—युद्धपरिस्थितीकडे पहाण्याची दूरदृष्टि—मध्यवर्ती साखर समिति–बाजारभावांचें नियंत्रण—दिल्ली येथील परिषद्—कच्च्या व पक्क्या मालाच्या किंमती · हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार | |
| ४ आयुर्विम्याची प्रगति (ले. ग. स. मराठे, एम. ए., ए. आय. ए., ॲक्चुअरी) ... | ५१५ |
| ५ महायुद्ध कालांतील वृत्तपत्रधंद्याची बिकट परिस्थिति (ले. आ. रा. भट, एम. कॉम. उपाध्यक्ष, देशी भाषा वृत्तपत्रसंघ, पुणें) ... | ५१७ |
| ६ कागदाचे भाव आणि नियंत्रण (ले. वि. अ. पटवर्धन, बी. एससी., आ. भू. मुद्रणालय पुणें) .. ... | ५१९ |
| ७ चाकपट्टी व पुणें शहर म्यु. चें धोरण (ले. श्री. वि. गाडगीळ, एम. ए., एलएल. बी., सं. मोटार ट्रॅन्सपोर्ट) ... | ५२१ |
| ८ सोनें बाजार (ले. प्रो. द. गो. कर्वे, एम. ए.) | ५२३ |
| ९ व्यक्ति एक पण सभासदत्वें अनेक (ले. "दत्तशर्मा") ... | ५२३ |
| १० हुंड्या, चेक व ड्राफ्ट आणि त्यांची वसुली (ले. ल. के. भागवत, बी. ए. ग्वाल्हेर) ... | ५२५ |
| ११ स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक प्रगति (ले. य. द. खोले, एल. एस. जी. डी.) ... | ५२७ |
| १२ महागाई व स्वस्ताई | ५२८ |
| १३ नुकसानभरपाई म्हणजे जुन्या ऐवजीं नवें देणें नव्हे ... ... | ५३० |
| १४ महाविद्यालयाचें ग्रंथालय (ले. र. श. पारखी, आसि. लायब्ररिअन, वाडिया लायब्ररी, पुणें) ... ... | ५३१ |
| १५ राष्ट्राची भावी पिढी (ले. वि. पां. बापट, डी. एम इ. इ., पुणें इ. सप्लाय कं.) ... | ५३३ |
| १६ हिंदी चहाचा धंदा | ५३५ |
| १७ ग्रेटब्रिटनची भावी राणी ... ... | ५३६ |
| १८ हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या गिरण्या | ५३७ |
| १९ उत्तर हिंदुस्थानांतील साखरेचे कारखाने | ५३८ |
| २० हिंदुस्थानची शिरगणती .. ... | ५३९ |
| २१ हिंदी चलनी नोटांची परिस्थिति ... | ५४१ |
| २२ शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति ... | ५४१ |
| २३ बॉम्बे को. कार्टेली | ५४१ |
| २४ कोंबड्या पाळण्याचा धंदा ... ... | ५४३ |
| २५ डिव्हिडंड व बोनस | ५४५ |
| २६ मुंबई शहरांतील रस्त्यांवरील वहानें ... | ५४५ |
| २७ निवडक बाजारभाव | ५४६ |
| २८ गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्ड ... ... | ५४७ |

# जाहिरातींची अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विजय टेक्स्टाईल्स लि. ... ... | ५०५ |
| २ बृहन्महाराष्ट्र शुगर सिं. लि. ... | ५०६ |
| ३ सांगली बँक लि. ... ... | ५०७ |
| ४ पुणें सेंट्रल को. बँक लि.... ... | ५०७ |
| ५ प्रेसिडेन्सी इं बँक लि. ... ... | ५०८ |
| ६ वेस्टर्न इंडिया कं. लि. ... ... | ५०८ |
| ७ न्यू सिटिझन बँक लि. ... ... | ५१४ |
| ८ दामोदरदास भगवानदास... ... | ५१६ |
| ९ महिंद्रकर ब्रदर्स ... ... | ५१७ |
| १० को. बुकडेपो ... ... | ५१८ |
| ११ पायोनियर डाइंग हाऊस ... ... | ५१८ |
| १२ कमार्शिअल बँक लि. ... ... | ५१८ |
| १३ सहकार ... ... | ५१८ |
| १४ एल. एस. जी. डी. ... ... | ५२० |
| १५ बँक ऑफ इंडिया ... ... | ५२० |
| १६ जे. जी. घेसास आणि कं. ... | ५२१ |
| १७ पुणें इ. स. कं. लि. ... ... | ५२२ |
| १८ सदर्न निटिंग वर्क्स लि. ... ... | ५२२ |
| १९ देवकरण नानजी बँक लि. ... | ५३२ |
| २० श्रीलक्ष्मी सें. को. बँक लि. ... | ५३२ |
| २१ धूतपापेश्वर पनवेल, लि. ... ... | ५३३ |
| २२ इंडियन प्रो. इं. कं. लि. ... ... | ५३४ |
| २३ कराड अ. को. बँक लि.... ... | ५३४ |
| २४ न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि. ... ... | ५३४ |
| २५ संत सखु ... ... | ५३५ |
| २६ औंध म्यु. विमा कं. लि.... ... | ५३६ |
| २७ ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशु. कं. लि. ... | ५३६ |
| २८ बुधगांव बँक लि. ... ... | ५३८ |
| २९ अर्बन को. बँक लि. ... ... | ५३८ |
| ३० रम्य वाचनालय ... ... | ५३८ |
| ३१ भिडे आणि सन्स ... ... | ५३९ |
| ३२ सी. आर. शेवक ... ... | ५३९ |
| ३३ जें जी. दातार ... ... | ५३९ |
| ३४ बापट ब्रदर्स ... ... | ५३९ |
| ३५ व्ही. पी. बेडेकर ... ... | ५४० |
| ३६ द. रु. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. ... | ५४० |
| ३७ माधवाश्रम ... ... | ५४० |
| ३८ अवर होम ... ... | ५४० |
| ३९ साठे बंधु, पुणें ... ... | ५४२ |
| ४० बार्शी सें. को. बँक लि. ... ... | ५४२ |
| ४१ कोल्हापूर अ. को. बँक लि. ... | ५४२ |
| ४२ द ना. हेजीब ... ... | ५४२ |
| ४३ पेन्टर ए. जी. बेडेकर ... ... | ५४३ |
| ४४ सोलापूर ग्लास वर्क्स लि. ... | ५४३ |
| ४५ कॉमनवेल्थ ॲ. कं. लि. ... ... | ५४४ |
| ४६ 'संगम' ... ... | ५४४ |
| ४७ मोहन वॉच कंपनी ... ... | ५४६ |
| ४८ मुजुमदार टॉय वर्क्स ... ... | ५४६ |
| ४९ म. गो. कुलकर्णी आणि कं. ... | ५४६ |
| ५० बायो टोना ... ... | ५४६ |
| ५१ मधुमेहावरील औषध ... ... | ५४७ |
| ५२ पूना गेस्ट हाऊस ... ... | ५४७ |
| ५३ हेअर कटिंग सलून ... ... | ५४७ |
| ५४ पोरवाल ब्लॅक टूथ पावडर... ... | ५३७ |
| ५५ ओगले ग्लास वर्क्स लि. ... ... | ५४८ |
| ५६ डोंगरे बालामृत ... ... | ५४८ |
| ५७ मिरज स्टेट बँक लि. ... ... | ५४९ |
| ५८ बँक ऑफ महाराष्ट्र लि.... ... | ५४९ |
| ५९ बॉम्बे प्रॉ को. बँक लि. ... ... | ५५० |
| ६० सारस्वत को. बँक लि. ... ... | ५५१ |
| ६१ आयुर्वेद रसशाळा पुणें लि. ... | ५५१ |
| ६२ आयुर्वेदाश्रम फार्मसी लि.... ... | ५५२ |
| ६३ डंकन पेपर मिल्स लि. ... ... | ५५२ |

## "अर्था"चा पुढील अंक

अर्थाचा ता. २९ ऑक्टोबरचा अंक दिवाळीनिमित्त बंद राहील आणि त्यापुढील अंक ता. ५ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.

# विविध माहिती

### लष्करी मोटारींच्या अपघातामुळें होणारें नुकसान

लष्करी मोटारींच्या ड्रायव्हरांच्या निष्काळजीपणानें हाकण्यामुळें अनेक ठिकाणीं अपघात घडतात. त्यामुळें होणारी नुकसानी अपघातांत सापडणारास भरून मिळते किंवा नाहीं, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यासंबंधांत असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स ऑफ इंडियानें हिंदुस्थान सरकारकडे विचारणा केली आहे. इंग्लंडमध्यें लष्करी मोटारहाक्याविरुद्ध नुकसान-भरपाईचा दावा आणतां येतो व ड्रायव्हरास भरावी लागणारी रकम सरकार देतें. म्हणजे, खाजगी मोटारीखाली सापडणारापेक्षां लष्करी मोटारीखालीं सापडणारास नुकसान-भरपाई तेथें मिळण्याचा संभव अधिक असतो. प्रत्यक्ष सरकारविरुद्ध मात्र दावा आणतां येत नाहीं.

### "गंगाष्टकम्"

"गंगाष्टकम्" ह्या नांवाचें कवि कालिदासाचें त्यावर नांव असलेलें पुस्तक बिहारमधील एका खेडेगांवांतील पंडित त्रिगुणानंद शुक्ल ह्यांस त्यांचे घरीं सापडलें आहे. जगप्रसिद्ध कवि कालिदास व पुस्तकावरील नांव असलेले कालिदास हे एकच कीं काय, हें नक्की सांगतां येत नाहीं.

### म्हैसूर सरकारच्या नियंत्रणाखालचे उद्योगधंदे

ज्या उत्पादनास लागणारा कच्चा माल मोनॉपलीचे स्वरूपाचा आहे अथवा तो शेतकरी करीत आहेत, अशा उत्पादनाच्या कारखान्यांची व्यवस्था सरकारी नियंत्रणाखाली असणें हितकारक ठरलें आहे, असें आपलें मत म्हैसूरच्या दिवाणांनीं म्हैसूर दसरा प्रदर्शनाचे वेळीं बक्षिसें वाटतांना प्रदर्शित केलें.

### स्टँडर्ड टाइम

इंडियन स्टँडर्ड टाइम सबंद हिंदुस्थानांत एक तास पुढें करण्याविषयींची मद्रास सरकारची सूचना आहे. तिला मुंबईतील व्यापारी संस्थांनीं विरोध दर्शविला आहे.

### मद्रासच्या गव्हर्नरांचा युद्ध-फंड

वरील युद्धफंडाची रकम १ कोटि, ५५ लक्ष रुपये झाली आहे. त्यापैकीं पूर्व गोदावरी व कोइमतूर जिल्ह्यानें प्रत्येकीं ११ लक्ष आणि मदुरा व गुंतूर जिल्ह्यांनीं प्रत्येकीं १० लक्ष रुपये दिले आहेत.

### डि. से. सर्टिफिकिटें घेण्यासाठी बँकेचें सहकार्य

अहमदाबाद येथील एका बँकेच्या नोकरवर्गानें १२,८०० रुपयांचीं डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें घेतलीं आहेत. बँकेनें ९०% रकम कर्जाऊ दिली आहे, ती सर्टिफिकिटें धारण करणारांनीं मासिक हप्त्यांनीं फेडावयाची आहे.

### इंडियन पेंट असोसिएशन

हिंदुस्थानांतील रंग, व्हार्निश, इत्यादींच्या कारखानदारांनीं आपल्या हितसंबंधांचें संरक्षण करण्याकरितां वरील नांवाची एक संस्था काढली आहे.

### सांगली बँक लि. ची ज्युबिली

सांगली बँक लि. नें आपली रौप्यज्युबिली नुकतीच साजरी केली. त्यावेळीं बँकेनें युद्धफंडास १ हजार रुपयांची देणगी दिली.

### खटाव मकनजी स्पि. ॲन्ड वी. कं. लि.

वरील कंपनीनें ३० जून, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी १ कोटि, १० लक्ष रुपयांचें सूत व कापड विकलें; म्हणजे त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा विक्रींत ५७% वाढ झाली. गिरणींत एकूण ४८ लक्ष रुपयांची कपास लागली. कंपनीस १०½ लक्ष रुपये नफा झाला व तिनें १०% डिव्हिडंड वाटलें.

### "बाँबर कमांड"

ब्रिटिश वैमानिक खात्यानें प्रसिद्ध केलेलें "बाँबर कमांड" ह्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या ३ लक्ष प्रती पुस्तकाच्या प्रसिद्धीचे दिवशींच खपल्या. सुमारें २५ भाषांत त्याच्या ४० स्वतंत्र आवृत्त्या आतां काढण्यांत येणार आहेत.

### मॅटर्निटी बेनिफिट

खाणींतील स्त्री-कामगार बाळंत होण्यापूर्वी कांहीं काळ व नंतर कांहीं काळ त्यांच्या कामाचें नियंत्रण करणारें व त्यांस भत्ता देणारें एक बिल मध्यवर्ती असेंब्लीच्या येत्या अधिवेशनांत मांडण्यांत येणार आहे.

### सबंद हिंदुस्थानासाठीं गुमास्ता कायदा

दुकानें, व्यापारी संस्था, हॉटेलें, सिनेमागृहें व नाटकगृहें ह्यांतील नोकरांस आठवड्यांतून एक दिवस सुट्टी देणारें एक बिल मध्यवर्ती असेंब्लीच्या येत्या बैठकींत सरकार मांडणार आहे. आणखी अर्धा दिवस सुट्टी दिली पाहिजे, अशी तजवीज वाटेल तर प्रांतिक सरकारांनीं करावयाची आहे. हा कायदा स्वतःस लागू करणें न करणें हें प्रांतिक सरकारांच्या इच्छेवर अवलंबून आहे.

### अफगाणिस्तानाचें हिन्दुस्थानावर अवलंबन

अफगाणिस्तानास लागणाऱ्या पेट्रोलपैकीं एक तृतीयांश रशियांतून व दोन तृतीयांश हिंदुस्थानांतून जात असे, परंतु आतां अफगाणिस्तानास पेट्रोलसाठीं हिंदुस्तानावर सर्वस्वी अवलंबून रहावें लागत आहे. हिंदुस्थानानें पेट्रोलचा पुरवठा २५ % नें कमी केला आहे, त्यामुळें दळणवळणास अडचण भासूं लागली आहे. तथापि, अफगाण सरकारनें काबूल ते पेशावर लॉरी सर्व्हिस चालू ठेवली आहे.

### हिटलरचें नवें पुस्तक?

रशियांतील युद्ध संपल्यानंतर त्यासंबंधीं हिटलर लिहीत असलेलें पुस्तक प्रसिद्ध होईल, अशी लंडनहून बातमी आली आहे. युद्धाची दैनंदिन माहिती त्यांत देण्यांत येईल.

### नात्सींच्या जुलमाचा हॉलिवुडवर परिणाम

युरोपचा बहुतेक भाग जर्मन नात्सींच्या पायाखाली तुडवला गेल्यानें हॉलिवुडच्या चित्रपटांचें तेथील मोठें गिऱ्हाइक नाहींसें झालें आहे. चवदा देशांतील मिळून ११,१६० सिनेमागृहें बंद पडलीं असून त्या देशांतील सुमारें १५ कोटि रहिवाशांपैकी निम्म्या प्रेक्षकांस तीं पारखीं झालीं आहेत.

### सिमेंटचें उत्पादन

हिंदुस्थानांत सिमेंटच्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनास १९१४ सालीं प्रारंभ झाला. सध्या त्याच्या २० कंपन्या असून त्यांचें वार्षिक उत्पादन १० लक्ष टनांपेक्षा अधिक आहे. हिंदी सिमेंट उत्कृष्ट दर्जाचें असल्यानें विदेशी सिमेंटला त्यानें पार मागें सारलें आहे.

वर्ष ७ वें | अर्थ | बुधवार, ता. २२ ऑक्टोबर, १९४१ | अंक ४३ वा

# स्वतःस 'बँक' म्हणवणाऱ्या संस्थांची जबाबदारी

## कंपन्यांच्या कायद्यांत सूचित दुरुस्ती

बँकांच्या व्यवहारांचें नियमन करणारा स्वतंत्र कायदा हिंदुस्थानांत अस्तित्वांत नाहीं. असा कायदा असणें अगत्याचें असल्याविषयीं अनेकवार सूचना करण्यांत आल्या आहेत आणि त्याचा एक मसुदाहि अलीकडे सरकारनें लोकमत प्रदर्शनासाठी प्रसिद्ध केला होता. त्या मसुद्यासंबंधानें कित्येक सूचनाहि संबंधी लोकांनीं सादर केल्या होत्या. परंतु असला वादग्रस्त व गुंतागुंतीचा प्रश्न हातीं घेण्यास सध्याची परिस्थिति अनुकूल नाहीं ह्या मुद्यावर सरकारनें त्याचा विचार करण्याचें पुढें ढकललें. संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांचा १९१३ सालचा व पुढें १९३६ मध्यें दुरुस्त झालेला जो कायदा आहे, त्यांतच बँकांचे संबंधीं कांहीं कलमें घालून त्या संस्थांच्या व्यवहाराच्या नियमनाची व्यवस्था हिंदुस्थान सरकारनें केली आहे. स्वतंत्र व व्यापक कायद्याच्या अभावीं बँकांच्या नियंत्रणाची तरतूद तात्पुरती त्या रीतीनें करण्यांत आली आहे. ह्यामुळें या संबंधांत कांहीं अडचण भासल्यास किंवा विशिष्ट योजना अमलांत आणणें आवश्यक वाटल्यास कंपन्यांच्या वर निर्दिष्ट केलेल्या कायद्याच्या दुरुस्तीच्या मार्गानेंच तो प्रश्न सोडवणें भाग आहे हें उघड आहे. अशा प्रकारची एक दुरुस्ती करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरवलें असून त्याबाबत लोकमत अजमावण्यांत येत आहे.

कंपन्यांच्या कायद्यांत बँकिंग कंपन्यांच्या प्रकरणांत २७७ एफ् ह्या कलमांत "बँकिंग कंपनी" कोणत्या संस्थेस म्हणावें ह्याचा खुलासा केलेला आहे. चेक किंवा तसल्याच दुसऱ्या आज्ञापत्रानें गिऱ्हाइकांस काढून घेतां येईल असा पैसा ठेव म्हणून स्वीकारणें हें बँकिंगच्या धंद्याचें प्रमुख लक्षण मानण्यांत येतें आणि त्याचा वरील कलमांत उल्लेख असून ह्याशिवाय अशा कंपनीनें कोणते व्यवहार केले तरी चालतील ह्याचा तपशील दिला आहे. त्यांत १७ बाबी आहेत आणि बँकर्स सामान्यतः ज्या प्रकारांचा व्यवहार करतात त्यांत निष्कारण त्यांची कुंचबणा होऊं नये हा तेथें उद्देश आहे. १९३६ सालानंतर स्थापन होणाऱ्या बँकांवर कांहीं निर्बंध २७७कलमांत घालण्यांत आले आहेत.त्यांमध्यें,सर्व बँकांनीं आपल्या ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत रोकड जवळ बाळगली पाहिजे आणि त्याविषयींचे आकडे दर महिन्यास कंपन्यांच्या रजिस्ट्रारकडे दाखल केले पाहिजेत असा एक नियम आहे. ह्या निर्बंधाचा हेतु उघड आहे. बँकांनीं स्वीकारलेल्या ठेवी योग्य वेळीं मागणीबरहुकूम परत करतां येण्यावर त्या संस्थांची सुरक्षितता अवलंबून रहाते. तथापि कांहीं बँका सावधगिरीचें हें अत्यावश्यक धोरण संभाळीत नाहींत आणि ठेवीदारांचा पैसा धोक्यांत आणतात. अशा प्रकारास आळा बसावा ह्या उद्देशानें रोकड शिलकेबाबतचा नियम केलेला आहे. बँकांच्या व्यवहाराचें नियमन कायद्यानें करण्याचें कारण, 'बँक' ह्या नांवावर जनतेचा विश्वास बसतो आणि लोक त्यांमध्यें ठेवी ठेवतात म्हणून ठेवीदारांच्या हिताचें संरक्षण करण्याची जबाबदारी सरकारवर येते, हें आहे.

ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत रोकड हाताशी बाळगून त्या विषयींचे मासिक तक्ते रजिस्ट्रारकडे पाठवण्याची अट "बँक" हें नांव धारण करणाऱ्या संस्थांवर कंपन्यांच्या कायद्यानें लादिली असल्याचें वर सांगितलें आहे. तथापि, कित्येक 'बँका' ह्या अटीमधून निसटण्यासाठी पळवाट काढतात असें निदर्शनास आलें असल्यानें त्यावर उपाय योजणें सरकारास जरूर वाटत आहे. एकूण १,४२१ बिगर शेड्यूल्ड बँकांपैकी फक्त ६७२ संस्था रोकड शिलकेविषयीं रजिस्ट्रारना माहिती पुरवतात किंवा योग्य प्रमाणांत रोकड जवळ ठेवतात असें आढळून आलें आहे आणि अशा रीतीनें कायद्यांतील निर्बंधाचा हेतु निष्फळ करून टाकण्यांत येत आहे. आपण ह्या निर्बंधाच्या कक्षेंत येत नसल्यानें त्यानें बांधलेली नाहीं असें ह्या बँकांचें म्हणणें आहे. चेकच्या मार्गानें काढून घेतां येतील अशा ठेवी स्वीकारण्याचा "प्रमुख व्यवहार असणें" हें बँकांचें लक्षण वर निर्दिष्ट केलेल्या २७७ एफ् ह्या कलमांत दाखल आहे. अवतरणांत दिलेल्या प्रकारचा आपला प्रमुख धंदाच नाहीं असा ह्या बँकांचा युक्तिवाद असून न्यायमंदिरांतहि कांहीं ठिकाणीं तो मान्य करण्यांत आला आहे. लहान आकाराच्या बँकांचे बाबतींत कोणत्या बँका कायद्याच्या कक्षेंत येतात आणि कोणत्या येत नाहींत हें कंपन्यांच्या रजिस्ट्रारला ठरवण्याची अडचण भासते. लहान सहान बँकांचा "प्रमुख व्यवहार" कायद्यांत सांगितलेला असेल किंवा नाहीं ह्या विषयींच्या निर्णयाचे बाबतींत मतभेद होण्यासारखा असल्यानें सरकारनें मूळ कायद्याच्या कलमांत स्पष्टीकरण करण्याचें ठरवलें आहे. वर वर्णिल्याप्रमाणें ठेवी स्वीकारणें हा कोणत्याहि बँकेचा मुख्य व्यवहार असो वा नसो, तिच्या नांवांत 'बँक' 'बँकर' किंवा 'बँकिंग' हा शब्द आला कीं ती संस्था कायद्याच्या निर्बंधांस पात्र होईल अशा आशयाची दुरुस्ती करण्याचा सरकारचा विचार आहे. आपल्या नांवांत वरील शब्द न येऊं देतां कित्येक संस्था बँकिंगचा व्यवहार करतील आणि कायद्याच्या निर्बंधांतून निसटूं शकतील हें खरें. तथापि, 'बँक' ह्या नांवानें जनतेची दिशाभूल होण्याचें बंद पडेल आणि स्वतःच्या पैशाच्या सुरक्षितपणाची जबाबदारी ठेवी ठेवणारांवर राहील. शिवाय, स्वतःस 'बँक' न म्हणतां ठेवींचे व्यवहार करणाऱ्या संस्थांच्या व्यवहाराची छाननी करून त्या कायद्याचे कक्षेंत येतांत असा निर्णय देण्यास रजिस्ट्रार ह्यांस मोकळीक राहीलच. आपला पैसा ठेव म्हणून बँकवजा संस्थांचे स्वाधीन करणाऱ्या सामान्य जनतेच्या दृष्टीनें सरकारनें योजिलेली कायद्याच्या दुरुस्तीची व्यवस्था योग्य आहे असेंच म्हटलें पाहिजे. ताक मागावयास जाणारांनीं भांडें लपवण्यांत काय स्वारस्य आहे ? असें 'बँक' हें नांव धारण न करतां ठेवी स्वीकारणाऱ्या कांहीं संस्थांस सरळ विचारतां येण्यासारखें आहे.

# स्फुट विचार

## दिवाळी

हिट्लरशाहीच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेनें अनेक लहानमोठ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा बळी घेतला असून तिनें आपला मोर्चा रशियाच्या विरुद्ध वळवला आहे. ह्या जगद्व्यापी संकटाचा प्रतिकार इंग्लंड व अमेरिका हीं राष्ट्रें निकरानें करीत आहेत आणि त्या कामांत हिंदुस्थानचें प्रथमपासून पूर्ण सहकार्य आहे. हिट्लरशाहीविषयींचा आपला तिटकारा हिंदी जनतेनें एकमुखानें असंदिग्ध रीतीनें व्यक्त केला आहे आणि तिच्या पाडावाचे प्रयत्न चालले आहेत, त्यांत हा देश परिणामकारक रीतीनें भाग घेत आहे. युद्धाचा लोंढा हिंदुस्थानच्या सरहद्दीस धडका देण्यास जवळ येऊं पहात आहे, अशा स्थितींत स्वसंरक्षणाच्या दृष्टीनेंहि हिंदी लोकांस युद्धाचे बाबतींत सर्व प्रकारचें सहाय देण्याचें कर्तव्य बजावावयाचें आहे. व्यापार, उद्योगधंदे, बाजारभाव आणि आर्थिक व सामाजिक राहाणी ह्यांवर युद्धामुळें अपरिहार्य रीतीनें होणाऱ्या परिणामांचें विवेचन आम्हीं वेळोवेळ केलें असून होणाऱ्या घडामोडींमधून हिंदी राष्ट्रानें मार्ग कसा काढावा ह्याचें दिग्दर्शनहि केलें आहे. देशाची आर्थिक घडी युद्धपरिस्थितीमुळें विस्कटावी हें स्वाभाविक आहे. तथापि, याच कारणानें ह्या देशाचें विस्तृत औद्योगिक केंद्र बनून नव्याजुन्या देशी उद्योगधंद्यांस विलक्षण चालना मिळाली आहे, हें विसरतां कामा नये. आज रशियांत घनघोर संग्राम चालला आहे आणि त्याच्या भावी परिणामांच्या कल्पनेनें जगाचें मन व्यग्र होणें सहाजिक आहे. तरीहि लोकांनीं शांत चित्तानें व निश्चयानें परिस्थितीस तोंड देऊन आपला जीवनक्रम सुरळीत चालवणें आवश्यक आहे. ह्याच भावनेनें जनता दिवाळीचा सण साजरा करील ह्यांत संशय नाहीं. यंदाची दिवाळी आमच्या वाचकांस, मित्रांस व आश्रयदात्यांस सुखाची जावो, असें आम्ही इच्छितों.

## युद्धपरिस्थितीकडे पहाण्याची दूरदृष्टि

पूर्व रणांगणांत युद्धाचा लोंढा रशियांत जसजसा वहात चालला आहे तसतसा रशियन सैन्याचा करारीपणा, चिकाटी व शौर्य हीं अधिकाधिक प्रत्ययास येत आहेत. लेनिनग्राड किंवा मॉस्को हीं शहरें आपल्या हातीं येण्यास आतां कांहीं अवकाश राहिला नाहीं अशी हिट्लरनें एका बाजूस कल्पना करावी तोंच रशियन फौजांनीं उलट हल्ले करून किंवा आपलीं ठाणीं घट्ट धरून बसून शत्रूची चाल कुंठित करून टाकावी असा प्रकार दुसऱ्या बाजूस घडून यावा हा अनुभव कित्येक आठवडे येत आहे. पुढें चाल करून जात असतां प्रत्येक पावलास रशियाचे भयंकर आघात सोसण्याचा प्रसंग जर्मन सैन्यास प्रत्यहीं आला आहे. रशियाच्या मानानें जर्मनीपाशी युद्धसामुग्री अधिक असून हिट्लरनें ती भरमसाटपणानें खर्चण्याचा क्रम चालू ठेवला आहे. फिन्स, हंगेरिअन्स, रुमानिअन्स व बल्गेरिअन्स ह्यांच्या फौजा त्यानें स्वतःच्या सहायास आणल्या आहेत त्या वेगळ्याच. आपली होणारी पीछेहाट किंवा हानी रशियन सेनानींनीं कधीच नाकबूल केलेली नाहीं. जर्मनीचा होणारा नाश मात्र त्यांनीं स्पष्ट करून सांगितला आहे. येथें सर्वांत महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवावयाची आहे ती ही आहे कीं, रशियाच्या सैन्याची फळी त्याच्या सेनानींनीं कधीच फुटूं दिलेली नाहीं. त्याचप्रमाणें, जर्मनीची पूर्व रणांगणांत कितीहि प्रगति झाली तरी रशियाचें लढण्याचें सामर्थ्य लंगडें पडावयाचें नाहीं हें प्रत्यक्ष अनुभवावरून आतांपर्यंत सिद्ध झालें आहे. प्रस्तुत चाललेल्या लढायांचे योगानें जर्मनीची लष्करी शक्ती पुष्कळच घटल्यावांचून रहावयाची नाहीं आणि ह्यापुढे इंग्लंड व अमेरिका ह्यांचे सहाय्यानें रशिया आपल्या सैन्याची नवी रचना करून अधिक उत्साहानें लढण्यास तयार व्हावयाचा आहे. प्रस्तुत युद्धांत मागील महायुद्धाप्रमाणें तुलनात्मक आर्थिक बळच अंतिम विजयाचें निर्णायक ठरणार आहे. युद्धपरिस्थितीचा विचार करतांना दूरवर दृष्टी फेकून पुढील घडामोडींचा कयास बांधला पाहिजे.

## मध्यवर्ती साखर-समिती

स्वदेशी साखरेच्या संबंधांत उद्भवणाऱ्या प्रश्नांचा विचार व निकाल करण्याच्या कार्यासाठी सेंट्रल कॉटन कमिटीच्या धर्तीवर एक मध्यवर्ती साखरसमिति स्थापली जावी अशी सूचना हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री सर ए. रामस्वामी मुदलियार ह्यांनीं कांहीं महिन्यांमागें केली होती. इंपीरियल कौंसिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या साखर कमिटीची सभा नुकतीच दिल्ली येथें भरली होती. तीमध्यें सदरहु सूचना चर्चेसाठी पुढें आली असतां मध्यवर्ती साखरसमितीची घटना वगैरे तयार करण्याकरितां तो प्रश्न सर श्रीराम व मि. खारेघाट ह्यांच्याकडे सोंपवण्यांत आला. ह्या समितीच्या मुळाशी अशी कल्पना आहे कीं तिच्यामध्यें ऊस पिकवणारे, साखर बनवणारे व साखरेचे व्यापारी ह्यांचा सभासद म्हणून समावेश व्हावा, तींत बिन अधिकारी सभासदांचें संख्याधिक्य असावें आणि संशोधनादि कामाकरितां तिला द्रव्यसहायाची स्वतंत्र व्यवस्था असावी. सर श्रीराम व मि. खारेघाट आपली समितीची योजना हिंदुस्थान सरकारास सादर करतील आणि तिला आवश्यक असलेल्या पैशाच्या तरतुदीचा विचार त्यांस करावा लागेल. साखरेच्या धंद्याच्या निरनिराळ्या शाखांच्या प्रतिनिधींस एकत्र आणून एका मध्यवर्ती प्रातिनिधिक मंडळामार्फत त्या धंद्याच्या अडचणी दूर करणें व त्यांत सुधारणा घडवून आणणें हीं कार्यें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. उसाची पैदास करणारे शेतकरी, साखर बनवणाऱ्या कारखानदार कंपन्या व साखरेची खरेदी-विक्री करणारे व्यापारी ह्यांचे हितसंबंध कित्येक वेळां परस्परविरुद्ध असल्याचें दिसून येतें. तसेंच, निरनिराळे प्रांत व देशी संस्थानें ह्यांमधील साखरेच्या धंद्याबाबत विरोधी संबंध व परस्पर-स्पर्धा अस्तित्वांत असल्याचें नजरेस येतें. त्या योगानें साखरेच्या धंद्यांत नेहमी अवघड व वादग्रस्त प्रश्न उपस्थित होत असतात. विरोध होईल तेवढा दूर करून भिन्न भिन्न हितसंबंधांचा मेळ घालणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य स्वदेशी साखरेच्या धंद्याचे भावी उत्कर्षाचे दृष्टीनें समाधानकारक रीतीनें होणें इष्ट आहे. होऊं घातलेल्या मध्यवर्ती साखर समितीच्या हातून ह्या कार्यास सहाय होईल तर त्या धंद्याच्या प्रगतीच्या व स्थैर्याच्या मार्गांतली एक मोठी अडचण नाहींशी करण्याचें श्रेय तिला मिळूं शकेल. उसाचे पिकाचे संबंधांत आजवर झालेल्या शास्त्रीय संशोधनाचा पुष्कळच उपयोग उत्पादकपणा वाढवण्यांत झालेला आहे. युद्धोत्तर काळांत हिंदी साखरेच्या धंद्यास परदेशी कारखानदारांच्या स्पर्धेस तोंड द्यावें लागणार आहे. ह्या दृष्टीनें त्याचें संघटन व

सुधारणा हीं एव्हांपासून पद्धतशीर रीतीनें हातीं घेतलीं जाणें अगत्याचें आहे.

---

### बाजारभावांचें नियंत्रण — दिल्ली येथील परिषद

कापड आणि धान्यें ह्यांसारखे कांहीं खाण्याचे पदार्थ ह्यांच्या किंमती अलीकडे विशेष चढल्याकारणानें सरकारनें ह्या कामीं नियंत्रणाची योजना हातीं घ्यावी अशा आशयाच्या सूचना चोहोंकडून आल्यानें हिंदुस्थान सरकारनें ह्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी दिल्लीं येथें बोलावलेली परिषद सर ए. रामस्वामी मुदलियार ह्यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या गुरुवारीं सुरू झाली. बाजारभावांचे नियंत्रणाच्या संबंधांत योजावयाच्या उपायांत मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांचें सहकार्य अगत्याचें असल्यानें ह्या सर्वांचे प्रतिनिधी ह्या परिषदेस उपस्थित होते. सर ए. रामस्वामी ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत पदार्थांच्या किंमतीविषयींची सामान्य परिस्थिति कोणत्या प्रकारची आहे आणि तिच्या संबंधांत हिंदुस्थान सरकारची भूमिका काय आहे ह्याचें थोडक्यांत वर्णन केलें. प्रस्तुत परिषदेसारख्या दोन परिषदा मागें भरल्या होत्या तेव्हां शेतीच्या मालाच्या किंमती थोड्या फार चढल्या तरी बहुसंख्य शेतकरी वर्गाच्या हिताच्या दृष्टीनें विचार करतां त्या उतरवण्याचा प्रयत्न करणें चुकीचें होईल असें सर्वसामान्य मत व्यक्त करण्यांत आलें होतें. उत्पादक, शेतकरी वर्ग आणि माल वापरणारी जनता ह्यांपैकी कोणासही अन्याय होणार नाहीं ह्या बेतानें सरकारनें आपलें धोरण निश्चित केलें होतें. चढणाऱ्या किंमतींचा भलताच फायदा मध्यस्थ व्यापाऱ्यांनीं घेऊं नये ह्यासाठी नियंत्रणात्मक उपायहि प्रांतिक सरकारांनीं योजले आहेत. परंतु अलीकडे कांहीं जातींच्या मालाच्या किंमती मर्यादेबाहेर चढल्या असल्यानें त्यांच्या नियंत्रणाचा प्रश्न पुन्हां हातीं घेण्याची वेळ आली आहे असें हिंदुस्थान सरकारच्या व्यापार-मंत्र्यांनीं सांगितलें.

---

### कच्च्या व पक्क्या मालाच्या किंमती

बाजारभावांच्या नियंत्रणाचा प्रश्न किती गुंतागुंतीचा आहे ह्याची कल्पना त्याचे विषयीं होणारी टीका व केल्या जाणाऱ्या विविध सूचना ह्यांचे वरून येण्यासारखी आहे. हिंदुस्थान सरकार आपणांस महागाई भत्ता नोकरांस द्यावा लागूं नये म्हणून बाजारभाव चढूं देत नाहीं असा आरोप करण्यांत आला आहे. दुसरा असा आरोप आहे कीं युद्धक्षेत्रांच्या बाजूस स्वस्त माल पाठवतां यावा म्हणून सरकार मुद्दाम त्याच्या किंमती दडपून ठेवीत आहे. अशा टीकेंत कांहींच अर्थ नाहीं असें म्हणून सरकारवरील आरोपांचा सर ए. रामस्वामी ह्यांनीं इनकार केला. गहूं किंवा तांदूळ असल्या मालाच्या किंमती चढूं न देण्याचा प्रश्न उद्भवतच नाहीं असें ते म्हणाले. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत गव्हाचें उत्पादन सुमारें ९९ लक्ष टन होतें आणि ह्या देशांतून केवळ एक लाख टन गहूं बाहेर जातो. तेव्हां एक लाख टनांची किंमत कमी होण्याच्या हेतूनें सरकार ९९ लाख टनांची किंमत खाली आणतें असें म्हणणें हास्यास्पद आहे असे उद्गार त्यांनीं काढले. कापसाच्या कापडाच्या किंमती जून, जुलै महिन्यांत चढूं लागल्या आणि जपानी कापड इकडे येण्याचें बंद होऊन हिंदुस्थानांतील गिरण्यांत होणाऱ्या कापडास युद्धासाठी मोठी मागणी आली, ह्यामुळें त्या किंमती अलीकडे आणखी वर गेल्या आहेत. कापडासारख्या पक्क्या मालाच्या किंमतींचा प्रश्न धान्यासारख्या शेतीच्या मालाच्या बाजारभावापासून भिन्न असून त्याचा स्वतंत्र रीतीनें विचार होण्याची आवश्यकता उघड आहे. हिंदी गिरण्यांत निरनिराळ्या पांचशे जातींचें कापड तयार होतें, त्यांच्या किंमतींचें नियंत्रण करणें अव्यवहार्य आहे. तथापि, सामान्य स्थितींतल्या लोकांस रोजच्या वापरास लागणाऱ्या कापडाच्या किंमती योग्य मर्यादेंत रहातील अशी व्यवस्था करणें अशक्य नाहीं. वीस नंबरच्या सुताचें कापड सामान्य जनतेस बेताच्या किंमतींत पुरवण्याचा उपाय येथें सुचतो आणि गेल्या महायुद्धांत त्याचा विचार करण्यांत आला होता. ह्या जातीचें जाडेंभरडें कापड लोकांस आतां पसंत पडेल किंवा नाहीं ही गोष्ट चिंतनीय आहे असें सर ए. रामस्वामी म्हणाले. तथापि कांहीं विशिष्ट जातींच्या कापडाचा पुरवठा बेताच्या किंमतींत होईल अशी तजवीज सरकारांनीं करणें शक्य आहे असें त्यांनीं सुचवलें. सुताच्या किंमती मर्यादेबाहेर चढल्या असल्याविषयींच्या तक्रारीचा त्यांनीं उल्लेख केला. परिषदेस ह्या सबंद प्रश्नासंबंधीं स्वतःचें मत बनवण्यास सहाय व्हावें म्हणून गिरणीवाल्यांच्या मंडळांच्या प्रतिनिधींस माहिती देण्यासाठी आपण मुद्दाम आमंत्रण दिलें असल्याचेंहि त्यांनीं सांगितलें.

---

### हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार

ह्या देशाचा निर्गत व्यापार गेल्या कांहीं महिन्यांत वाढला आहे हें समाधानकारक आहे. एप्रिल—ऑगस्ट या पंचमासिक मुदतींत खाण्याचे जिन्नस, धान्य व तंबाखू ह्यांची निर्गत पूर्ववर्षीच्या त्याच पांच महिन्यांच्या मानानें ५० टक्क्यांनीं अधिक होऊन तिची किंमत १८ कोटि, १५ लक्ष रुपये भरली. द्विदल धान्यें, कणीक व चहा ह्यांच्या निर्गतीमध्यें विशेष वाढ झाली. ह्या वाढीबरोबर कच्चा व अर्धा पक्का माल ह्यांच्या निर्गतीमध्यें घट होण्याची प्रवृत्ति बळावली. ही घट सुमारें ३ कोटि रुपयांची झाली आणि तीमध्यें मुख्यत्वेंकरून गळिताचीं धान्यें, कपास व ताग ह्यांचा हिस्सा मोठा होता. कापडाच्या निर्गत व्यापारांत शंभर टक्के विस्तार झाला, तथापि पक्क्या मालाची एकूण निर्गत एप्रिल-ऑगस्ट ह्या मुदतींत पूर्व वर्षाच्या तत्सम महिन्यांचे मानानें २ कोटि, २५ लक्ष रुपयांनीं कमी झाली. सुमारें पावणेसहा कोटि रुपये किंमतीची घट नुसत्या तागाच्या कापडांतच झाली. कातड्यांच्या निर्गतींत घटहि मोठी होती आणि तिचें परिमाण सुमारें पावणेदोन कोटि रुपये इतकें होतें. आयातीच्या निरनिराळ्या जातींच्या मालावर नियंत्रण घालण्यांत आल्याकारणानें तिचें प्रमाण उतरतें असणें साहजिकच आहे. तथापि एप्रिल—ऑगस्ट हे पांच महिने घेतले तर गेल्या वर्षाच्या तत्सम मुदतीच्या मानानें आयात व्यापाराच्या किंमतींत १८ कोटि रुपयांची वाढच झालेली असल्याचें दिसून येतें. खाण्यापिण्याचे जिन्नस व कच्चा माल ह्यांच्या आयातींत अनुक्रमेंकरून २ कोटि, ३२ लक्ष व ५ कोटि रुपयांनीं वाढ झाली. कापसाच्या तलम कापडास देशांत फार मोठी मागणी उत्पन्न झाल्यानें उंची दर्जाच्या कापसाच्या आयातीची किंमत मोठ्या प्रमाणांत वर गेली. ह्या कापसाची आयात पांच महिन्यांत ८ कोटि रुपयांची भरली. हा आकडा १९४० सालच्या तत्सम मुदतीपेक्षा १०० टक्क्यांनीं अधिक होता आणि १९३९ च्या मानानें ही वाढ १२५ टक्के ज्यास्त होती. पक्क्या मालाच्या आयातींत वाढ झाली, तींत मोटारगाड्यांनीं पहिलें स्थान पटकावलें आणि त्यांच्या खालोखाल सूत व कापड ह्यांची आयात झाली. रंग, औषधें, यंत्रें, धातू, कागद इत्यादि मालाचीहि किंमत वाढली.

---

★ ठेवीदारांची स्वतःची बँक ★

## "नव्या नागरिकाचें" विजया-दशमीच्या सुमुहूर्तावर सुरू झालेलें वैभवशाली कूच!

बँकेच्या भागविक्री करून उभारलेल्या भांडवलांत रु. ६०,००० नें वाढ

### महाराष्ट्राची पहिली शेडयूल्ड बँक

# दी न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

★ हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. ★

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

अध्यक्षः—श्री. जमनादास एम्. मेहता, एम. ए., एलएल. बी., बार-ॲट-लॉ, एम. एल. ए. ( सेंट्रल असेंब्ली )
मुंबई सरकारचे माजी अर्थमंत्रि व नॅशनल डिफेन्स कौन्सिलचे सभासद.

उपाध्यक्ष व ठेवीदारांतर्फे डायरेक्टर : श्री. ल. ब. भोपटकर, एम. ए., एलएल. बी., ट्रस्टी, केसरी व मराठा.

सर एच. पी. दस्तुर, बी.ए., एलएल. बी., बार-ॲट-लॉ., रिटायर्ड चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, मुंबई.
रावसाहेब आर. एस. आठवले, बी. ए., सांगलीचे माजी दिवाण.
मि. पी. बी. गोळे, बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट, माजी जमीन-महसूल मंत्रि, मध्यप्रांत सरकार.
मि. जी. एस. मराठे, एम. ए., ए. आय. ए., ॲक्चुअरी.

रावबहादूर एन. बी. देशमुख, माजी सरकारी वकील, अहमदनगर.
मि. भगवानजी मुरारजी गोकुळदास, मॅ. एजंट : दी बाँबे टायर सर्व्हिस लि.
मि. बी. डी. गरवारे, गव्हर्निंग डायरेक्टर : गरवारे मोटार्स लि.
मि. जी. व्ही. पुराणिक, गव्हर्निंग डायरेक्टर : श्रीधूतपापेश्वर लि.
शेठ गोविंददास नारायणदास बनातवाले, मुंबई.

★ युद्धजन्य परिस्थितींतहि होणारी सतत प्रगति ★

## बोलक्या आंकड्यांची कामगिरी

| तारीख | शेअर्सविक्रीचें रोख भांडवल | एकूण ठेवी | एकूण चालू भांडवल |
|---|---|---|---|
| | रुपये | रुपये | रुपये |
| ता. ३१-१२-१९३९ दुसऱ्या ताळेबंदाच्या वेळीं | ५,०६,४११ | १०,५७,००० बिलें सोडून. | १६,५०,००० |
| ३१-३-१९४१ तिसऱ्या ताळेबंदाच्या वेळीं | ५,०६,४११ | १९,८५,००० बिलें धरून. | १५,०१,००० |
| ७-१०-१९४१ अगदीं अलीकडे | ५,६६,५०० | २३,१०,००० बिलें सोडून | २८,९०,००० |

५% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागिदारांना पहिल्या दोन वर्षांत ५ टक्के नफा वांटण्यांत आला आहे.

### कामाचें नियम.

★ चालू व सेव्हिंग बँक खातीं उघडलीं जातात.
★ सेव्हिंग बँक खात्यावर २ ते २½ टक्के व्याज दिलें जातें.
★ चेकनें आठवड्यांतून दोनदां रक्कम काढतां येते.
★ मुदत ठेवी : १ ते ५ वर्षांच्या मुदतीच्या स्वीकारल्या जातात. रु. १०० पासून पुढें. व्याजाच्या दराची चौकशी समक्ष अगर पत्रद्वारें.
★ खाशिवाय बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

शाखा : ( स्थानिक )—( १ ) गिरगांव मुंबई नं. ४. ( २ ) दादर ( B. B. & C. I. ) मुंबई नं. १४.
( ३ ) जव्हेरी बाजार मुंबई नं. २.
( बाहेर )—( ४ ) नाशिक ( ५ ) कोल्हापूर ( ६ ) सोलापूर ( ७ ) सांगली.

*अधिक माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा—*

द. दा. देशपांडे, बी. ए.,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# आयुर्विम्याची प्रगति

आयुर्विम्याची सुरवात हिंदुस्थानांत होऊन पुष्कळ वर्षे झालीं असलीं तरी हिंदी आयुर्विम्याची खरी सुरवात१८७० पासून झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. १९१२ पर्यंत आयुर्विम्यासंबंधीं हिंदुस्थानांत कायदा असा नव्हता. तथापि, तोंपर्यंत स्थापन झालेल्या कंपन्या आपलें काम फार संभाळून करीत, कारण विलायती तेवढें आदर्शभूत अशी भावना सगळीकडे असे आणि विलायती कंपन्यांच्या हिंदुस्थानांतील शाखांचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति लोकांमध्यें असे. १९१२ चा कायदा झाल्यानंतर १९२४ पर्यंतचा एक कालविभाग मानतां येईल. या विभागामध्यें ज्या विमा कंपन्या स्थापन झाल्या त्यांची प्रवृत्ति जरा निराळी होती. १९०५ मधील बंगालच्या फाळणीची चळवळ व १९२० मधील असहकाराची चळवळ यांमुळें जनतेच्या मनांत एकप्रकारची चेंढखोरी उत्पन्न झाली होती आणि या मुदतींत निघालेल्या कंपन्यांच्या चालकांमध्यें जबाबदारीचा भाग कमी असून स्वैरपणाचा भाग जास्ती होता. तसेंच लढाईच्या काळामुळें जी एक प्रकारची कृत्रिम श्रीमंती जनतेमध्यें आली, तीमुळें भावनांच्या बळावर जनतेचा विश्वास संपादन करून घेण्याची प्रवृत्ति जास्त झाली. १९२४ ते १९३७ चा तिसरा कालखंड यामध्यें तर ही बेजबाबदार प्रवृत्ति अधिकच वाढली आणि नालायक कंपन्या बऱ्याच निघाल्या. या सर्व कंपन्यांना आपलें जीवन कंठण्यासाठी कांहीं तरी सुस्थितीचा देखावा मांडणें आवश्यक झालें. प्राथमिक अवस्थेंत बहुतेकांच्या हातून थोडासा अडाणीपणा व चुका होतातच. परंतु प्रत्येक व्हॅल्युएशनच्या वेळेला ॲक्चुअरीकडून मिळणाऱ्या सावधगिरीचा इषारा कंपन्यांकडून जुमानण्यांत आला नाहीं व आयुर्विम्याची सुरक्षितता धोक्यांत येण्याची भीति सर्व जनतेला वाटूं लागली. या धोक्यासंबंधीं मुख्य दोन-तीन गोष्टी लक्षांत घेणें आवश्यक आहे.

एक म्हणजे मॅनेजिंग एजन्सीची पद्धत. कंपनीला जितका फायदा मिळेल त्यावर मॅनेजिंग एजन्सीचें कर्तृत्व अजमावण्याच्या ऐवजी कंपनीला जितकें काम मिळेल त्यावर मॅनेजिंग एजंटांची योग्यता व अर्थलाभ अवलंबून ठेवण्यांत आल्यामुळें खर्चावर नियंत्रण राहिलें नाहीं आणि नव्या लहान कंपन्यांनीं बाजार बिघडवून टाकल्यामुळें मोठ्या कंपन्यांनाहि खर्चाचें धोरण काटकसरीचें ठेवणें कठीण जाऊं लागलें.

दुसरी गोष्ट अशी कीं, स्वदेशी कंपन्यांना विलायती कंपन्या विरुद्ध झगडावयाचें होतें. ब्लू बुकावरून असें दिसून येतें कीं, परदेशी कंपन्यांना मोठमोठ्या रकमांचे विमे मिळतात. त्यामुळें त्यांचें खर्चाचें प्रमाण आपोआप कमी पडतें. कारण, एक एक हजाराच्या पांच पॉलिसींकरितां कंपनीला जितका खर्च येतो त्यापेक्षा पांच हजाराची एकच पॉलिसी असली तर तो बराच कमी येतो. शिवाय, लौकिकाच्या दृष्टीनें पहातां परदेशी कंपन्यांना हिंदी कंपन्यांपेक्षा काम मिळविणें सोपें जातें. अशा रीतीच्या या झगड्यांत हिंदी कंपन्यांना अनुकूल असलेलें सरकार हिंदुस्थानांत नव्हतें.

तिसरी गोष्ट अशी कीं, मॅनेजिंग एजंट्स् जेथें समजूतदार असतील तेथें सुद्धा डायरेक्टर लोक अडाणी व स्वार्थी असून आपली अधिकार-बजावणी गैरशिस्त रीतीनें करीत. परदेशी कंपन्यांच्या डायरेक्टर लोकांत जी एक अनुभवाची शिस्त व व्यावहारिक नीति असते ती आमचे लोकांत अजून आलेली नाहीं.

या कारणांमुळें आयुर्विम्याच्या प्रगतींत धोका उत्पन्न होऊन नवीन कायद्याची आवश्यकता भासूं लागली. तथापि, नवीन कायदा होतांना जी एक खळबळीची परिस्थिति त्यावेळीं होती तिच्या योगानें कायद्यांत बरेच दोष राहून गेले, त्यांपैकीं कांहीं तपशीलाचे दोष मागावून सुधारले गेले. परंतु तात्त्विक दृष्ट्या जे दोष राहिले आहेत ते अजून बरेच बोचत आहेत. या सर्व दोषांचें वर्णन करण्याची ही जागा नाहीं, परंतु एकदोन मूलभूत गोष्टींचें निदर्शन करणें आवश्य आहे.

हा कायदा पास झाला ते वेळीं हिंदुस्थानांतील आयुर्विम्याच्या परिस्थितीसंबंधानें एकप्रकारचें विलक्षण घाबरट वातावरण देशांत निर्माण केलें गेलें होतें. या घाबरटपणाचा परिणाम असेंब्लींतील कॉंग्रेस पक्षावर सुद्धा होऊन त्या पक्षाचे पुढारी सरकारी मेंबरच्या आहारीं गेले होते. कंपनीच्या हातांतील पैशापैकीं निम्म्याहून अधिक पैसे सरकारी प्रॉमिसरी नोटांमध्यें घातले पाहिजेत असें जें कलम आहे त्यावरून हें सिद्ध होतें. सुपरिंटेंडेंट हा ॲक्चुअरी असला पाहिजे असें मोघम कलम कायद्यांत घालून इंग्लंडमधील एक सहानुभूतिशून्य मनुष्य सुपरिंटेंडेंटच्या जागेवर सरकारनें आणून ठेवला व त्याच्याकडून जो कारभार चालला आहे तो एकाद्या कडक पंतोजीप्रमाणें चालला आहे असें सगळीकडून येणाऱ्या तक्रारींवरून दिसून येत आहे. सरकार हें यंत्र आहे व कायदा हीं त्यांतील चक्रें आहेत अशा भूमिकेवर व्यवहार चालला आहे. सरकार व कायदे हे प्रजेसाठी असतात; प्रजा ही सरकार किंवा कायद्यासाठी नसते ही गोष्ट दृष्टीआड केली गेली आहे. माझ्या मतानें हाच कायदा सहानुभूतीच्या धोरणानें जर अंमलांत आणला तर राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें सुद्धा देशांतील परिस्थिति याहीपेक्षा अधिक सोयीनें व परिणामकारक रीतीनें सुधारतां येईल. आयुर्विमा ही गोष्ट इतर व्यवहारांच्या मानानें अधिक पवित्र आहे ही गोष्ट जरी गृहित धरली तरी राष्ट्राच्या इतर आर्थिक व्यवहारांत कायद्याच्या शब्दांतून पळवाटा काढून किंवा कायदा न जुमानतां जे अनेक गुन्हे, फसवणुकी, द्रव्यहानि वगैरे होत आहेत ते जर सरकारला चालतात तर आयुर्विम्याचा बाबतींतच इतका सोवळेपणा व इतकी भयंकर निष्ठुरता बाळगण्याची काय आवश्यकता आहे ?

सहानुभूतीचीं मी एक दोन उदाहरणें देतों. सध्याच्या कायद्याप्रमाणें इंग्लंडमधील परीक्षा घेणाऱ्या दोन संस्थांच्या चाळणींतून निघालेलीं माणसें एवढ्यांनाच ॲक्चुअरी म्हणतां येतें. ॲक्चुअरीचें ज्ञान देणारी व परीक्षा घेणारी संस्था हिंदुस्थानांत निर्माण करणें सरकारला मुळींच अशक्य नाहीं. ऑडिटरच्या परीक्षा घ्यावयाची सरकारनें व्यवस्था केली आहे तर ॲक्चुअरीची तशीच व्यवस्था करावयास काय हरकत आहे ? आजच्या स्थितीमध्यें ॲक्चुअरीच्या धंद्यामध्यें एकसूत्रता व नियंत्रण आणण्याची कांहींच सोय नाहीं, परंतु जर हिंदुस्थानांत ॲक्चुअरींची संस्था स्थापन झाली तर सध्या सुपरिंटेंडेंटला ज्या बऱ्याच अप्रिय गोष्टी करावयास लागतात त्यांतल्या बऱ्याच गोष्टी या संस्थेमार्फत नियंत्रण करून

टाळतां येतील. तसेंच, प्रत्येक धंद्याचें देशविषयक एक विशिष्ट व महत्त्वाचें असें स्वरूप असतें. त्याप्रमाणें हिंदुस्थानविषयक ॲक्चुअरीच्या ज्ञानाचें स्वरूप निर्माण करून वाढवितां येईल.

दुसरी गोष्ट म्हणजे आयुर्विमा कंपन्यांच्या चालकांचें अज्ञान व कर्तव्यशून्यता ही होय. या बाबतींत सुद्धा कांहीं अंशीं सरकारी कायद्यानें व कांहीं अंशीं सरकारच्या सहकार्यानें चालणारी एकादी परीक्षा घेणारी संस्था निर्माण करून कंपन्यांच्या कार्यक्षमतेंत समजुती समजुतीनेंच पुष्कळ भर टाकण्याजोगी आहे. परंतु यासाठी सरकारी कारभार पोलादी चौकटीसारखा असतां कामा नये.

अशी बातमी ऐकूं येते कीं थोड्याच वर्षांच्या मुदतींत हिंदुस्थानांतील आयुर्विम्याच्या कंपन्यांपैकीं निम्म्या कंपन्या तरी अस्तित्वांतून गेल्या पाहिजेत अशा तऱ्हेची भावना सरकारी अधिकाऱ्यांच्या मनांत आहे. अर्थात् राष्ट्रहिताच्या दृष्टीनें हें आवश्यक आहे असें त्यांस वाटत असलें पाहिजे. घोडा जायबंदी झाला म्हणजे त्याला त्याचा मालक अत्यंत प्रेमळ असूनहि प्रेमानेंच गोळी घालून मारतो, परंतु माणसाला तसें कोणी मारीत नाहीं. सरकारचें सध्याचें वर्तन जें घोडानीतीवर चालू आहे तें मानवी नीतीवर आलें पाहिजे. असें झालें म्हणजे आयुर्विम्याची प्रगति सुखानें व अधिक जलद होण्याचा संभव आहे असें मला वाटतें.

वरील मजकुरांत पुष्कळ सर्वसाधारण विधानें केलीं आहेत पण तीं सामान्य आहेत. कांहीं चांगल्या व कांहीं वाईट गोष्टी मिळून सामान्य कल्पना झाली आहे ती सांगितली आहे. निर्देश करण्याजोग्या चांगल्या गोष्टी कित्येक आहेत हें सांगणें आवश्य आहे.

---

### टाटा स्टील कंपनीच्या आर्टिकल्समध्यें दुरुस्ती

टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनीची विशेष साधारण सभा नुकतीच भरली होती. त्यावेळीं कंपनीच्या आर्टिकल्समध्यें दुरुस्ती करण्यांत आली. कंपनीला डिफर्ड भागांचें ऑर्डिनरी भागांत रूपांतर करण्यास परवानगी देण्यांत आली व डायरेक्टरांना त्यांच्या सभेस हजर रहाण्याची फीची कमाल रकम ७५ रुपयांची १५० रुपये करण्यांत आली. वेगवेगळ्या रिझर्व्ह फंडांत योग्य त्या रकमा टाकण्याचा अधिकार बोर्डास देण्यांत आला. ह्या अधिकारामुळें भागीदारांस मिळावयाच्या डिव्हिडंडमध्यें विनाकारण फरक पडणार नाहीं असें कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष, मि. जे. आर. डी. टाटा, ह्यांनीं आश्वासन दिलें.

### रिक्शा

कलकत्ता शहरांत माणसें वहाणाऱ्या ४,६०० हातगाड्या ( रिक्शा ) आहेत; २५ वर्षांपूर्वी तेथें एकहि नव्हती.

### खादीचा खप

गांधी जयंतीचे प्रसंगीं मुंबई शहरांत २ लक्ष, ३० हजार रुपयांच्या खादीचा खप झाला.

### पूर्व आघाडीची पहाणी

जर्मनीच्या पूर्व आघाडीचें निरीक्षण करण्याकरितां हिटलरच्या निमंत्रणावरून पोर्तुगॉलचें एक लष्करी मंडळ बर्लिनला जाण्याकरितां गेल्या बुधवारीं निघालें.

---


NOWHERE ELSE DOES

LOW PRICE BUY SUCH

Estd. 1872

REGISTERED TRADE MARK

Phone No. 9/907

HIGH-QUALITY PRODUCTS

( Finest in the Market )

— SUCH AS —

AGARBATTIES,
STANDARD ATTERS,
VARIETY HAIR OILS,
GULKAND, MURABBAS,
KATHA PILLS, JARDA
AND OTHER PERFUMERY ARTICLES OF EVERY KIND.

SPECIALITIES IN AGARBATTIES

Chandan-Amber No. 40,
Rajadarbari
Kasturi-Amber
Nos. 1010, 1008, 1006, 1004

Write for FREE SAMPLES or Call at

DAMODARDAS BHAGWANDAS

INDIA'S LEADING AGARBATTY MANUFACTURERS

761, Raviwar Peth,
POONA 2.

# महायुद्ध-कालांतील वृत्तपत्र धंद्याची बिकट परिस्थिति

परदेशी मालाची आयात महायुद्धामुळें घटल्यानें हिंदुस्थानांतील धंद्यांना आयतेंच संरक्षण मिळालें आहे. या परिस्थितीचा फ़ायदा, ज्या धंद्यांना लागणारा कच्चा माल नि इतर सामुग्री हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत उपलब्ध आहे अशांनाच मिळणें शक्य झालें आहे. परंतु ज्या धंद्यांना त्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाकरतां परदेशावर अवलंबून रहावें लागतें त्यांची मात्र या महायुद्धामुळें परिस्थिति कठीण झाली आहे. वृत्तपत्रांचा धंदा ह्या दुसऱ्या प्रकारच्या धंद्यांपैकी आहे.

वृत्तपत्रांना जो कच्चा माल लागतो तो दोन जातींचा असतो. एक वृत्त नि दुसरा कागद, शाई नि इतर सामुग्री. यांपैकीं वृत्त मिळण्यास फारशी अडचण पडत नाहीं. परंतु वृत्त पुरवणाऱ्या रॉयटर नि असोसिएटेड प्रेससारख्या संस्थांनीं बातम्या पुरवण्याच्या दरांत वाढ केली. वृत्तपत्रांना त्यांना लागणाऱ्या कागदाकरतां परदेशांवर अवलंबून राहावें लागतें. वृत्तपत्रीय कागद हिंदुस्थानांत तयार होत नाहीं व टॅरिफ बोर्डानें कागदाच्या धंद्याला संरक्षण देण्याच्या प्रश्नाचा विचार केला त्यावेळीं हा कागद हिंदुस्थानांत स्पर्धक दरांत तयार होण्यासारखा नाहीं असें मत प्रदर्शित केलेलें आहे. महायुद्धापूर्वी नि त्याच्या प्रारंभीं कांहीं दिवस मुख्यतः नॉर्वे, स्वीडन नि फिनलंड या तीन देशांतून वृत्तपत्रीय कागदाचा पुरवठा हिंदुस्थानाला होत असे परंतु नॉर्वेचा पाडाव झाल्यापासून तिकडून कागद येण्याचें बंद झालें. सांप्रत हिंदुस्थानाला कागदाचा पुरवठा होतो तो युनायटेड स्टेटस, कॅनडा नि न्यू फाऊंडलंड या देशांतून होय. पूर्वी नार्वे-स्वीडनपेक्षा अमेरिकेहून कागद आणवणें वाहतुकीच्या दृष्टीनें महाग पडे. परंतु आतां नॉर्वे-स्वीडनचा माल बंद झाल्यानें अमेरिकेंतून माल आणवणेंच आवश्यक झालें आहे.

महायुद्धापूर्वी वृत्तपत्रीय कागद दर पौंडाला सव्वा आणा दरानें मुंबईच्या बाजारांत विकला जात असे; सांप्रत तो अमेरिकेहून आणवणाराला दर पौंडाला चार आण्यांच्या आसपास मिळूं शकतो. म्हणजे महायुद्धापूर्वीपेक्षा कागदाच्या भावांत तिपटीनें वाढ झाली आहे. परंतु वर निर्दिष्ट केलेला चार आण्यांचा भाव हा जीं वृत्तपत्रें अमेरिकेहून स्वतःच्या नांवानें माल आणवूं शकतात त्यांनाच मिळूं शकतो. असें असलें तरी आज कोणी वृत्तपत्रव्यवस्थापक मुंबईच्या बाजारांत गेल्यास त्याला तयार कागद दर पौंडाला सहा ते साडेसहा आणे दरानें घ्यावा लागतो. कागदाच्या व्यापाऱ्यांनीं किमान ७० टक्के तरी नफेबाजी वृत्तपत्रीय कागदाबाबत चालवली आहे. ती नाहींशी करण्याकरतां सरकारानें कागदविक्रीचे कमाल भाव ठरवून देणें आवश्यक आहे. मोठ्या वृत्तपत्राच्या खर्चांपैकी महायुद्धापूर्वी २५ % ते ३३% खर्च कागदावर होत असे.आतां तो पूर्वीच्या तिपटीनें वाढला आहे. त्यामुळें वृत्तपत्रांचा धंदा अगदीं टेकीला आला आहे. टाइम्स ऑफ इंडियाच्या आठ पानांएवढ्या आकाराचीं मराठी, गुजराथी, इंग्रजी वगैरे वृत्तपत्रें सांप्रत दर प्रतीला एक आण्यानें विकलीं जातात व या आठ पानांचें वजन साधारणपणें साडेपांच तोळ्यांच्या आसपास असतें. कागदाचा भाव चार आणे पौंड धरल्यास एक आण्याला विकल्या जाणाऱ्या टाइम्सच्या आठपानी अंकाच्या कागदाची किंमत ७ पैच्या आसपास पडते. सर्व साधारणपणें एजंटांना विक्रीकरितां एक आण्याचीं वृत्तपत्रें दर शेकडा रु. ४ दरानें दिलीं जातात. म्हणजे वृत्तपत्राच्या मालकाला दर प्रतीमागें ७$\frac{1}{2}$ पै किंमत मिळते; परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, अजूनहि वृत्तपत्रें आठवड्यांतून बरेच दिवस टाइम्सच्या १० पानी आकाराचीं निघतात व त्यांच्या कागदाचीच किंमत ८$\frac{1}{2}$ पै असते. पूर्वी अंकविक्रीचें उत्पन्न नि वृत्तपत्राचा खर्च यांतील तफावत जाहिरात-उत्पन्नानें भरून निघे. परंतु कागद भयंकर महाग झाल्यानें ती परिस्थिति बदलून वृत्तपत्रांचा धंदा अगदी मेटाकुटीला आला असल्यास नवल नाहीं. सुमारें दोन महिन्यांपूर्वी टाइम्सच्या कचेरींत मुंबईतील वृत्तपत्र मालक-व्यवस्थापकांची सभा भरून त्यांत मुंबईतील प्रमुख वृत्तपत्रांनीं आपल्या किंमती वाढवाव्या असें ठरलें होतें, परंतु तें घडलें नाहीं. मात्र तें आज ना उद्यां घडणें अपरिहार्य आहे. प्रश्न, तें कसें घडावयाचें एवढाच आहे.

खुद्द हिंदुस्थान सरकारचीहि इच्छा परदेशांतून हिंदुस्थानांत येणाऱ्या कागदाची आयात कमी व्हावी अशी आहे व त्याकरतां हिंदुस्थान सरकार वृत्तपत्रांच्या वजनानुसार अगर आकारानुसार विक्रीच्या किमान किंमती ठरवून देईल अशी अपेक्षा आहे. तसें झालें तर वृत्तपत्रधंद्याची बिकट परिस्थिति आपोआप कमी होईल.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

**The Co-operators' Book Depot.**

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**'पायोनियर डाइंग हाऊस'**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

**दि कमर्शिअल बँक लि. कोल्हापूर**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ६०,००० वर |
| रोख भरलेलें (माग.प्र.) | रु. २०,००० वर |
| ठेवी | रु. २॥। लाखांवर |
| गेल्या सालीं बाहेरगांवची वसुलीसाठीं आलेलीं बिलें | रु. ६॥। लाखांवर |

—डायरेक्टर्स—

ॲड. एस. जी. दाभोळकर, (अध्यक्ष).
श्री. अनंत गणेश जामसांडेकर सराफ, (उपाध्यक्ष).
श्री. गणपतराव लक्ष्मणराव साळोखे, (एक्स ऑ.).
श्री. ग. ना. भोसले, (प्रेसिडेंट, अर्बन बँक)
श्री. य. रा. मोहिटे, (प्रेसिडेंट शिवछत्रपति सोसायटी).
श्री. नानासाहेब टेंबे.
श्री. बी. पी. बुधाले, (मालक बी. पी. बुधाले ॲन्ड सन्स)

**ठेवींचे व्याजाचे दर**

चालू १% टक्का, सेव्हिंग २½%, मुदतीच्या ठेवी ३½ ते ४½%, (मुदतीप्रमाणें).

बँक गेलीं दोन वर्षे शेअरवर दरसाल द. शे. ८-२ टक्के करमाफ डिव्हिडंड देत आहे.

बँकेसंबंधीं सर्व व्यवहार केले जातात. इतर विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें देऊं.

कोल्हापूर १९-९-४१.

जी. जी. मोघे
अकौंटंट

साळोखे आणि कंपनी
सेक्रे. ट्रेझ. ॲंड एजंटस.

अर्थ ग्रन्थमाला—पुस्तक ४ थें

# सहकार

## (हिंदी सहकारी संस्थांचा संसार)

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

★

# कागदाचे भाव आणि नियंत्रण

कित्येक गोष्टी अशा असतात कीं, त्या महत्त्वाच्या असूनही तिकडे योग्य प्रसिद्धीच्या अभावीं जावें तसें लक्ष जात नाहीं. अशांपैकींच कागदाच्या भावांचें नियंत्रण ही एक बाब आहे. युरोपांतील युद्धामुळें नित्योपयोगी जिनसांचे भाव वाढले आणि त्याबाबत कांहीं तरी उपाययोजना झाली पाहिजे असें सरकारला वाटूं लागलें. धान्य, कापड वगैरे हरघडी लागणारे जिन्नस इतके महाग होऊं लागले कीं, त्याबाबत सरकारला भाव-नियंत्रणाची जरूरी भासूं लागली. पण भावाचें नियंत्रण म्हणजे काय आणि त्याची आवश्यकता कां व केव्हां उत्पन्न होते, हें प्रथम पाहिलें पाहिजे. जेव्हां नेहमींची परिस्थिति असते, तेव्हां मालाचा पुरवठा भरपूर असतो; आणि बाजारांत पुरेसा माल असतो; व ज्या दरानें व्यापारी तो निपज करणारापासून विकत घेतात, त्यापेक्षा आपला योग्य फायदा घेऊन तो विकतात अशी साधारण पद्धत असते. पण मालाची चणचण झाली अगर जितका माल निघतो त्यापेक्षा जास्त मालाची आवश्यकता उत्पन्न झाली, तर व्यापारी या परिस्थितीचा फायदा घेऊन आपल्याला फायदा अतोनात व्हावा म्हणून भारी दरानें माल विकतात आणि त्यामुळें तो विकत घेणारांना जास्त पैसे द्यावे लागतात. भांडवलदार व्यापारी पैशाच्या जोरावर वाटेल तितका माल खरेदून भरमसाट फायद्यानें जेव्हां विकावयास प्रवृत्त होतो, तेव्हां लोकांची अत्यंत नाडणूक होऊन त्यांचा जीवनसंसार अत्यंत बिकट होतो. आपल्या प्रजेपैकी एका वर्गाचा अयोग्य फायदा व एका वर्गाची अडवणूक होऊं न देणें हें सरकारचें कर्तव्य असतें आणि अशी परिस्थिति निर्माण होते, त्यावेळीं सरकारला भावावर नियंत्रण घालणें भाग पडतें. युरोपांतील युद्धामुळें अशा प्रकारची परिस्थिति आज उत्पन्न झाली आहे आणि व्यापाऱ्यांच्या नफेबाजीस आळा बसावा म्हणून हिंदुस्थान सरकारनें बाजारभाव नियंत्रण परिषदा भरवून त्याबद्दल विचारविनिमय चालविला आहे. आजवर ही वाटाघाट मुख्यत: धान्य व कापड ह्यासंबंधानें झाली आहे. पण अलीकडे वरील नित्योपयोगी जिनसांच्या यादींत कागदाचा अंतर्भाव करण्याची वेळ खास आली आहे.

वृत्तपत्रासाठी जो कागद लागतो, त्याबद्दलच्या किंमतीवर कांहीं तरी नियंत्रण घालण्याचा सरकारचा विचार असावा असें सरकारच्या प्रसिद्धि पत्रकावरून दिसतें. पण पुस्तकांसाठी लागणारा अगर नेहमी लिहिण्यासाठी लागणारा कागद यांच्या किंमती नियंत्रित करण्याबाबत सरकारनें आजवर कांहीं केलें आहे असें दिसत नाहीं. शिक्षणाचा प्रसार दिवसेंदिवस जास्त होत आहे, आणि तो सुलभ आणि यशस्वी रीतीनें व्हावा म्हणून कागद भरपूर आणि स्वस्त दरांत मिळणें ही अत्यंत आवश्यक बाब आहे. युद्धामुळें परदेशांतून येणाऱ्या कागदाची आवक कमी झाल्यामुळें कागदाचा भरपूर पुरवठा करण्याची जबाबदारी देशांतील गिरण्यांवरच पडली असल्यास नवल नाहीं. प्रस्तुतचें युद्ध तारीख ३ सप्टेंबर १९३९ दिनीं सुरू झालें. त्यावेळीं येथील कागदाच्या गिरण्यांची स्थिति फार बिकट झाली होती. येथील गिरण्यांची वाढ आणि परदेशांतून येणारा अमाप उत्तम कागद, यामुळें येथील कांहीं गिरण्या बंद पडतील कीं काय अशी परिस्थिति तेव्हां उत्पन्न झाली होती; पण युद्धामुळें त्यांची परिस्थिति पालटली. परदेशी कागदाच्या आयातीस थोडी ओहोटी लागली, सरकार आणि लष्करी खातें यांच्या मागण्या वाढल्या आणि त्याचा परिणाम छापखानदारांना अगर कागदविक्रेत्यांना कागद कमी मिळण्यांत झाला. कच्च्या मालाच्या किंमती वाढल्यामुळें गिरण्यांनीं युद्धापूर्वीच्या किंमतीपेक्षां ७५ टक्क्यांनीं किंमती वाढविल्या, तर कागदाची चणचण हीच आपली सुवर्णसंधि असें वाटून कागद-व्यापाऱ्यांनीं आपल्या कागदाच्या किंमती युद्धापूर्वीच्या किंमतीपेक्षा ३०० ते ४०० टक्क्यांनीं वाढविल्या आणि याचा परिणाम मुद्रणधंद्यावर विशेषत्वानें होत असल्याचें दिसत आहे. पोहणारास जसें पाणी, तसा मुद्रकास कागद! आणि कागदच जर न मिळाला, अगर भरमसाट दर पडूं लागले, तर लेखक तरी आपलीं पुस्तकें छापवून कशीं काढणार? कागदाच्या अशा किंमती वाढल्यावर शाळांतील क्रमिक पुस्तकें महाग होऊन आधींच महाग असलेलें शिक्षण अधिकेंच महाग होऊन सामान्य जनांच्या आटोक्याबाहेरचें होणार! आणि हें कां होतें, तर कागद-व्यापाऱ्यांना भरमसाट नफेबाजी करावयाची आहे म्हणून! हा नफेबाजीचा प्रकार सरकारनें चालू देणें हें केव्हांही अयोग्य ठरेल. म्हणून सरकारनें कागदाच्या भावावर तावडतोब नियंत्रण घालणें आवश्यक आहे.

गिरण्यांच्या कांहीं कागदांचे आमचे भाव आणि बाजारांत असलेले भाव पुढें दिले आहेत. त्यावरून कागदाचे व्यापारी किती प्रमाणांत फायदा घेत आहेत, तें उघड दिसून येईल.

| कागदाची जात | गिरण्यांचे दर (पौंडास) | व्यापाऱ्यांचे दर (पौंडास) |
|---|---|---|
| लिहिण्याचा कागद | ०—५—१½ | ०—९—० |
| छपाई कागद | ०—५—२½ | ०—९—० |
| बॉन्ड कागद | ०—७—६ | ०-१२-० |
| बदामी कागद | ०—५—१½ | ०-१४-० |

गिरण्यांच्या दरापेक्षा सुमारें ७५ ते ८० टक्के फायदा घेऊन कागदाच्या व्यापाऱ्यांनीं कागद विकावा हें किती अयोग्य आहे हें उघड दिसणार आहे. ही जी नफेबाजी चालविली जात आहे ती गर्हणीय असून त्याबाबत सरकारनें भाव-नियंत्रणाचा उपाय योजला पाहिजे.

कांहीं व्यापाऱ्यांनीं एका वर्षांत होणारा फायदा सहा महिन्यांतच मिळविला असें म्हणतात. कागदाचे दर वाढण्याचे आणखीहि एक कारण असें आहे कीं, पुढें जास्त भाव मिळेल, म्हणून कित्येक व्यापारी आपला माल सध्या विकावयासच मुळीं तयार नाहींत आणि याचा परिणाम भाव-वाढीवर सहाजिकच होतो.

कागदवाल्यांच्याकडून असा कोटिक्रम केला जाण्याचा संभव आहे कीं, पूर्वीपेक्षा कागदाचा पुरवठा कमी प्रमाणावर होतो आणि त्यामुळें त्यांचा नेहमीचा फायदा मिळविणेसाठी ज्या प्रमाणांत पुरवठा कमी झाला असेल, त्या प्रमाणांत किंमती वाढविणें त्यांना अत्यावश्यक होय. वर ज्या किंमती दिलेल्या आहेत, त्यावरून असें दिसतें कीं, गिरणीच्या दरांपेक्षा व्यापाऱ्यांचे दर शे.

७५ ते ८० टक्के वाढलेले आहेत. तेव्हां कागदाचा पुरवठा या प्रमाणांत कमी झाला आहे का ? प्रस्तुत लेखकाच्या माहिती प्रमाणें इतक्या प्रमाणांत पुरवठा कमी खास झाला नाहीं आणि त्यामुळें अशी नफेबाजी करणें हें अन्यायाचें आहे.

सर्वसाधारण समाज युद्धजन्य महर्गतेमुळें मेटाकुटीस आला असतांना व्यापाऱ्यांनीं मात्र नेहमीचा फायदा घ्यावा असें म्हणणें सुद्धां अप्रयोजकच नाहीं काय? मागील महायुद्ध काय अगर प्रस्तुतचें युद्ध काय, या दोन्ही वेळां असेंच दिसून आलें आहे कीं, व्यापाऱ्यांनीं परिस्थितीचा भरपूर फायदा करून घेतला आहे. सर्वसाधारण समाजाला बोचणारी आणि संकटांत घालणारी परिस्थिति बदलून ती सर्वांस सह्य होईल असें करणें हें सरकारचें कर्तव्य आहे. ब्रह्मदेश आणि सिलोन सरकारांनीं कागदाच्या दरावर नियंत्रण घालून कागदाचे भाव नियंत्रित करण्याची आवश्यकता किती आहे हें सिद्ध केलें आहे. हिंदुस्थान सरकार या बाबतींत सर्व चौकशी करून कागदाचे भाव नियंत्रित करील अशी आशा आहे. पुणें प्रेस ओनर्स असोसिएशननें या बाबतींत सरकारला आपलें म्हणणें कळविलें असून निरनिराळ्या छापखान्यांनीं व प्रकाशकांनीं हिंदुस्थान सरकारच्या व्यापारमंत्र्यांकडे कागदाच्या भावींचें नियंत्रण करण्यासंबंधीं मागणें केलें पाहिजे आणि असें जर ते न करतील तर त्यांचेंच नुकसान होणार आहे.

### हिंदुस्थानांतील काचकारखाने

| प्रांत | संख्या |
|---|---|
| बंगाल | २८ |
| मुंबई | १९ |
| दिल्ली | १ |
| हिंदी संस्थानें | ११ |
| मद्रास | १ |
| पंजाब | ३ |
| संयुक्त प्रांत | ३८ |
| | १०१ |

### काचमालाची हिंदुस्थानांत आयात

| | किंमत रुपये |
|---|---|
| १९२६-२७ | २,५३,००,००० |
| १९३१ | १,६५,००,००० |
| १९३८-३९ | १,२५,००,००० |

### हिंदुस्थानांत काचसामानाचें उत्पादन

| अंदाजाचें वर्ष | किंमत रुपये |
|---|---|
| १९१४ च्या महायुद्धापूर्वी | ८०,००,००० |
| १९३१ | १,४०,००,००० |
| आजचें वार्षिक उत्पादन | २,००,००,००० |

१९१४ पूर्वी हिंदी मागणीच्या एक चतुर्थांशाइतकीहि मागणी हिंदी उत्पादन पुरवूं शकत नसे, आतां निम्मी मागणी तें पुरवूं शकतें.

### काचेच्या उत्पादनास लागणारीं कच्चीं द्रव्यें

शत मानानें प्रमाण

| | हिंदी | इंग्लिश | बेल्जम | जर्मन |
|---|---|---|---|---|
| वाळू | २३ | २७ | ९ | १९ |
| सोडाॲश | ६७ | ६१ | ८७ | ७९ |
| लाइम अथवा लाइमस्टोन | १० | १२ | ४ | २ |
| | १०० | १०० | १०० | १०० |


**L. S. G. D.** Training Classes for officers of Local Self Government Service under the auspices of the Government of Bombay and the Local Self Government Institute, will begin from

***3rd November, 1941 at Bombay Ahmedabad and Poona.***

**Fees Rs. 75**

*Apply for prospectus to :*

THE HONORARY SECRETARY.

**310 Shanwar, Poona 2**

or

THE DIRECTOR,

*11 Elphinstone Circle, Fort, BOMBAY*

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

# चाकपट्टी व पुणें शहर म्युनिसिपॅलिटीचें धोरण

पुणें शहर म्युनिसिपॅलिटीनें गेल्या एक-दीड वर्षापासून भाड्याच्या मोटारींच्या टॅक्सबाबत नवीन धोरण स्वीकारलें आहे व त्याप्रमाणें कित्येकांकडून नवीन कर वसूलहि केला गेला आहे. इतके दिवस ज्या गाड्या म्युनिसिपॅलिटीचे हद्दींत ठेवल्या जात नसत म्हणजे रात्रीं मुक्कामाला दुसऱ्या कोणत्याहि गांवीं असत त्यांना पुणें शहर म्युनिसिपॅलिटीची चाकपट्टी द्यावी लागत नसे. त्यावेळीं ही चाकपट्टी पोलिसखात्याकडून गाड्यांना लायसेन्स देण्याच्या वेळीं वसूल केली जात असे व आपली गाडी रात्रीं वस्तीला पुणें शहरांत नाहीं असें दाखविलें म्हणजे हा कर माफ होत असे.

रिजनल ट्रॅन्सपोर्ट ऑथॉरिटीकडे मोटारींच्या व्यवस्थेचें काम गेल्यापासून ही पद्धति बदलली असून चाकपट्टी वसूल करण्याचें काम पुणें शहर म्युनिसिपालिटीला स्वतःच करावें लागत आहे व त्याप्रमाणें हें काम करायला लागल्याबरोबर तिनें आपल्या धोरणांत बदल केला आहे. त्या धोरणाचें निदर्शक म्हणजे पुणें शहरांत येणाऱ्या सर्व गाड्यांना झाडून चाकपट्टी वसूल करण्याचीं बिलें धाडून दिलीं आहेत व त्याबरोबरच एक मोटारवाल्यांच्या माहितीकरितां म्हणून ज्या कलमान्वयें ही पट्टी वसूल करावयाची आहे तें कलम स्वतंत्र कागदावर छापून तिनें पाठविलें आहे. या कलमान्वयें ज्या ज्या मोटारगाड्या पुणें शहराच्या हद्दींत खेपा करीत असतील त्या सर्वांवर ही चाकपट्टी बसविण्यांत आली आहे.

या प्रकरणीं बरेच कायद्याचे मुद्दे उपस्थित होण्याजोगे आहेत. परंतु त्या सर्वांचा येथें विचार न करतां एका विशिष्ट मुद्याचाच विचार करण्याचें आम्हीं ठरविलें आहे. तो मुद्दा म्हणजे "जर एकादी गाडी एका गावांत रात्रीं दररोज मुक्कामाला असली व तिला त्या गावच्या म्युनिसिपालिटीचा कर भरावा लागत असला तर तिला पुनः पुणें शहर म्युनिसिपालिटीचा कर भरावा लागेल कीं काय" हा आहे. कारण ती गाडी जरी दररोज मुक्कामाला आपल्या गावीं जात असली तरी ती उतारू घेऊन दररोज पुण्याला येते व तिला पुणें शहर म्युनिसिपॅलिटीच्या हद्दींतून फिरावें लागतें.

यासंबंधांत मुंबई हायकोर्टानें ४० मुं. लॉ रि. पान १११ वर दिलेला निर्णय महत्त्वाचा आहे व त्या दृष्टीनें पुणें शहर म्युनिसिपॅलिटीनें आपल्या धोरणांत बदल करणें जरूर आहे. मुंबई हायकोर्टानें ज्या केसमध्यें या बाबतचा आपला निर्णय दिला आहे त्या केसची हकीकत पुढीलप्रमाणें आहेः-

बर्मा शेल कंपनीची पेट्रोल-साठ्याचीं व विक्रीचीं ठिकाणें मुंबईत व मुंबई उपनगरांत होतीं. त्यापैकी कांहीं विक्रीच्या ठिकाणीं मोटारनें पेट्रोल पोंहोचविलें जात असे. त्या कंपनीच्या मोटारींचे तबेले शिवरी येथें होते व मोटारी बद्दलचा 'व्हील टॅक्स' मुंबई कॉरपोरेशन घेत असे. कंपनीच्या मोटारींपैकी ४ मोटारी वांद्रा म्युनिसिपॅलिटीच्या हद्दींतील पंपासाठी पेट्रोल घेऊन जात असत. म्हणून वांद्रा म्युनिसिपॅलिटीनें कंपनीकडे व्हील टॅक्स मागितला व कंपनीनें तो टॅक्स "अंडर प्रोटेस्ट" भरून त्या टॅक्सचे पैसे परत मिळविण्यासाठी म्युनिसिपॅलिटीवर फिर्याद केली. त्या फिर्यादीचा निकाल खालच्या कोर्टांत कंपनीसारखा लागला. त्या विरुद्ध वांद्रा म्युनिसिपॅलिटीनें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें. त्या अपीलांतहि कंपनीसारखाच निकाल लागला. त्या अपीलाचा निकाल देतांना हायकोर्ट जज्जनें पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेतः—

"ही केस मुंबई बरोज ॲक्ट कलम ७३ प्रमाणें आहे. त्या कलमाप्रमाणें जी गाडी म्युनिसिपालिटीच्या हद्दींत असते (kept) त्या गाडीस व्हील टॅक्स द्यावा लागेल. या केसमध्यें मुख्य मुद्दा "kept" ह्या शब्दाच्या व्याख्येविषयीं आहे. kept ह्याचा अर्थ २४ तास ठेवणें असा होत नसून, गाडीचे तबेले एका विशिष्ट ठिकाणीं असून, कामाव्यतिरिक्त ती गाडी त्याच ठिकाणीं असते, असा आहे. तेव्हां एखाद्या म्युनिसिपॅलिटीचे हद्दींत एखादी गाडी थोडा वेळ राहून, तिचा तबेला जर त्या म्युनिसिपॅलिटीचे हद्दीबाहेर असेल तर त्या म्युनिसिपॅलिटीला व्हील टॅक्स घेतां येणार नाहीं."

(४० मु. लॉ रि. १११)


आतां या केसमध्यें 'ठेवल्या' किंवा 'केप्ट' या शब्दाचा अर्थ लावला आहे. पुणें शहर म्युनिसिपॅलिटीच्या धोरणाबाबत 'प्लाइंग विदिन म्युनिसिपल लिमिट्स' या शब्दांचा अर्थ लावण्याची जरूर भासेल व तो अर्थ करतांना ज्या गाड्या या पुणें शहर म्युनिसिपल हद्दींत भाड्यानें नियमित खेपा करीत नाहींत त्या गाड्या वगळाव्या लागतील असें आम्हांस वाटतें. कारण, 'प्लाय' या शब्दाला विशिष्ट अर्थ आहे व त्याप्रमाणें वाटेल त्या गाडीवर हा टॅक्स बसवितां येणार नाहीं. उदाहरणार्थ, पुणें ते दौंड एकादी गाडी भाडें करते असें मानलें व त्याकरतां ती गाडी पुणें शहर म्युनिसिपालिटीच्या स्टँडवर येऊन उभी राहात असली तर तिच्यावर ही चाकपट्टी बसवितां येणार नाहीं. तिच्यावर स्टँडचा कर फार तर बसवितां येईल.

या सर्व गोष्टींचा विचार पुणें शहर म्युनिसिपॅलिटीकडून झाला तर आधीच गांजलेल्या भाड्याच्या मोटार मालकांना बरीच सवड मिळणार आहे.

सर्व कंपन्यांचे रेकॉर्ड्स व ग्रामोफोन्स् मिळण्याचें
पुण्यांतील विश्वसनीय ठिकाण
"HIS MASTER'S VOICE"
जी. जे. घैसास आणि कंपनी
गिरगांव ट्रामनाका, मुंबई आणि लक्ष्मीरोड पुणें शहर.

## —आमच्या ग्राहकांस—

नवीन वर्ष सुखाचें जावो.



नवीन वर्ष आनंदाचें जावो.

## —विजेचे दरांत अपूर्व क्रांति—

—आतां—वर्षभर दीपोत्सव करून स्वस्त मिळणाऱ्या
विजेचा भरपूर उपभोग घ्या.

योग्य प्रकाशासंबंधीं शास्त्रीय माहिती विनामूल्य देण्यांत येईल.

**पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं., लिमिटेड.**

६ अर्सेनल रोड, पुणें नं. २.

## दि सदर्न निटिंग वर्क्स लि.

पुणें २

यांनीं तयार केलेली

# " पूना होजिअरी "

आपल्या व्यापाऱ्यांकडे अवश्य पहा.

सर्व प्रकारचा सुती व लोकरी आणि जाळीचा माल निरनिराळे डिझाइन्समध्यें तयार होतो. इंटरलॉक अंडर-वेअरर्स व शर्टस् ही विशेष स्पेशॅलिटी आहे.

# सोनें बाजार

चालू युद्ध सुरू झाल्यापासून सोन्याचा भाव चढत जाऊन आतां तो ४२ रुपयांच्या वर गेलेला आहे. युद्ध चालू असेतों-पर्यंत भाव उतरणार नाहीं ही सर्वसामान्य अपेक्षा आहे. परंतु युद्धो-त्तर काळांत भाव उतरेल किंवा काय व उतरलाच तर किती प्रमाणांत उतरेल ह्याबद्दल तज्ज्ञ मंडळींत मतभेद आहे. मतभेदाचें मूळ कोणत्या परिस्थितींत सांपडतें हें स्पष्ट झाल्यास प्रस्तुत प्रश्नाचें उत्तर जो तो आपापल्या बुद्धीप्रमाणें ठरवूं शकेल.

कोणत्याहि वस्तूच्या बाजारभावांबद्दल विचार करावयाचा झाल्यास तो तीन बाजूंनीं करावा लागतो : (१) पुरवठा; (२) मागणी; (३) चलनविषयक धोरण. सोन्यास असणारी मागणी ही प्रमुख राष्ट्रांच्या चलनविषयक धोरणावर बहुतांशीं अवलंबून असते. पहिलें महायुद्ध सुरू होण्यापूर्वी बहुतेक मोठ्या देशांत सुवर्णचलन चालू होतें. त्या महायुद्धाचे वेळीं व तदनंतर सोन्याचें नाणें रद्द करण्यांत आलें, तरी कागदी चलनाला आधार ह्या नात्यानें सोन्याचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होऊं लागला. अंत-र्गत व आंतरराष्ट्रीय व्यवहाराची एकंदर मर्यादा वाढती असल्यानें आणि नव्या राष्ट्रांसहि सोन्याच्या स्वतंत्र साठ्याची थोड्याफार प्रमाणावर जरूर वाटूं लागल्यानें सोन्यास मागणी जोराची होती.

कागदी चलनाबद्दल सोनें देण्याची प्रथा पुढील काळांत बंद झाल्यावरहि ह्या मागणीस खळ पडला नाहीं. कारण युद्धासारख्या असामान्य परिस्थितींत उपयोगी पडावें म्हणून सर्व राष्ट्रें सोन्याचा संचय करूं लागलीं होतीं. आतां युद्धाचीं दोन वर्षे होऊन गेलीं आहेत. बहुतेक सर्व युध्यमान राष्ट्रांतील सोनें एक अमेरिकेकडे नाहीं तर जर्मनीकडे ओढलें जात आहे. जेवढ्या प्रमाणांत अमेरिका इतर राष्ट्रांस माल विकीत आहे त्या प्रमाणांत सोन्याची आयात होणें अशक्य असल्यानें, त्या व्यवहारांतहि आतां सोन्यापेक्षा इतर व्यापारी आणि राजकीय धोरणांस अधिक महत्त्व आलें आहे. रशियासंबंधीं अमेरिकन लोकमत विशेष कलुषित झालेलें असल्यानें रशियास पुरवावयाचा माल सोनें घेऊन द्यावा असें सध्या अमे-रिकन धोरण आहे. रशियाजवळ स्वतःच्या खाणींतून निघणाऱ्या सोन्याचा मुबलक साठा असल्यानें हें धोरण लवकर बदलण्याची जरूर नाहीं. परंतु तसाच प्रसंग आला तर अमेरिका रशियालाहि सोनें अगर मालहि न मागतां आपला माल उधारीनें पाठवील ह्यांत शंका नाहीं.

नाणें, कागदी चलनाला आधार व आंतरराष्ट्रीय देवघेवींचें साधन ह्या तिन्ही क्षेत्रांतून आतां सोन्याचें उच्चाटण झालें अस-ल्याकारणानें युद्धोत्तर काळांत सोन्याच्या मागणीचें मान पुष्कळ उतरेल असें कांहीं लोकांस वाटत आहे. ही अपेक्षा सर्वस्वी निरा-धार नाहीं, परंतु सोन्याच्या भावावर तीव्र परिणाम होईल एवढी घट मागणींत न होण्यास अनेक कारणें आहेत. चलनाखेरीज इतर कामीं सोन्याचा उपयोग होतो व तो चलनाच्या निदान बरोबरीनें होतो असा दीर्घकालीन अनुभव आहे. चलनविषयक धोरणांतहि जरी सोन्याचा प्रत्यक्ष उपयोग थोडा असला तरी सोन्याची खरेदी-विक्री करून चलनाच्या पुरवठ्यांत वाढ अगर घट करावयाची ही पद्धत चालूच राहील. आतां ज्या राष्ट्रांचा सुवर्णसंचय धुवून गेलेला आहे तीं राष्ट्रें अधिक पुरवठा मिळण्याची खटपट करतील. मध्य-वर्ती पेढ्यांमार्फत लहान व कर्जदार राष्ट्रांस कितीहि मदत केली तरी त्यांच्या सुवर्णविषयक गरजा नाहींशा होणार नाहींत. तात्पर्य, सोन्याचें चलनव्यवस्थेंतून उच्चाटण झालें असें भासलें तरी त्यास असलेली चलनविषयक मागणी कमी न होतां उलट वाढेल व चलनाखेरीज इतर बाबींकरतां असणाऱ्या मागणीचें महत्त्व नेहमी सारखेंच राहील.

सोन्याच्या पुरवठ्याबद्दल आतांपर्यंत तज्ज्ञांनीं केलेलीं बहुतेक भविष्यें चुकीचीं ठरत आलीं आहेत. ह्याचीं मुख्य कारणें दोन आहेत. एक तर सोन्याचा साठा फार मोठा असून किंमतींत होणाऱ्या चढीमुळें तो चटकन बाजारांत येतो. शिवाय खाणीं-मधूनहि वाढत्या बाजारभावामुळें अधिक पुरवठा करणें फायद्याचें होतें. दिवसानुदिवस सोनें काढणें व गाळणें ह्या दोन्ही धंद्यांत सुधारणा होत असल्यानें पुरवठ्याचें मान वाढतें. मागणींतील व बाजारभावांतील फेरबदलांचें प्रत्यंतर सोन्याच्या पुरवठ्यांत असें तात्काल येत असल्यानें पुरवठा वाढला म्हणून भावांत एकदम उतार, अगर पुरवठा कमी झाला म्हणून भावांत एकदम वाढ होत नाहीं. उलट, बाजारभावानुसार पुरवठा कमी-अधिक होत राहतो.

राहतां राहिलें चलनविषयक धोरण. गेल्या महायुद्धाचे वेळीं सर्व राष्ट्रांत कागदी चलनाचा पुष्कळ प्रसार झाला होता. युद्ध संपल्यावर पुन्हां सुवर्णचलनपद्धति लवकर सुरू व्हावी अशी इंग्लंडची व इतर मोठ्या राष्ट्रांची उत्कंठा होती. ह्या महत्त्वाकांक्षेस बळी पडून त्यांनीं जवळील सोन्याच्या प्रमा-णांत चलन कमी करण्याचा सपाटा चालविला. चलन जस-जसें दुर्मिळ होऊं लागलें तसतसें किंमतीचें मान उतरूं लागलें. पुढें जागतिक मंदीचें जें अरिष्ट ओढवलें त्याचा उगम चलनाचा झपा-ट्यानें संकोच करण्याच्या ह्या कामांतच झाला. युद्धकाल व शांतिकाल ह्यांमधील परिवर्तन असें हिसक्यानें करणें धोक्याचें आहे हें आतां सर्वांस कळून चुकलें आहे. चलनाचा संकोच व बाजारभावांचा उतार झालेच तर पूर्वयोजनेनुसार व क्रमाक्रमानें होतील, एकदम चक्र फिरल्याप्रमाणें होणार नाहींत.

मागणी, पुरवठा व चलन ह्या तिन्ही बाबतींत युद्धोत्तर परि-स्थितींत एकदम मोठी तफावत पडेल अशीं चिन्हें निदान आज तरी दिसत नाहींत.

## वानरांच्या भाषेचा शब्दकोश

वानरांच्या भाषेचा शब्दकोश रचण्याचें काम चालू असून त्याकामीं अमेरिका, दक्षिण अमेरिका, इत्यादि ठिकाणचे शास्त्रज्ञ प्रयत्न करीत आहेत. पुष्कळ वानरें असलेल्या पिंजऱ्यांत आवा-जाचें रेकॉर्डिंग करणारें यंत्र बसविण्यांत येतें व कोणत्या परि-स्थितींत कोणत्या शब्दांचा उच्चार होतो, हें पहाण्यांत येतें. ह्या ध्वनिमुद्रिका वरचेवर वाजवल्या जाऊन आवाजांचा अर्थ लावण्याचा यत्न केला जातो. अनेक ठिकाणच्या प्रयोगांवरून असें दिसून आलें आहे कीं वानरांच्या भाषेंत तीन ते पन्नास शब्द आहेत. वानरांच्या पिलांना फक्त चार पांचच शब्द येतात. ही शब्द-संख्या त्यांच्या वयाबरोबर हळूहळू वाढत जाते. वानरांच्या निर-निराळ्या जातींच्या बोलींत थोडा थोडा फरक आढळतो, इतकेंच काय पण दीर्घकाळ वेगवेगळ्या पिंजऱ्यांत ठेवलेल्या वानरांच्या बोलींतहि फरक पडलेला दिसून येतो. माणसाच्या मुलांप्रमाणेंच वानरांचीं पिलें भाषा शिकतात.

# ★ व्यक्ति एक पण सभासदत्व अनेक ★

एकाच व्यक्तीस कर्जाऊ पैसे देणाऱ्या एकापेक्षा अधिक सहकारी संस्थांचे सभासद होण्याची मोकळीक ठेवल्यास त्यास आपल्या परतफेडीच्या ऐपतीबाहेर कर्ज काढण्याचा व वाटेल तेवढ्या भरमसाठ रकमांसाठी आपल्या मित्र सभासदांस जामीन राहण्याचा मोह सहजीं होतो असा आजवरचा अनुभव आला आहे. यास आळा बसावा म्हणून एका इसमास एकापेक्षा अधिक सहकारी पतपेढ्यांचे सभासद होतां येणार नाहीं अशी कायदेशीर तरतूद करून ठेवण्याशिवाय गत्यंतर नाहीं असें दिसून आल्यावरून एका व्यक्तीस एका वेळीं अनेक अनियमित जबाबदारीच्या सहकारी पतपेढीचे सभासद होतां येणार नाहीं असा कायदेशीर निर्बंध यापूर्वीच ठरविण्यांत आला होता. नियमित जबाबदारीवर स्थापन झालेल्या सहकारी संस्थांचे बाबतींत मात्र तो तसा ठरविण्यांत आलेला नव्हता याचें कारण कदाचित् असें असूं शकेल कीं अशा प्रकारच्या संस्था बहुतकरून शहरांत असतात व त्यांच्या कार्यकारी मंडळाचे सभासद आपली जरूर ती जबाबदारी ओळखून अशा प्रकारच्या चुका आपल्या संस्थेच्या सभासदांना करूं देणार नाहींत असा या चळवळींत काम करणाऱ्या बहुतेकांचा समज झालेला असावा. तें कांहींहि असो. प्रत्यक्ष अनुभव मात्र असा आला कीं पुण्यासारख्या शहरांतून देखील एकेक इसम अनेक सहकारी पतपेढ्यांचा सभासद असून एकाच वेळीं अनेकांकडून तो कर्ज काढतो व पुष्कळवेळां त्याचेकडून आपल्या कर्जाची वक्तशीरपणें परतफेड होत नाहीं एवढेंच नव्हे, तर; बरेच वेळां त्याचेवर कायदेशीर इलाज करून त्याच्या कडील कर्जाची परतफेड करून घेणें प्राप्त होतें. अशा कांहीं बाबतींत जामीनदारांना बरीच तोशीस सोसावी लागते असेंही दिसून आलें आहे. यास इलाज म्हणून अखेरीस नियमित जबाबदारीच्या सहकारी पतपेढ्यांचे बाबतींत देखील एका इसमास एकापेक्षा अधिक सहकारी पतपेढ्यांचे सभासद होतां येणार नाहीं असा कायदेशीर निर्बंध गेले सालीं सरकारी कायद्याखाली नवीन कानू मंजूर करून सरकारनें सुरू केला.

## नवीन कानूच्या अंमलबजाणींत अडचण

हा नवीन कानू मंजूर होऊन आज एक वर्ष होऊन गेलें तरी देखील त्याची अम्मलबजावणी सहकारी संस्थांकडून योग्य प्रकारें होऊं शकली नाहीं असें सहकारी खात्याचे नजरेस आल्यावरून त्यांनीं या बाबीकडे सदर संस्थांच्या चालकांचें विशेष लक्ष वेधलें असून कानूंची अम्मलबजावणी न करणें हा सहकारी कायद्याखाली गुन्हा होतो याची जाणीवही त्यांस करून दिली आहे. या कानूची अम्मलबजावणी होण्यास व्यावहारिक काय काय अडचणी येत आहेत, त्यांचा थोडक्यांत उहापोह या लेखांत करण्याचा आमचा मानस आहे.

कित्येक सभासदांकडे आज तारखेस अनेक सहकारी पतपेढ्यांची येणें कर्जाची बाकी एवढी मोठी आहे कीं त्यांना थोडे मुदतींत ती पूर्णपणें फेडणें अगदींच अशक्य आहे. तसेंच, त्यांनीं पत्करलेल्या जामीनकींचे बोजेहि एवढे मोठे आहेत कीं त्यांना या बोजांतून पार पडण्यास कित्येक वर्षे लागतील, अशी वस्तुस्थिति आहे. अशा परिस्थितींत वरील कानूची अम्मलबजावणी तावडतोब करावी अशी सहकारी पतपेढ्यांच्या चालकांची कितीहि इच्छा असली तरी तें त्यांना तूर्त करतां येणें अशक्य आहे. सबब, आहे ही परिस्थिति आणखी कांहीं वर्षे तरी चालू राहूं देण्याशिवाय गत्यंतर दिसत नाहीं. मात्र, त्यांनीं हल्लींचे सभासदांना अशी स्पष्टपणें वेळींच जाणीव देऊन ठेवणें जरूर दिसतें कीं यापुढें कोणत्या तरी एकाच पतपेढीकडे प्रत्येक सभासदास कर्जदार अगर जामीनदार म्हणून व्यवहार करतां येईल; अनेक ठिकाणीं करतां येणार नाहीं व तसा व्यवहार ते कोणत्या पतपेढीबरोबर यापुढें करणार आहेत तें त्यांनीं विशिष्ट मुदतींत जाहीर करावें व तसें त्यांनीं सदर मुदतींत जाहीर न केल्यास त्यांना यापुढें कोणत्याहि पतपेढीचे कर्जदार अगर जामीनदार सभासद म्हणून राहवयाचें नाहीं असें समजून त्याप्रमाणें सर्व सोसायट्यांनीं व सहकारी बँकांनीं नोंद घ्यावी म्हणजे झालें. अशी नोंद घेण्यांत आल्यानंतर अशा सभासदांना त्यापुढें नवीन कर्जही देऊं नये अगर त्यांना जामीन म्हणूनहि पत्करूं नये. असें झालें म्हणजे दोन-तीन वर्षांत वरील कानूची सहजी अम्मलबजावणी होऊं शकेल.

आतां प्रश्न राहिला सभासदत्वासंबंधीं. या बाबतींत सहकारी कार्यकर्त्यांत बरीच मतभिन्नता दिसते. कांहींचें म्हणणें असें पडतें कीं अद्याप या चळवळींत तज्ज्ञ इसमांचा तसेंच निस्पृहपणें काम करणारांचा बराच अभाव आहे. सबब अशा मंडळींना अनेक संस्थांचे सभासद होण्याची मोकळीक ठेवली नाहीं तर अशांच्या अनुभवाचा व सल्ल्याचा फायदा या सर्व संस्थांना मिळूं शकणार नाहीं. सबब, त्यांना तशी मोकळीक असावी. इतरांचें याविरुद्ध असें म्हणणें आहे कीं अशी मोकळीक अपवाद म्हणूनहि असतां कामा नये. कारण नियमांचे दृष्टीनें सर्व व्यक्ती सारख्याच समजल्या पाहिजेत. आमचे दृष्टीनें या दोन्ही विचारांचा समन्वय व्हावयास पाहिजे. सबब, आमची अशी सूचना आहे कीं ज्याप्रमाणें लँड मॉर्गेज बँकांत दोन प्रकारचे म्हणजे एक कर्जदार व दुसरे बिगर-कर्जदार सभासद असतात तसे नागरी पतपेढ्यांतही दोन प्रकारचे सभासद असावेत व ते तसे ठेवल्यास ज्या इसमांना अनेक संस्थांत सभासद म्हणून राहण्याची इच्छा असेल त्यांना वर नमूद केलेल्या कानूच्या मूलभूत हेतूस बाध न आणतांही अनेक संस्थांचें सभासदत्व स्वीकारतां येईल. तरी या दृष्टीनें सहकारी चळवळींत काम करणारांनीं याचा अधिक विचार करून वर लिहिलेल्या कानूची अम्मलबजावणी सहकारी संस्थांकडून तावडतोब कशा रीतीनें करवून घेतां येईल तें ठरवावें अशी आमची त्यांना प्रेमाची विनंति आहे.

---

## हिंदुस्थानांत इंजनांचें उत्पादन तूर्त शक्य नाहीं

रशिया व मध्य आशिया येथें पुरविण्याकरितां इंजनांचें उत्पादन हिंदुस्थानांत सुरू करतां येणार नाहीं का, ह्या प्रश्नास कॉमन्स सभेंत उत्तर देतांना भारतमंत्रि म्हणाले कीं चालू युद्धांत तरी तें शक्य होणार नाहीं. तथापि, रशिया व मध्य आशिया ह्यांस मदत करण्यास हिंदुस्थानचें शक्य तेवढें सामर्थ्य उपलब्ध केलें जाईल, असें त्यांनीं सांगितलें.

# ★ हुंड्या, चेक व ड्राफ्ट आणि त्यांची वसुली ★

बँकांकडून मुख्यतः ठेवी स्वीकारणें व कर्जे देणें हीं मामुली कामें मोठ्या प्रमाणावर होत असलीं तरी त्यांच्या व्यवहारांत इतर बऱ्याच सर्वसाधारण बाबींचा अंतर्भाव होतो. अशा बाबींत गिऱ्हाइकांच्या हुंड्या व चेकांची वसुली करण्याच्या व त्यांच्या रकमा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पाठविण्याच्या महत्त्वाच्या कामगिरीचा समावेश होतो. बँकांच्या व्यवहाराशी अनभ्यस्त असलेल्या जनतेकडून त्यांच्या खाजगी व्यवसायास लागणाऱ्या रकमांची ने-आण करण्याकरितां साधारणतः मनीऑर्डरी अगर विमा पोस्टाच्या द्वारें चलनी नोटा पाठविण्याच्या मार्गाचा अवलंब करण्यांत येतो, परंतु तो मार्ग बऱ्याच खर्चाचा असल्यामुळें तो व्यापारी व इतर धंदेवाल्या लोकांस परवडत नाहीं. या वर्गाच्या लोकांनीं ठिकठिकाणीं खरेदी-विक्री केलेल्या मालाच्या किमतीची व इतर रकमांची ने-आण शक्य तितक्या तत्परतेनें, कमी खर्चानें व रोकडीची जोखीम टाळून होण्यावर व्यापाराचें यश बऱ्याच अंशीं अवलंबून आहे. या दृष्टीनें त्यांच्या रकमा ठिकठिकाणच्या पेढ्या अगर बँकांच्या मार्फत आणण्या-नेण्याची तजवीज विशेष सोईची व फायदेशीर असल्याचें आढळतें. अशा पेढ्यांच्या व बँकांच्या मार्फत रकमांची ने-आण साधारणतः हुंड्या व चेक ह्यांच्या रूपानें करण्यांत येत असल्यामुळें प्रथम त्यांच्या सर्वसाधारण स्वरूपाचा येथें थोडक्यांत विचार करणें जरूर आहे.

### हुंड्यांचे प्रकार

हुंडी ही ठोळक मानानें व्यापाराच्या केंद्रस्थानीं असलेल्या एकाद्या व्यापाऱ्यास तीमध्यें दाखल केलेल्या इसमास नमूद केलेली रकम देण्याबद्दल देशभाषेंत लिहिलेलें पत्र होय. हुंड्यांची ही पद्धत आपल्याकडे पुरातन काळापासून चालत आली असून त्यांचें नियंत्रण ठिकठिकाणीं प्रचलित असलेल्या वेगवेगळ्या स्थानिक पद्धतीस व व्यापारी संघांनीं घालून दिलेल्या विशेष नियमांस अनुसरून होतें. देशभाषेंतील अशा हुंड्यांस लागू असलेल्या स्थानिक पद्धतींच्या बाबींत 'निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट'चा अंमल कलम १ प्रमाणें होत नाहीं. परंतु त्या पद्धतीच्या ऐवजीं त्या ॲक्टाचें बंधन हुंड्या देणारे व घेणारे यांनीं स्वीकारल्याबद्दल हुंड्यांत स्पष्ट उल्लेख केला असल्यास मात्र अशा हुंड्यांच्या बाबतींत त्या ॲक्टची अंमलबजावणी होते.

या हुंड्यांचे शहाजोग व देखाडनार धनीजोग असे दोन प्रकार आहेत. दुसरा प्रकार 'बेअरर चेक' च्या स्वरूपाचा असतो. पहिला जवळ जवळ 'क्रॉस चेकच्या' स्वरूपाचा असतो. ज्याप्रमाणें क्रॉस केलेल्या चेकाच्या रकमा फक्त बँकांमार्फतच देतां येतात, त्याप्रमाणें शहाजोग हुंड्यांच्या रकमा फक्त शहा म्हणजे प्रतिष्ठित स्थाइक इसमासच त्याच्या पेढीवर देतां येतात. परंतु बँकेस हुंडी दाखवतांच तिची रकम देणें अगर न देणें याचा एका क्षणांत निर्णय करावयाचा असल्यामुळें ती आणणाऱ्या इसमाच्या प्रतिष्ठितपणाबद्दल तपास करणें जवळ जवळ अशक्य होतें. यामुळें व मोठाल्या रकमा शहाच्या पेढीवर पाठविण्यांत बरीच जोखीम असल्यामुळें मुंबई प्रांतिक सहकारी बँकेनें तशा हुंड्या न देण्याबद्दल आपल्या गिऱ्हाइकांस सूचना दिली आहे.

### चेक्स

चेकसंबंधानें विचार करतां, बँकांत चालू खातीं ठेवून खातेदारांनीं त्यांतून वेळोवेळीं रकमा देण्याची ती सोय असते. स्थानिक बँकेंत अगर ज्या ठिकाणीं मोठा व्यवहार हमेशा करण्याची जरूरी पडते अशा ठिकाणच्या बँकांत चालू खातीं उघडून त्यांतून रकमा देण्याची व्यवस्था करणें, व्यापारी व इतर लोकांस बरेंच सोईचें पडतें. विवक्षित इसमास विवक्षित रकम देण्याबद्दल खातेदारांनीं बँकांस दिलेल्या हुकमास चेक ही संज्ञा आहे. चेकवरील स्टँप ड्यूटीची सरकारनें माफी दिल्यापासून जनतेंत बँकांच्या व्यवहारांबाबत अभिरुचि उत्पन्न होऊन चेकच्या पद्धतीचा बऱ्याच मोठ्या प्रमाणांत फैलाव झाला आहे. चेक दोन प्रकारचे असतात. पहिल्या प्रकारचा चेक फक्त त्यांत नमूद केलेल्या इसमासच अगर त्यानें लेखी हुकूम दिलेल्या इसमास (order) द्यावयाचा असून दुसरा तो धारण करणारास (Bearer) द्यावयाचा असतो. पहिल्या प्रकारचा चेक त्यांत नमूद केलेल्या इसमासच देण्याची बँकांवर जबाबदारी असल्यामुळें त्यांच्या रकमा देतांना त्या इसमाबद्दल बँकांनीं पूर्ण खात्री करून घेणें अवश्य आहे. या दोन्ही प्रकारच्या चेकवर डाव्या बाजूस वरच्या अंगास दोन समांतर रेषा मारून ते क्रॉस केल्यास त्यांच्या रकमा फक्त एखाद्या बँकेमार्फतच द्यावयाच्या असतात. सबब असा चेक प्रसंगविशेषीं बँकेकडे आल्यास त्याची रकम रोख आदा न करतां तो एकाद्या बँकेमार्फत पाठविण्याकरितां परत केला जातो. नाहींतर तसल्या चेकच्या रकमा रोख दिल्या गेल्यास त्याची जबाबदारी रकम देणाऱ्या बँकेवर पडते.

### पैशाची ने-आण

वरील दोन प्रकारांशिवाय खातेदारांच्या अगर इतर गिऱ्हाइकांच्या रकमा एका गावाहून दुसऱ्या गावीं पाठविण्याची महत्त्वाची कामगिरी बँकांकडून करण्यांत येते. अशा रकमा रोख अगर खात्यांतून दिल्या जातात व त्यांचे ऐवजी बँकांकडून ड्राफ्ट दिले जातात. बँकांनीं इतर बँकांवर अगर स्वतःच्या शाखांवर अगर परस्पर एकमेकांवर नमूद केलेल्या इसमास नमूद केलेली रकम देण्याकरितां सोडलेल्या पत्रास ड्राफ्ट ही संज्ञा आहे. ड्राफ्ट ज्या बँकेवर काढलेले असतील तीस ते दाखविले जातांच तावडतोब अगर त्यांत नमूद केलेल्या मुदतीनंतर द्यावयाचे असतात. अशा रीतीनें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं रकम पाठविण्याकरितां व मुदतीच्या ड्राफ्टच्या बाबतींत थोड्या मुदतीचीं कर्जे देण्याकरितां ड्राफ्टसचा उपयोग होतो आणि त्यांवर बँकांकडून योग्य कमिशन व व्याज आकारलें जातें. असे ड्राफ्ट फक्त त्यांत नमूद केलेल्या इसमासच( order ) देण्याचे असून ते साधारणतः क्रॉस केलेले असतात.

उपरिनिर्दिष्ट चेक व हुंड्या यांच्या वसुलीचें महत्त्वाचें काम बँकांकडून दोन प्रकारांनीं केलें जातें. एक, गिऱ्हाइकाची हुंडी अगर चेक वसुलीकरितां स्वीकारून त्याची रकम वसूल झाल्यानंतर खातेदाराच्या खातीं जमा करणें व दुसरें गिऱ्हाइकाची हुंडी अगर चेक विकत घेणें म्हणजे त्याची रकम वसूल होण्यापूर्वीच कमिशन कापून घेऊन तावडतोब रोख रकम देणें अगर त्याच्या खातीं जमा करणें. दुसरा प्रकार फक्त ज्यांची पत प्रस्थापित झाली असेल अशाच लायक इसमांच्या बाबतींत कांहीं ठराविक मर्यादेपर्यंत अंमलांत येतो. या व्यवहारापासून बँकांस रकमांची चाळवाचाळव करतां येऊन त्याबरोबर कमिशनचाहि फायदा मिळवतां

येतो. अशा रीतीनें हें महत्त्वाचें कार्य समायिक भांडवलाच्या सर्व व्यापारी बँकांच्या व्यवहाराचा एक बराच मोठा भाग होऊन बसला आहे.

### हुंड्या आणि सहकारी बँका

परंतु हा हुंड्यांचा व्यवहार सहकारी बँकांच्या कक्षेत येत नसल्याबद्दल सरकारचा अभिप्राय असून त्यांचेकडून तो वाजवी समजला जात नाहीं व त्यांच्या द्वारें वसूल झालेल्या रकमा 'रेमिटन्स ट्रांसफर रिसीट' नें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं मोफत पाठवणें हा सरकारनें दिलेल्या सवलतीचा दुरुपयोग समजला जातो. सहकारी बँका आपलें कार्य विशेषतः आडवळणी ठिकाणीं करीत असून तें मुख्यतः शेतीच्या मालाच्या व्यापारास बरेंच पोषक होत असल्यामुळें वास्तविक त्यास सरकारकडून हरएक प्रकारची मदत होणें अगत्याचें आहे. या गोष्टीचा मुंबई बँकिंग इन्क्वायरी कमिटीनेंही आपल्या रिपोर्टाच्या पृष्ठ १८२ वर प्रामुख्यानें पुरस्कार केला असून सहकारी बँकांस पिकें व शेतीच्या मालाच्या सुरळीत हालचालीस लागणाऱ्या रकमांची जलद व थोड्या खर्चानें तजवीज करतां येण्याकरितां प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं शाखा व पोटशाखा काढतां याव्या म्हणून सरकारनें काढून घेतलेली सवलत पुन्हां सुरू करण्याची जोराची शिफारस केली आहे.

सहकारी बँकांच्या हुंड्यांच्या व्यवहारांत वरील अडचण उपस्थित झाल्यामुळें त्या बँकांस हुंड्यांच्या रकमा ठरीव कमिशन देऊन सप्लाय बिलानें अगर विमा पोस्टानें चलनी नोटांच्या द्वारें पाठवाव्या लागतात व त्यामुळें जादा खर्च अगर नियोजित ठिकाणीं रकमा पोहोंचेपर्यंतच्या मुदतींत होणारें व्याजाचें नुकसान सोसावें लागतें. शेतीच्या धंद्यास भांडवल पुरवण्याच्या कामीं सहकारी बँकांची विशेष कामगिरी लक्षांत घेऊन रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत प्रांतिक सहकारी बँकांस विशिष्ट स्थान देण्यांत आलें आहे. या दृष्टीनें पैशाची ने-आण करण्याच्या संबंधानें प्रांतिक बँकांस निदान शेड्युल्ड बँकांच्या बरोबरीनें सवलती मिळाल्यास सहकारी संस्थांचा मार्ग थोडा सुकर होण्याचा संभव आहे. परंतु त्या बाबतींत अजून कांहीं अखेर निकाल लागला नाहीं.

### प्रांतिक सहकारी बँकेचें कार्य

मुंबई इलाख्यांतील सहकारी बँकांचा व्यवहार हल्ली बराच वाढला असून त्यांचा उत्तरोत्तर जनतेशीं निकट संबंध येत असल्यानें तो त्यांच्या भरभराटीस बराच पोषक होत आहे. अशा स्थितींत सहकारितेच्या स्वावलंबनाच्या मूळ तत्त्वास अनुसरून मुंबई प्रांतिक सहकारी बँक व प्रांतांतील इतर कांहीं जिल्हा व अर्बन सहकारी बँकांच्या परस्पर सहकार्यानें त्यांच्या गिऱ्हाइकांच्या हुंड्या व चेक वटविण्याची एक तपशीलवार योजना कांहीं वर्षांपूर्वी आखण्यांत आली होती. परंतु तींत नुकत्याच बऱ्याच दुरुस्त्या करून फेरफार करण्यांत आले आहेत. त्या योजनेचा मुख्य उद्देश सहकारी बँकांच्या गिऱ्हाइकांनीं प्रांतांतील कोणत्याही भागांतील चेक वसुलीकरतां आणल्यास तो वसुलीच्या व्यवस्थेच्या अभावीं परत करण्याचें कारण पडूं नये असा असून तिचें स्वरूप स्थूल मानानें खालील प्रमाणें आहे.

मुंबई प्रांतिक बँक ही स्थानिक "बँकर्स क्लिअरिंग हाउस"ची सभासद असून प्रांतांतील बहुतेक सहकारी बँकांच्या चेकच्या वसुलीचें काम तिच्यामार्फत होतें. या विशिष्ट योजनेच्या कमिशनच्या व इतर अटींस लेखीं मान्यता देऊन तींत सामील होणाऱ्या बँकांसच ती लागू होते. त्या बँकांकडून येणारे चेक मुख्यतः दोन प्रकारचे असतात; (१) सहकारी बँकांनीं इतर सहकारी बँकांवर काढलेले व (२) इतरांनीं काढलेले परंतु सहकारी बँकांमार्फत वसुलीकरतां आलेले. योजनेंत सामील असलेल्या बँकेनें आपला चेक इलाख्यांतील तशाच रीतीनें सामील झालेल्या इतर मध्यवर्ती अगर अर्बन बँकेकडे वसुलीकरतां पाठविल्यास त्या ठिकाणीं तिचें चालू खातें असल्यास त्या चेकची रकम ती बँक चेक पाठविणाऱ्या बँकेच्या खातीं कमिशनशिवाय जमा करते. परंतु अशा चालू खात्याच्या अभावीं, चेकची रकम ज्या बँकेवर चेक काढला असेल त्या बँकेकडून चेक वसुलीकरितां पाठविणाऱ्या बँकेस परस्पर पाठविली जाते अगर ती त्या बँकेच्या खातीं जमा करण्याकरितां मुंबई प्रांतिक सहकारी बँकेकडे पाठविली जाते. अशा रीतीनें पाठविलेल्या रकमेवर रकमेच्या कमीजास्ती प्रमाणावर दर शेकडा ठराविक कमिशन ज्या बँकेवर चेक काढला असेल तीस चेक पाठविणाऱ्या बँकेकडून मिळतें. चेकची रकम मुंबई प्रांतिक बँकेकडे चालू खातीं जमा होण्याकरितां पाठविल्यास दर चेक मागें दोन आणे प्रमाणें त्या बँकेस कमिशन द्यावें लागतें व तें चेक पाठविणाऱ्या बँकेकडून वसूल केलें जातें. बँकांनीं पाठविलेल्या गिऱ्हाइकांच्या चेकवरही वरील प्रमाणेंच कमिशनची आकारणी केली जाते; परंतु त्या बँकांनीं आपल्या गिऱ्हाइकांस आकारावयाचें कमिशन या योजनेनें ठरविलें नसून तें ज्या त्या बँकेनें तिच्या सोईप्रमाणें आकारावयाचें असतें. आरंभीच्या योजनेप्रमाणें चेकच्या वटावाच्या बाबतींत बँकांचीं एकमेकांकडे चालू खातीं असणें अगर नसणें याचा कांहीं संबंध नसून योजनेंत सामील झालेल्या सहकारी बँकांनीं इतर सहकारी बँकांवर काढलेल्या चेकच्या रकमा कमिशनशिवाय दिल्या जात. या नवीन योजनेप्रमाणें तींत सामील असलेल्या बँकांस परस्परांवर रुपये दोन हजारपर्यंत कमिशनशिवाय ड्राफ्ट काढण्याचीहि परवानगी ठेवली आहे. ही नवीन योजना अद्याप प्रयोगावस्थेंत असून तिच्या संबंधानें सन १९३८ मध्यें भरलेल्या सहकारी बँकांच्या परिषदेंत बराच उहापोह झाला व शेवटीं तिचा कांहीं दिवस अनुभव घेऊन नंतर तींत जरूर ते फेरफार करावे असें ठरलें. अशा रीतीनें हा सर्व प्रश्न अद्याप कायम स्वरूपाचा नसून तो बऱ्याच अंशीं रिझर्व्ह बँकेकडून प्रांतिक सहकारी बँकेस निदान शेड्यूल्ड बँकांचे बरोबरीच्या सवलती मिळण्यावर अवलंबून आहे. या दृष्टीनें त्या निकडीच्या प्रश्नाचा रिझर्व्ह बँकेकडून शक्य तितक्या लवकर निकाल लागून तिच्याकडून शेतीच्या भांडवलविषयक जिव्हाळ्याच्या प्रश्नास सक्रिय सहानुभूति मिळेल अशी सहकारी वर्गानें आशा करणें निःसंशय वावगें होणार नाहीं.


## "अर्थ" ग्रन्थ मालेचीं पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| बँका आणि त्यांचे व्यवहार<br>दुसरी आवृत्ति, १ रु. ८ आ. | रिझर्व्ह बँक<br>१ रु. | व्यापारी उलाढाली<br>१ रु. | सहकार<br>१ रु. |

# स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक प्रगति

मुंबई सरकारनें प्रो. वा. गो. काळे यांचे अध्यक्षतेखाली एक समिति नेमून तिच्याकडे स्थानिक स्वराज्य कारभाराविषयक अनेक प्रश्नांची माहिती गोळा करून त्यांवर त्या समितीचा अभिप्राय मागविला होता. अशा प्रकारची समिति नेमण्याबद्दल स्थानिक स्वराज्य परिषदेंत अनेक वेळां विनंतिवजा ठराव करण्यांत आले होते, परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. सन १९३७ सालीं कॉंग्रेसनें अधिकार-स्वीकार केल्यावर या प्रश्नांकडे आपुलकीच्या भावनेनें पाहून समिति नेमली व प्रो. वा. गो. काळे यांना मुद्दाम विनंति करून त्या कमिटीचें नेतृत्व स्वीकारण्यास निमंत्रण देण्यांत आलें.

स्थानिक स्वराज्य कारभारांत अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे नागरिकांच्या सुखसोईकरितां लागणारा पैसा कसा व कोठून उभा करावयाचा हा होय. या दृष्टीनें या समितीनें केलेल्या शिफारशी व सरकारनें त्या शिफारशींसंबंधीं आपले दिलेले निर्णय सामान्य नागरिकांना बोधप्रद होतील या हेतूनें त्यांचा सारांश या लेखामध्यें देण्याचा विचार आहे.

समितीनें या प्रश्नांचा विचार तीन बाजूंनीं केलेला दिसत आहे: ( १ ) चालू कर थोडेफार वाढविणें, ( २ ) नवीन कर बसविणें, ( ३ ) प्रांतिक सरकारनें त्यांच्या करांतील कांहीं भाग स्थानिक स्वराज्य संस्थांना देणें.

सध्या मुख्य उत्पन्नाच्या बाबी म्हणजे घरपट्टी व जकात या होत. समितीचा अभिप्राय असा आहे कीं, कांहीं ठिकाणीं घरपट्टीचें प्रमाण आहे तें वाढवावें. त्याचप्रमाणें जकातीचें दरवारीचें शेड्यूल बदलून ते कराचे प्रमाणें वाढवावें. ही शिफारस अधिकारी व स्थानिक स्व. संस्था यांच्या निदर्शनास आणण्याची शिफारस सरकारनें केली आहे.

जिल्हा लोकलबोर्डांनीं बसवावयाचा लोकलफंड सेस कमींत कमी १½ आणा व जास्तींत जास्त २½ आणे असावा व अनुक्रमें त्यांतील १८ पै व १० पै प्राथमिक शिक्षणासाठी असाव्यात अशी शिफारस समितीनें केली असून जमीन–महसुलाचा विशिष्ट अंश त्यांस तोडून द्यावा असें म्हटलें आहे. लोकलफंड सेस वाढविण्यासाठी लोकलबोर्ड कायद्यांत दुरुस्ती होणें अवश्य आहे. परंतु सध्यां विधिमंडळ अस्तित्वांत नसल्यानें हा प्रश्न तहकूब ठेवण्यांत येत असल्याचें सरकारनें नमूद केलें आहे. त्याचप्रमाणें शेतीचे कराबाबतची शिफारस सरकारास अमान्य वाटली आहे.

### नवीन करांच्या बाबी

समितीनें अशी सूचना केली आहे कीं, प्राथमिक शिक्षणासाठी 'शिक्षण कर' बसवावा व त्याचप्रमाणें खालीलप्रमाणें इतरही कर उत्पन्न वाढविण्यासाठी बसवावेतः—( १ ) धंद्यावरील कर, ( २ ) मालमत्ता वर्ग होतांना बसवावयाचा कर, ( ३ ) लग्न, दत्तविधान व मेजवान्या यांवरील कर. यांपैकी मालमत्तेवरील कर, ही बाब सरकारनें मान्य केली नाहीं. लग्न, दत्तविधान, वगैरे बाबींवर कर बसविण्याचें तत्त्व सरकारास मान्य आहे असें दिसतें. परंतु कर बसविणें व ते वसूल करणें वगैरे बाबत अडचणी बऱ्याच आहेत. एखाद्या म्यु. नें लग्न व दत्तविधान यांवर कर बसविण्याचें ठरविल्यास सरकार त्यांचा विचार करण्यास तयार आहे.

### प्रांतिक सरकारच्या करांतील उत्पन्नाचा भाग

समितीनें शिफारशी करतांना सरकारनें खालील उत्पन्नांच्या पैकीं कांहीं भाग स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावा अशी शिफारस केली आहे. ( १ ) बिगर शेतसारा, ( २ ) करमणुकीवरील कर, ( ३ ) इलेक्ट्रिक खपावरील सरचार्ज, ( ४ ) पेट्रोल ट्रॅक्स, ( ५ ) शेतसाऱ्यापैकीं १० टक्के. यापैकीं बहुतेक सर्व बाबींना सरकारनें नकार दिला आहे. समितीच्या शिफारशीप्रमाणें बिगर शेतसाऱ्याचें प्रमाण सरकारनें कमी करावें अगर उत्पन्नापैकी पुष्कळसा भाग म्हणजे सुमारें ७५ टक्के भाग म्यु. ना द्यावा.

करमणुकीवरील सर्व कराचें उत्पन्न स्थानिक संस्थांना द्यावें अशी शिफारस समितीनें केली होती. शहरांत खपणाऱ्या विजेवर सरकार सध्यां सरचार्ज बसवून सर्व उत्पन्न आपलेकडे घेतें. हा कर स्थानिक स्वरूपाचा असल्यानें निदान त्या कराचे उत्पन्नापैकी ५० टक्के उत्पन्न स्थानिक संस्थांना देण्याची शिफारस समितीनें केली होती.

पाश्चिमात्य देशांत जमिनीवरील कराचें उत्पन्न स्थानिक संस्थांना दिलें जातें. त्याचप्रमाणें आपल्या देशांतील स्थानिक संस्थांना शेतसाऱ्यापैकी जरी सर्व उत्पन्न नसलें तरी कमींत कमी १० टक्के तरी उत्पन्न जिल्हा बोर्डास देण्याची शिफारस समितीनें केली होती. त्याबाबत सरकारनें अद्याप निर्णय दिला नसून त्यासंबंधीं विचार चालू आहे.

नागर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीनें महत्त्वाची बाब म्हणजे बिगर शेतसाऱ्यामुळें शहराच्या वाढीस होणारा अडथळा दूर करण्यासाठी सध्या असलेला बिगर शेतसारा कमी करावा अगर त्यांतील शेकडा ७५ पर्यंत उत्पन्न म्यु. स द्यावें अशी शिफारस समितीनें केली. ही शिफारस अद्याप अनिर्णित अशी आहे. परंतु सरकारनें ही शिफारस मान्य केल्यास नागरिकांच्या इतर कराबाबत स्थानिक म्यु. ना पुष्कळसा भार कमी करतां येऊन सुखसोई, आरोग्य व शिक्षण यांवर अधिक पैसा खर्च करतां येईल.

या समितीनें केलेल्या शिफारशी व सरकारी निर्णय यांची योग्य तऱ्हेनें अंमलबजावणी करण्याचें काम खरोखर निमसरकारी सद्‌गृहस्थांचे हातीं असणें जरूर आहे. यदाकदाचित् कमिटीनें केलेल्या एकमुखी सूचना सरकारी अधिकारी यांना मान्य नसल्यास अंमलबजावणी करण्याचे कामीं समाधानकारक प्रगति होणें कठीण पडतें. यासाठी शक्य झाल्यास सरकारनें हें काम याच समितीकडे सोपवून आर्थिक सुधारणा, कारभागसंबंधीं सुधारणा व कार्यासंबंधीं सुधारणा ज्या सुचविल्या आहे त्यांची अंमलबजावणी करण्याचें काम तिला सांगावें. निदान या समितीस 'स्थायी समिति' ( Standing Committee ) नेमून स्थानिक स्वराज्यविषयक प्रश्न व विशेषतः या समितीचे अहवालावरून उत्पन्न होणारे प्रश्न अभिप्रायाकरितां तिजकडे सोपवावेत म्हणजे त्यायोगें स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रगतीचें पाऊल थोडेंफार तरी पुढें पडेल.

# महागाई व स्वस्ताई

(प्रो. काळे, ह्यांचें रेडिओवरील भाषण, ऑल इंडिया रेडिओ, मुंबईचे डायरेक्टर, ह्यांच्या परवानगीनें प्रसिद्ध करण्यांत येत आहे.)

## बाजारभावांचें नियमन

प्रस्तुत युद्धाच्या परिस्थितींत विशिष्ट कारणांमुळें कित्येक जिनसांच्या किंमती चढल्या आहेत. सबंद राष्ट्राच्या आणि त्यांतील भिन्न भिन्न वर्गांच्या हिताच्या दृष्टीनें महागाईचें नियमन करण्याचे योग्य उपाय कांहीं धोरणानें हिंदुस्थानांतील सरकारांनीं योजले आहेत. ह्या प्रश्नाची चर्चा देशांत चालू आहे आणि अधिकृत व पद्धतशीर रीतीनें त्यासंबंधानें विचार होऊन बदलणाऱ्या स्थितीस अनुलक्षून योजना निश्चित होण्याचें घाटत आहे. ह्या दृष्टीनें बाजारभावांच्या चढउताराचें व महागाईवरील उपायांचें स्वरूप काय असतें ह्याचें विवेचन सूक्ष्म रीतीनें होणें आवश्यक आहे. संसारांत नित्याच्या उपयोगास लागणाऱ्या जिनसांची स्वस्ताई असणें हें सुबत्तेचें व सुस्थितीचें प्रमुख लक्षण मानण्यांत येतें. खाण्यापिण्याचे पदार्थ–विशेषतः धान्यधुन्य–स्वस्त झालें म्हणजे तें वर्ष चांगलें समजलें जातें. ह्याचें कारण उघड आहे. स्वस्ताई म्हणजे धनधान्य-समृद्धि होय. रोजच्या जीवनास लागणाऱ्या जिनसा अल्प किंमतीनें बाजारांत मिळाल्या असतां सामान्य माणसाची वेताची प्राप्ती उदरनिर्वाहास सहज पुरी होते आणि तीमधून नैमित्तिक उपयोगाच्या वस्तुहि विकत घेऊन वापरण्यास वाव उरतो. ह्याच्या उलट, महागाई होऊन धान्यधुन्य, तेल, तूप, मीठ, मिरची, भाजीपाला, दूध-दुभतें ह्यांस नेहमीपेक्षा अधिक किंमती पडूं लागल्या असतां ज्यांची प्राप्ती अल्प असते आणि ज्यांचें हातावर पोट असतें अशा लोकांस रोजचा खर्च भागवून संसार चालवण्याची पंचाईत पडते. महिन्याचा पगार, वेतन किंवा मजुरी हीं त्या महिन्यास पुरीं होत नाहींत आणि प्राप्ती व खर्च ह्यांची तोंडमिळवणी होणें कठिण जातें. नैमित्तिक उपयोगाच्या व चैनीच्या वस्तूंची खरेदी पुढें ढकलतां येते, पण रोजचा संसार चालण्यास लागणाऱ्या जिनसांचा पुरवठा होणें अपरिहार्य असतें. ह्या जिनसा त्यांची स्वस्ताई असते तेव्हां साठवून ठेवण्याची ऐपत थोड्या लोकांत असते आणि ज्यांस ती असते, त्यांपैकी अनेकांस दूरदृष्टि नसते. लागतील तसतसे जिन्नस बाजारांत विकत घेऊन संसाराचा गाडा दैनंदिन हाकणें हाच बहुतेकांचा संवय झालेला आयुष्यक्रम असतो.

## मागणी आणि पुरवठा

सामान्यतः स्थूल मानानें बोलावयाचें झाल्यास स्वस्ताई म्हणजे सुस्थिति आणि महागाई म्हणजे दुःस्थिति ही गोष्ट समजण्यास सोपी आहे. तथापि, तीमध्यें पुष्कळ बारकावे आहेत ते ध्यानांत आले पाहिजेत. अशी सुस्थिति व दुःस्थिति निर्माण होण्याचीं कारणें काय आहेत, महागाई सर्वांसच जाचते कीं काय व असल्या आपत्तीवर कोणते उपाय योजणें शक्य व इष्ट आहे ह्याचा मात्र थोड्या सूक्ष्मतेनें विचार करणें आवश्यक आहे. अवर्षण, अल्प वर्षण किंवा अतिवृष्टी ह्यांचे योगानें धान्य पिकत नाहीं आणि जनावरांचा चारा होत नाहीं, ह्यामुळें कोठें ना कोठें देशांत महागाई होत असते हा हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या प्रांतांतला व जिल्ह्यांतला अनुभव आहे. अशा प्रसंगीं योजावयाचे सरकारी व बिनसरकारी उपायहि सर्वांच्या परिचयाचे झाले आहेत. धान्याची आणि कपास वगैरेंच्या पिकांची पैदास नैसर्गिक कारणांमुळें घटते तेव्हां त्यांचे बाजारभाव चढतात. पीक कमी येऊन भाव चढल्यानें शेतकऱ्यांचा कांहीं फायदा नाहीं. तसेंच, पीक चांगलें येऊन स्वस्ताई होण्यांत त्यांचें नुकसान नाहीं. शेतमालापासून त्यांच्या पदरांत प्राप्ती किती पडते ही खरी महत्त्वाची व मुद्याची गोष्ट आहे.

आगगाड्या व आगबोटी आणि अलीकडे मोटारगाड्या ह्यांच्या सारखीं शीघ्रगामी व सुलभ वहातुकीचीं साधनें उपलब्ध झाल्याकारणानें एक प्रांत किंवा जिल्हा ह्यांतील धान्याचा व इतर मालाचा तुटवडा शेजारचे व दूरचे प्रांत व जिल्हे किंबहुना बाहेरील देश ह्यांच्या समृद्धींतून भरून काढण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नित्याच्या संसारास लागणाऱ्या जिनसांचा पुरवठा आणि त्यांस असणारी नित्याची मागणी ह्यांच्या परस्पर-संबंधाच्या प्रमाणावरून स्वस्ताई किंवा महागाई निश्चित होते हें मागणी-पुरवठ्याचें साधें व मूलभूत आर्थिक तत्त्व आहे आणि सुकाळ किंवा दुष्काळ ह्याच्या मुळाशीं तें सापडतें. अन्न-वस्त्र आणि नित्याच्या उपयोगाचे इतर पदार्थ ह्यांच्या किंमती चढण्याचीं कारणें, मागणींत बदल झालेला नसल्यास, पुरवठ्याच्या परिस्थितींत शोधलीं पाहिजेत. तसेंच, महागाईविषयीं ओरड होते, ती जिनसांच्या किंमती चढल्या असतां लोकांच्या कमाईंत त्या मानानें वाढ झालेली नसते ह्यामुळें होते हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे.

## बाजारभाव कसे निश्चित होतात ?

व्यवहारांत पदार्थांची देवघेव होते ती पदार्थांच्या परस्पर अदलाबदलीनें अलीकडे क्वचितच होते. माल विकणारा आपला जिन्नस त्याच्या मोबदल्यांत चलन घेऊन, खरेदीदारास देतो. अर्थात् जिन्नस विकत घेणारा चलन देऊन त्याचा मोबदला म्हणून तो जिन्नस विकणाराकडून घेतो. पैशांत मोजली जाणारी ही किंमत किंवा बाजारभाव कसा निश्चित होतो ? विकणारा व विकत घेणारा ह्यांच्या, अनुक्रमें करून, पैशाच्या व मालाच्या गरजेची तीव्रता पदार्थांच्या किंमतींत प्रतीत होते. बाजारांत येणाऱ्या मालाचा पुरवठा मर्यादित झाला आणि तो विकत घेणारांच्या गरजेची तीव्रता मात्र कायम असली तर खरेदीदार नेहमीपेक्षा अधिक पैसा देऊन माल विकत घेतील आणि बाजारभाव चढलेले दिसतील. पुरवठा वाढलेला असेल आणि खरेदीदारांची इच्छा पूर्ववत् असेल तर किंमतीवर ह्याच्या उलट परिणाम होऊन त्या उतरतील. कारण, येथें सर्व मालाचा उठाव होऊं शकणार नाहीं आणि तो विकणारांस कमी प्रमाणांतील मोबदल्यावर संतुष्ट रहावें लागेल. बाजारभावांचा हा सर्वसामान्य नियम झाला आणि त्यास अनुसरून निरनिराळ्या जातींच्या मालाचा पुरवठा कमी-अधिक होईल त्या मानानें त्याच्या किंमती भिन्नभिन्न प्रमाणांत खाली-वर जातील. पण हा सर्व व्यवहार घडून येण्याचें जें साधन किंवा माध्यम म्हणजे चलन अथवा पैसा हाच समाजांत विशिष्ट कारणांमुळें कमी-अधिक प्रमाणांत खेळूं लागला तर ह्याचा परिणाम सर्वच बाजारभावांवर होईल. अमूक एका वजनाच्या गव्हाचा विनिमय अमूक एका लांबीच्या कापडाशीं होत नसून गहूं आणि कापड ह्यांचा विनिमय प्रत्येकी रुपयांशीं होतो. म्हणजे, रुपयांत

पदार्थांच्या मूल्याचें मापन होतें. आतां हें मापच जर कमी–जास्त होईल तर त्यानें मापला जाणारा मालहि अधिक-कमी झालाच पाहिजे. उदाहरणार्थ, लांबी–रुंदी मोजण्याचें साधन फूट हें आहे. त्या प्रमाणभूत साधनाची लांबी जर बारा इंचांचे ऐवजी सहा इंच केली, तर त्या आखूड मापाच्या सहायानें मोजावयाच्या कापडाची लांबी-रुंदी अधिक भरेल. हाच नियम पैसा किंवा चलन ह्या विनिमयाच्या साधनास लागू पडतो. व्यवहारांत जरूरीच्या प्रमाणाबाहेर पैसा खेळूं लागेल तर त्याच्या वाढलेल्या पुरवठ्यामुळें त्याचें मोल उतरेल आणि पैशाचें मोल उतरणें म्हणजे जिन्नस विकत घेण्यासाठी तो अधिक प्रमाणांत द्यावा लागणें हें होय. ह्याचाच अर्थ बाजारभाव वाढणें हा होय. व्यवहारांत चलन खेळवण्याचें काम मध्यवर्ती बँक व सरकार ह्यांचें असतें. हिंदुस्थानांत ह्या दोघांनीं चलनाच्या विस्ताराचा परिणाम बाजारभाव वाढण्यांत होऊं नये अशाविषयीं दक्षता बाळगलेली आहे. सर्वांत बचत करण्याची जबाबदारी त्यांचे बरोबरीनें लोकांवर पडते ती त्यांनीं ओळखली पाहिजे.

बाजारांत माल विकणारे व विकत घेणारे ह्यांची किंमतीच्या बाबतींत घासाघीस होते. स्वतःच्या दृष्टीनें अधिकांत अधिक फायदेशीर असा सवदा करण्याची दोन्ही पक्षांतील लोकांची स्वाभाविक प्रवृत्ति असते. स्वतःस शक्य तितकी अधिक किंमत मिळावी अशी पहिल्या पक्षाची खटपट असते तर आपणास शक्य तेवढी कमी किंमत द्यावी लागावी असा दुसऱ्याचा प्रयत्न असतो. ह्या प्रत्येक पक्षांत त्यांतील लोकांची परस्पर अंतर्गत स्पर्धा चालते आणि सवदा पटवण्याच्या झगड्यांत ज्यांस अधिक तग धरतां येईल ते यशस्वी होऊन त्यांच्या खरेदी–विक्रीच्या सवद्यांत ठरलेली किंमत बाजारांत अखेर निर्णायक होते. ह्यावरून बाजारांत व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांचे व गिऱ्हाइकांचे हितसंबंध व किंमतींविषयींचे प्रयत्न परस्पर-विरोधी कसे असतात हें ध्यानांत येईल.

## रहाणी, प्राप्ती व बाजारभाव

एकच वस्तु, भिन्न-भिन्न दृष्टींनीं तिच्याकडे पहाणारांस निरनिराळ्या स्वरूपांत दिसते ह्याचें उदाहरण बाजाराच्या व्यवहारांत पहावयास सापडतें. स्वस्ताई बहुजन समाजास प्रिय असते आणि महागाई जाचक वाटते हें मागें सांगितलेंच आहे. माल विकत घेणारांस त्याच्या किंमती उतरल्या तर आनंद होईल, पण माल तयार करणारे व विकणारे ह्यांस तें आवडणार नाहीं. तांदूळ, ज्वारी, गहूं, कपास ह्यांची पैदास करणारे शेतकरी आणि तो विकणारे व्यापारी बाजारभाव चढल्यानें हर्षतील, तर हा माल विकत घेणारे लोक महागाईविषयीं तक्रार करतील. समाजांतील निरनिराळ्या वर्गांतील लोकांची सरासरीची प्राप्ती आणि त्यांची निरनिराळ्या दर्जाची रहाणी ह्यांचा सामान्यतः मेळ बसलेला असतो, तो विशिष्ट बाजारभावांस अनुसरून व विवक्षित प्रकारच्या अन्नवस्त्राच्या उपयोगास अनुलक्षून निश्चित झालेला असतो. रहाणी, प्राप्ती व बाजारभाव ह्यांच्या परस्पर संबंधाच्या कोष्टकांत कांहीं कारणांमुळें सध्याप्रमाणें कमी ज्यास्त झालें असतां किंमती वाढलेल्या असल्यास किंवा प्राप्ती कमी झाली असल्यास विशिष्ट वर्गांच्या राहणीवर ताण पडतो. उत्पादक व उपभोक्ते असे दोन वर्ग समाजांत आहेत असें मानण्यांत येतें. वास्तविक पहातां सर्वच आर्थिक जीवन माल, श्रम, बुद्धि ह्यांच्या देवघेवीवर आधारलेलें असतें आणि वरील दोन वर्ग मिश्र व सापेक्ष आहेत असें समजलें पाहिजे. प्राप्ती आणि खर्च ह्यांची तोंडमिळवणी होण्याची समाजांतील बहुसंख्य लोकांस, विशेषतः अल्प मिळकत असणाऱ्या व श्रमजीवी वर्गास अडचण भासूं लागली असतां त्यांचें जीवित कष्टमय होतें आणि ह्या दुस्थितीचें निवारण करण्याचें साधन त्यांच्या स्वतःच्या हातीं नसतें. बाजारभावांचें नियमन, प्राप्तींत थोडीबहुत वाढ, गरिबांस सहानुभूतिजन्य सहाय इत्यादि उपायांचा अवलंब असल्या परिस्थितीवर तात्पुरते उपाय म्हणूनें सरकारास, वेतन देऊन दुसऱ्यांच्या श्रमाचा उपयोग करणारांस व धनिक नागरिकांस करावा लागतो. अवर्षण, अतिवृष्टी इत्यादि नैसर्गिक कारणांमुळें महागाई व गरीब लोकांच्या प्राप्तीमध्यें घट उत्पन्न होते तेव्हां वरील उपाय योजले जातात हें प्रसिद्धच आहे. शेतकऱ्यांस तगाई व इतर सवलती, नोकरांस महागाई भत्ता, दुष्काळी कामाची तरतूद, स्वस्त धान्याचीं दुकानें, बाजारभावांचें सरकारी नियंत्रण, इत्यादि प्रकारचीहि विविध व्यवस्था असते.

## किंमतींचें सरकारद्वारां नियंत्रण

सध्याच्या युद्धकालीन घडामोडींवर ह्या विवेचनानें स्पष्ट प्रकाश पडेल. प्रस्तुत युद्धपरिस्थितीमुळें सर्व जगाची व त्यांत हिंदुस्थानाची मामुली आर्थिक घडी विस्कटून जाणें अपरिहार्य आहे हें सांगावयास नको. नेहमीच्या नैसर्गिक कारणांच्या जोडीस युद्धजन्य घडामोडी येऊन व्यापार व बाजारभाव ह्यांच्यावर कांहीं बाबतींत जाणवतील असे तात्पुरते परिणाम झाले आहेत. विशिष्ट जिनसांच्या किंमती चढतांच कित्येक लोकांची एकदम ओरड चालू होते आणि बाजारभाव चढूं नयेत ह्यासाठी सरकारनें कडक उपाय योजावेत अशी मागणी केली जाते. ह्या प्रकारच्या तक्रारी सर्वस्वी निष्कारण किंवा निराधार असतात असें मुळींच नाहीं. जिनसांचा पुरवठा मर्यादित होण्याचीं चिन्हें दिसतांच त्यांचेसंबंधांतले व्यापारी माल पुढें व्यवस्थित रीतीनें मिळूं शकावा व त्याचा तुटवडा भासूं नये म्हणून किंमती तात्काळ चढवतात आणि ह्या व्यवहारांत त्यांस अवाच्या सवा फायदा तात्पुरता होतो ह्यांत संशय नाहीं. युद्ध सुरू झाल्यावर असे प्रकार घडणार आणि कांहीं जिनसांची महागाई होऊन ती सामान्य स्थितींतल्या लोकांस जाणवणार हें लक्षांत आणून सरकारनें विशिष्ट जिनसांच्या किंमती ठराविक मर्यादेबाहेर जातां कामा नयेत असे सक्त निर्बंध घातले. त्या मर्यादांचें उल्लंघन केल्याबद्दल कित्येक ठिकाणीं दुकानदारांविरुद्ध कडक उपायांची योजना अधिकाऱ्यांनीं केल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत ह्यावरून सरकारानें चालवलेल्या नियंत्रणाच्या प्रयत्नांची कल्पना येईल. परंतु बदलणाऱ्या परिस्थितीप्रमाणें बाजारभावांच्या नियमनाच्या मर्यादा बदलाव्या लागतील. उत्पादक व उपभोक्ते ह्यांच्या हितसंबंधांची छाननी होऊन एका वर्गास फायदा होत असतां दुसऱ्याचें फाजील नुकसान होणार नाहीं याविषयीं काळजी घेतली जाणें अगत्याचें असतें. निरनिराळ्या जिनसांचा पुरवठा कसा व कोठून होतो ह्याची चौकशी करून कोणत्याहि वर्गास अन्याय होणार नाहीं आणि देवघेवीच्या व्यवहारांचा गाडा सुरळीत चालेल अशा बेतानें त्या पुरवठ्याचें व बाजारभावांचें नियंत्रण सरकारास करावें लागतें.

## नियंत्रणास वाव आणि मर्यादा

परराष्ट्रीय व्यापार सोडला तरी हिंदुस्थानासारख्या अवाढव्य देशांत प्रांताप्रांतांतली देवघेव मोठी व गुंतागुंतीची आहे ती

बाजारभावांच्या नियंत्रणाचे संबंधांत महत्त्वाची आहे. तांदूळ, गहूं, ज्वारी, हरभरा, गूळ, साखर, तंबाखू, इत्यादि मालाची आयात-निर्गत प्रांताप्रांतांतून चालते. कोणताहि प्रांत स्वयंपूर्ण असा नाहीं. ह्याकरितां विशिष्ट ठिकाणचे बाजारभाव स्वतंत्र रीतीनें व तुटकपणानें निश्चित करण्याचा प्रयत्न झाल्यास तो यशस्वी व्हावयाचा नाहीं. कांहीं जिनसांच्या किंमतीचें नियंत्रण व त्यासंबधांतलें अखिल भारतीय धोरण सर्वस्वी हिंदुस्थान सरकारच्या कक्षेंत येतें. व्यवहारांत खेळणाऱ्या चलनाचें नियमन रिझर्व्ह बँक व मध्यवर्ती सरकार ह्यांनीं पैशाच्या पुरवठ्याचा परिणाम किंमती चढण्यांत होणार नाहीं अशा बेतानें चालवले असल्यानें महागाईचा पारा चढण्याचें एक प्रमुख कारण मुळांतच खुडून टाकण्यांत आलें आहे. प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींची एक परिषद् बोलावून त्यांचा परस्पर विचारविनिमय होण्याची आणि सहविचारपूर्वक धोरणानें बाजारभावांच्या नियंत्रणाचा प्रश्न सोडवण्याची व्यवस्था मध्यवर्ती सरकार करीत आहे तें प्रस्तुत प्रकरणांतली गुंतागुंतीची परिस्थिति लक्षांत घेतां अत्यंत योग्य आहे असें म्हटलें पाहिजे.

मामुली परिस्थितींत समाजाचें आर्थिक यंत्र, संपत्तीचें उत्पादन, विनिमय, विभागणी व उपभोग ह्यांचे संबंधांत आंतील शक्तीच्या जोरावर सुरळीत चालतें. युद्धकाळाच्या घडामोडींमध्यें त्या यंत्रांतल्या चक्रांचें परस्परांशीं घर्षण होऊं लागतें तेव्हां सबंद समाजाच्या वतीनें सरकारास त्यांत हस्तक्षेप करून त्याचें कार्य बिनतक्रार चालू राहील ह्याविषयीं व्यवस्था करावी लागते. युद्धासारख्या प्रसंगाचा अवास्तव फायदा कोणत्याहि वर्गानें घेऊं नये आणि सामान्य जनतेचा जीवनक्रम शक्य तितका सुरळीत चालेल ह्या बेतानें आर्थिक व्यवहारांचें नियमन त्यानें करणें आवश्यक असतें. अर्थातच सरकारापाशीं यक्षिणीची कांडी नाहीं आणि त्यास महागाईची स्वस्ताई एकदम करतां यावयाची नाहीं किंवा व्यवहाराच्या मूलभूत तत्त्वांचें उच्चाटन करतां येणार नाहीं. मालाचें उत्पादन, पुरवठा, बाजारभाव इत्यादींचा शक्य तितका समाधानकारक मेळ घालण्याचा प्रयत्न त्यानें करावयाचा असतो. याविषयींची व्यावहारिक योजना अंमलांत आणणें हाच येथें मुख्य प्रश्न आहे.

---

### युद्धप्रयत्नांचें फिरतें प्रदर्शन

हिंदुस्थानाच्या युद्धप्रयत्नांचें फिरत प्रदर्शन करण्याकरितां नॉर्थ वेस्टर्न रेल्वेच्या मोगलपुरा येथील वर्क—शॉपमध्यें एका आगगाडीची रचना झाली आहे. तिची लांबी १ हजार फूट आहे. लाहोर येथून ती १७ ऑक्टोबर रोजीं पांच महिन्यांच्या फिरतीसाठी निघाली. हिंदी लष्कराच्या वेगवेगळ्या खात्यांच्या प्रदर्शनाकरितां स्वतंत्र डब्यांची योजना केलेली आहे.

### ठेवीदारांस किती पैसे परत मिळतील ?

मध्य प्रांताच्या सहकारी रजिस्ट्रारनीं तेथील सहकारी बँकांच्या येण्या-देण्याच्या तपशीलाची व प्राथमिक पतपेढ्यांच्या सभासदांच्या कर्जपेढीच्या शक्तीची चौकशी चालविली होती. सहा बँकांची चौकशी पुरी झाली आहे. दर्यापूर आणि एलिचपूर बँकांच्या ठेवीदारांना त्यांचे सर्व पैसे परत मिळूं शकतील, बुलढाणा आणि मोर्शी बँकांच्या ठेवीदारांना रुपयांत अकरा आणे पत्करावे लागतील, मलकापूर बँकेच्या ठेवीदारांना त्यांचे निम्मे पैसे मिळतील व खामगांव बँकेच्या ठेवीदारांस रुपयांतील सहा आण्यांवर संतुष्ट व्हावें लागेल असा रंग दिसतो.

## नुकसानभरपाई म्हणजे जुन्याऐवजी नवें देणें नव्हे

झालेलें नुकसान भरून यावें, हा विम्याचा मुख्य हेतु आहे. आयुर्विम्याचे बाबतींत गेलेला प्राण भरून देतां येत नाहीं. परंतु विम्याचे इतर प्रकारांत नुकसान-भरपाईच मूलभूत असते. आग, अपघात, चोरी, इत्यादींमुळें झालेल्या नुकसानीपेक्षा अधिक नुकसानीची भरपाई करणें समर्थनीय होणार नाहीं. नुकसानभरपाईच्या ह्या तत्त्वामुळेंच विमा उतरणारास, ज्या मालमत्तेचा विमा उतरावयाचा, तीमध्यें त्याचा हितसंबंध असणें सक्तीचें असतें. मालमत्ता सुरक्षित राहिली तर त्याचा फायदा होईल व ती नाश पावली तर त्याचें नुकसान होईल अशी परिस्थिति असली पाहिजे. विमा उतरणाराची मालमत्तेवर पूर्णपणें मालकी असण्याची आवश्यकता नाहीं. विमा उतरणाराचा मालमत्तेंत हितसंबंध नसेल तर मालमत्तेच्या नाशामुळें त्याचें कांहींच नुकसान होणार नाहीं. अर्थातच त्यास नुकसानभरपाई मिळण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. विमा जेवढ्या रकमेचा उतरलेला, तिचेपेक्षा अधिक रकम नुकसानभरपाईदाखल कधींच मिळूं शकत नाहीं. एकाद्या इमारतीचा आगीचा विमा १० हजार रुपयांचा असला, परंतु तिची प्रत्यक्ष किंमत २० हजार असली, तरी ती इमारत अग्नीचे भक्षस्थानीं पडल्यास विमा उतरणारास १० हजारांपेक्षा अधिक नुकसानीची भरपाई मिळूं शकणार नाहीं. ह्याकरितां, मालमत्तेच्या पुऱ्या किंमतीचा विमा उतरणें आवश्यक असतें. सध्या मालमत्तेची व यंत्रसामुग्रीची किंमत फार वाढली आहे, तेव्हां त्यांचा विमा उतरतांना त्यांस पडलेली मूळ किंमतच केवळ विचारांत घेऊन भागणार नाहीं. त्यापेक्षां अधिक रकमेचा त्यांचा विमा उतरावा लागेल. मालमत्तेच्या विम्याची मुदत वरचेवर वाढवावी लागते, त्यावेळीं विमा कंपन्या ही गोष्ट आपल्या विमेदारांचे नजरेस आणतात व त्यांत कंपन्यांचें आणि विमेदारांचें दोघांचेंहि हित असतें. खऱ्या किंमतीपेक्षा कमी रकमेचा विमा उतरण्याची प्रवृत्ति बऱ्याच ठिकाणीं आढळून येते. वेळप्रसंग आलाच तर ह्यामुळें विमेदारांचें नुकसान होईल व विम्याचा मूळ हेतु पूर्णपणें साध्य होणार नाहीं. मालमत्तेचा संपूर्ण नाश झाला नाहीं व झालेला नाश विम्याचे रकमेपेक्षा कमी रकमेचा असला, तर विमेदारास त्याची सबंध नुकसानी भरून मिळेल किंवा नाहीं हें विमापत्रकांतील अटींवर अवलंबून असतें. विमेदारानें खऱ्या किंमतीपेक्षा कमी रकमेचा विमा उतरला असेल, तर त्या प्रमाणांतच त्यास भरपाई मिळेल, अशी अट कित्येक पॉलिसींत असते. अशा परिस्थितींत विमेदारास सबंध नुकसानीची भरपाई मिळणार नाहीं, हें उघड आहे. तथापि, बहुसंख्य पॉलिसींत अशी अट घातलेली नसते. नुकसान होण्यापूर्वी मालमत्तेची बाजारभावानें होणारी किंमत नुकसानभरपाई म्हणून विमेदारास मागतां येते. अर्थात्, झीज लक्षांत घेऊनच ही किंमत ठरविली पाहिजे. जुन्याचे जागीं नवीन जिन्नस देणें नुकसान-भरपाईपेक्षा फार अधिक मोबदला दिल्यासारखें होतें. हल्ली बाजारभाव फार वाढले असल्याकारणानें पॉलिसींची रकम त्या प्रमाणांत वाढविली नसल्यास विमेदाराचें नुकसान होण्याचा कसा संभव आहे हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

2.21. 4122

# ★ महाविद्यालयाचें ग्रंथालय ★

## उच्च शिक्षणक्रमांत ग्रंथालयाचें स्थान

महाविद्यालयांतील शिक्षणक्रम उच्च दर्जाचा असल्यामुळें तेथलि विद्यार्थ्यांना त्यांच्या ऐच्छिक विषयांचें अध्ययन व्यापक दृष्टीनें करावें लागतें. त्यामुळें त्यांना प्राध्यापकांचीं व्याख्यानें एकाग्रतेनें श्रवण करून त्यांनीं संदर्भिलेल्या वाङ्मयाचें वाचन व मनन सखोल रीतीनें करावें लागतें. या शिक्षणावर विद्यार्थ्यांचें भावी जीवित बरेंचसें अवलंबून असतें. ज्ञानसंपादनाची अशी संधि त्यांना भावी आयुष्यांत लाभणें कठिण. त्यामुळें याच वेळीं ज्ञानार्जनाची गोडी त्यांचे मनांत पूर्ण रुजवून ती वृद्धिंगत करण्याचा मार्ग त्यांना दाखविण्याचें कार्य प्राध्यापकांना करावें लागतें. ज्ञानाची व्यापकता दिवसेंदिवस इतकी वाढत चालली आहे कीं, नुसतीं व्याख्यानें देऊन किंवा ठराविक पुस्तकें विद्यार्थ्यांना वाचावयास सांगून आतां भागणार नाहीं. त्यांना प्रत्यक्ष भव्य ग्रंथालयांत नेऊन विविध ग्रंथांची उपयुक्तता समजावून सांगून ते वाचावयास व अशा वाचनाचा व्यासंग वाढवावयास उत्तेजन दिलें पाहिजे.

## ग्रंथसंग्रह व त्याची व्यवस्था

अशा उच्च दर्जाच्या शिक्षणसंस्थेचें ग्रंथालयसुद्धा त्या संस्थेला साजेसेंच असलें पाहिजे. त्यांत उगाच किरकोळ पुस्तकांचा भरणा करतां कामा नये. ज्ञानाच्या सर्व शास्त्रांवरील अगदी निवडक अशा ग्रंथांचा संग्रह येथें असला पाहिजे. जे ग्रंथ वारंवार निरनिराळ्या प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना लागतात अशा ग्रंथांच्या प्रति गरजेनुसार असावयास पाहिजेत. प्रत्येक महाविद्यालयाच्या ग्रंथालयांत कमीत कमी पंचवीस हजार ग्रंथांचा संग्रह असणें फार आवश्यक आहे. निरनिराळे ग्रंथ विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या वास्तव्याचे ठिकाणीं त्यांना सुलभरीतीनें उपलब्ध केले पाहिजेत. वर्गांतून प्राध्यापकांना व्याख्यानाचे वेळीं विद्यार्थ्यांना जीं पुस्तकें दाखवावीं लागतात व तेथें कांहीं महत्त्वाचे संदर्भ वाचून दाखवावे लागतात व लिहून घेण्यास सांगावे लागतात, अशा प्रकारचीं पुस्तकें वेळोवेळीं वर्गांत असणें फार आवश्यक आहे. शास्त्रीय प्रयोगशाळागृहांत वेळोवेळीं लागणाऱ्या उपयुक्त ग्रंथांचा संग्रह असावा लागतो. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांत वाचनीय कादंबऱ्या, चरित्रें, प्रवासवृत्तें अशा प्रकारचीं करमणुकीचीं कांहीं पुस्तकें असावयास पाहिजेत. प्रत्येक विद्यार्थ्याच्या राहण्याच्या खोलींत फक्त त्याच्या आवडीच्याच पुस्तकांचा भरणा असणें जरूर आहे. सारांश, विद्यार्थी कोठेंहि असले तरी त्या ठिकाणीं त्यांना ज्या प्रकारचें वाङ्मय पाहिजे असतें त्या प्रकारचें वाङ्मय तेथें सुलभ रीतीनें त्यांना मिळाल्यास त्यांच्या ज्ञानांत सुधारणा होऊन त्यांचा शिक्षणक्रम उत्तम रीतीनें पार पडूं शकेल.

## ग्रंथपाल व त्याची जबाबदारी

ग्रंथालयाचें नियंत्रण उत्तम रीतीनें करावयास विद्वान् व ग्रंथालयशास्त्रांत निष्णात असलेल्या ग्रंथपालाची फार आवश्यकता आहे. त्याची योग्यता व जबाबदारी ओळखून त्याला प्राध्यापकांच्या बरोबरीचे अधिकार व स्वातंत्र्य असावयास पाहिजे. आपली जबाबदारी उत्तम रीतीनें पार पाडावयास ग्रंथपालास प्राध्यापकांच्या व विद्यार्थ्यांच्या सहकाराची फार जरूरी आहे. याकरितां एक प्राध्यापकांची प्रातिनिधिक समिति व दुसरी विद्यार्थ्यांची प्रातिनिधिक समिति ग्रंथपालास वेळोवेळीं निरनिराळ्या बाबतींत सूचना करावयास नेमणें प्राप्त आहे. या दोन्ही समित्यांच्या सूचनांचा योग्य विचार करून त्यांची अम्मलबजावणी करण्याचें कार्य पार पाडावयास ग्रंथपालास विशेष कौशल्य दाखवावें लागतें. ग्रंथपालाची वागणूक सर्वांशीं समतेची, प्रेमळपणाची व सहानुभूतीची असावयास पाहिजे. ग्रंथालयांत कोणासहि कोणत्याहि प्रकाराचा संकोच वाटतां कामा नये. तेथें अगदीं प्रफुल्लित व मोकळें वातावरण असावयास पाहिजे.

## ग्रंथालयाचें स्थान व इमारत

ग्रंथालयाचें स्थान महाविद्यालयाच्या आवारांत मध्यवर्ती असावयास पाहिजे. यामुळें निरनिराळ्या प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना ग्रंथालयांत येण्यास अगदीं थोडा वेळ लागतो व त्यामुळें त्यांना ग्रंथालयांत वरचेवर यावेसें वाटतें. ग्रंथालयांतील ग्रंथसंग्रह वारंवार वाढत रहाणार म्हणून ग्रंथालयाची एक स्वतंत्र इमारत व तिच्या लगत भावी विस्ताराला आवश्यक जागा असावयास पाहिजे. इमारतीच्या कोणत्याहि भागांत भरपूर स्वच्छ हवा व उजेड असला पाहिजे. ग्रंथसंग्रहाची रचना अशी असावी कीं त्यामुळें इमारतींत कोठेंहि अंधार होतां कामा नये. साधारणपणें ग्रंथालयांत मोठाल्या खिडक्या असाव्यात व त्यांचे दोन्ही बाजूस एक-मेकांसमोर पुस्तकांचीं कपाटें ठेवावींत व मधल्या जागेंत प्राध्यापकांची व संशोधकांची वाचनाची सोय करावी. सर्वसाधारण विद्यार्थ्यांकरितां एक मोठें वाचनालयाचें दालन असावें. तेथें त्यांना वरचेवर लागणाऱ्या पुस्तकांचा संग्रह नादार कपाटांतून ठेवावा. नियतकालिकांचें एक स्वतंत्र दालन असावें व तेथें तीं वाचण्याची सोय करावी. ग्रंथालयाचें प्रवेशद्वार एकच असावें, व त्याचे लगतच ग्रंथपालाची व इतर कामगारांची कचेरी असावी.

## खर्चाचें प्रमाण

ग्रंथालयावर वार्षिक खर्च अजमासें प्रत्येक विद्यार्थ्यामागें २५ रु. या प्रमाणांत असावा. पांचशें विद्यार्थ्यांचें महाविद्यालय असल्यास तेथील ग्रंथालयाचा वार्षिक खर्च बारा हजार पांचशें रुपये असलाच पाहिजे. या रकमेची विभागणी पुढीलप्रमाणें करावी:—पगार शेकडा ३०; पुस्तकें शेकडा २५; नियतकालिकें शेकडा २५; ग्रंथबांधणी शेकडा १०; इतर किरकोळ खर्च शेकडा १०. याप्रमाणें पाश्चिमात्य देशांतील महाविद्यालयांच्या ग्रंथालयांवर खर्च केला जातो; म्हणून मुद्दाम वरील आकडे दिले आहेत. ग्रंथालयाच्या महत्त्वाच्या दृष्टीनें असा खर्च ग्रंथालयावर केल्याशिवाय त्याची उपयुक्तता नीट वाढवितां येणार नाहीं. ग्रंथालय ही शाखा नुसती शोभेकरितां नाहीं; तिचा जितका जास्त उपयोग करितां येईल तितकें वाचकांच्या जास्त फायद्याचें व संस्थेच्या हिताचें आहे.

## इतर व्यवस्था

ग्रंथांची रचना सर्वमान्य वर्गीकरण पद्धतीनें करावी. त्याचप्रमाणें ग्रंथांच्या याद्या (१) विषयवार, (२) कर्तावार, व (३) नामवार अशा असाव्यात. ग्रंथ शोधून काढण्यांत वाचकांचा फार वेळ जातां कामा नये. कोणताहि संदर्भ अल्प

प्रयत्नानें सापडावा अशी व्यवस्था असावी. वाचकांना संदर्भ दाखविणारा एक निष्णात कामकार ग्रंथालयांत नेहमीं असावा. ग्रंथालय सकाळीं ८ पासून रात्रीं १० वाजेपर्यंत नेहमी उघडें असावें. याकरितां ग्रंथालयाचे कामावर पुरेसे नोकर असावयास पाहिजेत; म्हणजे त्यांच्या गरजेप्रमाणें पाळया करण्यास सोयीचें पडतें. ग्रंथालय जरी सदैव उघडें असलें तरी नोकरांना काम जास्त पडतां कामा नये. त्यांना योग्य त्या सुट्या व रजा मिळाल्या पाहिजेत. त्यांचें वेतन सुद्धा त्यांच्या योग्यतेनुसार असावयास पाहिजे. त्यांच्या समाधानावर ग्रंथालयाचें सर्व काम अवलंबून आहे. ग्रंथालयांत काम करणाऱ्या नोकरांची निवड उत्तम प्रकारें केली पाहिजे. या कामाची ज्यांना आवड आहे व जे हें काम करण्यास पात्र आहेत असेच नोकर ग्रंथालयांत ठेवावेत.

### उपसंहार

वरीलप्रमाणें आपल्या देशांतील महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची व्यवस्था होणें फार जरूर आहे. त्यामुळें प्राध्यापकांची व विद्यार्थ्यांची उत्तम सोय होऊन एकंदर शिक्षणक्रमांत बरीच सुधारणा घडवून आणतां येईल. सध्या आपल्या बहुतेक महाविद्यालयांचीं ग्रंथालयें फार लहान असून त्यांची व्यवस्थाहि समाधानकारक नाहीं. अशा उच्च शिक्षणसंस्थांचीं ग्रंथालयें जर मागासलेलीं राहतील तर देशांत ग्रंथालयांचा प्रसार होणें फार कठीण जाणार आहे. या महत्त्वाच्या प्रश्नाकडे त्या ग्रंथालयांचे चालक विशेष लक्ष पुरवितील अशी आशा आहे.

---

### चीनमध्यें ब्रिटिश बातम्या

चीनमध्यें ब्रिटिश बातम्यांचा प्रसार करण्यासाठी सर्व उपलब्ध साधनांचा विशेषतः रेडिओचा पूर्ण उपयोग करण्यांत येत आहे असें ब्रिटिश प्रसिद्धी खात्याच्या मंत्र्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

### जर्मनी व तुर्कस्तान ह्यांमधील व्यापारी करार

जर्मनी व तुर्कस्तान ह्यांचेमधील व्यापारी करारावर ता. ११ ऑक्टोबर रोजीं सह्या झाल्या. कराराची मुदत ३१ मार्च, १९४३ अखेरची आहे. तुर्कस्तानास जर्मनी लोखंडी व पोलादी माल, युद्धसामुग्री इत्यादि देणार असून तुर्कस्तान त्याचे बदली कच्चा माल, अन्नसामुग्री, कपास, तंबाखू, इत्यादि देणार आहे. ह्या करारामुळें ब्रिटिश-टर्किश मैत्रीस बाध येत नाहीं असें जाहीर झालें आहे.

### कपाशीची खरेदी

ब्रह्मदेशाचें सरकार तेथील येत्या मोसमांतील कपाशीचें सबंध उत्पादन विकत घेणार आहे. शेतकऱ्यांस त्यांच्या श्रमाचा मोबदला मिळावा, एवढ्यासाठी ही योजना आहे. गेल्या चार वर्षांतील सरासरी किंमतीनें कपाशीची खरेदी केली जाईल.


### ब्रह्मी चिरूट

ब्रह्मदेशाचे मुख्य प्रधान इंग्लंडला पोचले. त्यांनीं आपल्याबरोबर मि. चर्चिल ह्यांना देण्याकरितां ब्रह्मी चिरूटांची एक पेटी नेलली आहे.

### ग्रीक पंतप्रधानांची सूचना

वेळ आली म्हणजे, जर्मनीनें पादाक्रांत केलेल्या देशांत जर्मनांनीं ज्यांचेवर अत्याचार केले, अशांच्या बायकामुलांच्या देखत बर्लिनमध्यें अत्याचारी जर्मनांचा खटला चालवून त्यांस देहांतशासन देण्यांत यावें, अशी सूचना ग्रीक मुख्य प्रधानांनीं मि. चर्चिल ह्यांस केली आहे.


# देवकरण नानजी बँक लि.



हेड ऑफिसः—एल्फिन्स्टन सर्कल, कोट, मुंबई.
शाखाः—काळबादेवी, सँडहर्स्ट ब्रिज, ठाकुरद्वार आणि मांडवी.

चालू खात्यांतः—दरसाल अर्धा टक्का दरानें व्याज देण्यांत येतें.
सेव्हिंग्ज बँक खात्यांतः—दरसाल २ टक्के दरानें व्याज देण्यांत येतें आणि पैसे चेकनें काढतां येतात.

बंद मुदतीची डिपॉझिटस्ः—वेळोवेळीं योजलेल्या अटींवर स्वीकारण्यांत येतात. बँकेनें मंजूर केलेल्या जामिनावर योजलेल्या अटींवर पैसे व्याजी दिले जातात.

बँकेच्या ५, १०, २०, ५०, १०० आणि २५० तोळ्यांच्या चांदीच्या लगडी बँकेच्या ऑफिसांत आणि हिंदुस्थानांतील इतर सुप्रसिद्ध बँकेंत व जवाहिऱ्याकडे मिळूं शकतात.

देना बँकेचीं सहा वर्षांचीं आणि ३ वर्षांचीं अनुक्रमें ३॥ टक्के व २॥। टक्के व्याज देणारी कॅश सर्टिफिकिटस रु. १० ते रु. ५,००० पर्यंत मिळूं शकतात.

बँकेसंबंधीं सर्व कामकाज करण्यांत येतें.

फलटण दरबारकडून पुरस्कृत असलेली

# श्रीलक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि., फलटण

(स्थापना १९२६)

| | | | |
|---|---|---|---|
| भागांचें अधिकृत भांडवल | ... | ... | रु. २,००,००० |
| भागांचें वसूल भांडवल | ... | ... | रु. ६२,००० वर |
| राखीव व इतर निधि | ... | ... | रु. ८९,००० वर |
| सेव्हिंग्ज ठेवी | ... | ... | रु. ४,३०,००० वर |
| खेळतें भांडवल | ... | ... | रु. ५,८०,००० वर |

ठेवीः—चालू, सेव्हिंग्ज व मुदत ठेवी स्वीकारण्यांत येतात.

कर्जेः—बँकेस जोडून घेतलेल्या सहकारी पेढ्यांना व बँकेच्या भागीदारांना सर्व प्रकारच्या तारणांवर बँकेकडून कर्जें मिळण्याची सोय आहे. स्थावर मिळकत, सोनें, चांदी, सरकारी कर्जरोखे, शेतीचा व औद्योगिक माल यांच्या तारणावर कर्जें मिळूं शकतें. तसेंच योग्य तारणावर ओव्हरड्राफ्ट मिळण्याची सोय करण्यांत आली आहे.

इतर व्यवहारः—हुंड्यांची खरेदीविक्री, चेक, हुंड्या, ड्राफ्ट्स, रेल्वे रिसिट्स, डिव्हिडंड-वॉरंटें, पेन्शनबिलें यांची वसुली व इतर सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमध्यें होतात.

विमाहप्तेः—वेस्टर्न इंडिया ला. इ. कं. लि., नेपच्यून ॲ. कं. लि., एशियन ॲ. कं. लि. व कॉमनवेल्थ ॲ. कं. लि. या कंपन्यांच्या हप्त्यांच्या रकमा या बँकेंत स्वीकारण्यांत येतात.

बँकेसंबंधीं अधिक माहिती व ठेवींच्या व्याजाची माहिती समक्ष अगर पत्रद्वारें मिळूं शकेल.

फलटण, श्री. ह. तळवलकर
दि. १९-१०-४१ व्यवस्थापक

# राष्ट्राची भावी पिढी

राष्ट्राची भावी पिढी म्हणजे त्या राष्ट्रांतील लहान मुलें हींच होय आणि राष्ट्राची उन्नति अथवा अवनति लहान मुलांची उन्नति अथवा अवनती ह्यांवरच सर्वस्वी अवलंबून असते. आपल्या भावी पिढीची सर्वांगिण उन्नति होण्याकरतां त्यांचें शिक्षण, आरोग्य वगैरेंची सोय आपण पहातों; परंतु ह्या सर्व गोष्टींकडे लक्ष पुरवितांना एक गोष्ट अजिबात वगळली जाते आणि ती म्हणजे त्या लहान मुलांच्या डोळयांचें आरोग्य ही होय. ह्या जगांतील जवळ जवळ सर्व ज्ञान आणि सुख उत्तम दृष्टीमुळेंच प्राप्त होऊं शकतें. साधारणपणें जेव्हां आपण आपल्या लहान मुलांस प्रथम शाळेंत घालतों तेव्हां परिस्थितीनुसार त्यांची पुढीलप्रमाणें काळजी घेतों. त्यांना लागणारें शरीरपोषक असें अन्न व निरनिराळया ऋतुमानाप्रमाणें, प्रकृतीमानाप्रमाणें कपडेलत्ते यांची सोय करून शाळेंत जातां येतांना कसें चालावें, रस्ता ओलांडतांना कोणती काळजी घ्यावी वगैरे निरनिराळया गोष्टी शिकवितों कीं, ज्यांपासून त्यांच्या प्रगतीला अडथळा येणार नाहीं. परंतु ह्या सर्व शिक्षणाबरोबरच ज्याकडे जास्त लक्ष द्यावयास पाहिजे त्याकडे अजिबात दुर्लक्ष्य होतें. "प्रकाश आणि दृष्टि" ( Light & sight ) ह्या विषयाकडे दुर्लक्ष होण्याचें कारण म्हणजे पुष्कळशा शिक्षकांना अथवा पालकांना त्यासंबंधीचें जरूर लागणारें ज्ञान अजिबात नसतें हें होय.


सर्वसाधारणपणें जन्मतः लहान मुलांची दृष्टि चांगली आणि निर्दोष असते; परंतु पुढें पुढें जसजशीं तीं वयांत येऊं लागतात तसतसे निष्काळजीपणानें आणि अज्ञानामुळें डोळे बिघडून दृष्टीवर वाईट परिणाम होतो आणि बव्हंशीं दृष्टि अधू होण्याचें कारण म्हणजे कमी आणि अपुऱ्या प्रकाशांत काम करण्यामुळें डोळयांवर ताण पडून दृष्टि बिघडते हें होय. शाळेच्या आवारांत अथवा क्रीडांगणांत भरपूर सूर्यप्रकाश असतो आणि ह्या ठिकाणीं वावरण्यामुळें लहान मुलांचें सर्व दृष्टीनें आरोग्य चांगलें राहतें, परंतु ह्याच शाळांतील वर्गांमधून जितका प्रकाश आवश्यक आहे, तितकासा नसतो, आणि कांहीं कांहीं वर्गांमधून दिवसादेखील इतका अंधार असतो कीं त्या ठिकाणीं शिक्षणक्रम चालू होतांनाच लहानपणापासूनच डोळ्यांवर ताण पडूनच दृष्टि बिघडण्यास सुरवात होते. तरी शाळेंतील अधिकाऱ्यांनीं आपल्या शाळेंतील सर्व वर्गांमधून स्वच्छ हवेबरोबरच योग्य प्रकाश आहे किंवा नाहीं याची खबरदारी घेणें अत्यंत आवश्यक आहे. पुष्कळ वेळेस उत्तम प्रकारच्या, सूर्याच्या नैसर्गिक प्रकाशाची सोय करतां येणें अशक्य असेल अशा वेळेस अनैसर्गिक प्रकाशाची सोय करणें अत्यंत इष्ट आहे आणि तो अनैसर्गिक प्रकाश म्हणजे विजेपासून मिळणारा प्रकाश हा होय; आणि ह्या विजेच्या दिव्यांची सोय योग्य तऱ्हेनें करून घेतल्यास भरपूर प्रकाश मिळण्यास मदत होते. पाश्चात्य देशांतून हा नैसर्गिक सूर्यप्रकाश सर्व वर्गांतून भरपूर मिळेल अशा पद्धतीच्या शाळेच्या इमारती बांधलेल्या असतात आणि ज्या ज्या वेळेस पावसाळी हवेमुळें सूर्यप्रकाश योग्य प्रमाणांत मिळत नाहीं त्यावेळेस उपयोगी पडणारी अशी विजेच्या दिव्यांची सोय अनुभवी प्रकाशतज्ज्ञांकडून करवून घेतलेली असते. ह्या आधुनिक पद्धतीच्या योजनेमुळें सर्व वर्गांमध्यें सूर्यप्रकाशावर अवलंबून न राहतां सर्व ऋतूंत चांगल्या प्रकाशाची सोय होते. अशा तऱ्हेच्या आधुनिक प्रकाशपद्धतीनें सुसज्ज असलेल्या शाळांतून अभ्यास करतांना विद्यार्थ्यांच्या डोळयांवर अजिबात ताण पडत नाहीं आणि त्यांचे डोळे नेहमी सतेज राहून दृष्टि निर्दोष असते. त्याचे उलट, आपल्याकडे कांहींकांहीं विद्यार्थ्यांना कमी आणि अयोग्य प्रकाशांत शाळेंत व घरीं अभ्यास करण्याची संवय लागते आणि ह्या वाईट संवयीचा परिणाम म्हणजे पुढील आयुष्यांत ऐन उमेदींत दृष्टि बिघडून हींच एकावेळची तेजस्वी मुलें कुचकामी ठरतात. एवढ्याकरतांच चांगली दृष्टि आणि चांगला प्रकाश ह्यांचें ज्ञान किती जरुरीचें आहे हें कळून येईल. हें ज्ञान आपल्या लहान मुलांना प्रथम शाळांमधून मिळण्याची अत्यंत आवश्यकता आहे; कारण पुष्कळ वेळां आपल्या पाहण्यांत येतें कीं कमी प्रकाशांत डोळयांस ताण देऊन, डोळे चोळून, किंवा रुमालानें साफ करीत अथवा आपल्या सावलींतच वाचावयाचा अथवा लिहावयाचा प्रयत्न तीं करीत असतात. तेव्हां, ह्या बालवयांतच त्यांना चांगल्या प्रकाशाचें महत्त्व आणि त्याचे दृष्टीवर होणारे परिणाम यांची ओळख शाळेंत शिक्षकांनीं आणि घरीं पालकांनीं करून देणें हें त्यांचें आद्य कर्तव्य आहे. ह्या त्यांच्या कर्तव्यपालनाचा परिणाम भावी पिढीच्या उन्नतीबरोबर राष्ट्राच्या भरभराटीस कारणीभूत होईल यांत संदेह नाहीं.

दिवाळीच्या भेटी-
सुगंधी कांचन हेअर ऑईल
-कांचनाची पेटी-
श्री धूतपापेश्वर पनवेल लि.
पुणें-वि. भि. खरे, सिटी पोस्टासमोर.
मुंबई-गिरगांव व काळबादेवी.
नागपूर-महाल रोड.

उत्कृष्ट दर्जाचें टिकाऊ काम, योग्य खर्च, चोख व सचोटीचा व्यवहार इत्यादि गुणांनीं जुन्या नामवंत कंपन्यां-प्रमाणें यश मिळविलेली

**दी इंडियन प्रोग्रेसिव्ह**

इन्शुअरन्स कंपनी




लिमिटेड पुणें शहर

या कंपनीची एजन्सी व पॉलिसी निश्चित फायदेशीर आहे.

★ माहिती मागवा. ★

सेक्रेटरीज

# दि कऱ्हाड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

( बँक गेलीं आठ वर्षें "अ" वर्गांत दाखल आहे. )

तारीख ३०–६–४१ अखेर वसूल झालेलें

| | |
|---|---|
| शेअर्स भांडवल | रु. ४२,६८० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. ४०,६९५ |
| ठेवी | रु. ४,१८,६६४ |

खालील दरानें ठेवी स्वीकारल्या जातात

| | |
|---|---|
| चालू ठेव १% | सेव्हिंग्ज ठेव २% |
| मुदत ठेव १ वर्ष ३% | २ वर्षें ३½% |

लोकलबोर्ड व म्युनिसिपालिटी यांच्या ठेवी या बँकेनें रु. ७५०००/– पर्यंत स्वीकारणेस सरकारची व खात्याची मान्यता आहे. शेअर-होल्डर्सना चालू सालीं डिव्हिडंड ७½% दरानें वाटलें.

सोनें गहाण, जंगम माल व जामिनकी वगैरे तारणावर सभासदांना फक्त कर्जें माफक व्याजानें दिलीं जातात. हुंडी, चेक्स यांची खरेदीविक्री, रेल्वेरिसिट्स वसुली वगैरे बँकिंगचा सर्व व्यवहार केला जातो. विशेष माहिती पत्रद्वारें अगर समक्ष ऑफिसकडून मिळेल.

व्ही. पी. जोशी,
मॅनेजिंग डायरेक्टर.

कऱ्हाड, तारीख २–१०–४१

# न्यू इंडिया इंडस्ट्रीज् लिमिटेड.

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११

अध्यक्ष श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी

## महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स् ★ छापखान्याचे रोलर्स ★ सर्व प्रकारचे रबरी वॉशर्स्
★ रबरी हातमोजे ★ रीमोल्ड टायर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार करतात.

मुदतीच्या ठेवींवरील व्याजाचे दर

| | | |
|---|---|---|
| मुदत वर्ष | १......५ | टक्के |
| ,, | २......५½ | ,, |
| ,, | ३......६ | ,, |

पु. ग. मराठे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदी चहाचा धंदा

चहाच्या लागवडीचें क्षेत्र १९३९ सालीं ८,३३,२०० एकर होतें; १९३८ सालीं तें ८,३३,८०० एकर होतें. एकूण ७ लक्ष, ७५½ हजार एकरांतील चहाचीं पानें गोळा करण्यांत आलीं. बाकीच्या एकरांतील झाडें फार लहान होतीं. चहाचे एकूण मळे ६,३९० होते. आसामांतील १,१२६ मळ्यांचें क्षेत्र ४,३८,२७२ एकर आहे. म्हणजे प्रत्येक मळ्यांत सरासरीनें ५१४ एकर जमीन आहे. बंगालमधील ४१२ मळ्यांचें प्रत्येकी सरासरी क्षेत्र ५१४ एकर भरतें. त्रावणकोरमध्यें २०७ मळे आहेत व त्यांचें प्रत्येकी सरासरी क्षेत्र ३७२ एकर आहे. म्हैसूर, कोचीन, बिहार, संयुक्त प्रांत, मद्रास, इत्यादि ठिकाणचे मळे ह्यापेक्षा फारच लहान आहेत.

चहाच्या उत्पादनाचे आकडे

| | लक्ष पौंड |
|---|---|
| आसाम | २५,२७ |
| बंगाल | ११,५५ |
| दक्षिण हिंदुस्थान | ७,८४ |
| उत्तर हिंदुस्थान | ४६ |
| बिहार | १३ |
| | ४५,२६ |

चहाच्या उत्पादनांत १९३८चे मानानें फक्त ७,३५,००० पौंडांचीच वाढ झाली. सर्वांत अधिक उत्पादन आसाममध्यें दारांग येथें झालें व सर्वांत कमी पंजाबमध्यें गरवाल येथें झालें. तेथील दर एकरी उत्पादनाचे आकडे अनुक्रमें ७२८ पौंड व ४४ पौंड असे आहेत. सबंध हिंदुस्थानाची सरासरी एकरी ५८४ पौंड आहे. एकूण ३६ कोटि पौंड चहाची निर्गत झाली त्यापैकी एकट्या ग्रेट ब्रिटननें २९ कोटि पौंड चहा घेतला. कॅनडा, अमेरिका, सिलोन, इराण, ऑस्ट्रेलिया, ब्रह्मदेश, आयर्लंड इत्यादींनीं मिळून ६ कोटि, २० लक्ष पौंड चहा घेतला. ग्रेट ब्रिटनमध्यें हिंदी चहा दाखल होतो, त्यापैकीं बराच मोठा भाग तेथून पुनः निर्गत होतो. चहा निर्गत करणाऱ्या बंदरांत कलकत्ता अग्रेसर आहे. १९३९–४० मध्यें कलकत्त्यानें सुमारें २१½ कोटि पौंड चहा बाहेर पाठविला. चितगांव बंदराच्या वाट्यास ८¾ कोटि पौंड चहाची निर्गत आली. दक्षिण हिंदुस्थानांतल्या बंदरांनीं ५¾ कोटि पौंड चहाची निर्गत केली व मुंबई आणि कराची ह्यांनीं मिळून १ कोटि पौंड चहा बाहेर धाडला. हिंदुस्थानांत ब्रह्मदेश, सिलोन, चीन व जपान यांचा मिळून ३३ लक्ष पौंड चहा उतरला. चहाच्या धंद्यांत एकूण ९,३५,२३७ लोक कामावर होते. चहावरील पट्टीचें उत्पन्न ४७ लक्ष रुपयांपेक्षां अधिक झालें.

---

कॉफीचा वार्षिक खप

| | टन |
|---|---|
| हिंदुस्थान | १०,००० |
| कॅनडा | १८,००० |
| दक्षिण आफ्रिका | १६,००० |
| ग्रेटब्रिटन | १५,००० |
| अमेरिका | ७,५०,००० |

दरमाणशीं खपाचा आकडा अमेरिकेंत १५ पौन्ड आहे, तर हिंदुस्थानांत तो पौंडाचा अत्यंत अल्प भाग आहे.


# किती पण मिठ्ठास !

हंसऱ्या "हंसा"चें हास्य जितकें मधुर तितकेंच तिचें बोलणें पण मिठ्ठास?



"किती नामी नामी रसमाधुरी" असें म्हाळसाकाकू गोडवे गाऊं लागल्या !

हंसाचा प्रत्येक शब्द इतका गोड कीं जसा कांहीं खडीसाखरेचा खडा ! तिच्या गोड आलापांपुढें म्हैसुरी मधाची गोडी फिक्की ! तिच्या गोड वाणीचे गोडवे दिगंबरपंत व म्हाळसाकाकू गाऊं लागतात तो प्रसंग फारच गोड !

दिवाळी आनंदांत घालविण्याकरितां "संत सखू" अवश्य पहा

४ था आठवडा

प्रभातचा प्रेक्षणीय **संत सखू** मराठी बोलपट

दिग्दर्शक—फत्तेलाल, दामले, राजा नेने

भूमिका—हंसा, गौरी, कुलकर्णी, शांता मुजुमदार, सुमित्रा

**प्रभात** (किबे लक्ष्मी थिएटर) **पुणें**

दररोज ६॥ व १० वा. सोम. ता. २७ पर्यंत

जादा खेळ दु. ३॥ वाजतां

## ग्रेटब्रिटनची भावी राणी

सध्याचे ग्रेटब्रिटनचे राजे ह्यांस पुनरत्न नसल्यानें, त्यांची ज्येष्ठ कन्या एलिझाबेथ हीच पुढें गादीवर येण्याचा संभव आहे. तिला आतां सोळावें वर्ष चालू आहे. तिचें शिक्षण गाजावाजा न करतां चालू आहे, तें इतकें की राजकन्येचें इंग्लंडमधून स्थलांतर करण्यांत आलें आहे, असें जर्मनीनें रेडिओवरून जाहीर करण्याची संधि सोडली नाहीं. महाराणी व्हिक्टोरियानें सातव्या एडवर्डास फार कडक शिस्तींत वागविलें, त्यामुळें त्यांस चैनीची सवय लागली. ड्यूक ऑफ विंडसर म्हणजे माजी आठवे एडवर्ड ह्यांस फार लवकर जागतिक सफरी करण्याची संधी मिळून त्यांस प्रसिद्धी मिळाली, त्याचा परिणाम त्यांच्या मनांत अस्थिरता उत्पन्न होण्यांत झाला. राजकन्या एलिझाबेथ यांचें शिक्षण ह्या दोन्हींचा सुवर्णमध्य साधून योजण्यांत आलेलें आहे. राजेसाहेब व राणीसाहेब ह्यांच्या स्वतःच्या शिक्षणाच्या व वाढीच्या अनुभवावरच तें आधारलेलें आहे. दुसऱ्या मुलाचा दुसरा मुलगा, ह्या परिस्थितींत राजेसाहेबांची वाढ इतर मुलांप्रमाणें होऊं शकली. "प्रिन्स आल्बर्ट" प्रमाणेंच "लेडी एलिझाबेथ बाउस-लिऑन" ची वाढ होऊन त्यांचें आदर्श सज्जदांपत्य झालें आहे. राजकन्येचें सार्वजनिक आयुष्यक्रमांत पदार्पण शक्य तितकें उशीरा व्हावें, अशी त्यांची इच्छा आहे. राजकन्येच्या बालपणीं त्यांची परिचारिका त्यांना गोष्टींतील राजकन्या व इंग्लंडची राजकन्या ह्यांमधील फरक समजावून सांगत असत; व आतां उच्च स्थानाबरोबर येणारी जबाबदारी कशी मोठी असते, हें तिच्या मनावर बिंबावें, अशा रीतीनें शिक्षणाची योजना केलेली आहे. अद्याप राजकन्येसाठी स्त्री-शिक्षकांचीच योजना केलेली आहे. एकहि पुरुष शिक्षक अजून नेमलेला नाहीं. राजकन्या कोणत्याहि शाळेंत जात नसली, तरी तिला प्रत्येक तीन महिन्यांनीं परीक्षेस बसावें लागतें आणि प्रश्न पत्रिका विश्वविद्यालयांचे प्राध्यापक काढतात व उत्तरें तेच तपासतात. अभ्यासांतील प्रगतीचा अहवाल मुख्य प्रधानांस वक्तशीरपणें सादर केला जातो. जगांत काय चाललें आहे, ह्याचें राजकन्येस आकलन व्हावें, ह्या दृष्टीनें विषयांची मांडणी केलेली असते. उदाहरणार्थ, ब्रिटिश आणि अमेरिकन राज्यघटना व ग्रेटब्रिटन आणि अमेरिका ह्यांचें वाढतें संघटन, ह्यांची माहिती तिला पद्धतशीरपणें दिली जाते. प्रत्येक दिवशीं ती रोजनिशी लिहिते व एक दिवस आड ती आपल्या आजीस – महाराणी मेरी – पत्र लिहिते. हीं पत्रें त्यांनीं जतन करून ठेवलीं आहेत. तिच्या नोटपेपरचा रंग अस्मानी निळा असून, त्याच्या डाव्या वरच्या कोपऱ्यांत एलिझाबेथचें आद्याक्षर E हें असतें. दर आठवड्यास तिला खर्चासाठी पांच शिलिंग पॉकेट्मनी मिळतो त्याचा हिशेब ती ठेवते. त्यांतून ती पुस्तकें, वाढदिवसासाठी बक्षिसें इत्यादि घेते व वक्तशीरपणें रॉयल हाऊसहोल्ड सेव्हिंग्ज असोसिएशनचा एक शिलिंग देते. बागकामाचीं आपलीं हत्यारें ती स्वतः स्वच्छ करून ठेवते. स्वतःच्या कपड्यांच्या निवडीचे बाबतींत तिला अद्याप फारसें स्वातंत्र्य दिलेलें नाहीं. तिची उंची ५ फूट ३½ इंच आहे, म्हणजे ती आपल्या आईपेक्षा उंच आहे. ती टेनिस बरी खेळते व पोहते उत्तम. ती रोज वर्तमानपत्रें वाचते व ब्रिटिश रेडिओवरील इंग्रजी, जर्मन व फ्रेंच भाषांतील बातम्या वक्तशीरपणें ऐकते. आठराव्या वर्षी राजकन्या कायद्याप्रमाणें वयांत येईल.

---


वि म्हणजे विजय

वि म्हणजे विमा

V आपल्या आयुष्यांत परिस्थितीवर विजय मिळविण्यास विम्यासारखें हत्यार नाहीं. कसलीहि परिस्थिति असली तरी ती चुरडून तुम्हांस उतारवयीं व कुटुंबासाठीं भरपूर तरतूद करण्यास विमा पॉलिसी मदत करते म्हणून वि म्हणजे

★ विम्याचा विजय होय. ★

असा विजय मिळविण्यासाठीं

महाराष्ट्राच्या पहिल्या म्युच्युअल विमा कंपनीची पॉलिसी घ्या. ★

विमा अगर एजन्सीसाठीं किंवा
जिल्हानिहाय चीफ एजन्सीसाठीं लिहाः—

मॅनेजिंग डायरेक्टर,
औंध म्युच्युअल विमा कंपनी लि.
६१ सरस्वती विलास, लक्ष्मीरोड पुणें २.

अत्यंत आकर्षक अटींवर ऑर्गनायझर्स नेमणे आहेत. कामाचा अनुभव असणारांनींच अर्ज करावा.



दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशु. कं. लि., पुणें.

दि ट्रस्ट ऑफ इंडियाची प्रगति स्थैर्याकडे लक्ष पुरवूनच होत आहे. उत्पन्न, खर्च व कार्याचा विस्तार याचा योग्य मेळ घसविल्यामुळें पहिल्याच मूल्यमापनांत कंपनी फायदा दाखवूं शकली.

● त्रैवार्षिक बोनस हजारी रु. ३० व ३६ ●


नामवंत कंपन्यांच्या उत्पन्नाशीं पडणाऱ्या खर्चाच्या प्रमाणांतच कार्याचा विस्तार होत असल्यानें लाइफ फंडांत व्यवस्थित वाढच होत आली आहे.

● चालू वर्षी स्वतःच्या इमारतीची योजना. ●

| आमच्या विमेदारांस व मागीदारांस नवें वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो. | अधिक चौकशीसाठीं लिहा. व्ही. एच. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर. |
|---|---|

उपशाखा व प्रचारकेंद्रें.

मुंबई, नगर, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, बेळगांव, मध्यप्रांत-वऱ्हाड-नागपूर, अकोला, सिवनी, मध्य-हिंदुस्थान, ग्वाल्हेर, इंदोर, मद्रास, नेलोर, बेझवाडा, बंगाल, मेहेरपूर, पुरुलिया इत्यादि.



# हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या गिरण्या

हिंदुस्थानांत कपास कापडाच्या ३८९ गिरण्या असून त्यांत १ कोटि चात्या व २ लक्ष माग आहेत. त्यांपैकीं ६०% चात्या व ७०% माग एकट्या मुंबई प्रांतांत आहेत. मुंबई प्रांतांतील चात्यांपैकीं २८½ लक्ष चात्या व ६७ हजार माग मुंबई शहरांतील गिरण्यांत आहेत. त्याचे खालोखाल अहमदाबादचा अनुक्रम येतो. तेथें १९ लक्ष चात्या व ४७ हजार माग आहेत. मद्रास प्रांतांत ५० गिरण्या आहेत, परंतु त्यांतील कित्येकांत फक्त सूत तयार होतें. मद्रास प्रांतांत हातमागांची संख्या मोठी असून त्यांस तेथील गिरण्या सुताचा पुरवठा करितात. कलकत्ता हें कापडाच्या उठावाचें जगांतील जवळजवळ पहिल्या प्रतीचें केंद्र आहे. बंगालमध्यें कापडाच्या गिरण्यांची स्थापना होऊन फार काळ लोटलेला नाहीं. संयुक्त प्रांतांतील गिरण्यांचें केंद्र म्हणजे कानपूर शहर होय. तेथें तयार होणारें कापड मुंबई-अहमदाबादच्या गिरण्यांपेक्षा अधिक जाडेभरडें असतें. दिल्ली व पंजाब येथेंहि उंची कापड निघत नाहीं. धोतरें व तंबूचें कापड तेथें चांगलें होतें. हिंदी संस्थानांपैकी बडोदें व इंदूर येथें चांगलें कापड निघतें. खालील तक्त्यांत प्रांतवार कपास कापडाच्या गिरण्यांची संख्या व त्यांतील चात्या आणि माग ह्यांचा तपशील दिला आहे.

**कपास कापडाच्या गिरण्या**

| कोणत्या प्रांतांत | गिरण्यांची संख्या | त्यांतील चात्या | त्यांतील माग |
|---|---|---|---|
| मुंबई शहर | ६८ | २८,५०,७७४ | ६७,२३५ |
| अहमदाबाद | ७७ | १९,०१,८७२ | ४६,८५३ |
| इतर मुंबई प्रांत | ६२ | १२,६३,६५१ | २६,८५२ |
| एकूण | २०७ | ६०,१६,२९७ | १,४०,९४० |
| राजपुताना | ६ | ८८,५२४ | २,१३४ |
| वऱ्हाड | ४ | ६८,३१२ | १,४३७ |
| मध्यप्रांत | ८ | ३,२३,५०२ | ५,७५९ |
| बिहार–ओरिसा | २ | २७,५०० | २६९ |
| हैद्राबाद | ६ | १,२४,१४० | २,१५७ |
| मध्यहिंदुस्थान | १६ | ३,८९,११८ | १०,९७२ |
| बंगाल | ३० | ४,४४,१९६ | ९,९४० |
| पंजाब | ८ | १,११,२६४ | २,६४७ |
| दिल्ली | ६ | १,०८,६३४ | ३,११२ |
| संयुक्तप्रांत | २६ | ७,२४,६८८ | ११,५३२ |
| मद्रास | ५८ | १३,६८,३०९ | ६,५१२ |
| त्रावणकोर | १ | १२,००० | ३०० |
| म्हैसूर | ८ | १,६५,०६२ | २,६०७ |
| पॉंडिचेरी | ३ | ८७,८२४ | १,९४६ |
| एकूण | ३८९ | १,००,५९,३७० | २,०२,४६४ |

गेल्या तीन वर्षांत हिंदुस्थानांतील गिरण्यांची उत्पादनाची वार्षिक सरासरी ४०० कोटि वार कापडाची आहे. त्यांपैकीं २० ते ३० कोटि वार कापडाची निर्गत होते; बाकी सर्व हिंदुस्थानांतच खपतें. गिरण्यांतील सुताच्या उत्पादनाची सरासरी १२० कोटि पौंड सुताची आहे. त्यांपैकी ४ कोटि पौंड वजनाचें सूत परदेशीं जातें. परंतु तितकेंच सूत आयातहि होतें. १२० कोटि पौंड सुतापैकी सुमारें ८० कोटि पौंड सुताचें गिरण्यांत कापड विणलें जातें; बाकीच्याचा उपयोग हातमागांवर कापड बनविण्याकडे होतो. हातमागावर हिंदुस्थानांत दरसाल सुमारें २०० कोटि वार कापड निघतें. अद्याप हिंदुस्थानांत दरवर्षी ७० कोटि वार कापडाची आयात होते. सध्या दरसाल हिंदी गिरण्या ४०० कोटि वार कापड काढतात, त्यासाठी ३०० दिवस दररोज ९ तास ह्याप्रमाणें त्या चालविल्या जातात व कांहीं गिरण्याच फक्त रात्रपाळी करतात, असा हिशेब आहे. रात्रपाळी सर्व गिरण्यांत चालू झाली तर उत्पादन पुष्कळ वाढूं शकेल. गिरण्यांत रात्रपाळी चालविण्यास कामगारांची अडचण फारशी भासणार नाहीं. युद्धापूर्वीच्या तीन वर्षांची सरासरी घेतली तर असें दिसतें कीं गिरण्यास ३४ लक्ष गाठी कपास लागते. त्यांपैकी ५ लक्ष गाठींची आयात झाली व २९ लक्ष गाठी देशी कपाशीच्या होत्या. ह्याच तीन वर्षांतील कपाशीचें सरासरी वार्षिक उत्पादन ५७ लक्ष गाठी होतें. त्यांपैकी निम्मी कपास हातमागांसाठी लागली असें धरलें तर सालिना २३ लक्ष गाठींची निर्गत होऊं शकेल असा अर्थ झाला. हिंदी कपाशीच्या वार्षिक निर्गतीचा आकडा ८ लक्ष गाठींच्या आसपास आहे. जपान कडील निर्गत बंद झाल्यावर त्या प्रमाणांत अधिक कपास अंतर्गत गिरण्यांस उपलब्ध होऊं शकेल व त्यापासून ३५ कोटि वार ज्यास्त कापडाचें उत्पादन होऊं शकेल. एवढें कापड हिंदुस्थानांत खपण्यास लोकांची क्रयशक्ति वाढलेली असणें आवश्यक आहे; परंतु ती तशी वाढलेली नाहीं. तथापि ज्या देशांत पूर्वी युरोपांतील देशांतून कापडाची आयात होत असे, तेथें हिंदी कापडास बाजारपेठ मिळविणें येथें शक्य आहे. खालील तक्त्यांत किती सूत हिंदी गिरण्यांस उपलब्ध होत आहे, ह्याचे आकडे दिले आहेत व त्यापुढील तक्त्यांत किती कापड हिंदुस्थानांत खपण्यास शिल्लक रहातें ह्याची माहिती दिली आहे.

**सुतासंबंधीं परिस्थिति**

(आकडे दशलक्ष पौंडांचे आहेत.)

| | १९३६–३७ | १९३७–३८ | १९३८–३९ |
|---|---|---|---|
| एकूण सुताचें उत्पादन | १,०५४ | १,१५९ | १,३०३ |
| उणें निर्गत (समुद्रमार्गें) | १२ | ४० | ३८ |
| „ (जमिनीवरून) | ७ | ५ | ७ |
| बाकी | १,०३५ | १,११४ | १,२५८ |
| आयात | २९ | २२ | ३६ |
| एकूण | १,०६४ | १,१३६ | १,२९४ |
| निर्गत | ... ... | ... ... | १ |
| उपलब्ध सूत | १,०६४ | १,१३६ | १,२९३ |
| कापडाचें उत्पादन | ७८२ | ८६४ | ९२० |
| त्यास लागणारें सूत | ६९८ | ७७१ | ८२१ |
| खपविण्यासाठीं उरलेलें सूत | ३६६ | ३६५ | ४७२ |

### कपास कापडासंबंधीं परिस्थिति

| | १९३६–३७ | १९३७–३८ | १९३८–३९ |
|---|---|---|---|
| एकूण उत्पादन | ३,५७२ | ४,०८४ | ४,२६९ |
| उणें निर्गत ( समुद्रानें ) | १०२ | २४१ | १७७ |
| (जमिनविरून) | १२१ | १२८ | ११५ |
| बाकी | ३,३४९ | ३,७१५ | ३,९७७ |
| आयात | ८३२ | ६२२ | ६७२ |
| एकूण | ४,१८१ | ४,३३७ | ४,६४९ |
| उणें निर्गत ( समुद्रानें ) | ११ | १० | १३ |
| ,, ( जमिनविरून ) | १०९ | ८८ | १०३ |
| उपलब्ध कापड | ४,०६१ | ४,२३९ | ४,५३३ |
| हातमागावरील कापड | १,७५१ | १,७४६ | २,२५९ |
| एकूण | ५,८१२ | ५,९८५ | ६,७९२ |

हिंदी कपास कापडाचीं मुख्य गिऱ्हाइकें म्हणजे सिलोन, ब्रह्मदेश, स्ट्रेट सेटलमेंट्स, व इजिप्त हीं होत. अनेक देशांत हिंदी कापड खपतें, परंतु त्यांपैकीं प्रत्येक देशांतील उठावाचा आकडा फार मोठा नाहीं. सुताच्या निर्गतीचे बाबतहि हीच परिस्थिति आहे. ब्रह्मदेश, हॅंगकॅांग, तुर्कस्तान, सिरिया, हे देश सुताच्या निर्गतीचे दृष्टीनें महत्त्वाचे आहेत.

## उत्तर हिंदुस्थानांतील साखरेचे कारखाने

### उत्पादन व किंमती ह्यांचें नियंत्रण

साखर-कारखान्यांनीं त्यांस पुरवल्या जाणाऱ्या उसाच्या किंमती, त्यांनीं गाळावयाच्या उसाचें परिमाण व त्यांची तयार झालेली साखर ह्यांचे बाजारभाव ह्या सर्वांचें परिस्थित्यनुरूप नियमन करण्याचा अधिकार संयुक्तप्रांत व बिहार येथील सरकारांनीं स्वतःकडे घेतलेला आहे. वरील सर्व बाबींविषयींचा निर्णय दर हंगामांत प्रसिद्ध करण्याचा त्यांचा क्रम आहे. त्याप्रमाणें ह्या दोन सरकारांनीं चालू हंगामाविषयींचें आपलें धोरण नुकतेंच जाहीर केलें आहे. त्याचा परिणाम हिंदुस्थानांतील साखरेच्या सबंद धंद्यावर होणार असल्यानें महाराष्ट्रांतील कारखानदारांनीं तें धोरण लक्षांत घेणें आवश्यक आहे.

संयुक्तप्रांत आणि बिहार येथील साखरेचा साठा दोन लक्ष टनांनीं १९४२ च्या नोव्हेंबरपर्यंत कमी व्हावा ह्या उद्देशानें १९४०–४१ व १९४१–४२ ह्या दोन हंगामांतील उत्पादन मर्यादित करण्याच्या धोरणास अनुलक्षून यंदाच्या हंगामांत ह्या दोन प्रांतांतलें साखरेचें उत्पादन ५ लक्ष, ७५ हजार टन इतकेंच व्हावें असें तेथील सरकारांनीं ठरवलें आहे. उसाचा पुरवठा हवा असा असल्यास आणि साखरेची निर्गत होऊं शकल्यास उत्पादनाच्या ह्या मर्यादेचा फेरविचार केला जाईल. युद्धामुळें सर्वच पदार्थांच्या किंमती वाढून रहाणी व उद्योग महागाईचे झाले आहेत. ह्या कारणांसाठीं आणि १९४२–४३ च्या हंगामांत पुरेसा ऊस उपलब्ध व्हावा म्हणून कारखान्यांनीं शेतकऱ्यांस द्यावयाच्या उसाच्या किंमतींत दर मणास साडेचार आण्यांचे ऐवजी पांच आणे असा बदल केला आहे. हंगामांत तयार होणाऱ्या साखरेची किंमत दर मणी ९ रु. १० आणे निश्चित केलेली आहे. परंतु प्रमाणभूत साखरेचा भाव बाजारांत चालल्यास हा दर २ आण्यांनीं वाढवण्यांत येईल. साखरेचा बाजारभाव दर मणी ९ रु. १२ आण्यांच्या वर गेल्यास पुढें जाहीर होईल त्याप्रमाणें शेतकऱ्यांस उसाची जादा किंमत कारखानदारांनीं दिली पाहिजे.

Under the kind Patronage of
Shrimant Sir MADHAVRAO BABASAHEB PATWARDHAN, K. C. I. E.
Raja of Miraj Junior State.

**दि बुधगांव बँक लिमिटेड, बुधगांव.**

( स्थापना १९३१. )

शाखा:–गुडगेरी, खंडाळी.

ट्रॅव्हलिंग एजन्सी:–सांगली.

अधिकृत भांडवल ... ... १,००,०००.
विक्री झालेलें ... ... ... १,००,०००.
वसूल केलेलें भांडवल ... ५०,०००

ठेवीवरील प्रचलित व्याजाचे दर

| मुदत ठेव वर्षे. | दरसाल दर शेंकडा. | मुदत ठेव वर्षे. | दरसाल दर शेंकडा. |
|---|---|---|---|
| ३ | ४–८–० | ६ महिने | ३–०–० |
| २ | ४–०–० | सेव्हिंग्ज | २–८–० |
| १ | ३–८–० | चालू ठेव | १–०–० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

–मॅनेजर.

**अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली**

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

डायरेक्टर्स:–
जी. के. गोडबोले, वकील.
एम. एच. गोडबोले, वकील.
डॉ. फडणीस
व्ही. व्ही. वाटवे, वकील.
जे. व्ही. करमरकर, सराफ.
एम. व्ही. कवठेकर, सराफ.
एस. जी. फडके, वकील.
जे. जी. गोडबोले
के. व्ही. साने, एंजीनियर.

सी. आर. शेवक यांचें "रम्य वाचनालय"
म्हणजेच
मनें व बुद्धि यांच्या विकासाचें व रंजनाचें केंद्र.
याचीं वैशिष्ट्यें:—
( १ ) सर्व लेटेस्ट स्टॉक.
( २ ) माफक वर्गणी.
( ३ ) इंग्रजी व मराठी बुकें, कादंबऱ्या, नाटकें, चरित्रें इ.
( ४ ) हिंदी, इंग्रजी, गुजराथी, मराठी मासिकें, तशींच वर्तमानपत्रें वगैरे.
शेवक क्वार्टर्स, फर्ग्युसन रोड, पुणें ४.

## हिंदुस्थानची शिरगणति

### दहा वर्षांत पांच कोटींची वाढ

अलीकडे झालेल्या हिंदुस्थानच्या लोकसंख्येच्या गणतीचे अखेरचे ठोकळ आकडे आतां उपलब्ध झाले आहेत, त्यांवरून गेल्या दहा वर्षांत ही संख्या पांच कोटींनीं वाढली असल्याचें दिसून येतें. ब्रिटिश प्रांत आणि संस्थानें ह्यांमध्यें एकूण ३८ कोटि, ८८ लक्ष इतकी शिरगणति झाली आहे. ह्यापैकीं २९ कोटि ब्रिटिश हिंदुस्थानांतील व बाकीचे ९ कोटि ८० लक्ष हिंदी संस्थानांत अशी लोकसंख्येची वांटणी आहे. १९३१ सालच्या शिरगणतींत ह्या दोन विभागांतील लोकसंख्येचें परस्पर प्रमाण तिहीस एक असें होतें, तेंच १९४१ च्या खानेसुमारींत राहिलें आहे म्हणजे त्या दोहोंमध्यें एकाच प्रमाणांत सारखी वाढ झाली आहे. १९३१ मध्यें पूर्वीच्या दशवार्षिक मुदतीच्या मानानें सुमारें साडेदहा टक्यांनीं लोकसंख्या वाढली होती. १९३१–४१ ह्या दहा वर्षांत ही वाढ १५ टक्के भरली आहे. १९३१ च्या शिरगणतीचे वेळीं ब्रह्मदेश हिंदुस्थानचा एक भाग होता आणि गेल्या खानेसुमारीच्या प्रसंगीं तो विभक्त झाला होता हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. दहा वर्षांमागची एकूण शिरगणति ३५ कोटि २० लक्ष होती आणि तीमध्यें ब्रह्मदेशच्या १ कोटि ४० लक्ष लोकसंख्येचा अंतर्भाव झालेला होता. अलीकडच्या शिरगणतींत ब्रह्मी लोकसंख्या मिळवली तर एकूण संख्या ४० कोटींचे वर जाईल. शिरगणतीचे तपशीलवार म्हणजे जिल्हावार, शहरवार व गाववार वगैरे आकडे अजून प्रसिद्ध व्हावयाचे आहेत.

शिरगणतीचे वेळीं जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे संबंधांत माहिती गोळा करण्यांत येत असते तीवरून देशाची प्रगति होत आहे किंवा नाहीं आणि रहाणी, उद्योगधंदे इत्यादि संबंधांत कोणत्या प्रकारच्या घडामोडी चालल्या आहेत, ह्या महत्वाच्या प्रश्नांवर उद्बोधक प्रकाश पडत असतो. अभ्यासू व सुधारणेछु लोकांस ह्या माहितीचा उत्कृष्ट उपयोग होतो. सामाजिक व आर्थिक सुधारणा घडवून आणण्यास त्या संबंधांतील आकड्यांची मोठी आवश्यकता असते. परंतु १९४१ च्या शिरगणतीमध्यें ह्या प्रकारची माहिती उपलब्ध होणार नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ह्या शिरगणतींत गोळा करावयाच्या माहितीस मर्यादा घालण्यांत आली, तिचा उद्देश खर्चांत काटकसर करणें हा होता. काटकसरीची कात्री खानेसुमारीच्या महत्त्वाच्या माहितीस लागली ही गोष्ट बरी झाली नाहीं. पूर्वीच्यापेक्षां अधिक व विविध माहिती गोळा करावी अशी सूचना नेहमी शिरगणताच बाबतींत करण्यांत येते. ह्या खेपेस तें तर झालेंच नाहीं, पण सामाजिक व आर्थिक महत्त्वाच्या मामुली बाबींचा समावेशहि केला गेला नाहीं, असें समजतें. ह्या कारणानें मागील शिरगणतीच्या माहितीशी अलीकडच्या परिस्थितीची तुलना करणें अशक्य होणार आहे असें दिसतें. ही गोष्ट अत्यंत असमाधानकारक आहे ह्यांत संशय नाहीं. आवश्यक असलेली माहिती गोळा करण्यास असा कितीसा अधिक खर्च आला असता ? काटकसरीस दुसरी जागा नव्हती काय ? हे प्रश्न येथें उपस्थित झाल्यावांचून रहात नाहींत. अपेक्षित माहितीचें विशेष महत्त्व हिंदुस्तान सरकारास वाटत नाहीं असें म्हणणेंहि समर्पक वाटत नाहीं. ह्या संबंधांत योग्य खुलासा होणें अगत्याचें आहे.


पाणी व पाणी

उम्हांस मुबलक पाणी पाहिजे ना ?

तर मग– आमचे बोरींग मशीननें तुमचे घरांत अगर शेतांत बोअर करून घ्या व एक हातपंप बसवा. वाटेल तेव्हां तुम्हांस पाणी मिळूं शकेल.



बोअर मशीन व पंप पूर्ण स्वदेशी असून आमचे कारखान्यांत तयार केलेले आहेत.

बोअर (भोंक) ८ इंच असून पंप इंजिननें चालतो.

दर वगैरे माहितीबद्दल चौकशी करा.

भिडे आणि सन्स, सांगली.

श्री विनायक फिल्टरी पावडे व तुळशी वापरा.

—SOLD, BOUGHT, HIRED OR MADE TO ORDER.—

First and second hand iron or wooden furniture.

Address:—Shevak Quarters, 1227 F. C. Road, Poona 4. Industrial Centre.

Yours faithfully, C. R. Shevak.

सर्व प्रकारचें लोखंडी व लांकडी फर्निचर विकत घेतलें जातें किंवा नवीन तयार करून अगर भाड्यानें मिळतें.

पत्ता—शेवक क्वार्टर्स, १२२७ फ. कॉ. रोड पुणें नं. ४.

इंडस्ट्रियल सेंन्टर, कारखाना पत्ताः—१५३ कसबा, पुणें २.

आपला—सी. आर. शेवक.

J. G. DATIR

जे. जी. दातीर

फुलांचे व्यापारी

८७२ सदाशिव, जिलब्या मारुती जवळ, पुणें २.

आमचे येथें लग्नमुंजीचे पोषाख, हार, गोटे, वाहनांचे डेकोरेशन, फुलांचें हरतऱ्हेचें सामान, सुंदर, सुबक व स्वस्त दरानें केलें जातें.

बापट ब्रदर्स- १००३ सदाशिव, पुणें २

आमचे दुकानीं—

★ सर्व तऱ्हेचे स्टोव्हज, पेट्रोमॅक्स, व इतर बत्त्या, सायकल्स व त्यांस लागणारें सुटें सामान मिळेल व तत्संबंधीं दुरुस्तीचें काम काळजीपूर्वक व वक्तशीर केलें जातें. ★

तसेंच—


जावा स्पिरिट, उत्तम फिनाईल, स्टॅन्डर्ड ऑईल कंपनीचें रॉकेल, रेनकोटस्, गॉगल्स, थरमॉस, टॉर्चेस वगैरे.

सर्व तऱ्हेचा माल घाऊक व किरकोळ योग्य भावानें मिळतो.

स्वादिष्ट मसाला
करणारे आद्य
कारखानदार




व्ही. पी. बेडेकर
बेडेकर आणि सन्स
पुणें येथील एजंट—
दत्तात्रय नारायण हेजीब.



माधवाश्रम
हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून, रेल्वे-स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.
जागा मध्यवस्तींत, हवाशीर, लागणारें फर्निचरनें श्रृंगारित असून, सोयीमुळें ती शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहणेची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.
माधवाश्रम बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

चालू दिवाळी
व
★ वर्ष ★
आमचे ग्राहक, एजंट व
हितचिंतक या सर्वांना
आनंदाचें जावो.

द. क. सांडू ब्रदर्स, चेंबूर लि.
आर्यौषधि कारखाना : चेंबूर, मुंबई
पुणें एजंट—ठाकुरदेसाई आणि कं. जोगेश्वरी नाका.

विशेषत्वानें नटलेलें
CIVIL MANAGED
अवर होम
आहार विहार सुख निद्रा गृह.
एकवेळ अवश्य भेट द्या.
६१९ शनवार पेठ,
पुणें नं. २.

## हिंदी चलनी नोटांची परिस्थिति

हिंदी चलनी नोटा व त्यांस असलेलें तारण ह्याविषयीं ताजी परिस्थिति खालील आकडे दर्शवितातः—

रिझर्व्ह बँकेचा नोटांचा विभाग

| देणें | रुपये |
|---|---|
| नोटा ( अ ) बँकिंग विभागांतील १४,०८,१०,००० रु. | |
| ( ब ) व्यवहारांत खेळत्या, हिंदुस्थानांत व ब्रह्मदेशांत मिळून २,८९,५९,१७,००० रु. | |
| एकूण देणें | ३०३,६७,२७,००० |
| **येणें** | |
| ( अ ) सोन्याचीं नाणीं व पाटले हिंदुस्थानांत ४४,४१,४३,००० रु. | |
| हिंदुस्थानाबाहेर ... ... ... | |
| पौंडांतील ( स्टर्लिंग ) रोखे १४३,६२,७६,००० रु. | |
| ( अ ) ची बेरीज | १८८,०४,१९,००० |
| ( ब ) रुपये | ३९,१२,११,००० |
| हिंदुस्थान सरकारचे रोखे | ७६,५०,९७,००० |
| अंतर्गत हुंड्या व इतर मत-पत्रिका | ... ... ... |
| एकूण येणें | ३०३,६७,२७,००० |

" अ "चें एकूण देण्याशीं प्रमाण : ६१·९३२%

## बॉंबे कोऑपरेटिव्ह क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा सप्टेंबर १९४१ चा अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्यें प्रथम प्रो. काळे ह्यांच्या, मद्रास सहकारी कमिटीचे रिपोर्टावरील लेखाचा तिसरा व शेवटचा भाग देण्यांत आला आहे. त्याचेमध्यें अर्बन बँका व सोसायट्या ह्यांचेसंबंधीं विवेचन केलेलें आहे. दिवाण बहादूर सी. एम गांधी ह्यांच्या सहकारी मध्यवर्ती बँकांच्या प्रश्नावरील लेखाचा उत्तरार्ध क्वार्टर्लींत देण्यांत आला आहे. सेंट्रल बँकांकडून शेतीस भांडवल पुरवठा, ह्या श्री. जी. एम. जोशी ह्यांचे लेखांत त्यांनीं सेंट्रल बँकांच्या वाजवी क्षेत्रांत लँड मॉर्गेज बँकांनीं प्रवेश करूं नये, सेंट्रल बँकांना शेतीस सर्व तऱ्हेनें भांडवल पुरवठा करतां येण्यास मोकळीक असावी व त्याकरतां लँडमॉर्गेज बँकांचें कांहीं डिबेंचर भांडवल सेंट्रल बँकांस उपलब्ध करून द्यावें, असें सुचविलें आहे. समाइक इस्टेटीचे संबंधांतील कायदेशीर मालकी हक्काचे छाननींविषयीं श्री. के. बी. गजेंद्रगडकर ह्यांनीं सूचना केल्या आहेत. पुस्तकावर अभिप्राय, संपादकीय स्फुटें, सहकाराची प्रगति, रजिस्ट्रारचीं सर्क्युलरें इत्यादि नेहमीचीं सदरें अंकांत आहेतच.

## शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति

हिन्दी शेड्यूल्ड बँकांची, ठेवी आणि कर्जें ह्यांचेसंबंधीं कशी परिस्थिति आहे, हें खालील ताज्या आकड्यांवरून समजून येईलः—

| | हजार रुपये |
|---|---|
| बिनमुदत ठेवी | |
| ( अ ) हिंदुस्थानांत | २०५,८२,४४ |
| ( ब ) ब्रह्मदेशांत | ११,८२,९३ |
| मुदतबंद ठेवी | |
| ( अ ) हिंदुस्थानांत | १०३,८२,९९ |
| ( ब ) ब्रह्मदेशांत | ४,५०,५३ |
| रोकड | |
| हिंदी चलनी नोटा | |
| ( अ ) हिंदुस्थानांत | ७,१४,३९ |
| ( ब ) ब्रह्मदेशांत | ५३ |
| ब्रह्मी चलनी नोटा | |
| ( अ ) हिंदुस्थानांत | १४ |
| ( ब ) ब्रह्मदेशांत | ७३,६१ |
| रुपये | |
| ( अ ) हिंदुस्थानांत | १,१२,०१ |
| ( ब ) ब्रह्मदेशांत | १,६४ |
| किरकोळ नाणें | |
| ( अ ) हिंदुस्थानांत | ४०,१५ |
| ( ब ) ब्रह्मदेशांत | ४४ |
| रिझर्व्ह बँकेकडे शिल्लक | ४८,७५,३८ |
| दिलेलीं कर्जें | |
| ( अ ) हिंदुस्थानांत | १०९,९६,६६ |
| ( ब ) ब्रह्मदेशांत | ३,८६,३७ |
| डिस्कौंट केलेलीं बिलें | |
| ( अ ) हिंदुस्थानांत | ३,४९,०९ |
| ( ब ) ब्रह्मदेशांत | ३,७५ |

## हिंदी ब्लँकेटें

कपास कापडाचीं ब्लँकेटें निर्गत करण्याचा धंदा जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया, हॉलंड, बेल्जम, इटली, फ्रान्स, ह्या देशांचा मोठ्या प्रमाणावर होता. जपानहि ब्लँकेटें निर्गत करीत असे. युद्धापूर्वी हिंदुस्थानांतूनहि पूर्व आफ्रिकेकडे ब्लँकेटें जात. त्या देशांत आतां इतर ठिकाणांहून ब्लँकेटें येऊं शकत नसल्यामुळें हिंदी ब्लँकेटांचा खप तेथें वाढण्यास पुष्कळ वाव आहे.

## साखरेचा दरमाणशी खप

| | शेर |
|---|---|
| अमेरिका | ५२३/४ |
| ग्रेटब्रिटन् | ५६ |
| जावा | ५१/२ |
| डेनमार्क | ६४ |
| इजिप्त | १४१/२ |
| जपान | १० |
| ऑस्ट्रेलिया | ५७ |
| न्यूझीलंड | ५७१/२ |
| हिंदुस्थान ( गुळाचा खप धरून ) | १२ |

मिलिटरी फूड लॅबॉरेटरीनेंही
पसंत केलेला




साठे बंधु पुणें
सर्वत्र मिळतो.

सतत अठ्ठावीस वर्षे खास लोकाश्रयाखालीं चाललेली व विश्वासास पात्र झालेली आणि कोल्हापूर स्टेटमध्यें प्रथम स्थापन झालेली

दि कोल्हापूर अर्बन
को-ऑपरेटिव्ह बँक लि. कोल्हापूर
स्थापना १९१३ इसवी

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | ३५,००० |
| बिल्डिंग फंड | १५,७२५ |
| रिझर्व्ह फंड | ५७,५०३ |
| जनरल रिझर्व्ह | १६,४६२ |
| इतर रिझर्व्ह | २८,७२३ |
| सरकारी रोख्यांत वगैरे | ६२,६५३ |

बँक कमीजास्त मुदतीच्या ठेवी स्वीकारते.

लहान लहान व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी मालाच्या तारणावर कर्ज देण्याची खास व्यवस्था करण्यांत आली आहे. बँकिंग-संबंधींचीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. बँकेचीं तिमाही सांपत्तिक पत्रकें कायद्यानुसार सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध केलीं जातात. ठेवींच्या व्याजाचे दरासंबंधीं व विशेष माहितीकरितां भेटा अगर लिहा.

गणपतराव नारायणराव भोंसले
प्रेसिडेंट,
एस्. एस्. गुप्ते, बी. कॉम.
मॅनेजर.

बार्शी सेंट्रल
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
( स्थापना १९०६ )

आपण मोठ्या परिश्रमपूर्वक सांठविलेली शिल्लक सुरक्षित तऱ्हेनें गुंतवावी असें प्रत्येकास वाटते. ही बँक स्थापनेपासून आजतागायत "अ" वर्गामध्यें आहे. येथें लहान-मोठ्या ठेवी स्वीकारल्या जातात.

माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

गणेश रामचंद्र साने,
चेअरमन.

★★★ सुक्या मेव्याचे
आद्य
प्रसारक, प्रवर्तक
★ ★ ★

द. ना. हेजीब
यांचे दुकानीं सर्व तऱ्हेचा
सुका मेवा नवा तयार आहे.

२० शुक्रवार पेठ, पुणें.

## कोंबड्या पाळण्याचा धंदा

### सुसंघटित करण्याचा सहकारी प्रयत्न

(नाशिक येथील ऑडिटर व रीकन्स्ट्रक्शन अधिकारी, श्री. जी. के. प्रधान, ह्यांची योजना.)

नाशिक जिल्ह्यांतील इगतपुरी तालुका व पेंट पेटा कोंबड्या पाळण्याचा दुय्यम धंदा सुरू करण्यास सोईचा आहे. इगतपुरी तालुक्यांतील ठाकूर आणि पेंट पेट्यांतील कोळी कोंबड्या बाळगून आपल्या शेतीच्या उत्पन्नास आजहि जोड देत आहेत. सध्या कोंबड्या व त्यांचीं अंडीं दोन्हींहि विक्रीसाठी मुंबईला पाठविण्यांत येतात. देवळाली येथील लष्करी छावणींतहि त्यांचा खप होतो. इगतपुरी तालुक्यांतील घोटी व पेंट पेट्यांतील पेंट येथून अंडीं पाठविण्यास तीं गांवें सोईस्कर केंद्रें आहेत.

मामलेदार अथवा महालकरी ह्यांचे सहायानें एक चांगलें गांव कोंबड्यांच्या धंद्यासाठीं निवडण्यांत यावें. तेथें कोंबडे किती आहेत, ते मोजून, योजनेच्या प्रमुखास ते देऊन टाकण्यास शेतकऱ्यांस प्रवृत्त करावें. दोन कोंबडे त्यांनीं दिले कीं त्यांचे बदली त्यांस एक पांढऱ्या लेगहॉर्न जातीचा कोंबडा देण्यांत यावा. गावठी कोंबडे सर्वच करून विकून टाकावे व येणारी किंमत योजना यशस्वी करण्याकरितां खर्च करावी. प्रत्येक खेडेगावांत फार तर ३० कोंबडे सांपडतील, त्यांचे बदली देण्यास १५ पांढरे लेगहॉर्न कोंबडे लागतील. सध्याच्या दराप्रमाणें (शेतकऱ्यांस सवलतीचा दर) प्रत्येक खेड्यास १५×४ रु. = ६० रुपये लागतील. आणखी ४० रुपये रूरल डेव्हलपमेंट ग्रँटमधून किरकोळ खर्चासाठी व कांहीं लेगहॉर्न कोंबडे मेल्यास त्यांचे जागीं नवीन घेण्यासाठी राखून ठेवावे. व्हाइट लेगहॉर्न कोंबड्यांचीच निवड करावी, ह्याचें कारण ह्या कोंबड्यांस ही हवा मानवते व ह्या जातीच्या कोंबड्या इतर कोंबड्यांपेक्षा दरसाल अधिक अंडीं घालतात. कोंबड्या बदलण्याचें कारण नाहीं. सातवी पिढी आपोआप शुद्ध लेगहॉर्न जातीची होईल ह्या हिशेबानें चार वर्षांत खेडेगावांतील सर्व कोंबड्या लेगहॉर्न जातीच्या होऊन जातील. ह्या मुदतींत कोठलाहि दुसरा कोंबडा गावांत प्रवेश करणार नाहीं अशी दक्षता बाळगली पाहिजे. पाटील व तलाठी ह्यांकडे हें काम सोपवून सर्कल इन्स्पेक्टर व मामलेदार ह्यांनीं त्यावर देखरेख करावी. पुढच्या वर्षी पहिल्या खेड्याच्या शेजारचेंच दुसरें एक खेडें ह्या कामासाठी पसंत करावें. अशा रीतीनें लेगहॉर्न जातीचा आपोआप प्रसार होऊं शकेल. रोगराईची भीति ही नेहमींचीच आहे. परंतु नीट देखरेख ठेवल्यास ती अर्थातच कमी होईल.

### सहकारी तत्त्वावर योजना

ही योजना संपूर्णपणें यशस्वी होण्यासाठी अंडीं व कोंबड्या पद्धतशीरपणें विकणारी एकादी संस्था पाहिजे. त्यासाठी सहकारी सोसायटी उत्तम. नमुनेदार पोल्ट्री फार्म स्थापण्यास लहान कर्जें देणें, कोंबड्या पाळण्याच्या धंद्याची व रोगराईपासून बचाव करण्याची माहिती देणें, अंडीं गोळा करणें, अंड्यांची प्रतवारी लावून त्यांवर त्याप्रमाणें शिक्का मारणें, अंडीं व कोंबड्या ह्यांच्या विक्रीची व्यवस्था करणें, तीं घेतांना रोख किंमत देणें परंतु १०% रकम कापून घेऊन भांडवल वाढविणें, नफ्याचा निम्मा भाग सभासदांस त्यांच्या उलाढालीच्या प्रमाणांत वांटणें, इत्यादि कामासाठी "पोल्ट्री ब्रीडिंग अँड एग सेलिंग सहकारी सोसायटी" उत्तम. प्रवेश फी ४ आणे व भागाची किंमत १ रुपया असावी. सभासदानें पुरेसा व्यवहार केला नाहीं तर त्यानें सोसायटीस दरमहा २ आणे तरी भांडवल वाढीसाठी दिले पाहिजेत. सभासदांची जबाबदारी नियमित राहील. कोणत्याहि सभासदास ५० रुपयांपेक्षा अधिक कर्ज देऊं नये. व्याजाचा दर दरमहा दर रुपयास १½ पै म्हणजे द. सा. द. शे. ९ रु. ६ आ. असावा. पहिलीं ३ ते ५ वर्षें सोसायट्यांना दरसाल १०० रुपयांची मदत लागेल; पुढें त्या आपल्या स्वतःचे पायांवर उभ्या राहूं शकतील. सोसायटीला कर्ज लागल्यास तें प्रांतिक सहकारी बँकेनें अथवा सरकारनें द्यावें. दारोदार हिंडून अंडीं व कोंबड्या गोळा करून विकणाऱ्या व्यापाऱ्यांचा धंदा किफायतशीर चालतो, तर सहकारी तत्त्वावर संघटित झालेल्या व सरकारची मदत मिळणाऱ्या धंद्याचें यश प्राथमिक अवस्थेंत मिळालेंच पाहिजे. रेल्वेकडूनहि कांहीं सवलती मिळवितां येणें शक्य आहे. घोटी व पेंट येथील केंद्रांस नवीन कोंबडे देण्यासाठी प्रत्येकीं १०० रुपये व सोसायटीस मदत म्हणून १०० रुपये ह्याप्रमाणें २००+२०० रु. असे ४०० रुपये सरकारकडून मिळाले व पांच वर्षांची योजना केली, तर २,००० रुपये खर्च येईल. सरकारी मदत किमान पांच वर्षें तरी लागेल. योजनेची ही केवळ रूपरेषा आहे. तज्ज्ञांना त्यांत दुरुस्त्या व सुधारणा सुचवितां येतील.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत
साईन-बोर्डस्, रबरी शिक्के,
आकर्षक
सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग
सतत २० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें
एकच ठिकाण
पेन्टर ए. जी. बेडेकर
(मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट)
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.

(स्थापना १ मे १९३९)
दी सोलापूर ग्लास वर्क्स लि. सोलापूर
कांच माल व शेअर विक्री सुरू आहे.
वर्क्स मॅनेजर पी. जी. काळे
बिझिनेस मॅनेजर के. आर. कुंभोजकर
मॅनेजिंग एजंट—चाटी आणि कंपनी

# * विमाक्षेत्रांतील 'कॉमनवेल्थ'चें अढळ स्थान *

## १९४० चें पूर्ण केलेलें काम........४५ लक्षांहून अधिक

### ★ बोलका—ढलपा ★

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८३,००० |
| सरकारी कर्जरोखे, गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१३,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.

### • कॉमनवेल्थचीं वैशिष्ट्यें •

(१) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरूकता
(२) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
(३) काळजीपूर्वक कांटकसरीची व्यवस्था
(४) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
(५) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

# कॉमनवेल्थ

## ॲशुअरन्स कंपनी लि., पुणें २.

—शाखा—

मुंबई—मद्रास—कलकत्ता—नाशिक—कराची—अहमदाबाद

एम्. एन्. भागवत, बी. ए.
ॲक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडेंट.





तुझा ध्यास हव्यास माझा असे। तुझ्या प्रीतिनें विश्व भरलें दिसें॥

# दोन प्रेमी हृदयांचें गोड मीलन

★ नवयुग चित्रपट लि. कृत ★

# संगम

निर्माते: विनायक

: लेखक : खांडेकर

: दिग्दर्शक : जुन्नरकर

या बोलपटांत लौकरच पहावयास मिळेल

भूमिका:—मीनाक्षी, वत्सला कुमठेकर, दामुअण्णा मालवणकर, साळवी, जोग व विनायक

प्रकाशक: —पिअरलेस पिक्चर्स, मुंबई ४.

## डिव्हिडंड आणि बोनस

बहुतेक लिमिटेड कंपन्या आपल्या भागीदारांस डिव्हिडंडचे स्वरूपांतच फक्त नफा वाटतात; परंतु कांहीं कंपन्या विशिष्ट टक्के डिव्हिडंड व बाकी बोनस ह्या स्वरूपांत नफावाटणी करतात. ह्या दोन पद्धतींपैकीं दुसरी पद्धति कित्येक वेळां श्रेयस्कर कशी असते, हें खालील विवेचनावरून लक्षांत येईल.

बरींच वर्षे चालू असलेल्या कंपन्यांना किती टक्के दरानें कायम डिव्हिडंड वाटतां येईल, ह्याचा अंदाज बांधतां येतो व भागीदारांनाहि आपल्या शेअरवर किती डिव्हिडंड मिळेल, हें निश्चितपणें सांगतां येतें. ह्या ठराविक दरापेक्षा अधिक दरानें एकादे वर्षी डिव्हिडंड वाटण्याजोगी कंपनीची परिस्थिति झाली, तर डिव्हिडंडचा दर न वाढवितां बोनसचे स्वरूपांत जादा नफा दिला, म्हणजे भागीदारांना समजून चुकतें कीं, हा जादा नफा त्या वर्षांपुरताच आहे, तो दरसाल आपणांस मिळावयाचा नाहीं; पूर्वीच्या डिव्हिडंडचा दर मात्र गृहीत धरण्यास प्रत्यवाय नाहीं. अर्थात्, डिव्हिडंडचा दर हा नेहमीच नफ्यावर अवलंबून रहाणार. तथापि, पूर्वीचा डिव्हिडंडचा दर जितका अपेक्षा करावयास हरकत नाहीं त्यापेक्षा बोनसची अपेक्षा भागीदारांनीं कमी धरावी हा त्याचा अर्थ आहे. बोनसहि सालोसाल मिळत गेलें, म्हणजे त्याविषयीं अपेक्षाहि कायम होईल व डिव्हिडंड आणि बोनस ह्यांमध्यें फरक उरणार नाहीं. एकादे वर्षी कंपनीस नेहमीपेक्षा अधिक नफा झाला व तिच्या भागीदारांस दरसालपेक्षां जास्त डिव्हिडंड मिळालें आणि पुढील वर्षी तो डिव्हिडंडचा दर जाहीर होऊं शकला नाहीं कीं कित्येक भागीदारांस कंपनीसंबंधीं विनाकारण गैरविश्वास वाटूं लागण्याचा संभव असतो. दरसाल ठराविक दरानें डिव्हिडंड मिळाल्यास भागीदार अधिक संतुष्ट रहातो, असा अनुभव आहे.

एकादी कंपनी दरसाल १२% डिव्हिडंड देत असली व तिला जरी कांहीं चलतीच्या वर्षी विशेष नफा झाला तरी तिनें पूर्वीचा डिव्हिडंडचा दर न सोडणें इष्ट असतें; कारण मंदीचींहि कांहीं वर्षे पुढें येणें संभवनीय आहे. जादा नफा वाटून न टाकतां तो पुढील मंदीसाठीं तसाच शिलक ठेवण्याचें धोरण दूरदृष्टीचें होईल. निदान ज्या वर्षी विशेष नफा होईल, त्या वर्षी डिव्हिडंडचा दर न वाढवितां भागीदारांस बोनस दिलें, तर त्यांस समजून तरी येईल कीं हा बोनस तात्पुरताच आहे, कायमचा नाहीं. एका वर्षी १२% व पुढील वर्षी १६% डिव्हिडंड वाटून पुनः १२% डिव्हिडंडवर येण्यापेक्षा १२% च डिव्हिडंड वाटणें इष्ट; निदान १२% डिव्हिडंड देऊन ४% इतकी रकम बोनसच्या स्वरूपांत तरी द्यावी किंवा १४% डिव्हिडंड देऊन उरलेल्या २% चा उपयोग पुढील डिव्हिडंडसाठी करून १४% डिव्हिडंड कायम ठेवावें.

अर्थात्, नफ्याची कृत्रिम रीतीनें अशी वाटणी करणें कित्येकांस रुचणार नाहीं. झालेला नफा त्या त्या वर्षी वाटावा, असें ते म्हणतील. ज्यांस कंपन्यांच्या ताळेबंदांचें आकलन करतां येतें, अशा भागीदारांची गोष्ट वेगळी; परंतु सर्वसामान्य भागीदारांस त्यांतील मर्म कळणार नाहीं व डिव्हिडंडमधील चढउतार त्यांस रुचणार नाहीं. कंपनीच्या डिव्हिडंडमधील चढउताराचा तिच्या भागांचे किंमतीवरहि परिणाम होईल, हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. कंपनीच्या ज्युबिलीचे वर्षी अथवा अशाच कांहीं प्रसंगानें वाटावयाचा जादा नफा बोनसचे रूपांतच देण्याचें प्रयोजन वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. इंडियन लाइफ अँ. कंपनीनें १९३३ सालीं ५% बोनस दिला होता. इंडियन मर्कंटाइल कंपनी १२½% डिव्हिडंडचा दर कायम ठेवून जादा नफा बोनसचे स्वरूपांत देत आली आहे. अहमदाबाद इलेक्ट्रिक कंपनी, टाटा हैड्रो-इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी, टाटा पॉवर कंपनी, बॉंबे डाइंग अँड मॅ. कंपनी, मोरारजी गोकुळदास स्पि. अँड वि. कंपनी, अरविंद मिल्स, अलेंबिक केमिकल वर्क्स कंपनी, कॅनरा बँक लि. इत्यादि कंपन्यांच्या डिव्हिडंडचा इतिहास ह्या दृष्टीनें उद्‌बोधक वाटेल.

---

## मुंबई शहरांतील रस्त्यांवरील वाहनें

### पेट्रोल नियंत्रणाचा परिणाम

पेट्रोल रेशनिंगचा मुंबई शहरांतील मोटार वहातुकीवर झालेला परिणाम अजमावण्याकरितां त्या शहरांतील १९ प्रमुख ठिकाणचे वहातुकीचे आकडे गोळा करण्यांत आले. ११ ऑगस्ट १९४१ रोजीं म्हणजे रेशनिंगचे आधी ४ दिवस पहिली चाचणी घेण्यांत आली. त्यानंतर २५ ऑगस्ट रोजीं पुनः चाचणी घेतली, परंतु त्या दिवशीं रेशनिंग पूर्णपणें अंमलांत आलें नसल्याकारणानें २२ सप्टेंबर रोजीं आणखी एकदा आकडे गोळा करण्यांत आले. खालील तक्त्यांत त्यांची माहिती दिली आहे:—

| वहानाचा प्रकार | ऑगस्ट १४ संख्या | ऑगस्ट २५ संख्या | फरक (%) | सप्टेंबर २२ संख्या | फरक (%) |
|---|---|---|---|---|---|
| मोटारी (खाजगी) | ...९७८ | ६१२ | −३७ | ७०४ | −२८ |
| टॅक्सी | ...१०४ | १०८ | +५ | १०५ | +२ |
| मोटार सायकली | ... २६ | २७ | +४ | ३६३ | +३८ |
| लॉऱ्या | ...३७१ | ३५० | −६ | २८३ | −२४ |
| सायकली | ...९७७ | १०७५ | +१० | १०३६ | +६ |
| बैलगाड्या | ...२०२ | २०१ | −.५ | १९४ | −४ |
| बी. ई. एस. टी. कंपनीच्या बसेस | ... ५५ | ६० | +९ | ६५ | +१८ |
| एकूण | ...२७१२ | २४३३ | −१०.३ | २४२३ | −१०.७ |

११ ऑगस्ट रोजीं मोजण्यांत आलेल्या वेगवेगळ्या वाहनांचें शंभरांत प्रमाण खालीलप्रमाणें पडलें:—

| | |
|---|---|
| मोटारगाड्या | ३४ |
| टॅक्सी | ४ |
| मोटार सायकली | १ |
| लॉऱ्या | १३ |
| व्हिक्टोरिया | ६ |
| सायकली | ३४ |
| बी. ई. एस. टी. बसेस | २ |
| बैलगाड्या | ७ |
| एकूण | १०० |

---

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १११—३ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३—४ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | ११०—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११६—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२७—४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४८—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% ... | ५०—० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १६१०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०८—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% ... ... | १४७—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २०६—६ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १७६०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १७५७—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ९३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% ... | ८७३-१२-० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६६२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २२५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ५२—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २६—३ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ५३—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४५३०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१७—८ |
| टाटा आयर्न द्वु. प्रे. ( १०० ) ७½% रु. ... ... | १५२—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३९६—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु.१० आ.० पै ... | २०६८–१२ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १५४–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२—१—३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास — ... | ६३–१४–० |


वक्तशीर आणि मनपसंत
काम करून देणारे
**मोहन वॉच कंपनी**
रेग्युलेशन मोफत
लक्ष्मीरोड पुणें २. कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर.

**मुजुमदार टॉय वर्क्स**
या आणि पहा
माना हालणारीं व साधीं लाकडी चित्रें
समक्ष येऊन खात्री करा.
२५५ सदाशिव पेठ, शेगडेवाडी, पुणें शहर.

भगिनींनो–
आमचे येथील
★ ताजें, भाजणी, चकल्या व कडबोळ्याचें
तसेंच
★ अनरशाचें पीठ वापरा व
इतर निवडक जिन्नस वापरून
वेळाची बचत करा.
खमंग काजूवाले
**म. गो. कुलकर्णी आणि कंपनी**
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें.

**बायो टोना**

शरीर व त्यांतील रक्त-पेशींची वाढ करणारें
उत्कृष्ट टॉनिक
★ नैसर्गिक रीतीनें हाडांची वाढ होण्यास आणि शरीर सदृढ करण्यास याची मदत होते.
★ हें मधुर व रुचकर असून मुलें आवडीनें घेतात.
किं. रु. १–८–० ट. ख. नि.
रॉय आणि कंपनी,
१७६, प्रिन्सेस स्ट्रीट : मुंबई २.

## गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्ड सक्तीनें शेअर्स मिळविणार

**कंपनी कायद्याच्या १५३ व्या कलमाची अंमलबजावणी**

गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्ड लि. नें १ मार्च, १९४१ च्या तारखेचें एक सर्क्युलर ता. १६ एप्रिल, १९४१ रोजीं बॉंबे टेलिफोन कं.लि. च्या सर्व भागीदारांस रजिस्टर करून पोस्टानें पाठविलें होतें. त्यांत एकूण भागांच्या किंमतीच्या तीनचतुर्थांशापेक्षा कमी नाहीं, इतक्या रकमेचे भाग धारण करणाऱ्या भागीदारांची संमति मिळाल्यास बॉंबे टेलिफोन कंपनीचें सर्व भाग-भांडवल प्रत्येक भागास ८९ रुपये १५ आणे देऊन विकत घेण्याचा आपला मानस गव्हर्मेंट टेलिफोन बोर्डानें कळविला होता. सर्क्युलर पाठविल्यानंतर चार महिन्यांचे आंत म्हणजे ५ ऑगस्ट, १९४१ पूर्वी तीनचतुर्थांश भाग धारण करणारांनीं ह्या योजनेस संमति दर्शविली. जे भागीदार ह्या योजनेस तयार नाहींत, त्यांस वर सांगितलेली चार महिन्यांची मुदत संपल्यानंतर दोन महिन्यांचे आंत नोटीस देऊन कळविण्यांत आलें आहे, कीं त्यांचे भाग सक्तीनें घेण्यांत येतील. नोटिशीनंतर एक महिन्याचे आंत अर्ज करून ह्या भागीदारांनीं कोर्टाकडून सक्तीची वर्गावर्गी थांबविली नाहीं, तर गव्हर्मेंट टेलिफोन बोर्डास त्यांचे भाग जाहीर केलेल्या अटींवर म्हणजे प्रत्येक भागास ८९ रुपये, १५ आणे देऊन, सक्तीनें वर्ग करून मिळवितां येतील. एखाद्या भागीदारानें कोर्टाकडे आपला भाग वर्ग होऊं नये असा अर्ज केला व तो कोर्टानें फेटाळला, तर नोटिशीच्या तारखेपासून एक महिन्यानंतर व अर्जाचें काम संपलें नसेल तर तें संपल्यावर, बॉंबे टेलिफोन कंपनीकडे गव्हर्मेंट टेलिफोन बोर्ड नोटिशीची एक प्रत पाठवून भागांची ठरलेली किंमत भरील व त्या कंपनीला गव्हर्मेंट टेलिफोन बोर्डाचे नांवानें भाग नोंदावे लागतील. अशा रीतीनें बॉंबे टेलिफोन कंपनीकडे जे पैसे जमा होतील, ते ती एका स्वतंत्र बँक खात्यांत टाकील व ज्यांचे भागांसाठी त्या रकमा जमा आहेत त्यांचेसाठीं त्या रकमा राखून ठेवील. बॉंबे टेलिफोन कंपनीच्या तीनचतुर्थांशापेक्षा अधिक भाग धारण करणारांनीं आपले भाग गव्हर्मेंट टेलिफोन बोर्डास वर्ग करण्यास संमति दिली आहे, परंतु १२७ भागीदारांस ती योजना पसंत नाहीं. त्यांचे भागांची सक्तीनें वर्गावर्गी न होण्यासाठीं त्यांस कोर्टाकडे अर्ज करावा लागेल. प्रत्येक भागीदारास आपल्या भागांसाठीं स्वतंत्रपणें अर्ज करून आपलें म्हणणें कोर्टापुढें मांडावें लागेल. एक महिन्याचे आंत त्यांनीं हें न केल्यास त्यांना आपले भाग सोडावे लागतील.

---

**तंबाखूची लागवड**

तंबाखूचे लागवडीचे बाबतींत हिंदुस्थान अग्रेसर आहे. १५ लक्ष एकर जमीन ह्या देशांत तंबाखूखालीं आहे.




मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

नवीन सोय ! (स्थापना १९३० ) नवीन सोय !!

डेक्कन जिमखान्यावरील पहिलें उच्च दर्जाचें

अप–टु–डेट

**हेअर–कटिंग सलून**

येथें आधुनिक इलेक्ट्रिक मशीनच्या सहायानें केस कापले जातात. इलेक्ट्रिक हेअर ब्रश व मसाज ह्यांची व्यवस्था. स्वच्छता व टापटीप हें आमचें वैशिष्ट्य. तज्ज्ञ माणसाकडून विजेच्या सहायानें काम सुबक व स्वच्छ होतें.

पत्ता:–प्रो. डी. एम. आढाव, पी. डी. ब्रदर्स बिल्डिंग, गोखले स्मारक चौक, डेक्कन जिमखाना, पुणें ४.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल

लॅक टूथ पावडर

येथें मिळेल

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

# ओगलेग्लासवर्क्स, लि.

★ कांचेच्या चिमण्या व ग्लोब्स,
★ बंगल्यावर घालण्याचीं कांचेचीं कौलें,
★ हेअर ऑइल्स अगर शाईकरितां लागणाऱ्या बाटल्या,
★ प्रभाकर हरीकेन लँटर्नस्,
★ एनामल्ड ॲडव्हर्टायझिंग साईन्स,
★ सूप, मीट व राईस प्लेट्स्, इत्यादि एनामल वेअर,
★ रेल्वेकडे लागणारीं हरतऱ्हेचीं एनामल कमोड्स्, वॉश बेसीन्स वगैरे,
★ एनामल्ड इलेक्ट्रिक शेड्स्.

## सर्व तऱ्हेचा माल अस्सल दर्जाचा होतो.

—: जास्त माहितीकरितां लिहा :—

एस. पी. ओगले आणि कंपनी,
मॅनेजिंग एजंटस्.
पोस्टः—ओगलेवाडी ( सं. औंध ), जिल्हाः—सातारा.



अशक्त व रोडकीं मुलें

## डोंगरे यांचे बालामृतानें सशक्त व गुटगुटीत होतात.

# दि मिरज स्टेट बँक लिमिटेड

[ स्थापना : १०-५-१९२९ ]

मुख्य कचेरी : बँक बिल्डिंग, मिरज

शाखा : १ लक्ष्मेश्वर, (जि. धारवाड) २ मोडनिंब, (जि. सोलापूर)

पे. ऑफिसेस : १ करकंब, (जि. सोलापूर) २ कुर्डुवाडी, (जि. सोलापूर)

★ मुख्य कचेरी व शाखांमार्फत सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात ★

खेळतें भांडवल ............रु. १९,००,००० वर

निरनिराळे फंड व रिझर्व

फंड मिळून, एकूण फंड ..................रु. १,००,००० वर

- कायम, सेव्हिंग बँक व चालू ठेवी स्वीकारल्या जातात.
- बँकेचे नियम व व्याजाचे दर याबद्दल चौकशी करावी.
- याशिवाय सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, चांदी यांचे तारणावर; माल गहाणाचे तारणावर व स्थावर मिळकतीचे तारणावर कर्ज अगर कॅशक्रेडिट दिलें जातें. शेअर्स व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री योग्य कमिशन घेऊन केली जाते. याबाबत समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

ल. ग. मराठे,
मॅनेजर.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

| शाखा | मुख्य कचेरी | शाखा |
|---|---|---|
| फोर्ट, मुंबई. | पुणें शहर. | डेक्कन जिमखाना, पुणें. |

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० | खपलेलें भांडवल | रु. ४,०२,०५० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० | वसूल झालेलें भांडवल | रु. २,०१,०२५ |

एकूण खेळतें भांडवल रु. ३२,००,०००.

— डायरेक्टर्स —

प्रो. वा. गो. काळे, (अध्यक्ष).

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे (उपाध्यक्ष) | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | श्री. फ. दो. पदमजी |

— मॅनेजर —

श्री. म. वि. गोखले.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. शेअर व रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते. डिसेंबर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड बँकेच्या शेअरवर दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे. विशेष माहितीकरितां तसेंच शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

मुंबई इलाख्यांतील चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉंबे प्रॉव्हिन्शिअल् को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

[ सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली ]

स्थापना : १९११

मुख्य कचेरी :

**९, बँक हाउस लेन, मुंबई.**

शाखा :

| | | |
|---|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | १० अहमदनगर (जि. अहमदनगर) | २० शिरपूर („ „) |
| २ सातारा (जि. सातारा) | ११ शेवगांव (जि. अहमदनगर) | २१ शहादें (जि. प. खानदेश) |
| ३ इस्लामपूर („ „) | १२ कोपरगांव („ „) | २२ नंदुरबार („ „) |
| ४ कऱ्हाड („ „) | १३ वाई (जि. सातारा) | २३ साक्री („ „) |
| ५ तासगांव („ „) | १४ पालघर (जि. ठाणें) | २४ शिंदखेडे („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी („ „) | १५ कल्याण („ „) | २५ मालेगांव (जि. नाशिक) |
| ७ शिराळें („ „) | १६ अकलूज (जि. सोलापूर) | २६ सटाणा („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | १७ विरमगांव (जि. अहमदाबाद) | २७ दोहद (जि. पंचमहाल) |
| ९ भिलवडी („ „) | १८ धुळें (जि. प. खानदेश) | २८ कालोल („ „) |
| | १९ दोंडाईचें („ „) | |

## खेळतें भांडवल रु. २,००,००,००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

● [ स्थापना १९१८ ] ●



● **मुदतीच्या ठेवीः**—रु. १०० अगर अधिक रकमांच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. बारा महिने मुदतीच्या ठेवीवर समासदांना दरसाल दरशेकडा २। व इतरांना २ प्रमाणें व्याज दिलें जातें.

● **सेव्हिंग्ज डिपॉझिटः**—ह्या खात्यांत रु. ५ पासून रु. ५००० पर्यंत ठेवी स्वीकारल्या जातात. दरसाल दरशेकडा १½ प्रमाणें व्याज दिलें जातें.

● **रिकरिंग डिपॉझिटः**—दरमहा रु. १ प्रमाणें सतत २४ महिने पैसे भरल्यास २८ महिन्यानंतर रु. २५ दिले जातात, व वरीलप्रमाणें ४५ महिने भरल्यास ६० महिन्यांच्या अखेरीस ५० रु. दिले जातात; म्हणजे व्याज सुमारें ३–३½ टक्के पडतें.

● **करंट अकाउन्टः**—दररोजच्या बाकीवर रु. १०० पासून रु. २५००० पर्यंत समासदांना १ व इतरांना ॥ टक्का व्याज दिलें जातें. या खात्याबाबत अधिक माहिती ऑफिसांत मिळेल.

● **परगांवच्या हुंड्याः**—मुंबई इलाख्यांतील सर्व मुख्य शहरांतील हुंड्या, रेल्वे रसीट वगैरे वसुलीचें काम माफक कमिशन घेऊन केलें जातें. त्याप्रमाणेंच कोणत्याही मुख्य शहरीं पैसे ड्राफ्टनीं पाठविण्याची व्यवस्था केली जाते.

● **खरेदी-विकी खातेंः**—शेअर व सरकारी रोखे खरेदी–विक्रीचें काम कमिशन घेऊन केलें जातें.

● **इतर व्यवहारः**—कॅश क्रेडिट, ओव्हरड्राफ्ट, इतर बँकांप्रमाणें दिले जातात. त्याचप्रमाणें शेअर्स, इमारती, सोनें–चांदी यांच्या तारणावर कर्जें दिलीं जातात.

● **कामाच्या वेळाः**—लोकांच्या सोयीसाठी सकाळीं व संध्याकाळीं ठेवण्यांत आल्या आहेत.

★ **विशेष माहिती बँकेच्या ऑफिसांत मिळेल** ★

| | |
|---|---|
| ♣ मुख्य कचेरी | ♣ दादर सब् ऑफिस |
| **सारस्वत बँक बिल्डिंग,** | **बिस्मिल्ला बिल्डिंग, रानडे रोड,** |
| **गिरगांव, मुंबई ४.** | बी. बी. सी. आय. रेल्वेच्या दादर स्टेशनसमोर |

---

**संपत्ति व आरोग्य हेंच सुखाचें साधन ! हें रसशाळेचे शेअर्स व औषधें घेण्यानें मिळतें.**




## अभिनंदनीय प्रगति

पहिल्याच वर्षी प्रेफरन्स शेअरवर ५% डिव्हिडंड देऊनही यंदा ऑर्डिनरी शेअरवर

| ऑर्डिनरी शेअर रु. | ७% डिव्हिडंड जाहीर केलें आहे. | प्रेफरन्स शेअर रु. |
|---|---|---|
| २५ | ═══ | १०० |

पैकीं नियमाप्रमाणें ३॥ टक्के आयुर्वेदीय उच्च शिक्षणास देणगीदाखल देऊन भागीदारास ३॥ टक्के नफा झाला.

**—पैसे गुंतविण्यास उत्तम संधि—**

प्रॉस्पेक्टससाठीं लिहा—

केंद्रें :

मुंबई–नागपूर–अमरावती–पुणें–हुबळी–सांगली–कोल्हापूर–वगैरे

**आमच्या सर्व ग्राहकांस व हितचिंतकांस दिपवाळी आनंदाची जावो !**

# आयुर्वेद रसशाळा पुणें लि., पुणें ४.

# नफा आणि तो धर्मादाय?

★ त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. अर्ध्याहून अधिक नफा धर्मादाय कार्यांत खर्च करणारा कारखाना म्हणून "आयुर्वेदाश्रम फार्मसी लि." प्रसिद्ध आहे. तो पैसा आयुर्वेद महाविद्यालय व धर्मार्थ दवाखाना ह्याप्रीत्यर्थ खर्चिला जातो. ह्या कारखान्याचीं औषधें व मुकुल तेल वापरण्यांत आपण स्वतःचा फायदा तर करून घेतांच; पण त्याबरोबरच परमार्थहि साधतां.

★ ★ ★ ★ ★

हीं बोधचिन्हांकित औषधें अल्पमोली आणि बहुगुणी असतात हा नेहमींचा अनुभव आहे.

## ★ही दिवाळी सर्वांना आनंदाची जावो.★

## आयुर्वेदाश्रम फार्मसी लि. अहमदनगर

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी लिमिटेड.

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें.**

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्हीं आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

**पदमजी पेपर मिल, मुंबई.**

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें,

अनेक प्रकारांचा व प्रतींचा

कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून

## तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें : : : : झेनिथ बिल्डिंग, सर फेरोजशा मेहता रोड, फोर्ट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ५ नोव्हेंबर, १९४१ अंक ४४

अर्थ ग्रन्थमाला—पुस्तक ४ थें

## सहकार

### ( हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

★

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### पुणें शहर म्युनिसिपॅलिटीचीं डिबेंचरें

पुणें शहर म्युनिसिपॅलिटीच्या ६३% व्याजाच्या डिबेंचरांची परतफेड ३१ जानेवारी, १९४२ रोजीं केली जाईल. त्या तारखेनंतर व्याजांत वाढ होणार नाहीं. ड्रेनेजच्या कर्जाची रकम रुपये ७७,९०० असून शहर सुधारणा योजनेचें कर्ज २,५८,००० रुपयांचें आहे.

### ट्रेझरी बिलांवर १० आ. ३ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आ. ३ पै पडला.

### एजंट जनरल

हिंदुस्थान सरकारचे अमेरिकेंतील एजंट जनरल म्हणून सर गिरिजाशंकर बाजपेय ह्यांची नेमणूक झालेली आहे, तिची मुदत ठरविण्यांत आलेली नाहीं.

### पाणबुड्या किती बुडविल्या !

अमेरिकेच्या नाविक दलानें किती जर्मन पाणबुड्या बुडविल्या, ह्याचे आकडे प्रसिद्ध न करण्याचें सरकारी धोरण कर्नल नॉक्स ह्यांनीं वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना नुकतेच समजावून सांगितलें. "ग्रेट ब्रिटन आज दीर्घकाळ युद्धांत गुंतलें आहे. तथापि, ब्रिटिश नाविक दलानें बुडविलेल्या जर्मन पाणबुड्यांचे आकडे त्यानें प्रसिद्ध केलेले नाहींत. ह्याचा अर्थ, बुडविलेल्या पाणबुड्यांची संख्या अल्प आहे, असा मात्र नव्हे. माहिती प्रसिद्ध न करणें हा धोरणाचा प्रश्न आहे."

### हिंदुस्थान सरकारच्या कचेऱ्यांचें गिर्यारोहण

हिंदुस्थान सरकारच्या कचेऱ्या उन्हाळ्यांत दिल्लीहून सिमल्यास जातात. तेथें जागेची व इमारतींची फार अडचण भासते. आतां तर कचेऱ्यांची संख्या वाढली आहे. तेव्हां, येत्या उन्हाळ्यापूर्वीं, सिमला येथें जागा मिळवून त्यावर कायम स्वरूपाच्या इमारती बांधण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे.

### समाधानकारक आरोग्य

ब्रिटिश जनतेच्या आरोग्याची अत्यंत समाधानकारक परिस्थिति युद्धाच्या दुसऱ्या वर्षांतहि कायम आहे.

### विमानांतून पेट्रोलची वहातूक

जर्मनी आपल्या पूर्व आघाडीवरील विमानदलास विमानांतून पेट्रोलची वहातूक करून पेट्रोल पुरवीत आहे, परंतु रशिया त्यांचा मोठ्या प्रमाणावर नाश करीत आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें २४ ऑक्टोबर अखेर संपलेल्या आठवड्यांत ११ कोटि, ६५ लक्ष रुपयांच्या ७६,७२९ चेक्सची देवघेव झाली.

### इराण व इंग्लंड आणि रशिया ह्यांचेमधील करार

एका बाजूस इराण व दुसऱ्या बाजूस इंग्लंड आणि रशिया ह्यांचेमधील करारावर लवकरच सह्या होतील, इंग्लंड व रशिया हे इराणला आर्थिक सहाय देतील, युद्ध-परिस्थिति निवळताच ते आपल्या फौजा इराणमधून काढून घेतील, इराणच्या पूर्ण स्वातंत्र्यास पुनः संमति देतील व इराणच्या हितसंबंधांस बाधक होईल अशी कोणतीहि अँग्लो-रशियन गोष्ट इराणला पूर्व सूचना दिल्यावेरीज घडणार नाहीं, अशी ते हमी देतील. इंग्लंड व रशिया ह्यांना इराण आपल्या देशांत वहातुकीच्या सर्व सवलती देईल.

### पॉवर अल्कोहोल

पेट्रोलमध्यें पॉवर अल्कोहोल मिसळून पेट्रोलची बचत करण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला आहे. अल्कोहोलमध्यें धूळ तात्काळ विरघळते, ह्याकरितां योग्य ती स्वच्छता पाळावी लागते. टाकींत पाणी बिलकूल जाऊं देतां कामा नये, कारण पाण्याच्या सान्निध्यांत पेट्रोल व अल्कोहोल स्वतंत्र होतात.

### हिंदी आगबोटींचीं नांवें

हिंदुस्थानांत आगबोटी बांधण्याचे कामास जोरानें प्रारंभ झाला आहे, व त्या चालविण्याकरितां नाविकहि तयार करण्यांत येत आहेत. एका प्रकारच्या आगबोटींस नद्यांचीं नांवें दिलीं जातील. सतलज, यमुना, नर्मदा, इत्यादि नांवें त्यासाठी मुक्रर करण्यांत आलीं आहेत. दुसऱ्या एका प्रकारच्या आगबोटींस पंजाब, रजपुताना, रेवर, कर्नाटक, औंध, आसाम, इत्यादि नांवें मिळतील. कांहीं हिंदी संस्थानिकांनीं मोठाल्या देणग्या दिल्या आहेत, त्याची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्रावणकोर, बडोदा, हैद्राबाद, हीं नांवेंहि दिलीं जातील. आग्रा, पाटणा, लाहोर, कराची, पेशावर, कलकत्ता इत्यादि शहरांतील लोकांनीं मोठ्या देणग्या दिल्या, ह्यासाठी त्या शहरांचीं नांवेंहि कांहीं आगबोटींस मिळतील. बडोदा नांवाची बोट कलकत्ता बंदरांतून नुकतीच तयार होऊन बाहेर पडली, तिला लेडी रसेल ह्यांनीं निरोप दिला.

### शिंया स्टीम नॅव्हिगेशन कं. लि.

३० जून, १९४१ अखेर संपलेल्या वर्षीं ९९ हजारांचा मागील शिलकी नफा धरून, २१ लक्ष, ४८ हजार रुपये नफा-वाटणीसाठीं उरले, त्यांतून भागीदारांस प्रत्येक भागावर प्राप्तीवरील करमाफ १ रुपया ह्याप्रमाणें डिव्हिडंड देण्यासाठी १४ लक्ष, ८४ हजार रुपये लागले. फेब्रुवारी, १९४० मध्यें काढलेले नवे ५ लक्ष भागहि डिव्हिडंडला पात्र आहेत.

### रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर, सर मणिलाल नानावटी, हे सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे जागीं बँकेच्या सेंट्रल बोर्डाचे सेक्रेटरी श्री. सी. डी. देशमुख, आय. सी. एस. ह्यांची नेमणूक होण्याचा संभव आहे.

### "वॅगन्स फिरत्या ठेवा"

बिहार आणि बंगाल येथील कोळशाच्या खाणींतून निघणाऱ्या कोळशाच्या उठावासाठी रेल्वेजनीं नेहमीपेक्षा अधिक वॅगन्स पुरविल्या तरी त्या कमी पडत आहेत. ह्याचें मुख्य कारण, ठिकठिकाणीं स्थापन होत असलेल्या कारखान्यांतून कोळशाचा होणारा वाढता उठाव हें होय. रेल्वेजना इतर मालाच्या वहातुकीसाठीहि आतां जास्त वॅगन्स लागतात. ऑगस्ट १९४१ मध्यें ईस्ट इंडियन रेल्वे आणि बेंगॉल नागपूर रेल्वे ह्यांनीं कोळसा भरण्यासाठी ९५,३३८ वॅगन्स पुरविल्या; १९४० च्या ऑगस्टमध्यें त्याकरितां ८५,०३० वॅगन्स देण्यांत आल्या होत्या. रेल्वेजनीं कोळशाच्या आपल्या स्वतःच्या साठवणीची अडचण सोसूनहि ह्या वॅगन्स पुरविल्या. रेल्वेजवरील वाहतूक वाढली असल्यामुळें त्यांसहि अधिक कोळसा लागू लागला आहे.

### डालमिया सिमेंट लि.

वरील कंपनीनें १९४० मध्यें एकूण ५६ लक्ष रुपयांचें सिमेंट विकलें. म्हणजे, १९३९ च्या मानानें विक्रींत ५१% वाढ झाली.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... ५५४ |
| २ जर्मनीचें आव्हान अमेरिकेनें स्वीकारलें | ... ५५५ |
| ३ एक्स-डिव्हिडंड | ... ५५६ |
| ४ सोयाबीन | ... ५५६ |
| ५ स्फुट विचार | ... ५५७ |
| रणांगणांवरील हालचाली—आंतरराष्ट्रीय कामगार संघटन—हिंदी साखरेच्या निर्गतीवर नियंत्रण—नियंत्रक कराराची मुदत वाढवूं नका—मद्री तांदुळाची निर्गत | |
| ६ कागदी चलन | ... ५५९ |
| ७ सहकारी संस्थांचा संवीरपणा | ... ५६० |
| ८ महावीर को. बँक लि. | ५६० |
| ९ हिंदी आयुर्विमा कंपन्या | ५६१ |
| १० वसंत इं. कंपनी | ... ५६१ |
| ११ हिंदी साखरेच्या धंद्याची वाढ | ... ५६१ |
| १२ निवडक बाजारभाव | ... ५६२ |


# अर्थ

बुधवार, ता. ५ नोव्हेंबर, १९४१

## जर्मनीचें आव्हान अमेरिकेनें स्वीकारलें

अमेरिकन खंडाचें आणि त्याच्या बरोबर इतर राष्ट्रांचें स्वातंत्र्य हिटलरशाहीपासून सुरक्षित राखण्यासाठी जर्मनीविरुद्ध निकरानें लढणाऱ्या इंग्लंडला व रशियाला पूर्ण युद्धसहाय देण्याची आवश्यकता प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं आजपर्यंत अनेक वेळां स्पष्ट शब्दांत व्यक्त केली आहे. तथापि, आरमार-दिनाच्या संबंधांत झालेल्या खान्याचे प्रसंगीं गेल्या आठवड्यांत त्यांनीं भाषण केलें तें चालू युद्धाच्या भवितव्याचे दृष्टीनें अत्यंत महत्वाचें आणि परिणामकारक असें समजलें पाहिजे. अमेरिकेचीं व्यापारी जहाजें निर्धास्तपणानें अटलांटिक व पॅसिफिक महासागरांत संचार करूं शकलीं पाहिजेत आणि त्यांवर जर्मनीनें हल्ला केल्यास ठोशास ठोसा ह्या नात्यानें अमेरिकेनें त्याचा समाचार घेतला पाहिजे हें आपलें मत त्यांनीं ह्यापूर्वीच पुढें मांडलें होतें. अलीकडे जर्मनीनें कांहीं अमेरिकन व्यापारी जहाजें बुडवून प्रतिकार करण्यास रूझव्हेल्ट ह्यांस जणूं काय आव्हानच दिलें होतें. तें आतां स्वीकारण्यांत आलें असून अमेरिकन राष्ट्र युद्धास सज्ज झालें आहे असें समजण्यास हरकत नाहीं. अमेरिकन जहाजांवर जर्मनीनें केलेल्या हल्ल्यास उद्देशून प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं वर उल्लेखिलेल्या भाषणांत खालील उद्गार काढले:—" आम्हीं स्वतः गोळीबार करण्याचें आतांपर्यंत टाळलें आहे; पण गोळीबारास प्रारंभ झाला आहे. प्रथम गोळीबार कोणी केला हें आतां इतिहास-प्रसिद्ध झालें आहे. परंतु शेवटची गोळी कोण झाडतो हीच गोष्ट वस्तुतः महत्वाची आहे. " ह्याचा आशय स्पष्ट आहे. जर्मनीनें आगळीक करून अमेरिकेविरुद्ध शस्त्र उचललें आहे आणि त्याचा समाचार घेतल्यावांचून आपणांस गत्यंतर नाहीं असें त्यांचें उघड म्हणणें आहे. अमेरिकेच्या बिनलढाऊ जहाजावरचा जर्मन हल्ला हा अमेरिकन राष्ट्रावर व जनतेवर केलेला आघात आहे. असल्या अत्याचारानें अमेरिकन राष्ट्रास भिवविण्याचा हिटलरचा उद्देश आहे पण तो निष्फळ आहे असें त्यांनीं निक्षून सांगितलें. जर्मनीच्या हल्ल्यास बिचकून त्यावर प्रत्याघात करावयाचा नाहीं असें म्हटल्यास अमेरिकन खंडांतील राष्ट्रांचीं जहाजें त्यांच्या बंदरांत डांबून ठेवावी लागून हिटलरच्या आज्ञेस अनुसरून घातलेल्या सीमेच्या आंतच त्यांस वावरावें लागेल. अमेरिकन खंडाचा स्वार्थ व स्वाभिमान ह्यांस असलें भेकडपणाचें वर्तन विघातक असल्यानें आपलें राष्ट्र तें पत्करणें शक्य नाहीं असें म्हणून समुद्रांवर वावरण्याच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं पुन्हां केला.

सबंध जगास जिंकून स्वतःच्या सत्तेचें जूं त्याच्या मानेवर ठेवण्याचा हिटलरचा बेत आहे, त्यासंबंधांत प्रेसिडेंटांनीं दोन विस्मयजनक गोष्टींचा उल्लेख केला. नवीन जागतिक घटना बनवणाऱ्या नात्सींनीं बर्लिनमध्यें तयार केलेला अमेरिकन खंडाच्या पुनर्रचनेचा नकाशा आपणांस मिळाला असून त्यांत अमेरिकन राष्ट्रांचे जर्मन सत्तेखालीं होणारे पांच गट दाखवण्यांत आलेले आहेत असें त्यांनीं सांगितलें. पनामा देश आणि पनामा कालवा ह्यांवर जर्मनीचें वर्चस्व स्थापन होऊन सबंध अमेरिकन खंडाच्या स्वातंत्र्याचा बळी घेण्याची हिटलरी कंपूची कशी गुप्त योजना आहे हें वरील नकाशावरून सिद्ध होत आहे अशी माहितीहि त्यांनीं दिली. हिटलरची दुसरी योजना जगांतील सर्व धर्म नष्ट करण्याबाबतची आहे. हिटलरचें "माझी लढाई" हें पुस्तक जगाचा धर्मग्रंथ बनवावयाचा आणि स्वस्तिक व नागवी तरवार हीं हिटलरी धर्माचीं चिन्हें व्हावयाचीं हें त्या योजनेचें सार आहे. ह्या प्रकारच्या जगाच्या विजयाविषयींच्या नात्सींच्या कल्पनांवर कांहीं अमेरिकन लोकांचा कदाचित् विश्वास बसावयाचा नाहीं आणि अमेरिकन जनतेमध्यें असलेल्या फुटीचें तें लक्षण आहे असें जर्मनी म्हणेल ह्या विषयीं सावधगिरीची सूचना प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं केली.

अमेरिकेनें प्रस्तुत युद्धाच्या भानगडींत पडूं नये असें म्हणणारांचा एक लहानसा गट आपल्या देशांत आहे. तथापि बहुसंख्य अमेरिकन लोकांस स्वतःच्या स्वातंत्र्यावर येऊं पहात असलेल्या संकटाची जाणीव असून त्याच्या रक्षणासाठीं इंग्लंड व रशिया ह्यांस युद्धसहाय वाढत्या प्रमाणांत देण्याचें महत्व त्यांस पटलेलें आहे. शत्रूचें जहाज कोठेंहि दिसलें कीं त्यावर हल्ला चढवण्याचा हुकूम अमेरिकन आरमारास देण्यांत आला असून, त्याची अंमलबजावणी होईल ह्या विषयींचा निर्धार प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं जाहीर केला आहे. व्यापारी जहाजांवर तोफा डागण्यास परवानगी अमेरिकन कॉंग्रेसनें तटस्थपणाच्या कायद्यांत दुरुस्ती करून दिली आहे तिचा उपयोग जर्मन हल्ल्यांचा प्रतिकार करण्याकडे आतां व्हावयाचा आहे. अमेरिकेंत युद्धसामुग्रीचा पुरवठा वाढत असून ह्या राष्ट्राच्या लढाऊ सामर्थ्याचा विस्तार होत चालला आहे. हिटलरशाहीचा नाश होण्याचें अगत्य एकदा पटलें कीं तिच्याशीं झगडणारांस सहाय देण्याचें महत्व सिद्ध झालेंच. अमेरिकन राष्ट्राची लढाऊ वृत्ति लोपली आहे, ही जर्मनीनें सहेतुक पसरवलेली कल्पना किती असत्य आहे हें दाखवण्याचा प्रसंग आतां आला असून हिटलरचें युद्धाचें आव्हान स्वीकारण्यांत आलें आहे असें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं जाहीर केलें. त्यांच्या ह्या परिणामकारक घोषणेनें नात्सींचीं मनें अस्वस्थ होऊन ते प्रेसिडेंटांवर दांत-ओठ खाऊं लागले असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. मागील महायुद्धांत अमेरिकेचें सहायच अखेर निर्णायक ठरलें आणि जर्मनीचा पाडाव होण्यास मुख्यत्वेंकरून कारणीभूत झालें ह्याची आठवण मि. रूझव्हेल्ट यांनीं करून दिली आहे आणि त्या गोष्टीचें विस्मरण जर्मन पुढाऱ्यांसहि होणें अशक्य आहे. अमेरिकन राष्ट्राच्या नवीन धडाडीच्या धोरणानें रशिया व इंग्लंड ह्यांचा उत्साह वृद्धिंगत होईल आणि जर्मनीमध्यें निराशेचें वातावरण पसरण्यास त्याचें सहाय होईल ह्यांत संशय नाहीं.

---

## भागांच्या किंमतीपुढें 'एक्स-डिव्हिडंड' असें केव्हां लिहितात?

कंपन्यांच्या भागांची किंमत छापतात, त्या वेळीं अनेक ठिकाणीं एक्स-डिव्हिडंड असे शब्द आढळतात. त्यांचा अर्थ काय? भागांची खरेदी-विक्री एकसारखी चालू असते, तेव्हां डिव्हिडंड कोणास मिळावयाचें हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. डिव्हिडंड जाहीर करण्याचे वेळीं जो भाग धारण करीत असेल, त्यास डिव्हिडंड मिळावें, असा नियम असता तर फार सोय झाली असती. मग त्यानें मागून भाग विकला तरी हरकत नाहीं. तथापि, डिव्हिडंड जाहीर झाल्यानंतर कांहीं काळपर्यंत भागीदाराजवळ भाग राहिला व नंतर त्यानें तो विकला, तरी मूळ मालकास डिव्हिडंड मिळेलच, असें नाहीं. स्टॉक एक्सचेंजवर भाग एक्स–डिव्हिडंड झाला, असें जाहीर करण्यांत आलें, म्हणजेच भागाच्या डिव्हिडंड-वरील मालकीची कालमर्यादा निश्चित झाली, असें समजावें. हें जाहीर होण्यापूर्वी एकाद्यानें भाग विकला, तर खरेदीदारास डिव्हिडंड मिळतें. तसेंच, भाग एक्स-डिव्हिडंड म्हणून जाहीर होण्यापूर्वी एकाद्यानें तो खरेदी केला, तर त्यास डिव्हिडंड मिळतें.

समजा, एकाद्या कंपनीचें वर्ष जून अखेर संपतें. त्यानंतर कंपनी नोटीस देऊन आपल्या भागांच्या तबदिलीचें काम कांहीं दिवस बंद ठेवते. ह्या मुदतींत भागांची खरेदी विक्री चालूच असते, परंतु कंपनीच्या दप्तरांत त्याची नोंद केली जात नाहीं. एकाद्यानें आपला भाग विकला तर डिव्हिडंड देण्यास सोईचें पडावें ह्याकरितां कंपनी भाग विकणारासच भागीदार समजेल व त्यास डिव्हिडंड देईल. कंपनीचे डायरेक्टर नफ्यांतून कांहीं टक्के दरानें डिव्हिडंड देण्यांत यावें असें सुचवितात आणि ही सूचना भागीदारांच्या सभेनें मान्य केली, म्हणजे डिव्हिडंड मंजूर होतें. ह्या मंजुरीचे तारखेनंतर स्टॉक एक्स्चेंजचा सेटलमेंटचा दिवस येईल त्या दिवशीं भाग एक्स–डिव्हिडंड म्हणून जाहीर होईल. त्यापूर्वी डिव्हिडंड प्रत्यक्ष दिलें जात नाहा. एकाद्या भागीदारानें आपला भाग तो एक्स-डिव्हिडंड होण्यापूर्वी विकला असला तर आधी सांगितल्याप्रमाणें डिव्हिडंडवर खरेदीदाराचा अधिकार पोचतो तेव्हां भागाच्या मूळ मालकास डिव्हिडंड वॉरंट मिळालें तरी दलालामार्फत हें त्यांस खरेदीदाराकडे पोंचतें करावें लागतें.

भाग एक्स-डिव्हिडंड झाला म्हणजे त्याची किंमत एकदम खाली येते; कारण भाग खरेदी करणारास त्यानंतर डिव्हिडंड मिळूं शकत नाहीं. समजा, कंपनीनें १२% दरानें डिव्हिडंड जाहीर केलें आहे. त्या कंपनीच्या १०० रुपयांच्या भागाची बाजारांतील किंमत तो एक्स-डिव्हिडंड होण्यापूर्वी ३०० रुपये असली, तर तो भाग एक्स-डिव्हिडंड होतां क्षणीच ती २८८ रुपये होईल. नंतर हळुहळु पुढील डिव्हिडंडची तारीख जवळ जवळ येऊं लागेल व भागाच्या किंमतींत डिव्हिडंडच्या अधिकाराची भर पडून त्याची किंमत चढूं लागेल. बारा महिन्यांत त्या भागास १२% डिव्हिडंड मिळणार असें गृहीत धरलें तर सहा महिन्यांनीं त्या भागावर ६% डिव्हिडंड चढेल असा हिशेब होतो. म्हणजे भागाची किंमत त्या मानानें वाढेल. प्रत्यक्ष डिव्हिडंड जाहीर होऊन तें हातीं येण्यास अर्थातच कांहीं काळ लागेल, हें उघड आहे. अशा रीतीनें भागाची किंमत वाढत जाऊन, भाग एक्स-डिव्हिडंड होईपर्यंत ती पुनः ३०० रुपये होईल. अर्थात, भागाच्या बाजारभावावर इतर कोणत्याहि कारणाचा परिणाम होत नाहीं, हें समजूनच वरील हिशेब केला आहे. भाग एक्स-डिव्हिडंड होण्यापूर्वी तो कम-डिव्हिडंड असतो, म्हणजे भाग धारण करणारास त्यावरील डिव्हिडंडचा अधिकार पोचत असतो. वरील विवेचनाचा भागांच्या एक्स-डिव्हिडंड किंमतींचा अर्थ समजण्यास सहाय होईल.

ज्या कंपन्यांच्या भागांची स्टॉक एक्सचेंजवर खरेदी विक्री होत नाहीं अशा भागांचे बाबतींत एक्स-डिव्हिडंड व कम-डिव्हिडंड ह्यांचा अर्थ थोडा मर्यादित होतो. तबदिलीचें काम बंद ठेवल्यानंतर ठराविक दिवशीं जीं नांवें भागीदारांचे पटावर असतील, त्यांसच डिव्हिडंड मिळूं शकतें; स्टॉक एक्सचेंजनें भाग एक्स-डिव्हिडंड म्हणून जाहीर करण्याचा येथें प्रश्न उपस्थित होत नाहीं. डिव्हिडंड जाहीर होण्याची तारीख व त्यानंतरच्या शेअर बाजारांतील सेटलमेंटच्या दिवसाची तारीख ह्यांचेमधील मुदतींतच एक्स-डिव्हिडंड व कम-डिव्हिडंड ह्यांचें महत्त्व असतें, हें उघड आहे.

---

## सोयाबीन

सोयाबीनचें झाड हें घेवड्याच्या जातीचें आहे. सोयाबिनपासून सुमारें ५० जिन्नस बनवितां येतात. कृत्रिम कॉफी, कृत्रिम दुध, इत्यादि खाद्य पदार्थ तर त्यापासून होऊं शकतातच परंतु साबण, रंग, रबरी पदार्थ, ग्लिसरिन, इत्यादिहि त्यापासून तयार होतात. मँच्युक्युओ, मोंगोलिआ, कोरिआ व जपान हीं सोयाबीनच्या उत्पादनाचीं प्रमुख केंद्रें आहेत. अमेरिकेंतहि त्याची लागवड वाढत आहे. जागतिक उत्पादनापैकीं ३०% ते ३५% उत्पादन एकट्या मँच्युक्युओमध्येंच होतें. जर्मनी हें सोयाबीनचें मोठें गिऱ्हाइक होतें. सोयाबीनचा खाद्य पदार्थासाठी फार मोठ्या प्रमाणांत उपयोग करण्याचा जर्मनीचा प्रयत्न आहे. हिंदी लोकांच्या अन्नांत प्रोटीन्सचा तुटवडा आहे, तो भरून काढण्याकरितां सोयाबीन्सचा प्रसार करण्याचा यत्न चालू आहे. तथापि, सोयाबीनला अद्याप फारशी मागणी येत नाहीं. जपानी व चिनी सैनिकांचे अन्नांत सोयाबीन्सचा समावेश केलेला असतो. कांहींच्या मतें सोयाबीन्समध्यें अन्नसत्त्वें मुबलक प्रमाणांत आहेत, तर कांहींच्या मतें तूर, उडीद, मूग इत्यादींपेक्षां सोयाबीन्स अधिक पौष्टिक नाहीं. सोयाबीन्सचा वास कित्येकांस आवडणार नाहीं. हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं सोयाबीन्सच्या लागवडीचे प्रयोग करण्यांत आलेले आहेत. बहुतेक प्रकारच्या मातींत त्याची लागवड होऊं शकते. सुमारें ६ इंच खोल नांगरणी त्यास पुरते. दर एकरी ८ ते १० गाड्या शेणखत घालावें. सोयाबीन हें खरीपाचें पीक आहे, म्हणजे त्याची लागवड जून-जुलैमध्यें करतात. दर एकरी २० ते ३० पौंड बीं लागतें. दोन फुटांच्या रांगांत त्याची पेरणी करावी व प्रत्येक दोन बियांत ३ ते १२ इंच अंतर राखावें. बीं जमिनींत २ इंच पुरावें. पावसावर तें रुजतें व वाढतें. डिसेंबर–जानेवारींत तें पिकतें; दरएकरीं ५०० ते १,००० पौंडांचें उत्पादन होतें. हिंदुस्थानांत सोयाबीनला मागणी नाहीं व त्याची निर्गत करावयाची म्हणजे लागवड मोठ्या प्रमाणावर केली पाहिजे. किंमत आकर्षक येण्यावरच हा उपक्रम अवलंबून रहाणार, हें उघड आहे.

---

# स्फुट विचार

## रणांगणांवरील हालचाली

मॉस्को ही राजधानी व पूर्व युक्रेनमधील औद्योगिक क्षेत्र ह्यांचेवर जर्मन सैन्यांनीं सध्या गर्दी केली आहे. क्रायमियाचें द्वीपकल्प व अझोफ समुद्र ह्यांचेवर ताबा मिळवून रशियन फौजांस पूर्वेकडे रेटीत नेण्याचें त्यांचें धोरण आहे. ह्या दक्षिणेकडील रणक्षेत्रांत शत्रु जबरदस्त हानि सोसून मुंगीच्या पावलानें पुढें जात आहे ही गोष्ट मॉस्कोच्या प्रसिद्धी खात्यानें कबूल केली आहे. शत्रूचें भयंकर नुकसान झाल्यावांचून त्यास एक पाउलहि पुढें टाकूं द्यावयाचें नाहीं आणि आपल्या सैन्यांची फळी फुटूं न देतां सावधगिरीनें नाइलाज होईल तितकाच पाय मागें घ्यावयाचा हें रशियन लष्करी अधिकाऱ्यांचें धोरण आहे. रशियन सैन्यें पळून मागें जात असतां त्यांची आम्हीं दाणादाण करून टाकली आहे अशा बढाया हिटलरच्या गोटांतून आजपर्यंत अनेकवेळां बाहेर आल्या आहेत. परंतु प्रत्येक प्रसंगीं रशियन सैन्यांनीं शिस्तीनें आपली जूट कायम ठेवल्याचें आढळून आलें आहे. तोच अनुभव ॲनेट्झच्या बाजूस येत आहे आणि येणार आहे. रशियन मुत्सद्दी पूर्व रशियाच्या बाजूस आपल्या सैन्याची नवी आघाडी तयार करीत आहे आणि टिमोशेंको ह्या प्रसिद्ध व हुषार सेनानीकडे तें लष्करी घटनेचें काम सोपवण्यांत आलें आहे. लढाऊ सामानाच्या बनावटीचे कारखाने पूर्व रशियांत चालू करण्यांत आले असून पांगलेल्या, दमलेल्या व दुर्बल झालेल्या जर्मन सैन्यास पुनर्घटित रशियन फौजेशीं ह्यापुढें लढावें लागणार आहे. हिटलरच्या वल्गनेप्रमाणें मॉस्कोची लढाई गेल्या महिन्यांतच पुरी व्हावयास पाहिजे होती. परंतु त्या बाजूच्या रणांगणावर रशियन सैन्य विलक्षण करारीपणानें लढत असून हिटलर तें शहर घेण्याची शिकस्त करीत असतां त्याची फौज मेटाकुटीस आली आहे. अमेरिका व इंग्लंड हीं राष्ट्रें हरतऱ्हेचे यत्न करून रशियास युद्धसामुग्री पोचवीत आहेत. पश्चिम जर्मनीवर ब्रिटिश विमानदलाचे हल्ले प्रत्यहि चालले आहेत आणि जर्मनीचीं जहाजें बुडवण्यांत येत आहेत. सबंद युरोपांत जर्मनीच्या विरुद्ध असंतोष जोरानें पसरत आहे. ह्या गोष्टींचाहि परिणाम रशियांतील लढायांवर झाल्यावांचून रहाणें अशक्य आहे.

## आंतरराष्ट्रीय कामगार संघटन

गेल्या महायुद्धानंतर पुनर्घटना झाली तेव्हां जागतिक महत्वाचे प्रश्न सामोपचारानें व शांततेनें सोडवण्याच्या हेतूनें राष्ट्र-संघ स्थापन करण्यांत आला. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आर्थिक घटनेंत कामगार वर्गाचें असलेलें महत्व लक्षांत घेऊन त्या स्थापनेंत पुढाकार घेणाऱ्या मुत्सद्यांनीं आंतरराष्ट्रीय कामगार संघटनहि निर्माण केलें. ह्या संस्थेनें कामगारांची आर्थिक स्थिति सुधारण्याचे बाबतींत आजपर्यंत उपयुक्त कार्य केलें आहे. राष्ट्रसंघाचें काम युद्धामुळें व त्याचे अनेक सभासद त्यांतून फुटून निघाल्याकारणानें अत्यंत मर्यादित झालें असलें तरी आंतरराष्ट्रीय कामगार संस्थेचें कार्य चालू राहिलें आहे. जर्मनी, इटली वगैरे राष्ट्रांचे प्रतिनिधी तीमध्यें अर्थातच असणें शक्य नाहीं पण इतर राष्ट्रांनीं युद्धपरिस्थितींतहि तिच्या कामाची हेळसांड केलेली नाहीं. जर्मनीसारख्या देशांत व्यक्ति-स्वातंत्र्य समूळ नष्ट झालें असल्यानें त्यांतील कामगार वर्गाच्या हितसंबंधाचें रक्षण होण्याचा तेथें प्रश्नच नाहीं. पण लोकशाहीच्या तत्वावर ज्यांची श्रद्धा आहे अशा राष्ट्रांतील कामगार वर्ग आपल्या सरकारांशीं युद्धाचे संबंधांत पूर्ण सहकार्य करीत आहे. उद्योगधंद्यांच्या व्यवस्थेंत युद्ध परिस्थितीमुळें महत्वाचे फेरफार झाले असून त्यांच्यावर सरकारी नियंत्रण अपरिहार्य झालें आहे. मजूरीचे दर, कामाचे तास इत्यादि बाबतींत हें नियंत्रण अमलांत येत आहे. तथापि, त्यांतहि कारखानदार व कामकरी ह्यांचें सहकार्य सरकारास मिळत आहे. अनेक वर्षें चळवळ करून संघटित कामगार वर्गानें मिळवलेल्या हक्कास बाध येणार नाहीं, अशा रीतीनें हें सहकार्य होत आहे. युद्धोत्तर होणाऱ्या आर्थिक पुनर्घटनेमध्यें युद्ध-परिस्थितीच्या अनुभवाचे महत्त्वाचे परिणाम सरकार, कारखानदार व कामकरी ह्यांच्या परस्पर-संबंधांवर झाल्यावांचून रहावयाचे नाहींत. आंतरराष्ट्रीय कामगार संस्थेची परिषद् अमेरिकेंत न्यूयॉर्क येथें नुकतीच भरली होती, तीमधील चर्चेंत ह्या महत्वाच्या प्रश्नाची चर्चा होणें सहाजिकच होतें. भावी आर्थिक पुनर्घटनेंत कामगार वर्गास योग्य स्थान कसें मिळेल हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. प्रस्तुत युद्धांत कारखान्यांत खपणाऱ्या कामगारांनीं रणक्षेत्रांत लढणाऱ्या सैनिकांप्रमाणेंच स्वार्थत्याग चालवला आहे. लोकशाहीच्या विजयांतच त्यांचें हित आहे, ह्या भावनेनें ते कामें करीत असल्यानें युद्धोत्तर होणाऱ्या पुनर्घटनेंत त्यांच्या मतास मान मिळणें अगत्याचें आहे हें उघड आहे.

## हिंदी साखरेच्या निर्गतीवर नियंत्रण

लंडनमध्यें १९३७ चे प्रारंभीं एक आंतरराष्ट्रीय साखर परिषद् भरली होती. त्या परिषदेनें मान्य केलेल्या योजनेस अनुसरून, हिंदुस्थानास आपली साखर बाहेर पाठविण्यास सवड ठेवण्यांत आलेली नाहीं. ह्या परिषदेचे वेळीं हिंदुस्थान सरकारनें स्वकीय हितसंबंधी लोकांचा सल्ला घेण्याचा रिवाज पाळला नाहीं व ब्रह्मदेशाखेरीज इतर देशांकडे हिंदी साखर निर्गत होणार नाहीं हा निर्णय हिंदुस्थानाच्या वतीनें परिषदेंत मान्य करण्यांत आला. जाव्हासारख्या देशांस निर्गतीची परवानगी मिळाली, परंतु हिंदुस्थानास त्याबाबत निर्बंध स्वीकारणें प्राप्त झालें. जपाननें मात्र लंडनच्या परिषदेच्या निर्णयास मान्यता दिली नाहीं. ह्या निर्णयास अनुसरून पंचवार्षिक कराराचा एक मसुदा तयार करण्यांत आला, त्यावर हिंदुस्थानातर्फे सही करण्यांत आली. हिंदी मध्यवर्ती असेंब्लीनें ह्या करारास संमति देण्याचें नाकारलें, तथापि त्याचा उपयोग नव्हता. ह्या कराराची मुदत ३० एप्रिल, १९४२ रोजीं संपते.

## नियंत्रक कराराची मुदत वाढवूं नका

साखरेच्या निर्गतीवर हिंदुस्थान सरकारनें नियंत्रण स्वीकारलें, हें अयोग्य झालें तरी त्याचा व्यावहारिक परिणाम हिंदुस्थानास फारसा प्रतिकूल झाला नाहीं. १९३९ अखेरपर्यंत हिंदी साखरेचें उत्पादन अंतर्गत मागणीस पुरेसें पडण्याइतकेंहि नव्हतें. सहाजीकच, साखरेच्या निर्गतीचा प्रश्न महत्त्वाचा नव्हता. तथापि, साखरेचें हिंदुस्थानांतील उत्पादन आतां वाढलें असून शिल्लक उरणाऱ्या साखरेच्या उठावाचें काय करावयाचें, असा प्रश्न निर्माण झाला आहे. १९३९-४० सालाच्या मोसमाचे अखेर ४ ते ५ लक्ष टन साखर शिल्लक राहिली तरी १९४०-४१ मध्यें उत्पादन त्या मानानें कमी झालें नाहीं. सध्याच्या युद्धपरिस्थितीमुळें

१९३७ चा साखर करार नाममात्र राहिला आहे. करारावर सही करणारे कांहीं देश जर्मनीचे भक्षस्थानीं पडले आहेत, तर कांहीं देशांस ब्रिटिश साम्राज्याच्या हिताचे दृष्टीनें करारांतील आपल्या वाट्यापेक्षा अधिक साखर निर्गत करणें क्रमप्राप्त झालें आहे. सध्याची परिस्थिति हिंदी साखरेस परराष्ट्रीय बाजारपेठ मिळविण्यास अत्यंत सोईची आहे. मलाया, सिलोन, इराक, इराण इत्यादि आजूबाजूचीं राष्ट्रें व प्रत्यक्ष ग्रेट ब्रिटन इकडे हिंदी साखर खपवितां येणें शक्य आहे. हिंदी साखरेचा दर्जा आतां सुधारला असल्याकारणानें तिच्या उठावास अडचण येऊं नये. बदललेली परिस्थिति लक्षांत घेऊन, हिंदुस्थान सरकारनें कराराची मुदत संपण्याचे वेळीं योग्य तें धोरण स्वीकारावें व हिंदी साखरेस परराष्ट्रीय बाजारपेठ मोकळी करून द्यावी, ह्या दृष्टीनें आतांपासूनच हितसंबंधीं लोकांनीं प्रयत्न केला पाहिजे.

---

### ब्रह्मी तांदुळाची निर्गत

ब्रह्मदेशांतील येत्या वर्षाच्या तांदळाच्या सर्व पिकांची निर्गत करण्याचा अधिकार ब्रह्मी सरकार स्वतःकडे घेणार आहे, त्यामुळें ब्रह्मी तांदुळाची निर्गत करणाऱ्या त्या देशांतील हिंदी व्यापाऱ्यांचें अतोनात नुकसान होणार आहे. हिंदी व्यापाऱ्यांच्या ब्रह्मदेशांत सुमारें ५० तांदळाच्या गिरण्या आहेत व तेथील भाताच्या जमिनींत त्यांनीं सुमारें ६० कोटि रुपये गुंतविलेले आहेत. ब्रह्मदेशांतून निर्गत होणाऱ्या २८ लक्ष टन तांदळापैकीं निम्म्यापेक्षां अधिक तांदूळ एकट्या हिंदुस्थानांत खपतो, ह्यावरून ब्रह्मी सरकारच्या धोरणाचा हिंदुस्थानावर केवढा मोठा परिणाम होण्याचा संभव आहे ह्याची कल्पना येईल. सिलोनकडे दरसाल ५ लक्ष टन तांदूळ ब्रह्मदेशांतून जातो व त्याची निर्गत हिंदी व्यापाऱ्यांमार्फतच होत असते. ब्रह्मी सरकारनें तांदळाच्या निर्गतीची व्यवस्था पहाण्याकरितां एक खास अधिकारी नेमला आहे. ब्रह्मी सरकारच्या ह्या धोरणाचा तांदळाचे बाजारभावावर काय परिणाम होतो, हें लवकरच दिसून येईल.

---

### दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

वरील बँकेच्या व्यवहारास २९ ऑक्टोबर, १९३८ रोजीं प्रारंभ झाला. त्यावेळीं तिचें भरणा झालेलें भांडवल ५७ हजार रुपये होतें, तें आतां ९०½ हजार रुपये झालें आहे. बँकेकडे एकूण १ लक्ष, ८६ हजार रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें ९१ हजार रुपये रोख व इतर बँकांत ठेवले असून तिनें १ लक्ष, ६½ हजारांचीं कर्जें दिलीं आहेत. प्राथमिक खर्च खातीं ४,२७६ रुपये व ऑर्गनायझेशन खर्च खातीं २,९३७ रुपये आहेत. मागील शिलकी नफा ३७४ रुपये धरून वर्षअखेर (३१ ऑगस्ट, १९४१) बँकेस २,३१७ रुपये नफा झाला, त्यांतून ३९० रुपये रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले, १३५० रुपयांचा विनियोग ६% क्यु. प्रे. भागांस १९४० चें डिव्हिडंड देण्याकडे करण्यांत आला, २७६ रुपयांनीं प्राथमिक खर्चाची बाब कमी करण्यांत आली, नोकर वर्गास १२५ रुपये बोनस दिला व १७६ रुपये नफा पुढील हिशेबांत ओढण्याचा ठरलें. बँकेचें वर्ष डिसेंबरअखेर करण्यासाठी डिसेंबर, १९४१ अखेर आणखी एक रिपोर्ट भागिदारांस सादर करण्यांत येईल, असें समजतें. श्री. के. व्ही. केळकर, एम. ए., एलएल. बी. हे बँकेचे अध्यक्ष असून तपकिरीचे कारखानदार श्री. व्ही. व्ही. वर्तक हे उपाध्यक्ष आहेत. श्री. आर. बी. साळवेकर, बी. ए., एलएल. बी. आणि श्री. एन. एन. क्षीरसागर हे दोघे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. बँकेची वार्षिक सभा ता. २५-१०-४१ रोजीं भरली होती.


## * विमाक्षेत्रांतील 'कॉमनवेल्थ'चें अढळ स्थान *

### १९४० चें पूर्ण केलेलें काम........४५ लक्षांहून अधिक

**★ बोलका–ढलपा ★**

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८२,००० |
| सरकारी कर्जरोखे, गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१२,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.

**• कॉमनवेल्थचीं वैशिष्ट्यें •**

(१) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरूकता
(२) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
(३) काळजीपूर्वक काटकसरीची व्यवस्था
(४) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
(५) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

## कॉमनवेल्थ

### ॲशुअरन्स कंपनी लि., पुणें २.

—शाखा—

मुंबई–मद्रास–कलकत्ता–नाशिक–कराची–अहमदाबाद

एम्. एन्. भागवत, बी. ए.
ॲक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडेंट.

## निजाम संस्थानांतील कागदी चलन

### जनतेचा दृढ विश्वास

दूरवर्षी निजाम सरकारच्या कागदी चलनाचा प्रसार अव्याहत वाढत आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील चलनी नोटांप्रमाणें येथील कागदी चलनाच्या तारणासाठीं चांदीचीं नाणीं व हिंदुस्थान सरकारच्या 'सेक्युरिटीज्' यांमध्यें एक वेगळी गंगाजळी ठेव राखून ठेवण्यांत आली आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर सुरवातीच्या थोड्याच महिन्यांत जेव्हां पुष्कळ राष्ट्रांच्या कागदी चलनावर प्रतिकूल परिणाम झाला तेव्हां कागदी चलनाचें चांदीच्या नाण्यांत तावडतोब रूपान्तर करतां येत असल्यानें येथील जनतेचा या बाबतींत किती विश्वास आहे हें अतिशय स्पष्ट रीतीनें निदर्शनास आलें. युद्धाचा तात्काळ परिणाम असा झाला कीं, चांदी सांठवून ठेवण्याकडे जनतेची प्रवृत्ति होऊं लागली; कांहीं दिवस तर कागदी चलनाचें रूपान्तर करण्याविषयीं मोठ्या प्रमाणांत रुपयांची मागणी होऊं लागली अशा बातम्या येऊं लागल्या परंतु सरकारी खजिन्यांतून अशा मागणीप्रमाणें पूर्ण रोकड रकम देण्यांत आल्यानें थोड्याच अवधींत जनतेचा चलनी नोटांविषयीं पूर्वीसारखा पुन्हां संपूर्ण विश्वास बसला.

### १९३९-४० मधील कागदी चलनाचा प्रसार

१९३९-४० च्या अखेरीस नोटांचा ठोक प्रसार १६·३१ कोटि रुपयांपेक्षां थोडा जास्ती होता व नक्की प्रसार १५.२०कोटि रुपयांचा होता. ब्रिटिश हिंदुस्थानांतील चलनाच्या दृष्टीनें वरील आंकडे लोकसंख्येच्या मानानें चांगलेच अनुकूल आहेत व भावी काळांत अशीच सुधारणा चालू राहील अशी अपेक्षा आहे.

### दहा रुपयांच्या चलनी नोटा सर्वांत जास्ती लोकप्रिय

चलनामध्यें दहा रुपयांची नोट फारच लोकप्रिय झाली व प्रसारांत असलेल्या एकंदर नोटांपैकीं दहा रुपयांच्या नोटांचें प्रमाण शेंकडा ७४ होतें. शंभर रुपयांच्या नोटांचा नंबर दुसरा आला व या नोटांचे प्रमाण शेंकडा ८ होतें. सर्वांत कमी लोकप्रिय दिसत असलेल्या पांच रुपयांच्या नोटांची संख्या ७.६३ लाखापासून ते ८·९३ लाखापर्यंत वाढली. उलटपक्षी, बँका व सरकारी खजिने यांमध्यें चालत असलेल्या व्यवहारांत मोठ्या रकमा पाठविण्यास सोईस्कर साधन म्हणून मुख्यतः हजार ( १,००० ) रुपयांच्या नोटांचा उपयोग करण्यांत येत असतो.

### कागदी चलनाच्या तारण ठेवी

अहवालाच्या वर्षी कागदी चलनाच्या तारणासाठीं राखून ठेवलेल्या रकमेची छाननी केल्यास असें दिसून येतें कीं, १०·८४ कोटि रुपयांपेक्षां थोडी जास्ती रकम चांदीच्या नाण्यांत असून हिंदुस्थान सरकारच्या 'सेक्युरिटीज्'मध्यें गुंतविलेली रकम आणखी ५ ३१ कोट रुपये आहे. हैद्राबाद सरकारच्या साडेतीन टक्के व साडेपांच टक्के प्रॉमिसरी नोटांत १६ लाख रुपयांची ही लहान रकम गुंतविली आहे. हिंदुस्थान सरकारच्या 'सेक्युरिटीज्' मध्यें गुंतविलेल्या रकमेचें उत्पन्न अहवालाच्या वर्षी २३.९ लाख रुपये आलें.

---

### पशुवैद्यकीचे खात्यावर सरकारी खर्च

मुंबई सरकारनें पशुवैद्यकीचे खात्यावर १९४०-४१ सालीं ५ लक्ष, ८५ हजार रुपये खर्च केला. त्यापैकी ४ लक्ष, ३८ हजारांचा बोजा प्रांतिक तिजोरीवर पडला.

### पशुवैद्यकीचें सरकारी कॉलेज

मुंबई येथें पशुवैद्यकीचें सरकारी कॉलिज आहे, त्यांत सवाशे ते दीडशे विद्यार्थी असतात.

---


# THE AYURVEDA RASASHALA POONA LTD.

Karve Road, Deccan Gymkhana, Poona 4.

# NOTICE.

Notice is hereby given that the Sixth Annual General Meeting of the Share-holders of the Ayurveda Rasashala Poona Ltd. will be held at the Registered Office of the Company, Karve Road, Deccan Gymkhana, Poona 4, on Sunday the 23rd November 1941 at 5-30 P.M. (S. T.) to transact the following business :—

(1) To receive and adopt the Directors' Report, the audited and certified Balance Sheet and Profit and Loss Account for the period ending 31st May 1941.

(2) To sanction the declaration of a Dividend.

(3) To confirm the appointments of Messrs. (1) H. V. Tulpule, (2) V. V. Patankar, and (3) G. V. Salvekar as directors elected according to the Company's Article of Association No. 101.

(4) To elect Directors in the place of three directors *viz.* (1) Sheth Ramdas Kisandas, (2) Sjt. P. K. Shiralkar, (3) Sjt. G. V. Salvekar; they are eligible for re-election and are offering themselves for re-election.

(5) To appoint auditors for the current year and to fix their remuneration. Messrs. G. M. Oka & Co., Poona were the auditors for the last year, they offer themselves for re-election.

Nominations from Messrs. G. S. Abhyankar, Bombay; B. C. Abhyankar & Co., Bombay; and Maheshwar Gadre & Co., Nagpur have been received for the Auditor's post.

(6) To transact such other business as may be brought before the meeting by the consent of the Chairman.

The Transfer Books of the Company will remain closed from 7th to 23rd of November 1941 both days inclusive.

Poona, Dated 22-10-41 } By order of the Board of Directors,
R. S. MARATHE,
Secretary.

## सहकारी संस्थांचा खंबीरपणा

(ले. वा. चिं. भानु)

हूडसाहेबांचे खडे बोल:—मि. एच. एम. हूड हे मद्रास इलाख्याचे नेक नामदार गव्हर्नर साहेब यांचे हल्लीं सल्लागार आहेत. मद्रास इलाख्यांतील लँडमार्गेज बँकांची एक परिषद् ता. ४ जानेवारी १९४१ रोजीं मद्रास येथें भरविण्यांत आली होती. त्या प्रसंगीं हूडसाहेबांना प्रास्ताविक भाषण करण्यासाठी निमंत्रण देण्यांत आलें होतें. सहकारी चळवळीच्या प्रगतीचे दृष्टीनें त्यांचें सारेंच भाषण मोठें मननीय व विचारप्रवर्तक आहे. आपल्या मुंबई इलाख्यांतील मराठी वाचकांच्या साठी मी त्यांच्या भाषणांतून थोडासा भाग सारांशरूपानें माझ्या शब्दांत देतों.

*    *    *    *

ते म्हणाले, "लँड मार्गेज बँकेनें कोणच्या व्याजाच्या दरानें कर्जें द्यावींत याबद्दल मी आपल्यापुढें एक विचारसरणी ठेवणार आहें. इ. स. १९२३ सालीं मीं मद्रासच्या सहकारी खात्याचा रजिस्ट्रार' म्हणून अधिकारसूत्रें हातीं घेतलीं तेव्हां व्यावहारिक दृष्टीनें फार महत्त्वाचे असे पुष्कळच प्रश्न येऊन पडलेले आहेत व त्यांचा निर्णय तितक्याच तत्परतेनें लावला पाहिजे असें माझ्या नजरेस ताबडतोब आलें. त्या प्रश्नांसंबंधानें व त्यांचेपासून होणाऱ्या फायद्यांची महति वर्णन करून सांगणारें गडगंज वाङ्मय घटकाभर बाजूला ठेवावें, तसेंच त्यांच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांची व त्यांच्या नैतिक अधिष्ठानाची चर्चा करण्याची ज्यांना हौस आहे त्यांच्याचसाठीं ते राखून ठेवावे असें मीं ठरविलें. सहकारी चळवळीचा जो काय इतिहास मला वाचायला मिळाला त्याचाही माझ्याच मताला पाठिंबा मिळाला आहे. सहकारी चळवळ ही बहुजन समाजाच्या बिकट व व्यावहारिक अडचणी दूर करण्यासाठींच निर्माण झालेली आहे. या चळवळीचा मूलभूत हेतु आर्थिक स्वरूपाचा होता व असावयास पाहिजे. सहकारी संस्थांबाबत निष्ठा व सहकारी कार्यापासून होणारे नैतिक परिणाम हे केव्हांही आरंभींचे हेतू नव्हते. ते मागाहून इष्टोत्पत्तीस आले. अर्थात् याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं सहकारी चळवळींतली निष्ठा किंवा नैतिक परिणाम यांचें महत्त्व मी कमी समजतों. परंतु सहकारापासून व्यावहारिक व आर्थिक स्वरूपाचे जे फायदे होतात त्यांचेकडे प्रथम लक्ष देणें जरूर आहे. या बाजूवर माझा जास्त कटाक्ष आहे. सरकारनेंहि तिकडे दुर्लक्ष करितां कामा नये. आर्थिक फायद्यामधूनच नैतिक उन्नतीचा उगम आहे. 'आधीं व्यवहार करावा नेटका' हेंच सहकारी चळवळीला यश देणारें धोरण. सहानुभूतिशून्य असल्याबद्दल कांहीं जण मजवर आरोप करितात. मी या आरोपाला पात्र नाहीं, निर्दोषी आहे, असें माझें म्हणणें आहे. दुसऱ्याच्या पैशावर धंदा करण्यास स्थापन केलेल्या सहकारी संस्थेनें प्रथम संस्थेचा पाया भक्कम करावा व धंदा व्यवहाराला धरून करावा असा मी आग्रह धरितों. याला कोणी सहानुभूतिशून्यता किंवा निष्ठुरता म्हटलें तर त्याच्या तोंडाला कोण हात लावणार ? सहकारी संस्थेपासून जास्तीत जास्त फायदे सतत व्हावे असें वाटत असेल तर ती संस्था प्रथम टिकाऊ कशी होईल इकडे सर्वांनीं लक्ष द्यावयास नको काय ? संस्थेला प्रत्यक्ष फायदा पदरांत कसा पडेल असाच व्यवहार तिनें केला पाहिजे. असा सतत फायदा होण्यास ती बँक कसल्याही हल्ल्यास टक्कर देण्यास समर्थ झाली असली पाहिजे. जनतेचा विश्वास संपादन करून कमी दरानें ठेवींचा ओघ असंडितपणें सुरू असणें हेंच बँकेच्या खंबीरपणाचें लक्षण आहे. लँड मॉर्गेज बँकांना तर हें धोरण अधिक काळजीपूर्वक लागू असलें पाहिजे. कारण शक्य तेवढ्या कमी व्याजानें शेतकरी वर्गाला विशेष लांब मुदतीनें कर्जें देणें हाच त्या बँकांचा आद्य हेतू आहे. शेतकऱ्यांना काय दरानें व्याज देणें परवडतें हा प्रश्न नसून कोणत्या दरानें कर्जें देणें बँकेस सततचें परवडेल हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे व त्याच दृष्टीनें तो सोडविला पाहिजे. शेतकऱ्यांना आजच्या घटकेस जेणें करून जास्तीत जास्त फायदा होईल या दृष्टीनेंच बँकेनें व्याजाचे दर कमी करावेत असें म्हणणारांचा एक वर्ग आहे. पण दुसऱ्याच्या भांडवलावर तिसऱ्यांची मात्र सोय करून देण्याचा आग्रह धरणाऱ्या दानशूर महात्म्यांच्या हातीं सहकारी चळवळीचीं सूत्रें एकदा कां गेलीं कीं चळवळीनें राम म्हटलाच म्हणून समजावें !"

*    *    *

मद्रास सरकारचे सल्लागार मे. हूडसाहेबांचा हा बहुमोल पण पुष्कळांना कर्णकटू वाटणारा सल्ला सध्याच्या घटकेला किती अर्थपूर्ण व सहकारी चळवळीच्या जिव्हाळ्याचा आहे, हें सहकारी बँकेंत कामें करणारांच्या व बँकेस भांडवलाचा पुरवठा करणाऱ्या ठेवीदारांच्या तेव्हांच लक्षांत येईल. हूडसाहेबांचा हा संदेश सहकार दिनाचे दिवशीं सर्वांनीं मनन करून स्वतः समजावून घ्यावा व इतरांस सांगावा इतकें त्याचें महत्त्व खास आहे.

---

### श्री. महावीर को. बँक लि., कोल्हापूर

३० जून, १९४१ असेर संपलेल्या ह्या वर्षीं बँकेचे पटावर ४४३ सभासद होते व त्यांचे भागांचे पोटीं २६,३२० रुपये जमा आहेत. बँकेच्या रिझर्व्हजची रक्कम ३,२९३ रुपये आहे. एकूण ठेवी १ लक्ष, ४४$\frac{३}{४}$ हजारांच्या आहेत. बँकेनें ५२$\frac{३}{४}$ हजार रुपये रोख व इतर बँकांत ठेवले असून १ लक्ष, २५$\frac{३}{४}$ हजार रुपये तिनें कर्जाऊ दिलेले आहेत. वर्षअखेर बँकेस ५,०२८ रुपये नफा झाला; त्यांत शिलक नफा २६६ रुपये मिळविला म्हणजे ५,२९४ रुपये होतात. त्यांतून १,२५७ रुपये रिझर्व्ह फंडांत, ८९१ रुपये इमारत फंडांत, ४४५ रुपये बॅड डेट फंडांत व २२३ रुपये डिव्हिडंड ई. फंडांत टाकून भागीदारांस ७$\frac{१}{२}$% दरानें डिव्हिडंड देण्याकडे १,७९५ रुपयांचा विनियोग करण्यांत आला. बँकेचा हा चौथ्या वर्षाचा वृत्तांत आहे. त्यावरून बँकेच्या प्रगतीची कल्पना येईल. सध्याच्या परिस्थितींत डिव्हडंडचा दर भागीदारांस आकर्षकच वाटेल. श्री. आप्पासाहेब बाबाजी लडगे बँकेचे अध्यक्ष असून श्री. बंडोपंत सुलताने हे मॅ. डायरेक्टर व श्री. बी. एन. गरगटे, बी. ए., एलएल. बी., हे सेक्रेटरी आहेत.

---

### पुणें जिल्ह्यांतील गुरांचीं इस्पितळें

पुणें जिल्ह्यांत गुरांचीं एकूण ७ इस्पितळें आहेत. त्यांत १९४०-४१ मध्यें एकूण १६,८१७ रोग्यांना औषधें देण्यांत आलीं. २,८४३ गुरें इस्पितळांत आलीं नव्हतीं, तरी त्यांस औषधें पुरविण्यांत आलीं. एकूण २,७३० जनावरें खचीं करण्यांत आलीं. इस्पितळांना १२,६१६ रुपये उत्पन्न झालें व त्यांचा खर्चहि तितकाच झाला.

## हिंदी आयुर्विमा कंपन्या

### १९४० मधील नवें काम

| कंपनी | रुपये |
|---|---|
| ओरिएंटल | ७,४८,८६,००० |
| हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह | २,८२,८६,८०० |
| नॅशनल इन्शुअरन्स | १,५६,५५,८०० |
| बॉंबे म्युच्युअल | १,५१,००,००० |
| भारत | १,५०,६७,८०० |
| न्यू इंडिया | १,४३,४४,७०० |
| एम्पायर ऑफ इंडिया | १,३१,८०,००० |
| बॉंबे लाइफ | १,२२,०७,६०० |
| युनायटेड इंडिया | ९८,२८,७०० |
| लक्ष्मी | ८२,६९,१०० |
| इंडस्ट्रिअल अँड प्रुडेन्शिअल | ८१,४१,५०० |
| जनरल ॲशुअरन्स | ६८,५३,८०० |
| वेस्टर्न इंडिया | ६६,५०,८०० |
| एशिअन | ६०,२०,००० |
| न्यू एशिॲटिक | ६०,१३,५०० |
| नॅशनल इंडियन | ४९,४१,५०० |
| कॉमनवेल्थ | ४६,६३,००० |
| इंडिया एक्विटेबल | ४४,५०,००० |
| बॉंबे को-ऑपरेटिव्ह | ४०,४२,००० |
| ईस्ट अँड वेस्ट | ४०,११,९७८ |
| इंडियन लाइफ | ३६,४०,५०० |
| आंध्र इन्शुअरन्स | ३३,१८,५०० |
| इंडियन म्यूच्युअल | ३१,४९,२०० |
| रुबी जनरल | ३०,६५,१०० |
| वॉर्डन | २७,८१,७०० |
| नेपच्यून | २१,७३,८०० |
| ज्युपिटर | २०,८६,००० |
| झेनिथ लाइफ | १९,८७,४०० |
| इंडियन मर्कंटाइल | १८,२१,२०० |
| एशिॲटिक ग. सि. | १७,१४,५०० |
| पपिल्स | १६,२२,६०० |
| युनिव्हर्सल फा. अँड ज. | ११,६२,००० |
| इंडियन ग्लोब | ११,५९,६०० |
| क्रीसन्ट | ११,१५,६०० |
| सेंटिनल | ९,६४,००० |
| कॅनरा म्युच्युअल | ८,००,४०० |
| पॉप्युलर | ६,४४,१०० |
| युनियन लाइफ (८० दिवसांचें काम) | ६,००,००० |
| ईस्टर्न फेडरल | ५,१२,००० |
| डिपॉझिटर्स बेनिफिट | ४,२७,००० |
| इंडियन प्रोग्रेसिव्ह | ३,६७,७०० |
| इंडियन इन्शुअरन्स | ३,६४,००० |

### वसंत इन्शुअरन्स कंपनी, लि.

वरील नांवाची आयुर्विमा कंपनी मुंबई येथें स्थापन झाली आहे. तिचे दिवाणबहादुर हिरालाल काजी हे अध्यक्ष आहेत. डायरेक्टर बोर्डांत शेठ कृष्णराज माधवजी दा. ठाकरसी, शेठ साकळचंद शहा, मि. एम. ए. फाझलभाई, रावसाहेब व्ही. सी. जाधव, श्री. व्ही. पी. वर्दे इत्यादि गृहस्थ असून श्री. अशोक हिरालाल काजी एम. एस्सी., हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. मि. के. बालसुब्रह्मण्यम् हे कंपनीचे ॲक्चुअरी आहेत. भागीदारांनीं निवडावयाच्या प्रत्येक डायरेक्टराचे नांवावर किमान ५ हजारांचे भाग असले पाहिजेत. श्री. अशोक काजी हे गणितज्ज्ञ असून दिल्ली येथील आय. सी. एस. च्या परीक्षेंत त्यांस गणित, आर्थिक इतिहास, आकडेशास्त्र व सर्वसाधारण माहिती ह्या विषयांत चांगले गुण मिळाले होते. त्यांची नेमणूक १५ वर्षांच्या कराराची असून त्यांस १००० रु.—१०० रु.—१,५०० रुपये ह्याप्रमाणें वेतन मिळावयाचें आहे. पहिल्या वर्षीं निम्में व दुसऱ्या वर्षीं एक चतुर्थांश वेतन ते सोडणार असून तीन वर्षें पगारवाढ घेणार नाहींत. नवीन कामावरील हप्त्याच्या उत्पन्नापैकीं ५% व चालू कामावरील हप्त्यांच्या उत्पन्नापैकी १¼% ह्या दरानें कमिशन त्यांस मिळावयाचें आहे. उत्पादकांस प्रमोशन फी मिळणार नाहीं. प्राथमिक खर्च १० हजार रुपयांवर जाणार नाहीं, अशी अपेक्षा आहे. आर. आर. नाबर आणि कंपनीनें, विक्रीस काढलेलें ३ लक्ष रुपयांचें भांडवल अंडरराइट केलें आहे.

---

### हिंदी साखरेच्या धंद्याची वाढ

| प्रांत | १९३१-३२ | ३३-३४ | ३५-३६ | ३७-३८ | ३९-४० |
|---|---|---|---|---|---|
| | कारखान्यांची संख्या | | | | |
| संयुक्त प्रांत | १४ | ५९ | ६७ | ६८ | ७२ |
| बिहार | १२ | ३३ | ३५ | ३३ | ३२ |
| पंजाब व सिंध | १ | ५ | ४ | ३ | ३ |
| मद्रास | २ | ४ | ८ | ८ | ७ |
| मुंबई | २ | ४ | ६ | ७ | ७ |
| बंगाल | ... | २ | ६ | ६ | ९ |
| ओरिसा | ... | ... | ... | २ | २ |
| हिंदी संस्थानें | ... | ४ | ९ | ९ | ११ |
| ब्रह्मदेश | १ | १ | २ | २ | २ |
| एकूण | ३२ | ११२ | १३७ | १३८ | १४५ |

---

### मध

मधाची उपयुक्तता लोकांना पटली, तर त्याचा प्रसार तावडतोब होईल. अमेरिकेंत प्रत्येक मनुष्य दरसाल सरासरीनें ४ शेर मध खातो. इंग्लंडमध्यें दरमाणशी खप पावशेरहि नाहीं. अमेरिकेंत मधाचा एवढा प्रसार होण्याचें कारण तेथील डॉक्टर लोकांनीं त्यास दिलेलें महत्त्व, हें होय. मधांतील साखर रक्तांत तात्काळ भिनते; उसांची साखर एकदम भिनूं शकत नाहींत. मधांतील साखर पचविण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. मधांत कोणतेच जंतु जगूं शकत नाहींत. मधांत जंतूंनीं प्रवेश करतांक्षणींच, त्यांचेमधील ओलावा मध शोषून घेतो; त्यामुळें जंतूंचा तावडतोब नाश होतो. शरीरास उपयुक्त अशीं द्रव्यें मधांत भरपूर आहेत.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | १११—४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३—४ |
| ३% (१९६३–६५) ... ... ... | ९५—१ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | ११०—० |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) ... .. | ११६—१२ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | १२७—४ |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १४७—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११८—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ९% ... | ५०—४ |
| इंपीरिअल बँक (५००) १२% ... ... | १६१७—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) १½ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०८–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १२% ... ... | १४६—० |
| कराची (१००) ९% ... ... ... | २०६—६ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २१२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १७००—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १७४०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर (१००) १½% ... ... | ९०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% ... | ८८८–८–० |
| तापी व्हॅली (५००) ८% ... ... ... | ६४३–१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. ... ... ... | २२४—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. ... ... | ५१—८ |
| शिंद्या स्टीम (१५) १ रु. ... ... ... | २७–१० |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ८ आ. ... | ५४—८ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ४५५५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २१७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) ७½% रु. ... ... | १५३—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३९२—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) १७२ रु. १० आ. ० पै. ... | २०९०—० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | १६१–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–९–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६३—१–० |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | १८ अकलूज (जि. सोलापूर) |
| २ सातारा („ सातारा) | १९ विरमगांव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | २० धुळें („ प. खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | २१ दोंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | २२ शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी („ „) | २३ शेहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २४ नंदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २५ साक्री („ „) |
| ९ वाई („ „) | २६ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २७ तळोदें („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २८ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २९ सटाणा („ „) |
| १३ बेलापूर („ „) | ३० कळवण („ „) |
| १४ राहुरी („ „) | ३१ लासलगांव („ „) |
| १५ भिवंडी („ ठाणें) | ३२ नांदगांव („ „) |
| १६ पालघर („ „) | ३३ दोहद („ पंचमहाल) |
| १७ कल्याण („ „) | ३४ कालोल („ „) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# पाणी व पाणी

तुम्हांस मुबलक पाणी पाहिजे ना?

तर मग– आमचे बोरींग मशीननें तुमचे घरांत अगर शेतांत बोअर करून घ्या व एक हातपंप बसवा. वाटेल तेव्हां तुम्हांस पाणी मिळूं शकेल.



बोअर मशीन व पंप पूर्ण स्वदेशी असून आमचें कारखान्यांत तयार केलेले आहेत.

बोअर (भोंक) ६ इंच असून यंत्र इंजिननें चालतें.

दर व इतर माहिती बद्दल चौकशी करा.

**भिडे आणि सन्स,**
सांगली.

श्री विनायक मिल्सची पातळें व लुगडी वापरा.



**—SOLD, BOUGHT, HIRED OR MADE TO ORDER.—**

First and second hand iron or wooden furniture.

**Address:**—Shevak Quarters,
1227 F. C. Road, Poona 4.
Industrial Centre.

*Yours faithfully,*
**C. R. Shevak.**

सर्व प्रकारचें लोखंडी व लांकडी फर्निचर विकत घेतलें जातें किंवा नवीन तयार करून अगर भाड्यानें मिळतें.

पत्ता—शेवक क्वार्टर्स, १२२७ फ. कॉ. रोड पुणें नं. ४.
इंडस्ट्रियल सेंटर, कारखाना पत्ताः–१५३ कसबा, पुणें २.
आपला–सी. आर. शेवक.



# बापट ब्रदर्स- १००३ सदाशिव, पुणें २

**आमचे दुकानीं—**

★ सर्व तऱ्हेचे स्टोव्हज, पेट्रोमॅक्स, व इतर बत्त्या, सायकलस व त्यांस लागणारें सुटें सामान मिळेल व तत्संबंधीं दुरुस्तीचें काम काळजीपूर्वक व वक्तशीर केलें जातें. ★

तसेंच—

जावा स्पिरिट, उत्तम फिनाईल, स्टॅन्डर्ड ऑईल कंपनीचें रॉकेल, रेनकोटस्, गॉगल्स, थरमॉस, टॉर्चेस वगैरे.

सर्व तऱ्हेचा माल घाऊक व किरकोळ योग्य भावानें मिळतो.



# मुजुमदार टॉय वर्क्स

या आणि पहा

**नाना हालणारीं व साधीं लाकडी चित्रें**

**समक्ष येऊन खात्री करा.**

२५५/४ सदाशिव पेठ, शेडगेवाडी, पुणें शहर.



# स्वादिष्ट मसाला करणारे आद्य कारखानदार





# व्ही. पी. बेडेकर

**बेडेकर आणि सन्स**

पुणें येथील एजंट—
दत्तात्रय नारायण हेजीब.






# माधवाश्रम

हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून, रेल्वे-स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.

जागा मध्यवस्तींत, हवाशीर, लागणारें फर्निचरनें शृंगारित असून, सोयीमुळें ती शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहणेची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

**माधवाश्रम बिल्डिंग,** गिरगांव, मुंबई.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल लॅक टूथ पावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

---

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें

संग्रह करा

कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट

पाचकवटी, पंचकोलासव

तसेंच

पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी

—: रक्तवर्धक :—

सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें

आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

---

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

---




मधुमेहावरील
औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
५२३ ए, सदाशिव, पुणें २.

---

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १२ नोव्हेंबर, १९४१ अंक ४५

## * विमाक्षेत्रांतील 'कॉमनवेल्थ' चें अढळ स्थान *

### १९४० चें पूर्ण केलेलें काम........४५ लक्षांहून अधिक

**★ बोलका–ढलपा ★**

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८२,००० |
| सरकारी कर्जरोखे, गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१३,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

**• कॉमनवेल्थचीं वैशिष्ट्यें •**

(१) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरूकता
(२) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
(३) काळजीपूर्वक काटकसरीची व्यवस्था
(४) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
(५) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

## कॉमनवेल्थ

**ॲशुअरन्स कंपनी लि., पुणें २.**

—शाखा—

मुंबई—मद्रास—कलकत्ता—नाशिक—कराची—अहमदाबाद

एम्. एन्. भागवत, बी. ए.
ॲक्टिंग ऑफिस सुपरिटेंडेंट.

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### मुंबई प्रांतांतील सिव्हिक गार्ड

मुंबई प्रांतांतील सिव्हिक गार्डांची संख्या गेल्या महिन्यांत ५,०२५ ची ५,१२५ झाली.

### बेटर फार्मिंग सोसायटी

मुंबई सहकारी पतपेढ्यांच्या १९२५ च्या कायद्यान्वयें नोंदलेल्या बेटर फार्मिंग सोसायट्यांना ग्रँट देण्याचा अधिकार मुंबई सरकारनें सहकारी रजिस्ट्रारला दिला आहे. पहिल्या वर्षीच्या ग्रँटची कमाल रकम १०० रुपये ठरविण्यांत आली आहे. साधारणतः तीन वर्षांनंतर सोसायटीला ग्रँट मिळणार नाहीं.

### लागवडीसाठीं आणावयाच्या बटाट्यांची वहातूक

सिमल्याच्या आसपासचे नंबरी बटाटे मुंबई प्रांतांत लागवडीस सोइस्कर असल्याचें आढळून आलें आहे. तथापि ते येथें मालगाडींतून आणण्यास फार दिवस लागतात व बटाटे खराब होतात. ऑगस्ट ते नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत ह्या बटाट्यांच्या वहातुकीस एक अष्टमांश पार्सलचा दर आकारण्याचें एन. डब्ल्यू., बी. बी. अँड सी. आय. व जी. आय. पी. रेल्वेजनीं मान्य केलें आहे.

### नवीन रेल्वे रस्ते

तुर्कस्तान मोठ्या प्रमाणावर नवीन रेल्वे रस्ते तयार करीत आहे.

### अमेरिकेचें रशियास कर्ज

अमेरिकेनें रशियास एक अब्ज डॉलर कर्जाऊ देण्याचें ठरविलें आहे. ह्या कर्जावर व्याज आकारलें जाणार नाहीं. युद्धसमाप्तीनंतर कर्जाची परतफेड केली जाईल.

### व्यवसायावर कर

व्यवसायावर सालिना ५० रुपयांपेक्षां अधिक कर बसविण्यास प्रांतिक सरकारांस बंदी करणारी, हिंदी घटना कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली आहे. परंतु बंगाल, संयुक्तप्रांत, मध्यप्रांत, इत्यादि प्रांतांनीं हा कर अगोदरच बसविलेला होता, त्यास पार्लमेंटचा कायदा लागू नाहीं. ह्या प्रांतांनीं ५० रुपयांपेक्षा अधिक कर घेऊं नये, अशा अर्थाचें सर फ्रेड्रिक जेम्स ह्यांचें बिल हिंदी मध्यवर्ती असेंब्लीनें मंजूर केलें आहे.

### आसाममधील चहाच्या मळ्यांतील मजूर

आसाममधील चहाच्या मळ्यांत १९३९-४० सालीं एकूण २३,८०० मजूर नव्यानें कामाला लागले. बंगाल, बिहार, ओरिसा, मध्यप्रांत, संयुक्तप्रांत, मुंबई व मद्रास ह्या प्रांतांतून ते मुख्यतः आले. मळेवाले विवाहित मजुरांस अगोदर नोकरी देतात, ह्यामुळें कित्येक मजूर आपलें लग्न झालें असल्याचें खोटेंच सांगतात. आसाममधील मळ्यांतील मजुरीचे सरासरी मासिक दर पुरुषास ९ रु. ८ आ. ७ पै, स्त्रीस ८ रु. ८ आ. ४ पै व मुलास ५ रु. १४ आ. ६ पै असे होते. मजुरांनीं घरीं मनिऑर्डरीनें २३/४ लक्ष रुपये पाठविले.

### फिल्मी टपाल

ग्रेटब्रिटन व ऑस्ट्रेलिया ह्यांचेमधील फिल्मी टपालाची योजना ऑस्ट्रेलियन मंत्रिमंडळानें अमान्य केली आहे. फिल्मी टपालाची माहिती "अर्था" मध्यें मागेंच आलेली आहे.

### बनारस विश्वविद्यालयाची रौप्य ज्युबिली

बनारस विश्वविद्यालयाची रौप्य ज्युबिली २१ जानेवारी, १९४२ रोजीं साजरी होईल, त्यावेळीं महात्मा गांधी मुख्य भाषण करतील.

### गुप्त पोलिसांचा पहारा

प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचा कनिष्ठ पुत्र, मि. जेम्स रूझवेल्ट, हे कॅलिफोर्नियामध्यें आपली पत्नी व सोळा महिन्यांचा मुलगा ह्यांचेबरोबर रहातात. त्यांचे घरांभोवतीं गुप्त पोलीस ठेवण्यांत आले आहेत. प्रेसिडेंट रूझवेल्टच्या नातवास पळवून नेण्याचा प्रयत्न होण्याचा संभव आहे व त्यासंबंधांत हा तरतूद आहे. असें समजतें.

### मोठ्या कारखान्यांवर नियंत्रण

मुंबई शहर आणि अहमदाबाद, खेडा, भडोच व पंचमहाल, सुरत, ठाणें, मुंबई उपनगर, अहमदनगर, नाशिक, पुणें, बेळगांव, धारवाड, कानडा, कुलाबा आणि रत्नागिरी ह्या जिल्ह्यांत २०० अथवा त्यापेक्षा अधिक कामगारांच्या गिरण्या अथवा कारखाने बांधण्यास किंवा वाढविण्यास मुंबई सरकारची आगाऊ परवानगी घेतली पाहिजे असा सरकारनें हुकूम काढला आहे. परवानगी देण्यापूर्वी सरकार कारखान्यांचा नकाशा पाहून, कारखान्यांचा बाँबहल्ल्यांपासून बचाव व्हावा ह्या दृष्टीनें सुधारणा सुचवील.

### हिंदी चलनी नोटांस ब्रह्मदेशांत बंदी

३१ मार्च, १९४२ नंतर, हिंदुस्थान सरकारच्या एक रुपयावाल्या नोटा वगळून बाकी कोणत्याहि चलनी नोटा ब्रह्मदेशांत चलन म्हणून स्वीकारल्या जाणार नाहींत. तथापि ३० सप्टेंबर, १९४२ पर्यंत तिजोऱ्यांत, पोस्ट ऑफिसांत व रिझर्व्ह बँकेच्या आणि इंपीरिअल बँकेच्या कचेऱ्यांत त्या घेतल्या जातील. त्यानंतर ३१ मार्च, १९४३ पर्यंत रंगून येथील रिझर्व्ह बँकेच्या कचेरींतच त्यांचा स्वीकार केला जाईल.

### खाणींतील स्त्री-कामगार

हिंदुस्थानांतील खाणींत एकूण ५० हजार स्त्री-कामगार आहेत, त्यांपैकीं २३ हजार कोळशाच्या खाणींत आहेत, असें मि. प्रायर ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

### ब्रिटिश मंत्रिमंडळ

ब्रिटिश मंत्रिमंडळांत कांहीं बदल होणार असल्याचें घाटत आहे, अशी बातमी प्रसिद्ध झाली होती, तिचेमध्यें कांहीं तथ्य नाहीं, असें समजतें. रशियाच्या मदतीकरितां उत्पादनांत शक्य तेवढी वाढ करण्याचे कामांत मि. चर्चिल हे गुंतले आहेत.

### कोर्टाचा अधिकार केव्हां नष्ट होतो ?

ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून विभक्त होण्याचे वेळीं ब्रह्मदेशांतील मालमत्तेसंबंधीं हिंदुस्थानांतील कोर्टांत दावा चालू असला तरी ब्रह्मदेश विभक्त झाल्यानंतर हिंदी कोर्टाचा अधिकार संपला असें त्रिचनापल्लीच्या सबजज्जाचें म्हणणें पडलें. त्यावर मद्रास हायकोर्टीकडे अपील करण्यांत आलें. "दाव्याचे प्रारंभीं कोर्टास अधिकार असला तर मागाहून होणाऱ्या कायद्यानें तो नाहींसा होत नाहीं. अशा कायद्यानें मुद्दाम तो अधिकार काढून घेतला असेल तर गोष्ट वेगळी" असा हायकोर्टानें अभिप्राय व्यक्त केला. ह्या प्रकरणांतील मुद्दा महत्त्वाचा असल्यानें फेडरल कोर्टाकडे अपील होईल.

### अमेरिकेंतील कपाशीच्या पिकाचा अंदाज

| | ५०० पौंडांच्या गाठी |
|---|---|
| १९४० | १,२५,६६,०० |
| १९४१ | १,१०,६१,००० |

### ब्रह्मदेशांतील कपाशीची लागवड

| | एकर लागवड |
|---|---|
| १९४०–४१ | ४,२१,००० |
| १९४१–४२ | ४,२५,००० |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ५६६ |
| २ शेतमालाच्या विक्रीची सुधारलेली व्यवस्था | ५६७ |
| ३ संयुक्त प्रांतांतील काच-कारखाने ... | ५६८ |
| ४ स्फुट विचार ... सार्वजनिक आरोग्य—स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराचें शिक्षण—रशियन रणांगणें आणि दोन भाषणें—हिंदुस्थान-ब्रह्मदेश करार—कापडाचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता—फॅक्टरी ॲक्टांत दुरुस्ती—एडवर्डच्या मुखवट्याचे रुपये बंद होणार | ५६९ |
| ५ पुणें सहकार सप्ताह | ५७१ |
| ६ व्यक्ति एक पण सभासदत्व अनेक | ५७२ |
| ७ आखूड धाग्याच्या कपाशीचा उठाव | ५७३ |
| ८ चहा | ५७३ |
| ९ निवडक बाजारभाव | ५७३ |
| १० हैद्राबादचा ट्रंक टेलिफोन | ५७४ |



# अर्थ

बुधवार, ता. १२ नोव्हेंबर, १९४१


## शेतमालाच्या विक्रीची सुधारलेली व्यवस्था

### ( दिल्ली येथील परिषद )

हिंदी शेतकरी वर्गाची स्थिति सुधारावयाची तर प्रथम त्याची प्राप्ती वाढली पाहिजे. ती वाढण्यास चांगलें बी-बियाणें व खत आणि सुधारलेल्या पद्धतीची मशागत ह्यांची आवश्यकता आहे. तथापि, कोणत्याहि स्थितींत शेतीच्या मालास चांगली किंमत येऊन ती शेतकऱ्यांच्या पदरांत पडण्याचें महत्त्व विशेष आहे. बाजारांची परिस्थिति, त्यांमधील मागणी-पुरवठा, विक्री-खरेदीच्या पद्धति, वजनेंमापें, दलाली इत्यादि अनेक बाबींवर शेतकऱ्यांस त्यांच्या मालाचें मिळणारें मोल अवलंबून रहातें आणि ह्या गोष्टींवर लक्ष ठेवून त्यांचा स्वतःस अधिकांत अधिक फायदा करून घेण्याचें सामर्थ्य त्यांमध्यें नसतें. माल चांगला होऊनहि त्याची योग्य किंमत त्यांच्या हातीं पडत नाहीं. ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून शेतीच्या मालाच्या विक्रीची संघटित व पद्धतशीर व्यवस्था करण्याचा प्रश्न हिंदुस्थान सरकारनें हातीं घेतला आणि त्याकरितां तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. प्रांतिक सरकारांनीं त्याच प्रकारची व्यवस्था केली. निरनिराळ्या जातींच्या शेतमालाची पैदास व विक्री ह्यांची पहाणी शास्त्रीय रीतीनें प्रथम करण्यांत आली. बऱ्या-वाईट मालाची भेसळ झाल्यानें किंवा उंच-हलका माल स्वतंत्रपणानें निरनिराळा बाजारांत न आल्यानें चांगल्या मालासहि योग्य किंमत मिळत नाहीं. गिऱ्हाइकहि साशंक वृत्तीनें सर्व मालाकडे पाहून तो कमी किंमतींत घेण्यास पहाणार आणि चांगली किंमत देऊन उंची दर्जाचे जिन्नस खरेदी करणारांची विशिष्ट गरज भागण्याची पंचाइत पडणार हें उघड आहे. ह्या दृष्टीनें मालाची प्रतबंदी करणें आणि त्याचे गुण ज्यानें प्रतीत होतील असें चिन्ह त्यावर घालणें ह्या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. निरनिराळ्या मालाच्या भिन्नभिन्न प्रती लावण्याचें काम सरकारी बाजारनियामक अधिकाऱ्यांनीं ह्याकरितांच अगोदर हातीं घेतलें. त्याप्रमाणें तूप, अंडीं ह्यांसारख्या जिनसांच्या प्रतींचे गुण निश्चित करण्यांत आले असून त्यांवर गुणवाचक चिन्ह घालण्यांत आलें आहे आणि अशा अंकित मालाची विक्री चालू झाली आहे. प्रतवारीबरोबर त्याच्या विक्रीच्या पद्धतीच्या अनेक अंगांकडे लक्ष देणें आवश्यक आहे. ह्यासंबंधांत चाललेल्या सरकारी प्रयत्नांत अनेक अवघड व प्रगतिविषयक प्रश्न उपस्थित होतात, त्यांचा विचार मध्यवर्ती व प्रांतिक विक्री-नियंत्रक अधिकाऱ्यांनीं करणें अगत्याचें असल्यानें त्यांची परिषद भरवण्यांत येते. अशी एक परिषद नुकतीच दिल्ली येथें भरली होती. तिच्या कार्यक्रमाविषयीं दोन शब्द लिहिणें उपयुक्त होईल.

बाजारांच्या पहाणीचे वृत्तांत अधिकाऱ्यांनीं प्रसिद्ध केले आहेत त्यांत वेळोवेळ होणाऱ्या फेरबदलांची माहिती प्रतिवर्षी दिली जावी असें परिषदेनें ठरवलें. व्यापाराच्या दिशा व बाजारपेठा ह्यांचेवर युद्धपरिस्थितीचे विशेष रीतीचे परिणाम घडून आल्यानें असल्या माहितीचें महत्त्व वाढलें आहे. परिषदनें असेंहि ठरवलें आहे कीं ह्यापुढें पहाणी वृत्तांतांत मालाची पैदास व पुरवठा, निरनिराळ्या टापूंत तयार होणारा माल, त्याच्या विक्रीचीं मुख्य ठिकाणें व तिचे परिमाण, विक्रीच्या पद्धती व बाजारभाव इत्यादि विषयींची सविस्तर माहिती देण्यांत यावी. सध्या असें घडतें कीं कांहीं जिनसांचें उत्पादन विशिष्ट टापूंत फाजील झालें असतां तो दुसरीकडे कोठें विकतां येईल ह्याची माहिती उपलब्ध नसल्यानें त्याचा खप होण्याची पंचाइत पडते आणि विक्री-नियामक अधिकाऱ्यांस ह्या बाबतींत आपलें कार्य करतां येत नाहीं. बाजारांच्या पहाणीपेक्षा त्यांमधील विक्रीच्या व्यवस्थेकडे अधिक लक्ष देण्याच्या महत्त्वावर परिषदेनें जोर दिला आहे, तें योग्यच आहे. प्रत्येक प्रांतांत दुय्यम विक्री अधिकारी आहेत, त्यांनीं कोणत्या तरी एका मालाच्या विक्रीच्या व्यवस्थेचें कार्य हातीं घ्यावें असें मत परिषदेनें व्यक्त केलें आहे. ही योजना अमलांत आली असतां विशिष्ट जातीच्या मालाच्या विक्रीची तपशीलवार व्यवस्था प्रत्यक्ष कृतीच्या स्वरूपांत दिसूं लागेल. प्रत लावणें, विक्रीच्या कराराचें स्वरूप निश्चित करणें, बाजारभाव व मालाचा पुरवठा यांसंबंधांत ताजी माहिती देणें, नियमबद्ध व संघटित बाजार स्थापणें, वजन-मापें ठरवणें, मालाची आच्छादनें सुचवणें, एका ठिकाणचा फाजील माल दुसरीकडे विकला जाण्याची तजवीज करणें, इतर देशांतील आयात-व्यापाऱ्यांच्या गरजांची चौकशी करणें, इत्यादि बाबींचा समावेश वरील हातीं घेण्यांत येणाऱ्या खास योजनांत अंतर्भाव होईल.

मालाची प्रतवारी किंवा त्यांचें गुणनिदर्शक चिन्ह हीं तो विकत घेणारांच्या अभिरुचीस धरून नाहींत असें आढळून आल्यास त्यांचेमध्यें जरूरीप्रमाणें योग्य बदल करण्यांत यावा अशी एक शिफारस परिषदेनें केली आहे. अंडीं व फळें ह्यांचे बाबतींत असा बदल आवश्यक होईल असें दिसतें. तुपाचा खप त्याच्या वासावर अवलंबून रहातो आणि ह्या बाबतींतली गिऱ्हाइकांची आवड-निवड निरनिराळी असते. ह्या कारणानें तुपाची प्रतवारी व गुणनिश्चिती करणें कठीण जातें. ही अडचण दूर होण्याच्या हेतूनें ज्या टापूंतून तूप पुरवलें जातें, त्याचा निर्देश करणें श्रेयस्कर होईल, असा अभिप्राय परिषदेनें व्यक्त केला आहे. सध्याची प्रतवारीची पद्धति खुषीची असल्यानें अधिकाऱ्यांस निरनिराळ्या क्षेत्रांत तपासणी करून तीवर नजर ठेवणें अवघड होतें. आरोग्य, सहकार, शेती, एतद्विषयक खात्यांच्या अधिकाऱ्यांचें सहाय मालाचा मासला देण्यांत मिळवण्याची आवश्यकता परिषदेंत प्रतिपादण्यांत आली. मधाची प्रतवारी आणि जना-

वर्रांच्या कातड्यांच्या प्रतवारींत बदल ह्या विषयांची चर्चाहि तिनें केली. पद्धतशीर मालविक्रीबाबतचा प्रचार कार्यक्षम रीतीनें होण्यास जरूर ती उपाययोजना करण्याचा विचार परिषदेमध्यें झाला.

ह्या सर्वांपेक्षा महत्त्वाचा प्रश्न राहिला तो विक्रीच्या व्यवस्थेशीं मालाची पैदास करणाऱ्या शेतकऱ्यांचा संबंध प्रत्यक्ष रीतीनें आणला जाणें आणि त्यांच्या हातीं अधिक किंमत पडण्याची तजवीज होणें ह्याविषयींचा असल्यानें परिषदेस त्याकडे लक्ष पुरवणें अगत्याचें वाटलें. सध्या ५०० निरनिराळया ठिकाणीं प्रतवारी केलेला माल विकला जातो आणि त्यांची सरासरीची वार्षिक किंमत ११६ लक्ष रुपये भरते. परंतु त्यापैकीं केवळ १८ टक्के किंमतीचा माल प्रत्यक्ष शेतकऱ्यांकडून येतो आणि बाकीचा दलालांचे मार्फत विकला जातो. चांगल्या किंमतीचा फायदा मध्यस्थांचे मार्फत शेतकऱ्यांपर्यंत जाऊन पोहोंचेल अशी प्रथम कल्पना होती. शिवाय, शेतकऱ्यांनीं व्यक्तिशः आणलेला माल एवढा थोडा असतो कीं, त्यांचेपैकी प्रत्येकाशीं व्यवहार निरनिराळा करणें अशक्यप्राय आहे. मालविक्रीच्या बाबतींत प्राथमिक उत्पादकांचें संघटन कसें करावें, त्यांचे संघ कसे बनवावे, प्रतवारीच्या आर्थिक फायद्याविषयींची योजना कशी तयार करावी इत्यादि प्रश्नांचा ऊहापोह परिषदेंत झाला. सहकारी तत्त्वावर खेड्यांमध्यें विक्रीसंघ स्थापन करावे असें तिच्या चर्चेंत ठरलें.

मुंबई प्रांतांत येथील विक्री-अधिकारी सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारच्या हाताखालीं काम करीत असून ग्रामसुधारणा व सहकार ह्यांच्या कार्याशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध जोडण्यांत आलेला आहे. तशीच व्यवस्था इतर प्रांतांत असावी कीं काय ह्याचा विचार परिषदेनें केला आणि सहकारी विक्रीसंस्था व शेतीच्या मालाचें उत्पादन ह्यांच्याशीं विक्रीअधिकाऱ्यांचा निकट संबंध राहिला पाहिजे असें तिनें ठरवलें. हिंदुस्थानांतून शेतीचा माल परदेशांत जातो, त्यामध्यें भेसळ व घाण असते अशी तक्रार नेहमी ऐकूं येते. ह्या मालाची प्रतवारी वस्तुतः लावलेली असली पाहिजे आणि निर्गत व्यापार करणारांनीं आपल्या परराष्ट्रीय गिऱ्हाइकांच्या गरजा चांगल्या तऱ्हेनें भागवण्याची व्यवस्था केली पाहिजे. दोन अधिकाऱ्यांनीं मुंबई व कलकत्ता ह्या बंदरांत प्रत लावलेल्या तेथें येणाऱ्या व तेथून बाहेर जाणाऱ्या मालावर नजर ठेवावी असें परिषदेनें सुचविलें.

### संयुक्त प्रांतांतील काचकारखाने

हिंदी काचकारखान्यांत काच सामानाचें वार्षिक उत्पादन सुमारें १¼ कोटि रुपयांचें होतें, त्यापैकीं एक कोटि रुपयांचा माल एकट्या संयुक्त प्रांतांत तयार होतो. आग्रा, अलिगड, मुरादाबाद व बिजनूर ह्या जिल्ह्यांतच बहुतेक काचकारखाने आहेत; अलाहाबादमध्यें बाटल्यांचे दोन कारखाने आहेत. बांगड्यांच्या उत्पादनाचा धंदा मुख्यतः फिरोजाबाद (आग्रा जिल्हा) येथें चालतो. तेथील २० हजार लोक ह्या धंद्यांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें गुंतलेले आहेत. तेथें हातानें बांगड्या करतात. सबंद आशिया खंडांत काचेचे तक्के करणारा एकच कारखाना आहे, तो मुरादाबाद जिल्ह्यांतील बहाजोई गांवीं आहे. त्या कारखान्यांत खिडक्यांचीं तावदानें करतात.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१५,५०,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), वांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—डी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,०२,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,०१,०२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३२,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## स्फुट विचार

### सार्वजनिक आरोग्य

हिंदुस्थान सरकारच्या दिमतीस सार्वजनिक आरोग्याविषयीं व्यवस्था करणारें एक खातें आहे, त्याचा १९४० सालाबाबतचा वृत्तांत पब्लिक हेल्थ कमिशनर, त्या खात्याचे मुख्य, यांनीं प्रसिद्ध केला आहे. देशाबाहेर युद्ध चालू असलें तरी हिंदुस्थानांत सार्वजनिक आरोग्याची काळजी नेहमीप्रमाणें घेतली जात आहे असें त्यांत म्हटलें आहे. युद्धाचा पल्ला आफ्रिकेंत येऊन पोहोंचल्यापासून आकाशमार्गाचें दळणवळण अलीकडे विशेष वाढलें असल्याकारणानें, त्या बाजूकडून पीतज्वराची सांथ ह्या देशांत पसरण्याची भीति उत्पन्न झाली आहे. त्या सांथीचा इकडे प्रसार होऊं नये म्हणून विशेष दक्षता बाळगण्यांत येत आहे. ह्या ताप ज्या ठिकाणीं आहे तेथून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी केली जाते आणि त्यांनीं त्याची लस टोंचून घेतल्याचा दाखला दाखवला नाहीं तर त्यांस हिंदुस्थानांत येण्यापूर्वी कांहीं दिवस शुद्ध हवेंत बाहेर रहावें लागतें. कराची येथें असलेल्या प्रवाशांस नऊ दिवस बाजूस ठेवण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. अशी खबरदारी घेतली गेली असतांहि पीतज्वराचा उद्भव ह्या देशांत न व्हावा म्हणून हिंदुस्थान सरकार प्रांतिक सरकारांच्या व संस्थानांच्या आरोग्याधिकाऱ्यांस तज्ज्ञांकरवीं सहाय देत आहे. डासांच्या उपद्रवानें पीतज्वर फैलावत असल्यानें त्यासंबंधांतहि जरूर ती तजवीज केली जात आहे. पंढरपूरसारख्या यात्रेच्या ठिकाणीं कॉलरा पसरण्याचा नेहमी संभव असतो, त्याविषयीं आणि खाण्यापिण्याच्या जिनसांत होणाऱ्या भेसळीनें रोगांचा प्रसार होतो, त्या बाबतींत विचार आणि शिफारसी करण्यासाठी समित्या नेमल्या होत्या. सूचनांची अंमलबजावणी होण्याची व्यवस्था केली जात आहे. मुंबई सरकारनें कॉलऱ्याची लस टोचण्यासंबंधानें पंढरपूरच्या यात्रेकरूंच्या बाबतींत तजवीज केली आहे तिला मान्यता देण्यांत आली आहे. भेसळीच्या व रोगचिकित्सेच्या संबंधांत शास्त्रीय पृथक्करणाची आवश्यकता असल्यानें त्याकरितां प्रयोगशाळा ठिकठिकाणीं स्थापण्याच्या महत्त्वावर जोर दिला गेला आहे. शहरांत दाट वस्तीमुळें क्षयरोगाचा प्रसार होतो, त्यास आळा बसण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनीं घरांच्या बांधणीविषयींचे नियम कडक रीतीनें अंमलांत आणले पाहिजेत असा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराचें शिक्षण

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हिताचे प्रश्न हातीं घेऊन त्यांस सहाय देणें आणि त्यांमध्यें कामें करणाऱ्या नोकरांच्या शिक्षणासाठी वर्ग चालवून त्यांची कार्यक्षमता वाढवणें हें कार्य मुंबई प्रांतांत लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इंस्टिट्यूट करीत आहे. लायक व कार्यदक्ष नोकर वर्ग स्थानिक संस्थांस मिळावा व त्यांच्या कारभाराची कार्यक्षमता वाढावी ह्या हेतूनें इंस्टिट्यूट ही शिक्षणाची तरतूद करीत आहे. त्या संस्थांनीं इंस्टिट्यूटशीं सहकार्य करून ह्या व्यवस्थेचा पूर्ण फायदा घेणें अगत्याचें आहे. संयुक्त प्रांतांत तेथील अलाहाबाद युनिव्हर्सिटीनें ही शिक्षणाची कामगिरी उचलली आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. युनिव्हर्सिटीनें चालवलेल्या वर्गांतील विद्यार्थ्यांस व्यावहारिक तऱ्हेचा अनुभव मिळण्याच्या सवलती आपण देऊं असें अभिवचन कित्येक स्थानिक संस्थांनीं दिलें आहे. प्रांतिक सरकाराच्या निरनिराळ्या खात्यांतील अधिकाऱ्यांनीं युनिव्हर्सिटीच्या वर्गांत व्याख्यानें देण्याचें काम पत्करलें आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सभासद किंवा अधिकारी असलेल्या व होऊं इच्छिणाऱ्या लोकांस ह्या वर्गांतील शिक्षणाचा फायदा मिळणार आहे. युनिव्हर्सिटीच्या वर्गाचें उद्घाटन करतांना व्हाइस चॅन्सेलर, प्रो. अमरनाथ झा, ह्यांनीं स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चोख व प्रामाणिकपणाचा व्हावा आणि कर देणाऱ्या जनतेच्या पैशाचा योग्य उपयोग सार्वजनिक हितासाठी योग्य रीतीनें केला जावा हें ध्येय शिक्षण घेणारांनीं स्वतः पुढें ठेवलें पाहिजे असें गेल्या आठवड्यांत सांगितलें. युनिव्हर्सिटीनें चालवलेल्या वर्गांत शिक्षण घेऊन प्रशस्तिपत्रक मिळवणारांस स्थानिक स्वराज्य संस्थांनीं अधिकाऱ्यांच्या नेमणुका करतांना अग्रतेचें स्थान द्यावें असें संयुक्त प्रांताच्या सरकारानें एक पत्रक काढून सुचवलें आहे. स्थानिक कार्यकारी अधिकाऱ्यांनीं युनिव्हर्सिटीचें प्रशस्तिपत्रक मिळवलें असलेंच पाहिजे असा सरसहा नियम करण्यांत आला पाहिजे असें प्रो. झा ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. संयुक्त प्रांतांतील उपक्रमाकडे आमच्या प्रांतांतील इन्स्टिट्यूट व स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांचें लक्ष जाणें आवश्यक आहे.

### रशियन रणांगणें आणि दोन भाषणें

रशियामध्यें लेनिनग्राड, मॉस्को व क्रायमिया ह्या तीन बाजूंस निकराच्या लढाया चालल्या आहेत. उत्तर, पश्चिम व दक्षिण ह्या तिन्ही दिशांनीं मॉस्को शहर घेरण्याचा जर्मनीचा प्रयत्न रशियन फौजांनीं मोठ्या शौर्यानें फोल केला आहे. कित्येक ठिकाणीं त्यांनीं उलट हल्ले करून शत्रूस जेरीस आणलें आहे. मॉस्को घेण्याची हिटलर शिकस्त करीत आहे, पण तितक्याच शिकस्तीनें रशियन सैन्यें त्या शहराचें रक्षण करीत आहेत. क्रायमियामध्यें सबॅस्टॅपूल ह्या सुप्रसिद्ध बंदराच्या दिशेनें जर्मनीच्या फौजा चाल करून जात आहेत आणि पूर्वेच्या बाजूसहि काळ्या समुद्राचा किनारा गाठण्याची त्यांची खटपट आहे. ह्या बाजूसहि रशिया शत्रूस धीरानें तोंड देत आहे. कॉकेशसच्या प्रांतावर डोळा ठेवून हिटलर आपल्या फौजा हालवीत आहे आणि काळ्या समुद्रांत वर्चस्व मिळवून त्या प्रांतावर चाल करण्याचा त्याचा बेत दिसतो. ह्या सर्व धुमश्चक्रीनें रशिया मुळीच गडबडलेला नाहीं, इतकेंच नव्हे, तर स्टालिननें मॉस्को येथें नुकतेंच भाषण केलें त्यावरून त्याचा हुरूप व यशप्राप्ति होईपर्यंत लढत रहाण्याचा निश्चय कायम आहे हें स्पष्ट दिसतें. आपले सैनिक कुशल असून युद्धसामुग्री उत्कृष्ट आहे; हिटलरचा शस्त्रास्त्रांचा पुरवठा आपणापेक्षा अधिक मोठ्या प्रमाणावर असल्यानेंच केवळ त्याची प्रगति झाली आहे; तथापि, जर्मनीची एवढी हानि झाली आहे आणि रशियांत ह्यापुढें लढण्याच्या त्याच्या मार्गांतल्या अडचणी एवढ्या कठिण आहेत कीं, आपण अखेर त्याचा पाडाव केल्यावांचून रहाणार नाहीं असें स्टालिननें बोलून दाखवलें आहे. त्याच वेळीं प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं केलेल्या भाषणांत रशिया व इंग्लंड ह्यांस सर्व प्रकारचें सहाय देण्याचा अमेरिकन राष्ट्राचा दृढनिश्चय व्यक्त झाला आहे. हीं दोन भाषणें लक्षांत घेतां युद्धपरिस्थिति ह्यापुढें जर्मनीस कशी प्रतिकूल होत जाणार आहे ह्याची चांगली कल्पना येते. रशिया व इंग्लंड ह्यांस शस्त्रास्त्रांचा पुरवठा आणखी विस्तृत प्रमाणांत होऊं लागला म्हणजे त्यांचें पारडें जड होऊन जर्मनीची बाजू लंगडी पडत जाणार आहे.

### हिंदुस्थान–ब्रह्मदेश करार

ब्रह्मदेशांत जाणाऱ्या व वास्तव्य करणाऱ्या हिंदी लोकांच्या हक्कांचे संबंधांत हिंदुस्थान सरकार व ब्रह्मी सरकार ह्यांचेमध्यें झालेल्या कराराविरुद्ध येथील लोकमताचें येवढें काहूर माजलें कीं तो करार इतक्यांत अंमलांत आणला जाऊं नये, या अर्थाचा एक ठराव मध्यवर्ती असेंब्लीनें पास केला आहे आणि तो सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्यांचेकडे पाठवण्याचें हिंदुस्थान सरकारनें कबूल केलें आहे. ह्या करारांतील अटी हिंदी लोकांच्या वाजवी हक्कांवर गदा आणीत असून त्या ह्या देशास अपमानकारक आहेत. त्याचप्रमाणें ब्रिटिश पार्लमेंटमध्यें व इतरत्र अधिकारी रीतीनें देण्यांत आलेल्या अभिवचनांस त्या करारानें हरताळ फासला जात आहे अशी टीका त्यावर करण्यांत आली आहे. ब्रह्मी सरकार व हिंदी सरकार ह्यांनीं कराराच्या अटींचा फेरविचार करावा आणि दोन्ही देशांतील लोकांस समाधानकारक वाटतील अशा रीतीचे फेरबदल केले जावे अशी मागणी करण्यांत आलेली आहे. मध्यवर्ती असेंब्लींत बिन-सरकारी सभासदांनीं व्यक्त केलेले विचार सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्यांचेकडे पाठवण्यांत येणार आहत. झालेल्या करारास चिकटून रहाण्याचा आग्रह हिंदुस्थान सरकारनें धरला नाहीं आणि असेंब्लीमध्यें पुढें आलेल्या ठरावाचा निकाल बिन-सरकारी सभासदांनीं स्वतंत्रपणानें करावा असें ठरवलें ही समाधानाची गोष्ट आहे. हा ठराव त्यांनीं सहमतानें तयार केला होता आणि असेंब्लीमधील सर्व पक्षांनीं त्यास पाठिंबा दिला हेंहि अभिनंदनीय आहे. कराराविषयीं ह्या देशांतलें लोकमत कसें एकजीव व प्रबळ आहे ह्याविषयीं सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्यांची खात्री होऊन हिंदी–ब्रह्मदेश करारांत जरूर ते फेरफार ह्या लोकमतास अनुसरून केले जातील अशी आशा आहे.

---

### कापडाचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

हिंदी गिरण्यांतील कापडाचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता तीव्रतेनें भासूं लागली आहे. कारण, जपानी कापडाची आयात बंद पडली असून ब्रिटिश कापडाची आयातहि कमी झाली आहे. कापडाची लष्करी मागणी मात्र वाढली आहे आणि ती पुरविण्यांत हिंदी गिरण्या गुंतल्या आहेत. ह्याचा परिणाम, कापडाचा पुरवठा नियंत्रित होण्यांत झाला आहे आणि ही परिस्थिति अशीच टिकली तर गोरगरिबांस कापड विकत घेणें अवघड होत जाईल, अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. ह्याला उपाय म्हणजे कापडाचें उत्पादन वाढविणें, हा आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्या प्रश्नाचा विचार केला व प्रांतिक सरकारांचा त्यासंबंधांत सल्ला घेऊन असें ठरविलें, कीं कामगारांच्या साप्ताहिक कामाच्या तासांत कांहीं काळपर्यंत वाढ करणें हा उत्पादन वाढविण्याचा मार्ग स्वीकारणें आतां आवश्यक झालें आहे. सध्या गिरणी-कामगारांची साप्ताहिक कामाची मर्यादा ५४ तासांची घालून दिलेली आहे ती ६० तास करावी, अशी हिंदुस्थान सरकारची प्रांतिक सरकारांना सूचना आहे.

---

### फॅक्टरी ॲक्टांत दुरुस्ती

ह्या सूचनेस अनुसरून मुंबई सरकारनें फॅक्टरी ॲक्टाच्या ३४ व्या कलमाची अंमलबजावणी सहा महिनेपर्यंत न करण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें कामगारांना आठवड्यांतून ५४ तासांऐवजी ६० तास काम करतां येईल. जादा कामाबद्दल फॅक्टरी ॲक्टाप्रमाणें त्यांस जादा मजुरी अर्थातच मिळावयाची आहे. ह्या जादा मजुरीचा दर मूळ मजुरीच्या सवापटीइतका आहे. मुंबईच्या इंडस्ट्रियल डिस्प्युट्स ॲक्टाप्रमाणें गिरणीमालकांस कामाच्या तासांतील फरक कामगारांस अगोदर कळवावा लागतो व कामगारांचें व त्यांचें जमलें नाहीं, तर तडजोड बोर्डाकडे हें प्रकरण जावें लागतें. तथापि, सध्याची निकड लक्षांत घेऊन, सरकारनें नोटिशीची आवश्यकता नाहीं, असें ठरविलें आहे. अशाच तऱ्हेचा कायद्यांत बदल मध्यप्रांत, वऱ्हाड, दिल्ली व संयुक्त प्रांत येथेंहि करण्यांत आला आहे. सध्याच्या महागाईच्या दिवसांत कामाचे तास वाढले तरी मजुरी तरी अधिक मिळेल, ह्या दृष्टीनें कामगार वरील योजनेस संमति देतील.

---

### एडवर्डच्या मुखवट्याचे रुपये बंद होणार

सातव्या एडवर्डच्या मुखवट्याचे रुपये ३१ मार्च, १९४२ नंतर चलन म्हणून स्वीकारले जाणार नाहींत, असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. सहाव्या जॉर्जच्या मुखवट्याच्या रुपयांत चांदीचा अंश कमी असतो व त्या रुपयाची बनावट नाणीं पाडणें कठीण आहे. ह्या दृष्टीनें ह्या रुपयांचा प्रसार वाढविण्याचें हिंदुस्थान सरकारचें धोरण आहे. सहाव्या जॉर्जच्या मुखवट्याचे रुपये व रुपयाच्या चलनी नोटा प्रसारांत व रिझर्व्हमध्यें पुष्कळ आहेत, त्यांची संख्या एडवर्डच्या मुखवट्याच्या रुपयांची जागा घेण्यास पुरेशी आहे. अर्थात्, रुपयाच्या चलनी नोटा व रुपयाचीं नाणीं ह्यांचे आकडे आतां स्वतंत्रपणें प्रसिद्ध करण्यांत येत नसल्या कारणानें त्यांचा तपशील समजण्यास मार्ग नाहीं. १९४० सालीं प्रचारांत असलेल्या रुपयाच्या नाण्यांपैकीं ३४½% नाणीं सातव्या एडवर्डच्या मुखवट्याचीं होतीं, ह्यावरून किती नाण्यांची देवघेवींमधून हकालपट्टी होणार आहे, ह्याची कल्पना येईल. ३१ मार्च, १९४१ नंतर हीं नाणीं व्यवहारांत चालली नाहींत, तरी ३० सप्टेंबर, १९४२ अखेर तीं सरकारी तिजोऱ्या, पोस्ट ऑफिसें व रेल्वे स्टेशनें येथें स्वीकारलीं जातील व त्यानंतर कांहीं मुदतीपर्यंत रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता व मद्रास येथील कचेऱ्यांतच फक्त तीं घेतलीं जातील.

---

### बॉंबे मोटार व्हेइकल्स टॅक्स ॲक्ट, १९३५

#### ( १९३९-४० मधील अंमलबजावणी )

ह्या कायद्यास अनुसरून एकूण ३८ लक्ष, ५ हजार रुपयांची वसुली झाली. रकम भरण्यासाठी एकूण ६,२२१ मनिऑर्डरी व २१,८७२ ट्रेझरी चलनें पाठविण्यांत आलीं होतीं. एकूण १,२६२ वाहनांना मोटारकराची माफी देण्यांत आली. त्यांपैकी २१७ वहानें हिंदी संस्थानिकांच्या मालकीचीं होतीं. कर चुकविण्याचे एकूण १,७७२ प्रयत्न जिल्ह्यांतून उघडकीस आले, त्यांपैकीं १,७७० मध्यें २१,०६३ रुपयांचा दंड घेण्यांत आला. ४६३ लोकांवर खटले भरले, त्यांपैकी २०५ लोकांवर गुन्हा शाबीत झाला. मुंबई शहरांत १,७७० लोकांकडून दंडादाखल ७,१०१ रुपये जादा वसूल करण्यांत आले.

#### महागाई भत्त्यांत वाढ

रेल्वे कामगारांना मिळावयाच्या महागाई भत्त्यांत वाढ हिंदुस्थान सरकारनें मंजूर केली आहे.

## पुणें सहकार सप्ताह

( ले.:—श्री. य. द्. खोले, एल. एस. जी. डी. )

अलीकडे कांहीं वर्षे बंद पडलेला सहकार दिन पुन्हां साजरा करावा अशी इच्छा प्रकट केली गेल्यानें पुणें जिल्हा युनियनच्या व पुणें सेंट्रल को. बँकेच्या पुरस्कारानें पुणें जिल्ह्यांत सहकार दिन साजरा करावा व त्यानिमित्त एक सप्ताहाचा कार्यक्रम आखून सहकारी चळवळीचें पुढें पाऊल कसें पडेल यासंबंधीं विचार विनिमय करावा असें ठरलें. त्याप्रमाणें हा सप्ताह तारीख २६-१०-४१ ते १-११-४१ या सात दिवसांत साजरा करण्यांत आला.

सप्ताहाची सुरवात पुणें सेंट्रल को. बँकेचे पहिले चेअरमन श्री. तात्यासाहेब केळकर यांचे हस्तें झाली. या दिवशीं शेतकी सोसायट्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांचें स्वागत पुणें शहरांतील नागर सहकारी संस्थांमार्फत करण्यांत येऊन एकमेकांच्या अडचणींसंबंधीं खुल्या दिलानें विचार–विनिमय झाला. प्रथम सप्ताह दिन समितीचे अध्यक्ष श्री. विद्वांस यांनीं स्वागतपर भाषण करून सहकाराची कल्पना सनातन असल्याचें सांगितलें व जिल्ह्यांत सहकारी संस्था स्थापन करण्यास वाव असल्याचें सांगितलें. यानंतर कांहीं सहकारी बंधूंचीं भाषणें झालीं. श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं आपल्या भाषणांत आरंभापासूनच्या कल्पनेचा व प्रसाराचा आढावा घेऊन सप्ताहांत तात्त्विक चर्चेपेक्षां सर्वांनीं एकत्र येऊन खुल्या दिलानें चर्चेत भाग घ्यावा व चळवळींतील अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करावा अशी सूचना केली.

दुसऱ्या दिवशीं ( २७।१० ) बँकेचे माजी चेअरमन प्रा. वा. गो. काळे यांचें माहितीपूर्ण असें व्याख्यान झालें. त्यांचा विषय हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतिक सहकारी चळवळीची स्थिति काय आहे असा होता. प्रांतांप्रांतांत सहकारी चळवळीचें स्वरूप भिन्न आहे असें सांगतांना त्याची कारणमीमांसा पुढीलप्रमाणें त्यांनीं केली : ( १ ) प्रांताची आर्थिक परिस्थिति, ( २ ) नैसर्गिक सोयी-गैरसोयी, ( ३ ) सरकारी शेतसारापद्धति. उदाहरण म्हणून त्यांनीं पंजाब व महाराष्ट्र यांची तुलना केली. पंजाबांतील शेतकरी सुस्थितींत आहे. त्यांच्यामधील बरेचसे लोक सैन्यांत नोकरी करतात व पगार किंवा पेन्शन म्हणून पैसा आणतात व त्यामुळें त्यांच्या खर्चाची तोंडमिळवणी होऊं शकते. ज्यावेळीं महाराष्ट्रांतील शेतकरी सैनिक म्हणून काम करीत होता त्यावेळीं शेतकऱ्यांची सुस्थिति होती. इतर प्रांतांतील चळवळीचा आढावा घेतां मुंबई प्रांतांतील चळवळ भीतिप्रद नसल्याचें त्यांनीं सांगितलें. प्रत्येक प्रांताचें वैशिष्ट्य असल्याचें सांगून उदाहरण म्हणून विशिष्ट प्रकारची सहकारी चळवळ कशी यशस्वी होतें हें सांगतांना पंजाब प्रांतांतील जमीन एकीकरण पद्धत, मुंबई प्रांतांतील नागर सहकारी संस्था व मद्रासमधील मालविक्रीच्या सोसायट्या ह्यांसंबंधीं माहिती त्यांनीं सांगितली.

तिसऱ्या दिवशीं ( २८।१० ) सहकारी चळवळीचें शुद्ध आणि दृश्य स्वरूप या विषयावर प्रा. द. गो. कर्वे यांचे अध्यक्षतेखालीं प्रा. सी. बी. जोशी व प्रा. रा. वि. ओतूरकर यांचीं भाषणें झालीं. श्री. जोशी यांनीं आपल्या व्याख्यानांत निराशा टाळण्यासाठी सहकारी पद्धतीनें कोणाची कोठपर्यंत सुधारणा होईल याला मर्यादा घालावी असें सांगितलें. प्रा. ओतूरकर यांनीं, या चळवळीचें सरकारनें आरंभीं नेतृत्व पत्करलें परंतु त्यास जी दिशा द्यावयास पाहिजे होती ती दिली नाहीं; आतां अशी वेळ आली आहे, कीं प्रत्येक खेड्यांत ग्रामसंस्था, शाळा व पतपेढी असणें अत्यंत आवश्यक आहे असें सांगितलें. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत तत्त्व आणि व्यवहार यांची सांगड घालण्याची आवश्यकता प्रतिपादन केली व गेल्या ३०।३५ वर्षांचा सहकारी चळवळीचा आढावा घेतां निराश होण्याचें कारण नाहीं असें सांगितलें. या चळवळीमुळें खेड्यापाड्यांतून जागृति उत्पन्न होऊन त्यामुळें आतां विश्वास वाढत आहे असें त्यांनीं सांगितलें व या चळवळीचें मार्गदर्शकत्व जिल्हा बँकेसारख्या मध्यवर्ती बँकेकडे असावयास पाहिजे असें त्यांनीं सुचविलें.

तारीख २९।१०।४१ रोजीं पुणें जिल्ह्यांतील हाउसिंग सोसायट्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा श्री. य. रा. दाते यांचे अध्यक्षतेखालीं झाली. या चर्चेस सुरवात करतांना श्री. दाते यांनीं प्रांतांतील सहकारी चळवळीचा आढावा घेतला. प्रांतांतील या चळवळीसंबंधीं आंकडे सांगून भाड्याच्या रकमेहून थोडे जास्त रकमेचे हप्ते देण्यास परवडेल अशा किंमतींत घरें बांधल्यास मध्यम वर्गातील लोकांस स्वतःचीं घरें असणें शक्य होईल असें त्यांनीं सांगितलें.

तारीख ३०।१०।४१ हा स्त्रियांसाठी खास दिवस राखून ठेवला होता. ही सभा सेवासदनमध्यें सौ. येसूबाई कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखालीं झाली. या दिवशीं प्रा. भागवत यांनीं आपण म्यु. नोकरवर्गासाठी जी सोसायटी चालविली आहे त्याची माहिती दिली. आपली राहणी उत्पन्नाच्या बाहेर जाणार नाहीं अशी खबरदारी स्त्रियांनीं घ्यावी असें त्यांनीं सुचविलें. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत सुखी जीवन हें ध्येय गांठण्यास शक्य तेवढा सहकारी तत्त्वाचा अवलंब करणें जरूर आहे असें सांगितलें.

तारीख ३१।१०।४१ रोजीं पुणें शहरांतील नागर सहकारी संस्थांच्या अडचणींसंबंधीं विचार श्री. पोतदार यांचे अध्यक्षतेखालीं झाला. त्यांत एकाच सोसायटींत सभासद असणेबाबत व जिल्हा मध्यवर्ती बँकेनें व्याजाबाबत नागरपेढींना द्यावयाची सवलत यांसंबंधीं चर्चा झाली.

सप्ताहाचा समारोप श्री. ल. ब. भोपटकर यांचे अध्यक्षतेखालीं तारीख १।११।४१ रोजीं झाला. प्रथमतः समितीच्या अध्यक्षांनीं अहवाल सादर केला व त्यानंतर आंतरराष्ट्रीय मंडळाकडून आलेला संदेश श्री. द्रा. वि. गोखले यांनीं निवेदन केला. त्यानंतर मुंबईचे गव्हर्नर यांचा संदेश श्री. एन. पी. भागवत यांनीं वाचून दाखल्यावर श्री. भानू यांनीं सप्ताह समितीचे अध्यक्षांनीं जिल्ह्यांतील सोसायट्यांना पाठविलेला संदेश वाचून दाखविला. यानंतर सप्ताह-कालांत झालेल्या चर्चेचा आढावा घेण्यांत आला व "सहकार विचार मंडळा" बद्दल स्थूल कल्पना देण्यांत आली. सदर मंडळाच्या सभा प्रत्येक शनिवारीं सायंकाळीं भरणार असल्याचें जाहीर करण्यांत आलें. समारंभाचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब भोपटकर यांनीं आपल्या भाषणांत ते स्वतः बँकेचे अध्यक्ष असतांना आलेला अनुभव सभेस निवेदन करून त्यांनीं असा अभिप्राय व्यक्त केला कीं, हिंदुस्थानांत राष्ट्र–संवर्धनाचे उपाय पाश्चिमात्य देशांतील राष्ट्रांप्रमाणें व्हावयास पाहिजेत. सरकारनें तळमळीच्या जिव्हाळ्यानें कामास हात घातला तर १०।१५ वर्षांचे आंत हिंदुस्थान एक अत्यंत बलाढ्य व आर्थिक दृष्टीनें खंबीर राष्ट्र पुन्हां एकवार निर्माण होईल.

यानंतर आभार-प्रदर्शन व अल्पोपाहार होऊन सप्ताहाची समाप्ति झाली.

## व्यक्ति एक पण सभासदत्व अनेक

### नवीन कायद्याचा जाचकपणा

( ले.— श्री. इ. अ. पुराणिक )

नुकत्याच पुणें सें. बँक लि. च्या दिवाणखान्यांत साजरा करण्यांत आलेल्या सहकारी सप्ताहांत सहकारी चळवळींत येणाऱ्या वेगवेगळ्या अडीअडचणींचा विचार करण्यांत आला व त्यावेळीं यापुढें कोणाहि एका व्यक्तीस एका वेळीं कोणत्या तरी एकाच सहकारी संस्थेचे कर्जदार सभासद म्हणून रहातां येणार आहे असा जो नवीन नियम नंबर ४५ अमलांत येणार आहे त्यास संघटित स्वरूपानें विरोध करण्यांत यावा .असा मुद्दा उपस्थित केला गेला आहे व त्याच बरोबर सहकारी चळवळींतील प्रमुख म्हणून समजले जाणारे सद्गृहस्थ याचा विचार करतील अशीहि आशा व्यक्त करण्यांत आलेली आहे. वरीलप्रमाणें दंडक यापुढें आपणावर जो लादला जाणार आहे. त्याची झळ फक्त मध्यम वर्गीतील लोकांनाच लागणार आहे व त्याबद्दलची खटपट आपण होऊनच करावयास पाहिजे असें माझें मत आहे. सहकारी चळवळ सुरू होऊन आज बरेच दिवस झाले व त्या चळवळीचा फायदा बहुतेक सर्व लोकांनीं ( श्रीमंत व गरीब ) घेतलेला आहे व आपलीं कर्जे कांहीं अपवाद सोडून परत केलेलीं आहेत. बहुतेक सोसायट्यांचे सभासद हे मध्यम स्थितींतील वर्गांपैकीच आहेत व त्यांनीं केवळ आपणापाशीं मुबलक पैसा आहे व त्याचा विनियोग कसा करावा या भावनेनें सहकारी सोसायट्यांचे भांडवलांत गुंतविलेला आहे असें नाहीं. सहकारी सोसायट्यांचे सभासद होऊन एकमेकांच्या पतीचा उपयोग करून घेऊन आपली स्थिति कशी सुधारतां येईल या एकाच भावनेनें प्रेरित होऊन त्यांनीं सभासदत्व पत्करलें आहे. कोणतीहि चळवळ राजकीय वा सामाजिक यामध्यें दोष हे असावयाचेच व केवळ दोष काढून टाकावयाचे सोडून त्या चळवळीस मुळांत घाव घालणें हें कोणत्या विशेषणानें समाजापुढें मांडावें हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ज्याप्रमाणें आंब्याची आढी घातली असतां सर्वच आंबे उत्तम स्थितींत रहात नाहींत; त्यांतील कांहीं आंबे निरुपयोगी होणारच. आढींतील सर्वच आंबे उत्तम स्थितींत राहिले पाहिजेत व जर त्यांतील कांहीं आंबे निरुपयोगी ठरले तर ज्या झाडापासून त्यांची उत्पत्ति झाली तें झाड मुळांत नाहींसें करणें हें जितकें हास्यास्पद होणार आहे, तितकेंच हा नवीन नियम अमलांत आणण्यानें होणार आहे हें स्पष्टपणानें येथें नमूद करणें योग्य होणार आहे. आपणांवर जो दंडक कायद्यानें लादण्यांत येणार आहे त्याबद्दलचीं कारणें अनेक आहेत व त्यांतील मुख्य कारण असें भासविण्यांत येत आहे कीं एकच सभासद आपली आर्थिक परिस्थिति विचारांत न घेतां सर्व सोसायट्यांतून कर्जे उचलतो व तीं परत करण्याची आपली पात्रता आहे किंवा नाहीं याचा तो विचार करीत नाहीं; व त्यायोगें अशा प्रकारचीं बऱ्याच ठिकाणचीं उचललेलीं कर्जे परत करण्यास त्यास अडचण पडूं नये व त्याच्या कर्ज काढण्याच्या प्रवृत्तीस आळा पडेल व अप्रत्यक्ष रीतीनें त्याची आर्थिक परिस्थिति सुधारण्यास मदत केली जाईल. भासविण्यांत येत असलेल्या मुद्याचा खोल विचार केला असतां असें स्पष्टपणानें म्हणावें लागतें कीं, मध्यम वर्गीतील नोकरवर्गास मिळत असलेल्या पगारांतून त्यांची दैनंदिन अडचण भागवितां येणें अशक्य असल्यानें त्यांना अशा तऱ्हेनें कर्जे काढल्याशिवाय आपल्या खर्चाची तोंडमिळवणी करण्यास दुसरें साधन नाहीं; याचा विचार कायदा करतांना केलेला दिसत नाहीं. केवळ कायद्याचा दंडक म्हणून नाइलाजानें सभासदांस कोणत्या तरी एका संस्थेंत सभासद म्हणून रहावें लागेल व तेथें मिळेल तितकें कर्ज घेऊन बाकीच्या गरजा भागविण्याकरतां इतर खाजगी सावकाराकडे धांव घ्यावी लागेल व आपली गरज जबर व्याज देऊन भागवावी लागेल; म्हणजे कर्जदार सभासदांची आर्थिक परिस्थिति सुधारण्याची जी शाब्दिक तळमळ व्यक्त केली जात आहे ती किती हास्यास्पद आहे हें निराळें सांगण्याचें प्रयोजन आहे असें मला वाटत नाहीं. सहकारी चळवळ अस्तित्वांत येण्यापूर्वी गरीब लोकांची परिस्थिति खाजगी सावकारीनें किती बिघडली होती हें निराळें सांगण्याची आवश्यकता आहे असें नाहीं. ही चळवळ अमलांत आणून आपआपल्या गरजा एकमेकांनीं भागवाव्यात अशा प्रामाणिक हेतूनेंच चळवळीचें बीज रोवण्यांत आलें व त्या योजनेचा फायदा आज कित्येक वर्षे सभासद घेत आहेत. त्या चळवळीचे पाय आंत ओढण्याचे जे प्रयत्न आज होत आहेत तें करण्याचें कांहीं कारण आहे असें मला वाटत नाहीं. गरीब लोकांच्या आर्थिक गरजांची जाणीव श्रीमंतांना असेलच असें नाहीं. तर मग त्यांनीं गरिबांचा प्रश्न सोडविण्याचा हट्ट कां धरावा हें आम्हांस समजत नाहीं. गरिबांचा प्रश्न गरिबांनींच सोडवावा. सहकारी चळवळीचा प्रसार आताशींच कोठें होऊं लागला आहे तोंच त्यास अशा प्रकारचा दंडक घालून तिचा पाडाव करण्याचा जो प्रयत्न होऊं पहात आहे त्यास संघटित स्वरूपानें विरोध करणें हें प्रत्येक सभासदाचें कर्तव्य आहे हें नमूद करणें अयोग्य आहे असें मला वाटत नाहीं. सदर दंडक घालण्यापूर्वी ज्यांना मध्यम वर्गातील लोकांची परिस्थिति समजावून घेतां आली असती अशा कार्यकर्त्यांची कमिटी नेमावयास पाहिजे होती व त्या कमिटीनें प्रत्येक सोसायटींतील सभासदांची आर्थिक पहाणी करावयास पाहिजे होती व नंतर सर्व सभासदांस एकत्रित बोलावून आपला अभिप्राय त्यांना आगाऊ समजावून देऊन पुढें काय धोरण आखावयास पाहिजे याचा विचारविनिमय करावयास पाहिजे होता. तसा प्रयत्न झालेला नाहीं व त्याकरतां सदर कायदा हा जुन्या सभासदांस लागू पडणार नाहीं तर नवीन सभासद होऊं इच्छिणाऱ्या सभासदांनाच लागू पडणार आहे असें गृहीत धरण्यास कांहीं हरकत आहे असें मला वाटत नाहीं; व त्याकरतां पुन्हां एकवार या प्रश्नाचा विचार अधिकारी वर्गानें करावा व तोंपर्यंत या कायद्याचा अम्मल सुरू होऊं नये अशा प्रकारची मागणी सर्व सहकारी बांधवांनीं करावी असें मला वाटतें. त्याप्रमाणें कांहीं तरी व्यवस्था होईल अशी आशा व्यक्त करून हा प्रश्न तज्ज्ञ सहकारी बांधवांकडे चर्चेकरतां व जरूर त्या उपाययोजनेकरतां मांडीत आहे व त्याप्रमाणें त्यांनीं गरीब सभासदांचीं गाऱ्हाणीं अधिकारी वर्गाकडे मांडावीत.

---

### ट्रेझरी बिलांवर १० आ. ११ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं. त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आ. ११ पै इतका पडला.

### आखूड धाग्याच्या कपाशीचा उठाव कसा होईल ?

बंगाल, उमरा, इत्यादि जातींच्या आखूड धाग्याच्या कपाशीचा उठाव कसा करतां येईल, हा बिकट प्रश्न हिंदुस्थानांत उपस्थित झाला आहे. जपानशीं हिंदुस्थानाचा व्यापार बंद झाल्यापासून ह्या कपाशीचें एक अत्यंत महत्त्वाचें गिऱ्हाईक नाहींसें झालें आहे. आखूड धाग्याच्या कपाशीचा साठा वाढत चालला आहे, त्या कारणानें ह्या कपाशीचा बाजारभाव आणखी उतरणार कीं काय अशी धास्ती वाटूं लागली आहे. असें असूनहि, लांब धाग्याच्या कपाशीचा व त्याच्या कापडाचा तुटवडा पडूं लागला आहे. आखूड व मध्यम धाग्याच्या कपाशीचें कापड सरकारनें गिरण्यांतून काढवून घेण्याचें ठरविल्यास व अशा कापडाचे उत्पादनास प्रोत्साहन दिल्यास हिंदी कपाशीची परिस्थिति सुधारण्यास सहाय होईल. आखूड धाग्याच्या कपाशीचा उठाव वाढविणें व त्या कपाशीची लागवड कमी करण्याची सटपट करणें हाच प्रस्तुत परिस्थितीवर उपाय आहे.

### चहा

चीनमध्यें चहापानास केव्हां प्रारंभ झाला, हें सांगतां आलें नाहीं, तरी ख्रिस्त शकापूर्वी २७०० वर्षें चेन-मुंग बादशहानें आपल्या प्रजाजनांस केलेला खालील उपदेश प्रसिद्ध आहे :—

"लोकांनीं चहापान करावें, कारण चहा दारूपेक्षा चांगला आहे. चहानें मनुष्यास गुंगी येत नाहीं. जागृतावस्थेंत मनुष्य बडबडणार नाहीं, अशी कोणतीहि गोष्ट चहापानामुळें धुंदी चढून तो बोलेल, असें घडत नाहीं. पाण्यापेक्षा चहा चांगला, कारण चहा जंतुमय नसतो." ३,६०० वर्षांनंतर चहानें जपानांत प्रवेश केला व १६ व्या शतकांत तो युरोपांत शिरला. आज, चहा हा इंग्लंडचें राष्ट्रीय पेय बनला आहे. हिंदुस्थानांतहि खेडोपाडीं चहा पसरला असून त्याच्या प्रचारासाठी पद्धतशीर प्रयत्न चालू आहेत.

### हिंदुस्थानांत कागदाचा उठाव

| आयात | टन. |
|---|---|
| पुठ्ठपल्पचा कागद | ४१,५३८ |
| जुनीं वर्तमानपत्रें | ४७,३८४ |
| रासायनिक रांध्याचा लिहिण्याचा व छपाईचा कागद | ३७,६५४ |
| स्ट्रॉबोर्ड, कार्डबोर्ड, पेस्टबोर्ड, इ. | २७,०५७ |
| हिंदी उत्पादन | ५९,१९८ |
| एकूण उठाव | २,१२,८३१ |

### कॉफीचें उत्पादन

कॉफीचें जागतिक उत्पादन २५ लक्ष टनांचें आहे. त्यांपैकीं ६०% उत्पादन एकट्या ब्राझीलमध्यें होतें. कोलंबियाचा वाटा ११% व हिंदुस्थानचा वाटा १% आहे.

### कॉफी

कॉफीच्या पेयास ॲबिसिनियांत प्रारंभ झाला. १२ व्या शतकांत अरबस्तानांत त्यानें प्रवेश केला व लंडन-पॅरीसकडे जाण्यास त्यास आणखी ३०० वर्षें लागलीं.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५-५५) | १११—४ |
| ४% १९४३ | १०४—० |
| ३½% बिनमुदत | ९६—० |
| ३½% १९४७-५० | १०३—४ |
| ३% (१९६३-६५) | ९५—१ |
| २¾% १९४८-५२ | ९७—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) | ११०—० |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३-६३) | ११६—१२ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) | १२७—४ |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००-५०) ११% | १४८—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ९% | ५२—० |
| इंपीरिअल बँक (५००) १२% | १६२२—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) १½ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% | १०८—१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १२% | १४४—० |
| कराची (१००) ९% | २११—४ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% | १६९६—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% | १७३१—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती (१००) ४½% | १०४—८ |
| पाचोरा-जामनेर (१००) १½% | ९७—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) ११½% | ८७५—० |
| तापी व्हॅली (५००) ८% | ६४३—१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. | २२७—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु. | ५१—८ |
| शिंदिया स्टीम (१५) १ रु. | २८—२ |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु. ८ आ. | ५५—० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. | ४५५५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% | २१७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) ७½% रु. | १५४—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. | ३९८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) १७२ रु. १० आ. ० पै. | २११०—० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. | १६६—४ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास | ४३-१०-६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६२-१४-० |

## अखिल भारतीय 'ट्रंक टेलिफोन'शीं हैद्राबाद जोडण्यांत यावयाचें आहे

### हिंदुस्थान सरकारबरोबर झालेला करार

### संस्थानांतर्गत 'ट्रंक टेलिफोन' योजना

हैद्राबाद संस्थान अखिल भारतीय 'ट्रंक टेलिफोन सिस्टिम्'शीं (दीर्घान्तर दूरश्रवण पद्धति) जोडणें आणि राजधानीचा संबंध जिल्ह्यांशीं अधिक निकट करण्यासाठीं संस्थानांतर्गत 'टेलिफोन सिस्टिम्' सुरू करणें यांसंबंधींच्या योजनेमुळें आणखी एक प्रगति-टप्पा गाठण्यांत आला आहे. निजाम संस्थान ब्रिटिश हिंदुस्थानाशीं 'ट्रंक टेलिफोन' नें जोडण्याबाबत निजाम सरकार व हिंदुस्थान सरकार यांमध्यें एक करार झाला आहे. या करारान्वयें हैद्राबाद 'एक्सचेंज' (दूरश्रवण केन्द्र) बोलारम येथील 'ट्रंक टेलिफोन एक्सचेंज'शीं जोडण्यासाठीं एक 'टेलिफोन लाइन' (दूरश्रवण मार्ग) बांधण्यांत यावयाची आहे. या 'लाइन'ची मालकी हिंदी पोस्ट व टेलिग्राफ खात्याकडे राहील व संस्थानास यासाठीं कांहीं भाडें द्यावें लागणार नाहीं. मध्यतरींच्या काळांत, हैद्राबाद शहराशीं जिल्ह्याचीं ठिकाणें जोडण्याकरितां संस्थानांतर्गत 'ट्रंक टेलिफोन लाइन्स' वाढविण्यांत येणार आहेत.

### ब्रिटिश हिंदुस्थानाशीं संबंध

ब्रिटिश हिंदुस्थानाच्या 'ट्रंक टेलिफोन सिस्टिम्'शीं हैद्राबाद जोडण्यासंबंधींची सूचना इ. स. १९३७ मध्यें सिकंदराबाद व्यापारी संघानें प्रथम केली होती. मुंबई व सोलापूर या दोन शहरांमध्यें अगोदरच 'ट्रंक सर्व्हिस' असल्यानें हैद्राबाद व मुंबई अशा सर्व्हिसनें, सोलापूरमार्गें जोडली जावींत अशी या संघाची सूचना होती. पूर्ण चौकशीनंतर ५ लाख रुपयांची योजना हैद्राबाद टेलिफोन खात्यानें तयार केली. परंतु ही योजना फायदेशीर होणार नाहीं असें आढळून आलें.

### बोलारम येथें मुख्य 'ट्रंक टेलिफोन'

मध्यंतरींच्या काळांत सोलापूर येथील अखिल भारतीय दीर्घांतर 'टेलिफोन सिस्टिम्'शीं बोलारम जोडण्याकरितां एक 'टेलिफोन लाइन' स्थापण्यांत आली असून 'कॉल ऑफिस' (संदेश पाठविण्याची कचेरी) बोलारम येथें ठेवण्यांत आली. संस्थानच्या स्वतःच्या 'टेलिफोन सिस्टिम'च्या व्यापाराविषयक भवितव्यावर त्यामुळें अनिष्ट परिणाम होईल असें लवकरच आढळून आलें, आणि त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारशीं हैद्राबाद सरकारनें बोलणें-चालणें सुरू केलें. सरतेशेवटीं, सोलापूर-बोलारम 'लाइन'शीं 'कनेक्शन' मिळविण्यासाठी व त्या योगानें अखिल भारतीय 'सिस्टिम'चा संबंध संपादन करण्यासाठी हैद्राबाद टेलिफोन 'एक्सचेंज्'ला सवलती देण्याचें कबूल करण्यांत आलें.

### करार

या करारान्वयें हैद्राबाद 'एक्सचेंज्' व बोलारम 'एक्सचेंज्' यांना जोडणाऱ्या टेलिफोन 'लाइन'चें बांधकाम हिंदुस्थान सरकारचें पोस्ट व टेलिग्राफ खातें करील व या 'लाइन'ची व्यवस्था व मालकी या खात्याकडेच राहील, परंतु या 'जंक्शन लाइन' साठी संस्थान कांहीं भाडें देणार नाहीं. याच्या उलट, बोलारम अथवा हैद्राबाद 'एक्सचेंज्' पासून अंशतः हैद्राबाद 'स्टेट टेलिफोन सिस्टिम्' आणि अंशतः हिंदुस्थान सरकारच्या 'टेलिफोन सिस्टिम्' यांवरून जाणाऱ्या सर्व 'ट्रंक कॉल्स'ची (दीर्घांतर भाषणें) फी त्या त्या प्रमाणें हिंदुस्थान सरकार किंवा हैद्राबाद सरकार यांच्याकडे जमा करण्यांत येईल. हिंदुस्थान सरकारच्या हद्दींतून जाणाऱ्या 'कॉल्स'ची फी हिंदुस्थान सरकारकडून वरचेवर ठरविण्यांत येत असते व हैद्राबाद मध्यवर्ती 'ऑटोमॅटिक एक्सचेंज्'च्या बाबतींत प्रत्येक 'कॉल'ला कल्दार तीन आणे आकारण्यांत येतात.

### संस्थानांतर्गत 'ट्रंक लाइन्स'

राज्यकारभार व व्यापारविषयक महत्त्वाच्या कारणांसाठीं हैद्राबाद शहरास आणि संस्थानांतील प्रमुख व्यापारी केन्द्रें यांना जोडण्यासाठीं जिल्ह्यांतील प्रचलित 'टेलिफोन सिस्टिम्'ची वाढ करण्याची आवश्यकता बरेच दिवसांपासून भासत आहे, आणि निजाम सरकारनें यांविषयींच्या सूचनाहि मंजूर केल्या आहेत. यांसंबंधीं हिंदी पोस्ट व टेलिग्राफ खात्याकडे लिहिण्यांत आलें असून रेल्वेच्या बाजूस व इतर ठिकाणीं असलेल्या त्याच्या 'लाईन्स'चा उपयोग भाडें घेऊन करूं देण्यास या खात्यानें कबूली दिली आहे. तथापि, या योगानें ज्या योजनेमुळें 'टेलिफोन लाईन' साठी लागणाऱ्या जिनसांच्या सांठ्याचा खप होईल अशा योजना प्रस्तुत युद्धजन्य परिस्थितीच्या योगानें सध्या हातीं घेणें हिंदी पोस्ट व टेलिग्राफ खात्यास अशक्य झालें आहे, म्हणून ही योजना तात्पुरती तहकूब करण्यांत आली आहे. परंतु युद्धकार्यासाठीं तिची जरूरी असल्यास ही योजना हातीं घेण्यांत येईल.

---

### मुंबई बंदरांत घोड्यांची आयात

१९४०-४१ मध्यें मुंबई बंदरांत परदेशांतून २७९ घोड्यांची आयात झाली. त्यांचा तपशील खालीलप्रमाणें आहे :—

| बंदर | संख्या |
|---|---|
| ब्रिटिश बंदरें | १३४ |
| भूमध्य समुद्र | १ |
| इराणचें आखात | १२२ |
| हिंदी बंदरें | २२ |
| एकूण | २७९ |

ह्यांपैकी १४७ इंग्लिश, १३० अरब व २ वेलर्स जातीचे होते. १९३९-४० सालीं ९२३ घोड्यांची आणि १९३८-३९ सालीं १,४५७ घोड्यांची व २ गाढवांची आयात झाली होती.




फॉस्फौरा:—

अशक्ततेमुळें हाडांतील (स्फुराम्लाचा) (क्षार) स्फुरण पावत नसल्यानें शरीराचे जे धर्म ते बरोबर काम करित नाहींत त्यामुळें मुलें सुस्त, आळशी तरुण षंढ, निर्वीर्य, कामाचा कंटाळा करणारे, तरुण स्त्रियांच्या गर्भाशयोन्माद (आचके) वंधत्व आणणें इत्यादि व वृद्ध चिडखोर, नेभळे वगैरे विकार हाडांतील मज्जातंतू व शुक्राची वाढ होत नसल्यानें होतात. त्यावर उपाय म्हणजे फॉस्फौरा गोल्ड-टॉनिक हें फार उपयुक्त औषध आहे. एक बाटली चाळीस दिवस पुरते. किं. रु. ३-८-०. शिवाय पोस्टखर्च.

— माहिती पत्रक मागवा —

रॉय आणि कंपनी, १७६, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई नं. २.




—SOLD, BOUGHT, HIRED OR MADE TO ORDER.—

First and second hand iron or wooden furniture.

Address:—Shevak Quarters, 1227 F. C. Road, Poona 4. Industrial Centre.

*Yours faithfully,* C. R. Shevak.

सर्व प्रकारचें लोखंडी व लांकडी फर्निचर विकत घेतलें जातें किंवा नवीन तयार करून अगर भाड्यानें मिळतें.

पत्ता—शेवक क्वार्टर्स, १२२७ फ. कॉ. रोड, पुणें नं. ४.

इंडस्ट्रियल सेंन्टर, कारखाना पत्ताः—१५३ कसबा, पुणें २.

आपला—सी. आर. शेवक.

## बापट ब्रदर्स- १००३ सदाशिव, पुणें २

आमचे दुकानीं—

★ सर्व तऱ्हेचे स्टोव्हज, पेट्रोमॅक्स, व इतर बत्त्या, सायकल्स व त्यांस लागणारें सुटे सामान मिळेल व तत्संबंधीं दुरुस्तीचें काम काळजीपूर्वक व वक्तशीर केलें जातें. ★

तसेंच—

जावा स्पिरिट, उत्तम फिनाईल, स्टॅन्डर्ड ऑईल कंपनीचें रॉकेल, रेनकोटस्, गॉगल्स, थरमॉस, टॉर्चेस वगैरे.

सर्व तऱ्हेचा माल घाऊक व किरकोळ योग्य भावानें मिळतो.

## मुजुमदार टॉय वर्क्स

या आणि पहा

मानां हालणारीं व साधीं लाकडी चित्रें

समक्ष येऊन खात्री करा.

२५५ सदाशिव पेठ, शेडगेवाडी, पुणें शहर.

## स्वादिष्ट मसाला करणारे आद्य कारखानदार





व्ही. पी. बेडेकर

बेडेकर आणि सन्स

पुणें येथील एजंट—

दत्तात्रय नारायण हेजीब.



## माधवाश्रम

हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून, रेल्वे-स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.

जागा मध्यवस्तींत, हवाशीर, लागणारे फर्निचरनें शृंगारित असून, सोयीमुळें ती शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहणेची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

माधवाश्रम बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक




पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें

**संग्रह करा**

कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट

पाचकवटी, पंचकोलासव

तसेंच

पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी

**—: रक्तवर्धक :—**

सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें

**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**'पायोनियर डाइंग हाऊस'**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




**मधुमेहावरील औषध**

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

| | | |
|---|---|---|
| बंबाचे माडीवर | **महिंद्रकर ब्रदर्स**<br>तयार कपड्याचे व्यापारी | बुधवार चौक, पुणें |


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख १९ नोव्हेंबर, १९४१ | अंक ४६

* विमाक्षेत्रांतील 'कॉमनवेल्थ' चें अढळ स्थान *

१९४० चें पूर्ण केलेलें काम.........४५ लक्षांहून अधिक

★ बोलका—ढलपा ★

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८२,००० |
| सरकारी कर्जरोखे, गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१३,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

• कॉमनवेल्थचीं वैशिष्ट्यें •

(१) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरूकता
(२) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
(३) काळजीपूर्वक काटकसरीची व्यवस्था
(४) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
(५) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

## कॉमनवेल्थ

ॲशुअरन्स कंपनी लि., पुणें २.

—शाखा—

मुंबई—मद्रास—कलकत्ता—नाशिक—कराची—अहमदाबाद

एम्. एन्. भागवत, बी. ए.
ॲक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडंट.

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## विविध माहिती

**दोन कोटि रुपयांचीं युद्धकर्जें निजाम सरकारनें घेतलीं**

निजाम सरकारनें आणखी २५ लक्ष रुपयांचे ३% डिफेन्स बॉंड्स घेण्याचें ठरविलें आहे. म्हणजे, निजाम सरकारची डिफेन्स बॉंड्समधील रकम आतां २ कोटि रुपये होईल.

**चेक्सची देवघेव**

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हौसमध्यें ३१ ऑक्टोबर अखेर संपलेल्या आठवड्यांत २१ कोटि, ४८ लक्ष रुपयांच्या १,२६,३७० चेक्सची देवघेव झाली.

**सुएझ कालव्याचे भाग**

सुएझ कॅनॉल कंपनीचे भाग विकत घेऊन त्या कालव्यावर आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याचा जर्मनीचा प्रयत्न चालू आहे. त्यामुळें सुएझ कालव्याच्या भागांची किंमत सवापट झाली आहे.

**बिस्किटांची निर्गत**

हिंदुस्थानांत तयार झालेलीं २४½ लक्ष पौन्ड बिस्किटें आतांपर्यंत परदेशांतील सैनिकांसाठी रवाना झालेलीं आहेत. नुकतीच एका पंधरवड्यांत ४५ हजार पौंड बिस्किटांची निर्गत झाली.

**वायरमेनच्या परीक्षा**

इलेक्ट्रिकल सुपरवायझर्स व वायरमेन ह्यांच्या परीक्षेस मुंबई, पुणें व अहमदाबाद ह्या तीन ठिकाणीं २६ जानेवारी रोजीं प्रारंभ होईल.

**इजिप्तचा गहूं ग्रेट ब्रिटन घेणार**

इजिप्तमध्यें कपाशीची लागवड कमी करून गव्हाची लागवड वाढविण्यास प्रोत्साहन देण्याचे हेतूनें, ग्रेट ब्रिटन इजिप्तचें १९४१-४२ चें गव्हाचें सर्व जादा पीक विकत घेणार आहे. इजिप्तच्या येत्या वर्षांतील कपाशीचा उठाव करण्यास त्याला ग्रेट ब्रिटनची मदत हवी असल्यास, एकूण ५० लक्ष कँटर कपाशीचें उत्पादनच केवळ हिशेबांत घेतलें जाईल.

**हिटलरचें वजन घटूं लागलें, केस पिकूं लागले**

"जर्मनीचें रशियाशीं युद्ध सुरू झाल्यापासून हिटलरचें वजन निदान १४ पौंडांनीं तरी घटलें आहे, त्याचा गणवेष त्याचे अंगावर लोंबूं लागला आहे व त्याचे केस जलद पिकूं लागले आहेत अशी माहिती दक्षिण अमेरिकेंतील एका मुत्सद्यानें समक्ष पाहणीनंतर सांगितली आहे."—एका ब्रिटिश वृत्तपत्रांतील "आजच्या गप्पा" ह्या सदरांतील एक परिच्छेद.

**सफरचंदें**

ग्रेट ब्रिटनमध्यें सफरचंदांचीं १ कोटि, ३० लक्ष झाडें आहेत. प्रत्येक झाडास दरसाल ४० शेर वजनाचीं फळें येतात.

**काळा आजार**

उत्तर आफ्रिकेंत सर्वत्र फैलावलेल्या "काळा आजार" रोगावर उपाय सांपडला आहे. त्यामुळें, मृत्यूचें प्रमाण ३०% ते ४०% चें १०% वर आलें आहे, अशी माहिती प्रो. वॉरिंग्टन यॉर्क यांनीं नुकतीच सांगितली.

**त्रावणकोर रेडिओ स्टेशन**

त्रावणकोर येथील रेडिओ स्टेशन जून, १९४२ च्या सुमारास सुरू होईल. मलायलम् भाषा बोलणारांच्या गरजांकडे तें विशेष लक्ष पुरवील. त्याची शक्ति पांच किलोवॅट असून त्रावणकोर विश्वविद्यालयाचे नियंत्रणाखालीं तें चालविलें जाईल.

**सर हेन्री स्ट्रॅकॉश**

सर हेन्री स्ट्रॅकॉश ह्यांनीं आपल्या वयाच्या ७० व्या वर्षी विवाह केला आहे. कांहीं काळ ते हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार होते. ते चहा पीत नाहींत व धूम्रपानहि करीत नाहींत.

**शेतीचीं प्रात्यक्षिकें**

शेतीच्या प्रात्यक्षिकांचीं केंद्रें स्थापण्याकरितां मुंबई सरकारनें चालू वर्षी ३३ हजार रुपयांची तरतूद केली आहे. प्रात्यक्षिकांच्या केंद्रांकरितां शेतकी खात्यानें ४० गांवें मुकर केलीं आहेत. ह्या वर्षअखेर अशा केंद्रांची संख्या ९४ होईल.

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स**

वरील संस्थेची १४ वी वार्षिक सभा शुक्रवार, ता. २१ नोव्हेंबर १९४१ रोजीं ५–३० वाजतां भरणार आहे.

**खास तिकिटें**

ग्रेट ब्रिटनमध्ये दरसाल पोस्टाची ६½ अब्ज तिकिटें लागतात. म्हणजे, दररोज सुमारें २ कोटि तिकिटें छापून झालीं पाहिजेत. चालू युद्धाच्या संबंधांत नवीन तिकिटें काढावीं अशी एक सूचना आहे. गेल्या १०० वर्षांत विशेष प्रसंगानें आतांपर्यंत फक्त सहा वेळा खास तिकिटें काढण्यांत आलेलीं आहे :–(१) वेंब्ले प्रदर्शन, १९२४-२५, (२) पोस्टल यूनियन काँग्रेसची बैठक, १९२९, (३) पांचव्या जॉर्ज बादशहांची रौप्य ज्युबिली, १९३५, (४) राज्यारोहण, १९३७ (५) पेनी पोस्टाचा शतसांवत्सरिक उत्सव, १९४०.

**गेल्या आठवड्यांतील ट्रेझरी बिलांची विक्री**

| | |
|---|---|
| एकूण मागणी | २ कोटि रुपये |
| आलेले अर्ज | ३ कोटि, ३४½ लक्ष रुपये |
| स्वीकारलेले अर्ज | २ कोटि रुपये |
| व्याजाचा सरासरी दर | द. सा. द. शे. १२ आ. २ पै |

**बोगदे**

जिब्राल्टरच्या डोंगराखालीं १० मैल लांबीचे नवे बोगदे खणण्यांत आले आहेत. दरमहा अर्धा मैल लांब नवे बोगदे तयार होत आहेत.

**मँच्युक्युओचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम**

मँच्युक्युओनें द्वितीय पंचवार्षिक कार्यक्रम आखला आहे. त्यांत लोखंड, पोलाद, कोळसा, रसायनें, यंत्रसामुग्री, कागदाचा रांधा, सिमेंट, मोटारगाड्या, इत्यादींचें वाढतें उत्पादन अपेक्षित आहे. सोयाबीन, गहूं, तांदूळ इत्यादींचें उत्पादनहि वाढविण्यांत येईल. १५ खासगी रेल्वेज बांधण्यांत येणार आहेत. कार्यक्रमास लागणाऱ्या पैशापैकी दोन तृतीयांश रकम जपान देणार आहे.

**युद्धोत्तर जर्मनी**

"युद्धसमाप्तीनंतर, जर्मनीवरील प्रशियाचें वर्चस्व नाहींसें व्हावें ह्या दृष्टीनें जर्मनीची राज्यघटना ठरवून खुद्द प्रशियाचींहि लहान लहान राष्ट्रें बनवावीं. १९३८ पूर्वीचीच जर्मनीची सरहद्द कायम ठेवावी. आजूबाजूच्या राष्ट्रांच्या हितसंबंधास तसें आवश्यक असल्यास त्यांत थोडा बदल करावा. १९१८ पूर्वीपेक्षा जर्मन राष्ट्राचा आकार लहान झाला, तर वसाहतींमध्यें त्याची भरपाई करतां येईल. झेकोस्लोव्हाकिया व पोलंड ह्यांचे संबंध संघटित करण्याची आवश्यकता निर्विवाद आहे" झेकोस्लोव्हाकियाचे अध्यक्ष मि. बेनस ह्यांचें अबरडीन विश्वविद्यालयांतील भाषण.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५७८ | रसशाळा पुणें लि.— हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न व खर्च. | |
| २ विलायतेंतील हिंदी ... कर्जाची परती ... | ५७९ | ५ युद्धपरिस्थितीची ... आर्थिक पार्श्वभूमि ... | ५८३ |
| ३ मुसार माल विक्रीची व्यवस्था ... | ५८० | ६ मोटार कारखाना ... | ५८४ |
| ४ स्फुट विचार ... | ५८१ | ७ रेल्वेज विकत घ्या ... | ५८४ |
| युद्धपरिस्थितीचा आढावा—मि. चर्चिल ह्यांचा खुलासा—उत्तेजन कारक घडामोडी—युद्धसामुग्रीचा पुरवठा—जपान काय करणार?—रानडे शतसांवत्सरिक जन्मदिन—औद्योगिक संशोधन निधी आयुर्वेद | | ८ विजेची नवी योजना | ५८४ |
| | | ९ सहकारी संस्थांची ... अंतर्व्यवस्था ... | ५८५ |
| | | १० नाविक युद्धाच्या ... अडचणी ... | ५८६ |
| | | ११ लॉर्ड रे म्यूझियम ... | ५८६ |
| | | १२ निवडक बाजारभाव | ५८६ |



# अर्थ

बुधवार, ता. १९ नोव्हेंबर, १९४१


## विलायतेंतील हिंदी कर्जाची परती

हिंदुस्थान सरकारनें लंडनच्या बाजारांत उभारलेल्या कर्जापैकीं कांहीं भाग फेडून टाकण्याची आणि त्याच्या जागीं ह्या देशांत काढलेल्या कर्जाची स्थापना करण्याची योजना कांहीं महिन्यांमागें अमलांत आणली गेली, तिच्या स्वरूपाचें विवेचन आम्हीं त्यावेळीं केलेंच आहे. ह्या विषयाची चर्चा मध्यवर्ती असेंब्लींत श्री. जमनादास मेथा ह्यांनीं पुढें मांडलेल्या ठरावाच्या चर्चेच्या अनुषंगानें झाल्यानें त्यासंबंधानें दोन शब्द येथें लिहिणें आवश्यक आहे. हिंदुस्थान सरकारचें विलायतेंतील कर्ज अजूनहि शिल्लक आहे, त्याची फेड व परती करण्याचा प्रसंग येईल तेव्हां असल्या व्यवहारांत ह्या देशास पैशाचें नुकसान होणार नाहीं ह्या बेतानें तो केला जावा अशी सूचना श्री. जमनादास ह्यांच्या ठरावांत होती, ती असेंब्लीनें बिनविरोध मान्य केली. हिंदुस्थानच्या वतीनें होणाऱ्या आर्थिक व्यवहारांत खर्च शक्य तेवढा अल्प व्हावा ही साधी व सरळ सूचना सरकार तरी अमान्य कशी करणार? श्री. जमनादास ह्यांच्या मूळच्या ठरावास एक शेपूट होत, तें त्यांनीं छाटून टाकण्याचें कबूल केलें तेव्हांच सरकारनें त्यास विरोध न करण्याचें ठरविलें हें मात्र येथें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. हिंदुस्थानच्या विलायतेमधील कर्जाची परती कांहीं महिन्यांमागें झाली तीमध्यें ह्या देशास चाट लागली तशी चाट ह्या पुढील तसल्या व्यवहारांत लागू नये अशी मेख मूळच्या ठरावांत होती आणि ती अखेर काढून टाकण्यांत आली. कर्जाच्या परतीच्या मागील व्यवहारांत बूड लागली हें श्री. जमनादास ह्यांस सरकारच्या गळीं उतरावयाचें होतें आणि तिची पुनरावृत्ति न होण्याची काळजी घेतली जावी अशी त्यांची सूचना होती. ठरावाच्या शेवटल्या भागांतला बोचका काटा श्री. जमनादास ह्यांनींच काढून टाकल्यामुळें सरकारचे कर्जाबाबतचे व्यवहार काटकसरीनें केले जावे हें साधें तत्व त्यांत शिल्लक राहिलें. ह्यामुळें तें मान्य करण्यास सरकारास कांहींच हरकत वाटली नाहीं. ठरावांतला निषेधात्मक व टीकाविषयक भाग गेला आणि कर्जाच्या परतींमध्यें ह्या देशावर खर्चाचा बोजा निष्कारण पडणार नाहीं असें सरकारचें धोरण असावें ही सूचना त्यांत उरली.

कर्ज-परतीच्या गेल्या योजनेंत हिंदुस्थानास ३५ कोटि रुपयांचें नुकसान झालें असें श्री. मेथा ह्यांचें म्हणणें होतें आणि त्याच्या समर्थनार्थ त्यांनीं कांहीं आकडे पुढें मांडले. परतीच्या योजनेंतील कर्जरोख्यांस तीं कर्जे उभारलीं तेव्हां ११ दशलक्ष पौंड बट्टा द्यावा लागला आणि रोख्यांच्या बाजारच्या किंमती उतरल्या होत्या त्यावेळीं त्यांची खरेदी करण्यांत कसूर झाल्यामें २० कोटि रुपये बुडाले व ह्या रीतीनें एकूण ३५ कोटि रुपयांची चाट हिंदुस्थानास लागली असा कोटिक्रम त्यांनीं लढवला. परतीच्या व्यवहारांत ब्रिटिश राष्ट्राची सोय व्हावयाची असल्यानें त्यानें योग्य मुदतीच्या आंत पैसा परत दिल्याबद्दल हिंदुस्थानास सूट मिळणें वाजवी होतें असें ते म्हणाले. मागें झालेल्या गोष्टींचा वाद न घालतां ह्यापुढें स्टर्लिंगमधील कर्जाची फेड होईल तेव्हां रोख्यांचा १९३९ मधला व आजचा भाव ह्यांच्या सरासरीच्या किंमतीनें ती केली जावी म्हणजे हिंदुस्थानास चढीचे दर द्यावे लागणार नाहींत अशी त्यांनीं विधायक सूचना केली. हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जरेमी रेसमन, ह्यांनीं त्यांचे सर्वच मुद्दे खोडून काढण्याचा प्रयत्न केला. कर्जाच्या परतीच्या मागील योजनेंत ह्या देशास निष्कारण फाजील खर्च पडला हें म्हणणें त्यांनीं नाकबूल केलें. कोणतेंहि कर्ज काढतांना द्यावा लागणारा बट्टा हा नुकसानीच्या सदरांत घालणें चुकीचें आहे असें ते म्हणाले. कर्ज उभारतांना तें घेणारा भांडवलवाल्यांशीं परतफेडीच्या किंमतीचा करार करतो आणि त्यांत ऋणकोनें आपल्या मर्जीप्रमाणें बदल करूं पाहणें हें नीतीस धरून नाहीं आणि शिवाय स्टर्लिंग कर्जरोखे धारण करणारे लंडनमधील गबर भांडवलवालेच आहेत असें नसून त्यांमध्यें किंत्येक हिंदी व्यक्ती व संस्था आहेत, ही गोष्टहि त्यांनीं असेंब्लीच्या नजरेस आणली. स्टर्लिंग रोख्यांचे भाव खाली गेले होते त्यावेळीं त्यांची खरेदी व फेड केली जाणें आवश्यक होतें ह्या मुद्यांत तथ्य नाहीं, कारण ह्या व्यवहारास लागणारा पैसा सरकारपाशीं लंडनमध्यें असल्यावांचून तो हातीं घेतां येणें अशक्य आहे असें उत्तर सर जरेमी ह्यांनीं श्री. मेथा ह्यांस दिलें. हिंदी चलन व्यवस्थेचा आधार म्हणून लंडन येथें रोख्यांच्या स्वरूपांत शिल्लक ठेवावी लागते तिचा उपयोग कर्जफेडीकडे करणें कांहीं झालें तरी शक्यच नव्हतें. जरूरीपेक्षा अधिक पैसा लंडनमध्यें राहूं लागला तेव्हां सरकारनें त्यामधून रोखे खरेदी चालू केली हा तर मामुली व्यवहार असल्यानें त्यावर आक्षेप घेतां येत नाहीं. ब्रिटिश सरकारनें हिंदी स्टर्लिंग रोखे वटहुकूम काढून स्वतःच्या ताब्यांत घेतल्यावांचून पुढचा व्यवहार झालाच नसता. ह्या कामीं हिंदुस्थान सरकारास त्या सरकाराशीं वाटाघाटी करून कर्जपरतीची योजना निश्चित करणें आवश्यक होतें. ह्या एकूण व्यवहारांत रोख्यांच्या बाजारभावांच्या बदलामुळें हिंदुस्थानास विशेष खोट अशी कांहींच लागली नाहीं हें सिद्ध करण्याकडे सर जरेमी ह्यांच्या युक्तिवादाचा रोख होता. हिंदुस्थान देश स्वतंत्र असता तरी त्याच्या सरकारानें आपणापेक्षा दुसरें कांहीं निराळें केलें असतें असें म्हणण्यास मुळीच जागा नसून कर्जपरतीचा व्यवहार ब्रिटिश सरकारानें योग्य रीतीनें घडवून आणला असा आपल्या म्हणण्याचा निष्कर्ष त्यांनीं अखेरे निवेदन केला.

ह्यापुढें लंडनमध्यें हिंदुस्थानच्या जमलेल्या शिलकांचा विनियोग कंपन्यांच्या व्यवस्थेखालील हिंदी रेलवेजचे आणि पोर्ट ट्रस्टस्चे भाग व रोखे खरीदण्याकडे केला जावा आणि त्याचप्रमाणें लढाऊ सामानाच्या उत्पादनासाठी यंत्रसामुग्री ह्या देशांत मोबदल्यांत त्या पैशांतून आणावी अशीहि सूचना श्री. जमनादास ह्यांनीं आपल्या ठरावाच्या अनुषंगानें केली. युद्धसामुग्री हिंदुस्थानांत बनवली जाण्याचें आज विशेष महत्त्व आहे आणि येथें मोठमोठे कारखाने निघण्याची आवश्यकता निकडीची आहे. एक पंथ, दोकाज ह्या न्यायानें सदरहु धोरण सरकारनें स्वीकारावें असें त्यांनीं प्रतिपादलें. इतःपर सोनें ह्या देशाबाहेर जाऊं देऊं नये आणि तें स्वतः खरेदी करून सरकारनें हिंदी चलनव्यवस्थेस बळकटी आणावी अशी सूचनाहि त्यांनीं केली.

## भुसार माल विक्रीची व्यवस्था

(ले.—श्री. वा. चिं. भानु)

कर्जाची देवाण-घेवाण करणाऱ्या सोसायट्यांनी कर्जदार सभासदांच्या शेतीचे मालाची विक्री करून देण्याची योजना शक्य तेवढ्या प्रमाणांत हातीं घेतल्याशिवाय तुंबलेल्या थकबाक्या कमी होणार नाहींत किंवा नवीन थकबाक्या तरी साधारणपणें वाढणार नाहींत असे विचार सहकारी चळवळीचीं सूत्रें हातीं असलेल्या सहकारी खात्याचे लहानापासून मोठे अंमलदार अलीकडे प्रकट करूं लागले आहेत. या विचारसरणींत पुष्कळ अर्थ आहे. पण नुसता विचार करून किंवा तो नुसता बोलका करून भागत नाहीं. तो विचार आचारांत आणण्याचा कसून व चिकाटीनें प्रयत्न झाला तरच त्याचीं इष्ट फळें चळवळीला लाभतील.

कर्जदार सभासदांच्या मालाची विक्री करून देण्याच्या मार्गांत पहिली अडचण म्हणजे, विक्री करून देणाऱ्या सोसायट्या फारच थोड्या आहेत. उदाहरण आपल्या पुणें जिल्ह्याचें घेतल्यास, फक्त पुणें येथेंच असलेली गूळ सेल सोसायटी किंवा बारामती येथील सेल यूनियन व नीरेची तिची शाखा. पण या तिन्हींहि ठिकाणीं विक्रीचा मुख्य माल गूळ आहे. अलीकडे मात्र बारामती येथें भुसार मालाची थोडी-फार विक्री करण्याची खटपट झाली असल्याचें समजतें. पुणें जिल्ह्यांत विक्रीच्या या साधनाशिवाय सहकारी पद्धतीचें दुसरें साधन नाहीं. तेव्हां जिल्हाभर पसरलेल्या अडीचशे सोसायट्यांच्या सभासदांच्या मालाची विक्री कशी सुलभतेनें होणार ? सर्वच प्रकारच्या मालाच्या विक्रीची जबाबदारी देखील अंगावर इतक्यांतच घेणें श्रेयस्कर होणार नाहीं. खेड-जुन्नर भागांतून अलीकडे 'ॲस्टर' चीं फुलें शेतकरी करितात. या फुलांना मुंबई हेंच मोठें व एकमेव गिऱ्हाईक. पण फूल तोडल्यापासून २४ ते २६ तासांच्या आंत मुंबईस गिऱ्हाइकाच्या हातीं पडलें तरच उपयोग. तेव्हां सुर्त ताबडतोब नाश होणाऱ्या मालाच्या विक्रीची अपेक्षा न धरितां फक्त टिकाऊ असलेल्या भुसार मालाच्याच विक्रीची व्यवस्था हातीं घेण्यासारखी आहे.

या कामीं आजच्या घटकेस विक्रीचीं दुकानें उघडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण नुसतीं दुकानें उघडूनहि काम होणार नाहीं. त्या दुकानांत विक्रीसाठी माल हमखास येईल अशी व्यवस्था अगोदर करणें जरूर आहे. आपलेकडे कित्येक लहान-मोठ्या ज्या खेड्यांत आठवड्याचा बाजार भरतो अशा ठिकाणीं हीं विक्रीचीं दुकानें स्थापन झालीं तर विशेष उपयुक्त होतील, पण विक्रीवर मिळणाऱ्या कमिशनमधून दुकानच्या व्यवस्थेचा खर्च निभणार नाहीं म्हणून अशा बाजारच्या गांवीं जी सोसायटी असेल तिला शक्य तेवढें पाठबळ देऊन तिच्या मार्फत विक्री करण्याचा प्रारंभ व्हावयास हवा. हें काम सहकारी खात्यानें नियमांची अडचण दूर करून आपणहून व पुढाकार घेऊन करावयास उद्युक्त झालें पाहिजे व मध्यवर्ती बँकांनींहि सक्रिय सहानुभूतीनें या कल्पनेचा पाठपुरावा केला पाहिजे.

याप्रमाणें विक्रीची व्यवस्था आखल्यानंतर विक्रीस माल कसा आणावयाचा याबद्दल माझी योजना खालीलप्रमाणें आहे. वर उल्लेख केलेल्या बाजारचे गांवानजीक म्हणजे ५-७ मैलांच्या टापूत ज्या सोसायट्या असतील त्यांचे सभासदांना आपापला माल या ठिकाणच्या विक्रीचे जागीं आणण्याबद्दल जरूर त्या प्रकारानें सूचना देण्यांत याव्यात. आपणहून माल पाठविणारांना कांहीं विशिष्ट सवलती देण्यांत याव्यात व माल न आणणारावर कांहीं विशिष्ट बंधनें बसविण्यांत यावींत. तसेंच हल्ली सोसायट्यांनीं दिलेल्या कर्जाचा वसूल रुपये आणे पै मध्यें घेण्याचा प्रघात आहे. त्यांत जरूर तो बदल करून वसूल मालाच्या स्वरूपानें स्वीकारण्याची परवानगी देण्यांत यावी. माल पोहोचल्याची कच्ची पावती सोसायटीनें त.बडतोब द्यावी व तो माल विक्रीच्या ठिकाणीं पाठवावा. मालाची विक्री होतांच जी रक्कम येईल त्यामधून सोसायटीनें अगाऊ कळविलेला हप्ता व्याजासह कापून घेऊन बाकीची रक्कम मालाच्या मालकास दुकानानें परस्पर किंवा सोसायटीमार्फत अदा करावी व काढून घेतलेली रक्कम सोसायटीला द्यावी आणि सोसायटीनें त्या रकमेची रीतसर पक्की पावती सभासदांस द्यावी. याप्रमाणें भुसार मालाची जमवाजमव आठवडाभर होऊन बाजारच्या दिवशीं दुकानानें मालाची विक्री करावी. योग्य बाजारभाव मिळत नसेल तर आणखी कांहीं दिवस माल सांठवून ठेवण्यासहि दुकानाला मालाचे मालकाकडून लेखी संमती अगाऊच घेऊन ठेवण्यांत यावी.

मुंबईला एक इलाख्याची विक्रीची संस्था स्थापन होण्याच्या मार्गांत आहे. ही संस्था भुसार मालाचीहि विक्री करून देण्याची व्यवस्था करूं शकेल. जिल्हाभर पसरलेल्या बाजारचे गांवीं साचणारा हा भुसार माल गटांत त्याचे शिफारशीचे व्यापाऱ्यांना विकतां येणें सुलभ होईल. त्या व्यापाऱ्यांकडून दुकानांकडे मागण्याही येऊं शकतील.

व्यवस्थेची ही सांखळी जुळवून घेण्यास सहकारी खात्यानें यूनियनमार्फत किंवा नवीनच नेमणूक केलेल्या डिस्ट्रिक्ट ऑफिसरमार्फत किंवा हद्दींतला बँक इन्स्पेक्टर व सुपरवायझर यांच्या जोडकमिटीकडे सर्व सोपविलें तरच येत्या हंगामांत मालाच्या विक्रीचा आरंभ होईल. मला माहीत आहे कीं पुणें सें. को. बँकेनें गेल्या वर्षापासून केडगांव, दौंड व इंदापूर येथें मालविक्रीचीं दुकानें उघडलीं आहेत. पण विक्रीसाठी माल आणण्याची व्यवस्था करणें त्यांच्या हातीं तितकेसें नसल्यानें व यूनियन्सचें लक्ष या प्रश्नाकडे, सहकारी खात्याचा हुकुमाशिवाय, जाणें शक्य नसल्यानें, या विक्रीच्या कामाकडे यूनियन-सुपरवायझर यांनीं खास लक्ष दिलें पाहिजे असा हुकूम सहकारी खात्यानें ताबडतोब काढल्याशिवाय मालविक्रीच्या प्रश्नाला जोर चढणार नाहीं.

# स्फुट विचार

**युद्धपरिस्थितीचा आढावा— मि. चर्चिल ह्यांचा खुलासा**

लंडन येथें लॉर्ड मेयर ह्यांच्या वार्षिक दिनाच्या समारंभाचे प्रसंगीं मामुली वहिवाटीस अनुसरून मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं युद्धपरिस्थितीचें सिंहावलोकन केलें. त्यांचीं भाषणें नेहमीच आवेशयुक्त आणि स्फूर्तिदायक असतात आणि लॉर्ड मेयरच्या मेजवानीचे वेळीं वार्षिक परिपाठाप्रमाणें मुख्य प्रधान महत्त्वाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांची चर्चा करतील अशी लोकांची अपेक्षा असणें स्वाभाविक आहे. आपल्या योजना व धोरण ह्यांची माहिती शत्रूस मिळणार नाहीं अशा बेतानें जनतेची जिज्ञासा तृप्त करण्याचें काम अवघड आहे. तथापि, युद्धाबाबतचा लोकांचा उत्साह कायम ठेवून तो वृद्धिंगत होण्यास मदत करणें ही गोष्ट मुख्य प्रधानांस साधावयाची असते. ती साध्य करण्यांत मि. चर्चिल अत्यंत तरबेज आहेत. त्यांचें वर उल्लेखिलेलें भाषण ह्याच नमुन्याचें होतें. त्यांत जरूर ती युद्धविषयक माहिती सावधगिरीनें देण्यांत आलेली आढळते आणि तें स्फूर्तिदायकत्वानें भरलेलें होतें. जर्मनीनें पादाक्रांत केलेल्या देशांमध्यें अलीकडे नात्सी पक्षानें शेकडो निरपराधी लोकांस गोळ्या घालून ठार मारण्याच्या शिक्षा दिल्या आहेत, त्यांचे योगानें सर्वत्र भयंकर उद्वेग व चीड उत्पन्न झाली असून आपल्या ह्या खुनी कृत्यांच्या परिणामामुळें खुद्द हिटलरहि गडबडला असल्याचें मि. चर्चिल ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. कम्यूनिस्ट किंवा ज्यू असल्याच्या अपराधावरून युरोपांत ज्यांस जर्मनांकडून देहदंड झाला आहे ते धारातीर्थी पतन पावलेले शूर शिपाईच गणण्यांत आले पाहिजेत असें ते म्हणाले. हिटलरच्या हुकमानें झालेल्या देहान्त शिक्षा त्यानें योजलेल्या युरोपच्या व सबंद जगाच्या पुनर्घटनेच्या नात्सी कल्पनेच्या निदर्शक असल्यानें युरोपमध्यें हिटलरशाहीच्या वर्चस्वास स्थान कधींहि व कांहीं झालें तरी मिळणार नाहीं असा आपला निर्धार त्यांनीं प्रकट केला.

---

**उत्तेजनकारक घडामोडी**

गेल्या बारा महिन्यांत झालेल्या घडामोडींचा आढावा घेऊन एक वर्षामागच्या व सध्यांच्या परिस्थितीची मि. चर्चिल ह्यांनीं तुलना केली. बारा महिन्यांमागें जर्मनीशीं दोन हात करण्यास इंग्लंड एकटें समरांगणावर उभें होतें आणि त्याची युद्धसामुग्री तोकडी होती. आजमितीस अमेरिकन आरमाराची इंग्लंडला मदत होत आहे आणि रशियानें जर्मन फौजांचा चांगला समाचार घेतला आहे. शिवाय ब्रिटिशांचें विमानदल आतां जर्मनीच्या विमानांच्या तोडीचें मोठें झालें आहे. भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमाराचें वर्चस्व स्थापित झालें असून जर्मनीच्या व इटलीच्या जहाजांचा धुव्वा उडविण्यांत आला आहे. ब्रिटिश आरमाराचें बळ आतां इतकें वाढलें आहे आणि जर्मन व इटालिअन आरमार इतकें हतबळ झालें आहे कीं इंग्लंडला हिंदी व पॅसिफिक महासागरांत आपलीं लढाऊ जहाजें आवश्यक वाटेल तेव्हां पाठवणें निर्धास्त झालें आहे, अशी उत्तेजनकारक माहिती मि. चर्चिल ह्यांनीं आपल्या भाषणांत दिली. ह्याच्या पुढचा मि. चर्चिल ह्यांच्या भाषणांतील मुद्दा विशेष महत्त्वाचा होता आणि तो जपानसंबंधांतला होता. जपानशीं इंग्लंडचें सख्य होण्याबाबत चाळीस वर्षांमागें झगडलों आणि जपानी लोकांविषयीं आपणांस मोठा आदर वाटतो, पण अमेरिका पूर्व एशियांत शांतता रहावी म्हणून आपली शिकस्त करीत असतां त्या बाजूस युद्ध उद्भवल्यास अमेरिकेच्या बाजूनें इंग्लंड तात्काळ युद्धांत पडेल अशी भयसूचना त्यांनीं दिली. अमेरिका व इंग्लंड ह्या दोघांशीं सामना देण्याचें अविचारी धाडस जपाननें करूं नये असें त्यांनीं स्पष्टपणानें बजावलें आणि चीनच्या शौर्याचें व चिकाटीचें कौतुक केलें. अमेरिका इंग्लंडला उदार हस्तांनीं देत असलेल्या सहायाबद्दल त्या राष्ट्राची त्यांनीं स्तुति केली. फायदा मिळवण्याच्या स्वार्थी बुद्धीनें अमेरिका इंग्लंडला मदत पोंचवीत आहे हा आरोप किती मिथ्या आहे हें त्यांनीं दाखविलें. ब्रिटिश जनतेनेंहि शिकस्तीचा स्वार्थत्याग व युद्धप्रयत्न चालवला असून अमेरिका व इंग्लंड ह्यांचें बळ आतां एकवटत असल्यानें अंतिम विजयाविषयींचा विश्वास अधिक दृढ झाला आहे, असें म्हणून युद्धतहकुबी व शांतता ह्यांचे संबंधांत जर्मनीकडून येऊं पहाणाऱ्या सूचनांचा मि. चर्चिल ह्यांनीं उल्लेख केला. कांहीं झालें तरी नात्सी पक्षाशीं तहाची किंवा तडजोडीची भाषा आपण कधींहि बोलणार नाहीं असें त्यांनीं निक्षून सांगितलें. युरोपांत मिळवलेल्या तात्पुरत्या जयाच्या जोरावर तहाचीं बोलणीं आढ्यतेनें हिटलर सुरू करण्याचा रंग दिसत आहे अशा स्थितींत त्याच्या योजनेचा फुगा मि. चर्चिल ह्यांनीं फोडून टाकला आहे.

---

**युद्धसामुग्रीचा पुरवठा**

कॉमन्स सभेंत केलेल्या आपल्या भाषणांत ब्रिटिश मुख्य प्रधानांनीं युद्धपरिस्थितीविषयीं अधिक अनुकूल अशी माहिती दिली. तीमधली महत्त्वाची बाब अटलांटिक महासागरांत जर्मनीनें चालवलेल्या ब्रिटिश जहाजांवरील हल्ल्यांचा जोर कमी होत चालल्याविषयींची होती. लढाऊ सामुग्री व खाण्यापिण्याचे जिन्नस ह्यांचा पुरवठा करण्याचें ब्रिटिश व्यापारी जहाजांचें बळ वाढत चाललें आहे आणि ह्याबरोबरच जर्मनी व इटली ह्यांचीं लढाऊ व बिन लढाऊ जहाजें झपाट्यानें नष्ट करण्यांत येत आहेत ही समाधानकारक माहिती त्यांनीं जनतेस दिली. रशियास युद्धसामुग्रीचा पुरवठा शक्य तितक्या त्वरेनें केला जात असल्याविषयीं कॉमन्स सभेची खातरजमा त्यांनीं केली. इंग्लंडमध्यें शेतीच्या मालाचें उत्पादन वाढत आहे आणि कोळशाचा पुरवठा भरपूर झाला आहे असेंहि त्यांनीं सांगितलें. मि. चर्चिल ह्यांचीं अलीकडचीं दोन भाषणें एकत्र वाचलीं असतां युद्धपरिस्थितीचा काटा इंग्लंडच्या बाजूनें निश्चयात्मक रीतीनें कसा झुकत आहे ह्याचें त्यांनीं रेखाटलेलें चित्र मनावर अनुकूल परिणाम केल्यावांचून रहात नाहीं. त्याचे योगानें चीनला धीर मिळेल, अमेरिका व रशिया ह्यांस समाधान वाटेल, ब्रिटिश साम्राज्यांत उत्साह वाढेल, जपानला विचार पडेल आणि जर्मनींत व इटलींत निराशेचें वातावरण पसरेल.

---

**जपान काय करणार?**

जर्मनी व इटली ह्यांच्याशीं प्रस्तुत युद्धकाळांत मैत्री जोडल्यामुळें जपानचें आंतरराष्ट्रीय धोरण नाजूक बनलें आहे. जर्मनीचें रशियाशीं युद्ध जुंपलें, आणि अमेरिकेचें इंग्लंड व चीन ह्या देशांस उघड रीतीनें सहाय होऊं लागले तेव्हां पूर्व एशियांत जपाननें आपल्या बाजूनें उचल खावी व आपल्या शत्रूंवर हत्यार उचलून युद्धाचा स्वतःवरचा भार हलका करावा, असा तगादा

हिटलरनें जपानी मुत्सद्यांस लावला असला तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. युरोपांत ज्याप्रमाणें जर्मनी आपलें वर्चस्व स्थापूं पहात आहे, तशाच प्रकारचें वर्चस्व आपण पूर्व एशियांत स्थापावें अशी जपानी पुढाऱ्यांची महत्त्वाकांक्षा असून ती त्यांनीं उघड रीतीनें व्यक्तहि केली आहे. इंग्लंडची शक्ति पश्चिमेच्या बाजूस खर्ची पडण्याची संधि साधण्याचा विचारहि त्यांच्या डोक्यांत घोळत आहे ह्यांत शंका नाहीं. इंग्लंड व अमेरिका ह्यांची सहानुभूति चीनच्या बाजूस स्पष्ट आहे आणि त्या देशाशीं चाललेल्या युद्धांत यश मिळण्याच्या मार्गांत जपानला अडचणी येत आहेत. पूर्व एशियांत वर्चस्व स्थापण्याचा लढाऊ व धडाडीचा कार्यक्रम हातीं घेण्याच्या योजनेस वाहिलेलें मंत्रिमंडळ जपानमध्यें अस्तित्वांत असून तें अमेरिकेनें पासिफिक महासागरांत जपानला स्वतःचे महत्त्वाकांक्षेचें धोरण अमलांत निर्वेधपणानें आणूं द्यावें असें सुचवीत आहे. ही सूचना अमान्य झाल्यास जपान पूर्व एशियांत युद्ध पुकारील अशी धमकीहि देण्यांत आली आहे. इंग्लंडनें सिंगापूर व हाँगकाँग ह्यांच्या बाजूकडे संरक्षणाची कडेकोट व्यवस्था केली असून एशियांत शांततेचा भंग करण्याच्या अविचारापासून त्यानें सावध रहावें असें जपानी सरकारास बजावण्यांत आलें आहे. अमेरिकेशीं जपानच्या निर्वाणीच्या वाटाघाटी चालू असल्याविषयींच्या बातम्या अलीकडे प्रसिद्ध झाल्या आहेत. जपानी प्रधानमंडळानें भलत्या महत्त्वाकांक्षेस बळी पडून पूर्व एशियांत युद्धाचा अतिप्रसंग करूं नये अशी इच्छा सर्वत्र प्रकट करण्यांत आली आहे.

---

## रानडे शतसांवत्सरिक जन्मदिन

प. वा. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे ह्यांच्या जन्मास येत्या जानेवारीच्या १८ व्या तारखेस एक शतक पुरें होतें. तो प्रसंग प्रकट रीतीनें साजरा व्हावा आणि न्यायमूर्तींनीं ज्या अनेक संस्था स्थापल्या आणि अनेक सार्वजनिक कार्यें चालू केलीं त्यांच्याशीं संबंध असलेल्या सर्वांस ह्या कार्यक्रमांत भाग घेतां यावा म्हणून योग्य ती व्यवस्था करण्यासंबंधानें विचार करण्याच्या हेतूनें प्राथमिक स्वरूपाची एक प्रातिनिधिक सभा नुकतीच गोखले हॉलमध्यें भरली होती. तीमध्यें अनेक ठळक निमंत्रित गृहस्थ उपस्थित होते. जन्मदिनाचा कार्यक्रम पार पाडण्याकरितां एक प्रातिनिधिक उपसमिति नेमण्यांत आली आहे. न्यायमूर्तींची सार्वजनिक कामगिरी एवढी विविध, व्यापक व परिणामकारक झालेली आहे कीं, तिचें स्मरण व गौरव करून तीपासून स्फूर्ति प्राप्त करून घेण्याची इच्छा सर्व विचारांच्या, पक्षांच्या, वर्णांच्या व धर्मांच्या पुढारी लोकांस असणें स्वाभाविक आहे. ह्या दृष्टीनें जन्मदिनाचा कार्यक्रम आखण्याबाबत अनेक सूचना वरील सभेंत करण्यांत आल्या. त्यांचा व यापुढें येणाऱ्या इतर सूचनांचा योग्य विचार नेमण्यांत आलेली उपसमिति करील. निरनिराळ्या संस्थांत आणि निरनिराळ्या ठिकाणीं न्यायमूर्तींच्या चरित्राचें स्मरण केलें जाईलच. तथापि, पुणें येथें साध्या रीतीचा पण व्यापक स्वरूपाचा समारंभ व्हावा अशी इच्छा प्रकट करण्यांत आली आहे. यंदा अखिल-भारतीय आर्थिक परिषदेचें अधिवेशन मुंबई येथें भरणार असून त्यामध्यें न्यायमूर्तींच्या भारतीय अर्थशास्त्र-विषयक कामगिरीचा गौरव व्हावयाचें अगोदरच ठरलें आहे. त्याचप्रमाणें देशांत निरनिराळ्या प्रांतांत मोठमोठ्या शहरीं हा उत्सव साजरा केला जाईल, यांत शंका नाहीं. ह्याबाबत कोणास सहाय द्यावयाचें असेल आणि सूचना करावयाच्या असतील त्यांनीं उपसमितीचे एक चिटणवीस प्रो. द. गो. कर्वे, फर्ग्युसन कॉलेज, पुणें ह्यांच्याशीं पत्रव्यवहार करावा.

---

## आयुर्वेद रसशाळा, पुणें लि.
### ( वार्षिक सभा : २३-११-१९४१ )

वरील कंपनीस ३१ मे, १९४१ अखेर सहा वर्षें पुरीं झालीं. अहवालाचे वर्षीं रसशाळेच्या इमारतीचें बहुतेक काम पुरें झालें. वर्षाअखेर इमारत खातीं ६३,४४३ रुपये खर्ची पडलेले आहेत. मंडळीच्या भाग भांडवलांत झपाट्यानें वाढ होत आहे व आतां खपलेलें व वसूल भांडवल अनुक्रमें २ लक्ष, ९ हजार रुपये व १ लक्ष, ५७½ हजार रुपये झालें आहे. वर्षातील विक्री १ लक्ष, ४१ हजार रुपयांची झाली व वर्षअखेर १ लक्ष, ६८ हजारांचा कच्चा-पक्का माल शिल्लक आहे. मंडळीस अहवालाचे वर्षीं १४,२८८ रुपये नफा झाला, त्यांत शिलकी नफा ८०३ रुपये मिळविला म्हणजे नफा वाटणीस १५,०९१ रुपये उरतात. त्यांतून रिझर्व्ह फंडांत २½ हजार रुपये व डिव्हिडंड ई. फंडांत ५०० रुपये टाकून ५% प्रेफरन्स भागीदारांस १,७३९ रुपये डिव्हिडंडसाठी खर्च करावे व ऑर्डिनरी भागीदारांस ९% दरानें डिव्हिडंड देण्याकडे ९,४२५ रुपयांचा विनियोग करावा, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. ९,४२५ रुपयांपैकीं निम्मी रक्कम कंपनीच्या आर्टिकल नं. ११३ प्रमाणें राष्ट्रीय शिक्षण मंडळास मिळेल व उरलेली निम्मी रक्कम ऑर्डिनरी भागीदारांस दिली जाईल. म्हणजे, प्रत्यक्ष हातीं ४½% दरानें डिव्हिडंड मिळेल. रा. शि. मंडळाच्यातर्फें कार्यकारी मंडळानें कंपनीचें सर्व काम विनावेतन केलें, हें डायरेक्टरबोर्डानें आभारपूर्वक नमूद केलें आहे. कंपनीची होत असलेली प्रगति कोणासहि समाधानकारकच वाटेल. श्री. के. व्ही. केळकर, एम्. ए., एलएल. बी. हे कंपनीच्या बोर्डाचे चेअरमन असून श्री. वैद्य आर. एस. मराठे, आयुर्विद्याविशारद, हे सेक्रेटरी आहेत.

---

## हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न व खर्च

युद्धाचा व्याप पसरत चालला असल्याकारणानें उत्पन्नाच्या मानानें हिंदुस्थान सरकारचा खर्च हळू हळू वाढत जाणें स्वाभाविक आहे. ह्या गोष्टीची प्रचीति त्या सरकारच्या उत्पन्न–खर्चाचे मासिक आकडे प्रसिद्ध केले जातात त्यांवरून येण्यासारखी असते. रेलवेज आणि पोस्ट खात्यांचे बाबतींतल्या हिशेबाची जुळणी दर महिन्यास होत नसते हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. ही गोष्ट जमेस धरतां गेल्या सप्टेंबर महिन्यांत सरकारच्या उत्पन्नापेक्षा खर्च पावणेदोन कोटि रुपयांनीं अधिक झाला. एप्रिल-सप्टेंबर ह्या सहामाहींतला अधिक खर्चाचा आकडा सवा पंचवीस कोटि रुपये एवढा होता. गेल्या वर्षाच्या ह्याच पहिल्या सहामाहींत उत्पन्नापेक्षा खर्च पावणेबावीस कोटि रुपयांनीं ज्यास्त झालेला होता. ह्यावरून उत्पन्न वाढत असतां त्या मानानें खर्च कसा अधिक होत आहे ह्याची कल्पना येईल. चालू सालच्या पहिल्या सहामाहींत सवा बारा कोटींनीं उत्पन्न वाढलें आहे पण त्याच बरोबर संरक्षण खर्चांत पावणे सोळा कोटींचा वाढावा झालेला आहे. यंदाच्या सहामाहींत रेलवेजच्या निव्वळ उत्पन्नांत सात कोटि रुपयांची सुधारणा झालेली आहे. ही रकम हिंदुस्थान सरकारास तात्पुरती वापरावयास सापडली तरी त्या उत्पन्नाचा कांहीं भाग रेलवेजच्या गंगाजळींत वर्षाचे अखेरीस टाकला जावयाचा असल्यानें ती सबंद सरकारी उत्पन्नाच्या सदरांत येत नाहीं. एप्रिल–सप्टेंबर ह्या सहामाहींत युद्धकर्जाबाबत साडे एकोणतीस कोटि रुपये जमा झाले. साडे पांच कोटि रुपयांच्या तीन टक्क्यांच्या १९४१ सालच्या मुदतीच्या रोख्यांची अदलाबदल झाली ती ह्या आकड्यांतून वगळलेली आहे. स्टर्लिंग रोख्यांच्या मोबदल्यांत काढलेले रुपयांतले रोखे रद्द केले गेल्यानें अखेर कायमच्या हिंदुस्थानच्या कर्जांत सतरा कोटि रुपयांची घट झाली आहे.

---

## युद्धपरिस्थितीची आर्थिक पार्श्वभूमि

( प्रो. वा. गो. काळे. ह्यांचें मुंबई रेडिओवरील भाषण, मुंबई रेडिओ अधिकाऱ्यांचे कृपेनें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. )

प्रस्तुत युद्धाचा एक विशेष सामान्य माणसाच्याहि लक्षांत आल्यावांचून राहाणें शक्य नाहीं आणि तो म्हटला म्हणजे त्यांत यांत्रिक शस्त्रास्त्रांचा व साधनांचा फार मोठ्या प्रमाणांत चाललेला उपयोग हा आहे. विमानें, रणगाडे, चिलखती गाड्या, पाणबुड्या नावा इत्यादि लढाऊ साधनें वापरण्यास कुशल व शूर माणसें आवश्यक आहेत, ह्यांत शंका नाहीं. तथापि, मुख्य भर नाशकारक शस्त्रास्त्रांवरच देण्यांत येत आहे हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. हिटलरनें प्रस्तुत युद्धाची तयारी, तें प्रत्यक्ष पुकारण्यापूर्वी कित्येक वर्षे चालविली होती आणि तिच्यामध्यें शस्त्रास्त्रांचा व इतर लष्करी साधनांचा भरपूर साठा करून ठेवणें हा प्रमुख भाग होता. भौतिक शास्त्रें व यंत्रविद्या ह्यांमध्यें शास्त्रज्ञांनीं चालविलेल्या संशोधनाचा पूर्ण उपयोग युद्धसामुग्री बनवण्यासाठी करण्यांत हिटलर वर्षानुवर्ष गुंतला होता. जर्मन सरकाराच्या व राष्ट्राच्या वार्षिक उत्पन्नाचा मोठा भाग लढाऊ उपयोगाचे कारखाने काढणें व त्यांत लष्करी सामुग्री तयार करणें ह्यांचे प्रीत्यर्थ खर्चला जात होता. मागील महायुद्धाच्या अनुभवावरून शहाणपण शिकून कोणतेंहि जाणतें राष्ट्र जागतिक शांततेचा भंग करण्याचा मूर्खपणा करणार नाहीं आणि युद्धाच्या तयारीसाठी शस्त्रास्त्रांच्या बनावटींवर आपली संपत्ति ओतणार नाहीं अशी सामान्य कल्पना जगांत पसरली होती. ह्या समजुतीनें इंग्लंड, फ्रान्स ह्या सारखीं राष्ट्रें निर्धास्त राहिलीं असतां गुप्त रीतीनें हिटलरनें युद्धाची पूर्वतयारी झपाट्यानें व पद्धतशीर रीतीनें चालवली होती. तुम्हांला तोफा पाहिजेत का भाकरीवर लोणी पाहिजे ? असा प्रश्न हिटलर जर्मन जनतेस विचारीत असे आणि तिची मनःप्रवृत्ति युद्धाच्या बाजूस वळवीत असे. आपल्या राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाचें व भावी उत्कर्षाचें भडक चित्र रंगवून त्यानें जर्मन जनतेस भयंकर स्वार्थत्याग करावयास लावला. जर्मन लोकांचीं उत्पन्नें घटलीं व त्यांची रहाणी खालावली, त्यांच्यामध्यें युद्धाचें वातावरण निर्माण झालें आणि त्याची पूर्व-तयारी म्हणून अन्नसामुग्री व युद्धसाधनें ह्यांच्या पुरवठ्याच्या योजना निश्चित करण्यांत आल्या. पुढील युद्धाच्या दृष्टीनेंच जर्मन राष्ट्राची आर्थिक घटना हिटलरनें बनविली. युद्ध चालूं झालें म्हणजे जरूरीच्या अनेक जिनसांची आयात बंद होणें अपरिहार्य असल्यानें त्यांच्या ऐवजी स्वतःच्या देशांतच मिळूं शकणाऱ्या कच्च्या मालाचा उपयोग करण्याची प्रथा पाडण्यांत आली आणि त्या कामींहि रसायन व यांत्रिक शास्त्रांतील नव्या शोधांचा पूर्ण उपयोग करण्यांत आला.

### इंग्लंडची प्रतिकाराची तयारी

सध्यांचें युद्ध चालूं झालें तेव्हां आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सिद्ध झालेला जर्मनी आणि मोठ्या प्रमाणावरील युद्ध सामोपचाराच्या प्रयत्नांनीं टाळतां येईल या कल्पनेनें शांततेची भाषा बोलणारीं जगांतील प्रमुख राष्ट्रें असा देखावा दिसून आला. पोलंडवर स्वारी करून जर्मनीनें त्यांचें स्वातंत्र्य नष्ट केलें तेव्हां इंग्लंड व फ्रान्स ह्यांस शस्त्र उचलावें लागलें. शेजारचे देश एकामागून एक गिळावयाचे असा हिटलरचा बेत होता, तो क्रमाक्रमानें अंमलांत आणला जात असतां त्याचा यशस्वी रीतीनें प्रतिकार करण्यास लागणारी तयारी इंग्लंड व फ्रान्स यांचे बाजूस नव्हती. तथापि, हिटलरचे विजय त्यास पचवूं द्यावयाचे नाहींत असा इंग्लंडनें निश्चय केला आणि प्रतिकाराची तयारी चालू ठेवली. ही तयारी म्हणजे जर्मनीच्या तोडीचीं शस्त्रास्त्रें बनवून त्यांचा पुरवठा वाढत ठेवणें हीच होती. ह्याच परिस्थितींत फ्रान्सनें युद्ध बंद केलें तेव्हां जर्मनीस तोंड देण्याची जबाबदारी एकट्या इंग्लंडवर येऊन पडली. ह्याच सुमारास इटली जर्मनीस जाऊन मिळाल्यानें ही इंग्लंडची जबाबदारी विलक्षण वाढली. जर्मनीच्या व्यापाराची नाकेबंदी करण्याच्या आर्थिक शस्त्राचा उपयोग इंग्लंडनें ह्यापूर्वीच चालू केला होता. अन्नसामुग्री व युद्ध-साधनें बाहेरून जर्मनीस मिळूं नयेत अशा रीतीची व्यवस्था समुद्रावर करण्यांत आली होती. स्वतः पादाक्रांत केलेल्या देशांतून जरूर असलेला माल लुटून आणण्याचा उपक्रम जर्मनीनें सुरू केला, पण हे देशहि परराष्ट्री व्यापारावर बहुतांशीं अवलंबून असल्यानें ह्या लुटीपासून विशेष निष्पत्ति होण्याचा संभव नव्हता. जर्मनीच्या जुलुमानें त्या देशांतील लोकांमध्यें असंतोष मात्र फैलावणार होता. महत्वाकांक्षी मुसोलिनीस जर्मनीनें चालवलेल्या युद्धांत आपणांस इटलीच्या साम्राज्याचा विस्तार करतां येईल अशी आशा वाटत होती. त्यानेंहि आपल्या देशाची आर्थिक घटना लढाऊ घाटाची बनवली होती. इंग्लंडनें इटलीचें आफ्रिकेमधील साम्राज्य हिसकावून घेण्यास प्रारंभ केला आणि भूमध्य समुद्रांत त्याच्याहि व्यापाराची नाकेबंदी सुरू केली.

### आर्थिक युद्धाचीं प्रमुख अंगें

ह्या परिस्थितींत नाकेबंदीचें इंग्लंडचें आर्थिक अस्त्र त्या राष्ट्रांवर उलटवण्याची योजना जर्मनीनें आखली. पाणबुड्या नावा आणि लढाऊ विमानें ह्यांच्या सहायानें इंग्लंडला जा-ये करणारीं व त्या देशांस जरूरीचा माल पुरवणारीं व्यापारी जहाजें अटलांटिक महासागरांत बुडवण्याचा क्रम त्यानें आरंभला. आफ्रिकेमधून इटालियन सैन्याची हकालपट्टी करण्यांत आली, सीरिया ताब्यांत घेण्यांत आला आणि ग्रीसमध्यें व क्रीटमध्यें ग्रीक फौजेस जर्मनीच्या विरुद्ध सहाय्य देण्यांत आलें हे प्रसंग सोडले तर इंग्लंड व जर्मनी ह्यांस दुरून आर्थिक शस्त्रास्त्रांनीं परस्परांशीं लढावें लागत आहे असें दिसून येईल. ज्या पक्षाचा आर्थिक दम अधिक त्यास अखेर जयश्री माळ घालणार ही गोष्ट याचबरोबर स्पष्ट झाली. इंग्लंडमध्यें विमानें पाठवून तेथील शहरें व कारखाने उध्वस्त करण्याचा जर्मनीचा क्रम कमीअधिक प्रमाणांत अव्याहत चालू आहे. त्यांचा प्रतिकार इंग्लंडनें यशस्वी रीतीनें करून जर्मनींतील प्रमुख औद्योगिक केंद्रें आणि फ्रान्स, बेल्जम व हॉलंड ह्या देशांतील बंदरें ह्यांवर बॉबचे हल्ले उलट चालू केल्यामुळें इंग्लंडवरची नियोजित स्वारी हिटलरला तहकूब करावी लागली. लढाऊ सामुग्रीचें उत्पादन वाढविणें आणि अटलांटिक महासागरांत शत्रूच्या हल्ल्यांचा प्रतिकार करून मालाची वहातूक निर्वेधपणें चालू ठेवणें ही इंग्लंडच्या आर्थिक युद्धाचीं दोन प्रमुख अंगें ठरलीं. शस्त्रास्त्रांच्या उत्पादनाचे बाबतींत खुद्द इंग्लंडमध्यें तर जोराचे प्रयत्न चालले आहेत. ह्या कामीं कॅनडा, हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया इत्यादि साम्राज्यांतर्गत देशांचें पण भरपूर व वाढतें सहाय्य होत आहे. युद्धाचा ओघ युरोपांतून पूर्वेकडे वाहूं लागला आणि जपानची जर्मनी व इटली या देशांशीं दोस्ती प्रकट झाली तेव्हां लढाऊ सामानाच्या पुरवठ्याची तजवीज हिंदुस्थान हें मुख्य केंद्र बनवून साम्राज्यांतील पूर्व दिशेकडील देशांनीं योजनात्मक पद्धतीनें चालूं केली. ह्या योजनेस अनुसरून विविध प्रकारांचें युद्ध-साहित्य वाढत्या प्रमाणांत तयार होण्याची व्यवस्था झाली आहे. पूर्वेच्या बाजूनें युद्धोपयोगी कच्चा-पक्का माल रणांगणावर पोहोचता होण्याची ही योजना अत्यंत सोईस्कर आहे हें लक्षांत घेणें अवश्यांचें आहे. ( अपूर्ण )

### नियोजित मोटार-कारखाना

हिंदुस्थानांत स्थापावयाच्या मोटारींच्या कारखान्याच्या उत्पादकांच्या चालकांनीं हिंदुस्थान सरकारकडे पत्र पाठवून, कारखान्याची स्थापना युद्धप्रयत्नांस कशी सहायकारक होईल, हें दर्शविलें आहे. अमेरिकेंतून मागवावयाच्या यंत्रसामुग्रीसाठीं डॉलरची हुंडणावळ उपलब्ध होणार नाहीं व कारखान्यास तज्ञ कामगारांचा तुटवडा भासेल, अशा दोन कारणांसाठी हिंदुस्थान सरकारनें योजनेस संमति न देण्याचें ठरविलें, परंतु खंड-उधारीच्या अमेरिकन कायद्यानें पहिली अडचण दूर केली आहे. युद्धप्रयत्नांत गुंतलेल्या सध्याच्या कोणत्याहि कारखान्यांतील तज्ञ कामगार आम्हीं आमच्या मोटारींच्या कारखान्यांत घेणार नाहीं असें आश्वासन उत्पादकांनीं वरील पत्रांत सरकारास दिलें आहे. कारखाना आतां स्थापन केल्यास, युद्धानंतर त्यांस संरक्षणाची गरज भासणार नाहीं व सरकारनें प्रारंभीं योग्य ती मदत केल्यास, तीन वर्षांचे आंत कारखाना मोटारीस लागणारे ५०% ते ६०% भाग तयार करूं लागेल. नियोजित कारखाना हा केवळ सुटे भाग जोडण्याची जागा होणार नसून, शंभर टक्के उत्पादनाचें काम त्यांत व्हावयाचें आहे; तेव्हां सरकारनें ऑस्ट्रेलियन व कॅनेडियन सरकारचें सहानुभूतीचें धोरण उदाहरण म्हणून आपल्या समोर ठेवून कारखान्याच्या स्थापनेस संमति द्यावी, अशी उत्पादकांची सरकारला विनंती आहे.

### म्हैसूर सरकारची विजेची नवी योजना

जोग धबधब्याच्या पाण्यावर चालविण्यांत यावयाच्या म्हैसूर सरकारच्या हैड्रो-इलेक्ट्रिक विद्युदुत्पादनाच्या योजनेस हिंदुस्थान सरकारनें मान्यता दिली आहे. त्यांत खालील अटी समाविष्ट आहेत:—

(१) शरावती नदींतून १ ऑक्टोबर ते १५ फेब्रुवारी अखेर ठराविक पाणी खालीं जाऊं द्यावें.

(२) कमाल ५ हजार अश्वशक्ति वीज मुंबई सरकारास म्हैसूर सरकारनें योग्य अटींवर द्यावी.

(३) योजनेस लागणारी ४०० एकर जमीन मद्रास प्रांताचे हद्दींत आहे, ती त्या सरकारनें अक्वायर करून म्हैसूर सरकारला ९९९ वर्षांच्या कराराचे खंडानें व धरणाखालीं पाण्यांत जाणारी ७२० एकर जमीन म्हैसूर सरकारास कायमची द्यावी.

शरावती म्हैसूर संस्थानांत शिमोगा जिल्ह्यांत उगम पावते. व संस्थानाचे हद्दीशी पोंचल्यावर पश्चिमेकडे वळण घेते आणि "जोग" धबधब्याच्या स्वरूपांत खालीं उडी टाकून उत्तर कानडा जिल्ह्यांत होनावर येथें समुद्रास मिळते. "जोग" विद्युदुत्पादनाचे योजनेवर म्हैसूर सरकार २ कोटि, ८०½ लक्ष रुपये खर्च करणार आहे.

### रेल्वेज विकत घ्या

बेंगॉल अँड नॉर्थ वेस्टर्न आणि रोहिलखंड कमाउन ह्या रेल्वेज हिंदुस्थान सरकारनें विकत घ्याव्यात, अशी मध्यवर्ती रेल्वे अडव्हायसरी कौन्सिलनें सरकारास सूचना केली आहे. ह्या रेल्वेज विकत घेण्यासाठीं सरकारास रोख १६ कोटि, ३४ लक्ष रुपयांची व्यवस्था करावी लागेल व १ कोटि, ४० लाखांचीं डिबेंचरें फेडण्याचा पत्कर घ्यावा लागेल. डिसेंबरच्या आंत, रेल्वेज विकत घ्यावयाच्या किंवा नाहीं हा निर्णय त्या रेल्वेजना कळविला पाहिजे.

बेंगॉल अँड नॉर्थ वेस्टर्न ३ फूट, ३⅜ इंच गेजची असून तिचेवर वहातुकीस १८८४ सालीं प्रारंभ झाला. तिच्या लोहमार्गाची लांबी १,२७० मैल आहे. रोहिलखंड-कमाउन रेल्वेचेंहि गेज ३ फूट, ३⅜ इंच आहे व तिचेवरील वहातुकहि १८८४ सालीं सुरू झाली. तिच्या लोहमार्गाची लांबी ३१२ मैल आहे.


### कर्जाचा आर्थिक परिस्थितीवर परिणाम

"युद्ध संपण्याचे वेळीं आपलें बरेंच भांडवल संपलें असल्याचें आढळून येईल, युद्धसाहित्याचे कित्येक कारखाने बंद पडतील व तात्पुरती बेकारीहि माजेल. स्वस्त लोकप्रियता मिळविण्याचे प्रयत्नामुळें निर्माण होणाऱ्या आर्थिक भानगडींचा बोजा युद्ध संपवून परत येणाऱ्या माझ्या मुलावर काय म्हणून पडावा? आधुनिक युद्धसाहित्याची सैनिकांस अत्यंत आवश्यकता आहे. परदेशीं लढण्यासाठीं गेलेल्या सैनिकाचे दृष्टीनेंहि त्याच्या स्वदेशांतील आर्थिक सुस्थितीची अत्यंत मोठी जरूरी आहे. सरकार मध्यवर्ति बँकेकडून १½ अब्ज रुपये कर्जाऊ घेत आहे. त्याचा ऑस्ट्रेलियन चलनावर होणारा परिणाम विचारांत घेतला पाहिजे." ऑस्ट्रेलियाचे माजी मुख्य प्रधान, मि. मेंझीज, ह्यांनीं ऑस्ट्रेलियन अंदाजपत्रकावर विधिमंडळांत केलेलें भाषण.

### पुणें सहकार सप्ताह

गेल्या अंकांत पुणें सहकार सप्ताहाची माहिती प्रसिद्ध करण्यांत आली होती, ती अधिकृत वृत्तांताचे आधारानें लिहिलेली होती. त्याचा निर्देश चुकून करावयाचा राहिला. हा वृत्तांत उपलब्ध करून दिल्याबद्दल चालकांचे आभारी आहों.


## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.



कंपनीच्या मालकीची नवी इमारत

## सहकारी संस्थांची अंतर्व्यवस्था

" सहकारी सोसायट्यांची अंतर्व्यवस्था "—लेखक, श्री. डी. ए. सावंत–प्रकाशकः शं. ब. सोमवंशी बी. ए., एलूएल्. बी.–सहकारी वाङ्मय प्रकाशन मंडळ, पुणें–किं. २ रु.

सहकारी संस्थांचा कारभार यशस्वी रीतीनें चालण्यास त्यांच्या सभासदांनीं विशिष्ट नैतिक तत्त्वें पाळलीं पाहिजेत.त्याचप्रमाणें त्यांची व्यवस्था धंदेवाइकपणाची असणें अगत्याचें आहे. धंदेवाइकपणाचा एक महत्त्वाचा भाग हिशेबीपणा आहे आणि तो सभासदांच्या अंगीं बाणण्यास जमाखर्चाची सामान्य माहिती त्यांस असणें आवश्यक आहे. तसेंच, सहकारी संस्थांचा व्यवहार विशिष्ट कायदा व नियम ह्यांस अनुसरून होत असल्याकारणानें त्यांची अंमलबजावणीहि त्यांच्या अंगवळणी पडली पाहिजे. ह्या सर्व बाबतींतल्या अज्ञानामुळें सहकारी संस्थांचा कारभार सुरळीत चालण्याचे मार्गांत अडचणी येतात. त्यांवर एक मुख्य उपाय म्हटला म्हणजे प्राथमिक स्वरूपाच्या, विशेषतः शेती पतपेढ्या कशा चालवल्या गेल्या पाहिजेत ह्याविषयींचें ज्ञान त्यांच्या सभासदांस करून देणें हा होय. ह्याकरितां सोप्या भाषेंत लिहिलेलीं तपशीलवार लहान पुस्तकें आवश्यक आहेत.

ह्या प्रकारच्या पुस्तकांची उणीव भरून काढण्याचा उपक्रम श्री. डी. ए. सावंत ह्यांनीं "सहकारी सोसायट्यांची अंतर्व्यवस्था" हें पुस्तक लिहून केला आहे, त्याकडे आम्ही येथें लक्ष वेधतों. सुपरव्हायजरच्या व कार्यकर्त्यांच्या नात्यानें लेखकानें शेती सोसायट्यांच्या कारभाराचा अनेक वर्षें अनुभव घेतला असल्यानें त्या संस्थांच्या सभासदांच्या अडचणी व गरजा ह्यांच्याशीं त्यांचा निकट परिचय आहे. शेती सोसायट्यांच्या व्यवहाराशीं त्यांचा रोजचा संबंध असल्यामुळें ह्या संस्थांच्या अंतर्गत कारभाराची इत्थंभूत माहिती देण्याची पात्रता त्यांचे अंगीं आहे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं आणि त्यांनीं आपलें संकल्पित कार्य चांगल्या तऱ्हेनें पार पाडलें आहे ह्यांत संशय नाहीं. आपलें हृद्गत उघड करून सांगतांना " सोसायट्यांतील आपलें कर्तव्य, जबाबदारी, हक्क आणि अधिकार यांची सभासदांना जाणीव करून देण्यास पुस्तक जितकें उपयुक्त होईल तितकेंच तें सोसायट्यांच्या पंच कमिट्या, प्रेसिडेंट, सेक्रेटरी, अॅडमिनिस्ट्रेटर्स, सुपरवायजर्स वगैरे सहकारी कार्यकर्त्यांसहि उपयोगी पडेल यांत शंका नाहीं " असें लेखकानें म्हटलें आहे त्याचें स्पष्टीकरण पुस्तकांतील विस्तृत अनुक्रमणिकेकडे पाहिलें असतां सहज होतें.

सहकार्य, सहकार्याचीं मूलतत्त्वें, सभासद, साधारण सभा, व्यवस्थापक कमिटी, चेअरमन, सेक्रेटरी, अधिकारी वर्ग, सोसायट्यांस मिळालेल्या सवलती, जमीनदारांची जबाबदारी, ५९ अ.चा जमाखर्च, अनियमित जबाबदारी व तिचे परिणाम, पत्रव्यवहार, पावत्यांचें महत्त्व, पास बुक, हुकूमनामा बजावणी रजिस्टर, अर्ज व नोटिसा, रोखे व दस्तऐवज, लवाद कोर्टांतील फॉर्म, बजावणी, आलेल्या मिळकतीची व्यवस्था आणि सोसायटीच्या वार्षिक रिपोर्टांचा नमुना ह्या तपशीलवार विषयांचा अंतर्भाव पुस्तकांत झाला आहे. श्री. सावंत ह्यांनीं स्वतःच्या दीर्घकालाच्या अनुभवावर व व्यावहारिक माहितीवर आधारलेल्या पुस्तकाचा उपयोग प्राथमिक शेती पतपेढ्यांशीं संबंध असलेल्या सर्वांस होईल असा भरंवसा वाटतो.

---


**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.



**फॉस्फौरा:—**

अशक्तपणामुळें हाडांतील ( स्फुराम्लाचा ) (क्षार) स्फुरण पावत नसल्यानें शरीराचे जे धर्म ते बरोबर काम करीत नाहींत त्यामुळें मुलें सुस्त, आळशी तरुण षंढ, निर्वीर्य, कामाचा कंटाळा करणारे, तरुण स्त्रियांच्या गर्भाशयोन्माद (आचके) वंधत्व आणणें इत्यादि व वृद्ध चिडखोर, नेभळे वगैरे विकार हाडांतील मज्जातंतू व शुक्राची वाढ होत नसल्यानें होतात. त्यावर उपाय म्हणजे फॉस्फौरा गोल्ड–टॉनिक हें फार उपयुक्त औषध आहे. एक बाटली चाळीस दिवस पुरते. किं. रु.१–८–०, शिवाय पोस्टखर्च.

— माहिती पत्रक मागवा —

रॉय आणि कंपनी, १७६, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई नं. २

पुण्यांत आल्यावर

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

अवर होम,

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

## पॅसिफिक महासागरांतील नाविक युद्धाच्या अडचणी

पॅसिफिक महासागरांत नाविक युद्ध चालविणें युरोपियन विभागांतील समुद्रांत तें चालविण्यापेक्षा अतिशय अवघड आहे, कारण युद्धनौकांस लागणारें तेल तेथें त्यांस मिळण्याची व्यवस्था करणें सोपें नाहीं. लहानसहान बेटें पॅसिफिकमध्यें विखुरलेलीं असलीं, तरी मोठाले जमिनीचे प्रदेश एकमेकांपासून फार दूर आहेत. होनोलुलूमधील पर्ल बंदर हें अमेरिकन नाविक दलाचें महत्त्वाचें केंद्र आहे व सिंगापूर हें ब्रिटिश नाविक दलाचें मुख्य केंद्र आहे. ह्या दोन्ही ठिकाणापासूनचीं प्रमुख ठिकाणांपर्यंतचीं अंतरें खालीं दिलीं आहेत :—

| | मैल |
|---|---|
| होनोलुलू ते हाँककाँग | ४,८६० |
| होनोलुलू ते मणिला | ३,३३० |
| होनोलुलू ते पनामा | ५,३८० |
| सिंगापूर ते हाँगकाँग | १,४४० |
| सिंगापूर ते शांघाई | २,२६० |
| सिंगापूर ते बटाव्हिया | ५०९ |
| हाँगकाँग ते व्हलॅडिव्होस्टॉक | २,४१५ |
| सिंगापूर ते मणिला | १,४०० |
| सिंगापूर ते सिडने | ४,३८० |

म्हणजे, तेल भरण्याच्या ठिकाणापासुन ब्रिटिश व दोस्त आगबोटींस ३½ ते १० दिवसांच्या प्रवासाचे अंतरापर्यंत भरलेल्या तेलावरच जावें लागेल. पॅसिफिकमधील युद्धनौकांस किनाऱ्याकडे तेल भरण्यास येण्यापेक्षा तेलाच्या साठ्याचे आगबोटींवरच तेल पुरवठ्यासाठी अवलंबून रहावें लागेल.

## लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें

ह्या संग्रहालयास जुलै ते सप्टेंबर १९४१ ह्या तीन महिन्यांत ४०,७२२ प्रेक्षकांनीं भेट दिली. "व्यापारवर्धनगृह" पहावयास ३९,७२७ प्रेक्षक आले होते. पुणें शहर म्युनिसिपालिटीनें संग्रहालय संस्थेच्या पुढील वाढीसाठी इमारतीकरितां चार एकर जागा संस्थेच्या ताब्यांत दिली आहे व संग्रहालय-संवर्धनाची योजना संस्थेच्या विश्वस्त-समितीनें हातीं घेतली आहे. "व्यापारवर्धनगृहांत" जुलै—रु. ३८४-४-६, ऑगस्ट—रु. ३४१-०-३ व सप्टेंबर—रु. ३६७—७-३ ची विक्री झाली. "व्यापार संवर्धनगृहा"स डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, मुंबई, यांनीं भेट दिली व अनेक उपयुक्त सूचना केल्या. म्हैसूर संस्थाननें आपल्या सरकारी खात्याच्यामार्फत कांहीं निवडक हस्तकौशल्याचा व कारागिरीचा माल पाठविला आहे. पुण्याचे पूर्वीचे कलेक्टर मि. ट्रॉटमन यांच्या शिफारसीवरून सिंध सरकारनें आपला कलाकौशल्याचा माल इकडे पाठवावयाची व्यवस्था केली आहे. मुंबईप्रांत सरकारच्या नियंत्रणानें चालणाऱ्या बेळगांव, मालेगांव, अहमदनगर, अहमदाबाद, व बागलकोट येथील को-ऑपरेटिव्ह असोसिएशन्सचा हातमागावर तयार होणारा नाना प्रकारचा माल येथें येऊं लागला आहे. "व्यापारवर्धनगृह" पहावयास व त्यांतील कलाकौशल्याचे जिन्नस, त्यांची अप्रतिम कारागिरी व या कारागिरीच्या पैदाशींचीं ठिकाणें यांची माहिती घेण्यासाठी शाळा-कॉलेजांचे वर्ग मधून मधून येत असतात. संस्थेच्या वाचनालयास नुकतेंच मुंबई प्रांतिक सरकारचें गॅझेट मिळूं लागलें आहे.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५-५५) ... ... | १११—० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०३-१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६-० |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०३—४ |
| ३% (१९६३-६५) ... ... ... | ९५—१ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९८—२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | ११०—० |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३-६३) — .. | ११६-१२ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... — | १२७—४ |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००-५०) ११% ... ... | १४९—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११९—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ९% ... | ५५—० |
| इंपीरिअल बँक (५००) १२% ... ... | १६२५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) १½ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०९—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १२% ... ... | १४२—४ |
| कराची (१००) ९% ... ... ... | २१७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १७०५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १७४०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती (१००) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा-जामनेर (१००) १½% ... ... | ९७—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% ... | ८८०—० |
| तापी व्हॅली (५००) ८% ... ... ... | ६४३-१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. ... ... ... | २५९—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु. ... ... | ५४—८ |
| सिंधिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | २८-१३ |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु. ८ आ. ... | ५७—८ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ४५५५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २१७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) ७½% रु. ... ... | १५४—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ४१२—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) १७२ रु. १० आ. ० पै ... | २१३०—० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | १६४—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४३-११-६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३-१—६ |

# पाणीच पाणी



तुम्हांस मुबलक पाणी पाहिजे ना?

तर मग— आमचे बोरींग मशीननें तुमचे घरांत अगर शेतांत बोअर करून घ्या व एक हातपंप बसवा. वाटेल तेव्हां तुम्हांस पाणी मिळूं शकेल.

बोअर मशीन व पंप पूर्ण स्वदेशी असून आमचें कारखान्यांत तयार केलेले आहेत.

बोअर (भोंक) ६ इंच असून यंत्र इंजिननें चालतें.

दर व इतर माहिती बद्दल चौकशी करा.

**भिडे आणि सन्स,**
सांगली.

श्री विनायक मिल्सची पातळें व लुगडी वापरा.

---

**—SOLD, BOUGHT, HIRED OR MADE TO ORDER.—**

First and second hand iron or wooden furniture.

**Address:**—Shevak Quarters, 1227 F. C. Road, Poona 4. Industrial Centre.

*Yours faithfully,*
**C. R. Shevak.**

सर्व प्रकारचें लोखंडी व लांकडी फर्निचर विकत घेतलें जातें किंवा नवीन तयार करून अगर भाड्यानें मिळतें.

पत्ता--शेवक क्वार्टर्स, १२२७ फ. कॉ. रोड, पुणें नं. ४.

इंडस्ट्रियल सेन्टर, कारखाना पत्ताः--१५३ कसबा, पुणें २.

आपला--सी. आर. शेवक.

---

# बापट ब्रदर्स- १००३ सदाशिव, पुणें २

**आमचे दुकानीं—**

★ सर्व तऱ्हेचे स्टोव्हज, पेट्रोमॅक्स, व इतर बत्त्या, सायकलस व त्यांस लागणारें सुटें सामान मिळेल व तत्संबंधीं दुरुस्तीचें काम काळजीपूर्वक व वक्तशीर केलें जातें. ★

तसेंच—

जावा स्पिरिट, उत्तम फिनाईल, स्टॅन्डर्ड ऑईल कंपनीचें रॉकेल, रेनकोटस्, गॉगल्स, थरमॉस, टॉर्चेस वगैरे.

सर्व तऱ्हेचा माल घाऊक व किरकोळ योग्य भावानें मिळतो.

---

# मुजुमदार टॉय वर्क्स

या आणि पहा

**माना हालणारीं व साधीं लाकडी चित्रें**

**समक्ष येऊन खात्री करा.**

३५५ सदाशिव पेठ, शेडगेवाडी, पुणें शहर.

---

# स्वादिष्ट मसाला करणारे आद्य कारखानदार





## व्ही. पी. बेडेकर

**बेडेकर आणि सन्स**

पुणें येथील एजंट—

दत्तात्रय नारायण हेजीब.

---




# माधवाश्रम

हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून, रेल्वे-स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.

जागा मध्यवस्तींत, हवाशीर, लागणारे फर्निचरनें शृंगारित असून, सोयीमुळें ती शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहणेची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

**माधवाश्रम बिल्डिंग,** गिरगांव, मुंबई.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक




पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
संग्रह करा
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट,
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
—: रक्तवर्धक :—
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें
आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
' पायोनियर डाइंग हाऊस '
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख २६ नोव्हेंबर, १९४१ | अंक ४७

## * विमाक्षेत्रांतील ' कॉमनवेल्थ ' चें अढळ स्थान *

### १९४० चें पूर्ण केलेलें काम.........४५ लक्षांहून अधिक

**★ बोलका—ढलपा ★**

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८३,००० |
| सरकारी कर्जरोखे, गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१२,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

**• कॉमनवेल्थचीं वैशिष्ट्यें •**

( १ ) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरूकता
( २ ) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
( ३ ) काळजीपूर्वक काटकसरीची व्यवस्था
( ४ ) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
( ५ ) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

## कॉमनवेल्थ

### ॲशुअरन्स कंपनी लि., पुणें २.

—शाखा—

मुंबई—मद्रास—कलकत्ता—नाशिक—
कराची—अहमदाबाद

एम्. एन्. भागवत, बी. ए.
*मॅनेजिंग ऑफिस सुपरिंटेंडेंट.*

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

( 1 ) We stock and supply Educational books, General books & Library books.

( 2 ) We supply Government of Bombay and Government of India publications.

( 3 ) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

( 4 ) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### मि. हेनेसी

अमेरिकेंतील हिंदी एजंट जनरलच्या कचेरींत इन्फर्मेशन ऑफिसर म्हणून मि. हेनेसी ह्यांची नेमणूक झाली आहे. त्यांस २,४५० रुपये पगार मिळून परदेशांतील नोकरीबद्दल ४५० रुपये जादा भत्ताहि मिळेल व अमेरिकेंतील वाढलेल्या रहाणीच्या मानानें आणखीहि भत्ता मिळेल. त्यांच्या पगारास प्राप्तीवरील कर लागू आहे किंवा नाहीं, हें माहीत नाहीं.

### धरणीकंप

मुंबईपासून ३,७५० मैल अंतरावर कोठेंतरी उद्‌भवलेला धरणीकंप कुलाबा वेधशाळेंत १८ नोव्हेंबर रोजीं रात्रीं १० वाजून २६ मिनिटांनीं तेथील सिसमोग्राफवर नोंदला गेला.

### बनारस विश्वविद्यालय

सर एस. राधाकृष्णन् ह्यांनीं चार दिवसांचे अवधींत अहमदाबाद येथें बनारस विश्वविद्यालयाकरितां १ लक्ष रुपये जमा केले.

### व्हाइसरॉयांचा दरबार

व्हाइसरॉयांच्या दरबाराच्या दिवाणखान्यांत अमेरिकेचे हिंदुस्थानांतील कमिशनर, मि. विल्सन, ह्यांनीं व्हाइसरॉयांस आपल्या नेमणुकीचीं कागदपत्रें दाखल केलीं. हिंदी सरकारचे मुकुटमणि व बादशहांचे प्रतिनिधि जे व्हाइसरॉय, त्यांस अशा तऱ्हेनें आदर दाखविला गेल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. "आगामी वसाहतीच्या स्वराज्याचें हें प्रतीक आहे," असें वरील समारंभाचें वर्णन एका वृत्तपत्राच्या बातमीदारानें केलें आहे.

### सत्याग्रही

सत्याग्रहाबद्दल एकूण ५,६५६ लोक १ ऑक्टोबर, १९४१ रोजीं शिक्षा भोगीत होते.

### रेडिओची वाढती लोकप्रियता

ऑक्टोबर, १९४१ मध्यें रेडिओचे १३,५१४ परवाने देण्यांत आले, त्यांपैकीं ४,५६७ नवे परवाने होते. आतांपर्यंत कोणत्याहि महिन्यांत एवढे लायसेन्स दिले गेले नव्हते.

### इन्शुअरन्स अॅडव्हायसरी कमिटी

इन्शुअरन्स अॅडव्हायसरी कमिटीची सभा दिल्ली येथें सरकारी व्यापार मंत्र्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. तींमध्यें विम्याचे सुपरिंटेंडेंट ह्यांनीं विमा कायद्याखालील नियोजित नियम समजावून सांगितले. विम्याच्या हप्त्यांचे दर, सध्याचे व्याजाचे हलके दर लक्षांत घेतां, वाढविण्याचें महत्त्व अध्यक्षांनीं प्रतिपादन केलें. कंपन्यांच्या डायरेक्टर बोर्डावरील विमेदारांच्या प्रतिनिधींची निवड कांहीं ठराविक वर्षांनीं एकदम व्हावी; पाळीपाळीनें ते दरसाल निवृत्त होऊं नयेत, असें कमिटीनें सुचविलें.

### साखर व गहूं ह्यांची निर्गत

इराणमध्यें अद्याप साखर व गहूं ह्यांचा तुटवडा भासत आहे, तो भरून काढण्याकरितां हिंदुस्थानांतून त्यांची निर्गतीची व्यवस्था करण्यांत येत आहे.

### टेलिफोन कमी वापरा

सध्याच्या युद्ध-परिस्थितींत टेलिफोनचा वापर अतिशय वाढला आहे, तेव्हां लोकांनीं शक्य तितक्या कमी वेळा टेलिफोनचा उपयोग करावा, अशी विनंति बंगाल टेलिफोन कॉर्पोरेशननें आपल्या गिऱ्हाइकांस केली आहे.

### हिंदी आयुर्विम्याची प्रगति

हिंदुस्थानांत १९३९ सालीं एकूण ४६ कोटि, ६२ लक्ष रुपयांचे ३,००,००० विमे उतरण्यांत आले. १९३८ सालीं ५१ कोटि ७२ लक्ष रुपयांच्या ३,२२,००० पॉलिसी देण्यांत आल्या होत्या.

### मुंबई शहराच्या पाणीपुरवठ्यांत काटकसर

मुंबई शहरास पाणी पुरविणाऱ्या तळ्यांत, यंदा पाऊस कमी पडल्यामुळें, जेवढें पाणी शिल्लक असावयास पाहिजे, तेवढें नाहीं. जुलै, १९४२ अखेर मुंबई शहरास पाण्याचा बक्कळ पुरवठा व्हावा, ह्याकरितां आतांपासूनच पाण्याची बचत करणें आवश्यक आहे, ह्या दृष्टीनें, १६ नोव्हेंबर १९४१ ते १५ फेब्रुवारी, १९४२ अखेर दररोज ९ कोटि, ८० लक्ष गॅलन पाणी सोडण्यांत येईल. म्हणजे सध्यापेक्षा ८० लक्ष गॅलन पाणी कमी मिळेल. १५ फेब्रुवारीनंतर १० कोटि गॅलन रोज सोडण्यांत येईल. १ जूननंतर, पाणीपुरवठा पुनः कमी करून तो ९ कोटि, ५ गॅलनांवर आणावा लागेल. मुंबईच्या नागरिकांनीं पाणी शक्य तितक्या काटकसरीनें वापरावें, अशी म्युनिसिपल कमिशनरनीं विनंति केली आहे.

### श्रीमंतांचा बर्फावरील खेळ

स्की क्लब ऑफ इंडिया गुलमर्ग येथें येत्या नाताळांत स्कीचे सामने भरविणार आहे. त्यांत भाग घेण्यास ईजिप्त, बसरा, ब्रह्मदेश, मलाया, इत्यादि ठिकाणांहून लोक येणार आहेत. ऑस्ट्रेलियांतील दोन तज्ज्ञ स्त्रिया स्कीच्या खेळाचें शिक्षण देण्यासाठी येणार आहेत. हिंदी लोक ह्या खेळाकडे दिवसानुदिवस अधिकाधिक आकर्षले जात आहेत. युरोपांतील बाजार बंद झाल्यामुळें खेळाचें साहित्य मिळण्याची अडचण भासूं लागली, परंतु कॅनडा व ऑस्ट्रेलिया येथून साहित्याची आयात करण्यांत येत आहे. नाताळाच्या दिवसांत अनेक नवशिके येतात, त्यांस शिकविण्याची सोय केली आहे. सिकिम, धर्मशाळा (सिमला), मरी, चित्रळ, इत्यादि उत्तर हिंदुस्थानांतील ठिकाणीं 'स्की' चा खेळ लोकप्रिय होऊं लागला आहे.

### इंडियन पोलिस सर्व्हिस

इंडियन पोलिस सर्व्हिसमध्यें १९१९ पर्यंत फक्त युरोपियनांसच प्रवेश होता. १९४० मध्यें त्यांतील युरोपियन अधिकाऱ्यांची संख्या ४२२ व हिंदी अधिकाऱ्यांची संख्या १९४ झाली. सध्या त्यांत ४०४ युरोपियन व २०२ हिंदी अधिकारी आहेत.

### हिंदी उद्योगधंदे

"हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी हिंदुस्थान सरकार फार हातभार लावूं शकणार नाहीं; हिंदी लोकांची धडाडी, कार्यक्षमता व प्राविण्य ह्यांचाच त्या वाढीस खरा उपयोग होणार आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीस सध्याइतकी अनुकूल परिस्थिति आतांपर्यंत कधीच प्राप्त झाली नव्हती." —सर गथ्री रसेल ह्यांनीं वरील मत नुकतेंच व्यक्त केलें.

### बंगालमधील जन्म-मृत्यू

बंगालमध्यें १९३९ सालीं १५,९७,६५१ जन्मांची व १०,९०,५३० मृत्यूंची नोंद झाली. १९३८ सालीं मृत्यूंपेक्षा जन्मांची संख्या २,०५,३६८ नें ज्यास्त होती. कलकत्ता जिल्ह्यांत जन्मापेक्षा मृत्यू अधिक झाले. जननांचें व मृत्यूंचें सर्वांत मोठें प्रमाण दार्जिलिंग जिल्ह्यांत आढळलें. १०० मुली : १०७ मुलगे ह्या प्रमाणांत जन्म झाले व १०० स्त्रिया : १०९ पुरुष ह्या प्रमाणांत मृत्यू झाले.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५९० | ग्लास वर्क्स लि.—लोकसंख्येविषयीं माहिती | |
| २ सहकारी बँक्स असोसिएशन ... ... | ५९१ | ५ निजाम स्टेट रेल्वे ... | ५९६ |
| ३ ग्रामसुधारणेशीं संबंध असणाऱ्या संस्था ... | ५९२ | ६ बॉंबे स्टीम नॅ. कं. ... | ५९६ |
| ४ स्फुट विचार ... | ५९३ | ७ धुळें तालुक्यांतील सहकारी चळवळ ... | ५९७ |
| लिबीयामधील मोहीम—मोहिमेची पूर्वतयारी—ब्रिटिशांची चढाई—ओगले | | ८ मुंबई प्रांतांतील शिक्षणप्रगति ... ... | ५९८ |
| | | ९ निवडक बाजारभाव | ५९८ |



# अर्थ

बुधवार, ता. २६ नोव्हेंबर, १९४१


## सहकारी बँक्स असोसिएशनचें उपयुक्त कार्य

तीन वर्षांपूर्वी मुंबई येथें मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांची एक परिषद् प्रो. वा. गो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखाली भरली होती; तिनें सेंट्रल आणि अर्बन बँकांच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा आणण्याकरितां व त्यांच्या हितसंबंधांच्या प्रश्नांचा विचार करण्याकरितां एक मध्यवर्ती संस्था स्थापण्याविषयीं ठराव मंजूर केला. त्या ठरावास अनुसरून असोसिएशनची रीतसर स्थापना झाली. ऑक्टोबर १९३९ मध्यें तिच्या कामास व्यवस्थितपणें प्रारंभ झाला.

सहकारी बँकांच्या प्रश्नांबाबत असोसिएशनचें मत विचारण्याचें आणि त्या मतास आवश्यक तें महत्त्व देण्याचें धोरण सहकारी रजिस्ट्रारनीं आरंभापासूनच स्वीकारलें, त्या कारणानें असोसिएशनच्या कार्याची उपयुक्तता वाढली व तिचेकडून भरीव कार्य होऊं शकलें. संस्थेच्या पटावर मुंबई भागांतील चार, महाराष्ट्र भागांतील नऊ, गुजराथ भागांतील चार व कर्नाटक भागांतील सात अशा चोवीस अर्बन बँका आणि बारा सेंट्रल व इतर बँका आहेत, ह्यावरून तिच्या प्रातिनिधिक स्वरूपाची कल्पना येईल. असोसिएशनचा दुसरा वार्षिक वृत्तांत नुकताच प्रसिद्ध झाला आहे. अहवालाचे वर्षी असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाच्या दहा सभा झाल्या व त्यांत ११४ प्रश्नांचा विचार झाला, ह्यावरून कार्याच्या विस्ताराची कल्पना येईल.

सप्टेंबर, १९४० मध्यें रिझर्व्ह बँकेनें पैशाच्या वर्गावर्गीच्या दरांत बदल केला, सोसायट्यांची त्या संबंधांतील सवलत काढून घेतली व प्रांतिक बँकांना देशी सावकारांच्या बरोबरीचा दर्जा दिला. असोसिएशननें हा प्रश्न तात्काळ हातीं घेऊन रिझर्व्ह बँक आणि मुंबई सरकार ह्यांचेकडे आपलें. रास्त गाऱ्हाणें अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मांडलें. रिझर्व्ह बँकेवर त्याचा परिणाम होऊन, तिनें नवीन योजनेचा मसुदा तयार केला, परंतु त्यांतील कांहीं कलमें सहकारी बँकांच्या दृष्टीनें अयोग्य होतीं, ह्याकरितां असोसिएशननें पुनः त्यासंबंधीं चळवळ केली. अशा रीतीनें, सहकारी बँकांच्या सामुदायिक हिताचें संवर्धन तिनें पद्धतशीरपणें करण्याचा यत्न चालविला आहे व त्यास यश मिळण्याचा पुष्कळ संभव आहे. सहकारी बँकांनीं आपआपसांतील पैशाच्या देवघेवींवर घ्यावयाचें कमिशन कांहीं वर्षांपूर्वीच त्यांनीं सहमतानें ठरविलें होतें, परंतु रिझर्व्ह बँकेनें आपले दर बदलल्यानंतर, सहकारी बँकांसहि आपल्या व्यवस्थेंत त्यास अनुसरून फरक करावा लागला. असोसिएशनची मध्यस्ती त्यास आतिशय सोईची झाली.

सेंट्रल बँकांनीं आपले ताळेबंद एका विशिष्ट नमुन्याप्रमाणें तयार करावेत, ह्या संबंधीं वाद असण्याचें प्रयोजन नाहीं. रिझर्व्ह बँकेनें अशा ताळेबंदाचा एक नमुना तयार केला, तो रजिस्ट्रारनीं असोसिएशनकडे पाठवून तिचें त्यावर मत विचारलें. ह्या नमुन्याचा असोसिएशननें बारकाईनें विचार केला व त्यांत कांहीं सुधारणा सुचविल्या. ह्या दुरुस्त्यांपैकीं बहुतेक सर्व मान्य करण्यांत आल्या आहेत. मध्यवर्ती बँकांनीं ह्या नमुन्याप्रमाणें ताळेबंद तयार करावेत, अशी त्यांस विनंति करण्यांत आली आहे. देखरेखीचें काम सुपरवायझिंग यूनियन्सकडून नीट पार पडत नाहीं व तें काम काटकसरीनेंहि होत नाहीं, अशी बँकांची तक्रार असोसिएशननें रजिस्ट्रारपुढें मांडली. यूनियन्सच्या कामांत इष्ट ती सुधारणा वर्षअखेर घडून आली नाहा, तर ह्या प्रश्नाचा विचार गंभीरपणें करण्याची मध्यवर्ती बँकांवर पाळी येईल, असेंहि त्यांस कळविण्यांत आलें व सुधारणेच्या दिशाहि दर्शविण्यांत आल्या. ग्रुप सेक्रेटरींच्या कामांतहि सुधारणा कशी घडवून आणतां येईल, ह्यासंबंधीं असोसिएशननें रजिस्ट्रारशी विचारविनिमय केला.

बँकांच्या ऑडिटविषयींहि असोसिएशननें उपयुक्त कामगिरी केली. ऑडिट फीची वसुली सरकार अतिशय भारी दरानें करतें, तिचा फेरविचार व्हावा, असें तिनें सुचविलें. सरकारी ऑडिटरांच्या खर्चाचा सबंध बोजा बँकांवर टाकणें योग्य नाहीं, कारण ऑडिटर ऑडिटाशिवाय आणखीहि इतर कामें करीत असतात, ही गोष्ट असोसिएशननें जोरानें पुढें मांडली. धंदेवाईक ऑडिटरांकडून ऑडिट करवून घेण्याची योजना सत्वर अंमलांत आणण्याची आवश्यकताहि असोसिएशनें रजिस्ट्रारच्या नजरेस आणली. ऑडिटसंबंधीं इतर अनेक प्रश्नांचाहि असोसिएशननें विचार केला. बँकांच्या नोकरवर्गाच्या नोकरीबाबतच्या नियमांत एकवाक्यता आणण्याची खटपट, त्यांस कार्यक्षम करण्याकरितां ट्रेनिंग क्लासची योजना, मार्केटिंग क्लासची योजना, इत्यादि कार्यें असोसिएशनच्या पुरस्काराविना होणें शक्यच नव्हतें. कोठारांच्या व्यवहारासंबंधीं रजिस्ट्रारनीं असोसिएशनचा सल्ला घेतला व तो बव्हंशीं मान्य केला, त्या कारणानें मालाचे तारणावर द्यावयाच्या कर्जासंबंधींच्या नियमांविषयींचें काम सोपें झालें. कंपनी कायद्याखाली नोंदलेल्या कंपन्यांशी कांहीं अटींवर व्यवहार करण्यास अर्बन बँकांस परवानगी मिळविण्याचा प्रयत्न असोसिएशननें केला, तो यशस्वी होण्याच्या मार्गांत आहे. २० हजार रुपये भाग भांडवल नसणाऱ्या संस्था बँकांच्या यादींतून जून १९४१ अखेर गळाल्या, परंतु सध्याच्या विशेष विकट परिस्थितींत त्यांचा बँकेचा दर्जा टिकविण्यासाठी भांडवल जम-

विणें अवघड आहे. ह्या दृष्टीनें वरील प्रश्नाचा फेरविचार करण्याविषयीं रजिस्ट्रारनें असोसिएशनच्या सांगण्यावरून सरकारास लिहिलें आहे.

असोसिएशनच्या विविध कार्याचा परामर्श येथें घेतां येणें शक्य नाहीं. तथापि, शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणासंबंधींच्या कायद्याचा सहकारी बँकांवर व सोसायट्यांवर होणारा परिणाम लक्षांत घेऊन, ह्या संस्थांचें वाजवी हितरक्षण करण्याचें अवघड कार्य असोसिएशन कसोशीनें करीत आहे, ही गोष्ट मात्र नमूद करणें आवश्यक आहे. सहकारी बँकांच्या ह्या प्रातिनिधिक संस्थेस आज जें विशिष्ट स्थान प्राप्त झालें आहे, त्याचीं मुख्य कारणें संस्थेच्या चालकांनीं केलेलें भरीव कार्य, त्यांच्या व्यवहारांतील जबाबदारपणा, बँकांचें हार्दिक सहकार्य व रजिस्ट्रारनीं तिच्या सल्ल्यास दिलेलें महत्त्व, हीं आहेत. अनेक सहकारी बँका अद्याप संस्थेच्या सभासद झालेल्या नाहींत. त्यांस आधीं कदाचित् संस्थेच्या कार्याची उपयुक्तता पटली नसेल, परंतु असोसिएशनच्या उपयुक्त कार्याचा वरील आढावा लक्षांत घेतां, त्यांनीं असोसिएशनमध्यें सामील होणें त्यांच्या स्वतःच्या व एकंदरीनें सहकारी चळवळीच्या कसें फायद्याचें आहे, हें दिसून येईल. श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांच्या ऑनररी सेक्रेटरी ह्या नात्यानें मदतीचा लाभ संस्थेला प्रारंभापासून झालेला आहे, ही गोष्ट संस्थेच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें फार महत्त्वाची गणली पाहिजे.

## ग्रामसुधारणेशी संबंध असणाऱ्या उपयुक्त संस्था

ग्रामसुधारणेशीं संबंध असणाऱ्या पुणें शहरांतील व त्याच्या आसपासच्या संस्थांविषयीं थोडक्यांत माहिती देणारें एक चोपडें मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. ग्रामसुधारणेच्या कामांत गुंतलेल्या अधिकाऱ्यांस ह्या संस्थांस भेट देणें फायद्याचें वाटेल. बिगरसरकारी लोकांनाहि संस्थांचे चालक संस्था दाखवून पाहिजे ती माहिती पुरवितील.

### पुणें शहर

**शेतकी खातें:-मेंढ्यांच्या पैदाशीचें फार्म** (शीप ब्रीडिंग फार्म). भांबुर्डी जंगल हद्दींत फार्म आहे. अधिक लोकर देणाऱ्या मेंढ्यांची पैदास करणें, महाराष्ट्रांतील मेंढी व आफ्रिकेंतील मेरिनो मेंढी ह्यांचा संकर करणें, लोकरीसंबंधीं संशोधन करणें इत्यादि कामें फार्मच्या कार्यक्षेत्रांत येतात.

**शेतकी खातें:—पोल्ट्री फार्म.** खडकीकडे जाणाऱ्या रस्त्याचे पुण्यापासूनच्या तिसऱ्या मैलाचे दगडाजवळ हें फार्म आहे. चांगल्या कोंबड्यांची पैदास करणें इत्यादि कामें ह्या फार्मावर होतात.

**शेतकी खातें:—फळांविषयीं प्रयोग केंद्र.** औंध रोडवर बोटॅनिकल गार्डनमध्यें वरील फ्रूट एक्सपेरिमेंटल स्टेशन आहे. बोटॅनिकल गार्डन ही मुंबई प्रांतांतील फार जुनी बाग आहे व तिचेमध्यें कांहीं फार दुर्मीळ झाडें आहेत. फळें चांगल्या स्थितींत दीर्घकाळ टिकविण्याचे प्रयोग ग्रॅस स्टोरेजमध्यें केले जातात. जवळच, फळांच्या नमुन्यांचा एक उपयुक्त संग्रह आहे. फळांच्या लागवडीच्या सुधारलेल्या पद्धतीचे प्रयोग बागेंत चालतात. बागवानांसाठी वर्ग चालविण्यांत येतो.

**शेतकी खातें:—प्लॅन्ट पॅथॉलॉजी लॅबॅरेटरी** ही प्रयोगशाळा शेतकी कॉलेजांतच आहे. पिकांच्या रोगराईचा नाश करण्यासंबंधीं प्रयोग येथें चालतात.

**औद्योगिक खातें:—ग्रामोद्योगाचें प्रयोगात्मक वर्कशॉप.** शेतकी कॉलेजाचे वाटेवरच हें वर्कशॉप आहे. शेतकऱ्यांस उपयुक्त अशा यंत्र-सामुग्रीची बनावट करणें, ती दुरुस्त करणें, इत्यादि कामाचे प्रयोग येथें चालतात.

**औद्योगिक खातें:—हातानें बनविलेल्या कागदासंबंधींच्या संशोधनाचें केंद्र** वरील वर्कशॉप शेजारीच आहे. अखिल भारतीय ग्रामोद्योग संघानें हें केंद्र चालविलेलें आहे. हातानें नवीन कोणत्या प्रकाराचें कागद करतां येतील, ह्याविषयीं प्रयोग तेथें चालतात. रासायनिक फिल्टर पेपरच्या उत्पादनाचे प्रयोग यशस्वी होत आहेत.

**औद्योगिक खातें:—लाखेच्या कामाचें प्रात्यक्षिक.** रविवार पेठेंत लक्ष्मीनारायण मार्केटाच्या इमारतींत हें केंद्र आहे. दरवर्षी सहा विद्यार्थ्यांस हें काम शिकविलें जातें.

**औद्योगिक खातें:—सहकारी हातमाग:-इन्स्टिट्यूट** सरदार मुदलियार रोडवर ही संस्था आहे. हातमागावर कापड काढण्याचें शिक्षण येथें दिलें जातें. संस्थेंत शिकून तयार होणारे विद्यार्थी देखरेख करण्यांत तयार व्हावेत अथवा त्यांस स्वतःचा धंदा चालवितां यावा, असा अभ्यासक्रम आखलेला आहे. पॉवरलूमसंबंधींहि शिक्षण दिलें जातें. सध्याची हातमागाच्या धंद्याची बिकट परिस्थिति लक्षांत घेतां,इन्स्टिट्यूटमधील हातमागांचें शिक्षण बंद करून पॉवरलूम्सचेंच शिक्षण सुरू करणें कितपत श्रेयस्कर होईल, ह्याचा विचार चालू आहे.

**जंगल खातें:—सिल्व्हिकल्चरल नर्सरी.** रेस कोर्सजवळ एम्प्रेस गार्डनमध्ये ही नर्सरी आहे. मुंबई प्रांतांत वेगवेगळ्या जंगलांत कोणतीं झाडें लावतां व वाढवतां येतील, ह्याचे प्रयोग येथें चालतात.

**पब्लिक हेल्थ खातें:—लॅबॅरेटरी** पी. डब्ल्यू. डी. पुणें वॉटरवर्क्सच्या हद्दींतच ती आहे. शुद्ध पाणी व अन्न ह्यांचे संबंधीची उपयुक्त माहिती येथें मिळेल.

**शिक्षण खातें:—तज्ञ यांत्रिक कामगार तयार करण्याचे** वर्ग कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्यें चालविण्यांत येतात.

**शिक्षण खातें:—ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन.** सुमारें २६० प्राथमिक पुरुष-शिक्षकांच्या शिक्षणाची येथें व्यवस्था आहे.

**शिक्षण खातें:—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन.** येथें सुमारें १२० स्त्री प्राथमिक शिक्षकांच्या शिक्षणाची व्यवस्था आहे.

**शिक्षण खातें:—लॉर्ड रे इं. म्युझियम.** म. फुले मार्केटच्या टॉवरमधील जागेंत हा म्यूझियम आहे. त्याची शाखा लक्ष्मी रोडवर कॉमनवेल्थ इमारतींत आहे. ह्या म्यूझियमविषयीं सविस्तर माहिती लोकांना आहेच.

### छत्रीवाले सैनिक

छत्रीवाले सैनिक हिंदुस्थानांत शिकवून तयार करण्याचें काम जोरांत चालू आहे. ब्रिटिश गुरखा व इतर पलटणींतील कित्येक लोक ह्या शिक्षणासाठीं आपण होऊन पुढें आले आहेत. पॅराशूट्सच्या उत्पादनाच्या कारखान्यांची उभारणी सुरू आहे.

## स्फुट विचार

### लिबियामधील मोहीम

गेल्या आठवड्यांतली अत्यंत महत्त्वाची युद्धविषयक बातमी म्हटली म्हणजे लिबियांत ब्रिटिश फौजांनीं चालू केलेल्या चढाईची होय. ह्या मोहिमेची माहिती ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं कॉमन्स सभेंत तात्काळ सांगितली ह्यावरून तिच्या वैशिष्ट्याची कल्पना येते. गेले कित्येक महिने इजिप्तची पश्चिम सरहद्द आणि टोब्रुक येथें ब्रिटिश सैन्य दबा धरून बसलें होतें. ब्रिटिश वैमानिक दलानें सेरेनैकोच्या व लिबियाच्या उत्तर किनाऱ्यावरील बंदरांवर हल्ले चढवण्याचें सत्र सारखें चालू ठेवलें होतें आणि ब्रिटिश आरमार शत्रूचीं जहाजें भूमध्य समुद्रांत बुडवीत होतें. त्याचप्रमाणें, इटली व सिसिली येथील मोक्याच्या ठिकाणांवर ब्रिटिश विमानें प्रत्यही हल्ले करीत होतीं. लिबियामधील जर्मन व इटालियन फौजेस युद्धसामुग्री जाऊन पोहोचूं नये हा वरील लढाऊ हालचालींचा उद्देश होता. तथापि, इतके महिने लोटले तरी लिबियामध्यें ब्रिटिश सेनानी चढाईचें धोरण कां स्वीकारीत नाहींत ह्या विषयीं इंग्लंडमध्यें व इतरत्र कुतूहल उत्पन्न झालें होतें. लिबियांत जनरल वेव्हल ह्यांनीं केलेले पराक्रम पुसून टाकून शत्रू तेथें ठाणें धरून बसला होता, त्यास तेथून हाकून लावण्याची आवश्यकता सामान्यतः सर्वत्र भासत होती. विशेषतः रशियांत घनघोर संग्राम चालला असतां जर्मनीस लिबियामध्यें पायबंद घालण्यानें रशियास आणीबाणीच्या वेळीं मदत आणि शत्रूच्या प्रतिकूल परिस्थितींत त्याचा पराजय हा दुहेरी हेतू ब्रिटिश सैन्याच्या लिबियामधील मोहिमेनें साधण्यासारखा होता. ह्या कल्पना ब्रिटिश लष्करी मुत्सद्यांच्या डोक्यांत घोळत नव्हत्या असें नाहीं. परंतु लिबियामध्यें शत्रुविरुद्ध मोहीम चालू करावयाची ती उत्कृष्ट तयारीनें करावयाची असें त्यांनीं ठरवलें असल्याचें आतां स्पष्टच झालें आहे. विमानें, आरमार, चिलखती गाड्या ह्यांनीं अनपेक्षित रीतीनें एकदम विस्तृत रणांगणावर चालून जावयाचें असा ब्रिटिश सेनानींचा संकल्प होता. त्यास त्यांनीं आतां मूर्त स्वरूप दिलें आहे.

---

### मोहिमेची पूर्वतयारी

रशियास प्रत्यक्ष रणांगणावर सहाय देण्याचें साधन इंग्लंडला आज उपलब्ध नाहीं. ह्या कामीं ब्रिटिश विमानदलाच्या तुकड्या रशियन रणांगणावर पाठवण्यापलीकडे फारसें विधायक कार्य करणें व्यवहार्य नाहीं. तथापि लिबियामध्यें त्यावर हल्ला करून जर्मनीचें तेथील सामर्थ्य नष्ट करणें हा रशियास सहाय करण्याचा एक मार्गच आहे. दुसरें असें कीं, फ्रान्सच्या मदतीनें पश्चिम आफ्रिकेंत चढाई करण्याचे आणि भूमध्य समुद्राचा पश्चिम विभागांत आपलें वर्चस्व स्थापण्याचे हिटलरचे बेत हाणून पाडणें आवश्यक होतें. व्हिशीच्या मंत्रिमंडळावर दडपण टाकून हा हेतु सिद्धीस नेण्याविषयींच्या जर्मनीच्या कारवाया चालू होत्या. त्या हाणून पाडण्यास जर्मन सैन्याची लिबियामधून हकालपट्टी करणें अगत्याचें होतें. ह्याकरितां लढाऊ साधनांची जुळवाजुळव ब्रिटिश सेनानी करीत होते आणि लिबियन मोहिमेच्या योजनांचा त्यांचा विचार चालला होता. भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमाराचे शत्रूवर हल्ले जोरानें चालले होते ते प्रस्तुत मोहिमेच्या पूर्व तयारीचा एक भाग ह्या स्वरूपाचे होतें हें आतां उघड झालें आहे. ही तयारी किती व्यवस्थितपणाची होती, हें शेवटपर्यंत तिचा पत्ता शत्रूस लागला नाहीं त्यावरून स्पष्ट होतें. चिलखती गाड्या आणि विमानें ह्यांच्या संख्याधिक्यावर जर्मनीचा सर्व भर असल्याचें आजपर्यंतच्या अनुभवावरून दिसून आलें आहे. त्यासंबंधांत सध्या लिबियामध्यें परिस्थिति ब्रिटिशांस अनुकूल अशी आहे. मोहिमेच्या पहिल्याच तीन दिवसांत शत्रूस कच खावी लागली आणि त्याची पीछेहाट झाली. तसेंच, त्याच्या चिलखती गाड्यांचा नाशहि मोठ्या प्रमाणावर होत आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

---

### ब्रिटिशांची चढाई

एका बाजूस इजिप्शन सरहद्द व दुसऱ्या बाजूस टोब्रुक ह्या दोहोंच्या चिमटयांत जनरल कनिंगहॅम ह्यांनीं शत्रूच्या सैन्यास धरलें आहे. त्यामधून निसटण्याचा प्रयत्न जर्मन सेनाधिकारी करीत आहेत. ह्या खटपटींत शत्रूच्या चिलखती गाड्यांचा नाश मोठ्या प्रमाणावर होत आहे. लिबियांत मुलूख काबीज करणें हा ब्रिटिश सेनानींचा उद्देश नसून जर्मनीच्या लष्करी बळाचा नाश करून टाकणें हा त्यांचा हेतु आहे. लिबियन वाळवंटांतील लढायांची तुलना मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत समुद्रामधील चकमकींशीं केली. वाळवंटाचा प्रदेश असा आहे कीं त्यांत धिमी लढाई होऊंच शकत नाहीं. दोन पक्षांची झटापट चालू झाली कीं तीमध्यें अल्पावधींत काय तो सोक्षमोक्ष व्हावयाचा असें त्यांनीं वर्णन केलें आहे. लिबियामध्यें प्रस्तुत द्रुतगतीच्या हालचाली होत आहेत, त्यांचें रहस्य ह्यावरून ध्यानांत येईल. येथें इटालिअन सैन्य अपेक्षेप्रमाणें बाजारबुणगेंच ठरलें असून मुसोलिनीस हिटलरचा धावा करणें एवढाच स्वसंरक्षणाचा मार्ग उरला आहे. व्हिशीवर दडपण आणून उत्तर आफ्रिकेंत ब्रिटिशांस शह देण्याची कारवाई हिटलर एका दिशेनें करीत असून त्याच वेळेस तुर्कस्थानास मध्यें पाडण्याची त्याची खटपट असल्याच्या बातम्या येत आहेत. युरोपमधील स्वतःच्या स्वामित्वाच्या पायावर युद्ध-तहकुबी आणि तह घडवून आणण्याची क्लृप्तीहि तो लढवीत आहे असें दिसतें. इकडे अमेरिका व जपान ह्यांच्यामधील वाटाघाटींचें घोंगडें भिजत पडलेंच आहे. असल्या गुंतागुंतीच्या परिस्थितींत लिबियामधील ब्रिटिश मोहीम किती योग्यकालिक आहे हें स्पष्ट होईल.

---

### ओगले ग्लास वर्क्सचा रौप्यमहोत्सव

ओगले ग्लास वर्क्स लि. च्या रौप्यमहोत्सवाचे शुभ प्रसंगीं आम्हीं ओगले बंधूंचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. गेल्या पंचवीस वर्षांचे अवधींत ओगले बंधूंनीं अविश्रांत मेहनत करून कारखाना नांवारूपास आणला व त्याचा विस्तार केला. सुमारें दीड वर्षापूर्वीं सीलोन सरकारनें श्री. गुरुनाथराव ओगले ह्यांस तेथील काचेच्या धंद्याच्या वाढीविषयक परिस्थितीची पहाणी करण्यास आमंत्रण दिलें व त्यांच्या रिपोर्टास अनुसरून तेथें काचकारखान्याच्या उभारणीचें काम चालू आहे. ह्यावरून ओगले बंधूंचें काचेच्या कारखानदारींतील उच्च स्थान स्पष्ट होईल. १९३९ सालीं म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि. हा कारखाना ओगले बंधूंनीच

काढला व त्याची एजन्सी ओगले ग्लास वर्क्सकडेच आहे. प्रभाकर कंदील, एनॅमलचीं भांडीं, इत्यादींच्या उत्पादनास प्रारंभ करून त्यांनीं आपल्या कारखान्याची सर्वांगीण वाढ केली आणि आतां इतक्या तपश्चर्येनंतर त्यांचा कारखाना यशस्वी ठरून त्यानें त्यांच्या परिश्रमाचें चीज केलें आहे. काचेच्या धंद्यास संरक्षण मिळणें आवश्यक असतांहि सरकारचें त्याकडे लक्ष गेलें नाहीं. ओगले बंधूंनीं संरक्षण मिळविण्यासाठी चिकाटीनें केलेली खटपट निष्फळ ठरली. सध्याच्या युद्धपरिस्थितीमुळें ह्या धंद्यास आपोआपच संरक्षण मिळालें आहे. पंचवीस वर्षांपूर्वी झोपड्यांत चालणाऱ्या काचकारखान्याची आज झालेली वाढ कौतुकास्पद आहे. सध्या तेथें सुमारें १,५०० लोक कामावर आहेत! रौप्यमहोत्सवाचे प्रसंगानें ओगले ग्लास वर्क्सनें एक सुबक स्मृतिग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांत कारखान्याच्या वाढीचा सविस्तर इतिहास कथन केलेला आहे. "सरळ व चोख व्यवहार, प्रगतिपर धोरण व महाराष्ट्राचे उज्वल कीर्तींत भर टाकण्याची प्रबल इच्छा" ह्या ध्येयानें ओगले बंधू काम करीत आहेत. आतांपर्यंतचा काळ परिस्थितीशीं झगडण्यांत गेला; यापुढील त्यांच्या योजना तयार आहेत त्यांत त्यांस यश लाभो व ओगले ग्लास वर्क्सचा उत्कर्ष होवो, असें आम्हीं इच्छितों.

---

### लोकसंख्येविषयीं माहिती

गेल्या मार्च महिन्यांत हिंदुस्थानची शिरगणति झाली, तिच्या संबंधांतले कांहीं पक्के आकडे प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतला मुख्य आकडा देशाच्या एकूण लोकसंख्येचा आहे. १९३१ मध्यें ही संख्या ३३ कोटी, ८१ लक्ष होती ती १९४१ मध्यें ३८ कोटि, ८८ लक्ष झाली. म्हणजे गेल्या दहा वर्षांच्या अवधींत हिंदी लोकसंख्येंत १५ टक्के वाढ झाली. ब्रिटिश मुलखांत १५·२ टक्के आणि संस्थानांत १४·८ टक्के असें त्या वाढीचें प्रमाण आहे. एक लक्ष व अधिक वस्तीच्या शहरांत वाढ विशेष मोठी झाली. एक लक्षापेक्षा ज्यांची लोकसंख्या कमी नाहीं अशी शहरांची संख्या वाढली असून त्यांतल्या रहिवाशांच्या संख्येंत सुमारें ११ टक्के व अधिक भर पडली आहे. कानपूर शहरांतली वाढ १०० टक्के आहे, म्हणजे त्यांतले रहिवाशी दुप्पट झाले आहेत. लोकसंख्येच्या बाबतींत बंगाल प्रांताचा नंबर पहिला लागतो. तेथील संख्या दहा वर्षांत पाच कोटींची सहा कोटि झाली. संयुक्त प्रांतांत ५½ कोटि, मद्रासमध्यें ४ कोटि, ९३ लक्ष, बिहारची ३ कोटि, ६३ लक्ष, पंजाबची २ कोटि, ८४ लक्ष, मुंबईची २ कोटि, मध्यप्रांताची १ कोटी, ६८ लक्ष, दिल्लीची ९ लक्ष ह्याप्रमाणें मुख्य प्रांतांतली संख्या आहे. गेल्या दहा वर्षांतली वाढ सर्वांत अधिक म्हणजे २५ टक्के सरहद्द प्रांतांत झालेली आहे. बंगाल व पंजाब ह्या प्रांतांतली वाढ २० टक्के आहे आणि मुंबईमधली सुमारें १६ टक्के आहे. सर्व हिंदुस्थानांत मिळून साक्षरांची संख्या ४ कोटि, ७३ लक्ष आहे. महत्त्वाच्या तपशिलाची माहिती १९४१ च्या शिरगणतींत जमा करण्यांत आलेली नाहीं ह्यामुळें दहा वर्षांच्या मागील खानेसुमारींतील कित्येक आकड्यांशीं तुलना करण्यास साधन उपलब्ध नाहीं.

---

## कागदाचे दर उतरले

(ले०:-श्री. वि. श्र. पटवर्धन)

युरोपांतील युद्ध सव्वा दोन वर्षांपूर्वी सुरू झाल्यापासून छपाईच्या व इतर तऱ्हेच्या कागदाच्या दरांत आस्ते आस्ते वाढ होऊं लागली. परदेशी कागदाची आवक कमी आणि देशी कागदाचा पुरवठा अपुरा यामुळें मागणी आणि पुरवठा (Demand & Supply) या तत्त्वानुसार कागदाच्या किंमती कागदव्यापाऱ्यांकडून भरमसाट रीतीनें वाढूं लागल्या. गेल्या सप्टेंबरांत जपान युद्धाबाबत कोणतें धोरण स्वीकारणार याबद्दल साशंकता उत्पन्न झाल्याची परिस्थिति पाहून कागदव्यापाऱ्यांनीं एकाएकीं आपल्या कागदाचे दर ५० टक्क्यानें एकदम वाढविले. कागदव्यापाऱ्यांनीं भरमसाट किंमती वाढविल्यानें मुद्रणधंद्याची स्थिति काय होणार अशी चिंता मुद्रकास वाटावयास लागली. देशी गिरण्यांचे जे दर आहेत त्यापेक्षां ७०।८० टक्के इतका भरमसाट फायदा घेऊन कागदव्यापाऱ्यांनीं कागद विकण्याचें ठरविलेलें पहातांच मुद्रकांनीं या बाबतींत टिटाघर गिरणी वगैरेकडे तक्रार करण्यास सुरुवात केली. पुणें प्रेस ओनर्स असोसिएशननें याबंधीं ठराव करून हिंदुस्थान सरकारच्या व्यापारमंत्र्यास आपलें गाऱ्हाणें कळवून कागदाचे भाव नियंत्रित करण्याची मागणी केली, आणि कलकत्त्याच्या तीन कागदाच्या (टिटाघरप्रभृति) ज्या गिरण्या आहेत, त्यांना पत्र पाठवून त्यांचे अधिकृत विक्रेते भरमसाट दरानें कागद विकत असल्याचें त्यांच्या निदर्शनास आणलें. पुणें प्रेस ओनर्स असोसिएशनचें मुखपत्र असलेलें 'मुद्रणप्रकाश', 'ज्ञानप्रकाश', 'काळ', 'केसरी', 'मराठा', 'जागृति' वगैरे वृत्तपत्रांतून कागदव्यापाऱ्यांच्या नफेबाजीबद्दल कडक टीका आली. या सर्व टीकेचा परिणाम कलकत्त्याच्या तीन कागद गिरण्या व पुण्याची डेकन पेपर मिल्स यांच्या चालकांवर होऊन त्यांनीं कागदव्यापाऱ्यांच्या नफेबाजीस आळा घालण्याचें ठरविलें; ही फार आनंदाची गोष्ट आहे. गेले कांहीं महिने गिरण्यांचे चालक व त्यांचे एजंट यांच्यामध्यें कागद वाजवी नफा घेऊन विकावा याबद्दल पत्रव्यवहार चालू होता. पण त्यास भीक घातली गेली नाहीं, असें कळतें. पण पुणें प्रेस ओनर्स असोसिएशन व इतरांच्याकडून तक्रारी आल्यावर वरील चार गिरण्यांनीं आपल्या एजंटांना निर्वाणीचा खलिता पाठवून कागद अमुक दरानें न विकल्यास त्यांच्या मालाचा पुरवठा बंद केला जाईल असें स्पष्टपणें कळविल्यामुळें आणि निश्चित प्रमाणांत कागदव्यापाऱ्यांना कागद पुरविण्याची हमी घेतल्यामुळें कागदव्यापाऱ्यांनीं गिरण्यांच्या अटीस मान्यता दिल्यामुळें आतां यापुढें कागद (क्रीमलेड प्रिंटिंग) कमी किंमतीस म्हणजे पुण्यांत पौन्डी पावणेसहा आणे दरानें विकला जावयाचा आहे. पंधरावीस दिवसांपूर्वी ह्याच कागदाचा भाव पौंडीं ९ ते १० आणेपर्यंत होता. पण हा कागद कोणास द्यावयाचा त्याबद्दल वरील गिरण्यांकडून पुढील आशयाचे नियम ठरविणेंत आले आहेत. (१) युद्धापूर्वी जे या गिरण्यांचा कागद घेत असतील त्यांनांच फक्त कागद विकावयाचा. (२) युद्धापूर्वी जितका कागद घेतला असेल त्या प्रमाणांत कागद दिला जाईल. (३) छापखान्यांस, प्रकाशकांस, वह्या, अकौंटबुकें, ऑफीस फाईल्स, डायरी इत्यादि बनविणारांसच फक्त कागद विकावयाचा, आणि तो सुद्धां रोखीनें. (४) छापखान्यांनीं व वरील नांवें दिलेल्या मालकांनीं कोणासहि कोरा कागद विकावयाचा नाहीं. (५) ज्या छापखान्यांचें कागदाचें दुकान असेल त्यांना कागद विकावयाचा नाहीं.

गिरण्यांच्याकडून नवीन जो माल येईल त्याला व जुन्या मालाला पण वरील नियम लागू आहेत. ज्या व्यापाऱ्यांच्याजवळ १५ आक्टोबर पूर्वी इतर ठिकाणीं जास्त दर देऊन विकत घेतलेला जुना माल शिल्लक आहे त्या मालालाच फक्त किंमतीच्या शर्ती लागू नाहींत. कलकत्त्याच्या टिटाघर, बंगाल व इंडिया पेपर अँड पल्प कंपनी या तीन गिरण्या व डेकन पेपर मिल्स यांच्या कागदापुरतेच वरीलप्रमाणें दर कमी झाले आहेत.


२५ वर्षांची ओगले यांची कांच
२५
वर्षांत अखिल हिंदुस्थानांतील हजारों गिऱ्हाइकांना आम्हीं हरतऱ्हेच्या दिव्यांच्या चिमण्या, ग्लोब्स व टंब्लर्स वगैरे पुरवून जनतेची सेवा केली आहे. त्याचा रौप्य-महोत्सव आज होत आहे ही अतिशय आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे.
आमचे प्रभाकर कंदिल हिंदुस्थानांतील घरोघरीं प्रकाश पुरवीत असून हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या सैनिकांचे तळही ते प्रकाशमान करीत आहेत.
ओगले ग्लास वर्क्स, लि.
ओगलेवाडी, ( औंध स्टेट )
नागपूर; बंगलोर.
आमचेकडे सर्व तऱ्हेचा कांच-माल, 'प्रभाकर' कंदील, एनॅमल वेअर, रेल्वेस लागणारे एनॅमलचे संडास व तोंड धुण्याचीं भांडीं तयार होतात.
ओगले ग्लास वर्क्स लि.
पो. ओगलेवाडी : संस्थान औंध : जि. सातारा.

## निजाम स्टेट रेल्वे

वरील रेल्वेचा वाडी जंक्शन ते सिकंदराबाद हा पहिला फाटा १८७४ साली चालू झाला. रेल्वे रस्त्याच्या लांबीत हळूहळू वाढ होत जाऊन, आतां ह्या रेल्वेचे व्यवस्थेखाली १,३६० मैल लांबीचे फाटे आहेत. १९४०-४१ मध्यें रेल्वेचें एकूण उत्पन्न २ कोटि, ७४ लक्ष रुपये झालें, म्हणजे त्या पूर्वीच्या वर्षापेक्षा उत्पन्न २०½ लाखांनीं अधिक भरलें. मामुली खर्चाचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण ३९.७% पडलें. गेल्या वीस वर्षांत तें इतकें कमी पडलें नव्हतें. गेल्या वर्षी निवळ उत्पन्न १ कोटि, ४५½ लक्ष रुपये झालें. मोटार वहातुकीचें एकूण उत्पन्न २९½ लाखांचें ३५ लाखां-पर्यंत गेलें व निवळ उत्पन्न २.३ लाखांचे ४.८ लाख रुपये झालें. विमान वहातुकींत १९३९-४० मध्यें १.३ लक्ष रुपये नुकसान आलें होतें; गेल्या वर्षी तो आकडा १.४ लक्ष रुपये भरला.

### निजामी चलनाचा प्रसार

निजामी चलनाचा प्रसार करण्याच्या धोरणास अनुसरून, निजाम राज्यांतील स्टेशनांचे एकमेकांतील उतारूंचे दर १ जानेवारी, १९४१ पासून निजामी चलनांत व्यक्त केले जात आहेत.

### वैमानिक वहातुक

बेगमपेठ विमानतळाची सुधारणा पुरी झाली आहे. अदिलाबाद व औरंगाबाद येथील विमानतळहि आतां वहातुकीस खुले आहेत. मार्च, १९४१ पासून रेल्वेची विमान-वहातुक व्यवस्था विमानविद्या शिकविणाऱ्या लष्करी ट्रेनिंग स्कूलच्या उपयोगासाठीं दिली आहे.

### युद्धप्रयत्न

इंग्रजी आणि उर्दू भाषेमध्यें निजाम स्टेट रेल्वे एक साप्ताहिक बातमीपत्र प्रसिद्ध करते, त्यांत युद्धाच्या प्रगतीची माहिती दिलेली असते. दर आठवड्यास त्याच्या पाच हजार प्रती वाटण्यांत येतात.

---

## बाँबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनी लि.

वरील कंपनीला ३० जून, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी, ५ लक्ष, ८४ हजार रुपये घसारा काढून, २ लक्ष रुपयांची करासाठी तरतूद करून, शिलकी नफा १८ हजार धरून व नोकरवर्गास २२½ हजार रुपये बोनस देऊन २ लक्ष, ९५ हजार रुपये नफा उरला. त्यांतून भागीदारांस प्रेफरन्स भागावर १५ रुपये [ वजा इनकम टॅक्स ] व ऑर्डिनरी भागावर करमाफ १० रुपये ( ४% ) डिव्हिडंड मिळालें. शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी लि. ही बाँबे स्टीम नॅव्हिगेशनची मॅनेजिंग एजंट आहे व श्री. वालचंद हिराचंद हे तिचे अध्यक्ष आहेत. १९३९ साली शिंदिया स्टीमनें किलिक निक्सन कंपनीकडून ही मॅनेजिंग एजन्सी मिळविली. बाँबे स्टीम पश्चिम हिंदी किनाऱ्यावर वहातुक करणारी सर्वांत जुनी कंपनी आहे. सरकारनें युद्धकार्यासाठी कंपनीच्या कांहीं आगबोटी घेतल्या आहेत. कंपनीस त्याबाबत मिळावयाचें भाडें व आगबोट बुडाल्यास मिळावयाची नुकसान-भरपाई ह्यासंबंधीं कंपनी व सरकार ह्यांचे-मध्यें वाटाघाटी चालू आहेत.

---


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), वांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**हेड ऑफिस :** पुणें शहर.

**स्थानिक शाखा :** डेक्कन जिमखाना, पुणें ४.

**मुंबअी शाखा :** दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,०२,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,०१,०२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३२,००,००० |

## डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## धुळें तालुक्यांतील सहकारी चळवळ

### श्री. सरया ह्यांचें भाषण

बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या धुळें येथील शाखेशी संलग्न असलेल्या सोसायट्यांची वार्षिक साधारण सभा ता. ९ नोव्हेंबर १९४१ या दिवशीं धुळें येथें बँकेच्या बोर्डाचे चेअरमन श्री. आर. जी. सरया यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. व्ही. एल. मेहता हेही त्यावेळीं हजर होते. सभेचा औपचारिक कार्यक्रम आटपल्यावर सहकारी चळवळींतील कांहीं पुढाऱ्यांची, कांहीं सोसायट्यांच्या मेंबरांचा चळवळींतील कामासंबंधीं असलेला उत्साहाचा अभाव, चांगल्या बीं-बियाण्यांचा उपयोग, मालाची वर्गवारी व त्यावरील उत्पन्नाची वर्गवारी करणें, बाजारांतील पद्धतशीर विक्री, ह्या विषयांवर भाषणें झालीं. मे. श्री. आर. जी. सरया आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले:—

बँकेची शाखा सन १९२३ सालीं धुळें येथें उघडण्याबद्दल त्यावेळचे स्थानिक पुढारी, सहकारी चळवळीचे नेते व बँकेचे डायरेक्टर रा. ब. गरूड ह्यांनीं विशेष नेटानें मागणी केली व त्याप्रमाणें शाखा उघडण्यांत आली. त्यावेळीं बँकेचें कर्ज अजमासें रु. १॥ लाख ह्या भागांत होतें. बँकेची स्थानिक शाखा असलेपासून सोसायट्यांचे व पर्यायानें सभासदांचे काय फायदे होतात. हें सदरहु शाखा येथें जवळजवळ १८ वर्षे असल्यानें आपणांस सांगावयाची जरूर आहे असें मला वाटत नाहीं. ह्यामुळें रक्कम नेआणण्याच्या खर्चाची बचत होते इतकेंच नव्हे, परंतु सभासदांच्या अडचणी व इतर गाऱ्हाणींही बँकेच्या कानावर येऊं शकतात, व तींही लवकर येऊं शकतात. ह्यामुळें सोसायट्यांत अव्यवस्था कमी होण्याचा बराच संभव असतो. कर्जेहि जेव्हां जेव्हां लागेल त्या त्या वेळीं मिळण्याची सोय झाल्यामुळें अनाठायीं खर्च होण्याचा संभव कमी होऊं शकतो.

### कर्जाची वाढ

"ह्या शाखेखालील सोसायट्यांच्या संख्येची व त्याचप्रमाणें बँकेच्या कर्जाची वर्षानुवर्षे वाढ होत गेली आहे. हल्लीं सोसायट्यांची संख्या ६६ आहे व त्यांपैकीं ९ रद्द झालेल्या सोसायट्या आहेत. त्यांनीं बँकेचें कर्ज रु. ५,०७,२७५ घेतलेलें आहे. व ह्यापैकीं रुपये १,०१,६२७ हे रद्द झालेल्या सोसायट्यांकडे आहेत. ह्या एकूण कर्जाची मजल १९३३ मध्यें ६। लाख रुपयांपर्यंत गेली होती. बँकेचें कर्ज जास्त वाढणें म्हणजे सभासदांचा कर्जबाजारीपणा वाढला, हें एका दृष्टीनें बरोबर नाहींच. परंतु हें कर्ज जर उत्पादक कारणाकरतां असेल, तर त्याबद्दल विषाद बाळगण्याचें कारण नाहीं.इतकेंच नव्हे, परंतु ती एक अभिमानाची गोष्ट होय. परंतु खालावलेल्या सोसायट्यांची यादी आम्हीं नुकतीच मागविली होती, त्यावरून पहातां आमच्या निदर्शनास असें आलें आहे कीं २२ सोसायट्या खालावलेल्या वर्गांत असून त्यांच्याकडे बँकेचें कर्ज रुपये २,९६,००० इतकें [illegible] व त्यांपैकीं कदाचित् ११ सोसायट्यांचें काम गुंडाळून त्या रद्दही कराव्या लागण्याचा संभव आहे व त्यांचेकडे बँकेची रुपये १,२६,००० बाकी आहे. ही परिस्थिति आपणांलाहि भीषणच दिसेल. सोसायट्या रद्द होण्याचा वाईट परिणाम त्या त्या गांवच्या सभासदांवर अगर बँकेवर होतो, इतकेंच नव्हे तर त्याचा परिणाम चालू सोसायट्यांवर व सरसहा सहकारी चळवळीवर होत आहे. कर्जे वसूल करण्याला कडक उपाय योजावे लागतात; त्यामुळें सभासदांची मनें कडू होतात. स्पेशल रिकव्हरी ऑफिसर नेमावे लागतात, देखरेखीकरतां जास्त नोकरवर्ग नेमावा लागतो, वगैरेमुळें खर्च जास्त होतो. त्याचप्रमाणें खालावलेल्या सोसायट्यांस व्याजांत सूट देणें भाग पडतें व रद्द झालेल्या सोसायट्यांकडून व्याज मिळूं शकत नाहीं त्यामुळें उत्पन्न कमी होतें. ह्या सर्व कारणांमुळें बँकेस नफा कमी होतो व चालू सोसायट्यांना व्याजाचे दर आहेत त्यापेक्षा जरूर आहे तरी सुद्धां कमी करणें बँकेस शक्य होत नाहीं.तसेंच ह्या भागाची ही खालावलेली परिस्थिति झाल्यावर प्रगतिपर योजना हातीं घेण्यास बँकेस् किंवा कोणासहि हुरूप रहात नाहीं.

### खरेदी-विक्रीची योजना

आपणांस माहीतच आहे कीं, पैशाच्या सोईपेक्षा शेतकऱ्यांच्या मालाच्या खरेदी-विक्रीच्या योजनेची जास्त आवश्यकता आहे व त्यापासून जास्त फायदा आहे. धुळें हें या प्रांतांतील एक मोठें मार्केट आहे. येथें सहकारी खरेदी-विक्रीची संस्था आहे. धुळें तालुक्यांतील सोसायट्यांचें भांडवल जवळ जवळ ८ लाख रुपये असेल. त्याशिवाय नरडाणे व साक्री भागांतील भांडवल जवळ जवळ ३-४ लाख रुपये असेल. परंतु सहकारी दुकानाच्या विक्रीचे आकडे पाहिले तर मात्र भांडवलाच्या ४ थ्या हिश्श्यानें सुद्धा माल विकला जात नाहीं. ह्याची कारणें काय असतील हें आपणच जाणत असाल. तरी ह्या बाबतींतील उदासीनता नाहींशी करण्यासंबंधीं योग्य ती योजना आखून जरूर ती खटपट केली पाहिजे. उत्तम तऱ्हेचें बीं, सुधारलेलें बीं, खतें वगैरे पुरविण्याची सोय जरूर केली पाहिजे. मीहि जरीला कपाशीच्या बी पुरवठ्यासंबंधीं काय करतां येईल ह्याची वाटाघाट शेतकी खात्याचे सुपरिंटेंडेंटसाहेब ह्यांच्याशी करणार आहेच.

"शेवटीं मला एवढेंच सुचवावयाचें आहे कीं आपल्या भागाची अशी परिस्थिति कां झाली व ती सुधारण्यासंबंधीं काय योजना आखली पाहिजे ह्याबद्दल विचार आपणासच म्हणजे शाखा कमेटी, सुपरवाझिंग यूनियन कमेटी व इतर सहकारी पुढारी लोक ह्यांना जितका करतां येईल तितका आमच्यासारख्या बाहेरच्या इसमांना करतां येणार नाहीं. तरी आपण सर्वांनीं ह्या गोष्टीकडे लक्ष पुरवून पक्षभेद असल्यास विसरून व सहकारी चळवळ हाच धर्म समजून खटपट केली पाहिजे. गावोगावीं जाऊन खऱ्या सहकारितेचें वळण आपल्या बांधवांस लावलें पाहिजे. माझी खात्री आहे कीं, 'नर करणी करे तो नरका नारायण हो जाय' ह्या म्हणीप्रमाणें धुळें तालुक्यांतील स्थावर असून हा थोड्याच वर्षांत आपण चांपाटी सूमार्गे दांखवाल व त्यास माझ्या रस्त्यावर आहे मदत मी करीन."

---

### गुरांच्या दवाखान्यांतील रोगी

मुंबई प्रांतांत सरकारी मदत मिळणारीं गुरांचीं १२१ इस्पितळें आहेत. त्यांत १९४०-४१ मध्यें एकूण २ लक्ष, ८५ हजार जनावरांना औषधें देण्यांत आलीं व ३५ हजार जनावरें खच्चीं करण्यांत आलीं. प्रत्येक दवाखान्यांतील रोजच्या रोग्यांची सरासरी २३ पडली. जळगांव, अहमदाबाद व पुणें शहर येथील रोजची सरासरी अनुक्रमें ७९,७१ व ६८ अशी होती.

## मुंबई प्रांतांतील शिक्षणाची प्रगति

**१९४०–४१**

| | १९३९–४० | १९४०–४१ |
|---|---|---|
| एकूण शिक्षण संस्था | २१,९७६ | २२,१४९ |
| त्यांतील विद्यार्थी | १७,८२,०७२ | १८,३२,३९२ |
| मुलग्यांचें एकूण पुरुष वस्तीशी प्रमाण (%) | १४·३० | १४·५० |
| मुलींचें एकूण स्त्री वस्तीशी प्रमाण (%) | ५·२५ | ५·६२ |
| सरकारमान्य शाळांतील विद्यार्थी | १७,५१,७०१ | १८,०६,३४३ |
| शिक्षणावरील प्रत्यक्ष खर्च | ३८७ लक्ष रु. | ४०९ लक्ष रु. |
| शिक्षणावरील अप्रत्यक्ष खर्च | ५६½ लक्ष रु. | ५९½ लक्ष रु. |
| मॅट्रिकला बसलेले विद्यार्थी | १५,५०४ | १७,८०१ |
| आर्ट्स कॉलेजांतील एकूण विद्यार्थी | १२,७०० | १४,१९५ |
| त्यांतील विद्यार्थिनी | १,९८१ | २,४१३ |
| व्यावसायिक कॉलेजांतील विद्यार्थी | ४,९८३ | ५,०३५ |

मुंबई प्रांतांतील २१,६६८ गांवांपैकीं १३,७६९ ठिकाणीं शाळा आहेत. म्हणजे प्रत्येक ५·६ चौरस मैलांत शाळा असलेलें गांव आढळतें.

शिक्षणावर झालेल्या खर्चापैकीं ४१·५% खर्च सरकारनें केला, १६·८% खर्च बोर्डांनीं केला, २८·७% खर्चाची तरतूद फी-वसुलींतून झाली व १२% खर्चाची व्यवस्था अन्य मार्गांनीं झाली. एकूण फी १ कोटि, ३३ लक्ष रुपये वसूल झाली.

मुंबई विश्वविद्यालयाचा खर्च १६½ लक्ष रुपये झाला. त्यांत कॉलेजांचा खर्च समाविष्ट नाहीं. आर्ट्स कॉलेजांचा खर्च ३०½ लक्ष रुपये झाला. व्यावसायिक कॉलेजांतील विद्यार्थ्यांची वर्गवारी खालीलप्रमाणें आहे:—कायदा १५५८, वैद्यकी १२६५, इंजिनिअरिंग २६५, शेती २१६, व्यापार १,४६५, केमिकल टेक्नॉलॉजी ५८, बी. टी. २०८.

हायस्कुलांची संख्या ३९२ होती व त्यांत १,५०,८३९ विद्यार्थी होते. ४२८ मिडलस्कुलांत ३०,९१४ विद्यार्थी होते. १९,७७९ प्राथमिक शाळांत १५ लक्ष, ६० हजार विद्यार्थी होते

---

## गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्म, पिंपळें

### जळगांव तालुका शेतकी सुधारणा मंडळ

वरील फार्मला मि. एच. एफ. नाइट, मुंबईच्या गव्हर्नरांचे सल्लागार, ह्यांनीं ता. २-११-१९४१ रोजीं भेट दिली, त्यावेळीं त्यांनीं खालील अभिप्राय शेरेबुकांत नमूद केला:—

"गिलिगन कॅटल ब्रिडिंग फार्म पिंपुळें'ला मला पुन्हां दुसऱ्यांदा भेट देण्यास औत्सुक्यपूर्ण आनंद वाटला. मि. ब्रुईन, लाइव्ह स्टॉक एक्सपर्ट, ऑफिस बेअरर्स व व्यवस्थापक कमिटीचे सभासद हेहि यावेळीं हजर होते. त्यांनीं गेल्या वर्षी फार्मावर केलेल्या सर्वांगीण सुधारणांची मला सविस्तर माहिती दिली.

"फार्म व फार्मचे चालक मंडळ आणि विशेषतः श्री. साळुंखे यांचें सर्वांगीण यशाबद्दल मी अभिनंदन करतों."

---

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | १११–१५ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०३–१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६–० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३–४ |
| ३% (१९६३–६५) ... ... ... | ९५–१ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७–१४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | ११०–० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | ११०–० |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) ... ... | ११६–१२ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | १२७–४ |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १४९–८ |
| बँक ऑफ बरोडा (१००–५०) १०% ... ... | ११९–० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०–२५) ९% ... | ५४–१२ |
| इंपीरिअल बँक (५००) १२% ... ... | १६२५–० |
| मुंबई प्रॉ. को. बँक (५०) १½ रु. ... ... | ५३–८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १११–० |

#### वीज

| | |
|---|---|
| मुंबई ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १२% ... ... | १४६–८ |
| कराची (१००) ९% ... ... ... | २१७–८ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २१७–८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १७२०–० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १७५०–० |

#### रेल्वेज


| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% ... ... | १०४–८ |
| पाचोरा–जामनेर (१००) १½% ... ... | ९७–० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% ... | ८७६–४ |
| तापी व्हॅली (५००) ८% ... ... ... | ६४३–१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. ... ... ... | २३९–० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. ... ... | ६०–१२ |
| शिंदिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | २८–१२ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ८ आ. ... | ६१–० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ४५५५–० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २१७–८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) ७½% रु. ... ... | १५४–८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ४१०–० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) १७२ रु. १० आ. ० पै ... | २३०७–८ |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | १७०–८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४३–१२–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३–१–६ |




# स्वादिष्ट मसाला करणारे आद्य कारखानदार




## व्ही. पी. बेडेकर

बेडेकर आणि सन्स

पुणें येथील एजंट—
दत्तात्रय नारायण हेजीब.

**—SOLD, BOUGHT, HIRED OR MADE TO ORDER.—**

First and second hand iron or wooden furniture.

**Address:**—Shevak Quarters,
1227 F. C. Road, Poona 4.
Industrial Centre.

C. R. Shevak.

**सर्व प्रकारचें लोखंडी व लांकडी फर्निचर विकत घेतलें जातें किंवा नवीन तयार करून अगर भाड्यानें मिळतें.**

पत्ता—शेवक क्वार्टर्स, १२२७ फ. कॉ. रोड, पुणें नं. ४.
इंडस्ट्रियल सेन्टर, कारखाना पत्ता:—१५३ कसबा, पुणें २.
आपला—सी. आर. शेवक.




# फॉस्फौरा:—

अशक्ततेमुळें हाडांतील (स्फुराम्लाचा) (क्षार) स्फुरण पावत नसल्यानें शरीराचे जे धर्म ते बरोबर काम करीत नाहींत त्यामुळें मुलें सुस्त व आळशी, तरुण षंढ, निर्वीर्य व कामाचा कंटाळा करणारे, तरुण स्त्रियांच्या गर्भाशयोन्माद (आचके) वंधत्व आणणें इत्यादि व वृद्ध चिडखोर, नेभळे वगैरे विकार हाडांतील मज्जातंतू व शुक्राची वाढ होत नसल्यानें होतात. त्यावर उपाय म्हणजे फॉस्फौरा गोल्ड-टॉनिक हें फार उपयुक्त औषध आहे. एक बाटली चाळीस दिवस पुरते. किं. रु.३-८-०. शिवाय पोस्टखर्च.

— माहिती पत्रक मागवा —

**रॉय आणि कंपनी,** १७६, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई नं. २



# मा ध वा श्र म

हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून, रेल्वे-स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.

जागा मध्यवस्तींत, हवाशीर, लागणारे फर्निचरनें शृंगारित असून, सोयीमुळें ती शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहणेची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

**माधवाश्रम बिल्डिंग,** गिरगांव, मुंबई.

# मुजुमदार टॉय वर्क्स

या आणि पहा

**माना हालणारीं व साधीं लाकडी चित्रें**

**समक्ष येऊन खात्री करा.**

२५५ सदाशिव पेठ, शेडगेवाडी, पुणें शहर.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अति स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल अँड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
संग्रह करा
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट,
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
—: रक्तवर्धक :—
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान–गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें
आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
' पायोनियर डाइंग हाऊस '
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
६२३ ए, सदाशिव, पुणें २.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ३ डिसेंबर, १९४१ अंक ४८

* विमाक्षेत्रांतील 'कॉमनवेल्थ'चें अढळ स्थान *

१९४० चें पूर्ण केलेलें काम.........४५ लक्षांहून अधिक

★ बोलका—ढलपा ★

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८३,००० |
| सरकारी कर्जरोखे, गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१३,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.

• कॉमनवेल्थचीं वैशिष्ट्यें •

(१) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरूकता
(२) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
(३) काळजीपूर्वक काटकसरीची व्यवस्था
(४) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
(५) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

कॉमनवेल्थ

ॲशुअरन्स कंपनी लि., पुणें २.

—शाखा—

मुंबई—मद्रास—कलकत्ता—नाशिक—कराची—अहमदाबाद

एम्. एन्. भागवत, बी. ए.
ॲक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडेंट.

The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

The Only Book Depot of its Kind in India.

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### चहाचा प्रसार

हिंदुस्थानांत चहाचा प्रसार व खप वाढविण्याकरितां इंडियन टी मार्केट एक्सपान्शन बोर्ड १९४१-४२ मध्यें २३ लक्ष, २० हजार रुपये खर्च करणार आहे.

### साखरेचें जागतिक उत्पादन

| | बिटाची साखर<br>टन | उसाची साखर<br>टन |
|---|---|---|
| १९३९-४० | १ कोटि ११ लक्ष | १ कोटि, ९३½ लक्ष |
| १९४०-४१ | १ कोटि, ९ लक्ष | १ कोटि, ९०½ लक्ष |

### लाहोर सेंट्रल को. बँकेचा युद्धप्रयत्न

लाहोर सें. को. बँकेनें युद्ध-कर्जांत १८ लक्ष रुपये गुंतविले आहेत, त्याबद्दल पंजाबच्या मुख्य प्रधानांनीं बँकेच्या डायरेक्टरांचें अभिनंदन केलें व इतर बँकांनींहि लाहोर बँकेचा कित्ता गिरवावा, असें सुचविलें.

### नव्या लिमिटेड कंपन्या—ताजे आकडे

| | संख्या | कंपन्यांचें भांडवल ( रु. ) |
|---|---|---|
| एप्रिल, १९३९ | ९९ | १८६ लक्ष |
| „ १९४० | ८८ | २०७ लक्ष |
| „ १९४१ | ९४ | १६५ लक्ष |

एप्रिल १९४१ मध्यें नोंदलेल्या ९४ कंपन्यांपैकीं ४३ कंपन्या बंगालमधील आहेत. ह्या महिन्यांत, हिंदुस्थानांतील सर्व कंपन्यांच्या मिळून अधिकृत, खपलेल्या व वसूल भांडवलांत अनुक्रमें ६१ लक्ष, ८७ लक्ष व ९४ लक्ष रुपयांची वाढ झाली.

### कपास कापडाच्या गिरण्यांत १० तासांची पाळी

गिरण्यांच्या रोजच्या कामाच्या तासांची संख्या नवाची दहा करण्यास मुंबई सरकारनें संमति दिली व त्याप्रमाणें मुंबईंतील कित्येक गिरण्यांनीं दहा तासांच्या पाळीस प्रारंभ केला. जादा कामाबद्दल कामागारांस सवापट दरानें रोज मिळावयाचा होता. परंतु कामगारांनीं जादा काम करण्यास तयारी न दर्शविल्यामुळें त्या गिरण्यांस पुनः नऊ तासाची पाळी सुरू करावी लागली. सरकारी पत्रकाचे अगोदरपासूनच ज्या गिरण्यांनीं कामगारांचे सहमतानें १० तासांची पाळी सुरू केली होती, त्यांचेमध्यें मात्र ती चालू राहिली आहे.

### रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर

सर मणिलाल नानावटी ह्यांच्या निवृत्तीमुळें रिकाम्या झालेल्या रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटि गव्हर्नरचे जागीं श्री. जी. डी. देशमुख ह्यांची नेमणूक झाली आहे. बँकेस दोन डेप्युटि गव्हर्नर असतात, त्यांची नेमणूक बँकेच्या बोर्डाची शिफारस लक्षांत घेऊन गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिलकडून केली जाते नेमणुकीची कमाल मुदत पांच वर्षांची असते.

### जलद वैमानिक वहातुक

ग्रेट ब्रिटन आणि हिंदुस्थान ( हेस्टन ते कराची ) मधील वैमानिक वहातुक सुधारून, हें अंतर २० तासांत तोडण्याची योजना आखण्यांत येत आहे. युद्धसमाप्तीनंतर ही योजना अंमलांत येईल. तिला लागणाऱ्या विमानांना प्रत्येकी १५ लक्ष रुपये पडतील.

### कोलार

कोलार हें म्हैसूर संस्थानांतील तिसऱ्या प्रतीचें शहर आहे. त्याची लोकसंख्या गेल्या १० वर्षांत ५८% वाढून ती आतां १ लक्ष, ३४ हजार झाली आहे.

### गव्हाची आयात

कराची बंदरांतून इराणच्या आखाताकडे हिंदी गहू पाठविण्यांत आला होता, त्याची जागा घेण्यासाठी १६ हजार टन ऑस्ट्रेलियन गहू आणण्यासाठी हिंदुस्थान सरकारला दोन आगबोटी उपलब्ध झाल्या आहेत. गव्हाच्या सध्यांच्या भारी दरानें तो विकत घेण्याची ब्रिटिश सरकारची इच्छा नाहीं.

### विजेची काटकसर

परवानगीपेक्षा अधिक वीज वापरणारांस कोळशाचे खाणींत काम करण्यास पाठविलें जाईल व जो जाणून बुजून त्या संबंधांतील नियमाचा भंग करील, त्यास देहांत शासन होईल, असा जाहीरनामा जर्मन सरकारनें बेलग्रेडमध्यें काढला आहे.

### टाटा केमिकल्स लि.

वरील कंपनीनें ३५ लक्ष रुपयांची ४% व्याजाच्या दराची डिबेंचरें उभारण्याचें ठरविलें आहे. भागीदारांस डिबेंचरांचेबाबत प्राधान्य मिळेल. प्रत्येक २० ऑर्डिनरी भागांस अथवा प्रत्येक ५ प्रेफरन्स भागांस शंभर रुपयांचें डिबेंचर मिळण्यास प्राधान्य दिलें जाईल. कंपनीची बहुतेक सर्व यंत्रसामुग्री दाखल झाली असून तिची उभारणी चालू आहे. सोडा अॅशचें उत्पादन जूनच्या सुमारास सुरू होईल.सोडा अॅश,कॉस्टिक सोडा, इत्यादींच्या उत्पादनाकरितां टाटा केमिकल्सची १९३९ च्या जानेवारींत स्थापना झाली. ह्या करितां कंपनीनें ओखा सॉल्ट वर्क्स लि. व पायोनिअर मॅग्नेशिया वर्क्स लि. हीं विकत घेतलीं. बडोदे सरकारनें कंपनीस कांहीं सवलती दिलेल्या आहेत.

### आगबोटींत ज्यास्त माल भरण्यास सवलत

आगबोटींच्या कमतरतेवर उपाय, म्हणून हिंदुस्थान सरकारनें इंडियन मर्चंट शिपिंग अॅक्टांतील कांहीं नियम बदलून, आगबोटींत अधिक माल भरण्याची सवड दिली आहे. ही सवलत ३१ ऑगस्ट, १९४२ अखेर तूर्त चालू रहाणार आहे.

### रॉयल इंडियन नेव्ही

रॉयल इंडियन नेव्हीमध्यें प्रवेश मिळवूं इच्छिणारांची परीक्षा दिल्ली येथें मार्च, १९४२ मध्यें फेडरल पब्लिक कमिशनमार्फत घेण्यांत येईल.

### बँक ऑफ फिनलंड

बँकेच्या नोटांचे बदली सोनें देण्याची बँक ऑफ फिनलंडवरील जबाबदारी दूर करण्यांत आली आहे.

### असोसिएटेड सिमेंट कंपनीज् लि.

३१ जुलै, १९४१ अखेर संपलेल्या वर्षाबद्दल प्रत्येक भागास ६ रुपये ( कर माफ ) डिव्हिडंड देण्याविषयीं शिफारस करण्याचें कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे. कंपनीचा भाग १०० रुपयांचा आहे. गेल्या वर्षीचा डिव्हिडंडचा दर ५ रुपये होता.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ६०२ |
| २ मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउस ... ... | ६०३ |
| ३ ओगले ग्लास वर्क्सचा स्फूर्तिदायक इतिहास | ६०५ |
| ४ स्फुट विचार ... | ६०५ |
| बर्लिनच्या परिषदेचा फार्स—हिंदुस्थानांत युद्धसामुग्रीचें वाढतें उत्पादन—सहकारी धान्य कोठारें—" लोक-शिक्षण "— सरस्वति मठ संस्था ... ... | |
| ५ सहकारी चळवळीसंबंधीं नवें पुस्तक ... ... | ६०७ |
| ६ मुं. बँकर्स क्लिअरिंग हाउसचे सभासद ... | ६०७ |
| ७ चलनी नोटा ... | ६०८ |
| ८ काचसामानाची निर्गत | ६०८ |
| ९ आकडेशास्त्राचें अध्यापन | ६०८ |
| १० औद्योगिक संशोधन निधि | ६०८ |
| ११ युद्धपरिस्थितीची आर्थिक पार्श्वभूमि ... ... | ६०९ |
| १२ सोनेरी केसास मागणी | ६१० |
| १३ निवडक बाजारभाव | ६१० |



# अर्थ

बुधवार, ता. ३ डिसेंबर, १९४१


## मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउस

### सभासदत्वाच्या नियमांत सुधारणा पाहिजे

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाउसच्या सभासद-बँकांची संख्या तीस असून, त्यांत रिझर्व्ह बँक, इंपीरिअल बँक, एक्सचेंज बँका, ब्रिटिश बँकिंग एजन्सी फर्मस् व कांहीं हिंदी जॉइंट स्टॉक बँका ह्यांचाच मुख्यतः भरणा आहे. क्लिअरिंग हाउसमध्यें प्रत्येक सभासद-बँकेचा प्रतिनिधि इतर बँकांवर काढलेले परंतु त्या बँकेकडे वसुलीसाठी आलेले चेक घेऊन दररोज जातो व इतरांनीं आणलेले त्याचे स्वतःचे बँकेवरील चेक्स व इतर बँकांवरील त्यानें आणलेले चेक्स ह्यांची वजावट करून निघणाऱ्या देण्याघेण्याची व्यवस्था करतो. सेटलिंगचें हें काम रिझर्व्ह बँकेची स्थानिक शाखा करते. क्लिअरिंग हाउसचें सभासदत्व मिळण्याचे कांहीं ठराविक नियम केलेले नाहींत. विद्यमान सभासदांनींच कोणास सभासद करून घ्यावयाचें हें ठरवावयाचें असतें.

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाउसची १३ नोव्हेंबर, १९४१ रोजी एक सभा झाली, त्यावेळीं तिनें कांहीं ठराव पास केले ते बिगर-सभासद बँकांना जाचक होण्याजोगे आहेत. क्लिअरिंग हाउसच्या सभासदांची कमाल संख्या तीस असावी असा ठराव त्या सभेंत मंजूर झाला. ह्या ठरावाचा असा अर्थ आहे कीं, क्लिअरिंग हाउसमध्यें एकादी जागा खाली झाली तरच नवीन सभासद करून घेण्याचा प्रश्न उपस्थित होणार ! म्हणजे, एकादी सभासद बँक बंद तरी पडली पाहिजे, शेड्यूलमधून ती गेली तरी पाहिजे किंवा तिनें क्लिअरिंग हाउसचे नियम तरी मोडले पाहिजेत; त्याविना क्लिअरिंग हाउसमधील जागा रिकामी होणार नाहीं. कांहीं ठराविक बँकांना सभासदत्वाचा कायमचा अधिकार देऊन टाकून, इतर बँकांना तो नाकारणें कितपत योग्य आहे, ह्याचा विचार व निर्णय केवळ क्लिअरिंग हाउसवरच सोपविणें इष्ट नाहीं.

ज्या बँका क्लिअरिंग हाउसच्या सभासद नाहींत, त्यांना सभासद-बँकांच्या मार्फत क्लिअरिंग हाउसचे उपसभासद होतां येतें. अर्थात्, क्लिअरिंग हाउसनेंच त्यास मंजुरी द्यावी लागते. मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसच्या उपसभासदांची संख्या चौदा आहे, त्यांत कांहीं शेड्यूल्ड बँकाहि आहेत. क्लिअरिंग हाउसचें सभासदत्व न मिळाल्याकारणानें त्यांना ह्या मार्गानें आपलें काम करून घ्यावें लागतें. उप-सभासद बँकांच्या चेकवर, ज्या सभासद बँकेची ती उप-समासद आहे, तिचें नांव घालावें लागतें. ह्याचा अर्थ, सभासद बँकेपेक्षा तिचा दर्जा कमी असल्याची ती जाहिरातच होते. उप-सभासदांना क्लिअरिंग हाउसचे निर्णय पाळावे लागतात. परंतु तिच्या सभांस हजर रहाण्याचा किंवा त्यांत मत देण्याचा अधिकार मात्र त्यांस नाहीं. चेक्सची वसुली करून दिल्याबद्दल सभासद बँका उप-सभासदांकडून बरीच रकम घेतात. चेक्सची रकम भरण्यास पैसे नेहमी उपलब्ध असावे ह्यासाठी सभासद-बँकेकडे उप-सभासदांस बरीच मोठी रकम बिन-व्याजी पडूं द्यावी लागते. ह्याखेरीज, कायद्याप्रमाणें त्यांस मोठाल्या रकमा हाताशीं अथवा रिझर्व्ह बँकेकडे शिल्लक ठेवाव्या लागतातच. शेड्यूल्ड बँकांनाहि ह्याच प्रकारानें व्यवहार करावा लागतो.

क्लिअरिंग हाउसचे सभासद व बिगर-सभासद ह्यांचेमध्यें क्लिअरिंगच्या सोईचे बाबत इतकी विषमता आहे, तीविरुद्ध बिगर-सभासद बँकांची तक्रार तर आहेच. परंतु निदान ही विषमता कांहीं तत्त्वानुसार व नियमानुसार तरी असूं द्या, अशी त्यांची रास्त मागणी आहे. शेड्यूल्ड बँकांचे यादींत हिंदी बँक गेली कीं तिला आपोआपच सभासदत्व मिळावें, असें शेड्यूल्ड बँकांना सहाजिकच वाटतें. सभासदत्वासाठी अर्ज करणाऱ्या बँकेचे रोज सरासरीनें १७५ चेक्स तरी क्लिअरिंगसाठी आले पाहिजेत, त्याविना अर्जाचा विचार होणार नाहीं, असें क्लिअरिंग हाउसनें ठरविलें आहे. हा नियम सर्वच बँकांस लागू करा, त्या नियमांत बसणाऱ्या बँकांना सभासद करून घ्या व त्यांत न बसणाऱ्या बँकांचें सभासदत्व काढून घ्या असें म्हटलें तर त्यांत गैरवाजवी काय आहे ? क्लिअरिंग हाउसच्या आजच्या सभासद बँकांपैकी ज्यांची रोजची देवघेव १७५ चेक्सच्या वसुली-इतकी होत नाहीं, त्यांनीं इतर मोठ्या देवघेवीच्या बँकांस जागा करून द्यावयास नको काय ? आधीं मिळविलेलें स्थान कायम करण्यासाठी केवळ नवीन अर्जदारांवरच १७५ चेक्सची अट लादावयाची हें कितपत योग्य आहे ? चेक्सच्या उलाढालीचे प्रमाणावरच क्लिअरिंग हाउसचें सभासदत्व अवलंबून ठेवणें इष्ट आहे असें बिगर-सभासद बँकांचें म्हणणें आहे.

आजच्या परिस्थितींत कांहीं सुधारणा होणें आवश्यक आहे, हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. ही सुधारणा घडवून आणण्याचें कार्य क्लिअरिंग हाउसवरच सोपविणें इष्ट नाहीं, हें उघड आहे. ह्या प्रश्नाचा व्यापक दृष्टीनें विचार झाला पाहिजे. हिंदी बँकिंगची अग्रगण्य संस्था, म्हणजे रिझर्व्ह बँक, तिनें ह्या प्रश्नाचा विचार करून, क्लिअरिंग हाउसचे सभासदत्वाविषयीं सर्व बँकांस सारखेच लागू पडतील असे नियम सुचविले पाहिजेत. रिझर्व्ह बँकेचा पुढाकारच ह्या बाबतींत युक्त आहे. क्लिअरिंग हाउसच्या सभासदांची यादी ह्या अंकांत दुसरीकडे दिली आहे तिचेवरून क्लिअरिंग हाउसच्या घटनेची कल्पना येईल. एकूण तीस बँकांपैकीं स्वतः रिझर्व्ह बँक वगळल्यास, सतरा बँका एक्सचेंज बँका आहेत, म्हणजे त्या सर्व विदेशी आहेत. अकरा बँका शेड्यूल्ड बँका असून उरलेली तिसावी बँक ही प्रांतिक सहकारी बँक आहे. क्लिअरिंग हाउसमध्यें एक्सचेंज बँकांचें वर्चस्व किती आहे, हें वरील आकड्यांवरून दिसून येईल. तेरा बँकांची सेटलमेंटची सोय एकट्या प्रांतिक सहकारी बँकेनें करून दिलेली आहे. तिची सहानुभूति व सहकार्य, ह्यामुळेंच केवळ हें शक्य झालें आहे. क्लिअरिंग हाउसच्या सुधारणेविषयींच्या मागणीची योग्य कल्पना येण्यास ही माहिती उपयोगी होईल.

# ओगले ग्लास वर्क्सचा स्फूर्तिदायक इतिहास

## स्मृतिग्रंथांतील उद्‌बोधक उतारे

### २८ वर्षांपूर्वीची स्थिति

सुमारें २८ वर्षांपूर्वी ज्यावेळीं ओगले बंधूंनीं औद्योगिक क्षेत्रांत पाऊल टाकलें त्यावेळीं महाराष्ट्रांत म्हणण्यासारखे मोठे धंदे तर मुळींच नव्हते. कांहीं कापडाच्या गिरण्या, दोनतीन ओतकामाचे कारखाने, कांहीं कॉटन प्रेस, जिनिंग फॅक्टऱ्या व दोनचार ऑईल मिल्स वगैरे होत्या. किर्लोस्कर कारखाना, पुण्यांतील भांड्यांचा कारखाना वगैरे नुकतेच उदयास येत होते. त्याकाळीं मुख्य भर बहुधा पिठाच्या गिरण्यांवर असे. तळेगांवचा कांचेचा कारखाना सुरू होऊन थोडीं वर्षे झालीं होतीं. औद्योगिक बाबतींत सुधारणा व्हावी इतकेंच वर्तमानपत्रकर्ते लिहीत. पण जनतेच्या मनानें अजून घ्यावी तशी पकड घेतलेली नव्हती. विद्युत्‌शक्तीचाहि उपयोग मोठ्या प्रमाणांत अजून सुरू झाला नव्हता. इलेक्ट्रिक लाईट फक्त मोठ्या शहरींच पाहाण्यास मिळे. भांडवलवाल्यांचे लक्ष कारखानदारींत पैसा न गुंतवितां व्यापारांत गुंतवून मिळेल तितका नफा मिळविण्याकडे होतें. त्यामुळें परदेशांतून तयार माल आणविण्याचे व्यवहारांतच मोठें भांडवल गुंतून पडलें.

### कांचेच्या धंद्यास संरक्षण नाहीं

कांचेच्या धंद्यास ५० टक्के प्रोटेक्शन द्यावें असा टॅरिफ बोर्डानें स्पष्ट निकाल दिला असूनसुद्धा कांचकारखानदारांना म्हणण्यासारखें कसलेंच प्रोटेक्शन मिळालें नाहीं याचें कारण कांचेच्या धंद्यांत विलायती भांडवल नाहीं हें होय. आधीं ६–७ वर्षे ही केस टॅरिफ बोर्डापुढें येऊंच शकली नाहीं. टॅरिफ बोर्डाची चौकशी होण्यांत १–२ वर्षे मोडलीं आणि ५० टक्के प्रोटेक्शन द्यावें असा टॅरिफ बोर्डाचा निकाल बाहेर पडल्यानंतरहि ती सूचना तीन वर्षांतहि अंमलांत आणली गेली नाहीं. नंतर सरकारी संशोधन खात्यानें एक नवीनच रिपोर्ट काढला, कांहीं प्रयोग केले आणि जाहिर केलें कीं आतां अशा तऱ्हेच्या भट्ट्या बांधल्यास प्रोटेक्शनची जरूरी भासणार नाहीं. आतां अर्थातच परिस्थितीच बदलली आहे आणि परदेशी माल थांबल्यामुळें भाव बरोबर मिळत आहेत. पण युद्धोत्तर काळांत प्रोटेक्शनची जरूरी आहेच.

### अस्पृश्यता व आर्थिक परिस्थिति

कारखान्यासाठी प्रथमतः एकच विहीर काढण्यांत आली होती आणि कामावर अस्पृश्य मानलीं गेलेलीं बरींच कुटुंबें होतीं. सर्वच लोक या विहिरीवर पाणी भरीत त्यामुळें अस्पृश्यतेचा प्रश्न आपोआप सुटूं लागला. भरपूर काम व पगार मिळूं लागल्यामुळें अस्पृश्यांच्या राहाणींतहि फरक पडूं लागला. आतां तर स्पृश्य व अस्पृश्य या कल्पनाच नाहींशा झाल्या आहेत. अस्पृश्यतेचें मूळ धार्मिक प्रश्नापेक्षा दुर्धर आर्थिक परिस्थितीशीं जास्त जखडलें गेल्याचें स्पष्ट दिसून येत आहे. सायंकाळीं काम सुटल्यावर कामकरी मुलें पांढरे स्वच्छ कपडे घालून रस्त्यावर सहल करतांना किंवा सायकलवर चकरा मारतांना अथवा क्रिकेट वगैरे खेळतांना पाहून कोणाहि समाजसुधारकाचें मन प्रसन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं.

### प्रभाकर कंदिलाबाबत ओगल्यांची चिकाटी

पहिल्या महायुद्धापूर्वी व नंतर सुद्धां पांच वर्षे कंदिलाचे भाव २०-२१ रुपये डझनाचे खालीं कधींच गेले नाहींत. आमचा कंदिलाच्या मूळ किंमतीचा अंदाज १४-१५ रुपये असा होता, व पुरेसा नफा पडण्यास कसलीच हरकत दिसत नव्हती. प्रभाकर टिन कंदील बाजारांत यावयाचे सुमारास जर्मन फायरहॅंड व अमेरिकन डीझ या कंदिलांचे कंपन्यांचे भावांत विलक्षण चढाओढ सुरू होऊन कंदिलांचे भाव डझनास ११-११॥ रुपयांपर्यंत घसरले आणि त्याचवेळीं जपाननें स्वस्त व गुणानेंहि अगदींच कमी असे कंदील ६॥ रुपये डझनाचे भावांत मुंबईपोंच देण्यास सुरुवात केली. जपानी पितळी कंदीलहि १२ आण्याला एक याप्रमाणें किरकोळ भावांत विकूं लागला. तरीही कंदील कारखान्याचें काम सुरूच राहिलें होतें. १९२८ सालीं कारखान्यास लष्करी खात्याकडून ३० हजार कंदिलांची मोठी ऑर्डर मिळाली व ती चांगल्या भावांत मिळाली. पुढेंही पांच सहा वर्षे अशीच ऑर्डर मिळत असे पण भाव मात्र कमी मिळूं लागले. पुढें ती कित्येक वर्षे मिळूं शकली नाहीं. आतां पुनः १९३९ सालपासून कंदिलाचे काम फार जोरांत सुरूं आहे.

### चिकाटीचें चिज झालें

प्रभाकर कंदिलास सरकारी प्रोटेक्शन मिळावें म्हणून रीतसर अर्ज १९३२ सालीं हिंदुस्थान सरकारला करण्यांत आला. १९३४ सालचे प्रारंभीं रा. गुरुनाथराव ओगले विशेष खटपट करण्याकरितां म्हणून तीन महिने दिल्लीस जाऊन राहिले होते. दिल्लीहून गुरुनाथराव ओगले जरा चिडूनच परत आले. काय वाटेल तें होवो, सर्वस्वाचा नाश झाला तरी हरकत नाहीं, (एव्हांना बहुतेक तो होतच आला होता) पण कंदील करण्याचें सोडावयाचें नाहीं असें त्यांनी ठरविलें. कंदील करीत राहायचें, त्याचे मूळ किंमतींत जितकी कपात करतां येईल ती साधावयाची व इतर कांहीं उद्योग करून कंदील डिपार्टमेंट तोलून धरावयाचें असा त्यांनीं निश्चय केला. प्रभाकर सीनियर व ज्यूनियर स्टोव्ह करण्यास सुरुवात केली व अल्पावकाशांत त्याचा खूप प्रसार झाला, पण नफ्याचें प्रमाण कंदील कारखाना तोलून धरण्याइतकें नव्हतें. मग त्यांनीं एव्हर सिल्व्हरचीं भांडीं बनविण्यास सुरुवात केली व एकदोन वर्षांत १५० पर्यंत निरनिराळ्या तऱ्हेचीं भांडीं तयार केलीं. दुसरें महायुद्ध चालू झाल्यानंतर कंदील कारखान्याची परिस्थिति एकदम बदलून तो एक यशस्वी कारखाना ठरला आहे.

### ओगले बंधूंचें नेतृत्व

हिंदुस्थानांतील अनेक जिनसा प्रथम तयार करण्याचा मान ओगल्यांचे कारखान्यास मिळाला आहे. उदाहरणार्थ, कांचेचीं कौलें, बशा, पेले, दौती, पेपरवेट्स् वगैरे कांचेचें दाबलेले जिन्नस, इलेक्ट्रिक शेड्स्, फुलदार पेपरवेट्स्, पांढऱ्या स्वच्छ बाटल्या, नकशीदार ग्लोब, बॅटरी जार्स वगैरे अनेक जातीचे कांचसामान, प्रभाकर कंदील, प्रभाकर स्टोव्ह, मोठ्या प्रमाणावर एव्हर सिल्व्हरचीं भांडीं, इमाटा जातीच्या एनॅमलच्या स्लेटपाट्या, रेल्वेकरतां लागणारीं बिडाचीं एनॅमल भांडीं, तसेंच घरगुती उपयोगाकरतां लागणारीं एनॅमलचीं हरतऱ्हेचीं भांडीं हीं अगदीं जर्मन व झेकोस्लोव्हेकियन मालाच्या तोडीचीं ओगले कारखान्यानें प्रथम काढलीं व तीं सर्वोत्कृष्ट असलेबद्दल सरकारी खात्याकडून सर्टिफिकिटें मिळविलीं आहेत.

# स्फुट-विचार

## बर्लिनच्या परिषदेचा फार्स

युरोपच्या पुनर्घटनेचें आपलें उद्दिष्ट हिटलरनें अनेक वेळां व्यक्त करून दाखवलें आहे. ह्या नवीन घटनेंत जर्मनीचें राजकीय व आर्थिक वर्चस्व औपचारिक रीतीनें स्थापन होईल, ह्यांत शंका नाहीं. किंबहुना तें स्थापन करणें हा हिटलरच्या मनांतला मुख्य हेतु आहे. तथापि ह्या संघटनेच्या मुळाशी कांहीं विशिष्ट तत्त्व साक्षात्कारी हवें. ह्याकरितां रशियांतली बॉल्शेव्हिकांची राजकीय व आर्थिक रचना त्याज्य असल्यानें तिचा प्रसार युरोपांत होऊं द्यावयाचा नाहीं हा उद्देश पुढें ठेवून युरोपांतील लोकमत हिटलर आपल्या बाजूस खेचूं पहात आहे. युरोपांत जिंकावयाचा शत्रू आतां कोणी राहिलेला नसल्यानें जर्मनीचें पुढारीपण पत्करून त्यांतील राष्ट्रांनीं एकजूट करावी आणि तेथें शांतता स्थापावी असें सांगून हिटलर आपली पुनर्घटनेची योजना त्यांच्या डोक्यावर लादूं पहात आहे. ह्यासाठी एक मोठी प्रातिनिधिक परिषद् भरवून जगाचे डोळे दिपवून टाकण्याचा त्याचा इरादा आहे. त्या योजनेची पूर्वतयारी म्हणून हिटलरनें बर्लिन येथें युरोपांतील अंकित राष्ट्रांच्या प्रतिनिधींची एक परिषद् नुकतीच बोलावली होती. तीमध्यें नात्सी पक्षाचे हस्तकच प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते, हें सांगावयास नको. निःशस्त्र व निर्बल झालेल्या युरोपियन देशांतल्या स्वतःवर सर्वस्वी अवलंबून असणाऱ्या लोकांस बोलावून कोणत्याहि योजनेस त्यांची संमति घेणें हें केवळ नाटक आहे हें उघड आहे. स्वतःचें राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य सोडून देऊन तें जर्मनीस बहाल करण्यास कोणतें राष्ट्र आपखुशीनें तयार होईल? आतां आम्हीं युरोप जिंकला असून त्यांतील लहान-मोठ्या राष्ट्रांचें शांततामय संघटन करीत आहों असें म्हणण्याच्या मार्गांत नात्झी लोकांस रशियाचा काटा अजून बोचत आहे. रशियास आपण केव्हांच जिंकूं आणि मग तात्काळ संघटित युरोपच्या नांवानें इंग्लंड व अमेरिका ह्यांस तहाच्या बोलण्याचें आव्हान देऊं असें हिटलरला वाटत होतें. हा अपेक्षित विजय पुढें ढकलला गेल्यामुळें हिटलरला बर्लिनच्या परिषदेचें सोंग उभें करावें लागलें आहे. कंटाळलेल्या जर्मन जनतेंत उत्साह उत्पन्न करणें हाहि बर्लिन परिषदेचा आणि तीमध्यें मान्य करवून घेतलेल्या परस्पर-सहायाच्या कराराचा उद्देश असला पाहिजे. परंतु असल्या सोंगांनीं कोण फसणार आहे?

## हिंदुस्थानांत युद्धसामुग्रीचें वाढतें उत्पादन

युद्धसामुग्रीच्या बनावटीसाठी हिंदुस्थान हें महत्वाचें मध्यवर्ती क्षेत्र केलें गेल्यामुळें येथें मोठमोठ्या कारखान्यांचा विस्तार झपाट्यानें चालला आहे. त्यासाठी जरूर तेथें नवीन कारखान्यांची स्थापना होत आहे आणि युक्त दिसेल तेथें जुन्यांमध्यें वाढ करण्यांत येत आहे. ह्यासंबंधांत मधून मधून माहिती प्रसिद्ध केली जाते तीवरून ह्या देशाची औद्योगिक व उत्पादनशक्ती किती पटीनें वाढली आहे ह्याची कल्पना येते. दारूगोळा, बॉम्ब, बंदुकी, तोफा, रणगाडे, चिलखती गाड्या, वगैरेंचा पुरवठा होण्यास त्या कामास युक्त अशी यंत्रसामुग्री हवी. तिच्या योजना झाल्या असून वरील प्रकारची लढाऊ सामुग्री वाढत्या प्रमाणांत ह्या देशांत होत आहे. रेल्वेजना लागणारें सामान, शिरस्त्राणें, समुद्रांतील सुरुंग काढून टाकणाऱ्या नावा, वगैरे किती तरी विविध प्रकारच्या युद्धसाहित्याची बनावट आतां चालू आहे. विमानांतून खाली येण्याच्या छत्र्या, विषारी धुरापासून बचाव करणारें कापड, ह्यांच्याहि उत्पादनाची व्यवस्था झाली आहे आणि होत आहे. लढाईमध्यें उपयोगांत आणतां येतील असे खाण्यापिण्याचे पदार्थ बनवले व पुरवले जाण्याची तजवीज निरनिराळ्या खाजगी धंदेवाल्यांचे मार्फत होत आहे. टिकतील असे बटाटे, लोणचीं, मसाला, बिस्किटें, विड्या ह्यांची आवश्यकता वाढत्या प्रमाणावर भासणार असल्यानें त्यांच्या पुरवठ्याची योजना अंमलांत आणली जात आहे. हिंदी जंगलांतल्या लाकडास युद्धाप्रीत्यर्थ मोठी मागणी उत्पन्न झाली आहे आणि साडेचार कोटि रुपये किंमतीच्या लाकडाची खरेदी आतांपर्यंत युद्धपुरवठा खात्यामार्फत होऊन गेली आहे. लष्करी कपड्यांसाठी जें निरनिराळ्या जातींचें कापड लागतें, त्यास तर विलक्षण मागणी आहे. कपड्याचे खात्यामार्फत दर महिन्यास सत्तर लक्ष नग तयार केले जात आहेत, ह्या एका आकड्यावरून ह्या उद्योगाच्या प्रचंड प्रमाणाची कल्पना येईल. शिवाय त्याच्या निरनिराळ्या पासष्ट जातींच्या कपड्यांची व्यवस्था ऐशी भिन्नभिन्न मंडळ्यांकडे सोपवलेली आहे. पंचावन हजार शिंपी कपडे शिवण्याच्या कामावर असून त्यांस मेहनताना चांगला मिळत आहे. सरकारास माल पुरवण्यासाठी कारखानदारांस यंत्रसामुग्रींत बदल किंवा वाढ करावी लागेल, त्या संबंधांत होणाऱ्या खर्चाबाबत प्राप्तीवरील कराच्या आकारणींत सवलती देण्यांत येतील असें सरकारनें ठरवलें आहे.

## सहकारी धान्य-कोठारें

ठाणें जिल्ह्याच्या कांहीं भागांत सहकारी पतपेढ्यांनीं धान्याचीं कोठारें चालू केलीं असून त्यांचा व्यवहार धान्याच्या बँकांसारखा होत आहे. सावकार लोक धान्य कर्ज म्हणून देतात आणि पिकें तयार झालीं म्हणजे तीं दिढीनें वसूल करतात. ठाणें जिल्ह्यांतील वाडा तालुक्यांत कांहीं सहकारी पेढ्यांनीं ह्या व्यवहाराचा उपक्रम केला असून तो यशस्वी झाला असल्याचें दिसतें. ह्या पतपेढ्यांच्या व्यवहारासाठी रजिस्ट्रारनें स्वतंत्र पोटनियम मंजूर केले आहेत. ज्यांच्यापाशीं स्वतःच्या मालकीचें भांडवल असून, ज्यांस कोठारांची सोय आहे आणि ज्यांचें काम पहाण्यास सेक्रेटरी आहेत, अशाच शेती पतपेढ्यांमध्यें धान्याच्या कर्जाचे व्यवहार केले जात आहेत. पेढीच्या ज्या सभासदास ह्या नवीन सोयीचा फायदा घ्यावयाचा असेल त्यानें धान्याच्या स्वरूपांत ठराविक प्रवेश फी व भागाचें भांडवल भरलें पाहिजे. ह्या मार्गानें जें भात जमा होईल त्याच्या दुपटीपर्यंत बँकेकडून कर्ज घेण्यांत येतें आणि त्याचें भातच साठवलें जातें. पावसाळा सुरू झाला म्हणजे सभासदास आपल्या भागाच्या तिपटीपर्यंत भात कर्जाऊ घेतां येतें. ह्या कर्जाची फेड हंगामांत सवापटीच्या प्रमाणांत धान्यामध्येंच केली जाते. हे जादा पंचवीस टक्के खर्चासाठी घेतले जातात. ह्या व्यवहाराचे हिशेब सेक्रेटरी ठेवतो आणि पंचमंडळी वसुली व साठवण ह्यांकडे लक्ष देते. वाडा तालुक्यांत १९ सोसायट्यांपैकी १५ मध्यें धान्य कर्जाचे विभाग चालू करण्यांत आले आहेत. ह्या योजनेंत सामील झालेल्या सभासदांची संख्या २०७ असून ४,६३० मण भात त्यांच्यामध्यें वाटण्यांत आलें आहे. बँकेकडून घेतलेल्या कर्जामधून तीन वर्षांच्या अवधींत १,४५६ मण भात खरेदी करण्यांत आलें. ज्यांनीं योजना चालू केली आहे अशा

पेढ्यांत १,७७६ मण भात सभासदांचे भाग म्हणून जमा झालें असून १,३५८ मणांचा नफा त्यांस झाला आहे. हा उपक्रम उत्तेजनकारक आहे ह्यांत संशय नाहीं आणि त्याचा फायदा शेतकऱ्यांस त्यांच्या अडचणीचे प्रसंगीं उत्कृष्ट रीतीनें होत आहे, हें वर दिलेले आकडे दर्शवीत आहेत.

### "लोकशिक्षण"

"लोकशिक्षण" मासिकाचा अकराव्या वर्षाचा शेवटचा अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे तो त्या मासिकाचा अखेरचाच अंक होय! "लोकशिक्षणा"चा पहिला अंक जानेवारी, १९२८ मध्यें निघाला व त्यांत विशद केलेल्या संपादकीय मनोगतानुसार, श्री. गणेश गंगाधर जांभेकर ह्यांनीं प्रस्तुत मासिक आतांपर्यंत अत्यंत चिकाटीनें चालविलें. पहिलीं पांच वर्षें केवळ वैयक्तिक जबाबदारीवरच हा उपक्रम चालविल्यावर १९३५ पासून "लोकशिक्षण मंडळ लि." ह्या मंडळीमार्फत त्यांनीं हें कार्य चालू ठेवलें व त्यास, "लोकशिक्षण-लघु-ग्रन्थमाले"ची जोड दिली. ह्या सर्व प्रयत्नांपायीं एकूण २५ हजारांवर रुपयांची झीज कार्यकर्त्यांस सोसावी लागली. ज्ञानप्रधान व लोकोन्नतिकर असें आदर्श ध्येयात्मक मासिक चालविण्याचें आपलें उच्च ध्येय संपादकांनीं अखेरपर्यंत कायम ठेवलें, ही गोष्ट नमूद करणें आवश्यक आहे. "लोकशिक्षणा"ची उपयुक्तता विचारवंतांस पटली असतांहि मासिकास पुरेसा लोकाश्रय मिळूं शकला नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. "लोकशिक्षणा"ला श्रेष्ठ प्रतीचें लेखनसहाय विनामूल्य सतत मिळालें, परंतु त्याचा लाभ घेण्यास पुरेसे ग्राहक मिळूं शकले नाहींत. "लोकशिक्षण" बंद पडल्याबद्दल विवेकी महाराष्ट्रास दुःख वाटल्यावाचून रहाणार नाहीं. "लोकशिक्षण-लघु-ग्रंथमालेचा"चा उपक्रम म्हणजे "लोक शिक्षणा"चें थोड्या मर्यादित स्वरूपांत कार्य चालू रहाणार आहे, तें यशस्वी होवो, असें आम्हीं चिंतितों.


### सरस्वति मठ संस्था

वरील संस्था सध्या पुणें व सोलापूर जिल्ह्यांतील खेडेगावांतून जेथें पूर्वी शाळा नव्हत्या अशा ठिकाणीं, वीस शाळा चालवीत आहे. १९२९ सालीं ह्या कार्यास प्रारंभ झाला. आतां सर्व शाळांतून मिळून ९१२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. चारशे ते पांचशे वस्तीच्या लहान खेड्यांतून शिक्षण प्रसार करण्याचें अवघड कार्य संस्था चिकाटीनें करीत आहे व तिच्या कार्याचा पद्धतशीरपणें विस्तार होत आहे. शाळा मुख्यतः पुणें जिल्ह्यांतील मावळ तालुक्यांत व सोलापूर जिल्ह्यांतील सोलापूर तालुक्यांत आहेत. संस्थेचा खर्च अर्थातच बहुंशीं देणग्यांमधून चालतो. नवभारत इं. कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. आर. एन. मोघे हे संस्थेचे अध्यक्ष असून श्री. एस. ए. गोपुजकर, एम. ए. हे चेअरमन आहेत. संस्थेच्या सोलापूर व पुणें येथें शाखा आहेत. पुणें शाखेनें चालविलेल्या तीन शाळांपैकीं एक दापोडी येथें, एक गहुंजे येथें व एक नेरे येथें आहे. संस्थेच्या कार्यास जनतेनें हातभार अवश्य लावावा.

**N. V. WADNERKAR**
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत
**साईन-बोर्डस्, रबरी शिक्के,**
आकर्षक
**सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग**
सतत २० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें
एकच ठिकाण
**पेन्टर ए. जी. बेडेकर**
(मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट)
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.

वक्तशीर आणि मनपसंत काम
करून देणारे
**मोहन वॉच कंपनी**
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.


**बायो टोनो**
शरीर व त्यांतील रक्त-पेशींची वाढ करणारें
उत्कृष्ट टॉनिक
नैसर्गिक रीतीनें हाडांची वाढ होण्यास आणि शरीर सदृढ करण्यास याची मदत होते. हें मधुर व रुचकर असून मुलें आवडीनें घेतात.
किं. रु. १-८-० ट. ख. नि.
रॉय आणि कंपनी, १७६ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २

## सहकारी चळवळीसंबंधी नवें पुस्तक

( लेखकः—श्री. द. दि. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर, पुणें सें. को. बँक )

### सहकारी चळवळीचीं तत्त्वें आणि घटना

( ले.–श्री. अ. न. चितांबर, सुपरवायझर, प्रवरा कॅनॉल आणि राहुरी तालुका सु. यूनियन, बेलापूर रोड. )

"सहकारी चळवळ विशेषतः खेड्यांतील सहकारी चळवळ यशस्वी होण्यास या चळवळींतील प्रत्येक संस्थेचा व्यवहार जितका तत्त्वतः शुद्ध होईल तितका हवा आहे." हें श्री. वैकुंठराय मेहता यांनीं वरील पुस्तकाचा पुरस्कार करितांना म्हटलें आहे तें शब्दशः खरें आहे. असा पायाशुद्ध व्यवह होण्यास त्या त्या संस्थेच्या सभासदांना जबाबदारीची जाणीव निर्माण झाली पाहिजे. अशी जाणीव अद्यापहि झालेली दिसत नाहीं याचें कारण प्रचारकार्य जितकें व जसें व्हावयास पाहिजे तसें झालेलें नाहीं. प्रचारकार्यास साधन असणारें वाङ्मयहि नाहीं ती उणीव ह्या पुस्तकानें अंशतः दूर होणारी आहे.

सहकाराचीं प्रमुख तत्त्वें आणि वेगवेगळ्या संस्थांची घटना, व्यवहाराचें स्वरूप व त्यांचें स्थान याबद्दलची माहिती ह्या छोटेखानी पुस्तकांत उदाहरणें देऊन व तुलनात्मक पद्धतीनें शक्य तेवढ्या सोप्या भाषेंत दिलेली आहे. ती सर्वसाधारण वाचकांस बोधपर झाल्याशिवाय राहणार नाहीं. पण सहकार हा अर्थशास्त्राचा एक भाग आहे व त्याचा राज्यकारभारशास्त्राशीं फार निकटचा संबंध असल्यानें राज्यकारभाराचे धोरणानुरूप सहकारी चळवळीचें अंतिम स्वरूप यशस्वी किंवा अपेशी होत असते. या अत्यंत महत्त्वाच्या व मूलभूत सिद्धांताचा उल्लेख पुस्तकांत योग्य स्थळीं व्हावयास पाहिजे होता असें मला वाटतें.

अशा धर्तीची जेवढीं पुस्तकें निघतील तेवढीं थोडींच आहेत. मात्र त्यांचा काळजीपूर्वक अभ्यास करणारा, वाचून समजावून घेणारा व समजावून घेतल्यानंतर त्यांतील तत्त्वांचा व्यावहारिक दृष्टीनें सदुपयोग करणारा वाचकवर्ग मात्र वाढण्यास हवा. आपले देशांत अद्याप साक्षरतेचें प्रमाण अल्प असल्यानें अशा पुस्तकांचा उपयोग प्रचारकार्याचें दृष्टीनेंच सुपरवायझर प्रभृती फिरती अंमलदारांनीं विशेष केला पाहिजे. सध्या सहकारी खात्यामार्फत सेक्रेटरींना शिक्षण देण्याचे वर्ग काढण्यांत आलेले आहेत त्या कामींही या पुस्तकाचा बराच उपयोग होण्यासारखा आहे. रा. चितांबर यांनीं ८ विभागांत पुस्तकाची मांडणी केली आहे. विशेषतः पृ. १४० ते १४३ मध्यें शेतकऱ्यांच्या अडचणी व त्यावरचे उपाय हे प्रकरण पुष्कळांना विचारप्रवर्तक खात्रीनें होईल. वेगवेगळ्या सहकारी संस्था, त्यांचे परस्पर संबंध, त्यांची कर्तव्यें व घटना याची माहिती त्रोटकपणें पण सहज समजेल अशी दिली असल्यानें रा. पितांबर यांचे पुस्तकाची उपयुक्तता वाढली आहे.

कंदाहारी कारागिरांनीं उत्कृष्ट पोलादाची पाणिदार तलवार जरी तयार केली असली पण ती वापरणाऱ्यास पूर्ण स्वतंत्रता नसेल तर प्रसंग अनुकूल असतांहि त्या अतुल शस्त्राचा उपयोग वापरणारास होत नाहीं असेंच कांहींसें सहकाराबाबत आपल्या हिंदुस्थान देशांत झालेलें आहे. सहकाराचीं उज्वल व राष्ट्रोपकारी तत्त्वें उत्कृष्ट आणि परिणामकारी आहेत यांत संशय नाहीं. पण त्यांचा खरा फायदा जोंपर्यंत या देशाला घेता येत नाहीं तोंपर्यंत तीं तत्त्वें पदार्थसंग्रहालयांतील कांचेच्या कपाटांत घासून पुसून ठेविलेल्या वस्तूंप्रमाणेंच फक्त दुरून पाहाण्याशिवाय गत्यंतर नाहीं, असे विचार इतर राष्ट्रांत सहकारानें केलेली उत्कृष्ट कामगिरी व आपल्या देशांत सरकारच्या छत्राखालीं सहकाराचा झालेला परिपाक यांची तुलना करितांना स्वाभाविकपणें सुचतात. सहकारामध्यें पडलेल्या कार्यकर्त्यांनीं या प्रकारच्या तुलनेपासून निघणारा बोध स्वतः घेऊन इतरांस शिकविला तरच हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीला भविष्यकाल आशादायक आहे असें मला वाटतें. या दृष्टीनें ह्या पुस्तकाचा उपयोग होवो.

---

## मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसचे सभासद

### सभासद बँका

○ ( १ ) अलाहाबाद बँक
* ( २ ) अमेरिकन एक्सप्रेस कं.
○ ( ३ ) बँक ऑफ बरोडा
○ ( ४ ) बँक ऑफ इंडिया
* ( ५ ) बँक ऑफ तैवान
* ( ६ ) बँको नॅशनिलअल्ट्रामरिनो
( ७ ) बॉंबे प्रॉ. को. बँक
○ ( ८ ) कॅनरा बँक
○ ( ९ ) कॅनरा इं. अँन्ड बँ. सिंडिकेट
○ ( १० ) सेंट्रल बँक
* ( ११ ) चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायना
* ( १२ ) कॉम्प्टोर नॅशनल डिस्काम्प्ट दि पॅरिस
○ ( १३ ) देवकरण नानजी बँकिंग कं.
* ( १४ ) ईस्टर्न बँक
* ( १५ ) ग्रिंडले अँड कं.
* ( १६ ) हाँगकाँग अँड शांघाय बँकिंग कॉ.
○ ( १७ ) इंपिरियल बँक
○ ( १८ ) इंडियन बँक
* ( १९ ) लॉइड्स बँक
* ( २० ) मर्कंटाइल बँक
* ( २१ ) मित्सुई बँक
* ( २२ ) नॅशनल बँक ऑफ इंडिया
* ( २३ ) नॅशनल सिटी बँक ऑफ न्यू यॉर्क
* ( २४ ) नेदरलंडस इंडिया कमर्शिअल बँक
* ( २५ ) नेदरलंडस ट्रेडिंग सोसायटी
○ ( २६ ) पंजाब नॅशनल बँक
( २७ ) रिझर्व्ह बँक
* ( २८ ) टॉमस कुक अँड सन ( बँकर्स )
○ ( २९ ) युनियन बँक ऑफ इंडिया
* ( ३० ) याकोहामा स्पिशी बँक

### उप-सभासद बँका

( १ ) डेकन मर्चंट्स को. बँक ( २ ) सारस्वत को. बँक ( ३ ) सी. के. पी. को. बँक ( ४ ) दक्षिणी ब्राह्मण को. बँक ( ५ ) नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत को. बँक ( ६ ) शामराव विठ्ठल को. बँक ( ७ ) मराठा मार्केट पीपल्स को. बँक ( ८ ) इस्लाइलिया को. बँक ( ९ ) बॉंबे मुस्लिम को. बँक ( १० ) दि बँक ऑफ महाराष्ट्र ( ११ ) झोरास्ट्रिअन को. के. बँक ( १२ ) लल्लुभाई सामळदास पीपल्स को. बँक ( १३ )* न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया ( १४ ) युनायटेड वेस्टर्न बँक.

वरील पैकी पहिल्या १३ बँका मुं. प्रां. सहकारी बँकेमार्फत उप-सभासद झाल्या असून चवदावी बँक सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे मार्फत उप–सभासद झालेली आहे.

---

* एक्सचेंज बँक ○ शेड्यूल्ड बँक

## चलनी नोट घेण्याचें नाकारल्यास काय होईल ?

### अलाहाबाद हायकोर्टाचा निकाल

आरोपी मीरसिंगचें एक दुकान होतें. त्या दुकानांतून रामनारायण नांवाच्या इसमानें ५ आण्यांचा माल विकत घेतला. रामनारायणजवळ सुटे पैसे नसल्यामुळें आरोपीला तो दहा रुपयांची नोट देऊं लागला. ती नोट स्वीकारण्याचें आरोपीनें नाकारलें म्हणून त्याचेवर डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टप्रमाणें खटला भरण्यांत आला. त्यांत त्याला खालच्या दोन्ही कोर्टांनीं दोषी ठरवून तीन तीन महिने सक्तमजुरी व १०० रुपये दंड अशी शिक्षा दिली, म्हणून त्यानें हें रिव्हिजन केलें होतें.

"आरोपी डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टखालीं शिक्षेस पात्र आहे किंवा काय ? त्या ॲक्टच्या नियम ३४ मध्यें "द्वेषमूलक कृत्य" या शब्दाची व्याख्या देण्यांत आली आहे. त्या व्याख्येप्रमाणें सरकारी कर्जें, रोखे, नोटा, नाणीं वगैरेवर असलेला लोकांचा विश्वास ज्या कृत्यामुळें नाहींसा होत असेल अथवा ज्याचा तसा परिणाम होणें अगदीं साहजिक आहे असें कोणतेंहि कृत्य "द्वेषमूलक कृत्या"च्या सदरांत येतें. कोणतेंहि द्वेषमूलक कृत्य करणें त्या ॲक्टानुसार शिक्षेस पात्र असतें. चलनी नोट नाकारण्यानें लोकांचा सरकारी चलनावर असलेला विश्वास नाहींसा होणें अगदीं अपरिहार्य आहे.

"मुकदम्यांतील पुराव्यांत असें सिद्ध झालें आहे कीं, आरोपीनें प्रथम बरीच उडवाउडवी केली व सरतेशेवटीं असें सांगितलें कीं, "चलनी नोटा सरकार देखील आपल्या खजिन्यांत स्वीकारीत नाहीं." आरोपीच्या या उद्गारामुळें चलनी नोटावर असलेला लोकांचा विश्वास नाहींसा होण्यास मदत झालेली आहे. सबब आरोपीचें कृत्य डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टान्वयें द्वेषमूलक ठरतें. वरील कारणास्तव आम्ही हें रिव्हिजन काढून टाकतों, व आरोपीला देण्यांत आलेली शिक्षा कायम ठेवतों." असा हायकोर्टानें निवाडा केला.

### हिंदी काचसामानाची निर्गत

| कोठें निर्गत होते ? | १९३७-३८ रुपये |
| --- | --- |
| एडन | ४,९९९ |
| बेहरिन बेटें | १६,६२५ |
| सिलोन | १६,१८५ |
| ब्रह्मदेश | ५४,११५ |
| मलाया | ७,४६५ |
| इतर ब्रिटिश मुलूख | ११,०२२ |
| अरबस्तान | ४,५५० |
| इराण | ६,९२२ |
| जपान | ३२ |
| इतर परकी देश | ७,६७५ |
| एकूण | १,२८,६९० |

निर्गत होणाऱ्या मालापैकीं ६१½ हजारांचा माल बंगालनें व ५१½ हजारांचा माल मुंबई प्रांतानें पाठविला.

## आकडेशास्त्राचें अध्यापन

अमेरिकेनें आकडेशास्त्राचे संबंधांत अतिशय प्रगति केली आहे व त्या शास्त्राच्या अध्यापनाचीहि चांगली व्यवस्था केली आहे. हिंदुस्थानांत ह्या शास्त्राचें महत्त्व पटण्यास बराच वेळ लागला. हिंदी आकडेशास्त्र परिषदेचें चवथें अधिवेशन बनारस येथें जानेवारी, १९४१ मध्यें भरलें होतें, त्यावेळीं परिषदेंत आकडेशास्त्राच्या अध्यापनासंबंधीं सर्वसाधारण परिस्थिति समजून यावी ह्याकरितां एक प्रश्नमालिका तयार करून तिचीं उत्तरें मागवावींत, असें ठरलें. त्याप्रमाणें एक प्रश्न मालिका तयार करण्यांत आली आहे. त्यांतील कांहीं प्रश्न येथें दिले आहेत :—

(१) आपल्या देशांत आकडेशास्त्रांत प्रवीण असणारांची वाण आहे काय ?

(२) अशा लोकांचा अखंड प्रवाह चालू रहावा, ह्या दृष्टीनें कांहीं व्यवस्था आवश्यक आहे काय ?

(३) आकडेशास्त्र शिकविण्याची सध्याची व्यवस्था पुरेशी व समाधानकारक आहे का ?

(४) आकडेशास्त्राच्या अध्यायनाचा समावेश कॉलेजांतील शिक्षणक्रमांत करण्यांत यावा काय ? का, त्यासाठीं स्वतंत्र संस्था असाव्यात ? जर आकडेशास्त्र कॉलेजांचे अभ्यासक्रमांत समाविष्ट केलें, तर त्याचें प्राथमिक शिक्षण शाळांतून दिलें जावें काय ? अंकगणितांत त्याचा समावेश करावा कीं बीजगणितांत ?

(५) आकडेशास्त्राचा स्वतंत्र अभ्यासक्रम ठरविल्यास, त्याचा गणित, अर्थशास्त्र, ज्योतिर्विद्या, इत्यादींच्या शिक्षणाशीं काय संबंध असावा ?

(६) आकडेशास्त्राचे शिक्षक तयार करण्याची व्यवस्था कशी करावी ?

(७) आकडेशास्त्रज्ञांस आज मागणी किती आहे ? व्यापारी व कारखानदार ह्यांचेमध्यें आकडेशास्त्राच्या महत्त्वाविषयीं प्रचार कसा करतां येईल ?

### औद्योगिक संशोधन निधि

औद्योगिक संशोधन निधि ह्या नांवाचा एक फंड स्थापन करावा व दरसालच्या अंदाजपत्रकांत त्याकरितां १० लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत यावी, असा ठराव सर रामस्वामी मुदलियार ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत मांडला, तो एकमतानें मंजूर झाला. औद्योगिक संशोधनाचें महत्त्व नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं. ग्रेट ब्रिटनसारख्या राष्ट्रांतहि औद्योगिक संशोधनावर पुरेसा खर्च केला जात नाहीं, अशी तक्रार ऐकूं येते. हिंदुस्थानांत ह्या संबंधांत नुकताच कोठें प्रारंभ करण्यांत आलेला आहे, सरकारनें नेमलेल्या 'बोर्ड ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च' नें गेल्या दीड वर्षांत चांगली कामगिरी केली असल्याचें सांगितलें, व औद्योगिक संशोधनाचें कार्य मजबूत पायावर कायम चालूं रहावें, ह्या दृष्टीनें फंडाची योजना करण्यांत आली आहे, असें ते म्हणाले. औद्योगिक संशोधनाकरितां फंड स्थापन करून सरकारनें त्याविषयींची आपली जबाबदारी मान्य केली आहे व फंडाची रकम आज विशेष मोठी नसली, तर प्रारंभ ह्या दृष्टीनें प्रस्तुत उपक्रमाचें महत्त्व मोठें आहे.

## युद्धपरिस्थितीची आर्थिक पार्श्वभूमि

( प्रो. वा. गो. काळे ह्यांचें मुंबई रेडिओवरील भाषण, मुंबई रेडिओ अधिकाऱ्यांचे रुपेनें प्रसिद्ध करण्यांत येत आहे.)

ता. १९-११-४१ च्या अंकावरून समाप्त.

युद्धाच्या आर्थिक बाजूच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाची व अखेर निर्णायक ठरणारी कोणती एक बाब असेल तर ती प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेनें इंग्लंडला शस्त्रास्त्रें पुरविण्याची अंमलांत आणलेली व्यावहारिक योजना ही होय. स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या राष्ट्रांस जर्मनीविरुद्ध आर्थिक मदत देण्याचें अमेरिकेचें धोरण इंग्लंडच्या दृष्टीनें केवळ बिनमोल आहे. सदरहू योजना अंमलांत आणण्याच्या प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या मार्गांत अनेक अडचणी होत्या त्या त्यांनीं अत्यंत कौशल्यानें हळु हळु दूर केल्या आहेत. अमेरिकेनें परराष्ट्रांस माल विकत द्यावयाचा तो रोखीनें विकला पाहिजे आणि तो खरेदीदारांनीं स्वतःच्या जोखमीनें वाहून नेला पाहिजे हा त्यांच्या मार्गांत जबरदस्त अडथळा होता. अमेरिकन काँग्रेसचें मन वळवून 'लीझ अ‍ॅन्ड लेन्ड अ‍ॅक्ट" ह्या नांवाचा कायदा त्यांनीं पास करून घेतला. परत देण्याच्या बोलीनें आणि कांहीं तारण घेऊन अमेरिका इंग्लंडला माल पुरवूं शकावी असा ह्या कायद्याचा उद्देश आहे. तथापि हा माल सुरक्षितपणें इंग्लंडला पोहोंचण्याची अडचण राहिली, तीवरहि प्रेसिडेंट रुझव्हेल्ट यांनीं उपाय योजण्याचें ठरविलें. इंग्लंडला युद्धसामुग्री पुरविणें म्हणजे अमेरिकन राष्ट्र व अमेरिकन खंड यांच्या संरक्षणाची तजवीज आहे असें ब्रीदवाक्य उच्चारून ही सामुग्री अटलांटिक महासागरांतून निर्वेधपणें जाऊन इंग्लंडला पोहोंचेल अशी व्यवस्था करणें हेंही अमेरिकेचें काम आहे असें त्यांनीं जाहीर केलें. जगांतील समुद्रांच्या हमरस्त्यांवरून मालाची ने आण करण्याचें अमेरिकेचें स्वातंत्र्य कोणीहि हिरावूं शकत नाहीं ही गोष्ट त्यांनीं असंदिग्ध रीतीनें स्पष्ट केली. अमेरिकन माल अटलांटिक महासागरांतून जात असतां त्याचें संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांनीं उघडपणें स्वीकारली. अमेरिकन कारखान्यांत विमानें वगैरे लढाऊ सामान मोठ्या प्रमाणावर तयार करून त्यांतील बराच मोठा भाग इंग्लंडला पुरवण्याची योजना अंमलांत आलेली आहे. कच्च्या मालाचा पुरवठा व मोठमोठे कारखाने यांच्या दृष्टीनें अमेरिका हा देश अत्यंत समृद्ध व पुढारलेला आहे. त्याचें आर्थिक पाठबळ हार्दिक उत्साहानें इंग्लंडला उपलब्ध होत आहे, ही प्रस्तुत युद्धांतील अंतिम विजयाच्या दृष्टीची अत्यंत जिव्हाळ्याची गोष्ट आहे. जर्मनीनें लढाऊ विमानांचा फार मोठा साठा केला असून त्यांच्या अविरत उत्पादनाच्या सहायानें त्यांचा पुरवठा कायम राहील अशी व्यवस्था केली आहे. त्याची बरोबरी करून त्यावर लढाऊ सामानाच्या बाबतींत सरशी करणें हें इंग्लंड व अमेरिका ह्यांचें आजमितीस उद्दिष्ट आहे.

### युद्धसाहित्याचा अखंड पुरवठा

रशियाशी झालेला आपला स्नेहाचा करार मोडून त्यावर मोहीम चढविण्यांत हिटलरचा हेतु कांहींहि असो, ह्या प्रचंड मोहिमेचे योगानें युद्धाचें क्षेत्र विलक्षण वाढलें आहे. उत्तरेस लेनिनग्राड, व दक्षिणेस क्रायमिया ह्या दोन टोकांच्या मध्यें पसरलेल्या रणभूमीवर निकराच्या लढाया तीन महिन्यांचे वर चालल्या आहेत. त्यांमध्यें जर्मन लढाऊ साधनांचा फार मोठ्या प्रमाणावर नाश झाला आहे. रशियानें अतुल पराक्रम करून जर्मनीच्या लढाऊ सामर्थ्याचे वाभाडे काढले आहेत. आपल्या स्वतःच्या देशांत व पादाक्रांत केलेल्या मुलुखांत लोकांमध्यें असंतोष सारखा वाढत आहे, त्यांचें सांतवन व्हावें म्हणून नुकत्याच केलेल्या भाषणांत हिटलरनें त्यांस धीर देऊन जिंकलेल्या रशियाच्या प्रांतांतली अपार संपत्ति आपणांस उपभोगतां येईल असें आमिष दाखविलें आहे. वस्तुस्थिती अशी आहे कीं, आपल्या पादाक्रांत होणाऱ्या मुलुखांत शत्रूच्या हातीं कोणतीही उपयुक्त वस्तु लागूं नये अशा बेतानें तो रशियानें उध्वस्त केलेला आहे. संपत्तीच्या उत्पादनाचीं साधनें, जर्मनीस, रशियांत सांपडावयाचीं नाहींत एवढेंच नाहीं तर त्याच्या फौजांस रशियन लोक सतावून सोडतील. हिंवाळा सुरू होण्यापूर्वी रशियन मोहीम पुरी करण्याचा हिटलरचा विचार आहे आणि त्यासाठीं तो आपलें लष्करी शक्तिसर्वस्व खर्चीत आहे. परंतु रशियास युद्धसाहाय्य देण्यास इंग्लंड व अमेरिका हीं दोन्ही राष्ट्रें पुढें सरसावलीं आहेत. रशियास विमानें व चिलखती गाड्या पुरविण्याचें ठरवून त्यांनीं आपलें लढाऊ सामानाचें उत्पादन त्यासाठीं वाढवलें आहे. इराणमध्यें फंदफितुरी करण्याचा प्रयत्न हिटलरनें आपल्या हस्तकांचे करवीं चालविला होता तो, त्यांची हकालपट्टी करून व आपलें वजन इराणी राजकारणांत स्थापून इंग्लंड व रशिया ह्यांनीं पश्चिम राशियांतल्या जर्मनीच्या कारवाया हाणून पाडल्या आहेत. रशियास लढाऊ सामानाचा पुरवठा होण्यास इराणमधून मार्ग मोकळा झाला आहे.

### युद्धसामुग्री अबाधित आहे

इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांचें पूर्ण सहकार्य हिटलरशाही हाणून पाडण्यामध्यें होत आहे. ह्या तीन राष्ट्रांचें आर्थिक सामर्थ्य एवढें प्रचंड आहे कीं, युरोपांत, जर्मनीनें, कितीही देश आपल्या स्वतःच्या सत्तेखालीं आणले तरी त्या एकत्रित सहकार्यापुढें हिटलरचे निकराचे युद्ध-प्रयत्न फोल ठरणार आहेत. ब्रिटिश साम्राज्यांतील देशांत युद्धाप्रीत्यर्थ होत असलेली खर्चाची व्यवस्था सुरळीत रीतीनें अमलांत येत आहे. अमेरिकेनें इंग्लंड व रशिया ह्यांस द्यावयाच्या मदतीच्या मार्गांत कोठल्याहि अडचणी येऊं नयेत अशी तजवीज प्रेसिडेंट रूझवेल्ट करीत आहेत. पूर्व युरोप व उत्तर रशिया ह्यांत रशियाचे प्रदेश एवढ्या विस्तीर्णपणें पसरले आहेत कीं, पश्चिम युरोपांतील लहान देशांस जर्मनीनें सहज आपले दास बनविलें तसें रशियाचे बाबतींत होणें अशक्य आहे. युक्रेन प्रांत व क्रायमिया आपल्या ताब्यांत आणण्याची हिटलरची धडपड आहे ती तेथील खनिज संपत्ति व कारखाने काबीज करण्याच्या उद्देशानें चालली आहे. ह्या मोहिमेंत रशियन सेनानींनीं जर्मनीची केलेली हानी भरून निघणें, अवघड, नव्हे, अशक्य आहे. ती मोहीम कशी बशी पुरी केली कीं आपला कार्यभाग संपला असें हिटलरला स्वतःच्या मनांत वाटत नसलें तरी तो लोकांस तसें भासवीत आहे. जर्मनीनें सध्या रशियांत लढाया चालवल्या आहेत, त्यांचे योगानें युद्ध लांबावयाचें असून तें ह्यापुढें हिटलरला अत्यंत प्रतिकूल अशा परिस्थितींत चालवावें लागणार आहे. युद्धसामुग्रीच्या पुरवठ्याची पुढल्या दोन वर्षांची तयारी इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं चालविली आहे. युद्धाचें पारडें जर्मनीच्या विरुद्ध जात असल्याचें तें स्पष्ट लक्षण आहे. रशियन राज्यकर्त्यांनीं आर्थिक प्रगतीच्या पंचवार्षिक योजना तयार करून त्या अंमलांत आणल्या. त्यामध्यें रॉकेल तेल, कोळसा, लोखंड, वगैरेचा व्यवस्थित पुरवठा होऊन पोलादाच्या बनावटीचे मोठ-

मोठाले कारखाने चालावे अशी व्यवस्था केली ती प्रस्तुत युद्धांत चांगली कामास आली आहे. रशियाचें आर्थिक सामर्थ्य कल्पनेच्या बाहेर हिटलरच्या प्रत्ययास येत असून इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या सहाय्यानें ते योजनात्मक रीतीनें आतां एकवटत असल्यानें, तें जर्मनीच्या पराभवाचा व नाशाचा क्षण जवळ आणीत आहे. युक्रेनच्या पलीकडेहि रशियाचे आर्थिक साधनांचे संचय आहेत आणि युद्धोपयोगी सामुग्री तयार करण्याचे त्यांचें सामर्थ्य अबाधित आहे. रशिया इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या प्रतिनिधींची एक परिषद् मॉस्को येथें नुकतीच भरली होती, त्यामध्यें ह्या तीन राष्ट्रांच्या आर्थिक सामर्थ्यांचा उपयोग कार्यक्षम रीतीनें करण्याची योजना निश्चित झाली आहे. हा जर्मनीच्या पराभवाचा प्रारंभच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ज्यांच्याजवळ मनुष्यबळ व द्रव्यबळ विपुल आहे, खनिज व वनस्पतिजन्य साधनांची ज्यांच्यापाशीं समृद्धी आहे, कारखानदारीच्या कलेंत जे पूर्णपणानें दर्दी आहेत, ज्यांच्या व्यापारास सात समुद्र मोकळे जाहेत आणि जीं स्वातंत्र्यासाठी उत्साहानें लढत आहेत अशीं इंग्लंड व अमेरिका हीं राष्ट्रें एका बाजूस आणि ज्याचा युरोपांत कोंडमारा झाला आहे, जित व असंतुष्ट लोकांच्या पिळवणुकीनें ज्यास युद्धसाधनें निर्माण करणें भाग आहे, ज्याच्या जुलमी सत्तेविरुद्ध लोकमत सर्वत्र प्रक्षुब्ध होत आहे व ज्याची आरमारी, नाविक व व्यापारी शक्ति नष्ट झाली आहे असा जर्मनी दुसऱ्या बाजूस, ह्या स्वरुपाचा प्रस्तुतचा झगडा आहे. त्यांत कोणत्या पक्षाची सरशी होणार हें सांगण्यास भविष्यवादी नको, सामान्य बुद्धीच्या माणसास ही गोष्ट सहज समजण्यासारखी आहे.

## सोनेरी केसास मागणी

दिल्लीच्या हवामानखात्यास स्त्रियांचे सोनेरी रंगाचे केस पाहिजे आहेत. ह्या केसांचा तेलकटपणा काढून टाकला, म्हणजे ते हवेंतील आर्द्रता मोजण्यास उपयोगी पडतात. इतर कोणताहि पदार्थ तितका उपयोगी होत नाहीं. जगांत सर्व ठिकाणीं, अशा केसांचें प्रसरण-आकुंचन वाढवून दर्शविणारीं यंत्रेंच आर्द्रता मोजण्याचें काम करीत आहेत. हवेंतील पाण्याची वाफ अगदी सूक्ष्म प्रमाणांत केसांत मुरली, तरी ह्या केसांची लांबी त्या प्रमाणांत वाढते. आर्द्रतानिदर्शक नाजूक यंत्रें आकाशांत २२ मैलांपर्यंत उंच फुग्यांतून वर पाठविलीं, म्हणजे ह्या यंत्रांवरील फिरत्या चाकांवर वाटेंतील आर्द्रता नोंदली जाते. यंत्रांस लागणारे केस तरुणींच्या डोक्यावरचे असले, तर अधिक चांगलें. त्यांची लांबी ८ ते १० इंच असावी व ते रेशमासारखे हातास मऊ लागणारे असावेत. तीन चार औंस केस दोन वर्षें पुरतील. मुंबईमधील एका फॅशनेबल केशकर्तनालयांतून हवामान खात्यास वकशीरपणें केसांचा पुरवठा आजवर होत असे, परंतु आतां त्या दुकानाचे केस समाधानकारक नसल्याचें आढळून आलें आहे. म्हणून दिल्ली येथील केशकर्तनालयांतून केस मागविण्यांत येऊं लागले आहेत. कृत्रिम सोनेरी केस यंत्रांस चालत नाहींत.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११०–१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०३–१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९६–० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३–४ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९५–१ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९८–० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | ११०–० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | ११०–० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... ... | ११६–१२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२७–४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १५०–० |
| बँक ऑफ बरोडा ( १००–५० ) १०% ... ... | ११८–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०–२५ ) ९% ... | ५३–१२ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १६३२–८ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) १½ रु. ... ... | ५३–८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११५–० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% ... ... | १४६–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१७–८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २२०–० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १८१५–० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १७५५–० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४–८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ९७–० |
| अहमदाबाद प्रांतज ( ५०० ) ११½% ... | ८७६–४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६४७–८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २४७–० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ५६–० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २८–० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ५९–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४८२५–० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१७–८ |
| टाटा आयर्न डु. प्रे. ( १०० ) ७½% रु. ... ... | १५५–४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ४०३–० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु. १० आ. ० पै ... | २१७०–० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १६५–० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४४–१२–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३–०–६ |

**पाणी व पाणी**



तुम्हांस मुबलक पाणी पाहिजे ना?
तर मग— आमचे बोरिंग मशीननें तुमचे घरांत अगर शेतांत बोअर करून घ्याव एक हातपंप बसवा. वाटेल तेव्हां तुम्हांस पाणी मिळूं शकेल.
बोअर मशीन व पंप पूर्ण स्वदेशी असून आमचे कारखान्यांत तयार केलेले आहेत.
बोअर (भोंक) ६ इंच असून यंत्र इंजिननें चालतें.
दर व इतर माहितीबद्दल चौकशी करा.
**भिडे आणि सन्स,**
सांगली.
श्री विनायक मिल्सची पातळें व लुगडी वापरा.



**—SOLD, BOUGHT, HIRED OR MADE TO ORDER.—**

First and second hand iron or wooden furniture.

**Address:**—Shevak Quarters, 1227 F. C. Road, Poona 4. Industrial Centre. **C. R. Shevak.**

**सर्व प्रकारचें लोखंडी व लांकडी फर्निचर विकत घेतलें जातें किंवा नवीन तयार करून अगर भाड्यानें मिळतें.**

पत्ता—शेवक क्वार्टर्स, १२२७ फ. कॉ. रोड, पुणें नं. ४.
इंडस्ट्रियल सेन्टर, कारखाना पत्ता:–१५३ कसबा, पुणें २.
आपला–सी. आर. शेवक.



# स्वादिष्ट मसाला करणारे आद्य कारखानदार




## व्ही. पी. बेडकर

**बेडकर आणि सन्स**

पुणें येथील एजंट—
दत्तात्रय नारायण हेजीब.





# फॉस्फौरा:—

अशक्ततेमुळें हाडांतील (स्फुराम्लाचा) (क्षार) स्फुरण पावत नसल्यानें शरीराचे जे धर्म ते बरोबर काम करीत नाहींत त्यामुळें मुलें सुस्त व आळशी, तरुण षंढ, निर्वीर्य व कामाचा कंटाळा करणारे, तरुण स्त्रियांच्या गर्भाशयोन्माद (आचके) वंधत्व आणणें इत्यादि व वृद्ध चिडखोर, नेभळे वगैरे विकार हाडांतील मज्जातंतू व शुक्राची वाढ होत नसल्यानें होतात. त्यावर उपाय म्हणजे फॉस्फौरा गोल्ड–टॉनिक हें फार उपयुक्त औषध आहे. एक बाटली चाळीस दिवस पुरते. किं. रु.३–८–०. शिवाय पोस्टखर्च.

— माहिती पत्रक मागवा —

**रॉय आणि कंपनी,** १७६, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई नं. २






# मा ध वा श्र म

**हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून, रेल्वे-स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.**

**जागा मध्यवस्तींत, हवाशीर, लागणारे फर्निचरनें शृंगारित असून, सोयीमुळें ती शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहणेची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.**

**माधवाश्रम बिल्डिंग,** गिरगांव, मुंबई.



# मुजुमदार टॉय वर्क्स

**या आणि पहा**

**माना हालणारीं व साधीं लाकडी चित्रें समक्ष येऊन खात्री करा.**

२५५ सदाशिव पेठ, शेडगेवाडी, पुणें शहर.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट
ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
टूथपावडर
पोरवाल ॲंड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

**पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें**

**संग्रह करा**

**कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट, पाचकवटी, पंचकोलासव**

तसेंच

पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी

**—: रक्तवर्धक :—**

सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक, रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें

**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**'पायोनियर डाइंग हाऊस'**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.



**मधुमेहावरील औषध**

**तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७**

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

| बंबाचे माडीवर | **महिंद्रकर ब्रदर्स** तयार कपड्याचे व्यापारी | बुधवार चौक, पुणें |
|---|---|---|

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १० डिसेंबर, १९४१ अंक ४९


## * विमाक्षेत्रांतील 'कॉमनवेल्थ'चें अढळ स्थान *

### १९४० चें पूर्ण केलेलें काम.........४५ लक्षांहून अधिक

★ बोलका—ढलपा ★

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८२,००० |
| सरकारी कर्जरोखे, गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१३,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

• कॉमनवेल्थचीं वैशिष्ट्यें •

( १ ) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरूकता
( २ ) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
( ३ ) काळजीपूर्वक काटकसरीची व्यवस्था
( ४ ) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
( ५ ) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

## कॉमनवेल्थ

अॅशुअरन्स कंपनी लि., पुणें २.

—शाखा—

मुंबई—मद्रास—कलकत्ता—नाशिक—कराची—अहमदाबाद

एम्. एन्. भागवत, बी. ए.
अॅक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडेंट.


## जाहीर नोटीस

सोसायटीचें काम करण्याकरितां सेक्रेटरी पाहिजे. मॅट्रिक, स्कूल फायनल अगर व्हर्नाक्युलर फायनल पास असून नॉन मॅट्रिक असावा. पगार दरमहा रुपये २५, कायम नोकरी, दर दोन वर्षांनीं रुपये दोन वाढ, अखेर रुपये ५० पर्यंत नेमणें आहे. उमेदवारांनीं आपले अर्ज आमचे फॉर्ममध्यें भरून ता. ३१-१२-४१ चे आंत पाठवावेत. फार्मांत आलेल्या अर्जांचाच विचार केला जाईल, तरी अर्ज फॉर्मकरितां रुपाया एक आणि पोस्टेजसाठीं आडीच आणे मिळून एक रुपाया आडीच आण्यांची मनिऑर्डर पाठवावी. कळावें.

मे. रामकृष्ण मारुतीराव भागवत
चेअरमन,

राहुरी को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी
मु. पो. ता. राहुरी जि. अहमदनगर.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

## व्याजाच्या दरांत बदल

बँकेचे खातेदार, ठेवीदार व बँकेशीं व्यवहार असणारे इतर सर्व लोक यांस विनंतिपूर्वक कळविण्यांत येतें कीं, ता. १ जानेवारी १९४२ पासून बँकेची मुख्य कचेरी व शाखा यांमधील सेव्हिंग्ज बँक खात्यांवरील व्याजाचा दर द. द. शेकडा $1\frac{1}{2}$ टक्के केला जाईल.

पुणें शहर,
ता. १०-११-४१

M. V. Gokhale
मॅनेजर.

सहकार
हिंदी सहकारी संस्थाचा संसार
किं. रु. २
अर्थ ग्रंथमाला, पुणें ४

## विविध माहिती

### लष्करभरती

कुलाबा जिल्ह्यांतील लोहारे खेड्यांतील पन्नास तरुणांनीं लष्करांत नांवें नोंदलीं आहेत. आणखी वीस लवकरच दाखल होतील. पळचिल गांवानें २० लोक दिले आहेत. त्या खेड्याची एकूण वस्ती ६०० आहे. महाड येथें भरणाऱ्या जमाबंदी दरबाराचे वेळीं खेड्याचे पाटलास फेटा बक्षीस देण्यांत येणार आहे.

### देवकरण नानजी विमा कं. लि

वरील नवीन विमा कंपनी नुकतीच स्थापन झाली आहे, तिचे श्री. प्राणलाल देवकरण नानजी हे अध्यक्ष आहेत. पहिल्या वर्षी कंपनी फक्त आयुर्विमेच स्वीकारील, नंतर इतर प्रकारच्या विम्यांचे कामास प्रारंभ होईल.

### चीनमधून आयात होणाऱ्या मालाची किंमत

चीन देशास त्याच्या हुंडणावळीवर नियंत्रण ठेवतां यावें व चीनमधून माल मागविणारांनीं द्यावयाचे पैसे खऱ्याखुऱ्या निर्गत करणारांसच मिळावे, ह्या हेतूनें हिंदुस्थान सरकारनें नवी व्यवस्था केली आहे. रिझर्व्ह बँकेस मान्य होईल अशा पद्धतीनें पैसे दिले, तरच मालाच्या आयातीचा परवाना वापरतां येईल, अशी ती व्यवस्था आहे व ती १ डिसेंबर रोजीं अंमलांत आली.

### चांदीची विक्री

रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारची चांदी १०० तोळ्यांस ६२ रु. ४ आ. ह्या दरानें विकण्यास प्रारंभ केला आहे. किमान २५ पाटले तरी एका वेळेस खरीदले पाहिजेत.

### जुना नर्मदा पूल

भडोच शहराजवळील नर्मदेवरील जुन्या रेल्वेपुलाचें साध्या पुलामध्यें रूपांतर करण्यासाठीं मुंबई सरकारनें ६,२०,८६४ रुपये मंजूर केले आहेत.

### महागाई भत्ता

मुंबईतील गिरणी कामगारांस १९४० सालीं प्रत्येकी जेवढें वेतन मिळालें, त्याच्या १२½% इतका महागाई भत्ता त्यांस २१ फेब्रुवारी रोजीं देण्यांत येईल. म्हणजे, त्या दिवशीं २ लक्ष गिरणी कामगारांस मिळून सुमारें १ कोटि रुपये वाटण्यांत येतील.

### गुजरात विश्वविद्यालय

शेठ अमृतलाल हरगोवनदास ह्यांनीं गुजरात विश्वविद्यालयाच्या स्थापनेचे बाबत पुढाकार घेतला आहे व त्यांस इतर मिल एजंटांचा पाठिंबा मिळत आहे. आवश्यक ते अर्धा कोटि रुपये लवकरच जमा होतील, असें दिसतें.

### सैनिकांसाठीं नाताळची भेट

हिंदी व ब्रिटिश सैनिकांस नाताळच्या सणाची देणगी म्हणून ५० हजार रुपये किंमतीच्या पिशव्या भरलेले ३५० पेटारे इराककडे रवाना झाले आहेत. ७ हजार ब्रिटिशांसाठी पाठविलेल्या प्रत्येक देणगींत फळें, सॉसेजेस, केक व सिगारेटचें पाकीट घातलेलें आहे. ३२ हजार हिंदी सैनिकांसाठी मिठाई, सुवासिक साबणाची एक वडी व रंगीत हातरुमाल असे जिन्नस आहेत.

### तारा लवकर करा

नाताळाचे वेळीं पोचण्याच्या बेतानें सैनिकांस व परदेशांत इतरांस पाठवावयाचे विद्युत्‌संदेश शक्य तितक्या लवकर पाठवावेत, म्हणजे सर्व संदेश योग्य वेळीं हातीं पडण्याची व्यवस्था करण्यांत येईल, असं पोस्ट व तार खात्यानें जाहीर केलें आहे.

### इनकमटॅक्स

इन्कम् टॅक्सचा भरावयाचा सध्याचा फॉर्म आणखी सोपा करतां येईल काय, ह्या प्रश्नास "कायद्याप्रमाणें सर्वव्यापी परंतु त्याबरोबरच समजण्यास सोपा असा फॉर्म तयार करणें फार अवघड आहे" असें उत्तर सर जेरेमी रेसमन ह्यांनीं दिलें.

### लष्करांत ऑस्ट्रेलियन अधिकारी

वाढत्या हिंदी फौजेस लागणारे अधिकारी पुरेसे उपलब्ध नसल्याकारणानें त्या जागीं कांहीं ऑस्ट्रेलियन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली आहे. ऑस्ट्रेलियन फौजेंत हिंदी अधिकारी नेमलेले नाहींत, अशी माहिती सर गुरुनाथ बेवूर ह्यांनीं दिली.

### बॉंबे को. मार्केटिंग सोसायटी लि.

वरील सोसायटी मुंबई येथें नोंदण्यांत आली आहे. तिला सरकारकडून पहिल्या वर्षी ९ हजार रुपये व दुसऱ्या वर्षी ८ हजार रुपयांपर्यंत ग्रँट मिळेल.

### ३० कोटि रुपयांचा भांडवली खर्च

रेल्वेजच्या स्टँडिंग फिनॅन्स कमिटीपुढें हिंदुस्थान सरकार ३० कोटि रुपयांच्या भांडवली खर्चाचा कार्यक्रम मंजुरीसाठीं ठेवणार आहे. त्या ३० कोटींपैकी सुमारे १९ कोटि रुपये बी. एन. डब्ल्यू व आर. के. रेल्वेजच्या खरेदीसाठी आहेत. इंजनांची खरेदी व कांहीं ठिकाणी वहातुक फार आहे तेथे रूळांची आणखी लाइन टाकणें ह्याकरितां बरीच मोठी रकम खर्चीं पडणार आहे.

### हवाई हल्ला व इनकमटॅक्स

हवाई हल्ल्यापासून मालमत्तेचें संरक्षण करण्यास आवश्यक असलेल्या गोष्टी करण्याकरितां व्यापाऱ्यांनीं व कारखानदारांनीं केलेला खर्च ही धंदा चालविण्याच्या खर्चाची आवश्यक बाब समजली जावी व त्यासंबंधांतील प्राप्तीवरील कराची आकारणी होऊं नये, असें हिंदुस्थानसरकारनें ठरविलें आहे. युद्धानंतरहि ज्या योजनांचा उपयोग होणार आहे, त्यांस ही कराची माफी मिळणार नाहीं. सरकारनें नेमलेल्या ए. आर. पी. अधिकाऱ्याचे सांगण्यावरून केलेल्या खर्चासच केवळ वरील सवलत मिळावयाची आहे.

### स्टँडर्ड टाइम पुढें ढकलली

कलकत्ता शहरांतील घड्याळांचे काटे १ ऑक्टोबर, १९४१ रोजीं ३६ मिनिटें पुढें लावण्यांत आले. स्टँडर्ड टाइमसुद्धां एक तास पुढें करण्यांत यावी, अशी सूचना बंगाल सरकारनें हिंदुस्थान सरकारास केली होती. ८२·५° अक्षांशाचे पश्चिमेकडील भागांतील वेळ आहे तशीच रहावी, परंतु त्याच्या पूर्वेकडील प्रांतांत (बिहार, बंगाल, आसाम व ओरिसा) स्टँडर्ड टाइम एका तासानें पुढें करावी, असें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें व १ डिसेंबर पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली.

### १९४० सालांतील औद्योगिक वांधे

सबंध हिंदुस्थानांत १९४० सालीं एकूण ३२२ औद्योगिक वांधे झाले; १९३९ सालीं त्यांची संख्या ४०६ होती.

| | १९३९ | १९४० |
|---|---|---|
| वांध्यांतील कामगार | ४,०९,००० | ४,५३,००० |
| वाया गेलेले कामाचे दिवस | ४९,९३,००० | ७५,७७,००० |

१९४० सालांतील एकूण वांध्यांपैकीं ६५⅓% वांधे पगारवाढीसाठीं होते. ५२⅓% वांध्यांत कामगारांना थोडेंफार तरी यश आलें.

### त्रावणकोर बँक

त्रावणकोर नॅशनल अँड क्विलॉन बँकेच्या ब्रिटिश हिंदुस्थानांतील घेणेकऱ्यांस आतापर्यंत रुपयांत पांच आणे डिव्हिडंड मिळालें आहे.

## अनुक्रमणिका

पृष्ठ
१ विविध माहिती ... ६१४
२ युद्धकार्याचें कार्यक्षम संघटन ... ... ६१५
३ हिंदी भुइमुगाचें पीक ... ...६१६
४ पंजाबमधील बँका ... ६१६
५ दुमत्या जनावरांची हत्या ... ... ६१६
६ स्फुट विचार ...६१७
जपानची आकस्मिक चढाई—लिबियामधील लढाया—रॉस्टॉव्ह येथील जर्मनीचा पराभव—मॉस्कोचा निकराचा बचाव—गव्हाचा बाजार-भाव वाढूं न देण्याचा प्रयत्न—आंतरराष्ट्रीय साखर करार ...
७ इनकम टॅक्स कायद्याची भूमिका ... ... ६१९
८ ग्रामसुधारणेशी संबंध असणाऱ्या उपयुक्त संस्था ... ... ६२१
९ सहकारी सोसायट्यांची अंतर्व्यवस्था ... ... ६२१
१० होळकर संस्थानांतील सहकारी चळवळ ... ६२२
११ कर्नाटक सें. को. बँक ... ... ६२२
१२ निवडक बाजारभाव ६२२

अर्थ

बुधवार, ता. १० डिसेंबर, १९४१

## इंग्लंडमध्यें युद्धकार्याचें अधिक कार्यक्षम संघटन

अमेरिका, कॅनडा वगैरे देशांतून युद्धसामुग्रीचा पुरवठा इंग्लंडला वाढत्या प्रमाणांत होत आहे, तरी शस्त्रास्त्रांचें उत्पादन वाढतें ठेवण्याची मुख्य जबाबदारी ब्रिटिश कारखान्यांवर येऊन पडली आहे. रशियास लढाऊ सामुग्री पुरवावयाची असून, आफ्रिका व एशिया येथील समरांगणांसाठी तिची तयारी ठेवावयाची कामगिरी इंग्लंडला करावयाची आहे. ही जबाबदारी पार पाडण्यास पुरेशा मनुष्यबळाची आवश्यकता असून तें मिळवण्याची व उपयोगांत आणण्याची व्यवस्था ब्रिटिश सरकारास करणें प्राप्त आहे. ह्या कार्याच्या सिध्यर्थ कॉमन्स सभेंत मि. चर्चिल ह्यांनीं एक ठराव पुढें मांडला आणि तो प्रचंड बहुमतानें मान्य झाला. त्या प्रसंगीं ब्रिटिश मुख्य प्रधानांनीं परिस्थितीचें विस्तृत वर्णन करून आपल्या सूचनांसंबंधानें कॉमन्स सभेचा व पर्यायानें राष्ट्राचा कौल घेतला. त्यांनीं असें सांगितलें कीं १९४१ साल युद्धसामुग्रीचे कारखाने उभारण्यांत गेलें आणि १९४२ सालीं त्यांमध्यें भरपूर उत्पादन होईल अशी कार्यक्षम व्यवस्था करावी लागेल. वयांतला प्रत्येक पुरूष व प्रत्येक स्त्री त्यांच्या लायकीप्रमाणें युद्धकार्यास लावल्या वांचून सरकारचा हेतु पुरा होणार नाहीं. ग्रेटब्रिटनची लोकसंख्या सुमारें ४६० लक्ष आहे आणि त्यापैकीं १४ व ६५ ह्या वयांच्या मर्यादेच्या आंत १६० लक्ष पुरुष व १७० लक्ष स्त्रिया मिळून एकूण ३३० लक्ष नागरिक आहेत. ह्यांचा युद्धकार्यांत कमाल उपयोग कसा करून घेतां येईल हा निकडीचा प्रश्न मंत्रिमंडळापुढें उभा राहिल्यानें त्यांनीं कांहीं महत्त्वाच्या सूचना केल्या.

युद्धास उपयोगी परंतु रणांगणावर प्रत्यक्ष लढावें न लागतां देशांतल्या देशांत करावयाचीं अशीं कामें स्त्रिया सध्या करीतच आहेत. पण त्या बाबतींत सक्तीचें तत्त्व लागू करण्यांत आलेलें नाहीं. वीस आणि तीस वर्षांच्या मधल्या सुमारें १६ लक्ष स्त्रियांस युद्धकार्यासाठी बोलवण्यांत येणार आहे. पुरुषांच्या बाबतींतली किमान वयोमर्यादा कमी करण्यांत येईल व ती साडे आठरा वर्षांची असेल. ह्या योजनेमुळें १९४२ सालांत ७० हजार अधिक लोकांस लष्करी पेहराव चढवतां येईल. सोळा ते आठरा वर्षांच्या मधील मुलामुलींची यादी करण्यांत येऊन त्यांस खुषीनें युद्धकार्याची तयारी करण्यास उत्तेजन दिलें जाईल. सक्तीच्या लष्करी कामासाठी कमाल वयोमर्यादा ४१ ची ५० वर्षें केली जाईल. ह्या मर्यादेंतील लोकांस रणांगणावर पाठवण्यांत येणार नाहीं. युद्धासाठी मनुष्यबळ वाढवण्याची ह्या प्रकारची व्यवस्था अंमलांत आणण्याचा कायदेशीर अधिकार सरकारास देण्याचें कॉमन्स सभेनें मान्य केलें आहे.

राष्ट्रीय मनुष्यबळाचा जरूरीप्रमाणें अधिकांत अधिक उपयोग करतां यावा म्हणून ब्रिटिश सरकारनें सक्तीचा अंमल करण्याचा अधिकार मागितला तेव्हां ह्या मागणीच्या मुळाशीं असलेल्या तत्वाचें बाबतींत कॉमन्स सभेंत किंवा तिच्या बाहेर म्हणण्यासारखा मतभेद नव्हता. तथापि, युद्धकार्याकरितां स्त्री-पुरुषांवर सक्तीच व्हावयाची तर तिच्या मर्यादा काय असाव्या ह्याविषयीं कामगार पक्षाच्या लोकांच्या दृष्टीनें सरकारनें आणखी पुढें जाऊन मोठमोठे धंदे व मालमत्ता ह्यांवरहि हुकमत चालवणें अगत्याचें होतें. नागरिकांवर कामाची सक्ती करावयाची तर त्यांची मालमत्ता व संपत्ती ह्यांवरहि सरकारनें आपला ताबा कां बसवूं नये ? असा कामगार प्रतिनिधींचा सवाल होता. ह्यावर कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचें असें म्हणणें होतें कीं लोकांकडून सक्तीनें काम घेण्याच्या तत्वाचा त्यांची संपत्ती हिरावून घेण्याशीं कांहींच संबंध नाहीं. शिवाय, प्राप्तीवरील कर व जादा नफ्यावरील कर ह्यांची आकारणी इतकी जबर आहे कीं मोठ्या धंदेवाल्यांच्या मिळकती घेतल्यानें युद्ध कार्यास सरकारास सहाय होणें शक्य नाहीं. ज्या बाबतींत उद्योगधंद्यांचा किंवा मालमत्तेचा ताबा युद्धाचे दृष्टीनें घेणें आवश्यक वाटेल त्यांमध्यें सक्तीचा अंमल करण्याचा अधिकार सरकारास असून त्याचा उपयोग तें करीत आहे व करील. ह्याच्या पलीकडे जाण्याची आवश्यकता नसून तें इष्टहि नाहीं असें कामकरी पक्षाच्या सूचनेविरुद्ध प्रतिपादण्यांत आलें.

ब्रिटिश मंत्रिमंडळांत कामकरी वर्गाचे प्रतिनिधी असल्यामुळें कॉमन्स सभेंतील कामगार पक्षानें मि. चर्चिल ह्यांच्या सूचनेस उपसूचना पुढें मांडली, तीवरील चर्चा महत्वाची होती. कामगार मंत्री मि. बेव्हिन ह्यांनीं चर्चेचा समारोप केला आणि उपसूचनेंतील मुद्यांस उत्तर दिलें. इंग्लंडमध्यें सर्व पक्षांचें प्रतिनिधी असें संयुक्त मंत्रिमंडळ स्थापण्याचा हेतु ब्रिटिश राष्ट्राचें शक्तिसर्वस्व युद्ध यशस्वी करण्यावर एकवटावें हा होता. ह्या उद्देशाच्या परिपूर्तीच्या आड कोणीहि किंवा कांहींहि आलें तरी त्याची पर्वा करावयाची नाहीं हें मंत्रिमंडळाचें मूलग्राही धोरण असून विशिष्ट धंदा किंवा मिळकती सरकारच्या ताब्यांत घेण्याची आवश्यकता त्याच्या नजरेस आणल्यास इष्ट वाटल्यास त्यांचे बाबतींत सक्तीचा अंमल करण्यास आपण मागें पुढें पहाणार नाहीं असें मि. बेव्हिन म्हणाले. व्यक्तींवर कोणत्याहि तऱ्हेची सक्ती होणें आपणांस तत्त्वतः पसंत नाहीं, पण युद्धपरिस्थितीमुळें सक्ती करणें अपरिहार्य झाल्यास त्या प्रसंगास आपण तोंड दिल्यावांचून रहाणार नाहीं असेंहि त्यांनीं सांगितलें. युद्धपरिस्थितीचा अयोग्य फायदा घेऊन आपल्या ध्येयवादाचें घोडें दामटण्याचा प्रयत्न समाजसत्तावाद्यांनीं करूं नये असें कॉमन्स सभेंत उपसूचना पुढें मांडणाऱ्या सभासदांस बजावण्यांत आलें होतें. हीच वृत्ती अखेर प्रभावी ठरून मंत्रिमंडळाचा ठराव प्रचंड बहुमतानें पास झाला. युद्धाचा शेवट शक्य तितक्या त्वरित यशस्वी रीतीनें करण्याचा ब्रिटिश राष्ट्राचा निश्चय त्यानें, राज्यकर्त्यांस सक्तीचे अधिकार पार्लमेंटमार्फत दिले आहेत, ह्यावरून स्पष्ट होतो.

## हिंदी भुइमुगाचें पीक

(१९४१-४२)

| प्रांत अगर संस्थान | १९४१-४२ | १९४०-४१ | घट (–) |
|---|---|---|---|
| | आकडे हजार | एकरांचे | आहेत |
| मद्रास | २,०७६ | ३,१४३ | –१,०६७ |
| मुंबई | २,१०० | २,४४७ | –३४७ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | २१३ | २३३ | –२० |
| ओरिसा | १८ | २० | –२ |
| हैद्राबाद | १,११५ | १,३०८ | –१९३ |
| म्हैसूर | १३९ | १८५ | –४६ |
| एकूण | ५,६६१ | ७,३३६ | –१,६७५ |

भुइमुगाच्या लागवडींत गेल्या वर्षीच्या मानानें २३% घट पडली. मद्रास प्रांतांतील लागवड एकूण लागवडीच्या ४५·२% आहे. तेथील लागवड १९४०–४१ च्या लागवडीचे मानानें ३०% कमी झाली आहे, ह्याचें कारण लागवड कमी करण्यासंबंधानें केलेला यशस्वी प्रचार, हें होय. मुंबई प्रांतांतील लागवड कमी होण्याचीं प्रमुख कारणें अपुरा पाऊस, परदेशी बाजारपेठेचा अभाव, कमी भाव मिळण्याची भीति, हीं आहेत. एकूण लागवडीपैकीं २७% लागवड मुंबई प्रांतांतील आहे.

भुइमुगाच्या तेलाचे उत्पादनांत हिंदुस्थानाचा अनुक्रम पहिला लागतो. भुइमुगाच्या जागतिक उत्पादनापैकीं एक तृतीयांशापेक्षा अधिक उत्पादन एकट्या हिंदुस्थानांत होतें, परंतु दर एकरी उत्पादन मात्र ९०० पौंड आहे. चीनमध्यें तें १,६०० पौंड व मॉरिशसमध्यें २,२०० पौंड पडतें.

गेल्या चाळीस वर्षांत हिंदुस्थानांतील भुइमुगाची लागवड झपाट्यानें वाढली आहे. चाळीस वर्षांपूर्वी ३ लक्ष एकर लागवड होती ती १९३७-३८ मध्यें ९० लक्ष एकरांवर गेली. त्या वर्षी ३६ लक्ष टन भुइमुगाचें उत्पादन झालें. १९३९-४० मधील लागवड ८० लक्ष एकरांची आहे.

चालू युद्धापूर्वी फ्रान्स, नेदरलंड्स, ग्रेटब्रिटन, जर्मनी आणि इटली ह्या देशांत हिंदी भुइमूग मुख्यतः खपत असे. १९३३-३४ ते १९३७-३८ ह्या मुदतींत त्या देशांनीं हिंदी निर्गतीपैकीं ८७% भुइमूग घेतला. फ्रान्सचा वाटा ३२%, नेदरलंडसचा २०% व ग्रेटब्रिटनचा १७%, होता.

हिंदी भुइमुगाची निर्गत मोठ्या प्रमाणावर होत असली, तरी भुइमुगाच्या तेलाची निर्गत फार थोडी आहे. ब्रम्हदेश, सिलोन, मॉरिशस, स्टेट्स सेटलमेंट्स, इत्यादि देश ह्या तेलाची प्रमुख गिऱ्हाइकें आहेत. भुइमुगाची पेंड मुख्यतः ग्रेटब्रिटनकडे जाते.

भुइमुगाचा अंतर्गत खप हळुहळु वाढत आहे. एकूण उत्पादनापैकीं एक अष्टमांश बियांसाठी लागतें व एक सोळांश दाण्यांच्या स्वरूपांत खपतें. दोन पंचमांश उत्पादनाचा विनियोग तेल गाळण्याकडे व पेंड करण्याकडे होतो.

दर माणशी दाण्यांचें खाण्याचें प्रमाण १½ पौंडापेक्षाहि कमी आहे. ब्रम्हदेशांत तें २½ पौंड पडतें.

## पंजाबमधील बँका

१९२९ सालीं पंजाबमध्यें एकूण १७ बँका नोंदलेल्या होत्या; त्यांची संख्या आतां ४१ झाली आहे. पंजाबाबाहेर नोंदलेल्या बँकांच्या पंजाबांतील शाखांची संख्या ह्या मुदतींत ४१ ची १२५ झाली.

पंजाबांत नोंदलेल्या बँकांपैकी चार बँका शेड्यूल्ड बँका आहेत, त्यांचीं नांवें पंजाब नॅशनल बँक, पंजाब को. बँक, पंजाब अँड सिंध बँक व सिमला इंडस्ट्रिअल अँड बँकिंग कंपनी अशीं आहेत. ह्या चारांत मिळून सर्व बँकांतील ठेवींपैकी ८३% ठेवी आहेत व १७% ठेवी बिगर-शेड्यूल्ड बँकांत आहेत. शेड्यूल्ड बँकांच्या ९४ शाखांपैकीं ६५ शाखा पंजाबमध्येंच आहेत. चारी शेड्यूल्ड बँकांत मिळून ११ कोटि रुपयांच्या ठेवी आहेत व त्यांचें भांडवल आणि रिझर्व्हज् अनुक्रमें ४९ लक्ष रुपये व ५२ लक्ष रुपये आहे. बँकांच्या ठेवींशीं त्यांनीं रोख्यांत गुंतविलेल्या रकमेचें प्रमाण ४७% पडतें व कर्जाचें ठेवींशीं प्रमाण ४२·३% पडतें. धान्य, कपास इत्यादींचें तारणावर बावयाच्या कर्जावरील व्याजाचे दर चारी बँकांनीं सहमतानें ठरविलेले आहेत. मुंबई, कलकत्ता, इत्यादि ठिकाणांपेक्षा पंजाबमधील बँकांना ठेवींवर जास्त दरानें व्याज द्यावें लागतें.

पंजाबांत नोंदलेल्या बिगर-शेड्यूल्ड बँकांची संख्या ३७ आहे. त्यांपैकी २५ बँकांचें भाग-भांडवल व रिझर्व्हज ५० हजारांवर असून बाकीच्या १२ बँकांचें त्याहूनहि कमी आहे. ह्या २५ बँकांकडे एकूण २ कोटि, ४० लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत; म्हणजे प्रत्येक बँकेंत सरासरीनें ९ लक्ष, ५५ हजारांच्या ठेवी आहेत. लहान, १२ बिगर-शेड्यूल्ड बँकांत मिळून १८½ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. म्हणजे प्रत्येकीची सरासरी १½ लक्ष रुपये ठेवींची आहे.

पंजाबांतील बँकांच्या एकूण कचेऱ्यांची संख्या २५० आहे. त्यांत इंपीरिअल बँकेच्या ६०, एक्स्चेंज बँकांच्या १४, इतर शेड्यूल्ड बँकांच्या ११० व बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या ६० कचेऱ्या आहेत. पंजाबांतील २०० गांवांपैकीं १०० गांवांत अद्याप बँक नाहीं.

## दुभत्या जनावरांची हत्या

दुभत्या गाई व म्हशी खेडेगांवांतून शहरांत आणण्यांत येतात, परंतु त्या पारठ्या झाल्या कीं त्या कसायास विकल्या जातात. त्यांची निगाहि नीट न ठेवल्याकारणानें पुढील वेतांस त्या नालायक होतात. चांगलीं दुभती जनावरें शहरांत आणलीं जातात, व त्यांचाच नाश झाला म्हणजे सहाजिकच दुभत्या जनावरांच्या संपत्तीचा नाश होतो. इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें ह्या प्रश्नाचा विचार करून मुंबई, कलकत्ता व मद्रास ह्या शहरांतील परिस्थितीची पहाणी करण्याकरितां एक कमिटी नेमली आहे. (१) गोठे शहराबाहेर नेणें कितपत व्यवहार्य होईल? (२) तें व्यवहार्य असल्यास, तें कसें घडवून आणतां येईल? (३) तें व्यवहार्य नसल्यास, त्यांत सुधारणा कशी करतां येईल? (४) दुभत्या जनावरांची शहरांकडे होणारी आयात कमी झाल्यास खेडेगांवांतील लोकांचे धंद्यावर काय परिणाम होईल? ह्या चार प्रश्नांसंबंधीं कमिटीनें तपशीलवार चौकशी करावयाची आहे. कमिटीनें एक प्रश्नपत्रिका तयार केली आहे, तिला उत्तरें ३० डिसेंबर अखेर मिळालीं पाहिजेत.

# स्फुट-विचार

## जपानची आकस्मिक चढाई

अमेरिका आणि जपान ह्यांचेमध्यें उत्पन्न झालेली तेढ नाहींशी होऊन पूर्व एशियांत जमूं लागलेले युद्धाचे ढग दूर व्हावे ह्यासाठीं वॉशिंग्टनमध्यें ह्या दोन राष्ट्रांच्या वाटाघाटी चालल्या होत्या त्यांचा निर्णय लागून जाहीर होण्यापूर्वीच जपाननें चढाई आरंभून युद्धाचा वणवा एकाएकी पेटवला आहे. अमेरिका व इंग्लंड ह्यांचेवर हल्ले चढवण्याची तयारी चालू असतां तिला वेळ मिळावा म्हणून जपाननें वाटाघाटीचें सोंग मांडलें होतें ही गोष्ट आतां स्पष्ट झाली आहे. पूर्व एशियांतली आपली राजकीय महत्त्वाकांक्षा आवरून धरण्यास जपान तयार नाहीं हें जपानी मुत्सद्दी व वर्तमानपत्रें ह्यांच्या अलीकडील लढाऊ भाषेवरून दिसतच होतें. ह्या कारणानें इंग्लंडनें सिंगापूर येथें संरक्षणाचा बंदोबस्त केला होता. इंडोचायनामध्यें मोठी जपानची फौज गोळा झाली होती आणि थायलंडवर स्वारी करण्याचा जपानचा बेत अजमावतां येत होता. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड व अमेरिका हीं राष्ट्रें सावधगिरीनें वागत होतीं, परंतु जपानच्या बाजूनें युद्धाचा स्फोट असा अचानक रीतीनें होईल अशी त्यांस कल्पना नव्हती. प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं जपाननें पॅसिफिक महासागरांत शांततेचा भंग करूं नये ह्यासाठीं शक्य तेवढी खटपट केली. जपाननें कोरूसो ह्या आपल्या खास वकिलास वॉशिंग्टनला पाठवलें तेव्हां त्याची मध्यस्थी युद्ध टाळण्याचे कामीं उपयोगी ठरेल असें वाटण्यास जागा उत्पन्न झाली होती. पूर्व एशियामध्यें आपलें राजकीय वर्चस्व प्रस्थापित झालें पाहिजे हा आग्रह सोडण्यास जपान तयार होईना. त्या देशांतील नवीन मंत्रिमंडळ दंडुकेशाही वृत्तीचें आहे आणि त्यास जर्मनीचें प्रोत्साहन आहे. इंग्लंड व अमेरिका ह्यांचेविरुद्ध जपानला उठवण्याचें राजकारण हिटलर लढवीत राहिला आहे आणि तें जपानी मुत्सद्यांच्या लढाऊ भूमिकेशीं जुळतें झाल्याकारणानें आतां प्रस्तुत युद्धास "जागतिक युद्ध" हें नांव सार्थ झालें आहे. अगदी निर्वाणीचा प्रयत्न म्हणून प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं जपानच्या बादशहास खास संदेश पाठवूनहि जपानला युद्धापासून परावृत्त करण्याचा खटाटोप केला. पण वॉशिंग्टन येथें शांततेविषयीं दोन पक्षांच्या वाटाघाटी एकीकडे चाललेल्या असतांनाच जपाननें पॅसिफिक महासागरांतील अमेरिकन ठाण्यांवर हल्ले चढविले. पूर्वसूचना न दतां जपाननें लढाया आरंभल्या आहेत आणि युद्धांतली पहिली गोळी झाडली आहे. जपानचें हें आव्हान अमेरिका व इंग्लंड ह्यांनीं अर्थातच स्वीकारलें आहे आणि त्या राष्ट्रानें केलेला विश्वासघात व त्याची मुजेरखोर पुंडाई ह्यांचा योग्य समाचार तीं राष्ट्रें घेतीलच. पूर्वेच्या बाजूनें युद्ध हिंदुस्थानाच्या जवळ येण्याची भीति आज कित्येक महिने वाटत होती ती आतां खरी ठरली आहे. अमेरिका व इंग्लंड पूर्व एशियांत आपणांस घेरीत आहेत आणि तेथील आपल्या ईश्वरदत्त जहागिरींत हात घालीत आहेत ही जपानची सबब किती लंगडी आहे, हें त्या राष्ट्रानें मँच्युकाओ व चीन ह्या देशांत केलेल्या व चालवलेल्या दंडेलीवरून अगोदरच सिद्ध झालें आहे. जपानचें सध्याचें आक्रमण ही शुद्ध पुंडाई असून तिचा बीमोड करण्याचे संघटित आणि निकराचे प्रयत्न आतां झाले पाहिजेत. ह्या बाबतींत हिंदुस्थानावर जबाबदारी प्रत्यक्षच येऊन पडली आहे आणि ती कसोशीनें पार पाडण्यांत आली पाहिजे.

---

## लिबियामधील लढाया

इजिप्तच्या पश्चिम सरहद्दीवरून ब्रिटिशांनीं अचानक मोठ्या प्रमाणावर चाल केली तीमध्यें त्यांस नांव घेण्यासारखें यश आलें. लिबियामध्यें जनरल रॉमेलच्या हाताखालीं असलेली जर्मन फौज चोहोंकडून घेरली गेली आणि विमानें व चिलखती गाड्या ह्यांच्या संख्येच्या बाबतींत वर्चस्व ब्रिटिशांच्या बाजूस राहिलें. टोब्रुकमध्यें कित्येक महिने ठाणें धरून राहिलेली ब्रिटिश फौज बाहेर पडली आणि तिनें पूर्वेकडील मुख्य ब्रिटिश सैन्यास मिळण्याचा प्रयत्न केला. जनरल रॉमेल पेचांत सापडला असतां त्यानें स्वतःच्या भोंवतीं पडलेला घेर फोडून बाहेर पडण्याची धडपड चालवली आहे. लिबियाच्या वाळवंटांत सोळाशे चौरस मैलांच्या विस्तृत क्षेत्रांत ह्या लढाया चालल्या आहेत हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. इतर युद्ध क्षेत्रांप्रमाणें तेथें पद्धतशीर रीतीनें व व्यवस्थित क्रमानें लढाया होऊंच शकत नाहींत. विशिष्ट मुलूख जिंकून तो आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रश्न तेथें उद्भवत नाहीं. लिबियांतील ब्रिटिशांच्या मोहिमेचा हेतु शत्रूचें लढाऊ सामर्थ्य नष्ट करावयाचें आणि त्याच्या युद्धसामुग्रीचा नाश करून टाकावयाचा हा आहे. त्या कारणानें ब्रिटिश व जर्मन सैन्यांनीं विशिष्ट ठिकाणें परस्परांच्या हातून पुन्हां घेतलीं अशा आशयाच्या येणाऱ्या बातम्यांचें आश्चर्य वाटावयास नको. सिद्धी रझेक आणि बीर एल हामीद हीं महत्त्वाचीं ठाणीं ब्रिटिशांनीं हस्तगत केलीं होतीं तीं जनरल रॉमेलच्या सैन्यानें परत घेतलीं असल्याची बातमी ह्याच प्रकारची आहे. पंधरा दिवस सारख्या चाललेल्या घुमश्चक्रीनंतर लढणाऱ्या दोन्ही बाजू आपल्या सैन्यांची जुळवाजुळव पुन्हां करीत आहेत. लिबियांत ब्रिटिशांचें लढाऊ सामर्थ्य एवढें मोठें आहे कीं त्यांच्या अंतिम विजयाबाबतचा विश्वास पूर्णपणें साधार आहे. अलीकडे पुनश्च चालू झालेल्या लढायांत त्यांची होत असलेली सरशी ह्याची द्योतक आहे.

---

## रॉस्टॉव्ह येथील जर्मनीचा पराभव

रशियांतील दक्षिणेकडील रणभूमीवर टिमोशेंको ह्या सेनानीनें फौजेची नीट जुळवाजुळव करून रॉस्ट्रॉव्हमधून जर्मन सैन्यांस हाकून लावून त्यांची पिछेहाट चालली असतां त्यांचा पाठपुरावा केला आहे. इकडे क्रायमिया व्यापून रॉस्टॉव्हच्या पुढें जर्मनी चाल करून जाणार आणि कॉकेशस प्रांताकडे मोर्चा वळवून तिकडील राकेल तेलाचा पुरवठा आपल्या ताब्यांत घेणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. प्रत्येक पावलास शत्रूची भयंकर हानी करून रशियन सैन्यें व्यवस्थेनें मागें हटत होतीं. युक्राइन प्रांत पादाक्रांत करून जर्मन फौज पूर्वेकडे घुसूं लागली तेव्हां तिचा प्रतिकार यशस्वी रीतीनें होण्यास आणि तिची प्रगति थांबण्यास रशियन सैन्याची पुनर्रचना त्या बाजूस कार्यक्षम केली जाणें आवश्यक होतें. ही कामगिरी स्टालिननें टिमोशेंको ह्या संधा लढवय्याकडे सोपवली, हा त्याचा टिमोशेंकोवरील विश्वास किती साधार होता हें त्या सेनानीनें रॉस्टॉव्ह हें महत्त्वाचें शहर जर्मनांच्या हातांतून हिसकावून घेऊन त्यांस तेथून पिटाळून लावलें आहे ह्यावरून सिद्ध होत आहे. जर्मन सैन्यास ह्या युद्धांत सोसावा लागलेला हा पहिलाच महत्त्वाचा अपजय आहे. रॉस्टॉव्हमधून त्यास पलायन करावें लागलें आहे, इतकेंच नव्हे तर पाठलाग करणाऱ्या रशियन फौजेस तोंड कसें द्यावें ह्याची त्यास पंचाइत होऊन गेली आहे. पश्चिमेच्या बाजूस

सर्बेस्टॅपूल हें राशियाचें बंदिस्त ठाणें अजून शत्रूशी लढतच आहे. जनरल फॉन क्लाइस्ट ह्याची पीछेहाट करणारी फौज आतां कोठें थांबून लढण्याची तयारी करते हेंच टिमोशेंको ह्यांस पहावयाचें असून शत्रूपासून परत घेतलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावावयाची आहे. रॉस्टॉव्हचा रशियानें मिळवलेला विजय उत्साहजनक आहे ह्यांत शंका नाहीं.

## मॉस्कोचा निकराचा बचाव

जनरल शिकॉस्को, स्वतंत्र पोलिश लोकांचे पुढारी व सेनानी, मॉस्कोस गेले असून रशियांतील आपल्या देशबांधवांची फौज तयार करण्याच्या योजनेविषयीं स्टालिन ह्यांच्याशीं चर्चा करीत आहेत. त्यांनीं मॉस्को येथें गेल्यावर काढलेले उद्गार प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून रशियन राजधानीच्या संरक्षणासाठी घनघोर संग्राम चालला आहे त्याविषयीं यथार्थ कल्पना येते. मॉस्को सर करून त्यांत आपण प्रवेश करणार असल्याच्या वल्गना हिटलरनें चार महिन्यांमागें केल्या होत्या, त्या स्टॅलिनच्या नेतृत्वाखाली रशियन फाजांनीं नेटानें व शौर्यानें लढून फोल ठरवल्या आहेत असें जनरल शिकॉस्को म्हणाले तें अक्षरशः खरें आहे. मॉस्को शहर चारी दिशांनीं घेरून त्याचा बचाव अशक्य करावयाचा असा जर्मनीचा बेत होता, आणि त्यास अनुसरून हिटलरच्या फौजा उत्तर, पश्चिम व दक्षिण ह्या दिशांनीं रशियन राजधानीवर लगट करीत आहेत. परंतु मॉस्कोच्या बचावासाठी रशियन सारखे निकरानें लढत असून त्यांनीं शत्रूची गती बहुतेक बाजूंनीं कुंठित केली आहे. रशियन सैन्यें स्वतःचा बचाव करून स्वस्थ रहात नसून संधी मिळेल तेथें शत्रूवर उलट हल्ले करीत आहेत. त्यांनीं जर्मनीचे सैनिक व युद्धसामुग्री ह्यांचे मोठ्या प्रमाणावर बळी घेतले आहेत. त्यांची चिकाटी खरोखर कौतुकास्पद आहे. एका बाजूनें शत्रू मॉस्कोजवळ हळुहळु येऊं लागला तरी त्यास शक्य तेथें डांबण्याचा व मागें रेटण्याचा निकराचा प्रयत्न रशियन फौजांनीं चालू ठेवला आहे. आपला कितीहि नाश झाला तरी हिटलर नवीन नवीन चिलखती गाड्या व इतर सामुग्री मॉस्को-भोंवतालच्या रणांगणांवर पाठवीत आहे त्यांचा योग्य समाचार घेण्याचा स्टॅलिन आणि त्याच्या फौजा ह्यांचा निश्चय कायम आहे.

## गव्हाचा बाजारभाव वाढूं न देण्याचा प्रयत्न

सुमारें दोन महिन्यापूर्वी, हिंदुस्थान सरकारनें गव्हावरील आयात जकात दर हंड्रेडवेटास १ रु. ८ आ. होती ती दर हंड्रेड-वेटास २ आणे केली असल्याचें जाहीर केलें. मध्य आशियांतील फौजांस गहू मोठ्या प्रमाणावर पाठवावा लागत असल्या कारणानें हिंदुस्थानांतील गव्हाच्या साठ्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होणार व साठा कमी पडणार, ह्या दृष्टीनें गव्हाच्या आयातीस उत्तेजन देण्याकरितां आयात जकात उतरविण्यांत आली, असें तेव्हां प्रसिद्ध झालें होतें. गव्हाच्या पुरवठ्याचे व साठ्याचे संबंधांतील परिस्थिति आतां अधिकच बिकट झाली असल्याकारणानें सरकारनें आयात जकात अजीबातच काढून टाकली आहे. पंजाबांतील लियालपूर व हापूर हीं गव्हाच्या विक्रीचीं प्रमुख केंद्रें आहेत, तेथील घाउक विक्रीचा भाव मणास ४ रु. ६ आ. असा सरकारनें ठरवून दिला आहे. इतर ठिकाणचा भाव, वरील केंद्रांतील बाजारभावाचें अनुरोधानें ठरविण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस देण्यांत आला आहे. गव्हाच्या बाजारांतील चणचण कमी करण्याचा हा प्रयत्न आहे. गहू पेरणाऱ्या शेतकऱ्यांस गेलीं वीस वर्षे मंदीचीं गेलीं व आतां चांगला भाव मिळण्याची संधि आली असतां, आयातीस उत्तेजन देऊन व कमाल भाव ठरवून टाकून सरकारनें शेतकऱ्यांचें हित पाहिलें नाहीं, अशी सरकारी धोरणावर टीका करण्यांत आली आहे.

## आंतरराष्ट्रीय साखर करार

साखरेच्या निर्गतीचें नियंत्रण करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कराराची मुदत ३० एप्रिल, १९४२ रोजीं संपते. १९३७ सालीं हा करार झाला, त्यावेळीं हिंदुस्थानाचे प्रतिनिधीनें इतर देशांकडे हिंदुस्थान साखरेची निर्गत करणार नाहीं, असा ह्या देशावरील निर्बंध मान्य केला. नवीन कराराचे वेळीं तरी हा निर्बंध दूर होणें आवश्यक आहे, ह्याविषयीं विवेचन "अर्था"मध्यें नुकतेंच येऊन गेलें आहे. पुढील धोरणाविषयीं खलबतें आतां सुरू झालीं आहेत व युद्धसमाप्तीपर्यंत कराराची मुदत लांबविण्यांत येईल, अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. करारावर सही करणाऱ्या राष्ट्रांपैकीं कित्येक राष्ट्रें जर्मन सत्तेखालीं गेलीं आहेत व तो गट वगळला तर उरलेल्या प्रदेशापुरता करार कायम रहाण्यास हरकत नाहीं; जरूरीप्रमाणें त्यांत बदल केला म्हणजे झालें, अशा आशयाचें धोरण स्वीकारलें जाण्याचा संभव आहे. हिंदी साखरेचा सुधारलेला दर्जा व साखरेचें वाढलेलें उत्पादन हीं लक्षांत घेऊन हिंदुस्थानाचें दृष्टीनें करारांत सुधारणा होणें आवश्यक आहे.

## फिलिपाइन्स

फिलिपाइन्समध्यें ७,०८३ बेटांचा समावेश होतो व त्यांत १ कोटि, ६० लक्ष लोकसंख्या आहे. १८९८ सालीं अमेरिकेनें ह्या बेटांचा ताबा घेतला. अमेरिकेंत खपेल अशा कच्च्या मालास उत्तेजन देण्याचा अमेरिकेचा प्रयत्न होता. फिलिपाइन्समधील १०% लोक साखरेच्या धंद्यावर अवलंबून आहेत. सरकारी मालकीच्या मणिला रेल-रोड कंपनीचे शेकडा ४० उत्पन्न साखरेच्या धंद्याच्या वहातुकीपासून मिळतें. फिलिपाइन्समधील लागवडीखालील जमिनीपैकीं एक तृतीयांश जमीन नारळाखाली आहे. ३०% लोकांचा उदरनिर्वाह नारळांच्या लागवडीवर अवलंबून आहे. ताग व तंबाखू हीं दुसरी दोन महत्त्वाचीं पिकें आहेत. ह्या एकट्या चार पिकांवर निम्म्यापेक्षां अधिक लोकसंख्येचें जीवन अवलंबून असणें इष्ट नाहीं. फिलिपाइन्समधील शेतकऱ्यांचें दारिद्र्य अतिशय तीव्र स्वरूपाचें आहे.

### प्रभा इनव्हेस्टमेंट्स लि.

वरील कंपनी मुंबई येथें नोंदण्यांत आली असून तिचे उत्पादक श्री. व्ही. पी. वर्दे हे आहेत. इनव्हेस्टमेंट्चा धंदा करणें हें कंपनीचें उद्दिष्ट आहे. तिचें अधिकृत भांडवल १ लक्ष रुपये आहे.

### अफगाणिस्तानांत कोळशाच्या खाणी

अफगाणिस्तानांत कोळशाच्या खाणींचा शोध लागला आहे. हा कोळसा भुकटीच्या स्वरूपांत असल्या कारणानें त्याच्या विटा करण्याकरितां अफगाण सरकारनें यंत्रसामुग्री मागवली आहे.

### गुजरात सेफ डिपॉझिट कं. लि.

वरील कंपनीच्या लॉकर्सपैकीं १,४२७ कप्पे भाड्यानें गेले आहेत. कंपनीला ३० सप्टेंबर, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी १४ हजार रुपये नफा झाला.

## इन्कमटॅक्स कायद्याची भूमिका

( लेखकः—श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, सातारा. )

१८८६ सालापूर्वी "इन्कमटॅक्स कायदा" असा सर्व हिंदुस्थानास लागू होणारा कायदा नव्हता. कांहीं प्रांत व इलाखे ह्याकरितां उत्पन्नावर कर घेणारे स्थानिक कायदे मात्र होते. १८८६ मध्यें प्रथमच सर्वव्यापी असा इन्कमटॅक्स कायदा (१८८६ चा दुसरा) सर्व हिंदुस्थानाकरितां केला गेला. ह्या कायद्यामध्यें वेळोवेळीं कांहीं दुरुस्त्या होऊन शेवटीं पुन्हां १९१८ चा ७ वा असा नवीनच इन्कमटॅक्स कायदा पास झाला. ह्या कायद्यामध्यें "एकंदर उत्पन्न" व 'कर घेण्यालायख उत्पन्न' असा फरक करण्यांत आला व कर–आकारण्याची व वसूल करण्याची पद्धति, कोणत्या उत्पन्नावर कर आकारावयाचा वगैरे गोष्टींत या कायद्यानें सुसंगतपणा व व्यवस्थितपणा आणिला. पुढें एक "सर्व हिंदुस्थान–इन्कमटॅक्स कमिटी" "The All India Income Tax Committee" नेमिली होती. या कमिटीचा रिपोर्ट १९२१ सालीं प्रसिद्ध झाला व ह्या रिपोर्टास धरून १९२२ सालीं पुन्हां १९२२ चा अकरावा असा नवीन इन्कमटॅक्स कायदा पास झाला व तोच कायदा हल्लीं सर्व हिंदुस्थानभर लागू आहे. कायद्याच्या बजावणीच्या कामीं व करवसुलीमध्यें जसजशा अडचणी उपस्थित झाल्या तसतसे वेळोवेळीं इन्कमटॅक्स दुरुस्त कायदे (Income Tax Amendment Acts) पास करण्यांत आले. ह्याप्रमाणें १९२५ चा १६ वा, १९२६ चा २४ वा, १९२८ चा ३ रा, १९३० चा २१ वा व २२ वा, १९३३ चा १८ वा व १९३७ चा ४ था असे दुरुस्त कायदे १९२२ च्या ११ व्या कायद्यांत समाविष्ट करण्यांत आले. ह्याप्रमाणें १९२२ सालापासून ह्या कायद्याची अम्मलबजावणी झाल्यानंतर प्रातिवरील कराची आकारणी व्यवस्थित कशी करावी आणि या कराच्या आकारणींतून कर देण्यास पात्र असलेलें उत्पन्न ज्याचें आहे असा कोणीही इसम निसटून न जाईल अशी तरतूद कशी करावी यासंबंधाच्या मुख्यत्वेंकरून सूचना करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें १९३५ सालच्या आक्टोबर महिन्यांत एक कमिटी नेमिली होती. ह्या कमिटीसाठी मेसर्स आयर्स व चेंबर्स असे दोन इन्कमटॅक्स तज्ज्ञ विलायतेहून आणविले होते आणि हिंदुस्थानांत त्या खात्यांत काम करीत असलेले एक अनुभवी अधिकारी खानबहादूर वाच्छा यांना त्या तज्ज्ञांच्या जोडीस दिले होते. असे त्या कमिटीचे तीन सभासद होते. ह्या कमिटीनें हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं हिंडून तोंडी पुरावा घेतला व निरनिराळ्या व्यक्ती व संस्था ह्यांचीं लेखी मतेंही मागविलीं. ह्याप्रमाणें आलेल्या सर्व सूचनांचा विचार करून कमिटीनें आपला रिपोर्ट १९३६ सालीं हिंदुस्थान सरकारास सादर केला. त्या रिपोर्टांत केलेल्या शिफारसीस धरून हिंदुस्थान सरकारनें एक बिल तयार केलें व तें कायदेमंडळामार्फत पास करून घेतलें तोच १९३९ चा सातवा इन्कमटॅक्स दुरुस्त कायदा होय. हल्लीं चालू असलेला कायदा म्हणजे १९२२ चा ११ वा इन्कमटॅक्स कायदा पुढें वेळोवेळीं निरनिराळ्या, १९३९ च्या सातव्या कायद्यासुद्धा दुरुस्त झालेला कायदा होय.

### स्लॅब पद्धति

१९३९ च्या सातव्या कायद्यानें मूळ १९२२ च्या ११ व्या कायद्यांत फार मूलग्राही दुरुस्त्या केल्या आहेत. त्यामुळें मूळ कायद्याचें स्वरूप अगदीं बदलून पुष्कळ बाबतींत नवीनच कायदा झाला आहे असें म्हणणें योग्य होईल. आतां प्राप्तीवरील कर चुकविण्याच्या ज्या पळवाटा होत्या त्या जवळजवळ बंदच झाल्या आहेत व कर आकारण्याच्या पद्धतींत शास्त्रीयदृष्ट्या योग्य त्या सुधारणा केल्या आहेत. मुख्य सुधारणा म्हणजे प्राप्तीवरील कर आकारण्याच्या 'स्टेप' पद्धतीऐवजीं स्लॅब पद्धति अमलांत आणली आहे. या पद्धतीमुळें इन्कमटॅक्स भरणाऱ्या सुमारें तीन लाख लोकांपैकीं दोन लाख साठ हजार लोकांवरील या कराचें ओझें थोडेंबहुत हलकें होणार आहे. पूर्वीच्या कर आकारण्याच्या स्टेप पद्धतींत कराची आकारणी करण्याचा दर एका रकमेपासून दुसरीकडे जलद उडी मारत असे. प्रथम दोन हजारापर्यंत कराचा दर शेंकडा २$\frac{१}{८}$ असे; दोन हजारापासून पांचहजारापर्यंत तो ३$\frac{१}{१०}$ पासून एकदम ४$\frac{५}{१६}$ पर्यंत गेला. नवीन अमलांत आलेल्या स्लॅब पद्धतींत कराची आकारणी एकदम वाढत नसून एक रुपया उत्पन्न वाढल्यास कराच्या दरांत अत्यंत सूक्ष्म प्रमाणांत वाढ होत असते.

### अपील

कराची आकारणी अन्यायाची व चुकीची झाली असल्यास त्याविरुद्ध अपील करण्याची पद्धति पूर्वीच्या कायद्यांतही होती पण यांतील पहिले अपील असिस्टंट कमिशनरकडे होतें. करवसुलीच्या खात्याशीं ज्याचा साक्षात् संबंध आहे अशा अधिकाऱ्याकडेच त्याच्या हाताखालील लोकांनीं केलेल्या अन्यायाविरुद्ध अपील चालत असल्यानें अपील करणारास न्याय मिळण्याचा संभव कमी असतो. यास्तव ज्याच्याकडे अपीलें ऐकण्याचें काम असेल त्या अधिकाऱ्याकडे कर-वसुलीच्या देखरेखीचें काम असूं नये असें आतां ठरवून अपेलेट असिस्टंट कमिशनर व इन्स्पेक्टिंग असिस्टंट कमिशनर असे असिस्टंट कमिशनरचे दोन भेद करून असिस्टंट अपेलेट कमिशनरकडे खात्याच्या वसुलीच्या देखरेखीचें कोणतेंही काम ठेविलेलें नाहीं. असिस्टंट अपेलेट कमिशनरनें दिलेल्या निकालाविरुद्ध दुसरें अपील करण्याचाही हक्क आतां दिला आहे. हें दुसरें अपील इन्कमटॅक्स अपेलेट ट्रायब्युनल (Appellate Tribunal) कडे करावयाचें आहे. ह्यामध्यें दहापर्यंत स्वतंत्र व निःपक्षपाती लोक असणार. ह्या लोकांपैकीं निम्मे लोक हायकोर्ट जज्जाच्या लायकीचे असून निम्मे अकौंटमध्यें तज्ज्ञ असलेले अकौन्टंट असणार. ह्यामुळें कराच्या आकारणीच्या बाबतींत अन्याय झाल्यास योग्य न्याय मिळण्याची तरतूद कायद्यामध्यें आतां केलेली आहे.

इन्कमटॅक्स ऑफिसरनें जाहीर नोटीस वर्तमानपत्रांत दिल्यानंतर ज्याचें उत्पन्न इन्कमटॅक्सला पात्र होण्याजोगें आहे त्यानें आपण होऊन आपलें उत्पन्न–पत्रक ६० दिवसांचे आंत अधिकाऱ्यांकडे पाठवावयाचें आहे. तसें न केल्यास असिस्टंट कमिशनरच्या संमतीनें सदर इसम दंडास पात्र होऊं शकेल. तसेंच एखाद्या व्यापाऱ्याचें कमी उत्पन्न धरून कर–आकारणी पूर्वी झाली आहे असें इन्कमटॅक्स ऑफिसरास वाटलें तर तो ८ वर्षीपर्यंतच्या उत्पन्नाचा अगर निदान चार वर्षांपर्यंतच्या उत्पन्नाचा फेरविचार करून त्यावर कर-आकारणी करूं शकेल. ह्या निर्बंधानें कर देण्यास पात्र असलेलें उत्पन्न ज्यांचे आहे असा कोणीही इसम कर–आकारणीपासून चुकून राहूं नये व कराची आकारणी वाजवीपेक्षां कमी होऊं नये अशी तरतूद कायद्यांत केली आहे.

### परदेशांतील उत्पन्न

ब्रिटिश हिंदुस्थानांतील नेहमीचा रहिवासी व त्यानें परदेशांत मिळविलेलें उत्पन्न ह्यासंबंधीं नवीन कायद्यांत खालील तरतूद केली आहे.

( १ ) जो हिंदुस्थानचा नेहमीचा रहिवासी नसेल अशा गृहस्थाच्या त्यानें हिंदुस्थानांत मिळविलेल्या अगर त्यानें परदेशांतून हिंदुस्थानांत आणलेल्या उत्पन्नावरच प्राप्तीवरील कर आकारण्यांत यावा. ( २ ) हिंदी नागरिकानें हिंदुस्थानाबाहेर मिळविलेल्या उत्पन्नापैकीं जेवढा भाग हिंदुस्थानांत आणला असेल त्याहून परदेशांतील त्याची त्या वर्षाची एकंदर प्राप्ती जितकी अधिक असेल त्यापैकीं ४'१०० रुपयाहून जी अधिक रकम राहील तेवढीच त्याच्या हिंदुस्थानांत आणलेल्या रकमेंत मिळवून त्यावर कर आकारणी करावी. यामुळें लहान प्रमाणावर परदेशांत व्यापार करणाऱ्या हिंदी नागरिकांवरील कराचें ओझें हलकें झालें आहे. ( ३ ) ज्या ब्रिटिश कंपनीचे व्यवस्थापक व नियामकमंडळ पूर्णतः हिंदुस्थानांत वास्तव्य करीत असेल ती कंपनी अगर ज्या कंपनीच्या एकंदर उत्पन्नापैकीं ५१ टक्के उत्पन्न हिंदुस्थानांतील व्यवहारामुळें झालें असेल ती कंपनी हिंदुस्थानची रहिवाशी समजून तिचें हिंदुस्थानांतील व हिंदुस्थानाबाहेरील उत्पन्न एकंदर करून त्यावर कर-आकारणी करावी. ( ४ ) कोणत्याही वर्षी हिंदुस्थानांत असलेला इसम, जर त्या वर्षापूर्वीच्या दहा वर्षांतील नऊ वर्षे हिंदुस्थानांत राहिलेला नसेल अगर त्या वर्षापूर्वीच्या सात वर्षांत, त्याचें हिंदुस्थानांतील एकूण वास्तव्य दोन वर्षांहून अधिक नसेल अशा इसमाला तो हिंदुस्थानचा रहिवासी आहे असें समजूं नये. ( ५ ) परदेशांत व्यापार करणाऱ्या हिंदी इसमाला त्या परदेशांतील उत्पन्नावर कर भरण्यासंबंधीं जर सवलत मिळत नसेल तर अशा हिंदी इसमाला परदेशांतील त्याच्या उत्पन्नावर त्या देशांतील सरकार जेवढा कर घेत असेल त्याच्या निम्म्या रकमेइतकी सूट हिंदुस्थानांत त्याच्यावर होणाऱ्या आकारणींत द्यावी. ( ६ ) ज्या ग्रेट ब्रिटनमधील कंपन्यांना त्यांच्या हिंदुस्थानांतील उत्पन्नावर ग्रेट ब्रिटनमध्यें कर भरावा लागतो त्यांच्या उत्पन्नावर हिंदुस्थानांत कर घेतला जात नाहीं.

### एकत्र कुटुंब पद्धतीवर घाला ?

एकत्र हिंदू कुटुंबाचे संबंध उत्पन्न एकाच मिळवित्या माणसाचें उत्पन्न आहे असें समजून त्यावर कराची आकारणी करावयाची आहे त्यामुळें एकंदर उत्पन्न पुष्कळ दिसून त्यावर कर आकारण्याचा दर जास्त होणार. त्यापेक्षां जर एकत्र कुटुंबातील सहभागीदार वेगळे राहूं लागले तर प्रत्येकाचें व्यक्तिशः उत्पन्न धरून त्यावर स्वतंत्रपणें कर द्यावा लागणार. अर्थात् प्रत्येकाचा कर आकारण्याचा दर निराळा असणार या दृष्टीनें कर देण्याच्या दृष्टीनें ज्या कुटुंबाचें उत्पन्न मोठें आहे अशा कुटुंबांतील सहभागीदारांनीं कर कमी द्यावा लागावा म्हणून वेगळें राहणेंच इष्ट होणार आहे. हा एकत्र कुटुंब-पद्धतीवर अप्रत्यक्षपणें घालाच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील नागरिकांची संस्थानांत अगर ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर कोठेंही शेती असली तर त्या शेतीच्या उत्पन्नावर कर आकारतां येतो.

याप्रमाणें नवीन इन्कमटॅक्स कायद्याचें सामान्य स्वरूप आहे. एकंदरीत विचार करितां हल्लीचा इन्कमटॅक्स कायदा हा पुष्कळच शास्त्रशुद्ध पायावर उभारला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेंक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## ग्रामसुधारणेशी संबंध असणाऱ्या उपयुक्त संस्था

### पुण्याबाहेरील संस्था

**ग्रामसेवकांच्या शिक्षणाचें मांजरी येथील केंद्रः**—हें पुणें-सोलापूर रस्त्यावर, पुण्यापासून ७½ मैलांवर आहे. शेतकी, सहकार, ग्रामोद्योग, इत्यादींचें शिक्षण देऊन सहकारी सोसायट्या, ग्रामपंचायती, शेतकी संस्था वगैरेंचे सेक्रेटरी तयार करणारी ही संस्था आहे.

**खेड येथील झाडें लावण्याचें क्षेत्रः**—पुणें-नाशिक रस्त्यावर, पुण्यापासून ३० मैलांवर आहे. महाराष्ट्रांतील झाडें नसलेल्या टेकड्यांवर झाडें वाढविण्याचा हा प्रयत्न आहे.

**शिरूर आरोग्य केंद्र**—पुणें-अहमदनगर रस्त्यावर घोडनदी येथें पुण्यापासून ४२ मैलांवर आहे. पुणें जिल्ह्यांतील शिरूर पेटा व अहमदनगर जिल्ह्यांतील पारनेर तालुका ह्यांतील सुमारें ५० खेडेगांवांचें आरोग्य सुधारणें हें ह्या केंद्राचें उद्दिष्ट आहे व रॉकफेलर फौंडेशनमधून त्याचा खर्च चालतो. रोगावर उपाय करण्यापेक्षा रोग उपस्थित होऊं न देण्याची खबरदारी घेण्याचें काम केंद्र करतें.

**पाडेगांव येथील ऊंस संशोधनः**—निरा रेल्वे स्टेशनजवळ हें संशोधन केंद्र आहे. महाराष्ट्रांतील कालव्यांचे पाण्यावर वाढतील अशा सकस उसाची लागवड काटकसरीची कशी होईल, ह्या दृष्टीनें प्रयोग येथें चालतात.

**सेंट्रल इरिगेशन व हैड्रोडायनॅमिक रिसर्च स्टेशन, खडकवासलें**:—हें केंद्र खडकवासल्याचे धरणाचे बांधाखालील बाजूस आहे. कालव्यांत वहात येणारी वाळू, नदीच्या पात्रांचें योग्य वळण, पाणी मोजण्याची एकजात पद्धति, पुलांचें संरक्षण, बांध न पडण्याची दक्षता, इत्यादिसंबंधीं प्रयोग करून प्रत्यक्ष अडचणी दूर करण्यास हें केंद्र सहाय करतें.

---

### सहकारी सोसायट्यांची अंतर्व्यवस्था

( लेः—ज्ञा. आ. सावंत, सुपरवायझर, शिरूर हवेली मावळ, ता. सु. यूनियन, पुणें. )

मराठी भाषेंत सहकारी संस्थांसंबंधानें व्यावहारिक माहिती देणाऱ्या पुस्तकांची अद्यापिहि उणीव आहेच. विशेषतः चळवळींतल्या व्यवहाराचें सरकारी धोरणांत ज्या झपाट्यानें फरक होत आहेत, कामकाजाच्या पद्धतींत फेरफार घडत आहेत, नवे कानू होत आहेत व सहकारी खात्याकडून मार्गदर्शक म्हणून निघणारीं सर्क्युलरें इतकी लागोपाठ निघत आहेत कीं त्यामुळें १५-२० वर्षे काम करणारांनाहि तोल संभाळून राहाणें मोठें अवघड झालेलें आहे. अशा वेळीं शेतकी सोसायट्यांच्या सेक्रेटरींचेसाठीं सहकारी खात्याचे वटहुकूम व पत्रव्यवहाराचे नमुने खात्याचे कृपेनें मिळवून एकत्र करून छापलें हें पुस्तकाच्या लेखकानें मोठेंच कार्य केलें आहे, यांत संशय नाहीं. सहकारी खात्याचें मॅन्युअल हल्ली बाजारांत उपलब्ध होत नाहीं. त्यामुळें अधिकृत नमुने एकत्र पहाण्यास मिळत नाहींत. असें एक नवीन मॅन्युअल सहकारी खात्यांत तयार होत असल्याचें ऐकिवांत आहे. पण तें प्रसिद्ध होण्यापूर्वींच लेखकानें आघाडी मारली आहे. ( द. दि. चि. )


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी** : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा** : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा** : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स** : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स** : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**हेड ऑफिस : पुणें शहर.**

**स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.**

**मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.**

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. | ४,१४,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. | २,०६,९७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. | ३३,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## होळकर संस्थानांतील सहकारी चळवळ

### ( १९३९-४० )

इंदूर संस्थानांतील सहकारी सोसायट्यांचे संख्येंत अहवालाचे वर्षी १७ संस्थांची भर पडून त्यांची संख्या ८४७ झाली. सभासदांची संख्या २७,६०६ ची २९,९७४ झाली, परंतु खेळतें भांडवल ९१ लक्ष, ४२¾ हजार रुपयांचें ८९ लक्ष, ८२¾ हजार रुपये झालें. प्रत्येक सोसायटीचे सरासरीनें ३५ सभासद आहेत व खेळत्या भांडवलाचें प्रत्येक सोसायटीशीं प्रमाण १०,६०५ रुपये आहे. सोसायट्यांचें स्वतःचें भांडवल २९ लक्ष, ६० हजार रुपये आहे; म्हणजे त्याचें एकूण खेळत्या भांडवलाशीं प्रमाण ३२.९% पडतें. सोसायट्यांचें कर्जाऊ भांडवल ६० लक्ष, २२ हजार रुपये आहे. सेंट्रल बँकांची व अर्बन सोसायट्यांची कर्जवसुली गेल्या वर्षापेक्षा बरी झाली, परंतु अर्बन सोसायट्यांच्या वसुलींत घट झाली. संस्थानांत ६ मध्यवर्ती बँका आहेत, त्या सोसायट्यांना ९% दरानें कर्जें देतात व सोसायट्या १२% दरानें आपल्या सभासदांस कर्जें देतात. "व्याजाचे दर ह्यापेक्षा कमी करणें शक्य होणार नाहीं." मध्यवर्ती बँकांचें खेळतें भांडवल १¼ लक्ष रुपयांनीं वाढून तें ३२¾ लक्ष रुपये झालें, ह्याचें मुख्य कारण त्यांनीं घेतलेले कर्जाऊ पैसे, हें होय. इंदूर प्रीमियर को. बँक ही संस्थानांतील सहकारी ॲपेक्स ( प्रांतिक ) बँकेसारखीच गणली जाते. तिचें खेळतें भांडवल २५¾ लक्ष रुपये आहे. संस्थानांतील सहकारी विमा सोसायटीच्या कामास जोराची चालना देण्यास मुंबई प्रां. सहकारी विमा सोसायटी मदत करीत आहे. शेतकऱ्यांच्या निकृष्ट परिस्थितीतहि निरुत्साही न होतां सहकारी चळवळीची प्रगति कायम राखण्याचा प्रयत्न सहकारी खातें करीत आहे. श्री. ए. जी. शेर्लेकर हे खात्याचे रजिस्ट्रार आहेत.

---

## कर्नाटक सें. को. बँक लि. धारवाड

वरील बँकेचा रजत महोत्सव २३ नोव्हेंबर, १९४१ रोजीं साजरा झाला. प्रारंभीं बँकेच्या पटावर ४१ व्यक्ती व ७१ सोसायट्या होत्या. आतां तिच्या सभासदांची संख्या ७५४ व्यक्ती व ५६९ सोसायट्या अशी झाली आहे. तिच्या १७ शाखा असून तिचें वसूल भांडवल ५ लक्ष, ५४¾ हजार रुपये व रिझर्व्ह आणि इतर फंड ४ लक्ष, ६० हजार रुपये, अशी तिची प्रगति झाली आहे. ठेवींचा आकडा ३७ लक्ष रुपये असून एकूण खेळतें भांडवल सुमारें अर्धा कोटि रुपये आहे. सोसायट्यांकडे बँकेचें येणें १७¾ लक्ष रुपये आहे. बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीची किंमत ३० हजार रुपये आहे. इमारतीची वाढ करण्याचें ठरलें आहे. गदग येथील बँकेची शाखाहि बँकेच्या स्वतःच्या इमारतींतच आहे. महोत्सवाचे प्रसंगीं बँकेचे चेअरमन, श्री. डी. आर नलावडी, बी. ए., एलएल. बी., एम. एल. ए. ह्यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. उत्सव समारंभाचे अध्यक्ष, श्री. व्ही. एस. भिडे, आय. सी. एस., कमिशनर, ह्यांनीं आपल्या भाषणांत बँकेस कांहीं उपयुक्त सूचना करून, तिच्या चालकांचें, उत्सवाचे प्रसंगानें, अभिनंदन केलें.

---

## पेट्रोल पुरवठा

ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत पेट्रोल आणण्यास सोइस्कर आगबोटी नाहींत. परंतु ही अडचण दूर करण्याचा यत्न सरकार करीत आहे असें सर रामस्वामी मुदलियार ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

## निवडक बाजारभाव

---

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११०-१० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०३-१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९५-१४ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०३-४ |
| ३% ( १९६३-६५ ) ... ... ... | ९५-१४ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९८-० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | ११०-० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | ११०-० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... ... | ११६-१२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२७-४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% ... ... | १४९-८ |
| बँक ऑफ बरोडा ( १००-५० ) १०% ... ... | ११८-८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०-२५ ) ९% ... | ५३-८ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १६३०-० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) १½ रु. ... ... | ५३-८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११२-८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% ... ... | १४५-० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१७-८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २२०-० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १७०२-८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १७५०-० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४-८ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) १½% ... ... | ९७-० |
| अहमदाबाद प्रांतज ( ५०० ) ११½% ... | ८७६-४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६५०-० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २४८-० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ५५-८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २५-० |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ८ आ. ... | ५५-८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४८२५-० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २११-४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) ७½% रु. ... ... | १५३-८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ४१०-० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु. १० आ. ० पै ... | २१९०-० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १६५-० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४७-१२-० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६७-०-० |

# पाणीच पाणी



तुम्हांस मुबलक पाणी पाहिजे ना ?
तरमग- आमचे बोरींग मशीननें तुमचे घरांत अगर शेतांत बोअर करून घ्या व एक हातपंप बसवा. म्हणजे तेव्हां तुम्हांस पाणी मिळूं शकेल.
बोअर मशीन व पंप पूर्ण स्वदेशी असून आमचे कारखान्यांत तयार केलेले आहेत.
बोअर (भोक) ८ इंच असून यंत्र इंजिननें चालतें.
दर व इतर माहिती बद्दल चौकशी करा.

भिडे आणि सन्स,
सांगली.

श्री विनायक मिल्सची पातळें व लुगडीं वापरा.

---

**—SOLD, BOUGHT, HIRED OR MADE TO ORDER.—**

First and second hand iron or wooden furniture.

**Address:**—Shevak Quarters,
1227 F. C. Road, Poona 4.
Industrial Centre.

**C. R. Shevak.**

**सर्व प्रकारचें लोखंडी व लांकडी फर्निचर विकत घेतलें जातें किंवा नवीन तयार करून अगर भाड्यानें मिळतें.**

पत्ता—शेवक क्वार्टर्स, १२२७ फ. कॉ. रोड, पुणें नं. ४.
इंडस्ट्रियल सेन्टर, कारखाना पत्ताः—१५३ कसबा, पुणें २.
आपला—**सी. आर. शेवक.**

---

# स्वादिष्ट मसाला करणारे आद्य कारखानदार




## व्ही. पी. बेडेकर

**बेडेकर आणि सन्स**

पुणें येथील एजंट—
दत्तात्रय नारायण हेजीब.

---




# फॉस्फौरा:—

अशक्ततेमुळें हाडांतील ( स्फुराम्लाचा ) (क्षार) स्फुरण पावत नसल्यानें शरीराचे जे धर्म ते बरोबर काम करित नाहींत त्यामुळें मुलें सुस्त व आळशी, तरुण पंढ, निर्वीर्य व कामाचा कंटाळा करणारे, तरुण स्त्रियांच्या गर्भाशयोन्माद (आचके) वंधत्व आणणें इत्यादि व वृद्ध चिडखोर, नेभळे वगैरे विकार हाडांतील मज्जातंतू व शुक्राची वाढ होत नसल्यानें होतात. त्यावर उपाय म्हणजे फॉस्फौरा गोल्ड-टॉनिक हें फार उपयुक्त औषध आहे. एक बाटली चाळीस दिवस पुरते. किं. रु.३-८-०. शिवाय पोस्टखर्च.

— माहिती पत्रक मागवा —

**रॉय आणि कंपनी,** १७६, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई नं. २

---




# माधवाश्रम

हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून, रेल्वे-स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.

जागा मध्यवस्तींत, हवाशीर, लागणारे फर्निचरनें शृंगारित असून, सोयीमुळें ती शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहणेची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

**माधवाश्रम बिल्डिंग,** गिरगांव, मुंबई.

---

# मुजुमदार टॉय वर्क्स

या आणि पहा

## माना हालणारीं व साधीं लाकडी चित्रें

## समक्ष येऊन खात्री करा.

२५५ सदाशिव पेठ, शेडगेवाडी, पुणें शहर.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक

वक्तशीर आणि मनपसंत काम
करून देणारे
**मोहन वॉच कंपनी**
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

**पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें**
**संग्रह करा**
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट,
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
**—: रक्तवर्धक :—**
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें.
**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
**' पायोनियर डाइंग हाऊस '**
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




**मधुमेहावरील औषध**
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १७ डिसेंबर, १९४१ अंक ५०

## * विमाक्षेत्रांतील ' कॉमनवेल्थ ' चें अढळ स्थान *

### १९४० चें पूर्ण केलेलें काम.........४५ लक्षांहून अधिक

**★ बोलका—ढलपा ★**

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८३,००० |
| सरकारी कर्जरोखे, गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१३,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

**• कॉमनवेल्थचीं वैशिष्ट्यें •**

( १ ) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरूकता
( २ ) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
( ३ ) काळजीपूर्वक काटकसरीची व्यवस्था
( ४ ) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
( ५ ) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

## कॉमनवेल्थ

### ॲशुअरन्स कंपनी लि., पुणें २.

—शाखा—

मुंबई—मद्रास—कलकत्ता—नाशिक—कराची—अहमदाबाद

एम्. एन्. भागवत, बी. ए.
*ॲक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडेंट.*

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

( 1 ) We stock and supply Educational books, General books & Library books.
( 2 ) We supply Government of Bombay and Government of India publications.
( 3 ) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
( 4 ) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### सात दिवसांचा आठवडा

युद्धप्रयत्नाची शिकस्त करण्याकरितां आठवड्यांतील सातहि दिवस कारखाने चालू ठेवण्याची आवश्यकता लवकरच भासेल, असें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं सुचवून ठेवलें आहे.

### ग्रेट-ब्रिटन-रशिया-इराण करार

ग्रेट ब्रिटन, रशिया व इराण ह्यांचेमध्यें व्हावयाच्या कराराचा मसुदा ग्रेट ब्रिटन व रशिया ह्यांनीं तयार करून इराण सरकारचे स्वाधीन केला आहे, त्यास इराणची संमति असल्यास करारावर तात्काळ सह्या होतील.

### विजेचें उत्पादन

मद्रास प्रांतांतील वीजगृहांत १९४०-४१ मध्यें एकूण २० कोटि, ८२ लक्ष यूनिट्स विजेचें उत्पादन झालें. १९३९,४० चा तत्सम आकडा १६ कोटि, ८४ लक्ष यूनिट्स होता.

### शारीरिक तपासणीचा कडकपणा

अमेरिकेच्या नाविक दलांत प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्या उमेद्‌वारांच्या शारीरिक तपासणीचा कडकपणा जरा कमी करण्यांत आला आहे. भरती लवकर करण्याकरितां, किरकोळ दोषांकडे दुर्लक्ष केलें जाईल व क्षुल्लक दोष बरे केले जातील.

### हिंदी सरकारी रेल्वेजचें उत्पन्न

| १ एप्रिल ते ३० नोव्हेंबर | रुपये |
|---|---|
| १९४० | ७०,१८,००,००० |
| १९४१ | ८१,१७,००,००० |
| १९४१ च्या पहिल्या आठमाहींत वाढ | १६% |

### लाहोर शहरास गव्हाचा पुरवठा

प्रांतांतील इतर ठिकाणांहून लाहोरमध्यें गहूं आणण्याची व्यवस्था सरकार करीत आहे, तेव्हां तेथील नागरिकांनीं काळजी करूं नये, असें पंजाब सरकारनें जाहीर केलें आहे.

### थायलंड-जपान लष्करी करार

थायलंड ( सयाम ) व जपान ह्यांचेमध्यें लष्करी करार झाला आहे. "सध्यांच्या जागतिक परिस्थितींत स्वतःच्या इच्छेप्रमाणें करणें नेहमींच शक्य होतें असें नाहीं." असें ह्या कराराचें समर्थन थायलंडच्या मुख्य प्रधानांनीं केलें आहे.

### बादशहांचा ४६ वा वाढदिवस

आपला ४६ वा वाढदिवस बादशहांनीं नुकताच साजरा केला. प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं त्यांस अभिनंदनपर संदेश पाठविला होता.

### मोटारगाड्यांचें उत्पादन

युद्धप्रयत्नास सहाय व्हावें, ह्याकरितां अमेरिकन कंपन्यांनीं खासगी मोटार गाड्यांचें उत्पादन आणखी कमी केलें आहे.

### कागदपत्र जतन करा

कलकत्ता शहरांतील महत्त्वाचे कागदपत्र जतन करण्याविषयीं सूचना तेथील सरकारी कचेऱ्यांस देण्यांत आली आहे. पूर्वेकडील नवीन युद्धपरिस्थितीचा हा परिणाम आहे.

### न्यूयॉर्कचे तोंडाशीं सुरुंग

न्यूयॉर्क बंदराचे तोंडाशीं अमेरिकन सरकारनें सुरुंग पेरले आहेत.

### पदवीचा त्याग

जपानी आक्रमणाचा निषेध करण्याकरितां डॉ. जे. एच. कझिन्स ह्यांनीं त्यांस मिळालेला जपानी एलएल. डी. पदवीचा त्याग केला आहे.

### ब्रह्मी मुख्य प्रधान

ब्रह्मदेशाचे मुख्य प्रधान ग्रेटब्रिटनहून परत येत असतांनाच पॅसिफिकमध्यें युद्ध उपस्थित झालें. होनोलुलूमध्यें ते सुखरूप आहेत, कारण त्यांचें मृत अथवा जखमी लोकांचे यादींत नांव आलेलें नाहीं, असें प्रसिद्ध झालें आहे.

### हवामानविषयक माहिती

जनतेसाठीं प्रसिद्ध करण्यांत येणारी हवामानविषयक माहिती चालू युद्धपरिस्थितींत ह्यापुढें प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं, असें हिंदी हवामान खात्यानें जाहीर केलें आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें ५ डिसेंबर असेर संपलेल्या वर्षी २५ कोटि,१२ लक्ष रुपये किंमतीच्या १,३३,८८३ चेक्सची देवघेव झाली.

### ट्रेझरी बिलांवर १५ आ. ११ पै व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं एक कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द्. शे. १५ आ. ११ पै इतका पडला.

### जपान-रशियाचे सलोख्याचे संबंध

जपान व रशिया ह्यांचे परस्पर संबंध पूर्वीप्रमाणेंच रहातील, असें एक जपानी सरकारी प्रतिनिधि नुकतेंच म्हणाला. रशिया-जपान कराराची मुदत पांच वर्षांची आहे.

### विषारी वायूचा उपयोग

विषारी वायूच्या उपयोगासंबंधी जिनीव्हा येथील १९२५ च्या कराराप्रमाणें वागण्याचा ग्रेट ब्रिटनचा उद्देश आहे. त्या बाबतींत जपान, फिनलंड, हंगेरी व रुमेनिया ह्यांच्या धोरणाचा खुलासा त्यांस ब्रिटिश सरकारनें विचारला आहे.

### तटस्थ तुर्कस्तान

युद्धाचा वणवा पूर्वेकडे पसरला असला तरी तुर्कस्तानाची तटस्थता कायम आहे असें त्या देशानें जाहीर केलें आहे.

### अमेरिकेंतील इटालिअन व जर्मन नागरिक

अमेरिकेंत ६ लक्ष, ९४ हजार इटालिअन व ३ लक्ष, १५ हजार जर्मन नागरिक आहेत.

### बेलापूर कं. लि.

बेलापूर शुगर कंपनीनें ३० सप्टेंबर, १९४१ असेर संपलेल्या वर्षी २९ लक्ष, ६७ हजार रुपयांची साखर विकली; त्या पूर्वीच्या वर्षांची विक्री ३८ लक्षांची होती. कंपनीनें एक्साइज ड्यूटी ७ लक्ष रुपये दिली. नफा ६ लक्ष, ७० हजार रुपये उरला, म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा तो ७ लक्ष ३२ हजारांनीं कमी झाला. नफा कमी होण्याचीं कारणें साखरेच्या भावांत घट, उंसांतील साखरेचें अल्प प्रमाण, कामगारांचे बांधे, खर्चांत घट होण्याची अशक्यता इत्यादि आहेत. इनव्हेस्टमेंट रिझर्व्हमधून १½ लक्ष रुपये घेऊन डिव्हिडंड वाटलें तरी डिव्हिडंडचा दर २०% चा १४% करावा लागला.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ६२६ | नवीन घटना पॅसिफिक महासागरांतील युद्ध. | |
| २ हिंदुस्थानच्या युद्धकार्याचा आढावा ... | ६२७ | ५ सहकारी वाङ्मयांत भर | ६३२ |
| ३ किर्लोस्कर बंधु लि. | ६२८ | ६ हिंदी उसाचें पीक ... | ६३३ |
| ४ स्फुट विचार ... | ६२९ | ७ हिंदी तांदळाचें पीक | ६३३ |
| प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचा संदेश—मुंबई मॉं. स. इन्स्टिट्यूटचें कार्यक्षेत्र— | | ८ ग्रेट ब्रिटनमधील कापडाच्या गिरण्या ... | ६३४ |
| | | ९ युद्धप्रयत्नाची प्रगति... | ६३४ |
| | | १० निवडक बाजारभाव | ६३५ |



# अर्थ

बुधवार, ता. १७ डिसेंबर, १९४१


## हिंदुस्थानच्या युद्धकार्याचा आढावा

जपाननें पॅसिफिक महासागरांत अमेरिका व इंग्लंड ह्यांच्या प्रदेशांवर अचानक हल्ला चढवून युद्धाच्या आखाड्यांत उडी टाकल्यामुळें हिंदुस्थानच्या लढाऊ कामगिरीस अधिक महत्वाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. जपानी फौजा थायलंडमध्यें शिरल्या असून त्या ब्रह्मदेशाच्या सरहद्दीकडे घुसण्याचा प्रयत्न केल्यावाचून रहाणार नाहींत. त्याचा बंदोबस्त ब्रिटिश सैन्य त्या बाजूस जाऊन करीत आहे. युद्धाच्या डावपेचांचा एक भाग म्हणून हिंदुस्थानास उपद्रव देण्याची कारवाईहि जपान करील अशी वाटणारी भीति अनाठायीं आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. ह्या बाबतची योग्य व्यवस्था होणें अगत्याचें असून ती केली जात आहे. पुढेंमागें पूर्वएशियांत युद्ध जुंपल्यास हिंदुस्थान देशाचें युद्धसामुग्री पुरवण्याचें महत्वाचें केंद्र बनवण्याचें धोरण अत्यंत उपयुक्त ठरेल ह्या जाणीवेनें ह्या देशांत अंमलांत आणली गेलेली योजना आज दूरदर्शीपणाची ठरली आहे. अमेरिकन राष्ट्र युद्धांत पडलें आहे आणि त्यास स्वतःच्या सैन्यास सामुग्री पुरवण्याकडे अधिक लक्ष द्यावें लागणार आहे. तिकडे लिबियांत लढाया चालल्या आहेत आणि रशिया जर्मन फौजांस मागें हाटवीत असतां त्यासहि युद्धाच्या सामानाचा पुरवठा व्हावा लागेल. युद्धाच्या वणव्याच्या ज्वाला ह्या रीतीनें पसरत चालल्यामुळें हिंदुस्थानचें उत्पादक सामर्थ्य वाढवणें अगत्याचें व निकडीचें झालें आहे. ह्या दृष्टीनें पहातां ह्या देशाची युद्धविषयक कामगिरी आतांपर्यंत किती व कोणत्या प्रकारची झाली आहे त्याची संकलित माहिती मिळणें बोधप्रद होईल.

ह्यासंबंधांत स्टेट्समन पत्रानें आढावावजा माहिती एकत्र करून नुकतीच छापली आहे, तिचा गोषवारा येथें दिला असतां तो उपयुक्त ठरेल. सदरहु आढाव्यांतील महत्वाच्या बाबींचा निर्देश खाली केला आहे:—

(१) हिंदी फौजेमध्यें दर महिन्यास पन्नास हजार ह्याप्रमाणें भरती होत आहे.

(२) युद्ध चालू झाल्यापासून हिंदी आरमारांत आणि कुशल दर्यावर्दी लोकांत सहापटीनें वाढ झाली आहे.

(३) हिंदी विमानदलांत दहा स्क्वॉड्रन्स बनवले जात आहेत. युद्धापूर्वी येथें एकच स्क्वॉड्रन होतें.

(४) मेडिकल सर्व्हिसमध्यें युरोपिअनांपेक्षा अडीच पटींनीं अधिक हिंदी अधिकारी आहेत.

(५) ऑक्झिलिअरी नर्सिंग सर्व्हिसेसमध्यें अडीचशे नर्सेस शिकून तयार होत आहेत. दरवर्षी दोनहजारांपर्यंत इतकी त्यांची संख्या वाढवण्यांत यावयाची आहे.

(६) युद्ध चालू झालें तेव्हां हिंदुस्थानच्या पुरवठा खात्यांत चार अधिकारी व सहा कारकून होते. एकट्या मुख्य कचेरींत आज दोहोंची मिळून संख्या बाराशें आहे.

(७) निरनिराळ्या प्रकारच्या लहान नावा हिंदुस्थानच्या नाविक कारखान्यांत बांधल्या जात आहेत.

(८) व्यापारी जहाजांवरील खलाशी व अधिकारी आरमारी जहाजांवर काम करण्यास तयार आहेत.

(९) पूर्वीपेक्षा चौपट रणगाडे हिंदी फौजेंत कामांत आहेत.

(१०) कापसाच्या व लोकरीच्या गिरण्या चालू सालांत बत्तीस कोटि वार कापड तयार करीत आहेत. युद्धापूर्वीच्या काळांत हिंदी सैन्यावर जो खर्च होत असे तेवढा खर्च केवळ ह्या कापडाच्या खरेदीवर होणार आहे.

(११) हिंदुस्थान सरकारच्या यांत्रिक शिक्षणाच्या योजनेस अनुसरून १९४२ च्या मार्चपूर्वी पंधरा हजार लोक शिकून तयार होतील. १९४३ च्या मार्चमध्यें ही संख्या ४८ हजार होईल.

(१२) आरमारी शिक्षणाच्या शाळांमध्यें काम वाढत्या प्रमाणांत चालू आहे.

(१३) १६० व्यापारी जहाजांस सशस्त्र बनवण्यांत आलें आहे.

(१४) बिनलढाऊ विमानांसाठी प्रतिवर्षी दोन हजार कुशल कारागीर शिकवून तयार केले जात आहेत.

(१५) प्रतिवर्षी तीस लक्ष बुटांच्या जोड्या लष्करासाठी बनवल्या जात आहेत. घोडदळास लागणारें कातड्याचें सामान तयार करणाऱ्या सरकारी कारखान्यांत दोन हजारांच्या ठिकाणीं बारा हजार माणसें कामावर असून ह्या कामांत दोनशें बिनसरकारी मंडळ्यांचें सहकार्य होत आहे.

(१६) मोटारींच्या टोप्यांचें कॅन्व्हस बंगालमध्यें तयार होऊं लागलें आहे.

(१७) सैन्यास औषधी सामान लागतें, तें पूर्वी २५ टक्के ह्या देशांत होत असे. तें प्रमाण आतां ६० टक्क्यांवर गेलें आहे.

(१८) कापडाच्या निरनिराळ्या जातींमध्यें तीस नवीन प्रकारांची भर पडली आहे.

(१९) फौजेच्या उपयोगी पडणाऱ्या सिगारेट्सचें उत्पादन वाढलें आहे.

(२०) दारूगोळ्याचें उत्पादन २५० ठिकाणीं आणि २३ रेल्वेजच्या कारखान्यांत चाललें आहे. सातशें निरनिराळ्या बाबी

त्यांमध्यें तयार होत आहेत. आपल्या स्वतःच्या गरजा भागवून हिंदुस्थाननें दारूनें भरलेले सहा लक्ष गोळे बाहेर पाठवले आहेत आणि लहान तोफा-बंदुकांच्या पंधरा कोटि गोळ्या निर्गत केल्या आहेत.

( २१ ) पुरवठा खात्याच्या वतीनें सात कोटि लष्करी कपडे बनवण्यांत आले आहेत. ह्या देशांतील युद्धबंद्यांसाठीं चाळीस लक्ष कपडे पुरवण्यांत आले आहेत.

( २२ ) वैद्यकी हत्यारांसाठी विशिष्ट प्रकाराचें पोलाद लागतें तेंहि जमशेदपूरच्या कारखान्यांत तयार होत आहे.

ही यादी बोधप्रद आहे ह्यांत संशय नाहीं. हिंदुस्थानच्या उत्पादनाचें प्रमाण मनांत भरण्यासारखें आहे, त्यांतल्या कांहीं बाबींचें गणिती वर्णन स्टेट्समन पत्रानें केलें आहे. हिंदी कापडाच्या गिरण्यांत तयार व्हावयाच्या मालाची १९४२ सालासाठी योजना करण्यांत आली आहे, तीस अनुसरून बनलेलें कापड कलकत्ता व मुंबई ह्या शहरांच्या मध्यें पसरलें तर २६० वार रुंदीचा त्याचा लांबलचक पट्टा होईल. चालू वर्षी ह्या देशांत बनवल्या जाणाऱ्या सिगारेट्स एकापुढें एक ह्याप्रमाणें मांडल्यास त्यांचें पृथ्वीच्या गोलाभोंवतीं सहा वेळां वेष्टन होईल. १९४२ मध्यें १० लक्ष टन वजनाचें इमारती लाकूड कापून तयार होईल त्याची लांबी एक लक्ष सत्तर हजार मैल भरेल. त्याचा सात वार रुंदीचा रस्ता तयार केल्यास हें लाकूड इंग्लंड व अमेरिका ह्यांच्यामधलें अटलांटिक महासागरांतलें अंतर तोडील. युद्धसामुग्रीच्या पुरवठ्यासाठी आतांपर्यंत अस्तित्वांत नसलेले धंदे काढण्यांत आले आहेत आणि अगणित जातींचा माल त्यांत तयार होत आहे त्याचा उपयोग युद्धोत्तर काळांतहि होईल हें येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

---

## किर्लोस्कर बंधु लि.

( वार्षिक सभा : ३०-१२-४१ )

किर्लोस्कर बंधु लि.ला ३१ जुलै, १९४१ अखेर संपलेल्या २१ व्या वर्षी २ लक्ष, ५६ हजार रुपये नफा झाला. गेल्या वर्षीच्या नफ्याचा आकडा १ लक्ष, ३६ हजार रुपये होता व त्यापूर्वीच्या वर्षी ६४ हजार रुपये नफा झाला होता. इमारती, मशिनरी, वगैरेवरील घसाऱ्याचे ९८ हजार रुपये काढून व ४½ हजार रुपये बुडीत येणें कमी करून कंपनीस वर सांगितल्याप्रमाणें नफा उरला आहे. कंपनीस मालविक्रीपासून २१ लक्ष, ६२½ हजार रुपये मिळाले. खर्चाचे बाजूस ११ लक्ष, ७६½ हजार रुपये खर्च झालेला कच्चा माल; ३ लक्ष, ५६ हजार रुपये पगार व मजुरी; १ लक्ष, ६७ हजार रुपये रेल्वे भाडें व क्लिअरिंग चार्जेस, इत्यादि प्रमुख आकडे आहेत. कंपनीचें वसूल भांडवल १२ लक्ष, ६६ हजार रुपये असून ३७½ हजारांचा शेअर प्रीमियम रिझर्व्ह आहे. रिझर्व्ह व इतर फंड १ लक्ष, ८२½ हजारांचे आहेत. घसाराखातीं ८ लक्ष, ११ हजार रुपये दाखविलेले आहेत. कंपनीनें २ लक्ष ९६ हजार रुपये कर्जाऊ अथवा ठेवींच्या स्वरूपांत घेतलेले आहेत. कंपनीच्या इमारतींची व मशिनरीची किंमत अनुक्रमें ४ लक्ष, ९२ हजार व ६ लक्ष, ५१ हजार रुपये आहे. कच्चा माल व यांत्रिक सुटे भाग ह्यांची किंमत ४ लक्ष, ७२ हजार रुपये भरते. शिल्लक माल, मूळ पडलेल्या किंमतीप्रमाणें, ३ लक्ष, ९४½ हजारांचा आहे. कंपनीचें येणें ५ लक्ष, ६६ हजार रुपये असून मालाकरितां आगाऊ दिलेली रकम १ लक्ष, ८३ हजार रुपये आहे. कंपनीचे १ लक्ष, १३ हजार रुपये ठेवी, रोखे व भाग ह्यांमध्यें आहेत, त्यांत मुख्यतः म्हैसूर सरकारचे रोखे व म्हैसूर किर्लोस्कर लि. कंपनीचे भाग आहेत. बँकांकडे खात्यांवर व रोकड शिल्लक मिळून १ लक्ष, ७० हजार रुपये आहेत.

३१ जुलै, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी झालेल्या नफ्याचा विनियोग खालीलप्रमाणें मुख्यतः करावा अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे:—

७५ हजार रु. डिव्हिडंड ( ६% ), १८,७५० रु. भागीदारांना बोनस ( १½% ), १४ हजार रु. कामगार प्रॉ. फंडास देणगी, ५० हजार रु. इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह, ३० हजार रुपये नोकरांना बोनस, २० हजार रु. बाजाराचे चढउतारासाठीं रिझर्व्ह, ४३ हजार रु. मॅनेजिंग एजंटांचे देणगीसाठी.

"अहवालाचें सालीं बाजारभावांतील चढउतारासाठी जादा संरक्षणाचे दृष्टीनें टाटा आयर्न आणि स्टील कंपनी लिमिटेडच्या किंमती विचारांत घेऊनच कंपनीजवळ असलेला कच्चा माल, विशेषतः लोखंडाच्या किंमती ठरविल्या गेल्या आहेत. सदरच्या नफ्यांतून भागीदारांना शेकडा ९ टक्केप्रमाणें रु. १,१२,५००-०-० इतकी रकम डिव्हिडंडकरितां देऊनहि मॅनेजिंग एजंटांना नफ्यापैकीं तिसरा हिस्सा रु. ८५,२७१-०-० कंपनीच्या नियमाप्रमाणें कमिशनच्या रूपानें घेतां आलें असतें. परंतु आपल्या कंपनीचे डायरेक्टर आणि मॅनेजिंग एजंट्स यांना अशा रीतीनें नफ्याची विल्हेवाट करणें कंपनीच्या हिताच्या दृष्टीनें श्रेयस्कर वाटत नाहीं; म्हणून भागीदारांना शेकडा ६ टक्केप्रमाणें डिव्हिडंड देऊन शिवाय शेकडा दीड टक्काप्रमाणें बोनस म्हणून देण्याबद्दल शिफारस करणें आपल्या डायरेक्टरांना योग्य वाटत आहे व या गोष्टीला कंपनीचे मॅनेजिंग एजंटांनींहि ( दिलदारपणें ) मनापासून संमती दिली हें नमूद करण्यास डायरेक्टरांना आनंद वाटत आहे. या शिफारसीमुळें कंपनीचे मॅनेजिंग एजंटांचें अपरिमित नुकसान होत आहे याची जाणीव डायरेक्टरांना आहे म्हणून त्यांनीं आजपर्यंत सोसलेला स्वार्थत्याग विचारांत घेतां त्यांना आज देणगी म्हणून नफ्यापैकीं रुपये ४३,१६३-०-० यावेत अशी शिफारस आपले डायरेक्टर करीत आहेत. या कारणाकरितां भागीदारांना स्पेशल ठराव करण्याबद्दल डायरेक्टरांनीं सूचना केलेली आहे."

कंपनीच्या बॅलन्सशीटवरून तिच्या प्रगतीची व सुस्थितीची कल्पना येते. आलेल्या कठीण परिस्थितीस तोंड देण्याचा कणखरपणा ज्याप्रमाणें किर्लोस्कर बंधूंनीं मागें दाखवून दिला, त्याचप्रमाणें मिळालेल्या संधीचा उपयोग करून घेण्याची तत्परताहि त्यांनीं चांगल्या तऱ्हेनें सिद्ध केली आहे, आणि शेतीचीं औतें करणाऱ्या कारखान्याचें रूपांतर आतां आधुनिक यंत्रसामुग्रीच्या कारखान्यांत झालें आहे. म्हैसोर किर्लोस्कर लि. ह्या नांवाची मशीन टूलसच्या उत्पादनासाठी हरिहर येथें कंपनी स्थापून किर्लोस्कर बंधूंनीं आपल्या कार्याचा विस्तार उत्कृष्ट रीतीनें केला आहे. कंपनीची वाढ घडवून आणण्यांत व तिच्या कार्यांत प्रगतिपर फरक करण्यांत चालकांनीं दाखविलेलें चातुर्य अभिनंदनीय आहे. वाढत्या कार्यविस्तारास अनुसरून मॅनेजिंग एजंटांनीं आपल्या फर्ममध्यें श्री. एन. डब्ल्यू. गुर्जर व श्री. राजाराम एल. किर्लोस्कर ह्यांस नवीन भागीदार म्हणून घेतलें आहे. कंपनीच्या कार्यास गेल्या वर्षी आलेलें फळ भागीदारांस अत्यंत संतोषदायक वाटेल ह्यांत संशय नाहीं.

# स्फुट-विचार

## प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचा संदेश

अमेरिकन राजकारणाचें तारू प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं किती कौशल्यानें हाकलें आहे ह्याची खात्री जपाननें पॅसिफिक महासागरांत आरंभलेल्या पुंडाईनें सहज पटते. आपल्या लोकांनीं इंग्लंड व जर्मनी ह्यांच्यामधील युद्धाच्या भानगडींत पडूं नये असें प्रतिपादणारा एक वर्ग अमेरिकेंत होता आणि इंग्लंड व रशिया ह्यांस युद्धसहाय देण्याच्या प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्या धोरणास त्यांनीं सारखा विरोध चालवला होता. जर्मनी, इटली व जपान ह्यांची गट्टी जगामध्यें स्वतःचें वर्चस्व स्थापण्यासाठीं असून त्यांचा युरोपांत व पूर्व एशियांत विजय झाल्यास अमेरिका खंडाचें स्वातंत्र्य संपुष्टांत येईल असें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांचें म्हणणें होतें आणि जागतिक शांतता व राष्ट्रीय स्वातंत्र्य ह्यांचेसाठी झगडणाऱ्या राष्ट्रांस सहाय देणें हें स्वार्थ व परमार्थ ह्या दोन्हीं दृष्टींनें अपरिहार्य असल्याचें ते बजावून सांगत आले आहेत. हिटलर–मुसोलिनी–जपानी मुत्सद्दी ह्यांच्या त्रिकुटाचें कारस्थान त्यांनीं पुरें ओळखलें होतें आणि त्याची प्रचीति आतां सर्वांस स्पष्टपणानें आल्याचें आपल्या अलीकडील संदेशांत त्यांनीं बोलून दाखवलें आहे. आतां प्रत्यक्ष अमेरिकन मुलुखावरच जपाननें कपटी कारस्थान रचून अचानक हल्ला केला असतां अमेरिकन नागरिकांचें युद्धास सर्वतोपरी सहाय देण्याचें आद्यकर्तव्य कसें आहे हें त्यांनीं खणखणीत आवाजानें सांगितलें आहे. गेल्या दोन वर्षांत अमेरिकेनें आपलें लढाऊ सामुग्रीचें उत्पादन वाढवलें आहे. हा शहाणपणाचा मार्ग त्या राष्ट्रानें चोखाळला असून त्या योगानें युद्धाच्या तयारीस त्यास वेळ मिळाल्यासारखें झालें आहे. जर्मनी–इटली–जपान ह्या त्रिकुटाचा पूर्ण पाडाव होऊन त्यांचीं दुष्कृत्यें ह्यापुढें अशक्य होतील अशा रीतीचा कायमचा बंदोबस्त करणें हें अमेरिकेचें उद्दिष्ट आतां असलें पाहिजे आणि त्यासाठीं आबालवृद्धांस व स्त्रीपुरुषांस कराव्या लागणाऱ्या कार्यांत स्वार्थत्याग नसून स्वहिताचें कर्तव्यच आहे, अशा आशयाचा प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचा संदेश आहे. त्याचा ध्वनि व प्रतिध्वनि सबंद जगभर पसरून त्याच्या कानांत घुमत राहील. शांततेच्या प्रयत्नांचा बहाणा करून जपाननें अमेरिका व इंग्लंड ह्यांच्या प्रदेशावर अनपेक्षित हल्ले करण्याची तयारी ठेवली होती, ह्यामुळें प्रारंभीं त्यास जय मिळाल्यासारखें दिसत असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. पण आतां ह्या दोन राष्ट्रांच्या संयुक्त लढाऊ सामर्थ्यास जपानला तोंड द्यावें लागणार असून जपानी मुत्सद्यांनीं हिटलरशीं केलेलें कारस्थान कोलमडून पडणार आहे. अमेरिकन जनतेनें आपली शक्ति एकवटावी आणि नेटानें युद्ध विजयी शेवटास न्यावें असें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांचें स्फूर्तिदायक प्रवचन आहे. त्याचा इष्ट परिणाम इंग्लंड व त्यांचे जोडीदार आणि रशिया व चीन देश ह्यांचेवर अत्यंत अनुकूल असाच झाल्यावांचून रहावयाचा नाहीं.

## मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटचें मर्यादित कार्यक्षेत्र

सहकारी कार्यकर्त्यांचें सहकारी संघटनेस नीट सहाय मिळावें, ह्या उद्देशानें मुंबई प्रांतिक इन्स्टिटयूटची स्थापना झाली, परंतु मूळ उद्देशांप्रमाणें तिचें कार्य होऊं शकलें नाहीं व अलीकडे कांहीं वर्षें तर तिचें महत्त्व कमी झालें आहे. प्रांतिक सहकारी खातें, इन्स्टिटयूट व तिच्या शाखा, सुपरवायझिंग यूनियन्स व त्यांचीं जिल्हा बोर्डें, मध्यवर्ती बँका, इत्यादींचीं कार्यक्षेत्रें अलग रहाणें अशक्य झालें, व इन्स्टिटयूट करीत असलेलीं शिक्षण प्रसारासेरीज बाकीं कामें इतर संस्था करूं शकतील, इन्स्टिटयूटनें केवळ सहकारी शिक्षणासच स्वतःस वाहून घ्यावें, असें सुचविण्यांत आलें. इन्स्टिटयूटच्या ह्या मर्यादित कार्यक्षेत्रास अनुसरून तिच्या घटनेचा व व्यापाचा फेरविचार होणें प्राप्त झालें. ह्या प्रश्नाचा विचार सरकारनें दीर्घ काल करून, आतां त्यासंबंधांतील योजना जाहीर केली आहे. ह्या योजनेप्रमाणें, सहकारी सोसायटयांचे सभासद व सहकारी कार्यकर्ते, ह्यांच्या शिक्षणाचें काम हें इन्स्टिटयूटचें प्रधान कार्य ठरविण्यांत आलें असून इन्स्टिटयूटनें सहकारी शिक्षणाची शिक्षण-तज्ञांची मध्यवर्ती संस्था ह्या नात्यानें काम करावयाचें आहे. बिन-सरकारी सहकारी कार्यकर्त्यांच्या मतप्रदर्शनाचें इन्स्टिटयूट हें केंद्र बनावें अशी अपेक्षा आहे. शेतकी सोसायटयांच्या सुपरवायझिंग यूनियन्स वगळून, सोसायटयांच्या फेडरेशन्सना इन्स्टिटयूटचे सभासद होतां येईल. ज्या सोसायटयांचें भाग भांडवल व रिझर्व्ह २० हजारांवर आहे, अशा बिगर-शेतकी सोसायटयांचें कार्यक्षेत्र सबंद प्रांत हें असून ज्या वरील दोन्ही गटांत येत नाहींत, अशा सोसायटया व व्यक्तिशः सभासद हेहि इन्स्टिटयूटचे सभासद होऊं शकतील.

### नवीन घटना

इन्स्टिटयूटच्या सध्याच्या घटनेप्रमाणें को-ऑपरेटिव्ह कौन्सिल व एक्झिक्युटिव्ह कमिटी ह्यांचेकडे व्यवस्थेचें काम असून शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी एका सेंट्रल एज्युकेशन बोर्डाची नेमणूक करण्यांत येते. कौन्सिलवरील सुमारें सवाशे सभासदांत जिल्हा शाखा व भाग शाखा ह्यांचे प्रतिनिधी, रजिस्ट्रार, प्रांतिक बँक व मध्यवर्ती बँका व अर्बन बँका, इत्यादींच्या प्रतिनिधींचा समावेश होतो. एक्झिक्यूटिव्ह कमिटींत सोळा सभासद असतात. नव्या घटनेंत, इन्स्टिटयूटचें काम करण्यासाठी फक्त एकाच कमिटीची योजना असून तिच्या १५ सभासदांपैकीं एक जागा रजिस्ट्रार व एक जागा सरकारनियुक्त गृहस्थ ह्यांसाठी राखून ठेवलेली आहे. बाकीचे १३ सभासद निवडून यावयाचे आहेत. डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपरवायझिंग यूनिअन्समार्फत जिल्ह्यांतून सहकारी शिक्षणाचें काम चालू ठेवण्यांत येईल. एकापेक्षा अधिक जिल्ह्यांस उपयुक्त अशा शैक्षणिक कामासाठी इन्स्टिटयूट कमिट्या नेमूं शकेल. इन्स्टिटयूटच्या पैशाचा कारभार एक्झिक्यूटिव्ह कमिटीच पाहील. सभासदांच्या वर्गण्या, सहकारी सोसायटयांच्या नफ्यांतून सहकारी, शैक्षणिक अथवा धार्मिक कार्यासाठी राखून ठेवलेल्या रकमेपैकीं ५ ते १० टक्के फी, देणग्या, पुस्तकाची विक्री व परीक्षेची फी ह्यांपासून होणारें उत्पन्न, सरकारी ग्रँट, इत्यादि उत्पन्नाचे मार्ग इन्स्टिटयूटला उपलब्ध रहातील. शिक्षणाचे कार्यक्रम इन्स्टिटयूट आखील, फिरत्या लायब्ऱ्या काढील, पुस्तकें व मासिकें प्रसिद्ध करील व ट्रेनिंग क्लासेस चालवील. इन्स्टिटयूटच्या कार्यक्षेत्राची मर्यादा संकुचित होणार हें मागेंच ठरलें होतें; प्रत्यक्ष योजना आतां जाहीर झाली आहे तीवरून हें क्षेत्र किती मर्यादित आहे, हें कळून चुकलें आहे. इन्स्टिटयूटच्या एक्झिक्यूटिव्ह कमिटीच्या १३ निवडून यावयाच्या सभासदांची निवड कोणत्या पद्धतीनें होणार, कमिटीवरील जागांची वाटणी कोणत्या तत्त्वावर होणार, इत्यादि गोष्टींचा तपशील अद्याप कळ-

लेला नाहीं. तथापि, प्रत्यक्ष शिक्षणाचें कार्य इन्स्टिट्यूटकडे न रहातां जिल्हा सुपरवायझिंग यूनियन्सनीं तें करावयाचें असल्यानें व इन्स्टिट्यूटच्या शाखा बंद झाल्याकारणानें, स्थानिक कार्य-कर्त्यांच्या मदतीचा फायदा सहकारी चळवळीस मिळणें कठीण तर होणार नाहींना ? सहकारी शिक्षणाच्या प्रसाराच्या संकुचित कार्य-क्षेत्रांतहि इन्स्टिट्यूटच्या कार्याची उपयुक्तता प्रभावी होण्यास नवीन घटना कितपत उपयोगी पडेल, तें पहावयाचें आहे.

---

### पॅसिफिक महासागरांतील युद्ध

जपाननें अमेरिका व इंग्लंड ह्यांच्या पूर्व एशियामधील प्रदेशांवर अकल्पित हल्ला केल्यामुळें पॅसिफिक महासागरामधील लढ्यास अपूर्व महत्त्व प्राप्त झालें आहे. राशियामध्यें सर्व रणांगणांवर जर्मनीस हळुहळु माघार घ्यावी लागत आहे आणि लिबियांत ब्रिटिश फौजांची प्रगति पुन्हा चालू झाली असून शत्रूची सारखी पीछेहाट होत आहे. पॅसिफिक महासागरांत व सयाममध्यें प्रथम व आकस्मिक हल्ल्यांचा फायदा मिळाला आहे. परंतु अमेरिका व इंग्लंड ह्यांच्या लढाऊ बळाची नीट जुळवाजुळव करण्यांत येत असून तिचा परिणाम जपानवर लवकरच झाल्यावाचून रहाणार नाहीं. दोन नामांकित ब्रिटिश जहाजें पॅसिफिकमधील युद्धांत प्रारंभींच बुडालीं, तथापि ह्याचा वचपा थोड्याच काळांत काढण्यांत येईल ह्यांत संशय नाहीं. जपानचें एक मोठें जहाज बुडाल्याच्या व इतर हानि झाल्याच्या बातम्या नुकत्याच आल्या आहेत. जपाननें आपली आरमारी व वैमानिक शक्ति युद्ध पुकारण्यापूर्वीं योजनात्मक रीतीनें निरनिराळया ठिकाणीं पेरून ठेवली होती, ह्या कारणानें पॅसिफिकमधील पांगलेल्या बेटांचें संरक्षण करणें अमेरिकेस कठीण झालें. जपानच्या ह्या चढाईमुळें अमेरिकेस नुकसान सोसावें लागलें असल्याचें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनींच जाहीर केलें आहे. थायलंड आपल्या ताब्यांत घेऊन त्यामधून ब्रिटिशांस उपद्रव देण्याचा क्रम जपाननें आतां आरंभला आहे. उत्तर मलायामध्यें युद्धास तोंड लागलें आहे आणि हाँगकाँग येथें लढाई चालू आहे ब्रिटिश व अमेरिकन लढाऊ बळ एकदा एकवटलें म्हणजे जपानला ह्या दुहेरी माऱ्यास तोंड द्यावें लागेल. आपल्या लोकांचा स्वतःवरील विश्वास दृढ करण्यासाठीं हिटलरनें नुकतेंच भाषण करून प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्यावर तोंडसुख घेतलें आहे. आपल्या युद्धाविषयींच्या उदात्त ध्येयांची वाच्यता त्यानें पुन्हां केलीच आहे. अमेरिकन राष्ट्राचा प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्यां धोरणास पूर्ण पाठिंबा असून तें राष्ट्र आतां युद्धाच्या आखाड्यांत उतरलें आहे. जपानचा समाचार घेतल्यावर अमेरिका व इंग्लंड ह्यांस आपलें सामर्थ्य एकवटावयाचें आहे आणि तें अखेर प्रभावी ठरेल ह्यांत शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

---

### हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्न–खर्चाचे आकडे

ऑक्टोबर, १९४१ मध्यें हिंदुस्थान सरकारचा खर्च उत्पन्नापेक्षा ५½ कोटि रुपये अधिक झाला. चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांतील उत्पन्नापेक्षा जास्त झालेल्या खर्चाचा आकडा ३० कोटि, ७५ लक्ष रुपये आहे. गेल्या वर्षीं तो २७ कोटि, २५ लक्ष रुपये होता. चालू वर्षीं उत्पन्न १४¾ कोटींनीं वाढलें तरी खर्च १७½ कोटींनीं अधिक झाला.

### ॲग्रिकल्चरल एकनॉमिक्स परिषद्

वरील परिषदेचें तिसरें अधिवेशन पुणें येथील शेतकी कॉलेजांत २६, २७ व २८ डिसेंबर रोजीं सर टी. विजयराघवाचार्य ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार आहे. रावबहादुर डॉ. पी. सी. पाटील हे स्वागत मंडळाचे अध्यक्ष असून डॉ. एम. बी. घाटगे, ॲ. एकनॉमिक्सचे शेतकी कॉलेजांतील प्रोफेसर, हे स्थानिक चिटणीस आहेत. २६ तारखेस सायंकाळीं परिषदेचें उद्घाटन होईल व २७ आणि २८ तारखांस सकाळ–संध्याकाळ चर्चा होईल. (१) शेतीच्या खंडासंबंधीं प्रश्न, (२) चालू युद्धपरिस्थितींत शेतीच्या मालाच्या जादा साठ्यामुळें निर्माण झालेली परिस्थिति, (३) शेतीच्या जमिनींच्या योग्य खंडाची मोजणी, (४) अनेक पिकें काढण्यापासून होणारा नफा–तोटा, हे चार विषय चर्चेकरितां निवडण्यांत आले आहेत.

---

### युरोपांतून स्वदेशीं जाण्याची अखेरची संधी

पोर्तुगालमधील सर्व अमेरिकनांनीं तेथील अमेरिकन वकिलातींत नांवें नोंदवावींत व अमेरिकेस निघण्यास तयार रहावें, अशी सूचना तेथील अमेरिकन नागरिकांस त्यांच्या वकिलातीनें दिली आहे. ह्यानंतर युद्ध संपेपर्यंत आणखी आगबोट युरोपहून अमेरिकेकडे जाणार नाहीं; असेंहि त्यांस सांगण्यांत आलें आहे.

---


**The Brihan-Maharashtra Sugar Syndicate, Ltd., Poona City.**

## NOTICE.

Notice is hereby given that the Seventh Ordinary General Meeting of the Share-holders of the Brihan Maharashtra Sugar Syndicate, Ltd., Poona 2, will be held on Wednesday the 31st December, 1941 at 3 P. M. (S. T.), at the Company's Registered Office, Commonwealth Building, Laxmi Road, 980, Sadashiv Peth, Poona 2, to transact the following business:—

1. To adopt the Directors' Report and Audited Statement of Accounts for the year ended 30th September, 1941.

2. To elect Directors in place of Dr. R. G. Thakar, Shreemant Jagannath Maharaj Pandit, Rao Bahadur B. L. Modak who retire by rotation as per Article 103 and being eligible offer themselves for re-election.

3. To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

The Transfer Books of the Company will be closed from 16th of December, 1941 to 7th January 1942, ( both days inclusive ).

By Order of the Board of Directors,
C. G. Agashe & Co.,
Managing Agents,
Poona 2.

Dated, 11th December, 1941.

# युद्धजन्य परिस्थितीमुळें

साशंकता कां बाळगतां ?

## वेस्टर्न इंडियाची

पॉलिसी घेतल्यानें आपले पैसे सुरक्षित ठिकाणीं
गुंतले जाऊन शिवाय विम्याचें भरपूर
संरक्षणहि मिळूं शकेल.

माफक हप्त्याचे दर : : : सढळ विम्याच्या अटी

ॲक्सिडेंट बेनिफिट

मालकीचें घर बांधण्यासाठी कर्ज मिळूं शकतें.
सर्व दर्जाच्या लोकांना सोईस्कर अशा
—विम्याच्या योजना—

भरपूर त्रैवार्षिक बोनस दर हजारीं

हयातीनंतर : : हयातींतील
रु. ६७॥ रु. ५४

आजच सविस्तर माहिती मागवा अगर समक्ष भेटा.

# वेस्टर्न इंडिया

## लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

हेड ऑफिसः—सातारा सिटी.

: पुणें शाखा :
१७९ बुधवार
लक्ष्मीरोड, पुणें

## सहकारी वाङ्मयांत भर

( ले. श्री. वा. चिं. भानु )

महाराष्ट्र वाङ्मयाच्या विशाळ मंदिरांत सहकार विभाग हें एक नवीन दालन निर्माण होत आहे ही समाधानाची गोष्ट होय. सहकारी चळवळीसंबंधानें, त्यामधील संस्थांच्या व्यवहारासंबंधानें व सहकारी संस्थांबाबत सरकारनें आजवर केलेल्या कायदेकानु संबंधानें विवेचन करणारीं पुस्तकें अधूनमधून प्रसिद्ध होत आहेत. सहकार हा अर्थशास्त्रांतला एक अत्यंत महत्वाचा विभाग आहे, आणि सहकारी चळवळ- 'को-ऑपरेटिव्ह मुव्हमेंट', ही अर्थशास्त्रांतल्या सिद्धांतावर आधारलेली बाब आहे. अर्थशास्त्रांतले मूलभूत सिद्धांत जरी स्थिर असले तरी त्या सिद्धांतावरून होणारा प्रत्यक्ष व्यवहार हा मात्र देश, काल आणि परिस्थिति याप्रमाणें बदलत जात असतो. प्रत्येक स्वतंत्र राष्ट्र आपल्या स्वतःच्या सुस्थितीला पोषक होईल असें स्वतःचें व्यावहारिक अर्थशास्त्र बनवीत असतें. पांचपन्नास वर्षांपूर्वी यूरपमधील अर्थशास्त्रज्ञ खुल्या व्यापाराचीं तत्वें मोठ्या गंभीरपणानें उच्चारीत असत पण आज तेच अर्थशास्त्रज्ञ देश, काल आणि परिस्थिति दोन महायुद्धांनीं बदलतांच बंदिस्त व्यापाराचा टाहो फोडूं लागले आहेत! आपल्या हिंदुस्थानचें असें स्वतःचें अर्थशास्त्र असलें पाहिजे व तें कसें असावें याची रूपरेषा कै. न्या. माधवरावजी रानडे यांनीं कित्येक वर्षांपूर्वी प्रकट केलेली होती व त्याच मार्गाचा अवलंब करून प्रो. वामनरावजी काळेप्रभृति अर्थशास्त्राचे मार्ग दर्शवीत असतात. सहकार हा अर्थशास्त्राचा एक भाग व अर्थशास्त्राचा राजनीतीशास्त्राशीं अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध; त्यामुळें, प्रत्यक्ष जरी दिसत नसला तरी सहकाराचा राजनीतीशास्त्राशीं फार निकट संबंध आहे. राजनीती शास्त्राचें ध्येय राजकीय स्वातंत्र्य, तसेंच अर्थशास्त्राचें ध्येय आर्थिक स्वातंत्र्य आणि हीं दोन्हीं स्वातंत्र्यें एकमेकास जुळ्या भावंडांसारखीं चिकटलेलीं आहेत. असो, हें ध्येय गाठण्याचा सहकार हा एक अभिजात मार्ग आहे, एक साधन आहे, साध्य नाहीं!

ही दृष्टि जागरूक ठेऊनच सहकाराच्या चळवळीकडे, सहकाराच्या संस्थांकडे आणि सहकारी वाङ्मयाकडे पहावयास हवें आहे. या ध्येयाकडे खेचून नेणारें, तें ध्येय वाचकांना सुस्पष्ट करणारें, ध्येयाचे मार्ग चोखाळण्यास मदत करणारें, शिकविणारें तेंच खरें व अभिजात सहकारी वाङ्मय. असें वाङ्मय निर्माण करणारांची स्वराष्ट्राविषयींची भावना खडबडून जागी झालेली असेल, स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित झालेली असेल, आणि भाषा कमावलेली असेल तरच त्याचें सहकारवाङ्मय राष्ट्राला उद्योगप्रवण करील आणि ध्येयाकडे नेईल. हे विचार सुचण्याचें कारण गेल्या ३-४ महिन्यांत सहकारी संस्थांसंबंधानें माहिती देणारीं, जीं तीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत तीं होय. सहकाराचे चळवळींत वेगवेगळ्या दर्जावर कामें करणारांनीं हीं पुस्तकें रचलीं आहेत; आणि त्यांच्या दर्जाला शोभेल असेंच त्यांचें अंतरंग आहे. प्रो. वा. गो. काळे यांचें 'सहकार', श्री. अ. ज. चितांबर यांचें 'सहकारी चळवळीचीं तत्वें आणि घटना' व श्री. ज्ञा. आ. सावंत यांचें 'सहकारी सोसायट्यांची अंतर्व्यवस्था' हीच तीं तीन पुस्तकें होत. प्रो. वामनरावजी काळे यांच्या अधिकारासंबंधानें एक अक्षरही लिहिण्याची आवश्यकता नाहीं, इतका त्यांचा अर्थशास्त्राशीं व सहकारी चळवळीशीं दाट परिचय आहे व जाणत्यांना त्यांच्या अधिकाराची माहितीहि आहे. दुसऱ्या दोन नवोदित लेखकांची मात्र तशी स्थिति नाहीं. परंतु दोघेही अनुक्रमें अहमदनगर आणि पुणें जिल्ह्यांत यूनियन सुपरवायझर म्हणून प्रख्यात आहेत. सहकारी शेतकी संस्थांवर देखरेख करणारे, निमसरकारी पगारदार अंमलदार आहेत. तेव्हां या तिन्हीही लेखकांची तुलना करणें वेडेपणाचें होईल.

प्रो. काळे यांची गेल्या ४० वर्षांची अर्थशास्त्राचे प्राध्यापक, जबरे लेखक व प्रत्यक्ष कार्यकर्ते म्हणून दीर्घ तपश्चर्या सतत चालू असल्यानें त्यांचे पुस्तकांत सहकारी चळवळीचा तात्विक आणि व्यावहारिक अशा दोन्हीहि दृष्टीनें पण अत्यंत सुटसुटीतपणें विचार करण्यांत आलेला आहे हें निराळें सांगावयास हवें असें नाहीं. पाश्चात्य देशांतील या चळवळीशीं त्यांनीं मोठ्या मार्मिकपणें जी तुलना दुसऱ्या प्रकरणांत केली आहे, त्यामधूनच हिंदुस्थानांतली चळवळ परिणामकारक कां होऊं शकली नाहीं व आहे अशीच राजकर्त्यांची आर्थिक धोरणाची दृष्टि राहील तर सहकाराची खरी प्रगति येथें होऊं शकणार नाहीं, या प्रश्नांचीं उत्तरें कोणाहि अभ्यासू वाचकाला त्यांच्या पुस्तकांत सहज सांपडतील अशीं आहेत. प्रो. काळे यांचें पुस्तक शालोपयोगी क्रमिक पुस्तकासारखेंच झालें आहे. अभ्यासू विद्यार्थ्याला सहकारशास्त्राची, हिंदुस्थानांतल्या सहकाराची, सहकारी कायद्यांची व कानूंची, वेगवेगळ्या प्रमुख संस्थांची इत्थंभूत कामाची पद्धत व महत्व यांची सांगोपांग माहिती पाल्हाळ न लावतां किंवा द्विरुक्ती न करितां, हवी असेल तर हें एकच पुस्तक पुरेसें होईल.

रा. चितांबर आणि सावंत या दोन सुपरवायझरांनीं लिहिलेल्या पुस्तकांत जरी एकच विषय असला तरी त्या विषयाचा परामर्ष मात्र दोघांनीं वेगवेगळ्या पद्धतीनें घेतलेला आहे. दोघेहि सरकारनें नुकत्याच चालविलेल्या सहकार शिक्षणाचे वर्गांत विद्यार्थी म्हणून गेले होते. त्या वर्गांत त्यांनीं शिकत असतां, ज्या टिपण्या ( नोटस ) घेतल्या त्याच सुधारून वाढवून छापून प्रसिद्ध केल्या आहेत असें दिसतें. रा. चितांबर यांनीं आपल्या पुस्तकाचा विस्तार क्रौन साईजच्या १७२ पृष्ठांत ८ प्रकरणें करून बसविला आहे, तर रा. सावंत यांनीं त्याच आकाराचीं २२३ पृष्ठें खर्चून २१ विभाग बनविले आहेत. रा. चितांबर यांनीं सहकाराचीं तत्वें व सहकारी संस्थांची घटना, त्यांचें कामकाज याबद्दल प्रसंगाप्रमाणें उदाहरणें देऊन स्वतःच्या भाषेत विषय समजावून देण्याचा प्रयत्न केला आहे, तर रा. सावंत यांनीं स्वतःची भाषा फारशी खर्ची न घालतां फक्त शेतकीच पतपेढीच्या बाबत कायदे कानू, रजिस्ट्रार साहेबांचीं सर्क्युलरें, पोटनियमांचे मसुदे संकलित करून मॅन्युअलच्या धर्तीवर आपलें पुस्तक थाटलें आहे. याशिवाय साधारण व पंचकमेटीच्या सभेत करावयाच्या ठरावांचे मसुदे, पोटनियम-दुरुस्ती प्रकरणें कशीं खात्याकडे पाठवावींत त्याचा नमुना, कर्जरोख्यांचे नमुने, जमिनी ताब्यांत घेण्याबद्दलचे नमुने, सहकारी खात्यानें सर्क्युलरें काढून यूनियनच्या सुपरवायझरसाठीं पाठविलीं होतीं तींच बहुतेक सर्व शेवटच्या १२३ पृष्ठांत संग्रहित केलीं आहेत. त्यामुळें सेक्रेटरी मंडळींना विशेषसें डोकें न चालवितांहि सरकारी ऑडिट तपासणी-

साठीं किंवा त्याचे पाठोपाठ होणाऱ्या यूनियन सुपरवायझरचे तपासणीसाठी सोसायटीचें दप्तर अद्यवत तयार ठेवतां येण्याची मात्र चांगलीच सोय रा. सावंत यांनीं करून ठेवली आहे. हाच त्यांच्या पुस्तकाचा विशेष आहे. तथापि यांतहि सेक्रेटरीनें जिंदगी-पत्रक कसें तयार करावें त्याचें सोसायटीच्या सांपत्तिक खंबीर-तेचे दृष्टीनें किती महत्व आहे, या संबंधीनें मात्र उल्लेख व्हावा तसा केलेला नाहीं. त्याचप्रमाणें सोसायटीच्या दप्तरांत कोणचीं महत्वाचीं रजिस्टरें व खतावण्या ठेवाव्या लागतात, व्याज-आकारणी केव्हां व कशी करावी याहि बद्दल उल्लेख केलेला नाहीं. हा अपुरेपणा वगळल्यास पुस्तक ठीक आहे.

रा. चितांबर यांनीं मात्र आपल्या पुस्तकांत सहकारी तत्वें व वेगवेगळ्या प्रकारच्या संस्था यांची व्यवस्थित मांडणी करून सर्व-सामान्य वाचकाला विषय समजावून देण्याचा बरा प्रयत्न केलेला आहे. सातव्या प्रकरणांत त्यांनीं शेतकऱ्यांच्या अडचणी व सर-कारवरील जबाबदारी याबद्दल केलेला उल्लेख (पृ. १४० ते १४४) लेखकाची दूरदृष्टि व निस्पृहता दाखवीत आहे. या दृष्टीनें पाहिल्यास त्यांचें पुस्तक रा. सावंताच्या सर्क्युलर संग्रहा-पेक्षा सर्वांना अधिक उपयुक्त होईल असें म्हणावयास हरकत नाहीं. विषय नीट समजावून घेतला असल्यानें त्यांची भाषा सुबोध व ओघवती आहे, व पुस्तकाची किंमतहि कागदाची चणचण लक्षांत घेतां दीड रुपया म्हणजे माफकच आहे.

## हिंदी उसाचें पीक

(१९४१-४२)

| प्रांत अगर संस्थान | १९४१-४२ | १९४०-४१ | वाढ (+) घट (−) |
|---|---|---|---|
| | आकडे हजार | एकरांचे | आहेत |
| सं. प्रांत | १,८३३ | २,३९३ | −५६० |
| पंजाब | ५०६ | ४५४ | +५२ |
| बिहार | ३८४ | ५३० | −१४६ |
| बंगाल | ३०१ | ३३३ | −३२ |
| मुंबई | १५६ | १४१ | +१५ |
| मद्रास | १०५ | १४९ | −४४ |
| सरहद्द प्रांत | ९३ | ७९ | +१४ |
| आसाम | ४१ | ४१ | ... |
| ओरिसा | ३१ | ३५ | −४ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | ३२ | ३२ | ... |
| सिंध | ९ | ७ | +२ |
| दिल्ली | १ | १ | ... |
| हैद्राबाद | ३५ | ३८ | −३ |
| भोपाळ | ९ | ८ | +१ |
| बडोदें | ४ | ३ | +१ |
| एकूण | ३,५४० | ४,२४४ | −७०४ |

उसाच्या एकूण लागवडीपैकीं ५२% लागवड एकट्या संयुक्त प्रांतांत आहे! इतर प्रांतांचा वाटा पंजाब ११·६%, बिहार १०·५%, बंगाल ७·९%, मुंबई ३·१%, असा आहे.

## हिंदी तांदुळाचें पीक

(१९४१-४२)

| प्रांत अगर संस्थान | १९४१-४२ | १९४०-४१ | वाढ (+) घट (−) |
|---|---|---|---|
| | आकडे हजार | एकरांचे | आहेत |
| बंगाल | २३,१४३ | २०,११३ | +३,०३० |
| मद्रास | ५,८०९ | ६,४३७ | −६२८ |
| बिहार | ८,८१९ | ९,२४६ | −४२७ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | ७,७२७ | ७,८५६ | −१२९ |
| सं. प्रांत | ६,५३८ | ७,५४५ | −१,००७ |
| आसाम | ४,३६५ | ४,७९३ | −४२८ |
| ओरिसा | ४,७११ | ४,५५७ | +१५४ |
| मुंबई | २,२४२ | २,२७६ | −३४ |
| सिंध | १,४५५ | १,२८३ | +१७२ |
| पंजाब | ९१६ | ९११ | +५ |
| हैदराबाद | ४६८ | ६५१ | −१८३ |
| बडोदें | १२६ | १५५ | −२९ |
| भोपाळ | ३४ | ३६ | −२ |
| एकूण | ६६,३५३ | ६५,८५९ | +४९४ |

ग्लोब, पुणें.
"ब्रिलियंट" चा पहिला विनोदी मराठी बोलपट
म्यु
नि
सि
पा
लि
टी
श्री. एन्. एस्. लोकूरसाहेब, यांचे अध्यक्षतेखाली
शुक्रवार ता. १९
रोजीं रात्रीं १० वाजतां सुरू होणार!

## ग्रेटब्रिटनमधील कापडाच्या गिरण्या

### सूत व कापड ह्यांच्या निर्गतीचे आकडे

| १९३८ | सूत (दश लक्ष पौंड) | कापड (दश लक्ष चौ. वार) |
|---|---|---|
| पहिली तिमाही | ३३·९ | ३८४·३ |
| दुसरी तिमाही | २७·० | ३२०·६ |
| तिसरी तिमाही | २८.९ | ३३८·२ |
| चौथी तिमाही | ३३·० | ३४४·३ |
| १९३९ | | |
| पहिली तिमाही | ३७·८ | २६२·१ |
| दुसरी तिमाही | २९·५ | ३४०·३ |
| तिसरी तिमाही | २३·५ | ३५२·७ |
| चौथी तिमाही | २३·१ | ३३८·७ |
| १९४० | | |
| पहिली तिमाही | २६·७ | ३२२·४ |
| दुसरी तिमाही | १८·६ | २८५·५ |
| तिसरी तिमाही | १२·१ | २१७·९ |
| चौथी तिमाही | ९·२ | १५२·६ |
| १९४१ | | |
| पहिली तिमाही | ८·१ | १८५·१ |
| दुसरी तिमाही | ७·७ | १७८·७ |

### ब्रिटिश सूत व कापड ह्यांची निर्गत

युद्ध-परिस्थितीचा परिणाम ब्रिटिश कपास कापडाच्या गिरण्यांवर काय झाला आहे ह्याची माहिती वरील आकडे दर्शवितील. १९४१ च्या पहिल्या सहामाहीमधील कपाशीच्या सुताची निर्गत १९३८ च्या मानानें २९% इतकी भरली, परंतु कपास कापडाची निर्गत ५०% च्या पेक्षा अधिक आहे. युरोपांतील देशांतच ब्रिटिश सुताचा खप मुख्यतः होई व तेथील बाजारपेठ आतां बंद पडली आहे त्यामुळें सुताची निर्गत एवढी रोडावली आहे. बाहेरून कपास आणून त्याचें सूत करून निर्गत करण्यापेक्षा कापड करून विकणें अधिक फायद्याचें असतें. हेंहि कपास कापडाचे निर्गतीपेक्षां सुताची निर्गत जास्त प्रमाणांत रोडावण्याचें कारण असावें. मागणीच्या मानानें तयार मालाचा पुरवठा फारच कमी होत आहे.

### युद्धप्रयत्नाची प्रगति

#### ऑक्टोबर, १९४१ मधील जमा

| मध्य भाग | वॉरपर्पज फंड | रेडक्रॉस | डिफें. सेव्हिं. स्टॅंप्स | डिफें. सेव्हिं. सर्टिफिकेट्स | ३% डि. बाँड्स | बिनव्याजी रोखे | वॉरबाँड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | ९,५२६ | ३४९ | ... | ३२० | १२,३०० | ... | ... |
| पू. खानदेश | २५४ | १७१ | ... | ७१० | १०० | ... | ... |
| प. खानदेश | ७११ | ७४ | ... | ४,०७० | ७०२ | ... | ... |
| नाशिक | ८७ | ६८ | ... | १८० | ... | ... | ... |
| पुणें | ८,२२५ | १,२१३ | ... | १८,११० | ९१,२०० | ३,००४ | ५० |
| सातारा | २,४५९ | २२ | ... | ९,४८० | १०,०३८ | ... | ... |
| सोलापूर | ५३४ | ३७ | ... | ९१० | ... | ... | ... |


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

अधिकृत भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,१५,५०,०००

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,१४,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,०६,९७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३३,००,००० |

डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. बा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | १०८—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०२-१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९२—८ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०२—० |
| ३% ( १९६३-६५ ) ... ... ... | ९३—८ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९७—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) ... ... | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% ... ... | १३९—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११०—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% ... | ४६—० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) १½ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०७—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% ... ... | १४८—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २२०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १७०२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६५०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) १½% ... ... | ९३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% ... | ८७७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६४१—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २४५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ५५—८ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २४-१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ८ आ. ... | ५३—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४८२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१०—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) ७½% रु. ... ... | १५०—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३८३—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु. १० आ. ० पै ... | २०१०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १६८—० |


#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४७-१३-० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६६-१२-० |


स्वादिष्ट मसाला करणारे आद्य
कारखानदार


व्ही. पी. बेडेकर
बेडेकर आणि सन्स
पुणें येथील एजंट—
दत्तात्रय नारायण हेजीब.





माधवाश्रम
हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून, रेल्वे-स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.
जागा मध्यवस्तींत, हवाशीर, लागणारे फर्निचरनें शृंगारित असून, सोयीमुळें ती शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहणेची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.
माधवाश्रम बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक

वक्तशीर आणि मनपसंत काम
करून देणारे
**मोहन वॉच कंपनी**
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

**पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें**
**संग्रह करा**
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट,
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
**—: रक्तवर्धक :—**
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें
**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
**'पायोनियर डाइंग हाऊस'**
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




**मधुमेहावरील**
**औषध**
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव!** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख २४ डिसेंबर, १९४१ | अंक ५१


## * विमाक्षेत्रांतील 'कॉमनवेल्थ' चें अढळ स्थान *

### १९४० चें पूर्ण केलेलें काम........४५ लक्षांहून अधिक

**★ बोलका—ढलपा ★**

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८३,००० |
| सरकारी कर्जरोखे, गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१३,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

**• कॉमनवेल्थचीं वैशिष्ट्यें •**

(१) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरूकता
(२) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
(३) काळजीपूर्वक काटकसरीची व्यवस्था
(४) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
(५) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

## कॉमनवेल्थ

अॅशुअरन्स कंपनी लि., पुणें २.

—शाखा—

मुंबई—मद्रास—कलकत्ता—नाशिक—कराची—अहमदाबाद

एम्. एन्. भागवत, बी. ए.
अॅक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडेंट.

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

The Only Book Depot of its Kind in India.

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### बँकांस सुटी
नाताळनिमित्त बुधवार, गुरुवार व शुक्रवार ता. २४ ते २६ डिसेंबर असेर बँका बंद राहतील.

### जपानी शेड्यूल्ड बँका
हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या यादींतून याकोहामा स्पिशी बँक, बँक ऑफ तैवान व मिटसुई बँक ह्या तीन जपानी बँका वगळून टाकण्यांत आल्या आहेत.

### स्वीडन व जर्मनी ह्यांचेमधील व्यापारी करार
स्वीडन व जर्मनी ह्यांचेमध्यें एक व्यापारी करार झाला आहे, त्याचे अन्वयें जर्मनीनें स्वीडनला ५७ लक्ष टन कोळसा यावयाचा असून त्याचे मोबदल्यांत त्याला खनिज धातू व यंत्रसामुग्री मिळावयाची आहे. कराराची मुदत एक वर्षाची आहे.

### विम्याची सक्ती
हिंदुस्थानांतील सर्व कारखान्यांचा विमा उतरविण्याची सक्ती लवकरच केली जाईल. फॅक्टरी ॲक्ट लागू असलेले १३ हजार कारखाने हिंदुस्थानांत आहेत.

### आय. सी. एस. परीक्षा
आय. सी. एस.च्या परीक्षेस बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा त्यांच्या लेखी परीक्षेबरोबरच जानेवारी, १९४२ मध्यें घेण्यांत येईल. लेखी परीक्षेंत चांगले गुण मिळविणाऱ्या कांहीं उमेदवारांसच फक्त तोंडी परीक्षेसाठी बोलावण्याची आजवर पद्धति होती.

### युद्ध खर्च
ग्रेट ब्रिटन चालू युद्धासाठी प्रतीदिन १८ कोटि रुपये खर्च करीत आहे.

### हिंदी सैन्य
चालू युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी हिंदी फौजेंत २½ लक्ष सैनिक होते. त्यांची संख्या आतां १० लाख झाली आहे. अमेरिकेनें युद्धसाहित्य पुरविल्यास, ४० ते ५० लक्ष सैनिक हिंदुस्थानांत सहज तयार होतील, असें सर षण्मुखम् चेट्टी ह्यांनीं न्यू यॉर्कमध्यें सांगितलें.

### हाँगकाँग बँक
हाँककाँग अँड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन ह्या ब्रिटिश एक्सचेंज बँकेची मुख्य कचेरी हाँगकाँग येथें आहे. तेथील दळणवळण तुटल्यामुळें, लंडन येथील मॅनेजरकडे मुख्य मॅनेजरचें काम देण्यांत आलें असून, सर्व शाखांनीं त्यांचे हुकूम पाळावे, अशी त्यांस सूचना देण्यांत आली आहे. म्हणजे, लंडन येथील कचेरीनें बँकेचें नेतृत्व स्वीकारलें आहे.

### पंडित जवाहरलाल ह्यांच्या भाषणाची फिल्म
"मार्च ऑफ टाइम्स" ह्या छोट्या फिल्म्समध्यें घालण्याकरितां एका अमेरिकन कंपनीनें पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अलाहाबाद येथील भाषणाचा प्रसंग चित्रित केला आहे.

### आखूड धाग्याच्या कपाशीची लागवड
आखूड धाग्याची कपास लावणाऱ्या शेतकऱ्यांनीं कपाशीऐवजी धान्य पेरण्यांस प्रारंभ करावा, असें सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांनीं आपल्या भाषणांत नुकतेंच सांगितलें.

### लॉर्ड विलिंग्डन ह्यांचें मृत्युपत्र
हिंदुस्थानचे माजी व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन ह्यांनीं आपल्या मागें मृत्युपत्रांत सुमारें १८ लक्ष रुपयांची इस्टेट ठेवली. त्यांनीं १५ हजार रुपये रोख आपल्या पत्नीस देऊन मुलास १½ लक्ष रुपये व कॅनडा माइन्स लि. मधील हिस्सा दिला. बाकीच्या इस्टेटीचा उपभोग पत्नीनें तिच्या हयातींत करावा व तिच्या मृत्यूनंतर मुलाकडे ती इस्टेट जावी, अशी व्यवस्था आहे.

### चित्रपटांचे वेळांवर नियंत्रण
कराची शहरांतील इंग्रजी चित्रपट दाखविणारीं गृहें रात्रीं ११-३० नंतर उघडीं रहातां कामा नयेत व देशी चित्रपट १२-३० च्या आंत संपले पाहिजेत, असा हुकूम सिंध सरकारनें काढला आहे. १ जानेवारीपासून त्याची अंमलबजावणी होईल.

### वॉर रिस्क विम्याचा हप्ता वाढवला
१९४० च्या ऑर्डिनन्सनें कांहीं विशिष्ट मालाच्या युद्धविषयक विम्याची सक्ती केली. त्या विम्याचा हप्ता आतां वाढवून दर शेकडा दरमहा दोन आणे करण्यांत आला आहे. जानेवारी ते मार्च १९४२ ह्या तिमाहींत हा दर चालू राहील.

### वॉर टॅक्स
ऑस्ट्रेलियन सरकार एक खास युद्ध कर बसविणार आहे, तो प्राप्तीवर अवलंबून राहील. कंपन्यांवरील करहि वाढविण्यांत येणार आहे.

### वाढदिवस
पंडित मदन मोहन मालवीय ह्यांचा ८१ वा वाढदिवस बनारस विश्वविद्यालयांत नुकताच साजरा करण्यांत आला.

### चौकशी कमिशन
जपान पर्ल बंदरावर अचानकपणें हल्ला कसा करूं शकला, ह्याची चौकशी करण्याकरितां सुप्रीम कोर्टाच्या एका न्यायाधिशाचे अध्यक्षतेखाली प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं एक कमिशन नेमलें आहे.

### कोळसा-पुरवठा-अधिकारी
हिंदुस्थानांतील कोळशाचा कारखान्यांस योग्य प्रमाणांत पुरवठा चालू रहावा, ह्याकरितां व्यवस्था करण्यासाठी सरकारनें मि. सी. ए. कुक, आय. सी. एस. ह्यांची खास नेमणूक केली आहे.

### नॅशनल डिफेन्स कौन्सिल
नॅशनल डिफेन्स कौन्सिलची तिसरी बैठक दिल्ली येथें व्हाइसरॉयांचे अध्यक्षतेखाली ता. २, ३ व ४ फेब्रुवारी रोजीं भरणार आहे.

### एक महिन्याचा आगाऊ पगार
ज्या सरकारी नोकरांना आपल्या कुटुंबांतील मंडळींस कलकत्ता शहराचे बाहेर पाठविण्याचें असेल, त्यांस एका महिन्याचा आगाऊ पगार देण्यांत येणार आहे.

### शत्रुपक्षीयांचे हितसंबंध
जर्मनी, इटली व बल्गेरिया ह्यांच्या अमेरिकेंतील हितसंबंधांकडे स्वित्सरलंड लक्ष देणार असून स्वीडननें हंगेरी व रुमेनिया ह्यांच्या हितसंबंधांकडे पहाण्याचें मान्य केलें आहे.

### वॉररिस्क (गुड्स) इं. फंड
मालाच्या युद्धविषयक धोक्याच्या विम्याच्या फंडाचा ३० सप्टेंबर १९४१ अखेरचा आकडा १ कोटि, ५ लक्ष रुपये झाला आहे. फंडांतून पैसे देण्याचा प्रसंग आला नाहीं.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ६३८ |
| २ प्राप्तीवरील कर आणि आर्थिक परिस्थिति ... | ६३९ |
| ३ पोस्ट्स आणि तारखात्याची कामगिरी ... | ६४० |
| ४ स्फुट विचार ... | ६४१ |
| कागद आणि स्टेशनरी—बाजारभावांचें नियंत्रण—बाजारभाव आणि चलन-पूर्व रशियांतील युद्ध—रणांगणावरील परिस्थिति— | |
| ५ कॉमर्स मॅ. असोसिएशन | ६४३ |
| ६ हिंदी आयुर्विम्याची प्रगति | ६४४ |
| ७ मलायामधील सुलतान | ६४५ |
| ८ ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या | ६४५ |
| ९ कातड्याच्या बुटांचें जागतिक उत्पादन ... | ६४६ |
| १० कोइमतूर येथील गिरण्या | ६४६ |
| ११ निवडक बाजारभाव | ६४७ |



# अर्थ

बुधवार, ता. २४ डिसेंबर, १९४१


## प्राप्तीवरील कर आणि आर्थिक परिस्थिति

हिंदुस्थान सरकारच्या प्राप्तीवरील खात्याचा १९३९–४० सालाबाबतचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून असें दिसतें कीं सदरहु खात्याच्या दक्षतेमुळें सरकारी तिजोरीच्या उत्पन्नांत सवातीन कोटि रुपयांची भर पडली; म्हणजे खात्यानें चौकशी निक्षून केली नसती तर कर देणारांनीं सवातीन कोटि रुपयांचें देणें चुकवलें असतें. प्राप्तीवरील करास पात्र असलेले लोक आपल्या मिळकतीचे आकडे खात्याकडे पाठवतात, ते विश्वसनीय मानून खात्यानें डोळे मिटून स्वीकारले असते आणि त्यांस अनुसरून आकारणी केली असती तर सरकारचें वरील नुकसान झालें असतें. प्राप्तीवरील करास पात्र असलेल्यांच्या यादींतून ३८ हजार नांवें काढून टाकण्यांत आलीं आणि ३६ हजार नवीन नांवें दाखल केलीं गेलीं. हरतऱ्हेनें कर चुकवण्याचे प्रयत्न अहवालाच्या सालीं नेहमीप्रमाणें सर्रहा चालू होते असा त्यांत शेरा मारण्यांत आला असून ह्या हिकमतींचीं उदाहरणें देण्यांत आलीं आहेत. हिशेबाच्या दोन प्रकारच्या वह्या ठेवणें, खोट्या खरेद्यांचे आकडे दाखवणें, विक्री लपवून ठेवणें, घरांसारख्या मालमत्तेचें उत्पन्न व धंद्यांच्या शाखांपासून होणारी मिळकत वगळणें, भलत्यांच्या नांवांचीं खातीं ठेवून वाटेल त्या रकमा व्याज व पगार ह्यांच्यासारख्या बाबींवर खर्ची टाकणें इत्यादि प्राप्ती कमी दाखवून कर टाळण्याच्या युक्त्या नमूद करण्यांत आल्या आहेत. हिशेबांत खोट्या इसमांच्या नांवांनीं रकम खर्ची टाकून एका गृहस्थानें आपल्या सट्ट्यांच्या व्यवहारांपासून झालेला फायदा छपवून ठेवण्याचा यत्न केला होता, तो उजेडांत आणला जाऊन पावणेपांच लक्ष रुपयांची त्याच्या प्राप्तीवर कर आकारणी झाली. त्यानें ह्या रकमेच्या ऐवजी सुमारें सवा लक्षाचा आंकडा दाखवला होता. त्याचा कर तर वाढलाच, पण शिवाय पन्नास हजार रुपयांचा दंडहि त्यास भरावा लागला. एका जमीनदारानें बँकांतील आपल्या ठेवींच्या वरचें व्याज प्राप्तींत धरलें नव्हतें; त्याचें प्रकरण पांच हजार रुपये त्यानें भरून मिटलें. जंगलाचीं कंत्राटें घेणाऱ्या एका मंडळीनें खर्च फुगवून दाखवला आणि विक्रीपैकीं कांहीं उत्पन्न भागीदारांच्या वैयक्तिक खात्यांत जमा केलें. ह्या भागीदारीनें एक लक्ष रुपयांचें उत्पन्न दाखवलें होतें. चौकशी अंतीं १२ लक्षांची प्राप्ति निश्चित करण्यांत आली, त्या रकमेवर कर आकारणी झाली आणि शिवाय दंड द्यावा लागला. एका वकिलाच्या बाबतींत त्यानें उत्पन्न झाकल्याचें आढळून आलें आणि तडजोडीवर प्रकरण निकालांत निघालें. एक गृहस्थ आपल्या दूरच्या नातेवाइकाच्या नांवानें व्यवहार करीत होता, त्यास दंड भरावा लागला. दुसऱ्या एकास व्याजाचे चाळीस हजार रुपये मिळाले होते, त्याचे हिशेब न दाखवले गेल्यानें त्यास आठ हजार रुपये दंड झाला. दुसऱ्या एकास बाहेरच्या ठिकाणांहून चेकनें धंद्याचें मोठें उत्पन्न येत असे तें तो आपल्या अज्ञान मुलांच्या नांवानें जमा करी. त्यावर खटला भरण्यांत आला आणि अखेर त्यांत दीड लक्ष रुपयांवर तडजोड झाली.

प्राप्तीवरील ( सुपर टॅक्स धरून ) कराची एकूण आकारणी, दोन कोटि रुपयांचा रिफंड वजा जातां, १९३९-४० मध्यें वीस कोटि रुपये होती. त्यापैकीं प्रत्यक्ष वसुली एकोणीस कोटींची झाली. १९३८-३९ मध्यें हा आकडा सतरा कोटि होता. प्राप्तीवरील करांचें उत्पन्न व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या परिस्थितीवर अवलंबून असतें हें सांगावयास नको. धंद्यांची चलती असेल त्या मानानें तें अधिक-कमी होतें. त्रावणकोर नॅशनल अँड क्विलॉन बँक बुडाल्यामुळें मद्रास प्रांतांतील उद्योगधंद्यांवर मंदीची छाया पसरली होती. कपास सुताच्या व कापडाच्या गिरण्या साधारणपणें बऱ्या स्थितींत होत्या. साखरेच्या धंद्यास चांगला फायदा मिळाला. पांढरपेशा वर्गाची प्राप्ती मात्र घसरणीला लागलेली दिसून आली. लढाऊ सामानाच्या वाढत्या उत्पादनामुळें लोखंड-पोलादाच्या कारखान्यांची स्थिति अनुकूल होती. ह्या धंद्यांतून निघणारें उत्पन्न एका वर्षांत ३७ लक्ष रुपयांचे ५० लक्ष रुपये झालें तरीहि व्यापाराची स्थिति सामान्यतः सुमारच होती. बंगाल प्रांतांत दगडी कोळसा, कापूस, इंजिनिअरिंग, वीज यांचे संबंधांतील धंदे आणि चहा ह्यांची स्थिति बऱ्यापैकीं होती पण ताग व कापड ह्यांच्या धंद्यास वाईट दिवस आल्यानें बंगालच्या कित्येक जिल्ह्यांतलें सरकारी उत्पन्न घटलें. जहाजांच्या वहातुकीचा धंदा करणाऱ्या कंपन्यांस नफ्यामधून घसारा काढण्यासहि वाव मिळाला नाहीं आणि म्हणून त्यांचेकडूनहि सरकारी उत्पन्न निघणें अशक्य झालें. विमा कंपन्यांचा कारभार पूर्वीच्या वर्षांच्या मानानें खालावलेला दिसला. संयुक्त प्रांतांतील धंद्यांचा विचार करतां असें आढळतें कीं कामकरी लोकांचे बांधे, मागणीच्या मानानें फाजील उत्पादन, कच्च्या कापसावरील आयात जकात, ब्रिटिश कापडावरील जकातींत घट आणि जपानी मालाची मोठ्या प्रमाणावरील आयात इत्यादि कारणांमुळें तेथील आर्थिक परिस्थिति समाधानकारक नव्हती. कच्च्या मालाच्या किंमतीच्या मानानें पक्क्या मालाचे बाजारभाव वर जाऊं शकले नाहींत, ह्या कारणानें व्यापार व उद्योगधंदे किफायतशीर झाले नाहींत. जपानच्या स्पर्धेमुळें रेशमाच्या कापडाच्या व्यापारास मंदी आली. जकातीच्या संरक्षणामुळें साखरेचे कारखाने तेजींत राहिले. शेतकऱ्यांचीं कर्जें कमी करून त्यांस सहाय देण्याच्या हेतूनें अनेक प्रांतांत कायदे झाले त्यांचा परिणाम खेडेगावी सावकारांच्या धंद्यावर प्रतिकूल रीतीचा झाला. सावकारांस आपलीं येणीं वसूल करण्याची पंचाइत झाली आणि त्यांची प्राप्ति घटली. प्राप्तीवरील कर वसूल करणाऱ्या हिंदुस्थान सरकारच्या खात्याच्या कारभाराची १९३९-४० सालाबाबत माहिती वर दिली आहे तिच्या योगानें हिंदी धंद्यांच्या परिस्थितीवर उद्बोधक प्रकाश पडतो.

## पोस्ट्स आणि टेलिग्राफ्स खात्याची कामगिरी

हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत पोस्टाच्या खात्याकडे विविध प्रकारचीं महत्त्वाचीं कामें सोपवण्यांत आलेलीं आहेत. जनतेच्या नित्याच्या आयुष्यक्रमाशीं व देशाच्या आर्थिक व्यवहारांशींहि त्यांचा निकट संबंध आहे. देशांत व परदेशांत पत्रें पोहोंचवणें, विजेनें संदेश पाठवणें, लोकांची बचत ठेव म्हणून बाळगणें, पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पाठवणें इत्यादि उपयुक्त कामगिरी पोस्ट्स खातें करीत असून त्याचा खर्च सरकारच्या अंगावर न पडतां त्यापासून थोडेसें नक्त उत्पन्नहि येतें. युद्ध परिस्थितींत पोस्ट्स आणि टेलिग्राफ्स खात्याच्या कारभाराचा विस्तार वाढला असून युद्धकार्य चोखपणानें होण्याची जरूर ती व्यवस्था त्यांनें केली आहे. सर्व युद्धक्षेत्रांत पोस्ट ऑफिसें उघडण्यांत आलीं असून त्यांमध्यें सर्व दर्जांचे एक हजार नोकर कामावर आहेत. ह्या क्षेत्रांसाठी विद्युत्संदेशांची तरतूद करणेंहि आवश्यक होतें. तीमध्यें पंधराशे माणसें काम करीत आहेत. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतहि युद्धामुळें खात्याचें काम वाढलें आहे आणि त्याच्या वृत्तांताच्या गेल्या वर्षांत दोन हजार नवीन नोकरांची भरती करण्यांत आली आहे. ह्या कारणानें नित्याच्या नोकरांची संख्या एक लक्ष एकवीस हजारांपर्यंत वर गेली आहे. हंगामी नोकर कामावर घेण्यांत आले आहेत. त्यांची गणती ह्या संख्येंत नाहीं. युद्धामुळें यांत्रिक तऱ्हेचें शिक्षण असलेले नोकर जरूर असतात; त्यांच्या शिक्षणाकरितां खास वर्ग चालवण्यांत येत आहेत.

युद्धपरिस्थितीचा परिणाम पोस्ट्स खात्यावर अनेक बाबींमध्यें झाला आहे. १९४० च्या डिसेंबरांत देशांतल्या देशांत पाठवावयाच्या पत्रांवरील स्टँपचा दर एक आण्याचा पांच पैसे करण्यांत आला आणि बुक पोस्ट वगैरेचा हा दर पांच तोळ्यांस नऊ पै केला गेला. इंग्लंड, इजिप्त वगैरे देशांकडे जाणाऱ्या पत्रांचेवरील दरहि वाढवण्यांत येऊन तो साडेतीन आणे झाला. ब्रह्मदेशाचा दर दोन आणे निश्चित करण्यांत आला. आकाश मार्गानें जाणाऱ्या टपालाच्या वहातुकीबाबत योग्य फेरबदल करावे लागले आहेत. कांहीं देशांशीं दळणवळण बंद करावें लागलें असून दुसऱ्यांच्या मार्गाची आंखणी बदलण्यांत आली आहे. हुंडणावळीचा आणि विशेषतः डॉलर हुंडीचा दर स्थिर रहावा म्हणून परदेशांत पाठवल्या जाणाऱ्या मनीऑर्डरी आणि सोनें, जवाहीर वगैरेंचीं पार्सलें ह्यांवर नियंत्रण घालण्यांत आलें आहे. आफ्रिका, इराक, मलाया इत्यादि ठिकाणीं कामगिरीवर असलेल्या फौजेच्या टपालाच्या सोयीसाठी सवलतीच्या दराची आकारणी करण्यांत आली आहे. विद्युत्संदेशांच्या संबंधांतहि सोयीची तजवीज केली गेली आहे. युद्धकार्यास जनतेनें खर्चांत होणाऱ्या बचतीचा उपयोग ती सरकारकडे ठेव म्हणून ठेवण्यानें चांगला होत असतो. ह्या दृष्टीनें पोस्टांत 'डिफेन्स सेव्हिंग्ज बँक' ह्या नांवाची स्वतंत्र शाखा काढण्यांत आली आहे आणि तीमधील ठेवींवरील व्याजाचा दर दीडच्या ऐवजी अडीच टक्के आहे. युद्धसमाप्तीनंतर एक वर्ष होईपर्यंत ह्या खात्यांतले पैसे ठेवीदारांस काढतां येत नाहींत ही येथें अट आहे. आणि तिचा उद्देश स्पष्टच आहे. डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांची योजना १९४० सालीं चालू झाली आणि तिचे योगानें सुमारें साडे तीन कोटि रुपये पोस्टामार्फत सरकारकडे जमा झाले आहेत. अत्यंत अल्प प्राप्तीच्या लोकांस आपली बचत सरकारकडे ठेवतां यावी म्हणून 'डिफेन्स सेव्हिंग्ज स्टँप'ची योजना १९४० च्या ऑगस्ट महिन्यांत सुरू करण्यांत आली. तिच्या मार्गानेंहि पैसा सरकारकडे येत आहे.

टेलिफोन आणि टेलिग्राफ ह्यांच्या व्यवस्थेंत महत्त्वाचा विस्तार झाला आहे. ट्रंक टेलिफोन वाढले आहेत आणि दिल्ली-कलकत्ता व दिल्ली-सिमला ह्यांच्यामधील टेलिफोनची व्यवस्था अधिक विस्तृत केली जात आहे. १९४० च्या डिसेंबरांत टेलिग्राफ व टेलिफोन ह्यांच्या दरांत वाढ करण्यांत आली. देशांतल्या व बाहेरच्या तारांची व त्यांतल्या शब्दांची संख्या वाढली असून १९३९-४० च्या मानानें १९४०-४१ मध्यें तारांतील शब्द अडीच पटीनें अधिक झाले. युद्धविषयक बातम्यांचा प्रसार कार्यक्षम रीतीनें व्हावा म्हणून १९४१ च्या ऑक्टोबरपासून वृत्तपत्रांकडे जाणाऱ्या तारांचे दर कमी करण्यांत आले. तारांच्या संदेशांचे सोयीसाठी आठ हजार मैल लांबीच्या जादा तारा टाकण्यांत आल्या आहेत. टेलिफोन्सना विलक्षण मागणी वाढली आहे. १९४०–४१ मध्यें त्यांची संख्या तीस टक्क्यांनीं वाढली आणि युद्धप्रयत्नास उपयोगी पडणाऱ्या टेलिफोन्सना अग्रस्थान द्यावें लागलें आहे. युद्धामुळें रेडिओची लोकप्रियता वाढली आहे आणि गेल्या तीन वर्षांत त्यांचे परवाने तिप्पट झाले आहेत. टेलिग्राफ आणि टेलिफोन ह्यांचेसाठी सामान लागतें, तें युद्धपरिस्थितींत मिळण्याची अडचण पडली. युद्धासाठी प्रत्यक्ष उपयोगांत येणारे जिन्नस आणवण्याची खास तजवीज करण्यांत आली. टेलिग्राफ शाखेच्या वर्कशॉपमध्यें जरूरीचे जिन्नस कामकरी रात्रंदिवस खपून बनवीत आहेत. चोवीसशे कुशल कामगार ह्या कारखान्यांत खपत आहेत. ह्यापूर्वीं टेलिफोन्स परदेशांतून आणावे लागत असत; आतां ते टेलिग्राफ कारखान्यांत बनवले जात आहेत. बॅकेलाइटचा माल तयार करण्यासाठी दाबाचीं यंत्रें आणवलीं जात आहेत. पोस्ट्स व टेलिग्राफ्स खात्यांतील नोकरवर्गानें स्वयंस्फूर्तीनें युद्धफंड जमा केला आहे. तीन लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी दोन लक्ष रुपये ह्या फंडांतून ब्रिटिश सरकाराकडे पाठवण्यांत आले असून त्यांस हिंदी पोस्ट्स, टेलिग्राफ्स व टेलिफोन्स ह्यांचीं नांवें देण्यांत आलीं आहेत. आतांपर्यंत दिलेल्या माहितीवरून हिंदुस्थानांतील पोस्ट्स व टेलिग्राफ्स खात्यानें युद्धामुळें उत्पन्न झालेल्या विशिष्ट परिस्थितींत आपलें उपयुक्त कार्य चालू ठेवून तें कसें वाढवलें आहे ह्याची सहज कल्पना येईल. ह्या कामगिरीचें वाढतें मोल जनतेस यावें लागत आहे ही गोष्ट खरी आहे. तथापि, खात्याचा खर्च सर्व बाजूंनीं वाढत चालला असतां आपल्या कामाची किंमत त्यास वाढवावी लागणें क्रमप्राप्तच आहे हें विसरतां कामा नये.

# स्फुट-विचार

## कागद आणि स्टेशनरी

वृत्तपत्रांचा व इतर जातींचा कागद विलक्षण महागला आहे ह्याचा अनुभव सर्वांस प्रत्यहीं येत आहे. हिंदी कागद गिरण्यांनीं आपलें उत्पादन कितीहि वाढवलें तरी त्यांस देशांतली मामुली मागणीहि पुरवतां येणें शक्य नाहीं हें उघड आहे. हिंदुस्थान सरकारास लागणारा कागद व स्टेशनरी ह्यांचा पुरवठा जरूरीप्रमाणें लंडनमधील इंडिया स्टोअर्स डिपार्टमेंटकडून होत असतो. पण तो आतां बहुतेक संपुष्टांत आल्याकारणानें सरकारची गरज ह्या देशांत मिळेल त्या निवडक मालावर भागवली जाणें अपरिहार्य झालें आहे. १९३९-४० सालीं ४६ लक्ष रुपये किंमतीचा कागद सरकारसाठीं खरेदी करण्यांत आला होता आणि ह्या खरेदीची किंमत १९४०-४१ मध्यें ५४ लक्षांवर गेली. चालू सालांत साडेनऊ हजार टन वजनाचा कागद लागेल ह्या हिशेबानें त्याच्या पुरवठ्यासंबंधांतली व्यवस्था निरनिराळ्या स्वदेशी गिरण्यांशीं करण्यांत आली होती. पण वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांतच आठ हजार टनांचा पुरवठा होऊन गेला आहे. कागद पुरवणाऱ्या गिरण्या आणि व्यापारी ह्यांस कच्चा माल व इतर सामुग्री मिळण्याची अडचण भासत होती, त्या कामीं सरकारनें त्यांस मदत दिली. सेंट्रल स्टेशनरी ऑफिसनें १९४०-४१ मध्यें ७४ लक्ष रुपयांचा कागद व स्टेशनरी ह्यांची खरेदी केली; १९३९-४० मध्यें ही खरेदी ६१ लक्षांची झाली होती. अलीकडे सरकारी आफिसें व त्यांचें काम ह्यांमध्यें मोठा विस्तार झाला असल्यानें चालू सालीं पावणे दोन कोटि रुपयांचेवर हा आकडा जाईल असा अंदाज आहे. युद्धापूर्वी सरकारी खात्यांच्या उपयोगासाठी दर महिन्यास सरासरीनें २०० टाइपरायटर सेंट्रल स्टेशनरी ऑफिसच्या मार्फत खरेदी केले जात असत; आतां हा आकडा ६०० झाला आहे. म्हणजे टाइपरायटर्सच्या खरेदींत २०० टक्के वाढ झाली आहे. सरकारी छपाईचें कामहि विलक्षण वाढलें असून सरकारी छापखान्यांस तें उरकेनासें झालें आहे. त्यामुळें त्यांतलें बरेंचसें काम खाजगी छापखान्यास देण्यांत येत आहे.

## बाजारभावांचें नियंत्रण

गहू, तांदूळ ह्यांच्या सारख्या जनतेच्या नित्याच्या आहाराच्या जिनसांच्या किंमती कडकू लागल्यामुळें त्या प्रवृत्तीवर परिणामकारक उपाय योजले जाण्याचा प्रश्न तातडीनें ह्या देशांत उद्भवला आहे. खाण्याच्या जिनसांचे भाव योग्य मर्यादेंत रहाण्यासाठी सरकारनें काय करावें ह्याचा विचार सारखा चाललेला आहे. प्रांतिक सरकार व हिंदुस्थान सरकार ह्यांच्या प्रतिनिधींनीं त्याबावत चर्चा केली असून कित्येक प्रांतांत विशिष्ट जिनसांच्या कमाल किंमती निश्चित केल्या गेल्याहि आहेत. धान्य पिकवणारे, त्याचा व्यापार करणारे व वापरणारे ह्यांच्या हितसंबंधाचा मेळ घालण्याची आणि हिंदुस्थानासारख्या विस्तृत देशांत पुरवठा व किंमती ह्यांचे बाबतींत नियंत्रण घालण्याची अडचण तीव्रतेनें भासत आहे. तथापि, धान्यांचे बाजारभाव मर्यादेबाहेर कडकू लागून त्यांचा व्यापारी व्यवहारांत अनिश्चितपणा व चढउतार होणें अनिष्ट वाटल्यावरून पंजाबासारख्या प्रांतांत सरकारास गव्हाच्या कमाल किंमती ठरवाव्या लागल्या आहेत, इतकेंच नव्हे, तर त्या धान्याचा पुरवठा स्वतःच्या ताब्यांत घेऊन त्याचें नियमन करावें लागलें आहे. सध्याच्या सारख्या परिस्थितींत मामुली पद्धतीचे व्यापारी व्यवहार, त्यांतील सट्टेबाजी व वायद्याच्या विक्र्या-खरेद्या इत्यादि प्रकार नेहमीप्रमाणें चालूं शकत नाहींत; आणि असल्या विशिष्ट स्थितींत विशिष्ट नियमनात्मक उपाय योजावे लागतात. मुंबईमध्यें तांदूळ, कोळसा, वगैरे नित्याच्या उपयोगाच्या जिनसांचे भाव चढत असल्यानें प्रांतिक सरकारनेंहि किंमती निश्चित करण्याचें धोरण शक्य तेथें अंगिकारलें आहे. ह्या मालाचा पुरवठा वाढण्याचीहि व्यवस्था होणें अगत्याचें आहे.

## बाजारभाव आणि चलन

मालाचा पुरवठा व मागणी ह्यांचे संबंधांत जिल्ह्याजिल्ह्यांतली परिस्थिति भिन्न असल्यानें ती विचारांत घेऊन प्रांतिक सरकारांस बाजारभावांच्या नियमाचें धोरण अमलांत आणावें लागेल. एवढेंच नव्हे तर निरनिराळे प्रांत व हिंदुस्थान सरकारच्या हुकमतखालच्या रेल्वेज व इतर खातीं ह्यांचें पूर्ण सहकार्य झालें पाहिजे. ह्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें प्रस्तुत प्रश्न प्रांतिक कक्षेंत येतो म्हणून प्रांतांच्या सरकारांवरच तो सोंपवून चालावयाचें नाहीं आणि त्यांत त्यानें लक्ष घालणें आवश्यक आहे. व्हाइसरॉय, लॉर्ड लिनलिथगो, ह्यांनीं असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या वार्षिक सभेंत कलकत्ता येथें गेल्या आठवड्यांत भाषण केलें, त्यामध्यें ह्या प्रश्नाचा उल्लेख प्रामुख्यानें आला आहे. बाजारभाव चढण्याच्या एका कारणाचें विवेचन त्यांनीं विस्तृतपणानें केलें आणि त्यासंबंधानें खबरदारी घेतली जाण्याच्या महत्वावर जोर दिला. पदार्थांच्या पुरवठ्याच्या मानानें जनतेच्या विशेषतः शहरी लोकांच्या हातीं फाजील चलन खेळणें हें तें कारण होय. तें दूर होण्याचा मुख्य उपाय म्हटला म्हणजे ज्यांच्या हातिं अधिक चलन येईल, त्यांनीं तें सरकारी कर्जांत गुंतवणें हा होय. आपला पैसा अशा रीतीनें गुंतवतां यावा ह्याकरितां पोस्टामार्फत सरकारनें सामान्य जनतेसहि सोयी करून दिल्या आहेत. त्यांचा उपयोग सर्वांनीं करावा अशी सूचना व्हाइसरॉय ह्यांच्या भाषणांत आहे. किंमती चढल्या कीं, मजूरीचे दर वाढवावे लागतात आणि मजूरी वाढली म्हणजे किंमती पुन्हां चढतात. हें चक्र असें फिरूं नये ह्याकरितां त्यांची सूचना आहे, व्यवहारांत फाजील चलन खेळणें आणि त्यायोगानें बाजारभाव चढणें ही सामाजिक व राष्ट्रीय आपत्ति आहे हें येथें लक्षांत ठेवणें आणि इतर देशांच्या ह्या बाबतींतल्या कटु अनुभवापासून वेळींच योग्य बोध घेणें अगत्याचें आहे.

## पूर्व रशियांतील युद्ध

युद्ध आतां हिंदुस्थानाच्या दरवाजाजवळ येऊन धडकलें आहे ह्या उक्तींत यत्किंचितहि अतिशयोक्तीचा भाग राहिलेला नाहीं. पश्चिमेकडे सुएजचा कालवा आणि पूर्वेस सिंगापूर हीं हिंदुस्थानच्या रक्षणाचीं मान्याचीं ठिकाणें आहेत असें आजवर सांगण्यांत येत होतें आणि लिबिया, सीरिया, इराक व इराण ह्यांच्या बाजूस शत्रूचा बंदोबस्त झाल्याकारणानें ह्या देशास युद्धाची भीती उरली नाहीं असें वाटण्यास जागा होती. पॅसिफिक महासागरांत सिंगापूरच्या बाजूस संरक्षणाची तयारी चांगली झाली होती आणि अमेरिका व इंग्लंड ह्यांचें शत्रुत्व स्वतःवर ओढून घेण्याचें धाष्टर्य जपान करणार नाहीं अशी सामान्य समजूत

होती. वॉशिंग्टन येथें चाललेल्या वाटाघाटींचा परिणाम पूर्व एशियांतील शांतता अबाधित रहाण्यांत होईल अशी आशा शेवटपर्यंत वाटत होती. परंतु युद्धाची सर्व तयारी जय्यत करून जपाननें अनपेक्षित रीतीनें अमेरिका व इंग्लंड ह्यांच्या प्रदेशांवर एकदम हल्ले चढवल्यानें जागतिक युद्धास आतां निकराचें स्वरूप प्राप्त झालें असून स्वसंरक्षणाची योग्य व्यवस्था करण्याची जबाबदारी हिंदुस्थानावर येऊन पडली आहे. जपानच्या अचानक हल्ल्यांमुळें अमेरिका व इंग्लंड ह्यांच्या लढाऊ साधनांचा नीट जम करून त्यांचा परिणाम शत्रूवर होण्यास वेळ लागणें अपरिहार्य आहे. पॅसिफिक महासागरांत लहान मोठीं बेटें कशीं विखुरलीं आहेत हें पाहिलें असतां शत्रूस प्रारंभीं कांहीं ठिकाणीं बेताचाच प्रतिकार होणें कसें स्वाभाविक आहे हें सहज समजेल. मलायामध्यें जपानी सैन्यें हळुहळु पुढें सरकत आहेत ह्याचें कारण फ्रेंच इंडोचायना व थायलंड ह्यांचे मधून पश्चिम व दक्षिण ह्यांचे बाजूकडे चाल करण्यास त्यास वाव मिळाला हें आहे. पण सध्याच्या युद्धांत रशिया, अमेरिका, इंग्लंड व चीन ह्यांची एक फळी लागून राहिली आहे हें येथें ध्यानांत बाळगलें पाहिजे आणि जपानला ह्या जुटीस तोंड देणें कठिण होणार आहे ह्या विषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं. रशियन सैन्यांनीं आपल्या सबंद आघाडीवर जर्मनीस मागें रेटलें असून लेनिनग्राड व मॉस्को ह्यांवर येऊं पहात असलेलें संकट दूर झालें आहे. लिबियांत जर्मन व इटालियन फौजांची पीछेहाट सारखी चालू आहे. ह्या घडामोडी उत्तेजनकारक असून अमेरिका व इंग्लंड ह्यांस आपलें लढाऊ सामर्थ्य आतां पूर्व एशियांत एकवटावयाचें आहे. त्या कामीं व्यवस्थित प्रगति होत आहे आणि जपानची घमेंड जिरवण्याची तयारी चालली आहे. हिंदुस्थानचें युद्धांतलें मध्यवर्ती स्थान आतां अधिक उठावदार दिसत आहे आणि त्या स्थानास योग्य अशी कृति ह्या देशाकडून होईल ह्यांत संशय नाहीं.

---

### रणांगणांवरील परिस्थिति

कडक हिवाळा रशियांत पडूं लागण्यापूर्वींच लेनिनग्राड व मॉस्को काबीज करून बसण्याचा जर्मनीचा बेत फसला आहे आणि जर्मन सैन्यांस सर्व रणभूमींवर मागें हटावें लागत आहे. ही पीछेहाट प्रत्यक्ष जर्मनीनेंच कबूल केली आहे. रशियन सैन्यास कडक थंडीची व बर्फाची अधिक संवय असल्यानें ती शत्रूचा सारखा पाठलाग करून गमावलेला प्रदेश पुन्हां हस्तगत करून घेत आहेत. बंदिस्त जागा निवडून तेथें हिवाळ्यांत मुक्काम करून रहावयाचा जर्मनीचा इरादा दिसतो, पण त्या कामीं रशिया शत्रूस यश मिळूं देणार नाहीं. तूर्त कांहीं महिने पूर्वेकडील आघाडीवर बेताचें सैन्य ठेवून आफ्रिकेच्या बाजूस आपला मोर्चा वळवण्याचें धोरण हिटलर आखीत असणें शक्य आहे. लिबियामध्यें जर्मन व इटालियन सैन्यांस माघार खात्री लागली असल्यानें नवीन युद्धक्षेत्राची तयारी करणें त्यास प्राप्त आहे. रशियाच्या विजयानें जर्मनीची इभ्रत व शक्ती कमी झाली आहे, ती भरून काढण्यास हिटलर कोणती युक्ती शोधून काढतो ह्याविषयीं तर्क चालू आहेत. पॅसिफिक महासागरांत जपाननें युद्ध आरंभल्यानें त्या दोस्ताच्या मदतीसाठी दुसऱ्या बाजूस इंग्लंड व अमेरिका ह्यांचे विरुद्ध कांहीं तरी खटपट करणेंहि जर्मनीस प्राप्त आहे. पण असें करतां येण्याजोगें लढाऊ बळ त्याजवळ आहे किंवा काय ह्याची शंका आहे. स्पेनची आपल्या मदतीसाठी उठावणी करण्याचे जर्मनीचे प्रयत्न निष्फळ झाल्याची बातमी आहे. व्हिशीच्या फ्रेंच मंत्रिमंडळावर असेंच दडपण आणण्याची खटपट जर्मनीनें आज कित्येक महिने चालवली आहे. ह्या दृष्टीनें आणि पूर्व एशियांत जपाननें अमेरिका व इंग्लंड ह्यांचे वर एकाच वेळीं शस्त्र उचललें असल्यानें रशिया, इंग्लंड, अमेरिका, चीन व डच ईस्ट इंडीज ह्यांच्या युद्ध-विषयक धोरणांत एकसूत्रीपणा आणणें व लढाऊ सामुग्रीचें उत्पादन वाढविणें अगत्याचें झालें आहे. शत्रूच्या त्रिकुटाशीं लढण्यांत ह्या राष्ट्रांस आपल्या लष्करी व आर्थिक बळाची योजना एकमेकांस पोषक व सहायक होईल अशा बेतानें केली पाहिजे. अटलांटिक, भूमध्यसमुद्र, पॅसिफिक व हिंदी समुद्र ह्या सर्व बाजूंस त्यांचें लढाऊ बळ सारखेंच प्रभावी होण्यासाठी पूर्ण सहकार्याची योजना आखली जात आहे हें योग्य आहे. सर्व रणांगणांवरील हालचालींचीं सूत्रें हिटलरनें स्वतःच्या हातीं घेतल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ह्यावरून रशियन मोहिमेंत जर्मनीस आलेल्या अपयशाचे परिणाम किती दीर्घगामी होत आहेत, हें दिसून येतें. जपाननें आकस्मिक रीतीनें अनेक ठिकाणांवर एकदम हल्ले केल्यानें मलायामध्यें ब्रिटिश फौजांस व्यवस्थित रीतीनें माघार घेणें दूरदर्शीपणाचें झालें आहे. ब्रिटिशांच्या युद्धसाधनांची नीट जुळवाजुळव झाली म्हणजे त्यांस जपानला व्यवस्थित रीतीनें तोंड देतां येईल. अमेरिकेचे प्रयत्न ह्या दिशेनें चाललेच आहेत आणि त्यांचा परिणाम जपानवर हळुहळु होत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत.

---


**मिनर्व्हा—पुणें**

**शनिवार ता. २० पासून सुरु**

**ध्येयाच्या शिखराकडे दृष्टि रोंखून प्रणयाचीं गीतें गाणाऱ्या दोन जीवांची नाविन्यपूर्ण कथा !**

*

**नवयुग चित्र**

**संगम**

: निर्माते : विनायक | : दिग्दर्शक : जुन्नरकर | : लेखक : खांडेकर

भूमिकाः—मीनाक्षी, वत्सला कुमठेकर, मालती गुप्ते, सुंदराबाई, बेबी देवी, साळवी, दामुअण्णा मालवणकर, जोग, नंदू खोटे, विनायक.

रोज : ६। व १० शनि. रवि. व सोम. व रजेचे दिवशीं जादा खेळ ३। वाजतां

**न्यू वेस्ट एण्ड—मुंबई**

**७ वा यशस्वी आठवडा**

### महाराष्ट्र कॉमर्स ग्रॅज्युएट्स असोसिएशन

दि महाराष्ट्र कॉमर्स ग्रॅज्युएट्स असोसिएशनचें उद्घाटन करण्याचा समारंभ ता. २१ डिसेंबर रोजीं पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत लोकनायक अणे ह्यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला. त्यावेळीं पुणें शहरांतील सुमारें १०० निवडक मंडळी हजर होती. प्रथम, संस्थेचे अध्यक्ष, श्री. आ. रा. भट ह्यांनीं प्रास्ताविक भाषण करून संस्थेचे उद्देश निवेदन केले व संस्थेस देणगी देणाऱ्या सहायकांचीं नांवें वाचून दाखविलीं. श्री. अणे ह्यांनीं व्यापारविषयक व्यावहारिक ज्ञानाचें महत्त्व वर्णन करून संस्थेचें उद्घाटन केल्याचें जाहीर केलें. श्री. बी. एस्. दाबके ह्यांनीं संस्थेचे अभिनंदनपर भाषण करून तिला यश चिंतिलें. आभारप्रदर्शन व अल्पोपाहार झाल्यावर "वंदे मातरम्" गीत होऊन समारंभ समाप्त झाला.

---

### हिंदी तांदळाचें पीक
### ( १९४१–४२ )

एकूण लागवडीच्या प्रांतवार वाटणींत बंगालचा पहिला (२९%) अनुक्रम येतो. बंगालचे खालोखाल मद्रास (१३·१%), बिहार (१२·८%), मध्यप्रांत (१०·३%), संयुक्त प्रांत (९·७%), आसाम (७%) ह्या प्रांतांतील लागवडीचें क्षेत्र आहे. मुंबई प्रांतांत फक्त ३·२% लागवड आहे.

**इतर देशांतील लागवड**

| | हजार एकर |
|---|---|
| ब्रह्मदेश | १२,६५१ |
| फॉर्मोसा | १,५७८ |
| अमेरिका | १,१८६ |

---

### इंडियन आयर्न अँड स्टील कं. लि.

वरील कंपनीस ३१ मार्च, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी १ कोटि, २६ लक्ष रुपये नफा झाला. डिबेंचर्सवरील व्याज, घसारा, इत्यादींची तरतूद करून व प्राप्तीवरील करासाठीं २८ लक्ष रुपये बाजूस काढून वाटण्याजोगा ६३ लक्ष रुपये नफा उरला. त्यांतून प्रत्येक भागास दिलेल्या १२ आणे इंटेरिम डिव्हिडंडचे १९ लक्ष रुपये वजा करून १ रु. ८ आ. आणखी इंटेरिम डिव्हिडंड देण्याकडे २८ लक्ष रुपयांचा विनियोग करण्यांत आला. कंपनीचें वसूल भांडवल २ कोटि, ५४ लक्ष रुपये आहे व रिझर्व्हमध्यें २ कोटि १४ लक्ष रुपये आहेत. डिबेंचर्स २ कोटि, ६ लाखांचीं आहेत. कंपनीनें अहवालाचे वर्षी ५ कोटि, ३१ लक्ष रुपयांचा माल विकला.

### जपान–थायलंड करार

जपान व थायलंड ह्यांचेमध्यें १० वर्षें मुदतीचा एक लष्करी राजकीय व आर्थिक स्वरूपाचा करार झाला आहे.

### घड्याळें एक तास पुढें

ब्रह्मदेशांतील सर्व घड्याळांचे काटे २४ डिसेंबर रोजीं पहाटे २ वाजतां एक तास पुढें करण्यांत आले. लोकांना दिवसाकाठीं घरीं पोचतां यावें, ह्याकरितां ही योजना आहे.

### ब्रह्मी मुख्य प्रधान

ब्रह्मदेशाचे मुख्य प्रधान अमेरिकेहून स्वदेशीं परत येत असतांना होनोलुलु येथें अडकून पडले होते, ते आतां अमेरिकेस परत गेले आहेत. अन्य मार्गानें ब्रह्मदेशाकडे सुखरूप येण्यासंबंधीं सर्व व्यवस्था पुरी झाल्यावर ते ब्रह्मदेशाकडे येण्यासाठी निघतील.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

**शाखा**

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# हिंदी आयुर्विम्याची प्रगति

( १९४० संबंधीं सरकारी रिपोर्ट )

### १९३८ च्या विमा कायद्याप्रमाणें नोंदलेल्या विमा कंपन्या

| | |
|---|---|
| हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या | १९७ |
| बाहेर स्थापन झालेल्या | ९६ |
| सोसायटी ऑफ लॉइड्सशीं करार असलेल्या | २ |
| एकूण | २९५ |

### हिंदी कंपन्यांच्या मुख्य कचेऱ्या

| प्रांत | कचेऱ्या |
|---|---|
| मुंबई | ६३ |
| बंगाल | ५३ |
| मद्रास | ३० |
| पंजाब | २० |
| दिल्ली | १२ |
| संयुक्तप्रांत | ९ |
| मध्यप्रांत | ३ |
| बिहार | ३ |
| सिंध | २ |
| आसाम | १ |
| अजमीर-मारवाड | १ |
| एकूण | १९७ |

### हिंदी कंपन्यांची वर्गवारी

| | |
|---|---|
| फक्त आयुर्विम्याचें काम करणाऱ्या | १५९ |
| इतर विम्याबरोबर आयुर्विम्याचें काम करणाऱ्या | १८ |
| आयुर्विमा सोडून इतर विम्याचें काम करणाऱ्या | २० |
| एकूण | १९७ |

### विदेशी कंपन्यांची वर्गवारी

| | |
|---|---|
| फक्त आयुर्विम्याचें काम करणाऱ्या | ६ |
| इतर विम्याबरोबर आयुर्विम्याचें काम कररणाऱ्या | १० |
| आयुर्विमा सोडून इतर विम्याचें काम करणाऱ्या | ८० |
| एकूण | ९६ |

### १९३९ मधील आयुर्विम्याचें काम

| | |
|---|---|
| एकूण आयुर्विमापत्रकें | ३,००,००० |
| आयुर्विम्यांची रकम | ४६ कोटि, ६२ लक्ष रु. |
| त्यांचा वार्षिक हप्ता | २ कोटि, ३७ लक्ष रु. |

### वरील कामाची वर्गवारी

| | पॉलिसी | विम्याची र. (रु.) | वार्षि. हप्ता(रु.) |
|---|---|---|---|
| हिंदी कंपन्या | २,८९,००० | ४२ को. ५१ ल. | २ को. १४ ल. |
| विदेशी कं. | ११,००० | २ को. ५ ल. | २३ ल. |
| ब्रि. साम्राज्यांतील कंपन्या | | १ को. ९५ ल. | |
| स्विस कंपनी | | ११ ल. | |

### १९३९ अखेरचें एकूण चालू काम

| | पॉलिसी | विम्याची र. (रु.) | वार्षि. हप्ता(रु.) |
|---|---|---|---|
| हिंदी कंपन्या | १३,३१,००० | २१५ को. १९ ल. | ११ को. १३ ल. |
| विदेशी कंपन्या | १,६६,००० | ५६ को. ६१ ल. | ३ को. १३ ल. |
| एकूण | १४,९७,००० | २७१ को. ८० ल. | १४ को. २६ ल. |

### १९३९ मधील पॉलिसींची सरासरी रकम

| | |
|---|---|
| हिंदी कंपन्या | रु. १,४७३ |
| विदेशी कंपन्या | रु. ३,७१६ |

### १९३९ मधील वर्षासनांचें काम

| | वर्षासनें ( रु. ) |
|---|---|
| हिंदी कंपन्या | ५०,००० |
| विदेशी कंपन्या | २,११,००० |
| एकूण वर्षासनें | २,६१,००० |

### वर्षासनांचें चालू काम

| | रुपये |
|---|---|
| हिंदी कंपन्या | ६,४७,००० |
| विदेशी कंपन्या | ८,१२,००० |
| एकूण | १४,५९,००० |

### विमा कंपन्यांस पडलेलें व्याज ( % )

| | |
|---|---|
| १९३५ | ४·९३ |
| १९३६ | ४·६९ |
| १९३७ | ४·७६ |
| १९३८ | ५·१५ |
| १९३९ | ४·६८ |

### विमा कंपन्यांच्या खर्चाचें हप्त्यांच्या उत्पन्नाशीं प्रमाण (%)

| | |
|---|---|
| १९३५ | ३१·० |
| १९३६ | ३२·५ |
| १९३७ | ३२·२ |
| १९३८ | ३१·७ |
| १९३९ | ३३·२ |

### लहान कंपन्यांच्या खर्चाचें प्रमाण (%)

| | |
|---|---|
| १९३५ | ४१·३ |
| १९३६ | ४३·३ |
| १९३७ | ४२·२ |
| १९३८ | ४१·१ |
| १९३९ | ४१·८ |

### मूल्यमापन

एकूण ४८ कंपन्यांच्या मूल्यमापनाचे रिपोर्ट १९३९ सालीं प्रसिद्ध झाले, त्यांची वर्गवारी:—

| | |
|---|---|
| वाढावा दाखविणाऱ्या कंपन्या | २० |
| ३५ (७) कानूप्रमाणें वाढावा दाखविणाऱ्या कंपन्या | ४ |
| तूट दाखविणाऱ्या कंपन्या ( मरणा झालेल्या भांडवलानें तूट भरून निघण्याजोगें आहे ) | ७ |
| तूट दाखविणाऱ्या कंपन्या ( तूट भरून निघण्याजोगी नाहीं ) | १० |
| ३५ ( ३ ) कानूप्रमाणें तूट दाखिवणाऱ्या कंपन्या | ७ |
| | ४८ |

### ॲक्चुअरी

इन्स्टिटयूट ऑफ ॲक्चुअरीज अथवा फॅकल्टी ऑफ ॲक्चुअरीजचे अकरा फेलो व १९३९ च्या इन्शुअरन्स कानूप्रमाणें ज्यांस सर्टिफिकेट देण्यांत आलें आहे, असे इन्स्टिटयूट ऑफ ॲक्युअरीजचे अठरा असोसिएट्स मिळून २९ ॲक्चुअरींची यादी विमा वार्षिकांत देण्यांत आली आहे. फेलोजमध्यें एस. एन. वैद्य

### मलायामधील सुलतान

मलायाचें क्षेत्रफळ इंग्लंडइतकें असून त्याची लोकसंख्या ३५ लक्ष आहे. मलाया हा देश अत्यंत सुपीक आहे. सर शेन्टन टॉमस हे तेथील हाय कमिशनर आहेत. स्थानिक राज्यकर्ते नालायक ठरले, तरच त्यांच्या कारभारांत हात घालण्यांत येतो. प्रत्येक संस्थानिकाची स्वतंत्र फौज आहे. कित्येक संस्थानिक गबर व प्रबळ आहेत, तर कित्येक नाममात्र आहेत. हिज हायनेस सर इब्राहिम, सुलतान ऑफ जोहोर, हा अत्यंत श्रीमान संस्थानिक आहे. सिंगापूर येथील तळ सुसज्ज करण्याचे खर्चासाठीं त्यानें १९३५ सालीं ग्रेटब्रिटनला पाऊण कोटि रुपये दिले. गेल्या वर्षी त्यानें युद्धफंडास मोठी देणगी दिली. सुलतानाचा राजवाडा अगदीं आधुनिक पद्धतीचा आहे. असेच दुसरे अनेक सुलतान मलायामध्यें आहेत. पेराकचा सुलतान, त्रेनगनूचा सुलतान, पेहांगचा सुलतान, इत्यादि प्रसिद्ध आहेत. त्यांनीं इंग्लंडचा प्रवास केलेला आहे व त्यांचेवर युरोपियन रहाणीचा परिणाम झालेला आहे.

जगांतील इतर कित्येक देश ब्रिटिशांच्या ताब्यांत आले, त्याच प्रकारानें मलाया देश त्यांस मिळाला. फ्रान्सचे ताब्यांत मलाया देश होता व नेपोलियनच्या पाडावानंतर तो ग्रेट ब्रिटनचे हातीं आला. मलायांतील लोकांचे पूर्वज बुद्धधर्मीय असावेत, परंतु आज ते मुसलमान आहेत. जावाच्या सुलतानानें मलाया देश १३९० चे सुमारास जिंकला; नंतर तो पोर्तुगीजांचे ताब्यांत आहे व मग डच ईस्ट इंडिया कंपनीनें तो घेतला. हॉलंडवर नेपोलिअनचें वर्चस्व झाल्यानंतर, डच मालकीचें रूपांतर फ्रेंच मालकींत झालें व ग्रेट ब्रिटननें फ्रान्सवर विजय मिळविल्यानंतर, मलाया ब्रिटिशांचे ताब्यांत आला. त्यांतील कांहीं भाग डच लोकांस परत देऊन ग्रेट ब्रिटननें कॅरिबिअन समुद्रांतील कांहीं ठाणीं मिळवलीं.

### ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या

ऑस्ट्रेलियाचें क्षेत्रफळ जवळ जवळ अमेरिकेएवढें असलें, तरी त्याची लोकसंख्या केवळ ७० लक्ष आहे. इंस्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चरल सायन्स ही संस्था ऑस्ट्रेलियामध्यें किती लोकांचा उदरनिर्वाह होऊं शकेल, ह्यासंबंधीं पहाणी करीत आहे. पावसाचें मानावर लोकसंख्या पुष्कळ अंशीं अवलंबून असते. ऑस्ट्रेलियाच्या एक तृतीयांश भागांत सालिना १० इंचहि पाऊस पडत नाहीं. एक तृतीयांश भागांतील पावसाची सरासरी १० ते २० इंच इतकी आहे. म्हणजे उरलेल्या एक तृतीयांश विभागांतच फक्त मोठी लोकसंख्या शक्य आहे. औद्योगिक प्रगतीस फक्त समुद्रकिनाऱ्याचे पट्टीवरील प्रदेशांतच वाव आहे; म्हणजे चांगल्या पावसाचे क्षेत्रांतच औद्योगिक वाढ होणार, असा अर्थ झाला. ऑस्ट्रेलियांत मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे निघाले, तरी लोकसंख्येची वाटणी सध्यांप्रमाणेंच राहील, असा रंग दिसतो.

### कोळसा

मुंबईमध्यें दररोज सुमारें एक हजार टन कोळसा खपतो. मुंबईंत बाहेरून कोळसा कमी आल्यामुळें व स्थानिक साठा बेताचा असल्यामुळें कोळशाचें भाव वाढले आहेत.

### रेल्वे बांधकाम

कोणत्याही नवीन रेल्वे रस्त्याचें बांधकाम १९४२-४३ मध्यें हातीं घेतलें जाणार नाहीं.


**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत

**साईन–बोर्ड्स, रबरी शिक्के,**

**आकर्षक**

सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग सतत २० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें

**एकच ठिकाण**

– पेन्टर ए. जी. वेंडेकर –

( मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट )

बुधवार चौक पुणें २ ( सिटी )

बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द्. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.



**बायो टोनो**

शरीर व त्यांतील रक्त-पेशींची वाढ करणारें उत्कृष्ट टॉनिक

नैसर्गिक रीतीनें हाडांची वाढ होण्यास आणि शरीर सदृढ करण्यास याची मदत होते. हें मधुर व रुचकर असून मुलें आवडीनें घेतात.

किं. रु. १–८–० ट. ख. नि.

रॉय आणि कंपनी, १७६ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २

### कातड्याच्या बुटांचें जागतिक उत्पादन

जगांतील सर्व देशांतून कातड्याच्या बुटांचें उत्पादन गेल्या दोन वर्षांत वाढलें आहे; युरोप खंड मात्र त्यास अपवाद आहे. १९३८ सालीं ९९३/४ कोटि बुटांच्या जोड्या सबंद जगांत तयार झाल्या. १९४० चा तत्सम आंकडा १०१३/४ कोटि जोड्या, असा आहे. इतकें मोठें उत्पादन असूनहि, दर माणशीं बुटाची एक जोडीहि सरासरीनें येत नाहीं. अमेरिकेंत प्रत्येकास दरसाल सरासरीनें ३१/२ जोड्या लागतात, ह्यावरून इतर ठिकाणचे कितीतरी लोक पायतणावांचून चालतात, ह्याची कल्पना येईल. सध्यां, उत्तर व दक्षिण अमेरिका खंडांतील सर्व देशांत बुटांचें उत्पादन वाढलें आहे. युद्धविषयक धंद्यांस प्राधान्य, लष्करी मागणी, कच्च्या मालाचा तुटवडा, उत्पादनाचें नियंत्रण, वापरावर नियंत्रण, किंमतींचें नियंत्रण, कामगारांचा तुटवडा, उत्पादन खर्चांत वाढ, करवाढ, परदेशी बाजारपेठांत माल पाठविण्याची अडचण, इत्यादि कारणांमुळें युरोपांतील बुटांच्या धंद्यावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. अमेरिकेनें १९३८ व १९४० सालीं अनुक्रमें ३९ व ४०१/२ कोटि जोड्या बनविल्या; ग्रेट ब्रिटननें १९३८ सालीं १२३/४ कोटि व १९४० सालीं १३ कोटि बूट-जोड्यांचें उत्पादन केलें. रशियांतील उत्पादन ४३/४ कोटि बूट-जोड्यांचें ८ कोटि जोड्यांवर आलें. जर्मनींतील उत्पादनाचे आंकडे १९३८ सालीं ११३/४ कोटि जोड्या व १९४० सालीं ९ कोटि जोड्या असे आहेत.

आशिया खंडांत लोकसंख्या प्रचंड असली तरी त्यांतील लोक दरिद्री असल्याकारणानें जगांतील इतर कोणत्याहि ठिकाणापेक्षा आशियांत पायतणांचा खप कमी आहे. ऑस्ट्रेलियामध्यें १९३८ सालीं २ कोटि बूट जोड्या तयार झाल्या. १९४० चें उत्पादन २१/४ कोटि जोड्यांचें आहे. ब्रिटिश हिंदुस्थानाचे तत्सम आकडे ५५१/२ लक्ष बूट जोड्या व ६७१/२ लक्ष बूट-जोड्या असे आहेत. जपानचें उत्पादन १ कोटि जोड्यांचे सुमारास आहे. आफ्रिका खंडांतील उत्पादनापैकी ८०% उत्पादन एकट्या दक्षिण आफ्रिकेंत होतें. तेथें १९४० सालीं ९४१/२ लक्ष जोड्या तयार झाल्या.

---

### कोइमतूर येथील कपास कापडाच्या गिरण्या

कोइमतूर हें मद्रास प्रांतांतील एक मोठें शहर आहे. तेथें १९२९ सालापर्यंत फक्त ६ गिरण्या होत्या व त्यांत ५,६०० कामगार होते. कोइमतूर येथील गिरण्यांची संख्या आतां २७ झाली आहे व त्यांत सुमारें २० हजार कामगार आहेत. कोइमतूरच्या आसपास १० मैलांचे आंतच सर्व गिरण्या आहेत. कोइमतूरची हवा गिरण्यांस अतिशय अनुकूल आहे. मजुरांचा पुरवठा मुबलक आहे व मजुरीचे दर अल्प आहेत. तेथील पुरुष कामगारांची मासिक प्राप्ती १६ रुपये व स्त्री कामगारांची प्राप्ती ९ रुपये आहे. कोइमतूर जिल्ह्यांतील कपास उच्च दर्जाची असून गिरण्यांस ती स्वस्त मिळूं शकते. बहुतेक गिरण्या लहान आकाराच्या आहेत. प्रत्येक १२००० चात्यांच्या गिरणीस ६ लाखांचें वसूल भांडवल, असें प्रमाण पडतें. मद्रास सरकारच्या पायकरा वीज योजनेमुळें गिरण्यांस स्वस्त दरानें वीज मिळूं लागल्यापासून गिरण्यांची प्रगति चांगली झाली आहे. मद्रास प्रांतांत, विशेषतः मदुरा आणि सेलम येथें हातमागांवर मोठ्या प्रमाणावर कापड विणण्यांत येतें. एकट्या मद्रास प्रांतांत ४ लक्ष हातमाग आहेत, त्यांचें गिऱ्हाइक कोइमतूरच्या सुतास मिळतें. कोइमतूर येथें स्पिनिंगचीच वाढ झाली आहे, कारण त्यांत नफा अधिक सुटतो व विणकामास आवश्यक असणारा पाणीपुरवठा तेथें उपलब्ध नाहीं. गिरण्यांतील यंत्रसामुग्री ताजी व कार्यक्षम आहे.

---


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर १/२% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट :—टी. आर. लालवाणी.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,१४,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,०६,९७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३३,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षीं द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) … … | १०८–१२ |
| ४% १९४३ … … … … | १०२–१२ |
| ३½% विनमुदत … … … … | ९२–१२ |
| ३½% १९४७–५० … … … | १०१—० |
| ३% ( १९६३–६५ ) … … … | ९२—८ |
| २¾% १९४८–५२ … … … | ९६–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) … | १०८—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) … … | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) — .. | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) … — | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% … … | १४१—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% … … | ११०–० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% … | ४७–४ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% … … | १६०५—० |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० )१½ रु. … … | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% … … | १०४—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% … … | १३६—८ |
| कराची ( १०० ) ९% … … … | २१७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% … … | २२०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% … … | १५८०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% … … | १६५५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% … … | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% … … | ९३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% … | ८७७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% … … … | ६४१—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. … … … | २३६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. … … | ५०—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. … … … | २१—६ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. … | ५२—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. … | ४७१०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% … … | २११—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) ७½% रु. … … | १३९—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. … … | ३१७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु.१० आ.० पै … | १६६०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. … | १५९—० |


#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास … … | ४७–१५–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस … … | ७०–८–० |


स्वादिष्ट मसाला करणारे आद्य
कारखानदार




व्ही. पी. बेडेकर
बेडेकर आणि सन्स
पुणें येथील एजंट—
दत्तात्रय नारायण हेजीब.




माधवाश्रम
हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून, रेल्वे-स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.
जागा मध्यवस्तींत, हवाशीर, लागणारे फर्निचरनें शृंगारित असून, सोयीमुळें ती शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहणेची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.
माधवाश्रम बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक व्यवस्थापक

वक्तशीर आणि मनपसंत काम
करून देणारे
**मोहन वॉच कंपनी**
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
**संग्रह करा**
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट,
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
**—: रक्तवर्धक :—**
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा
मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें
**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
**' पायोनियर डाइंग हाऊस '**
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




**मधुमेहावरील
औषध**
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ मांबुडां घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' मांबुडां, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ३१ डिसेंबर, १९४१ अंक ५२

## संगम

नवयुग चित्र

मिनर्व्हा पुणें

: निर्मिते :
विनायक
: दिग्दर्शक :
जुन्नरकर
: लेखक :
खांडेकर

वर्षारंभाचा आनंद
म्हणजे
नवें आणि जुनें
यांचा
गोड संगम !

२ रा
आठवडा

भूमिकाः—मीनाक्षी, सुंदराबाई, वत्सला कुमठेकर, मालती गुप्ते, जी. ए., बेबी देवी, विनायक, साळवी, दामुअण्णा मालवणकर, जोग, नंदू खोटे.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## SPOTLIGHTS ON INDIAN LIFE INSURANCE

BY B. N. SAHASRABUDDHE

Foreward By Dr. R. B. AMBEDKAR.

Contains extremely useful information and a mass of facts, figures and charts. Equally useful to Policy-holders, Agents and Life Offices alike.

Highly spoken of by Messrs G. S. Marathey and C. Venkatasubbiah (Actuaries), An Insurance Manager, N. C. Kelkar, and Prin. D. R. Gadgil, M. A., M. Litt.

Price Rs. 3-0-0 (Post free in India against payment in advance.)

Book-Sellers will be given reasonable terms.

*Copies can be had of:—*

| | | |
|---|---|---|
| B. N. Sahasrabuddhe, | P. D. Joshi, | The Insurance World Office, |
| D. G. Colony, | P. B. No. 202, | 15 ChittaranjanAvenue, |
| POONA, 4. | MADRAS. | CALCUTTA. |

# विविध माहिती

**बॉंबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनी लि.**

वरील कंपनीस ३० जून, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी ५ लक्ष, ८४ हजार रुपये घसारा काढून, २ लक्ष रुपयांची कराची तरतूद करून व १ लक्ष रुपये आगबोटींच्या विक्रींत आलेली तूट भरून काढण्याकडे खर्ची टाकून, ३ लक्ष, १७ हजार रुपये नफा उरला. प्रत्येक प्रेफरन्स भागास १५ रुपये ( प्राप्तीवरील कर कापून ) व प्रत्येक ऑर्डिनरी भागास १० रुपये म्हणजे ४% ( करमाफ ) डिव्हिडंड मिळालें. कंपनीचें भांडवल ६० लक्ष रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड ७९ लक्ष रुपयांचे आहेत. मालमत्तेच्या बाजूस दाखविलेल्या आकड्यांत १० लक्ष, ६४ हजार रुपये गुडविल व ६ लक्ष रुपये तुटीचा समावेश आहे.

**शिंद्या स्टीम नॅव्हिगेशन कं. लि.**

**( ३० जून, १९४१ अखेरचा ताळेबंद )**

वरील कंपनीचें वसूल भांडवल २ कोटि, २२½ लक्ष रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड १ कोटि, ९२ लक्ष रुपयांचे आहेत. देणीं ७३ लाखांचीं असून अपूर्ण प्रवासांच्या भाड्यांची किंमत २१ लक्ष ८५ हजार रुपये आहे. नफ्याचा आकडा २१½ लक्ष रुपये आहे. येणें बाजूस १ कोटि ९७½ लाखांची मालमत्ता आहे, म्हणजे १२ महिन्यांत तींत १० लाखांची वाढ झाली आहे. स्टोर्सची किंमत ४२ लक्ष रुपये आहे, येणें रकम ४२ लक्ष रुपये असून इनव्हेस्टमेंट १ कोटि, ६० लाखांची आहे. कर व घसारा ह्यांकरितां राखून ठेवलेल्या रकमांची वेरीजच ६३लक्ष रुपये होते.व त्यांची गुंतवणूक इनव्हेस्टमेंटमध्यें येते. कंपनीच्या सोन्या-चांदींतहि मोठाल्या रकमा आहेत व इतर कंपन्यांचें भागहि तिनें घेतलेले आहेत. येणें रकम ४२ लक्ष रुपये आहे आणि रोख व बँकांत १ कोटि, १५½ लक्ष रुपये आहेत. बारा महिन्यांत कंपनीचे वसूल भांडवलांत १ लाख रुपयांची भर पडली व रिझर्व्ह व इतर फंड ७५½ लाखांनीं वाढले.

**बेलापूर कं. लि.**

वरील कंपनीचें वसूल भांडवल ३७ लक्ष,६० हजार रुपये असून रिझर्व्हजमध्यें १८ लक्ष रुपये आहेत. कंपनीला ३० सप्टेंबर १९४१ अखेर संपलेल्या वर्षी मागील शिलकी नफा धरून ७ लक्ष, ४ हजार रुपये नफा झाला. त्यांत रिझर्व्हमधील १½ लक्ष रुपये घालून ८ लक्ष, २९ हजारांचा आकडा होतो. त्यांतून भागीदारांस प्रत्येक भागास ७ रुपये (१४%) करमाफ डिव्हिडंड देण्याकडे ५ लक्ष, २६ हजारांचा विनियोग झाला. ३० सप्टेंबर रोजीं कंपनीच्या ५,१४७ एकरांत उसाची लागवड होती.

**सी. पी. रेल्वे कं. लि.**

वरील कंपनीस ३० सप्टेंबर १९४१ अखेर संपलेल्या वर्षी ३ लक्ष, ९०½ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस सबंध वर्षांचें ४¾% डिव्हिडंड मिळालें. कंपनीचें भरणा झालेलें भांडवल ९४ लक्ष रुपये आहे. डिव्हिडंडमधून कराची रकम कापण्यांत आली.

**टिटाघर पेपर मिल्स कं. लि.**

वरील कंपनीनें ३०-९-४१ अखेरच्या सहामाहींत ९९ लक्ष, ७८ हजार रुपयांचा कागद विकला. कंपनीचें वसूल भांडवल ६६ लक्ष रुपये आहे. कंपनीस निवळ नफा ४२½ लक्ष रुपये झाला, त्यांपैकीं ११½ लक्ष रुपये फंडांत टाकून व २४½ लक्षांची कराची तरतूद करून ६½ लक्ष रुपये वाटणीसाठीं उरले.

**युरोपियन व हिंदी फर्म्स ह्यांमध्यें भेदाभेद**

"युरोपियन फर्म्सचे ऑडिट झालेले हिशेब इनकम टॅक्स खातें खरे मानतें, परंतु तद्वतच ऑडिट झालेले हिंदी फर्म्सचे हिशेब तें खरे मानीत नाहीं व त्या हिशेबांची कसून चौकशी व छाननी करण्यांत येते. ह्यासंबंधांत परिस्थिति अधिकच बिघडत चाललीं आहे व तिचेसंबंधीं तक्रार ऐकूं येते, ती प्रत्यक्ष आलेल्या अनुभवावर आधारलेली आहे":—सर बद्रिदास गोयंका ह्यांचें कलकत्ता येथील इंडियन चेंबर ऑफ कॉमर्समध्यें भाषण.

**ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. १ रु. व्याज**

रिझर्व्ह बँकेनें येत्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपये किंमतीचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. पडला.

**केसर शुगर वर्क्स लि.**

वरील कंपनीनें, ३१ जुलै, १९४१ अखेर संपलेल्या वर्षाचें ६% ( कर वजा करणेचें ) डिव्हिडंड जाहीर केलें. कंपनीचें भांडवल वाढवून तें १ कोटि रुपये करण्यांत आलें व त्यासाठी प्रत्येकी १०० रुपयांचे ८०,००० भाग काढण्यांत आले. त्यांपैकी ३० हजार ऑर्डिनरी व ५० हजार प्रेफरन्स आहेत. सध्याचे २० हजार भाग हे ऑर्डिनरीच आहेत. म्हणजे नवीन अधिकृत भांडवलापैकीं निम्मे ऑर्डिनरी व निम्मे प्रेफरन्स झालें.

**मनमाड इलेक्ट्रिक कंपनी लि.**

वरील कंपनीला ३० जून, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी २१½ हजार रुपये नफा झाला. व्याजाचे ३½ हजार रुपये वगळले व शिलकी नफा मिळवला म्हणजे १८½ हजार रुपये उरतात. डिव्हिडंड वाटलें नाहीं.

**चेक्सची देवघेव**

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें १९ डिसेंबर अखेर संपलेल्या आठवड्यांत २५½ कोटि रुपये किंमतीच्या १,४६,३२५ चेक्सची देवघेव झाली.

**मॉडेल मिल्स, नागपूर लि.**

वरील कंपनीस ३० जून, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी ४ लक्ष, २९ हजार रुपये नफा झाला. मागील वर्षाचा नफा २ लक्ष, ५२ हजार रुपये होता. २½% दरानें डिव्हिडंड वाटलें.

**बॉंब हल्ल्यांपासून बचाव**

कलकत्ता येथील अशुतोष म्यूझियममधील दगडाच्या सुमारें ५०० मूर्ती जमिनींत खड्डा खणून ठेवण्यांत येणार आहेत. पुस्तकालयांतील मौल्यवान ग्रंथांचेंहि जतन करण्यांत येत आहे.

**मेजर विल्सन**

मुंबई प्रांताचे माजी गव्हर्नर, सर लेस्ली विल्सन ह्यांचा धाकटा मुलगा, मेजर डेव्हिड विल्सन ह्यांस युद्धांत जखमा होऊन मृत्यु आला.

**एक हजार रुपये दंड**

जानेवारी ते एप्रिल, १९४१ ह्या मुदतींत आपल्या ४½ लक्ष रुपये किंमतीच्या मालाचा युद्धविषयक धोक्याचा विमा न उतरविल्याबद्दल कलकत्ता येथील एका व्यापाऱ्यास एक हजार रुपये दंड झाला.

**म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.**

**( वार्षिक सभा २९-१२-४१ )**

वरील कंपनीस ३० जून अखेर संपलेल्या वर्षी ५,७६० रुपये निवळ नफा झाला. २,०४० रुपये नफा पुढील वर्षांत ओढण्यांत आला.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ६५० | ५ रिझर्व्ह बँक आणि सहकारः ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्याचें सिंहावलोकन | ६५५ |
| २ विलायतेंतील सर्व हिंदी कर्ज फेडून टाकणार | ६५१ | ६ युद्ध जोखमीचा विमा | ६५६ |
| ३ हिंदी विम्याची प्रगति | ६५२ | ७ शेतीविषयक अर्थशास्त्रज्ञांची परिषद | ६५७ |
| ४ स्फुट विचार ... नाताळ आणि युद्ध—नफेबाजीस आळा—सरकारचा निश्चय—इराण—वॉशिंग्टनमधील युद्धयोजना | ६५३ | ८ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. | ६५७ |
| | | ९ निवडक बाजारभाव | ६५९ |


# अर्थ

बुधवार, ता. ३१ डिसेंबर, १९४१

## विलायतेंतील सर्व हिंदी कर्ज फेडून टाकणार

हिंदुस्थान सरकारचा स्वतःचा खर्च युद्धामुळें वाढलेला आहे आणि त्याबरोबरच साम्राज्य सरकारच्या वतीनें ह्या देशांत युद्ध-सामुग्रीची खरेदी होत आहे. तिच्या किंमतीचा बटवडाहि त्यास करावा लागत आहे. पैशाच्या ह्या दुहेरी व्यवहारांपैकी पहिल्या खर्चाची व्यवस्था सरकारास स्वतःच्या करांच्या उत्पन्नांतून व तूट पडेल त्या मानानें कर्ज काढून त्यामधून करावी लागते. दुसऱ्या प्रकारच्या व्यवहारांतला खर्च सरकारच्या अंगावर पडत नसून त्यानें केलेल्या बटवड्याचा मोबदला त्यास साम्राज्य सरकाराकडून मिळत असतो. ह्या दुसऱ्या व्यवहाराचें वैशिष्ट्य हें आहे कीं हिंदुस्थान सरकारचा पैशाचा बटवडा ह्या देशांत होतो, पण त्याची भरपाई त्यास लंडनमध्यें करून मिळते. ह्याचा परिणाम असा होतो कीं सरकारच्या देवघेवीचे व्यवहार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मार्फत होत असल्यानें त्या बँकेच्या लंडनमधील कचेरींत सरकारी खात्यावर जमा वाढत जाते. ही शिल्लक अल्प मुदतीच्या व इतर ब्रिटिश रोख्यांत गुंतवणें आवश्यक होतें. हिन्दी चलनी नोटांस आधार म्हणून रिझर्व्ह बँकेस स्टर्लिंग रोख्यांत लंडनमध्यें रक्कम विशिष्ट प्रमाणांत घालून ठेवावी लागते. तथापि ह्या गुंतवणीस मर्यादा आहे आणि ती मोकळी होण्याची व्यवस्था करणें जरूर पडतें. हिंदुस्थानच्या मालकीचा लंडनमध्यें जमलेला पैसा ह्या देशांत परत कसा आणावयाचा हा येथें प्रश्न आहे. हिंदुस्थान सरकारनें लंडनमध्यें काढलेलें कर्ज देणें आहे त्याची वजावाट ह्या शिलकेशीं घातली असतां तो प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटण्यास सहाय होतें. लंडनमध्यें पौंड-स्टर्लिंग रोख्यांची गुंतवण आणि तेथें हिंदुस्थान सरकारनें उभारलेलीं स्टर्लिंग कर्जें ह्यांची हा अदलाबदल असल्यानें तिच्या योगानें वरील प्रकारची वजावाट सहज होऊं शकते.

हिंदुस्थान सरकारचीं मुदतीचीं कर्जें लंडनमध्यें काढलेलीं आहेत त्यांची वजावाट गेल्या मार्च महिन्यांत ब्रिटिश सरकारच्या सहकार्यानें करण्यांत आली, तिची संपूर्ण माहिती देऊन ह्या विषयाचें विवेचन आम्हीं मागें केलेंच आहे. हिंदुस्थान सरकारची शिल्लक लंडनमध्यें पुन्हां वाढल्या कारणानें मागच्या प्रमाणेंच व्यवहार पुन्हां करण्याचें आणि शिल्लक राहिलेल्या आपल्या सबंद स्टर्लिंग कर्जाची परतफेड करून टाकण्याचें सरकारनें आतां ठरवलें आहे. ह्या कर्जाची रक्कम अजमासें १६ कोटि पौंड म्हणजे २१० कोटि रुपये इतकी आहे. तिची वजावाट पुढील सालांत व नंतर १९४३ मध्यें हप्त्याहप्त्यानें होईल. ती होण्यास हिंदुस्थान सरकारच्या खात्यावर आणि हिंदी चलनाच्या निर्धीत रिझर्व्ह बँकेजवळ लंडनमध्यें किती रकमा आहेत हें प्रथम पाहूं या. रिझर्व्ह बँकेच्या हिशेबाचें १९ डिसेंबरचें पत्रक प्रसिद्ध झालें आहे त्यांत तिच्या चलनखात्याच्या व बँकिंग खात्याच्या रकमा लंडनमध्यें किती आहेत ह्याची माहिती दिलेली आहे. तीमधून आवश्यक ते आकडे येथें उद्धृत करीत आहों. युद्धपरिस्थितीमुळें चलनी नोटांचें प्रमाण अलीकडे बरेच वाढलें असून त्यांस तारण म्हणून धारण केलेल्या स्टर्लिंग व रुपयांच्या कर्जरोख्यांची गुंतवणहि अर्थात विस्तार पावली आहे. काढलेल्या एकूण चलनी नोटांची किंमत ३३८ कोटि रुपये असून त्यापैकी २१ कोटि रुपयांच्या नोटा ब्रह्मदेशांत आहेत. ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून वेगळा झाला असला तरी त्याच्या पैशाचा व चलनाचा व्यवहार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच पहात आहे ह्या गोष्टीचें स्मरण येथें करून देणें आवश्यक आहे. एकूण ३३८ कोटि रुपयांच्या नोटांस जें तारण आहे त्यांत २१७ कोटि रुपये किंमतीचे पौंड स्टर्लिंगमधले रोखे आहेत. ह्याशिवाय रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग व्यवहाराच्या खात्यांत ५३ कोटि रुपयांची शिल्लक लंडन येथील गुंतवणींत आहे. म्हणजे सुमारें २७० कोटि रुपयांची एकूण रक्कम लंडनमध्यें आहे. हिंदुस्थान सरकारास साम्राज्य सरकारच्या वतीनें खर्च सारखा करावा लागणार असल्यानें ह्या रकमा वाढत जाणें अपरिहार्य आहे. ज्यांची परतफेड करावयाची आहे अशीं बिनमुदतीचीं तीन कर्जें आहेत. त्यांत ३½ टक्के व्याजाचें कर्ज सुमारें पावणे आठ कोटि पौंडांचें आहे, ३ टक्के दराचें ७ कोटि पौंड आहे व २½ टक्क्यांचें १ कोटि पौंड आहे. ह्या कर्जाची फेड निम्मी निम्मी १९४२ आणि १९४३ सालीं करण्याचा सरकारचा विचार आहे आणि त्या संबंधांतली जरूर ती व्यवस्था इंग्लंडमध्यें व हिंदुस्थानांत हातीं घेण्यांत येत आहे.

सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया, ३½ टक्क्यांच्या बिनमुदतीच्या स्टर्लिंग कर्जाचे रोखे धारण करणारांस आपण ५ जानेवारी १९४३ रोजीं त्यांची फेड करणार आहों अशा आशयाची नोटीस देत आहेत. बिन मुदतीच्या कर्जरोख्यांचे पैसे मागण्याचा ते धारण करणारांस हक्क नसतो, पण एक वर्षाची आगाऊ सूचना देऊन सरकारास कर्जफेड करतां येते. ही फेड १९४३ मध्यें व्हावयाची असल्यानें तीमधले रोखे ते धारण करणारांनीं ब्रिटिश तिजोरीच्या स्वाधीन करावे असा हुकूम आज काढण्याचें प्रयोजन नाहीं, परंतु ३ टक्के व २½ टक्के दरांचे स्टर्लिंग रोखे ग्रेटब्रिटनमधील धारण करणारांनीं ब्रिटिश सरकारच्या हातीं द्यावे असा हुकूम ब्रिटिश सरकारनें काढला आहे. ह्या रोख्यांची किंमत बाजारभावांस अनुसरून आकारलेली आहे. येत्या फेब्रुआरीच्या ९ तारखेच्या आंत वरील रोखे सरकाराकडे आले पाहिजेत अशी योजना असून त्यांची फेड मार्चच्या २ तारखेच्या सुमारास होईल. हिंदुस्थान सरकारनेंहि ह्याच प्रकारचा जाहीरनामा डिफेन्स

ऑफ इंडिया रूल्स खाली काढला असून ह्या देशांत वरील दोन कर्जांचे रोखे धारण करणारांनीं ते सरकारच्या स्वाधीन केले पाहिजेत असें फर्मावलें आहे. रोख्यांची रुपयांतली किंमत १८ पेन्स १ रुपाया ह्या हुंडणावळीच्या दरानें आकारली जाईल. सरकारकडे येणाऱ्या स्टर्लिंग रोख्यांच्या मोबदल्यांत हिंदी रुपयांतले रोखे लागलीच दिले जाणार नाहींत; परंतु त्या संबंधांतली व्यवस्था योग्य वेळीं करण्यांत यावयाची आहे. ही योजना १९४२ मध्यें पुरी होईल आणि दुसऱ्या हप्त्याची तजवीज १९४३ सालीं झाली म्हणजे हिंदुस्थान सरकारचें लंडनमध्यें काढलेलें सर्व कर्ज फेडलें जाईल.

## हिंदी विम्याची प्रगति

### आगीचा, आगबोटींचा व इतर प्रकारचा विमा

( १९४० संबंधीं सरकारी रिपोर्ट )

आयुर्विमा वगळून बाकीच्या प्रकारांच्या विम्याच्या हप्त्यांचें उत्पन्न १९३९ सालीं ३ कोटि, ३७ लक्ष रुपये झालें, त्यापैकीं हिंदी कंपन्यांचा वाटा फक्त १ कोटि, २ लक्ष रुपये भरला. विदेशी कंपन्यांस २ कोटि, ३५ लक्ष रुपये मिळाले.

३ कोटि, ३७ लक्ष रुपयांची वर्गवारी खालीलप्रमाणें आहेः—

| | |
|---|---|
| आगीचा विमा | १ कोटि, ५२ लक्ष |
| आगबोटींचा विमा | ९५ लक्ष |
| इतर विमा | ९० लक्ष |
| एकूण | ३ कोटि, ३७ लक्ष रुपये |

ह्या रकमेची वाटणी खाली दिली आहे:—

| | हिंदी कंपन्या | विदेशी कंपन्या |
|---|---|---|
| आगीचा विमा | ४८ लक्ष | १ कोटि ५ लक्ष |
| आगबोटींचा विमा | १८ लक्ष | ७७ लक्ष |
| इतर विमा | ३६ लक्ष | ५३ लक्ष |
| | १३२ लक्ष | २ कोटि, १५ लक्ष |

विदेशी कंपन्यांच्या व्यवहारासंबंधीं माहिती खाली दिली आहे.

| कंपनी कोणत्या देशांतील | आग | आगबोट | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|
| | (आकडे | लक्ष | रुपयांचे | आहेत) |
| ग्रेट ब्रिटन | ७३·८ | ३२·६ | ४५·५ | १५१·९ |
| ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देश | २०·० | ३४·३ | ७·८ | ६२·१ |
| अमेरिका | ८·५ | ८·१ | ... | १६·६ |
| युरोप | १·१ | ... | ... | १·१ |
| जपान | ०·५ | ०·३ | ०·१ | ०·९ |
| जावा | ०·७ | १·३ | ... | २·० |
| एकूण | १०४·६ | ७६·६ | ५३·४ | २३४·६ |

आग, आगबोट, इत्यादि प्रकारच्या विम्याच्या जोखमींपैकीं बऱ्याच मोठ्या जोखमीचा विमा पुनः विदेशी कंपन्यांकडे उतरविण्यांत येत असल्यानें, हिंदी कंपन्यांच्या व्यवहाराचे दिलेले आकडे वस्तुस्थिति–निदर्शक समजतां कामा नयेत. त्यापेक्षा बऱ्याच कमी रकमेच्या विम्याची प्रत्यक्ष जोखीम त्यांचेकडे शिलक रहाते.

### हिंदी कंपन्यांची जिंदगी

| | कोटि रुपये |
|---|---|
| मालमत्तेचें गहाण | २·०४ |
| विमापत्रकांच्या सोडकिंमतीचे प्रमाणांत दिलेलीं कर्जें | ६·२७ |
| स्टॉक्स-शेअर्सवर कर्जें | ०·१९ |
| इतर कर्जें | ०·३५ |
| हिन्दी सरकारी रोखे | ३६·९८ |
| हिन्दी संस्थानी रोखे | ०·४० |
| ब्रिटिश, साम्राज्यांतर्गत देशांचे व परदेशी सरकारांचे रोखे | ०·८० |
| म्युनिसिपल, पोर्ट व इं. ट्रस्ट रोखे | ५·६२ |
| हिन्दी कंपन्यांचे भाग | ४·७२ |
| जमिनी व घरें | ४·६९ |
| एजंटांकडून येणें, हप्ता येणें, व्याज येणें इ. | ३·१३ |
| ठेवी, अनामत, तिकिटें | २·६१ |
| इतर | १·३४ |
| | ६९·१४ |

स्टॉक एक्सचेंजवर ज्यांची खरेदी-विक्री होऊं शकते, अशा रोख्यांत हिन्दी कंपन्यांचे ४७·२८ कोटि रुपये आहेत. म्हणजे एकूण जिंदगीपैकीं ७०% रक्कम त्यांत गुंतलेली आहे. इन्व्हेस्टमेंट फ्ल. फंडांत १ कोटि २४ रुपये ताळेबंदांत दाखविलेले आहेत.

### विदेशी कंपन्यांची हिंदुस्थानांतील जिंदगी

विदेशी कंपन्यांची हिंदुस्थानांतील जिंदगी २४ कोटि, ९२ लक्ष रुपये आहे, त्याची वर्गवारी खालालप्रमाणें आहेः—

| कंपनी | हिंदुस्थानांतील जिंदगी ( रुपये ) |
|---|---|
| ब्रिटिश | १४ कोटि, ७७ लक्ष |
| साम्राज्यांतील इतर देशांतील | ९ कोटि, ८६ लक्ष |
| अमेरिकन | १२ लक्ष |
| युरोपियन | ८ लक्ष |
| जपानी | ६ लक्ष |
| जावानीज | ३ लक्ष |
| | २२ कोटि, ९२ लक्ष |

ज्या विदेशी कंपन्या केवळ आयुर्विम्याचें किंवा इतर प्रकारच्या विम्यावरोबर आयुर्विम्याचें काम करतात, अशा कंपन्यांच्या हिंदुस्थानांतील जिंदगीचा आकडा २१ कोटि, १ लक्ष रुपये भरतो.

### ग्रेट ब्रिटनमध्यें हिंदी टपाल

हिंदुस्थानांतून ग्रेट ब्रिटनकडे ९ ते १६ ऑगस्टचे दरम्यान व १९ ते २४ ऑक्टोबरचे दरम्यान आगबोटींतून निघालेलें टपाल ग्रेट ब्रिटनमध्यें वाटण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें, ५ ते ९ नोव्हेंबरचे दरम्यान विमान-मार्गानें निघालेलें टपालहि वाटलें आहे.

## स्फुट-विचार

### नाताळ आणि युद्ध

ख्रिस्ती लोकांचा नाताळ हा महत्त्वाचा सण आहे. बंधुभाव, कौटुंबिक मीलन, शांतता व सात्विक आनंद इत्यादींचा अनुभव तो साजरा करणारांनीं घेण्याची ख्रिस्ती समाजाची प्रथा आहे. ह्या ख्रिस्तजयंतीचे अनुषंगानें शांतता व मनुष्यप्रेम ह्यांविषयींच्या उपदेशाची पुनरावृत्ति दरवर्षी करण्यांत येते. यंदाच्या नाताळांत युद्धक्षेत्रांचा विस्तार झालेला असल्यानें जागतिक शांततेचा भंग करून असंख्य स्त्री-पुरुष व बालकें ह्यांच्यावर जर्मनीनें आपत्ति आणलेली असतां ह्या पुंडाईचा बीमोड करण्याचा निश्चय इंग्लंड व अमेरिका ह्या ख्रिस्ती राष्ट्रांतील लोकांस करावा लागला आहे. इटलीच्या खुद्द राजधानींत ख्रिस्ती कॅथोलिक पंथाचे मुख्य गुरु पोप ह्यांनीं नाताळानिमित्त शांति-संदेश प्रसिद्ध केला आहे. इंग्लंडचे राजेसाहेब ह्यांनीं आपल्या साम्राज्यांतील प्रजाजनांस उद्देशून खास भाषण केलें असून येत्या वर्षीच्या युद्ध-प्रयत्नांस यश चिंतिलें आहे. जगाच्या निरनिराळ्या भागांत समुद्रांत, हवेंत किंवा जमीनीवर असंख्य स्त्री-पुरुष धैर्यानें व स्वार्थत्यागपूर्वक युद्धकार्य करीत आहेत त्यांच्या तत्वनिष्ठेचें त्यांनीं साभार कौतुक केलें आहे. निरनिराळ्या समरांगणांवर लढणाऱ्या सैनिकांस उद्देशून त्यांच्या मुख्यांनीं तसेच उत्तेजनपर संदेश पाठवले आहेत. अमेरिकेंत प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व मि. चर्चिल हे जर्मनी व जपान ह्यांच्या विरुद्ध लढणाऱ्या राष्ट्रांच्या युद्धप्रयत्नाच्या एकीकरणाचा प्रश्न सोडवण्यांत गुंतले आहेत आणि त्यांनींहि नाताळास अनुलक्षून उत्साहवर्धक व समयोचित भाषणें केलीं आहेत. हिटलरशाहीचें निर्मूलन झाल्यावांचून नाताळाच्या मुळाशीं असलेल्या शांततेची व आंतरराष्ट्रीय स्नेहभावाची स्थापना होणार नसल्यानें पूर्ण विजय मिळेपर्यंत चिकाटीनें लढण्याचा कृतसंकल्प तडीस नेण्याचें कर्तव्य सर्व स्वातंत्र्यप्रेमी लोकांनी निष्ठेनें बजावलें पाहिजे हें त्यांच्या संदेशाचें सार आहे. रशियांत व लिबियांत झालेल्या पराभवांमुळें जर्मनीचें सामर्थ्य नष्ट झालें आहे असें कोणी समजूं नये आणि हिटलरच्या नव्या डावपेचांस तोंड देऊन त्यास ठेचून काढण्याची तयारी वाढत्या प्रमाणांत केली पाहिजे असें त्यांनीं म्हटलें आहे.

---

### नफेबाजीस आळा—सरकारचा निश्चय

युद्धपरिस्थितीमुळें महागाई झाली आहे, हें खरें असलें, तरी वाजवीपेक्षा बाजारभाव वाढल्याचें सरकारास आढळून आलें आहे. विशेषतः, जपान युद्धांत पडल्यापासून किंमती वाढविण्याची व्यापाऱ्यांची प्रवृत्ति असल्याचें दिसून येतें. रेल्वेजवळील मालाचे कित्येक डबे युद्धोपयोगी मालाचे वहातुकींत गुंतल्यामुळें कित्येक वेळां नेहमीची माल-वहातुक अगदी वक्तशीर चालू रहाणें कठीण पडतें व कांहीं मालाचा साठा कमी होऊं लागतो. ही परिस्थिति अगदी तात्कालिक असली तरी व्यापारी तीस उग्र स्वरूप देऊन नफेबाजी करूं लागतात. ती टाळण्याकरितां मुंबई सरकारनें वहातुक शक्य तेवढी अखंड चालू रहावी व कोळसा, गहू, ज्वारी इत्यादि आवश्यक मालाचा पुरवठा तरी कमी पडणार नाहीं अशी व्यवस्था केली आहे. रोजच्या रहाणीस आवश्यक असलेल्या जिनसांच्या किंमतीची कमाल मर्यादा ठरवून टाकण्याचा अधिकार मुंबई सरकारनें कंट्रोलर ऑफ प्राइसेसला दिला आहे. युद्धविषयक वहातुकीमुळें इतर वहातुक कमी पडली, तर पडलेली तूट भरून निघावी, असाहि प्रयत्न करण्यांत येत आहे. इतकी खबरदारी सरकारनें घेतल्यानंतर व्यापाऱ्यांनीं आपले भाव निष्कारण वाढविण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. परंतु, त्यांनीं ते विनाकारण वाढविले, तर त्यास तात्काळ आळा घालण्याचें सरकारनें ठरविलें आहे. व्यापाऱ्यांच्या रास्त अडचणी दूर करण्यास सरकार तत्पर आहे, तेव्हां त्यांनीं आपल्या अडचणी सरकारपुढें अवश्य मांडून त्या दूर करून घ्याव्या. परंतु जनतेच्या हिताचें संरक्षण करणें हें सरकारचें आद्य कर्तव्य असल्याकारणानें, व्यापाऱ्यांनीं भरमसाट नफेबाजी चालविल्यास, ती बंद पाडण्याची तें शिकस्त करील, असें प्रसिद्ध झालें आहे. जरूर पडल्यास, व्यापाऱ्यांच्या दुकानांचा ताबा घेऊन आंतील मालाचा योग्य तो निकाल लावण्याचाहि निश्चय सरकारनें केला आहे. व्यापाऱ्यांनीं ह्या थरापर्यंत गोष्टी जाऊं न देण्याची खबरदारी घ्यावी हें इष्ट आहे. त्यामुळें, व्यापार सुरळीत चालून सर्वांचेंच हित साधलें जाईल.

---

### इराण

इराणचें क्षेत्रफळ फ्रान्सच्या तिप्पट आहे, परंतु त्याची लोकसंख्या १½ कोटि आहे. इराणमधील जमिनींपैकी निम्मी ते तीन-चतुर्थांश जमीन वालुकामय आहे. इराणमध्यें मीठ, लोखंड, तांबें, कोळसा, गंधक, इत्यादि पदार्थ सापडूं शकतील परंतु त्यासंबंधांत जोराचा प्रयत्न अद्याप करण्यांत आलेला नाहीं. अँग्लो-इराणिअन ऑइल कंपनी निर्गत करीत असलेल्या पेट्रोलवरच इराणची परराष्ट्रांतील खरेदी अवलंबून आहे. इराण हें इतिहास-प्रसिद्ध राष्ट्र आहे. अफगाणिस्तान तें भूमध्यसमुद्र एवढा त्याचा विस्तार एकेकाळीं होता. इराणच्या उत्तर सरहद्दीवर कॉकेशस पर्वत पसरलेला आहे व त्यांतूनच बाकू ते बाटम पेट्रोलचे नळ गेलेले आहेत. हिंदुस्थान व रशिया ह्यांचे दरम्यान इराण हें स्वतंत्र राष्ट्र राखण्याचें ब्रिटिशांचें धोरण होतें; व ह्या दृष्टीनेंच रशियाशी १९०७ चा तह करण्यांत आला होता. सध्याचा शहा १९२६ सालीं गादीवर येईपर्यंत अशी रूढी होती, कीं तेथील महत्त्वाची खातीं युरोपियन अधिकाऱ्यांचे देखरेखीखालीं रहावीं. सध्याच्या शहानें जर्मन तज्ञ बोलावून रेल्वे तयार केली, व तेव्हांपासून जर्मनांचा प्रवेश झाला. इराणमधील विद्यार्थी शिक्षणासाठीं जर्मनींत जाऊं लागले व जर्मनीला अनुकूल असें वातावरण तेथें निर्माण झालें. जर्मनांचें प्रस्थ माजलें व सर्व महत्त्वाच्या व अवघड कामीं जर्मनांची नेमणूक होऊं लागली. जर्मन लोक म्हणजे कोणी तरी विशेष लोक आहेत, अशी तेथें समजूत झाली. रेझा शहा पहेलवीला आतां तक्तावरून दूर जावें लागलें आहे. ग्रेट-ब्रिटन व रशिया ह्यांनीं इराणमध्यें प्रवेश करून जर्मनांस शह देण्याची तयारी केली आहे. जर्मनींचे दुष्ट हेतूहि इराणी लोकांस कळून चुकले असून त्यांचे डोळे उघडले आहेत व ते ब्रिटिशांच्या बाजूचे झाले आहेत.

---

### वॉशिंग्टनमधील युद्धयोजना

प्रेसिडेंट रूझवेल्ट आणि मि. चर्चिल ह्यांची परस्पर भेट मागें अटलांटिक महासागरांत होऊन अमेरिका व इंग्लंड ह्या राष्ट्रांच्या युद्ध सहकार्याच्या योजना निश्चित झाल्या तो प्रसंग इतिहासांत अपूर्व असा होता आणि लोकांच्या मनावर त्याचा विलक्षण परिणामहि झाला. तथापि, जगांतील प्रमुख अशा ह्या दोन मुत्सद्यांनीं त्याच्या पुढची मजल आतां मारली आहे. जपाननें अमेरिकेशीं कपटानें युद्ध चालू केल्यामुळें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्यावर गंभीर स्वरूपाची जबाबदारी येऊन पडली आणि त्यांच्याशीं विचारविनिमय करून नवीन व कार्यक्षम योजना आखण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. जपाननें उपस्थित केलेल्या संकटास तोंड देण्यासाठीं अमेरिका व इंग्लंड ह्या राष्ट्रांचें लढाऊ सामर्थ्य एकवटून त्याचा उपयोग योग्य रीतीनें होण्याचें महत्त्व मि. चर्चिल ह्यांनीं तात्काळ ओळखलें आणि ते वॉशिंग्टन येथें आपल्या सल्लागारांस घेऊन तात्काळ उपस्थित झाले. अमेरिकेंत त्यांचें जें स्वागत झालें आहे त्यावरून इंग्लंड व अमेरिका ह्यांचीं ध्येयें व कार्यक्रम ह्यांची एकवाक्यता होण्यास अनुकूल वातावरण किती मोठ्या प्रमाणावर तयार झालें आहे ह्याची कल्पना येते. अमेरिकेच्या काँग्रेसच्या दोन्ही सभांच्या सदस्यांपुढें ब्रिटिश मुख्य प्रधानांनीं परिणामकारक भाषण करून त्यांचीं मनें आकर्षित करून घेतलीं ही मि. चर्चिल ह्यांच्या आयुष्यांत अत्यंत महत्त्वाची व चिरस्मरणीय अशीच गोष्ट झाली आहे ह्यांत शंका नाहीं. मि. चर्चिल ह्यांच्या उत्कृष्ट वक्तृत्व शक्तीविषयीं ख्याती आहे आणि अमेरिकन काँग्रेसमध्यें झालेलें त्यांचें भाषण ह्या लौकिकास साजेल असें आहे एवढेंच नव्हे तर तें त्यांच्या कीर्तींत भर घालील. जर्मनी-इटली-जपान ह्या त्रिकुटाचा मानवी स्वातंत्र्य नष्ट करण्याचा निश्चय हाणून पाडून शांतता, न्याय व स्वतंत्रता ह्यांची स्थापना भक्कम पायावर करणें हें इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांतील लोकांचें उद्दिष्ट असून तें गाठण्यास लागणारें सामर्थ्य त्यांचेमध्यें आहे. ह्या शक्तीचा योग्य उपयोग करून जर्मनी व जपान ह्यांची राक्षसी महत्त्वाकांक्षा कायमची गाडून टाकणें हें कार्य पद्धतशीर रीतीनें आपणांस करावयाचें आहे ह्याची स्पष्ट कल्पना मि. चर्चिल ह्यांनीं अमेरिकन राष्ट्रापुढें मांडली. तसें करतांना सध्याच्या युद्धपरिस्थितीचें त्यांनीं सिंहावलोकन केलें आणि पुढील मार्ग कसा आक्रमला पाहिजे, ह्याचें दिग्दर्शन केलें. त्यांचें सबंद भाषण अत्यंत स्फूर्तिदायक व उत्साहवर्धक असें होऊन त्याचा अपेक्षित परिणाम अमेरिकन राष्ट्राच्या मनावर झालेला आहे. ह्यारीतीनें एका बाजूनें अनुकूल मानसिक व अध्यात्मिक पार्श्वभूमि तयार करून मि. चर्चिल ह्यांनीं प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व त्यांचे सल्लागार ह्यांच्या सहविचारानें निरनिराळ्या आघाडींवर धडाक्यानें युद्ध चालू ठेवण्याच्या व त्यास लागणारी सामुग्री पुरवण्याच्या योजना निश्चित केल्या. वॉशिंग्टन येथील प्रस्तुत वाटाघाटी ह्या युद्धाच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचें पाऊल आहे ह्यांत शंका नाहीं. जपानच्या पॅसिफिक महासागरामधील आक्रमणामुळें उद्भवलेली परिस्थिति लवकरच आटोक्यांत आणली जाईल असा विश्वास वाटण्यास प्रस्तुत वाटाघाटी व त्यांतून निघालेल्या योजना ह्यांचे योगानें जागा झाली आहे. अमेरिकन राष्ट्राचें सामर्थ्य प्रभावी होऊं लागून त्याचा सांधा ब्रिटिश लढाऊ शक्तीशी जुळला असतां जपानच्या अपयशाची तयारीच झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. | ४,१४,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. | २,०६,९७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. | ३३,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## रिझर्व्ह बँक आणि सहकार

### ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्याचें सिंहावलोकन

रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या ५४ व्या कलमास अनुसरून त्या बँकेमध्यें ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्याची स्थापना एप्रिल, १९३५ मध्यें करण्यांत आली. ह्या खात्याचीं मुख्य कामें (१) शेतीस लागणाऱ्या भांडवलासंबंधींच्या प्रश्नाचा अभ्यास करण्याकरितां तज्ञांची योजना करून, मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें, प्रांतिक सहकारी बँका, इत्यादींस सल्लामसलत देणें व (२) शेतीस लागणाऱ्या भांडवलाचेसंबंधीं रिझर्व्ह बँक व भांडवल पुरविणाऱ्या सहकारी आणि इतर संस्था ह्यांच्या प्रयत्नांची सांगड घालणें हीं आहेत. शेतीच्या भांडवलाच्या प्रश्नाचा विचार करून सहकारी चळवळीचें त्यांतील कार्यक्षेत्र व शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा ह्यांसंबंधीं सुधारणा सुचविणें; त्याचप्रमाणें वेगवेगळ्या प्रांतांतील सहकारी चळवळीचा तेथें प्रत्यक्ष तज्ञ अधिकारी पाठवून अभ्यास करणें,सहकारी चळवळीच्या प्रगतीवर लक्ष ठेवणें व सल्ला देणें, हीं कामें ॲग्रिकल्चरल क्रेडिट खातें करीत आलें आहे. बँकेच्या कायद्याचे ५५ व्या कलमाप्रमाणें ह्या खात्यानें १९३७ साल संपण्यापूर्वी एक रिपोर्ट मध्यवर्ती सरकारास सादर करावयाचा होता, तो तिनें मुदतीचे आधीच एक वर्ष प्रसिद्ध केला. सावकारांचे व्यवहारांवर नियंत्रण ठेवून त्यांच व्याजाचे दर उतरविण्यासाठी कायदा करण्यांत यावा, अशी सूचना त्या रिपोर्टांत करण्यांत आली होती. शेतकऱ्यांस भांडवलाचा पुरवठा करण्यास सहकारी संस्था ह्याच सर्वांत उपयुक्त आहेत व आज जरी त्या संस्था मूळ अपेक्षेप्रमाणें यशस्वी ठरल्या नसल्या, तरी त्यांचेमध्यें सुधारणा घडवून आणल्यास त्या अत्यंत उपयुक्त ठरल्याविना रहाणार नाहींत, असा विश्वास त्या रिपोर्टांत व्यक्त करण्यांत आला होता. ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्यानें कांहीं पत्रकें प्रसिद्ध केलीं त्यांत व प्रत्यक्ष आपल्या पहिल्या रिपोर्टांत सहकारी चळवळीच्या प्रगतीची दिशा दाखवून दिली, त्याचा परामर्श वेळोवेळ "अर्था"मध्यें घेण्यांत आलेलाच आहे. वेगवेगळ्या प्रांतांतून शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणावर उपाय म्हणून कायदे करण्यांत येत आहेत, त्यांचा परिणाम शेतकऱ्यांस कर्जे देणाऱ्या सावकारांवर व संस्थांवर होऊन नवीन कर्जें मिळणें शेतकऱ्यांस कठीण होऊन बसलें आहे. सहकारी चळवळ हा शेतकऱ्यांचें अडचणींवरील एकमेव तोडगा आहे असें म्हटल्यानंतर कालहरण होऊं न देतां त्या चळवळीची पुनर्घटना तात्काळ घडवून आणणें क्रमप्राप्त ठरतें. सध्याच्या बिकट परिस्थितीमुळें सहकारी संस्थांच्या कारभारांतील दोष स्पष्टपणें निदर्शनास आले आहेत व ते दूर करण्याचा प्रयत्न बहुतेक प्रांतांत चालू आहे. बँकेनें वेळेवर प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत सहकारी चळवळीची पायाशुद्ध पुनर्घटना कशी करावी, हें दाखवूनं दिलेलें आहे. परंतु ध्येय आणि व्यवहार ह्यांचेमधील अंतर शक्य तेवढें दूर करण्याचा अवघड प्रश्न सोडविण्याचें काम प्रांतिक सरकारांस बिनसरकारी कार्यकर्त्यांचे सहायानें पार पाडावयाचें आहे.

ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्यानें आपला रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर त्या रिपोर्टांत व्यक्त केलेलीं मतें अनुभवाचे कसोटीस कितपत उतरलीं, खात्यानें केलेल्या सूचना लोकांना कितपत पटल्या व त्या कितपत अंमलांत आल्या, हें पाहण्याची वेळ आतां येऊन ठेपलेली आहे. सहकारी चळवळीचें तपशीलवार परिशीलन रिपोर्टांचे वेळीं झालें नव्हतें, तेंहि एकदा व्हावयास पाहिजे होतें. १९३९-४० सालाबाबत हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीचा आढावा ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्यानें नुकताच प्रसिद्ध केला आहे, तो वरील उद्देशानेंच होय. वेगवेगळ्या प्रांतांतील सहकारी चळवळीची प्रगति स्थानिक परिस्थितीस अनुसरून भिन्न भिन्न प्रकारांनीं झालेली आहे, तेव्हां त्या चळवळीचा साकल्यानें विचार करून, त्याच्या अनुभवाचा फायदा सर्वांस मिळावा, ह्या दृष्टीनें तज्ञांनीं सहकारी चळवळीच्या प्रगतीचा आढावा घेणें इष्टच होतें. रिझर्व्ह बँकेच्या ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्यानें हें काम उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें आहे. सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांस सहकारी मूलतत्त्वें व देण्याघेण्याच्या व्यवहारांत घ्यावी लागणारी दक्षता ह्यांचा कित्येक वेळां विसर पडतो व चळवळीची गाडी रुळावरून घसरून जाऊं लागते. रिझर्व्ह बँकेचा कटाक्ष सहकारी संस्थांचे व्यवहार पायाशुद्ध होण्यावर विशेष असल्या कारणानें, तिच्या सूचनांचा उपयोग सहकारी चळवळीचे व्यवस्थित वाढीस पोषक असाच व्हावा व ह्या दृष्टीनें त्यांचें स्वागत केलें पाहिजे.

सहकारी चळवळीचें पुनरुज्जीवन होण्याचे दृष्टीनें गेल्या पांच-सहा वर्षांत दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. रिझर्व्ह बँकेची स्थापना १९३५ सालीं होऊन शेतकऱ्यांच्या भांडवलविषयक प्रश्नाचा विचार करण्यासाठी ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्याची त्यांत स्थापना झाली आणि अशा रीतीनें शेतकऱ्यांच्या अडीअडचणींवरील उत्कृष्ट उपाय म्हणजे व्यापक स्वरूपाची सहकारी चळवळ हाच होय, असा त्या खात्यानें स्पष्ट अभिप्राय व्यक्त केला. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नव्या राज्यघटनेस अनुसरून स्थापना झालेलीं लोकमतानुवर्ती प्रांतिक प्रधान मंडळें, ही होय. ह्या प्रधानमंडळांचें लक्ष सहाजीकच खेडेगावांच्या सुधारणेकडे गेलें व त्यांच्या योजनांचा सहकारी चळवळीवर मोठा परिणाम झाला. सावकारांवरील निर्बंध, व्याजाच्या दरांचें नियंत्रण, कर्जांची तडजोड, इत्यादि उपक्रमांमुळें शेतकऱ्यांस नवीं कर्जें मिळणें कठीण गेलें व सहकारी पतपेढ्यांचीं देणींहि तडजोड बोर्डांकडे देण्याच्या धोरणामुळें पैसे परत करण्याच्या जबाबदारीची भावना लोकांत कमी झाली. सहकारी संस्थांमार्फत नियमाप्रमाणें कर्जें मिळण्यापेक्षा कर्जें अजीबात रद्द झालीं तर पहावीं, अशी लोकांची प्रवृत्ति होऊं लागली. युद्धास प्रारंभ झाल्यानंतर भाव वाढून शेतकऱ्यांचे हातांत थोडेसे पैसे येतील अशी आशा वाटूं लागली, तीहि खोटी ठरली आणि प्रथम थोडे बाजारभाव वाढले ते पुनः खाली गेले. शेतीच्या मालाची सहकारी विक्री करण्याच्या प्रयत्नांस युद्धजन्य नफेबाजीनें प्रोत्साहन दिलें आहे व सहकारी चळवळीचें क्षेत्र त्यामुळें विस्तार पावत आहे. युद्धसाहित्याच्या उत्पादनास हिंदुस्थान सरकारचे पाठिंब्यानें प्रांतिक सहकारी खातीं मदत करीत आहेत व खेडेगांवीं उद्योगधंद्यास त्यामुळें उत्तेजन मिळालें आहे. अशा परिस्थितींत सहकारी चळवळ विशिष्ट टप्प्याशी येऊन ठेपलेली आहे, तिचें समालोचन रिझर्व्ह बँकेच्या ॲ. क्रे. खात्यानें केलें आहे, तिचेकडे सहकारी लोकांचें लक्ष वेधलें जाणें अगत्याचें आहे.: ह्या समालोचनाचा तपशीलवार विचार "अर्था"मध्यें क्रमशः करण्याचा विचार आहे.

---

## युद्ध-जोखमीचा विमा

( लेखकः—श्री. वि. गो. जोशी मॅनेजिंग डायरेक्टर, औंध म्युच्युअल विमा कं. लि., पुणें.)

एकादा हिंदी वीर लढाईवर निघाला आणि त्यास जर आपल्या मुलाबाळांची तरतूद करण्याचे हेतूनें विमा उतरणें झालें तर आज आमच्या हिंदी विमा कंपनींचीं द्वारें त्याला बंद आहेत. त्याला परकी विमा कंपनीकडेच सदर विमा उतरणें भाग आहे. कारण, अशा अर्जदारांस अगदी नव्या कंपन्यापासून तहत जुन्यांत जुन्या आणि भरभक्कम विमा कंपनीकडे सुद्धां अर्ज घेऊन गेल्यास नकार मिळतो आणि शेवटीं परकीयांचे आश्रयास जाणें भाग पडतें. याला कारण हिंदी विमा कंपन्या विमेच्छू जर लढाईवर जाणारा असेल तर त्याचा विमा नाकारतात. म्हणजे, लढाईमुळें येणारी जोखीम त्या घेऊं शकत नाहींत. फक्त एक हिंदी विमा कंपनी अशी जोखीम घेते पण तीसुद्धां एका परक्या विमा कंपनीच्या आधारावरच.

याला कारण असें कीं सामान्य विमेदारांच्या आयुष्याचा विमा उतरून जी जोखीम विमा कंपनीवर येते त्याहून फार अधिक पटीनें युद्धावर जाणाऱ्या विमेदाराचे बाबत जोखीम असते व त्यामुळें मृत्यूचें प्रमाण वाढून त्याचा ताण कंपन्यांच्या निधींवर पडण्याचा संभव असतो व म्हणून असा विमा घेतां येत नाहीं. या अडचणींतून मार्ग काढणें अवश्य आहे; व तो मार्ग काढण्यास हिंदी विमा कंपन्यांनीं थोडें धाडस करणें जरूर आहे. नेहमीचा विमा उतरणें जसें धाडस आहे तसेंच हें परंतु थोडेसें अधिक धाडस आहे. परकी देशांत जें विमा संस्थेचें बीज रुजलें त्यामागें केवढा थोर धाडसाचा इतिहास आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे स्वकीयांचे हितार्थ विद्यमान संस्थांनीं धाडस केल्याशिवाय हिंदी विमा-व्यवसायास ऊर्जितावस्था येणार नाहीं हें लक्षांत येईल. केवळ गतानुगतिकाप्रमाणें जाण्यांत काय स्वारस्य आहे ?

### जोखमीची सामुदायिक वाटणी

अशा प्रकारें धाडस करणें कोणाहि एका कंपनीस शक्य नाहीं. हिंदी विमा कंपन्यांच्या असोसिएशननें हा प्रश्न धसास लावणें अवश्य आहे. आज असोसिएशन जरी अस्तित्वांत असली तरी तिचेकडून कोणत्याहि प्रकारचें भरीव कार्य जनतेचे नजरेंत भरण्यासारखें झालेलें नाहीं; आणि याला कारण म्हणजे आमचा आळस आणि अनास्था. या असोसिएशनमध्यें ठराविक व्यक्तींसिरीज इतर व्यक्ती म्हणजे विमा कंपन्यांचे मॅनेजर लक्ष घालीत नाहींत; आणि जे लक्ष घालीत आहेत त्यांना मोठें नांव मिळवण्यापलीकडे कांहीं उद्दिष्ट नसतें. असे कित्येक प्रश्न आज हिंदी विमा व्यवसायांतील व्यक्तींपुढें आहेत कीं ते या असोसिएशनकडूनच किंवा तितक्या जबाबदार संस्थेकडूनच सोडविले जातील आणि विमा कंपन्यांना एकेकटे सोडवितां येणार नाहींत. त्यापैकीच युद्ध-जोखमीचा विमा हा एक प्रश्न आहे. असोसिएशननें याबाबत खालीलप्रमाणें मार्ग अवलंबिल्यास हिंदी विमा कंपन्यांपुढील हा महत्वाचा प्रश्न सुटेल व हिंदी वीरांच्या काळजीचें निराकरण होईल.

कोणत्याहि विमा कंपनीनें युद्धावर जाणाऱ्या इसमांचा विमा घ्यावा. युद्धावर जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची डॉक्टरी तपासणी व ताकत पाहूनच त्यांची भरती केलेली असते त्यामुळें त्याची पुन: कंपनीनें तपासणी करून विमा उतरणें अवघड नसतें. अशा विमेदारांकडून युद्ध-जोखमीबद्दल किती जादा आकार घ्यावा हें असोसिएशननें नेमून द्यावें. जादा आकारावर एजंटांना कमिशन देण्याचा प्रश्नच नाहीं व येऊंहि नये. सदर प्रकारचा विमा उतल्यानंतर त्याबाबत संपूर्ण माहिती आणि जादा आकाराची रक्कम असोसिएशनकडे पाठविण्यांत यावी व तिची विभागणी असोसिएशनचे सभासदांत त्यांचे विमा-निधींचे प्रमाणांत करावी. पण अशी विभागणी करतांना प्रत्येक सभासद-कंपनीकडे त्या त्या कंपनीच्या विमानिधीनुसार हप्त्यांची रक्कम जाणें अवश्य आहे. असें केल्यानंतर युद्ध-जोखीम अंगिकारल्यामुळें जितके क्लेम्स येतील तितके सर्व त्या त्या कंपनीनें ताबडतोब द्यावेत आणि आपली भरपाई असोसिएशनकडून करून घ्यावी म्हणजे क्लेमची रक्कम असोसिएशनचे सभासदांकडून भरली जाईल व कोणाहि एका संस्थेस हा भार सहन करावा लागणार नाहीं.

हा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे आणि तिचेकडे आमच्या हिंदी कंपन्यांचें लक्ष वेधणें अवश्य आहे. वर दर्शविल्याप्रमाणें जर जोखमीची विभागणी केली तर हिंदी विमा कंपन्यांची इभ्रत वाढेल, परकी देशांत अशा जादा आकाराबाबत जाणारा पैसा स्वदेशांत ठेवतां येईल आणि आमचे तरुण हिंदी वीरांस निर्धास्तपणें युद्धावर जाऊन मर्दुमकी गाजवतां येईल व राष्ट्राचें रक्षण करतां येईल.

### सैनिकांवर विम्याची सक्ति

हिंदुस्थान सरकारनें मालाचा युद्ध-जोखमीचा विमा सक्तीचा केला आहे. तद्वतच युद्धावर जाणाऱ्या सैनिकांचा विमा सक्तीचा करण्याबाबत लक्ष घातलें पाहिजे. जरी सदर सैनिक मयत होऊन त्यांचे बायकांमुलांस सरकारकडून पेन्शन मिळत असलें तरी ज्या त्या सैनिकाचे पगाराप्रमाणें त्याचा आयुर्विमा उतरणें अवश्य आहे आणि तें जर सक्तीचें केलें तर कित्येक कुटुंबांच्या पोषणाची तरतूद सरकारकडून होईल. अशा विम्याबाबत भरावा लागणारा जादा आकार सरकारनें सैनिकांचे पगारांतून कापून घ्यावा आणि ज्याप्रमाणें मालाचा युद्धविमा उतरण्याबद्दल कंपन्या निवडून त्यांचेकडे जोखीम सोपविली आहे त्याप्रमाणेंच आयुर्विम्याची जोखीम सक्तीनें हिंदी विमा कंपन्यांकडे सोपवावी. असे कित्येक सैनिक लढाईवर जात असतील किंवा गेले असतील कीं ज्यांचा विमा उतरलेला नाहीं. अशांच्या कुटुंबांची जबाबदारी कोण घेणार ? ती आमच्या राष्ट्रांतील विमा कंपन्यांनींच घेतली पाहिजे आणि त्या दृष्टीनें सक्ति करणें अवश्य आहे. हा प्रश्न आमचे युद्ध मंडळावरील सभासदांनीं मनावर घेऊन जरूर ती तजवीज करणें अवश्य आहे आणि तसें केल्यानें युद्धावर जाणाऱ्या विमेच्छूंस हिंदी विमा कंपन्यांचे दारांतून विन्मुख जावें लागणार नाहीं.

लष्कराचें हिंदीकरण व्हावें अशी हिंदी जनतेची इच्छा आहे; पण हिंदीकरण व्हावयाचें म्हणजे सैन्यांत भरती होण्यास हवी आणि अशी भरती करून वरच्या जागा मिळवावयाच्या म्हणजे अशा धाडसी लोकांच्यावर अवलंबून असणाऱ्या आप्तेष्टांची तरतूद करण्यास हवी आणि ही तरतूद हिंदी विमा कंपन्यांसिरीज कोण करणार ? हिंदी विमा कंपन्यांची असोसिएशन व युद्ध-मंडळावरील हिंदी प्रतिनिधी हा प्रश्न मनावर घेतील काय ?

---

## शेती-विषयक अर्थशास्त्र्यांची परिषद्

शेतीच्या धंद्याचा अर्थशास्त्राच्या दृष्टीनें विचार स्वतंत्र रीतीनें होण्याचें महत्त्व ह्या विषयाशीं संबंध असलेल्या कित्येक विद्वानांस व अधिकाऱ्यांस वाटून त्यांनीं सदरहु कार्यासाठीं एक अखिल भारतीय मंडळ स्थापन केलें असून त्याच्या विद्यमानें तिसरी वार्षिक परिषद पुणें येथें गेल्या आठवड्याचे अखेर दि. ब. सर टी. विजयराघवाचार्य ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. परिषदेचें उद्घाटन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी डेप्युटी गव्हर्नर सर मणिलाल नानावटी ह्यांच्या हस्तें व्हावयाचें ठरलें होतें, पण ते आयत्यावेळीं येऊं न शकल्यामुळें त्यांचें भाषण वाचून दाखवण्यांत आलें. स्वागतमंडळाचे अध्यक्ष रावबहादुर डॉ. पी. सी. पाटील, ह्यांनीं निमंत्रितांचें व सभासदांचें स्वागत केलें. एवढा कार्यक्रम झाल्यावर परिषदेचें पहिल्या दिवसाचें काम संपलें.

रा. ब. पाटील ह्यांनीं आपल्या भाषणांत शेतीचा अर्थशास्त्राच्या दृष्टीनें अभ्यास होण्याच्या महत्त्वावर जोर दिला आणि त्या संबंधांत मुंबई प्रांतांत झालेल्या प्रयत्नांचें सिंहावलोकन केलें. शेतीच्या धंद्यांतली वस्तुस्थिति समजून ती सुधारण्याचे उपाय शोधले जाण्यास जी माहिती आवश्यक असते ती पद्धतशीर रीतीनें जमवून प्रसिद्ध केली जाण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादलें आणि त्या धंद्याचा व्यापक सामाजिक दृष्टीनें अभ्यास झाला पाहिजे असें त्यांनीं सांगितलें.

सर मणिलाल नानावटी ह्यांनींहि शेतीचा अर्थशास्त्र दृष्टीनें अभ्यास होण्याचें महत्त्व अलीकडच्या कित्येक वर्षांच्या आर्थिक मंदीमुळें वाढलें असल्याचें सांगून कारखानदारीचा विकास व शेतीची सुधारणा ह्यांचेमध्यें विरोध असण्याचें कारण नाहीं, असें आपलें मत दिलें. शेती च्या अर्थशास्त्रीय अभ्यासासाठी निघालेल्या मंडळाचें कार्यक्षेत्र अधिक विस्तृत व त्याची कामगिरी अधिक विविध व भरीव होईल अशी व्यवस्था केली जाण्याविषयींची सूचना त्यांनीं केली. शेतीच्या सांपत्तिक बाजूसंबंधानें रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केलेल्या वाङ्मयाचा त्यांनीं उल्लेख केला आणि या बाबतींत व्यापक प्रमाणावर व विविध अंगांनीं प्रयत्न होणें अगत्याचें आहे असा त्या बँकेचा सिद्धांत असल्याचें त्यांनीं सांगितलें.

परिषदेचे अध्यक्ष सर टी. विजयराघवाचार्य, ह्यांनीं शेतकरी वर्गाचें कर्ज व त्याचें निवारण ह्याच विषयाचें विस्तृत विवेचन केलें. मद्रासच्या सहकारी चळवळीची चौकशी करण्यासाठीं अलीकडे नेमलेल्या कमिटीचे ते अध्यक्ष असल्यानें तिचा रिपोर्ट हाच आपल्या भाषणाचा मुख्य आधार त्यांनीं केला होता. शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणासाठीं मद्रासमध्यें पास झालेल्या कायद्याचें वर्णन त्यांनीं केलें आणि त्यी संबंधांतल्या सहकार चौकशी-कमिटीच्या शिफारशींची माहिती दिली.

---

### वहातुकीवर नियंत्रण

कोणत्याहि वहानांतून कोणत्याहि रस्त्यानें माल अगर माणसें ह्यांच्या वहातुकीस प्रतिबंध करण्याचा अथवा तिचें नियंत्रण करण्याचा अधिकार डिफेन्स ऑफ इंडिया कानूंत दुरुस्ती करून मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांस देण्यांत आला आहे.

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि.

(वार्षिक सभाः ३१-१२-४१)

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटनें ३० सप्टेंबर, १९४१ अखेर संपलेल्या वर्षीं १ लक्ष, ४१ हजार रुपयांचा नवीन भांडवली खर्च केला, त्याचा तपशील डायरेक्टर बोर्डानें आपल्या रिपोर्टांत दिला आहे. कंपनीचें वसूल भांडवल ६ लक्ष, ३३½ हजार रुपये झालें असून तिचेकडे १४ लक्ष, १५ हजारांच्या मुदती ठेवी आहेत. ताळेबंदांतील मालमत्तेचे बाजूस ६½ हजार रु., जमिनी, कारखाना व इतर इमारती ३ लक्ष, ७२ हजार रुपये, यंत्रसामुग्री ४ लक्ष, ८४ हजार रुपये, डेडस्टॉक व फर्निचर १६ हजार रुपये, रस्ते १८ ½ हजार रुपये, डेव्हलपमेंट व ऑर्गनायझेशन ७५ हजार रुपये, स्टोर्स, खतें, रसायनें इ. ३ लक्ष, ८ हजार रुपये, उभें पीक ५ लक्ष, ८ हजार रुपये शिलकी साखर ३२ हजार रुपये, रोख व बँकांत शिलक १ लक्ष, ५९ हजार रुपये, रिफंड रेव्हेन्यू खर्च ३४ हजार रुपये, तोटा १ लक्ष ९४ हजार रुपये, ह्याप्रमाणें बाबी आहेत. अहवालाचे वर्षींतील १ लक्ष, ९९ हजारांच्या तोट्यास रिपोर्टांत कारणें खालील प्रमाणें दिलेलीं आहेत:—(१) साखरेच्या भावाची मंदी, (२) साखरेचा कमी पडलेला उतारा (३) इंजिनिअरिंग स्टोअर आणि रसायनें यांच्या किंमतींत वाढ व (४) एक्साइज ड्यूटींत सरकारनें केलेली नवीन वाढ. ३० सप्टेंबर अखेर १८१० एकर उंसाचें पीक उभें आहे, त्यापैकीं ११६० एकर ऊंस १९४१-४२ च्या हंगामांत गाळला जाईल, ९० एकर ऊंस नवीन लागणीकरितां उपयोगांत आणला जाईल व ५६० एकर आडसाली व आडसाली खोडवा १९४२-४३ च्या हंगामासाठी पुढें राखून ठेवला जाईल.

नफा-तोटा पत्रकांतील प्रमुख आकडे खालील प्रमाणें आहेत:— जमेचे बाजूस साखर व गूळ विक्री १३ लक्ष, ७४ हजार रुपये, शिलक साखर ३२ हजार रुपये, किरकोळ विक्री ८½ हजार रुपये, व्याज ६ हजार, तोटा १ लक्ष, ९९ हजार रुपये. खर्चाचे बाजूस शिलक साखर १४½ हजार रुपये, गाळण्यास दिलेल्या उसाची किंमत ६ लक्ष, ६७ हजार रुपये, साखर व गूळ करण्याचा खर्च ३ लक्ष, ८२ हजार रुपये, इक्साइस पट्टी ३ लक्ष, ७ हजार रुपये, विक्री व वहातुक खर्च ४१ हजार रुपये, व्याज ७३½ हजार रुपये, जनरल खर्च ४५½ हजार रुपये.

कंपनीनें योग्य तो घसारा काढूनच हिशेब केलेले आहेत. महाराष्ट्रांतील इतर साखर कंपन्यांसहि गेल्या वर्षीं त्या पूर्वीच्या मानानें कमी नफा उरलेला आहे. ताळेबंदांत देणें बाजूस दाखविलेली १ लक्ष, ८७½ हजारांची कराची तरतूद भरपूर असल्यानें, कंपनीची परिस्थिति ताळेबंदांत दिसते त्यापेक्षां कांहीं अधिक चांगली वस्तुतः आहे.

---

### इंडियन नॅशनल एअरवेज लि.

वरील कंपनीस ३० जून, १९४१ अखेर संपलेल्या वर्षीं ४७,७३२ रुपये नफा झाला. नफा-वाटणीस निवळ नफा ४३½ हजार रुपये येतो, त्यांतून ३५ हजार रुपये डेव्हलपमेंट खातीं वर्ग करून ८½ हजार रुपये पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढण्यांत आले. डिव्हिडंड देण्यांत आले नाहीं.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. दृ. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत
**साईन-बोर्डस्, रबरी शिक्के,**
आकर्षक
**सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग**
सतत २० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें
एकच ठिकाण
**पेन्टर ए. जी. बेडेकर**
( मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट )
**बुधवार चौक, पुणें २ ( सिटी )**
बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.



**बायो टोनो**

शरीर व त्यांतील रक्त-पेशींची वाढ करणारें उत्कृष्ट टॉनिक

नैसर्गिक रीतीनें हाडांची वाढ होण्यास आणि शरीर सदृढ करण्यास याची मदत होते. हें मधुर व रुचकर असून मुलें आवडीनें घेतात.

किं. रु. १–८–० ट. ख. नि.

रॉय आणि कंपनी, १७६ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २

*** विमाक्षेत्रांतील 'कॉमनवेल्थ'चें अढळ स्थान ***

**१९४० चें पूर्ण केलेलें काम........४५ लक्षांहून अधिक**

**★ बोलका–ढलपा ★**

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८२,००० |
| सरकारी कर्जरोखे, गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१२,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

**• कॉमनवेल्थचीं वैशिष्टयें •**

( १ ) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरूकता
( २ ) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
( ३ ) काळजीपूर्वक काटकसरीची व्यवस्था
( ४ ) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
( ५ ) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

**कॉमनवेल्थ**

**ॲशुअरन्स कंपनी लि., पुणें २.**

—शाखा—

मुंबई—मद्रास—कलकत्ता—नाशिक—
कराची—अहमदाबाद

एम्. एन्. भागवत, बी. ए.
ॲक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडेंट.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १०८–१२ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०२–१२ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९२–१२ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०१—० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९२—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९६–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळयांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४१—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११०–० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% ... | ४७–४ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १६०५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० )१½ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०४—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% ... ... | १३६—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २२०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५८०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६५५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ९३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% ... | ८७७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६४१—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २३६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ५०—० |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१—६ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ५२—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४७१०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २११—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) ७½% रु. ... ... | १३९—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३१७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु. १० आ. ० पै ... | १६६०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १५९—० |

#### सोनें–चांदी


| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४७–१५–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ७०–८–० |


स्वादिष्ट मसाला करणारे आद्य
कारखानदार




व्ही. पी. बेडेकर
बेडेकर आणि सन्स
पुणें येथील एजंट—
दत्तात्रय नारायण हेजीब.





माधवाश्रम

हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून, रेल्वे-स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.

जागा मध्यवस्तींत, हवाशीर, लागणारे फर्निचरनें शृंगारित असून, सोयीमुळें ती शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहणेची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

माधवाश्रम बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

वक्तशीर आणि मनपसंत काम
करून देणारे
**मोहन वॉच कंपनी**
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

**पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें**
**संग्रह करा**
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट,
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
**—: रक्तवर्धक :—**
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान–गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें
**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
**'पायोनियर डाइंग हाऊस'**
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




**मधुमेहावरील औषध**
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.